निवडक

सांस्कृतिक समृद्धीसाठी

# अंतर्नाद



निवडक

# अंतर्नाद

निवडक अंतर्नाद

**अक्षरजुळणी व मुखपृष्ठ :** अमोघ आर्ट्स, **रेखाटने** : भ. मा. परसवाळे (पृष्ठ ९, ८१, १७५, २५७, ३३३, ४१३ वरील)
**मुद्रण :** प्रतिमा ऑफसेट, **व्याकरण-सल्लागार :** यास्मिन शेख, **कार्यकारी संपादक :** वर्षा काळे
**संपादक, मुद्रक, प्रकाशक :** भानू काळे, सी २, गार्डन इस्टेट, नागरस रस्ता, औंध, पुणे ४११००७.
संपर्क : ९८५०८ १००९१ / bhanukale@gmail.com **मूल्य :** ₹ ९००/-

**वाटचाल सव्वीस वर्षांची** / संपादकीय / ६

**ललितलेखन** / ९

- **ज्याचा त्याचा बोधिवृक्ष, दोन संकल्पना – एक विचार** आणि **दया लोभ असावा** / *लक्ष्मणझुला* या **लक्ष्मण लोंढे** यांच्या सदरामधील तीन लेख / ११
- **आपला 'इम्पोर्टेड' उपास!** / **प्रभाकर सोवनी** / १६
- **अंतरिक्ष फिरलो पण..., डोळा वाटुली संपेना** आणि **विसरशील खास मला** / *कविता स्मरणातल्या* या **शान्ता ज. शेळके** यांच्या सदरातील तीन लेख / १८
- **कर तिचे जुळती** / **विजया देव** / २७
- **भेट** / श्री. बा. जोशी यांच्याशी झालेल्या भेटीविषयी **मीना प्रभु** / २८
- **माझी कविता आणि मी** / **इंद्रजित भालेराव** / ३३
- **मुकी संभाषणे, बोलकी नाती** / **आशुतोष शेवाळकर** / ३६
- **अजि म्या ब्रह्म पाहिले!** / पंढरपूरच्या विठोबाची महापूजा करतानाचा अनुभव सांगत आहेत **मधु मंगेश कर्णिक** / ४२
- **चित्रकार हुसैन : एक आठवण** / **अरुण डिके** / ४५
- **अखेरचं अवधान** हा *अवधान* सदरातील आणि **मी चोवीस तास** हा *अनवधान* सदरामधील लेख / **अवधूत परळकर** / ४७
- **भाग्यवती कविता** / आपल्या एका कवितेविषयी **दत्ता हलसगीकर** / ५३
- **कवितेची सुरुवात** / *पुन्हा कविता* या सदरातील पहिला लेख **हेमंत गोविंद जोगळेकर** / ५५
- **पन्नास हबशी गुलाम** / **भाग्यश्री बारलिंगे** / ५९
- **सय्यद गलाह** / **शंतनू अभ्यंकर** यांनी रेखाटलेले एका अफगाणी वर्गमित्राचे व्यक्तिचित्र / ६२
- **झाडे** / **दत्ता दामोदर नायक** / ६६
- **काळेपांढरे दिवस** / **मंगला गोडबोले** / ७३
- **कविता :** हेमंत जोगळेकर / ३२, प्रशांत असनारे / ६५, दीपा गोवारीकर / ७६, संजय कृष्णाजी पाटील / ७७, सुरेश भट, आशुतोष जावडेकर, विजय पांढरीपांडे / ७८, अंजली कुलकर्णी / ७९, संजीव चांदोरकर / ८०

**कथा** / ८१

- **कांचनमृग** / **सुबोध जावडेकर** / ८३
- **एक अनुभव : दोन कथा – विजय पाडळकर** आणि **मधुकर धर्मापुरीकर** यांच्या दोन कथा / ९२
- **भरपाई** / **सदानंद देशमुख** / १००
- **सत्य** / **पंकज कुरुलकर** / १०८
- **सद्बुद्धी** / मूळ हिंदी कथा : **नयन कुमार**, अनुवाद : **लीना मेहेंदळे** / ११७
- **वर्षाकाठी एकदा वाघ** / मूळ तेलुगु कथा : **सत्यम शंकरमंचि**, अनुवाद : **लक्ष्मीनारायण बोल्ली** / १२२
- **पंचीम** / **संजय कृष्णाजी पाटील** / १२४

- **सुटका** / एक कथा आणि तिच्या जन्माची कहाणी / **विलास पाटील** / १३१
- **भुंडी** / **विद्याधर म्हैसकर** / १३६
- **अभ्यंगस्नानम्** / **नीलिमा इनामदार** / १४०
- **वळणावर** / **रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ** / १४७
- **स्पर्श** / **श्रीरंग विष्णु जोशी** / १५८
- **कृष्णचूडा** / मूळ बंगाली कथा : **प्रचेत गुप्त**, कथानुवाद : **सुमती जोशी** / १६२
- **एकटेपणाच्या तऱ्हा** / कथानुवाद व कथास्वाद / **मधुकर धर्मापुरीकर** / १६८

**व्यक्तिविमर्श** / १७५

- **बेडेकर** / **अरविंद गोखले** / १७७
- **एक करपलेला झंझावात** / सुरेश भट यांच्याविषयी **राम शेवाळकर** / १८२
- **एका राजाचे निर्गमन** / त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्याविषयी **विश्राम गुप्ते** / १८६
- **वाईटपणा विकत घेणारा माणूस : गं. ना. जोगळेकर** / **मिलिंद जोशी** / १९०
- **दादा** / आपले ज्येष्ठ बंधू देवदत्त दाभोळकर यांच्याविषयी **दत्तप्रसाद दाभोळकर** / १९४
- **कमलताई** / कथाकार कमल देसाई यांच्याविषयी **अनिल अवचट** / १९८
- **माझे लेखन : जीवनमूल्यांचा आविष्कार** / **नागनाथ कोत्तापल्ले** / २०२
- **प्रकाशाआडचा दिनकर** / दिनकर गांगल यांच्याविषयी **कृ. ज. दिवेकर** / २०७
- **'माणूस'मागचा माणूस : श्री. ग. माजगावकर** / **विनय हर्डीकर** / २०९
- **अरविंद गोखले : कथा एके कथा** / **राजेन्द्र बनहट्टी** / २१९
- **एसेम** / **नरेन्द्र चपळगावकर** / २२३
- **ज्येष्ठ क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा** / **वर्षा काळे** / २२९
- **माझे वडील आणि मी** / ना. सी. फडके यांच्या आठवणी, कन्या **गीतांजलि अविनाश जोशी** यांनी सांगितलेल्या / २३१
- **शोकांतिका जगलेला न-नायक : आनंद यादव** / **रवींद्र शोभणे** / २३९
- **गिरीश कार्नाड : एक विलक्षण स्वप्न** / **उमा वि. कुलकर्णी** / २४६
- **खुंटलिया धावा तृष्णेचिया** / व्यक्तिचित्र / **अनिल जोशी** / २५२

**साहित्यविश्व** / २५७

- **रीडर्स डायजेस्टसाठी लिहिताना** / अनुभवकथन / **प्रेम वैद्य** / २५९
- **शेक्सपीअरची महानता** / **के. रं. शिरवाडकर** / २६६
- **कालिदासाच्या नायिका** / **लीला अर्जुनवाडकर** / २७३
- **रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र** / **श्रीपाद जोशी** / २७९
- **'खाणे' : एक भाषिक व्यवहार** / **नीलिमा गुंडी** / २८४
- **पुस्तकाचा चेहरा** / ग्रंथनिर्मितीचा महत्त्वाचा भाग / **रविमुकुल** / २८५
- **प्रसन्न करणारं निर्मितीचं थकलेपण...** / मोनिका गजेंद्रगडकर यांची **संजय भास्कर जोशी** यांनी घेतलेली मुलाखत / २९०
- **माधवराव सप्रे : मराठीचे हिंदीला योगदान** / **ज्ञानेश्वर मुळे** / २९४
- **केवळ वाचनालय नव्हे** / बदलापूर येथे श्याम जोशी चालवत असलेल्या 'ग्रंथसखा'विषयी **रविप्रकाश कुलकर्णी** / २९५
- **आठवणींचा पायरव** / 'पॉप्युलर'मधील दिवसांविषयी **अंजली कीर्तने** / २९८
- **स्वागत** या सदरातील चार परीक्षणे : **आर्त : अपेक्षा वाढवणाऱ्या सकस कथा** / परीक्षण : **संजय भास्कर जोशी**, **रॉय किणीकर – माणूस आणि साहित्य** / परीक्षण : **मिलिंद जोशी**, **मार्ग : चांगले पण साचेबद्ध होण्याची शक्यता असणारे कादंबरीलेखन** / परीक्षण : **बाळकृष्ण कवठेकर**, **एक धारवाडी कहाणी – जीए समजून घेताना** / परीक्षण : **श्रीराम शिधये** / ३०५

- **पाडगावकरांची शहाणपणाची कविता** / समीक्षा / **सुधीर रसाळ** / ३११
- **जादू जयपूरच्या लिटफेस्टची** / वृत्तान्त / **मृण्मयी रानडे** / ३२०
- **निद्रिस्त परी** / संस्कृतचे महत्त्व सांगत आहेत **सरोजा भाटे** / ३२५
- **मिळून केलेला लेखनप्रवास** / अनुभवकथन / **माधुरी तळवलकर** / ३३१

**समाजवेध** / ३३३

- **हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरा आणि मी** / **गंगाधर गाडगीळ** / ३३५
- **राष्ट्रीय गाणं** / **स. ह. देशपांडे** / ३३९
- **आज २००१ साली जयप्रकाश नारायण** / **निळू दामले** / ३४०
- **शेख आडनाव आणि मी** / **यास्मिन शेख** / ३४५
- ***साहब मिले सबूरी में...*** / **विनय सहस्रबुद्धे** यांचे प्रामाणिक कार्यकर्त्याची व्यथा सांगणारे चिंतन / ३४८
- **समाजसेवेची दुकानदारी नको** / **शरद जोशी** / ३५२
- **हे लढे कशासाठी?** / **सर्वोत्तम ठाकूर** / ३६४
- **मराठीपणाचे वैश्विक आयाम** / **ज्ञानेश्वर मुळे** / ३६९
- **विकाससन्मुख धोरणांची आवश्यकता** / **सुरेश द्वादशीवर** यांची दोन टिपणे / ३७३
- **मराठी भाषेपेक्षा मराठी मानसिकता कालानुरूप व्हायला हवी** / **विवेक सावंत** / ३७७
- **लॉग-इन आयडी व पासवर्ड विसरलेली सुवर्णभूमी** / **दत्तप्रसाद दाभोळकर** / ३८६
- **माया... माझ्या पराभवाचे नाव** / **हेरंब कुलकर्णी** / ३९२
- **दिल्ली विद्यापीठाची दुनिया** / **निशिकांत मिरजकर** / ३९७
- **आक्रोशांचे अवकाश** / अफगाणिस्तान आणि इतर युद्धग्रस्त ठिकाणी निष्पाप स्त्रिया आणि मुले यांच्या वाट्याला येणाऱ्या दुर्दैवाची कहाणी / **प्रतिभा रानडे** / ४०३

**संकीर्ण** / ४१३

- **बेगम अख्तर** / एका श्रेष्ठ गायिकेविषयी **अरविंद गजेंद्रगडकर** / ४१५
- **गांधी** / एका श्रेष्ठ चित्रपटाच्या निर्मितीची आगळी कहाणी / **यशवंत रांजणकर** / ४१९
- **आपली क्रीडासंस्कृती** / **भीष्मराज बाम** / ४३६
- **खाद्यसंस्कृतीतले मराठीपण** / **वर्षा काळे** / ४४१
- **यात्रा रेल्वेची!** / **गणेश मनोहर कुलकर्णी** / ४४५
- **देवदासचे गारुड** / **प्रकाश मगदूम** / ४५०
- **कॅमेरा आणि सतार** / सत्यजित रे आणि रविशंकर या जगविख्यात कलावंतांच्या परस्परसंबंधांविषयी **विजय पाडळकर** / ४५३
- **वा. वि. मांजरेकर – एक आत्ममग्न, संयत चित्रकार** / **साधना बहुळकर** / ४५९
- **अंतर्नादची दशकपूर्ती : थोडे प्रकट चिंतन** / संपादकीय / ४६६
- **श्रेष्ठ पुस्तके विशेषांक : थोडी पार्श्वभूमी** / संपादकीय / ४७१
- ***प्रत्यक्षाहुनि प्रतिमा अद्‌भुत*** / संपादकीय / ४७७
- **दूधवाला, कचरेवाला, पेपरवाला** / संपादकीय / ४८२
- **प्रतिसाद** या सदरातील काही निवडक पत्रे / ४८४

**शेवटचा अंक प्रकाशित झाल्यानंतर...**

- **अंतर्नादपर्व** / ललित दिवाळी अंकातील स्नेहा अवसरीकर यांचा लेख / ५०८
- **अंतर्नादचा पूर्णविराम** / साधना साप्ताहिकातील रवी गोडबोले यांचा लेख / ५१०

# वाटचाल सव्वीस वर्षांची

गेल्या वर्षीचा अंतर्नादचा सव्विसावा दिवाळी अंक हा अखेरचाच अंक होता. मागील पंचवीस वर्षांतील काही निवडक लेखनाचा समावेश असलेला. दुर्दैवाने तो प्रकाशित झाला तेव्हा कोविडच्या साथीमुळे अवतीभवतीचे सगळेच जीवन झाकोळून गेले होते; त्यामुळे तो अंक आमच्या गावोगावी विखुरलेल्या काही जुन्या वाचकांपर्यंत आणि वाचनालयांपर्यंत पोहोचू शकला नव्हता. शिवाय पुष्कळ उत्तम लेखने अंकात समाविष्ट करता आली नव्हती. त्या काळात प्रवासावर असलेल्या बंधनांमुळे इतर काही हितचिंतकांशी फारशी काही चर्चाही होऊ शकली नव्हती. सगळेच जरा अनिश्चिततेच्या सावटाखाली आणि घाईघाईत झाले होते. बऱ्याच वाचकांनी त्यावेळी अशी इच्छा प्रदर्शित केली होती की मासिक किंवा दिवाळी अंक या स्वरूपात अंतर्नाद यापुढे निघणार नसला तरी, अंतर्नादमधील निवडक लेखनाचे चार-पाच खंड दीर्घकाळ संग्रही ठेवता येतील अशा स्वरूपात (कलेक्टर्स आयटम म्हणतात तसे) प्रकाशित करावेत. तसे पाहिले तर अजूनही कोरोनाचे संकट पुरते दूर झालेले नाही; पण केव्हातरी हे करायलाच हवे या दृष्टीने चार-पाच नाही तरी निदान एका खंडात *निवडक अंतर्नाद* हे संकलन प्रकाशित करत आहोत.

संकलनाच्या प्रतीही अगदी मोजक्या छापल्या आहेत. पाचशेहून अधिक पृष्ठे, नॅचरल शेडचा मॅपलिथो कागद, पुठ्ठाबांधणी वगैरे असूनही व्यापारी रूप लाभू नये म्हणून कुठल्याच जाहिराती संकलनात घेतलेल्या नाहीत; तरीही किंमत शक्य तितकी कमी ठेवली आहे. ज्यांनी वर्षानुवर्षे आम्हाला सोबत केली त्यांना आठवण म्हणून हे संकलन संग्रही ठेवता यावे हाच खरेतर या मागचा उद्देश आहे.

ऑगस्ट १९९५ मध्ये अंतर्नाद मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला ते दिवस आजही डोळ्यापुढे स्पष्ट दिसतात. त्याच्या आधीचीच दहा-पंधरा वर्षे, साधारण १९८०-८५ पासूनच, मराठी मासिकांची पडझड सुरू झाली होती. तशा परिस्थितीत नवे साहित्यिक मासिक सुरू करणे आणि तेही पूर्णवेळाचे काम म्हणून करणे हे अवाजवी धाडस ठरेल असे अनेक मित्रांनी त्यावेळेलाही सांगितले होते. वृत्तपत्रांतूनही साहित्यापेक्षा राजकारण, मनोरंजन व इतर चटपटीत आणि मुख्य म्हणजे आटोपशीर लेखनालाच स्थान मिळत होते. लिहावेसे वाटते, पण ते प्रकाशित कुठे करायचे, हा प्रश्न अनेक लेखकांना सतावत होता. अशा परिस्थितीत एखाद्या चांगल्या व्यासपीठाची नितांत गरज आहे हे लक्षात घेऊन, समोर उघड-उघड दिसणाऱ्या अनेक अडचणींवर मात करायच्या जिद्दीने अंतर्नाद सुरू झाले होते.

'अंतर्नादची दशकपूर्ती : थोडे प्रकट चिंतन' हे ऑगस्ट २००५ अंकाचे संपादकीय या संकलनात पुनर्मुद्रित केले आहे. ते वाचताना जाणवते की त्यावेळच्या सर्व अडचणी पुढेही कायमच राहिल्या; किंबहुना अधिकच बिकट होत गेल्या. नुसती रिमोटची कळ दाबताच घरबसल्या उपलब्ध होणाऱ्या रंगीबेरंगी वाहिन्या, प्रत्येकाच्या हातात पोचलेल्या मोबाइलचा अखंड वापर, मराठी भाषेची सातत्याने होत गेलेली हेळसांड, लाखाच्यावर पगार घेणाऱ्यांचीही मासिकाची वर्गणी भरायची तयारी नसणे, तरुणवर्ग अन्य जीवनक्षेत्रांकडे आकृष्ट होऊन वाचनाबद्दल कमालीचा उदासीन बनणे, वाचकांचे तसेच लेखकांचेही वाढत चाललेले सरासरी वय अशा अनेक अडचणी.

आणखी एका अडचणीचा उल्लेख करायला हवा. या काळात संभाव्य वाचकापुढे अनेक आकर्षक पर्याय सहजगत्या उपलब्ध होत गेले. त्याला खिळवून ठेवायचे असेल, तर त्याच्या अधिक खोलवरच्या आंतरिक गरजा भागवणारे साहित्य उपलब्ध करून देणे आवश्यक होते. ते कुठून मिळवायचे हा या काळात अगदी कळीचा असा प्रश्न बनत गेला. उत्तम लिहावे आणि साहित्यक्षेत्रात नाव कमवावे अशी आस असणारे वेगवेगळ्या जीवनक्षेत्रातले प्रतिभावान तरुण पुढे फारसे दिसेनासे झाले. लेखकाचे – व एकूणच साहित्याचे – समाजातील एकेकाळचे अग्रस्थान झपाट्याने ढळत गेले. अगदी आपल्या नातेवाईक व मित्रपरिवाराकडे, शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे नजर टाकली तर हे वास्तव कोणालाही कबूल करावे लागेल. परिणामतः मासिकांचा प्राणवायू मानता येईल अशा कसदार लेखनाचा स्रोत, पूर्ण आटलेला नसला तरी, काळाच्या ओघात बराच आक्रसत गेला आहे.

तसे पाहिले तर अंतर्नादमध्ये लेखन केलेल्या नवोदित तसेच नामांकित लेखकांची यादी खूप मोठी होईल. अंतर्नादला चोखंदळ वाचकवर्गही लाभला होता. साहित्यविषयक पुरस्कार देणाऱ्या जवळजवळ सर्वच प्रमुख संस्थांचे अनेक पुरस्कार अंतर्नादला मिळाले होते. समीक्षकांनी व वृत्तपत्रांनीही अंकाची वेळोवेळी विस्तृत दखल घेतली होती. थोडेफार नावही झाले होते आणि ह्याचाही आनंद नाही म्हटले तरी होताच.

पण हे सारे असूनही खोटा आत्मविश्वास जोपासणे आणि सर्व काही आलबेल होते असा शहामृगी पवित्रा घेणे ही आत्मवंचना ठरेल. कारण अंतर्नादच्या वर्गणीदारांची संख्या अडीच हजारापुढे कधीच जाऊ शकली नव्हती. स्टॉलवरील किरकोळ विक्री फारशी होत नव्हती आणि जाहिरातीदेखील फारशा मिळत नव्हत्या. या जाहिरातीही ज्यांच्याकडून अपेक्षा होती

त्यांच्यापेक्षा ज्यांच्याकडून अजिबात अपेक्षा नव्हती अशांकडूनच मिळत होत्या. चर्चा करणारे व सल्ला देणारे अनेक असत पण प्रत्यक्ष मदत करणाऱ्यांची संख्या खूप सीमित होती. अशा परिस्थितीत व्यक्तिगत क्षमतेवर व प्रयत्नांवर बहुतांशी अवलंबून राहणे क्रमप्राप्त होते. कारण एखाद्या स्वतंत्र, स्टँड-अलोन मासिकाला आवश्यक ती व्यावसायिक यंत्रणा (प्रोफेशनल सेट-अप) उभारणे खूप मर्यादित असलेल्या खपामुळे शक्यच नव्हते. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या आमच्याही काही व्यक्तिगत मर्यादा होत्या. अंतर्नाद मासिक सुरू झाले तेव्हाची, म्हणजे ऑगस्ट १९९५मधली परिस्थिती आणि आजची परिस्थिती ह्यात खूप फरक पडला आहे हे नक्कीच. २०१८, २०१९ व २०२० ही तीन वर्षे फक्त दिवाळी अंक निघाला. त्यानंतर मात्र वाटचाल थांबवणे हाच एक पर्याय उरला. या संकलनात शेवटी असलेल्या चार पानी स्मरणयात्रेत या प्रवासातील काही क्षणचित्रे नोंदवली आहेत.

'निवडक अंतर्नाद'साठी साहित्य निवडायची प्रक्रिया सोपी नव्हती. इतक्या वर्षांत नाही म्हटले तरी शेकडो लेखकांनी लिहिलेला सुमारे पंधरा हजार पानांचा मजकूर अंतर्नादमधून प्रकाशित झाला. तो चांगला वाटला होता म्हणूनच मुळात तो प्रकाशनासाठी आलेल्या विपुल साहित्यातून स्वीकारला गेला होता. त्यातील पुन्हा अगदी पाच-सहा टक्के मजकूर निवडायचे ठरवले तरी सुमारे आठशे पानांचा मजकूर पहिल्या चाळणीत निवडला गेला. गेल्या वर्षीच्या दिवाळी अंकात २८४ पृष्ठांचा मजकूर घेता आला होता, पण दिवाळी अंकाची संभाव्य किंमत वगैरे व्यावसायिक मर्यादा विचारात घेता पृष्ठसंख्या त्याहून अधिक वाढवणे शक्य नव्हते. या संकलनात ती अडचण काहीशी दूर सारून ५१२ पानांचा मजकूर समाविष्ट केला आहे. अर्थात तरीही बराच चांगला मजकूर वगळावा लागला आहे.

आनंद यादव, अनंत सामंत, मिलिंद बोकील, वि. ग. कानिटकर, राजन खान, किशोर आरस, बाळ गाडगीळ, लीला दीक्षित, शंकर सारडा, चंद्रकांत बांदिवडेकर, गं. ना. जोगळेकर, अरुण गद्रे, रा. ग. जाधव, अशोक केळकर, रवींद्र पिंगे, सुभाष भेण्डे, अरविंद वामन कुलकर्णी, महेश केळुसकर, अनिल किणीकर, सुनीलकुमार लवटे, गिरीश जाखोटिया, अरुण साधू, नीरजा, आशा बगे, विवेक गोविलकर, परशुराम देशपांडे वगैरे अनेकांची लेखने उत्तम असूनही या संकलनात घेता आली नाहीत. ही यादी खरे तर अजून बरीच लांब होईल. अनेक सदरे, विविध परिसंवादांत लेखकांनी मांडलेले विचार, अनेक उत्तमोत्तम कथा-दीर्घकथा, मराठी भाषेविषयीचे लेख, विविध साहित्यसंमेलनांवरचे व दिवाळी अंकांचा आढावा घेणारे लेख, मुलाखती, शरद जोशी विशेषांक, चित्रपट विशेषांक, अनुवाद विशेषांक, धार्मिक सलोखा विशेषांक, भाषाभगिनी विशेषांक अशा अनेक विशेषांकांतील मुद्दाम मागवलेले जाणकारांचे लेख हे काही घेता आले नाही. 'मैत्र जीवाचे'सारख्या सदरातून अंतर्नाद पाच-सहा पानांची विस्तृत पुस्तकपरीक्षणेही आवर्जून छापत असे. २००६ सालचा दिवाळी अंकतर श्रेष्ठ पुस्तके विशेषांक म्हणूनच काढला होता व त्यात वाचकांनी निवडलेल्या वीस उत्तम मराठी पुस्तकांची विस्तृत परीक्षणे फक्त होती. त्यांतले काही घेता आले नाही. प्रवासवर्णने, साधना बहुळकर व रवी परांजपे यांचे चित्रकलेविषयीची जाण वाढवणारे लेख, अनेक उत्तम कविता असेही बरेच काही गाळत जावे लागले. शिवाय शक्यतो एका लेखकाचे एकच लेखन संकलनात घ्यायचे असे ठरवल्यामुळे अंतर्नादमध्ये सातत्याने लिहिणाऱ्या काही लेखकांना यथोचित स्थान देता आले नाही. पण या साऱ्याला खरेच नाईलाज आहे. असे असले तरी ललितलेखन, कथा, व्यक्तिविमर्श, साहित्यविश्व, समाजवेध आणि संकीर्ण अशा सहा भागांमध्ये मिळून त्र्याण्णव लेखकांचे वेधक साहित्य (प्रकाशनाच्या कालानुक्रमे त्या-त्या भागात) अंकात समाविष्ट करू शकलो याचे समाधान वाटते. पुढेमागे कदाचित अनेक वाचकांनी सुचवल्याप्रमाणे अंतर्नादची वेबसाइट तयार होऊ शकेल व त्यावर सर्वच जुने अंक व त्यांतील लेखने जाऊ शकतील; अभ्यासकांसाठी उपलब्ध राहू शकतील. पण या साऱ्याबद्दल आज नक्की काही सांगणे अवघड आहे.

या संकलनातील सर्व लेखन अर्थातच पूर्वी अंतर्नादमध्ये प्रकाशित झालेले असेच आहे आणि शक्यतो ते मुळात जसे होते तसेच पुनर्मुद्रित केले आहे; फक्त काही ठिकाणी संबंधित लेखकांनी सुचवलेले बदल समाविष्ट केले आहेत; अर्थात ते अगदी किरकोळ असेच आहेत.

अंतर्नादच्या एकूण वाटचालीबद्दल मागे वळून बघताना आज काय वाटते?

*निवडक माणूस* या माणूस प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित झालेल्या अप्रतिम संकलनात अगदी शेवटच्या पानावर (पृष्ठ ६११) सतीश कामत आणि प्रसन्नकुमार अकलूजकर यांनी लिहिले आहे :

"*माणूस* बंद होणे अपरिहार्य होते का? *सत्यकथा* बंद का झाले? *माणूस* किंवा *सत्यकथा* बंद व्हायला केवळ आर्थिक कारणे आहेत का? की आणखी काही? १९७० नंतरच्या काळात, त्यातही १९८० नंतरच्या दशकात मध्यमवर्गीय मराठी समाजाकडे सुबत्ता आली. समृद्धी आली. मग या समाजाला *माणूसची* गरज वाटेनाशी झाली असा अर्थ घ्यावयाचा का? मौज मुद्रणालयाचे पाठबळ आणि आर्थिक सहाय्याचे अनेकांचे हात उंचावलेले असतानाही *सत्यकथा* बंद झालेच ना? हे का घडले याच्या कारणांचा शोध घ्यावयास हवा. ही काळाची अपरिहार्यता मानायची का?"

यातला शेवटचा प्रश्न संकलनाच्या शेवटच्या वाक्यात विधानाच्या स्वरूपात आला आहे. अंतर्नादचा कालखंड तर *सत्यकथा* (शेवटचा अंक ऑगस्ट १९८२) आणि *माणूस* (शेवटचा अंक ऑगस्ट १९८६) यांच्या कितीतरी नंतरचा; मराठी नियतकालिकांसाठी खूपच अधिक प्रतिकूल बनलेला; 'काळाची अपरिहार्यता' अधिकच प्रकर्षाने जाणवणारा; बहराचे दिवस सरल्यानंतरचा.

रीडर्स डायजेस्ट आणि इंडिया टूडे या दोन

नियतकालिकांविषयी मी अंतर्नादमध्ये दोन दीर्घ लेख लिहिले होते. आशयाचा विचार केला तर अंतर्नादचे स्वरूप उघडउघड वेगळे होते पण व्यावसायिक पातळीवर विचार केला तर त्यांच्यासारखे काहीतरी मराठीत निर्माण करायची एक सुप्त इच्छा मनात होती. इतरही अनेक कल्पना होत्या. पण स्वप्नात होते तसे स्वरूप अंतर्नादला प्रत्यक्षात लाभू शकले नाही हे कबूल करायला आता काहीच हरकत नाही. साहित्याच्या पडत्या काळात आपण अनेक लेखकांना व्यासपीठ पुरवू शकलो आणि वाचनाचा आनंद आपल्या वाचकांपर्यंत अनेक वर्षे पोचवू शकलो हाच तेवढा त्यातल्या त्यात समाधानाचा भाग.

'एका माणसाने चालवलेली सर्कस' असे मराठी मासिकांचे वर्णन केले गेले आहे. काही प्रमाणात ते खरेही असले तरी निदान अंतर्नादच्या बाबतीत तरी ते पूर्णतः खरे नाही. कारण अनेकांची बहुमोल मदत या उपक्रमात वेळोवेळी होत गेली. अर्थात एकूण परिस्थितीच इतकी प्रतिकूल होती की कुठलीही मदत तशी अपुरीच ठरणारी होती; पण त्यामुळे त्या मदतीचे मूल्य कमी होत नाही.

अजातशत्रुत्व ही संपादनक्षेत्रासाठी तरी नक्कीच कविकल्पना आहे. एखाद्याची राजकीय विचारसरणी, वैयक्तिक संबंध किंवा अन्य कुठलाही साहित्यबाह्य निकष निदान जाणीवपूर्वक तरी न लावता अंतर्नाद साहित्यनिवड करत होते पण तरीही एकाचे साहित्य प्रकाशनार्थ स्वीकारताना इतर किमान पाच-सहा जणांचे साहित्य नाकारावे लागत होते. ज्यांचे साहित्य नाकारले गेले ते काहीसे दुखावले जाणे स्वाभाविक आहे. 'साहित्याचा अस्वीकार हा आपला अस्वीकार' असेही दुर्दैवाने कधीकधी मानले जाते. ज्यांच्याशी आपला प्रत्यक्ष संबंध येतो त्यांच्या साहित्याचा अधिक प्राधान्याने विचार केला जातो आणि ज्यांच्या थेट संपर्कात आपण येत नाही, ज्यांच्याकडून लेखन मागवत नाही त्यांच्या मनात डावलले गेल्याची आणि या मासिकाने आपली उचित दखल घेतली नाही अशी भावना निर्माण होते. त्यामुळेही काही मंडळी दुखावली जाणे सहजशक्य आहे. शिवाय आपली केमिस्ट्री सगळ्यांशीच जुळेल असेही नसतेच. अर्थात माझ्या चुकांमुळेही काही जण दुखावले गेले असणे शक्य आहे. त्यांची इथे क्षमा मागतो. काही मित्र नेमके का दुरावले हे मलाही खरे तर कधीच कळले नाही. अर्थात अशांची संख्या खूप कमी आहे. शिवाय जीवनाच्या अन्य कुठल्याही क्षेत्रात आणि अन्य कोणाच्याही बाबतीत हे घडू शकते.

हे संपादकीय म्हणजे अंतर्नादचे मूल्यमापन करायचे स्थान नव्हे. या सर्व प्रवासाबद्दल केव्हातरी विस्ताराने लिहायला हवे, त्यात मी जवळून बघितलेले साहित्यविश्वही ओघाने येईल; पण त्यासाठी अजून थोडे दिवस जायला हवेत असे वाटते. आज ते दिवस डोळ्यांसमोर अगदी ताजे आहेत. चित्रापासून थोडे दूर उभे राहिल्यावर ते चित्र अधिक यथायोग्य दिसते असे म्हणतात. अनुभवाच्या बाबतीतही ते खरे असावे. शिवाय तशा प्रकारचे लेखन हा खरे तर स्वतंत्र पुस्तकाचाच विषय आहे.

आज एवढेच सांगता येईल की या सव्वीस-सत्तावीस वर्षांच्या प्रवासात आम्ही अनेक चांगल्या माणसांशी जोडले गेलो. त्यांतील काहींशी साधली गेलेली आणि आजही टिकून राहिलेली जवळीक फारच मोलाची आहे; ती आयुष्यातून वजा झाली तर आम्ही खूप गरीब होऊ. व्यक्तिगत आयुष्याला सार्थकता देणारे अनेक क्षण वाट्याला आले. माझे आणि वर्षाचे जीवन अंतर्नादने समृद्ध केले. काळाच्या ओघात अडचणींच्या स्मृती विरून जातील, अपयशाचे शल्य पुसट होत जाईल आणि समाधानाची भावना अधिक जास्त टिकेल अशी आशा आहे.

अंतर्नादचा शेवटचा अंक प्रकाशित झाल्यानंतर अनेक प्रतिक्रिया उमटल्या. त्यांतील 'अंतर्नादपर्व' हा ललित दिवाळी २०२० अंकातील स्नेहा अवसरीकर यांचा लेख आणि 'अंतर्नादचा पूर्णविराम' हा साधना साप्ताहिकाच्या २० मार्च २०२१ अंकातील रवी गोडबोले यांचा लेख यांनी आमचे लक्ष विशेष वेधून घेतले. स्नेहा अवसरीकर अंतर्नादच्या दीर्घकाळच्या सहकारी तर रवी गोडबोले सजग वाचक आणि भारतात आले की न चुकता भेटून जाणारे. पण आपण असे काही लिहिणार आहोत याची त्या दोघांनीही आम्हाला जराही पूर्वकल्पना दिली नव्हती; संपादक अशोक कोठावळे आणि विनोद शिरसाठ यांनीही तसे काही लेख प्रकाशित होणार आहेत असे कधीच सांगितले नव्हते. साहजिकच जेव्हा ते अंक प्रत्यक्ष हाती आले, तेव्हा ते लेख वाचून आश्चर्याचा सुखद धक्का बसला. मुळात बरेच विस्तृत असलेले ते लेख संक्षेपित करून या संकलनात घेतले आहेत. संकलनाच्या एकूण स्वरूपाला ते पूरक ठरतील असे वाटल्यामुळे. त्यासाठी संबंधित लेखकांनी आणि संपादकांनी अनुमती दिली याबद्दल त्यांचे मनापासून आभार.

अंतर्नादचे दीर्घकाळ वाचक, लेखक व हितचिंतक असलेले विवेक सावंत, दत्ता दामोदर नायक, अनिल जोशी, नीलिमा गुंडी, दत्तप्रसाद दाभोळकर, सुरेश द्वादशीवार, ज्ञानेश्वर मुळे आणि नागनाथ कोत्तापल्ले यांनी पाठराखण या स्वरूपात काही मजकूर, आमच्या विनंतीवरून, अगदी अल्प मुदतीत लिहून दिला याबद्दल त्यांचेही मनापासून आभार. या संकलनाचे अक्षरलेखन आणि मुखपृष्ठ करणारे हरीश घाटपांडे आणि मुद्रण करणारे अजित ठोंबरे यांनाही खास धन्यवाद.

अंतर्नादच्या लेखकांनी, वर्गणीदारांनी, जाहिरातदारांनी, विक्रेत्यांनी व अन्य व्यावसायिक संबंधितांनी आजवर चांगले सहकार्य दिले. त्या सर्वांचे या निमित्ताने आभार मानतो. नावानिशी उल्लेख करणे स्थळाभावी टाळले असले तरी त्यांच्याविषयी आमच्या मनात कृतज्ञता आहे आणि ती भविष्यातही कायमच राहील. या सर्वांना आपापल्या अंतर्नादाप्रमाणे फुलण्याचे व बहरण्याचे स्वातंत्र्य आणि सामर्थ्य लाभो ही सदिच्छा व्यक्त करून निरोप घेतो.

■



# ललितलेखन



# ज्याचा त्याचा बोधिवृक्ष

**लक्ष्मण लोंढे**

अंतर्नादच्या ऑगस्ट १९९५ मधील, म्हणजे पहिल्याच अंकापासून लक्ष्मणझुला हे निसर्ग, विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालणारे ललितलेखनाचे सदर सुरू झाले. पहिल्या अंकातील हा सदराचा पहिला लेख, त्यानंतर *दोन संकल्पना – एक विचार* हा लेख व मग जानेवारी १९९९ मधील या सदराचा शेवटचा लेख.

अगदी अलीकडची गोष्ट. फार दूर नाही, आपल्या माथेरानला गेलो होतो. सुदैवानं माथेरानला अजून बऱ्यापैकी जंगल आहे. भर दुपारी जंगलात फिरायला गेलं तरी सूर्यकिरणांचा ताप न लागता झाडांच्या सावलीखालून चांगलं मैलोन् मैल फिरता येतं. शिवाय वर डांबरी रस्ते केल्यामुळे आणि पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांना बंदी केलेली असल्यामुळे शहरी जीवनापासून दूर आल्याचा आनंद माथेरान अजूनही देतं. त्यातून ऑफ सीझन गेलं तर फारशी गर्दीही नसते.

तर अशीच टळटळीत दुपारची, जवळ जवळ माध्यान्हाचीच वेळ होती आणि मी एका पॉईंटपाशी पोचलो होतो. चालण्याचे बऱ्यापैकी श्रम झालेले होते. त्यामुळे त्या पॉईंटवर थोडा वेळ विश्रांती घेत बसायचं ठरवलं. तो पॉईंट महत्त्वाच्या पाच-दहा पॉईंट्सपैकी एक नव्हता. त्यामुळे पॉईंटपाशी चहाचं दुकानसुद्धा नव्हतं. उन्हाळा असला तरी रविवार किंवा जोडून सुट्टी नसल्यामुळे आजूबाजूला एकही माणूस नव्हता.

मी पॉईंटच्या अगदी कडेवरच्या एका मोठ्याशा खडकावर जाऊन बसलो. खडकाच्या बाजूलाच एक मोठा डेरेदार वृक्ष होता आणि त्याची गर्द, काळी सावली खडकावर पडली होती. पण हा सावलीचा भाग सोडला तर मात्र सर्वत्र रणरणतं ऊन पडलं होतं. त्याचा ताप डोळ्यांनाही जाणवत होता. तळपता सूर्य आसमंत भाजून काढीत होता. विटांची भट्टी पेटलेली असावी तशी चारी बाजूनं आग पसरली होती. खडकापासून चार पावलांवर खाली कडा तुटला होता आणि पलीकडे खाली खोल दरी होती. दरीत छोटीशी चार झोपड्यांची वस्ती असलेलं गाव दिसत होतं. त्यातल्या एका झोपडीतील गृहलक्ष्मी पोटाची आग भागविण्यासाठी स्वयंपाक करीत असावी. कारण त्या एका झोपडीच्या छपरातूनच फक्त निळसर धुराची एक वक्र रेषा दरीत वर चढताना दिसत होती. बाकी सर्वत्र चिडीचिप होतं. दरीतल्या आकाशात एक घार तरंगताना दिसत होती.

मी डोळे मिटून खडकावर उताणा झालो. एका अननुभूत मानसिक शांततेचा अद्भुत आस्वाद मला मिळत होता. वाटत होतं, मीही जणू त्या चित्राचा भागच बनलोय आणि ही भावना अतिशय सुखद होती. थोडावेळ मग मी मनाशी चाळा केला. माझ्या आजूबाजूला पसरलेला तोच भूभाग रात्रीच्या चांदण्यात कसा दिसेल याचं मी मनात चित्र रेखाटू लागलो. पहिली गोष्ट म्हणजे उन्हाची तल्खली पार नाहीशी झालेली असेल. अंगावर शिरशिरी आणणारा गारवा असेल. आता दुपारच्या वेळी वार पडलेला होता, पण रात्री कदाचित गार वारा वाहत असेल. आता नीरव शांतता होती. रात्री रातकिड्यांचे आवाज असतील. शीतल चांदण्याची चंदेरी चादर सर्व चराचरावर पसरलेली असेल. त्या रुपेरी वातावरणात दूरचे डोंगर अधिकच परके, अधिकच गूढ दिसत असतील. सारं वातावरण काव्यमय, मोहक वाटत असेल आणि कदाचित त्या वातावरणाशी संपूर्णपणे विसंगत असं एक नाट्यही त्याच वेळी तिथे घडत असेल. जंगलातली श्वापदं त्या वेळी शिकारीसाठी बाहेर पडतील. रात्रीच्या काळोखातही भक्षकाला आपलं भक्ष्य नेमकं दिसेल. त्याचा आवाज ऐकू येईल. त्याचा गंध येईल. जीवनमरणाचं एक थरारनाट्य खेळलं जाईल. भक्ष्य होणारा छोटा प्राणी जीवाच्या आकांतानं पळण्याचा प्रयत्न करील. पण पुढच्या काही क्षणांत शिकारी लांडग्यानं आपले दात त्याच्या मानेत घट्टपणे घुसवलेले असतील. त्याची एक आर्त किंकाळी खालच्या दरीत घुमेल. मृत्युनं झडप मारलेल्या त्या जीवाची आर्त किंकाळी मला खरोखरच ऐकू आली. मी माझ्या दिवास्वप्नातून जागा झालो.

शरीर चांगलंच सुस्तावलं होतं. डोळ्यावर आलेली झापड काही जात नव्हती. मी थोडी कुशी बदलली. वरच्या पर्णसंभारातून उन्हाचा एखादा चुकार कवडसा डोळ्यांवर येत होता. तो टळेल अशा स्थितीत शरीराची पुनर्स्थापना केली. काही काळापुरेसं मन पूर्णपणे रिकामं झालं. पण मनच ते – ते स्वस्थ थोडंच बसणार? आता मनानं दुसराच चाळा सुरू केला. वाटलं, आता उन्हाळा आहे, धुंवाधार पावसात हेच डोंगर कसे दिसतील ते पाहावं.

आणि पाहता पाहता समोरचा डोंगर हिरवागार झाला. धूळ बसलेल्या वनश्रीचा चेहरा पहिल्या पावसानं कसा स्वच्छ, तजेलदार दिसू लागला. उन्हाच्या तकाट्यानं थकलेली, म्हातारी


झाल्यासारखी वाटणारी झाडं पाण्याचा पहिला घोट मिळताच चैतन्यानं तरारून उठली. कोरड्या आणि सुट्या सुट्या झालेल्या मातीच्या ढेकळांना पाण्याच्या प्रेमाचा ओलावा मिळताच ती पुन्हा एकदा जमिनीशी घट्ट बांधली गेली. मे महिन्याच्या सुट्टीत उन्हाळ्यामुळे हवेत रानोमाळ उनाडक्या करायला गेलेले धुलीकण पुन्हा जमिनीच्या कुशीत शिरले आणि हवा स्वच्छ झाली. आता दरीतून सुसाटपणे घोंघावत फिरणारा वारासुद्धा त्यांना हवेत खेळायला बोलावू शकत नव्हता.

पावसाची संततधार सुरू झाली. झाडापानांवरून ओघळून पाण्याचे थेंब जमिनीवर उड्या घेऊ लागले. त्यांच्या टपटप ध्वनीनं साऱ्या निसर्गदृश्याला एक सुरेख पार्श्वसंगीत लाभलं. आता वाऱ्याचा जोर वाढला. त्यानंही आपला स्वर या पार्श्वसंगीतात मिसळून दिला. वाऱ्याच्या वाढत्या जोरामुळे झाडांनाही या संगीत जलशात भाग घ्यावासा वाटला. पण त्यांना तर गाता येत नव्हतं. म्हणून त्यांनी शरीराची घुसळण करीत पिंगा घालायला सुरुवात केली. कविवर्य पाडगावकरांनी मराठीला बहाल केलेल्या एका सुंदर शब्दात वर्णन करून सांगायचं तर पावसाच्या 'धारानृत्या'ला सुरुवात झाली. माझं मनही नाचू लागलं. आणि तेवढ्यात कडाडकन् ढगांच्या पाठीवर विजेचा आसूड ओढला गेला. ढगांनी एवढा आक्रोश केला की मी ताडकन भानावर आलो. विश्वास ठेवा अगर ठेवू नका, त्या वेळी माझ्या अंगावर पाण्याचे चार थेंब पडलेले होते!

पुन्हा शरीरानं कुशी बदलली, मनानं चाळा बदलला. आता हिवाळ्यातल्या पहाटे खालच्या दरीत धुकं कसं साचत असेल, त्याच्यामुळे खालची दरी अदृश्य होऊन आपण हवेत तर तरंगत नाहीना असा भास कसा होत असेल, सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबर धुक्याचा पडदा कसा विरळ विरळ होत जात असेल आणि गवताच्या पात्यांवरच्या दवबिंदूंना पहिला सूर्यकिरण कोणतं तेज बहाल करेल याचा विचार माझं मन करू लागलं.

वेळ कसा निघून गेला समजलंच नाही. सेकंद, मिनिटं, तास आपल्या पावलांचा थोडाही आवाज न करता माझ्या अंगावरून निघून गेले. त्यांनाही समजलं, माझी भावसमाधी लागलेली आहे आणि कोणालाही समाधीतून जागं करायचं नसतं इतपत सभ्यता काळही पाळतो! त्या दीड-दोन तासांच्या काळात माझ्या मनातले नेहमीचे छोटे-मोठे राग-लोभ, द्वेष-काळज्या पार नाहीशा झाल्या होत्या. मी गुंतवलेल्या शेअर्सच्या किंमती उद्या कोसळणार तर नाहीत ना, कालपरवा माझ्या छातीत दुखत होतं त्याचा हार्ट ॲटॅकशी तर संबंध नव्हता ना, उद्या संध्याकाळी माथेरानहून परत जायला निघेन त्यावेळी नेरळला मला गर्दीत चढता येईल ना, घरी पोचेन तेव्हा लिफ्ट चालू असेल ना, मला बिल्डिंगच्या आठ मजल्यांचे जिने चढावे लागणार नाहीत ना, मुलाला चांगल्या कॉलेजात ॲडमिशन मिळेल ना अशा प्रकारचे जे अनेक विचार माझं अस्तित्व कायम कुरतडत असतात त्या विचारांना यावेळी मनात बिल्कुल थारा नव्हता.

मन आनंदाच्या एका उच्च पातळीवर गेलं होतं. 'आनंदाचे डोही, आनंद तरंग । आनंदचि अंग, आनंदाचे ॥' ह्या अभंगाचा



*रेखाटन : दीपक संकपाळ*

मला अर्थ समजला. एवढंच नव्हे तर मी त्याचा चक्क अनुभव घेतला. आपल्या दैनंदिन जीवनातल्या अशाश्वत पण भेडसावणाऱ्या विचारांना विसरून आपण जेव्हा शाश्वताच्या विचारात गढून जातो तेव्हा फक्त आनंदच असतो हे ज्ञान मला त्या तासा दोन तासांत झालं.

मी म्हणतो, माथेरानच्या त्या अप्रसिद्ध पॉईंटवरच्या त्या वृक्षाला मी माझा बोधिवृक्ष का म्हणू नये? गयेला जाऊन बोधिवृक्षाचं दर्शन घेणं, त्याला फेऱ्या मारणं हे मी कधीच केलेलं नाही. पण भगवान बुद्धांना जिथे दर्शन झालं त्या बोधिवृक्षाचं दर्शन घेण्यापेक्षा प्रत्येकाला आपापला बोधिवृक्ष सापडणं हेच अधिक महत्त्वाचं नाही का?

*(ऑगस्ट १९९५)*

# दोन संकल्पना - एक विचार

पर्यावरणाच्या रक्षणासाठी आपण काही केलं पाहिजे अशी जाणीव आजकाल पुरेशा प्रमाणात नसली तरी काही प्रमाणात का होईना, निश्चितच सर्वत्र पसरू लागली आहे. ज्या प्लास्टिकच्या पिशव्या निसर्गक्रमात नष्ट होत नाहीत त्या मी वापरणार नाही, वाण्याकडून घेतलेलं सामान आणण्यासाठी मी जातानाच कापडी पिशवी बरोबर नेईन अशा अतिशय साध्या साध्या प्रकाराने का होईना कित्येक माणसं पर्यावरण स्वच्छ राखण्यातला आपला खारीचा वाटा उचलू लागली आहेत आणि ही अतिशय चांगली गोष्ट आहे.

मानव मोठ्या प्रमाणात खनिज इंधनाचा वापर करीत आहे आणि त्याने जीवनावश्यक प्राणवायूचं प्रमाण घटून उष्णता निर्माण होते आणि वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढते. हा दुष्परिणाम टाळणं माणसाला फारच कठीण जात आहे. कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांचा वापर करायचं बंद किंवा कमी करणंसुद्धा कठीण जात आहे. त्यामुळे या पर्यावरणीय समस्येच्या बाबतीत तरी गुन्हा करतोय हे कळतंय, करू नये हेही पटतंय पण गुन्हा केल्याशिवाय तर भाग नाही अशी आपली अवघडलेली मनःस्थिती झालेली आहे.

या अशा अवघडलेल्या मनाला शांती मिळवण्याचा एक मार्ग उपलब्ध आहे आणि तो म्हणजे वृक्षारोपण करणं. माझ्या ओळखीच्या काही पर्यावरणवादी मित्रांनी, म्हणूनच मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घ्यायचं ठरवलं. काही वर्षांपूर्वी त्यांनी मुंबईपासून जवळचंच एक खेडंगाव निवडलं. या गावाच्या शेजारी पूर्वी जंगल होतं, आता नाही. मुंबईच्या 'विकासासाठी' त्या जंगलाची जंगल अधिकारी आणि मुंबईतील बिल्डर यांनी संगनमतानं हत्या केलेली आहे. मित्रांनी आपापसात वर्गणी काढून, पैसे गोळा करून विविध प्रकारची सुमारे पाच हजार रोपटी त्या गावातील गावकऱ्यांच्या हवाली केली. बाल्यावस्थेत असताना त्या झाडाची नीट देखभाल व्हावी म्हणून गावातल्याच एक-दोघांना पगार देऊन झाडांची निगा राखावयास सांगितलं. खतं खरेदी करून दिली. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला अशी हजारभर रोपटी विविध गावांत वाटायची आणि या प्रयोगाला सातत्य आणायचं असंही त्यांनी ठरवलं. त्यांच्या त्या प्रयोगाचा आमच्या मित्रमंडळात बोलबाला झाला. कौतुक झालं. ही झाली पाच-सहा वर्षांपूर्वीची गोष्ट.

अलीकडे त्यांच्यातला एक जण भेटला तेव्हा मी मोठ्या उत्सुकतेनं त्याला त्यांच्या सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमाविषयी विचारलं. तोंड वाकडं करीत तो म्हणाला — 'काही उपयोग नाही रे, आमचा प्रयोग फसला. गावाशेजारी जंगल पुन्हा तयार होणं गावकऱ्यांच्याही किती हिताचं आहे हेही आम्ही पटवून सांगितलं होतं. पण आमच्या पर्यावरणीय शिक्षणाचाही काही परिणाम झाला नाही. पहिली तीन-चार वर्षं गावकऱ्यांनी झाडांची नीट देखभाल केली. पण पाचव्या वर्षी जाऊन पाहतो तो सगळी झाडं तोडली गेली होती.' एक मोठा सुस्कारा सोडून विषण्ण होऊन तो म्हणाला, 'त्यांना तरी काय दोष देणार म्हणा! दारिद्र्यरेषेखाली असलेल्यांनी चुलीच्या सरपणासाठी ती वापरली असली तर त्यांना काय बोलणार? आज पोटात पडलेली आग महत्त्वाची, पर्यावरण वगैरे सर्व नंतर!'

— आजच्या भुकेची समस्या सर्वांत महत्त्वाची; धर्म वगैरे नंतर विचारात घ्यायच्या गोष्टी आहेत असं खुद्द विश्वामित्रांनी बारा वर्षांच्या तपस्येनंतर पोटात आग पडलेली असताना मेलेल्या कुत्र्याची तंगडी खाताना म्हटलं होतं. तेव्हा मला मित्राचं मत न पटण्याचा प्रश्नच नव्हता.

पण नंतर एकदम काही तरी महत्त्वाचं आठवल्यासारखं करून मित्र म्हणाला, 'पण या गावकऱ्यांचं वागणंही मोठं विचित्र होतं हं. त्यांनी सगळी झाडं सरसहा तोडली पण त्यातली जी वडा-औदुंबराची झाडं होती ना, त्यांना मात्र त्यांनी हात लावला नाही. ती अजूनही वाढतायंत.'

मित्रानं सांगितलेल्या त्याच्या अनुभवातील या 'टेल पीस'नं मला विचार करायला लावलं. गावकऱ्यांनी वडा-औदुंबराची झाडं तोडली नव्हती याचं कारण उघड होतं. ही झाडं पवित्र मानली जातात. औदुंबर हे तर साक्षात दत्ताचं निवासस्थान असतं आणि त्यामुळे ती तोडली तर आपल्याला पाप लागेल हीच भावना त्या गावकऱ्यांच्या मनात असणार. आमच्या मुंबईकर मित्रांनी फुकट दिलेली झाडं तोडली तर ते गैरकृत्य होणार होतं, ते बेकायदेशीर कृत्यही ठरण्याची शक्यता होती. पण गावकऱ्यांचं मन कायदा मोडण्याइतपत निर्ढावलं होतं; पाप करायला मात्र त्यांची तयारी नव्हती.

प्रसंग छोटा असला तरी तो बरंच काही सांगून जातो. समाजात बऱ्या आणि वाईट, समाजाला उपकारक आणि अपायकारक अशा दोन्ही तऱ्हेच्या घटना घडत असतात. उपकारक घटना घडाव्या म्हणून समाजाचं नियमन करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था अशा घटनांना प्रोत्साहन देत असतात. उलटपक्षी समाजाला हानिकारक, अपायकारक घटना घडू नयेत असाही समाजधुरीणांचा प्रयत्न असतो.

बहुतेक सर्वच मानवी समाजात हे वाईट गोष्टींना बंदी करण्याचं काम सुरुवातीच्या काळात धर्मानं केलं. ज्या गोष्टी समाजाला हानिकारक होत्या अशा गोष्टींना 'पाप' हे लेबल चिकटवण्यात आलं आणि प्रत्येक पापासाठी देवाच्या दरबारात शिक्षा भोगावी लागते असं धर्मानं माणसाच्या मनावर बिंबवलं.

पंधराव्या-सोळाव्या शतकांत युरोपात राज्यक्रांत्या झाल्या. ब्रिटिशांनी राजाचे अधिकार अगदी मर्यादित केले आणि फ्रान्समध्ये तर लोकशाही अवतरली. लोकशाहीचा हा लढा बऱ्याच अंशी राजेशाहीविरुद्धचा असला तरी तो एका अर्थी धर्माविरुद्धचाही होता. कारण राजेशाहीला धर्माचा — म्हणजे

समाजनियमनासाठी गुन्हा या संकल्पनेपेक्षा पाप ही संकल्पना निर्विवादपणे अधिक श्रेष्ठ, अधिक परिणामकारक आणि अधिक शास्त्रीय आहे. आपण सेक्युलर होण्यात धर्माचं एक बलस्थान मोडीत काढलेलं आहे.

युरोपपुरतं बोलायचं तर तेथील चर्चचा, ख्रिस्ती धर्माचा – पाठिंबा होता. त्यामुळेच या लोकशाही राजवटींनी राज्ययंत्र काबीज केल्याबरोबर राजाप्रमाणेच धर्माच्याही अधिकारांवर काही प्रमाणात अंकुश चालविला. लोकशाही राजवटी धर्मनिरपेक्ष (Secular) असल्याचं जाहीर करण्यात आलं व त्यांनी समाजनियमनाचं कार्य आपल्या ताब्यात घेतलं. समाजाला घातक अशा कृत्यांना 'गुन्हा' हे लेबल लावलं व शासनसंस्थेचाच एक भाग असलेल्या न्यायालयांतर्फे गुन्हा करणाऱ्याला शिक्षा देण्याची सोय केली. या न्याययंत्रणेचा भाग म्हणून कोर्टं आली, वकिली हा व्यवसाय आला आणि लिखित स्वरूपाचा कायदा आला.

आमच्या मित्रानं सांगितलेल्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर माझ्या मनात 'पाप' आणि 'गुन्हा' या दोन संकल्पनांचं तौलनिक मूल्यमापन सुरू झालं आणि मला निश्चितपणे जाणवलं की समाजनियमनासाठी गुन्हा या संकल्पनेपेक्षा पाप ही संकल्पना निर्विवादपणे अधिक श्रेष्ठ, अधिक परिणामकारक आणि अधिक शास्त्रीय आहे. आपण सेक्युलर होण्यात धर्माचं एक बलस्थान मोडीत काढलेलं आहे. हे अर्थात सेक्युलॅरिझम, धर्मनिरपेक्षता या संकल्पनेवर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रामाणिक विचारवंतांसाठीच लिहिलेलं वाक्य आहे. सेक्युलॅरिझमचा राजकीय धंदा करणाऱ्यांसाठी नाही.

भारतातल्या चेंगट, वेळकाढू, काही प्रमाणात भ्रष्ट न्यायप्रणालीची तर गोष्टच सोडा; पण अगदी कार्यक्षम न्यायव्यवस्थांमध्ये आढळणारा वकील या प्राण्याचा खेळ आठवा. वास्तविक तत्त्वशः वकील हाही न्यायसंस्थेचा भाग असतो आणि त्यानं न्यायमूर्तींना गुन्ह्याच्या संदर्भात सत्य काय घडलंय हे शोधून काढायला मदत करायची असते. पण हे तत्त्व पाळणारा एकही वकील या पृथ्वीतलावर अस्तित्वात असेल की नाही याची शंका आहे. सर्व वकील 'सत्य शोधण्याचं काम न्यायाधीशाचं, माझं काम अशिलाची बाजू व्यवस्थितपणे मांडण्याचं' असं स्वतःच्या वागण्याचं समर्थन करतात. 'पण तुम्हाला स्वतःलाही तुमच्या अशिलानंच गुन्हा केला आहे असं वाटत असलं तरी...?' असा प्रश्न विचारला तरी त्यावर या सज्जनांचं उत्तर तयार असतं, 'हो, तरी गुन्हा सिद्ध होईपर्यंत प्रत्येक आरोपी निर्दोषच मानायला हवा.' या सगळ्याचा काय परिणाम होतोय हे आपण आपल्या आजूबाजूला पाहतोच आहोत. त्यावर भाष्य करण्याची गरज नाही. अधिक पैशानं हुषार वकील आणि पर्यायी न्याय खरेदी करण्याची राजरोस पद्धतच आपण पाडलेली आहे. दुसरं, गुन्हा 'सिद्ध' करावा लागतो आणि तो सिद्ध करण्याची जबाबदारी आरोप ठेवणाऱ्यावर असते. याचाच व्यवहारातला अर्थ असा घेतला जातो की बिनबोभाटपणे, शासनाच्या लक्षात येणार नाही अशा रीतीनं किंवा शासनातील गुन्हाअन्वेषण यंत्रणेच्या संमतीनं केला तर गुन्हा, गुन्हाच नसतो. याचीही उदाहरणं आपल्या आजूबाजूला विखुरलेली आपल्याला दिसतील.

पाप या संकल्पनेत देवाच्या दरबारात वकील देण्याची पद्धत ऐकिवात नाही. शिवाय शिक्षा देण्यापूर्वी देवाला आरोपीचे पाप 'सिद्ध' करावे लागत नाही. पाप ज्या क्षणी घडलं त्या क्षणापासूनच स्वयंसिद्ध असतं. तसंच पाप लपविताही येत नाही. कारण पापाबद्दल जो शासन करणारा असतो तो 'सर्वसाक्षी' आहे. शिवाय गुन्ह्याच्या शिक्षेच्या बाबतीत जशी अनिश्चितता आहे तशी पापाच्या शिक्षेच्या बाबतीत अनिश्चितता नाही.

पण पाप या संकल्पनेची श्रेष्ठता सिद्ध करणारं या सर्वांहूनही महत्त्वाचं आणि परिणामकारक असं एक बलस्थान आहे आणि ते म्हणजे त्या संकल्पनेचा गुन्हेगाराच्या मनावर होणारा परिणाम. धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेत गुन्हेगारानं गुन्हा केलेला असूनही तो सिद्ध झाला नाही तर समाजात उजळ माथ्यानं फिरता येतं. अशा वेळी त्याच्या मनाला टोचणी लागण्याची गरज नसते आणि प्रत्यक्षात तशी लागलेली दिसतही नाही. पापी माणसाचं पाप मात्र गुप्त राहिलं तरी त्याचा पिच्छा सोडीत नाही. कारण पापाच्या बाबतीत जणू माणसाचं मनच न्यायाधीश बनतं आणि या न्यायाधीशापासून काहीच लपविता येत नाही. गुन्ह्याची शिक्षा एकवेळ टाळता येईल पण पापाची शिक्षा ते घडतं त्या क्षणापासूनच सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीच्या स्वरूपात सुरू झालेलीच असते. पापाचं प्रायश्चित्तही खुद्द गुन्हेगाराला स्वतःच घ्यावं लागतं.

'चोर सोडून संन्याशाला फाशी' असा प्रकार धर्मनिरपेक्ष न्यायाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत घडू शकतो आणि म्हणूनच त्या न्यायाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत 'एकवेळ हजार गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये' असं त्या व्यवस्थेचं दुबळेपण सिद्ध करणारं तत्व अंगिकारावं लागतं. पापाच्या बाबतीत असं कधीच घडू शकत नाही. सदसद्विवेकाच्या टोचणीची शिक्षा प्रत्येक पाप्याला होतेच आणि एकाही निष्पापाला होत नाही.

खून, बलात्कार अशी काही दुष्कृत्यं ही पाप आणि गुन्हा या दोन्ही सदरांत मोडतात. कारण ती धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वीच दुष्कृत्ये म्हणून मानली गेली होती. समाजातील या दुष्कृत्यांचं प्रमाण निश्चितच अतिशय कमी आहे आणि ते श्रेय निःसंशयपणे त्यांच्याशी निगडीत असलेल्या पापसंकल्पनेला द्यायला हवं असं मला वाटतं. पण धर्मनिरपेक्ष शासन अस्तित्वात आल्यानंतरच प्रामुख्यानं गेल्या काही वर्षांत उदयाला आलेल्या 'आर्थिक गुन्ह्यांना' पाप या संकल्पनेचं स्वरूप कधीच प्राप्त झालं नाही. आणि म्हणूनच ती दुष्कृत्यं कदाचित अधिक मोठ्या प्रमाणावर, अधिक निर्ढावलेपणे आणि अधिक उजळ माथ्यानं केली जात असावीत, असं तर नाही?

*(जुलै १९९६)*

# दया लोभ असावा...

''हे सदर लिहिताना एक प्रकारे मीच स्वत:ला शोधीत होतो, घडवीत होतो आणि माझ्या आयुष्याचं प्रयोजन शोधताना मी माझ्या वाचकांना त्यात सहभागी करून घेत होतो.''

प्रिय भानू,

हे पत्र जरी तुझ्या नावानं लिहिलं असलं तरी एका परीनं ते तुझ्याद्वारा 'अंतर्नाद'च्या सर्व वाचकांसाठीही आहे.

तुझं पत्र वाचलं. *लक्ष्मणझुला* हे सदर अंतर्नादच्या पहिल्या अंकापासून चालू आहे. ते या अंकातील सर्वांत जास्त चाललेलं सदर आहे याचा लेखक म्हणून माझ्या मनाला रास्त अभिमान आणि एक प्रकारे अपार समाधानही वाटत आलेलं आहे. त्यातच वेळोवेळी आलेली वाचकांची कौतुकाची पत्रं आणि ''लक्ष्मणझुला हे सदर एका अर्थी अंतर्नादची फिलॉसॉफीच सांगतं'' असे तू माझ्यापाशी काढलेले उद्‌गार यांनी 'झुल्याला' अंतर्नादच्याच नव्हे, माझ्याही विश्वात एक निराळंच स्थान मिळत गेलं.

वास्तविक 'ज्याचा त्याचा बोधिवृक्ष' हा पहिला लेख प्रत्यक्ष लिहिला त्यावेळी ते सदर लेखन स्वरूपात चालवावं असं माझ्या मनातही नव्हतं. भानूच्या नव्या मासिकाच्या पहिल्याच अंकात आपला लेख हवा असा त्यानं आग्रह धरला आहे, म्हणून एक चांगला लेख लिहिण्याचा तो प्रयत्न होता. तुला तो लेख आवडला, मी सदर स्वरूपात तसे लेख लिहावे ही सूचनाही तूच केलीस. इतकंच काय, *लक्ष्मणझुला* हे सुंदर नावही तूच दिलंस. तेव्हा सदर आतापर्यंत आपला दर्जा टिकवून राहिलं, अंतर्नादच्या अतिशय चोखंदळ आणि दर्जेदार वाचकांमध्ये लोकप्रिय झालं याचं बरंच श्रेय माझ्याइतकंच तुझंही आहे हे प्रांजळपणे मान्य करण्यात मला आनंदच वाटतो.

सर्वच सदरांना एखादी निश्चित कालमर्यादा असावी असं माझंही मत आहे, किंबहुना वाचकांनी 'आता थांबा' म्हणण्यापूर्वीच लेखकानं थांबण्यात मजा असते. यापूर्वी मी एकदा *मुंबई सकाळ*, दोन वेळा *सोबत* आणि तीन वेळा *महानगर* मध्ये जी सदरं लिहिली त्या प्रत्येक वेळी संपादकानं सांगितलेलं नसताना, किंबहुना ते अजून लिहा म्हणत असतानाच, मी आपण होऊन ती बंद केली होती. त्यामुळे लक्ष्मणझुल्यालाही निश्चित कालमर्यादा हवी याबद्दल तुझ्या-माझ्यात दुमत नाही.

पण इतर सदरं थांबवताना मला जसं वाईट वाटलं त्याहून जास्त वाईट मला *लक्ष्मणझुला* थांबवताना वाटणार आहे इतकी माझी या सदराशी ॲटॅचमेंट झाली आहे. याला काही वैयक्तिक कारणं आहेत. माझं वय आज त्रेपन्न वर्षं. म्हणजे हे सदर मी माझ्या पन्नासाव्या वर्षी लिहायला सुरुवात केली. माझ्या वैयक्तिक आयुष्यात या वर्षी दोन फार महत्त्वाची स्थित्यंतरं घडली. एक म्हणजे नुकतीच माझ्या हृदयावर बायपास शस्त्रक्रिया केली गेली होती. या शस्त्रक्रियेनंतर माणसाची मन:स्थिती फार नाजूक होते. आपण आयुष्याची 'दुसरी लीज' सुरू केली आहे याची जाणीव ही शस्त्रक्रिया किंवा अशा प्रकारचा महत्त्वाचा आजार तुम्हाला करून देतो. हे माणसाला अंतर्मुख करणारं स्थित्यंतर असतं.

शिवाय याच काळात मी माझ्या वीस वर्षांच्या नोकरीनंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली व आता अन्यत्र कोठेही नोकरी करायची नाही असंही त्याचक्षणी ठरवून ठेवलं होतं.

अशावेळी आता उरलेलं आयुष्य जगण्याचं प्रयोजन मी शोधीत होतो. हा माझा शोध चालू असताना माझ्याकडून झालेलं वाचन आणि मनात चाललेलं चिंतन यांचं प्रतिबिंब लक्ष्मणझुल्यात उमटत होतं. हे सदर लिहिताना एक प्रकारे मीच स्वत:ला शोधीत होतो, घडवीत होतो आणि माझ्या आयुष्याचं प्रयोजन शोधताना मी माझ्या वाचकांना त्यात सहभागी करून घेत होतो. अखेर वाचकाशी माझं नातं हे एवढं जवळचं आहे, एवढं आपुलकीचं आहे. माझ्या भावविश्वात मी त्यांना सहभागी करून घेतलं आहे!

मागे वळून आत्तापर्यंत या सदरात आलेल्या विषयांकडे पाहिलं तर काय आढळून येतं? या सदरात जीवनाच्या विविधांगांनी घेतलेल्या शोधाला विज्ञानाचा स्तर होता पण विज्ञानाचा तर्ककर्कशपणा नव्हता. जीवनातल्या 'सत्य-शिव-सुंदरा'वर मनापासून केलेलं प्रेम होतं, सौंदर्याचा शोध होता, व्यक्तीपलीकडे जाऊन समष्टीचा विचार होता आणि या समष्टीत सारी मानवजातच नव्हे तर निसर्ग, पुढल्या पिढ्याही होत्या. पर्यावरणाविषयी प्रेम होतं, काळजी होती... या सदराच्याद्वारे मी स्वत:च घडत होतो असं जे मी म्हणतो ते हेच. आधी उल्लेखलेल्या माझ्या वैयक्तिक जीवनातल्या स्थित्यंतरांनंतर गेली तीन साडेतीन वर्षं मी काय करतोय याचं मला मिळालेलं उत्तर *लक्ष्मणझुला* हे होतं.

'झुला' थांबला तरी माझा हा शोध चालूच राहील. दरमहा अंतर्नादमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखाच्या स्वरूपात नव्हे तर अन्य काही प्रकारे मला माझ्या साऱ्या वाचक सुहृदांस या शोधात कसं सहभागी करून घेता येईल या विषयी माझ्या मनात काही विचार आहेत. ज्या वाचकांना या प्रकल्पात रूची असेल त्यांनी माझ्याशी स्वतंत्रपणे संपर्क साधावा.

अधिक काय लिहिणे? असाच दयालोभ ठेवावा ही विज्ञापना.

तुझा,
लक्ष्मण

*(जानेवारी १९९९)*

# आपला 'इम्पोर्टेड' उपास

**प्रभाकर सोवनी**

साबुदाणा, बटाटा आणि भुईमुगाचे दाणे हे पदार्थ उपासाला चालणाऱ्या पदार्थांतील सर्वांत लोकप्रिय घटक पदार्थ आहेत. पण मौजेची गोष्ट ही, की हे सारे पदार्थ आपल्या ऋषी-मुनींनी कधी डोळ्यांनी तर पाहिले नव्हतेच, पण त्यांचे नावही कधी ऐकले नव्हते! हे पदार्थ अगदी अलीकडे, म्हणजे सोळाव्या शतकात, पोर्तुगीजांनी भारतात आणले.

गेल्या महिन्यातली गोष्ट. खूप वर्षांनी एक जुना दोस्त भेटला. त्यावेळी आम्ही दोघेही कामाच्या गडबडीत असल्यामुळे 'एकदा निवांतपणे घरीच ये ना गप्पा मारायला' म्हणून त्याला आग्रह केला. दुसरे दिवशी संध्याकाळी त्याने माझ्याकडे यायचे कबूल केले.

घरी येताच मी तसे पत्नीला सांगितले – ''अग, उद्या संध्याकाळी माझा एक जुना दोस्त यायचा आहे. खूप वर्षांनी भेटतोय तो. तेव्हा खायला काहीतरी चमचमीत कांदेपोहे, शिरा असं कर!''

ती म्हणाली, ''अहो, उद्या संकष्टी आहे! आपण करीत नसलो तरी हल्ली खूपजण संकष्टीचा उपास करायला लागले आहेत. तुमच्या या मित्रालाही संकष्टी असली म्हणजे पंचाईत व्हायची. त्यापेक्षा मी असं करते – झकासपैकी खोबरे वगैरे घालून खिचडी करते. कालच आणलेले वेफर्स आहेत. थोड्या साबुदाण्याच्या पापड्या तळते. शेवटी कॉफी आहेच!''

पत्नीचे म्हणणे अगदी बरोबर होते. माझ्या मित्राला खरोखरच संकष्टीचा उपास निघाला. अर्थात गरमागरम खमंग खिचडी, वेफर्स अन् स्ट्राँग कॉफीवर तो खूष झाला. आमच्या गप्पा खूप रंगल्या.

मित्र निघून गेल्यावर मात्र या निमित्ताने माझे विचारचक्र सुरू झाले. उपास हे काय प्रकरण आहे? त्याचा मूळ उद्देश काय? आज त्याला कसले स्वरूप आले आहे?

उपास या शब्दाचे मूळ रूप 'उपवास' म्हणजे 'सन्निध राहाणे.' सन्निध कुणाच्या? तर अर्थातच ईश्वराच्या.

आपल्या रोजच्या रामरगाड्यातल्या कटकटी जरा बाजूला ठेवून एखादा दिवस तरी केवळ आपल्या इष्ट देवतेची उपासना करीत काळ घालवायचा आणि त्यामुळे मनाला शांतता मिळवायची व या काळात खाण्यापिण्याचा फारसा व्याप न ठेवता साधा दुध-फळे असा आहार घ्यायचा, हा उपवासाचा मूळ हेतू असला पाहिजे. आपल्या धर्मात एकादशी, महाशिवरात्र, संकष्टी असे उपास तर सांगितलेले आहेतच, पण त्याशिवाय इष्ट देवतेसाठी सोमवार, गुरुवार, शनिवार क्वचित मंगळवार, शुक्रवार अशा वारांचे उपासही अनेकजण करतात.

आपल्या धर्माप्रमाणेच इतरही बहुतेक सर्व धर्मांत, म्हणजे ख्रिश्चन, ज्यू, मुसलमान, शीख, जैन, बुद्ध अशा धर्मपंथांत उपासाचा अंतर्भाव आहे. मुसलमानांचे रमजान, महिनाभर चालणारे रोजे सर्वांच्या परिचयाचे आहेत.

उपासाला काय चालते आणि काय चालत नाही याची भली मोठी लांबलचक यादी ऐकायला मिळते. चुकून भलता पदार्थ नकळतही खाण्यात आला तरी उपास मोडला, उपासाचे सारे पुण्य वाया गेले, या विचाराने उपास करणाऱ्याच्या मनाला चुटपुट लागते. पण काय खावे यावर निर्बंध असले तरी 'किती खावे' यावर मात्र निर्बंध असलेले आढळत नाहीत!

उपास करायचा तो पापनाशनासाठी आणि पुण्य जोडण्यासाठी. यामागे अर्थातच धर्माचा आदेश आहे हे उघडच आहे. पण धर्माने उपासाला चालणाऱ्या आणि न चालणाऱ्या पदार्थांची दिलेली यादी पाहिली म्हणजे मात्र कोणत्या ऋषीमुनींनी, कुठल्या काळात व कोणत्या निकषांवर ही यादी तयार केली असावी याचे आश्चर्य वाटू लागते! आषाढी-कार्तिकी एकादशी आणि महाशिवरात्र या दिवशी सार्वत्रिक उपास असतो. एरवी कधी उपास न करणारेही या दिवशी उपास करतात. घरात सर्वांनाच उपास असतो. या उपासाच्या फराळाचा मेन्यू काय असतो? तर वऱ्याचे तांदूळ (म्हणजे भात), भुईमुगाच्या दाण्याच्या कुटाची आमटी, साबुदाण्याची लापशी, रताळ्याचा कीस, राजगिऱ्याच्या लाह्याचे लाडू किंवा वड्या, केळी इत्यादी. दुधाचे सर्व पदार्थ म्हणजे श्रीखंड, बासुंदी, पेढे, बर्फी हे उपासांना चालतात. चहा, कॉफी, कोको ही पेयेही उपासाला चालतात. या यादीकडे नजर टाकली म्हणजे एक ध्यानात येईल की साबुदाणा, बटाटा आणि भुईमुगाचे दाणे हे पदार्थ उपासाला चालणाऱ्या पदार्थांतील सर्वांत लोकप्रिय घटक पदार्थ आहेत. पण सर्वांत मौजेची गोष्ट ही की हे सारे पदार्थ आपल्या ऋषीमुनींनी कधी डोळ्यांनी तर पाहिले नव्हतेच, पण त्यांचे नावही कधी ऐकले नव्हते! हे पदार्थ अगदी अलीकडे, म्हणजे सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी भारतात आणले आणि गेल्या शंभर-दीडशे वर्षातच त्यांचा भारतात इतका सार्वजनिक वापर होऊ लागला आहे.

'बटाटा' ही वनस्पती मुळातली दक्षिण अमेरिकेतल्या पेरू आणि बोलिव्हिया यांच्या सीमेवरच्या टिटिकाका नावाच्या मोठ्या सरोवराच्या परिसरातली. तिथे सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासूनच बटाट्याची लागवड होत आहे. स्पॅनिश दर्यावर्दी लोकांनी १५८७च्या सुमारास प्रथमच बटाटा युरोपात आणला आणि पोर्तुगीजांनी १६२७च्या सुमारास भारतात प्रथम बटाटा आणून त्याची लागवड पश्चिम किनारी प्रदेशात केली. अवघ्या तीनशे वर्षांपूर्वी भारतात आलेल्या या 'इम्पोर्टेड' बटाट्याने रोजच्या आहारात तर महत्त्वाचे स्थान मिळवले आहेच, पण उपासाच्या पदार्थांतही आपला शिरकाव करून घेतला आहे!

भुईमुगाचेही तसेच आहे. या वनस्पतीचे मूळचे स्थानही दक्षिण अमेरिकेतील (ब्राझील) आहे. भुईमुगाची आयात आणि लागवड पोर्तुगीजांनीच सोळाव्या शतकाच्या अखेरीस केली. याही इम्पोर्टेड पाहुण्याने उपासाच्या पदार्थांमध्ये एक आवश्यक पदार्थ म्हणून स्थान मिळवले आहे!

भुईमुगाचे उपासाला 'चालणे' आणि 'न चालणे' यात आणखी एक गंमत आहे. भुईमुगाचे दाणे उपासाला चालतात पण भुईमुगाचे तेल मात्र चालत नाही! शिवाय मजा अशी की तेच भुईमुगाचे तेल 'हायड्रोजनेशन' करून त्याचे वनस्पती तूप केले की ते उपासाला बिनदिक्कत चालते!

साबुदाणा हा उपासाच्या पदार्थातला तिसरा महत्त्वाचा पदार्थ. साबुदाण्याची खिचडी, साबुदाणा वडे, लापशी, पापड्या, कुरड्या अशा अनेक प्रकाराने साबुदाण्याचे उपासाचे खाद्यपदार्थ बनवले जातात. हा साबुदाणा अगदी अलीकडे म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळापर्यंत (१९४० पर्यंत) आपल्याकडे चीन आणि इंडोनेशिया या देशांतून आयात केला जात होता. महायुद्ध संपल्यानंतर, १९४६ नंतर भारतात जागोजागी टॅपिओकाची लागवड सुरू झाली आणि आता साबुदाणा तयार करण्याचे कारखाने बऱ्याच मोठ्या संख्येने तामिळनाडूत सुरू आहेत.

साबुदाणा ज्या झाडाच्या जाड, फुगीर, रताळ्यासारख्या दिसणाऱ्या मुळांपासून तयार करतात ती 'टॅपिओका' ही वनस्पतीसुद्धा मुळातली दक्षिण अमेरिकेतलीच आहे! या वनस्पतीचा प्रसारही पोर्तुगीजांनीच सतराव्या शतकात आफ्रिका, आग्नेय आशियाई देश आणि भारत या प्रदेशात केला!

पूर्वी आपल्याकडे इंडोनेशियातून साबुदाणा येत असे. तिथे सॅगो नावाच्या पाम जातीच्या झाडाच्या खोडात असणाऱ्या पिष्टमय (स्टार्च) पदार्थातून तो बनवला जात होता. हल्ली भारतात तयार होणारा साबुदाणा टॅपिओकाच्या मुळात असणाऱ्या पिष्टमय पदार्थांपासून तयार करतात. पण सॅगो किंवा टॅपिओका या दोन्ही वनस्पतींतील पिष्टमय पदार्थ एकदा वेगळा केला की त्यावर करावयाच्या त्यापुढच्या प्रक्रिया सारख्याच आहेत. या क्रिया म्हणजे प्रथम सॅगोच्या खोडाचा किंवा टॅपिओकाच्या मुळ्यांचा बारीक चुरा करून तो पाण्याच्या टाकीत खळबळून मिसळायचा. हे पाणी मोठमोठ्या टाक्यांत साठवले म्हणजे सर्व स्टार्च तळाशी बसतो. हा स्टार्च त्यात ५० टक्के जलांश राहील इतपत सुकवायचा म्हणजे त्याच्या दमट ओलसर वड्या पडतात. असा वड्यांच्या स्वरूपातला स्टार्च भोकाभोकांच्या चाळणीवर घासून त्याचे मोतीचूर किंवा बुंदीसारखे छोटे-छोटे बुंद खाली पाडतात. हे बुंद तेल फासलेल्या गरम सपाट पत्र्यावर किंवा तेलाने माखलेल्या गरम उथळ कढईत पडतील असे पाडतात. असे करताना साबुदाण्याच्या बुंदाचा पृष्ठभाग तापून, झटकन सुकून, तो गुळगुळीत आणि चकचकीत होतो. नंतर हे बुंद सावलीत पूर्ण सुकवतात. हाच आपला साबुदाणा!

या साऱ्या प्रक्रियेत हे बुंद ज्यावेळी चाळणीतून गरम पत्र्यावर किंवा कढईत पडतात त्यावेळी ते चिकटू नयेत म्हणून तव्याला अथवा कढईला जो तेलकट स्निग्ध पदार्थ फासलेला असतो तो प्रत्यक्षात काय असतो हे समजल्यावर तर उपासाच्या सोवळेपणाबद्दल काटेकोर असणारा कोणीही धर्मनिष्ठ पापभीरू माणूस साबुदाण्याला स्पर्शही करणार नाही! इंडोनेशियात याबाबतीत कसलाही विधिनिषेध नसल्यामुळे आणि तिथे पोषणमूल्याच्या दृष्टीने तेला-तुपाइतकेच चरबीचे (टॅलो) महत्त्व असल्यामुळे तिथे सरसहा यासाठी चरबीचाच वापर होत असतो. भारतातही तामिळनाडूत यासाठी जरी चरबी वापरीत नसले तरी ज्या तेलाचा वापर करतात ते तेल उपासाला चालणारे खासच नसते. अशा ''संस्कारित'' आणि इम्पोर्टेड असणाऱ्या साबुदाण्याने उपासाच्या पदार्थात किती महत्त्वाचे स्थान पटकावले आहे, हे पाहिल्यावर आश्चर्य वाटते!

चहा, कॉफी, कोको या पेयांचेही असेच आहे. कॉफी आणि कोको या दोन्ही वनस्पती परदेशातून इम्पोर्ट केलेल्या. चहा हे पेय ब्रिटिशांनीच १८३५ नंतर चीनमधून आणून, भारतात लागवड करून, आपल्या रोजच्या जीवनात आणले.

गंमत अशी, की असला इंपोर्टेड चहा उपासाला तर चालतोच, पण पूजेसाठी गुरूजी आले की पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्या पुढे चहाचा कप ठेवला जातो! जणू चहाच्या इंधनाशिवाय पूजापाठाची गाडी सुरूच होऊ शकत नाही!

निष्ठेने उपास करणाऱ्या साऱ्या मंडळींनी खरोखरच आपण उपास करतो म्हणजे काय करतो, कशासाठी करतो, याचा मुळापासून विचार करावा. धर्माचा आणि सद्यःस्थितीतल्या उपासाच्या खाद्यपदार्थांचा अर्थाअर्थी काहीही संबंध राहिलेला नाही. त्यामुळे उपासाचे निकष नव्याने ठरवण्याची वेळ आली आहे.

*(दिवाळी १९९५)*

---

कवीच्या कवितेत चिमण्या चिवचिवतात  
पण कवी स्वत:च्या घरात चिमण्यांना खोपा करू देत नाही.

**दासू वैद्य**

# अंतरिक्ष फिरलो पण...

**शान्ता ज. शेळके**

---

केशवसुतांची तुतारी किंवा बालकवींची फुलराणी म्हणजे मराठी काव्यजगातली उत्तुंग शिखरे. पण उत्तुंग शिखरांइतक्याच छोट्या छोट्या टेकड्याही कधी कधी मनाला भुरळ पाडतात. प्रतिभेच्या अवचित झालेल्या परीसस्पर्शाने अशा छोट्या छोट्या टेकड्याही कधी कधी उजळून निघालेल्या असतात. काही जुन्या, तुलनेने कमी प्रसिद्ध, पण सुंदर कवितांची दखल घेणारे, वाचकांची वाङ्मयीन अभिरूची समृद्ध करणारे सदर. हे सदर अडीच वर्ष चालले. असे एकूण २५ रसग्रहणपर लेख शान्ताबाईंनी लिहिले. त्यांतील हे तीन लेख.

---

### अंतरिक्ष फिरलो पण...

*अंतरिक्ष फिरलो पण*
*गेली न उदासी*
*गेली न उदासी!*

*लागले न हाताला*
*काही अविनाशी*
*काही अविनाशी!*

*क्षितिज तुझ्या चरणांचे*
*दिसते रे दूर*
*दिसते रे दूर*

*घेऊन मी चालू कसा*
*भरलेला ऊर*
*भरलेला ऊर*

*जरि वाटे जड कळले*
*तळ कळला नाही*
*तळ कळला नाही!*

*जड म्हणते 'माझा तू'*
*क्षितिज म्हणे 'नाही'*
*क्षितिज म्हणे 'नाही'!*

*अंतरिक्ष फिरलो पण*
*गेली न उदासी*
*गेली न उदासी!*

**– म. म. देशपांडे**

काही कवी सातत्याने भरपूर लिहितात. ते मोठे असतात आणि त्यांच्या अविरत चाललेल्या लेखनातून 'कवी' म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकास पावताना दिसते. ते रसिकांच्या मनावर ठसते आणि त्यातून त्यांची एक निश्चित प्रतिमा आकारास येते. कुसुमाग्रज, इंदिरा, बा. भ. बोरकर, अनिल, नारायण सुर्वे ही अलीकडच्या काळातली याची काही उदाहरणे. जुन्या काळात विपुल काव्यरचना करणारे भा. रा. तांबे यांचाही यात समावेश करता येईल. या कवींनी वैपुल्याने कविता लिहिली आणि काव्य म्हणूनही ती उत्तम आहे, असे रसिकांना जाणवले. मुख्य म्हणजे या कवींच्या काव्यावर त्यांची स्वत:ची अशी ठसठशीत मुद्रा आहे. इतकी स्पष्ट, की कवितेखाली त्यांचे नाव जरी नसले तरी केवळ कवितेच्या शब्दकळेवरून, तिच्या तोंडवळ्यावरून ती अनिलांची की बोरकरांची, तांब्यांची की कुसुमाग्रजांची हे आपण सहज ओळखू शकतो. इतकी त्या त्या कवीची पृथगात्मता त्यांच्या काव्याला लाभलेली असते. मधल्या कालखंडातल्या इतर काही कवींचीही नावे या संदर्भात आपणास आठवतील.

याउलट काही कवी अगदी मोजके लेखन करतात. ते अतिशय कसदार, अस्सल असते. सातत्याने लिहिणाऱ्या कवींना रसिकांचा जो भरघोस प्रतिसाद, लाभतो, त्यांच्या नावांना साहित्यात जी प्रतिष्ठा मिळते, तसले काही या मोजके लेखन करणाऱ्या कवींच्या वाट्याला येत नाही. पुढच्या पिढीला कदाचित त्यांनी नीटशी ओळखही राहत नाही. वैपुल्याने आणि सातत्याने काव्यलेखन करणाऱ्या कवीच्या वाट्याला येणारी लोकप्रियता त्यांना मिळत नाही. परंतु त्यांनी जे मोजके लेखन केलेले असते, ते साहित्यप्रेमी रसिकांच्या, चोखंदळ समीक्षकांच्या मनात आपल्यापुरते एक महत्त्वाचे स्थान मिळवून राहिलेले असते.

म. म. देशपांडे हे असे मोजके पण अतिशय सत्त्वशील आणि कसदार लेखन करणारे कवी आहेत. त्यांचा *वनफूल* हा काव्यसंग्रह एकोणीसशे पासष्ट साली मौज प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाला. त्यातही मोजक्याच कविता आहेत. पण या कविता

ज्यावेळी मासिकांतून प्रसिद्ध होत होत्या, त्यावेळी रसिकांनी त्यांचे वेगळेपण जाणले होते आणि वाचकांच्या त्या ध्यानातही राहिल्या होत्या.

त्यांच्या प्रारंभाच्या काही कवितांवर ना. घ. देशपांडे यांच्या शैलीचा पुसट ठसा उमटलेला दिसतो. पण पुढे सर्व कवितांवर स्वत: म. म. देशपांडे यांचीच स्पष्ट छाप आहे, याची आपल्याला खात्री पटल्यावाचून राहात नाही. 'आम्ही *स्वान्त:सुखाय* म्हणजे केवळ आपल्या स्वत:च्या समाधानासाठी कविता लिहितो,' असा बहुतेक सर्व कवींचा दावा असतो. तो काही अंशी खराही असतो. सर्वच कवी केवळ प्रसिद्धीसाठी, लोकप्रियतेसाठी, लोकानुरंजनासाठी कविता लिहिताना असे म्हणणे बरोबर नाही. ते त्या कवींवर अन्याय करणारे ठरेल. परतु कवी जसजसा नामवंत होऊ लागतो, तसतसे त्याच्या दृष्टीने वाचकांना कमी-जास्त प्रमाणात महत्त्व येऊ लागते, यात शंका नाही. दिवाळी अंक असतात, कविसंमेलने असतात, कवितेवरचे परिसंवाद असतात किंवा अन्य काही साहित्यविषयक कार्यक्रम असतात. नाही म्हटले तरी कवी या साऱ्यांत कळत-नकळत गुंतत जातो. आपल्या लोकप्रियतेचे काही मोल त्याला द्यावे लागते. हा अनुभव सुखद असला तरी कवीच्या एकान्त आत्मसंवादात त्यामुळे काही प्रमाणात तरी विक्षेप येतो.

काही कवी मात्र अशा कसल्याही कार्यक्रमात स्वत:ला गुंतवून घेत नाहीत. या प्रलोभनांपासून ते कटाक्षाने दूर राहतात. त्यांची कविता आणि ते स्वत: यांचेच एक दृढ नाते जमलेले असते आणि आश्चर्य असे की या आत्मरत कवींची कविताही लोकांचे मन आकर्षून घेतल्याखेरीज राहात नाही. म. म. देशपांडे हे या दुसऱ्या जातीचे कवी आहेत.

पासष्ट साली वनफूल प्रकाशित झाल्यावर मधल्या काळात देशपांडे यांनी जवळजवळ काही लिहिले नाही म्हटले तरी चालेल. अधूनमधून त्यांची एखादी कविता 'सत्यकथे'त वाचल्याचे आठवते. पण एकूण देशपांडे कवितेपासून दूर गेले, असेच म्हणायला हवे. त्याला काही बाह्य कारणेही होती. ग्वाल्हेरसारख्या महाराष्ट्रापासून दूर असलेल्या ठिकाणी वास्तव्य, समानशील कविमित्रांच्या संगतीचा अभाव, पुढे दुर्धर आजाराने केलेला पाठपुरावा यामुळे देशपांडे यांची कविता अगदीच संपुष्टात आली. त्यांच्या काही जिव्हाळ्याच्या मित्रांनी गतवर्षी *अंतर्देही* या नावाने त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला आणि मधल्या काळात इतस्तत: विखुरलेल्या त्यांच्या कविता रसिकांना एकत्रित वाचण्यासाठी उपलब्ध करून दिल्या ही एक चांगली घटना घडली. तरीदेखील म. म. देशपांडे आणि वनफूल यांची जी सांगड मोजक्या व चोखंदळ रसिकांच्या मनात बसली आहे, ती अद्याप तशीच कायम आहे.

वनफूल कवितासंग्रहातल्या कवितांना त्यांची स्वत:ची अशी पृथगात्मता आहे. अत्यंत साधी पण आतून विलक्षण कसदार अशी त्या कवितांची निवेदनशैली प्रथमदर्शनी आपणाला काहीशी चकवते. तिच्या साधेपणामुळे तिच्यातून वाहणाऱ्या काव्यात्मतेचा स्रोत एकदम जाणवणे अवघड होते. या कवितांत निसर्ग आहे, प्रणयाचे विविध रंग आहेत. समाज, जीवन, परमेश्वर या संबंधीचे काही खोल चिंतन आहे. मुख्य म्हणजे या साऱ्यांना कवीच्या खास त्याच्याच अशा शब्दकळेची जोड लाभली आहे. त्यामुळे वरकरणी साध्या, सहज, अल्पाक्षरी असणाऱ्या या कवितेने आपल्याला किती खोलवर हलवून टाकले आहे, अस्वस्थ केले आहे आणि किती दीर्घकाळ ती आपल्याला साथ देत आली आहे, याचा आजही प्रत्यय येतो आणि देशपांडे यांच्या कवितेची शक्ती कळते. सहज सहज आठवणाऱ्या वनफूलमधल्या या काही कवितापंक्ती बघाव्यात –

– *हे रस्ते सुंदर कुठे तरी जाणारे*
*अन् पक्षी सुंदर काहीतरी गाणारे*
*हे पक्षी गाती निरर्थ काही गाणे*
*मी निरर्थकातिल भुलतो सौंदर्याने*

– *संध्येचा श्यामल हात कोवळा*
*पकडू पाहतो नदीकाठचा उडता बगळा!*

– *तळ्यात चांदणी न्हाते आहे*
*पाहू नकोस!*

अशा ओळी इतक्या वर्षांनंतरही आपल्याला आठवतात. मराठी कवितेने नंतर कितीही वळणे घेतली तरी देशपांडे यांची कविता रसिकांना खुणावत, मुग्ध करत तशीच आपल्या जागी स्थिर आहे, जिवंत आणि चैतन्यमय आहे, याचा सुखद प्रत्यय येतो. या बाबतीत म. म. देशपांडे यांचे दुसऱ्या एका देशपांड्यांशी – ना. घ. देशपांड्यांशी – जवळचे नाते आहे, असे जाणवते.

*अंतरिक्ष फिरलो पण...* ही वनफूलमधली एक सुंदर कविता. या कवितेत कवीने आपली स्वत:ची एक व्यथा निवेदन केली आहे. पण खरे म्हटले तर साऱ्या मानवजातीचेच ते एक सनातन दु:ख आहे. मानवप्राणी हा या जड भूमीशी, इथल्या ठाम वास्तवाशी खिळलेला आहे. कायमचा बांधलेला आहे. परंतु तरीही आकाशाचे, आकाशापलीकडे असणाऱ्या एका अगम्य शक्तीचे त्याचे आकर्षण कधीही सुटत नाही, सुटलेले नाही. शरीर जड पार्थिवाला खिळलेले आणि मन मात्र अपार्थिवाकडे सतत झेप घेऊ बघणारे असे एक विलक्षण द्वंद्व माणसाच्या वाट्याला कायमचे आलेले आहे. त्या द्वंद्वाचा उल्लेख अनेक कवींच्या काव्यात आलेला आढळतो. बालकवी म्हणतात –

जीव धावतो वरवर जाया चैतन्यापाठी
परी सुटेना जड भूमीशी दृढ बसली गाठी!

कुसुमाग्रजांच्या कवितेतही भूमी आणि आकाश यांच्यामधले कवीला परस्परविरुद्ध दिशेला खेचणारे बंध अनेकदा आढळून

येतात. एका कवितेत ते म्हणतात –

*आकाशपण हटता हटत नाही*
*मातीपण मिटता मिटत नाही*
*आकाशमातीच्या या संघर्षात*
*माझ्या जखमांचे देणे फिटता फिटत नाही!*

माणसाच्या जड देहाचे मातीशी म्हणजेच या भूमीवरच्या विविध व्यवहारांशी नाते जडलेले असते. पण तो पूर्णपणे या मातीचा कधी होऊ शकत नाही. इथल्या साऱ्या सुखोपभोगात, वासनाविकारात, ऐहिक विलासात तो मग्न असतानाही अचानक एक उदासीनता त्याला जाणवू लागते. ती आकाशाची, अपार्थिवाची ओढ असते. या ओढीचे आणि तिच्यामुळे मनाला सतत जाणवणाऱ्या व्याकुळतेचे फार प्रत्ययकारी वर्णन देशपांडे यांनी या कवितेत केले आहे.

कवितेचा प्रारंभ या दृष्टीने एका उत्कट उदासीचा सूर छेदणारा आहे. कवी म्हणतो –

*अंतरिक्ष फिरलो पण*
*गेली न उदासी*
*गेली न उदासी*

*लागले न हाताला*
*काही अविनाशी*
*काही अविनाशी!*

मानवाने विशिष्ट अर्थाने आकाश जिंकले आहे. साऱ्या अंतरिक्षातून तो भ्रमण करून आला आहे. पण तरीही त्याच्या मनाची उदासीनता नाहीशी झालेली नाही. सारे विश्व फिरूनही हाताला अविनाशी, शाश्वत असे काही आले नाही. तो पृथ्वीचा आहे. तिथे तो वावरतो. सारे व्यवहार करतो. सारी सुखे मिळवतो. मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा बाळगतो आणि एका अर्थाने तो अत्यंत यशस्वीही होतो. पण हे सारे अनुभवताना व्यर्थतेची एक जाणीव सतत त्याच्या मनात सलत असते. पार्थिवापलीकडचे अगम्य असे काही त्याला हवे असते. आणि ते तर त्याच्या आटोक्यात येत नाही. काय असते ते? कवी म्हणतो –

*क्षितिज तुझ्या चरणांचे*
*दिसते रे दूर*
*दिसते रे दूर!*

*घेऊन मी चालू कसा*
*भरलेला ऊर*
*भरलेला ऊर!*

या मानवाला 'त्याच्या चरणांचे क्षितिज' दूर दिसते आहे. ते त्याला खुणावते आहे. साद घालते आहे. पण पार्थिव वासनाविकारांनी, व्यवहाराच्या अनेकविध ताणांनी त्यांचे हृदय व्यथित झाले आहे. 'तो' दुरावला आहे. त्याच्यापाशी जावे तर हा 'भरलेला ऊर' घेऊन तिथपर्यंत जाता येत नाही. म्हणून कवी परमेश्वराला म्हणतो, 'तुझ्या पावलांचे क्षितिज मला नेहेमी दिसते. पण हे भरलेले, जड झालेले हृदय घेऊन तिथपर्यंत मी कसा येऊ?'

इथे 'तो' म्हणजे एक दुर्लभ चैतन्य. ते दिसते पण हाती येत नाही. ओढ लावते पण दूर दूर सरकत राहते. या दृष्टीने 'क्षितिज तुझ्या चरणांचे' ही प्रतिमा किती सुंदर, अर्थपूर्ण आहे, ते सहज ध्यानात येईल.

साऱ्या सुखात, समाधानात ही अतृप्ती माणसाला का जाणवत असेल? अगदी साधुसंतांपासून तो कवी तत्त्ववेत्त्यांपर्यंत सर्वांना या अतृप्तीचे फणकारे सातत्याने सोसावे लागतात. माणूस जितका संवेदनशील तितकी ही अपार्थिवाची ओढ अधिक उत्कट असते. कवी म्हणतो –

*जरि वाटे जड कळले*
*तळ कळला नाही*
*जड म्हणते 'माझा तू'*
*क्षितिज म्हणे 'नाही!'*

इथे माणसाच्या या अतृप्तीची काही मीमांसा कवी करतो. साऱ्या भौतिक गोष्टी आपल्या आटोक्यात आल्यावर 'जड सृष्टीचे कोडे आपल्याला उलगडले, तिच्यावर आपण विजय मिळवला,' असे क्षणिक समाधान त्याला वाटतेही. पण त्याबरोबर आपल्या या विजयाला मर्यादा आहेत, हे त्याला उमगते. 'जडाचा उलगडा झाला पण त्याच्या तळाशी असलेल्या चैतन्याला आपण जिंकू शकलो नाही'; 'जरि वाटे जड कळले, तळ कळला नाही' ही हूरहूर त्याला जाणवत असते.

कारण तो एका विचित्र द्वंद्वात सापडलेला आहे. ही जड सृष्टी त्याच्यावर सत्ता गाजवते. 'तू माझा आहेस' असे ती त्याला बजावून सांगते. परंतु त्याच वेळी क्षितिज त्याला म्हणते, 'नाही, तू केवळ या भूमीचा नाहीस. माझीही तुझ्यावर सत्ता आहे. मला तू संपूर्णपणे विसरू शकणार नाहीस.'

'देह मातीशी बांधलेला पण आत्मा मात्र सतत या आकाशस्थ चैतन्यतत्त्वाकडे ओढ घेत असलेला' अशी दारुण अवस्था माणसाच्या वाट्याला आलेली आहे. ऐहिक आणि पारलौकिक, पार्थिव आणि अपार्थिव यांच्यातील हा संघर्ष सतत चालू आहे आणि मानवाचे हृदय हे त्या संघर्षाचे स्थान आहे. इंद्रियांचे चोचले कितीही पुरवले तरी अतींद्रियाचे गूढ आकर्षण माणसावर सतत सत्ता गाजवत असते. त्या आकर्षणातून त्याची सुटका नाही. म्हणून देह भूमीला खिळावा आणि ओढ आकाशाची असावी, हे भागधेय माणसाच्या वाट्याला आलेले आहे.

'जड म्हणते 'माझा तू', क्षितीज म्हणे 'नाही' हे खरे दुःख आहे. ते दुःख, ती उदासी म. म. देशपांडे यांनी या लहानशा कवितेत अतिशय उत्कटपणे व्यक्त केली आहे. म्हणूनच कविता वाचून प्रत्येक संवेदनशील रसिक मनातून अस्वस्थ होतो आणि 'अंतरिक्ष फिरलो पण गेली न उदासी' ही ओळ एखाद्या गीताच्या करुण सुरासारखी त्याच्या हृदयात सतत गुंजत राहते.

*(मे १९९७)*

# डोळा वाटुली संपेना...

### डोळा वाटुली संपेना...

*इथे रंगली पंगत*
*मिटक्यांची, भुरक्यांची;*
*साधासुधा माझा हात*
*बाळजीभ अमृताची;*

*इथे चालला अभ्यास*
*इथे झाली भातुकली*
*गोष्टी, गाणी नि मस्करी*
*खोली भरून राहिली;*

*इथे घडले पतंग*
*इथे फिरला भोवरा*
*इथे हदगा मांडला*
*इथे खुडला मोगरा;*

*खेळा-शाळेच्या मागून*
*दूर दूर दिसाकाठी*
*सांजावता दारामध्ये*
*कमरेला घट्ट मिठी*

*दिसामाशी वाढताना*
*घर झाले हे लहान*
*पालवीत पंख नवे*
*गेली याच दारातून*

*सांज टळली तरीही*
*दार लावावे वाटे ना*
*'वळेल का कुणी मागे?'*
*डोळा वाटुली संपेना...*

*– संपावया हवी वाट*
*लावायला हवा दिवा*
*पोटासाठी मुकाट्याने*
*हवा टाकायला तवा!*

**– इंदिरा**

इंदिरा. गेली अनेक वर्षे मराठी काव्यप्रांतात आपल्या स्वयंभू तेजाने तळपणारे एक ठळक, ठसठशीत कविनाम. चार तपांहून अधिक काळ इंदिराबाई आपले कवितालेखन करत आहेत. एकोणीसशे चाळीस साली *सहवास* या समर्पक नावाने इंदिरा संत आणि ना. मा. संत ह्या संत दांपत्याच्या कवितांचा एकत्रित असा संग्रह प्रसिद्ध झाला. तो इंदिराबाईंच्या कवितेचा पहिलावहिला अविष्कार होता. 'सहवास'मधल्या इंदिराबाईंच्या कवितांवर समकालीन काव्यसंकेतांची छाया पडलेली होती. ती तशी असणे स्वाभाविकही होते. पण त्या कवितांतूनही ओवीबद्ध रचना, भावनेचा सच्चेपणा, सहज सोपी पण आपल्या साधेपणानेच मनाला जाऊन भिडणारी मृदुकोमल रचना हे इंदिराबाईंचे काव्यगुण प्रकट होऊ लागले होते. संत दांपत्याचे एकमेकांवरील उत्कट प्रेम, उभयतांची काव्यात्म वृत्ती आणि तरुण वयातच अंकुरू लागलेला कवितेचा ध्यास – या सर्व गोष्टींचा प्रत्यय त्यात येतो. आपल्याला लाभलेल्या सफल प्रेमजीवनाविषयीची तृप्तीही तिथे आढळते.

तथापि विवाहानंतर अवघ्या दहा वर्षांतच इंदिराबाईंचे पती ना. मा. संत यांचे दुर्दैवी निधन झाले आणि इंदिराबाईंवर दुःखाचा प्रचंड डोंगर कोसळला. या दारुण घटनेने त्यांचे संथ, सुरक्षित जीवन जसे उलटे-पालटे झाले तसे त्यांच्या कवितेनेही अंतर्बाह्य वेगळे रूप धारण केले. अग्नीतून तावून निघालेले सोने जसे अधिकच लखलखते, त्याप्रमाणे यानंतर लिहिली गेलेली इंदिराबाईंची कविता एक अनपेक्षित झळाळी घेऊन अवतीर्ण झाली. प्रियकराचा अकाली झालेला वियोग आणि त्यामुळे आलेले अपार एकाकीपण यांच्या दुःखाला इतक्या उत्कटपणे, इतक्या विविध रूपांनी आणि इतक्या वेगवेगळ्या प्रतिमांतून मराठी कवितेत यापूर्वी कधीही उद्गार मिळालेला नव्हता. *सहवास* नंतर प्रकाशित झालेले *शेला, मेंदी, मृगजळ* यांसारखे संग्रह म्हणजे विरहदुःखाच्या व्यथेचे अत्यंत तीव्र, तीक्ष्ण, विविधांगी आविष्कार आहेत.

इथून पुढच्या इंदिराबाईंच्या कवितेचे जसे अंतरंग बदलले, तशी तिची शब्दकळाही पार पालटली. पूर्वी साध्या सहज भाषेत बोलणारी त्यांची कविता आता प्रतिमांच्या भाषेत बोलू लागली. निसर्गाची विविध रूपेच आता प्रतिमा बनली. त्याखेरीज खास इंदिराबाईंचे म्हणून अनेक भावनाकारही (Motifs) आता त्यांच्या कवितेत येऊ लागले. वाट, रात्र, नक्षत्रखचित आकाश, माळ, तृण, नागीण, ऋतुंचे बदलते रंग अशा प्रतिमा या कवितांत वारंवार भेटतात. आणखी एक महत्त्वाची प्रतिमा 'माती' ही आहे. कवयित्रीचे या मातीशी जडलेले नाते केवळ या जन्मापुरते नाही, ते जन्मजन्मांतरीचे आहे. आपल्या 'मृण्मयी' कवितेत कवयित्री म्हणते –

*रक्तामध्ये ओढ मातिची, मनास मातीचे ताजेपण*
*मातीतुन मी आले वरती, मातीचे मम अधुरे जीवन*

इंदिराबाईंच्या कवितेतील निसर्गप्रतिमा या केवळ

अलंकरणासाठी वा बाह्य सजावटीसाठी येत नाहीत. अत्यंत तीव्र आणि तरल अशा इंद्रिय संवेदनांच्या द्वारा हा निसर्ग कवयित्रीच्या भाववृत्तींत भिनून गेला आणि आता अनंतात विलीन झालेला प्रियकर सर्वव्यापी होऊन या निसर्गप्रतिमांच्या द्वाराच कवयित्रीला पुन्हा वेगवेगळ्या स्वरूपांत दर्शन देऊ लागला. निसर्ग आणि अंतरीची विरलव्यथा यांचे झालेले हे अद्वैत केवळ विलक्षण आहे. इंदिराबाईंच्या कवितेत येणारा आणखी एक ठळक विशेष म्हणजे त्यांची अत्यंत उत्कट अशी रंगजाणीव. त्यांच्या प्रतिमांत हे रंग वारंवार येतात आणि ते सर्व काव्यालाच एक वेगळे परिमाण देतात. अल्पाक्षरत्व, वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांची पखरण, दुःखभावनेचा विविध पैलूंतून झालेला आविष्कार हे इंदिराबाईंच्या काव्याचे आणखी काही ठळक विशेष आहेत. मुख्य म्हणजे अगदी सुरुवातीच्या काळात रविकिरण मंडळाचे संस्कार व्यक्त करणारी त्यांची कविता पुढे इतकी वेगळी झाली, इतकी त्यांची स्वतःची बनली की आज कवितेखाली 'इंदिरा' हे नाव नसले तरी ती कविता इंदिरेने लिहिलेली आहे, हे रसिकांना सहज कळते. इंदिराबाईंच्या कवितेची ओळ हीच जणू त्यांची सही असते!

संजीवनी, पद्मा या ज्येष्ठ कवयित्रींच्या जोडीने इंदिराबाई कविता लिहू लागल्या. या दोन्ही कवयित्रींचे काव्यलेखन आता कालपरत्वे ओसरत गेले आहे. इंदिराबाईंची कविता मात्र आजही आपल्याला सातत्याने दर्शन देते. गेल्या चार तपांतला त्यांच्या कवितेचा विकास, विस्तार आणि वैपुल्य पाहिले म्हणजे मन विस्मयाने थक्क होते. *शेला, मेंदी* इथपासून तो *गर्भरेशीम* आणि अगदी अलिकडे प्रसिद्ध झालेले *वंशकुसुम* इथपर्यंत इंदिराबाई अव्याहत कविता लिहीत आहेत. वयपरत्वे कवितेचे स्वरूप बदलत गेले. दुःखाने त्यांना व्यक्तिगत पातळीवर उद्ध्वस्त केले खरे, पण हे दुःख हाच पुढे इंदिराबाईंचा जीवनाधार झाला. त्याच्या बळावरच त्यांनी जीवनातील विविध संघर्षांना धीराने तोंड दिले. कर्तव्यतत्पर गृहिणी होऊन मुलांचे संगोपन केले. मुख्य म्हणजे कवितेशी जोडलेले आपले नाते त्यांनी अगदी आजपर्यंत अतूट राखले आहे. जिवाभावाने सांभाळले आहे. आपल्या स्वतःच्या कवितेचे एका मुलाखतीत त्यांनी केलेले हे वर्णन अतिशय समर्पक पण तितकेच भेदक आहे. इंदिराबाई म्हणतात, 'चाकूने किंवा सुरीच्या टोकाने मनगटावर घाव करावेत आणि त्या घावातून आलेल्या रक्ताच्या थेंबांकडे टक लावून बघत राहावं तशा या कविता आहेत.' आपल्या कवितेचे असे वर्णन फक्त स्वतः कवयित्रीच करू शकते

इंदिराबाईंनी गद्यलेखनही केलेले आहे. प्रारंभीच्या काळात त्यांनी कथा लिहिल्या. *श्यामली, कदली, चैतू* असे तीन कथासंग्रह त्यांच्या नावावर रुजू आहेत. पण एकंदरीने इंदिराबाईंची मराठी रसिकांच्या मनात जी प्रतिमा आहे, ती एका अभिजात प्रतिभासंपन्न कवयित्रीचीच आहे. या त्यांच्या काव्याचे रसिकांनी तर भरभरून कौतुक केलेच, पण साहित्य अकादमी पुरस्कार, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा पुरस्कार, अनेक शासकीय पारितोषिकेही त्यांना लाभलेली आहेत.

प्रारंभीच्या काळात इंदिराबाई आपल्या व्यक्तिगत दुःखात बुडालेल्या व त्यामुळे विलक्षण आत्ममग्न अशा होत्या. कालांतराने त्यातून त्या बाहेर आल्या आणि आपले गृहिणीपण सांभाळताना मुले-बाळे, भोवतालचे जीवन, त्यातले अनेक भावानुभव हेही कवितेत चित्रित करू लागल्या. 'डोळा वाटुली संपेना' ही त्यांची *रंगबावरी* संग्रहातून इथे घेतलेली कविता याच प्रकारची आहे. हे दुःखमग्न प्रणयिनीचे रूप नाही तर एका प्रपंचरत, घरगुती, मुलाबाळांत रमलेल्या गृहिणीचे, वत्सल मातेचे लोभसवाणे रूप आहे. मुला-बाळांचे लाडकोड पुरवणारी, त्यांच्या संगतीत सुखावणारी एक आई इथे आहे. त्याचबरोबर ती मुले वयाने वाढल्यानंतर, आपापल्या मार्गाला लागल्यानंतर पुन्हा वाट्याला आलेल्या एकटेपणामुळे व्यथित होणारी अशी निखळ स्त्रीही आहे.

हे आईपण कवयित्रीने या कवितेत कसे चित्रित केले आहे ते बघण्याजोगे आहे. इथे मुलांचे तपशील, त्यांची नावे न देता इंदिराबाई फक्त कधी मुलांची अंगत-पंगत, कधी त्यांचे अभ्यास व खेळ, कधी संध्याकाळी शाळा आणि खेळणे आटोपून घराच्या ओढीने परतल्यावर आईच्या कमरेला पडणारी त्यांची गाढ बाळमिठी या तुटक संदर्भांतून एक मुला-बाळांनी भरलेले, हसते-खेळते आणि – कदाचित घरात वडील नसल्यामुळे – केवळ आईभोवतीच केंद्रित झालेले असे घर आपल्यासमोर साक्षात उभे करतात. हे सर्व चित्रण कवयित्रीच्या व्यक्तिगत अनुभवांतून आलेले असावे, इतके ते जिवंत आणि प्रत्ययकारी बनले आहे. त्याबरोबरच कुठल्याही मध्यमवर्गीय कुटुंबाच्या चित्रासारखेच हे चित्र असल्यामुळे त्याला एक प्रकारची सार्वकालीन प्रातिनिधिकताही लाभली आहे.

या कवितेतली आई आता मुलांशिवाय ओक्याओक्या वाटणाऱ्या घरात इथे तिथे फिरते. त्याबरोबर त्या त्या खोलीशी, स्थळाशी निगडित असलेली अनुभवचित्रेही तिला दिसू लागतात. ती म्हणते –

*इथे रंगली पंगत, मिटक्यांची, भुरक्यांची*
*साधासुधा माझा हात, बाळजीभ अमृताची*

आपला हात 'साधासुधा' होता. जेवणातले पदार्थही काही खास नव्हते. पण मुलांच्या बाळजिभेतच अमृत भरलेले असल्यामुळे ते साधे पदार्थही ती कशी मिटक्या मारून, भुरके घेऊन खात होती! जेवणानंतर कवयित्री मुलांच्या खोलीत जाते. इथे तर त्यांच्या असंख्य आठवणी भरून राहिलेल्या आहेत. इथेच त्यांनी अभ्यास केला. इथे मुलींनी आपली भातुकली साजरी केली. इथे मुलांनी पतंग बनवले. भोवरे फिरवले. मुलींचा हदगा इथे रंगला. आणि खुडलेल्या मोगऱ्याच्या कळ्या इथेच त्यांनी केसात हौसेने माळल्या. किती गोष्टी, किती गाणी, किती थट्टामस्करी – क्वचित भांडणे देखील – इथेच झाली असतील. मुलांचे ते सुखी, खेळकर, प्रसन्न असे बाळपण आजही त्या खोलीत कवयित्रीला अगदी बारीक बारीक तपशिलांसह आठवते आणि तिचे मन व्याकुळ होते.

घरातल्या खोल्या-खोल्यांतून अशी हिंडत, जुन्या आठवणी मनात घोळवत कवयित्री अखेर घराच्या दारात येऊन उभी राहते. आणि मग तर काय, आठवणींचा पूरच घोंघावत येतो –

*खेळा-शाळेच्या मागून, दूर दूर दिसाकाठी*
*सांजावता दारामध्ये, कमरेला घट्ट मिठी!*

खेळ, शाळा आटोपून मुले घराकडे परततात. सांजवेळ झालेली असते. आता आईची आठवण त्यांच्या मनात दाटून येते

आणि तीही त्यांची वाट बघत दारातच उभी असते. मुले तिच्या अंगावर झेप घेतात. तिच्या कमरेला घट्ट मिठी मारतात. दिवसभराचा वियोगसुद्धा आई-मुलांना सहन होत नाही. म्हणून ही भेट उभयतांनाही अगदी अपूर्वाईची वाटते.

मुलांचे निरागस शैशव, त्यांचा हवाहवासा सहवास, त्यांच्या संगतीत पतिवियोगाच्या दुःखाचा झालेला उपशम – भूतकाळातला हा सर्व चित्रपट कवयित्रीच्या डोळ्यासमोरून झरझर सरकून जातो. पण काळाच्या ओघात ते सारे वाहून गेलेले आहे. पिल्ले दिवसामाशी वाढू लागली. त्यांच्या वाढत्या देहमनांना घराचे चिमणे घरटे अपुरे पडू लागले आणि निसर्गक्रमानुसार आपले नवे पंख पालवीत त्याच दारातून ती निघूनही गेली. आता पुन्हा कवयित्री घरात एकटीच आहे. घराचे ते रितेपण तिला खायला उठते. तसे आपले एकाकीपण तिने धीराने पत्करले आहे. पण एखादा दिवस असा येतो, की तिच्या संयमाचा बांध फुटतो. ते जुने जीवन तिला पुन्हा हवेसे वाटू लागते. मुलांच्या वियोगाने तिचे काळीज व्यथित होते. खरे तर आता पुन्हा तशीच सांजवेळ दाटून आली आहे. पण तिच्या कातर, व्याकुळ मनाला आज दार लावून आत जावेसे वाटत नाही. तिचा जीव हुरहुरतो आणि डोळ्यांत प्रतीक्षा उभी राहते. त्या वाटेवरून कुणी परत येणार नाही, हे तिला ठाऊक असते. तरीही वाट बघणारी वाट आज संपता संपत नाही.

*सांज टळली तरीही, दार लावावे वाटे ना*
*'वळेल का कुणी मागे?' डोळा वाटुली संपेना....*

या अगदी साध्या शब्दांत 'वळेल का कुणी मागे?' या आर्त प्रश्नात कवयित्रीची मनःस्थिती किती उत्कटपणे व्यक्त झाली आहे! आणि मग अधीरपणे डोळ्यांतून वाट बघणारे तिथे मन हताशपणे म्हणते –

*डोळा वाटुली संपेना....*

वाटेसाठी 'वाटुली' हा शब्द कवयित्रीने योजिला आहे. तो थेट संतकवींच्या भावार्त मनोवृत्तीपर्यंत आपल्याला नेऊन पोहोचवतो. 'पाहता वाटुली, शिणले डोळुले' या तुकारामांच्या उद्गारांचे स्मरण आपल्या मनात जागे करतो. तुकारामांचे आर्त विठ्ठलाच्या भेटीचे आहे. कवयित्रीच्या प्रापंचिक मनाला आपल्या दुरावलेल्या मुला-बाळांच्या भेटीची आस लागली आहे. पण दोन्हीकडे तीच तळमळ, भेटीची तीच तीव्र असोशी आहे.

खरे तर दुसऱ्या एखाद्या कवीने वा कवयित्रीने कविता इथेच संपवली असती. पण इंदिराबाई तसे करत नाहीत. त्या आणखी चार ओळी लिहितात आणि समोर आलेल्या वास्तवाचा कवयित्रीने केलेला समजूतदार स्वीकार त्यातून स्पष्टपणे व्यक्त होतो. हृदयाला जाऊन भिडतो. कवयित्री म्हणते –

*– संपायला हवी वाट, लावायला हवा दिवा*
*पोटासाठी मुकाट्याने, हवा टाकायला तवा!*

कितीही वाट पाहिली तरी 'डोळ्यांतल्या वाटुली'चा काही उपयोग नाही, हे कटू पण अटळ वास्तव कवयित्री स्वीकारते. जीवन अर्थशून्य वाटू लागले तरी रोजची कर्तव्ये संपत नाहीत. संसारचक्राचे ठराविक फेरे फिरतच राहतात. कवयित्री स्वतःचीच समजूत घालत म्हणते, 'ही वाट आता संपवली पाहिजे. रित्या अंधारलेल्या घरात दिवा लावला पाहिजे. इतकेच नव्हे तर पोटपूजेसाठी मुकाट्याने चुलीवर तवा टाकून भाकरही भाजली पाहिजे!'

आजकाल घरोघरी प्रत्ययाला येणारे हे एक दृश्य. ते इथे कवयित्रीच्या स्वतःच्या अनुभवविश्वातून प्रकट झाल्यामुळे त्याला विलक्षण तीव्रता, हृदयस्पर्शित्व प्राप्त झाले आहे. इतर ठिकाणी मुले-बाळे आपापल्या मार्गाने गेली तरी मागे वृद्ध पतिपत्नी राहतात. ती एकमेकांच्या संगतीत आपले आयुष्य व्यतीत करतात. पण इथे जोडीदार आधीच निघून गेला आहे. आणि आता मुलेही दुरावली आहेत. कवयित्री एकाकी अवस्थेत जुन्या आठवणी मनात घोळवत आहे. त्यामुळे ते एकाकीपण अधिक तीक्ष्ण, धारदार झाले आहे.

या कवितेचे सारे सौंदर्य तिच्या साधेपणात, संयमशील निवेदनात आहे. इथे मुलांचा प्रत्यक्ष उल्लेख कुठेही नाही. पण जेवताना त्यांनी मारलेल्या मिटक्या, भुरके, मुलांचे पतंग, भोवरे, मुलींची भातुकली, हदगा आणि कधीमधी त्यांनी हौसेने माळलेल्या मोगऱ्याच्या कळ्या, त्यांच्या गप्पागोष्टी, गाणी, मस्करी आणि शाळेतून घरी आल्यावर दारातच त्यांनी आईच्या कमरेला घातलेली घट्ट मिठी. या लहान लहान तपशिलांतून मुलाबाळांनी गजबजलेले एक सुखी घर डोळ्यांसमोर उभे राहाते. इथे घरधनी नाही. म्हणून मुलांचे सारे प्रेम एका आईच्याच ठायी एकवटले आहे. पण हे सारे कवयित्री कुठेच स्पष्ट शब्दांत बोलत नाही. ते सारे सुचवले जाते. त्यामुळेच कवितेची उत्कटता अधिक वाढली आहे.

साधे शब्द, त्यांचा अत्यंत संयत वापर आणि क्वचित वापरलेल्या समर्पक प्रतिमा यांमुळे ही कविता जेवढे सांगते त्यापेक्षा कितीतरी अधिक ती आपल्या मनात जागे करते. 'डोळा वाटुली संपेना' किंवा 'पोटासाठी मुकाट्याने, हवा टाकायला तवा' अशा जवळजवळ गद्यसदृश शब्दांतून अर्थाचे ब्रह्मांड आपल्या डोळ्यांसमोर उभे राहाते. इथे आक्रस्ताळे उद्गार नाहीत. दुःखाचे तपशीलवार भडक चित्रण नाही. उरात खोल साठवलेली, गिळलेली व्यथा एखाद्या उसाशाने केवळ व्यक्त व्हावी तशी ही कविता.

या कवितेतील शब्दांचा वापरही अगदी मोजका पण तितकाच सूचक आहे. कवयित्रीचा हात 'साधासुधा' आहे, पण मुलांची बाळजीभ 'अमृताची' आहे म्हणून ताटातले साधे अन्नही ती मिटक्या मारत, भुरके घेत खातात. आता कवयित्री सांजवेळी एकटीच दारात उभी आहे. जिथे पंगत रंगली होती तिथे आता एकटीनेच जेवायचे आहे हे सत्य तिला जाणवते. आणि डोळ्यांतली प्रतिक्षेची वाटुली संपवली पाहिजे हेही तिला उमगते. पण तेही ती अगदी साधेपणानेच सांगते –

*पोटासाठी मुकाट्याने, हवा टाकायला तवा!*

हा तवादेखील कवयित्रीच्या मनाचेच एक प्रतीक आहे. रोजची भाकर आपणच भाजली पाहिजे, तापलेल्या देहमनाला आपणच शांत केले पाहिजे, नित्यक्रम चालू ठेवला पाहिजे – हे सारे या दोन ओळी आपल्याला सांगतात.

एरव्ही निसर्गाची रम्य चित्रे रेखाटणाऱ्या, विलक्षण प्रतिमांनी आपला दुःखभोग परोपरीने परिणामकारक करणाऱ्या इंदिराबाईंनी इथे एक साधी कविता लिहिली आहे. पण या साधेपणातच तिचे सर्व सौंदर्य, सारी उत्कटता आणि सारे हृदयस्पर्शित्व भरून राहिले आहे.

*(ऑगस्ट १९९७)*

# विसरशील खास मला

विदर्भाने मराठी काव्यसृष्टीला अनेक उत्तमोत्तम कवी दिले आहेत. गुणवंत हनुमंत देशपांडे, ना. घ. देशपांडे, वा. ना. देशपांडे, आत्माराम रावजी देशपांडे म्हणजेच कवी अनिल यांच्यापासून तो थेट आजच्या सुरेश भट, मधुकर केचे, ग्रेस यांसारख्या कवींपर्यंत ही परंपरा अखंड चालू आहे. यातल्या सर्व कवींचे काव्य मराठी रसिकांनी साक्षेपाने आणि उत्कट प्रेमाने वाचलेले आहे.

तथापि विदर्भात काही कवी असेही होऊन गेले की त्यांनी तोलामोलाचे काव्य लिहिलेले असूनसुद्धा आज ते काहीसे विस्मृतीत गेले आहेत, आजच्या पिढीपर्यंत त्यांच्या कविता पोचलेल्या नाहीत. या क्षणी मला निदान दोन कवी असे आठवत आहेत. एक श्रीनिवास रामचंद्र बोबडे आणि दुसरे जयकृष्ण केशव उपाध्ये.

ज. के उपाध्ये हे नागपूरचे. त्यांचा जन्म नागपूर इथे अठराशे ऐंशी साली झाला आणि त्यांचे बालपण तिथेच गेले. त्यांचा मृत्युशक उपलब्ध नाही. उपाध्ये यांच्या बाबतीतली एक उल्लेखनीय गोष्ट अशी की ऐन तरुण वयात त्यांनी तीन वर्षांपर्यंत श्रीरामनामाचे पुरश्चरण केले होते. माडगूळकर यांच्या 'गीतरामायणा'सारखी पण त्यांच्या कितीतरी पूर्वी त्यांनी 'गीतराघव' या नावाने रामचरित्रावर आधारलेली जी गीतमालिका रचली तिची प्रेरणा या रामभक्तीतून त्यांना मिळाली असावी.

प्राचीन मराठी वाङ्मयाचे त्यांचे अध्ययनही चांगले होते. त्यांच्या रचनेतील निर्दोष रेखीवपणा या अभ्यासाची साक्ष देतो. उपाध्ये यांच्या काव्यामध्ये राष्ट्रप्रेमाचा आविष्कारही उत्कटपणे झाला आहे. त्यांनी आपले 'श्रीलोकमान्यचरितामृत' हे एकोणीसशे चोवीस साली लिहिलेले ओवीबद्ध काव्य, त्याप्रमाणे 'स्वतंत्र हिंदुस्तान', 'भारत भाग्योदय', 'तरुण भारता', 'हिंदू संघटन' यांसारख्या कवितांमधून त्यांच्या राष्ट्रभक्तीचा प्रत्यय येतो. या कवितांच्या जोडीने प्रेमभावनेचा सूक्ष्म आणि तरल आविष्कार करणाऱ्या काही रसपूर्ण कविताही त्यांनी लिहिल्या आहेत. 'विसरशील खास मला' ही इथे घेतलेली सुंदर कविता त्यांतलीच एक आहे.

उपाध्ये यांच्या कवितेत आढळून येणारे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या ठायी असलेली अभिजात विनोदबुद्धी. त्यातून त्यांच्या काही लक्षणीय विडंबन कवितांची निर्मिती झालेली आहे. 'चालचलाऊ भगवद्गीता' हे त्यांनी भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायाचे केलेले विडंबन उत्कृष्ट आहे. आजही उपाध्ये या कविनामाचा उल्लेख झाला तर जुन्या पिढीच्या रसिकांना त्यांचे हे विडंबन हटकून आठवते. कवितेत होणारा यतिभंग कशी रसहानी करतो हे दाखवून देणारी त्यांची 'चहाटळपणा' ही कविता त्यांच्या तरल कल्पकतेची साथ पटवते. 'या महाराष्ट्र देशात उपजलो मीच शाहीर' किंवा 'कविते, करीन तुला मी ठार' असा प्रारंभ असणाऱ्या त्यांच्या कविता म्हणजे कवितेच्या क्षेत्रात सामान्य कवींचे जे पेव

## विसरशील खास मला

*विसरशील खास मला दृष्टिआड होता*
*वचने ही गोड गोड देशि जरी आता!*

*दृष्टिआड झाल्यावर सृष्टिही निराळी*
*व्यवसायही विविध, विविध विषय भोवताली*
*गुंतता तयात कुठे वचन आठवीता?*
*विसरशील खास मला दृष्टिआड होता!*

*स्वैर तू विहंग अंबरात विहरणारा*
*वशही वशीकरण तुला सहज जादुगारा*
*लाभशील माझा मज केवि जसा होता?*
*विसरशील खास मला दृष्टिआड होता!*

*स्वत्वाचे भान जिथे गुंतल्या नुरावे*
*झुरणारे हृदय इथे हे कुणी स्मरावे?*
*होइल उपहास खास आस धरू जाता*
*विसरशील खास मला दृष्टिआड होता!*

*अंतरिची आग तुला जाणवू कशाने?*
*बोलते न वेदनाच वचन दुःख नेणे*
*यापरता दृष्टिआड होऊ नको नाथा*
*विसरशील खास मला दृष्टिआड होता!*

**– जयकृष्ण केशव उपाध्ये**

नेहमीच फुटलेले असते त्या संदर्भातली काव्ये आहेत. कवितेत माजलेल्या अनेक अपप्रवृत्तीवर त्यांत मार्मिक भाष्य केलेले आढळते. उपाध्ये यांच्या या कविता आचार्य अत्रे यांच्या 'झेंडूच्या फुलां'मधील विडंबन कवितांशी जवळचे नाते सांगणाऱ्या आहेत.

इतके सारे विविध प्रकारचे काव्यलेखन केलेले असूनही उपाध्ये यांचा केवळ एकच कवितासंग्रह निघालेला असावा ही गोष्ट काहीशी विस्मयकारक वाटते. 'पोपटपंची' या कुतूहलजनक नावाने प्रकाशित झालेल्या प्रस्तुत संग्रहातही उपाध्ये यांच्या फक्त त्रेचाळीसच कविता असाव्यात याचे तर अधिकच आश्चर्य वाटते. त्यातही एक नवलाची गोष्ट अशी की, उपाध्ये यांच्या सर्व कवितांचा संग्रहात अन्तर्भाव झालेलाच नाही. 'चालचलाऊ भगवद्‌गीता' हे विडंबन 'पोपटपंची'त नाही. *विसरशील खास मला* ही जी सुंदर कविता इथे घेतलेली आहे तीही 'पोपटपंची'त आढळली नाही. याचा अर्थ असा की उपाध्ये यांच्या इतर काही कविता समकालीन मासिके, नियतकालिके यांत विखुरलेल्या असाव्यात. त्या एकत्रित करून 'पोपटपंची'ची समग्र आवृत्ती कुणी काढली तर कवी या नात्याने उपाध्ये यांची अधिक नेमकी ओळख पटेल आणि आजच्या पिढीलाही त्यांची कविता पुन्हा उपलब्ध होईल. पण तूर्त तरी हे अशक्य दिसते.

उपाध्ये यांच्या कवितांचा आणखी एक उल्लेखनीय गुणविशेष आहे. त्यांच्या अनेक कविता म्हणजे उत्कृष्ट भावगीते आहेत. या बाबतीत भा. रा. तांबे, रविकिरण मंडळातले कवी यांच्याशी त्यांचे साम्य आहे असे म्हणता येईल. अतिशय आकर्षक ध्रुपद, तीन किंवा चार कडव्यांतून मध्यवर्ती कल्पनेचा केलेला विस्तार, अस्ताई अंतऱ्याचे वेगळे राखलेले वजन यांमुळे त्यांच्या या गीतांना आपोआपच गेयतेचे परिमाण लाभलेले आहे. ही गेयता संगीतकारांनी अचूक हेरली आणि उपाध्ये यांच्या काही गीतांना त्यांनी रसपरिपोषक चाल लावून ती स्वरबद्ध केली. त्याबरोबर गुणी गायक-गायिकांनी ती गाइली. उपाध्ये यांची ही गीते ध्वनिमुद्रितही झाली आहेत. आजच्या अनेक तरुण कवींना आणि काव्यप्रेमी रसिकांना उपाध्ये या कवीची थोडीबहुत ओळख आहे ती त्यांच्या या ध्वनिमुद्रित गीतांमुळेच. मुळात काव्यगुणांनी संपन्न असलेली ही गीते चांगली चाल व गाणारा गोड गळा यामुळे अधिकच रसाळ झाली आहेत.

*विसरशील खास मला* हे उत्तम चाल लावलेले आणि आशासारख्या प्रतिभावंत गायिकेने गायिलेले गीत रसिकमान्य झाले आहे. उपाध्ये यांचे *रामचंद्र मनमोहन नेत्र भरूनि पाहिन काय?* हे मूळच्या दीर्घ कवितेचा संक्षेप करून तयार केलेले भावगीतही ध्वनिमुद्रित झालेले आहे. *किति गोड बाई! बाळ जसे कमल उमलले* हे सुंदर गीत विख्यात नाटककार वसंत कानेटकर यांनी आपल्या नाटकात घेतलेले आहे आणि रसिकांना जर आठवत असेल तर फार वर्षांपूर्वी रामचरित्रावर आधारलेल्या *रामराज्य* या चित्रपटासाठी राजा बढे यांनी गीते लिहिली होती, तेव्हा एका गीतात त्यांनी उपाध्ये यांच्या *सीते, सीते, विमलचरिते, प्रेमले, चारुशीले! का गे! ऐसे कठिण मन तू कोमले आजे केले!* या ओळींचा जसाच्या तसा अन्तर्भाव केला होता. उपाध्ये यांच्या काव्याचे हे भावगीतात्म (Lyrical) वैशिष्ट्य मुद्दाम नमूद करावयास हवे.

*विसरशील खास मला* ही उपाध्ये यांची इथे घेतलेली कविता हे एक नाट्यगीत आहे. कुणीतरी एक 'तो' आणि कुणीतरी एक 'ती' यांच्या हृदयांचा एक सुंदर मेळ इथे जुळलेला आहे आणि आता 'तो' आपल्या वल्लभेला सोडून कुठे तरी दूर जायला निघालेला आहे. जातेवेळी तिचा निरोप घेताना त्याने 'मी तुला कधी विसरणार नाही' असे तोंड भरून आश्वासन दिले असेल. आपल्या एकनिष्ठ प्रीतीची साक्ष तिला पटवली असेल आणि परदेशी गेल्यानंतर तिथे कोणत्याही आणि कुणाच्याही मोहपाशात न गुंतता मी आहे तसाच निर्लेप परत येईन असे तिला पुन्हा पुन्हा सांगितले असेल. पण त्याच्यापेक्षा 'ती' जास्त चतुर, संवेदनाक्षम, आणि स्त्रीजातीला निसर्गतःच लाभलेल्या एका गूढ शक्तीमुळे या विषयात अधिक जाणकारही आहे. *अतिस्नेहः पापशंकी* या न्यायानुसार आपल्या प्रियकराच्या 'गोड गोड' वचनांवर विश्वास ठेवणे तिला अवघड जात आहे.

मन समर्थ असेलही, पण शरीर दुबळे असते. प्रेमाचे अधिष्ठान असलेली व्यक्ती डोळ्यांना दुरावली की मनातूनही हळू हळू तिची मूर्ती अंधुक होत शेवटी अन्तर्धान पावते, हा निसर्गाचा नियम एका अभिजात शहाणपणाने तिला आधीच ठाऊक झाला आहे. दृष्टिआड सृष्टी या मराठी म्हणीप्रमाणे किंवा Out of Sight, Out of Mind या इंग्रजी वचनानुसार आपल्या भेटीगाठी बंद पडल्या की आज आपल्यावर उत्कट प्रेम करणारा प्रियकर उद्या आपल्याला विसरून जाईल या आशंकेने तिचे मन बावरून गेले आहे. अस्वस्थ झाले आहे. तिचे सारे बावरलेपण, भय कवितेच्या पहिल्या दोन ओळींतच किती परिणामकारकपणे व्यक्त झाले आहे हे बघण्यासारखे आहे. ती म्हणते –

*विसरशील खास मला दृष्टिआड होता*
*वचने ही गोड गोड देशि जरी आता!*

प्रेमाला विस्मरणाचा शाप असतो. त्यातून पुरुषप्रेम तर चंचल, भ्रमर वृत्तीचे असते. आपला प्रियकरही त्याला अपवाद नसणार हे एका अन्तःप्रेरणेने जाणणारी ही प्रणयिनी त्याच्या गोड वचनावर, मधुर आश्वासनांवर विश्वास ठेवू शकत नाही. एकदा माणूस नजरेआड झाले, सहवासाला दुरावले की काय घडू शकते हे ती पुढे सांगते. तिची ही व्यथा तिची एकटीची नाही. ती अवघ्या स्त्रीजातीचीच मनोवेदना आहे.

*दृष्टिआड झाल्यावर सृष्टिही निराळी*
*व्यवसायहि विविध, विविध विषय भोवताली*
*गुंतता तयात कुठे वचन आठवीता?*

ती प्रेयसी म्हणते, एकदा मी प्रियकराच्या दृष्टीआड झाले म्हणजे त्याच्या मनातले माझे स्थानही हळूहळू नाहीसे होणारच. तो परदेशी गेला म्हणजे त्याच्या भोवतालचे सारे जगच पालटेल. नाना व्यवसायांत तो गुंतून जाईल आणि त्याचे चित्त वेधून घेणारे असंख्य विषय त्याच्याभोवती जमतील. त्याचे पुरुषी मन एकदा या नवनव्या आकर्षणांनी विद्ध झाले म्हणजे मला दिलेली

चिरस्मरणाची वचने त्याला कुठून आठवणार?

पुढे ती म्हणते –

*– स्वैर तू विहंग अंबरात विहरणारा*
*वशहि वशीकरण तुला सहज जादुगारा*
*लाभशील माझा मज केवि जसा होता?*

पुरुष हा जात्यां बहुगामी असतो. प्रेम हे स्त्रीचे सर्वस्व असते. पण पुरुषाच्या दृष्टीने तो त्याच्या जीवनाचा केवळ एक भाग असतो. स्त्री ही भूमीला चिकटून राहणारी, तिथे स्थैर्य शोधणारी आणि आपल्या प्रेमाचे सातत्य टिकवू बघणारी असते. तर पुरुष आकाशात भरारी मारणाऱ्या, दाही दिशांचा वेध घेऊ बघणाऱ्या पक्ष्यासारखा असतो. पक्ष्याप्रमाणेच कोणतेही बंधन – मग ते प्रेमाचे का असेना, त्याला अल्पावधीतच काचू लागते. पुन्हा आपला प्रियकर तर अत्यंत लाघवी, लडिवाळ आणि स्त्रीमनाला भुरळ घालणाऱ्या, त्याला वश करणाऱ्या अनंत कळा अंगी असणारा जादूगार आहे, याची तिला पूर्ण जाणीव आहे. कारण ती स्वतःही अशीच त्याला सहज वश झाली नव्हती का? मग परदेशी गेल्यानंतर त्याच्या या जादूला इतर स्त्रियाही बळी पडणार नाहीत कशावरून? ही सारी संभाव्य वस्तुस्थिती तिच्या डोळ्यांपुढे उभी रहाते आणि मग ती व्याकुळ होऊन म्हणते, 'हे सारे ध्यानी घेतले म्हणजे वाटू लागते, आज तू जसा आहेस तसा माझा, अगदी पूर्ण माझा, तू मला पुन्हा कसा लाभशील?'

पण प्रणयिनीला केवळ पुरुषाच्या चंचलपणाचेच भान आहे असे नाही तर एकूण मानवी मनाच्या दुर्बलतेचीही तिला चांगली जाणीव आहे. इंग्रजीमध्ये एक सुंदर वचन आहे. Nature abhors vacuum, निसर्गाला पोकळी मंजूर नाही. वास्तव, भौतिक सृष्टीतली कोणतीही पोकळी निसर्ग जसा लगेच भरून काढतो, त्याप्रमाणे रिते मनही तो पुन्हा परिपूर्ण करतो. मानवी मन हे दुबळे आहे. एकनिष्ठेची वचने आज देणारे हृदय अल्पावधीत ती वचने विसरून दुसऱ्या आकर्षणकक्षेत सहज बद्ध होऊ शकते. आज एका स्त्रीवर जिवापाड प्रेम करणारा पुरुष कालांतराने दुसऱ्या स्त्रीवरही तितक्याच उत्कटतेने आपल्या प्रणयभावनेचा वर्षाव करू शकतो. (हीच वस्तुस्थिती स्त्रीच्याही बाबतीत संभवनीय आहे.) यात काहीही अनैसर्गिक नाही किंवा इथे विश्वासघाताचाही प्रश्न येत नाही. काळाचा रेटा जबरदस्त असतो. म्हणूनच आज वियोगदुःखाखाली पार चिरडून गेलेली हृदयेही पुन्हा अंकुरित, पल्लवित होतात! म्हणून या कवितेतली प्रणयिनी आपल्या प्रियकराला दोष देऊ शकत नाही.

उलट ती म्हणते –

*स्वत्वाचे भान जिथे गुंतल्या नुरावे*
*झुरणारे हृदय इथे हे कुणी स्मरावे?*
*होईल उपहास खास आस धरू जाता!*

उद्या आपला प्रियकर एखाद्या नव्या मोहात गुंतला तर आपले स्वत्वदेखील तो विसरून जाईल. आणि जिथे स्वतःचाही विसर पडू शकतो तिथे मागे राहिलेले माझे आशाळभूत, व्यथित, विरहाने झुरणारे हृदय त्याने कसे स्मरणात ठेवावे? ते तो विसरून गेला तर स्वाभाविकच नाही का? उलट इथे मी त्याच्या प्रेमावर विश्वास ठेवून, त्याची आशा मनात बाळगून बसले तर माझ्या त्या वेडेपणाबद्दल माझ्या वाट्याला जगाचा उपहास, कुचेष्टाच येण्याचा संभव! लोक मला खचित हसणार! मीच मूर्ख ठरणार!

शेवटी ती व्याकुळ प्रणयिनी एका अतिरेकी आवेगाने आपल्या प्रियकराला म्हणते –

*अंतरिची आग तुला जाणवू कशाने?*
*बोलवे न वेदनाच वचन दुःख नेणे*
*या परता दृष्टिआड होऊ नको नाथा!*

माझ्या हृदयात संशयाची, भयाची, विरहाच्या दुःखाची जी आग भडकली आहे तिची जाणीव तुला कशी देऊ? माझी ही वेदना मूक आहे. माझे दुःख शब्दांना न कळणारे आहे. या साऱ्या दुःखाशोकाचा भोग मला देऊन तुला माझ्यापासून दूर जायलाच हवे का? त्यापेक्षा नाथा, प्रियतमा तू माझ्या दृष्टीआड झालाच नाहीस तर चालणार नाही का? नको, तू मला सोडून दूर जाऊच नकोस!

ज. के. उपाध्ये यांनी आपल्या या कवितेत प्रेमासारख्या चिर-परिचित भावनेचा एक अगदी वेगळा पैलू फार परिणामकारकरीत्या दाखवून दिलेला आहे. प्रेम कितीही उत्कट असले तरी त्याला विस्मरणाचा शाप असतो. ही कविता, विशेषतः तिची पहिली ओळ वाचताना महाकवी कालिदासाच्या 'शाकुन्तल' नाटकाचे स्मरण झाल्यावाचून राहात नाही. दुष्यन्त शकुन्तलेच्या दृष्टीआड गेला आणि तो तिला विसरला. त्याचे हे विसरणे स्वाभाविक वाटावे म्हणून कालिदासाने आपल्या प्रतिभेने दुर्वासाच्या शापाची नाटकात योजना केली.

मूळ महाभारतातील दुष्यन्त अगदी वेगळा आहे. त्याला शकुन्तलेशी जडलेला आपला प्रेमसंबंध, आपण तिच्याशी केलेला गान्धर्व विवाह स्पष्ट आठवत आहे. तरीही केवळ लोकनिंदेच्या भयाने तो शकुन्तलेची ओळख नाकारतो. तिला राजसभेतून परत पाठवण्यास सिद्ध होतो. कालिदासाला दुष्यन्ताचे हे निर्घृण वर्तन सहन झाले नाही आणि त्याने दुष्यन्ताचे विस्मरण स्वाभाविक वाटावे म्हणून दुर्वासाच्या शापाची नाटकात योजना केली. यात कालिदासाच्या सहृदयतेची, संवेदनाशील कविमनाची साक्ष पटते. पण त्याबरोबरच हा शाप प्रतिकात्मकही वाटतो.

'दृष्टीआड झाल्यावर सृष्टिही निराळी' हे प्रेमाच्या व्यवहारातले एक कठोर वास्तव आहे. जन्मजन्मान्तरीचे नाते जिथे जोडलेले असते त्या नात्याचाच कालांतराने विसर पडावा ही प्रेमाच्या सृष्टीतली एक विपरीत पण कठोर वस्तुस्थिती आहे. जयकृष्ण केशव उपाध्ये या कवीचे मोठेपण हे की त्याने ही विपरीत वस्तुस्थिती जाणली आणि एका सुंदर कवितेच्या द्वारा ती आपल्या निदर्शनाला आणली!

प्रेम अमर असते, चिरंतन असते हे जितके खरे तितकेच ते भंगुर, विस्मरणशील असते हेही खरे.

*(सप्टेंबर १९९७)*

# कर तिचे जुळती...

**विजया देव**

''दगडांच्या राशीजवळ ती आली आणि पटकन खाली वाकून दगडाला स्पर्श करून तिनं तो हात कपाळाला लावला. बाजूचा हातोडा उचलला आणि पहिला घाव त्या दगडावर घातला.''

कधी कधी, मन हेलावून टाकणारी दृश्यं अगदी अनपेक्षितपणे, सहज जाता जाता नजरेला पडतात. अनाहूतपणे आपल्या समोर घडून जाणारं काहीतरी इतकं साधंसुधं असतं की, त्या साधेपणापुढे झगमगत्या दुनियेचा कोलाहल फिका पडतो.

एक दिवस सकाळी टेकडीवरून फिरून परत येत होते. पहाटेचा गारवा आणि ताजेपणा यांची शिंपण अजून आसमंतात होती. घरच्या वाटेवर नेहमीची दृश्यं दिसत होती. दूधवाला, पेपरवाला, शाळेची मुलं, फिरायला निघालेले कुणी, कुणी आपल्या घराच्या सज्जात चहाचा आस्वाद घेणारे. झाडांच्या शेंड्यांवर पाखरांची लगबग आणि वेलीवर डोलणारी रंगीबेरंगी फुलं... गल्लीच्या एका बाजूला, एका बंगल्याबाहेर दगडांच्या एक-दोन राशी पडलेल्या दिसल्या. बांधकामाच्या साहित्याचे ढीग, खणलेला रस्ता, विखुरलेला कचरा या गोष्टी बोगन वेलीच्या सुक्या पाकळ्यांची पखरण किंवा पारिजातकाचा सडा यांच्यासमवेत गुण्यागोविंदानं नांदत असतात. आजच तिथे आलेली ती दगडांची रास मी पाहिली आणि ह्या बंगल्याच्या कुंपणभिंतीचं काम चाललेलं दिसतंय, असं मनात आलं.

तेवढ्यात समोरून एक कामकरी बाई आली. घोळदार लेहंगा आणि आरसे लावलेली गडद ओढणी असा तिचा पेहराव. दगडांच्या राशीजवळ ती आली आणि पटकन खाली वाकून दगडाला स्पर्श करून तिनं तो हात कपाळाला लावला. बाजूचा हातोडा उचलला आणि पहिला घाव त्या दगडावर घातला.


माझ्या लेखी तो दगडांचा ढीग रस्ता अडवणारा एक अडथळा होता. ती दगडांची रास हे तिचं चरितार्थाचं साधन होतं. तिचा उदरनिर्वाह त्यातून चालणार होता, आणि तो चालवायचा तर त्या दगडावर हत्यार चालवणं, पुरेशा ताकदीनं तो फोडणं तिला भाग होतं. त्याला इजा करूनच तिच्या पोटाची खळगी भरणार होती. तो बापडा मूकपणे पडून होता, त्यावर आघात करून त्याचे तुकडे तुकडे केल्याशिवाय तिचा चरितार्थ चालणार नव्हता. म्हणून ती क्षमायाचना करत होती का? – उदरनिर्वाहाच्या साधनाबद्दलची ती कृतज्ञता तर होतीच, पण दणकट हत्याराचे कठोर घाव घालण्यापूर्वी त्या दगडाला ती सहकार्य करायला विनवत होती का?

रंगदेवतेला वंदन करणारे रंगकर्मी, कारखान्यातल्या यंत्राला नमस्कार करणारा मजूर, देवळाच्या पायरीला हात लावून तो मस्तकी नेणारा भाविक आणि दगडाला नमस्कार करणारी ही बाई यांच्यातून एक परंपरा वाहत होती.

रस्त्यावरून वाहनं येत जात होती. रिक्षांमधून, गाड्यांमधून, पायी शाळेत निघालेली मुलं हा तिचा वर्तमानकाळ नव्हता. एकमेकांना आधार देत फिरायला निघालेलं वयस्क दांपत्य हा तिचा भविष्यकाळ नव्हता. फिरून घरी गेल्यावर मिळणार असलेला ताज्या दुधाचा चहा आणि दाराशी आलेला पेपर हे तिचं वास्तव नव्हतं. मुळात जे दगड ती फोडत होती, त्या दगडाच्या भिंतींचा आधार तिच्या छपराला नव्हताच. रस्त्यावरचं आयुष्य, मुकादम म्हणेल तिथे काम आणि पदरी पडेल तो दाम, यासाठी ती कष्टत होती. तरी उपजीविकेच्या साधनाबद्दल एवढा विनम्र भाव तिच्यात कोठून आला?

ठक्ठक् आवाज घुमत होता. कोवळं पिवळं ऊन पसरलेलं होतं.

*(जानेवारी २००२)*



# भेट

## मीना प्रभु

बडोद्याला गेल्या असताना मीना प्रभु यांनी ज्येष्ठ लेखक श्री. बा. जोशी यांची भेट घेतली. सहज पाच मिनिटं भेटण्यासाठी गेलेल्या मीना प्रभु जोशी दांपत्याशी दिलखुलास गप्पांत रमून गेल्या. एका लोकप्रिय लेखिकेच्या लेखनाचा हा आगळावेगळा आविष्कार.

बडोद्याचं सूर्य पॅलेस हॉटेल. सकाळचे साडे नऊ वाजलेले आहेत. रात्रभर गाडीचा प्रवास करून नुकतीच पोहोचले असले, तरी बाहेर जाण्याचा जामानिमा करून मी जय्यत तयार आहे. प्रश्न तयारीचा नाही, जाण्याचाच आहे. आजचा नाही, गेल्या वर्षभराचा आहे.

''त्यांनी स्पष्ट सांगितलंय, कुणालाही माझ्याकडे आणू नका.'' देशपांडे म्हणताहेत, ''मग मी तुम्हांला त्यांच्याकडे कसं नेऊ?''

''मलाही तसंच बजावलेलं आहे'' कन्नल पुस्ती जोडतात. ''त्यांची आणि त्यांच्या पत्नीची तब्येत ठीक नसते. वय झालंय. त्यांच्याकडून आल्यागेल्याची उठबस होत नाही. जाऊ नका.''

मुंबईतसुद्धा हेच कानी आलेलं. मैत्रिणीनं आग्रह करून तिकीट काढलं तरी माझा बडोद्याला जायचा निश्चय होत नाही. जाऊ की नको? गेल्यानंतर त्यांना भेटल्याखेरीज कसं परतायचं? आणि मग मुळात जायचंच कशाला? त्यांना प्रत्यक्ष भेटायची इच्छा मला गेली चार वर्षं आहे. त्यांचं पहिलं पत्र आल्यापासून.

आमच्या मैत्रीची सुरुवातही किती गमतीची.

''श्री. बा. जोशींच्या 'गंगाजळीत' 'रविवार सकाळ'मध्ये तुझ्या पुस्तकाचा उल्लेख आला होता. वाटलं, तुला कात्रण पाठवावं.'' कात्रणासोबतचं मित्र-पत्र सांगत होतं. गंगाजळीत 'माझं लंडन'चा संदर्भ देऊन म्हटलेलं होतं. ''एक अप्रतिम पुस्तक आहे असं मित्र म्हणतात. अजून वाचायचा योग आलेला नाही.''

मनातून फुलारले, पण सदरातल्या बाकीच्या मजकुरानं लक्ष वेधून घेतलं. साध्या, सरळ, सोप्या भाषेत, सुबोध शैलीत वेचक लिहिलेलं होतं. त्यात विविध विषय आलेले. त्यांचा योग्य तो परामर्श घेतलेला. त्यातून लेखकाची वाचन-संपन्नता आणि त्यांचे अचूक निष्कर्ष मन वेधून घेत होते. असं शुचिर्भूत लिखाण आता पहायलाही मिळत नाही, असं म्हटलं तर अतिशयोक्ती नव्हे.

माझ्या परदेश वास्तव्यानं आजवर माझा या सदराशी परिचय नव्हता. हळहळ वाटली. अशा व्युत्पन्न व्यक्तीशी ओळख व्हावी असं वाटलं. त्याच भरात 'माझं लंडन' पाठवून दिलं. त्याच्यावर 'तुमच्या अपेक्षा फोल ठरणार नाहीत अशी आशा करते,' हे केवळ तोंडदेखलं लिहिलं नव्हतं. मनातून खरंच धडधड होती. पसंत पडेल की नाही?

जवळजवळ उलट डाकेनं पत्र आलं. ''आकाशफळ हाती यावं तसं अनपेक्षितपणे आज तुमचं पुस्तक हाती आलं.'' एका वाक्यानं मी भरून पावले होते.

मग पत्रापत्री सुरू झाली. ते परिचित रेखीव अक्षर पत्त्यावर पाहिलं की मन उचंबळायचं. हातचं सारं बाजूला सारून त्याचं आधी वाचन आणि मग पारायणं व्हायची. श्री.बा. पस्तीस वर्षं कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून राहिलेले. साहित्याची, लेखन-वाचनाची अतोनात आवड असलेल्या श्री.बां.ना ही नोकरी म्हणजे माशाला समुद्रात पोहायची नोकरी. प्राचीनपासून आधुनिक ग्रंथांपर्यंत सर्व साहित्यसंपदा हाताशी. किती वाचू नि किती नको. त्यातून 'साहित्य सोनियाच्या खाणी' असलेली बंगाली भाषा उत्तम अवगत. त्यामुळे वाचन केवळ मराठी-इंग्लिशशी निगडीत न राहता इतर भारतीय भाषांच्या साहित्याचा सांगोपांग विचार करण्याची संधी आणि पात्रता दोन्हीही लाभलेलं. त्याची प्रतिबिंबं त्यांच्या पत्रात खोलवर पडलेली असत. वाचताना दर वेळी काहीतरी वेगळं हाती लागायचं. असं वाटे की, अशी अधिकारी व्यक्ती शेजाराला असेल तर काय बहार येईल! काय वाचलंच पाहिजे ते कळेल आणि काय टाळावं तेही. आपली साहित्याची जाण अनेक पटींनी वाढेल. त्यांचं एक सविस्तर पत्र पोस्टात गहाळ झालं हे पुढच्या एका पत्रातून उमजल्यावर वाटलेली हळहळ अजून छळते.

पत्रातून माझ्या लिखाणावरही स्पष्ट भाष्य असे. 'माझं लंडन'वरचा परखड अभिप्राय वाचून या एकाच वाचकानं पुस्तक नीट वाचलंसं वाटलं होतं. 'दक्षिणरंग'मध्ये माझं पाऊल पुढे पडल्याची प्रशस्ती वाचून अंगावर मूठभर मांस चढलं. तोवर मला त्यांचं 'संकलन'ही भेट आलं होतं. त्याचं अनोखेपण भावलं होतं. आता उत्सुकता होती समक्ष भेटीची. पत्रातून ती मी व्यक्त केली होती. घरी कसं यायचं याचं नीट मार्गदर्शनही लिहून आलं होतं.

दरवेळी भारतात यायची ते बडोद्याचे बेत करत. दरवेळी कुणी ना कुणी ते हाणून पाडायचे. सगळे जण स्पष्ट सांगत, ''जाऊ

नकोस, निदान सध्यातरी.''

मनात यायचं, ''मग केव्हा?''

मध्ये वर्षाच्या लग्नात अडकले. मोठा बोवाळ घातल्यानं तीन महिने मान वर करणं जमलं नाही. तरी आठवणीनं पत्रिका पाठवली होती. पण कसलंच उत्तर आलं नाही. वाटलं, पोस्टात गहाळ झाली बहुतेक. पुढची दोन वर्षं तशीच उलटली. माझी भारतात ये-जा होती. बडोद्याला जाणं मनातनं जात नव्हतं, पण जायलाही जमत नव्हतं. मित्रमंडळींना माझा ध्यास माहीत होता. सरोजताई काही निमित्तानं बडोद्याला फेरी मारून आल्या. त्यांना भेटूनही आल्या. पण मला म्हणाल्या, ''ते भेटत नाहीत गं कुणाला, जाऊ नकोस.''

गेल्या ऑक्टोबरमध्ये पुन्हा बेत ठरला. अगदी दिवसही नक्की झाला. जगभर भटकणारी मी लहान मुलासारखी त्याची वाट पाहायला लागले आणि पुन्हा माशी शिंकली. जाणं रद्द झालं. पुन्हा मनावर सावट आलं. त्यांना भेटणं आपल्या नशिबात नाही बहुतेक!

यावेळी लंडनला जायच्या आधी बडोद्याचं आमंत्रण आलं होतं. त्याच्या अंदाजानंच लंडनहून परतले. आले तोच घसा धरला. तोंडातून शब्द फुटेना. आता कसची जाते? शिवाय नाजूक प्रकृतीच्या या पति-पत्नींना माझा आजार बाधला तर? नकोच ते. तिकीट परत करा. शिवाय न भेटण्याचा निरोप जारी होताच.

''एरव्ही मी तुम्हांला आनंदानं घेऊन गेलो असतो,'' देशपांडे फोनवर म्हणाले, ''पण आता मलाच तंबी मिळालेली आहे. मध्यंतरी एका प्रतिभावंत लेखिकेला भेटायला त्यांनी नकार दिला. तेव्हा तुमचं तुम्ही काय करायचं ते बघा. आधी न कळवता तशाच थडकलात तर तुमच्या तोंडावर दार लावून घेतील असं नाही, पण फारशा स्वागताची आशा नको. कंटाळलेत ते.''

''मी फार त्रास देणार नाही त्यांना. माझी ऊठबससुद्धा करायला नको. मी चहा-कॉफी काही पीत नाही. एकदाच भेटायची इच्छा आहे.''

''मग पाहा प्रयत्न करून. नशीब तुमचं.''

सगळे संवाद, सगळे सल्ले कानात घुमत आहेत. धीर करून बडोद्याला येऊन पोहोचले तर आहे, पण पुढे जाऊ की नको? – नक्की ठरत नव्हतं.

''मी तुम्हांला त्यांच्या दारापर्यंत नेऊन सोडतो,'' कन्नल उदारपणे म्हणाले. ''दूर राहतात ते. रिक्षावाला नीट नेईलशी खात्री नाही. तुम्हांला सोडून मी लांब उभा राहतो. पंधरा-वीस मिनिटांत तुम्ही परताल. मग परत घेऊन जातो.''

''मला नुसतं सोडलंत तरी चालेल. मी रिक्षानं परतेन.''

''रिक्षा मिळणंही तितकं सोपं नाही त्या भागात. मी थांबतो.''

आता कन्नलांची वाट पाहत आहे. ते येतात. गाडीत चढताना मी म्हणते, ''अजिबात अभ्यास झाला नसताना गणिताच्या पेपरला निघाल्यासारखं वाटतंय.'' सगळे जण हसतात... मी सोडून!

पावणे अकराचा सुमार. 'सुखिया' अशी वळणदार अक्षरं असलेलं बैठं घर. ज्याच्या जाळीनं वेढलेल्या व्हरांड्याबाहेर मी उभी आहे. पाय किंचित कापताहेत. 'बिन बुलाए न जाए खुदाके यहाँ भी' या ब्रिदाची कास धरणारी मी सुखियाच्या दारी अनाहूतपणे उभी आहे. डोक्यात उलटसुलट विचारांची रीले रेस चालू आहे.

'मी केवळ एकदा भेटायला आले आहे. पाचच मिनिटं थांबेन. पूर्वी घरी कसं यायचं याचा आराखडा त्यांनी पाठवला होताच ना?'

'तो किती पूर्वी! आता कित्येत दिवसांत पत्रव्यवहारही नाही. तुला नावानं ओळखतील की नाही कोण जाणे!'

'नाही ओळखलं तर मी पत्रांची आठवण करून देईन. मेक्सिकोवरचं नवं पुस्तक आपल्या हातानं त्यांना देण्याची माझी इच्छा आहे. तेवढं केलं की माझं काम झालं. थोडीच जास्त थांबणार आहे मी?'

'पण एकदम रागावून बोलले तर? – त्यांना कुणीही भेटायला यायला नको आहे.'

'ती शक्यता आहेच. (कोकणस्थ माणूस!) मग दूम दबाके भागो, दुसरं काय!'

गल्ली क्रिकेटचा एक चुकार चेंडू अंगावर आपटून तंद्री मोडते. मी पुन्हा शोधते, पण जाळीच्या आसपास घंटीचं बटन कुठे सापडत नाही. मला नीटसं पाहताही येत नाही. नुसतीच जाळी दोनदा खडखडवते.

आतलं दार उघडं दिसतंय. पण अजून कसं कुणी येत नाही? बाहेर गेलेत की काय?

क्षणभर एकदम सुटल्यासारखं वाटतं. पण लगेच निराशही वाटतं. एवढं जमवून, धैर्य एकवटून आले आहे आणि आता दारातून परतावं लागणार. मागचं दार उघडं दिसतंय. तिकडून शिरकाव होतो का बघू का? वाघ म्हटलं तरी खाणार, वाघोबा म्हटलं तरी खाणार. पुढचं दार काय नि मागचं काय?

वळसा घालून मी पाठी जायच्या प्रयत्नात.

पुढचं दार उघडल्याचा आवाज.

''अहो काका, कुणीतरी बाई इथं होत्या. त्या मागच्या बाजूला गेल्यात पाहा.'' त्याच क्रिकेटवीराची मदत.

माझी उत्सुक पावलं परत वळतात. त्याहून उत्सुक डोळे दाराकडे धावतात.

गेल्या दोन-तीन वर्षांत मी मनात श्री.बा. कसे दिसत असतील, याची पुष्कळदा कल्पना केलेली होती. उंच, उभट, पातळ चेहरा, तीव्र नाक-डोळे, बारीक मिशांची रेख, काळे-पांढरे गच्च केस आणि चेहऱ्यावरच्या विद्वत्तेला असणारी त्रासिक किनार. सगळं चित्र एकदम तयार झालेलं नव्हतं, हळूहळू रंगत गेलं होतं. त्यात हल्ली नवे रंग चढले होते. सगळ्यांमध्ये बहुश्रुत विद्वत्ता अखंड.

यातलं विद्वत्तेचं गांभीर्य सोडून सगळंच चुकलं आहे. समोर लालवट गोरी, मध्यम मूर्ती. काळ्या फ्रेमचा चष्मा. जवळजवळ बंद डोळे, रुंद गोबरा मवाळ चेहरा. त्यावर गोंधळलेलं अर्धस्मित.

''कोण आपण? – या, आत या.''

मागे वळून परत जात ते म्हणतात.

निदान घरात बोलावलंय. तोंडावर दार बंद केलं नाही. एक लढाई जिंकली.

आत जाऊन मी नुसतीच त्यांच्याकडे पाहत उभी राहते. साधी खोली. मोजकं फर्निचर. पुस्तकांची सलग कपाटं. भोवतालाच्याबरोबर त्यांचा आवाज मनात नोंदवला जातो. एकविसाव्या शतकात असून फोनची सुविधा नसल्यानं साधं फोनवरून बोलणंही आजवर साधलेलं नसतं.

''लक्षात नाही आलं कोण ते.'' त्यांच्या चेहऱ्यावरचा गोंधळ आणखी वाढलेला.

''मी... मी मीना प्रभु. इथं बडोद्याला आले होते. पाचच मिनिटं भेटायची इच्छा होती म्हणून अचानक आले. क्षमा करा, आधी न कळवता आले.''

मी भडाभडा बोलून मोकळी होते. माझा बसका आवाज मलाही न ओळखू येणारा. फार न थांबण्याचा इरादा प्रथम स्पष्ट करते. मग मनापासून करावसा वाटला म्हणून, पटकन वाकून नमस्कारही करते.

त्यांच्या चेहऱ्यावरच्या गोंधळाची जागा आता आश्चर्यानं आणि आनंदानं घेतली आहे. मनापासूनचं हसू तोंडावर पसरतं. डोळे लुकलुकतात.

''तुम्ही मीना प्रभु? न पाहूनही तुम्हाला ओळखीनसं नक्की वाटायचं मला. पण ओळखलं नाही. आम्ही तुमची किती वाट पाहत होतो. येऊन भेटालसं वाटलं होतं. पण हल्ली तर पत्रंही आली नाहीत. मग वाटलं, आता येणार नाहीत. अहो, अशा उभ्या का? बसा ना. या इथं आरामात टेकून बसा. कशा आलात? घर कसं सापडलं?''

''रिक्षानं आले. रिक्षावाल्यानं हिंडवलं आसपास, पण अखेरीस सापडलं घर.''

साफ बनवून सांगत होते. कन्नलनी स्वतःचं नाव सांगू नका म्हणून बजावलेलं. हे 'गोरं असत्य' क्षम्य ठरावं. पण मन सैरभैर होतच राहतं.

''अहो, जरा आधी तरी यायचंत.'' आतून पदराला हात पुसत गोल, प्रेमळ चेहऱ्याच्या, ठेंगण्या, ठुसक्या बाई पुढे येतात. ''आत्ताच जेवणं आटोपली आमची. खरं तर उतरायलाच इकडे यायचंत. कुठे उतरला आहात तुम्ही?''

मी एकीकडे प्रश्नांची उत्तरं देते, एकीकडून आश्चर्यचकित होते आणि एकीकडून आनंदानं गदगदूनही येते. पटकन वाकून त्यांनाही एक नमस्कार घडतो. किती मोकळं, किती बरं वाटत होतं मला त्या घरात. या दोघांच्या सहवासात. खरंच यांनी कुणाला आणू नका म्हणून निरोप दिले असतील का? की हे केवळ माझंच सौभाग्य? पत्रांमधून कल्पिलेले चेहरे नसतील, पण मनं मात्र नेमकी तीच हाती आली आहेत. आम्हाला नकळत, क्षणभरात अगदी जवळ आली आहेत. किती बोलू नि किती नकोसं वाटतंय. जणू आज आम्ही पहिल्यांदा एकमेकांना पाहत नव्हतोच, पहिल्यांदा भेटत नव्हतोच. पहिल्यांदा एकमेकांशी बोलत नव्हतोच. ही गोष्ट उभा जन्म घडत आली आहे. घडत राहणार आहे.

पण मी हे अगत्य ताणावं का? आणखी थांबू का? की निघू आता?

''ही छोटीशी भेट,'' हातातल्या किरकोळ गोष्टी पुढे करत मी म्हणते. ''आणि हे माझं नवं पुस्तक. हेच देण्यासाठी मी आले आहे.''

''तुम्ही कशाला आणलंत? मी विकत घेणार होतो.''

मागे पत्रातून 'दक्षिणरंग' न पाठविण्याची अशीच आज्ञा झालेली होती.

''ते मला माहीत आहे, म्हणूनच घेऊन आले.''

पुस्तकावर नाव घालण्यासाठी पेन हाती घेते, पण नेमकं काय लिहावं सुचत नाही. किती वेडपट चुका करते लिहिण्यात. फार थोड्यांच्या हाती पुस्तक देताना इतकं भरून यायला होतं. माझ्या लिखाणाबद्दल इतका जिव्हाळा आणि जवळीक फार थोड्या जाणकारांच्या मनात आहे, या जाणिवेनं पुन्हा एकदा पायाशी विनम्र व्हावंसं वाटतं.

''हे पाहा, आता जेवूनच जा. घरात फारसं काही केलेलं नाही. पण चटकन पिठलं-भात टाकते. तो खायचा. आमची जेवणं नुकतीच आटोपलीत. नाहीतर बरंसं जेवायला मिळालं असतं.''

बिंबाताई काळजापासून आग्रह करतात. त्यांच्या गोऱ्या घवघवीत कपाळावरचं पावलीएवढं किरमिजी कुंकू पाहत मी मनातल्या मनात आवंढा गिळते. हकालपट्टीच्या जागी एवढी आपुलकी?

''मी रिक्षावाल्याला जायला सांगून येते.''

बाहेर थांबून राहिलेल्या कन्नलची मला सुटका करायची असते. गाडीशी क्षणमात्र थांबून मी झटकन परतते.

''टॅक्सी करून आला होता का?''

मी घरात आल्यावर श्री.बा. विचारतात. त्यांनी खिडकीतून मोटार बघितलेली असते.

एक खोटं झाकायला दहा खोटी जन्म घेतात. थाप निष्पाप असली तरी.

''हो. हॉटेलनं करून दिली होती.'' दामटून सांगताना मी आता शरमते. मघाशी रिक्षा म्हणाले होते ते त्यांच्या लक्षात असेल तर?

चटकन मी विषय बदलते.

आता नाना विषय येतात. प्रामुख्याने साहित्यातले. नाना भाषांतल्या उत्तम साहित्याचा, साहित्यिकांचा खल होतो. मराठीच्या थिटेपणावर एकमत होतं. प्रवासवर्णनं कशी असावीत?

''आपल्याकडे प्रवासाच्या अनुभवापेक्षा प्रवासातला लेखकच त्यात अधिक डोकावत असतो. लिहावं उमाप्रसाद मुखर्जीसारखं. वर्षानुवर्षं हिमालयात भ्रमंती करून त्याची रेघन्‌रेघ न्याहाळणारा. ती तळहातावरच्या रेषांइतकी ओळखणारा आणि गेलं पाव शतक त्यातून पाव शतक पुस्तकं लिहिणारा. भाषा कशी रेशमासारखी मृदू-झळझळीत. तिचं सामर्थ्य वाचताना जाणवतंच, पण त्यांच्या

वाणीतून स्रवताना हृदयात शिरतं. ऐकणाऱ्याच्या डोळ्यांवाटे झिरपतं. फक्त एकदाच ऐकलंय मी त्यांचं भाषण.''

अनेक बऱ्या-वाईट लेखकांची चर्चा. खूप मंथन होत आहे. जिवाचे कान करून ऐकावसं वाटतंय.

''बरं झालं तुम्ही एकट्या आलात. कशा मनसोक्त गप्पा मारता येत आहेत. दुसरं कुणी बरोबर आलं की ते नाही म्हटलं तरी वेगळंच.

दारावरच्या कठोर घंटेनं तंद्री भंगते.

''सहजच आलो होतो...''

कन्नल मला न्यायला आलेले असतात तरी तसं म्हणणार कसं? त्यांची मदतीची भावना मला कळते, पण निघावंसं वाटत नाही. जोशीद्वयाला मी जावंसं वाटत नाही.

गप्पा रूळ बदलतात. हास्यविनोद झडतात. खुलवून किस्से सांगितले जातात. श्री.बा. खदखदून हसत असतात. स्वत: भर घालतात. मागाहून कन्नल सांगतात, ''सर, आज किती दिवसांनी हसत-बोलत होते. गप्पांत रमले होते. आनंदात डुबले होते....''

पुढ्यात आलेलं फ्रुटसॅलड खाऊन कन्नल उठतात.

मी तिथंच.

''आता जेवायला चल हं. केव्हाचं पिठलं केलेलं गार होऊन गेलं पार.''

बिंबाताईंच्या बोलण्यातला औपचारिक 'अहो' कधीच गळाला आहे. तो गळतो, कारण तो त्या घरगुती जिव्हाळ्यात खड्यासाररखा टोचत आहे. डावं-उजवं वाढलेलं पान सजलेलं. दोन भाज्या, पिठलं, चपात्या, लोणीसाखर, भात, दही आणि काही काही. मी संकोच बाजूला सारून पोटभर जेवते. जेवताना ओल्या हातानं, नंतर सुकल्या हातानं गप्पा अखंड चालूच.

''मी काही कोणी विशेष लेखिका नाही. माझं लिखाणही उशिरा चालू झालेलं. तीन-चार पुस्तकं नशिबानं गाजली. आता आणखी लिहू की थांबू?'' — मी मनापासून विचारते.

''थांबायचं कशाला?'' — बिंबाताई पटकन म्हणतात.

''लिहीत राहा तू. छानच तर लिहितेस. लोकांना आवडतं आणि इतर कुणी काय म्हणेल त्याकडे कशाला लक्ष द्यायचं?''

''पण एकाच चाकोरीतलं लिहीत राहीनशी भीती वाटते.''

माझी खोल शंका डोकं वर काढते.

''आपण फार मोठी लेखिका नसल्याची जाणीव जोपर्यंत मनात जागी आहे, तोवर तुम्ही चांगलं लिहाल.'' श्री.बा. गंभीरपणे म्हणतात. ''तुमच्या अनुभवांमध्ये नावीन्य आहे. सरळ, साध्या भाषेत ते वाचकापर्यंत पोहोचवण्याची ताकद आहे. जितके नवे प्रदेश वाचकांना दाखवाल, तेवढे थोडे.''

''पण प्रवासवर्णन हा कादंबरीसारखा सर्जनशील साहित्यप्रकार नाही.''

''मग काय बिघडलं? — एक तर सर्जनशीलतेची अशी प्रतवारी नाही. तुम्हीही सच्चे अनुभव सच्चेपणानं पुढे मांडून जीवनाचं दर्शन घडवता. उत्तम कादंबरी तेच करते. त्यात कमीपणा नाही. पुढेमागे लिहावीशी वाटली तर कादंबरी जरूर लिहा. पण आता जमलेली भट्टी मोडू नका. हातचं लेखन सोडू नका.''

मला पाहिजे होतं ते खरंखरं उत्तर मिळतं. त्याबरोबर ''आगे बढो''चं आश्वासनही.

अडीच वाजून गेलेले. पाच मिनिटांसाठी टपकलेली मी. तीन तास उलटलेले. ते दोघं थकले असतील.

''झोपायचं असेल ना तुम्हाला?'' मी थोडं संकोचत म्हणते.

''मी झोपत नाही दुपारचा. तुम्ही आलात, एकट्या आलात, खूप बरं वाटलं.''

''मी इथेच जरा लवंडते, तू बोल.'' बिंबाताईंचं उत्तेजन.

मग गप्पांना अंत कुठला. त्या घरगुती विषयावर वळतात. जड साहित्यचर्चा मागे पडते.

''पाहुणे या विषयावर मी एक पुस्तक लिहीन. आम्ही इतकी वर्षं कलकत्त्याला होतो ना. काय काय अनुभव आलेत म्हणून सांगू या प्राण्याचे.''

लंडनला गेली पस्तीस वर्षं मीही या तापातून जात असते. आम्हा तिघांचे किती अनुभव किती सारखे!

''एक पाहुणे आमच्याकडे दरवर्षी यायचे. मुक्काम ठोकून असायचे,'' श्री.बा. सांगत असतात. ''कलकत्त्याला असल्यानं आम्ही बंगाली मिठाई नेहमी खात असू. पण आंबाबर्फी, बुंदीचे लाडू अशा खास मराठी मिठाईची आठवण मला खूप येते, असं मी त्यांना म्हणालो. आजवर कधी कुणी तसली भेट आणायचे कष्ट घेतलेले नव्हते.

''दुसऱ्या दिवशी सकाळी चहा करायला लवकर उठलो तर स्वयंपाकघरात मुंग्यांची रांग. तिचा उगम पाहुण्यांच्या होल्डॉलमधून. मी त्यांना तो दाखवल्यावर त्यांचा चेहरा कसासा झाला. त्यांनी होल्डॉल उघडला. त्यात लाडूंनी भरलेला भला मोठा डबा. त्यालाच मुंग्या लागलेल्या. तो उघडून त्या सद्गृहस्थांनी लाजेकाजेस्तव चार लाडू काढून हिच्याकडे दिले.''

''पुढचे चार दिवस मी ते त्यांच्याच पानात वाढून टाकले...'' बिंबाताई सूत्रपूर्ती करतात. ''त्यांचे लाडू खावेसे वाटत नव्हतं. आम्ही उष्टावलेही नाहीत, पण ते लक्षात येऊनही त्याचं त्यांना काही वाटलं नाही.''

''ते असो. वर्षा आणि राहुलचं कसं चाललंय? कुठे असतात दोघे जण? त्यांची लग्नाची पत्रिका खूप आवडली होती आम्हांला. कितीतरी दिवस इथं समोरच ठेवली होती. त्यानंतर तुम्ही यालसं खूप वाटलं होतं. एकदा येणार असंही कळलं होतं. पण ते रद्द झाल्याचं समजलं. सगळे जण एकदम येण्यापेक्षा तुम्ही एकट्या यायला हव्या होत्या आम्हांला. ते आज जुळलं. फार बरं वाटलं.''

येरझारांनी दमलेल्या बिंबाताई बैठक मारतात. पाय पुढे पसरून ते हातांनी दाबतात. खूप श्रमवलेलं दिसतंय मी आज. आले त्याचा त्रास झाला असणार. नको होतं का यायला?

अशाच संकोचानं पुण्यात राहत असून माझी गदिमांची भेट झाली नाही. त्याची हळहळ मला कायम लागलेली आहे. नेमकी हीच हळहळ श्री.बां.च्या मनालाही आहे. एकदा ठरवून सवरून खास त्यासाठी पुण्याची वारी करूनही गदिमा-योग आला नव्हता. तो किस्सा ते साद्यंत सांगतात. दोघांच्या कुंडल्या इथंही जुळल्या आहेत.

चार वाजतात. 'थांब अजून' चालूच राहतं. पुन्हा सरबत, मेथी लाडू, हलवासनची गोडी जिभेवर चढते. गप्पांची गाडी भरधाव धावतच असते. घड्याळाचे काटे तिच्याहून पुढे. पाचला एक व्याख्यान आहे. साडेचारला निघावंच लागतं.

बिंबाताईंच्या हाती हळद-कुंकवाचा करंडा, कपडा, खाकऱ्याचं पाकीट, तिळगूळ, राजगिऱ्याची चिक्की, चवळीचे उंडे – एक ना दोन. अनेक गोष्टींनी माझी ओटी भरते.

''हे मी तुला वर्षाच्या लग्नानंतर द्यायचं ठरवलं होतं. ते आत्ता द्यायचा योग येतोय. घे. सुपारी वगैरे काहीतरी ठेव त्यात.'' माझ्या नकाराला बाजूला सारत, चांदीची वाटी हातात देत बिंबाताई म्हणतात, ''पुन्हा ये ग लवकर.''

मी त्यांना गळामिठी घालते. म्हणते, ''नक्की येईन. पण नको असलेले इतके पाहुणे आले लंडनला. हवे असलेले दोन यावेतसं फार वाटतं मला. याल का?'' निमंत्रण वरवरचं नसतं. मनापासूनचं असतं. स्वीकारतील का? – मी अवघडत निरोप घेते.

''हिला रिक्षापर्यंत पोहोचवून या.''

बिंबाताईंच्या सूचनेची गरज नसते. श्री.बां.नी आधीच उन्हाची पांढरी हॅट डोक्यावर चढवलेली आहे.

''ऊन फार भाजतंय. डोक्यावरून पदर घ्या.''

मायेनं भरलेली सूचना. दहा मिनिटं चालत गल्लीच्या तोंडापर्यंत येणं. रिक्षावाल्याला नीट पोहोचवण्याबद्दल परत परत बजावणं, अगत्यानं ''पुन्हा या'' म्हणणं. कडक उन्हात एकट्यानं परत फिरणं.

रिक्षा निघाल्यावर माझा बांध फुटतो. उडणारे केस सावरत गळणारे डोळे पुसते. अनेक वर्षांपूर्वी माहेरचा निरोप घेऊन लंडनला निघत्यावेळची आठवण उफाळून येते. तोच जिव्हाळा पुन्हा भेटलेला असतो.

छाती धडधडत पाच मिनिटांसाठी उंबरा चढलेली मी, पाच तासांनंतर सुखिया होऊन उतरले होते. सकाळच्या गणिताच्या पेपरात पैकीच्या पैकी मार्क मिळाले होते मला.

*(मे २००२)*

---

## कवितालेखन : आपलेच कापलेले पंख

मी कवितालेखन सुरू केले, तेव्हा मी आय.आय.टी.च्या वसतिगृहात राहत होतो. लिहिलेल्या कविता मी एका मित्राला वाचायला देत असे. *मला एकदा, पंख फुटले होते* ही कविता वाचून तो म्हणाला, ''ही कविता वेगळी आहे.'' तीच माझी प्रकाशित झालेली पहिली कविता. *होड्या* या पहिल्या कवितासंग्रहातील प्रारंभकविता. 'होड्या'च्या प्रस्तावनेत या कवितेविषयी प्रा. विजया राजाध्यक्ष म्हणतात, ''कवीचे अवघे अनुभवक्षेत्र, त्याची आविष्कारशैली, काव्यदृष्टी यांचे जवळ जवळ संपूर्ण एकसंध प्रतिबिंब या कवितेत आहे.'' तेव्हा या कवितेतून कोणती शैली, कोणती काव्यदृष्टी दृष्टीस पडते ते पाहू.

*मला एकदा पंख फुटले होते*
*फुलपाखरासारखे*
*पण ते कुणाला कळलेही नाही*
*मग मी ते पंख कापून टाकले*
*बारीक बारीक तुकडे करून*
*हळूच वाऱ्यावर सोडून दिले*
*पण तेही कुणाला कळले नाही.*

कवितेची भाषा साधी – आपण नेहमी बोलताना वापरावी तशी आहे. कवितेत काही घडते आहे. पण घडते ते साधे नाही. निवेदकाला (एकदा) पंख फुटणे व तेही फुलपाखरासारखे ही फॅण्टसी – हे अद्भुत आहे. त्यामुळे त्याची प्रतिमा होते. पंख कसे फुटतात ते निवेदक सांगत नाही. 'ते कुणाला कळलेही नाही' एवढेच सांगतो. त्यानंतर मात्र निवेदक जे करतो ते किंचित विस्ताराने सांगितले आहे. त्याचे दृश्यरूप साकारलेले आहे. जणू काही त्याकडे निवेदकाला लक्ष वेधायचे आहे. इथवर निवेदकाला त्याबद्दल काय वाटते आहे ते कुठेच सांगितले गेले नाही. मग शेवटची ओळ येते –

*पण तेही कुणाला कळले नाही.*

ही ओळ, निवेदकाला आपल्याला फुटलेले पंख कुणाला कळावेत असे वाटत होते, किंबहुना त्याचे पंख कापणेही त्यासाठीच असावे हे सुचवते आणि ज्यांना कळते त्यांना निवेदकाचे दुःख प्रतीत होते. आपल्याला कधी तरी फुटलेल्या आणि कापलेल्या पंखांची आठवण करून देते.

कवितालेखन हेदेखील आपलेच कापलेले पंख हळूच कागदावर सोडून देणे असते. ते कुणाला तरी कळावे ही असोशीही असते. साधी भाषा, फॅण्टसी, घटना सांगणे, त्यांच्या दृष्यरूपावर भर देणे, त्यांचे प्रतिमा होत जाणे, निवेदकाने आपल्या भावना व्यक्त न करणे पण कवितेने त्या सुचवणे – हे सारे माझ्या कवितेत टिकून राहिले आहे.

या कवितेत घटना सांगितल्या आहेत. कधी कधी त्यांची गोष्टच होऊन जाते.

*(अगा कवींनो... या लेखमालेतील समारोपाच्या लेखातून, अंतर्नाद, जून २०११)*

**हेमंत गोविंद जोगळेकर**

# माझी कविता आणि मी

**इंद्रजित भालेराव**

मनकविता या २००३ आणि २००४ सालांतील एका सदरात फ. मुं. शिंदे, दासू वैद्य, सुहासिनी इर्लेकर, विजया जहागीरदार, वसंत आबाजी डहाके, लक्ष्मीकांत तांबोळी, इंद्रजित भालेराव, ना. धों. महानोर, हेमकिरण पत्की, पुरुषोत्तम पाटील, महेश केळुसकर, नीरजा, गोविंद कुलकर्णी, अरुण म्हात्रे, सतीश सोळांकुरकर, अरुणा ढेरे व हेमंत गोविंद जोगळेकर या प्रख्यात कवींनी लेखन केले. आपला अल्पपरिचय, कवितेविषयीची एकूण भूमिका, एखादी अप्रकाशित कविता आणि त्याचबरोबर दुसऱ्या एखाद्या अल्पपरिचित कवीचाही परिचय असे या सदराचे स्वरूप होते. त्या सदराची ही एक झलक.

कशासाठी लिहितो मी कविता? या प्रश्नाची उत्तरं अनेक आहेत. परंतु मला सर्वाधिक विश्वसनीय वाटणारं उत्तर आहे, आयुष्यातले सर्व प्रकारचे अभाव भरून काढण्याचं काम कविता करते, म्हणून मी कविता लिहितो. कवितेनं मला आनंद दिला, कवितेनं मला आत्मभान दिलं, कवितेनं मला विश्वास दिला, कवितेनं मला सन्मान दिला, कवितेनं मला पैसा दिला, कवितेनं मला हिंमत दिली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कवितेनं माझा जन्म सार्थकी लावला. यातलं काहीच कवितेकडून मी अपेक्षित केलेलं नव्हतं. कवितेनं मला दिलेला गोतावळा तर एवढा मोठा आहे की त्याची मी स्वतःच कल्पना करू शकत नाही.

बऱ्याचदा लोकांना उत्सुकता असते की काय पार्श्वभूमी आहे कवीची? कोणत्या परिस्थितीत कवीनं कविता लिहायला सुरुवात केली? मी माझ्यासंबंधी अशाच स्वरूपाचा विचार केला तेव्हा लक्षात आलं –

*वटकन लावून ताटातली भाजी गोळा करावी*
*तर तितक्यात हातातली भाकरच सरावी*
*रात्री अंगाची आग होऊन उठावं*
*तर तितक्यात नाकातल्या घोळण्यानं फुटावं*
*अरे आपलं बालपण काय बालपण होतं?*
*ते तर मुलखाचं बकालपण होतं*
*पण बाप सांगायचा गोष्टी अन् माय म्हणायची गाणी*
*मग भूक भागवायचं फक्त काळं पाणी*

*गोष्टीची भाकर गाण्याची भाजी*
*घरभर होती तुडुंब ताजी*
*माय म्हणायची जात्याला, आयुष्य लाभतं गात्याला*

*काळी काळी रात बाई गोरी गोरी होते*
*गोष्टीच्या नादानं सूर्य वरी वरी येते*
*दाण्याच्या जोडीनं होतो जिवाचा रगडा*
*गाण्याच्या ओढीनं तुला ओढीते दगडा*

अवती-भवती जात्यावर गायलेल्या ओव्या याच मी आयुष्यात ऐकलेल्या पहिल्या-वहिल्या कविता. त्यांचा संस्कार आणि ठसा इतका पक्का आहे की, मला जात्यावरच्या ओव्याच खऱ्या कविता वाटतात. पुस्तकी कविता वाचताना मला सतत ओव्या आठवत जातात आणि तुलना केली की एकेक ओवी लाख मोलाची वाट जाते. मला पडलेल्या प्रत्येक वाङ्मयीन प्रश्नाचं उत्तरदेखील मला ओवीतच सापडलं आहे. जसं की वरील कवितेच्या शेवटी दिलेल्या आईच्या ओवीत तिनं आपण ओव्या कशासाठी म्हणतो, तर आयुष्याचं जड दगडी जातं ओढायला सोपं जावं म्हणून, हे दिलेलं उत्तर कलावादी-जीवनवादी हे सगळे वाद निकाली काढणारं आहे. म्हणून मला नेहमी वाटत आलेलं आहे की, पुरुषानं स्वतःतली अर्धनारी जगवल्याशिवाय त्याला कविता लिहिता येत नाही.

*माईचा सोडून ज्यानं*
*भलतिचाच धरला पदर*
*अशांची कवितेनं*
*कधीच केली नाही कदर*

*ज्याला कधी बहिणीचा*
*मुऱ्हाळी नाही होता आलं*
*कवितेला त्यांच्यासाठी*
*गोड गुऱ्हाळी नाही होता आलं*

*पोटची पोर नांदायला जाताना*
*ज्याचा आसू ढळत नाही*
*अशांच्या तर मरणदारीही*
*कविता कधी वळत नाही*

*अशा पुरुषापासूनच इतिहासात*
*कवितेला कायम भीती राहिली होती*
*म्हणून फक्त जात्याभोवतीच*
*कविता जिती राहिली होती*

मी शेतकऱ्यांच्या जगण्यावर कविता लिहिल्या, राबण्यावर कविता लिहिल्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कविता लिहिल्या. हे जगणं, हे राबणं, हे प्रश्न आज माझे आहेत का? नाही. मी ते सगळं ओलांडून आलोय. या प्रश्नांनी पेटलेल्या घरातून मी बाहेर



| | | |
|---|---|---|
| *जन्म* | : | ५.२.१९६२ |
| *शिक्षण* | : | एम.ए., एम.फिल. (मराठी), डॉ. आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद. |
| *नोकरी* | : | ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी. |
| *पुस्तके* | : | १) पीकपाणी (कवितासंग्रह) १९८९<br>२) आम्ही काबाडाचे धनी (दीर्घ कविता) १९९२<br>३) दूर राहिला गाव (कवितासंग्रह) १९९४<br>४) गाई घरा आल्या (ललित) १९९७<br>५) ळळा (ललित) २०००<br>६) भिंगुळवाणा (कादंबरी) १९९६ |

पडलोय. परंतु माझे आप्त त्या आगीतच अडकलेत आणि माझा आत्मा त्यांच्यात अडकलाय.

*शेत माझी पिढी । शेत माझा वंश ।*
*रक्तामध्ये अंश । मातीचाच ॥*

*अशा शेतामधी । पेटला वणवा ।*
*पाण्याची वानवा । आधीचीच ॥*

*म्हणून पळालो । शेतातून धुमाट ।*
*नोकरीशी गाठ । बांधली मी ॥*

*डोळ्याने पाहतो । जळणारे शेत ।*
*मनातला हेत । मनातच ॥*

मला खरोखरच शेतात राबायचं होतं. मातीशी एकरूप व्हायचं होतं. पण ते होणं नव्हतं. तेच मी कवितेतून करत आहे. म्हणून शेतशिवारांचे संदर्भ फक्त प्रतिमांपुरते माझ्या कवितेत येत नाहीत, तर प्रत्यक्ष कवितेचा विषय होऊनच येतात.

*कवितांना सजवणाऱ्या प्रतिमांपुरता*
*मी केला नाही फक्त तुझा वापर*
*दिलीच असतीस रोटी*
*घुमनं घेऊन बसलो असतो तर*

*कुठल्या ऊर्मीनं कुणास ठाऊक*
*मी वेगळी व्यवस्था केली*
*अनवाणी कुरवाळता न आलेली*
*ढेकळं आता स्वप्नात येतात*
*स्वप्नातच त्यावर हळदकुंकू वाहतो*

कशी असावी कवितेची भाषा? हा मोठा गहन प्रश्न आहे. प्रत्येक कविता लिहिताना या प्रश्नानं मला सतावलं आहे. थोडा प्रयत्न केला तर कविता गहन, गूढ आणि अवघड करता येते. थोर कवी म्हणून मिरवायला ही सोपी गोष्ट आहे. परंतु मला नेहमीच वाटत आलेलं आहे की, कवितेनं सामान्य माणसाची नाळ न तोडता स्वत:ला आखीव-रेखीव शिल्प बनवावं. आपल्या प्रतिभेचा उपयोग कुणाला हुलकावण्या देण्यासाठी, फसवण्यासाठी, स्वत:चं श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी करणं, हा मला प्रतिभेचा अपमान वाटतो. ज्ञानेश्वर, तुकारामांनी असं कधी केलं नाही. करंदीकर, चित्रे, सुर्वे असं कधी करत नाहीत. अशी वाङ्मयीन बुवाबाजी करणारे लोक मला भोंदू वाटतात.

तरी कवितेचं शिल्प घोटीव असावं हे तर खरंच. या शिल्पासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे भाषा हा महत्त्वाचा घटक आहे. प्रमाणभाषेत चांगली कविता लिहिता येईल यावर माझा विश्वास नाही. कवितेची भाषा हा आजचा सगळ्यात मोठा कळीचा प्रश्न आहे.

*मास्तर मास्तर तिरकोंबडा*
*म्हणत कवितेची भाषा घेऊन*
*पोरं रानावनात पळून गेली*

*पडक्या भिंतीच्या मालातच*
*नवी भिंत बांधावी तशी*
*मास्तरांनी धरून आणलेल्या*
*पोरांना शिकवलेली भाषा*

*सामोरं गेल्याशिवाय*
*रानावनातल्या पोरासोरांना*
*कवितेवरचा रुसवा*
*नाही सोडणार पाठमोरी भाषा*

सुरुवातीच्या काळात व्यासपीठावरून जाहीर कवितावाचन करण्याच्या मी विरोधात होतो. माझं पहिलं पुस्तक प्रकाशित होऊन आणि गाजूनही तीन वर्षं उलटली, तरी मी जाहीर कवितावाचन फारसा करीत नसे. परंतु १९९३ साली सातारा इथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात शंकर सारडा यांनी मला कवितावाचनासाठी प्रथमच आणि आग्रहाने उभं केलं. भीतभीतच मी 'जल्म' नावाची माझी कविता म्हटली. उपस्थित पंधरा हजार रसिकांनी ती इतकी डोक्यावर घेतली की, मला ती कविता पुन्हा म्हणावी लागली. माझ्यासाठी हा पहिलाच अनुभव थरारक राहिला. राम गोसावी यांच्यासारख्या अंध कवीने 'आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग' अशी या प्रसंगाची नोंद करून ठेवली.

याआधी संमेलनातून गाजायच्या त्या शृंगारिक किंवा व्यंग कविता. परंतु या संमेलनापासून यात बदल झाला आणि व्यासपीठावरून आत्मविश्वासाने गंभीर कविताही सादर होऊ लागल्या. सातारा, परभणी आणि अहमदनगर इथे झालेल्या अ.

थोडा प्रयत्न केला तर कविता गहन, गूढ आणि अवघड करता येते. थोर कवी म्हणून मिरवायला ही सोपी गोष्ट आहे. परंतु मला नेहमीच वाटत आलेलं आहे की, कवितेनं सामान्य माणसाची नाळ न तोडता स्वत:ला आखीव-रेखीव शिल्प बनवावं.

भा. मराठी साहित्य संमेलनातल्या मुख्य कविसंमेलनाचं मी सूत्रसंचालन केलं. परभणी संमेलनात तर आम्ही त्याआधी अ. भा.च्या व्यासपीठावर फारशा न आलेल्या डहाके, काळसेकर, गणोरकर यांनाही बोलावलं आणि सूत्रसंचलन नीट केलं तर गंभीर कविताही लोक किती उत्कट दाद देऊन ऐकतात, ते दाखवून दिलं.

साताऱ्यानंतर मला सतत कवितावाचन करावं लागलं आणि कविता लोकांपर्यंत पोचवण्याचं एक साधन म्हणून मीही ते गंभीरपणे करू लागलो. त्याचा परिणाम म्हणजे माझ्या कवितासंग्रहाच्या चार-चार, पाच-पाच आवृत्त्या प्रकाशित झाल्या. शिवाय त्यातून पैसाही खूप उभा करता येतो, हे लक्षात आल्यावर गेल्या दिवाळीपासून एका संस्थेला पन्नास हजाराची आणि तीन नियतकालिकांना (साक्षात्, कवितारती, पंचधारा) प्रत्येकी अकरा हजाराची मदत मी करू शकलो. आपल्या मनाविरुद्ध कराव्या लागणाऱ्या कामाचा असाही उपयोग करता येतो.

माझी एक अप्रकाशित कविता पुढे देत आहे.

*जसा कावुसाच्या पोटी*
*कधी जन्मा यावा वूस*
*दृष्ट्या पुत्रा उसवते*
*तशी नतद्रष्ट कूस*

*कधी दुबळी असते*
*बळीवंताची बहीण*
*कुळवंतापोटी कन्या*
*कधी जन्म घेते हीन*

*शेप वाकडी तरीही*
*तोल सावरते नीट*
*काणी होवून जन्मते*
*कधी दाण्यातले पीठ*

*नर मारीतो नराला*
*नाही कळत येड्याला*
*मादी आयुष्य मागते*
*हातामधल्या चुड्याला*

आता मला भावणाऱ्या एका नव्या कवीबद्दल. जो या सदराचा एक भाग आहे. बालाजी इंगळे हा उस्मानाबाद जिल्ह्यातल्या उमरग्यासारख्या आडबाजूच्या गावात राहणारा एक नवकवी आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अनुदानातून नुकताच त्याचा 'मातरं' हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. त्याची एक मला आवडणारी कविता पुढं देत आहे. जनावरासोबत राबणाऱ्या शेतकऱ्याला आपण बायकोशी चांगला व्यवहार केला नाही याची जाणीव होते, तेव्हा त्याची कृती कोणतं वळण घेते, ते फार सूचकपणे त्यानं या कवितेत मांडलं आहे. आज खेड्यापाड्यांतून खूप मुलं अशा ताकदीच्या कविता लिहीत आहेत.

खेड्यापाड्यांतून लिहिणाऱ्या पोरांवर वाङ्मयीन संस्कार कसे करायचे, हा एक प्रश्नच आहे. आपल्या महत्त्वाकांक्षेच्या बळावर ही मुलं दूरपर्यंत, योग्य मार्गदर्शकापर्यंत पोचली आणि चांगली वाङ्मयीन संस्कृती त्यांना पाहायला मिळाली तर बरं, नाहीतर ही मुलं प्राप्त परिस्थितीचा बळी होऊन खुरटण्याची शक्यता जास्त असते आणि चुकीचं अन्नद्रव्य मिळालं तर वाईट अर्थानं फोफावत जाण्याची शक्यताही असतेच. खुरटण्यापासून आणि फोफावण्यापासून स्वत:ला वाचवू पाहणाऱ्यांचा बालाजी इंगळे हा प्रतिनिधी आहे. सुंदर प्रतिमेसह सुंदर कविता आणि प्रतिमेशिवायही सुंदर कविता ही या कवीची ताकद आहे. त्यांची ही एक कविता –

*पेरता पेरता चाड्याची दोरी तुटली*
*आणि जागच्या जागीच ती थांबली*

*धनी तसाच कुळव घेऊन पुढी*
*ती चाडं धरून तशीच जाग्यावर उभी*

*तशीच उभी तिनं आवाजच दिला नाही*
*मुरडण घेताना कळालं ती मागं नाही*

*जीवनाच्या वाटेवर सोबत घेतलं नाही कधी*
*मागं मागं चालली थांबा म्हटलं नाही कधी*

*जीवनाचीही होईल तातातूट असं वाटलं त्याला*
*अन् कुळव सोडून तो निर्धारानं तिच्याकडे निघाला*

*(जुलै २००३)*

# मुकी संभाषणे, बोलकी नाती

**आशुतोष शेवाळकर**

''काही दिवसांपूर्वी हॉलमध्ये असाच बसलो असताना हलणारे मासे पाहून, 'अरे, इथे काहीतरी जिवंत अस्तित्व आपल्या बाजूला, आपल्या सोबतीला आहे,' अशी काहीतरी जाणीव आत लकाकून गेली व तेव्हाच या जिवंतपणाची ही गमावलेली संवेदनशीलता पुन्हा जाणवली.''

– माणसांइतकेच जिवाभावाचे नाते मुक्या प्राण्यांशीही कसे जोडता येते हे सांगणारा लेख.

वणीला अगदी गावाबाहेर जिनींग फॅक्टरीच्या एका मोठ्या आवाराला लागून असलेल्या घरात माझं लहानपण गेलं.

गावाबाहेर, आजूबाजूला जिनाचं मोठ्ठं आवार. कापसाचा सीझन संपला की तेसुद्धा पूर्ण रिकामं व निर्मनुष्यही. आजूबाजूला नेमकी मोजकी तीन-चारच घरं, असा तो परिसर होता. माणसांपेक्षा प्राण्यांचाच वावर कदाचित त्या काळात माझ्या अवतीभवती जास्त असावा.

साप, नाग, विंचू, इंगळ्या या भीतिदायक प्राण्यांच्या जोडीनेच पोपट, भारद्वाज, सुतार व इतर विविध पक्षी, रेशमी किडे, सोनपाखरं, कुत्रे, मांजरी, चिमण्या, खारी या सगळ्यांचाच या परिसरात मुक्त वावर असायचा. पावसाळ्यात विविध आकाराचे, आवाजाचे, जातींचे किडे व भुंगेही खूप यायचे. घराच्या चारही बाजूंना पाणी साचलेल्या लहान-मोठ्या डबक्यांतून 'डराँव डराँव' असा रात्रभर चाललेला बेडकांचा आवाज हे पावसाळ्याच्या रात्रीचं हमखास पार्श्वसंगीत असे.

या बेडकांच्या मागे म्हणून पावसाळ्यात जास्ती, पण तसा बाराही महिने या आवारात सापांचाही सुळसुळाट असायचा.

उन्हाळ्यात एका रात्री आम्ही असेच बाहेर झोपलो होतो. आरामखुर्चीत बाबा वाचत बसले होते. आई घरापासून थोड्या दूर अंतरावर असलेल्या संडासात गेली. आत शिरून, दार लावून, दिवा लावताच तिला एका कोपऱ्यात एक मोठा डोम्या नाग असल्याचं दिसलं. तोही भेदरून दाराताच आडवा झाला. तीन बाय चारच्या संडासात दार बंद व दारात आडवा नाग. ही ओरडायला लागली. हिचं ओरडणं व भेदरणं पाहून तोही घाबरून फणा काढून फुत्कारायला लागला. तोही भेदरलेला व त्यालाही कुठे जाता येणं शक्य नव्हतं. आईने अर्धा तास जिवाच्या आकांताने ओरडूनही बाबांना काही हाक ऐकू गेली नाही. एक तर लहानपणाच्या आजारामुळे त्यांचे कान थोडे अधू व वाचनात मग्न असले, की तसंही त्यांना जगाचं कुठलंच भान राहत नाही.

हिचा आवाज ऐकून बाजूच्या नगरवालांचा अल्सेशियन कुत्रा 'टिपू' मात्र संडासाकडे जायला निघाला. तिथे पोचून नखांनी दारावर ओरखडू लागला. आई आणखीनच घाबरली. कारण नाग आता तिथून हलला तर अंगावरच यायचा. पण सुदैवाने नागाची प्रतिक्रिया सावधतेची झाली. अंग आखडून, फणा मागे फिरवून तो बाहेरची चाहूल घेऊ लागला. यामुळे अर्धं दार मोकळं झालं. आईनं मग जिवाची हिंमत करून, साडी वर खोचून, कडी उघडून, अर्धंच दार उघडून बाहेर उडी मारली.

नगरवालांच्या भाऊराव नोकराने नंतर तो नाग मारला, तेव्हा म्हणाला की, ''बाई, चावला असता तर दहा मिनिटंसुद्धा दिली नसती, इतका हा विषारी आहे.''

असाच एके काळी याच संडासाच्या छतात टिन व बल्ली यांच्यामधील फटीत एक साप दोन दिवस होता. काही केल्या तिथून हलतच नव्हता. त्या दोन दिवसांत आम्ही दोन मिनिटांत संडासला जाऊन यायचो, पण तेव्हाही बाबा मात्र वाचायला नेलेलं पूर्ण करूनच, अर्ध्या तासानेच परत यायचे.

एकदा पावसाळ्याच्या दिवसांत बाबा दौऱ्यावर असल्याने मी व आईच घरी होतो. मी अभ्यास करता करता लघवी लागली म्हणून बाहेर गेलो, 'दुश्मन दुश्मन, जो दोस्तों से प्यारा है...', असं काहीतरी गाणं म्हणत. मी लघवी करणार इतक्यात खाली पाहिलं, तर एक नाग फणा काढून अगदी माझ्यासमोर एका बेडकावर लक्ष केंद्रित करून होता. दोनच सेकंदानी मला लघवी झाली असती तर ती बरोबर त्याच्या फण्यावरच पडली असती. पूर्ण ध्यान बेडकावर असल्याने त्याचंही माझ्याकडे लक्षच नव्हतं. लगेच परत पावली मी धूम ठोकली. त्या माझ्या धांदलीने त्याचंही ध्यान भंगलं व तो माझ्या मागे मागे यायला लागला. मी व आई दाराबाजूच्या खिडकीतून त्याला हाकलायचा प्रयत्न करत होतो व तो जिथे फट सापडेल, तिथून आत यायचा प्रयत्न करायचा. कसाबसा त्याला बाहेर घालवला.

एकदा तर श्रावण महिन्यातल्या एका मुसळधार पावसाच्या दिवशी आमच्या मधल्या खोलीतल्या मागच्या खिडकीबाहेर लागूनच एका सापाने एका बेडकाला गिळलं. इंचाइंचानी त्याच्या शरीरात आत आत सरकत जाणारा बेडूक आम्ही जवळपास तासभर पाहत होतो.

आमच्या झोपायच्या खोलीत खिडकीमागे तारेच्या कुंपणाबाहेर एका मोठ्या काटेरी झुडपाखालच्या बिळात एक सात-आठ फुटी धामण जवळपास महिनाभर वास्तव्याला होती. कधी तोंडाजवळचा दोन-तीन फूट भाग बाहेर काढून ऊन खात बसलेली, कधी बिळात हळूहळू शिरताना, तर कधी बाहेर येताना तिला पाहणं हा माझा त्या दिवसांतला खेळच झाला होता. शाळेत जाताना तिला पाहून जाणं, शाळेतून आल्याबरोबर ती आली आहे का, बिळाबाहेर निघते आहे का पाहणं, असं तेव्हा चालायचं. एकदा फिरायला बाहेर निघाल्यावर नेहमीच्या मार्गाने न जाता तिनं आमच्या बगीच्याच्या कुंपणाकडे मोर्चा वळवला. तेव्हा ओरडून, पाय आपटून तिला तिच्या इराद्यापासून परावृत्त करून, परतपावली फिरायला लावण्यात माझी व आईची दमछाक झाली. त्या दिवशीच्या आमच्या तशा वागण्याने अपमानित होऊन, तिनं तिचं ते राहतं घर जे सोडलं ते कायमचं.

समोरच्या गोडाऊनच्या उंच कैच्यावरून फिरणाऱ्या, अगदी नेहमी हमखास दिसणाऱ्या अशाच आठ-दहा फुटी धामणी, एकदा दोन तासापर्यंत चाललेला साप-सर्पिणीचा लाग, अशा अनेक गोष्टी तेव्हा पाहायला मिळाल्या.

विंचू व त्याहीपेक्षा काळ्याभोर इंगळ्याही तिथं खूप, अगदी जिथे तिथे निघायच्या. संडासाच्या कडीवर विंचू व कडी उघडल्याबरोबर टुणकन उडी मारून आपल्या हातावर. एकदा तर माझ्या मावसबहिणीला पाळण्यात ठेवायला गेलो, तर पाळण्यातल्या गादीवर पंजाभर मोठी काळीशार इंगळी!... असे अनेक प्रसंग तेव्हा आलेत.

पावसाळा सुरू झाला, की आम्ही मित्र शिकारीला बाहेर पडावं, तसे इंगळ्या पकडायला बाहेर पडायचो. बांबूच्या कमचीला दोरा बांधून त्याच्या टोकाला फास करायचो व जिनात कापसाच्या गंजीसाठी अंथरून ठेवलेल्या मोठ्या गोल गोट्यांपैकी एक एक उचलत जायचो; कुठे ना कुठे खाली इंगळी दिसायची. मग तिच्यासमोर काठी ठोकायची, म्हणजे ती आक्रमक होऊन नांगी वर उचलत असे. तिने तसं केलं, की हलकेच फास तिच्या नांगीत अडकवून कमची वर उचलायची म्हणजे ती फासात अडकत असे. मग अशी जिवंत इंगळी झाडाला त्याच दोराने लटकवून ठेवायची व तिच्याशी खेळायचं. कधी तिची नांगी तुटून ती खाली पडली तर सगळ्यांनी धूम ठोकायची. असे खेळ तेव्हा चालायचे.

हे घर सोडल्यावर मात्र सापांशी माझा संबंध सुटला. नागपूरसारख्या शहरात आल्यावर तर गारुड्यांकडचे कचकडी पाळीव साप बघण्याचंच नशिबात आलं. कधीमधी रात्रीच्या ड्रायव्हिंगमध्ये रस्त्यावर येऊ पाहणारं, तर कधी गावी नदीवर पोहायला गेल्यावर काठावर दिसणारं असं दुर्मीळ सर्पदर्शनच मग आयुष्यात आलं. एका नागपंचमीला बत्तीस शिराळ्यात गेलो होतो. तेव्हा मात्र पोट भरून व तेही तेजस्वी, चपळ साप व नाग पाहायला मिळाले.

कल्याणेश्वर शिवमंदिराची जागा विकत घेतल्यावर तिथे ठाण मांडून मंदिराला चरस, गांजावाल्या साधूंचा अड्डा करून बसलेल्या पुजाऱ्याला मी हुसकावून लावलं. तेव्हा बदला म्हणून एक आठ फुटी जाडजूड व तोंड उघडल्यावर मूठभर जबडा होणारा नाग त्याने लपून एका रात्री आमच्या बंगल्याच्या आवारात सोडला होता. पण शेरू नावाच्या अल्सेशियन कुत्र्याच्या सजगतेमुळे आम्ही वाचलो. बांधलेला असतानाही भुंकून भुंकून त्याने त्या नागाला समोर जाण्यापासून थांबवून एकाच जागी खिळवून ठेवलं. रात्री बारा वाजता आम्ही बाहेरून जेवून परतताना कंपाउंडचं गेट उघडायला माझी पत्नी मनीषा खाली उतरली, तेव्हा गाडीच्या लाईटमध्ये दूर पोर्चमध्ये काहीतरी हलताना मला दिसलं. बारकाईने पाहिलं तेव्हा तो नाग असल्याचं लक्षात आलं. मी लगेच ओरडून मनीषाला पुढे जाण्यापासून थांबवलं. बाजूच्या 'पर्णकुटी'मधून फोन करून घरी दार उघडू नये म्हणून सांगितलं व शेरूला बाजूला नेऊन 'पर्णकुटी'च्या चौकीदाराच्या साहाय्याने त्या नागाचा समाचार घेतला. इतक्या दिवसांच्या सर्पांच्या विरहाचं उट्टं या सर्पराजांनी असा जीवघेणा प्रसंग आणून एका भेटीतच काढलं.

लहानपणी इंगळीसारखेच फास करून सरडे पकडायचे, मग तंबाखू मळून त्यांच्या तोंडात टाकायची, वरून पाणी पाजायचं म्हणजे त्याला नशा येऊन तो कसा नाचतो ते पाहायचं. आठवीत असताना बेडकी पकडून नगरवालांच्या गाडीतलं डिस्टिल्ड वॉटर टाकून तिचं डिसेक्शन करायचं. असे काहीबाही खेळ माझे चालायचे. अशाच बेडक्या किंवा त्यांची पिल्लं पकडून दसऱ्याच्या दिवशी सोनं म्हणून मुठीतून मित्रांच्या हाती ठेवायची व त्यांची होणारी तारांबळ पाहायची, अशीही मजा मी करत असे.

'मृग' नक्षत्राला सुरुवात झाली की 'गोसावी' नावाचे लाल रंगाचे रेशमी किडे निघायचे. ते पकडून पाळायचे. मग त्यांच्यासाठी 'ब्रुक बाँड'चा लाल डबा आणायचा. त्यात वाळू भरायची. गवत टाकायचं. मग कुणाचा गोसावी बंदच राहतो, कुणाचा चालू लागतो व कुणाचा किती पळतो हे तासन्‌तास बघत बसायचं.

हिवाळ्यात बाभळीच्या वनात जाऊन निरनिराळ्या रंगाचे 'सोनपाखरू' नावाचे अतिशय सुरेख दिसणारे मोठे भुंगे पकडायचे. त्यांना दोरा बांधून पतंगासारखं उडवायचं व आपण दोऱ्याचं दुसरं टोक धरून त्यांच्याखालून धावायचं असे अनेक खेळ त्या वेळी अवतीभवतीच्या प्राणिजगताने मला दिलेत. भाऊबहीण नसल्याने घरी एकटाच असल्यामुळे येणारा माझा एकटेपणा अशा रीतीने आजूबाजूच्या निसर्गाने हाताळला.

जिनातल्या सगळ्या भटक्या कुत्र्यांपैकी बहुतेक कुत्र्यांची माहेरपणं व बाळंतपणं मी करीत असे. प्रत्येक वेळेस त्यातल्या एखाद्या पिल्लाच्या मोहात मी पडायचो व ते पाळायचो. दोन-तीन महिन्यांनी मग आई त्याला सोडायला लावी. त्यातली पाळलेली, मी 'गोबुली' नाव ठेवलेली, पांढरी स्वच्छ गावरानी कुत्री व काळ्यापांढऱ्या पट्ट्यांची मांजर, या दोन माझ्या खास आवडत्या.

ही मांजर विहिरीत पडली तेव्हा स्वत: विहिरीत उतरून मी तिला बाहेर काढलं, नंतर 'मांजरीची जात कशी बेइमान, गळा धरून ते माणसाला कसं मारतं व तिने घाबरून तुझाच गळा पकडला असता तर?' असं जिनातल्या भैय्याने आईला सांगितलं, त्या वेळी आई घाबरूनच गेली होती. पण त्या मांजरीचाही माझ्यावर अतिशय जीव होता. तीच मांजर एकदा विषारी काही

खाऊन आल्यावर, मिठाचं पाणी पाजून उलट्या करायला लावून मी तिला वाचवलं होतं, तेही आठवतं.

शेरू नावाचा मी पाळलेला कुत्रा विष खाऊन मेलेला उंदिर खाऊन आल्यावर त्याच्या शेवटच्या क्षणांत व्हायोलंट झाला. कुणी त्याच्या जवळपास जायला धजत नसताना, मी जवळ गेल्यावर त्याही अवस्थेत पडल्या पडल्या प्रेमाने शेपटी आपटत व अगदी शेवटच्या क्षणापर्यंत अत्यंत प्रेमाचं आर्जवी हसू डोळ्यांत आणून तो माझ्याकडे पाहत होता. त्याला तसंच टाकून अभ्यासाला मी मित्रांकडे निघून गेलो व संध्याकाळी परत आलो तर तो गेलेला होता. त्याला तसंच टाकून गेल्याबद्दलच्या तीव्र पश्चात्तापाची व दुःखाची ती संध्याकाळ अजूनही आठवते. मिठाचं पाणी पाजून त्या मांजरीसारखं आपण त्यालाही वाचवू शकलो असतो, हे खूप नंतर कधीतरी लक्षात येऊन, ते आपल्या लक्षात तेव्हा का आलं नाही, यासाठी अगदी आजपर्यंत मी हळहळत असतो.

नगरवालांकडच्या टिपू व डॉली या खतरनाक अल्सेशियन कुत्र्यांच्या जोडीशीही अशीच माझी घट्ट मैत्री. यांच्या आसपासही जायला माणसं घाबरतात. पण मी त्यांच्या पाठीवर बसून, त्यांचे कान उपटून त्यांना 'घोडा घोडा' करायला लावी. एरवी सदोदित चवताळणारे हे मुके जीव माझे हे लाड मात्र निमूटपणे पुरवत.

पोपट पाळणं, त्याला बोलायला शिकवणं, त्याचा पिंजरा धुणं, त्याला आंघोळ घालणं, त्याच्यासाठी खायला हिरव्या मिरच्या आणणं, आपल्याला खायला मिळालेली अर्धी फळं अर्धी खाऊन बाकी त्याला देणं, आईने हळदी-कुंकवाला जाऊन आणलेली बोराची लूट त्याला देणं, बांबूला तिरकी कमची सुतळीने बांधून, बाथरुमच्या टिनांवर चढून त्या आकोड्यांनी चिंचा तोडणं, त्या पोपटाला खायला देणं, यात्रेतून त्यांच्यासाठी पिंजरा आणणं, या पोपटांच्या बाबतीतल्या माझ्या आठवणी. कंठवाला पोपट, अगदी लहान पिल्लू असे अनेक पोपटही मी तेव्हा पाळलेत. त्यांना खाऊ घालताना किंवा लोभ करताना किंवा चिडवताना अनेकदा बोटंही फाडून घेतलीत. पुढे आठवी-नववीत 'फळे मधुर खावया' ही कविता मराठीच्या सरांनी अतिशय जीव लावून शिकवल्यानंतर कधीतरी माझं हे पोपट पाळणं आपोआपच सुटलं.

नगरवालांचा गोठा, त्यातल्या गाई-म्हशी, वासरं व दर दिवाळीच्या दिवशी गोठ्यात दिवा लावून येण्यासाठी आईचं पणती भरून देणं, हेही आठवतं. आज स्वतःची गाय व गोठा असताना आई दिवाळीच्या दिवशी गोठ्यात दिवा ठेवून यायला पणती देते, तेव्हाही दर वर्षी वणीच्या दिवाळीची तशी संध्याकाळ आठवत असते.

पकडता येतील ते व पाळता येतील तितके सगळे प्राणी मी या काळात पाळलेत. हिरवेगार मोठे नाकतोडेही मी पकडून पाळायचो. यवतमाळला पोस्टल ग्राउंडच्या गवतावर हे मोठमोठे नाकतोडे सापडायचे, म्हणून उन्हाळ्याच्या सुट्टीत तिथून येताना ते आणणं, मग त्यांच्यासाठी 'बुक ब्रॉंड'च्या डब्यात गवत वगैरे ठेवून ते पाळणं हे आठवतं. एकदा आणताना त्यातला एक मध्येच मेला म्हणून करंजीजवळच्या टेकडीजवळ बसच्या खिडकीतून बाहेर फेकला, आता त्या जागी सवयीमुळे उजवा हात नमस्कारासाठी दोन डोळ्यांच्यामध्ये जातो हेही सगळं या हिरव्या, सुंदर नाकतोड्यांच्या आठवणी म्हणून आठवतं.

यवतमाळच्या पोरांबरोबर वावरताना भटकणाऱ्या बकऱ्याही आम्ही पकडायचो व त्यांचं दूध काढून प्यायचो.

वणीला बाबांच्या अभ्यासिकेत चिमणी आत आली की दारं-खिडक्या लावून, नॅपकिनचा बोळा करून तिच्या अंगावर फेकून तिला उडवून उडवून दमवणं व शेवटी पूर्ण दमली की पकडून तिला लाल, निळ्या किंवा हिरव्या रंगाच्या शाईनं रंगवणं, हाही एक खेळ असायचा. आपण पकडून सोडल्यावर आपला वास त्या चिमणीला लागतो, म्हणून इतर चिमण्या तिला टोचून टोचून मारून टाकतात, असं आईनं कधीतरी समजावून सांगितल्यावर हा खेळ पुढे आपोआपच बंद झाला.

माझ्या भावविश्वाच्या अनेक विणी या प्राण्यांनीही विणल्या आहेत, असं आता हे सर्व लिहिताना लक्षात येतं आहे.

नदीतून पकडून आणून बादलीतून मी विहिरीत सोडलेल्या मासोळ्या त्यानंतर केवढ्यातरी मोठ्या झाल्या होत्या व त्यांची प्रजाही पूर्ण विहीर भरून वाढली होती. फिश पाँड घेण्याचं जमत नसल्यामुळे काचेच्या जारमध्ये पाळलेल्या या नदीतल्या मासोळ्या जगल्या मात्र कधीच नाहीत. उन्हाळ्याच्या दिवसांत सुट्टीत आलेल्या मामेभावांबरोबर रोज सकाळी नदीवर जाणं व मासोळ्या पकडत बसणं, हा तेव्हा उद्योग असायचा. बाहेर अंगणात झोपलो असताना सकाळी डोळे उघडल्याबरोबर पहिला विचार पाळलेल्या मासोळ्यांचा येऊन उघड्या दारातून डायनिंग टेबलवर काचेच्या जारमध्ये त्या दिसल्या, की प्रचंड आनंदाची लहर व एक्साईटमेंट मनात यायची.

सुट्टी संपली, पावसाळी ढग वातावरणात आले, की मामेभाऊही परत जायचे व मी पुन्हा एकटा व्हायचो. दोन-तीन दिवस उदास व रडवेला राहायचो.

फिश पाँड घरी असावा ही माझी लहानपणीची इच्छा काही ना काही कारणांनी मागे पडत जाऊन, शेवटी आता दोन वर्षांपूर्वी जिन्याखाली आठ फूट बाय आठ फुटाचा मोठा काचेचा फिश टँकच तयार करण्याने पूर्ण झाली. टायगर शार्कपासून सगळे मासे मी यात पाळले. सुरुवातीला लहानपणासारखीच एक्साईटमेंट या टँकमुळे आली. वेळ मिळेल तेव्हा समोर बसून या माशांचे खेळ मी तासन्तास पाही. नंतर नंतर हे मागे पडत जाऊन नकळत इतर शोभेच्या निर्जीव वस्तूंसारखंच या फिश पाँडचं अस्तित्व मनात तयार झालं. काही दिवसांपूर्वी हॉलमध्ये असाच बसलो असताना हलणारे मासे पाहून, 'अरे, इथे काहीतरी जिवंत अस्तित्व आपल्या बाजूला, आपल्या सोबतीला आहे,' अशी काहीतरी जाणीव आत लकाकून गेली, व तेव्हाच या जिवंतपणाची ही गमावलेली संवेदनशीलता पुन्हा जाणवली.

वसंत ऋतूमध्ये कोकिळा यायल्या लागल्या की त्यांच्याच सारखा आवाज काढून त्यांना ओरडायला लावून लावून चिडवून सोडणं (जे कधीमधी मूड आला की मी आजही करतो), ओसरीपाशी अंगणात येणारा भारद्वाज पक्षी, बाबांनी शिकवलं म्हणून त्याला नमस्कार करणं, सुतार पक्ष्याचं टकटक करत झाडं

कोरणं तासन्तास पाहात बसणं, काजवे पकडून आगपेटीत ठेवून रात्री त्यांच्या लाईटची गंमत पाहाणं, असे अनेक प्रकार करायला मला लहानपणी आवडायचं.

हरीण व मोर पाळणं आणि यवतमाळच्या झपाटे आजोबांसारखं वाघाचं पिल्लू पाळणं, या माझ्या इच्छा मात्र अपुऱ्या राहिल्यात; जशा श्रीमंतांच्या मुलांसारखी पायडल दाबत चालण्याची छोटी मोटर व एका पायाने ढकलत चालवायची स्कूटर, या खेळांच्या राहिल्यात. मोठेपणी मोर पाळायची इच्छा पूर्ण होण्याची संधी आली, पण ती पिलं जगू शकली नाहीत म्हणून ती इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. बाजारगावच्या शेतात अचानक सापडलेला रंग बदलवणारा सरडा 'चॅमेलीऑन' मात्र अनपेक्षितपणे काही दिवस पाळता आला.

बिल्डर बनल्यावर माझ्या पहिल्याच प्लॅट कन्स्ट्रक्शन स्कीममध्ये – 'भूप' अपार्टमेंट्समध्ये – तिसऱ्या मजल्यावर मी स्वत:साठी फ्लॅट ठेवला होता. या फ्लॅटच्या हॉलची एक पूर्ण मोठी लांब बाजू मी काचेची केली होती. या काचेला लागूनच दोन आंब्याची व एक कडुलिंबाचं अशी तीन झाडं होती. या झाडांच्या अगदी शेंड्याच्या पातळीला हा माझा फ्लॅट असल्याने अगदी पक्ष्यासारखं वर, पक्ष्यांच्या शेजारी आपण राहतो आहोत, असं तिथे वाटायचं. पक्ष्यांची घरटी अगदी शेजारी अशी दिसायची. इथे ग्रीलही मी मुद्दाम लावली नव्हती, त्यामुळे फांद्यांच्या शेंड्याही मोठ्या मोठ्या काचांच्या उघड्या खिडक्यांतून आत डोकवायच्या. हात लांबवून फळं तोडता यायची.

लग्नाआधीचे हे दिवस असल्याने मी एकटाच तेव्हा तिथे राहत असे. मी कामाला बाहेर गेल्यावर कुणाचा वावरही तिथे नसे. त्यामुळे झाडावरचे पक्षी, पोपट मुक्तपणे उघड्या खिडक्यांतून आत येऊन डायनिंग टेबलवरची शितं खात, किंवा फ्लोअर सिटींगच्या गादीवर हुंदडत.

नंतर नंतर मी फारसा धोकादायक नाही व शेजारधर्म पाळणारा आहे, हे कळून येऊन त्यांची भीड चेपली व मी घरात असतानाही हॉलमध्ये मुक्तपणे ते वावरू लागले.

नवेगावबांधला सैबेरियातले पक्षी स्थलांतरित व्हायचे, त्याच्या सुरुवातीच्या व नंतरच्या काळात या झाडांवर विविध प्रकारचे पक्षी दिसायचे. त्यातला एक पक्षी तर पुढील वर्षी परतताना याच झाडावर मुक्काम ठोकायचा ते पुढे पाच-सहा महिन्यांपर्यंत गळ्याभोवती पट्टा व कपाळावर लाल टिळा असलेला हा अतिशय देखणा असा हिरवा पक्षी असे. बहुधा हा सुतार जातीच्या प्रकारांपैकी कुठला तरी पक्षी असावा. कारण हा सतत उलटा होऊन झाड कोरीत असायचा व एकलकोंडा असा राहायचा. त्याची ही भीड नंतर चेपून तो डायनिंग टेबल व बैठकीच्या गादीवर यायला लागला होता. आणि दरवर्षी बहुधा हाच पक्षी परतीच्या प्रवासात इथे मुक्काम करीत असावा. कारण दुसऱ्या वर्षी पहिल्याच दिवसापासून तो डायनिंग टेबलवर यायला लागला होता. एकदा खाली राहणाऱ्या डॉ. गंधेंच्या उदयने लेन्सने डायनिंग टेबलवरचे त्याचे क्लोज-अप्सही घेतले होते. त्यानेही अगदी डौलदारपणे ते फोटो-सेशन दिलं होतं.

आताही बंगल्यात माझी खोली दुसऱ्या मजल्यावर असल्याने आजूबाजूच्या झाडांच्या मध्यभागापर्यंत येते. इथेही दोन गुलमोहोराची मोठी व एक कडुलिंबाचं झाड माझ्या खोलीच्या खिडकीला व समोरच्या गच्चीला लागून आहेत. त्यामुळे आजही माझ्या खोलीत चिमण्यांची व कवड्यांची उन्हाळ्यात राहण्याची, बाळंतपणाची, खाली पडलेली पिल्लं पुन्हा उचलून घरट्यात ठेवण्याची जबाबदारी मी घेत असतो.

'भूप'च्या फ्लॅटमध्ये चहा, साखरेशिवाय माझ्या घरात धान्याचा एक कणही नसायचा. आणि तरीही तिथे एक उंदीर माझ्यासोबत सतत मुक्कामाला राहायचा. मी त्याला काहीच त्रास देत नसल्यामुळे तो न घाबरता खेळकरपणे माझ्या अवतीभोवती हुंदडत असे. रात्री मी झोपल्यावर माझ्या पायाची बोटं कुरतडत असे. रात्री दोन-तीनदा तरी तो असं करून मला उठवत असे. थकलेला असलो व मोठ्याने रागावलो तर आवाजामुळे त्याला कदाचित कळत असे व त्या रात्री त्यानंतर मग मला तो त्रास देत नसे.

माझ्या फ्लॅटमध्ये अन्नाचा कणही नसताना हा जगत कसा असेल, असा मला तेव्हा नेहमी प्रश्न पडायचा. त्या अर्थी पोट भरायला खालच्या कुठल्यातरी फ्लॅटमध्ये जाऊनयेऊन मुक्कामाला मात्र निष्ठेने हा माझ्या सोबतीला राहात असतो, असं वाटायला लागलं.

एकदा बाल्कनीत मित्रांशी गप्पा मारत असताना तो माझ्या अवतीभवती येऊन खेळत होता. आम्ही खात असलेले दाणे त्याच्या पुढ्यात टाकून माझ्या एका बिल्डर मित्रानेही त्याला खेळवलं व मग मी मग मी नको नको म्हणत असतानाही अचानक एका बेसावध क्षणी काठीने त्याला पाणी जाण्याच्या छिद्रातून खाली ढकललं. अंधारात तिसऱ्या मजल्यावरून तो खाली कुठे पडला, जगला की नाही, काही कळलं नाही. पण त्यानंतर तो फ्लॅटमध्ये मात्र कधीच आला नाही. वेळीच ठामपणे त्या मित्राला अडवलं नाही, याबद्दल माझ्या मनात अजूनही तीव्र हळहळ आहे.

सुदैवाने ड्रायव्हिंगमध्ये माझ्या हातून आजपर्यंत एक अपवाद वगळता एकही प्राणी मेलेला नाही. बेडूक, सरडा वगैरे जरी अचानक रस्त्यावर आले तरी त्यांना दोन्ही चाकांच्यामध्ये घेऊन मी वाचवायचा प्रयत्न करत असतो.

अपवाद फक्त एक. एकदा रात्री अकरा वाजता तोतलाडोहाच्या जंगलात जात असताना अचानक बाजूच्या झाडीतून एका सशाने नेमकी माझ्या जिप्सीच्या समोरच्या डाव्या चाकावरच उडी घेतली व तो तसाच मागे फेकला गेला. ब्रेक दाबून मी गाडी थांबवली. मागे चालत येऊन पाहिलं तर तो एका ठिकाणी जखमी होऊन रक्तबंबाळ झाला होता. पण डोळे उघडत होता. त्याला उचलून गाडीत आणलं, पाणी पाजलं व बाजूच्या सीटसमोरच्या मॅटींगवर ठेवून तोतलाडोहाच्या दवाखान्यात काही उपचार करता येतील, म्हणून निघालो. गाडी चालवताना मध्येमध्ये वाकून, त्याला हात लावून धग आहे का ते मी पाहत असे. तेव्हा तोही माझ्या हाताला बिलगून आधार घेत असे. मध्येच एकदा

पाहिलं तेव्हा धग थंडावली होती. गाडी थांबवून लाईट लावून पाहिलं, तर डोळे निर्जीव झाले होते. शरीर शांत झालं होतं. मग उतरून त्याला उचलून  बाजूच्याच एका पुलावर ठेवलं व खचलेल्या मनाने गाडीकडे परत आलो.

आजही माझी होळी माझ्या पॉमेरिअन कुत्र्यांशी खेळण्यापासून सुरू होते. त्यांना वेगवेगळ्या रंगांनी मी रंगवतो. पुढे महिनाभर अनेकदा आंघोळ करूनही ते त्याच रंगाचे राहून होळीच्या स्मृती जागवत असतात.

टिपू नावाचा पॉमेरिअन कुत्रा व डॉन नावाचा डॉबरमन कुत्रा हे दोघे आमच्याकडे जवळपास पंधरा वर्षं राहिलेत. त्यांच्या बारीकसारीक भावना व दुखणं-खुपणं आम्हांला व आमचे बारीकसारीक मुड्स त्यांना कळण्याइतपत ते 'ह्युमन' झाले होते. टिपू तर गाडीचं दार उघडलं की टुणकन उडी मारून आत सीटवर बसायचा व चक्कर मारून आणण्याचा लाडिक हट्टाचा चेहरा करायचा. लग्नानंतर काही दिवस भूप अपार्टमेंटमधील फ्लॅटवर मी व मनीषाच राहत असू. पलंगावर खेळलं की मनीषा रागावते म्हणून आम्हांला झोप लागल्यावर उडी मारून पलंगावर येऊन तो माझ्या पाठीशी घट्ट बिलगून झोपे. फ्लॅटमध्ये आम्ही दोघंच असल्यामुळे कुठेही बाहेर जायचं असलं की मनीषाला त्याला बरोबर न्यावं लागे. आत कोंडून गेलं, तर ओरडून ओरडून आकांत करायचा. पण पार्किंगमध्ये गाडीत मात्र तासन्तास शांत राही.

मी रनिंगला कधी गेलो, तर गाडीमध्ये त्याला नेई. तेव्हाही मी जाऊन परत येईपर्यंत डौलदारपणे व उत्सुक नजरेनं इकडेतिकडे पाहत तो शांतपणे बसलेला असे. गाडी व प्रवास हे त्याच्या अत्यंत आवडीचे. एकदा आजारी होता म्हणून त्याला आम्ही सोबतच ताडोबालाही नेलं होतं. तिथे कुठे मोकळा सुटला, तर जंगलात हरवेल असं सतत टेन्शन असायचं.

एकदा वणीच्या डॉक्टरांच्या चुकीने याच्या नर्व्हमध्ये इंजेक्शन दिलं गेल्यामुळे याच्या मागच्या एका पायातला जीव नाहीसा झाला होता. मग तो स्वत:च तो पाय कुरतडून घेई. सगळ्याच डॉक्टरांनी पाय कापून टाकण्याचा सल्ला दिला होता. पण पीव्हीसीच्या पाईपमध्ये घालून ठेवून  शेवटी आम्ही तो पाय वाचवला. त्यात थोडा जीवही नंतर आला होता. पण शेवटपर्यंत तशा अधू पायाने थोडासा रखडतच तो चालायचा.

बंगल्यात राहायला आल्यावर असाच तो डायनिंग टेबलखाली आईच्या पायाच्या तळव्यांवर तिची साडी अंगाभोवती ओढून घेत झोपे. मी बाहेरगावी गेलो तर तो जेवण सोडायचा व दारात उदासवाणेपणे वाट बघत बसायचा. माझ्या गाडीचा हॉर्न कुठूनही ओळखून आनंदाने उड्या मारायचा.

डॉन हा डॉबरमन. उंच, काटक व अंगापेराने मजबूत होता. आवाज बुलंद. अत्यंत ग्रेसफुल, डौलदार अशी त्याची चाल होती. पाहूनच लोक घाबरायचे, भुंकणं ऐकलं तर बघायलाच नको. अत्यंत चपळ व स्वाभिमानी, आक्रमक व चिडखोर असा तो होता.

पण असं असलं तरी तो मनाने अतिशय संवेदनशील, जीव लावणारा व पझेसिव्ह होता. पॉमेरिअनपासून सगळ्या लहान कुत्र्यांना अंगाखांद्यावर खेळवायचा. त्यांनी काहीही केलं, तरी हा चिडत नसे. पण मोठ्या कुत्र्यांनी थोडी जरी कुरापत काढली तर मात्र हा अक्षरश: त्यांना फाडून टाकेपर्यंत लढत असे. आम्ही वणीला असताना तिथल्या भटक्या डुकरांचा याला फार राग. कंपाउंडमधून कधी सुटला तर त्या डुकरांना पकडून हा अक्षरश: फाडून टाकत असे.

आम्ही कुठल्याच कुत्र्यांना मांस-मटण कधीच दिलं नाही. नाहीतर हा अजून किती आक्रमक झाला असता देव जाणे. हुशारही खूप. याला वास देऊन बॉल बगीच्यात सहा इंचापर्यंत जमिनीत गाडून लपवून ठेवला तरी तो बरोबर ती जागा हुडकून, उकरून बॉल परत आपल्या हाती आणून देत असे. हा त्याचा अत्यंत आवडीचा खेळ. परत परत बॉल तोंडात धरून आपल्या हातात आणून देऊन आपल्याला तो लपवायला सांगत असे.

मोकळा असला आणि मी किंवा आई दिसलो की धावत येऊन उडी मारून छातीवर दोन्ही पाय ठेवून उभा राहायचा. पुढच्या दोन्ही पायांनी कमरेला अगदी लहान मुलासारखी मिठी मारून पोटावर डोकं घुसळत 'कुंई कुंई' आवाज काढायचा. हा त्याचा आवाज मग त्याच्या इतर वेळेच्या आवाजापेक्षा अगदी वेगळा असे. त्याच्या घराजवळ कधी गेलं, तर चेहऱ्यावर हात फिरवून फिरवून त्याचे लाड करावे लागायचे. तेव्हाही तो असाच 'कुंई कुंई' आवाज काढायचा. लाड न करता परत जायला निघालो तर नेहमीच्या त्याच्या मोठ्या आवाजात आकांडतांडव  करायचा.

आई-बाबांच्या खोलीची पलंगामागची खिडकी थोडी जरी उघडी राहिली, तरी हा ग्रीलमधून तोंड आत घालून 'कुंई कुंई' आवाज काढत बसे. मग बाबांनी चेहऱ्यावर हात फिरवून लाड केल्याशिवाय तो स्वस्थ होत नसे. त्याचे दात एवढे मोठे, अणकुचीदार व तीक्ष्ण होते व अंगात जोरही खूप, त्यामुळे थोडा वेळ जरी भांडण सोडवलं नाही गेलं, तरी याच्या समोरचा विरोधक रक्तबंबाळ व्हायचा. पण लाड करायला गेलं की हात तोंडात घेऊन तो चावत बसे, तेव्हा जखम काय, एवढासा ओरखडादेखील माझ्या हाताला कधी झाला नाही.

डॉन व आईचं असंच भावनिक नातं होतं. मी व मनीषा नागपूरला व बाबांचे दौरे सुरू. या १९८६ ते १९९१ या काळात ती कित्येकदा वणीला घरात एकटीच असायची व डॉन तिचा रक्षक. रात्री दारं बंद करून ती आत असायची व घराच्या चारही बाजूला धावत-पळत, फिरत डॉन रात्रभर खडा पहारा देत असे. एवढंसंही कुठे खुट्ट वाजलं की भुंकायचा, त्या जागेवर पळत जायचा. कंपाउंड वॉलवर पाय ठेवून बाहेर डोकवत, भुंकून भुंकून आकांत करायचा. त्याचा आकांत वाढला तर आई खिडकी किलकिली करून बाहेर पहायची. अदमास घ्यायची. त्याला आवाज द्यायची. त्याने त्याला बळ मिळायचं, उत्साह यायचा. किमान दोनदा तरी त्याने असेच चोर परतवलेत, कारण रात्री त्याचा असा आकांत झाल्यावर त्याच रात्री कॉलनीत आजूबाजूला चोऱ्या झाल्याचं दुसऱ्या दिवशी लक्षात आलं.

आतमध्येही कुठे काही आवाज झाला, उंदरांनी काही पाडलं तर त्या खोलीबाहेरच्या जागी येऊन तो काळजीचा स्वर असलेलं भुंकायचा. आईनं आतून येऊन खिडकी किलकिली करून त्याला 'डॉन, काही नाही आहे, शांत हो,' म्हटलं की आई सुरक्षित आहे, हे पाहून शांत व्हायचा. प्राण्यांना भाषा समजत नसेल पण 'टोन'वरून कदाचित भावना त्यांच्यापर्यंत पोहोचतेच, याचे आम्हांला प्रत्येक कुत्र्याच्या बाबतीत अनेकदा अनुभव आलेत.

एकदा मी नागपूरहून वणीला गेलो असताना मी व आईच घरी होतो. रात्री डॉन असाच भुंकायला लागला, म्हणून मलाही जाग आली. बाजूला पाहिलं तर आई नव्हती. काळजीने पटकन उठलो, बाहेर आलो, तर खिडकी किलकिली करून ती अत्यंत एकाग्रतेने बाहेरचा अदमास घेताना दिसली. काही चोरबीर असतील म्हणून मीही अगदी हळू पावलांनी तिच्या मागे जाऊन उभा राहून अंदाज घेऊ लागलो. बोलण्याचा आवाज येऊ नये म्हणून तिला हात लावून 'काय आहे?' असं विचारायला गेलो, तर ती एकदम दचकून मोठ्याने ओरडली. मग भीतीचा भर ओसरल्यावर आम्ही दोघंही खूप वेळ हसत राहिलो. डॉनचं आणि आईचं रात्रीच्या असुरक्षिततेचं असं हे एक वेगळंच भावनिक विश्व होतं.

आम्ही सगळेच नागपूरला शिफ्ट झाल्यावर वणीच्या घराची कितीतरी वर्षं डॉनने एकट्यानेच राखण केली. त्यानंतर नागपूरला आणल्या आणल्या एकदा हा नजर चुकवून बाहेर पडला व कुठेतरी हरवला. एका रिक्षावाल्याने त्याला स्वत:कडे ठेवून घेतलं होतं. त्यानंतर तब्बल तीन वर्षांनी हा त्याच्या डॉक्टरांमार्फतच पुन्हा सापडला.

मागच्या वर्षी नवरात्रात टिपूचा शेवटचा आजार होता. त्याने खाणं-पिणं सोडलं होतं. निपचित पडलेला असे. जवळ जाऊन त्याच्या अंगावरून हात फिरवला की त्याच्या डोळ्यांत ओळखीचं हसू येत असे व क्षीणपणे तो शेपटी जमिनीवर आपटत असे. सलाईनच्या भरवशावरच त्याचं जगणं सुरू होतं. आई त्याच्या बाजूला बसून त्याच्या अंगावर हात फिरवत त्याला ''टिपू, सणासुदीचे दिवस नीट निभावून घे हं बेटा'' म्हणायची. जायच्या दोन दिवसच आधी डॉक्टरकडे नेण्याच्या निमित्ताने माझं त्याला गाडीतून फिरवून आणणंही झालं. गाडीत बसून फिरणं त्याच्या अत्यंत आवडीचं. त्या त्राण नसलेल्या अवस्थेतही त्याने दोन पाय खिडकीवर ठेवून नेहमीसारखं खिडकीबाहेर पाहत, शेवटचं फिरूनही घेतलं. त्याच्या चिमलेल्या चेहऱ्यावरचं हसू उदासवाणं दिसत होतं. आपलं हे शेवटचंच फिरणं, हे समजून तो जणू त्या दिवशी ते उपभोगून घेत होता.

आईचं त्याने ऐकलंही. काही न खाता, पिता, पण तरीही चिकाटीने त्याने नवरात्र काढलं. दसऱ्याच्या दिवसही निभावला. त्या रात्री पहाटे तीन-चार वाजता केव्हातरी तो गेला. आम्हांला सकाळीच कळलं. माणसाचा करावा तसा कपडा, फुलं, मिठानिशी त्याचा अंत्यसंस्कार मी करून आलो. आमचा एक फॅमिली मेंबर कमी झाला.

या वर्षी डॉनही गेला. योगायोगाने तोही दसऱ्यानंतरच्या आठवड्यातच गेला. पण त्याचं जाणं अनपेक्षित होतं. तो ॲक्सिडेंटने गेला. ॲक्सिडेंटनंतर दोन-तीन दिवस जगला. गाडीने उडवल्यामुळे त्याचं मागचं शरीर लुळं झालं होतं. त्याला उभंसुद्धा राहता येत नसे. त्या भागात अत्यंत वेदना होत होत्या. कळवळून तो ओरडत असे. खाली जवळ बसून डोकं मांडीवर घेऊन लोभ केला की कळवळणं थोडं शांत व्हायचं. डोळ्यांत तसंच प्रेम यायचं. पण चेहरा केविलवाणा होत असे. तो सतरा वर्षांचा झाला होता. माणसांच्या दृष्टीने बघायला गेलं तर डॉबरमनसाठी हे वय ऐंशी वर्षांचं होतं. थोड्या दिवसांनी पाय ठीक होतील, पण हा जाणार नाही असंच मला वाटे. पण बाबाच म्हणालेच होते, ''आता याचं काही खरं नाही.''

तिसऱ्या दिवशी डॉक्टरकडे न्यायला गाडीपाशी आणल्यावर तो तिथेच कोसळला. दुसऱ्याच क्षणी त्याच्या डोळ्यांत जीव नव्हता. डॉक्टर म्हणाले, ''वेदनेच्या स्ट्रेसमुळे याचं हार्ट बंद पडून हा गेला.'' एका क्षणात त्याला शांत मरण आलं. कुठलं आजारपण नाही, किंवा काही नाही. जितक्या ग्रेसफुली जगला, तितक्याच ग्रेसफुली तो गेला.

शेवाळकर फॅमिलीचा आणखी एक मेंबर कमी झाला. अशा रीतीने टिपू शेवाळकर व डॉन शेवाळकर दोघेही एकाच वर्षात आम्हांला सोडून गेले. टिपूच्याच बाजूला, त्याच इतमामाने डॉनचाही आम्ही अंत्यसंस्कार केला.

*(फेब्रुवारी २००४)*

---

सहज फुलू द्यावे फूल, सहज दरवळावा वास
अधिक काही मिळवण्याचा करू नये अट्टहास
सुवास-पाकळ्या-पराग-देठ, फूल इतकीच देते ग्वाही...
अलग अलग करू जाता हाती काहीच उरत नाही...

थेंबामध्ये समुद्राची जर पटते सहजखूण
सुंदराचा धागा धागा कशासाठी घ्यावा उकलून?
मुखवटाही असेल, असो... मागले काहीच नये दिसू
साधे शब्द, पुरेत तेच, एक साधे सोपे हसू...

**शान्ता ज. शेळके**

# अजि म्या ब्रह्म पाहिले!

**मधु मंगेश कर्णिक**

हे महापूजेचे निमंत्रण सर्वस्वी अनपेक्षित होते. श्री विठ्ठलाची महापूजा ही दरवर्षी फक्त मुख्यमंत्री करतात, एवढे माहीत होते. दूरदर्शनवर तिची दृश्ये पाहिली होती. पंढरीच्या पांडुरंगाची महापूजा आपण करणार? विश्वासच बसेना.

देव, धर्म आणि यांवरील श्रद्धा यांमुळे माणसाच्या जगण्याला मोठा आधार मिळतो, असे मानणारा मोठा वर्ग समाजामध्ये असतो आणि तो जगाच्या पाठीवर सर्वत्र आढळतो. व्यक्तिश: मी या वर्गामध्ये मोडतो का, याचा मी अनेकदा विचार करतो. कारण या बाबतीत माझी नेहमी द्विधा मन:स्थिती असते.

माझ्या घरी बालपणापासून मी श्रद्धाळू वातावरणात वाढलो. माझे वडील कितपत धार्मिक वृत्तीचे होते, ते मला माहीत नाही, कारण ते मी अगदी असतानाच हे जग सोडून गेले. पण ते श्रावणात गावकऱ्यांना जमवून त्यांना पोथी वाचून दाखवत, हे मला अंधूक आठवते. माझे आजोबा विवेकानंदांच्या शिकवणीच्या प्रभावाने, त्यांचा शोध घेत परागंदा झाले. आई पूर्णपणे आस्तिक आणि श्रद्धाळू. तिच्या भाविकपणाला तोड नसे. तिचे उपासतापास, व्रतवैकल्ये कधी चुकली नाहीत. एकादशी, संकष्टी, सोमवार, शनिवार हे उपवास ती न चुकता करी. इतके असूनही तिच्या नशिबाची दु:खे आणि अपेष्टा नाहीशी झाली नव्हती. स्वत: मी अजाण वयात जगाचे टक्केटोणपे खात वाढलो. जग स्वार्थी मतलबी असते, निष्ठुर असते, याचा मी आईवडिलांचे छत्र हरपल्यापासून कोवळ्या वयात अनुभव घेतला आणि तो अनुभव दिवसेंदिवस गडदच होत गेला.

नंतरच्या जाणत्या आयुष्यातही जगाचा कोरडेपणा, खोटेपणा आणि अधर्म खूप पाहिला. त्यामुळे देव माणसांना सद्बुद्धी देतो, हे फारसे पटले नाही. धर्म ही पारंपरिक संकल्पना मानली तर 'माझा धर्म हिंदू आहे', एवढे सांगण्यापुरताच तो धर्म उरला. पण यापलीकडे 'कर्तव्य' म्हणून एक धर्म आहे, 'माणुसकी' म्हणून एक धर्म आहे आणि 'सदाचरण' हाही एक धर्म आहे, हे मनात स्वानुभवाने पक्के बिंबत राहिले. प्रार्थनेचे म्हणून एक अंगभूत पावित्र्य व सामर्थ्य असते, प्रार्थनेमुळे मनाला शांती मिळते, हे मनाला पटलेले आहे. पण त्याला जोडून कर्मकांड नको, याबद्दल मनात संदेह नाही.

तरीही हिंदू धर्माची भगवी पताका खांद्यावर घेऊन माणसे वेड्याबापड्यासारखी, उपाशीतापाशी वणवण फिरताना पाहिली, स्वामी विवेकानंदांचे विचार वाचले, विनोबांची गीताप्रवचने वाचली, माझ्या आजोबांनी लिहिलेले 'हिंदुधर्म' हे चिमुकले पुस्तक वाचले, की आपण हिंदू आहोत, याबद्दल अभिमान, आनंद आणि समाधान वाटते. कोणतेही देऊळ समोर दिसले की आपोआप हात जुळत नसले, तरी पंढरपूरचे विठ्ठल मंदिर, आळंदीची श्री माउलींची समाधी, नेवाशाचा पैस, देहूचे तुकाराममंदिर, रामदासांची शिवथर घळ, रायगडावरील श्री शिवछत्रपतींचे सिंहासन आणि समाधी, रत्नागिरीचे सावरकरांचे आणि लोकमान्यांचे स्मारक, मालगुंडचे केशवसुत स्मारक ही सारी मंदिरे वाटतात आणि नकळत हात जोडले जातात, मस्तक नम्र होते आणि अंत:करणात एका अनामिक आनंदाचा झरा उचंबळून येतो.

ही श्रद्धा काही जन्मजात नव्हे. ती अंधश्रद्धाही नव्हे. जेव्हा श्रद्धेची-अंधश्रद्धेची काहुरे मनात निपजतात, तेव्हा सजग मन एकच पाहते. या ठिकाणी कर्तव्य, माणुसकी आणि सदाचरण या धर्मांचे पालन होते आहे का? जर हे धर्मपालन तेथे श्रद्धापूर्वक, मन:पूर्वक होत असेल तर तेथे श्रद्धा-अश्रद्धा-अंधश्रद्धा यांचा पट फिटतो. काहूर नाहीसे होते आणि मनात एक नितळ चांदणे पसरू लागते.

या श्रद्धा-अंधश्रद्धेतून लाभणाऱ्या चिदानंदाचे एक अलीकडेच प्रत्ययाला आलेले उदाहरण येथे नमूद करतो.

गेल्या जुलै महिन्यामध्ये एका सकाळीच करूळच्या माझ्या घरी अनपेक्षितपणे एक फोन आला. फोन पंढरपूरहून आलेला होता व तो राजश्री दत्तोपंत बाळासाहेब बडवे, शिंदे सरकार या नावे आला होता. भरदार आवाजात दत्तोपंत मला सांगत होते, ''आपल्या उभयतांच्या हातून श्री विठ्ठलाची महापूजा करविण्याचा निर्णय समस्त बडवे समाजाने घेतलेला आहे! आपण श्रावण शुद्ध सप्तमी रोजी दिनांक एक ऑगस्टला पंढरपुरी ही श्री विठ्ठल पूजा यथासांग करावी अशी आम्हां सर्वांची विनंती आहे.''

हे महापूजेचे निमंत्रण सर्वस्वी अनपेक्षित होते. श्री विठ्ठलाची महापूजा ही दरवर्षी फक्त मुख्यमंत्री करतात, एवढे माहीत होते. दूरदर्शनवर तिची दृश्ये पाहिली होती. पंढरीच्या पांडुरंगाची महापूजा आपण करणार? विश्वासच बसेना. त्याआधी एकदा की दोनदा पंढरपुरी जाण्याचा नि विठ्ठलाचे

ओझरते दर्शन घेण्याचा योग आला होता. सोलापूरला दरवर्षी दमाणी साहित्य पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होतो. काही वर्षांपूर्वी या पुरस्काराचा स्वीकार करण्यासाठी गेलो होतो, तेव्हा पंढरपूरला जाऊन आलो. तेथे भागवताचार्य वा. ना. उत्पात यांनी विठ्ठलाचे दर्शन घडवून आणले होते. पण युगे अठ्ठावीस विटेवर उभ्या असलेल्या या सावळ्या परब्रह्माला डोळे भरून पाहता आले नव्हते. क्षणभर दर्शन घडते न घडते तोवर पुजारी दुसऱ्या दर्शनेच्छुकाला पुढे ढकलतो! त्या गोजिऱ्या रूपाला डोळ्यात साठवताच येत नाही.

एरवी मी घरच्या देवाचीही कधी नियमित पूजा केलेली नाही! देव आणि धर्म यांतील द्वैत सतत पाठलाग करीत आले होते. क्षणभर मनात असेही येत होते, की आपण पंढरपूरचे आमंत्रण येताच देवभोळेपणाने हुरळून गेलोय का? आजवर आपल्या आयुष्यात हा विठ्ठल कुठे होता?

मग दत्तोपंत बडवे यांनी निमंत्रणाबरोबर आणखीही जे काही सांगितले होते याची आठवण झाली. दत्तोपंत म्हणाले होते – ''आपण येणार असल्याचा लाभ घेऊन एक अभिनव कार्यक्रम आयोजित केला आहे तोही आपल्याच उपस्थितीत व्हावा, अशी विनंती आहे.''

हा कार्यक्रम खरोखरच अभिनव अशा सामाजिक स्वरूपाचा होता. समाजातील एकत्र कुटुंबपद्धतीने, एकाच चुलीवर अनेक माणसांचा स्वैपाक रांधणाऱ्या, कुटुंबे एकत्र ठेवणाऱ्या त्या कुटुंबप्रमुख महिलांचा जाहीर सत्कार त्या कार्यक्रमात होणार होता. एकतेतून देवत्वाकडे जाण्याचा हा प्रवास निश्चितच सत्कारार्ह होता व मला त्याचे विठ्ठलाच्या पूजेएवढेच अप्रूप वाटत होते. विठ्ठल जर सर्वांचा, तर तोच ही सर्वात्मकता जपण्याचे बळ देतो, असे मला वाटले आणि ती महापूजा म्हणजे समाजाच्या ऐक्याची महापूजा मला वाटली. माझ्या मनातील सारे द्वैत निमिषात नाहीसे झाले. मी पंढरपूरची वाट धरली.

आदल्या दिवशी सपत्नीक पोचलो, तेव्हा विठ्ठल रुक्मिणीच्या गौरीच्या विसर्जनाची मिरवणूक सुरू होत होती. गौरीचा सजवलेला शोभिवंत मुखवटा असलेला चौरंग मस्तकावर घेऊन एक वृद्ध भाविक चालत होते. त्यांच्या बरोबरीने चालणारे आळीपाळीने ते मखर आपल्या मस्तकी घेऊन चालत होते. पंढरपूर शहरातील सर्व स्त्रिया नटूनथटून गौरीच्या दर्शनाला निघाल्या होत्या. ''देवदर्शना निघती ललना हर्ष माझ्या हृदयांत'' – ओल्या श्रावणाला अधिकच चिंब करणारे ते रमणीय दृश्य!

मुंगीच्या पावलांनी चालणारी ती मिरवणूक सूर्यास्तासमयी चंद्रभागेच्या घाटावर पोचली. सश्रद्ध अंतःकरणाने जड हातांनी पुरोहितांनी गौरीचे गंगेत विसर्जन केले. निरोपाची आरती, पूजा सारे यथासांग झाले. गौरीच्या या सोहळ्यासाठी अख्खे पंढरपूर घाटावर एकवटले होते.

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी श्री विठ्ठलाची महापूजा. पुरोहित सर्व पूजासाहित्य घेऊन पुढे गेले होते. दर्शनार्थींची रांग एव्हाना सुरू झाली होती आणि पावलापावलाने वाढत होती. परमेश्वराची षोडशोपचारे पूजा करायची तर पूजेचे सर्व नियम पाळावे लागतात. त्याप्रमाणे सौ. स्वच्छ रेशमी लुगडे नेसली होती पण मला रेशमी कद वा मुकटा नेसणे जमत नव्हते! मग पुरोहितांनी हातभार लावला आणि आम्ही उभयतां पूजेसाठी सज्ज झालो. प्रथम विठ्ठलाच्या गाभाऱ्याच्या एका बाजूच्या मोकळ्या जागेत पुण्याहवाचन, गणेशपूजा आदी मुख्य पूजेच्या आधीचे विधी पार पडले. ते आटोपल्यानंतर दत्तोपंत बडवे यांनी आम्हांला विठ्ठलापुढील चांदीने मढविलेल्या महाद्वारासमोर थेट नेऊन उभे केले. श्री विठ्ठलाचे समीपदर्शन. 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' असलेल्या त्या परब्रह्माला पाहताच मन आतून उचंबळून आले.

प्रारंभीचीच महापूजा आमची होती. आम्हांला श्री विठ्ठलाच्या समोरच्या दरवाज्यात बसवण्यात आले. आम्ही एकटक विठ्ठलाकडे पाहत होतो. अजून त्याच्या अंगावर आदल्या दिवशीचाच वेष होता. मग पुरोहित पुढे झाले. (इथे प्रत्येक लहानसहान विधीसाठी ठरलेले मानकरी व सेवेकरी असतात.) त्यांनी विठ्ठलाच्या अंगावरील निर्माल्य हळूहळू बाजूला केले. मग त्याचे कपडे उतरवण्यास प्रारंभ केला. किंचित्काळात विठ्ठलाची उघडी मूर्ती डोळ्यांसमोर साकार झाली! काळासावळा वर्ण, ओबडधोबड देह, विस्फारल्यागत वाटणारे पण निश्चल, शांत, आश्वासक डोळे, दोन्ही हात कटीवरी, कमरेवर शेला आणि खाली समचरण; मस्तकी उंच टोपी... बाकी सर्व देह उघडा, अवस्त्र... स्वप्नातही न पाहिलेले 'सुंदर ते ध्यान' साक्षात समोर ठाकले होते नि आम्ही साक्षात आमच्या इवल्याशा डोळ्यांत ते मावेल तेवढे साठवून घेत होतो! याच मराठमोळ्या, कानडा विठ्ठलाला डोळ्यांत साठवण्यासाठी दशदिशांतील वारकरी इथे, या इवल्याशा जागेत एकत्र होतात. सबंध महाराष्ट्राचा आणि कर्नाटकाचा हा देव. येथल्या भोळ्याभाबड्या, राकट काळ्या, ओबडधोबड देहाच्या माणसासारखाच त्याचा हा देव! वर वर पाहिले तर एक ओबडधोबड मूर्ती. रेखीवपणाचा अंशही नसलेली... पण अंतर्मनातून, अंतःचक्षूंनी पाहिली तर किती रूपसुंदर! 'देहुडा चरणी वाजवीत वेणू' असलेला हा उभा चक्रपाणी पाहण्यासाठी डोळेही तसेच हवेत.

अश्रद्ध मनाने, कोरड्या डोळ्यांनी दिसेल ती एक प्राचीन, आकारविल्हे नसलेली दगडी मूर्ती! पण जेव्हा तुम्हांला जाणवेल, की याच मूर्तीच्या दर्शनासाठी संतांनी टाहो फोडला होता, ज्ञानदेव माउली, तुकाराम महाराज, रामदास महाराज, एकनाथ, निवृत्ती, जनाबाई आणि नामदेव यांनी याच परब्रह्मासाठी जिवाचा आकांत केला होता, किती साधुसंतांचे मस्तक या समचरणावर नत झाले असेल, हे सारे अंतःकरणात जाणवताक्षणी समोरचा विठ्ठल म्हणजे कोण आहे, त्याचा विसर पडतो. माय रखुमादेवीवरू.... साक्षात आई आणि प्रत्यक्ष

वडील... सारे सारे एका त्या दीडहात मूर्तीमध्ये सगुण, साकार झाल्याचे जाणवते आणि एकूणच दृष्टिसुख कैवल्याचे होते.

आता श्री विठ्ठलाला दह्या-दुधा-जळाची आंघोळ सुरू झाली होती. अत्तराची एक मोठी कुपी त्याच्या अंगावर उपडी केली होती. दूध, तूप, दही, मध, पाणी या साऱ्यांनी मूर्ती सुस्नात केली जात होती. विठ्ठलाची काया नितळ नव्हती. त्या खडबडीत कायेला दुधातुपाच्या आंघोळीने तकतकी आली होती. दुधाच्या चरव्यामागून चरव्या ओतल्या जात होत्या. पायतळी एक चांदीच्या चरणांचे मोठे चौरंगधारी तबक होते. विठ्ठलाच्या चरणाऐवजी चांदीच्या चरणांवर दूध ओतले जात होते. स्वच्छ वस्त्राने ते पुन्हा पुन्हा पुसले जात होते. त्या चांदीच्या कवचामुळे विठ्ठलाचे मूळ पाय, त्या समचरण पादुका मूळ स्वरूपात शाबूत राहिल्या होत्या.

पांडुरंगाचे दूधदहीतीर्थोदकाने स्नान पूर्ण झाले आणि त्याच्या अंगावरील घट्ट चंदनाचे जे टिळे आधीच काढण्यात आले होते, त्याची एक सुपारीएवढी गोळी आम्हांला देण्यात आली. पांडुरंगाच्या देहावरचे चंदन आमच्या हातात आले! मग आणखी काही उपचार झाल्यानंतर, प्रत्यक्ष पूजेला सुरुवात झाली. आमच्या हातून पूजा करविण्यात आली. प्रसादाचे ताट समोर धरण्यात आले. आम्ही पांडुरंगाच्या मूर्तीला सर्वांगी स्पर्श केला. त्याच्या छातीवरील जखमेची खूण, कौस्तुभ, कवचकुंडले, नाभिकमळ, पितांबराचा शेव, झिजलेले पण गोजिरे चरण, या साऱ्याला आम्ही उभयतांनी प्रत्यक्ष स्पर्श केला आणि जन्मजन्मांतरीचे धन्य झालो. मग तुळशीची भरगच्च माळ पांडुरंगाला घातली, त्याचे वस्त्र (उपरणे) गळ्याभोवती गुंडाळले, विठ्ठलाचा प्रसाद म्हणून मिळालेले जरीचे वस्त्र शिरोभागी धरून त्याचा स्वीकार केला. मग पांडुरंगाच्या चरणावर डोके ठेवण्याचा चिदानंद क्षण... तोही आम्ही अनुभवला.

मग सर्वप्रथम विठ्ठलाच्या भाळावर चंदनाचा केशरी लंबाकार उभा टिळा मुख्य पुरोहितांनी लावला. हे सारे पार पडताच विठ्ठलाला वस्त्रप्रावरणे नेसवण्यास सुरुवात झाली. प्रथम भरजरी पितांबर, तो नेसवण्याची विशिष्ट पद्धत, त्याचे काठपदर, धारी, पट्टेदार रीतीने दोन्ही मांड्यांवर चोपून बसते. त्यावर पुन्हा कमरेभोवती विशिष्ट पद्धतीनेच नेसवलेले शेल्यासारखे राजवस्त्र, छाती-दंडावर मखमली, रेशमी, भरजरी वस्त्रे, गळ्यात सुवर्णालंकार, कटीवरील हातांनाही रेशमी वस्त्रे, आणि शेवटी मस्तकावर सोन्याचा मुकुट! तुळशीमाळा गळा कर ठेवुनि कटी, कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी! आता मात्र ते सावळे परब्रह्म मूर्तिमंत श्रीमंत, ऐश्वर्यवान दिसू लागले. तेवढ्यात पुजाऱ्यांनी शंखनाद केला. पाठीमागे कुणी वारकऱ्याचे सुमधुर मंद स्वरांतील, फक्त टाळ-वीणेच्या साथीने सुरू झालेले, 'तो हा माधव बरवा, तो हा विठ्ठल बरवा!' हे भजन. धूपदीपांनी भारलेली, चांदीसोन्याने मढवलेली गर्भगुडी, चांदीची नक्षीदार प्रभावळ, घंटानाद आणि आरती –

एका तंद्रीतच आमची पूजा संपली. पुरोहितांनी पुन्हा नमस्कार, हस्तस्पर्श करवून घेतला आणि शेवटच्या संकल्पपूर्तीसाठी आम्हांला मुख्य सभामंडपात, जिथे ती भव्य कासवाकृती आहे, तिथे आणले. विठ्ठलाच्या महापूजेचा भाळी अकल्पितपणे लिहिलेला सोहळा अडीच तासांनी संपला. हे अडीच तास आम्ही एका अननुभूत, अपूर्व अशा आनंदात वावरत होतो. 'चिदानंद' म्हणतात तो हाच का? हा वेडावाकुडा, काळासावळा, ओबडधोबड पांडुरंग अनादी काळापासून कोट्यवधी लोकांना वेड का लावतो त्याचा अल्पसा अनुभव आम्हांला त्याने लावलेल्या वेडातून मिळाला.

त्याच दिवशी सायंकाळी विठ्ठल मंदिरापासून जवळच असलेल्या पांडुरंग भवनामध्ये 'एक चूल – एक कुटुंब' हा अभिनव कार्यक्रम होता. पंढरपूरचे आमदार श्री. सुधाकरपंत परिचारक यांनी तो आयोजित केला होता. महिलांची प्रचंड संख्या आणि एकत्रित कुटुंबधर्माचे श्रद्धेने पालन करणारी कुटुंबीय मंडळी. मी अनेक सामाजिक उपक्रम पाहिले. अनेकांना उपस्थित राहून भाषणे केली. पण सामान्यजनांच्या कुटुंबांच्या माध्यमातून समाज एकात्म ठेवण्याचा हा प्रयत्न वेगळा होता. ऐशी-नव्वद वर्षांच्या कुटुंबप्रमुख महिलांचा कृतज्ञभावनेने केलेला सत्कार प्रथमच पाहत होतो. त्या सर्वांना, कधी नव्हे ते, व्यासपीठावर सन्मानाचे स्थान मिळाले होते. त्यांना माईकवरून आपले मनोगत सांगण्याची अपूर्वाईची संधी मिळाली होती. त्या सर्वांच्या बोलण्याचे सूत्र एकच होते. पांडुरंगाच्या या नगरीत एकोप्याने राहण्याची बुद्धी आम्हांला तोच देतो! पंढरपुरात अशी किमान पंचवीस तरी विशाल, एकत्र कुटुंबे आहेत जी एकाच चुलीवरील स्वयंपाक जेवतात. सर्व जातिधर्मांची, सर्व थरांतील. संतांनी समाजपुरुष एकात्म ठेवण्याचा भक्तिमार्गाने प्रयत्न केला. येथे कुटुंबे एकत्र ठेवण्याचा संतांनीच दिलेला मार्ग ही मंडळी श्रद्धेने चोखाळीत होती.

माणसाच्या मनातील श्रद्धा, भक्ती, ममत्व, प्रेम यांच्या आधारावरच तो जगत असतो. तो कितीही बुद्धिनिष्ठ असला तरी त्याला या भावनांना सामोरे जावे लागतेच. त्याला मी तरी अपवाद कसा असणार? एरवी कधीही पूजेअर्चेला फारसे महत्त्व न देणारा, कर्मकांड न पाळणारा, न मानणारा मी विठ्ठलाच्या दर्शनाने एवढा व्याकूळ का झालो? माझ्या हातून भक्तिभावपूर्वक यथासांग पूजा कशी घडली? माझ्या लेखककुलातील सोनोपंत दांडेकर, गो. नी. दांडेकर, इरावतीबाई, दुर्गाबाई, दि. बा. मोकाशी, तर्कतीर्थ, महामहोपाध्याय पोतदार हे सारे इथे असेच व्याकूळ झाले होते? आणि आमचे कुलस्वामी ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, नामदेव? मी तर त्यांच्यासमोर अणुरेणूएवढा. तरीही व्याकूळ होऊन मला त्यांच्या पंक्तीत एका टोकाला बसण्याचे भाग्य लाभले व मी क्षणार्ध आकाशाएवढा झालो! श्रद्धा, अश्रद्धा, अंधश्रद्धेच्या काहुरामध्ये, सीमारेषांवर अडखळणारा माझ्यासारखा सामान्य माणूस शेवटी परब्रह्मदर्शन घेऊन निवांत, शांत कसा होतो? हे सारे कोणत्या व्याख्येत बसवणार? कोणत्या अध्यात्मात?

*(मार्च २००७)*

# चित्रकार हुसैन : एक आठवण

**अरुण डिके**

एम. एफ. हुसैन यांच्यासारखा जागतिक कीर्तीचा एक चित्रकार सहज म्हणून इंदूरमधील एका जुन्या मित्राकडे साध्या रिक्षातून जातो, मित्र भेटला नाही म्हणून वेळात वेळ काढून दुसऱ्या दिवशी पुन्हा जातो आणि पुढचे दोन तास अगदी घरचाच माणूस म्हणून वावरतो त्या प्रसंगाची ही रसाळ आठवण.

जवळजवळ २१ वर्षे लोटली त्या गोष्टीला. डिसेंबर १९९०च्या तिसऱ्या आठवड्यात चित्रकार मकबूल फिदा हुसैन इंदूरात होते. त्यावेळी सेंट रेफियल स्कूलमध्ये त्यांचा अमृतमहोत्सव साजरा झाला होता. २० डिसेंबरच्या संध्याकाळी इतर कामे आटोपून मी, माझी बायको व मधली मुलगी त्रिवेणी (वय २०) घरी परतलो.

माझा सर्वात धाकटा मुलगा अभिराम (वय १६) हॉलमध्ये एकटाच अभ्यास करत बसला होता. आल्या आल्या तो मला म्हणाला, ''पापा, हुसैन अंकल आए थे''

आमचे एक पारिवारिक मित्र मझहर महम्मद हुसैन इंदूरला लोकसेवाआयोग(पी.एस.सी.)चे सदस्य होते. अधूनमधून ते भेटायला घरी यायचे. आम्हांला वाटले तेच आले असतील.

''सोबत अंटीपण आली होती का?'' हिने विचारले.

''अग आई, आले होते ते आपले हुसैन अंकल नाही. ते, पेंटर... उंच उंच पांढरी दाढी, लांब केस, हातात ब्रश...ते आले होते. बरोबर आपले शाहीद अंकलपण होते.''

माझा पत्रकार मित्र शाहीद मिर्झा त्यावेळी हुसैन साहेबांचे चरित्र लिहीत होता. ''क्यों रे, मैं ही मिला सुबह से तेरे को बेवकूफ़ बनाने'' मी अभिरामला हसत विचारले.

''कसम पापा, काकू को ऊपर जाकर पूछलो'' अभिराम गळ्याची शपथ खात बोलला. मी लगेच वर सुशीलावहिनींना (माझे वडील बंधू ऊर्फ बाबांच्या पत्नी) विचारायला गेलो.

''हो, ते आले होते बाबांना भेटायला. म्हणाले, उद्याच सकाळच्या विमानाने मुंबईला परतायचे आहे,'' वहिनी म्हणाल्या.

मी हिरमुसला चेहरा करून खाली आलो. मन खट्टू झाले होते. वाटले, की एवढा मोठा कलाकार घरी येऊन गेला अन् आम्हांला कळलेसुद्धा नाही. नेहमीप्रमाणे बाबापण जेवण झाल्यावर रात्री गप्पा मारायला खाली आले. त्यांनापण वाईट वाटले. आम्ही ठरवले, की हुसैन साहेबांना एक दिलगिरीचे पत्र लिहून सकाळी विमानतळावर जाऊन त्यांना द्यायचे.

सकाळी हिने मला पत्राची आठवण करून दिली. मी तयारी करणार, इतक्यात फोन वाजला. त्रिवेणीने फोन घेतला. फोन शाहीदचा होता. त्रिवेणी त्याच्यावर जाम भडकली, पण लगेच ''क्या सच?'' म्हणत तिने फोन ठेवला आणि म्हणाली, ''पंधरा मिनिटात ते परत आपल्या घरी येत आहेत.''

झाले, आमची धावाधाव सुरू झाली. बरोबर पंधरा मिनिटांनी आमच्या घरासमोर एक ऑटोरिक्षा थांबली. सडसडीत बांध्याचे, धवल दाढी व केशरचना असलेले हुसैन साहेब रिक्षातून खाली उतरले.

त्यांना पाहताच मोहल्ल्यातले लोक गोळा झाले. आमच्यासमोर राहणाऱ्या मेहता वकिलांच्या वडिलांनी तर कंबरेला टॉवेल गुंडाळलेल्या स्थितीत धावत येऊन हुसैन साहिबांशी हस्तांदोलन केले.

''मैं केवल १० मिनिट बाबासाहब को मिलने आया हूँ। एक गिलास पानी भी नहीं लूँगा।'' माझ्या बायकोच्या व त्रिवेणीच्या नमस्काराला उत्तर देत हुसैन साहेब हसत म्हणाले व झपझप पायऱ्या चढत वरच्या मजल्यावर बाबांना भेटायला गेले.

पायऱ्यांवरच बाबांनी त्यांचे नमस्काराने स्वागत केले. ''क्या चल रहा है बाबा साहब?'' हुसैन साहबांनी बाबांचा खांदा थोपटत विचारले.

''हिन्दू-मुसलमानों के हाल ही में हुए दंगों पर एक नाटिका लिखकर दे रहा हूँ इन्दौर युनिवर्सिटी को।'' हुसैन साहेबांना खुर्ची देत बाबा म्हणाले.

''नहीं नहीं, कुर्सी पर आप बैठिये, मैं यहाँ पलंग पर बैठकर आपका स्केच बनाऊँगा. और हां, आप सुनाइये क्या लिखा है?'' पलंगावर आरामात बसून मागे भिंतीला टेकत हुसैन म्हणाले.

बाबा वाचू लागले –

(खून से सनी तलवार लेकर उसने प्रवेश किया और बोला)

'एक झटके में दो की गर्दन उड़ा दी।'

'जीयो प्यारे। लेकिन जिनको मारा वो मुसलमान ही थे ना?'

'ये किसने देखा? हम तो भैय्या सच्चे धर्म निरपेक्ष है...'

''क्या बात है – बाबा साहब क्या बात है!'' बाबांना टाळी देत हुसैन म्हणाले.

एव्हाना माझी बायको एका मोठ्या प्लेटमध्ये काजू, गजक व एक ग्लास दूध घेऊन वर आली होती. गजक पाहताच हुसैन साहेबांचे डोळे लकाकले. ''अरे वा! ये तो पूरी प्लेट मैं ही चाट जाऊँगा।'' गजकचा तुकडा चघळत हुसैन साहेब म्हणाले.

त्यांचे स्केच काढणे व बोलणे चालू होते. त्रिवेणी कॅमेऱ्याने त्यांचे फोटो काढत होती.


दहा मिनिटांसाठीच म्हणून आलेले हुसैन साहेब चांगले दोन तास आमच्या घरी होते. इतकेच नव्हे तर जाताना त्यांनी त्रिवेणीला विचारले, ''क्यूं, मेरे आटोग्राफ नहीं चाहिए?''

त्रिवेणी तर इतकी भांबावून गेली की, ''ठहरिये, ठहरिये'' बोलत खाली पळाली आणि वर येऊन एअर इंडियाची हाती मिळाली ती एक डायरी तिने हुसैन साहेबांसमोर ठेवली. हुसैन साहेबांनी तिच्यातल्या समोर उघडलेल्या पानावर अक्षरशः दोन मिनिटांत त्यांचा आवडता घोडा काढला व आपली सही दिली (सोबतचे चित्र).

त्यांनी कला महाविद्यालयात नुकत्याच काढलेल्या गणपतीच्या चित्राबद्दल मी त्यांना विचारले, की गणपतीचे चित्र का काढले?

माझ्या खांद्यावर हात ठेवत ते शांत स्वरात म्हणाले, ''मुझे दिनभर में कई पेंटिंग्ज करने थे और मैं मेरे काम की शुरुवात गणेश जी से करता हूँ।''

(ऑक्टोबर २०११)



# अखेरचं अवधान

## अवधूत परळकर

"ज्या समाजात वाचन ही बिनमहत्त्वाची गोष्ट समजली जाते; ज्या समाजात ज्ञानपीठविजेत्या व्यक्तीपेक्षा टीव्ही मालिकेतला नवा कलाकार अधिक पैसा, प्रतिष्ठा मिळवून असतो, त्या समाजात कुणाही लेखकाला निराशेनं ग्रासलं तर नवल नाही."

सलग चार वर्षे चाललेल्या अवधान या सदरातील समारोपाचा लेख.

---

हे शेवटचं 'अवधान'.

'अवधान' सुरू करण्याचा निर्णय संपादकांचा होता. पण हे सदर थांबवायचा निर्णय मात्र त्यांनी माझ्यावर सोपवला.

"अवधान सदर 'अंतर्नाद'च्या अखेरच्या अंकापर्यंत चालवायला आम्हांला आवडेल. मात्र तुमची इच्छा होईल तेव्हा ते तुम्ही बंद करू शकता," असं ते मला नेहमी म्हणायचे. अलीकडल्या भेटीत त्यांनी हे वाक्य पुन्हा उच्चारताच, त्या वाक्याची वाट पाहत असल्याप्रमाणे, सदर याच महिन्यात संपवावं असं मला वाटत असल्याचं त्यांना बोलून दाखवलं. निरोपादाखल अखेरचं एक 'अवधान' लिहून त्यात सदर समाप्तीची घोषणा करावी असं ठरलं.

'अवधान'लिहिणं थांबवावं असं मला का वाटावं? लिहायची तर मला चांगलीच हौस आहे. मग, संपादकांची काही तक्रार नसता, मला हे सदर थांबवावंसं का वाटलं? या अखेरच्या 'अवधान'मधून मी स्वत: या प्रश्नाची उत्तरं शोधू पाहातोय.

उत्तरं शोधू पाहण्याच्या या प्रक्रियेत स्वत:विषयी बोलणं आलं; जी गोष्ट मला अजिबात आवडत नाही. मग हे कसं जमायचं? एका मित्राच्या सांगण्यानं हे अवघडलेपण बरंच दूर झालं. मित्र म्हणाला, "विचार करून बघ, आपल्याला स्वत:विषयी बोलायला आवडत नाही; आत्मप्रौढी रुचत नाही, असं बोलणं हेही स्वत:विषयी आत्मप्रौढीनं बोलणंच नाही का? आपल्याला कोणत्याही प्रकारचा गर्व नाही असं छाती पुढं काढून बोलणं हे काय असतं? गर्वच नाही काय तो एक प्रकारचा?"

मित्राचं बोलणं एकदम पटून गेलं. स्वत:विषयी बोलायला पुरेसं नैतिक अधिष्ठान प्राप्त झालं.

मला लिहायची हौस आहे असं आधी म्हणून गेलो, ते अर्धवट सत्य आहे. मला लिहायला आवडतं म्हणजे विचार प्रकट करायला आवडतात. पण ते विचार नीटपणे कागदावर उतरवणं मला नेहमीच कठीण वाटत आलं आहे. जसं आता मला अवधान थांबवायचं एकच एक ठाम कारण सांगणं कठीण होऊन बसलं आहे. काय करावं? आपल्या आळशीपणाची जाहीर कबुली कशी द्यायची?

थोडा विचार केला, तेव्हा आणखी काही मुद्दे मिळत गेले. उदाहरणार्थ : माझी तक्रार लिहिण्यासंबंधी नाही; लिहायला वेळेचं बंधन असण्यासंबंधी आहे. विशिष्ट मुदतीत विशिष्ट मजकूर लिहिणं ही मला शिक्षा वाटते. शाळेत मला निबंध लिहायला आवडायचा; पण शाळेच्या परिक्षेत निबंध लिहिणं मला संकट वाटायचं. लेखनासाठी कालमर्यादा नकोशी वाटायची. 'अवधान'चा तीन पानी मजकूर लिहायला मी सात सात दिवस घेत असे. माझा लिहायचा वेग कमी आहे. लिहिण्याआधी विषयावर विचार करण्यासाठी वेळ द्यावा लागतो. माझा विचार करण्याचा वेळ तर माझ्या लिहिण्याच्या वेगाहून कमी आहे. हे मी माझा मोठेपणा किंवा कमीपणा म्हणून तुमच्यापुढं ठेवत नाही. माझ्या बऱ्या-वाईट स्वभावाचं वास्तव म्हणून हे तुमच्यासमोर मांडतोय. लिहिणाऱ्याचा स्वभाव, आवडीनिवडी त्याच्या लेखनातून वाचकांपुढं येत राहतात असं म्हटलं जातं. पण ते पूर्ण सत्य नाही. लिहिणारे (आणि न लिहिणारे लोकदेखील) अनेकदा स्वत:ला व्यक्त करण्याऐवजी स्वत:चं अंतरंग लपवण्यासाठी शब्द वापरतात.

अंजली कुलकर्णीनं आपल्या कवितेत म्हटलंय –

'बरे झाले निर्माण झाली भाषा संकरातून
म्हणूनच शब्द आले माणसाच्या तैनातीसाठी
अन्यथा कसे दडवले असते आपण सत्य पोटी?'

तर एकूणच लिहिता-बोलताना आपली अशी दडवादडवी बरीच चालते.

कारणांचा शोध घेऊ या असं जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा आपण त्या संशोधन कामासाठी अप्रत्यक्षपणे वाचकांच्या सहकार्याची मागणी करत असतो. सहकार्य कोणते? तर आपण वाचकांना जे सांगू पाहत असतो, त्यामागील प्रामाणिकपणा समजून घ्यायचा वाचकांनी प्रयत्न करावा हे.

कोणतीही गोष्ट नियमित होऊन बसली, की शिक्षा होऊन जाते. एकीकडे विचार प्रकटीकरणाची हौस मला एकापाठोपाठ एक 'अवधान' लिहायला प्रवृत्त करत होती. पण त्यासाठी पाळावी लागणारी शिस्त, घ्यावे लागणारे लेखनकष्ट हे सर्व तापदायक वाटत होते. हा त्रास मला लेखनापासून परावृत्त करत होता. याखेरीज इतर अडचणी जाणवायला लागल्या. 'अवधान' लिहिण्यात अडकून पडलं, की इतर बरीच अवधानं मागे पडतात हे लक्षात यायला लागलं. मुळात कोणत्याही स्वरूपाचं लेखन करताना अशी अडकून पडल्याची भावना असणं हे वाईट. सतत दुसऱ्याला काहीतरी सांगण्याचा एवढा अट्टाहास तरी कशासाठी? असे प्रश्न मनात यायला लागले. या अट्टाहासासाठी आपण काय किंमत चुकवतो आहोत?

विचारमांडणीतून हाताशी काय लागतं?

जे समविचारी असतात, ज्यांच्या मनातले विचार आपल्या विचारांशी जुळतात, त्यांना आपलं लिखाण आवडतं. मात्र ज्यांनी आपले विचार समजून घ्यावेत, आपल्या विचारांनी ज्यांच्या मनोभूमिकेत फरक पडावा असं आपल्याला वाटत असतं, त्यांच्यावर आपल्या वैचारिक मांडणीचा काही परिणाम होत नाही. ते काही केल्या आपले विचार सोडायला तयार नसतात. आपल्या लेखातील विरोधी विचारानं ते खवळून जातात; आपण त्यांच्या मनातून उतरतो. 'अंतर्नाद'साठी लिहिताना असे अनुभव अनेक येत गेले. प्रतिकूल मतांनी वाचक नाराज व्हायचे. मनातले विचार काहीशा आक्रमकपणे मांडण्याच्या माझ्या सवयीनं काही वाचकांचा क्षोभ त्यांनी पाठवलेल्या पत्रांतून व्यक्त व्हायचा. संपादकांकडे पत्रं जायची, त्यातली काही ते छापायचे; संकोचापोटी त्यांनी अनेक प्रतिकूल पत्रं छापली नसावीत, असा माझा संशय आहे.

प्रतिकूल पत्रातल्या सकारात्मक विधानांतून प्रश्नाची दुसरी बाजू आपल्यासमोर येईल; आपलं प्रबोधन होईल ही आशा मात्र फोल ठरली. माझ्या लेखानामुळे त्यांचा झालेला प्रक्षोभ तेवढा त्यांच्या पत्रातून दिसत गेला. मी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरं द्यायचा प्रयत्न त्यांच्यापैकी कोणी करत नसे. नुसताच त्वेष आणि दूषणं.

पूर्वसूरींच्या अभ्यासकांनी, पंडितांनी मांडलेल्या सत्याला तुम्ही विरोध करता म्हणजे काय? समजता कोण तुम्ही स्वत:ला? असा सूर अनेक पत्रांत असायचा.

गीता वाचताना मला कायम पडत असलेले एकदोन प्रश्न मी एकदा वाचकांसमोर ठेवले. आपल्या इच्छेविना या सृष्टीतलं पानही हलत नाही, असं गीतेत श्रीकृष्णानं म्हटलं आहे त्याचा संदर्भ घेऊन मी म्हटलं होतं, की संपूर्ण जगाचं नियंत्रण श्रीकृष्ण करत असेल तर परवाचे बॉम्बस्फोट श्रीकृष्णानं घडवून आणले, असं का नाही म्हणायचं? ओसामा बिन लादेन, दाऊद हे निमित्तमात्र आहेत, अर्जुनाप्रमाणे. श्रीकृष्णच त्यांच्याकरवी निरपराधांच्या हत्या घडवून आणतो आहे, असं आपण का नाही म्हणायचं? श्रीकृष्णच जर सर्व सृष्टीला आपल्या मनाप्रमाणे वागायला लावतो आहे; जगातल्या सर्व व्यवहाराला तोच जबाबदार आहे, तर अर्जुनाच्या मनात जे युद्धविरोधी विचार आले; धनुष्य टाकून तो खाली बसला, हे कोणी घडवलं?

श्रद्धावान वाचकांचा या प्रश्नांमुळे प्रक्षोभ झाला. अद्वातद्वा भाषेत त्यांची मला पत्रं आली. पण एकानंही माझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचा प्रयत्न केला नाही.

चांगलं वागण्यासाठी मोक्ष, स्वर्ग याची लालूच, आणि नरकाची दहशत कशासाठी? या प्रलोभनाविना किंवा भीतिविना माणूस चांगला वागू शकत नाही काय? असा माझा दुसरा प्रश्न होता. माझ्या धर्मप्रेमी वाचकमित्रांनी याबाबतही माझं प्रबोधन केलं नाही. म्हणजे माझ्या लिखाणापासून फायदा ना त्यांचा ना माझा. ही हताशता हेही लिखाण थांबवण्यामागचं एक कारण असावं.

मी मांडलेले विचार फार नवीन नव्हते. ''चांगल्या कृत्याबद्दल ईश्वराची पूजा करायची, तर वाईट घटनांबद्दल त्याला जबाबदार धरून त्याचा गळा का धरायचा नाही?'' असा प्रश्न वि. दा. सावरकरांनीही आपल्या निबंधात विचारला होता.

लेखातून मांडलेल्या शहाण्या किंवा मूर्ख प्रश्नांमुळे जी लहानमोठी वादळं निर्माण झाली त्या वादळांत भानू काळे आणि वर्षा काळे हे संपादक दाम्पत्य माझ्यामागे ठामपणे उभं राहिलं. माझ्या विवेचनातले मुद्दे स्वत:च्या मनाला पटोत न पटोत, व्हॉल्तेअरच्या वचनाला जागून, त्यांनी प्रतिकूल मत प्रतिपादन करण्याच्या माझ्या अधिकाराला भक्कम पाठिंबा दिला. सह-संपादिका स्नेहा अवसरीकर हिनंही माझ्या लिखाणामागील सचोटीला आणि वैचारिक निष्ठेला अशा समरप्रसंगी नैतिक पाठबळ पुरवलं.

मला आठवतं, एका लेखात मी रामकृष्ण परमहंसांच्या संदर्भातल्या माझ्या शंका मांडल्या होत्या. परमहंसांनी आयुष्यात पैशाला कधी स्पर्श केला नाही अशी आख्यायिका आहे. स्वामी पैशाला स्पर्श न करता जगू शकले कारण कोणी ना कोणी त्यांच्या वतीनं पैशाला स्पर्श करण्याचं पाप करत होतं, असं मी म्हटलं होतं. त्यावर स्वामिभक्तांनी गदारोळ केला. मला त्याबद्दल माफी मागावी असं तेव्हा वाटलं नाही; आताही वाटत नाही. उलटपक्षी, अज्ञानावर आधारलेल्या श्रद्धा दुखावल्याबद्दल माफी मागण्यानं अज्ञानाचा गौरव होतो, असं मला वाटत आलं आहे.

अज्ञान माझ्या प्रतिपादनामागेही असू शकतं. पण ते दाखवून द्यायचा प्रयत्न या मंडळींपैकी कोणालाही करावासा वाटला नाही, हे मला आज या अखेरच्या 'अवधान'मध्ये स्पष्टपणे मांडावसं वाटतं.

मनमोकळेपणानं आपल्या मनातले प्रश्न मांडणं हा काही सामाजिक गुन्हा नाही. या कृत्यानं कोणाची मनं दुखावली जात असतील तर तो त्यांचा प्रश्न आहे. असहिष्णुता हा मानवी विकार आहे असं मी मानतो.

मी काय असं विघातक बोलत होतो? संतमंडळींच्या संदर्भातल्या खऱ्याखोट्या आख्यायिकांपेक्षा त्यांचे विचार महत्त्वाचे, हे मी निराळ्या प्रकारे सांगायचा प्रयत्न करत होतो. पण संतवचनांऐवजी पादुका पुजण्यात धन्यता मानणाऱ्या वाचकांच्या

गळी मला हे उतरवता आलं नाही. उठता बसता फुले, आंबेडकरांचा, ज्ञानेश्वरांचा जप करणाऱ्यांच्या राज्यात आपण मोकळेपणानं मनातले विचार मांडू शकत नाही, याचं मात्र मला मनापासून दु:खं होतंय.

लेखासंदर्भातल्या सर्व पत्रांना मी उत्तरं दिली नाहीत हे खरं आहे. कारण अनेक पत्रांतले मुद्दे गैरलागू असायचे. एका पत्रात माझ्या शारीरिक व्यंगावर टीका-टिपण्णी होती, तर दुसऱ्या एका पत्रात मी ज्या संस्थेत काम करतो, तिथलं माझं पद आणि योगदान काय याची विचारणा होती. याचा अर्थ मी कचेरीत चतुर्थ श्रेणीचा कर्मचारी असेन तर मला कोणावर काही टीका-टिपण्णी करायचा अधिकार नाही. उपस्थित केलेल्या मूळ प्रश्नाला बगल देणारे आक्षेप मी स्वीकारू शकत नाही, हे आत्मप्रौढीचा दोष स्वीकारून मला सांगायलाच हवं. काही विरोधी पत्रांत मात्र मुख्य मुद्द्यांवर विधायक चर्चा असायची. अशा पत्रांनी माझं निश्चितपणे प्रबोधन व्हायचं, हेही इथं नमूद केलं पाहिजे.

पण एकुणातच 'अवधान'मधल्या मांडणीला 'अंतर्नाद'च्या वाचकांचा मोठ्या प्रमाणावर विरोध आहे, हे माझ्या, उशिरा का होईना, लक्षात येऊ लागलं. तेव्हा वाचकांना क्लेश देणारा हा प्रकार बंद करावा या विचारानं मी कदाचित या निर्णयाप्रत येऊन पोहोचलो असेन.

दोन अफाट कादंबऱ्या लिहिलेल्या आणि त्यांना मिळालेल्या उदंड प्रतिसादातून वाचकवर्तुळात अफाट कीर्ती आणि सन्मान मिळण्याचं भाग्य लाभलेल्या आजच्या एका आघाडीच्या लेखिकेनं अलीकडे लेखन थांबवायचा निर्णय घेतला. 'यापुढे मी कोणाला चार ओळींचं पत्रही लिहिणार नाही; उद्या आत्महत्या केली तर बोटभर चिठ्ठीही लिहिणार नाही,' असं म्हणतेय आज ती. लेखनाचा इतका पराकोटीचा तिटकारा तिच्या मनात का निर्माण व्हावा?

लिहिणं हा माझा श्वास बनून गेला आहे, असं बोलणारे एका बाजूला; आणि लिहिणं उच्छ्वासाप्रमाणे एका दमात सोडून देणारी ही लेखिका एका बाजूला. लेखन ही गोष्ट तिला एकाएकी बंडल वाटायला लागण्यामागची तिची कारणं काय हे तिचं तिला ठाऊक. आपण आपल्या बुद्धीनं केवळ त्यावर तर्कवितर्क लढवू शकतो.

ज्या समाजात वाचन ही बिनमहत्त्वाची गोष्ट समजली जाते, ज्या समाजात ज्ञानपीठविजेत्या व्यक्तीपेक्षा टीव्ही मालिकेतला नवा कलाकार अधिक पैसा, प्रतिष्ठा मिळवून असतो, त्या समाजात कुणाही लेखकाला निराशेनं ग्रासलं तर नवल नाही. न वाचणाऱ्या समाजात लेखन हा मूठभरांनी खेळायचा गोल्फसारखाच खेळ ठरतो. गोल्फदेखील जास्ती लोक खेळतात, असं कोणी यावर म्हणायचा!

आपली कादंबरी अफाट खपली हे खरं, पण ती वाचली किती जणांनी? हा प्रश्न थोरामोठ्या लेखकांनाही सतावत असतो. एक हजाराची एक आवृत्ती म्हणजे पुस्तकाच्या एक हजार प्रती. अशा पाच आवृत्त्या संपल्या, की आपल्याकडे लेखक-प्रकाशकांना अस्मान ठेंगणं होतं. नऊ कोटी लोकसंख्या असलेल्या मराठी भाषिक राज्यात प्रथितयश लेखकाच्या पुस्तकाच्या पाच-सहा हजार प्रती खपणं ही हुरळून जाण्याची घटना बनून जावी, ही गंमतच आहे.

मला एका टीव्ही निर्मात्याची गोष्ट आठवते. "माझ्या कार्यक्रमाला छान रिस्पॉन्स मिळतो आहे," असं तो मला एकदा म्हणाला. मी म्हटलं, "हे रिस्पॉन्स वगैरे कसं ठरवता तुम्ही लोक?" उत्तरादाखल त्यानं ड्रॉवर उघडून मला महिन्याभरात आलेली पत्रं दाखवली. एकूण आठ पत्रं होती. पण ती दाखवताना माझ्या निर्मात्या मित्राचा चेहरा भलता उत्तेजित झाला होता. दूरदर्शन पाहणारे पाच कोटी प्रेक्षक आणि कार्यक्रमाची प्रशंसा करणारी ही आठ पत्रं. आपण फक्त दीर्घ श्वास सोडायचा. अनेक प्रसंगी सुस्कारा सोडण्यापलीकडे आपल्या हातात काही नसतं.

मनाशी विचार केला तर एक कबूल करायला हवं, की माझ्या बाबतीत तरी लेखन हा श्वास बनून गेला आहे, अशी काही गोष्ट नाही. वाचण्याबद्दल विचाराल तर मात्र वेगळं उत्तर द्यावसं वाटेल. 'वाचणं'हा मात्र माझा श्वास बनून गेला आहे, असं मिरवायला मला आवडेल. वास्तविक लेखन ही जशी वेळखाऊ गोष्ट आहे, तशीच वाचन ही चांगल्यापैकी वेळखाऊ गोष्ट आहे. पण आपली आवडती गोष्ट करताना आपला वेळ वाया गेला असं कधीच वाटत नाही.

'लिहिणं' आणि 'जगणं' यांतून एकाची निवड करायची असा प्रसंग ओढवला, तर जगण्याची निवड करणं नि:संशय शहाणपणाचं. मात्र 'जगणं' आणि 'वाचन करणं' यांतून एकाची निवड करायची वेळ आल्यास जगण्याला फार महत्त्व देऊ नये असं मी म्हणेन.

वाचण्यासारखी अद्‌भुत गोष्ट नाही असं मला वाटतं. वाचनाचा माझा छंद बाजूला ठेवून विविध विषयांवर आपल्याला काय वाटतं हे सांगण्यात मी आयुष्याची आणि 'अंतर्नाद'ची बरीच पानं खर्च केली. लेख असो कादंबरी असो की कविता, सर्व प्रकारचं लिखाण हे विविध विषयांवरल्या आपल्या प्रतिक्रिया थेट किंवा अप्रत्यक्ष मांडणंच तर असतं.

'अवधान' आणि इतर तीन-चार सदरांसाठी नियमित लिहिताना वाचणं हे लिहिण्यापेक्षा अधिक महत्त्वाचं आहे, हेच अवधान सुटलं. दोन लेखांच्या दरम्यान जो काही थोडा वेळ मिळायचा त्यात वाचन व्हायचं; नाही असं नाही. पण अनेकदा तेही लिखाणासाठी संदर्भ म्हणून केलं जायचं. वाचताना सदरांच्या तारखा सांभाळण्याची टोचणी कायम असायची. बाहेरच्या दुनियेत उत्तमोत्तम सिनेमे प्रदर्शित झालेले असायचे. सिनेमहोत्सव चालू व्हायचे. नवनवी प्रायोगिक नाटकं घराजवळच्या नाट्यगृहात लागलेली असायची. पण सदरलेखनाच्या तणावामुळे नाटक-सिनेमाला फिरकता यायचं नाही. जगणंच थांबून गेल्यासारखं झालं.

संपादकांची भेट होताच स्पष्टपणे त्यांना हे दैनंदिन ताण-तणाव सांगून टाकले. एकीकडे 'अवधान'सारखं सदर लिहिताना

आनंद होत असला, तरी दुसऱ्या पातळीवर सदर लेखनाच्या रेट्यामधून वैयक्तिक जीवनावर होत असलेले परिणाम त्यांच्यापुढं मोकळेपणानं मांडले. 'अवधान' थांबवायचा निर्णय त्यांना कळवून टाकला. लिहिण्याचा आनंद इतके दिवस घेतला, आता न लिहिण्याचा आनंद घेऊ असा मनात विचार आला. सुटका झाल्यासारखं वाटलं. (कदाचित वाचकांनाही माझ्याप्रमाणेच सुटका झाल्याप्रमाणे वाटलं असेल.)

हे निरोपादाखलचं पान 'अवधान'मधल्या लेखांचा आढावा घेण्यासाठी वापरायचं नाही, हे आधीच ठरवलं होतं. बौद्धिक व्यासंगाबद्दल माझी ख्याती नाही, हे 'अवधान'च्या वाचकांना सांगायची गरज नाही. दर महिन्याला त्याचा प्रत्यय त्यांना येतच होता. एका अनपढ व्यक्तीच्या हाती एक स्तंभ संपादकांनी इतका दीर्घ काळ चालवायला कसा दिला, याचं अनेकांना आश्चर्य वाटलं असेल.

स्वतःच्या लेखन-गुणवत्तेबद्दल मी स्वतः काही चांगलं-वाईट बोलणं अश्लीलच ठरेल. एक मात्र सांगावंसं वाटतं, वैचारिक सुस्पष्टता हे 'अवधान'चं वैशिष्ट्य कधीच नव्हतं. वैशिष्ट्य असलंच, तर वैचारिक अस्पष्टता हे होतं. सुरुवातीला विषय एका विशिष्ट अंगानं मांडायचा या उद्देशानं मी लिहायला सुरुवात करत असे, पण लिहिता लिहिता विषयाच्या अनेक बाजू दिसायला लागत. सुरुवातीला या प्रकारानं गोंधळ उडायचा. मग विचार केला, की जेवढ्या बाजू दिसताहेत तेवढ्या सगळ्या मांडाव्यात. मनात गोंधळ असेल तर तो जसाच्या तसा कागदावर उतरवावा. काय हरकत आहे? नाहीतरी, आज सगळ्या विचारप्रणालींमध्ये, मूल्यव्यवस्थेमध्ये किती वैचारिक अराजक माजलं आहे! समाजजीवनातलं हे अराजक लेखात उतरलं तर त्यात गैर वाटायचं कारण काय? परिणामी लेखात वैचारिक विस्कळीतपणा येत गेला. विस्कळीतपणा हाच लेखाचा मुख्य विषय असल्याच्या थाटात मी तो मिरवला.

एक आग्रहानं सांगितलं पाहिजे, 'अवधान'मधले विषय आणि विचार बरे-वाईट कसेही असले तरी, ते मांडण्यामागे प्रामाणिकपणा असायचा. खरं तर, प्रामाणिकपणा एवढं एकच भांडवल अवधान लिहिताना माझ्यापाशी असायचं. सदर लिहिण्यासाठी मला ते पुरेसं वाटायचं.

'अवधान'मधून आपल्या बुद्धीच्या पलीकडे जाऊन लिहायचा माझा प्रयत्न असे. प्रत्यक्षात लेख बुद्धीच्या अलीकडे येऊन थांबत असे.

एखादा अगदी नवा विषय हाताळला, की त्या विषयाला आपण किती न्याय दिला याची छाननी करण्यापेक्षा आपण नवा विषय हाताळला, याचंच समाधान मला वाटत असे. अल्पसंतुष्टांना नैराश्य येण्याची शक्यता कमी असते, हे लक्षात आल्यापासून मी कायम अल्पसंतुष्ट राहायला धडपडतो आहे. पण नेमक्या याच वृत्तीमुळे विषयाच्या खोलात शिरायचा मी प्रयत्न केला नसावा. माझ्या लिखाणावर उथळपणाचा शिक्का माझेच काही मित्र मारायचे. त्यांच्या टीकेत तथ्य असावं. लेखात अनेक विषयांना उडता स्पर्श असायचा. आपल्याप्रमाणे वाचकांच्या मनात या मुद्द्यांवर विचार तरंग उमटावेत, त्यांच्या पद्धतीनं त्यांनी त्यावर विचार करून उत्तरं शोधावीत, अशी माझी भूमिका राहिली. एखाद्या प्रश्नावर सर्वमान्य असं उत्तर शोधून काढणं मला आजच्या कोलाहलात कठीण वाटतं.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे मी बुद्धी आणि व्यासंग दोन्ही बाबतीत कमी असलो, तरी मला बुद्धिमान मित्रपरिवार लाभलेला आहे. या बाबतीत मी मित्तल, अंबानींहून श्रीमंत आहे. विविध प्रश्नांवर या माझ्या बुद्धिमान मित्रांत अखंड चर्चा चालू असतात. त्या नुसत्या ऐकल्या तरी आपण समृद्ध होऊन जातो. 'अवधान'साठी विषय पुरवण्याचं अप्रत्यक्ष काम या चर्चांनी केलं आहे.

हे काहीसं आभारप्रदर्शनासारखं होत असेल तर त्याला माझा नाइलाज आहे. समविचारी वाचकांइतकेच माझ्या विचारांशी सहमत नसलेल्या वाचकांचे आभार मानायला हवेत. सर्वांनीच काही त्वेषानं शाब्दिक हल्ला केला नाही. अनेकांनी माझे वेडेवाकडे विचार सहन केले. काहींनी या बालीश, खुळ्या माणसाच्या नादी कशाला लागा म्हणून दुर्लक्ष केलं. इतरांनी एका असंस्कृत माणसाच्या हाती स्तंभ सोपवल्याबद्दल संपादकांना दोषी धरलं. असो.

प्रत्यक्षात 'अंतर्नाद'च्या संपादकांशी माझं फार कमी मुद्द्यांवर एकमत आहे. पण दुसऱ्यांच्या विचारांचा आदर राखण्याचा दुर्मीळ गुण त्यांच्यापाशी आहे. मला हा फार मूल्यवान गुण वाटतो. मी त्यांच्या या गुणाचा विपुल फायदा उठवला आणि बरंच व्रात्य, उनाड लेखन केलं. माझ्या उद्धट लेखनशैलीनं दुखावलेल्या वाचकांचा रोष संपादकांना सहन करावा लागतोय, यानं मी अस्वस्थ होत असे. वाचकांच्या पत्रांनी त्यांना कमी मनस्ताप झाला नसेल. पण तरीही संपादकांनी मला एखाद्या मोठ्या प्रतिष्ठित लेखकाप्रमाणे कमालीच्या आदरानं वागवलं. माझ्या कोणत्याही मजकुरावर त्यांनी कधी सेन्सॉरची कात्री चालवली नाही. लिखाणातला एखादा शब्द बदलायचा झाला तरी ते त्यासाठी फोनवरून माझी परवानगी घेत.

माझ्या मूर्तिभंजक लेखनानं नाराज झालेल्या एका वाचकानं मध्यंतरी संपादकांना आर्थिक धमकी द्यायचा प्रयत्न केला होता. ''मी तुम्हांला पंचवीस सदस्यांची वर्गणी पाठवतो आहे. 'अवधान' सदर चालू ठेवणार असाल तर मात्र मला हा निर्णय रद्द करावा लागेल,'' असं त्यांनी म्हटलं होतं. संपादकांनी आर्थिक लाभ नाकारला; त्या वाचकाच्या धमकीला भीक घातली नाही.

आता त्या सदगृहस्थांनी पंचवीस-तीस सदस्यांची वर्गणी पाठवायला हरकत नाही.

*(जानेवारी २००८)*

*(यानंतर पुन्हा अंतर्नादच्या वाचकांसाठी अवधूत परळकर यांनी अनवधान या शीर्षकाचे आणखी एक सदर लिहिले. त्यातील एक लेख पुढील पानावर.)*

# मी चोवीस तास

**अवधूत परळकर**

''पण दिवस मार्केटिंगचे आहेत. स्वत:चं घोडं पुढं दामटवलं नाही, तर आपण शर्यतीत मागे पडू, या विचारानं सगळे भयभीत झाले आहेत. या भयातून नवे अतिरेकी जन्माला येत आहेत. हळूहळू ऐकणाऱ्यांची संख्या कमी कमी होत जाईल आणि एक दिवस जगात स्वत:विषयी बोलणारेच तेवढे शिल्लक राहतील.''

*माझीया मीपणावर पडो पाषाण, जळो हे भूषण नाम माझे...* असं जे तुकाराम महाराजांनी म्हणून ठेवलंय, ते त्यांच्यापुरतं ठीक आहे. आपल्याला त्याचा काय उपयोग? भाषणाबिषणातून श्रोत्यांना प्रभावित करण्यासाठी संतांची वचनं ठीक असतात. ज्या शैलीत आपला जीवनव्यवहार चालू आहे, त्या जीवनशैलीत विचारांचा आचारांशी संबंध जोडणं हे काही जमण्यासारखं नाही आपल्याला. तुलनेनं विचारांचे टाळ कुटणं अधिक सोपं आहे आजच्या परिस्थितीत. नाहीतरी एका गालावर चापटी मारल्यावर कोणता ख्रिश्चन आज दुसरा गाल पुढं करतो? तो हातच उगारतो. तेव्हा म्हणेनात तुकाराम महाराज... *माझीया मीपणावर पडो पाषाण.* आपण थोडेच संतबिंत आहोत! इथं आपलं पूर्ण आयुष्य मीपणावर उभारलेलं.

आपल्या मीपणावर पाषाण म्हणजे संपलंच सगळं. आपल्या मीपणावर सदा न कदा फुलं पडोत आणि आणि या वर्षावात आपला मीपणाही अधिक फुलून येवो. नाही केला फुलांचा असा वर्षाव कोणी, तर तो आपण स्वत: करू.

स्वत:वरच फुले उधळण्याचे; स्वत:च स्वत:चा गौरव करायचे उद्योग देशात सध्या जोरात चालू आहेत. आजकाल जो भेटतो, तो स्वत:बद्दल बोलत राहतो. आणि बोलण्यातून या ना त्या प्रकारे सतत तो स्वत:चा मोठेपणा मिरवत राहतो. 'सारखं स्वत:बद्दल बोलणारी ही माणसं वात आणतात' असं परवा एक जण मला लोकलमध्ये सांगत होता आणि बघता बघता तो स्वत:विषयी कधी बोलायला लागला, त्याचं त्याला कळेना. त्याची बडबड त्याचं उतरायचं स्टेशन येईपर्यंत अथक चालू होती. स्वत:चं गुणगान करताना कधीच थकवा येत नाही. तो मला हेच सांगत होता. स्वपुराण लावणाऱ्या बोअर मंडळींपासून आपण कसे वेगळे आहोत, लहानपणापासून आपण कसे वेगळ्या वातावरणात वाढलो; त्यामुळे स्वत:विषयी कमी बोलायची वृत्ती आपल्यात कशी भिनली, वगैरे सगळं तो मला पटवून देत होता.

आणि ही फक्त परवाची गोष्ट नाही; काल तेच घडलं, आज तेच, उद्याही तेच घडणार आहे.

रोज अशी माणसं भेटतात. आपला हात हातात घेऊन सांगत राहतात – आपण आपल्या क्षेत्रात किती हुशार आहोत, बाहेर आपल्याला किती डिमांड आहे, ऑफिसात आपल्याशिवाय कोणाचं कसं काही चालत नाही; आपल्या कामानं मॅनेजमेंट कशी इम्प्रेस झाली आणि आपल्याला कशी भराभर प्रमोशन मिळत गेली. प्रॉब्लेम कितीही कॉम्पलिकेटेड असले, तरी आजवर आपण ते कसे चुटकीसरशी सोडवले आहेत...

या मंडळींचं हे सर्व आपल्याला निमूट ऐकावं लागतं. आपल्या विनयशीलतेविषयीदेखील ते छाती फुगवून सांगतात की... आपण इतके थोर नि कर्तृत्ववान असताही आपल्याला आपल्या थोरपणाचा गर्व कसा नाही; इतरांप्रमाणे आपल्या हुशारीचा, कर्तृत्वाचा डांगोरा पिटायला आपल्याला अजिबात आवडत नाही, हे सगळे लहानपणापासूनचे संस्कार आहेत, वगैरे... आपण कान उघडे ठेवून आणि तोंड बंद करून ऐकायचं फक्त.

आपला जन्म ऐकण्यासाठी झाला आहे, त्यांचा बोलण्यासाठी.

शाहरूख आणि सलमान खानच्या हिंदी सिनेमाइतकाच, सतत स्वत:बद्दल बोलत राहण्याचा हा प्रकार आज आपल्या देशात कमालीचा लोकप्रिय आहे. बोलणाऱ्यांसाठी सुखदायक, ऐकणाऱ्यांसाठी तापदायक प्रकार. प्रकारच म्हटलं पाहिजे याला; विकार नाही. आपल्या देशातल्या सत्तर टक्के लोकांची जी सवय आहे; जी जीवनपद्धती आहे, तिला विकार कसं म्हणून चालेल? राजन खान या आमच्या हरहुन्नरी लेखक मित्रानं दोनेक वर्षांपूर्वी मराठी साहित्यिकांसाठी एक कार्यक्रम ठेवला होता. 'मी आणि माझे साहित्य' या विषयावर साहित्यिकांनी बोलावं, अशी ती कल्पना होती. आमच्या मित्रवर्तुळानं त्याला 'हा कसला विषय ठेवलास' म्हणून छेडलं. त्यावर राजन म्हणाला, ''अरे, मी पाहिलंय, कोणताही विषय द्या, माइकजवळ उभे राहिले, की हे आपले साहित्यिक शेवटी स्वत:बद्दलच बोलत राहतात.''

राजरोस स्वत:चं गुणगान करायला, स्वत:च्या कामगिरीचे नि:संकोच पोवाडे गायला 'आत्मचरित्र' नावाची एक छान युक्ती साहित्यिक मंडळींनी शोधून काढली आहे. आपल्या थोरपणाच्या, आपल्या पराक्रमांच्या, संकटांवर व शत्रूंवर आपण मिळवलेल्या विजयांच्या खऱ्या-खोट्या कहाण्या तपशिलांसह आत्मचरित्रात

पद्धतशीर सांगता येतात. असे कितीतरी गौरवाचे प्रसंग आत्मचरित्रकारांच्या आयुष्यात घडतात ज्याला तेच फक्त साक्षी असतात. ज्या मास्तरांनी आपल्या रूममध्ये त्यांना मुद्दाम बोलावून शाबासकी दिलेली असते; 'भविष्यात तू खूप नाव कमावणार' म्हणून भाकीत केलेलं असतं ते मास्तरही दिवंगत झालेले असतात. मग काय, मुक्त चित्रकला असते तशी मुक्त आत्मकथनकला. मान्यवर नेत्याचं किंवा लोकप्रिय कलावंताचं निधन होतं, तेव्हा आदरांजली वाहताना त्या व्यक्तीला हलकेच दूर करून आदरणीय वक्ते स्वत:बद्दलचं पुराण कसं लावतात हे आपण पाहत आलोत. दिवंगत व्यक्ती आपल्याला कोठे भेटली; अल्पावधीत आपण तिचे सर्वांत जवळचे मित्र कसे बनून गेलो, अशा वर्णनांनी ही भाषणं भरलेली असतात. श्रद्धांजली वाहण्यासाठी भरवलेल्या प्रत्येक शोकसभेत, त्यानिमित्त लिहिलेल्या मृत्युलेखात दिवंगत व्यक्तीचा आपल्याशी किती घनिष्ट संबंध होता, हे सांगण्याची स्पर्धाच लागलेली असते.

का बोलत असतात माणसं असं सारखं स्वत:बद्दल?

आपल्याशिवाय जगात दुसरं काही महत्त्वाचं आहे याची त्यांना खरोखरच जाण नसते की काय? की आपले गुणविशेष आपण नाही सांगितले तर ते इतरांना कधीच कळणार नाहीत अशी चिंता त्यांना भेडसावत असते? आपल्यापाशी असलेलं बुद्धिकौशल्य इथल्या आसमंतात दुसऱ्या कोणापाशी नाही, अशी त्यांची खरोखरच समजूत झालेली असते? आणि म्हणून त्यांच्याकडून हा वेडाचार घडतो?

सतत स्वत:च्या हुशारीच्या नि पराक्रमाच्या कहाण्या सांगणारी ही माणसं मूर्ख असतात, असं मात्र म्हणता येत नाही. किंबहुना, या मंडळींत गुणवंत आणि विद्वान लोकही मोठ्या प्रमाणात आढळतात. ज्या पराक्रमांची ते वर्णनं करतात ते सर्वच्या सर्व खोटे असतात असंही नाही. तरीपण या मंडळींचा सहवास लोकांना नकोसा होऊन जातो. समोरचा माणूस ऊठसूट स्वत:च्या गुणांचं स्तोत्र गात राहिला तर मित्रकर्तव्यापोटी आपण ते किती ऐकायचं? स्वगुण-प्रशंसेनं आपण समोरच्याला कंटाळा आणत आहोत; केवळ भिडस्तपणामुळे ती व्यक्ती आपल्याला हे तोंडावर सांगत नाही, हे त्यांना कळत कसं नाही? सगळा अवघड प्रकार होऊन जातो.

लांबच्या प्रवासाला निघाला असता गाडीतला अपरिचित शेजारी तुम्हांला एखादा शेर सांगतो. त्याला बरं वाटावं म्हणून तुम्ही 'बहोत अच्छे' म्हणता. मग 'और एक सुनिये' म्हणून तो दुसरा शेर म्हणून दाखवतो. संकोचानं तुम्ही तो आवडल्याचं दर्शवलंत, की तो थोर शायर आपली शायरीची डायरीच काढतो. एवढ्यावर हे थांबत नाही. कवी म्हणून आपली कशी जडणघडण झाली याची कॉमेंट्री तुम्हांला सुनावली जाते. वयाच्या कितव्या वर्षापासून आपण शेर रचायला सुरुवात केली, शेरांना कुठे कशी दाद मिळाली याचा तपशील पुढं येऊ लागतो. एकाचा आनंद दुसऱ्याची पीडा बनून जाते. पण शायर लोकांना त्याचं काय?

इतरांच्या मानसिकतेची, आवडीनिवडीची, व्यक्तिगत स्वातंत्र्याची किंचितही पर्वा नसणारे, समोरच्या माणसाच्या सभ्यतेचा गैरफायदा घेऊन आपलंच घोडं पुढं दामटवणारे महाभाग आज दुनियाभर पसरले आहेत. त्यांच्या लेखी ते स्वत: सोडून जन्माला आलेले इतर सर्व हे श्रोते असतात.

माझ्या परिचयाचे असे एक लेखक आहेत. साहित्यात त्यांचं भरीव योगदान आहे, अनेक विषयांत त्यांना गती आहे वगैरे सगळं ठीक आहे. पण हा माणूस त्यांना भेटायला येणाऱ्याचा ताबाच घेतो. समोर बसलेल्याच्या शरीराचं बघता बघता एका भल्या मोठ्या कानात रूपांतर होतं. त्या लेखकांचा चेहरा नाहीसा होऊन त्याच्या जागी त्याला बडबडणारे दोन ओठ दिसायला लागतात. समोरच्याचा कान थकतो, पण त्यांचे ओठ थकत नाहीत.

स्वत:बद्दल अखंड बोलणारी ही माणसं अशिक्षित वा अर्धशिक्षित असतात असं समजायचं कारण नाही. त्यांच्या विषयात ती चांगल्यापैकी हुशार असतात. आपल्या मेहनतीच्या आणि बुद्धीच्या जोरावर त्यांनी त्यांच्या क्षेत्रात उच्च स्थान मिळवलेलं असतं. काहींनी स्वकर्तृत्वावर उद्योग-व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवलेलं असतं तर काही कलेच्या क्षेत्रात नाव कमावून असतात.

आपल्या कर्तृत्वाचे ढोल आपणच वाजवू नयेत, आपल्या गुणांचे पोवाडे आपणच गाऊ नयेत, आणि त्यासाठी दुसऱ्याचा अवकाश तर अजिबात वापरू नये, हे तर साधं शहाणपण आहे. या शहाण्या मंडळींपाशी एवढं मूलभूत शहाणपण नसावं ही आश्चर्याची गोष्ट आहे. आपल्याविषयी आत्मीयता असावी; आपल्या कलागुणांविषयी सार्थ अभिमान असावा. आपणही कोणीतरी महत्त्वाचे आहोत, ही जाणीव मनात असावी. हाती घेतलेल्या कामांना आत्मविश्वासाची जोड मिळण्यासाठी हे आवश्यक आहे. स्वत:विषयी तिरस्कार असणाऱ्याचं मन आत्महत्येकडे झुकायचा संभव अधिक असतो. मानसिक संतुलन राखण्यासाठी आपल्याविषयी आपुलकी वाटणं गरजेचं आहे यात शंका नाही. गडबड सुरू होते ती आपल्याविषयीच्या आपलेपणाची डिग्री वाढल्यावर. नोकरी किंवा पदोन्नतीसाठी द्याव्या लागणाऱ्या मुलाखतींसाठी स्वत:च्या हुशारीविषयी, अकादमिक कामगिरीविषयी बोलणं गरजेचं असतं. मात्र नोकरी मिळाल्यावर, व्यवसायात, कलेत अपेक्षित यश मिळाल्यावर समोर भेटेल त्या व्यक्तीशी स्वत:च्या चांगुलपणाविषयी, स्वत:च्या कलागुणांविषयी, कर्तृत्वाविषयी प्रौढी मिरवणारं असं सतत बोलत राहाणं, हे केवळ अशोभनीय नाही, तर लाजिरवाणंही आहे. स्वत:लाच नव्हे, तर पूर्ण मानवजातीला. स्वत:च स्वत:ची शेखी मिरवायला बंदी घालणारा कायदा करायची वेळ आली आहे.

पण दिवस मार्केटिंगचे आहेत. स्वत:चं घोडं पुढं दामटवलं नाही, तर आपण शर्यतीत मागे पडू, या विचारानं सगळे भयभीत झाले आहेत. या भयातून नवे अतिरेकी जन्माला येत आहेत. हळूहळू ऐकणाऱ्यांची संख्या कमी कमी होत जाईल आणि एक दिवस जगात स्वत:विषयी बोलणारेच तेवढे शिल्लक राहतील. पण ऐकणारेच नसतील तर त्यांनी आपल्या पराक्रमाचे पोवाडे गायचे तरी कोणापुढे?

*(ऑक्टोबर २०११)*

# भाग्यवती कविता

**दत्ता हलसगीकर**

---

समर्पणाची, दातृत्वाची, काहीसं निर्मोही होण्याची आणि परतत्त्वस्पर्शाची भावना जसजशी गडद होत चालली तशी तशी कवितेची ओळ अगदी सहजपणे सुचत गेली. शब्दांना माझा भाव कळला असावा. दोऱ्यात फुलं ओवली जावीत तसे अनुकूल शब्द येत गेले आणि कविता लिहून झाली.

---

दैनिक सकाळचे माजी कार्यकारी संपादक श्री. अनंत दीक्षित यांनी 'सकाळ'मध्ये एक लेख लिहिला होता आणि त्या लेखाचा समारोप माझ्या एका कवितेतील शेवटच्या चार ओळींनी केला होता. तो लेख माझ्या वाचनात आला होता. एके दिवशी 'अंतर्नाद' मासिकाचे संपादक श्री. भानू काळे यांचा मला फोन आला. मी चकित झालो. या मासिकात माझ्या काही कविता प्रसिद्ध झाल्या होत्या, पण माझी संपादकाची ओळख नव्हती. फोनवरून ते म्हणाले, ''सकाळमधील लेखातल्या तुमच्या चार ओळी आवडल्या पण ही पूर्ण कविता फोनवरून सांगा.'' मी त्यांना ती कविता सांगितली आणि विचारले, ''कशासाठी हवी आहे कविता?'' ''नंतर कळेल,'' एवढंच ते उत्तरले. दोन महिन्यांनी अंतर्नादचा मार्च २००१ महिन्याचा अंक घरी आला. वेष्टन उघडून पाहतो तर माझी *उंची ही* कविता गुलाबी रंगात मोठ्या टाइपात चक्क मुखपृष्ठावर झळकलेली. अंतर्नादसारख्या एका दर्जेदार अंकावर माझी कविता पाहून झालेला आनंद उरी पोटी मावेना.

अंतर्नादचा वाचक रसिक, आस्वादक आणि चोखंदळ. मुखपृष्ठावरची माझी कविता वाचून वाचकांनी ती आवडल्याचं पत्रांतून, फोनवरून कळवलं. पत्रांचा तर नुसता पाऊस पडत होता. पसंतीची ही पावती मोठी सुखकर असते. कुंडीतल्या फुलझाडाला तांब्याभर पाणी घातलं तर झाड मुळापासून पानाफुलांपर्यंत सतेज टवटवीत होतं. तसं माझंही होतं होतंच. आजवर लिहिलेल्या कवितांना वेळोवेळी प्रतिसाद मिळतच होता; पण 'अंतर्नाद'मध्ये ठळकपणे प्रसिद्ध झालेल्या या कवितेनं मला मराठी मुलखात खूप दूरवर नेलं.

एके दिवशी मु. पो. जांभूळपाडा, ता. सुधागड, जिल्हा रायगड इथून शिंत्रे यांचा फोन आला, ते म्हणाले, ''आम्ही या गावात बेघर मुलांसाठी एक आश्रम चालवीत आहोत. आश्रमात २४ मुलं आहेत. हा आश्रम एस. टी. स्टँडच्या समोर आहे. लोकांची सारखी ये-जा असते. मनात एक विचार आला की 'अंतर्नाद'वरची तुमची कविता मोठ्या फलकावर रंगवून आश्रमाच्या आवारात सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावावी. ही कविता प्रतिमांच्या स्वरूपात आहे आणि जगण्याचं प्रयोजन सहजपणे या कवितेत संदेशरूपानं दिलं आहे. तुमची परवानगी असेल तर ही कविता फलकावर येईल.'' मी त्यांना अनुमती दिली.

काही दिवसांनी मी पुण्यात शिंत्रे यांना भेटलो. त्यांनी मला जांभूळपाड्याला नेलं. फलक दाखवला. तेव्हा माझं शब्दरुप पाहून सोलापुरातला मी या कवितेच्या माध्यमातून जांभूळपाड्यासारख्या गावातल्या आश्रमापर्यंत पोचलो याचा मनोमन आनंद झाला. शिंत्रे म्हणाले, ''ठळक अक्षरात असलेली ही तुमची कविता वाचून लोकांनी स्वयंस्फूर्तीने देणग्या दिल्या आहेत. काही दिवसांत या छोट्या वास्तूचं रूपांतर सर्व सुखसोयींनी युक्त अशा मोठ्या वास्तूत होईल.'' आणि सांगायचं म्हणजे आज तीन मजली उंच आणि विस्तृत आश्रमशाळा तिथं उभी आहे. या वास्तूच्या प्रवेश समारंभाचं निमंत्रण त्यांनी मला पाठवलं आणि कार्यक्रमाचं स्वागतगीत लिहून पाठवण्याची विनंती केली. मी गीत पाठवलं. आपल्या कवितेमुळं एका पवित्र कार्याला हातभार लागला याचं समाधान मला मिळालं.

पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनी संस्थेनं ही कविता त्यांच्या दिवाळी भेटकार्डासाठी घेतली. अनेक बँकांनी, काही सामाजिक संस्थांनी ही कविता शुभेच्छापत्रांसाठी घेतली. रोटरी क्लबसारख्या संस्थांनी त्यांच्या अधिवेशनात या कवितेचं वाचन केलं. सोलापूरजवळ कारंबा या गावी वेश्यांच्या मुलामुलींचं पुनर्वसन व्हावं यासाठी 'स्नेहालय' ही संस्था काम करते. इथं २१० मुलं-मुली आहेत. या संस्थेच्याही आवारात ही कविता ठळकपणे फलकावर लावली आहे. नुकताच मी पुण्यात आलो तेव्हा सोलापूरचा एक तरुण भेटला. तो म्हणाला, ''बाबा आमटे यांच्या आनंदवनात परवा जाऊन आलो. तिथं मोठ्या काचेच्या फलकाआड एका बोर्डवर तुमची ही कविता पाहिली आणि आपल्या गावच्या कवीची कविता योग्य ठिकाणी आली याचा आनंद झाला.'' मला हे माहिती नव्हतं. ऐकून किती बरं वाटलं!

## उंची

*ज्यांची बाग फुलून आली*
*त्यांनी दोन फुले द्यावीत*
*ज्यांचे सूर जुळून आले*
*त्यांनी दोन गाणी गावीत.*

*ज्यांच्या अंगणात झुकले ढग*
*त्यांनी ओंजळ पाणी द्यावे*
*आपले श्रीमंत हृदय त्यांनी*
*रिते करून भरून घ्यावे.*

*सूर्यकुलाशी ज्यांचे नाते*
*त्यांनी थोडा उजेड द्यावा*
*प्राक्तनाच्या अंधारात*
*प्रकाशाचा गाव न्यावा.*

*मन थोडे ओले करून*
*आतून हिरवे हिरवे व्हावे*
*मन थोडे रसाळ करून*
*आतून मधुर मधुर व्हावे.*

*आभाळाएवढी ज्यांची उंची*
*त्यांनी थोडे खाली यावे*
*ज्यांचे जन्म मातीत मळले*
*त्यांना वरती उचलून घ्यावे.*

**– दत्ता हलसगीकर**

मला कळलेली माझी कविता पोचलेली ही ठिकाणं. आणखीनही कुणी कुणी कुठं कुठं या कवितेची दखल घेतली असेल, त्या अज्ञात परिसरात माझं नाव कवितेसह पोचलं असेल. एखादी कविता कशी भाग्यवती असते! तिच्या आशयसौंदर्यानं वाचकाच्या मनात करुणेचा ढग होऊन ओथंबणारी, त्याला कृतिशील करणारी.

ही कविता कशी सुचली हे सांगायला मला आवडेल. माझ्या घराण्यात अनंताचं व्रत आहे. अनंत चतुर्दशीला अनंत दोरकाची पूजा झाल्यावर अनंताची पोथी गेली काही वर्षं वाचतो. या पोथीत एक कथा आहे. कथा मोठी आहे. माझ्या कवितेच्या संदर्भापुरता आवश्यक भाग तेवढा सांगतो. या कथेतील कौंडिण्य ऋषी भीषण दारिद्र्यानं हताश होतो आणि देहार्पण करण्यासाठी अरण्यात जातो. तिथं त्याला फळांनी लगडलेलं एक डेरेदार उंच झाड दिसतं. पण अवतीभवती पक्ष्यांचा किलकिलाट असताना या झाडावर मात्र एकही पक्षी उतरलेला त्याला दिसत नाही. त्याला आश्चर्य वाटतं. पुढं आणखीन काही काही तो पाहतो पण त्याच्या लक्षात राहतं ते पक्ष्याविना उभं असलेलं हे फळसमृद्ध झाड. त्याला काही वेळानंतर ईश्वराचं दर्शन होतं. तेव्हा तो देवाला विचारतो, ''मी ते असं असं झाड पाहिलं, याचा अर्थ काय?''

देव म्हणतो, ''एक विद्वान गृहस्थ होता. महापंडित बहुश्रुत. त्यांनी आपली अवगत विद्या कुणालाच दिली नाही. त्या विद्येच्या घमेंडीत तो जगला आणि मरून गेला. हे झाड म्हणजे गतजन्मीचा पंडित होय. फळं आहेत पण किडकी. या फळांचा ना झाडाला ना इतर कुणाला उपयोग. म्हणून वत्सा, आपल्याकडे जे काही असेल ते अंशरूपानं आपण ज्यांना गरज असेल त्यांना द्यावं, दिल्यानं कधीही कमी होत नाही, उलट वाढतं. पाण्याच्या आडातून एक पोहरा पाणी शेंदून घेतलं तर झऱ्यातून सहा पोहरे पाणी पुन्हा आडात येतं. उदार मनानं देत राहणं हा आपला स्वभाव झाला पाहिजे.''

हा उपदेश केवळ कौंडिण्यऋषीपुरता नव्हे तर सर्वांसाठीच आहे, असं मला ही कथा वाचल्यावर वाटलं. मी विचार करायला लागलो तेव्हा डोळ्यापुढं आलं अंगणातलं पारिजातकाचं झाड. रात्री पांढऱ्या केशरी फुलांनी गच्च डवरलेलं आणि सकाळी उठून पाहतो तर अंगणात फुलांचा सडा टाकून मोकळं झालेलं. पुन्हा रात्री उत्फुल्ल होणारं. फुलांचा सडा हा अनुभव होता; पण, त्यापेक्षा उपदेश होता. पुरुषार्थानं शक्य तेवढं प्राप्त करावं, समृद्ध व्हावं पण केवळ स्वतःच्या जीवनाचा उत्सव न करता जे सुखापासून वंचित आहेत त्यांच्यापर्यंत काही पोहोचतं करावं, त्यांच्या माळरानावर काही उगवून यावं. झाडं पंचमहाभूतांतून जीवनरस घेतात, अंकुरित, पल्लवित, पुष्पित आणि सुफलित होतात, सहवासात येणाऱ्यांना आपली सावली आणि फळं देतात. देण्याचंही एक आंतरिक समाधान असतं.

समर्पणाची, दातृत्वाची, काहीसं निर्मोही होण्याची आणि परतत्त्वस्पर्शाची भावना जसजशी गडद होत चालली तशी तशी कवितेची ओळ अगदी सहजपणे सुचत गेली. शब्दांना माझा भाव कळला असावा. दोऱ्यात फुलं ओवली जावीत तसे अनुकूल शब्द येत गेले आणि प्रतिमांच्या स्वरूपात ही साधी, सोपी, सहजगम्य कविता लिहून झाली. असंख्य रसिकांनी ती आपल्या संग्रहात ठेवली हे कळलं, तेव्हा एक विचारठेव त्यांच्याकडे या कवितेच्या रूपानं आहे याचं मला समाधान वाटलं.

'अंतर्नाद'ने माझा अंतःस्वर रसिक वाचकांपर्यंत पोचवला आणि माझ्या या कवितेचे स्वागत झाले. मी भरून पावलो आहे.

*(जानेवारी २००९)*

# कवितेची सुरुवात

**हेमंत गोविंद जोगळेकर**

---

मुंबई आयआयटीमधून केमिकल इंजिनियर झालेले व नॅशनल केमिकल लॅबोरेटरीत अनेक वर्षे शास्त्रज्ञ म्हणून असलेले हेमंत जोगळेकर हे अंतर्नादच्या वाचकांना चांगले परिचित आहेत. *अगा कवितांनो* (जानेवारी २००५ ते दिवाळी २००५) आणि *अगा कवींनो* (जानेवारी २०१० ते जून २०११) या त्यांच्या अंतर्नादमधील दोन लेखमालांतून त्यांची काव्यविषयक सूक्ष्म जाण दिसलीच होती. *पुन्हा कविता* ही त्यांची नवी लेखमाला या अंकापासून सुरू करत आहोत.

---

कवितेची सुरुवात बहुधा कवितेच्या शीर्षकाने होते. 'बहुधा' असे मी म्हणतो, कारण कधी कधी कवी आपल्या कवितेला शीर्षक देतच नाहीत. तेव्हा कवितेची पहिली ओळच कवितेच्या शीर्षस्थानी येते. कधी कविता प्रसिद्ध करणारे नियतकालिकांचे संपादकच कवितेला शीर्षक देतात. सुरुवातीला मीही माझ्या कवितांना शीर्षके देण्याच्या बाबतीत उदासीन होतो. या माझ्या सुरुवातीच्या काही कविता मी *किर्लोस्कर* मासिकाकडे दिल्या होत्या. माझी पहिली प्रकाशित झालेली कविता होती 'मला एकदा पंख फुटले होते'. किर्लोस्करचे तेव्हाचे कार्यकारी संपादक ह. मो. मराठे यांनी ती छापताना तिला 'कविता' असे सर्वसमावेशक शीर्षक दिले होते. त्यानंतर त्यांनी छापलेल्या माझ्या 'तेव्हा ना, धूळ गवत आणि खडे माझ्या पायांना थेट गुदगुल्या करीत' या कवितेला मी 'बालपण' असे बाळबोध शीर्षक दिले होते. ते बदलून त्यांनी 'तेव्हा ना' असे सार्थ शीर्षक दिले. भले ती कविता बालपणाविषयी असेल! पण तेव्हाच्या गोष्टींबद्दल कवितेच्या निवेदकाला वाटत असलेले अप्रूप आणि 'तेव्हा असे होते' असे म्हणताना जाणवणारी 'आता ते राहिले नाही' ही हुरहूर 'तेव्हा ना' या शीर्षकातून नेमकी पोचविली जाते.

ग्रंथालीने १९८० साली, १९७० ते ८०च्या दरम्यान लिहू लागलेल्या आणि १९८० ते ९०च्या काळात प्रभावी होतील असे संपादकांना ज्यांच्याविषयी वाटते अशा दहा कवींचा संग्रह 'कविता दशकाची' या नावाने काढला. त्यात त्यांनी घेतलेल्या माझ्या दहा कवितांपैकी एक होती :

रात्री तू माझ्याजवळ झोपतेस,  
सकाळी माझ्यासाठी न्याहारी बनवतेस,  
मी ऑफिसला गेल्यावर  
माझ्यासाठी डबा भरून पाठवतेस,  
संध्याकाळी न चुकता  
मी तुला फिरायला नेतो,  
वाटेत कुणी भेटले तर  
तुझी ओळख करून देतो,  
''ही माझी पत्नी.''  
मग तू हसतेस.  
का हसतेस?  
खरं सांग, का हसतेस?

याही कवितेला मी शीर्षक दिले नव्हते. संपादक मंडळाने असे ठरवले होते की ज्या कवितांना कवींनी शीर्षके दिलेली नसतील त्या कवितांच्या पहिल्या ओळी त्या त्या कवितांची शीर्षके म्हणून द्यावीत. पण माझ्या कवितांवर टिपण लिहिणाऱ्या रमेश तेंडुलकरांनी मला मुद्दाम पत्र लिहून विचारले, ''रात्री तू माझ्याजवळ झोपतेस' ऐवजी 'का हसतेस?' हे शीर्षक दिले तर? पहिली ओळ शीर्षकासाठी वापरल्यास वाचकांचा रोख अकारण भलतीकडेच वळेल असे वाटते.'' त्यांची सूचना अगदी रास्त होती आणि मी ती साभार स्वीकारली. या कवितेचा निवेदक कवितेच्या पहिल्या चार ओळींत त्याची पत्नी रात्रीपासून दुपारपर्यंत त्याच्यासाठी करत असलेल्या गोष्टी सांगतो. नंतर तो इमानेइतबारे पत्नीला घेऊन फिरायला जातो. वाटेत कुणी परिचित भेटल्यास तिची आपली पत्नी म्हणून ओळख करून दिल्यावर तिने उत्तरादाखल स्मितहास्य करणे स्वाभाविक आहे. पण निवेदकालाच प्रश्न पडतो की 'ती का हसते आहे?' केवळ पत्नीने करावयाची कर्तव्ये तिला करायला लावून आपण तिला सहधर्मचारिणीचा दर्जा देत आहोत का? ही त्याला वाटणारी अपराधभावना केवळ त्याला पडणाऱ्या या प्रश्नाने सूचित होते. कवितेला तसे स्पष्ट न सांगता सुचवावयाची असलेली ही गोष्ट 'का हसतेस?' या शीर्षकानेच व्यक्त होते. (रात्री तिच्या त्याच्याजवळ झोपण्याने नाही!) पहिल्या ओळीपेक्षा ही शेवटची ओळ शीर्षक म्हणून देऊनच हे साधले गेले आहे.

याच कवितेचा इंग्रजी अनुवाद पुढे 'भारतभवन'ने काढलेल्या समकालीन भारतीय कवींच्या प्रातिनिधिक 'कविभारती २' या संग्रहात समाविष्ट झाला. इंग्रजी अनुवादात तर पहिली ओळ – At night, you sleep with me – अधिकच विशिष्ट बनते. मी नवोदित कवी असतानाही मराठीत ही कविता प्रसिद्ध होण्यास काही अडचण आली नाही. पण या कवितेचा हिंदी अनुवाद 'श्याम विमल' या हिंदी कवींनी केला, तो हिंदी नियतकालिकाने 'अश्लील'

म्हणून नाकारला. तेंडुलकरांनी भाकित केल्याप्रमाणे कवितेच्या पहिल्या ओळीने त्यांचा रोख भलतीकडेच वळला असावा. असो!

मर्ढेकर आपल्या कवितांना शीर्षके देत नसत. बऱ्याचदा त्यांच्या कवितेची पहिली ओळ थेट विषयाला हात घालत असे. असभ्य समजले जाणारे उल्लेख कवितेच्या पहिल्या ओळीत करायला ते जराही कचरत नसत. उदाहरणार्थ,

१. बडवीत टिर्‍र्या । अर्धपोट किंवा

२. शिवलिंग माझे लिंग । हेच अशांतीचे बिंग

३. संडासातिल घाण जिरावी

बऱ्याचशा कवितांची शीर्षके वर्ण्य विषयाला / अनुभवाला कोण, कुठे, केव्हा, काय, कसे, का हे सहा क-प्रश्न करून सिद्ध झालेली असतात.

व्यक्तिचित्र रेखाटणाऱ्या कविता ज्या कुणा व्यक्तीचे चित्र काढले आहे त्याच्या नावे असतात. उदाहरणार्थ, विंदा करंदीकरांची *बकी* किंवा *धोंड्या न्हावी*; नारायण सुर्व्यांच्या *माझी आई, शीगवाला*; वसंत बापटांच्या *सकीना, सावंत*; निरंजन उजगऱ्यांच्या *माकडवाला, दहावीच्या बाई*; आणि अशा अनेकांच्या अनेक कविता. कधी कधी शीर्षक असलेल्या व्यक्तीचे कविता हे व्यक्तिचित्र नसते. पण कवितेतील व्यक्तींच्या दृष्टीने शीर्षक-व्यक्ती महत्त्वाची असते. गुरुनाथ धुरींच्या 'ग्लोरिया' कवितेत तीन मेकॅनिक रात्री, लोकल गाडीत भान हरपून 'ओ ग्लोरिया' गाताहेत. आणि

तिघांच्या हृदयांतील
तीन ग्लोरिया मावळून
तिघेही झालेत
ग्लोरिया

मग कवितेचे शीर्षक 'ग्लोरिया' होणे अपरिहार्य होऊन जाते.

कधी कधी कवितेतील अनुभव कधी घेतला गेला आहे, ते कवीला महत्त्वाचे वाटते. दिलीप पुरुषोत्तम चित्र्यांच्या 'एक उन्हाळी संध्याकाळ' कवितेत जे काही घडते, त्याला ती उन्हाळी संध्याकाळच कारणीभूत असावी, असे कवितेतल्या हडकुळ्या उंच रुमेनियन मुलीला वाटते.

"ये, ये, ये!" ती पुटपुटत राहिली.
माझ्या पाठीला ओरबाडत राहिली.
पुष्कळ वेळानंतर, मी निघून जाताना
तिनं उन्हाळ्यालाच सर्व दोष दिला.

चित्र्यांच्याच एका कवितेचे नाव 'जुलाय १९५६' आहे. वाचकांच्या दृष्टीने १९५६च्या जुलै महिन्याला काही महत्त्व नाही. पण कवितेच्या निवेदकाने 'जुलाय १९५६' मध्ये घेतलेला अनुभव त्याच्या दृष्टीने इतका महत्त्वाचा आहे, की तो महिना त्याच्या मनावर कोरला गेला आहे. म्हणूनच कवी तो महिना कवितेचे शीर्षक म्हणूनही कोरून ठेवतो.

कधी कधी कविता कशाविषयी आहे किंवा काय सांगते, ते कवितेचे शीर्षक बनते. अनुराधा पोतदार 'माझं हरपलेलं आईपण' लिहितात. द. भा. धामणस्कर 'हस्तांतर' लिहितात. आणि कुसुमाग्रज 'स्वप्नाची समाप्ती'. पण 'स्वप्नाची समाप्ती' या रुक्ष नावापेक्षा रसिकांच्या स्मरणात राहतात त्या कवितेतील

काढ सखे गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात

या भावार्त ओळी.

द. भा. धामणस्करांच्या 'हस्तांतर' कवितेत निवेदकाच्या हातातली विसर्जनासाठी नेतानाची गणपतीची मूर्ती निवेदकाचा तरुण मुलगा आपल्या हातात घेतो. या हस्तांतरात परंपरा पुढे सरकते; पण मुलगा परंपरेच्या ओझ्याखाली वाकतो. हे ओझ्याचेही हस्तांतर 'हस्तांतर' हा कवितेत नसलेला शब्द सूचित करतो – कवितेचे शीर्षक बनून.

कधी गोष्ट कशी घडते ते कवितेचे शीर्षक होते. शरच्चंद्र मुक्तिबोध 'सांज ये हळूहळू' असे शीर्षक देतात. बा. भ. बोरकर 'क्षितिजि आले भरते ग' म्हणतात. भा. रा. तांबे 'सहज तुझी हालचाल' वर्णतात. पण सर्वात भावपूर्ण शीर्षक आठवते ते ना. वा. टिळक यांच्या कवितेचे – 'कुणास्तव कुणीतरी'. कुणाची तरी कुणीतरी घरी वाट पाहत आहे. या दोघांच्या परस्परप्रेमाची ही साधी कौटुंबिक गोष्ट. यातील नायक-नायिकांचा उल्लेखही 'कुणीतरी' असा तिऱ्हाइतासारखा आहे; पण त्यात प्रेयसीने प्रियकराला 'एक माणूस' म्हणावे तसा गोडवा आहे. आणि हे प्रेम व्यक्तिविशिष्ट नाही. त्याची सार्वत्रिकताही 'कुणीतरी'मधून जाणवते. कवितेचे हे मर्मच शीर्षकरूपाने कवितेच्या शिरावर ठेवलेले आहे.

क्वचितच काव्यविषयाचे किंवा कवितेचे कारण शीर्षकरूप धारण करते. ना. घ. देशपांडे त्यांच्या एका कवितेत जे सांगतात त्याचे कारण 'जीव तुझ्यात गुंतला' त्या कवितेचे शीर्षक म्हणून आले आहे. दिलीप पुरुषोत्तम चित्र्यांच्या एका कवितेचे शीर्षक मोठे लांबलचक आहे. 'घरफोडी होऊन तुकारामांच्या गाथेची प्रत व इतर वस्तू चोरीस गेल्या ते समयी रचलेले अभंग, आदिस अबाबा १९६३'. हा प्रसंगच हे अभंग स्फुरण्याचे कारण आहे. या शीर्षकात केव्हा आणि कुठे हेही सांगितले आहे.

अनेकदा 'कुठे' हे कवितांचे शीर्षक होते. दिलीप पुरुषोत्तम चित्र्यांच्याच अनेक कवितांची, विशेषतः 'बर्फाचे दिवस' या कवितासमुच्चयातील कवितांची शीर्षके अशी युरोपातील स्थळे आहेत. 'चित्रे यांचा वाडा, खारीबाव रोड बडोदे' हेही त्यांच्या एका कवितेचे शीर्षक आहे. गणेश विसपुते 'धुंवाधार गजबजलेल्या रस्त्याच्या मधोमध' नावाची कविता लिहितात आणि तेच नाव आपल्या कवितासंग्रहाला देतात. कधी काव्यविषयाचे स्थळ हे कवितेच्या निवेदकाला किंवा कवीला फार महत्त्वाचे वाटते.

वसंत आबाजी डहाके यांची एक कविता आहे :

**शंकर लॉज, हिंगणघाट**

एखाद्या शहराच्या कपाळावर
अखंड धूळ पडत राहावी
तसली धूळ अंगावर घेऊन उभी असलेली
डोक्यावरून पदर घेतल्यासारखी साधीसुधी इमारत.

करकरणाऱ्या झडपांच्या खिडकीतून
धूळच धूळ पाहत राहणं.
कोणत्याही वाटेवर धुळीत लोळणारी गाढवं,
गल्लीबोळांतून तुरुतुरु धावणारी डुकरं,
झाडांना पानांसारखे लगडलेले कावळे.
सकाळी सकाळी बंद गिरणीतले बेकार मजूर
चौकातल्या माणसांच्या बाजारात
स्वत:ला विकून घ्यायला टपलेले,
वाढलेल्या दाढ्या, मळलेली पटकुरं,
त्यांच्या केसांमध्ये शहराची धूळ.
दिवसाचा बराच काळ सुन्न पडलेलं स्टेशन
अन् रात्री छातीत कळ यावी
तसली शिट्टी फुंकणारी मालगाडी.
संध्याकाळी गिधाडासारखं झेपावत येणारं आभाळ,
रात्रीच्या निर्जन रस्त्यांची झिंगलेली बरळणी,
रातराणीचा हिंस्र गंध.
भिंतीवरून सरकणाऱ्या पालींपासून वाचवीत
रात्रभर जागत राहून पहाटे पहाटे
पालींवर पाली पाहत चुरगळलेल्या शरीराला
सकाळ होताच हौदातल्या करवती पाण्याच्या
स्वाधीन करणं
आणि धमकावल्यासारख्या स्तब्ध चेहऱ्यांच्या
घोळक्यात शिरणं.
लायब्ररीतल्या पुस्तकात एखाद्या क्षणाची शांतता शोधणं,
उन्हात वाळत घातलेल्या, कसरीनं खाल्लेल्या
'एनकाउंटर'च्या अंकांना चाळणं,
वर्गात लक्ष नसलेल्या मुलांना
बेकेट अन् आयनेस्को सांगणं,
बाकांवर उगवलेल्या चेहऱ्यांवरचा अबोधपणा वाचणं.
दुपारी दोन वाजता बाबूभाईंच्या मुकाट खाणावळीतून
जेवून मरून गेल्यासारखं झोपणं,
संध्याकाळच्या अस्वस्थ उजेडात
पांढऱ्या कागदांवर पिळवटल्यासारख्या
काळ्या रेघा ओढणं,
जाळीजाळीच्या घरांपुढच्या
खोल खड्ड्यातल्या नळांचं पाणी भरून देवीसारख्या
वर येत असलेल्या मुली पाहणं.

हीच होती कविता
जी मला लिहीत होती
धुळीनं भरलेल्या शहराच्या कागदावर

हिंगणघाटसारख्या कुग्रामातील शंकर लॉज ही धूळ भरली इमारत – जिच्याशी वाचकांना काही देणे घेणे नाही – कवितेतही तिचा नामोल्लेख येत नाही, पण तेथील नीरस वास्तवात कवीला काव्य जाणवत आहे. ते नेमके काय आहे हे त्यालाही समजलेले नसावे, म्हणून तो तेथील तपशील नोंदतो आहे. तपशिलांना दिलेल्या उपमांतून निवेदकच नोंदला जातो आहे. म्हणूनच त्याला वाटते आहे

हीच होती कविता
जी मला लिहीत होती
धुळीनं भरलेल्या शहराच्या कागदावर.

ते अनाम काव्य कवीच्या स्मृतीत 'शंकर लॉज, हिंगणघाट' आहे. म्हणून तेच कवितेचे नाव झाले आहे आणि त्या तपशिलांतील काव्य वाचकांना प्रतीत करून देत आहे.

थोड्याच कवितांची शीर्षके, त्या कवितेला काय सांगायचे आहे किंवा सुचवायचे आहे ते अधोरेखित करीत असतात. द. भा. धामणस्करांची एक कविता आहे :

**यापुढचं जीवन**

पुस्तकाचं नाव : 'यापुढचं जीवन'
ते आहे मूलत: प्रेमाविषयी,
मनाच्या हळुवारपणाविषयी –
सर्वच चराचराच्या संदर्भात. ते तिने
वाचून परत केलं तेव्हा कव्हराची
ही ऽऽ दुर्दशा झालेली;
पानं एखाद्या झंझावातानं हाताळल्यासारखी
जागोजाग फाटलेली आणि त्यांना
गुण्यागोविंदानं नांदवणारं सूत्र, जणू
गृहकलहाला कंटाळून घराबाहेर पडलेलं.
मुद्दाम शोध घेतला तर
हळुवारपणा भरलेल्या पानांनीच नेमकं
गठ्ठ्यानं पलायन केलेलं. तरीही
मातीत खेळून आलेल्या मुलाला आईने
आंघोळ वगैरे घालून पूर्वीचा
स्वच्छ चेहरामोहरा द्यावा तसा मी
नवे कव्हर घालून पुस्तकाला
सुभग चेहरा देतो. त्यावर एवढ्या पडझडीनंतर
पुस्तकानेच स्वत:चे नाव विसरू नये म्हणून
जुन्याच हळुवारपणे, माझ्या प्रिय पुस्तकाचे नाव
परत कोरतो : 'यापुढचं जीवन'.

'यापुढचं जीवन' हे या कवितेतील पुस्तकाचे नाव आहे. पण हे हळुवार प्रेमाचे पुस्तक तिच्याकडून परत येते, तेव्हा त्यातील हळुवारपणा भरलेली पानेच निखळून नाहीशी झालेली असतात. निवेदक पुस्तकाची डागडुजी करून कव्हरवर पुस्तकाचे नाव परत कोरतोही. पण आता ते केवळ पुस्तकाचे नाव राहत नाही. तिच्या या वागणुकीमुळे निवेदकाचेच यापुढचे जीवन असे प्रेमहीन झालेले आहे. आणि हेच नेमके या कवितेच्या शीर्षकाने अधोरेखित केलेले आहे.

थोड्या कविता अशाही असतात, ज्यांचे संदर्भ त्यांची शीर्षके स्पष्ट करतात आणि हे संदर्भच कविता उलगडून दाखवतात.

मात्र कविता संपली की कटाक्षाने टाकावे घालून
तिच्याखाली आपले नाव
घराचे दार लावल्यावर कुलूप घालावे तसे

आणि किल्ली द्यावी ठेवून
कवितेच्या डोक्यावर
शीर्षक म्हणून.

गुरुनाथ सामंतांची एक कविता आहे 'गुरुनाथ धुरी'. कवितेतील तो म्हणजे गुरुनाथ धुरी हा प्रतिभावंत मनस्वी कवी आहे, हे शीर्षकावरून समजते आणि तिचा अर्थ उलगडतो. गुरुनाथ धुरींनीही 'वसंत आबाजी डहाकेसाठी' नावाची कविता लिहिली आहे. तिचा शेवट आहे :

अखेर नुस्तं उरतं तें तुझ्या कवितांतलं सत्य :
हाडं हाडं हाडं : डहाके!

आणि वसंत आबाजी डहाके यांनी 'अमिताभ बच्चन' नावाची कविता अमिताभला उद्देशून लिहिली आहे. ती अमिताभ बच्चन या व्यक्तीविषयी नाही, पण कवितेच्या निवेदकाच्या सहा वर्षांच्या मुलीवर गारूड करणाऱ्या अमिताभच्या चित्रपटाच्या पडद्यावरील प्रतिमेला उद्देशून आहे. चित्रपटाच्या नायकावर आलेल्या संकटांनी मुलगी व्याकूळ होते तेव्हा निवेदक तिला सावरायचा प्रयत्न करतो. पण तो जाणून आहे की,

त्यांत खरें तर कांही अर्थहि नसतो.
ती स्वत:ची स्वत:च सावरते कांही वेळाने
– जसें तिला पुढे पुष्कळदा करायचें आहे
आणि त्या वेळीं तूं खूपच मागे राहून गेलेला असशील.

कथेमध्ये सुरुवातीसच पात्रपरिचय घडवून आणलेला असतो, कथेचे स्थळ, काळ, प्रसंग विस्ताराने स्पष्ट केलेला असतो. कवितेत हे करायला जागा नसते. पण कवितेचे शीर्षक आणि पहिल्या ओळींनी वाचकांना या गोष्टी आपोआप समजतात. नारायण सुर्व्यांच्या अनेक कविता वेगवेगळ्या पात्रांच्या नाट्यछटांसारख्या आहेत. पण त्यांच्या केवळ भाषेवरून पहिल्या काही ओळींतच हे कोण, कुणाला, कुठे सांगत आहे ते वाचकांना उमगते.

कवितांची शीर्षके कधी कधी दिशाभूल करणारीही असतात. अनिलांची एक दशपदी आहे : 'आणीबाणी'. आणीबाणी म्हटले की आता आपल्याला केवळ देशात पुकारण्यात येणारी आणीबाणीची स्थिती आठवते. या कवितेतील आणीबाणी ही निवेदकाची वैयक्तिक कठीण परिस्थिती आहे – जिचे वर्णन पहिल्या आठ ओळींत आहे. पण ते कवितेचे मर्म नाही. मर्म आहे शेवटच्या दोन ओळींत सांगितलेली या कठीण परिस्थितीतून निवेदकाला निभावून नेणारी हृद्य गोष्ट :

कसे निभावून गेलो कळत नाही कळले नव्हते
तसे काही जवळ नव्हते – नुसते हाती हात होते!

माझ्या 'कंसदमन' कवितेविषयी बोलताना एका समीक्षिकेने तिचे शीर्षक दिशाभूल करते असे म्हटले होते. पण ही दिशाभूल सहेतुक आहे. कंसदमन म्हटल्यावर आपल्याला कृष्णाने केलेला कंसवध आठवतो. पण ही कविता लेखनात वापरले जाणारे कंस, त्यांचे तऱ्हेवाईक उपयोग यांचा छडा लावते. शीर्षक करीत असलेली दिशाभूल या कवितेच्या प्रकृतीशी सुसंगतच आहे.

कवितेचे शीर्षक कधी कवितेला अधिक अर्थपूर्ण करते, कधी काव्यविषयाचे संदर्भ स्पष्ट करते, कधी कवितेचे मर्म अधोरेखित करते, कधी कवितेला नवे परिमाण देते. शाळकरी वयात निबंध कसा लिहावा हे शिकताना निबंधाची सुरुवात आकर्षक असली पाहिजे हे आपण घोकलेले असते. कवितेचे शीर्षक आणि सुरुवात वाचकांना आकर्षित करू शकते. पण कवितेचा निर्ढावलेला वाचक कवितेची सुरुवात आकर्षक असली तरी आणि रुक्ष, अनाकर्षक, दिशाभूल करणारी असली, तरीही कविता वाचतोच वाचतो; जशी या लेखांकमालेची ही सुरुवात वाचूनदेखील तुम्ही ही संपूर्ण लेखनमाला वाचणार आहात!

मी फक्त म्हणू शकतो
रस्त्यावरच्या नगरपालिकांच्या पाट्यांइतके निर्विकार होऊन
'तुमचा प्रवास सुखाचा होवो
आभारी आहोत.'

**उद्धृत कविता**

१) का हसतेस? : हेमंत गोविंद जोगळेकर, 'होड्या'.
२) शंकर लॉज, हिंगणघाट : वसंत आबाजी डहाके, 'शुन:शेप'
३) यापुढचं जीवन : द. भा. धामणस्कर, 'बरेच काही उगवून आलेले'.

**उद्धृत कवितांश :**

१) तिघांच्या हृदयांतील ... , ग्लोरिया, गुरुनाथ धुरी, 'ग्लोरिया'.
२) ''ये, ये, ये!''... , एक उन्हाळी संध्याकाळ, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, 'एकूण कविता'.
३) काढ सखे..., स्वप्नाची समाप्ती : कुसुमाग्रज, रसयात्रा.
४) मात्र कविता संपली..., कागद : हेमंत गोविंद जोगळेकर, 'तिसरा डोळा'.
५) अखेर नुस्तं उरतं... , वसंत आबाजी डहाकेसाठी : गुरुनाथ धुरी, 'समुद्रकविता'.
६) त्यात खरे तर ... , अमिताभ बच्चन : वसंत आबाजी डहाके, 'शुभवर्तमान'.
७) कसे निभावून गेलो..., आणीबाणी : अनिल, 'दशपदी'.
८) मी फक्त म्हणू..., व्यवहार : हेमंत गोविंद जोगळेकर, 'मनातले घर'.

*(फेब्रुवारी २०१३)*

# पन्नास हबशी गुलाम

**भाग्यश्री बारलिंगे**

"रिचर्ड हसत हसत सांगत होता, की गुलामही एकमेकांमध्ये पंक्तिभेद करत असत – घरात काम करणारे गुलाम (house slaves) शेतातल्या गुलामांपेक्षा (farm slaves) उजळ असत आणि ते शेतगुलामांना कमी लेखत. ('स्मृतिचित्रे'मध्ये लक्ष्मीबाई टिळकांनी जी ब्राह्मणेतर समाजाची उतरंड वर्णिली आहे, त्याची आठवण झाली.)"

कारुण्याचा झरा माझ्या मनात अनाहत वाहत असावा, अशी लोकांची माझ्याकडून अपेक्षा असते – मी स्त्री असल्यामुळे व डॉक्टर असल्यामुळे! माझ्या मनात असे झरे आहेत का, याचा पत्ता मला अजूनतरी लागलेला नाही. पण अमेरिकेत करुणेविषयी फार बोलले जाते. त्यामुळे मी नकळत स्वतःची उलटतपासणी करत असते. 'Compassion burn-out' या विषयावर आमच्या हॉस्पिटलमध्ये भाषणे होतात. याचा अर्थ करुणा ही एक फार काळ न टिकणारी भावना आहे.

'करुणेची शिकवण' येशू ख्रिस्ताने जगाला दिली असे म्हटले जाते. म्हणजे आपण जन्मतःच स्वार्थी आणि क्रूर असतो आणि करुणा हा गुण आपल्याला शिकावा लागतो. करुणा, सहनशक्ती, विनोदबुद्धी हे गुण जर ब्लडप्रेशर, पल्स यांसारखे मोजता आले असते, तर माणसाच्या अस्तित्वाची खोली अधिक कळली असती. मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेताना बुद्धीबरोबर करुणेचीही चाचणी घेता आली असती.

माझ्या मध्यमवर्गीय बालपणी भिकाऱ्याला भीक घालणे आणि 'श्यामची आई' पुस्तक वाचणे यापलीकडे कारुण्य जोखणारे प्रसंग आल्याचे आठवत नाही. आरुणीची गोष्ट, गुरुकुलात झाडपाला खाऊन, गुरूच्या घरी काबाडकष्ट करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गोष्टी वाचून डोळ्यात टिपूसभरही पाणी आल्याचे आठवत नाही. या गोष्टींचा निष्कर्ष म्हणजे 'गुरू किती चांगले' असाच शिकवल्याचे आठवते.

सर्वांत आवडते पुस्तक 'अल्लाउद्दिन आणि जादूचा दिवा' यात एक मनोहर चित्र होते – सुलतानाच्या दरबारात अल्लाउद्दिन 'नजराणे' घेऊन जातो; ते नजराणे म्हणजे हिऱ्यांनी भरलेली ताटे, अनेक स्त्रिया व पन्नास हबशी गुलाम! हबशी हा शब्द मी प्रथम तिथेच (आणि आत्तापर्यंत तरी फक्त तिथेच!) वाचला. तेव्हा हे कुणालाच आक्षेपार्ह वाटले नव्हते. (आत्ता स्वतःचे मानसिक विश्लेषण करताना आपण नकळत 'human trafficking' आणि गुलामगिरी यांना मूक संमती दिली होती की काय, असा भयानक विचार मनाला चाटून गेला. अर्थात, ते फक्त गोष्टीचे पुस्तक होते, संदर्भ वेगळे होते, वेगळ्या काळातील ती संस्कृती होती इत्यादी अनेक युक्तिवाद करून मी स्वतःची समजूत घातली.) त्यामुळे माझ्या मनात करुणेचे झरे काय, साधा पाझरसुद्धा नसावा, असाच माझा समज होता.

तो गैरसमज होता हे रिचर्ड बास (Richard Bass), एका हॉस्पिसचा मालक, मला भेटायला आला तेव्हा कळले. मी 'compassionate physician' आहे असे त्याला कळले आणि म्हणून तो मला त्याच्या हॉस्पिसमध्ये काम करशील का, हे विचारायला आला आहे, असे त्याने पहिल्याच भेटीत सांगितले. (हॉस्पिस ही संस्था मृत्यूच्या दारात असणाऱ्या व्यक्तींची मरणाची क्रिया जास्तीत जास्त वेदनारहित कशी होईल याची काळजी घेते.) पन्नास हबशी गुलामांपैकी एक गुलाम चक्क अमेरिकन जीन्स आणि टी-शर्ट घालून माझ्यासमोर उभा राहील, असे मला स्वप्नातही वाटले नव्हते.

पहिला हबशी (आफ्रिकन) माणूस मी पाहिला तो अमेरिकेत एअरपोर्टवर. आपल्या पुराणांमध्ये वर्णन केलेले राक्षस लोक ते हेच, असे प्रथमदर्शनी वाटले. पुढे निरनिराळ्या पदांवर कृष्णवर्णीय व्यक्ती बघितल्या – अगदी झाडूवाल्यापासून ते राष्ट्रपतीपर्यंत! सर्वच आफ्रिकन लोक काही पर्वतासारखे धिप्पाड असतात असे नाही. त्यांपैकी काहीतर अगदी भारतीय वाटावेत असे मध्यम चणीचे! गोऱ्या लोकांसारखेच हसरे व अमेरिकन शिष्टाचार पाळणारे. अमेरिकेत अनेक वर्षे राहिल्यानंतर मलातरी दैनंदिन जीवनात गोऱ्या-काळ्यांमध्ये काही फरक आहे असे वाटत नाही. कदाचित माझ्या मर्यादित सामाजिक वर्तुळामुळे अमेरिका मला एकरंगी, एकसंध वाटत असावी.

काळे लोक ॲरिझोनात कमी. फिलाडेल्फिया, न्यूयॉर्क या भागात त्यांची संख्या जास्त. रिचर्ड हा एक सामान्य आफ्रिकन अमेरिकन माणूस! मी एक सामान्य एशिअन अमेरिकन स्त्री! दोघेही गप्पा मारण्यात पटाईत. हॉस्पिसच्या कामामुळे आम्ही भेटतो. एकदा आमचे संभाषण हॉस्पिसमधले पेशंट्स, तिथे काम करणाऱ्या निरनिराळ्या देशांतल्या स्त्रिया, करुणेचे महत्त्व यावरून भारतीय स्त्रिया आणि नंतर अमेरिकेतील काळ्या लोकांवर घसरले. रिचर्डला अमेरिका एकरंगी, एकसंध वाटत नाही. त्याला वंशभेद

अजूनही जाणवतो. त्याची आई म्हणते, की मिसिसिपी भागात जो वंशद्वेष आहे तो उघडपणे दिसतो, पण ॲरिझोना, कॅलिफोर्निया या भागात वंशद्वेष छुपा आहे.

माझ्या मते वंशभेदाचा विखार, वणवा विझून गेल्यानंतर निखारे उरावेत एवढाच उरला आहे. इतर कुठल्याही अमेरिकन माणसाला जेवढ्या संधी असतील तेवढ्या आफ्रिकन-अमेरिकन माणसालापण आहेत. असे असूनही काळ्या माणसाची ओळख (identity) ही मुख्यत्वेकरून खेळाडू आणि गायक (Rap singers) अशीच आहे याचा रिचर्डला अभिमान नाही तर खंत आहे. कारण या दोन्ही क्षेत्रांतील व्यक्तींचा मादक द्रव्ये व विध्वंस यांच्याशी संबंध जोडला जातो. रिचर्ड स्वत: शाळा-कॉलेजात बास्केटबॉल खेळाडू होता, पण पुढे त्याने इंग्लिशमध्ये बीए करून स्वत:चा बिझिनेस काढला. याचे कारण कदाचित त्याच्या पूर्वायुष्यातील घटनांवरही अवलंबून असेल. तो पाच वर्षांचा असताना त्याचे वडील ओकलँड, कॅलिफोर्निया येथे त्याच्यासमोर एका बंदूकधारी घरफोड्या चोराकडून मारले गेले. हा गुन्हा वंशद्वेषामुळे घडलेला नव्हता. ''It was a random act of violence,'' तो म्हणतो.

तेव्हा त्याची आई, मिनी बास, पंचवीस वर्षांची होती. तिने परत कधीच लग्न केले नाही; इतकेच नव्हे, तर डेटिंगसुद्धा केले नाही. रिचर्डची आई त्याच्यासाठी आदर्श (role model) आहे, त्याची हिरो आहे, त्याची गुरू आहे. पण तिच्या प्रेमात बंधन नाही – रिचर्डची बायको, मेरी ग्रिफिन, गोरी म्हणजे व्हाइट अमेरिकन आहे. त्यांच्या मुली – बर्कली आणि माया – या गोऱ्या आहेत; मेरीसारख्या.

त्याच्या आंतरवंशीय लग्नाविषयी त्याला बरेचदा विचारण्यात आले असावे, कारण त्याचे उत्तर तयार होते – त्याच्या आईत असलेले गुण त्याला या गोऱ्या मुलीत दिसले. अर्थात लग्न झाल्यावर त्याला त्याच्या सासरी मोकळे (comfortable) वाटत नसे; त्याला सारखा असा संशय यायचा, की ग्रिफिन मंडळी त्याच्या कुटुंबाविषयी आडून आडून बोलताहेत. पण त्याला थोड्यात दिवसांत लक्षात आले, की मेरीच्या आईवडिलांनी त्याचा जावई म्हणून पूर्णपणे स्वीकार केला आहे. रिचर्ड दर उन्हाळ्यात केप कॉडला त्याच्या सासरी बीच हाऊसवर राहायला जातो, यावरूनच ते त्याला अतिशय प्रेमाने व आदराने वागवतात हे दिसून येते.

''आम्ही उन्हाळ्यात फिनिक्सहून केप कॉडला जातो,'' (म्हणजे नागपूरहून नाशिक) हे सांगताना रिचर्डचा चेहरा फुलला. त्याच्या चॉकलेट-ब्राऊन चेहऱ्याला खळ्या पडतात आणि तो दिसायला चांगला आहे, हेही पहिल्यांदाच मला लक्षात आले. अर्थात, त्याच्या आईचे सौंदर्य आणि त्याचे देखणेपण जगाच्या सौंदर्याच्या व्याख्येत बसेलच असे नाही, कारण आपल्या सगळ्यांना युरोपिअन सौंदर्य हेच खरे सौंदर्य आहे असे शिकवले गेले आहे. कृष्णवर्णीयांची त्वचा (complexion) अतिशय सुंदर असते, त्यांच्यात असणारा गोडवा, त्यांचा बांधा इतर वंशांत दिसत नाही. म्हणूनच की काय, अमेरिकेच्या सुपरमॉडेल्स नेओमी कॅम्पबेल, टायरा बँक्स वगैरे आफ्रिकन अमेरिकनच आहेत.

अमेरिकेत civil rights movement १९६०च्या दशकात झाली. तेव्हापासून कृष्णवर्णीयांनी केवढेतरी सामाजिक अंतर पार केले आहे. काळ्या लोकांनी धर्म आणि भाषा गोऱ्यांचीच ठेवली; त्या भिंती कृष्णवर्णीय नेत्यांना पाडाव्या लागल्या नाहीत! रिचर्डला इंग्लिश भाषा प्रिय आहे. ''भाषेला वंश नसतो,'' अमेरिकेतला हा साधासुधा माणूस म्हणाला! रिचर्डला फक्त काळा म्हणून कुठलीही खास सोय, कुबडी किंवा पाठीवर थाप नको आहे. त्याची मुलेपण इतर अमेरिकन मुलांबरोबर स्पर्धा करून शाळा-कॉलेजात प्रवेश मिळवतील.

✦

दास्यातून मुक्त झाल्यानंतर अनेक दशकांनी, सुमारे १९२०च्या दरम्यान, मार्कस गार्व्ही (Marcus Garvey) या काळ्या नेत्याने ठरवले, की अमेरिकेत आणलेल्या सर्व आफ्रिकन लोकांना परत आफ्रिकेत न्यायचे. तशी जहाजे भरून तयारीपण झाली. पण रिचर्डने सांगितले, की आफ्रिकेतील लायबेरिया या देशात पोचल्यानंतर अनेकांचा अपेक्षाभंग झाला. कारण अमेरिकेत ज्या सोयी सामान्य माणसालासुद्धा उपलब्ध आहेत, त्या तिथे नव्हत्या; त्यामुळे त्यांचे देशभक्तीचे रोमँटिक स्वप्न तिथेच धुळीस मिळाले आणि बहुतांशी लोक अमेरिकेत परत आले.

✦

अमेरिकेतील आफ्रिकन लोकांच्या सामाजिक जीवनाचा चढता आलेख रिचर्डच्या आयुष्यावरून दिसतो. दास्याच्या, गुलामगिरीच्या गोष्टी आता इतिहासकालीन झाल्या आहेत. युद्धस्य वार्ता रम्या! रिचर्ड हसत हसत सांगत होता, की गुलामही एकमेकांमध्ये पंक्तिभेद करत असत – घरात काम करणारे गुलाम (house slaves) शेतातल्या गुलामांपेक्षा (farm slaves) उजळ असत आणि ते शेतगुलामांना कमी लेखत. ('स्मृतिचित्रे'मध्ये लक्ष्मीबाई टिळकांनी जी ब्राह्मणेतर समाजाची उतरंड वर्णिली आहे, त्याची आठवण झाली.)

कृष्णवर्णीयांच्या जखमांवर खरेच खपल्या धरल्या गेल्या आहेत का? की रिचर्ड फक्त माझ्यासारख्या 'निमगोऱ्या' लोकांनाच अशा गोष्टी सांगू शकतो?

दास्यातून मुक्त झाल्यानंतर अनेक दशकांनी, सुमारे १९२०च्या दरम्यान, मार्कस गार्व्ही (Marcus Garvey) या काळ्या नेत्याने ठरवले, की अमेरिकेत आणलेल्या सर्व आफ्रिकन लोकांना परत आफ्रिकेत न्यायचे. तशी जहाजे भरून तयारीपण झाली. पण रिचर्डने सांगितले, की आफ्रिकेतील लायबेरिया या देशात पोचल्यानंतर अनेकांचा अपेक्षाभंग झाला. कारण अमेरिकेत ज्या सोयी सामान्य माणसालासुद्धा उपलब्ध आहेत, त्या तिथे नव्हत्या; त्यामुळे त्यांचे देशभक्तीचे रोमँटिक स्वप्न तिथेच धुळीस मिळाले आणि बहुतांशी लोक अमेरिकेत परत आले. रिचर्डला

असा अमेरिका सोडायचा निर्णय कुणी घेऊ शकते याचेच हसू येते. शेवटी गुलामीतून मुक्तता झाली तरी ते सवयीचे गुलाम राहिले! रिचर्डला आपण अमेरिकन असल्याचा अभिमान आहे. तो त्याच्या आईवडिलांपेक्षा वेगळ्या अमेरिकेत जन्मला आहे. त्यामुळे त्याची युद्धेपण वेगळी असतील. एकेकाळी फक्त कृष्ण-धवल असणारी अमेरिका आता जगातील सर्व वंशांचे कोलाज झालेली आहे – Not a melting pot but a beautiful salad bowl!

अमेरिकेतील सगळेच आफ्रिकन लोक काही गुलाम म्हणून आलेले नाहीत. त्यातले अनेक आमच्यासारखे immigrants म्हणूनपण आलेले आहेत. त्यांचा बाज वेगळा असतो. त्यांच्या खांद्यावर गुलामगिरीच्या इतिहासाचे ओझे नसते. ते स्वत:ला इथल्या आफ्रिकन्सपेक्षा सुपिरियर समजतात.

रिचर्डला अमेरिकेतील भारतीयांविषयी काय वाटते हे मला अजून ठरवता आलेले नाही. कारण बोलताना त्याने 'मिसिसिपी मसाला' या सिनेमाचा विषय काढला. त्यात एका आफ्रिकन-अमेरिकन मुलाचे एशिअन अमेरिकन मुलीशी प्रेमसंबंध दाखवले आहेत. तो कृष्णवर्णीय म्हणून तिचे आईवडील त्याला विरोध करतात. त्याच्या तोंडी तेव्हा एक वाक्य घातले आहे – तिच्या कुटुंबाला उद्देशून. "You think you are white!" या प्रश्नाला / विधानाला उत्तर देणे सोपे नाही.

एकूण इमिग्रेशनविषयी मात्र रिचर्डचे मत अनुकूल आहे. त्याचे एक, काहीसे छापील म्हणता येईल असे, उत्तर त्याने मला दिले – "इमिग्रंट्समुळे या देशात उत्तम मूल्ये येतात, देशाच्या व्यक्तिमत्त्वात मोलाची भर पडते. त्यांच्यामुळे समाजाची वीण घट्ट होते." रिचर्डची स्वत:ची मूल्ये उच्च दर्जाची आहेत. तो सांगतो, की तो आणि त्याची आई पंथमुक्त (non-denominational) ख्रिश्चन आहेत. तो जीझसची शिकवण रोज आचरणात आणण्याचा प्रयत्न करतो. सर्वांना प्रेमाने, आदराने व करुणेने वागवायचे ही ती शिकवण. त्याच्या हॉस्पिससाठी डॉक्टर, नर्सेस आणि इतर निवडताना तो धर्म किंवा वंशाला महत्व न देता व्यक्तीच्या गुणांना महत्त्व देतो. रिचर्डला स्त्रियांविषयी आदर आहे. त्याची करुणा फक्त अमेरिकेतील स्त्रियांसाठी नाही. महाराष्ट्रातील स्त्रियांसाठी जे ॲनिमिया प्रोजेक्ट माझी संस्था *(अक्षयभाषा)* करते आहे, त्यासाठी त्याने घसघशीत अनुदान दिले आणि आम्ही दोघे वंश, लिंगभेद वगळून सारख्याच प्रकारचे लोक आहोत हे सिद्ध केले.

त्याच्याशी बोलता बोलता आमच्यामधले साम्य मला जाणवायला लागले. शतकानुशतके बंधनात असलेल्या भारतीय स्त्रियांची मुक्त प्रतिनिधी मी अन् पिढ्यान्‌पिढ्या गुलामगिरीत असणाऱ्या वंशाचा मुक्त प्रतिनिधी तो! आमच्या दोघांच्याही स्वातंत्र्याला कारुण्याचे अस्तर!

अल्लाउद्दिनच्या गोष्टीतले पन्नास हबशी गुलाम आता मला जाचत नाहीत. तेतर कधीच मुक्त झाले आहेत. भविष्याभिमुख, सुजलाम-सुफलाम, विज्ञानप्रिय, विद्वानसंग्रही अशा अमेरिकेच्या भूमीवर आम्ही आमच्या भूतकाळाची गाठोडी खाली ठेवतो आणि व्यवसायाबद्दल कारुण्यपूर्णतेने बोलू लागतो! (And we start talking business with compassion!)

*(जानेवारी २०१४)*

## सावरकरांनी नव्याने सुचवलेले वा जुने पण नव्याने प्रचलित केलेले काही मराठी शब्द

*चित्रपट* : चित्रपट, बोलपट, मूकपट, वृत्तपट, परिचयपट (ट्रेलर), पटकथा, दिग्दर्शक, नेपथ्य, मध्यंतर, चित्रण, बाह्यचित्रण, ध्वनिलेखन, ध्वनिमुद्रिका

*सभा* : प्रकट, प्रकट सभा, हस्तपत्रक (हॅण्डबिल), परिपत्रक (सर्क्युलर), ध्वनिक्षेपक, प्रतिवृत्त (रिपोर्ट), विसर्जन (बरखास्त)

*संस्था* : कार्यवाह, कोषाध्यक्ष, गणसंख्या (कोरम), आजीव, अभियान (मोहीम), विश्वस्त

*शिक्षण* : मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य, प्रपाठक (रीडर), प्रवाचक (लेक्चरर), प्रबोधिका (ॲकॅडमी), अध्यासन (चेअर), परीक्षक, ज्ञानशाखा (फॅकल्टी), प्रवेश, उपस्थित, उपस्थिती, कुमार, कुमारी, गणवेश, क्रीडांगण, उत्तीर्ण

*ग्रंथ* : ग्रंथभांडार (बुकडेपो), पुस्तकविक्रेता, नगर वाचनालय, ग्रंथपाल.

*मुद्रण* : समास, जुळारी, उपमुद्रित (प्रुफ), बांधणी

*टपाल* : टपाल, दूरध्वनी (टेलिफोन), दूरमुद्रक (टेलिप्रिंटर)

*युद्ध* : शस्त्रसंधी (आर्मिस्टिस), उपसंधी (ट्रूस), अंतिमोत्तर (अल्टिमेटम), कीलक राष्ट्र (बफर स्टेट), शिबिर, युद्धनौका, वायुदल, भूदळ, नौदल, संचलन.

*शासन* : कार्यालय, सचिवालय, विधिमंडळ, संसद, लोकसभा, संसदपटू, विभाग, अर्थसंकल्प, संमत, सेवानिवृत्त, निवृत्तिवेतन, नगरपालिका, नगरसेवक (शेरीफ), महापालिका, महापौर, राजसत्ता, पदच्युत, शिरगणना, देश, विदेश.

*इतर* : नभोवाणी, दूरदर्शन, हुतात्मा, क्रमांक, दिनांक.

*(डॉ. अरविंद सदाशिव गोडबोले यांच्याकडून प्राप्त)*

*(मे २००८)*

# सय्यद गलाह

## शंतनू अभ्यंकर

''पुढे अफगाणिस्तानात युद्धाचा भडका उडाला. तिथे तालीबानचं राज्य आलं. नजीबला गाडीमागे बांधून रस्त्यात फरफटत नेत ठार मारण्यात आलं. त्याच्या मृतदेहाचे धिंडवडे निघाले. लिंग कापून त्याचा मृतदेह झाडाला लटकवला गेला. सय्यदच्या काळजाचं पाणी पाणी झालं. नजीब हा त्याच्या वडलांचा दोस्त. लहानपणी नजीबच्या हवेलीवर खेळायला गेलेला हा.'' – पुण्यात मेडिकल कॉलेजात शिकत असतानाच्या एका अफगाण वर्गमित्राचे व्यक्तिचित्र.

कोण कुठला सय्यद गलाह, अचानक माझ्याच वर्गात माझ्याच बॅचला दाखल होतो काय आणि चांगला मित्र बनतो काय, सारंच जरा वेगळं घडलं.

...आणि आता रोज बातम्या येतात युद्धाच्या, निर्वासितांच्या, छळ-छावण्यांच्या, क्रांतीच्या आणि प्रतिक्रांतीच्या. रोज टी.व्ही.वर चित्रं झळकतात, वर्तमानपत्रात मोठे मोठे फोटो येतात; युद्धात मेलेल्यांचे, मारणाऱ्यांचे, मरायला टेकलेल्यांचे, मरायला तयार असणाऱ्यांचे आणि मारण्यासाठी लायनीत उभे केलेले जीव सगळे. असं रोजच छापून येतं म्हटल्यावर रोजच मला सय्यदची आठवण येते. तो वगळता त्याच्या कुटुंबीयांना मी भेटलेलो नाही. पण तरीही युद्धपीडित माणूस, कुटुंब, देश वगैरे म्हटलं की मला आपोआप सय्यद, त्याचं कुटुंब आणि देश आठवतो.

तो अफगाणिस्तानचा. मेडिकल कॉलेजला पहिल्या वर्षाला माझ्या वर्गात आला. त्याला हिंदी, इंग्रजीचा गंध नव्हता. त्याची ॲडमिशनच मुळी एक आंतरराष्ट्रीय मामला होता. त्याचे वडील दिल्लीत, अफगाण वकिलातीत, कोणी बडे अधिकारी होते. अफगाण कम्युनिस्ट पक्षाचे ते एक मोठे नेते होते म्हणे. सय्यदही शाळेत असतानाच रशियात गेला होता – शाळेसाठी, लष्करी प्रशिक्षणासाठी आणि कम्युनिस्ट होण्यासाठी! बंदुका, बॉम्ब वगैरे हाताळण्याचं तंत्र अवगत होतं त्याला; कम्युनिझम नव्हतं. भाषा अवगत होत्या रशियन आणि पुश्तू. वडलांची दिल्लीत बदली झाल्यावर तो दिल्लीत आला. भारत आणि अफगाणिस्तान हे दोन्ही देश रशियाचे बगलबच्चे म्हणून ज्ञात होते. होतेच ते बगलबच्चे. अफगाणिस्तानात नुकतंच सैन्य घुसवलं होतं रशियानं. तिथल्या जनतेच्या मनाविरुद्ध. 'क्रांतीच झाली अफगाणिस्तानात त्याला आमचा काय इलाज?', असा रशियाचा सवाल; आणि 'असल्या छप्पन क्रांत्या बघितल्याहेत, असल्या क्रांत्यांचं नेमकं काय करायचं हे आम्हांला चांगलं माहीत आहे', हा अमेरिकेचा आग्रह. पण रशियाच्या ह्या आंतरराष्ट्रीय दादागिरीपुढे ब्र काढायची भारताची हिम्मत नव्हती. उलट अफगाण सरकारला मान्यता, तिथल्या सर्व संस्थात्मक ढाच्याला आधार आणि ह्यातून परस्पर पाकिस्तानला शह असंच धोरण होतं. मग यातूनच भारतातल्या अफगाणी अधिकाऱ्यांच्या सर्व गरजांची काळजी घेणं ओघानंच आलं. मग त्यात त्यांच्या मुलांचीही काळजी आली. मग त्यात त्या मुलांच्या शिक्षणाचीही काळजी आली. आणि येणेप्रमाणे सय्यद माझ्या वर्गात दाखल झाला.

पुण्याला कॉलेजला जायचं म्हटल्यावर त्यानं दिल्लीत इंग्रजीचा क्लास लावला होता, दोन महिन्यांसाठी!

पहिल्याच दिवशी कॉलेज संपल्यावर मला म्हणाला, 'रूमवर सोड.'

'कुठे आहे रूम?'

त्यानं चक्क स्टेशनजवळच्या प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलचंच नाव घेतलं. मी उडालोच. जिथल्या लाल रुजाम्यावर चालण्याकरिता आमचे पाय आसुसले होते, जिथल्या दारवानाच्या कुर्रेबाज मिश्यांच्या मिजाशीपुढे आम्ही चाचरायला लागायचो अशा त्या हॉटेलात हा गेले पंधरा दिवस राहात होता. कॉलेज सुरू होईपर्यंत म्हणून ही व्यवस्था होती. तो लवकरच होस्टेलवर दाखल होणार होता; झालाच दाखल चार दिवसांत.

कुठे ते हॉटेल आणि कुठे आमचं होस्टेल. पण सय्यदनं थोडीसुद्धा नाराजी दाखवली नाही. अगदी सहजपणे तो होस्टेलच्या कुशीत शिरला. गैरसोयी आणि ढेकणांना पुरून उरला. त्याची ही सहनशक्ती अजबच म्हणायची.

त्याची रूम होती 'ई' ब्लॉकवर, टॉप फ्लोअरला, पण तो पडीक असायचा माझ्याच रूमवर. सक्काळी जॉगिंग, मग 'डी' ब्लॉकसमोर चहा, मग लेक्चर, क्लिनिक, डबा, लेक्चर, संध्याकाळी व्हॉलीबॉल, फुटबॉल, रात्री डबा, जर्नल कमप्लीशन, जनरल टवाळक्या....आणि मग रनिंग रेस! रोज रात्री होस्टेलसमोरच्या रिकाम्या गल्लीत रनिंग रेस व्हायची. रोज सय्यद जिंकायचा, रोज रात्री रबडी पाजायचा आणि झोपायला तेवढा रूमवर जायचा. त्या रबडीइतकंच गाढ मैत्रं जुळलं हळूहळू.

एकदा सहज त्याचं बँकेचं पासबुक दाखवलं त्यानं, तर त्यातली रक्कम बघून माझे डोळेच फिरले. 'एवढी मोठी रक्कम तू सेव्हिंग खात्यात कशाला ठेवलीस?' असं विचारताच वडलांनी

पुढील पाच वर्षांची तरतूद म्हणून हे पैसे पाठवल्याचं त्यानं सांगितलं. मग आम्हीच दोघांनी बँकेच्या मॅनेजरना भेटून एफ.डी. वगैरे केल्या. एवढ्या मोठ्या रकमेची एफ.डी. बसल्या जागी मिळत्येय हे पाहून त्या मॅनेजरना कृतकृत्य होत होतं. पण आमचं वय, आमची ष्टोरी आणि रक्कम यांचा मेळ बसेना. काबूल, दिल्ली, कॉलेज, पुणे, सय्यद, नोज नॉट इंग्लिश...असं ते बराच वेळ पुटपुटत राहिले. त्यांना भलत्या भलत्या शंका यायला लागल्या. तेवढ्यात सय्यदनं त्याचा तो डिप्लोमॅटिक पासपोर्ट पुढे केला. आधी त्या मॅनेजरना त्यात काही गम्य दिसलं नाही पण आतल्या केबिनमधून त्यांनी कुणालातरी फोन लावला आणि त्यांना त्या पासपोर्टचं महत्त्व उमगलं. तात्काळ किती आणि कशी मदत करू असं झालं त्यांना. त्यांनी चहा-बिस्किटं मागवली आणि पुढे एफ.डी.च्या पावत्या द्यायला जातीनं रूमवर आले साहेब. रूमची आणि त्यातील सय्यदची अवस्था पाहून त्यांना आमच्याबद्दल पुन्हा शंका आली असणार!

कॉलेज सुरू झालं तेव्हा रशियाने आपल्या फौजा अफगाणिस्तानातून काढून घ्यायला नुकतीच सुरुवात केली होती. हा टेकू जाताच तिथलं, नजीबचं सरकार अस्थिर झालं होतं. प्रचंड यादवी माजली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता. चिनी आणि अमेरिकन समर्थन असलेल्या मसूदच्या फौजा, पाकिस्तानचा कळसूत्री बाहुला हेकमत्यार आणि अरबी आधाराने लढणारा हक्कानी हे सगळे नजीब सरकार विरुद्ध लढत होते. मधूनच वेळ मिळाला की आपापसांतही लढत होते. हे सगळं समजायचं काही त्रोटक बातम्यांवरून. 'टाइम्स' किंवा 'एक्स्प्रेस'मध्ये काय कॉलमभर बातमी येईल त्यावरून. सय्यद आसुसलेला असायचा, मायदेशीच्या बातम्यांसाठी. पण मार्ग कोणताच नव्हता.

त्याला मग एके दिवशी ब्रिटिश कौन्सिलच्या लायब्ररीत घेऊन गेलो. काही दिवस हा क्रम चालला. तिथल्या आंतरराष्ट्रीय पेपरांत इथल्यापेक्षा जरा जास्त माहिती यायची. पण ते पेपर ब्रिटिशधार्जिणे होते आणि त्यातल्या बातम्या या बंडखोरांच्या बाजूने असायच्या. राष्ट्राध्यक्ष नजीब यांचा उल्लेखच मुळी 'नामधारी अध्यक्ष' असा असायचा. पुढे पुढे नजीब सरकारचा पाडाव स्पष्ट दिसायला लागला. 'क्रूर', 'नादान', 'रशियाच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या' सरकारचा धिक्कार, पानोपानी दिसायला लागला. बातम्याही त्रासदायक आणि त्यातली भाषाही क्लेशदायी. ब्रिटिश कौन्सिलच्या भेटी बंदच झाल्या हळूहळू. आता टी.व्ही.वरचा प्रणव रॉयचा 'द वर्ल्ड धिस वीक' हा कार्यक्रमच उरला फक्त. अफगाणिस्तानात काही भलं घडतच नव्हतं. दर आठवड्याला बुरं तेवढं ऐकून खालमानेने सय्यद रूमवर परतायचा. पण नजीब तसा चिवट. जाता जाता रशियाने त्याला शस्त्रास्त्रांचा भरपूर प्रसाद दिलेला. ह्या जोरावर सरकार तगून होतं.

इकडे फर्स्ट इअरची परीक्षा आणि तिकडे जलालाबादेत धुमश्चक्री पेटलेली. बंडखोरांनी सर्वशक्तीनिशी हल्ला केलेला. सय्यद विदीर्ण.

'मी नापास झालो तर रे? तरीदेखील मैत्री राहील नं आपली?' परीक्षेआधी त्याचा मला प्रश्न. त्याच्या चेहऱ्यावर प्रचंड काळजीची काजळी.

'अर्थात' माझं बेसावध उत्तर.

'अरेच्या! मला वाटलं तू म्हणशील, सय्यद, तू नापास कसा होशील? तू पासच होशील!!' सय्यद.

तो नापास होणार नाही असा आश्वासक सूर हवा होता त्याला. पण तो पास होणं शक्यच नव्हतं. एक वर्ष तर इंग्लिश शिकण्यातच गेलं होतं. नुकतंच तर त्याला कुठे बऱ्यापैकी इंग्लिश जमायला लागलं होतं. आता येत्या सहा महिन्यांत परीक्षा. दीड वर्षांचा सगळा अभ्यासक्रम नेमलेला. तेवढ्यात जुजबी इंग्लिशच्या जोरावर, दीड वर्षांचा अभ्यासक्रम वाचणं, आत्मसात करणं, आणि आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरं जाणं हे अशक्यच होतं. पण सय्यदला मात्र माझ्याकडून आश्वासक प्रतिसाद हवा होता. तो त्याचा हक्क आणि माझी जबाबदारी होती.

मी कुठून देणार होतो त्याला विश्वास? इथे भल्याभल्यांची फाटली होती; पण माझ्या उत्तरानं तो खूप दुखावला गेला. जलालाबादची लढाई आश्चर्यकारकरीत्या नजीबनं जिंकली. सय्यद सुखावला. त्या उन्मादात सय्यदनं परीक्षाही मोठ्या आत्मविश्वासाने दिली, पण सय्यद फर्स्ट इयरला लटकला.

पहिल्या वर्षी नापास मुलांना सहा महिन्यांनी पुन्हा परीक्षा देता येते. ती पास झाल्यावरच त्यांचं दुसरं वर्ष सुरू होतं. या बॅचला ऑड बॅच म्हणतात. एकदा तुम्ही ऑड बॅचला गेलात की तुमच्या बरोबरच्या मित्रांची संगत आपोआप सुटते. कारण वर्ग, प्रॅक्टिकल, क्लिनिक, परीक्षा ह्या सगळ्याचं वेळापत्रक कधीच जुळत नाही. भेटी-गाठी, एकत्र खेळ, अभ्यास, दंगा हेही मग कमी कमी होत जातं. शिवाय रेग्युलर बॅचचा अहंगंड आणि ऑड बॅचचा न्यूनगंड कमीअधिक प्रमाणात उरलीसुरली मैत्री संपुष्टात आणतो. सय्यद अपेक्षेप्रमाणे ऑड बॅचला गेला, पण तरीही आमची मैत्री मात्र विरली नाही.

फर्स्ट इयरचा रिझल्ट लागला तो दिवस जगाच्या इतिहासात ऐतिहासिक ठरला. त्या दिवशी जर्मनीची ती कुप्रसिद्ध भिंत छिन्न छिन्न झाली. त्याची मोठी बहीण जर्मनीत होती, पूर्व जर्मनीत. तिचा नवरा, अहमद, तिथल्या अफगाण वकिलातीत कोणी अधिकारी होता. तिचे आणि तिच्या चार गोंडस मुलांचे फोटो तो अधूनमधून दाखवत असे. थुईथुई नाचणाऱ्या कारंज्यापुढे थुईथुई नाचणारी ती गोंडस पोरं. त्याची बहीण अगदीच बुरख्यात नाही, पण तोंडावर रुमाल वगैरे बांधून. सय्यद सांगत होता आता त्या बहिणीला आणि तिच्या कुटुंबीयांना जर्मनीत राहाणं अशक्य आहे. जर्मन कम्युनिस्ट स्वीकारार्ह होते पण बाहेरचे कम्युनिस्ट अजिबात नाही.

झालंच तसं. महिन्याभरात सय्यद भरल्या डोळ्यांनी रूमवर आला. ही भिंत पाडायला पूर्व जर्मनीतल्या कट्टर कम्युनिस्टांचा विरोध होता. अशाच एका गटाच्या गुप्त सभेसाठी अहमद गेला होता. तिथे विरोधी गटाचे लोक आले, बोलाचाली झाली, प्रकरण हमरीतुमरीवर आले. ह्या भडक माथ्याच्या अफगाणाने खिशातून पिस्तूल काढलं, पण त्या झटापटीत ते दुसऱ्याच कुणीतरी हिसकावलं, आणि पहिल्याच गोळीत याला टिपलं! पुढे पूर्व आणि पश्चिम जर्मनीचं एकत्रीकरण झालं आणि त्याची ती बहीण व तिची चार पोरं जर्मनी सोडून गेली. पोलंडमार्गे फ्रान्समध्ये आश्रयाला गेली; बहुतेक, पण नेमकं काहीच कळत नव्हतं.

पुढे अफगाणिस्तानात युद्धाचा भडका उडाला. तिथे तालीबानचं राज्य आलं. नजीबला गाडीमागे बांधून रस्त्यात फरफटत नेत ठार मारण्यात आलं. त्याच्या मृतदेहाचे धिंडवडे निघाले. लिंग कापून त्याचा मृतदेह झाडाला लटकवला गेला. सय्यदच्या काळजाचं पाणी पाणी झालं. नजीब हा त्याच्या वडलांचा दोस्त. लहानपणी नजीबच्या हवेलीवर खेळायला गेलेला हा. त्याचा पुतण्या याचा खास दोस्त. नजीबला भर रस्त्यात फाशी दिल्याची बातमी आली आणि विस्फारित नेत्रांनी सय्यद पाहात राहिला. बातम्यांतले फोटो पाहात राहिला. अफगाणिस्तानात रक्तरंजित क्रांती झाली. मूलतत्त्ववाद्यांचं सरकार आलं. नव्या सरकारचं आणि भारत सरकारचं सूत जुळेना. जुन्या सरकारचे कारभारी काही दिवस दिल्लीच्या आश्रयाला राहिले, पण त्यांनाही पुढे देश सोडावाच लागला.

सय्यदचे आई-वडील तडकाफडकी दिल्ली सोडून गेले. त्याला भेटूच न शकता! ते कुठे आहेत वगैरे काहीच बरेच दिवस कळेना. फोन, पत्रं काहीच नाही. मायभूमीची वाताहत, सतत युद्ध, आई-बाप गायब, विधवा बहीण जर्मनीत का पोलंडमध्ये का फ्रान्समध्ये काही पत्ता नाही. हा इथे पुण्यात, इंग्रजी आणि मेडिकलच्या अभ्यासक्रमाशी झगडतोय. पण सय्यद भलताच चिवट आणि खंबीर. या असाधारण परिस्थितीबद्दल चकार शब्द कधी काढायचा नाही. मी विचारलं तर चार-दोन शब्दांची त्रोटक उत्तरं यायची. शेवटी मी नाद सोडून दिला.

सिनेमाला गेलो एकदा. मीरा नायरचा 'सलाम बॉम्बे'. अंगावर येणारा सिनेमा. घरातून परांगदा झालेलं ते पोरगं, त्याचं नाव हरवतं, गाव हरवतं आणि मुंबईत मिळेल ते काम करून त्याचा जगण्याचा झगडा सुरू होतो. ते पोरगं चहाच्या गाड्यावर हरकाम्या म्हणून कामाला लागतं. त्याला कोणी नाव विचारत नाही की नावानं हाक मारत नाही. 'ए च्या-पाव' हेच त्याचं नाव बनतं.

एकदा पोस्ट ऑफिस पाहून त्याला घरी पत्र लिहायची उबळ येते. लेखनिकासमोर बसून तो मोठ्या उमेदीने मजकूर तर सांगतो, पण पत्ता विचारल्यावर म्हणतो, 'रामपूर'.

कुठलं रामपूर?' लेखनिक खेकसतो.

हा कोरा.

'पत्ता माहीत नाही तर पत्र लिहून टायम बरबाद का केला माझा?'

त्याच्या डोळ्यांत पाणी.

'अरे कुठलं रामपूर? भारतात प्रत्येक जिल्ह्यात रामपूर असेल...'

हा गप्प.

तो लेखनिक पुन्हा पुन्हा विचारत राहातो, हा हिरमुसला हिरमुसला होत जातो. मुसमुसत मुसमुसत, विझत-विझत जातो. शेवटी वैतागून तो लेखनिक त्या पत्राचा बोळा करून फेकून देतो. कॅमेरा त्या घरंगळणाऱ्या कागदी बोळ्यावर स्थिरावतो आणि ह्या प्रचंड मानवसमूहातल्या बेपत्ता माणसांचं एकलेपण आपल्यावर भिरकावून देतो.

हे सगळं बघताना शेजारी बसलेला सय्यद अगदी आतून हलल्याचं मलासुद्धा जाणवलं. त्याला सहनच होईना. उतू येणारे दुःखाचे कढ शेवटी बंध फोडून बाहेर आले. तो गदगदून रडायला लागला. त्याला कसबसा सावरत सांभाळत मी होस्टेलला आणला. चार दिवस सय्यद घुमा. एका शब्दानं बोलेना. चौथ्या दिवशी मला म्हणाला, 'चार दिवस झोपलो नाहीये मी. झोपूच शकलेलो नाही.' मला काय बोलावं हेच सुचेना. पण ह्या भळभळत्या दुःखावर शर्तीली दवा त्याची त्यानीच शोधून काढली होती. त्या दिवशी त्यानी तो सिनेमा एकदा नाही, दोनदा नाही, तीनदा पाहिला. थेटरच्या अंधारात मनसोक्त, मनमोकळं रडला तो. त्या दिवशी तो शांत शांत झाला. काळजातल्या दुःखाचा सगळा गाळ एकदाचा उपसला गेला. रक्त वाहातं झालं.

इतक्या वर्षांत त्याला कधीही कोणीही घरचं भेटायला आलं नाही की हा कधी सुट्टीत घरी गेला नाही. घर होतंच कुठे? उद्ध्वस्त आणि अस्वस्थ अफगाणिस्तानमधून सारेच पांगलेले, परांगदा झालेले. आलाच तर माझ्याच गावी यायचा. मनसोक्त राहायचा. निघताना होस्टेलच्या रखवालदाराला, आपल्या खर्जातल्या कर्कश आवाजात, फर्ड्या मराठीत सांगायचा, 'गाव्वी ज्वावून यतो!' गावातल्या ब्लड-बँकेत आवर्जून रक्तदान करायचा. (केल्यावर न-चुकता चक्कर येऊन पडायचा!!) गमतीनं म्हणायचा, ''तुझा अल्सेशिअन भॉव भॉव असं ओरडत नसून 'गलाः गलाः' अशी मलाच हाक मारतोय!'' एकदा बॅडमिंटनच्या स्पर्धेचं उद्घाटन त्याच्या हस्ते केलं, तर पठ्ठ्यानं स्पर्धेत भाग घेऊन करंडकच जिंकला की. घाटावरच्या कळकट हॉटेलातली चटकदार मिसळ तन्मयतेनं खायचा. पूरग्रस्तांच्या मदतफेरीत झोळी घेऊन फिरायचा. गावच्या शाळेसाठीच्या श्रमदानात खरोखरी श्रमायचा. कृष्णा नदीच्या उत्सवात मनसोक्त ढोल बडवायचा.

नदीकाठी घाटावर आम्ही गप्पा ठोकत बसायचो. त्याच्या अफगाण वंशाचा त्याला कोण अभिमान. इराणी, दुराणी, सोमनाथ लुटणारा अब्दाली हे माझ्या इतिहासातले खलनायक त्याचे स्फूर्तिदाते होते. कोणी कोणी भारतावर कधीकधी आणि कितीकिती वेळा स्वाऱ्या केल्या; कधीकधी, कसंकसं, कुठेकुठे आणि कायकाय लुटलं; हे सगळं तो साभिमान बडबडत राहायचा. माझा अफगाणिस्तान हा गांधारी, पठाणी व्याज, काबुलीवाला आणि पानिपतापुरता सीमित. इराणी, दुराणी आणि अब्दालीला माझ्याकडे उतारा होता कुठे? पानिपतावरचा पुरता पराभवच मला माहीत. मी आपला त्याच्या फुशारक्या सहन करत बसायचो. लढावू अफगाण जनता कधीही पारतंत्र्यात गेली नाही हेही तो छाती फुगवून सांगायचा. भारतातली जातिसंस्था हा तर त्याच्या टीकेचा आवडीचा विषय. शिवाय भ्रष्टाचार, बेशिस्त, अस्वच्छता, निरक्षरता... टीकेला विषय भरपूर होते त्याच्याकडे. खरी, खोटी, रंजित, अतिरंजित टीका. काही वेळा बोचणारी, काही वेळा ओरखडणारी, ओरबाडणारी रक्तरंजित टीका.

एके दिवशी मी प्रतिहल्ला करायचं ठरवलं. डायरेक्ट अफगाणी बायकांच्या बुरख्यालाच हात घातला. ही चाल कशी असमानतेची, पुरुषी सत्तेची द्योतक आहे, ह्यामुळे बायकांना रेस्पिरेटरी इन्फेक्शन, टी.बी. वगैरे कसा होतो, व्हिटामिन डी कसं कमी पडतं... वगैरे बरंच बरंच बोललो. माझ्या बोलण्याचं त्याला

भयंकर आश्चर्य वाटलं. असा काही दृष्टिकोन असू शकतो, हे त्याच्या गावीही नव्हतं. त्याच्या मते बुरखा ही स्त्रीच्या सौंदर्याला, वयात येण्याला, मादकतेला, पुरुषांना आव्हान देणाऱ्या हालचालींना दिलेली मोकळीढाकळी, दिलखुलास, लाजवाब दाद आहे!! 'तू बुरखा घाल बये, नाहीतर झालोच आम्ही घायाळ', असं सांगणं आहे! 'तुझ्या नखाचं दर्शनही आम्हांला विव्हल करतं' असं दर्शवणं आहे!! बुरखा ही अभिमानानं मिरवायची चीज आहे. स्त्रीत्वाचं लेणं आहे ते....!!! मी चांगला टराटरा फाडलेला बुरखा सय्यदनं पुन्हा झटक्यात शिवून टाकला होता.

हळूहळू कॉलेजमध्ये सय्यद समरसून गेला. लायनी मारण्यापर्यंत त्याची प्रगती झाली. कॉलेज ऑर्केस्ट्राच्या वेळी एक मुलगी त्याला अगदी बिलगून बसली होती. ती घारी, गोरी, अप्सरा त्याच्या मनात भरली होती. त्याला छेडलं तर चक्क लाजला वगैरे. मी म्हटलं, 'अवघड आहे सय्यद तुझं, तिचं घराणं कडक धर्मनिष्ठ वगैरे आहे.' म्हणतो कसा, 'मला फक्त मजा करायची आहे आणि तिलाही!'

सय्यद ऑड बॅचला गेला आणि वाहावत गेला, बहकत गेला. अभ्यासाची संगत सुटली. नवे छंद जडले, नवे फंद पडले. 'क्रॉनिक' (वारंवार नापास) मुलांबरोबर राहून राहून त्याला यात काही गैर वाटेनासं झालं. पण पुढे हेही ग्रहण सुटलं. आपल्या बरोबरीची मुलं आपल्या बरीच पुढे गेलेली पाहून त्याला शरम वाटू लागली. त्यानं मग नेटानी अभ्यास सुरू केला.

दरम्यान वडलांची नियमित पत्रं येऊ लागली. ते आता फ्रान्समध्ये होते. कुठल्यातरी संस्थेत प्राध्यापकी करत होते. बहीणही तिथेच होती. पण इतकं सगळं होऊनही सय्यदची आणि कुटुंबीयांची भेट होऊ शकत नव्हती. याचा पासपोर्ट अफगाणिस्तानच्या पदच्युत सरकारने दिलेला. त्या सरकारला युरोपीय देशांची मान्यता नव्हती, आताच्या सरकारचा पासपोर्ट त्याच्याकडे कुठून येणार? असा काहीसा तो तिढा होता. त्याच्या वडिलांनी बराच काळ, बराच पत्रव्यवहार करून हा प्रश्न मार्गी लावला. फायनलची परीक्षा पास होताच सय्यद साऱ्या कुटुंबीयांना भेटायला फ्रान्सला रवाना झाला. त्याच्या इतकाच आनंद आम्हां मित्रांनाही झाला.

सय्यद आता इंग्लंडमध्ये आहे. एका खेड्यात प्रॅक्टिस करतो. आईवडील फ्रान्समध्ये होते. पण तिथलं वातावरण अफगाणांसाठी चांगलं नाही, त्यामुळे आता इराणला आहेत. सय्यदच्या आजोळी. बहिणीने आता एका नायजेरिअन व्यापाऱ्याशी लग्न केलं आहे. ती असते मेक्सिकोत. सय्यदची बायको मूळची ऑस्ट्रेलियन, लहानाची मोठी झाली सुदानमध्ये. ह्याला भेटली फ्रान्समध्ये. त्याची दोन गोजिरवाणी पोरं आहेत. तो आणि मुलं मँचेस्टर युनायटेडचे पक्के फॅन आहेत. एकही मॅच चुकवत नाहीत. सारे मला फेसबुकवर भेटतात.

येईन म्हणतो कधीतरी कॉलेजच्या गेटटुगेदरला. काबूललाही जाईन म्हणतो. शिवाय इराणला आजोळी, ऑस्ट्रेलियाला सासरी, मेक्सिकोला भाच्यांना भेटायला...असं कुठेकुठे जायचं असतं त्याला... आता कुठेकुठे जातो आणि कधी माझ्याकडे येतो ते बघायचं. माझ्या गावीही यायचं असतं त्याला, पुन्हा नदीकाठी गप्पा मारायला.

आला की संध्याकाळी आम्ही घाटावर जाऊ. नदीत पाय सोडून मनसोक्त गप्पा छाटू.

नदी वाहत असेल, काठावरच्या गावांना पाणी आणि संस्कृती बहाल करत नदी वाहत राहील. आपल्या स्वतःच्या देशातून, स्वतःच्या गावातून परांगदा झालेल्या सय्यदला नदीनं माझं गावही बहाल केलं असेल. कारण माझी खात्री आहे, सय्यद केव्हाही माझ्याकडे आला, केव्हाही इंग्लंडहून निघाला, तरी तिथून निघताना त्यानं मुलांना सांगितलं असेल, 'गाव्वी ज्वावून यतो!'

*(दिवाळी २०१६)*

---

## स्त्री : घराघरात जळणारी एक वात

प्रत्येक घरातील स्त्री, घरातल्या या स्त्रीचा मानसिक कोंडमारा, दोन पिढ्यांच्या विचारांमध्ये तिची होणारी घुसमट हा माझा आवडता विषय. 'वात' नावाची माझी ही कविता पहा.

*मुलगा म्हणाला,*
*''आई, दिव्याची वात मोठी कर,*
*मला वाचता येत नाही.''*
*वडील म्हणाले,*
*''अग! दिव्याची वात कमी कर,*
*मला झोप लागत नाही.''*

*आई रात्रभर*
*दिव्याची वात कमी-जास्त करत राहिली*
*आयुष्यभर दोघांमध्येच*
*वातीसारखी जळत राहिली.*

*(माझ्या कवितेच्या डायरीची काही पानं... या अंतर्नादमधील लेखातून, जुलै २००८)*

***प्रशांत असनारे***

# झाडे

**दत्ता दामोदर नायक**

एक संवेदनाक्षम लेखक झाडांशी त्यांच्याच भाषेत संवाद साधू लागतो, त्यांच्याशी मैत्र जोडतो आणि मग तीही त्याच्याशी आपुलकीने बोलू लागतात. प्रत्येक झाडाचे वेगळे टवटवीत सौंदर्य त्याला जाणवू लागते. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांप्रमाणेच झाड हे सहावे महाभूत असे तो मानू लागतो.

झाडांचे आणि माझे नाते हल्लीहल्लीपर्यंत दूरस्थ होते.

झाडे सर्वप्रथम मला लहानपणी गोष्टींतून भेटली. पंचतंत्रातील माकड आणि मगरीच्या गोष्टीतून जांभळाचे झाड भेटले. पुराणांतल्या कृष्ण, सत्यभामा आणि रुक्मिणीच्या कहाणीतून पारिजातकाचे झाड भेटले. य. गो. जोशींच्या कथेतून शेवग्याच्या झाडाची ओळख झाली. वेताळपंचविशीत राजा स्मशानात वडाच्या झाडावर उलटे टांगलेले प्रेत आणायला जातो, तेव्हा प्रेतातला वेताळ जागा होतो हे वाचून झाडाविषयी गूढ वाढत चालले. कथा-कहाण्यांतली झाडे माणसाशी बोलणारी होती. सावत्र आईने उखळात ठेचून मारून परसात पुरलेल्या मुलीच्या कथेत ती कडुलिंबाच्या झाडाच्या रूपाने बोलत होती.

पुढे विज्ञानात झाडांचे वनस्पतिशास्त्र शिकलो. झाडे हवेतला कर्बवायू शोषण करून हवेत प्राणवायू सोडतात. झाडांची मुळे जमिनीतले पाणी शोषतात आणि झाडांची पाने ह्या पाण्याचा हवेत उत्सर्ग करतात, म्हणून पाऊस पडतो हे शास्त्र शिकलो.

नंतर एकदा आर्किटेक्ट चार्ल्स कोरिआ यांनी मला झाडांविषयी एक दंतकथा सांगितली. खूप खूप वर्षांपूर्वी पृथ्वीतलावर लाखो झाडे होती. ही झाडे हवेतला कर्बवायू शोषण करून हवेत प्राणवायू सोडत होती. त्यामुळे हवेतल्या प्राणवायूचे 'प्रदूषण' वाढल्याचे झाडांच्या लक्षात आले. मग झाडांमधल्या पर्यावरणवादी झाडांनी 'पृथ्वी बचाव समिती' स्थापन केली. या समितीने पृथ्वीवर जाणीवपूर्वक अधिक माणसांची 'लागवड' केली. त्यामुळे पृथ्वीवरील लोकसंख्या वाढली. हवेतला कर्बवायू वाढला. प्राणवायूचे 'प्रदूषण' कमी झाले. अशा रीतीने पृथ्वीवरील लोकसंख्यावाढीचे श्रेयही ही दंतकथा झाडांना देते!

पृथ्वीवर झाडे नसती तर पृथ्वी वैराण झाली असती; हैराण झाली असती. झाडे नसलेल्या पृथ्वीला काळाने भस्मसात केले असते. याची समज मला विज्ञानाने दिली.

त्यानंतर झाडे प्रवासात भेटली. धावत्या गाडीच्या खिडकीतून मागे पडणारी झाडे मी पाहिली. डोंगरावरून, जंगलातून फिरताना सभोवतालची गच्च, भरगच्च झाडे पाहिली. देशविदेशांत फिरताना विविध प्रकारची पानझाडे, फुलझाडे, फळझाडे पाहिली. पावसाळ्यात भिजून ओलीचिंब होणारी, हिवाळ्यात गोठणारी आणि उन्हाळ्यात फुलून फुलभारित होणारी झाडे पाहिली. तरी झाडांचे आणि माझे नाते जवळकीचे झाले नाही. ते दूरस्थच राहिले.

हल्लीच मी शेतकरी झालो. सह्याद्रीच्या पायथ्याशी मांडवी नदीच्या किनारी पंचवीस एकरांची सुपीक बागायती जमीन विकत घेतली. या जमिनीत माड, पोफळी, काजू, आंबे, फणस, केळी अशी झाडे आहेत. ज्या गावात ही बागायती जमीन आहे. त्या गावाचे नाव सांगोड. तिथे मी सेंद्रिय पद्धतीने लागवड करू लागलो. या बागायतीत झुळझुळत्या नदीच्या जवळच मी लाल चिऱ्यांचे एक फार्महाऊस बांधले. त्याचे नाव ठेवले 'सांतेर'. सांतेर म्हणजे वारूळ. हा एक अर्थ. पण सांतेर ही गोव्याची आद्य भूदेवता, कृषी देवता हा दुसरा अर्थ. बागायतीत मी झाडांमध्ये आंतरपिके म्हणून स्थानिक भाज्यांची लागवड केली. भाज्यांचे मळे फुलले. सगळा परिसर हिरवागार दिसू लागला. झाडांना आता मी मुळांपासून शेंड्यापर्यंत ओळखू लागलो. झाडांशी आता मी बोलू लागलो. झाडेही आता माझ्याशी बोलू लागली. झाडांशी आता मी एकजीव झालो. झाडांशी माझे नाते आता अंतर्बाह्य बदलून गेले.

ऋतुचक्रातले झाडांचे सांकेतिक इशारे मला कळू लागले. झाडांच्या पानांचे बदलते रंग, झाडांना येणारा मोहोर, त्यांना येणारा फुलांचा बहर, त्यानंतरचा फळांचा भार, झाडांची पानगळ, त्यांची निष्पर्णता, झाडांची जमिनीवर येणारी हताश मुळे आणि झाडांचे उन्मळून जाणे... हे सगळेच माणसाच्या जिण्यासारखेच आहे असे मी मानू लागलो. आकाश, प्रकाश, वारा, पाणी आणि पृथ्वी ह्या पंचमहाभूतांप्रमाणेच झाड हे सहावे महाभूत असे मी मानू लागलो. झाडांतून निसर्ग बोलत असतो. झाडे ही निसर्गाची चित्रलिपी आहे, रंगबोली आहे. झाडे ही रोपांच्या मूक भाषेतील विरामचिन्हे आहेत असा भास, आभास मला होऊ लागला.

काही वर्षांपूर्वी मी अलास्काला गेलो होतो. तिथल्या बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांनी माणूस आणि निसर्गातील झाडे व प्राणी यांमधले द्वैत कधीच मानले नाही. गोव्यातही

झाडांकडे पाहाण्याची ही दृष्टी असावी. मला आठवते, माझ्या लहानपणी मी माझ्या मावशीच्या घरी उसगावला गेलो होतो. तिथे न्हाणीघरात चक्क झऱ्याचे पाणी माडाच्या पोकळ वाश्यावरून वळवले होते. गोव्यातील अनेक घरांत माड न कापता तसेच ठेवलेले मी पाहिले आहेत. आपल्या पूर्वजांनी घरे बांधताना झाडे कापली नाहीत, त्या झाडांभोवती घरे बांधली. लोकांनी झाडे कापू नये, म्हणून झाडांना देवत्व दिले. झाडांच्या राया देवराया झाल्या. झाडांना भूतत्व दिले. झाडांवर वेताळ, म्हारू, देवचार, हापशी असतो अशा अंधश्रद्धा जाणीवपूर्वक पसरवल्या. त्यामुळे झाडांविषयी मानवी मनात एकाच वेळी आदर आणि गूढ निर्माण झाले.

पुढे साहित्यिकांनी आणि चित्रकारांनी झाडांभोवती सौंदर्याची चौकट तयार केली. महाकवी वाल्मीकी, महर्षी व्यास, भास, भवभूती, कालीदास, रवींद्रनाथ सगळ्यांनी झाडांवर अतीव प्रेम केले.

झाडांच्या जेवढ्या जवळ जावे, तेवढे झाड आपल्या अंतरंगांतले सेंद्रिय सौंदर्य तुम्हांला उघडून दाखवते. झाडांचे हे सुस्नात सौंदर्य, कोवळे, ताजे, टवटवीत सौंदर्य दर झाडागणिक वेगळे असते.

## माड

माड हा कधीच एकटा नसतो. माड हे समूहाने वाढणारे झाड आहे. अरबी दर्याची गाज ऐकत खारा वारा आकंठ पीत समुद्रकिनाऱ्यावर समुद्रसन्मुख उभ्या असलेल्या माडांच्या बागा डौलाने उभ्या असतात किंवा हिरव्यागार भाताची मेर संपली की डोंगरउतार सुरू होण्यापूर्वी माडांची बाग दिमाखाने उभी असते. माडाला इतर झाडांप्रमाणे फांद्या नसतात. त्यांची मुळे जमिनीत खोलवर जातात. ह्या सुदृढ मुळांमुळे माड उंच वाढतो. माड कधीच काटकोनात जात नाही. तो लघुकोनात किंवा विशालकोनात वाढतो. विशिष्ट उंचीनंतर माडाला हिरव्यागार झावळ्या येतात. ह्या छत्रीसारख्या झावळ्या ही माडाची खरी शोभा असते. त्यामुळे माडाला त्याचे शाही, बादशाही, राजेशाही रूप लाभते. वर्षातून चार वेळा माडाला नारळाच्या भरगच्च पेंड्या येतात. गोव्यात काही माड रेंदेराला सूर काढण्यासाठी दिलेले असतात. पहाटेला कातारांचे सूर आळवत माडावर चढलेले रेंदेर हे किनारपट्टीवरील हमखास दिसणारे दृश्य असते. माडाच्या शहाळ्यांचे पाणी अमृततुल्य असते. केरळ, कर्नाटक, गोवा ह्या भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर जितके लोक राहातात तितकेच माड असावेत. दोन माड एकमेकांपासून विशिष्ट अंतरावर लावले पाहिजेत. ते एकमेकांपासून जवळ लावले तर त्यांना योग्य सूर्यप्रकाश, वारा मिळत नाही. आणि त्यामुळे त्यांना चांगले नारळ येत नाहीत. माडाला माणसांची संगत हवी असते, निर्जन जागी माडांना नारळ लागत नाहीत अशी नारळ बागायतदारांची (अंध)श्रद्धा आहे.

गोव्याच्या जेवणात नारळाच्या खोबऱ्याचा भरपूर उपयोग करतात. नारळाच्या तेलाचा (ज्याला खोबरेल म्हणतात) मासे तळण्यासाठी उपयोग केला जातो. खोबरेल तेलात तळलेले मासे अन्य तेलात तळलेल्या माशांपेक्षा अधिक रुचकर लागतात. गोव्यात नारळाचा रस, गूळ व अंडी यांपासून बेंबिंका नावाचे पक्वान्न ख्रिश्चन लोक नाताळच्या सणात बनवतात. ते फारच स्वादिष्ट असते.

माडापासून केलेल्या दारूला माडेल म्हणतात. माडाचे खोड (वांशे) आणि झावळ्या यांचा छतासाठी वापर केला जातो. माडाचा कोणताच भाग वाया जात नाही त्यामुळे माड हा गोव्याचा राज्यवृक्ष तर आहेच, शिवाय सर्व दृष्टीने तो कल्पवृक्ष आहे.

नारळाला हिंदू धर्मात खास धार्मिक स्थान आहे. म्हणूनच त्याला श्रीफल म्हणतात. पूर्वी देवापुढे नरबळी देऊन मानवी कवटी अणि रक्ताचा नैवेद्य दिला जाई. कवटीऐवजी नारळ आणि रक्ताऐवजी शेंदूर ही प्रथा पडली व नरबळी देणे बंद झाले, असा इतिहास आहे.

त्यामुळे आज गोव्यात जत्रोत्सवांत विजयरथापुढे शेकडो शेंदूर लावलेले नारळ फोडले जातात. नारळ हे सुफलीकरणाचे (गर्भाचे) प्रतीकही मानले जाते, त्यामुळे सौभाग्यवतीची नारळाने ओटी भरली जाते.

गोव्यात नारळाला रुपये दहा आधारभूत भाव आहे. नारळाचे भाव बदलत असतात. आज गोव्यात नारळाला घाऊक बारा रुपये व किरकोळ वीस रुपये दर आहे. पण केरळ, कर्नाटकात नारळाचे खूप उत्पादन झाले, तर नारळाचे भाव चार, पाच रुपयांपर्यंत कोसळतात. त्यावेळी आधारभूत भावाचा उपयोग होतो. काही बागायतदार नारळ सुकवून खोबरे करून ते विकतात.

## माडी

पोफळीला (सुपारीच्या झाडाला) गोव्यात माडी हे छान नाव आहे. माडाचे हे स्त्रीलिंगी नाव पोफळीला फार शोभून दिसते. कारण माडाच्या बागेशेजारीच पोफळीचे म्हणजे माड्यांचे (माडीचे अनेकवचन माड्यो) कुळागर असते. कुळागर ही गोव्यातील बहुजन ग्रामस्थांनी शेकडो वर्षांपासून ग्रामीण गोव्यात रुजवलेली अभिनव कृषी संकल्पना आहे. कुळागर म्हणजे रांगेने लावलेली पोफळीची झाडे, त्यावर चढवलेल्या मिरीच्या वेली, त्यामधून झुळझुळू वाहणारे पाण्याचे पाट आणि त्यापुढे लावलेले गावठी भाज्यांचे मळे कुळागराच्या जवळपासच झरा वाहत असतो. त्याचे निवळशंख, आरस्पानी पाणी कुळागारात पाटांनी खेळवलेले असते. वर माडी उंचच उंच वाढलेली असते. त्यावर हिरव्यागार पानांच्या मिऱ्यांच्या वेली चढवलेल्या असतात. माड्यांवर सुपारीचे घोस तर मिऱ्यांच्या वेलीवर काळ्या मिऱ्यांचे घोस लोंबत असतात. कुळागारात अखंड पाणी खेळत असल्यामुळे तिथली जमीन दूर्वांकुरांनी हिरवीगार झालेली असते. पावसात तिथे पिवळी, जांभळी, गुलाबी रानफुले फुलतात. कुळागराच्या अवतीभवतीच्या सुपीक पाणवठ जमिनीत वांगी, सात शिरांचे भेंडे, तांबडी भाजी, मुळे, घोसाळी, दुधी भोपळा असलेल्या गावठी भाज्यांचा मळा फुललेला असतो. अशा कुळागरात गेले, की श्रांत मन निवांत होते.

आज सुपारीला १८० रुपये किलो भाव आहे तर मिऱ्यांना ३५० रुपये भाव आहे. गावठी या विशेषणाला कोकणी भाषेत

नकारात्मक छाया आहे, पण हे विशेषण भाज्यांना लावले की त्याला सकारात्मक अर्थ येतो आणि गावठी भाज्यांची किंमत वाढते.


कुळागर हा गोव्यातील दर बागायतीचा आत्मा असतो.

## केळ

बागायतीत असो, घराच्या मागीलदारातील परसात असो, केळी पाहिजेतच. हिरव्यागार पानांनी सालंकृत होणारी केळ हे निसर्गातले फार सुंदर झाड आहे. केळीचे खोड (ज्याला कोकणीत गभा म्हणतात) मोत्यासारखा तेजस्वी असतो. पूजेच्या वेळी केळीचा गभा कापून त्यावर रंगीत बेगड लावून सजवला जातो. केळीची जर्द हिरवी पाने पंगतीत चोळखा म्हणून ताटाऐवजी वापरली जातात. लाल केळफुलांची भाजी तर फारच स्वादिष्ट लागते. रसरशीत पिकलेल्या केळीच्या घडांनी केळ लवंडली, की त्या फळभारित केळीचे रूप फार सुरेख दिसते.

केळी ही बहुजनांची फळे आहेत. भुकलेल्या पोटी दोन-चार केळी खाल्ल्यास पोट भरू शकते. केळी ही अभिजनांचीही फळे आहेत. केळी ही सर्वजनांची फळे आहेत. गोव्यात मयडोळी गावात किंगसाइज मोठी केळी पिकतात. त्याचा गोड हलवा करतात. महाराष्ट्रात केळ्यांचे शिकरण करतात. केरळात, कर्नाटकात केळ्यांचे चिप्स करतात. केळे कोणत्याही पदार्थात मिसळल्यास त्याला गोड, मिठास स्वाद येतो.

मॉरिशसमध्ये गेल्यावर तिथे भारतीय लोकांच्या घरांच्या पुढील परसात केळ लावलेली मी पाहिली. त्यानंतर माझ्या लक्षात आले, की आपण भारतात केळ कधीच घराच्या पुढील परसात लावत नाही. कारण केळ आपण अशुभ मानतो. माणूस मृत झाल्यावर त्याचे पार्थिव केळीच्या गभ्याचे तीन तुकडे करून त्यावर ठेवतात. मूळ कथा अशी की आदि शंकराचार्यांची आई निवर्तल्यावर तिचे पार्थिव नेण्यासाठी कोणीच येईना. कारण आदि शंकराचार्य त्या काळाच्या संदर्भात हिंदू धर्मांतले बंडखोर होते. म्हणूनच त्यांना पुढे प्रच्छन्न बुद्ध म्हणू लागले. त्यामुळे आदि शंकराचार्यांनी आपल्या आईच्या पार्थिवाचे तीन तुकडे केले आणि ते स्मशानात नेले. त्यानंतर ही चाल पडली. अन्यथा इतर धार्मिक सणांत आपण केळीला पवित्र स्थान दिले आहे. हिंदू धर्मात अनेक विसंगत गोष्टी आहेत. पौर्णिमा पवित्र मानली आहे, अमावस्या अपवित्र मानतात. पण हिंदू धर्मातला सर्वांत पवित्र सण दिवाळी अमावास्येला येतो. केळीचे झाडही अशाच विसंगतीला बळी पडले आहे.



## आंबा

आंब्याचे झाड हे मोठे तृप्त, संतृप्त, समाधानी झाड आहे. आंब्याचे झाड पाहिले, की मला बुद्धांच्या 'मुदितेची' आठवण येते. आंब्याचे झाड हे मुदितेचा दृश्यावतार आहे. हे आत्ममग्न, अंतर्मुख, सजग, संन्यस्त झाड कुठल्यातरी अनुपम आंतरिक आनंदाचा उपभोग घेत मग्न आहे असा मला त्याच्याकडे पाहून भास होतो. ह्या झाडाचा हा आंतरिक आनंद त्याच्या फळांच्या माधुर्यातून आपल्याला चाखायला मिळतो. आपल्या सुमधुर फळांच्या रसांतून हे झाड आपली मुदिता वाटत असते.

आंब्याचे झाड हे फार प्राचीन पुरातन झाड आहे. वेद, उपनिषदांत, बौद्ध साहित्यात

त्याचा पदोपदी उल्लेख आहे. आंब्याचे झाड भारतवर्षात सर्वत्र पसरलेले आहे. आंब्याच्या अनेक जाती, उपजाती आहेत. उत्तर प्रदेशात दशहरी, लंगडा, आंध्रप्रदेशात तोतापुरी, नीलम, बिहारात सिंधुराई, बंगालात मालडा तर गोव्यात मानकुराद, मुसराद, मांगीलाल, फर्नांडिस, आल्फोंसो (हापूस) अशी त्याची नावे आहेत. १६व्या शतकात गोव्यात पोर्तुगीज आल्यानंतर त्यांनी आंब्याच्या झाडावर कलमे करून त्याच्या उत्तमोत्तम जाती केल्या. उदाहरणार्थ, हापूस आंब्याचे कलम करणाऱ्यांचे श्रेय पोर्तुगिजांना दिले पाहिजे.

आंब्याच्या झाडाची पाने सण-उत्सवाच्या वेळी तोरण म्हणून वापरली जातात. माझ्या लहानपणी आमच्या घरी 'आंब्याची समाराधना' नावाचा उत्सव साजरा केला जाई. वैशाख महिन्यात गोव्यात आंब्याचा मोसम असायचा. तेव्हा हा उत्सव यायचा. देवाला आंब्याचा नैवेद्य करायचे. जेवणात आंब्याच्या घोटांचे सांसव, आंब्या-फणसाची भाजी, कैरीची उडदमेथी, आमरस पुरी, त्याशिवाय पंगतीत भरपूर आंबे असा बेत असायचा. पुढे मी नास्तिक झालो, अधार्मिक झालो, पण लहानपणाच्या 'आंब्याच्या समाराधने'तले स्मृतिसुख मी कधीच विसरलो नाही.

आंबा हे माझे अतिशय आवडते फळ आहे. म्हणूनच माझ्या बागायतीत मी आंब्याची खूप झाडे लावली आहेत. त्याला अजून आंबे लागले नाहीत. काही वर्षांनी या झाडांना आंबे लागतील. तेव्हा ते आंबे मी विकणार नाही. ते सर्व आंबे मी खाऊही शकणार नाही. आंबे खाण्याइतकाच आंबे मित्रांना, नातेवाइकांना वाटण्याचा आनंद गोड आहे.

## काजू

काजूचे झाड गोव्यात पोर्तुगिजांनी आणले. मार्च महिना लागला की गोव्यातील रानेवने काजूच्या झाडाच्या मोहराने घमघमू लागतात आणि पिवळ्या, लाल काजूच्या म्हुट्ट्यांनी अंगोअंग भरलेल्या काजी रानभर दिसू लागतात. अशावेळी काजूचे ते पिके म्हुट्टे काढत रानात फिरणे हा अपूर्व आनंद असतो. वास्तविक काजूचा म्हुट्टा हे काजूचे फळ नव्हे. काजूला आलेली बी हे शास्त्रीय दृष्ट्या काजूचे फळ. काजूच्या म्हुट्ट्यांपासून हिंग फोडणी घालून रुचकर शाकभाजी करतात. ह्या म्हुट्ट्यांचा गोड रस नीरा नावाने मिळतो. तो अतिशय गोड असतो. म्हुट्ट्यांच्या रसाचे एकदा बाष्पीकरण करून हुर्राक ही दारू बनवली जाते. दुसऱ्यांदा बाष्पीकरण करून फेणी केली जाते. काजूची फेणी अतिशय गंधित व मादक असते. काजूच्या बिया भाजून काजूगर बनवतात. त्याची गोव्यात, शेष भारतात व परदेशांत निर्यात होते.

काजूच्या झाडाच्या शिरंतरांनी कसले विचित्र रसायन वाहते म्हणून त्याचे काजूगर इतके गोड, रूचकर आणि त्याची फेणी इतकी दाहक, गंधित होते, कोण जाणे!

काजूच्या झाडामुळे गोव्याच्या कृषिव्यवस्थेचे अर्थशास्त्रच बदलून गेले. नारळांचे उत्पन्न गोव्यातील अभिजन सारस्वतांच्या हातात जाते, तर काजूच्या म्हुट्ट्यांचे व बियांचे उत्पन्न गोव्यातील अभिजन भंडारी समाजाच्या हातात जाते. हा गोव्यातील कृषी अर्थकारणाच्या व्याकरणाचा प्राथमिक नियम आहे.

काजूचा मोसम आला, की मला माझे मित्र (आमदार) काशीनाथ जल्मी यांची आठवण येते. एप्रिल महिन्यात ते आम्हांला माशेलात बोलवत. काजूच्या रानात तिन्हीसांजेला ते आम्हांला घेऊन जात. म्हुट्ट्यांची गोड नीरा प्यायची. काजूच्या बिया जमवायच्या. तिथेच लाकडे पेटवून इंगळ्यात त्या भाजून गर खायचे. मग जल्मी आम्हांला ऑमलेट आणि खोर्णातले कुरकुरीत उंडे असे जेवण देत. तीन वर्षांपूर्वी बहुजनांचे नेते जल्मी गेले.

## पिंपळ

पिंपळाला भारतीय संस्कृतीत विशिष्ट स्थान आहे. देवळाच्या प्राकारांत पिंपळाचे झाड असते म्हणून पिंपळाला इंग्रजीत 'टेंपल ट्री' म्हणतात. संस्कृतात पिंपळाला 'अश्वत्थ' असे नाव आहे. भगवद्गीतेत श्रीकृष्णाने सर्व झाडांत मी पिंपळाचे झाड आहे असे म्हणून पिंपळाचा गौरव केला आहे. पिंपळाच्या झाडाखाली गौतम बुद्धाला साक्षात्कार झाल्यामुळे बौद्ध धर्मातही पिंपळाला खास मान आहे.

पिंपळाला यमदेवतेचे झाड असे भारतीय पुराणे मानतात. त्यामुळे स्मशानातही पिंपळाची झाडे असतात. देऊळ आणि स्मशान अशा दोन्ही पवित्र आणि अपवित्र ठिकाणी पिंपळ असतो! पिंपळाची झाडे दिवसा हवेतला कार्बन डायऑक्साइड वायू शोषण करतात व हवेत प्राणवायू सोडतात, पण रात्री मात्र हवेतला प्राणवायू घेऊन कार्बन डायऑक्साइड सोडतात, त्यामुळे पिंपळाच्या झाडाखाली रात्री झोपू नये असे म्हणतात.

पिंपळाची सळसळणारी पाने ही सतत वाऱ्याशी संवाद करत असतात. पिंपळाचे झाड हे मोठे बोलघेवडे झाड आहे. ते अहोरात्र वाऱ्याशी, आकाशाशी बोलत असते, तर कधी स्वत:शी बोलत असते. काही झाडे माणूसघाणी असतात, पिंपळ तसा नाही. त्याला माणसांची साथसंगत आवडते. पिंपळाखालचा पार हे खेड्यापाड्यांतील लोकांचे गुजगोष्टी करण्याचे आवडते स्थान आहे.

## वड

वडाचे झाड हा निसर्गाचा चमत्कार आहे. वड हे प्रसरणशील झाड आहे. वड हा सर्जनाचा दृश्यावतार आहे. वड हा नवनवोन्मेषशाली सर्जनशीलतेचा मानदंड आहे; फ्लॅगपोस्ट आहे.

भारतीय पंचांगातील ज्येष्ठ पौर्णिमा वटपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया वडाला सुताचे धागे बांधतात आणि आपल्या नवऱ्याला चिरंजीवित्व मिळावे अशी प्रार्थना करतात. सत्यवान सावित्रीच्या कथेवरून ही अंधश्रद्धा भारतातील हिंदू स्त्रियांमध्ये पसरली आहे. नवऱ्याच्या प्राणासाठी यमाकडे भांडणारी आणि त्याचे प्राण परत मिळवणारी पतिव्रता सावित्री ही भारतीय स्त्रियांपुढील आदर्श स्त्री हे वडाच्या पुनर्वेच्या सणाने आजही भारतीय स्त्रियांच्या हृदयात कोरले जात आहे.


पाँडेचरीला ऑरोविल हे पहाटेचे शहर – सिटी ऑफ डॉन बांधण्याचे ठरवण्यात आले तेव्हा त्याच्या आराखड्याचे कंत्राट

फ्रेंच वास्तुशिल्प रॉजर एन्गर याला देण्यात आले. ऑरोविलचा मास्टर फ्लॅन करण्यापूर्वी प्रतीक म्हणून ऑरबिंदोच्या मदरपुढे होते ते कमळ. निसर्गात कमळासारखे सुंदर, सुरेख, पूर्ण, परिपूर्ण असे दुसरे फूल नाही. आकारलालित्याच्या दृष्टीने कमळ हे कोणत्याही वास्तूला आदर्श ठरावे. पण रॉजर एन्गरला वाटले, ऑरोविलची संकल्पना कमळासारखी स्टॅटिक नसावी, ती एक्सपान्डिंग असावी. आणि अचानक त्याच्या डोळ्यासमोर गॅलेक्सी आली. प्रसरणशील आकाशगंगा आली. ह्या लंबगोलाकार आकाशगंगेचे प्रतीक डोळ्यासमोर ठेवून रॉजर एन्गरने ऑरोविलची रचना केली. पण ही रचना करताना त्याला नव्या शहराचा गुरुत्वमध्य हवा होता. ऑरोविलसाठी घेतलेल्या संकल्पित जागेवर एक पुरातन वडाचे अजस्त्र झाड होते. रॉजरने ह्या वडाला नव्या शहराचा केंद्रबिंदू बनवले. आज ऑरोविलात या वडाभोवती मुक्त, मोकळे मैदान आहे. वडाखाली निवांत बसून ऑरोविलच्या शांत, प्रशांत शांतीचा मनसोक्त अनुभव घेता येतो.

## सांवर (शाल्मली)

ग्रीष्माची, सुग्रीष्माची चाहूल सांवरीला सगळ्यात आधी लागते. आणि अचानक सांवर फुलते. त्याआधी आपली सगळी पाने गाळून सांवर निष्पर्ण होते. मग अवचित बांधावरची, मेरेवरची, डोंगरावरची सांवर फुलते. अंगभर फुलते. आपल्या रक्ततांबड्या फुलांनी गच्च, भरगच्च फुलते. फाल्गुनातल्या पहाटे सांवरीचे हे पुष्पमंडित रूप मला फार आवडते. फुलभारित सांवर हा पहाटेच्या अंधारात पेटलेला तांबड्या फुलवातींचा लामणदिवाच असतो!

सांवरीची ती वसंतपूजा पाहायला दशादिशांतून शेकडो पक्षी येतात. वसंत ऋतूतली काकडआरती गाऊन सांवरीच्या फुलाफुलातला गोड सुमधुर मधाचा नैवेद्य खाऊन, तृप्त होऊन आभाळात उडून जातात. वसंत ऋतू संपल्यावर सांवरीला फळे येतात. यशावकाश फळे उलगू लागतात आणि त्यातून कापसाची पांढरीशुभ्र बोंडे आकाशात भुरूभुरू उडू लागतात.



वेर्णेच्या डोंगरावर जुने म्हार्दोळ आहे. पाच शतकांपूर्वी कुठल्या काळोख्या रात्री अग्नाशिनी जुवारी नदी ओलांडून म्हाळशेला अंत्रुज महालातल्या म्हार्दोळ गावात आणण्यात आले. नव्या म्हार्दोळ गावातील म्हाळशेला श्वेतवस्त्रावृता जायांची पूजा बांधली जाते. जुन्या म्हार्दोळातील म्हाळशेला जायांचे हे विलोदी वस्त्र आवडत नाही, तिला सांवरीची रक्तफुले आवडतात.

जुन्या म्हार्दोळात आत म्हाळशेचे नवे देऊळ बांधले आहे. तिथून थोड्या दूर दोन सांवरी आहेत. सरत्या तिन्हीसांजेला ह्या सांवरीच्या पायाशी बसावे आणि सांवरीच्या फुलांच्या रूपाने सांवरीचे अश्रू पदरात घ्यावे. इतिहासाला अवगत असलेली कुठली तरी गूढ दंतकथा या सांवरी आपल्या पोटात दडवून आहेत, असे उगीच वाटू लागते.

## सांतान

कार्तिक संपून मार्गशीर्ष लागला. हिवाळा सुरू झाला. थंडीचे दिवस आले. डिसेंबर महिना लागला. सांतान वृक्षाला नाताळांची सूलूस लागली. त्याच्या सर्वांगावर चंवर आला. त्याची पाने दिसेनाशी झाली. सगळीकडे फुलांचे घोसच घोस मोहरून आले. सांतान आता वृक्ष राहिला नाही. सांतानाची आता वेल झाली. सांतानाची आता अस्तुरी झाली. पुरुषी देह कमनीय झाला. रमणीय झाला. सांताना आता सांतोण झाली.

आमोर झाली, दिवेलागण झाली. सांतोणीच्या उग्र फुलांचा वास सरभवतणी पसरला. याला गंध म्हणता येणार नाही. हा सुगंधही खचितच नव्हे. हा परमळ नव्हे. घमघमाट नव्हे. हा केवळ वास. सांतानाच्या श्वासाचा आणि उच्छ्वासाचा वास. सांतानाच्या घामाचा सेंद्रिय वास. रात्रभर सांतान या गंधभारात वावरतो. पहाटे वासाचा देठ तुटून त्याची फुले मुळाशी तुटून पडतात.

सांतानाच्या मुळापाशी सर्प फिरतात असे म्हणतात. हे विषारी सर्प सांतानाच्या मुळांना दंश करत असले पाहिजेत. सांतानाची मुळे हे विष पिऊन टाकत असली पाहिजेत. त्यामुळेच तर हे विष त्याच्या रंध्ररंध्रात पसरत असावे आणि त्या विषाचाच हा विचित्र वास येत असावा!

सांतानाचा मोहोर थोडेच दिवस टिकतो. मग सांतान निष्फूल होतो. सांतानाचा वास अंतर्धान पावतो. मग सांतान एक सामान्य वृक्ष होतो.

सांतानाचे सांतानपण त्याच्या फुलांनी नव्हे, त्याच्या सात पानांनी असते. म्हणून संस्कृतात त्याला सप्तपर्ण म्हणतात. सांतान फक्त फुलांतून फुलतो असे म्हणता येणार नाही, तो आपल्या पानांतूनही फुलतो. सांतानाची हिरवीगार पाने ही त्याच्या रसरशीतपणाचा, त्याच्या जित्या, जिव्या टवटवीतपणाचा दृश्यावतार असतो.

सांतानाकडे देवळाच्या प्राकारात असलेल्या पुराणपुरुष पिंपळाचे राजबिंडेपण नसते. सगळी पाने आणि फुले सांडून निष्पर्ण, निष्फूल होणाऱ्या चाफ्याचे भणंगपणही नसते. नसते त्याच्याकडे कुळागरातील माडीची शिरशिरीत काया. नसते त्याच्याकडे, केळीचे देहलावण्य. सांतान हा तसा दुर्लक्षित, अलक्षित वृक्ष आहे. म्हणूनच तो महाकाव्याचा नायक बनू शकणार नाही. सांतान हा शापित गंधर्व आहे. तो खंडकाव्याचा उपनायक बनू शकेल.

माझ्या लहानपणी आमच्या घराच्या मागील दाराच्या परसात एक सांतान होता. त्याच्याकडे पाहात मी बोलत बसायचो. एका आषाढातल्या उत्तररात्री पावसात सोसाट्याचा वारा येऊन तो माझा बालमित्र सांतान उन्मळून पडला. त्याच्याबरोबर माझे सारे बाल्यही संपून गेले असा भास मला त्या दिवशी झाला.

## झाडातली माणसे

झाडाशी माझी मैत्री झाली आणि झाडे माझ्याशी आपुलकीने, आत्मीयतेने बोलू लागली, तेव्हा एकेका झाडात मला माझ्या जीवनातले स्मृतिशेष मित्र आणि नातेवाईक दिसू लागले.

आपली सर्व पाने आणि फुले फेकून बोडकी झालेली सांवर मला तिच्यात माझी पणजी दिसू लागली. पांढराभोर कापूस आभाळात सोडणाऱ्या सांवरीसारखी ती पांढरे वस्त्र नेसायची. डोक्यावर पदर घ्यायची. माझे आजोबा तिला 'बा' म्हणायचे. घरातले सर्व लोकही तिला 'बा'च म्हणायचे. त्या एकाक्षरी शब्दात ॐ काराची गोडी होती. दिवेलागणीनंतर देवखोलीतल्या समईच्या मंद उजेडात बा कुठलीतरी पोथी वाचायची. त्या पोथीचा अर्थ आम्हांला तेव्हा कळला नाही. 'बा'च्या माथ्यावरच्या पदराचाही अर्थ कळला तो फार उशिरा, बा गेल्यानंतर काही वर्षांनी!

माझ्या आजीला मी पाहिलेच नाही. ती खूप सुंदर दिसत होती. तिचा एकच फोटो घरातल्या भिंतीवर आहे. त्यात ती मोनालिसाप्रमाणे मुग्ध हसते. पाचवा शालू नेसून आणि पाचवा चुडा घालून नवी सून बनून माझी आजी आमच्या घरात आली, तेव्हा ती हिरव्यागार पानाच्या केळीसारखी शिरवंत दिसत असली पाहिजे. ती केळीसारखी मागीलदारच्या परसातच राहिली आणि एके पावशी रात्री कोणाला न सांगता अकाली उन्मळून पडली.

तिच्या मरणानंतर माझे आजोबा अनासक्त झाले. विरक्त झाले; पण अध्यात्माच्या नादाला लागले नाहीत. त्यांना ज्ञानाची तहान लागली. ज्ञानाचे फळ चाखल्यानंतर त्यांनी लिहून ठेवले, ''माझ्या लग्नापूर्वी हे फळ मी चाखले असते, तर मी लग्नच केले नसते.'' माझ्या आजोबांनी लग्नापूर्वी ज्ञानाचे फळ चाखले नाही याचा मला फायदा झाला!

दत्तात्रेयाच्या देवळासमोर असलेल्या औदुंबराच्या झाडासारखे होते माझे आजोबा!

माझ्या आजोबांना एक काका होते. त्यांना मूलबाळ नव्हते, पण दिगंतरातून येणाऱ्या पक्ष्यांवर प्रेम करणाऱ्या वडासारखा होता तो दादा! एकत्र कुटुंबातील मोठ्या घरातील सर्व मुलाबाळांचा लळा असलेला.

वडाचा बॉन्साय केला की माझ्या काळजात चर्र होते. इतर

कोणत्याही झाडांचे बॉन्साय करा हवे तर! वडाचा बॉन्साय करू नका रे!

त्याचे मी नाव सांगणार नाही. त्याचे मी गावही सांगणार नाही. तो माझा मित्र नव्हता. नातेवाईकही नव्हता. सगळे जग त्याला दुष्ट म्हणून ओळखत होते. त्याला मलाही फसवता आले असते. माझ्याशीही दुष्टपणाने वागता आले असते. पण का कोण जाणे इतरांशी वागला त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने तो माझ्याशी वागला. जीवनात त्याने इतरांना काटे दिले असतील, मला मात्र भरभरून फुलांचे घोस दिले. त्याच्या हृदयात सुवासाची एक अदृश्य कुपी असावी. माझ्यासाठी ती तो खुली करायचा. त्या वासात मला मार्गशीर्षात अचानक फुलणाऱ्या सांतानाच्या फुलांचा वास यायचा. हल्लीच तो ख्रिस्तवासी झाला. दफनभूमीत त्याच्या कॉफीनवर मूठभर माती घालण्यासाठी मी गेलो. तिथे मोजकेच लोक होते. त्यांना आश्चर्य वाटले. एका 'दुष्ट' माणसाच्या अंत्यदर्शनाला एक 'चांगला' माणूस कसा आला, असा प्रश्न त्यांना पडला असावा. गुड फ्रायडेला देवाला मरण येते. हे 'सांताना'चे मरण – मी मनात म्हटले.

चिंचेचे झाड पाहिले, की मला माझी मुणकात्र किंवेरीची आठवण येते. माझ्या लहानपणी फातराडेच्या समुद्रकिनाऱ्याजवळ आमची नारळाची बागायत होती. पुढे माझ्या वडिलांनी ती विकून टाकली. ही बागायत राखायचे काम किंतेर मुणकात्र करायची. किंतेरीचा नवरा जुझे दर्यावर्दी म्हणजे तारवटी. तो जहाजावर गेला आणि परतलाच नाही. त्याची वाट पाहून पाहून किंतेर थकली. किंतेरीला दर्याकिनाऱ्यावरील रांपणकार 'वेळेमाय' म्हणायचे वेळेमाय म्हणजे समुद्रकिनाऱ्याची आई. किंतेर आडदांड धिप्पाड होती. रांपणकार पहाटे समुद्रातून रांपण काढून परतू लागले, की किंतेर त्यांना कडक बिनदुधाचा चहा आणि पोदरांच्या खोर्णातले कुरकुरीत उंडे घेऊन जाई. मग रांपणकार तिला रांपणीतले काही मासे देत. तिन्हीसांजेला किंतेर फेणी पिऊन तर्र होई आणि किनाऱ्यावर जाऊन आपल्या नवऱ्याला हाका मारी, ''जुझे, तू केन्ना येतलो रे?'', ''जुझे तू कधी येणार रे?'' जुझे कधीच परत आला नाही. जुझेची वाट पाहता पाहता किंतेर म्हातारी झाली आणि तिला वेड लागले. एके तिन्हीसांजेला किंतेरीने फेणीच्या दोन बाटल्या अख्ख्या पिऊन टाकल्या. माडाचे पेटलेले चुडीत घेऊन 'जुझे तू केन्ना येतलो रे? जुझे तू केन्ना येतलो रे?' असे म्हणत ती समुद्रात चालत राहिली आणि समुद्राच्या पाण्यात बुडून मेली. दुसऱ्या दिवशी पहाटे रांपणकाराच्या रांपणीत किंतेरचे प्रेत लागले. रांपणकारांनी रांपणीतले सगळे मासे समुद्रात सोडून दिले.

## माणसातली झाडे

एकेका झाडात मी एकेक माणूस पाहू लागलो आणि एकेका माणसात एकेक झाड आहे याचा साक्षात्कार मला झाला.

प्रत्येक लहान मूल हे झाडाच्या रोपासारखे असते. जसा माडाचा कवाथा, आंब्याचे रोप. लहानपणी त्यांची निगा राखावी लागते. त्यांना वारा, प्रकाश, पाणी हवे असते. त्यांना अवतीभवती पिंजरे नको असतात. लहान मुलांचे जीवन झाडाप्रमाणे उत्स्फूर्त असते. सेंद्रिय असते. रंगीबेरंगी कपडे घालून हातात फुगे घेऊन नाचणारी, खिदळणारी लहान मुले पाहिली की पेरूच्या झाडावर लाल चोचीचा हिरव्याकंच पोपटाचा थवा बसला आहे आणि पेरूची झाडे पिकलेल्या, पिवळ्या पेरूंची देवाणघेवाण करत त्यांच्याशी खेळताहेत असे वाटते.

दिवेलागणीला घराच्या बल्कावावर बसून तृप्त, समाधानी जीवन जगलेली आजी आपल्या नातवंडांना आभाळातून उडत येणाऱ्या परीची गोष्ट सांगते, तेव्हा तिच्यात मला गोड, रसाळ फणसांनी लोंबणाऱ्या मागीलदारच्या परसातील फणसाच्या झाडाची आठवण येते.

काही माणसे गुलमोहरासारखी हसतमुख असतात. त्यांचे केशरी हास्य हृदयाच्या अंतहृदयातून सर्वांगावर पाझरत फुललेले असते. जीवनातला सगळा कडवटपणा त्यांनी पचवलेला असतो. ते समाधानी असतात. तृप्त असतात. गुलमोहराच्या झाडाकडे पाहून डोळ्यांना जे सुख मिळते, तसेच अशा माणसांकडे पाहून आश्वस्त वाटते. ही माणसे स्वतःच्या सुखाप्रमाणेच दुसऱ्याच्या सुखानेही आनंदी होतात. अनेकदा करुणेपेक्षा मुदिता कठीण असते. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणे सोपे असते; दुसऱ्याच्या सुखाने आनंदी होणे सगळ्यांनाच जमते असे नाही. तसे झाले असते, तर कोपऱ्याकोपऱ्यावर गुलमोहराची झाडे असली असती!

प्रत्येक स्त्री हे एक झाडच आहे. पुरुषांना पक्ष्यांसारखे पंख असतात. स्त्रियांना झाडासारखी मुळे असतात. स्त्रियांना झाडासारख्या फांद्या असतात. स्त्रियांना कळ्या येतात, फुले येतात. झाडांप्रमाणे स्त्रिया गर्भवती होतात. त्यांना फळे होतात. स्त्रियांच्या अंगाखांद्यावर पक्ष्याप्रमाणे मुलेबाळे खेळतात. स्त्रिया झाडांप्रमाणे उन्मळून पडतात. स्त्री हे झाड असल्यामुळे स्त्री आणि फूल यांचे अन्योन्य नाते असावे. फुलांना स्त्रिया आणि स्त्रियांना फुले आवडत असावी.

## झाडांसारखे जीवन

झाडांकडून मी एक गोष्ट शिकलो. झाडांसारखे अकृत्रिम, उत्स्फूर्त, सेंद्रिय जीवन जगता आले पाहिजे. झाडांचे काहीच प्रमाणबद्ध नसते. छंदोबद्ध नसते. झाड ही एक मुक्तछंद कविता असते. झाडाला सिमेट्री नसते. झाडाला भूमितीचे आणि त्रिमितीचे कुठेलच नियम लागू पडत नाहीत. झाड हे अवकाशाच्या कॅन्व्हासवर रंगवलेले जलरंगातले विमुक्त चित्र असते. जीवन असे जगता आले पाहिजे. ते सरळ रेषेत जगता कामा नये. ते झाडाप्रमाणे वक्र रेषेत जगले पाहिजे. वक्रतेतले हे सौंदर्य मला झाडाच्या पानांनी, मुळांनी, फुलांनी, फळांनी शिकवले.

झाडांकडून मी पिकलेल्या फळांची परिपक्वता शिकलो. झाडांकडून मी पानगळीतल्या निष्पर्णतेची नम्रता शिकलो. झाडांच्या मुळांकडून मी ज्ञानार्जनाची तृष्णा घेतली. झाडांच्या फांद्यांकडून मी आकांक्षेचा हव्यास घेतला. झाडांच्या फुलांकडून मी चारित्र्याचा सुवास मागून घेतला. झाडांच्या खोडांकडून मी ताठ कणा घेतला. झाडांशी जवळीक झाल्याने माझे माणूसपण उन्मळून पडले आणि माझे झाड झाले.

*(रेखाटने : भ. मा. परसवाळे)*

*(दिवाळी २०१८)*

# काळेपांढरे दिवस

**मंगला गोडबोले**

रंगाची पखरण जीवनाचे सौंदर्य वाढवते हे नक्की, पण ‘अति सर्वत्र वर्जियेत’ हे इथेही लागू असते. म्हणूनच ‘ब्लॅक अँड व्हाइट’चा जमाना आजही लोभस वाटतो. जसे ‘ब्लॅक अँड व्हाइट’ सिनेमे किंवा साधे फोटो आकर्षक वाटतात. आपल्या खुशखुशीत शैलीत लेखिकेने जागवलेल्या बालपणातल्या आंबटगोड आठवणी.

आठवतं त्यानुसार माझे वाढीचे दिवस हे काळेपांढरे दिवस होते. ‘ब्लॅक अँड व्हाइट’चा जमाना. माझा म्हणजे माझ्या एकूण पिढीचाच. सुमारे स्वातंत्र्यापासूनच्या पुढच्या अडीचतीन दशकांचा.

‘ब्लॅक अँड व्हाइट’ म्हटलं की कोणालाही पटकन चित्रपट आठवतात. ‘बी अँड डब्ल्यू’ फिल्मस! पण त्या बेट्या मोजक्याच निघायच्या, त्यातल्याही फार थोड्या आम्हाला पैसे टाकून बघायला मिळायच्या. त्यामुळे त्यांच्यात रंग नसण्याने काही फरक पडत नव्हता. पण एकूणच बाह्य जीवनात रंग कमी असायचे हे आताच्या रंगरंजित दिवसांमध्ये अनेकदा जाणवतं.

घराघरांच्या भिंती साधारणपणे एकाच पांढरट-पिवळट म्हणण्याजोग्या रंगांच्या असायच्या. तो रंग दिला तेव्हा पिवळा असावा अशी शंका यावी इतपत छटा त्याला काळाच्या ओघात आलेल्या असायच्या. आता अनेक नवआधुनिक घरांमध्ये मुलांच्या खोल्यांना प्रत्येक भिंतीला वेगळा रंग असतो, तोही अनेकदा मुलांनी निवडलेला असतो. ही चैन माहीतच नव्हती. भिंतींनाच नेमका रंग नसल्याने पडदे कुठल्याही रंगाचे चालायचे. टेलिफोन आणि चारचाक्या फार कमी लोकांकडे असायच्या. पण फोन काळे आणि मोटारी शक्यतो काळ्या किंवा पांढऱ्या अशाच असायच्या. पायताणं बहुधा चामड्याच्या रंगाची किंवा काळी असायची. फारतर पंपशू पांढरे असायचे, पण गुलाबी, आकाशी वगैरे रंग पायताणात असू शकतात अशी कल्पनाही मनात येत नसे. जिला कौतुकाने ‘रांगोळी’ किंवा ‘रंगावली’ म्हणायचं, तीही रोज सकाळी दारापुढे चार रेघा ओढत असताना फक्त पांढरीच असायची. रंगीबेरंगी रांगोळीची चैन दिवाळीला! खाण्याच्या पदार्थांना अंगभूत रंग असायचे आणि त्यावर बाहेरून चढवला तर एकच केशरी रंग यायचा. पांढऱ्या शुभ्र हलव्यामध्ये शोभेसाठी चार केशरी दाणे टाकायचे, पक्वान्नांना खऱ्या केशराचा किंवा कृत्रिम केशरी रंगाचा शिडकावा झाला तर व्हायचा. एका संक्रांतीला हलव्याच्या पुडीमध्ये हिरवे दाणे पहिल्यांदा पडले तेव्हा घरादारात त्याचं किती कौतुक झालं ते मला चांगलं आठवतं.

पुदिना, बीट, गाजर, टमाटा यांचे रंग फक्त आणि फक्त लग्नातल्या रुखवताच्या सजावटीच्या जिनसांना दिलेले आठवतात. रुखवतामधली ती ‘बीटाच्या शालूची घडी’ (म्हणजे नारळाच्या वड्यांमध्ये बीट घालून आणलेली रंगशोभा) फारसं कोणी खात मात्र नसे. रक्तमांसाचा वर्ण म्हणून तो अनेक शाकाहाऱ्यांना तोंडात घालवत नसे. लहानपोरं लालभडक बर्फाचा गोळा खात तो सोडला तर एरवी खाण्यात लाल रंगाला फारशी जागा नसे. कोल्हापूरच्या त्या सुप्रसिद्ध तांबड्या-पांढऱ्या रश्श्याचा इतिहास मला माहीत नाही. पण आम्हा शाकाहारी मंडळींच्या पानात लसणाच्या चटणीचा फिकट लाल रंग हा कडेलोट लाल असे. कृत्रिम खाद्यरंग अजून यायचे होते. सर्वसाधारण माणसाच्या चेहऱ्यावर रंग नसत. कोणत्यातरी पावडरची फक्की मारलेली असे. ती ठळकपणे दिसे. कॅरम खेळायला, तबल्यावर शिंपडायला, घामोळ्याला आणि माफक प्रसाधनाला एकच पावडर अनेक घरांमध्ये वापरत असल्याने ती कातडीच्या रंगाशी फटकून राहाणं हे स्वाभाविकच असे. केस हे वयानुसार नैसर्गिकपणे काळेपांढरे असत. मुलींच्या वेण्यांना रिबिनी तेवढ्या रंगीत असत, पण त्यातही काळ्या-पांढऱ्या रिबिनी जास्त वापरल्या जात. फार तर लाल!

छायाचित्रकला बरीचशी प्राथमिक असल्याने घरात फोटो असलेच तर ते साहजिकच काळेपांढरे असत. बहुतेक घरांमध्ये भिंतीवर काही तसबिरी लटकत. त्यातल्या माणसांच्या तसबिरी काळ्या-पांढऱ्या असत, पण देवादिकांना भडक रंग लावण्याची परवानगी दिलेली असे. त्यामुळे देवांच्या तसबिरी रंगारंग असत. गडद लिपस्टिक लावलेला राम डोळाभर काजळ फासलेल्या सीतेकडे बघत असताना ती हिरव्या गवतावर बागडणाऱ्या केशरी कांचनमृगाकडे निर्देश करतेय अशी चित्रं भिंतींवर लटकत. दत्ताच्या चित्रातली गाय – कपिला – ही कोड आल्यासारखी पांढरी असे. यातून मनावर असंच काहीसं ठसत गेलं असेल का, की बुवा, रंगांची चैन आपल्यासारख्या मर्त्य माणसांसाठी नाही; देवांची गोष्ट वेगळी.

योगायोग म्हणजे सिनेमाच्या पडद्यावर पहिल्यांदा रंग झळकलेले पाहिले. तेही देवलोकाच्या संदर्भात. शाळेतर्फे कोणत्यातरी पौराणिक सिनेमाला नेलं होतं. नारद ‘नारायण-नारायण’ करत देवलोकात जातो असा काहीतरी संदर्भ होता.

'आणि तिथे बघतो तर काय... अप्सरांचं नृत्य सुरू.' असं वाक्य आलं, ढॅण.... असा आवाज आला, चित्र बदलण्याचा चक्राकार संकेत पडद्यावर आला आणि लगेच भीषण रंगांचे कपडे घातलेल्या अप्सरांच्या नृत्याचा 'शीन' आला. शिमग्यातली सोंगं बरी म्हणावीत अशा त्या अप्सरा दिसत होत्या. त्या शीनचा डोळ्यांना इतका शीण झाला की अप्सरांना 'दूर सरा' म्हणण्याच्या घाईला आलो. फूजी कलर, गेव्हा कलर, ईस्टमन कलर हे कंपन्यांचे आणि तंत्रज्ञानाचे टप्पे ओलांडण्यापूर्वीच्या सिनेसृष्टीत अशीच काळ्यापांढऱ्या चित्रपटांमधली मोजकी दृश्यं – स्वप्नदृश्यं, नृत्यं, प्रेमगीतं वगैरे बाहेरून रंगीत केलेली असत आणि जाहिरातीत त्यांचा विशेष उल्लेख असे. इतके दुर्मिळ होते रंग!

आज सगळ्यात आश्चर्य वाटतं ते तेव्हाच्या अत्यंत रुक्ष, रंगहीन पुस्तकांवर आमच्यासारख्या काहींनी केलेल्या अलोट प्रेमाचं. मोठ्यांचीच काय, मुलांचीही पुस्तकं-मासिकं रंगीत नसत. कारण किंमत कमीतकमी ठेवणं हे मुख्य उद्दिष्ट असे. क्रमिक पुस्तकांच्याबद्दल तर रंग, सजावट असं बोलायलाच नको. अभ्यास कसा, रुक्षच असला पाहिजे. पिक्चर बुक्स, कॉमिक्स वगैरे मराठीत फारशी नव्हतीच.

पुढे चांदोबाछाप मासिकांनी भीतिदायक रंगातल्या पऱ्या, एकमेकात रंग मिसळलेले राजवाडे, पुष्करिणी, कारंजी वगैरे दाखवले पण त्यामुळे रंगाबाबत रुची निर्माण व्हावी ही जराही शक्यता नसे. शाळांचे गणवेषही खाकी, गर्द निळा वगैरे कंटाळवाण्या रंगांचे असत. रंग म्हणजे छछोरपणा, थिल्लरपणा असं का मानलं जायचं माहीत नाही. पण छान प्रसन्न रंगसंगती करून एखादी गोष्ट नटवावी, खुलवावी असा प्रयत्न कमीच आढळे. अर्थात साधनसामग्रीचा, तंत्रज्ञानाचा अभावही होताच. आज कागद, कापड, कृत्रिम धागे, प्लॅस्टिक वगैरेंच्या तंत्रज्ञानात आणि रंगसज्जेत फार क्रांती झाली आहे. नुसता पांढरा रंग म्हटला तरी स्नो व्हाईट, कॅण्डी व्हाईट, किंवा लाल रंग म्हटला तरी ब्लड रेड, ग्लेज्ड रेड, बर्गण्डी रेड एवढी गोत्रप्रवरं आताची शेंबडी पोरंसुद्धा सांगू शकतात. आम्हाला फक्त 'तांबडा' माहीत होता त्यांच्या वयात! तांबडा म्हणजे तांबडा, पांढरा म्हणजे पांढरा, फार तर त्यातली गडद किंवा फिकट छटा घ्यायची! भडकलाल... धप्प पांढरा... लालसर... पांढुरका! इति!

रंगांचीच माफक ओळख असल्याने रंगसंगतीचा विचारही गौण असणार! शिवाय एकूण जगण्याची दृष्टीच मुळी उपयुक्ततावादी! पडद्यांनी खिडक्या झाकल्या की झालं! झाकणांनी रंगांची चैन कशाला करायची? बूट, चपला, पर्सेस, छत्र्या, बॅगा ह्या पहिल्या फाटल्यावरच दुसऱ्या घेतल्या जायच्या. त्यामुळे कशावरही 'जाणाऱ्या' काळ्या-पांढऱ्या रंगांनाच अग्रक्रम दिला जायचा. प्रौढ स्त्रिया बहुतेक सगळ्या रोजच्या साड्यांवर पांढरी पोलकी घालायच्या. का? कारण पांढरा रंग कशावरही जातो; हा भ्रम. तो फक्त साडीच्या शोभेवर बोळा फिरवून जायचा अनेकदा, पण असं बोलायची टाप नसायची. पांढऱ्या रंगातही नाना छटा असतात आणि त्या सगळ्या इतर सगळ्या रंगांबरोबर सारख्या खुलत नसतात, उलट कित्येकदा मारक ठरतात, असा विचारतरी कितींना सुचला असेल, कोण जाणे!

आयुष्यातल्या ज्या एका दिवशी प्रत्येक मुलगी आपल्या परीने जास्तीत जास्त चांगलं दिसण्याची पराकाष्ठा करते त्या दिवशी, म्हणजे तिचं शुभमंगल होण्याच्या दिवशीही तिला रंगसंगती साधण्याची मुभा नसे. हातात हिरव्या बांगड्या, कपाळावर लालपिवळ्या रंगाचे म्हणजे हळदकुंकवाचे फराटे, मनगटाला कळकट दोऱ्यात बांधलेलं पिवळं हळकुंड, केसात तिरंगी वेणी (अबोली + मारवा + पांढरी हंगामी फुलं ह्यांच्या तीन ओळींमध्ये विणलेली वेणी.... जी बघताच तिने डोक्यात देशाचा झेंडा रोवलाय असं वाटे!) अंगावर ऐपतीप्रमाणे सोन्यामोत्या-खड्यांचे नानारंगी दागिने, काळ्या मोत्यांचे मंगळसूत्र, आणि ह्या सर्वांशी फटकून राहणारा भलत्याच रंगाचा शालू! 'लग्नाच्या दिवशी नवऱ्यामुलीला सगळं शोभून दिसतं' ह्या एका वाक्यात सगळं गुंडाळलं जायचं आणि एवढ्या उमेदीच्या वयातल्या पोरीबाळीसुद्धा खुशाल गुंडाळून घ्यायच्या!

आजच्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी जगात कोणीही कोणालाही कशाबाबतही सहजासहजी गुंडाळू शकणार नाही. जो तो आपापल्या इच्छेनुसार कपडे, बूट, चपला, बॅगा इत्यादीच नव्हे तर अंग, केस, नखं, भुवया, पापण्या हव्या त्या रंगात रंगवून घेतो. मुलांच्या बाबतीत तर जन्मल्यापासून मुलींना 'गुलाबी' व मुलग्यांना 'निळा' रंग बहाल केलेला असतोच. पण पुढेही मुलांना रंग आवडतील किंवा आकृष्ट करतील ह्या भ्रमाखाली मुलांच्या वस्तू एकाहून एक भडक, आक्रमक रंगांच्या केलेल्या दिसतात. मुलांच्या वाढदिवसांना 'कलरथीम्स' देणारे उच्चभ्रू पालक भेटतात. लहानवयापासून मुलांकडे नाना रंगांच्या ट्यूबा, डब्या, खडू, पेन्सिली, शाई, मेण याची लयलूट केलेली दिसते. मुलं अत्यंत बेदरकारपणे ते रंग वापरत, नासत असतात. मोजक्या रंगांमध्येही चांगली, प्रभावी चित्रं काढता येतील ह्याचा पत्ता त्यांना लागूच दिला जात नाही. ही चंगळ करू देणाऱ्या त्यांच्या पालकांची वाहनं, गाड्या, फर्निचर, यंत्र, खाद्यपेय रंगारंग असावीत हे ओघाने आलंच.

एकेकाळी रंगसजावट ही बायकांची मिरास असेल, तर पुरुषही त्या क्षेत्रात त्यांच्या 'खांद्याला खांदा लावून उभे' आहेत. आजकाल स्वत:च्या लग्नाच्या दिवशी नवऱ्या मुली दिवसभरात शे-शंभर पोषाख बदलताना प्रत्येकवेळी त्या-त्या पोषाखाच्या अनुरूप ॲक्सेसरीज बदलतात हे तर झालंच. पण विशेष म्हणजे अनेकदा त्यांचे जोडीदार नवरदेव हेही त्यांच्या थाटामाटाशी 'कलर कोऑर्डिनेटेड' 'अटायर' वगैरे चढवतात. हा रंगसंगतीचा सोस थक्क करणारा वाटतो. एकतर आपादमस्तक प्रत्येक गोष्ट विशिष्ट रंगाच्या अचूक छटेची पैदा करणं हे केवढं मेहनतीचं, खर्चाचं काम असणार! आणि दुसरं, त्याहून गूढ म्हणजे, लग्नाच्या दिवशीच दोघांनी एवढं अचूक मॅचिंग साधल्यावर पुढे आयुष्यभर त्यांना 'लग्न' ह्या खात्यावर करण्याजोगं उरणार काय?

रंगांबाबत ऐच्छिक विसंगतीपासून सक्तीच्या सुसंगतीपर्यंतचा हा प्रवास आता कळसाला पोचला आहे. शहरातल्या रस्त्यावर बिनामॅचिंगचे कपडे घातलेली बाई किंवा पुरुष दाखवा (आणि शंभर रुपये बक्षीस मिळवा) असं आवाहन करायला हरकत नाही. शंभर रुपये कधीही गमवावे लागणार नाहीत याची खात्री!

रंगांनी शिणलेले डोळे घटकाभर निववण्यासाठी जुन्या

काळ्यापांढऱ्या दिवसांची आठवण काढताना तेव्हाचं रंगांबाबतचं औदासीन्य आठवल्याशिवाय राहात नाही. 'वरलिया रंगा' भुलू नये ही कायमची शिकवण! वैभव-संपन्नता वगैरे काय कमवायचं ते अंतरंगाचं, हा सांस्कृतिक आदर्श. वास्तविक आपला खरा लोकप्रिय देव श्रीरंग आहे, त्याच्या रंग खेळण्याविषयी खूप लिहिलं गायलं गेलंय, संस्कृत साहित्यानेही राजीवलोचना, पक्वबिंबाधरोष्ठि, भुंग्यासारखे काळेभोर डोळे असणारी, लज्जेने आरक्त कपोल होणारी असं स्त्रीसौंदर्याचं भरपूर टेक्निकलर वर्णन ठिकठिकाणी केलेलं आहे. मात्र ते महाकाव्यातल्या स्त्रियांचं आहे, देवतांचं, नायिकांचं, राजघराण्यातल्या स्त्रियांचं आहे. सर्वसामान्य स्त्रीस त्याचं काय होय? एकतर आर्थिक वकूब बेताचा आणि प्रापंचिक धबडगा मोठा, शिवाय कोणत्याही प्रसंगी तिचं स्थान नीचतम पातळीवर! यामुळे मग तिनं सौम्य, सोज्वळ, सात्त्विक असणं, रंगरंगोटीपासून कायम हातभर लांब राहणं असे मानदंड तिच्या मनावर बिंबवले असतील. मुळात दारिद्र्याला सात्त्विकतेचा मुलामा चढवण्याचं आपलं नेहमीचं तंत्र इथेही वापरलं गेलं असेल. आणि रंगापासून फटकून राहाणं जनसामान्यांच्या, त्यांच्यातल्या स्त्रियांच्या वाट्याला आलं असेल. (आश्चर्य म्हणजे हा ठोकताळा अजूनही तेवढाच ठोकला जातो. पडद्यावर दिसणाऱ्या खलनायिकांची रंगरंगोटी आजही नायिकांपेक्षा भडक असते, कपाळावरची कुंकवं जितकी रंगीबेरंगी आणि मोठी तितकी त्यांच्या खलत्वाची तीव्रता वाढते.)

'मळखाऊ' हा कपड्यांचा रंग आणि 'सावळा' हा मुलींचा (विशेषत: लग्नाळू मुलींचा) रंग सर्वाधिक भेटे त्या रंगदुष्ट काळात! 'मळखाऊ' हे विशेषण कपड्याची प्रशस्ती करे, तर सावळा रंग धर्मसंकटातून सोडवे. उगाच थेट काळंबिळं म्हणून कशाला नाराज करा? आणि गोरंबिरं म्हणून खोट्याचं धनी तरी का व्हा? त्यापेक्षा सावळागोंधळ बरा. ज्याने त्याने आपापलं तारतम्य वापरून 'शेडकार्ड' तयार करावं.

रंगांची ही शेडकार्डं निसर्गातल्या रंगांवरून तयार व्हावीत हे ओघाने आलंच. झाडं, पानं, फळं, फुलं, वाळू, माती, ढग, आकाश ह्यांचे – म्हणजे निसर्गाने दिलेले रंगच परिचित असणार. 'सावळाच रंग तुझा' ह्या अजरामर गीतात महाकवी गदिमांनी तरी त्या सावळेपणाचं वर्णन कसं केलंय? तर चंदनाच्या बनापरी सावळा, पावसाळी नभापरी सावळा किंवा गोकुळीच्या कृष्णापरी सावळा! कुठलीतरी, आधुनिक भाषेतली, सिंथेटिक, मेटॅलिक, सायकेडेलिक वगैरे रंगाची उपमा त्यांना देताच आली नसती. कुठली सातासमुद्रापारची झाडं, पानं, फुलं त्यांना आठवलीच नसती त्यांच्यावेळच्या रंगांच्या सीमित दुनियेत. आता निसर्गात, त्याच्या निर्मितीतही रंग जबरदस्ती घुसडायला कमी करत नाही आपण. अनेक भाज्यांना, फळांना कृत्रिम रंग दिलेले असतात. आकाश आणि पाणी ह्यांच्यावर रंगाचे झोत फिरवून नाट्यमयता वाढवण्याचे प्रयत्न होतात. हलके, सूक्ष्म रंग गडद केले जातात आणि सोडले जातात आपल्या डोळ्यांवर आदळायला.

पण जेव्हा डोळ्यांवर दृश्यं, रंग आदळत नाहीत तेव्हा माणूस मनाच्या डोळ्यांनी ती बघायला लागतो, कल्पनशक्ती वापरायला लागतो, हा एक लाभच असतो. आठवतंय त्याप्रमाणे जुन्या बऱ्याच मराठी सिनेमांमध्ये हिरॉईन एकदोनदा तरी सौभाग्यसूचक पारंपरिक वेषात पडद्यावर यायचीच. पण सिनेमा तर काळा-पांढरा असायचा. मग त्या ठोकळा हिरोला तिच्याकडे सूचकतेने बघत, मिशी कुरवाळत एक वाक्य टाकावंच लागायचं.

'आज एक माणूस ....हंहंहंहं, हिरव्या लुगड्यात ....हंहंहंहं ....फारच खुलून आलंय बुवा....'

इथे प्रेक्षागृहातील सगळी माणसं कल्पनेने त्या नायिकेच्या साडीचा हिरवागार रंग, चुड्याचं काचेरी हिरवेपण, कुंकवाचं जिवंत लालपण बघू शकायची. तिचं 'आमी नै ज्वा' होईपर्यंत तिचा सप्तरंगी साजशृंगार प्रेक्षकांच्या मनाच्या डोळ्यांसमोर पुरा व्हायचा. प्रेमगीताच्या एखाद्या दृश्यातलं काळंपांढरं इंद्रधनुष्य सातही रंगांच्या छटा स्पष्टपणे दाखवायला लागायचंच एका टप्प्यावर! बटबटीतपणे रंग दाखवण्यासाठी अडत नव्हतं कोणाचंच!

आज अशी कल्पनाशक्ती वापरायची गरजही नाही आणि तिला वावही नाही. बघावं त्या माध्यमात, दृश्यात, चित्रात अनन्वित रंगाचार केलेला सापडतो. आहेत हाताशी, तर घ्या वापरून, करा चैन लेको, असा छुपा भाव दिसतो. रंगांबाबतचा हा चंगळवाद डोळ्यांना, संवेदनशील मनांना त्रासदायक होतो हे कोण कोणाला सांगणार? आताशा एखाद्या देवळाच्या जीर्णोद्धाराचा प्रस्ताव कानावर आला, आर्थिक मदतीचं आवाहन आलं की माझी पहिली प्रतिक्रिया असते ती धसकण्याची! धसका पैसे देण्याचा नाही, तर त्या पैशांच्या मोबदल्यात देवळाच्या कळसावर किती रंग बदाबदा ओतलेले बघावे लागतील ह्याचा.

जीर्णोद्धार करण्याची बहुतेकांची कल्पना रंग फासण्याची का असते कोण जाणे! पण असते खरी. गाभाऱ्यातल्या मूर्तीपासून आकाशाकडे झेपावणाऱ्या कळसापर्यंत दिसेल ते सप्तरंगात बुचकळून काढतात. आपलं ('आपल्या' ज्ञातीचं, 'आपल्या' देवाचं... तिथेही आपलंतुपलं खूपच!) देऊळ सगळ्या परिसरातल्या इमारतींच्या धक्काबुक्कीत उठून दिसण्यासाठी धडपड सगळी. देवळाच्या पायऱ्या, फरश्या, छतं, गाभारे, प्रत्यक्ष मूर्ती, तिच्या भोवतीची प्रभावळ, अगदी अंगणातल्या दीपमाळासुद्धा जीव खाऊन रंगवून ठेवतात आणि कळसाची रंगसफेदी हा रंगाधळेपणाचा कळसच असतो. अनेक जुन्या देवळांच्या बाहेरच्या दगडी दीपमाळा किंवा त्रिपुरं मूळचे काळे असत आणि वर्षानुवर्षं त्यात लावलेल्या तेलातुपाच्या दिव्यांमधल्या चिकट ओघळाने आणखी काळेकुट्ट झालेले असत. देवदिवाळीला, त्रिपुरी पौर्णिमेला त्यात पणत्या, दिवे लावले की दुरून बघताना त्या दगडी दीपमाळा मागच्या अंधाराशी एकजीव होऊन जात आणि सगळे दिवे अंधारात अधांतरी तेवताहेत असं वाटे. आता ते नेत्रसुख मिळत नाही. एकतर आताचा अंधारही नितळ काळाकभिन्न नसतो. कुठलेकुठले सर्चलाईट्स, सिग्नल्स, फिरते प्रकाशझोत, मोबाइलचे मध्येच उजळून दचकवणारे स्क्रीन्स असे सारखे अंधारावर चरे ओढत असतात. त्यात त्या दगडी दीपमाळांवर रंग फासले असले तर बघायलाच नको.

रांगोळीबद्दलही हाच प्रकार झालाय. शेणाने सारवलेल्या, कावेने मढवलेल्या जमिनीच्या छोट्या तुकड्यांवर रांगोळीच्या रंगांच्या नाजूक रेघा ओढल्या की त्या नुसत्या रंगरेखा राहात नसत,

भावरेखा होत. अलीकडे एका विशिष्ट गटाची रांगोळी फार लोकप्रिय झालेली आहे. तिच्यात प्रवेशद्वारापाशी, उत्सवस्थळी, रस्त्यावर शेरावारी रंग ओतलेले असतात. त्या त्या स्थळावर नुसता रंगांचा बुलडोझर ओढल्यासारखा वाटतो. त्याने ना सौंदर्य वाढत, ना पावित्र्य. अडगळ फक्त वाढते. एरवी ध्वनिप्रदूषणाबाबत एवढं बोलणारा समाज ह्या दृश्यप्रदूषणाबद्दल काहीही का बोलत नाही, हे मलातरी समजत नाही. अर्थात ह्याचा त्रास वाटावा एवढीही संवेदनशीलता शिल्लक नसेल तर बोलण्यात काही अर्थही नाही.

मध्यंतरी एका कामासाठी मला फोटो काढून घ्यायचे होते. नाक्यानाक्यावर माफक पैशात, अल्प वेळात, रंगीतसंगीत फोटो काढून देणारे खूप लोक उपलब्ध होते. मी आहे त्याहून देखणी (!) आणि रंगीबेरंगी दाखवायला सगळे उत्सुक होते, पण मला 'ब्लॅक ॲण्ड व्हाइट' पोर्ट्रेट फोटो हवा होता. त्यातल्या त्या काळ्या-पांढऱ्या रंगांची नजाकत, रेषांचा नेमकेपणा आणि एकूण वास्तवाच्या जवळ जाण्याच्या शक्यता मला मोहवत होत्या. पण तसा फोटो काढून द्यायला सहजासहजी कोणी मिळेना. आमच्याकडे ती इक्विपमेंट नाही, त्यासाठी लागणारं विशिष्ट प्रकाशतंत्र नाही, आणि मुळात आता 'तसले' फोटो 'डाऊन मार्केट', समजले जातील अशी उत्तरं मिळाली.. मनात आलं, आता सौंदर्याचे निकषही मार्केट ठरवायला लागलंय! त्याच्या ताकदीपुढे आपलं काय चालणार? एकदोघांनी मात्र मलाच छेडलं,

'तुम्हाला रंगीत फोटोचा प्रॉब्लेम काय आहे पण?'

'फोटोंचा नाही, माझा प्रॉब्लेम आहे. माझ्या जीवनात रंग बऱ्यापैकी उशिरा आले आहेत. म्हणून त्यांच्याशी दोस्ताना नसेल करता येत मला. आम्ही आपले बी ॲण्ड डब्ल्यूवाले...'

कलाक्षेत्रातले दर्दी खूपदा असं म्हणतात की आपल्या देशात संगीतसाक्षरता जेवढी आहे तेवढी चित्रसाक्षरता अजिबात नाही. चित्रं बघणं, समजून घेणं, त्यांचा आनंद घेणं आपल्याला फारसं कळलेलंच नाही. असं काही ऐकलं की मला ते काळेपांढरे दिवस आठवतात. गाणं बापडं बालवयापासून नानाप्रकारे सहजपणे कानावर पडत गेलं, मनामध्ये झिरपत गेलं. रंगरेषा त्यामानाने दुर्लभच राहिल्या. एकतर तंत्रज्ञान अगोदर विरळ होतं. नाना रंगढंगाचे कागद, पॅकिंग मटिरियल, कृत्रिम धाग्यांची कापडं, धातूवर, काचेवर, लाकडावर रंगलेपन करण्याच्या पद्धती, कागद आणि छपाईतली रंगांची चैन वगैरे अगोदर फार काळ हाताशी नव्हतं आणि आलं तेव्हा इतक्या वेगाने आणि इतक्या प्रमाणात आलं की कोणी, कुठे, कसं, कशासाठी ते वापरावं ह्याचं तारतम्यच राहिलं नाही. काळ्यापांढऱ्या रेषा, टोकं, बिंदू, फराटे, कुठे उरूच दिले नाही त्याने.

एखादा भूप्रदेश अगोदर दीर्घकाळ पाऊस न पडल्याने, अनावृष्टीने कंगाल असतो आणि नंतर खूप काळ अतिवृष्टीमुळेही कंगालच राहतो तसं काहीसं होतंय का आपलं? हे तर खरंच की अनावृष्टीची, काळ्यापांढऱ्या दिवसांची आंधळी भलावण करून चालणार नाही. रंगांचं चक्र असं मागे नेता येणार नाही. पण दृश्यात्मकतेच्या चित्रसाक्षरतेच्या अभावाबद्दल नुसतीच हळहळ करूनही पुरणार नाही. रंग, माध्यम, पोत, छाया, प्रकाश, वापरायला शिकणारे, शिकवणारे, व्यापारी उपयोग करणारे ह्यांना जबाबदारीची जास्त जाणीव करून देता आली तर ..... रंगांबद्दलची अंतरंगातली संवेदनक्षमता वाढवायची वेळ आलीये खरी!

*(दिवाळी २०१९)*

---

## माणसे वाचताना...

*माणसे वाचताना*
*चष्मा काढून ठेवावा*
*जुन्या माणसाला भेटताना नवे व्हावे*
*नवे पान उलटावे*
*पुराणा संदर्भ चाळू नये ।*

*माणसे वाचताना*
*विरामचिन्हे ऐसपैस पेरावीत*
*मोकळे मन आनंदाचे महाद्वार असते ।*

*आपले वाचन आपणच करावे*
*डोळे आणि कान यांतले अंतर स्मरावे ।*


*माणसे वाचताना अडखळलेलेच बरे ।*

*मुख्य म्हणजे*
*पट्टीच्या वाचकाने(ही)*
*आपणदेखील माणूस आहोत*
*हे विसरू नये ।*

*(दिवाळी १९९५)*

**दीपा गोवारीकर**

# त्या फोटूमदल्या बाईवानी



*त्या फोटूमदल्या बाईवानी,*
*नुस्तीच ढिम्म बसून -हानार हाय बगा उद्यापास्नऽऽ*

*काटवटीत घेनार न्हाई पीठ का पानी*
*फुकनार न्हाई चूल छाताड फुटल्यावानी*
*त्या फोटूमदल्या बाईवानी*
*नुस्तीच ढिम्म बसून -हानार हाय बगा उद्यापास्नऽऽ*

*जरा घराबाहेर पडावं, घसा घसा राबावं*
*तर ते न्हाई.*
*मजुरीला साखर कारखान्यात जावावं,*
*तर ते न्हाई.*
*नुस्त ढोसन्यापुरतं भायेर पडायचं*
*आनी मला मारत घरात घुसायचं.*
*गेला अस्तासा रामभाऊ दिवश्याच्या गु-हाळावर*
*पोरांनी बोटं चाटली आस्ती काकवीबरबर*
*चव आली आस्ती भाकरीलाबी चार दिस*
*तर तुमी मातुर हिथंच पिवून फिस्.*
*मी तरी एकटीनं कुठं कुठं फुरं पडायचं*
*हे वझ्झं मी एकटीनंच व्हय वो वडायचं?*

*लै वाटतंय मलाबी*
*त्या फोटुमदल्या बाईवानी*
*गंध-पावडर लावावी*
*केसामंदी घानेरीची का हुईना*
*फुलं टोचावी*
*रुपायाभर कुंकू लावून, आंगभर पदर घिवून*
*सखीच्या न्हाईतर ठकीच्या लगनाला मिरवत जावावं*
*लांबलचक उखान्यामदी तुमचं नाव घेवावं!*

*तोंडाची चवच घालीवलीया या संसारानं!*
*मानसाचं कसं नाव घ्यावं उखान्यानं?*

*हात मागं घ्या!*
*आता न्हाई मी झेलायची मार!*
*गाडगी फुटली तर फुटू देत चार*
*आनतीच बगा नाऱ्या कुंभाराकडनं*
*एक चूल आनी चार गाडगी उदारीवर*
*राबती गावाच्या बांधाबांधानं मजुरीवर*

*रोजचा कामाचा पिट्टा पाडीन*
*आनी पोरांस्नीच तेवडं जेवायला वाडीन.*
*तुमी आनी तुमचं प्वाट पायजे तिकडं निगा*
*पटत आसल तर बगा*
*न्हाई तर त्या फोटुमदल्या बाईवानी*
*नुस्तीच ढिम्म बसून -हानार हाय बगा उद्यापास्नऽऽ*

*लावलंय म्हनं सरकारनं*
*बायकांचंबी कसलं आरकशान*
*त्येच्याबरोबर तिला बी देतो आता शिकशान.*
*उद्याच जावून गुरुजीच्या पाया पडती,*
*शिकवनी का काय म्हंत्यात तेबी लावती.*
*त्येला बालिस्टर आनी तिला डाक्टरीन*
*करायला लावनार.*

*पटत असाल तर बगा*
*जरा सुद्धीनं वागाऽऽ*
*न्हाईतर त्या फोटूमदल्या बाईवानी*
*नुस्तीच ढिम्म बसून -हानार हाय बगा उद्यापास्नऽऽ*
*बगशीलाच तुमी!*

*(दिवाळी १९९९)*
**संजय कृष्णाजी पाटील**
***रेखाटन : धनंजय सस्तकर***



रेखाटन : भ. मा. परसवाळे

## सुगंध

*जे नको तेच मी करत गेलो!*
*मी तुझ्या अंतरी शिरत गेलो!*

*काय कोणी कधी प्रेम केले?*
*वेदनेलाच मी वरत गेलो!*

*ते शहाणे सुखी लोक होते!*
*मीच वेडापिसा ठरत गेलो!*

*लाख नाकार तू शब्द माझे,*
*मी तुझ्याही मनी जिरत गेलो!*

*जन्म कोड्यापरी काढला मी!*
*संपतानाच मी उरत गेलो!*

*डोळियांनी मला 'बंद' केले...*
*लेखणीतून मी झरत गेलो!*

*ते तुझे धोरणी दार होते...*
*मी जसाच्या तसा परत गेलो!*

*सोबतीचा कुठे प्रश्न होता?*
*हात माझाच मी धरत गेलो!*

*पाय होते जरी बांधलेले,*
*मी सुगंधापरी फिरत गेलो!*

*(दिवाळी १९९६)*

**सुरेश भट**

## परदेशात गेलेल्या दोस्तांनो

*तुमची रोज आठवण यावी एवढी सलगी आता कुठे?*
*तरी होतात तुमचे भास, अधे-मधे, इथे-तिथे*

*कोलाहल बाहेर असतो, आत तरी वेगळे काय?*
*सायंकाळी परतून येते धूळमाखली शिणली गाय*

*तसेच माझे मनदेखील तुमचे होते संध्येला*
*स्वत:शीच राहे बोलत, स्वत:च थांबे सोबतीला*

*तुम्ही तिथे, मी इथे : मी खरे तर इथे-तिथे*
*माझ्यावाचून सांगा आता कुठली तुम्ही गाता गीते?*

*खळखळणारे आपले वय खळखळ करत संपून गेले*
*फाटे फुटले, रस्ते चुकले, आपला गाव शोधित गेले*

*तुमचा मुक्काम पक्का तिथे, माझा डेरा पडला इथे*
*तुमची रोज आठवण यावी एवढी सलगी आता कुठे?*

*तरीही पश्चिमवारा येता, हृदयापाशी काही तुटे*
*आणि तुमचे भास होतात असे क्षणात इथे-तिथे*

*....अधे-मधे ....इथे-तिथे!*

(दिवाळी २००८)

**आशुतोष जावडेकर**

## कविता - साठीनंतरची

*खूप वाचले पदव्या झाल्या*
*सूर्य अजूनी ढळला नाही*
*आयुष्याचा अर्थ खरोखर*
*अजून मजला कळला नाही ॥*

*मी कोण कुठुनी आलो*
*सार्थक झाले का जन्माचे?*
*ह्या प्रश्नाचे उत्तर मजला*
*पुस्तकात आढळले नाही ॥*

*मी उत्तर शोधीत बसलो*
*अवती भवती येथे तेथे*
*नाद आतला माझा मजला*
*कळून कदाचित वळला नाही ॥*

*रंग मनाचे ढंग जनाचे*
*समजायाला अवघड सारे*
*मित्र कोण अन् शत्रू कुठला*
*फरक ह्यातला कळला नाही ॥*

(दिवाळी २०१७)

**विजय पांढरीपांडे**

# या नीट लिहायला हव्यात

*या नीट लिहायला हव्यात कविता*
*पेन्सिलीचे छिलके काढून टाकावेत*
*तसे काढायला हवे टोक आशयाचे*
*भरभक्कम करायला हवे भूमिकेचे भान*
*विस्तारायला हवाय जाणिवेचा परिसर*
*आणि सारे कसे स्पष्ट नि निधडे हवे*
*उगाच बोटचेपेपणाखाली*

*मुरडायला नकोय कवितेने*

*अंग झडझडून सळसळून*
*उठला पाहिजे अभिव्यक्तीचा पोत*
*नागिणीच्या फण्यासारखा*
*विस्तवातल्या निखाऱ्यागत*
*उजेड पडला पाहिजे*
*कवितेच्या अंगावर, धगीचा*

*असे लिहिता आले*
*तर तसे जगताही येईलच ना?*

*(दिवाळी २०१४)*

# गुंता

*सकाळी बारा वाजता मुलगा उठतो झोपेतून*
*आणि ब्रश करत करतच उघडतो इंटरनेट*
*घुसवतो चेहरा फेसबुकच्या पुस्तकात*
*आणि त्यातच गढून जातो*
*मुलगा उठल्याचं बघून लगबगीनं*
*ठेवते आई दुधाचा ग्लास त्याच्यासमोर*
*जो पडून राहतो तासन्‌तास कम्प्यूटर टेबलावर*

*मुलाची परीक्षा आलीय जवळ*
*ऐपत नसताना घेतलंय इंजिनिअरींग*
*पण कळतच नाहीये आईला*
*त्याचं काय चाललेलं असतं ते*

*रात्रभर कम्प्यूटसमोर बसून तो*
*नक्की काय करतो, आईला नाही कळत*
*गेम खेळतो, पिक्चर बघतो, चॅटिंग करतो*
*मोबाइलवर हलक्या आवाजात बोलत राहतो*
*पुस्तकं न वाचता, पेनानं न लिहिता*
*तो कसलासा म्हणे अभ्यास करतो*
*कुणाचा तरी मेसेज येताच गडबडीनं बाहेर पडतो*
*मधूनच दोन दोन दिवस गायब होतो*

*तिला वाटतं हळूच जावं त्याच्या खोलीत*
*नि त्याच्या डोक्यावर थोपटत*
*घ्यावं त्याला कुशीत*
*'काय चाललंय तुझ्या मनात?' विचारावं काटकाळजीनं*
*'नीट अभ्यास कर रे बाबा' म्हणून विनवावं*

*पण त्याला नाही आवडत विचारलेले असे प्रश्न*
*नाही आवडत दार ढकलून खोलीत गेलेलं*

*मध्यंतरी एक गोड गोजिरी परी*
*यायची त्याच्याबरोबर घरी 'चाची चाची' करत*
*भोवती फिरायची भिरी भिरी*
*आताशा ती न येण्याचं कारण विचारलं*
*तर वैतागलाच फटकन*
*'तू सारख्या भलत्याच कल्पना*
*नको ना करत जाऊस*
*अशानं आणणारच नाही मी कुणाला घरी'*
*म्हणताच गप्प बसते ती*
*तिरीमिरीत बाईक काढून निघून जाणाऱ्या*
*पोराकडे धास्तावून बघत बसते*

*आताही नुसताच पडून आहे हा बेडवर*
*शुन्यामध्ये बघत – वरून शांत पण आत अस्वस्थ*

*तरी होत नाहीय त्याला टोकण्याचं धाडस*
*अभ्यासाचं टेन्शन, मित्रांचं टेन्शन, मैत्रिणीचं टेन्शन*
*ब्रेकअपचं टेन्शन, करियरचं टेन्शन, ट्रॅफिकचं टेन्शन*
*समाजात सुरू असलेल्या भलभलत्या गोष्टींचं टेन्शन*

*'पोराच्या मनाचा गुंता झालाय नुसता*
*एक गरिबी सोडली, तर सोपा होता*
*आमच्या पुढचा रस्ता...'*
*आई पुटपुटते नि झोपलेल्या पोराचं पांघरूण नीट करते*
*झोपेत त्याच्या पिळवटलेल्या बेफिकीर*
*चेहऱ्याकडे बघत रात्रभर बसून राहते..*

*(दिवाळी २०१७)*

**अंजली कुलकर्णी**

---

नामस्मरणानं पापं जळतात
पण मेला भात करपतो.

**अरुण कोलटकर**

# फॅन्टसीचे उफराटे वृक्ष

*पौगंडावस्थेपासून*
*घरात, दारात*
*चित्रपटगृह, टीव्ही, नाहीतर स्मार्टफोनच्या स्क्रीनवर*
*कथा, कादंबऱ्यांतून*
*नाहीतर गुळगुळीत पानांवरच्या छायाचित्रांमधून*
*पडत जातात, रुजत जातात*
*लैंगिक फॅन्टसीची बीजे*
*पुरुषाच्या मनोभूमीत.*

*त्यातच मिसळून जातात*
*त्याच्याच बापजाद्यांच्या अगणित अतृप्त लैंगिक इच्छा.*

*होतात आरूढ, अधिकाराने, आपल्या वारसदाराच्या अंगप्रत्यंगावर!*

*वटारलेले डोळे, संयत दुर्लक्ष,*
*''किती घाणेरडा आहेस तू''*
*''हाऊ मीन यू आर''*
*यातून तो ओढून घेत राहतो*
*त्याच्या लैंगिक फॅन्टसीज.*

*मनाच्या जमिनीत, दडवून ठेवतो खोलवर,*
*दुसऱ्या कोणाच्या, लग्नाच्या बायकोच्या, अगदी जवळच्या मित्रांच्यादेखील दृष्टीस पडणार नाहीत अशा.*

*जमिनीवर वाढण्यास बंदी असल्यामुळे*
*जमिनीखाली उलटे वाढतात त्या फॅन्टसीच्या बियांचे वृक्ष, खोल, अजून खोल*
*कालानुरूप फुटतात त्या वृक्षाला*
*खोड, फांद्या, उपफांद्या, पाने आणि गूढ, मादक वासाची ती फुलेदेखील.*
*प्रत्येक पुरुषाचा फक्त स्वतःचा खाजगी वृक्ष!*

*शरीरात उलट्या वाढणाऱ्या त्या वृक्षाची मूळे पसरतात त्याच्या कातडीच्या जमिनीला समांतर*
*दिसतील न दिसतील अशी*
*म्हातारपणात,*
*मांसल जमिनीची धूप होत गेल्यावर*
*मात्र नाही लपवता येत म्हाताऱ्या पुरुषाला*

*हातापायावर, कातडीवर डोके वर काढणाऱ्या हिरव्या निळ्या शिरांच्या रूपाने प्रथमच बाहेर डोकावणारी*
*त्याच्या त्या फक्त स्वतःच्या खाजगी वृक्षाची मुळे*

*स्मशानात म्हाताऱ्या पुरुषाचे शरीर जाळताना*
*येणारे ते चित्रविचित्र वास*
*असतात*
*त्याच्या शरीरातील त्या जळणाऱ्या*
*त्या फॅन्टसीच्या उफराट्या वृक्षाचे, खोडाचे, फांद्यांचे अन् त्या गूढ, मादक वासाच्या*
*पण आता सुकून गेलेल्या फुलांचे!*

*(ऑगस्ट २०१७)*

**संजीव चांदोरकर**



# कथा

# कांचनमृग

## सुबोध जावडेकर

ह्या कथेतल्या पात्रांच्या नावांचा प्रत्यक्षातल्या कुणा व्यक्तीशी संबंध नाही. वृत्तीशी मात्र निश्चित आहे. कथेत ज्या वास्तूंच्या नावांचा उल्लेख आला आहे, त्या तुमच्या शेजारीपाजारी असल्या, तर तो निव्वळ योगायोग आहे. पण त्यात राहणाऱ्यांना जर तुम्ही ओळखत असला तर तो मात्र योगायोग नाही. आजही प्रासंगिक ठरावी अशी कथा.

रात्री साडेनऊ वाजता दारावरची घंटा वाजली तेव्हा प्रमोदच्या कपाळावर आठ्या पडल्या. आत्ता या वेळी कोण आलं असेल?

पार्वतीसदनच्या पहिल्या मजल्यावर रहाणारं देशमाने कुटुंब जेवण आटपून टीव्हीसमोर बसलेलं होतं. प्रमोद रिमोट कंट्रोलची बटणे दाबत भराभरा चॅनेल बदलत होता. त्याचा मुलगा अभिजित ''बाबा असू दे ना हे चॅनेल. आत्ता *सुपरहिट मुकाबला* सुरू होईल.'' अशी विनंतीवजा आज्ञा करत होता. अपर्णाच्या हातात शाळेचं पुस्तक होतं पण नजर मात्र समोरच्या पडद्यावर खिळली होती.

''मला *घुटन* बघायचंय. मेट्रो चॅनेल लावा'', स्वयंपाकघरात आवराआवर करत असलेल्या माधुरीनं आतूनच ओरडून सांगितलं. प्रमोदची आईही गवार निवडत टीव्हीसमोर बसली होती.

''अभिजित, कोण आहे बघ रे,'' प्रमोदने मुलाला सांगितलं. मुलानं दार उघडलं. बाहेर दोघंजण उभे होते. चेहऱ्यावरुन सभ्य दिसत होते. एकानं सफारी सूट घातला होता. दुसऱ्यानं पांढरा शर्ट आणि पांढरीच पँट घातली होती.

''देशमाने साहेब आहेत का?''


''बाबा, तुमच्याकडे कोणतरी आलंय,'' अभिजित दारातूनच ओरडला आणि आत येऊन त्यानं टीव्हीचा रिमोट ताब्यात घेतला. चरफडत प्रमोद उठून दारात गेला.

''काय पाहिजे? मीच देशमाने.''

''तुमच्याकडे थोडं काम होतं, साहेब. आत येऊ का?''

''कसलं काम? काही सर्व्हेबिर्व्हे करणार असलात तर –''

''नाही साहेब, सफारी सूटमधला माणूस हसून म्हणाला. तो हसला तसा त्याच्या तोंडातला सोन्याचा दात दिव्याच्या प्रकाशात चमकला. साधारण चाळीशीचा दिसत होता. चेहऱ्यावर वरवर जरी अजीजी दिसत होती तरी एकंदरीत व्यक्तिमत्त्वात काहीशी गुर्मी



*रेखाटन : राजेश भावसार*

होती. त्याच्या शेजारचा पांढऱ्या कपड्यातला बुटका माणूस चेहऱ्यावर काहीच भाव न दाखवता त्याच्याकडे पहात होता.

''माझं नाव नवरे. थोडं बोलायचं होतं.''

''या आत'' प्रमोद नाईलाजानं म्हणाला. ती दोघं आत आली. प्रमोदच्या आईनं निवडत असलेली गवार पातेल्यात भरली आणि ती आत गेली. माधुरीनं पदराला हात पुसत आतूनच आलेल्या पाहुण्यांकडे एक कटाक्ष टाकला. अपर्णा आणि अभिजितची काहीतरी नेत्रपल्लवी झाली. ती दोघं उठून गॅलरीत गेली.

''बसा.''

''सॉरी हं साहेब, तुम्हाला डिस्टर्ब केलं'' कोचावर बसत नवरे म्हणाला. ''हे पांडे.''

पांडेंनी आपल्या खिशातून एक कार्ड काढून प्रमोदकडे दिलं. 'सिद्धीविनायक ज्युवेलर्स' असं त्या कार्डावर छापलेलं होतं. ते वाचून प्रमोदला काहीच अर्थबोध झाला नाही. त्यानं प्रश्नार्थक नजरेनं नवरेकडे पाहिलं.

''सिद्धीविनायक ज्युवेलर्स हे नाव तुम्ही ऐकलं असेलच. ह्या बिल्डिंगच्या तळमजल्यावर त्यांची नवी ब्रँच चालू होतेय.''

''बरं, मग?''

''मी सिद्धीविनायक ज्युवेलर्ससाठी काम करतो,'' पांडे म्हणाले. त्यांच्या मराठी उच्चारावर हिंदीची छाप होती. ''तुमच्या खालच्या मजल्यावरची जागा आम्ही घेतलीय. तिथं रिनोव्हेशनचं काम चालू आहे. और दो तीन महिनोंमे दुकान शुरू हो जायेगी.''

प्रमोदला आठवलं. खालच्या माळ्यावरचे दामले नुकतेच जागा सोडून गेले होते. तिथं नवीन दुकान येणार होतं. ते ह्या ज्युवेलर्सचं नाही का? खरंच की.

''ती जागा आम्हाला पुरी पडत नाही. आहाला आणखी जागा हवी आहे. म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो. म्हणजे असं की ही तुमची रहाती जागा तुम्ही आम्हाला द्यायची. आम्ही तुम्हाला दुसरी बेहतर जागा देऊ आणि वर बढिया कॉम्पेन्सेशन देऊ,'' पांडेनं थोडक्यात सांगितलं.

''काही गरज नाही. मला तुमची बढिया जागा नको आणि कॉम्पेन्सेशनही नको. मी आहे इथं ठीक आहे.''

''आमची ऑफर ऐकून तर घ्या,'' नवरेंनी चिकाटी सोडली नाही.

''मला जागा सोडायची नाही. तुम्ही जाऊ शकता.'' प्रमोद उठला.

''अशी डोक्यात एकदम राख काय घालून घेता साहेब,'' नवरे म्हणाला. कॉम्पेन्सेशन पन्नासच्या वर असेल हे लक्षात घ्या.''

''म्हणजे ही मध्यवर्ती जागा सोडून मी ठाणे-डोंबिवलीला दुसऱ्या कुठल्यातरी जागेत रहायला जायचं आणि त्याचं कॉम्पेन्सेशन म्हणून तुम्ही मला वर फक्त पन्नास हजार देणार? काही गरज नाही. आ ॲम नॉट इंटरेस्टेड.''

नवरे गालातल्या गालात हसला. ''पन्नास हजार नाही साहेब. पन्नास लाख! अर्धा कोटी! अर्थात नव्या जागेची किंमत धरून.''

''पन्नास ला.....'' प्रमोदचा आ विस्फारलेला तसाच राहिला. आजकाल ह्या मेनरोडवरच्या जागांना सोन्याचं मोल आलं आहे, हे त्याला माहीत होतं. जागांच्या किंमती अफाट झाल्या आहेत ह्याची कल्पना होती. पूर्वी ज्या सहजतेनं लोक आठ-दहा हजार म्हणत तितक्या सहजपणे आज आठ-दहा लाखाच्या गप्पा होताना त्यानं ऐकल्या होत्या. पण तरीही? इतके पैसे? पन्नास लाख?

''बघा साहेब, तुम्ही विचार करा. आम्हाला आजच तुमचं उत्तर हवं असं नाही. तुमच्या घरातल्या माणसांना विचारा. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा सल्ला घ्या. हवं तर एखाद्या वकिलाला विचारा. मग आम्हाला सांगा.'' नवरे म्हणाला.

''आणि साहेब,'' पांडे म्हणाला. ''आमचा व्यवहार एकदम साफ असतो. दामलेसाहेबांना विचारून खात्री करून घ्या. त्यांचा हा नवा फोन नंबर.'' पांडेनी प्रमोदच्या हातात एक कागदाचा चिटोरा दिला. प्रमोदच्या चेहऱ्यावरचे भाव पांडे आणि नवरे निरखत होते. पन्नास लाखाच्या आकड्यानं योग्य तो परिणाम साधला....

''कोणाशी बोलायची मला गरज वाटत नाही. मला नोकरीसाठी चर्चगेटला इथून थेट बस मिळते. बायकोची नोकरीची जागाही जवळच आहे. मुलांची शाळा-कॉलेजिस दहा मिनिटाच्या अंतरावर आहेत.''

डोंगरे हसला. म्हणाला, ''तुम्ही स्वतःच्या गाडीनं ऑफीसला जाऊ शकाल आता, देशमानेसाहेब. वहिनीसाहेबाना नोकरी करायचीच गरज रहाणार नाही. आणि मुलांचं म्हणाल तर त्यांना जवळच्या शाळा कॉलेजात प्रवेश मिळू शकतो. लागलं तर आम्ही मदत करू. आमच्या तिवारीसाहेबांच्या खूप ओळखी आहेत.''

''तरीही... नाही. नको आम्हाला तुमचं प्रपोजल. आम्ही इथं आहोत तेच ठीक आहोत.'' प्रमोद म्हणाला खरा पण त्याच्या आवाजात ठामपणा नव्हता. त्या दोघांनाही ते जाणवलं.

''सोच विचार करून मग सांगा साहेब. पुढच्या हप्त्यात सांगितलं तरी चालेल,'' पांडे म्हणाले. ''पण ज्यादा देर करू नका. दोन बिल्डिंग टाकून शंकरनिवास आहे. तिथं पण आमची बोलणी चालू आहेत. आता ती जागा जरा लांब पडेल हे खरं, पण चालेल. तुमची मिळाली तर जास्त सोयीचं होईल. बघा. फार तर रकमेत थोडं कमीजास्त करू. आमची तयारी आहे.''

''पांडेसाब, उन्हें थोडा सोचने दीजिये. फिर बात करेंगे. बरं मग आम्ही निघतो साहेब. पुढच्या आठवड्यात भेटू.'' नवरे उठले.

ते लोक गेले तसे प्रमोदचे कुटुंबीय त्याच्याभोवती गोळा झाले. सगळ्यांच्या कानावर बोलणी पडलेलीच होती.

''काय करायचं ठरवलंय बाबा तुम्ही?'' अभिजितने सरळ प्रश्न केला.

''मी माझं हे कॉलेज सोडून कुठे जाणार नाही सांगून ठेवतो.''

''मी पण नाही माझी शाळा सोडणार'' अपर्णानं भावाची री ओढली. ''आपण इथंच रहायचं. माझ्या मैत्रिणी इथंच आहेत.''

''तुम्ही दोघं गप्प बसा रे,'' माधुरीनं त्यांना दटावलं. ''कोणी जागा सोडायला निघालेलं नाही. बाबांनी त्यांना काय सांगितलं ते ऐकलं ना? आणि काय करायचं ते आम्ही ठरवू. तुम्ही मुलांनी ज्यादा शहाणपणा करून आम्हाला सल्ले देऊ नका, कळलं?''

''म्हणजे काय? आमच्या लाईफबद्दलचा डिसीजन घेताना आम्हाला कन्सल्ट नाही करणार? हे बरं आहे! आणि आता मी मोठा झालोय'' अभिजित कुरकुरला.

प्रमोदनं काही न बोलता त्याच्याकडे एक रागाचा कटाक्ष टाकला. तसा तो धुसफूसत गप्प बसला.

प्रमोदच्या आईचं वय झालं असलं तरी कान तिखट होते. तिनंही झालेलं सगळं संभाषण नीट ऐकलं होतं, स्पष्टच होतं.

''तू बोललास ते बरोबरच बोललास. अरे, गेली पंचवीस वर्षं आपण इथे राहतोय. तुझ्या बाबांनी कर्ज काढून हा ब्लॉक घेतला. पन्नास हजाराचं कर्ज त्यावेळी किती मोठ्ठं वाटत होतं बाळा! सहा वर्षं लागली फिटायला. आता सांगते, तुम्हाला हसू येईल, पण तुझे बाबा ऑफिसमधून बसनं यायचे तर आपल्या घराजवळच्या स्टॉपवर न उतरता आधीच्या स्टॉपवर उतरायचे आणि चालत यायचे. बसची स्टेज बदलायची ना! म्हणजे मग तिकिटाचे पंधरा पैसे कमी पडायचे. अस्से एकएक पैसा जोडून कर्ज फेडलं हो त्यांनी. पण ब्लॉकचं सुख जास्त दिवस नव्हतं त्यांच्या नशीबी. कर्ज फिटलं. आता जरा मौजमजा करावी म्हणाले – त्याच्या पुढच्याच महिन्यात –'' आईनं डोळ्याला पदर लावला.

प्रमोदनं त्याच्या आईच्या हातावर थोपटलं. ''हो, आई. मला कल्पना आहे सगळी. म्हणून तर मी त्यांना नाही म्हणून सांगून टाकलं. तू ऐकलंस ना?''

''इथं कोणी हा ब्लॉक सोडून चाललं नाहीये, आई'' माधुरी म्हणाली. तुम्ही उगीचच त्रास करून घेतायत झालं. पुरे झाली चर्चा आता. सगळे झोपायला जाऊया. अकरा वाजायला आले. उद्या कामावर जायचंय सगळ्यांना.''

''आई, मी वाचत बसणार आहे हं,'' अभिजितनं सांगितलं.

''मला पण अभ्यास करायचाय,'' अपर्णा म्हणाली.

''टेबललॅम्प लावून अभ्यास करा. आजीला दिव्याचा त्रास होतो. झोप लागत नाही.''

''आणि आई –'' अपर्णा हळूच म्हणाली.

''काय आता?''

''*स्वाभिमान* बघायचीच.''

''टीव्ही मुळीच लावायचा नाही'' माधुरीनं दटावलं. ही मालिका रात्री साडेअकराला लागायची. ''सगळ्यांची झोपमोड होते.''

''अगदी हळू आवाजात लावीन, आई प्लीजऽऽज.''

''असू दे, सूनबाई. म्हातारपणी झोप जरा कमीच होते आणि दुपारी पडायला मिळतं मला.''

कितीही उशीरा झोपलं तरी आईंना पहाटे चार वाजता जाग येते हे प्रमोद, माधुरीला माहीत होतं.

''काही गरज नाही स्वाभिमान बघायची. अजिबात टीव्ही लावायचा नाही.'' माधुरीनं कितीही बजावलं तरी मुलं टीव्ही लावणारच, तिला माहीत होतं. घरात एकच बेडरूम होती. प्रमोदची आई आणि मुलं ड्रॉईंगरूममध्येच झोपत. त्या सगळ्यांना बाहेरच्या खोलीत कोंबून बेडरूममध्ये जाताना माधुरीला अलीकडे संकोच वाटे.

....जागेसंबंधीचं हे प्रपोजल स्वीकारलं तर ठाणे-डोंबिवलीला का होईना पण तीन बेडरूमचा फ्लॅट घेता येईल, तिच्या मनात आलं. मुलांना अभ्यासाला स्वतंत्र खोली मिळेल. त्यांच्या वेळीअवेळी दिवा लावण्यानं सासूबाईंची झोपमोडही होणार नाही. कुणालाही हवा तेव्हा टीव्ही बघता येईल. सगळ्यांच्या दृष्टीनंच सुखाचं होईल ते... पण मग ही जागा सोडावी लागेल... लागेना का? काय बिघडलं? तिच्या मनानं उचल खाली. ह्या जागेला काय असं सोनं लागलंय?... नोकरीचं ठिकाण लांब पडेल खरं, पण सोडूनच द्यायची नोकरी. नाहीतरी ऑफीसनं व्हॉलंटरी रिटायरमेंट स्कीम जाहीर केलीच होती. भरपूर बँक बॅलन्स असल्यावर नोकरीची गरजच काय?...

प्रमोदच्या मनात नेमके हेच विचार चालू होते. एकमेकांशी त्यांनी ते बोलून दाखवले नाहीत, पण दोघांनाही रात्री लवकर झोप लागली नाही. बाहेरच्या खोलीतून टीव्हीचा आवाज येत होता.

दुसऱ्या दिवशी लंच अवरमध्ये प्रमोदने आपल्या सहकाऱ्यांशी हा विषय काढला. भातखंडे अशा बाबतीत चांगलेच माहीतगार होते.

''आमच्या एरियात जागेचे भाव काय आहेत, तुला माहीत आहेत का?'' डबा खाताखाता त्यानं भातखंडेला विचारलं.

''नक्की माहीत नाहीत, पण आठ-दहा हजार सहज असतील.''

''आठ-दहा हजार म्हणजे?''

''म्हणजे दर चौरस फुटाला रे. त्यातून तू तर अगदी मेनरोडवर राहतोस. तुझ्या इथं तर जास्तच असेल. का विचारतोहेस?''

प्रमोद मनातल्या मनात आकडेमोड करू लागला. साडेपाचशे चौरस फूट गुणिले आठ हजार किंवा दहा हजार. म्हणजे साडेपाच गुणिले आठ –

''का रे?'' भातखंडेने विचारलं. तुझ्या जागेला कुणी गिऱ्हाईक आलंय की काय?''

''गिऱ्हाईक असं नाही'' प्रमोदन सावधपणे सांगितलं. ''पण विचारणा होताहेत.''

''अरे वा, लकी आहेस लेका. पण कुणाची आली ऑफर तर लगेच हो म्हणू नकोस. जरा चौकशी करून मगच ठरव. पण चान्स आला तर मात्र सोडू नकोस.''

''पण माझी नोकरी, मुलांची शिक्षणं...''

''आयला जागा विकल्यावर नोकरीचं काय पडलंय तुला. जन्मभर बसून खाल्लंस तरी संपणार नाही.'' भातखंडेच्या स्वरात असूया होती. ''आमच्या बापानं आत कुठंतरी जोगेश्वरीला ब्लॉक घेतला. शांत एरिया म्हणून. आता ती एरिया शांतही राहिली नाहीये आणि त्याला फारसा भावही नाहीये. हजार-बाराशे म्हणजे डोक्यावरून पाणी. पण ते जाऊ दे. तुला केवढ्याची ऑफर आलीय?''

''अजून पक्की बोलणी झाली नाहीत. म्हणून तर तुला विचारलं. माझंच नक्की होत नाहीये. सध्या चाललंय ते काय वाईट आहे?''

''मूर्ख आहेस तू. त्यांना नाही म्हणून सांगितलं असलंस तर ते एकापरी बरंच झालं. त्यांना वाटेल तू ताणून धरतोहेस. म्हणजे चार पैसे वाढवून मिळतील. पण प्रत्यक्षात नाही म्हणायचा विचारसुद्धा मनात आणू नकोस. तुला इतके पैसे मिळतील की मनात आणलंस तर लोणावळ्यासारख्या थंड हवेच्या ठिकाणीसुद्धा बंगला घेता येईल; मला विचारशील तर ठाणे किंवा बोरीवलीला मोठा फ्लॅट घे. नोकरी सोड. हवं तर एखादा छोटासा व्यवसाय कर. नाही केलास तरी चालेल. उरलेले पैसे बँकेत ठेवून व्याजावरसुद्धा जगता येईल आरामात.''

''मुलीची शाळा – अभिजितचं कॉलेज –''

''ठाण्याला काय शाळा-कॉलेजं नाहीत? नाहीतरी हल्ली क्लासमध्येच जाऊन परीक्षा द्यायच्या असतात. शाळा-कॉलेजं कसलीही असली तरी काय फरक पडतो?''

''मुलं ऐकणार नाहीत.''

''मग त्यांना हॉस्टेलमध्ये ठेव. नाहीतर असं कर, मुलाला कोरी करकरीत होंडा घेऊन दे. आणि तुझी मुलगी यंदा अकरावीला ना? पुढच्या वर्षी बारावीला जाईल. कुठं जायचंय तिला?''

''मेडिकलला जायचं म्हणतेय खरी. आहे तशी डोक्यानं बरी. पण बघूया कसे मार्क्स पडताहेत ते. त्याच्यावर ठरवू.''

''जागेच्या पैशातून आठ-दहा लाख डोनेशन तू सहज देऊ शकशील. सॉरी, आता त्याला डोनेशन नाही म्हणायचं नाही का? डोनेशन नाही, पेड सीट! काय?''

''आठ-दहा लाख डोनेशन? हा विचार प्रमोद कधी मनातच आणू शकला नव्हता याआधी. अपर्णा डॉक्टर होऊ शकेल?

''मग काय झालं. अरे, आपल्याला काही रिझर्व्ह कोट्यातनं ॲडमिशन मिळणार नाही. कुणा मंत्र्याचा वशीलाही नाही आपल्याकडे. तुझ्या नशीबानं तुझ्याकडे चांगली मोक्याची जागा आहे. वेळेवर ऑफर आलीय तर सोडून नकोस. नशीबवान आहेस.''

''पण आई? तिच्या भावना गुंतल्याहेत ह्या जागेत रे.''

''आता किती दिवस राहिलेत तिचे?''

प्रमोदने दचकून वर पाहिलं तसा भातखंडे वरमला. ''सॉरी, मला तसं नव्हतं म्हणायचं. पण तू मोठी जागा घेतलीस तर तिला स्वतंत्र खोली देऊ शकशील. तिचे उरलेलं आयुष्य आरामात जाईल. बघ विचार करून. पटेल तुला.''

खरं तर प्रमोदला हे आधीच पटलं होतं. फक्त आईला कसं पटवायचं असा प्रश्न होता.

घरी आला तेव्हा आईनं त्याला चहा देता देता सांगितलं, ''हल्ली खाली फार जोरानं आवाज चालतात रे, प्रमोद. दुपारचं दोन घटका शांतपणे पडावं म्हटलं तर काही शक्य होत नाही.''

''खाली म्हणजे?''

''खाली तळमजल्यावर रे. काहीतरी दुरुस्ती चाललीय ना? त्याची सारखी खरखर, घरघर चालू असते. काहीतरी तोडफोडपण चालली आहे. पाडल्याचे आवाज येतात.''

''हो, ते रिनोव्हेशन चाललंय ना त्या ज्युवेलर्सचं? सगळ्या फरशा काढून नवीन बसवत असतील.''

''काही का करेनात. पण जरा आवाज कमी करायला सांग त्यांना. उद्या सोसायटीची मीटिंग आहे ना? शेजारच्या सांगत होत्या. त्यात काढा हा विषय. जरा हळू काम करा म्हणावं, काय?''

''आई, दुरुस्तीचं काम म्हणजे आवाज होणारच आणि आपल्या बरोब्बर खाली आहे म्हणून इथं जास्त जोरात ऐकू येतात.''

''पण केवढ्या जोरानं धाड् धाड् चालली असते. माझं अगदी डोकं उठतं.''

''आपण असं करू या का आई, हे घर सोडून दुसरीकडे घेऊ या. नाहीतरी हे आपल्याला लहान पडतं. शिवाय अगदी मेनरोडवर आहे. रहदारीचे आवाज, फेरीवाले, सारखी गडबड. त्यातून ह्या दुरुस्त्या. यापेक्षा दुसरीकडं रहायला जाऊ.''

प्रमोदची आई अवाकच झाली. इतक्या छोट्या गोष्टीवरून प्रमोद जागाच बदलायला निघेल याची तिला कल्पना नव्हती.

''म्हणजे काय? काल आले होते त्या माणसांना जागा विकणार की काय तू? काही नको जागा सोडायला. एवढा काही मला त्रास होत नाही. आणि काय जी दुरुस्ती करताहेत ती होऊन जाईल महिन्याभरात.''

''ते ठीक आहे ग, पण एकूणच ही शांत जागा नाही. आता तळमजल्यावरची दुरुस्ती झाली तर वरती सुरू होईल.'' प्रमोद तिचा अंदाज घेत म्हणाला. ''ती माणसं काल आली म्हणून नव्हे ग. पण एवीतेवी मी मोठी जागा घ्यायचा विचार करत होतोच. चांगला तीन बेडरूमचा ब्लॉक. तुला स्वतंत्र खोली. त्यात तुला देवघर.''

''काही नको मोठं घर. तुम्हाला पाहिजे असेल तर तुम्ही घ्या आणि रहा. मला म्हातारीला नाही कुठं जायचं.''

''अग, आई तुला सोडून आम्ही कसे कुठं जाऊ?''

''मग नकाच जाऊ. आपण सगळी राहू इथंच.''

स्वैपाकघरातून माधुरी खुणावून आत बोलावत होती. प्रमोदचं तिकडं लक्ष गेलं. तो उठून आत गेला.

''तुमची कमाल आहे,'' माधुरी दबत्या आवाजात म्हणाली. ''हा विषय आत्ता – असा काढायचा? आपण जरा ठरवून व्यवस्थित नसतो का बोललो. झालं आता. आता आई मुळीच हो म्हणणार नाहीत. एकच घोशा धरून बसतील.''

''मला तरी काय कल्पना?'' प्रमोद पडेल चेहेऱ्याने म्हणाला. ''वाटलं विषय निघालाय तर बोलून घेऊ. ती कबूल होईल.''

''डोंबलाचं बोलून घेऊ! आता त्या मुळीच कबूल होणार नाहीत. नीट बेताबेतानं त्या मुद्यावर यायचं. पण तुम्हाला सगळी घाई. बसा आता.'' माधुरी फणकाऱ्यानं म्हणाली.

''वळवू आपण तिचं मन.''

''वाट बघा!'' माधुरीनं नाक उडवलं.

एकमेकांशी अजिबात चर्चा न करता प्रमोद आणि माधुरी दोघंही घर विकायच्या निर्णयापर्यंत येऊन पोचले होते. आईचं मन वळवता आलं तर उत्तमच. पण गरज पडल्यास तिच्या मनाविरुद्धसुद्धा का होईना, जागेची ऑफर स्वीकारायची यावर दोघांचं एकमत झालं. समोर ठाकलेल्या कांचनमृगानं जणू नजरबंदीच केली होती.

पैसे मिळाल्यानंतर काय काय करायचं, काय काय घ्यायचं, कुठे प्रवास करायचा आणि उरलेले पैसे कुठे गुंतवायचे याची चर्चा करत दोघंही बराच वेळ जागी होती. भविष्याची सोनेरी स्वप्ने बघताना रात्र कशी सरली ते त्यांना कळलंच नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यांच्यासमोर राहणारे वाधवानी त्यांच्याकडे आले. सकाळच्या वेळी ऑफिसला जाण्याच्या घाईत कुणी आला की कुणाच्याही कपाळावर आठ्या पडतात.

''येऊ का? जरा बोलायचं होतं,'' ते म्हणाले.

''संध्याकाळी बोलूया. आत्ता गडबड आहे. काही अर्जंट आहे का?'' प्रमोद शर्टाची बटणं लावत लावत म्हणाला.

''हो अर्जंटच आहे. आज रात्री सोसायटीची मीटिंग आहे. त्या आधी काही ठरवावं लागेल आपल्याला.''

''कशाबद्दल?''

''तुमच्याकडे सिद्धीविनायक ज्युवेलर्सचे लोक आले होते ना?''

प्रमोद चपापला. त्यानं स्वैपाकघराच्या दिशेनं पाहिलं. आई आतच असणार. तिला ऐकू जायला नको. ''ठीक आहे. तुमच्या घरी बोलूया, चालेल?''

''चालेल ना. यू आर वेलकम.''

''मी आलोच ग दहापंधरा मिनिटात.'' असं माधुरीला ओरडून सांगून प्रमोद वाधवानींबरोबर त्यांच्या घरी आला.

''बसा. चहा घेणार?''

''नको, मला आधी सांगा, तुम्हाला कोण म्हणालं?''

वाधवानी हसले. म्हणाले, ''काळजी करू नका. मी काही इन्कमटॅक्सवाल्यांना कळवत नाही! मला माहीत आहे कारण ते माझ्याकडेही आले होते.''

प्रमोद दचकला. आपल्याला प्रतिस्पर्धी आहे. तर आपण जागा दिली नाही तर ते वाधवानींची जागा घेतील. हातातोंडाशी आलेला आपला घास ते बळकावतील. फुग्यातली हवा गेल्यासारखा त्याचा चेहेरा पडला.

''घाबरू नका. त्याना माझी जागासुद्धा पाहिजे आहे म्हणून ते माझ्याकडे आले होते. खाली शोरूम आणि वरती सोन्याचांदीच्या दागिन्यांसाठी प्रशस्त हॉल असं करायचंय. शिवाय वर भक्कम तिजोरीवजा खोल्यासुद्धा करायच्यात. त्यासाठी तुमचा आणि माझा ब्लॉक हवाय त्यांना.''

''अस्सं!'' प्रमोदच्या जीवात जीव आला.

''तुम्ही काय सांगितलं?''

''मी प्रथम नाही म्हणूनच म्हटलं. पण तेच म्हणाले नीट विचार करून सांगा.''

''चांगलं केलंत. आपण उत्सुकता दाखवली की ते भाव पाडतात. पैशासंबंधी काही बोलणं झालं?''

''पन्नास देऊ असं म्हणाले. तुम्हाला काय ऑफर केलीय?''

''मलाही तेवढेच सांगितलेत. पण मी त्यांना सांगणार आहे. नवीन घर सगळ्या फर्निचरसकट, इंटर्नल डेकोरेशनसकट, त्यांनी ताब्यात द्यायचं. मगच आम्ही हे घर सोडू.''

''म्हणजे? फक्त घराऐवजी मोठं घर! इतकेच?''

''छे हो, तसं नाही. वर द्यावेच लागतील त्यांना. न देऊन सांगतात कुणाला? पण घर आपण खरेदी करायचं नाही. कारण त्यालासुद्धा पुष्कळ ब्लॅक लागणार. तो पैशाचा व्यवहार आपण करायचा नाही. म्हणजे रिस्क तेवढं कमी.''

''ते बरोबर आहे.'' प्रमोदला त्यांचा मुद्दा पटला. आपण वाधवानींशी बोलतोय ते बरं आहे. आपल्याला ह्या खाचाखोचा माहीत नाहीत. त्यांची मदत होईल. ''पण वरती किती मागायचे?''

''ते तुम्ही घर कुठं घेताय त्यावर अवलंबून आहे. मी बोरीवलीला घेणार आहे. त्याचे पंधरा-वीस होतील फर्निचर धरून. म्हणजे मग वर चाळीस मागेन.'' वाधवानींनी लाळ गिळत सांगितलं.

''बाप रे! एवढे मिळतील?''

''मागून बघायचे. तीस पस्तीस तरी मिळतीलच. आणि सोसायटीचं काय ते त्यांचं त्यांनी बघून घ्यायचं.''

''सोसायटीचे?''

''अर्थात. सोसायटीला द्यावे लागतीलच नियमाप्रमाणे. पण ते व्हाईटमध्ये. ते काय दोनचार असतील ते त्यांनी द्यायचे. वरती सेक्रेटरी आणि अध्यक्षांचे काय असतील ते स्वतंत्र.''

प्रमोदने प्रश्नार्थक मुद्रेनं त्यांच्याकडे बघितलं. मग हळूहळू

त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. दामले तळमजल्यावरची जागा सोडून गेले त्याच्या पुढच्याच महिन्यात सेक्रेटरीच्या घराची रंगरंगोटी झाली होती. बेडरूमला एअरकंडीशनर बसवण्यात आला होता. अध्यक्षांची नवी मारुतीही अगदी अलीकडेच आली होती. ह्या साऱ्याचा अर्थ आता कोठे त्याच्यापर्यंत पोचत होता.

प्रमोदचं लक्ष घड्याळाकडे गेलं. आठ वाजून गेले होते. आज ऑफिसला जायला उशीर होणार. तो दचकून ताडकन उठला आणि मग त्याच्या लक्षात आलं, जे चाललं होतं ते ऑफिसला वेळेवर जाण्यापेक्षा त्याच्या दृष्टीनं फार महत्त्वाचं होतं.

प्रमोद मध्यमवर्गातनं अचानक श्रीमंत वर्गात उचलला गेला होता. ऑफिसची फिकीर त्याला आता राहिली नव्हती. तो पुन्हा आरामात कोचावर बसला.

''आज रात्री सोसायटीची मीटिंग आहे. तुम्ही सहसा येत नाही, मला ठाऊक आहे. पण आज मात्र या. आज थोडी वादावादी होण्याची शक्यता आहे.''

''वादावादी? कशावर?''

''त्याचं काय आहे, ते तळमजल्यावर जे रिनोव्हेशनचं काम चाललंय ना, ते सोसायटीतल्या काहीजणांना पसंत नाही. त्यांचं ऑब्जेक्शन आहे त्यावर.''

''ऑब्जेक्शन कशाबद्दल? आवाज होतो म्हणून?'' प्रमोदला त्याच्या आईची तक्रार आठवली. ''की, धूळ-धुरळा उडतो म्हणून?''

''छे, हो! आवाजाचं काय एवढं? पण काहीजणांचं म्हणणं असं की रिनोव्हेशनमुळे इमारतीला धोका आहे.''

''इमारतीला कसला धोका आलाय रिनोव्हेशनमुळे? काहीतरीच!''

''नाहीतर काय?'' वाधवानी धूर्तपणे हसत म्हणाले, ''खरं सांगू का देशमानेसाहेब? दामल्यांना त्यांच्या जागेचे भरपूर पैसे मिळाले म्हणून काहीजणांच्या पोटात दुखतंय झालं. त्यांचे ब्लॉक्स मागच्या अंगाला असल्यामुळं ते जाण्याची शक्यता कमी. ती खरी खंत आहे त्यांची. म्हणून ते काहीतरी ऑब्जेक्शन्स घेताहेत झालं. बरोबर आहे ना?''

''बरोबर, अगदी बरोबर,'' प्रमोदला पटलं.

''तेव्हा देशमानेसाहेब, तुम्ही आजच्या मीटिंगला याच. आपले सेक्रेटरी, अध्यक्ष, खजिनदार सगळी मंडळी आहेत. पण काहीकाहीजणं नसती कुसपटं काढून वाद करण्यात पटाईत आहेत. त्यांची अर्थात मेजॉरिटी नाहीये. पण त्यांनी काही काड्या घालण्यापूर्वीच त्यांना आवर घातलेला बरा. नाही का?''

''मी ओळखतो अशा लोकांना. दुसऱ्या मजल्यावरचे माणके असणार आणि तिसऱ्या मजल्यावरचे तावडे.'' प्रमोद बोलून गेला.

''अगदी बरोबर ओळखलंत देशमानेसाहेब. यांना दुसऱ्यांचं काही चांगलं झालेलं बघवत नाही.''

खरं तर या दोघांबद्दल प्रमोदचं मत मुळीच वाईट नव्हतं. कुणालाही मदत करण्यात माणके नेहमी पुढं असत. प्रमोदच्या कुटुंबालाही त्यांनी छोटीमोठी मदत केली होती. तावडे तर त्यांच्या भागात सामाजिक कार्यकर्ते म्हणूनच ओळखले जात. ग्राहक पंचायतीचं कामही ते बघत. लोकांच्या छोट्यामोठ्या कामासाठी संबंधितांना भेटणं, वर्तमानपत्रात पत्र लिहिणं अशा गोष्टी ते वयस्कर असूनही उत्साहानं करत. इतकं असून ते कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधलेले नव्हते, म्हणून प्रमोदला त्यांच्याबद्दल खूप आदर वाटे.

पण आज परिस्थिती बदलली होती. काही कारणानं तळमजल्यावरचं सिद्धिविनायक ज्युवेलर्सचं काम बंद पडलं तर मग त्यांना प्रमोदच्या ब्लॉकमध्ये रस राहणार नव्हता. प्रमोद आणि माधुरीने उभारलेले भविष्याबद्दलचे सारे इमले मग हवेतच विरून गेले असते. अगदी दाराशी आलेली संधी वाया गेली असती. ह्या कल्पनेनं प्रमोदचा अगदी चडफडाट झाला.

''मग तुम्ही रात्री येताय ना नक्की?''

''येतो, येतो. नक्की येतो.'' प्रमोद उठला.

''बघा, नाहीतर त्यांना काय, इथं जमलं नाही तर समोरच्या बिल्डिंगमध्ये बोलणी चालली आहेतच त्यांची. तेव्हा —'' खुंटी हलवून बळकट करत वाधवानींनी विचारलं.

''काही काळजी करू नका. मी येईन. आता निघतो मी.''

रात्री सोसायटीच्या मीटिंगमध्ये प्रमोदला पाहून सगळ्यांनाच जरा आश्चर्य वाटलं.

''अरे वा! देशमाने, तुम्ही? या या,'' तावड्यांनी स्वागत केलं.

''बरं झालं तुम्ही आलात ते.'' माणके म्हणाले, ''आज महत्वाच्या विषयांवर बोलायचंय.''

प्रमोद कसनुसा हसला.

सुरुवातीला सोसायटीच्या वॉचमनचा पगार, वाढलेली पाणीपट्टी, अशा सटरफटर विषयांवर थोडं बोलणं झाल्यावर तळमजल्यावरच्या रिनोव्हेशनचा प्रश्न निघाला.

''दामल्यांच्या जागेत सध्या जी तोडफोड चालली आहे, ती थांबवायला हवी. त्याला ऑब्जेक्शन घ्यायला पाहिजे. आपल्या इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं.'' माणकेंनी विषयाला तोंड फोडलं.

''ऑब्जेक्शन कसं घेणार?'' सोसायटीचे सेक्रेटरी म्हणाले.

''सिद्धिविनायक ज्युवेलर्स आता आपल्या सोसायटीचे मेंबर आहेत. त्यांनी रीतसर परवानगी घेऊनच रिनोव्हेशन सुरू केलंय.''

''रिनोव्हेशन? सध्या तिथं जी तोडफोड चाललीय त्याला रिनोव्हेशन म्हणता? चक्क पाडापाडी चाललीय. आतल्या खोलीच्या भिंती उतरवून मोठा हॉल करताहेत ती लोकं. याला काय रिनोव्हेशन म्हणायचं? आणि जमिनीची पातळी खाली करून तळमजला टाईप बांधताहेत. तुम्ही उद्या बघून या.''

''मला कल्पना आहे. पण त्यानं काय असं बिघडणार आहे?

उगाच अतिशयोक्ती करू नका.'' सोसायटीचे अध्यक्ष म्हणाले. त्यांनी म्युनिसिपाल्टीकडून रीतसर प्लॅन पास करून घेतलाय. आपल्याकडे कॉपी आहे त्याची.''

''डोंबलाचा प्लॅन! अहो, म्युनिसिपाल्टीची परवानगी कशी घेतात हे मी तुम्हाला सांगायला हवं का?'' तावडे म्हणाले. ''आपल्या सुरक्षिततेची काळजी आपणच घ्यायला हवी.''

''आतल्या एकदोन भिंती उतरल्या म्हणजे काही बिल्डिंग धोक्यात येत नाही, तावडेसाहेब. बिल्डिंगला आधार कॉलम्सचा असतो, भिंतींचा नाही. शिवाय भिंती पाडताना तिथं योग्य असा सपोर्ट दिला जातोय. आणि आपली बिल्डिंग तशी काही जुनी म्हणता येणार नाही. वीस-पंचवीस वर्षांपूर्वीच बांधलेली आहे. तेव्हा उगाच भलभलत्या कल्पना डोक्यात घेऊ नका.''

''एक्झॅक्टली. तावडेसाहेब उगाच राईचा पर्वत करताहेत,'' सोसायटीचे सेक्रेटरी म्हणाले.

''राईचा पर्वत? मूर्खासारखं बोलू नका. मी स्वतः जाऊन बघून आलो. मधल्या दोन बीम्स पाडून त्यांना हवी तशी जागा बदलून घेताहेत. हे काम रिनोव्हेशन म्हणायचं? उद्याच्या उद्या त्यांना नोटीस देऊन रिनोव्हेशनची परवानगी रद्द करा,'' तावडे रागारागाने म्हणाले.

''शांत व्हा तावडेसाहेब. सोसायटीच्या खजिनदारांनी प्रथमच तोंड उघडलं, सभ्य माणसाच्या घरात शिव्या देऊ नका, प्लीज.''

''शिव्या? शिव्या कुणी दिल्या?''

''तुम्ही आत्ता आपल्या सेक्रेटरींना मूर्ख म्हणालात. सभेत बोलायची ही पद्धत नाही.''

''खड्ड्यात गेली तुमची सभेत बोलायची पद्धत! इथं माणसाच्या जिवावर बेतलंय आणि तुम्ही सभेत बोलायच्या पद्धती काय घेऊन बसलात? दॅट स्काऊंड्रल इज प्लेईंग विथ अवर लाईव्ज. तुम्हाला कळत कसं नाही?''

''तावडेसाहेब, जरा दमानं घ्या. यांना सभेच्या नियमानुसार वागायचंय ना? ठीक आहे. आपण सभेच्या नियमाप्रमाणे जाऊ या,'' माणके म्हणाले. ''सिद्धिविनायकची रिनोव्हेशनची परवानगी रद्द करावी अशी मी सूचना मांडतो. आपण ती मताला टाकूया.''

माणक्यांनी आजूबाजूला नजर फिरवली. हे तीन चोर असं सरळ ऐकणार नाहीत. पण त्यांना सोडून आणखी पाचसहाजण आहोत आम्ही. त्यांचं आज काही चालणार नाही. कदाचित वाधवानी त्यांच्या बाजूला जातील. त्यांचा काही भरवसा देता येत नाही. पण तरीही आमचीच मेजॉरिटी होईल. बरं झालं आज देशमाने सभेला आले, त्यांच्या मनात येऊन गेलं.

''ठीक आहे,'' सेक्रेटरी म्हणाले. ''आपण सूचना मताला टाकूया. माणक्यांच्या सूचनेला फॉर कितीजण आहेत?''

माणके आणि तावडे सोडून आणखी फक्त दोघांनी हात वर केले. वाधवानी सेक्रेटरीला सामील असतील असं माणक्यांना वाटलं होतंच. पण प्रमोदचा हात वर जाईल म्हणून त्यांनी वाट पाहिली. प्रमोदनं त्यांची नजर चुकवली.

''एक-दोन-तीन-चार! चौघंजणं फॉर आहेत. ठीक. सूचनेला विरोध कुणाचा आहे?'' स्वतःचा हात वर करत सेक्रेटरींनी विचारलं.

पाच हात वर झाले.

प्रमोदचा हात वर होता पण मान खाली होती.

''पाच. पाचजणांचा विरोध आहे. तेव्हा माणके तुमची सूचना फेटाळण्यात येत आहे.''

''यू फूल्स –'' तावडे संतापाने ओरडले. ''तुम्ही लोकं स्वतःच्या पायावर धोंडा घालून घेताय. माणके, चला. यांच्या नादाला लागण्यात अर्थ नाही. आपण उद्या कोर्टाकडे जाऊन इंजंक्शन आणूया. चला.''

माणके आणि तावडे तरातरा चालते झाले. मघाशी त्यांना पाठिंबा दिलेल्या दोघांच्या चेहेऱ्यावर संभ्रम दिसत होता. प्रमोद अस्वस्थपणे बसून होता. वाधवानींनी शेजाऱ्याच्या हातावर टाळी दिली. त्यांच्या ओठावर हास्य होते.

''बरं झालं तो म्हातारा गेला ते.'' तावड्यांना उद्देशून मारला गेलेला हा शेरा प्रमोदच्या मनावर चरा उठवून गेला.

मीटिंगमध्ये पुढं काय झालं त्यात प्रमोदला रस राहिला नाही. आपण केलं ते बरोबर की चूक हे त्याचं त्यालाच समजत नव्हतं. माणके म्हणाले ते खरं तर नसेल ना?

घरी आल्यावर मीटिंगमध्ये काय झालं असं माधुरीनं विचारलं. ''उद्या सांगतो'' असं सांगून तो अंथरुणावर पडला.

डोंगरे आणि पांडे येऊन गेले त्याला फक्त अठ्ठेचाळीस तास झाले होते. एवढ्या थोड्या वेळात बरंच काही घडून गेलं होतं. प्रमोदच्या भोवतालचं जग तेच होतं. पण प्रमोद आता दुसऱ्या जगात वावरत होता.

त्याच्या डोळ्यांसमोर त्याला त्याचा सहा खोल्यांचा प्रशस्त ब्लॉक, दाराशी गाडी, हाताशी भरपूर पैसा दिसत होता. सुवर्णमृगाच्या झळाळत्या कांतीचा मोह जबरदस्त होता.

❑

पांडेंकडचा फोन रात्री बारा वाजता वाजला. ते जागेच होते.

''पांडेसाहेब, मै नवरे बोल रहा हूँ.''

''हाँ, बोलो'' पांड्यांचा आवाज जड येत होता. त्यांचा ड्रिंकचा पाचवा राऊंड चालू होता.

''पार्वतीसदन सोसायटीच्या मीटिंगचा रिपोर्ट द्यायला फोन केला साहेब.''

''क्या हुआ?''

''आपल्या रिनोव्हेशनची परवानगी इंजंक्शन करण्यासाठी ठराव आणला होता मीटिंगमध्ये. पण तो पास नाही झाला.''

''बहोत अच्छा! काही पैसे सोडावे लागले?''

''नाही साहेब. आपण दोन दिवसापूर्वी जाऊन देशमाने आणि वाधवानींना कॉन्ट्रॅक्ट केलं होतं ना? त्यांची जागा आपण घेणार आहोत ही हूल पुरेशी होती. आपण जागा घेतली तर

भरपूर पैसे मिळतील आणि काम थांबलं तर पैसे हातचे जातील ह्या कल्पनेनं त्यांनी ठरावाला विरोध केला. प्रत्यक्ष काही द्यावं लागलं नाही.''

''वेरी गुड!''

''पण साहेब – ''

''काय?'' पांडेंनी जांभई दिली.

''मीटिंगला हजर असलेले एकदोघेजण इंजंक्शन आणणार म्हणत होते.''

''त्यांना तसं करता येणार नाही. सोसायटीनंच अर्ज करावा लागतो. सेक्रेटरीची सही असल्याशिवाय कोर्ट अर्ज दाखल करून घेणार नाही.'' त्यांनी थंडपणे सांगितलं.

''तरीपण मला वाटतं साहेब, आपण तिथलं काम जरा स्पीड अप् करावं. म्हणजे काही खटपटी लटपटी करून कुणी इंजंक्शन आणलंच तरी आपलं काम मार्गी लागलेलं असेल.''

''सही है, मी सांगतो आपल्या कान्ट्रॅक्टरला.''

''ओके साहेब, गुडनाईट.''

❑

दुसऱ्या दिवशी प्रमोद घरी आला तेव्हा सात वाजून गेले होते. तळमजल्यावर चाललेल्या कामाचे आवाज येत होते. कॉम्प्रेसरचा धडधडाट, फरशा कापणाऱ्या यंत्राचा चढत जाणारा आवाज, हातोड्यांचे घाव घातल्याचे आवाज आणि कामगारांचा गलका.

''अजूनपर्यंत काम चालूच आहे?'' प्रमोदने आल्याआल्या विचारलं. ''रोज मी येईतो संपलेलं असतं.''

''काही विचारू नकोस बाबा. आज तर अगदी चेव आल्यासारखं काम चालू आहे. दुपारी आपल्यावरचे दोघंतिघं सांगायला गेले तर त्यांच्याशी भांडाभाडी केली त्या लोकांनी,'' प्रमोदची आई म्हणाली.

''वरचे? वरचे कोण?''

''ते रे. आपल्या वर राहणारे माणके. ते सांगायला गेले होते.'' आईनं माहिती पुरवली.

''मग?''

''मग काय? त्यांचं काही ऐकलं नाही कुणी.''

फट् फट् फट् फट् असा कॉम्प्रेसरचा आवाज चढत जाऊन एकदम बंद झाला. मग फस्स्स्स् असा हवा सोडल्याचा आवाज आला. दोन क्षण शांततेत गेले आणि पुन्हा कॉम्प्रेसरचा फडफडाट चालू झाला.

''पाहिलंस?'' प्रमोदची आई म्हणाली. ''हे असं चालू आहे सकाळपासून.''

पाच मिनिटातच प्रमोदचं डोकं उठलं होतं. बिचारी आई दिवसभर हे कसं सहन करत असेल? त्याच्या मनात आलं.

– जाऊ दे. आता फार दिवस नाही सहन करायला लागणार. ठाण्याला घ्यायचा ब्लॉक, रहदारीपासून अगदी दूर घ्यायचा. मग कारपेट एरिया जरा कमी मिळाला तरी चालेल. पण शांतता हवी.

''माधुरी आली?'' कोचावर बसून बूट काढत त्यानं विचारलं.

''आत पडलीय जरा. डोकं दुखतंय म्हणाली. दिवसभर नोकरी आणि घरी स्वैपाकपाणी. अगदी पिट्टा पडतो बापडीचा.''

– तिलाही आता नाही नोकरी करायला लागणार. तिची इच्छाच असेल तर एखादी पार्टटाईम नोकरी बघू दे. जवळपास कुठंतरी.

तो आत गेला. त्याची चाहूल लागून ती उठली. ''अगं, पड पड. उठतेस कशाला?''

''चहा टाकते.''

''काही नको. अपर्णाला सांगतो.'' तिचे खांदे धरून तिला बळेबळे बसवत तो म्हणाला, ''डोकं दुखतंय ना? उन्हात जावं लागलं का कुठं? गोळी घेतलीस ॲस्पिरिनची?''

''घेतली. पण नाही कमी झालं.''

''आता जेवल्यावर आणखी एक घे. तोपर्यंत हे खालचे आवाजही थांबतील.'' तो म्हणाला खरा, पण मनातल्या मनात त्याला जाणवलं की बहुधा दोन पाळ्यात काम सुरू केलं असावं त्यांनी. म्हणजे रात्री अकरापर्यंत थांबायची लक्षणं नाहीत.

''आज पोळ्याबोळ्या करत बसू नको. अपर्णाला खिचडी टाकायला सांगतो आणि पाव आणूया. चालेल?''

''मला खावसं वाटतच नाहीये.''

''असं कसं चालेल? पोटात काही नसल्यानंसुद्धा डोकं चढतं. दूध घेतेस थोडं?''

''नको. आल्याआल्या घेतलं.''

''बरं मग लवकर जेवायलाच करूया. अपर्णा ...'' असं म्हणत तो बाहेरच्या खोलीत आला.

''काय बाबा?''

''आज जेवण तू कर. खिचडी किंवा पिठलंभात चालेल.''

''टाकते. एवढा कार्यक्रम बघते आणि टाकते.''

''आणि अभिजित, समोरून तेवढा पाव घेऊन ये.''

''बाबा, मी अभ्यास करतोय.''

''टीव्ही तर बघतोयस. गॅलरीत तरी बस.''

''गॅलरीत मोठ्यानं आवाज येतो म्हणून आत बसलोय. टीव्ही अपर्णानं लावला.''

''असू दे. पण पाव घेऊन ये लवकर, नाहीतर बेकरी बंद होईल.''

''बाबा, आमचं सबमिशन आहे उद्याला. आधीच वांधे लागलेत. अपर्णाला सांगा ना पाव आणायला.''

''नको राजा, प्रमोदची आई म्हणाली. ''अंधार पडलाय. बेकरीच्या आसपासची वस्ती चांगली नाही. तूच आण, बाळा.''

अभिजित काही बोलला नाही. थोडा वेळ तसाच बसून राहिला. पण धुसपुसत उठता आणि शर्ट घालून बाहेर पडला. जाताना दार दाणकन आपटून बंद केलं.

पाव घेऊन परत येताना वाटेत त्याच्या कॉलेजमधला दीपक भेटला. त्याच्याशी गप्पा मारत उभा राहिला. बोलताना वेळेचं भान राहिले नाही. अचानक त्याच्या लक्षात आलं, घरी आपली वाट बघत असतील.

''चल, जातो रे आता घरी –'' असं म्हणून तो वळला आणि त्याचे डोळे भयानं विस्फारले.

समोरची बिल्डिंग वाळूचा किल्ला कोसळावा तशी खचत होती. आभाळ फाटल्यासारखा प्रचंड आवाज करत एकेक मजला खाली कोसळत होता. धुळीचे लोट उठत होते. दोन क्षणापूर्वी उभ्या असलेल्या त्या पाच मजली इमारतीच्या जागी आता सिमेंटकाँक्रिटचा ढिगारा दिसू लागला.

भोवतालचं सगळं जग थिजून गेल्यासारखं झालं. मातीच्या पुतळ्यासारखा अभिजित तिकडे बघत जागच्या जागी उभा होता. मग एकदम त्याला वास्तवाची जाणीव झाली.

''आई-बाबा...'' असा आक्रोश करत तो पुढे धावला. कुणीतरी त्याला घट्ट पकडून ठेवलं.

''सोडा – सोडा मला. माझे आईबाबा तिथं...'' अभिजितनं त्या पकडीतून सुटायचा प्रयत्न केला आणि क्षणभर धडपड करून तो खाली कोसळला.

❑

पांडेंच्या घरचा फोन वाजला.

''हॅलोऽऽ''

''साहेब, मी नवरे बोलतोय, साहेब पार्वतीसदन बिल्डिंग कोसळली.'' धापा टाकत नवरे सांगत होता.

''क्या बकते हो ?''

''हो साहेब. खरी गोष्ट आहे. आपलं काम चालू होतं ती बिल्डिंग आत्ता दहा मिनिटांपूर्वी कोसळली. मला इस्माईलचा फोन आला. तो समोरच राहतो.''

''बापरे! पक्की खबर आहे ना?'' पांडे धीर एकवटून म्हणाले.

''हाँ जी. पक्की खबर. इस्माईलच्या घरातून बिल्डिंग दिसते. पुरती बिल्डिंग कोसळलीय. आतली सगळी माणसं गाडली गेलीत.''

क्षणभर फोनच्या दुसऱ्या टोकाला शांतता होती.

''साहेब, तुम्हाला धोका आहे. आपलं काय चाललं होतं ते आसपासच्या लोकांना माहीत आहे. प्रकरण अंगाशी येण्याची शक्यता आहे. तुम्ही लगेचच मुंबईबाहेर निघून जा. कुठं जाताय ते कुणाला सांगू नका. मी तिवारीसाहेबांना फोन करून सांगतोय बाहेर जायला.''

''मै –''

''आता बोलण्यात वेळ घालवू नका. तुम्हाला अटक होण्याची शक्यता आहे. घाई करा. मी तुमच्यासाठी अटकपूर्व जामीन मिळतो का ते बघतो''

''हाँ यही ठीक रहेगा.''

''लगेच निघा. मी इथलं सगळं सांभाळतो. काळजी करू नका. महिना पंधरा दिवसांनी सगळं व्यवस्थित होईल. लोकांची स्मरणशक्ती खूप कमी असते!''

''सच है.''

''आपण कुठल्याच कागदपत्रात गुंतलो नव्हतो. बिल्डिंगच्या जागी आता एक सिमेंटकाँक्रिटचा ढिगारा उरलाय. त्यामुळं आपण पाडापाडी केल्याचा पुरावा सापडणं शक्य नाही. चिंता नको.''

''गॉड इज ग्रेट!'' पांडेंच्या जिवात जीव आला.

❑

पार्वतीसदनच्या ह्या शोकांतिकेनं सारी मुंबई हादरली.

वर्तमानपत्रांना हेडलाईन मिळाली. साप्ताहिकांना कव्हरस्टोरी मिळाली. टीव्ही चॅनेल्सना 'ह्यूमन अँगल'वाले विषय मिळाले. पडलेल्या इमारतीचे, त्याखाली दबल्या गेलेल्या माणसांचे फोटो... इस्पितळात हातपाय गमावून विव्हळत पडलेल्या जखमींच्या मुलाखती घेण्यास गर्दी उसळली.

मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब घटनास्थळाला भेट देऊन मदतकार्याची पहाणी केली. जखमींना एक हजार रुपयांची आणि मृताच्या नातेवाईकाना दोन हजार रुपयांची मदत जाहीर केली. ह्या दुर्घटनेमागे जे जबाबदार असतील त्यांची कसून चौकशी केली जाईल, कुणाचीही गय केली जाणार नाही, ह्याची ग्वाही दिली.

पंचवीस वर्षं जुनी इमारत पडतेच कशी? ह्या विषयावर चर्चा झाल्या. वर्तमानपत्रात पत्रे आली.

महिन्याभरात निवडणुका जाहीर झाल्या आणि हा विषय मागे पडला. पार्वतीसदन नावाची एखादी बिल्डिंग होती हे लोक विसरून गेले.

❑

दोन महिन्यांनंतरच्या एका रात्री शंकरनिवासमध्ये राहणाऱ्या उमराणींच्या दारावरची घंटा वाजली.

उमराणी कुटुंब टीव्ही बघत बसलं होत. ''कोण आलंय ह्या अवेळी,'' असं पुटपुटत उमराणींनी दार उघडलं.

बाहेर दोघंजण उभे होते. एकाने सफारी सूट घातला होता. दुसरा पांढऱ्या शुभ्र शर्टपँटमध्ये होता.

''तुमच्याकडे थोडं काम होतं, साहेब. आत येऊ का?'' सफारीसूट घातलेला माणूस अदबीनं उमराणींना विचारत होता.

''तुमच्या ह्या जागेबद्दल बोलायचं होतं...''

*(जुलै १९९६)*

# एक अनुभव : दोन कथा

विजय पाडळकर आणि मधुकर धर्मापुरीकर हे दोघे लेखक नोकरीनिमित्त आपापल्या कुटुंबापासून दूर राहात असतात. एका भेटीत एक अनुभव गप्पांत येतो आणि जाणवते, की यात एक कथाबीज आहे. तोच अनुभव केंद्रस्थानी ठेवून दोघेही आपापल्या कथा लिहितात. त्या दोन जुळ्या कथा आणि त्यांच्या जन्माची आगळी कहाणी.

## प्रास्ताविक

### विजय पाडळकर

आपण जगत असतो.

एक क्षण आपल्यासमोर येतो, आपल्यावरून ओघळून जातो. पानावर पडलेल्या थेंबासारखा. आपण तिथेच, तसेच. पण कधीकधी समोरचा क्षण आपल्या साऱ्या अस्तित्वालाच कवेत घेतो. आपण त्यात विरघळून जातो. असा मनाला सौंदर्याच्या स्पर्शानी प्रकाशित करणारा अनुभव कधी प्रत्यक्षात येतो. कधी कुणा कलावंताच्या जादूमय शब्दांतून येतो. कधी कुणा सुहृदाच्या मनमोकळ्या भेटीतूनही येतो.

काही दिवसांपूर्वी असेच झाले. मधुकर धर्मापुरीकर माझे मित्र. कथेवर मनापासून प्रेम करणारे व स्वत:ही चांगले कथाकार. व्यवसायपरत्वे आम्ही वेगवेगळ्या गावी असलो, तरी जेव्हा भेटतो तेव्हा कथेबद्दल भरभरून बोलतो. पत्रातून एकमेकांना लिहितो ते कथेबद्दलच. बोलण्यात असंख्य संदर्भ असतात. मी वाचलेली एखादी अफलातून कथा, धर्मापुरीकरांच्या मनात असलेली कथाबीज, संपादकांची कथा स्वीकारल्याची वा साभार परतीची पत्रे, आणि या साऱ्यामागे एक धागा असतो – कथा जन्मते कशी, ती फुलते कशी आणि पूर्ण कशी होते याचा शोध घेणे. कथांच्या पायवाटांवरला हा विलक्षण आनंददायी प्रवास मी अनेकदा त्यांच्या सोबतीने केला आहे.

त्या दिवशी गप्पा मारताना सहज धर्मापुरीकरांनी त्यांचा एक अनुभव सांगितला. नोकरीनिमित्त ते गंगाखेडला असतात. पत्नी आणि मुले नांदेडला. दर आठवड्याला ते नांदेडला येतात. एकदा त्यांनी ठरविले की बायकापोरांनाच नोकरीच्या गावी न्यायचे. तिथे एका छोट्या खोलीत त्यांनी संसार थाटलेला. बदल म्हणून सारे त्या सुटीच्या दिवशी गंगाखेडला जमले. परततांना वहिनींनी (सौ. धर्मापुरीकरांनी) सुगृहिणीप्रमाणे नवऱ्याची आठवड्याची तयारी करून ठेवली. खोली स्वच्छ केली. डब्यात पीठ भरून ठेवले. दोन दिवसांनंतर साऱ्यांना धर्मापुरीकरांनी नांदेडला परत पाठविले.

दुसऱ्या दिवशी खोलीवर नेहमीप्रमाणे स्वयंपाक करताना पोळ्या करण्यासाठी डबा उघडला, तेव्हा धर्मापुरीकर पाहातच राहिले. पिठावर बायकोच्या हाताचा स्पष्ट ठसा उमटला होता! धर्मापुरीकर हे सांगत होते व माझ्या नजरेसमोर तो ठसा एकदम एक प्रतीक म्हणून चमकला. मी थरारून गेलो. कुठेतरी खोल माझ्या मनात तो ठसा उमटला. 'डॉ. झिवागो' कादंबरीतील एका प्रसंगाची आठवण झाली. डॉ. झिवागोपासून लारा कायमची दूर गेलेली असते. वियोगाच्या क्षणाच्या त्या आघाताने झिवागो सुन्न होऊन गेला आहे. त्याला काहीच सुचत नाही. घरात येऊन गुदमरल्यासारखा बसून राहतो. सहज चाळा म्हणून तिच्या वस्तू नीटनेटक्या ठेवताना अचानक तिची शिवणकामाची सुई त्याच्या हातात कचकन घुसते. तो विव्हल होऊन रडू लागतो. हे आठवले आणि मी अचानक म्हणालो, 'धर्मापुरीकर, ही तर एक उत्तम कथा आहे.'

ती संध्याकाळ आम्ही केवळ या अनुभवावर बोलत होतो. दुसऱ्या दिवशी आम्ही आपापल्या गावी परतलो. पण मनातला तो ठसा सारखा अस्वस्थ करू लागला. त्या दृष्याशी मी एवढा एकाकार झालो की मला तो माझाच अनुभव वाटू लागला. असे होण्यास आणखी एक कारण होते. मीसुद्धा माझ्या कुटुंबापासून दूर एकटा राहत होतो. माझे घर नांदेडला होते व मी सोलापूरला. एकटेपणाचा, वियोगाचा अनुभव मीही एवढ्याच उत्कटतेने भोगत होतो.

आणि अशाच एका उत्कट क्षणी, दूरदेशी राहून घर आठवतांना मला आतून वाटून गेले की आपणही या थीमवर कथा लिहावी. पहिला विचार असा आला की दुसऱ्याच्या अनुभवावर चांगली कथा लिहिता येईल का? पण खरे तर हा अनुभव केवळ 'दुसऱ्याचा' असा त्यावर शिक्का मारणेही योग्य नव्हते. या अनुभवाशी आता माझे नाते जुळले नव्हते का? आणि म्हणून तो माझाच झाला नव्हता का?

पण कितीही केले तरी ही उसनी घेतलेली कल्पना आहे असे मनाला वाटत होतेच, तसे हे कथाबीजही मनातून जात नव्हते. मग विचार करताना कधीतरी ॲरिस्टॉटलचे वाक्य आठवले : "While telling a tale each man adds something to it and that increases the pleasure." मग पुढला मार्ग स्पष्ट दिसला. किंवा खरेच सांगायचे म्हणजे अस्पष्ट दिसला. कारण दिशा कळली होती, अजून जिथे पोहचायचे तिथे पोहचू

किंवा नाही याची शंका होती. पण त्यासाठी प्रवासाला सुरुवात करणे तर आवश्यक होते.

कथेचा शेवट तर आधी ठरलेलाच होता. हा अनुभव होता कुटुंबापासून दूर राहणाऱ्या पतीचा. पण मी त्याला पत्नीच्या दृष्टिकोनातून दाखवायचे ठरविले. कारण एकमेकांपासून दूर राहण्याचे दुःख दोघांचेही होते. वाट्याला येणारे चारदोन सोनेरी क्षण जगत, आठवत, जीवनातल्या धकाधकीत न हरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या साऱ्यांचीच ती वेदना होती. मी या अनुभवाच्या केंद्रस्थानी त्या गृहिणीला घेतले. पतीच्या गावाला जाऊन नुकतीच ती परत आली आहे. तिच्या मनात अजून त्या सुखद क्षणांची याद ताजी आहे. त्या दिवसातला एकेक प्रसंग तिला आठवतो. तिला वाटते की नवऱ्याचे पत्र यावे. आणि त्याचे पत्र येतेही. तिला जे आठवले तेच तिच्या नवऱ्याने लिहिले होते. मनाच्या तारा जुळल्या असल्या की सारेच जुळते. ह्या पत्राच्या शेवटी तो तिला त्याचा अनुभव लिहून कळवतो. ठश्याचा. जणू तिने दिलेला आनंदाचा ठेवा तो तिला परत करीत असतो. एकमेकांच्या अस्तित्वाचा ठसा दोघांच्याही जीवनावर उमटलेला असतो.

नंतर धर्मापुरीकरांनी त्यांची कथा मला वाचायला दिली. त्यांनी अर्थातच ह्या कथाबीजाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले. ठश्याच्या दर्शनाने त्यांच्या नायकाला आपल्या पत्नीची असंख्य रूपे आठवतात. सहजीवनाचे ते सुंदर, लोभस क्षण त्याच्या मनात पिंगा घालू लागतात. छोट्या छोट्या ठिपक्यांतून रांगोळी उमलावी तसे लहान लहान प्रसंगांतून तिचे चित्र त्याच्या मनात तयार होते. कधी एखादा कटाक्ष, कधी एखादे खट्याळ हसू, एखादी खूप ओळखीची झालेली लकब. प्रत्येक घटनेतला तिचा सहभाग त्याला उत्कटतेने जाणवतो आणि जाणवते की ठसा फक्त पिठावरच उमटलेला नाही. साऱ्या अस्तित्वावरच उमटला आहे.

अशा या दोन कथा. त्यांची शैली, त्यांची रचना यांतील साम्य व भेदाचे आणखी विश्लेषण करता येईल. पण इथे मला तो प्रयत्न करायचा नाही. शेवटी प्रत्येकाचा 'अंदाजे बयां' औरच असतो. एकाच झाडावरली दोन फुले जशी वेगळी असतात, तशा आणि तितक्याच ह्या कथा वेगळ्या आहेत. जणू एकाच ठिकाणावरून निघालेल्या दोन पायवाटा. या वाटांवरून पुढला प्रवास आता वाचकांनी करावयाचा आहे.

# ठसा

## विजय पाडळकर

रेणू शाळेतून आली. त्यावेळी अगदी वैतागून गेली होती. सहामाही परीक्षा होऊन बरेच दिवस झाले तरी अजून पेपर तपासणे झाले नव्हते. पोरांनी सारखा 'मार्क सांगा' असा धोशा लावला होता. कशी कुणास ठाऊक, हेडमास्तरांपर्यंतही भुणभुण पोहोचली होती. आज शाळा सुटल्यावर त्यांनी तिला बोलावून घेतले होते –

''तुमचे पेपर्स अजून तपासून झाले नाहीत म्हणे –''

''हो...''

''का?''

या प्रश्नाला उत्तर होते, पण सरांना ते पटण्यासारखे नव्हते. ती गप्प राहिली.

''मग? केव्हा देता पेपर्स?''

''देते दोन-तीन दिवसांत'' ती कसाबसा प्रसंग निभावून नेण्यासाठी म्हणाली.

शाळेचे काम आजकाल भयंकर वाढले होते. शिवाय नांदेड जिल्हा संपूर्ण साक्षर करण्याची मोहीम निघाली होती ना! कुठलीही अशी सरकारी टूम निघाली की, आधी वेठीला धरले जातात ते शिक्षकच. गावातल्या अशिक्षित बायकांच्या याद्या तयार करायच्या, त्यांना शिकायला पाठवा म्हणून त्यांच्या घरच्यांच्या मनधरण्या करायच्या, रात्री त्यांचे वर्ग घ्यायचे, त्याचे रिपोर्ट तयार करायचे... एक ना दोन!

यातच आठवडा निघून जाई. शनिवारी मात्र रेणूचा पाय गावी ठरत नाही. लग्नाआधीपासून इथे माहेरीच ती नोकरी करते आहे. रमेशच्या सारख्या कुठे कुठे बदल्या व्हायच्या. आता तो गंगाखेडला असतो. रेणूचे सासर नांदेडला. तिथे बंटीला इंग्रजी शाळेत घातलेले. असे तीन ठिकाणी तिघेजण. शनिवारी-रविवारी तिघेही एकत्र नांदेडला जमत. पुन्हा सोमवारी सकाळी दोन दिशांना दोघे पांगत. अशाने पेपर कधी तपासून होणार?

अर्थात हे सरांना सांगून काय फायदा? एकदा तिने पुसटसा केव्हातरी याचा उल्लेख केला होता. तेव्हा हेडमास्तर म्हणाले होते, ''हे सगळे खरे हो. पण फॅमिली प्रॉब्लेम कुणाला नसतात? सगळीकडे पळसाला पाने तीन. आता माझ्याकडे बघा. माझ्या डोक्याला काय कमी ताप आहे? ऑफिसपेक्षा घरचा दुप्पट! पण त्यामुळे कामावर परिणाम व्हायला नको.''

घरी आल्या आल्या कोनाड्यातला पेपरचा गठ्ठा तिला दिसला व तिच्या कपाळावर आठ्या पडल्या. पायातल्या चपला दाराशी काढून ती घरात आली. हातातली पर्स टेबलावर टाकली आणि पदराने वारा घेत ती पलंगावर टेकली. ती आल्याचे आईने खिडकीतून पाहिले होते, ती आतून म्हणाली, ''रेणू, तोंड-हात-पाय धुवून घे, चहा ठेवतेय बघ.''

रेणू उठली. मोरीत जाऊन तिने थंडगार पाणी हातापायांवर ओतून घेतले. खसखसा तोंड धुतले. स्वयंपाकघरात येऊन बसली. तिच्या समोर चहाचा कप ठेवीत आई म्हणाली,

''तुझी दोन पत्रं आलीत बघ.''

''दोन?''

''एक बंटीचं आणि एक जावईबापूंचं''

''कुठे आहेत?''

''तुझ्या बाबांनी मला सांगितलं. बघ बाहेरच्या खोलीत असतील.''

रेणू लगबगीने उठली. बाहेर येऊन तिने टेबलावर पाहिले. तिथे पत्रे नव्हती. पलंगावरही काही नव्हते.

''आईऽऽ 'कुठे ठेवलीत गं बाबांनी?''

''मला तरी काय माहीत.... नाहीतर हे येतीलच देवळातून. त्यांनाच विचार.''

आज गुरुवार. आज बहुतेक रमेशचे पत्र येतेच. पण बंटीचे पत्र म्हणजे विशेष होते. काय असेल बरे पत्रात? ती विचार करू लागली.

तिला गेल्या शनिवारची आठवण झाली. शनिवारी तिचा नांदेडला जाण्याचा प्रोग्रॅम ठरलेला असतो. पण यावेळी बदल म्हणून रमेश म्हणाला होता की सारेजण गंगाखेडलाच या म्हणून. मग शनिवारी ती लवकर नांदेडला गेली होती. तिथून बंटीला घेऊन रमेशकडे गंगाखेडला.

तो एक दिवस आणि दोन रात्रीचा काळ तिच्या नजरेसमोर लख्खपणे उभा राहिला. खरे तर अजून ती बाहेर पडलीच नव्हती.

जाण्यापूर्वी काही ठरविले नव्हते. असे काही ठरविले की हमखास फिसकटते असा तिचा अनुभव होता. बस! तिघांनी मिळून एका नव्या ठिकाणी आनंदात दिवस घालवायचा, एवढेच. रमेशची बदली नुकतीच गंगाखेडला झाली असल्याने ती तेथे प्रथमच जात होती. त्याची खोली, त्याचा पसारा, शेजारी-पाजारी, गाव याबद्दल त्याच्या तोंडून ऐकले होते.

प्रत्यक्ष तिने ज्यावेळी रमेशची खोली पाहिली तेव्हा तिला गंमत वाटली. एका मोठ्या वाड्यातला अनेक खोल्यांपैकी ती एक खोली होती. इटुकली. भिंतीला पलंग उभा करून ठेवला होता; तो टाकला की अर्धी खोली भरून गेली. दुसऱ्या भिंतीत असलेल्या उघड्या कप्प्यात दोन पिठाचे डबे, तिखटमिठाचा गोल डबा, दोन चहा-साखरेचे डबे, एक दोन पातेली, तांब्या-पेला, ताटवाटी असा लहानसा संसार होता. खाली स्टोव्ह ठेवलेला. त्यावर पाणी तापवायचे ॲल्युमिनीयमचे भांडे, शेजारी दीड लिटरचा कुकर, पाण्याची बादली व कळशी. भिंतीवर जुही चावलाचे कॅलेंडर. तिरप्या कोपऱ्यांना जोडणारी एक दोरी बांधून तिच्यावर लटकत टाकलेले कपडे. पलंगाशेजारच्या कपाटात चार पुस्तके आणि पॉकेट रेडिओ.

''कसा काय वाटला आमचा संसार?''

''मी लहान असताना बाबांनी मला पितळेचा खेळ आणून दिला होता छोटा-छोटा. तसाच तुमचा संसार वाटतो,'' तुमचा ह्या शब्दावर जोर देत ती कौतुकाने हसून म्हणाली.

....हा संसार रमेशचा म्हणजे आपलाच की! पण किती नवीन वाटतोय. लग्न झाल्यावर प्रथम सासरी आलेल्या दिवसांची तिला आठवण झाली.

रमेश आणि बंटीच्या गप्पा चालू होत्या.

''बाबा, तुम्हाला आता पोळ्या चांगल्या करता येतात?''

''एकदम बेस्ट! गोल गरगरीत. अगदी तुझ्या आईसारख्या!''

''मी गोल गरगरीत आहे होय?''

''तुझ्यासारख्या म्हणजे तू करतेस त्या पोळ्यांसारख्या!''

''अच्छा अच्छा! बरं, आम्हाला चहा तरी पाजा. लांबून आलोय आम्ही!''

''अवश्य, दूध घेऊन ठेवलंय मी सकाळीच,'' रमेश म्हणाला.

आणि रमेशने स्टोव्ह पेटवायला सुरुवात केली. स्टोव्हशी खटपट करणाऱ्या रमेशकडे पाहून तिचे मन भरून आले. आपण बाई असून सकाळ संध्याकाळ चुलीसमोर बसणे किती कंटाळवाणे वाटते हे तिला ठाऊक होते.

''सरका तुम्ही. मी करते चहा,'' ती म्हणाली.

''नको नको, मी करतो की. तू बैस पाच मिनिटं निवांत.''

''उठा बरं,'' तिने त्याला हात धरून उठविले आणि सारे घरच जणू ताब्यात घेतले...

रात्रीच्या जेवणासाठी रेणूने दशम्या आणल्या होत्या. त्या सगळ्यांनी दुधाबरोबर खाल्ल्या. तिघेजणही कितीतरी दिवसांनी एकाच ताटात जेवायला बसले. तिला रमेशबरोबर जेवायला फार आवडते. कारण पोळ्या कुस्करणे, कालवणे वगैरे सारे तो करतो. तिचे काम फक्त मुटुमुटु घास गिळणे एवढेच राहते. त्याने कुस्करलेल्या पोळीला चवही छान येते. चार घास जास्त जातात. नांदेडला किंवा तिच्या माहेरी अशी संधी मिळत नाही.

जेवणे झाल्यावर भांडी घासण्यासाठी तिने आवराआवर सुरू केली; तेव्हा रमेश म्हणाला, ''राहू दे, सकाळी घासता येईल. झोपू आता.''

त्याच्या आवाजातील उत्कंठा तिला जाणवली. त्याने हातात घेतलेला हात हलकेच सोडवून घेत ती हळूच म्हणाली, ''थांबा थोडं, मी आता आवरते. तोवर बंटीही झोपेल.''

बंटी प्रवासाने पेंगुळला होता. नाहीतर आतापर्यंत त्याची बडबड अखंड चालू राहिली असती. तिने चटचट भांडी विसळून टाकली. बंटीला जवळ घेऊन त्याला थोडेसे थापटले की तो झोपलाही. तिने त्याला नीट निजविले. त्याच्या अंगावर पांघरुण घातले, लाईट बंद कैला व ती रमेशला अधीरपणे सामोरी झाली.

दुसऱ्या दिवशी तिला सकाळीच जाग आली. तिने आजूबाजूला पाहिले. खोलीतली प्रत्येक वस्तू आता खूप जुन्या ओळखीची वाटू लागली होती. तिला वाटले, शेवटी कुठलीही जागा म्हणजे काय असते? आपल्या मनाची अवस्थाच. मन काळजीतून मुक्त असेल, ताजेतवाने असेल आणि सोबतीला आपली प्रिय माणसे असतील तर साऱ्याच गोष्टींना लोलकातून

पाहिल्यासारखे रंगीबेरंगी आवरण लाभते. किरकोळ गोष्टीही आनंद देऊन जातात. किती साध्या साध्या गोष्टींनी आपण सुखावतो. पण त्याही मनजोगत्या मिळत नाहीत. त्यासाठी तरसावे लागते. उद्या परत निघायचे. पुन्हा तोच एकटेपणाचा आठवडा समोर. ह्या विचारांनी क्षणभर तिचे मन खिन्न झाले. पण लगेच हे विचार तिने मनातून झटकून टाकले. आजतरी असा मूड नको.

तेवढ्यात कुणीतरी दार ठोठावले. उघडून पाहिले तर दारात दूधवाली उभी होती. ''काय वैनीबाई, कवा आलाव?''

''काल संध्याकाळी.''

''ऱ्हावा आता चार दिवस. सायबांनी एकटं एकटं किती ऱ्हावं?''

''कसलं राहणं होतंय! नोकरी आहे ना. उद्या सकाळी जावंच लागेल.''

दुपारी घरमालककाकडे जेवायला बोलावले होते. तिथेही तोच विषय. मालकीणबाई जेवताना म्हणाल्या, ''साहेबांनी किती दिवस हाताने करून खायचं? तसा काही सणवार असला, सुट्टी नसली आणि साहेब इथे असले, की मी जेवायला बोलावतेच. पण आपलं घर म्हणजे वेगळंच असतं आणि पुरुषांना एकटं राहवत नाही.''

''त्यांना काय होतंय?'' घरमालक म्हणाले. 'मस्त आठ वाजेपर्यंत झोपतात. मनाला आलं तर स्वैपाक करायचा, नाहीतर हॉटेलात जाऊन जेवायचं! कसलं झंझट नाही. रात्री फर्स्टक्लास गाणी लावत बसतात अकरा-बारापर्यंत.''

''तुम्हाला नाही कळणार. तुम्ही एकटं राहून पहा म्हणजे समजेल.''

''मग तुला कसं कळतं?''

''बायकांच्या लक्षात येतात अशा गोष्टी! वहिनी इथे येऊ द्या. मग रात्री बाराला गाणी कशी सुचतात बघते मी!''

रविवारचा दिवस तर कसा निघून गेला, कळलेच नाही. दुपारी रेणूने स्वच्छता मोहीम सुरू केली. खोली स्वच्छ धुवून काढली. तांबे, पेले चकचकीत घासून ठेवले, कपड्यांच्या घड्या करून ठेवल्या. रमेशने गव्हाचे चुंगडे आणून ठेवलेले तिला दिसले होते.

तिने रमेशला विचारले, ''दळण आणताना गहू निवडून घेता की तसेच?''

''ऊ! कोण निवडीत बसलंय. गव्हाबरोबर थोडे खडे आणि किडे पोटात जातील फार तर!''

तिला ते ठाऊक होतेच. दुपारी तिने गहू निवडून ठेवले. दळण आणून पीठ डब्यात भरले. रमेश सारखा कुरकुर करीत होता.

''बाई, तू एक दिवसासाठी आलीस, जरा निवांत बस की. इथे तरी आराम कर थोडा.''

''या कामाचं काही नाही वाटत हो; तुम्ही एवढं म्हणालात की सगळा शीण निघून जातो.''

''पण तुझ्याकडे पहाता पहाता मलाच थकल्यासारखं व्हायला लागलंय त्याचं काय?''

रमेशची ही कॉमेंट आठवली आणि रेणूला खुद्कन हसू आले. एकमेकांसोबत घालविलेला तो दिवस, परतताना जड झालेली पावले, घशात दाटलेले शब्द, हे सारे तिला आठवले. मन साऱ्या स्मृतींनी ओझावून गेले होते.

तेवढ्यात बाबा बाहेरून आले.

''बाबा, माझी पत्र आली होती ना?''

''ती काय तिथे ठेवलीत. रेडिओखाली.''

''रेडिओखाली होय? मी सगळीकडे शोधली.''

पत्रे घेऊन रेणू गच्चीवर गेली. रमेशचे पत्र आले की ती गच्चीवरच नेऊन वाचते. प्रथम तिने बंटीचे पत्र वाचले. बंटीने पोस्टकार्डवर मोठ्या मोठ्या अक्षरांत लिहिले होते –

*आज आमची परीक्षा झाली. माझा पहिला नंबर आला. आपण बाबांकडे गेलो होतो, तेव्हा बाबांनी मला कविता समजावून सांगितली होती. तीच टीचरनी विचारली. बाबा किती छान कविता म्हणतात. समजावतात. तिथे खूप मजा आली. आपण पुन्हा एकदा जाऊ का तिथे?...*

रमेशचे पत्र नेहमीप्रमाणे लांबलचक होते. पत्र वाचताना तिला फार गंमत वाटली. तिला आता जे जे आठवले होते, तेच नेमके रमेशने लिहिले होते. मनाच्या तारा जुळलेल्या असल्या की सारेच जुळते. पत्राच्या शेवटी रमेशने लिहिले होते,

*...काल सकाळी तू परत गेलीस. मी तुला सोडायला स्टँडवर आलो होतो. तिथून परस्पर ऑफिसला गेलो. संध्याकाळी खोलीवर परतलो. तू आलीस आणि माझ्या खोलीचा कायापालटच होऊन गेला. आजवर ही खोली फक्त माझी होती. आता ती आपल्या दोघांची झाली. खोलीवर फिरलेला तुझा हात मला सर्वत्र दिसू लागला आहे. दोरीवर व्यवस्थित ठेवलेले कपडे, लख्ख घासलेले तांब्या-पेले... तू होतीस तेव्हा तुझ्या असण्याने खोली भरून गेली होती. आज तू इथे नाहीस. परंतु तुझ्या आठवणींनी खोली तितकीच भरून गेली आहे.*

*रात्री स्वयंपाक करण्यासाठी बसलो, स्टोव्ह पेटविला. कपाटातून पिठाचा डबा काढला आणि उघडून पाहतो तर... माझ्या अंगावर सरसरून शहारा आला. डब्यात मावावे म्हणून तू पीठ दाबून बसविले होते. तसे दाबताना तुझ्या हातांचा ठसा त्या पिठावर स्पष्ट उमटला होता. अगदी रेष अन् रेषेसह. मी त्या ठश्याकडे पहातच राहिलो. तो केवळ पिठावरला ठसा नव्हता. माझ्या एकटेपणावर तुझ्या अस्तित्वाचा उमटलेला तो ठसा होता. पीठ काढून तो मोडण्याचे धैर्य मला झाले नाही...*

वाचता वाचता रेणूचे डोळे भरून आले. कातरवेळीच्या संधिप्रकाशात ती मूकपणे बसून राहिली.

*(दिवाळी १९९६)*

# तुझ्यातली... तू

**मधुकर धर्मापुरीकर**

दूरचं दिसत नाही आणि जवळचं दिसतं – हा डोळ्यांचा अनुभव मनाच्या किती उलटा असतो! नाही समजलं? इतक्या जवळचं असून तुला समजत नाही म्हणजे आणखी एक गंमतच. सरळच सांगतो. तुला, पोरांना सोडून मी इथं नोकरीच्या गावाला राहतो. शनिवार, रविवारी तुम्हाला भेटतो. तुझ्या संगतीत राहतो आणि मग इथे येतो आठवड्यासाठी. इथे मग तुझ्या भेटीचे सर्व तपशील लख्ख आठवत रहातात मला. तू इतकी स्पष्ट दिसत असतेस की – की वाटत रहातं, अरे हीच का ती? आणि मग माझा बेचैन करणारा खेळ सुरू होतो.

तुझ्यातली तू कशी असतेस याचा शोध मी इथे नोकरीच्या गावाला आलो, की घेत असतो. का घेत असतो मी हा शोध?.... कदाचित एकटेपणाचा चाळा असेल हा. कधी वाटतं, नाही, हा चाळा नाहीच. इथं एकटेपणात जेव्हा तू आठवतेस, तुझं वागणं-बोलणं आठवत रहातं तेव्हा त्या त्या वागण्या-बोलण्याच्या अनुषंगाने सुचलेले वेगळे प्रश्न, वेगळी उत्तरं मला इथं खेळवीत रहातात. आपण हे तेव्हाच का नाही विचारलं, का नाही सांगितलं, असे हे प्रश्न असतात. तुझ्या बोलण्याचे वेगळे अर्थ मला इथं जाणवत राहतात; तुझ्या वागण्यातले, वावरण्यातले, हसण्यातले, गप्पपणातले त्या त्या वेळी मला न जाणवलेले रंग आता इथे स्पष्ट होतात, गुंतवून टाकतात. ऑफिसचं काम करण्यात गुंतून जावं तसा मी गुंतून जातो.

पण फरक असतो त्यात. तुझ्यातल्या तुला शोधताना, त्यात गुंतल्यावर त्यातून बाहेर पडावसंच वाटत नाही. आणि तू सापडतेस तरी कुठं? काहीतरी धागेदोरे – गोड धागेदोरे सापडतात. हे म्हणजे साखरेच्या गाठीतल्या दोऱ्यासारखे आणि गाठीची पदकं म्हणजे सोमवार ते शनिवार आणि रविवार म्हणजे... *अं! उगी लांबण लावू नका – मुद्दा सांगा!* असंच म्हणतेस ना तू?

पण माझ्या गप्पा तुला ऐकाव्याशा वाटतात. त्यातला मध तू गोळा करीत असतेस. मला माहीत आहे आणि मी घोंगावणाऱ्या माशी (राजा माशी?) सारखा बोलतच राहतो, बोलतच रहातो...

– आणि मग इथं आलं की शोधतच रहातो.

तुझ्याबद्दलच्या समजुतींचे हे गोड धागेदोरे घेऊन मी शनिवारी संध्याकाळी गाठतो तुला. भलताच अवखळ होतो. काहीच सुचत नाही. तू फक्त हसतेस आणि मी धिंगाणा घालतो पोरांबरोबर. फुगडी खेळू का तुझ्याबरोबर, हे विचारून एकदा बोलणं खाल्लं होतं. पोरं हसत होती. बाबांच्या वेडेपणाला! हेच, हेच मला शोधायचं असतं. चांगलं हसता बोलता तू एकदम डोळे वटारून मला बोलतेस... सोबत आणलेले ते गोड धागेदोरे केव्हाच निसटलेले असतात.....

मी गप्प बसलो की तू हळूच जवळ येतेस. कधी म्हणतेस, ''एलआयसीच्या हप्त्याची नोटीस आलीय, ड्यू लागेल.''

ती नोटीस तू हातात अशा तऱ्हेने धरतेस, अन् अशा मजेदार गंभीर चेहऱ्याने तू म्हणत असतेस की वाटतं – ड्यू लागला तरी हरकत नाही – तू असंच ती नोटीस धरून, असंच सांगत रहावं...

काटकसर हा तर फार मजेदार खेळ आहे आपला. मला तू नेहमीच बाद करतेस आणि या विषयावर तुझं बोलणं मला खावं वाटतं! हे म्हणजे भिडूनं सफाईनं दूर पळण्याऐवजी सूर मारून उलट जवळ येणं; नाही का? पण तुझ्या त्या काटकसरी चेहऱ्यात मी हरवतो. अरे ही कोण?

परवा तू मोत्यांच्या बांगड्या, ती घोळदार साडी, तो गजरा घालून एकदम समोर आलीस. मी दाढी करीत होतो. पहातच राहिलो.

''जोशींच्या इथे लग्न आहे, नऊ तीसला'' एवढं म्हणून हसून आणि पायात चप्पल सारून गेलीससुद्धा. ते हसणं... ते हसणं अशाच प्रसंगात मला सापडतं. पुन्हा गुंतलो. गालावरचा साबण वाळला. पण ते हसणं – असं कसं हसतेस गं तू? ते हसणं तुझंच असतं का? – की ती हसणारी दुसरी कोण? आणि तुझ्या ठेंगण्या उंचीत, ठेवणीतल्या साडीत तू किती लहान दिसतेस – माझ्या एकदम अर्ध्या वयाची! आजच्या पिढीतल्या पोरी ठेंगण्याच का? हा माझा विषय आहे संशोधनाचा – तू म्हणतेस आगाऊपणाचा!

– आणि रडणंसुद्धा. त्या शनिवारी संध्याकाळी आलो, तर चप्पलसुद्धा काढू दिली नाहीस. ''चला बरं डॉक्टरकडे, अंगठ्याचा फोड ठसठसतोय हो सकाळपासून'' – म्हणालीस. माझी वाट पहात होतीस. साडी बदलून तयार होऊन. मी निघालो. तुझ्याबरोबर निघायला मला खुषी झाली होती. विशेष म्हणजे तू ''रेडिमेड'' तयार होतीस नं म्हणून. नाहीतर एरवी तुझं ते तयार होणं आणि माझी ती तणावपूर्ण शांतता!

''तुम्हाला थट्टा सुचते, इथं मला किती त्रास होतो!''

तुझ्या डोळ्यांतली वेदना पाहिली आणि कधी कधी थट्टा केल्याबद्दल वाईट वाटतं नं तसं वाटलं. ती वेदना, तो चेहरापण नवा होता मला. मी गप्प राहून शोधू लागलो.

डॉक्टरने त्या पिकलेल्या अंगठ्याला हात लावला मात्र – चटका बसल्यासारखा तू हात मागे घेतलास. अगदी हळूवार वागणं, बोलणं झालं तुझं. मी पहात होतो – आणि डॉक्टरनं ड्रेसिंगला सुरुवात केली, की तुझ्या तोंडून वेदनेने बाहेर आलेले ते शब्द, ते विव्हळणं! नेहमीच्या शुद्ध भाषेतले स्पष्ट शब्द नव्हतेच ते. ''आईऽऽ नको होऽऽ हळू – डॉक्टर दुखतंय हो फार'' आणि त्या शब्दांना कंप, रडवेला आवाज, असंबद्ध. मी पहात होतो. छान फुलाफुलांची पांढरी गुलाबी साडी, गोरा चेहरा, कुंकवाची टिकली

आणि असंबद्ध शब्द. आवाज...

ते शब्द म्हणजे एक प्रकारचा ''पस्'' होता.

माझ्या अशा बोलण्यावर तू रागात पाहिलंस माझ्याकडे. पण त्या रागातल्या डोळ्यात पाणी होतं. मी तुझा हात हातात घेतला. त्या अंगठ्याला डॉक्टरने पांढरीशुभ्र साडी नेसविली होती. रक्ताच्या कुंकवाचा ठिपका दिसत होता. हे सांगितलं तर त्याच पाणीदार डोळ्यानं पुन्हा रागात पाहिलंस.

मग त्या आठवड्यात सोमवार ते शनिवार तुझं ते पहाणं आठवत राहिलो. असं कसं असतं? आं? रागात पहाणं अन् पाणीभरल्या डोळ्यानं? छे! त्यातून काय सांगायचं असतं? अन् मग सांगत का नाहीस? किती बेचैन होतो मग मी.

''पुढल्या जन्मी तुम्ही बायकांचा जन्म घ्या. बायकांच्या जन्माला गेल्यावर कळेल तुम्हाला, काय दुःख असतं ते – नुसतं हसायला काय होतं?'' हे तुझं आवडतं मत नेहमी ऐकून होतो.

एकदा म्हणालो होतो – ''पुढल्या जन्मी बाई व्हायला हरकत नाही माझी; पण माझ्या सवयीमुळे माझी फार गैरसोय होईल त्यावेळी.''

''कोणती?''

मी म्हणालो, ''अगं बसच्या प्रवासात प्रत्येक स्टॉपवर उतरून मला...''

रस्त्यावरून गप्पा मारीत आपण जात होतो म्हणून. घरी असतो तर असा कर्रऽऽकन चिमटा घेतला असतास तू मला! पण त्यानंतर तू मला स्त्री जन्म देण्याच्या भानगडीत पडली नाहीस कधी – आणि त्या विनोदावर मी किती वेळा हसलो होतो, अजूनही हसतो. तू फक्त पहिल्या वेळेसच गमतीदार चेहरा केलास अन् नंतर प्रत्येक वेळेस माझं हे बोलणं ऐकताना घरात कोणी नाही ना – असा चेहरा करून पहातेस. का? रागावत पण नाहीस. का? ...अशा वेळेस मला कॉलेजचे वात्रट दिवस आठवतात.

माझ्या थट्टेखोर स्वभावामुळे माझा एक फायदा होतो. तू खळखळून हसताना तुझ्याकडे पाहात रहाण्याची माझी इच्छा असते, ती पूर्ण होते.

आणि याच स्वभावामुळे नुकसान, हो, मोठंच नुकसान होतं. माझ्या गंभीर बोलण्या-वागण्याकडे तू संशयाने पहातेस! कित्येकदा हसण्याच्या कडेवर येऊन तू माझ्याकडे असं पहातेस की, आता क्षणात हसण्याचा प्रवाह होणार. पण थांबतेस. माझं बोलणं तुला संशयास्पद वाटतं.

त्या उलट माझी थट्टा करायच्या ऐवजी माझ्याशी कितीतरी वेळ मनातलं सांगत रहायची, कुठंतरी नजर ठेऊन आवेगाने बोलत रहायची तुझी सवय! गंमत आहे की नाही!

...म्हणून तर हे जे तुला सांगत आहे, विचारीत आहे ते तुझ्याशिवाय, पत्राशिवाय...तू माझं कुठं ऐकतेस? मी तर पाहिजे आणि मला पाहिजे ते बोलणं मात्र नको – असं तू का वागतेस?... मग माझ्या मनाचं वासरू होतं...

– पण खरं सांगू? तुझ्या सोबत असताना, मी खेळत असतो. अन् तुला सोडून इथे आल्यावर मी अभ्यास करीत असतो तुझा. हो, अभ्यास. तुझ्या बोलण्यातले काही शब्द मला गमतीदार वाटतात! अभ्यास, दुःख, जीवन, मर्यादा, ध्येय आणि ते तुझं वाक्य – ''माणसानं कसं स्पष्ट असावं!''

म्हणजे काय? हे वाक्य तर मला माझ्या बायकोचं वाटत नाही.

सोमवार ते शुक्रवार – तू माझ्याजवळ असतेस आणि शनिवार-रविवार – मी तुझ्याजवळ! इथे पाच सहा दिवस गाणी ऐकण्यात, वाचण्यात रमतो आणि परत तुला त्यात शोधत रहातो – अगदी तू जसं मॅचिंग ब्लाऊज पीस शोधतेस तसं!

परवा एक उर्दू कविता वाचली अन् त्याच शब्दांत तुला आठवत राहिलो...

...मैं जब सोता हूँ थककर
तुम सरहाने बैठ जाती हो
मेरी हमजाद हो शायद
तुम्हे क्या नाम दूँ आखिर ।

हमजाद म्हणजे सांगू काय ते? माणसाच्या जन्मापासून त्याची सोबत करणारा देवदूत!

माझ्या शब्दांचा पाऊस, पोर झोपली की थांबतो. मग तुझं बोलणं सुरू होतं. एखाद्या विषयावर अगदी मनापासून आवेगाने. यात मात्र मी फक्त श्रोता व्हावं असं अपेक्षित असतं आणि तेच मला आवडतं. शब्दांच्या शक्तीनुसार बदलणारे तुझे भाव, तो चेहरा...

मग वाटतं, बोलतानाची तू माझी, की न बोलतानाची... खरं खोटं, चांगल वाईट, आपलं परकं या शब्दांत मला नाही बोलायचं गं! माणूस सगळाच आपला असतो हे पण मला माहीत आहेच. पण बोलणं आणि न बोलणं यात फरक असेल की मग? गप्पपणाचा तुझा रंग कोणता? गोरापान की सावळा? तू बोलत असतेस माझ्याशीच. मला कळतं, तुला काय सांगायचंय, काय बोलायचंय माझ्याशी ते...पण तू जेव्हा काम करताना गप्प असतेस, तेव्हा कशी असतेस? कोणत्या रंगाची? – ''आता काम करताना काय बोलावं माणसानं! काऽऽही म्हणता बुवा तुम्ही!'' तू चिडतेस.

खरंच, मला स्पष्ट नाही सांगता येणार. पण बोलत असतानाची तू आणि न बोलणारी तू यात मी बऱ्याच वेळा हरवलो आहे. पाण्यात उतरून हाताने मासळी पकडण्याचा हा खेळ मी खेळत असतो.

माझ्या गप्पात तर कधी तुला एवढं हसताना पाहिलं आहे, की अगदी अंगावर रेलून पुरे पुरे म्हणतेस. सकाळी गावाला निघतानासुद्धा ते हसू विझलेलं नसतं. मग मी मस्तीत काढतो तो आठवडा!

तुझ्या लहानपणच्या आठवणी सांगताना तुझा चेहरा आणखी वेगळा होतो. पोरांसोबत मी पण हनुवटीखाली मनगट घेऊन ऐकत असतो. खोपा करायचा तुझा अतिशय आवडता खेळ होता. मी

म्हणालो होतो, मी दौऱ्यावर असताना तू माझा खोपा सांभाळीत असतेस की नाही? तू पटकन म्हणालीस, ''काऽऽही नाटकी बोलत जाऊ नका!''

हो आणि कितीदा तरी म्हणालीस, ''तुम्ही थट्टेत बोलता की सिरीयस असतं हे कळतंच नाही...''

मला तरी कुठं कळतं?

नोकरीच्या गावाला हातानं करून खायचा माझा निर्णय सांगितल्यावर केवढी खुश झालीस तू!

''हॉटेलचं खातच जाऊ नका. प्रकृती बिघडते. मी तुम्हाला शिकविते, काळजी करू नका.''

आणि पोळ्यांचा ''क्लास'' घेतलास. बोलत होतीस. पोळ्या करून दाखवीत होतीस – मी फक्त तुझ्याकडे पहात असल्याचे कळल्यावर मग मात्र कर्रऽऽकन् चिमटा घेतलास, तश्श्या हाताने!

मी शिकलो. छान शिकलो. स्वैपाक करताना तुझी हालचाल आठवायचा नवा छंद लागला. तुझा तो अभिनय, ती हालचाल, ते पटकन् कपड्याला हात पुसणं, तांदूळ निवडण्याची तुझी ती पद्धत, अशा कितीतरी लकबी नवीनच कळल्या मला! आतापर्यंत कसा काय गाफिल राहिलो होतो मी!

शनिवारी संध्याकाळी घर गाठलं, की माझा धिंगाणा सुरू होतो पोरांबरोबर. तू पण वाट पहात असतेस. हलकं हसून मस्त चहा करून आणतेस. माझा पाऊस सुरूच असते – शब्दांचा, मुसळधार. तू हसतेस, बोलतेस. माझं तर लक्षच नसतं तुझ्याकडे तेवढं. फक्त गप्पा, बोलणं, हसणं....

अन् त्या दिवशी पोरं झोपल्यावर मला सांगत होतीस एका आवेगाने – तुझ्या आईच्या प्रकृतीचा वृत्तांत. आईची प्रकृती फारच बिघडली होती. इथे येऊन तुझ्या अण्णांनी डॉक्टरकडे दाखवलं होतं. पोटाचं दुखणं. ''आईच्या वेदना पाहवत नाहीत होऽऽ कालपासून मला सारखी आईच दिसते समोर.''

त्याच दिवशी दुपारी तुझी आई गेली होती परत कहाळ्याला – तुझ्या माहेरी! ऐकून मी अवाक् झालो होतो. घरात पाऊल पडल्यापासून मी जे जे बोललो होतो, हसलो होतो ते पुन्हा पुन्हा आठवून पाहिलं. तुझा चेहरा आठवला... हसला. मला अपराध्यासारखं वाटलं होतं. ''मग मला आल्या आल्याच का सांगितलं नाहीस?''

''तुम्ही आधीच त्रासून गेलेले असता.. किती दगदग तुमची – त्यात आल्या आल्या कसं सांगावं?'' पोरं गाढ झोपली होती. तू किती प्रौढ वाटत होतीस. विचारी डोळे.. त्यात काळजी, तो चेहरा – ते वागणंचा अनोळखी होतं मला. क्वचित दिसणारं.

इथे गावाला आलो आणि माझ्यावरच चिडलो. घरची काय स्थिती आहे, घरच्यांच्या अडचणी काही आहेत का, याची आधी चौकशी करायची सोडून काय खिदळत असतो आपण मूर्खासारखं! त्याच्या उलट मनातील वेदना, तापलेलं दूध झाकावं, तशी झाकून तू माझं स्वागत करतेस! विचारपूस करतेस, हसतेस, कौतुक करतेस! हे कसं काय? वेदना लपवून हसताना तुला काय वाटत असेल, कधी सांगितले नाहीस. का?

तुझी आई उपचाराकरिता महिनाभर राहिली. त्यावेळेस तर तिचं सगळं करून तू पोरांचं, माझं, घरचं – ही सगळी कामं तर नेहमीपेक्षा तातडीने केलीस.

परत विचारलंस सुद्धा. हळवेपणाने, ''आईमुळे तुमची, पोरांची आबाळ झाली का हो माझ्याकडून?''

मला काय वाटलं म्हणून सांगू! त्या आठवड्यात ते तुझं वाक्य किती घर करून होतं मनात! असं का वाटलं तुला? असं बोललीसच कसं तू? का?

उपचारानंतर आई गावाला गेली आणि त्या शनिवारी रात्री तू रडतच उठलीस. मध्यरात्रीनंतर... रडतच म्हणत होतीस... ''मला नं, वाईट्ट स्वप्न पडलं... आई गेल्याचं.''

रात्रीचा तो सन्नाटा... वॉचमनच्या शिट्ट्या, कुत्र्याचं ओरडणं.. मी तुला थोपटलं, समजूत घातली. तू झोपलीस. पुन्हा उठलीस, म्हणालीस ''मला नं, मला एक शीर्षक सुचलंय.''

''कशाचं?''

''गोष्टीचं! मला एक गोष्टच सुचलीय.''

माझ्या लिखाणाच्या चर्चेचा तुझ्यावर झालेला हा परिणाम!

''कोणतं?''

''उतराई,'' तू म्हणालीस.

''आई इथे महिनाभर होती नं, तिचं मीच केलं सगळं. आई-अण्णांना वाईट वाटत असेल... त्यांनी मला साडी घेऊन दिली...''

मी म्हणालो, ''काही घेऊन देणं आवश्यकच असतं का? पुष्कळदा तुझ्याबद्दल ते किती कौतुकाने बोलतात! तेवढंच...''

''हो,'' तू म्हणालीस. अन् चटकन् झोपूनपण गेलीस. इतक्या सहज... असं कसं?

आणि आता माझं बोलणं, माझी थट्टा कमी झाली आहे. माझं हे वागणं माझ्या प्रकृतीशी जसं विसंगत, तसंच तुझी प्रकृती आताची...

ऑपरेशन झाल्यानंतरची तू म्हणजे पंख काढून टाकलेली पक्षिणीच की नाही? अं? डॉक्टर म्हणतात, डिलीव्हरीनंतर केलेलं ऑपरेशन सोपं असतं; पण आता अशा ''ऑड'' वेळच्या ऑपरेशनमध्ये वीकनेस येणारच. दोनतीन महिने लागतील.

पण, हे दोनतीन महिने जावेत केव्हा गं? ती लगबग, हालचाल, ते हसणं विरघळून गेलेलं... सुकलेलं; आणि आता तुझं ते सगळं संथ, सावकाश वागणं-बोलणं पाहिलं की....

...मग करमत नाही नोकरीच्या गावाला.

संसाराची आणि संसारासाठी केल्या जाणाऱ्या धडपडीची ही अशी कशी विचित्र गाठ पडली आहे आपल्या नशिबात...

माझी थट्टा उफाळून येतेच कधी. त्या वेळेस तुझं ते हसणं... हलक्या आवाजात हसणं... हलकेच पोटावर हात घेणं... मग मी आवरतो.

''अहो, मी ही अशी आणि अशा अवस्थेत तुम्ही मला हसवता! माझ्या प्रकृतीची काळजी कशी नाही तुम्हाला? अं?''

– असं तू मला विचारीत नाहीस? रागावत का नाहीस खरंखरं? असं कसं तुझं वागणं आणि अशी कशीएस तू..?

माणूस दूर असलं, की किती हळवं होतं याची जाणीव तुझ्या नजरेत दिसते मला आणि दूर असलेलं माणूस आजारी असलं तर.. आता पहा नं काय झालं ते. तुझ्या ऑपरेशनपूर्वी तू कशी होतीस ते सारखं आठवतं मला आणि ते दोन दिवस...

त्या दोन दिवसांची आपली गॅदरिंग! पोरांसहित तू इथं आली होतीस, माझ्या गावाला! माझ्या एकुलत्या एका खोलीत! पोरं किती खुश होती! सकाळी खोलीसमोर दूधवाली कशी ओरडते, नळ कसा खाकरतो, दहीवाला कसा आवाज देतो, भाजीवाली कशी ओरडते यांचं मी आधीच ॲक्टिंग केलं होतं. पोरं ते पडताळून पहात होती, हसत होती. खिदळत होती. तू माझ्या लहानग्या संसारात भातुकली खेळत होतीस. मी लक्षपूर्वक पहात होतो. तुझी सहजता. स्नान झाल्यावर तुझं ते देवापुढे हात जोडणं. हळदी कुंकवाची हलकी टिकली लावणं. हे एवढं कसं जमतं तुला इतक्या सहज? पोरांबरोबर हसत खेळताना, माझ्याशी मस्त गप्पा मारताना... मला असंच वाटत रहातं, की तुझ्यात आणखी एक तू आहेस. की मला वाटतं, तो भास आहे...?

संध्याकाळी नांदेडला परत निघताना तुझी ती लगबग... मला दिलेल्या सूचना... ''लोणचं त्या बाटलीत आहे, ते मेतकूटपण आणलं आहे, पीठ आठ दिवस पुरेल. रोज सकाळी लाडू खात जा...'' आणि लाडूचा रिकामा डबा उघडून त्यात एक लाडू घातलास, सोबत घेतलास – का? ''आईचा डबा आहे हा. तिला पाठवून देते...'' किती सहज... असं कसं?

तुम्हाला नांदेडला सोडून सोमवारी इथे आलो, ते सरळ ऑफिसला गेलो. स्वयंपाकाचा कंटाळा आला होता. बाहेरच जेऊन खोलीवर रात्री आलो. दार उघडून लाईट लावला. अन् भक्क उजेडात सगळं आठवलं. दोन दिवसांचा पोरांचा धिंगाणा... तुझा वावर, टापटीप...

पंख्याच्या आवाजाची संगत घेऊन झोपलो.

सकाळी दूधवालीनं विचारलं, ''ग्येला का सगळा बाजार?''

स्नान करून आरशात पाहिलं, तर कोपऱ्यात तुझी टिकली चिकटलेली!

पोळ्या करायला बसलो. पिठाचा डबा उघडला. पाहिलं –

डब्यात पीठ चोपून बसविलेलं होतं. पिठावर तुझं दोनही हात उमटले होते. हातांच्या रेषांसहित...

मला सांग, तू इथे दोन दिवस होतीस, माझ्या या खोलीत वावरलीस. मी पहात होतो. लक्ष होतंच. माझं तुझ्या सगळ्या हालचालीकडं – मग हे उसे उमटवताना मला तू दिसली नाहीस? का? की माझ्या पिठावर तुझे हात तुझ्याशिवाय उमटले होते?

त्या दिवशी बघ, मी स्वैपाक केलाच नाही. करावासा वाटला नाही मला!

मला न सांगता सवरता तुझे हात कसे फिरतात माझ्यावरून?

*(दिवाळी १९९६)*



# भरपाई

## सदानंद देशमुख

ग्रामीण भागात राहणाऱ्या एका साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखकाच्या प्रतिभेचा प्रारंभीच्या काळातील रसरशीत कथाविष्कार. एका सामान्य गरीब शेतकऱ्याची खोटी बियाणे विकणाऱ्या व्यापाऱ्याकडून होणारी फसवणूक आणि त्या अन्यायामुळे पेटून उठलेल्या त्या शेतकऱ्याची स्वाभाविक संतप्त प्रतिक्रिया मुखर करणारा.

डोळ्यातली झोप पार उडून गेली होती. मध्यरात्र झाली होती. सारं गाव काळोखाच्या विळख्यात सुस्तावलं होतं. पावसाळी वातावरण. बाहेर आभाळ गच्च मेघांनी भरून आलं होतं. पण पाऊस काही कोसळत नव्हता. त्याच्यानं एक गडदपण दाटून आलं होतं. आवळून धरल्यासारखं वाटत होतं.

शेजारच्या घरातला सत्तर वर्षांचा म्हातारा मधूनच खोकायचा. खोकायचा आणि मधूनच एक भेसूर आवाज काढायचा. तो पितळी परातीवर खिळा घासावा, तसा काळोखाला, शांत वातावरणाला ओरखडा घेतल्यासारखा वाटायचा आणि उदास उदास करायचा.

अशा या मध्यरात्रीच्या थरकापी माहोलात विठोबा गवारे कसमसत होता. गोधडीवर नुस्तानुस्ता घोळत पडला होता. अर्धवट जळून तळमळणाऱ्या माणसासारखा झाला होता.

मोड करायची वाट पाहणारं हायब्रीडचं शेत आठवत होतं. सारखं-सारखं डोळ्यापुढं येत होतं. आणि त्याच्या मनाची आग फुंकणीने चूल फुंकल्यासारखी आतल्या आत भडकत होती. मोड...मोड...मोड...कष्टानं पेरल्या हायब्रीडच्या शेताची मोड. कर्ज काढून खत आणलं...महागडं बियाणं पेरलं. आशा केली...आवंदाच्या साली भरपूर, महामूर ज्वारी घ्यायची. पण तिचा सगळा चिंधीचोळा झाला.

...या बळीराजा कृषीसेवा केंद्रवाल्या सुभाष झोऱ्यानं त्यो केला... साल्याचं कडकन नल्डं फोडाय पाह्यजे... वाघानं शिकारीचं फोडल्यावाणी... खतम करून टाकाय पाह्यजे हरामखोराले... पण त्याले खतम करून टाकावं, त मंग माघारी आपल्या बायकोचं कसं व्हावं? पोरायचं कसं व्हावं? आपून बसू जेलात जाऊन...अन् लहान लहान पोरंसोरं फिरतान याच्या त्याच्या दारोदार...साला हा संसार म्हणजे निरानाम पायखुटी हाये आपली. पायखुटी घातल्या ढोराले गंजगंज इकडी तिकडी पळावं वाटते. पण साधत नाई. तशीच आपलीबी गत...

डोळ्यातली झोप खोबाल्या झाली. मनात भरून आल्या आभाळासारखी चिंता दाटाळून आली होती. आणि टकटक डोळ्यांनी भुईला पाठ देऊन तो टिनाच्या नळ्या पाहात होता. नळ्या सगळ्या धुराने धुरकटून काळ्याभोर झाल्या होत्या. झिरो लाइटाच्या उजेडात विचित्र तळमळल्यासारख्या भासत होत्या...

...साला आपलाबी जलम ह्या काळवंडल्या टिनावाणीच झाला, काई खरं नाई राह्यलं. घरात रोज चूल पेटती. धुपट कोंडल्या घरात गुरमळते अन् टिनावर जाऊन झोंबते. तिथंच टिनावर त्याचं किटण तयार होते. तसंच आपल्या मनाचंबी. मनात चूल पेटते. चिंतेचं, उदासीचं धुपट आतल्या आत किटण व्हते. अन् उदासीचा गंज मनावर चढते. या गंजानंच आपला जलम काळवंडून चाल्ला...सम्दा जुना-जुनाट झाला.

कानावर एक डास गुंऽगुंगऽऽ कराय लागला तसा त्याने तळहाताचा फटकारा मारला. पण त्याच्याच गालफडावर थापड झोंबली. कासावीस झाला. लगेच खालच्या उघड्या पोटरीवर दोन डास कचाकच चावले. पुन्हा जोर खाऊन तिथं थापड्या मारल्या...झोंबल्या. मनातल्या मनात कातावून गेला.

...साली ही मच्छराची जात म्हंजी महान हरामी जात. झोंबून डसल्यावर अंगाची आग व्हती तवाच समजते की मच्छर डसला. नाईत मंग कानाशी गुंऽगुंगऽऽ आवाज व्हते, तवाच समजते की कानाशी मच्छर आला. कानावर हाणाय जावावं; त पळून दुसरीकडं डसतात. डसल्या जागेवर माराय जावावं तं भिडून तिसऱ्याच जागी डसतात. या पावसाळ्याच्या तोंडीत हरामी लय लय जेरीस आणतात.

पुन्हांदा कानाशी मच्छर गाणं म्हणायला लागले. तसा तो उठूनच बसला. उभा झाला. बटण दाबून मोठा लाइट लावला. पलीकडे भिंतीशेजारी बायको झोपली होती. तिचा एक हात मळक्या चादरीतून बाहेर आला होता. अन् त्या उघड्या हातावर तारांवर पाखरं बसावीत तसे ओळीत डास बसले होते. मासात सोंडी खूपसून रक्त ओढायचं काम करीत होते. ते पाहून विठोबा गवारे कासावीस झाला. बायकोच्या हातावरचे डास पाहून त्याचा जीव कासावीस झाला. डास उठवून लावायला त्याने तिच्या हातावर चटाचटा चापटा मारल्या तर रक्तानं फुगून गेलेले डास पोटातून फुटले. अन् त्याच्या तळहातावर सगळं रक्त लागलं. हात लालभडक झाला. बायकोची झोपमोड झाली अन् ती दचकून उठली. जवळ त्याला बसलेलं पाहून संतापली.

''झोपू द्यानं मुकाट्यानं. कावून तरास देता रातचे बेराच्चे? दिवसभर काम करू करू माहं मढं जाते. जीव कसा टणकून जाते...तुमी कावून खेव देता? झोपमोडी करता?''

असं म्हणून तिने पुन्हांदा भुईला पाठ दिली. अन् अंगावर चादर घेऊन मळक्या चादरीत गुरफुटून गेली. मग त्याने गोधडीवरच्या आपल्या झोपल्या पोराकडं पाहिलं. ते अस्ताव्यस्त उघडंच पडलं होतं. त्याच्या उघड्या हातापायांवर डासांचं लवकांड भिडून रक्त ओढायच्या कामात गढून गेलं होतं. दुसऱ्या चवथीत जाणाऱ्या पोराचीही तीच अवस्था होती.

त्याला आतल्या आत भरून आल्यासारखं झालं. त्यानं पाहिलं, उजवायला आलेली पोरगी तेवढी आपल्या अंगावरच्या चादरीत गुरफुटून झोपली होती. नखही उघडं दिसत नव्हतं. त्याच्यानं ती सुरक्षित होती. तिच्या अंगावरच्या चादरीवर डास बसून होते, पण अंगास काही डसू शकत नव्हते.

...मोठ्या लोकायचं, नवकरीवाल्या पगारदारायचं एक बरं आस्ते. पंखा लावून झोपतात. पण आपून पंखाबी घेवू शकत नाई. लाडा नवसाची लाईन घेतली घरात. पण पंखा नाई घेवू शकलो. तेवढा पैसाच कधी शिल्लक उरला नाई. पिकपाण्याचा पैसा येते हाती. हंगामाच्या घाती. त त्यो सम्दा मांगली भोकं बुजण्यात जुळवाजुळवीतच सरून जाते. मांगला दिसा एकदा बील भरल्या गेलं नाई, तवा लाईनच कट झाली. तवापासून तीबी कशी पुरवून पुरवून वापरावं लागती. जास्ती युनीट जळू नाई. जास्ती बील येवू नाई. म्हणूनसऱ्या किती काळजी घ्यावं लागती. बील थकलं की लाइनमन लाइन कट करू जातात. मग बसा लागते अंधारा कंधाराचं बोंबलत...

त्याने पोराच्या अंगावरची गोधडी बरोबर टाकली. पण गोधडीखालचे दोन्ही पोरं हातपाय झाडाय लागले. गोधडीखाली दम कोंडला असावा. म्हणून सगळीच्या सगळी गोधडी अंगावरून फेकून दिली. झोपेत काहीतरी बडबड केली. तसा विठोबा गवारे चारी अंगाने शहारून उठला. अशी झोपेत पोरं कधी कधी बडबड करतात, बायको वसणावते. तेव्हा तो पार भेदरून जातो...

...सालं माणूस झोपीत बडबड करते, वसणावते...म्हंजी एकदम मुडदाच बोलल्यासारखा वाटते.

घरच्या टिनपत्र्यावर तुटक ताटक पावसाचे थेंब पडत होते. बाहेर आभाळ ढगांच्या दाटीत दमकोंडी झाल्यासारखं वाटत होतं...तो उठून बाहेर आला. घनघोर काळोख दाटाळून आला होता. ग्रामपंचायतीचे रस्त्यावरचे लाइट नेहमीप्रमाणे बंदच होते...त्याच्या अंगावर झिमझिम पावसाचे थेंब फवाऱ्यासारखे आले. तसा तो कतावून गेला.

...अता हे बुहार बटकं आभाळ उडदा-मुंगाच्या आगाईतावर हमखास कोकडा – मव्हा – दह्या आसे रोग पाडणार...पाडणार म्हंजे पाडणार...पुन्हांदा फवारणीसाठी त्या सुभाष झोरेची दाढी धरावं लागणार...हावीटाच्या थैलीवर एकशे वीस रुपये किंमत छापेल व्हती. त्यानं दोनशे-आडीचशेले थैली देली. मालाचा शॉर्ट्रेज हाये म्हणे. कपाशीच्या थैलीवरबी तसंच. छापेल किंमतीच्या दुप्पट पैसे घेतले. आंब्यातला वरपून घ्यावं तसं आपल्याले...गावातल्या कास्तकारायले वरपून-चिरपून घेतलं...हाब्रेटाची ती तशी झकमारी झाली. आवंदाच्या साली खायापुरतीबी जवारी व्हती का नाई...त्या भगवंतालेच डोळे...भगवंत तरी कुठून देणार हाये? वावरात आगाईतच निगल नाई. सम्दा कुंदा अन् हराळी जोर माराय लागली...

हायब्रीड पेरलं वावर डोळ्यापुढं आलं. इथं एक तर तिथं एक असे कोमटे उगवले होते...पडते वाटते ते तीन एकर वावर आता बोकांडी! का करावं लागते कोणाले माईत मोडतोड...

हायब्रीडचं तीन एकर वावर सारखं सारखं डोळ्यांशी फिरायला लागलं. अन् विठोबा गवारे काळजाला कोरपड झोंबल्यासारखा झाला. डोक्यात चक्कर दाटाळून आले. कसंच्या कसं उदास, भकास वाटायला लागलं. घरात परतून यायला लागला तर दारात एक बेडूक! टुणूक टुणूक उड्या घालत घरात जात होता. त्याच्या तळपायाची आग मस्तकात भिडली. साली बेंडकी घुसायच्या कोणाच्या हांथुरणात अन् उठायचं कोणी भेदरून...त्याने पायात बुट घातले. बेडकाजवळ गेला, अन् दातओठ खाऊन सारी दुनिया चिरडून टाकण्यासाठी द्यावा तसा बेडकावर पाय दिला. चिर्रऽऽ चिर्रऽऽ चिक् आवाज उठला. पायाखाली बेडकाचा मूठभर चिखल झाला. तावा-तावान् तशीच ठोकरून अंगणात फेकली.

आत आला. मग मनास असं वाटाय लागलं की बेंडकीच्या जागी साप पाह्यजे व्हता. हातात धरून पिळून चोथा केला आस्ता...सरप माराय पाह्यजे. बेंडकी बिचारी गरीब...तिले मारण्यात काय भूषण?

पोरांचे हातपाय उघडे पडलेले होते. त्याने वाकून पाहिलं. डासांचे ठिपके अंगावर बसून कुरतडत होतेच. कातावून गेला. मस्तकात जणू आग लागली. काय साले आपल्या आंगातलं रगत शोषून घ्यायसाठी एक एक पैदा झाले...रगत आपल्याच अंगातलं चोखून घेणार...पंखावाल्यायचं आजेबात नाई...बेंडकी हाथुरणात घुसायच्या भितीनं पायाखाली चिरडून मारली. पण मच्छरायचं काय? आसेच डसतात. मग पोरं सोरं बेमार पडतात. तिथं डॉक्टर पुन्हांदा पिळून घेते. कमाई करत रहा अन् भरत रहा डॉक्टरांचे खिसे...काय करावं? मस्तकावर सहज हात गेला तर त्याचं त्यालाच ते गरम लागलं.

मग तावातावाने चुलीजवळ गेला. चुलीत गोवऱ्या कोंबल्या. तुरकाट्या कोंबल्या. काडी लावली. धुराचे लोट उठले. मग पुन्हा जळत्या तुरकाट्यावर चिंध्या टाकल्या. सगळ्या घरात धूरच धूर झाला...

...साले सम्देच्या सम्दे धुपटानं मरून पडतात आता. नाईतं जळून जातान...पण काही पळून जातान. पळून जातन ते धुपट सरल्यावर पुन्हांदा घरात येतान. बायको पोरास डसतान... काय करावं? का कायमच अंगाशी धुपट घेवून जागावं?

कोंडल्या घरात धुराचा ठसका उठला. तशी बायकोला जाग आली. धुपट जाणवून ती जोरात दोनदा ओरडली, ''धावा धावा ऽऽ आग लागली...आग लागली.''

तिची किंकाळी रात्रीच्या शांत पावसाळी काळोखाला कापत गेली. काय झालं? त्याला थोडावेळ कळलंच नाही. पण कळलं तसा तो तिच्यावर कोसळला. तिचं तोंड गच्च गच्च दाबून धरलं. दुसऱ्यांदा तिला ओरडूच दिलं नाही.

''बोंबलू नको...आग नाई लागली कुठं काई...धुपटं केलं म्या घरात... मच्छर मारायसाठी!'' तो तिच्या कानात धुसफुसला.

तसा तिने धडपडा केला. जोरजोरात मान हलवीत त्याचा तोंडावरचा हात बाजूला केला. ठसकत ठुसकत उठून बसली.

''तुमी कावून जागी हा आतालोक? निमी रात झाली आसल!'' असं म्हणून तिने जांभई दिली. अंग खाजवलं.

''हे मच्छर! याह्यच्या मायमी! झोपच येवू देत नव्हते! लय खेव देतात याह्यच्या मायमी!''

त्याचं बोलणं ऐकलं आणि तिचं हसू उसळून आलं.

''कावून हासा लागली?'' त्याने गोंधळून विचारलं.

''तुमची इब्लिस शिवी आयकुन हासाय आलं. डासायची माय कुठंच सापडावं तुमाले आता?''

''पोरायलेबी तसंच फोडून काढत व्हते. आंगावरबी ठेवत नाही अवलाद!''

असं म्हणून त्याने पोरांच्या अंगावरचं नेटकं केलं. ती दार उघडून अंगणात गेली. अन् बाहेर पाय टाकल्याबरोबर जोरात ओरडली.

''कावं काय झालं?'' त्याने ओरडून विचारलं.

''महाया पायाले वळवळ लागलं. काय सरप हाये का कया हाये कोणाले माईत?'' ती भेदरल्या आवाजात म्हणाली.

''काई भिवू नको...हिंमत धर! बेंडकी हाये ती. म्याच पायाखाली चेंदून मारली. पाय धुवून येजो घरात. सम्दं बेंदाड लागलं आशीन पायाले!''

ती पाय धुवून घरात आली. घरात धूर दाटाळला होता. त्याला मच्छर कमी झाल्यासारखे वाटत होते पण धुराने दम कोंडला गेला होता.

''इझवू का आता चूल? मच्छर कमी झाले आता...''

''मच्छर कमी झाले. पण पुन्हा येतातच धुपट कमी झाल्यावर.''

''मग का रातभर जागी राह्यता का काय आता?''

''ह्योच ह्येल हाये आता...झोपच नाई येऊन राह्यली. आंगास हे मच्छरं डसतात... त माह्या मनालेबी दुसरे घोर मच्छरावाणी झोंबतात...डोक्स दुखवतात!''

''कोन्ते घोर करून राह्यले आता? डोक्सं देऊ का तुमचं दाबून?''

ती त्याच्याजवळ गोधडीत येऊन बसली. त्याचं डोकं दाबल्यासारखं कराय लागली. पण त्याने तिचे हात धरून अडवलं.

''काय कपळ गरम झालं तुमचं! सन-सन कराय लागलं!''

''माह्या मस्तकात त्या हाब्रीटाच्या वावराचा कीडा घुसेल हाये! ते वावर याद आलं की भयाण उदास वाटाय लागते. करमतच नाई! तुमी झोपता पण माह्या वाट्याची रात झोपमोडी होऊन मोडून जाती!''

असं तो म्हणाला. तशी ती गंभीर झाली.

''हावं न! किती पतलं निंगलं आगाईत! आता सालभर कोणती जवरी खावावं? निदान जवारी तरी घरची पाह्यजेल!''

अंगास मच्छर झोंबाय लागले. ती चापटा माराय लागली.

''त्या बळीराजा कृषीसेवा केंद्रावाल्यानं सम्दी आपली उधडून लावली. मायले त्याच्या...काळ्या मायशी बेमानी केली.''

अंगावर डास चावला. त्याला जोरात चापट मारली. बळीराजा कृषीसेवा केंद्रावाल्यास मारल्यासारखी. डास रगडला. हात रक्ताळला. डास मेला होता.

''त्या मेल्याचं कधी बरं व्हनार नाई. या पापाचे भोग त्याले सात जल्म भोगावं लागतान. हळकळा लागल्यान त्याले!''

''आवं, त्याले आपून शिव्या-सराप देऊन राह्यलो. पण त्याच्यावाणी सुखी कोणीच नाई. आपल्या सम्द्या गावात! उडदा-मुंगाचा अन् कापसाचा धंदा करते सिझनवर. दुप्पटं भावानं इकते त्यो माल...दणकावून नफा कमावते. मॅटॅडोर घेते. व्हीडीओ घेते. सम्द बेमानी करून चालू हाये. काळ्या मायशी बेमानी! काळ्या मायच्या लेकरायशी बेमानी!''

''त्या पऱ्हाटीचं तरी तसं नाई व्हायले पाह्यजे. तेबी जर बोगस आसलं तं आटपलच आपलं. पोरीचं लगन पक्क केलं. दिवाळी झाल्यावर हुंडा द्यायचा. लगन करायचं. अन् ते सम्दं कापसाच्या भरोशावर...कापूस नाई झाला तं जहर खायाचंच काम हाये आपल्याले.''

असं ती म्हणाली, तर तिचे डोळे आपोआप पोरीवर गेले. त्याचेही गेले. उजवायचं ठरलेली पोरगी शांत, अंगावर गुरफुटून झोपली होती. तिला पाहून तिच्या मनात आलं...

...आजूक दोन-चार सालं अशी शांत झोपंल. एकदा लगन होऊन पोरं-सोरं झाले की तिच्या नशिबात आपल्या वाणीच भवाडे येणार. संसाराची काळजी...झोपमोडी...

''तुमी म्हणत कावून नाई त्या मुड्याले?''

''कोणाले?'' त्यानं अंगावरचे डास मारत विचारलं.

''त्याच कृषी सेवा केंद्रावाल्या सुभाष शेठले!''

''तुले वाटते म्या त्याले म्हन्ल नसंल का? दररोज त्याले म्हन्तो...तुमचं बी खराब व्हतं. बी खराब व्हतं. वावर पतलं निंगलं. त म्हन्ते; त्याले मी काय करू? बी वरूनच तसं खराब आलं. म्या का घरी केलं!''

''काल वावरातल्या बायका त्याच्याच गप्पा सांगत व्हत्या.''

''काय?''

''सुभाष शेटनं घरची खायची जवारी थैल्यात मिसळून इकली म्हणून...कंपनीच्या पाच किलोच्या उडदाच्या थैलीतबी त्यानं दोन किलो रेती मिसळली. आपल्या मन नदीची काळी रेती देली उडदाच्या थैलीत मिसळून अन् आसली बियाणं काढून घरच्या वावरात पेरलं. सोयऱ्या धायऱ्याले देलं.''

''तसं कसं करील त्यो? आपून त शिलबंद घेतल्या न थैल्या त्याच्याकून?''

''हे शील त्यानं घरच्या घरीच लावलं. थैल्यावर शिलाईबी घरीच मशीननं मारून घेतलीय.''

''पण कंपनीचा शिक्का अन् कागद व्हते न शिलबंद थैलीच्या तोंडावर?''

''बाया म्हणत, त्याच्यातबी एक गोम हाये!''

''कोन्ती?''

''त्यानं पेरा करेल वावरवाल्याकून रिकाम्या थैल्या इकत घेतल्या...पंचवीस रुपयाची एक...तोंडाशी असणारे कागद संभाळून आणा म्हणत जाय. कंपनीवाल्याकडी थैल्याचा तुटवडा हाये म्हणून. त्याह्याले वापीस पाह्यजे म्हणाजाय रिकाम्या थैल्या.''

''आस्स?'' असं विचारून त्याने गालावर चापट मारली. तिथं डास डसला होता.

''हाव! मांगल दिसा चहाचे रिकामे पुडे नवते का वापस घेत दुकानदार आपल्या गावात...अन् तिच्यात घरी उकळून पियेल चहाचं भुसकट भरून आपल्याले इकत व्हते! तशीच आयडीया केली त्यानं! रिकाम्या थैलीचे पैसे देऊन त्या इकत घेतल्या...अन् घरची जवारी भरून इकली. सम्दे लोकं बोंबलत व्हते त्याच्या नावानं!''

ते बोलणं पहिल्यांदा त्याने सहज ऐकावं तसं ऐकलं. पण नंतर गळ्यापर्यंत चिखलात फसलो, फसवलो गेलो, ही जाणीव त्याला कुरतडून काढायला लागली...आपल्याले नक्कीच भेसळीची थैली देली भडव्यानं! चार रुपये किलोची जवारी सत्तर रुपये किलो देली...आपला सम्दा खानाखराब सत्यानास केला. आता आपलं काई खरं नई...

त्याला मस्तक तापल्यासारखं वाटाय लागलं. त्याने हात लावला. चटका लागला. घामही आला होता. तो पुसून काढला. आता करावं लागणार मोड अन् एकदा कास्तकाराच्या मागं मोड लागली की काई खरं नाई.

आपणास भेसळीची थैली दिली या विचाराने त्याचं डोकं गच्च झालं. कानात मधूनच कानठळ्या बसल्यागत व्हायला लागलं तर कधी शिट्या ऐकायला येऊ लागल्या...त्याच्या डोळ्यातली झोप पार चिंधीचोळा झाली. त्याची रात झोपलीच नाही.

बायको त्याची थोड्याच वेळात गुरफटून झोपली. दिवसभराच्या निंदनाच्या कामाने थकून गेली होती. तो डास मारत जागाच होता. तळमळत होता...पांढरीतलं ढोर तोडलेले कुत्रे अपचन होऊन बेजार झाले होते. पोट दुखत होतं म्हणून वर आभाळाकडे तोंड करून भेसूर विव्हळत होते. त्यांचे आवाज काळजावर चरका उठवत होते...रातकिड्याचे आवाज रात्र घुमवत होते. ओढ्याच्या डबक्यात बेडक्या ओरडत होत्या. ते सगळेच आवाज त्याचं मस्तक झांझरून टाकत होते.

मध्येच घराच्या पत्र्यावर थडथड पाऊस वाजला. एक हलकीशी सर कोसळून गेली. तिचा गारवा हवेत पसरला. मग भुरुभुरू फवारा मारल्यासारखा पाऊस पत्र्यावर झिरझिरत राहिला. तो बाहेर आला. अंगावर दव थेंब पडावे तसा पाऊस जाणवला. अंगण मात्र मघाशी आलेल्या पाऊस सरीने ओलं झालं होतं. तो पुन्हा गोधडीत येऊन पडला.

सकाळी मशिदीत अजान उठली. तसा तो उठून बसला. डोक्यात ज्वारीचं शेत रात्रभर तळमळत होतंच. ती तळमळ आता दुपटीने वाढली.

त्याने पाहिलं. बायको पोट पोटाशी घेऊन झोपली होती. मुटकुळा झाली होती. पोरंही अस्ताव्यस्त पसरले होते. तो उठला. पायात वाटर प्रुफचे बुट घातले. पोत्याची खोळ डोईवर घेतली. दार ओढून रानवाटेला लागला.

पाऊस फार काही पडला नव्हता. पण पायास पेंड लागत होते. बुटाचं वजन वाढवत होते. अन् पायातले बूट सटासट सटकत होते. मागच्या टाचाकडून फतड्क फतड्क वाजत होते. तो कसरत केल्यासारखा अवघडत चालून कंटाळून गेला. त्याला रागच आला. तर पायातले बूट उपसून बाहेर काढले. अन् बांधावरच्या कुपाटीत ओळखण ठेवून दडवले. तसाच अनवाणी पायाने लगबग वावराकडे चालायला लागला.

पांदीला लागूनच वावर होतं. पहिल्या तोंडाशी मुंगाचा पेरा. मुंग चांगला दणकवून तासी लागला होता. मुगाच्या शेजारी चौफुलीवर पऱ्हाटी...सगळी निघून आली होती. तुरळक तोड्याच्या जागेवर तुरीचे दाणे टोपले होते. तेही निघून आले होते. दोन्ही पिकं ओलांडून झरझर चालत तो ज्वारीच्या शेतात आला. अन् कच्कन पायात बाभळीचा सुळकाटा मोडला. एकदम जिव्हारीच लागल्यासारखा झाला. तो मटकन खाली बसला. त्याने पाहिलं, गहूभर सुळकाटा पायात रुतून बसला होता.

त्याने शिवी हासडली. तसाच लंगडत बाभळीच्या झाडाजवळ गेला. दुसरा काटा मोडून हा काटा टोकरला, नखाने उपसला. तर रक्ताची धारच उठली. पायास ओल्या मातीचे पेंड लागले होते. त्यावर रक्त सळसळ झालं.

गडी तसाच उभा झाला. लंगडी खेळत ज्वारीचं वावर तुडवायला लागला. तर पायातल्या काटवणाची कळ बरोबर काळजात खोलवर गेली.

आचक-विचक तासं दिसत होते. भरीत भर लव्हाळी हराळीचे कोंब सळकून वर उठले होते. हायब्रीडची पेरणी करताना मागून मोघ्याने खत पेरलं होतं. ज्याच्यासाठी पेरलं ते आगाईत त्याजागी उगवलंच नव्हतं. पण तणकटास खत लागून त्यास माज चढल्यासारखा झाला होता. हिरव्यागार तणकटाचा विळखा काळीज कापीत होता.

खाली बसून, वाकून चालून, सगळं करून त्याने ज्वारीचे कोमटे न्याहाळले. आचक-बिचकच निघाले होते. एक कोमटा इथं, तर दुसरा तिकडं हाता दोन हातावर...ह्या सुभाष झोऱ्यानं आपल्या कुणबीकीले कीड लावली भडव्यानं... आता काय खावावं सालभर? आता हे तीन एकर वावर आपल्या अंगावर पडणार...एवढ्याच पेऱ्यात तीस पोते जवारी झाली आस्ती...आता तीन पोतेबी व्हती का नाई काई सांगता येत नाई...

तसाच लपक-झपक चालत चालत गावात परतून आला. सूर्य उगवला होता. पण ढगांचा जोर होता. त्याच्यानं अडप-झडप दिसत होता. गावातले लोक टमरेलं घेऊन पांदवाटेकडे जात होते.

घरी येताना दारापुढे बेडूक दिसला. रात्री पायाखाली चिवंदा करून मारलेला...त्याला मुंग्या लागल्या होत्या...आसेच ठेसाय पाह्यजे सम्दे...का आपल्यालेच ठेसून राह्यलं म्हणावं कोणी? आपूनच तं हावोत सुभाष शेठ झोऱ्याच्या पायाखालच्या बेंडकी वाणी...एकदम केविलवाणी...आपली बायको बेंडकी अन् पोरं बेंडक्यायले पिल्ल! टुणूक टुणूक उड्या मारायच्या. अन् कोण्यातरी अजगराच्या दाभाडात जाऊन फसायचं. नाईतं खेटराखाली चिवंदा व्हायचं.

...साले आपले खेटरबी वावरात राह्यले कानू आज... नाई... वावरात नाई... पांदणवाटेतल्या झुडुपाखाली. पण कोणी नेणार नाई... कोण पाह्यणार हाये तिथी लगी मुद्दाम वाकून? आणू दुपारून वावरात गेलो की.

''कुठी गेले व्हते रामपाह्यरीच? चहाबी घेतला नाई... चहा देवू का? उकळेलच हाये भगुण्यात...''

''हाव! दे!''

''कुठे गेले व्हते तुमी?''

''गेलो व्हतो वावरात...''

''कसं काय हाये हाब्रीट?''

''काई खरं नाई त्याचं...''

''त्या मुड्द्याच्या घरी कावून जात ना? दे म्हणा आमचे पैसे भरून. पद्दावून पैसे घ्यावं त्याच्याकून...आपली नुकसान भरपाई...''

असं म्हणून ती आत गेली. चहाची कानतुटकी कपबशी भरून आली. लाल गुळमट पाणी. ते कुणाचं तरी रक्त प्यावा तसा प्यायला लागला. भुरके माराय लागला. मनात विचार आला... जे होईल त्ये होवो! आज खाडानिवाडा करायचाच...आता भिवून जमायचं नाई...चांगली धौस द्यायची त्याले...

चहा पिवून झाल्यावर तट्कन उठून उभा झाला.

''येतोच जावान सुभाष झोऱ्याच्या घरून...'' म्हणत पायउचल झाला.

सुभाष झोरे बैठकीच्या खोलीत बसून पेपर वाचत होता. समोरच्या टेबलावर कलर टीव्ही सुरू होता. टीव्हीपुढच्या सोफ्यावर, कॉटवर, खुर्च्यांवर त्याची बायको अन् पोरं-पोरी बसलेल्या होत्या. टीव्हीवर गाणं सुरू होतं. सगळे मन लावून पाहत होते. तिकीट काढून बसावं तसे पाहत होते. सुभाष झोरेचे डोळेही तिकडेच. पेपर फक्त हाती धरलेला. एका हातात चहाचा कप. घोट घोट घेत होता. समोर उघडी नागडी लंगोटी लावलेली नटी नाचत होती. गोरीपान चामडी होती. एकदा इकडून, एकदा तिकडून असं चारी बाजूनी आपलं अंग हलवून दाखवत होती. मध्येच पाठीवर झोपून, मग हात खाली घेऊन जाडी भरली छाती वर उचलत होती. गाणं म्हणत होती. नट तिच्या मागे धावपळ करत होता. मध्येच कवळून उचलत होता. मिठी मारून, गालावर, मानेवर अन् कुठेकुठे कुत्र्यासारखं हुंगून चाटल्यासारखं करत होता.

दारात उभा राहून विठोबा गवारे सगळं पाहत होता. समोर पाठमोऱ्या बसलेल्यापैकी कोणालाच त्याची जाणीव नाही. सगळे गाणे पाहण्यात मग्न! विठोबा गवारेलाही क्षणभर भुरळ घातल्यासारखी झाली. तोही पाहत राहिला. तर एकदम डोळ्यापुढे ज्वारीचं शेत आलं. पातळ निघलेलं. शिट्या वाजाय लागल्या. डोकं भणकल्यासारखं झालं आणि तो कासावीस झाला.

''राम राम हो सुभाषराव...'' त्याच्या नकळत जोराने ओरडला.

त्याच्या आवाजाने पाठमोरा बसलेला सुभाष झोरे एकदम दचकला. मागे वळून पाहिलं तर दारात विठोबा गवारे. रागच आला. मस्तकावर आठ्या उमटल्या.

''कारे बावा? काय हाये?''

''नेमकाच वावरातून आलो. त्ये हाब्रेटाचं रान...सम्द पातळ फटक निंगल...चार आणे निंगल...अन् बारा आणे बरबाद झालं...''

बोलताना लक्षात आलं. छताखाली पंखा गरगरत होता. भिडून झप-झप हवा सोडत होता. साल्याच्या पोरास मच्छर डसायचं काम नाई...आपल्या पोरायच्या अंगावर सम्द्या गुथाच गुथा! आपल्याले कशाचा पंखा? आपुन तसेच आंग खाजवू खाजवू झोपा...आपल्या पैशाच्या नफ्यावर हे हवा खाऊन राह्यले...

''आरे पण त्याले मी काय करू? कितीदा सांगतलं तुले म्या? म्या का घरी तयार केलं का ते बियाणं? कंपनीतूनच तसं आलं...''

''कंपनीतून नवतं आलं...तुमीच भेसळ करून देलं...''

''काय बकवास करा लागला आशी? तुले शरम वाटती का नाई काई?'' सुभाष झोरे भडकला.

''शरम तुमाले कराय पाह्यजे...''

अशी त्यांची बडबड सुरू झाली. तसे टीव्ही पाहणारे अस्वस्थ झाले. रागाने मागे वळून पहायला लागले.

''अहो, इथी बडबड नका करू! गाणे आयकुदा सुखानं...''

''आरे तुमच्या बापानं मले दुखात टाकलं...अन् तुम्ही काय गाणे आईकता ते सुखानं!''

विठोबा गवारेचा आवाज त्याच्याच नकळत असा चढला.

''चाल...चाल...मी सांगतो तुले समजावून सम्दं...आपून दुकानात बसू. पोरायले तरास नको...''

असं म्हणून सुभाष झोरे उठला. या हॉलमधून एक दार कृषी सेवा केंद्रात उघडत होतं. ते उघडून दुकानात आला. इकडून रस्त्यावर उघडणारं दार आतून उघडलं. बाहेरचा रस्ता आतून मोकळा दिसाय लागला. विठोबा गवारेही दुकानात आला.

''काय भण-भण लावली पाह्यटी पाह्यटी? कावून टकुरं उठवाय लागला तू?'' खुर्चीवर बसत सुभाष झोरे म्हणाला.

''टकुरं उठवत व्हतो इतक्या दिवस...पण आता फोल्ड्याबगर नाई सोडणार.''

विठोबा गवारेच्या आवाजात त्याच्याच नकळत अशी जरब

दाटाळून आली. आवाज घोगरा झाला. मस्तक भणकल्यासारखं झालं. हाताच्या मुठी रागाने वळून ताठ झाल्या. अन् त्याचा तो अवतार पाहून सुभाष झोरेच्या पोटास झोंब आली. तरी उसणं अवसान आणून तो म्हणाला –

''आरे काय, दारू-बिरू पिवून आला का काय बापा राम पाह्यरी?''

''दारू पिवून नशा येणार नाई आपल्याले आता...त्याच्यासाठी तुमचं रगत प्यावं लागंल वरपून चिरपून...तवा अंगात भिणंल, अन् पर्र नशा येईल...मायमी तुह्या खराब बी मपल्या मस्तकी मारलं. सम्दं पानदान वाजवलं.'' त्याचा आवाज चिरकला.

त्याचा तो अवतार पाहिला अन् सुभाष झोरे घरात पळू पाहू लागला. दुकानाचं तिकडच्या हॉलमध्ये उघडणारं दार त्याने लावून घेतलं होतं. त्याचा आता पश्चात्ताप झाला. मनास भीती वाटाय लागली. तो भेदरून विठोबा गवारेला पाहत होता. अन् तिकडं बायको अन् पोरंसोरं गाणे पाहण्यात दंगून गेले होते. *मैं तो भेलपूरी खा रहा था!* गाणं जोरात सुरू होतं. बंद दारातूनही इकडं ऐकायला येत होतं.

त्याला एकदम राग आला. साले बायकोपोरं कोणी दार उघडून इकडे येत कावून नाईत? हा इठल्याबी खरंच आपलं रगत पिते का काय म्हणावं? त्याची छाती दडपून दडपा झाली. धाकड धुकून होऊन ऊरात दूखाय लागलं.

तो हळूहळू दाराकडे सरकू लागला. तसा विठोबा गवारेने गचकन त्याचा हात धरला. अन् सुभाष झोरेच्या अंगास कापरं सुटलं. तो भेदरल्या डोळ्यांनी विठोबाकडे पहाय लागला. कसा एकदम गलितगात्र झाला.

''सांग, मले खराब बियाणं देलं का नाई?''

''हावं देलं!''

''उडदाच्या थैल्यात माती मिसळली का नाई?'' भेसळ प्रतिबंधक अधिकाऱ्यानं विचारावं तसं त्याने विचारलं.

''हावं मिसळली...माती नाई. रेती मिसळली!''

तशी फाड्कन विठोबानं त्याच्या गालफडात लगावली. सुभाष झोरे इकडचा तिकडे दुमता तिमता झाला.

''तुहा विचार तरी काय हाये भल्या माणसा?''

''मी तुपला मुडदा पाडणार हाये साल्या...एकतं थैलीवर छापेल किंमतीच्या जास्त पैसे घेतले. अन् त्यातबी भेसळीचं बियाणं देलं...हरामखोरा! देश पोसणाऱ्या बळीराजाच्या टाळूवरचं लोणी खातू! अन् सावसुदाम्यासारखा कृषी सेवा केंद्राचं नाव बळीराजा ठेवतू! आता मी तुपला भेसळ करणारा हात मोल्ड्याबिगर राह्यणार नाई...'' असं म्हणून विठोबा त्याच्याकडे सरकायला लागला. तसा सुभाष झोरे बोंब माराय लागला.

''महेशाऽऽ नरशाऽऽ दार उघडा...दार उघडा...हा मारून राह्यला बे मले!''

तो दाराजवळ जाऊन ओरडायला लागला. पण आतून कोणाची काही चाहूलच नाही. आत टी.व्ही.वर मुकाबला मुकाबलाऽऽ गाणं सुरू होतं. आतले सगळे तल्लीन होवून गाणे ऐकत होते. याचा आवाज तिकडे अजिबात जातच नव्हता.

''बिलकुल बोंबलायचं नाही! बिलकुल बोंबलायचं नाई...चूप बसायचं...नाईतं आसाच नल्डा दाबून जीभ बाहीर काढीन तुपली!''

विठोबा गवारे असं त्याच्या कानाशी धमकावल्यासारखा बोलला. त्याच्या डोळ्यापुढे पायाखाली चेंगरून मारलेलं बेडूक दिसाय लागलं. आतडे कातडे पोटाच्या बाहेर पडलेले. बटबट डोळ्यांचे वाळूचे खडे झालेले...ते बेडूक आठवलं. डसणारे डास आठवले...सुभाष झोरेही एक डास वाटाय लागला. भेसळ करून शेतकऱ्याचं रक्त पिणारा मोठा डास... अन् पुन्हा त्याने मच्छराला मारण्यासाठी मारावी तशी थापट सुभाष झोरेच्या गालावर उठवली. तर सुभाष झोरे एकदम त्याच्या पायावरच पडला.

''तुम्ही सम्दी नुकसान भरपाई मी करून देतो. पण तू मले सोडून दे! मारू नको! याच्या पुढी मी आजेबात आसे धंदे करणार नाई! काळाबाजार करणार नाई...तुले किती जवारी झाली आस्ती सम्दी?''

''सम्दी तीस पोते! तीन एकरात तीस पोते!''

''तं त्या तीस पोत्याचे पैसे आत्ताच मपल्याकडून घेऊन जाय! तीनशे रुपये क्विंटलचय भावानं नऊ हजार व्हतात...पण मी दहा हजार देतो तुले...पण मले आशी मारझोड करू नको. माही बी.पी. वाढली तं पटकन मरून जाईल मी! अन् माहे लेकरं बाळं उघडे पडतान...''

त्याला घाम फुटला होता. जीव घाबरला होता. म्हणून धडपडत भिंतीकडे गेला. बटण दाबून पंखा सुरू केला. सिलिंग फॅनची पाती गरगर-गरगर फिरायला लागली. तोंडाचा आ वासून तो धापा टाकाय लागला. पंख्याच्या हवेने त्याचा घाम जिरल्यासारखा झाला.

''काई हारकत नाई! दे दहा हजार रुपये! अन् बाबू मी सांगून ठेवतो. मी जिवावर उदार होयेल हाये. माह्याशी जर का दगाबाजी केली त खतमच करून टाकीन तुले. मले काय इथी संसारात राहून खायची त तिथी जेलात जावून खाईन मी...पोरंबाळं ऐरी तरी धावूनच खातात मपले...पण तुपल्या सम्द्या घराचा उन्हाळा केल्याबिगर राहणार नाई मी...''

''नाई रे बाबा! काईच दगाबाजी नाई करत मी. मले मह्य जीव प्यारा हाये!''

''चाल जाय! आण घरातल्या तिजोरीतून दहा हजार रुपये!'' असं म्हणून विठोबा गवारेने त्याला ढकलून दिलं. अन् आरामात बाजऱ्याच्या बियाण्याच्या थैल्या भरलेल्या होत्या, त्या थैल्यावर बैठक मारून बसला.

बसल्या बसल्या भोवताली डोळे भिरभिरायला लागले. भोवताली खचाखच माल भरलेला होता. फळ्यांवर विषारी किटकनाशकांच्या बाटल्या मांडून ठेवल्या होत्या. बाजूच्या भिंतीला लागून युरियाच्या, सुफलाच्या खताच्या थैल्या होत्या.

भिंतीवर कॅलेंडर लटकत होते. त्यावर शेतकऱ्याचं चित्र होतं. खाली कुठल्यातरी खताची जाहिरात होती. अन् वरच्या चित्रात हायब्रीडचं पीक दाखवलं होतं. मोठमोठी हातभर लांबीची कणसं चित्रातल्या धांड्यावर दिसत होती. अन् त्याच्या अलीकडे मासाळलेला शेतकरी मस्त नजरेने मिशीवर पीळ मारत बसला होता.

...मायमी, आसा शेतकरी दिवसा कंदील लावूनबी सापडायचा नाई कुठी! एवढं बदबद पीक घेणारा. मासाळल्या अंगाचा...सुखावल्या तोंडाचा! शेतकरी तं सम्दे हैराण हैराण होयेल आस्तात... कर्जापायी...खताच्या...अन् बियाणाच्या महागाईपाई पैसा लावून बी पीकं व्हत नाईत. तवा कर्जाचे डोंगर छाताडावर उभे राह्यतात. डोक्स्यावर केसं मोजले तरी ते कर्जाच्या रकमेच्या इतले भरत नाईत. टाळक्यावर केसं कमी. पण कर्ज जास्ती अशी गत आस्ती... अन् हे व्यापारी लेकाचे मोठे चित्र छापतात... शेतकऱ्याचे. त्याह्यच्या सकवार बायकायचे... मायमी; शेतकऱ्याची बायको कुठी सकवार, रुपवान राह्यती का? दिवसच्या दिवस उनाताणाचे काम करून सम्द्या काळ्याभंगार दिसतात बिचाऱ्या...झकपक राह्यले कुठी टैम आस्ते त्याह्यले? आंगुळ करतात बिचाऱ्या. तरीबी त्याह्यच्या अंगावर सारवणाचं शेण तसंच चिकटपेलं राह्यते. ऐरवाळी चिरवाळी तरण्यापणातच म्हताऱ्या दिसाय लागतात. चिमून जातात. आपाडी आंबा पिकवल्यासारख्या.

तो असा विचार करीत होता. अन् भिंतीवर दुसरं एक कॅलेंडर फडफडताना दिसलंच. शेतकरी अन् त्याची बायको विहिरीसमोर उभे!

त्यांच्या मागच्या बाजूने पाइपातून पाण्याची धार पडत होती. मागच्या बाजूने घनघोर ऊसाचं पीक होतं. अन् दोघं नवराबायको हसत होते...

हे वावर अस्सल शेती कसणाऱ्या कास्तकराचं आसूच शकणार नाई...एकत हे वावर खोटं हाये...नाईत हे शेतकरी खोटे हायेत...ह्या देशातला शेतकरी आसा आसूच शकत नाई...मागं कधीच नवता. आताबी नाई...अन् याच्या पुढीबी कधी राहू शकणार नाई.

त्याला रागच आला. त्याच्या नकळतच तो उठला. अन् भिंतीवरची कॅलेंडरं फाडून फेकाय लागला.

सगळे कॅलेंडर फाडून चिंधीचोळा केले. कागदाचे बोळे कोपऱ्यात फेकून दिले. तेव्हा त्याचं समाधान झालं.

पलीकडून दार उघडल्याचा आवाज आला. सुभाष झोरे नोटांची बंडलं घेऊन दुकानात आला. येताना त्याने आतल्या घराचं दार लावून घेतलं. आता आतले टीव्हीवरचे गाणे बंद झाले होते. अन् आतलं घर एकदम सामसुम होतं.

''बरोबर दहा हजार हायेत बापा...पण दुसऱ्या कोणाले सांगू नको...नाईत ज्याह्यानं ज्याह्यानं मोड केली ते सम्देच येतान नुकसान भरपाई मागाय अन् मले मरावं लागल बी.पी. वाढून...''

असं म्हणून सुभाष झोरेने त्याच्या हाती पैसे दिले. विठोबा गवारे समाधान पावला...आज त काई झालं... वारेवाऽऽ खळेदळे न करता...दणके-दुणके न घेता जवारीचे पैसे हाती आले...बायकोस दाखोले त किती हरखून जाईल ती!

सुभाष झोरे हताश झाल्यासारखा खुर्चीत बसला होता. बिटीबिटी डोळ्यांनी विठोबा गवारेला पाहत होता. ते लक्षात आलं तसा नोटा कुरवाळणारा विठोबा संकोचला. पण पुन्हांदा सावध झाला. नोटा खिशात ठेवल्या त्याच खिशातून चुनाळू बाहेर काढलं. तंबाखूची चिमूट तोंडात फेकली. मग पिक सावरत त्याने विचारलं,

''कसा काय राह्यला यावर्षीचा सिझन? कितीक कमाई केली?''

विठोबा गवारेच्या या प्रश्नाने सुभाष झोरे आश्चर्यचकित झाला. त्याच्या तोंडाकडे टकाटका पहायला लागला. काय बोलावं? त्याला काही सुचेनासं झालं. पण बळेबळेच म्हणाला,

''काय दीड लाखाची कमाई झाली या सिझनवर!''

''बाप रे!'' विठोबा गवारे हबकला. तसा सुभाष झोरेला पश्चात्ताप झाला. सालं, उगीच सांगितलं, अशानं त आखीन मागायचा हा पैसे.

''तुले हाब्रेटाचं वावर मोडायचं आसंल त चिंता नको करू. बाजऱ्याचं बियाणं हाये आपल्याकडी. ऑगस्ट मह्यण्याच्या शेवटच्या हप्त्यातबी चालते पेरायले.''

''आरे हूऽऽत कोण पेरील तुमच्या जवळचं भेसळीचं बियाणं आता! आता खामगावहून आणतो मी बियाणं. एवढे पैसे खिशात आसल्यावर कोण घेईल सडकं बी?''

असं आपल्या खिशाकडे खुणावत विठोबा गवारे उठला. अन् पायऱ्या उतरून रस्त्याला लागला. त्याला दिसलं; बाहेर लख्ख ऊन सांडलं होतं. आभाळ निवळलं होतं. पावसाची भुरभुर थांबून गेली होती.

रस्त्याने चालत बाजार भरायचा त्या मैदानात आला. पटांगणात वडाचं मोठंच्या मोठं झाड...हजारो फांद्यांचं. दाट सावलीचं. चारी अंगानी पारंब्याच्या जटा लोंबलेलं. झाड नाहीच...महावृक्ष म्हणायचं. महावृक्षाखाली गायी गवारं उभं होतं. पन्नास साठ गायी, वासरं रवंथ करत, रानात जायची वाट पाहत उभे होते...बारकाली पोरं पारंब्याला झोके घेत होती. आपूनबी लहाणपणी इथं गवाऱ्यात गायी आणून घालायचो...पारंब्याले झोके घ्यायचो...विठोबा गवारे कितीतरी वेळ त्या वडाच्या दाटवनात हरवून गेला.

''रामराम गवारेबुवा!'' भगवान कुसळकर जवळ उभा होता.

''रामराम!''

''काय पाहून राह्यले बापा वडाच्या झाडात एवढं एकचित होवून?''

''मी मलेच पाहून राह्यलो! जाऊ द्या ते! तुमी कुठी चाल्ले?'' त्याने भगवान कुसळकरला विचारलं.

''तेच आपलं भणकं...मोड मागं लागली न बाप्पा आवंदाच्या साली...सम्दं खराब, भेसळीचं बियाणं भेटलं.

झकमारी झाली. चाल्लो पुन्हांदा सुभाष झोऱ्याच्या दुकानावर! आणतो बाजऱ्याचं बी!''

त्याचं बोलणं ऐकलं. अन् विठोबा गवारे पुन्हा गंभीर झाला...सालं आपून केला आपला खाडानिवाडा पण या बाकीच्या कास्तकरायचं काय?

''काय त्याच्या दुकानावर जाता एकदा फसल्यावर पुन्हा?''

''काय करता मंग? कुठी जाता? आपली तं उधारीपाधारीची अन् व्याजाबट्ट्याची कुणबीक हाये सम्दी! कोऱ्या कागदावर, तेबी स्टॅम्प पेपरवर सह्या देल हायेत त्याले! त्याच्या कर्जाखालून आपला जलम काई सुटत नाई...''

''आसं कसं म्हन्ता! सरकं व्हा त्याच्यावर. नुकसानभरपाई मांगा त्याले!''

''काय मांगता? कोऱ्या स्टँप पेपरवर आपल्या सह्या हायेत. कमी जास्ती बोलाय जावावं तं घ्यायचा इस्टेट लिहून. अन् या लागायचं सडकीवर. त्याच्यापेक्षा बरं हाये जे चालू हाये ते!''

असं म्हणून कुसळकर चालाय लागला. विठोबा गवारेही गलबलून आला.

...आपून आपला खाडानिवाडा करून घेतला. पण आता ह्या बाकीच्यायचं काय? हे बिचारे आसेच मरणार हातपाय खोरू खोरू...याह्यच्या जल्माचं कर्ज काई फिटणार नई. या विचाराने आतल्या आत खोलखोल झाला. अन् पुन्हा एकाएकी उदास उदास वाटाय लागलं...

उदास मनाने तसाच पुढे चालत राहिला. मेनरोडवरची दुकानं नव्या नजरेने पहायला लागला. सुरज जनरल स्टोअर्सपुढे आला. तर डोळे दुकानातल्या टेबलावर खिळून बसल्यासारखे झाले. तिथं पंखे ठेवलेले होते. वेगवेगळ्या रंगाचे, चकाकणारे पंखे...

...सालं किती दिवसाचा इचार करून राह्यलो. पंखा घ्यायले पाह्यजे. रातभर मच्छर फोडून खातात. सम्दं रगत पिवून घेतात.

नकळतच हात खिशावर गेले. खिसा गरम होताच. घेऊनच टाकू पंखा. झपाझप दुकानाच्या पायऱ्या चढून वर गेला.

''पंखा केवढ्याचा हाये जनक भाऊ?'' पंख्याला चारी अंगाने निरखून पाहत, कुरवाळत त्याने विचारलं.

''कावून बव्हणीच्या टायमाले रिकाम्या चवकशा करता गवारेबुवा? घेणं ना देणं...अन् फुकट तोंड वाजवणं...तुमी कुठी पंखा घेणार हाये आता? या दिवसात कुठोलचे पैसा असणार हायेत तुमच्याजवळ... ह्यॅऽह्यॅऽऽ जा बापाऽऽ नाट नका लावू पाह्यटी पाह्यटी!''

त्याचं बोलणं ऐकलं अन् विठोबा गवारे तिळपापड झाला.

''तुमी व्यापारी लोकं कावून एवढं हलकट समजता पण आमा वावरावाल्यायले? त्याच्या माथं सम्दे जगतात... त्यो पिकवते म्हणूनसन्या समद्यायची खाय-पियाची चंगळ व्हती. अन् त्यालेच हलकट समजता? हे पहा पैसे! पैसे पैसे काय वसणावता? हे पहा पैसे... किती पैसे व्हतात बोला पंख्याचे?''

असं म्हणून विठोबा गवारेने त्याच्यापुढे नोटांचं बंडल नाचवलं. तसा दुकानदार एकदम पुढे झाला. त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला,

''आहो मी मज्जाक करत व्हतो मालक तुमची...तुमाले त लगी लय राग आला...तुमची बरोबरी का आमाले येणार हाये? एवढ्या मोठ्या जमीनजुमल्याचे मालक तुमी...आमी काय झिजोल्डे दुकानदार...'' असं म्हणून तो पंख्याकडे वळला. कपड्याने पंखा साफ करत मग म्हणाला,

''पहा पहा! कोणता पंखा देऊ? हा हजार रुपयाचा...हा बाराशे पन्नास रुपयाचा...हा सव्वा तेराशे रुपयाचा...बोला कोणत्या कंपनीचा देऊ?''

''ती कंपनी गिंपनी काय समजत नाई आपल्याले...चांगला भारीत भारी द्या मजबूत...गरगर हवा फेकणारा. मच्छरं कुचलून मारणारा...''

''तं मंग हा तेराशे पंचवीस वालाच घेऊन जा तुम्ही... थांबा, मी लावून दाखवतो.'' असं म्हणून दुकानदार पुढे झाला. बोर्डवर पीन लावली. पंखा सुरू केला. चांगली हवा फेकाय लागला. हवेची गती कमी जास्त करून दाखवली.

''ही कमी हवा...ही जास्त हवा...तुमाले पाह्यजे तेवढी हवा खा! लय जोरदार मॉडेल हाये...टीव्हीवर तं हमेशा जाहिरात येती याची. आवाज तं आजेबात देत नाई...''

''ते जावू द्या...यानं मच्छरं झोंबणार नाईत नं?''

''आजेबात नाई...याच्यापुढी मच्छरं आलं की बातच्या सात पाणी होवून जाईल त्याचं!''

''बस न मंग! द्या हाच!''

असं म्हणून विठोबा गवारेनं पैसे मोजून दिले. अन् पंखा खांद्यावर घेवून ऐटीत घराकडे निघाला. त्याच्या खांद्यावर पंखा पाहून लोक आश्चर्यचकित झाले.

''नवा आणला का काय?''

''हाव मंग?''

''या दिवसात?''

''हाव मंग?''

रस्त्यावरचे लोक रोवल्यासारखे त्याच्याकडे पाहत रहायचे. काही काही विचारायला पाहायचे. पण विठोबा गवारेजवळ बोलायला, थांबायला वेळ नव्हता. कधी घरी जातो, कधी पंखा लावतो अन् घरातले मच्छर पळवून लावतो असं त्याला झालं होतं. डोळ्यापुढं पंखा गरगरत होता. त्याच्यापुढे मच्छर हेलपाटून इकडं तिकडं गोळामोळा होत होते. त्यातच सुभाष झोरे दिसत होते. मच्छर झाला होता अन् इतर मच्छरासोबत इकडचा तिकडे हेलपाटत होता.

*(फेब्रुवारी १९९७)*

# सत्य

**पंकज कुरूलकर**

---

''मी क्षणभर ट्रॅकवर थांबलो. हाच तो क्षण. लोकल समोरून येत होती व मी नि:स्तब्धपणे ट्रॅकवर उभा होतो. लोकलखाली मरून जावंसं वाटत होतं. कशी कोणास ठाऊक, बाजूला चालणाऱ्या राहुलने माझी ती अवस्था ओळखली होती. त्याने मला धावत जवळ येऊन बाजूला खेचलं व क्षणार्धात लोकल वेगानं निघून गेली होती.''

---

आयुष्याचं काही खरं नसतं हेच खरं. सगळंच अनिश्चित असतं. म्हणजे राहुल त्रिवेदीचं असं काही होईल असं वाटलंच नव्हतं. त्याची कधी कल्पनाही केली नव्हती.

मी संध्याकाळी नेहमीप्रमाणे घरी आलो. (घर माझं नाही. बव्र्यांचं. मी त्यांचा पेईंगगेस्ट.) हातपाय धुतले व दूरदर्शनसमोर बसलो. तेवढ्यात बद्री आला.

त्याला बघून मला नवल वाटलं. विरारची खोली सोडून मला सहा महिने होत आले होते व त्यानंतर मी आजच त्याला बघत होतो. दुसऱ्यांचं घर असल्यामुळं तो हळूच चोरट्यासारखा माझ्याजवळ येऊन बसला व म्हणाला,

''गडबड हुआ है.''

''क्या?''

''राहुल का ॲक्सीडेंट हो गया है. वो सिरीअस है. तुम अभी मेरे साथ चलो.''

''किधर?''

विरार मे.''

''कैसे?''

''वो सबकुछ बाद मे बताता हूँ, पहले मेरे साथ चलो.''

मी त्याला नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. परत कपडे नीट केले व त्याच्याबरोबर बाहेर पडलो. लोकलला नेहमीप्रमाणे तोबा गर्दी होती. त्यामुळे एकमेकांच्या बाजूला उभं राहून निवांतपणे बोलणंही शक्य नव्हतं. दोघंही गर्दीत कुठेतरी उभे राहिलो. त्यामुळे मला त्याला राहुलबद्दल काही विचारता येईना.

वसईनंतर आमचे चेहरे एकमेकांना दिसले व तोपर्यंत विरार जवळ आलं होतं. विरार स्टेशनहून आमची रूम पाच मिनिटांवर होती. कुठल्या हॉस्पिटलमध्ये राहुलला ठेवलं आहे हे बद्रीने मला सांगितलं नव्हतं व मीही विचारलं नव्हतं.

उतरल्यावर बद्री म्हणाला, ''चाय पियेंगे.''

''अरे, पण आधी राहुलला बघू ना.''

माझं न ऐकता त्याने मला आमच्या नेहमीच्या टपरीवर नेले व दोन चहा ऑर्डर केले.

चहा येईपर्यंत कसे कोणास ठाऊक, आमचे आणखी दोन रूममेट – गोसावी व खन्नाही – आले. मला आश्चर्यच वाटलं.

''तुला लगेच घेऊन येतो म्हणून ह्याने आम्हाला सांगितलं होतं'' गोसावी म्हणाला,

तिघांचेही चेहरे फटफटीत दिसत होते.

''काय झालं? पटकन सांगत का नाही?'' मी वैतागलो होतो.

''राहुलने आत्महत्या केली. लोकलखाली येऊन आत्महत्या केली. काल रात्री साडेबाराच्या सुमारास हे घडलं. डेड बॉडी पोलिसांच्या ताब्यात आहे. राहुलच्या पाकिटात तुझं कंपनीचं कार्ड सापडलं. मग ते तुझ्याबद्दल विचारू लागले. तुझ्या कंपनीत जातो म्हणाले होते. मग आम्हीच म्हटलं, कंपनीत जाऊ नका, आम्हीच त्याला बोलावून आणतो!''

मला त्यांचं ऐकून काही सुचेचना. राहुल असं काही करू शकतो ह्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. तो एवढं मोठं धाडस कसं करू शकला हेच समजत नव्हतं. साध्या झुरळाला घाबरणारा राहुल; अंगात एवढं धैर्य कुठून आणू शकला?

''मी आणि तो नेहमीच्या सवयीप्रमाणे जेवण झाल्यावर रात्री अकरानंतर स्टेशनला फिरायला आलो होतो. इथेच मी सिगरेट घेतली व आम्ही गप्पा मारत उभे होतो. तेवढ्यात राहुल लघवी करून येतो म्हणाला. आपली रेल्वे ट्रॅकवर रात्रीची लघवी करायची सवय तुला माहितीच आहे. मी तो आत्ता परत येईल म्हणून तेथेच उभा राहिलो. प्लॅटफॉर्मवरून विरार लोकल सुटलेली मी बघितली. पण असं काही होईल वाटलंच नव्हतं. ह्या माणसाने समोरून ट्रेन येत आहे बघितल्यावर सरळ उडी मारली. त्याचे दोन तुकडे झाले. ट्रेन थांबलेली व थोडासा गलका झाल्याचं मी बघितलं. मी सहज कुतूहल म्हणून पुढे बघायला गेलो व हे समोर आलं. त्याचा हात व मुंडकं अक्षरश: वेगळं होऊन तुटून पडलं होतं. अजूनही आठवलं की अंगावर शहारे येतात.''

गोसावीने बोलता बोलता टेबलखाली मान घातली व तो चक्क रडू लागला. मला काय बोलावं तेच सुचत नव्हतं.

गोसावी बावीस तेवीस वर्षांचा पोरगा असेल. राहुलच्या शरीराची अशी अवस्था झाल्याची कल्पना केल्यावर माझ्या

अंगावरही शहारा आला होता. गोसावीची अवस्था मी समजू शकत होतो. मी त्याच्या पाठीवरून हलकासा हात फिरवला. शेवटी मी त्याच्यापेक्षा पाच सहा वर्षांनी मोठा होतो.

''उसको पुलिसने जोरसे दो झापड मारा'' खन्ना म्हणाला.

''क्यों?''

''पुलिसने बोला की तेरे दोस्तको तुने धक्का देके मारा होगा. कुछ दुश्मनी होगी. बादमे मोटरमन और प्लॅटफॉर्म के लोगोने बताया की वो खुद ट्रेनके सामने आया था, किसीने उसे धक्का देते हुअे देखा नही!'' खन्नाच्याही डोळ्यात बोलता बोलता पाणी आलं.

वातावरणात चमत्कारिक शांतता पसरली. थोड्या वेळाने गोसावीच बोलला,

''मी त्याला धक्का देऊ शकेन का? मी त्याची खूप चेष्टा करायचो. आपल्या सर्वांमध्ये मोठा तूच होता. त्यानंतर राहुल. पण अगदी सोवळा. सुपारीच्या खांडाचं व्यसन नाही या सदरात मोडणारा. सिगरेट नाही. दारू नाही. पोरीबाळी नाही. एकदम सज्जन. कुणाच्या अध्यात नाही, मध्यात नाही; मग त्याची चेष्टा नाही करणार तर काय करणार! कधी रूममध्ये ब्लू फिल्म लावली तर आतल्या खोलीत जाऊन झोपणार. त्याच्या भिंतीवर स्टेफी ग्राफऐवजी राम-कृष्णाच्या तसबिरी लावणार! मग मी तरी कसा गप्प बसणार?'' राहुलची ही आठवण निघाल्याने त्याला आता परत बरं वाटत असावं.

''काल काही विशेष घडलं का? राहुल सगळ्यांशी कसा बोलत होता? तुम्ही त्याला काही बोललात का? तो नाराज वगैरे होता का? आत्महत्येच्या संदर्भात काही बोलला होता का?''

''विशेष काहीच घडलं नाही ह्याचंच आश्चर्य वाटतं आहे. आमच्यापैकी कोणाशीही त्याचं भांडण झालं नाही. एरवीही तो आमच्याशी कमीच बोलायचा. आम्ही त्याला लहान वाटत असू. तू दादरला राहायला गेल्यावर दोन तीन महिने इकडे फिरकला नाहीस, तेव्हा तो म्हणाला होता की, 'राघव तो बडा आदमी हो गया. नौकरी मिल गयी तो अपनेको भूल गया.' ''

''मी त्याला या रविवारी भेटणारच होतो. त्याचा मला ऑफिसमध्ये फोन आला होता. अजून दोन दिवसांनी मीच विरारला येतो, म्हणालो होतो. तेवढ्यात तो असं काही करेल असं वाटलं असतं तर आधीच आलो असतो.''

''आम्हाला तर त्याची पुसटशी कल्पनाही नव्हती. खन्नाला नेहमीप्रमाणे त्याच्याकडून शंभर रुपये उधार हवे होते. ते त्याने लगेच काढून दिले. त्याने थोडाफार अभ्यासही केला. बाकीचा वेळ गाणंबिणं ऐकत बसला होता. पूजाही केली. काही बिघडलं आहे असं वाटलंच नाही. शेवटपर्यंत त्याने कल्पनाही येऊ दिली नाही.''

''मग तो अपघात कशावरून नाही? आत्महत्याच कशावरून? तंद्रीत तो ट्रॅक ओलांडून जात नव्हता कशावरून?''

''शक्यच नाही. ट्रॅक ओलांडण्याचा प्रश्नच येत नाही. आपण लघवी नेहमी सर्व्हिस ट्रॅकवर करतो. लोकल ट्रॅकपर्यंत जायचा प्रश्नच येत नाही आणि लोकल येताना दिसल्यावर त्याने अंग झोकून दिल्याचं मोटरमननेच सांगितलं.''

''बॉडी कुठं आहे?''

''पोस्टमार्टेम झालं आणि नंतर बॉडी पोलिसांच्या ताब्यात आहे.''

''त्याच्या घरी कळवलंत?''

''कळवलं, पण आमची चूक झाली. आम्ही गोधऱ्याला फोन केला. त्याच्या वडलांना तो वारला म्हणून कळवलं आणि बॉडी घेऊन येतो आहे म्हणून कळवलं. पण आता पोलीस बॉडी ताब्यातच देत नाही आहेत. घरच्यांना बोलवा म्हणताहेत.''

''तू फोनवरून राहुल वारल्याचं कळवलंस की आत्महत्या केल्याचं कळवलंस?''

''म्हणजे तसं आत्महत्या केल्याचंच कळवलं. आमची जरा चूकच झाली. असं कळवायला नको होतं.'' गोसावीला त्याची चूक लक्षात आली होती.

''ओह गॉड! हे ऐकल्यावर त्याच्या वडलांना काही झालं तर? असं कधी कळवतात का? मला सांगताना कशी बरोबर अक्कल सुचली?''

''आपल्याला काहीच सुचत नाही बुवा. असा प्रसंग आयुष्यात कधी आपल्यावर आला नव्हता. आपण मॅड झालो आहोत. बॉडी आपल्याला बघवत नाही. आत्तापर्यंत आपल्यात असलेला मित्र असा कसा जाऊ शकतो यार? काय दुःख होतं त्याला? आम्ही त्याच्या एवढे जवळ होतो पण त्याला आपल्याला काहीच सांगावसं वाटलं नाही? आम्ही एवढे परके होतो? आपण जवळ राहतो म्हणजे काय? आपण एकमेकांना कितपत ओळखतो? आजपर्यंत आपण नुसतेच खुशालचेंडू होतो. आता कशाचाच अर्थ समजत नाही!'' गोसावी परत रडू लागला. रडता रडता तो उठून बाहेर गेला.

''उसको सुबहसे उल्टी हो रहा है. कुछ समझमे नहीं आता.'' खन्नाचाही चेहरा भेदरलेला होता.

''पोस्टमार्टेम झाल्यावर त्या डॉक्टरला म्हणालो की ते धड आणि हात एकत्र दिसेल असं थोडंफार तरी शिवून टाका. तर त्यांनी कायदा सांगितला की जेवढं शरीर उसवलं, तेवढंच शिवायचं असतं. आता त्या शरीराचे तीन तुकडे गोधऱ्याला घेऊन जायचे तर पोलिस म्हणतात तुम्ही त्याचे कोण? बॉडीचीही परस्पर विल्हेवाट लावणार नाही कशावरून? बॉडी त्याच्या वडिलांच्याच हातात देणार कशावरून? नातेवाईकाने येऊन ओळख पटवून बॉडी ताब्यात घ्यायची असते.''

खन्नाने मराठी बोलण्यात चांगलीच सुधारणा केलेली दिसत होती. शेवटी त्यालाही मुंबईत येऊन तीन वर्षं झाली होतीच.

''हमारे साथ पुलिसमें चलो. बॉडीको लेते है और गोध्रा चलते है.''

मी त्याचाच विचार करत होतो. पोलीस सरळपणे बॉडी ताब्यात देतील असं वाटत नव्हतं. राहुलच्या वडलांना परत गोधऱ्याला फोन करण्यात अर्थ नव्हता. मला केदारांचं नाव

आठवलं. इथले ते नगरसेवक होते व थोडेफार ओळखीचेही होते. त्यांचं घरही मला माहिती होतं.

''कुठल्या पोलिसांच्या ताब्यात आहे बॉडी?''

''रेल्वे पोलिसांच्या.''

''मी गोसावीला घेऊन जातो व अर्ध्या तासात येतो. तोपर्यंत तुम्ही इथेच बसा.''

टपरीच्या बाहेर उभ्या असलेल्या गोसावीला मी बरोबर घेतलं आणि निघालो.

सुदैवाने केदारसाहेब घरीच होते. मी त्यांना ओळख सांगितली. त्यांनी मला ओळखलंही. मी त्यांना माझं काम सांगितलं. ''काय करायचा तुमचा हा राहुल त्रिवेदी?''

''सर, आम्ही सगळेच रेडिओ ऑफिसरच्या परीक्षेसाठी मुंबईत आलेलो. गेल्या चार वर्षांपासून मी आणि राहुल परीक्षा देत होतो. ह्या परिक्षेचे तीन ग्रुप असतात. एका वेळी एका ग्रुपची परीक्षा द्यायची. असे आम्ही दोघेही दोन्ही ग्रुपच्या परीक्षा पास व्हायचो पण शेवटच्या ग्रुपच्या एका पेपरला नापास होत होतो. पुढच्या वेळी परत पहिल्या ग्रुप्सची परीक्षा द्यावी लागते. फक्त उरलेल्या पेपरची परीक्षा देऊन चालत नाही. या प्रकाराला कंटाळून मी शेवटी दुसरी नोकरी धरली. पण राहुलचा प्रयत्न चालूच होता.''

''म्हणजे परीक्षेला कंटाळून त्याने आत्महत्या केली तर...'' केदार पटकन बोलले.

मला त्यांचं आश्चर्य वाटलं. किती पटकन त्यांनी राहुलच्या आत्महत्येवरचा निष्कर्ष काढला होता. मी काहीच बोललो नाही.

''हे पोलीस खूप हरामी असतात. मी त्यांना दम देऊन काम करून घेतलं तर पुढे मागे ते कटकटी करतील. तेव्हा त्यांची मागणी आपल्याला मान्य करावीच लागेल.''

''तुम्ही यातून सोडवा माझ्या मित्रांना. आपण काय पाहिजे तो खर्च करूच.''

''तू असं कर, माझ्याकडे काही पैसे देऊन ठेव. मी त्यांच्याशी बोलतो. तुझं काम होईल. बॉडी कशी घेऊन जाणार?''

''ॲम्ब्युलन्स करावी लागेल. आम्हालाच बॉडी गोधऱ्याला घेऊन जावी लागेल.

''तू ॲम्ब्युलन्सची सोय कर. तोपर्यंत मी बॉडी मिळवून देतो.''

मी केदारांकडे पैसे ठेवले.

कालच पगार झाला होता. पगारही अजून फारसा नव्हता. बऱ्याचे पैसे द्यायचे होते. पण ही वेळ महत्त्वाची होती. मित्रांकडे काय पैसे असायचे याची मला कल्पना होती. मी नुकताच त्यांच्यातून सुटलो होतो. गोधऱ्याला राहुलची बॉडी दिल्यावर त्याच्या वडलांकडे पैसे मागू असाही विचार पटकन मनात येऊन गेला.

केदारांकडून निघालो व स्थानिक शिवसेनेच्या शाखेकडे ॲम्ब्युलन्सची चौकशी केली. सुदैवाने त्यांच्याकडे एक दिवसासाठी ॲम्ब्युलन्स मिळू शकत होती.

राहुलच्या गावाला डेड बॉडीबरोबर जाण्याची सगळ्यांनीच तयारी दाखवली. माझा तिथे जाण्याचा इरादा नव्हता. माझी एक दिवस रजा लागली असती व मला ते परवडणारं नव्हतं. पण सर्वांचं मत पडलं की मी त्यांच्याबरोबर हवाच.

मी यात पुरतो अडकलो आहे ह्याची मला कल्पना आली. माझ्याकडे मित्रांनी मोठेपण देऊन टाकलं होतं. माझी सुटका दिसत नव्हती. मी रडतखडत ते मान्य केलं.

केदारांनी खरोखरच काम केलं. बॉडी लगेच मिळाली. ॲम्ब्युलन्स तयार होतीच. खन्ना म्हणाला,

''कुछ खा लेते है. आठ घंटेका सफर है. सुबह तक पहुँच जाएँगे. रूम मे चलो. कुछ खाना बनाते है.''

खन्नाला भूक लागलेली दिसत होती.

''बॉडीला आपण जास्त काळ असं ठेवू शकत नाही. नाहीतर वास येईल. परत आठ तास बॉडीबरोबर प्रवास करायचा आहे,'' मी घाई केली.

''त्याची व्यवस्था केली आहे. वास येणार नाही.'' बद्री बोलला.

मग आम्ही रूमवर आलो. डोळसकर म्हणून सद्गृहस्थांचा तो फ्लॅट होता. आम्ही विद्यार्थी म्हणून त्यांनी आम्हाला कमी भाड्यात फ्लॅट वापरण्यासाठी दिला होता. आम्ही सगळे आधी हैद्राबादला रेडिओ ऑफिसरचा कोर्स करत होतो. तेथील कॉलेजमध्ये प्रॅक्टिकलची नीटशी सोय नव्हती. त्यामुळे पूर्वी ग्रुप वनची परीक्षा पास होऊनही इथे येऊन माहिमच्या संस्थेत विद्यार्थी म्हणून नाव नोंदवलं होतं व परत पहिल्यापासून आम्ही कोर्स जॉईन केला होता.

त्यानंतर परत त्याच परीक्षा. शेवटापर्यंत जाणं व परत मागं फिरणं. पण कोर्सनंतर होणारे फायदे आमच्या डोळ्यासमोर दिसत होते. डॉलर्समध्ये पगार. सतत परदेशी भटकंती. एका बंदरावरून दुसऱ्या बंदरावर. वेगवेगळं जीवन. इथे येणारा प्रत्येक जण भविष्यात आपल्यासाठी सुंदर काहीतरी वाढून ठेवलं आहे असं स्वप्न घेऊन येतो.

हा कोर्स करायला लागून चार साडेचार वर्षं झाली तरी मी मी पास होण्याची चिन्हं दिसत नव्हती. मी निश्चितच ढ नव्हतो. पण काहीतरी चुकत होतं हे नक्की. नगरसारख्या ठिकाणी राहून आई नोकरी करत होती व मला पैसे पाठवत होती हे मला शोभादायक नक्कीच नव्हतं. आयुष्यात मी एकही गोष्ट धडपणे न करता आईला त्रास मात्र देतो अशी भावना निर्माण झाली होती. एक फ्रस्ट्रेशन आलं होतं. आपल्याला नऊ ते पाच नोकरी करायची नाही असं काहीतरी मागेच ठरवलं होतं. पण नशिबात तेच दिसत होतं. परत दुसरं काही करण्यासाठी आईकडे पैसे मागायची लाज वाटत होती. एवढ्या काळात मुंबईला काही मित्र झाले होते. ते म्हणाले, ''तू कॉम्प्युटरचा कोर्स कर. कोर्सनंतर तुला नोकरी नक्कीच मिळेल. कोर्सचे पैसे सध्या आम्ही देतो. नोकरी लागल्यावर आमचे पैसे परत देऊन टाक.''

त्यांचं बोलणं ऐकून मला गहिवरून आलं होतं. एवढे चांगले

मित्र मिळणं भाग्याची गोष्ट होती.

मी मित्रांकडून पैसे घेऊन कॉम्प्युटरचा कोर्स केला व मला खरोखर नोकरीही मिळाली. मी ह्या मित्रांपासून वेगळा झालो.

''आज कोणाची पाळी आहे स्वयंपाकाची?''

''राहुलची होती,'' बद्री बोलला.

''हरकत नाही. त्याच्यापुढची पाळी माझी होती. मी करतो रे स्वयंपाक. नाहीतरी राहुलला आता धरायचं नाही आहे.'' बद्रीला बोलताना परत भरून येत होतं.

बद्रीने स्वयंपाक सुरू केला. मी राहुलची खोली बघू लागलो. काही महिन्यांपूर्वी मी त्याच्याबरोबर ह्याच खोलीत झोपत होतो. राहुल फार शिस्तीचा, नीटनेटका होता. त्याच्या भिंतीला त्याचं सामान नीटनेटकेपणाने लावलेलं होतं. गादी, सुटकेस, अभ्यासाची पुस्तकं. देवाच्या तसबिरी. त्याच्या समोरची भिंत माझी होती. मी गेल्यावर ह्या लोकांनी दुसरा कोणी पार्टनर घेतला नव्हता. त्यांना त्यामुळे जास्त भाडं भरावं लागत होतं.

''राहुलला घरून काही परेशानी आहे असं कधी वाटलं का? कधी तुमच्याशी तसं बोलला?'' मी त्याच्या सुटकेसला हात लावत गोसावीला विचारलं.

''तसं विशेष कधी बोलला नाही. पण त्याला घरून लग्न करण्याबद्दल सांगितलं असावं. तो घरचा किती श्रीमंत होता हे तुला माहिती आहेच. त्याला रेडिओ ऑफिसर बनण्याची अवदसा कुठून सुचली कोणास ठाऊक. घरी एवढी मोठी शेती. तेलाचा व्यापार. हा नुसता घरी बसला असता तरी चाललं असतं. एकदा तो बोलला होता की घरचे म्हणतात, जेवढे पैसे नोकरीत मिळतील तेवढे काही न करण्यासाठी देतो पण घरी बैस. पण त्याला स्वत:च्या हिमतीवर पुढे यायचं होतं. त्याला लग्नाबद्दल विचारलं तर पटकन नाही म्हणाला. त्यामुळे घरचे वैतागले होते. गुजराती लोकांमध्ये लवकर लग्न करतात. हा एव्हाना दोन मुलांचा बाप असायला पाहिजे होता.''

''तेच त्याचं दु:ख असावं. तुला आठवतं, कलकत्त्याहून जो आपली ओरल घेणारा आला होता त्यानेच आपले थीअरीचे पेपर तपासल्याचं कळलं होतं. मी त्याचा पत्ता मिळवून कलकत्त्याला पत्र पाठवलं होतं व विचारलं होतं की मला कुठल्या हिशेबाने नापास करता आहात? पण त्यानं उत्तर दिलं नाही. मग मी कोर्सच सोडायचं ठरवलं. राहुललाही तसं वाटत होतं. पण अपयशी होऊन त्याला घरी जाण्याची हिंमत नव्हती. म्हणूनही त्याने आत्महत्या केली असेल.''

''पण मग अशी मधेच का? आता काही रिझल्ट लागलेला नव्हता. उलट परीक्षा जवळ आलेली आहे म्हणून तो नेहमीप्रमाणे अभ्यास करत होता. मग त्याच्या डोक्यात आत्महत्या करण्याचं एकदम का यावं?'' गोसावीने रास्त प्रश्न विचारला.

माझ्याकडेही त्या प्रश्नाचं उत्तर नव्हतं. किंबहुना मी तेच शोधत होतो. बोलता बोलता राहुलची सुटकेस उघडण्याचा प्रयत्न करत होतो. पण सुटकेस लॉक केलेली होती.

''राहुल सुटकेस कधी बंद ठेवायचा नाही. यामधे तो काही महत्त्वाचं ठेवायचा? तुमच्यापासून लपवून वगैरे?''

''असं उघडपणे तरी वाटलं नाही. तू गेल्यापासून तो तसा एकटा असायचा, हे मात्र खरं आहे.''

''आपण सुटकेस उघडून बघायची? नाहीतरी तो कायमचा गेलाच!''

''कशाला? त्याचं सर्व सामान त्याच्या गावी पोचतं करू. मग त्याच्या आईवडलांना काय करायचं ते बघून घेतील.''

''कदाचित यात तो काहीतरी ठेवत असेल. त्याने आत्महत्या का केली हे तुला शोधावंसं वाटत नाही?''

''शोधून काय मिळणार आहे? डोक्याला त्रास होईल.''

''आपल्यातील एकाला आत्महत्या का करावीशी वाटली हे तुला शोधावंसं वाटत नाही? मी माझ्या जबाबदारीवर कुलूप तोडतो.'' मी म्हटलं.

मला गोसावीचा रागच आला. कुलूप तोडणं माझ्यासाठी अवघड नव्हतं. मी हाडाचा इंजिनिअर होतो. पटकन कुलूप तोडलं. बॅग व्यवस्थित लावलेली दिसत होती. राहुलचे कपडे त्यात व्यवस्थित लावून ठेवलेले दिसत होते. एक दोन अध्यात्माची पुस्तकंही दिसत होती. जणू तो आता गावाला चालला आहे किंवा गावाहून येत आहे अशा पद्धतीने सर्व लावून ठेवलेलं होतं.

''राहुल गावाला जाणार आहे, असं काही बोलला होता?''

''त्याला गावाहून पत्र आलं होतं. पण तो गावाला जायचं काही बोलला नव्हता!''

मग मी परत बॅग शोधू लागलो. पैशाचं पाकिट दिसलं. त्याच्यात बरेच पैसे दिसत होते.

''आपला पैशाचा प्रॉब्लेम मिटला. राहुल जातानाही बरेच पैसे ठेवून गेला आहे!''

कोणी काही बोललं नाही. मी काही नोटा काढून चक्क माझ्या खिशात ठेवल्या. तळाशी एक लिफाफा होता. तो उघडल्यावर आत एक पत्र व मुलीचा फोटो दिसला.

मुलगी खानदानी गुजराती दिसत होती. पत्र गुजरातीत लिहिलेलं होतं. राहुलच्या सहवासात राहून गुजराती साधारण कळू शकत होतं. पत्र वडलांनी लिहिलं होतं. 'फोटोतली मुलगी पसंत केली आहे. तिच्याशी लग्न पक्कं करत आहोत. तुझ्या पसंतीची अपेक्षा आहे. एकदा येऊन तिला बघून जा.' वगैरे लिहिलं होतं. राहुल गावाला जायची तयारी करत असावा.

मग मधेच त्याला हे का सुचावं?

मी बॅग बंद केली. बद्रीचं जेवण तयार झालं होतं. मलाही भूक लागली होती. मित्राने आत्महत्या केली असूनही आम्ही सगळेच व्यवस्थित जेवलो. परत रात्रीचा प्रवास करायचा होता.

ॲम्ब्युलन्समध्ये आम्ही बसलो. बॉडी मागे. ड्रायव्हरशेजारी मित्रांनी मला बसायला सांगितलं. या तिघांपैकी एक जण आलटून पालटून माझ्या बाजूला बसणार होता. दोघे जण मागे बॉडीबरोबर.

मी त्यांना नकार दिला नाही. ते आपणहून मला पूर्ण वेळ पुढे बसण्यास सांगत होते. तेवढे मला जपत होते. सुरुवातीस गोसावी माझ्याजवळ बसला.

ॲम्ब्युलन्स हायवेला लागली आणि तिने चांगलाच वेग पकडला. झोंबणारा वारा येऊ लागला म्हणून माझ्याकडील खिडकी बंद करून टाकली. गोसावी माझ्याशी बराच वेळ काहीच बोलला नव्हता. काहीतरी विचार करत असावा. मग एकदम म्हणाला,

''राघव, मला तुझ्याशी काही बोलायचं आहे.''

''मग बोल ना –''

काही क्षण परत शांततेत गेले.

''राहुलने माझ्यामुळे आत्महत्या केली असं मला वाटतं.''

त्याचा चेहरा एकदम रडवेला झाला. मी त्याचा हात धरला. हलकासा दाबला.

''मोकळेपणी सांग, मनात ठेवू नकोस. त्याने जास्त त्रास होईल.''

माझ्या बोलण्याने त्याला थोडा धीर आला असावा.

''राहुल खूप चांगला होता. त्याच्याशिवाय मी हा कोर्स पूर्ण करू शकत नाही.''

''का?''

''जवळपास गेलं वर्ष तो माझा खर्च करत होता. माझा उदरनिर्वाह त्याच्यामुळे होत होता. तुला माझी घरची परिस्थिती माहिती आहेच. वडील सरकारी नोकरीत. प्रामाणिक अधिकारी. आई घरीच असते. दोघं धाकटी भावंडं. बहीण बी.कॉम.ला तर भाऊ इंजिनिअरींगला. मला काहीतरी वेगळं बनायचं होतं. लहानपणापासून सिंदबादच्या सफरी मनावर कोरत आल्या. वाटलं असं आपणही समुद्रावर जावं. त्या ऊर्मीतून ह्या कोर्ससाठी आलो. चार वर्षं झाली, अजूनही आपला कोर्स झालेला नाही. वडलांना सांगितलं होतं की दोन वर्षांत कोर्स पूर्ण होईल. पण तीन वर्षं झाली. तसा वडलांचा धीर खचत गेला. ते तसे वाईट नाही आहेत, पण त्यांच्याही अडचणी आहेत.

''मी मागच्या वर्षी गावी गेलो होतो. तेव्हा वडलांनी घरची परिस्थिती समजावून सांगितली. धाकट्या बहीण-भावाने तुला पोसण्याची वेळ आणू नकोस म्हणाले. आपण हैद्राबादहून मुंबईत आलो होतो. वडलांचं म्हणणं मुंबईत शिकवण्या वगैरे करूनही बरेच पैसे मिळतात. आता तू तुझं बघून घे. अगदीच अडचण असेल तर मला सांग. मी गावाहून आल्यावर खूप परेशान होतो. इथे विरारला कोणाच्या शिकवण्या घ्यायच्या हा प्रश्नच होता.

''राहुलला माझी ही अवस्था कळली असावी. त्याने मला माझी परेशानी विचारली. तो म्हटला, 'शिकवण्या घेणं तुला जमेल का ह्याची मला शंका आहे. तू जरूर प्रयत्न कर. पैशाची चिंता करू नकोस. मी माझ्या घरून जास्त पैसे मागवेन. तुझा कोर्स पूर्ण करण्याची जबाबदारी माझी!'

''मला हे बिलकूल अपेक्षित नव्हतं. कोणी एवढा चांगला असू शकतो हे माझ्या कधी मनातही आलं नव्हतं. जे करायला वडील नकार देत होते ते राहुल करू बघत होता. मीसुद्धा बदमाशच असेन. राहुलचं म्हणणं मी सरळ मान्य केलं. कुठलीही खळखळ न करता ते स्वीकारलं. मला रेडिओ ऑफिसर व्हायचं होतं. मी शिकवण्यांसाठी प्रयत्नच केला नाही. राहुलवर पूर्णपणे अवलंबून होतो. जणू माझा त्याच्यावर हक्कच होता. तुम्हाला कळू नये म्हणून महिन्याच्या सुरुवातीलाच तो माझ्याकडे पैसे देऊन ठेवायचा. नंतरही मला लागले तर मी त्याच्याकडे हक्काने मागायचो. तो घरचा श्रीमंतच होता. त्याला काही फरक पडत नव्हता. सगळं व्यवस्थित चाललं होतं.

''तू आमच्यातून बाहेर पडलास आणि काहीतरी बिनसायला लागलं. राहुल उदास दिसायचा, पण आम्हाला काही सांगायचा नाही.

''त्याच्या लग्नासाठी घरून कधीचा दबाव येत होता. अखेर राहुलने लग्न करायचं ठरवलं. मला धक्काच बसला. राहुलने लग्न करून मला चालणार नव्हतं. माझं रेडिओ ऑफिसर बनण्याचं स्वप्न अधुरं राहिलं असतं.

''कारण शेवटी राहुलच मला पोसत होता. तो लग्न करून मधेच निघून गेला असता तर? वडलांकडून पैसे घेणं मी कधीच बंद केलं होतं. त्यांना वाटत होतं मी शिकवण्या घेऊन शिकतो आहे. कोणालाच सत्य काय ते माहिती नाही.

''राहुल गेला असता तर माझ्या स्वप्नांचा चक्काचूर झाला असता. मी त्याची कडक शब्दांत निर्भर्त्सना केली! लग्नच करायचं होतं तर एवढी वर्षं आमच्याबरोबर कशाला काढलीस म्हणून विचारलं. तो वाद घालण्याऱ्यांपैकी नव्हता.

''मी एक दिवस त्याला स्पष्टच म्हटलं, 'तू लग्न करून गेलास तर मी काय करायचं? मला असं अर्धवट सोडून तू कसा जाऊ शकतोस?'

''तो म्हटला, 'मी लग्न ठरवतो आहे. लगेच करत नाही. मी स्वत: हा कोर्स पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. तूही लवकरात लवकर हा कोर्स पूर्ण करण्याचा प्रयत्न कर.'

''मला काय हौस आहे कोर्स लांबवण्याची? आणि तू आता असं म्हणतो आहेस. पण घरच्यांपुढे तू काय बोलणार?''

''मग राहुल गप्प बसला. कुठलाच वाद तो वाढवायचा नाही.

''तो गावाला जाऊन लग्न ठरवणार होता. मला तसं व्हावसं बिलकूल वाटत नव्हतं. मी अगदी स्वार्थी झालो होतो. मला काय झालं होतं तेच मला आता समजत नाही. दुसऱ्या दिवशी तो गावाला जाणार आणि हे घडलं. तो आता कायमचाच गेला. माझे सगळेच प्लॅन अर्धवट सोडून. त्याच्यावर मी नैतिक दबाव आणला होता. त्याला टेन्शन आलं असणार. मैत्री आणि घरचे लोक यांच्यामधे तो अडकला होता. त्याला काय करावं हे सुचलं नसेल. माझ्यामुळे त्याचं असं झालं.''

गोसावी परत रडू लागला.

मी त्याला थांबवलं नाही. थोड्या वेळानं तो आपोआपच थांबला. काही वेळ कोणीच बोललं नाही. ॲम्ब्युलन्स बऱ्यापैकी वेगानं चालली होती. ड्रायव्हरच्या खिडकीतून गार वारा येत होता.

अंगाला छान वाटत होते. मग गोसावी म्हणाला,

''आता बद्रीला पुढे बसू दे. मी मागे बसतो व झोपण्याचा प्रयत्न करतो.''

त्याने ड्रायव्हरला थांबण्याची सूचना केली.

ॲम्ब्युलन्स थांबल्यावर आम्ही सर्वच उतरलो. सगळ्यांनाच घाईची लघवी लागली होती. आम्ही रांगेत लघवीला उभं राहिल्यावर राहुलने मागे एकदा काढलेला आमचा फोटो मला आठवला व त्याही परिस्थितीत हसू आलं. आज राहुलचा मृतदेह आमच्याबरोबर होता.

बद्रीलाही ते आठवलं असावं. तोही हसला.

ड्रायव्हर कुठेतरी दूर लघवीला जाऊन आला. गाडी परत सुरू झाली.

यावेळी बद्री माझ्याजवळ बसला होता. मी जरा सावरूनच बसलो होतो. गोसावीनं जे सांगितलं त्या सर्व गोष्टींचा विचार करत होतो. गोसावी आणि राहुलमधल्या आर्थिक संबंधांबद्दल आपल्याला काहीच कसं माहीत नव्हतं याचं आश्चर्य वाटत होतं. माणूस कळणं किती अवघड असतं, याची जाणीव होत होती.

''और बद्री? तेरा कैसा चल रहा है?'' मी विचारलं.

बद्री काहीच बोलला नाही.

''बहुत बुरा हुआ राहुलका. उसने ऐसा करना नही था.''

बद्रीला मराठी चांगलं समजायचं पण बोलता यायचं नाही. किंबहुना त्याने प्रयत्न केला नाही.

''राहुल गया उसमे मै दोषी हूँ ऐसा लगता है'' जरा वेळानं तो म्हणाला.

मी एकदम आवंढा गिळला. बद्री हे नवीनच सांगत होता.

''हां राघव. मुझे ऐसाही लगता है.''

''क्यो? तुने क्या किया?''

''राहुल चक्कर आदमी था. एक बात उसके दिमाग मे घुस गयी तो उसको निकालना मुश्कील होता था. बहुत जिद्दी था.''

''उसने क्या किया?''

''तूने रूम छोड दिया तबसे वो कुछ खोया खोया लगता था. हमे कुछ बोलता नही था. एक छुट्टी के दिन मै उसको माटुंगा मे मेरे मामा के घर लेके गया. तुझे भी मालुम है मेरे यहाँ कुछ रिश्तेदार है. मै उसे लेके गया. अपनेपनमे. उधर कुछ और ही हो गया.''

''क्या हुआ?''

''मेरे मामा की बेटी बीस साल की है. बी.कॉम. करती है. पिक्चर में श्रीदेवी कैसी दिखती है, वैसी है. उसे कॉलेज की श्रीदेवी कहतेभी है. राहुलने उसको देखा और वो पागल हो गया. हम घर आते वक्त वो मुझे कहता है की वो लक्ष्मी से शादी करेगा.''

मलाही हे नवीनच वाटलं.

''राघव, हम अय्यर है. लक्ष्मी अभी सीख रही है. उसको आगे पढ़ना है.''

''अय्यर है तो क्या हुआ? राहुल भी कुछ कम नही था.'' जातधर्माबद्दल कोणी बोललं की मला राग यायचा. पण आपल्या भारतीय मनात जात-धर्म-प्रांत अगदी खोलवर रुजले आहेत.

''ये नही हो सकता राघव. मुझे ये अच्छी तरहसे मालूम है, मैने उसे यही समझाया. उसने मेरा माना नही.''

''मग त्याने काय केलं?''

''आपल्या घरी त्याने मला दोनतीनदा तिच्याबद्दल विचारलं. तिचाच विचार तो एकसारखा करत असावा. मुझे बोलता नही था. एक दिन उसने पागलपन की कमाल कर दी.''

''क्या?''

''वो मुझे पुछे बगैर मेरे मामा के पास चला गया. खुद के बारे में मामा को सब बताया और बोला की उसको लक्ष्मीसे शादी करनी है. मामा परेशान हुए. उसने प्रपोजल रिजेक्ट नही किया मगर हाँ भी तो नही बोला. वो कैसे हाँ बोलता था? राहुल हॅड टेकन इट इन रॉंग स्पिरीट. मामाने मुझे उसके घर बुलाया और ये सब बात बतायी. मै परेशान था. राहुल दुःखी था. वो मुझसे मदत चाहता था. परहॅप्स इट वॉज हिज फर्स्ट लव. पहला प्यार ज्यादा दुःख पहुँचाता है. उसका अंत ऐसे होगा ये मैन कभी सोचा नही था. वो खोया खोया रहता था. मै उसे क्या मदद कर सकता था? शादी खेल थोडी है? राहुल मेरा अच्छा दोस्त था. शायद मैने ठीक से दोस्ती निभायी नही. मामला इस हद तक पहुंचेगा ऐसा लगता था, तो मै जरुर कुछ ना कुछ करता था. उसकी जान सबसे किंमती थी. राहुल कभी किसीसे मदत नही चाहता था. सिर्फ इस मामलेमे उसे मेरी मदद की जरुरत थी और मैने कुछ नही किया. वो अंदरही टुटता गया. सब दुःख अपने आप सह लेता था. आय वॉज हेल्पलेस. मैने उसे बचाने की कोशीश तक नही की. सिर्फ देखता गया.''

बद्री खिडकीवर डोकं ठेवून बसला. तो आतून रडतो आहे हे कळत होते. मी त्याचा हात हलकासा हातात घेतला.

''जे घडायचं ते घडून गेलं. आता त्याचा काही उपयोग नाही.''

''हम सबको तेरी याद आती थी. तू उसे समझा सकता था. वो तेरी बात मानता था.''

मी काही बोललो नाही. राहुलने चार दिवस आधीच फोन करून मला भेटायला सांगितलं होतं. मीसुद्धा त्याला भेटणारच होतो. त्याआधीच त्यानं ते केलं. त्याला माझ्याशी काय बोलायचं असेल?

मी गप्प बसलो. डोळ्यावर झोप येत होती. कोणाशीच बोलावंसं वाटत नव्हतं. डोक्यात राहुलचे विचार होते.

तेवढ्यात बद्री बोलला, ''अरे खन्ना को बैठने दो. वो बेचारा कबसे पिछे बैठा है.''

मला ते नकोसं वाटत होतं. आता खन्ना आणखी काय सांगेल याची भीती वाटत होती. पण बद्रीने ॲम्ब्युलन्स थांबवली.

परत लघवीचा प्रोग्राम झाला व यावेळी खन्ना माझ्या बाजूला येऊन बसला.

खन्ना म्हणजे टिपिकल पंजाबी होता. रुबाबदार व्यक्तिमत्त्व. हसरा, सतत जोक सांगणारा. आमची तो करमणूक होता. पण आज तो खूपच शांत होता. मी आपणहून त्याच्याशी काही बोललो नाही. तो आपणहून बोलेल ह्याची जणू मनातून खात्री वाटत होती.

''राहुल हल्ली फार चमत्कारिक वागत होता'' खन्नाने निरव शांततेत बोलण्यास सुरुवात केली.

''म्हणजे?''

''हे मी माझ्याच बाबतीत बोलतो आहे, इतरांच्या बाबतीत मला माहिती नाही. आणि गोष्टच अशी आहे की इतरांना मी ती सांगू शकत नाही. आज तू बाहेरचा झाल्यामुळे धाडस करू शकतो.''

''मनात ठेवू नकोस. सांगितल्याने बरं वाटेल.''

मग काही वेळ शांततेत गेला. खन्ना मनाशी जुळवाजुळव करत असावा.

''तू गेल्यावर ह्याची सुरुवात झाली. तू व राहुल एका खोलीत झोपायचा तर आम्ही तिघे दुसऱ्या खोलीत. तू गेल्यावर राहुलला एकटं वाटू नये म्हणून मी त्याच्याबरोबर झोपू लागलो. काही दिवस ठीक गेले. एकदा रात्री मी झोपलेलो असताना मला एकदम जाग आली. बघतो तर राहुल माझ्या पँटच्या चेनशी चाळे करत होता. माझा क्षणभर विश्वास बसला नाही. मला काही कळायच्या आत राहुल समोरच्या भिंतीला स्वत:च्या अंथरुणात जाऊन झोपला. मी एरव्ही झोपताना कधी पँट घालत नाही. लुंगी नेसतो हे तुला माहिती आहे. त्यादिवशी मी पिक्चरहून रात्री उशिरा आलो होतो व जाम थकल्यामुळे तसाच झोपलो होतो. माझा आधी स्वत:वर विश्वास बसला नाही. भास झाला असेल असं वाटलं. मी त्याला याबद्दल काहीच बोललो नाही. नंतर काही दिवस गेले असतील. परत एके रात्री तसाच प्रकार घडला. पण यावेळी माझा स्वत:वर विश्वास होता. मला परत झोपेतून जाग आली होती. यावेळी मी लुंगी नेसली होती. झोपेत लुंगी कधीच जागेवर राहत नाही. ती जागेवर नव्हतीच. सुटलेली होती व राहुलने माझ्या अंडरवेअरमधून आत हात घातला होता. माझं लिंग तेव्हाही ताठरलेलं दिसलं. मी राहुलला घाबरून विचारलं,

'तुला काय पाहिजे?'

'तू.'

'तू मला आवडतोस खन्ना. किती रुबाबदार आहेस.'

'तू मुलगी आहेस?'

'तू फक्त मुलींनाच आवडायला हवास?'

'अर्थात.'

'मलाही आवडलास तर काय बिघडेल?'

'आर यू मॅड? तू मुलगा आहेस. तुला मी आवडून कसं चालेल?'

'मला मुलगेच आवडतात. मला तू आवडतोस.'

''मला त्याच्या बोलण्याची शिसारी आली. राहुल असं काही म्हणेल अथवा करेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं.

''मी म्हटलं, 'तू सोजा राहूल. मुझे ऐसी बातोमे थोडाभी इंटरेस्ट नही है. मुझे लडका सिर्फ दोस्तीके लिए पसंत है. बाकी चीजके लिए लडकी. तेरा लडकी को देखके उठता नही है क्या?' मी त्याला सरळ विचारलं.

''तो गप्प बसला. निराश झाल्यासारखा वाटला. परत आपल्या जागेवर जाऊन झोपला. राहुल जेवढा अपसेट झाला नसेल तेवढा अपसेट मी झालो होतो. राहुलची माझ्या मनात काही इमेज होती ती सर्व इमेज या घटनेमुळे तुटून पडली. राहुलबद्दल असं काही डोक्यातच आलं नव्हतं. मला तो होमो आहे ही कल्पनाच सहन होत नव्हती. काय करावं हेच सुचत नव्हतं. आपल्यापैकी कोणाला त्याने असा त्रास दिला आहे का, हा विचार डोक्यात येत होता. पण कोणाला काही विचारायची सोय नव्हती. राहुलबद्दल आणखी कोणाला काही वाईट समजू नये असंही वाटत होतं.''

''राहुलने परत तसा प्रयत्न केला नाही?''

''केला पण अस्पष्टसा. एकदा हे दोघेही नसताना परत एकदा प्रयत्न केला. पण परत मी त्याला झिडकारलं. कडक शब्दांत सुनावलं. त्याच्यासाठी हे चांगलं नाही हे समजावून सांगितलं. तो गप्प बसला. गेल्या काही महिन्यांत मात्र त्याने माझा नाद सोडला होता. मी हाताशी येत नाही हे त्याच्या लक्षात आलं असावं.''

''दुसऱ्या कोणाबरोबर त्याने असं काही केलं असल्याचा संशय आला?''

''नाही. मी नंतर काही तरी कारणाने परत या दोघांच्या रूममध्ये झोपू लागलो. राहुल एकटाच त्या रूममध्ये झोपायचा.''

''ह्या गोष्टीचा आणि राहुलच्या आत्महत्येचा काही संबंध असेल असं वाटतं का?''

''असेल असं वाटतं. राहुलला नेमकं काय पाहिजे होतं हेच समजत नाही. त्याच्या बॅगेत मुलीचा फोटो बघितला. ती त्याला नको असेल. त्याला मी हवा असेन. मनात तो खूप निराश झाला असेल. तसं असेल तर मी त्याच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलो असं होईल.''

मग खन्ना गप्पच बसला. त्यालाही पुढे काय बोलावं ते समजत नव्हतं. माझ्याही डोक्यात वादळ उठलं होतं. सगळा गुंता होत चालला आहे असं वाटत होतं.

राहुलने नेमक्या कोणत्या कारणासाठी आत्महत्या केली असेल?

ॲम्ब्युलन्स वेगाने चाललेली होती. खन्ना खिडकीवर डोकं ठेवून झोपून गेला. मला मात्र काही सुचत नव्हतं. मी राहुलचा शोध घेत होतो.

गुंता सुटला नाही. पण गोध्रा आलं.

पहाट झाली होती. राहुलच्या घरात दिवे दिसत होते.

ॲम्ब्युलन्स थांबेपर्यंत त्या घरातून कोणीतरी बाहेर आलं व

गुजरातीमधून 'राहुलची बॉडी आली वाटतं' असं म्हणालं. त्यामुळे हेच राहुलचं घर हे न सांगता कन्फर्म झालं.

त्याच्या वडलांनी, मोठ्या भावानं आम्हाला जवळपास पकडलंच. राहुलही त्यांच्याजवळ माझ्याबद्दल बरंच काही सांगत असावा. कारण घरात सर्वांना माझं नाव चांगलं परिचयाचं होतं. हे सगळं कसं घडलं हे सांगणं आमची जबाबदारी होती. जणू घडलं त्या घटनेलाही आम्ही जबाबदार होतो. कदाचित आम्ही ते होणं टाळू शकलो असतो असं त्यांना वाटत होतं. त्यांचा मुलगा आमच्याबरोबर राहिल्यामुळंच गेला होता असा सूर उमटत होता व त्यावेळी त्याचा प्रतिवाद करणं बरोबर नव्हतं.

आम्ही सर्वांनीच वाद टाळला. राहुलची डेडबॉडी त्यांच्या ताब्यात दिल्यावर खरं तर आमची जबाबदारी संपली होती. पण राहुलच्या मृतदेहाला अग्नी दिल्याशिवाय आमची सुटका नाही हे लक्षात आलं. आम्ही ॲम्ब्युलन्सही थांबवली होती. कारण जाताना परत ॲम्ब्युलन्सने जायचं ठरवलं होतं.

निघताना मात्र राहुलचे वडील माझ्या गळ्यात पडले व रडू लागले.

''तुम्ही राहुलसाठी खूप केलंत. जे झालं ते झालं. तुमचे आभार कसे मानू? आमच्या मते राहुलने विशिष्ट तऱ्हेने घडायला हवं होतं. राहुल तसा घडला नाही. त्यात कोणाचीच चूक नाही. राहुलचं नशीब!''

मला त्यांना काय उत्तर द्यावं हे समजेना. राहुल गेल्याचं दुःख त्यांच्याएवढंच आम्हालाही होते. त्यांना ते सर्व सांगण्यात अर्थ नव्हता. मी त्यांच्या पाठीवरून हात फिरवला. त्यांना बरं वाटलं असावं.

त्यांचा निरोप घेऊन निघालो तेव्हा दुपारचं ऊन डोक्यावर आलं होतं. आम्ही सर्वच झाल्या प्रकाराने अस्वस्थ होतो. येताना आम्ही सर्वच मागे बसलो. एकमेकांशी फारसं बोलतही नव्हतो. कोणी झोप काढत होतं. कोणी शांतपणे खिडकीबाहेर बघत होतं. मी राहुलचा विचार करीत होतो.

त्याने आत्महत्या का केली असावी? मी त्याच्यापासून दूर गेल्यामुळे? मी त्याला न मिळाल्यामुळे? आमच्या दोघांत दुरावा निर्माण झाला आहे असं त्याला वाटल्यामुळे? त्याने मला बोलावूनही मी त्याला काहीसं उशिरा भेटण्याचं ठरवलं म्हणून?

ह्या सगळ्याची सुरुवात कशी कशी झाली? सांगणं अवघड आहे.

पण हैद्राबादला कुठेतरी झाली. राहुल बघताबघता माझ्याजवळ आला. अगदी जवळ आला. जणू आम्ही नवराबायको होतो. इतरांना ह्याबद्दल कल्पनाही नव्हती. आयुष्याच्या बेसावध क्षणी सुरू झालेल्या हकीकतीची एवढी मोठी किंमत द्यावी लागली होती काय?

मी त्याच्यापासून दूर झाल्यामुळे अस्वस्थ नव्हतो. मला मुलींबद्दल आकर्षण तेव्हाही वाटायचं, आताही वाटतं. राहुल मला आवडायचा हे खरं, पण त्याच्याकडे मी माझी बायको, माझ्या आयुष्याचा जोडीदार वगैरे दृष्टीतून कधी बघितलं नाही. आम्ही दोघं जवळ होतो तेव्हा मला त्याची ओढ वाटायची हेच खरं. इतर रूम पार्टनरना चुकवून आम्ही दोघं एकमेकांच्या जास्तीतजास्त सहवासात राहायचा प्रयत्न करायचो हेही खरं आहे. प्रत्येक वेळी काहीतरी नवीन गोष्ट करायची. त्यात तो माझी बायको किंवा मैत्रीण, प्रेयसी आणि मी त्याचा नवरा किंवा मित्र, प्रियकर असायचो. तेवढ्या वेळेपुरती ती गुंतवणूक माझ्यापुरतीही खरी असायची. पण त्यानंतर मी केवळ राहुलचा विचार करायचो नाही.

हैद्राबादहून आम्ही मुंबईला आलो तरी आमचं प्रकरण चालूच राहिलं. त्याचा शेवट काय होणार, कुठे होणार ह्याची दोघांनाही कल्पना नव्हती. त्याचा विचार करण्याची आमच्या दृष्टीने लगेच जरुरीही नव्हती. आमचा कोर्स पूर्ण होणं हे आमच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचं होतं व तोच पूर्ण होत नव्हता. त्यामुळे टेन्शन वाढत होतं, अस्वस्थता वाढत होती.

मी बाहेर बघितलं. आम्ही विरारमध्ये आलो होतो. ॲम्ब्युलन्स थांबली. रात्र झाली होतीच. घरी परत स्वयंपाक करायचा सगळ्यांनाचा कंटाळा आला होता. त्यापेक्षा बाहेरच जेवायचं ठरवलं.

आमच्या नेहमीच्या रेस्टॉरंटमधे जेवलो. मित्रांबरोबर गप्पा मारल्या. चांगलं हादडलं. मस्ती केली. जणू काल काही घडलंच नव्हतं. जीवनाचा नवीन अध्याय परत सुरू झाला होता. कोणीही मुद्दाम अशी राहुलची आठवण काढली नाही. माझ्या मनात त्याचा विचार येत होता तरी बोललो नाही. कदाचित इतरांचंही तसंच असावं. राहुलचे काही पैसे उरले होते. रेस्टॉरंटचं बिल म्हणून मी तेच पैसे दिले. जेवून उठताना सगळे म्हणाले, 'राहुल के नाम आखरी खाना' आणि मग सगळे भसकन हसले.

मित्र मला नेहमीच्या ठिकाणी सोडायला आले. तेथे सर्वांनी लघवी केली. एकेकाने माझ्या हातात हात मिळवला. ''आम्ही तुला त्रास दिला. पण तुझी आम्हाला मदत झाली. खूप बरं वाटलं.''

गोसावी अगदी मनापासून बोलतो आहे हे कळत होतं. दोन दिवसात बरंच काही घडून गेलं होतं. कायमचं लक्षात राहील असं घडून गेलं होतं.

''काही वाटलं तर बोलवा. मी तुमच्यासाठी हजर आहेच,'' निघताना मी मित्रांना म्हटलं.

ते निघाले. त्यांची आणि माझी दिशा वेगळी झाली होती.

मी रेल्वेच्या सर्व्हिस ट्रॅकवरून चालायला लागलो. ही नेहमीची सवय होती. हा ट्रॅक ओलांडून मग मेन ट्रॅकला जायचं. दोन तीन मिनिटं त्या ट्रॅकवरून चालायचं की मग प्लॅटफॉर्म. लोकल ट्रेन घ्यायची आणि मग दादर.

डोक्यात परत पूर्वीचे विचार सुरू झाले.

कोर्स पूर्ण न झाल्यामुळे त्यावेळी फार डिस्टर्ब व्हायला झालं होतं. आईकडून पैसे मागणं लज्जास्पद वाटत होतं. आपण फालतू

माणूस आहोत असं वाटू लागलं होतं. या वयात इतर मित्र नोकरीत सेटल झालेले, लग्नाच्या तयारीला लागलेले बघत होतो. इथे माझ्याकडे सगळाच आनंद होता. जीवनात कधी नव्हे एवढा मी अपसेट झालो होतो. राहुलला माझी अवस्था कळत होती. तो सतत माझ्याबरोबर असायचा.

सर्व्हिस ट्रॅक संपून मेन ट्रॅक आला. रात्रीची वेळ. आजूबाजूला शांतता. समोरून लोकल निघालेली दिसत होती. आता पुढच्या लोकलसाठी थांबावं लागणार. त्याला बराच वेळ असणार. पण पर्याय नव्हता. पळत जाऊन लोकल पकडणं शक्य नव्हतं, कारण लोकल माझ्या दिशेनं येत होती.

आता मिनिटभरात ती आपल्याजवळ येईल, बाजूला व्हायला हवं...

मी क्षणभर ट्रॅकवर थांबलो. हाच तो क्षण. लोकल समोरून येत होती व मी नि:स्तब्धपणे ट्रॅकवर उभा होतो. लोकलखाली मरून जावंसं वाटत होतं.

कशी कोणास ठाऊक, बाजूला चालणाऱ्या राहुलने माझी ती अवस्था ओळखली होती. त्याने मला धावत जवळ येऊन बाजूला खेचलं व क्षणार्धात लोकल वेगानं निघून गेली होती.

''जिंदगी मरने के लिए नही होती. जीने के लिए होती है. तुम जिओ. हम सब के लिए, मेरे लिए, तुम्हारे माँके लिए, तुम्हे जीना पडेगा. तुम मुझसे वादा करो!'' कधी नव्हे तो मला ओरडून बोलला होता. मी त्याला शरणागत होतो.

त्याने माझी जिंदगी वाचवली होती ह्याची कुठेही वाच्यता केली नाही. परत त्याबद्दल कधीही बोलला नाही. मी मात्र सावरलो.

ठरवलं की हा कोर्स सोडून द्यायचा. एवढी वर्षं घातली. आता बस झालं. कॉम्प्युटर कोर्स जॉईन केला. राहुलला ते तितकंसं आवडलं नाही. कोर्स पूर्ण झाल्यावर मला नोकरीही लागली. विरारहून रोज जाणंयेणं करणं शक्य नव्हतं म्हणून दादरला जागा बघायचं ठरवलं. राहुलपासून दूर व्हायची वेळ आली होती.

मलाही वाईट वाटत होतं पण पर्याय नव्हता. राहुलला शेवटचं कडकडून भेटलो. जणू नवरा बायकोपासून दूर चाललाय. कुठेतरी युद्धावर.

''राघव, अब हमारे रास्ते अलग हो गये है. तोभी हम मिलते रहेंगे. तू मुझे हमेशा याद आता रहेगा.''

मी त्याच्यापासून वेगळा झालो. माझी जिंदगी बनली. एक दिशा मिळाली. राहुलला अजून दिशा मिळत नव्हती. त्याने मला बोलावलं होतं. मी त्याला येतोही म्हणालो होतो.

विचारांच्या तंद्रीतून मी भानावर आलो. वर्तमानात येत मी ट्रॅकवरून बाजूला झालो. ट्रेन धडधडत निघून गेली.

हाच तो क्षण! राहुलने मला अशाच क्षणी वाचवलं होतं आणि राहुलला वाचवायला कोणीही नव्हतं. त्याने माझ्याच पद्धतीनं आत्महत्या केली होती. मला वाचवून. मला वाचवून तो मेला. मी त्याच्यासाठी काही करू शकलो नाही.

आता हे शल्य आयुष्यभरासाठी आहे.

राहुलने आत्महत्या का केली?

नक्की माहिती नाही. सत्य कधी समजत नाही.

आयुष्याचं काही खरं नसतं हेच खरं.

*(जून १९९८)*




*रेखाटन : शैला सायनेकर*

# सद्बुद्धी

**मूळ हिंदी कथा : कुमार नयन**
**अनुवाद : लीना मेहेंदळे**

---

असा काय गुन्हा केला होता आम्ही? हां! एकच केलं होतं. यावेळी इलेक्शनमध्ये जाऊन मतं देऊन आलो होतो. हा काय असा मोठा गुन्हा आहे, ज्यासाठी दोन-दोन पिढ्यांचं नातं विसरून गेले? बस, हुकूम करून मोकळे झाले की, 'आजपासून या लोकांना आमच्या बासवाड्यावर शौचासाठी जाता येणार नाही. कुणी हुकुमाची बेदखल केली तर हरियासारखीच अवस्था केली जाईल.'

---

वद्य पक्षाची दशमी-एकादशी असेल. चंद्राची मंद कोर आकाशात जडवत थबकलेली वाटत होती. तिच्या अर्धवट प्रकाशात सगळं वातावरण अंधुक अंधुकच होतं. सुमेसर बसलाय बांबूच्या गचपणात. तिथून पूर्वेकडे दीड-दोनशे पावलांच्या अंतरावर त्यांचे डेरे पडलेले. वर्षानुवर्षं. आणि इकडे पश्चिम दिशेला जोगिंदर मिसिरची अवाढव्य कोठी, आणि कोठीसमोरच विस्तीर्ण अंगण. बांबूच्या जाळीतून सुद्धा अंगणात पडलेल्या बाजा आणि त्यावर झोपलेले मिसिरचे पहारेकरी स्पष्ट दिसताहेत. सुमेसरचं सगळं लक्ष त्यांच्याकडेच आहे. विशेषतः एका बाजेखाली पहुडलेल्या अल्सेशियन कुत्र्याकडे. तोही पाय ताणून झोपला आहे, पण अधूनमधून खात्री केलेली बरी.

उकिडव्या बसलेल्या सुमेसरनं पायाला रग लागत्येयसं वाटून पाय थोडा हलवायचा विचारच फक्त केला, पण तेवढंच निमित्त होऊन पायाखालची वाळकी पानं चुरमुरली आणि त्या आवाजानं सुमेसरला धस्स झालं. कुणी पहारा देणारा जागा झाला का? पण त्यांच्यात काही हालचाल नव्हती. अल्सेशिअनपण अजून तसाच पाय ताणून झोपला होता. श्वास रोखून सुमेसर अविचल बसून राहिला.

बऱ्याच धाकधुकीनंतर तिकडे हालचाल होत नसल्याची खात्री पटल्यावर सुमेसर आपल्या कामाचा विचार करू लागला. म्हणजे शौचाचा. ते काम आता घाईनं उरकायला हवं होतं. त्यानं पोट वारंवार दाबलं, कुंथून-कुंथून थुकून गेला. इतरही प्रयत्न करून झाले. घरून आणलेल्या तंबाखूच्या गोळ्यांपैकी दोन गोळ्या एव्हाना दाढेखाली गेल्या होत्या. पण आतड्यातून काहीच बाहेर निघत नव्हतं.

सुमेसरनं ऐकलं होतं की, भीतीमुळे पोटात मुरडा येऊन हगायला होतं. कितीतरी किस्से! बलेसरकाका अजूनही बेचाळीस-त्रेचाळीसच्या काळातला इंग्रजी अधिकाऱ्याचा किस्सा सांगतो. चौफुल्यावर उभं राहून हातात तलवार घेतलेल्या बलेसरकाकानं त्या इंग्रज अधिकाऱ्याला ललकारलं होतं, तर भीतीनं त्या अधिकाऱ्याची पँटच पिवळी होताना दिसली.

खोटं बोलत असावा बलेसरकाका. इथं तर भीतीनं गाळण उडालेली आहे आणि पोटातलं चलनवलन मात्र शून्य. अर्धा तास होत आला. सुमेसरला आता वेळेची काळजी लागून राहिली. चार वाजायला कितीसा वेळ शिल्लक असेल अजून? चार वाजले की तिकडे मिसिरच्या अंगणात जाग यायला सुरुवात होईल. मग ते पहारेकरीपण बहिर्विधीसाठी इकडेच येऊ लागतील — हे एक नवीन कारण झालं काळजी करण्यासाठी.

अंगणातल्या बाजांवर अजून काही हालचाल दिसत नाही. अल्सेशिअनची शेपटी मात्र मधेच हलत्येय. कदाचित माशा बसत असाव्यात आणि तो शेपटीनं उडवत असावा.

सुमेसर त्या भयंकर हिंस्र कुत्र्यावरच डोळे रोखून बसला आहे. — याला जरा जरी वास लागला आपण इथं असल्याचा तर शरीराचे लचके पडतील. आतंकाची एक प्रचंड लाट सुमेसरच्या शरीराला थरथरून टाकत गेली. पण कुत्र्याची शेपूट आता पुन्हा शांत झाली होती. त्याच्या जिवात जीव आला. विचारांचं चक्र पुन्हा सुरू झालं.

— कुणीहीकडून बघा. आजचा त्याचा निर्णय आणि शौचासाठी इकडं मिसिरच्या बांबूच्या वनात येऊन बसायची कृती म्हणजे मूर्खपणाचा कळस होता हे नक्की. असं चोरासारखं इथे येण्याचा विचार त्यानंच का केला? त्यांच्या डेऱ्यावर इतर बापये नव्हते का? आणि पुरुषच का, बायका आणि मुलंपण आहेत. ही समस्या काय त्याची एकट्याची आहे? एकूण आठ घरं आहेत. घरटी मोठी परिवार. साठ-सत्तर माणसांचा कबिला. सगळ्यांनाच परसाकडे जाण्याच्या समस्येला एखाद्या मोठ्या अजगराप्रमाणं जखडून टाकलं होतं. आज तीन दिवस संपून चौथा दिवस. त्यानं कोणाशी सल्लामसलत न करताच हा धोका पत्करला. आता इथून सहीसलामत निसटणं म्हणजे धावत्या रेल्वेखाली दोन रुळांच्या मधे पडूनही जीव वाचवण्याइतकंच कठीण होतं.

या दुस्साहसाचा परिणाम काय होईल ते मिसिरनं आधीच सांगून ठेवलेलं आहे. हे त्याचे जल्लाद पहारेकरी सुमेसरची गठडी वळून अंगणाच्या कोपऱ्यातल्या कोठीत टाकतील आणि अल्सेशिअनच्या तोंडी देतील. पुनः एकदा सुमेसरचा थरकाप उडाला. इतकं भय त्याला आतापर्यंत कधीच वाटलं नव्हतं. त्यानं

केलेली दु:साहसं कमी का आहेत? याच मिसिरच्या ताडीबनात मध्यरात्री फिरणाऱ्या पिशाच्चांची आणि त्यांच्या इतर भुताखेतांची पर्वा न करता, अंधारात ताडीच्या झाडावर चढून, मडक्यात झिरपून गोळा झालेली ताडी त्यानं पिऊन टाकली होती. मिसिरच्या लहानग्या भाच्याच्या हातातलं पाच तोळे सोन्याचं कडं वेताळाच्या विहिरीत पडलं होतं, तेव्हा वेताळाची पर्वा न करता सुमेसर विहिरीत उतरला होता, आणि विहिरीच्या अंधाऱ्या तळात बुड्यांवर बुड्या मारून शेवटी तासाभराच्या प्रयत्नानंतर त्यानं ते कडं शोधून काढलं होतं. त्याचं बक्षीस जोगिंदर मिसिरने काय दिलं होतं, तर वीस रुपयांची एक नोट – बस्स. आजूबाजूच्या बघ्यांनी मात्र त्याच्या साहसाची मुक्त कंठानं प्रशंसा केली होती.

जुन्या कहाणीच्या रंगात बुडून जाण्याची ही वेळ नव्हती. या वेळी तर भीतीनं त्याच्या घशाला कोरड पडली होती आणि फाल्गुनी थंडीतही अंगाला दरदरून घाम फुटला होता. वाळक्या पापडांसारख्या शुष्क ओठांवरून जीभ फिरवून त्यानं आकाशाकडे एक नजर टाकली. पहाटेच्या फटफटण्यामुळं तिथं आता एक-दोन सोडल्या तर बाकी चांदण्या मंद होऊन गेल्या होत्या. पण सुमेसरच्या आजूबाजूला बांबूवनात मात्र अजून अंधार होता.

आता मात्र इथून पळून जाणंच श्रेयस्कर. शौचाबद्दल आता त्यानं डोक्यातून विचार काढून टाकला. अंगणाकडे त्यानं पुन्हा एक नजर टाकली. सगळं काही पूर्ववत होतं. एक खाट मात्र रिकामी दिसत होती.

हे काय? हा ललनवा कुठं गेला? सगळ्या पहारेकऱ्यांपैकी मजबूत शरीराचा, दगडी छातीचा, जल्लाद-धरमी ललनवा! याचा बाप तितकाच जल्लाद परभुवा! त्यानेच हरियाला पकडून कुत्र्यांच्या तोंडी दिलं होतं. चितेसाठी प्रेताचे तुकडेदेखील शिल्लक राहू दिले नव्हते. कुठे गेला असेल ललनवा? इकडे बांसवाड्यातच शौचासाठी येत नसेल ना? किंवा शौचासाठी नाहीतर नुसता पहारा देण्यासाठी, चोरा-चिलटांची खात्री करून घेण्यासाठी? आता सुमेसर निघून जाण्यासाठी उठला रे उठला की ललनवा त्याच्यावर झेप टाकील किंवा समोरून नाही तर पाठीमागून त्याच्या टकुरावर काठीचा एक जोरदार वार करील. या पहारेकऱ्यांकडे तर दुनाळी बंदूक पण आहे ती काय नुसतं घाबरवण्यासाठीच?

सुमेसर काळजीत पडला. निश्चल बसून चौकस नजरेनं इकडे तिकडे ललनवाचा शोध घेऊ लागला. पूर्वेकडे त्यांचीच घरं होती. त्यांना 'पूरवा का डेरा' असंच म्हणत. तिथल्या झोपड्या आणि समोरची डुकरांची खोपी अजूनही मसणवट्यासारखी शांतच होती. एरवी खांय् खांय् खोकणारा बलेसरकाकाचा गळा आज घरघरत नव्हता. रामायणबाबाचं भजनगायनही भल्या पहाटे सुरू व्हायचं तेही आज बंद होतं. गेल्या चार दिवसांच्या संकटानं सर्वांनाच असं त्रासून टाकलंय, की आता निद्रेच्या हवाली जाऊन सर्वांना थोडी शांती मिळाली असावी.

असं संकट कुणावर येऊ नये. दोन वेळच्या जेवणाचं संकट, पोरी-बाळींच्या कपड्यांचं संकट, राहण्यासाठी जागेचं संकट, दवा-दारूचं संकट! आत्तापर्यंत एवढीच संकटं माहीत होती. सगळ्यांनाच त्यांना तोंड द्यावं लागत होतं. पण शौचाला कुठं जायचं हेही प्रश्नचिन्ह उमटू शकतं का?

आमच्या शौचविधीवरच बंधन लादायचं होतं तर इथे आमची वस्ती का वसवली? दोन गुंठे जमिनीत आठ परिवार आणि त्यांची जनावरं कशी राहतात हे कधी अनुभवलंय त्या जोगिंदर मिसिरनं? आज तोच धनी आहे, मालक आहे. मग प्रजेचं दु:ख कळायला नको का त्याला? त्यानं स्वत:च सुविधा निर्माण करून दिल्या पाहिजेत. इथं उलट सांगावा आला – "पूरवा का डेरावाल्यांचं हगणं-मुतणं आतापासून आमच्या शेता-बांधावर बंद!"

असा काय गुन्हा केला होता आम्ही? हां! एकच केलं होतं. यावेळी इलेक्शनमध्ये जाऊन मतं देऊन आलो होतो. हा काय असा मोठा गुन्हा आहे, ज्यासाठी दोन-दोन पिढ्यांचं नातं विसरून गेले? बस, हुकूम करून मोकळे झाले की, 'आजपासून या लोकांना आमच्या बांसवाड्यावर शौचासाठी जाता येणार नाही. कुणी हुकुमाची बेदखल केली तर हरियासारखीच अवस्था केली जाईल.'

हरियाबद्दल डेरावाल्यांनादेखील थोडंसं कानकोंडं वाटत होतं. एखाद्या भरल्या घरातल्या लेकी-सुनांबरोबर संबंध ठेवणं ठीक नाही. तेही श्रीविष्णुदेवाइतक्या पवित्र ब्राह्मण कुळातल्या बालविधवा झालेल्या सुनेबरोबर? हरिया चुकला. डेऱ्यावरील कोणीही हे नाकबूल करीत नाही. आता आगीत हात टाकल्यावर परिणाम भयंकर होणारच. तो झाला. या ललनवाच्या बापाकडून – परभुवाकडूनच हरियाला पकडून घेतलं होतं जोगिंदर मिसिरनं आणि दोन-दोन अल्सेशिअनना त्याच्यावर सोडलं होतं.

पुरबा डेऱ्याच्या घराघरांमधून विसरायचं म्हटलं तरी ही कथा विसरली जात नाही. आज सात वर्षं झाली पण कुठल्यातरी निमित्तानं दररोज हरियाची आठवण निघतेच. जणू हीच हरियाला वाचारूपी श्रद्धांजली.

पण आगीत हात घातल्यासारखं इलेक्शनच्या मतदानात काय आहे? सगळ्या पार्ट्यांचे नेता लोक येत होते मत मागायला. एकेका घरात शिरून हात जोडत होते – आम्हांला मत द्या. आपापल्या निवडणूक-चिन्हांची ओळख पटवून देत होते. त्यावरच शिक्का उमटवा असं सांगत होते.

पलटूनं जवळजवळ सर्वच नेत्यांना एक प्रश्न विचारला होता – "कसा असतो शिक्का नि तो कसा उमटवतात? कसा असतो मतदानाचा कागद? आम्ही आत्तापर्यंत कधी पाहिला नाही. आम्हांला कधी कुणी वोट देऊ दिलं तर ना!"

यावर येणाऱ्या प्रत्येक नेत्यानं सरकार, प्रशासन आणि इतर मतं-डाकूंचा उद्धार करत त्यांना शिव्यांची लाखोली वाहिली होती. आणि आम्हांला मतदान करण्याबद्दल पुन:पुन्हा बजावलं होतं. मग आमच्या मनातही लालसा निर्माण झाली की आपणही मत द्यायचं.

मग पलटू एकदा बक्सरला जाऊन आला. आपल्या जातीच्या एका नेत्याला भेटून आला. सुखराम बाबूंनी आतापर्यंत डेऱ्यावरच्या लोकांनी जी भीती बाळगली, त्याचा धिक्कार केला. "स्वत:च्या अधिकारांसाठी जे लढत नाहीत, त्यांना देव कधी माफ करत नाही. अरे, काही ठाऊक आहे का, की वोट न देण्याचा

नेमका अर्थ काय? अर्थ असा की, जणू तुम्ही या देशाचे नागरिकच नाही, कधी रे येणार तुमच्यामध्ये राजनैतिक चेतना आणि अस्मितेचा हुंकार? जा, आता मी सांगतो तसं वागा. मतदानाच्या दिवशी सक्काळी सक्काळी आपल्या डेऱ्याच्या सर्व लोकांना नेऊन लायनीत उभं करा. या वेळी निवडणूक आयोग डोळ्यांत तेल घालून जागरूक आहे. तुम्हांला मत टाकण्यापासून कुणी अडवलं तर पोलीस येऊन त्यांना गिरफ्तार करतील. मी तुझ्या गावाचं नाव कलेक्टरांकडे देऊन ठेवतो. तुमच्या मतदानकेंद्राचं नाव अतिसंवेदनशील मतदानकेंद्रांच्या यादीत टाकतो. कुठे असतं तुमचं मतदान?'' असं म्हणून सुखराम बाबूंनी आपली डायरी आणि पेन बाहेर काढलं. केंद्राचं नाव लिहून घेतलं. पलटू निघाला तसं त्याला बजावलं —

''जा आणि नि:शंक मनानं मतदानाच्या दिवशी वोट टाकून या. कुणी अडवलं तर पोलिसांना सांगा. यावेळी आपल्या इकडच्या बंदोबस्ताला 'पंजाब पोलीस' येणार आहेत. मतदारांना सर्व तऱ्हेची सुरक्षा दिली जाईल. तरी कुणी मतदार स्वत:च भीती बाळगून घरात दबकून बसला तर पोलीस काय करतील? हे तू मतपत्रिकांचे काही नमुने घेऊन जा. हे माझं निवडणूक चिन्ह. त्यावर असा शिक्का मारायचा. हे सगळं आपल्या डेऱ्यातल्या लोकांना नीट समजावून सांग. शेवटी मीच अडीअडचणीला तुमच्या मदतीला धावून येणार. काळजी करू नका. अरे, जिथं तुमचा घाम सांडेल तिथं या सुखरामचं रक्त सांडेल. कधीही आजमावून बघा.''

सुखराम बाबूंच्या शेवटच्या वाक्यानं पलटूत नवीन उत्साह संचारला. त्यांची सगळी वाक्यं त्यानं त्यांच्याच स्टायलीत नक्कल करत बोलून दाखवली तेव्हा डेऱ्यातील सगळ्या घरांमध्ये चैतन्य सळसळलं, मत टाकायला जायचं म्हणून.

आणि खरंच मतदानाचा दिवस उजाडला तसं अर्धा तास आधीच सर्वजण रांगेत जाऊन उभे राहिलं. तसं तर एक दिवस आधी मिसिरची माणसं येऊन धमकावून गेली होती की, मत देण्याचा अपराधाचा दंड भयानक असेल. पण कोणी ते मनावर घेतलं नव्हतं. उत्साहाच्या भरात त्यांचं शहाणपण हरवलं होतं जणू!

आणि आता प्रातर्विधीसाठी बांसवाड्यात न जाण्याची शिक्षा अतिकठोर ठरत होती. डेऱ्याच्या चहूकडे जमीन त्यांचीच आहे. पूर्वेकडे मोठी आमराई, त्याला आठ फूट उंच भिंत घातलेली. दक्षिणेकडे इतर फळबागा आहेत, तर त्याला काटेरी तारांचं कुंपण घालून आत एक अल्सेशिअर मोकळा सोडून ठेवला आहे. उत्तरेकडे त्यांचंच शेत आहे आणि बांधा-बांधावर रखवालदार असतात. राहिलं पश्चिमेकडचं हे मोठं अंगण आणि त्याच्याअलीकडे हे बांबूंचं बन. आता डेरावाल्यांनी जायचं तरी कुठं? झोपड्यांमध्ये तर कुठेही शौचाची जागा नव्हती.

पहिल्या दिवशी सगळ्यांनी मधल्या मैदानात सहा बाय सहाचा एक पुरुषभर खड्डा खणला. सगळ्यांनी तिथेच विधी उरकले आणि वर माती लोटून दिली. पण दुसऱ्या दिवशीची माती जमिनीच्या लेव्हलपर्यंत येऊन पोचली, आणि दुर्गंधी अशी की खोपटाच्या आत स्वयंपाक होणं मुश्कील झालं. पलटू पहिल्याच दिवशी सायंकाळी मिसिरच्या माणसांचा डोळा चुकवून सुखराम बाबूंना याची कल्पना देण्यासाठी बक्सरला गेला होता.

दुसऱ्या दिवशी रात्री पलटू परतला. त्यानं सांगितलं, तो सुखराम बाबूंकडे पोचला तेव्हा ते विजय-मिरवणुकीतून थकून भागून परतले होते. 'उद्या सकाळी तुझं ऐकू,' असं सांगून लगेच झोपायला निघून गेले. रात्री तो त्यांच्या कार्यालयात गेला आणि तिथल्या ओट्यावर तसाच उपाशी पोट दुमडून झोपला. सकाळी त्यांना भेटण्यासाठी खूप कासावीस होऊन प्रयत्न केले पण भेटू शकला नाही. बक्सर मोठं शहर, जिल्ह्याचं ठिकाण. एकेक मोठाली माणसं येऊन त्यांना भेटत होती — अभिनंदन करत होती. गळ्यात हार घालत होती. मोठमोठ्या टोपल्या भरभरून मिठाया येत होत्या. सुखराम बाबू त्या आत पाठवत होते. मोटारगाड्यांची लाइन लागली होती. आतल्या खोलीत दाटीवाटीनं बसलेल्या लोकांकडून सुखराम बाबू अभिनंदनांचा स्वीकार करीत होते. तासन्‌तास तिथल्या चपराशाची विनवणी करून कसाबसा पलटू आत जाऊ शकला आणि त्यांच्यापर्यंत पोचू शकला. त्यानं रडत कढत आपली अडचण सांगितली.

त्यांचा चेहरा गंभीर झाला. बऱ्याच वेळानं मौनभंग करून ते म्हणाले, ''आता तू गावी परत जा. मी तिथं पोलीस पाठवतो. हा कुठला जंगली नियम? कुणाचं हगणं-मुतणं बंद करण्याचा त्यांना काय अधिकार? मग गरिबानं कुठं जायचं? मी बघतो... तू गावाकडं जा. मला तर आजच पटण्याला जावं लागेल. उद्या विधानसभेत शपथ घ्यायची आहे...''

पटलूला सांगायचं होतं की पोलीस फोर्स पाठवा, मीपण त्यांच्याबरोबरच गावी जातो. पण तेवढ्यात तिथं बसलेल्या एका थुलथुलीत माणसानं संभाषणाचा ताबा घेतला — ''सर! मला विश्वास वाटतो की यावेळी तुम्हांला मंत्रिमंडळात नक्की जागा मिळेल. पण तसं नाही झालं तर हे घोषणा-पत्राच्या विरुद्ध झालं, असंच मानावं लागेल. मग आमचे लोक गप्प बसणार नाहीत. आपलंच सरकार असलं म्हणून काय? आम्ही धरणं धरू आणि उपोषणं आयोजित करू. तेवढी परवानगी असावी.''

''धीर धरा, लोकहो, धीर धरा. आता आपलंच सरकार येईल. त्यात अन्याय कसा होऊ शकतो? म्हणूनच तर मी आज रात्रीच जातो आहे.'' सुखराम बाबू हसत त्याच्याकडे वळून म्हणाले.

पलटू त्या थुलथुलीत माणसाच्या तोंडाकडे पाहतच राहिला. कारण आता त्याच्याकडे कुणाचंच लक्ष जाणार नव्हतं. त्याची उपस्थिती सगळे जण विसरले. हास्य-विनोद सुरू झाले. थोड्या वेळानं पलटू उठला आणि सुखराम बाबूंना नमस्कार करत बाहेर पडला.

तो गावी येऊन आता दोन दिवस झाले. कुठली पोलीस पार्टी आणि कुठलं काय! कोणी नेतापण फिरकला नाही आणि कोणी ऑफिसरपण नाही!

सुमेसरच्या मनात सगळं घटनाचक्र एकदा वेगानं फिरून गेलं आणि त्याचं मस्तक सुन्न झालं. का त्यानं केला इकडे येण्याचा आगाऊपणा? इतरांसारखंच डेऱ्यावरच का नाही गेला? पण तिथल्या हगणवाड्यात आता तो पाऊल टाकू शकत नव्हता.

तिथेच कशाला? झोपडीतही राहणं अशक्य झालं होतं. दुर्गंधीमुळं डोकं फाटून जायची वेळ आली होती.

नुसत्या आठवणीनं सुमेसरला वाटलं की ती डेऱ्यावरची दुर्गंधी वाऱ्याबरोबर इथपर्यंत आली जणू. त्याला ओकारी येईलसं वाटलं. पण थुंकी टाकली तर आवाज होईल कदाचित. मग त्यानं तोंडातली तंबाखूची गोळी हातानेच काढून बाहेर टाकून दिली. अजूनही मिसिरच्या अंगणातल्या खाटांवर पहारेकरी झोपलेलेच होते, आणि एका खाटेखाली अल्सेशिअनपण बेशुद्धीत असल्यासारखा पडून होता. मात्र एक खाट अजूनही रिकामीच दिसत होती.

हा ललनवा परतला नाही कसा अजून? कुठं गेला असेल? आपल्याला पाहिलं तर नाही ना त्यानं? कुणास ठाऊक! कुठे अंधाऱ्या कोपऱ्यात बसून मी उठण्याचीच वाट पाहत असेल. उठलो की बसली त्याची काठी टाळक्यात. दुसऱ्या एखाद्या पहारेकऱ्याच्या काठीनं प्राण जायला थोडा वेळ लागेल कदाचित. पण ललनवाचा वार म्हणजे वज्रास्त्रच. जसा बाप जल्लाद तसाच बेटा. या निठल्ल्यांना कामं काहीच नाहीत. बस! खा, प्या आणि शरीरावर चरबी गोळा करा. यांच्यासाठी मिसिरजी जणू देवघरचे दूतच बनून आले आहेत. काय मेल्यांनी जादू केली मिसिर आणि यांच्या भाऊबंदांवर, की त्यांच्या डोळ्यांदेखत धान्य-धुन्य उचलून स्वतःचं घर भरतात आणि ते एक शब्दही बोलत नाहीत. मिसिरजींच्या मागे लागून लागून महतोंच्या पाड्यावर एक बोरिंगपण बसवून घेतलं होतं. काय असं देणं लागत होते मिसिरजी यांचं? त्यांच्या घरी काही कार्य निघालं की आम्हीदेखील एका पायावर उभे असतो कामाला. पण त्यांनी आमच्यावर कधी विश्वास नाही दाखवला. आम्ही खालच्या जातीचे आहोत, हे कबूल, पण महतो पाड्याची जात तरी कोण मोठी लागून गेली आहे? आमच्यापेक्षा थोडे उच्च असतील एवढंच. पण हे महतो लोक आमचाही केवढा दुस्वास करतात!

सुमेसरला वाटलं की ही त्याची सगळी तर्कसंगती चुकली होती. सोपी, साधी गोष्ट ही की जो ज्याची चाकरी करत असेल, तो त्याचा हुकूम पाळणारच. ही रीतच आहे जगाची. तसं म्हणाल तर रामायणबाबांनी कितीकदा मिसिरला सांगून पाहिलं होतं – 'जसं महतो टोळी आणि मल्लहांच्या टोळीला तुम्ही आश्रय दिलाय, अडी-अडचणीला सल्ला देताय, तशी आम्हांला पण काही सेवा करण्याची संधी द्या, आम्हीही कुठे कमी पडणार नाही.' पण मिसिरनं आम्हाला कधीच त्यांच्याइतकं जवळ केलं नाही. आता मधून मधून एखादा बांबू कापून नेण्याची परवानगी मिळत होती तेवढीच. आणि हरियाच्या मृत्युनंतर एक बैलगाडी भरून बांबू दिले होते. त्या दानाचा अर्थ डेरावाल्यांना कळत नाही थोडाच!

या निरर्थक गोष्टींचा विचार करून काय फायदा? सुमेसरचं डोकं भणभणू लागलं होतं. आता खरी काळजी करायला हवी ती इथून सुखरूप आपल्या झोपड्यांकडं कसं जाता येईल त्याची.

तिकडे रात्रीचा शेवटचा प्रहर संपून दिवसाचा पहिला प्रहर सुरू होऊ घातलेला आहे. आकाशातले मघाशी चमकणारे तारेपण क्षीण होत चालले. अजून ललनवा दिसत नाही याचा अर्थ उठण्यामधे धोका आहे. पण चार वाजत आले आहेत, म्हणजे थांबण्यातही धोका आहे. एकदा का पहारेकरी उठले की बहिर्विधीसाठी तेपण इकडेच येणार आणि तो अल्सेशिअनपण इकडेच येणार. रात्रीचा मोकळाच असतो. फक्त दिवसा बांधतात त्याला.

संकट अगदी समोर येऊन ठेपलं. इकडे आड तिकडे विहिर. आता उठून पळण्यातला धोका पत्करायलाच पाहिजे.

नीट विचार करून सुमेसरनं बरोबर आणलेल्या अल्युमिनियमच्या टमरेलातील पाणी हळूहळू सांडून टाकलं आणि उभं राहून तो अंडरवियरची नाडी बांधू लागला. आता त्याची दृष्टी स्थिर होऊन फक्त अंगणातल्या बाजांवरच खिळली होती. हृदयाचे ठोके वाढले होते. हातापायांना कापरं भरलं होतं. घामानं शरीर डबडबून गेलं. नाडी बांधून त्यानं पायातली टायरची चप्पल एक एक करून हातात घेतली, आणि खाली वाकून वाकून बांबूच्या गजपणातून वाट काढत तो हळूहळू एक एक पाऊल टाकू लागला.

चर्र, चर्र, चर्र... कितीही सांभाळा, बांबूची वाळकी पानं पायाखाली चुरतच होती आणि आवाज थोपवता येत नव्हता. दहा एक पावलांनंतर बांसवाडा संपेल आणि शेताचे बांध सुरू होतील. तिथं सकाळप्रहराचा लालिमा पसरलेला होता. गोष्टी स्पष्ट दिसत होत्या. अंगणात कुणी जागं झालं असलं तर नक्कीच त्याला बघू शकेल.

ती दहा पावलंपण त्यानं पार केली. उजेडाच्या आगीत पाऊल टाकण्याआधी पुनः एकदा अंगणाकडे नजर टाकली, आणि पटकन पुढे केलेलं पाऊल मागे घेतलं. अल्सेशिअनची शेपटी जोरजोरात हलत होती. ती थांबेपर्यंत आपणही थोडी वाट पाहावी हे बरं! आता जराशी घाईगडबडदेखील मृत्यूला निमंत्रण ठरू शकते. त्यानं आधीच जरा जास्त उशीर केला. तो ललनवा झोपेत असतानाच उठून जायला हवं होतं. पण आता उशीर केलेलाच आहे तर इथून पुढे जपून जपूनच पावलं टाकली पाहिजेत.

त्याची नजर अजूनही अल्सेशिअनच्या शेपटीवरच स्थिरावली होती. पण शेपूट हलायची थांबत नव्हती. आता तर त्याच्या देहाची हालचाल दिसू लागली. बहुतेक तो उठून आपलं अंग ताणून आळोखेपिळोखे देत आहे. सुमेसरची भीती वाढली. हे म्हणजे जणू कुणी पळण्याच्या रस्त्यावर मोठेमोठे दगडच रचून ठेवले असावेत. सुमेसरनं आठवतील त्या सर्व देवांचा धावा सुरू केला आणि हनुमानावर येऊन तो अडकला. आपल्याला हनुमानचालीसा पाठ म्हणता येत नाही. आधी का नाही आपण घोकून ठेवली? तिचं पारायण करताक्षणी संकटं स्वतःच पळू लागतात. पण आता काय उपयोग! हे संकट काही टळताना दिसत नाही.

जर तो धावत जाऊन बांधालगतच्या पायवाटेवर पोचला तर? तर काय? तिथंदेखील तो पळू शकणार नाही. आवाज होईल आणि अल्सेशिअन हवेच्या वेगानं पळत येऊन त्याला जबड्यात पकडेल. सुमेसरनं कसाबसा हा विचार डोक्यातून परतवून लावला. तिकडे अल्सेशिअन आता उठून सावध होऊन बसला होता. तो परत झोपी जाण्याची शक्यता संपली होती. सुमेसरला वाटलं, त्याचं सर्व शरीर मृतवत झालेलं आहे. फक्त डोक्यात थोडी आकलनशक्ती शिल्लक राहिली आहे. तिथं त्याला

अल्सेशिअनच्या रूपानं यमदूतच दिसत आहे.

आता अल्सेशिअनला काही तरी वास येऊ लागला असावा. तो जमिनीला सरपटून वास घेत घेत बांसवाड्याकडे येऊ लागला. जणू एखादा बाणच सर्रकन येऊ लागला सुमेसरच्या विचारशक्तीला. तो पळाला. हातातल्या चपला कुठेतरी पडल्या. क्षणात तो बांसवाडा ओलांडून पायवाटेला लागला होता. पण त्याच क्षणांत अल्सेशिअनलादेखील सगळं काही कळून चुकलं. वेगानं धावत तो सुमेसरच्या दिशेनं येऊ लागला आणि काही क्षणांतच त्याच्यापासून चार पावलांवर येऊन ठेपला.

सुमेसरची नसन्‌नस थिजून गेली. दुसऱ्या क्षणीच सुमेसरची तंगडी त्याच्या जबड्यात असेल आणि पाठीवर पहारेकऱ्यांच्या काठ्यांचा वर्षाव.

तेवढ्या क्षणातच त्याला हेही दिसलं की अल्सेशिअनच्या जोडीनं ललनवापण धावत येत होता. त्याची तेल पाजलेली लाठी हवेत चमकत होती. आधी अल्सेशिअन त्याच्या मांसाचा लचका तोडतोय की आधी ललनवाची काठी त्याची कवटी भेदत्येय...

जिवाच्या आकांताने सुमेसर पळत होता.

इकडे अल्सेशिअननं त्याच्या अंगात आपले दात घुसवण्यासाठी हवेत उडी घेतली आणि तिकडे ललनवाची काठी दोनदा बरसली... सडाक् - सडाक्...

जबरदस्त प्रहाराचे सपकारे चहूकडं घुमले. पूरबा डेऱ्यातील झोपड्यांमधून स्त्री-पुरुष बाहेर येऊन गोळा झाले होते आणि पलीकडे खाटांवरून उठून बसलेले पहारेकरीपण पळत इकडेच येऊ लागले होते.

डेऱ्यापासून वीसएक पावलांवर अल्सेशिअन विव्हळत पडला होता. पहारेकरी याची सुसंगती लावायचा प्रयत्न करत होते. सुमेसर धापा टाकत रामायणबाबा आणि बलेसरच्या कानाला लागला. ''या ललनवानंच मारलं अल्सेशिअनला, माझ्या मागं लागला म्हणून.'' आणि आता एकटक तो ललनवाकडे पाहत उभा राहिला – ज्याच्या काठीच्या दोन फटक्यांनीच अल्सेशिअन धराशायी झाला होता.

आकाशात हा कोण नवा तारा उगवला होता? पूरबा डेऱ्यातील झोपड्यांना थंडावा देणारा!

काय सूर्य, काय चंद्र, काय इतर तारे – आतापर्यंत सगळ्यांनी पूरबा डेऱ्यावर आगच ओकली आहे. का ललनवा आपल्या बापाच्या पापाचं प्रायश्चित करत होता? त्यानं बलेसरकाकाचा हात जोरानं दाबला.

तेवढ्यात जोगिंदर मिसिर पण आपल्या भाऊबंदांसह येऊन दाखल झाले. कुणी तरी धावत जाऊन त्यांना सगळं सांगितलं होतं. जमिनीवर तडफडणाऱ्या आपल्या अल्सेशिअनला पाहून ते तांबडेलाल झाले. ''कोणी मारलं त्याला?'' ते गरजले.

''मी मारलं मालक! हा वेडा होऊन माझ्या मागं लागला होता, मी मारलं नसतं तर हा मला घायाळ करणार होता.'' ललनवानं पुढे होऊन नम्र स्वरात उत्तर दिलं.

''तू खोटं बोलतोस. हा पागल नव्हता झालेला. अरे हरामजाद्यांनो, तोंड काय पाहतां? तो जिवंत आहे अजून. घेऊन चला त्याला बक्सरच्या मोठ्या दवाखान्यात. आणि तू ललनवा माझ्या नजरेसमोरून आधी दूर हो.''

जोगिंदर मिसिरनी गर्जना केली. आदेश प्रमाण मानून ललनवा पाऊलवाट धरून आपल्या ठिकाणाकडे जाऊ लागला. पूरबा डेऱ्यातले तमाम झोपडीवासी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं बघत राहिले. रामायणबाबा आणि बलेसरकाकाच्या डोळ्यांतून त्याच्यासाठी स्नेह आणि आशीर्वाद पाझरू लागले.

*(दिवाळी १९९९)*

---

## संस्कृती

काही भारतीयांना पाश्चिमात्य देशांमधली 'कल्चर' ही संकल्पना एतद्देशीय भाषांमध्ये आणावीशी वाटली. बांगलाभाषकांनी त्यासाठी 'कृष्टि' हा शब्द वापरून मूळची शेतीच्या मशागतीची लक्षणा कायम राखण्याचा प्रयत्न केला. रवींद्रनाथ ठाकूर यांना हा शब्द फारसा पसंत पडला नव्हता. त्यांनी पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयातील संस्कृतचे प्राध्यापक आणि गाढे अभ्यासक डॉ. प. ल. वैद्य यांच्याकडे विचारणा केली. वैद्यांनी त्यांना सांगितले, की मराठीमध्ये इतिहासकार आणि विचारवंत विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी घडवलेला 'संस्कृती' हा शब्द लोकांना समाधानकारक वाटल्याने रुळला आहे. रवींद्रनाथांना हा शब्द आवडला, त्यांनी तो जसाच्या तसा वापरला आणि तो एक अखिल भारतीय पातळीवर सामायिक शब्द म्हणून रुळण्याचा मार्ग मोकळा केला.

'कल्चर' या शब्दाचे सरधोपट भाषांतर न करता राजवाड्यांच्या प्रतिभेने त्याच्या अर्थातील एक धागा उचलून त्यासाठी आपल्याकडील संस्कार ही परंपरेतील सर्वज्ञात संकल्पना उचलली. संस्कारांनी सिद्ध होते ती संस्कृती. मग ते संस्कार बरे असतील किंवा वाईट असतील, जाणिवेतील किंवा नेणिवेतील असतील आणि स्वकीय असतील किंवा परकीय असतील. संस्कार म्हणजे व्यक्तीला जो परिसराचा, विशेषतः मानवी परिसराचा अनुभव येतो, त्या अनुभवाचे व्यक्तीवर उमटलेले ठसे. असे हे संस्काराचे ठसे कधी संचित रूपात टिकतात, कधी लोप पावतात, तर कधी कालांतराने स्थितिस्थापित होतात असे भारतीय परंपरा मानते. संस्कृती म्हणजे अशा संस्कारांचे भांडार. राजवाड्यांच्या योजकतेमुळे संस्कृती हा शब्द, कल्चर या शब्दापेक्षा अधिक अर्थघन असा, आपल्या हाती आला.

'कल्चर'साठी संस्कृती या शब्दाचा वापर हे सर्जनशील भाषांतराचे सुंदर उदाहरण आहे.

**– अशोक केळकर**

*(ऑक्टोबर २००३)*

# वर्षाकाठी एकदा वाघ

**मूळ तेलुगु लेखक : सत्यम् शंकरमंचि**
**अनुवाद : लक्ष्मीनारायण बोल्ली**

---

एका भाषेतील साहित्याचा, विशेषतः ललितकृतीचा दुसऱ्या भाषेत रसाळ आणि तरीही प्रामाणिक अनुवाद करणे खूप अवघड आहे. एका कुपीतील अत्तर दुसऱ्या कुपीत ओतण्याइतके. पण भारतासारख्या बहुभाषिक देशात अनुवादित साहित्याला खूप महत्त्व आहे हेही तितकेच खरे. म्हणूनच आपल्या पहिल्या अंकापासून अंतर्नादने अनुवादित साहित्याला मानाचे स्थान दिले. ही एक तेलुगू भाषेतील छोटीशी पण सरस कथा.

---

वाघाच्या वेषात नबीसाहेबाला एकदा पाहायलाच हवं. मोहरमच्या सणात मुलांच्या उत्साहाला आलेलं उधाण जितकं अप्रुपतेचं, तितकंच नबीसाहेबाच्या वाघाचंसुद्धा.

लांबवर हलग्यांचा आवाज... डण डण... डण डण... डण डण...

शिट्या... टाळ्या... शिट्या... टाळ्या...

वाघाच्या वेषात नबीसाहेब रस्त्यावर आला. घरातली कामं सोडून सर्वजण रस्त्यावर दाटीवाटीनं जमले. लहानपोरं भीतीनं मोठ्यांच्या पाठीमागे लपली. हलग्या पुढे पुढे चालल्या. चिक चिक चिक... चिक चिक चिक.

आता वाघ चौकात आला. वीरावेशात तो उड्या मारू लागला. एका हातात लालजर्द दस्ती तर दुसऱ्या हातात पिवळंधम्मक लिंबू. हलग्यांच्या खणखणाटात वाघाचा खेळ रंगू लागला. पाहणाऱ्यांच्या रक्तात आवेश संचारू लागला. वाघ डरकाळ्या फोडू लागला. आक्रमकतेनं झेप घेऊ लागला. पंजा पसरून लोकांच्या अंगावर धावून येऊ लागला. लोक सैरावैरा पळू लागले. वाघाला भिऊन वाट देऊ लागले.

एखाद्या जगज्जेत्याप्रमाणं छाती काढून नबीसाहेब पुढे चालू लागला. जयजयकाराच्या घोषात, देश जिंकून आलेल्या एखाद्या चक्रवर्तीसारखा तो पुढे सरसावू लागला. दोन्ही बाजूला वाजणाऱ्या हलग्या. खचाखच झालेली लोकांची गर्दी. शिट्या-टाळ्या पिटत उधळले जाणारे पैसे तो खिशात भरून घेत होता. सारं गाव त्यालाच पाहत होतं. साऱ्या गावातून नबीसाहेब वीरविहार करीत होता. त्याची छाती गर्वाने फुगून गेली. 'या सगळ्या लोकांपेक्षा मी कोणीतरी मोठा आहे' असा भाव त्याच्यात शिरला होता. धन, धान्य, माड्या, इमले असलेल्यांपेक्षा मी कोणीतरी आगळावेगळा आहे, असं सांगणारी त्याची नजर. उधळलेले पैसे झेलताना चक्रवर्ती, सामंत, राजे यांच्याकडून शाही खजिना स्वीकारल्याचा आविर्भाव. अगदी सूर्य मस्तकावर येईतोपर्यंत वाघ नबीसाहेब हा वीर, राजा, चक्रवर्ती होत विजयविहार करीत राहिला.

बोली केल्याप्रमाणं हलगीवाल्यांना पैसे देऊन आपल्या अंगणात पाय ठेवताना नबीसाहेबाचं रूपच पालटलेलं असायचं. कावरीबावरी नजर इतस्तत: टाकीत, कंबर खचल्यागत, आपल्याच पायात घोटाळत नबीसाहेब घरात आला. नबीसाहेबाला आपली बायको अमीनाबी हिची प्रचंड भीती वाटायची.

"किती पैसे मिळाले..." आकाश गर्जत अमीनाबी बोलली.

ओठ ओलांडून नबीसाहेबांचे शब्द बाहेर येऊ शकले नाहीत. नबीसाहेबाने सारी चिल्लर तिच्या हातात ओतली.

"परसात जाऊन रॉकेलनं धुवून घ्या," अमीनाबी.

वाघ शेळी होऊन परसात आला. बायकोनं अंग घासलं नाही, भला शब्द उच्चारला नाही, श्रम केल्याचं कौतुक नाही. तो स्वत:लाच शिव्या हासडू लागला. आतल्या आत आक्रंदू लागला.

बायकोच काय, सारं गाव कुठं मला माणूस म्हणून ओळखतंय? मोलमजुरीसाठीसुद्धा लोक काम देत नाहीत. आठवड्याकाठी, महिन्याकाठी दवंडी पिटायला किंवा ताशा वाजवायला बोलावतात. त्यापलीकडे आपल्याला माणसांतसुद्धा मोजत नाहीत...

त्यामुळे गाववाले म्हटले की, नबीसाहेबाचा राग उफाळून यायचा.

मोहरमचा एकच दिवस त्याच्या आवडीचा.

त्या दिवसातले चार तास म्हणजे त्याचा प्राण. त्या एका दिवसाची, त्यातल्या चार तासांची तो वर्षभर वाट पाहायचा. तेवढे चार तास तो वाघ, वीर, जगज्जेता, चक्रवर्ती. वर्षाकाठी फक्त एका दिवसाचं आयुष्य. त्या दिवसासाठी प्रतीक्षा.

गावचे लोकसुद्धा नबीसाहेबाच्या वाघाचीच प्रतीक्षा

प्रस्तुत कथेचं मूळ तेलुगु शीर्षक 'याडादिकी ओक्का रोजु' असं आहे. सत्यम शंकरमंचि यांच्या 'अमरावती कथलु' (अमरावतीच्या कथा) या कथासंग्रहातील ही एक गाजलेली कथा आहे. एकूण १०० छोटेखानी कथा या संग्रहात आहेत. या कथासंग्रहातील तेरा कथांवर बेतलेली 'अमरवतीकी कथाएँ' ही दूरदर्शन मालिका शाम बेनेगल यांनी सादर केली होती.

---

करायचे. आदल्या दिवशीच्या रात्री तो जेवायचा नाही. पहाटेच उठून शरीर रंगवायचा. वाकलेली कंबर बाणासारखी ताठ व्हायची. डोळ्यांत रक्त उसळून यायचं. शरीर दुणावायचं. तनू वीरावेशानं तटतटायची. गल्लीत, चौकात, गावात तो विलयतांडव करायचा. तांडव जसजसं वाढायचं, तशा शिट्या, टाळ्या ऐकू यायच्या. कित्येक दिवस नबीसाहेबाच्या वाघाची गावात चर्चा होत राहायची.

दुसऱ्या दिवशी तो सामान्य नबीसाहेबच. लाचारीनं बिड्या मागून घेणारा. बायकोचे शिव्याशाप झेलणारा. वर्षभर पेज पिऊन रात्रीच्या झोपेत, वाघाची स्वप्नं पाहात राहणारा.

नबीसाहेब म्हातारा झाला. पूर्वीप्रमाणं वाघाचा खेळ तो दाखवू शकत नव्हता. नव्या तरुण वाघांबरोबर, हलग्यांच्या तालावर तो उड्या मारू पाहायचा, पण त्यात त्याच्या तरुणाईची रग नसायची. डोळ्यांत आग नसायची. थकून मिरवणुकीच्या मध्यावरच तो गळाठायचा. त्यानंतरच्या काळात रस्त्यावर येण्याची ताकदसुद्धा तो हरवून बसला. जीर्णशीर्ण खाटेवरच पडून असायचा.

पुन्हा मोहरमचा सण आला.

लांबवर हलग्यांचा आवाज. शिट्या... टाळ्या...

खाटेवर पडलेल्या नबीसाहेबाच्या शरीराला भरतं येऊ लागलं.

डण... डण... डण... डण... नबीसाहेबाचे हातपाय लयीत हलू लागले. चिक चिक चिक...

पडल्यापडल्या अंथरुणातच तो वाघ होऊ लागला. डोळ्यांत अखंड अश्रूंच्या धारा.

रोज शिव्याशाप देणाऱ्या कृश, हडकुळ्या अमीनाबीनं वाघ होऊ पाहणाऱ्या आपल्या नवऱ्याकडे पाहिलं. तिला दुःख अनावर झालं. नबीसाहेबाजवळ येत, लयदारपणे हलणारे हात हातात घेऊन ती म्हणाली,

''आता बस करा. ताकद होती तेवढे दिवस खेळलात, तुमचा खेळ संपला आहे. आता बस करा... ग्लानी येईल.'' आपल्या नवऱ्याकडे तिनं अत्यंत प्रेमानं पाहिलं.

हे स्वप्न की सत्य हे नबीसाहेबाला कळेनासं झालं. तो भारावून तिच्याकडे पाहू लागला. तिचे डोळे तुडुंब भरलेले.

बायकोचे डोळे पुसत नबीसाहेब म्हणाला, ''इतकं चागंलं तू जन्मात कधी बोलली नाहीस. इतके सुखद शब्द यापूर्वीच ऐकले असते तर वर्षाकाठी एक दिवस काय, अगदी आयुष्यभर वाघच होऊन राहिलो असतो.''

*(जुलै २०००)*

---

## पाच ज्यू

ते पाचहीजण ज्यू होते. पण साऱ्या विश्वावर विविधांगांनी वर्चस्व गाजविणाऱ्या पाश्चिमात्य जगाचा इतिहास, तिथल्या लोकांची मनोवृत्ती व तिथली जडणघडण करणाऱ्या नियतीला दिशा दाखविण्याचे महत्कार्य त्या पाच जणांनी केले.

पहिला होता मोझेस. बायबलच्या जुन्या कराराचा नायक. परमेश्वराने निवडलेला नरोत्तम. त्याने माणसाच्या बुद्धिमत्तेला आवाहन केले : ''माझे ऐका नि तुमचे कुणीही वाकडे करू शकणार नाही.''

नंतर येशु ख्रिस्त अवतरला. साक्षात देवपुत्र. माणसाच्या हृदयाला हात घातला नि तो करुणामूर्ती म्हणाला, ''माझी दया, क्षमा आणि शांती ही शिकवण आचरणात आणा; म्हणजे तुम्ही सुखी व्हाल.'' कुणी आपल्या एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करण्याचा उपदेश करणाऱ्या त्या दैवी राजपुत्राने क्रुसावर वेदनांनी तळमळत असतानादेखील वैऱ्यांना क्षमा केली व दयेचा असीम साक्षात्कार घडवला.

त्यानंतर मार्क्सचा उदय झाला. त्याचे प्रतिपादन वेगळे होते. ''माणसाचे डोके आणि हृदय यांपेक्षा त्याचे पोट त्याची नियती घडविते'' असे तो ठणकावून बोलला नि दरिद्री लोकांच्या पोटातले कावळे एकसुराने बंड करून उठले.

''छे, तसे मुळीच नाही,'' त्यानंतर आलेल्या फ्रॉईडने सिद्धान्त मांडला. ''माणसाच्या पोटाखाली असलेला भाग खूप महत्त्वाचा असतो.'' माणसाच्या जीवनात दुर्लक्षित राहिलेल्या कामजीवनाचे महत्त्व त्याने विशद केले.

''खरे म्हणजे,'' त्यांच्यानंतर आलेला पाचवा ज्यू, आईनस्टाईन, म्हणाला, ''यांपैकी एकही तंतोतंत खरे नाही. सगळे काही सापेक्ष आहे. या सगळ्या बाबी एकमेकांशी निगडित आहेत.''

**– जोसेफ तुस्कानो**

*(सप्टेंबर २०००)*

# पंचीम

## संजय कृष्णाजी पाटील

''चिमणी विझलेली. छप्पर डुगडुगू लागलेलं. अंधाराचा जबडा वासत चाललेला. शेवंताक्काचा आवाज भिजत-भिजत चाललेला. बुलडोझरचं चाक पुढे पुढे सरकलेलं. बुलडोझरचं पातं आणि शेवंताक्काचं जातं – दोन्हींची घरघर चालूच.''

एका स्त्रीच्या दुर्दैवाची अंतःकरण हेलावणारी कर्मकहाणी.

''नाग को दूध दे दो बाबा, नाग को दूध दे दो'' शेवंताक्का फाटक्या आवाजात ओरडत होती. बांद्रा स्टेशनच्या फ्लायओव्हरच्या छाताडावरनं मुंगीच्या गतीनं हलणाऱ्या गर्दीला तिच्या फाटक्या आवाजाचं कौतुक नव्हतं. शेवंताक्काच्या अगदी समोरून अडखळून पडून जाणाऱ्यांनाच तिचा आवाज कसाबसा ऐकायला येत होता. त्यामधले निम्मे तरी, ''ना जाने कहांसे आते है भीकमंगे लोग'' म्हणत खुनशी नजरेनं बघत जात. थोडेसेच कोणी श्रद्धाळू तिच्या हातातल्या नागाकडे बघत, भक्तिभावानं नमस्कार करत. कोणीतरी एखादं नाणं टाके.

नाग हातात धरून-धरून शेवंताक्काच्या दहा बोटांपासून ते दोन्ही खांद्यांपर्यंत रग लागली होती. मध्येच तिनं नागोबाचं तोंड खाली झुकवलं, दुधाच्या वाटीत कोंबलं. निघण्यापूर्वीच इसाकशेठनं तिला नागोबाचं शिवलेलं तोंड दाखवलं होतं. मुळात नागोबा दूध पीत नाही. त्यात तो तोंड शिवलेला. पण प्रश्न धार्मिकतेचा होता. इसाकशेठनं बजावून सांगितलं होतं, ''देख आक्का, वो दूध पिये ना पिये, उसका निजी मामला है, लेकिन लोगोंको कुछ दिखाए बिना उनका हात खिसेतक जाता नहीं!''

...खरंच की इसाकशेठचं. नागोबा दूध पिऊ दे नाहीतर नाही. लोकांच्या धार्मिक भावनेला हात घातलाच पाहिजे. तरच हात खिशात जाईल. बरेच हात खिशांत गेले तरच तिसरी मोकळी टोपली पैशांनी भरणार. दोन नागांचं भाडं शंभर रुपये. इसाकशेठचे शंभर. एकुणात तीनशे जमले तरी बास. शंभर ऱ्हातील हाताशी. तेवढ्यात आठवडा जाईल. तंवर झोपडीचा व्यवहार होईल. जातं-जुनेरं, ट्रंक आणि टमरेल घेऊन गाव गाठू. पंचीम गेली तर गेली. गौरी-गणपतीला तरी गावपांढरीत घुसता येईल. आला तर आला दिवस, गेला तर गेला दिवस. मरगूआईच्या पायरीवर डोस्कं ठेवून देऊ.

ऊन चरचरायला लागलं. फाटक्या पदरामधनं, बिनतेलाच्या केसांमधनं मेंदूपर्यंत झिरपायला लागलं. घसा सुकून-सुकून रखरखीत वाळवंटासारखा झालेला. सकाळी प्यालेल्या कोऱ्या चहाचा मागमूसही नाही. शेवंताक्कानं बाजूच्या तांब्यामधलं मचूळ पाणी घोट-घोट खाली ढकललं. रिकामी आतडी भरून पावली. ''कसला ग बाई ह्यो श्रावण म्हणायचा? गावाकडचा वैशाख परवडला –'' तिला स्वतःचंच नेहमीचं वाक्य आठवलं. अर्धा दिवस उलटायला आला. जेमतेम सत्तर-ऐंशी रुपये जमले असतील. कसं व्हायचं?

शेवंताक्कानं निरोशनं दोन्ही नाग दोन्ही टोपलीत वेटोळे घालून बंद केले. पुलाच्या काठाच्या ओबडधोबड आधाराला डोकं टेकवलं. तसा आठवणींचा टोपलीमधला तोंड न शिवलेला नाग अवचितपणे शेवंताक्काच्या समोर सरसरून उभा राहिला. काळीकुट्ट, मचमचती, लवलवती जीभ नाचवत तिची नजर भेदू लागला.

''दो रुपय का तेरा सुई, तेरा सुई का दो रुपय'' हणम्यानं सेकंड क्लासच्या डब्यात कचकचून आवाज दिला. निबर गर्दी जराशी थरथरली. परत एकमेकाला गळामिठी घालून स्तब्ध. हार्बर रेल्वेची ''धडाक धुम, धडाक धुम'' कलकल चालूच. ''शर्ट सिलाव, पॅन्ट सिलाव, ब्लँकेट सिलाव, चद्दर सिलाव, चड्डी सिलाव, बनियन सिलाव, कुछ भी सिलाव. दो रूपय का तेरा सुई, तेरा सुई का दो रुपय –'' हणम्यानं परत जोर धरला.

तसे गर्दीमधून पाच-दहा हात पुढे आले. कुठला हात कोणाचा हे ब्रह्मदेवाला माहीत. वडाच्या पारंब्यांसारखे अधांतरी लोंबकळणारे हात. प्रत्येक हातामधलं दोनचं नाणं, नोटा खेचत तिथं हणम्यानं सुईच्या पाकिटाची तजवीज केली. आणि घसा फाडत तो पुढे सरकला.

''दस रूपय का छे'' असं म्हणत हणम्यानं संत्री विकण्यापासून सुरुवात केली होती. अगदी अगदी नाईलाज झाला की दस रुपयाला दहा संत्री द्यायची. एखादा दिवस भाकड. पण माल परत आणायचा नाही. संत्री, चिक्कू, पाकिटं, पेनं असू देत नाहीतर डायऱ्या. चेंबूरच्या सिंधीची ताकीदच होती तशी. *इमानदारीसे बेचो, कमाओ.* छोट्या सिंधीकडे हणम्यासारखी अशी गोवंडीच्या झोपडपट्टीमधली पन्नासेक पोरं कामाला होती. रेल्वेवाले, पोलीस, टिपनाट भाई लोक ह्या सगळ्यांच्या हप्त्यांचं

छोटा सिंधी बघायचा. बाकी *खिटखिट नाय पायजे. इमानदारीसे बेचो. इमानदारीसे कमाओ.* सुरुवातीला हणम्याला स्टेशनांची नावंसुद्धा माहीत नव्हती. संडास रोड, डाकी रोड असं तो म्हणायचा. मग बाकीची पोरं त्याला फिदीफिदी हसत. ''साला घाटी सुधरेगा नही'' म्हणून चिडवत. चिडलेला हणम्या संतापून जायचा. खूप माल विकायचा. विकता विकता शिकायचा. शिकलेलं मनात साठवायचा, सारखं आठवायचा. सुधरत जायचा.

हळूहळू डाकी रोडला डॉकयार्ड रोड स्टेशन, संडास रोडला सॅन्डहर्स्ट रोड स्टेशन असं खणखणीत आवाजात हणम्या बोलू लागला. ''ले लो, ले लो डायरी ले लो. हॉस्पिटल नंबर, पोलीस स्टेशन नंबर, एसटीडी नंबर, आयएसडी नंबर, फायर ब्रिगेड नंबर, सब मिलेगा नंबर. ले लो, ले लो डायरी ले लो, पाच रुपये का एक डायरी. एक डायरी का पाच रुपया.''

हणम्याची प्रगती बघून बाकीची पोरं चाट पडली. तसा बडी सिंधीचा हणम्यासाठी निरोप आला. छोटा सिंधी इमानदारीचा धंदेवाला. बडा सिंधीकी बात अलग. अफू, गांजा, चरस, हवालाच्या नोटा – बेइमानी म्हणजे पैशाला पासरी. बडा सिंधीकडे बढती मिळावी म्हणून पोरं टाचा घासायची. हणम्याला मात्र बढती न मागता मिळाली. तसा हार्बर लाईनवरच्या गर्दीसारखा हणम्या दिवसेंदिवस फोफावू लागला.

चोरून बिडी पिणारा हणम्या सिगरेट शिलगावू लागला. म्हातारीला वास जाऊ नये म्हणून सुगंधी बडीशेप खाऊ लागला. एक दिवस अस्लम त्याला कानात म्हणाला, ''देख हणम्या, दारू पिनेके बाद चिकू खाके घर जानेका. घरवालों को झ्याट बास समझता नही.'' संध्याकाळी झोपड्याकडे वळताना हणम्या रोज चिकू खाऊ लागला.

एक दिवस काय झालं कोणास ठाऊक – एकतर दारू जास्त झाली असणार, नाहीतर चिकू कमी पडला असणार – दारूच्या वासानं शेवंताक्काचं डोकं भणभणलं. सात्यासरा अंगात घुसल्यासारखी ती तिरपाटली. हणम्याला लाथाबुक्क्यांनी तुडवू लागली. कोपऱ्यातलं जातं उचलून त्याच्या डोक्यात घालावं म्हणून धावली, तशी शेजारच्या झोपडीतली आयेशाबी धावत आली.

''गप ए, शेवे. अगे क्या करती? जीव लेती क्या छोकरे का?''

''तू गप बस भाभी. ह्येचा मुडदा बशीवती भाड्याचा.''

''पागल हो गयी क्या शेवे तू? हात ले पीछे. नहीं तो मेरे डोस्के में डाल. रोज पचास-सौ कमाके लाताय, किंमत नहीं क्या तेरेकू?''

''काय बोडक्यावर वाटायचं माझ्या ते शंभर रूपडं व्हय गं भाभी? कसलं इदरकल्याणी पोरगं बघ की गं बाई माझे?''

बोलता-बोलता झाड पडल्यासारखी शेवंताक्का खाली पडली. वादळानं थरथरणाऱ्या फांद्यांसारखी लटलटू लागली. दोघींनी गळ्यात गळा घातलेला बघून हणम्या हळूच बाहेर सटकला.

''दारू पितंय न्हवं गं. ह्येला पटकीचा फोड आला त्यो भाड्याला. दारू पिवून पिवून आतड्याच्या चिंध्या झाल्या. सोताच्या हातानं तिरडी उचलली न्हवं गं ह्येच्या बानं? आनी हे बी इदरकल्याणी कार्ट, बापाच्याच पायावर पाय ठेवाय लागलंय. कसं जगावं आणि कसं मरावं काय कळंना व्हय गं खज्जाळीच्याला?''

ऊन अजून बेसुमार झालेलं. एकाही श्रावणसरीचा पत्ता नाही. अंगातला घामाचा ढग बाहेर यायचा तेवढ्यापुरताच श्रावण. उनाचा तापटपणा वाढायला लागला, तशी शेवंताक्काच्या डोळ्यांसमोर अंधारी यायला लागली.

''नाग को क्यूं दूध देनेका?''

''म्हंजे? द्याचं आसल तर दे, नाहीतर गप जा की बाबा.''

''फिर भी क्यूं दूध देने का? वो कबसे पिने लगा?''

''लेकरा काय करायचंय तुला? कोन हाईस तू?''

''आम्ही वन्यप्राणी संरक्षणवाले आहोत. कशाला नागाला त्रास देता मावशी?''

''मग घेऊन जा तुझ्या घरला. न्हे जा. तुझ्या आई-बाच्या पायावर ठेवून दे. आशीर्वाद द्या म्हणावं ह्या नागास्नी. कुत्री, मांजरं पाळत्यात तसं पाळ जा ह्या नागास्नी. हे घे. जा घिवून.''

कार्यकर्ती पोरं बावचळून पळाली. इसाकशेठचा माणूस लगबगीनं आला आणि वडापाव बांधलेली कागदाची पुडी शेवंताक्काच्या तिसऱ्या टोपलीत ठेवून गेला. शेवंताक्कानं अधाशासारखा वडापावचा मोठा तुकडा घशात ढकलला. तसा जोराचा ठसका आला. दुप्पट वेगानं वडापाव बाहेर येऊन आदळला.

सगळ्या पोरींनी दहीभात नाइलाजाने संपवला. खाण्याची वासना नव्हती. पण प्रसादाचा दहीभात टाकायचा नाही. गौरी-गणपतीचं विसर्जन झालं. पुरुष माणसं, पोरंटोर नदीवर परतायला लागली होती. बाया आणि पोरी-टोरी आवराआवरीला लागल्या. शेवंतानं आवाज लावला तशा बाकी पोरीसुद्धा एकसुरी झाल्या.

गेली गवरा गवरा ग बाई
मला गमंना गमंना ग बाई
मला जेवूसं वाटंना वाटंना ग बाई
पानी पिवूस वाटंना वाटंना ग बाई

पोरी खिन्नपणे मागे परतू लागल्या. पाय जडावलेले...

''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.''

खरंच की. आता पुढच्या वर्षी गणपती येणार. मगच पोराच्या पाठोपाठ गौराई येणार. एक वर्ष ग बाई, लगेच जायला पाहिजे ते. सारखे गौरी-गणपती असले पायजे घरात. मग काय मजा येईल!


शेवंता मोहोरून गेली. इतर पोरींमध्ये परत मिसळली. परतीची वाट अर्धी झाली. गल्लीमधलं एक शेंबडं पोरगं गळणारं नाक आणि लोंबणारी चड्डी सावरत धावत आलं.

''शेवंताक्का, तात्यानं बलिवलंय तुला लवकर, सरवड्यास्नं तुझा मामा आलाय. सोळंबीची माणसं तुला बघाय येणार हाईत.''

बबन्याच्या निरोपावर पोरी फिदफिदल्या. शेवंताला कोपरखळ्या हाणू लागल्या. तशी थिरकत पावलांनी शेवंता घराकडं पळत सुटली.

''दाजी, त्यास्नी देण्या-घेण्याचं काय न्हाई. बिन आई-बाचं पोरगं. त्येला बी त्याच्या मामानं वाडिवलय. हां, जरा वाढलंय लाडात खरं. मुंबईला मिलमदी नोकरी. लालबागला बारकीशी खोली. हिकडं जराशी वावरं हाईत ती हाईतच. खरं मागणं एकच त्येचं. लगीन लागल्यावर पोरीला लगेच आठ दिवसाच्या आत सलामवाडी-मुंबई गाडीत बसवायची. त्येला रजा न्हाई मिळत. खाण्यापिण्याचं त्येचं हाल नकोत म्हणून लगेच राजा-राणीच्या संसाराला पाठवायची.''

जानूतात्या हरखला. लांब राहील पोरगी, खरं सुखात राहील. कायमची नोकरी. त्यात मालकीची खोली. गुणाची माझी लेक ती. नेटानं संसार करील. ज्याच्या घरी जाईल तिथं लक्ष्मी पाणी भरील. दृष्ट लागावी अशी दिसती. रुक्मिणीवरच गेलीया. एवढी कष्टात वाडीवली. आईवेगळी लेक. लांब न्हायली तरी चालंल. काळजावर दगड ठेवीन. उजवायचीच पोरीला.



गहिवरलेला जानूतात्या, मोहोरलेली शेवंता. मामा रात्रीचं जेवून सरवड्याला परत गेला. फौजेत लढताना गोळी लागून मातीत मिसळलेला मोठा पोरगा यशवंत आणि मुलाच्या हबक्यानं अकाली गेलेली रुक्मिणी. दोघांचे फोटो छातीशी धरून जानूतात्या रात्रभर हंबरत राहिला. बापाचा जगावेगळा आनंद निरखीत शेवंता रात्रभर खुळ्यासारखी बसून राहिली.

पहिली दोन-चार वर्ष शेवंताचा नवरा धनाजी वेळेवर घरी यायचा. हळूहळू मिल सुटली तरी त्याचा येण्याचा वेळ वाढू लागला. घरात अंगावर पिणारं लहान पोरगं आणि रात्री उशिरा लटपटत्या पायांनी दारात येऊन उभा राहणारा नवरा. शेवंता सटपटली. पोराच्या डोक्यावर हात ठेवून शपथ घ्यायला लावली. हातापाया पडली. जोतिबाला, अंबाबाईला नवस बोलून झाला. धनाजीच्या तोंडाचा वास काही कमी व्हायला तयार नाही. एका गणपतीत शेजारची जाधवीण शेवंताच्या कानाला लागली!

''हिथ मंडपाच्या मागे कशी जुगार खेळत्यात? तशी तिकडं परळलाबी एक स्वतंत्र खोली हाय म्हणं कुणाचीतरी.''

''कसली?''

''जुगार खेळायची.''

''मग?''

''धनाजीभाऊ डबल पाळीला थांबतो म्हंत्यात तवा ते मिलमंदी कधी असत्यात?''

''तर गं बाई?''

''आगं शेवंता, तिकडे जुगार खेळत बसत्यात. परळच्या दोस्ताच्या खोलीवर.''

शेवंता हबकली. मामा-मामींनी लाडात वाढवलेलं पोरगं. कुणाचा एक शब्द ऐकून घ्यायचा नाही. माझंच खरं. शेवंतानं बसकण मारली. तिला उठता येईना. हळूहळू शेवंताच्या संसाराचं कंबरडं मोडत गेलं.

''शेवे, वो लिज्जत पापड के हाफिस में चल जायेंगे.''

''कशाला ग भाभी?''

''अग चल तो. वो सब बाईलोगोंका काम है. जाके उनको बतानीका, हमकोबी काम करने का करके.''

''कशाचं काम भाभी? काय गमंना मला.''

''तू बैठके खाएगी? क्या महाराणी है तू?''

''कोन बसून खातंय हिथं भाभी? माझं जनावरासारखं राबनं बघतीस न्हवं? मला कामाची लाज न्हाई. धुणीभांडीच काय, घाणबी साफ करीन मी. त्येच करत आलीय, धनी गेल्यापास्नं. खरं धुणी-भांडी करणारी बाई, गोवंडीच्या झोपडपट्टीत न्हाणारी बाई म्हटल्यावर येणारी-जाणारी सगळीच कशी बघत्यात काय सांगू तुला? ह्या पुरुषमंडळीच्या डोळ्यातली घाण कशी साफ करायची सांग मला?''

''अगे घाबरती काय? हणम्याबी आता जवान झालाय. इत्ना बडा लडका है तेरा. डरनेका नहीं. वो भी बेचताय ना लोकलमें कुछ ना कुछ? तेरा कमाई, उसका कमाई – सब अच्छा हो जायेगा. चल उधर.''

लिज्जत पापडच्या ऑफिसमध्ये कसल्यातरी कागदांवर शेवंताक्कानं अंगठे उठवले. पीठ झोपडीत आणून देतील. आपण कणीक मळून लाटायची. रेल्वे रुळाच्या पलीकडे वाळवायचे. वाळलेले पापड अलगद भरून पाठवायचे. दिवसाला वीस-तीस रुपये सुटायचे. शेवंताक्का हातांना रग येईपर्यंत पापड लाटू लागली. बघावं तेव्हा तिचं पोळपाट-लाटणं बेसुमार लटलटू लागलं. दिवसाला पन्नास-साठ रुपये मिळू लागले. अतिश्रमानं शेवंताक्का सुखाने झोपू लागली.

एक दिवस सुकलेले पापड वाऱ्यानं उडतील म्हणून शेवंताक्का गोळा करायला गेली. एवढ्यात आयेशाबी धावत आली. शेवंताक्कांचा हात धरला आणि पिसाटल्यासारखी धावू लागली.

''भाभी? आगं कुठं? कुठं जायाचं?''

''चल जलदी शेवे, जलदी चल.''

आयेशाबीनं बळजबरीनं खेचत शेवंताक्काला टॅक्सीत बसवलं. इकडं टॅक्सी सुरू झाली तसे तिकडं वाऱ्यानं सगळे पापड आभाळभर उधळले. पिवळ्या-पिवळ्या ठिपक्या होऊन गरगरत खाली रूळांवर, रस्त्यावर, मातीवर, चिखलात, गटारांवर येऊन पडू लागले.

''काय झालं भाभी? दंगल पेटली की काय?''

''दंगल? दंगल को कौन डरताय शेवे? मेरे धनी को वो दंगल में तुम्हारे लोगोंने रास्तेमें काट्या था तलवारसे, तबसे दंगलका भ्याच मेरे मनसे निकल गया. कौन डरताय दंगलको?''

बोलता बोलता आयेशाबीने डोळ्यांना पदर लावला. ती गदगदून रडायला लागली तसा शेवंताक्काचा धीर सुटला.

''बोलंनास गं भाभी? बोल की.''

टॅक्सी सायन हॉस्पिटलच्या दारात थांबली. सगळीकडे नुसती बघ्यांची आणि रोग्यांची गर्दी. खोकल्याची ढास आणि औषधांचा वास. काऊंटरवर कसली तरी चौकशी करून आयेशाबी शेवंताक्काला खेचत एक वॉर्डात गेली. दोन-चार पोलीस आणि एक इन्स्पेक्टर. समोर एक झाकलेला मुडदा. भाभीनं इन्स्पेक्टरला सांगितलं,

''ये है उसकी मां. शेवंताक्का.''

''हा बडा सिंधीसाठी काम करायचा. सुरमा वंजारीचं आणि बड्याचं पहिल्यापासून वाकडं. माटुंगा रेल्वेस्टेशनसमोर ह्याला आज अपोझिटवाल्यांनी गोळ्या घातल्या.''

इन्स्पेक्टरच्या सांगण्याकडे शेवंताक्काचं लक्ष नव्हतं. थरथरत्या हातांनी तिनं फडकं दूर केलं. कसल्यातरी भितीनं हणम्याचे डोळे विस्फारले होते. ते तसेच उपडे राहिलेले. बापासारखीच झुबकेदार मिशी लहानपणी चाळीच्या जिन्यातून गडगडत पडल्यावर कपाळाला खोक पडलेली. त्याची एक निशाणी. खालचा ओठ दातात अडकून फाटलेला, कानाच्या मागून एक रक्ताचा ओघळ. आता पोस्टमार्टेम आणि पुढचं सगळं – म्हणजे नगरसेवक बनसोडेलाच गाठायला पाहिजे. या विचारात आयेशाबी शेवंताक्काच्याजवळ सरकली. आभाळ फाटलेल्या शेवंताच्या तोंडून शब्दही बाहेर पडेना. हुंदका तर नाहीच नाही.

''दातखीळ बैठ्या है, लगता है!''

स्वत:चं आडमुठं तिरपागडेपण सोडून ऊन जरा तिरकं व्हायला लागलं, तसं ते शेवंताक्काच्या सरळ सरळ बुबुळांतच घुसायला लागलं. बाजू बदलून बसावं तर समोर चार-पाच महारोगी – नकोच ते, हाय हे बरं हाय.

एक हवालदार काठी आपटत आला. दम द्यायला लागला.

''कुणी बसायला सांगितलंय?''

''इसाकभाईनं.''

''मं ठीक हाय. कामाचा माणूस. चालू द्या.'' हवालदार निघून गेला.

तिसरी टोपली अर्धा भरली होती. दुसऱ्या टोपलीचं झाकण किलकिलं करून एक नाग बाहेर डोकवायला बघत होता. उन्हानं शुद्धबधिर झालेली शेवंताक्का, नागाच्या किलकिलत्या नजरेकडं तिचं लक्षच नव्हतं. नागोबानं फट मोठी केली. हळूच मान बाहेर काढली. भीड चेपली तसं सगळं अंग सळसळत बाहेर आलं. रस्ता दिसेल तिकडं सुसाट पळालं. रिकामी टोपली गुपचूप फतकल मारून बसली.

सुरवातीला दोन-दोन पाळ्या करणारा धनाजी कामाचाच कंटाळा करू लागला. एखादी पाळी केली नाही केली, मनानी मर्जी.

*पानं पिसायला पायजेत, दारू ढोसायला पायजे. पोरगं सरळ शाळा शिकंना आनी ह्यो बाबा संसारात लक्ष घालंना. आई जेवायला वाढीना आनी बाप भीक मागू देईना अशी अवस्था.*

*– कुठं एकटीने मी फुरं पडायचं? आनी किती फुरं पडायचं?*

जोडीला गिरणीचा संप रावणासारखा येऊन बसला. मानेवर पाय देऊन. चाळीच्या चाळी हडबडल्या. वस्त्याच्या वस्त्या गडबडल्या. तोंडाचं पाणी पळालं. मनिऑर्डरची वाट बघणाऱ्यांच्या पोटाचा घास पळाला. हमाली तरी करावी. पण एकाचवेळी कितीतरी हजार नवीन हमाल रस्त्यावर. कोणी हमाली द्यावी आणि कोणाकोणाला द्यावी? बायकांचे अगोदर कान मोकळे झाले, मागनं गळे मोकळे झाले. जुन्या फाटक्या चपला किती दिवस वापरायच्या? नव्या आणणार कुठनं? मातीमोलाला खोल्या विकून, डोक्यावर ट्रंका घेतलेले अनवाणी पाय मोकळे झाले. दिसेल त्या दिशेला पायवाटा फुटू लागल्या. जमीन फुटलेली आणि आभाळ फाटलेलं, कोणी टाका घालावा? कसा टाका घालावा?

डोकं काम देईना, आतडं गप बसू देईना, दारूनं नशा येईना, तसा धनाजी स्पिरीट पिऊ लागला. त्याच्या भपकाऱ्याच्या वासानं खोली गुदमरू लागली. शेवंताच्या मनाची भिंत आतल्या आत ढासळू लागली.

कोणाच्या तरी सांगण्यावरनं धनाजी नको नको म्हणताना शहापूरला गेला. नोकरी बघायला जातोय म्हणाला, खरं गेला वेगळ्याच कामाला. नागपंचमी तोंडावर आलेली. शहापूरच्या जंगलात जाऊन नाग पकडून आणू. एकेक नाग हजार पाचशेला जातो. भांडवल काय लागतं सोबत? एक पोतं आणि एक दोरी. दोस्ताबरोबर बावीस नाग पकडले. दलालाकडनं पैसे घेतले, दारू प्याला. नाग मोजून दिले. एका नागाचं तोंड अर्धं शिवायचं राहून गेलेलं. त्यातनं त्याची जीभ दातासकट वळवळली. धनाजीचं मनगट हिरवं-काळं झालं. अगोदरच आतडं सडलेलं, त्यात दारूचा अंमल, त्यात नागाचं विष. काळ्या ठिक्कर पडलेल्या धनाजीला वाचवायला शेवंताक्का हंबरडा फोडत धावली. खोली लिहून देते म्हणाली. ''पैसे उभी करीन, वाचवीन धन्याला.''

बाकीच्या चाळवाल्या म्हणाल्या, ''आता कुठं खोली इकतीस मर्दिने? जुगारासाठी खोलीवर अगोदरच धनाभाऊ पाच-पन्नास हजार उचलून बसल्यात. काय हातात पडलंच किडूकमिडूक, तर एखादं झोपडं घेता येईल तुला धारावीला, न्हाईतर गोवंडीला.

तेवढाच तुला आणि हणम्याला आधार.''

थंडथंड धनाजीच्या शेजारी शेवंताक्का नुसतीच बसून राहिली. बायका चुकचुकू लागल्या. हणमा रडू भेकू लागला. शेवंताक्काचा पदर फाटला. शेवंताक्काचं आभाळ फाटलं. शेवंताक्काच्या कपाळावरचा कुंकवाचा ठसा सुटला. सगळं उजाड झालं. ओसाड झालं.

सळसळणाऱ्या नागराजाकडे कोणाचंच लक्ष नव्हतं. जो तो आपल्याच तंद्रीत. जो तो आपल्याच गर्दीत. *आज आपला सण, आज ऐटीत फिरू. पुन्हा उद्याचं उद्या बघून घेऊ.*

जनावर धावतच होतं.

''प्लॅटफॉर्म क्रमांक चारपर आनेवाली गाडी, दो बचकर चालीस मिनटकी हार्बर लाइनसे छत्रपती शिवाजी टर्मिनस जानेवाली धीमी लोकल है.''

निवेदिकेचा गिचमिड आवाज घुमला. गाडी अजून फलाटात यायची होती. गाडी येणार तोवर कुणाच्यातरी पायात जनावर अडखळलं. ''सापऽऽ सापऽऽ अस्सल नाग दिसतोयऽऽ'' आरडाओरडा झाला. धक्काबुक्की, चेंगराचेंगरी, जीव वाचविण्याची धडपड, पडापड याला ऊत आला. गाडी मस्तीत आत शिरली. गडबड-गोंधळात, ढकला-ढकलीत चारजण रूळावर पडले. रेल्वेच्या चाकांचा घास झाले.

किंकाळ्या आणि रक्ताच्या चिळकांड्या एकाचवेळी उडाल्या. किंकाळ्या दबल्या तरी फलाटावर उडालेलं रक्त शांतपणे खाली ओघळत राहिलं.

काठी आपटणाच्या हवालदाराला साप दिसला तसे त्याचे डोळे विस्फारले. त्याचं पोलिसी डोकं चाललं. तो धावतच फ्लायओव्हर ब्रिज चढला. शेवंताक्काच्या जवळ गेला. तिची एक टोपली रिकामी होती. शेवंताक्काला लाथेनं उठवीत तो दंडाला धरून फरफटत पोलीस स्टेशनच्या दिशेनं खेचू लागला.



शेवंताक्काच्या नागाचं आयेशाबीला कळलं, तसं ती डोकं धरून खाली बसली.

''या अल्ला! क्या दिन दिखाया तूने? और कितनी झडती लेनेवाला है तू? मैं ही पागल, वो जाती नहीं थी, तो मैनेही उसको दबाकर भेजा.''

आयेशाबी स्वत:च्याच झिंज्या उपटून घेऊ लागली. तसं तिला नगरसेवक बनसोडेनं सावरलं. ''ये सामने क्या पड़ा है, उसको पयले देखना पड़ेगा भाभी.''

आयेशाबी वरमली. एका पोराला तिनं इसाकभाईकडे पिटाळलं.

''शेवंताक्काको जल्दी छुडाके लाव बोलना इसाकभाईको'' म्हणत ती परत येणाऱ्या संकटामध्ये घुसली.

– इसाकभाई तिला सोडवल्याशिवाय राहणार नाही आणि तोवर आपण हे सगळं निस्तरू या.

कुठल्याही क्षणी झोपड्या तोडणारी लोकं येणार होती. कुर्ल्याला आणि शिवडीला अगोदरच तोडा-तोडी झाली होती. बनसोडे सावध झाला होता. फोर्स मोठा आहे. म्युनिसिपालटी, रेल्वेवाले आणि पोलीस एकाच वेळी तिथे चाल करून येणार होते.

– आपण काहीही करून गोवंडी ते मानखुर्द एवढ्या झोपड्यांचा पट्टा वाचवायचाच. गाजराची पुंगी, वाजली तर वाजली, नाही वाजली तर मोडून खाऊ. तोडातोडी थांबवली तर एका रात्रीत हिरो. पुढच्या वेळी विधानसभा. तोडातोड झालीच तरी लोकांना कळणार – शेवटपर्यंत आपल्यासाठी भांडला. म्युनिसिपालटीच्या पुढच्या निवडणुकीतही वार्ड सुरक्षित.

बायकांनी कसं आडवं पडायचं, पोरांनी कशी दगडफेक करायची हे सगळं बनसोडे सांगत गेला. ऐकणारे ऐकत गेले.

''माणसं मेलीत चार, जखमी झालेत सतरा. मेलेल्यांचे नुकसान दावे वेगळे. जखमी झालेल्यांची मलमपट्टी वेगळी. कसं करतोस इसाकभाई? झेपणार नाही तुला. ह्या म्हातारीला मरू देत इथंच. तू जा निघून.'' इन्स्पेक्टर सांगत गेला, तसा इसाकशेठ गांगरला.

''अरे साब, ऐसा मत करो. बेचारी गरीब, बुढी औरत. हाथियार हाथमें लेके थोडाही किसीको मारा है?''

''तो तुझेही लॉकअपमें डालता हूँ!

''खुशीसे मेहरबान. कुछ चिंता नहीं. अपनेका क्या, चार दिन अंदर, चार दिन बाहर चलते ही है. मगर उस बुढीका कुछ करो साब.''

''कसं काय करणार? किती जालीम केस आहे ही!''

''साहेब यावेळी तीनशे तरी आणले. गेल्यावेळी पाचशे साप आणले होते मी बाहेरच्या जंगलातनं. कभी कुछ नहीं हो गया. आजही ऐसा क्यूं हो गया अल्ला जाने.''

''खरं सांग किती कमावतोस?''

''वो तो धंदे की बात है साब. साप लानेका, आज दिनभर बिठानेका, उद्या स्थानिक गारुड्यांना हजार-पाचशे को बेच डालनेका. हरसालका खेल है साब और हमारा तुम्हारा तो रोजका

मिलना-जुलना. आप कहेंगे वैसा हो जाएगा. सिर्फ वो रिपोर्ट बदलके बुढीको अभी के अभी छोड़ दो.''

इन्स्पेक्टरने हवालदाराला सांगितलं तसं बाजूच्या खोलीत बसवलेल्या शेवंताक्काजवळ इसाक गेला. ''आका, आप जावो अभी.''

शेवंताक्का सगळं ऐकत होती, बघत होती, पण तिच्या मेंदूपर्यंत काय पोचत नव्हतं. त्यात पोलीस स्टेशनमध्ये आणल्या-आणल्या दोन-तीन पोलिसांच्या काठ्यांनी हात धुऊन घेतलेले. शेवंताक्काची चोळी पाठीवर आणि दंडावर फाटलेली. चोळीच्या आत काठीच्या मारहाणीचे हिरवे निळे वळ. कळसूत्री बाहुलीसारखी शेवंताक्का उठली. कसल्याशा तंद्रीत बांद्रा पोलीस स्टेशनच्या बाहेर आली.

नेहमीसारखीच माणसांची ही झुंबड आणि गर्दी. तिला ते नवं वाटलं.

बया-बया-बया-बया कसली म्हणायची ही गर्दी? आरं देवा, कसली म्हणायची ही जत्रा? जोतिबाची का अंबाबाईची? आनी मला कशी कळली नसंल? येवढ्या लांबनं जोतिबा आनी आंबाबाई हिकडं आलंत म्हणायचं व्हय?

हळूहळू शांताक्का जत्रेत मिसळली.

मानखुर्द स्टेशनवरून शेवंताक्का उलटं चालत गोवंडीकडे निघाली. रेल्वे रूळाच्या कडेकडेने. रेल्वे बंद झालेल्या. सगळं चिडीचूप. माणूस-काणूस कोणच नाही. तिचं चालणं वाढायला लागलं तसा तसा उजेड पळायला लागला. सावल्यांनी लांब ढेंगा टाकायला सुरुवात केली. शुद्धबधिर झालेली शेवंताक्का ठणकत्या अंगानं झोपडीत शिरली. सवयीनं तिनं चिमणी पेटवली. ट्रंक खेचली. जातं जवळ ओढलं. एक जुनरं होतं, ते ट्रंकेत टाकावं म्हणून ट्रंक उघडली. आत भावाचा – यशवंताचा – आणि आईचा फोटो.

*– कसल्या फौजेत गेला कुणास दक्कल, गोळी लागली आणि खाली पडला म्हणं. दादाऽऽ तू गेल्याचं आणि आईबी हबाकली बघ. कसली फौज आणि कशाचं काय रं दादा? तुलाबी लेकीसाठी जगावं आसं वाटलं न्हाई व्हय गं आई? सगळी कशी सोडून गेल्यासा? आई, हे तुझ जातं. तुजी याद म्हनून जपून ठेवलं. चाळवाल्या हासायच्या फिदीफिदी. 'कसली घाटीण म्हनायची ही. जातं कसलं आणती मुंबईत?' आई तू ओव्या म्हनत दळलेल्या पिठाच्या कापसासारख्या भाकरी खाल्ल्यात न्हवं गं मी. आजून तोंडाला पानी सुटतं बघ. कसली भाकर आणि कसला तुकडा. सगळाच शेणकाला की ग बाई.*

*गोंदणारी बाई दारात आली. बाबा म्हनाला,*

*''गोंदीव तिच्या हातावर. आमच्या शेवंताच्या गोऱ्या गोऱ्यापान हातावर हिरवी गोंदण उठून दिसायला पायजे. चल गोंदीव – 'शेवंता जानू फराकटे' – लाखात एक माझी पोरगी. जिथं जाईल तिथं राजवाडा होईल. लक्ष्मी पाणी भरंल. लै गुणाची लेक माझी.''*

*आता कसला राजवाडा आनी कसल पानी? गटाराच्या पान्याकडंला झोपडं माझं. बाबा, तू तरी असा कसा न सांगता गेलास?*

*गावात शिमग्याचा सण. सगळी बेस आनंदात. ''आज पोळी, उद्या नळी, बामण मेला संध्याकाळी.'' शिपायाची सोंगं काढत, बोंबा मारत गल्लीगल्लीमधनं पोरं फिरतेली. तंवर एक पोरगं बोंबा मारत आलं. ''आरं छातीत कळ येऊन जानूतात्या म्हसोबाच्या पारावरनं धाड्दिशी खाली पडला.'' तुज्या बाजूने बोंब मारायला कोन हुतं बाबा? आमाला तर तार काय मिळाली न्हाई. सदोबाचं टपाल मिळालं तवा आठ दिवस व्हऊन गेल्यालं. दारू पिऊन-पिऊन धनाजीराव आठ दिवसासाठी दवाखान्यात झोपलेला. बाबा, माझी माहेरची शेवटची फांदीबी तोडलीस. कुणाचा त्यो रस्ता आनी कुठलं कुनाचं गाव? चारी बाजूंनी पुसत गेलं बघ, बाबा तुज्या लेकीचं नाव.*

टोळधाडीसारखा पोलीसफोर्स गोवंडीजवळ घुसला. सोबत राज्य राखीव दलाचे पोलीस. डोक्यावर हेल्मेट, एका हातात लोखंडाची जाळी, दुसऱ्या हातात काठी. एका आड एक मध्येच बंदुकधारी शिपाई. रेल्वे पोलीस, महानगरपालिकेची लटांबर. असा मोठा जामानिमा. बुलडोझर, पोक्लेन्स, डंपर, घमेली, फावडी एवढं सगळं सामान. झोपड्या नि झोपड्या खाली झालेल्या. लोकलसेवा कुर्ल्यालाच बंद करून ठेवलेली. रूळांच्या दोन्ही बाजूंनी लागून सगळ्या झोपड्या.

सहायक पोलीस आयुक्त रंजन देसाईनं खूण केली की लगेच पोलीस सावध होणार. एकदम ताठ. लाठ्या उगारणार, बंदुका रोखणार.

वॉर्ड ऑफिसर देवांग गांधीनं खूण केली की लगेच दोन्ही बाजूंनी दोन बुलडोझर धडधडायला लागणार. बघता बघता झोपड्या भुईसपाट होणार.

नगरसेवक बनसोडेनं खूण केली की इतका वेळ गप्प असलेल्या बायका बुलडोझरच्या पुढे आडव्या पडणार. मोक्याच्या ठिकाणी दबा धरलेल्या पोरांच्या हातातनं दगडांचा वर्षाव होणार.

वार्ड ऑफिसर देवांग गांधीनं ध्वनिक्षेपक हातात घेतला –

''उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रेल्वे रुळालगतच्या पन्नास फुटांपर्यंतच्या झोपड्या जमीनदोस्त करावयाचे आदेश आहेत. आम्ही तुम्हांला वेळेवर नोटिसा दिलेल्याच आहेत. कृपया शांतता राखून सहकार्य द्या.''

देवांग गांधीला काल रात्रीच आयुक्तांनी बोलावलं होतं. ''उद्याच्या मोहिमेत काही फट राहता कामा नये. खुद्द सी.एम.चे आदेश आहेत. जरा जरी हलगर्जी केलीस तर तुझी त्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाची फाईल वर काढीन. लगेच सस्पेंड होशील.''

– आता दगडांच्या वर्षावात चिंध्या झाल्या तरी चालतील, मागे हटायचं नाही.

देवांग गांधीनं स्टाफला खूण केली.

येणार-येणार म्हणत संकट चालून आलंच. थोडं तरी थोपवू, थोपवण्याचं नाटक तर करू, म्हणत नगरसेवक बनसोडे पुढे गेला. ए.सी.पी. देसाईंना नमस्कार केला. खोटं हसून म्हणाला,

''साहेब पंच्याण्णव पूर्वीच्या आणि नंतरच्या हा फैसला व्हायचाय. सरसकट सगळ्या झोपड्या कशाला तोडता मायबाप? तो वटहुकूम निघेपर्यंत थांबलं तर चालणार नाही का मेहेरबान?''

ए.सी.पी. रंजन देसाईनं बनसोडेचा अंदाज घेतला. त्याला खालीवर निरखलं. पहाटेच पोलीस उपायुक्तांनी देसाईला बंगल्यावर बोलावून घेतलं होतं.

''सी.एम.चे आदेश आहेत. पाळायला पाहिजेत. हलगर्जीपणा केलास तर सरळ गडचिरोलीला बदली. इथला मुंबईचा मलिदा तर जाईलच, परत त्या जंगलात जाऊन नक्षलवाद्यांबरोबर गांडमारी करायला लागेल ती वेगळी. काय सांगतोय ते समजून जा. फार वरनं शिजलंय सगळं आणि दुसरं देसाई. तुझ्या त्या गुडराई चांदी प्रकरणातलं संशयास्पद वागणं गृहमंत्रालयापर्यंत पोचलंय. जरा जपून, नाहीतर उद्याच्या एसटीनं बायकापोरांसह परभणीला पोचशील.''

देसाईच्या कपाळावरची शीर उडाली.

''ए बनसोडेऽऽ'' घोगरा आवाज फुटला.

एकदम एकेरीवर? बनसोडे समजला. काहीतरी बिनसलंय. जरा जपून राहावं.

''बनसोडे, फायनल सांगतो तुला. कुणालाही भडकवू नको. आजचा दिवस आवरून धर. लै डोस्कं फिरलंय आपलं. हयगय करणार नाही. एकेकाच्या गांडीत गोळी घालीन भेंचोद.''

बनसोडे वरमला. त्यातनं धीर करून म्हणाला, ''बायकांचं एक ठीक आहे साहेब, तरुण पोरांचा काय भरोसा? कसं आवरायचं सांगा ना साहेब?''

''बनसोडे, एकाही पोराच्या एका जरी हातातनं दगड बाहेर आला, तर आज रात्रभर तुला लॉकअपमध्ये बंद करून तुझ्या गांडीत मी थर्ड डिग्रीचा खुट्टा मारीन भडव्या. काय ते समजून जा. शाना बन.''

बनसोडे हिरमुसला. आज आपली डाळ काही शिजत नाही. त्याने सिग्नल दिला तसे रहिवाशी हळूहळू मागे सरकायला लागले. देवांग गांधीने हात वर करून ऑर्डर सोडली. ''स्टार्ट...''

बुलडोझर घरघरू लागले. घमिल्या, फावड्यांचा खणखणाट वाढू लागला. पोकलन आणि डंपर हालू लागले. माणसांचा गलबला, धुळीचा गलका, सगळं एक व्हायला लागलं.

''भाभी, वो आका को कभीका छुडा दिया इसाकशेठने. वो उधरकी साईडसे झोपडेमे गई लगता है.'' मघाचं पोरगं तशा गर्दीतसुद्धा आयेशाबीच्या कानाला लागलं, तसं तिचं काळीज लक्कन हललं. ''या अल्ला!''

आयेशाबी बनसोडेकडे रडू भेकू लागली. अगोदरच ए.सी.पी.ने त्याचा पापड केला होता. बनसोडेची सटकली. ''तू तर मरच, परत मला पण घाल त्या बुलडोझरखाली. पागल हो गई है तू? रेड अलर्ट है उनको, कोई भी सामने आयेगा तो गोली मारेंगे. जरा चुप बैठ और मुझे सोचने दे.''

आयेशाबीच्या अंगाचं पाणी झालं. ''इतक्या वरसांची दोस्ती. शेजारीण आपली. कधी बिचारी कुणाबद्दल वाईट बोलली नाही. नेक औरत. भगवानने सुनी नहीं होगी उसकी. फिर भी सच्ची औरत. अपने साथ बडे बेहेन जैसा बर्ताव किया.'' आयेशाबी मूर्च्छा येऊन खाली कोसळली.

शेवंताक्कानं हाताला येईल तेवढी माती, छोटे-मोठे दगड जात्यात टाकले. भरडू लागली. बऱ्याच वर्षांच्या विश्रांतीनंतर जातं घरघरू लागलं. मातीला परत माती करून बाहेर सांडू लागलं. चिमणी विझायला आलेली. शेवंताक्काच्या विझत्या डोळ्यांच्या मिणमिणत्या पणत्या तेवढ्या तेवत असलेल्या.

यंत्रा-माणसांचा गलका जवळ येत होता. बुलडोझर अधिक हिंस्रपणे घरघरत होता. पुढे पुढे सरकत जवळ येणारी टोळधाड. शेवंताक्काला काहीच कळत नव्हतं. शुद्धबधिर शेवंताक्का एकाग्रपणे जातं ओढीत होती. जात्यात माती टाकत होती. डोळे पुशीत होती. चाक ओढीत होती.

बंधू येईल ग, नेईल माहेरपणाला<br>
गौरी-गणपतीच्या सणाला

*कुठल्या रानात तुला कसली गोळी लागली म्हनायची रे बंधुराजा? कधी याचास तू? गौरी-गणपती आलं न्हवं तोंडावर? तू आलास की मी काय हे जुनेरं नेसणार हाय व्हय रे दादा? लै भारीतलं पाताळ आन बघ मला.*

*शालू भरजरी भावजय*<br>
*देईल ल्यायाला*<br>
*गौरी-गणपतीच्या सणाला.*

*मी एवढ्या लांब मुंबईला. तुम्हांला तरी सारखं कुठनं जमनार. वर्षातनं एकदाच होणार माझं म्हायारपन. आईला आनी बाबालाबी घे संगट. सगळी एकदम माझ्या दारात आलासा म्हंजे माझा जीवबी तेवढाच हलका.*

*गाडी घुंगराची येईल ग न्यायाला*<br>
*गौरी-गणपतीच्या सणाला*<br>
*बंधू येईल ग नेईल माहेरपणाला*<br>
*गौरी-गणपतीच्या सणाला.*

चिमणी विझलेली. छप्पर डुगडुगू लागलेलं. अंधाराचा जबडा वासत चाललेला. शेवंताक्काचा आवाज भिजत-भिजत चाललेला. बुलडोझरचं चाक पुढे-पुढे सरकलेलं. बुलडोझरचं पातं आणि शेवंताक्काचं जातं. – दोन्हींची घरघर चालूच.

*(दिवाळी २०००)*

*(रेखाटने : प्रकाश कोळी)*

# सुटका

## विलास पाटील

''कथाबीजातून कथा निर्माण होण्याची प्रक्रिया एवढी सूक्ष्म, तरल आणि धुक्याआडची असते, की त्याचा नेमका शोध घेणं लेखकालाही अवघड होऊन बसतं. पण एकमात्र खरं, की त्याच्या मनात जे कथाबीज पडतं, त्याचं स्वरूप आणि त्यातून निर्माण झालेली कथा या दोन्हींचं निरीक्षण नक्कीच मनोरंजक आणि काहीसं कुतूहलपूर्ती करणारं असू शकतं.''

सुटका ही कथा आणि तिची निर्मितिप्रक्रिया.

### प्रास्ताविक

लेखकाला कथा सुचते तरी कशी? याबद्दल वाचकाच्या मनात एक कुतूहल असतं. तसं ते लेखकाच्या मनातही असतं. पण त्याचा तो खोलवर शोध घेण्याचा प्रयत्न करत नाही. त्याची त्याला जरुरीही वाटत नाही. कारण, जेव्हा एखादी घटना, एखादा प्रसंग तो पाहतो, तेव्हा त्याच्या मनात खोलवर कुठेतरी एक बीज पडतं. या बीजाचं कथेत रूपांतर होत असताना लेखक सजग नसतो आणि तसा तो असणं जरुरीचंही नसतं. त्या बीजातून कथा आकार घेताना लेखकानं जर अभ्यासकाची भूमिका घेतली, तर त्याच्या कथालेखनाच्या तल्लीनतेला धक्का बसण्याची शक्यता असते. एकाच वेळेला तो कथालेखन करणारा निर्माता आणि तो सारा व्यापार दुरून न्याहाळणारा प्रेक्षक म्हणून वावरणं, त्याच्या एकतानतेला, तल्लीनतेला बाधा आणणारं ठरू शकतं. शिवाय, कथाबीजातून कथा निर्माण होण्याची प्रक्रिया एवढी सूक्ष्म, तरल आणि धुक्याआडची असते, की त्याचा नेमका शोध घेणं लेखकालाही अवघड होऊन बसतं. पण एकमात्र खरं, की त्याच्या मनात जे कथाबीज पडतं, त्याचं स्वरूप आणि त्यातून निर्माण झालेली कथा या दोन्हींचं निरीक्षण नक्कीच मनोरंजक आणि काहीसं कुतूहलपूर्ती करणारं असू शकतं. तेव्हा त्या दृष्टीनं माझ्याच एखाद-दुसऱ्या कथेचं कथाबीज मला कसं गवसलं आणि त्यातून निर्माण झालेली कथा कशी होती हे वाचकाला कळावं, म्हणून वानगीदाखल एका कथेचा जन्म आणि प्रत्यक्षात ती कथा वाचकांपुढे ठेवणं मला अगत्याचं वाटतं. त्यासाठी मी निवडलेली कथा आहे 'हार्टफेल!' या कथेचं बीज कसं माझ्या मनात पडलं आणि त्यातून निर्माण झालेली कथा कशी होती हे इथं प्रत्यक्षातच मांडतो आहे.

पुण्यात राहायला आल्यावर मी डेक्कनवर फ्लॅट घेतला. पेपरमध्ये जाहिरात पाहून मी फ्लॅट पाहायला गेलो, तेव्हा बांधकामाला नुकतीच सुरुवात झाली होती. ते १९९९ साल असावं. फ्लॅट तयार झाला आणि २००० साली मी राहायला आलो. खरं तर या अपार्टमेंटमध्ये निवासी रहिवासी मी एकटाच होतो. बाकी सारी ऑफिसेस होती. मला कोणी शेजारी नव्हता. 'निदंकाचे घर, असावे शेजारी', असं जरी तुकोबांनी म्हटलं असलं तरी ते माझ्या भाग्यात नव्हतं.

शेजारी नव्हता हे खरं; पण सोबत करायला वॉचमन होता आणि बिल्डरनं त्याला पत्र्याचं घर उभं करून दिलं होतं. त्यात तो सहकुटुंब राहत होता. त्यानं एक कुत्र्याचं पिल्लू पाळलं होतं. त्या पिलाला जन्मजातच शेपटी नव्हती. शेपटीच्या जागी खडूएवढा तुकडा होता. शेपटी कापलेले कुत्रे मी पाहिले होते; पण मुळातच शेपटी नसलेला कुत्रा मी प्रथमच पाहत होतो. कुत्र्याची शेपटी का कापतात हा माझ्यापुढचा प्रश्न होता. पण कुणीतरी सांगितलं, की पुढे जबरदस्त कुत्रा भांडायला आला की साधारण कुत्रा आपली शेपटी मागच्या दोन पायात घालतो आणि पळ काढायला बघतो. त्याची शेपटी ही त्याच्या शरणागतीची निशाणी असते. आपण पाळलेला कुत्रा असा शरणागतिप्रिय होऊ नये, म्हणून कुत्र्याचा मालक त्याची शेपटीच कापून टाकतो. परिणामी, तो कुत्रा शरण न जाता लढायला सज्ज होतो. त्याच्यापुढे दुसरा पर्यायच नसतो. थोडक्यात, कुत्र्याला लढवय्या करण्यासाठी मालक त्याचे पळून जाण्याचे मागचे दोरच कापून टाकतो. हे दोर म्हणजेच कुत्र्याची शेपटी असते.

या कुत्र्याच्या पिल्लाचं नाव वॉचमनने 'रॉकी' असं ठेवलं होतं. त्या पिल्लाला वॉचमन खाऊपिऊ घालून मोठा करत होता. आमच्या अपार्टमेंटमध्ये ऑफिसेस असल्यानं लोकांचा वावर होता. त्यांना चावून उपद्रव देऊ नये, म्हणून वॉचमन कुत्र्याला दिवसभर बांधून ठेवत असे. रात्री रॉकी साखळीतून मोकळा होई.

हळूहळू लक्षात यायला लागलं की कुत्रा भलताच कडक आहे. तो कधी कुणाच्या अंगावर जाईल आणि पिंडरीचा लचका

काढेल हे सांगता येत नव्हतं. म्हणून वॉचमन त्याला निरंतर साखळीत बांधून ठेवत असे. रात्री तो मोकळा होई. कुत्र्याला सतत बांधून ठेवला, की तो चिडखोर आणि कडक होतो असं सांगतात. हे सांगणं बरोबर आहे, हे रॉकीच्या बाबतीत सिद्ध व्हायला लागलं. तो मोठा व्हायला लागला आणि तेवढाच कडकही. त्याला सांभाळणं अवघड व्हायला लागलं. शिवाय, वॉचमन दिमतीला असताना प्रश्न फारसा गंभीर वाटत नव्हता; पण वॉचमन नोकरी सोडून गेला आणि प्रश्न लगेच गंभीर बनला. कुत्र्याला सोबत नेणं वॉचमननं पसंत केलं नाही. रॉकी राहिला आणि त्याचं काय करायचं, हा प्रश्न मला भेडसावू लागला. कारण अपार्टमेंटचा मी अध्यक्ष होतो आणि अपार्टमेंटमधल्या ऑफिसवाल्यांच्या अंगावर तो धावून जायला लागला. प्रसंगी चावेही घ्यायला लागला. एक दिवस त्याला दूर कुठेतरी सोडून येणं अपरिहार्य ठरलं. आणि त्या उद्योगाला मी लागलो. नवीन वॉचमन त्या कुत्र्याला सांभाळायची जबाबदारीच घ्यायला तयार नव्हता. तसा त्यानं प्रयत्न केला तेव्हा त्याच्या हाताचा कुत्र्यानं लचकाच काढला.

त्याच्यापासून सुटका करून घेण्यासाठी एके दिवशी मी त्याला मोटारीत घातला आणि लांब भूगावकडे घेऊन गेलो. तिथे त्याला गाडीतून बाहेर काढला. गळ्यातली साखळी काढून घेतली. तो काही क्षण बावरला. गाडीच्या मागे तो पळून येऊ नये, म्हणून मी गाडी तशीच पुढे पौडच्या दिशेने पळवली. खूप पुढे गेल्यावर वळवून पुण्याकडे यायला निघालो. एकूण त्याची पीडा दूर केली या समाधानात मी होतो, तर दुसऱ्या दिवशी तो अपार्टमेंटमध्ये हजर! मी आश्चर्याने थक्क! चालून-चालून तो पेंगाळला होता. एक कोपरा धरून तो मुकाट बसून राहिला. काय करावं, मला कळत नव्हतं. जित्या-जागत्या माणसाला मी भूगावला सोडलं, असतं तर पत्ता न सांगता, कोणाशीही विचारपूस न करता, एखादा नवखा डेक्कनवर नेमक्या पत्त्यावर येणं केवढं अवघड होतं! मुळात चांदणी चौकात पोहोचल्यावर केवढेतरी रस्ते फुटत होते! पाषाण रोड होता. तो औंधकडे जात होता, एन.डी.ए. रोड भलतीकडे जात होता. कात्रजचा रस्ता वेगळाच होता आणि पुण्याकडे येणारा पौड रोड वेगळाच होता.

पुढे या रस्त्यांना अनेक फाटे फुटत होते. कुठलीही विचारपूस न करता हा रॉकी आलाच कसा? याचं मला नवल वाटत होतं. मी त्याच्याकडे रागाने पाहत होतो आणि तो दीन होऊन दयेची जणू भीक मागत होता. माझा राग मावळला आणि त्याला सोडून देण्याचा विचार मी आधी सोडला. त्याला आहे त्या परिस्थितीत कसा सामावून घ्यायचा, त्याला कोणतं ट्रेनिंग द्यायचं, या उद्योगाला मी लागलो आणि कालांतराने त्यात यशस्वी झालो. तो आता अपार्टमेंटमध्ये रुळला. कोणाला चावेल ही भीती नष्ट झाली. तो आमच्यापैकी एक झाला. रात्री तो जागा असे. चोरा-चिलटाचं भय आम्हांला राहिलं नाही. त्याच्या भरवशावर आम्ही आणि आमचा वॉचमन निश्चिंत झालो.

दिवस जात राहिले. कॅलेंडरची पानं उलटत गेली. कॅलेंडर्स बदलत गेली. अनेक वॉचमन आले आणि गेले. रॉकी अपार्टमेंटमध्येच होता. २०१४ साल उजाडलं. आता तो म्हातारा झाला होता. कुत्र्याचं आयुष्य १२-१४ वर्षांचं असतं. त्याचे दिवस भरले होते. तो आता जख्ख म्हातारा झाला होता. त्याला नीटसं उभं राहता येत नव्हतं. पाय लुळे झाले होते. पायऱ्यावरून उतरताना त्याचे पाय घसरत. तो कोलमडून पडे.

तो म्हातारा झाला आणि त्याला सांभाळणं हे आमचं कर्तव्य बनलं. पण सुरुवातीपासून त्याची एक शारीरिक दुर्बलता होती. त्याचे केस जायचे. अंगावर चट्टे पडायचे. आतली स्कीन दिसायची. आणि एकूणच तो घाणेरडा दिसायचा. पण त्यावर एक लोशन मिळायचं ते लावलं की तो बरा व्हायचा. केस पुन्हा यायचे.

आता तो पार म्हातारा झाला. त्याचे केस गळून अनेक चट्टे पडले. त्यात त्याच्या अंगावर गोमाशा झाल्या. हे कमी की काय, म्हणून उवा झाल्या. किडे पडायला लागले. तो फार ओंगळ दिसायला लागला. तो नेमका आमच्या फ्लॅटच्या दाराशी येऊन बसायचा. आणि अशा कुलंगी कुत्र्याला आम्ही असे घरासमोर बसू कसे देतो, असं घरी येणाऱ्या थोरा-मोठ्यांना वाटायला लागायचं.

जंतुनाशक औषधानं त्याला अंघोळ घातली, लोशन लावलं पण त्याचा रोग हटायला तयार नव्हता. काय करावं हे मला कळत नव्हतं. खूप विचार केला आणि एका व्हेटर्नरी डॉक्टरला फोनवरून ही अडचण सांगितली. त्यांनी सल्ला दिला, एक इंजेक्शन आहे ते त्याला दिलं, की तो शांतपणे झोपेल आणि पुन्हा उठणारच नाही.

मी डॉक्टरांना येऊन ते इंजेक्शन द्यायला सांगितलं. तुमची जी काही फी असेल ती देण्याचं आश्वासन दिलं. दरम्यान अपार्टमेंटच्या वॉचमनला योग्य अशी जागा बघून खड्डा खणायला सांगितलं. तो कुत्रा मेला, की त्याला त्वरित पुरून टाकता येईल हा त्यामागचा विचार! त्यानं रॉकीला अपार्टमेंटमध्ये पुरण्याऐवजी माझ्या शेतावर पुरण्याचा सल्ला दिला. म्हटलं ठीक आहे. तसं करू. एखाद्या फुलझाडाच्या मुक्कामी त्याला पुरून टाकू. पुढं त्याचं खत होईल. झाडाला छान फुलं येतील. रॉकीची आठवण त्या फुलांच्या गंधातून वास करून राहील.

दोन दिवस डॉक्टरांची वाट पाहत होतो. ते आले नाहीत. रॉकीला पाहत होतो. मनात आता चलबिचल व्हायला लागली. त्याला असं मारणं मनाला रुचेना. डॉक्टरला येण्याची आठवण करायला मन तयार होईना. रॉकी राहून गेला. त्याचं त्वरित मरण टळलं. तो कसाबसा खुरडत चालत होता.

माझ्या मनाशी कुठेतरी विचार चालू होता. विचारचक्र फिरत होतं. एक कथा आकार घेत होती. कथेचा जन्म मी अनुभवत होतो. कथेनं मनाशी आकार घेतला. मी पेन उचललं. कागदावर लिहायला लागलो. त्यातून माझी 'हार्टफेल' ही कथा (नंतर बदललेले नाव सुटका) जन्माला आली. एखाद्या घटनेतून, प्रसंगातून कथा कशी आकार घेते, त्या बीजाला अंकुर कसे फुटतात, पुढे त्याच्या फांद्या कशा होतात हे पाहणं रंजक असतं.

म्हणून मी ती कथा पुढे देतो आहे. वाचकांनीच मूळ घटना, प्रसंगांशी तुलना करून कथा कशी अवतरते हे पाहायचं आहे. तर ती कथा पुढे वाचकांची वाटच पाहत आहे.

■

# सुटका

''इतके दिवस सेवा शुश्रूषा केली त्यांची. दोन वर्षांपासून दादा बिछान्यावर पडून आहेत. गेले तीनचार महिने तर सारे विधी अंथरुणातच होताहेत. कलावतीलाच हे सारं करावं लागतं. शेवटी तिच्याही काही शारीरिक मर्यादा आहेत. कुठेतरी तिलाही थोडी विश्रांती हवी आहे. दादा तुझेही वडील आहेत. तुझंही काही कर्तव्य आहेच ना? तेव्हा आता काही काळ तू त्यांना तुझ्याकडे नेलंस तर काय हरकत आहे?'' जगन्नाथ घायकुतीला येऊन आपल्या धाकट्या भावाला सांगत होता. हे सांगण्यासाठी त्यानं अशोकला अनेक निरोप पाठवले होते. आज अशोक उगवला होता. जगन्नाथचं तळमळून सांगणं तो निर्विकारपणे ऐकत होता. कलावतीबाई उंबऱ्याच्या आत उभ्या राहून भावाभावांचं हे बोलणं ऐकत होत्या. खरं तर अशोकला हे निक्षून सांगण्यासाठी त्याच वारंवार जगन्नाथला भरीला घालत होत्या. धाकट्या भावाला किती अधिकारवाणीनं ते सांगतात हेच त्यांना पाहायचं होतं.

''मी काय सांगितलं, ते ऐकलंस ना?'' जगन्नाथनं थोडंसं चिडूनच विचारलं.

विचारात पडलेल्या अशोकनं भानावर येऊन जगन्नाथकडे पाहिलं.

''ऐकतोयस ना मी काय म्हणतोय ते?'' पुन्हा एकदा त्यानं विचारलं.

''हो, ऐकतोय ना! संपूर्ण ऐकतोय,'' थोड्याशा पडलेल्या आवाजात तो उत्तरला.

''नुसतं ऐकून काय उपयोग? नुसतं ऐकवायला निरोप पाठवले नव्हते मी! यावर तू काय करणार आहेस ते मला हवं आहे. थोडे दिवस तू आता दादांना घेऊन जा,'' ठामपणे जगन्नाथ म्हणाला.

अशोकनं थोडंसं खाकरून घेतलं; आतून कलावतीवहिनीचं लक्ष आहे हे त्याच्या लक्षात आलं होतं. एक मिनीट गप्प बसून थोड्याशा पडत्या आवाजातच तो बोलला.

''तू म्हणतो आहेस ते कळतंय मला. पण माझ्याही काही समस्या आहेत. त्याचा तू विचार केला आहेस काय?''

''समस्या कुणाला नसतात? सगळ्यांनाच असतात. आम्हालाही आहेत त्या! म्हणून का जन्मदात्या बापाला रस्त्यावर सोडायचं? शेवटी त्यांनी तुलाही जन्म दिला आहे, वाढवलं आहे, शिक्षण दिलंय, लग्न करून दिलंय.'' आणखी काय बोलावं हे जगन्नाथला कळेना. त्यानं अगतिक होऊन आपल्या पत्नीकडे नजर टाकली. त्या करड्या नजरेनं ठामपणं नवऱ्याकडे पाहत होत्या.

''हो! ते खरं आहे. मीही नाकारत नाही ते! माझं कर्तव्य आणि जबाबदारी दोन्हीही मला कळतात. मी नाही कुठे म्हणतो?'' अशोक उत्तरला.

''हे बघ, नुसते मुद्दे मान्य करून चालत नाही. त्यावर कृती काय करणार हे महत्त्वाचं आहे. दादांना तू तुझ्याकडे कधी घेऊन जाणार आहेस ते मला हवं आहे. आणि आपण त्याबद्दलच बोलू.''

''तेच सांगतोय मी. माझा फ्लॅट केवढा आहे, ठाऊकच आहे तुला! वन बेडरूम किचन आहे. एका बेडरूममध्ये आम्ही असतो. दोन्ही मुलं बाहेरच्या छोट्या हॉलमधे असतात. मग दादांना नेऊन किचनमध्ये का ठेवायचं?'' थोड्याशा त्राग्यानं तो बोलला.

''आम्हीही कुठे एखाद्या राजवाड्यात नाही राहात आहोत! इथेही प्रश्न आहेत, समस्या आहेत. पण त्या साऱ्यांना तोंड देत सांभाळलंच ना त्यांना इतके दिवस? तुलाही काही रस्ता काढावा लागेल,'' जगन्नाथ तिरीमिरीतच बोलला.

''आता बोलू नये, पण वेळच आली म्हणून बोलतोय. दादांचं हे घर नाही म्हटलं तरी माझ्या घेतलेल्या फ्लॅटपेक्षा केवढं तरी मोठं आहे. आणि ते तू सारं घेतलेलं आहेस. मी त्याबद्दल आजवर काही बोललो नाही. आता हे सारं घेतो आहेस, तर त्यांची जबाबदारी थोडीफार घेतलीस तर बिघडलं कुठं?''

अगदी धैर्य करून अशोक बोलला. त्याची बायको नेहमी त्याच्या कानीकपाळी जे व्यवहारज्ञान ओतत होती, ते एकदाचं त्यानं आपल्या भावासमोर ओतलं.

''छान! म्हणजे या घरात मी राहतो आहे, म्हणून दादांची सारी जबाबदारी माझ्यावर टाकून तू मोकळा होतो आहेस, असंच आम्ही समजायचं का?''

''मला अगदीच तसं म्हणायचं नाही; पण माझीही अडचण तू समजावून घेतली पाहिजेस. शिवाय माझी पत्नी नोकरीला आहे. आम्ही दोघेही नोकरी करतो म्हणून तो फ्लॅट मी घेऊ शकलो. दोघेही नोकरीला गेल्यावर दादांना बघणार कोण?'' अगदी साळसूदपणे अशोक म्हणाला.

त्या जुन्या घराच्या बाहेरच्या छोट्याशा हॉलमध्ये त्यांची ही चर्चा चालू होती. हॉल कसला, ती एक छोटीशी खोलीच होती! बाजूला एका छोट्याशा कॉटवर विनायकराव पडूनच होते. त्यांना काही कळतं का, बोललेलं काही समजतं का, हेही कळत नव्हतं. डॉक्टर येऊन पाहून जात. 'शेवटचे काही मोजकेच दिवस राहिले आहेत विनायकरावांचे,' असं डॉक्टर सांगून जातील या आशेवर जगन्नाथ आणि कलावती दिवस काढत होते; पण डॉक्टर त्यांना तपासून नुसता सुस्कारा सोडत नवनवीन औषधं लिहून देत. बरं आपण तरी डॉक्टरांना कसं विचारायचं ते कधी जातील म्हणून? ही जगन्नाथपुढची समस्या होती. या प्रश्नातून कसं बाहेर पडायचं या प्रयत्नात ते नवरा-बायको दोघंही होते आणि अशोक त्यांना दाद देत नव्हता.

एवढ्यात विनायकरावांना खोकल्याची उबळ आली. कलावतीबाई लगबगीनं बाहेरच्या खोलीत आल्या. नॅपकीननं त्यांनी विनायकरावांचं तोंड पुसलं. फुलपात्रातील थोडंसं पाणी चमच्यानं त्यांच्या तोंडात सोडलं आणि पुन्हा एकदा त्यांचं तोंड पुसून त्या आतल्या खोलीत गेल्या.

''हे बघ, कलावतीला आता खूप त्रास होतो. तिला बीपीचा त्रासही सुरू झाला आहे. डॉक्टरांनी विश्रांती घ्यायला सांगितली आहे. पहिला हार्ट ॲटॅक काहीही करून टाळा असं ते निक्षून सांगतात. पहिला ॲटॅक आला तर दुसऱ्याचं काही खरं नाही. तेव्हा दादांची काही व्यवस्था लावली तरच तिला काही विश्रांती मिळणं शक्य आहे. म्हणून त्यांना तू काही दिवस तुझ्याकडे न्यावंस हाच एक मार्ग मला दिसतो आहे. तेवढ्यासाठी तुला वारंवार निरोप पाठवत होतो. आता काहीतरी सोक्षमोक्ष लावायचं पाहा. निष्कारण या प्रश्नातून आपल्यामध्ये कटुता येऊ नये असं मला वाटतं,'' जगन्नाथनं एका दमात हे धाकट्या भावाला सांगितलं आणि आपल्या पत्नीकडे वळून पाहिलं पण कलावतीबाई आत निघून गेल्या होत्या. आपलं बोलणं तिनं ऐकलं आणि मगच ती आत गेली की त्याआधीच गेली हा संभ्रम त्याच्या मनात चमकून गेला.

अशोक काय बोलावं या विवंचनेत काही क्षण होता. नंतर त्यानं खाकरून घेतलं. रुमालानं तोंड पुसून घेतलं. मग तो बोलला, ''मला हिच्याशी बोलावं लागेल. शिवाय बहिणीच्या बाळंतपणासाठी एक महिन्याची रजा घेऊन ती तिकडं जायचं म्हणतेय. एकूण मला तरी ते अवघड दिसतंय.'' धैर्य एकवटून तो हे बोलत होता हे स्पष्टच जाणवत होतं.

''हे बघ, ते तुझे वडील आहेत. आजवर आम्ही हे सावरून नेलं. आता अगदीच अवघड होत चाललंय. तुला काय करायचं ते तू पाहा. पण दादांना तू आता घेऊन जावंस असं मला वाटतं. त्याशिवाय मला तरी कुठला मार्ग दिसत नाही,'' हताशपणे जगन्नाथ बोलला. या बैठकीत या प्रश्नाचा निर्धार लावायचा ही ठाम भूमिका त्यानं मनाशी घेतली होती हे स्पष्ट दिसत होतं.

रुमालानं अशोकनं एकदा मानेवरचा घाम पुसून घेतला. रुमाल एकदा झटकून त्याची घडी घातली. तो मनाशी काही निर्णय घेऊ पाहत होता. काही क्षण शांततेत गेले. मग अशोक बोलला,

''त्यापेक्षा असं करता आलं तर...? एखाद्या वृद्धाश्रमात किंवा असे पेशंट ठेवतात अशा ठिकाणी दादांची व्यवस्था लावता आली तर काय हरकत आहे?'' थोडंसं थांबून धीर करून तो पुढे बोलला. ''दादांचं सारं काही तूच घेतो आहेस. तेव्हा यासाठी लागणारे पैसे तू दिलेस तर काही बिघडत नाही... मला तरी हा एक मार्ग दिसतो. तेव्हा यावर तू विचार कर.'' पत्नीनं सांगितलेला हा विचार अशोकनं धैर्यानं मांडला. काही क्षण शांतता पसरली.

''हे घर... यात मी राहतो आहे... एवढ्या कारणावरून तू स्वत:ची सारी जबाबदारी टाळतो आहेस. आपले वडील, त्यांचं प्रेम, त्यांनी केलेलं संगोपन, दिलेलं शिक्षण याबद्दल काहीच मनात येत नाही तुझ्या? थोडीही ओढ वाटत नाही तुला?'' चिडलेल्या स्वरात जगन्नाथ बोलला.

एवढा वेळ कसंबसं आणलेलं मानसिक धैर्य अशोकला टिकवून धरणं अवघड झालं होतं. त्यातल्या त्यात एक गोष्ट बरी होती. ती म्हणजे ज्या वडिलांबाबत ही सारी चर्चा चालली होती. ते तिथून चार-दोन फुटांवर बिछान्यावर झोपले होते. त्यांना हे सारं ऐकायला जात होतं. पण ते कळण्याइतपत ते शुद्धीवर होते का, त्यांना हे सारं कळत होतं का, याचा अंदाज अशोकला येत नव्हता. बहुधा काही कळण्याच्या पलीकडच्या अवस्थेतच ते गेले असावेत. अगदी कोमात गेले नव्हते तरी त्यांची शुद्ध हरपली असावी, असा तर्क करायला आधार होता आणि तोच अशोकला आधारभूत वाटत होता. आता कोणता युक्तिवाद मांडावा याचा तो विचारच करत होता, तेवढ्यात शेजारचे देशपांडे अचानक घरात आले. दोन भावांची काही गंभीर विषयावर चर्चा चालू आहे ही गोष्ट त्यांच्या गावीही नव्हती. समोरच्या खुर्चीवर स्थानापन्न होत ते म्हणाले, ''जगन्नाथ, थोडंसं तुझ्याशी बोलायचं होतं. बोलू का?''

विषय अटीतटीला आला होता आणि नेमके देशपांडे टपकले होते. काहीतरी निमित्त सांगून अशोक सटकण्याची शक्यता होती. ते जगन्नाथला नको होतं. कलावतीबाईंचा दट्ट्या होता – काही करून हा प्रश्न तडीला लावा. जगन्नाथनं निश्चय केला होता आणि हे देशपांडे प्रकरण मध्येच टपकलं होतं.

''आपण नंतर बोललं तर चालणार नाही का?'' देशपांडेंकडे तुटकपणे पाहत जगन्नाथ म्हणाला.

''नाही. विषयच महत्त्वाचा आहे, म्हणून मी लगबगीनं आलो आहे. एरव्ही मलाही असं अनपेक्षित येऊन तुला सांगण्याची जरुरी नव्हती,'' देशपांडेंनी खुलासा केला. ते काय म्हणतात ते जगन्नाथला ऐकणं भागच होतं.

''तुझा कुत्रा म्हातारा झालाय. अगदी पिलू असताना तू त्याला आणलं होतंस, पंधराएक वर्षं तरी झाली या गोष्टीला,'' देशपांडेंनी थोडंसं थांबून जगन्नाथचा अंदाज घेतला.

''हो, पंधराएक वर्षांचा तरी तो झाला आहे.''

''कुत्र्याचं आयुष्य किती असतं? ठाऊक आहे तुला?'' त्यांनी प्रश्न केला.

''हेच चौदा-पंधरा वर्षं,'' जगन्नाथ उत्तरला.

''म्हणजे तो आता जख्ख म्हातारा झाला. हो ना?''

''हो.'' जगन्नाथनं होकार भरला.

''तो पूर्वीपासून आमच्या हॉलमध्ये येऊन बसतो. ही त्याला पिलू असताना दूध पाजायची. पुढे चपात्या द्यायला लागली.''

''हो, काकूंना कुत्र्यांची आवड आहे.''

''तर त्याला आमच्या घरी यायची, बसायची पूर्वीपासून सवय होती. पण आता एकतर तो म्हातारा झालाय. त्यात त्याला स्कीन डिसीज झालाय. त्याच्या अंगावरचे केस झडून गेले आहेत. तो आता कुलंगी कुत्र्यासारखा दिसायला लागला आहे. आणि अशा स्थितीत तो आमच्या हॉलमध्ये येतो. ठरलेल्या जागी बसतो. दोन दिवसांपूर्वी मी नीट पाहिलं. त्याच्या उघड्या पडलेल्या स्कीनवर किडे पडले आहेत. बहुधा, त्या उवा आहेत. त्या त्याचं रक्त पितात.'' देशपांडेंनी तोंड वेडवाकडं करत खुलासा केला.

''आमच्या घरात तो आल्यावर त्याचे हे किडे आमच्या हॉलच्या भिंतीवर चढतात. त्यांना मारायचा मी प्रयत्न केला तर भिंतीवर रक्ताचे डाग उमटले. ओल्या कापडाने पुसायचा प्रयत्न केला तर ती लाली भिंतीवर पसरली... त्याला घरात येऊ द्यायचं नाही म्हटलं तर दार निरंतर लावून घ्यावं लागेल. बरं! हाकलून तरी किती वेळा देणार! तेव्हा तू त्याचं काय करणार आहेस? तेच विचारायला आलोय मी.'' देशपांडेंनी आपल्या येण्याचं कारण स्पष्ट केलं.

''तुम्ही म्हणताय ते खरं आहे. तो म्हातारा तर झालाच आहे, पण त्याच्या अंगावर किडे झाले आहेत. पूर्वी आमच्या ऑफिसचा शिपाई महिन्यातून दोनएक वेळा तरी त्याला अंघोळ घालायचा. पण तो शिपाई आता रिटायर्ड झालाय. त्यामुळे प्रश्न आला आहे. तुमची खूप अडचण होते आहे हे मला मान्य आहे. पण मी त्यावर एक उपाय शोधून काढलाय.'' अशोक जायची चुळबूळ करतो आहे असं जगन्नाथला उगीचच वाटायला लागलं. देशपांडेंना शक्य तो त्वरित निरोप द्यायला हवा होता. जगन्नाथला ते जाणवत होतं.

''पण तू काय करणार आहेस हे तरी सांग, म्हणजे आम्हाला किती दिवस वाट पाहावी लागेल हे तरी कळेल.''

''काही नाही. मला दोन-तीन दिवस अवधी द्या. मी त्याचा बंदोबस्त करतो आहेच,'' जगन्नाथ म्हणाला.

''ते ठीक आहे. पण दोन-तीन दिवसांत काय करणार आहेस हे तरी कळू दे?'' देशपांडेंनी डोळ्याला डोळा भिडवून विचारले.

''एक व्हेटर्नरी डॉक्टर आहे. माझा मित्रच आहे तो. लग्नाला म्हणून दोन-तीन दिवस बाहेर गावी गेलाय. तो आला की इकडे येणार आहे.'' जगन्नाथनं खुलासा केला.

''म्हणजे तो आला की लगेच प्रश्न मिटणार आहे का? औषधाने कदाचित किडे मारले जातील. पण तो लूत भरलेल्या कुत्र्यासारखा दिसतोय. काही वेळा आमच्या दारातच येऊन बसतो हाकलला तरी. घरी येणाऱ्या मित्रांच्या, पाव्हण्यांच्या दृष्टीने ते ठीक नाही.''

''हे पाहा देशपांडेसाहेब, मी त्याचा कायमचा बंदोबस्त करणार आहे. तुम्ही निश्चिंत राहा.''

''म्हणजे तू करणार आहेस तरी काय?'' देशपांडेंनी सरळ सवाल केला.

''डॉक्टरांनी सांगितलंय, त्याला एक इंजेक्शन देण्यात येईल. शांतपणे त्याला झोप येईल आणि नंतर तो उठणारच नाही. पुढचं जे काही करायला लागेल, त्याचीही व्यवस्था झाली आहे.'' जगन्नाथनं त्वरेनं खुलासा केला. त्याला अशोक जाईल हीच एक काळजी लागून राहिली होती.

''मग ठीक आहे. गुड डिसिजन! दोन दिवस आम्हीही कळ काढायला हरकत नाही.'' देशपांडे एवढं बोलून जायला उठले.

''जाताय? चहा तरी घेऊन जा,'' औपचारिकता म्हणून जगन्नाथ बोलला.

''ओः नो! मला घरी जायलाच हवं. मुलाचा अमेरिकेतून फोन येणार आहे. कदाचित आलाही असेल,'' देशपांडे म्हणाले आणि चालायला लागले.

देशपांडे गेले आणि दोन मिनिटं कुणी बोललंच नाही. अशोक विचारमग्न होता. जगन्नाथ तो काही बोलण्याची वाट पाहत होता. एवढ्यात कलावतीबाई चहाचा ट्रे घेऊन आल्या. दोघांना चहा दिला. त्याही काही बोलल्या नाहीत. दोघेही निमूटपणे चहा पीत होते. चहा पिऊन झाल्यावर अशोकनं मनगटावरच्या घड्याळात किती वाजले ते पाहिलं.

''मी उद्या-परवा तुला फोन करून कळवतो,'' तो भावाला म्हणाला.

''आता काय कळवायचं राहिलंय? सरळ दादांना घेऊन जायचं पाहा. हिच्या सर्व तपासण्या करण्यापूर्वी दोन दिवस दवाखान्यात ॲडमिट करायचं आहे. डॉ. साठ्यांनी हे 'मस्ट' असल्याचं सांगितलंय,'' निक्षून सांगण्याच्या आविर्भावात जगन्नाथ बोलला.

अशोक उठला. वडलांच्या कॉटजवळ गेला. काही वेळ तो त्यांना पाहत होता. त्यांचे डोळे मिटलेले होते. खाली वाकून त्यानं हलक्या आवाजात हाक दिली – ''दादाऽऽ''

कुठलाही प्रतिसाद आला नाही. अशोकनं पुन्हा एकवार हाक मारली. दादा डोळे उघडून पाहणार नाहीत याची खात्री असूनसुद्धा! मग तो जायला वळला. ''वहिनी! मी चलतो. पुन्हा येतोय,'' चहाचा ट्रे न्यायला आलेल्या वहिनींना तो बोलला. जगन्नाथचा निरोप घेतला आणि घरातून बाहेर पडला. बाहेर मोटारसायकल होती. ती सुरू करून तो निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी अशोक दाढी करत होता. बायकोला हे सारं कसं सांगावं याचा विचार करत होता. एवढ्यात फोनची घंटी वाजली. त्यानं साबण लावायचा ब्रश समोरच्या आरशाच्या स्टँडवर ठेवला. फोन घेतला.

''हॅलोऽऽ, अशोक, मी जगन्नाथ बोलतोय. दादा गेले. पहाटेच लक्षात आलं. डॉक्टर साठ्यांना बोलावलं. त्यांनी तपासणी करून सांगितलं दादांना हार्टॲटॅक आला म्हणून. तू लवकर यायचं पाहा. आम्ही पुढच्या तयारीला लागतोय.'' फोन बंद झाला.

अशोक काही क्षण स्तब्ध झाला. कालची सारीच चर्चा दादांनी ऐकली असेल काय? तशात देशपांडे आले. त्यांनी कुत्र्याचा विषय काढला. दादांना ते सारं कळत असेल काय? या विचारातच तो आरशासमोर उभा राहून दाढीला साबण फासायला लागला.

*(दिवाळी २०१४)*

*(कथेचे मूळ शीर्षक : हार्टफेल)*

# भुंडी

**विद्याधर म्हैसकर**

शेळ्या पाळणारी एक म्हातारी आणि तिची नात. त्यांच्या तेवीस शेळ्या. सगळ्याच काळ्या. पण दोघी त्यांना बरोबर ओळखतात. भुंडी नावाची त्यांतली एक हरवते आणि शेवटी सापडते. साधेसुधे प्रसंग, हलकेफुलके अल्पाक्षरी संवाद यांच्यातून चितारलेली एक कथा.

मुलगी थकलेली. चिमुरडी पोरच. भर उन्हात दारात येऊन उभी राहिलेली.

'मावशीऽ पाणी दे ग.'

तिला बघून पत्नीनं विचारलं, 'अशी घाबरलेली का?'

'लई येळ झाला, शेरडी शोधतेय. आता घशाला कोरड पडलीय. पाणी दे ना मावशी.'

'देते, पण झालं काय?'

'भुंडी हरवली.'

न विंचरलेले केस तिच्या कपाळावर आलेले. पालथ्या मुठीनं तिनं ते मागं केले. कपाळावरचा घामही तसाच पुसला. चेहरा रडवेला, हताश झालेला.

'सगळी ठिकाणं बघितली; पण नाय गावली.'

'अग, तू तिला ओळखणार कशी? सगळ्या शेळ्या तुझ्या काळ्याच. त्यांतली नेमकी कोणती हरवली? कसं ओळखणार?'

तिनं परत तेच सांगितलं – 'भुंडी हरवलीय.'

'तुझी आजी कुठाय आज?'

'डोंगराकडं गेलीय. भुंडी तकडं गेलीय का बघून येते म्हणाली.'

'आणि बाकी शेळ्या कुठं गेल्या?'

'समद्यास्नी घरला नेलं. कोंडून हिकडं आलेय.'

मी संवाद ऐकत होतो. टेबलावर चाललेलं काम आवरतं घेतलं. उठलो, बाहेर गेलो. हिनं पाण्याचा तांब्या पुढं केला.

मुलीनं आधी चूळ भरली. पाण्याचा हबका तोंडावर मारला. मग डाव्या हातातला तांब्या तिरका तिरका करत उजव्या हाताची ओंजळ ओठाजवळ घेतली. त्यात पडणारं पाणी घटाघटा प्यायला लागली. एक थेंब जमिनीवर सांडला नाही. तांब्या संपवून राहिलेल्या पाण्यानं खंगाळून परत केला.

मी विचारलं, 'भुंडी हरवली?'

रडवेल्या चेहऱ्यानं तिनं मान हलवली.

'कोणती भुंडी?'

'थोरली.'

दारात उभा होतो, तो मी पुन्हा घरात गेलो. कपाटातून रेखाटणांच्या वह्या काढल्या. त्यातील नेमकी वही घेऊन बाहेर गेलो. मला जे जे भावतं ते ते मी रेखाटत असतो.

घरासमोर वडाच्या झाडाखाली रोज शेरडं घेऊन म्हातारी आणि तिची नात येणारच. वीस-पंचवीस तिची शेरडं आहेत. वड



दिसायला लागला की ती सारी धावत सुटतात. वडाची गळून पडलेली पानं चघळतात. कोणी पारावर बसतात. एखादा बोकड आपले पुढचे पाय वडाच्या बुंध्यावर रोवून, मान उंच करून, ओल्या पापडासारखी गोल, हिरवीलूस पानं मटामटा खाणार. किंवा खाली आलेल्या पारंब्यांची कोवळी टोकं तटातटा खुडणार. हे रोजचंच.

मी त्यांच्या हालचाली निरखीत राहतो. कधी वाटलं तर उभ्या उभ्या त्यांची रेखाटणं करतो. असंच केव्हातरी केलेलं भुंडीचं रेखाटण मी त्या मुलीला दाखवलं. विचारलं – 'हीच भुंडी ना?' ती हो-नाही काही बोलली नाही. चित्र बघत राहिली.

बिनशिंगांची भुंडी शेळी मोठ्या चौकसपणानं, मान तिरकी करून काही शोधू पाहतेय, असं केलेलं ते रेखाटण होतं. मुलीच्या डोळ्यांत पाणी आलं. तिनं चित्राकडं बोट दाखवलं. म्हणाली – 'हीच भुंडी. हिलाच शोधतोय आम्ही.'

उन्हाचा ताप सपाटून होता. माणूस त्यात करपून जाईल. चिमुरडी खरोखरच करपली होती. तिचे पाय भेंडाळले होते.

'आता काय करणार?'

'खाली जाते. मंडईकडं. बघते तिकडं आहे का.'

'मंडई संध्याकाळी भरते. आता तिथं कोण आहे?'

'कोणी नाही. पण मंडई उठल्यावर शिल्लक माल, टांबाटू, कोबी, मुळ्याचा पाला, खराब सबजी टाकून जात्यात. ते खायाला शेरडांना घेऊन आम्ही जातो की. भुंडी तिकडंच गेलीय का, बघते, असेल तिथं.'

नेटानं पाय ओढत ती पोर गेली.



दुपारी तीन वाजता त्या दोघी पुन्हा पारावर बसलेल्या दिसल्या. पिसं झडलेल्या मैनेसारखी म्हातारी अन् बावरलेल्या पिलासारखी तिची नात दिसत होती. हिरव्यागार टंच झालेल्या वडानं त्यांच्यावर गडद सावली धरली होती, तरी त्या दोघी सैरभैर झालेल्या.

मी विचारलं – 'काय झालं?'

'आम्हांला वाटलं, आमची वाट बघत भुंडी पारावर येऊन उभी राहिली असेल, पण ह्यो एकलाच इथं उभा दिसतोय.'

माझ्याकडं केविलवाणं बघत म्हातारीनं विचारलं – 'दादा, भाकरतुकडा देशील?' ती माझ्याकडं मोठ्या आशेनं बघत राहिली.

मी मागं वळलो. स्वयंपाकघरात काही शिल्लक होतं. दोघींना दोन भाकऱ्या, पीठ पेरून केलेली भोंगी मिरची आणि एक कैरी दिली. दोघी घास घेत राहिल्या. पण भुंडीच्या आठवणीनं, घास दोघींच्या, घशाखाली उतरत नसावा.

मी विचारलं – 'शेळी अशी कशी हरवली?'

'काय कळत नाय.'

'शेरडं होती किती?'

म्हातारीचा हिशेब हातांच्या बोटांवर. म्हणाली – 'एक विसा तीन.'

'म्हणजे तेवीस?'

'हो.'

'आता किती आहेत?'

'एक विसा दोन.'

'शेळी हरवलीय हे तुला कसं कळलं?'

'कळलं.'

'सगळ्या शेळ्या काळ्या. एकसुद्धा काळी पांढरी किंवा हरणासारखी तपकिरी, पांढऱ्या ठिपक्यांची नाही.'

'त्या लई महाग असतात दादा.'

'त्या कोणत्या जातीच्या?'

'बाबरी.'

'आणि ह्या तुझ्या काळ्या?'

'उस्मानाबादी.'

'तू तुझ्या शेरडांना नावं ठेवलीयंस का?'

'न्हाय.'

'मग कसं ओळखणार? कोणती हरवली ते?'

'भुंडी हरवलीय' असं उत्तर देत पुढं म्हणाली – 'सकाळी इथंच आलो होतो. शेरडांचं खाणं-चरणं झालं की निघालो. एक ठिकाण सोडताना शेरडं मोजायचीच. तशी मोजलीसुद्धा. बरोबर होती. मग निघालो, उगवतीकडं. तिकडून शाळेतली पोरं यायला लागलेली. लई मोठी रांग. त्यांना घेऊन मास्तर डोंगरावर चाललेला...'

'ते का?'

'डोंगरावर झाडं लावायची म्हणून.'

'मग?'

'त्या पोरांची झिंबड उडालेली. आरोळ्या मारत होती. हातात लिवलेल्या पाट्या. खोरी, फावडी, कुदळ, खुरपी नाचवत होती. शेरडं बावरली. त्यांची पळापळ झाली. पोरांनीसुद्धा मग उगाच कालवा केला. 'भुंडी-भुंडी' म्हणून तिला खडं मारलं. तशी ती मागं फिरली. हरणासारखी चौखूर उधळली....

'मी फुडं. पोरगी शेरडामागून. तिनं भुंडीला थोपवलं. तशी ती सगळ्या शेरडांत घुसली, असं वाटलं. मग निघालो. पण बोकड सारखा थांबत होता. मागं मागं वळून बघत होता. त्याला एकदा दोनदा हाकलला तरी फुडं जायचा थांबायचा. सारखा मागं बघायचा.'

'असं का?'

'कळपात भुंडी नाही हे त्याला बराबर कळलं होतं. म्हणून तो हलायला तयार नव्हता. शाळेची पोरं गेल्यावर मी सगळी शेरडं एके जागी गोळा केली. मोजली तर एक कमी. माझ्याकडं भुंड्या शेळ्या दोन हायत. पण एकच दिसत होती. तेव्हा लक्षात आलं, थोरली भुंडी दिसत नाहीय.'

'मग शोधाशोध चालू केली काय?'

'हो.'

'भुंडी शेळी मोठी आहे ना?'

'हो, गाभण हाय.' म्हातारीचा सूर काळजीचा.

'गाभण शेळी हरवली!'

'तशी हरवणार नाय, पण कोणीतरी धरली असंल.'

पोरीच्या डोळ्यांत टचकन पाणी आलं. म्हणाली – 'आज्ये, भुंडी आपल्याला शोधत असेल काय?'

मी म्हटलं, 'असेल असेल. तुम्ही तिला शोधताय आणि ती तुम्हांला. सारखी चुकामूक होत असणार. त्यामुळं गाठभेट होत नाहीय.'

म्हातारी निराश. दोन्ही गुडघे जवळ घेऊन, त्याभोवती हातांची मिठी घालून बसलेली. जवळच नेहमीचं घमेलं. त्यात एक छपाटी आणि पोत्याची घडी.

'कोणी तरी भुंडीला धरली असणार. लई शाणी हाय ती. अशी चुकायची नाय. लहानगी करडं चुकत्यात. त्यांवर ध्यान ठेवावं लागतंय. पण भुंडी कशी?....'

'आता काय करणार?'

तिनं कपाळाला हात लावला. स्वत:शीच बडबडली. 'गाभण होती. दोन करडं झाली असती. मग दोन शेरडं घालवली असती. पाच महिन्यांची हाय. आता कधीबी भुंडी विणार...'

'घालवली असती म्हणजे?'

'खाटकाला अिकायची.'

'का?'

'दुसऱ्याचं कर्ज फेडायला नगं?'

'खाटीक किती देणार?'

'सात-आठ हजार.'

'शेळीची किंमत एवढी आहे?'

'हो. अन् रोकडा पैसा मिळतो.'

'अन् बोकडाला?'

'दहा तरी मिळणारच.'

'तुझ्याकडं बाबरी बोकड नाही?'

'त्यो लई महाग.'

'तो असता तर?'

'चाळीस हजार मिळाले असते.'

'तुझ्याकडं वीस-पंचवीस शेरडं आहेत. उस्मानाबादी का असेनात, पण तू लक्षाधीशच आहेस. नाही का?'

तिला कळलं न कळलं.

म्हणाली – 'दिवस शेरडांमागं जातो. पोराला कधी म्हटलं, तू शेरडं घेऊन जा, तर नाही म्हणतो.'

'तो काय करतो?'

'वाजवायला जातो. बेंजो आहे त्याचा... आता मला जमत



नाय. पायाला मुंग्या येतात. असं खाली बसलं की थांबतात. म्हणून ईळभर बसायचं.'

म्हातारी आणि नातीची भाकरी खाऊन झाली. पाणी प्याली. उठता उठता पुटपुटली. 'शाणी भुंडी गेली. कशी गेली कळत नाय.'

'कशाला आणायची गाभण शेळी?' मी जरा रागानंच विचारलं.

'त्याला काय झालं? चरत चरत ती येणारच. कुठं का असेना. रानात डोंगरात नाही तर बांधावर. व्याली की तिथंच पोराला चाटून साफ करणार. तासाभरात हवा खाऊन पोर आपल्या पायांवर उभं राहतंय. मग आपण घ्याचं उचलून. एकटीला घरी ठेवून कोण तिच्याकडं बघणार?'

'सगळं खरं, पण आत्ता कोण आहे तिच्याजवळ?'

??

दिवस गेले... महिनाभर परगावी गेलो होतो. आलो त्या दिवशी म्हातारी वडाखाली बसलेली. पाच-पंचवीस शेरडं इकडं-तिकडं भटकत चरत-चघळत होती. उभी, आडवी, तिरकी, मागून पुढून, सगळ्या कोनांतून त्यांचं दर्शन होत होतं...

एक बोकड. चांगला पोसलेला. तो पाठमोरा. त्याचं तोंड दिसत नव्हतं. पुढचे दोन्ही पाय गुडघ्यात दुमडून, शेळीच्या मागच्या पायांतून कासेला ढुशा देत, तो लुचत होता. त्याचे मागचे तगडे पाय उभे. शेपटी उंच धरलेली. खुळखुळा वाजवावा तशी हलत होती. त्याच्या फाकलेल्या मांड्यांत नारळ लोंबत होता.

'एवढा मोठा बोकड झाला तरी दूध पितोय?'

म्हातारी म्हणाली, 'शेळीच पाजतीय तेला आपखुषीनं. लहान आहे.'

'लहान? किती वर्षांचा झालाय?

'दोन वर्सांचा.'

'मग लहान कसा?'

'बरमचारी हाय.'

'म्हणजे?'

'बाल बरमचारी.'

'बोकड आणि ब्रह्मचारी?'

'हो.'

म्हातारी पुढं म्हणाली – 'ते दोन पाट बघ. बोकड हायेत. तीन महिन्यांचे झालेत. आणि महिन्याभरात उडायला लागतील अन् ह्यो दोन वर्साचा हाय, पण एकदाही मादीवर गेला नाय.'

मी गप्पच झालो.

'ह्याला दुसऱ्या कळपातल्या माद्या दाखवल्या, तरी उडाला न्हाय. सगळ्या माद्या ह्याला आय-भनी परमान हायेत...'

'मग याचा उपयोग काय?'

'राखणीचा हाय तो.'

'याला घालवलास तर सात-आठ हजार मिळतीलच की.'

'याला न्हाय घालवायचा. तो दुसरा बोकड, तकडं उभा हाय बघा. दाढीवाला, त्याला खाटकाची मागणी आलीय. दहा हजाराला. पण आत्ता देणार नाय. खुदब्याला घालवीन, तवा बारा हजार सहजी मिळतील.'

मला एकाएकी भुंडी शेळीची आठवण झाली. म्हातारीला विचारलं –

'भुंडी शेळीचं पुढं काय झालं?'

'ती सापडली की, त्याच दिवशी. आमची वाट बघत घरी जाऊन थांबली होती. त्या दिवशी बरमचारी सारखा थांबत होता. त्याचं कळपावर लक्ष असतंय. सगळ्यात फुडं चालत असला तरी मागं कोण राहिलंय, कोण दिसत नाहीय हे त्याला बराबर कळतं. त्यो कावराबावरा होऊन थांबतो. त्या दिवशी तो असंच करायला लागला तेव्हा शंका आली. भुंडी हरवली, हे कळलं, ते त्याच्यामुळंच.'

'कमाल आहे. पण आत्ता भुंडी कुठं दिसत नाही ते?'

म्हातारी हसली. म्हणाली –

'ती काय, बरमचाऱ्याला पाजतीय...'

*(रेखाटने लेखकाचीच)*
*(जानेवारी २०१७)*




*जानेवारी २००८*
*(चित्रकार आलालाल रहिमान)*

# अभ्यंगस्नानम्

## नीलिमा इनामदार

अबोध, निरागस शैशव, अननुभवी, सोत्कंठ तारुण्य आणि सांसारिक कडूगोड अनुभवातून प्रौढत्व पार केलेलं आयुष्य... सुखी, सुरक्षित आणि समृद्ध! ... तरीही... आता या शेवटच्या टप्प्यावर हुरहुरलेलं, काजळलेलं, बेचैन, अतृप्त असं तिचं मन... निर्मल अभ्यंगस्नानाची आस आणि प्रतीक्षा असलेलं...

एका हरवत चाललेल्या संस्कृतीची हुरहुर लावणारी कहाणी.

केळी-नारळीने वेढलेल्या त्या प्रशस्त वाड्यासमोरील अंगणात हिवाळ्यातले तलम, सोनेरी, ऊबदार ऊन पसरले. अंगणातील सडा, रांगोळी केव्हाच झाली होती. वृंदावनातील सावळी तुळस वाऱ्यावर मंद डोलत होती. गुलाबाच्या फुलांचा मंद दरवळ आसमंतात पसरला होता.

ओसरीवरच्या झोपाळ्यावर लोडाला टेकून अण्णासाहेब बसले होते. पायाखालच्या फरशीला हलका रेटा देत होते. कडीच्या कुईं कुईं आवाजाच्या तालावर मागेपुढे लयबद्ध झुलणाऱ्या झोपाळ्याच्या गतीत रमून हातातला 'केसरी' चाळत होते. अंगावर पांढरे शुभ्र मलमली धोतर आणि अर्ध्या बाहीच्या पैरणीवर गरम जाकिट, खांद्यावर काश्मिरी शाल. भरगच्च मिशा, डोक्याला टक्कल. डोळ्यांवर गोल भिंगाची आरशी. नजरेत दरारा, जरब. घरमालकाचा रुबाब! फाटकातून आत येणाऱ्याजाणाऱ्यावर करडी नजर. घराच्या आतबाहेर धडपडणाऱ्या पोराबाळांना आणि बागेत काम करणाऱ्या माळ्याला हुकमी सूचना. सारे काही झोपाळ्याच्या लयीत –

वृंदावनापलीकडे पायऱ्या चढत गेले की लांबलचक ओटी. सागवानी नक्षीदार खांब आणि लाकडी कठडा असलेल्या भिंतीवर देवादिकांच्या आणि पूर्वजांच्या तसबिरी. खिडक्यांना उभे, लोखंडी गज. आत जाणाऱ्या दारावर काचेच्या पुंगळ्यांचे तोरण. ओटीच्या एका बाजूला पितळी कड्यांचा झोपाळा आणि दुसरीकडे प्रशस्त सागवानी आरामखुर्ची.

घराला डावी घालून परसदारी जायची वाट. रोजच्याप्रमाणे मागच्या अंगणात गडीमाणसांची, मोलकरणींची वर्दळ चालू होती. कपडे धुण्याचे, भांडी घासण्याचे, पाणी उपसण्याचे आवाज ऐकू येत होते. पाणी तापवायच्या तांब्याच्या बंबातून धूर यायला लागला, की एखादी मोलकरीण खालची चाळणी हलवून राख झटकत होती. बंबात लाकडी ढलप्या घालून पुन्हा जाळ करीत होती. पाण्याची बादली भरून आत कुणाच्या तरी स्नानासाठी घेऊन जात होती. हौदातले गार पाणी विसवणासाठी नेत होती.

डोक्यावरचा पदर सावरीत फाटकातून आत शिरलेल्या म्हाताऱ्या आजीबाई परसदारी आल्या आणि हातपाय धुऊन जाळीच्या मागीलदाराने आत स्वयंपाकघरात शिरल्या. स्वयंपाकघरात लगबग सुरू होती. दहा जणांचं घर आणि लाडकी लेक बाळंतपणाला आलेली! काकूंनी आजीबाईंपुढे खाण्याची पितळी ताटली आणि गरमागरम चहाचा कप ठेवला. वहिनींनी जाळीच्या कपाटातला कल्हईदार पितळी डबा उघडला. कालच साजूक तुपातले मेथीचे लाडू केले होते. आजीबाईंच्या ताटलीत लाडू वाढला गेला.

''बघा कसा झाला आहे. तुम्हांलाही शक्ती हवी ना! बाळबाळंतिणीचं करायचं आहे. पोट चांगलं चोळा हो आईचं. बाळाला मात्र सांभाळून हं. उघडी ठेवू नका फार वेळ. खिडक्या नीट लावा. वारा लागू देऊ नका उघड्या अंगावर. रात्री किरकिरत होती. टाळू नीट भरा. अंघोळीनंतर दुपट्यात नीट गुंडाळा....'' मायेपोटी वहिनींच्या सूचना संपतच नव्हत्या. कप, ताटली विसळून आजीबाई बाळंतिणीच्या खोलीत शिरल्या.

बाळंतीणबाई आरामखुर्चीत बसली होती. चेहऱ्यावर तेज आले होते. त्यावर नवथर मायपणाची साय पसरली होती. बाजूच्या नक्षीदार पायाच्या शिसवी टेबलावर हळिवाच्या खिरीचा वाडगा आणि वाटीत मेथीचा लाडू दिसत होता. वावडिंग टाकून उकळून गार केलेल्या पाण्याचा तांब्या आणि चकचकीत पानदानही दिसत होते. बाळंतिणीने रोज दोन्ही जेवणानंतर विडा खाल्लाच पाहिजे – बदामबिदाम घालून – अशी ताकीद घरच्या वडीलधाऱ्या स्त्रियांकडून मिळाली होती म्हणे!

आजीबाई तान्हुलीच्या पाळण्याजवळ गेल्या. अंगडे-टोपडे घातलेले बाळरूप डोळे किलकिले करून पाहत होते. अंगाला आळोखेपिळोखे देत होते.

गोडगोड बोलत, बाळाला आईच्या मांडीवर देत, आजीबाई अंघोळीच्या तयारीला लागल्या. राघूमोर लावलेल्या पाळण्यातली दुपटी बदलून स्वच्छ बिछाना तयार केला. नव्याने धुनकून घातलेल्या कापसाची मऊ मऊ गादी. त्यावर वहिनीबाईंच्या वापरून, धुऊन, मऊमऊ झालेल्या लुगड्याचे, हातशिलाईचे, पिसाच्या स्पर्शाचे दुपटे. बाजूला छोटे रेशमी लोड, मानेखाली बाकदार उशी. पायाजवळ पणजीबाईची ठेवणीतली नरम शाल.

आजीबाईंनी पलंगावर दुसरे दुपटे पसरले. आत्याबाईंनी हौशीने रंगीबेरंगी तुकडे जोडून केलेले. एका कोपऱ्यात चिऊताई आणि दुसऱ्यात मनीमाऊ काढलेले. शेजारी बाळाचे चिमुकले कपडे ठेवले. अंगडे, टोपडे, गोंड्याचे पायमोजे. स्टुलावर तीट, काजळ अन् पावडरीच्या चांदीच्या डब्या. गायीच्या तुपाच्या, तांब्याच्या निरांजनाच्या ज्योतीवर धरलेलं काजळ आणि साबुदाणा भाजून केलेली तीट. चांदीच्या सफरचंदात पावडर आणि फुलासारखा पावडर पफ!

आणि सरतेशेवटी सगळा जामानिमा झाल्यावर बाळाला गुंडाळायला आजोबांच्या धोतराचे, दुधात भिजवून धुऊन आणखीच मुलायम केलेले, बाळीच्या कोमल कायेला कुठेही खुपणार नाही, टुपणार नाही अशा मायेच्या काळजीने निगुतीने बनवलेले दुपटे पलंगावर ठेवून आजीबाई न्हाणीघरात शिरल्या.

एखाद्या खोलीसारखे प्रशस्त न्हाणीघर. लाकडी झडपांच्या खिडक्या, बसायला चौरंग, पितळी तांबे, बादल्या, लाकडी खुंट्यांवर स्वच्छ पंचेजोड. आजीबाईंनी भिंतीशी उभा पाट फरशीवर आडवा मांडला. शेजारी चौरंगावर तिळाच्या तेलाची चांदीची छोटीशी झारी, दूध-बेसनाची काशाची वाटी. पितळी बादल्यांमधे थंड गरम पाणी.

सर्व तयारी झाल्यावर आजीबाईंनी नेसूचे लुगडे गुडघ्यापर्यंत वर खोचले आणि आईच्या मांडीवरून बाळाला उचलले. मायेच्या उबेतल्या साखरझोपेचा भंग झाल्याने बाळाने सूर लावला.

''उगी, उगी! कुणी मारलं माझ्या बाळाला? हात रे काऊ. त्रास नको देऊ माझ्या छकुलीला. नाही रे नाही माझ्या शोन्या. उन्हात घर बांधू या हां त्याचं!....'' वगैरे वगैरे बोलत त्या सपीठाच्या गोळ्याला उराशी धरत आजीबाई नहाणीत आल्या. हळुवारपणे काळजीपूर्वक एक एक करून त्यांनी बाळाचे कपडे उतरविले. कपड्यांच्या उबेतून बाहेर आलेले, शिरशिरलेले बाळ एकदम चूप झाले. हातपाय वेगाने हलवू लागले. मानेला आधार देऊन, बाळाला बसते करून, टाळूवर तेलाची धार सोडली. बोटाच्या हलक्या, सराईत हालचालींनी आजीबाई टाळूत तेल जिरवू लागल्या. त्यांनी पाय लांब केले व बाळाला पायावर घेतले. झारीतून कोमट तेलाची धार बाळाच्या अंगाखांद्यावर पडू लागली. आजीबाईंची बोटे कधी सरळ, कधी चक्राकार फिरून बाळाला मालिश करू लागली. हालचालीची एक लय निर्माण झाली. बाळ हुंकार देऊ लागले. पायांवर पालथे केल्यावर मान वर उचलू लागले, पाठीला बाक देऊ लागले. तो छोटासा जीव या स्नानसोहळ्याला आपल्यापरीने साथ देऊ लागला, दाद देऊ लागला. त्याची तसून्‌तसू काया स्निग्धतेत लपेटली गेली.

आजीबाईंनी बाळाला सरळ केले. आता त्याच्या अंगावर दूध-बेसनाचा हात फिरू लागला. घरी जात्यावर दळलेले, चाळलेले स्वच्छ बारीक बेसन आणि दुधावरची दाट साय! हलक्या हाताने अंगावरच्या मळ्या निघू लागल्या. बाळाची काया सतेज होऊ लागली.

हा सर्व वेळ वहिनीबाईंच्या आतबाहेर खेपा आणि सूचना चालूच होत्या. मधूनच बाळाशी बोबडे बोलणेही! बाळाची आईही डोकावून जात होती. पहिलाच अनुभव असल्याने काय करावे हे तिला सुचत नव्हते. बाळाला चाललेली दमदार मालिश पाहून भेदरायला होत होते.

'अयाई ग! हळू हो आजीबाई. दुखेल माझ्या बाळीला. केवढासा जीव तो!'' अशा घाबरट उद्‌गारावर आजीबाई हसत होत्या. ''कायबी व्हत नाही. दिसामासानी वाढंल पोर. हाडं बळकट व्हाया होयीत. बाळसं चढाया पायजेल. पन्नास बाळंतपणं काढली म्या! सगळी पोरं गुटगुटीत. हीबी तशीच होईल. गावामंदी नाव हाय माजं. उगाच न्हाई बलावली वहिनीबाईंनी. तुलाबी तुझ्या न्हानपणी न्हाणली आन् तुझ्या भावंडांना बी....'' आजीबाईंची बडबड मधेच बाळाला, मधेच तिच्या आईला उद्देशून चालली होती.

मालिश संपत आली तशी वहिनींनी मोलकरणीला हाक दिली. तिने पितळी बादल्यातल्या कढत पाण्यात विसवण घातल्यावर त्यांनी स्वतः आपल्या कोपरावर ओतून ते बाळाला सोसवेल की नाही याचा अंदाज घेतला. मोलकरीण हळुवारपणे बाळाच्या अंगावर पाणी घालू लागली. आजीबाई तिला स्वच्छ करू लागल्या. सुख आणि श्रमाने बाळाचा अक्षरशः डोळा लागला. बाळाला पालथे करून 'हर गंगे, हर भागीरथी' म्हणत तिच्या मस्तकावर पाण्याचा तांब्या उपडा केला. जागे होऊन बाळ रडू लागले. मोठ्या मायेने आजीबाईंनी त्याला सरळ केले. अंगावरून पाण्याचे थेंब ओघळणारे, गळ्यात जिवती, मनगटात बिंदुल्या, दृष्टमणी आणि पायांत रुप्याचे पैंजण घातलेले ते सालंकृत कृष्णरूप मोठे लोभस दिसत होते. काहीतरी पुटपुटत, बाळाच्या अंगावरून पाण्याने भरलेला तांब्या आजीबाईने तीनदा फिरवला आणि मोरीत ओतून दिला.

मोलकरणीने दिलेल्या पंचाने तिचे अंग टिपून काढले. कोपऱ्यातल्या लोखंडी घमेल्यातल्या पेटत्या गोवऱ्यांवर ओवा, हळद टाकली. नहाणीघरात आणि शेजघरात धुराचा वास दाटून गेला. घराला बाळबाळंतिणीचा गंध लागला. आजीबाईने काळजीपूर्वक बाळाच्या अंगाला, मस्तकाला धुरी दिली आणि तिला कुंचीत लपेटले.

बाजूला चौरंगावर बसून वहिनीबाई सर्व काही लक्षपूर्वक निरखीत होत्या. त्यांच्या हातात बाळाला देऊन आजीबाई उभ्या राहिल्या. नेसूचे नीट करून बाळाला हाती घेऊन त्या शेजघरात आल्या. बाळाला दुपट्यावर ठेवून उघड्या छातीवर वेखंडाची पूड चोळली. अंगावर हलकासा पावडरचा पफ फिरवून कपडे चढवले. डोळ्यांत काजळ, कपाळाला तीट लावून गालावर आणि तळपायावर काजळाचं बोट ओढलं. कुणा पाप्याची, आल्यागेल्याची, भुताखेताची.... दृष्ट नको लागायला छकुलीला!

सर्व जामानिमा झाल्यावर, आजोबांच्या धोतराच्या पांढऱ्या स्वच्छ, नरम दुपट्यात फक्त चेहरा दिसेल असे बाळाचे घट्ट गाठोडे बांधले आणि ठेवून दिले पाळण्यात. पाळण्याला हलकासा झोका देऊन आपल्या मऱ्हाटमोळी आवाजात अंगाई गाता गाता पाळण्यात गाढ झोपी गेलेल्या तान्हुलीला पाहता पाहता आजीबाईचे मन मायेने ओथंबून आले. घरादाराला वेड लावणाऱ्या आणि सर्व

वडीलधाऱ्यांच्या प्रेमाच्या छत्रछायेत नाहणाऱ्या त्या छकुलीच्या अंगावर त्यांनी हलक्या हाताने मायेची पिढीजात शाल पांघरली आणि त्या आईकडे वळल्या!

लग्नघर पाहुण्यांनी गच्च भरलेले. मागीलदाराच्या मांडवात तळल्या जाणाऱ्या बुंदीच्या लाडवाचा, केशर वेलदोड्यांचा घमघमाट, नवीन कोऱ्या वस्त्रांचा वास, झेंडूच्या फुलांचा, आंब्याच्या पानांचा गंध, खसच्या अत्तराचा आणि गुलाबपाण्याचा दरवळ यांनी घर परमळले होते. स्वयंपाकघरात अहोरात्र चहापाणी आणि स्वयंपाक चालू होता. मागीलदारी करंज्या, चकल्या, शेवेचे घाणे उठत होते. काम करता करता बायकांच्या गप्पांना ऊत आला होता. कुठे बारीकसारीक रुसणी, फुगणी फोडणीला असली तरी सर्वांच्याच उत्साहाला उधाण आले होते.

वधू कावरीबावरी, यौवनाच्या उंबरठ्यावर. माहेर आणि सासर या शब्दांचा अर्थ नीटसा न कळणारी. महिन्याभरापूर्वी 'बघायला' आलेल्या 'पाव्हण्यावर' जीव जडवून बसलेली. वाढत्या वयाच्या प्रत्येक अवस्थेचा नेमकेपणा न जाणवता, मुग्धावस्थेतून पूर्ण विकसित झालेल्या स्थितीचे कौतुकमिश्रित आश्चर्य इतरांच्या डोळ्यांत वाचणारी, गृहस्थीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेली, ओघानेच येणाऱ्या गृहस्वामिनीच्या पदाबद्दल अजाण कुतूहल असणारी, उत्सुक पण हुरहुरलेली नवयौवना!

सनईच्या सुरात वराकडची उष्टी हळद आली. प्रशस्त देवघरात पंचरंगी रांगोळीवर चौरंग. त्यावर मखमली उशी. बाजूला ताम्हनात हळद, कुंकू, अक्षता, सुपारी आणि निरांजन. आजूबाजूला जरीवस्त्रे नेसलेल्या, दागदागिन्यांनी झळझळलेल्या स्त्रिया. गोठ-पाटल्या, चंद्रहार घातलेली आई पुढे झाली. आपल्या बोटातली अंगठी ताम्हनात टाकली. लाडक्या लेकीला औक्षण करताकरता डोळे भरून आले. छकुलीची जन्मापासूनची रूपे डोळ्यापुढे साकार झाली. आता आता अंघोळीनंतर राघूमैनेच्या सोबतीने पाळण्यात गाढ झोपी गेलेले रूपडे एवढे मोठे कधी झाले हा संभ्रम पडला. डोळ्यातल्या पाण्याच्या पडद्यापलीकडे तिची लेक सौभाग्यकांक्षिणी वधूरूपात चौरंगावर बसली होती. तिच्या मस्तकावर तेलाचे थेंब टाकून, गाला-हाताला हळदीची बोटे लावून भरल्या मनाने ती हळूच बाजूला झाली. पाच सवाष्णींचे औक्षण झाल्यावर आत्या पुढे सरसावली, लाडक्या भाचीला नहायला घालायला!

बाथरूममधे चकचकीत स्टीलच्या बादल्यांत थंड, गरम पाणी, एका वाडग्यात नारळाचे दूध, दुसऱ्यात गाळलेली सुगंधी शिकेकाई, तिसऱ्यात तिळाखसखशीचे उटणे आणि तिच्या बालपणीची तीच तेलाची चांदीची झारी! जरा संकोचत, उभे लावणे लावून ती स्टुलावर बसली. आत्याने तिची वेणी सोडवली. लांबसडक, चमकदार, रेशमी केसांच्या लडी अंगाखांद्यावरून ओघळू लागल्या. मस्तकावर अलगद पडणाऱ्या जुईच्या सुगंधित तेलाच्या थेंबांनी आणखीच तकाकू लागल्या. आत्याबाईंचे हात मायेने तिच्या केसांतून, पाठीवरून फिरू लागले. नारळाचे दूध केसांत मुरू लागले. उटण्याच्या स्निग्ध, खरखरीतपणाने रंध्र रंध्र मोकळे होऊ लागले. कांती खुलू लागली. आवळ्या- संत्र्याच्या शिकेकाईच्या सुवासाने नहाणीघर दरवळून गेले. गरम पाण्यातून उठणाऱ्या वाफांनी वातावरण तरल होऊन गेले. मस्तकावर उपड्या होणाऱ्या तांब्यातील पाण्याबरोबर खळमळ वाहून जाऊ लागले.

'अग नीट पुसून घे ग' म्हणत आत्या बाहेर गेली. सोहळ्यासाठी सज्ज होणाऱ्या स्वतःच्या पूर्ण विकसित देहाकडे ती स्वतःच अचंबित बघू लागली. मऊ टर्किश टॉवेलने अंगप्रत्यंग पुसताना, पंचात ओले केस गुंडाळताना उगीचच लाजल्यासारखे, बावरल्यासारखे होत होते. कल्पनेचे मोरपीस अंगावर रेशमी काटा फुलवीत होते. बाथरूमच्या बाहेर येऊन ओले केस झटकताना, कंगव्याने विंचरताना, अंबाड्याच्या सैल गाठीत बांधताना ते पीस जाणवतच होते.

बाहेर आई आणि मामीचे काहीतरी बोलणे चालू होते. कपाटातले दागिने मामीजवळ सोपवून आई बाहेर गेली. मामीने पिवळ्या रंगाची रेशमी बुट्टेदार शालूची घडी पुढे केली. ''अगबाई नऊवारी? मला नाही बाई येत नेसता.'' ती बावरली.

''अग, मी करते मदत तुला. आज हीच नेसायची हो मामाकडची. आजचा मान त्याचा. एरवी आहेतच की तुमच्या गोल साड्या. आजचा दिवस महत्त्वाचा. आज आपली रूढी जपायची. आमच्या वेळी पिवळी अष्टपुत्री असे. सुती साडी. हळदीने रंगवलेली. आणि मंगळसूत्र काळ्या पोतीतलं. सोन्याची एक वाटी सासरची, एक माहेरची! पुष्कळदा तर विजोडच असायच्या वाट्या. नाकात पाणीदार मोत्याची नथ आणि पायांत जोडवी, विरोल्या, मासोळ्या. कपाळी लाल पिंजर मेणावर लावलेली. कशी साजरी दिसायची नवी नवरी!''......

तिला नऊवारी नेसवता नेसवता मामी जुन्या जगात रंगून गेली!

साजशृंगार पूर्ण झाल्यावर ती आरशासमोर उभी राहिली तेव्हा मामीच काय, तीसुद्धा विस्मयचकित झाली. एका अल्लड, निरागस मुलीचे युवतीत झालेले रूपांतर बघून!

सोनसळी रंगाची प्रभा तिच्या सौष्ठवपूर्ण निरोगी देहावर पसरली होती. गालांवर हलकी तांबूस जिल्हई, मानेला सोलीव बदामाचे तेज, केस तकतकीत सुळसुळीत, कांती नितळ, डोळे चमकदार, चेहऱ्यावर सलज्ज प्रभा!

रेशमी वस्त्राने आच्छादलेली, सोन्यामोत्याच्या, फुलांच्या दागिन्यांनी सजलेली अशी ती नववधू! सुस्नात! एखाद्या झळझळीत कळसासारखी.... घाटदार, तजेलदार आणि सुमंगल! आईने खांद्यावर टाकलेला, घरंदाज अस्मानी बनारसी बुट्टेदार शेला सावरत, पतीच्या जीवनात पाऊल टाकायला सज्ज झालेली....

वर्षे लोटली! तिचा सांसारिक प्रवास सुरू राहिला. चारचौघींसारखा, सुखदुःखाचे कमी-जास्त रंग आलटून पालटून दाखविणारा. मुलेबाळे, नवरा, सासूसासरे, पाहुणेरावळे यांनी

गजबजलेला. हे, ते मिळविण्याचा ध्यास असलेला. स्वत:च्या इच्छा, अपेक्षा, आकांक्षा आणि जबाबदाऱ्या यांचे जोखड मानेवर असलेला. घड्याळाच्या काट्यावर तोललेला, मौजमजा आणि विश्रांतीही वेळापत्रकात बसवणारा. वाढदिवसाच्या दिवशी – 'अगबाई, आणखी एक वर्ष कसं गेलं कळलंच नाही' – असे जाणवून देणारा. श्वास घ्यायला उसंत न देणारा!

रोजच्या धावपळीच्या जगण्यात, मनसोक्त वेळ देऊन केलेले स्नान कधीच मागे पडले होते. सकाळ संध्याकाळ घाईघाईत शॉवरखाली उरकण्यात येणाऱ्या क्रियेला 'स्नान' म्हणावे की नाही ही शंकाच होती. नरकचतुर्दशीचे अभ्यंगस्नान तरी काय? ते सूर्योदयापूर्वी होणे या ना त्या कारणाने मागे पडले होते. घाईघाईत औक्षण, तेल, उटण्याची रीत पाळून अभ्यंग उरकले जात होते.

या सर्वांचा वचपा काढण्यासाठी की काय, स्वत:च घरी अंगाला तेल बेसन लावणे, मास्क लावणे, सवड असेल तेव्हा मालिशवालीला घरी बोलावणे, पार्लरमध्ये जाऊन 'हेडवॉश' घेणे, नवीन निघालेल्या 'फूट स्पा'ला भेट देणे वगैरे गोष्टी मधून मधून सुरू होत्या. तात्पुरते छान वाटत होते. पण कुठेही परिपूर्णता वाटत नव्हती. परिचारिकांच्या कृत्रिम गोड बोलण्याचा, बेगडीपणाचा कंटाळा येत होता. नुकत्याच घेतलेल्या 'सेकंड होम' मधला जाकुझी किंवा अमेरिकेतल्या भावाकडे आठ फूट उंचीच्या मोठ्या शॉवरहेडखाली बाथरूममधे अनुभवलेला पाऊस काहीही सुखवत नव्हते. मन लागत नव्हते खरे!

कैक वर्षे मागे पडली. रोजच्या धडपडाटात तनामनावर मालिन्याची पुटे चढताहेत. जाणिवा बोथट होताहेत. कधी निवांत क्षणी बेचैनी दाटून येते. मन भूतकाळात फेरफटका मारते. धूसर, निवांत, ऊबदार आजोळघरात फिरून येते. माहेरच्या मायघरात विसावते. आजीबाई आठवणीत असणे शक्य नाही. पण शैशवातला त्यांचा जिव्हाळ्याचा स्पर्श अंतर्मनात रिघून बसला आहे. आत्याबाईंच्या सावरीच्या स्पर्शाला जीव आसुसला आहे. ते स्पर्श केवळ हाताबोटांचे नव्हते, तर मन, दृष्टी आणि वाचेतूनही होत होते. त्यांनी स्नानासारख्या एका नित्य क्रियेचा परिपूर्ण संस्कार बनवला होता!

साठी आली! नको नको म्हणताना सर्वांनी साजरी केली. काही दिवस कृतकृत्य वगैरे वाटले. नंतर जाणवले – एक सर्वसामान्य आयुष्य आपले. कर्तव्य, जबाबदाऱ्या वगैरे बोजड शब्द वापरण्याएवढे त्यात काही नव्हते. चिमणाचिमणीही घरटी बांधतात, अंड्यातून बाहेर पडलेल्या पिलांना चारा भरवतात, उडायला शिकवतात आणि घरटे रिकामे झाले, की स्वत:ही उडून जातात. आपलेही तसेच थोड्याफार फरकाने!

परदेशातून आलेल्या मुलाने परतताना हातात एक पावती ठेवली. एका प्रसिद्ध आयुर्वेदिक मसाज सेंटरची. ''नक्की जा बरं का, आई. हल्ली तू स्वत:कडे खूप दुर्लक्ष करतेस. बरं नाही ते.'' वगैरे प्रेमळ दटावणीसकट!

'खरंच गेलं पाहिजे, बरंच ऐकलं आहे आयुर्वेदिक मसाजबद्दल' असा विचार करीत ती सेंटरच्या पायऱ्या चढली. चपला बाहेर काढून आतल्या दालनात तिने पाऊल ठेवले. पहिल्या दर्शनानेच अंतर्मनाची तार छेडली. छोट्या पणत्यांची आरास, शांत स्वरात बोलणारी स्वागतिका आणि पावलांचा आवाज न करता आलेली परिचारिका.

'चलो माँ' असे अदबीने म्हणत परिचारिकेने तिला वरच्या खोलीत नेले. अंधारापेक्षा थोडा उजळ असा मंद प्रकाश आणि हळुवार, भावमधुर वाद्यसंगीताचे स्वर यांनी वातावरण भारले होते. समोर उणापुरा दहाफुटी लांब, गडद आमसुली रंगाचा उंच अरुंद पलंग, दणकट आणि अवजड. डोक्याच्या बाजूला हलकी नक्षी असलेला. त्यावर चढायला दोन पायऱ्यांचे स्टूल. डोक्याच्या बाजूला एका उभ्या स्टँडला लावलेले पसरट, नक्षीदार पितळी भांडे. पांढऱ्या स्वच्छ धुवट कपड्यातल्या दोन काळ्या-सावळ्या सेविका. प्रयत्न करूनही ऐकू येणार नाही असे त्यांचे हलके, कुजबुजते बोलणे, संयमित हालचाली आणि शांती प्रस्फुटित करणारी देहबोली!

अभ्यंगस्नान! सर्वांग निर्मल करणारे स्नान! समर्पणाच्या भावनेने सुरुवात. डोळे मिटून शांत स्वरात, सेविकांनी प्रार्थना केली. मोडक्यातोडक्या हिंदीत, कमीत कमी शब्दांत आपण काय करणार याची तिला कल्पना दिली. त्यांच्या मदतीने वस्त्रे उतरवताना तिच्या मनाचे बंध हळूहळू सैल होऊन गळून पडत होते.

'हेड मसाज माँ!' टाळूवर कोमट तेलाची धार जाणवली. सेविकेची बोटे मुलायमपणे हळूहळू केसांच्या मुळाशी फिरू लागली. कधी हलकासा दाब देऊ लागली. बोटांच्या चक्राकार गतीने क्वचित कोवळ्या झिणझिण्या येऊ लागल्या.

भरपूर तेल रिचलेल्या गुळगुळीत टेबलावर आडवे झाल्यावर तो स्पर्श तिच्या सर्वांगाला सुखवून गेला. दोन सेविका दोन्ही बाजूला उभ्या. मुखी संस्कृत प्रार्थना. शरीरावर कोमट तेलाची धार. प्रथम नाभीस्थानी, नंतर क्रमाने चेहरा, मान, खांदे, दंड, कोपरे, तळहात, छाती, पोट, मांड्या, पाय, पोटऱ्या, पावले आणि तळपाय. सर्वांगावर सेविकांचे हात फिरत होते. मऊपणे किंचित दाब देत. आपलेच शरीर आपल्याला किती अनोळखी झाले होते याचा प्रत्यय तिला येत होता. सकस खाण्यापिण्यावर, आप्तस्वकीयांच्या मायेवर पोसलेला हा देह! निगराणी करून वाढविला. ह्यात सर्व देहभोग भोगले. किती गोष्टींसाठी अविश्रांत झिजवला, राबवला. अन्नपाण्याशिवाय त्याच्या काही गरजा असतात हे विशेष कधी जाणवले नाही. त्याच्या किती जागांना आज आपले अनाथपण जाणवून गेले. निर्हेतुक ममतेच्या स्पर्शाला वंचित राहिलेले कायेचे अणुरेणू जणू खूप काळाने जागे होत होते. निर्विकल्प स्पंदने निर्माण करीत. आज या स्पर्शाने जणू सर्वांग आणि त्याबरोबर अंतर्मनही जागे होऊ लागले!

'माँ शिरोधारा!' सेविकेचा कुजबुजता स्वर ऐकू आला. केवळ मस्तकावर पडणाऱ्या मंद धारेची संवेदना. उजवीकडून डावीकडे, डावीकडून उजवीकडे पितळी पात्रातले तेल केसात पाण्यासारखे रिचवले जात होते. समाधीची परमावधी. ही अवस्था संपूच नये

या असोशीने मनाचा ताबा घेतला!

शरीराचा डोलारा सांभाळणारे हे मस्तक. विचार करून मेंदू शिणला किंवा डोके दुखले की गरम चहा आणि ॲस्पिरीनची गोळी एवढीच बांधिलकी त्याच्या बाबतीत. आल्याला जमिनीशी जोडणाऱ्या त्याच्या मुळाशी आपल्याला काय काम? जगण्याच्या धडपडीत, विचारांचे काहूर आणि भावनांचा गुंता त्यातून काढून टाकण्याची कधी गरज भासली नाही, सवड झाली नाही आणि हे जाणवले तरी ते कसे करावे याबाबतचे अज्ञान नडले.

आज या स्पर्शाने जणू सर्वांग जागे झाले. गात्रागात्रांत साचलेला शीण निचरू लागला. थकलेला देह विश्रामाच्या खोल गुहेत जाऊ लागला. तेलाचे स्निग्ध, मुलायम आच्छादन पांघरून तिने नकळत डोळे मिटून घेतले.

अभ्यंगाचा शेवटचा टप्पा. शरीरावर उटण्याचा लेप. नाक, कानात धुरी. डोळ्यांत औषधी थेंब. उटण्याचे लेपन काढताना सर्वांगावर झुळझुळत होते. कोमटपेक्षा गरम आणि गरमपेक्षा थंड असे सुगंधित पाणी!

स्नानगृहात वर्षोन्वर्षे नियमित घासले गेलेले चकचकीत भले मोठे पितळी घंगाळे, त्यात वनौषधीयुक्त गरम गरम पाणी, चौरंगावर तांब्या, मनपसंत शांपू आणि हूकवर पांढरा स्वच्छ पंचा. मनसोक्त नाहताना स्वर्गसुख ते हेच असे तिला जाणवत राहिले.

अंग टिपून, सुस्नात, अशी ती कपडे करून बाहेर पडली. खांद्यावरून पदर पुढे ओढून. आज खूप खूप वर्षांनी ती स्वत:ला भेटली होती – नव्याने!

साठी मागे पडूनही काही वर्षे झाली. मुले मोठी होऊन आपापल्या संसारात रममाण झाली. कामातून निवृत्ती मिळाली. आता खूप मोकळा वेळ सापडू लागला. त्याचे काय करावे कळेना. घरात नवराबायकोचे काम ते काय? प्रवास, छंदवर्ग, योगासने, व्याख्याने, सिनेमा, नाटक हे सर्व आळीपाळीने करूनही करमेना. अवेळी बेचैनी दाटून येऊ लागली. एखाद्या एकट्या संध्याकाळी विनाकारण डोळ्यांवर पाण्याचा पातळ पडदा जमू लागला.

बाकी सगळे ठीक होते. पण कितीही जोपासले तरी वय हळूहळू जाणवू लागले. आरशात स्वत:कडे बघताना काया काळवंडलेली, सैल पडलेली दिसत होती. विरळ भांगात रूपेरी छटा उमटली होती. रात्री बिछान्यावर पडल्यावर 'आई ग! दमले' असा सुस्कारा बाहेर पडत होता. सकाळी उठल्यावर पूर्वीसारखे झटकन उठून उभे राहणे जमत नव्हते. मध्यान्ही बाहेर पडले तर उन्हाची तिरीप डोळ्याला खुपत होती. समवयस्कांच्या घोळक्यात शुगर, बीपी, कोलेस्टेरॉल वगैरे शब्द लाह्यांसारखे उडत होते. 'सिनीयर सिटीझन'चे बिरुद लागले होते. भाजीवाली तर केव्हाच 'मावशी'ऐवजी 'आजी' संबोधू लागली होती.

पेपरमधल्या वाईट बातम्या वाचून बाहेर गेलेल्या घरच्या प्रत्येकाबद्दल नको त्या काळज्या करण्याचा रोग पडला होता. नातवाला साधे खरचटले तर 'गँगरीन तर होणार नाही' या चिंतेने झोप उडून जात होती. नवऱ्याचा खोकला जरा लांबला की 'त्याला घशाचा कॅन्सर तर झाला नसेल' ही काळजी जिवाला कुरतडत होती.

सासूबाईंच्या हिऱ्याच्या कुड्या सुनेला द्याव्या की मुलीला यावर महिनोन्महिने निर्णय होत नव्हता. हव्यासापायी घेऊन कधीही न नेसलेल्या कपाटातल्या अनेक साड्या बघून मनात उद्वेग आणि विरक्ती दाटून येत होती. फुटलेल्या पाइपमधून उडणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्यात भिजून नाचणाऱ्या झोपडीतल्या पोरांकडे पाहून डोळ्यांत पाणी येत होते. नळाखाली पाय धुणाऱ्या रखमाच्या भेगाळलेल्या, धुळीची पुटे चढलेल्या पायांकडे बघून मनात कळ उठत होती.

मन खूप बेचैन, हळवे आणि चिडचिडे झाले होते. एक दिवस अशाच सैरभैर अवस्थेत तिने निर्णय घेतला. कोल्हापूरला जायचा! कुलदेवतेच्या दर्शनाला जायचा. खूप दिवस झाले आईला भेटून. जिवाची तगमग तिला सांगू. विसाव्याचे चार क्षण शोधू!

समजूतदारपणे नवऱ्याने तत्परतेने सगळी तयारी करून दिली. हॉटेलचे बुकिंग, गाडी, ड्रायव्हर! तिला म्हणे एकटेच जायचे होते. आपल्या बायकोला मधूनच काहीतरी असा झटका येतो हे त्याला माहीत होते!

शहरी कोलाहलापासून गाडी भरधाव दूर निघाली. गावामागून गावे मागे पडू लागली. डोंगरावरची हिरवाई आणि आकाशाची निळाई मनावर जादू करू लागली. ते आपोआप शांत होऊ लागले. दिवसाउजेडी हॉटेलमधे पोहचून, गावात फेरफटका मारून, देवीच्या ओटीचे सामान घेऊन परतायला सूर्यास्त होऊनच गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळची महापूजा. देवळाबाहेर महाद्वाराजवळ फुलांची, ओटीसामानाची दुकाने सजली होती. हातातल्या नक्षीदार पितळी तबकात मोठ्या कौतुकाने देवीसाठी घेतलेली जरीबुट्ट्यांची गर्द जांभळी साडी, पिवळा जरीकाठी खण, हिरव्यागार बांगड्या आणि ओटीसामान होते. समोरच्या दुकानात फुलापानांचा संमिश्र गंध दरवळत होता. पाच कमळांच्या फुलांची वेणी! किती छान दिसेल देवीला! जांभळ्या बुट्टेदार नऊवारीवर!

मनावर पडलेला एक एक वेढा सैल होत होता. प्रवेशद्वारातून आत जाताना, गणपतीपुढे तांदूळ ठेवताना, भाविकांच्या ओळीमधे चालताना ती बघत होती – आईच्या ओढीने आलेली लेकरे – कोऱ्या कपड्यातली, बाशिंगे बांधलेली नवपरिणित जोडपी, तान्ही बाळे कडेवर घेतलेले तरुण आईबाप आणि थकले भागलेले सुरकुतलेले वृद्ध! चढत्या आयुष्याकडे अपेक्षेने बघणारे आणि उतरणीवर आयुष्याचा ताळेबंद मांडणारे, आईच्या कृपेचे, मायेचे दान मागणारे याचक!

कोरीव दगडी खांबांमधून हळूहळू पुढे सरकत ती

गर्भगृहाच्या उंबरठ्याजवळ देवीसन्मुख आली. भरजरी तोरणाखाली, पुजाऱ्याकडे ओटीचे तबक सरकवताना, देवीपुढे नतमस्तक होताना, तिच्या सोनपावलांवर खिळलेली दृष्टी वर घेताना, तिच्या राजस, मनोहारी, आश्वासक रूपाची जशी तिच्यावर मोहिनी पडली!

'चला, चला, पुढे सरका, बसून घ्या, पूजा सुरू होते आहे!' वगैरे शब्दांच्या तालावर ती कासवमंडपात कधी जाऊन बसली तिला कळलेच नाही. अवतीभवती गुळगुळीत काळ्या पाषाणाचे, असंख्य घडीव नक्षीदार खांब – हाताच्या कवेत न मावणारे, कोरीव घुमटाचा डोलारा सांभाळणारे! धूप, दीप, फुलांच्या गंधाने, मंद प्रकाशाने, घुमणाऱ्या घंटानादाने आणि कुजबुजत्या स्वरांच्या जादूने भारलेले वातावरण. आईच्या महापूजेसाठी सज्ज झालेले, सोवळ्यातले पुरुष आणि जरीवस्त्रे, दागदागिने, फुलांचे गजरे ल्यालेल्या त्यांच्या अर्धांगिनी – आपल्या अपत्यांसहित!

एका खांबाच्या आधारे ती बसली होती. तिच्या मागेच बसलेले एक दक्षिणी कुटुंब सुरेल, भाविक आवाजात देवीची स्तोत्रे म्हणत होते. समोर पुजाऱ्यांनी देवीच्या महापूजेला सुरुवात केली –

वर्षानुवर्षे घरी पाहिलेल्या शारदीय नवरात्रीतील देवीच्या प्रतिष्ठापनेच्या पूजा तिच्या डोळ्यांपुढे तरळून गेल्या. मंत्रोच्चारांचे स्वर कानांत गुंजारव करू लागले –

श्री महागणपती, इष्टदेवता, कुलदेवता, ग्रामदेवता, स्थानदेवता, वास्तुदेवता, नवग्रहदेवता आणि मातृपितृदेवता... सर्वांना प्रार्थून, आळवून आळवून पाचारण केलेल्या श्रीदेवीच्या रूपाची किती भक्तीने केलेली षोडषोपचार आतिथ्यपूजा! सर्वांगपरिपूर्ण, विनम्र आणि समर्पित!

त्या पूजेत चालू होता तिचा स्नानसोहळा, अभ्यंगस्नान! पंचामृतांचे – दूध, दही, तूप, मध, साखर – आणि गंधोदकाचे! अभिषेक होत आहेत श्रीच्या मस्तकावर –

कामधेनोः समुद्भूतं
देवर्षिपितृतृप्तिदम्
पयो ददामि हे देवी
स्नानार्थं प्रतिगृह्यताम्

दूध कसे? कामधेनूपासून निर्माण झालेले. देव, ऋषी आणि पितरांची तृप्ती करणारे – तुझ्या स्नानासाठी हे देवी अर्पण करीत आहे. त्याचा स्वीकार कर.

....चंद्रमंडल संकाशं सर्व देवप्रियं
दधी स्नानार्थं प्रतिगृह्यताम्

दुधापासून तयार केलेले, चंद्राप्रमाणे शुभ्र, शीतल असणारे दही आपण स्वीकारावे.

.... आज्यं सुराणामाहार, आज्यं यज्ञेप्रतिष्ठितम्......

तसेच लोण्यापासून बनवलेले, यज्ञकर्मात लागणारे, अत्यंत पवित्र असे हे तूप.... त्याचा स्वीकार करावा.

आपल्या मंगलस्नानासाठी.

....सर्वोषधी समुत्पन्नं पीयूष सदृशं मधु
मधुस्नानार्थ प्रतिगृह्यताम्....

फुलांच्या परागापासून प्राप्त केलेला, औषधी गुण असलेला अमृततुल्य असा... हा मध स्नानासाठी अर्पण करीत आहे.

इक्षुदंड समुद्भूत दिव्यशर्करया शिवे
स्नापयामि महाभक्त्या... प्रसन्ना भवचंडिके
शर्करास्नानम् समर्पयामि....

उसापासून बनवलेल्या दिव्य शर्कराने – साखरेने तुला मोठ्या भक्तिभावाने स्नान घालतो – स्वीकार व्हावा.

कर्पूरैलासमायुक्तं सुगंधद्रव्यम् संयुतम् तामिहोपव्हये
गंधोदकं महादेवी स्नानार्थं समर्पयामि।

कर्पूर आणि इतर सुगंधद्रव्यांनी युक्त असे गंधोदक, हे महादेवी, तुझ्या स्नानासाठी समर्पित करतो.

त्या काळ्याभोर पाषाणमूर्तीवरून, चारी बाजूंनी पंचामृताचे, गंधोदकाचे ओघळ झुळझुळताहेत.

प्रत्येक अमृतस्नानानंतर होत आहे अभिषेक शुद्ध जलाचा –

शर्करास्नानानंतरम् शुद्धोदकस्नानम् समर्पयामि।

उदक तरी कसे –

उष्णेन विमलेनैव स्वर्णकुंभ स्थितेनच...
स्वर्णकुंभात ठेवलेले, उष्ण आणि निर्मल...

आणि नंतर....

अमृताभिषेकोस्तु....
सुवर्णाभिषेकोऽस्तु
स्नानान्ते आचमनीयम् समर्पयामि।
वस्त्र-उपवस्त्रार्थे अक्षताम् समर्पयामि।

वस्त्र, उपवस्त्रे, दिव्य मौक्तिक कंचुकी...

अनेक रत्नखचित भूषणे – किरीटहार, केयूर, रत्नकुंडले, कौस्तुभहार, रत्नकंकणे, नुपूर, कंठसूत्र –

हरिद्रा, कुंकुम, सिंदूर कण्णल आदी सौभाग्यलेणी;

चंदन, देवंतिका, बकुल, चंपक, पुभाग अशी परिमलद्रव्ये... बिल्व, प्रवाल, तुलसीपत्रे.... समर्पित होत आहेत – देवीची, शंकराची स्तुती होत आहे.... गंधाक्षता, धूप, दीप, नैवेद्य, ताम्बूल अर्पण होत आहे – आरती, प्रदक्षिणा, पुष्पांजली.... महापूजा संपूर्ण आणि संपन्न झाली!

पंचारती गाभाऱ्याबाहेरील देवतामूर्तींपुढे फिरून येते.... आणि शेवटी....

शंखस्नान! सर्व जण उभे, नतमस्तक! तीही त्यातली एक. मस्तकावर पडणाऱ्या तीर्थजलाच्या थेंबाच्या अमृत शिडकाव्यात अंतर्बाह्य कृतकृत्य झालेली!

गर्दी ओसरू लागली. निघावेसे वाटत नव्हते. ती खांबाला टेकून, डोळे मिटून बसली. तिच्या मागेच, एक प्रौढा आपल्या

मन वर्षानुवर्षे मागे गेले आणि पुढे आले. तिला कळले, जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावर होती ती! नववधूच्या वेषात माहेर सोडतानाची अवस्था पुन्हा साकार झाली. तेव्हा न कळलेले अर्थ आता उमगू लागले –

*बाबुल मोरा नैहर छूटो जाय –*

खेडवळ, प्रांजल, गोड आवाजात आईला आळवत होती –

चांदीची कळशी
आठवण येते आईची
समोर सोप्यामधे दुरडी ग
आई माझी आली पाहुणी
माझ्या अंबीला दह्यादुधाची आंघुळ ग
तान्हं बाळ माझं
सोन्याची पाऊलं धुळीमातीत....

निसटते शब्द दुखऱ्या मनाला मलमपट्टी करीत होते. त्या भाबड्या गीतात अंबाबाईची कधी अंबी होत होती आणि रेणुकामातेची रेणू! पुढ्यातली अंबाबाई कधी बाळरूपात, तर कधी मातृरूपात जाणवत होती. स्त्रीची सर्व रूपे तिच्यात एकाकार झाली होती. हरवलेले काहीतरी गवसत होते. पण काय हरवले आणि काय गवसले हेच उमगत नव्हते. मनात होती एक श्रांत तृप्ती!

शैशव, बाल्य, यौवन, प्रौढावस्था आणि आता.... निश्चितपणे वार्धक्याकडे चाललेला प्रवास... दुवे अस्पष्ट जाणवत होते. डोळ्यांपुढे उलगडत होती.... परतीची वाट!

परतीची वाट! शहर मागे पडले. डावी-उजवीकडे भरगच्च हिरवीगार शेते. पलीकडे धूसर निळसर डोंगर, पाण्याचे लहानमोठे ओहोळ. आभाळ ढगांनी ओथंबलेले! घनगंभीर!

चाळा म्हणून रेडियोचे बटन दाबले. जुनी गाणी चालू होती. 'स्ट्रीट सिंगर'मधील प्रसिद्ध रचना! स्वर्गीय कुंदनलाल सैगलच्या आवाजातील भैरवीतील ठुमरीने जिवाचा ठाव घेतला –

*बाबुल मोरा नैहर छूटो जाय –*

अवधचा शेवटचा काव्यवेडा, रसिक नवाब – वाजिद अली शाह! मायभूमीतून हद्दपार झालेला – कलकत्त्याजवळील अनोळखी 'मातिया बुर्ज'ला निघालेला – विद्ध झालेल्या नवाबाची वेदना सैगलच्या दर्दभऱ्या आवाजातून भळभळत होती.

मन वर्षानुवर्षे मागे गेले आणि पुढे आले. तिला कळले, जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावर होती ती! नववधूच्या वेषात माहेर सोडतानाची अवस्था पुन्हा साकार झाली. तेव्हा न कळलेले अर्थ आता उमगू लागले –

*बाबुल मोरा नैहर छूटो जाय –*

तो क्षण जवळ आलाय. अळता लावलेली सुकुमार पावले माहेरघराच्या अंगणाबाहेर उमटू लागली आहेत. मायेच्या सुरक्षित कुशीतले निवांत जीवन बदलू पाहत आहे. जिवाचा जिवलग पलीकडे उभा आहे. जन्मोजन्मीची साथसंगत करायला. पाठीमागे आप्तांच्या नजरा पाणावल्या आहेत –

चार कहार मिले मोरी डोलिया सजावे
मोरा अपना बेगाना छूटो जाय –

लाल गाद्यागिर्द्यांची पालखी! त्याला रेशमी गोंडे. कुणातरी वडीलधाऱ्याच्या आधाराने ती पालखीत बसते. झिरझिरीत पडदे सोडण्यात आले आहेत. प्रियजनांच्या वियोगाच्या जाणिवेने पाणावल्या डोळ्यांना सगळे धूसर दिसते आहे. मन:पटलावर आपल्या, परक्यांच्या प्रतिमांची सरमिसळ झाली आहे.

मायबाप, भाऊबहिणी, सख्यासोबतिणी –
भातुकलीचे खेळ, भांडणे, रुसणीफुगणी –

वयात येतानाची वळणे, आडवळणे, उत्कट भावनांची देणीघेणी – सगळ्यांनी भोवती फेर धरला आहे!

भोयांनी पालखी उचलली आहे. हृदयाची धडधड वाढली आहे. कुठे जायचे आहे? कसा असेल तो अज्ञात प्रदेश? आणि माझा सोबती?.... कपाळावर घर्मबिंदू जमताहेत. हातांचे ओलसर तळवे आधार शोधताहेत. मनात हुरहुर. निमिषार्धात किती विलक्षण एकाकीपण हे!

अंगना तो परबत भया
और देहरी भई बिदेस...

भोयांनी वाटचाल सुरू केली. मागचा ठाव मागे सुटला. घराचा उंबरठा परका झाला आहे. मायघरापुढचे अंगण दिसेनासे झाले आहे...

जे घर बाबुल आपना
मै चली पियाके देस...

तो पुढे घोड्यावर स्वार... बंद झरोख्यातूनही त्याचे अस्तित्व जाणवतेय. आधारासाठी जीव आसुसला आहे. तगमग वाढली आहे... सगळ्यांचा निरोप घेऊन प्रियतमाच्या देशाकडे पालखी निघाली आहे!

आजूबाजूला सप्तरंगांची उधळण आहे. त्यात न्हाऊन निघाल्यावर दिसतो आहे केवळ प्रकाश – एकही रंग नसलेला.... तेजस्वी!

सैगलच्या निखळ स्वरातील आर्तता काळजाला भिडली आहे. मनातली बेचैनी डोळ्यांतल्या पाण्याबरोबर वाहून जात आहे. कदाचित यात्रा सफल झाली आहे!

सर्वदूर सुजल, सुफल, सस्यश्यामल पृथ्वीवर आकाशातून बरसताहेत अमृतधारांचे कुंभ....

तिच्या कणाकणाला अभ्यंगस्नान घालीत!

*(जानेवारी २०१७)*

# वळणावर

## रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ

आयुष्याच्या एखाद्या अडनिड्या वळणावर कोणी भेटलं आणि दोघांनी ते नातं उत्कट अलवारपणे सांभाळलं, तरी पुढे त्याचं काय करायचं हा तिढा कायमच राहतो. आपली प्रत्येक संवेदना पिंजून ती सूक्ष्मदर्शकाखाली न्याहाळणारा बुद्धीमान, संवेदनशील पुरुष व तितकीच कर्तबगार पण कणखर स्त्री यांनी आपल्या नात्याचा घेतलेला प्रगल्भ शोध...

आयुष्याच्या अशा अडनिड्या वळणावर का भेटलीस तू मला?

– हे एकच वाक्य पिंजत बसण्याचा एकमेव अजेंडा घेऊन एकांताच्या निबिड अरण्यात येऊन बसलोय मी!

लहानपणी आमच्या गल्लीच्या टोकाला उस्मानभाई पिंजाऱ्याचं घर होतं. दुपारी, संध्याकाळी, कधी कधी रात्रीदेखील त्याच्या खोलीतून कापूस पिंजणाऱ्या धनुकलीचा आवाज यायचा. मला त्या आवाजाचं वेडच लागलं होतं. तो आवाज कुठून येतो हे पाहायला एकदा मी त्याच्या घरी गेलो. कोणालाही नकळत त्याच्या खिडकीचं दार उघडून आत डोकावून पाहिलं. मला ना उस्मानभाई दिसला ना त्याची धनुकली. साऱ्या खोलीभर उडणारे रुईचे पुंजके न् त्या पुंजक्यांच्या ढगातून येणारा भुंग्याच्या गुंजारवासारखा आवाज ह्यांच्या आत उस्मानभाई व त्याची धनुकली पार लपून गेले होते.

आता मीही उस्मानभाई बनून ह्या एका वाक्याच्या चिंधोट्याचिंधोट्या करणार. मग त्यातला एकेक तंतू घेऊन तो पिंजणार. गहन एकांताच्या गुहेत मी, गुंजारव करणारं माझं मन आणि आम्हांला व्यापणारी अर्थांची असंख्य वलयं, उडणाऱ्या रुईच्या म्हाताऱ्या ... क्या बात है!

★ ★ ★

मी स्वतःशी मारे कापूस अन् धनुकलीच्या बाता मारतोय. पण फॅक्ट ऑफ द मॅटर इज अ‍ॅज फॉलोज् –

पंचवीस नोव्हेंबर दोन हजार पंधरा.

पहाटे पाच वाजून दहा मिनिटांनी मला डाव्या खांद्यातून जाणारी वेदनेची सूक्ष्म लहर जाणवली. मी नुकताच ध्यान करायला बसलो होतो. माझं मन सजग होतं व संवेदना अतिशय लख्खपणे जाणवत होत्या. पहिली कळ ओसरली तोच दुसरी आली. पहिलीहून अधिक तीव्र. ह्यावेळी ती दंडातून खांद्यात व तिथून खाली पाठीत पसरली. तिसरी कळ खांद्याकडून छातीकडे पसरत असताना मी माझे अवघं चित्त एकाग्र करून तिच्याकडे पाहिलं. साक्षीभावाने पाहिलं. हृदयाचे स्नायू आकुंचित होत असताना त्या वेदनेशी मी डोळा भिडवला व मला तिची खूण पटली. त्या स्पंदनांवर हेच वाक्य कोरलं होतं –

'आयुष्याच्या अशा अडनिड्या वळणावर का भेटलीस तू मला?'

गेली बावीस वर्षं ह्या वाक्याशी लपंडाव खेळल्यावर आज त्याच्याशी नजर भिडविण्याची वेळ येऊन ठेपली होती.

नेमकं सांगायचं तर बावीस वर्षं, एक महिना व अकरा दिवस.

चौदा ऑक्टोबर एकोणीससशे त्र्याण्णव.

म्हैसूर विद्यापीठाच्या अ‍ॅकेडेमिक स्टाफ कॉलेजमध्ये सामाजिक शास्त्रांच्या प्राध्यापकांसाठी आयोजिलेल्या रिफ्रेशर कोर्समध्ये मार्गदर्शन करायला मला बोलावलं होतं. हे शहर आणि इथल्या विद्यापीठाचा परिसर ह्या दोन्ही माझ्या अतिशय परिचयाच्या व आवडीच्या गोष्टी!

ह्या कोर्सचा समन्वयक जयंत शिरूर माझा जुना दोस्त. गेली दोन वर्षं मला इथे येणं जमलं नव्हतं म्हणून त्याने मला यंदा चार दिवस राहायला बोलावलं होतं. कोर्समध्ये दोन सेशन्स, एक-दोन मीटींग्ज, आणखी दोन भाषणं असा भरगच्च कार्यक्रम होता. मला प्लेनरीत बोलायचं होतं. त्यामुळे हॉल थोडा मोठा होता. शे-सव्वाशे माणसं असतील.

जयंतने माझी ओळख खुसखुशीत पद्धतीने करून दिली, पण त्याचवेळी मी समाजशास्त्र व तत्त्वज्ञान ह्या दोन विषयांत कोलंबिया विद्यापीठातून मिळविलेल्या डॉक्टरेट्स, भारतीय व पाश्चात्त्य – दोन्ही ज्ञानपरंपराविषयीचं माझं अध्ययन, माझी पुस्तकं व माझं देश-विदेशातलं फॅन-फॉलोइंग ह्याचाही उल्लेख केला. इतकी वर्षं झाली; पण अजूनही सार्वजनिक ठिकाणी बोलण्यापूर्वी मी थोडासा कॉन्शस असतो. हळूहळू श्रोत्यांचा अंदाज घेत मी पुढे जातो. एकदा आवाज लागला, की मैफल कशी सजवायची-गाजवायची ते मला चांगलंच अवगत आहे.

मी नेहमीप्रमाणे छोटे छोटे विनोद पेरत, म्हैसूरच्या जुन्या आठवणी सांगत सुरुवात केली. ओळखीच्या चेहऱ्यांशी नजरानजर होत होती. त्यातून मिळणारी दाद व स्नेह-आदराचा

शिडकावा ह्यामुळे मी अधिकाधिक रीलॅक्स होत होतो. माझं भाषण आता हळूहळू 'चढू' लागलं होतं. तेवढ्यात मला 'ती' दिसली.

'ती' बऱ्याच मागे तिसऱ्या-चौथ्या रांगेत बसली होती. अर्धगोलाकृती रचनेत काहीशा परिघावर. तिच्या आसपासच्या दोन-तीन खुर्च्या रिकाम्या होत्या. ती अगदी मन लावून माझं भाषण ऐकत होती. माझ्या कुठल्याशा वाक्याला दाद देत तिने सहज नजर उचलून समोर पाहिलं आणि आमची नजरानजर झाली. तिच्या प्रतिसादामुळे मनोमन हरखलेला मी तिच्या दृष्टिक्षेपामुळे पार स्तिमित झालो.

मला आधी जाणवलं त्या नजरेतलं तेज – बुद्धिमत्तेचं, सजगतेचं. एवढा कसलेला वक्ता मी, पण पार गोंधळून गेलो. तिच्या नजरेत गुंतलेली माझी नजर मी प्रयत्नपूर्वक सोडवली खरी, पण ती तिच्या चेहऱ्यापाशीच थबकून राहिली. मी आजवरच्या आयुष्यात देश-विदेशात काही कमी सुंदर मुली पाहिल्या नव्हत्या. पण हे सौंदर्य वेगळंच होतं. त्यात आव्हान नव्हतं की आवाहन, निमंत्रण नव्हतं, तसा ताठाही नव्हता. स्वतःच्या प्रकाशाच्या आभेत गुंतलं होतं ते. बाहेरच्या जगापासून काहीसं अंतर राखून असणारं, स्वमग्न नव्हे, पण स्वतःशी संवादात हरवलेलं असं ते व्यक्तित्व. माझ्या भाषणाच्या रूपाने तिचा बहुधा स्वतःशीच छानसा संवाद सुरू झाला होता. पण मी असा अर्ध्यावर अडखळल्यामुळे तो अचानक तुटला, म्हणून तीही थबकून माझ्याकडे पाहत होती. दोन तीन सेकंद असेच गेले, मी अवाक्. अखेरीस मी सावरलो. झटकन प्रसंगावधान राखून माझी नजर मी ओळखीच्या एका वरिष्ठ प्राध्यापकांकडे वळवली, एक वाक्य बोलून पुन्हा पॉज घेतला. मग म्हणालो,

''माणसा-माणसांच्या संवादात कधी असंही घडतं की थबकायला होतं. ह्याचा अर्थ असा नाही, की संवाद संपला किंवा अशक्य झाला. त्याचा अर्थ हा असतो, की संवादासाठी अधिक संपन्न, अधिक अर्थवाही भाषेची गरज आहे आणि ती भाषा आपलीशी करण्यासाठी थोडं थांबण्याची, स्वतःला, समोरच्याला, संवादप्रक्रियेला नव्याने समजून घेण्याची गरज आहे. अशा वेळी थोडं थांबणं आवश्यक असतं आणि उपयुक्तदेखील. हेच समाजाच्या बाबतीतही घडतं. प्रत्येक समाजाचा काळाशी सतत संवाद सुरू असतो. कधी कधी त्या संवादातही अशी वेळ येते पॉज घेण्याची. अशीच वेळ आता भारतीय समाजावर आली आहे. परंपरा आणि परिवर्तनाची घुसळण आपल्या परिचयाची आहे. पण कधी कधी परिवर्तनाची गती व तीव्रता इतकी जास्त असते, की तिला पाहण्यासाठी, समजून घेण्यासाठी भूतकाळाशी असणारं आपलं नातं आपल्याला काही काळ स्थगित ठेवावं लागतं. माझ्या आजच्या भाषणाचा विषय आहे – A Pregnant Pause: A Tool to Understand the Meaning of Globalization for India.

टाळ्यांचा कडकडाट झाला. बाजी पुन्हा माझ्या हातात आली होती. ते भाषण मग तुफान रंगलं. मी दोन-तीनदा 'तिकडे' पाहिलं. 'ती' नोट्स घेण्यात गर्क होती. लेक्चर संपल्यावर माझ्याभोवती गराडा पडला – नवे प्राध्यापक, पीएच.डी. व एम.फिल.चे विद्यार्थी. ती मात्र आली नाही. रात्री मी डायरीत लिहिलं – My God, she was so distractingly beautiful!

★ ★ ★

''तू कशाला आलीस इथे?''

''तुम्हांला पाहायला आले होते. नको येऊस म्हणत असाल तर जाते परत.''

''इतकी कशाला चिडतेस?''

''चिडू नको तर काय करू? तुम्हांला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायची वेळ आली, आणि मला पत्ताच नाही. एकतर कितीतरी दिवस भेटायचं नाही, फोन, मेसेज करण्यावर बंधनं. नशीब, निदान तुमची मेल कोणी चेक करत नाही. तुम्ही मला एक शब्दाने कळवू नका आणि मी आल्यावर मला विचारता, की का आलीस?''

''चुकलो बाई, साफ चुकलो. सॉरी म्हटल्याने राग जाईल का की कान धरून उठाबशा काढू?''

''काढाच कधीतरी उठाबशा. मलाही बघू देत तुम्ही कसे दिसता उठाबशा काढताना! आता नाटकं पुरेत. उठाबशा काढू नका, फक्त हे सांगा की तुम्हाला नेमकं काय झालं? हॉस्पिटलला जाण्याची वेळ का आली? आणि थापा नकोत, आपल्याकडे बोलायला वेळ कमी आहे हे लक्षात ठेवा. एकमेकांपासून काही लपवायचं नाही हे आपण खूप आधीच ठरवलं होतं, ह्याची आठवण करून द्यायला हवीय का?''

''नाही ग बाई. तुझ्यापासून लपवणार तरी काय मी? शक्य असतं तर तुलाच लपवलं असतं माझ्यापासून...''

''डायलॉग पुरेत. तब्येत...''

''माइल्ड हार्ट ॲटॅक येऊन गेला असावा अशी डॉक्टरना शंका आहे, मला तसं वाटत नाही. पण बीपी २००/११०च्या खाली जातच नाही.''

''कुठलं टेन्शन आहे तुम्हांला?''

''कुठलंच नाही, फक्त एका प्रश्नाचं उत्तर कितीतरी वर्षं शोधूनही सापडत नाही.''

''कुठल्या?''

''आयुष्याच्या अशा अडनिड्या वळणावर का भेटलीस तू मला...?''

''काय बोलणार मी ह्यावर? बोलायचं काही राहिलंय?''

''नकोच बोलूस तू काही.''

तुडुंब भरलेले डोळे, आतुर पण विवश हात...

''अरे, कशावरून एवढा वाद चाललाय दोघांचा? सुचित्रा, तू केव्हा आलीस, मला कळलंही नाही...''

''नाही मॅडम, आताच आले. एक पेपर पाठवायचा होता कॉन्फरन्ससाठी. सरांना फोन लावला तर लागतच नव्हता. चक्कर

मारून पाहावी म्हणून आले. त्यांना पाहून – बरं नाही का? – एवढंच विचारलं, तर म्हणाले ह्या विषयावर बोलूच नकोस. तुम्हीच सांगा आता...''

''मी बाई काय बोलणार? आपल्या लाडक्या स्टुडंटला जर ते काही सांगत नसतील तर बायको म्हणजे किस झाड की पत्ती...''

''असं बिलकुल नाही मॅडम. सर सगळ्यांना सांगतात – माझी गृहिणी, सखी, सचिव सर्व सर्व म्हणजे माझी पत्नी. आणि आम्ही बघतोय ना रोज तुम्ही किती करता त्यांचं.''

''ते खरंय ग. पण ह्यांचा हट्टी स्वभाव... तुला तर माहीतच आहे. आता इतके आजारी आहेत; पण म्हणतात, की मला आपटेंच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हायचं नाही.''

''आपटे म्हणजे ते हार्ट स्पेशालिस्ट? पण त्यांच्याकडे ॲडमिट कशासाठी व्हायचं?''

''घ्या, म्हणजे तुला काहीच माहीत नाही तर... त्याचं काय झालं. त्या दिवशी एकादशी होती, म्हणजे माझा उपवास. सकाळी सकाळी मी नीताशी स्काइपवर बोलत होते. नीता म्हणजे माझी आतेबहीण आहे ना सोलापूरची, तिच्या नणंदेची मुलगी. ती असते शिकागोला. ती कसली तरी इंजिनियर आहे आणि तिचा नवरा डॉक्टर. तिला नं, १०-१५ दिवसांतून एकदा तरी माझ्याशी बोलल्याशिवाय चैन नाही पडत. एकवेळ सख्ख्या आईला सांगणार नाही ती गोष्ट, ती माझ्याशी शेअर करते. म्हणते, तुम्ही म्हणजे ना...''

''तुम्ही सरांच्या तब्येतीबद्दल काही सांगत होता ना?''

''अग, तेच तर सांगते. मी अशी स्काइपवर बोलण्यात मग्न. तर ह्यांनी मला जोरजोराने हाका मारल्या. मी म्हटलं, ह्यांची ती जुनी सवय. प्रत्येक गोष्टीसाठी सावित्री हवी. तर मी केलं थोडा वेळ दुर्लक्ष, तर ह्यांच्या आणखी मोठ्या मोठ्याने हाका. अगदी सात समुद्रापलीकडे त्या नीताच्या कानावर. तीच घाबरली न् म्हणाली 'सावूमामी, तुम्ही आधी मामांकडे बघा. ते कधीच अशा हाका मारत नाहीत.' मग मी स्काइप अर्धवट टाकलं आणि आले बेडरूममध्ये, तर काय? ह्यांचा चेहरा घामाने चिंब आणि हाताने छाती दाबताहेत. मी विचारलं – काय झालं? तर म्हणतात कसे – तुला आता वेळ मिळाला का? आता ह्यांना बरं नाही असं स्वप्न पडलं होतं का मला?''

''तेच तर म्हणतोय मी – आयुष्याच्या अशा कोणत्या अडनिड्या वळणावर आणून ठेवलंय मला तुझ्या ईश्वराने?''

''माझा ईश्वर तुमच्या पाठीशी आहे, म्हणून तर ठीक चाललंय तुमचं...''

''खरंय, नाही तर आजच्या काळात माझ्यासारख्या अश्रद्ध, नास्तिक माणसाचं तुमच्यासारख्या श्रद्धावान माणसांनी काय केलं असतं सांगता येत नाही.''

''झाले तुमचे टोमणे सुरू? सुचित्रा, तूच बघ कसे वागतात हे माझ्याशी...''

''मॅडम, चलते मी. सर, अठ्ठावीस डिसेंबरच्या सेमिनारला तुम्ही येणार नाही असं तुम्ही कळवलं असलं, तरी तुमचा पेपर तयार असला, तर आम्ही तो साऱ्या डेलिगेट्सना सर्क्युलेट करू असा पद्मनाभन सरांचा निरोप होता. मला कळवा काय ते...''

★ ★ ★

'माय डियर सुचित्रा,

पद्मनाभनला काय उत्तर द्यायचं हे मी तुझ्यावरच सोडतो. मला नाही वाटत माझ्या सध्याच्या अवस्थेत मी नवीन काही लिखाण करू शकेन म्हणून... पण माझ्या जुन्या लिखाणात ह्या सेमिनारसाठी काही रेलेव्हंट आहे असं वाटलं, तर दे त्याला पाठवून, पण ते पूर्वीचं आहे हे स्पष्ट कर; उगाच नंतर गोंधळ नकोत. तो बॅकग्राऊंड पेपर म्हणून सर्क्युलेट करायचा की माझ्या वतीने तू तो प्रेझेंट करायचा हेही त्यालाच ठरवू दे.

परवाच गुलजारसाहेबांची एक कविता वाचनात आली. तिच्यात ते म्हणतात –

*ये कैसी उम्र में आकर मिली हो तुम!*
*बहुत जी चाहता है फिर से बो दूँ अपनी आँखें*
*तुम्हारे ढेर सारे चेहरे उगाऊँ और*
*बुलाऊँ बारिशों को*
*बहुत जी है कि फुर्सत हो, तसब्बुर हो*
*तसब्बुर में थोड़ी बागवानी हो!*

पुढची कहाणी सगळी आपल्याला माहीत असलेलीच आहे. त्यांच्या-माझ्या गोष्टीत फरक एवढाच आहे, की त्यांना 'ती' आयुष्याच्या अगदी पुढच्या टप्प्यावर, खूप उशिराने भेटली. मला 'ती' भेटून बावीस वर्षं उलटून गेलीत. पण मूळ प्रश्न अजून तसाच आहे.

भेटायचं होतंच तर अशा अडनिड्या वळणावर का भेटलीस तू मला?

– सर'

'आदरणीय सर,

तुमच्या आदेशानुसार मी तुमचे जुने 'दप्तर' तपासून त्यांतला एक पेपर निवडला. बाबरी मशीद पडल्यावर लगेचच झालेल्या ICHR कॉन्फरन्समध्ये तुम्ही वाचलेला Re-Reading Babarnama : Some Reflections हा पेपर निवडून मी तो पद्मनाभन सरांकडे पाठवला. Writing and Rewriting of History: Role of Ideas and Ideologies ह्या सेमिनारच्या विषयाशी तो खूपच सुसंगत आहे. त्यावर झालेली चर्चाही लोकांच्या अजून स्मरणात आहे. ह्या पार्श्वभूमीवर मूळ पेपरचं पुनर्वाचन सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचं ठरू शकेल. इथे माझं काम संपलं. मी तो पेपर तुमच्या वतीने वाचण्याची जबाबदारी घेणार नाही. माझी ती पात्रता नाही. शिवाय मीही सेमिनारला जाणार नाही. तुझे सर कुठे आहेत? ह्या विविधार्थी प्रश्नाला उत्तरं देत बसण्याची माझी इच्छा नाही व मानसिक तयारीही.

होप यू अंडरस्टँड.
– सुचित्रा'

मेल वाचून 'आय व्हेरी वेल अंडरस्टँड इट् बेबी' असं म्हणालो आणि लगेच स्वतःची जीभ चावली. ह्या 'बेऽऽबी'वरून काय गदारोळ झाला होता! आता सुचित्राला किंवा कोणत्याही बाईला मी चुकूनही बेबी म्हणालो, तर स्वप्नातही मी जीभ चावेन ह्यात शंका नाही.

★ ★ ★

''पण तुम्ही असं कसं म्हणू शकता?''

''का? त्यात काय झालं? तू इतरांच्या दृष्टीने असशील a grown-up matured woman. पण माझ्यासाठी you are always a baby.''

''हे तर आणखीन भयानक आहे. सर, प्लीज थांबवा हे सारं. माझ्या मनातल्या तुमच्या इमेजला तडे जाऊ नयेत असं वाटत असेल तर ही बेबीची भाषा बंद करा.''

''अरे, पण काय चुकलं माझं? तू तुझा फेमिनिझम असा झेंड्यासारखा प्रत्येक क्षणी फडकावलाच पाहिजे का?''

''तर मग तुम्हीही ऐका. मी शक्य तितक्या शांतपणे तुम्हांला सांगायचा प्रयत्न करते, तो तुमच्याविषयी माझ्या मनात असणारा आदरभाव लक्षात ठेवून. पुढच्या वेळी मी इतक्या विनयाने बोलणार नाही. तर पहिली गोष्ट ही, की मी स्वतःला फेमिनिस्ट मानत नाही. मला त्या शब्दाची लाज वाटते म्हणून नाही, तर मला अभिप्रेत असलेल्या फेमिनिझमपर्यंत मी अजून पोहचले नाही, म्हणून. दुसरी गोष्ट, तुम्ही म्हणता तो फेमिनिझम जर माझा असेल, तर तो तितकाच तुमचाही असायला हवा. आपलं नातं १५ सेकंदांच्या ad filmमधलं नसेल, तर आपण विचारांच्या एकाच वेवलेंग्थवर आहोत असं मी मानते. मी तुमच्याहून वयाने, अनुभवाने खूप लहान आहे, आपल्या नात्याची सुरुवात गुरु-शिष्य म्हणून झाली, हेही खरं आहे. पण म्हणून तुम्ही मला बेबी म्हणावं? एखादा पुरुष समोरच्या स्त्रीला बेबी म्हणतो तेव्हा त्यामागे भयंकर patronizing attitude असतो. ह्या शब्दाला chauvinism चा वास येतो असं नाही तुम्हांला वाटत? तेही इतका वैचारिक प्रवास केल्यावर? अगदी माझ्यासोबत इतकी वर्षं घालवल्यावर?''

''सॉरी, मी खरंच इतक्या सीरीयसली विचार नव्हता केला ह्या शब्दाचा, त्यातून प्रकट होणाऱ्या अर्थ आणि भाव ह्यांच्या विविध छटांचा.''

''मग करा ना सर! संकल्पनांच्या बाबतीत काटेकोरपणाचा आग्रह धरणाऱ्या तुमच्यासारख्या माणसाने तर शब्दांच्या वापराबद्दल अधिकच दक्ष राहायला हवं.''

''ओके. मानतो मी हे सगळं. पण एक सांग, अगदी प्रेमाच्या क्षणी स्त्री व पुरुष परस्परांना बेबी म्हणतात, हे तुला मान्य आहे? तुझ्या पिढीकडूनच हे ऐकलं आहे मी.''

''सर, तुम्ही माझ्या पिढीचे नाही आहात. तुमची, किंवा माझी भाषाही ह्या पिढीची नाही. पण तुम्ही प्रेमाच्या आवेगात, जवळिकीच्या क्षणात असे काही म्हणाला असता तर मीही तुम्हाला तसा प्रतिसाद दिला असता. मला तर खूपदा वाटतं की खरं तर 'you' are a baby – a baby that always wants to be pampered. पण नका ना हा विषय काढू. ज्या गावाला जायचं नाही असं ठरवलंय, त्याची चर्चा तरी का करायची?

जाते मी...''

आणि ती गेली निघून. मग १५ दिवस फोन नाही, मेसेज नाही की मेलला उत्तर नाही. मी फोन केला तरी घेतला नाही. अखेरीस आली तीही न कळवता.

बाहेर आकाशात ढग दाटले होते, केव्हाही कोसळतील असं वाटत होतं. मीही माझं बाहेर जाणं रद्द करून पावसाच्या कोसळण्याची वाट पाहत बसलो होतो. तेवढ्यात ती आली. डोळ्यात श्रावणमेघ दाटलेले. काही बोलली नाही. फक्त 'सॉरी' लिहिलेला कागद माझ्या हातात ठेवला आणि निघाली. मला वाटलं – तिला जवळ घ्यावं, मांडीवर घेऊन थोपटावं, म्हणावं – You are just a kid, baby. तिच्या डोळ्यातून वाहणारे अश्रू ओठांनी टिपून घ्यावे आणि रात्रभर तिला आंदोळत, आंदोळत प्रेम करावं तिच्यावर. इतक्या वर्षांच्या अर्ध्यामुर्ध्या प्रेमातून तिच्या मनाला पडलेल्या गाठी-निरगाठी हळुवारपणे सोडवाव्या. एका रात्रीत तिला इतकं प्रेम द्यावं की ते आयुष्यभर तिला पुरू शकेल.

माझ्या डोळ्यात तिने ते सारं वाचलं. म्हणाली – 'मला जाऊ द्या सर. आता नाही गेले तर मग जाताच येणार नाही.'

ती झटकन गेली आणि दोनच मिनिटांत सावित्री आली. म्हणाली, 'सुचित्रा आली होती? आणि इतक्या लगेच गेलीही?' मी 'हु:' करून पुस्तक डोळ्यांसमोर धरलं.

सुचित्राच्या व माझ्या प्रसंगावधानाचं मला कितीतरी दिवस कौतुक वाटत राहिलं...

★ ★ ★

अशी कितीतरी भांडणं... त्या साऱ्यातून किती जवळ आलो आम्ही! आमचं पहिलंवहिलं भांडण तर माझ्या नेहमीच लक्षात राहील. नुकतीच आम्ही परस्परांजवळ आपल्याला काय वाटतं ह्याची कबुली दिली होती. म्हणजे माझ्याकडून धो धो प्रवाह अगदी सुरुवातीपासून वाहत होता, पण तिने आपली कवाडं बंद करून घेतल्यामुळे तिच्यापर्यंत तो पोहचला नव्हता, किंवा आधी आलेल्या असंख्य कटू अनुभवांमुळे ती आमच्या नात्याला कुठल्यातरी समाजमान्य चौकटीत बसवू पाहत होती. पण केव्हातरी ही कोंडी फुटली. तेव्हाच केव्हातरी मी तिला माझी डायरी वाचायला दिली. आमच्या पहिल्या भेटीचा प्रसंग ती वाचत होती. आश्चर्याने फुललेले तिचे डोळे, मध्येच जिवणीपाशी रेंगाळणारं किंचितसं हसू (खळखळून हसणं विसरून आता युगं उलटली होती), सेमिनारमध्ये बोलताना आमची नजरानजर झाली व मी सगळं काही विसरून पार भांबावून गेलो ह्या क्षणापाशी ती आली आणि तिचा श्वास फुलला, दृष्टी एकाग्र झाली. मी स्वतःला सावरलं इथपर्यंत आल्यावर ती खुदकन हसली. पण मग अचानक एका शब्दाशी

ती अडखळली, पुन्हा पुन्हा तिने तो शब्द वाचला आणि मग ती भडकली –

"What do you mean by distractingly beautiful?"

''अर्थ अगदी स्पष्ट आहे,'' मी उत्तरलो.

''म्हणजे तुमच्याही लेखी बाई म्हणजे एक distraction?''

''मी कोणत्याही बाईबद्दल ही कॉमेंट केलेली नाही. ही केवळ तुला दिलेली compliment आहे.''

"Compliment, my foot! म्हणजे तुम्ही आहात विश्वामित्र किंवा तत्सम कोणी ऋषी आणि मी तुमचा तपोभंग करणारी अप्सरा?''

''तपोभंग वगैरे सोडून दे, पण अप्सरा ही compliment आहे, एवढं तर मान्य करशील?''

...मी अजूनही मस्करीच्या मूडमध्ये होतो. मी केवढी मोठी चूक करतोय ह्याची मला कल्पनाच नव्हती.

''सर, तुम्ही माझ्या प्रेमात पडला त्या क्षणी तुम्हांला माझ्यात फक्त एक सुंदर बाईच दिसली? आणखी काहीच नाही? तुम्हांला मी इतकी सुंदर वाटले? मी तशी नसते तर तुम्ही माझ्या प्रेमात नसता पडला?''

''कम ऑन यार... एवढी सिरीयस होऊ नकोस. शेवटी प्रेम हे प्रेम असतं. त्याची अशी काटेकोर समीक्षा नाही करता येत. ते मनानं समजून घ्यायचं असतं.''

''तुम्हांला व तुमच्या प्रेमाला मनानं समजून घेत मी इथवर आलेय. इथे पोहोचण्यासाठी मी किती लांबचा प्रवास केलाय, काय काय सहन केलंय ह्याची कल्पना आहे तुम्हांला? नाही सर, मला तुम्ही 'सिरियस होऊ नकोस' असं नाहीच म्हणू शकत. मी ह्या नात्याकडे अतिशय गांभीर्याने बघते. कारण मी एकूण आयुष्याकडेच गांभीर्याने बघते. जरा मजेत त्याच्याकडे पाहावं इतकी 'मोहलत' मला त्याने दिलेली नाही. आणि हे नातं त्या आयुष्यातली अतिशय महत्त्वाची व मोलाची बाब आहे, असावी, असं मी मानते. तुम्हांला कळतंय का मी काय म्हणतेय ते?''

मी गप्पगार. मानेपर्यंत बर्फात पुरलेला.

''मी सुंदर आहे हे माहीत आहे मला. अगदी वीट येईपर्यंत लोकांनी मला हे ऐकवलं आहे – लहानपणापासून ते आतापर्यंत. पुरुषांनीच नाही तर बायकांनीही. कोणी प्रेमाने, कोणी मत्सराने. कोणी माझ्यापर्यंत पोहचण्याचा मार्ग म्हणून, तर कोणी बायकांशी वागण्याची पद्धत म्हणून. बायकांना म्हणे असं म्हटलं की गुदगुल्या होतात, त्यांचा इगो सुखावतो. मला नाही असं वाटत. कारण कळायला लागलं तेव्हापासून माझा हा रंग, ही त्वचा, हे नाकडोळे, हा बांधा ह्यांनी माझ्या व्यक्तिमत्त्वाची जागा व्यापून टाकली आहे. मी लहानपणापासून खूप चांगली विद्यार्थी होते. प्रत्येक गोष्ट मुळापासून समजून घेणं हा माझा ध्यास होता. मी कधीही पाठांतर केलं नाही. शाळा-कॉलेजातली, शहरातली वाचनालयं चाटून पुसून साफ केली. मला परीक्षांत यशही उत्तम मिळालं. पण त्याचं श्रेय कधी माझ्या बुद्धिमत्तेला, मेहनतीला मिळालं नाही. जणू 'ही आहे ना सुंदर, मग तिला मिळणारच चांगले मार्क्स', असाच सर्वांचा आविर्भाव असे. मी कधीही माझ्या दिसण्याचा वापर केला नाही – काही लाभ मिळविण्यासाठी नाही तसंच कोणावर छाप टाकण्यासाठीही नाही. कोणी माझ्यावर तसा आरोप करू नये म्हणून मी नेहमी घोळक्यापासून दूर असते. चार लोकांत मिसळत नाही. माझ्यातच मग्न असते. तुमच्या अध्यातमध्यात मी येत नाही. तरी माझ्यामुळे तुमचं लक्ष विचलित होतं. मग मी करायचं तरी काय?''

★ ★ ★

खरं होतं तिचं म्हणणं. ती आपल्या जागी ठाम होती, कामात व्यग्र होती; विचलित होत होती तिच्याभोवतालची माणसं. (मी एकटाच तसा नव्हतो, हेही लौकरच कळलं मला.) म्हैसूरच्या त्या मुक्कामातले तीन दिवस संपले. चौथ्या दिवशी सकाळीच निघायचं होतं. माझ्या सगळ्या भाषणांना ती आली होती. शांतपणे नोट्स घेत होती. पण भाषणानंतर माझ्याभोवती पडणाऱ्या गराड्यात ती नसायची. शेवटच्या भाषणानंतर सगळ्यांशी बोलून मी निघणार तेवढ्यात ती आली. माझ्या दोन भाषणांतली तीन महत्त्वाची विधानं तिने टिपली होती, त्यांचे संदर्भ तिला हवे होते. त्यातले दोन मी लगेच सांगितले. तिसरं माझ्या नुकत्याच येऊ घातलेल्या पुस्तकातलं होतं. माझ्या उत्तराने तिचे समाधान झालेलं दिसलं. जाता जाता थबकून ती म्हणाली –

''सर, तुमचा pregnant pauseचा मुद्दा महत्त्वाचा आहे. भारतात जागतिकीकरणाची आत्ता कुठे सुरुवात झाली आहे. त्यामुळे त्याच्या परिणामांविषयी बोलण्यात आपण घाई करत आहोत असं नाही वाटत तुम्हांला? हा पॉज अजून लांबवता नसता आला?''

इट वॉज अ डॉट बॉल! त्यानंतरही मी जेव्हा जेव्हा जागतिकीकरणावर बोललो, तेव्हा तेव्हा तिची कॉमेंट किती समर्पक होती ह्याचा प्रत्यय मला येत गेला. मी तिला तिचं नाव विचारलं –

''सुचित्रा, सुचित्रा वेदान्त. मी जयंत सरांच्या मार्गदर्शनात एम.फिल. करतेय. मार्चमध्ये थीसिस सबमिट करीन,'' ती म्हणाली.

''मग पीएच.डी. करणार ना?''

''काही ठरवलं नाही अजून,'' असं म्हणून ती निघून गेली.

रात्री जेवताना तिचा विषय निघाला. जयंत म्हणाला, 'एकदम वेगळी मुलगी आहे. विलक्षण बुद्धिमान, मेहनती. माझ्या आतापर्यंतच्या करियरमध्ये असा स्टुडंट मी पाहिला नव्हता. पण एकदम मनस्वी आहे. खरं तर पीएच.डी.चं निम्म्याहून अधिक काम तिने एम.फिल.मध्येच संपवलं आहे.

पण अजून ती पीएच.डी.चं नावही काढत नाही. तिच्या मनात काय आहे कळत नाही. खरं तर तिने पीएच.डी. करण्यात माझाच स्वार्थ आहे. असा स्टुडंट मिळायला भाग्य लागतं. आपल्या सोशल सायन्सेसची काय वाताहत होते आहे हे मी तुला सांगायला नको. तुझं बरं आहे. तुला काय, मुंबईसोबत कोलंबियाचे स्टुडंटही मिळतात...'

★ ★ ★

मध्यंतरी तीन चार वर्षं म्हैसूरला जाणं झालं नाही. पण सुचित्रा मात्र आठवत राहिली. कधी जागतिकीकरणावर बोलताना, कधी इपीडब्ल्यूत प्रकाशित झालेले तिचे (जयंतसह लिहिलेले) दोन शोधनिबंध वाचताना, तर कधी केव्हाही उगाचच... मी माझ्या अभ्यासिकेत काही वाचता वाचता थांबून एखाद्या मुद्द्याचा रवंथ करीत असे. चष्मा कपाळावर, पुस्तक छातीवर आणि मी माझ्या लाडक्या आरामखुर्चीत विसावलेला. अशा वेळी अचानक ती दिसे. म्हैसूरला दिसली तशी. स्वतःत मग्न तरी कुतूहलाने भारलेली तिची नजर. कधी वाटे ती दूर उभी राहून आपल्या सर्व खटाटोपाकडे बघते आहे मिस्कीलपणे. कधी असं करताना डुलकी लागली तर विचारतेय – 'प्रेग्नंट पॉज जरा जास्तच लांबला असं नाही वाटत तुम्हांला, सर?...'

मध्ये केव्हातरी एका कॉन्फरन्समध्ये जयंत भेटला. इपीडब्ल्यूतल्या पेपर्सबद्दल त्याचं अभिनंदन केलं तर म्हणाला, ''हे सारं तिचंच काम. मी दोन रेफरन्स जास्तीचे टाकणं आणि एडिट करणं ह्याशिवाय काही केलं नाही. दोन्ही पेपर्स चांगलेच गाजले.''

''तिचं पीएच.डी. कोठवर आलं?'' मी विचारलं.

''कसलं पीएच.डी. अन् कसलं काय? बाई गायब झाल्या त्या उगवल्याच नाहीत. आपली एमफिलची डिग्री घ्यायलाही ती आली नाही.''

''कुठे गेली?''

''कोणास ठाऊक! बहुधा लग्न करून कुठे गेली असावी.''

''पण ही पोरगी तर लग्न करून गायब होणाऱ्यातली नव्हती ना?''

''तुला म्हटलं नव्हतं मी – खूप मनस्वी मुलगी आहे, काय करेल सांगता येत नाही.''

''पण त्यामुळे आपल्या फील्डचं किती नुकसान झालं! एका चांगल्या रीसर्चरला आपण मुकलो.''

''अगदी खरं. चांगल्या नाही, उत्तम म्हण.''

नंतरही मला ती 'दिसत' राहिली. नितांत एकांताच्या क्षणी जाणवत राहिली. पण आता ती गप्प गप्प असायची. तिच्या ओठांवर मिस्कील हास्य नव्हतं. तिची नजर आणखी खोलवर बुडलेली असायची. सूर मारून तिच्या डोळ्यात शिरलो तरी तिचा पार लागणार नाही, असं वाटे. ती कुठेही असो, सुखात असो, एवढंच मला वाटत राही. (पक्का निरीश्वरवादी मी, तिच्यासाठी प्रार्थना करतोय की काय? अशी शंकाही माझ्या मनाला अनेकदा शिवून गेली होती.)

★ ★ ★

सोळा ऑगस्ट एकोणीससे अठ्ठ्याण्णव.

बँकेत गर्दी असणार हे माहीत होतं, पण जाणंही आवश्यक होतंच. न्यू जर्सीला साऊथ एशियन कॉन्फरन्स होती व त्याला जोडून मी तीन महिने अमेरिकेत इस्ट कोस्टवरच्या तीन विद्यापीठांत राहणार-फिरणार होतो. जवळच्या रुपयांचे डॉलर्स करून घ्यायला हवे होते. विद्यापीठाच्या कामासाठी फोर्टात आलो होतो. ते आटोपून जवळच्याच एका बँकेत शिरलो. चौकशीच्या काउंटरवर गर्दी होती. आपला नंबर केव्हा लागणार हे आजमावत होतो. तेवढ्यात त्याच रांगेत मला 'ती' दिसली.

सुचित्रा? नक्कीच. पण मन ते मानायला तयार नव्हतं. शिवाय हिच्या डोळ्यावर चष्मा होता आणि चेहऱ्यावरचे भाव आणखी गंभीर. आता ह्या वयात एखाद्या मुलीला तू 'तीच का?' असं विचारायला काय घाबरायचं? असा विचार करून मी तिच्याजवळ गेलो.

तिचं लक्ष नव्हतं. मी 'एक्स्क्यूज मी' म्हणताच भुवया उंचावून तिने माझ्याकडे पाहिलं.

ती सुचित्राच होती. त्यानंतर माझ्यासोबत जवळच्या इराण्याच्या हॉटेलात पंधरा मिनिटं चहासोबत मस्का-पाव खाताना ती भयंकर संकोचली होती. मोठ्या कष्टाने तिने तिचा फोन नंबर दिला. मला भेटून तिला आनंद झाला होता हे खरं, पण बरंच काही ती लपवू इच्छित होती व त्याबद्दल मी काही प्रश्न विचारेन म्हणून धास्तावली होती.

★ ★ ★

''सर, इतक्या वर्षांनी भेटल्यावर तुम्ही माझी प्रेमाने चौकशी केली, पण त्याबरोबर माझ्या प्रायव्हसीचा आदरही केला. त्यापूर्वीच्या पाच वर्षांबद्दल मी स्वतःहून सांगेपर्यंत तुम्ही मला कधीही त्याबद्दल छेडलं नाही. मला माझ्या कोशातून बाहेर काढायचा प्रयत्न केला, पण मला कानकोंडं वाटणार नाही, ह्याचीही काळजी घेतली. तीन वर्षांच्या मुलीला घेऊन मुंबईत नशीब आजमावायला आलेली मी एक एकल पालक, तरुण स्त्री. तुम्ही माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात. घर, कंदुलीची शाळा, सुरुवातीच्या काळात मला जॉब नसताना ट्युशन्स मिळवून देणं, नंतर लेक्चररच्या जागेसाठी अप्लाय करायला सांगणं... प्रत्येक वेळी तुम्ही होता म्हणून सारं काही, सोपं नसलं तरी, शक्य झालं. आता तर विद्यापीठातली नोकरी, माझ्या आवडत्या विषयातलं करियर, माझ्या लाडक्या कंदुलीवर तुम्ही धरलेली छत्रछाया... मी तर कल्पनाही केली नव्हती ह्या साऱ्या गोष्टींची!''

''आज काय माझा निरोप समारंभ आहे का?''

''काहीतरीच काय बोलता? तुम्हांला निरोप द्यायचा विचार

तरी माझ्या मनात येईल का?''

''मग आज भांडण न काढता एवढी तारीफ?''

''इतकी भांडते का हो मी तुमच्याशी? असेनही भांडत. दुसरं कोण आहे ज्याच्याशी मी भांडू शकेन? म्हणून साऱ्या जगाशी करायचं भांडण मी तुमच्याशी भांडून घेते. पण सर, तुम्ही कसे असे राहू शकता? मी कितीही भांडले तरी तुमचा आवाज कधी चढलेला मी ऐकला नाही. डिपार्टमेंट, कँपस, आपल्या विषयांच्या सोसायट्या, मंडळं – सगळीकडे तुमच्याशी खडूसपणे वागणाऱ्या लोकांशीही तुम्ही प्रेमाने वागता-बोलता. आता सावित्रीमॅडमशीही तुम्ही भांडत असाल असं मला वाटत नाही. जी काही भांडणं असतील ती सर्व एकतर्फीच असणार.''

''असं अजिबात नाही. कोणाच्याही बाबतीत मी सुरुवातीला बराच वेळ ऐकून घेतो, समजावून सांगतो. इन अ वे, आय गिव्ह द अदर पर्सन अ लाँग रोप टू हँग हिमसेल्फ ऑर हरसेल्फ. पण कडेलोट झाला तर मीही समोरच्याला चांगलंच सुनावतो. सावित्रीची तर गंमतच आहे. ती उत्तम गृहिणी आणि प्रेमळ आई आहे, हे खरं, पण त्यासोबतच ती किती भयंकर संशयी आणि हेकेखोर आहे हे तुला मी सांगायला नकोच. लग्नानंतर मी तिला कॉन्फरन्सला वगैरे सोबत घेऊन जायचो. पण मला लोकांना भेटण्यात, चर्चेत रस, तर तिला फक्त शॉपिंगमध्ये. शिवाय ती मला सतत कॉन्फरन्सला आलेल्या, माझ्याशी बोलणाऱ्या बायकांबद्दल विचारत बसे. उदाहरणार्थ, ती म्हणे, 'ती मॉव्ह कलरची शिफॉनची साडी नेसलेली बाई होती बघा, स्लीव्हलेस ब्लाऊजवाली, ती इतका वेळ तुम्हांला काय विचारत होती?' ह्यावर माझे प्रतिप्रश्न – 'कुठे? लेक्चर हॉलमध्ये की जेवताना?'

'लेक्चर हॉलमध्येच हो. तुमच्याशी जेवताना बोलत होती तिची साडी मरून कलरची होती. शिवाय ती फार वेळ बोलली नाही. सोबत तिचा नवरा की बॉयफ्रेंड होता. मी म्हणते आहे ती वेगळीच. तुमच्या लक्षात नाही असं बिलकुल दाखवू नका. तुम्हांला सारं काही व्यवस्थित लक्षात राहतं हे मला माहीत आहे.'

ह्यावर माझं उत्तर साधारण असं असायचं – 'माझ्या भाषणानंतर माझ्याशी सुमारे सात-आठ स्त्रिया बोलल्या. त्यातल्या तिघी जणी प्रत्येकी पाच मिनिटांहून जास्त वेळ बोलत होत्या. त्यांपैकी किती जणींचे नवरे, बॉयफ्रेंड्स इत्यादी आसपास आहेत ह्याची मला कल्पना नाही व मी तसं त्यांना विचारलंही नाही. एकीने मला विचारलं होतं, की भक्ती संप्रदायातल्या स्त्रियांच्या बंडखोरीबद्दल मला काय वाटतं? दुसरीला लिंगायत व महानुभाव चळवळी जातिअंताच्या दिशेने पुढे का गेल्या नाहीत ह्यावर माझं मत हवं होतं. तिसरीने मला विचारलं, की तुमची बायको तुमच्यावर सतत पाळत ठेवून का असते? तू ह्यांपैकी कोणाबद्दल बोलते आहेस?'''

''ग्रेऽऽट! मग काय झालं?''

''तिने माझ्यासोबत कॉन्फरन्सला येणं सोडलं. पण मग मला तिथून परतल्यावर तिला सविस्तर रिपोर्टिंग करावं लागे. किती बायका होत्या? त्यात तिच्या माहितीतल्या कोण कोण होत्या? किती जणी सुंदर होत्या? मी ग्रुपसोबत एखाद्या प्रेक्षणीय स्थळी गेलो असेन, तर माझ्याशेजारी कोण बसलं होतं?... मला वैताग यायचा ह्या प्रश्नांचा. पण चिडचिड केली किंवा उत्तरं दिली नाही तर बाईसाहेबांचा पारा आणखी चढायचा. मग ही सिच्युएशनही मी माझ्या पद्धतीने हॅन्डल करायला शिकलो. उदाहरणार्थ – 'सावू, परवाच्या कॉन्फरन्समध्ये एकूण २५३ डेलिगेट्स आले होते. १६३ पुरुष व ९० बायका. त्यांतल्या सुमारे ३० जणी आपला नवरा, बॉयफ्रेंड किंवा तत्सम पुरुष पात्रासोबत आल्या होत्या. बाकीच्यांना एकतर असं पात्र अजून भेटलं नसावं किंवा त्यांना त्याच्यासोबत जाण्यात इंटरेस्ट नसावा अशी माहिती मला माहीतगार सूत्रांकडून मिळाली.' असं म्हणताच ती एकदम चवताळलीच म्हणून समज. मग मी तिला तिच्या माहितीच्या चार-पाच बायकांची नावं घेऊन त्या तुझी चौकशी करत होत्या व तू नसल्यामुळे त्या किती बोअर झाल्या हे सांगत होत्या असं सांगत बसे. मग गाडी थोडी वळणावर येई.''

★ ★ ★

कौसानीला ऑल इंडिया सोशल सायन्सेस कॉन्फरन्स होती. अचानक त्या भागात बर्फाचं वादळ आल्यामुळे वाहतूक कोलमडली. बरेच डेलिगेट्स पोहचू शकले नाहीत. आम्ही मात्र आदल्या सकाळीच पोहोचल्यामुळे वाचलो.

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून तिथला सुप्रसिद्ध सूर्योदय पाहायला निघालो तेव्हा हॉटेलच्या लॉबीत आम्हां दोघांशिवाय इतर कोणीही नव्हतं. पहाटेचा गारवा, जवळजवळ निर्मनुष्य रस्ता. हातात हात केव्हा आले कळलंच नाही. शब्दांची गरज नव्हती, त्यांचा अडसरच झाला असता.

रस्ता छोटासा होता. केव्हा संपला ते कळलंच नाही. पॉइंटपाशी आलो, तेव्हा आमच्यासारख्या काही जोड्या उभ्या असलेल्या दिसल्या. एकमेकांना खेटून परस्परांच्या डोळ्यात पाहत आम्ही उभे राहिलो. हातात हात होतेच. हळूहळू सभोवतालची वर्दळ वाढत गेली. खाली दरीतून धुक्याचे लोट वर यायला लागले. आम्ही मंत्रमुग्ध होऊन समोर पाहू लागलो. अंधाराचं जाळं हळूहळू विरळ होत गेलं. क्षितिजाच्या भव्य रंगमंचावर एक स्वर्गीय नाट्य आकाराला येत होतं आणि आम्ही स्तिमित होऊन ते पाहत होतो, जगत होतो, भोगत होतो, परस्परांसोबत असण्याचं आणि त्या विराट सृष्टिनाट्याचे नशीबवान प्रेक्षक असल्याचं – अशी सारी सुखं एकाच वेळी भोगत होतो. आकाशाचे रंग कैकदा बदलले. धुक्याचा पडदा उचलला गेला आणि अचानक रत्नांच्या राशी ओतल्यासारखी झगमगीत हिमशिखरं दिसू लागली. विस्फारलेल्या पापण्या झुकण्यापूर्वीच धुक्याचा दुसरा पडदा पडला आणि ते दृश्य झाकोळून गेलं. कधी लागोपाठ असे पडदे उचलले जात आणि एकापाठोपाठ एक अशा कितीतरी शिखररांगा लखलखत झळाळत साकार होत. अशी अनेक दृश्यं डोळ्यात-मनात साठवत आम्ही हॉटेलवर परतलो. बाकीची मंडळी अजूनही उठली नव्हती. आम्ही ब्रेकफास्ट माझ्या रूमवरच मागवला.

''आज पहिल्यांदाच आपण एकमेकांच्या प्रेमात आहोत ह्याचा मनापासून आनंद झाला मला,'' सुचित्रा म्हणाली.

मी गप्प होतो.

''तुम्हांला माहीत आहे, तुम्ही माझ्यावर प्रेम करता ही गोष्ट स्वीकारायला माझं मन तयार नव्हतं. निदान हा माणूस तरी माझा मित्र म्हणून राहू दे, अशी प्रार्थना मी करत असे. माझ्या बाबतीत असं इतक्यांदा घडलंय... पुरुष माझ्या संपर्कात येतात. काही काळ मित्रासारखे वागतात. मग काय बिनसतं कोण जाणे! पण त्यांना 'मित्र' हे पद पुरेसं वाटत नाही. त्यांना प्रियकरच व्हायचं असतं. किंवा असंही असेल की आधीपासून ते माझ्या प्रेमात असतात. त्यांना मला ते सांगण्याची हिम्मत होत नसते. म्हणून माझ्या जवळ येण्यासाठी ते मित्र असल्याचं भासवतात व संधी मिळताच आपल्या प्रेमाची घोषणा करतात. मी मनात म्हणते – ये बंदा भी गया काम से! तुम्ही माझे एकमेव फ्रेंड, फिलॉसॉफर, गाइड होता व आहात. मला भीती होती तुम्हांला मी हरवून बसेन याची. आता नाही तसं वाटत...''

★ ★ ★

''सुचू, तुझं एकटेपण तू कसं पेलतेस? एकटेपण तरी ठीक; आपल्याला त्याच्यासोबत समझौता करता येतो. पण आता आपल्यासोबत कोणी आहे हे कळल्यावर त्याच्यापासून दूर राहणं किती कठीण असतं! आपलं असं अर्धंमुर्धं प्रेम, भेटूनही न भेटणं, कित्येक तास सोबत घालवूनही मनातले दोन शब्दही बोलता न येणं... कधी तू इतकी सुंदर दिसतेस, की तुझ्यावर सारं सारं कुर्बान करून टाकावं, तुझ्यावर प्रेमाचा वर्षाव करावा असं वाटतं. कधी कधी तू इतकी व्हल्नरेबल वाटतेस, की तुझ्याभोवती छातीचा कोट करून राहावं असं वाटतं आणि हे असं काही करता येत नाही म्हटल्यावर जिवाची इतकी तगमग होते... तू तर तरुण आहेस, माझ्यापेक्षा २२ वर्षांनी लहान. पुन्हा आयुष्य इतक्या गंभीरपणे घेणारी. काय होत असेल तुझं?''

''काऽऽही होत नाही. मी मजेत राहते. बघताय ना तुम्ही? तुम्ही भेटल्यावर तर आता आयुष्य गमतीने घ्यायचा प्रयत्नही करायला लागले आहे. आयुष्य काही अगदी बेइमान निघालं नाही. त्यानेच तर तुमची साथ दिली, तुम्ही इतक्या गोष्टी शिकवल्या. माझ्या आवडत्या विषयाकडे आयुष्यात पुन्हा वळता आलं, त्यात स्वतःची जागा निर्माण करता आली. बस झालं...''

''हे बघ, रोजच आपण स्वतःची अशी समजूत घालत असतो. तू म्हणतेस त्याबद्दल काही वाद नाही. जे काही मिळालं त्याबद्दल कृतज्ञता आहेच, पण जे नाही मिळालं, किंवा आपण जे प्रयत्नपूर्वक नाकारलं, त्याचं काय? शरीर-मनाला भाजून काढणारी तलखी तू अनुभवली नाहीस, असं म्हणू नकोस. मध्ये आपण उडिपीला इन्स्पेक्शनसाठी गेलो होतो. आपली सोय अगदी आजूबाजूच्या खोल्यांमध्ये केली होती. रात्री जेवल्यावर आपण लाउंजमध्ये कितीतरी वेळ बोलत बसलो होतो. कसल्या कसल्या आठवणी येत होत्या आपल्याला. मला आठवतंय, तेव्हाच तू पहिल्यांदा मला तुझ्या आणि गिरीशच्या सपशेल फसलेल्या लग्नाबद्दल सविस्तर सांगितलं होतंस. घरच्यांचं दडपण, इमोशनल ब्लॅकमेलिंग, कॅनडातला तो लांबच लांब हिवाळा, त्यात तुला आलेलं डिप्रेशन, मनाला स्पर्शही न करणारे शारीरिक संबंध, कंदुलीच्या जन्माच्या वेळी जाणवलेली असहायता व एकाकीपण, लग्न तोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतल्यावर माहेरच्यांनी फिरवलेली पाठ... आपल्याला त्या दिवशी एकमेकांना सोडवत नव्हतं. आपण दोघांनीही त्या रात्री आपापल्या खोलीचा दरवाजा आतून बंद केला नव्हता. रात्रभर तू जागी होतीस हे माहीत आहे मला...''

''हो ना, पण शेजारच्या खोलीत तुम्हीही जागे आहात, आपण दोघंही मनात आलं तर एकमेकांकडे जाऊ शकतो आणि परस्परांचा त्या त्या क्षणाचा जो काही निर्णय असेल त्याचा आपण दोघंही सन्मान करू, हा केवढा मोठा दिलासा होता माझ्यासाठी त्या रात्री व त्यानंतरही... तुम्ही जे आता म्हणाला, की तुम्हांला माझ्यावर कधी प्रेमाचा वर्षाव करावासा वाटतो, तर कधी मला खूप जपावंसं वाटतं, ते त्या त्या क्षणी पोहचलंय ना माझ्यापर्यंत! आणखी काय हवं? निदान मलातरी हे पुरेसं वाटतं. आणि तुम्ही समजता तितकी मी आता तरुण कुठे राहिलेय? ४७ पूर्ण झालीत, मेनोपॉजची चिन्हं दिसायला लागलीत. आता काही मी पूर्वीसारखी सुंदर दिसणार नाही. मग तुम्हांला आणखी कोणा distractingly beautiful मुलीला शोधावं लागेल!''

''शोधायला कशाला हवं? distractingly beautiful मुली स्वतःहून माझ्या वाटेवर, आय मीन माझ्या आयुष्यात येतात...''

''वाट पहा! मला तुमची real intentions कळायला पाच वर्षं जावी लागली. तोवर कोण कोणाच्या वाटेत पुन्हा पुन्हा येत होतं?''

''अरेरे, आता इतकी उमेदवारी करण्यासाठी शक्तीही उरली नाही!''

''शिवाय डोक्यावरचे केसही गेले! सर, तुम्ही खरंच पूर्वी, म्हणजे डोक्यावर भरपूर केस असताना, किती रुबाबदार दिसत होता! अगदी कोलंबियाच्या तुमच्या विद्यार्थिनी – जेनिफर, रमोला, सुझान – त्यासुद्धा मरायच्या तुमच्यावर त्या दिवसांत.''

''अच्छा? तूही माझ्या स्टुडंट्सचा बराच ट्रॅक ठेवलेला दिसतोय...''

''अर्थात! खास मॅडमनी ही जबाबदारी सोपवलीय माझ्यावर.''

''बाप रे! मग तुझ्यापासून आता सावध राहायला हवं. पण सावूने हा लोण्याचा गोळा ह्या मांजराच्या संरक्षणाखाली कसा काय ठेवला?''

''म्हणे लोण्याचा गोळा! अंगावर थोडंफार मांस असतं तर म्हणताही आलं असतं कुणाला बरं वाटावं म्हणून!''

''ठीक आहे, तुझ्या बाबतीत तर म्हणता येईल ना दुधावरची साय, गुलाबपाण्यात भिजलेली...''

''सर, आता बस झालं. तुमच्या प्रतिभेला बहर येण्यापूर्वी आपण उठू यात बरं. कंदुली आली असेल घरी. वाट पाहत असेल.''

''चला, कोणीतरी वाट पाहतंय तुझी.''

''तुमचं घरही तुमची वाट पाहत असतं सर. जरा संवाद तर करून पहा.''

''तुला वाटत नाही राणी, की मी संवादाचे प्रयत्न केले असतील म्हणून? कारण नसताना गिल्ट घेऊन जरा जास्तच केले मी प्रयत्न. जाऊ दे झालं. जपून जा, बाय!''

''बाय सर, स्वतःला सांभाळा.''

★ ★ ★

सुचित्रा कशी सांभाळू शकते स्वतःला आणि मी का नाही? मी पुरुष आहे म्हणून, म्हातारपण घेरू लागलं आहे म्हणून, ती 'सुचित्रा' आहे आणि मी 'अरविंद' आहे म्हणून? मीही गुंतवतो माझं मन. रमतो मुलगा-सून-नातू ह्यांच्या प्रेमात-प्रश्नांत, जपतो बायकोला, बघतो तिचं दुखणं-खुपणं (दुखण्यावर उपाय करता येतात मला, खुपण्यावर नाही), अजूनही वाचतो अफाट, लिहितो, फिरतो, भाषणं देतो, जगभरातल्या विद्वानांशी संपर्क ठेवतो. ऐकतो गाणी, करतो पांचट विनोद. पण तरीही आतून ओली जखम चिघळत राहते. माझ्या प्रश्नांना नाही मिळत तर्कसंगत उत्तरं. मग मी हताश होऊन जातो. सगळं सगळं फोल वाटतं. प्रचंड गिल्टी वाटत राहतं आतून, सावित्रीबद्दल नाही, तर सुचित्राबद्दल.

मला माहीत आहे मी अन्याय नाही केला सावित्रीवर. ती जरी कोणाच्या प्रेमात पडली असती, तरी मी घेतलं असतं ते समजून, कारण मुळात कोणी कोणाच्या प्रेमात कधी पडावं ह्याला कोणताच नियम कधीच लागू नव्हता. अगदी मानवी आहे, नैसर्गिक आहे हे असं वाटणं. अनादी अनंत काळापासून स्त्री-पुरुष असे प्रेमात पडत आले आहेत, ह्या मधु तेजाबाची चव चाखत आले आहेत, हे जाणतो मी. बहुपतीत्व, बहुपत्नीत्व, एक पती-पत्नीत्व, टोळ्या, आधुनिकोत्तर समाज – सर्वत्र हे घडत आलं आहे, घडत राहणार आहे, हे मी जाणतो माझ्या अध्ययनातून.

सावित्री हे समजू शकत नाही. तिची वाढ वेगळ्या प्रकारे झाली आहे व तिने त्याहून वेगळं काही आकळण्याचा प्रयत्नही केला नाही. माझी त्याबद्दल तक्रार नाही. वाईट वाटतं ते फक्त सुचित्राबद्दल.

'अशा अडनिड्या वळणावर तू का आलीस माझ्या आयुष्यात?' असं मी तिला विचारतो तेव्हा खरं तर मला हे स्वतःला विचारायचं असतं, की 'तुला होती ना ही अक्कल? होतास ना तू वयाने, ज्ञानाने, अनुभवाने मोठा? मग का नेलंस तू स्वतःला त्या वळणावर जिथे ही तरुण पोर भेटणार होती? का केलेस प्रयत्न तिच्याशी संपर्क ठेवण्याचे, वाढवण्याचे? तुला तिचं भलंच करायचं होतं, तर राहायचं होतं तिच्यापासून सुरक्षित, आदरणीय अंतरावर. तिलाही भेटलाच असता कोणीतरी तिच्यावर तुझ्याइतकंच किंवा तुझ्याहून अधिक प्रेम करणारा. का बांधून ठेवलंस तिला अशा नात्यात ज्याला तसा काहीच अर्थ नाही?

किंवा असंही वाटतं, कशाला ह्या काळात, ह्या समाजात जन्माला आलो आपण दोघं? युरोप, अमेरिकेत असतो (किंवा तिथे गेलो) तर कोणालाच गैर वाटणार नाही आमचं नातं. अगदी भारतात, ह्या महाराष्ट्रात राहत असतो कुठल्या तरी आधीच्या शतकात – गाथा सप्तशतीच्या काळात, तरी कोणी नाकं मुरडली नसती आमच्या नात्याला. हा चोरटेपणा, हा अपराधगंड नसता आला आमच्या वाट्याला.

★ ★ ★

''किंवा समजा असं झालं असतं, की आपण ह्या वळणाऐवजी एरवी कोठेतरी भेटलो असतो, तर?''

''सर, आपण पहिल्यांदा भेटलो तेव्हा तुम्ही होता ४७चे व मी होते पंचविशीतली. तुमच्या तरुणपणी भेटलो असतो, म्हणजे तुमच्या पंचविशीत, तर मी तेव्हा कुठे चाला-बोलायला लागले होते! अगदी पस्तिशीत म्हटलं तरी माझं तेव्हाचं वय होतं १३ वर्षं. आणि अगदी आत्ता भेटलो असतो तर आणखीनच कठीण झालं असतं असं नाही वाटत तुम्हांला?... कसलं दुःख आहे तुम्हांला, मनासोबत शरीराला नेता आलं नाही, ह्याचं? देहाच्या पडावावर आपण विसावलो होतो काही काळ. खूप शांत, तृप्त, निवांत वाटलं होतं आपल्याला! पण त्या वाटेने पुढे जायचं नाही हेही आपणच ठरवलं होतं ना? त्या निर्णयाचा पश्चात्ताप होतोय? की आपण त्या निर्णयाचा आता पुनर्विचार केला तरी शरीरमनात ती असोशी उरली नाही ह्याची खंत वाटतेय तुम्हांला? ....तुम्ही मला मागे कधीतरी जी. ए. कुलकर्णींच्या एका कथेबद्दल सांगितलं होतं. तुम्ही म्हणाला होता की त्यांच्या लिखाणातली नियतिशरणता तुम्हांला पटत नाही. पण त्यांच्या काही कथा अनुभव म्हणून, प्रचिती म्हणून (हा तुमचाच शब्द हं!) मनाला भिडतात, त्यांतली ही एक. ह्या कथेत एक वाटसरू चालत चालत एका चौरस्त्यावर येतो. त्यातला एक रस्ता पकडून पुढे जातो. त्याच्या अखेरीस त्याच्या वाट्याला जे काही येतं, ते त्याला पटत नाही. समजा तो त्या रस्त्याने गेला नसता आणि त्याने दुसरा रस्ता धरला असता तरी अखेरीस तो तिथेच पोहचला असता जिथे तो आता आहे, अशी काहीशी ती गोष्ट होती. मलाही हेच वाटतं, की ह्या नाही, तरी त्या वळणावर आपण भेटणारच होतो, म्हणून भेटलो.

''हा नियतीचा संकेत वगैरे नाही. मी नशीब वगैरे मानत नाही, हे तुम्हांला माहीत आहे. आतापर्यंत माझ्या आयुष्यात जे काही घडलं ते कुठेतरी माझ्याच संमतीने घडलं असेल असं मी मानते. माझी संमती नसेल त्या गोष्टीला, तर ती रोखण्यासाठी पुरेसं सामर्थ्य नसेल माझ्यात. पण ते तसं का घडलं, माझ्याच बाबतीत का घडलं असा आकांत मी करणार नाही. माणसं आणि नातेसंबंध आपल्यावर येऊन आदळत असतात. आपल्याला प्रत्येक वेळी निवड नाही करता येत – मग ते नातं रक्ताचं असेल, नोकरी-व्यवसायातलं असेल, लग्नासोबत आलेलं असेल किंवा निखालस मैत्रीचं असेल. आपण फक्त त्या नात्यांना आपल्या पद्धतीने

आकार देण्याचा प्रयत्न करू शकतो. अर्थात, ते दोघांचं असल्यामुळे दोघांनी तसं ठरवल्याशिवाय आपल्याला तसं करता येत नाही. आपण त्यात आपल्या बाजूने प्रामाणिक असणं, निखळ असणं, खुलं असणं एवढंच करू शकतो. एवढं करूनही त्या नात्याचं काय होतं, समोरची व्यक्ती, समाज हे त्याकडे कसे बघतात हेही आपण ठरवू शकत नाही. समाजाचे नॉर्म्स आपण ठरवून बदलू शकत नाही. ते पाळायचे की नाही, कितपत पाळायचे हे निर्णय मात्र आपण घेऊ शकतो.

''...सर, तुम्हांला पडलेला प्रश्न मलाही खूपदा पडतो. पूर्वी अनेकदा मी बेसावध असताना तो माझी वाट अडवायचा. मीही बेचैन व्हायचे तुमच्यासारखी. सतत एक ओझं असायचं मनावर. कशाचं ते कळत नव्हतं. पण ते अचानक बदललं.

''त्याला कारण ठरली माझी शाल्मली. तिला लहानपणापासून लाडाने कंदुली म्हणत होते. त्यामुळे ती मोठी झाली हे लक्षातच आलं नव्हतं माझ्या. ती लॉ करायला दिल्लीला गेली. सुटीत आली की लाड करून घ्यायची. फोनवरून एवढ्या तेवढ्या गोष्टी विचारायची. त्यामुळे मीही बेसावधच होते. आत्ता कुठे ती वीस वर्षांची होतेय. ह्या वेळी ती घरी आली तेव्हा म्हणाली – 'अम्मा, तुझ्याशी काहीतरी बोलायचं आहे.'

''मला वाटलं पोरगी प्रेमात पडली वाटतं. मी म्हणाले – 'बोल ना.'

''ती म्हणाली – 'नाही, मी नाही बोलणार. बोलायचं तू आहेस. मी फक्त तुला काही विचारणार आणि तू खरं खरं सांगायचं, लपवायचं नाही.'

''मी म्हटलं – 'विचार ना, तुझ्यापासून काय लपवणार मी?'

''तिने मला काय विचारलं असेल? म्हणाली – 'अम्मा, तुझं प्रेम आहे अरविंद सरांवर?'

''आणि मी क्षणात उत्तरले – 'हो!'

'आणि त्यांचं?'

'त्यांचंही आहे माझ्यावर प्रेम', बोलताना जराही संकोचले नाही मी.

'मला वाटलंच होतं, ही इज सच अ वंडरफुल पर्सन. यू आर व्हेरी लकी अम्मा..'

'का ग? आणि हे सारं आता कशाला विचारलंस?'

'अग, अगदी लहानपणापासून मला हा प्रश्न पडला होता. कधी कधी मैत्रिणीही विचारायच्या, कधी त्यांच्या आया खवचटपणे आडून आडून विचारायच्या. त्यांना कसं तोंड द्यायचं हे मी स्वतःच शिकले होते, कधी तुझ्यापर्यंत येऊ दिलं नाही मी ते. तू मला कधी गिरीशपासून तोडलं नाहीस. तोही भारतात आला की मला भेटून जायचा, कधी फोनही करायचा. माझे लाडही केले त्याने. पण त्याला कधी अप्पा किंवा पप्पा म्हणावंसं वाटलं नाही मला. नंतर नंतर तोही त्याच्या नव्या संसारात, नव्या मुलांमध्ये रमला. त्याचं फारसं दुःखही झालं नाही मला. मी अरविंद सरांना सरच म्हटलं, पण माझ्या मनात वडिलांची जी प्रतिमा आहे ती त्यांचीच आहे.'

'पण आता कसं काय विचारलंस?'

'मी आता थर्ड इयरला आहे. मला खूप प्रश्न पडतात रिलेशनशिपबद्दल. खूप कन्फ्युजन असतं डोक्यात. माझ्या आसपासचे सारे जण कन्फ्युज्ड आहेत. आमची अख्खी जनरेशनच तशी असेल बहुतेक.'

'काही वाईट नाही. अंधविश्वासू असण्यापेक्षा कन्फ्युज्ड असणं बरं. निदान तुम्ही विचार करत आहात, कोणत्याही गोष्टीवर उगाचच विश्वास ठेवत नाहीत, बाबा वाक्यं प्रमाणं मानत नाही ह्याचं द्योतक आहे ते,' मी तिला म्हणाले.

'मी स्वतःला विचारते – मी कोण आहे? माझ्या जवळचे, आसपासचे लोक कोण आहेत? काय नातं आहे त्यांचं माझ्याशी, एकमेकांशी? हे सारे प्रश्न मला सतावतात. तू इतक्या मोकळेपणाने माझ्याशी बोलतेस, हीच तर ताकद आहे माझी. तुला एक सांगू? म्हणजे तसं काही सांगण्याचा अधिकार नाही माझा. मी लहान आहे अजून आणि तुम्ही सगळा मागचा-पुढचा विचार करून ठरवल्या असतील आपल्या नात्याच्या सीमारेषा. पण तरीही सांगते – तुम्हा दोघांना कधी आपलं नातं जाहीर करावंसं वाटलं तर नक्की करा. मी तुमच्या सोबत आहे.'

''गुणाचं लेकरू माझं. तिचं एवढंसं बोलणं मला किती ताकद देऊन गेलं...''

''म्हणजे तू असं म्हणते आहेस का, की आपण आता आपलं खरंखुरं नातं जगजाहीर करावं? आणि माझ्यात तेवढी हिम्मत नसेल तर?''

''अरविंद, आता तुम्ही माझे सर नाही, फक्त प्रियकर आहात. समजून घ्या मला काय म्हणायचं आहे ते. माझा असा आग्रह नाही की आपलं नातं आपण जाहीर करावं. तुमच्यावरची बंधनं मला माहीत आहेत. मी फक्त माझा अनुभव शेअर करत होते तुमच्यासोबत. मी किती भित्री, संकोची, जगाची, इतर लोकांची पर्वा करणारी होते व अजूनही आहे हे तुम्हांला चांगलंच माहीत आहे. कंदुलीला आपल्याबद्दल काय वाटेल, ह्याचं माझ्यावर प्रचंड दडपण होतं. खूपदा तर ती घरी येण्याची वेळ झाली असली तर तुम्ही अगदी माझ्या कामासाठी माझ्याकडे आले असतानाही मी तुम्हांला 'जा' म्हणायचे. तुम्हांला आठवतं ना हे सारं? त्याच माझ्या लाडक्या मुलीशी आपल्या नात्याबद्दल निःसंकोचपणे बोलण्याची ताकद मला कुठून मिळाली हे मला माहीत नाही. पण ते सांगितल्यावर मला विलक्षण बरं वाटलं. I felt empowered. तिलाही हे नातं मान्य झालं ही आनंदाची गोष्ट, पण तसं झालं नसतं तरी मला अपराधी वाटलं नसतं.


''मला वाटतं की खुलेपणात एक ताकद आहे आणि मला ती जाणवली. तुम्ही तुमच्या एखाद्या मित्राशी, किंवा तुमच्या मुलाशी – विशूशी – बोललात तर तुम्हांलाही बरं वाटेल कदाचित....प्रत्येकाचं सत्य वेगळं असतं आणि प्रत्येकाला ते

शोधावं लागतं हे तुमचं म्हणणं मला मान्य आहे आणि म्हणून माझा काहीच आग्रह नाही. छातीतून निघणाऱ्या जीवघेण्या वेदनेवर किंवा इसीजीच्या नागमोडी रेषांवर स्वार होऊन जेव्हा तो प्रश्न तुमच्यासमोर येईल, तेव्हा त्याला काय उत्तर द्यायचं हे तुमचं तुम्हांलाच ठरवावं लागेल. मला आडवाटेला गाठून जेव्हा हा प्रश्न माझी जगण्याची वाट अडवेल, तेव्हा त्याला काय उत्तर द्यायचं हे मात्र आता मला कळलं आहे, एवढंच सांगते.


''आयुष्याच्या अशा अडनिड्या वळणावर आपण का भेटलो एकमेकांना?' असं मला कोणी विचारलं तर मी सांगेन, की आतापर्यंत माझ्या आयुष्यात माझ्या हातून जे काही चांगलं, खरंखुरं, निखळ असं घडलं असेल, त्याचं बक्षीस, जे मला ह्याच जन्मात मिळायला हवं (कारण पुनर्जन्माची कल्पना कितीही रोमँटिक असली, तरी तिच्यावर माझा विश्वास नाही) ते मला प्रेमाच्या रूपाने मिळायला हवं होतं, म्हणून आयुष्याच्या ह्या अडनिड्या नव्हे तर अतिशय सुंदर वळणावर मला अरविंद भेटले, आम्ही एकमेकांचे झालो व तसे होऊनही मुक्त राहिलो आणि हातात हात घेऊन चालत राहिलो इथवर. आयुष्याच्या, मृत्यूच्या, मॅडमच्या, तुमच्या – कोणाच्याही डोळ्याला डोळा भिडवून हे सांगायला मला भीती किंवा संकोच नाही वाटणार.

''तुम्हांला एकांताच्या गुहेत जाऊन बसायचं असेल तर जरूर बसा. पण माझ्या अस्तित्वाशिवाय तुमच्या एकांताला अर्थ नाही, हेही ध्यानात ठेवा. तुम्हांला नेमकी कशाची भीती वाटते हे शोधा. कारण आपल्याला अवघड वाटणाऱ्या उत्तरापर्यंत इतर लोक सहजच पोहचले असतात. स्वतःशी संवाद साधण्यासाठी थोडा अवकाश हवा असेल तुम्हांला, तर तो अर्थपूर्ण अवकाश – pregnant pause – तुम्ही अवश्य घ्या. अडनिड्या वळणाविषयीचा तुम्हांला अवघड वाटणारा प्रश्न बाहेरून न येता तुमच्याच काळजातून येतो आहे आणि त्याला उत्तरही तिथूनच मिळणार आहे, हे मी तुम्हांला सांगायला हवं अरविंद? मी वाट पाहतेय पुढच्या वळणावर तुमची. बाय!!''

*(ऑगस्ट २०१७)*




*जुलै २००८*
*(चित्रकार दत्तात्रय पाडेकर)*




*जून २०१०, 'गुळाचा गणपती' चित्रपटात पु. ल. देशपांडे.*
*त्यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त*
*(चित्रकार मनोजकुमार सकळे)*

# स्पर्श

**श्रीरंग विष्णु जोशी**

“वैभवीचा गोरापान, गुबगुबीत हात टेबलावर विसावला होता. तिची निमुळती बोटे गुलाबी होती. तिच्या बोटांनी माधवरावांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्यातील कॉलेजमधील मुलाने तिच्या हातावर आपला ओथंबून आलेला हात टेकवला. एका हातातील ऊब व थरार दुसऱ्या हाताला जाणवला न जाणवला तोच वैभवीने आपला हात झटकन काढून घेतला.”

सरत्या मे महिन्यातली वळिवाची पहिली सर. झाडे, छपरेच नव्हे, तर अवघा आसमंत सुस्नात झालेला. तृप्त वातावरणातून दरवळणारे मातीचे अत्तर. इथेतिथे साचलेल्या पाण्यामधून थरथरणारे रेशमी ऊन. टेलिफोनच्या खांबावरील वायरवर एका ओळीत बसलेल्या चिमण्या मैत्रिणी. पदरावरचे विविध रंग मोजता यावेत असे बिलोरी इंद्रधनुष्याचे आरस्पानी सप्तरंग. वायुलहरीने वेलींच्या पानापानामधून अवचित सांडणारा मोतियाचा चुरा.

माधवरावांना घरात बसवेना. निनादत राहणारी चर्चमधील घंटा आणि नंतरचे प्रार्थनेचे घनगंभीर सूर. त्यांनी टीव्ही बंद केला आणि ते बागेत आले. त्यांचे मन मोहरले. पन्नाशीची झुळूकदेखील ते विसरले. त्यांचे गेटकडे लक्ष गेले.

बाहेर एक मुलगी उभी होती.

काळसर मखमलीची तंग तुमान, पांढराशुभ्र कुर्ता, स्वप्निल उत्तरीय. हसरा चेहरा आणि पाठ झाकून टाकणारे घनदाट केशधन.

माधवराव गेट जवळ गेले. त्यांच्या मनात आले; पंधरा सोळा वर्षांची असेल. सुदृढ. उंच. विलक्षण पाणीदार टपोरे डोळे.

गेटवरील नावाच्या पाटीकडे बघत ती किणकिणली, “आपणच ना?”

“होय, या देहाला माधवराव सरपोतदार म्हणतात –”

मधेच ते थबकले... किती गहिरे भावपूर्ण डोळे!

“मी वैभवी खानोलकर. कडी काढल्याशिवाय आत कशी येणार मी?”

माधवरावांना हसू आले. मिस्किल आणि लबाड दिसते पोर! त्यांचाही मूड जरा हलकाफुलका बनला.

ते म्हणाले, “तुझ्या मनातलं मला कसं कळणार? त्यात तू गेटजवळ पाठमोरी उभी होतीस!” त्यांच्या मनात वाऱ्यावर उडणारे तिचे घनगच्च केस. “विन्मुख मुलगी सन्मुख झाल्याखेरीज ती आपल्याकडेच येणार असावी हे कसे कळावे?”

“तुमच्याकडेच आलेय. एक स्कूटरवाला भर्रकन गेला जवळून, म्हणून वळले मी. हे टपोरे हिरो महाइब्लिस! बरं. बाबांचा फोन आला होता का?”

“ओहो, चिंतामणराव खानोलकरांचा ना? डोंबिवली बँकेचे मॅनेजर. बरोबर. त्यांची तू मुलगी का!”

“तेच. सध्या नोटाबंदीमुळे बाबांना घडीची फुरसत नाही. अहो, त्यांच्या स्वप्नातदेखील माणसांचा क्यूच! खरं तर तेच येणार होते माझ्याबरोबर.”

दोघेही व्हरांड्यात आले. व्हरांड्यात टेबलासमोर एक आणि बाजूला एक अशा दोन खुर्च्या. भिंतीला काचेचे पुस्तकांचे कपाट सिलिंगपर्यंत पोचलेले.

‘बैस वैभवी, आलोच; इथेच बसू. प्रकाश उदंड आहे इथं. आलोच हं.”

माधवराव आत गेले. वैभवीने सुरेख रंगविलेला व्हरांडा पाहून घेतला. डाव्या बाजूला भिंतीत सर्व्हिस विंडो. चहा, कॉफी वगैरे किचनमधून देण्यासाठीच्या संपर्क-गवाक्षाची कल्पना तिला विशेष आवडली. पश्चिमेकडील ग्रिलवर जाड काचेचे भक्कम तावदान. अगदी बागेत बसल्यासारखा फील येतोय.

माधवराव चष्मा चढवून आले. स्मित करीत म्हणाले, “वैभवी, बोल आता. कितवीत आहेस तू?”

“दहावीत आहे मी. सुंदर इंग्रजी कसं लिहायचं हे शिकायला तुमच्याकडे आलेय.”

“कोणत्या क्लासला जातेस सध्या?”

“द शेक्सपीयर इंग्लिश क्लासेस मी जॉइन केलाय. पण मला नॉनअकॅडॅमिक इंग्रजी शिकायचं आहे.”

“पण ते मी कसे शिकविणार?”

“तुम्हीच शिकवाल, अंकल. त्यामुळेच तर तुमचा मुलगा बोर्डात नामवंतांच्या यादीत आला असं म्हणत होते बाबा.”

“अग, नामवंत विद्यार्थ्यांची यादी आता बंद झालीय ना? त्याने म्हणे, इतरांच्या भावना दुखवतात!” माधवराव हसत म्हणाले.

“तुम्ही तर कमाल करता हं, काका! अहो, प्रसिद्धी बंद झाली तरी सिद्धी उरतेच ना? नथिंग डुइंग! कधीपासून येऊ तेवढं सांगा.”

...लाडिक, भ्रामक, वेल्हाळ आविर्भाव. प्रणयचंचल भ्रूलीलाच अधिक.

''मी काय करावं अशी अपेक्षा आहे तुझी?'' माधवराव गंभीर होत म्हणाले.

''इंग्रजीमधील वेगवेगळ्या फ्रेजिस आणि त्यांचा वापर कसा करावा हे शिकायचंय मला. त्याने निबंध चांगला लिहिता येईल का हो? फ्रेज हा भाषेचा अविभाज्य घटक असतो असं आमचे इंग्रजीचे सर म्हणतात.''

''बरोबर, फ्रेजिसच्या वापरामुळे वाक्यरचना सुरेख व्हायला मदत होते.''

चहाचा कप वैभवीसमोर ठेवत काकू म्हणाल्या, ''अग, आमच्या भिशीमंडळात खानोलकरवहिनी आहेत ना, त्यांची तू मुलगी का?''

''कसं ओळखलंत हो?''

''अगदी तुझ्या वयातील खानोलकरवहिनीसारखीच असावीस बघ. तू त्यांची प्रतिमाच वाटतेस; आणि प्रतिमा नेहमीच प्रत्यक्षाहून अधिक उत्कट असते!''

''काय हो, तुम्हीपण काकू! मात्र चहा सुरेख झालाय हो!''

''इतकी फिटंफाट नको हा करायला.'' असे म्हणत हसत हसत काकू किचनकडे वळल्या.

बशीतला शेवटचा घोट पीत असताना वैभवीचे डोळे माधवरावांकडे वळले. त्यांची नजर तिच्यावर खिळली होती. ती तशीच ठेवून ते म्हणाले, ''तुमचा संवाद म्हणजे खूप जुनी ओळख असल्यासारखा.''

''आम्हा बायकांचं असंच असतं हो काका!'' वैभवी हसत म्हणाली.

रिकामा कप आत ठेवायला ती वळली. जणू आपली सावली ठेवूनच ती गेलीय असे समजून ते पाहत राहिले.

ती पुन्हा आपल्या जागी येऊन बसत म्हणाली, ''दोन मिनिटांत माझ्यात कोणता बदल झालाय, ओळखाल?''

''त्यात काय अवघड आहे? तिनं तुला सोनचाफ्याचं फूल दिलं आणि तू ते तुझ्या केसात माळलंस!''

''पन्नास गुण फक्त! काकूंनी सोनचाफा माझ्या अगदी मानेवर केसात खोचलाय. मी मानेच्या जरा उजव्या बाजूला तो माळला असता.'' मान थोडी नकळत कलती करीत वैभवी म्हणाली.

...सूर्यफूलदेखील असेच नकळत वळत असावे असे माधवरावांना वाटून गेले. खरंच वैभवीचे चालणे राजहंसीचे आहे, बोलण्यात सतारीचा झंकार आहे, तिच्या साध्या पाहण्यातदेखील उमलत्या फुलाचा डौल आहे. तिचे एकूण असणे म्हणजेच मध्यमातील कविता आहे.

बाहेर ऊन अधिकच रेशमी झाले होते. ते थोडे हलतही होते. टेलिफोनच्या तारेवरून खाली उतरलेल्या चिमण्या रस्त्यात साठलेल्या पाण्यात मनसोक्त खेळत होत्या. अजूनही इंद्रधनुष्यातील सप्तरंग आहे तसेच होते.

''वैभवी, जूनमधे तुझी शाळा सुरू होईल. वेळापत्रक निश्चित होईल. मगच आपणाला तपशील ठरविता येईल. पण साधारणपणे एवढे लक्षात ठेव. शनिवार आणि रविवार हे दोन दिवस तास दीड तास आपण इंग्रजी घेऊ. तीनचार महिने तुला यावे लागेल. तोवर एक लक्षात ठेव. इंग्रजीतले किमान पाच नवे शब्द तुला दररोज पाठ करावे लागतील. आता एवढंच सांग. फ्रेज म्हणजे काय?''

वैभवी सावध होऊन बसली. ती संथपणे म्हणाली, ''जनरली, अ फ्रेज ईज अ ग्रुप ऑफ वर्ड्स विच डझ नॉट मेक कंप्लिट सेन्स.''

''अहो, टीव्ही कशाला लावताय?'' काकू किचनमधून म्हणाल्या.

''टीव्ही बंदच आहे हो.''

काकू बाहेर येत म्हणाल्या, ''फसवलेस ग वैभवी. छानच आहेत तुझे उच्चार. ऱ्हिदम आहे हो बोलण्यात!''

''काहीतरीच हं काकू.''

मग वैभवी उठली. ईषत् थबकली आणि निघून गेली.

बाहेर इंद्रधनुष्य अजून उमललेलेच होते. त्या रंगीबेरंगी कमानीखालून पांढरे शुभ्र बगळे झेपावत होते. त्यांचे फॉर्मेशन लक्ष वेधून घेत होते. वैभवीला वाटले, ते कुठे चालले असावेत? त्यांचे झाड चुकत नाही का? उशीर झालेला एखादा बगळा अंधार पडल्यावर चांदण्यांच्या धूसर प्रकाशात कसा जात असेल? त्याच्या घरी कोण असेल? घरटे नसेल तर त्याच फांदीवर त्याला झोपायचे असेल का? झोपेत त्यालाही स्वप्न पडत असेल? जुन्या घराचे, गावाचे, आईचे की वडिलांचे? इतक्यात तिला हाक ऐकू आली.

''इकडे कुठे वैभवी?'' समोर एक जुनी मैत्रीण उभी.

''सरपोतदारकाकांकडे आले होते, इंग्रजीसाठी.''

''ग्रेट आहेस. त्यांचा मुलगा बोर्डात आला होता.''

मग दोघीही विरुद्ध दिशेने निघून गेल्या.

वैभवीच्या मनात आले; पर्यायाने मघाशी मैत्रीण काकांनाच ग्रेट म्हणाली, नाही का?

...त्यांचं व्यक्तिमत्त्वही तसेच प्रभावी आहे. गोरापान वर्ण, निळे डोळे, धारदार नाक, लक्ष वेधून घेणारी उंची आणि ऑथॉरिटेटिव्ह व्हॉईस. सफाईदार इंग्रजी उच्चार. त्यांनी उच्चारलेला साधा 'फ्रेझ' हा शब्ददेखील अजूनही मनात निनादत आहे. रोज पाच नवे शब्द या प्रमाणे चार महिन्यांत सहाशे नव्या शब्दांची भर पडावी यात त्यांची योजकता दिसते. चार महिन्यात मी 'फ्रेझरिच' होणार यात शंकाच नाही.

काकूंनी माझ्या केसात माळलेल्या सोनचाफ्याच्या फुलासंदर्भात आपण थोडे अधिक बोल्ड होऊन तर नाही ना बोललो?

तरीपण आपल्या सोनचाफ्याचा कुवारगंध त्यांच्यापर्यंत पोचत असावा या केवळ शक्यतेनेदेखील आपले मन हुरहुरल्यासारखे का व्हावे? आपण गेटमधून आत प्रवेश करताना 'विन्मुख मुलगी सन्मुख झाल्याखेरीज ती आपल्याकडेच येणार असावी हे कसे कळावे' या विधानात स्टेटमेंट प्लस काहीतरी असेल का?

तथापि 'तुझ्या मनातले मला कसे कळणार?' हा त्यांचा प्रश्न मात्र should be weighed in gold या तोलामोलाचा वाटला आपणाला, नाही का?

खरंच, माझ्या मनावर पडलेले तुमच्या व्यक्तिमत्वाचे गारूड तुम्हांला कळणारच नाही कधी! ही तर माझी जादुईउमर अशी आहे, की इथे आभाळ सदैव निळे असते, संध्याकाळी पश्चिमेला रंगांची उतारपेठ असते, पण त्या नंतरची कातरवेळ मात्र बेचैन करणारी असते. मला तर ओंजळीत चेहरा झाकून घ्यावा अशी लाज वाटते.

वैभवी खानोलकर येताना मृद्गंध घेऊन आली आणि वळिवानंतरच्या सोनेरी उन्हात चुकार थेंबांच्या ओल्या पावलांनी निघून गेली हे खरे असले, तरी ती अजूनही आपल्या मनात ठाण मांडून बसली आहे असे माधवरावांना वाटले.

...तंग सलवार, कुर्ता तिला नऊवारी सारखाच शोभून दिसला, नाही का? उत्तरीय सावरणारा तिचा फुलपाखरी आविर्भाव भर्जरी पदर वागविणाऱ्या शालीन, चाफेगौर बोटांसारखाच वाटला. तिचे वय हीच एक कविता होती आणि तिचा बिनधास्तपणा हा तिच्या बिलोरी व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होता. 'आपणाला सुंदर इंग्रजी लिहायला शिकायचं आहे' हे सांगण्यात तिचा नेमकेपणाच जाणवला. दुर्बिणीमधून पक्षीनिरीक्षण करीत असताना जाणावणाऱ्या मोहक हालचाली तिच्या व्यक्तिमत्त्वात प्रकाशत होत्या.

तिचे वडील माझे स्नेही हे तर खरेच, पण तेवढ्या भांडवलावर भेटणे हा तिच्या आत्मविश्वासाचा भाग होता. फ्रेज या शब्दाची तिने सांगितलेली व्याख्या टीव्हीवरील निवेदनासारखी वाटावी यात सारेकाही आले. तीनचार महिन्यात तिला लेखनकलेची ओळख व्हावी. तिचे असणे ही जशी कविता असू शकते, तसेच तिचे वागणे हा निबंधच म्हणायला हवा. या मुलीला घडविण्यात आनंदच आहे.

तथापि आपणही स्वत:ला सावरत जबाबदारीनेच वागायला हवे. घरी मुलास शिकवताना असे प्रश्न आले नाहीत. निरांजन उजळताना दीपकळी थरथरते, पण बोटाला चटका बसण्याचीही शक्यता असते. म्हणून तर आपण सावध असायला हवं, कारण कॉलेजमधील आपले रेकॉर्ड अगदीच सोनोपंत दांडेकरी नव्हते.

गेले दोनतीन महिने शनिवारी-रविवारी वैभवी बिनचूक क्लासला जात राहिली. गृहपाठ ती चोख करून येत असल्यामुळे माधवरावांच्या अपेक्षेप्रमाणे तिची प्रगती त्यांना जाणवत राहिली. रोज पाच शब्द याप्रमाणे मुखोद्‌गत केलेल्या तीनशे शब्दांची वहीही तिने दाखविली. नकळत अधिक मोकळेपणाने वागत असल्यामुळे ती आपल्या अधिक जवळ येत तर नाही ना, या विचाराने माधवराव बेचैन झाले. आपली तैलबुद्धी वापरून आपणाभोवती नकळत ती एक अदृश्य मायाजाल तर विणत नसेल ना, अशी त्यांना शंका आली.

वर्गात तिची गुणवत्ता सिद्ध होत असतानाच नकळत ती एका अनाकलनीय दिशेने इथे ढकलली जात होती.

घरातील हिंडत्याफिरत्या पत्नीच्या व्यक्तिमत्त्वाचा अनामिक धाक आपल्या जवळपास वावरत असावा, असे बहुधा त्या दोघांना जाणवत असावे.

...शिकविताना केला जाणारा विनोद निखळ होता; पण हसणे चोरटे होते. लिहीत असताना मधूनच तिचे पाहणे अधिक गोमटे होते; तरीपण ते अगदी साळसूदही वाटावे. गुरूच्या शब्दोच्चारांचा नाद शिष्येच्या ओठांतून निनाद होऊन बाहेर पडे. तिमाही परीक्षेत इंग्रजी विषयात ती पहिली आली. मॅडमनी तिला टेबलाजवळ बोलविले आणि उत्तरपत्रिकेतील तिचा निबंध भरवर्गात वाचून दाखवायला सांगितले.

शनिवारी ती माधवरावांना म्हणाली, ''अंकल, यस्टरडे आय वॉज ऑन क्लाउड नाइन!''

ऑक्टोबर उजाडला.

एका रविवारी नऊला वैभवी अशीच नेहमीप्रमाणे आली होती. बागेतली फुलझाडे, वेली वायुलहरींवर शहारत होत्या.

वैभवीचा गोरापान, गुबगुबीत हात टेबलावर विसावला होता. तिची निमुळती बोटे गुलाबी होती. तिच्या बोटांनी माधवरावांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्यातील कॉलेजमधील मुलाने तिच्या हातावर आपला ओथंबून आलेला हात टेकवला. एका हातातील ऊब व थरार दुसऱ्या हाताला जाणवला न जाणवला तोच वैभवीने आपला हात झटकन काढून घेतला.

तेवढ्यात काकू आल्या आणि चहाचे दोन पेले ठेवून निघून गेल्या.

...त्यांच्यातील सीसीटीव्ही सदैव कार्यरत होता का?

कसे घडले हे माधवरावांना कळलेच नाही.

नंतर दोघांनीही हसत, खेळत चहा घेतला. जणू काहीच घडले नव्हते.

एक ढग आला. त्याची सावली भुईवरून सरकत गेली. मातीखालच्या मातीत हिरवळ शहारली. नंतर पुन्हा ऊबदार ऊन पडले.

ढगात वीज होती आणि इंद्रधनुष्याचे स्वप्नही होते.

काही वेळाने वैभवी निघून गेली. जाताना तिने बाहेरून गेटचे दार काळजीपूर्वक लावून घेतले, पट्टी अडकविली आणि ती पाठमोरी झाली.

माधवराव व्हरांड्यात बाहेर आले. वैभवी गेली त्या दिशेने ते पाहत राहिले.

माधवरावांना वाटले, नेहमीप्रमाणे स्वाध्याय पूर्ण झाल्यावरच वैभवी जाणार होती. तिचा स्वाध्याय पूर्ण होत आलाच होता. तेवढ्यात ही विपरीत घटना घडून गेली.

...एका अनिर्वचनीय अशा अपराधीपणाच्या भावनेने आपले मन झाकोळून गेले आहे. खरे तर, आपला तोल सुटला होता असेच म्हणायला हवे. एकंदरीत तिच्या वागण्यातून आपण वेगळेच दुवे जुळवीत गेलो आणि ही आपत्ती ओढवली.

'आपण असे वागाल असे वाटले नव्हते' असे तर वैभवीला सुचवायचे नसेल? आपल्या आईवडिलांना ही घटना तिथे कथन केली, तर आपणाला तोंड लपवायला जागा उरणार नाही! शुद्ध मराठीत आपण वैभवीचा 'हात धरायचा' प्रयत्न केला असाच या घटनेचा अर्थ होतो ना?

कदाचित आपली पत्नी चहा घेऊन येत असल्याची चाहूल तिला लागली असावी का? पत्नीच्या दृष्टीस जे पडू नये ते तिच्यासमोर प्रत्यक्ष घडले, तर अनर्थ ओढवेल या भयाने वैभवीने असा पवित्रा घेतला असेल का? या विपरीत घटनेचा ताण न सोसवल्यामुळे ती काहीही न बोलताच तडकाफडकी निघून तर गेली नसेल?

गेल्या तीन-चार महिन्यांत आपली म्हणून एक 'इमेज' उभी करण्याचा प्रयास केला, तो असा पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळला तर! दिल्लीस असलेल्या आपल्या मुलाच्या कानी ही वार्ता गेली तर? खरे तर आपण तसे काहीही केलेले नाही. पत्नीच्या कानी ही गोष्ट गेली तर तिला काय वाटेल?

स्त्रीपुरुषसंबंधातील नीतिमत्तेविषयी आपला समाज फाजील संवेदनशील आहे त्याला काय करायचे! पत्नीचा स्वभाव पाहता ती आपणाला याबद्दल काहीही विचारणार नाही हे तर स्पष्टच आहे. बस्स, झाले ते झाले. काळ हेच औषध आहे. आता कानाला खडा.

त्यानंतर ती अनेक वर्षे भेटली नाही.

सुमारे दहा वर्षे लोटली असतील.

माधवराव दारात उभे होते. सकाळी अकराचा सुमार. पोस्टमन टपाल देऊन गेला. त्यात एक लग्नपत्रिका होती. ती साध्या बुकपोस्टने न येता पाकिटातून आली होती. लखोटा उघडल्यावर कुंकममंडित अक्षता टेबलावर घरंगळल्या.

वैभवी खानोलकर हिच्या लग्नसमारंभाचे ते निमंत्रण होते. उभयताना आवर्जून उपस्थित राहण्याविषयी ती विनंती होती.

'--- डॉ. वैभवी' असा पत्रिकेत उल्लेख होता.

माधवरावांच्या मनापुढून जुन्या घटनांची चित्रफीत सरकून गेली. इतके शरमिंदा होण्याचे कारण नाही असे त्यांना वाटले. तरीपण त्यांच्या मनात सल होता. हुरहूर होती. उत्साह नव्हता. उभारी नव्हती. समारंभाच्या निमित्ताने पुण्याला जाणे भाग होते. मुजरीम हाजिर होगा!


पंधरावीस मिनिटे आधी माधवराव सहकुटुंब कार्यालयात पोचले. अशा गर्दीतही पत्नी बायकांच्या गर्दीत मिसळून सामावून गेली. अक्षता, मंगलाष्टके, 'वाजवा रे वाजवा' पार पडले.

व्यासपीठावर जाऊन पत्नी वधूवरांना भेटून अभीष्टचिंतन करून आली. वधूने तिला अगत्यपूर्वक वाकून नमस्कार केला. 'वैभवी तुमची चौकशी करीत होती' असे त्या माधवरावांना म्हणाल्या.

मग माधवराव व्यासपीठावर गेले आणि वैभवीसमोर उभे राहिले. आपल्या मेंदीभरल्या ऊबदार हाताने तिने माधवरावांचा हात हातात घेतला. क्षणभर डोळे मिटले आणि उघडले. तिच्या डोळ्यात पाणी तरळल्याचा भास माधवरावांना झाला. मग व्यासपीठावरून खाली उतरून त्यांनी मागे वळून पाहिले. पण कुणालातरी नमस्कार करण्यासाठी वैभवी खाली वाकली होती.

मग माधवराव गर्दीत हरवून गेले.

*(दिवाळी २०१७)*




*जून २०११*
*(चित्रकार शिवाजी तुपे)*

# कृष्णचूडा

**मूळ बंगाली कथा : प्रचेत गुप्त**
**अनुवाद : सुमती जोशी**

''मला फक्त मौखिक भाषा दिलीय, शारीरिक नाही. ती किती जरुरीची आहे, ते मला आत्ता समजलं. मी तुझ्या शरीराबरोबर कम्युनिकेट करू शकले नाही. इच्छा असूनही मला ते शक्य झालं नाही.''

कृष्णचूडा. एक सुंदर तरुणी. पण खरी रोबो. ती प्रेमात पडते तेव्हा... उद्याच्या रोबॉटिक्स युगातील विज्ञानकथा किंवा भविष्यवेधी कथा.

ती भयंकर घटना समजली लंच अवरमध्ये. कामाचा विलक्षण ताण असूनही इन्स्टिट्युटमधल्या बहुतेक सगळ्या माणसांनी आपली पोटपूजा आटपत आणली होती. तरी डिरेक्टर मणिमय सामंत यांना लंच घ्यावंसं वाटत नव्हतं. त्यांनी फक्त एक वाटी दही मागवलं. तेवढंही त्यांना जाईना. टेन्शन. भयंकर टेन्शन! दोन रात्री झोप लागली नाही. कालपासून भूकही नाहीशी झाली होती.

मणिमय सामंत. रोबॉटिक्स विषयातले पंडित. विश्वविख्यात माणूस. 'झेड.एम.पी. टेकनिक'साठी त्यांनी दिलेलं योगदान लक्षणीय होतं. झेड.एम.पी. टेकनिक वापरल्यामुळे रोबोने कधी हालचाल करावी, ते ठरवता येई. सरळ चालायचं, उड्या मारायच्या की पोहायचं यावर नियंत्रण ठेवता येई. हायड्रॉलिक सिस्टिम, मोटर आणि इलेक्ट्रिक सर्किट्स यांची अदलाबदल करून रोबोला मानवी चेहरा देण्यात ते यशस्वी झाले होते. रोबोच्या आतली शक्ती कमी झाली तर जांभई देऊन आता रोबो आपल्याला सूचना देऊ शकतो. त्यांच्या या संशोधनाचा खूपच बोलबाला झाला होता. माणसाने इतकं टेन्शन घेणं योग्य नाही.

मणिमय सामंतांना हे माहीत होतं. ते स्वत:वरच रागवत. त्यांना वाटे, संशोधन करत होतो, तेच ठीक होतं. कशाला मरायला या संशोधन केंद्राचा डिरेक्टर झालो कोणास ठाऊक! मणिमय यांनी त्याच क्षणी ठरवून टाकलं, हातातोंडाशी आलेलं प्रदर्शन पार पडलं, की डिरेक्टरपदाचा राजीनामा द्यायचा. असलं झेंगट गळ्यात घ्यायचं नाही. रोबोवर काम करत असलो म्हणून काय झालं! ते स्वत: रोबो नव्हते, माणूसच होते!

तीन दिवसांनी या इन्स्टिट्युटमध्ये जे प्रदर्शन भरणार होतं, त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून होत्या. प्रतिष्ठानचा मानसन्मान तर होताच, पण आर्थिक बाबीही होत्या. सगळं अपेक्षेनुसार पार पडलं असतं, तर पुढची काही वर्षं फंड मिळवायची चिंता करावी लागली नसती. सखोल अभ्यास आणि जिवापाड मेहनत घेऊन रोबो तयार केले होते. यासाठी देशोदेशीचे पाहुणे येणार होते. त्यात जसे रोबॉटिक्स विषयाचे अभ्यासक, इतर वैज्ञानिक होते, तसे अनेक बड्याबड्या कंपन्यांचे प्रतिनिधीसुद्धा होते. रोबो पसंत पडला, तर ऑर्डर्स मिळणार होत्या. ज्यांना संपूर्ण रोबो खरेदी करणं जमलं नसतं, त्यांनी कदाचित वायर्सचं सर्किट, डायग्रॅम किंवा सॉफ्टवेअर यांपैकी काहीतरी खरेदी केलं असतं.

नेमक्या त्याच वेळी मणिमय सामंत यांच्याकडे ती बातमी येऊन थडकली. डॉक्टर सुफल सरकार यांनी इंटरकॉमवरून ही बातमी सांगितली.

बातमी ऐकल्यावर काही क्षणांसाठी त्यांचं डोकं अगदी सुन्न झालं. आपल्या पोटात आग पडल्याची मणिमयना अचानक जाणीव झाली. त्यांनी चमचाभर दही खाल्लं. अतिशय टेन्शन असताना त्यावर आणखी टेन्शन येऊन आदळलं तर असं होतं का? नाहीशी झालेली भूक दुप्पट जोराने डोकं वर काढते का? मणिमयना ठाऊक नव्हतं.

ही घटनाच अशी होती, की सगळं सोडून देऊन डॉक्टर सुफल सरकार धावत लॅबोरेटरीत गेले. गेल्या काही दिवसांपासून 'आर. थ्री.' मॉडेलच्या सेन्सरमध्ये बिघाड झाला होता. हा रोबो आलजिब्रा, जॉमेट्री, कॅल्क्युलस यांतली अवघड, गुंतागुंतीची सूत्रं झरझर सांगत असे; पण बिघाड झाल्यामुळे साधे पाढे म्हणतानाही तो अडखळू लागला. १९चा पाढा म्हणताना शहात्तरपाशी येऊन अडखळला. थांबला. पाहुण्यांसमोर असं झालं, तर ते जिव्हारी लागेल असं अपयश ठरलं असतं. त्याशिवाय प्रदर्शनात 'आर. थ्री' मॉडेलला 'प्रोफेसर' म्हणून प्रदर्शित करायचं ठरलं होतं. अगदी युनिव्हर्सिटीच्या स्तरावर शिकवणारा प्रोफेसर. त्याच्या 'प्रोग्रॅमिंग'मधलं सिलॅबस बदललं की झालं. तसा विचार केला तर आर. थ्री. हे प्रदर्शनातलं महत्त्वाचं मॉडेल होतं. त्यात अचानक झालेल्या बदलामुळे सुफल सरकार अस्वस्थ होणं स्वाभाविक होतं. डिरेक्टरनाही याची कुणकुण लागली होती. म्हणून तर त्यांनी सुफल सरकार यांना बोलावून घेतलं.

''डॉक्टर सरकार, मी ऐकलंय ते खरं आहे का? आर. थ्री. रोबोमध्ये थोडा बिघाड झालाय का?''

मान खाली घालत डॉक्टर सरकार म्हणाले, ''हो सर. खरं आहे. तो कठीण प्रॉब्लेम्स छान सोडवतोय, पण सोपी आकडेमोड करताना चुकतोय.''

तटस्थपणे मणिमय म्हणाले, ''आता प्रदर्शन तीन दिवसांवर आलंय. उद्यापासून पाहुणे येऊ लागतील. नेमक्या या मोक्याच्या वेळी आर.थ्री.मध्ये बिघाड कसा झाला?''

''तेच समजत नाहीए. नेमकं काय बिघडलंय, हे शोधून काढायचा माझा प्रयत्न चालू आहे.''

तरीही या बोलण्यामुळे मणिमय सामंतांचं समाधान झालं नाही. मान हलवत ते म्हणू लागले, ''व्हेरी बॅड डॉक्टर सरकार. किती आधीपासून आपण तयारी सुरू केली होती आणि तरीही आपल्यावर अशी नामुष्कीची वेळ यावी! बाकीच्यांचं काय? त्यांच्यात नाही ना बिघाड झाला?''

''नो नो सर! बाकीची मॉडेल्स अगदी परफेक्ट आहेत. 'एक्स फाइव' या रोबोच्या हायड्रॉलिक पिस्टनमध्ये थोडीशी समस्या होती. मान वळवताना रोबोला थोडा हिसका बसत होता. पण डॉक्टर भादुडींनी तो कालच दुरुस्त केलाय.''

भुवया उंचावीत मणिमय म्हणाले, ''त्याचं काम... ''

''खेळातला साथीदार होणं. म्हणजे समजा, माणूस मॉर्निंग वॉकला निघाला, तर त्याच्याबरोबर चालणं किंवा जॉगिंग करणं. काही खेळांमध्ये तो खेळणाऱ्या माणसाचा पार्टनरही होऊ शकतो.''

डोळ्यांवरचा चष्मा काढत मणिमय सामंत म्हणाले, ''हं. आत्ता आठवलं. खेळामध्ये तुम्ही बॅडमिंटन आणि पोलो असे दोन खेळ घेतलेयत ना? मी आधीच बजावलं होतं. पोलो हा जगातला पॉप्युलर गेम आहे आणि बॅडमिंटन असायलाच हवं. नाहीतर महिला या मॉडेलमध्ये रस घेणार नाहीत. एन.टू. रोबो? त्याची काय खबर? त्याने नाही ना घोटाळा केला?''

''या रोबोला 'डोमेस्टिक हेल्पर' ही भूमिका बजावण्यासाठी सज्ज केलंय, सर. स्वयंपाकापासून सुरुवात करून पाहुण्यांची सरबराई करण्यापर्यंतच्या सगळ्या गोष्टी हा रोबो करू शकतो.''

मणिमय सामंतांनी एक निःश्वास टाकला. ''त्याने तसं केलं म्हणजे झालं. डॉक्टर सरकार, त्या 'मॅनेजर' मॉडेलचा कोड काय आहे?''

''सर, तो आहे 'झेड फोर'. अकाउंट्स, को-ऑर्डीनेशन, प्रॉडक्शन, मार्केटिंग या सगळ्या कामात हे मॉडेल मदत करू शकतं. सगळ्यात महत्त्वाची कामगिरी म्हणजे 'झेड.फोर' मीटिंगमध्ये हजेरी लावून सगळ्यांबरोबर संवाद साधू शकतो. त्याच्या बाबतीत एकच त्रुटी होती. या मॅनेजरबाबांचा चेहरा वाजवीपेक्षा जरा जास्तच हसरा दिसत होता.''

अस्वस्थ होत मणिमय सामंत म्हणाले, ''हसतो? मॅनेजर हसतो? कंपनीच्या गंभीर मीटिंगमध्ये मॅनेजर हसायला लागला, तर ते किती हास्यास्पद ठरेल, याचा विचार केलायत का तुम्ही? मग हे मॉडेल त्याच्या हसऱ्या चेहऱ्यामुळे बाद होईल.''

डॉक्टर सरकार घाईघाईने म्हणाले, ''ती त्रुटी आता दूर झालीय, सर. फेशियल एक्सप्रेशन म्हणजे फायबरच्या कामात काहीतरी चूक झाली होती.''

घाम आला नव्हता, तरीपण मणिमय सामंतांनी खिशातून रुमाल काढून कपाळावरचा घाम पुसला.

मंद स्मित करत सुफल सरकार म्हणाले, ''इतकी काळजी करू नका, सर. प्रदर्शन, सेमिनार सगळं छान पार पडेल. एम. फाइव आणि के. सिक्स ही आपली मॉडेल्स अप्रतिम आहेत. के.सिक्स सर्वोत्तम काम करतो, हे आपल्याला माहीत आहे ना? डॉक्टर शकुंतला मित्र यांनी सर्व कल्पनाशक्ती पणाला लावून याची निर्मिती केलीय.''

''आता बिनचूक आहे, असं म्हणताय. उद्या येऊन सांगाल, त्यात दोष निर्माण झालाय. काही कनेक्शन्स बिघडल्यामुळे ती मुलगी फटाफट शिंकू लागलीय किंवा अचानक मोठ्याने हसू लागलीय!''

सुफल सरकारना हसू आलं. पण त्यांनी ते जाणवू दिलं नाही. डॉक्टर सामंतांचं टेन्शन प्रमाणाबाहेर वाढलंय. नाहीतर रोबो शिंकू लागलाय, असली भन्नाट कल्पना त्यांच्या डोक्यात आली नसती.

''नाही सर, आपण बघाल'' डॉक्टर सरकार सांगू लागले. ''के. सिक्स हे नुसतं सर्वोत्तम मॉडेल आहे असं नाही, त्याचा ॲपिअरन्ससुद्धा अफलातून झालाय. 'साडी नेसलेली बंगाली तरुणी' असं इम्प्रेशन दिलंय तिला. डॉक्टर मित्र यांनी तिच्यासाठी शांतिनिकेतनला जाऊन खास दागिने आणलेयत. हायड्रॉलिक सिस्टिमचा प्रोग्रॅम अशा विशिष्ट पद्धतीने तयार केलाय, की ठरावीक वेळाने ती तरुणी कपाळावरची बटही मागे सारते. ती रोबो आहे, हे कोणालाही खरं वाटणार नाही. सर्वांना वाटेल, ही कॉलेजमध्ये शिकणारी तरुणी आहे. आम्ही सगळ्यांनी डॉक्टर मित्र यांचं अभिनंदन केलंय. आपणही होतात त्यावेळी.''

''मीपण केलंय का? लक्षात नाही. केलं असेल कदाचित. म्हटलं ना तुम्हाला, मला सगळ्याचा विसर पडत चाललाय. के.सिक्सचं काम काय आहे? तिचं नटणं कशासाठी? ती फॅशन शोमध्ये चालणारेय का?''

यावेळी मात्र सुफल सरकारना हसू आलं नाही. ''सर, के.सिक्स ही फक्त मैत्रीण आहे. ती 'कंपनी' देऊ शकते. तरुणांबरोबर गप्पागोष्टी करू शकते. इंटरॲक्ट करू शकते. अनेक देशांत एक सीरियस प्रॉब्लेम जाणवू लागलाय. मित्र नाहीत, हितगुज करायला जिवाभावाची माणसं नाहीत. हे काम अवघड होतं. डॉक्टर मित्र यांनी ते आव्हान स्वीकारलं. असं मॉडेल करण्यात त्या यशस्वी झाल्यात. तरुणीचं दिसणं जितकं आकर्षक, तितकंच तिचं व्यक्तिमत्त्वही नजरेत भरेल असं आहे. गमतीची आणि इंटरेस्टिंग अशी आणखी एक बाब – इतर कोणत्याही मॉडेलला आपण विशेषनाम दिलेलं नाही, पण के. सिक्सला दिलंय.''

''विशेषनाम? म्हणजे रोबोचं नामकरण केलंय?''

''हो सर. डॉक्टर शकुंतला मित्र यांनीच नाव दिलंय. बंगाली नाव – 'कृष्णचूडा'. आम्ही या रोबोचा उल्लेख 'कृष्णचूडा' या नावाने करतो.''

सुफल सरकार निघून गेल्यावर मणिमय सामंतना वाटलं,

बापरे, आपल्याला महत्त्वाच्या गोष्टींचा विसर पडायला लागलाय. हे काही बरोबर नाही. सगळ्या मॉडेल्सच्या कॅटलॉगवर नजर टाकायला हवी. टेबलावर ठेवलेल्या फाइलींच्या ढिगाऱ्यात त्यांना आठवणीने ठेवलेला कॅटलॉग सापडेना. लॅपटॉपवर बोटं चालवली असती, की लगेच कॅटलॉग मिळाला असता. पण त्यांना तीही इच्छा होईना! त्यांच्यासमोर मिष्टी दह्याची वाटी होती. ती तशीच ठेवून ते गप्प बसून राहिले आणि तेवढ्यात डॉक्टर सरकार यांनी इंटरकॉमवरून ती भयंकर बातमी दिली.

त्यांचा आवाज अक्षरश: कापत होता. ''सर, लॅबची लोकं म्हणतायत, कृष्णचूडा नाहीशी झालीय.''

''कृष्णचूडा? ही आणखी कोण? हू इज शी?''

''आपलं के.सिक्स मॉडेल, सर. मी आर.थ्री. दुरुस्त करायला लॅबमध्ये आलोय. काम पुरं करून बाहेर पडताना अचानक लक्षात आलं, के.सिक्सची जागा रिकामी.''

''रिकामी? म्हणजे?''

''काही समजेनासं झालंय, सर. डॉक्टर शकुंतला मित्रना फोन केलाय. त्या क्वार्टर्समध्ये होत्या. येतीलच त्या इतक्यात.''

मणिमय सामंतांनी शांतपणे विचारलं, ''बाकीची मॉडेल्स?''

''बाकीची सगळी आहेत. फक्त के. सिक्स...''

इंटरकॉम ठेवल्यावर पोटातली आग त्यांना जाणवू लागली. दही खाता खाता ते विचार करू लागले, आता करावं तरी काय? ताबडतोब रेसिग्नेशन द्यावा की डोक्यावर ठेवायला बर्फ आणायला सांगावा? जेलमधून कैदी पळाला तर घंटा वाजवतात. लॅबोरेटरीमधून रोबो पळाला तर काय करतात? त्याशिवाय के. सिक्स पळालाय, ही जगावेगळी कल्पना कोणाच्या पचनी पडेल का? रोबोत बिघाड होऊ शकतो, पण तो पळून जाऊ शकत नाही. प्रसिद्ध वैज्ञानिक मणिमय सामंत यांना वाटू लागलं, ते वेडे होत चाललेयत.

थोड्याच वेळात आणखी एक बातमी आली. एका अल्पवयीन तरुणीला बाहेर पडताना कोणीतरी पाहिलं होतं. तिच्या डोक्यावर गुलाबी रंगाची छत्री होती. मोठा रस्ता क्रॉस केल्यावर छत्री मिटवून ती तरुणी टॅक्सीत बसली.

सुमारे तासाभरानंतर डिरेक्टरच्या घरी चाललेल्या एका महत्त्वाच्या मीटिंगमध्ये शकुंतला मित्र यांनी सांगितलं, नुसतं के. सिक्स मॉडेलच नाही, तर तिची छत्रीसुद्धा हरवलीय. आदल्या वर्षी टोकियोला त्या एका कॉन्फरन्सला गेल्या होत्या, तेव्हा त्यांनी ती छत्री तिथे खरेदी केली होती. तीच छत्री काल त्या लॅबमध्ये विसरून गेल्या होत्या.

मणिमय सामंत यांनी विचारलं, ''के. सिक्सच्या चीपमध्ये इतरांबरोबर संवाद साधण्यासाठी विशिष्ट भाषा दिली होती का?''

शकुंतला मित्र म्हणाल्या, ''होय सर. संवाद साधण्यासाठी तिला भाषा अवगत होती. त्याखेरीज आणखीही एक गोष्ट झालीय. मॉडेल तयार झाल्यावर आम्ही तिला तऱ्हतऱ्हेचे पोशाख घालून बघितले होते. ते सगळे पोशाख एका बॅगेत भरून ठेवले होते. ती बॅग नाहीशी झालीय.''

मणिमय सामंत म्हणाले, ''आपल्याला गुप्तपणे शोध घ्यायला हवा. ही बातमी बाहेर कोणालाही समजता कामा नये. तिचा फोटो माझ्यापाशी द्या. मी याविषयी पोलिसांशी बोलणी करीन.''

लगेचच त्यांनी पोलिसांना बातमी सांगितली. पण फोटो देता आला नाही. कारण तिचा फोटो कोणी काढलाच नव्हता. होता फक्त सर्किट डायग्रॅम. पोलिसांनी प्रांजळपणे उत्तर दिलं होतं – सर्किट डायग्रॅम बघून माणसांच्या गर्दीतून रोबो शोधून काढणं अशक्य आहे.

तीन महिन्यांनंतर –

कृष्णचूडा तोंड फिरवून बसली होती. सिंचनच्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं तिनं दिली नाहीत. जी काही थोडीफार दिली, ती तोंड फिरवलेल्या अवस्थेतच. हे वेगळं होतं. नवीन होतं. गेल्या तीन महिन्यांत या तरुणीबरोबर सिंचनचे किती मानापमान झाले होते, पण कधी अशी वेळ आली नव्हती. शिवाय पूर्वी घडलं होतं ते तिच्या लटक्या रागामुळे. ठरलेल्या वेळी न आल्यामुळे, रात्री आठवणीने फोन न केल्यामुळे, ऑफिसच्या कामात गढून गेल्यामुळे फिरायला जाऊ न शकल्यामुळे अशी विविध कारणं होती. तो लटका राग सहजी दूर करता आला होता. कधी सिनेमा, कधी आइसक्रीम तर कधी छोट्याछोट्या भेटवस्तू. मग तिचा राग केव्हाच पळून जाई.

आज मात्र या रागाने वेगळं वळण घेतलं होतं. इथे बसून ही तरुणी वेगळाच काहीतरी विचार करतेय, असं सिंचनला वाटू लागलं. समजायला अवघड असलेला विचार. खरं पाहता आदल्या दिवशी जी घटना घडली होती, त्यामुळे राग यायला हवा होता सिंचनला. अपमान जर कोणाचा झाला असेल, तर तो सिंचनचा, कृष्णचूडेचा नव्हे! सिंचनला राग आला आणि वाईटही वाटलं. रात्री उशिरापर्यंत तो जागा होता. यापुढे तिच्याबरोबर होणाऱ्या भेटीगाठी बंद करायच्या, असं त्याने मनोमन ठरवलं. प्रेमात पडल्यावर फक्त मुलींनीच रागवायचं, असं कुठे लिहिलेलं नव्हतं. पण सकाळी उठल्यावर लक्षात आलं, रात्रीची उद्विग्नता सकाळी नाहीशी झाली होती. यालाच 'प्रेम' म्हणत असावेत.

सिंचनने आपल्या मोबाइलवरून तिला फोन लावला, ''गुड मॉर्निंग, कृष्णचूडा.''

''गुड मॉर्निंग.'' गदगदल्या स्वरात कृष्णचूडाने प्रतिसाद दिला.

थट्टेच्या स्वरात सिंचन म्हणाला, ''आवाजावरून जाणवतंय, अजून राग गेला नाहीय. हे बराय! आपण कसंही वागायचं आणि वर स्वत:च रागवायचं?''

''तुला आज थोडी उसंत मिळेल का सिंचन? मला भेटायचंय तुला. तुझ्याबरोबर बोलायचंय.''

फोन ठेवल्यावर सिंचन थबकला. कृष्णचूडा इतकी गंभीर का बरं झाली असावी? खरं पाहाता तो या तरुणीला सर्वार्थाने ओळखू शकला नव्हता. त्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी पुरेसा नव्हता. तरीही... हसतमुख, समंजस आणि सरळ स्वभावाची ही मुलगी

इतक्या साध्या कारणावरून... कितीतरी वेळा याच कॉफी शॉपमध्ये तो तिला घेऊन आला होता. 'क्यापुचीनो' ही तिची फेवरीट कॉफी. अशी कॉफी आपण यापूर्वी कधीच प्यायलो नाही, अशा आविर्भावात हसत हसत ती आज त्याच कॉफीचा आस्वाद घेत होती. ते दृश्य सिंचनला आवडलं नाही. पण कृष्णचूडेचं लक्ष नव्हतं. ती कसला तरी विचार करत असावी.

सिंचन म्हणाला, ''कृष्णचूडा, तू जरा जास्तच रागावतेयस. इतकं रागावण्यासारखं काल काही घडलंय का?''

कृष्णचूडाने जीन्सवर वांगी रंगाचा टॉप घातला होता. किती सुंदर दिसत होती ती! तीन महिन्यांपूर्वी सिंचन जेव्हा तिच्या प्रेमात पडला, त्या दिवशी जीन्स-टॉप नव्हता. ती नेसली होती साडी.

त्या दिवशी सिंचन ऑफिसमधून निघाला होता तेव्हा उशीर झाला होता. कंपनीमध्ये नेहमीच कामाचा ताण असतो. त्यात त्याची ही नवी नोकरी. कामाची वेळ संपली तरी बॉसने दिलेली असाइनमेंट पेंडिंग ठेवून निघून जाणं प्रशस्त वाटत नव्हतं. ते काम पूर्ण करून तो बाहेर पडला, तेव्हा सेक्टर फाइव्हसारख्या एरवी गजबजलेल्या भागातही शुकशुकाट वाटत होता. या बाजूला येणाऱ्या बसेस आधीच कमी, त्यात रात्री तर त्या आणखीनच कमी असत. थोडं चालून सिंचन शेअर टॅक्सीस्टँडपाशी आला. स्टँडवर गर्दी होती. टॅक्सी दिसली की ती मिळवण्यासाठी सगळे धावत होते. ज्यांना संधी मिळे, ते धक्काबुक्की करत टॅक्सीत घुसत. सिंचनला दोन टॅक्सी सोडाव्या लागल्या. तिसरी टॅक्सी दिसल्यावर त्याने चपळाई करत ती पकडली.

त्याला खिडकीची जागा मिळाली. आत येणाऱ्या वाऱ्यामुळे तो सुखावला. डोळे मिटून स्वस्थ बसून राहिला. रस्ताभर त्याने कोणाकडे पाहिलं नाही. टॅक्सीत बसलेल्या इतर पॅसेंजर्सकडेही नाही, अगदी शेजारी बसलेल्या तरुणीकडेही नाही! यादवपूर आलं की लक्ष ठेवायला हवं. उतरायची वेळ आली तेव्हा टॅक्सी बरीचशी रिकामी झाली होती.

''एक्सक्यूज मी, मला वाटतं, मी पर्स विसरून आलेय. कॅन यू हेल्प मी?''

एका तरुणीचं लडिवाळ बोलणं कानी पडल्यावर सिंचनने चमकून तिच्याकडे पाहिलं. अंधारात तिचा चेहरा नीटसा दिसत नसला तरी आवाजावरून तिचा साधेपणा जाणवला होता. ती खरंच अडचणीत सापडली असावी. तिने साडी नेसली होती. हल्ली साडी नेसलेल्या तरुणी अभावानेच आढळतात. विशेषतः सेक्टर फाइवमध्ये तर अगदी क्वचित. सिंचन थांबला.

''टॅक्सीत बसण्याआधी लक्षात आलं नाही.''

''इट्स ओ.के. किती हवेयत?''

''टॅक्सीचं भाडं दिलंत की पुरे.''

त्याने आपल्या वॉलेटमधून पन्नास रुपयांची नोट काढली आणि तिच्या हाती देऊ लागला.

''प्लीज, मला देऊ नका. तुमची हरकत नसली तर ड्रायव्हरलाच द्या.''

सिंचन खूश झाला. ती खरोखरच पर्स विसरलीय, याबद्दल त्याच्या मनात संदेह उरला नव्हता. त्याने ड्रायव्हरला दोन माणसांचं भाडं दिलं. तरुणी गाडीच्या खिडकीतून त्याच्याकडे पाहात म्हणाली, ''आपला पत्ता किंवा मोबाइल नंबर दिलात तर मी उद्याच...''

सिंचन म्हणाला, ''इट्स ओ.के. एवढेसे पैसे परत द्यायची गरज नाही. तुम्ही नीट घरी जा. टेक केअर.''

ती हसली. पुटपुटली, ''थँक यू व्हेरी मच. गुड नाइट.''

टॅक्सी पुन्हा सुरू होण्यापूर्वी विरुद्ध दिशेने येणाऱ्या गाडीचा हेड लाइट तिच्या चेहऱ्यावर पडल्यामुळे सिंचनला तिचा चेहरा दिसला. पाणीदार डोळ्यांनी ती त्याच्याकडे पाहात होती. तिच्या चेहऱ्यावर कृतज्ञताभाव ओसंडला होता. सिंचनला धन्य धन्य झालं. तरुणी हुशार दिसत होती. पत्ता किंवा मोबाइल नंबर दिला असता, तर या सुंदर दृश्यापासून तो वंचित झाला असता. तो कंजूष आहे किंवा त्याचा दुसरा काहीतरी छुपा हेतू आहे, असं तिला वाटलं असतं. अर्थातच मग हे भाव तिच्या चेहऱ्यावर उमटले नसते. गुणगुणत सिंचन घरात शिरला.

दुसऱ्या दिवशी काम संपल्यावरही सिंचन ऑफिसमध्ये रेंगाळला. वेळेचं गणित मांडून आदल्या दिवशीप्रमाणेच तो उशिरा बाहेर पडला. त्याला वाटलं, कदाचित आपलं गणित चुकेल. पण तसं झालं नाही. हाच जीवनाचा नियम असावा. थोडं पुढे गेल्यावर टॅक्सी स्टँड. तिथे काल भेटलेली मुलगी टॅक्सीची वाट पाहात उभी होती. स्टँडवरचा चकचकीत उजेड आज त्याला आणखी चकचकीत भासू लागला. दूरवरून सिंचनला पाहिल्यावर हसऱ्या चेहऱ्याची ती तरुणी पुढे आली. ''आपलीच वाट पाहात होते.''

सिंचनच्या छातीत धडधडू लागलं. किती स्मार्ट! मुलींशी वागण्याबोलण्यात तो उस्ताद नसला तरी तिला पाहून घाबरणाराही नव्हता. त्या दिवशी मात्र सगळं वेगळंच घडलं. ही मुलगी त्याच्यासाठी नुसती 'एक मुलगी' राहणार नाही, त्यापेक्षा अधिक काही घडेल, असं त्याला वाटलं. तो नर्व्हस झाला. म्हणाला, ''मी इथे येईन हे तुला कसं समजलं?''

''मला बरंच काही समजू शकतं.'' हसत हसत कृष्णचूडा म्हणाली.

''आणखी काय समजलं?''

खुदुखुदु हसत ती म्हणाली, ''आपण एक नाइस पर्सन – सुंदर माणूस आहात.''

''बाप रे, फक्त वीस रुपयांत माणूस समजतो? मी 'नाइस पर्सन' आहे, हे तुला कसं समजलं?''

''वीस रुपये खूप झाले. अहो, दोन रुपयावरूनही माणूस समजतो. माणूस ओळखण्यात माझी चूक होणार नाही. माझे सेन्सर्स खूप पॉवरफूल आहेत.''

''सेन्सर्स? म्हणजे काय?'' भुवया उंचावल्या सिंचनने. तरुणी सुंदर तर आहेच पण विनोदी आणि मजेशीर आहे.

''जाऊ दे. सोडून द्या ते सगळं. टॅक्सी घेताय की

माझ्याबरोबर कॉफी प्यायला येताय? आपल्याला वेळ असला तर... पैसे परत करून तुम्हाला दुखवायचं नाहीय मला. कॅन यू गिव्ह मी अ चान्स? कृतज्ञता दाखवायची एक संधी?''

एरवी इतक्या रात्री कॉफी प्यायला जायचा विचारसुद्धा सिंचनने केला नसता. पण त्या दिवशी त्याला वाटलं, कपभर कशाला, या तरुणीला हवं असलं तर दहा कप कॉफीही पिईन! ''चल, जाऊ या. तुझं नाव समजेल का मला?''

''कृष्णचूडा.''

''वा! किती छान नाव आहे!''

''आणखी एक नाव आहे. पण ते तितकंसं सुंदर नाही.''

''टोपणनाव?''

कृष्णचूडा हसत म्हणाली, ''नाही. कोडनेम. ऐकायचंय का?''

सिंचन म्हणाला, ''तू चांगलीच थट्टेखोर आहेस कृष्णचूडा. कोड्यात बोलतेयस.''

''मला कोडी सोडवता येतात.''

सिंचनला वाटलं, २६ वर्षं जिची वाट पाहात होतो, तीच ही मुलगी. तो प्रेमात पडला होता.

पण आज तीच कृष्णचूडा इतक्या क्षुल्लक विषयाचं रामायण-महाभारत करेल, असं वाटलं नव्हतं.

यावेळी सिंचन काहीसा विरक्त झाला होता. पण त्याने स्वत:ला सावरलं. नरमाईच्या स्वरात म्हणाला, ''ठीक आहे. किती रागावशील? प्लीज, आता तोंड वळवून एकदा तरी माझ्याकडे बघ. तुझा सुंदर चेहरा किती वेळात दिसला नाही.''

आपलं तोंड न वळवता कृष्णचूडा म्हणाली, ''बघायची काही गरज नाही.''

''बरं. नाही बघणार. मी डोळे मिटतो. आता तरी तोंड वळवून बघ.''

तोंड न वळवता गदगदल्या स्वरात ती म्हणाली, ''कालचा प्रसंग मी विसरू शकत नाहीय.''

आता मात्र सिंचन स्वत:ला सावरू शकला नाही. तिच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला, ''काय लहान मुलासारखं बोलतेयस कृष्णचूडा? मी काही केलं नव्हतं, बघता बघता काही न सांगतासवरता तूच पळून गेलीस. मी तुझ्यावर जबरदस्ती केली होती का? भाग पाडलं होतं का? तुझी इच्छा नाही, हे समजल्याबरोबर मी थांबलो. पुढे गेलो नाही.''

आता कृष्णचूडाने तोंड वळवलं. त्या क्षणी सिंचनला ती नितांतसुंदर भासली. रागावल्यावर सगळ्या तरुणी अधिक चांगल्या दिसतात की काय?

कृष्णचूडा खाली पाहात उद्विग्न होत म्हणाली, ''पुढे जायचं ठरवलं असतं, तर तूच अडचणीत सापडला असतास सिंचन.''

''काहीतरीच काय बडबडतेयस कृष्णचूडा? काळाला अनुसरून नाही तुझं बोलणं. तू अजूनही आजी-पणजीच्या काळात आहेस!''

कृष्णचूडा केविलवाणं हसली. डोळे, चेहरा याप्रमाणे तिचं दाताचं सेटिंगही वेगळं होतं. कोणी मापून तयार करून बसवलेयत, असं वाटत होतं. ''तुला समजत नाहीय, सिंचन. तू समजूच शकणार नाहीस.''

''जाऊ दे. मला आणखी काही समजायची गरज नाही. तू कालचा दिवस काढून टाक बघू डोक्यातून. कम ऑन कृष्णचूडा. मी आज ऑफिसला जात नाही. कुठेतरी मस्त फिरून येऊ या. चल, गंगेतून बोटीत बसून फिरून येऊ या का?''

बोटीतून सैर करायचा प्रस्ताव तिला आवडला नसावा. ती विषण्ण होत म्हणाली, ''तुला समजलं नाही तरी मला सगळं आकलन होतंय. कालपासून माझ्या लक्षात आलंय. मी तुला फसवू शकणार नाही, सिंचन. गेले तीन महिने मी तुझ्यात फार गुंतत गेले. ते ठीक नव्हतं.''

कपाळावर आलेली बट तिने मागे सारली. अधूनमधून केसांची बट मागे सारायची तिची लकब होती. सिंचनच्या ती केव्हाच लक्षात आली होती. त्यावेळी ती आणखीच सुरेख दिसे. त्याच्या पेशी अन् पेशी शहारून जात. वाटे, प्रेमाने तिच्यावर झडप घालावी.

खरं सांगायचं तर कालची घटना तशाच प्रकारची होती. तसं काही घडेल याची त्याला सुतराम कल्पना नव्हती. काही महिन्यांपूर्वी त्याच्या बॉसना, सौम्यदांना क्वार्टर्स मिळाल्या होत्या. रुपी पार्क जवळची अप्रतिम जागा. तिसऱ्या मजल्यावरचा प्रशस्त फ्लॅट. दक्षिणेकडली खिडकी उघडली की सुंदर तळं दिसे. सौम्यदा आपल्या आईला आणायला पाटण्याला गेले होते. जाण्यापूर्वी सिंचनच्या हाती चावी देत म्हणाले होते, ''एकदा जाऊन बघून ये. किती महिने जागा रिकामीच पडलेली होती. मला काळजी वाटतेय.''

तोच फ्लॅट बघायला सिंचन काल गेला होता. फार वेळ नाही, फक्त थोडा वेळ डोकावून जायचं होतं. कृष्णचूडाला घेऊन जायचं काही कारण नव्हतं. पण तिनेच आग्रह धरला.

''जाऊ या ना. तेवढंच तुमच्याबरोबर आणखी फिरता येईल.''

''छे! याला काय फिरणं म्हणतात? ही फक्त ड्युटी आहे. जाऊन सगळं ठाकठीक आहे ना, हे बघून यायचंय.''

युक्तिवाद करत ती म्हणाली, ''मीपण पाहीन. खिडक्या-दारं घट्टमुट्ट बंद केलीयत की नाही, हे तुमच्यापेक्षा मला जास्त चांगलं बघता येईल. माझी हायड्रॉलिक सिस्टिम, मोटर आणि इलेक्ट्रिक सर्किट्स खूपच सक्षम आहेत.''

सिंचनला हसू आलं. ''कोड्यात बोलण्याची तुझी सवय काही सुटत नाही. तू काय बोलतेयस, ते माझ्या डोक्यावरून गेलं. नाही कृष्णचूडा. तू येऊ नकोस. तुला तिथल्या धुळीचा त्रास होईल.''

कृष्णचूडा फुरंगटली. गाल फुगवत म्हणाली, ''तुम्हाला माझी अडचण होणार असली तर...''

तातडीने सिंचन म्हणाला, ''हे बघ काय ते! पुन्हा रागावलीस? बरं बाई. चल माझ्याबरोबर.''

सिंचनने घर उघडलं. हवेसाठी बेडरूमची खिडकी उघडली. तळ्यावरून येणारा गार वारा खोलीत घुसला. खिडकीपाशी कृष्णचूडाचं *(कृष्णचूडा म्हणजे गुलमोहोर)* झाड फुललं होतं. लालेलाल दिसत होतं. कृष्णचूडेचे केस वाऱ्यावर उडत होते. हाताने केस सारखे करत ती उद्गारली, ''ब्युटीफुल!''

त्यानंतर मात्र सिंचन स्वत:ला अडवू शकला नाही. त्याने तिच्या गालावर अलगद आपले हात ठेवले. ओठ तिच्या चेहऱ्यापाशी आणले. तिने झटकन बाजूला व्हायचा प्रयत्न केला. पण ती हलू शकली नाही. सिंचन आपले ओठ तिच्या पापण्यांवर, कपाळावर टेकवू लागला. ती त्याला अडवू लागली. आपल्या हातानी सिंचनचं तोंड दूर सारायचा तिने विचार केला. तोपर्यंत सिंचनचे हात तिच्या छातीवर विसावले होते. बोटं काम करू लागली होती. वेगाने बाजूला सरकताना तिचं डोकं खिडकीच्या ग्रीलवर आपटलं. मान वळवून कृष्णचूडा इकडे-तिकडे पाहू लागली. सिंचन आपले ओठ तिच्या ओठांवर टेकवू लागला. कधी जमलं, कधी नाही. त्याच वेळी एक हात तिच्या पाठीवर टेकवून दुसऱ्या हाताने तिच्या टॉपची बटणं शोधू लागला. बेधुंद अवस्था! तारुण्याचा उन्माद! मधाळ नजरेने तिच्याकडे पाहात पुटपुटत होता, ''कृष्णचूडा! माझी कृष्णचूडा!...''

कृष्णचूडा झटक्यासरशी बाजूला झाली. तिने आपली सुटका करून घेतली. टॉप सारखा करत म्हणाली, ''मी जाते...''

''काय झालं?'' चकित होत सिंचनने विचारलं.

''काही झालं नाही. पण मी चालले.''

''सॉरी कृष्णचूडा, अचानक काय झालं तुला?'' सिंचन तिला शांतवायचा प्रयत्न करू लागला. ''काम डाऊन, कृष्णचूडा. इट्स ओ.के. आय ॲम सॉरी. मी सांगतोय ना, माझी चूक झाली.''

''मला परत जाऊ दे, प्लीज.''

स्वत:च्या केसावरून हात फिरवता फिरवता सिंचन म्हणाला, ''मीही निघतो आता. पण अचानक झालं तरी काय तुला?''

कृष्णचूडाने उत्तर दिलं नाही. सिंचनला गोंधळलेल्या मन:स्थितीत ठेवून ती बाहेर पडली. लिफ्टमधून खाली आली. हतवाक झालेला सिंचन पाठोपाठ खाली आला आणि तिला शोधू लागला.

— गेली कुठे इतक्यात? बघता बघता दिसेनाशी झाली?

यापुढे रागवायचं नाही, सिंचनने ठरवून टाकलं. आपल्या प्रेमिकेचं चुंबन घ्यायचाही अधिकार नव्हता का त्याला? शारीरिक स्पर्श, बटणं काढायचा प्रयत्न... हे जरा वावगं झालं... पण अशा धुंद अवस्थेत सगळ्या हालचाली ठरवून, तोलूनमापून करता येतात का? त्यात समजुती-गैरसमजुतीचा प्रश्न येतोच कुठे?

त्यानंतरची त्यांची ही आजची भेट. कॉफीचा मग बाजूला सारून तो म्हणाला, ''तुला काय म्हणायचंय, ते मला खरंच समजत नाहीय. तुला वाटत असलं की मी जरा जास्तच सलगी केली, तर मी तुझी क्षमा मागतो. आय ॲम सॉरी.''

त्याच्या नजरेत आपली नजर मिळवत तिने मंदस्मित केलं. म्हणाली, ''तुला सॉरी म्हणायची गरज नाही. मीच सॉरी म्हणायला हवं. सॉरी सिंचन. मला अनेक कोडी सोडवता येत असली, तरी काही कोडी माझ्या आवाक्याच्या बाहेर असतात. मी ती सोडवू शकत नाही. तू मला विसरून जा.''

सिंचन आर्ततेने म्हणाला, ''असं का म्हणतेयस तू? तुला वेड लागलंय का? आर यू मॅड? पराचा कावळा...''

कपाळावरची बट मागे सारत कृष्णचूडा म्हणाली, ''तुझ्यासाठी ती छोटी गोष्ट असली, तरी माझ्यासाठी नाही. मला फक्त मौखिक भाषा दिलीय, शारीरिक नाही. ती किती जरुरीची आहे, ते मला आत्ता समजलं. मी तुझ्या शरीराबरोबर कम्युनिकेट करू शकले नाही. इच्छा असूनही मला ते शक्य झालं नाही.''

''म्हणजे?''

कृष्णचूडा काहीतरी बोलणार होती. पण गप्प झाली. फक्त ''हाय'' म्हणाली. ती दमली असावी. सिंचन हताश होऊन बसून राहिला.

कॉफीचं बिल देऊन झाल्यावर ती म्हणाली, ''तू मला एक टॅक्सी मिळवून देशील का? मला खूप झोप येतेय.''

''देईन.''

मिस्किलपणे ती म्हणाली, ''टॅक्सीचं भाडं द्यावं लागेल तुला. देशील ना?''

बाहेर पडल्यावर तिने आपली गुलाबी छत्री उघडून डोक्यावर धरली. सिंचन तिच्याबरोबर चालू लागला. म्हणाला, ''तू पुन्हा एकदा विचार करशील का कृष्णचूडा?''

कृष्णचूडा तोंड फिरवत म्हणाली, ''नाही जमणार. जी क्षमता मला दिलेली नाही, त्याचा विचार मी करू शकत नाही.''

पहाटे पहाटे के. सिक्स मॉडेल सापडलं. इन्स्टिट्युटच्या गेटला टेकून डोळे मिटून ती बसली होती. झोपाळलेल्या अवस्थेत. तिचे एअर मसल्स, सेन्सर्स, हायड्रॉलिक सिस्टिम यांपैकी एकही घटक काम करत नव्हता. बघितल्याबरोबर लक्षात येत होतं, या मॉडेलचा इनबिल्ट चार्ज संपलाय.

बातमी समजल्याबरोबर मणिमय सामंत धावले.

*(दिवाळी २०१८)*

# एकटेपणाच्या तऱ्हा

**मधुकर धर्मापुरीकर**

एकाच विषयाच्या, एकाच प्रकारच्या अनुभवाशी गुंतून असणाऱ्या दोन भाषांतल्या या लघुकथा. एक, 'माय फादर सिट्स इन द डार्क' ही इंग्रजी कथा तर दुसरी 'मां रसोई में रहती है' ही हिंदी कथा. या दोन्ही कथांच्या निमित्ताने माणसाच्या एकटेपणाची हकिकत मांडणारा हा कथानुवाद आणि लेख.

पिता-पुत्र संबंधांवरच्या कथांच्या संपादनाचे काम चालू होते. मराठीशिवाय हिंदी भाषेतल्या कथांचाही शोध घेत होतो. या दरम्यान हिंदीतील सुप्रसिद्ध कवी-कथालेखक श्री कुमार अंबुज यांची, श्री जयप्रकाश सावंत यांनी अनुवादित केलेली कथा 'समस्या' (मूळ शीर्षक 'मुश्किल') वाचण्यात आली. कथा फारच आवडली आणि मी ती निवडली. कुमार अंबुज यांच्या कथांबद्दल कुतूहल वाढले. त्यांचा 'इच्छाएं' हा कथासंग्रह मागवून घेतला. त्यांच्याशी फोनवर बोललो. ते उत्तम कवीही आहेत हेही दरम्यान समजले आणि पिता-पुत्र नात्यावर त्यांच्या उत्तम अशा कविताही वाचण्यात आल्या. असे काही छान वाचण्यात आले, की हाती घेतलेल्या कामाला गती येते, तसे माझे झाले.

आणि कुमार अंबुज यांच्याशी या विषयावर झालेल्या गप्पांमुळे त्यांची मैत्रीही झाली. नव्याने ओळख झालेला लेखक, त्याच्या आवडलेल्या कथा-कवितांच्या अनुषंगाने होणाऱ्या गप्पा, प्रत्यक्ष भेट नसताना होणारी ती मैत्री मोठी जिव्हाळ्याची असते. या माझ्या उपक्रमामुळे आणखी दोन तीन परभाषक लेखकांशी मैत्री झाली.

'इच्छाएं' या संग्रहात 'मुश्किल' ही मूळ कथा वाचली आणि त्याच नादात इतर कथा वाचल्या. आजचा परिसर, आजचे वास्तव साधेपणाने मांडणाऱ्या या कथा; शिवाय, भूतकाळाच्या आठवणींतून आज काही शोधू पाहणाऱ्या या सगळ्याच कथा विसंगती, उपरोध, व्यंगांचे अस्तर लावून असतात, त्यामुळे गांभीर्य अधिक जाणवत असते.

या संग्रहातली, 'मां रसोई में रहती है' ही कथा वाचली आणि दोन-तीन वर्षांपासून पिता-पुत्र नात्याच्या कथा गोळा करीत होतो, त्या कामाला स्थगिती देऊन वेगळ्याच नादाला लागलो.

किशोरवयीन मुलाने आपल्या आईबद्दल सांगितलेली ही कथा कुमार अंबुज यांनी आठवणींच्या रूपातून सांगितली आहे. गोष्ट सांगायची इच्छा आणि शैली असेल तर, गोष्टीसाठी ठळक घटनांची गरज नसते हे दाखवून देणारी ही साधीसुधी, मात्र सुरेख अशी कथा आहे.

स्वयंपाकघरात बसून राहणारी आई. केव्हाही पाहा दिवसा, रात्री स्वयंपाकघरातच वावरत असणाऱ्या आपल्या आईबद्दल हा पोरगा सांगतो आहे. पूर्ण कथेत आई स्वयंपाकघरातच आहे, ती बाहेर येतच नाही. कथेत तसं काही 'घडत' नाही, तरीही ही एक कथा आहे, उत्तम कथा.

❑

## आई स्वयंपाकघरात असते...

पहाटे तीनच्या आसपास मला जाग आली. काही खुडबुड ऐकायला आली; जाऊन पाहतो, तर स्वयंपाकघरात आई काहीतरी भांडी काढीत होती. मला पाहताच तिला आश्चर्य वाटलं. मग हसून सांगू लागली, ''अरे, पहाटेला आणखी वेळ आहे, जा झोप जा...'' तिची दंतपक्ती मोठी मोहक दिसायची.

मी आळस देत विचारलं, ''इतक्या रात्री काय करतेस? झोपली नाहीस का?''

''असं कसं? आताच तर उठले मी!''

''अं! रात्री तर अकरा वाजेपर्यंत जागीच तर होतीस!'' मी आश्चर्याने विचारलं.

''मग काय झालं? माझी झोपच एवढी असते. तू जा, झोप जा!''

काही दिवसांनंतर मी अचानक रात्री एक-दीड वाजता उठून बसलो. कोणतं स्वप्नं तुटलं होतं, का कसलातरी आवाज आला होता. लक्षात आलं, की स्वयंपाकघरात कुणीतरी आहे. लाइट

चालू होता. जाऊन पाहिलं, तर स्टुलावर बसून आई वर्तमानपत्र वाचत होती. मला पाहून गडबडून गेली. मग स्वत:ला सावरून विचारू लागली, ''पाणी प्यायचं आहे?'' आणि मी काही सांगायच्या आधीच ओगराळे घेऊन पाण्याचा पेला भरू लागली. पाणी पिऊन मी विचारलं, ''आई, तू अजून झोपली का नाहीस?''

''अं! झोप येत नव्हती तर इथे येऊन वाचत बसले, झोपते आता.''

''काय बोलतेस आई तू! केव्हाही पहा, अर्ध्या रात्रीसुद्धा तू स्वैपाकघरातच बसून असतेस!''

''का रे! स्वैपाकघरात बसू नये का? मला तर इथेच बसायला आवडतं.''

''ठीक आहे, मी वैतागून म्हटलं, ''चल, आता झोप बरं!''

''तू जाऊन झोप जा, मी येतेच एवढं पान वाचून.''

पुन्हा असं अनेक वेळा झालं. जेव्हा केव्हा मला रात्रीला जाग येते – बारा वाजता, दोन वाजता, चार वाजता किंवा पहाटे पहाटे पाचला – तेव्हा आई मला स्वयंपाकघरात दिसायची. कधी सांगायची, ''विरजण घालायचं राहूनच गेलं होतं बघ. आता पाच मिनिटांत झोपायला जातेच बघ.'' कधी म्हणायची, ''अरे, लक्षात आलं की घरात भाजीच नाही उद्याला. मग सकाळसाठी चणे भिजत घातले बघ.'' किंवा कधी म्हणायची, ''कणीक तशीच बाहेर होती, फ्रीजमध्ये ठेवायला आले.'' एकदा रात्री बारा वाजता पाहिलं, तेव्हा ती कॅलेंडरवर दुधाचा हिशेब मांडीत होती. विचारलं, तर सांगितलं, ''दररोज दूधाचा हिशोब लिहून ठेवते, पण आज विसरले बघ. आत्ता आठवलं तर लिहून ठेवत आहे.'' कधी रागावते माझ्यावर. म्हणते, ''मी कधी रात्री उठले काही कामासाठी तर, लागलीच माझ्या मागे मागे येतोस!''

✦

गोष्ट सांगायची इच्छा आणि शैली असेल तर, गोष्टीसाठी ठळक घटनांची गरज नसते हे दाखवून देणारी ही साधीसुधी, मात्र सुरेख अशी कथा आहे.

✦

हे तर ती नेहमीच म्हणत असते, ''पाणी प्यायला उठले होते, तर खिडकीतून छान हवा येऊ लागली, तर थांबले घटकाभर.''

स्वयंपाकघरात दक्षिण दिशेला एक छोटीशी खिडकी होती.

एकदा मी घाबरलो होतो. रात्रीचे दोन अडीच वाजले असावेत. आई आपल्या खोलीत दिसली नाही. वडील केवळ उताणं झोपून घोरत होते. बाथरूममध्येसुद्धा नव्हती ती. बैठकीत आणि स्वयंपाकघरात अंधार होता. बाहेरचा दरवाजा तर आतून बंद होता. मी आवाज दिला, ''आई, कुठे आहेस?''

स्वयंपाकघराच्या अंधारातून आई बाहेर आली – ''काय रे, काय झालं? एवढं ओरडायला काय झालं? मला भीती वाटली! हळू बोल. घरातले उठतील ना!''

''बाप रे, आई! मी किती घाबरलो होतो! मला वाटलं, कुठं गेलीस तू?''

''मी कुठे जाईन – मी तर स्वैपाकघरातच होते!''

''मी सगळीकडे शोधलं – स्वैपाकघरात तर अंधार होता.''

''तुला वाटत असेल काळोख, मला सगळं दिसतं. पाणी प्यायला आले होते, खिडकीतून पहात होते. आज सप्तमी आहे वाटतं...''

मला फार राग आला होता, पण मी काय करणार होतो? जाऊन झोपलो!

बाहेरून परतलं, की आईच नेहमी दरवाजा उघडते. मात्र ती येते, सरळ स्वयंपाकघरातून आणि जाते पुन्हा स्वयंपाकघरातच. कधी अचानकच उत्साहाने सांगते, ''बरं झालं, आलास ते. जरा स्टूलवर चढून तो पापडाचा डबा काढून दे बरं!''

तिची सगळी कामं स्वयंपाकघराशीच संबंधित असतात. आणि तिची सगळी स्वत:ची कामंसुद्धा स्वयंपाकघरातच व्हायची. ब्लाऊजची हुकं शिवण्यापासून ते गहू निवडणं-पाखडण्यापर्यंतची सगळी कामं. वर्षातून एखाद्या वेळी मावशीला नाहीतर आत्याला ती पत्र लिहिते, तेही इथूनच. स्वयंपाकघरात बसून. एखादं पुस्तक हाताखाली धरून, वहीच्या पानावर ती लिहिते. शेजारच्या आजी किंवा गल्लीतल्या मुली आईला नेहमी भेटायला येतात, त्यांनाही ती इथेच बसवून घेते. एक लहान चटई आहे, ती कधी फाटत नाही ना उसवत. आजी, अलका आणि मधू या सगळ्या जणींनी आईला अनेक वेळा सांगितलं आहे, तिचं हे स्वयंपाकघर फार छान आहे, नीटनेटकं ठेवलेलं. आमच्या सगळ्या गल्लीत हे सर्वांना माहीत आहे.

कधी निवांत असलेली आई दिसते, तीही आपल्या त्या फूटभर उंचीच्या स्टुलावर बसलेली आणि इथेच स्वयंपाकघरात. हे स्टूल माझ्या जन्माच्याही आधीचं आहे. ...नाहीतर आई दिसते, ती खिडकीशी उभी असलेली दिसते. कुठे हरवून गेल्यासारखी. खिडकीतून दूरवर न जाणे कुठे नजर लावून! मला तर वाटतं, दक्षिण दिशेचं सगळं आभाळ तिला आता माहीत झालेलं आहे. तिकडे कोणते तारे आहेत, किती आहेत, कोणती नक्षत्रं आहेत....कोणत्या ऋतूत, कोणत्या वेळेस हा सूर्य तिथून सरकतो, आणि चंद्राच्या किती कला आहेत इथून दिसणाऱ्या – तिला सगळं काही माहीत आहे. हवेच्या अदमासावरून, आकाशावरून तिला ऋतूंचा अंदाज येत असतो किंवा असं वाटतं, की ती हे सगळं पाहातसुद्धा नसेल. दूरवर दिसणाऱ्या दोन-तीन झाडांच्या पानांकडे पाहत असेल किंवा केवळ श्वास घेण्यासाठी म्हणून ती इथे उभी राहत असेल. तिच्याकडून या गोष्टी माहीत करून घेणं नेहमीच मोठं अवघड असतं. ती आपल्याला काहीतरी सांगून वेळ मारून नेऊ शकते आणि गंमत म्हणजे आपल्याला वाटणारही नाही, की ती तशा तऱ्हेने काहीतरी वेळ मारून नेते आहे.

तिला स्वयंपाकघरातून बाहेर काढायचा-बोलवायचा प्रयत्न नेहमीच असफल होत असतो. आवाज देऊन तिला विचारलं, की

बेल्ट किंवा मोजे नाहीतर घड्याळ कुठे आहे माझं, तर आपली अपेक्षा असते, की ती बाहेर येईल. पण ती स्वयंपाकघरातूनच सगळं काही सांगेल. दाराच्या मागे खिळ्याला पहा, नाहीतर कोपऱ्यात झाडूपाशी पहा किंवा तिथे उशीच्या खाली. तिच्या आवडीचं कोणतं गाणं रेडिओवर लागलं असेल तर ती तिथूनच सांगेल, ''रेडिओचा आवाज थोडा मोठा कर, इथे स्वैपाकघरात ऐकायला येत नाहीये.''

सुटीचा दिवस होता. दुपारच्या दीडच्या सुमारास मी जेवण करून आराम करायला बैठकीत आलो. लहान भाऊ क्रिकेट मॅच खेळायला गेला होता. साडेतीन वाजता उठून पाहिलं, तर आई स्वयंपाकघरात बसून तांदूळ निवडत बसली होती. मी तिच्या गळ्यात पडलो आणि हट्टाने म्हणू लागलो, ''हे काय ग! दिवसरात्र काम न् काम! काही न काही करत असतेस – कधी पीठ तर कधी पाणी तर कधी दूध. कधी हे गरम कर, कधी ते थंड कर, कधी हे भर, कधी निवड तर कधी पाखड! काही काम नसेल तर नारळ खवत रहातेस नाहीतर मसाल्याचे डबे बदलत असतेस. स्वैपाकपाणी तर चालूच असतं. भाजी निवडून तर त्याचा ढीग लावून बसतेस. आता हे तांदूळ घेऊन बसलीस. पेपर वाचणं, पत्र लिहिणं हेसुद्धा इथेच. मला हे सगळं काही आवडत नाही बघ. मोलकरीण भांडी घासते, तेव्हाही तू इथेच असतेस. तुझ्या खोलीत जाऊन तू आराम का नाही करत? बाबांची अन् तुझी खोली आहे, ती नावापुरती! मग तू बैठकीततरी आराम करीत जा...''

''तुला नाही कळायचं ते. ही सगळी कामं आधीच करून ठेवावी लागतात. एकाच वेळी कुणी कसं काय भात-भाजी-वरण करू शकणार सांग! जेव्हा भूक लागते, तेव्हा ती एकदम भूक लागलेली असते. मोलकरणीशी बोलत असते, तिला काही उरलं-सुरलं देत असते. कधी तिला चहा करून द्यावा लागतो. अशी बारकी-सारकी कामं करावीच लागतात, ही कोण करणार? आणि मी तर आमच्या खोलीतच झोपते की रे; बैठकीत बसणं, लवंडणं मला बिलकूल नाही आवडत. तिथे एवढी वर्दळ असते, की दोन मिनिटांचा आरामसुद्धा होत नाही. माझं काम स्वैपाकघरातच असतं, इथेच मला बरं वाटतं पहा.'' माझ्या डोक्यावरून हात फिरवीत, समजावीत तिने मला सविस्तर सांगितलं. या वयातही आईचे केस कसे काळे अन् लांबसडक आहेत!

ती अशा तऱ्हेने बोलते, की मी चार-पाच वर्षांचा मुलगा आहे आणि मला काही समजत नाही. प्रत्येक वेळेस मला वाटतं, की खरंच मी आईसमोर लहानच आहे, अजाण बालकासारखा.

एकदा संध्याकाळी मी पाहिलं, तर स्टूल भिंतीशी ठेवलं आहे, त्यावर आई बसली आहे. तिच्या मांडीवर ताट आहे, त्यात दूधी सोलून ठेवलेला आणि तिथेच चाकूसुद्धा ठेवलेला. डोकं भिंतीला टेकवून आई झोपली होती! एक गाढ अशी विश्रांती तिच्या चेहऱ्यावर दिसून येत होती आणि दीर्घ श्वास चालू होता. आईला जागं करावं का कसं या विचारात मी थोडावेळ उभा होतो. परतून जात होतो, आणि एवढ्यात जागं होऊन आईने विचारलं, ''काय रे, काय पाहिजे?''

आईकडे लक्षपूर्वक पाहात मी म्हटलं, ''आई, तू किती थकून जातेस, पण इथेच – इथेच बसून रहातेस! तुझ्या खोलीत जाऊन का बरं आराम करीत नाहीस? बघ, तू आत्ता इथे थकून झोपली होतीस!''

''नाही रे, मी झोपली नव्हते. कधी कधी मला असं भिंतीला टेकून बसून रहायला छान वाटतं. मी मुळीच थकलेली नाहीय; काय-काय पाहिजे तुला?''

''आजकाल बायका काय काय काम करतात! तू कधी कधी बाहेर जाऊन येत जा ना! इथे या पिंजऱ्यात बसून काय असतेस?'' मी मोठ्या तळमळीने तिला सांगू लागलो.

''मी फिरून येत असते, तू लक्ष देत नाहीस. सगळीकडे जाते, तिकडे बाहेर बागेतसुद्धा. तुम्ही जेव्हा घरी नसता, तेव्हा मी बरीच फिरत असते. कितीतरी वेळा मी दूर गेले आहे...'' तिचा आवाज, स्वयंपाकघरातल्या गव्हाच्या टाकीतून यावा तसा येत होता.

मला तिचं काही बोलणं समजू लागलं, काही नाही. मग ती हसून सांगू लागली, ''सुरुवातीला मी अस्वस्थ व्हायचे. मात्र आता मला घरचं काम करायलाच चांगलं वाटतं बघ. घरातच एवढं चालणं-फिरणं होतं, कुठे वेगळं जायची गरजच वाटत नाही. मी माझ्या आईवर गेलेय, असं म्हणतात! तिलासुद्धा हेच सगळं आवडायचं.''

''तुला मुलगी असती, तर तिलासुद्धा तू असंच बनवलं असतंस.''

''सगळ्यांना सगळे मिळून बनवत असतात. आम्ही सगळे. मुलीसुद्धा अशाच तऱ्हेनं बनत जातात. पण आजच्या जमान्याचं काय सांगावं! ती वेगळीसुद्धा झाली असती!'' आई खूश होती का उदास का नाराज, काही कळत नव्हतं.

मी मुकाट्याने माझ्या खोलीत गेलो. थोड्या वेळाने, स्वयंपाकघरासमोरून गेलो. पाहिलं, तर आई किचन ओट्यावर चढून कसला तरी डबा काढायच्या प्रयत्नात आहे.

''आता मात्र हद्द झाली आई तुझी! मी घरी आहे ना? मला सांग, काय उचलायचं आहे?'' मी तिच्यावर ओरडलोच.

''दिवसभर कितीतरी वेळा अशा वस्तू उचलाव्या, ठेवाव्या लागतात. किती वेळा तुला सांगायचं?''

मग ती ओट्यावरून खाली उतरली ती जवळपास उडी मारावी तशी. आणि एकदमच आपल्या डाव्या पायाची टाच हाती धरून वेदनेने कण्हू लागली. मी तिला सांभाळून तिथेच स्टुलावर बसवलं. सांगू लागली, ''मला वाटतं, मुरगळलाय...''

''हो, अशा तऱ्हेने उतरलीस तर दुसरं काय होणार? मी केलं नसतं का हे काम?''

''थोडं मुडपलं असेल, पाय तिरपा झाला. चालायचंच. चल,

तो मसाल्याचा डबा घे बरं इकडे.''

आणि तिथेच स्टुलावर बसून ती पायाला लावायला हळदीचा लेप तयार करू लागली.

त्याच रात्री मध्येच मला जाग आली, तेव्हा मी तिथूनच पाहिलं. खिडकीतून स्वयंपाकघरात प्रकाश येत होता. आणि त्या दुधाळ उजेडात आई खिडकीशी उभी होती. एकदम सहज, सरळ. पायाला कसली मुरड पडल्याची वा जखमेची जाणीवसुद्धा तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. ती खिडकीतून दूरवर पाहत होती. कदाचित आकाशातला चंद्र, कदाचित झाडी... किंवा कदाचित काहीच नाही. मग ती सावकाश वळली आणि स्टुलावर बसली. भिंतीला डोकं टेकवून तिने डोळे मिटले.

■

स्वयंपाकघरात बसून राहणाऱ्या आईबद्दलची ही कथा वाचली, आणि मला फार पूर्वी वाचलेली एक इंग्रजी कथा आठवली. योगायोगाची गंमत वाटली; कारण त्या इंग्रजी कथेचा अन् या हिंदी कथेचा गाभा एकच होता – स्वयंपाकघरात बसून राहणे आणि एकटे बसून असणे. दोन्ही कथांत हे महत्त्वाचे साम्य होतेच, शिवाय आणखी सारखेपणाचे काही मुद्दे होते.

दोन्ही कथांत हकीकत सांगणारा किशोरवयीन मुलगा होता.

दोन्ही कथांत या निवेदकाला कमालीचे आश्चर्य आणि कुतूहल असते.

दोन्ही कथांत एकटेपण होते आणि स्वयंपाकघरातलेच ते एकटेपण...बसून असणे...

दोन कथांत फरक असा होता, की इंग्रजी कथेत निवेदकाचे वडील स्वयंपाकघरात रात्री (रात्रभर) एकटेच बसून असतात आणि हिंदी कथेत आई.

दोन्ही कथांमध्ये मुले तेच विचारतात – 'तू/तुम्ही झोपायला का नाही जात? काय करतेस/करता इथे बसून?'

दोन्ही कथांत या प्रश्नांना स्पष्ट अशी उत्तरे नसतात.

दोन्ही कथा दीड हजार शब्दसंख्येपर्यंतच्या लघुकथा.

कथा जसजशा पुढे जातात, तसतसा वाचणाराही तसाच अस्वस्थ होत जातो – त्याचे कुतूहल वाढत जाते. तेच प्रसंग, तशीच उत्तरे... कथा पुढे जातात.

एका कथेतले बाबा, दुसऱ्या कथेतली आई.

स्वयंपाकघरात बसून असणारे, वावरणारे.

त्यांचे ते एकटेपण.

हिंदी कथेचा अनुवाद आपण वाचला आहे. इंग्रजी कथेबद्दल विस्ताराने पाहू या.

'माय फादर सिट्स इन द डार्क' ही ती जेरोम वाईडमन (१९१३-१९९८) या अमेरिकन लेखकाची कथा. या लेखकाने कादंबरी, कथा आणि नाटके लिहिली. १९६०मध्ये त्यांना नाट्यलेखनाबद्दल पुलित्झर पुरस्कार मिळाला.

कथेतला निवेदक पोरगा, कुण्या निमित्ताने रात्री केव्हाही तो स्वयंपाकघरात जात असतो.

स्वयंपाकघरात अंधारात बसून असतात त्याचे बाबा. तोंडात चिरूट. सावकाश धूम्रपान चालू असते त्यांचे. स्वस्थ खुर्चीत बसून अंधारात नजर लावून बसलेले बाबा; एकटक नजर लावून बसलेले.

पोराला आश्चर्य वाटते. तो विचारतो, "Why don't you go to bed, Pa?"

हिंदी कथेतसुद्धा मुलगा विचारतो, ''तुम इतनी रात में क्या कर रही हो? क्या सोई नहीं?''

दोन्ही कथांत, या प्रश्नांना उत्तर असते – 'तू जा, झोप; येतोच/येतेच.'

कथेतला हा निवेदक मुलगा आपल्या बाबांची ही सवय सुरुवातीलाच सांगतो. ती विचित्र सवय. रात्री हा जेव्हा स्वयंपाकघरात पाणी पिण्यासाठी जातो, तेव्हा त्यांच्यात असे संवाद होतात.

''बाबा?''

''अं...''

''तुम्ही झोपायला का नाही जात बाबा?''

''जातो...''

पण ते बसून असतात. मी झोपायला जातो, झोपून जातो; पण मला खात्री असते, बाबा तिथेच बसून आहेत अंधारात. चिरूट तोंडात धरून, झुरके घेत बसलेले बाबा.

घरी आई असते, त्याची बहीण असते, लहान भाऊ असतो. रात्री आवराआवर करून सगळे झोपायला जातात, आईसुद्धा बाबांचा निरोप घेऊन झोपायला जाते. हा निवेदक काहीतरी वाचत असतो. त्याला माहीत असते. मध्येच जेव्हा तो उठून जातो, आणि पाहतो – बाबा बसून असतात अंधारात. मुलाला कुतूहल वाटते, काळजी वाटते, कधी बाबांच्या संक्षेपाने उत्तर देण्याच्या सवयीचा रागसुद्धा येतो. आपल्यालासुद्धा एक गूढ कुतूहल वाटत असतेच. एकदा पोरगा बाबांना विचारतो –

''तुम्ही झोपायला का जात नाही बाबा?''

''जातो आता,'' ते म्हणाले, ''माझी वाट पाहू नको.''

''पण तुम्ही कितीतरी तासांपासून बसून आहात, काय झालंय – कशाचा विचार करीत आहात एवढा?''

''काही नाही रे बेटा.'' ते म्हणतात, ''काही नाही, मी निवांत आहे, बस. काही नाही.''

बाबा ज्या तऱ्हेने सांगायचे, ते मुलाला पटायचे. ते तसे काळजीत तर दिसायचे नाहीत. त्यांचा आवाजही साधा-समजुतीचा असतो नेहमी. पण तरीही ते रात्रभर एका साध्या-अवघड अशा खुर्चीत बसून कसला विचार करतात, त्यांना काही चिंता आहे का असा विचार मुलाचा पिच्छा सोडत नाही. पुन्हा तेच प्रश्न, पुन्हा त्याला तशीच उत्तरे. बाबांची बुद्धी क्षीण होते आहे असे नाही. त्यांची प्रकृती उत्तम आहे, मित्रांत ते चांगले बोलतात. वर्तमानपत्र ते चवीने वाचतात. राजकीय घटनांबद्दल त्यांची स्वत:ची अशी मते असतात. कुठेच काही बिघडलेले नसते. कुटुंबाची आर्थिक स्थितीसुद्धा तशी बऱ्यापैकी असते. एवढे असताना बाबा रात्री का बरे एकटेच बसून असतात स्वयंपाकघरात अंधारात? नुसतेच बसून... एकदा अगदी तळमळीने तो बाबांना विचारतो –

''काही बिघडलंय का बाबा?''

''नाही बेटा, काहीच नाही.''

''मग तुम्ही इथे एकटे का बरं बसून असता? विचार करता उशिरापर्यंत...''

''निवांत वाटतं बेटा, मला आवडतं.''

मला कसे अधांतरी वाटत राहते. उद्या पुन्हा ते इथे बसतील. मी पुन्हा संभ्रमात पडेन. काळजी वाटेल मला. आता मी थांबणार नाही. आता मला राग येतोय.

''ठीक आहे, तुम्ही कशाबद्दल विचार करता ते सांगा नं बाबा! तुम्ही का असे बसून असता इथे? तुम्हाला कशाची काळजी वाटते? काय विचार करता?''

''मला कशाची काळजी नाही बेटा. मी व्यवस्थित आहे. निवांत आहे. जा, झोप जा.''

बाबा जे काही सांगतात, ते एवढेच. एकदा मुलाला तहान लागते. (त्याला फार तहान लागते, नेहमी पाणी प्यायला तो जात असतो.) स्वयंपाकघरात नेहमीप्रमाणे अंधार असतो. नळ हाताला लागत नाही, तसा तो दिवा लावतो आणि बाबा जणू धक्का बसल्यासारखे सावरतात. दिवा बंद करायला सांगतात. कारण विचारले, तेव्हा सांगतात,

''हेच बरं वाटतं. मला प्रकाशात बसणं अवघड वाटतं. लहान असताना, आम्ही युरोपमध्ये होतो, तेव्हा आमच्याकडे वीज नव्हती...''

आणि तिथे या मुलाला – कथेच्या निवेदकाला काहीतरी अंधूक आठवते. तो सांगतो,

'...ऑस्ट्रियामधल्या, बाबांच्या लहानपणाच्या त्या हकिकती मला आठवू लागल्या...तांबड्या-पेटलेल्या निखाऱ्यांची, रुंद अशी भट्टी असलेली ती खानावळ मला दिसू लागली. त्या भट्टीमागे माझे आजोबा उभे आहेत...रात्र वाढत चाललेली, गिऱ्हाइकं निघून गेलेली.... आणि त्याला डुलकी लागत असलेली... विस्तवाचा तो गालिचा मला दिसतो आहे. भडकलेल्या ज्वालांचे आता विझत चाललेले ते निखारे... परिसर अंधाराचा-अधिकच दाट अंधाराचा होत चाललेला... एक लहान पोरगा... पानांच्या डहाळ्या-फांद्यांनी बनविलेल्या बिछान्यावर गुडघ्यात वाकून बसलेला...बाजूला ती मोठी-लांबट अशी भट्टी. त्या विझत चाललेल्या विस्तवावर रोखलेली त्याची ती नजर...नजरेतली ती चमक... हा लहान पोरगा – म्हणजेच माझे बाबा. स्वैपाकघराच्या दाराशी उभं राहून बाबांकडे पाहताना हे सगळे भूतकाळाचे क्षण मला जाणवले.'

गंमत अशी, की बाबांच्या तशा अंधारात बसून राहण्याच्या सवयीचा उलगडा आता झाला, तरी मुलाला एक प्रश्न अस्वस्थ करीत असतोच. आपल्या खोलीकडे जाताना, पोरगा परत फिरतो. पुन्हा दारात थांबतो. परत मुलाचे-बाबाचे संवाद होतात,

''पण तुम्ही कशाचा विचार करता बाबा?'' मी विचारले.

दूरवरून आल्यासारखा बाबांचा आवाज आला, शांत स्थिर असा...

''काहीच नाही, काहीच तर नाही...'' बाबा म्हणाले.

आणि कथा तिथेच थांबते.

■

हिंदी कथेतले वातावरण ओळखीचे आहे. आईबद्दल सगळ्यांचा असा अनुभव तसा सारखा असतो. मात्र इंग्रजी कथा... आपण दोन्ही कथांचा विचार करायला लागतो. सहसा कथेमध्ये, शेवटच्या भागात कथेला एक गती आलेली असते. काही उलग़डा तरी होतो, किंवा घटनांना असे वळण लागते, की कथा संपल्यावर त्या सगळ्या मजकुराला एक छान असे कथारूप आलेले दिसते. आपण 'कथा' वाचली असा अनुभव येतो. (यानिमित्ताने मी नमूद करून ठेवलेले आहे, की कस्तुरीमृगाच्या बेंबीमध्ये जशी कस्तुरी असते – जिथे असते, तसेच कथेचे असते. कस्तुरीचा जसा दरवळ, तसा त्या कथेच्या आशयाचा; ज्यामुळे ती कथा आपल्याला जाणवत राहते.) इंग्रजी कथा अशा स्वरूपाची आहे. यात कथेच्या उत्तरार्धात कथनाला तसे वळण लागले, आणि बाबांच्या अंधारात बसून असण्याचे कारण मुलाला अंधूक का होईना, कळू लागले.

तरीही बाबा कशाचा विचार करतात, हा प्रश्न शेवटी लेखकाने आपल्यावर सोडला आहे.

मला ही कथा आवडली, ती त्या कुतूहलापोटी. ते वातावरण, बाबांचे व्यक्तिचित्रण – यांमुळे. पण त्यांच्या सवयीचा जो संदर्भ आहे, त्यांच्या लहानपणातल्या अनुभवाचा – झोपेला आलेला, तो छोटा पोरगा, त्याची नजर भट्टीतल्या त्या विझत चाललेल्या विस्तवावर खिळून असलेली...त्याचा असा संबंध, हे सगळं 'रोमँटिक' वाटू लागले.

नेटवर या कथेवर सविस्तर चर्चा आहे. इतकेच काय,

कथेच्या अनुषंगाने प्रश्न-उत्तरांचे एक पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनही आहे. ते वाचून व बघून मला एक महत्त्वाचा मुद्दा कळला. ही कथा मला 'तेवढी' का जाणवली नाही, त्याचे कारण समजले.

निवेदकाचे बाबा, निवेदकाचे आजोबा – ते कुटुंब तिकडे ऑस्ट्रियात होते. युद्ध किंवा अन्य समस्यांमुळे त्यांना देश सोडावा लागला...आता आजोबा नाहीत. बाबा इथे आहेत, त्यांचे सगळे कुटुंब इथे – इथल्या देशात सुरक्षित अशा वातावरणात आहेत. बाबांच्या मनात मात्र तीच अस्थिर, अस्वस्थ करणारी आठवण असेल, मायदेशाची, ते दिवस... त्यांच्या वडिलांच्या आठवणी आता या वयात त्यांना तीव्रतेने येत असतील....असेच असावे. मला तसे युद्धाचे-वाताहतीचे अनुभव ना कधी आले, ना कधी पाहिले. त्यामुळे मला निवेदकाच्या बाबांच्या वेदना जाणवल्या नसाव्यात का? किंवा या संदर्भामुळे ही कथा एवढी गाजली असावी का?

हिंदी कथेत तर मी म्हटले, तशी शेवटी काही गती आली नाही – ना आईच्या तशा राहण्याचा उलगडा होत. मग त्या 'कस्तुरी'चे काय? ही कथा' होऊ शकते का...


याचे उत्तर कथेचे अभ्यासक व्यवस्थित देऊ शकतील. माझ्यासारख्या वाचकाला कथेबद्दल सांगण्यासाठी उपमा-प्रतिमांचा आधार घ्यावा लागतो. मला हिंदी कथेतली ही आई एका नितळ, संथ आणि निर्मळ प्रवाहासारखी वाटते. सतत प्रवाही आणि कार्यरत राहणारे एका स्त्रीचे ते व्यक्तिमत्त्व. (ही उपमा जेव्हा मी कुमार अंबूज यांना सांगितली, तेव्हा त्यांनी 'हिंदुस्थानी स्त्री!' अशी त्यात दुरुस्ती केली!) त्याउलट, जीवनप्रवाहात भोवरा यावा, माणूस त्या भोवऱ्यात फिरत राहावा, तसे त्या इंग्रजी कथेतले बाबा. हिंदी कथेत एक सुरेख असे व्यक्तिमत्त्व उभे केलेले आहे आणि गोष्ट सांगावी तशी ती हकिकत सांगितलेली आहे.

हिंदी कथा आणि इंग्रजी कथा या दोन्हींत असलेले आणखी एक साम्य सांगायचे राहिले – दोन्ही कथांत स्वयंपाकघरात एक खिडकी आहे. रस्त्यावरच्या दिव्याचा मंद असा छाया-प्रकाश त्यातून येतो आणि स्वयंपाकघरातले वातावरण अधिकच गूढ होत जाते, ते इंग्रजी कथेमध्ये. ('The dim shadow of light that comes through the window from the street lamp only makes the room seem darker.') आणि 'मां रसोईमें रहती है' कथेमध्ये निवेदक सांगत असतो –


...खिडकी से रसोई में रोशनी आ रही थी और उस दूधिया रोशनी में मां खिडकी पर खडी थी। एकदम सीधी, तनी हुई।...वह खिडकी के पार देख रही थी। शायद चांद, शायद पेड। शायद कुछ नहीं...

दोन्ही कथांतल्या मुख्य पात्रांच्या एकटेपणाच्या अशा वेगवेगळ्या तऱ्हा...

*(दिवाळी २०१८)*





*फेब्रुवारी २०११, कुसुमाग्रज*
*(छायाचित्र : ल. म. कडू)*




*ऑगस्ट २०११*
*(चित्रकार मुक्ता अवचट)*

# भीती हीच वाटते

मराठी भाषेबद्दल आपण असंच उदासीन राहिलो
तर एक वेळ अशी येईल;
आदिवासी भाषेसारखं
जुजबी महत्त्व
मराठी भाषेला राहील.



*प्रश्न भावनिक अभिमानाचा नाही*
*तर अस्मितेचा आणि*
*अस्तित्वाचा आहे.*

**अंतर्नादची धडपड त्यासाठीच आहे**

*(अंकात वेळोवेळी छापलेले निवेदन)*



# व्यक्तिविमर्श

# बेडेकर

**अरविंद गोखले**

(कै.) अरविंद गोखले यांचा हा लेख त्यांचे चिरंजीव श्री. आनंद अरविंद गोखले यांनी अंतर्नादकडे दिला. लेख तसा जुना आहे. हस्तलिखितावरची तारीख मार्च १९८३ची आहे. परंतु विश्राम बेडेकरांकडे पाहण्याच्या एका आगळ्या, वेधक नजरेमुळे हे लेखन पुन्हा प्रकाशित करणे योग्य वाटले.

एका श्रेष्ठ लेखकाने दुसऱ्या श्रेष्ठ लेखकाच्या व्यक्तित्वाचा घेतलेला हा शोध वाचकांना आवडावा.

राहून राहून वाटतं की या माणसाची व आपली मैत्री व्हायला हवी होती. वारंवार भेटीगाठी घडायला हव्या होत्या. याची आगळे अनुभव घेण्याची किमया व ते प्रत्ययकारी पद्धतीत मांडण्याचं कसब शिकून घ्यायला हवं होतं. लेखनातलं याच्या शब्दकळेचं कूळ आणि सिनेमातलं याच्या संहितेचं मूळ समजून घ्यायला पाहिजे होतं.

हा माझ्याहून वयाने मोठा, बराच प्रसिद्धिविन्मुख, अतिशय बुद्धिमान, विलक्षण प्रतिभावान. स्नेह, सहवास जरासा अशक्यच. तरी पण ज्या आमच्या ओझरत्या गाठीभेटी झाल्या त्यामुळे ओळखीची ओढ वाटते. पण मीच आळस केला, अनास्था दाखवली. याच्याशी सलगी करण्यात हीरोवर्शिप, गुरुबाजी वगैरेचा वास येईल असं वाटून मीच...

मूर्तिभंजक मनोवस्थेत असतानाच या माणसाचं नाव मला कळलं. किंबहुना हाती आलेल्या पुस्तकावर लेखकाचं नाव छापलेलं नव्हतं. त्यामुळे ते कळलेलं नाव अधिक लक्षणीय झालं. सवंग प्रसिद्धी, उथळ जाहिरातबाजी, परभूत लेखन, खोटी मूल्यं — या सर्वांविरुद्ध मन नुकतंच बंड करू लागलं होतं. पाश्चात्त्य साहित्याचा परिचय होत होता आणि मराठीत काही सकस, सर्वस्पर्शी वाचायला मिळत नाही याची खंत वाटत होती. अशा अस्वस्थ अवस्थेत नुकतीच प्रसिद्ध झालेली 'रणांगण' ही छोटेखानी कादंबरी हाती आली. एका बैठकीत ती मी झपाटल्यासारखी वाचून काढली. अन् मग विकत घेऊन वेळीअवेळी वाचत राहिलो.

मला हवी तशी सकस, सर्वस्पर्शी, आत्म्याला हात घालणारी कलाकृती! 'रणांगण' या अपूर्व भावकथेने मी भारावून गेलो. मंत्रमुग्ध झालो. भावपूर्ण भाषा, आगळी शैली. अंतर्मुख करणाऱ्या, भावजीवन ढवळून टाकणाऱ्या घटना. अनोखी, विफल प्रेमाची कहाणी. जागतिक महायुद्धाची विदारक पार्श्वभूमी. अपूर्व, अक्षर!

'रणांगण'मधील दोन-चार शब्दांची वाक्यं, अशा वाक्यांच्या मालिकेतून परावर्तित होणारा आशय, काळजात स्त्रवणारी भावनांची कारंजी आणि डोळ्यांपुढे येणारी रंगीत इंद्रधनुष्यं...

'...उशासमोर पोर्टहोल होते. बाहेर नजर टाकली. आकाश झाकोळले होते. त्यामुळे सगळे खिन्न वाटे. समुद्राचे डबके झाले होते. शांत आणि गढूळ. मध्येच थोडे ऊन पडले...'

हे सुरुवातीचं वर्णन. अन् —

'...ऐन तारुण्य. सगळे जग समोर. सगळ्या शक्ती अधीन. आणि दोन मानवी जीव जवळ येतात. हात हातात घेतात. म्हणतात, हा भेटीचा क्षण अखेरचा! असे आयुष्यात सहसा कधी होते का? मृत्युवेळेशिवाय?

ही जीवाला घोर लावणारी प्रारंभीची खेळी. जुन्या स्मशानास, ''मृत्यूच्या हिवाळ्याने पसरलेले पांढरे शुभ्र बर्फ!'' अशासारख्या वेगळ्या विलक्षण उपमा. काळीज पिळवटत, डोळे विस्फारित एक करुणरम्य भावकथा कायमची झपाटून गेली. हॅर्टाची पत्रातली ती अखेरची वाक्यं तर मनावर कायमची कोरली गेली.

'...अनेक दुःखांच्या आघातांनी, आशंकांनी, भीतीने माझ्या काळजाचे पाणी झाले होते. त्या मनाचा तू स्वीकार केलास. येशूच्या नुसत्या नजरेने पेल्यातल्या पाण्याचे सुंदर मद्य झाले! तुझ्या स्वीकाराने माझ्या साठलेल्या गढूळ जीवनाला आशेची आरक्ती आणली! नेहमी कठोर भासणाऱ्या तुझ्या नजरेत क्वचित आर्द्रता चमकते. त्या खोल दडलेल्या झऱ्यांचा शोध लावण्यासाठी मन उत्सुक होते. तुझा कठोरपणा कितीही खणत राहावे लागले, त्यासाठी कष्ट पडले, प्राण कासावीस झाले तरी त्या श्रमात आनंद होतो. आणि शेवटी थकून जाऊन मनाचे वेडे पाखरू तुझ्या हाती सोपविले की पाहता पाहता तू स्वतःच नाजूक होतोस. मधुर शब्दांच्या फुलांचे, कल्पनांचे हिंदोळे बांधून देतोस; त्यावर झुलवीत बसतोस... हेच प्रीतीचे अपार वैभव माझ्या अपुऱ्या हातांनी लुटण्याचा मी वारंवार यत्न केला. तरीही ते उरलेच!'

असल्या अनोख्या कलाकृतीचा लेखक अज्ञात राहून साहित्यातील या 'हॅपनींग'ला एक नवीनच परिमाण आलं.

पण 'रणांगण'चे लेखक विश्राम बेडेकर आहेत हे उघड गुपित लवकर सर्वत्र फैलावलं. निनावी नाही, पण 'विभावरी शिरूरकर'

हे टोपण नाव घेऊन स्त्री-जीवनावरील खळबळजनक लेखन करणाऱ्या बाळुताई खरे यांच्याशी बेडेकरांचा विवाह झाला आहे ही वार्ता साहित्य सांस्कृतिक जगात सनसनाटी ठरली. सुशिक्षित, साहित्यप्रेमी समाज बाळुताईंच्या लेखा-भाषणांची चर्चा करीत विश्राम बेडेकरांच्या पुढील लेखनकृतीची प्रतीक्षा करीत राहिला.

बेडेकरांचं नाव यापूर्वी मी ऐकलं होतं. ते सिनेमा-नाटकांच्या संबंधात. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांनी 'ब्रह्मकुमारी' नावाचं नाटक लिहिलं होतं. मास्टर दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर यांनी ते दिमाखदार बसवलं होतं. आता जरी त्यातली गाणीच गाजत असली तरी तेव्हा ते नाटक ही एक अभिनव साहित्यकृती समजली गेली होती. पुढे याच 'बलवंत' कलावंतांसाठी बेडेकरांनी 'ठकीचे लग्न आणि सत्याचे प्रयोग' हा, दोन वेगळ्या कथानकांचा विनोदी चित्रपट दिग्दर्शित केला होता. 'ब्रह्मकुमारी' मी वाचलं नव्हतं. पण हा वेगळा बोलपट पुण्याच्या 'किर्लोस्कर' थिएटरात दोन-चार वेळा पाहिला होता. आचार्य अत्रे-मास्टर विनायक यांच्या कामगिरीच्या आधी कितीतरी वर्षे बेडेकरांनी दामुअण्णा मालवणकरांना पडद्यावर आणलं होतं. गडकरी-चिं. वि. जोशी यांच्या लेखनाला दृक्श्राव्य माध्यम दिलं होतं. अभिजात विनोदी सिनेमा काढण्याची करामत केली होती.

अभिजात, अभिनव असं नाटक, मग चित्रपट आणि मग कादंबरी. विश्राम बेडेकरांचं नाव माझ्या लेखी फार महत्त्वाचं झालं होतं. आदराचं, आणि कुतूहलाचंही...

यातच अकस्मात भर पडली, भोवरे उठले ते बेडेकरांना प्रभात फिल्म कंपनीमध्ये पाहिलं – तेव्हा! 'प्रभात' ही आम्हा सर्वांना प्रिय, पूज्य अशी संस्था होती. तेथील कलाकार व कारागीर माझे मित्र होते. तेथील कलाकृतींची जडणघडण मी जवळून न्याहाळीत होतो. अशा कलामंदिरात विश्राम बेडेकर, शांतारामबापू यांच्याकडे कथा-संवाद लिहायला व चित्रपटाचं तंत्र शिकायला आले आहेत ही घटना मला अर्थपूर्ण वाटली. प्रभात-बेडेकर युती मराठी चित्रपटसृष्टीचं भवितव्य अधिक उज्ज्वल करणार यात मला संदेह नव्हता... बेडेकर-शांतारामबापू यांच्यामधील जुगलबंदीचे किस्से कानावर येऊ लागले – दुसऱ्याला चटकन चांगलं न म्हणणारे शांताराम आठवले व राजा नेने बेडेकरांनी लिहिलेल्या 'शेजारी' कथेच्या संवाद, सिनॉप्सीसची तोंड भरून तारीफ करू लागले... पायघोळ धोतराचा काचा, खांद्यावर कायमचा कोट टाकलेला, भक्कम शरीराला साजेसा व तरी जरा मोठा भासणारा जबडा – आपल्याच नादात प्रभात रोडवरून एकटे जाणारे, इंटरनॅशनल बुक डेपोत पुस्तकं चाळणारे, ई. म्युरॅटोर रेस्टॉरंटमध्ये शिरणारे विश्राम बेडेकर – एखाद्या ग्रीक पुतळ्याकडे पाहावं तसं मी व माझे स्नेही भारावून बघत राहिलो.

'नजराणा' ह्या माझ्या पहिल्या कथासंग्रहाच्या निमित्ताने बेडेकरांची भेट झाली.

✦

स्फूर्तीचा झटका, अवकाशातून येणारा अनुभूतीचा स्पर्श, काळजात उगवणारी कलाकल्पना, निर्मितीचं गूढ, प्रतिभेच्या परीसाचा चमत्कार, आकृतिबंधाचा साक्षात्कार, कलाकाराच्या दैवी गुणाचं गारुड... आजवर सर्जनशील कलाकृतीबद्दल ऐकलेलं, वाचलेलं, मानलेलं हा माणूस मोडून टाकीत होता.

✦

बाळुताईंची व माझी आधी बरीचशी ओळख होती. पहिल्या पुस्तकाच्या उत्साहात मी 'नजराणा'च्या प्रती ओळखीच्यांना वाटीत होतो, त्यात एक प्रत कुठल्याशा निमित्ताने बाळुताईंना आवर्जून दिली. पुढे त्या भेटल्या तेव्हा म्हणाल्या की, त्यांना वाचायला फुरसत मिळाली नाही, पण बेडेकरांनी त्या कथा वाचायची शिफारस केली आहे. बाळुताईंनी माझं पुस्तक वाचलं नाही याचं वाईट वाटण्याऐवजी बेडेकरांना 'नजराणा'तल्या कथा आवडल्या याचाच मला हर्ष झाला.

मी मग एका रविवारी सकाळचा उठलो आणि प्रभात रोडवरच्या एका गल्लीतील 'मनुस्मृति' बंगल्याच्या दाराशी उभा राहिलो.

विश्राम बेडेकरांनी माझं स्वागत केलं. पण 'नजराणा'चा विषय त्यांनी काढला नाही. मी 'रणांगण'बद्दल बोलू लागलो तेव्हा म्हणाले की ती कादंबरी त्यांनी लिहिलीच नाही! 'नजराणा'तील कथांचा अखेर नाइलाजानं त्यांनी उल्लेख केला. एखादादुसरी उणीव दाखविण्यापुरता! मला रागबिग आला नाही. उलट गंमत वाटत राहिली. बेडेकरांना माझ्या कथा आवडल्या होत्या हे त्यांच्या अर्धांगीने आधीच मला सांगितलं होतं. 'रणांगण' त्यांनीच रचलं आहे हेही मला विश्वासू ठिकाणाहून कळलं होतं.

आमच्या या भेटीमुळे बेडेकर माझे लेखनातले मार्गदर्शक होण्याऐवजी माझ्या लेखी एक कुतूहलजनक कलाकार म्हणून ठरले.

'रणागंण'नंतर पुढील चार-पाच वर्षांत त्यांनी कथा-कादंबरी काही न लिहिल्याने कुतूहल. या अभिजात लेखकाने लेखणी खाली ठेवावी याचं कुतूहल व किंतू. साहित्य सोडून सिनेमात रमलेला हा मनस्वी माणूस एखादा प्रतिभासंपन्न, प्रायोगिक चित्रपट तयार करील याबद्दल कुतूहल आणि काळजी.

'शेजारी'च्या पटकथेची पडद्यावर परवड झाली होती. शांताराम-जयश्री प्रकरणामुळे चित्रपटाचा तोल गेला होताच. पण 'शेजारी'ची मूळ कथा वि. चिं. बेडेकरांची नाही, तर वि. स. सुखठणकरांची आहे, असा दावा केला गेला होता. 'महापुराची शिकवण' ही सुखठणकरांची कथा पुरावा म्हणून पुढे केली जात होती. दुसऱ्याच्या कथा-कल्पनेवर बेडेकरांनी प्रतिभेचा पसारा मांडावा हे मला त्या वेळी विचित्र, विषादपूर्ण वाटलं.

प्रभातमध्ये पुढे प्रलय झाला. राजा नेने वगैरे माझे मित्र बाहेर फेकले गेले. या घटनेने मी व्यथित झालो. पण विश्राम बेडेकर प्रभातमध्ये प्रस्थान ठेवून आहेत याने मुदितही झालो. 'रामशास्त्री'च्या चमकदार दिग्दर्शनात बेडेकरांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनीच पटकथा व दिग्दर्शन बांधेसूद केलं, हे कानावर आलं तेव्हा वाटलं की त्यांचा पुढील चित्रपट... पण त्यांचं कथा-संवाद-दिग्दर्शन असलेलं प्रभात चित्र 'लाखाराणी' अनाकलनीय व

श्री. आनंद गोखले म्हणतात,

''बेडेकरांबद्दल माझ्या वडिलांना पूर्वीपासूनच खूप आकर्षण होतं. याचं कारण बहुधा बेडेकरांचं सिनेसृष्टीचं ज्ञान आणि त्या क्षेत्रात जायची वडिलांची लहानपणापासूनची इच्छा हे असावं. पुढे इंटरला नापास झाल्यामुळे घरच्यांनी वडिलांना फर्ग्युसनमधून काढलं व मुंबईला पाठवलं. तिथे ते अभ्यासात रमले. पदवी परीक्षेत सुवर्णपदक मिळवून अमेरिकेस गेले. नंतर मग आयुष्याला वेगळंच वळण लागलं. पण बेडेकरांविषयी एक सुप्त आकर्षण मनात राहिलंच.

''मागे मुंबईत हिंदू कॉलनीत राजा शिवाजी विद्यालयात भरलेल्या साहित्य संमेलनाचे बेडेकर अध्यक्ष होते. एरव्ही अशा कार्यक्रमांना कधीही हजर न राहाणारे वडील केवळ बेडेकरांचं भाषण ऐकण्यासाठी म्हणून संमेलनाला गेले. लांब कुठेतरी कोपऱ्यात उभे राहिले. त्यांना शोधत शोधत मी त्यांच्यापाशी गेलो. पण बेडेकरांचं भाषण संपताच त्यांना भेटण्यासाठी वगैरे न थांबता, 'निघतो मी आता' एवढं मला सांगून वडील तिथून बाहेर पडले. दोघांची भेट होणं सहज शक्य असूनही राहूनच गेलं.''

---

अयशस्वी ठरलं. 'बेडेकरी मसाला' म्हणून त्याची संभावना झाली. माझ्यासारख्या अनेकांचा अपेक्षाभंग झाला.

पुढे कधीतरी बेडेकरांची निवांत भेट झाली तेव्हा स्वप्नभंगाची ही व्यथा मी बोलून दाखवली.

'लाखाराणी'बद्दल बेडेकर बोलले नाहीत. 'तुलासुद्धा ते पिक्चर पसंत पडलं नाही, समजलं नाही?' अशा आशयाच्या छटा त्यांच्या चेहऱ्यावर तरळल्याच्या मला भास झाला. 'शेजारी'संबंधी मात्र बरंच काही म्हणाले. शांतारामबापूनाच त्यांनी चॅलेंज दिला होता. एखादी कथाकल्पना सांग, पटली तर पाचेक दिवसांत संपूर्ण पटकथा तयार करून देतो – म्हणून. दामले आणि फत्तेलाल या आपल्या भागीदारांच्या अतूट मैत्रीबद्दल शांतारामबापूंना अप्रूप होतं. तोच कथाविषय. त्यावरून बनविलेला 'शेजारी'...

माझं समाधान झालं. पण बेडेकर आपली शल्यं सांगतच राहिले. माझा प्रिय मित्र राजा नेने याचा प्रभात सोडताना बेडकरांशी बेबनाव झाला होता, असं ऐकलं होतं. राजामुळे मला बेडेकरांच्याबद्दल किल्मिष वाटत होतं. ते हेरून बेडेकरांनी प्रभातच्या हितासाठी राजाबरोबर सहकार्य करण्यासाठी केलेल्या खटपटीची हकीगत सांगितली. राजाने ठरवलेल्या भैय्या ठेंगडीऐवजी बेडेकरांना मान्य असलेला चंद्रमोहनच रामशास्त्री म्हणून सुयोग्य ठरला असता. त्यावेळी सगळेच अहंभावाने वागत होते हेही लक्षात आलं. तरी पण बेडेकरांनी 'रामशास्त्री'ला आपलं नाव चिकटवू न देता... जसं 'रणांगण'च्या प्रथमावृत्तीवर...

''चित्रपटाच्या बाबतीत माझं असंच होतं आहे...'' बेडेकर एकदा म्हणाले, ''...'नारद-नारदी' चित्रपटाचं लेखन-दिग्दर्शन नव्याण्णव टक्के माझं. पण श्रेय मात्र प्रकट करता आलं नाही. 'रामशास्त्री'चं प्रकरण तुम्हाला माहीत आहेच... 'अमर भूपाळी'ची पटकथा पूर्णपणे माझीच. मीच संवादासाठी मूळ लेखकाला बोलावलं... चित्रपटधंद्याचं असंच तिरपागडं आहे...''

मी ऐकत राहिलो. 'वासुदेव बळवंत' हा थोड्या भांडवलात व असंख्य अडचणींत तयार झालेला अतिशय सुंदर, सबकुछ बेडेकर बोलपट. त्याबाबत, आपल्या यशाबद्दल ते का बरं बोलत नव्हते?

''तरी पण 'चूल आणि मूल' मला फारसा आवडला नाही. 'पहिला पाळणा' फार आवडला. पण सुरुवातीचा सीन एका इंग्रजी चित्रपटावरून सुचला असं तुम्ही पद्यावलीच्या प्रस्तावनेत लिहिलं आहे, त्याने विरस झाला.'' मी अपेक्षाभंगाचं चऱ्हाट चालू ठेवलं.

''...'चूल आणि मूल'ची कल्पनाही अशी इंग्रजी कथेवरून डोक्यात आली... मला कुणी उद्युक्त केल्याशिवाय, काहीतरी कल्पना-योजना पुढे मांडल्याशिवाय लिहायला बळच येत नाही... मी आपण होऊन, उत्स्फूर्तपणे लेखनाची बैठक मांडीत नाही. काहीतरी निमित्त घडावं लागतं, कुणी तरी भरीला घालावं लागतं...''

मी चमकलो. चक्रावून गेलो. स्फूर्तीचा झटका, अवकाशातून येणारा अनुभूतीचा स्पर्श, काळजात उगवणारी कलाकल्पना, निर्मितीचं गूढ, प्रतिभेच्या परीसाचा चमत्कार, आकृतिबंधाचा साक्षात्कार, कलाकाराच्या दैवी गुणाचं गारुड... आजवर सर्जनशील कलाकृतीबद्दल ऐकलेलं, वाचलेलं, मानलेलं हा माणूस मोडून टाकीत होता. मला एक कणवत् कल्पना द्या, मी त्यावर कथानकाचा कुतुबमिनार उभा करीन असं म्हणता होता. एखादं चित्र, एखादा चॅलेंज – आणि याच्या हातून त्यावर दृष्ट लागण्यासारखं चित्रपट-नाटक साकार होत होतं. माझं कुतूहल तीव्र झालं. एका वेगळ्या, वादळी व्यक्तिमत्त्वाला, निराळ्याच रसायनाने बनलेल्या प्रतिभावंताला, मी पाहात होतो.

चित्रपटाचं माध्यम नाहीतरी धेडगुजरीच आहे. संकर साधणारी कला – नाटक-कादंबरीसारखी ती शुद्ध, एका हाती असलेली नाही. नाट्यप्रयोगसुद्धा सामूहिकरीत्या सिद्ध होतो. पण नाट्यलेखन...

''मी आणि हरी मोटे आगगाडीने चाललो होतो -'' बेडेकरांनी एकदा सांगितलं, ''वाटेत एका स्टेशनावर हरीने नाटकाचं एक चोपडं खरेदी केलं. गाडीत बसल्या बसल्या मी ते चाळलं नि भिकार वाटून बाहेर भिरकावून दिलं. रागावलेल्या हरीला बजावून म्हटलं की केवढा चांगला पौरोणिक विषय फुकट घालवलाय त्या नाटकात. या विषयावर किती वेगळ्या तऱ्हेने लिहिता येईल. मी लिहितो! म्हणून 'ब्रह्मकुमारी' लिहिलं.''

मी परत चक्रावून जाण्याऐवजी सावध झालो. प्रतिभेच्या दिव्य

साक्षात्काराच्या कल्पनांना कवटाळून बसलो. बेडेकर बोलत आहेत त्यामागे पद्धतशीर बेफिकीरी आहे, असं मला भासू लागलं. बेछूटपणा, कदाचित कडवटपणा पण. वरवरचं शल्य नाही, तर खोलवरची वेदना. त्या वेदनेला आलेलं 'सिनिक' स्वरूप सांभाळण्याचं सोंग.

मला अर्थात् 'रणांगण'ची आठवण झाली. एव्हाना 'रणांगण'ची दुसरी आवृत्ती बाजारात आली होती व त्यावर लेखक म्हणून विश्राम बेडेकरांचं नाव स्पष्टपणे छापलेलं होतं. आता ते पितृत्व नाकारू शकत नव्हते. मातृत्व, मूळ... बेडेकरांनी त्या अभिजात कलाकृतीचं जन्मरहस्य झटकन सांगून टाकलं.

''इंग्लंडहून आलो होतो अन् सोलापूरला बाळूताईच्या बंगल्यावर रिकामा बसलो होतो. ती दिवसभर कामात आणि मी घरी उपऱ्यासारखा, निरुद्योगी. तिने लिहिलेल्या पुस्तकांची पारायणं करीत. तिला प्रसिद्धी, कौतुक खूप मिळत होतं. आपल्या लिखाणाबद्दल अभिमान, गर्वही होता. मला त्या लेखनात अनेक दोष दिसायचे. ते मी दाखवायचाही. पण नुसतं टीका करायला काय जातं? स्वत: काही न लिहिता... म्हटलं, कादंबरी कशी लिहायची हे दाखवावंच. म्हणून, अन् वेळही मोकळा होता म्हणून 'रणांगण' लिहिली.''

''इंग्लंडहून आलो होतो अन् सोलापूरला बाळुताईच्या बंगल्यावर रिकामा बसला होतो. ती दिवसभर कामात आणि मी घरी उपऱ्यासारखा, निरुद्योगी. तिने लिहिलेल्या पुस्तकांची पारायणं करीत. तिला प्रसिद्धी, कौतुक खूप मिळत होतं. आपल्या लिखाणाबद्दल अभिमान, गर्वही होता. मला त्या लेखनात अनेक दोष दिसायचे. ते मी दाखवायचाही. पण नुसतं टीका करायला काय जातं? स्वत: काही न लिहिता...
म्हटलं, कादंबरी कशी लिहायची हे दाखवावंच. म्हणून, अन् वेळही मोकळा होता म्हणून 'रणांगण' लिहिली.''

कसा रिकामटेकड्याचा, चुटकीसारखा खेळ आहे — असंच बेडेकरांनी बोलताना जणू सुचवलं. नेहमीसारखी कलती मान करून रोखून पाहिलं. मिश्कील स्मितही केलं. मग सगळं मनातून काढून टाकल्याचा आविर्भाव केला.

मला हसू आलं. सगळं मनात घट्ट जाऊन बसलं. हा इसम जातिवंत कलावंत आहे. प्रतिभेचं याला दैवी देणं आहेच. पण जादूगाराचं कसबही याचेजवळ आहे. जीवनातलं याला काही वेगळं कळलं आहे. एका दृष्टीने हा सर्वांपासून मुक्त आहे. एका अर्थाने हा आयुष्याचा खेळ मस्तीत खेळत आहे.

नंतरच्या एका भेटीत बेडेकर आणिक मोकळे झाले. प्रभातने शिस्त, शिरस्ता वगैरे जी जी घडी घालून दिली होती ती ती सारी, सर्वाधिकार मिळताच, त्यांनी मोडली असं मी ऐकत होतो. त्याबद्दल मी त्यांना विचारलं तेव्हा त्यांनी त्याचा इन्कार केला. 'चूल आणि मूल' चित्रपटासाठी गाणी आपण एकटाकी कशी लिहिली हे ते खुलवून सांगू लागले. असल्या शीघ्रकवित्वाला फार कसब लागत नाही, असंही बजावून आणिक किस्से सांगू लागले. सारं निरर्थक, सोपं आहे इत्यादी... शिस्त, शिरस्ता, तपश्चर्या, दाद, मान्यता सारं फालतू आहे वगैरे...

मग एकदम म्हणाले, ''एवढे सगळे 'रणांगण'ला डोक्यावर घेतात. पण इतक्या वर्षांत मला त्याबद्दल डझनभरसुद्धा पत्रं आली नाहीत...''


मला गंमत वाटली, ''अहो, मी तीस-पस्तीस वर्षं कथांचे रतीब घालतोय. चारशेचेवर कथा. मला डझनभरच पत्रं आली असतील. वाचकांची खुषीपत्रं येणं हे कित्येकदा धोकादायक...''

हे सारं या गृहस्थाला माहीत नाही काय? 'रणांगण'चं व्हावं तेवढं कौतुक झालं नाही, त्याकाळी कुठलंसं बक्षीस मिळालं तेही दुसरं नि विभागून, 'ब्रह्मकुमारी'वरही अत्रेसारख्यांनी परीक्षणं लिहिली नाहीत — अशा अनेक फुटकळ व फालतू तक्रारी या लेखकाला सुचतात हे पाहून मला काहीतरी समजल्यासारखं वाटलं. खूपसं कळून घ्यावंसं वाटलं.

प्रतिभावान पण वेगळ्या व्यक्तिमत्त्वाच्या लेखकाचे मनोव्यापार व लेखनप्रकार.

आमच्या अर्ध्याअपुऱ्या सटीसहामाहीच्या भेटीगाठीत आणि बेडेकरांच्या नाटका-चित्रपटांतून मी त्यांच्या मनोरचनेचा चक्रव्यूह न्याहाळीत होतो. 'सेंड मी नो फ्लॉवर्स' ही परदेशी वस्तू त्यांनी घेतली याचं हीण, आणि त्याचं 'वाजे पाऊल आपुले' हे उत्कृष्ट नाटक बनवलं याचा हर्ष! फाशीच्या शिक्षेसारखा कठीण; सर्वव्यापी विषय व त्याच्यावरील 'नरो वा कुंजरो वा —' हे नाटक. कुठे तसं वरच्या दर्जाचं, अपूर्व; पण काही ठिकाणी ठिसूळ, अधांतरी... 'सोहराब-रुस्तुम' हे ताकदीचं तितकंच चटपटीत चित्र, लोकमान्य टिळकांच्यावरील अभिनव, उत्कृष्ट डॉक्युमेंटरी, आगरकरांच्यावर चित्रपट काढण्याचा भव्य संकल्प आणि 'टिळक आणि आगरकर' हे खूप परिश्रम करून लिहिलेलं व दिग्दर्शिलेलं पण अनेक त्रुटी असणारं विवाद्य नाटक... आणि अर्थात रणांगण... बेडेकरांच्या एकूण लेखन-दिग्दर्शनातच असं द्वंद्व दिसतं. खूप दिपविणारं अन् त्यातही उसनं असणारं; प्रतिभा पणाला लावलेलं, पण अडचणींनी अवघडलेलं...

मला विश्राम बेडेकरांच्या एकूण आयुष्याबद्दलच अचंबा वाटू लागला. हा हिंदुस्थानातला पहिला दुसरा हस्ताक्षरतज्ज्ञ. हजारो रुपये कमविण्याची कला हस्तगत, पण अन्नान्नदशा दाखविणाऱ्या चित्रपटधंद्यात उडी... ऐन तारुण्यात दीनानाथ-कोल्हटकरांचा सहवास अन् चित्रपट-नाटकाने दिलेलं अपयश... दिलदार, लखपती, साहित्याची जाण असलेले प्रकाशक मोटे परममित्र व बंडखोर लिखाण करणाऱ्या तेजस्वी स्त्रीशी



**विश्राम चिंतामण बेडेकर**

**जन्म : १३ ऑगस्ट १९०६, निधन : ३० ऑक्टोबर १९९८**

*(रेखाटन : बाळ ठाकूर)*

सहजीवन... शेजारी आणि अमरभूपाळी या श्रेष्ठ पटकथा, रणांगण...

'रणांगण'शी मी अडलो तेव्हा बेडेकर भेटले. डेक्कनक्वीनच्या प्रवासात. गप्पांच्या ओघात त्यांनी एक कथाकल्पना सांगितली. ती ऐकताच मी सावरून बसलो. भारावून म्हणालो,

''बेडेकर, यावर अप्रतिम कादंबरी होईल. रणांगणसारखी.''

''खरं म्हणता?''

माझ्या विचारांचं आवर्तन पुरं झालं. 'रणांगण'नंतर बेडेकरांनी पुन्हा कथा-कादंबरी का लिहिली नाही याचं एक कारण कळलं. 'रणांगण'चं अफाट यश त्यांना सतावत असावं. असावं? की साध्या लेखनापेक्षा परफॉर्मिंग आर्टस्मध्येच त्यांची प्रतिभा चालते? नाटकातले प्रवेश, सिनेरीयोतले सीन्स त्यांना आधीच दिसतात? टिळकांच्यावरील डॉक्युमेंटरी करीत असलेले, 'लाखाराणी' दिग्दर्शित करीत असलेले मनस्वी बेडेकर मी बघितले होते. नाटकाच्या तालमी घेताना त्यांचे प्रकटणारे रूप मोठे मोठे नट व निर्माते रंगवून सांगत होते. याचं माध्यम दृक्श्राव्य. हा कलावंत नाटकाच्या व चित्रपटाच्या दिग्दर्शनातच रमतो, रंगतो –

पुन्हा कुतूहल, पुन्हा कोडी. वाटलं, बेडेकरांना भेटावं, भेटत राहावं. नाटकाच्या तालमीचे वेळी, सिने-शूटिंग सुरू असेल तेव्हा, संवादात भरबदल, काटछाट करताना बघावं. त्यांच्या मनाचा मागोवा घ्यावा.

पण माझा स्वभाव आड आला. इतर उद्योगही. कलावंत, लेखक, बेडेकर बरेचसे अज्ञातात, अंधारातच राहिले. खेरीज माझ्यासारख्या सामान्य इसमासाठी त्या थोर कलावंताने आपला अमूल्य वेळ दवडावा हेसुद्धा...

तरी वाटतं या माणसाची व आपली मैत्री व्हायला हवी. वारंवार भेटीगाठी घडायला हव्यात. विशेषत: काही निमित्ताने त्यांनी मला एक पत्र लिहिलं होतं, त्यातील अखरेच्या तीन ओळींच्या मजकुरामुळे तर मुद्दामच.

''तुमच्या भेटी झाल्याचं समाधान माझ्या ध्यानात आहे. त्या प्रत्येक वेळी तुमच्या विशेष परिचयाची संधी हुकली अशी चुटपुटही मनाला लागून राहिली. तुम्ही आता मनावर घेतलंत तर हे एक असमाधान नाहीसे होईल...''

*(फेब्रुवारी, १९९९)*

# एक करपलेला झंझावात

राम शेवाळकर

''आपल्या खऱ्याखोट्या दु:खावर जीव टाकणे, जिवाभावाचा सोबती म्हणून त्याला कुरवाळत राहणे, हाच त्याचा हळूहळू स्वभाव बनत गेला. हळूहळू याचे व्यक्तिसीमित किरटे दु:ख विश्वव्यापक होत गेले.''
कविवर्य सुरेश भट ह्यांना विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनव्रती' हा मानाचा पुरस्कार मिळाला. त्या निमित्ताने...

खूप दिवसांनी त्याला मी त्या दिवशी पाहिला. मुख्यमंत्र्यांना भेटायला गेलो होतो. रविभवनमध्ये माझ्या अगोदरच तो येऊन बसलेला दिसला. गेल्या गेल्या मी त्याला नमस्कार केला. त्याने उलट नमस्कार करून मान वळवली. मी त्याच्या समोरच्या सोफ्यावर जाऊन बसलो. काय करावे ते न सुचून शेजारच्या मुलीशी तो हास्यविनोद करीत बसला. विनोद नेहमीसारखेच स्फोटक असावेत, कारण त्या मुलीला अशा विनोदांवर चारचौघांत हसण्याचा संकोच वाटत होता. त्याच वेळी हसणे आवरताही येत नव्हते.

अलीकडे त्याची भेट होत नाही. कधीतरी रस्त्याने कुणाच्या तरी स्कूटरवर डबलसीट जाताना दिसतो. अलीकडे त्याचे कार्यक्रमही होताना दिसत नाहीत. कविताही फारशा वाचायला मिळत नाहीत. एकूणच सृजनशीलता मंदावलेली दिसते. पूर्वपुण्याईवरच जगणे चालू असावेसे वाटते. एकेकाळी त्याच्या कवितांनी जो आनंद दिला, एकेकाळच्या त्या कवितांनी आजही जो आनंद मिळतो त्याची किंमत ऐहिक स्वरूपात वसूल करण्यातच आयुष्य व्यतीत होत आहे की काय कोण जाणे! एवढ्यात त्याला जिवाभावाचे कोणी मित्र असावेत, असे दिसत नाही. कवितेने जोडलेले सगळे जिव्हाळे आपल्या वागण्याने तो कापून टाकीत आला. त्यामुळे कवितेवर प्रेम असूनही त्यांच्यापैकी कुणाला त्याच्या जवळ जावेसे वाटत नाही. त्याला जवळ करावेसेही वाटत नाही.

सध्या तो विलक्षण एकाकी असावा, असे वाटते. आता त्याच्या भोवती त्याच्या आडदांड वागणुकीला वचकून असणाऱ्या बोटचेप्या व खुशामतखोर लोकांच्या गराड्यात तो असतो. हा गराडाही त्याने प्रयत्नपूर्वक जमवला आहे, पण निरुपायाने टिकवला आहे. चहा पाजणे, चटकदार पदार्थांनी भूक भागवणे वा तंबाखू आणून देणे, यांसारख्या लहानसहान कामांच्या बाबतीत हा गराडा त्याच्या उपयोगी पडतो. हरकामाच्या बाबतीतले त्याचे परावलंबन आपल्याला समजावून घेता येते. त्या त्या प्रासंगिक गरजा भागवणे, हा त्याचा गौण उद्देश असावा. आपल्यापेक्षा अधिक शिकलेले लोक आपल्यासाठी लहानसहान कामे करण्यात कमीपणा मानीत नाहीत, हे इतरांच्या निदर्शनास आणण्यात वाटणारा अभिमान चाखत राहण्याचे त्याला समाधान असते. त्यामुळे तो गर्दीत असूनही एकटाच आहे.

तसा लहानपणापासूनच भरल्या घरातही तो एकटाच होता. जन्मजात उणेपणामुळे आलेल्या न्यूनगंडापोटी तो सर्वांवर सूड उगवल्यासारखा वागत आला. त्याच्या विक्षिप्त वागण्यापायी घरच्यांनी त्याला वाळीत टाकले. त्यातून मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग त्याला मन:पूत वागण्यासाठी करता आला. पण तो वाहवला नाही. काही वावगे वर्तनही त्याच्याकडून घडले नाही. पण कोणालाही कशासाठीही न जुमानण्याची प्रवृत्ती या स्वातंत्र्यामुळेच बळावत गेली.

या काळात घरातील सौहार्दाची उणीव त्याला बाहेरच्या जगातील गराड्यातून वेळोवेळी भरून काढता आली. त्याचा गराडा बराच व्यापक होता. त्यापैकी बरेच जण त्याच्यावर मनापासून प्रेम करीत असत. हे प्रेम त्याच्या काव्यगुणांवर होते. त्याच्या लोकसंग्रहाच्या वृत्तीवर होते. मैत्री टिकवून ठेवण्याच्या मनोधर्मावर होते. त्याच्या कलंदरपणावर होते आणि कुणाची पत्रास न ठेवणाऱ्या उर्मटपणावरही होते.

पण तेव्हापासूनच त्याला खरी सोबत फक्त त्याच्या दु:खाचीच होती. यापैकी काही दु:ख खरे होते. काही उबवलेलेही असेल. पण आपल्या खऱ्याखोट्या दु:खावर जीव टाकणे, जिवाभावाचा सोबती म्हणून त्याला कुरवाळत राहणे, हाच त्याचा हळूहळू स्वभाव बनत गेला.

दु:ख माझे माझियापाशी असू दे
ते बिचारे एकटे जाईल कोठे?

दु:खाला जवळ करण्याच्या या वृत्तीतूनच अतीतातील व विद्यमानातील दु:खितांशी त्याचे नाते जुळले. त्यांचे कण्हणे त्याच्या अंत:करणात प्रतिध्वनित होऊ लागले. त्यांची दु:खे तो स्वत: नव्याने सोसू लागला. हळूहळू याचे व्यक्तिसीमित किरटे दु:ख विश्वव्यापक होत गेले.

त्यानंतर याला अविचलित सोबत मिळाली ती कवितेची. अविश्वासामुळे इतरांजवळ व्यक्त करता न येणारी सुखदु:खे अत्यंत सलगीने सांगता येण्यासारखे एक विश्वसनीय स्थळ त्याला उपलब्ध झाले. इतरत्र माजलेल्या अनुकरणप्रियतेच्या गर्दीत याच्या कवितेचे वेगळेपण अस्सल अनुभवाच्या बावनकशीपणामुळे

एकदम नजरेत भरत गेले व मनात ठसत गेले. कवितेतील अनुभूती उसनी नव्हती. सवंग अनुकरणातून आलेली नव्हती. अभिव्यक्तीही अशीच स्वतंत्र होती. तिच्यावर त्याच्या आगळ्या अस्तित्वधर्माची मुद्रा होती. रूढ चाकोरी नाकारून वेगळ्या दिशेने विचार करणाऱ्या त्याच्या मनाला कवितेच्या रूपाने मुक्त श्वासोच्छ्वास करण्याचे एक केंद्र उपलब्ध झाले. विशेष म्हणजे त्याने कवितेशी गळेपडूपणा केला नाही. कविताच जणू याच्या गळ्यात पडली. आपल्या सर्व विभ्रमांसह ती याला वश झाली.

कवितेवर याचे खरेखुरे प्रेम जडले. तिची अकृत्रिम निसर्गावस्था याला लोभावून टाकू लागली. मग ती कविता जुनी असो की नवी असो, किंवा कोणत्याही भाषेतली असो. पण यावनी कविता याला विशेष मानवली. त्यातही इराणी इष्कातली नजाकत अधिक भावली. उर्दू शायरांचा निस्संग बेदरकारपणा याच्या पिंडाशी जुळणारा होता. प्राचीन भारतीय काव्यातील राधाभाव व गोपीबंध याला विलोभनीय वाटले. अवैध प्रेमात एक बेबंद धुंदी असते, नि:शेष समर्पणाची ओढ असते व स्वैतर जगाविषयी एक उन्मत्त बेफिकिरी असते. परस्परांच्या भावव्यूहाला व देहसौंदर्याला न्याय देण्याची सहृदयता व मर्मज्ञता असते. उभय देहांच्या कणाकणाला कृतकृत्य करणारी आस्वादक क्षमताही असते. हे प्रेमविश्व निष्ठेच्या सरहद्दीपलीकडे असते. तिथे उत्कटता व हळुवारपणा यांचीच नांदणूक असते.

या गुणांमुळे याची कविता लोकप्रिय ठरू लागली. कविता न कळणाऱ्या लोकांनाही याच्यावरील प्रेमामुळे ती आवडू लागली, कविता कळणाऱ्यांना (याच्या वागण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे) आस्वादसमयी भुरळ घालू लागली. याचे कवितेचे सादरीकरणही सुरेल व प्रत्ययकारी असल्यामुळे त्याच्या लोकप्रियतेचे क्षेत्र विस्तीर्ण होत गेले. ते वाढायला याच्या लोकसंग्रहाची अर्थातच मदत झाली. काव्याच्या क्षेत्राबाहेरील लोक आशयाच्या व अभिव्यक्तीच्या आगळेपणामुळे याच्या कवितेवर फिदा होऊ लागले. त्या काव्यलुब्धांमध्ये राजकारणातील महनीयांचा समावेश झाल्यामुळे याची लौकिक प्रतिष्ठाही ओघानेच उंचावत गेली. रसिकता एरवी मूक असते. घेतलेल्या आस्वादाची ती स्वत:शीच चर्वणा करीत असते. अशा रवंथ करण्यानेच तिच्या लेखी आस्वादाची लज्जत वाढत असते. कविता अधिकाधिक आपलीशी होत जाते. तिला आपल्या वशीकरणाचा व वशीभवनाचा बोभाटा व्हायला नको असतो.

पण याचे वैशिष्ट्य असे की, याच्याबद्दलची रसलुब्धता नि:शब्द राहण्यास राजी नव्हती. ती बोलघेवडी होती. आवडलेल्याची पुन्हा पुन्हा मोठमोठ्याने आवर्तने करण्याची तिला हौस होती. आवडलेल्या जागांवर दाद देण्यात व घेण्यात तिला खुशी होती. परिणामी कविता स्वसंवेद्यतेचे कुंपण ओलांडून स्वत:च एक रंगकला बनून गेली. याचे हेही कार्यक्रम तुफान यशस्वी झाले. व्यावहारिक दृष्ट्याही लाभदायक ठरावेत, इतकी लोकमान्यता त्याने एव्हाना संपादन केली होती. याचा अर्थ सर्वसाधारण समाजाची अभिज्ञतासुद्धा वाढवण्याचे काम याच्या काव्यदर्शनाला साधले होते. परिणामी भावकवीचा स्निग्ध उंबरठा ओलांडून याने लोककवीच्या विशाल प्रांगणात प्रवेश केला. हळूहळू तो तिथे स्थिरपद झाला. पण तरी त्याच्यामध्ये शाहिरीचा ढोबळपणा आला नाही. आपले मूळ घराणे त्याची कविता विसरली नाही. सर्वजनसुलभ होण्याच्या दृष्टीने तिने अर्थसुगमतेचे पथ्य सांभाळले. दाद मिळण्याजोगे प्रासांचे नादसौंदर्यही जपले. तिला आपोआपच सुभाषितप्रायता लाभली. आणि लोकांच्या ओठी रुळण्याची हमीही देता आली. पण यामुळे भावकवितेतली अलवार अनुभूती व तेवढीच सुकुमार अभिव्यक्ती उत्तरोत्तर दुर्मिळ होत गेली. हे सर्व जाणिवेच्या पातळीवरच असेल, असे नाही. पुष्कळदा हे नकळतही घडून येत असते. तरीही समूहाच्या तात्काळ प्रतिसादाचा मोह वाढत चालल्याची चाहूल त्यातून मिळाल्याशिवाय राहत नाही.

या वाढत्या प्रतिसादाची एक झिंग असते. ती मस्तकात जाऊन भिनली, की प्रौढत्वी निजशैशवास जपणे हा कवीचा बाणा हळूहळू सैल पडत जातो.

तसे याचे झाले असेल काय? आपण जे निर्माण केले, जे भरभरून लोकांना दिले, नामांकित कलावंतांनी आपल्या स्वर्गीय सुरांवर जे तोलून धरले आणि ज्यामुळे असंख्यांच्या गद्य जीवनाला रोमांचित होता आले, त्याची तृप्ती मनावर चढली असेल काय? एक अलंबुद्धी उत्पन्न झाली असेल काय? त्याच्यामुळे वृत्ती अधिकाधिक बहिर्मुख होत गेली असेल काय? वर्तमानावर अनाहुत भाष्य करण्याची सुरसुरी त्यातूनच वाढली असेल काय?

याच्या व्यक्तित्वाचे दोन भाग याच्या कवितेच्या शैशवापासून मी अनुभवीत आलो आहे. त्यावेळी याच्या कविता रचनासौंदर्याच्या दृष्टीने आकर्षक वाटत. पण त्यामध्ये जीवनाबद्दलची खोल उमज उमटायची होती. अनुभवाचा एकेरीपणाच त्यातून जाणवायचा. याची पहिली कविता मी १९५०च्या सुमारास केव्हातरी 'युगवाणी'मध्ये वाचल्याचे आठवते. आमच्या प्रा. दिवाणजींचा अपघाती मृत्यू झाला होता. विदर्भ साहित्य संघाचे केंद्रीय कार्यालय त्यावेळी अमरावतीला होते. दिवाणजी त्याचे सरचिटणीस होते. वामनराव चोरघड्यांच्या संपादकत्वाखाली 'युगवाणी'ने त्यांच्यावर विशेषांक काढला होता. त्यात याची कविता मी पहिल्यांदा वाचली. त्या कवितेत दिवाणजींच्या मृत्युमुळे शारदेच्या पायातील पैंजण गळून पडल्याची कल्पना केली होती. त्या ओळीने या माणसाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. तोपर्यंत जगावर सतत थुंकणारा फाटक्या तोंडाचा एक पांगळा माणूस, म्हणूनच मीही त्याच्याकडे पाहत होतो. पण या कवितेने त्याच्या अस्ताव्यस्त अस्तित्वावरील सहृदय मन मला दाखवले आणि त्याच्या माझ्यातील जवळीक वाढवली. त्यानंतर त्याच्यातील कवीशी जसजसे माझे सख्य वाढत गेले, तसतशी त्याच्या आडदांड व्यक्तिमत्त्वातील एका भाबड्या माणसाशी माझी सलगीही वाढत गेली. त्याच्या कुटुंबाशी घरोबाही वाढला. पुढे केशवराव भोळ्यांच्या आत्मचरित्रात याच्या वडिलांचे व्यक्तिचित्र वाचले. आणि याच्या राहण्याच्या व वागण्याचा उगम सापडला. याच्या कवितांचा मला नादच जडला. त्यांचा संग्रह मी माझ्या हस्ताक्षरात लिहून काढला. त्यातील काही ओळी मला अजून आठवतात :

*पुन्हा पातलो आज दारी तुझ्या*
*जुनी बाळगोनि उराशी व्यथा*

*पुन्हा ओळखीचा दिसे उंबरा*
*खुळ्या यौवनातील भोळी कथा ।*

*घनश्याम वा सुंदरा कायसे*
*इथे नादलेले सडा घालता*
*कुणाची निनावी तरी पावले*
*तशी थांबली चालता चालता...*

पुढील ओळी स्मरणातून गळून गेल्या आहेत. त्याच्या प्रकाशित संग्रहात ही कविता मला आढळली नाही. पुढे त्याच्या कवितांना 'मौज'ने, 'सत्यकथे'ने उचलून धरले. मंगेशकरांच्या कंठातून ती जगभर रुंजत गेली. त्याची काव्यगायनेही लोकप्रिय होऊ लागली. ठिकठिकाणी मोठमोठे कार्यक्रम होत गेले. एखाद्या गाजलेल्या गवयाने मिळवावा तेवढा याच्या मानधनाचा आकडा वाढत चालला. असे यश कुणाच्याही मस्तकात जाऊन भिनले, तर ते अस्वाभाविक म्हणता येणार नाही. विशेषत: कवितेला दाद देण्याच्या निमित्ताने सत्ताधीशांना राजकारणाच्या धबडग्यातही आपली रसिकता टिकवून धरल्याचे श्रेय जाहीरपणे मिळवता येऊ लागल्यापासून याची राजदरबातील पत वाढली. सत्तेवर कुणीही असले, तरी याच्या कवितेला दाद देणे त्याला आवडायचे. आणि सत्ताधीश कोणत्याही गटाचा, पक्षाचा असला, तरी याच्याशी त्याची जवळीक प्रस्थापित व्हायची. आणि ओघानेच तत्पूर्वीचे त्याचे हितसंबंध केवळ रद्दच नव्हे, तर त्याज्य ठरायचे.

याच्या निष्ठा वरचेवर बदलत गेल्या. त्यामध्ये वैचारिक कारण नसावे. व्यावहारिक असू शकेल. पुष्कळदा त्याच्या निष्ठेचा लंबक एका ध्रुवाकडून पार दुसऱ्या ध्रुवापर्यंत जायचा. त्यामुळे कडव्या डाव्या विचारसरणीकडून पायघोळ व गटप्रचुर काँग्रेसवादाद्वारे मूलतत्त्ववादापर्यंतचा त्याचा प्रवास, त्याच्या आरंभापासूनच्या पाठीराख्यांना वरचेवर चक्रावून टाकत असे. पण नव्याने स्वीकारलेल्या कोणत्याही निष्ठेची समर्थनपूर्वक पाइकी बाकी तो पूर्वीच्याच लढाऊ व आक्रमक आवेशाने करायचा. त्याची ही स्थित्यंतरे विचारप्रेरित असती, तर काही प्रश्न नव्हता. पण ती उदरप्रेरित असल्याचे लक्षात आल्यामुळे त्याचे हितचिंतक उद्विग्न होत.

पुढे पुढे तारेवरच्या या लक्षवेधक सर्कशींमुळे त्याची कवितेबद्दलची एकाग्रताही शिथिल होणे स्वाभाविक होते. तरीही लेखन थांबलेले नव्हते. त्याचे लेखन हे त्याची स्वत:ची व्यावहारिक गरज झालेले होते. रसिकांची गरज आता तेवढीशी उरलेली नव्हती. पण त्याची याला दरकार नव्हती. त्याचे गद्यलेखन आता नियमित, अनियमितपणे चालू झाले. पण हे लेखन म्हणजे त्याच्या नित्याच्या वागण्याबोलण्याची छापील अनुकृती होती. त्यात आत्मशोधाची आविष्कृती नव्हती. त्याने 'गझल' नावाच्या यावनी वृत्ताला सकस मराठी वळण दिले. त्यात यावनी मनोवृत्तीतील नि:संग निधडेपणा होता, बेधडकपणा होता. अवास्तव, अकल्पितपणा होता. क्वचित खोल दर्दही होता. या दर्दामुळेच त्याच्या ओळी जिव्हारी जाऊन झोंबायच्या, खऱ्या रसिकतेला कासावीस करायच्या व रसिकतेचा आव आणणाऱ्या सवंग श्रोत्यांची हुकमी दादही मिळवून जायच्या. अशांची संख्या अर्थातच विपुल होती. या वैपुल्याच्या तालावरच त्याचे मन दीर्घकाळ झुलत राहिले आणि बिचाऱ्या जाईच्या पाकळ्या डुलत्या दवबिंदूच्या अभावी उपाशीच राहिल्या. त्या वैपुल्यातूनच याचा एक संप्रदाय उभा राहिला व गावोगावच्या रचनालुब्ध नवोदितांना घरबसल्या प्रासप्रावीण्याचे धडे देणे, हा याचा आवडता उद्योगच होऊन बसला. परिणामी काही चमकदार व अफलातून कल्पनांच्या साहाय्याने यमकांशी लाडीगोडी करण्यालाच काव्यसाधना मानले जाऊ लागले.

अनुकरण हे प्रशस्तीचेच एक रूप असते. त्यामुळे लहानांपासून थोरांपर्यंत पसरलेली अनुकरणाची लाट ही याची विजययात्राच ठरली. त्यापुढे नवीन कविता त्याच त्या कल्पनांच्या व शब्दावलींच्या आवर्तात सापडल्याचे कोणाच्याही लक्षात आले नाही. उर्दू शायरीत प्रेमसाफल्यापेक्षा प्रेमभंगाचीच ओढ आढळते, तशी मराठी कवितेत सार्थकतेऐवजी व्यर्थतेचीच सूक्ते आळवली जाऊ लागली. आपुले मरण आपुल्याची डोळे पाहण्याचा अनुपम सुखसोहळा तुकारामालासुद्धा एकदाच अनुभवायला मिळाला. पण नवथर गझलकारांचा तो हुकमी विषय झाला. आपली अंत्ययात्रा पाहण्याचे, ती आपणच आपल्या खांद्यावर वाहून नेण्याचे, मसणातल्या मुडद्यांनी एकमेकांची जात विचारण्याचे एरवी चक्रावून टाकणारे उल्लेख सरावाचे होऊन गेले. मराठी काव्यातील तल्लख उत्प्रेक्षांचा अध्याय समाप्त झाल्यावरही अकल्पनीय कल्पनाव्यूहाची कारकीर्द नव्या मुखवट्याने चालूच राहिली व भान विसरून मान डोलावणाऱ्या समीक्षेला तिने तोंडघशी पाडले.

त्याच्या गद्यलेखनात एक आकर्षक औद्धत्य असे व भिडस्त बोटचेप्यांच्या गर्दीत हा शाब्दिक उर्मटपणा वेगळा उठून दिसत असे. त्यामुळे लोकांचे तो लक्ष वेधून घेई. त्यातील विधानांना त्याच्या दैवी कल्पकतेचे पाणी चढलेले असायचे. शिवाय आपल्याच ओळी आपल्या विधानांना आधार म्हणून श्रुति-वचनांसारख्या अधूनमधून वापरण्याची त्याला खोड आहे. ज्याच्यावर तुटून पडायचे, त्या विषयापेक्षा तुटून पडण्याचा याचा आविर्भाव वाचकांच्या लेखी लक्षणीय ठरायचा. पुष्कळदा हे त्याचे लेखन आक्रस्ताळे, त्याच्या वागण्यासारखे अशोभनीय आणि त्याच्या बोलण्यासारखे अर्वाच्यही व्हायचे. पण असे वागणे-बोलणे आवडून घेणारा एखादा खुशामतखोरांचा वर्ग असतोच. तसेच असे लिहिणे मिटक्या मारीत वाचणारा मत्सरग्रस्त विषयवैऱ्यांचा एक उत्सुक गटही त्याला अनायासे उपलब्ध झाला.

आज तो अशाच तोंडपुज्यांच्या कैदेत सापडून अगतिक झालेला दिसतो. या गराड्यातील काही लोक निश्चित त्याचे अंधभक्त आहेत, तर बाकीचे हितसाधक व खुशमस्करे आहेत. त्यांच्या प्रासंगिक तोंडपुजेपणामुळे फुलणारी कळी लोप पावल्यानंतर वास्तवाच्या जाणिवेने याचा भ्रमनिरस होत नसेल काय? या बौद्धिक कोंडमाऱ्यामध्ये त्याचा जीव गुदमरून जात नसेल काय? खुशामतखोरीच्या या कोलाहलात आपले मानसिक एकाकीपण त्याला भयप्रद वाटत नसेल काय?

अलीकडे काही कारण नसताना त्याने आपल्या खऱ्या हितेच्छूंशी वैर धरलेले दिसते. खरे म्हणजे त्याचा हा स्वभाव नाही. जे असेल ते तोंडावर बोलण्याचा त्याचा लौकिक आहे. मागाहून कुरापती काढण्याचा वा कारवाया करण्याचा त्याचा पिंड नाही. सृजनशील प्रतिभावंताने अशा कामात आपली शक्ती व बुद्धी खर्च करू नये, असे

त्याच्यावर निरपेक्ष प्रेम करणाऱ्यांना वाटते. कारण ती त्याची एकट्याची हानी नसून एकूण सांस्कृतिक क्षेत्राचीच हानी आहे.

जे इतरांना वाटत आले, ते याच्या संवेदनक्षम मनाला कधी जाणवलेच नसेल काय? कोणत्या प्रेरणेला बळी पडून याच्या हातून अशी नकारात्मक कामे घडत असतील? चांगले पाहण्याची व जाणून घेण्याची दृष्टी मंदावल्यामुळे असे होत असेल, की सृजनशक्ती क्षीणबल झाल्यामुळे? आपले अस्तित्व अट्टाहासाने टिच्चून दाखवण्याचा हा प्रकार असावा काय?

तशी भांडणे विकत घेण्याची याची सवय जुनीच आहे. लोकांची उणी-दुणी काढायची व कारण नसताना आपणहून त्यांच्या अंगावर धावून जाण्याची खोडही नवी नाही. मध्यमवर्गीय कचखाऊ मनाला असे पाहण्याचीही सवय नसते, मग करण्याची हिंमत तर दूरच. लोकांना नको तेव्हा व नको त्याबद्दल दुखवण्याची व वैराची लागवड उत्साहाने करण्याची एखाद्याची आंतरिक गरज असते काय?

मी सगळ्यांनाच भले म्हणतो असा त्याचा माझ्यावर आक्षेप आहे. अशी भले म्हणण्याची वृत्ती दुर्बलतेपोटी किंवा भीतीपोटी येत नसते. आत्मविश्वासाच्या अभावी बचावात्मक सावधगिरी म्हणूनही येत नसते. पण दुसऱ्याचे वाईटच तेवढे पाहायचे, तेवढेच लक्षात ठेवायचे, तेवढेच अखंड चघळत बसायचे, या आवडीपोटी नकळत वाईटाचीच उपासना आपल्या हातून घडत असते. त्यापायी दुसऱ्याजवळ जे आणि जेवढे चांगले असेल, ते अजिबात न पाहण्याची कृपणता वाढीस लागते व ते नाकारण्याचे करंटेपण वाट्याला येते. दुसऱ्याचे चांगले ते अव्हेरण्याच्या या सवयीमुळे त्या चांगल्याच्या परिणामांच्या शक्यताही आपण अवरुद्ध करून ठेवीत आहोत, हेही लक्षात येत नाही.

त्याचे अलीकडचे गद्यलेखन वाचून माझेही मन गोंधळून जाते. मनात शंका अशा येतात, की हाच का तो आपला मित्र की ज्याने मातृभूमीचे भावोत्कट स्तोत्र गायिले, तिच्या विद्यमान दुरवस्थेबद्दलच्या स्फोटक भावना व्यक्त केल्या?

*उभा देश झाला आहे आज बंदिशाळा.*
*इथे देवकीचा पान्हा दुधाने जळाला.*
*कसे पुण्य दुर्दैवी अन् पाप भाग्यशाली?*

किंवा –

*कसा सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली?*

किंवा –

*आम्ही ती स्मशाने ज्यांना प्रेतही न वाली!*

यांसारख्या काळीज कातरणाऱ्या ओळी लिहिल्या? 'सखी मी मज हरपून बसले ग', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी', 'मालवून टाक दीप', 'मलमली तारुण्य माझे', 'गीतगंगेच्या तटावर' यांसारखी मन हुरळून टाकणारी गीते लिहिली?

*स्पंदने ज्ञानेश्वरांची*
*माझिया वक्षात व्हावी*
*इंद्रियावाचून मीही*
*इंद्रिये भोगून घ्यावी*

– अशी मनीषा व्यक्त करणाऱ्या ओळींमधून अभद्र भाषा कशी निघू शकते? प्राजक्ताच्या ओठांनी हळुवारपणे दहिवर चुंबून घ्यावे, अशा अलवार कल्पना प्रसवणाऱ्या मनात विषारी द्वेषाचा अंगार कसा फुलून येतो? ज्ञानेश्वर, तुक्याच्या आकाशगंगेत न्हाऊन आलेल्याने, गालीब-उमरखय्यामने दिलेली पश्मिन्याची शाल पांघरून शिमग्याचे गटार उपसण्यास का प्रवृत्त व्हावे? खरोखर, हा कविता लिहितो आणि गातो, त्यावेळी तो प्रत्यक्ष परमेश्वराचीच मैफिल भूषवीत असतो. अशा भाग्यशाली प्रतिभावंताला अधूनमधून असे नरकपुरीचे डोहाळे का लागावे? हा कधी काळी ओसाड जागी असेल, वैराण वाराही असेल, पण एकदा बाहूत मधुमास घेतल्यावर ओंगळ पिचकाऱ्या टाकण्याचा मोह याला का व्हावा? माणसांच्या मध्यरात्री हिंडणाऱ्या सूर्याने आपल्या गीतांना द्वेषाचा जुना आधार असल्याचे ठणकावत अंधाराची स्तोत्रे का आळवावीत? आज आपण जे गीत गातो, ते उद्या सारे जग गाणार असल्याचा उदंड आत्मविश्वास बाळगणाऱ्या सुरेल झंझावाताला माझा हा एकच साधा प्रश्न आहे. त्याला लाख नकोत, एकच समाधानकारक उत्तर मिळाले, तरी पुरेसे आहे.

परवा तो पुन्हा अचानक दिसला. मला पाहिल्यावर त्याने अपेक्षेप्रमाणे मान फिरवली. मला त्याचे वैषम्य वाटले नाही, आश्चर्य वाटले नाही. पण विलक्षण कीव आली. त्याला सर्वार्थाने समजावून घेणारे एखादे जवळचे माणूस अशा वेळी त्याच्याजवळ असायला हवे, असे बाकी तीव्रतेने वाटले. मला या बाबतीत पुढाकार घेता येणार नाही, हे उघड आहे. त्याच्याशी बरोबरीच्या नात्याने बोलू शकणाऱ्या समवयस्क स्थानिक मित्रांनाही पुढाकार घ्यावासा वाटणार नाही. कळवळ्यापोटी केलेल्या या सामंजस्याच्या कृतीतून गैर अर्थ काढून त्याचा अपप्रचार होण्याचीच मित्रांना काळजी वाटते. पण त्याने सतत चालवलेल्या आगीच्या वर्षावातही गतकाळातील काही क्षण मला विसरता आले नाहीत. गेल्या अर्धशतकापासूनची त्याची मैत्री, आपण अमरावतीच्या कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवत असताना अनाहूतपणे येऊन, भर पावसात चिंब भिजत त्याने आपला केलेला एकाकी प्रचार, वेळोवेळी निरपेक्षपणे दिलेल्या रकमेची त्याने ऐन वास्तुशांतीच्या मुहूर्तावर अनपेक्षितपणे केलेली परतफेड, विदर्भ साहित्य संघाबद्दल मन कलुषित असतानाही आपण अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचा, शंभर रुपयांची मिठाई वाटून त्याने प्रगट केलेला आनंद, मनाविरुद्ध पण केवळ आपल्या दमदाटीपणामुळे त्याने शल्यक्रियेसाठी दाखविलेली सिद्धता – असे काही प्रसंग प्रयत्न केला तरी मला विसरता येणार नाहीत.

काळोखामध्ये दिलासा देणाऱ्या तेज:किरणांच्या पूजनाची माझी ही वृत्ती अनेकदा निकटवर्तीयांच्या रोषाला पात्र ठरली आहे. त्याच्याबद्दल घेतले जाणारे आक्षेप खोटे नाहीत. कारण ते अनुभवावर आधारलेले आहेत. सांभाळू पाहणारे मन व सावरू शकलेले हातही अशा दाहक अनुभवांनी होरपळून निघाले आहेत. पण खुशामतखोरीला वश झालेल्या व बळी पडलेल्या बलदंड बेगुमानाची हतबलता व अगतिकता पाहावी लागणे होरपळण्यापेक्षा कमी दाहक नसते. त्याला परिस्थितीपोटी करावी लागलेली ही तडजोड त्याच्या आत्मसमाधानासाठी पुरेशी असेल. पण हितचिंतकांना ती फारच केविलवाणी वाटते, एवढे मात्र खरे!

*(मार्च २०००)*

# एका राजाचे निर्गमन

**विश्राम शरच्चंद्र गुप्ते**

''त्यांच्या कादंबऱ्यांतून मानवी जीवनाचे अतार्किक विभ्रम आपल्या अंगावर मारेकऱ्यांसारखे धावून येतात. गारठवून टाकतात. अंतर्मुख करतात. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यानंतर चौथी मूलभूत मानवी गरज म्हणजे 'हिरवा-निळा द्वेष' तर नसेल? हा प्रश्न सरदेशमुखांच्या कादंबऱ्या वाचून मला पडतो. हा हिरवा-निळा, काहीसा वेडसर भासणारा द्वेष त्यांच्या तिन्ही कादंबऱ्यांचा जणू स्थायिभाव आहे.''

डिसेंबर २००५ मध्ये त्र्यं. वि. सरदेशमुख गेले. बातमी अनपेक्षित नव्हती. म्हणजे तसं वय झालं होतं. त्यांना सन्माननीय मृत्यू आला. तो सगळ्यांनाच तसा येतो असं नाही, पण त्यांचा मृत्यू त्यांची आब राखून आला. मृत्यूपूर्वी काही तास अगोदरच त्यांनी आपल्या भावी लिखाणाची टाचणं काढल्याचं वाचलं. आपल्या विहित कर्मात शेवटच्या श्वासापर्यंत बुडालेला हा गंभीर प्रवृत्तीचा मराठी कादंबरीकार, अनुवादक आणि समीक्षक कधीही परतून न येण्यासाठी आपल्यातून निघून गेला.

बातमी ऐकून मन व्याकूळ झालं. सुमारे एका वर्षापूर्वी – नेमकेपणे सांगायचं तर, १६ डिसेंबर २००४ रोजी – त्यांना भेटायला मी त्यांच्या सोलापूरच्या घरी गेलो होतो. माझ्या पहिल्याच कादंबरीला 'अल् तमीर'ला, भैरूरतन दमाणी पुरस्कार जाहीर झाला होता. तो स्वीकारण्यासाठी मी माझ्या पत्नीसोबत सोलापूरला पोहोचलो होतो. सोलापूरच्याच डॉ. गो. मा. पवारांनासुद्धा हा पुरस्कार जाहीर झाला होता. डॉ. पवारांना मी म्हटलं, 'सरदेशमुखांना भेटायची खूप इच्छा आहे, ते भेटतील का?' पवारांनी लगेच त्यांना फोन केला. दुसऱ्या दिवशी, सकाळी साडेनऊला आमची भेट ठरली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच सरदेशमुखांनी मला माझ्या मोबाइलवर फोन केला. आपल्या घरचा पत्ता समजावून सांगितला. रस्त्यावर कडक उन्ह पडलं होतं. मी त्यांच्या घरी नेमक्या वेळेस पोहोचलो. ते शुचिर्भूत होऊन माझी वाटच पाहत बसले होते. मी त्यांना वाकून नमस्कार केला. भारावल्यासारखा त्यांनी मला आशीर्वाद दिला. पुरस्कार त्या संध्याकाळी मिळणार होता, पण त्यापूर्वीच त्यांचा आशीर्वाद मिळाला.

सरदेशमुखांची आणि माझी ओळख ही त्यांच्या कादंबऱ्यांतूनच झाली होती. तिच्यावर सारी भिस्त ठेवून मी त्यांच्या दारी गेलो होतो. मराठीतल्या एका गंभीर वृत्तीच्या लेखकाला भेटतानाचं दडपण आणि आनंद दोन्हींच्या संमिश्र भावना मनात दाटलेल्या होत्या. त्या दिवसांमध्ये मी त्यांची 'डांगोरा : एका नगरीचा' ही साहित्यअकादमी पुरस्कारप्राप्त कलाकृती वाचत होतो. त्या कादंबरीतलं साइखेड संस्थान आणि त्याचा उमदा तरुण राजा रघुवीरसिंह मनात रेंगाळतच होता. कादंबरीची भयसूचक नैतिकता अस्वस्थ करत होती.

सरदेशमुखांची पहिली कादंबरी 'बखर एका राजाची' किंवा नंतरची दुसरी 'उच्छाद' वाचताना ज्ञानेश्वरीतली एक ओळ मला सारखी सारखी आठवे : *जे खळाची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रति वाढो.* सरदेशमुखांनी या 'खळाच्या व्यंकटी'बद्दल दुष्टांच्या वाकडेपणाबद्दल, काहीतरी भयसूचक लिहून ठेवलं आहे. ते अस्वस्थ करणारं आहे. सुखाची झोप लागू न देणारं आहे. निरभ्र प्रेमाचे, मैत्रीचे विश्वात्मक 'पसायदान' आणि जमिनीवरचे निर्घृण वास्तव या दोहोंमधल्या घेरी आणणाऱ्या दरीची ती अथांग खोली सरदेशमुख वाचकांना दाखवतात. एक गंभीर, नैतिक अंतर्दृष्टी जोपासणारा हा कादंबरीकार आहे असं मला नेहमीच वाटलं. त्यांनीच दार उघडलं. मला बघून त्यांना आनंद झालेला दिसला.

'तुमच्या पिढीतल्या लेखकाने माझ्याबद्दल आस्था दाखवणं मला तरी अपेक्षित नव्हतं,' अशा अर्थाचं काहीतरी ते मला बघताच बोलून गेले. मी म्हटलं, ''तुमची पुस्तकं माझ्या पुढच्याही पिढ्या वाचणार आहेत.'' त्यांनी माझ्या खांद्याला स्पर्श करून मला खुर्चीवर बसतं केलं. सरदेशमुखांच्या घरातलं फर्निचर अगदी साधं, कुठलाही बडेजाव मिरवणारं नव्हतं. मात्र लहानशा आलमारीत, टी-पॉयवर, इकडे तिकडे पुस्तकं ठेवलेली होती. भिंतीवर त्यांच्या वडलांची तसवीर होती. त्या पहिल्याच भेटीत सरदेशमुखांमध्ये आणि माझ्यात एक अपूर्व आणि अनपेक्षित जवळीक निर्माण झाली. आम्ही एकमेकांशी खूप बोललो. खरं सांगायचं तर तेच आपल्या थरथरत्या आवाजात भरभरून बोलले. मी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होतो. त्यांच्या त्या लहानश्या दिवाणखान्यात आम्ही सुमारे एक-दीड तास एकत्र होतो. त्यांच्या मुलीने अगत्याने चहा आणून दिला आणि कामानिमित्ताने ती बाहेर गेली. मग घरी आम्ही दोघंच उरलो.

सकाळचे साडेनऊ-पावणेदहा झाले असावेत, खिडकीबाहेर लख्ख सूर्यप्रकाश फाकला होता. हवेत हलका गारवा होता. समोरच्या गॅलरीतून येणाऱ्या लख्ख प्रकाशात सरदेशमुखांना मी

अंतर्बाह्य न्याहाळण्याचा प्रयत्न करत होतो. ब्याऐंशी-त्र्याऐंशी वर्षांच्या सरदेशमुखांची प्रकृती बरी नसल्याचं जाणवलं. त्यांची हालचाल संथ होत होती. सांधेदुखीचा त्रास असावा बहुधा. डोळेही नीट काम करत नसावेत. वाचताना त्रास होई. इतरही काही त्रास होते. मी त्यांना सप्रेम भेट दिलेल्या माझ्या कादंबरीची प्रत त्यांनी उघडून बघितली. आस्थेने तिला न्याहाळलं आणि ''मला वाचताना जरी त्रास होत असला तरी ही कादंबरी मी कोणाकडून तरी खास वाचून घेईन'' असं त्यांनी मला आश्वासन दिलं. मग त्या प्रतीच्या आत माझ्या घरचा फोन नंबर लिहायला त्यांनी मला सांगितलं. ''वाचली की तुमच्याशी बोलेन'' असं म्हणाले. ''तुम्ही काय काय वाचता?'' त्यांनी विचारलं. मी सांगू लागलो. व्हिक्टर ह्यूगो, डोस्टोव्हस्की, टॉलस्टॉय, हर्मन हेसे ही आमची समान दैवतं निघाली आणि ते एकदम खुलले. ह्यूगो, हर्मन हेसे, डोस्टोव्हस्कीबद्दल बोलताना त्यांचा थरथरणारा स्वर उत्तेजित झाला आणि चष्म्याच्या आड दडलेल्या त्यांच्या स्निग्ध नजरेत या लेखकांबद्दल वाटत असलेला प्रेमादर अगदी ओतप्रत भरला होता.

स्वत:ला विसरून दुसऱ्या कुठल्याही लेखकाबद्दल आत्मीयतेने बोलणारा कुठलाही लेखक मला मोठा माणूस वाटतो. सरदेशमुख हर्मन हेसे, ह्यूगोबद्दल भान विसरून बोलू लागले. ते सारंच बोलणं या विचारवंत कादंबरीकाराच्या जीवनाचा अर्क होता. साऱ्या दिग्गजांनी त्यांच्या लिखाणाबद्दल किती प्रचंड निष्ठा दाखवली, हे सांगताना त्यांच्या स्वरात मला कुठेतरी त्यांच्या स्वत:च्या साहित्यिक निष्ठेचेही प्रतिध्वनी ऐकू येत होते.

''मी तसा खूप बोलणारा नाही, पण काय कोण जाणे, तुम्हांला बघितलं आणि खूप बोलावसं वाटू लागलं,'' ते म्हणाले. तेव्हा त्यांचा आवाज भावाकुल आणि डोळे किंचित पाणावलेले वाटले. ''माझा मुलगा जर असता तर तो आज तुमच्या एवढा असता,'' ते अगदी सहजपणे बोलून गेले. त्यांच्या दिवंगत पत्नीबद्दल आणि कौटुंबिक समस्येबद्दलही ते थोडं बोलले.

''माझ्या साइखेड संस्थानावरच्या कादंबऱ्यांबद्दल वाचकांना कमालीची उत्सुकता वाटत असते आणि रघुवीरसिंह नावाचा असा कुठला राजा, त्याचा देसाई नावाचा कारभारी हे खरोखरच होऊन गेले का? हा त्यांचा प्रश्न असतो. या कादंबऱ्यांच्या पात्रांची वाचक नेहमीच उत्सुकतेने विचारपूस करत असतात. ही पात्रं खरी असावीत असा सगळ्यांचा संशय आहे. पण मी याबद्दल कुठलंही विधान करत नाही. माझ्या कादंबऱ्या या साहित्यिक कलाकृती म्हणूनच समजाव्यात असं मी वाचकांना सांगतो,'' ते सांगू लागले.

मात्र त्या कादंबऱ्यांमधली आत्मचरित्रात्मकता कुठे आहे हे त्यांनी मला मोकळेपणे सांगितलं. तशा अर्थाचं त्यांचं विवेचन 'बखर : एका राजाची'च्या प्रस्तावनेत आलंच आहे, पण माझ्याशी बोलताना त्यांनी आपल्या वडलांबद्दल फार उमाळ्याने सांगितलं. सच्छील प्रवृत्तीच्या, नेकदार चारित्र्याच्या आपल्या वडलांचा संस्थानदरबारी कसा आणि किती छळ झाला, हे सांगताना त्यांच्या चेहेऱ्यावरची व्यथा ताजी वाटत होती. दुष्टांची वक्रता, खलत्व, अन्याय याबद्दलची व्यथा त्यांच्या शब्दांमधून पाझरत होती. संस्थानच्या चाकरीत त्यांच्या वडलांची जबरदस्त मानखंडना झाली होती, भयंकर मानसिक छळ झाला होता.

सरदेशमुखांचं काळीज त्यांनी आपल्या वडलांच्या स्मृतिकोषात अलगद ठेवून दिलेलं होतं. वडलांची ओली आठवण त्यांच्या शुष्क वृद्धापकाळाचा आसरा असावा. वडलांबद्दल बोलताना त्यांच्या आवाजाची कंपनं मला स्पर्शून गेली. त्यांच्या लेखनाची प्रेरणा मला त्यांच्या वडलांच्या जीवनातून त्यांच्यापर्यंत संक्रमित झालेली वाटली. ब्याऐंशी-त्र्याऐंशी वर्षांच्या पक्व आणि व्यामिश्र जीवनानुभवाने समृद्ध झालेले सरदेशमुख बोलता बोलता वडलांबद्दल इतके कोवळे झाले, की ते ऐकून कुणाही व्यक्तीच्या काळजात पितृप्रेमाचे कोवळे कोंभ फुटले असते.

हर्मन हेसेची 'स्टिपनवुल्फ' कादंबरी माझी आवडती. त्यांचीही ती आवडती. कादंबरीतला एकाकी नायक हॅरी जेव्हा सायंकाळी आपल्या एकाकी घरी परतून येतो तेव्हा शेल्फवर विराजमान झालेले डोस्टोवस्की, टॉलस्टॉय, शेक्सपीयर हे साहित्यिक व मोझार्ट, बिथोवन हे संगीतकार त्याची कशी आतुरतेने वाट बघत असतात, हे हेसे वाचकांना सांगतो. हेसेचा 'स्टिपनवुल्फ' एकाकी नव्हता. त्याची मैत्री अशा अभिजात कलाकारांसोबत होती आणि हे फार भाग्याचं आहे, असं मी म्हटलं. यावर सरदेशमुखांनी मान डोलावली. पण त्यांच्या चेहेऱ्यावर एक मुरलेली व्यथा झाकोळून गेली. ती बघून मी व्यथित झालो आणि त्या भयंकर शक्यतेने दचकलो.

''मी फार एकटा आहे हो,'' ज्या वेदनेने ते हे बोलून गेले त्या स्वरांचं शब्दांकन मला कधीही करता येणार नाही. आपलं एकटेपण आपल्यापाशीच जपून ठेवणारी लहान-मोठी माणसं भोवताली असतातच. सरदेशमुख हे तर नक्कीच त्या कुळातले वाटत होते. पण आम्हा दोघांच्या त्या संवादात असं काही तरी दडलेलं असावं, की त्यांना आपल्या एकटेपणाबद्दल उमाळा आला.

मी ते कानकोंडं होत ऐकून घेतलं. ऐकून मला सूक्ष्म अपराधी टोचणी लागली. मी खिडकीबाहेर बघितलं. तिथला सूर्य रखरखीत वाटत होता. गेल्या पन्नास-साठ वर्षांतलं किंवा न जाणो, संपूर्ण ऐंशी वर्षांतलं, त्यांचं अवघं एकटेपण त्यांच्या स्वरांतून नकळतपणे पाझरून गेलं होतं.

एकटेपणा हा त्यांचा आत्मप्रत्यय असावा का? तसा तो असेल तर दुसरी एखादी व्यक्ती त्यावर काय बोलणार? सरदेशमुख, तुम्ही एकटे नाही आहात, तुमच्यासोबत सारे आहेत हे सांगणं सोपं. पण सोपं बोलणं, वागणं, विचार करणं हे साइखेड कादंबऱ्यांच्या लेखकाला माहीत असेल का? त्यांच्या कादंबऱ्यांवर एकवार नजर फिरवली तरी त्यांनी निर्माण केलेल्या पात्रांचं जीवन किती अनघड, व्यामिश्र आणि शोकात्म आहे हे जाणवतं. अशी सृष्टी निर्माण करणाऱ्या कादंबरीकाराला तो एकटा नाही हे कुठल्या तोंडाने सांगायचं? निरुत्तर होऊन मी त्यांच्याकडे बघत बसलो होतो.

विलास सारंगांच्या अलीकडच्या एका प्रदीर्घ मुलाखतीत मुलाखतकारांनी सारंगांना 'एकाकीपणाचा शिल्पकार' म्हटल्याचं आठवलं. याचा अर्थ सारंगांनी आपल्या या एकाकीपणाला घडवलं, जाणीवपूर्वक कोरून काढत आपलं जीवन आणि

साहित्य निर्माण केलं. तो त्यांचा निर्णय होता. पण खिडकीबाहेर हळूहळू चढत जाणाऱ्या त्या शुष्क दिवसांत त्या दिवाणखान्यात माझ्यासमोर बसून आपल्या पाणीदार डोळ्यांनी, थरथरत्या आवाजात, सरदेशमुख मला सहोदर समजून जे काही बोलत होते त्यावरून सरदेशमुखांना 'एकाकीपणाचा शिल्पकार' म्हणण्याचं धाडस मला झालं नाही. एकाकीपणाचं शिल्प त्यांना नकोसं वाटत असावं. आयुष्यात एकाकीपणाची निवड त्यांनी जाणीवपूर्वक केली नसावी बहुधा. एकाकीपणा त्यांच्यावरचं संकट होतं.

शिल्पकार हा स्वत:च्या मनातली प्रतिमा कोरत कोरत तिच्याशी तादात्म्य पावतो. सरदेशमुख आपल्या लेखनातून खलत्वाच्या समस्येला भिडले. या चिरंतन समस्येवर उपाय नाही, असं काहीतरी प्रौढ, अस्वस्थ करणारं सत्य त्यांनी सांगितलं. माणसाला माणूस म्हणून जगण्यात नैतिक हताशा येते हे त्यांनी रघुवीरसिंह राजाच्या संवेदनशील रूपकातून, देसाईंच्या निष्ठावान सेवेतून आणि राजस नावाच्या प्रेयसीच्या हताशेतून सांगितलं. कुणाला आवडो, न आवडो, पण इतिहासाचे अनुसर्जन करणारी त्यांची प्रखर नैतिक लेखणी ही सुईसारखी टोकदार आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतून मानवी जीवनाचे अतार्किक विभ्रम आपल्या अंगावर मारेकऱ्यांसारखे धावून येतात. गारठवून टाकतात. अंतर्मुख करतात. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यानंतर चौथी मूलभूत मानवी गरज म्हणजे 'हिरवा-निळा द्वेष' तर नसेल? हा प्रश्न सरदेशमुखांच्या कादंबऱ्या वाचून मला पडतो. हा हिरवा-निळा, काहीसा वेडसर भासणारा द्वेष त्यांच्या तिन्ही कादंबऱ्यांचा जणू स्थायिभाव आहे.

द्वेष व असूया, खुळचट, निरर्थक, हिंसक द्वेष आणि त्याला बळी पडणारी सत्त्वशील, मनात पासयदान पुटपुटणारी, निर्विष माणसं रंगवताना सरदेशमुखांना किती वेदना झाल्या असतील? पण त्या सुसह्य व्हाव्यात म्हणून त्यांनी कधी आपल्या जीवनदृष्टीशी, नैतिक धारणेशी, कलात्मक भानाशी आदर्शवादी तडजोड केलेली दिसत नाही. राजकीय सत्ता, मानवी चरित्र व नैतिकता, परिघावरच्या उपेक्षितांचे अंतरंग, स्त्री-पुरुषांचे भावुक व लैंगिक संबंध हे स्वत:च्या आस्थेचे विषय मानणाऱ्या सरदेशमुखांनी स्वत:ला आणि वाचकांना केवळ बरं वाटावं म्हणून स्वत:च्या अभिव्यक्तीशी आदर्शवादी तह केलेले नाहीत. तर मग सरदेशमुखांच्या अवघ्या लेखनाचं प्रयोजन काय? कुठली जीवनमूल्यं त्यांना खुणावत असावीत? मला वाटतं, अभिजात संवेदनशीलता, चिंतनशील आत्मानुभूती व प्रखर वास्तववादी दृष्टी या तीन गोष्टी म्हणजे त्यांच्या मूल्यांचा गाभा होता. या मूल्यभानाला पितृप्रेमाची बैठक आहेच.

हे सारं मला त्यांना सांगायचं होतं, पण हे काही मला त्या भेटीत बोलता आलं नाही. त्यांच्या वाणीचा ओघ थांबवणं मला अप्रस्तुत वाटलं. ते करंटेपणाचंही ठरलं असतं. मी त्यांना अखंड बोलू दिलं. अंतर्मुख माणूस जेव्हा बोलतो, उमाळ्याने बोलतो, तेव्हा त्याच्याइतकं सुंदर चालतं-बोलतं शिल्प कुठलंच नसतं. तरीही मला त्यांना एक प्रश्न विचारावासा वाटत होता. कारण त्या प्रश्नाच्या उत्तरात कदाचित, मला माझ्या मनातले प्रतिध्वनी ऐकायला मिळाले असते. ते ऐकायला माझं मन आतुर होतं. मला त्यांना जो प्रश्न विचारायचा होता, तो खरं तर, माझ्या पाठीमागे देणेकऱ्यासारखा दहा-वीस वर्षांनी लागणारच होता. मात्र त्या प्रश्नाचं उत्तर वीस वर्षांनंतर काय राहील हे मला सांगता येत नव्हतं. सरदेशमुखांकडे या प्रश्नाचं उत्तर तयार असेल असं वाटल्याने मी त्यांना दबकतच विचारलं, ''एक कादंबरीकार म्हणून, एक लेखक म्हणून तुम्ही समाधानी आहात काय?''

त्यांनी माझ्याकडे रोखून बघितलं. मी संकोचलो. अदृष्टाची भीती एका झटक्यात मनाला स्पर्शून गेली.

''विश्राम, मी देवाला एकच मागणं मागतो, पुढच्या जन्मी तरी मला युरोपमध्ये एक लेखक म्हणून जन्माला घाल,'' सरदेशमुख बोलून गेले.

हे बोल त्यांनी त्यांच्या अंतर्यामी खूप घोळवलेले वाटले. मनात खूप साचून राहिलेली ही सल असावी. ती उच्चारताना त्यांच्या चर्येवर एक निर्मम वेदना तरळत होती आणि स्वरात अमिट कारुण्य. त्यादिवशी तरी मला त्यांच्याकडून नेमकं हे उत्तर ऐकायचं नव्हतं. त्यादिवशी मनाची उभारी वाढेल असं काहीतरी चांगलंचुंगलं मला त्यांच्याकडून हवं होतं. (माझ्या कादंबरीला त्या संध्याकाळी पुरस्कार मिळणार होता!) पण सरदेशमुखांनी देवाकडलं हे मागणं माझ्या पुढ्यात उच्चारलं, तेव्हा मला खिन्न वाटलं. संभ्रमित वाटलं.

ज्या लेखकाला मी प्रगल्भ जीवनदृष्टीचा शिल्पकार समजत आलो होतो त्याच्या काळजात उपेक्षेचं हे शल्य केव्हा आणि कोणी खुपसलं? त्यांच्या समोर बसल्याबसल्याच मी अंतर्मुख झालो, हताश झालो. निरुत्तर झालो. याबद्दल पुढे काही छेडून मी त्यांना आणि स्वत:ला अधिक त्रास करून घेणार नव्हतो. पण गंभीर निष्ठेने लिखाण करणाऱ्या आमच्यातल्या एका सशक्त कादंबरीकाराला आम्ही असं कसं एकाकी टाकलं? खरंच वाचकांनी त्यांची उपेक्षा केली, की त्यांना स्वत:च्या उपेक्षेचा भास झाला? किती कठीण प्रश्न होता हा! साक्ष तरी कोणाची काढायची? याबाबतीत त्यांचीच साक्ष मला पुरेशी वाटली.

सरदेशमुखांना पुढच्या जन्मी लेखक म्हणूनच, पण युरोपमध्ये जन्माला यायचं होतं. त्यांचा आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास असावा, कर्मविपाक सिद्धान्तावर श्रद्धा असावी. हर्मन हेसेच्या आधिभौतिक आशय असलेल्या दोन अप्रतिम, अर्थगर्भ कादंबऱ्या, 'सिद्धार्थ' आणि 'जर्नी टू इस्ट' सरदेशमुखांनी आपल्या अभिजात मराठी शैलीत अनुवादित केल्या आहेत. त्यावेळी हेसे जिवंत होता आणि सरदेशमुखांचा व त्याचा प्रत्यक्ष पत्रव्यवहार झाला होता. तो त्यांनी मला सविस्तर वर्णून सांगितला. मग कसेबसे उठून, कपाटातून या दोन कादंबऱ्यांच्या मराठी अनुवादाची नवी प्रत त्यांनी काढून मला भेट दिली. मुखपृष्ठावर हर्मन हेसेचं छायाचित्र छापलेलं आहे. ते आम्ही दोघांनी एकत्र बसून कौतुकानं न्याहाळलं. त्या अनुवादावर सरदेशमुखांची स्वाक्षरी मला हवी होती, पण बोलण्यात ते राहूनच गेलं.

माझी वेळ संपत आली होती. त्यांचा निरोप घेण्यासाठी मी उठलो. त्यांनी माझ्याकडे एक प्रेमळ कटाक्ष टाकला आणि मेजावर

ठेवलेली वाटी उचलली. तिच्यात पारिजातकाची ओंजळभर फुलं होती. ती त्यांनी माझ्या ओंजळीत टाकली. ''तुमच्या पाहुणचारासाठी आत्ता माझ्याजवळ काहीच नाही, ही फुलं घ्या,'' ते म्हणाले. मी भारावून जाऊन ती फुलं ओंजळीत घेतली. मग हळुवारपणे ती शर्टाच्या खिशात जपून ठेवली आणि त्यांचा निरोप घेतला. मला सोडायला ते जिन्यापर्यंत आले होते. ''संध्याकाळी जमलं तर पुरस्कार वितरण सोहळ्याला येतो,'' म्हणाले. मी त्यांचा हात हातात घेतला, त्यांच्याकडे वळून बघितलं आणि पायऱ्या उतरू लागलो.

रस्त्यावर आलो. रिक्षा केली आणि त्यांच्या-माझ्यातला संवाद परत एकदा मनातल्या मनात ऐकू लागलो. त्यांच्या एकाकीपणाच्या आणि उपेक्षेच्या शल्यावर फुंकर घालावी असा माझा अनुभवही नव्हता आणि अधिकारही. तरी पण मला त्यांना सांगायचं होतं, की सरदेशमुख, तुम्ही फार मनाला लावून घेऊ नका, आमची ही शतखंडित वाङ्मयीन अभिरुची कायम कलावादी, जीवनवादी, रूपवादी, देशीवादी, अस्तित्ववादी, स्त्रीवादी, शहरी, ग्रामीण, दलित, ब्राह्मणी, मराठा, डाव्या, उजव्या, प्रतिगामी, पुरोगामी, पारंपरिक, आधुनिक आणि आता उत्तर-आधुनिक अशा अगणित राहुट्यांमध्ये विभागून क्षीण होऊन गेली आहे.

तुम्ही लेखक म्हणून यांपैकी कुठल्या राहुटीत आश्रय घेतला होता? प्रश्न फार महत्त्वाचा आहे सरदेशमुख. तो टाळू नका. या वेगवेगळ्या राहुट्यांमध्ये एखाद्या लेखकाबद्दल, त्याच्या एखाद्या कलाकृतीबद्दल कधीतरी एकवाक्यता होती का? बोला, सरदेशमुख, बोला. आता तुम्हीच बघा नं, आजही मराठी सारस्वतात 'ज्ञानदेव-तुकाराम' या दोन नावांशिवाय इतर कुठल्या नावावर एकवाक्यता आहे? तिथेही कोणा एकाच्या नावाने भुणभुण आहेच. तर ते शल्य विसरा सरदेशमुख.

सरदेशमुख, या छिन्नभिन्न साहित्यिक अभिरुचींच्या लहान-मोठ्या, रंगीबेरंगी तंबूंमध्ये, चित्रविचित्र कनातींमध्ये, 'निष्ठावान' सैनिक दबा धरून बसलेले आहेत आणि त्यांच्या प्रत्येकाच्या पाठीवर 'निष्ठावान संवेदनशीलतेचे' भाते लटकत आहेत. या भात्यांमध्ये शत्रूंसाठी फक्त उपेक्षेचे आणि अनुल्लेखाचे जिव्हारी बाण भरलेले आहेत. या बाणांची गंमत म्हणजे ते न मारल्यानेच लागतात, फक्त नेम धरला की झालं. या न मारलेल्या बाणांमुळे मग तुमच्यासारखा कलावंत जिव्हारी जखमी होतो. युरोपमध्ये पुढचा जन्म घेण्याची वांच्छा मनी बाळगतो.

पण सरदेशमुख, तुम्हांला म्हणून सांगतो, की मीच नव्हे, तर माझ्यासारखे अनेक वाचक तुमच्या लिखाणावर मनापासून प्रेम करतात. करत राहू. कारण तुमच्या वाङ्मयीन आस्थेचे प्रश्न हे शालेय गणिताच्या पाठ्यपुस्तकातल्या उदाहरण-संग्रहासारखे, आपापली तयार उत्तरं सोबत घेऊन आलेले नाहीत. आम्हांला हे माहीत आहे, सरदेशमुख.

हे आणि असंच खूप काही मला त्यांना सांगावसं वाटलं होतं, पण माझी वेळ संपत आली होती. शिवाय त्यांच्या वयाचा धाक होताच.

मला त्यांना काळजापासून सांगावंसं वाटलं होतं, की सरदेशमुख, पुढच्या जन्मीसुद्धा तुम्ही त्र्यं. वि. सरदेशमुख म्हणून महाराष्ट्रातच जन्माला या. मुंबई-पुण्याला नको, विदर्भ-मराठवाड्यातसुद्धा नको, तर आपल्या हक्काच्या सोलापूर गावीच जन्माला या. तोपर्यंत आमच्यामध्ये आस्थेचे नवे कोंभ फुटलेले असतील आणि वाचक म्हणून आम्ही कदाचित अधिक प्रगल्भ आणि दिलदार झालेले असू. पण माझी ही प्रार्थना मनातल्या मनातच राहून गेली. माझा स्वर्गावर विश्वास नाही. पण सरदेशमुखांचा जर असेल तर आज तिथे माझी ही प्रार्थना पोहोचू दे.

आज त्या भेटीला वर्षाहून अधिक काळ लोटला. त्यांचा अन् माझा क्वचित टेलिफोनवर संपर्क होता. त्यांचा 'सिद्धार्थ' आणि 'जर्नी टू इस्ट'चा मराठी अनुवाद मला विलक्षण आवडला. मी ते सांगायला लगेच त्यांना फोन केला. म्हटलं, ''जर हर्मन हेसेची मातृभाषा मराठी असती तर त्यानी तुम्ही वापरलेले शब्दच वापरले असते.'' ते खुषीत आले. म्हणाले, ''ज्यांनी ज्यांनी हा अनुवाद वाचला त्यांनी त्याची फार तारीफ केली.'' आम्ही परत एकदा अनेक पाश्चात्त्य लेखकांवर बोललो.

त्यांनी खलील जिब्रानच्या 'द प्रोफेट'चा मराठी अनुवाद केला होता आणि तो त्यांना मला कुरियरने पाठवायचा होता. त्यासाठी त्यांना माझा पोस्टाचा पत्ता हवा होता. मी म्हटलं, ''मी तुम्हांला पत्र लिहितो आणि माझा पत्ताही कळवतो.'' त्यांच्या 'डांगोरा....' वर मला खूप काहीतरी लिहायचं होतं. जोपर्यंत माणूस सुटासुटा आहे, त्याची नियती सुटीसुटी आहे तोपर्यंत असूया राहील आणि म्हणून तुमच्या 'प्रॉब्लेम ऑफ इव्हिल'चं उत्तर संभवत नाही, असं काहीतरी मला त्यांना सांगायचं होतं.

तीन चार महिन्यांपूर्वी रात्री दहाच्या सुमारास अचानक त्यांचा मला फोन आला. खूप इकडलं तिकडलं बोलणं झालं. त्यांनी मला आपणहून फोन केल्यामुळे मी जरा भांबावून गेलो होतो. त्यांनी माझी कादंबरी तर दुसऱ्याकडून वाचून घेतली नसणार? माझी छाती धडधडू लागली. पण आमचं बोलणं काही माझ्या कादंबरीवर आलं नाही. मी मग त्यांना पत्र लिहिण्यासाठी शुभमुहूर्त शोधू लागलो. दिवस घरंगळून जात होते.

मग एकदम ते गेल्याची बातमीच ऐकली. मन व्याकूळ झालं. सरदेशमुखांना आपण एका पत्राचं तरी देणं लागतो याची रुखरुख लागून राहिली. त्यांच्या कादंबरीत भेटणाऱ्या रघुवीरसिंह राजासारखे ते मला उमदे, संवेदनशील, कर्तव्यपरायण पण परिस्थितिशरण आणि विकल भासले होते. त्र्यं. वि. सरदेशमुख नावाचा राजा आता आपल्या राज्यातून, आपल्या राजवाड्यातून, आपल्या पार्थिव कुडीला सोडून निघून गेला आहे. त्याचे निर्गमन झाले आहे. त्याची फार रुखरुख लागून राहिली आहे. आजही मला अवचित पारिजातकाचा सुगंध आला, की सोलापूरात भेटलेले सरदेशमुख आठवतात, खिडकीबाहेरचा तो प्रकाश आठवतो आणि मग माझं अवघं अस्तित्व सुवासिक होऊन जातं.

*(मे २००६)*

# वाईटपणा विकत घेणारा माणूस

**मिलिंद जोशी**


''नमस्कार करावा अशी पावलं आज दिसत नाहीत. संस्थात्मक पातळीवर तर अभावानेच निःस्पृह माणसे भेटतात. वैयक्तिक स्वार्थासाठी कातडीबचाऊ धोरण अवलंबिणाऱ्या माणसांचा गजबजाट सभोवती दिसतो. अशा परिस्थितीत संस्थेचे चारित्र्य सांभाळण्यासाठी वाईटपणा विकत घेणाऱ्या डॉ. गं. ना. जोगळेकरसरांचे स्मरण करणे ही गोष्ट निश्चितच बळ देणारी ठरेल.''

१४ ऑगस्ट २००७ या दिवशी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर काळाच्या पडद्याआड गेले. १३ ऑगस्टला सासवड येथे आचार्य अत्रे साहित्यसंमेलनासाठी मी त्यांच्याबरोबर गेलो होतो. सोबत म. सा. प.च्या कार्यवाह नंदा सुर्वे आणि कोल्हापूर जिल्ह्याचे म. सा. प.चे प्रतिनिधी राजन मुठाणे होते. प्रवासात जोगळेकरसरांना उलटी झाली होती. ''सर, आपली तब्येत बरी नसेल तर परत जाऊ या का?'' असं मी त्यांना विचारलं. पित्तामुळे उलटी झाली असेल, असं कारण सांगत त्यांनी गाडी सासवडच्या दिशेने न्यायला सांगितली. तिथे त्यांनी संमेलनात भाषण केले. उद्घाटनाच्या सत्रानंतर ना. धों. महानोर, जब्बार पटेल यांच्याबरोबर आम्ही जेवण केले. छान गप्पा झाल्या. परतीच्या प्रवासातही ते आमच्याशी मनापासून बोलत होते.

त्याच दिवशी संध्याकाळी पुण्याला परिषदेमध्ये श्याम भुर्के आणि गीता भुर्के यांचा 'खुमासदार अत्रे' हा कार्यक्रम आम्ही आयोजित केलेला होता. सासवडहून पुण्यात आलो, तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. परिषदेतला कार्यक्रम साडेसहा वाजता होता. मी सरांना म्हणालो, ''सर, आज प्रवासाची दगदग झालेली आहे. त्यामुळे विश्रांती घ्या. संध्याकाळच्या कार्यक्रमाला आला नाहीत तरी चालू शकेल.'' त्यावर मंद स्मित करीत नेहमीच्या शैलीत ते म्हणाले, ''बघतो.'' सर घरी गेले. पण बरोबर साडेसहा वाजता हातात पिशवी आणि काठी घेऊन त्यांची मूर्ती परिषदेच्या दारात उभी. मला आश्चर्याचा धक्काच बसला. तो कार्यक्रम संपेपर्यंत सर परिषदेत उपस्थित होते. साडे आठला कार्यक्रम संपला. ते आणि मी दोघेही रिक्षाने प्रवास करणारे. मी त्यांच्यासाठी रिक्षा आणून दिली. ''उद्या लवकर या. आपल्याला काही पत्रं पाठवायची आहेत.'' असे म्हणत ते रिक्षात बसले. मीही माझ्या घरी आलो. पहाटे पाच वाजता माझा दूरध्वनी वाजला. परिषदेतला सेवक महेंद्र मुंजाळ बोलत होता, 'सर गेले' असा निरोप होता. माझा विश्वासच बसत नव्हता. काल दिवसभर मी ज्यांच्या बरोबर होतो ते आज हयात नाहीत? माणूस पराक्रमी असला तरी नियती क्रूर असते, असेच म्हणावे लागेल.

मला अजूनही तो प्रसंग स्पष्टपणे आठवतो. अंतर्नादच्या २००५ सालच्या दिवाळी अंकात जोगळेकरसरांचा 'साहित्यसंस्था : काल, आज आणि उद्या' हा लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखात सरांनी साहित्यसंस्थांचे जरा जास्तच कौतुक केले होते. त्यांचे काही विचार मला पटले नाहीत. त्या लेखावरची प्रतिक्रिया व्यक्त करणारे माझे पत्र मी अंतर्नादकडे पाठविले. 'डॉ. जोगळेकरांचा लेख : एकांगी' अशा शीर्षकाचे ते पत्र संपादकांनी पुढच्या अंकात प्रसिद्ध केले. साहित्यसंस्था, तिथले राजकारण, साहित्याशी सुतराम संबंध नसलेली तिथली माणसे यांवरती टीका करीत मी माझा मोर्चा म. सा. प.कडे वळविला होता. मसापच्या ग्रंथालयाच्या दुरवस्थेबद्दल लिहिले होते. हे पत्र प्रसिद्ध झाले, त्याच महिन्यात मसापच्या ग्रंथालयातून पुस्तक बदलून मी येत होतो. सरही नेमके त्याचवेळी परिषदेच्या फाटकातून आत येत होते. पत्र मोठ्या धाडसाने लिहिलेले असले तरी मी चपापलो. सरांना चुकवून जावे म्हटले तर सरांनी मला पाहिले होते. माझ्याजवळ येऊन थांबत त्यांनी त्यांची ती कडक नजर माझ्यावरच रोखली आणि आपल्या नेहमीच्या धीरगंभीर आवाजात म्हणाले, ''अंतर्नादमधली तुमची प्रतिक्रिया वाचली. लिहिता चांगलं. पण वस्तुस्थितीचा विचार करा. साहित्यसंस्थांच्या बाहेर राहून संस्थांवर टीका करणं सोपं आहे. इथे या, काम करा, अनुभव घ्या, मगच आपली मतं बनवा.'' ते बोलत असताना मी शांत होतो. त्यांच्या पाठोपाठ मी त्यांच्या खोलीत आलो. त्यांनी बेल दाबली. तिथल्या सेवकाला म्हणाले, ''जोशींना चहा सांगा. माझ्या वाटणीची साखर त्यांच्याच कपात घालायला सांगा.'' स्वतःचा चष्मा कपाळावर घेत खिशातल्या रुमालाने अलगद डोळे पुसत माझ्याकडे पाहत ते म्हणाले, ''सध्या काय लिहिता आहात? माझी एक तक्रार आहे, तुम्ही व्याख्यानात फार वेळ वाया घालवता. लिहिलेलं तेवढंच मागे उरतं हे लक्षात ठेवा.''

त्या दिवशी जर माझी आणि सरांची भेट झाली नसती, तर कदाचित मी साहित्यपरिषदेच्या निवडणुकीत भागही घेतला नसता.



त्या दिवशी जर माझी आणि सरांची भेट झाली नसती, तर कदाचित मी साहित्यपरिषदेच्या निवडणुकीत भागही घेतला नसता. काही दिवसांतच निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाला. सरांच्या विरोधी पॅनेलमधून मी निवडून आलो, पण सरांबरोबर काम करताना त्यांच्यातला माणूस, हाडाचा कार्यकर्ता मला वेगवेगळ्या कोनांतून समजत गेला.

काही दिवसांतच निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाला. सरांच्या विरोधी पॅनेलमधून मी निवडून आलो, पण सरांबरोबर काम करताना त्यांच्यातला माणूस, हाडाचा कार्यकर्ता मला वेगवेगळ्या कोनांतून समजत गेला.

सर साहित्यसंस्थांचे आधारवड होते. संस्थात्मक पातळीवर निरपेक्ष बुद्धीने कसे काम करता येते, याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी घालून दिला होता. त्यांच्या कार्यशैलीविषयी लोकांमध्ये मत-मतांतरे होती; पण त्यांची साहित्यनिष्ठा, सचोटी, प्रामाणिकपणा यांबाबत मात्र कुणाचेही दुमत नव्हते. मराठी साहित्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्वसंपन्न विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडविल्या. शिस्तप्रिय प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून फर्ग्युसन महाविद्यालयातले त्यांचे विद्यार्थी त्यांचे आजही नाव काढतात.

सरांच्या विद्वत्तेचे तेज त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरती झळाळत असे. त्यांचे लिहिणे आणि बोलणे अतिशय नेमके, सुस्पष्ट आणि आटोपशीर असे. 'अभ्यासोनि प्रकट व्हावे। नाहीतरी झाकोनी असावे।' या समर्थविचाराला त्यांच्या जीवनात मोलाचे स्थान होते. करारी चेहरा, आवाजातली जरब आणि अफाट व्यासंग यांमुळे माणसे त्यांच्याशी बोलताना बिचकत असत. त्यांचा एक प्रकारचा नैतिक धाक वाटत असे. त्यांची स्मरणशक्ती अफाट होती. संस्थेच्या घटनेतल्या बारीक सारीक तपशिलापासून ते वाङ्मय इतिहासाच्या खंडातल्या एखाद्या संदर्भापर्यंत त्यांना अनेक गोष्टी मुखोद्गत होत्या. साहित्याचा इतिहास त्यांना सनावलीसहित पाठ होता. मी कधीतरी त्यांना गमतीने म्हणत असे, ''सर, आपण साहित्यातले बाबासाहेब पुरंदरे आहात.'' या माझ्या टिपणीवर ओठ किंचित पसरट करीत ते स्मित करीत असत.

सरांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा संसार मनोभावे केला. थोडी-थोडकी नव्हे तर आपल्या आयुष्यातली तीस वर्षे त्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता या संस्थेसाठी दिली. कार्यकारिणी सदस्य, कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक, कोशाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह आणि कार्याध्यक्ष असा त्यांचा प्रवास घडत गेला. कार्याध्यक्ष म्हणून ते चौथ्यांदा निवडून आले होते. आपल्या कर्तृत्वाने त्यांनी परिषदेच्या प्रतिष्ठेत भरच घातली. सातत्य हे त्यांच्या जीवनातले एक महत्त्वाचे सूत्र होते. वेळेबाबत ते खूप काटेकोर होते. त्यांच्या परिषदेत येण्याच्या व जाण्याच्या वेळा पाहून आपले घड्याळ लावावे इतके ते वेळेबाबत दक्ष होते. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या समृद्धीसाठी परिषदेच्या माध्यमातून काम करताना त्यांनी याविषयी आस्था असणाऱ्या चांगल्या लोकांचे संघटन केले. मराठीच्या जुन्या-नव्या प्राध्यापकांना एकत्र आणले. त्यातून वाङ्मय इतिहासाच्या खंडाच्या पुढच्या भागाच्या निर्मितीला चालना मिळाली. मुळात एखादा माणूस ज्ञानी असणे, त्याचा जनसंपर्क दांडगा असणे, त्याच्याकडे व्यवस्थापनकौशल्य असणे, एवढे सगळे असताना संस्थेसाठी काम करण्याची तयारी असणे आणि ही सारी गुणवत्ता एकाच व्यक्तीच्या ठायी असणे हा एक दुर्मिळ योग असतो. सरांकडे ही सारी गुणवत्ता होती, त्याच्या जोडीला तत्त्वनिष्ठ होती. त्यामुळे साहित्यसंस्थांचा संसार ते मनोभावे करीत होते.

स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा स्थायिभाव होता. एखादी गोष्ट नाही म्हणण्यासाठी जे धाडस लागते, ते त्यांच्याकडे होते. एखाद्या माणसाच्या अपरोक्ष त्याची निंदानालस्ती करण्यापेक्षा त्याला चांगले-वाईट काय असेल ते तोंडावर सांगण्यात ते कचरत नसत. त्यामुळे फटकळ अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. त्याचे त्यांना दुःख नव्हते. शासनाविषयी त्यांच्या मनात आदराची भावना होती. पण शासनाची भाषेसंदर्भातली भूमिका विसंगत असेल, तर ते कडक शब्दात त्याविषयी लेखात आणि भाषणात आपली भूमिका मांडत असत. साहित्यसंमेलनासाठी शासनाकडून मिळणारा निधी असो, साहित्य संस्कृती मंडळाकडून साहित्य संस्थांना मिळणाऱ्या अनुदानाबाबतच्या काही अटी असोत, जोगळेकरसरांनी आपली भूमिका ठामपणे मांडली. त्यासाठी त्यांना अनेकांचा विरोध सहन करावा लागला. पण त्याची त्यांना तमा नव्हती. वाईटपणा विकत घेण्यासाठी जे एक प्रकारचे नैतिक धैर्य लागते ते त्यांच्याकडे होते. त्यामुळे वाईटपणा विकत घेणारा माणूस, पण संस्थेच्या भल्यासाठी, अशी त्यांची ख्याती होती.

त्यांचा जन्म कर्नाटकातील जमखंडी येथे झाला होता.

सीमावासीयांच्याविषयी त्यांच्या मनात अतिशय आदरभाव होता. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नात मराठीसाठी महत्त्वाची भूमिका घेणाऱ्या बाबूराव ठाकूरांपासून ते किरण ठाकूरांपर्यंत सर्वांच्याविषयी त्यांच्या मनात आपुलकी होती. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना सीमाप्रश्नासंबंधी साहित्य महामंडळात आणि सरकारपुढे आपल्या मर्यादशील परंतु कणखर भूमिकेचे त्यांनी सतत भान ठेवले. सीमाभागातल्या आणि चळवळीशी संबंधित एका ज्येष्ठ लेखकाला म. सा. प.च्या वार्षिक समारंभात सन्मानित करण्याची प्रथा त्यांनी सुरू केली. मराठी माणसांची मुस्कटदाबी करणाऱ्या कन्नडिगांना त्यांच्या धारदार लेखणीतून त्यांनी अनेकदा फटकारले. साहित्यसंमेलनाच्या संयोजनात त्यांचा हातखंडा होता. एखाद्या मॅनेजमेंट गुरूप्रमाणे ते लहान-सहान तपशिलांचा विचार करीत असत.

साहित्यसंस्थांमध्ये धडाडीच्या कार्यकर्त्याची भूमिका बजावणाऱ्या डॉ. जोगळेकरांना लेखनासाठी फारशी उसंत मिळाली नाही. त्यांनी मोजके लिहिले, पण पुढच्या अनेक पिढ्यांना उपयोगी पडेल असे लिहिले. *अभिनव भाषाविज्ञान, मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास भाग १ व २* (संपादन, लेखन), *मराठी टीकाकार, मराठी भाषेचा इतिहास, साहित्य समीक्षा-स्वरूप आणि विकास* या त्यांच्या ग्रंथांमुळे अभ्यासक आणि संशोधक कायम त्यांच्या ऋणात राहतील. संस्थात्मक कार्यात सहभागी न होता साहित्यसंस्थांवर टीका करणाऱ्या लोकांना ते सुनावत असत. ''प्रवाहात सामील व्हा. संस्था चालविण्यातल्या अडचणी समजून घ्या आणि मग बोला'', अशा शब्दांत ते आपली भूमिका भल्याभल्यांना तोंडावर ऐकवीत असत. या साऱ्यामागे एक कळकळ होती. ते त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचे बोल होते. ते हट्टी होते, पण तो त्यांचा हट्ट रचनात्मक आणि चांगल्या कामासाठी होता.

✦

सर तीस वर्षे परिषदेसाठी काम करीत होते. पूर्वी दुचाकीवर येत असत, गेल्या काही वर्षांत रिक्षाने येत होते. सकाळी आणि संध्याकाळी अशा दोनही वेळेला स्वखर्चाने रिक्षाने येत असत. गेल्या तीस वर्षांतल्या या फक्त प्रवासखर्चाचा जरी हिशोब मांडला तरी तो काही लाखांमध्ये जाईल. आर्थिक पदरमोड करून संस्थेसाठी झिजणारा असा व्रतस्थ कार्यकर्ता शोधूनही सापडणार नाही.

✦

एरवी धीर-गंभीर मुद्रेने समाजात वावरणाऱ्या डॉ. जोगळेकरांच्या अंतरंगात एक खोडकर, मिष्किल माणूस दडलेला असायचा. प्रवासाला कुठे बाहेर निघाले, की मग त्यांचे एक वेगळेच दर्शन घडायचे. बार्शीच्या म. सा. प.च्या शाखेच्या उद्घाटनासाठी मी, प्रा. द. मा. मिरासदार, डॉ. वि. भा. देशपांडे आणि जोगळेकरसर पुण्याहून बार्शीला निघालो. या प्रवासात सरांच्या मोकळेपणाचा मी अनुभव घेतला. द. मा., वि. भा. आणि गं. ना. यांच्या पोतडीतून एकेक किस्से बाहेर पडत होते. शब्दबद्ध न झालेल्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन त्यांच्या बोलण्यातून घडत होते. जोगळेकरसरांनी तर आघाडीच घेतली होती. चित्रपटाचा विषय निघाला, तशी त्यांची कळी आणखीनच खुलली. जुन्या नट-नट्यांचा इतिहास ते अधिकारवाणीने तपशीलवार सांगत होते. चित्रपटाच्या कथानकाच्या मागची कथा त्यांना तोंडपाठ होती. या प्रवासात असंख्य हिंदी गाणी त्यांच्याकडून ऐकायला मिळाली. हिंदी चित्रपटावरून विषय जेव्हा मराठी चित्रपटांवर आला, तेव्हाही जोगळेकरसर तितकेच समरसून बोलत होते. गीतांचा, गीतकारांचा, संगीतकलेचा इतिहास त्यांना माहीत होता. गीतांवरून विषय कवितांवर आला होता, तेव्हा त्यांच्या पाठांतराला सलाम करावा अशीच परिस्थिती होती. प्रवासातल्या या गप्पांचं ध्वनिमुद्रण व्हायला हवं असं मला सारखं वाटत होते. या प्रवासात जोगळेकरसर मिरासदारांच्या तोडीस तोड विनोद सांगत होते. या सर्वांमध्ये वयाने, अनुभवाने आणि कर्तृत्वाने मी सर्वांत लहान; पण जोगळेकरसरांनी मला एक छोटा मित्र म्हणून त्या मैफलीत सामावून घेतले होते. अशा वेळी या करारी माणसाच्या अंत:करणातले खळाळते निर्मळ पाणी दिसत असे आणि त्यांच्याविषयीचा आदर वाढत असे.

सर माणूसघाणे नव्हते, पण चुकीची कामं करणारी माणसं त्यांच्या आसपास बसली, की त्यांच्याशी ते फारशा आपुलकीने वागत नसत. 'मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास' या तुकोबारायांच्या उक्तीला कृतीत उतरविणारे सर 'नाठाळाचे माथां देऊं काठी' या उक्तीचेही स्मरण ठेवत असत आणि अशा लोकांना त्यांच्या जागा दाखवून देत असत. एक निवृत्त प्राध्यापक एकदा परिषदेत आले. 'संस्थेला देणगी द्यायची आहे. पद्धत काय असते? रक्कम कशी गुंतवावी लागते?' याची त्यांनी चौकशी केली. अमुक एका दिवशी येऊन 'चेक देतो' असेही सांगितले. निघताना स्वत:च्या पिशवीतून हळूच एक पुस्तक काढत ते डॉ. जोगळेकरांना म्हणाले, ''मी पंधरावीस पुस्तके लिहिली आहेत. मला शासनाचा पुरस्कारही मिळाला आहे. पण आपल्या संस्थेने मात्र माझी दखल घेतली नाही. यावर्षी जर आपण माझ्या पुस्तकाचा पुरस्कारासाठी विचार केलात तर बरे होईल.'' हे ऐकल्यानंतर काहीसा आवाज चढवत जोगळेकरसर त्यांना म्हणाले, ''हे पहा, आमच्याकडे देणगी घेऊन पुरस्कार देण्याची प्रथा नाही. पुरस्कारासाठी ग्रंथांची निवड नेमलेले परीक्षक करतात. तुमचं पुस्तक पुरस्काराच्या योग्यतेचं असेल तरच पुरस्कार मिळेल. देणगी देऊन पुरस्कार मिळवू, अशा भावनेने तुम्ही आला असाल, तर तुमची देणगी आम्हांला नको आहे. या आता.'' त्या गृहस्थांचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता.

साहित्यसंस्था समाजाच्या आर्थिक मदतीवर चालतात हे खरे असले तरी पैशासाठी संस्थांनी स्वत:ची तत्त्वे गहाण टाकावीत, तडजोड करावी या गोष्टीला ते कडाडून विरोध करीत असत. अशा संस्थांमध्ये नाना प्रवृत्तींची माणसं अनेक हेतू मनात बाळगून येत

असत. डॉ. जोगळेकरांना माणसं पारखण्याची एक दृष्टी होती. स्वार्थी हेतूने आलेली माणसं ते क्षणार्धात ओळखत. एका घावात दोन तुकडे करून अशा लोकांचे मनसुबे उधळून लावत. जोगळेकरांनी हा फटकळपणा जाणूनबुजून स्वीकारला होता, तो संस्थेचे चारित्र्य निष्कलंक ठेवण्यासाठी. आपण केवळ पूर्वसुरींच्या परंपरा सांगतो, त्यांच्या कामाचा अभिमानाने उल्लेख करतो, पण हा समृद्ध वारसा पुढे चालविण्याची जबाबदारीही आपल्यावरच आहे आणि म्हणून आपली निष्ठा अव्यभिचारीच असली पाहिजे, असं ते सारखं बजावत असत.

मी त्यांच्या विरोधी पॅनैलमधून निवडून आलो होतो. पण हा विरोधातला, अशी त्यांची भूमिका कधीच राहिली नाही. त्यांच्याकडे व्यक्तीच्या गुणवत्तेला प्राधान्य होते. वयाने लहान असणाऱ्या माझ्यासारख्या सहकाऱ्याला त्यांनी जे प्रेम, मार्गदर्शन दिले ते मला आयुष्यभर पुरणारे आहे. आवडत्या माणसांवर ते जिवापाड प्रेम करीत असत. आमच्या म. सा. प.च्या ग्रंथालय विभागाचे कार्यवाह अनंत जोशी हे एक अतिशय उत्साही व्यक्तिमत्त्व. त्यांनी कार्यवाह म्हणून निवडून आल्यानंतर अल्पावधीतच स्वतंत्र कामाची चुणूक दाखविली. ग्रंथालयाचा कायापालट केला. भावी योजनांसाठी देणग्या मिळविल्या. डॉ. जोगळेकर त्यांच्या कामाचे मनापासून कौतुक करीत असत. एके दिवशी अनंत जोशी बाथरूममध्ये पाय घसरून पडले. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. डॉ. जोगळेकर त्यांना भेटण्यासाठी दवाखान्यात गेले. विचारपूस झाली. निघायच्या वेळेला डॉ. जोगळेकरांनी पिशवीतून आणलेले पन्नास हजार रुपये अनंत जोशी यांच्या हातावर ठेवले आणि म्हणाले, ''दवाखान्यात खूप खर्च येतो, असू द्या हे तुमच्याजवळ. नंतर मला परत करा. आणि केले नाही तरी चालतील.'' अनंत जोशी यांचे डोळे भरून आले. अनंत जोशी यांची पैशाची व्यवस्था झालेली होतीच. त्यांनी ते पैसे डॉ. जोगळेकरांना परत केले. समाजाच्या दृष्टीने शिष्ट, परखड, हेकट असा शिक्का बसलेल्या सरांचे या प्रसंगातून एक वेगळे रूप दिसले. संकटात सापडलेल्यांच्या मदतीसाठी त्यांच्यातला माणूस असा तत्परतेने धावून जात असे, आणि तोही कोणताही गाजावाजा न करता.

जे काम आपण स्वीकारले आहे, त्यासाठी पूर्णपणे वाहून घेणे हा सरांचा स्वभाव होता. म. सा. प.चा हाडाचा कार्यकर्ता म्हणून काम करताना त्यांनी केवळ तन आणि मन अर्पण केले असे नाही, तर धनही दिले. स्वतः हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या. तेवढ्याच मिळविल्या. हा 'थँकलेस जॉब' करताना परिषदेकडून कोणतीही अपेक्षा ठेवली नाही. सर तीस वर्षे परिषदेसाठी काम करीत होते. पूर्वी दुचाकीवर येत असत, गेल्या काही वर्षांत रिक्षाने येत होते. सकाळी आणि संध्याकाळी अशा दोनही वेळेला स्वखर्चाने रिक्षाने येत असत. गेल्या तीस वर्षांतल्या या फक्त प्रवासखर्चाचा जरी हिशोब मांडला तरी तो काही लाखांमध्ये जाईल. आर्थिक पदरमोड करून संस्थेसाठी झिजणारा असा व्रतस्थ कार्यकर्ता शोधूनही सापडणार नाही. जोगळेकरांवर टीकास्त्र उगारणाऱ्यांना साहित्यसंस्थेसाठीचे त्यांचे हे दातृत्व कधी समजलेच नाही.

आज जोगळेकरसर आपल्यात नाहीत, पण त्यांनी उभा केलेला कामाचा डोंगर आपल्यासमोर आहे. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी त्यांनी दिलेली पालखी निर्धाराने पुढे घेऊन जाणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

नमस्कार करावा अशी पावले आज दिसत नाहीत. संस्थात्मक पातळीवर तर अभावानेच निःस्पृह माणसे भेटतात. वैयक्तिक स्वार्थासाठी कातडीबचाऊ धोरण अवलंबिणाऱ्या माणसांचा गजबजाट सभोवती दिसतो. अशा परिस्थितीत संस्थेचे चारित्र्य सांभाळण्यासाठी वाईटपणा विकत घेणाऱ्या जोगळेकरसरांचे स्मरण करणे निश्चितच बळ देणारे ठरेल.

*(जानेवारी २००८)*

---

## कादंबरीलेखकांना सूचना!

उत्तम कादंबरी लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना विख्यात कादंबरीकार मारिओ पुझो ('गॉडफादर'चा लेखक) याने काही सूचना केल्या आहेत. त्या अशा –

१) कादंबरीचे निवेदन कधीही प्रथमपुरुषी करू नका.

२) आपले लेखन दुसऱ्या कोणालाही दाखवू नका. त्यामुळे तुमच्या मनात काही पूर्वग्रह, भये निर्माण होतात.

३) पुन्हा पुन्हा, न थकता लिहीत राहणे, लिहिलेल्या मजकुरावर संस्कार करत राहणे हे उत्तम लेखनाचे आद्य रहस्य आहे.

४) लोकांना जो तुमचा लहरीपणा वाटतो ती खरे तर तुमची चिंतनशील एकाग्रता असते. ही तन्मयताच लेखकाच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे.

५) टीका, समीक्षा वगैरे सुरुवातीला वाचणे ठीक आहे. पण नंतर टीकेपेक्षा इतर लेखकांच्या कादंबऱ्या वाचत राहा. त्यातून कादंबरीलेखनाचे कसब तुम्हाला आत्मसात करता येईल.

*(शान्ता ज. शेळके यांच्याकडून प्राप्त)*

*(मे २००६)*

# दादा

**दत्तप्रसाद दाभोळकर**

दिवसभर दीनानाथ त्यांच्या जवळ असे. त्याने दादांना विचारले, ''दादा, परमेश्वर आहे की नाही याबाबत आज तुम्हांला काय वाटतं?'' दादांचा चेहरा एकदम फुलला. म्हणाले, ''तू प्रथम तुझं मत सांग. तुझं जे मत असेल त्याच्या विरुद्ध माझं मत. मग त्यावर आपण एक छान चर्चासत्र करू या. घरात जे आहेत त्यांना बोलाव!''

आपले ज्येष्ठ बंधू आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांच्याबद्दल आणि त्या निमित्ताने आपल्या इतर भावंडांबद्दलही लिहीत आहेत डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर.

माझी आई ९४ वर्षांची होऊन गेली. शेवटची वर्षं-दोन वर्षे वॉटर-बेडवर होती. त्यावेळी देवदत्त मुलाला म्हणाले, ''मलासुद्धा असं जगावयास आवडेल ड्ढ शेवटी जगण्यामध्ये ब्रह्मानंद!'' पण त्यांच्या बोलण्यात नेहमी ग्यानबाची मेख असे वा नाथांच्या घरची उलटी खूण! त्याचवेळी म्हणाले, ''मात्र याला एक पूर्वअट आहे. माणूस गेल्यावर 'सुटलो एकदाचा' असं त्या माणसाला आणि 'सुटलो एकदाचे' असं मनातल्या मनात इतरांना वाटण्यापूर्वी त्याने जावयास हवं आणि एकमेकांत गुंतलेल्या त्याला आणि इतरांना एकमेकांची मनं न बोलता समजली पाहिजेत.''

आम्ही एकूण दहा भावंडे — सात भाऊ, तीन बहिणी. आमची आई म्हणायची, ''मला दहा मुलं आहेत. एकासारखं दुसरं नाही आणि माणसासारखं एकही नाही!'' अर्थात याला कारण आई-वडीलच असणार. कारण माझे वडील दत्तभक्त होते. अगदी दरवर्षी गाणगापूरला जाऊन पारायण करायचे. आई कोल्हापूरची, मराठी चौथीपर्यंतच शिकलेली. पण चौथीच्या परीक्षेत ती संपूर्ण कोल्हापूर राज्यात पहिली आली होती. तिच्यावरचे संस्कार कोल्हापूरचे. छत्रपती शाहू महाराजांचे. ती त्या काळात घरी मंगळसूत्र घालायची नाही, कुंकू वगैरे लावायची नाही. मंगळागौर, हळदीकुंकू, सत्यनारायणाची पूजा वगैरे म्हणजे काय हे आम्हांला घरी कधी बघावयास मिळाले नाही. मात्र घरी वडिलांच्या पारायणाचे ती सर्व अगदी व्यवस्थित करायची — कुंकू न लावता, मंगळसूत्र न घालता.

आज कळायला लागल्यावर या सर्वांचे आश्चर्यच वाटते. कारण आईवडिलांचे अगदी मेतकूट होते — किंवा गुळपीठ. त्यांच्यात काही वैचारिक मतभेद असतील पण वैचारिक मतभेदामुळे ताणतणाव येणार, असे कुठे काहीच नाही. एक शक्यता जाणवते. अध्यात्म, देव, विज्ञान, पुरोगामी वृत्ती या गोष्टी जर मनात नीट कळलेल्या असतील तर माणूस सर्वप्रथम समोरच्या — केवळ वेगळ्या नव्हे, तर विरोधी मत असलेल्या — माणसाचाही आदर करावयास शिकणार — आणि आपल्याला घर चालवायचेय, मुलांना वाढवायचेय, आयुष्यातील हे एकमेव किंवा प्रमुख ध्येय आहे, हे मनाशी पक्के केल्यावर असल्या फिजूल गोष्टींची माणूस पर्वा करीत नसणार. आपले आचार्य अत्रे संयुक्त महाराष्ट्राच्यावेळी जे म्हणाले होते, 'चवलीच्या भांडणासाठी बंदा रुपया गमावू नका' हे मराठी माणसाला समजले पाहिजे — ते माझ्या आईवडिलांना समजलेले असणार.

पण या अशा 'संस्कारां'मुळे आमच्या घरात गंमत आहे. नरेंद्र माझ्याहून धाकटा भाऊ. तो काय करतो (किंवा काय करत नाही!) हे सर्वांना माहीत आहे. डॉ. नरसिंह हा माझ्याहून लगेचचा मोठा भाऊ. तोपण एम्.डी. वगैरे आहे. मुंबईच्या सायन मेडिकल कॉलेजचा डीन वगैरे होता. पण नरेंद्र करतो त्याच्या संपूर्ण उलट तो करीत असतो. सर्व व्रतवैकल्ये निष्ठेने. महाशिवरात्रीला या वयातही तो पूर्ण दिवस पाणीसुद्धा घेत नाही. देवदर्शनाच्यावेळी चैन करावयाची नसते, म्हणून दर महाशिवरात्रीला मुंबईहून एस.टी.ने सातारला येऊन, यवतेश्वरला जाऊन, शंभोचे दर्शन घेऊन, दुसरे दिवशी सकाळी पुन्हा तोंडात पाण्याचा थेंबही न घेता एस.टी.ने मुंबईला. तेथे घरी गेल्यावर मग पाणीग्रहण! दत्तजयंतीला पुन्हा हेच. सातारला येऊन माळावर वडील ज्या दत्ताच्या दर्शनाला जायचे त्या दत्ताचे दर्शन घेऊन परत. त्यातून सातारचा त्याचा मुक्काम नरेंद्राच्या घरी! तो जगभर हिंडतो आणि आमचे वेद सारे मानवी शरीर आणि मन आधीच कसे अधोरेखित करून गेलेत हे इंग्रजीत समजावून देतो!

मी या दोघांच्या मध्ये 'सॅन्डविच' होऊनही वाचलेला. पण आमच्या घरात हे असे वाचणेही खरे नव्हे. आमच्या थोरल्या बहिणीने मृत्यूपूर्वी तिच्या सर्व संपत्तीचा एक ट्रस्ट केलाय. बाकी उरलेले भाऊ-बहीण ट्रस्टी. त्या आमच्या काऊचिऊच्या छोट्या ट्रस्टची वार्षिक सभा सुरू होती. देवदत्तांनी एक ठराव मांडला — ''नरेंद्रला सा. रे. पाटील यांनी मोटार दिली आहे. पण तो साधनेकडून मानधन घेत नाही. दर महिन्याला त्या गाडीचा चालक व इंधन यासाठी ट्रस्टने चार हजार रुपये द्यावेत.'' ठराव नरसिंहने व्हेटो वापरून फेटाळला. तो म्हणाला, ''अं.नि.स.सारख्या समाजविघातक कृत्याला हा ट्रस्ट मदत करणार असेल तर मला विश्वस्तपदाचा राजीनामा द्यावा लागेल!''

देवदत्तांची आठवण येताना हे सारे आठवण्याचे कारण

म्हणजे हा सारा 'शिकारखाना' गुण्यागोविंदाने, हसतमुखानी चालविताना त्यांना काय करावे लागले असेल ते समजावे म्हणून. आमचे वडील ५५ साली गेले. आधीसुद्धा देवदत्तांना घरात सर्वाधिक मान होता, पण आता आम्हां सर्वांना ते वडिलांच्या ठिकाणी झाले. आम्ही काही भाऊ-बहिणी तर शाळा-कॉलेजात. त्यांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी यांच्यावर आली. लग्नाची जबाबदारी नव्हती. कारण अगदी लहानपणापासून आई-वडिलांनी आम्हां सर्वांना छान समजावून दिले होते – ''तुम्हांला हवं ते सर्व शिक्षण देण्याची जबाबदारी आमची; पण तुमच्या लग्नाशी आमचा संबंध काय? वाटलं तर करा? नको वाटलं तर नका करू! ज्याच्याशी करावंसं वाटतं त्याच्याशी करा! फक्त नोंदणीपद्धतीने करा!'' आता लग्नानंतर उभयतांनी देवाला नमस्कार करावा की करू नये याबद्दल या दोघांच्यात दुमत असणार; पण ते आम्हांला न कळण्याची काळजीपण त्यांनी घेतली असणार!

मॅट्रिकला संबंध मुंबई इलाख्यात – त्यात कराची, कारवार, अहमदाबाद हेदेखील होते – सर्वप्रथम आलेल्या देवदत्तांनी, जाणीवपूर्वक व्रत म्हणून अध्यापनाचे क्षेत्र निवडले होते. पण आमच्या आई-वडिलांप्रमाणेच, त्यांनीही अभ्यास करा असे आम्हांला कधी सांगितले नाही. हवा तर करा, नाहीतर खेळा. मला एस.एस.सी.ला ४७ टक्के मार्क मिळाले. नरेंद्रला ४८ टक्के! त्यामुळे तो माझ्यापेक्षा हुशार आहे आणि आम्ही दोघे मिळून दादांच्याहून टक्केवारीत पुढे आहोत असे तो सांगतो. 'अं.नि.स.'च्या चळवळीमुळे विषय कसा मांडावा हे त्याला चांगले समजते!

सांगायचा मुद्दा वेगळा. या अशा बहीण-भावंडांचे खटले आनंदाने, गुण्यागोविंदाने, हसतमुखाने, आपल्या तुटपुंज्या वेतनात चालवणे फार कठीण असणार.

आमच्या सुमनवहिनी एम.ए.ला इंग्रजी व समाजशास्त्र असे दोन विषय घेऊन मुंबई विद्यापीठात प्रथम श्रेणीत पहिल्या आल्या होत्या. त्यातून बर्ट्रंड रसेल वगैरे मंडळींच्यावर त्यांनी मराठीत पुस्तके लिहिलेली. वडील निवृत्त न्यायाधीश. बहिणीचे यजमान आय.सी.आय.सी.आय. बँकेचे चेअरमन. त्यांचे नाव सुरेश नाडकर्णी. वहिनींनी लहानपणी कधी स्वयंपाकघर पाहिलेले नाही. पण एका घरात एकाच व्यक्तीने नोकरी करावी या दादांच्या मताला मान देत त्यांनी खूप काळ नोकरी केली नाही. मी आणि नरेंद्र खायला वाघ. पैजेने चपात्या खाणाऱ्या आमच्यासाठी दोन्ही वेळेला प्रत्येकी दहा चपात्या लाटणाऱ्या वहिनींचा चेहरा समोर आला की, माझ्या आणि नरेंद्रच्या दोघांच्याही पोटातील भूक आज मरते.

देवदत्तांची सर्व भावंडांशी फार छान मैत्री होती; पण खरी गट्टी किंवा अगदी गुळखोबरे होते ते फक्त 'श्री.अ.' यांच्याशी! श्री.अ. म्हणजे प्रयोग परिवाराचे व्हेन्चरानंद. त्याचे नाव श्रीपाद. पण घरीदारी त्याला मुकुंद म्हणत. श्रीपाद या नावाने शाळेतील मुले चिडविण्याचा धोका आहे हे ज्ञान त्याला शाळेत जाण्यापूर्वीच आले. तो वयाच्या ७८व्या वर्षी आसाममधून शेतकऱ्यांच्या बरोबर हिंडताना विषारी डास चावून तडकाफडकी गेला. म्हणजे तो गेला तेव्हा दादा ८२ वर्षांचे असणार. पण त्या वयातही मुकुंद आणि दादा शाळेतून परत आलेले दोन भाऊ वर्गात आज आपण कोणते अवघड गणित सोडवले, कुणाची कशी चेष्टामस्करी केली,



**पुण्यातल्या एका प्रख्यात सार्वजनिक गणपतीसमोरची सत्यनारायणाची पूजा फर्ग्युसनचे प्राचार्य व त्यांची धर्मपत्नी यांनी घालावी अशी प्रथा असल्याचे देवदत्त दाभोळकरांना सांगण्यात आले. त्यांनी प्रथेचा आदर केला – मात्र पूजा हरिजन विद्यार्थ्याने मांडावी असा आग्रह दादांनी धरला व तो मंदिराने मान्य केला.**

कोणता नवा मित्र मिळविला हे जेवढ्या उत्साहाने सांगतात तशा उत्साहाने एकमेकांशी बोलत असत. आणि हे बोलणेसुद्धा तासन्‌तास. आणि भेट झाली नाही तर फोनवर हेच एवढ्या वेळेचे दळण! ते दोघे बोलावयास बसले की, मी आणि नरेंद्र अवाक् होऊन हसत असू. आणि केवळ आम्ही दोघे नव्हे, तर मुकुंदाची तीन मुलेदेखील हेच करत.

मुकुंदाला 'जमनालाल बजाज पारितोषिक' मिळाले, त्यावेळी दादाना झालेला आनंद अवर्णनीय होता. पण हेही काही खरे नव्हे. मुकुंदने कुठलाही नवा विचार किंवा प्रयोग सांगितला की, या आपल्या भावाला अजून 'नोबेल पारितोषिक' कसे मिळाले नाही असा आनंद व आश्चर्यमिश्रित भाव दादांच्या चेहऱ्यावर असे. आणि दादांनी आपल्याला एवढे मानलेय म्हणजे 'नोबेल पारितोषिक' किंवा जगातील कुठलेही पारितोषिक यापुढे फालतू आहे, ही ऐट मुकुंदाच्या चेहऱ्यावर!

नरेंद्र व नरसिंह यांचा जसा 'शंकराचार्य-मंडनमीश्र' वाद असे, तसा वाद दादांशी फक्त माझा दुसरा भाऊ चारुदत्त घालत असे – किंवा त्याला कुणालाही शिंगावर घ्यायलाच आवडायचे. आमच्या घरातील दादांच्या समोरचा वैचारिक हाहाकार कोणत्या टोकाला पोचत असे हे नीटपणे सांगायचे असेल तर चारुदत्त आणि मुकुंद यांचे उदाहरण देता येईल. चारुदत्तने वयाच्या चोविसाव्या वर्षी, १९५४ साली ब्रिटनमध्ये शिक्षण घेत असताना 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना' असे एक पुस्तक लिहिले होते. त्यावेळी ते प्राज्ञ पाठशाळेने प्रसिद्ध केले होते. महाराष्ट्रातील शेतीत 'उतरत्या नफ्याचा नियम' (Law of diminishing return) कार्यरत आहे, शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित न्याय्य भाव दिला तर महाराष्ट्रातील दुष्काळ लगेच संपेल हे त्याने शरद जोशींचे शेतकरी आंदोलन सुरू होण्याच्या २५ वर्षे आधी सांगितले होते! शेतकरी आंदोलन



**ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल वि. स. खांडेकर यांचा सत्कार करताना. खांडेकरांच्या डावीकडे वसंतदादा पाटील व उजवीकडे देवदत्त दाभोळकर**

सुरू केल्यावर खूप नंतर हे पुस्तक शरद जोशींनी वाचले. त्यांनी मला पत्र पाठवून ''तुमच्या भावाने हा विचार शास्त्रीय पद्धतीने माझ्या आधी मांडलाय'' असे कळवले!

चारुदत्तचा आत्मविश्वास दांडगा. दादा कसे कसे चुकतात हे तो सांगत बसायचा. तो दादांच्या आधी वर्षभर गेला. पण त्याच्या वाटेला जायची माझी व नरेंद्रची कधी हिंमत झाली नाही. नरेंद्र-नरसिंहप्रमाणेच मुकुंद व चारुदत्त यांच्यातही सतत खटके उडत असत. मुकुंद मोठा शेतीतज्ज्ञ. प्रयोग-परिवारचा जनक. तासगावच्या द्राक्षक्रांतीचा प्रणेता. सगळे त्याला मानत. पण चारुदत्त त्यांच्याशी सतत वाद घालत असे. तोही शेतीतज्ज्ञ होता, पुढे आरे मिल्क कॉलनीचा प्रमुख बनला. शेती तोट्यातच का चालते हे त्याला उमजले होते. मुकुंदचे सगळे विचार कसे चुकीचे आहेत, शेतकऱ्यांना मागे नेणारे आहेत, हे तो दादांना पटवून द्यायचा!

खरे तर मुकुंद व चारुदत्त यांची शेतीबाबतची मते एकमेकांना पटावयास हवी होती. पण नाही! नरेंद्र व नरसिंह परवडले! दुसऱ्याच्या मांडणीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे अपरंपार नुकसान कसे होईल हे ते दोघेही दादांना साक्षी ठेऊन सांगायचे! पण चारुदत्तचा मुकुंदला विरोध का हे मला ठाऊक होते! चारुदत्तचा खरा दादांना विरोध आणि दादांना मुकुंदचे भारी कौतुक, म्हणून चारुदत्तचा मुकुंदलाही विरोध!

दादा विचारस्वातंत्र्य आणि समन्वय या दोन गोष्टींचा आजन्म आदर करीत होते. दादा पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते. पण आणीबाणीला 'अनुशासन पर्व' म्हणणाऱ्या विनोबाजींच्या आचार्य कुलाचेही आमंत्रित ज्येष्ठ सदस्य. पण आणीबाणीला विरोध म्हणून सुमनवहिनींनी आणि मेडिकल कॉलेजला शेवटच्या वर्षाला असलेल्या त्यांच्या मुलाने (म्हणजे प्रसन्नने. आता तो सायकिॲट्रिस्ट आहे. हा मे. पु. रेगे यांचा जावई) सत्याग्रह करून तुरुंगवास पत्करला तेव्हा त्या दोघांना त्यांनी अजिबात विरोध केला नाही.

हे तसे समजण्यासारखे होते. हा आणीबाणीविरुद्धचा सत्याग्रह त्यांच्या विचारात बसणारा होता. पण १९४८ साली दादा विलिंग्डन कॉलेजात प्राध्यापक होते त्यावेळी माझा भाऊ दीनानाथ हा त्यांच्याकडे राहून, कॉलेजात जात होता. तो संघाचा 'सेकंड इयर ट्रेंड' वगैरे. परीक्षा जवळ आली असताना वर्ष बुडवून संघबंदीला विरोध म्हणून तो सत्याग्रहात उतरला. त्याने काही चूक केले असे तेव्हाही दादांना वाटले नाही.

समन्वय शोधण्याची त्यांची अखंड धडपड मला आठवते. मी दिल्लीचा मुक्काम संपवून सातारला आलो होतो. क्षेत्र माहुली येथे प्रतिष्ठेचा 'न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे' पुरस्कार न्यायमूर्ती धर्माधिकारी यांना प्रदान होणार होता. पृथ्वीराज चव्हाण प्रमुख पाहुणे होते आणि अध्यक्ष होते दादा. न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी आपल्या भाषणात कळत न कळत पृथ्वीराज चव्हाण यांच्या भाषणावर काही टीका केली. जमलेले खेडूत अस्वस्थ झाले. दादा अध्यक्ष म्हणून बोलायला उठले. हसतखेळत, संतवाङ्मयातले व विनोबाजींचे आधार देत, पृथ्वीराज चव्हाण व न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी नेमकी एकच गोष्ट वेगवेगळ्या प्रकारे आपल्याला कशी समजावून दिली आहे हे सांगितले – श्रोत्यांत बसलेले मी व नरेंद्र एकमेकांना म्हणालो, ''आज दादांना मानले. आपल्या आयुष्यात हे जमायला हवे.''

शेवटचे एक वर्ष दादा 'वॉटरबेड'वर होते. बहुतेकवेळ गुंगीत असत. मात्र जो थोडा वेळ जागृतीचा असे त्यावेळी मेंदू सतेज व तल्लख असे. तरल विनोदबुद्धी कायम होती. वर्षापूर्वी सांगली येथील वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजचे निवृत्त प्राचार्य व प्राध्यापक त्यांना भेटावयास आले. म्हणाले, ''तुम्ही सांगलीच्या चिंतामणराव कॉलेजचे प्राचार्य होता, त्यावेळी आम्ही इंजिनिअरिंग कॉलेजात विद्यार्थी होतो. पण तरीही तुम्हांला ओळखतो. अधून मधून तुमच्या कॉलेजात यायचो.'' देवदत्त शांतपणे म्हणाले, ''तुम्ही माझ्या कॉलेजात येणारच! तुमच्या कॉलेजात मुली नव्हत्या, माझ्या कॉलेजात होत्या!''

एक किस्सा तर भन्नाट आहे. सहा महिन्यांपूर्वी आमच्या दाभोळकर परिवाराचे दोन दिवसांचे गेटटुगेदर होते. पारिवारिक गेटटुगेदर म्हणजे दाभोळकरी पद्धतीने व त्यात दाभोळकरी पद्धतीचे फिशपाँड्स. दादांनी मला जवळ बोलावले. म्हणाले, ''बंड्या, मला आता लिहिता येत नाही. तूच आता माझा एक फिशपाँड लिहून घे. फिशपाँड असा – दाभोळकरांच्या घरातील द्रौपदी कोण?'' खरे सांगतो, फिशपाँड ऐकून मी हादरलो. माझा गोंधळलेला चेहरा पाहून दादा म्हणाले, ''तू का चिंता करतो आहेस. त्या फिशपाँडच्या खाली मी सही करणार!'' – मी अजून हादरलेलाच होतो. मी म्हटले, ''दादा, तुमची सही वगैरे ठीक आहे. पण कोण ही? जरा अंदाज द्या. आपण उत्तरावर जरा चर्चा करू.'' दादा म्हणाले, ''तू या घरातला. उत्तर तुला माहीत पाहिजे.'' मी जरा सावध झालो. म्हटले, ''दादा, आपलं खटलं मोठं. तुमच्यात आणि नरेंद्रच्यात २६ वर्षांचं अंतर आहे. तुम्ही पहिले, तो दहावा, मी आठवा. त्यामुळे मी बाहेर नेहमी सांगतो, देवदत्त माझे लांबचे सख्खे भाऊ आणि नरेंद्र माझा जवळचा सख्खा भाऊ! आता या

घरात तुमच्या डोळ्यासमोर कोणतं महाभारत घडलं आहे, ते मला काय माहीत?'' दादा शांत आवाजात म्हणाले, ''या द्रौपदीशी सर्वाधिक संबंध तुझाच आहे.'' – मला आता घाम फुटायला लागला होता. तेवढ्यात दादा मिस्कीलपणे म्हणाले, ''अरे! द्रौपदी म्हणजे तुझी मोटारगाडी! आम्ही सर्व भाऊ ती वापरत असतो!''– आता आमच्या 'गेटटुगेदर'मध्ये हा फिशपाँड विचारल्यावर एक तास काय सन्नाटा पसरला असेल आणि काय धमाल उडाली असेल, जरा मनासमोर आणून बघा.

दादांच्या समोर असलेला हा 'शिकारखाना' केवढा वेगळा होता हे समजावे म्हणून अनेक 'भारी' संवादांतील एक संवाद सांगतो. नरेंद्र आणि नरसिंह दोन ध्रुवावर दोघे आपण म्हणत एकमेकांजवळ उभे असतात. गुण्यागोविंदाने असतात. आता नरेंद्र आणि नरसिंह यांची विज्ञान, धर्म, समाज, श्रद्धा, अंधश्रद्धा यांबाबत अगदी विरुद्ध टोकाची मते आहेत – त्या दोघांना एकत्र जोडणारी एकमेव गोष्ट म्हणजे दारू! मी त्यांना दोघांनाही सांगतो की तुम्हां दोघांना 'दारू न पिण्याचं व्यसन' आहे! दारू पिण्याचे व्यसन वाईट व न पिण्याचेपण वाईट! आनंद म्हणून कधीमधी एकदोन घोट घेणे चांगले. कुठल्याच व्यसनात माणसाने सापडू नये! पण हे सांगूनही काही उपयोग नाही. कारण नरसिंहला चहा, कॉफी असले घातक पदार्थ न पिण्याचेपण व्यसन आहे! त्याने अजून आयुष्यात चहा आणि कॉफी याची चव घेतलेली नाही. नरेंद्र आणि नरसिंह एका मुद्द्यावर एकत्र येतात. दारू वाईट, दारूमुळे माणूस रसातळाला जातोय.

येथवर ठीक आहे. पण मानव समाजाला दारूपासून मुक्त करण्याचे यांचे मार्ग परस्परविरोधी. नरेंद्र 'परिवर्तन व्यसनमुक्ती केंद्र' चालवतो. नरसिंह त्याला एकदा समजावून सांगत होता – ''समाज व्यसनमुक्त करण्याचा प्रमुख उपाय म्हणजे, मुलांना घरी आणि शाळेत धर्मग्रंथ शिकवले पाहिजेत. तुझ्या 'अंनिस'मुळे समाज धर्मग्रंथांच्यापासून दूर जातो आणि मग त्यातील काही जण व्यसनाधीन होण्याचा धोका संभवतो. म्हणजेच, तुझ्या 'परिवर्तन व्यसनमुक्ती केंद्राला' गिऱ्हाईकं मिळवून घेण्याचं काम तू अंनिसमधून करतोस!''

माझी बहीण वेणू पळशीकर. इकॉनॉमिक्समधील गोखले इन्स्टिट्यूटची डॉक्टरेट. वसंतराव पळशीकरांची अर्धांगिनी. अर्थातच कायम खादी वापरणारी! आता आजन्म खादी वापरणाऱ्या दादांशी तिचे जरा अधिक जमावयास हवे होते की नाही? पण नाही! संघाच्या सत्याग्रहात गेलेला दीनानाथ चुकला म्हणून तिने उपास केलेला! आणि अशा वेळीही दिनूबरोबर राहिलेले दादा 'दांभिक गांधीवादी' आहेत असे ती आम्हांला पटवून द्यायची!

हे असले वाद ऐकून माझी धाकटी बहीण डॉ. अमरजा नेरूरकर, जी अर्थशास्त्राची प्राध्यापक आहे, एकदा दादांना म्हणाली, ''तुम्ही तुमच्या बंगल्याचं नाव 'समन्वय' ठेवलंय. तुम्हांला 'समन्वय विद्यापीठाचे कुलगुरू' म्हणतात. मेधा पाटकर, माधवराव चितळे आणि गुजरातचे मुख्यमंत्री यांचं चर्चासत्र आयोजित करून तुम्ही तो तिढा सोडवण्याचापण प्रयत्न केलाच. मात्र समन्वयाशिवाय काही खरं नाही हे तुम्ही आम्हां भावंडांच्याकडून शिकलात! आमचं हे ऋण मान्य करा!''



पत्नीसमवेत देवदत्त दाभोळकर

दादांच्या आयुष्यातील हा शेवटचा महिना आहे हे त्यांनी व आम्ही सर्वांनीच ओळखले होते. दिवसभर दीनानाथ त्यांच्या जवळ असे. त्यांना वाचून दाखवत असे. त्याने दादांना विचारले, ''दादा, परमेश्वर आहे की नाही याबाबत आज तुम्हांला काय वाटतं?'' दादांचा चेहरा एकदम फुलला. म्हणाले, ''तू प्रथम तुझं मत सांग. तुझं जे मत असेल त्याच्या विरुद्ध माझं मत. मग त्यावर आपण एक छान चर्चासत्र करू या. घरात जे आहेत त्यांना बोलाव!''

टागोर हे देवदत्तांचे सर्वांत आवडते कवी. त्यांच्या देवदत्तांनी स्वत:च अनुवादिलेल्या या चार ओळी ते नेहमी गुणगुणायचे –

*खुले प्रकाशसागरी सहस्त्रपद्म शोभन*
*मधुप मुग्ध मी असे धन्य धन्य जीवन...*
*या क्षणीच व्हायचा असेल अंत होऊ दे*
*हेच गीत गात गात मज इथून जाऊ दे*

मरणाबद्दलचे हे सजग भान त्यांनी आयुष्यभर आणि अगदी शेवटच्या क्षणातसुद्धा सहजपणे जपले. मृत्यू हे या आयुष्यातील एकमेव सत्य आहे आणि मृत्यू ही या आयुष्यातील सर्वांत सुंदर गोष्ट आहे हे त्यांनी आम्हां सर्व भावंडांना उघडपणे न सांगता, आपल्या वृत्तीमधून समजावून दिले.

दादांनी आईप्रमाणेच शरीरदान केले होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे, त्यांच्या मृत्यूनंतर ८-१० दिवसांनी येणाऱ्या, सर्वांच्या सोयीच्या, पहिल्या रविवारी, आपापल्या नव्या कुटुंबांसह, त्यांच्या आठवणी एकमेकांना सांगण्यासाठी आम्ही सगळे जमलो होतो. त्यांच्या इच्छेप्रमाणे हसत-खेळत, आठवणींना उजाळा देत, चहाकॉफीचे कप संपवत वेळ कसा गेला कळलेच नाही.

त्या प्रसन्न संध्याकाळचा निरोप घेऊन परत जाताना, इरावती कर्वेंच्याप्रमाणे मी मनात म्हटले, ''केवढं मोठं माझं भाग्य, की हा असला थोरला भाऊ मला मिळाला. आणि त्याहूनही केवढं मोठं माझं महत्‌भाग्य, की मी थोरला भाऊ होऊन, असली भावंडं मला मिळाली नाहीत!''

– आणि माझी अगदी खात्री आहे, परत जाताजाता आम्हां सर्व भावंडांच्या मनात नेमकी हीच भावना असणार!

*(मार्च २०११)*

# कमलताई

## अनिल अवचट

रंग, रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग, काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई यांसारख्या गाजलेल्या कथा-कादंबऱ्यांच्या लेखिका कमल देसाई हे मराठी साहित्यातील एक आदराने घेतले जाणारे नाव. प्रतिभावान पण तितक्याच फटकळ आणि मनस्वी. अनिल अवचट यांना त्या कशा दिसल्या आणि भावल्या?

परवा मोबाइल वाजला आणि नाव बघतो, तर काय? कमळी? म्हणजे? कमळी जिवंत आहे की काय? जगाला असा गुंगारा दिला होय?

पण फोनवर होती कमलताईंची सून. नंदू. कमलताईंच्या मित्रमंडळींना येत्या रविवारी घरी एकत्र बोलावलंय, त्याचा फोन. पण मी तर लांब गडचिरोलीला. येणं शक्यच नव्हतं.

पण त्या फोनने हादरवलंच मला. कमळी जिवंत आहे की काय? 'परलोकात गेले, पण आवडतच नाही मला तिथलं. मग आले पळून', असं म्हणून हसत सुटली असती कमळी. कमळीचं हसणं, म्हणजे भीती वाटायची. झेपेल का तिच्या जेमतेम तब्येतीला? पण हसत कोचावर अगदी आडवे होणे, पडणे हीच तिची रीत. हसण्याचा आवाजही एरवीच्या हळू आवाजापेक्षा दहा पटींनी मोठ्ठा. तिचं सगळंच उत्स्फूर्त. आणि वय? ऐंशीच्या पुढं!

तिच्या आधीच्या रास्ता पेठेतल्या खोलीवर जायचो. खिडकीला पडदा लावला होता. त्यावर चौकोनाचौकोनाचं डिझाईन. प्रत्येकात एक गणपती छापलेला. मी म्हटलं, 'कमळे, इथं गणपतींची जनरल बॉडी मीटिंग आहे की काय?'

त्यावर असंच हसत सुटणं, थांबवता न येणं, आणि शेवटी आडवं होणं.

कधी त्याचं दुसरं टोकही.

उमाताईंनी पूर्णचंद्र तेजस्वींच्या 'चिदंबर रहस्य' या कन्नड कादंबरीचा मराठीत अनुवाद केलेला. त्याचं वाचन ऐकायला आम्ही जमलेलो. तसे त्यांचे अनेक अनुवाद आम्ही त्यांच्या तोंडून ऐकलेले. तर शेवटी अनेक अनिष्ट गोष्टींनी जंगल पेटतं, सगळे होरपळून मरतात, फक्त एक तरुण-तरुणी प्रेमिक वाचतात, असं आहे. कमळी आत उठून गेली आणि ओक्साबोक्शी रडत बसली. शांत झाल्यावर म्हणाली, 'त्यातला शहाणा माणूस पाटील..... त्याला तेजस्वींनी का मारावं? शहाण्याचा नेहमीच पराभव जिथे तिथे का दाखवतात? ज्ञानाचा नेहमीच अपमान होतो. तो का सहन करायचा आम्ही?'

आता त्यांच्या शोकाकुलतेची जागा संतापाने घेतली होती.

माझ्या पहिल्या भेटीचा अनुभव असाच. त्यावेळी त्या प्रसिद्ध लेखिका कमल देसाई होत्या. सांगलीच्या जुन्या घरातल्या माडीवर मी दबकतच गेलो होतो. त्यांनी माझी त्यावेळची 'माणसं', 'धागे आडवे उभे' ही पुस्तकं वाचलेली. त्या आपल्या सगळ्या आदरणीय नेत्यांवरच घसरल्या. 'तुम्ही आम्हांला हे जे जग दाखवता, माणसं दाखवता, ते जग या मान्यवरांनी का नाही दाखवलं? का आम्हांला अंधारात ठेवलं?' मी घाबरत म्हणालो, 'अहो, हे माहीत नव्हतं त्यांना.'

त्यावर उसळून म्हणाल्या, 'मग कशाला म्हणायचं यांना नेते?'

तेव्हापासून मी त्यांच्या 'गुड बुक्स'मधे आहे, तो आजवर. अरेच्या, मी 'शेवटपर्यंत' असा शब्द का नाही लिहिला? आजवर? कमाल आहे.

आणि ती किती साधी असावी? सुनंदाच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये त्यांच्या नातेवाईक मुलीला दाखल करायचं होतं. मी सुनंदाला सांगून ठेवलं होतं. त्या तिथं आल्या, पण वरच्या मजल्यावर सुनंदाला भेटायला नाही गेल्या. तिथल्या माहिती देणाऱ्या टेबलवर जाऊन ऐटीत सांगणं दूरच, की माझी सुनंदाची ओळख वगैरे. सुनंदा घरी जायला खाली येईपर्यंत त्या बसून राहिल्या. सुनंदा नंतर मला म्हणाली, 'अरे, त्या कुठं बसल्या होत्या, माहीत आहे का? तिथं समोर खुर्चीवर नाही बसल्या. संडास आहेत ना, त्याच्या शेजारी जमिनीवर मांडी घालून बसल्या होत्या.'

वा! वा! या 'काळा सूर्य आणि हॅट घालणाऱ्या बाई' या स्त्रीवादी युग निर्माण करणाऱ्या पुस्तकाच्या लेखिका, फक्त चार पुस्तके लिहिली; पण ज्यांनी प्रवाह निर्माण केला, त्या लेखिका. पण आता खेड्यातून आलेल्या पेशंटच्या नातेवाइकांसारख्या खुरमुंडी करून खाली बसलेल्या!

नंतर सुनंदाची त्यांची चांगलीच गट्टी जमली. दुपारी घरी जाताना काही वेळा ती कमळीकडे जायची. त्या मस्त जिरेभात करून लोणच्याबरोबर खायच्या. आणि नंतर 'पडून' गप्पा मारायच्या. मी विचारायचो, 'पडून का? बसून नाही मारता येत?'

कमळी हसून म्हणायची, 'नाही, नाही. पडून गप्पा मारायला खरी मजा येते.' सुनंदा गेल्यावर ती नेहमी म्हणायची, 'सुनंदाला मी समजले होते, इतकी मी कुणाला कळ्ळेच नव्हते.'

'कळ्ळं' हा तिचा खास उच्चार. कुणा आपल्याला आदरणीय वाटणाऱ्या माणसाबाबत विषय असला, तरी तिचा शेरा, 'त्याला नं, आपला समाज कळ्ळाच नाही.' तोही शेरा तेवढ्यापुरताच.

लोणचं लावून भात खाणं, म्हणजे तिच्या सुखाचा कळसच. साधा भात. पण ती थोडं काहीतरी लावून असा चवदार करायची की बस्स. तिच्या एकटीच्या संसारात सगळाच स्वयंपाक आटोपशीर असला, तरी तिच्या हाताला चव होती. एकदा तिने उमाताईंकडे 'कोळाचे पोहे' करून आम्हां सगळ्यांना खाऊ घातले. वेगळाच पदार्थ, चव म्हणाल तर अहाहाच!

रास्ता पेठेतल्या खोलीत गेलं, की कधी त्या पांघरूण जोडून पांघरून घेत आणि वाचत बसलेल्या असत. मी म्हणालो, 'अहो, बाहेर कुठं थंडी आहे? त्यात आत्ता दुपारचे अकरा बारा वाजताहेत.' ती हसून म्हणाली, 'मला असं पांघरूण घेऊन वाचायला आवडतं.' नेहमी काही ना काही वाचत असे. बहुधा इंग्लिश पुस्तकं. साहित्यावर, कुठल्या पुस्तकावर किंवा लेखकावर आम्ही क्वचित बोलत असू. तरी गप्पा घमासान. बरं, आमच्यात समान धागा काय असावा, तर वरकरणी काही नाही. मला तिची कित्येक मतं पटायची नाहीत. आमचे लिहिण्याचे प्रकारही अलग अलगच. तरी आवडण्यासारखं भरपूर होतं. तिचा मनस्वी स्वभाव आवडायचा. ती तिच्या साठीनंतर भेटली, तरी ती कधी साडीत दिसली नाही. घरात घालायचे गाऊन मात्र तऱ्हेतऱ्हेचे. त्यावरून मी थट्टा करायचो. कधी ती टी-शर्ट पँटही घालायची. सुमित्रा-सुनीलने तिची प्रदीर्घ मुलाखत चित्रित केलीय, त्यात ती टी-शर्ट व पँटमध्ये दिसली.

साहित्याच्या एवढ्या कल्पना उच्च, अनेक आघाडीचे लेखक त्यांनी नापास केलेले. पण हिंदी सिनेमे फार आवडायचे. तेही कुठलेही. दुपारी जवळच्या अपोलो टॉकीजच्या बकाल शोला तिकीट काढताना पाहिलंय. अमिताभ बच्चन आवडता. त्याचा प्रत्येक सिनेमा जाऊन बघणार. पण त्यातही तिरपागडी अट अशी, की तो 'त्यांच्या' अपोलोला लागला असला तरच पाहायचा. तसाच अलीकडचा आवडता लेखक हॅरी पॉटर. मराठी सीरियल पाहणं तिला आवडायचं. त्यावेळी कुणी आलं असलं, तरी सांगायची, 'मी आत जाते. माझी अमक्या सीरियलची वेळ झालीय.' उमाताईंकडे राहायला गेल्या, तरी तिथेही तेच.

मला ती भेटली उतारवयात. तिची अनेक आजारपणं चालू असायची. प्रकृती तोळामासा. तिला मी कधी माझ्या मित्र डॉक्टरांकडे नेलंय, अगदी माझ्या स्कूटरवर मागे बसवून, तरी ती यायची. आधी कमलताई म्हणायचो, नंतर कधी कमळी म्हणू लागलो, ते कळलंच नाही. ती म्हणायची, 'अशोक (शहाणे) आणि तू या दोघांनाच 'कमळी' म्हणण्याचा अधिकार.' दुर्गा भागवत त्यांचं आदरस्थान. कमळी म्हणायची, 'दुर्गाताईंना माझी काळजी. म्हणायच्या, कमळे तुझं कसं होणार? रा. भा. पाटणकर आणि ती अहमदाबादला एकत्र शिकवायला होते. त्यांनी 'कमल देसाईंचे कथाविश्व' असं पुस्तकच लिहिलंय. रा. भा. म्हणजे केवढे विद्वान! त्यांच्या 'सौंदर्यमीमांसा' या पायाभूत ग्रंथास केवढी मान्यता मिळालेली! त्यांनी कमलताईंच्या लेखनावर असं लेखन करावं, हा केवढा बहुमान. पण कमळी तिच्या साहित्याविषयी चकार शब्द काढत नसे.


कधीतरी तिची स्त्रीवादी म्हणा किंवा मनुष्य म्हणून रग मी पाहिलीय. लहानपण, तरुणपणाविषयी सांगत होती. म्हणाली, 'आम्ही बहिणी काळ्या होतो, म्हणून त्या सगळ्यांनी आम्हांला तुच्छ समजावं? काळं असणं हा काही गुन्हा आहे? का आम्हांला त्यावरून लोकांनी टोचावं?' तिच्या बोलण्यात तिच्या दिवंगत थोरल्या बहिणीविषयी' बरंच यायचं. त्यांच्या घराच्या खटल्याविषयी की वादाविषयी यायचं. कधी विषण्ण होऊन म्हणत असे, 'मला ना, आता मरायचं आहे.' मी कारण विचारता, म्हणे, 'मला कंटाळा आला आहे.' मी म्हणायचो, 'कंटाळा जाईल. दिवस पालटू शकतात. तब्येत सुधारू शकते.' पण त्यावर म्हणाली, 'आता जगावर भार देऊन कशाला जगायचं?' शेवटी विरूपाक्षांनी (कमळी त्यांना बिरुदा म्हणायची) त्यांना सांगितलं, 'आपण काही चॉइसनं या जगात आलो नव्हतो. जेव्हा निसर्गतः मृत्यू येईल, तेव्हा येऊ द्यावा. आपण त्यात ढवळाढवळ कशाला करायची?' त्यानंतर मग तिनं मरणाचा विषय काढला नाही. उलट जगण्याचा आनंद ती घेऊ लागली.

सुमित्रा-सुनीलने 'कमलताई, एका सिनेमात काम करता का?' विचारलं, तर ती खो खो हसू लागली. सुमित्रा म्हणाली, 'या हसण्यासाठीच तुम्ही आमच्या फिल्ममध्ये यावं.' कमळी कोकणातल्या त्या गावी गेली आणि त्या तणावमुक्त घरात एक छान रमणारी, हसणारी म्हातारी तिनं रंगवली. रंगवली तरी कशाला म्हणा, ती आहे तश्शीच होती, अगदी कॅमेऱ्यासमोरही.

तिच्या गोतावळ्यात द. ग. गोडसे होते. ते गेल्या पिढीचे मोठे चित्रकार. माझी काही वेळा गाठभेट झालेली. त्यांनी 'माणदेशी माणसं' या पुस्तकातल्या व्यक्तिरेखा अशा काही काढल्यात की बस्स. त्यांचं कमळीकडे जाणंयेणं. दोघं म्हातारे छान गप्पा मारत. मीही ऐकण्यासाठी सामील व्हायचो. एकदा मी कमळीला विचारलं, 'काय म्हणतोय तुझा बॉयफ्रेंड?' ती आश्चर्याने बघू लागताच मी म्हटलं, 'गोडसे.' तर ती जी हसत सुटली, की थांबेचना.

एक प्रसंग आठवतोय. एकदा जी.एं.वर भरपूर टीका केली. पण जी.ए. गेले. पुण्यात गेले. मी त्यांचं अंत्यदर्शन घेऊन आलो आणि कमळीकडे गेलो. ही बातमी सांगताच त्या अस्वस्थ झाल्या. आणि नंतर तर ओक्साबोक्सी रडू लागल्या. मला खूप आश्चर्य वाटलं. पुढे श्री. पु. भागवत पुण्यात आले. तेव्हा माझ्या स्कूटरवर मागे बसवून त्यांना कमळीकडे घेऊन गेलो. नंतर बाईंचा मूड पालटला.

पहिल्यांदा माझ्याकडे आली, तेव्हा हॉलमध्ये तक्क्याला टेकून बसली. काही वेळानं म्हणाली, 'तुझ्या घरानं मला



**कमळी माझी दोस्त कशी झाली? तिचा तिरपागडेपणा माझ्यात नावालाही नाही. मी सरळ सगळ्यांसारखा विचार करणारा, सगळ्यांच्या भाषेत सगळ्यांना समजेल असं बोलणारा, लिहिणारा. ती ज्या प्रकारची लेखिका, त्यातला मी नव्हतो.**

स्वीकारलंय बरं का?' हे तिचं फॅड. मी हसलो. ती म्हणाली, 'अरे, खरंच सांगते. असं असतंच. घरही आपल्याला स्वीकारतं किंवा नाकारतं.'

मी त्यावरनं थट्टा केली, पण ती बधली नाही. म्हणाली, 'तसं एखादं गावही आपल्याला स्वीकारतं किंवा नाही स्वीकारत.' तिनं उदाहरण दिलं. 'धुळ्याला होते, तर मी धुळ्याला स्वीकारलं होतं, पण धुळ्यानं मला स्वीकारलं नव्हतं. पुढे भिवंडीला आले, तर भिवंडीनं मला स्वीकारलं. पण मी नाही तिला स्वीकारलं.' असा सगळा वेडपटपणा! आणि त्या भावनांवर त्या ती नोकरी सोडत, ते गाव सोडत. कुठं एका ठिकाणी त्या टिकल्याच नाहीत. नोकरी पेन्शनीला पात्र व्हायच्या अगोदरच सोडली. अनेक ठिकाणी नोकऱ्या झाल्या. त्यामुळे सोडल्यावर कसल्याही तऱ्हेचे फायदे मिळाले नाहीत. काय म्हणावं या अव्यवहारीपणाला?

पुढे त्यांनी पुणं सोडलंच. सांगलीला गेल्या. भाच्यानं जुनी इमारत पाडून नवी बनवलेली. त्यात कमळीला स्वतंत्र खोली. सांगलीला तिचं बस्तानच बसलं. तिथल्या तरुण कविलेखकांमध्ये ती जाऊ-येऊ लागली. त्यांच्यात बसून चर्चा करू लागली. अधून-मधून त्या बाजूला जाणं झालं की वाकडी वाट करून भेटून यायचो. तिकडे त्यांचा पंचाहत्तरीनिमित्त सत्कार झाला. मी, विरूपाक्ष, उमाताई खास पुण्याहून गेलो होतो. मी तिचे वेळोवेळी फोटो काढलेले. ते मोठे करून संयोजकांकडे पाठवले. ते त्यांनी हौसेने हॉलबाहेरच्या भिंतीवर लावून छोटे प्रदर्शनच भरवलं.

इतके लोक बोलले अगदी भरभरून. तिचा खरा गौरव सांगली-मिरजकरांनी केलाय. महाराष्ट्र त्याबाबतीत मागेच राहिला. मी अनेक फाउंडेशन्स, अ‍ॅकॅडम्या, सरकार यांना सुचवून पाहिलं. पण यश आलं नाही. (हे अर्थात कमळीच्या नकळत हां. नाहीतर तिनं मारलंच असतं!) तर तो कार्यक्रम मोठा हृद्य झाला. सुमित्रा-सुनीलने शूट केलेली ती मुलाखतही दाखवली. शेवटी या सगळ्याला कमळी काय उत्तर देते, त्याची उत्सुकता होती. पण ती बोलेचना. कुणी आग्रह केला तर म्हणाली, इतका वेळ (त्या फिल्ममध्ये) मी बोललेच ना. आणखी काय बोलायचं? परत गप्प. एखादीने ७५ वर्षांचा सुखदुःखांचा आढावा घेतला असता. गुरुजनांविषयी कृतज्ञता, वगैरे. पण कमळी गप्पच. शेवटी म्हणाली, 'सगळं काय शब्दांतूनच व्यक्त होतं काय?' अशी ती कमळी.

तेजस्वींच्या 'कर्वालो' या कादंबरीच्या प्रेमात त्या पडल्या. आणि तेव्हापासून त्यांची उमा-विरूपाक्षांशी घट्ट मैत्री झाली. आम्ही बरोबर फिरायला जायचो. आमचा ग्रुपच जमला. मी त्याला 'चांडाळ चौकडी' म्हणायचो. कमळीच्या लग्न न करण्यावरूनही थट्टामस्करी व्हायची. ती म्हणायची, 'कोणी योग्य भेटला असता, तर केलं असतं लग्न.'

मी म्हणालो, 'पण योग्य कोण? एखादं उदाहरण?' ती म्हणाली, 'महाभारत लिहिणारा व्यासच एक माझ्यासाठी योग्य

आहे.' म्हणालो, 'कमळे, तुला तो योग्य नवरा मिळेल, पण व्यासांचं काय होईल?' हशाच हशा.

विरूपाक्ष म्हणाले, 'व्यास म्हणजे राख फासलेला, कित्येक महिने अंघोळ न केलेला, जटा न विंचरलेला असणार....' परत हशा.

उमा-विरूपाक्ष संकोची. ते त्यांची थट्टा करायला मागे राहत. ती तर कसले बंधन नसलेली. पण तेही हळूहळू या कल्लोळात, थट्टा करण्यात, करून घेण्यात सामील होऊ लागले. 'क्या बोला!' म्हणून कमळी टाळीही देत असे.

उमाताईंची कादंबरी मोठी असली, की दोन दोन दिवस वाचन चालायचं. त्यांच्याकडे दुपारचं जेवण, झोप. परत वाचायला बसायचे.

भैरप्पांनी महाभारतावर लिहिलेली 'पर्व' कादंबरी तिला अजिबात आवडली नाही. 'त्याला महाभारत कशाशी खातात, ते समजलं नाही. त्यानं लिहिताच कामा नये.' त्यांच्या संतापाला मी पंक्चर केलं. म्हणालो, 'तुझ्या व्यासाचं महाभारत म्हणून तुझी परवानगी घ्यायला हवी होती का?' त्यावर तसंच हसत सुटणं.

एकदा त्यांच्याकडून आम्ही अस्तित्ववाद ऐकला होता. असेच दोन दिवस सलग. तेव्हा बोलणारी कमळी नेहमीची नव्हती. वेगळंच माणूस बोलतंय जसं.

पुढे सांगलीहून त्या पुण्याला 'निळावंती' बंगल्यात राहायला आल्या. भावाचं निधन झालेलं. भाचा दिलीप आणि भाचेसून नंदू त्या घरात. आणि भावाची पत्नी, त्यांना आम्ही वहिनी म्हणायचो. त्या कमळीपेक्षा वयानं थोड्या मोठ्या. त्या घराची आठवण जास्त करून माझ्या गाणं म्हणण्याची. 'केव्हा तरी पहाटे' दरवेळी म्हणवून घ्यायच्याच. त्यांच्या वहिनीही येऊन बसायच्या. वहिनी शेवटच्या आजारी पडल्या, तेव्हाही खूण करून मला हेच गाणे म्हणायला लावलं. कमळीला गझल आवडायच्या. त्यात 'आवारगी'ची गझल फार आवडायची. 'इस दश्त मे इक शहर था, वो क्या हुआ, आवारगी' ही ओळ त्यातली जास्त आवडती. या वाळवंटात एक शहर होतं, ते कुठं गेलं? म्हणायची, 'फार गूढ अर्थ आहे त्यात.' कधी 'अब के हम बिछडे...' ची फर्माईश...तर कधी 'रंजिशी'ची. मला म्हणायची, 'तू गाण्याकडे जास्त लक्ष पुरवायला हवं होतंस. त्याच्याकडे दुर्लक्ष करून आमच्यावर अन्याय केला आहेस.'

मी म्हटलं, 'बरोबर. मी एक गायक झालो असतो. मग मी लिहिलं नसतं. ते चाललं असतं?'

ती निरुत्तर. पण परत पुढच्या वेळी तेच वाक्य. एकदा तिने एक गझल कशी म्हणायची असते, त्याचं प्रात्यक्षिक दाखवलं. कुठल्या शब्दावर भर पाहिजे, कुठं गॅप घेतली पाहिजे, वगैरे. मी अलीकडे शास्त्रीय रागांच्या चिजा शिकत होतो. मग काय, शिकलो की, पहिलं प्रात्यक्षिक कमळीपुढं.

कमळी माझी दोस्त कशी झाली? तिचा तिरपागडेपणा माझ्यात नावालाही नाही. मी सरळ सगळ्यांसारखा विचार करणारा, सगळ्यांच्या भाषेत सगळ्यांना समजेल असं बोलणारा, लिहिणारा. ती ज्या प्रकारची लेखिका, त्यातला मी नव्हतो. ती गावांशी, घरांशी, घरातल्या वस्तूंशी बोलणारी. मला तो वेडपटपणा वाटायचा. तिला म्हणायचो, 'तुला सायकियाट्रिस्टकडे नेलं पाहिजे. पण नको. तोही वेडा होईल. म्हणायला लागेल, हा पेन आत्ताच म्हणत होता, पण तेवढ्यात हा स्टेथो मधेच बडबडला.'

कमळी हसून बेजार. उत्सुकतेने म्हणाली, 'मग पुढं? स्टेथोला काय म्हणायचं होतं?'

थट्टा करता करता मला त्याची कधी बाधा झाली कळलंच नाही. फिरायला जायचो, तिथली झाडं बोलू लागली. जंगलातल्या वाटा बोलू लागल्या. एवढंच काय, डोक्यावरचा पंखा, दारापासच्या चपला बोलू लागल्या. मग त्यातनं गोष्टी लिहू लागलो. काही वेळा तर असं झालं, लेख लिहायला घेतला. असह्य परिस्थितीतून ज्या व्यक्तीला पुढं जायला वाटच नाही, अशी अशक्य परिस्थिती. तिथं लगेच ही कमळीची फँटसी आली. तिनं एक काय, अनेक रस्ते दाखवले.

मी आनंद(नाडकर्णी)ला म्हणालो, 'हे सगळे माझ्याशी बोलतात. हे जेव्हा खरं वाटू लागेल, तेव्हा मी तुझ्याकडे ट्रीटमेंटला येईन.' कमळीच्या रस्त्याने जाऊ लागलो, तसं मला या विविध वस्तूंना, जीवांना काही अस्तित्व आहे, असं जाणवू लागलं. आपल्यासाठी झिजणाऱ्या चपला. या जुन्या झाल्या की नव्या घ्यायच्या, या फेकून द्यायच्या, हाच माझा खाक्या. आता मला चपलांविषयी अगत्य वाटू लागलं. कृतज्ञतेने मन भरून आलं. कमळीच्या पागलपणात सामील झाल्याने हे मला मिळालेलं धन. 'थ्रो अवे' संस्कृतीपासून दूर होतोच. पण आता याच पागलपणाने वेगळी मजा आणली, तसंच लालित्यही.

अगदी रास्ता पेठेतल्या घरात तिचा माझा एक करार ठरला होता. दोघांनी एकमेकांवर जिवंत असेतो लिहायचं नाही. मी आधी गेलो, तर तिनं लिहायचं, आणि ती आधी गेली, तर मी. तरी करार मोडून ती माझ्यावर कादंबरी लिहिणार होती. ते मागं पडलं. मग लेख लिहिणार होती.

आता सगळंच संपलं. मी अगदी जिवावर आल्यासारखं लिहायला घेतलं. दोन तीन पानं लिहिली. ते जमेना म्हणून पानं फेकून दिली. परत एकदा तस्संच झालं. मग मी कमळीला म्हणालो, 'तू आता 'गेली' आहेस ना, मग मला ठरल्याप्रमाणे लिहू का देत नाहीस?'

आता गडचिरोलीला आलो. निवांत घर, शांत वातावरण. सगळे आपापल्या कामावर गेलेले. तेव्हा कमळी पेनातून आली आणि पेपरावर उतरतच गेली. कमळे, मी करार पूर्ण केला आहे. आता मी जाईन, तेव्हा तू लिहायचं. कशावर लिहिशील? आभाळावर ढगांच्या पेनने? की समुद्रावर वाऱ्याच्या लेखणीने? की कुरणांवर झाडाच्या पेन्सिलीने?

आणि म्हणू नकोस, की हा निरोप 'कळ्ळाच' नाही!

*(दिवाळी २०११)*

# माझे लेखन : जीवनमूल्यांचा आविष्कार

नागनाथ कोत्तापल्ले


अंतर्नादच्या २०१२ सालच्या दिवाळी अंकात 'मी आणि माझे लेखन' हा एक विशेष विभाग होता. त्यात राजेन्द्र बनहट्टी, नागनाथ कोत्तापल्ले, आशा बगे, अरुण साधू, रंगनाथ पठारे, भारत सासणे, नीरजा, सदानंद देशमुख, अरुणा ढेरे, आनंद यादव, विजय पांढरीपांडे, विश्वास पाटील, इंद्रजित भालेराव, मोनिका गजेंद्रगडकर आणि कविता महाजन या मराठीतील काही आघाडीच्या लेखकांचे लेख प्रसिद्ध झाले होते. त्या विशेष विभागाची ही एक झलक.

आपण काहीतरी लिहावे किंवा लिहिलेच पाहिजे असे तीव्रतेने वाटून मी एक कविता लिहिली. त्याच्या पाठोपाठच एक लेखही लिहिला. कविता कुठेतरी वाचलेल्या कवितेचा प्रतिध्वनी होती. मात्र लेख स्वत:चा असावा, असे वाटते. 'इतिहासाकडे पुन्हा वळावे लागेल', असे काहीसे त्या लेखाचे शीर्षक होते. म्हणजे भोवती जे काही पाहत होतो, ते मला रुचत नव्हते. यातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे पुन्हा इतिहासाकडे वळले पाहिजे, इतिहासातील आदर्श व्यक्तींचा आदर्श समाजापुढे ठेवला पाहिजे, असा काहीसा आशय त्या लेखाचा होता. मुखेडला — माझ्या गावी — माझ्या अगदीच छोट्या घरात बसून मी तो लेख झपाटल्यासारखा लिहिला होता. लेख लिहून झाला, तेव्हा मला विलक्षण आनंद झाला होता. तेव्हा मी इयत्ता नववीमध्ये होतो. ते वर्ष असावे १९६३ किंवा १९६४.

अभ्यासात मी नावाजलेला विद्यार्थी होतो. तेव्हा अभ्यास सोडून मी हा लेख का लिहिला असावा, हा प्रश्न आहे. वाचन तर मी तिसरी-चौथीपासूनच करत होतो. परंतु एकाएकी एक मोठा लेख मी लिहून काढला. मित्रांना वाचून दाखवला. शाळेतला लेखकच झालो म्हणा ना! मग हे का घडले? घरात लेखनाची-वाचनाची परंपरा नव्हती. परंतु असे सांगितले जात होते, की माझ्या आजोबांना नाटकांचा फार शौक होता. ते स्वत: नाटकात काम करीत असत. एवढेच नाही, तर गडकऱ्यांचे अपूर्ण नाटक 'राजसंन्यास' त्यांनी त्यांच्या पद्धतीने पूर्ण केले होते व त्याचा प्रयोग केला होता. माझ्या जन्माआधी काही महिने त्यांचे निधन झाले होते. मी त्यांना पाहिलेही नव्हते. फक्त कोठेतरी एका ग्रुपफोटोमध्ये त्यांना पाहू शकलो होतो. त्यावेळी गडकरी, 'राजसंन्यास' हे काही माहीत नव्हते. त्यामुळे तो फोटो मागून घ्यावा, माहिती जमवावी असे काही कळण्याचे माझे वय नव्हते. परंतु आपले आजोबा नाटकात काम करीत होते, ही माहिती मिळून आनंद झाला होता. मग माझ्या या लेखाचा आजोबांच्या ऐकीव माहितीशी काही संबंध आहे का? सांगता येत नाही. परंतु प्रत्यक्ष लिहावेसे वाटणे याला दोन कारणे होती, असे मला वाटते. एक म्हणजे, आमच्या शाळेमध्ये तेव्हा श्री. धरणीधरराव इनामदार हे शिक्षक होते. ते फार मारकुटे व संतापी होते. परंतु त्याकाळात त्यांच्या कथा 'प्रसाद' मासिकात छापून येत. तेव्हा आपणही लिहावे, असे मला वाटत असणार. दुसरे म्हणजे, भोवती जी काही परिस्थिती होती, ती काही चांगली नव्हती. आमच्या घरी मी व आजी असे दोघे राहात होतो. वडील प्राथमिक शिक्षक. त्यामुळे ते व सारे कुटुंब बदलीच्या गावी असत. आजी तिची शेतातली कामे सांभाळून माझी काळजी घेई. तरीही परिस्थिती ओढगस्तीचीच होती. घरात काही ताणही होते. त्यातून पुढे वाटण्या झाल्या.

कौटुंबिक पातळीवरचे हे तणाव होतेच, पण त्याकाळात भोवती समाजात जे काही चालू होते, त्याबद्दलही मी असमाधानी असणार. फार काही कळण्याचे वय नव्हेच ते. पण मी वर्तमानपत्र वाचत असे. त्यातूनही एक असमाधान मनात साचत असणार. या साऱ्या असमाधानातून सुटका करून घेण्याचा किंवा या असमाधानावर मात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मला तो लेख लिहावासा वाटला असणार. मला वाटते, कुठल्याही लेखकाच्या लेखनाची मुख्य प्रेरणा त्याचे असमाधान हीच असावी.

मी दहावीची परीक्षा पास झालो आणि नुकत्याच उघडलेल्या देगलूर महाविद्यालयात मी प्रवेश घेतला. नांदेडमध्ये दोन महाविद्यालये होती. नावाजलेली होती. परंतु नांदेडमध्ये राहून शिक्षण घेणे परवडणारे नव्हते. (तसेच विज्ञानाकडे माझा ओढा नव्हताच.) मी देगलूर महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि ते फारच चांगले झाले, असे आता वाटते. एक तर तेथे विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत कमी होती. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे शिक्षकांना शक्य होते. प्राचार्य धर्माधिकारी यांनी तर मला घरी बोलावून एकट्यासाठी काही वर्ग घेतले होते राज्यशास्त्राचे. माझ्या आयुष्यात प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी यांचे स्थान फार मोठे आहे. ते प्रयोगशील वृत्तीचे आणि सामाजिक बांधिलकी मानणारे निर्भीड शिक्षक होते. त्यांनी आम्हां काही विद्यार्थ्यांना सोमनाथ येथे झालेल्या पहिल्या 'श्रमसंस्कार छावणी'मध्ये पाठवलेले होते. बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांच्या कार्यामुळे आणि व्यक्तित्वामुळे आम्ही विद्यार्थी भारावून गेलो होतो. या श्रमसंस्कार छावणीचे आणि आम्हांला तेथे पाठविणाऱ्या प्राचार्य धर्माधिकारी यांच्या संस्काराचे ठसे माझ्या जीवनात तरी अमीट असेच राहिले आहेत. एकूण जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन महाविद्यालयात तयार होत गेला, असे म्हणता येईल. पुढील आयुष्यात तो अधिक विकसित होत गेला. कुठल्याही लेखकाचे-व्यक्तीचे



जन्म : २९ मार्च १९४८, मुखेड (जिल्हा नांदेड) येथे
शिक्षण : एम. ए. (१९७१, मराठवाडा विद्यापीठात सर्वप्रथम), पीएच.डी. (१९८०)
अध्यापन : १९७७ ते १९९६ (मराठी विभाग, मराठवाडा विद्यापीठ),
१९९६ ते २००५ (मराठी विभागप्रमुख, पुणे विद्यापीठ)
२००५ ते २०१० कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
सध्या अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी भाषा सल्लागार समिती
लेखन : मुद्रस (कविता १९७९), संदर्भ (कथा १९८४), गांधारीचे डोळे (कादंबरी १९८५), ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध (समीक्षा १९८५) व उद्याच्या सुंदर दिवसांसाठी (ललित २००२) या पुस्तकांना महाराष्ट्र राज्य शासनाचे पुरस्कार.

असेच होते.

महाविद्यालयात आल्यानंतर मात्र साहित्यासंबंधीची माझी जाण अधिकाधिक विकसित होऊ लागली. मुख्य म्हणजे वाचन वाढले. येथे मराठी शिकविण्यासाठी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी होते. ते स्वतः कवी आणि कथाकार म्हणून मान्यताप्राप्त होते. स्वाभाविकपणेच मी व माझा कविमित्र वसंत जाधव त्यांच्या घरी जाऊ लागलो. त्यांच्या घरची पुस्तके हक्काने खोलीवर नेऊ लागलो. एखादे आम्ही वाचले नाही, तर ते आवर्जून देत. चर्चा करीत. आम्ही त्यांच्या घरचेच झालो. मग त्यांच्या नव्या कविता आम्ही वाचत असू. त्यांच्या 'दूर गेलेले घर' या कादंबरीचे पहिले वाचक (श्रोते) मी, वसंत जाधव आणि ताई होतो (सौ. तांबोळी). ही कादंबरी ऐकून आम्ही फार प्रभावित झालो. हे सर्व चालू असताना मी कविता लिहीत होतोच. त्यांना दाखवीत होतो. त्यांना आवडल्या, तर ते त्यांचे पत्र जोडून एखाद्या मासिकाकडे पाठवीत. त्यांतील काही कविता छापून आल्या. याच काळात मी ललित निबंध लिहू लागलो. असे ललित निबंध गोव्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'मांडवी' या मासिकातून आणि रविवारच्या 'मराठा'तून प्रसिद्ध होऊ लागले. महाविद्यालयात असताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लातूरच्या दयानंद महाविद्यालयाने एक कथास्पर्धा जाहीर केली. त्यात मला दुसरे बक्षीस मिळाले. पुढे मात्र मी कुठल्या स्पर्धेत भाग घेतला नाही. अशा स्पर्धांचा नव्या लेखकांना फायदा होतो. एकदम नाव माहीत होते. परंतु काय असेल ते असो, मी मात्र स्पर्धांमधून भाग घेतला नाही. कविता, ललित निबंध, कथा मात्र लिहीत राहिलो. महाविद्यालयातील आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. आम्हांला सत्यनारायण जाजू हे प्राध्यापक हिंदी शिकवीत. माझे हिंदी नव्हते, तरी त्यांच्याकडे जाणे-येणे होते. तेही वाचन करवून घेत. चर्चा करीत. हिंदीतील नवसाहित्य म्हणजे कमलेश्वर, राजेंद्र यादव, मन्नू भंडारी, श्याम जोशी, इलाचंद्र जोशी असे सारे वाचून काढले. धर्माधिकारी, तांबोळी, जाजू यांच्याशी झालेल्या चर्चा माझी वाङ्मयीन समज विकसित करणाऱ्या होत्या. लेखनही चालू होते. बी.ए. होईपर्यंत कवी म्हणून माझे नाव चार लोकांना माहीत झाले होते. पुढे मी एम.ए.साठी मराठवाडा विद्यापीठामध्ये गेलो. तेथे सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. वा. ल. कुलकर्णी हे विभागप्रमुख होते. डॉ. पठाण, डॉ. सुधीर रसाळ आणि डॉ. गो. मा. पवार हे इतर शिक्षक होते. येथे साहित्याकडे अधिक जागरूकपणे पाहण्याचे शिकता आले.

आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. आर्थिक परिस्थितीमुळे मी 'मराठवाडा साहित्य परिषदे'मध्ये कारकून म्हणून काम करू लागलो. माझ्या आवडीचे तेथील काम होते ते 'प्रतिष्ठान' या वाङ्मयीन नियतकालिकाचे. डॉ. रसाळ संपादक होते. महाराष्ट्राच्या सर्व भागांतून विविध प्रकारचे साहित्य येत असे. कविता, कथा, समीक्षा आणि इतर लेखन येई. मी ते नोंदवून घेऊन डॉ. रसाळ यांच्याकडे पाठवीत असे. (अर्थात ते मी वाचत असेच.) डॉ. रसाळांकडे जे साहित्य पाठविले जाई, त्यात मी माझ्या कविता आणि कथा पाठवू लागलो. त्यांतल्या काही कविता व कथा डॉ. रसाळ निवडत. पुढे यथावकाश हे साहित्य 'प्रतिष्ठान'मध्ये प्रकाशित होऊ लागले. त्याच वेळी 'सत्यकथे'मधून माझ्या कथा व कविता येऊ लागल्या. तो काळ असा होता, की 'सत्यकथा', 'प्रतिष्ठान'मधून छापून आले, की तो लेखक रातोरात महत्त्वाचा होऊन जायचा. विशेषतः 'सत्यकथे'चा दबदबा अधिक होता.

१९७१ साली मी बीड येथे महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो. मला कवी आणि कथाकार म्हणून बऱ्यापैकी नाव मिळालेले होते. तेथे असताना मी अनेक कथा लिहिल्या. कविताही लिहिल्या. तेथे एक छोटा साहित्यिक मित्रांचा ग्रुप जमला. सोपान हाळमकर, वासुदेव मुलाटे, त्र्यंबक असरडोहकर आणि मी असे आम्ही साहित्यप्रेमापोटी एकत्र आलो. अधूनमधून भास्कर चंदनशीव बीडला येत. मग गप्पांना बहर येई.

बीडच्या वास्तव्यात आणखी एक झाले. मी नव्या महत्त्वाच्या पुस्तकांवर 'प्रतिष्ठान', 'नवभारत', 'समाजप्रबोधनपत्रिका', 'अस्मितादर्श' या आणि इतर अनेक नियतकालिकांमधून परीक्षणे लिहू लागलो. एम.ए.ला असताना मोठे समीक्षक आम्हांला शिकवायला होते. त्यांच्यामुळे असेल अगर इतर कुठल्या कारणामुळे असेल, परंतु मी समीक्षा लिहू लागलो. त्या काळातील माझी समीक्षालेखनाची मुख्य प्रेरणा होती, नव्याने आलेल्या चांगल्या पुस्तकांचा परिचय वाचकांना करून द्यावा. मराठीमध्ये होते असे, की दरवर्षी किमान १५-२० पुस्तके महत्त्वाची ड्ढ लक्षणीय अशा स्वरूपाची असतात. परंतु त्यांची दखल घेतली जातेच, असे होत नाही. मला आठवते त्याप्रमाणे भ. मा. परसवाळे, सरिता पदकी, शरच्चंद्र चिरमुले, महावीर जोंधळे यांच्या नव्या आणि इतर अनेक पुस्तकांवर मी विस्ताराने लिहिले होते. तसेच बालकवी, तांबे यांच्या समग्र कवितेविषयीही लिहिले होते.

बीडला पाच-सहा वर्षांची नोकरी पूर्ण झाली आणि जून १९७७ला मी मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागात अधिव्याख्याता म्हणून रूजू झालो. बीडला असतानाच म्हणजे १९७६ साली माझा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. माझ्यासारखेच अनेक नवे कवी आणि कथाकार होते, ज्यांना आपली

पुस्तके प्रकाशित व्हावीत असे वाटत होते. परंतु ती कशी प्रकाशित होणार? खरे तर, त्यासाठी प्रकाशकांशी संपर्क करायला हवा होता. कवितासंग्रह छापणारे प्रकाशक थोडे. तरीही का कुणास ठाऊक, त्यांच्याकडे जावे असे वाटले नाही. परंतु कवितासंग्रह प्रकाशित झाला पाहिजे, असे तीव्रतेने वाटत होते.

याच काळात भालचंद्र नेमाडे औरंगाबादला होते. त्यांनी स्वत:ची आणि त्यांच्या वर्तुळातील कवींची पुस्तके काढावयास सुरुवात केली. इतर प्रकाशकांची मनधरणी करण्यापेक्षा आपण आपले कवितासंग्रह काढावेत, अशी त्यांची भूमिका होती. भालचंद्र नेमाडे यांच्या 'वाचा' प्रकाशनाच्या प्रेरणेने अनेक कवींनी आपले संग्रह स्वत:च काढले. हे एक उदाहरण समोर होते. तेव्हा डॉ. प्रभाकर मांडे आणि महावीर जोंधळे यांनी पुढाकार घेऊन 'साहित्य सहकार' या नावाची प्रकाशन संस्था सुरू केली. वितरणाची जबाबदारी ना. वि. देशपांडे यांनी स्वीकारली. त्यांचे औरंगपुऱ्यात पुस्तकांचे मोठे दुकान होते. कल्पना अशी होती, की लेखकांनी निर्मितीखर्च द्यावा, विक्रीनंतर त्याचे मूळ भांडवल परत केले जाईल. या योजनेत सात-आठ पुस्तके निघाली. महावीर जोंधळे यांच्या पुढाकाराने माझा 'मुड्स' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. छोटासा होता. पन्नासेक पानांचा. त्याचा प्रकाशन समारंभही झाला. परंतु त्याला मला उपस्थित राहता आले नाही. यानंतर माझ्या कुठल्याही पुस्तकाचा प्रकाशन समारंभ झाला नाही. या संग्रहाच्या निर्मितीसाठी मी रुपये ६०० दिले. ते कधीच परत आले नाहीत. तशी अपेक्षाही नव्हती. पुढे प्रकाशन संस्थेचे कामकाज थांबलेच.

कवितासंग्रह प्रकाशित झाला आणि त्याला त्या काळात खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. माझ्या एका मित्राला तर संपूर्ण कवितासंग्रहच पाठ होता. परीक्षणेही तीन-चार आली. मुख्य म्हणजे, त्याला महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. तो क्षण अतिशय आनंदाचा होता. पण खरा आनंद पुढे समारंभाच्या वेळी झाला. सुप्रसिद्ध समीक्षक आणि कादंबरीकार त्र्यं. वि. सरदेशमुख हे तज्ज्ञ समितीत होते. त्यांनी कविता विलक्षण आवडल्याचे सांगितले. मला अतिशय आनंद झाला. परंतु येथून पुढे मात्र हळूहळू कवितालेखन कमी होत गेले. साधारणत: १९९०पर्यंत थोड्या कविता मी लिहिल्या. त्यात काही वेगळ्या कविता होत्या. 'विदूषिका' या नावाने त्या प्रकाशित झाल्या. समाजातील खोटेपणाचा उपहासाच्या अंगाने या कवितांमधून आविष्कार होत होता. तरीही या कविता संख्येने फारशा नव्हत्या. (आता २०१२ साली 'मुड्स आणि नंतरच्या कविता' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. त्यात साधारणत: १९९०पर्यंतच्या कविता एकत्रित केल्या आहेत.) पुढे मला कविता सुचेनाशी झाली, आणि मीही सहज सुचत नसेल तर अट्टहासाने कविता लिहिण्याचा/पाडण्याचा उपद्व्याप केला नाही. आता मागील वर्षापासून म्हणजे २०११ पासून मला पुन्हा कविता सुचू लागल्या आहेत. त्यांतील काही प्रकाशित झाल्या आणि अनेक रसिकांचे फोन आले. बरे वाटले. आता शंभर सव्वाशे कविता प्रसिद्धीच्या प्रतीक्षेत आहेत.

येथे एक प्रश्न असा, की माझे कवितालेखन मध्येच का बंद झाले असावे? त्याचे निश्चित उत्तर देता आले नाही, तरी दोन-तीन कारणे सांगता येतील. मी माझ्या प्रबंधलेखनात व इतर समीक्षालेखनात गुंतलो होतो. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे, माझ्यामध्ये बदल होत होता. विद्यापीठात शिकत असताना मोईन शाकीर यांच्याशी मैत्री झाली. ते कडवे मार्क्सवादी होते. त्यांना साहित्याची आवड होतीच. त्यांच्याबरोबर होणाऱ्या चर्चा मला अधिक डोळस करीत होत्या. त्यातून नुसतेच भ्रमनिरासाने व्याकूळ होणे पुरेसे नाही, त्याच्यापुढे जाता आले पाहिजे, असे अंतर्मनात कोठेतरी वाटत असणार. याच काळात साहित्यक्षेत्रात साहित्यचळवळींचे वारेही जोरदार वाहत होते.

विशेषत: दलित साहित्याची चळवळ सुरू झालेली होती. भारतीय समाजातील बहुसंख्याकांच्या दु:खाचे मूळ हे भारतीय जातिव्यवस्थेमध्ये आहे, हे महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि म. विठ्ठल रामजी शिंदे यांनी सांगितलेलेच होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या जगन्मान्य विद्वानालाही जातीयतेच्या विषारी इंगळ्यांनी दंश केला होता. हा सगळा इतिहास दलित साहित्याच्या चळवळीतून मुखर होत होता. एखाद्या झंझावातासारखे दलित साहित्य आले. पुढे ग्रामिणांच्या दु:खाला वाचा फुटू लागली. १९७४नंतर स्त्रियांच्या घुसमटीला अंकुर फुटू लागले. असा सगळा हा चळवळींचा काळ होता. नव्या जाणिवांचा काळ होता. या साऱ्याच गोष्टींचा परिणाम माझ्यावर झालेला आहे. तरीही मला वाटते, की मी या सर्व चळवळींशी समांतर राहून लेखन केले. सर्व चळवळींविषयी सहानुभूती, आपलेपणा असूनही मी त्यांना समांतर आहे, असे मला वाटते.

माझी कविता का थांबली असावी, असा विचार करताना मला वाटते, की भोवतीच्या वाङ्मयीन पर्यावरणाचा परिणाम माझ्यावर झाला असणार आणि आपण अधिक शोधक होणे आवश्यक आहे, असे माझ्या अंतर्मनाला वाटले असणार. कुठल्या कारणाने नक्की सांगता यायचे नाही, परंतु मधली वीस-पंचवीस वर्षे कविता मला सोडून गेली होती, ही मात्र वस्तुस्थिती आहे. या मधल्या वर्षांत मला कविता सुचत नाही, याची विलक्षण खंत वाटत असे.

माझे कथालेखन चालूच होते. अर्थात वर्षाला तीन-चार कथा असे माझे कथालेखनाचे प्रमाण होते. साधारणत: १९८० पर्यंत तीस-पस्तीस कथा लिहून झाल्या होत्या. (त्यांतल्या काही आज माझ्याकडे नाहीत.) कथासंग्रह यावा, असे वाटत होते. प्रतिष्ठित प्रकाशकांना विचारले पाहिजे, असे काही माझ्या डोक्यात आले नाही. कुणाच्या तरी सांगण्यावरून 'रा. ज. देशमुख आणि कंपनी'ला पत्र पाठविले. अर्थात त्यांचा नकार आला. दरम्यानच्या काळात नांदेडला माझे मित्र प्रा. मामीडवार यांनी प्रकाशन संस्था काढली. त्यांनी मला स्वत: होऊन विचारले. विशेष म्हणजे रु. ५०००/- मानधन दिले. 'काफिला' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. याच दरम्यान प्राचार्य गजमल माळी यांच्या 'पृथक प्रकाशना'च्या वतीने माझा 'कर्फ्यू आणि इतर कथा' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. या प्रकाशनाच्या वतीने त्यांचा कवितासंग्रह व माझा कथासंग्रह प्रकाशित झाला. पुढे हे प्रकाशन काही उभे राहिले नाही. 'मौज प्रिंटिंग प्रेस'मधून पुस्तकांची छपाई झाली. परंतु माझा कथासंग्रह मात्र फारसा वितरित झालाच नाही. उत्तम कथा असणारा हा कथासंग्रह पडून राहावा, ही विलक्षण दु:खकारक गोष्ट होती. परंतु काही इलाज नव्हता. १९८४च्या दरम्यान कोल्हापूरच्या 'प्रचार प्रकाशना'च्या वतीने माझा 'संघर्ष' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. त्याला राज्यशासनाचा पुरस्कार मिळाला. थोडीबहुत दखल घेतली गेली. परंतु पहिले दोन संग्रह लोकांपर्यंत नीट पोचलेच नाहीत.

(पुढे १९८८ नंतर मेहता प्रकाशनाने माझे तीन-चार कथासंग्रह काढले.)

मला वाटते, आरंभीच्या काळातील पुस्तके रसिकांपर्यंत नीट पोचली नाहीत, तर त्या लेखकाची लेखक म्हणून प्रतिमा उभी राहण्यामध्ये अडचणी येतात. त्या दृष्टीने लेखकाने सजग राहिले पाहिजे. एवढेच नाही, तर लेखकाने आपली प्रतिमा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. माझा मित्र असणाऱ्या एका ज्येष्ठ समीक्षकाने असे म्हटले होते, की समीक्षा आणि ललितलेखन करणाऱ्या लेखकांची लेखक म्हणून प्रतिमा नीट निर्माण होत नाही. काहीतरी एकच लिहावे. म्हणजे समीक्षा तरी किंवा ललितलेखन तरी. मला मात्र असे वाटते, की लेखकाला जे जे लिहावेसे वाटते, ते ते त्याने लिहिले पाहिजे. अर्थात त्यासाठी कुठल्या तडजोडी कराव्यात, असे मी म्हणणार नाही. परंतु पुस्तके महाराष्ट्रात सर्वदूर पोचली पाहिजेत, त्यावर बरी-वाईट चर्चा झाली पाहिजे, यासाठी तरी लेखकाने प्रयत्न केले पाहिजेत. हे मी आज सांगतो आहे, परंतु हे मला मात्र जमले नाही. मला वाटायचे, आपले साहित्य चांगले असेल, तर त्यावर चर्चा व्हायलाच पाहिजे. हे तत्त्वत: बरोबर असले, तरी असे होईलच असे मात्र नाही.

महाविद्यालयीन जीवनात मी केलेले लेखन बाजूला ठेवले, तरी साधारणत: १९७०पासून माझा उमेदवारीचा कालखंड सुरू होतो. उमेदवारीचा कालखंड किती असावा, याचे काही गणित नाही. काही लेखकांना एका पुस्तकातच इतकी प्रसिद्धी मिळते, की त्यांची उमेदवारीच संपून जाते. मी मात्र साधारणत: दहा वर्षे तरी उमेदवारीच करीत होतो, असे वाटते. या दहा वर्षांत कवी म्हणून चांगली प्रतिमा उभी राहिली होती. कथाकार म्हणूनही चर्चा होत होती. परंतु दोन संग्रह येऊनही ते लोकांपर्यंत मात्र पोचले नव्हते. कथासंग्रहांचे जसे झाले, त्याप्रमाणेच समीक्षालेखनाचेही झाले. कादंबरीकार आणि विनोदी लेखक असणारे मित्र त्र्यंबक असरडोहकर यांनी अचानक २५ वर्षांची बँकेतील नोकरी सोडून दिली. लेखनावर जगायचे, असा त्यांनी ध्यास घेतला. परंतु लेखनावर जगता येत नाही, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी 'रिमझिम प्रकाशन' या नावाने व्यवसाय सुरू केला. मी समीक्षेचे 'पापुद्रे' हे पुस्तक त्यांना दिले. त्याचे वितरण त्यांनी चांगले केले. परंतु प्रकाशन नवे होते. पुस्तक प्रकाशित झाले एवढेच.

या उमेदवारीच्या कालखंडात कोणी फारसे मार्गदर्शन केले, असे आठवत नाही. महाविद्यालयात असताना प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, प्रा. जाजू आणि प्राचार्य धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन असायचे. पुढे डॉ. रसाळ, डॉ. पवार हे माझे शिक्षक असले, तरी माझ्या साहित्याबद्दल त्यांच्याशी क्वचितच चर्चा झाली. 'चला, एक कुत्रा तर संपला' ही कथा वाचून डॉ. गो. मा. पवार यांनी आवडल्याचे सांगितले होते. डॉ. रसाळ 'प्रतिष्ठान'साठी माझे कोणते साहित्य निवडतात, ते मी बारकाईने पाहत होतो. एका प्रकारे त्यांच्याशी घडणारा हा मूक संवाद होता. माझी एक कविता एका लघू अनियतकालिकात प्रकाशित झालेली होती. ती पाहून प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी नाराजी व्यक्त केली होती. परंतु मी उत्तम दीर्घ कविता लिहू शकेन, असेही मत पुढे त्यांनी व्यक्त केले होते. तेव्हा लेखन वाचून चर्चा करणे, त्या लेखनात काही सुधारणा सुचविणे असे प्रकार माझ्या बाबतीत झाले नाहीत.

खरे म्हणजे, मीही कोणाकडे जाणे, वाचून दाखविणे, मत घेणे, चर्चा करणे असल्या गोष्टी करीत नव्हतो. हे चूक का बरोबर हे मला सांगता यायचे नाही. परंतु आजही मी स्वत:च्या साहित्याबद्दल क्वचितच बोलतो. त्यामुळे 'आपुलाचि वाद आपुल्याशी' करीत मी पुढे जात राहिलो. पुस्तकप्रकाशनाबाबतीत मात्र टक्केटोणपे सोसत राहिलो. याचा परिणाम माझ्या कथेसंबंधी चर्चा न होण्यात झाला, असे वाटते. वस्तुत: १९७० ते ८० या काळात मी ज्या कथा लिहिल्या त्यांतील अनेक कथांमध्ये मी विविध प्रयोग केलेले होते. अनेक कथांमधून लोकसाहित्यातील बंध वापरले आहेत. निवेदनाच्या संदर्भात प्रयोग केलेले आहेत. विशेष म्हणजे माणसाच्या अंतरंगाचा सूक्ष्म शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. पुढे माझ्या साहित्यावर ज्यांनी पीएच.डी.चे प्रबंध लिहिले, त्यांनी या गोष्टींचा उल्लेख केला आहे. परंतु प्रारंभी मात्र काही चर्चा झाली नाही. याची रुखरुख अजूनही लागलेलीच आहे.

१९८०नंतर मी अधिक जाणीवपूर्वक कथालेखन करू लागलो. विशेषत: बदललेले समाज-वास्तव आणि टिकून असलेल्या सरंजामी परंपरा यांच्या ताणातून संवेदनशील मनाची होणारी घुसमट मी अनेक कथांमधून व्यक्त केली आहे. धर्म आणि परंपरा व बदललेले राजकारण यांच्यातील ताण मुखर करण्याचाही मी प्रयत्न केला आहे. राजकारण आणि राजकारणातील स्वार्थ, साहित्यकारण यांसारख्या गोष्टीही मी माझ्या कथांमधून व्यक्त केल्या आहेत. मुख्यत: मूल्यविहीन जीवनातील विद्रूपता माझ्या पुढच्या कथांमधून व्यक्त होताना दिसते. माझी कथा दीर्घही होत गेली. मला वाटते, १९८५नंतर मराठीत दीर्घकथा अधिक मोठ्या प्रमाणात लिहिली जाऊ लागली. जी. ए. कुलकर्णी हे तर होतेच, पण इतर अनेक लेखक दीर्घकथा लिहीत होते. आनंद विनायक जातेगावकर आणि भारत सासणे अशी दोन प्रातिनिधिक नावे सांगता येतील. 'राजधानी', 'कवीची गोष्ट', 'सावित्रीचा निर्णय' आणि 'रक्त आणि पाऊस' या संग्रहांमधून माझ्या दीर्घकथा आल्या आहेत. अनुभवाचा पट मोठा असेल, तर त्यातून दीर्घकथा जन्माला येणे स्वाभाविक आहे. छोट्या आकारात मोठ्या आशयाचा प्राण कासावीस होतो. म्हणून दीर्घकथा लिहिणे आवश्यक ठरते.

माझे समीक्षालेखन अधिक गतीने चालू होते. विशेषत: ग्रामीण साहित्याची सैद्धांतिक मांडणी करणारा माझा ग्रंथ 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध' हा १९८५ला प्रकाशित झाला. त्याची चांगली चर्चा झाली. आज या ग्रंथाच्या पाच-सहा आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. पुढे क्रमाने 'साहित्याचा अन्वयार्थ' (चार आवृत्त्या), 'साहित्याचा अवकाश' आणि 'मराठी कविता : एक दृष्टिक्षेप' (चार आवृत्त्या), 'नवकथाकार शंकर पाटील' ही समीक्षेची पुस्तके प्रकाशित झाली.

१९८५मध्ये मी तीन कादंबऱ्या लिहिल्या. त्यांतील एक म्हणजे 'मध्यरात्र' (या कादंबरीची पहिली आवृत्ती 'उलट चालिला प्रवाहो' या नावाने प्रकाशित झाली). ग्रामीण भागात दलितांवर कसा बहिष्कार टाकला जातो व हा बहिष्कारही राजकारण्यांसाठी राजकारणाचा विषय कसा ठरतो, याचे चित्रण त्यात आहे. या अनुभवावरची मराठीतील ही एकमेव कादंबरी आहे. म्हटली, तर तिला दलित कादंबरी म्हणता येईल; म्हटली, तर ग्रामीण म्हणता येईल. राजकारण हा तर या कादंबरीचा प्राणच आहे. 'गांधारीचे डोळे' ही माझी दुसरी कादंबरी. हीसुद्धा मराठीतील वेगळी कादंबरी आहे. तृतीयपंथीय व्यक्ती

आमदारपदासाठी निवडणूक लढविते आणि त्यातून काय काय घडत जाते, याचे चित्रण या कादंबरीतून प्रकट होत जाते. परंतु यातील मुख्य जाणीव आहे ती एकूण भारतीय समाजाला प्राप्त झालेले पौरुषविहीन रूप प्रकट करण्याची. तसेच, भारतीय माणूस क्रमाने संवेदनाविहीन होत चाललेला आहे, याचीही जाणीव या कादंबरीतून व्यक्त होते. माझ्या दृष्टीने या दोन्ही कादंबऱ्या अनेक अर्थांनी महत्त्वाच्या आहेत. परंतु त्या दुर्लक्षित राहिल्या याची खंत आहेच. आणखी एक दुर्लक्षित राहिलेली माझी कादंबरी म्हणजे 'काळोखाचे पडघम' (पहिली आवृत्ती 'पराभव' या नावाने प्रकाशित). अर्थात या दुर्लक्षित राहिल्या, तरी काही जाणत्या वाचकांनी त्यांची नोंद घेतली आहे. या कादंबऱ्यांनी आणि कथांनी मला विलक्षण आनंद दिलेला आहे. जीवन उन्नत करणाऱ्या जीवनमूल्यांचा मी आविष्कार करू शकलो, हीच माझ्या समाधानाची मोठी बाब आहे.

समीक्षालेखनामध्ये मी काही नव्या बाबी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत:, चळवळींचे साहित्यशास्त्र मांडता येईल का, मांडल्यास ते कसे असेल, याचा शोध मी घेतला आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनेकांना साहित्य हे निरुपद्रवी असते, असे वाटते. मला तसे वाटत नाही. साहित्याचे – ललित साहित्याचे – क्षेत्रही भूमिका मांडणारेच असते, अशी माझी धारणा आहे. त्यातूनच साहित्याचे क्षेत्र म्हणजे भूमिकांची रणभूमी असते, हा विचार मी मांडला. या विचाराच्या प्रकाशात प्रबोधने आणि साहित्य, समाजकारण-सामाजिक चळवळी आणि साहित्य, राजकारण आणि साहित्य इ. बाबींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्यामध्ये लालित्याबरोबरच 'अन्वयार्थ' महत्त्वाचा असतो, असे माझे ठाम मत आहे. अशी सगळी एक वेगळी मांडणी मी माझ्या समीक्षेतून करण्याचा प्रयत्न केला आहे. या वेगळ्या मांडणीचे एक समाधान निश्चितच आहे.

साहित्यातील चळवळींचा अभ्यास करता करता माझ्या असे लक्षात आले, की महाराष्ट्रातील प्रबोधन साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय साहित्याचा नीट अन्वयार्थ लावता येणार नाही. साहित्यातील प्रवाहांचा आणि चळवळींचाही अभ्यास करता येणार नाही. त्यातूनच माझे 'जोतिपर्व' हे पुस्तक आकाराला आले. त्याच्या आता चार-पाच आवृत्त्या झाल्या आहेत. अर्थात प्रबोधन चळवळीतून निर्माण झालेल्या साहित्यासंबंधी आणखी खूप लिहिले पाहिजे, लिहावयाचे आहेच.

कुठलाही लेखक, लेखक म्हणून एकदम समाधानी होऊन जातो, असे मला वाटत नाही. शेवटच्या श्वासापर्यंत त्याला लिहावे, असेच वाटते. मलाही लिहावयाचे आहे. विशेषत: महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेबद्दल लिहावयाचे आहे, तसेच, संतसाहित्याबद्दलही लिहावयाचे आहे. कथा तर लिहावयाच्याच आहेत. एक कादंबरी लिहावयाची आहे. आतापर्यंत राहून गेलेल्या बऱ्याच गोष्टी करावयाच्या आहेत. परंतु, समाजाचे वाचन हळूहळू कमी होत आहे की काय, अशी शंका येऊ लागलेली आहे. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी एखादी कविता लिहिली, एखादी कथा लिहिली, की त्याला मोठा प्रतिसाद मिळावयाचा. कदाचित स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या समृद्धीसाठी पूर्वी वाचन ही एकमेव बाब असायची. आज व्यक्तिमत्त्वाच्या समृद्धीसाठी नाही, तर वेळ घालविण्यासाठी, करमणुकीसाठी चोवीस तास दूरदर्शन उपलब्ध आहे. या दूरदर्शनमुळे मुलांचे खेळणे संपले. त्याचे मुलांवरील परिणाम जाणवायला लागले आहेत. माणूस कमालीचा एकाकी होत चालला आहे. या एकाकीपणाला दूरदर्शन, इंटरनेट यांसारख्या गोष्टी खतपाणी घालीत आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे लोकांचा वेळ प्रवासातच जात आहे. त्यांना वाचायला वेळ तरी कुठे आहे? परंतु असा वेळ काढणे आवश्यक आहे, असे त्यांनाच काही दिवसांनी जाणवायला लागेल.

इंग्रजी शाळांचे परिणाम आज आपणांस तेवढे जाणवणार नाहीत. परंतु आणखी २५-३० वर्षांनंतर इंग्रजी माध्यमाचे फार गंभीर परिणाम भारतीय समाजावर होणार आहेत. एक तर, ही सारी मुले आपल्या संस्कृतीपासून, मुळांपासून तुटतील. शिक्षणाचे स्वाभाविक माध्यम हे कधीही मातृभाषाच असू शकते. मातृभाषेमधून विद्यार्थ्यास जेवढे चांगले समजते, तेवढे चांगले दुसऱ्या भाषेतून समजू शकत नाही. ही मुले अर्धी कच्ची राहतात. मुख्य म्हणजे माणूस नेहमी आपल्या मातृभाषेतूनच विचार करीत असतो. विचार मातृभाषेत करावयाचा व तो इंग्रजीतून व्यक्त करावयाचा, यातून ज्ञानाची उपासना होऊ शकत नाही. शालेय वयातच विद्यार्थ्याची विचारशक्ती विकसित होणे गरजेचे असते. त्यातूनच तो काही निर्मिती करू शकेल. विद्यार्थ्यांना निर्मितीशील बनविणे ही शिक्षणप्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची बाब असते. मातृभाषा हे माध्यम नसेल तर ती निर्मितिशील होणारच नाहीत. त्यांची विचारशक्ती विकसित होणारच नाही. परिणामी आपल्या देशात ज्ञानाची निर्मिती होणार नाही. फार झाले तर, 'अमेरिकन' किंवा 'ब्रिटिश' स्टाइलने इंग्रजी उच्चार करण्यात लोक धन्यता मानतील! ज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची फक्त आवक आज चालू आहे. उद्याही आपल्याकडे नुसतीच आवक होत राहील. आपण ज्ञान आणि तंत्रज्ञान बाहेर देऊ शकू किंवा नाही, याबद्दल मात्र मीतरी साशंक आहे.

आज मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्यांना एक न्यूनगंड येतो आहे. त्याला विविध कारणे आहेत. परंतु असा न्यूनगंड येणार नाही, उलट अभिमान वाटेल, अशी परिस्थिती समाजाने आणि शासनाने निर्माण केली पाहिजे. आज इंग्रजी शब्दांचे प्रमाण वाढते आहे आणि मराठी ही काही महत्त्वाची भाषा नाही, असे इथे रोज मुलांच्या मनावर बिंबवले जात आहे. अशा अवस्थेत ही मुले मराठी का बरे वाचतील? खरे म्हणजे ही मुले काहीही वाचत नाहीत. इंग्रजी साहित्य – बालवाङ्मय तरी वाचतात का? तर त्याचेही उत्तर नकारार्थीच द्यावे लागते. थोडक्यात, मराठी शाळा नष्ट होणे म्हणजे आपल्या स्वत:च्या अस्तित्वाला स्वत:च नख लावून घेणे होय.

अशा सगळ्या परिस्थितीमध्ये उद्याचे मराठी साहित्य कसे असेल, हा खरोखर अवघड प्रश्न आहे. एक मात्र खरे, की प्रत्येक पिढी आपले आपले साहित्य निर्माण करीत असते. ती तिची आंतरिक गरज असते. संस्कृतीच्या प्रारंभापासून साहित्य निर्माण होत आहे, ते आंतरिक गरजेतूनच. उद्याही ही गरज असणारच आहे. कागदी पुस्तकांच्याऐवजी संगणकावर वाचता येणारी पुस्तके असतील; पण पुस्तके असतीलच. ती प्राथमिक गरज नसली, तरी सांस्कृतिक गरज असेल. ही गरज भागविताना उद्याचा माणूस विज्ञान, तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या गुंतागुंतीतून स्वत:ची सुटका करून घेण्याची धडपड करेल. अधिक निर्मळ जगण्यासाठी तो शेवटी साहित्याच्याच आश्रयाला येईल.

*(दिवाळी २०१२)*

# प्रकाशाआडचा दिनकर

## कृ. ज. दिवेकर

'ग्रंथाली' या अभिनव वाचकचळवळीचे व 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या सामाजिक बांधिलकी जागवणाऱ्या उपक्रमाचे एक प्रवर्तक, ज्येष्ठ पत्रकार व लेखक दिनकर गांगल यांनी अलीकडेच पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त ही एक स्मरणांजली.

दिनकर गांगल अल्पकाळ एस.टी.त कामाला होते हे अनेकांना माहीत नाही. कारण तशी ती रेग्युलर नोकरी नव्हती. एस.टी.चे जे 'एस.टी. समाचार' नावाचे हाऊस मॅगेझिन होते त्याचा संपूर्ण कायापालट करून व आकर्षक स्वरूपात सादर करून अधिकारीवर्गात, कर्मचाऱ्यांमध्ये आणि एस.टी. प्रवाशांमध्ये ते लोकप्रिय करावे या हेतूने एस.टी.च्या संचालकांनी दिनकर गांगल यांना साकडे घातले. त्यांचा वृत्तपत्रांतील सखोल अनुभव व 'ग्रंथाली' या ध्येयवादी व नावीन्यपूर्ण प्रकाशनाचे एक संस्थापक, संचालक व संवर्धक या नात्याने त्यांनी केलेली भरीव कामगिरी सर्वश्रुत होती. त्यामुळे दिनकर गांगल यांनी 'एस.टी. समाचार'चे संपादक म्हणून काम पाहावे असा आग्रह धरण्यात आला. 'महाराष्ट्र टाइम्स' सोडल्यानंतर त्यावेळी गांगलांना खास अशी दुसरी असाइनमेंट नव्हती. चांगले मासिक-मानधन, सुसज्ज केबिन व मुख्य म्हणजे या विषयातील सर्वाधिकारी अशी ऑफर असल्यामुळे गांगल 'समाचार'चे संपादक म्हणून एस.टी.त रुजू झाले.

त्यांची व माझी आधीची ओळख होतीच. त्यांच्या कुर्ला स्टेशनजवळ असलेल्या नेहरूनगरमधील '३४/९०२' या घरी मी दोन-चारदा गेलो होतो. त्यांची मुलगी अपर्णा हिच्यासह ठाण्याला गांगलही आमच्या घरी येऊन गेले होते. ते 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये रविवार पुरवणीचे संपादक असताना मी त्यांच्यावर कथा व लेखांचा मारा केला होता (व त्यांनी शिताफीने त्याला अनेकदा यशस्वी बगल दिली होती!). पण ही ओळख घट्ट व नित्यनैमित्तिक नव्हती. ते एस.टी.त आल्यावर ती तशी झाली. कारण त्यावेळी मी एस.टी. महामंडळात केंद्र सरकारतर्फे निवासी लेखापरीक्षा अधिकारी (रेसिडेन्ट ऑडिट ऑफिसर) होतो. एस.टी.च्या मुखपत्राला सक्षम व वेगवान बनविण्यासाठी वेळेचे बंधन नसूनही गांगल दररोज नियमितपणे तेथे येऊ लागले. त्यामुळे कधी त्यांच्या तर कधी माझ्या केबिनमध्ये दुपारच्या लंचब्रेकच्या वेळी आमची बैठक जमायची. रेसिडेंट ऑडिट म्हणजे एस.टी.तल्या सगळ्या आतल्या गोष्टीची उकल करणारा विभाग. गांगल त्या गोष्टींत रस घेत, पण त्यांचा त्यांनी कधीही दुरुपयोग केला नाही, त्यांची कधी इतरत्र वाच्यताही केली नाही. त्यांनी 'एस.टी. समाचार'च्या संपादकपदाची ऑफर गरजेपोटी स्वीकारल्याचे ते सांगत. वृत्तपत्रे व प्रकाशनव्यवसाय यांतील कित्येक रंजक किस्से ते ऐकवीत. बरेचसे आतल्या गाठीचे व विजय तेंडुलकरांप्रमाणे स्वत: कमी बोलून दुसऱ्याला बोलते ठेवत आणि भेदक नजरेने समोरच्याचा अंतर्वेध घेण्याचा व त्याच्यातील अंतर्नाद ऐकण्याचा गांगलांचा जो स्वभाव, तो आमच्या या त्यावेळच्या दैनंदिन गप्पाटप्पांत खूपच सैल व मनमोकळा व्हायचा.

नव्या स्वरूपातील 'एस.टी. समाचार'चा पहिला अंक खूप थाटामाटात व 'पथिक' या नवीन नामकरणाने प्रसिद्ध करण्यात आला. त्याला व त्यानंतरच्या काही अंकांना एस.टी. प्रवाशांसकट सर्वांचाच उत्तम प्रतिसाद मिळाला. 'किर्लोस्कर' मासिक हेही मूळात किर्लोस्कर कारखान्यांचे हाउस जर्नल, पण ज्या खुबीने त्याचा प्रसार सातत्याने वर्धिष्णू होत राहिला तसे 'पथिक'चे झाले नाही. गांगल आपली युक्ती, बुद्धी, शक्ती वापरून खूप परिश्रमपूर्वक अंक अधिकाधिक आकर्षकपणे सादर करत होते. त्यासाठी चित्रकार कमल शेडगे या 'अक्षर-लेखका'ची व अन्य कल्पक मित्रांची, त्यांना योग्य ते मानधन देऊन ते मदत घेत. त्यामुळे अर्थातच जास्त व्यय होणे अपरिहार्यच होते. सुरुवातीला अशा वाढीव खर्चाला मंजुरी सहजपणे मिळाली. पण पुढेपुढे हात आखडता घेतला जाऊ लागला. गांगलांना नवनव्या कल्पना प्रत्यक्षात आणणे जड जाऊ लागले. काही नव्याने पुश-अप करायचे तर थोडा काळ जावा लागतो, नफा-नुकसानीची गणिते बाजूला ठेवावी लागतात. पण झापडबंद सरकारी महामंडळांना तेवढा पोच नसतो व धीरही धरता येत नाही. त्यामुळे जेमतेम वर्षभर गांगल एस.टी.त राहिले व मग नाउमेद होऊन बाहेर पडले, एस.टी.तील सेवाकार्याला त्यांनी कायमचा ब्रेक लावला. 'एस.टी. समाचार'चे आधीचे संपादक व जनसंपर्क अधिकारी शशिकांत गुप्ते यांनी आखून दिलेल्या पठडीप्रमाणे व त्यांच्याच नेतृत्वाखाली नंतर 'पथिक' याच नावाने एस.टी.चे हाऊस मॅगेझिन पूर्ववत प्रसिद्ध होत राहिले. गांगल पुन्हा तिकडे फिरकले नाहीत.

गांगलांच्या व माझ्या भेटीगाठी, ज्या 'पथिक'च्या

आधीपासूनच सुरू होत्या, त्या नंतरही चालूच राहिल्या. बिल्डर-कॉन्ट्रॅक्टर, मालक व भाडेकरू या त्रिकोणातील ताणतणावांचा आलेख काढलेली 'एक बंगला बने न्यारा' ही माझी कादंबरी व आधी चौर्यकर्म करणाऱ्या पण नंतर पूर्ण सुधारलेल्या सहृदयी अशोक व्यासचे मी हिंदीतून अनुवादित व संपादित केलेले 'तिळा उघड' हे आत्मकथन अशी दोन पुस्तके मी 'ग्रंथाली'कडे १९९१मध्ये प्रकाशनार्थ दिली. त्या आधी १९६० पासून कादंबऱ्या व कथासंग्रह मिळून माझी १७ पुस्तके प्रसिद्ध झाली होती. पण म्हणून त्याला महत्त्व न देता गांगलांनी वरील दोन्ही पुस्तकांचा स्वतंत्रपणे विचार केला आणि 'तिळा उघड' व 'एक बंगला बने न्यारा' ही पुस्तके अनुक्रमे सप्टेंबर १९९१ व जानेवारी १९९२ मध्ये 'ग्रंथाली'च्या दर्जाला साजेल अशा प्रकारे प्रसिद्ध केली व त्यांचे वितरणही चांगले झाले. 'एक बंगला बने न्यारा' कादंबरीचे मुखपृष्ठ अपर्णा गांगल यांनी मॉडर्न पण सूचक असे केले होते. या पुस्तकाला ९२-९३चा उत्कृष्ट कादंबरीचा राज्यशासन पुरस्कारही मिळाला. या दोन पुस्तकांच्या संदर्भात माझी गांगलांशी वेळोवेळी जी चर्चा झाली ती माझ्यासाठी अत्यंत मार्गदर्शक व मौलिक ठरली. मी काही वेगळे व विशेष लिहिले तर आधी गांगलांना दाखवायचे, असे मग ठरूनच गेले.

गांगलांचा विशेष म्हणजे क्वचित कधी 'राजकारण' केले तरी एरवी ते कमालीचे प्रांजळ आहेत. कोणाला दुखवायचे नाहीत, पण रास्त मार्ग सोडून वाकड्या वाटेने कदापि जायचे नाही हे त्यांचे 'स्वाभाविक' व्रत आहे. उपेक्षित अशा दलित लेखकांचे तर गांगल हे तारणहार ठरले. दया पवारांच्या 'बलुतं'चे हस्तलिखित त्यांनी पुन्हा पुन्हा वाचून, त्यावर संस्कार केले व त्याचे पुनर्लेखन करून घेतले. त्यामुळे मराठीला आद्य दलित लेखक लाभला. 'उपरा', 'आयदान', 'उद्ध्वस्त क्षितिज,' 'कोल्हाट्याचे पोर' आणि इतरही अनेक उपेक्षित विषयांवरची पुस्तके 'ग्रंथाली'च्या गांगलांचीच साहाय्यकारी निर्मिती.

पारंपरिक प्रकाशन व्यवसायाला छेद देऊन, जास्तीत जास्त पुस्तके, जास्तीत जास्त लोकांपर्यंत, जास्तीत जास्त गाजावाजा करून पोहोचविण्याची तळमळ, जिद्द आणि व्यावसायिक दृष्टी गांगलांनी दाखविली. सामाजिक जाणीव साहित्यामधून व्यक्त व्हावी, संपूर्णपणे नवे आणि विदारक अनुभव नवोदितांच्या लेखणीतून धीटपणे व थेट बाहेर यावेत, लेखन ही कुणा एका वर्गाची मक्तेदारी राहू नये, यासाठी झुंबड उडवून देऊन 'ग्रंथमोहोळ' नव्या तसेच वेगळ्या वाटेवर नेण्याचे काम त्यांनी केले आणि मानवी जीवनाचा आजपावेतो लपलेला खरा चेहरा पुस्तकांच्या माध्यमातून मराठी साहित्याला दिला.

प्रत्येक माणसांच्या अंतरंगात असणारी ऊर्मी प्रत्यक्षात फार वेगळे सांगत असते. गुळगुळीत शब्दांच्या पलीकडील अनुभव अनेकदा बोलीभाषेतूनच प्रकट होतात. ती भाषा ऐकायला ठीक वाटते, पण लिखित वाङ्मयात अस्पृश्य ठरविली जाते. गांगलांनी मोठ्या हिमतीने जीवनाचा वास्तव अर्थ दाखविणारे हे साहित्य 'ग्रंथाली'च्या माध्यमातून वाचकांपर्यंत आणले व त्यातूनच गांगलांमधील अभिजात, संवेदनशील संपादकाची ओळख मराठी प्रकाशनाला झाली. अनेकांना लिहिते करणाऱ्या आणि लिहिणाऱ्यांना संधी देणाऱ्या गांगलांना नवोदितांचे खरे आधारस्तंभ आणि मार्गदर्शक म्हटले जाते ते योग्यच होय. प्रगल्भ मनाचा, कायम माणसांच्या गराड्यात राहणारा, उत्साही, साहित्यप्रेमी आणि उत्तम संघटनकौशल्य असणारा वाङ्मयीन संपादक दिनकर हरी गांगल ही त्यांची खरी ओळख.

एकूणच ग्रंथप्रसार चळवळीसाठी गांगलांनी जितके रक्त आटवले, जितके केले तितके फार थोड्यांनी केले असावे. तेवढा वेळ व परिश्रम त्यांनी स्वत: ग्रंथलेखन करण्यात खर्ची घातले असते, तर मराठी लेखकांच्या पहिल्या श्रेणीत त्यांचे नाव निश्चित नोंदले गेले असते. पण असंख्यांना मदत करून स्वत: मागे राहण्याची, नामानिराळे राहण्याची भूमिका त्यांनी सतत निभावली व त्यामुळे स्वत: 'दिनकर' असूनही 'प्रकाशाआड राहणारे गांगल' अशीच त्यांची ओळख मराठी वाचकांना आहे.

त्यांनी वयाची सत्तर वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने '७० गांगल, ३५ ग्रंथाली' या अभिनव नावाने त्यांच्यावरील गौरवग्रंथ प्रसिद्ध झाला, ज्यात त्यांच्या स्नेह्यांनी, परिचितांनी गांगलांच्या साहित्यसंवर्धन कार्याविषयी भरभरून लिहिले आहे. मात्र त्यात जवळच्या नव्हेच पण दूरच्या नातलगांपैकीही एकाचाही लेख नाही. पुस्तकाच्या नावात 'ग्रंथाली'हून दुप्पट 'गांगल' असूनही स्वत: त्यांच्यासंबंधीची व्यक्तिगत माहितीही पुस्तकात कमालीची जुजबी आहे. त्यांची २५ नोव्हेंबर १९३९ ही जन्मतारीख, तसेच 'नाना' म्हणून ओळखले जाणाऱ्या त्यांच्या वडिलांचे नाव 'हरी' होते, हेही कोठे आले नाही. मातोश्री व भावंडांबद्दलचा उल्लेख तर दूरच!

त्याशिवाय त्या ग्रंथात मुख्य कमतरता जाणवली, ती म्हणजे ज्या दलित साहित्याला गांगलांनी अमर्याद योगदान दिले, आणि त्यातून जे दलित लेखक पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठा व मानसन्मानांचे धनी झाले, त्यांनी गांगलांचे त्यांच्यावरील ऋण मानल्याचे, व्यक्त केल्याचे दिसत नाही. या गौरवग्रंथात त्यांच्यापैकी क्वचित अपवाद वगळता कोणीही लिहिले नाही. एकूणच कृतज्ञतेचा अभाव, जो आजकाल सर्वत्र आढळतो तो, गांगलांच्याही वाट्याला यावा यात नवल कसले?

पण एक चांगले झाले. पैसा, प्रसिद्धी व प्रतिष्ठा यांपासून सतत दूर पळणाऱ्या गांगलांचा मागोवा घेत एकाहून एक श्रेष्ठ पुरस्कार व सत्कार बऱ्याच उशिराने का होईनात पण त्यांच्याकडे आपण होऊन चालत आले. त्यावरून गांगलांच्या कार्यकर्तृत्वाची जाण व भान महाराष्ट्राला आहे याचे समाधान वाटते. 'तो' दिनकर जसा कायमचा कधी मावळत नाही, तसेच 'या' दिनकराचे वाङ्मयीन योगदान कधीच अस्त पावणार नाही. त्यांचा ग्रंथरूप जीवनप्रवास शतकोत्तरही निर्वेधपणे चालू राहावा या शुभेच्छा!

*(फेब्रुवारी २०१४)*

# ‘माणूस’मागचा माणूस : श्री. ग. माजगावकर

## विनय हर्डीकर

१९६१ ते १९८६ अशी साधारण पंचवीस वर्षे चोखंदळ मराठी वाचकांना ‘माणूस’ने विपुल खाद्य पुरवले. टीव्ही आणि मोबाइलपूर्वीच्या त्या कालखंडात वाचकांची मोठी गरज उत्तम प्रकारे भागवली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या पाव शतकातील बहुतेक सर्वच महत्त्वाच्या राजकीय व सामाजिक घडामोडींचे प्रतिबिंब ‘माणूस’मध्ये उमटत होते. ‘माणूस’चे शिल्पकार श्री. ग. माजगावकर यांचा २० फेब्रुवारी हा स्मृतिदिन. त्यानिमित्त –

- १ -

प्रिय माजगावकर,

कित्येक वर्षांत आपली भेट नाही, गप्पा नाहीत, वादविवाद नाहीत; एकमेकांना नव्या कल्पना ऐकवणं नाही, नवे उपक्रम हातात घेणं नाही; आसपासच्या राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक घडामोडींवर (‘मोडी’च जास्त) चर्चा करणं नाही, संध्याकाळी ५॥ ते ७ या वेळात फिरायला जाणं नाही; तुमच्याबरोबर (अर्धा) साधा डोसा खाणं आणि (अर्धाच) चहा पिणं नाही, ‘गड्या, तुला एक सांगतो’ किंवा ‘गड्या, तुझं एक बरं आहे’ हे शब्द कानावर पडून आनंद होणंही नाही.

तशी तुमची-माझी शेवटची भेट काही फार उत्कट झाली नव्हती. राजेंद्रनगरमधल्या तुमच्या घरी आलो होतो – तुम्ही कॉटवर पडून होता. आधी फोन करून आलो होतो तरी तुमचा काही गप्पा मारायचा – निदान ऐकायचा – मूड दिसेना; काही वेळानंतर तर तुम्ही स्पष्टच सांगितलंत, ‘आता मला अस्वस्थ वाटायला लागलंय, त्रास होतोय; तू आता जा!’ तोपर्यंत आपल्या मैत्रीला वीस वर्षे उलटून गेली होती. मात्र अर्ध्या भेटीतून तुम्ही मला कधीच असं काढून लावलं नव्हतं. कधी तुम्हांला दुसरीकडे जायचं असेल किंवा आधी ठरवून तुमच्याकडे कोणी येणार असेल तर गप्पा आवरत्या घ्याव्या लागल्या तरी ‘आता इथे थांबू या, दोनचार दिवसांनी तू पुन्हा ये’ अशी तहकुबी केली जायची; ‘तू जा’ हे शब्द मी पहिल्यांदाच ऐकत होतो. अंथरुणाला खिळलेल्या मित्रावर राग धरू नये हे सभ्य तत्त्वही मी विसरून गेलो इतका तो धक्का मोठा होता. वैतागून मी तुमच्या घरातून बाहेर पडलो ते पुन्हा न यायचं ठरवूनच! अर्थात ते काही जमणार नव्हतंच. ऑक्टोबर १९९६ मध्ये तुम्हांला नाशिकला वनशेतीविषयीचा सन्मान मिळाला तेव्हा पुण्याहून गेलेल्या १५-२० जणांत मी होतोच. तो सगळा दिवस आमच्या ‘ग्रामायन’ ग्रुपच्या गाडीमध्ये हास्यविनोदाची कारंजी उडत होती. तुम्ही त्या गाडीत नव्हता पण ‘ग्रामायन’च्या गप्पांत तुम्ही नसणं अशक्यच होतं. त्या कार्यक्रमात तुम्हांला शेवटचं सार्वजनिक भूमिकेत पाहिलं – शरदराव पवारांनी तुमच्या आणीबाणीमधल्या निर्भयतेचा उल्लेख केलेला ऐकला आणि खूप बरं वाटलं! जुना राग मावळला आणि पुन्हा तुम्हांला भेटायचं ठरवलं.

काही दिवस ‘आज जाऊ – उद्या जाऊ’ करण्यात जातातच! मात्र तुमच्या आजारपणाच्या शेवटच्या टप्प्यात ‘माजगावकर/श्रीभाऊ स्वत: फार त्रास करून घेताहेत आणि त्याचा इतरांनाही फार त्रास होतो आहे’ हे कानावर आलं होतं; म्हणूनही तुम्हांला भेटायचं, थोडी समजूत घालायची, थोडं मैत्रीच्या हक्काने रागवायचं; पार्किन्सनच्या पेशंटने स्वत:ला न्यूनगंड येऊ देऊ नये असा सल्ला द्यायचा असं ठरवत होतो. तुमचे-माझे मित्र विद्याधर पुंडलिक यांनाही असा सल्ला दिला होता आणि तो वायाच गेला होता, तरीही! पण मला ती संधी तुम्ही दिलीच नाहीत. तुमची-माझी भेट २० फेब्रुवारी १९९७ ला वैकुंठ स्मशानभूमीतच झाली. तुम्ही त्या दिवशी ‘तू जा’ म्हटल्यानंतर तुमच्याशी नंतर कधी बोलता आलंच नाही!

माजगावकर, तरीही तुम्ही माझ्या आयुष्यातून गेला नाहीतच. प्रत्यक्ष भेटी गेल्या १७ वर्षांत झाल्या नाहीत एवढंच. माझ्या सामाजिक-राजकीय अनुभवांवर मी लिहितो-बोलतो तेव्हा तुमचं नाव पूर्वीच्या मिरज जंक्शनसारखं घ्यावंच लागतं; जिथे ब्रॉडगेज, मीटरगेज आणि नॅरोगेज असे तिन्ही रेल्वेमार्ग होते. पत्रकारिता, ग्रामविकसन आणि नवीन राष्ट्रवादाची मांडणी हीच आपली तीन गेजेस होती ना! मात्र वरचा क्रम उलटा करून आपण त्यावरून धावत होतो; आणि केवळ एवढंच नाही – ‘कारुण्योपनिषद’ हे माझं मर्ढेकरांच्या कवितेवरचं पुस्तक आलं तेव्हाही तुमचा उल्लेख अपरिहार्य होता; कारण ज्या ‘मर्ढेकरांच्या शोधात’ या लेखापासून ते पुस्तक सुरू झालं तो ‘माणूस’च्या १९७८ च्या दिवाळी अंकात आला होता. एवढंच नव्हे, सतीश (कामत) बरोबर तुम्ही स्वत: अंक आणि १०० रु. (अबब!) मानधनाचं पाकीट घेऊन माझ्याकडे आला होता. ‘गड्या, हा लेख जमला आहे!’ – हे तर तुम्ही छापायच्या आधीच सांगितलं होतं. ‘सुमारांची सद्दी’ नावाचा माझा लेख २००३ मध्ये ‘कालनिर्णय’ दिवाळी अंकात आला तो केवळ ‘माणूस’ आणि तुम्ही दोघेही नव्हता म्हणूनच. माजगावकर, १२ वर्षे झाली तरी त्या लेखाची मिरास आणि मिजास कायम

आहे. अजूनही कोणीतरी कळवतं, 'त्या लेखाच्या प्रती काढून आम्ही पाचपन्नास जणांना वाटल्या!' पण त्याचं खरं कौतुक तुम्हीच केलं असतं – मूल्यमापनही! 'जनांचा प्रवाहो'नंतर माझी तीन पुस्तकं आली, त्यांचंही तसंच स्वागत झालं, पण तुम्ही नव्हता ही रुखरुख असतेच. 'निवडक श्री. म. माटे' या माझ्या संपादनाचं मोलही तुम्हीच जाणलं असतं – माझी प्रस्तावना वाचून दाद दिली असती आणि अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले तेव्हा तर आपण (तुमच्या माफक पद्धतीने) सेलिब्रेट नक्की केलं असतं.

आणि एवढंच नाही – अण्णा हजारे फेनॉमेननचा तुम्ही इतरांच्यापेक्षा वेगळा परामर्श घेतला असता – तुम्ही त्यांना संतपदावर विराजमान केलं नसतं! सध्याच्या उन्मादी भाजपला तुम्ही काँग्रेसविरोध आणि काँग्रेसद्वेष यांतली फारकत-रेषा दाखवली असती; कारण १९७७ मध्ये जनता पक्षाचा असाच उन्मादी मूड असताना 'इंदिरा गांधींचं witch-hunting करू नका', असं तुम्ही मांडत होता, आम्हा सगळ्यांची नाराजी पत्करून! आम आदमी पार्टीची 'सॉलोमन ग्रंडी'च्या बालगीतासारखी अचानक सुरू झालेली आणि 'अतिघाई संकटात जाई' या (ट्रकवाल्यांच्या) सुभाषिताप्रमाणे सुरुवातीतच संपलेली घिसाडघाई नीट समजून सांगण्याचं कामही तुम्हाला जमलं असतं. गेल्या वीस वर्षांत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं लाजिरवाणं दुष्टचक्र थांबण्याची चिन्हं दिसत नाहीत आणि एखादा पी. साइनाथसारखा अपवाद वगळता पत्रकार-बुद्धिजीवी वर्गाला त्याची काही खंत/खेद वाटत नाही. तुम्ही काही वेगळं भाष्य केलं असतं, कारण भूदान चळवळीपासून ते आमच्या शेतकरी संघटनेपर्यंतच्या सर्व घडामोडी तुम्ही स्वतःचं आद्य कर्तव्य असल्यासारख्या स्वतः प्रवास-अभ्यास करून समजून घेतल्या होत्या आणि शेतीमधल्या आधुनिक प्रयोगांचं – पाणीपंचायत, म्हैसाळची दलित सहकारी शेती, निफाडची वनशेती – स्वागतही केलं होतं. ही यादी वाढवत नाही कारण स्वतःचं कौतुक ऐकून घेण्याचा 'सुसंस्कृतपणा' तुमच्यामध्ये कधीच नव्हता!

तुम्ही गेल्यानंतर पहिल्या स्मृतिदिनी 'निवडक माणूस'चं प्रकाशन करण्याचं ठरलं; त्या संपादक मंडळात पहिलं नाव माझं असणं क्रमप्राप्तच होतं. त्या 'सांस्कृतिक दस्तावेजा'मध्ये तुमच्या काही संपादकीय लेखांची निवड मी केली आणि त्याला छोटी टिपणवजा प्रस्तावना लिहिली तीही आपली एक भेट म्हणता येईल. नॅरो, मीटर आणि ब्रॉड या तिन्ही गेजीसवरच्या तुमच्या वाटचालीची अगदी त्रोटक नोंद त्या टिपणात करताना मी तुमच्या प्रवासाचा शेवट संघपरिवार या स्वगृहाकडे परतण्यात झाला व ते अपरिहार्यच होतं अशी उदास टिपणीही केली होती. त्या मांडणीला कोणी फारशी हरकत घेतली नाही. कदाचित ते टिपण फारसं वाचलं गेलंच नसावं; कारण तुमचं बहुआयामी व्यक्तित्व आणि आयुष्य, संपादक म्हणून केलेली कामगिरी, 'माणूस' नावाची सांस्कृतिक श्रीमंती, नवीन विषय आणि तो पेलू शकणारा लेखक शोधण्यातला तुमचा निष्णातपणा यांच्या नोंदींनी ते पुस्तक खचाखच भरलं आहे; ते अपेक्षितच होतं. मात्र कुमार केतकरची प्रस्तावना, स.हं.नी घेतलेली तुमच्या वैचारिक परिभ्रमणाची दखल, यशवंत सुमंतने तुमच्या राजकीय विचारधारेला दिलेलं 'व्यावहारिक हिंदुत्ववाद' हे नाव इकडे फार लक्ष गेलेलं नाही. तुम्ही तसं केलं नसतं – आमच्या प्रत्येकाच्या अभिप्रायावर तुम्ही चर्चा केली असती. कदाचित स.ह. आणि तुम्ही या क्षणी तेच करत असाल, कारण स.हं.नी तो ग्रंथ वाचला होता!

गेल्या मे महिन्यातली घटना आहे. मुंबईला रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये वैचारिक नियतकालिकांवर एक चर्चासत्र झालं; त्यात 'माणूस साप्ताहिकाचे दिवस' असा एक विषय दिला होता. अरुण साधू, वीणा गवाणकर, मी अशांनी बोलायचं होतं. सतीश कामत सूत्रसंचालन करणार होता. काही कारणानं सतीश येऊ शकला नाही. साधू आणि गवाणकर दोघेही लेखणीचे जबरे पण भाषणात मितभाषी. मला बऱ्यापैकी वेळ मिळाला. एरवी 'नोस्टॅल्जिया'ला व्याधी-विकृती समजणारा मी 'माणूस'च्या दिवसांबद्दल बोलता बोलता त्या सत्तरच्या दशकात जाऊन पोचलो. सगळ्या आठवणी केवळ जाग्या झाल्या नाहीत, ती चित्रं दिसायला लागली. तुमचं ऑफिस, तिथला ओकाबोका वाटणारा साधेपणा, ते दोन हतोत्साह वाटायला लावणारे कारकून, मोजकी कपाटं, टेबलं-खुर्च्या, मजकूर वाचताना बदलत जाणारा तुमचा चेहरा, मधेच फोन आला तर कमीत कमी शब्दांत कॉल संपवण्याची शिस्त, कलती मान करून समोरच्याकडे पाहण्याची स्टाइल, चष्मा काढल्यावर दुप्पट मोठे दिसणारे डोळे, पँट-हाफ मॅनिला, थंडी असल्यास हाफ जॅकेट असा नीटनेटका पेहराव आणि काही वेगळं चमकदार ऐकल्या/वाचल्यावर खुलणारी कळी! मी बोलत गेलो. ऐकणारे माझ्याबरोबर त्या काळात पोचले होते हे जाणवत होतं. खरं म्हणजे मी कठोर/परखड बोलायचं, तुमच्या मर्यादा स्पष्टपणे मांडायच्या असं ठरवून गेलो होतो. ते सगळं मी बोललोही पण शब्द कठोर नव्हते, तुमच्या मर्यादा माझ्याही आहेत अशी भावनाही डोकावत होती. शेवटी मी म्हणालो, 'पुन्हा 'माणूस' सुरू झालं आणि 'माणूस प्रतिनिधी' ठिकठिकाणी जायला लागले तर त्यात मी नक्की असेन.'

असं बोललो आणि मलाच फार बरं वाटलं. कदाचित मी आता अस्तित्वात नसलेल्या 'स्वगृही' पोचलो होतो का? पुण्याला परत आल्यावर मी सरळ दिलीपरावांना 'राजहंस प्रकाशन'च्या ऑफिसात भेटलो आणि माझ्या तीन संकल्पित पुस्तकांची माहिती त्यांना दिली; त्यातलं एक त्यांनी स्वीकारावं असा प्रस्तावही मांडला. तो त्यांनी स्वीकारल्यावर पुन्हा एकदा खूप बरं आणि मोकळं वाटलं!

डिसेंबर २०१४मध्ये वंदना आणि सतीश (जकातदार) भेटायला आले; 'श्रीगमा आणि त्यांचा काळ' या विषयावर पुस्तक तयार करण्याची कल्पना घेऊन. या पुस्तकामध्ये तुमच्या काही समकालीन संपादकांच्या कामगिरी(?)चा वेध घेऊन तुमचं वेगळेपण मांडावं अशी त्यांची योजना दिसली. मी एवढंच म्हणालो, 'इतरांना मोठं ठरवण्यासाठी माजगावकरांना खर्ची घालू नका, मात्र श्रीगमांवरती स्वतंत्र पुस्तक – कदाचित त्यांचं चरित्र – करता येईल; नव्हे करावंच!' हे पुस्तक तयार करताना पुन्हा आपण वारंवार भेटणारच आहोत. त्यासाठीच मी त्यात असणार आहे.

मग आज हे पत्र कशासाठी? तुम्ही विसरला असाल पण आपल्या मैत्रीची सुरुवातच माझ्या एका पत्रापासून झाली. १९७५ मध्ये आणीबाणी जारी होऊन सेन्सॉरशिप लागू असताना 'माणूस'मध्ये अनिल बर्वेंची 'थँक्यू मिस्टर ग्लाड' ही लघुकादंबरी तुम्ही दोन भागांत दिली होती. त्या धाडसाचं आणि त्या कथेचं बेभान स्वागत करणारं पत्र मी 'माणूस'कडे पाठवलं होतं. त्या अंकाच्या कव्हरपेजच्या पाठीमागच्या पानावर – जिथे बहुधा तुमचं संपादकीय टिपण असायचं – तुम्ही ते संपूर्ण पत्र छापलं होतं. पुढच्या वीस-बावीस वर्षांच्या संवादाची ती नांदी होती.

मात्र ते पत्र लिहायला मला कित्येक वर्षे लागली होती!

– २ –

१९६१मध्ये तुम्ही 'माणूस' मासिक सुरू केलंत तेव्हा मी आठवीमध्ये होतो. आमच्या घरी मासिकाची वर्गणी भरण्याइतकी आर्थिक ताकद नव्हतीच तरीपण *किर्लोस्कर, स्त्री, मार्मिक, कुमार* ही नियतकालिके आसपासच्या कमीअधिक ओळखीच्या घरांतून आणून वाचत होतो. मासिकाचं नाव 'माणूस' असण्यातला ठोस अर्थ कळण्याचं ते वय नव्हतंच पण काही अंक पाहिले होते. आमच्या मराठीच्या पुस्तकात 'स्मृतिचित्रे'मधला बालकवींनी लक्ष्मीबाईंना 'माणूस' (शब्द) काढून दाखवला तो गमतीचा उतारा होता. 'माणूस' या गाजलेल्या सिनेमातलं 'कशाला उद्याची बात' गाणं आईच्या तोंडी होतं. त्या शब्दाशी याच दोन आठवणी जोडल्या असताना त्या नावाचं मासिकही असण्यात अपूर्वाईही होती. 'सांगत्ये ऐका' एका दिवाळी अंकात आल्यावर आम्ही कोल्हापूरचे असल्यामुळे आपल्या घरातल्या, ओळखीतल्या काही 'रसिक' मंडळींची नावं तर त्याच्यात आलेली नाहीत ना, अशी चर्चाही झाली होती. मात्र मी माणूसशी जोडला गेलो ते डेमी आकाराच्या अंकातून 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' येऊ लागल्यानंतर! सीरियल रहस्यकथेच्या पुढच्या भागाची जशी उत्कंठा वाटते, तसं ते 'रा. म. शास्त्री' या गूढ नावाने येणारं रूपांतर आमच्यासमोर दुर्बल राष्ट्र बलवान कसं करता येतं त्याची हकीकत जिवंत करत होतं. त्याच काळात संघातही जात असल्यामुळे हिटलरबद्दल ओढही होतीच. मी मन लावून हिटलरच्या उदयाची कहाणीच वाचली होती – पाडावाचा वृत्तांत धावता वाचला होता! त्या पाठोपाठ अरुण साधूंची 'आणि ड्रॅगन जागा झाला' ही लेखमाला आली आणि मी माणूसचा नियमित वाचक झालो. 'फिडेल, चे आणि क्रांती', वसंत पोतदारांच्या 'अग्निपुत्र'ची प्रकरणं वाचल्यावर थरारून जायला झालं होतं. माओ, फिडेल, चे यांच्या तर प्रेमातच पडलो होतो – हिटलर हळूहळू विसरतही होतो.

मासिक-पाक्षिक-साप्ताहिक असा 'माणूस'चा विकास ४/५ वर्षांतच अतिशय वेगाने झाला. त्यातच डेमी आकारातले अंक अतिशय देखणे असायचे. रोज लोकलने अपडाऊन करणाऱ्या मुंबईच्या वाचकांसाठी तो आकार स्वीकारला होता. योगायोगानं त्या आकारामुळे नासाडी होणार नाही अशा कागदाचा मोठा साठाही उपलब्ध होता, ही माहिती तुम्हीच नंतर सांगितली होती. डेमी पुस्तकाच्या आकारामुळे साप्ताहिकसुद्धा छोट्या पुस्तिकेसारखंच वाटायचं, टाकून देववत नसे. काही अंक फुटपाथवरच्या रद्दीत आले तरी तिथेही त्यांचा दिमाख वेगळाच असे. सुटसुटीत आकार, 'संगम'ची सुबक छपाई, विषयांची वेगळी निवड, वाचनीय मजकूर, परिणामकारक सदरे प्रत्येक अंकाला वेगळी ओळख बहाल करीत होती. सगळ्या विचारसरणींचे लेखक 'माणूस'मध्ये होते – जरी *साधना, विवेक, सोबत, मार्मिक* अशी त्या त्या विचारांची साप्ताहिकं होती तरी. अगदी नवख्या युवकांपासून ते अनुभवी वृद्धांपर्यंत सगळ्या वयांचे लेखक हा आणखी एक विशेष. त्यांतले काही जण आधीच नाव कमावून होते, काही नंतर नावारूपाला आले, काही 'माणूस'मध्ये थोडे दिवस दिसले आणि नंतर गायब झाले. ललित लेखन, विचारक-अभ्यासक-विश्लेषक-निरीक्षक, लिहू शकणारे राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, लिहू न शकणाऱ्या पण निरनिराळ्या चळवळींचं नेतृत्व करणाऱ्यांच्या खटाटोपावर वस्तुनिष्ठपणा कायम ठेवून पकड घेणारं लेखन करू शकणारे वृत्तांतलेखक – नुसती 'निवडक माणूस'ची अनुक्रमणिका पाहिली तरी हे सगळे प्रकार दिसतात; प्रत्यक्ष संख्या अजून खूपच मोठी होती.

टायटल पेजवर नावांची गर्दी नाही; ब्रीदवाक्य, घोषणावजा वाक्य नाही. संपादकीयाचा आकार बेताचा, अग्रलेखाचा बडेजाव नाही. त्यात कुणाची 'काढणे' किंवा कुणाची 'उडवणे' ही मराठी संपादकांच्या हाडीमासी खिळलेली चापलुसी नाही. संपादकीयाखाली लफ्फेदार सही नाही – फक्त 'श्री.ग.मा.' अशी तीन अक्षरे. 'माणूस' प्रतिनिधी म्हणून तुम्ही स्वतः काही लिहिलं असेल तरच तुमचा मोठा लेख अंकात असे. वाचकांची पत्रेदेखील मूळ अंकातल्या मजकुराची वैचारिक चर्चा काही पुढे नेण्याची गरज भासली तरच. एकूणच 'मेरी आवाज सुनो' या स्वभावाचे संपादक आसपास कंठाळी आवाजात 'आम्ही बजावून सांगतो' असा फुकट राणा भीमदेवी किंवा 'आमचा नम्र सल्ला आहे' असा कुचकट छद्मी रतीब घालत असताना 'माणूस' वेगळा आणि ताजा ठरला नसता तरच नवल! 'अकरा कोटी गॅलन पाणी' ही लेखमाला आली आणि त्यावेळी कॉलेजच्या मासिकात थोडेफार लिहिलेल्या मला 'माणूस'मध्ये आपलाही लेख आला आहे असं स्वप्न पडायला लागलं, कारण अनिल बर्वे माझ्याच बरोबरीचा हे मला माहीत होतं!

'माणूस'चा खप 'जनता' अंकानंतर पंधरा हजारच्या घरात पोचलेला. भव्य मळेकरवाड्यात तुमचं ऑफिस. गर्दीचं तुम्हांला कायमच वावडं. त्यामुळे कुठेही पॉप्युलर व्यासपीठावर तुमची हजेरी नाही, स्वतःची भ्रमंती चालू असल्यामुळे ऑफिसात गप्पा मारायची सवड नाही. एकदोन वेळा तुम्हांला लांबून पाहिलं तर भव्य व्यक्तिमत्त्व वगैरे काही नाही. एकदोन किरकोळ लेख पाठवले होते, त्यांचा स्वीकार सोडा, साधी पोचदेखील आली नव्हती. आता तुमच्यापर्यंत पोचायचं कसं आणि माझं लेखन 'माणूस'मध्ये यायचं कसं! ओळखीच्या लेखकांचं तुम्ही छापताच असं नाही तर लेखन पसंत पडलं, तुम्हांला हलवून गेलं तर त्या लेखकाची ओळख स्वतः करून घेता, हे तेव्हा माहीत नव्हतं.

आणखीही एक अडथळा नव्हे पण अडचण होती. मीही तुमच्याप्रमाणे शालेय शिक्षण संपवून पुण्यात आलो होतो. मात्र

पुण्याच्या संघवर्तुळाशी माझा काही धागा नव्हता; मी ज्ञानप्रबोधिनीमध्ये रमलो होतो. मळेकरवाडा आणि प्रबोधिनी एकमेकांपासून फार तर दोन हाकांच्या अंतरावर – पण आप्पा पेंडसे आणि 'माणूस'कार यांच्यातलं अंतर कित्येक लाइट वर्षांचं! आप्पांना आधुनिक विवेकानंदप्रणीत हिंदुत्वाचा concentrated डोस निवडक बुद्धिवंतांना द्यायचा होता तर श्रीगमांना हिंदुत्वाचं ब्राह्मणी, शहरी, अभिजनवादी, विषमतेला मान्यता देणारं स्वरूप बदलून त्याला पूर्णपणे बहुजनवादी ग्रामीण चेहरा द्यायचा होता. एवढंच नव्हे तर सामर्थ्याच्या मागे धावण्यापेक्षा सेवाकार्याला महत्त्व देणारं हिंदुत्व त्यांना अभिप्रेत होतं. मग हे दोघे एकाच बिंदूपासून निघाले तरी एकमेकाला भेटणार कसे! म्हणजे मी एकाचा उल्लेख दुसऱ्याकडे करू शकणार नव्हतो.

१९६९च्या जानेवारी-फेब्रुवारीमध्ये तुम्ही 'श्रीकैलास ते सिंधुसागर' असं 'अन्न स्वतंत्रता संचलन' केलंत. अजून संघाची भाषा तुमच्या तोंडी होती. 'वेरूळ ते मुंबई पदयात्रा' असे साधे शब्द तुम्हांला सुचले असतीलच पण रुचले नव्हते? या पदयात्रेनंतर दि. बा. मोकाशींनी 'अठरा लक्ष पावलं' हे पुस्तक लिहिलं आणि तुमच्यापर्यंत पोहोचणं चांगलंच अवघड असणार, याची खात्री पटली. ती पदयात्रा करत असताना तुम्ही अधूनमधून 'माणूस'मध्ये वार्तापत्रवजा मजकूर पाठवत होता. त्यातला काही मी वाचलाही होता. पण मोकाशींनी मिष्किल तटस्थपणे तुमच्या स्वभावाचं अवघड गणित अत्यंत मार्मिकपणे मांडलं होतं. तुमचा सततचा अस्वस्थ स्वभाव, काहीसा लहरीपणा, सहकाऱ्यांशी संवाद करण्यात सातत्य नसणं, अचानक एखादी भूमिका जाहीर करून सगळ्यांना गोंधळात पाडणं – एका गावी फारच घाण दिसली होती, तिथे 'चला सगळे मिळून गाव झाडून स्वच्छ करू या' असं तुम्हांला म्हणता आलं असतं पण तुम्ही कल्पना मांडलीत ती 'आम्ही पदयात्रावाले गावातली सगळी विष्ठा गोळा करून तिचा लिलाव करणार आहोत' अशी! पदयात्रा चालू असताना मध्येच 'आता श्रीगमा/श्रीभाऊ राजकीय पक्षाची घोषणा करणार' या अफवेमुळे उडालेला गोंधळ, झालेली धावपळ आणि मध्येच सूक्ष्मात गेल्यासारखा (विनोबांकडून आलेला?) अबोलपणा; गांधींच्याप्रमाणेच सतत स्वत:च्या 'आतल्या आवाजा'प्रमाणे चालण्याची वृत्ती आणि एकूणच एकांतप्रियता – हे सगळं वाचल्यावर हा श्रीगमा नावाचा गड सहजासहजी जिंकता येणार नव्हता, हे उघड होतं; संधीची वाट पाहण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता! ती संधी माझ्याकडून निर्माण होणं अशक्य, कारण मी २० वर्षांचा होतो आणि तुम्ही ४०!

कोंडी फोडणारी पहिली संधी तुम्हीच दिलीत. जानेवारी १९७४मध्ये तुम्ही समविचारी मित्रांबरोबर 'ग्रामायन' नावाने ग्रामीण विकसनासाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि विकासाची वेगवेगळी मॉडेल्स, सिद्धांत मांडणाऱ्या अभ्यासकांना दोन दिवस एकत्र आणलंत! ते दोन दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय होते; कारण एव्हाना प्रबोधिनीत आता आपले थोडे दिवस उरलेत हे कळलं होतं; पुढचा रस्ता 'ग्रामायन'मधून सापडणार होता. मुख्य म्हणजे तुमच्यापर्यंत पोचता येणार होतं! महाराष्ट्रभरचे पन्नास-पाऊणशे कार्यकर्ते-अभ्यासक तिथे होते मात्र मला इंटरेस्ट मधुकरराव देवल आणि तुम्ही या दोनच माणसांत होता. तुम्ही दोघेही विचारक-कार्यकर्ते होता. सगळा मेळावाभर मी तुम्हा दोघांच्या आसपासच घुटमळत होतो. तुमच्या सवयी-लकबी बारकाईने पाहत होतो. प्रतिक्रियांना दाद देत होतो. मीही तुमच्या लक्षात राहीन अशी फिल्डिंग लावत होतो. त्यातच तुम्हा दोघांतला फरकही कळला. मधुकरराव कायम शांत, धीरगंभीर आणि चेहऱ्यावर प्रसन्नता ठेवून असायचे; तुम्ही मात्र एवढ्यातेवढ्यावरून अस्वस्थ! कुणी मुद्दा सोडून बोलायला लागला, जास्त वेळ घेतला, चहाच्या/जेवणाच्या वेळा चुकल्या, की कढईतल्या लाहीसारखी तुमची जागच्या जागी तडतड सुरू असायची! पण माझी चिकाटी वाया गेली नाही. मेळावा संपताना मी मधुदादांकडून म्हैसाळला यायचं आमंत्रण मिळवलं; तुमच्याकडूनही 'येत जा अधूनमधून ऑफिसात' असा टेम्पररी व्हिसा मिळाला. पासपोर्ट आप्पांनी तयार करून ठेवलाच होता!

दुसरी संधी दिली ती इंदिरा गांधींनी; जून ७५मध्ये देशांतर्गत आणीबाणी जारी करून! मधल्या वर्ष-सव्वावर्षात तुमच्या-माझ्यामध्ये ice-breaking झालं होतं. एक संगीतपरीक्षणही 'माणूस'मध्ये लिहिलं होतं. ज्ञानप्रबोधिनीच्या इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनाला तुम्ही श्रोत्यांमध्ये होता. 'कव्हरवर आमच्या या इमारतीचा फोटो छापा, मग आतमध्ये तुम्ही प्रबोधिनीवर तुम्हांला हवं ते लिहा' ही माझी स्मार्ट ऑफर तुम्ही हसून सोडून दिली होती. पण त्या हसण्यामध्ये नकार/नापसंती/दुरावा नव्हता. आणीबाणी घोषित होण्यापूर्वीच गुजरातच्या नवनिर्माण आंदोलनाने देश खडबडून जागा झाला होता. त्याच सुमारास पुण्यात जेपींचं भाषण झालं होतं. काहीतरी मोठी उलथापालथ होणार याचे वेध लागले होते. त्यामुळे आपल्या भेटी-चर्चा नियमितपणे होणारच होत्या. कारण मोकळेपणाने बोलणारी माणसं दुर्मिळ होती. इंदिरा गांधींनी ती अनिश्चित अवस्था एका आदेशात संपवली होती. इथून पुढे इंदिरावादी तुरुंगाबाहेर पण गुलामीत असणार होते आणि लोकशाहीवादी तुरुंगात पण स्वतंत्र असणार होते! तुमच्या माझ्या भूमिकेत काहीच फरक नव्हता. सर्व शक्तीनिशी आणीबाणीचा नेटाने विरोध करणं, त्यात बिनडोक घिसाडघाई न करता आपल्या मर्यादित शक्तीचा अधिकाधिक परिणामकारक वापर करणं, योग्य वेळेला मी सत्याग्रह करणं आणि 'माणूस'कारांनी सेन्सॉरशिपची पत्रास न ठेवणं ही रणनीती काही दिवसांतच ठरून जाणार होती. आपण एकमेकांशी बोलायच्या आधीच दोघांचीही मनं तापलेली होतीच.

ती एकत्र आली 'माणूस'मध्ये 'थँक्यू मिस्टर ग्लाड' आल्यानंतर. त्या पत्राचा शेवट मी 'थँक्यू मिस्टर ग्लाड', 'थँक्यू मिस्टर अनिल बर्वे' असा केला होता. खरं म्हणजे त्यात 'थँक्यू मिसेस इंदिरा गांधी', आणि 'थँक्यू मिस्टर माजगावकर' ही वाक्येदेखील टाकायला हवी होती!

– ३ –

इथून पुढे 'माणूस' पूर्णपणे बंद होईपर्यंत १२ वर्षांहून अधिक काळ मी कमीअधिक सातत्याने तुमच्याबरोबर होतोच.

८५-८६मध्ये मी शेतकरी संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता झाल्यानंतर पुण्यातच फार थोडा वेळ मिळत असे तरी काही महत्त्वाच्या घडामोडींनंतर आपली भेट होतच असे. खरं म्हणजे ७४पासून तुमच्यासमोरच्या अडचणी/कटकटी वाढायला सुरुवात झाली होती. दर्डाप्रकरण ही या कसोटीच्या १२/१३ वर्षांची सुरुवात होती. 'माणूस'ची पहिली १५ वर्षंदेखील भरपूर धावपळ करावी लागली होती, कष्ट उपसावे लागले होते, आर्थिक गणित जुळवताना नाकी नऊ येतच होते; पण त्या वर्षातलं कोणतंही धाडस/साहस उलटून अंगावर आलं नव्हतं, यशस्वीच ठरलं होतं. आपण एक नवी ओळख, नवा अवकाश मराठी माणसांच्या वैचारिक जगात निर्माण करतो आहोत ही खात्री म्हणजे टॉनिकच होतं. तुम्ही आणि तुमची छोटीशी टीम (family get-together?) त्या टॉनिकवरच आनंदात नवनवीन विशेषांक काढत होता!

आता परिस्थिती बदलली – दर्डा यांच्या (कथित) बदनामी प्रकरणात कोर्टातले हेलपाटे दमवायला लागले; आणीबाणी जाहीर झाली आणि सेन्सॉरशिपचं लचांड मागे लागलं. 'पॅपिलॉन' हे खरं तर भाषांतरित पुस्तक, पण नाव विचित्र वाटल्यामुळे सेन्सॉरने तो मजकूर अडवून ठेवला होता! याच दिवसात श्री. बाबासाहेब पुरंदरे राजहंस प्रकाशनमधून निवृत्त झाले. ('जनांचा प्रवाहो'च्या पहिल्या आवृत्तीवर प्रकाशक म्हणून त्यांचं नाव छापलं होतं – मी धन्य झालो होतो!) आणि त्यांची हमखास खपाची पुस्तकं गेल्यामुळे तिथलं गणितही अवघड होऊन बसलं, मळेकर वाड्याच्याही कोर्टकचेऱ्या होत्याच, कागद-शाई-छपाई या सगळ्याच वस्तूंच्या किमती सतत वाढत होत्या. मुळातच प्रेस काढताना तुम्ही साशंक होता, ती शंका खरी ठरायला सुरुवात झाली होती. 'दिनांक' हे नवीन साप्ताहिक सुरू झाल्यामुळे समाजवादी वाचकांचा प्रतिसाद कमी व्हायला लागला होता. तुमच्यावरच्या घरच्या जबाबदाऱ्याही वाढत होत्या. पन्नाशी जवळ आल्यामुळे पूर्वीसारखी भटकंती करणं अवघड झालं होतं. त्यामुळे नवे ताजे अनुभव, इनपुट्स तुम्हांला सेकंडहँडच घ्यावे लागत होते. वैभवाच्या दिवसांच्या आठवणी शिल्लक होत्याच. 'आमची गंधर्व नाटक कंपनी आहे; मखमली पडदा, पैठण्या, खरे सोन्याचे दागिने अशी मिजास करणारी, रोज पंचपक्वान्नं करून जेवणारी, प्रेक्षकांना अत्तर लावणारी! मात्र गड्यांनो, तो काळ संपला आणि कठीण काळ आल्यावर, कर्ज डोक्यावर बसल्यावर तुम्ही आमच्याकडे आलात!' हे आम्ही – मी, सतीश कामत, शिरीष सहस्रबुद्धे, शेखर पुरंदरे – अनेकदा ऐकत होतो.

✦
तुम्ही माझ्यापेक्षा दीड पिढीने वडील आणि इतरांपेक्षा दोन अडीच पिढ्यांनी! तुमचे समवयस्कही 'ये एकदा गप्पा (!) मारायला' म्हणत असत, पण मार्गदर्शनाच्या नावाखाली हे आपल्याला जाम घुमवणार आणि एक कप चहाच्या बदल्यात स्वत:च्या डोक्यातलं सगळं भंगार आपल्या डोक्यात घुसवून, आपल्याला गोंधळात पाडून, आपण पुन्हा यांच्याच दवाखान्याचे लाइफ मेंबर होणार हे न कळण्याइतके आम्ही बावळट नव्हतो; कदाचित म्हणूनच तुमचे लाडकेही होतो?
✦

कितीही संकटं आली तरी 'प्रारब्धम् उत्तम जना: न परित्यजन्ति!' नवीन लेखक आणि नवीन विषय यांचा शोध नव्हे, नुसती चाहूल लागली की तुमचे डोळे चमकायला लागायचे आणि चेहऱ्यावरती गोड, निर्मितिपूर्व अस्वस्थता दिसायला लागायची. माझ्यापासून अविनाश धर्माधिकारीपर्यंत पुन्हा एक नवीन पिढी 'माणूस'मध्ये आणीबाणीपासून लिहिती झाली आणि तुमचे (आणि आमचेही) आनंदाचे दिवस परत आले – केवळ नव्या कल्पना, नवे निष्कर्ष, बेधडक मतप्रदर्शन करण्याची हिंमत यांचं कौतुक, चांगल्या मार्मिक निरीक्षणाला मोठ्याने हसून हातावर टाळी देऊन दिलेली दाद, फिरायला गेल्यावर मध्येच 'गड्या' म्हणून अलगद खांद्यावर ठेवलेला हात हा खुराक आम्हांलातरी दुसऱ्या कोणाकडून मिळणार होता? तुम्ही माझ्यापेक्षा दीड पिढीने वडील आणि इतरांपेक्षा दोन अडीच पिढ्यांनी! तुमचे समवयस्कही 'ये एकदा गप्पा (!) मारायला' म्हणत असत, पण मार्गदर्शनाच्या नावाखाली हे आपल्याला जाम घुमवणार आणि एक कप चहाच्या बदल्यात स्वत:च्या डोक्यातलं सगळं भंगार आपल्या डोक्यात घुसवून, आपल्याला गोंधळात पाडून, आपण पुन्हा यांच्याच दवाखान्याचे लाइफ मेंबर होणार हे न कळण्याइतके आम्ही बावळट नव्हतो; कदाचित म्हणूनच तुमचे लाडकेही होतो?

पु. ल. देशपांडे हे केवढं मोठं नाव! मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या पुण्यात तीन सलग मैफली झाल्या. (१९७६ ऑक्टोबर – आणीबाणी असूनही तीन सोन्याचे दिवस!) त्यांचं रसग्रहण करणारा मोठा लेख मी 'माणूस'मध्ये लिहिला. 'मल्लिकार्जुन मन्सूर यांचे चिरयौवन!' तो पुलंना आवडला. त्यांनी तुम्हांला फोन केला आणि 'हा कोण नवा मुलगा आहे; माझ्याकडे घेऊन ये' म्हणाले. तुम्ही मला म्हणालात, 'पुलचा फोन आला होता. (विनोबांप्रमाणेच तुम्हीही बहुतेक सगळ्यांचे उल्लेख एकेरी करू लागला होता); त्याला तुझा लेख आवडला. आपल्याला त्याच्याकडे जायचं आहे.' मी म्हणालो होतो, 'मग त्यांनी मला भेटायला यायचं की मीच त्यांच्याकडे जायचं!' तुम्ही अक्षरश: गडबडून गेलात. नजरेमध्ये आश्चर्य-कौतुक-आनंद होताच. अक्षरश: रदबदली केल्यासारखं म्हणालात, 'बाबारे, तुझं खरंच आहे; पण माझा आता शब्द गेला आहे, चल माझ्याबरोबर!' आपण जाऊन आलो. पुलंनी मला पेट्रनाइज करण्याची धडपड केली; ती मला आवडली नाही हे तुम्ही ओळखलं होतं; पुन्हा कुणाला तसा शब्द तुम्ही दिला नाही.

पुलंबद्दलचा दुसरा किस्सा! 'तीन पैशाचा तमाशा' या सर्वार्थाने धेडगुजरी प्रहसनावर शिरीष सहस्रबुद्धेने त्याचा पार धुव्वा उडवणारा लेख लिहिला. ('निवडक माणूस'मध्ये आहे.) तेव्हाही पुलंचा तुम्हांला फोन आला आणि पुन्हा एकदा 'हा कोण आहे, त्याला काही गोष्टी समजल्या नाहीत, मला फोन करायला सांग' असा पुलंनी तुमच्याकडे फोन केला. शिरीषला असा निरोप देऊन काही उपयोग नव्हताच. म्हणून तुम्ही त्याला 'माणूस'मध्ये युक्तीप्रयुक्तीने धरून आणलंत. शिऱ्याने फोन केला. लँडलाइनवर बराच काळ फोन चालला. आपण सगळे ऐकत होतो. शिरीष पुलंचा एकही मुद्दा मान्य करीत नाही हे कळतच होतं. शेवटी रदबदलीच्या सुरात पुल त्याला म्हणाले, 'पण या मुद्द्यांचा विचार करून तू पुन्हा एकदा प्रयोग पाहा'. शिऱ्याने बेधडक सांगितलं, 'हे नाटक पुन्हा पाहणं केवळ अशक्य आहे' आणि फोन कट केला. आता तुम्ही काय म्हणणार याची उत्सुकता सगळ्यांनाच होती. तुम्ही म्हणालात, 'तुम्ही पोरं मला आयुष्यातनं उठवणार आहात. आता त्या पुलची समजूत घालणं आलंच!' पण एका अक्षराने शिरीषला रागावला नाहीत! व्वा!

अस्वस्थ, तरुण, टवटवीत लेखकाचा ताजेपणा, उत्साह जपला पाहिजे हे तुमचं ब्रीदच होतं. अशा लेखकाने स्वत: विषय निवडला आणि त्याच्या लिहिण्यात वाचनीयता असली, की त्याला पूर्ण स्वातंत्र्य द्यायचं, ही एक पद्धत; तर लेखनगुण असलेल्याला विषय शोधून लिहायला सांगणं, दौऱ्यावर पाठवून त्याच्याकडून वार्तापत्र/वृत्तांत लिहून घेणं ही दुसरी. मी या दोन्हींमधून गेलो. मन्सूर, मर्ढेकर हे विषय मी स्वत: निवडलेले होते पण केरळचा दौरा करून (सतीश कामतबरोबर) 'कुरुक्षेत्र केरळ' ही तिथल्या रा. स्व. संघ आणि कम्युनिस्ट यांच्या हिंसक संघर्षावरची लेखमाला लिहिली ती तुमच्या सांगण्यावरून! 'जनांचा प्रवाहो'ची जन्मकथा अजून वेगळी आहे. जानेवारी ७७मध्ये आणीबाणी शिथिल करून लोकसभा निवडणुकांची घोषणा झाली. फेब्रुवारीमध्ये आपण 'माणूस'चा जनविराट अंक काढून जनता पक्ष या राजकीय प्रयोगाला काही तात्त्विक खाद्य पुरवायचा प्रयत्न केला. या अंकातला सगळ्यात मोठा लेख राम बापट यांचा संघावरचा. तो मिळवण्याचं सगळ्यात दुष्कर कर्म माझ्या वाट्याला आलं होतं! या अंकात मी माझ्या तुरुंगवासावर एक बऱ्यापैकी मोठा लेख लिहिला होता. या निवडणुकीत इंदिरा काँग्रेस भुईसपाट होऊन राजकीय भूकंप होणार याचा अंदाज लेख लिहिताना आला नव्हता. त्यामुळे 'आपली खरी जागा कुठे आहे, बाहेर की आत?' असं त्या लेखाचं संभ्रम व्यक्त करणारं नाव होतं – 'जनांचा प्रवाहो' अजून 'चालिला' नव्हता. त्या लेखाचं स्वागत झालं. प्रा. स. शि. भाव्यांनी खूप कौतुक केलं व पुस्तकाची रूपरेषा त्यांच्या-माझ्या बोलण्यातून तयार झाली. यातलं काहीच तुम्हाला माहीत नव्हतं. १९७७च्या १५ ऑगस्टला एक विशेषांक काढावा आणि जनता पक्षातल्या उतावळ्या, अर्ध्या-कच्च्या मडक्यांना त्यांच्यावरच्या ऐतिहासिक जबाबदारीची जाणीव करून द्यावी – कारण एव्हापर्यंत अंतर्गत लाथाळ्यांना सुरुवात झाली होती – अशी कल्पना सुचल्यावर 'तू या अंकासाठी काय लिहिणार?' असं तुम्ही विचारलंत. मी लिहायला बसलो ते प्रा. भाव्यांची रूपरेषा डोक्यात ठेवून; आणि पुस्तकच तयार झालं!

– ४ –

विषय आणि लेखक यांची पत्रिका जुळते आहे अशी खात्री वाटली, की तुम्ही त्या लेखकाला फारशा अटी घालत नव्हता, सल्लामसलतही त्याला हवी असेल तरच होत असे. पहिला खर्डा – मग चर्चा – मग पुनर्लेखन असा घोळ घालण्यात तुम्हांला स्वारस्य नसे. त्यामुळे कायम एक दीर्घ अभ्यासपूर्ण लेखमाला चालू आणि त्याचवेळी समकालीन विषयांवरचा अभ्यासपूर्ण वृत्तांतवजा ताजा मजकूर हे 'माणूस'च्या कोणत्याही अंकाचे दोन मुख्य वादी-संवादी असत. लेखकाच्या कामात फार ढवळाढवळ न केल्यामुळे काही लेखमाला जरा लांबल्या, काही जडजंबालही झाल्या पण त्यांच्याकडे दुर्लक्ष झालं नव्हतं; त्यांची पुस्तकं झाली होती व निदान एक आवृत्ती संपली होती. एकदा मात्र तुम्ही चांगलेच कात्रीत सापडला होता. कॉम्रेड शरद पाटील यांची 'दासशूद्रांची गुलामगिरी' ही लेखमाला 'माणूस'मध्ये येत होती. विषय महत्त्वाचा, मोठ्या आवाक्याचा, लेखक भरपूर अभ्यास करून लिहिणारा, शिवाय प्रत्यक्ष कार्यकर्ता, सत्यशोधक मार्क्सवादी पक्षाचा संस्थापक. त्यामुळे लेखमाला 'माणूस'मध्ये येण्यात अनेक प्रकारचं औचित्य साधलं जात होतं. पण कॉ. पाटलांच्या जडजंबाल शैलीमुळे वाचक दमले. कॉ. पाटील यांचं भाषण/व्याख्यान असो की लेख/पुस्तक असो; भाषा पूर्णपणे जड, ग्रांथिक, पारिभाषिक; वाक्ये मोठमोठी पल्लेदार आणि एकूणच विस्तारावर त्यांचा भर; त्यामुळे श्रोते/वाचक एकीकडे अचंबित व्हायचे तर दुसरीकडे बधिरही होऊन जायचे. एकदा मी 'माणूस'मध्ये आलो तर तुम्ही कपाळाला हात लावून बसला होता. १०/१२ पत्रं तुमच्यासमोर होती आणि सगळ्या पत्रांतून एकच धोशा होता – 'कॉ. पाटलांचा अभ्यास आणि अधिकार आम्हांला मान्य आहे; पण त्यांनी जरा सोप्या शब्दांत लिहिलं तर आम्हांला ते कळेल!' 'पाटलाच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची' ही तुमची विवंचना! मी म्हटलं, 'तुम्ही ही सगळी पत्रं त्यांच्याकडे पाठवून द्या, स्वत: मध्ये पडूच नका.' तुम्हांला जरा हायसं वाटलं. मग ते सगळं बाड रजिस्टर्ड पोस्टाने धुळे मुक्कामी पाठवण्यात आलं; त्या काळात कुरिअर्स नव्हते, फोनही जेमतेम चालू असत. महिनाभर शांततेत गेला. मधल्या काळात लेखमाला चालूच होती.

एक दिवस तुमचा SOS आला. 'ताबडतोब भेट!' मी दुपारी चार वाजताच हजर झालो. 'तुझं ऐकलं आणि बघ काय झालं!' म्हणत तुम्ही माझ्या हातात कॉ. पाटलांचं पत्र ठेवलंत. त्यांनी बाणेदारपणे लिहिलं होतं, 'महत्त्वाच्या आणि गहन विषयावर सोप्या भाषेत लिहिता येतं या भ्रमात कोणी राहू नये...खरं म्हणजे मी अजून या विषयाच्या गहन भागात शिरलेलोच नाही. शिरेन तेव्हा वाचकांची खरी कसोटी लागेल!' आपले डावपेच असे उलटतील याची मुळीच अटकळ नव्हती. पण अजून एक मार्ग होताच. 'आता ही सगळी पत्रं आणि कॉ. पाटलांचं उत्तर दोन्ही एका अंकात छापून टाकू आणि शेवटी

'या विषयावरची चर्चा 'माणूस'मधून थांबवत आहोत. वाचकांनी कॉ. पाटील यांच्याशी थेट पत्रव्यवहार करावा' असं संपादकीय निवेदनही छापू.' तुम्हांला माझा सल्ला पटला. लेखमाला येत राहिली. पुढच्या 'खऱ्या गहन' चर्चेमुळे कोण वाचक किती दमले या भानगडीत आपण पडलो नव्हतोच पण कॉ. पाटलांना तुम्ही कोणताही सल्ला दिला नव्हता. रिस्क घ्यायला तुम्ही तयार होता कारण लेखक-विषय दोन्ही महत्त्वाचे होते. मात्र असे प्रसंग अपवादात्मक असत!

तुमच्या सूचना मोजक्या शब्दांत असत. काही वेळा एका विचारसरणीचा लेखक (स्वत:च्या व्यक्तित्वाला पैलू पाडण्यासाठी) दुसऱ्या विचारसरणीत घुसायला बघत असे; तुम्ही अशा एक-दोन सीनियर लेखकांना 'तो तुमचा विषय नाही' असं स्पष्ट सुनवायला कमी केलं नव्हतं. आणि काही वेळा अचानक एखादी कल्पना सुचली, की तुम्ही ताबडतोब ती कागदावर उतरवायच्या खटपटीला लागायचा. जोशी-अभ्यंकर खून खटला ही पुण्यातली थरारक घटना होती. वरुण भिडे दैनिक सकाळसाठी रोज कोर्टात जात होता. त्या तरुण मुलांना फाशी झाली तेव्हा हिस्टेरिकल पुणेकरांनी पेढे वाटायचे तेवढे शिल्लक ठेवले होते; वरुण मात्र प्रचंड उदास होता. तुमच्याकडे येऊन त्याने आपलं मन मोकळं केलं आणि चार दीर्घ लेख 'माणूस'साठी लिहिले – त्या घटनेचे सांस्कृतिक, सामाजिक आयाम आपोआपच अधोरेखित झाले. आपले दोघांचेही जिवलग विद्याधर पुंडलिक यांची शोकांतिका सगळ्यांनाच हलवून टाकणारी होती. एक दिवस तुम्ही सकाळी 'माणूस'मधली कामं उरकून सरळ पुंडलिकांचं घर गाठलंत आणि रागिणीवहिनींना त्या वर्षीच्या दिवाळी अंकासाठी लिहायला सांगितलंत; वहिनी चाटच पडल्या होत्या. त्यातच 'तुम्ही पुंडलिकमधला लेखक पकडा' असं नेमकं बोलून तुम्ही उठून गेलात. वहिनी दिवसभर विचार करत बसल्या. संध्याकाळी माझ्याकडे आल्या; आमचं बोलणं झालं; 'पुंडलिकाचे भेटी' हे नाव मी ठरवलं; एक वाचनीय दीर्घ लेख प्रथम तयार झाला. त्याचं स्वागत झालं म्हणून मग त्याचा विस्तार करून 'साथसंगत' हे वहिनींचं पुस्तक 'मौज'ने प्रकाशित केलं. इतक्या कमी वेळात मौजनं फार थोडी पुस्तकं काढली असतील. हातभार अनेकांचा लागला, पण मूळ कल्पना तुमची होती.

गहन गंभीर विषयांसाठी तुम्ही वेगळे लेखक हेरले होते. वार्तापत्रांसाठी अनिल बर्वे, निळू दामले, विजय परुळकर; स्वत:च्या अनुभवांचा अर्थ लावू शकणाऱ्यांमध्ये अनिल अवचट (पूर्णिया), मी, नंतर अविनाश, दत्तप्रसाद दाभोळकर वगैरे; ग्रंथ, नाट्य, सिनेमावर लिहिणारी वेगळी मंडळी. इंग्रजी वाचन करून विषय सुचवणारे समवयस्क मित्र – तुम्ही स्वत: फिनिक्स लायब्ररीच्या पोंडांना 'माणूस'मध्ये इंग्रजी पुस्तक-परिचयासाठी जागा करून दिली होती. गावोगावचे लहानमोठ्या घटनांची नोंद घेऊन बऱ्यापैकी लिहू शकणारे वाचक-कार्यकर्ते – असं तुमचं नेटवर्क होतं. शिवाय श्री. ज. जोशी येऊन गेले, की एकूण मराठी साहित्यात काय चाललं आहे त्याची बित्तंबातमी कळत असे. विनायकराव पाटील भेटून गेले, की काँग्रेस आणि शरद पवार, डॉ. लेले भेटले की जनसंघ-भाजप, अशोक मनोहर येऊन गेला की कम्युनिस्ट आदिवासी – या आघाड्यांवर काय चालू आहे, त्याचा अंदाज येई! बसल्या जागी महाराष्ट्रभरची माहिती आणि कळीच्या प्रश्नांची जाणीव होत असे. त्यातच 'ग्रामायन'चं नेटवर्क मिळाल्यानंतर शेतीविषयक विषयांची भर पडली.

लिहितो म्हणून एखाद्या लेखकानं आयत्या वेळी दगा दिला की तुमची फार चिडचिड व्हायची. मी तसा अनुभव दोनदा दिला होता. १९७८मध्ये इंदिरा गांधींनी चिकमगळूर या कर्नाटकमधल्या लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवली व त्या पुन्हा संसदेत आल्या, तेव्हा मी पंधरा दिवस 'माणूस' प्रतिनिधी म्हणून गेलो होतो. मात्र जनता पक्षाचा पराभव झाला आणि माझा मूड गेला. मी काहीतरी खुसपट काढून लेखमाला लिहिलीच नव्हती. तुम्ही भयंकर वैतागलात, आदळआपट केलीत पण मी दाद दिली नाही. पुढे १९७९च्या दिवाळी अंकासाठी मी तो विषय आणि एकूण जनता पक्षाच्या अडीच वर्षांवर मोठा लेख लिहिला तेव्हाही तुम्ही तोंड वाकडं करूनच तो छापलात. एकही कौतुकाचा शब्द माझ्या वाट्याला आला नाही. मात्र माजगावकर, तेव्हा उपेक्षा झालेल्या त्या लेखाचं आता बऱ्यापैकी कौतुक होत आहे; कारण जनता पक्षाचा असा सविस्तर परामर्श फारसा कुणी घेतलेला नाही.

दुसरा प्रसंग १९८०च्या दिवाळी अंकाच्या वेळचा. त्यावेळेपर्यंत मी शास्त्रीय संगीत ऐकायला सुरुवात करून १५ वर्षं झाली होती. सवाई गंधर्व पुण्यतिथीसारख्या लोकप्रिय महोत्सवी संगीतापासून सुरुवात करून मी कुमार गंधर्व-मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या विचक्षण आणि विलक्षण गायकीपर्यंतचा प्रवास कसा केला, यावर 'सवाई गंधर्व ते कुमार गंधर्व' असा विषय मी सुचवला आणि तुम्ही खूष झालात. मी अभ्यासाला लागलो आणि गोविंदराव टेंबे, केशवराव भोळे, कृ. द. दीक्षित या पूर्वसुरींच्या पुढे एक पाऊलही मला टाकता येणार नाही हे लक्षात आलं. मी लेख रद्द केला. 'तू माझ्या दिवाळी अंकाचा सगळा समतोल बिघडवून टाकलास!' हे तुम्ही मला महिनाभर तरी ऐकवत होता. कारण दिवाळी अंकामध्ये सामाजिक-राजकीय गंभीर चर्चेपेक्षा साहित्य-संगीत-कला या क्षेत्रातल्या दर्जेदार मजकुरावर तुमचा भर असायचा. शिवाय शास्त्रीय संगीत हा तुमच्या जिव्हाळ्याचा छंद. 'मी संपादक झालो नसतो तर बुवा (गाणारा) झालो असतो,' असं तुमचं म्हणणं असायचं. मास्टर कृष्णरावांच्या मागे तंबोऱ्यावर बसल्याची आठवणही तुम्ही मला सांगितली होती. 'माणूस'चे सगळे दिवाळी अंक ओळीने पाहिले तर भारदस्तपणाचं भान ठेवून सांस्कृतिक विषयांवर जाणीवपूर्वक भर जाणवतोच!

– ५ –

एक गमतीचा विरोधही माझ्या लक्षात आला होता. 'माणूस'चे संपादक माजगावकर कायम उत्साहात असत; मात्र 'माणूस'चे आणि राजहंस प्रकाशनाचे व्यवस्थापक माजगावकर कायम चिंताक्रांत – कधीकधी वैतागलेलेसुद्धा दिसायचे! कारण स्पष्ट होतं – संपादन हा तुमचा स्वभाव होता. साप्ताहिकाचं मार्केटिंग आणि प्रकाशनाची विक्री हा मात्र व्यवसाय असणार होता आणि १०० टक्के व्यावहारिक भूमिका घेणं तुमच्या स्वभावात बसतच नव्हतं!

घरचा प्रेस असला तरी व्यावहारिक गणित उत्तरोत्तर अवघडच होणार हे स्पष्ट होतं. निरनिराळ्या बिलांचे तगादे, पुस्तकाच्या मानधनासाठी लेखकांचे तगादे – लेखक प्रकाशकाला बहुधा दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी पत्र पाठवीत नसावेत; पुस्तकविक्रेत्यांकडून पैसे येण्याला लागणारा वेळ, थकलेली बिलं वसूल करण्याची धावपळ, वेळ/शक्तीचा अपव्यय यांनी तुम्ही कायमच घेरलेले असायचा.

मला अजूनही एक अंदाज करावासा वाटतो. सतत नवीन विषय आणि लेखकांच्या शोधात असल्यामुळे तुमचा जुन्या लेखकांशी – ज्यांची एकदोन पुस्तकं मार्गी लागलेली असत – फारसा संवाद उरत नसे. त्यांच्या पुस्तकांची विक्री, प्रतींची संख्या, इतर खर्च वजा जाता उरणारं निव्वळ मानधन हे सगळं त्यांनी ऑफिसमधल्या कारकुनांशी बोलावं अशी तुमची अपेक्षा होती, पण लेखकांना ती रणनीती वाटत असावी. ते तुमचा पिच्छा सोडत नसत. नावडत्या बायकोच्या बिमारीने (abused wife syndrome) पछाडलेल्या काही लेखकांची पत्रं तुम्ही मला वाचायला दिली होती. शिवाय एक पुस्तक यशस्वी झालं की लगेच दुसरंही लिहायचं आणि प्रकाशकाने ते पहिल्याइतक्याच उत्साहानं काढावं अशी अपेक्षा नसणारे लेखक (मराठीत तरी) दुर्मिळच होते. मी त्यांच्यापैकी नव्हतो – एक पुस्तक लिहिलं हेच माझ्यासाठी आश्चर्य होतं. 'जनांचा प्रवाहो'च्या पहिल्या आवृत्तीचे हिशोब करताना आपल्यातही तणाव निर्माण झाला होता. कारण 'तुझ्या नव्या पुस्तकाची घोषणा करू, प्रकाशनपूर्व सवलतही देऊ आणि त्याच योजनेमध्ये 'जनांचा प्रवाहो'ची दुसरी आवृत्ती काढू' अशी तुमची ऑफर होती. मला ते शक्य नव्हतं आणि जे काही मानधन असेल ते लगेच मिळण्याची निकड होती. आणि मी तुम्हाला फसवलं नाही. माझं दुसरं पुस्तक १९ वर्षांनी – तुम्ही गेल्यावर – १९९७ मध्ये प्रकाशित झालं!

✦

मात्र मला मुळातच तुम्ही माझ्यासाठी निश्चित केलेली भूमिका पटत नव्हती. मला सामाजिक जाणीव असलेला अस्वस्थ बुद्धिजीवी व्हायचं नव्हतं; आणीबाणीच्या विरोधात संघर्ष करून खरा उतरल्यामुळे माझ्या स्वत:विषयीच्या अपेक्षा वाढल्या होत्या. परिवर्तनाच्या 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार'मध्ये मला स्वारस्य उरलं नव्हतं. 'गड्या, आपल्याला सातपुड्यामधला आदिवासी पुण्यामुंबईच्या मध्यमवर्गीय घरांच्या टीपॉयवरती नेऊन ठेवायचा आहे,' हे तुमचं आमंत्रण म्हणजे मला मोठी संधी वाटली नव्हती. तुम्ही मला पूर्णपणे ओळखलं नव्हतं अशी शंका आली होती.

✦

हे सगळं घडत होतं त्याच्याही आधीच तुम्ही 'माणूस'चा पसारा आवरता घ्यावा या विचारात होता हे दिलीपरावांनी तुमच्यावर लिहिलं (समांतर : महाराष्ट्र टाइम्स वार्षिक १९९७) तेव्हा कळलं. जर आधी माहीत असतं तर मी तगादा लावला नसता. अर्थात आपण दोघेही ते ताणतणाव विसरून गेलो आणि 'माणूस'च्या रौप्यमहोत्सवाच्या कार्यक्रमात पुन्हा सगळे एकत्र आलो. माझ्या भाषणात मी 'माणूस'चं वर्णन 'आमचं वैचारिक दंगामस्ती करण्याचं क्रीडांगण' असं केलं. त्याला दादही मिळाली होती. मग पुढचे काही दिवस 'माणूस'चं हस्तांतरण करता येईल का, या चर्चा झाल्या. संभाव्य संपादकांमध्ये माझं नाव होतंच. तेव्हा मी इंडियन एक्सप्रेसमध्ये होतो. पुन्हा एकदा अरुण साधूंप्रमाणे एक्सप्रेस सोडून कुणीतरी 'माणूस'मध्ये यायची शक्यता मोहक होती; पण मी पक्का जमिनीवर चालणारा असल्यामुळे आर्थिक जबाबदारीचं गणित सुटेना; माझं नाव मागे पडलं! त्यातच तुमचा स्वप्नज्वर पुन्हा उफाळून आला. डोळे चमकायला लागले आणि तुम्ही नवं स्वप्न मांडलंत – 'गड्या, 'माणूस' हा विषयच तुझ्या-माझ्यात नको. पंचवीस वर्षे झालीत; मलाही आता कंटाळा आला आहे. तू आता इंग्रजीत चांगला स्थिरावला आहेस आणि तुझ्यासारखा मोहरा मराठीत खर्ची घालावा हे मला पटत नाही. आपण दोघे मिळून एक इंग्रजी बुलेटिन काढू; स्वबळावर! जे काम 'माणूस'ने महाराष्ट्र पातळीवर केलं ते आता देशपातळीवर करू या! एवढे पंधरा दिवस जाऊ देत. सध्याची माझी गडबड संपली की भेटू या!'

मी सावध होतो – त्या प्रोजेक्टबद्दल मी कधीच तुम्हांला भेटलो नाही. इथून पुढे 'माणूस'च्या युवक-युवती विशेषांकासाठी एक लेख लिहिला तेवढाच! आपण हट्टीपणा करून इंग्रजी बुलेटिन काढलं असतं तर ते इंग्रजीमधल्या बेदरकार स्पर्धेसमोर टिकलंच नसतं आणि ए. डी. गोरवालांच्या 'ओपिनियन'पेक्षाही त्याची अवस्था केविलवाणी झाली असती. मात्र मला मुळातच तुम्ही माझ्यासाठी निश्चित केलेली भूमिका पटत नव्हती. मला सामाजिक जाणीव असलेला अस्वस्थ बुद्धिजीवी व्हायचं नव्हतं; आणीबाणीच्या विरोधात संघर्ष करून खरा उतरल्यामुळे माझ्या स्वत:विषयीच्या अपेक्षा वाढल्या होत्या. परिवर्तनाच्या 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार'मध्ये मला स्वारस्य उरलं नव्हतं. 'गड्या, आपल्याला सातपुड्यामधला आदिवासी पुण्या-मुंबईच्या मध्यमवर्गीय घरांच्या टीपॉयवरती नेऊन ठेवायचा आहे,' हे तुमचं आमंत्रण म्हणजे मला मोठी संधी वाटली नव्हती. तुम्ही मला पूर्णपणे ओळखलं नव्हतं अशी शंका आली होती. ज्ञानप्रबोधिनीच्या 'अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो'मधून बाहेर पडून प्रत्यक्षात मैदानात उतरल्यावरही तुम्ही मला परत एकदा जनआंदोलनाच्या वार्तांकनाचं काम सांगत होता. खरं म्हणजे शेतकरी संघटनेकडे तुम्हीच माझं लक्ष वेधलं होतं. मात्र तुमची इंग्रजीची ऑफर नाकारून मी संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता झालो तेव्हा तुम्ही एका शब्दानेदेखील प्रतिक्रिया दिली नव्हती. 'शरद जोशी नुसता रान पेटवत जाणारा माणूस आहे. त्याच्या हातून

भरीव, ठोस काही व्हायचं नाही!' असा सावधगिरीचा इशारा मात्र दिला होता. तुमचे शब्द शरद जोशी खरे करून दाखवणार आहेत हे मला तेव्हा माहीत नव्हतं. पण तसं असलं तरी मला प्रत्यक्ष कृतीच्या मार्गाने जायचं होतं. हजारो-लाखोंच्या लाटा दुरून पाहायच्या नव्हत्या, उठवायच्या होत्या. जमलं तर त्यांच्यावर स्वार व्हायचं होतं.

तुम्ही फार वेगाने संघाकडे परत चालला होता हा माझ्यासाठी दुसरा जोरदार धक्का होता. मी संघ आणि नंतर ज्ञानप्रबोधिनी या दोन्ही ठिकाणी पुन्हा जाणार नव्हतो. जनता पक्षाच्या प्रयोगातल्या अपयशाचा दोष सर्वच नेते आणि घटक पक्षांचा होता हे एव्हाना माझ्या लक्षात आलं होतं. मुळातच जनता पक्ष ही एक ऐतिहासिक गरज होती. आणीबाणी हटवणं एवढंच त्याचं प्रयोजन होतं हेही माझ्या लक्षात आलं होतं. मला पुढे जायचं होतं आणि तुम्ही मागे पाहत होता. तुमच्याच शब्दात सांगायचं तर ''जावडेकरांचा यती, गांधी-विनोबांचा लोकसेवक, संघाचा अपरिग्रही, अनिकेत स्वयंसेवक-प्रचारक – भारतीय समाजवाद प्रस्थापनेची, अखंड भारत संस्थापनेची ही वाट आहे, हा मार्ग आहे, कळेल त्याला कळेल, नाही त्यांनी खुशाल म्हणत-लिहीत राहावं.... 'झोत' टाकावेत... संघ म्हणजे एक जुनाट व बुरसटलेली शक्ती आहे'' वगैरे वगैरे. (ऑक्टोबर १९७९) मला हे काही पटत तर नव्हतंच पण त्यात एक अनुदारपणाही जाणवत होता.

१९८३मध्ये रा. स्व. संघाचं पुण्यात तळजाईच्या पठारावर महाशिबिर मकर संक्रांतीचा दिवस गाठून भरवण्यात आलं होतं. संघाने आपलं इव्हेंट मॅनेजमेंटमधलं कौशल्य पणाला लावून ते यशस्वी केलं. तुम्ही या शिबिराचं स्वागत करणारा 'कर्टन रेझर' लेख 'माणूस'मध्ये लिहिताना म्हटलं होतं, ''अन्यान्य क्षेत्रातील कार्य उभे राहिले तरी ते वाढवण्यासाठी, नवनवीन क्षेत्रांत पदार्पण करण्यासाठी, चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांचा पुरवठा सतत व्हावा लागणारच. हे कार्यकर्ते घडविण्याचे, व्यक्तिगत व सार्वजनिक चारित्र्यनिर्मितीचे कार्य संघशाखा देशभर करीत आहेत. हे मूलभूत कार्य आहे.'' तेव्हाही मला जरा 'हे अती होतं आहे' असंच वाटलं होतं. मी त्या तीनचार दिवसांत पुण्यात थांबलो नव्हतो. एक्सप्रेसमध्ये मी फिरता प्रतिनिधी होतोच – बाहेर दौऱ्यावर गेलो होतो – मी एक 'मेसेज' देत होतो.

आठवड्याभराने मी परत आलो तेव्हा पुणे शहर संघाच्या व्यवस्थापन कौशल्याने थक्क झालेलं होतं; अगदी टीकाकारदेखील नियोजनाला दाद देत होते. यथावकाश आपण भेटलो. तुम्ही जरा नाराजीनेच विचारलंत, 'अरे इतकं सुंदर शिबिर झालं. तू कुठे होतास?' मी दौऱ्यावर असल्याचं सांगितल्यावर तुम्ही जास्तच रागावलात. 'अशा वेळी दौरा ॲडजस्ट करायचा असतो.' त्यावर मी म्हटलं, 'ॲडजस्ट केलेलाच होता दौरा!' मग तुम्ही भडकलात. 'पाच वर्षांपूर्वी (संदर्भ 'जनांचा प्रवाहो'मधला संघाचा परामर्श) तूच काय म्हणत होतास जरा आठवून पाहा!' मीही वैतागलो होतो, 'पाच वर्षात माझी वाढ झाली, मला काही नवीन इनपुट्स मिळाले. ते घेऊन मी माझी भूमिका ठरवली आहे; तुम्ही मात्र होता तिथेच आहात!' आणि चर्चा संपली. पुन्हा कोणत्याच विषयावर आपण फार मनापासून बोलल्याचं आठवत नाही.

आज संघविचारांचा पंतप्रधान आहे. मात्र तुम्ही ज्या कामाची अपेक्षा संघाकडून करत होता, ते निदान शब्दरूपात तरी माहीत असलेले संघस्वयंसेवक किती आहेत कोण जाणे!

– ६ –

असं व्हायला नको होतं, माजगावकर; आपण दोघांनीही एक पाऊल मागे जाऊन संवाद टिकवायला हवा होता, इतकं आपल्या दोघांच्या वाटचालीत साम्य होतं! आपण दोघेही कॉलेजसाठी पुण्याला आलो. दोघांनीही संघामध्ये शाळेची वर्षं घालवलेली, दोघेही गुजराथीबहुल प्रदेशातून आलो – बडोदा आणि मुलुंड, संघात असलो तरी दोघांनाही टिळक, सावरकर यांचं प्रचंड आकर्षण, दोघांनाही संघाच्या कंटाळवाण्या अनाकर्षक विचारहीनतेचं वावडं, दोघेही चांगले वक्ते, दोघांनाही शास्त्रीय संगीताची आवड, काही शिक्षणही घेतलेलं; मुख्य म्हणजे भारतीय राष्ट्रवादाचा नवा अजेंडा ठरवण्यात दोघांनाही स्वारस्य! आपण उगीच वेगळे झालो.

✦
नेमकं कुणाचं चुकलं होतं? 'माणूस' आज ना उद्या बंद करावा लागणार हे तर तुम्ही खूप आधीच – प्रत्यक्ष बंद करायच्या दहा वर्षं आधी – ओळखलं होतं. किंबहुना 'माणूस' ही एका विशिष्ट परिस्थितीमधली एक मोठी यशस्वी, अभिमानास्पद झेप होती. परिस्थिती बदलली तशी 'माणूस'सारख्या व्यासपीठाची/माध्यमाची गरज कमी होणारच होती.
✦

त्या फारकतीनंतर तुमचं आयुष्य १०/१२ वर्षांचंच होतं. त्यातच शेवटची दोन-तीन वर्षं आजारपणातच गेली होती. मी मात्र गेल्या ३० वर्षांचा ताळेबंद मांडायचा प्रयत्न करतो तेव्हा त्या क्षणापाशी येऊन थांबतो; नेमकं कुणाचं चुकलं होतं? 'माणूस' आज ना उद्या बंद करावा लागणार हे तर तुम्ही खूप आधीच – प्रत्यक्ष बंद करायच्या दहा वर्षं आधी – ओळखलं होतं. किंबहुना 'माणूस' ही एका विशिष्ट परिस्थितीमधली एक मोठी यशस्वी, अभिमानास्पद झेप होती. परिस्थिती बदलली तशी 'माणूस'सारख्या व्यासपीठाची/माध्यमाची गरज कमी होणारच होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दहा वर्षं झाल्यावर नवा देश घडवण्याचं काम केवळ सरकार करूच शकणार नाही, सरकारकडे तेवढा वैचारिक आवाका नाही आणि बांधिलकीही नाही हे तुम्ही ओळखलंत आणि 'माणूस'चा जन्म झाला. १९६०च्या दशकात सगळ्याच राजकीय-आर्थिक विचारप्रणालींचे समर्थक आपापल्या भूमिकांचा पुनर्विचार करण्याच्या मन:स्थितीत होते; कारण भारतामधल्या गुंतागुंतीच्या

सामाजिक, आर्थिक वस्तुस्थितीला कोणी एक विचारवंत समजून घेऊन काही अजेंडा मांडू शकेल हे शक्य नव्हतं. विनोबांच्या भूदानाचा बोजवारा उडाल्यावर सर्वांना समावेशक भूमिकेतून एकत्र येण्याची निकड वाटू लागली, महाराष्ट्र पातळीवर काँग्रेस वगळता सर्व मंडळींना 'माणूस' आपला वाटला आणि तुमचं विलोभनीय नेटवर्क उभं राहिलं.

पण माजगावकर, सातपुड्यातल्या आदिवासींना मध्यमवर्गीय घरात नेऊन ठेवण्याची महत्त्वाकांक्षा मुळातच फार तोकडी होती हे तुमच्या लक्षात आलं तेव्हा गाडं फार पुढे निघून गेलं. उत्तरार्धामध्ये तुम्ही 'माणूस' चालवत नव्हता, 'माणूस' तुम्हाला खेचून नेत होता? वार्तांकन/लेखमाला पुरेनात म्हणून तुम्ही स्वत: एकेकाळी रस्त्यावर उतरलाही होता. वेरूळ ते मुंबई अशी पायपीटही केली होती. तिला फार मोठा प्रतिसाद मिळणार नव्हताच – कोणत्याही अत्यंत अभिनव कल्पनेकडे सुरुवातीला दुर्लक्ष होतंच, हे तुम्हांला कुणी सांगायची गरज नव्हती. एकदा रस्त्यावर उतरलेले तुम्ही परत मध्यमवर्गीय अजेंड्याकडे का वळलात?

✦

माजगावकर, हे अभ्यासमंडळ फार फसवं असतं. त्यातच पुगंसारखा खंदा सांगोपांग चर्चा करणारा प्रमुख असला तर अभ्यास नावाची गोष्ट कधी संपतच नाही. आपण प्रश्नांचा अभ्यास करतो आहोत हेच आपलं योगदान आहे असा भ्रमही निर्माण होतो. एका प्रश्नाचा अभ्यास करून काही उत्तर सापडेपर्यंत एकतर त्या प्रश्नाचं स्वरूप बदललेलं असतं किंवा आणखी एक नवा प्रश्न उभा राहून तुम्हांला अभ्यासासाठी गळाला लावत असतो. कृती मागे पडते; हे लक्षात येईपर्यंत उमेदीची वर्षं संपून जातात.

✦

'निवडक माणूस'मध्ये तुमच्या एका जिवलग मित्राच्या लेखात असा उल्लेख आहे की पु. ग. सहस्रबुद्धे यांचं अभ्यासमंडळ नसतं तर आपण दोघं कुठे असतो, असं तुम्ही म्हटलं होतं. माजगावकर, हे अभ्यासमंडळ फार फसवं असतं. त्यातच पुगंसारखा खंदा सांगोपांग चर्चा करणारा प्रमुख असला तर अभ्यास नावाची गोष्ट कधी संपतच नाही. आपण प्रश्नांचा अभ्यास करतो आहोत हेच आपलं योगदान आहे असा भ्रमही निर्माण होतो. एका प्रश्नाचा अभ्यास करून काही उत्तर सापडेपर्यंत एकतर त्या प्रश्नाचं स्वरूप बदललेलं असतं किंवा आणखी एक नवा प्रश्न उभा राहून तुम्हांला अभ्यासासाठी गळाला लावत असतो. कृती मागे पडते; हे लक्षात येईपर्यंत उमेदीची वर्षं संपून जातात. इंग्रजांनी आपल्याला संस्था काढण्याची घातक सवय लावून गैरराजकीय कामात गुंतवून ठेवलं; तर संस्था काढण्याचीही कुवत नसलेल्यांनी अभ्यास मंडळं काढून कृतीचा मार्ग बंद करून टाकला. संध्याकाळी संघस्थानावर जाऊन लाठ्या आपटण्याइतकंच आठवड्यातून एक दिवस पार विश्वाच्या उत्पत्ती-विनाशाची चर्चा करणं फिजूल असतं! आसपासच्या प्रश्नांपैकी सर्वात कळीचा प्रश्न ठरवून – इथे पुन्हा अती अभ्यासाच्या खाईत पडायची शक्यता असतेच – त्याचं उत्तर शोधून ते जनतेपुढे घेऊन जाण्याचं कृतिशील राजकारण आपण सगळ्यांनीच का टाळलं? लोकशाही प्रक्रिया राबवून, सत्तेला कमी न लेखता, राजकीय ताकद उभी करून विकासाभिमुख राष्ट्रवादाचा अजेंडा आपण मांडायला हवा होता! हे काम अवघड होतंच; पण नुसतं 'माणूस' चालवणं तरी सोपं कुठे होतं!

टिळक-गांधी-सावरकर-गोळवलकर-जावडेकर-विनोबा-लोहिया-दीनदयाळ-जयप्रकाश हे तुमच्या आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचे प्रमुख आधार. नेहरूंनासुद्धा तुम्ही संघ पार्श्वभूमीचा माणूस क्वचित देईल एवढं श्रेय – भारतासाठी एक भव्य स्वप्न पाहण्याचं – दिलं होतं. मात्र या सगळ्यांची सांगड घालणं अशक्यप्राय होतं, हे तुम्ही विसरलात की नजरेआड केलंत? अशी सर्वसमावेशकता फार लवकर कुंठित होते, तशी ती झालीच? त्यातच तुम्ही परत एकदा संघपरिवाराकडे आशेने पाहू लागल्यावर हिंदुत्वाचं वावडं असणारी मंडळी आपापल्या तंबूमध्ये परत गेली. 'माणूस'साठी कुणीही काही आर्थिक मदत वगैरे धावपळ केली नाही. उलट काही जण 'हे आम्हांला आधीच माहीत होतं' अशी कुत्सित टिप्पणी करत राहिले. पंचवीस वर्षं सगळ्यांना सांभाळून तुम्ही एकटे पडलात. एक उदारमतवादी उपक्रमशील संपादक ही तुमची ओळख छान असली तरी अपूर्ण आहे, नवभारतीय राष्ट्रवादाचा शिल्पकार अशीही तुमची ओळख हवी होती.

आणि माजगावकर, आता तर सातपुड्यातला आदिवासीही बदलला आहे आणि पुण्यामुंबईचा मध्यमवर्गही. मध्यमवर्गीय आता शरीराने इथे राहतात एवढंच – मनाने ते भारतीय नाहीत. मी त्यांना 'निवासी अ-भारतीय' म्हणतो. (माझ्या या वाक्प्रचाराला तुम्ही दाद दिली असती!) आदिवासीच नाही तर सगळे अविकसित गट आता हक्काची मागणी करत नाहीत, 'कर्तृत्वाला संधी द्या' म्हणत नाहीत – सगळ्यांना आरक्षण हवं आहे आणि सगळेजण ते द्यायला तयारच आहेत. संपत्ती निर्माण व्हायच्या आधीच तिच्या वितरणाचे (लुटीचे) नवेनवे मार्ग शोधले जाताहेत, काळा पैसा वाढतो आहे, देशाची अर्थव्यवस्था जुन्या-नव्याच्या स्किझोफ्रेनियामध्ये सापडली आहे, सुशासनाची प्रवचने रोज घडताहेत, मात्र जीवन अधिकाधिक जिकिरीचं होतं आहे. गळेपडू, गळेकाढू आणि गळेकापू शैली बळावत आहेत. अशा परिस्थितीमध्ये कृतिशील, संघर्षशील उदारमतवादी विचारसरणीची कास धरून स्वार्थप्रेरणेला तुच्छ वा अनैतिक न मानता तिला सुसंस्कृत करण्याची निकड जाणवते आहे.

कधी नव्हे इतकी तुमची आठवण येते आहे...

तुमचा,
विनय

*(फेब्रुवारी २०१५)*

# अरविंद गोखले : कथा एके कथा

**राजेन्द्र बनहट्टी**

'परमनप्रवेशाची किमया लाभलेला लेखक' असे ज्याच्याविषयी म्हटले जाते, ज्याने आयुष्यभर कथा हा फक्त एकच साहित्यप्रकार हाताळला आणि तरीही साहित्यजगतात खूप मोठे स्थान प्राप्त केले अशा मराठी नवकथेच्या एका प्रवर्तकाविषयी.

पन्नास-साठ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. १९६०-६२च्या सुमाराची. त्यावेळी मी 'सुविचार प्रकाशन मंडळ' या प्रकाशनसंस्थेचा संचालक म्हणून काम पाहत होतो. आमचे कार्यालय टिळक रस्त्यावर होते, अजूनही आहे. मला आठवते, १९६१ साली 'विघ्नहर्ती' हा अरविंद गोखले यांचा कथासंग्रह आम्ही प्रकाशित केला. त्याच्या प्रती तयार झाल्यावर मी एके दिवशी दुपारी गोखल्यांना दूरध्वनी केला.

''प्रती पाठवून देतो. घरी आहात ना?''

''पाठवू नका. मीच संध्याकाळी येईन. घेऊन जाईन.''

संध्याकाळी गोखले आले. गौर वर्ण, मध्यम उंची, चौकोनी, देखणा चेहरा, काहीसा गंभीर, पण डोळ्यात मिस्किल, हसरी झाक. परीटघडीची पँट. त्यात खोचलेला शुभ्र, सफेद हाफशर्ट. आत येता येता त्यांनी त्यांच्या मृदू, मऊसर खर्जातल्या आवाजात दबकत मंद पुकारा केला.

''ग्रेटेस्ट स्टोरीरायटर ऑफ टिळक रोड यांनी आत यावे काय?'' गोखले समोर येऊन बसले. 'विघ्नहर्ती'च्या प्रती टेबलावरच होत्या. मी त्या गोखल्यांना दिल्या. एक प्रत हातात घेऊन त्यांनी चाळली नि बाजूला ठेवली. पुस्तकाबद्दल, ते कसे झाले आहे, याबद्दल ते काहीच बोलले नाहीत. हलकेसे हसत त्यांनी माझ्याकडे बघितले. म्हणाले,

''आपण सेलिब्रेट करू या.''

''सेलिब्रेट?''

''अहो, हे 'विघ्नहर्ती' सेलिब्रेट करू.''

''म्हणजे?'' मी कोड्यात. तसा प्रकाशनक्षेत्रात मी तेव्हा नवखा होतो.

''आनंदोत्सव.''

मी त्यावर काही बोललो नाही. मग त्यांनी थोडे पुढे झुकत विचारले, ''तुम्ही ड्रिंक घेता ना?''

''ड्रिंक?'' मी पुन्हा दुग्ध्यात.

''ड्रिंक वगैरे घेता की नाही?''

''घेतो ना.''

''कुठले, काही स्पेशल चॉईस?''

''स्पेशल काही नाही, आपलं गोल्डस्पॉट घेतो.''

त्यावेळी गोल्डस्पॉटचा जमाना होता. थम्स अप, कोक, पेप्सी यांचा उदय व्हायचा होता.

''अहो, ते ड्रिंक नाही.'' गोखले हसले नाहीत. सोशिक शब्दांत बोलले.

''मग?''

''ड्रिंक म्हणजे दारू.'' गोखल्यांचे शब्द सहज होते.

''दारू?''

दारू हा शब्द माझ्या कोशात नव्हता. निदान तोपर्यंत तरी. तो ऐकताच अंगावर नकळत थरार उठला. डोळ्यासमोर 'एकच प्याला'तली सुधाकर, तळीराम वगैरे मंडळी तरळून गेली असणार. गोखल्यांनी तो विषय वाढविला नाही. पुस्तकाच्या प्रती काखोटीला मारून ते उठले. ''संध्याकाळी या सातला. वाट बघतो.''

गोखले त्यावेळी ना. सी. फडके यांच्या 'दौलत' बंगल्याच्या तिरपे समोर विजयानगर कॉलनीत राहत होते. मी त्यांच्या घरी पहिल्यांदाच जात होतो. मी बिचकू नये, संकोच करू नये म्हणून असेल कदाचित, त्यांनी माझे स्नेही वि. शं. पारगावकर यांनाही बोलावले होते. पारगावकरांबरोबर मी संध्याकाळी त्यांच्या घरी पोचलो तेव्हा उरात नाही म्हटले तरी थोडी धाकधूक होती. पण आत जाताच गोखल्यांनी सहजपणे गोल्डस्पॉटची बाटली माझ्यासमोर ठेवली.

''हे घ्या तुमचे ड्रिंक.''

गप्पा सुरू झाल्या. गोखले तसे फारसे बोलके नव्हते. बोलत होते ते बरेचसे पारगावकर. अधूनमधून मी. पण जरा वेळाने गोखले खुलले. त्यांच्या हळुवार, हलक्या सुरात गुफ्तगु करावी तशा लेखकांच्या, प्रकाशकांच्या गमतीजमती सांगू लागले. मध्येच एखादी कथा कशी सुचली, ती हकीकतही त्यांच्या तोंडून बाहेर

पडत होती. तासदीडतास गप्पा रंगल्यावर गोखल्यांनी आम्हाला कँपातल्या दोराबजीच्या जुनाट, पसरट, बसक्या हॉटेलात नेले. तेथे त्यांचा आवडता पदार्थ त्यांनी मागवला. तो म्हणजे, अंड्याचे पिठले. नाव अकोरी किंवा अकोडी. ती हिरव्या मिरच्या पेरलेली झणझणीत अकोडी, रस्सा आणि पावाबरोबर खायची. त्यानंतर खमंग बिर्याणी. शेवटी पोळलेल्या जिभेवर आइस्क्रीम किंवा कॅरॅमल कस्टर्डची मलमपट्टी. 'विघ्नहर्ती'चे सेलिब्रेशन चांगलेच रंगले. सात वाजता आम्ही जमलो होतो. खानपान, गप्पांच्या भरात रात्रीचे अकरा कधी वाजले ते कळले नाही. इतके ते सेलिब्रेशन बहरत गेले. सुजल, सुफळ, सकळ संपूर्ण झाले.

गंमत म्हणजे 'विघ्नहर्ती'नंतर गोखल्यांचा कुठलाच कथासंग्रह मी कधी प्रकाशित केला नाही, तरी आमचे 'सेलिब्रेशन' चालूच राहिले. वेळप्रसंगी सवडीनुसार आम्ही भेटत होतो. कधी ते माझ्या कार्यालयात संध्याकाळी येत तर कधी 'वेळ आहे का आज?' अशी पृच्छा करून मला घरी बोलवत. आमच्या गप्पा मारुतीच्या शेपटासारख्या लांबत गेल्या की त्यांची अखेर होई दोराबजी रेस्टॉरंटच्या अकोडीने आणि आईस्क्रीम किंवा कॅरॅमल कस्टर्डने. कधी आमच्याबरोबर पारगावकर असत, कधी बाळ गाडगीळ तर कधी मुंबईहून आलेले गंगाधर गाडगीळ.

गोखले हे माझ्यापेक्षा वयाने ज्येष्ठ तर होतेच पण लेखक म्हणूनही नामांकित होते. पण तो मोठेपणा त्यांनी कधी जाणवू दिला नाही. खरेतर मी त्यांचा केवळ एक प्रकाशक होतो. लेखक आणि प्रकाशक यांच्यात कधी सकारण तर कधी अकारण तेढ आणि दुराव्याची भावना निर्माण होत असते. तसा प्रकार आमच्यात कधी घडला नाही. लेखक आणि प्रकाशक यांच्यात आर्थिक संबंधामुळे एक अंतर असते, ते गोखल्यांनी कधी राखले नाही. पहिल्याच भेटीत ते त्यांनी मिटवून टाकले होते. 'विघ्नहर्ती' हा कथासंग्रह प्रकाशित करायचे ठरले तेव्हा ते प्रथमच मला भेटायला आले. तोवर दूरध्वनीवरच आमचा संवाद घडला होता. ते आल्यावर नेहमीप्रमाणे पुस्तकाच्या कराराचा मसुदा मी त्यांना दिला. पुस्तक जसे खपेल तसा खपलेल्या प्रतींचा हिशेब व त्यावरची रॉयल्टी देत जाऊ. थोडक्यात, 'ऑन सेल रॉयल्टी' वगैरे अटी करारात होत्या. गोखल्यांनी कराराचा मसुदा शांतपणे वाचला. विचारले,

''या पुस्तकाच्या ज्या प्रती तुम्ही काढणार आहात, त्या किती वर्षांत खपतील?''

''चार-पाच वर्षे लागतील.''

''सहा वर्षे धरा. चालेल?''

''चालेल. सहा वर्षात आवृत्ती निश्चित संपेल.''

''मग तुम्ही सहा वर्षांत मला देणार असलेल्या रॉयल्टीच्या रकमेतून बँकरेटप्रमाणे सहा वर्षाचं होणारं व्याज कमी करा आणि उरलेली रक्कम मला आता देऊन टाका. म्हणजे तुम्ही मला हिशोब पाठविण्याचं कारण नाही. मी तो मागण्याचं कारण नाही.'' गोखल्यांनी कराराचा कागद मला परत दिला.

गोखल्यांची सूचना मला बिनतोड वाटली. मी त्यांना त्या रकमेचा चेक दिला. त्यांनी मला पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची संपूर्ण रॉयल्टी मिळाल्याची पावती दिली. एका फटक्यात व्यवहार संपला, तसाच आमच्यातील लेखक-प्रकाशक हा भेदभावही. मैत्र जोडायला ते मोकळे. मी मोकळा.

गोखल्यांना मी पहिल्यांदा पाहिले होते ते १९५६ साली ते नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयाच्या वाङ्मयमंडळात कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून आले होते तेव्हा. त्यावेळी मी तेथे बी.ए.च्या दुसऱ्या वर्षात शिकत होतो. गोखले त्याकाळात पुण्याच्या शेतकी महाविद्यालयात प्राध्यापक होते. आघाडीचे नवकथाकार म्हणून मराठी साहित्यात ओळखले जात होते. त्यामुळे मराठी साहित्याच्या आम्हां विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्याबद्दल बरेच कुतूहल होते. आम्ही त्यांच्या भाषणाला गर्दी केली होती. भाषणामध्ये गोखल्यांनी त्यांच्या संयत मिस्किल शैलीत आमच्या कॉलेजातील वाङ्मयमंडळाची भलावण केली होती. मला अद्याप आठवते, ते म्हणाले होते : ''तुमच्या या कॉलेजात हे वाङ्मयमंडळ आहे. त्यात साहित्यिक येतात. त्यांची भाषणे होतात. साहित्यावर चर्चा होतात. परिसंवाद होतात. आमच्या शेतकी कॉलेजात तसले काही नाही. साहित्य कशाशी खातात याचीसुद्धा तेथे कल्पना नाही. तेथल्या विद्यार्थ्यांना आम्ही पहिला धडा शिकवतो तो म्हणजे, हाऊ टू अप्रोच अ बुल.''

पुढे पुण्याला आल्यावर परिचय झाला तेव्हा मी गोखल्यांना ही आठवण सांगितली. त्यांनी नुसते स्मित केले. जास्त चौकशी केली नाही. कॉलेजची आणि माझीही. केव्हातरी लवकरच त्यांनी शेतकी कॉलेजला रामराम ठोकला. नोकरीनिमित्त मुंबईला स्थलांतर केले. मुंबईत वांद्र्याला ते साहित्यसहवासमध्ये राहत होते. मी एक-दोनदा मुंबईला त्यांच्या घरी गेलो होतो. पुणेकराने मुंबईकराकडे जायची वेळ म्हणजे दुपारची. दुपारी एक ते तीनपर्यंतची. ती मुंबईकराची विश्रांतीची वेळ.

मीसुद्धा साधारण दुपारी दीड दोनच्या सुमारासच त्यांच्याकडे गेलो होतो. पण त्यांनी न कंटाळता माझे दिलखुलास स्वागत केले. मी न कळवता गेलो होतो. तरी आश्चर्य किंवा नाखुषी व्यक्त केली नाही. तासभर त्यांच्या संयमित, हळुवार आवाजात गप्पा मारल्या. त्या अवेळीही माझा चांगला पाहुणचार केला. आठवते, की एकदा जिलेबी समोर प्लेटमध्ये होती तर एकदा खरवस. गोखले मुंबईला गेल्यावर केव्हातरी होणारे तुरळक भेटणे सोडले तर आमच्या गाठीभेटी साहजिकच उणावल्या होत्या. पण संपर्क तुटला नाही. खरे म्हणजे त्यांनीच तो ठेवला. पुण्याला अधूनमधून त्यांची फेरी होई. तेव्हा ते आवर्जून माझ्या कार्यालयात येत. मार्मिक, मोजके संभाषण करीत. मध्यंतरीच्या काळात मी कथा लिहू लागलो होतो. त्या काही ठिकाणी प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांची दाद गोखले न विसरता देत होते. अगदी रस्त्यात ओझरते भेटले तरी 'अमुक कथा वाचली', 'तमुक वाचली' असे सांगत असत. माझ्या सुरुवातीच्या चाचपडत्या साहित्यप्रवासात त्यांची ही स्नेहाळ सोबत उत्तेजक ठरत गेली. त्या आधारावर माझ्या 'कृष्णजन्म' या दीर्घकथासंग्रहाला ब्लर्ब लिहिण्याची मी त्यांना विनंती केली. ती तत्काळ मान्य करून त्यांनी यथावकाश ब्लर्ब लिहून पाठविला. त्यात त्यांनी लिहिले होते, ''या कथांचा

आत्मा कथेचा असला तरी आवाका कादंबरीचा आहे.'' त्यानंतर एकदा भेट झाली तेव्हा म्हणाले, ''तुम्ही कादंबरीचा ऐवज दीर्घकथेत ठासून भरता, त्यापेक्षा कादंबरीच का लिहीत नाही?''

गोखल्यांनी मला कादंबरी लिहिण्यास सुचविले. पण त्यांनी स्वतः कधी कादंबरी लिहिली नाही. इतर कथाकारांनी कादंबरी, नाटक, चरित्र, एकांकिका असे अनेक वाङ्मयप्रकार हाताळले. पण गोखल्यांनी कथेची कास सोडली नाही. 'कथा एके कथा' असाच ठेका त्यांनी धरला होता. त्यात कधी खंड पडला नाही. त्यामुळे गोखले हे मराठी कथाक्षेत्रातले एक विक्रमवीर ठरले आहेत. मराठी कथेच्या वाटचालीमध्ये अनेक विक्रम त्यांनी प्रस्थापित केले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे गोखल्यांची पहिली कथा १९३६ साली 'मनोहर' मासिकात प्रसिद्ध झाली. त्यावेळी गोखले सतरा वर्षांचे होते. 'वहिनींची इच्छा' हे त्या कथेचे नाव आहे. १९३६पासून पुढे पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ गोखल्यांनी सातत्याने कथालेखन केले. म्हणजे गोखले हे मराठीतले एक सुवर्णमहोत्सवी कथाकार आहेत. केवळ आवड म्हणून, केवळ निष्ठा म्हणून त्यांनी हे अखंड आणि प्रचंड असे कथालेखन केले, असे नाही, तर कथालेखन ही त्यांच्या व्यक्तित्वाची अदम्य अशी भूक होती. त्यांच्या प्रतिभेची ती एक अपरिहार्य गरज होती. या नैसर्गिक आणि अटळ अशा आवेगातूनच अर्धशतकापेक्षा जास्त काळ त्यांनी अविरतपणे झपाटल्यासारखे कथालेखन केलेले आहे. त्यांच्या 'अग्निहोत्र' या पुस्तकात एके ठिकाणी ते लिहितात. ''शब्दांशी नातं जडल्यावर वयात येताच मी लघुकथेशी गांधर्वविवाह केला. कथालेखन हे मला श्वासोच्छ्वासासारखं आवश्यक आणि सहज आहे.'' ते म्हणतात, ''टू मी इट्स अ वे ऑफ लाईफ.'' म्हणजे कथालेखन ही त्यांची जीवनदृष्टी होती. जीवनाकडे बघण्याचा त्यांचा तो एक दृष्टिकोन होता. त्यांच्या जीवनपद्धतीचाच तो एक भाग होता. इतकेच नव्हे तर कथालेखन हा त्यांच्या जगण्याचाच एक अविभाज्य आणि अतूट अशा अंश होता. त्यांनी केवळ कथा लिहिली नाही तर ती कथा ते जगले. कथा लिहिता लिहिता ते जगले आणि जगता जगता त्यांनी कथा लिहिली. कारण कथालेखन हा त्यांच्या लेखणीचा धर्म होता. ती त्यांच्या लेखणीची प्रकृती होती. आणि म्हणूनच त्यांच्या हयातीत त्यांचे सुमारे ४७ कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. आणि या संग्रहांमध्ये त्यांच्या शेकडो कथा समाविष्ट झाल्या आहेत. पण गोखल्यांचा कथालेखनातील हा विक्रम केवळ सातत्याचा किंवा संख्येचा नाही, तो फक्त संख्यात्मक नाही तर प्रामुख्याने गुणात्मक आहे, दर्ज्याचा आहे, उत्कृष्टतेचा आहे.

१९४५ साली 'कोकराची कथा' ही लघुकथा लिहिल्यानंतर गोखले एकदम प्रसिद्धीस आले. त्यानंतर *मंजुळा, नर, कमळण, रिक्ता, गंधवार्ता, आभा सावंत, वेडी बाभूळ, अविधवा, कातरवेळ, माहेर, मिलन, जागरण, कवडसा, शुभा, मिथिला, यात्रा, मुक्ता, विघ्नहर्ती* अशांसारख्या मराठी कथेचा मानदंड ठरलेल्या एकापेक्षा एक सरस असंख्य कथा त्यांनी लिहिल्या. त्यांच्या अशा उत्कृष्ट कथांची यादी आणखी खूप वाढवता येईल. त्यांच्या 'गंधवार्ता' या कथेला ग्रॅहम ग्रीन आणि स्टीफन स्पेंडर यांच्यासारख्या परीक्षकांनी आंतरराष्ट्रीय कथास्पर्धेत अव्वल क्रमांकाचे पारितोषिक दिलेले आहे. मराठी कथेचा हा पहिला जागतिक सन्मान होता. तो गोखल्यांच्या कथेला लाभला आहे. म्हणजे गोखल्यांची कथा संख्येने जशी मोठी आहे, तशी गुणवत्तेने, दर्ज्यानेही मोठी आहे. फार लिहिले, की लेखनाचा दर्जा घसरतो असा नेहमीचा अनुभव असतो. विपुलता आणि गुणवत्ता यांचे प्रमाण नेहमी व्यस्त असते, असा नियम मानला जातो. पण गोखल्यांची कथा या नियमाला अपवाद आहे. प्रमाण आणि दर्जा, विपुलता आणि गुणवत्ता यांचा दुर्मिळ मिलाफ त्यांच्या कथालेखनात झालेला आहे.

हा मिलाफ साधणे ही फार कठीण गोष्ट आहे. कारण गोखल्यांची कथा ही मूलतः मनोव्यापाराची कथा आहे त्यांच्या कथेत प्रामुख्याने व्यक्तिमनातील भावविश्वाचे चित्रण त्यांनी केले आहे. कथानक, घटना, प्रसंग यांना त्यांच्या कथेत फारसे महत्त्व नाही. जे प्रसंग आणि घटना येतात ते त्या कथेतील व्यक्तीच्या मनाचा शोध घेण्यासाठी, त्या व्यक्तीच्या मनाची अवस्था दर्शविण्यासाठी येतात. एखाद्या घटनेच्या किंवा प्रसंगाच्या आधारे गोखले अलगद त्या व्यक्तीच्या मनात शिरतात आणि तिच्या व्यक्तित्वाचे पदर उलगडून तिचे अगदी वेगळे, जिवंत आणि अनपेक्षित असे दर्शन आपल्याला घडवितात. एखाद्या प्रसंगाच्या अनुरोधाने व्यक्तिमनाचा सर्वस्वी अकल्पित असा आविष्कार करण्याची किमया गोखल्यांना साधलेली आहे. याचे प्रत्यंतर त्यांच्या बहुसंख्य कथा वाचताना आपल्याला येते. त्यांच्या 'रिक्ता' या प्रसिद्ध कथेत हीनदीन, रंग, रूप, शिक्षण नसलेली रंगनाथाची बायको आहे. तिच्या रिक्तपणात, रितेपणातच तिचे सगळे सामर्थ्य आहे. त्यांच्या 'सावधान' या कथेतील रामदासस्वामींच्या उपेक्षित वाग्दत्त वधूचे एकाकीपण; 'सुरामारी' या कथेतील रझाक या गुंडाची मनोव्यथा; 'कवडसा'मधील मवाल्यापासून सुटका करणाऱ्या उपकारकर्त्याचाच तिरस्कार करणारी सुषमा; 'कातरवेळे'ला भरल्या माहेरात एकाएकी लग्नापूर्वीच्या प्रियकराच्या आठवणीने व्याकूळ होणारी आक्का; 'विघ्नहर्ती' या कथेतील, लग्न निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून नवऱ्याच्या मृत्यूचे दुःख लपविणारी दत्तूकाकाची बायको; किंवा 'अविधवा'मधली डॉ. इरावती यांसारखी विलक्षण आणि अतर्क्य असे जगणारी आणि वागणारी माणसे गोखल्यांच्या कथांमधे आपल्याला ठिकठिकाणी दिसतात. या साऱ्या माणसांच्या, व्यक्तींच्या अंतरंगात शिरून ही सारी माणसे गोखल्यांनी उत्कट आणि सजीव केलेली आहेत. म्हणून गोखल्यांची कथा म्हणजे तऱ्हतऱ्हेच्या प्रसंगांतून जाणाऱ्या भिन्नभिन्न व्यक्तींच्या अंतरंगाचा अखंड शोध आहे.

मानवी मानसिकतेचा हा शोध घेताना निरनिराळ्या धर्मांच्या, जातींच्या, पेशांच्या, वेगवेगळ्या परिस्थितीतल्या आणि प्रसंगातल्या असंख्य नानाविध व्यक्तींनी, माणसांनी गोखल्यांचे कथाविश्व गजबजले आहे. पण तरीही तिथे गर्दी झालेली नाही. कारण गोखल्यांनी ही सर्व माणसे एकमेकांपेक्षा वेगळी केलेली आहेत. प्रत्येकाला वेगळे अस्तित्व दिलेले


आहे. प्रत्येकात वेगळा स्वतंत्र प्राण ओतलेला आहे. हे गोखल्यांना जमले ते त्यांच्या या माणसांकडे पाहण्याच्या अनपेक्षित दृष्टिकोनामुळे, या माणसांच्या जीवनातील आणि व्यक्तित्वातील चमत्कृती शोधून काढण्याच्या त्यांच्या हव्यासामुळे आणि अखेरीला वेगवेगळ्या प्रसंगांत सापडलेल्या या माणसांशी समरस होण्याच्या त्यांच्या अमर्याद शक्तीमुळे. या शक्तीमुळेच त्यांच्या कथेतील या सर्व व्यक्ती, ही सर्व माणसे इतकी वेगवेगळी, वैयक्तिक आणि चित्रविचित्र स्वरूपात प्रकटली आहेत, की त्यामुळे गोखल्यांच्या कथेला एक खरीखुरी आणि अंतर्बाह्य विविधता आणि वैचित्र्य लाभले आहे. या अंतर्बाह्य विविधतेमुळेच गोखल्यांच्या कथेला कुठलेही तंत्र नाही, कुठलीही शैली नाही. तंत्राच्या आणि शैलीच्या ठरावीक चाकोरीत ती बसूच शकत नाही. 'Style is the man' असे म्हटले जाते. ते खरे असेल किंवा नसेल; पण 'Style is not an author'. कारण स्टाइल म्हणजे अखेरीला साचा, स्टाइल म्हणजे बंधने, स्टाइल म्हणजे मर्यादा. गोखल्यांच्या कथेमध्ये इतकी विविधता आहे की ती शैलीच्या बंधनात अडकूच शकत नाही. शैलीचे जोखड तिला मानवणेच शक्य नाही. कारण त्यांच्या प्रत्येक कथेची शैली वेगळी, अभिव्यक्ती वेगळी आहे. ती स्वतंत्र, स्वयंभू आणि आशयानुरूप आहे. कथेतल्या अनुभवातून ती निर्माण झाली आहे, इतकेच नव्हे तर त्या अनुभवाशी ती एकजीव झाली आहे. अंगाला, शरीराला जसे कातडे चिकटलेले असते तशी त्यांच्या कथेची अभिव्यक्ती आशयाला चिकटलेली असते. म्हणून त्यांची कथा वाचताना त्यांची शैली स्वतंत्रपणे जाणवत नाही. कारण तिचे अस्तित्व आशयापासून अभिन्न आहे.

गोखल्यांची कथा जशी तंत्राच्या, शैलीच्या बंधनात अडकलेली नाही तशी ती आशयाच्या, अनुभवाच्या बंधनातही अडकलेली नाही. ‘अनामिका’मध्ये वेश्यांच्या जीवनातल्या सुखदुःखांवर त्यांनी कथा लिहिल्या आहेत. ‘मंत्रमुग्धा’मध्ये लेखकांचे, कलावंतांचे एक वेगळे भावविश्व त्यांनी रंगविले आहे. आणि ‘मुसळधार’ या संग्रहात त्यांनी त्यांच्या कथांच्या जन्मकहाण्या सांगितल्या आहेत. म्हणजे मानवी जीवनातला कुठलाही अनुभव त्यांच्या कथेला वर्ज्य नाही. इतकेच नव्हे तर अमानवी जीवनातल्या अनुभवांनाही त्यांची कथा सामोरी गेली आहे. ‘के’ या कथेत त्यांनी कोकिळेच्या भावमधुर अशा प्रणयाचे चित्रण केलेले आहे. वासरांच्या आठवणीने आक्रंदन करणाऱ्या म्हशीचे चित्रण ‘पारू’ या त्यांच्या कथेत आहे आणि ‘माहेर’ ही तर एका भिंतीवरच्या वेलीचे काव्यात्म चित्रण करणारी कथा आहे. गोखले या सर्व प्रकारच्या कथा उत्कटपणे, समरसतेने लिहू शकले, कारण ते एक स्वतंत्र, उन्मुक्त आणि स्वच्छंद कथाकार होते. इतिहासाची, संस्कृतीची, सामाजिकतेची, वाङ्मयीन संकेतांची किंबहुना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची आणि प्रतिभेचीदेखील बंधने त्यांच्या कथेवर पडली नव्हती. त्यामुळेच त्यांची कथा स्वयंभू वेगळेपणाने मराठी साहित्यात उठून दिसते. मराठी कथेच्या अत्युच्च शिखरावरील तिचे स्थान अढळ आहे.

गोखले १९९२ साली काहीसे अचानकपणे वारले. त्यावेळी त्यांचे वय ७३ वर्षांचे होते. म्हणजे आजकालच्या मानाने फार नाही. पण मुंबईहून पुण्याला बसने येताना वाटेत ते कुठेतरी पडले, त्यातून उद्‌भवलेल्या दुखण्यातून ते सावरले नाहीत, असे मला कळले. त्यांना रूबी नर्सिंग होममध्ये मी भेटायला गेलो होतो. पाच-दहा मिनिटे मी त्यांच्या खोलीत होतो. पण ते माझ्याशी काही बोलले नाहीत. कदाचित ते बोलण्याच्या अवस्थेत नव्हते. आमच्यात संवाद घडला नाही. त्यांनी क्षीण हास्य करीत माझ्याकडे बघितले. त्यांची नजर काय सांगत होती, हे मला उमजले नाही. निःशब्द नजरभेट घेऊन मी निघालो. दुसऱ्या दिवशीच गोखले गेल्याची बातमी आली. त्यांनी अबोल निरोप घेतला होता. निदान माझ्यातरी.

*(अरविंद गोखले, १९१९-१९९२)*

(दिवाळी २०१५)




*दिवाळी २०१४*

*(चित्रकार नेत्रा साठे)*

# एसेम

## नरेन्द्र चपळगावकर

ज्येष्ठ समाजवादी नेते एसेम जोशी यांचे नाव संयुक्त महाराष्ट्राशी कायम निगडित राहील. किंबहुना एसएम ही त्यांची आद्याक्षरे म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र असे एकेकाळी म्हटले जाई. त्यांचा निकटचा सहवास लाभलेल्या लेखकाने चितारलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व. १ एप्रिल या एसेम यांच्या स्मृतिदिनानिमित्त.

कनिष्ठ मध्यमवर्गात आम्ही मोडत होतो, तरीही वडिलांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत माझ्या जन्माच्या अगोदरपासून भाग घेतला होता. गांधी विचारांवर आणि अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गावर विश्वास असलेल्या स्वामी रामानंद तीर्थांच्या सहकाऱ्यांपैकी ते एक होते. त्यामुळे राजकारण थोडेफार आमच्या घरातच होते. व्यक्तिजीवनातील सचोटी आणि निरलसता हा त्याकाळी अनेक राजकीय कार्यकर्त्यांत आढळणारा विशेष होता. १९४८ साली नाशिकला मामांकडे काही दिवस असताना मी राष्ट्र-सेवादलाच्या घराजवळच असलेल्या शाखेवर जात होतो; पण ते वय राजकीय तत्त्वज्ञान समजण्याचे नव्हते. १९५०च्या सुमाराला गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे इत्यादी आणि त्यांचे अनुयायी काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांनी समाजवादी पक्षात जावे, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. गोविंदभाईंना ते मान्य नव्हते. गोविंदभाईंनी लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स नावाचा एक पक्ष स्थापन केला, त्यात अनंतरावही गेले. कम्युनिस्टांबरोबर लीगने आघाडी करून निवडणुका लढवल्या. त्यात दारुण पराभव झाल्यानंतर लीग ऑफ सोशालिस्ट वर्कर्स विसर्जित झाली तेव्हा बहुतेक कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षात गेले. थोड्या राहिलेल्या मंडळींनी स्वतंत्र राहून लोकशाही समाजवादी विचारांच्या आधाराने काही सार्वजनिक काम सुरू केले. अनंत भालेराव त्यांपैकीच एक. अनंतरावांचा ओढा समाजवादी पक्षाकडे होता. ते ज्या वृत्तपत्राचे संपादक होते त्याचा अधिकृत पाठिंबा कोणालाच नसला तरी सर्वसामान्यतः सत्ताधाऱ्यांना विरोध आणि लोकशाही समाजवादी विचारांना पाठिंबा हीच त्याचीही भूमिका होती. साहजिकच एस.एम., नानासाहेब गोरे आदी मंडळी औरंगाबादला आली म्हणजे ती अनंतराव, काशीनाथ नावंदर, बन्सीलाल लड्डा अशांना भेटत. राष्ट्रसेवादल कलापथकाचे कार्यक्रम झाले की त्याची व्यवस्था अनंतराव आणि त्यांचे मित्रच करीत असत.

माझे वडील अनंतरावांचे स्नेही होते. विद्यार्थिजीवनापासूनच अनंतराव आणि 'मराठवाडा' यांच्याबद्दल मलाही आपुलकी होती. या परिवारातच कधीतरी एस.एम.ना समक्ष पाहिले. मी विद्यार्थी असताना काही दिवस सरस्वती कॉलनीत राहत होतो. सरस्वती भुवन सभागृहात सार्वजनिक सभा होत. तेथून जवळच माझे घर होते. एकदोन वेळा एस.एम.ची भाषणे झाल्यानंतर त्यांची विश्रांतीची व्यवस्था माझ्या घरात करण्यात आली होती. एका विद्यार्थ्याचे घर. त्यात फारशा सोयी काय असणार? पण एसेमना त्याची काळजी नसे. कार्यक्रम संपवून आले, म्हणजे एसेम १०- १५ मिनिटे तरी माझ्याशी बोलत. माझ्या अभ्यासाचे विषय, माझी उत्साही बातमीदारी, माझे कुटुंब याबद्दलचेच ते बोलणे असे. राजकारणाचा विषय त्यात नसे. घरातल्या एखाद्या वडीलधाऱ्या माणसाने चौकशी करावी, आस्था व्यक्त करावी असे ते बोलणे असे. आग्रह केला तर कपभर दूध घेत आणि झोपून जात. सकाळी कोणी तरी त्यांना पुढच्या मुक्कामासाठी घेऊन जाई.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा तो काळ होता. एस.एम. हे त्या चळवळीचे नेते होते. मला तरुणवयात सर्वांत जास्त प्रभावित केले ते एस.एम.नी. त्यांच्या व्यक्तित्वातला नितळपणा आणि सामान्यांविषयी असलेली कळकळ मला आकर्षित करे. लोकशाही समाजवादाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून मी समाजवादी झालो नाही. राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून ते तत्त्वज्ञान अमलात आणू इच्छिणाऱ्या राजकीय पक्षात सामील होण्याची प्रक्रिया फार कमी लोकांची होत असावी. मी समाजवादी पक्षाकडे ओढला गेलो याचे कारण एस. एम. जोशी आणि अनंत भालेराव ही दोन माणसे. औरंगाबाद येथे असताना आणि नंतर लातूरच्या एक वर्षाच्या प्राध्यापकीत एस.एम. यांचे नेतृत्व मनावर संस्कार करत होते. अनंत भालेराव हे तर माझेच नव्हे तर माझ्या वडिलांचेही स्नेही होते. राजकीय विचार पुस्तकातून वाचण्याऐवजी या दोघांच्या प्रत्यक्ष कृतीतून मी समजून घेत होतो आणि नंतर त्याला वाचनाची जोड देऊन त्याचा शास्त्रीय आधार समजून घेत होतो. लोकशाही समाजवाद मी बऱ्याच नंतरच्या काळात समजून घेतला. तात्त्विक भूमिकेपेक्षा कोणत्याही अन्यायाविरुद्ध राजकीय

फायद्यातोट्याचा विचार न करता संघर्ष करण्याची एस.एम.ची मानसिकता मला आवडली.

१९४८ साली नाशिकला मामांच्या घरी काही दिवस असताना जवळच भरणाऱ्या राष्ट्रसेवादलाच्या शाखेत मी जाऊ लागलो. परंतु सहा महिन्यांतच आम्ही पुन्हा बीडला परत आलो. त्यानंतर बरीच वर्षे राष्ट्रसेवादलाचा संपर्क आला नाही. बीडला सेवादलाची नियमित शाखा आम्ही चालवत होतो. मात्र मध्यवर्तीशी त्याचा काही संबंध नव्हता. त्या शाखेवर अनेकांची भाषणे होत. त्यात विचाराने लोकशाही समाजवादी असलेले बाबासाहेब परांजपेही होते. परंतु माझे वय राजकीय तत्त्वज्ञान समजण्याचे खचितच नव्हते.

चळवळीच्या काळात काँग्रेसचे हंगामी प्रमुख बनलेल्या मामा देवगिरीकरांनी काँग्रेस सेवा दलाचे विसर्जन जाहीर केले, त्यामुळे स्वतंत्र युवक संघटना स्थापन करण्याची गरज वाटू लागली. एस.एम., नानासाहेब गोरे व शिरुभाऊ लिमये यांनी ही जबाबदारी स्वीकारण्याचे ठरवले. राष्ट्रसेवादलाचे काम बेचाळीस ते सत्तेचाळीसपर्यंत व्यवस्थित चालले. बेचाळीसच्या चळवळीत तोडफोडसुद्धा करणारे समाजवादी कार्यकर्ते नेते असलेले राष्ट्रसेवादल ही वाढणारी शक्ती असली तरी ती मंगल आहेच की नाही, अशी शंका शंकरराव देवांच्या मनात निर्माण झाली व ती त्यांनी बोलून दाखवली, त्यामुळे राष्ट्रसेवादल काँग्रेसपासून स्वतंत्र झाले. आपला कार्यक्रम स्वतंत्रपणे सेवादलाने राबवावा, फक्त निवडणुकीच्यावेळी आणि महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांबद्दल मात्र समाजवादी पक्ष ही आपली राजकीय आघाडी आहे, असे सेवादलाने मानावे, असा सल्ला आचार्य जावडेकरांनी दिला. त्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संघटना खूप जोरात फोफावत असल्यामुळे सेवादलाचे कार्य वाढवण्याची गरज समाजवादी नेत्यांना वाटत होती.

१९६० साली मी एम.ए. झालो आणि लातूरच्या दयानंद महाविद्यालयात मराठी विषय शिकवू लागलो. त्यावेळी बापू काळदाते राष्ट्रसेवादलाचे पूर्ण वेळ सेवक होते. महिन्या दोन महिन्यांनी त्यांची लातूरला फेरी होई. लातूरला राष्ट्रसेवादलाची शाखाही असे आणि सेवादलाच्या विचारांना मानणारी व समाजवादी कार्यकर्त्यांबद्दल सहानुभूती बाळगणारी निरनिराळ्या व्यवसायांत असलेली काही माणसेही होती. त्यामुळे लातूर हे राष्ट्रसेवादलाच्या कार्याचे एक केंद्र बनले होते.

याच काळात वरळीला सरदार पटेल स्टेडियमवर राष्ट्रसेवादलाचा भव्य क्रीडा-मेळावा भरला होता. या मेळाव्याला मी गेलो होतो. मेळाव्याच्या समारोपासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्रीप्रकाश आले होते. त्यांच्या पहिल्या रांगेच्या मागच्याच रांगेत मी बसलेलो होतो. राज्यपालांच्या शेजारी बसलेले एस.एम. त्यांच्याशी बोलत होते. दोघेही एकमेकांना पहिल्या नावाने संबोधत होते. मला त्याबद्दल आश्चर्य वाटत होते. नंतर अनेक वर्षांनी कळले, की श्रीप्रकाशांच्या घरीच समाजवादी पक्षाच्या स्थापना-तयारीची बैठक झाली होती. श्रीप्रकाश समाजवादी विचारांच्या आणि नेत्यांच्या स्नेहात होते. एस.एम.नी बोलताबोलता श्रीप्रकाशांना प्रश्न केला की 'राज्यसभेवरील नेमणुका करताना राजकारणात नसलेल्या पण समाजोपयोगी काम करणारांचा विचार का होत नाही?' श्रीप्रकाशांनी विचारले, 'तुझ्या मनात असे एखादे नाव आहे काय?' एस.एम.नी संततिनियमनाच्या प्रचाराचे काम सातत्याने करणाऱ्या शकुंतलाबाई परांजप्यांचे नाव सुचवले. थोड्याच दिवसांनी शकुंतलाबाईंची राज्यसभेवर नेमणूक झाली. एस.एम.च्या शब्दाला त्यांची निःस्वार्थवृत्ती जाणणाऱ्या मंडळीत केवढे महत्त्व आहे, हे मला कळले.

पुढे मी समाजवादी पक्षाचे काम रीतसर करू लागलो. फारसा क्रियाशील नव्हतो, जवळपास सहानुभूतीदाराचेच काम होते; पण थोडा अधिक वेळ त्यासाठी देऊ लागलो होतो. समाजवादी पक्षाच्या दोनतीन मेळाव्यांत-अधिवेशनांत एस.एम.ना पाहण्याची संधी मिळाली तेव्हा एस.एम.विषयी कार्यकर्त्यांच्या मनात किती प्रेम आहे, हे लक्षात आले. हडपसरच्या मेळाव्यात बाबा आढाव यांनी राजकीय पक्षाच्या माध्यमातून समतेची चळवळ पुढे नेणे अशक्य आहे, त्यासाठी आंदोलनाचे मार्गच स्वीकारावे लागतील, अशी भूमिका मांडली होती. त्या चर्चेच्या नंतर शेवटी एस.एम.नी दोन्ही मार्ग एकमेकांच्या हातात हात घालून स्वीकारणे कसे आवश्यक आहे, याबद्दल आपले मत मांडले होते.

एस.एम.च्या राजकीय जीवनाचा प्रारंभ 'युथ लीग' नावाच्या युवक संघटनेत झाला होता. जातीयवादाविरुद्ध संघर्ष, संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढा आणि स्वदेशीचा वापर अशा तीन प्रतिज्ञा या संघटनेचे युवक घेत होते. या संघटनेच्या परिषदांना सुभाषचंद्र बोस आणि जवाहरलाल नेहरूसुद्धा येत असत. विशीपंचविशीतच एस.एम.चा राजकारणातला सहभाग सुरू झाला. कठीण आर्थिक परिस्थितीशी सामना देत, चळवळीतून वेळ मिळेल तेव्हा अभ्यास करीत, त्यांनी शिक्षण चालू ठेवले होते. फारसे वक्तृत्व नव्हते; आपले भाषण मुद्दाम आकर्षक करण्याची सवयही नव्हती; पण प्रतिपादनात त्या विषयासंबंधी केलेला विचार आणि तळमळ प्रगट होत असे. मनाचा नितळपणा आणि पूर्णपणे निःस्वार्थवृत्ती हे एस.एम.चे गुण त्यांच्याबद्दल विलक्षण प्रेम निर्माण करण्याला कारणीभूत होते. पर्वती हे आता पुणे शहरात आलेले देवस्थान. त्यात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांना प्रवेश मिळावा यासाठी आपल्या मित्रांसह एस.एम.नी सत्याग्रह केला आणि त्यात सनातन्यांनी केलेल्या मारहाणीत डोकेही फोडून घेतले.

किडकिडीत शरीरयष्टी असलेल्या; पण वृत्तीने निर्भय असलेल्या, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या, रंगाने गोरे असलेल्या, नितळ स्वभावाच्या या तरुणाने तत्कालीन अनेक तरुण मुलींच्या मनात स्थान मिळवले असणार. पण आपल्या पुढील कर्तव्याचा आणि जीवनातल्या आपल्या प्राधान्यांचा कधीही विसर न पडू देणारा हा तरुण या तारुण्यसुलभ भावनेला निग्रहाने दूर सारत होता. शेवटी एक शाळेत शिक्षिकेचे काम करणाऱ्या तारा पेंडसे या तरुणीच्या आराधनेला यश आले. संसार मांडण्यासारखी आपली आर्थिक परिस्थिती नाही, हे स्पष्टपणे एस.एम.नी अनेक वेळा सांगूनही ताराबाई आपल्या निश्चयापासून मागे ढळल्या नाहीत. निमंत्रणपत्रिकाही न काढलेल्या व गोखले हॉलमध्ये १९३९ साली संपन्न झालेल्या या विवाहास अनेक मंत्री, विविध

पक्षांतले राजकीय कार्यकर्ते व सामान्य नागरिकही मोठ्या संख्येने हजर होते. वराचे घर म्हणजे एक खोली व त्यात लग्नाला आलेल्या नातेवाईक मंडळींनी दाटीवाटी केलेली. शेवटी एका मित्राने त्यांना आपल्या घरी नेले. पुढे त्यांचा कष्टाचा पण आनंदाचा, एकमेकांना समजून घेण्याचा संसार सुरू झाला. ताराबाईंचा पगार हेच उत्पन्नाचे कलम. त्यात काटकसरीने संसार करीत एस.एम.नी देशाच्या संसाराकडे लक्ष दिले.

'चले जाव'ची घोषणा गांधीजींनी गोवालिया टँक मैदानावरच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात बेचाळीस साली केली आणि आपण लगेच अटक करून घेण्याऐवजी भूमिगत होऊन मनुष्यहानी न करता राज्ययंत्रणा खिळखिळी करणाऱ्या चळवळीचे मार्गदर्शन करण्याची योजना समाजवाद्यांनी आखली. जयप्रकाश, नानासाहेब गोरे, एस.एम., साने गुरुजी, अच्युतराव पटवर्धन अशी सगळीच मंडळी भूमिगत झाली आणि चळचळीला काही दिवस जोम आला. या काळात पोलिसांनी आपल्याला ओळखू नये म्हणून एस.एम.नी दाढी वाढवून मुस्लिम परिवेश आणि इमामसाहेब हे नाव धारण केले. एस. एम.च्या निर्भय आणि त्यागमय जीवनाला इमामसाहेबांनी एक रोमँटिक अध्याय जोडला.

स्वातंत्र्य जवळ आले तेव्हा पुढच्या काळात समाजवादी मंडळी आणि काँग्रेस पक्ष यांचा परस्परसंबंध कसा असावा, याबद्दल चर्चा सुरू झाली. आतापर्यंत काँग्रेसअंतर्गत एक उपपक्ष म्हणून समाजवादी काम करत होते. आता काँग्रेसमध्येच राहून असे काम करता येणार नाही, असे दिसू लागले. समाजवादी आणि काँग्रेस यांनी आपसातील वाद वाढवून कम्युनिस्टांचे फावू देऊ नये, असा अनेकांनी विचार केला. त्या दोघांत काहीतरी सामंजस्य शिल्लक राहावे, अशा सूचनाही करण्यात आल्या. दोन्ही पक्षांतील काही नेत्यांच्या एकत्र बैठकाही झाल्या. स्वत: गांधीजींनीही मध्यस्थी केली; पण त्याचा उपयोग झाला नाही. अठ्ठेचाळीस साली स्वातंत्र्यानंतर अवघ्या एक वर्षाने समाजवादी काँग्रेसमधून बाहेर पडले. समाजवादी नेत्यांबद्दल लोकांत प्रचंड आदर होता; पण त्यांना कारभार करण्यासाठी निवडून द्यावे, असे मात्र लोकांना वाटत नव्हते. बावन्नच्या निवडणुकीत मोठाच अपेक्षाभंग झाला आणि लोकचळवळ हाच आपल्यासाठी लोकसेवेचा मार्ग आहे, हे त्यांच्या ध्यानात आले. एस.एम.ना तर सत्तेची अभिलाषाच नव्हती. त्यांनी बावन्न सालची निवडणूक लढवलीच नव्हती. चळवळ हेच त्यांच्या मनोभूमिकेला साजेसे काम होते आणि त्यांनी ते मात्र आयुष्यभर केले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत एस.एम.च्या व्यक्तित्वाचे तेज आणखी उजळून निघाले. पक्षातील अनेकांचा विरोध पत्करून ते संयुक्त महाराष्ट्र समितीत सामील झाले. सर्व कठीण प्रसंगांना तोंड देऊन चळवळ चालवली आणि कम्युनिस्टांनी समितीचा राजकीय पक्ष करण्याची सूचना केल्यानंतर एस.एम. समितीतून बाहेरही पडले. कम्युनिस्टांच्या भूमिकेला त्या काळात पाठिंबा देणाऱ्या आचार्य अत्र्यांच्या शाब्दिक शेणमाराला त्यांनी तोंडही दिले. संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा मंगल कलशाच्या श्रेयाच्या भांडणात ते गेलेच नाहीत. तरी 'एस.एम. म्हणजे संयुक्त महाराष्ट्र' हे समीकरण महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात कायमचे बसले आहे. निवडणुकीच्या काळात समाजाच्या मनात खोल असलेले जातवास्तव वर येते आणि त्याचे चटकेही बसतात. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ भरात असताना विधानसभेची निवडणूक झाली. त्यात 'समिती निवडून आली तर एस.एम. मुख्यमंत्री होतील' असे सूचक जातीय अर्थाचे विधान प्रचारात करण्याचा मार्ग भल्याभल्या काँग्रेस नेत्यांनी वापरला. पण समितीला बहुमत मिळाले नाही आणि मिळाले असते तरी एस.एम. मुख्यमंत्री झाले नसते. जेव्हा एस.एम. ज्या राजकीय पक्षात होते तो राजकीय पक्ष पुढे सत्तेत भागीदार झाला तेव्हाही एस.एम.नी कोणतेही सत्तापद स्वीकारले नाही.

दंगल जातीय असो अगर इतर कारणाने पेटलेली, त्यात आत घुसून दंगलखोरांना आवरणारी माणसे आता उरली नाहीत. क्रुद्ध झालेल्या आणि सुडाने पेटलेल्या माणसांच्या डोळ्यांनाही ज्याचे व्यक्तित्व थांबवू शकते, अशी काही माणसे त्या काळी होती. दिल्लीतल्या हिंदू-मुसलमानांच्या दंगलीत जवाहरलाल नेहरू एकदोन वेळा घुसले व त्यांनी दंगल थांबवण्याचा प्रयत्न केला होता. पुण्यामध्ये १९६५ साली हिंदू-मुस्लिम दंगल झाली. या दंगलीच्या वेळी मुस्लिम वस्ती असलेल्या इस्लामपुरा नावाच्या भागात जाळपोळ चालू आहे, हे कळताच एस.एम. तिकडे धावले व त्यांनी दंगलखोरांना आवरून तो भाग वाचवला. १९७३ सालीसुद्धा नानापेठेत एस.एम. दंगलखोरांना सामोरे गेले आणि त्यांनी शांतता प्रस्थापित केली. दंगल थांबवणे हे जिवावर उदार होऊ शकणाऱ्या माणसाचेच काम असते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत २८ जानेवारी १९५६ रोजी घडलेला प्रसंग आहे. दादर भागातल्या फुलबाजारात जाळपोळ थांबवण्यासाठी आलेल्या पोलिसांनाच जमावाने घेरले. आडवाणी नावाचे इन्स्पेक्टर पोलिसांचे नेतृत्व करत होते. त्यांना मारण्यासाठी जमाव पुढे सरकू लागला तेव्हा एस.एम. पुढे झाले आणि आपले दोन्ही हात बाजूला पसरवून त्यांनी आडवाणींना पाठीशी घातले. एस.एम.नी सांगितले 'मला ठार केल्यानंतरच तुम्ही यांच्या अंगाला हात लावू शकाल.' बोलत बोलत एस.एम.नी पाठीमागे रेटत रेटत लॉरीपर्यंत आडवणींना पोहोचवले आणि त्यांना वाचवले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत गुजरात्यांवर अत्याचार होत आहे, अशी खोटीच आवई विरोधकांनी उठवली. त्यावेळी एस.एम. आणि भाऊसाहेब रानडे काही दिवस गुजरात्यांच्या चाळीमध्ये त्यांच्यात विश्वास निर्माण करण्यासाठी रात्री झोपायला जात.

एस.एम.बद्दल जी जवळीक जयप्रकाशांसारख्या ज्येष्ठ नेत्यापासून अगदी तळाच्या सामान्य कार्यकर्त्यापर्यंत वाटे तिचे कारण एस.एम.चे निःस्वार्थ व कोणत्याही त्यागाला तयार असलेले व्यक्तिमत्त्व हेच होते. ही पारदर्शकता आणि नितळपणा केवळ व्यक्ती म्हणूनच नव्हे तर एक राजकारणी म्हणूनसुद्धा एस.एम.जवळ होता. एखाद्या प्रश्नासंबंधी त्यांच्या होणाऱ्या प्रतिक्रिया अतिशय स्वाभाविक असत आणि त्याला ते अगदी उघड वाट करून देत. राजकारणाच्या सोयीसाठी हा माणूस एखादी भूमिका मुद्दाम घेतो आहे असे कधीही वाटत नसे. कारण तसे ते होतच नव्हते. अन्यायाविषयी आणि अत्याचाराविषयी चीड हा

एस.एम. यांच्या अंत:करणाचा उद्गार होता. एखाद्या वाईट गोष्टीविषयी गप्प बसावयाचे आणि दुसऱ्या एखाद्या वाईट गोष्टीचा मात्र निषेध करावयाचा असे त्यांच्याकडून होत नसे. एस.एम.चे राजकारण आणि समाजकारण ही त्यांची सहजप्रेरणा होती.

या त्यांच्या नितळपणामुळे लोकांचे मन कळणेही त्यांना अधिक सोपे होई. इतर कार्यकर्ते ज्यावेळी स्वत:भोवती निर्माण केलेल्या कोषामुळे भ्रमात वावरत त्यावेळी एसेम मात्र वास्तवात पक्के उभे असत. अशाच एका निवडणुकीच्या वेळी मी आणि ना. य. डोळे त्यांना नांदेडहून लातूरला घेऊन जात होतो. आमच्या लातूरच्या उमेदवाराने जी गाडी आणली होती त्यात तो उमेदवार आणि मी, तर डोळ्यांच्या गाडीत डोळे आणि एस.एम. असे होतो. लोहयाच्या जवळ डोळ्यांच्या गाडीचे दिवे गेले आणि अंधारात गाडी चालवणे धोक्याचे असल्यामुळे आम्ही थांबण्याचा निर्णय घेतला. पहाटेचे तीन वाजले होते. लोहयाच्या डाक बंगल्यातील एका कॉटवर अण्णा (एस.एम.) लवंडले परंतु त्यांना झोप लागत नव्हती. म्हणून मी व डोळे त्यांच्याशी गप्पा मारत होतो. त्यावेळी आमचे लोकसभेत २४-२५ खासदार होते. या निवडणुकीत ही संख्या किती वाढेल असा आम्ही प्रश्न केला. अण्णांनी 'वाढेल कसली, जास्तीत जास्त आपले दोन-चार लोक निवडून आले तरी जिंकलो म्हणू,' असे उत्तर दिले. अण्णांचे उत्तर आमचा भ्रमनिरास करणारे होते. परंतु ते बरोबर ठरले. आमचे तीनच लोक निवडून येऊ शकले. लोकांच्या मनात काय चालले आहे हे अण्णांना बरोबर उमगत होते.

एका निवडणूक दौऱ्यात किशोर पवारांनी एक गाडी एसेमच्या मदतीला दिली होती. त्या गाडीची एक समोरची सीट एसेमना झोपता येईल अशी पूर्ण मागे वळविण्याची व्यवस्था होती. या गाडीने एस.एम. औरंगाबादला आले. तेथून दौरा सुरू होणार होता. त्यांना एका सभेसाठी नेण्याची जबाबदारी माझ्याकडे होती म्हणून मी औरंगाबादला आलो होतो. मी त्यांना घेऊन गेलो. तेथील सभा आटोपली आणि एस.एम.ना निरोप देताना लक्षात आले की, ड्रायव्हर सोडून त्यांच्याबरोबर कोणीच नाही. बरोबर कोणी का नाही असे मी विचारले, तेव्हा 'त्याचा विचार दौरा ठरवणारांनी करावयास हवा होता' एवढेच एस.एम. म्हणाले. वस्तुत: एस.एम.चे वय आणि दर्जा आणि निवडणुकीतील वातावरण लक्षात घेता कोणीतरी सोबत असणे आवश्यक होते. ते पुण्याला परत जाईपर्यंत त्यांच्याबरोबर राहण्याचा मीच निर्णय घेतला.

चार-पाच दिवसांच्या दौऱ्यात एस.एम.ना आणखी जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यातली एक सभा माळशिरसला होती. सभा मोठी होती पण वीज गेलेली होती. चांदण्यात समोर बसलेल्या माणसांची मोठी गर्दी मात्र दिसत होती. व्यासपीठावरही उजेड नव्हता. चंद्रशेखरांवर नुकताच जवळच्या अकलूजमध्ये हल्ला झाला होता. अंधारातून व्यासपीठाच्या दिशेने कोणी एखादा दगड भिरकावला तरी कठीण प्रसंग उद्‌भवू शकत होता. एस.एम.च्या खुर्चीजवळ उभे राहण्यापलीकडे दुसरे काहीच करता येण्यासारखे नव्हते. एस.एम. मात्र अतिशय शांतपणे राज्यघटनेतील स्वातंत्र्याचे आणि समतेचे तत्त्व अगदी तळाच्या माणसांनासुद्धा कसे उपलब्ध करून देता येईल हे पाहणे राजकारणाचे ध्येय असले पाहिजे हे समजावून सांगत होते. प्रचंड मोठी सभा संपूर्ण शांततेत त्यांचे भाषण ऐकत होती.

एस.एम.बरोबरचा हा प्रवास म्हणजे एक शिक्षणानुभव होता. काही निवडणूक प्रचारसभा खूप मोठ्या असत. तर काही ठिकाणी सभेचे नियोजन बरोबर नसे. अशा सर्व ठिकाणी एस.एम. सारख्याच गांभीर्याने बोलत. एस.एम.च्या वक्तृत्वाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांचा सोपेपणा. महत्त्वाचा विचार सांगतानासुद्धा अवघड शब्दांचा आधार घ्यावा लागत नाही हे एस.एम.कडून शिकण्यासारखे होते. भारताने अंगीकारलेली लोकशाही व्यवस्था, राज्यघटनेत हमी देण्यात आलेली मूलभूत स्वातंत्र्ये आणि त्यावर घालण्यात येणारी बंधने एस.एम. अतिशय सोप्या शब्दांत आणि नेमक्या उदाहरणांनी समजावून सांगत. त्यांच्या वक्तृत्वाचा दुसरा विशेष म्हणजे त्यामागची तळमळ. एस.एम. काही शब्दांचा फुलोरा फुलवू शकणारे किंवा आपल्या बोलण्याच्या वेगाने लोकांना मंत्रमुग्ध करणारे वक्ते नव्हते. आकर्षून घेई ती त्यांच्या बोलण्यामागची तळमळ. एखादा विषय हा लोकांच्या हिताचा आहे आणि तो लोकांना समजावून सांगितला पाहिजे हे त्यांना मनोमन पटलेले असे आणि त्यामधून त्यांचे प्रतिपादन जन्माला आलेले असे. साहजिकच एका शिक्षकाने लोकांशी साधलेला संवाद असे त्यांच्या भाषणाचे स्वरूप असे.

*मी एस.एम.* या त्यांच्या आत्मकथनात आपल्यावर लोक एवढे प्रेम का करतात या प्रश्नाचे उत्तर त्यांनीच शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात त्यांच्या अवघ्या जीवनाचे मर्म व्यक्त झाले आहे. ''माझ्या अंगी लोकोत्तर असे काही नाही. परंतु काम हाती घेतले म्हणजे त्यात सारा जीव ओतून ते करण्याचा माझा जणू स्वभावच बनला आहे. त्यामुळे एखाद्याच्या दु:खाबद्दल मला सहानुभूती वाटली तर मी त्याच्याशी पूर्णपणे एकजीव होऊन ते अनुभवतो. माझा तो स्वभावधर्मच बनला आहे. कित्येक वेळा मला प्रश्न पडतो की, लोक माझ्यावर इतके प्रेम का करतात? त्याचे उत्तरही माझ्या या स्वभावधर्मामध्ये शोधावे लागते.''

लोकांची दु:खे आणि प्रश्न हे हल्ली राजकीय नेत्यांसाठी चळवळीला उपयोगी पडणारे विषय असतात. त्यांची निवड करून ते विचारपूर्वक हाती घेतले जातात. एस.एम.बद्दल असे घडत नव्हते. लोकांचे दु:ख आणि त्यांच्यावर झालेला अन्याय एस.एम.च्या अंत:करणाला भिडे आणि त्यांच्याकडून आपोआपच क्रिया होई.

मी महाविद्यालयीन विद्यार्थी असताना संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली होती. एखाद्या प्रश्नाला सर्वस्व वाहिलेला नेता कसा असतो याचा त्या काळातले एस.एम. हा एक वस्तुपाठ होता. अनेक राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते चळवळीचा आपल्या पक्षाला काय उपयोग होईल याचा हिशेब मांडत होते आणि एस.एम. मात्र कर्मफलाची आशा न धरणाऱ्या एखाद्या योग्याप्रमाणे चळवळीचे नेतृत्व करीत होते. या चळवळीच्या काळात एस.एम.नी घेतलेले अनेक निर्णय त्यांच्या या नि:संग वृत्तीचेच द्योतक होते. ५७ सालची निवडणूक होणार होती. समितीला चांगले यश मिळणार हे दिसतच होते. अशा वेळी ज्यातून ते स्वत: निवडून आले होते तो सदाशिव पेठ मतदारसंघ हिंदुमहासभेने

जयंतराव टिळकांसाठी मागितला. समितीत ऐक्य टिकावे, हिंदुमहासभा ही बरोबर राहावी याच इच्छेने एस.एम.नी आपला मतदारसंघ टिळकांना देऊन टाकला. समितीच्या शिडीने सत्तेच्या सिंहासनावर चढता येईल असे सर्वांचे हिशेब असताना समितीला बहुमत मिळाले तरी समितीने सत्ता घेऊ नये अशी भूमिका एस.एम.नी मांडली. बहुतेक नेते या भूमिकेच्या विरोधात होते. सत्ता मिळण्याची शक्यता असताना सत्ता न घेण्याचा निर्णय करणे हे राजकारणातील नेत्यासाठी फार अवघड असते. डॉ. आंबेडकरांनी मात्र पूर्वीच एस.एम.च्या या भूमिकेला पाठिंबा दिला होता आणि बजावले होते की, सत्तेला स्पर्श केलात तर तुमचे ऐक्य टिकणार नाही.

१९५० ते ६५ या सुमाराचा काळ हा लोकशाही समाजवादी चळवळीच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी एक सुवर्णयुग होते. सत्तेबित्तेच्या आम्ही जवळ नव्हतो, परंतु चळवळीचे नेतृत्व आणि कार्यकर्ते या सर्वांच्याबद्दल एक विलक्षण आदराची भावना महाराष्ट्रभर होती. ज्यांच्या निष्ठेबद्दल अजिबात शंका नव्हती, ज्यांच्या अविश्रांत धडपडीमुळे लोकमानसात त्यांनी स्थान मिळवले होते असे विविध जातीधर्मांचे खूप कार्यकर्ते चळवळीला लाभले होते. एसेम आणि नानासाहेबांचे नेतृत्व तर होतेच, परंतु संसदीय क्षेत्रात भारतीय लोकशाहीला पडलेले एक सुंदर स्वप्न असे ज्यांचे वर्णन होई असे नाथ पै होते, मधू दंडवते होते. जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, बाबा आढाव यांच्यासारखे नेते वेगवेगळ्या क्षेत्रांत लोकांच्या आदराचा विषय होईल असे काम करत होते. अशा या मेळाव्यात बरोबर राहणे आणि छोटेही काम करणे हा जीवनाला सार्थकता देणारा आणि धन्य करणारा अनुभव होता. एस.एम. हे या मेळाव्याचे मध्यवर्ती केंद्र होते.

एस.एम. यांचा आणखी एक विशेष महत्त्वाचा होता. एस.एम. हे लोकांच्याबरोबर आणि कार्यकर्त्यांबरोबर राहणारे नेते होते. समाजवादी पक्षाला जयप्रकाश, अच्युतराव आणि अशोक मेहता यांच्यासारखे नेते लाभले होते. जयप्रकाशांनी पक्षाला विश्वासात घेऊन त्यात चर्चा न करताच आपले आयुष्य विनोबांच्या चळवळीला देऊन टाकले. अच्युतराव पटवर्धन राजकारणातून निवृत्तच झाले तर अशोक मेहतांनी आपल्या काही सहकाऱ्यांसह काँग्रेस गाठली. या तिघांच्या नेतृत्वावर विसंबलेले असंख्य कार्यकर्ते पक्षात होते. त्यांना वाऱ्यावर सोडून देण्यात आले होते. नेता एखादा राजकीय पक्ष बनवतो, संघटना बांधतो त्यावेळी कार्यकर्ते त्याच्यावर विसंबून संघटनेत किंवा पक्षात येतात आणि त्यांच्याशी सल्लामसलत करण्याची जबाबदारी नेत्यांवर असते. रेल्वेच्या सगळ्या डब्यांना रस्त्यात सोडून इंजिनने भलतीकडेच जावयाचे नसते. परंतु हे मानणारे नेते कमीच असतात. एसेम हे एक असे नेते होते की ज्यांनी कार्यकर्ता हा आपला राजकीय निर्णयाचा भाग आहे असे मानले. जनता पक्ष फुटला त्यावेळी एसेम विभाजनाच्या विरुद्ध होते. ताडदेवच्या जनता केंद्रात समाजवादी कार्यकर्त्यांची या फुटीच्या प्रश्नासंबंधी एक बैठक झाली.

या बैठकीत जॉर्ज फर्नांडिस आणि मधू लिमये यांनी आपण पक्ष का फोडणार ही भूमिका विशद करून सांगितली. बैठकीत चर्चेला वावच नव्हता; कारण त्या दोघांचा निर्णय पूर्वीच झालेला दिसत होता. या सभेत माधव साठे नावाचे तरुण कार्यकर्ते फार पोटतिडकीने जे बोलले ते खरे होते. पुढाऱ्यांचे पक्ष बदलल्याने फारसे बिघडत नाही; पण सामान्य कार्यकर्त्यांची जीवने उद्ध्वस्त होतात, त्यांचा विचारच न करता नेते निर्णय घेतात असा साठ्यांचा आक्षेप होता. एस.एम.ना मात्र पक्ष सोडण्याचे निर्णय घाईघाईने व अपुऱ्या कारणामुळे घेऊ नयेत असे वाटत होते. संसोपाचे (संयुक्त समाजवादी पक्षाचे) ते अध्यक्ष असताना प्रजासमाजवादी पक्षाची मंडळी बाहेर पडली. परंतु त्यासाठीची कारणे पुरेशी नव्हती, त्यांची चर्चाही झाली नव्हती. अशा परिस्थितीत समाजवादी ऐक्य टिकविण्याचा प्रयत्न म्हणून सगळेच जुने सहकारी बाहेर गेले असतानाही एस.एम. संसोपातच राहिले.

पक्षातील आपले सहकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी आपले संबंध फक्त पक्षकार्यापुरते औपचारिक आहेत असे एस.एम. मानीत नव्हते. माणूस म्हणूनसुद्धा ते आपले स्नेही आहेत असे एसेम समजत. त्यामुळे थोडे मतभेद झाले की काढ आपल्याच सहकाऱ्याविरुद्ध पत्रक असे एस.एम. करीत नव्हते. आपला जुना सहकारी आपले म्हणणे ऐकून न घेता, आपली बाजू समजून न घेता आपल्याविरुद्ध जाहीर पत्रक काढतो याचे दुःख एस.एम.नाही भोगावे लागले होते. भारत-चीन युद्धानंतर चीनशी बोलणी करावीत अशी एसेमनी सूचना करताच ही सूचनाच अराष्ट्रीय आहे असे पत्रक त्यांच्या एका जुन्या सहकाऱ्याने काढले. त्याबद्दलची आपली व्यथा एसेमनी नोंदविली आहे.

एखाद्या मुद्द्यावर मतभेद झाले तरी स्नेह कायम राहू शकतो, नव्हे राहिला पाहिजे यावर एस.एम. यांची श्रद्धा होती. प्रजासमाजवादी पक्षातील सगळे जुने सहकारी संसोपा सोडून गेले आणि एसेम मात्र संसोपात राहिले. अधिवेशन संपवून ते मुंबईला आले तेव्हा त्यांना स्टेशनवरून आणण्यासाठी संसोपातील मित्रांनी गाडी पाठविली होती. पण एस.एम. स्टेशनवरून सरळ डॉ. मंडलिकांच्या घरी गेले. मंडलिक प्रसोपात परतले होते. पक्ष वेगळे झाले असले तरी स्नेहात अंतर येण्याचे कारण नव्हते. राजकारणाने अशी कटुता निर्माण करण्याचा एस.एम. यांचा स्वभाव नव्हता.

श्रेयाचे धनी होण्याची सुतराम इच्छा न बाळगता, लोकांच्या कामासाठी झटताना एस.एम. त्यांच्याशी कसे एकरूप होत याची एक आठवण पुण्याचे माजी महसूल आयुक्त के. एस. सिद्धू यांनी सांगितली आहे. ८३-८४ साली महाराष्ट्राच्या काही भागात दुष्काळ होता. अनेक खेड्यांत पिण्याचे पाणी नव्हते. एस.एम.नी एका खेड्यात नळयोजनेद्वारे पाणीपुरवठा व्हावा अशी सूचना एक पत्र लिहून आयुक्तांना केली होती. सरकारी अहवालाप्रमाणे ज्या खेड्यांना प्राधान्याने नळयोजना आवश्यक होती त्यात एसेमनी सुचवलेल्या खेड्याचा उल्लेख नव्हता. पण एसेमसारख्या व्यक्तीने सुचवले तेव्हा ती गरज खरीच असणार हे जाणून पुनः माहिती घेण्यात आली. खात्री पटल्यावर त्या गावाला नळयोजना मंजूर करून पूर्ण करण्यात आली. गावकऱ्यांनी त्या योजनेचे उद्घाटन समारंभपूर्वक करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी आयुक्त सिद्धूंना बोलावले. समारंभ उत्साहात झाला. त्यावेळी

गावकऱ्यांसोबत स्वागताला एसेम उभे होते. सिद्धूंनी त्यांना पाहिले व 'तुम्हीच योजनेचे उद्घाटन करा' अशी विनंती केली. पण एस.एम.नी नकार दिला. उद्घाटन सिद्धूंच्या हस्तेच झाले. एस.एम. गावकऱ्यांपैकी एक बनून त्यांच्यातच उभे होते. सिद्धूंनी लिहिले आहे, 'ज्यांनी हयातीत कधी सार्वजनिक अधिकारपद स्वीकारले नाही त्यांना नळयोजनेच्या समारंभात प्रमुख पाहुणा होण्यात काय विशेष? ते लोकांमध्ये उभे राहिले तेच बरोबर. कारण लोकांच्या हृदयात त्यांना स्थान होते.'

दु:खितांचे अश्रू पुसण्यासाठी प्रत्येक वेळी धावणारा हा माणूस निरस आणि रुक्ष नव्हता. व्यक्तिगत जीवनातल्या आवडीनिवडी समाजाचे हित समोर ठेवून बाजूला साराव्या लागतात हे लक्षात घेऊन एस.एम. जगले. परंतु वेळ मिळेल तेव्हा त्यांच्या मनातले क्रिकेट आणि संगीत जागे होई. बार्शीला पक्षाचे राज्य अधिवेशन भरले होते. इंग्लंडप्रमाणे भारतातील आरोग्यव्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण करावे या ठरावावर चर्चा चालू होती. त्याचवेळी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सुप्रसिद्ध लढत चालू होती. इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे वैद्यकीय सेवेचे राष्ट्रीयीकरण झाले तसेच भारतातही व्हावे, अशी मागणी करणारा ठराव चर्चेला आला होता. एस.एम. व्यासपीठावर चर्चेचे नियंत्रण करीत होते. त्यांनी खूण करून मला व्यासपीठावर बोलावले व क्रिकेटच्या सामन्याची ताजी स्थिती काय आहे याची माहिती देण्यास सांगितले. ऑस्ट्रेलियाच्या विकेट भराभर पडत होत्या आणि भारताचा विजय होण्याची शक्यता निर्माण झाली होती. आकाशवाणीवरून प्रक्षेपित होणाऱ्या धावत्या वर्णनाच्या आधारे मिळणारी माहिती मंडपाजवळच्या एका दुकानात ऐकून दर अर्ध्या तासांनी मी चिठ्ठीवर लिहून अण्णांना पोहोचवत होतो. राजकारणाचे गांभीर्य आणि त्यापासून होणारे क्लेश आयुष्यभर सोसणाऱ्या एस.एम.ना खेळ आणि संगीत यांतही रुची होती आणि जीवनातला रसिकतेचा दरवाजा त्यांनी बंद केलेला नव्हता.

एस.एम. हे आपल्या व्यक्तिगत जीवनाप्रमाणेच सार्वजनिक जीवनातही नैतिकतेचा आग्रह धरणारे नेते होते. त्यांना 'राजकारणातील स्फटिक' असे यथार्थपणे संबोधण्यात येई. मूल्यांचा ते सतत धरीत असलेला आग्रह ठायीठायी प्रगट होई. समाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या वेळी युरोपातील काही छोट्या समाजवादी देशांचे प्रतिनिधी निरीक्षक म्हणून हजर असत. अशाच एका अधिवेशनात आलेले काही प्रतिनिधी आमच्या एका ज्येष्ठ मित्राबरोबर बोलत होते. भारतात सार्वत्रिक निवडणुका लवकरच होणार होत्या. त्या परदेशी प्रतिनिधीने चांगल्या भावनेने एक प्रस्ताव आमच्या मित्रासमोर ठेवला. भारतीय समाजवादी पक्षाला निवडणुकीत मदत म्हणून कार्यालयीन कामकाजासाठी काही टाइपरायटर्स देणगी म्हणून देण्याची त्यांची इच्छा होती. आमच्या मित्राने हा प्रस्ताव एस.एम.ना सांगितला. एस.एम.नी आपल्या खास शैलीत त्याला सुनावले. 'शेणच खायचे तर मुंगीचे कशाला? हत्तीचे खाऊ की! अगदी मोठे देशही मदत करतील. पण शेण खायचे का याचा निर्णय अगोदर करा.' निवडणुकीत परकीय मदत ही गोष्ट एसेमच्या नैतिक कल्पनेत बसूच शकत नव्हती. त्यांची प्रतिक्रिया अतिशय तीव्र होती व अशा प्रसंगी त्यांच्या तोंडून सहज निघणाऱ्या रोखठोक भाषेत ती व्यक्त होत होती.

पाचलेगावकर महाराजांचे मराठवाड्यात बरेच चाहते होते. त्यांचे नेहमी दौरेही होत. एकदा नांदेडला एस.एम. असताना पाचलेगावकरांचाही मुक्काम नांदेडला होता. अचानक एस.एम.नी आपण पाचलेगावकरांना भेटायला जाऊ असे मला सांगितले. हिंदुत्ववादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पाचलेगावकर महाराजांना भेटण्यात एस.एम.ना काय स्वारस्य असा प्रश्न साहजिकच माझ्या मनात निर्माण झाला. मी बोललो मात्र काही नाही. पुढे मग मी वाचले, की पाचलेगावकर महाराज पुण्याच्या येरवडा तुरुंगात एस.एम.बरोबरच स्थानबद्ध होते. अण्णांना घेऊन पाचलेगावकर ज्या ठिकाणी उतरले होते तेथे मी गेलो. तेथे बाहेरच जुने समाजवादी कार्यकर्ते पद्माकर लाठकर उभे होते. ते आम्हांला आत घेऊन गेले. पाचलेगावकरांनी एस.एम.चे स्वागत केले. पाचएक मिनिटे औपचारिक बोलणे झाल्यावर आम्ही परत निघालो. परतताना एस.एम.म्हणाले, 'पद्माकरचा फार आग्रह होता. त्याला बरे वाटेल म्हणून आलो.' एस.एम. तत्त्वांशी तडजोड करीत नसत. परंतु कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर सौजन्य दाखवण्यास त्यांची ना नसे.

एस.एम.ना लोकांचे प्रचंड प्रेम मिळाले ही गोष्ट खरी. परंतु सार्वजनिक जीवनात असे नुसतेच प्रेम वाट्याला येत नसते. कोणी तरी अजाणता दुखावले जाते. कोणी तरी बेजबाबदारपणे वाटेल ते आरोप करते. कधी कधी अगदी जवळचे सहकारीही मनाला वेदना देऊन जातात. पूर्वीच्या जनसंघातून जनता पक्षात आलेल्या एका नेत्याने 'एस.एम.ना उपराष्ट्रपती व्हावयाचे आहे व त्यासाठी ते निरनिराळे प्रयत्न करीत आहेत' असा बेजबाबदारपणाचा आरोप केला. या सत्त्वशील नेत्याचा अवमान करण्याचेही प्रसंग घडले. परंतु यांपैकी कशानेही जे मलिन होणार नाही असे धवल चारित्र्य अण्णांच्या जवळ होते. माझ्यासारख्या असंख्य छोट्या माणसांना त्यांचे जीवन हा एक प्रेरणा देणारा आधार होते.

पुण्यात भरलेल्या संयुक्त समाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनातील एस.एम. यांचे एक भावपूर्ण भाषण माझ्या लक्षात आहे. संध्याकाळी समारोपादाखल बोलताना एस.एम. म्हणाले होते की 'समाजवादाचा ध्वज या खांद्याने आजवर पेलला. कधी तरी हा खांदा निरुपयोगी होईल. तेव्हा तो ध्वज तुम्ही आपल्या खांद्यावर घेतला पाहिजे आणि फडकत ठेवला पाहिजे.' एस.एम. भाषणात फार कमी वेळा भावुक होत. परंतु त्या अधिवेशनात घडलेल्या अनेक घटनांनी त्यांना अस्वस्थ केले होते. एस.एम. यांचे भाषण सर्व उपस्थितांना हेलावून गेले.

आज आपल्या समाजजीवनात सर्वत्र मूल्यांची पीछेहाट होत आहे. समाज एकसंघ होण्याऐवजी त्याच्या चिरफळ्या होण्याची प्रक्रिया चालू आहे. सत्तासंपादनाचे साधन म्हणून द्वेष वापरला जात आहे. रोजची वृत्तपत्रे वाचणे हा अतिशय उद्वेगजनक अनुभव झाला आहे. भ्रष्ट आचरण हा जीवनाच्या सर्व क्षेत्रांचा स्थायीभाव झाला आहे. हे जे दृश्य दिसते आहे ते एस.एम.ची उणीव अधोरेखित करणारेच आहे. पण गांधीजी असोत अगर एस.एम., ते नेहमीच कसे उपलब्ध होतील?

*(एप्रिल २०१७)*

# ज्येष्ठ क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा

**वर्षा काळे**

स्वातंत्र्य मिळवण्यासाठी असंख्य लोकांनी अपरिमित कष्ट घेतले, हालअपेष्टा भोगल्या, पण त्या मानाने त्यांतील बरीच मंडळी दुर्लक्षितच राहिली. अनेकांची नावेही आपल्याला ठाऊक नसतात. मूळ गुजरातमधले पण पुढे युरोपात वास्तव्य केलेले कायदेपंडित श्यामजी कृष्ण वर्मा त्यांच्यातलेच एक.

गेली काही वर्षं कच्छमधल्या रणोत्सवला जायचं म्हणून घोकत होते. शेवटी एकदाचा तो योग यंदाच्या जानेवारीत आला. रणोत्सवाला जोडून अहमदाबादचा पतंगोत्सव बघायचा बेत आखला. पुण्याहून जाणारा आमचा पंधरा जणांचा गट होता. पुणे ते अहमदाबाद विमानप्रवास, मग अहमदाबाद ते भूज आगगाडीचा सहा तासांचा प्रवास व त्यापुढे कच्छच्या रणात जाण्यासाठी आणखी दोन तासांचा बसप्रवास.

२००५ सालापासून गुजरात सरकारने कच्छच्या रणाला प्रवासी ठिकाण बनवलं. उत्तम जाहिराती केल्या. नोव्हेंबर ते फेब्रुवारी असा हा रणोत्सव असतो. आता तर 'रणोत्सव सिटी' म्हणून एक शहरच या कालावधीपुरतं सरकारतर्फे वसवलं जातं. तंबूंचं शहर. पण आधुनिक सोयींसह. अगदी कमोडसकट. शिवाय खासगी हॉटेल मालकांचा धंदासुद्धा अगदी तेजीत असतो.

कच्छचं रण हा एक डोळे दिपवणारा चमत्कार आहे. संपूर्ण घट्ट मिठाचं अफाट वाळवंट. अगदी आपल्या खडे मिठासारखं मीठ सर्वत्र पसरलेलं. पांढऱ्या रंगाचं. ह्या रणाचा विस्तार तब्बल साडेसात हजार चौरस किलोमीटर इतका आहे. दोन दिवस रणात घालवून भूजकडे निघालो.

वाटेत मांडवी नावाचं एक गाव लागलं. तिथल्या 'क्रांतितीर्थ' नावाच्या ठिकाणाला भेट द्यायचं सहल नियोजकाने ठरवलं होतं. 'इथे बघण्यासारखं काय आहे?' अशी चौकशी केल्यावर 'इथे श्यामजी कृष्ण वर्मा नावाच्या क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिकाचं स्मारक आहे,' असं सांगितलं गेलं. आता 'हे कोण वर्मा?' हा प्रश्न आमच्यापैकी सगळ्यांच्याच डोक्यात भणभणायला लागला. तेवढ्यात बस क्रांतितीर्थच्या आवारात शिरलीसुद्धा.

हा ५२ एकरांचा स्वच्छ, सुंदर परिसर आहे. २०१० साली ही वास्तू उभारली गेली. लंडनमधील इंडिया हाउस या प्रख्यात वास्तूची प्रतिकृती इथे बांधली आहे. मांडवी हे वर्मांचं मूळ गाव. त्यांचा आणि त्यांच्या पत्नी भानुमती यांचा अस्थिकलश इथे ठेवलेला आहे. त्या दोघांचे पुतळेही आहेत. आत शिरताच आमचं आपुलकीनं स्वागत केलं गेलं. सगळ्यांना एका सभागृहात बसवून एक साधारण अर्ध्या तासाचा अनुबोधपट दाखवला गेला. नंतर सगळा परिसरही फिरून बघितला. त्यावरून श्यामजी कृष्ण वर्मा ह्या आद्य क्रांतिकारकाची थोरवी आम्हांला पटली व भावली. ह्या एवढ्या थोर व्यक्तीचं नावसुद्धा आपल्याला माहीत नसावं ह्याचा विषाद वाटला.

स्वातंत्र्य मिळवण्यासाठी असंख्य लोकांनी अपरिमित कष्ट घेतले, हालअपेष्टा भोगल्या, पण त्या मानाने त्यांतील बरीच मंडळी दुर्लक्षितच राहिली. अनेकांची नावंही आपल्याला ठाऊक नसतात. श्यामजी कृष्ण वर्मा त्यांच्यातलेच एक. त्यांचा जन्म मांडवीमध्ये ४ ऑक्टोबर १८५७ रोजी झाला. माध्यमिक शिक्षण भूजमध्ये झालं व पुढील शिक्षण मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये झालं. १८७५मध्ये त्यांचं लग्न भानुमती यांच्याशी झालं. यानंतर ते आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांच्या संपर्कात आले. त्यांचा फार मोठा प्रभाव वर्मांवर पडला. वैदिक तत्त्वज्ञान व धर्म यांवर ते व्याख्यानंही देऊ लागले. ती इतकी लोकप्रिय झाली, की १८७७मध्ये काशीच्या पंडितांनी त्यांना 'पंडित' ही उपाधी बहाल केली. ही उपाधी मिळवणारे ते पहिले अब्राहमण ठरले. त्यांनी संस्कृतवर खूप प्रभुत्व मिळवलं व त्यामुळेच त्यांचा मोनीएर विलियम्स या ऑक्सफर्डमधील संस्कृतच्या प्राध्यापकांशी संबंध आला. प्रोफेसर विलियम्स यांनी त्यांना आपला मदतनीस म्हणून बोलावलं व त्यानुसार श्यामजी इंग्लंडला गेले. त्यांचं पदवीपर्यंतचं व पुढील वकिलीचं शिक्षण ऑक्सफर्ड येथील बालीमोल (Ballimol) कॉलेज इथे झालं. इंग्लंडचे दोन भूतपूर्व पंतप्रधान हॅरॉल्ड मॅकमिलन आणि एडवर्ड हीथ हे याच कॉलेजचे विद्यार्थी.

बॅरिस्टर बनल्यानंतर श्यामजी भारतात परतले व इथे वकिली करू लागले. जुनागढसारख्या कच्छमधील काही संस्थानांचे दिवाण म्हणूनही त्यांनी काम केलं. पण भारतीय स्वातंत्र्यासाठी इंग्लंडमध्ये जाऊन प्रयत्न करायला हवा, कारण

भारतातील सत्तेची सर्व सूत्रं इंग्लंडमधूनच हलवली जातात, हे त्यांना ठाऊक असल्याने त्यांनी इंग्लंडमध्ये परतायचा व तिथे राहून वकिली करता करताच स्वातंत्र्यासाठी लढा उभारायचा निर्णय घेतला.

फेब्रुवारी १९०५मध्ये श्यामजींनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी लंडनमध्ये *इंडियन होमरूल सोसायटी* स्थापन केली. भिकाजी कामा, एस. आर. राणा, लाला लजपतराय आदींचा त्यांना जोरदार पाठिंबा होता. त्याच वर्षी श्यामजींनी लंडनमध्ये *इंडिया हाउस* स्थापन केलं. इंडिया हाउसचा अधिकृत उद्देश लंडनमध्ये शिकायला येणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल म्हणून वापर करण्याचा होता; पण लौकरच स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या जहाल क्रांतिकारकांचा तो प्रमुख अड्डा बनला. वि. दा. सावरकरांना इंग्लंडला जाण्यासाठी शिष्यवृत्ती द्यावी अशी विनंती लोकमान्य टिळकांनी श्यामजींना केली होती व त्यानुसार श्यामजींनी सावरकरांना तशी शिष्यवृत्ती दिली. स्वातंत्र्यवीर सावरकर, मदनलाल धिंग्रा आदी क्रांतिकारकांची तिथे नेहमी ऊठबस असे. त्या सर्वांचे, तसेच भारतात राहून लढणाऱ्या भगतसिंग यांच्यासारख्या अनेक क्रांतिकारकांचे श्यामजी कृष्ण वर्मा हे प्रेरणास्थान होते.

पुढे १९१० साली सावरकरांना अटक झाली तेव्हा त्यांची सुटका व्हावी म्हणून श्यामजींनी युरोपात दबाव गट तयार केला होता. भारतीय स्वातंत्र्याला युरोपिअन जनतेचा पाठिंबा मिळावा म्हणून त्यांनी केलेल्या अथक कार्याचं महत्त्व आपल्याकडे फारसं ठाऊक नसलं, तरी ते खूप होतं, कारण युरोपिअन जनमताचा प्रभाव ब्रिटिश सरकारवर पडतच होता. खुद्द ब्रिटनमध्ये श्यामजींना मानणारा ब्रिटिशांचा मोठा गट होता.

✦

श्यामजींनी लंडनमध्ये *इंडिया हाउस* स्थापन केलं. इंडिया हाउसचा अधिकृत उद्देश लंडनमध्ये शिकायला येणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल म्हणून वापर करण्याचा होता; पण लौकरच स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या जहाल क्रांतिकारकांचा तो प्रमुख अड्डा बनला. स्वातंत्र्यवीर सावरकर, मदनलाल धिंग्रा आदी क्रांतिकारकांची तिथे नेहमी ऊठबस असे. त्या सर्वांचे, तसेच भारतात राहून लढणाऱ्या भगतसिंग यांच्यासारख्या अनेक क्रांतिकारकांचे श्यामजी कृष्ण वर्मा हे प्रेरणास्थान होते.

✦

लंडनमधील Inner Temple मधून श्यामजींना १९०९ साली त्यांच्या क्रांतिकारी हालचालींमुळे काढून टाकण्यात आलं. कोर्टात वकील म्हणून उभं राहण्यासाठी हे सदस्यत्व आवश्यक असायचं. खूप नंतर, म्हणजे २०१५ साली, ह्या Inner Templeने त्यांचं सदस्यत्व रद्द करायचा निर्णय, मरणोत्तर का होईना, पण मागे घेतला व त्यांना मरणोत्तर सन्माननीय सदस्यत्व दिलं गेलं; श्यामजींच्या कर्तृत्वावर पुन्हा शिक्कामोर्तब केलं गेलं.

१९०५मध्येच श्यामजींनी द *इंडियन सोशिऑलॉजिस्ट* हे मासिक सुरू केलं. मासिकाचं उपशीर्षक होतं : *स्वातंत्र्याचे मुखपत्र – राजकीय, सामाजिक आणि धार्मिक सुधारणा.* त्यातून भारतीय व ब्रिटिश राजकारणाविषयी जहाल मतं मांडली जात. लौकरच ब्रिटिश सत्तेच्या ते डोळ्यात आलं व श्यामजींना अटक करायचं ठरलं. ही बातमी श्यामजींच्या कानावर गेली व अटक टाळण्यासाठी ते १९०७ साली पॅरिसला गेले. जातेवेळी इंडिया हाउसची सूत्रं त्यांनी सावरकरांच्या हाती सुपूर्द केली होती.

फ्रेंच सरकारने श्यामजींचा ताबा आपल्याला द्यावा म्हणून ब्रिटिशांनी प्रयत्न सुरू केले. सुरुवातीला फ्रेंच सरकारने त्यांना दाद दिली नाही, पण पुढे पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर फ्रेंच सरकारचाही नाइलाज झाला. त्याचवेळी, म्हणजे १९१४ साली, श्यामजी पॅरिस सोडून जिनिव्हाला राहायला गेले. स्वित्झर्लंड हे महायुद्धात तटस्थ राष्ट्र असल्याने त्यांना तिथे आश्रय घेता आला.

पुढे श्यामजींची तब्येत झपाट्याने ढासळू लागली. ३० मार्च १९३० रोजी त्यांचं जिनिव्हा इथेच निधन झालं. तत्पूर्वी जिनिव्हाच्या स्थानिक प्रशासनाशी व तेथील सेंट जॉर्जेस स्मशानभूमीच्या अधिकाऱ्यांशी बोलून श्यामजींनी त्यांच्या व पत्नीच्या अस्थी भारत स्वतंत्र झाल्यावर भारतातच पाठवल्या जाव्यात व आपल्या जन्मगावी पुरल्या जाव्यात अशी इच्छा व्यक्त केली व भारत कधी स्वतंत्र होईल याची खात्री नसल्याने त्या अस्थी जिनिव्हातच पुढील शंभर वर्षांसाठी जतन कराव्यात अशी व्यवस्था केली. त्यासाठी आवश्यक ते पैसेही त्यांनी भरले. त्यांच्या निधनाची बातमी ब्रिटिशांनी गुप्त ठेवली होती; पण देशातील जहाल क्रांतिकारकांपर्यंत ती पोचली होती व त्यावेळी लाहोर तुरुंगात बंदिस्त असलेल्या भगतसिंग व अन्य क्रांतिकारकांनी त्यांना तुरुंगातच श्रद्धांजलीही वाहिली होती.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला, पण दुर्दैवाने त्यानंतरही ह्या महान क्रांतिकारकाच्या अस्थी भारतात परत आणायचं कोणालाच सुचलं नाही. तत्कालीन सरकार तर ह्याबाबत पूर्ण उदासीन होतं. अखेर २२ ऑगस्ट २००३ रोजी गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी ह्याबाबत पुढाकार घेतला. ते जिनिव्हाला गेले आणि त्यांनी त्या अस्थी गुजरातमध्ये आणल्या. संपूर्ण राज्यभर त्या मिरवणुकीने फिरवल्या गेल्या व नंतर श्यामजींच्या इच्छेनुसार मांडवी ह्या त्यांच्या जन्मगावी आणल्या गेल्या. पुढे २०१० साली ह्याच ठिकाणी भव्य अशा क्रांतितीर्थची उभारणी पूर्ण झाली.

इंडिया हाउस, इंडियन होमरूल सोसायटी ही नावं केव्हातरी इतिहासात ओझरती वाचनात आली होती. पण ह्या सर्वांचे जनक श्यामजी कृष्ण वर्मा हे होते हे मात्र मला ठाऊक नव्हतं. कच्छचं रण आणि अहमदाबादचा पतंगोत्सव बघणं महत्त्वाचं होतंच, आणि त्यासाठीच आम्ही गुजरातचा दौरा आखला होता; पण ह्या निमित्ताने एका श्रेष्ठ पण माझ्यासाठी अज्ञात राहिलेल्या क्रांतिकारकाशी परिचय झाला याचा आनंद सर्वाधिक होता. त्यांच्या स्मृतीला उशिरा का होईना, पण वाहिलेली ही श्रद्धांजली.

*(ऑगस्ट २०१७)*

# माझे वडील आणि मी

## गीतांजलि अविनाश जोशी

''आप्पांनी मराठी साहित्याला तीन अमूल्य उपहार दिले असं म्हणता येईल. एक म्हणजे सोपी, ओघवती, प्रसन्न भाषा. दोन, गुजगोष्टी किंवा ललित निबंध. आणि तीन म्हणजे त्यांनी आग्रह धरून रूढ केलेला, 'मानधन दिलंच पाहिजे' ह्या पद्धतीनं स्थापित झालेला, लेखकाचा आत्मसन्मान!''

आपल्या कन्येच्या नजरेतून ज्येष्ठ साहित्यिक पद्मभूषण ना. सी. फडके.

१९४९ साली माझा जन्म झाला तेव्हा आप्पांचं म्हणजे माझ्या वडिलांचं वय ५५ वर्षांचं होतं. माझा जन्म झाल्यावर काहीच महिन्यांत राजाराम कॉलेजातल्या प्राध्यापकाच्या नोकरीतून ते निवृत्तही झाले. म्हणजे खरं तर ते माझ्या वडिलांपेक्षा माझ्या आजोबांच्याच वयाचे होते. परंतु आमच्या दोघांच्या वडील आणि मुलीच्या नात्यात वयातल्या ह्या अंतरानं कधीच फरक पडला नाही. माझा जन्म झाला त्या सालची आप्पांची दैनंदिनी एकदा माझ्या हाती लागली. त्या काळातल्या बहुतांश व्यक्तींसारखीच आप्पांनाही दैनंदिनी लिहिण्याची सवय होती. माझ्या जन्माआधीच्या तीन-चार महिन्यांमधे 'कमल डॉ. डनिंगकडे जाऊन आली.' अशा नोंदी दिसतात. माझा जन्माच्या दोन-तीन दिवसच आधी आप्पा व्याख्यानासाठी औरंगाबादला गेल्याची नोंद आहे. मी ह्या जगात अवतरल्याची बातमी त्यांना तिथेच कळली असणार. त्या दिवशी दैनंदिनीत 'कमल प्रसूत झाली.' एवढीच नोंद दिसते. त्यानंतर मात्र माझं वजन, मला घेऊन पाहिलेला 'माझा' पहिला चित्रपट, माझ्या बाबागाडीची किंमत अशा अनेक नोंदी आढळतात.

१९५१ साली कोल्हापूर सोडून आप्पा-ताई पुण्याला स्थायिक झाले. भांडारकर पथावरच्या भालेरावांच्या बंगल्याचा तळमजला आप्पांनी भाड्यानं घेतला आणि १९५६ पर्यंत माझं बालपण त्याच घरात गेलं. आज कोणी भांडारकर पथ पाहिला तर मोठमोठ्या इमारती, दुकानं आणि ऑफिसांनी हा रस्ता गजबजलेला दिसेल. भरधाव धावणाऱ्या मोटारी आणि दुचाकी वाहनांनी पायी चालणाऱ्यांना रस्त्यानं चालायलादेखील जागा मिळत नाही. पण १९५१ मधे मात्र हा पुण्याचा शांत, काहीसा निर्जन भाग होता. आमच्या घरालगत एक कालवा होता जो बहुतेक वेळा सुकलेला असायचा. कालव्याच्या दुसऱ्या काठावर श्री. वा. काळ्यांचा बंगला होता. त्यांचा मुलगा विश्वास आणि त्यांच्या घरात भाड्यानं राहणाऱ्या वास्तुतज्ज्ञ डोंगऱ्यांची मुलं नंदू आणि राजू माझे बालमित्र होते. आमच्या घरासमोर हैद्राबादच्या राणीसाहेबांचा सुंदर, बैठा बंगला होता. फ्लॅट संस्कृती नव्हतीच तेव्हा पुण्यात. आमचं ते घर थोडसं कोंदट आणि अंधारं असल्याचं मला आठवतं. पुढच्या पोर्चमध्ये आप्पांनी झोपाळा लावून घेतला होता. घराच्या खोल्या आगगाडीच्या डब्यांसारख्या एका रांगेत होत्या. ३-४ खोल्यांमधे माझे आई-वडील, आम्ही तीन भावंडं, माझ्या आईची आई, तवंदीहून, म्हणजे माझ्या आईच्या माहेरगावाहून वरसंशोधनासाठी पाठवल्या गेलेल्या माझ्या दूरच्या नात्यातल्या दोन मावशा, फर्ग्युसन कॉलेजात शिकणारा माझा लाडका मावसभाऊ चंदू (प्रकाश नारायण संत) असे सर्व जण आनंदात राहायचो. ह्याशिवाय एक माकड, एक पोपट आणि दोन-चार मांजरं आमच्या कुटुंबाचे माननीय सभासद होते.

आप्पांची आणि माझी गट्टी ह्या काळातच झाली असावी. माझ्या बहिणीला – रोहिणीला शाळेत घालायची घाई न करता एक वर्षभर आप्पांनी घरीच शिकवलं. त्यानंतर ती शाळेत जाऊ लागली. माझा धाकटा भाऊ विजय एक-दीड वर्षांचाच होता. तो बहुतेक वेळा माझ्या आईपाशीच असायचा. ह्या दोघांच्या मधली मी. मी मात्र एखाद्या चिवट, चेंगट मांजराच्या पिल्लासारखी आप्पांच्या आसपासच घुटमळत राहायची. घराच्या दर्शनी खोलीतच आप्पांचं लिहिण्याचं टेबल (आप्पांचा लाडका शब्द 'मेज') होतं. टेबलावर डाव्या बाजूला त्यांचा टाइपरायटर असे. एका सुंदरशा फाइलमधे पांढरे शुभ्र चौरस कागद ठेवलेले असत. एका लांबट ट्रेमधे विविध प्रकारच्या लेखण्या आणि अणकुचीदार टोक केलेल्या पेन्सिली असत. त्यातली एक अर्धी निळी आणि अर्धी लाल पेन्सिल मला फारच आवडायची. एक हस्तिदंती पेपरनाइफ, कागदाला भोकं पाडणारं पंचिग मशिन आणि शाई टिपण्यासाठी टीपकागद लावलेलं बोटीच्या आकाराचं एक यंत्रही असायचं. ह्या सगळ्याचं मला फार आश्चर्य वाटायचं. खोलीत कुणी नसलं की मी आप्पांच्या खुर्चीवर बसून त्यांचा 'रोल' करायची आणि हे सगळं हाताळायची. ते आप्पांच्या लगेच लक्षात यायचं. त्यांनी माझं नावंच 'कारभारीण' ठेवलं होतं. पण मला ते कधीच रागावले नाहीत.

एक गमतीदार आठवण म्हणजे आमच्या पोपटाला बोलतं करण्यासाठी ताईनं प्रचंड प्रयत्न केले. पहाटे त्याच्याशी बोलणं, त्याला हिरवी मिरची खायला देणं वगैरे वगैरे. पण पोपट काही


बोलेना. मात्र तो रोज आप्पांच्या टाइपरायटरचा आवाज ऐकत असे. काही दिवसांनी तो टाइपरायटरचा आवाज हुबेहुब काढू लागला! 'टक् टक् टक् कर्रर किट्ट' आणि मग घंटी वाजल्याचा 'रिंग' असा आवाज!

आप्पांच्या लिहिण्याच्या वेळा अगदी ठरलेल्या होत्या. सकाळी ९ ते १२ आणि संध्याकाळी ४ ते ६. शिवाय पत्रव्यवहार, व्याख्यानांची तयारी वगैरे काम असायचं. दर्शनी खोलीतच त्यांचं टेबल असल्यानं येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांचा, आम्हां मुलांच्या खेळण्याचा त्यांना त्रास होतंच असणार. पण जलाशयातील मासोळ्यांपासून अलिप्त राहून फुलणाऱ्या कमळासारखं त्यांचं साहित्य फुलतच राहिलं.

१९५७ साली आप्पांनी 'दौलत' बंगला बांधला आणि आम्ही ४२ विजयानगर कॉलनी ह्या जागी राहायला गेलो. त्या काळात केवळ लेखनावर उदरनिर्वाह करणाऱ्या लेखकाचा बंगला असणं हीच नवलाची गोष्ट होती. ताईच्या नावावर तिच्या वडिलांनी ठेवलेली बेळगावची छोटी वास्तू विकून आणि *दौलत* कादंबरीचे हक्क विकून हा बंगला उभा राहिला. 'दौलत'मधे त्यांच्या ऑफिसच्या दोन खोल्या घरात असूनही वेगळ्या होत्या, त्यामुळे त्यांचं काम निर्वेध होऊ लागलं. ताईनंदेखील मोठ्या हौशीनं त्यांच्या लिहिण्याच्या खोलीची सजावट केली होती. ती खोली अजूनही माझ्या दृष्टीसमोर आहे. आप्पांच्या लिहिण्याच्या खोलीजवळ ताईनं दत्तू माळ्याकडून पिवळ्या गुलाबाची वेल लावली होती. ती वेल बहरली की गुलाबांच्या सुगंधानं आप्पांची खोली दरवळून जायची. भिंतीवर नाट्याचार्य खाडिलकरांचा फोटो आणि 'काश्मिरी गुलाबा'साठी बाबुराव पेंटरांनी केलेलं मुखपृष्ठ ह्या दोनच फ्रेम लावल्या होत्या. टेबलाजवळच्या कोपऱ्यातल्या त्रिकोणी लाकडी शेल्फवर आप्पांचे लाडके विद्यार्थी कोल्हापूरचे शहाजी महाराज (ज्यांच्यावर आप्पांनी 'एक होता युवराज' ह्या कादंबरीतल्या युवराजाचं व्यक्तिचित्र बेतलं) ह्यांचा चांदीच्या फ्रेममधला फोटो होता, ज्याच्यावर To my dear Sir असं लिहून त्यांनी स्वाक्षरी केली होती. आप्पांबद्दल त्यांच्या विद्यार्थ्यांना किती प्रेम आणि आदर होता ह्याचंच ते प्रतीक होतं.

ताईशी विवाह झाल्यावर आप्पा जेव्हा पहिल्या घरातून बाहेर पडले होते, तेव्हा तिथली एकच वस्तू त्यांनी बरोबर आणली होती – शिसवी लाकडाचं त्यांचं लिहिण्याचं टेबल.

तर आमच्या भांडारकर पथावरल्या घरात आप्पा खोलीत लिहायला बसले, की टेबलाखालच्या पाय ठेवण्यासाठी बनवलेल्या कमानाकृती जागेत, अगदी आप्पांच्या पायाशी मी माझी भातुकलीची भांडीकुंडी आणि बाहुली घेऊन बसत असे. आप्पांना पार्किन्सनच्या आजारामुळे हाताला कंप होता. त्यामुळे फार पहिल्यापासून त्यांच्याकडे लेखनिक असे. ते डिक्टेशन देत आणि लेखनिक आपल्या सुंदर अक्षरात लिहून घेई. लेखनिकाचं काम करणारी मुलं बरेचदा कॉलेजात शिकणारी गरजू मुलं असत. त्यांतले किती तरी पुढं जाऊन प्राध्यापक किंवा नामवंत लेखक झाले. तर त्यांचं असं काम चालू असताना मी दिलेला गरऽम चहा त्यांना भुरके मारीत प्यावा लागे. शेंगदाणे गुळाचे लाडू आणि पोह्यांचा भात खाऊन 'छान झालाय हं स्वयंपाक' अशी शाबासकी



**ना. सी. फडके – ४ ऑगस्ट १८९४ ते २२ ऑक्टोबर १९७८**

*(छायाचित्र सौजन्य : जया दडकर)*

मला द्यावी लागे! आम्ही सगळ्या पोराटोरांनी एकदा आमच्या मांजराचं लग्नही लावलं होतं. आमंत्रणाला मान देऊन आप्पा व ताई लग्नाला हजर झाले होते. त्याच्या आठवणी अजूनही विश्वास काळे काढतो!

ह्या घरातली आणि पुढे जाऊन दौलतमधली प्रमुख महत्त्वाची जागा म्हणजे पुढच्या अंगणातला झोपाळा. ह्या झोपाळ्यावर बसून आप्पा आम्हांला गोष्टी सांगत. आप्पा-ताई तिथेच बसून जिवाभावाच्या गोष्टी करीत किंवा आप्पा सिगरेट ओढत त्यांच्या लेखनाचा विचार करीत. पुष्कळदा गोष्ट ऐकता ऐकताच त्यांच्या मांडीवर डोकं ठेवून मी झोपी जात असे. ताईनं कालवून दिलेला दहीभात ते मला आणि विजूला भरवीत असत ते ह्याच झोपाळ्यावर. पुढे आम्ही मोठे झालो, तेव्हाही त्यांच्या पानातला दहीभात वाटीत घालून ते मला देत असत. त्या भाताची अमृताची चव अजून आठवते.

आपले आईवडील इतर समवयस्क मुलांच्या पालकांपेक्षा वेगळे आहेत हे मला नेहमीच जाणवत राहिलं. नऊ ते पाच ऑफिसात काम करणाऱ्या बापांपेक्षा माझे आप्पा खूपच वेगळे होते. ते सभा समारंभातून परतले, की मला हारामधली कलाबूत मिळत असे, ती मी मैत्रिणींना बाहुलीच्या लग्नासाठी देत असे. मला हवे तेवढे पांढरेशुभ्र कागद, येणाऱ्या पत्रांवरची तिकिटं, पंचिंग मशिनमधल्या कागदाच्या टिकल्या असा अमूल्य खजिना

मिळत असे. माझ्या शाळेतल्या अभ्यासाच्या पुस्तकात माझ्या वडिलांचे धडे असत, त्यामुळे माझा भाव वाढत असे! त्याहून चांगली गोष्ट म्हणजे माझे आईवडील सतत घरीच असत. आप्पा आमच्याशी कॅरम, पत्ते खेळत. आमच्यासाठी पेटी वाजवत. आम्हांला नाटका सिनेमाला नेत किंवा कँपमध्ये आइसक्रीम खायला नेत. कुठेही गेलं की माझी ओळख ना.सीं.ची मुलगी अशीच होत असे. अजूनही तशीच होते आणि त्याचा मला फार अभिमान वाटतो – गर्व नाही!

ताईही 'श्यामची आई'पेक्षा अगदी वेगळी आई होती. केस कापलेली, इंग्रजी लिहिता वाचता येणारी, बांगड्या-मंगळसूत्र न घालणारी आणि साहित्याच्या जगात रमणारी. माझी ताई सुगरण, कुटुंबदक्ष आई होती. ही गोष्ट ६० वर्षांपूर्वीची आहे हे लक्षात घ्यायला हवं. आमच्या घरातलं वातावरणही खूप वेगळं होतं. घरात मराठी, इंग्रजी नव्या जुन्या पुस्तकांची आणि नियतकालिकांची रेलचेल होती. रोहिणीला आणि मला कथ्थक नृत्य शिकवायला पवार मास्तर घरी येत. अनंतराव रानडे पेटीवर आणि माझा मावसभाऊ चंदू व्हायोलिनवर अशी आमची साग्रसंगीत तालीम व्हायची. मी पाच वर्षांची असताना काही काळ मला साक्षात हिराबाई बडोदेकरांनी गाणं शिकवलं. कारण त्या आप्पांना भाऊ मानायच्या. पुढे मी मोठी झाल्यावरही हिराबाईंच्या भगिनी गुलुताई, भाऊराव टेंबे, केशवराव भोळे, जयमाला शिलेदार ह्यांनी वेळोवेळी शिकवलं ते आप्पांमुळेच. दौलतमधे राहायला गेल्यावर भारत गायन समाजाचे भोपे गुरुजी मला गाणं शिकवू लागले. विजय क्रिकेट खेळू लागला. आप्पा त्याला टेस्ट मॅच दाखवायला मुंबईला घेऊन जात. तो नंतर जेव्हा अॅकॉर्डियन वाजवू लागला तेव्हा बीटल्सची गाणी घरात वाजू लागली. आप्पांनी ती आवडीनं ऐकली. रोहिणीला शिवणकला आवडायची, तर तिला शिवण शिकवायला मगर बाई घरी यायच्या. मी कविता लिहू लागले. पी.डी.ए.मधे नाटकांत काम करू लागले. सांगायचं तात्पर्य म्हणजे, अतिशय कलाप्रिय वातावरणात स्वत:च्या आवडीनुसार आम्ही वाढलो. त्या आर्थिक तंगीच्या काळात आमच्यासाठी हे सगळं करताना दोघांना किती धडपड करावी लागली असेल... पण त्याचा उल्लेखही कधी झाला नाही. आप्पा-ताई दोघांनी आमच्यावर कधीच काही लादलं नाही. अगदी शाळेचा अभ्यासदेखील नाही.

आप्पा कोल्हापूरहून पुण्याला आले त्या आधीच १९५० मधे *झंकार* साप्ताहिक बंद झालं होतं. नोकरीही नव्हती. तेव्हा चरितार्थासाठी आपण एक प्रकाशन संस्था काढावी आणि स्वत:ची काही पुस्तकं आणि एखादं नियतकालिक सुरू करून त्यांचं प्रकाशन आणि वितरण व्यवस्था ह्या संस्थेतर्फे केली जावी अशी कल्पना त्यांना सुचली. ह्या कल्पनेतून 'अंजलि प्रकाशन' ह्या संस्थेची स्थापना १९५१ साली झाली. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, डी व्हॅलेरा, टेरेन्स मॅकस्विनी ह्या त्यांनी लिहिलेल्या चरित्रांचं आणि काही कथासंग्रह, कादंबऱ्या ह्यांचं प्रकाशन आणि वितरण ते करू लागले. त्या जोडीनं 'अंजलि' नावाच्या षण्मासिकाचे वासंतिक आणि दिवाळी असे दोन अंकही निघू लागले. त्या अंकाचं मुख्य आकर्षण अर्थात आप्पांची नवी कादंबरी असायचं. पहिल्या शुभारंभाच्या अंकात 'खेळणी' ही कादंबरी होती. इतर कथा आणि लेखही अत्यंत दर्जेदार असत. 'अंजलि' त्यांनी १९५१ ते १९७८ असं तब्बल सत्तावीस वर्षं चालवलं. वसंत कानेटकर, अरविंद गोखले, व. पु. काळे, शं. ना. नवरे. जयवंत दळवी, आशा भाजेकर, भा. द. खेर असे अनेक लेखक त्यांच्यासाठी लिहीत होते. ह्या पुस्तकांचं संपादन, प्रकाशन आणि वितरण आमच्या घरातूनच व्हायचं.

आप्पांची साहित्यनिर्मिती विस्मयकारक होती. १९१२ साली त्यांची 'मेणाचा ठसा' ही पहिली कथा प्रसिद्ध झाली. १९१७ मधे 'अल्ला हो अकबर' ही पहिली (आधारित) कादंबरी आणि १९२५ मध्ये 'कुलाब्याची दांडी' ही पहिली स्वतंत्र कादंबरी प्रसिद्ध झाली. तेव्हापासून ते आयुष्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत, म्हणजे ६६ वर्षांच्या दीर्घ साहित्यप्रवासात, त्यांनी १९२ ग्रंथांची निर्मिती केली. ७४ कादंबऱ्या, २८ लघुकथासंग्रह, गुजगोष्टींचे १४ संग्रह, २५ वाङ्मयीन निबंध-प्रबंधांचे ग्रंथ, १५ इंग्रजी पुस्तकं आणि इतर ३६ पुस्तकं असा प्रचंड खजिनाच त्यांनी मराठी वाचकांना दिला.

यांतली काही पुस्तकं 'मैलाचा दगड' – अविस्मरणीय ठरली. त्यातले एक म्हणजे १९३१ साली त्यांनी लिहिलेले 'प्रतिभासाधन' हे पुस्तक. आप्पांची वाङ्मयीन भूमिका सांगणारा हा ग्रंथ होता. 'साहित्याचं प्रयोजन कोणतं, त्याची प्रतिज्ञा काय आणि त्याचं प्रधान कार्य कोणतं?, असे मूलभूत प्रश्न मांडून 'कलेसाठी कला' हा सिद्धांत किंवा सौंदर्यवादाची विचारसरणी मांडणारे मराठी साहित्यातले ते प्रणेता ठरले. हा ग्रंथ प्रकाशित झाल्यावर क्लेटन हॅमिल्टनच्या 'Art of fiction' ह्या ग्रंथाचं वाङ्मयचौर्य फडक्यांनी केलं असा आरोप त्यांच्यावर केला गेला. वादावादीचा गदारोळ झाला. एक चौकशी समिती नेमली गेली. त्या समितीनं फडक्यांच्या ग्रंथावर हॅमिल्टनच्या ग्रंथाची घनदाट छाया आहे एवढाच निष्कर्ष काढला आणि हे वादळ शांत झालं. ह्या ग्रंथाच्या अनेक आवृत्या निघाल्या. आजही नवोदित लेखकांसाठी हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. ह्याच धाटणीचे 'लघुकथा लेखन : तंत्र आणि मंत्र' आणि 'प्रतिभा विलास' हे ग्रंथही त्यांनी सिद्ध केले. 'मानस मंदिर' ह्या पुस्तकात आधुनिक मानसशास्त्राची मूलभूत तत्त्वं आणि मुख्य पाश्चात्त्य संप्रदायांचे सिद्धान्त आणि त्यांचं विवेचन होतं तर 'आधुनिक गीता' म्हणजे विल डयूरंटच्या 'ऑन मीनिंग ऑफ लाइफ' ह्या ग्रंथाचं भाषांतर होतं. जीवनाच्या प्रयोजनासंबंधी विविध नामवंत लोकांना प्रश्नावली पाठवून त्यांची उत्तरं डयूरटनं एकत्रित केली होती. र. धों. कर्व्यांसारखं त्या काळात कुटुंबनियोजनावर पुस्तकं लिहून त्या लेखनासाठी दिलगिरी प्रदर्शित न करता, एक ख्रिस्ती मिशनरी संस्था चालवत असलेल्या नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजातल्या नोकरीचा राजीनामा देणारे आप्पा लिहिलेल्या शब्दांसाठी कणखरपणे उभे राहाणारे लेखक म्हणून प्रसिद्ध झाले होते.

आप्पांनी मराठी साहित्याला तीन अमूल्य उपहार दिले असं म्हणता येईल. एक म्हणजे सोपी, ओघवती, प्रसन्न भाषा. दोन, गुजगोष्टी किंवा ललित निबंध. आणि तीन म्हणजे त्यांनी आग्रह धरून रूढ केलेला, 'मानधन दिलंच पाहिजे' ह्या पद्धतीनं स्थापित

झालेला, लेखकाचा आत्मसन्मान! ह्या तीन गोष्टींसाठी आणि साहित्यातल्या वैविध्यासाठी मराठी रसिकांनी आप्पांना नेहमीच आठवणीत ठेवलं आहे. १९४९ पर्यंत नोकरी सांभाळून आणि नंतर पूर्ण वेळाचा लेखन, व्याख्यानं, संपादन, प्रकाशन, वितरण हा प्रचंड डोलारा त्यांनी कसा सांभाळला असेल?

ह्याची गुरुकिल्ली त्यांच्या अतिशय काटेकोरपणे पाळल्या गेलेल्या कामाबद्दलच्या शिस्तीत आणि साहित्याबद्दलच्या समर्पित वृत्तीत सापडते. फालतू गावगप्पांचे अड्डे जमवणं किंवा स्वत:च्या चाहत्यांचे 'दरबार' भरवणं त्यांनी कटाक्षानं टाळलं. त्यासाठी त्यांचा कोकणस्थी फटकळपणा उपयोगी पडला असावा. लिहिण्याच्या वेळात कोणी भेटायला आलं, की ते अस्वस्थ होत. पाच-दहा मिनिटं बोलत आणि सडेतोड शब्दांत पाहुण्यांना सांगत, 'आता माझं काम चालू आहे. तुम्ही परत कधी तरी या.' असं झालं की ताईची धावपळ सुरू होई आणि आलेल्या पाहुण्यांचं यथायोग्य आदरातिथ्य करून ती त्यांना निरोप देई. ह्या त्यांच्या वागण्यामुळे ते गर्विष्ठ आहेत, माणूसघाणे आहेत असा साधारण समज झाला होता. पण त्यांनी तसं केलं नसतं, तर त्यांची एवढी प्रचंड साहित्यनिर्मिती होऊच शकली नसती.

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'चित्रे आणि चरित्रे' ह्या पुस्तकात पु. भा. भाव्यांवर 'पुरुषोत्तम भास्कर भावे : एक स्पार्टन योद्धा' हा अतिशय वाचनीय लेख आहे. त्यात त्यांनी वर्णन केलेला एक प्रसंग वरील संदर्भात वाचण्यासारखा आहे. माडगूळकर लिहितात –

'बावन्न साल. रखख उन्हाची वेळ. अशावेळी भावे जिमखान्यावर माझ्याकडे माझ्या घरी आले. थोड वेळ बसल्यावर म्हणाले, ''व्यंकटराव, अप्पाराव फडके इथंच राहतात, म्हणे?''

''हो पलीकडंच... भांडारकर रोडला.''

''जाऊ या का त्यांच्याकडे सहज?''

माझी आणि आप्पासाहेबांची तेव्हा तशी ओळखदेख नव्हती. म्हणालो,

''आपण आधी कळवलं नाही. शिवाय भर दुपार आहे.''

''जाऊ या. नाही भेटले तर परत येऊ.''

लांबलचक असं घर. ह्या टोकाच्या दारातून डोकावून भावे ओरडले, ''आहेत का?''

त्या पलीकडच्या खोलीतून आप्पासाहेबांचा आवाज. ''कोण आहे?''

''मी भावे. येऊ का?''

''या, या.''

आप्पासाहेबांचं लिहिणं चालू होतं. त्यांच्या टेबलासमोरच्या लांबड्या कोचावर बसलो.

''काय चाललंय?''

''लिहितोय.''

''रोज किती तास लिहिता?''

''चालू असतं सारखं.''

''फार लिहिलं की कस राहात नाही. सुमार लिहून होतं असं वाटत नाही का?''

''तुम्ही थोडं लिहिता आणि ग्लोरिफाय करता.''

''तुमच्या पहिल्या कादंबऱ्या उत्तम आहेत. हल्लीच्या नाहीत.''

''माझं उलटं मत आहे. आताचं माझं लेखन जास्ती मॅच्युअर आहे. पूर्वीचं चांगलंच होतं. आताचंही आहे.''

थोडा वेळ शांतता. पण ताणलेली. लेखनात व्यत्यय आला म्हणून आप्पासाहेब अस्वस्थ आहेत असं वाटलं.

भावे एकदम विचारतात, ''तुम्ही फार मेथॉडिकल आणि स्ट्रिक्ट आहात असं म्हणतात. खरं का?''

आप्पासाहेब लिहिलेल्या कागदांकडे दृष्टी टाकून म्हणाले,

''मेथड आता दिसली. स्ट्रिक्टनेस थोड्या वेळानं दिसेल.''

पुन्हा काही क्षण अवघडलेले.

भावे – ''आता जायचं का?''

आप्पासाहेब शांतपणे – ''बराय. या.''

सभासमारंभात जाण्याविषयीही आप्पा चोखंदळच होते. रत्नागिरीच्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची कागदपत्रं भरायला ते परिषदेत गेले तेवढेच. एरवी ते तिकडे विशेष फिरकत नसत. अध्यक्ष म्हणून रत्नागिरीच्या साहित्यसंमेलनाला आणि खांडेकरांकडे अध्यक्षीय सूत्रं सोपवण्यासाठी सोलापूरला ते गेले. ह्याव्यतिरिक्त क्वचितच ते साहित्यसंमेलनाच्या सर्कशीत अडकले. मात्र महाविद्यालयीन किंवा शालेय वाङ्मयविषयक कार्यक्रमांना ते आवर्जून जात. तो त्यांच्यातला जागरूक 'शिक्षक' असावा! संगीत नाटकं, चांगले चित्रपट पाहायला, अगदी मुंबईला जाऊन क्रिकेट मॅच पाहायला ते एका पायावर तयार असत. हे सर्व जे त्यांनी अनुभवलं, ते आपल्या साहित्यातून वाचकांपर्यंत पोचावायचा त्यांच्या सदैव प्रयत्न असायचा.

त्यांच्या प्रेमातले काही लोक 'भेटायला येणार' असं त्यांना आधीच कळवत. मग कामाचं नियोजन करून ते अशा व्यक्तींना आवर्जून भेटत. छोटा गंधर्व, जयराम आणि जयमालाबाई, पद्माताई शाळिग्राम, जगन्नाथबुवा पुरोहित हे गायक, दि. ब. देवधर, चंदू बोर्डे, बाळ ज. पंडित असे क्रिकेटर किंवा जयवंत दळवी, शं. ना. नवरे, व. पु. काळे, बाळ कोल्हटकर, कविवर्य बा. भ. बोरकर, वसंत कानेटकर, मधुसुदन कालेलकर असे लेखक त्यांचे फार आवडते मित्र होते. दुसरा अपवाद होता मनोहर बागी, यशवंत पेटकर, यशवंतराव चव्हाण ह्या त्यांच्या लाडक्या विद्यार्थ्यांचा आणि बाबू टांगेवालासारख्या सामान्य पण रसिक व्यक्तींचा. विठ्ठलराव दीक्षित, डॉ. रामराव राहतेकर आणि माणिकलाल परदेशी हे त्यांचे परममित्र. ते आले की ''माझ्या दुकानाच्या फळ्या



**दौलत बंगल्यातील दिवाणखान्यात रंगलेला पत्त्यांचा डाव, ८ डिसेंबर १९६९**
**(डावीकडून) पत्नी कमल, मुलगा विजय, फडके स्वतः व मुलगी गीतांजलि**

बंद करतो आणि मग निवांत गप्पा करू.'' असं म्हणून ते काम आवरत. लेखक आणि वक्ता ह्याप्रमाणेच एक जाणकार रसिक म्हणूनही त्यांची ख्याती होती. त्यामुळे विविध क्षेत्रांतले ख्यातनाम कलावंत त्यांना भेटायला येत. पण ह्या सगळ्यात ते अडकून राहिले नाहीत. पुरस्कार, पदव्या ह्यांच्यामागे ते कधीही धावले नाहीत. म्हणूनच त्यांनी इतकी कसदार साहित्यनिर्मिती केली.

आप्पांकडे कोणी मोठे कलावंत आले, की ते मुद्दाम आम्हां मुलांना बोलावून घेत. पाहुण्यांच्या पाया पडायला लावत आणि म्हणत, ''बसा इथे चुपचाप. चार चांगले शब्द कानांवर पडू द्या.'' ह्या मोठ्या कलावंताना पाहणं, त्यांचे विचार ऐकणं हे आमच्यावरचे संस्कारच होते. ललितकलांद्वारा जीवनातला आनंद घेत जगण्याचा आप्पांचा वारसा ह्या संस्कारांमुळेच आम्हांला मिळाला.

वारशात अजून एक गोष्ट मला मिळाली, ती म्हणजे त्यांची सुगंधाची आवड. त्यांना सुगंधाची, ताज्या फुलांची, घरभर दरवळणाऱ्या उदबत्तीच्या सुगंधाची अतिशय आवड होती. एकूणच स्वच्छतेची, टापटिपीची आणि सौंदर्याची आवड त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पुरेपूर दिसून यायची. स्वच्छ, शुचिर्भूत, स्नान करूनच ते लिहायला बसायचे. त्यांचं रोजचं स्वच्छ पांढरं धोतर, शर्ट, एवढंच काय, त्यांचा रुमालदेखील ताई इस्त्री करून ठेवायची. ते बाहेर समारंभाला जाताना सूट, रेशमी शर्ट घालायचे. कॉलरलगतचं बटण उघडं ठेवायचे. त्या काळात त्यांच्या इतक्या दिमाखदार व्यक्तिमत्त्वाचा मराठी लेखक बहुतेक नसावा. अंघोळीला म्हैसुर सँडल साबण त्यांना आवडायचा आणि दिवाळीत हमखास 'मोती' साबण असायचा. पात्रा, इव्हनिंग इन पॅरिस, खस, हीना हे त्यांचे आवडते सुगंध. चाफा, पिवळा गुलाब, बकुळ, मोगरा ही फुलं त्यांना आवडायची. लिहायच्या टेबलावर एका तबकात नेहमी ही फुलं ठेवलेली असायची.

त्यांना खरं तर अस्वच्छ, मलिन असं मी कधीच पाहिलं नाही. रोज दुपारी ते दाढी करायचे. त्यावेळी त्यांना पाहायला मला फारच आवडायचं! दर महिन्याला त्यांचे केस कापायला न्हावी घरी यायचा. ताई स्वतः त्यांच्या हाता-पायांच्या बोटांची नखं कापायची. शेवटच्या वर्षात ते खूप थकले, तेव्हा ताई त्यांची दाढीपण मन लावून करायची. आणि ते तिला त्याबद्दल शाबासकी द्यायचे! पुढे पुढे सूट घालणं त्यांना नकोसं वाटायचं. तर त्यांचे नवे कोरे सूट त्यांनी त्यांच्या लाडक्या बाबू टांगेवाल्यांना देऊन टाकले. आप्पा थोडं खायचे, पण फार चोखंदळपणे खायचे. त्यांची आवडनिवड लक्षात ठेवून घरात स्वयंपाक व्हायचा. पांढरेशुभ्र उकडीचे मोदक, भरली वांगी, वालाचं बिरडं, टोमॅटोचं सार, आळूवड्या हे त्यांचे आवडते पदार्थ होते.

आप्पा सकाळी उशिरा उठायचे. आठ वाजायच्या सुमारास त्यांचा चहा तयार झाला, की त्यांना उठवायचं काम आम्हां मुलांपैकी कोणा एकाचं असायचं. सकाळी दोन कप चहा प्यायचे. पण चहा अगदी ताजा आणि गरम लागायचा. चहा झाला की स्नान करून, तयार होऊन, नऊ वाजता आप्पा लिहिण्याच्या खोलीत जायचे. लेखनिक वाटच पाहात असे. न विचारता न पाहाता आदल्या दिवशी थांबले असतील त्या वाक्याच्या पुढच्या वाक्यापासून आप्पांचं डिक्टेशन सुरू होई! त्यांच्या मनात सर्व काही आधीच तयार असे. प्रत्येक कादंबरीच्या आधी भरपूर 'होम वर्क' करून त्या कादंबरीचा पूर्ण आराखडा आप्पा तयार करत. पात्रं, त्यांची वयं, व्यवसाय, जन्म इत्यादी तपशील सगळं ठरलेलं असे. कामातली त्यांची ही शिस्त, नेमकेपणा मी इतर कुणात पाहिला नाही. दहा-साडेदहाला एक कप दूध आणि हलका नाश्ता करायचे. टोस्ट आणि स्क्रॅम्बल्ड अंडं त्यांना विशेष आवडायचं. मग परत काम सुरू. बारा-साडेबाराला काम संपवून लेखनिक घरी जायचा. आप्पा जेवायला यायचे. दुपारी विश्रांती.

संध्याकाळी चार वाजता लेखन सुरू. लिहून झालं की पत्रोत्तरं लिहायचे. आलेल्या प्रत्येक पत्राला व्यवस्थित उत्तर जायचं. नामवंत व्यक्तींइतकंच ते आवर्जून सर्वसामान्य वाचकांच्या पत्रांना उत्तर द्यायचे. नवीन काही वाचलं आणि आवडलं तर त्या लेखकाला पत्र लिहून कळवायचे. प्रत्येक पत्राखाली स्नेहांकित ना. सी. फडके अशी डौलदार सही करायचे.

आमच्या घरात आम्हां मुलांवर फारसे निर्बंध असल्याचं मला आठवत नाही. मुलग-मुलगी असे भेदभाव कधीच केले गेले नाहीत. दोघांचाही आम्हां मुलांवर पूर्ण विश्वास होता. माझ्या नाटकाच्या तालमी रात्री असत, 'सातच्या आत घरात'चा तो जमाना होता. पण आमच्या सुरक्षिततेची काळजी घेताना आमच्यावर नको ती बंधनं कधीच घातली गेली नाहीत. रोहिणी आणि विजय स्वभावाने शांत होते. मी मात्र फारच बडबडी होते. माझा प्रचंड मित्रपरिवार होता. शाळा-कॉलेजातल्या मैत्रिणी, नाटकातले सहकारी, शेजारीपाजारी सगळेच मला जवळचे. ताईला न विचारता मित्रमैत्रिणींना घरी जेवायला बोलावून मी तिची अनेकदा पंचाईत केली आहे. मैत्रिणींपेक्षा माझे मित्रच जास्त होते आणि त्यातल्या कुणाला मी लग्नमंडपात उभं करणार आहे अशा धास्तीतच आप्पा-ताई असावेत!

मी अकरावीत असताना अगदी धपकन पहिल्या प्रेमात पडले. पपी लव्ह म्हणतात तसा तो प्रकार होता. जितक्या त्वरेनं प्रेमात पडले, तितक्याच लवकर प्रेमाबाहेरही पडले. पण आप्पांनी कधीही माझ्या त्या अबोध, अपरिपक्व प्रेमाचा अनादर केला नाही. 'थोडी वाट बघ आणि ठरव' असा सुज्ञ सल्ला त्यांनी मला दिला. एक गोष्ट मात्र मला समजली. मी माझ्या आईवडलांना काहीही सांगू शकते. तेवढा मोकळेपणा आमच्या नात्यात होता.

त्यानंतर मी अविनाशच्या प्रेमात पडले. तेव्हाही मी १९ वर्षांचीच होते. पण ह्यावेळी मामला सिरियस होता. आमच्यात खूप फरक होते. अविनाश भारतीय वायुसेनेत फायटर पायलट होता. त्याला मराठीचा गंधही नव्हता. संगीत, नाटक, साहित्य, ह्यांपासून दूर असलेला हा माझा मित्र. पण आमची एकमेकांबद्दलची प्रेमभावना खरी आहे असं कळल्यावर आप्पा-ताईंनी थाटामाटानं आमचं लग्न लावून दिलं. रोहिणीचे पती चंदू खरेदेखील सैन्यातच होते. आप्पा विनोदानं म्हणत, 'माझ्या दोन्ही मुली लष्करच्या भाकऱ्या भाजतात!' लग्नानंतर मी पंजाबला गेले. खरं तर, प्रत्येक आई-बाप आपल्या अपत्याच्या भविष्याची स्वप्नं बघतात. मी नाट्यक्षेत्रात कर्तृत्व दाखवावं, खूप लिहावं अशी त्यांची इच्छा होती. ती सगळी स्वप्नं मी मोडली होती. त्याचं वैषम्य त्यांना वाटलंच असणार. पण त्यांनी आमच्यावर आपल्या इच्छा-आकांक्षा कधीच लादल्या नाहीत. हा त्यांचा केवढा मोठेपणा होता!

मी घरापासून दूर होते. त्यामुळे मला मराठी वाचायला मिळत नाही ह्याचं त्यांना वाईट वाटत असे. पुण्या-मुंबईच्या सांस्कृतिक बातम्या मला कळाव्यात अशी त्यांची धडपड असे. त्यासाठी आप्पा मला सकाळ, केसरी, महाराष्ट्र टाइम्सच्या रविवार पुरवण्या पोस्टानं पाठवीत असत. त्यासाठी घरातल्या लोकांना वर्तमानपत्र फाडू नका, वेडीवाकडी दुमडू नका अशी ताकीद ते देत. वर्तमानपत्राच्या घडीत कधी परसातल्या आंब्याचा पहिला मोहर तर कधी गुलमोहराचं लालचुटुक फूल ठेवत. मी निदान चांगली इंग्रजी पुस्तकं तरी वाचावीत म्हणून लेखकांची, पुस्तकांची नावं मला कळवत. लग्नानंतर मी फारच कमी लिहिलं. पण जेव्हा केव्हा लिहिलं, तेव्हा मी त्यांना ते पाठवून देत असे. त्याचा त्यांना फार आनंद होत असे. मी शाळेत नोकरी धरली तेव्हा माझ्या धाकट्या मुलीकडे दुर्लक्ष तर होणार नाही ना अशी हलकेच चौकशी करणारं पत्र त्यांनी १९ ऑक्टोबर १९७८ला लिहिलं. ते मला मिळालं तेव्हा २२ ऑक्टोबरला त्यांचा मृत्यू झाला होता.

माझं लग्न झालं आणि नवराबायकोमधलं नातं वास्तवात किती नाजूक आणि कमकुवत असतं हे मला समजलं. एखाद्या नाजूक रोपट्यासारखी ह्या नात्याची जपणूक करायला लागते. आणि दोघांनी एकमेकांना वाढायला 'अवसर' किंवा स्पेस देणं किती गरजेचं आहे हेही मला समजलं. हे नातं कसं संपुष्टात येऊ शकतं, ह्याची अनेक उदाहरणं मी आमच्या मित्रपरिवारात पाहिली. तोपर्यंत माझ्या वैवाहिक जीवनाच्या कल्पना अतिशय 'फिल्मी' होत्या. वास्तव नजरेसमोर आलं आणि माझ्या मनात माझ्याही नकळत तुंबून राहिलेला एक प्रवाह खळखळून मोकळा झाला. माझ्या आईवडिलांच्या – विशेषतः वडिलांच्या – आयुष्यातल्या एका पर्वाबद्दल माझ्या मनात समज-गैरसमजांचा जो गुंता होता, तो आपोआपच सुटत गेला. कारण नवराबायकोच्या नात्याला समर्थ किंवा दुबळं करणं त्या दोघांवरच अवलंबून असतं हे माझ्या लक्षात आलं. हे सगळं लगेच घडलं नाही आणि ते घडेपर्यंत माझ्या मनात आप्पांविषयी काही प्रश्न घोंगावतच राहिले.

प्रत्येक मुलीला आपले आईवडील अगदी परफेक्ट वाटतात तसेच मलाही वाटायचे. पण मी मोठी होऊ लागले आणि कदाचित तसं नाहीय हे लक्षात यायला लागलं. मला नवल वाटतं ते हे, की एरवी आमच्याशी इतक्या मोकळेपणानं, अगदी मैत्रीच्या नात्यानं वागणाऱ्या आप्पांनीही त्यांचा पहिला विवाह, त्यांचा पहिला संसार, त्यांची मुलं ह्याबाबत आम्हां मुलांना पूर्णपणे अंधारात का ठेवलं होतं? आम्ही लहान होतो, तेव्हा ह्या गोष्टी आमच्या आकलनाच्या बाहेर आहेत असं त्यांना वाटणं शक्य आहे. पण आम्ही समजुतदार झालो, तेव्हा तरी त्यांनी आम्हांला मोकळेपणानं सर्व सांगायला हवं होतं. आम्हांला (निदान मला तरी) काहीसं अस्पष्ट, अंधुक कळत गेलं ते लोकांच्या कुत्सित प्रश्नांतून कानावर पडलेल्या कुजबुजीतून. मी चौथी-पाचवीत असताना एका मैत्रिणीनं 'हिला दोन आया आहेत' असं जाहीर केल्यावर मी तिच्याशी भांडले होते. असं काही झालं, की मी भांबावून जाई. पण आप्पा-ताईंशी ह्या विषयावर बोलण्याचं धाडस मला कधीच झालं नाही.

१९६८मध्ये आप्पा फार आजारी होते. डॉ. भाव्यांच्या दवाखान्यात दाखल होते. त्यांना भेटायला गोऱ्यापान, बुटक्या नऊवारी साडी नेसलेल्या एक बाई आल्या. ताईनं सांगितल्याप्रमाणे मी त्यांना वाकून नमस्कार केला आणि खोलीच्या बाहेर आले. तेव्हा चंदूची पत्नी सुप्रिया आणि माझी थोरली बहीण रोहिणी ह्यांच्यातलं संभाषण माझ्या कानावर पडलं. सुप्रियानं रोहिणीला विचारलं, 'ह्या बाई कोण?' तेव्हा रोहिणीनं सांगितलं 'एक्स मिसेस फडके.' माझ्या मनातली शंका पक्की करणारे हे शब्द होते. पण

त्यानंतरही ह्या विषयावर कुणाला तरी विचारावं, निदान भावंडांमधे तरी बोलावं असा धीर मला झाला नाही.

पण ते प्रश्न माझ्या मनात खोल कुठेतरी रेंगाळत राहिलेच असावेत. ताईमुळे मनोरमाबाईंचं आणि त्यांच्या मुलांचं आयुष्य उद्ध्वस्त झालं ह्या विचाराची टोचणी मला कित्येकदा अस्वस्थ करीत असे. आप्पा आमच्यावर जिवापाड प्रेम करत. मग त्यांनी आपल्या त्या मुलांना वाऱ्यावर कसं सोडलं असेल, हाही विचार मला खुपत राहायचा. पण ती कोंडी फुटत नव्हती. काही कोडी सुटतच नव्हती.

१९७७ मधे आप्पा उच्च रक्तदाबाच्या झटक्याने कोमात गेले. मी पंजाबात होते. रोहिणी देवळालीला. आम्ही पुण्याला धाव घेतली. आप्पा निजूनच होते. डोळे बंद होते. कानाशी बोललेलं त्यांना समजत होतं. बोलणं बरळल्यासारखं पण सुसंबद्ध होतं. ते आता ह्या अवस्थेतून बाहेर येतील का आणि आले तर कुठल्या अवस्थेत असतील ह्याबद्दल डॉक्टरही सांगू शकत नव्हते. ताई सावलीसारखी त्यांच्यापाशी होती. आक्का बेळगावहून धाव घेऊन आली होती. सगळेच चिंतेत होते. अशात एके दिवशी दुपारी दारावरची बेल वाजली. मी दार उघडलं तर समोर लीलाताई उभ्या होत्या. ह्याआधी मी त्यांना कधी पाहिलं नव्हतं. पण त्या खूपच आप्पांसारख्या दिसल्या. लगेच ओळखलं मी त्यांना. त्यांना आत बसायला सांगून मी ताईला बोलवायला गेले. ताईनं स्वतः त्यांना आप्पांकडे नेले. आप्पांच्या कानाशी सांगितलं, ''आप्पा तुम्हाला भेटायला लीला आली आहे.'' आप्पांना आधार देऊन बसवलं, पाठीशी उशी लावली. लीलाताई त्यांच्या पायांशी बसल्या. आप्पांचे डोळे मिटलेलेच होते. पण अस्पष्ट आवाजात आप्पा म्हणाले, ''लीला, मला माफ केलंत ना तुम्ही? मला माफ करा आता.'' ते वारंवार हेच शब्द उच्चारत राहिले. त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांमधून पाणी झरत होतं. लीलाताईंचे डोळे ओले होते. ताईच्या डोळ्यांमधून आसवं गळत होती. तो क्षणच फार पवित्र होता.

बाप-लेकीच्या भेटीचा तो प्रसंग पाहिल्यावर माझ्या मनातली कोडी सुटत गेली. आयुष्यात कधी असे प्रसंग उभे राहतात, की कुठलाही निर्णय घेतला तरी कोणी तरी दुखावलं जातंच. अशा कचाट्यात माझे वडील सापडले असणार आणि कोणाच्याही मते चुकीचा असला, तरी त्यावेळी त्यांना योग्य वाटला तो निर्णय त्यांनी घेतला असणार. पण ह्याचा अर्थ असा नाही, की पहिल्या पत्नीला किंवा मुलांना दुखावण्यात त्यांना काही वाटलं नव्हतं किंवा त्यांना कुणाची पर्वा नव्हती. इतकी वर्षं, त्या वेळेस घेतलेल्या कठोर निर्णयाची अपराधी जाणीव, त्यांनी मनात खोल कुठे तरी बाळगलीच होती. अर्धबेशुद्धीच्या त्या अवस्थेतही लीलाताईंना त्यांनी ओळखलं होतं आणि मनोरमाबाईंना आणि लीलाताईंना झालेल्या मनस्तापाबद्दल ते माफी मागत होते. लीलाताईंसाठीसुद्धा वडिलांबद्दलचं प्रेमच त्यांना आप्पांना भेटायला घेऊन आलं होतं... मानवी भावना किती अनपेक्षित रंग घेऊ शकतात!

ह्या प्रसंगानंतर नाती का विस्कटतात आणि नवी नाती का आणि कशी निर्माण होतात ह्याचा विचार माझं मन करू लागलं. वयानुसार, अनुभवाचे टक्केटोणपे खाल्ल्यावर माझ्यातही परिपक्वता आली आणि बऱ्याच गोष्टींभोवतालचं धुकं वितळून मला स्वच्छ दिसू लागलं.

आप्पांचा पहिला विवाह १९१६ साली झाला. तेव्हा ते २२ वर्षांचे होते. मुलं झाली, चारचौघांसारखा संसार झाला आणि वयाच्या ४२व्या वर्षी कमल दीक्षित ह्या १९ वर्षांच्या, स्वप्नाळू डोळ्यांच्या, सुंदर, बुद्धिमान विद्यार्थिनीच्या ते प्रेमात पडले. तिच्याहून मोठी त्यांची मुलं होती. सुरळीत चाललेला संसार होता. तरीही दोघांची मनं एकमेकात गुंतली. ही कदाचित चूकच झाली त्यांची. ह्या रेशीम गाठी सोडवणं त्यांना जमलं नाही. एक गोष्ट मला तीव्रतेनं जाणवली, त्यांच्यासारख्या प्रेमाच्या त्रिकोणात अडकलेल्या काही नामवंतांनी आपल्या कृतीची जबाबदारी घ्यायचं टाळलं होतं. तसं करणं आप्पांना अधिक सोयीचं ठरलं असतं. विश्वासानं हातात हात देणाऱ्या प्रेयसीला वाऱ्यावर सोडून स्वतःच्या सुरक्षित संसाराकडे परत जाता आलं असतं. आप्पा-ताईंवर गलिच्छ टीका करणाऱ्या काही नामांकित लेखकांनी तो प्रकार केलाही होता. असा भ्याडपणा माझ्या वडिलांनी केला नाही. त्यांनी नेहमीच आयुष्यात जे काही केलं ते उघडपणे केलं, त्याची जबाबदारी पत्करली आणि त्यासाठी समाजाचा रोषही सहन केला. पहिल्या पत्नीचा त्याग केल्याचा दोष त्यांनी स्वीकारला, पण ताईला त्यांनी एकटं सोडलं नाही. ताईनंही खूप सहन केलं. तिच्यावर समाजानं बहिष्कार घातला. महिला मंडळांनी निषेधसभा घेतल्या. परंतु आप्पांवरचा तिचा विश्वास आणि प्रेम तसूभरही कमी झालं नाही, 'एप्रिल-डिसेंबर' लग्न काय टिकणार अशी कुचेष्टा त्यांच्या वयातल्या बावीस वर्षांच्या अंतराला उद्देशून केली गेली. ही तरुण मुलगी ह्या वयस्कर माणसाला लवकरच सोडून देईल अशी भाकितं केली गेली. पण आयुष्याच्या शेवटपर्यंत दोघांचं प्रेम गडदच होत गेलं.

असं असलं तरीही आप्पांच्या स्वभावाच्या काही बाजू, काही कंगोरे जे आम्हांला ज्ञात नव्हते ते त्यांच्या पहिल्या कुटुंबाला अतिशय बोचले, अतिशय त्रासदायक वाटले ही सत्यस्थिती आहे. एक पती आणि पिता म्हणून ते त्यांच्या पहिल्या संसारात अयशस्वीच ठरले.

त्यांचा पहिला विवाह का मोडला ह्याची कारणं आप्पांना आणि मनोरमाबाईंनाच माहीत असणार, पण त्यांचं वैवाहिक जीवन पाहिलं तर आपण अंदाज मात्र करू शकतो.

आप्पांचा आणि मनोरमाबाईंचा विवाह झाला, तेव्हा ते पुण्याला आईवडिलांबरोबर राहात होते. न्यू पूना कॉलेज(सध्याचे एस. पी. कॉलेज)मधे प्राध्यापक होते. लग्नानंतर चारच वर्षांनी गांधीजींच्या असहकार चळवळीत भाग घेऊन त्यांनी नोकरी सोडली. त्यानंतर सहा-सात वर्षं दिल्ली, सिंध, हैद्राबाद, मुंबई, नागपूर अशा विविध ठिकाणी अस्थिर जिप्सीचं आयुष्य ते जगत होते. मनोरमाबाई सासू-सासऱ्यांची आणि मुलांची देखभाल पुण्याला राहून करीत होत्या. सासूच्या शिस्तीत रांधा-वाढा-उष्टी काढा असंच त्यांचं आयुष्य असावं. आप्पा मात्र कादंबरीकार, व्याख्याता आणि प्राध्यापक म्हणून प्रसिद्धीच्या झोतात जगत होते. कोल्हापूरला राजाराम कॉलेजात नोकरी मिळाल्यावर आप्पांनी

आईवडील, पत्नी आणि मुलांना कोल्हापूरला नेलं. कोल्हापूरच्या त्यांच्या कौटुंबिक जीवनाचं वर्णन लीलाताईंनी लिहिलेल्या 'केंजाळ' ह्या लेखात आहे. 'आईला कधी आजीला विचारल्याशिवाय रोजचा स्वयंपाक रांधताना, आप्पांबरोबर कुठे जाताना किंवा साधं मनमुराद हसताना पाहिलेलं आठवत नाही.' असं त्या लिहितात. 'ओलांडताना' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लीलाताई लिहितात, 'साचेबंद स्त्रीत्वामुळे आईला बसणाऱ्या चटक्यांमुळे माझ्या स्वातंत्र्याला तिनं अडसर घातले नसतील का?' आपल्या घरातल्या वरच्या माडीवरचं आप्पांचं जग आणि अंधाऱ्या माजघरातलं आईचं जग अशा दोन भिन्न जगांचं वर्णन लीलाताईंनी केलं आहे. आप्पांची चांदीची सिगरेट केस, चांदीच्या मुठीचा केस विंचरण्याचा ब्रश, सुगंधी अत्तराचा फवारा मारणारी काचेची कुपी, कागद कापायची हस्तिदंती सुरी, त्यांच्या खोलीतला मऊ रेशमी गालिचा, येणारे-जाणारे लोक, सुबक सुंदर खोलीतलं सामान आणि ह्याच्या अगदी विरुद्ध असं अंधाऱ्या माजघरातलं आईचं 'बाईचं' जग. त्या माजघरातली आईची ओबडधोबड लाकडी वेणीफणीची पेटी. 'पितळेच्या झारीतलं एवढंसं तेल हातावर घेऊन लहानशा आरशाच्या भिंगात गडबडीनं पाहात अंबाडा वळणाऱ्या आणि कुंकवाचं बोट कपाळावर टेकवणाऱ्या आईला पाहून मी म्हणे, 'तू का ठेवीत नाहीस आप्पांसारखा ब्रश, पोमेड आणि तसला मोठा आरसा?' आणि लीलाताईंना त्यांची आई म्हणे, 'पुरुषांच्या त्या वस्तू बायकांना काय करायच्यात?' हे सर्व अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

मी माझ्या लहानपणी पाहिलेलं माझ्या आईवडिलांचं सहजीवन मात्र फार वेगळं होतं. रात्रीच्या अंधारात आप्पा-ताईंच्या कुशीत मी झोपी जात असे. मधेच अचानक झोप उलगडली तर बेडलँपच्या ऊबदार वर्तुळात दोघंही इंग्रजी मासिकं किंवा नव्या जुन्या मराठी-इंग्रजी पुस्तकांचं वाचन करताना दिसत. घरी आलेल्या पाहुण्यांना 'आज ताई भेटणार नाही. कारण तिची कथा पूर्ण होईपर्यंत ती खोलीत बंद आहे.' असं सांगणारे आप्पा मी पाहिले आहेत. रोज संध्याकाळी एकत्र फिरायला जाणारे, नाटकासिनेमांचा एकत्र आस्वाद घेणारे, रात्री झोपाळ्यावर बसून दिवसभराच्या राहिलेल्या गप्पा मारणारे आप्पा-ताई मी पाहिले आहेत. त्यांनी दोघांनी मिळून खूप प्रवास केला. त्यावर 'त्रिवेंद्रमची यात्रा' आणि 'उटकमंडची सफर' ही दोन अत्यंत वाचनीय प्रवासवर्णनं ताईनं लिहिली. ताई लग्नानंतर नृत्य शिकली. तिनं नाटकात कामं केली.

आप्पांच्या दोन घरांतल्या भिन्न वातावरणाचं कारण काय असावं? एकच वडील असलेल्या आम्हां भावंडांना इतकं वेगळं वातावरण का मिळावं? दोन चित्रं, दोन्ही तेवढीच खरी. कधी कधी वाटतं लग्नबंधनात असलेल्या स्त्रीला स्वतःचं वेगळं व्यक्तिमत्त्व वाढवता आलं नाही, परिस्थितीमुळे आणि जबाबदाऱ्यांमुळे ती अडकून राहिली आणि तिचा नवरा मात्र पुढे जात राहिला तर किती दुःख निर्माण होतं आणि कशी अंतरं वाढतच जातात.... त्यात दोष कुणाचाच नसतो. किंवा त्रिकोणाच्या तिन्ही कोनांचा असतो. ह्या प्रश्नाशी निगडित तिन्ही माणसं हयात नसताना उत्तर शोधणं योग्य ठरणार नाही. तसा प्रयत्नही मला करायचा नाही. 'पॅरलल लाईव्हज्' ह्या पुस्तकाचं सुनीताबाई देशपांडे ह्यांनी केलेलं 'समांतर जीवन' हे पुस्तक माझ्या वाचण्यात आलं आणि प्रतिभावंत नवऱ्याच्याबरोबर आयुष्य काढताना बाईची कशी फरफट होऊ शकते ते समजलं आणि त्रिकोणाचा तिसरा कोन का निर्माण होतो हेही समजलं.

१९४२ साली आप्पा-ताईंचा विवाह झाला, तेव्हा उठलेल्या सामाजिक प्रक्षोभाची कल्पना करून घ्यायची असली, तर डॉ. स्वाती कर्वे ह्यांनी संपादित केलेलं 'स्त्रियांची शतपत्रे' हे पुस्तक पाहावं. १८५० ते १९५० ह्या कालखंडात स्त्रियांनी लिहलेली १०० पत्रं त्यात आहेत. त्यात दोन पत्रं आप्पा-ताईंच्या विवाहाबद्दल आहेत. ती वाचली की ह्या तिन्ही व्यक्ती आणि अर्थात आप्पांच्या मुलांना कुठल्या अग्निदिव्यातून जावं लागलं, हे लक्षात येईल. त्याकाळी रविवार सकाळमध्ये स्त्रियांच्या पत्रव्यवहाराचं खास सदर असायचं आणि सुधामावशी ह्या काल्पनिक मावशी त्या पत्रांना उत्तरं द्यायच्या. २१ फेब्रुवारी १९४३चं हे पत्र आहे. त्यातला काही भाग असा –

'फडक्यांसारख्या ख्यातनाम साहित्यिकाला व मानसशास्त्रज्ञाला तरी प्रथम पत्नीच्या सुखाचा विचार करायला नको का? त्याचप्रमाणे आपल्या मुलांच्या मनावर याचा काय परिणाम होईल ह्याचा विचार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर नाही काय?' ह्या पत्राचं उत्तर देताना दुसऱ्या लग्नात वयातील अंतरामुळे निर्माण होऊ शकणाऱ्या समस्यांचा उल्लेख करून सुधामावशींनी लिहिलेली दोन वाक्यं फार बोलकी आहेत. 'व्यक्तिशः प्रो. फडक्यांच्या बाबतीत यापैकी काही घडणे शक्य नाही. हे जरी खरे असले, तरी सामाजिकदृष्ट्या विचार करता या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवे. कारण प्रो. फडके ह्यांची सांपत्तिक स्थिती, त्यांची बौद्धिक व सांस्कृतिक उंची, सौ. कमल फडक्यांची त्यांच्यावरील प्रीती व भक्ती या गोष्टी इतक्या प्रकर्षाने समाजात सापडणार नाहीत.''

आप्पा-ताईंच्या आयुष्यातील ह्या अध्यायाबद्दल इतक्या विस्तारानं लिहिलं, कारण ह्या कालखंडाबद्दल माझ्या मनात संभ्रम होता, तोपर्यंत आप्पांना समजून घेण्यात मी असमर्थ होते. जेव्हा आप्पा-ताईंच्या आयुष्यातला हा भाग कुणालाही लहान किंवा मोठं, चूक किंवा बरोबर हे न ठरवता जसा घडला तसा मी स्वीकारला, तेव्हाच माझा संभ्रम नाहीसा झाला. आपल्या सगळ्यांचेच पाय (किंवा ग्रामीण भाषेत कुल्ले) मातीचे असतात हे सनातन सत्य स्वीकारलं आणि आपल्या प्राणप्रिय व्यक्तीलाही 'पेडस्टल'वर न चढवता, एक माणूस म्हणून त्याच्यातल्या गुणदोषांसकट आपलं म्हटलं, की नाती सशक्त होतात हे मी ताईकडूनच शिकले. त्यानंतर माझ्यातलं आणि आप्पांमधलं नातं, ते नसतानादेखील, आजही अगदी तेव्हा होतं तसंच राहिलं आहे. आपण प्रेम करतो त्या व्यक्तीला आपल्या प्रेमातून मुक्त करणं – टु लेट गो – किती आवश्यक आहे हे मी आप्पांकडून शिकले. त्यांनी आम्हांला कधीच बांधून ठेवलं नाही. म्हणूनच आम्ही सतत त्यांच्याजवळच राहिलो.

*(उर्वरित मजकूर पान २४५ वर)*

# शोकांतिका जगलेला न-नायक : आनंद यादव

**रवींद्र शोभणे**

प्रतिभावान लेखक असूनही आनंद यादव फक्त स्वतःच्या लेखनात कधीच रमले नाहीत, समाजाशी फटकून राहिले नाहीत. कायम साहित्यचळवळीत अग्रगण्य राहिले. ग्रामीण साहित्य परिषद स्थापन करून गावोगावी साहित्य संमेलने घेतली. ग्रामीण भागातील अनेक साहित्यिकांना उमेदवारीच्या काळात त्यांनी मोठा आधार दिला.

काही माणसं आपल्या आयुष्यात खूप लवकर येतात, काही योग्य वेळी येतात, तर काही खूप उशिरा येतात. आनंद यादव माझ्या आयुष्यात एक लेखक म्हणून काहीसे उशिरा आले असं मला सारखं वाटत होतं. पण नंतर मात्र असं जाणवलं, की यादवांशी आणि त्यांच्या साहित्याशी आपली ओळख झाली ती अगदी योग्य वळणावर. त्यातही आधी त्यांची प्रत्यक्ष ओळख झाली आणि नंतर त्यांच्या साहित्याची ओळख झाली. तोवर मी *सत्यकथा* हे मासिक मोठ्या भक्तिभावाने वाचत होतो. पण त्यावेळी यादवांनी सत्यकथेत लिहिणं सोडलं होतं. आणि त्यातही माझे आवडते लेखक म्हणून त्यावेळी मी श्री. ना. पेंडसे, चिं. त्र्यं. खानोलकर, ग्रेस, जी. ए. कुलकर्णी आणि तत्सम लेखकांच्या साहित्याचा चाहता झालो होतो. नाटकात वसंत कानेटकर, तेंडुलकर हे आवडते लेखक होते. दलित-ग्रामीण साहित्यही त्यासोबतच वाचत होतो. थोडक्यात, वाचन असं शिस्तबद्ध नव्हतंच. जेव्हा जे हाताशी येईल ते वाचून काढीत होतो.

याच वयात मी लेखन सुरू केलं होतं आणि माझ्या लेखनाची प्रकृती काहीशी तशीच तयार झाली होती. त्यांच्या लेखनाचा प्रभाव माझ्या लेखनावर स्पष्टपणे जाणवत होता. आपल्या अवतीभवतीचं जग आपल्या लेखनातून टिपण्यापेक्षा माझा ओढा तेव्हा अशा अमानवी आणि चमत्कृतिपूर्ण, नियतिशरण लेखनाकडे अधिक होता. केवळ वाचनाच्या संस्कारातून तयार होऊ पाहणाऱ्या माझ्यासारख्या लेखकाची नाळ जमिनिशी जोडू पाहण्याच्या शक्यतांची प्रचीती करून देण्याचं काम प्राचार्य या. वा. वडस्कर यांनी जाणीवपूर्वक केलं. त्यांच्याच बैठकीत आनंद यादव हे नाव अनेकदा त्यांच्या मुखावाटे मी ऐकलं होतं.

अशातच प्राचार्य वडस्कर यांनी नागपूरच्या धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये अमृता प्रीतम यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसीय जनसाहित्य संमेलनाचं आयोजन केलं होतं. या साहित्यसंमेलनात मी पहिल्यांदा आनंद यादव यांना पाहिलं. उंच बांधा, गौर वर्ण, अंगात साधीच शर्ट पँट, डोक्यावरचे पांढरे झालेले केस चापून चोपून नीट बसवलेले, आणि चेहऱ्यावर कायमचं स्मित. त्या साहित्य संमेलनात मी स्वयंसेवकाचं काम करीत होतो. साहित्याविषयीची मनातून आवड असल्यामुळे मी या संमेलनात ही भूमिका पार पाडत होतो. त्यासोबतच माझ्या लेखकीय कारकीर्दीतली पहिली कथा मी याच संमेलनात वाचली होती. या साहित्यसंमेलनात सहभागी झालेले अनेक लेखक नंतर माझे कायमचे मित्र झाले, ही माझी या साहित्यसंमेलनातली मोठी कमाई मी मानतो. आनंद यादव हे त्यातलेच एक होत.

आनंद यादवांच्या या भेटीनंतर, ओळखीनंतर त्यांची माझी मैत्री हळूहळू वाढीस लागली. खरं तर त्यांच्या माझ्या वयात एका पिढीचं अंतर होतं; पण ते अंतर पहिल्या दुसऱ्या भेटीतच कधी कसं गळून पडलं तेही जाणवलं नाही. प्राचार्य वडस्करांनी माझी यादवांशी ओळख करून देताना सांगितलं होतं – 'हा बऱ्यापैकी लिहिणारा लेखक आहे. पण बेटा ग्रेस-जी.एं.च्या प्रभावात आहे अजूनही. त्याला या प्रभावातून बाहेर काढावं लागेल.' त्यावर यादव म्हणाले होते – 'ते सध्या पुस्तकं वाचून लिहितात, म्हणून ग्रेस, जी.एं.च्या प्रभावात आहेत. जीवन वाचायला लागतील तेव्हा आपोआपच त्या प्रभावातून बाहेर पडतील.'

त्यांचं ते वाक्य माझ्या वाङ्मयीन जाणिवांची उलथापालथ करणारं ठरलं. वाचनाच्या या प्रक्रियेत जीवनदर्शाचे काही वेगळे पैलू आपल्याला आकळता येतात का याचाही विचार करू लागलो. आपल्याच जगण्याकडे अधिक गंभीरपणे, अधिक चौकसपणे पाहायला सुरुवात केली. साहित्यांतर्गत आणि जीवनांतर्गत सत्याचा, शक्यशक्यतांचा अधिक गंभीरपणे विचार करण्याची सवय मला याच अवस्थेत कधीतरी लागली आणि ती कायमची अंगवळणी पडली.

त्यानंतर मी याच काळात आनंद यादवांचं हाताशी येईल तेवढं साहित्य वाचून काढण्याचा जणू सपाटाच सुरू केला. काही काळातच मला जाणवलं – यादव माझे आवडते लेखक झालेले आहेत. त्यांचं ललित आणि समीक्षणात्मक असं दोन्ही प्रकृतींचं लेखन मी अधाशासारखं वाचून काढलं. मीही ग्रामीण भागातून आल्यामुळे यादवांची बोलीविषयीची, ग्रामीण साहित्यनिर्मितीसंबंधीची मतं मला पटू लागली. पटू लागली असं

म्हणण्यापेक्षा त्या मतांचा मीही माझ्या परीने पुरस्कार करू लागलो. त्यांच्या *खळाळ, गोतावळा* इत्यादी कलाकृतींबद्दलची – विशेषतः निवेदनासंबंधीची मतं मला अधिक भावू लागली होती. मराठी ग्रामीण साहित्याच्या – विशेषतः साठोत्तरी ग्रामीण साहित्याच्या – संदर्भातील यादवांचं योगदान किती महत्त्वपूर्ण आहे याची जाणीव झाली. ग्रामीण कलाकृतीचं निवेदनसुद्धा बोलीमधूनच करणं त्या त्या अनुभवाच्या प्रकटीकरणासाठी अधिक उपयुक्त ठरतं, स्वाभाविक ठरतं हा विचार त्यांनी आपल्या लेखनातून प्रत्यक्षपणे, आग्रहपूर्वक मांडला आणि तो त्या काळाच्या साहित्याविश्वाने केवळ स्वीकारलाच नाही, तर या भूमिकेचं अनुयायित्व पत्करण्याचं धाडसही अनेकांनी केलं.

हे धाडस यासाठी की यापूर्वीच्या मराठी ग्रामीण साहित्याची प्रकृती काहीशी वेगळी होती. कलाकृतीचं निवेदन प्रमाणभाषेत आणि संवाद मात्र बोलीत अशाप्रकारे ग्रामीण साहित्य अस्तित्वात होतं. वाचकांची सोय म्हणून या लेखनाकडे पाहिलं जात होतं. वाचकाला कलाकृतीचा आस्वाद घेताना कुठला व्यत्यय येऊ नये, हाच त्यामागे विचार होता. आणि या प्रकृतीने लिहिलेल्या अनेक महत्त्वाच्या कलाकृती मराठीत अस्तित्वात होत्या. तथापि यादवांनी मांडलेला कलाकृतीच्या रचनेसंबंधीचा हा विचार स्वीकार करून लिहिती झालेली एक पिढी मराठी साहित्यात अस्तित्वात आली होती. त्या पिढीने आनंद यादव यांचा एक प्रतिभासंपन्न लेखक म्हणून स्वीकार केला होताच; त्याशिवाय एक संघटक, ग्रामीण साहित्य चळवळीचे अध्वर्यू म्हणूनही त्यांना त्यांचं श्रेय बहाल केलं होतं.

आनंद यादवांनी आपलं कसदार लेखन आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या टप्प्यात तर केलंच. १९६६ ते १९८० या काळात त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची यादी जरी पाहिली, आणि त्यासाठी त्यांना मिळालेले मानसन्मान पाहिले, तर ते मराठी साहित्यात पहिल्या प्रतीचे लेखक म्हणून स्थिरावल्याचं दिसून येतं. *हिरवे जग* ते *नटरंग* असा हा त्यांच्या साहित्यनिर्मितीचा अडीच दशकांचा कालखंड आहे. हे लेखन करताना त्यांना एक गोष्ट आवर्जून जाणवली आणि ती म्हणजे या काळात आपले अनुभव घेऊन लिहू पाहणारी ग्रामीण भागात एक नवी पिढी उभी राहते आहे. या पिढीसमोर व्यक्त होण्यासाठी माध्यमांचा आणि मार्गदर्शनाचा अभाव आहे. आणि त्यातूनच ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा जन्म झाला. ललित लेखकाने फक्त लिहीत राहावं, त्याने सामाजिक चळवळीच्या किंवा तत्सम गोष्टींमध्ये अडकून पडू नये; किंबहुना असं अडकून पडणं त्याच्या प्रतिभेच्या आणि सर्जनाच्या आड येतं असा विचार करणारा तो एक काळ आणि वर्ग होता – ज्यात आनंद यादव वावरत होते. सर्जनशील लेखकाला सामाजिक प्रश्नाविषयी, चळवळीविषयी जे काही बोलायचं आहे ते आपल्या लेखनातूनच मांडावं, असा विचार करणाऱ्या लोकांमध्ये यादव वावरत होते. पण यादवांनी मात्र हा विचार बाजूला ठेवून ग्रामीण साहित्यचळवळीच्या निकडीतून ग्रामीण साहित्य परिषदेची स्थापना केली आणि महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातल्या गावांत जाऊन तिथल्या जिद्दीने लिहू पाहणाऱ्या नव्या लेखकांना सजगपणे लिहितं केलं. त्यांच्यासाठी गावोगावी साहित्य संमेलनं घेऊन त्या लेखकांना व्यासपीठ मिळवून दिलं. हे यादवांचं कार्य निश्चितच महत्त्वाचं मानलं जातं.

या काळातच मी यादवांच्या अधिक जवळ आलो. लेखक म्हणून यादव माझ्याकडे काहीशा आपुलकीने याच काळात पाहू लागले. आणि त्याला तसं एक निमित्तही झालं. १९८५ साली महाराष्ट्र शासनाने राम गणेश गडकरी यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने त्यावर्षीचा शासनाच्या वाङ्मय पुरस्कार वितरणाचा सोहळा नागपूरजवळ असलेल्या सावनेर या गावी आयोजित केला होता. सावनेर हे गाव गडकऱ्यांशी संबंधित आहे. इथे त्यांनी आपला अखेरचा श्वास घेतला होता. या वाङ्मयपुरस्कार सोहळ्यासाठी पुरस्कार घ्यायला म्हणून आनंद यादव नागपूरला आले होते. त्यांच्या *नटरंग* या कादंबरीला पुरस्कार मिळाला होता. त्यांचा मुक्काम नागपूरच्या आमदार निवासात होता. वाङ्मयपुरस्कार स्वीकारायला आलेल्या लेखकांमध्ये डॉ. अरविंद वामन कुलकर्णीही होते. याच दरम्यान माझी *प्रवाह* ही कादंबरी प्रकाशित झाली होती. प्रवाहची प्रत आनंद यादव यांना भेट म्हणून देण्यासाठी मी त्यांना भेटायला आमदार निवासात गेलो. ही त्यांची माझी फार तर दुसरी किंवा तिसरी भेट असावी. पण ही भेट स्वतंत्र होती. प्रवाहची प्रत त्यांना भेट म्हणून दिल्यावर त्यांनी माझी आस्थेने चौकशी केली. इतर वाचन-लेखनाबद्दल मनापासून विचारणा केली. प्रवाहच्या भेटप्रती मी अनेकांना दिल्या होत्या. पण फारशी त्या लेखनाची कुणी दखल घेतली नव्हती. अर्थात ते माझं लेखनही तसं कच्चं होतं आणि मला त्याची जाणीवही होती. तेव्हा आनंद यादवही पुस्तक घेतील आणि आपल्या कपाटात ठेवून देतील असं मला वाटलं होतं. एवढा व्यग्र आणि मोठा लेखक आपलं हे सामान्य पुस्तक वाचेल अशी मला साधी आशाही नव्हती; पण यादवांनी मला आश्चर्याचा सुखद धक्का दिला.

त्यानंतर महिन्याभराच्या आताच माझ्या पत्त्यावर त्यांचं पत्र आलं. त्यांचं मला आलेलं ते पहिलं पत्र होतं. प्रवाह वाचून त्यांनी मला काही महत्त्वाच्या सूचना केल्या होत्या. चांगलं लेखन करताना ललितलेखकाला कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी लागते, याविषयी त्यांनी मला मनापासून चार गोष्टी त्या पत्रातून सांगितल्या होत्या. त्या मला पटल्याही होत्या. माझ्यातल्या लेखकाच्या विकासासाठी या सगळ्या गोष्टी कशा पूरक आणि पोषक आहेत याची मला जाणीव झाली होती. इथून आमच्या खाजगी पत्रव्यवहाराची सुरुवात झाली ती त्यांच्या अखेरच्या दिवसांपर्यंत कायम होती.

या दरम्यानच आनंद यादवांनी अ. भा. मराठी साहित्य संमेलनाची निवडणूक लढविण्याचं मनावर घेतलं.

त्या संदर्भातल्या बातम्या वर्तमानपत्रातून येऊ लागल्या. हे संमेलन प्रवरानगर येथे सहकारमहर्षी बाळासाहेब विखे पाटील

आयोजित करणार होते आणि त्यांना या संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून आनंद यादव हवे होते. यादवांचे प्रतिस्पर्धी म्हणून सुप्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर हेसुद्धा रिंगणात उतरले होते. अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष होते गंगाधर गाडगीळ. त्यापूर्वी रायपूरच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी गाडगीळांच्या विरोधात कानेटकर उभे होते आणि ते पराभूत झाले होते. त्यामुळे गाडगीळांची सहानुभूती कानेटकरांकडे होती. यादवांचं वय तेव्हा बावन्न वर्षांचं होतं तर कानेटकरांचं वय चौसष्ट वर्षांचं होतं. त्यामुळे एकीकडे ज्येष्ठत्वाच्या कारणांवरून काहींचा कल कानेटकरांकडे होता तर यादव भूमिका घेऊन लिहिणारे लेखक आहेत आणि कानेटकर लोकप्रिय नाटककार आहेत या मुद्द्यावरून काही मंडळींचा कल यादवांकडे होता. पण यादवांकडे कल असणारी मंडळी महामंडळाचे मतदार नव्हती. तथापि यादवांच्या पाठीमागे असणारी मंडळी पाहून कानेटकरांनी आपली उमेदवारी मागे घेण्यासाठी गाडगीळांकडे राजीनामा दिला; पण तो न स्वीकारता गाडगीळांनी कानेटकरांना मैदानात कायम ठेवलं. आता आपल्याला निवडणूक लढविण्यावाचून दुसरा पर्याय नाही हे पाहून कानेटकर कामाला लागले.

परिणामी कानेटकर निवडून आले आणि यादवांचा पराभव झाला. आपल्याला हवा असलेला अध्यक्ष पराभूत झाला या सबबीवर बाळासाहेब विखे पाटील यांनी संमेलन घ्यायचं नाकारलं. त्यामुळे ते संमेलन ठाण्याला झालं. इकडे महामंडळाचे अध्यक्ष असताना गाडगीळांनी पक्षपात केला म्हणून गाडगीळांना महामंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासात वेगळ्या राजकारणाने गाजलेलं हे एकमेव संमेलन होय. या सगळ्या प्रकारावर नागनाथ कोत्तापल्ले यांनी एक पुस्तकही लिहिलं. या काळात यादवांना पाठिंबा देणारं पत्रक नागपुरातून या. वा. वडस्कर यांनी काढलं होतं आणि त्या पत्रकावर सह्या घेण्यासाठी वडस्करांच्या सोबत मीही फिरलो होतो.

त्यानंतर यादवांनी दुसऱ्यांदा अध्यक्षपदासाठी उभे राहण्याचा प्रयत्न केला तो परभणी येथील साहित्य संमेलनाच्या वेळी. त्यावेळी त्यांच्याविरुद्ध नारायण सुर्वे उभे होते आणि महामंडळ नागपूरला होतं. आधीच्या वर्षी पणजीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य राम शेवाळकर बिनविरोध निवडून आले होते. त्यावेळी शेवाळकरांसाठी सुर्वेंनी माघार घेतली असल्यामुळे सुर्व्यांविषयी तमाम रसिक वाचकांच्या मनात आपुलकीची आणि आदराची भावना होती. त्यामुळे याही वेळी यादवांना पराभव पत्करावा लागला. या दोन्ही पराभवांमुळे यादवांच्या मनात या व्यवस्थेविषयी अनास्थेची आणि दुराग्रहाची भावना निर्माण झाली होती. ती पुढे खूप वर्षं कायम होती. मला या संदर्भात नेहमी असं वाटतं, या दोन्ही वेळेला त्यांच्याकडून काही गफलत तर झाली नाही ना? कारण यादवांचा तो अधिकार कुणीही नाकारू शकत नव्हतं. फक्त प्रश्न होता योग्य वेळेचाच. आणि तीच त्यांना नेमकी साधता आली नाही की काय? कारण या दोन्ही वेळेला मी यादवांसोबत होतो.

प्रवरानगर प्रकरणाच्या आसपासच यादवांची *झोंबी* ही आत्मचरित्रात्मक कादंबरी प्रकाशित झाली आणि यादव यानिमित्ताने साहित्यवर्तुळात अधिक चर्चेत आले. आत्मचरित्रात्मक कादंबरी ही संकल्पना यादवांनी झोंबीला एक टिपण जोडून जाणीवपूर्वक मांडली आणि त्यामुळे या नव्या वाङ्मयप्रकाराची चर्चा सुरू झाली. झोंबीला पु. ल. देशपांडे यांची प्रस्तावना लाभल्यामुळे आणखी वेगळी झळाळी या सगळ्याला प्राप्त झाली होती. ही कादंबरी त्याकाळी वाचकांनी वेड्यासारखी वाचली आणि तिच्यावर वेड्यासारखं प्रेम केलं. शेकड्यांनी पत्रं आली. जो तो झोंबी वाचून गदगदून जायचा. कुठून कुठून त्यांना माणसं भेटायला यायची. झोंबी लिहिणारा लेखक कोण आहे, कसा आहे हे पाहायला वेड्यासारखे वाचक त्यांच्याकडे यायचे.

एक असाच अनुभव यासंदर्भात सांगता येईल. मी त्यांना भेटायला गेलो होते. सकाळची वेळ होती. घरी यादव एकटेच होते. त्यांनाही तासाभरात विद्यापीठात निघायचं होतं. आमच्या गप्पा सुरू होत्या. एवढ्यात तीन चार माणसं अचानक त्यांना भेटायला म्हणून आली. कुठून खेडेगावातून आलेली असावीत. तरुणच होते. विशी पंचविशीचे. अंगावर मळकट कपडे, केस अस्ताव्यस्त, बोलण्यात-वागण्यात ग्रामीण ढब. त्यांना यादवांनी विचारलं – 'काय बाबांनो, कसे काय आला?' त्यावर त्यातला एक जण म्हणाला – 'सर, आम्ही सगळ्यांनी मिळून आपली झोंबी वाचली. आणि आम्ही लई अस्वस्थ झालो की. आमचीच गोष्ट तुम्ही लिहून काढली की. रहावलं नाही म्हणून रात्रभर एस.टी.चा प्रवास करून तुम्हाला भेटायला आलो.' यादव घरी एकटेच असल्यामुळे त्यांच्यासाठी चहापाणीही करू शकत नव्हते. त्यांनी त्यांची अडचण सांगितली. त्यावर ती मुलं म्हणाली, 'असलं काय बी नको सर. फक्त तुमच्या पायावर डोकं ठेवू आणि निघू की.' आणि श्रद्धेने यादवांच्या पायांवर डोकं टेकवून ती सगळी मुलं आल्या पावली निघून गेली. मी स्तंभित होऊन हे सगळं पाहत होतो. त्यानंतर यादव म्हणाले – 'शोभणे, झोंबीनं असा खूप मोठा गोतावळा उभा केला बघा माझ्याभोवती महाराष्ट्रभर.'

यादवांच्या मुलीनं – कीर्ती मुळीकनं – जानेवारी २०१७च्या 'ललित'मध्ये सांगितलेला अनुभव तर अंगावर शहारा आणणारा आहे. यादवांना इकडे स्मशानभूमीवर नेलं असावं. आणि त्यांची झोंबी वाचून गडचिरोलीचा एक वाचक घरी त्याना भेटायला त्यांच्या घरी आला होता. दोन दिवसांच्या प्रवासात त्याने पेपर वाचला नव्हता व त्यामुळे यादव गेले, ते त्याला कळलंही नव्हतं.

या कादंबरीला त्यावर्षीचे बहुतेक महत्त्वाचे पुरस्कार मिळाले. त्यांच्या प्रतिभेला सलाम म्हणून त्यावर्षीचा साहित्य अकादमीचा पुरस्कार झोंबीला प्राप्त झाला आणि यादवांच्या नावाला आणखी महत्त्व प्राप्त झालं. पुढे यादवांनी या वाङ्मयप्रकाराची चिकित्सा करताना यातील कादंबरी हा शब्द बाजूला सारला आणि चार खंडांत आपले आत्मचरित्र (*झोंबी, नांगरणी, घरभिंती* आणि *काचवेल*) मांडलं. त्यांच्या या आत्मचरित्रात्मक प्रकल्पावर अनेकांनी टीकाही केली; पण ते त्या टीकेला बधले नाहीत.

लेखक म्हणून या काळात माझीही धडपड सुरू होती. अशातच माझी *रक्तध्रुव* ही कादंबरी लिहून पूर्ण झाली होती. ती मी यादवांना वाचायला दिली. त्यांनी त्यात काही बदल सुचविले. नंतर ती कादंबरी त्यांच्याच पुढाकाराने आधी 'पुढारी'च्या दिवाळी अंकातून आणि नंतर मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे पुस्तकरूपात प्रकाशित झाली. यानंतर आमचे मैत्रीचे संबंध अधिक घट्ट झाले. माझे कादंबरी-लेखन मी त्यांना वाचायला देऊ लागलो. त्यावर ते आपल्या प्रतिक्रिया देऊन माझ्याकडून त्याचे पुनर्लेखन करवून घेऊ लागले. साधारणत: माझ्या *कोंडी* या कादंबरीपर्यंत हा आमचा संवाद कायम होता.

त्यामागचं एक कारणही होतं. आणि ते म्हणजे यादव त्यावेळी मेहता पब्लिशिंग हाऊससाठी संपादनाचे काम करीत होते. यादवांमुळेच मी मेहता पब्लिशिंग हाऊसचा लेखक झालो होतो. त्यावेळी माझ्या पिढीच्या अनेक लेखकांना यादवांनी मेहतांच्या उंबरठ्यावर उभं केलं होतं. पण पुढे त्यातल्या काहींनी केवळ आपल्या स्वार्थासाठी यादवांकडे पाठ फिरवली. केवळ पाठच फिरवली नाही, तर त्यांच्यावर वैयक्तिक टीका करायलाही त्यांनी मागेपुढे पाहिलं नाही. अशा मंडळींविषयी त्यांच्या मनात कायमच पश्चातापाची भावना सलत होती.

यादवांच्या साहित्याशी माझी तोंडओळख व्हायला लागली तेव्हा मी त्यांच्या नटरंग या कादंबरीने अक्षरश: भारावून गेलो होतो. हे भारावलेपण जरा वेगळ्या कारणामुळे निर्माण झालं होतं. आणि ते कारण होतं कारण होतं माझ्या नाट्यप्रेमाचं. नटरंग वाचल्यावर मला एक गोष्ट आवर्जून जाणवली आणि ती म्हणजे या कादंबरीत फार मोठी नाट्यात्मकता आहे. यावर नाटक लिहिलं तर ते रंगभूमीवर अधिक यशस्वी होईल, अशी खात्री पटली. त्या दिवसांत मी नाटकांच्या प्रेमात पार बुडलो होतो. आपलीही नाटकं रंगभूमीवर यावीत, त्यांचे भरपूर प्रयोग व्हावे असं वाटत होतं. यापूर्वी माझं एक नाटक महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत सादरही झालं होतं. त्यामुळे इथल्या नाटकवाल्यांशी बऱ्यापैकी मैत्रीही झालेली होती. नटरंगवर आपण नाटक लिहावं आणि ते राज्य नाट्यस्पर्धेत सादर करावं असं मनातून वाटू लागलं आणि त्याच इच्छेपोटी मी यादवांकडे या कादंबरीच्या नाट्यरूपांतराची परवानगी मागितली. यादवांसारखे ज्येष्ठ लेखक आपल्याला याविषयीची परवानगी देतील की नाही ही शंका मनात होतीच. पण त्यांनी ताबडतोब पत्र पाठवून मला या नाट्यरुपांतराची परवानगी दिली.

माझ्यासाठी नटरंगचे नाट्यरूपांतर करणं ही गोष्ट जेवढी आनंददायक होती तेवढीच ती जोखमीचीही होती. कारण एक तर मी अशा प्रकारचं कलांतर पहिल्यांदाच करीत होतो. आणि त्यातच कादंबरीतला अख्खा जीव मला त्या तीन तासांच्या प्रयोगात ओतायचा होता. मी माझं सगळं कसब पणाला लावून अधिक जबाबदारीने लेखनाला बसलो आणि दोन ते तीन आठवड्यांत त्यावरील काम पूर्ण केलं. त्याचं शीर्षक ठेवलं होतं – *होती एक बृहन्नडा.* नाट्यरूपांतराचा पहिला खर्डा पूर्ण झाला आणि तो मी यादवांना पाठवून दिला. त्यांची काय प्रतिक्रिया येते हे पाहण्यासाठी. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांचं आठ दिवसांत पत्र आलं आणि त्यांनी त्यात लिहिलं होतं – 'यापूर्वी नटरंगवर तिघाचौघांनी नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला; पण त्या सगळ्यांपेक्षा तुमचे नाट्यरूपांतर अधिक उजवे आहे.'

त्या प्रतिक्रियेने माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं होतं. नागपूरच्या रंगस्वानंद या नाट्यसंस्थेने एकोणतिसाव्या राज्य नाट्यस्पर्धेत त्या नाटकाचा सुरेख प्रयोग सदर केला. इथे ते प्रादेशिक फेरीत दुसरं आलं. अंतिम फेरीसाठी या नाटकाची निवड झाली. या नाटकाचा प्रयोग यादवांनी बघावा म्हणून मी त्यांना दोन्ही वेळेला आग्रहाने बोलावलं होतं; पण त्यांना ते शक्य झालं नाही. मुंबईच्या प्रयोगाला मात्र त्यांच्याऐवजी त्यांची मोठी मुलगी स्वाती आपल्या यजमानांसोबत आली होती. तो प्रयोग तिलाही खूप आवडला होता. हा प्रयोग पाहायला डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर आवर्जून आले होते. तेव्हापासून त्यांची मैत्री झाली ती कायमची. प्राथमिक फेरीसाठी परीक्षक असलेले श्री. अनंत ओक (रोहिणी हट्टंगडीचे वडील) यांनी ते नाटक कापड गिरणी नाट्य स्पर्धेसाठी बाजीराव पोपळकरांना सुचविलं. त्याचे प्रयोग त्या स्पर्धेतही झाले. पुढे बाजीराव पोपळकरांनी नटरंगवर त्याच नावाने यादवांकडून नाटक लिहून घेऊन त्याचे व्यावसायिक रंगभूमीवर प्रयोग केले. पण ते नाटक व्यावसायिक रणभूमीवर फार चाललं नाही.

यादवांनी खूप आधी *रात घुंगराची* या नावाचं एक वगनाट्य लिहिलं होतं. त्यावरूनच त्यांनी पुढे *नटरंग* लिहिली होती. तीच गोष्ट त्यांच्या *गोतावळा* या कादंबरीची सांगता येईल. त्यांच्या *इंजिन* या कथेवरून त्यांनी ही कादंबरी लिहिल्याचं त्यांनीच नमूद करून ठेवलं आहे.

यादवांचा लेखनाचा झपाटा चकित करणारा होता. एकाच वेळी ते सव्यसाची वृतीने लेखन-वाचन करीत होते. शिवाय ग्रामीण साहित्य चळवळही ते नेटाने चालवीत होते. याच दरम्यान ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुखही झाले होते. पण त्यांच्या लेखनावर आणि वाचनावरही या प्रशासकीय कामाचा कुठलाही परिणाम झाला नव्हता. उलट, त्यांच्या आत्मचरित्राचे शेवटचे दोन खंड त्यांनी याच दरम्यान लिहून काढले होते.

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सत्तांतर'ला १९८३चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आणि काही दिवसांतच *सत्तांतर* ही कशी उचलेगिरी आहे, एका इंग्रजी पुस्तकावरून ती कशी बेतली आहे याबद्दलचा लेख श्री. ग. वा. बेहेरेंच्या 'सोबत'मधून एक निनावी लेख प्रकाशित झाला होता. तो निनावी लेख यादवांनी लिहिला असं म्हटलं गेलं आणि तेव्हापासून माडगूळकर-यादव यांच्यातील वैमनस्याला चांगलीच धार चढली. माडगूळकरांनी यादवांवर अब्रुनुकसानीचा दावा टाकला. पण पुढे माडगूळकर गेले आणि तो विषय तिथेच संपला. खरं तर हे वैमनस्य इथेच संपायला हवं होतं; पण त्याची परिणती *कलेचे कातडे* लिहिण्यात झाली. ही कादंबरी माडगूळकरांची बदनामी करणारी कादंबरी आहे, अशी चर्चा सुरू झाली आणि त्यामुळे माडगूळकरप्रेमी फार दुखावले. यादवांविषयी मराठी साहित्यवर्तुळात प्रतिकूल वातावरण निर्माण व्हायला सुरुवात झाली ती इथूनच.

मध्यंतरी 'माऊली'सारखी एक वेगळ्या विषयावरील कादंबरीही यादवांनी लिहिली होती. आदिम मातृबंधाची एक वेगळी कलात्मक मांडणी कशी असू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही कादंबरी होय.

मी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीत सदस्य असताना व्याख्यानमाला हा विभाग सांभाळत होतो. तेव्हा यादवांना व्याख्यानमालेसाठी बोलावलं होतं. यादवांनी दोन व्याख्यानं दिली होती. मध्यंतरी डॉ. सुभाष सावरकरांनी भंडारा येथे जनसाहित्य संमेलन आयोजित केलं होतं त्याचे अध्यक्ष आनंद यादव होते. त्यांना विदर्भातून अनेकदा अशा वाङ्मयीन कार्यक्रमांचं बोलावणं जायचं आणि ते प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून यायचे. त्यांच्या अशा मुक्कामात त्यांची माझी आवर्जून भेट व्हायची. एकमेकांची ख्यालीखुशाली आम्ही परस्परांना विचारायचो. तोपर्यंत त्यांचे-माझे मैत्रीचे बंध कौटुंबिक पातळीवर स्थिरावले होते. नागपूरला आले, की ते आवर्जून घरीही यायचे. यादव हे मराठीतील एक महत्त्वाचे लेखक आहेत आणि त्यांच्यावर अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या बाबतीत कुठल्या का कारणाने होईना, पण दोनदा अन्याय झाला, आता ते या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व्हायला हवेत, असं मनोहर म्हैसाळकरांना मनातून वाटत होतं. मागच्या दोन वेळेला विदर्भ साहित्य संघ त्यांच्या पाठीशी उभा राहू शकला नव्हता. आता आपण त्यांच्या पाठीशी निश्चितपणे उभे राहू. तेव्हा त्यांनी आता अध्यक्षपदासाठी अर्ज भरावा म्हणून म्हैसाळकरांनी दोनतीनदा त्यांच्याकडे माझ्यातर्फे निरोप दिला होता. 'आता तुम्ही हा विचार केला तर विदर्भ साहित्य संघ निश्चितपणे तुमच्या पाठीशी उभा राहील,' म्हणून मीही त्यांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला होता. पण आधीच्या दोन अनुभवांनी ते इतके दुखावले होते, की त्यांनी तो विचार मनातून जवळजवळ काढूनच टाकला होता.

मध्यंतरी माझ्या *चिरेबंद* या कादंबरीला रणजित देसाई यांच्या नावाने साहित्य पुरस्कार जाहीर झाला आणि मी तो पुरस्कार घ्यायला रणजित देसाई यांच्या कोवाड या गावी गेलो. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुढाकाराने हा पुरस्कार सुरू झाला होता आणि पहिल्या पुरस्काराचा मानकरी मी ठरलो होतो. मी कोवाडला गेलो तेव्हा तिथे आनंद यादव, अनिलभाई मेहता, चंद्रकुमार नलगे ही मंडळी आधीच आलेली होती. यादव कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तिथे रणजित देसाईंच्या पांडुरंग कुंभार या लेखनिकाकडून मला कळलं – आनंद यादव परीक्षक मंडळात होते आणि त्यांनी आपला कौल माझ्या बाजूने दिला म्हणून. अर्थात एक संकेत म्हणून यादवांनी हे मला कधीही सांगितलं नाही. पण असे अनेकदा ते माझ्या पाठीशी उभे राहिलेले आहेत.

आणि याला कारण म्हणजे ते माझे एक तटस्थ वाचक होते. माझ्या बहुतेक पुस्तकांवरील त्यांच्या प्रतिक्रिया मला खूप मोलाच्या वाटत होत्या. माझ्या लेखनासंबंधी ते नेहमी म्हणत – 'तुमच्या लेखनाची प्रकृती शांत आणि संयमित स्वरूपाची आहे. एखादा अनुभव तुम्ही कलाकृतीत मांडता तेव्हा तो सर्वांगाने कसा विकसित होईल आणि त्यात लेखक कसा तटस्थ राहील हे तुम्ही फार चांगल्या रीतीने साधता. असं लेखन फार कमी लेखकांना साधतं.' त्यांची माझ्या लेखनाविषयीची ही प्रतिक्रिया माझ्यावरील प्रेमापोटी असेल, पण ती आंधळी नव्हती हेही मला समजत होतं.

निवृत्तीनंतर आनंद यादवांनी वारकरी संप्रदायातील दोन महत्त्वाच्या संतांवर कादंबऱ्या लिहिण्याचा संकल्प सोडला. त्यातली पहिली *लोकसखा ज्ञानेश्वर* आणि दुसरी होती *संतसूर्य तुकाराम.* दोन्ही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आणि त्या चांगल्या विकल्यासुद्धा गेल्या. वाचकांना त्या मनापासून आवडल्या. पण त्यावेळीही माझ्या मनात एक प्रश्न निर्माण झाला होता. आणि तो म्हणजे या दोन कादंबऱ्या लिहून आनंद यादवांचा वाङ्मयीन आलेख असा कितीसा उंचावला?

कारण चरित्रात्मक कादंबरीलेखनाची त्यांची प्रकृती नव्हती. त्यांचा पिंड नवसाहित्यावर पोसला गेला होता. ते मौजेचे लेखक होते. श्री. पु. भागवत, राम पटवर्धन यांच्या तालमीत ते तयार झाले होते. त्यामुळे समकालीन वास्तवाचा विचार त्यांच्या साहित्यात प्रामुख्याने अधोरेखित व्हायचा. असा वाङ्मयीन पिंड असलेला लेखक या विषयांकडे का वळावा हा प्रश्न मला आजही अनुत्तरीतच आहे. हे दोन्ही संत लोकमानसात खूप खोलवर रुजलेलं असल्यामुळे त्यांच्यावर या आधी अशा प्रकारचे कादंबरीलेखन झालेलं होतं. नाही असे नाही. त्यामुळे या आधीच्या लेखनापेक्षा आणखी वेगळं असं ते काय आपल्या लेखनातून मांडू शकतील, ही शंका मला होतीच. त्यापेक्षा या संतांवर त्यांनी समीक्षणात्मक, वाङ्मयीन कर्तृत्वावर विवेचनात्मक, अभ्यासपूर्ण लेखन केलं असतं, तर कदाचित ते त्यांचं लेखन अधिक महत्त्वपूर्ण ठरलं असतं असं मला वाटतं. अर्थात हे माझं मत झालं. पण तरीही त्यांनी त्या कादंबऱ्या लिहिल्या आणि त्या लोकप्रियही ठरल्या. लोक त्या आवडीने वाचू लागले. यानंतर यादव आपल्या कादंबरीलेखनासाठी कोणता विषय निवडतात याविषयी मला उत्सुकता होती.

मधल्या काळात ते ललितसाहित्याविषयी काहीसे उदासीन झालेले दिसत होते. आवर्जून वाचावं असं काही हाताशी येत नाही ही त्यांची तक्रार होती. अर्थात त्याविषयी मी त्यांच्याशी सहमत होतोच असंही नाही. कारण माझ्या पिढीवर माझा भरवसा होता. आम्ही आमच्या पिढीपेक्षा वेगळं असं काही मांडण्यासाठी धडपडत आहोत असं मला वाटायचं. पण यादवांनी मात्र या काळात काही अपवाद सोडले तर ललितसाहित्य वाचायचं बंद केलं होतं. त्याऐवजी ते तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास अशी पुस्तकं अधिक वाचू लागले होते. वाचनाच्या बाबतीत जे होतं तेच लेखनाच्या बाबतीतही त्यांचं झालं होतं. या काळात त्यांचं ललितलेखनही जवळ जवळ थांबलं होतं. कथा तर त्यांनी लिहीणंच सोडलं होतं. 'आता आधीसारखं काही सुचत नाही,' अशी त्यांची स्वत:विषयीचीच तक्रार असायची.

ही तक्रार साधारणतः वयाच्या किंवा लेखनाच्या विशिष्ट टप्प्यानंतर प्रत्येकच लेखकाच्या बाबतीत असते का? त्याचे

सर्जनाचे झरे आटून जातात का? शेवटी शेवटी विजय तेंडुलकर जाहीरपणे सांगायचे – मला आधीसारखं नाटक आता दिसत नाही म्हणून. मला वाटतं या काळात सर्जनशील लेखक आपल्या आतल्या झऱ्याच्या शोधात एखाद्या कस्तुरीमृगासारखा वणवण भटकत असतो. त्याला त्याच्या आतलं सत्व हवं असतं. पण ते गवसत नाही म्हणून की काय तो आपल्या लेखनाशी तडजोडी करू लागतो की काय? त्याची ही पठारावस्था असते की काय? यादवांच्या बाबतीतही काही प्रमाणात हे असं घडलं असावं आणि म्हणून ते संत ज्ञानेश्वर आणि संत तुकारामांवर कादंबऱ्या लिहायला उद्युक्त झाले की काय, अशीही शंका माझ्या मनात येते.

मध्यंतरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांना साहित्याचं व्यासपीठ प्राप्त व्हावं यासाठी 'समरसता साहित्य मंचा'ची स्थापना झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक विजय कापरे हे या मंचाचं काम पाहत होते. समरसता साहित्य मंचातर्फे समरसता साहित्य संमेलनांचं आयोजन करण्याचा विचार त्यांनी केला आणि १९९८मध्ये जळगाव येथे आयोजित पहिल्या समरसता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान आनंद यादवांना दिला. या साहित्य संमेलनाचं सूत्र होतं – 'साहित्य आणि सामाजिक समरसता.' यामुळे समरसतेची संकल्पना मांडण्याची जबाबदारी यादवांवर येऊन पडली. आणि ही संकल्पना मांडताना त्यांनी उजवी विचारधारा कशी उपयुक्त आहे ते मांडण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी यादव फुले-शाहू-आंबेडकर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले होते. त्या पार्श्वभूमीवर समरसता साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवावं हे त्यांच्या ग्रामीण साहित्य चळवळीच्या सहकाऱ्यांना फारसं रुचलं नाही. त्यामुळे ते दुरावले. यादव काहीसे एकटे पडले. ग्रामीण साहित्य चळवळ थंडावली.

२००८मध्ये साधना प्रतिष्ठानने पहिले साधना साहित्य संमेलन पुण्याला कादंबरी या वाङ्मयप्रकारावर आयोजित केलं होतं. स्थळ होतं एस. एम. जोशी सभागृह. त्या संमेलनात माझाही सहभाग होता. तिथे आनंद यादव काही वेळासाठी डोकावून गेले होते. त्यांची माझी भेट झाली. औपचारिक गप्पा झाल्या. त्यानंतर तिथे दोनेक तासांनी मला ह. ल. निपुणग्यांचा फोन आला. ते म्हणाले – 'मोकळे झाला असाल, तर माझ्या ऑफिसात या. यादवांना तुमच्याशी महत्त्वाच्या विषयावर बोलायचं आहे.' मी ताबडतोब रिक्षा करून निपुणग्यांच्या ऑफिसात गेलो. यादव तिथे बसलेलेच होते. तिथे निपुणग्यांनी सांगितलं – 'यावर्षी महाबळेश्वरला अ. भा. मराठी साहित्य संमेलन आयोजित होत आहे. आणि यादव या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभे राहू इच्छितात.'

मी त्या सूचनेचं मनापासून स्वागत केलं. माझ्या मनातला लेखक या वर्षी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होतो आहे हा आनंद मलाही अधिक झाला होता. यादवांच्या विरोधात शंकर सारडा उभे होते. त्यावर्षी महामंडळ औरंगाबादला होतं आणि कौतिकराव ठाले पाटील महामंडळाचे अध्यक्ष होते. यादव या निवडणुकीत रीतसर जिंकून आले. यापूर्वीचं त्यांचं दोन वेळेचं अपयश आता धुवून निघालं होतं. माझ्यासारख्या त्यांच्या चाहत्यांना निश्चितच आनंद झाला होता. त्यांच्यावर मी नागपूरच्या 'तरुण भारत'मध्ये एक लेख लिहून त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाला उजाळा दिला होता.

तरुण भारतच्या रविवार पुरवणीत त्यांच्यावरील माझा लेख छापून आला त्याच दिवशी रात्री सुमारास माझा मोबाइल वाजला. पलीकडून कुणी अमरावतीहून बोलत होतं – त्यांचं म्हणणं होतं, 'यादवांनी संतसूर्य तुकाराम या कादंबरीत तुकारामाची बदनामी केली आहे. त्यामुळे यादवांवर लोक चिडलेले आहेत. त्यांना या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बसण्याचा अधिकार नाही.' त्या फोनचं मला आश्चर्य वाटलं आणि मी त्याकडे दुर्लक्षही केलं. कारण संतसूर्य तुकाराम ही कादंबरी प्रकाशित होऊनही तीन-चार वर्षं उलटली होती. या मधल्या काळात कुणीही हा मुद्दा उपस्थित केला नव्हता. त्यानंतर सतत वर्तमानपत्रांतून याविषयी लिहून येऊ लागलं. आणि शेवटी वारकऱ्यांनी जाहीर केलं की – 'आनंद यादव यांनी या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा. अन्यथा काहीही झालं तरी आम्ही हे संमेलन होऊ देणार नाही.'

आयोजकांची आणि महामंडळाचीही मोठी पंचाईत झाली. मध्यंतरी आनंद यादवांनी देहूला जाऊन तुकारामांच्या चरणांवर डोकं टेकवून आपली ही कादंबरी परत घेतली. तुकारामांची माफी मागितली. पण वारकरी काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. त्यावर्षीचा लाभसेटवार साहित्यसन्मान मला मिळाला होता आणि त्या पुरस्कार वितरण सोहळ्याला आनंद यादव प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. यादव नागपुरात आल्यानंतर कार्यक्रमस्थळी कुठला अपप्रकार घडू नये म्हणून आम्ही पोलीस बंदोबस्त ठेवला होता. पण एवढं करूनही या कार्यक्रमाला यादवांचं येणं जोखमीचं होतं. म्हणून त्यांनी येऊ नये असं आम्हांला वाटत होतं. तसा आम्ही त्यांना निरोपही दिला आणि तेही आले नाहीत. तेव्हा मोठ्या संकटातून सुटल्याचा आम्ही नि:श्वास टाकला. कारण कुठलं अघटित कसं आणि कधी घडेल हे सांगता येत नव्हतं.

यादवांनी अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा म्हणून वारकरी सर्वत्र मागणी करीत होते. त्यांच्या घरावर चालून जाण्यापर्यंत त्यांची मजल गेली. इतकंच नव्हे तर त्यांच्या घरी अश्लील फोन जाऊ लागले. त्यांच्या घरच्या मंडळींना त्याचा प्रचंड त्रास होऊ लागला. शेवटी यादवांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, तेव्हाच सगळं वातावरण निवळलं. महाबळेश्वरचं साहित्यसंमेलन अध्यक्षाविनाच पार पडलं. या काळात अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या गप्पा मारणारे अनेक महापुरुष आपापल्या कुटींमध्ये दडून बसले होते. एकट्या प्राचार्य राम शेवाळकरांनी फक्त काय ती सामंजस्याची भूमिका घेतली होती. तसं आवाहन त्यांनी एक पत्रक काढून केलं होतं.

मधल्या काळात यादवांच्या नटरंगवर चित्रपट आला. राष्ट्रीय पातळीवर तो गाजला. त्यातली गाणी रसिकांच्या ओठांवर खेळू लागली. व्यावसायिक यशही या चित्रपटाला भरपूर मिळालं. महाबळेश्वरच्या साहित्य संमेलनाच्या

पार्श्वभूमीवर निश्चितच हे यश त्यांना कुठेतरी सुखावणारं होतं. तथापि यादवांच्या आयुष्यातील हा कालखंड फार मनस्तापजनक आणि दुःखद असा होता. त्यांच्या मागे लागलेलं हे दुष्टचक्र केवळ एवढ्यावरच थांबलं नव्हतं. त्यांना त्याच्या झळा लागतच होत्या. तुकारामाच्या संदर्भातली त्यांच्याविरुद्धची फिर्याद वारकऱ्यांनी हायकोर्टात सादर केली होती. कोर्टाचा निकाल लेखक आनंद यादव आणि प्रकाशक अनिल मेहता यांच्या विरोधात लागला. बाजारात असलेल्या सर्व प्रती मागे बोलावून त्या नष्ट करण्याचे आदेश देऊन आणि वैयक्तिक दंड आकारून हा वाद कोर्टानेच कायमचा मिटवला.

गंमत म्हणजे याबद्दल मराठी साहित्यविश्वात कुठल्याही प्रतिक्रिया उमटल्या नाहीत. एखाद्या माणसाच्यामागे त्याचे वैरी किती अमानुषपणे लागू शकतात, त्याचं अख्खं जगणंच कसं उद्ध्वस्त करून टाकतात, आपल्या छोट्या छोट्या स्वार्थासाठी अकारण कोण कुणाचा वैरी होऊ शकतो, हे यादवांच्या या उदाहरणावरून पाहिलं, की माणुसकीवरील विश्वासच उडून जातो. वैचारिक मतभेदही किती वैयक्तिक पातळीवर जाऊ शकतात आणि ते माणसाच्या जगण्याशी जोडून किती निर्दयपणे माणसांचे मुडदे पाडू शकतात, हे पाहिल्यानंतर भूमिका घेऊन लिहिणाऱ्या लेखकाने कुणाच्या आधाराने उभे राहावे हा प्रश्न पडतोच. मराठीत भूमिका घेऊन लिहिणाऱ्या लेखकांची वानवा आहे अशी मल्लीनाथी करणाऱ्यांनी हा विचार करायचीही गरज आहे असं यावरून वाटतं.

न्यायालयाच्या निर्णयाने यादव अक्षरशः खचल्यासारखे झाले होते. त्यांची लेखनाची उमेद जवळजवळ संपली होती. साहित्यक्षेत्रापासून त्यांनी स्वतःला तोडून घेतलं होतं. या अशा कटु अनुभवांनी माणूस आणखी कुठल्या निर्णयाला येणार?

मधली चार-पाच वर्षं आमच्या भेटीविनाच गेली. पुण्याला तसं माझं वारंवार जाणं व्हायचं. पण त्यांच्याकडे जाणं होत नव्हतं. त्यातलं एक प्रमुख कारण त्यांचं शहरापासून दूर असलेलं वास्तव्य. पण मधूनमधून फोन व्हायचे. तेव्हा ते आवर्जून 'घरी या' म्हणून निमंत्रण द्यायचे. लेखनाविषयीची चौकशी करायचे. 'तुमचं सध्या छान चाललं आहे' म्हणून समाधानही व्यक्त करायचे. अशातच त्यांच्या प्रकृतीच्या तक्रारी उद्भवू लागल्या. मधूनमधून त्यांच्या कीर्ती या धाकट्या लेकीशी बोलणं व्हायचं. तिच्याकडूनही त्यांच्याविषयीची हालहवाल कळायची. 'अक्षरपेरणी'चे संपादक बाळासाहेब धोंगडे मध्यंतरी भेटले, तेव्हा त्यांच्याकडूनही समाचार कळला. तो हाच की अलीकडे यादवांची प्रकृती बरी नसते.

त्यांच्या निधनाच्या तीन दिवस आधीच मी पुण्याला जाऊन आलो होतो. तेव्हा त्यांच्याकडे जायचाही विचार मनात आला. पण कुठल्या तरी कारणाने तेव्हाही जाणं टळलंच. आणि अचानक व्हॉट्सअपवर त्यांच्या निधनाची वार्ता आली. आपल्या वाढदिवसाच्या तीन दिवस आधी, २७ नोव्हेंबरला, ते या जगातून निघून गेले होते. दुसऱ्या दिवशी मी कीर्तीला फोन लावला. तेव्हा तिच्याकडून सगळं कळलं.

त्यांची माझी भेट झाली नाही याचं शल्य मनात कायमच घर करून राहणार आहे. आणि त्याहीपेक्षा आपली ही तथाकथित व्यवस्था एखाद्या प्रतिभावंताला कशी संपवणारी आहे हे पाहिल्यावर होणारं दुःख यादवांच्या जाण्यापेक्षाही खूप मोठं आहे.

*(दिवाळी २०१७)*

---

*(पान २३८ वरून)*

आप्पांच्या शेवटच्या काही दिवसांच्या आठवणी फार क्लेशदायक आहेत. त्यांचा देह फार थकला होता. डोळ्यांना सतत गॉगल लावावा लागे. एकेकाळी तेजस्वी, दिमाखदार दिसणारा चेहरा आता अशक्त खंगलेला दिसत होता. ताई सतत त्यांच्यासोबत असायची. पण त्यांचं बाहेर जाणं जवळजवळ थांबलंच होतं. लेखन मात्र जिवाचा आटापिटा करून चालू होतं. तो तर त्यांचा श्वासच होता. पण आपल्या मागे ताईचं कसं होईल ही काळजी त्यांना मागे ओढत होती. आपल्याला कोणी किती पैसे देणं आहे आणि ताईला किती पैसे चरितार्थसाठी लागतील ह्याची अनेक गणितं त्यांच्या दैनंदिनीत मांडलेली मी पाहिली आहेत.

वाईट ह्याचं वाटतं, की त्यांच्या ह्या संधिप्रकाशातल्या प्रवासात मी त्यांच्याबरोबर नव्हते. तीन मुली वाढवताना आणि नवऱ्याबरोबर गृहकर्तव्यं सांभाळताना त्यांच्यापासून खूप दूर राहावं लागलं होतं. माझी काळजी आणि प्रेम पत्राद्वारे त्यांच्यापर्यंत पोचवणं एवढंच माझ्या हातात होतं.... १९७८च्या एप्रिल महिन्यात विजयला मुलगा झाला. त्याचं बारसं थाटामाटात साजरं झालं. तेव्हा आम्ही महिनाभराच्या रजेवर घरी आलो होतो. तेव्हा मी आप्पा-ताईंबरोबर मनसोक्त राहिले. रोज संध्याकाळी आम्ही गच्चीवर खुर्च्या टाकून बसत असू. ते थोडसं चालत आणि मग गुलमोहराच्या बहराच्या लाल-हिरव्या छायेत ठेवलेल्या आरामखुर्चीवर बसून कसलासा विचार करीत राहात. मी आणि ताई जिवाभावाच्या गप्पा करीत असू. त्यांना ऐकू येत नसे. त्यामुळे त्यांच्याशी शाब्दिक संभाषण कमी होत असे. पण कधीकधी माझा हात हातात घेऊन ते गप्प बसून राहात. काही न बोलता त्यांचा तो स्पर्श त्यांची माया माझ्यापर्यंत पोचवीत असे. पती-पत्नीचं नातं असो, दोन मित्रांमधलं मैत्र असो किंवा वडील-मुलीचं आयुष्यभराचं प्रेम असो, ते परिपक्व झालं, की संवादही निःशब्द होतो.

आता तर आप्पा देहरूपानं ह्या जगात नाहीत. पण जेव्हा मला त्यांच्याशी बोलावसं वाटतं, त्यांना काही सांगावं विचारावं अशी हुरहुर लागते तेव्हा काळाची सगळी बंधनं ओलांडून मी त्यांच्याशी असाच निःशब्द संवाद साधते.

*(दिवाळी २०१७)*

# गिरीश कार्नाड : एक विलक्षण स्वप्न

**उमा वि. कुलकर्णी**

भारतीय साहित्यिकाला दिला जाणारा, सर्वोच्च मानला गेलेला ज्ञानपीठ पुरस्कार आठ कन्नड साहित्यिकांना मिळालेला आहे. अन्य कुठल्याही भाषेपेक्षा जास्त. कुवेम्पू, द. रा. बेन्द्रे, शिवराम कारंथ, मस्ती वेंकटेश अय्यंगार, व्ही. कृ. गोकाक, गिरीश कार्नाड, यू. आर. अनंतमूर्ती आणि चंद्रशेखर कंबार. त्यातील एकाचे, कार्नाड यांचे ज्येष्ठ अनुवादिका उमा कुलकर्णी यांनी रेखाटलेले व्यक्तिचित्र.

मी आपणहून गिरीश कार्नाडांचं साहित्य अनुवादित करण्यासाठी, त्यांच्याशी पत्रव्यवहार करायला गेलेच नसते. भेट घेणं तर दूरच राहिलं! पण हे घडलं! माझ्या दृष्टीनं तर ही कधीही न पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता!

अनुवाद करायला सुरुवात करण्याआधीच मी कार्नाडांचं नाव विविध संदर्भात ऐकत होते. त्यांचे 'स्वामी', 'निशांत', 'रत्नदीप', 'सूरसंगम', यांसारखे अनेक चित्रपट आम्ही थिएटरला जाऊन मनापासून पाहिले होते. 'उंबरठा'ही त्याच उत्कंठेनं पाहिला होता. 'स्वामी'मधला साधा संयमी आणि सहनशील नायक भलताच आवडला होता. 'उंबरठा'मधला नायक तर त्यातल्या नायिकेपेक्षाही आमच्या मनात सहानुभूती मिळवून गेला होता! त्यांची 'एफटीआयआय'मधली कारकीर्द वेगवेगळ्या कारणांनी गाजत होती. त्याच्या बातम्याही पुण्यातल्या वृत्तपत्रांमध्ये गाजत होत्या.

कार्नाडांचं 'हयवदन' हे विजया मेहता यांनी दिग्दर्शित केलेलं नाटक बालगंधर्व रंगमंदिरात अत्यंत भारावून जाऊन पाहिलं होतं. तसंच तेव्हा 'तुघलख' हे नाटकही गाजत होतं. ही नाटकं अनुवादित करण्यासाठी ख्यातनाम मराठी लेखक-कवी चिं. त्र्यं. खानोलकरांनी आणि 'तुघलख'साठी कार्नाडांइतकेच गाजत असलेले मराठीचे नाटककार विजय तेंडुलकर यांनी आपापल्या लेखण्या झिजवल्या होत्या! कार्नाड स्वत:च्या नाटकांचे स्वत:च इंग्लिश अनुवाद करत असल्यामुळे त्यांना आमच्यासारख्या अनुवादकांची गरजच नाही, अशी माझी भावना होती. त्यांच्या चित्रपटसृष्टीशी असलेल्या संपर्कामुळे त्यांची नाटकं सहजच भारतभर पोचत होती. अशा वेळी त्यांच्याशी संपर्क साधण्याचं धैर्य दाखवलं तरी आपल्या पदरात काहीच पडणार नाही, याची मला खात्रीच होती.

०००

इतर कन्नड लेखकांच्या लेखनाचे अनुवाद करत असतानाच हैदराबादच्या द. पं. जोशींची ओळख झाली. दक्षिणेकडच्या 'पंच-द्रविड' (तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम् आणि मराठी) भाषांचा परामर्श घेत त्यांनी 'पंचधारा' हे त्रैमासिक चालवलं होतं. डॉ. द. दि. पुंडेंमुळे त्याची आम्हांला कल्पना होती. एका भेटीत जोशींनी प्रस्ताव मांडला. त्यांना एका अंकात गिरीश कार्नाडांचं एक भाषण अनुवादित करून घ्यायचं होतं. त्याच्याबरोबर त्या वेळी नव्यानं प्रकाशित झालेल्या 'नागमंडल' या नाटकाचा एक अंकही द्यावा असा त्यांचा मानस होता. ते काम त्यांनी माझ्याकडे सोपवलं. सगळं आपोआप घडलं होतं.

त्या आधी मी कथा-कादंबऱ्या-लेख अनुवादित केले असले तरी नाटक अनुवादित केलं नव्हतं. या नाटकाच्या अनुवादाला सुरुवात करत असतानाच एक दिवस एका उत्कृष्ट लखोट्यातून उत्तम कागदावर बोरूनं लिहिलं असावं अशा लफ्फेदार अक्षरात लिहिलेलं एक पत्र आमच्या पत्त्यावर आलं. नाव बघताच मी उडालेच! स्वत: गिरीश कार्नाडांनी लिहिलेलं ते पत्र होतं. त्यात लिहिलं होतं, '...तुम्ही माझ्या नाटकाचा अनुवाद करता आहात असं समजलं... मला मराठी येतं... त्यामुळे अनुवाद झाला की मला पाठवून द्या...'

हेही माझ्या दृष्टीनं नवं होतं. लेखकानं आपण होऊन संपर्क साधला होता. तोही कार्नाडांसारख्या विविध क्षेत्रांत प्रसिद्धी पावलेल्या! दुसरं म्हणजे, त्याआधी मी अनुवादित केलेल्या कुठल्याही कन्नड लेखकाला मराठी येत नव्हतं. त्यामुळे अशी मागणी व्हायचा प्रश्नच नव्हता. (डॉ. शिवराम कारंतांच्या पत्नींना मराठी येत असल्यामुळे अनुवादाची परवानगी देताना त्यांनी दोन प्रकरणे मागून घेतली होती, तेवढंच.) त्यामुळे मला एकाच वेळी दडपण आलं आणि त्याचबरोबर अनुवाद-प्रक्रियेत आमच्याबरोबर कुणीतरी असल्याची भावनाही जाणवली.

मी त्यांना खर्डा पाठवला. इतर मराठी माणसांप्रमाणे मी त्यांचं नाव 'कर्नाड' असं लिहिलं होतं. त्यांनी दुरुस्ती केली, 'मी माझ्या नावाचं स्पेलिंग कार्नाड असं करतो...'

त्यानंतर मी त्यांची चार नाटकं, आत्मकथनं आणि इतर काही लेख अनुवादित केले. प्रत्येक वेळी हीच पद्धत राहिली. त्यांच्या सूचना या केवळ 'सूचना'च असत. त्यांनी स्वत:ही अनुवाद केले असल्यामुळे (पु. ल. देशपांडे यांचं 'तुझे आहे तुजपाशी', 'रंगाटनी बेगने बारो..' या नावानं केलं. महेश एलकुंचवारांची दोन नाटकेही कन्नडमध्ये केली.) त्यांना अनुवादातल्या खुबी आणि

अनुवादकाच्या अडचणी ठाऊक होत्या. पण त्यांच्या काही सूचनांवरून माझं उद्‌बोधन होत होतं. उदाहरणार्थ, कथा-कादंबऱ्यांच्या अनुवादाच्या सवयींमुळे नाटकाचा अनुवाद करताना मी मुबलक प्रमाणात उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर केला होता. ती सारी त्यांनी खोडली होती. कदाचित माझ्याकडून त्या चिन्हाद्वारे दिग्दर्शक-कलाकाराच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर घाला येत असावा असा माझा मीच निष्कर्ष काढला.

हे अनुवाद सुरू होते तेव्हा कार्नाड विविध कारणांनं भरपूर कार्यरत होते. अनेकदा चित्रीकरणामुळे ते कुठल्यातरी आडगावात असत, मिटिंगसाठी परगावी असत. सतत कुठल्या ना कुठल्या देश-परदेशातल्या प्रवासात असत. त्यातच ते हस्तलिखित तपासून देत. एकदा रामचंद्र गुहांनी एक आठवण लिहिली होती, '...विमानात गिरीश पुढच्या दोन रांगा सोडून सीटवर होता. पाहिलं तर त्याच्यासमोर कागदांची एक चवड होती. विचारलं तर त्यानं सांगितलं, त्याच्या नाटकाच्या मराठी अनुवादाचा खर्डा तो तपासत होता. मला त्याच्याविषयी वाटणारा आदर वाढला...'

'नागमंडल'चा अनुवाद अशा प्रकारे पुरा झाला आणि प्रकाशकाकडे छपाईला गेला होता. त्याच वेळी वृत्तपत्रात एक बातमी प्रकाशित झाली. 'नागमंडल' नाटकाची प्रॅक्टिस सुरू झाली होती. पण त्यासाठीचा अनुवाद आणखी कुणाचा तरी होता. मी गडबडले. लगेच कार्नाडांना पत्र लिहिलं. त्यांचंही गोंधळून पत्र आलं. 'असं कसं घडलं?...' नंतर त्यांनी सगळा शोध घेऊन क्षमायाचना करणारं पत्र लिहिलं, '...सॉरी आता त्यांची प्रॅक्टिस सुरू झाली आहे... काही करणं शक्य नाही... पण पुस्तक तुमच्याच अनुवादाचं येईल याची खात्री बाळगा...' आणि नंतर मात्र त्यांनी ती काळजी घेतली.

पाठोपाठ 'सुगावा प्रकाशन'च्या उषा-विलास वाघ यांच्याकडून 'तलेदंड' या नाटकाच्या अनुवादाचं काम आलं. मनावरचं दडपण पहिल्यासारखं राहिलं नव्हतं. या अनुवादाच्या वेळच्या काही आठवणी आहेत.

'तलेदंड' हे नाटक बाराव्या शतकातल्या बसवेश्वराच्या जीवनातल्या एका कालखंडावरचं आहे. सनातन धर्मातल्या जातीय-व्यवस्थेसारख्या वाईट रूढींच्या विरोधात बसवण्णानं एक सर्वव्यापक चळवळ उभी केली. जातिव्यवस्था नष्ट करून एकसंघ समाज निर्माण करण्याचं भव्य स्वप्न पाहणारा हा द्रष्टा महापुरुष. त्याच्या 'रोटी-व्यवहारा'ला विरोध झाला तरी काही प्रमाणात यश मिळालं. पण ब्राह्मण मुलगी आणि चांभार मुलाचं लग्न करायच्या 'बेटी-व्यवहारा'ला कडाडून विरोध झाला आणि रक्तक्रांतीच झाली. कर्नाटकातल्या अनेक लेखक-नाटककारांना या विषयानं वेळोवेळी लिहायला उद्युक्त केलं आहे. प्रस्तावनेत कार्नाड म्हणतात त्याप्रमाणे दुखऱ्या दाताकडे पुन्हा-पुन्हा नकळत जीभ वळते, तसाच हा प्रकार.

या नाटकातलं बिज्जळ हे पात्र महत्त्वाचं. हा न्हावी जातीतला उत्तम माणूस आता राजा झाला आहे. याच्या दरबारात उच्चपदावर असलेल्या बसवण्णाचं बरंच कार्य याच्याच पाठिंब्यावर चाललं आहे. त्यामुळे नाटकातलं हे पात्र महत्त्वाचं आहे. त्याच्या आणि त्याच्या मुलाच्या, सोविदेवाच्या, तोंडातली भाषा शिवराळ आहे. अनुवाद तपासून पाठवताना कार्नाड मी वापरलेल्या शिव्यांखाली रेष मारून तिथे 'स्ट्राँग' शिवी वापरण्याची आग्रहाची सूचना करत! कारण मी वापरलेली शिवी 'नालायक' एवढ्याच ताकदीची असे! अखेर मीही संशोधन करून अधिक स्ट्राँग शिव्या मिळवल्या आणि वापरल्या!

पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर आणखी एक प्रसंग घडला. कार्नाडांचे एके काळचे शिक्षक डॉ. पंडित आवळीकर हे आमच्याही परिचयाचे होते. ते मुलाकडे पुण्यात आले की आमच्याकडे भेटायला येत. एका भेटीत मी त्यांना मोठ्या उत्साहानं मराठी 'तलेदंड'ची प्रत भेट म्हणून दिली. पुढच्या भेटीत त्यांनी भरपूर अभ्यास करून त्यातील काही आक्षेपार्ह शब्द काढून दाखवले!

कथा बाराव्या शतकातली असल्यामुळे मी माझ्या भाषेत



**'खेळता खेळता आयुष्य' या कार्नाड यांच्या आत्मकथनाच्या अनुवादाचे प्रकाशन झाले त्यावेळचे छायाचित्र**

नकळत शिरलेले इंग्रजाळलेले शब्द त्यांनी नीट वेचून बाजूला काढले होते. हे करताना अनावश्यकपणे संस्कृतकडे जायचा मोहही टाळला होता. हे नाटक असल्यामुळे प्रत्येक वाक्य स्टेजवरून बोलायचे आहे याचंही भान ठेवलं होतं. मुख्य म्हणजे मूळ लेखकानंही सारं तपासलं होतं! तरी यात काही उर्दू-फारशी शब्द घुसले होते आणि त्याला आवळीकरांनी आक्षेप घेतला होता. त्यातले अनेक शब्द कार्नाडांनीही वापरले होते, हेही आवळीकरांनी नमूद केलं होतं!

यादी पाहताच मी गडबडले आणि कार्नाडांना फोन केला. (एव्हाना घरी फोन आला होता.) सगळी हकीकत सांगून विचारलं, 'ती यादी तुम्हाला पाठवू का?'

त्यांनी हसत हसत सांगितलं, 'नको! मला तर पाठवू नकाच, पण तुम्हीही त्यात लक्ष घालू नका!'

विशेष म्हणजे डॉ. पंडित आवळीकरांनीही हे कुठेही प्रकाशित केलं नाही, हा त्यांचा मोठेपणा!

०००

कार्नाडाच्या नाटकांचा अनुवाद करायला सुरुवात केल्यानंतर त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू झाला. त्यावेळी सुरुवातीला त्यांचा मायना काही वेळा 'उमावहिनी आणि विरूपाक्षजी' असा असायचा. क्वचित प्रसंगी फोनवर बोलणंही होऊ लागलं. कितीतरी काळानंतर त्यांची आमच्याशी पहिली भेट झाली. पुण्यात संगीत-नाटक अकादमीची एक मिटिंग होती. अध्यक्ष या नात्यानं ते त्यासाठी पुण्यात आले होते. त्यांनी ते उतरलेल्या हॉटेलमध्ये विशिष्ट वेळी भेटायला बोलावलं. दबकत-घाबरत तिथं पोचल्यावर गप्पा झाल्या. आपोआपच दडपण कमी झालं. (अर्थात ही माझी अवस्था! विरूपाक्ष नेहमीसारखे सहजच वावरत होते.) दुसरे दिवशी तिथं सगळ्यांसाठी जेवणही होतं. त्यासाठीही कार्नाडांनी आम्हाला निमंत्रित केलं. चित्रपट आणि कलासृष्टीतल्या कलाकारांनी खचाखच भरलेल्या त्या समूहात आम्ही दोघंही अगदी केविलवाणे दिसलो असणार, विमानतळावर पत्र्याच्या बॅगेसह आणि वळकटीसह उतरलेल्या निम्नवर्गीय प्रौढ जोडप्यासारखे; असंच मला वाटत राहिलं. पण याच ठिकाणी ओळख झालेल्या मीना चंदावरकर नंतर भेटी होत तेव्हा आमच्याशी खूप छान वागत राहिल्या.

याच वेळी झालेला आणखी एक संवाद आठवतो. तेव्हा मी पूर्णचंद्र तेजस्वी यांच्या कथांचे अनुवाद करत होते आणि संग्रह करायचं घाटत होतं. मी कार्नाडांना म्हटलं, 'त्यांच्या प्रकाशनाला तुम्ही यायला पाहिजे! म्हणजे हा लेखक महाराष्ट्रात नीट पोचेल!'

कार्नाड आमच्याकडे वळले आणि म्हणाले, 'जर पुचंते (म्हणजेच पूर्णचंद्र तेजस्वी) येणार असेल तर मी नक्की येईन! सगळी कामं बाजूला सारून येईन!' हे म्हणताना त्यांच्या चेहऱ्यावर मिश्किल हसू होतं. त्याचा उलगडा नंतर झाला. कार्नाड तेजस्वींना आमच्यापेक्षा चांगलं ओळखत होते. बावीस एकर जंगल कापून वेलदोड्याची आणि कॉफीची शेती करणारे तेजस्वी म्हैसूरच्या गर्दीलाच 'काय ही गर्दी' म्हणत यायचं टाळत होते! ते पुण्याला येणार नाहीत याची खात्रीच या मिश्किल हसण्यामागं होती!

जेव्हा तेजस्वींची कादंबरी आणि कथासंग्रह मराठीत प्रकाशित झाले, तेव्हा मी ते कार्नाडांना पाठवून दिले. त्यांनी पत्र लिहून कळवलं, 'तुम्हाला पुचंतेची स्टाईल पकडण्यात यश आलं आहे!'

अनुवादकाच्या दृष्टीनं ही तर अगदी फुशारून जाण्याचीच गोष्ट!

नंतर मात्र अनेकदा भेटी होत. अगदी प्रत्येक पुणे-भेटीत जमलं नाही तरी त्यांना जेव्हा वेळ असे तेव्हा ते आम्हांला हॉटेलवर बोलावून घेत आणि तिथं गप्पा होत. एकदा गप्पा मारताना त्यांना आम्ही कर्नाटकातल्या नव्या लेखकांविषयी विचारत होतो. तेव्हा मी म्हटलं, 'कर्नाटकात आपल्या मुळांचा वेध



**अनेक उत्तम कन्नड कलाकृती उमा कुलकर्णी यांनी मराठीत आणल्या. त्यांचे पती विरूपाक्ष यांच्या सहकार्याने. अंतर्नादमध्ये प्रसिद्ध झालेल्या भैरप्पा यांच्या व्यक्तिचित्रात त्या लिहितात, ''लग्नानंतर मी कन्नड बोलायला शिकले असले, तरी लिपी येत नव्हती. त्यामुळे विरूपाक्ष वाचून दाखवायचे आणि मी अनुवाद करायची''**

**वरील छायाचित्रात विरूपाक्ष आणि उमा कुलकर्णी यांच्यासमवेत गिरीश कार्नाड**

बरेच लेखक प्रभावीपणे घेताना दिसतात. पण त्या प्रमाणात नागरी संवेदना तितक्या प्रभावीपणे व्यक्त होताना दिसत नाहीत, अशी माझी भावना आहे. तुम्हाला काय वाटतं?'

ते म्हणाले, 'बरोबर आहे. कारण कर्नाटकात नगरं आहेतच कुठं? अगदी बेंगळूरही मोठं गाव आहे. नगर म्हणता येणार नाही. त्या गावाचे प्रॉब्लेम्सही मुंबई-कलकत्त्यासारख्या नगरापेक्षा वेगळे आहेत!'

एव्हाना कार्नाडांचं दडपण वाटणं कमी झालं होतं. त्यामुळे त्या आधी टीव्हीवर प्रदर्शित होणाऱ्या त्यांच्या मालिका, दिग्दर्शित होणारे चित्रपट, त्यांच्या भूमिका यांचं दडपण येणं कमी झालं होतं. त्यांचं लेखकपण अधिक प्रभावीपणे समोर येत होतं.

०००

त्यांची सगळी नाटकं पुन्हा एकदा नव्या स्वरूपात मराठीत येण्याच्या दृष्टीनं हालचाली सुरू झाल्या. त्यावेळी मी अनुवादित केलेली 'नागमंडल' आणि 'तलेदंड' घेण्याचं ठरलं. तसंच काही अनुवाद नव्यानं करून घ्यायचं ठरत होतं. तेव्हा 'टिपू सुलतानचं स्वप्न' या नाटकाचा अनुवाद करायचं काम माझ्याकडे आलं. ते मी मोठ्या आनंदानं करून दिलं.

तसंच 'ययाती'चंही झालं. तो अनुवाद आधी श्री. र. भिडे या आमच्या ज्येष्ठ स्नेह्यांनी केला होता. त्याचा पुन्हा अनुवाद करायचं काम माझ्याकडे आलं. त्या पुस्तकाबरोबरच माझ्याकडे काही कार्नाडांच्या हातानं लिहिलेली पानंही आली. पुस्तकं आणि हस्तलिखितात काही खुणा होत्या. मी फोन करून चौकशी केली तेव्हा त्यांनी सांगितलं, 'होय. मी नाटकात काही ठिकाणी थोडाफार बदल केला आहे. तोही अनुवादात समाविष्ट करायचा आहे.' पुढे ते म्हणाले, 'हे नाटक लिहिलं तेव्हा मी एकवीस वर्षांचा होतो. आता बहात्तर वर्षांचा आहे. त्यामुळे तेवढा बदल तर होणारच ना! लेखनात पुन्हा-पुन्हा बदल करणारा लेखक आहे मी!'

आणखीही काही नाटकं मराठीत करायची होती. प्रकाशकांना विशिष्ट तारखेला ती प्रकाशित करायची होती. त्या दृष्टीनं त्यांनी कामाला सुरुवात केली होती. त्या वेळी मी 'सोनियाचा उंबरा' या डेलीसोप सिरीयलच्या लेखनात गुंतले होते. त्यामुळे तारखा जमण्यासारख्या नव्हत्या. (अर्थात ठरलेल्या तारखांना प्रकाशन झालं नाही, ती गोष्ट वेगळी!) त्यामुळे मी ठरलेल्या अवधीत अनुवाद करून द्यायला असमर्थता दाखवली.

या घटनेमुळे कार्नाडांचा गैरसमज झाला की काय हे मला तेव्हा कळलं नाही. मला तशी शक्यता वाटली नव्हती. कारण कार्नाड त्या क्षेत्रात वावरत असल्यामुळे डेलीसोपच्या लिखाणाचं दडपण ते समजू शकतील, अशी माझी भावना होती. पण त्यानंतर घडलेली गोष्ट. आमचे एक नातेवाईक त्यांना विमानतळावर भेटले. नातेवाइकांनी उत्साहानं माझा संदर्भ सांगून त्यांच्याशी ओळख करून घेतली आणि मला फोन लावून दिला. फोनवर कार्नाड म्हणाले, 'तुम्ही अनुवाद करणार नाही, म्हणालात!' मी तत्परतेनं खुलासा केला. त्यानंतर मात्र गैरसमज दूर होऊन आत्मकथनाच्या वेळी पुन्हा माझं नाव पुढं आलं आणि मी तो अनुवाद मोठ्या आनंदानं केला. माझ्या महत्त्वाच्या अनुवादांमध्ये त्याचा समावेश होतो.

कार्नाडाच्या नाटकांचा अन्य भारताबरोबर महाराष्ट्रातही चांगलाच परिचय आहे. मराठी साहित्य आणि नाट्यक्षेत्रानं ज्यांना आपलं मानलं आहे, अशा काही भारतीय लेखकांपैकी कार्नाड आहेत. अनेक विद्यार्थी त्यांच्यावर पीएच.डी. करतात. काही जणांनी त्यांच्या नाटकांवर (विशेषत: मिथकांवर आधारीत) स्वतंत्र पुस्तकंही लिहिली आहेत.

चित्रपट-नाटकासारख्या 'ग्लॅमरस' क्षेत्रात कार्यरत असताना



**कार्नाड यांची गोमांसभक्षणाविषयीची आणि आपण 'अर्बन नक्षलवादी' असण्याबद्दलची विधाने देशभर वादग्रस्त ठरली. कार्नाड यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त राजहंस प्रकाशनाने आयोजित केलेल्या समारंभात (डावीकडून) विजया मेहता, गिरीश कार्नाड आणि उमा कुलकर्णी.**

त्यांचं 'लेखक'पण झाकोळलं नाही हे विशेष! कवी म्हणून घ्यायचं मोठं स्वप्न उराशी बाळगणारे कार्नाड नाटककार म्हणून एकूणच भारतीय नाट्यक्षेत्रात मान्यता मिळवून आहेत. एक साहित्यिक म्हणून मान्यता मिळवताना त्यांनी 'तलेदंड'साठी साहित्य अकादमी आणि भारताच्या साहित्यक्षेत्रात मानाच्या मानल्या जाणाऱ्या ज्ञानपीठ पुरस्काराला गवसणी घातली आहे.

इंग्लिश कवी म्हणवून घेण्याची कॉलेजपासूनची इच्छा असणाऱ्या कार्नाडांना आपली पहिली महत्त्वाची कलाकृती कन्नड नाटक म्हणून जन्माला आली याचं मनोमन दु:ख होऊन रडू आलं होतं, असं त्यांनी मुलाखतीतून व्यक्तही केलं. शिवाय त्या वेळी त्यांची कन्नड भाषाही वाईट असल्याचं त्यांचे जवळचे मित्र अशोक कुलकर्णी म्हणायचे, हेही त्यांनी आपल्या आत्मकथनात लिहिलं आहे. पण त्यांचे प्रकाशक 'मनोहर ग्रंथमाले'चे जी. बी. जोशी आणि तेव्हाचे मोठे समीक्षक कीर्तिनाथ कुलकर्णी यांनी कार्नाडांमधला नाटककार हेरला होता.

त्यांच्या नाटकांची स्थूल मानानं पौराणिक कथांवर आधारित (ययाती, अग्नी आणि पाऊस, बळी), इतिहासावर आधारित (तलेदंड, तुघलख, टिपू सुलतानचं स्वप्न), लोककथांवर आधारित (हयवदन, नागमंडल) आणि सद्य:परिस्थितीवर आधारित (वेडींग अल्बम, काटेसावरी, उणेपुरे शहर एक) अशी विभागणी केली गेली तरी इतिहास, पुराण आणि लोककथांना नाट्यरूप देताना ते सद्य:परिस्थितीशी सहजच जोडून घेतात असा वाचकाला-प्रेक्षकाला अनुभव येतो. त्यामुळे यांतील पात्रांच्या जीवनातले प्रश्न आणि त्यांचा ऊहापोह आजच्या काळातही तितकाच लागू पडणारा असतो. त्यामुळेच भाषा, प्रदेश आणि संस्कृतीचा अडसर ओलांडून त्यांची नाटके सर्वदूर पोचू शकतात. उलट अनुभव-क्षितिज विस्तारलेल्या कार्नाडांच्या दृष्टिकोनामुळे त्यांना वैश्विक मूल्य प्राप्त होतं, असाच रसिकांचा अनुभव आहे.

एकूणच भारतीय रंगभूमीवर कार्नाडांची ऐतिहासिक नाटकं येण्याआधी ऐतिहासिक नाटकं हा केवळ पोषाखी अभिव्यक्तीचा प्रकार होता. जेव्हा 'तुघलख' आलं तेव्हा प्रथमच वाटलं, केवळ गौरव-गाथा सांगणाऱ्या ऐतिहासिक नाटकांपेक्षा ही पात्रं स्वतंत्रपणे विचार करतात, चुकाही करतात. कारण ती जिवंत माणसं आहेत. हेच पौराणिक नाटकाच्या बाबतीतही झालेलं दिसतं. 'ययाती' प्रकाशित होताच एका कन्नड समीक्षकानं म्हटलं, 'यातला पुरू जुन्या लेखकांच्या नायकांप्रमाणे धीरोदात्त तर आहेच, शिवाय तो स्वतंत्रपणे विचारही करतो.' कन्नड रंगभूमीलाही ही कार्नाडांच्या नाटकांनी दिलेली देणगीच म्हणावी लागेल.

याशिवाय 'पुष्पसाज' आणि 'बिखरे बिंब' या दोन 'स्वगतां'मध्ये कार्नाडांनी लेखक म्हणून प्रयोग केला आहे. 'पुष्पसाज'ची पार्श्वभूमी काहीशी ऐतिहासिक-पौराणिक म्हणावी तशी आहे. ही दोन्ही नाटके एकपात्री आहेत. 'बिखरे बिंब'मध्ये त्यांनी तांत्रिक गोष्टींचाही अभिनव पद्धतीनं वापर केला आहे. यातील एकमेव पात्र प्रत्यक्ष स्टेजवर तर आहेच, शिवाय टीव्हीवरही आहे! अशा प्रयोगांत लेखकाबरोबरच दिग्दर्शक आणि कलाकारालाही वेगळी 'आव्हाने' स्वीकारणं भाग पडतं.

कार्नाड स्वत: लेखक-दिग्दर्शक-कलाकार असल्यामुळे त्यांचं नाटक उत्तम प्रकारे बांधलेलं असतंच, त्याचबरोबर त्यात एक प्रकारची लवचिकता असते. त्यातही लोककथांवर आधारित नाटकांमध्ये. आम्ही पाहिलेल्या 'हयवदन'मध्ये लोकांमधूनच पालखी येते. 'नागमंडल'मधली पहिली, पडक्या देवळात अंधाऱ्या रात्री जमून गावगप्पा करणाऱ्या ज्योतींची गोष्ट तर इतकी तरल आहे की प्रत्येक दिग्दर्शक ती वेगवेगळ्या प्रकारे दाखवू शकतो. 'नागमंडल'चा शेवट करताना लेखकानं स्वत: दोन शेवट दिलेच आहेत. कर्नाटकातल्या बी. जयश्री यांच्यासारख्या दिग्दर्शिका तिसराच शेवट दाखवायचं स्वातंत्र्य घेऊ शकतात!

कार्नाडांच्या मृत्यूनंतर डॉ. चंद्रशेखर कंबार या कर्नाटकातील ज्ञानपीठपुरस्कृत लेखकानंही त्यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. हे दोघेही समकालीन. एकमेकाला एकेरी हाक मारणारे मित्र. प्रकाशक जी. बी. जोशी हे संवेदनशील नाटककार असल्यामुळे त्यांनी या दोन्ही लेखकांमधला नाटककार हेरून त्यांचं नीट पोषण केलं. गिरीश कार्नाडांची चित्रकला हाही या दोन मित्रांमधला आस्थेचा विषय. त्यामुळे कंबारांच्या 'ऋष्यशृंग' नाटकाच्या मुखपृष्ठासाठी कार्नाडांनी चित्रही काढून दिलं होतं.

हे दोघं घनिष्ठ मित्र असले तरी साहित्यिक दृष्टीनं दोघंही स्पर्धेच्या मानसिकतेत होते, असा कंबारांनी उल्लेख केला आहे. दोघांनाही ए. के. रानानुजन या लोकसाहित्याच्या अभ्यासकानं एक लोककथा सांगावी आणि दोघांनीही ईर्ष्येनं त्यावर नाटक लिहावं असं अनेकदा घडलं आहे. एका कथेवर कंबारांनी 'सिरीसंपिगे' (मराठी अनुवाद – 'श्रीचाफा') हे नाटक लिहिलं. ते एका नियतकालिकात प्रकाशित झालं. त्या आधी कार्नाडांचं 'हयवदन' आलं होतं. 'सिरीसंपिगे' वाचताच कार्नाड म्हणाले, 'या कथेवर मीही नाटक लिहिन.' त्यानंतर 'नागमंडल' लिहिलं गेलं. नंतर कार्नाडांनी 'तलेदंड' लिहिलं तर लगेच कंबारांनी त्याच विषयावर 'शिवरात्री' लिहिलं. (कंबारांच्या 'सिरीसंपिगे' या नाटकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. नंतर त्यांना ज्ञानपीठही मिळाला आहे.) कंबार म्हणतात, 'प्रत्येक सर्जनात्मक लेखकाची बलस्थानं, आविष्काराची पद्धत आणि त्यामुळे होणारी अभिव्यक्ती वेगवेगळी असते. त्यामुळे कथावस्तू एकच असली तरी कलाकृती वेगवेगळ्या बनतात. कथा एकच किंवा जवळपासची असली तरी गिरीशच्या नाटकात प्रखर वैचारिकता अग्रभागी असते आणि माझ्या कलाकृतीत काव्यात्मक क्रिया उठून दिसते!' अशा प्रकारच्या साहित्यिक स्पर्धेतून कन्नड साहित्याला मात्र दोन चांगली नाटके मिळाली आणि दोन ज्ञानपीठपुरस्कृत लेखक!

कार्नाडांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा कर्नाटकातही त्यांच्या विरोधात वाद उमटले. (हे मोठ्या पुरस्कारानंतर सगळ्याच प्रदेशांत घडते!) याचा सूर असा होता, 'गिरीश कार्नाडांनी नवी पात्रं निर्माण केली नाहीत, की नवं अवकाश निर्माण केलं नाही. नवी निर्मिती न करता जुन्याच पात्रांचा आणि कथांचा वापर करून त्यांना संदर्भ नवा दिला, एवढंच! हे तर प्रत्येक काळात घडत राहील. मागील फळीचे टी. पी. कैलासम, श्रीरंग या कन्नड नाटककारांनीही हेच काम तितक्याच प्रभावीपणे केलं आहे.'

कार्नाडांवर होणारा दुसरा आरोप म्हणजे 'कार्नाडांवर भारतीयत्वाचा जो काही प्रभाव आहे तो कलेच्या अंगानं आहे (त्यांचे शिरसीतले अनुभव). पण भारतीय जीवन आणि तत्त्वज्ञानापासून ते दूर आहेत. उलट ख्रिश्चन तत्त्वज्ञान आणि पाश्चात्त्य संस्कृतीशी ते मुळापासून जुळलेले आहेत.'

तसंच, त्यांच्या ('तलेदंड' वगळता) ऐतिहासिक नाटकांनीही असेच वाद निर्माण केले. विशेषत: टिपू सुलतान हे कर्नाटकाशी तितकंच निगडित नाव. कर्नाटकाची राज्यभाषा टिपूनं कन्नड असलेली बदलून उर्दू केली, ही कर्नाटकात खटकणारी गोष्ट. शिवाय टिपूच्या अनेक बऱ्या-वाईट कथा तिथल्या जनमानसात रुळलेल्या. त्यामुळे कार्नाडांचं टिपूचं व्यक्तिचित्रण अनेकांना खटकलं. नंतरच्या काळातली त्यांची गोमांसाविषयीची आणि अर्बन नक्सलवादी असण्याविषयीची विधानं संपूर्ण भारताप्रमाणेच कर्नाटकातही वादग्रस्त ठरली. त्यांच्या रवींद्रनाथ टागोरांवरील विधानानंही अशीच भारतभर खळबळ उडवून दिली होती. 'नागमंडल'मध्ये वापरल्या गेलेल्या एका गाण्याच्या संदर्भात त्यांच्यावर वाङ्मयचौर्याचे आरोपही झाले.

पण कर्नाटकातले बुद्धिवादी समूह मात्र त्यांना विचारांना दिशा देणारा लेखक मानतो. तसेच त्यांना आधुनिक नाटकांमध्ये चैतन्य भरणाऱ्या लेखकांपैकी एक मानतात. इंग्लिशसह भारतात सर्वदूर पोचलेले गिरीश कार्नाड आजच्या काळातले महान भारतीय नाटककार ठरतात. चित्रपट-संस्कृतीमुळे चैतन्यहीन झालेल्या नाट्यसृष्टीला साठाव्या शतकात ज्या भारतीय नाटककारांनी चैतन्य देण्याचं महान कार्य केलं, त्यात गिरीश कार्नाडांचं स्थान वादातीत आहे.

००० 

'उणेपुरे शहर एक' या नाटकाचा पुण्यातला प्रयोग आम्ही कार्नाडाच्या शेजारी बसून पाहिला. त्यानंतर घडलेला प्रसंग.

'लेखिका साहित्य-संमेलना'च्या निमित्तानं मी नागपूरला गेले असता तिथल्या संयोजकांनी मला ऑफिसमध्ये बोलावून घेतलं. ते अनेक वर्षं गिरीश कार्नाडांना नागपूरला बोलवायचा प्रयत्न करत होते. अनेकांकरवी प्रयत्न करून झाले होते. तिथल्या साहित्य आणि नाट्य क्षेत्रांतल्या मंडळींची कळकळ स्पष्टच दिसत होती. त्यासाठी त्यांची योग्य तो खर्च करायचीही तयारी होती. पण याबाबतीत मी त्यांना काय मदत करू शकते, हे मला समजत नव्हतं.

मी विचारलं, 'त्यांच्या नव्या नाटकाचा प्रयोगही सोबत ठेवाल का? तर मी तसं विचारून बघते. बाकी तपशील तुम्ही आपसात ठरवा.' व्याख्यान किंवा मुलाखत आणि नाटकाचा प्रयोग अशा दोन्ही कार्यक्रमांसाठी संबंधितांची सहजच तयारी होती. मी लगेच कार्नाडांना फोन केला. फक्त व्याख्यान किंवा मुलाखतीसाठी त्यांनी तयारी दर्शवली नाही. पण नाटकाच्या प्रयोगाचं बोलताच ते तयार झाले. पुढील बोलणी त्यांनी परस्पर ठरवली आणि दोन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम झाला. कार्नाडांची मुलाखत आणि नव्या नाटकाचा प्रयोग पाहून नागपूरकर भरून पावले. त्या वेळी कार्नाडांच्या स्वभावाचा नवाच पैलू सामोरा आला. आजही नागपूरमधले साहित्यप्रेमी आणि नाट्यप्रेमी त्या दोन दिवसांची भरभरून आठवण काढतात.

नंतर आणखी एका कार्यक्रमासाठी त्यांना फोन केला तेव्हा मात्र त्यांनी परगावी प्रवास करण्याविषयी असमर्थता व्यक्त केली.

०००

कार्नाडांचं आत्मकथन 'खेळता खेळता आयुष्य' थाटामाटात प्रकाशित झालं आणि मराठी वाचकांनी त्याचं मोकळ्या मनानं स्वागत केलं. त्यातही गाजली ती त्याची गमतीशीर 'अर्पण-पत्रिका'. मागच्या पिढीतल्या पुण्यातल्या सुप्रसिद्ध स्त्री-रोगतज्ज्ञ डॉ. मधुमालती गुणे यांना त्यांनी ते अर्पण केलं. कारण त्या ठरलेल्या वेळी न आल्यामुळे आपला जीव बचावला आणि म्हणून आपण अस्तित्वात आलो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. साहजिकच सुरुवातच अशा मनोरंजक प्रकारे झाल्यामुळे आत्मकथनाविषयी उत्सुकता निर्माण होते.

तीन आवृत्त्या संपल्यानंतर माझ्या कानांवर एक गोष्ट आली ती अशी;

या अर्पणपत्रिकेमुळे डॉक्टरांचे काही आप्तस्वकीय दुखावले गेले होते. त्यांना ओळखणाऱ्यांची प्रतिक्रिया अशी होती, 'त्या अशा प्रकारची कामं करणाऱ्या डॉक्टर नव्हत्या हो! कितीतरी जीव वाचवलेत त्यांनी! घरटी आठ-दहा मुलं असायची त्या जमान्यात तर ही फारच हीन मानली जाणारी गोष्ट होती. काही मेडिकल प्रॉब्लेम असेल तरच बाईचा जीव वाचवण्यासाठी या मार्गाचा अवलंब केला जायचा. मुख्य म्हणजे जरी डॉक्टरीणबाई वेळेवर आल्या असत्या तरी कार्नाडांच्या जिवाला अजिबात धोका नव्हता याची हमी देणारी कितीतरी माणसं आजही पुण्यात सापडतील!'

०००

अखेरची काही वर्षं गिरीश कार्नाड बरेच आजारी असायचे. ते परगावी जात नाहीत, पण ऑक्सिजनची नळी सोबत बाळगून गावात फिरतात, हे अशोक कुलकर्णी यांच्याकडून समजायचं. त्यांचा 'अर्बन नक्षलवादी' असल्याचा फलक घेतलेला, नाकात नळ्या घातलेल्या फोटोही सगळ्यांनी पाहिला. आपल्याला जे वाटेल ते स्पष्टपणे सांगण्याचा स्वभाव त्यांनी तेव्हाही सोडला नव्हता.

गिरीश कार्नाडांच्या मृत्यूनंतरचे सगळे विधी त्यांच्या इच्छेनुसार सर्वस्वी टाळण्यात आले. राजकीय इतमामानं अंत्यक्रिया व्हावी अशी तयारी शासनाकडून व्यक्त झाली तरी कार्नाडांच्या कुटुंबीयांनी ठाम नकार दिला. अखेरच्या काळात ते एका सोसायटीत राहायला गेले होते. मृतदेह अंत्यदर्शनासाठी ठेवला तर वाहतुकीच्या अडचणी निर्माण होतील, या विचारानं तेही केलं गेलं नाही. विद्युत-दाहिनीची जागा गावापासून बरीच दूर होती. अंत्यदर्शनाची इच्छा असलेल्यांना तिथं ठरावीक वेळेला यायला सांगितलं गेलं. पण माणसं पोचण्याच्या आत सगळं संपलं होतं!

'आपला मृतदेह कुणाच्या नजरेला पडू नये' या गिरीश कार्नाडांच्या इच्छेचाही त्यांच्या कुटुंबीयांनी सन्मान केला!

हेही सारं गिरीश कार्नाड या नावाला साजेसंच!

*(दिवाळी २०१९)*

# खुंटलिया धावा तृष्णेचिया

**अनिल यशवंत जोशी**

समाजाचा गाडा सुरळीत चालतो यामागे रूढार्थाने प्रकाशझोतात नसणाऱ्या पण आपले नियत कार्य निष्ठापूर्वक करणाऱ्या अनेकांचा हातभार असतो. अशांपैकी एक म्हणजे पंढरपूरचे वकील भाऊसाहेब. त्यांचे हे हृद्य व्यक्तिचित्र. त्यांच्या चिरंजीवांनी रेखाटलेले.

*कां झांकलिये घटींचा दिवा । नेणिजे काय जाहला केव्हां ।*
*या रीती जो पांडवा । देह ठेवी ॥*

***(ज्ञानेश्वरी ११.९८)***

(प्राणत्याग कसा व्हावा याविषयी गोनिदांच्या 'कुणा एकाची भ्रमणगाथा'मधील हे चिंतन! जसा एखाद्या तेवत्या दिवलीवर घट पालथा घालावा, मग ती केव्हा विझते ते कळतही नाही, तसा...)

अशीच एक दिवली शांतपणे निमाली त्या दुपारी! नेहमीप्रमाणे दुपारची वामकुक्षी उरकून कामाला निघायची वेळ झाली. कपडे करून जाताना आईने हटकलं, ''अरे! चहाची वेळ झाली तरी अजून 'हे' का उठत नाहीत ते बघ... बहुतेक त्यांचा डोळा लागलेला दिसतो.'' भाऊसाहेब! अहो भाऊसाहेब!! म्हणून हाक मारूनही प्रतिसाद येईना म्हणून त्यांना थोडंसं हलवायला गेलो अन् लगेचच 'तो' मृत्यूचा थंड स्पर्श माझ्या सराईत डॉक्टर हाताला जाणवला. सारं काही संपल्याचं जाणवलं.


चेहऱ्यावर तेच शांत, समाधानी भाव. एखाद्या नितांत रमणीय ठिकाणी जाताना आपल्याला जे वाटतं, तसं काहीसं. रीतीप्रमाणे आप्तेष्ट जमले. दहनसंस्कार झाले. येणारा प्रत्येक जण हा भाऊसाहेबांच्या मृत्यूचा प्रकार वाखाणत होता. बोलीभाषेत 'उठाउठी जाणं' असा एक चपखल शब्दप्रयोग या मृत्यूचं वर्णन करण्यासाठी सातत्याने वापरला जात होता. एका ठिकाणाहून उठून चटकन आपण दुसऱ्या ठिकाणी बसतो, तसं काहीसं इहलोकातून उठून परलोकात जाणं, याचं हे वर्णन. भेटायला येणाऱ्या सर्वांशी बोलताना एक गोष्ट जाणवत होती, की आपलं शेवटी काय होणार? आपला मृत्यू कसा होणार? याचा भुंगा प्रत्येकाच्या मनात कोठेतरी असतोच. या अंतिम सत्याची क्षणिक जाण सतत राहावी म्हणून जे काही आपण करतो, त्यालाच अध्यात्म म्हणत असावेत.

मी तसा अज्ञेयवादी आहे. देव-धर्म, पुनर्जन्म, पूर्वसंचित, कलियुग असे अनेक विचारकलह सांभाळत तळ्यात-मळ्यात चाललेलं असतं. कलियुगात तुम्ही जे काही बरंवाईट करता त्याची झाडाझडती येथेच द्यावी लागते आणि त्यानुसार तुम्हाला क्लेश-यातना भोगाव्या लागतात असं सांगितलं जातं. लोकांना सत्प्रवृत्त करण्याचा एक मार्ग म्हणून मी याकडे पाहतो, पण भाऊसाहेबांचा हा मृत्यू पाहिल्यानंतर मला त्यात काहीतरी तथ्य असावं असं वाटू लागलं आहे.

भाऊसाहेब ८४ वर्षांचे होऊन गेले. जाताना त्यांना कोठलाही मोठा आजार नव्हता, कोणत्याही गोळ्या-औषधं चालू नव्हती. माझ्या जाणिवेत मी त्यांना कधीही कोणावरही रागावलेलं पाहिलं नाही, कुणाबद्दल अपशब्द वापरलेला पाहिलं नाही. लहानपणी केलेली तालीम, व्यायाम यामुळे शरीरप्रकृती धडधाकट. नाही म्हणायला साठीच्या आसपास श्रवणशक्ती मात्र थोडीशी क्षीण झाली होती, पण त्यांनी कधीही माझ्यापाशी किंवा घरातल्या कोणापाशी तब्येतीची कोणती तक्रार केलेली ऐकिवात नाही. मी डॉक्टर असूनही त्यांनी स्वतःहून माझ्याकडून कधी कोणती गोळी मागून घेतली असं मला स्मरत नाही. त्यांच्या किरकोळ तब्येतीच्या तक्रारी आईमार्फत मला कळायच्या आणि मग आम्ही दिलेली एखादी गोळी ते नाखुशीने आणि आमचं दोघांचं मन मोडू नये म्हणून घ्यायचे. त्यामुळे त्यांच्यापेक्षा आम्हालाच जास्त बरं वाटायचं!

माझे आजोबा गणेश वामन उपाख्य बाबुराव जोशी हे त्या काळातलं पंढरपुरातलं एक प्रस्थ होतं. त्यांना आम्ही घरातील सर्व जण 'बाबा' म्हणून हाक मारायचो. हे 'वलय' त्यांनी स्वकर्तृत्वाने मिळवलं होते. मराठी, संस्कृत व इंग्रजीवरती असाधारण प्रभुत्व, अमोघ वाणी आणि जाणीवपूर्वक चाललेलं अखंड वाचन ही त्यांची काही वैशिष्ट्यं. गांधीविचारांचे पाइक असलेले बाबुराव स्वातंत्र्यलढ्यातही अग्रेसर होते व त्यामुळे त्यांच्या सततच्या तुरुंगवाऱ्या चालू होत्या. बाबा आचरणातही पक्के गांधीवादी होते.

त्यामुळे जातपात आमच्या घराच्या आसपासदेखील नव्हती. पंढरपूरच्या सामाजिक इतिहासात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या ...हरिजन मंदिर प्रवेश व सर्वधर्मीयांचा मंदिर प्रवेश.



साने गुरुजींनी मंदिर प्रवेशासाठी पंढरपुरात प्राणांतिक उपोषण केलं. त्यावेळी हरिजन मंदिर प्रवेश मान्य व्हावा व गुरुजींचे प्राण वाचावे म्हणून स्थानिक पातळीवरील झालेल्या सर्व प्रयत्नांची धुरा बाबा व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाहिली. या उपोषणाची कोंडी फुटावी म्हणून अनेक स्थानिक लोकांची मनधरणी त्यांना करावी लागली. या सर्व प्रयत्नांचं फलित म्हणून विठ्ठल 'विश्वदेव' झाला.

पंढरपूर देवस्थानाच्या त्यावेळच्या कारभाराबाबत आलेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी नाडकर्णी कमिशन नेमण्यात आलं होतं. त्यापुढे त्याकाळचे विधानसभा सदस्य म्हणून बाबांची साक्ष झाली होती. मतांचा हिशोब न करता बाबांनी परखडपणे तत्कालीन व्यवस्थेतील गैरप्रकार कमिशनच्या नजरेस आणून दिले होते. नाडकर्णी कमिशन हा पंढरपूर देवस्थानाच्या व्यवस्थापनाचा एक अप्रिय परंतु आवश्यक आढावा आहे. कमिशनचे अध्यक्ष नाडकर्णी व सचिव हुपरीकर यांनी चौकशी अहवाल कसा तयार केला पाहिजे त्याचा जणू एक आदर्शच या निमित्ताने निर्माण केला आहे.

बाबांचा संसार त्यांची आई व पत्नी या दोघी मिळूनच यथाशक्ती चालवीत होत्या. त्याकाळी घरचं खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचीच प्रथा असल्याने बाबांनी पंढरपुरात अनेक संस्था स्थापन करून त्या जोपासल्या, पण कटाक्षाने त्यांची संस्थाने होऊ दिली नाहीत. अशा पित्याचे आपल्या मुलांकडे किती व काय लक्ष असणार ते वेगळे सांगायला नको.

त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब म्हणजे माझे वडील. त्यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९२९ रोजी पंढरपूर मुक्कामी झाला. त्यांना दोन भाऊ व दोन बहिणी! भाऊसाहेबांचा क्रमांक वरून दुसरा. भावंडं जास्त असण्याचे काही फायदे-तोटे असतात. भाऊसाहेबांना फायदेच जास्त झाले असं म्हणायला हरकत नाही. बाबांसारखे घरात फारसं लक्ष न देणारे वडील असल्याने ही भावंडं आपले प्रश्न-अडचणी एकमेकांना विचारून सोडवीत असत. भाऊसाहेबांसमोर अशा स्थितीत आदर्श होता तो त्यांचे थोरले भाऊ बाळासाहेब यांचा. या सर्व भावंडांचं एक वैशिष्ट्य म्हणजे बाबांसारख्या हिमालयाच्या सावलीत वाढतानादेखील त्यांनी आपली बौद्धिक वाढ खुंटू दिली नाही. बाळासाहेब यांचं व्यक्तिमत्त्व अतिशय व्यासंगी होतं. वाचन, लेखन, वक्तृत्व या बाबतीत त्यांनी आपल्या पित्याचाच वारसा पुढे चालवला होता. ते पुढे जळगाव व भुसावळ इथे महाविद्यालयांचे प्राचार्य झाले व पुणे विद्यापीठाच्या विद्वत्सभेचे ते अनेक वर्षं सभासद होते.

त्यांचाच कित्ता गिरवत भाऊसाहेब प्रथम इतिहास विषय घेऊन एम.ए. झाले व नंतर एलएल.बी. इतिहासाची आवड व प्राध्यापक होण्याची मनीषा असणारे भाऊसाहेब नियतीच्या एका डुलकीने सरकारी वकील झाले. एखाद्या गुन्ह्याचा, पोलिसांनी 'तपास' या नावाखाली लावलेला निकाल 'इदं न मम' वृत्तीने न्यायासनासमोर मांडणाऱ्या गरीब-बिचाऱ्या प्राण्याला 'सरकारी वकील' म्हणतात! ही सरकारी नोकरी त्यांनी २५-३० वर्षं केली. नोकरीनिमित्ताने पहिली बढती मिळाल्यावर गडचिरोलीमध्येही त्यांनी दोन-अडीच वर्षं काम केलं. 'नक्षलवादाचा किती त्रास झाला?' असं त्यांना विचारल्यावर 'गडचिरोलीत न्यायदानाचं काम नक्षलवादीच करत असल्याने मला तिथल्यासारखा आराम कोठेच मिळाला नाही' असं त्यांनी मला एकदा हसत हसत सांगितलं.

या सर्व शासकीय नोकरीच्या काळात त्यांनी कधीही बदली किंवा बढती या विषयांकरिता आपल्या पुढारी असलेल्या वडिलांच्या ओळखीचा वापर केला नाही. ते गडचिरोलीत असताना तेथील दुर्गम भागातील एका गावचा सरपंच एका शासकीय कामाबद्दल त्यांचं मार्गदर्शन घ्यायला गडचिरोलीला जिल्हा मुख्यालयात येऊन त्यांना भेटला. भाऊसाहेबांशी चर्चा करून तो गावी परततात, शासनाचा खबऱ्या असल्याचा संशय घेऊन त्याचा शिरच्छेद करण्यात आला. ही गोष्टही आम्हाला भाऊसाहेबांकडूनच कळली.

माझा मोठा भाऊ अजित याच्या जन्माच्यावेळी त्याच्या मानेभोवती नाळेचा तिढा पडला होता व त्यावेळी वेळेवर प्राणवायू न मिळाल्याने तो प्रसूतीच्या वेळी गुदमरला. त्याला त्यामुळे अपस्माराचे झटके येऊ लागले. उपचारांची पराकाष्ठा होऊनही त्याचा हा आजार पूर्ण बरा झाला नाही. चौथीपर्यंत त्याने शालेय शिक्षण घेतले. त्यावेळी तो पहिल्या-दुसऱ्या क्रमांकात असायचा. पुढे वैद्यकीय सल्ल्याने नाइलाजाने त्याची शाळा बंद करावी लागली. अजित हा भाऊसाहेबांच्या भावविश्वातला एक हळवा कोपरा होता. त्याला ते फार काळजीने जपायचे, शक्यतो त्याच्या मनाविरुद्ध काही घडणार नाही याची काळजी घ्यायचे. ते जरी त्याचे वडील असले तरी त्याच्याशी एक मित्र म्हणून वागायचे.

आम्हाला त्यांनी कधीही मारलं नाही किंवा आम्हाला ते कधी रागावलेदेखील नाहीत. ते एकदा नोकरीनिमित्त सांगलीत असताना मे महिन्याच्या सुट्टीत मी त्यांच्यापाशी सांगलीला राहायला गेलो होतो. ते ऑफिसातून घरी आले की मारुती चौकातल्या एका पुस्तकाच्या दुकानात आम्ही फिरत जायचो व रोज एक छोटं पुस्तक ते मला विकत घेऊन द्यायचे. माझं वाचनवेड जपण्याचा त्यांचा हा अभिनव उपक्रम होता.

मी पाचवीत गेल्यावर इंग्रजी विषय माझ्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाला. त्याकाळी इंग्रजी व्याकरणाची 'Brighter Grammar' या नावाची चार-पाच पुस्तकांची मालिका प्रसिद्ध

होती. इंग्रजी व्याकरणातील अनेक संकल्पना त्यात आकर्षक चित्रांचा जागोजागी वापर करून समजवण्यात आल्या होत्या. प्रत्येक प्रकरणाअखेरीस अनेक प्रश्न दिलेले असत. त्यांची उत्तरं दिली, की ते-ते प्रकरण पक्कं होत असे. मी ही पुस्तकमालिका भाऊसाहेबांबरोबर सोडवली. त्यांच्या खांद्यावर, डोक्यावर, मांडीवर बसून प्रत्येक प्रकरणाअखेरीचे प्रश्न मी सोडवत असे. माझ्या बऱ्या इंग्रजीचं मूळ या हसतखेळत केलेल्या इंग्रजीच्या पाठांमध्ये बऱ्याच प्रमाणात आहे. 'अभ्यासाचा आता कंटाळा आला' असं मी जाहीर केलं, की लगेच आमचा हा अभ्यास थांबत असे. पण गुरुजींच्या खांद्यावर बसून अभ्यास करण्याची मुभा असल्याने कंटाळा लौकर कसा येईल!

भाऊसाहेबांना बालमानसशास्त्राची जाण होती, का त्यांच्यात एक निरागस बालक होतं ते माहीत नाही, पण ते बच्चे कंपनीत फारच लोकप्रिय होते. माझा मुलगा मिहिरही माझ्यासारखाच शब्दशः त्यांच्या अंगाखांद्यावर खेळला. भाऊसाहेब, आई व मिहिर हे तिघे मिळून रामायणातील व महाभारतातील अनेक प्रसंग घरी सादर करायचे. मिहिरच्या इच्छेनुरूप रावण, कुंभकर्ण, शूर्पणखा, दुर्योधन, दुःशासन इत्यादी खलनायकी थाटाची पात्रं आई व भाऊसाहेबांच्या वाट्याला यायची व त्याला ते यथाशक्ती न्याय द्यायचे. वानरसेनेचा भाग म्हणून आपल्या लेंग्यात वृत्तपत्राच्या पट्ट्यांची तयार केलेली शेपटी अडकवून भाऊसाहेब मिहिरच्या बरोबरीने उड्या मारायचे, पळायचे, प्रसंगी युद्धातला एखादा बाण वर्मी लागून त्यांना धारातीर्थी पडण्याचं सोंगही वठवावं लागे! मिहिरप्रमाणेच घरी येणाऱ्या इतर बालचमूतही भाऊसाहेब 'आबा' अतिशय लोकप्रिय होते. आपण घरात एखादं लहान मूल आलं की जरा जादा सतर्क होतो. ते काही तोडफोड करणार नाही ना याची सर्व जण दक्षता घेऊ लागतात व त्याच्यावर सूचनांचा एकच भडिमार सुरू होतो. भाऊसाहेब आबांची खोली मात्र याला अपवाद होती. तिथे येणाऱ्या बच्चे कंपनीला अक्षरशः मुक्तद्वार होतं. कागद फाडणं, पेन फेकणं, पुस्तकं उलटीसुलटी करून पाहणं, कपड्यावर शाईचे फराटे मारणं या गोष्टींना तेथे अजिबात मज्जाव नसायचा. प्रसंगी त्याला उत्तेजनच दिलं जायचं.

आता ही भाऊसाहेबांची खोली हा एक जगावेगळा प्रकार होता. आई काहीशा वैतागाने त्याला 'मठी' म्हणायची. ही खोली आमच्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर एका बाजूला होती. खरंतर जास्तीचं सामान ठेवायला म्हणून ही खोली बांधलेली. सेवानिवृत्तीनंतर भाऊसाहेबांनी हळूहळू या खोलीचा ताबा घेतला. अडगळीची खोली असल्याने घरात इतरत्र प्रचलित असलेले साफसफाई, नीटनेटकेपणा इत्यादी 'सद्गुण' या खोलीत फारसे प्रवेश करू शकायचे नाहीत. या खोलीच्या उंबऱ्याबाहेरचं विश्व व खोलीतलं भाऊसाहेबांचं भावविश्व यांत अक्षरशः युगायुगांचं अंतर होतं. ज्याला ब्रह्म व माया यांतील फरक समजावून घ्यायचा असेल त्याने या खोलीत एकदा डोकावले तरी त्याची बरीच प्रगती झाली असती! खोलीत दोन भिंतींलगत लावलेल्या जुन्या ट्रंका होत्या. इतर दोन भिंतींत असलेल्या कप्प्यांत असंख्य जुनी पुस्तकं रचून ठेवलेली होती. वृत्तपत्रात येणाऱ्या मजकुराची कात्रणं कापून ठेवायचा भाऊसाहेबांना छंद होता. पुणे येथील सुप्रसिद्ध भाषातज्ज्ञ पद्मश्री डॉ. अशोक केळकर हे भाऊसाहेबांचे कॉलेजमधील मित्र होते. मराठी भाषा किंवा व्याकरणाचे संदर्भ असलेली अनेक कात्रणं आपल्या टिपणीसह भाऊसाहेब त्यांना पाठवायचे. ते ती टिपणं वाचून त्यावरची त्यांची मतं भाऊसाहेबांना पाठवायचे. हा पत्रव्यवहार फारसा गाजावाजा न होता अनेक वर्षं चालू होता.

या भाऊसाहेबांच्या मठीत पंखा नव्हता. तरीही भर उन्हाळ्यात भाऊसाहेब डोक्याला पाट घेऊन व खाली चक्क वर्तमानपत्र अंथरून अनेकदा तेथेच गाढ झोपी जायचे. आईचा संताप संताप व्हायचा, पण तो संताप त्या खोलीत पोचूच शकायचा नाही.

काय काय होतं त्या खोलीत? या प्रश्नाच्या उत्तरासाठी 'काय काय नव्हतं त्या खोलीत?' असा प्रतिप्रश्न करावा लागेल. आमची सर्वांची शालेय प्रगतिपुस्तकं, पंचांग, वेगवेगळे वैद्यकीय अहवाल, प्रमाणपत्रं, जन्मदाखले, विवाहदाखले, लग्नपत्रिका, अगदी ब्रह्मांडच म्हणाना! त्यांची स्वतःची कागदपत्रं ठेवण्याची एक विशिष्ट पद्धत होती. वरकरणी जरी ती अगम्य वाटली, तरी त्यांना स्वतःला कोणता कागद कोठे आहे ते अगदी अचूक माहीत होते. काहीही मागितलं की क्षणार्धात ते तो कागद हजर ठेवायचे. त्यांचा देवावर विश्वास होता का, याचा मी विचार करू लागतो. हा विचारच अत्यंत प्रेरक होता.

त्यांच्या खोलीत सर्व बाजूंना मिळेल तिथे खिळे ठोकलेले असायचे. जाडसर छापडीच्या एका बाजूला कोरा पांढरा कागद लावून, त्यावर ॐ असं लिहून ते जागोजागी लावलेले असत. त्यांच्या आवडत्या पुस्तकांच्या यादीत बायबल हे अग्रस्थानी होते. मीही त्यांच्याबरोबर पत्राद्वारे बायबल अभ्यासक्रमाचे काही धडे बालपणी विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले. ते आईबरोबर अनेक वेळा ज्ञानेश्वर महाराजांच्या मठात, होळकर वाड्यातील राममंदिरात जायचे, पण प्रत्यक्ष देवळात न जाता चपला राखण्याच्या नावाखाली जवळच्या फळीवर बसून राहायचे. विनोद म्हणजे एकदा भाऊसाहेब असे चपला राखत बसलेले असतानाही त्यांचाच स्वतःचा चपलाजोड चोरीला गेला होता! आम्ही पंढरपुरात राहात असूनही भाऊसाहेब आवर्जून कधी पांडुरंगाला गेल्याचं मलातरी आठवत नाही. एकंदरीत त्यांचा कल निर्गुण उपासनेकडे असावा असं वाटतं.

त्यांना अंतिम सत्य गवसलं होतं का? मला माहीत नाही! हा त्यांचा प्रवास मात्र चालू होता. त्या प्रवासात खिळ्याला लावलेले ओंकार व कप्प्यातील बायबल हे त्यांचे मैलाचे दगड होते. 'Fear those who have found the truth, cherish those who are in search of it' असं साक्षात व्हॉल्टेअर सांगून गेला आहे. मुलगा म्हणून माझ्यावरती कसलेही धार्मिक संस्कार करण्याचा यत्किंचित प्रयत्न त्यांनी कधी केला नाही. त्याचबरोबर वडील म्हणून त्यांनी मला धाक दाखविण्यासाठी एकदाही हात लावला नाही हेही आवर्जून नमूद करावे लागेल.

खिळे मारण्याच्या त्यांच्या वर उल्लेख केलेल्या छंदापायी त्यांना अनेकदा हाताला किंवा पायाला लागून रक्तस्राव व्हायचा. आम्ही कोणीतरी काहीतरी बोलू म्हणून ते आम्हाला ही बाब सांगायचेच नाहीत. पायजम्यावर किंवा शर्टावर पडलेल्या रक्ताच्या

एखाद्या डागाने बिंग' फुटायचे व मग त्यांना आईच्या सरबत्तीला तोंड द्यावे लागे. मठीत फार वस्तू जमा झाल्या की मग आईचं तिकडे लक्ष जाऊन तिच्या आधिपत्याखाली एखादी विशेष स्वच्छता मोहीम राबवली जायची. ही मोहीम म्हणजे भाऊसाहेबांच्या या विश्वावर एकप्रकारे आक्रमणच असायचं. भाऊसाहेब त्यातून त्यांना हव्या असणाऱ्या गोष्टी वाचवायचा शर्थीचा प्रयत्न करायचे. मी क्वचित् प्रसंगी या लढ्यात भाऊसाहेबांची बाजू घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करायचो. अर्थातच त्याला फार मर्यादित यश यायचं.

आमची आई म्हणजे 'खुबसुरत'मधली 'दिना पाठक' असं समजा! म्हणजे जास्त सांगायला नको! हे माझं विधान नकारात्मक अजिबात नाही. आमच्या घरात गेल्या अनेक पिढ्या मातृसत्ताक आहेत. बाबांची आई व पत्नी यांच्यामुळे त्यांचं राजकारण व समाजकारण झालं, तर माझ्या आईमुळे भाऊसाहेबांचा संसार झाला.

भाऊसाहेब वकील होऊन आल्यानंतर सुरुवातीचे काही दिवस त्यांनी खासगी वकिली केली. अशील यायचे, खटला चालायचा, अनुकूल निकालही यायचा, पण फी कशी मागायची हा प्रश्न काही वकीलसाहेबांना सुटायचा नाही! आईने वेळीच हस्तक्षेप करून भाऊसाहेबांना सरकारी नोकरी घ्यायला लावली. आजकाल स्त्री सबलीकरण हा चर्चेतला विषय आहे. त्या काळात माझी आजी कसलंही आरक्षण नसताना खुल्या प्रवर्गातून निवडणूक लढवून आधी नगरसेवक व नंतर पंढरपूर नगरपालिकेची पहिली महिला उपाध्यक्ष झाली होती. माझ्या दोन्ही आत्यादेखील व्यवस्थित शिकल्या. धाकटी आत्या तर तत्त्वज्ञान हा विषय घेऊन पुणे विद्यापीठाची बी.ए. झाली. आईने आपल्या सासूचा समाजसेवेचा वारसा वर्धिष्णू केला. तीदेखील अनेक वर्षे नगरपालिकेची नगरसेवक होती. इथल्या एका मोठ्या नागरी सहकारी बँकेची ती चेअरमन झाली. या बँकेची पूर्णपणे महिलांनी चालवलेली 'महिला शाखा' तिनेच स्थापन केली.

भाऊसाहेब अत्यंत नियमितपणे रोजनिशी लिहायचे. त्यांचं अक्षर फारसं सुवाच्य नव्हतं. त्यामुळे ती इतर कोणाला वाचता येणं शक्य नव्हतं. अव्यक्त भावना व्यक्त करण्याचा हा त्यांचा मार्ग असावा. भाऊसाहेब नोकरीनिमित्त बऱ्याच गावांत वास्तव्य करते झाले. त्या त्या गावामधून ते आईला वेळोवेळी पत्र पाठवायचे. आईलादेखील त्यांची पत्र वाचताना त्रासच व्हायचा. आई विनोदाने म्हणायची, ''पत्र आलं याचा अर्थ ते सुखरूप आहेत... लिखित शब्दामागची भावना महत्त्वाची!'' त्यांचं अक्षर विद्यार्थिदशेत बरं होतं. नंतर ते हळूहळू बिघडत गेलं. ते रोजनिशीत काय लिहितात, ते त्यांना विचारायचा मी एकदोनदा प्रयत्न केला होता. पण त्यांनी तो विषय शिताफीने टाळला. भाऊसाहेबांचं अक्षर बिघडणं सुनियोजित होते! म्हणजे त्यांनी ते काहीसे ठरवून केलं होतं काय, असा मला बऱ्याच वेळा प्रश्न पडतो! त्यांच्या अंतर्मुख प्रवृत्तीचा तो आविष्कार असावा. अर्थात हा माझा कयास आहे.

भाऊसाहेब पुण्यातून वरिष्ठ श्रेणी पोलीस अभियोक्ता म्हणून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी गृहखात्याला पोलीस अभियोक्ता कसा असावा याविषयीचं एक टिपण पाठवलं होतं. त्यात एक महत्त्वाची शिफारस होती – पोलीस अभियोक्ता या पदनामातच पोलीस हा शब्द आहे. त्यामुळे त्याने पोलिसांच्या आधीन राहून फक्त पोलिसांचीच वकिली करावी असं गृहीतक निघतं. प्रत्यक्षात तो जनतेचा वकील असतो. न्यायव्यवस्थेसमोर घडलेल्या गोष्टीची यथार्थ, निष्पक्ष मांडणी करून खऱ्या अर्थाने न्याय व्हावा यासाठी या व्यवस्थेने काम केले पाहिजे. त्यासाठी पोलिसांच्या नियंत्रणातून ही व्यवस्था मोकळी करून तिची स्वतंत्र वेगळी आस्थापना स्थापन करावी अशी ती शिफारस होती. बऱ्याच वर्षांनी शासनाने धोरणबदल करून या सरकारी वकिलांची पोलिसी नियंत्रणातून सुटका केली. आता गृहखात्याअंतर्गत एक वेगळा विभाग या वकिलांच्या कामकाजाचं नियंत्रण करतो. आता या पदाला 'पोलीस अभियोक्ता' असे न म्हणता 'सरकारी वकील' (Public Prosecutor) म्हणतात. आता पोलिसांच्या तपासाबाबतचं आपलं मत हे वकील मोकळेपणाने मांडू शकतात व त्याचा परिणाम अधिकाधिक आरोपींना शिक्षा होण्यात होऊ लागला आहे.

११ ऑगस्टला २०१३ साली त्यांचा नातू मिहिर उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला गेला. त्याला मुंबई विमानतळावरून निरोप देऊन १२ तारखेला रात्री मी व सौ. शुभांगी परतलो. १३ तारखेला सकाळी सौ. शुभांगीने त्यांना मिहिर सुखरूप पोचल्याचं सांगितलं. 'त्याची जेवणाची व्यवस्था काय आहे?' असं भाऊसाहेबांनी विचारलं. त्याच दिवशी दुपारी भाऊसाहेबांनी इहलोक सोडला.

ते गेल्यानंतर मला एक वेगळीच बधिरता आली. अंत्यसंस्कार पार पडले. आप्तेष्ट येऊन भेटत होते. सर्वांशी रीतसर बोलत होतो. पण मनात अजिबात दुःख वा शोक किंवा इतर कसलीच भावना येत नव्हती. एखाद्या यंत्रमानवाचा वावर व्हावा तसं काहीसं माझं झालं होतं.

चार-पाच दिवसांनी रात्री अकरा-साडे अकराच्या सुमारास मी संगणकावर थोडंसं काम करत होतो. साचलेल्या काही इमेल मार्गी लावल्या आणि काहीतरी ऐकावं म्हणून भीमसेन जोशींकडे वळलो. अचानक संत तुकारामांचा पंडितजींनी गायिलेला एक अभंग सापडला.

*याजसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥१॥*
*आता निश्चिंतीने पावलो विसावा । खुंटलिया धावा तृष्णेचिया ॥२॥*
*कवतुक वाटे झालिया वेचाचे । नाव मंगळाचे तेणे गुणे ॥३॥*
*तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आता दिवस चारी खेळीमेळी ॥४॥*

पंडितजींचा आर्त सूर अक्षरशः हृदयात घुसत होता. डोळ्यांमधून अश्रूंची धार कधी सुरू झाली ते कळलं नाही. मी हे अश्रू आवरायचा अजिबात प्रयत्न केला नाही. या अश्रूरूपाने मला जी अनुभूती मिळत होती, तिच्यामागे तृष्णेवर विजय मिळविणारे भाऊसाहेब होते. अतिशय आनंद वा दुःख झालं की डोळ्यात अश्रू येतात असं म्हणतात, पण अश्रूंचा हा प्रकार मात्र अलौकिक होता. एका स्थितप्रज्ञाच्या जीवनसाधनेचं ते सार होतं. त्याचं शब्दात वर्णन करण्याची माझी पात्रता नाही!

*(दिवाळी २०१९)*

'नव्या जगाची सुरुवात स्वत:पासून होते' या वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभलेल्या व अडीच वर्षे चाललेल्या जाहिरातमालिकेची एक झलक. व्हॉट्सॲपची ज्ञानगंगा दुथडी भरून वाहू लागण्यापूर्वीचे ते दिवस होते हे नमूद करायला हवे.

## धागा तोडू नका, फुली मारू नका

*एकही डाग नसलेली सफरचंदं*
*सापडणं कठीण आहे*
*तशी ती नसतातच*
*पण थोडेफार डाग असलेली, टाकून द्यायची नसतात*
*जरा साल काढून घेतली*
*तर आतून ती चांगलीच असतात.*

*माणसांचंही तसंच असतं*
*थोडंफार वगळलं तर, बरचसं चालण्यातलं असतं.*
*एवढ्यातेवढ्यावरून*
*फुली नसते मारायची*
*इतरांवर, वा स्वत:वरही*
*तोडून नसतं टाकायचं*
*इतरांपासून आपल्याला*
*वा आपल्यापासून आपल्याला.*
*तोडणं सोपं असतं*
*पण पुन्हा जोडणं कठीण असतं*
*आणि मग कितीही जोडलं*
*जखम भरली, खपली धरली*
*तरी व्रण कायमच राहतो*
*तुटलेला धागा जोडला*
*तरी गाठ कायमच राहते.*

*रोज-रोजच्या जगरहाटीत*
*तुमच्या आमच्या दिवसरातीत*
*जास्तीत जास्त ताण-ताप*
*चलनवाढ आणि तेलटंचाई*
*जिहाद आणि जंगलकटाई*
*यातून नाही येत.*
*तो येतो, तू-तू, मी-मीतून*
*नात्यागोत्यांतल्याच गाठींतून*
*त्यावरच ठरतो आपला खरा मूड.*
*तो चांगला असेल*
*तर भोवतालचं जगही*
*अधिक चांगलं दिसायला लागतं.*
*दृष्टी बदलली की सृष्टीही बदलते.*
*आधी आपण बदलतो*
*मग जग बदलतं.*

*नव्या जगाची सुरुवात स्वत:पासून होते*

*(दिवाळी २००६)*



# साहित्यविश्व

# रीडर्स डायजेस्टसाठी लिहिताना...

**प्रेम वैद्य**

या मासिकासाठी लिहिणं हा एक बहुमान तर आहेच, पण शिवाय खूप शिकवणारा एक अनुभवही आहे. भारत सरकारच्या फिल्म्स डिव्हिजनमधील एक निर्माते प्रेम वैद्य यांचा Peon Novelist हा दीड पानी लेख रीडर्स डायजेस्टच्या ऑगस्ट १९९५च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्या लेखाची ही आगळीवेगळी जन्मकथा.

ऑक्टोबर ३, १९९३ची गोष्ट. रीडर्स डायजेस्टच्या मुंबई कार्यालयातून मला एक पत्र आलं. 'Please collect some research material on Marathi writer Uttam Bandu Tupe...'

''उत्तम बंडू तुपे या मराठी लेखकावर आम्हाला रिसर्च मटिरिअल हवे आहे. त्यांच्याबद्दल मिळवू शकाल तेवढी माहिती मिळवा. ज्यामुळे त्यांना लेखनाची प्रेरणा मिळाली असे त्यांच्या जीवनातील प्रसंग, त्यांच्या मित्रमंडळींतील त्यांचे स्थान वगैरेंची माहिती आम्हाला हवी आहे. त्यांचे interviews रेकॉर्ड करावे. त्या रेकॉर्डेड कॅसेट्स आम्हाला पाठवाव्यात.

आमचे काही मुद्दे :

१) तुपेंचे physical description आणि त्यांचे वय.

२) ते का लिहितात आणि त्यांनी लिखाणास सुरुवात केव्हा केली?

३) त्यांच्या मित्रमंडळींनी त्यांना लेखनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला का? त्यांची लेखन करण्याची जिद्द कशामुळे टिकून आहे?

४) त्यांच्यासमोर कुठल्या अडचणी उभ्या राहिल्या? त्यांच्या ऑफिसमधल्या लोकांनी त्यांची पुस्तके वाचलीत का? तुपेंशी असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांच्या वर्तनात तुपे लेखक बनल्यावर काही फरक पडला का?

५) तुपेंना पारितोषिके मिळत गेली त्यावेळी त्यांच्या ऑफिसमधल्या लोकांच्या वागण्यात काही फरक तुपेंना जाणवला का?

६) तुपेंचे लेखनाचे विषय कोणते? त्यांना लेखनाकरिता कोण मदत करतं?

७) त्यांची पुस्तके कोणी प्रसिद्ध केली? तुपे सरकारी ऑफिसमध्ये चतुर्थ श्रेणीचे काम करतात हे समजल्यावर प्रकाशकांनी त्यांची मानहानी केली का?

या सर्व प्रश्नांची माहिती आपण सविस्तर गोळा करून पाठवावी. ही माहिती आमच्या 'Heros For Today' या सदराकरता हवी आहे.''

सुमारे दहा वर्षांपूर्वी मी रीडर्स डायजेस्टकरता लिहायचा मोठ्या जिद्दीने प्रयत्न केला होता. खूप मेहनत घेऊन मी लिहिलेले दोन्ही लेख त्यांच्याकडून साभार परत आले होते. परंतु त्या संदर्भात मला त्यांच्याशी ओळख करून घ्यायची संधी मिळाली होती. माझा मुलगा अभय टाईम्स ऑफ इंडियाचा प्रतिनिधी म्हणून वॉशिंग्टनला त्यावेळी काम करत होता. त्याची व माझ्या अमेरिकेत स्थायिक झालेल्या मुलीची रीडर्स डायजेस्टच्या मुंबई कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांशी ओळख होती.

अशा काही कारणांमुळे मला अधूनमधून रीडर्स डायजेस्टकडून पत्रं येत असत. त्यांना काही माहिती हवी असेल व मी ती गोळा करू शकेन असं त्यांना वाटलं तर ते मला पत्राने कळवत. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेविषयी (Bhandarkar Institute of Oriental Research) व पुण्यातील दुर्मिळ नाणी (Coins) या विषयांवर बरंच मटिरिअल मी त्यांना गोळा करून दिलं होतं. त्याचे त्यांनी त्यांच्या व्यावसायिक नीतीला अनुसरून मला पैसेही दिले होते. पण त्या माहितीच्या आधारे कुठलाच लेख प्रत्यक्षात रीडर्स डायजेस्टमध्ये प्रसिद्ध झाला नव्हता.

उत्तम बंडू तुपेंवरती काही लेख रीडर्स डायजेस्टच्या संपादकांच्या वाचनात आले होते. हा विषय रीडर्स डायजेस्टकरता त्यांना योग्य वाटला होता. परंतु प्रसिद्ध झालेल्या लेखांपैकी एकही लेख त्यांना पुनर्मुद्रित करण्याजोगा वाटला नव्हता. इतरत्र पूर्वी प्रकाशित झालेलं साहित्यच निवडायचं व त्यावर संस्कार करून, त्याचं अनेक वेळा पुनर्लेखन करून, तेच मग छापायचं हे नेहमीचं रीडर्स डायजेस्टचं धोरण असतं. अगदी क्वचित प्रसंगीच ते एखादा लेख मुद्दाम कमिशन करून लिहून घेतात. यावेळी तुपेंवरती लेख लिहून घ्यायचं त्यांनी ठरवलं होतं. त्यामुळेच या वेळचं त्यांचं पत्र सविस्तर व नेमकं होतं. साहजिकच माझ्या आशा पल्लवित झाल्या.



**पुणे पुरालेखागारातील आपल्या कचेरीत काम करताना उत्तम बंडू तुपे**

स्वत:शीच मी म्हणालो, 'चला, आता एकदाचा आपला लेख रीडर्स डायजेस्टमध्ये येणार.' मोठ्या उत्साहानं मी तुपेंबद्दलची सर्व माहिती गोळा करण्यास सुरुवात केली.

सर्वप्रथम मी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या श्री. अनिल मेहतांना ५ ऑक्टोबर १९९३ रोजी भेटलो. रीडर्स डायजेस्टचं पत्र मिळाल्यावर दोनच दिवसांनी. त्यांनी तुपेंचं पहिलं पुस्तक, 'काट्यांवरची पोटं'च्या दोन आवृत्त्या छापल्या होत्या. तुपे आणि त्यांच्या साहित्याबद्दलची मेहतांची मतं मी टेप केली.

दुसरी भेट डॉ. आनंद यादवांची घेतली. त्यांनी काट्यांवरची पोटंची प्रस्तावना लिहिली आहे.

या दोघांनी – मेहता आणि यादव यांनी – बरीच माहिती दिली. मेहतांनीच तुपेंची दुसरी कादंबरी *इजाळं* प्रकाशित केली आहे. या पुस्तकांसंबंधी डॉ. आनंद यादव यांच्याशी तुपेंनीही बरची चर्चा केली होती.

यानंतर मी तुपेलिखित हाती आली ती सगळी पुस्तकं चाळली. काट्यांवरची पोटं, इजाळं, चिपाड, खुळी, भस्म, आदण (कथासंग्रह), लांबलेल्या सावल्या, झावळं इत्यादी.

यादवांच्या माहितीवरून कळलं की तुपेंचं शालेय शिक्षण तिसरीपर्यंतच झालेले आहे. उत्तम तुपे मातंग समाजातले. विशिष्ट प्रकारचं गवत वाळवून दोर तयार करणं हा त्यांचा पिढीजात व्यवसाय. ''पण ग्रामीण जीवनातील अनुभवांचा साठा असलेला बोलताचालता कोशच आहेत तुपे म्हणजे. आणि या अनुभवाचं यथार्थ चित्रण करण्याची क्षमताही त्यांच्यात आहे'', असं डॉ. यादवांनी मला सांगितलं.

आता ठरवलं, की तुपेंना प्रत्यक्षात भेटायचं. त्यांचा घरचा पत्ता माहीत नसल्यामुळे त्यांच्या ऑफिसात, पुणे पुरालेखागारमध्ये, (Department of Archeology) गेलो.

ऑफिसात बाहेरच्या गॅलरीत एक गृहस्थ झाडू हातात घेऊन ऐतिहासिक कागदपत्रांच्या गठ्ठ्यांवरची धूळ झाडीत होते.

''मला उत्तम बंडू तुपेंना भेटायचं आहे!'' मी म्हटलं.

त्या गृहस्थांनी झाडू खाली ठेवला आणि मला नमस्कार करत म्हणाले, ''मीच तुपे, बोला!'' मला आश्चर्याचा धक्का बसला.

''एका प्रख्यात इंग्रजी मासिकातील लेखाकरिता आपल्याशी काही बोलायचं आहे.''

''आपण इथेच बाकावर बसा. मी जरा आत जाऊन आमच्या साहेबांना विचारून येतो.''

विश्वास बसेना! मनात विचार आला, खरंच का ३२ कादंबऱ्या लिहिणारा हा लेखक असावा? (३२ हा तुपेंनी मला सांगितलेला आकडा. रीडर्स डायजेस्टच्या संपादकांनी महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय वगैरे अधिकृत संस्थांकडे स्वतंत्ररीत्या याची चौकशी करून तुपेंच्या पुस्तकांची यादी तयारी केली. त्यांना काही ३२ नावं सापडली नाहीत. प्रत्यक्ष लेखात त्यांनी स्वत: खात्री केलेली माहितीच वापरली.) पण मग

लगेच वाटलं रीडर्स डायजेस्टने यांच्यावर रीसर्च मटिरीयल गोळा करायला सांगितले आहे त्याअर्थी नक्कीच यांच्यात काहीतरी विशेष असलं पाहिजे! हातात झाडू असूनही हा माणूस वेगळ्याच सभ्यतेने वागल्याचं आणि मनमोकळेपणाने बोलल्याचं मला जाणवलं होतं.

थोड्या वेळात तुपे परत आले आणि म्हणाले, ''आपण सुट्टीच्या दिवशी केव्हातरी आला तर जास्त बरं! आपल्याला सविस्तर बोलता येईल.''

मला ते पटलं. त्यांच्या घराचा पत्ता घेतला आणि येणारा सुट्टीचा दिवस, २ ऑक्टोबर १९९३, भेटीसाठी ठरवला.

त्याप्रमाणे ठरलेल्या वेळी ८ मुळारोड, खडकी, पुणे – ३ येथे टेपरेकॉर्डर आणि नोटबुकसह मी पोचलो.

दारातच 'राणा' कुत्रा आणि तुपे माझी वाट पाहात होते. नमस्कार-चमत्कार झाल्यावर तुपे बोलू लागले. 'राणा'ने जणू सगळं उमजून माझ्यावर भुंकण्याचं थांबवलं आणि शेपूट हालवत मला त्या घरात स्वीकारलं! तुपे यांच्या पत्नी सौ. जिजाबाई तेथेच होत्या. थोड्या मोठ्या आवाजातच तुपे बोलत होते. घर ऐन रहदारीच्या रस्त्यावर... येणारे जाणारे, फेरीवाले, वाहने सारखी ये-जा करत होती. सारखा आरडोओरडा चालला होता.

✦

*रीडर्स डायजेस्ट* हे जगातील सर्वांत यशस्वी मासिक समजले जाते. दरमहा त्याच्या सुमारे दोन कोटी सत्तर लाख प्रती खपतात. भारतात त्याचा खप सुमारे चार लाख तर महाराष्ट्रात सुमारे ९०,००० आहे. डेविट आणि लीला वॉलास या जोडप्याने फेब्रुवारी १९२२ मध्ये भाड्याच्या गॅरेजमध्ये कुठच्याही सहकाऱ्याविना फक्त ३०० डॉलर्स भांडवलावर (तेही भावाकडून डेविटने उसने आणले होते आणि केवळ पहिला अंक काढायलाच ही रक्कम पुरेशी होती) सुरू केलेले हे मासिक म्हणजे प्रकाशनक्षेत्रातील एक चमत्कार गणला जातो.

✦

तुपे यांचं 'घर' म्हणजे १६ बाय १६ची मुळारोड झोपडपट्टीतली एक खोली आहे. स्वच्छ, नीटनेटकी ठेवलेली. तुपे यांचा परिवार लहानच – सौ. जिजाबाई, चि. विनोद (वय २४ वर्षं), चि. मिलिंद (वय १८ वर्षं) आणि अर्थात पाळलेला कुत्रा 'राणा' (वय १४ वर्षं)!

रीडर्स डायजेस्टनी दिलेल्या प्रश्नावलीप्रमाणे प्रश्नोत्तरं सुरू झाली.

तुपे म्हणाले,

''आमचं मूळ गाव एनकुल. तालुका खटाव, सातारा जिल्हा. भावंडांत मी सगळ्यात लहान. मला चार बहिणी आणि दोन भाऊ... माझ्या संपूर्ण कुटुंबात मीच एक शिकलेला. तोही तिसरीपर्यंतच. माझी बायको अगदी निरक्षर. अंगुठेबहाद्दरच आहे... मातंग समाजातील असल्याने विदारक अनुभव माझ्या पदरी पडले...''

''तुम्ही लिहिता कशाकरिता?''

माझ्याजवळ अनुभवांचा साठा आहे आणि माझ्या भाषेत हे अनुभव व्यक्त करण्याची क्षमता आहे. खूप सुचलं की ते लिहिल्याविना चैन पडत नाही! माझ्या मते आज आपला समाज जातीपातींच्या भोवऱ्यात सापडला आहे. त्याचं नुकसान सगळ्यांनाच भोगावं लागतं. पण असं कोणीच मनापासून म्हणत नाही, की माणुसकी हीच सर्वश्रेष्ठ जात आहे आणि माणुसकी हाच खरा धर्म आहे. म्हणून मला लिहावंसं वाटतं. मी जास्त करून सामाजिक आणि स्त्रियांच्या प्रश्नांवर लिहितो.''

मला रविदासचे गंगेकाठी उच्चारलेलं पद आठवलं –

''जाति जात में जात है, ज्यों केलनके पात ।

रविदास न मानुष जुड सकें, ज्यों लौं जात न जात ॥''

तुपेंची व्यथा मला पटली.

''लिखाणाकडे तुम्ही वळलात कधी?'' मी विचारलं.

''माझा पिंड हा लावणीकाराचा आहे. माझ्या काही हितचिंतकांनी मला माझे विचार कथारूपाने लिहिण्यास प्रोत्साहित केले आणि मी माझा पहिला लेख 'हुंडा' कथारूपात लिहिला. ही कथा गाजली आणि साहित्य परिषदेचे मला रु. ५०१/-चं पारितोषिक १९७५ मध्ये मिळालं. फार बरं वाटलं. मुख्य म्हणजे लिहिल्यामुळे पैसेही मिळतात आणि नावपण होतं हे मला जाणवलं. आणि मी लिहित गेलो. मला सांगण्यात आलं की, ''आता तू मोठं काहीतरी लिहायला घे... तुझं आत्मचरित्र लिही.'' मी लिहिण्यास सुरुवात केली. १९८१ मध्ये ते पूर्ण केले. (काट्यांवरची पोटं) आमचा, दहा बोलक्या आणि सात मुक्या जनावरांचा परिवार. घरात भाकरीची ओढाताण आणि त्यासाठी सगळ्यांना कामवार करावंच लागे. सगळ्यांचीच काट्यांवरची पोटं. उपासमारीतून निर्माण झालं माझं पहिलं काट्यांवरची पोटं हे आत्मनिवेदन.''

पुढच्या महिन्याभरात तुपेंशी नंतर अशाच आणखीन तीन-चार भेटी झाल्यानंतर, दि. १३ नोव्हेंबर १९९३ला मी छानपैकी नऊ पानी लेख (त्याच्या सगळ्या प्रश्नांचं सविस्तर उत्तर असणारा) आणि त्याचबरोबर, तुपेलिखित १२ पुस्तकांच्या कव्हर्सच्या झेरॉक्स प्रती, तुपेंची पाच छायाचित्रं आणि तुपेंना मिळालेल्या पारितोषकांची यादी रीडर्स डायजेस्टला पाठवून दिली. "Uttam Bandu Tupe – A flower from Cactus" असं त्या लेखाचं शीर्षक होतं.

लगेच २१ नोव्हेंबर १९९३ला त्यांचं दुसरं पत्र आलं. "I showed your article to one of our editors and she feels he (Tupe) does qualify for our Heros' section. But I want some more information... Next week I will send you my (some more) querries."

लगोलग २७ नोव्हेंबरला रीडर्स डायजेस्टचं तिसरं पत्र (नव्या १२ प्रश्नांचं) आलं. त्यातले काही प्रश्न जरा वेगळ्या शब्दांत पुनः विचारले होते. यांची मी सविस्तर उत्तरं आधीच पाठविली होती. फोनवरतीही बरीच माहिती त्यांना दिली होती. मी म्हटलं, ''पुन्हा पुन्हा तेच तेच काय विचारतायत ही माणसं?''

त्यावर खुलासा करणारं त्यांचं पत्र आलं. ''जरी प्रश्न repeat झाले असले तरी आपण पुन्हा माहिती द्यावी. हे सगळं आमच्या पद्धतीप्रमाणेच आहे. पाठवलेल्या सर्वच प्रश्नांची उत्तरं सविस्तर पाठवावी... "How Tupe struggled despite adverse circumstances and what he had done to help others... Many thanks for your efforts so far…"

कुठेतरी वाचल्याचं आठवलं,

What makes Reader's Digest the most successful magazine in publishing history?

उत्तर होतं,

Beneath the fun and excitement that fill our pages, we are above all else, a serious magazine. Our readers are serious people.


मी पुन्हा एकदा कंबर कसली.

पुन्हा तुपेंकडे, त्यांच्या प्रकाशकांकडे, मित्रमंडळींकडे, ऑफिसात वरिष्ठ ऑफिसर्सकडे आणि त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या सहकारी वर्गाकडे माझ्या चकरा नव्याने सुरू झाल्या.

आता तुपे स्वतःच मला जरा कंटाळलेले वाटले. त्यांनाही वाटलं असावं की एकाच लेखासाठी हा माणूस पुन्हा पुन्हा का एवढा त्रास देतो. मी त्यांना समजावून सांगितलं की हे रीडर्स डायजेस्टसारख्या प्रख्यात मासिकाकरिता आहे. आपण आपल्या परीने सहकार्य द्यावं. कसंबसं मी तुपेंचं मन वळवलं.

तुपेंच्या पुरालेखागार ऑफिसातल्या एक सहकारी स्त्रीने तर चिडून मला प्रश्न केला, ''तुपेंवर लेख लिहिण्याकरिता ही सगळी माहिती पाहिजे, की ही C.B.I. ची enquiry आहे?''

याच सुमारास माझा मुलगा अभय सुट्टीत दिल्लीहून पुण्याला आला. (आता तो तिकडे दिलिप पाडगावकरांबरोबर काम करत होता.) मी रीडर्स डायजेस्टकरिता Research Material गोळा करीत असल्याचं त्याला कळलं. तो मला सावध करीत म्हणाला, ''बाबा, जरा जपून. रीडर्स डायजेस्टची assignment म्हणजे भल्या भल्यांची कसोटी असते. तुम्ही पाठवलेली सर्व माहिती ते डोळ्यांत तेल घालून वाचतील. एकदा नाही, अनेकदा. मग Para by Para वाचतील. आणि मग Word by Word. कुठेही शंकेला जागा राहू देणार नाहीत. मग त्यांच्या दुसऱ्या Sources नी पुन्हा तुम्ही लिहिलेला मजकूर Counter Check करतील. लेखात एका शब्दाचा वापर ते शक्यतो दोन वेळा करत नाहीत! शिवाय लेखातला प्रत्येक अनावश्यक शब्द ते गाळत जातात. आणि समजा, हे सगळं केल्यानंतरही त्यांना थोडी जरी शंका आली, लेख छापण्याजोगा झालेला नाही असं किंचित जरी वाटलं तरी ते संपूर्ण लेख नाकारतील. तरी एक गोष्ट खरी, It is worth working for Reader's Digest. आपल्याला बरंच काही शिकायला मिळतं त्यांच्यासाठी काम करताना.''



**आपल्या झोपडपट्टीतील एका खोलीच्या घरात मध्यरात्र उलटून गेल्यावर लेखनाला बसलेले तुपे**

रीडर्स डायजेस्टसाठी काम करायचा अभयला स्वतःला पूर्वी अनुभव होता. खूप मेहनत घेऊन त्याने पाठवलेला लेख त्यांनी त्याच्याकडून पुन्हा पुन्हा लिहून घेतला. त्यांनी स्वतःही त्या लेखावर भरपूर मेहनत घेतली. पण एवढं सगळं करून त्यांनी अभयचा लेख छापला नाही तो नाहीच. (लेखाचं मानधन मात्र अभयला दिलं गेलं!)

मला त्यांचं एक विधान आठवलं.

"The Digest never loses sight of the fact that each day all of us confront a tough, challenging world. To millions who know our record of viewing this world, we are not a luxury; we are a necessity."

आता मीही जिद्द धरली. प्रामाणिकपणाने मी आपलं पुनर्लेखन पुढे चालू ठेवलं.

तुपे सकाळी ९ ते संध्याकाळी ५.३० पर्यंत ऑफिसात असतात. घरी येण्यास साडेसहा वाजतात. मग ते लिहितात तरी केव्हा? आणि कुठे? हा माझ्यासमोर मोठाच प्रश्न होता. रीडर्स डायजेस्टच्या प्रश्नावलीतही तो होता. लेखनाचं कार्य सुट्टीच्या दिवशीसुद्धा त्यांच्या झोपडपट्टीतल्या त्या खोलीत करणं रहदारीमुळे शक्य नव्हतं. ऑफिसमध्ये तर लेखन शक्यच नव्हतं. कारण

तुपेंच्या म्हणण्याप्रमाणे ''तिथे माझं सगळं लक्ष सतत वाजणाऱ्या साहेबांच्या घंटीकडे आणि फाईलचं ओझं आणणं आणि नेणं, याकडेच असतं!''

''मग?'' मी विचारलं.

''मग काय, लिहायचं तर होतंच. मी आणि माझ्या सौभाग्यवतींनी यावर तोडगा काढला. संध्याकाळी साडेसहा वाजता माझं जेवण तयार असतं. ऑफिसातून आल्याबरोबर मी कपडे बदलतो. हात, पाय धुऊन लगेच जेवण घेतो. जेवणानंतर लगेच साडेसातलाच झोपतो. ऑफिसच्या थकव्यामुळे मला चांगली गाढ झोप येते. आणि त्यानंतर मी रात्री बरोबर अकरा वाजता उठतो. या वेळेस आमच्या झोपडपट्टीभागातदेखील शांतता असते! रात्री अकरा ते पहाटे चारपर्यंत मी सलग आपलं लेखन करतो आणि चारच्या नंतर पुन्हा सहा वाजेपर्यंत दोन तास चांगली झोप घेतो.''

''...माझ्याजवळ अनुभवांचा साठा असल्याकारणाने माझं पेन भराभर चालतं. एकदा लिहिलं की ते माझं शेवटचंच लेखन असतं. (या विधानाला रीडर्स डायजेस्टवाल्यांनी अर्थातच खूप आक्षेप घेतले. सततचं पुनर्लेखन हे रीडर्स डायजेस्टच्या यशाचं एक मोठं रहस्य आहे. अशा प्रकारच्या पुनर्लेखनाशिवाय लेखनामध्ये परीपूर्णता येत नाही, यावर त्यांची अविचल श्रद्धा आहे.) मी माझ्या ग्रामीण बोलीभाषेत लिहितो. सकाळी सहाला उठून स्नान, नाश्ता आटपतो आणि जेवणाचा डबा घेऊन नऊ वाजता ऑफिस गाठतो.''

अशाप्रकारे तुपेंचं लेखन चालतं. या बाबतीत जिजाबाईंशीसुद्धा माझं बोलणं झालं आणि तुपेंच्या लेखक होण्यातील त्यांच्या सहभागाची मला पुरेपूर कल्पना आली. Behind every successful man there is a woman! तुपे स्वत: तिचा वाटा लगेच कबूल करतात.

रीडर्स डायजेस्टच्या प्रश्नांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न असाही होता की, ''लिखाणामुळे तुपेंच्या स्वत:च्या जीवनात, त्यांच्या स्वत:च्या वागण्यात किंवा लेखक म्हणून प्रसिद्ध झाल्यावरही चपरासी म्हणून काम करीत असताना लोकांच्या त्यांच्याकडे बघण्यात किंवा त्यांच्याशी वागण्यात काही फरक झाला काय?''

''नक्कीच!'' तुपे म्हणाले, ''मी माझ्या स्वत:मध्ये थोडं थोडं परिवर्तन किंवा सुधारणा नेहमीच करू इच्छितो. आज जो थोडाबहुत फरक मला जाणवतो त्याचा परिणाम माझ्या कुटुंबियांवरही झाला आहे. आमच्या सगळ्यांमध्ये एक प्रकारचा उत्साह निर्माण झाला आहे. आणि या उत्साहाचा माझ्या लेखनावरही चांगलाच परिणाम झालेला दिसतो.''

तुपेंचे शुभचिंतक डॉ. आनंद यादव म्हणतात, ''आपण एवढं निश्चितपणे मानलं पाहिजे की उत्तमसारखे अनेक अनघड कलावंत सध्याच्या सामाजिक संक्रमण-अवस्था काळात घडण्यासाठी धडपडत असतात. त्यांना घडण्यासाठी संधी उपलब्ध झाली नाही तर, ते तसेच काळाच्या पडद्याआड जातील. तेव्हा त्यांना कमीत कमी संधी उपलब्ध करून देण्याचं कार्य कलावंत म्हणून, रसिक म्हणून, जाणकार म्हणून आपल्यावर पडतं!''

तुपेंच्या पुणे पुरालेखागार कार्यालयात काम करणारे एक सहकारी – English Complier – श्री. मुन्नवर रियासत खान म्हणतात : ''मैं, उत्तम तुपे को करीबन २० सालसे जानता हूँ. ये काफी अच्छा लिखते है. यहाँ ऑफिस में इनका लिटरेचर करीबन सभी लोग पढ़ते हैं. प्यून होने के बावजूद ऑफिस के लोग इन्हें अच्छी रिसपेक्ट देते है. आगे भी इनका लिखाई का काम अच्छा चलता रहेगा; क्योंकि इनमें एक तडफ है. ऑफिस के लोगों के साथ अच्छा रुख है, क्योंकि इतना कम education होने के बावजूद ये इतने बड़े लेखक बन गये है. ये महज उनकी कोशीश की वजह से बन पाये है ।''

तुपे परिवारात जे परिवर्तन घडत होतं, त्याचं थोडंसं चित्र मलाही दिसलं. आमचं संभाषण टेप करताना 'राणा' शेपटी हलवत मुकाटपणे कोपऱ्यात बसायचा, जराही भुंकायचा नाही!

दोन्ही मुलं आणि सौ. तुपे अगत्याने माझी विचारपूस करीत. कधीही गेलं तरी ट्रेमध्ये चहा, बिस्किटं आणि तुपेंबद्दलच्या कात्रणांची फाईल माझ्यासमोर आणून ठेवत. झोपडपट्टीतील एका खोलीत बिऱ्हाड असूनसुद्धा सगळी भांडीकुंडी चकचकीत व नीटनेटकी लावलेली दिसायची. खोलीच्या एका कोपऱ्यात Black & White टीव्ही ठेवला होता. दारासमोरून येणारे-जाणारे ओळखीचे लोक आदराने नमस्कार करीत असत.

तुपेंकडे येणाऱ्या पत्रांची फाईलसुद्धा पाहायला मिळाली. त्यातली काही पत्रं मी Xerox करून घेतली. डायजेस्टकडे पाठविण्यासाठी.

त्यांच्यात सामाजिक समरसता मंच, ३०९ शनिवार पेठ, पुणे यांचं ११-११-१९९३चं एक पत्र होतं.

''आपले साहित्य व कला क्षेत्रातील योगदान सामाजिक समरसतेस मोठी चालना देणारे ठरले आहे. आपले कादंबरी, आत्मकथन, नाटक, कथा आदी स्वरूपांतील लिखाण जागृती निर्माण करणारे आहे. आम्हास कळविण्यास आनंद वाटतो की मंचाद्वारे नियुक्त केलेल्या समितीने या वर्षी रु. ५,०००/- सन्मानपूर्वक समरसता पुरस्कार म्हणून आपणास देण्याचा निर्णय घेतला आहे.

''आपणाकडून स्वीकृती मिळाल्यानंतर २८ नोव्हेंबर रोजी, म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथीनिमित्त हा पुरस्कारप्रदानाचा कार्यक्रम निश्चित करण्याचा मानस आहे.''

याचबरोबर तुपेंना आलेलं एक दुसरं पत्र होतं महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, यांचं १६ नोव्हेंबर १९९३चं. विषय होता – मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेतील पुस्तकांच्या हस्तलिखितांवर अभिप्राय देण्यास उत्तम बंडू तुपेंची संमती.

ही सगळी माहिती गोळा करून मी रीडर्स डायजेस्टच्या १२ प्रश्नांच्या उत्तरांबरोबर पुन्हा नवा सुधारित आठ पानी टाईप्ड लेख ८ डिसेंबरला पाठविला. सुटकेचा नि:श्वास सोडला.

१९९३ संपलं आणि नवीन वर्ष १९९४ सुरू झालं. मला अनेक शुभेच्छा कार्डं आली आणि वाटलं की आता या शुभेच्छांचं फळ मिळणार!

पण पुन्हा तिसरा झटका बसला! २३ मार्च १९९४ला रीडर्स डायजेस्टचं पुन्हा पत्र आलं :

"There are a few points on which we need a clearer perspective. I am putting down these questions with some querries..."

आता पुन्हा आणखी १४ प्रश्नांची उत्तरं त्यांना पाहिजे होती! पुन्हा माझ्या फेऱ्या सुरू झाल्या.

तुपे आता चांगलेच वैतागलेले दिसले, कारण त्यांच्या घरी ती माझी आठवी किंवा नववी खेप होती! मी त्यांना पुन्हा धीर देत म्हणालो, ''आपण हार मानता कामा नये.''

मला वाटतं तुपेंना माझी दया आली असावी! आमच्या पुन्हा दोन तीन बैठका झाल्या. या वेळच्या प्रश्नावलीत एक महत्त्वाचा प्रश्न मला जाणवला तो असा की, ''तुपेंच्या लेखनाला समाजाने किती आणि कसा प्रतिसाद दिला? आणि लेखनाशिवाय तुपेंनी समाजाकरिता काही कार्य केले का?''

याचं उत्तर होकारार्थी होतं. तुपेंच्या *भस्म* या कादंबरीवर आधारित पुरुषोत्तम बेर्डे यांनी ''भस्म'' याच नावाने एक चित्रपट काढला आणि या चित्रपटाची १९९५च्या मुंबईत सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात होणाऱ्या इंडियन पॅनोरमासाठी प्राथमिक फेरीत निवड झाली होती.

The Times of India च्या बातमीनुसार,

"The theme deals with a socially oppressed community called 'Masanjogi'. The film strongly projects the anti-superstition message."

मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब सरपोतदार, सेक्रेटरी श्रीमती स्मिता तळवलकर, निर्माते श्री. किरण शांताराम, श्री. विजय नेवाळकर, श्री. सतीश कुलकर्णी, दिग्दर्शक श्री. रामदास फुटाणे, श्री. संजय सूरकर, श्री. अमोल पालेकर, श्री. जयंत धर्माधिकारी आणि लेखक वसंत सबनीस या सगळ्यांनी *भस्म* चित्रपटाबद्दल बराच पुढाकार घेतला होता.

तुपे म्हणाले,

''माझ्या लिखाणामध्ये समाजातून अंधश्रद्धा जावी हेच तुम्हाला आढळेल. जे मी पाहतो तेच मी लिहितो. काल्पनिक मी कधी लिहित नाही. 'हुंडा' हा विषय एका भयाण राक्षसासारखा दिसतो. आज समाज विघटन करणारा हा प्रश्न होऊन बसला आहे. 'हुंडा' या प्रश्नाला कुठेतरी खीळ बसली पाहिजे असं मला मनापासून वाटतं, म्हणूनच मी 'हुंडा' नावाची कथा लिहिली.

''कोळ्यांबद्दल मी *जावळं* लिहिलं आहे. माझं *झुलवा* हे लेखन देवदासी प्रथेच्या विरुद्ध आहे. *झुलवा* लिहिण्यासाठी मी स्वत: वेषांतर करून या देवदासींबरोबर त्यांच्यातलाच एक म्हणून राहिलो होतो. जिच्यावर झुलवाची कथा घेतलेली आहे त्या जगनचं मीच एका चांगल्या तरुणाबरोबर लग्नही लावून दिलं व तिची या नरकातून सुटका केली. *भस्म* हे स्मशानजोगींवर आहे. माझी *चिपाड* नावाची कादंबरी आहे, ती सुशिक्षित बेकारांवर. एकूणच मी समाजाचा विचार करतो आणि मग लिहितो.''

सौ. जिजाबाई तुपेंच्या बोलण्यावरून कळलं की तुपेंनी दोन-तीन मुलींचं लग्न हुंडा न देता लावून दिले आहे.

आता मिळालेली ही सगळी माहिती पुन्हा व्यवस्थित टाईप करून ११ एप्रिल १९९४ला रीडर्स डायजेस्टला पाठवली. मात्र या माहितीबरोबर एक सांकेतिक ओळ अशीही लिहिली की आता आम्ही दोघं – तुपे आणि मी – केव्हा एकदाचा हा लेख छापून येणार याची आतुरतेनी वाट पाहात आहोत!

५ ऑगस्ट १९९४ला त्यांचं एक आशादायक पत्र आलं :

"The article on *Bhasma* will be useful for our article on Tupe. The item on *Devdasi* is very interesting. However, we may have to refer to other sources."

मी पुरविलेल्या तुपेंसंबंधीच्या सर्व माहितीवर रीडर्स डायजेस्टचं Counter Checking चाललंच होतं! अर्थात मला ते कधीच कळू नये याची दक्षता ते घेतच होते.

पुढे त्यांचं पत्र येणं जवळ जवळ थांबलं. पण मधूनमधून फोन यायचे आणि मागितलेल्या प्रश्नांची उत्तरं मी द्यायचो. अचानक १० नोव्हेंबरला १९९४ला रीडर्स डायजेस्टच्या असिस्टंट एडिटर शानू बिजलानींचा फोन आला. "I am in Pune tomorrow morning. We will go and meet Tupe."

मला एकदम प्रश्न पडला. विचार करू लागलो, माझ्या माहितीत कुठे काही चुकलं की काय? दुसऱ्या दिवशी मी श्रीमती बिजलानींना भेटलो आणि आम्ही दोघे तुपेंना भेटण्यासाठी त्यांच्या घराकडे निघालो! वाटेत मला जाणवलं की तुपेंच्या घराकडे कसं जायचं, कुठल्या रस्त्यावर कुठे वळायचं हे त्यांना ठाऊक आहे. मला नवल वाटलं. मी त्याबद्दल आश्चर्य व्यक्त करताच श्रीमती बिजलानींनी मला दुसरा धक्का दिला. ''मी काल पुण्यात आल्याबरोबर तुपेंच्या घरी जाऊन त्यांना भेटून आले! आज आपल्या भेटण्याची ही वेळही त्यांनीच दिली आहे.''

हळूहळू रीडर्स डायजेस्टच्या Counter Checkingची जाणीव होत गेली!

दारातच राणाने भुंकून आमचं स्वागत केलं. त्याचं भुंकणं ऐकून तुपे बाहेर आले. नमस्कार चमत्कार झाला. सौ. जिजाबाई तर बिजलानींशी असं बोलू लागल्या की जणू दोघींची जुनी ओळखच होती! काल काही वेळाच्या भेटीत त्यांचं बरंच बोलणं झालं असावं असा भास मला झाला. तुपेंची दोन्ही मुलं, विनोद आणि मिलिंद, आम्हाला नमस्कार करून बाहेर पडली. यानंतर बिजलानी-तुपे संवाद सुरू झाला. मध्ये दोनदा सौ. जिजाबाईंनी चहा आणि बिस्किटं आणून तुपेंना मिळालेली पारितोषिकं आणि तुपेंबद्दलच्या कात्रणांची फाईलही आमच्यापुढे ठेवली. आमच्या गप्पा सतत चार तास चालल्या. शेवटी बिजलानी जायला निघाल्या.

''असं कसं चाललात? जेवायची वेळ झाली आहे! जेवण करून जायचं. जेवण तयार आहे. तुम्ही हात धुवा, तितक्यात मी

पानं मांडते.'' सौ. जिजाबाईंनी हात जोडून बिजलानींना आग्रह केला. सतत चार तास ज्या वेळेस आमचं संभाषण चाललं होतं त्यावेळी सौ. जिजाबाई जेवण करीत असाव्यात, पण आम्हाला तसं काही त्यांनी जाणवू दिलं नव्हतं! जेवण गरमागरम, साधं पण स्वादिष्ट, आणि गोड खिरीसकट होतं.

परत येताना वाटेत बिजलानींनी रीडर्स डायजेस्टबद्दल थोडी माहिती मला दिली.

''लिखाण, लिखाणाचे विषय आणि व्यक्ती यांचा समतोल विचार करूनच आम्ही आमची सगळी माहिती, लेखांसह युनायटेड स्टेट्समधील Head Officeला पुरवतो. त्यांच्या OK शिवाय आम्ही काहीही छापत नाही.''

What is Reader's Digest? मधील एक वाक्य मला आठवलं. "Readers depend upon us for truth and accuracy, logic and common sense. Our stories come from the grit of human experience – the tough, the tender, the funny."

माझ्या माहितीत बरीच भर पडत गेली. २१ मार्च १९९५ला मला रीडर्स डायजेस्टचं दोन ओळींचं पत्र आलं... "We will need Tupe's colour photograph."

पण दोन ओळींच्या पत्राने मला केवढा आनंद झाला असेल याची कल्पनाच करावी! तुपेंचे रंगीत फोटो मी लगेच कुरीयरमार्फत पाठवून दिले.

२२ जून १९९५ला रीडर्स डायजेस्टच्या Research Editor श्रीमती ढापणे डिसोजांचं पत्र आलं :


"Tupe's article has been cleared by our Pleasantville, New York, Office and will appear in our August 1995 issue."

''भगवान भला करे सभी रीडर्स डायजेस्टवालोंका!'' माझ्या तोंडून उत्स्फूर्तपणे उद्गार निघाले. माझी दोन वर्षांची मेहनत फळाला आली होती.


शेवटी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. कारण माझी खात्री आहे की अनेकांना त्याबद्दल कुतूहल असेल. ती म्हणजे, या लेखाबद्दल मला किती पैसे मिळाले? मानधनाचा आकडा सांगणं अनुचित ठरेल. प्रत्यक्ष लेखाचं मानधन म्हणून, संशोधन करून गोळा केलेल्या माहितीबद्दल म्हणून, प्रवास-पोस्टेज वगैरे आनुषंगिक खर्चासाठी म्हणून आणि मी दिलेल्या फोटोंसाठी म्हणून अशा एकूण चार हेडिंग्जखाली मला मानधन दिलं गेलं.

घेतलेल्या श्रमांच्या मानाने हे मानधन फार प्रचंड वगैरे नक्कीच नव्हतं. पण मानधनाच्या रकमेपेक्षा रीडर्स डायजेस्टबरोबर काम करताना मला जे शिकता आलं, professional excellence म्हणजे काय हे जे पदोपदी जाणवलं, त्यामुळेच हा अनुभव लक्षात राहण्याजोगा ठरला.

*(छायाचित्रे : प्रेम वैद्य)*
*(सप्टेंबर १९९६)*




*जुलै २०१६ (चित्रकार अब्दुलरहीम आलमेलकर)*




*ऑक्टोबर २०१७, काव्यवाचन करताना विंदा करंदीकर*
*(छायाचित्र ल. म. कडू)*

# शेक्सपीअरची महानता

## के. रं. शिरवाडकर*

''शेक्सपीअरच्या कल्पनाशक्तीची अपूर्व किमया कशी शक्य झाली आणि कशी साध्य झाली हे कुणाला नीटसे कळले नाही आणि कळेलसे वाटत नाही. एवढे विपुल साहित्य लिहिणाऱ्या ह्या महाकवीने स्वत:च्या लिखाणाबद्दल एक शब्दही लिहू नये हे मोठेच आश्चर्य! नटाने रंगमंचावर घातलेली वेषभूषा जितक्या सहजपणे उतरून टाकावी तितक्या सहजपणे शेक्सपीअरने साहित्यभरणे दूर केली. आपल्या साहित्याबद्दल अथवा नाट्यानुभवाबद्दल तो कधीही बोलला नाही; अथवा त्याने त्याबद्दल कुठे लिहिले नाही.''

शेक्सपीअरचे मोठेपण वादातीत आहे ह्यात शंकाच नाही, पण त्याने आपल्याला नेमके काय दिले? तत्त्वज्ञान? नीती? संदेश? रंजन? प्रबोधन?

खरे तर ह्यांपैकी एकच एक असे काहीच नाही. तसे थोडेफार सगळेच दिले असेल पण ह्यांपैकी एखाद्या विशिष्ट गोष्टीसाठी शेक्सपीअर वाचा असे आपण कोणाला सांगणार नाही. शेक्सपीअरने जे दिले ते ह्यापेक्षा वेगळे आणि ह्या सर्वांपेक्षा फार मोलाचे आहे. पण ते काय आहे ते निश्चितपणे सांगता येत नाही आणि कुणाला कधी समाधानकारपणे सांगता येईल असे वाटत नाही.

शेक्सपीअरने दिले आहे ते जीवन; त्यातल्या विविधतेसह आणि सधनतेसह. त्याच्या साहित्यातील जीवनाचा हा महासागर आपल्या उदरातील प्रचंड सृष्टी घेऊन आपल्याकडे येतो आणि आपण तो पाहून स्तिमित होतो. टेनिसनचा युलिसेस म्हणतो,

I cannot rest from travel, I will drink
Life to the lees, All times, I have enjoy'd
Greatly, have suffered greatly, both with those
That loved me, and alone….
I have become a name
For always roaming with a hungry heart
Much I have seen and known, cities of men
And manners, climates, councils, governments
I am part of all that I have met

शेक्सपीअरची प्रतिभा असेच स्वगत म्हणत असेल; निदान या काव्यपंक्ती शेक्सपीअरच्या मुखातून स्वत:च्या साहित्यसर्जनाची प्रेरणा म्हणून शोभून दिसतात. युलिसेस अव्याहत फिरत होता भौगोलिक सागरावर, तर शेक्सपीअर मानव जीवनाच्या महासागरावर. शेक्सपीअर वाचताना अनुभवांच्या राशी आपल्यासमोर उभ्या राहतात. 'तिळा उघड' म्हणून आपण ह्या गुहेत प्रवेश करतो आणि ज्या वेळी परततो त्या वेळी समृद्ध मनाने पण भयचकित होऊन! ह्या गुहेत रत्ने पाहिलीत, कोळसे पाहिलीत, सर्प पाहिलेत, देवदूत भेटलेत, सैतानाला सामोरे गेलोत, कोकिळा ऐकल्यात, कावळे उडताना दिसलेत, किडे-कीटक होते तसे दिनोसारही होते, येथे मांगल्य आणि मलीनता, दुष्टता आणि सुष्टता, धैर्य आणि भेकडपणा, विश्वास आणि विश्वासघात, पाप आणि पुण्य ह्या साऱ्यांचीच जाण आली. तेही एकमेकांत गुंतलेले, अडकलेले आणि कधीकधी एकामुळे दुसरे निर्माण झालेले.

शेक्सपीअरच्या कल्पनाशक्तीची अपूर्व किमया कशी शक्य झाली आणि कशी साध्य झाली हे कुणाला नीटसे कळले नाही आणि कळेलसे वाटत नाही. एवढे विपुल साहित्य लिहिणाऱ्या ह्या महाकवीने स्वत:च्या लिखाणाबद्दल एक शब्दही लिहू नये हे मोठेच आश्चर्य! नटाने रंगमंचावर घातलेली वेषभूषा जितक्या सहजपणे उतरून टाकावी तितक्या सहजपणे शेक्सपीअरने साहित्यभरणे दूर केली. आपल्या साहित्याबद्दल अथवा नाट्यानुभवाबद्दल तो कधीही बोलला नाही; अथवा त्याने त्याबद्दल कुठे लिहिले नाही. एवढेच नव्हे तर गजबजलेल्या रंगभूमीचे मध्यवर्ती केंद्र असूनही आणि तीवर नाटककारांचे कडाडून वाद चालू असतानाही त्याने दुसऱ्या कुणाबद्दल अवाक्षरही काढले नाही. ह्याचा अर्थ असा होतो का की शेक्सपीअरने आपले लिखाण अगदी अलिप्ततेने केले? शेक्सपीअरच्या जीवनात एक विलक्षण अलिप्तता होती हे जितके खरे तितकेच त्याच्या साहित्यात विलक्षण सामीलकी होती हेही खरे. तो स्वत:ला दुरावला आणि जीवनात मिसळून गेला; जीवनाशी एकरूप झाला. हातात लेखणी घेतली तेव्हा तो स्वत:चा उरला नाही आणि लेखणी ठेवली तेव्हा तो साहित्याचा उरला नाही.

शेक्सपीअरच्या नाट्याने रंग काळानुसार बदलत गेले. त्याच्या अभिव्यक्तीवरही बदलत्या काळाच्या छटा उमटत गेल्या.

* तात्यासाहेब शिरवाडकरांचे बंधू प्रा. के. रं. शिरवाडकर हे नांदेड येथील पीपल्स कॉलेजचे प्राचार्य व नंतर पुणे विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक होते.

त्याचे साहित्य म्हणजे सारस्वताचे झाड. त्याची पाळेमुळे वास्तवात खोलवर गेली होती आणि वातावरणातील वाऱ्यावादळाचेही त्याच्यावर परिणाम होत होते. सुरुवातीच्या नाटकांत सीमित व्यक्तिगत जीवनाचे सूर लागले होते पण भोवतालच्या समाजजीवनातील आनंदाची पार्श्वभूमीही होती. हळूहळू जीवनाचे रंग पालटू लागले. छोट्या-मोठ्या वर्तुळांतून निराशेचे प्रतिध्वनी उमटू लागले. वाढत्या वयाबरोबर आणि वाढत्या जाणिवांबरोबर खोलवर जाणारी परंतु पुष्कळ वेळा क्लेशदायक ठरणारी अंतर्दृष्टी येऊ लागली. नैतिक समस्यांचे ताण जाणवू लागले. सतराव्या शतकाच्या शेवटी राष्ट्राला जाणवणारी नैतिक अवनती आणि सार्वत्रिक निराशा शेक्सपीअरच्या संवेदनशील मनात प्रतिध्वनित होत होती. ह्या काळातच त्याने तीन समस्याप्रधान नाटके किंवा डार्क ट्रॅजेडीज लिहिल्या. भोवताली दिसणारा सांस्कृतिक अध:पात आणि त्यामुळे जाणवणारी निराशा प्रस्तुत नाटकांना गडद रंग देऊन गेली.

Man, Proud man, plays such fantastic tricks,
Before high heaven, as would make the angels weep.

हे उद्‌गार माणसाच्या नैतिक वर्तनाबद्दलच्या अविश्वासाचे द्योतकच आहेत. शेक्सपीअरची जीवनदृष्टी काळाशी एकरूप झालेली होती; किंबहुना तत्कालीन काळाशी विविध सूर पकडून शेक्सपीअरने आपली बंदिश सादर केली असे म्हणावयाला हरकत नाही. चार शोकात्मिकांमध्ये माणसांच्या क्लेशाचा त्याने विचार केला. 'किंग लिअर'मध्ये तर मानवी दु:खाची परिसीमा गाठली आहे. शेवटच्या नाटकात रोमान्सेसमध्ये प्रेमाच्या विधायकतेची शेक्सपीअरला तीव्रतेने जाणीव झालेली दिसते. भोवताली घडणाऱ्या घटना त्याच्या संवेदनांना रूप देत होत्या, पण ह्या घटनांनी निर्माण केलेल्या नैतिक तणावांवर तो नैतिक समाधान (Moral Solution) शोधत होता आणि ते दृष्टीपथात आले ते शेवटच्या नाटकात – 'टेंपेस्ट'मध्ये.

शेक्सपीअरच्या नाटकांतील रूपाला (फॉर्मला) पुष्कळ वेळा तत्कालीन साहित्यिक परंपरांचा हातभार लागलेला आहे. त्याला यशस्वी नाटके लिहावयाची होती म्हणून लोकाभिरुचीच्या नाडीवर बोट ठेवून लिखाण करणे त्याला आवश्यक होते आणि आवडतही होते. रंजनात्मक नाटके आवडतील तर तो रंजनात्मक नाटके लिहित होता, ऐतिहासिक नाटकांची मागणी असेल तर तशी नाटके, शोकांतिका लोकप्रिय होत असतील तर शोकांतिका, अशी त्याची लेखनपद्धती होती. छोट्या नाट्यगृहांसाठी संगीतप्रधान नाटक, खुल्या नाट्यगृहांसाठी व्यक्तिरेखनप्रधान नाटक असाही हा हिशोब होता. शक्यता ही आहे की निवडलेला नमुना अथवा प्रकार त्याच्या जीवनदृष्टीला चटकन वेगळा आकार देत होता. शोकान्तिकेच्या रूपाने काही गहर गंभीर नैतिक समस्यांची जीवघेणी जाणीव होऊ लागली तर संगीतप्रधान नाटकांच्या उभारणीत ख्रिश्चन धर्मदृष्टीला जवळ असलेले प्रेमाधारित स्वप्न फुलू लागले. कोठल्याही महान कलावंताप्रमाणेच शेक्सपीअरच्या कल्पनाशक्तीत रूप आणि आशय एकमेकांवर सर्जनशील प्रभाव टाकत होते. जीवनदृष्टी विशिष्ट रूपाची निवड करीत होती आणि रूप-कल्पना जीवनदृष्टी साकारीत होती. तसे नसते तर शेक्सपीअरच्या हातून वेगवेगळे नाट्यप्रकार हाताळले गेले नसते आणि एकदा हाताळलेल्या प्रकाराकडे तो पुन्हा वळला नाही असे झालेही नसते.

शेक्सपीअरच्या प्रश्नातीत मोठेपणाचे मानदंड सतत बदलत गेले असे शेक्सपीअर समीक्षेचा इतिहास सांगतो. एक काळ शेक्सपीअरच्या कथा मोठ्या आकर्षक वाटत होत्या. पण खरे तर त्याच्या ३६-३७ नाटकांच्या कथा सर्वस्वी त्याच्या नाहीत. कालिदास, भवभूती, सॉफोक्लिस्, किंवा युरोपाइडिस या नाटककारांप्रमाणेच त्याने उपलब्ध कथांनाच नाट्यस्वरूप दिले आहे. १९व्या शतकात शेक्सपीअरचे संविधानक रचनाचातुर्य वाखाणले गेले. पण कितीतरी नाटककारांनी, विशेषत: गेल्या दोन शतकांत, अतिशय सुव्यवस्थित आणि सुविहित संविधानके सादर केली आहेत असा नाट्यांचा इतिहास सांगतो. १९व्या शतकाच्या सुरुवातीस शेक्सपीअरची स्वभावरेखनाबद्दल प्रशंसा झाली. त्याच्या काही स्वभावरेखनात कणन्‌कण वास्तवता आढळली तर काहींमध्ये विराट नैतिकता दिसली. काही व्यक्ती मानसशास्त्रीयदृष्ट्या जटिल वाटल्या, तर काही राजकीयदृष्ट्या चाणाक्ष वाटल्या. पण व्यक्तिरेखन हे स्वयमेव थोडेच महत्त्वाचे असते? नाटक म्हणजे पोर्ट्रेट पेंटिंग नव्हे. नाटकातील व्यक्ती एका नाट्यानुभूतीची घटक म्हणूनच आपल्यापुढे येते. तेव्हा केवळ स्वभावरेखनामुळे शेक्सपीअरचे अथवा कुणाही नाटककाराचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे कठीण आहे. म्हणून शेक्सपीअरच्या मोठेपणाचा शोध इतरत्र घेणेच आवश्यक होते.

✦
शेक्सपीअरच्या नाटकांतील मानवी जीवनाचे दर्शन अत्यंत मनोवेधक आहे. त्यात विलक्षण विविधता आहे, वैपुल्य आहे ह्यात शंकाच नाही. ह्या बाबतीत 'महाभारत' सोडल्यास शेक्सपीअरची बरोबरी इतर कुणी करू शकेल असे वाटत नाही.
✦

शेक्सपीअरच्या नाटकांतील मानवी जीवनाचे दर्शन अत्यंत मनोवेधक आहे. त्यात विलक्षण विविधता आहे, वैपुल्य आहे ह्यात शंकाच नाही. ह्या बाबतीत 'महाभारत' सोडल्यास शेक्सपीअरची बरोबरी इतर कुणी करू शकेल असे वाटत नाही. प्रीतीच्या ज्वालेत पतंगासारखी झेप घेणारा भावनाप्रधान तरुण रोमिओ, लोभीपणाची परिसीमा सहजपणे गाठणारा निर्दय शायलॉक, हास्याचे भुईनळे उडविणारा फॉलस्टाफ. क्रूरकर्मा तिसरा रिचर्ड, लाजरी बुजरी मिरांडा, खोडकर खेळकर रोझॅलिंड, बुद्धिमान पोर्शिया, तत्त्वनिष्ठेत हरवलेला ब्रुट्स आणि वासनेत हरवलेला अँटनी, दवबिंदूसारखी स्वच्छ, निरागस डेस्डिमोना तर फेसाळलेल्या मादक मदिरेसारखी क्लिओपात्रा, जीवनाच्या गुंतागुंतीने अगतिक झालेला हॅम्लेट, महत्त्वाकांक्षेच्या अफाट गतीने जीवनपथावर फरफटत जाणारा मॅकबेथ, कृतघ्नतेच्या आघाताने वेडा झालेला अहंकारी राजा लिअर! शेक्सपिअरचे नाट्यविश्व

किती सुष्ट, दुष्ट, मंगल, अमंगल, ध्येयवादी, विश्वासू, विश्वासघातकी, धार्मिक, नीतिमान, व्यवहारी, ढोंगी, प्रेमळ, ज्ञानी, अज्ञानी, लोकांनी भरलेले आहे! Here is God's plenty! (इथे आहे ईश्वरनिर्मित विपुलता!)

पण शेक्सपीअरच्या नाटकांत मानवी जीवनाचे दर्शन म्हणजे स्थिर चित्रण नाही. रंगभूमीवर आपल्यासमोरच धागे विणले जातात, गाठी पडतात, सुटतात अथवा तुटतात. जीवन उभे राहाते. ते कधी स्थिर होते तर कधी नष्ट. शेक्सपीअरचे विश्व विविध माणसांनी आणि माणसांच्या विविध वर्तनांनी गजबजले आहे. त्यांच्या अपेक्षित आणि अनपेक्षित वागण्यातून परस्परसंबंधांना नाट्यमय कलाटण्या मिळतात हेही खरे आहे. पण शेक्सपीअर केवळ मानवी स्वभावाच्या दर्शनावर अवलंबून राहात नाही. मानवी जीवन म्हणजे भोवतालच्या परिस्थितीशी येणाऱ्या संबंधांचे फलित. परिस्थितीच्या प्रवाहातील माणूस हा शेक्सपीअरच्या नाटकाचा विषय. म्हणूनच शेक्सपीअरचे नाटक असंख्य नाट्यमय प्रसंगांचे अविस्मरणीय भांडार झाले आहे.

उदाहरणार्थ, 'मर्चंट ऑफ व्हेनिस'मधील खटल्याचा प्रसंग. त्यामधील शॉयलॉकची निर्दश हुशारी व हजरजबाबीपणा, सूड घेण्याची जिद्द आणि ह्या सर्वांना तोडीस तोड म्हणून पुढे येणारी पोर्शियाची अचाट बुद्धिमत्ता, शॉयलॉकला स्वत:च्याच जाळ्यात पकडण्याची तिची विलक्षण हुशारी आणि त्याने दया दाखवावी म्हणून केलेले 'The Quality of Mercy'... हे भाषण – हा सारा प्रसंगच मुळी अविस्मरणीय झाला आहे.

ज्युलिअस सीझर हेसुद्धा अशाच अविस्मरणीय प्रसंगांनी भरलेले एक नाटक. सीझरवर प्राणसंकट येणार म्हणून त्याने सिनेट सभेला जाऊ नये असे त्याची पत्नी त्याला विनवते. तेव्हा सीझरचे आत्मविश्वासाने भरलेले उत्तर, प्रत्यक्ष सिनेटमधे झालेला त्याचा वध, ब्रूट्सने केलेल्या वारानंतरचे सीझरचे व्यथित उद्‌गार, त्याच्या वधानंतर ब्रूट्स आणि अँटनी ह्यांची अंत्यसंस्काराची भाषणे... हे सगळे पाहताना आणि ऐकताना मन नेहमी संवेदनाशक्तीच्या टोकावर टांगलेले असते. प्रत्येक प्रसंग म्हणजे माणसाची इच्छाशक्ती आणि भोवतालची परिस्थिती ह्यांच्यामधील प्रभुत्वासाठी होणारा संघर्ष.

हॅम्लेटची सुरुवातच मोठी वेधक आहे. Not a mouse stirring अशी भयाण रात्र, एलिनॉर किल्ल्यावर होरेशिओ आणि दोघे सहकारी पहाऱ्यावर आहेत. आदल्या दिवशी दोघांनी हॅम्लेटच्या वडिलांसारखेच दिसणारे पिशाच्च भटकताना पाहिले आहे, पण होरेशिओचा असल्या भाकड कथांवर विश्वास नाही. तेवढ्यात पिशाच्च पुन्हा येते-जाते. होरॅशिओसकट सगळे स्तिमित होतात. डेन्मार्कच्या परिस्थितीबद्दल ते बोलतात आणि पिशाच्च पुन्हा येते. वास्तवशक्ती आणि वास्तवातीत शक्ती दोन्ही मिळून माणसांच्या जगात भोवरे निर्माण करायला लागतात आणि आपली खात्री होते की, एक तुफान येऊ घातले आहे.

जेव्हा जेव्हा प्रसंग अत्यंत नाट्यपूर्ण असतो तेव्हा तेव्हा शेक्सपीअरचे काव्य अतिशय उत्कट होते. ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ऑथेल्लोच्या शेवटच्या अंकातील डेस्डिमोनाच्या वधाचे दृश्य (अंक ५, दृश्य २) डेस्डिमोनाचा वध करण्यासाठी मध्यरात्री ऑथेल्लो सभागृहात येतो, ती निरागस स्त्री गाढ झोपलेली. जवळ मेणबत्ती जळते आहे. खिडकीतून आकाशात चमकणाऱ्या तारका दिसत आहेत. ऑथेल्ला म्हणतो,

It is the cause, it is the cause, my soul;
Let me not name it to you, you chaste stars,
It is the Cause....
Put out the light and then put out the light....

तिची जीवनज्योत मालविण्याचा निर्णय, 'त्या' कारणाचा उल्लेख, पण निष्कलंक, शुद्ध (chaste) चांदण्यापाशी त्याचा नामनिर्देशही नको. आपल्या आत्म्याला पटविण्याची पाळी, हातातील ज्योत आणि शय्येतील जीवनज्योत ह्यांची तुलना... सारे भोवळून टाकणारे!

किंग लिअरच्या शेवटच्या अंकात तर आपण अश्रूंच्या सरितेपाशीच (vale of tears) येऊन पोहोचतो. लिअर आणि कॉर्डेलियाची भेट, मितभाषी कॉर्डेलियाचे प्रेमळ शब्द, दोघांचे कैद होणे, लिअरचे No, no, no, no, Lets away to prison... हे लहान मुलासारखे उद्‌गार, कॉर्डेलियाचा वध आणि लिअरचे (ब्रॅडलेच्या शब्दांत) काव्याच्या अत्युच्च शिखरावर (Peak of poetry) नेणारे उद्‌गार :

No, no life!
Why should a dog, a horse, a rat have life;
And thou no breath at all? Thou'll come no more
Never, never, never, never, never!
Pray you undo this button –

लिअर मनावरील दु:खाच्या प्रचंड मानसिक तणावाला, छातीवरील कोटाची बटणे मोकळी करून शारीरिक पातळीवर दु:खाचा परिहार शोधतो. त्याच्या शेवटच्या शब्दांत विराटता, कारुण्य, शोकात्मता, वैफल्य अशा विविध भावांचे हृदयस्पर्शी मिश्रण झालेले आहे आणि साध्या परंतु परिणामकारक शब्दांत शेक्सपीअरने ते पकडले आहे.

पण वातावरणाला काव्याने रेखीवपणे शब्दांकित करण्याचे अलौकिक सामर्थ्य जागोजागी दिसते ते मॅकबेथमध्ये. ह्या नाटकाचे सामर्थ्य नैतिक समस्येच्या विवरणात अथवा महत्त्वपूर्ण आशयापेक्षाही वातावरणनिर्मितीत आहे. भयप्रद गूढतेचे दाट धुके साऱ्या नाटकाला गुंडाळून टाकते. सारी कृती अंधाऱ्या वातावरणात घडते. (सबंध नाटकात फक्त दोन वेळा सूर्यप्रकाश आहे.) मध्यरात्रीचा किर्र अंधार, घनदाट अरण्य, भुते, चेटकिणी, चीत्कार करणारी घुबडे आणि वटवाघुळे ह्या साऱ्यांनी सृष्टीचा ताबा घेतला आहे आणि माणसांनीही त्यांच्या मार्गदर्शनाचा स्वीकार केला आहे. पावलोपावली हादरून टाकणारे प्रसंग तितक्याच हादरून सोडणाऱ्या शब्दांतून उभे राहतात.

पाचव्या अंकातील पहिले दृष्य : लेडी मॅकबेथ हातात मशाल (taper) घेऊन झोपेतच चालत येते. ती स्वत:शीच बोलते :

Hell is murky – Fie, my lord, fie! A soldier and afeared?

What need fear who knows it, when no one can call our power to account? Yet who would have thought that the old man can have had so much blood in him?

(नरक आहे काळा धूसर.... छी:, महाराज छी:, शिपाईगडी आणि घाबरता? कुणाला कळले तरी भ्यायचं काय कारण? आपल्या सत्तेला कोण जाब विचारणार? ...तरी म्हाताऱ्याच्या शरीरात एवढं रक्त असेल ह्याची कुणी कल्पना केली असती!)

आणि ती पुढे म्हणते :

Here is the smell of the blood still; all the perfumes of Arabia will not sweeten this hand. Oh! Oh! Oh!

(अजून हा रक्ताचा वास; अरेबियाची सारी अत्तरं ह्या हाताला सुगंधी करू शकणार नाहीत...)

लेडी मॅकबेथ मध्यरात्री झोपेत चालत येते ती एक मशाल घेऊन. खुनानंतर तिच्याजवळ सतत उजेड असला पाहिजे अशी तिची आज्ञा होती. ती येते हात पुसत कारण डंकनच्या रक्ताचे हातावर डाग आहेत असा तिला भास होत असतो. झोपेत नेणिवेत दडपलेली पिशाच्चे जागी होतात आणि तिला चालवतात, बोलते करतात. झोपेने जागृतीवर मात केली आहे आणि सद्सद्विवेकबुद्धीच्या थडग्यात कोंबलेली पिशाच्चे नाचू लागली आहेत. सारेच भेसूर, भयंकर!

शेक्सपीअरचे जग म्हणजे स्थिर-चित्रण नाही आणि त्यातील माणसे केवळ सद्‌गुणांचे किंवा केवळ दुर्गुणांचे ढोबळ पुतळे नाहीत. येथे माणसे जन्माला येतात, वाढतात, जगतात, कधी एकमेकांना आधार देतात तर कधी एकमेकांचा नाश करतात. कुणी प्रेमाने तर कुणी द्वेषाने भारलेले आहेत, कुणी स्वार्थी तर कुणी त्यागी. सगळे एकमेकांत अडकलेले. साऱ्या जीवनाला कधी सुखाच्या स्वार्थाकडे नेणारे तर कधी संपूर्ण विनाशाकडे. यात्रेचा शेवट होतो कधी प्रेमपूर्तीत तर कधी मृत्यूत!

शेक्सपीअरची कथानके, त्याची संविधानके, नाटकातील स्वभावरेखन ह्या आणि इतर अनेक कलात्मक घटकांनी त्याचे नाट्यवैभव सिद्ध झाले आहे. पण ह्या सर्वांना सामावून घेणारी एक विलक्षण शक्ती म्हणजे त्याची कविता. मला वाटते शेक्सपीअरचे अंतिम सामर्थ्य आहे ते त्याच्या काव्यात. नाटक आपण पाहातो, नाट्यगृहात तीन-चार तास मुग्ध होऊन बसतो, पण नंतर... नंतर काय स्मरणात राहाते? पाच अंकांचे आणि हजारो ओळींचे नाटक नाही. कथानक अस्पष्ट होते, संविधानकांची चतुराई विसरून जाते, पात्रे आणि प्रसंगही स्मृतिपटलावर पुसट होतात.

शेक्सपीअर लक्षावधी लोकांच्या मनात घर करून बसला आहे तो त्याच्या अद्वितीय कवितेमुळे आणि ही कवितारती त्याच्या नाट्यवैभवाचा मुकुट आहे. रंगमंदिरातून आपण बाहेर पडतो आणि आपल्या आयुष्यात परततो, आपल्या जगण्यात परततो. नाटक रंगमंदिरात राहते, किंवा पुस्तकात राहते, पण जगता जगता जी मनात घुमत राहाते ती त्याची कविता. ह्या नाटकातल्या दोन ओळी, त्या नाटकातील चार ओळी, ज्युलिएटचा प्रेमालाप, अँटनीचे भाषण, हॅम्लेटचे स्वगत, लिअरची शापवाणी, प्रॉस्पेरोचे भाष्य... जीवनात ठेचा खाल्ल्या किंवा आनंद झाला म्हणजे, सतारीच्या तारांवर आघात होताच त्या झंकारून उठतात, तशा ह्या ओळी आपल्या मनात झंकारतात.

आयुष्याचा प्रवास शेवटी एकाकी असतो, अगदी एकाकी. पण ह्या एकाकी प्रवासातही कधीकधी अदृश्य सोबत मिळते कवितेची. ती छायेसारखी आपल्याबरोबर राहाते आणि आपल्याला सोबत करते, आपल्याशी बोलते, आपल्याला दिलासा देते. आयुष्याच्या अंधारात आपल्या प्रकाशाने चमकणाऱ्या ह्या तारका — त्यांच्याकडून प्रकाश मिळो न मिळो, आधार मिळतो. शेक्सपीअरचे योगदान ह्या दृष्टीने मोठे आहे.

त्याच्या काव्यातील झपाटणाऱ्या (haunting) काव्यपंक्तींच्या मोजदाद करणे अशक्य आहे. बर्नार्ड शॉच्या मते* शेक्सपीअरची श्रेष्ठता त्याच्या शब्दांतील संगीतामध्ये (word music) आहे. आपणा भारतीयांना हे पटणार नाही, कारण शब्दातील संगीतमयता सर्रासपणे आपल्याला कळणार नाही. तरीपण आपणा ह्या कवितेने मोहित होतो, ह्या कवितेत यथार्थ संगीत रिघत असते हे मात्र नि:संशय. ते पाहिजे तेव्हा मधुर होते, पाहिजे तेव्हा गूढ अथवा भयप्रद.

मर्चन्ट ऑफ व्हेनिसमधील लॉरेन्झच्या पुढील ओळी सुखद आणि मधुर वाटतात :

How sweet the moonlight sleeps on the bank!
Here will we sit and let the sounds of music
Creep in our ears, soft stillness and the night
Become the touches of sweet harmony

उलट लेडी मॅकबेथ नवऱ्याला राजाचा खून करण्यासाठी प्रवृत्त करताना सांगते की अशा वेळी मी तर काहीही केले असते, अगदी निर्भयपणे, निर्दयपणे :

I have give suck and know
How tender it is to love the babe that milks me;
I would, while it was smiling in my face
Have plucked my nipple from his boneless gums,
And dashed the braine out.

आणि हे वाचताना मातृत्वाच्या पवित्र भावनेची होळी करणाऱ्या भयंकर उद्‌गारांनी धक्काच बसतो — कधीही न विसरणारा.

---

* शॉला अभिप्रेत असलेले शब्दांतील संगीत आणि नाटकात सरळपणे संगीत आणणारी गाणी ह्या वेगळ्या गोष्टी आहेत. शेक्सपीअरच्या नाटकांतील गाणी हा विवेचनाचा स्वतंत्र विषय आहे. एवढे मात्र नमूद करण्यास हरकत नाही की ही गाणी नाटकातल्या एकूण भाववृत्तीशी इतकी समरस झालेली असतात की त्यामधून नाटकाचा किंवा त्यामधील महत्त्वाच्या भागाचा सारांशच प्रतिध्वनित होतो.

आपल्या मनात घर करून बसतात असल्या आपल्या जीवनाशी संबद्ध असलेल्या काव्यपंक्ती.

हॅम्लेटची स्वगते अशीच आपल्या भावनाविश्वातील ध्वनी प्रतिध्वनित करणारी ठरतात. हॅम्लेटच्या प्रसिद्ध To Be or not to be… ह्या स्वगतात शेक्सपीअरने आयुष्याची एक महत्त्वाची समस्या पकडण्याचा प्रयत्न केला आहे. असावे की नसावे? जगावे की मरावे? खवळलेल्या दैवाचे आघात धैर्याने, शांतपणे सोसावेत का हाती शस्त्र घेऊन अरिष्टांशी लढावे आणि लढता लढता संपावे? प्रश्नांचा उच्चारच मुळी समाधान देणारा आहे; त्यांचे उत्तर कदाचित तसे नसेलही. पण दुर्दैवाचे प्रत्याघात पडू लागले म्हणजे भिंतीला पाठ देऊन ते झेलताना आपल्या मनात शब्द घुमतात : Whether it is nobler in mind to suffer... त्यासाठी राजपुत्र हॅम्लेट थोडेच असायला पाहिजे, काका खुनी थोडाच असायला पाहिजे! शेवटी कथा, प्रसंग, व्यक्ती कवितेतून गळून पडतात आणि उरते काव्यात साकार झालेले निखळ भाव आणि अनुभूती. आत्महत्येच्या दरवाजापाशी आलेला, जीवनातील रस हरवून बसलेला हॅम्लेट म्हणतो :

O, that this too solid flesh would melt
Thaw and resolve itself into dew!
O God! O God!
How weary, stale, flat and unprofitable
Seem to me all the uses of this world.

ह्या केवळ हताशतेनेच तो आपल्याला मित्रासारखाच वाटतो. कारण ती निराशा केवळ हॅम्लेटची नसते. ती असते आपल्या सर्वांची.

हॅम्लेटच्या शोककथेचा शेवट हृदयाचा ठाव घेणारा आहे. तो मित्राला म्हणतो :

O good Horatio, What a wounded name,
Things standing thus unknown, shall leave behind me…
O I die Horatio
….the rest is silence.

जगताजगता जीवनाचा गुंताच इतका कठीण होतो; तो सुटता सुटत नाही. माणसे एकमेकांना समजून घेऊ शकत नाहीत; घेऊ लागता लागता आयुष्य संपायचीच वेळ येते. आणि मागे राहते ती लांच्छित आठवण! खरे तरी ही वेदना केवळ हॅम्लेटची नाही. ती वेदना आहे अवघ्या जीवनाची, जगण्याच्या प्रयासाची, माणसाच्या प्राक्तनाची.

शेक्सपीअरच्या हॅम्लेट, ऑथेल्लो, किंग लिअर, मॅकबेथ आणि अँटनी अ‍ॅण्ड क्लिओपाट्रा ह्या पाच शोकांतिकांत शेक्सपीअरच्या काव्याचे अतुलनीय वैभव विशेष करून सापडते. जीवनाचे अनेक गहन, गूढ तणाव काव्यात पसरले आहेत. भाषा आणि भावना एकरूप झाल्या आहेत आणि आविष्कारांचे स्वरूप स्तिमित करणारे आहे.

मॅकबेथ नाटकातल्या काही ओळी ऐकल्या म्हणजे आपण आश्चर्याने थक्कच होतो. नुसते शब्द तरी किती भारदस्त : Vaulting ambition, imperial theme, multitudinous seas incarnandine… घरी पाव्हणा म्हणून आलेल्या आणि पूर्ण विश्वासाने राहिलेल्या राजाचा खून करण्याचे ठरविले तरी मॅकबेथची मानसिक तयारी होत नाही. तो म्हणतो :

If it were done when it's done, then it were well.
It were done quickly. If the assassination
Could trammel up the consequences, and catch
With his surcease, success; that but this blow
Might be the be-all and end-all here.

या उद्गारांतील विराटता प्रसंगाच्या, भावनेच्या विलक्षणपणाला साजेशीच आहे. विश्वातील एक प्रचंड शक्तीच प्रवासाच्या विचित्र वळणावर चिंतन करते आहे असा भास होतो.

असाच आणखी एक, शेक्सपीअरच्या वाचकाला परिचित प्रसंग. मॅकबेथची पत्नी वारल्याची बातमी मॅकबेथच्या कानावर घालण्यात येते. जीवनाच्या तुफान संघर्षात गुंतलेल्या मॅकबेथला दुःख करायलाही फुरसद नाही. तो म्हणतो :

She would have died hereafter;
There would have been a time for such a word,
Tomorrow, and tomorrow and tomorrow,
Creeps in this petty pace from day to day.
To the last syllable of recorded time;
And all our yesterdays have lighted fools
The way to dusty death. Out, out brief candle!
Life's but a walking shadow; a poor player,
That struts and frets his hour upon the stage
And then is heard no more; it is a tale
Told by an idiot, full of sound and funy,
Signifying nothing.

ही एक रूपकांची शर्यत, प्रतिमांची घोडदौड. Out, out brief candle! मेणबत्तीची शान तिच्या ज्योतीत असते हे खरे. ज्योत तिचा केवळ एक भाग आहे. पण तिची निर्मिती असलेली ज्योत सारी मेणबत्तीच गिळून टाकते. शानदार महत्त्वाकांक्षा – जी आयुष्याचा केवळ एक भाग असू शकते – ती मॅकबेथचे सारे जीवनच गिळून टाकते आहे. ती संपेल तेव्हा संपेल, नव्हे संपत आलीच आहे. Out, out brief candle! प्रचंड अर्थ थोडक्या शब्दांत ठासून भरण्याचे शेक्सपीअरचे सामर्थ्य थक्क करणारे आहे.

पुढे मॅकबेथ म्हणतो : उद्या, उद्या आणि उद्या दरदिनांच्या (day to day) अंतरात सरपटत जातात आणि आपले सर्व काल (all our yesterdays) मूर्खांना मरण्याच्या मार्गावर प्रकाश दाखवितात. सगळा काळ म्हणजे एक विसंगती, एक अर्थशून्यता!

पुढील ओळींत तीन प्रतिमा आल्या आहेत. त्यात प्रचंड निराशावाद साठलेला आहे. कोठलीही एक प्रतिमा घ्या.

जीवन म्हणजे एखाद्या सामान्य नटाचा रंगभूमीवरील चार क्षणांचा आरडोओरडा, छाती काढून चालणे, मुठी आवळून बोलणे, शेवटी काळांच्या विगमध्ये गेला की तो होतो नि:शब्द, नगण्य!

अथवा दुसरी प्रतिमा घ्या; (जीवन म्हणजे) मूर्खाने आरडाओरडा करीत सांगितलेली गोष्ट जिला काहीच अर्थ असत नाही. शेवटी ती गोष्ट आणि तो मूर्ख दोघेही संपतात, तो दिमाख, तो मूर्ख विश्वास सारेच भ्रम विरून जातात. उरते नि:शब्दता, उरतो काळोख!

आणि तिसरी प्रतिमा म्हणजे Walking shadowची. माणसाचे जीवन म्हणजे जणू चालतीबोलती सावली : म्हणजे पुन्हा तीच निरर्थकता.

शेक्सपीअरमध्ये येणाऱ्या असल्या प्रतिमा घंटानादासारख्या असतात. अभिधेचा ठोका पडतो आणि व्यंजनेच्या लहरी दूरवर जातात. सवंग दिमाखाने शब्द आणि चाल फेकणारा नट संपतो, त्याचे शब्द संपतात. दिमाख उरत नाही. नाट्यगृहात तो विसरला जातो. नाटक संपते. शेवटी नाट्यगृह रिते होते आणि उरते शांतता – सगळे काही निरर्थ करणारी, हास्यास्पद करणारी. व्यंजनेच्या लहरी मनाला अशा दूरवर नेतात आणि सगळा संदर्भ व्यापतात.

पण शेक्सपीअरने आपल्याला नेमके काय दिले? विचार? विचारप्रणाली? तत्त्वज्ञान? यातले एकच एक काही त्याने दिले असे वाटत नाही. वैचारिक निराशावाद आपणा सर्वांना मान्य होईल असे नाही. तो खरा असेल अथवा नसेलही. शेक्सपीअर आविष्कृत करतो तो केवळ विचार नव्हे तर त्यामागील भावनेचे क्षेत्र (emotional field). शेवटी विचारात क्रिस्टलाईज होणारी भावनांची प्रक्रिया, not the product, but the process. ती प्रक्रिया तो समग्रतेने आपल्यापुढे उभी करतो.

कवितेचे सामर्थ्य विचारप्रदानात नसते. ते भावना आणि तिच्या संदर्भाचे व्यापक क्षेत्र ह्यांच्या एकत्रित आविष्कारात असते. प्रस्तृत संदर्भात आपण असे म्हणू की निराशावाद खरा नसेल पण निराशा खरी आहे. काव्य म्हणजे काही धंदेवाईक आशावाद्यांनी अथवा निराशावाद्यांनी लावलेल्या दुकानांचा बाजार नव्हे. येथे कधी *क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे* असे वातावरण असते तर कधी *आषाढघनांशी झुंजे वादळवात* असे दृष्य दिसते. आणि जे दिसते ते हृदयाला भिडते. जीवनाच्या गुंतागुंतीचे अनेक तणाव व्यवस्थित आविष्कृत करणारी अद्वितीय भाषा हे शेक्सपीअरचे विशेष वैभव.

शेक्सपीअर आपण वाचला. काय मिळाले आपल्याला ह्या प्रवासामधून? आयुष्याच्या कटकटी का कमी असतात? हॅम्लेटने म्हटल्याप्रमाणे गर्विष्ठांचा उद्धटपणा, कायद्याचा विलंब, नालायकांचा शहाजोगपणा इत्यादी अनेक वैताग आणणाऱ्या गोष्टींनी आयुष्य भरले असताना आणखी कशाला हे ताणतणाव?

थकलेला, दमलेला अँटनी क्लिओपात्राबद्दल विचार करतो की आयुष्यात ती भेटलीच नसती तर किती बरे झाले असते! हे ताण तरी पडले नसते!

त्यावर त्याचा सहकारी इनोबार्बस् म्हणतो : Then you had left unseen a Wonderful piece of work, Which not blessed withal, Would have discredited your travel!

(तर मग तुम्ही एका अजब कृतीला मुकला असता आणि त्या अभावी तुमचा जीवनप्रवास अर्थशून्य झाला असता.)

शेक्सपीअरच्या काव्याविषयी निदान एवढे तरी निश्चित म्हणता येईल. ही रसयात्रा झाली नसती तर जीवनाचा प्रवासच मुळी अपुरा राहिला असता; आग्ऱ्याला जाऊन ताजमहाल न पाहिल्यासारखा!

शेक्सपीअरसाहित्य वाचल्यामुळे जीवन जगणे सुकर झाले असे म्हणणे हास्यास्पद वाटेल. शेक्सपीअरने उपदेश केलेला नाही, नीतितत्त्वांवर भर दिला नाही, अध्यात्म सांगितले नाही, किंवा धर्मप्रचार केला नाही. वास्तवतेचे सहीसही प्रतिदर्शनही त्याच्या साहित्यातून मिळणार नाही. आणि त्याने आदर्शांची आरासही लावली नाही. जीवनाचे विविध दर्शन, आंतरिक आणि बाह्य, त्याने उभे केले आहे; पण त्याही पलीकडे आणि ह्याहून अधिक काहीतरी त्याने केले आहे.

जीवनाची कृतार्थता सुफलित होण्यात आहे, परिपक्वता मिळविण्यात आहे. फुलाची कृतार्थता फुलण्यात, फळाची पिकण्यात आहे आणि माणसाची मानसिक समृद्धीने जगण्यात आहे. शेक्सपीअरची कविता वाचताना मनाला येणाऱ्या परिपक्वतेचा, मिळणाऱ्या समृद्धीचा आनंद सतत जाणवत राहतो. शेवटी ज्याला जन्म आहे त्याला मृत्यूही आहे. दोन टोकांच्यामध्ये होणाऱ्या प्रवासाचे गुणात्मक मोजमाप हेच की जो जन्मला, तो (तसाच) मृत्यू पावला नाही. फुलाप्रमाणे त्याचा विकास झाला, फळाप्रमाणे तो पक्व झाला. थोडक्यात तो जगून मेला. किंग लिअरमधील शब्दांत :

Men must endure Their going hence,
Even as their coming hither,
Ripeness is all.

शेवटी सगळा उपदेश, सगळे धर्म, सगळी नीतितत्त्वे, सगळ्या बांधिलक्या ह्यांचे महत्त्व अस्तित्वाचे बोचके उतरताना नाहीसे होते.

मग महत्त्वाचे काय? Ripeness is all.

सगळीच कविता मनाला समृद्ध करते, परिपक्वता देते, शेक्सपीअरची कविता ती परिपक्वता अधिक पूर्णपणे आणि सर्वांगाने देते आणि म्हणूनच ती कविता वाचल्यावर जीवनयात्रेची कृतार्थता जाणवते, गोएटेचे शब्द आठवतात :

We learn nothing by reading great literature; but we become something.

*(एप्रिल १९९८, शेक्सपीअर विशेषांक)*

# शेक्सपीअर विशेषांकामागची संपादकीय भूमिका

एप्रिल २३ ही शेक्सपीअरची जयंती आणि पुण्यतिथीही. जागतिक ग्रंथदिन म्हणून तो साजरा होतो. त्या निमित्ताने हा शेक्सपीअर विशेषांक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

मराठी भाषेच्या समृद्धीसाठी झटणाऱ्या अंतर्नादसारख्या मासिकाने शेक्सपीअरसारख्या इंग्लिश साहित्यिकावर विशेषांक काढावा यात सकृतदर्शनी विरोधाभास वाटले. परंतु मराठी साहित्याची जाण समृद्ध होण्यासाठी इंग्रजी साहित्याचा अभ्यास पोषक आहे आणि इंग्रजी साहित्याचा अभ्यास करण्यासाठी शेक्सपीअर समजून घेणे पोषक आहे हे लक्षात घेतले तर यातली सुसंगती, किंबहुना अपरिहार्यता, जाणवेल.

मातृभाषेची ओढ ही माणसाची एक स्वाभाविक, हाडीमांसी रुजलेली प्रवृत्ती आहे. सोव्हिएट संघराज्यांचा अनुभव हेच पुन्हा एकवार सिद्ध करतो. सत्तर वर्षांच्या मॉस्कोकेंद्रित कठोर एकाधिकारशाहीनंतरही उझबेकीस्तान किंवा युक्रेनमधल्या माणसाला रशियन ही 'परकी' भाषाच वाटते ही वस्तुस्थिती पुरेशी बोलकी आहे. अंतर्नादसारख्या मासिकांना तर प्रतिकूल परिस्थितीतही तग धरण्यासाठी आंतरिक बळ देणारी ही वस्तुस्थिती आहे.

पण आपले मराठीप्रेम इंग्रजीच्या संदर्भात कधीकधी अकारण हळवे बनते. कॉम्प्युटरला संगणक म्हणण्याइतपत ठीक आहे; पण नंतर कॉम्प्युटरशी संबंधित ड्रायव्हर, फ्लॉपी, मॉडेम, इंटरफेस, हार्ड डिस्क, सॉफ्टवेअर, Y2K अशा असंख्य शब्दांना, संस्कृतशी कसरत करत क्लिष्ट प्रतिशब्द शोधण्याऐवजी, आपल्यातच सामावून घेतले तर? जगातल्या (इंग्रजीसह) सर्वच भाषा असे नवेनवे शब्द सामावून घेतच जास्त समृद्ध होत आहेत.

इंग्रजीबाबतची अंतर्नादची भूमिका यानिमित्ताने स्पष्ट करावीशी वाटते. ज्ञानभाषा म्हणून, आंतरराष्ट्रीय संपर्कभाषा म्हणून इंग्रजीचे अनन्यसाधारण महत्त्व आज जगन्मान्य झाले आहे. फ्रेंचांसारखे इंग्रजीचे दीर्घकालीन स्पर्धकही आज आंतरराष्ट्रीय संपर्कभाषा म्हणून इंग्रजीचे अनन्यसाधारण महत्त्व खुल्या मनाने स्वीकारत आहेत. काही ऐतिहासिक कारणांमुळे भारतातील सुशिक्षितांना इंग्रजी (तुलनेने) बऱ्यापैकी अवगत असते व त्याचा बराच ऐहिक फायदा आज आपल्याला जागतिक स्तरावर मिळत आहे.

मराठी भाषा आणि साहित्य चैतन्यशाली व्हायला हवे असेल तर आपल्या मराठीप्रेमाचे रूपांतर इंग्रजीद्वेषात होऊ देता कामा नये. 'वसुधैव कुटुम्बकम्' हा आपला खरा वारसा जपला पाहिजे. कारण इंग्रजीशी (आणि खरेतर हिंदीशीही) वाढते साहचर्य मराठीच्या विकासाला मारक नव्हे तर तारकच ठरणार आहे.

मराठी साहित्यावरील इंग्रजीचा प्रभाव व्यापक आणि सखोल आहे. आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांच्या सतारीचे बोल, झपूर्झा यांसारख्या अनेक महत्त्वाच्या कवितांवर इंग्रजी कवींची छाप आहे. फडके-काणेकरांच्या लघुनिबंधांचा धागा ए. जी. गार्डिनरच्या पर्सनल एसेज्शी तर दिवाकरांच्या नाट्यच्छटांचा धागा ब्राऊनिंगच्या ड्रॅमॅटिक मोनोलॉग्ज्शी जुळलेला आहे. आपल्या ऐतिहासिक वा सामाजिक कादंबऱ्यांवरील स्कॉट वा हार्डीचा आणि नवकथेवरील चेकॉव्ह-ओ हेन्रीचा प्रभाव उघड आहे. इब्सेन-मोलिएर-शॉ-ओनील यांचा मराठी नाटकांवरचा किंवा जेरोम-चेस्टरटन-वुडहाऊस यांचा मराठी विनोदावरचा ठसा वरवरचा नाही. अर्नाळकरांच्या रहस्यकथाही कमी परपुष्ट नाहीत! एकूणच, माती इथलीच असली तरी बीजे खूपदा बाहेरची आहेत; कधी वाऱ्याबरोबर उडत आलेली तर कधी मुद्दाम आणून लावलेली. अर्थात या सगळ्यात वावगे काहीच नाही, इंग्रजी साहित्यावरील प्राचीन ग्रीक-लॅटिनचा किंवा अर्वाचिन फ्रेंच-रशियनचा प्रभावही सर्वश्रुत आहे. महत्त्वाचा मुद्दा हा की मराठीतील कुठल्याही साहित्यशाखेचा अभ्यास आपल्याला अपरिहार्यपणे इंग्रजीच्या दारात आणून सोडतो.

आणि इंग्रजीच्या दारात आपण येऊन ठेपलो की शेक्सपीअरचे अस्तित्व नजरेआड करताच येत नाही, इतका शेक्सपीअरचा इंग्रजी भाषेवर पगडा आहे. ''आम्ही एकवेळ आमचे सगळे साम्राज्य देऊ, पण आमचा शेक्सपीअर कदापि देणार नाही'' हे मूळ कार्लाईलचे व नंतर चर्चिलने उद्धृत केलेले विधान वरवरचे नाही. All that glitters is not gold किंवा Rose will smell sweet even when called by any other name यांसारखी असंख्य सुभाषिते ही इंग्रजी भाषेला शेक्सपीअरने प्रदान केली आहेत याची खूपदा आपल्याला कल्पनाही नसते. अशा सुभाषितांनी शेक्सपीअरचे साहित्य इतके खचाखच भरले आहे की शेक्सपीअर प्रथमच वाचणारी एक वृद्धा एकदा उद्गारली, "What is original about him? He is just full of quotations!'' Sound of Music किंवा Brave New World यांसारखी संस्मरणीय शीर्षके मूळ शेक्सपीअरच्याच शब्दरचना आहेत. सर लॉरेन्स ऑलिव्हिएपासून नसीरुद्दीन शहापर्यंत कुठचाही जातिवंत नट शेक्सपीअरचे नायक साकार करणे हे अभिनयक्षेत्रातले सर्वांत मोठे आव्हान समजतो. कुठच्याही क्षेत्रात एखाद्या व्यक्तीला सर्वश्रेष्ठ ठरवणे तसे धाडसाचे असते; पण जगातला सर्वश्रेष्ठ साहित्यिक कोण यावर यदाकदाचित जाणकारांमध्ये मतदान घेतले तर तो सन्मान शेक्सपीअरलाच मिळेल याविषयी दुमत व्हायची शक्यता खूप कमी आहे.

असे असूनही शेक्सपीअरविषयी मराठीत तुरळक अपवाद वगळता फारसे अभ्यासपूर्ण लेखन उपलब्ध नाही. ही उणीव काही अंशी तरी भरून काढण्याचा हा प्रयत्न. अंकाच्या निर्मितीत शेक्सपीअरचे गाढे व्यासंगी व प्रेमी श्री. परशुराम देशपांडे यांनी केलेल्या सहकार्याचा येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो.

*(एप्रिल १९९८, शेक्सपीअर विशेषांक)*

# कालिदासाच्या नायिका

**लीला अर्जुनवाडकर**

प्रचंड मोठ्या अशा दु:खानेही खचून न जाता, गैरसमजाची दरी उद्‌भवू न देता, केवळ आपलेच दु:ख कुरवाळणाऱ्या अपंगपणाचा स्पर्शही होऊ न देता या स्त्रिया आपल्या अबोल सत्त्वाच्या, उदार आणि व्यापक समंजसपणाच्या आधाराने आपले प्रेम टिकवतात.

संस्कृतात 'काव्य' ही संज्ञा 'ललित वाङ्मय' – मग ते गद्य असेल किंवा पद्य – या अर्थाने वापरली जाते. या काव्यप्रकारातले मोठा जीव असलेले प्रकार म्हणजे महाकाव्य, खंडकाव्य, रूपक (म्हणजे मराठी अर्थाने नाटक), कथा आणि आख्यायिका हे. 'नायिका' म्हणजे त्यातील मध्यवर्ती स्त्रीव्यक्तिरेखा. पण 'मध्यवर्ती स्त्रीव्यक्तिरेखा' हे शब्दही काहीशा मर्यादितच अर्थाने घेतले पाहिजेत. याचे कारण असे की जुन्या संस्कृत काव्यातील कोणतीही कृती फक्त स्त्रीलाच मध्यवर्ती कल्पून लिहिलेली नाही. त्या कृतीच्या शीर्षकात त्या नायिकेचे नाव गुंफलेले असलेही – जसे 'मालविकाग्निमित्र', 'विक्रमोर्वशीय', 'अभिज्ञानशाकुन्तल'. पण मुख्य कथेचा ओघ वाहतो तो नायकाच्याच अनुषंगाने. बाणभट्टाच्या रचनेला नायिकेचेच, म्हणजे कादंबरीचे नाव आहे. पण मुख्य कथा आहे ती चंद्रापीडाची. म्हणजे नायकाचीच.

टॉमस हार्डीच्या 'टेस ऑफ दि डर्बरव्हिल्स' या प्रसिद्ध कादंबरीत जसे टेसलाच अथपासून इतिपर्यंत महत्त्व आहे, पु. शि. रेग्यांच्या 'सावित्री'मध्ये जसे सावित्रीलाच सर्वोच्च महत्त्व आहे, तसे स्थान संस्कृत काव्यात नायिकेला दिलेले आढळत नाही. अपवादच सांगायचा झाला – आणि तो अगदी सद्य:कालीन आहे – तर तो अलीकडच्या काही वर्षांत प्रसिद्ध झालेल्या 'इन्दिराजीवनम्' आणि 'इंदिरागान्धीचरितम्' या इंदिरा गांधींच्या चरित्रावर आधारलेल्या महाकाव्यांचा.

संस्कृत काव्यात मुख्य असतो तो नायकच. तोच 'फलस्वामी' असतो. जे मिळायचे असते ते मूलत: त्यालाच. नायिकेला स्वतंत्रपणे काहीच मिळायचे नसते. कथानकाची सारी बांधणी त्याच्याच अनुरोधाने झालेली असते. अवस्था, अर्थप्रकृती आणि संधी ही भरताने सांगितलेली नाटकाच्या कथारचनेची तत्त्वेदेखील नायकालाच समोर ठेवून सांगितलेली आहेत. नायिका नायकाचा आब राखून त्याच्या शेजारी, पण दोन पावले मागेच, उभी असते.

एखादी 'साधारण' नायिका वगळली तर 'स्वीया' नायिका स्वत: डोळे वर करून पाहणार नाही की तोंड उघडून बोलणार नाही. ते काम तिची सखी करील. कारण 'मितभाषणी तीच कुलकामिनी' या आदर्शाने या नायिकांचे जीवन घडवलेले आहे. सीतादेखील *सत्याय मितभाषिणी* अशी आहे. तिने फक्त एकदाच तोंड उघडले – निर्वाणीचे – अखेरचे शब्द उच्चारण्यासाठी. एरवी धिटाईने वागणारी देवांगना उर्वशीदेखील चित्रलेखेकरवीच आपले मन राजापुढे मोकळे करते. मात्र एक खरे की नायकाशी अतिशय मोकळेपणाने, खेळीमेळीने वागण्याचे धाडस, शूद्रकाच्या वसंतसेनेप्रमाणे, उर्वशीच करू शकते. ती अभिसारिका बनते आणि हळूच मागून येऊन पुरूरव्याचे डोळे झाकते. मालविका किंवा शकुंतला हे धारिष्ट्य कधीही करू शकणार नाहीत. त्या कुलवंत स्त्रिया आहेत. रूढ रीतीची बंधने तोडून विपरीत वागण्याचा मोकळेपणा त्यांना नाही.

याचे कारण या स्त्रिया ज्या समाजात जन्मल्या, वाढल्या, वावरल्या, ज्यात त्यांनी खूप काही भोगले, त्याची गरत्या स्त्रीकडून असणारी अपेक्षा. या समाजात गणिकांना मिळालेले स्वातंत्र्य आणि मोकळेपणा गरत्या गृहिणीला कधीही मिळाला नव्हता. ती नेहमी विविध कर्तव्ये, कुलपरंपरा, रीतभात यांच्या बंधनात जखडलेलीच राहिली. त्याच्या जोडीला तिने *शयनेषु रंभा* असावे, हीही अपेक्षा सतत केली गेली. त्यात समाज पुरुषप्रधान आणि बहुपत्नीकत्वाची रूढी दृढमूल झालेला. त्यामुळे अंत:पुरात सवतीमत्सराचा खेळ आणि बाहेरच्या जगात गणिकांविषयी आकर्षण अशी अवस्था अपरिहार्यच झाली.

कुलीन स्त्रीने स्पृहणीय असे 'गृहिणी' पद मिळवावे, टिकवावे, अगोचरपणाने वागून कुळाला बट्टा लावू नये. वीर पुत्रांना जन्म द्यावा. घरादाराची वडिलधाऱ्यांची नीट देखभाल करावी. नवरा रागावला, त्याने अपमान केला तरी त्याच्याच मनासारखे वागून, सवतींशी गोडीगुलाबीने राहून संसार फुलवावा. साऱ्यांना सांभाळून घेऊन घराचे घरपण टिकवावे. या लक्ष्मणरेषेपलीकडे त्यांनी चुकूनही जाऊ नये, एवढीच या समाजाची कुलीन स्त्रीकडून अपेक्षा होती आणि ही बंधने म्हणजे आपली भूषणेच आहेत असे मानून या स्त्रियांनीही तो आदर्श जपला.

त्याच्या बाहेर जाणाऱ्या स्त्रिया तशा क्वचितच भेटतात.

एखादी पंडितकौशिकी आपल्या नृत्यातील जाणकारीने स्पर्धेसाठी परीक्षक बनते. पण ते तिच्या वयाला शोभणारेच असते. एखादी उमा कडकडीत तप:साधना करून, खंडनमंडनात्मक वादविवादात बटूला तोडीस तोड ठरते. पण तीही शिवाला सांगते, ''मी काही 'घरघुशी' नाही. माझ्या पित्याची रीतसर संमती घ्या. मगच मी विवाहाला उभी राहीन.'' या सर्व स्त्रियांत आपल्या तेजस्वी वृत्तीने अगदी वेगळी, आधुनिक म्हणून दिसते ती फक्त सीता.

कुटुंब, समाज यांच्या अपेक्षांनुसार वागून आणि वयामुळेही थोडा अधिकार प्राप्त करून घेतलेली 'मालविकाग्निमित्रा'तली धारिणी, 'विक्रमोर्वशीया'तली काशीराजपुत्री या स्त्रिया आपल्या पतीला त्याच्या भ्रमरवृत्तीबद्दल बोलतात, टोमणे देतात, अंत:पुरात काही थोडे राजकारणही करतात. पण त्यांनाच पुढे वाईट वाटते आणि अशोकदोहदपूर्तीच्या निमित्ताने म्हणा, प्रियप्रसादनव्रत पार पाडायचे म्हणून म्हणा, त्या राजाच्या नव्या प्रेमप्रकरणाला मान्यताच देतात. एखादी हंसपदिका अगदी आर्ततेने संगीतातून आपल्या दु:खाला हळुवार वाचा फोडते. तर मानिनी, तडकफडक वृत्तीची इरावती अग्निमित्राला अतिशय उग्रपणे बोलते. नव्हे, त्याला कंबरपट्ट्याने मारायलाच निघते. पण अग्निमित्राने तिचे पाय धरून सपशेल लोटांगण घातल्यावर चडफडत का होईना तिथून निघून जाते. (अर्थात राजाही तिची फिकीर करणारच नसतो. ही पायधरणी हा आपला एक दाखवण्याचा, शठ नायकाच्या 'दाक्षिण्या'चाच भाग असतो, ही गोष्ट वेगळी.) म्हणजे हेही सारे वागणे हे 'भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मा स्म प्रतीपं गम:' (नवऱ्याने कितीही अपमान केला तरी रागावून त्याच्या उलट जाऊ नकोस) या उपदेशाचेच आचरण.

✦

जुन्या संस्कृत काव्यातील कोणतीही कृती फक्त स्त्रीलाच मध्यवर्ती कल्पून लिहिलेली नाही. टॉमस हार्डीच्या 'टेस ऑफ दि डर्बरव्हिल्स' या प्रसिद्ध कादंबरीत जसे टेसलाच अथपासून इतिपर्यंत महत्त्व आहे, पु. शि. रेग्यांच्या 'सावित्री'मध्ये जसे सावित्रीलाच सर्वोच्च महत्त्व आहे, तसे स्थान संस्कृत काव्यात नायिकेला दिलेले आढळत नाही.

✦

तसे पाहिले तर आता उल्लेखिलेल्या स्त्रिया या सहनायिका किंवा उपनायिका आहेत. मुख्य नायिका नव्हेत. मग मुख्य नायिका कोणाला म्हणायचे? 'साहित्यदर्पणा'त नायिकेची वेगळी अशी व्याख्या नाही. नायकाचे गुण सांगून विश्वनाथ म्हणतो की साधारणपणे हेच गुण नायिकेच्या ठिकाणी असावेत. ते कोणते? नायक असतो त्यागशील, पराक्रमी, उच्चकुलीन, उमद्या देखण्या व्यक्तिमत्त्वाचा, संपन्न, रूपयौवनयुक्त, उत्साही, जागरूक, ज्याच्यावर लोक भाळतील असा, तेजस्वी, चतुर आणि सुशील. हे सारे वर्णन आहे स्थूलमानाने. प्रत्येक नायकाच्या ठिकाणी प्रत्येक गुण असतोच असे नाही. शिवाय या गुणांचे स्वरूपही देशकालपरिस्थितीनुसार पालटतेच. नाही तर सारे नायक एकाच ठशाचे गणपती झाले असते. हे गुण म्हणजे त्यांची सर्वसामान्य ठेवण किंवा शरीररचना (anatomy) आहे. प्रत्येक कवी त्या रचनेची चौकट कमी अधिक प्रमाणात वापरून, इतर मालमसाला घालून नायकाचे व्यक्तिमत्त्व घडवीत असतो. म्हणून तर समीक्षकांना नायकांचे धीरोदात्त, धीरोद्धत, धीरललित आणि धीरप्रशांत असे चार प्रकार करता आले.

मुख्य नायिकेच्या बाबतीत हेच सारे विवेचन लागू आहे. या नायिकेच्या ठिकाणी 'नायकसामान्य' गुण 'यथासंभव' लागू पडतात असे सांगून विश्वनाथ नायिकांचे 'स्वा किंवा स्वीया, अन्या आणि साधारणा' असे तीन प्रकार सांगतो. हे भेद पाहताना एक गोष्ट ठळकपणे जाणवते की त्यात प्रमुख भर आहे तो नायिकेचे देहसौंदर्य, वय, मदनविकारानुकूलता यांवर. आणि दुसरे असे की ती कोणत्याही वर्गातली असो, नायक कसाही असला तरी त्याच्यावर रागावून रुसून शेवटी त्याचा स्वीकारच करणारी असते.

स्वीया नायिका विनय, आर्जव या गुणांनी युक्त, गृहकर्मतत्पर आणि पतिव्रता असते. अन्या नायिका दुसऱ्या पुरुषाची पत्नी किंवा अपरिणीता, सलज्जा आणि नवयौवना असते. तर साधारणा म्हणजे वेश्या. तिच्या व्यवसायानुसार ती धीर आणि कलाप्रगल्भ असते. हिच्या संदर्भात सर्वांत जास्त तपशील आले आहेत.

नृत्यात नेहेमी भेटणाऱ्या स्वाधीनभर्तृका, खंडिता, अभिसारिका, कलाहान्तरिता, विप्रलब्धा, प्रोषितभर्तृका, वासकसज्जा आणि विरहोत्कंठिता या आठ शृंगारनायिका, या वर निर्देशिलेल्या मुख्य तीन नायिकांचेच प्रसंगोपात्त होणारे पोटभेद आहेत. संस्कृत विमर्शकांची शहामत अशी की एवढ्यावरच न थांबता वेगवेगळ्या अक्षांनी वर्गीकरणे आणि गुणाकार करून त्यांनी तीनशे चौऱ्याऐंशी नायिकाभेद सांगितले आहेत!

एवढ्या तपशिलात आपल्याला जाण्याचे काहीच कारण नाही. कालिदासाची तीन नाटके (*मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय आणि अभिज्ञानशाकुंतल*) दोन महाकाव्ये (*रघुवंश आणि कुमारसंभव*) आणि एक खंडकाव्य (*मेघदूत*) एवढ्या वाङ्मयसंपेदचा विचार केला तर असे दिसते की मालविका ही 'अन्या' नायिका आहे. म्हणजे कलाप्रगल्भा खरी, पण अपरिणीता, मुग्धा, नवयौवना, सलज्जा अशी. एक गुंगी गुडिया. शकुंतला पहिल्या तीन अंकांपर्यंत याच वर्गातली, तर त्यापुढे 'स्वीया' नायिका होते. सीता आणि यक्षपत्नी यांच्याप्रमाणे. 'कुमारसंभवा'तल्या उमेच्या बाबतीत हाच मुद्दा लागू होतो. उर्वशी ही देवांगना. म्हणजे 'साधारणा' या वर्गातली. ती धीरा, कलाप्रगल्भा अशी आहेच; पण अभिसारिका, खंडिता, कलहान्तरिता, विरहोत्कंठिता या शृंगारनायिकांचे विशेष ती अधिक ठसठशीतपणे दाखवते. पण तिला शेवटी इंद्राच्या वराने पुरूरव्याजवळ राहायला मिळते आणि तीही शेवटी 'स्वीया' नायिका होते.

इत्यर्थ असा की हे सांकेतिक भेद म्हणजे या स्त्रियांच्या

आयुष्यातील वेगवेगळ्या किंवा प्रसंगोपात्त त्यांच्या वाट्याला आलेल्या अवस्था आहेत आणि साहित्यशास्त्रीय, कामशास्त्रीय व्याख्यांची नुसती लेबले लावून त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व आपल्याला गवसणार नाही. त्यासाठी ही पारंपरिक चौकट मोडून टाकून मोकळ्याढाकळ्या दृष्टीने कालिदासाच्या वाङ्मयातील फक्त नायिकांकडे नव्हे, तर सर्वच स्त्रियांकडे बघायला हवे.

या सांकेतिक कल्पनांचा चक्रव्यूह फोडून बाहेर आले की प्रथम असे जाणवते की कालिदासाने चित्रित केलेली स्त्रीसृष्टी संख्या आणि वैविध्य या दोन्ही दृष्टींनी मोठी समृद्ध आहे. सारे कालिदासीय वाङ्मय एखाद्या प्रचंड मोठ्या झुंबरासारखे आहे. त्याच्या वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या लोलकांत कालिदासाच्या सर्व मानसकन्या लहान-मोठ्या ज्योतींप्रमाणे पेटत्या, तेवत्या, लखलखत्या राहिल्या आहेत.

कडकडीत निष्ठा आणि उग्र तपश्चर्या यांची प्रखर दाहक मूर्ती म्हणजे 'कुमारसंभवा'तली उमा. अनपेक्षित आणि दारुण दुःखाघाताने क्षणभर मूर्च्छित पडणारी 'रघुवंशा'तली सीता लगोलग सावरून रामाला अतिशय परखड तेजस्वी निरोप पाठविते. परित्यागानंतर, प्रदीर्घ विरहानंतर पुन्हा त्याच मानहानीला तोंड द्यायची वेळ आली असता कोणतीही तडजोड न करता निर्धाराचे, निर्भय आत्मविश्वासाचे आणि निर्वाणीचे खणखणीत शब्द उच्चारून कायमची अंतर्धान पावते. ही सीता म्हणजे पातिव्रत्याच्या तेजाची, प्रेमबलाची परासीमाच आहे.

✦

सारे कालिदासीय वाङ्मय एखाद्या प्रचंड मोठ्या झुंबरासारखे आहे. त्याच्या वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या लोलकांत कालिदासाच्या सर्व मानसकन्या लहान-मोठ्या ज्योतींप्रमाणे पेटत्या, तेवत्या, लखलखत्या राहिल्या आहेत.

✦

साऱ्या चराचर तपोवनाला जीव लावणारी पोरकी मुलगी, ब्रह्मचारी कण्वाला गृहस्थाहूनही गृहस्थ बनवणारी कन्या, मैत्रिणींवर जिवाभावाने प्रेम करणारी आणि त्यांच्याकडून करून घेणारी मैत्रीण, सर्वस्व अर्पून प्रेम करणारी प्रेयसी, साशंकतेचे, दुःखाचे चरचरीत चटके अनुभवणारी परित्यक्ता, एकाकी माता आणि विलक्षण उदार क्षमाशील पत्नी – ही स्त्रीची वेगवेगळी उदात्त रूपे कालिदासाने एकट्या शकुंतलेत साकार केली आहेत. आपल्या प्रियकराचे प्रेम निरंतर लाभावे यासाठी पोटच्या मुलालाही दूर ठेवणारी, 'पझेसिव्ह' प्रेमाचा आविष्कार असणारी उर्वशी त्याने रेखाटली आहे. ईर्ष्या, मत्सर, असूया, कावेबाजपणा, अगतिकता हे सामान्य भाव कमी अधिक प्रमाणात दाखवणाऱ्या इरावती, धारिणी, काशीराजपुत्री, हंसपदिका अशाही स्त्रिया कालिदासाने रेखाटल्या आहेत. पण त्याचे बहुमत रूप म्हणजे शकुंतलेचे. शकुंतलेची भिन्न भिन्न रूपे म्हणजे स्त्रीजीवनाचा – त्यातील भाग्य आणि दुर्दशा यांसकट – एक मोठा 'पॅनोरामा'च आहे. उमा, सीता आणि शकुंतला या कालिदासीय वाङ्मयाच्या झुंबरामधल्या सर्वांत तेजस्वी व डोळे दिपवणाऱ्या ज्योती आहेत.

कमी-अधिक महत्त्वाच्या इतर स्त्रियाही त्यात आहेत. अपत्यप्राप्तीसाठी आसुसलेली सुदक्षिणा, दीपशिखेसारखी तेजःपुंज सौंदर्याची इंदुमती, स्वयंवरासाठी जमलेल्या राजांची मोठ्या चतुराईने आणि मार्मिकपणाने, मिस्किलपणाने ओळख करून देणारी सुनंदा, 'मुलांना इतकं भोगावं लागतं, तर नको ती वीरप्रसूही कीर्ती' हे हळुवार स्पर्शाने जाणवून देणाऱ्या राममाता, मालविकेला सर्वतोपरी मदत करणारी आणि *विमर्दसुरभिः बकुलावलिका खलु अहम्* (चुरगळल्यावर अधिक सुगंधित होणारी बकुळीची माळ म्हटलं मी!) असा धीर देणारी बकुलावलिका, भारी गोड समयसूचक बोलणारी मोहक प्रियंवदा, जबाबदारीने वागणारी अनसूया, पोक्ती पुरवती प्रेमळ पण काही करू न शकणारी गौतमी, 'असं अप्सरेला न शोभण्यासारखं काय वागतेस?' असा खाकरवसा घालूनही उर्वशीला मदत करणारी थट्टेखोर चित्रलेखा, संन्यासिनी असूनही मालविकेसाठी झटणारी पंडितकौशिकी – अशा विविध स्त्रियांनी कालिदासीय वाङ्मयाचे झुंबर तेजस्वी झळझळीत केले आहे.

वेगवेगळे प्रसंग, अनेकविध भावभावना, देहाच्या, वयाच्या वेगवेगळ्या अवस्था यांच्या कोंदणात कालिदासाने या स्त्रियांची लहानमोठी चित्र जडवली आहेत. मृदुता, प्रेम, वात्सल्य, क्षमाशीलता, दुःख, दुस्वास, ईर्ष्या, मत्सर, क्रोध, प्रौढत्व, उदारता, सहनशीलता, समंजसपणा, तेजस्विता, आक्रस्ताळेपणा, निर्धार, जिद्द, लोकव्यवहाराची जाण – असे अनेक विशेष असणाऱ्या या स्त्रिया पोरकी मुलगी, लाडाकोडाची लेक, प्रणयिनी, पत्नी, माता, सासू, सवत, फणकारा असलेली मानिनी, वृत्तीने व अनुभवाने प्रौढत्व आलेली, परित्यक्त्या, ज्येष्ठ कुटुंबिनी – अशा कितीतरी नात्यांच्या संदर्भात जिवंत झालेल्या आपल्याला दिसतात. पण त्यांच्या जीवनाचे मूळ सूत्र आहे कण्वाचा उपदेश –

शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने<br>
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः।<br>
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी<br>
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः॥

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत पुरुष गुरफटलेला असतो तो आपली महत्त्वाकांक्षा, प्रतिमा, स्थान, अधिकार, वर्चस्व यांच्या जंजाळात. त्यामुळे संसाराची सारी जीवघेणी धकाधकी, कुतरओढ वाट्याला येते ती बाईच्या. तीमधून वाट काढताना तिला मदत करतात ते तिच्या तिच्या स्वभावानुसार व स्थानानुसार वर उल्लेखिलेले गुण. उमा, सीता आणि शकुंतला यांनी केवढी मोठी किंमत मोजली आहे हे पाहिले म्हणजे हा मुद्दा स्पष्ट होईल.

मुख्य नायिका असोत, उपनायिका असोत, आलेली अडचण, उभा राहिलेला प्रश्न, कोसळलेले संकट यांच्याशी संघर्ष करून टक्कर घेऊन विजय मिळवायचा ही या स्त्रियांची वृत्तीच नाही. क्षमाशीलता, मनाचा मोठेपणा हे त्यांचे खरे बळ आहे. त्यामुळे त्या संघर्षापेक्षा आत्मविलोपाला अधिक महत्त्व देतात. पूर्ण

प्रांजळपणाने क्षमा मागणे हेही सोपे नसते. कारण क्षमायाचना हा पुष्कळदा एक व्यावहारिक पवित्रा असतो. (जसा अग्निमित्राचा आहे. फक्त इरावतीच्याच बाबतीत नव्हे; धारिणीच्याही बाबतीत. तो भरतवाक्यात धारिणीला म्हणतो – *त्वं मे प्रसादसुमुखी भव चण्डि नित्यम्,* म्हणजे पुन्हा एकदा नव्याने मालविकाग्निमित्र घडले तर तू अशीच क्षमाशील राहा.)

क्षमा मागणे त्या मानाने कमी कठीण. क्षमा करणे फार फार दुर्घट. स्वत:चे मन पूर्ण निर्मळ, सात्त्विक आणि सबळ असल्याखेरीज क्षमाशीलता परवडतही नाही आणि ती खरीही ठरत नाही. शकुंतलेने दुष्यंताला केलेली क्षमा ही निर्मळ, सात्त्विक आणि सबळ मनाची क्षमा आहे, जशी दुष्यंताची क्षमायाचना पूर्णपणे प्रामाणिक आणि प्रांजळ आहे. तोही शकुंतलेचे पाय धरतो, पण ती क्षमायाचना अग्निमित्राच्या क्षमायाचनेसारखी लटकी नाही. सातव्या अंकातला दुष्यंत हा तिसऱ्या अंकातला प्रामाणिक 'आर्य' दुष्यंत आहे. शकुंतलेलाही मनापासून याचा आनंद होतो की दुष्यंताने निष्कारण आपला परित्याग केलेला नाही. मुग्धा शकुंतलेला पूर्वी अंगठीचा फार मोठा आधार होता. जीवनाच्या सत्त्वपरीक्षेत तावूनसुलाखून निघालेल्या शकुंतलेला तिची आता गरजच उरलेली नाही, कारण तिचा स्वत:वरचा विश्वास बळकट आणि तिची क्षमाशीलता पूर्ण निर्मळ आहे.

✦

दु:खकारक घटनांनी त्या व्याकूळ, दु:खी जरूर होतात, पण ज्यांच्याकरवी ह्या घटना घडल्या त्या व्यक्तींना ह्या घटनांपासून त्या अलग ठेवतात. शेवटी त्या व्यक्तीही आपल्या पूर्वकर्माचे साधन आहेत हे भान त्यांच्या मनातून जात नाही. दारुण दु:खाच्या अनुभवाने सीता आणि शकुंतला दोघींचीही विभूती अधिक विस्तारली आहे, समृद्ध झाली आहे.

✦

सीता आणि शकुंतला या दोघींची परिस्थिती काही अंशी समान आहे. त्या गर्भवती असतानाच दोघींचाही परित्याग झाला आहे. पण शकुंतलेच्या वाट्याला आलेली दुर्दशा अधिक भीषण आहे. रामाने सीतेच्या ठिकाणचा गर्भ नाकारला नव्हता. शिवाय सीता वयाने मोठी, जग पाहिलेली, आधीच दुर्दैवाचे फेरे अनुभवलेली होती. त्यात तिला वाल्मीकीच्या रूपाने स्थिर माहेर भेटले. प्रेमळ पिता भेटला. शकुंतलेला तपोवनाच्या बाहेरच्या जगाचा वाराही लागलेला नव्हता. अतिशय प्रेमळ, शीतल वातावरणात ती वाढली होती. शिवाय ती वयानेही अगदी कोवळी, जेमतेम सतरा अठरा वर्षांची पोर. मनाशी मोठ्या अपेक्षांचे इमले उभारत दुष्यंताकडे आलेल्या तिला विलक्षण अपमानकारक नाही नाही ते शब्द ऐकून घ्यावे लागले. सीतेप्रमाणे तिच्याही तोंडी शब्द आले – *भगवति वसुधे, देहि मे विवरम्.* सीतेला तिच्या आईने आधार दिला. शकुंतला पुन्हा पोरकी झाली. पण तिलाही तिची आई मिळाली. निमूटपणे शकुंतला तिच्याबरोबर गेली. जाताना राजाच्या मनाला जबरदस्त हादरा देऊन गेली. तिचे शब्द संपले होते. तिच्या ओंजळीत अश्रूंशिवाय काही नव्हते.

सीता फार वेगळी वागली. रामाने केलेल्या परित्यागाच्या वेळी तिने लक्ष्मणाबरोबर अतिशय परखड, तेजस्वी संदेश पाठवला आणि लक्ष्मण दिसेनासा झाल्यावर ती गळा काढून ढसढसून रडली. पण रामाने दिलेली आज्ञा तिने शंभर टक्के स्वीकारली आणि चौदा वर्षांनंतर पुन्हा त्याच मानहानीला तोंड द्यायची वेळ आल्यावर तीही आपल्या आज्ञास्वीकाराच्या भूमिकेवर टिच्चून उभी राहिली. त्या आज्ञेची तार्किक परिणती काय होणार, ते तिने दाखवून दिले. आपल्या शुद्धीचे प्रात्यक्षिक तिने किती वेळा करायचे आणि का करायचे? आणि ते करून तिला आता मिळवायचे तरी होते काय? रामाने तिच्याविषयी संशय घेतला नव्हता. तिच्याविषयीचे प्रेमही त्याच्या मनात ओतप्रेत भरले होते. पण प्रजेची खात्री पटवण्याबद्दल त्याचा आग्रह होता. सीतेच्याही मनात रामाविषयी उदंड प्रेम होते. म्हणून तर लक्ष्मणाहाती पाठवलेल्या निरोपात तिने म्हटले होते – *भूयो यथा मे जननान्तरेऽपि त्वमेव भर्ता न च विप्रयोग:* (पुढच्या जन्मी तूच मला पती मिळावास, पण विरह मात्र व्हायला नको.) हे दोघेहीजण दुसऱ्याविषयीच्या प्रेमाला धक्का लागू न देता आपापल्या भूमिकेवर स्थिर राहिले. म्हणून सीतेनेही अखेरचे दिव्य केले आणि ती कायमची अंतर्धान पावली. मुले आता मोठी होती. रामाने त्यांना काहीसे जवळही घेतले होते. हे सीतेच्या भूमिप्रवेशाचे कारण असेल काय?

शकुंतलेचा मुलगा लहान होता. ती स्वत:देखील वयाने तरुण, जेमतेम पंचविशीतली होती. शिवाय दुष्यंतचा प्रामाणिक पश्चात्ताप तिला उलगडला आणि पटला होता. म्हणून ती पुन्हा संसारिणी झाली असेल का? निर्मळ क्षमाशीलतेमुळे तिच्या मनात कसलीही अढी किंवा पीळ राहिलेला नाही. जितक्या सहजतेने ती पहिल्या अंकात दुष्यंताची होते, तितक्याच सहजतेने ती सातव्याही अंकात त्याची राहते.

सीता आणि शकुंतला या दोघींचेही आयुष्याविषयीचे निर्णय पूर्ण वेगळे आहेत. पण दोघींनीही आपल्या पतीचे सत्त्व कधीही दृष्टीआड होऊ दिलेले नाही. त्यांनी आपल्या दु:खाचा गवगवा तर केलेलाच नाही पण वाट्याला आलेले दु:ख शांतपणे सोसून त्यांनी आपले बळ वाढवले आहे. (क्षमाशीलता व दु:ख डिग्निटीने सोसणे म्हणजे काय हे ओरिसातील मनोहरपूरच्या ग्लॅडिस स्टेन्सने अलीकडच्या काळात दाखवून दिलेले आहे.) प्रचंड मोठ्या अशा दु:खानेही खचून न जाता, गैरसमजाची दरी उद्‌भवू देता, केवळ आपलेच दु:ख कुरवाळणाऱ्या अपंगपणाचा स्पर्शही होऊ न देता या स्त्रिया आपल्या अबोल सत्त्वाच्या, उदार आणि व्यापक समंजसपणाच्या आधाराने आपले प्रेम टिकवतात. केवढे मोठे दु:ख त्यांच्या वाट्याला आले! पण ते एक मधला टप्पा म्हणून राहिले आहे. या दोघीहीजणी हे दु:ख स्वीकारून, पचवून त्याच्या पार होतात. दु:खाच्या आवर्तात सापडून त्या लहान होत नाहीत. दु:खकारक घटनांनी त्या व्याकूळ, दु:खी जरूर होतात, पण ज्यांच्याकरवी ह्या घटना घडल्या त्या व्यक्तींना ह्या घटनांपासून त्या अलग ठेवतात. शेवटी त्या व्यक्तीही आपल्या पूर्वकर्माचे साधन आहेत हे भान

त्यांच्या मनातून जात नाही. दारुण दुःखाच्या अनुभवाने सीता आणि शकुंतला दोघींचीही विभूती अधिक विस्तारली आहे, समृद्ध झाली आहे.

कालिदासाने आपल्या सर्व नायिकांच्या वेगवेगळ्या वयोवस्थांमधील देहसौंदर्याचे वर्णन अतिशय रसिक दृष्टीने केले आहे. या सौंदर्याचा सर्वांत देखणा नमुना म्हणजे मेघदूतातील यक्षपत्नी.

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिम्बाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणीप्रेक्षणा निम्ननाभिः।
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां
या तत्र स्याद् युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः॥

(कृशांगी, ऐनपणातली, कुंदकळ्यांसारखे दात असलेली, पिकल्या तोंडल्याप्रमाणे ओठ असलेली, कमरेत बारीक, बावरलेल्या हरिणीप्रमाणे नजर असलेली, नाभिप्रदेश खोल असलेली, नितंबभारामुळे मंदगती आणि स्तनांमुळे किंचित झुकलेली अशी – स्त्रीजातीमधली विधात्याची आद्य निर्मितीच.)

मात्र आपल्या प्रत्येक नायिकेच्या सौंदर्याचे अवयवशः वेगळे असे ठाशीव व्यक्तिमत्त्व त्याने फारसे दाखवले नाही. पण त्याने रेखाटलेल्या स्त्रियांच्या चित्रांत खूप वेगवेगळ्या छटा आल्या आहेत. मुग्धत्व आणि यौवन यांच्या सीमेवर उभी असलेली मालविका त्यात आहे. दरड ढासळल्यामुळे जिचा प्रवाह गढूळ झाला पण जी आता पुन्हा निर्मळ होऊ लागली आहे अशा गंगेप्रमाणे भासणारी मूर्च्छेतून बाहेर येणारी उर्वशी आहे. जिच्या देहावर गर्भाचे तेज पसरू लागले आहे अशी *लतेव संनद्धमनोज्ञपल्लवा* (जिच्यावर कोवळी सुंदर पालवी धरली आहे अशा लतेप्रमाणे असणारी) सुदक्षिणा आहे. दीपशिखेप्रमाणे झळझळीत लावण्याने डोळे दिपवून टाकणारी इंदुमती आहे. अनाघ्रात पुष्प, कोवळी लुसलुशीत लालसर पालवी, वेज न पाडलेले रत्न, ताजा कुणीही न आस्वादलेला मध आणि सर्व पुण्याचा परिपाकच जणू असे रूप असणारी शकुंतला आहे. सर्व सौंदर्य एकत्रच पाहायला मिळावे म्हणून सर्व उपमाने एकत्र करून विधात्याने जिला घडवले ती उमा आहे. आणि जी नजरेला पडावी म्हणून अयोध्येतल्या साऱ्या स्त्रिया दाटीवाटीने वाड्यांच्या खिडक्यांत उभ्या राहिल्या ती नूतनपरिणीता सीता आहे.

(एक सहज उलगडलेला तपशील – सीता अखेरची अयोध्येत आली, तेव्हाही लोकांची गर्दी जमलेली होतीच. पण तिच्याकडे पाहण्याची कुणाची हिम्मत झाली नाही. आत दाणे भरल्यावर साळीच्या लोंब्या जशा खाली झुकतात, तशा साऱ्यांचा नजरा खाली झुकल्या. काषाय वस्त्र धारण केलेल्या, पायाकडे दृष्टी असलेल्या शांतमूर्ती सीतेला पाहून.)

उमा, शकुंतला आणि सीता या कालिदासाच्या सर्वश्रेष्ठ अशा व्यक्तिरेखा. त्यांची निष्ठा, उदार क्षमाशीलता आणि तेजस्वी बाणा यांमुळे त्या उत्तुंग उंची गाठणाऱ्या व्यक्तिरेखा बनल्या आहेत. पुरुषप्रधान आणि स्त्रियांविषयी तुच्छतादर्शक निंदा करणारी भाषा वापरणाऱ्या समाजात राहूनही ('पंचतंत्रा'तील उल्लेख, भर्तृहरीचे श्लोक यांतील संदर्भ पाहावेत.) कालिदासाने स्त्रीचे चित्रण अतिशय सहानुभूतीने केले आहे.

*अपि स्वदेहात् किमुतेन्द्रियार्थाद् यशोधनानां हि यशो गरीयः* (यशोधन लोकांना आपली कीर्ती स्वतःच्या देहापेक्षाही मोलाची वाटते; मग केवळ इंद्रियविषयाचा काय पाड!) किंवा *अत्यारूढो हि नारीणामकालज्ञो मनोभवः* (स्त्रियांचा प्रमाणाबाहेर गेलेला मदनविकार काळवेळ जाणत नाही.) हे चरण कालिदासाचे स्त्रीविषयक अनुद्गार म्हणून नेहमी उद्धृत केले जातात. पण प्राप्त संदर्भात या दोन्हीही उद्धरणांचे अर्थ वेगळ्या रीतीने लावता येतात व लावलेही पाहिजेत. *कन्यापितृत्वं खलु नाम कष्टम्* (मुलीचा बाप होणे म्हणजे दुःखच!) किंवा *न वै स्त्रैणानि सख्यानि सन्ति सालावृकाणां हृदयानि एता* (स्त्रियांबरोबर मैत्री होणे दुर्घटच; कारण त्या लांडग्यांच्या काळजाच्याच असतात.) ही धारणा पिढ्यान्‌पिढ्या जपणाऱ्या समाजात कालिदासाची स्त्रीविषयक सहानुभूती वेगळेपणाने उठून दिसते.

*गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ* असा टाहो फोडणाऱ्या अजाची आर्तता आणि पुढची दुरवस्था पाहिली तर स्त्रीचे केवढे महत्त्व कालिदासाने दाखवलेले आहे ते ध्यानी येईल. कन्याजन्मही पुत्रजन्माइतकाच आनंददायी असतो हे त्याने उमेचा जन्म आणि रघूचा जन्म या वेळच्या तुल्य वर्णनातून दाखवले आहे. 'बाई ग, तुझ्या शुद्ध आचरणाच्या पुण्याईनेच आमची मुले फार मोठ्या संकटातून तरली' असे म्हणणाऱ्या प्रेमळ सासवा त्याने दाखवल्या आहेत. शंभूलाही विवाह करावासा वाटला कारण सत्पत्नी हे सर्व धर्मक्रियांचे अधिष्ठान असते हे त्याला अरुंधतीमुळे कळले. किंबहुना, आपला विवाह ठरवण्याच्या बाबतीत अरुंधतीने पुढाकार घ्यावा, कारण अशा संदर्भात स्त्रियाच प्रगल्भ असतात, असेही त्याने स्पष्ट केले आहे.

असे सारे संदर्भ लक्षात घेतले आणि कालिदासाच्या संपूर्ण स्त्रीसृष्टीचे अवलोकन केले तर असे निश्चित म्हणता येते की कालिदासाने स्त्रीचे मन अतिशय बारकाव्यांनिशी जाणले होते. तिच्या अनेकविध गुणदोषांची त्याला फार चांगली जाण होती. तिच्या सुखदुःखांविषयी त्याला मनापासून सहानुभूती होती. त्याची संविधानके जरी रूढ परिपाटीप्रमाणे नायकाला मध्यवर्ती स्थान देणारी असली तरी त्याच्या मुख्य नायिका त्याच्या काव्यग्रंथांचे आभाळ व्यापून राहिल्या आहेत. त्या वाचकांच्या मनात घर करून राहतात.

*(जुलै १९९९, कालिदास विशेषांक)*

# कालिदास विशेषांकामागची संपादकीय भूमिका

आषाढचा पहिला दिवस (यंदा १३ जुलै) हा 'महाकवी कालिदास दिन' म्हणून साजरा होतो. त्या निमित्ताने 'अंतर्नाद'चा हा जुलै अंक 'कालिदास विशेषांक' म्हणून वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

कालिदासाच्या व्यक्तिगत जीवनाचे संदर्भ निर्विवादपणे सांगणारा दस्तऐवज उपलब्ध नाही. त्याचे चित्रही अस्तित्वात नाही. त्याच्या लेखनावरूनच त्याच्या व्यक्तित्वाचा अंदाज करता येतो. अर्थात ह्या संदिग्धतेमुळे कालिदासाच्या वाङ्मयीन महात्मतेला कुठल्याही प्रकारे उणेपण येत नाही. किंबहुना कालिदास हा भारतीय साहित्यकारांमध्ये सर्वश्रेष्ठ आहे असे म्हटले तर बहुधा ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

*मरणं प्रकृतिः शरीरिणाम्, शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्, किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्, अतिस्नेहः पापशंकी* यांसारखी त्याची वचने सर्वच भारतीय भाषांनी शतकानुशतके अलंकार म्हणून मिरवली आहेत. शकुंतला, सीता आणि उमा यांच्या रूपाने भारतीय स्त्रीत्वाचे आदर्शच कालिदासाने साकार केले आहेत. मुग्ध प्रणय, अनुनय, पूर्तता, दीर्घ विरह आणि चिरमिलन या प्रेमाच्या विविध अवस्था चितारणाऱ्या 'शाकुंतल'चा उल्लेख 'काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शकुंतला' असा केला जातो. शृंगाररसाचा सम्राट मानला गेलेल्या कालिदासाने 'मेघदूता'त निसर्गसौंदर्याचाही सर्वोत्तम आविष्कार केला आहे. कालिदासाविषयी श्रेष्ठ जर्मन विचारवंत प्रो. मॅक्स मुल्लर लिहितात, "Rarely has a man walked our earth who observed the phenomena of living nature as accurately as he did, though his accuracy was of course that of a poet and not that of a scientist."

अंतःपुरातील गुजगोष्टींपासून हिमालयाच्या उत्तुंग शिखरांपर्यंत कुठेही कालिदासाची लेखणी लीलया संचार करते. भोग व त्याग, शृंगार व वैराग्य, काम व मोक्ष यांचा सुरेख समन्वय कालिदास साधतो. डॉ. के. ना. वाटवे यांनी म्हटल्याप्रमाणे वाल्मीकीच्या नीतीला आणि व्यासाच्या बुद्धीला कालिदासाने सौंदर्याची जोड दिली. व्यासाने सत्य, वाल्मीकीने शिव, तर कालिदासाने सौंदर्य यांची प्रचीती प्रामुख्याने दिली. व्यास, वाल्मीकी आणि कालिदास यांच्यात भारतीय संस्कृतीचे सार साठवलेले आहे असे महर्षी अरविंद म्हणत ते याचसाठी.

हे सगळे असूनही साहित्यप्रेमींच्या आजच्या पिढीला कालिदासाचा म्हणावा तितका परिचय नाही. एखाद्या मराठी नियतकालिकाने 'कालिदास विशेषांक' काढायचा हा कदाचित पहिलाच प्रयत्न असावा.

कालिदासाची थोरवी वाचकांपुढे पुनश्च आणणे या व्यतिरिक्त हा 'कालिदास विशेषांक' काढण्याचे दुसरेही एक कारण आहे. ते म्हणजे राजकीय अस्थिरतेच्या व विघटनवादी प्रवृत्तींच्या वाढीच्या या काळात भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे एक प्रतीक म्हणून कालिदास महत्त्वपूर्ण आहे. भारताच्या बहुतांश भागांची वर्णने त्याच्या साहित्यात आढळतात. भारतीय संस्कृतीचे म्हणून जे आदर्श आहेत, ते कालिदासाने अभिव्यक्त केले आहेत व म्हणूनच केरळपासून काश्मिरपर्यंत सर्वांनाच कालिदास पूज्य वाटतो, 'आपला' वाटतो.

हा विशेषांक काढण्यामागे संस्कृत भाषेकडे जाणकारांचे लक्ष वेधावे हाही 'अंतर्नाद'चा एक उद्देश आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा इस्राएलचा पुनर्जन्म झाला, तेव्हा ठिकठिकाणचे ज्यू तिथे परतले आणि त्यांनी जवळपास मृतप्राय झालेल्या त्यांच्या हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन केले. आज इस्राएलमधले सर्व व्यवहार हिब्रू भाषेत चालतात. आपणही संस्कृतचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही. भारत जगाला देऊ शकेल अशा आयुर्वेदासारख्या आपल्या संचिताच्या अनेक भांडारांची संस्कृत ही किल्ली आहे. नवीन शब्द निर्माण करायची संस्कृत भाषेची अनन्यसाधारण क्षमता हा सर्वच भारतीय भाषांचा मोठा आधार आहे. कॉम्प्युटरला संगणक किंवा प्रोग्रॅमला आज्ञावली यांसारखे सुरेख प्रतिशब्द संस्कृतमधूनच आपण निर्माण करू शकतो. संस्कृत ही भारताची राष्ट्रभाषा असावी असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही नमूद केले होते. जगातल्या अनेक विद्यापीठांत आजही संस्कृतचे अध्ययन चालते, ही बाब लक्षणीय आहे.

अनेकांच्या सहकार्यातून हा विशेषांक साकार झाला आहे. सर्वप्रथम उल्लेख करायला हवा तो कॅप्टन माधव व सौ. अनुराधा चिन्मुळगंद या साहित्यप्रेमी दांपत्याचा. या 'कालिदास विशेषांका'ची आखणी करण्यासाठीची पहिली बैठक त्यांच्याच घरी जून १९९८ मध्ये झाली. ह्या आखणीत डॉ. अशोक केळकर यांचीही महत्त्वाची मदत मिळाली. वसंत बापट, सरोजा भाटे, स. ह. देशपांडे, विमला जोशी, शान्ता शेळके, लीला अर्जुनवाडकर, मृणालिनी गडकरी आणि चंद्रकांत बांदिवडेकर या सर्व ज्येष्ठ लेखकांनी विहित मुदतीमध्ये आपापले लेख दिले. केवळ 'अंतर्नाद'विषयीच्या आपुलकीतूनच त्यांनी हे कष्ट घेतले. 'कालिदासकालीन सामाजिक-सांस्कृतिक जीवन' हा पूर्वनियोजित लेख केवळ अचानक उद्भवलेल्या गंभीर आजारपणामुळे प्रा. राम शेवाळकर देऊ शकले नाहीत, याचे वाईट वाटते. प्रा. यास्मिन शेख यांनी अंकातील सर्व लेख शुद्धलेखनाच्या दृष्टीने काळजीपूर्वक तपासून दिले. धनंजय सस्तकर यांनी अंकासाठी अतिशय कल्पक असे मुखपृष्ठ तयार करून दिले. या सर्वांविषयी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. अंकात काही चांगले असेल तर त्याचे श्रेय याच सर्वांना आहे.

*(जुलै १९९९, कालिदास विशेषांक)*

# रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र

**श्रीपाद जोशी**

रवींद्रनाथांनी 'शिवाजी-उत्सव' ही १८ कडव्यांची दीर्घ, प्रसादपूर्ण कविता बंगालीत लिहिली. इतकेच नव्हे तर कलकत्त्याच्या टाउन हॉलमध्ये त्यांनी ती स्वतः वाचूनही दाखवली. असे सांगतात, की सदर कवितेचे मराठी भाषांतर वाचल्यावर लोकमान्य टिळकांनी रवींद्रनाथांना लिहिले, ''तुमचे हे काव्य बंगाल व महाराष्ट्र यांचे मिलन युद्धाशिवाय घडवून आणील, यात मुळीच शंका नाही.''

विश्वकवी रवींद्रनाथ ठाकूर (टागोर), थोर चिंतक खलील जिब्रान आणि उर्दूचे महाकवी इकबाल, हे गेली ५० वर्षे माझ्या अभ्यासाचे विषय राहिले आहेत. या तिन्ही महाकवींच्या अभ्यासाची प्रेरणा आचार्य स. ज. भागवत यांच्याकडून मला मिळाली; आणि त्यांच्याच मार्गदर्शनाने मी या तिघांविषयी मराठी, हिंदी व उर्दू या तीन भाषांत पुष्कळ लिखाण केले. त्यापैकी बरेचसे पुस्तकरूपाने प्रकाशितही झाले. रवींद्रनाथांच्या जन्मशताब्दीच्या वेळी आचार्यांच्या प्रेरणेनेच मी रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र हे १९० पृष्ठांचे एक संकलन तयार केले होते व ते 'महाराष्ट्र राज्य रवींद्रनाथ जन्मशताब्दी समिती'चे पहिले प्रकाशन म्हणून १९६१ साली प्रसिद्धही झाले होते. या गोष्टीला ४० वर्षे होऊन गेली. आता ते पुस्तक अप्राप्य (दुर्मिळ) झाले आहे. ते वाचलेल्या वाचकांच्या स्मरणातही ते आता राहिले नसावे. नव्या पिढीला तर त्याची माहितीही असण्याची शक्यता फारशी नाही. म्हणून अंतर्नादच्या नव्या दमाच्या वाचकांसाठी त्याच पुस्तकाच्या आधाराने हा लेख लिहिला आहे.

## चार कविता

रवींद्रनाथांच्या काही हजार कवितांतून महाराष्ट्रविषयक कविता शोधून काढणे तसे अवघड होते. परंतु चिकाटी असेल आणि आपण करीत असलेल्या कामात अद्‌भुत आनंद मिळत असेल तेव्हा त्यातला अवघडपणा नाहीसा होतो, हा माझा अनुभव या बाबतीतही खरा ठरला आणि मला त्यांच्या अशा चार कविता सापडल्या. त्यांपैकी 'प्रतिनिधी', 'सती' व 'विचारक' या तीन काव्यकथा असून त्यांपैकी 'प्रतिनिधी' ही कविता 'मराठ्यांची संग्रामगीते' (Ballads of The Maratha) या शीर्षकाने एच. ए. ॲक्वर्थ साहेबांनी संकलित केलेल्या ग्रंथातील शिवाजी व रामदास यांच्या भेटीवर आधारलेल्या ऐतिहासिक घटनेवर (की दंतकथेवर?) आधारलेली आहे. (एका दृष्टीने या चारही कथाकविता ॲक्वर्थ साहेबांच्या लिखाणावर आधारित आहेत.)

या भेटीत ऐतिहासिकदृष्ट्या किती तथ्य आहे, हे इतिहासकारच सांगू शकतील. या बाबतीत इतिहासकारांमध्ये किती तीव्र व मूलभूत स्वरूपाचे मतभेद आहेत, याची कल्पना जिज्ञासू वाचकांना असलेच. ते कसेही असले तरी रवींद्रनाथाची ही कविता नाट्यगुणांनी परिपूर्ण असून रसिक वाचक तिच्यातील कल्पनारम्य (रोमँटिक) संवाद व वातावरण यांचा रसास्वाद घेऊन खूष होतात. एखाद्या काव्यकथेत नाट्यमयता व कल्पनारम्यता यांच्याबरोबरच मानवी जीवनातील एखादे उच्च तत्त्व गुंफणे ही रवींद्रनाथांची विशेषता या कवितेतही आहे. त्यामुळे ही साधी दंतकथा न राहता एक संदेशकविता बनते.

दुसरी कविता 'सती' हीदेखील १८१४ साली 'लाँगमन्स ग्रीन्स आणि कंपनी'ने प्रकाशित केलेल्या ॲक्वर्थ साहेबांच्या Ballads of The Maratha या पुस्तकातील The Story of A Sanyasee (एका संन्याशाची कहाणी) या शीर्षकाच्या कथेवर आधारलेली आहे. ही कविता मूळ एकाच पोवाड्यावर आधारित नसून अनेक पोवाड्यांतील घटनांचे संकलन तिच्यात झाले आहे. मात्र या कवितेतील घटनेचे 'सती'च्या मूळ कथेशी खूपच साम्य आहे. रवींद्रनाथांची स्त्रीविषयक सहानुभूतीची भूमिका या कवितेत स्पष्ट दृगोच्चर होते. वस्तुतः हे एक संवाद-गीतच आहे. तिला छोटी संगीतिका असेही म्हणता येते.

अमाबाई (उमाबाई) या विवाहवेदीवर उभ्या असलेल्या वधूला एक यवन पळवून नेतो आणि तिच्याशी लग्न करून चांगला संसार करतो. तीही त्या संसारात रमते. तिला एक मुलगाही होतो. कालांतराने, ज्याच्याशी तिचे मुळात लग्न होणार होते तो जिवाजी या यवनावर स्वारी करून त्याला ठार मारतो. त्या लढाईत जिवाजीही मारला जातो. आता अमाबाईने जिवाजीच्या प्रेताबरोबर स्वतःला जाळून घेऊन सती व्हावे, यासाठी तिचा बाप विनायकराव तिला समजवण्याचा प्रयत्न करतो. पण ती आपले घरटे मोडून, मुलाला अनाथ बनवून, परपुरुषासाठी सती जाण्यास तयार होत नाही. विनायकरावाला तिची भूमिका पटते. तो तिला सोडून देण्यास तयार होतो. पण तिची आई रमाबाई अत्यंत करारीपणाने तिला जिवाजीच्या सरणावर सती जाण्यास भाग पाडते, अशी ही कथा आहे. या कवितेतील संवादात खरा धर्म, हृदयाचा धर्म म्हणजे काय याची सुंदर मूलग्राही चर्चा रवींद्रनाथांनी केली

आहे. तिच्यामुळे ही साधी कविता अत्यंत उच्च अशा कलात्मक पातळीवर जाऊन पोचते.

तिसरी कविता 'विचारक' (न्यायाधीश) ही पेशव्यांचे सरन्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांनी रघुनाथराव (राघोबादादा) पेशव्याला त्याच्या पुतण्या नारायणराव याच्या खुनाबद्दल देहांताची शिक्षा सुनावली, या घटनेवर आधारलेली आहे. कवितेच्या शेवटी शास्त्रीबुवा म्हणतात, ''मी हा न्यायदंड टाकून दिला आणि आपल्या गावी परत चाललो. इथलं न्यायालय हे पोरखेळाचं घर बनलंय. तिथं मी यापुढं आणखी गुंतून राहणार नाही...''

त्या दीन-दरिद्री ब्राह्मणाने आपले गौरवपद सोडून दिले. सारी संपत्ती दूर फेकून दिली आणि खेड्यातल्या आपल्या पर्णकुटीत तो परत निघून गेला. ही कविता वाचताना आपल्या डोळ्यांसमोर आजच्या लाचार व लोभी न्यायाधीशांचे उद्वेगजनक चित्र नकळत उभे राहून जाते.

चौथी कविता 'शिवाजी उत्सव'. १९०४ साली लिहिलेली १५० पंक्तींची (चरणांची) ही दीर्घ, प्रसादपूर्ण कविता कोणत्याही अन्य भाषेत लिहिल्या गेलेल्या शिवाजीविषयक कवितांमध्ये सर्वश्रेष्ठ समजली जाते. मराठी भाषकांनी तिची फारशी दखल घेतल्याचे दिसत नाही. त्याचे कारण बहुधा हे असावे की ज्या उच्च पातळीवरून रवींद्रनाथांनी शिवाजी महाराजांच्या वैशिष्ट्यपूर्ण श्रेष्ठत्वाचे रसग्रहणात्मक मूल्यमापन केले आहे, त्याचे आकलन स्थूलत्वाची, बटबटीतपणाची आवड असणाऱ्या मराठी मनाला झाले नाही. त्या आणि त्यानंतरच्याही काळात अनेक बंगाल्यांच्या जिभेवर ती कविता होती. अगदी अलीकडच्या काळातही ती संपूर्ण कविता तोंडपाठ म्हणून दाखविणारे बंगाली लोक मला भेटले आहेत. या कवितेचा इतिहासही मोठा उद्बोधक आहे.

लोकमान्य टिळकांनी १८९७ साली देशभक्तीच्या भावनेचा प्रचार करण्याच्या उद्देशाने शिवाजीउत्सव सुरू केला. कै. सखाराम गणेश देउसकर (१८६९-१९१६) या महाराष्ट्रीय गृहस्थांनी या उत्सवाचे लोण बंगालमध्ये नेऊन पोचवले. एक श्रेष्ठ दर्जाचे पत्रकार व स्वदेशाभिमानी साहित्यिक म्हणून आजही श्री. देउसकर यांची बंगालमध्ये ख्याती आहे. 'देशेर कथा' हा त्यांचा ग्रंथ जहाल राष्ट्रवादी बंगाल्यांचा स्फूर्तिग्रंथ बनला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे १९०४ साली कलकत्त्यात शिवाजी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होऊ शकला. त्यांच्याच विनंतीवरून रवींद्रनाथांनी 'शिवाजी-उत्सव' ही १८ कडव्यांची दीर्घ, प्रसादपूर्ण कविता बंगालीत लिहिली. इतकेच नव्हे तर कलकत्त्याच्या टाउन हॉलमध्ये त्यांनी ती स्वतः वाचूनही दाखवली. असे सांगतात, की सदर कवितेचे मराठी भाषांतर वाचल्यावर लोकमान्य टिळकांनी रवींद्रनाथांना लिहिले, ''तुमचे हे काव्य बंगाल व महाराष्ट्र यांचे मिलन युद्धाशिवाय घडवून आणील, यात मुळीच शंका नाही.''

लोकमान्यांच्या या उद्गारांतील 'युद्धाशिवाय' हा शब्द महत्त्वाचा आहे. कारण गुरुदेवांच्या या काव्यात त्यांनी असे म्हटले होते की, ''गेल्या तीन शतकांपासून कोणाच्या मनात असा विचारही आला नाही, स्वप्नातही कोणाला कळले नाही, की तुझे नाव बंगाल-महाराष्ट्राला युद्धाशिवाय एकत्र करील...'' त्यांच्या या विचाराला लोकमान्यांनी दिलेला तो प्रतिसाद होता.

ही संपूर्ण कविता रवींद्रनाथांनी शिवाजी महाराजांना संबोधून लिहिली आहे. तिच्या कडव्या-कडव्यात त्यांनी शिवाजीसाठी जी संबोधने वापरली आहेत, त्यातून रवींद्रनाथांची प्रतिभा आणि भक्ती या गोष्टी सजीवपणे व्यक्त होतात. ती संबोधने अशी :

हे राजा शिवाजी, हे विचारवंता, हे वीर मराठ्या, हे राजतपस्वी वीरा, हे राजसंन्याशा, हे अशरीरी तापसा, हे स्वामी, हे धर्मराजा, हे अमरमूर्ती, हे राजन...

या कवितेच्या पहिल्या कडव्यात विश्वकवी म्हणतात, ''हे राजा शिवाजी, कोण जाणे कोणत्या दूरच्या शतकाच्या, कोणत्या एका अप्रसिद्ध दिवशी, महाराष्ट्राच्या कोणत्या शैलावर, अरण्याच्या अंधकारात बसून 'छिन्नविच्छिन्न झालेल्या, विस्कटलेल्या भारताला मी एका धर्मराज्याच्या बंधनात बांधून टाकीन' ही भावना तुझे भाल प्रकाशित करून विद्युत्-प्रभेप्रमाणे अवतरली होती.''

दुसऱ्या कडव्यात ते म्हणतात, ''त्या दिवशी हा बंगदेश चमकून झोपेत जागा झाला नाही. त्याला तो संदेश मिळाला नाही. तो धावून बाहेर आला नाही. त्याच्या प्रांगणामध्ये शुभ शंखनाद दुमदुमला नाही. शेकडो ग्रामवासीयांची दले शांतमुखाने आपले कोमल, निर्मल, श्यामल उत्तरीय पांघरून पेंगुळलेल्या संध्येला छातीशी धरून राहिली.''

शेवटच्या दोन कडव्यांत ते म्हणतात, ''त्या दिवशी आम्ही तुझे सांगणे ऐकले नाही. आता आम्ही तुझा आदेश शिरोधार्य मानू. तुझ्या ध्यानमंत्राने भारतातील सारे प्रदेश एकमेकांना स्नेहालिंगन देतील, बैराग्याच्या उत्तरीयाची ध्वजा बनवून आम्ही ती फडकवू. तेच आम्हा दरिद्र्यांचे सामर्थ्य! 'या भारतात एक-धर्म-राज्य होईल!' या महावचनाला आम्ही आमचे धन बनवू. हे बंगालवासीयांनो! आज मराठ्यांच्याबरोबर एक स्वराने म्हणा, शिवाजीचा जय असो!''

या कवितेतील 'एक-धर्म-राज्य' या शब्दसमूहाच्या खऱ्या अर्थाचे आजच्या दूषित वातावरणात वाढलेल्या वाचकांना कदाचित नीट आकलन होणार नाही. हाच अर्थ व्यक्त करणारा 'रामराज्य' हा शब्द गांधीजींनी वापरला होता. त्याचा खरा अर्थ न समजल्यामुळे देशात व जगात खूपच गैरसमज पसरला. खोट्या धर्मनिरपेक्षतेच्या दारूची झिंग चढलेले आजचे तथाकथित पुरोगामी व बुद्धिप्रामाण्यवादी लोक रवींद्रनाथांच्या 'धर्मराज्य' या शब्दाचा व्यापक अर्थ समजण्याची कुवत नसल्यामुळे, लाल फडके पाहताच बुजून उधळणाऱ्या खोंडाप्रमाणे, त्यांना छुपे हिंदुत्ववादी व क्षुद्र जातीयवादी ठरविण्यास क्षणाचाही विलंब लावणार नाहीत. पण त्याला इलाज नाही. रवींद्रनाथ हे 'हे विश्वचि माझे घर' मानणारे, विश्वभारतीचे पुरस्कर्ते व सच्चे मानवतावादी होते, याची कल्पना असणाऱ्यांचा मात्र तसा काही गैरसमज होण्याची मुळीच शक्यता नाही. वस्तुतः धर्म आणि संप्रदाय या शब्दांतील फरक न कळल्यामुळे जगभर पसरलेल्या गैरसमजाचाच तो परिणाम आहे. ते कसेही असले तरी या कवितेच्या संदर्भात एक गोष्ट सहज

लक्षात येण्यासारखी आहे. ती अशी, की गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांना संकुचित मराठी मनाच्या कोंदणातून बाहेर काढून रवींद्रनाथांनी त्यांना भारतवर्षाच्या दिव्यभव्य सिंहासनावर, जनगणमनाच्या हृदयसिंहासनावर नेऊन बसवले आहे, यात मुळीच शंका नाही.

## पाच गद्य लेख

महाराष्ट्राचा इतिहास, मराठी माणूस व महाराष्ट्र देश (भूमी) यांच्याविषयी रवींद्रनाथांनी पहिल्यापासूनच एक अद्‌भुत आकर्षण वाटत असावे. ही गोष्ट जशी त्यांच्या उपरोक्त कवितांवरून लक्षात येते, तशीच ती त्यांच्या काही गद्य लेखांतूनही प्रकर्षाने दिसून येते. त्यांचे असे पाच लेख मला त्यांच्या साहित्यात सापडले. ते असे :

१) झान्सीर राणी, २) शिवाजि ओ माराठा जाति, ३) शिवाजि ओ गुरुगोविंदसिंग, ४) बोम्बाई शहर, व ५) कारवार.

यांपैकी 'झान्सीर राणी' हा लेख इ.स. १८७७ साली 'भारती' या नियतकालिकात त्यांनी वयाच्या केवळ सतराव्या वर्षी 'भानुसिंह' या टोपणनावाने लिहिलेला असून त्यांच्या 'इतिहास' या लेखसंग्रहात (पृ. १०३ ते ११३) समाविष्ट आहे. तसा हा लेख मुळात मोठा आहे. परंतु अल्पवयात लिहिला असल्यामुळे त्यात काही त्रुटी राहिल्या आहेत. म्हणून त्या लेखाच्या शेवटी रवींद्रनाथ लिहितात, ''इंग्रजी इतिहासातून राणीची एवढीच माहिती आम्हांला मिळाली आहे. आम्ही स्वत: तिचा जो काही इतिहास जमवला आहे, तो पुढे-मागे प्रसिद्ध करण्याची आमची इच्छा आहे.'' परंतु पुन्हा त्यांनी लक्ष्मीबाईंविषयी कोठे लिहिल्याचे दिसत नाही. या लेखातील तात्या टोपे, कुमारसिंह व लक्ष्मीबाई यांची माहिती तशी सर्वज्ञात आहे. परंतु लेखाच्या प्रारंभी रवींद्रनाथांनी जे मनोगत व्यक्त केले आहे, ते त्यांच्या ज्वलज्जहाल देशभक्तीवर प्रकाश टाकणारे आहे. त्यात ते म्हणतात,

''आम्हांला एकदा असे वाटले होते, की हजार वर्षांच्या गुलामगिरीच्या भाराखाली दबला गेल्यामुळे राजपुतांचा वीर्यवन्ही विझून गेला असावा आणि मराठ्यांना त्यांच्या देशप्रेमाचा व रणकौशल्याचा विसर पडला असावा. पण मग बंडाच्या वावटळीमध्ये किती वीर पुरुष उत्साहाने पेटून आपल्या कार्यसिद्धीसाठी भारताच्या प्रांताप्रांतांत लढाया करीत फिरले ते आम्ही पाहिले, तेव्हा आमच्या लक्षात आले की विशिष्ट जातींमध्ये जे गुण सुप्तावस्थेत पडून असतात, ते सारे एखाद्या बंडाच्या वेळी, आणीबाणीच्या प्रसंगी खडबडून जागे होतात. शिपाई-युद्धाच्या वेळी अनेक राजपूत व महाराष्ट्रीय वीरांनी आपले शौर्य चुकीच्या मार्गाने वापरले, ही गोष्ट स्वीकार करूनही ते सच्चे वीर होते, हे मान्य करावे लागेल.''

तात्या टोपे यांच्या शौर्याचे वर्णन केल्यावर ते लिहितात, ''असा हा असामान्य वीर पारणच्या जंगलात झोपला असता मानसिंहाने विश्वासघात करून त्याला पकडून शत्रूच्या हवाली केले. जाडजूड शृंखलांनी जखडून त्यांना लष्करी न्यायालयासमोर उभे करण्यात आले. आणि मग त्यांनी फाशीच्या फळीवर आरोहण केले. शेवटपर्यंत ते निर्भय व आनंदी राहिले. त्यांनी दयेची याचना केली नाही. ते एवढेच म्हणाले की, ब्रिटिश सरकारच्या हातून मी दुसरी कसलीच आशा (अपेक्षा) बाळगलेली नाही. माझी एवढीच विनंती आहे, की माझी फाशीची शिक्षा ताबडतोब अमलात आणली जावी; आणि माझ्यासाठी माझ्या निरपराध बंदी परिवाराला यातना भोगाव्या लागू नयेत.''

यानंतर त्यांनी जे लिहिले आहे ते, त्या काळच्या निर्घृण गोऱ्या सरकारच्या संशयी व खुनशी वृत्तीचा विचार करता खूपच निधडेपणाचे आहे, हे आजच्या सामान्य वाचकाच्या कदाचित लक्षातही येणार नाही. ते लिहितात, ''इंग्रज लोक स्वार्थी, बनिये नसते, शौर्याविषयी त्यांच्या मनात निष्कपट भक्ती असती, तर त्या दुर्दैवी वीराला अशा प्रकारे कैदी बनून गुन्हेगाराप्रमाणे अपमानित होऊन मरावे लागले नसते. तसे झाले असते तर एव्हाना तात्या टोपे यांचा दगडी पुतळा इंग्लंडातील संग्रहालयामध्ये श्रद्धापूर्वक जपून ठेवण्यात आला असता. ज्या औदार्याने सिकंदराने पुरुराजाचे क्षत्रियोचित धाष्टर्य मानले, त्याच औदार्याने तात्या टोपे यांना क्षमा करण्यात आली असती तर संस्कृति-अभिमानी इंग्रज जातीच्या बाबतीत ती अधिक गौरवाची गोष्ट झाली नसती काय? या असामान्य भारतीय वीराच्या बाबतीत इंग्रजांनी रक्ताचा बदला रक्ताने घेऊन आपली पाशवी वृत्तीच सिद्ध केली, यात शंका नाही.''

राणी लक्ष्मीबाईसंबंधी ते लिहितात, ''या सर्व वीरांमध्ये झांशीची राणी वीरांगना लक्ष्मीबाई यांना आम्ही विशेष भक्तिपूर्वक नमस्कार करतो. त्यांचा खरा व विस्तृत इतिहास मिळणे कठीण आहे. शोध केल्यानंतर जो काही इतिहास मिळाला तोच शब्दबद्ध करून आम्ही वाचकांना सादर करीत आहोत...''

## शिवाजीविषयक दोन लेख

रवींद्रनाथांनी १९०८ साली लिहिलेला शिवाजी ओ माराठा जाति आणि १९१० साली लिहिलेला शिवाजि ओ गुरु गोविंदसिंह हे दोन लेख रवींद्रनाथांनी शिवाजी महाराज व महाराष्ट्रीय लोक (ओ = व) यांच्याविषयी वाटणाऱ्या आदरयुक्त कौतुकाची उत्कृष्ट अभिव्यक्ती करणारे आहेत. या लहानशा लेखात या दोन लेखांतील आवश्यक तेवढी उद्धरणे देणे शक्य नसल्यामुळे वानगीदाखल काही निवडक उद्‌गार उद्‌धृत करणे भाग आहे. यांपैकी पहिला लेख ही शांतिनिकेतनातील ब्रह्मचर्याश्रमाचे भूतपूर्व प्राध्यापक कै. शरत कुमार राय यांच्या 'शिवाजि ओ मराठा जाति' या ग्रंथाची प्रस्तावना असून दुसरा लेख ही त्याच लेखकाच्या शिखगुरू ओ शिखजाति या ग्रंथाची प्रस्तावना आहे. या लेखाचे इंग्रजी भाषांतर श्री. यदुनाथ सरकार यांनी केले होते. ते 'मॉडर्न रिव्ह्यू' मासिकाच्या एप्रिल १९११च्या अंकात The Rise and Fall of the Sikh Power या शीर्षकाने प्रसिद्ध झाले होते. या लेखावर शीख लोक खूप नाराज झाले होते, असे वाचल्याचे स्मरते.

यांपैकी पहिल्या लेखात रवींद्रनाथ म्हणतात, ''आधुनिक भारतातील एखाद्या प्रदेशाला जर इतिहास असेल आणि त्या इतिहासातून जर काही ऐतिहासिक तत्त्व शिकता येत असेल तर तो मराठ्यांचाच इतिहास होय... मराठ्यांच्या इतिहासात आपल्याला

शिवाजी हाच सर्वश्रेष्ठ पुरुष दिसतो. परंतु साऱ्या मराठ्यांनी शिवाजी महाराजांनी मोठे केले नसते तर ते मोठे होऊ शकले नसते... महाराष्ट्रातील धर्मांदोलनाने देशातील सारे लोक एकत्र घुसळले जात होते. शिवाजी महाराजांनी प्रतिमा याच मंथनातून निर्माण झालेली होती. ती साऱ्या देशाच्या धर्मोद्‌बोधनाशी संबद्ध होती. त्यामुळेच देशाच्या शक्तीत शिवाजी महाराजांना धन्यत लाभली आणि त्यांच्या शक्तीमुळे देश धन्य झाला. अखेर कालांतराने जेव्हा ही धर्मसाधना स्वार्थसाधनेत परिणत होऊन विकृत झाली... तेव्हा परस्परअविश्वास, मत्सर, विश्वासघात इत्यादींनी मराठ्यांच्या प्रतापच्या मराठ्यांच्या प्रतापाच्या विशाल भिंती जीर्णविदीर्ण करून टाकल्या. धर्माने साऱ्या समाजाला एक केले होते; पण स्वार्थाने त्याला विस्कळीत करून टाकले. हाच मराठ्यांच्या अभ्युत्थानाचा व पतनाचा इतिहास होय.''

दुसऱ्या लेखात रवींद्रनाथ म्हणतात, ''गुरू नानकांनी ज्या मोक्षप्राप्तीला सर्वांत श्रेष्ठ ठरवले होते, तिच्यावर गुरू गोविंदांना आपले लक्ष स्थिर करता आले नाही. शत्रूच्या हातून मुक्ती मिळविणे हीच एक गोष्ट त्यांनी आपल्या शिष्यांच्या मनावर ठसविली. त्यामुळे इतिहासांमध्ये क्षणभर शिखांचा पराक्रम उज्ज्वलपणे चमकला हे खरे; परंतु बाबा नानकांनी जे पाथेय देऊन त्यांना एका विशाल, उदार मार्गावरून चालण्याची प्रेरणा दिली होती, ते पाथेय त्यांनी तेथेच खर्च करून टाकले आणि आपली यात्राही त्यांनी याच ठिकाणी संपविली. यांच्यानंतरचा शिखांचा इतिहास म्हणजे फक्त लढाया आणि मुलूखगिरी यांचाच इतिहास होय. शीख इतिहासाचा परिणाम आमच्या देशाच्या बाबतीत अत्यंत शोकावह झाला आहे.''

शिवाजी महाराजांसंबंधी या लेखात गुरुदेव म्हणतात, ''शिवाजी महाराजांनी ज्या हिंदू समाजाला मोगल आक्रमणाविरुद्ध विजयी बनविण्याचा प्रयत्न केला, त्या समाजाच्या मुळामध्येच आचार-विचारांतील भेदभाव घर करून राहिलेला होता. त्या भेदमूलक धर्मसमाजालाच त्यांनी साऱ्या भारतवर्षात विजयी बनविण्याचा प्रयत्न केला. यालाच म्हणतात, वाळूचा बांध बांधणे! ती तर असाध्य गोष्ट होती!''

## स्फुट प्रसंग

रवींद्रनाथांनी मुंबई व कारवार या शहरांविषयी लिहिलेले लेख वेगवेगळ्या कारणांसाठी उल्लेखनीय आहेत. मुंबईविषयी ते लिहितात, ''जे दृश्य पाहून हृदय सर्वांत अधिक तृप्त होते ते म्हणजे येथील स्त्री-पुरुषांचा संमिश्र समाज! स्त्रीवर्जित कलकत्त्याचे दैन्य किती मोठे आहे, ते येथे मुंबईला आल्यानंतरच पाहायला मिळते. अर्थात स्त्रीला पडद्यात ठेवण्याची ही शिक्षाच म्हणायची!''

कारवारसंबंधीच्या लेखात मुख्यत: तेथील निसर्गसौंदर्याचे हृदयंगम वर्णन आहे.

रवींद्रनाथांचे थोरले बंधू श्री. सत्येंद्रनाथ ठाकूर हे पहिले भारतीय सर्वोच्च मुलकी अधिकारी (आय.सी.एस.) होते. त्यांनी त्या काळच्या मुंबई इलाख्यात नोकरी करण्याचे पसंत केले. ते अधूनमधून छोट्या रवींद्रनाथांना आपल्याजवळ बोलावून घेत. त्यामुळे रवीबाबूंना बालपणीच महाराष्ट्र-गुजरात-कर्नाटकात राहण्याफिरण्याची संधी मिळाली. त्या वेळच्या आपल्या आठवणी रवींद्रनाथांनी छेलेबेला या बालपणाच्या आत्मकथेत नमूद करून ठेवल्या आहेत. इतर अनेक घटना श्री. प्रभातकुमार मुखोपाध्याय यांच्या रवींद्रजीवन या चतु:खंडात्मक बृहत रवींद्रचरित्रात समाविष्ट आहेत. रवींद्र रचनावली या १५ खंडांच्या ग्रंथातून बरीच उपयुक्त माहिती मिळाली. रवींद्र जन्मशताब्दीच्या वेळी (१९६१ साली) प्रत्येकी सुमारे १,००० पृष्ठांच्या १४ खंडांत पश्चिम बंगाल सरकारने अत्यंत स्वस्तात (१,००० रुपयांत) संपूर्ण रवींद्र रचनावली उपलब्ध करून दिली होती. (पंधरावा खंड सूचीचा होता.) त्यानंतर तिच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आणि बहुधा अजूनही निघत असाव्यात!

सत्येंद्रनाथ तुकाराम महाराजांचे मोठे चाहते होते. रवींद्रनाथांनाही ते तुकारामांचे अभंग समजावून सांगत. त्या अभंगांचे अनुवाद रवींद्रनाथ करीत. कालांतराने सत्येंद्रनाथांनी केलेल्या कवितांचा एक संग्रह नवरत्नमाला या शीर्षकाने प्रसिद्ध झाला. त्यात तुकारामांच्या अभंगांचे बंगाली अनुवादही आहेत.

२१ सप्टेंबर १९२२ रोजी रवींद्रनाथांनी विश्वभारतीसाठी मदत गोळा करण्याच्या निमित्ताने दक्षिण भारताच्या आपल्या दौऱ्यात पुण्याला भेट दिली होती. त्यावेळी त्यांना गायन समाज, आनंदाश्रम, केसरी मराठी संस्था, न्यू पूना कॉलेज, फीमेल हायस्कूल, फर्ग्युसन कॉलेज वगैरे ठिकाणी पानसुपाऱ्या झाल्या. रविवारी सकाळी किर्लोस्कर थिएटरमध्ये त्यांचे 'विश्वभारती'संबंधी निबंधवाचन झाले. व्याख्यानाकरिता लावलेल्या तिकिट विक्रीने ४३६ रुपये जमले. पैकी ५१ रुपये खर्च वजा जाता ३८५ रुपये विश्वभारती संस्थेला देण्यात आले. साऱ्या कार्यक्रमांचा वृत्तांत 'केसरी'मध्ये (२६/०९/१९२२) प्रसिद्ध झाला होता. एका सभेमध्ये लोकमान्य टिळकांसंबंधी आपली एक आठवण रवींद्रनाथांनी सांगितली. लोकमान्यांनी एका माणसाच्या हाती ५० हजार रुपयांचा चेक रवींद्रनाथांकडे पाठवून त्यांनी युरोपात जाऊन स्वत:च्या (रवींद्रनाथांच्या) विचारांचा प्रचार करावा, असे सुचवले होते. अर्थात रवींद्रनाथांनी ते पैसे घेतले नाहीत. परंतु लोकमान्यांच्या त्या कृतीतून लोकसंग्रहाची त्यांची भूमिका कशी दिसून येते, हे सांगण्यासाठी या घटनेचा उल्लेख केला होता. पुण्याच्या मुक्कामात पंडिता रमाबाईंचे व्याख्यान ऐकण्यास रवींद्रनाथ मुद्दाम गेले होते. पण स्वत:ला धर्मरक्षक समजणाऱ्यांनी ती सभा उधळून लावली. त्याबद्दल रवींद्रनाथांनी आपली नापसंती व्यक्त केली होती.

रवींद्रनाथांच्या प्रतिभेची कदर करणारी बंगलाबाहेरील पहिली व्यक्ती मुंबईची अन्नपूर्णा तर्खडकर हिच्याविषयी (श्री. बा. जोशी यांच्यासारख्या) अनेकांनी संशोधनपूर्ण लिखाण केले आहे. रवींद्रसाहित्याची अनुरागिणी या शीर्षकाखाली मी त्याचे संकलन केले आहे. ते एक फार मोठे प्रकरण आहे. त्याचा फक्त ओझरता उल्लेख करणेच या लेखात शक्य आहे.

अंतर्नादसाठी हा लेख लिहिताना या सगळ्या जुन्या स्मृती जाग्या झाल्या. त्याबद्दल संपादकांना मन:पूर्वक धन्यवाद!

(मे २०००, रवींद्रनाथ विशेषांक)

# रवींद्रनाथ विशेषांकामागची संपादकीय भूमिका

अंतर्नादने एप्रिल ९८मध्ये 'शेक्सपिअर विशेषांक' व जुलै ९९मध्ये 'कालिदास विशेषांक' प्रसिद्ध केला होता. या दोन्ही विशेषांकांचे वाचकांनी चांगले स्वागत केले होते. २०००मध्ये एखाद्या अर्वाचीन भारतीय साहित्यिकावर विशेषांक काढावा असे ठरले, त्यावेळी सर्वप्रथम रवींद्रनाथ ठाकूर यांचेच नाव डोळ्यांपुढे आले. एक गीतकार, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वचिंतक, देशभक्त अशा विविध भूमिकांतून रवींद्रनाथांनी इतिहासावर आपला ठसा उमटवला आहे. नोबेल पुरस्कार मिळवणारी ही केवळ पहिली भारतीय व्यक्ती नव्हे, हा पुरस्कार मिळवणारी ही पहिली युरोपबाहेरील व्यक्ती. *जन गण मन* आणि *आमार शोनार बांगला* ही गीते लिहून या एकाच कवीने भारत व बांगलादेश या दोन देशांना आपापली राष्ट्रगीते दिली. हाही एक विरळाच पराक्रम.

महाराष्ट्राबद्दल त्यांना विशेष आस्था होती. पण असे असूनही सर्वसामान्य मराठी माणसाला 'गीतांजली'पलीकडे रवींद्रनाथांचा फारसा परिचय नाही याची खंत वाटते. दुसरे समकालीन श्रेष्ठ बंगाली साहित्यिक शरच्चंद्र चटर्जी हे त्या मानाने मराठी वाचकांना जास्त परिचित. याचे श्रेय मामा वरेरकरांसारख्यांनी केलेले शरदबाबूंच्या कादंबऱ्यांचे अनुवाद, 'देवदास'सारखे चित्रपट वा 'श्रीकांत'सारख्या टीव्ही-मालिका यांना द्यावे लागेल. रवींद्रनाथांवर एखाद्या मराठी नियतकालिकाने विशेषांक काढायचा अलीकडच्या काळातील हा बहुधा पहिलाच प्रयत्न असावा.

व्यक्तिशः मला सर्वांत भावणारा रवींद्रनाथांचा विशेष म्हणजे त्यांचे सौंदर्यपूजन. सत्यम्-शिवम्-सुंदरम् हा भारतीय संस्कृतीचा आदर्श मानला जातो, परंतु या तिघांतील सत्यम् व शिवम् यांच्यावरच बहुतेक भारतीय महापुरुषांनी जास्त भर दिला आहे व सुंदरम्कडे तसे दुर्लक्षच केले आहे असे खूपदा वाटते. आपली शहरे, बागा, रस्ते, नद्या, देवळे, तीर्थक्षेत्रे अशा सर्वच ठिकाणी सुंदरम्कडे दुर्लक्ष होत आहे असे वाटते.

पुरुषोत्तम दास टंडन यांनी खजुराहो, कोणार्क व पुरी येथील मंदिरांतील कामोत्तेजक चित्रे व मूर्ती गाडून टाकाव्यात; असा प्रस्ताव स्वातंत्र्यपूर्वकाळात मांडला होता. महात्मा गांधींनीही या प्रस्तावाला पाठिंबाच दिला होता. विरोध करणाऱ्यांमध्ये सर्वांत आघाडीवर होते ते रवींद्रनाथ. त्यांच्याच विरोधामुळे शेवटी हा प्रस्ताव बारगळला.

रवींद्रनाथांचे सौंदर्यप्रेम त्यांचे अवघे जीवन भारून टाकणारे होते. ते परिधान करत असलेली सोनेरी-अंजिरी-नारिंगी वस्त्रे, उंची शाली, मखमली टोप्या यांतून ती सौंदर्यदृष्टीच दिसते. एरवी ऋषितुल्य वाटणाऱ्या रवींद्रनाथांना चॉकलेट, च्युईंगगम खूप आवडायचे. आइस्क्रिमदेखील. उन्हाळ्याच्या दिवसांत कधीकधी एकाच दिवसात ते आठ-दहा आंबेही फस्त करत. कसेतरी जगणे रवींद्रनाथांना मंजूर नव्हते. जीवनातील सर्व प्रकारच्या सौंदर्याचे ते उपासक होते. याला स्त्रीसौंदर्याचाही अपवाद नव्हता.

रवींद्रनाथांची पिढीजाद जमीनदारी दार्जिलिंगपासून दूर नव्हती. गंगेइतकेच हिमालयाच्या उत्तुंग शिखरांचेही त्यांना आकर्षण होते. दार्जिलिंग-कालिमपाँग परिसरात ते खूपदा घोड्यावरून फिरत. सत्यजित राय यांनी *कांचनजंगा* हा त्यांचा चित्रपट रवींद्रनाथांच्याच एका कथेवर बनवला. या चित्रपटात दार्जिलिंग परिसरात फिरायला आलेला एक गरीब तरुण स्थानिक जमीनदाराच्या मुलीच्या प्रेमात पडतो व लग्नाचा प्रस्ताव घेऊन जमीनदाराच्या भव्य हवेलीवर जातो. ''तू कुठे, आम्ही कुठे? ही हिंमत तू केलीसच कशी?'' – संतापलेला जमीनदार त्याच्यावर गरजतो. तो तरुण शांतपणे उत्तरतो, ''सर, मला ठाऊक आहे, की मी एक अगदी सामान्य तरुण आहे. पण कसं कोण जाणे, या उत्तुंग शिखरांच्या सहवासात मीही कोणीतरी आहे असं मला वाटून गेलं.''

निसर्गाच्या सहवासात होणाऱ्या मानवी मनाच्या उन्नयनाचा हा एक सुरेख दाखला. सौंदर्यप्रेमाचीच एक अभिव्यक्ती.

रवींद्रनाथ अतिशय देखणे होते आणि वाढत्या वयाबरोबर त्यांचे सौंदर्य वृद्धिंगतच होत गेले. एकदा एका विवाहसमारंभात रवींद्रनाथ आणि शरदबाबू हजर होते. त्यांचे वर्णन करताना एका पत्रात शरदबाबूंनी लिहिले आहे, ''फार काळानंतर परवा मी रवींद्रनाथांना पाहिलं. डोळे दूर करावेसे वाटेनात. वय वाढतंय तसं त्यांचं रूप जणू उमलतंय. जगात याहून विलक्षण नवल मला तरी माहीत नाही.'' त्यावेळी रवींद्रनाथ ६६ वर्षांचे होते!

आचार्य रजनीश यांनी त्यांच्या व्याख्यानात एकदा महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ यांच्या एका भेटीची कहाणी सांगितली होती. तसा दोघांनाही एकमेकांविषयी आदर. असे म्हणतात, की *महात्मा* ही उपाधी गांधींना प्रथम रवींद्रनाथांनी दिली; तर रवींद्रनाथांना *गुरुदेव* ही उपाधी प्रथम गांधींनी दिली. पण गांधी मुख्यतः सत्यम्-शिवम्चे उपासक तर रवींद्रनाथ मुख्यतः सुंदरम्चे उपासक. गांधीजी एकदा रवींद्रनाथांकडे राहायला गेले होते. संध्याकाळी फिरण्याचा रिवाज गांधीजी अगदी नियमितपणे, शिस्तीने पाळत. आपली वेळ होताच गांधीजी फिरायला जाण्यासाठी बाहेर पडत होते. ''मीही येतो,'' असे म्हणत आरशासमोर उभे राहून रवींद्रनाथ केस विंचरू लागले. पाच मिनिटे गेली, दहा गेली, पंधरा गेली तरी त्यांची तयारी उरकेना. इकडे उशीर होतो म्हणून गांधीजी कमालीचे अस्वस्थ झाले होते. शेवटी एकदाचे दोघे बाहेर पडले. ''आता या वयात कोण तुमच्याकडे बघणार आहे? एवढा सगळा जामानिमा करायची गरज काय?'' वैतागलेल्या गांधीजींनी विचारले. ''मी कुरूप दिसलो, तर मला बघणाऱ्याच्या मनाला वेदना होतील. सुंदर दिसलो तर त्याला आनंद होईल. माझ्या दृष्टीने कुरूपता ही हिंसा आहे, सुंदरता ही अहिंसा.'' रवींद्रनाथ उत्तरले.

सुंदरता आणि अहिंसा यांचा हा आगळा संबंध अहिंसेचा आजन्म पुरस्कार करणाऱ्या गांधीजींनी प्रथमच ऐकला असावा!

आपल्या भोवतालच्या कुरूप वा केवळ उपयुक्ततावादी अशा कळाहीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर रवींद्रनाथांचे हे सौंदर्यप्रेम खूप लोभस वाटते.

(मे २०००)

# 'खाणे' : एक भाषिक व्यवहार

नीलिमा गुंडी

मराठी भाषा परिषदेच्या सहकार्याने २००० सालात अंतर्नादमधून *संसार भाषेचा* हे सदर प्रकाशित झाले. मॅक्सिन बर्नसन, नीलिमा गुंडी, आशा मुंडले, विद्युल्लेखा अकलूजकर, तारा भवाळकर, मृणालिनी शहा, शरदिनी डहाणूकर, विजया देव आणि अशोक केळकर यांचे लेख त्यातून प्रकाशित झाले. त्या सदराची ही एक झलक.

एखाद्या भाषेचा स्वभाव जाणण्यासाठी व्यवहारात शब्द झोकून देण्याची तिची रीत लक्षात घ्यावी लागते. त्यासाठी तिच्यात नाम, विशेषणे, क्रियापदे यांच्याशी निगडित असे किती शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार आहेत याचा शोध घेणे मनोरंजक ठरते. उदाहरणार्थ, आपल्या मराठी भाषेत 'खाणे' या एकाच क्रियापदाशी निगडित असलेले शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार यांचा येथे विचार करू या. त्याआधी हेही लक्षात ठेवायला हवे की वाक्प्रचार हा जसाच्या तसाच वापरावा लागतो. जर 'एखाद्यावर खार खाणे' (म्हणजे एखाद्याचा रागराग करणे) हा वाक्प्रचार 'एखाद्याने खार खाणे' असा वापरला, तर त्यातील अर्थ भुईसपाट होईल!

'खाणे'शी निगडित आणखी काही मासलेवाईक शब्दप्रयोग असे आहेत : (१) वारा खाणे, (२) खस्ता खाणे, (३) पैसे / लाच खाणे, (४) मार खाणे, (५) दात-ओठ खाणे, (६) दम खाणे, (७) डोके खाणे, (८) शेण खाणे, (९) ठेचा / ठोकर खाणे, (१०) गोते / गटांगळ्या खाणे, (११) धक्के खाणे, (१२) शब्द खाणे, (१३) एखाद्याचे शब्द खाणे, (१४) भाव खाणे, (१५) वेळ खाणे, (१६) जीव खाणे, (१७) कच खाणे, (१८) टक्केटोणपे खाणे, (१९) हार खाणे, (२०) डुलक्या खाणे, (२१) एखाद्याचे मन त्याला खाणे, (२२) हाय खाणे.

ही यादी आणखीही वाढवता येईल. (तसा 'डबा खाणे' हाही आपल्या दैनंदिन वापरातील लाक्षणिक शब्दप्रयोग आपल्या ओळखीचा आहेच!)

भाषेतून समाजाचे अंतरंग कळते; असे म्हणतात. मराठी माणसाच्या आगळ्यावेगळ्या आहारक्षमतेचा हा पुरावा तर नव्हे? यातून मराठी माणसाच्या प्रवृत्तीवर काय भाष्य करणार? मराठी माणूस खादाड मानायचा की बुभुक्षित? की त्याच्या रांगडेपणाचे प्रतिबिंब या भाषिक व्यवहारात प्रतिबिंबित झाले आहे असे म्हणायचे? – अर्थात हे सहज विनोदाचे बोलणे झाले.

थोडे खोलात जाऊन आपल्याला भाषेतील अंगभूत अशी सुप्त अलंकरणशक्ती शोधता येईल. अमूर्तापासून मूर्तापर्यंत सर्व काही खाऊन पचवण्याची अजब अशी जिवट शक्ती सुचवण्याचा हा मार्ग तर नव्हे? 'खाणे' म्हणजे केवळ 'मुखाद्वारे पदार्थ भक्षण करण्याची क्रिया' असा वाच्यार्थ येथे उरत नाही. त्याव्यतिरिक्त इतर अनेक अर्थ यातून सूचित होतात. कधी 'खाणे' म्हणजे 'वगळणे' – उदा. तो लिहिताना अधलेमधले शब्द खातो. कधी 'खाणे' म्हणजे 'वर्चस्व गाजविणे'. उदा. अमुक एका चित्रपटातील खलनायकच चित्रपट खाऊन टाकतो. कधी 'खाणे' म्हणजे 'छळणे'. उदा. जीव खाणे, डोके खाणे. कधी 'खाणे' म्हणजे 'इंद्रियांच्याद्वारे' अनुभवणे.' उदा. मार खाणे, धक्के खाणे, तर कधी 'खाणे' म्हणजे 'मनाने अनुभवणे'. उदा. हाय खाणे.

या 'खाणे' गटातील मनाने अनुभवण्याच्या भावभावनांमध्ये किती विविधता आहे! राग व्यक्त करताना 'दात-ओठ खाणे' आणि पश्चात्ताप व्यक्त करताना 'एखाद्याचे मन त्याला खाणे' किंवा 'जिवाला खाणे'. एकंदरीत, अगदी टोकाच्या भावभावनांची आंदोलनेही 'खाणे'शीच निगडित व्हावीत ना? सगळे रंग एकाच पांढऱ्या रंगात मिसळावेत तसे! अशावेळी 'खाणे' ही भाषिक क्रिया एकप्रकारे जगण्याच्या सारसर्वस्वाचीच प्रतिमा वाटू लागते.

अन्न ही माणसाची सर्वांत पहिली मूलभूत गरज. त्यामुळे 'खाणे' ही क्रिया जैविक पातळीवरील सर्वांत महत्त्वाची कृती ठरते. तसेच सुसंस्कृत मानव बनण्याच्या प्रक्रियेतीलही ती पहिली पायरी ठरते. कारण मनुष्य हा एकप्रकारे प्राणी असला तरी त्याने 'काय खावे नि काय खाऊ नये' (उदा. दुसऱ्याचे चोरून खाऊ नये, समोर इतर लोक उपाशी असताना खाऊ नये इ.) अशा नियमांचे पालन करीतकरीतच मानवी संस्कृतीची पायाभरणी झाली. त्यामुळेच 'पैसे खाणे, शेण खाणे' यांसारखे शब्दप्रयोग 'खाऊ नये ते खाल्ले जात आहे' हे सुचवून सुसंस्कृतपणाची सरहद्द ओलांडल्याबद्दलचा निषेधच एकप्रकारे नोंदवून टाकतात!

भाषिक व्यवहार हा शेवटी जीवनव्यवहाराचे एक अंगच असतो. त्यामुळे 'खाणे'शी संलग्न शब्दप्रयोगांतून आपली शारीरिक व मानसिक रगच कसाला लागत असावी! म्हणच आहे – 'चणे खावे लोखंडाचे, तेव्हा ब्रह्मपदी नाचे!'

एकंदरीत, 'काहीही खाल तरच टिकून राहाल' असा जीवनव्यवहारासाठीचा मंत्रच या भाषिक व्यवहारातून जणू सुचवला जात आहे!

*(फेब्रुवारी २०००)*

# पुस्तकाचा चेहरा

**रविमुकुल**

''मुळात प्रकाशनक्षेत्रात तुम्हांला चित्रकार म्हणून काम करायचं असेल, तर तुम्ही उत्तम वाचक असणं ही पहिली अट आहे, असं माझं मत आहे. सर्व वाङ्मयप्रकार – कथा, कविता ते थेट समीक्षा – तुम्ही समजून घेतले पाहिजेत. त्याशिवाय तुम्हांला लेखनाच्या आशयाशी सुसंवादी निर्मिती करताच येणार नाही.''

– ''माझ्या पुस्तकाचं कव्हर चांगलं रंगीत करा. ते इतर दलित पुस्तकांसारखं नुसतं ब्लॅक अँड व्हाइट मला नको. मीही जरी दलित लेखकच असलो तरीही इतरांच्या लेखनात आणि माझ्या लेखनात प्रचंड फरक आहे. शिवाय मी स्वतःला नुसता दलित लेखक मानत नाही.''

– ''ते चित्राचं काय ते तू बघ. पण लेटरींग मात्र दणदणीत पाहिजे. त्या ह्यांच्यासारखं किरटं, बारीक नको. लांबूनही ठळक दिसायला पाहिजे, आणि मुख्य म्हणजे टायटल वरच्याच बाजूला पाहिजे. जरा इंग्रजी पुस्तकं बघत चला.''

– ''आर्टिस्ट, माझी एक बारीक सूचना आहे. म्हणजे बघा हं, आम्ही काय चित्रकार नाही, पण एक वाटलं... चित्राच्या *मागच्या* बाजूला *बॅकग्राऊंडवर* एक सोनचाफ्याचं झाड दाखवायचं. माझ्या मिसेसला ते फार फार आवडतं. एवढं नाही म्हणू नका. बाकी मात्र तुम्हांला पाहिजे ते करा. पण तेवढा सोनचाफा घ्याच!''

– ''हे प्रकाशक लोक आपल्या लेखकाला प्रमोट करतच नाहीत. वर मोठ्ठं लेखकाचं नाव आणि खाली कादंबरीचं नाव द्यायला काय हरकत आहे? इंग्रजीत कसं लेखकाचं कौतुक करतात! आमचे मराठी प्रकाशक म्हणजे हे असलेच! आणि मग बोंबलतात आमच्या नावानं, की तुमची आवृत्ती संपायला पाच-पाच, दहा-दहा वर्षं लागतात. एका तरी प्रकाशकानं आजवर त्याच्या कव्हरवर छापलंय का – 'बाय द ऑथर ऑफ अमुक अमुक बेस्ट सेलर' असं! कारण यांच्या पोटात दुखतं! दुसऱ्या प्रकाशकानं काढलेल्या पुस्तकाची फुकट जाहिरात आपण का करा म्हणून!''

– ''चित्रकार, लेखकाचं नाव एवढं मोठं काढत नका जाऊ बुवा. अहो, ते लगेच डोक्यावर बसतात! शेवटी आम्ही पैसे घालतो म्हणून तर यांचं नाव होतं. पुस्तक खपलं तर ह्यांच्या लेखणीमुळं आणि आपटलं तर आम्हांला विक्री करता येत नाही, अशी यांची बोंब!''

– ''चित्र चांगलं डबलस्प्रेड करा. आपण पैशाला मागंपुढं पाहत नाही, पण चित्रात एक तरी फिगर टाकाच. मग ॲब्स्ट्रॅक्ट का असेना!''

– ''रविमुकुल तुमचं *कव्हरेज* मात्र ग्रेट च्यायला!''

इतक्या वर्षांत ही काही लक्षात राहिलेली मुक्ताफळं.

परवा एक पुस्तकविक्रेते सांगत होते. ''राजस्थानच्या आमच्या स्टॉलवर इतरही भाषक वाचक येत होते. आपल्या पुस्तकांची कव्हरं बघून ते हरखून जायचे. पुनःपुन्हा बघायचे आणि शेवटी ही भाषा आपल्याला येत नाही म्हणून चुकचुकत पुस्तक खाली ठेवायचे. आपली कव्हरं इतरांच्या तुलनेत नक्कीच ग्रेट असतात ह्याचा हा पुरावाच.''

कुठल्याही मराठी ग्रंथप्रेमीला अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. पण थोडा विचार केला तर एक लक्षात येईल, आपली मुखपृष्ठं *आकर्षक* असतात एवढंच यातून सिद्ध होतं. कारण परभाषकांना पुस्तकाच्या शीर्षकाचाही अर्थ लागणं शक्य नाही. मग संपूर्ण साहित्य वाचन करून चित्राबद्दल मतप्रदर्शन करणं, हे तर दूरच.

हे तर आपणही करत नाही. चित्राबद्दल चटकन मतप्रदर्शन करून आपण मोकळे होतो. कारण चित्र एका दृष्टिक्षेपात पाहता येतं. वाचन करायला काही तास, दिवस घालवावे लागतात आणि मग आपण त्या लेखनाबद्दल विचारपूर्वक विधान करतो.

मुखपृष्ठाबद्दल असा विचार करण्याइतके आपण अजून साक्षर झालेलो नाही. 'कोणत्याही पुस्तकाचं मुखपृष्ठ म्हणजे त्या विशिष्ट पुस्तकाकरिताच निर्मिलेली आशयपूर्ण, संवादी कलाकृती' अशी माझी व्याख्या आहे. अर्थात येथे आणि यापुढेही लिहिताना मला सकस लेखन अपेक्षित आहे – मग कथा, कादंबरी, कविता, समीक्षा असा कोणताही प्रकार असो.

कॅलेंडर, पोस्टर अशी चित्रं बघताना ज्या वेगात आपण 'वा! ग्रेट!' किंवा 'होपलेस! काही दम नाही' असं बोलून जातो तसं मुखपृष्ठावद्दल बोलणं हे योग्य नाही. तसं बोलून या विषयातला निरक्षरपणा आपण काहीर करत असतो.

अर्थात या परिस्थितीला जबाबदार आपल्या प्रकाशनक्षेत्राचा इतिहासच आहे. वाचक, प्रेक्षकाला सर्वांत प्रथम दिसणाऱ्या मुखपृष्ठ या घटकाला सुरुवातीला पुस्तकाच्या निर्मितिप्रक्रियेत

अत्यंत गौण स्थान होतं. एक कसलंतरी रंगीत – विशेषतः एखाद्या कमनीय तरुणीचं चित्र असलं की बस. एवढंच त्याचं काम. ही धारणा अगदी पंचवीस-तीस वर्षांपूर्वी होती. लेखक, प्रकाशक आणि चित्रकार या तिघांनाही त्यात काही गैर वाटत नव्हतं. परस्परांच्या संमतीनं, सहकार्यानंच ही अनिष्ट प्रथा पडली होती. मग ज्याच्यासाठी आपण हे सर्व करतो आहोत, त्या 'वाचक' या मुख्य घटकाला विचारातही घ्यायचं कारण नव्हतं. 'आम्ही देऊ तेच त्यानं घेतलं पाहिजे' ही हडेलहप्पी प्रवृत्ती त्यात होती. शिवाय ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोचणारी ही पुस्तकं वस्त्रहरण केलेलीच असायची. त्यामुळे जिथं चित्र बघायलाच मिळत नाही, त्यावर कसला विचारही होणं शक्य नव्हतं.

त्यामुळे वाचक मुखपृष्ठाबाबतीत निरक्षर राहिला हे एकवेळ समजून घेता येईल; परंतु लेखक, प्रकाशक आणि स्वतः चित्रकारही या सशक्त घटकाबद्दल इतके उदासीन कसे राहिले, याची संगती अशी लावता येईल –

'आशयहीन, केवळ आकर्षक चित्र' या मागणीमागे प्रत्येकाची गरज अशी असू शकते –

अ) लेखक – जास्तीत जास्त वाचक आपलं पुस्तक पाहतील, मग वाचतील.

ब) प्रकाशक – ग्रंथविक्रेता खुश झाला म्हणजे जास्त खप होईल.

क) चित्रकार – लेखक-प्रकाशक यांचं समाधान हेच आमचं ध्येय.

तीस-पस्तीस वर्षांपूर्वी लेखक किंवा प्रकाशक किंवा हे दोघेही चित्रकार या *कामगाराला* बोलावून 'चित्रकल्पना' सांगायचे किंवा थोडक्यात लिहून द्यायचे. लेखकानं हस्तलिखित चित्रकाराला वाचायला देणं, चर्चा करणं वगैरे भानगडी नव्हत्या.

लेखकाच्या चित्रकल्पनाही दिव्यच असायच्या. सिनेमाचा एखादा शॉट सांगावा असं ते सांगायचे. चित्रात हे कसं दिसेल, किमान हे मावेल तरी का, याचा काडीमात्र विचार लेखकाने केलेला नसे.

पंचवीसएक वर्षांपूर्वीचा माझा एक अनुभव सांगतो. एका वाचकप्रिय / लायब्ररीप्रिय लेखकानं मला 'थोडक्यात' म्हणून फुलस्केप पान पाठपोट गच्च भरून चित्रकल्पना लिहून पाठवली होती. तिचा अगदी थोडक्यात सारांश असा – दूरवर पसरलेलं शहरवजा खेडं... संध्याकाळची वेळ आहे... पाखरं घराकडं परतू लागली आहेत... कादंबरीचा नायक एक बुद्धिमान पण 'इंपोटंट' प्राध्यापक... त्याची सुस्वरूप पण अतृप्त तरुण पत्नी... नायकाचा एक जिवलग मित्र – जो त्याचा सखा, बंधू, मार्गदर्शक इ. आदर्शांनी परिपूर्ण... नायकाची आई – हिचे चित्र सर्वांत अलीकडे आणि ठसठशीत हवे – जी त्याची स्फूर्तिदायिनी आहे... नंतर नायक गावच्या राजकारणात पडतो, नगराध्यक्ष म्हणून निवडून येतो, गुलाल उधळीत जाणाऱ्या विजयी मिरवणुकीचे चित्र... पुढे नायकाची वृद्ध माता मरण पावते – गाव लोटतो – तिच्या भव्य अंत्ययात्रेचं चित्र आवश्यकच इ. इ.

सर्वांत शेवटी लेखकाने माझ्यावरचा विश्वास प्रकट केला होता. ''आपण एक मान्यवर चित्रकार आहात, या कल्पनेवरून आपण आजवरचे आपले सर्वांत बेस्ट चित्र काढणार याची खात्री आहे. याशिवायही तुम्हांला आणखीन काही काढायचे असल्यास माझी हरकत नाही. कळावे.''

आणि हे सर्व मला क्राउन आकारात (वाचकप्रिय लेखकांची पुस्तकं अजूनही याच आकारात छापली जातात. डेमी आकारात काढली तर खपत नाहीत म्हणे.) म्हणजे १२.५ x १८.५ सें.मी. या आकारात किंवा डबलस्प्रेड म्हणजे स्पाईन, मलपृष्ठासह धरल्यास जास्तीत जास्त २७ x १८.५ सें.मी. या आकारात काढण्याचं 'चॅलेंज' होतं.

अर्थात हे असलं 'चॅलेंज' मी स्वीकारणं शक्यच नव्हतं.

चित्रकल्पना देणं / सांगणं हे प्रकार पुढे बंद झाले. निदान माझ्यापुरते तरी. तरीही अजूनही लेखकांना कुठंतरी असं वाटत असतं, की चित्रकारानं आपलं ऐकलं पाहिजे. यात चित्रमाध्यमांबद्दल अज्ञान तर असतंच; शिवाय मी या पुस्तकाचा कर्ता आहे; तर मग माझ्या म्हणण्याप्रमाणं चित्रकारानं ऐकलं तर गैर काय; हा एक विचित्र अहंकारही असतो. लेखकाच्या सांगण्याबरहुकूम चित्र न करणारा चित्रकार या क्षेत्रात अतिशहाणा किंवा उद्धटही ठरतो.

जे चित्रकार पुस्तक न वाचता चित्र करायला तयार होतात त्यांच्याबद्दल ही धारणा एकवेळ बरोबर ठरू शकेल. पण ज्यांचं वाचन चांगलं आहे, जे विचारपूर्वक काम करतात अशांनाही याच मोजपट्टीनं मोजणं योग्य नव्हे.

मुळात प्रकाशनक्षेत्रात तुम्हांला चित्रकार म्हणून काम करायचं असेल, तर तुम्ही उत्तम वाचक असणं ही पहिली अट आहे, असं माझं मत आहे. सर्व वाङ्मयप्रकार – कथा, कविता ते थेट समीक्षा – तुम्ही समजून घेतले पाहिजेत. त्याशिवाय तुम्हांला लेखनाच्या आशयाशी सुसंवादी निर्मिती करताच येणार नाही.

वाचन न करता केवळ शीर्षकावरून मुखपृष्ठ केलं तर काय ब्रह्मघोटाळा होऊ शकतो, त्याचं एक उदाहरण इथं देणं मला सयुक्तिक वाटतं.

मनोहर माळगावकरांच्या 'प्रिन्सेस'चा मराठी अनुवाद अनेक वर्षांपूर्वी प्रकाशित झाला होता. दहा-पंधरा वर्षांपूर्वी तिच्या नव्या आवृत्तीच्या मुखपृष्ठासाठी 'प्रिन्सेस' माझ्याकडे आली. प्रकाशक माझा मित्रच होता. वाचल्याशिवाय मी चित्र करत नाही, हे त्याला माहीत होतं. पण त्याला कादंबरी बाजारात आणायची प्रचंड घाई होती. त्यामुळे ही चार-पाचशे पानांची कादंबरी मी वाचणार केव्हा आणि चित्र करणार केव्हा, या विचारानं तो त्रस्त झाला होता. पण माझ्या हट्टामुळं त्याला थांबावं लागलं. कादंबरी मी पूर्ण वाचली आणि तिच्यावरचं पूर्वीच्या चित्रकारानं केलेलं चित्र पाहून हैराण झालो. कादंबरीवर त्यानं एका राजकन्येचं चित्र काढलं होतं. 'प्रिन्सेस' म्हणजे 'राजकन्या' असं साधं समीकरण होतं.

मुळात माळगावकरांची ही कादंबरी राजकन्येविषयी नाहीच. 'प्रिन्सेस' हे शीर्षक त्यांनी 'प्रिन्स'चं अनेकवचन ('The Princes') या अर्थी दिलेलं आहे. कादंबरी अनेक संस्थानी-



**रविमुकुल : गेल्या २७ वर्षांत सुमारे २,५०० पुस्तकांची मुखपृष्ठे**

राजपुत्रांच्याविषयी आहे; 'Princess' म्हणजे राजकन्येविषयी नव्हे.

माझ्या हातात असलेली ही आवृत्ती दुसरी-तिसरी होती. म्हणजे आजवर कुठल्याही वाचकाला सोडाच पण प्रकाशक/लेखक यांनाही हे मुखपृष्ठ चुकीचं वाटलं नव्हतं, खटकलं नव्हतं.

मी नंतर जुन्या खानदानी हार्डबाऊंड इंग्रजी पुस्तकासारखं मुखपृष्ठ केलं – लंबवर्तुळात एका देशी प्रिन्सेसचं पोर्ट्रेट वाटावं असा चेहरा, डार्फ मरून रंगाची बॅकग्राऊंड, सोनेरी रंगात 'दि प्रिन्सेस' ही इंग्लिश डौल दाखवणारी अक्षरं असं.

एक चांगलं 'कार्य' केल्याचं समाधान बरेच दिवस वाटत होतं. मध्ये बरीच वर्ष गेली. त्या माझ्या मित्रानं प्रकाशनव्यवसाय बंद करून हमखास यश देणारा 'वधू-वर सूचक मंडळाचा' कॉम्प्युटराईज्ड व्यवसाय सुरू केला.

परवा 'प्रिन्सेस'ची नंतरची नवी आवृत्ती पाहिली. एका मातब्बर प्रकाशन संस्थेनं काढलेली आणि हादरलो.

पूर्वीचीच राजकन्या पुन्हा कव्हरवर मिरवते आहे.

प्रकाशकाची चित्राची ही 'जाण' पाहून थक्क होण्यापलीकडे आपल्या हाती काय आहे?

गुळगुळीत, आकर्षक, आशयहीन मुखपृष्ठाची ही कोंडी प्रथम फोडली ती प्रभाकर गोरे या प्रतिभावान चित्रकाराने. थेट रंगांचे तुकडे वापरून केलेली गुणाकार (गंगाधर गाडगीळ), पिंगळावेळ, हिरवे रावे (जी.ए.) अशी काही त्यांची मुखपृष्ठं अजूनही स्मरणात, डोळ्यांसमोर आहेत. एकप्रकारे त्यांनी पुढच्या चित्रकारांना निर्भय बनवलं.

तरल, संवेदनशील रंगसंगती दाखवणाऱ्या पद्मा सहस्रबुद्धे यांनी कवितासंग्रहांना एक स्वतःचा असा खास संवादी चेहरा दिला. खूणगाठी (ना. घ. देशपांडे), अनीह (पु. शि. रेगे) असे काही कवितासंग्रह किंवा मृद्‌गंध (इंदिरा संत), पैस (दुर्गा भागवत), सावित्री (पु. शि. रेगे) यांसारख्या ललित पुस्तकांवरची त्यांची मुखपृष्ठं अप्रतिम आहेत, मनात रेंगाळणारी आहेत.

जोरकस लयदार रेषा, उत्तम क्रॉस शेडिंग आणि सॉलीड ब्लॅकबरोबर लवलवत्या रेषांचा सुयोग्य मेळ साधावा तो बाळ ठाकूर यांनीच. सुजाण रसिकांना त्यांची कित्येक चित्रं आठवतील. 'गोतावळा' (आनंद यादव) वरचा त्यांचा मस्तवाल कोंबडा, 'लज्जा' (तस्लीमा नासरीन) वरची सपासप जाड रेषांत साकारलेली मुस्लीम तरुणी अशी त्यांची अनेक चित्रं विसरू म्हणता, विसरता येणार नाहीत. हाडकलेली हाताची बोटं प्रत्यक्षात पाहताना ओंगळ दिसतात, पण तीच ठाकुरांच्या चित्रात हुकमी सुरूप दिसतात.

'प्रतिभावान *रेषालेखक*' असं ज्यांचं सार्थ वर्णन विजय तेंडुलकरांनी केलंय, त्या वसंत सरवटे यांना आपण केवळ व्यंगचित्रकार समजतो हा खरं तर त्यांच्यावर अन्यायच आहे. त्यांची कितीतरी चित्रं रूढार्थाने आपण ज्यांना व्यंगचित्र म्हणतो, त्यांच्यापलीकडे गेलेली आहेत. त्यांची रेषा विचार करायला भाग पाडते. केवळ चित्र/व्यंगचित्र म्हणून आपण त्यांच्या चित्राकडे पाहूच शकत नाही. वाचकाला/प्रेक्षकाला अंतर्मुख करण्याची जबरदस्त ताकद त्यांच्या अनेक चित्रांतून प्रत्ययाला येते. 'बटाट्याची चाळ'(पु.लं.)च्या त्यांच्या मुखपृष्ठाला केवळ व्यंगचित्र कसं म्हणता येईल? ('बटाट्याची चाळ'च्या नाट्यरूपांतरात नेपथ्य म्हणून ढोबळ रंगीत चाळ दाखवण्याऐवजी हेच चित्र प्रचंड आकारात एन्लार्ज करून ठेवायला हवं होतं.)

'काही अप्, काही डाऊन' (पु. ल.) या लेखासाठी सरवट्यांनी काढलेला मोजक्या, नाजूक, रेषांतला गावापासून लांब असलेला निवांत फलाट कडूलिंबाचा निर्मळ, आल्हादक वास घेऊन येतो.

'पु. ल. एक साठवण' हे जेवढं पु.लं.चं, जेवढं संपादक जयवंत दळवींचं, तेवढंच वसंत सरवटे यांचंही आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर लेखक, संपादकाबरोबर चित्रकाराचाही फोटो छापल्याचं हे एकमेव उदाहरण आहे.

वसंत सरवटे आणि शि. द. फडणीस हे दोघेही मूळचे कोल्हापूरचे. परंतु तथाकथित 'कोल्हापूर स्कूल'पासून पूर्णपणे अलिप्त. स्वतंत्र प्रतिभेचे देणे घेऊन जन्माला आलेले. सरवटे टाक, पेन वापरणारे, तर फडणीस ब्रशच्या नेमक्या स्ट्रोक्समधून अचूक परिणाम साधणारे. रूक्ष शालेय पाठ्यपुस्तकेही – विशेषतः गणितातली आकडेमोडही आनंददायी प्रसन्न करता येते, हे फडणीसांनी प्रथम दाखवून दिलं. जाडी आणि सौंदर्य याची आपण कल्पनाच करू शकत नाही. परंतु शि. द. फडणीसांची ब्रशची जाड रेषा हा संगम लीलया घडवून आणते. चित्र पाहताक्षणी हसू फुटलं पाहिजे, ही किमया फडणीस सहजपणे करतात.

पु.लं.च्या अनेक पुस्तकांना अर्थपूर्ण, प्रसन्न दृश्यात्मकता

देण्यात सरवटे आणि फडणीस यांचा फार मोठा वाटा आहे.

वर उल्लेखिलेल्या चित्रकारांच्या अगोदरपासून दीनानाथ दलाल, द. ग. गोडसे, रघुवीर मुळगावकर असे काही ज्येष्ठ चित्रकार प्रकाशनक्षेत्रात काम करत होतेच. परंतु दलालांनी 'स्व-गत' (जयवंत दळवी), 'माहीमची खाडी' (मधु मंगेश कर्णिक) असे काही उत्तम अपवाद वगळता अर्थपूर्ण, लक्षात राहण्याजोगी कामं क्वचितच केली. बॉम्बे आर्ट सोसायटीचं सुवर्णपदक मिळवणाऱ्या दलालांनी प्रकाशनक्षेत्रातल्या कामाला 'कमर्शियल' समजूनच काम केलं. तजेलदार, उत्कृष्ट रंगयोजना हे त्यांचं बलस्थान पुस्तकाच्या आशयाशी फारसं सुसंवादी ठरू शकलं नाही. अर्थात त्या काळाचा विचार करता ते साहजिक होतं.

दलालांच्या बरोबरीनं द. ग. गोडश्यांनी केलेली 'माणदेशी माणसं'तली (व्यंकटेश माडगूळकर) चित्रं त्या-त्या व्यक्तिरेखा जिवंत करणारी होती. पण गोडसे यांचं 'व्यक्ती आणि वल्ली'चं (पु. ल.) मुखपृष्ठ पूर्णपणे विसंगत, निरर्थकच होतं.

मुळगावकरांविषयी तर बोलायलाच नको. त्यांनी कॅलेंडर आणि पुस्तकाचं मुखपृष्ठ यांत फरक मानलाच नाही. त्यांचे सर्वच चेहरे एकसारखे, डोळ्यांत 'जाई काजळ' घातलेले असायचे.

प्रभाकर गोरे यांनी पुढच्या पिढीतल्या चित्रकारांना जी निर्भयता प्राप्त करून दिली त्याचा आणखीन पुढे जाऊन पुरेपूर उपयोग करून घेतला तो सुभाष अवचटांनी. प्रकाशनक्षेत्रातला एक कालखंडच त्यांनी त्यांच्या निरनिराळ्या प्रयोगांनी गाजवला. माझ्या पिढीतल्या जवळजवळ सर्वच चित्रकारांवर सुरुवातीला त्यांचा प्रभाव होता हे मान्यच करावं लागेल.

वाचकाला दचकवून टाकणारी, पूर्वसंस्कारांना धक्के देणारी त्यांची बेधडक शैली जवळजवळ सर्वच प्रकाशकांनी स्वीकारली. सहज हस्ताक्षरात लिहावी तशी त्यांची पुस्तकावरची शीर्षकं, पूर्वीच्या कोरीव, फिनिश्ड लेटरिंग्जना साफ धुडकावून टाकणारी अशी होती. अंगठ्याचे ठसे वापरून टेक्सचर निर्माण करण्याचं त्यांचं तंत्र अद्भुत होतं. ('आजकालचे साहित्यिक' – गंगाधर गाडगीळ – या पुस्तकावर मात्र त्यांनी तीन अंगठे उठवून गाडगीळांना अभिप्रेत असलेल्या साहित्यिकांवर अकारण हल्ला केला होता. त्यांना पार मोडीत काढलं होतं.) चित्रात ले-आऊटला सोयीस्कर अशा ठिकाणी उतरलेले कावळेही यायचे. रंगाचे, रेषेचे, मासचे, त्याकाळी मिळणाऱ्या निरनिराळ्या स्क्रीनपेपरचे त्यांनी अनेक प्रयोग केले.

'गर्द' (अनिल अवचट) मधली डोळ्यांच्या ठिकाणी नुसत्या खोबण्या दाखवणारी खप्पड चेहऱ्याची पोरं मनावर चरे उमटवणारी होती. 'उत्तररात्र' (रॉय किणीकर) मधले अनेक विभ्रमांतले कवी रॉय किणीकर जाड पेन्सिलच्या रेषांमधून त्यांनी त्यांच्या भणंगपणासह अचूक टिपले होते. 'राधेय' (रणजित देसाई) वर काळ्या आणि लाल रंगात काढलेला वनवासी, राकट कर्ण मला दलालांच्या कर्णापेक्षा (मृत्युंजय) जास्ती खरा वाटला होता. लेखक रणजित देसाई यांना हा कर्ण आवडला नसल्यामुळे पुढच्या आवृत्तीसाठी चित्र करायला माझ्याकडे आलं होतं. प्रकाशकांना मी आग्रहपूर्वक मूळचं चित्र का बदलू नये, ते समजावून सांगितल्यानं त्यांनी ते तसंच ठेवलं. नाहीतर एक चांगलं चित्र दृष्टीआड झालं असतं.

प्रकाशनक्षेत्रावर मुखपृष्ठकार/सजावटकार म्हणून अमीट ठसा उमटवणारे हे काही मातब्बर चित्रकार. खरं तर प्रत्येकावर स्वतंत्र लेख लिहावा इतकं त्यांचं कर्तृत्व मोठं आहे.

पंचविसाहून अधिक वर्षं मी या क्षेत्रात चित्रकार या नात्यानं काम करतो आहे. साहित्यातल्या सर्वच प्रकारांसाठी मुखपृष्ठं, पुस्तकाची अंतर्गत मांडणी, एवढंच काय, काही पुस्तकांचे ब्लर्बही मी लिहिलेत. काही पुस्तकांना शीर्षकंही दिली आहेत. याचं कारण प्रकाशकांपेक्षाही अधिक गांभीर्याने मला वाचावं लागतं.

सर्व प्रकारच्या माध्यमांत गरजेनुसार मी चित्रं केली आहेत. अगदी पेन्सिल, चारकोल, पेन, बॉलपेन ते ऑईलकलर्सपर्यंत सर्व माध्यमं मला त्या त्या पुस्तकांसाठी आवश्यक वाटली तेव्हा वापरली आहेत. काही चित्रं कोलाजचीही आहेत, तर काहींसाठी मी फोटोग्राफीही केली आहे.

वर्षानुवर्षं विशिष्ट माध्यमात, विशिष्ट शैलीत काम करणाऱ्या चित्रकारांबद्दल मला आदर आहे. मला मात्र ते कंटाळवाणं वाटतं. विशेषतः प्रकाशनक्षेत्रासाठी. एकच शैली निरनिराळ्या पुस्तकांना कशी चालू शकते, हे मला न सुटलेलं कोडं आहे.

इतक्या वर्षांच्या प्रवासानंतर हल्ली एक प्रश्न मला सतत पडत असतो. प्रकाशनक्षेत्रात काम करणाऱ्या चित्रकाराला साहित्य किती कळावं? म्हणजे त्याला फक्त चित्रसजावटीपुरतंच कळणं (व्यावसायिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्यासुद्धा) योग्य आहे की काय? त्यानं जास्ती खोलात शिरूच नये का? पण तशी लक्ष्मणरेषा कशी आखता येईल? खुद्द लेखकानंही त्याच्या कृतीचा जो अपेक्षित परिणाम ठरवलेला नाही, तोही जर अधिकाधिक विचार केल्यामुळे चित्रकाराला दिसत असेल, तर काय करायचं? चित्रात जर तेच आलं तर ते लेखकाच्याही डोक्यावरून जाईल. म्हणजे नेमका कुठपर्यंत विचार करायचा?

कधी कधी असंही होतं, की एक चित्र प्रत्यक्षात मी काढत असताना दुसऱ्याच चित्राची कल्पना मनात साकारू लागते. मग हातातलं चित्र कधी एकदा पूर्ण होतंय, इकडंच लक्ष लागून राहतं. हे होणं तसं बरं नव्हे; पण तसं होतं; हे मात्र खरं!

असं व्हायचं कारण म्हणजे चालू असलेल्या चित्रापेक्षा, म्हणजे ज्या लेखनासाठी चित्र मी आत्ता करतोय त्यापेक्षा, मनात घोटाळणारी चित्रकल्पना ज्या दुसऱ्या लेखनावरून सुचलीय, ते जास्ती परिणामकारक असतं; जास्ती आव्हानात्मक असतं.

साधारणपणे एखादं हस्तलिखित वाचलं, की त्यावरच विचार करायचा अशी माझी पद्धत आहे. परंतु होतं काय, की वाचलेलं स्क्रिप्ट मुळातच सुमार, भिकार असलं, की चित्र जाम सुचता सुचत नाही, म्हणून मग हाती असलेल्या दुसऱ्या हस्तलिखिताकडे मी वळतो. स्वतः लेखक आणि प्रकाशकही जेव्हा आपल्या पुस्तकावर बेहद्द खुश असतात तेव्हा त्यांची अपेक्षा, मुखपृष्ठकारानं

काहीतरी अद्‌भुत (आणि तरीही 'स्टॉल अपिलिंग!') दाखवावं अशी असते. व्यावसायिक चित्रकार म्हणून ती गरज पूर्ण करणं मला आवश्यकही वाटत असतं. पण मुळात लेखनच कच्चं, उथळ, भरकटलेलं, शब्दबंबाळ असं असलं, की माझी सत्त्वपरीक्षा सुरू होते.

चित्र सुचत नाही म्हणून मी अस्वस्थ. चित्र अजून मिळत नाही म्हणून लेखक-प्रकाशक वैतागलेले. (त्यात प्रकाशन-समारंभ ठरवलेला असला तर मग विचारायलाच नको.) वेळ जसजसा जात राहतो, तसतशी माझी चडफड वाढायला लागते. *हुकमी* काही काढता येत नसल्याबद्दलची खंत बळावू लागते. त्या काळापुरता तरी मी वैफल्याने ग्रासून गेलेला असतो. खरंच का यापूर्वी आपण शेकडो पुस्तकांची मुखपृष्ठं केली होती? हा प्रश्न वेगवेगळ्या स्वरांत स्वतःलाच ऐकू येऊ लागतो.

मुळात ज्यांना लेखनच कळत नाही किंवा जे चित्रकार वाचायचा, समजून घ्यायचा ताप घेत नाहीत; लेखक-प्रकाशकांच्या कल्पनेनुसार चित्र करून द्यायला ज्यांना जमतं, त्यांना माझा दंडवत आहे. मला त्यांचा हेवा वाटतो. इथे सगळेच रिलॅक्स्ड असतात. केवळ मुखपृष्ठ न मिळाल्यामुळे भांडवल अडकून पडलंय, याची प्रकाशकाला टोचणी नसते. लेखकाला विशिष्ट तारखेच्या आत पुस्तक प्रकाशित झाल्यामुळे प्रकाशन समारंभाची / बक्षिसाला पुस्तक पाठवण्याची अडचण होत नाही आणि चित्रकारही काम पार पडल्याने निवांत. सगळं कसं सोप्पं असतं अशा केसमध्ये!

पण हे माझ्या नशिबी नाही.

एकदा माझा एक प्रकाशकमित्र चित्रासाठी माझ्याकडे आला. हस्तलिखिताऐवजी कादंबरीचं कथानक दोन पानांत लिहून लेखकानं पाठवलं होतं. वास्तविक, मी हस्तलिखित वाचल्याशिवाय चित्र कधी करत नाही. पण इथं मित्रानं गळ घातली.

मूळ कॉपी त्यानं प्रेसला दिली होती आणि त्यावेळी फोटोकॉपी अस्तित्वात नसल्यामुळे त्याला मला दुसरी प्रत देता येत नव्हती. एकावेळी दहा-दहा, पंधरा-पंधरा पुस्तकांचा सेट काढणाऱ्या प्रकाशकांपैकी हा माझा मित्र होता. बाकीची पुस्तकं जवळजवळ तयार झाली होती. या एका पुस्तकामुळे त्याचा सेट अडकून पडणार होता. साहजिकच त्याचं भांडवल तितके दिवस गुंतून पडणार होतं. म्हणून त्यानं ही दोन पानी कथानकाची सोय केली होती.

मी ती पानं वाचली.

कुठूनतरी सुरुवात करून कुठेतरी संपवायलाच पाहिजे म्हणून ते कथानक (?) संपवलेलं होतं. चित्राच्या दृष्टीनं खोदून खोदून पाहिलं, तरीही ढेकळंही हाती लागत नव्हती.

एकीकडे मला मित्राची दया येत होती आणि दुसरीकडे चित्र काही केल्या डोक्यात येत नाही, म्हणून मी हैराण.

कुठून या धंद्यात पडलो, असं वाटायची वेळ.

रोज दुसऱ्या दिवसाचा वायदा करत होतो. मित्र यायचा आणि माझ्या बोर्डवर दुसरंच काही तरी चालू आहे हे बघून स्वतःवर संयम ठेवायचा.

दर दिवसागणिक आम्हां दोघांतला ताण वाढत चालला होता.

एके दिवशी तर मी या ताणापासून थोडं रिलॅक्स व्हावं म्हणून बाबूराव अर्नाळकरांची कुठलीतरी एक 'झुंजारकथा' वाचत बसलो होतो. मित्र नेमका त्याच वेळी आला आणि त्याचा भडकाच उडाला. शेवटी मी मनाचा हिय्या करून त्याला सांगितलं, ''खरंच मला काही सुचत नाहीय. प्लीज, तू दुसऱ्या कुणाकडून तरी काढून घे!''

त्यानं सुन्नपणे डोळे मिटले आणि नंतर तापून म्हणाला, ''आता इतके दिवस तू खाल्ल्यावर मी अजून कुणाकडे जाऊ? ते काही नाही, तूच काहीतरी चांगलं ('चांगलं', हे बेटा एवढा भडकूनही नाही विसरला!) काढून दे. उद्याच! अजून एक दिवस देतो. मी लेखकाला दाखवणारही नाही. छापल्यावरच तो बघेल.''

''बरं बघतो!'' मी खचून म्हणालो.

''बघतो नाही! उद्याच! काहीतरी कर अ‍ॅट्रॅक्टिव्ह! ती स्टोरी गेली खड्ड्यात!''

मग मलाही ती ''स्टोरी'' यात घालणं भागच होतं.

लेटरिंगला प्राधान्य देऊन तजेलदार रंगातलं चित्र मी केलं. थोडीफार कमर्शियल गिमिक्स वापरून मी शोधलेली ती चक्क पळवाट होती.

पुस्तक छापून झालं. कव्हर बरं दिसत होतं.

पुढे आम्ही दोघेही हे सगळं विसरून गेलो.

एके दिवशी सकाळी सफारी सुटातले एक गृहस्थ माझ्याकडे आले. नमस्कार करून झाल्यावर म्हणाले – ''मी...'',

मी दचकलो. हेच 'त्या' कादंबरीचे लेखक! प्रकाशकमित्रावर मनातल्या मनात संतापलो. माझा पत्ता यांना कशाला दिला म्हणून!

चेहऱ्यावर रुंद हसू आणत प्रसन्नतेने लेखक म्हणाले – ''आर्टिस्ट, यू आर ग्रेट... मला जे जे सांगायचं होतं, ते ते तुम्ही कव्हरवर परफेक्ट दाखवलंय.''

मी अवाक्. मला वाटलं, ते उपरोधानं बोलताहेत.

''खरंच, अगदी तंतोतंत... आपण खुश आहोत तुमच्यावर!''

खरोखरीच ते खुशीत होते.

मी रडल्यासारखं हसलो.

पुढे काही दिवसांनी माझ्या त्या प्रकाशक मित्रानं सांगितलं – 'अरे, ते पुस्तक एका कॉलेजच्या लायब्ररीत संदर्भ विभागात ठेवलंय. आहे की नाही मज्जा?''

कारण उघड होतं – नुसतं लेटरिंग असलेलं कव्हर म्हणजे ते समीक्षा, संदर्भग्रंथ या प्रकारातलं असतं हा सार्वत्रिक समज.

मला वाटतं, पुस्तकाच्या चेहऱ्याविषयी गंभीर आणि गमतीदार तूर्तास एवढं पुरे.

*(एप्रिल २००५)*

# ''प्रसन्न करणारं निर्मितीचं थकलेपण...''

जून २००७ मध्ये अंतर्नादने कथामंथन या नावाने एक कथालेखनाचे शिबीर आयोजित केले होते. त्याअंतर्गत मोनिका गजेंद्रगडकर यांची संजय जोशी यांनी घेतलेली मुलाखत.

## प्रास्ताविक

*'भूप' या आपल्या पहिल्याच कथासंग्रहाने वाचकांचं लक्ष वेधून घेणाऱ्या मोनिका गजेंद्रगडकर या लेखिकेचा दुसरा कथासंग्रह 'आर्त' मौज प्रकाशनातर्फे लवकरच येतोय. भूपला वाचक-समीक्षकांबरोबरच बऱ्याच पारितोषिकांनीही दाद मिळाली. त्यातल्या 'नाळ' आणि 'आधार'सारख्या कथा विलक्षण ताकदीच्या आहेत आणि मोनिकाच्या अनाग्रही आणि अनिर्णायक शैलीमुळे वाचकाच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतात. एका निष्ठेने अन् सातत्याने कथालेखन करणारी मोनिका आपल्या वडिलांच्या, म्हणजे कै. विद्याधर पुंडलिकांच्या, कथालेखनाच्या प्रभावक्षेत्रात कधीच राहिली नाही. तिने आपल्या वाटा स्वत: शोधल्या अन् आपल्या वाटेवरून ती मनस्वीपणे चालत राहिली आहे. अंतर्नाद कथामंथन शिबिराच्या निमित्ताने मोनिकाशी मुलाखतवजा मनमोकळ्या गप्पा मारण्याचा योग आला. त्याचा हा संक्षिप्त वृत्तान्त.*

*या मुलाखतीआधी मोनिकाच्या 'श्रद्धा' या कथेवर माझे आस्वादात्मक विवेचन आणि शिबिरार्थींची चर्चा झाली होती. त्या चर्चेत व्यक्त केलेल्या 'श्रद्धा' कथेतल्या तपशिलांबाबत विचारले असता सुरुवातीलाच मोनिकाने स्पष्ट केले, ''माझ्या नात्यातल्या अनुभवावर आणि सारे तपशील साक्षेपाने गोळा करून आणि तपासूनच मी ही कथा लिहिली.'' मोनिकाची कथानिष्ठा अशी विषयाच्या निवडीपासून तपशिलापर्यंत दिसत राहते. असो. मुलाखतीतला हा काही महत्त्वाचा भाग. काही प्रश्नांना तिने लेखी पाठवलेल्या सविस्तर उत्तरांचाही आधार घेऊन ही मुलाखत पुन्हा लिहिली आहे.*

***संजय** : घरात साहित्याचं वातावरण होतं त्यामुळे आपोआपच तुला वाचनाची गोडी लागली का? का लहानपणी तुला इतर काही खास छंद होते? शिवाय लेखक वडील असल्याने तुझ्या वाचनाला काही शिस्त आली का? म्हणजे इतरांसारखंच तू आई-वडिलांना चोरून वगैरे वाचत होतीस का? जशा त्यावेळच्या मराठमोळ्या मुली कदाचित काकोडकर-फडके वाचत असतील किंवा हल्लीच्या इंग्रजाळलेल्या मुली मिल्स अँड बून वाचतात तसे?*

**मोनिका** : हो. घरी बऱ्याच मोठ्या लेखकांचं येणं-जाणं अन् चर्चा घडत असत. त्यामुळे महत्त्वाचं म्हणजे लेखक असणं ही वेगळी आणि असामान्य गोष्ट आहे असं जाणवलं. त्यामुळे वाचनाची गोडी वाढत गेली. पण तरी त्या काळात वाचन हा माझा मुख्य छंद नव्हता. खरा छंद होता तो म्हणजे सतार वाजवायचा. आणि माझ्या वाचनाला तशी शिस्त नव्हतीच. घरात अभिजात पुस्तकं असायची नेहेमीच. आणि अमुक पुस्तकंच वाचायची, खरेदी करायची अशी सक्तीही नव्हती. अर्थात फडके वगैरेंची पुस्तकंही घरात होतीच, पण त्यातला प्रणय वगैरे मला कधी विशेष आकर्षित नाही करू शकला आणि चोरून वगैरे वाचावं असं तर कधीच वाटलं नाही. शिवाय आमच्या घरचं वातावरण मुळात अगदी मोकळं होतं.

***संजय :** घरी लेखनाचा वारसा असताना नेमकं कधी अन् का तुला असं वाटलं, की आपणही उरातली वादळं शमवण्यासाठी काही लिहू शकतो? आणि मुख्य म्हणजे कुठल्याही नॉर्मल लेखकाप्रमाणे तुझं पहिलं लेखन कवितेचं होतं का? आणि पहिल्या लेखनावर कुणाचे संस्कार आणि छाप होती? वडलांची का इतर कुणा लेखकाची?*

**मोनिका :** खरं सांगायचं तर मला कधी जाणवलंच नाही, की माझ्यात हा वारसा आला आहे असं. मी लिहू शकते असंही. आशू, माझा भाऊ, अकाली गेल्यावर मात्र एक एकाकीपण माझ्यात दाटून येत गेलं आणि मी त्या एकाकीपणातच कविता करू लागले. अर्थात त्यात फार वैयक्तिक भावनांचं प्रगटीकरण होतं. पण पहिल्या लेखनावर, म्हणजे कवितांवर, कुणाची छाप वगैरे नव्हती. आणि पहिली कथा – 'स्पर्श' नावाची, ती लिहिली होती मी माझ्या मैत्रिणीच्या पहिल्या प्रेमावर. तीही सासरी आल्यावर लिहिलेली. त्यावेळची माझी एकाकी मन:स्थिती, दुरावलेल्या मैत्रिणी, नवं शहर... वगैरे अनुभवावर होती ती कथा. अर्थात त्या कथेवरही



केवळ 'ही एक स्त्री असूनही, लेखिका असूनही असं धाडस दाखवते' असल्या कौतुकासाठी वा कौतुकमिश्रित आक्षेपासाठी, थोडक्यात धाडसासाठी धाडस म्हणून, मी काही लिहीत नाही. मला असलं धाडस दाखवणं मान्य नाही. पटत नाही.

छाप कुणाचीच नव्हती. पण ती केवळ अनुभव या पातळीवर राहिल्याने मला जमलेलीही नव्हती नीटशी. जमली नव्हती म्हणण्यापेक्षा ती फसलीच होती.

***संजय*** *: मुळातून का लिहितेस?*

**मोनिका** : जेव्हा मला जाणीव मिळाली, की शब्दांतून आपण आपल्या नजरेला, अंतर्मनाला दिसणारं, अगदी वास्तवातलं वा कल्पनेतलं जग, माणसं, त्यांच्यातली नाती साकारू शकतो, काल्पनिक जगाला वास्तवाच्या पातळीवर नि वास्तवाला एका कल्पिताच्या पातळीवर रेखाटू शकतो, तेव्हा मला मनापासून लिहावंसं वाटलं. अजून एक जाणीव झाली, की हा एक प्रकारचा शोधच आहे. आयुष्याचा, माणसांचा. एखादं बीज मनात रुजलं जातं, त्या अनुषंगाने व्यक्तिरेखा उभ्या राहतात. त्यांचे संवाद, त्यांची व्यक्तिमत्त्वं, आयुष्यं यांचा माझा मन एक शोध घेत राहतं. हा शोध चालू होतो तेव्हा एका अर्थानं मला माझाही शोध लागत असतो. माझ्यातली लेखिका माझ्यातल्या माणसाचाही शोध घेत असते. हा शोध मलाही घडवत नेतो. प्रगल्भ करतो. मला अजूनही वाढायचं आहे, याची जाणीव मला माझी कथा सतत देत असते, त्यासाठी मी लिहिते.

दुसरं असं, की माझ्याकडून होणाऱ्या निर्मितीच्या ह्या आनंदासाठी. निर्मितीतून प्रत्येक लेखकाला अपूर्व असाच आनंद मिळत असतो. पण त्या आनंदातून जे सात्त्विक समाधान लाभतं, त्या समाधानाला मी निष्ठा, भक्ती असं म्हणते. लेखन – विशेषतः माझी कथा, ही माझी निष्ठा, बांधिलकी आहे असं मी मानते. ती माझी श्रद्धा आहे. आयुष्यात मी जेवढी नि जितकी स्वतःशी प्रामाणिक आहे, तितकीच माझ्या कथेशी.

**संजय** : तुझ्या बऱ्याच कथांत संगीत आहे. स्वर आहेत. आणि उपरे नव्हे, तर कित्येकदा ते कथेचा एक भाग बनून येतात. हे कसं अन् कोठून आलं?

**मोनिका** : एक तर माझे वडील फार सुंदर गायचे. त्यांनी मला या कलेची देणगी दिली. मी स्वतः गेली अनेक वर्षं सतार वाजवते. संगीत ही अद्भुत गोष्ट आहे. समुद्रासारखी विशाल. तुमच्या जगण्याला अर्थपूर्ण, सुंदर करणारी. तुमच्या आयुष्याला संगीताचा स्पर्श लाभलेला असेल, तर तुमचा जीवनाकडे पाहायचा दृष्टिकोनच बदलून जातो. माझ्या कथांतून येणाऱ्या संगीतामुळे माझ्या कथांना थोडं वेगळं रूप येतं खरं.

***संजय*** *: आता एक अत्यंत निर्बुद्ध वाटेलसा पण तरीही महत्त्वाचा प्रश्न. एक गृहिणी म्हणून नानाविध जबाबदाऱ्या पार पाडताना आपल्यातलं लेखकपण कसं सांभाळतेस? याला अर्थात अनेक पैलू आहेत. वेळेचं नियोजन हा अगदी साधा पैलू, पण इतरही पैलू आहेत. उदाहरणार्थ, तुला मिळणारे मानसन्मान आणि सार्वजनिक ओळख आणि नवऱ्याची त्याबद्दल आस्था/प्रतिक्रिया/समज वगैरे. किंवा नातेवाइकांत तुझ्या प्रतिमेने येणाऱ्या अपेक्षा आणि अंतर... असे अनेक. एकुणातच तुझे लेखिकापण तू कौटुंबिक पातळीवर कसं मॅनेज करतेस, असा प्रश्नाचा रोख आहे.*

**मोनिका** : गृहिणी आणि लेखिका या माझ्यातल्या दोन भूमिका मी दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर ठेवल्या आहेत. सुदैवाने मला सासर म्हणून एक अत्यंत सुसंस्कृत घराणं मिळालं. माझ्या सासूबाई फार छान वाचत, दाद देत. माझ्या कथा ऐकत. फार अभिमान होता त्यांना. नवरा अभिजित ढ्ढ त्याची साथ तर फार महत्त्वाची असते. त्यानंही मला खूप घडवलं, खूप वाढत गेले मी त्याच्या सहवासात. कधी कधी डोक्यात कथा घोळत असते, लक्ष कशातच नसतं, पण घरच्या जबाबदाऱ्या झुगारून मी फक्त लेखन करणार, असं मला वागता येत नाही. मला ते पटतही नाही. संसार मांडला आहे, तर बंधनं येणारच थोडीफार. आपल्या भूमिका जाणून घेऊन त्या पार पाडणं यालाही मी महत्त्व देतेच.

तसं सगळं लाथाडून देऊनही वागता येतं; पण मला वाटतं, स्वतःशी प्रामाणिक असलेल्या कोणत्याही स्त्रीला सर्व झुगारून देता येत नाही. कुठेतरी ही मुक्तीही तिला असुरक्षित नि अपराधी करत असते. कुटुंब आणि करिअर ही प्रत्येक स्त्रीची ओढाताण असतेच, पण या कसरतीतूनच तिला स्वतःची ओळख पुरेशी मिळत जाते. स्वतःचा शोध घेता येतो. यातूनच तिला तिचं सामर्थ्य

समजत जातं असं मला वाटतं. करिअर आणि संसार या दोन्ही जबाबदाऱ्यांचा समतोल साधत स्वत:ला अजमावणारी प्रत्येक स्त्री मला प्रभावशाली वाटते.

***संजय** : तुझ्या कथेत विषयातलं धाडस असतं कधी कधी. लैंगिकतेचे संदर्भही असतात. पण तुझ्या अभिव्यक्तीत विशेष धाडस नसतं. म्हणजे स्पष्ट करायचं तर शिव्यांचा अतिरेकी वापर, लैंगिक संबंधांचं अन् क्रियांचं उघड आणि धाडसी चित्रण वगैरे नसतं. हे कशामुळे होतं? तुला त्याची गरज वाटत नाही म्हणून? का कसलं दडपण? का संस्कार? का स्वत:च्या इमेजची भीती? का तत्त्वं? नेमकं काय कारण आहे यामागे?*

**मोनिका** : लिहिताना मी फक्त लेखिका असते व त्यामुळे माझ्यावर दडपण, संस्कार किंवा इमेज यातलं कुठलंच बंधन येत नाही. एखाद्या अनुभवाची गरज असेल तर धाडसी अभिव्यक्ती, चित्रण करणं ठीक आहे. पण केवळ 'ही एक स्त्री असूनही, लेखिका असूनही असं धाडस दाखवते' असल्या कौतुकासाठी वा कौतुकमिश्रित आक्षेपासाठी, थोडक्यात धाडसासाठी धाडस म्हणून, मी काही लिहीत नाही. मला असलं धाडस दाखवणं मान्य नाही. पटत नाही. दुसरं म्हणजे संयतता, सूचकता हे साहित्याचे फार मोठे गुण आहेत, यावर माझा विश्वास आहे. संयततेने आणि सूचकतेने तुम्ही फार मोठा परिणाम साधू शकता, जो परिणाम वाचकाला अंतर्मुख करतो.

***संजय** : लेखिका असूनही तू रूढ अर्थाने स्त्रीवादी दृष्टिकोन बाळगून लिहीत नाहीस. याचं कारण काय? एकूणातच समाजात, साहित्यादी क्षेत्रांत, कुटुंबात, स्त्रीला कमी दर्जाची वागणूक मिळत नाही, असं तुला वाटतं का? बंडखोरीचा आवेश तुला नकोसा वाटतो का?*

**मोनिका** : मला या संदर्भात सिल्व्हिया पाथ आठवते. तिच्या कवितेत तिचं जीवन आणि जीवनाने तिच्याकडून अपेक्षिलेलं रूप यांतला संघर्ष येतो. पण ती फेमिनिस्ट नव्हती. विजयाबाई राजाध्यक्षही स्वत:ला पोस्टफेमिनिस्ट म्हणतात. परिवार-कुटुंब यांबद्दल त्यांना ओढ वाटते, असं त्या म्हणतात. आशा बगेही पूर्ण स्त्रीवादी लेखिका नव्हेत. मी ज्या घरात, संस्कारात वाढले, त्या घरात माझ्या वडिलांनी माझ्या आईला बरोबरीनं वागवलं. थोडाफार अन्याय झालाही असेल, पण मुख्यत: तिच्यावर कुठली बंधनं नाही लादली. तिनं या अर्थानं खूप स्वातंत्र्य उपभोगलं. सुदैवाने त्याहीपेक्षा मुक्तता मला सासरी मिळाली. अगदी माझी दोन मुलंही माझं लेखिकापण जपतात. कदाचित म्हणूनच स्त्रीवाद मला केवळ मर्यादित अर्थाने जवळचा वाटतो. अजूनही वेगवेगळ्या क्षेत्रांत स्त्रीवर केवळ स्त्री म्हणून अन्याय होताना मीही अनुभवले आहेत. पण बंडखोरी ही व्यक्तिमत्त्वातच असावी लागते हे जितकं खरं, तितकंच अभिनिवेशाने स्वत: स्त्रीच आपलं दुबळेपण त्या अभिनिवेशापोटी पुन:पुन्हा असं ना तसं अधोरेखित करत जाते की काय, हेही विचारात घ्यायला हवं. आजची स्त्री मला वाटतं पुरेशी समर्थ आहे. तिच्यावर होणाऱ्या अन्यायांची तिला जाणीव आहे आणि त्याविरुद्ध ती अशी ना तशी झगडते आहे. स्त्रीमधलं हे आंतरिक सामर्थ्य अन् त्याची जाणीव तिला असणं हे माझ्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे. तिचं एकीकडे सौम्य, शांत परंतु आंतरिक मात्र कणखर खंबीर रूप, तिला वाटणारी आत्मसन्मानाची प्रखर ओढ बंडखोरीच्या अभिनिवेशापेक्षा, त्या आवाजापेक्षा कधीकधी जास्त तीव्र ठरून जाते. माझ्या बहुतेक नायिका या अशा आंतरिक सामर्थ्याने अधिक उठून दिसतात – *नाळ, जन्म, जाणीव, देणं...* वगैरे कथांत.

***संजय** : पुरुष-लेखकांनी रंगवलेली स्त्रीपात्रे आणि त्यांचे मनोव्यापार आणि स्त्री-लेखकांनी रंगवलेली स्त्री यांत नेमका काय फरक जाणवतो तुला? केवळ तूच असं नव्हे, तुझ्या आधीच्या आणि समकालीन अशा दोन्ही, म्हणजे सानिया, गौरी, मेघना, नीरजा, आशा बगे वगैरे अनेक लेखिका मला इथे अभिप्रेत आहेत. अर्थात एका दमात म्हटले म्हणून या लेखिकांतदेखील काही साम्य मला अभिप्रेत नाही. ही नावं केवळ उदाहरणादाखल घेतली इतकंच.*

**मोनिका** : मला सगळ्याच लेखकांच्या बाबतीत म्हणता येणार नाही, पण काही लेखकांना स्त्री आणि तिचं सामर्थ्य जाणवलं आहे आणि त्यांनी कायमच तिला कचकड्याची बाहुली आणि पुरुषांसाठी केवळ प्रणयिनी असं रंगवलेलं नाही. पुंडलिकांची *सती* ही कथा, बोकिलांची *उदकाचिया...*, मतकरींचं कथांचं पुस्तक – *दहा जणी*, जी.एं.ची *कैरी*, गोखल्यांची *मंजुळा* वगैरे. असे काही अपवाद वगळता ही लेखकमंडळी कमी पडलीही असतील, तिचं सहनशील, सोशिक रूपच त्यांनी अधिक रेखाटलं असेल. पण मला असं वाटत नाही, की त्यांना स्त्री समजलीच नाही. हां, तिची दु:खं किती प्रकारची असू शकतात आणि तिची कुचंबणा त्यांना तितकीशी समजली नसेल. त्यांना तिचं सामर्थ्य तितकंसं जाणवलं नव्हतं असं म्हणता येईल. शिवाय त्या काळाचाही तो परिणाम असेल. त्यामुळे बहुतेक कथा स्त्री-प्रधान नव्हत्या, कथांतलं स्त्रियांचं चित्रण तितकसं ठळक नव्हतं. गौरीने स्त्रीवादी नायिका आपल्या लेखनातून पुढे आणल्या. आधी कमल देसाईंनी. यामुळे स्त्रीवादी भूमिकेचं व्यापकपण ठसलं गेलं. गौरी, सानिया या लेखिकांनी मुख्यत: स्त्रीला केंद्रस्थानी ठेवूनच पुढे कथा लिहिल्या. स्त्रीच्या संवेदना, तिच्या व्यथा, तिची घुसमट एक स्त्री या नात्याने या लेखिकांना अधिक जिवंतपणे, तीव्र संवेदनशीलतेने मांडता आली. तिच्या मनाचे पापुद्रे उलगडता आले.

***संजय** : मुळात कथा सुचते कशी? कसं पडतं ते बीज मनात? आणि कथा सुचणं ते कथा लिहून संपणं हा प्रवास – एकदा तुझ्याशी बोलताना मी याला गरोदरपण असा सुरेख शब्द वापरला होता, आठवतं? – हा प्रवास नेमका कसा होतो तुझ्या बाबतीत?*

**मोनिका** : कधी कधी कथेसाठी एखादा शब्दही मला पुरतो. उदाहरणार्थ, माझी *रूट्स* ही कथा. अमेरिकेत स्थायिक झालेल्या उद्ध्वस्त भारतीय मनांची. ती अक्षरश: फक्त 'रूट्स' या शब्दावरून, त्या शब्दामुळे सुचली. आणि एखाद्या अनुभवातून मला वाचकापर्यंत काय पोहोचवायचं आहे, ते मी आधी मनाशी संघर्ष करत करत लिहून ठेवते. मला जे सांगायचं आहे, तो शेवट

माझ्या कथेला सुरुवात करून देतो. कधी मनातलं अधांतरी कथानक लिहीत जावं तसं सुस्पष्ट होत जातं, आपोआप. 'मौज'मधल्या संपादनाच्या कामामुळे साक्षेपी संपादक श्री. पु. भागवत यांचा सहवास, त्यांची विचक्षण नजर-जाण, चर्चा यांमुळेही माझ्या मनातल्या काही कथांना दिशा, आकार मिळत गेला आहे.

***संजय** : तू बऱ्याचदा दीर्घकथेचा घाट घालतेस. कधी कधी त्यातली काही अनुभवकेंद्रं पुरेशी explore होत नाहीत, असं माझं मत आहे. एकुणात तुला कादंबरीलेखनाकडे वळावंसं वाटत नाही का?*

**मोनिका** : कादंबरीकडे मी वळले आहे. ते मला एक आव्हान वाटतेय अन् पेलून दाखवायचंय. पण आत्ताच त्याबद्दल बोलणं नको.

***संजय** : एक वाचक म्हणून आजूबाजूच्या कथालेखनाबाबत तुला काय वाटतं? मराठी कथेत नेमकं काय घडतंय? काय घडायला हवंय?*

**मोनिका** : कथा लिहिली खूप जातेय; पण अर्थवाही कथा कमी आहे. त्यात चांगली मासिकंही नाहीत. नव्या लेखकांना अनुभवाला गोष्टीचं रूप देता येतंय, पण कथेचं नाही, असं माझं निरीक्षण आहे. या लेखकांजवळ पुरेशी परिपक्व नजर नाही असंही वाटतंय. त्यामुळे अनुभवाला भिडणं, त्याचे पापुद्रे उलगडत नेणं, नि जीवनानुभवाशी त्या अनुभवाची सांगड घालणं इथे हे लेखक थोडे कमी पडतात.

***संजय** : आता तू एक ओळखली जाणारी कथालेखिका आहेस. तेव्हा तुला हा प्रश्न विचारायला हरकत नाही. तुझ्या अन् तुझ्या वडलांच्या कथेत तुला काय फरक आढळतो? तुझं नेमकं वेगळेपण काय आहे? आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगांनं विचारतोय मी.*

**मोनिका** : माझ्या वडिलांनी दीर्घकथा कमी लिहिल्या. माझ्या बहुतेक कथा या दीर्घकथा असतात. लघुकथा तर त्यांनाच जमली. बहुतेक वेळा म्हटलं जातं, की दीर्घकथा अवघड असते लिहायला. पण मला वाटतं, अनुभवाची तीव्रता अन् उत्कटता लघुकथेतच पकडता येते. ती मला नाही जमली. माझे वडील शब्दांसाठी खूप जागृत होते. त्यासाठी ते अडून राहत, आशयाइतकंच त्यांनी शैलीला महत्त्व दिलं. माझ्या कथेत शैलीपेक्षा कथेचा गाभा, केंद्र मला अधिक महत्त्वपूर्ण वाटतं. तो आशय तुम्ही कसा सांगता हे महत्त्वाचं असलं, तरी आशयच कमकुवत असेल तर ती कथा शैली कितीही प्रभावी असली तरी मनाची पकड घेत नाही, असं मला वाटतं.

***संजय** : तुला अनेक पुरस्कार मिळाले. कथेला मिळालेल्या मानसन्मानांबद्दल तुला काय वाटतं?*

**मोनिका** : त्याला महत्त्व नाही असंही मी म्हणत नाही, हुरूप येतो हे खरंय, पण पुरस्कारांनी लेखक मोठा-लहान ठरत नसतोच. अर्थात आपल्या लेखनाला मिळालेली दाद उत्साह वाढवणारी असते, हे निश्चित.

***संजय** : आता एक बाळबोध वाटणारा, पण बहुतेक तू 'ते सांगणं अवघड आहे' असं उत्तर देशील असा प्रश्न – तुला स्वत:ला सर्वांत आवडलेली तुझी कथा कोणती, अन् का? हा प्रश्न अनिवार्य गटातला आहे असं समज.*

**मोनिका** : सांगते. माझी 'आधार' ही कथा. कारण या कथेनं मला प्रसन्न करणारं निर्मितीचं थकलेपण दिलं. या कथेनं माझ्यापुढे, माझ्यातल्या लेखिकेपुढे, एक आव्हान उभं केलं होतं. त्यातलं मामा-भाच्यातल्या समलिंगी संबंधांचं नातं, हे मामाच्या दृष्टीनं एकीकडे त्याच्या कलानिर्मितीशी जोडलेलं, त्याचबरोबर त्याच्या एकटेपणाशी. लैंगिक अतृप्तीशीही. या नात्यामागच्या अशा अनेक पातळ्या होत्या आणि तरीही मला तो अनुभव विकल करणारा, करुण या अर्थानं, पोहोचवायचा होता. म्हणून ही कथा मला विशेष आवडलेली. ती कितपत यशस्वी ठरली, माहीत नाही.

***संजय** : एक स्त्री म्हणून तुला लेखन हा आत्माविष्काराचा सर्वोत्तम पर्याय वाटतो का?*

**मोनिका** : हो. मला नेहमी वाटतं, बहुतेक गोष्टी तुम्ही साधन या अर्थानं कौशल्य, गुण, बुद्धी पणाला लावून मिळवू शकता. पण लेखकपण नाही. लेखन ही गोष्ट स्वत:ला व्यक्त करणारी सर्वांगसुंदर अशी सामर्थ्यशाली गोष्ट आहे.

***संजय** : आणि आता शेवटचा प्रश्न म्हणजे श्रेष्ठ कथेचे तुझे निकष काय आहेत? एखादी कथा चांगली आहे, असं तू केव्हा म्हणतेस?*

**मोनिका** : सांगणं अवघड आहे. असे निकष मुळात कोणत्याच साहित्यप्रकाराच्या श्रेष्ठतेबाबत नाही लावता येत. ही व्यक्तिसापेक्षच कला आहे. तरीही ढोबळपणे अन् प्राथमिक पातळीवर कथेबाबत असं म्हणता येईल – त्या कथेनं अंतर्मुख करायला हवं. कथा संपली तरी वाचकांच्या मनाचा कब्जा तिनं घ्यायला हवा. कल्पिताच्या एका पातळीवरून जो अनुभव लेखकाच्या मनात चालू होतो त्या अनुभवाचं कल्पितपण पुसून वास्तवाशी वाचकांना नेऊन सोडायला हवं. मला वाटतं, अनुभवाकडे कोणत्या नजरेतून नि कसा लेखक पाहतो आणि त्याच्यातल्या शक्यता, स्तर, खोली तो किती संवेदनांनी अजमावतो, त्यावर ती कथा चांगली वा श्रेष्ठ ठरू शकते. इटालियन नाटककार पिरांदेलीनं म्हटलं आहे, ''कधी कधी मला वाटतं, मी दुसऱ्याच कुणाचं तरी आयुष्य जगतो आहे.'' लेखकानं अशी त्याच्या व्यक्तिरेखांची आयुष्यं ओढून घेऊन स्वत:ला खरवडत जगावं लागतं, तरच त्याचं लेखन जिवंत, श्रेष्ठ यांच्या आसपास पोहोचण्याची निदान शक्यता तरी निर्माण होते.

*(ऑगस्ट २००७)*

# माधवराव सप्रे : मराठीचे हिंदीला योगदान

**ज्ञानेश्वर मुळे**

छत्तीसगडचे सहकारमहर्षी वामन बळीराम लाखे, पूर्वांचलचे गांधी बाबा राघवदास, वाराणशीचे संपादक पंडित बाबूराव विष्णू पराडकर हे तीन मूळचे महाराष्ट्रपुत्र. हिंदी भाषेला व हिंदी प्रदेशाला त्यांनी अभूतपूर्व योगदान दिले. महाराष्ट्रात ते फारसे परिचित नसले तरी हिंदी भाषकांनी त्यांना सदैव प्रचंड आदर दिला. त्याच मालिकेत बसणाऱ्या मध्य प्रदेशातील साहित्यिक माधवराव सप्रे यांचा ज्ञानेश्वर मुळे यांनी करून दिलेला हा परिचय.

मराठी माणूस राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत सावध व बुजरा दिसतो, हे मी वारंवार अनुभवले आहे. क्षेत्र कोणतेही असो, धाडस व कल्पकता यांच्या बळावरच राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रभाव प्रस्थापित करता येतो.

या पार्श्वभूमीवर एकोणिसाव्या शतकात व काही अंशी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काही मराठी माणसांनी राष्ट्रीय पातळीवर वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांतल्या फुले, टिळक, गोखले इत्यादी महाराष्ट्रस्थित व्यक्तींची कामगिरी सर्वांच्या परिचयाची आहे. पण महाराष्ट्राबाहेर राहून असे महत्त्वपूर्ण काम करणारे अनेक लोक उपेक्षित राहिले आहेत. ते महाराष्ट्राचे म्हणून महाराष्ट्राबाहेर उपेक्षित राहिले आणि महाराष्ट्राबाहेर काम करतात म्हणून महाराष्ट्रात उपेक्षित राहिले.

'तद्‌भव' नावाच्या एका हिंदी साहित्यिक नियतकालिकातील (जानेवारी २००८) एका लेखावर माझी नजर पडली व ती तिथेच थांबली. 'माधवराव सप्रे का महत्त्व' हा लेख 'मैनेजर पाण्डेय' या दिल्लीवासी लेखकाचा आहे, आणि लेख पूर्ण तेरा पानांचा आहे. माधवराव सप्रे हे नाव मी स्वप्नातही ऐकले नव्हते. महाराष्ट्रात आजवर हे नाव माझ्यासमोर उच्चारणारी दुसरी कोणी व्यक्तीही मला भेटलेली नाही.

माधवराव सप्रेंच्या विषयीची त्या लेखातली माहिती थक्क करून सोडणारी आहे. माधवरावांचे पूर्वज कोकणातून येऊन मध्य प्रदेशातल्या दामोह जिल्ह्यात स्थायिक झाले. त्यांचा जन्म १९ जून १८७१ मध्ये पथरिया या गावात झाला आणि अवघ्या पंचावन्न वर्षांनी २३ एप्रिल १९२६ रोजी देहान्त. त्यांचे कार्य अत्यंत प्रभावी ठरले. त्यांच्या जीवनाची ठळक वैशिष्ट्ये अशी :

– ''ते हिंदीचे आधारस्तंभ, सामाजिक, साहित्यिक व राजकीय संस्थांचे संस्थापक आणि राष्ट्रीय तेज असणारे व्यक्तिमत्त्व होते'' अशा शब्दांत त्यांचे वर्णन माखनलाल चतुर्वेदी या अतिशय नामवंत हिंदी साहित्यिकाने केले आहे.
– ते एक साहित्यिक पत्रकार होते. टिळकांच्या 'केसरी'वर आधारित त्यांनी संपादित केलेल्या 'हिंदी केसरी'वरून त्यांचा इंग्रजांनी छळ केला. १९०८मध्ये त्यांना अटक झाली आणि 'स्वदेशी आंदोलन और बॉयकॉट' या त्यांच्या पुस्तिकेवर बंदी आली.
– इंग्रजांना कळू नये म्हणून त्यांनी अनेक नावांनी लिखाण केले. त्यांपैकी काही नावे : माधवदास रामदासी, त्रिमूर्ती शर्मा, त्रिविक्रम शर्मा.
– राजनीती, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मनोविज्ञान व विज्ञान हे सगळे विषय त्यांनी हाताळले.
– १९०० साली 'छत्तीसगड मित्र' या नियतकालिकाची स्थापना. हिंदीत समीक्षेची सुरुवात आणि समीक्षेचा प्रसार या नियतकालिकाने केला असे मानले जाते.
– १९०५मध्ये नागपूर येथे 'हिंदी ग्रंथ प्रकाशन' मंडळाची स्थापना. १९०६पासून 'हिंदी ग्रंथमाला'चा प्रारंभ. १३ एप्रिल १९०७मध्ये 'हिंदी केसरी'ची स्थापना. स्वदेशीचा प्रचार, विदेशीचा बहिष्कार, स्वराज्याचा प्रसार हे मुख्य काम.
– १९०८मध्ये 'हिंदी केसरी'मुळे अटक. हिंदी पत्रकारितेच्या इतिहासातील राजद्रोहाचा हा पहिला खटला.

भावाने आत्महत्येची धमकी दिल्याने त्यांनी इंग्रजांची माफी मागितली व ते सुटले. पण, अपराधी भावनेने व्याकूळ होऊन त्यानंतरचे त्यांचे जीवन अज्ञातवास, गरिबी, संताप, पश्चात्ताप, लज्जा अशा अवस्थेत गेले.

अज्ञातवासातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी 'दासबोधा'चे भाषांतर, निरूपण आणि विश्लेषण केले. त्यानंतर 'गीतारहस्या'चा अनुवाद केला. हा अन्य भाषेतील गीतारहस्याचा पहिला अनुवाद होता. 'महाभारत मीमांसा' हा त्यांच्या तिसरा अनुवाद.

हिंदी भाषेत अर्थशास्त्रासंबंधी लिखाण करणारे ते पहिले भारतीय होते. समीक्षक, निबंधकार, साहित्यकार, अनुवादक व पत्रकार अशा विविध रूपांत सप्रे समोर येतात. पण या सर्वांहून त्यांची जाज्ज्वल्य देशभक्ती मनाला मोह पाडते, कारण तीच त्यांच्या जगण्याची प्रेरणा होती. ज्या आदराने 'मैनेजर पाण्डेय' यांनी हा लेख लिहिला आहे, तो आदर प्रत्यक्ष लेख वाचून अनुभवण्यासारखा आहे. माधवराव सप्रे यांना माझे शत शत प्रणाम!

*(ऑगस्ट २००९)*

# केवळ वाचनालय नव्हे...

रविप्रकाश कुलकर्णी

साहित्यसंस्कृती जोपासण्यासाठी वाचनालये अनिवार्य आहेत. स्वतःचे राहते घर विकून 'ग्रंथसखा'सारखे एक अद्ययावत ग्रंथालय उभारणारे आणि त्यामार्फत विविध साहित्यिक उपक्रम उत्साहाने राबवणारे बदलापूरचे श्याम जोशी यांच्याविषयी.

मराठी वाङ्मय-व्यवहार म्हटला की आलेली मरगळ, उदासीनता आणि झपाट्याने होणारी पडझड, असल्याच गोष्टी सातत्याने वाचायला व ऐकायला मिळतात. त्याचीही सवय होऊन काहीच वाटेनासं झालं आहे. असं सगळं असूनसुद्धा मनाला उभारी देणाऱ्या घटना घडत असतात. प्रश्न आहे आमच्या भावाचा, सकारात्मक पाहण्याचा... आता हे मी सर्व पुन्हा एकदा का सांगतो आहे? तर बदलापूर येथे असणाऱ्या 'ग्रंथसखा'ची तुम्हांला माहिती आहे काय? श्याम जोशी हे नाव कुठेतरी कानावरून गेल्यासारखं वाटतं काय?

होय, तेच बदलापूर, जेथे एके काळी ना. गो. चाफेकरांसारखा व्युत्पन्न माणूस पुणं सोडून आला. आपल्या आईचं स्मरण म्हणून ते दरवर्षी वाङ्मयीन श्राद्ध घालत. ज्याला पुण्याहून दत्तो वामन पोतदार यांच्यापासून ते मुंबईहून न. र. फाटक यांच्यासारख्यांपर्यंतचे सगळे भिन्न प्रकृतीचे रसिक आवर्जून येत. जणू छोटसं पण उत्तम असं साहित्य संमेलनच. 'आमचा गाव बदलापूर' नावाचा ग्रंथ – ज्यात एखाद्या गावाचा सांगोपांग वेध घेतला गेला आहे, असं मराठीतील पहिलं पुस्तक – लिहिणारे तेच हे ना. गो. चाफेकर. पण त्यांच्यानंतर बदलापुरातील साहित्याचं वारं पडलंच. त्यानंतर मध्य रेल्वेवरील औद्योगिक संस्कृतीमुळे गरजेपोटी वाढत, पसरणारं गाव ते बदलापूर, अशीच त्याची ओळख होत गेली... लोंढेच्या लोंढे फक्त... जगण्याच्या लढाईत स्वत:ला विसरून गेलेले. कुठूनतरी कुठे चाललेले हेच दृश्य! कमी-जास्त हाच काय तो फरक. यात नवीन ते काय? पण इथेच मला स्वत:ला धक्का बसला, ज्यातून अजूनही फारसं सावरायला झालं आहे असं नाही. असं काय झालं? सांगतो –

गच्च भरलेल्या लोकलमध्ये श्वास घ्यायची पंचाईत, तिथे वाचताना कोण कशाला दिसणार आहे? त्यात पुन्हा दिसलंच तर कुठलंतरी सटरफटर मासिक, वा चटोर कादंबरी वाचणारा, असा सगळा प्रकार. अशा वेळी एकाच्या हातात चक्क गजानन भास्कर मेहेंदळेकृत छत्रपती शिवाजी महाराज चरित्रग्रंथ! काही दृष्टिभ्रम तर नाही ना, म्हणून मग 'कुठलं हे पुस्तक?' असं विचारलं, तर पठ्ठ्यानं ग्रंथराजच पुढे केला. पान उलटून पाहिलं तर कळलं, चक्क ग्रंथालयातलं पुस्तक!! एरवी मोठ्या वाचनालयातदेखील असे संदर्भ ग्रंथ नसतात, असलेच तर 'संदर्भ' म्हणून कडीकुलुपात असतात, असा स्वानुभव असताना बदलापुरातील वाचनालयात हे पुस्तक आणि तेदेखील खुलेआम वाचकाच्या हातात! धक्क्यावर धक्के असंच सगळं.

'ग्रंथसखा' वाचनालय पहिल्यांदा माहीत झालं ते असं. पण एकदा का 'ग्रंथसखा' माहीत झालं, की त्या वाचनालयाचे सर्वेसर्वा काळजीवाहू श्याम जोशी तुम्हांला माहीत होतातच. म्हणजे तुम्ही तरी त्यांना भेटता किंवा ते तरी तुम्हांला भेटायला येतात. पुढे तुमच्या लक्षात येतं 'ग्रंथसखा' हे केवळ वाचनालय नाही, तर त्यापलीकडे आणखी काही बरंच असं आहे.

बदलापूरच्या पूर्वेला तेलवणे टॉवरच्या कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये एकीकडे टेलर, दुसरीकडे चहाचं दुकान, वाणसामान अशा गर्दीत दर्शनीच मोठं आणि तेदेखील एअर कंडिशन्ड वाचनालय? अशक्य वाटणारं, पण खरोखरच समोर दिसतच असल्याने विश्वास ठेवायला लागतो. 'ग्रंथसखा'त शिरताच सगळीकडे पुस्तकंच पुस्तकं दिसतात, हे समजण्यासारखं आहे. पण कुठेही कसल्याच सूचना देणाऱ्या पाट्या नाहीत. ते सोडा. ते कुणाचं आहे, याचादेखील पत्ता नाही! तुम्ही आत थेट जाता. पुस्तकं चाळू लागता. कितीही वेळ लागला तरी कुणी हटकत नाही! तुम्हांला हवं ते पुस्तक मिळत नाही, हे तुमच्या देहबोलीवरून लक्षात आलं, तर मग तुम्हांला पुस्तक मिळवून देण्याकरिता स्टाफ मदतीला येतो. पर्यायी पुस्तकंदेखील सुचवली जातात. तरी देखील तुमचं समाधान होत नाही, असं लक्षात येताच मग त्या मदतीला आलेल्या बाई म्हणतात, ''आता आमचे 'सर' तुम्हांला नक्की मदत करतील.''

हे सर म्हणजेच इतका वेळ कुठे वाचनालयातील पुस्तकं विभागवार लाव, कुठे मासिकांचा गठ्ठा उचलून ठेव असलं काहीतरी करणारे आणि त्या स्टाफपैकीच वाटणारे गृहस्थ – श्याम जोशी सर. एके काळी ते शाळेत लोकप्रिय शिक्षक होते. त्यावेळी शिल्लक राहिलेली खूण म्हणजे – ते अजूनही 'जोशीसर' म्हणूनच ओळखले जातात. आज 'ग्रंथसखा' म्हणजे जोशीसर आणि

जोशीसर म्हणजे 'ग्रंथसखा' असं सायुज्य नातं झालेलं आहे. पण ह्याची सुरुवात कशी आणि कुठून झाली?

श्याम जोशीसर म्हणतात,

''माझे वडील साने गुरुजींच्याबरोबर काम करणारे. ते संस्कार आमच्यावर झालेले. घरात पुस्तकंच पुस्तकं. वडिलांनी त्यांची दीड हजार पुस्तकं नंतर 'डोनेट' करून टाकली. हा असा वारसा माझ्याकडे आलेला. वाचनाची आवड होतीच. पण पुस्तकांच्या किमतीमुळे प्रत्येक पुस्तक विकत घेणं अशक्यच होतं. मग वाचनालयातून पुस्तकं वाचायला सुरुवात केली. पण वाचनालयातदेखील सगळी पुस्तकं मिळतील याची खात्री नसते. असलंच तर जादा अनामत रक्कम, पुस्तक आठ दिवसांत परत करा, क्लेम, असल्या सगळ्या जाचक नियमांच्या अडथळ्यांची शर्यत... तेव्हाच ठरवलं होतं, की जेव्हा केव्हा शक्य होईल, तेव्हा वाचकाला कुठलाही अडथळा न येता, त्याला वाचनानंदाचा अवीट आनंद उपभोगता येईल, असं काहीतरी करायला हवं. कारण माझीच ती गरज होती! अर्थात ते सहजासहजी शक्य होणं अशक्यच होतं.

नोकरी, प्रपंच असं करताना एक वेळ अशी आली, की आम्ही भावंडं सक्षम झालो. मग वडिलांचं स्मारक म्हणून काय करता येईल. याचा विचार करताना त्यांच्या आवडीचं काम करायचं म्हणून 'निसर्ग ट्रस्ट' स्थापन केला. त्यातून वृक्षारोपण, पर्यावरण असले कार्यक्रम सुरू केले. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून 'ग्रंथसखा' सुरू केलं. मिळतील ती पुस्तकं आणलीच. पण खरा प्रवास सुरू झाला तो न मिळणाऱ्या पुस्तकांसाठी. गावा-आडगावांत गेलो. ध्यास एकच, दुर्मिळ पुस्तकांचा शोध घ्यायचा. एखाद्याने असं दुर्मिळ पुस्तक द्यायला नकार दिला, तर त्याला त्या पुस्तकाची झेरॉक्स तरी द्या, अशी विनंती करायची. कष्ट, दगदग, पैसा कशाकशाची म्हणून पर्वा केली नाही. वाचकाला, अभ्यासकाला 'ग्रंथसखा' कायम आधार वाटला पाहिजे, हे आमचं स्वप्न आहे.''

श्याम जोशींनी स्वप्नाबद्दल सांगितलं खरं, पण स्वप्नालापण गहिरे रंग असतात, त्याबद्दल सांगा, असं म्हणताच ते म्हणाले,

''ही कधीही न शमणारी तृष्णा आहे... मी निरनिराळी ग्रंथालयं पाहत होतो, तेव्हा लक्षात आलं, ग्रंथालयात पुस्तकं आहेत, आणखी वाढतील. पण केवळ संग्रह करणं हे वाचनालयाचं उद्दिष्ट आहे काय? वाचकाला अभिरुचिपूर्ण करणं, त्याची अभिरुची वाढवणं हे काम कुणी करायचं? त्यातून वाचनालयात वाचकाला मदत करणाऱ्या 'काउन्सिलर्स'ची कल्पना पुढे आली. सुदैवाने मला तशा मेढीमॅडम, प्रधानमॅडम मिळाल्या. त्यांच्याभोवती माहिती घेण्यासाठी वाचकांचा कायम गराडा असतो. हे मला महत्त्वाचं वाटतं. वाङ्मयीन घटना घडत असतात त्याला अनुसरून प्रतिसाद देणं, वाचकांना त्यासंबंधात प्रेरित करणं हेपण मला करावसं वाटतं. त्यासाठी मी प्रयत्न सुरू केले. कार्यक्रम केले. उदाहरणार्थ, दिवाळी अंकांची शताब्दी होती. मासिक 'मनोरंजन' हा पहिला दिवाळी अंक आहे, तो कसा होता हे वाचकांना कळायला हवं, असं



**'ग्रंथसखा'चे श्याम जोशी : ''लेखक आणि वाचक यांच्यामधला दुवा एवढंतरी 'ग्रंथसखा'ला समाधान मिळावं, त्यासाठी माझी धडपड आहे.''**

मला वाटलं आणि त्याच्या जोडीलाच मग दिवाळी अंकांचा एकूणच प्रवास कुठकुठल्या अंकांनी केला हेपण दाखवणं गरजेचं वाटलं. म्हणून मग 'ग्रंथसखा'तर्फे पहिल्या दिवाळी अंकापासून ते अगदी आजच्या अंकापर्यंत हे टप्पे दाखवणारं दिवाळी अंकांचं प्रदर्शन भरवलं. ते पाचपंचवीस ठिकाणी पदरमोड करून नेलं, त्यासंबंधात व्याख्यानं दिली. अशा उपक्रमांचा आणखी एक फायदा झाला. अनेकांकडे पुस्तकं-मासिकं पडलेली आहेत — त्यांना ती टाकवतही नाहीत आणि ठेवावीशीपण वाटत नाहीत, त्यांना माझं वाचनालय हा आधार वाटला. पुस्तकं, मासिकं अशीही मिळू लागली.

''इथे हेही सांगायला हवं, की यात व्यापारी वा स्वार्थी दृष्टिकोन नाही. हे सगळं वाचकांचं आहे, आम्ही केवळ त्याचे ट्रस्टी आहोत, देखभाल करणारे आहोत.

''मघाशी अनेकांकडे पडून असलेल्या पुस्तकांबाबत सांगायचं राहिलं. त्याबाबत मी 'दत्तक योजना' सुरू केली आहे. अनेक लेखकांची मुलं ही आता परदेशात आहेत वा त्यांना या गोष्टीत रस नाही. त्यांच्यापुढे प्रश्न पडतो, की त्यांच्या वाडवडिलांनी जमवलेल्या ग्रंथ आदी गोष्टींचं करावं काय? विद्यापीठं, साहित्य–परिषदा वगैरेंची पुस्तकं जमा करण्याची वा त्यांचा सांभाळ करण्याची क्षमता संपलेली आहे. मला वाटतं, आपण पर्यायी व्यवस्था करायला हवी. माझ्यासंबंधात बडोद्याच्या दादूमियाँ यांनी 'धर्मभास्कर' अंकात लेख लिहिला. हा लेख प्रसिद्ध लेखक रवींद्र पिंगे यांच्या वाचनात आला. त्यांनी मला बोलावून घेतलं. सगळी माहिती घेतली आणि ते मला म्हणाले, 'माझी काळजी आता मिटली आहे. माझ्याकडची पुस्तकं, पत्रव्यवहार, अंक ह्यांचं करायचं काय, हा माझ्यापुढे प्रश्न होता. हे सर्व मी 'ग्रंथसखा'ला देणार.'

''दुर्दैवाने हे बोलणं झालं आणि पिंगे दुर्धर रोगाची शिकार झाले. त्यातच ते गेले. पण हे त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांना सांगून

ठेवलं होतं. त्याप्रमाणे पिंगे यांच्या पत्नी कमलाताई, मुलगा सांबप्रसाद यांनी सर्व गोष्टी माझ्या स्वाधीन केल्या. दोन ट्रक भरेल एवढ्या या गोष्टी होत्या. त्यातून मग 'रवींद्र पिंगे दालन' निर्माण करण्याची कल्पना सुचली. पिंगे यासंबंधात या साहित्याचं, माहितीचं वर्गीकरण करण्याचं काम सुरू आहे. पिंगे यांच्या साहित्याची सूची प्रकाशित करायची आहे. म्हणजे उद्या कुणा अभ्यासकाला रवींद्र पिंगेसंबंधात अभ्यास करायचा आहे, तर त्याला 'ग्रंथसखा'ला भेट देण्याशिवाय पर्याय राहता कामा नये.

''याचा एक परिणाम असा झाला, की आता इतरही लेखकांकडून, त्यांच्या कुटुंबीयांकडून विचारणा होऊ लागली आहे. त्यांच्या भेटीगाठी सुरू आहेत. आणखी एक योजना आहे. शांता शेळके, दुर्गा भागवत यांचं बरंच साहित्य अंकांतून विखुरलेलं आहे. ते ग्रंथबद्ध करणं हे प्रकाशकाचं काम झालं. पण त्याची सूची करणं मला अपेक्षित आहे. अभ्यासकांना ते किमान झेरॉक्स करून देण्यासाठी माझी धडपड आहे. म्हणजे एकीकडे वाचकाची वाचन-अभिरुची वाढवणं, त्यासाठी त्याला साहित्य देणं, हे जसं 'ग्रंथसखा'चं काम आहे, तसंच या साहित्यिकांच्या कारकिर्दीचं 'डॉक्युमेन्टेशन' जपून ठेवणं, उपलब्ध करून देणं, हा माझा उद्देश आहे.

''हे असं मी तासन्तास बोलू शकतो; कारण माझ्यासमोर माझी कामंच मला दिसतात. पण हे सगळं माझ्याकडून केव्हा आणि कसं होणार आहे? माझी तेवढी क्षमता आहे का? असा प्रश्न निर्माण होतोच. त्यासाठी २०१५ पर्यंतचं माझं 'टारगेट' तयार आहे. त्याचा कच्चा आराखडाच मी तुमच्यापुढे मांडतो –

– 'द बुक युनिव्हर्सिटी' जिथे पुस्तकं मिळतीलच; पण कसं, काय, केव्हा वाचावं याचं मार्गदर्शन होईल, हे आमचं उद्दिष्ट आहे.

– वाचनालयं अनेक आहेत. पण त्यांची 'बुक व्हॅल्यू' तपासण्याची यंत्रणा आमच्याकडे कुठे आहे? टपरीतलंपण वाचनालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि 'ग्रंथसखा'पण वाचनालय. असं समजून चालेल? ते निकष मांडायचे आहेत, मांडतो आहोत. याच पातळीवर वाचकाची 'इयत्ता' तपासून त्याला उंचीवर कसं न्यायचं?

– पुस्तकांचा प्रवास दाखवणारं संग्रहालय, जिथे सगळा शब्दांचा, भाषावैभवाचा प्रवास दाखवायचा आहे.

– 'ग्रंथसखा'ची गृहपत्रिका असेल. हा केवळ हवेतील विचारविलास नाही, तर त्याला वास्तवाचं अधिष्ठान आहे, हे त्यातून स्पष्ट होईल.

– 'बुक टुरिझम' करायचा विचार कुणी केला आहे का? विश्वकोश कसा आणि कुठे होतो? भाषांतराचा खजिना उपलब्ध करणारे मेहता पुण्यात बसून हे कसं काय जमवतात, हे अनेक वाचकांना जाणून घ्यावंसं वाटतं. हे सगळं प्रत्यक्ष तिथे नेऊन मला वाचकांना दाखवायचं आहे.

''असे उपक्रम अर्थातच माझ्या 'ग्रंथसखा' वाचनालयाच्या सभासदांच्या मदतीच्या जिवावरच करणार आहे. शिवाय अनेक ग्रंथप्रेमींचा मदतीचा हात पुढे येतो आहे. सगळ्या योजना भले मला एकट्याला नाही करता येणार. पण काहीतरी होतीलच ना? माझी धडपड त्याच्यासाठी आहे. लेखक आणि वाचक यांच्यामधला दुवा एवढंतरी 'ग्रंथसखा'ला समाधान मिळावं, त्यासाठी माझी धडपड आहे.''

श्याम जोशी ग्रंथ आणि ग्रंथालय यांबाबत बोलायला लागले, की त्यांना थांबता येत नाही. याचा अर्थ जोशीबुवांना काही अडथळे, समस्या नाहीतच का? तसं अजिबात नाही. त्या प्रतिकूल गोष्टींचे डोंगरच्या डोंगर उभे आहेत. पण त्यावर मात करायची जिद्द जोशीबुवांच्यात आहे. प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याची इच्छा आहे.

अशा वेळी तुम्ही-आम्ही, ज्यांना ग्रंथव्यवहारात रस आहे, आस्था आहे, ते किमान जोशीबुवांना 'आगे बढो, हम तुम्हारे साथ है' एवढं तरी म्हणू शकतो ना? जोशीबुवांना एवढं पाथेयदेखील पुरेसं ठरेल!

त्यांच्याशी संपर्क साधू शकता – ग्रंथसखा, तेलवणे टॉवर्स, बदलापूर (पूर्व), ४२१५०३

'ग्रंथसखा'मुळे एक नवा चेहरा बदलापूरला मिळतो आहे. उद्या बदलापूरला जावंसं तुम्हांलाही वाटेल. हो ना?

*(ऑक्टोबर २०१०)*

ज्या सुंदर गोष्टींचे सौंदर्य इतरांना समजावून सांगावे लागते तिच्यावर माझा फारसा विश्वास नाही. सौंदर्याचा निर्माता सोडून आणखी कोणालातरी त्या सौंदर्याचे स्पष्टीकरण देणे जेव्हा भाग पडते तेव्हा कलावंत म्हणून तो निर्माता कोठेतरी कमी पडला आहे असे मला निश्चित वाटते.

**– चार्ली चॅपलिन**

वीणेच्या तारा खूप सैल असतील तर त्यातून संगीत निघणार नाही. खूप घट्ट असतील तरीही संगीत निघणार नाही. पण त्या तारांची एक अवस्था अशीही असते जेव्हा त्या सैलही नसतात आणि घट्टही नसतात. नेमक्या त्याच बिंदूवर संगीताचा जन्म होतो. त्याचप्रमाणे भोग आणि संयम यांच्यामधली एक अवस्था असते. नेमक्या त्याच बिंदूवर जीवनाचा जन्म होतो.

**– आचार्य रजनीश**

*(दिवाळी २०१६)*

# आठवणींचा पायरव

## अंजली कीर्तने

मुंबईचे पॉप्युलर प्रकाशन ही साहित्यक्षेत्रातील एक नामांकित संस्था. आपल्या कारकिर्दीच्या अगदी सुरुवातीला १९८१ ते १९८६ अशी पाच वर्षे लेखिकेने त्या संस्थेत काम केले. त्या दिवसांच्या या आंबटगोड आठवणी.

पीएच.डी.चा अभ्यास पूर्ण झाला होता. त्यापूर्वी मी म. वा. धोंड आणि वा. ल. कुलकर्णी या दिग्गज समीक्षकांच्या हाताखाली मराठी वाङ्मयकोशाच्या समीक्षाखंडाचं काम केलं होतं. त्या दोघांच्या 'विद्यापीठा'त अभ्यासाची पायाभरणी झाली होती. त्या ज्ञानाचा साहित्याच्या परिसरात उपयोग करण्याची वेळ येऊन ठेपली होती. मला प्राध्यापकी पेशात अजिबात रस नव्हता. अशावेळी माझं लक्ष *पॉप्युलर प्रकाशन* या संस्थेकडे वळलं. राम कोलारकरांनी माझी ही इच्छा रामदास भटकळांच्या कानावर घातली. पॉप्युलरच्या मराठी विभागाचं काम मृदुला जोशी पाहत. त्यांची साहाय्यक म्हणून मी पॉप्युलरमध्ये रुजू झाले. ते साल होतं १९८१!

माझी बसायची व्यवस्था एका मोठ्या दालनात होती. माझ्यासमोर टायपिस्ट मंगला कलबाग. तिच्यामागे टेबलांच्या तीन ओळी. तिथे सगळा कर्मचारी वर्ग. माझ्या डावीकडे मृदुला जोशी. त्यांच्या मागच्या भिंतीवर माझे गुरुजी वा. ल. कुलकर्णी यांची मोठीथोरली, हसरी तसबीर. माझ्या पाठीमागे आमचे जनरल मॅनेजर रघुनाथ गोकर्ण. त्यांची सर्वांवर करडी नजर. या दालनाला खूप खिडक्या होत्या. खिडकीतून मागचं गोल्फचं गर्द हिरवं मैदान दिसे. वातावरण प्रसन्न व चिंतनाला, वाचनाला अनुकूल.

पहिला दिवस आजही आठवतो. वेळ दुपारी दीडची. जेवणाची सुट्टी नुकतीच संपली होती. मृदुलाबाई मला माझ्या टेबलाकडे घेऊन गेल्या. त्यांच्या टेबलावरचा एक मोठ्ठा ढीग त्यांनी माझ्या टेबलावर ठेवला. त्या म्हणाल्या, ''आपल्याकडे ही हस्तलिखितं आली आहेत. ती वाचा आणि अभिप्राय द्या.'' मी कामाला लागले. प्रत्येक पुस्तक वाचून माझा अभिप्राय तयार केला. तीन-चार दिवसांत तो ढीग संपला. मृदुलाबाई आश्चर्यानं म्हणाल्या, ''झाली सगळी? तुम्ही अगदी रोडरोलर फिरवून रस्ता सपाट करून टाकलात!'' त्या मला रामदासांच्या केबिनमध्ये घेऊन गेल्या. मी ती सगळी हस्तलिखितं नाकारली होती. त्यामागची कारणंही मी रामदासांना स्पष्ट केली. रामदास समाधानानं हसले आणि म्हणाले, ''चला! डोक्यावरचं ओझं गेलं!''

आज ते सारं किती दूरचं वाटतं आहे! १९८१ ते १९८६ ही पाच वर्षं मी पॉप्युलरमध्ये होते. पॉप्युलर सोडून आता २७ वर्षं झाली. पॉप्युलरमध्ये काम करता करता 'पुस्तक' या वस्तूच्या विविधांगांचं दर्शन घडलं. निर्मितीचा अनुभव मिळाला. पुस्तक हे आधी 'हस्तलिखित' असतं. प्रत्येक हस्तलिखिताला त्या त्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा गंध असतो. लेखक जेव्हा आपलं हस्तलिखित प्रकाशकाच्या घरी 'सोडून' जातो, तेव्हा त्याचं मन हुरहुरत असतं. त्यानं ते सुवाच्य अक्षरात लिहून, नीटनेटकं बांधून आणलेलं असतं. सोबत 'प्रतिसादाच्या अपेक्षेत' असलेलं पत्र असतं. दिल्या क्षणापासून तो होकाराची वाट पाहत असतो. प्रकाशकाच्या दृष्टीनं मात्र हस्तलिखित वाचणं हे अनेक कामांपैकी एक काम असतं. त्यामुळे हस्तलिखिताकडे पाहण्याच्या लेखक-प्रकाशकांच्या दृष्टिकोनात नेहमीच फरक पडतो. प्रकाशकांचा संपादक हा प्रथम हस्तलिखित संपादित-संस्कारित करतो. त्यातून मुद्रणप्रत तयार होते. त्यानंतर वेळापत्रक बनवून योग्य तो छापखाना शोधला जातो. तो लेटर प्रेसचा जमाना होता. खिळे कसे जुळवतात ते मला पाहायचं होतं. म्हणून मी एकदा पुण्याच्या कल्पना मुद्रणालयातील खिळे जुळाऱ्यांना भेटले होते. छापखान्यातून येणारी गॅली प्रुफांची भेंडोळी म्हणजे पुस्तकाचं 'गर्भरूप'. त्याची नंतर पानं पाडून, त्यांना पृष्ठ क्रमांक देऊन पेजप्रुफं तयार झाली, की पुस्तकाला 'बाळरूप' येतं. चुका सुधारून आलेलं, तिसरं स्वच्छ प्रूफ पाहायला मला फार आवडे. मृदुलाबाईंनी मला पुस्तकाच्या प्रारंभी येणारी उपशीर्षक, शीर्षक, इंप्रिंट, अर्पणपत्रिका, अनुक्रमणिका ही प्रिलिम्सची पानं करायला शिकवलं. पुस्तकाची मुखपृष्ठं घेऊन चित्रकार येत. त्यांनी दोन-तीन रफ स्केचेस आणलेली असत. त्यावर रामदास, मृदुलाबाई आणि मी यांची चर्चा होई.

पुस्तकांच्या या दुनियेत माझं जीवन बहुमुखी झालं. मी रुजू झाल्यानंतर काही महिन्यांनी मृदुलाबाईंची प्रकृती बिघडली. त्यांचं येणं अनियमित झालं; आणि नंतर तर त्यांनी नोकरीच सोडली. आता जबाबदारी वाढली. हस्तलिखितं निवडण्यापासून

ते पुस्तकाच्या निर्मिती-प्रसारापर्यंत अनेकविध कामं करावी लागली. मी नवीन होते; परंतु प्रॉडक्शन मॅनेजर शिराली, जनरल मॅनेजर गोकर्ण, कमर्शियल आर्टिस्ट डिकुन्हा या 'प्राध्यापकां'च्या आणि 'प्राचार्य' रामदास भटकळ यांच्या या 'विद्यापीठा'त माझा अभ्यास सुरू झाला. बुद्धी आणि कल्पनाशक्तीला चालना देणारा आणि नवनिर्मितीचा आनंद देणारा हा अभ्यासक्रम होता.

रामदास एकदा मला म्हणाले, ''अंजली, तू रोजनिशी लिहायला लाग. स्वत:साठी लिही. मला दाखवायची जरुरी नाही.'' कल्पना चांगली होती. ती प्रत्यक्षात आणायचा मी मनापासून प्रयत्नही केला. मात्र जगणंच इतकं आकर्षक असताना, त्याच्या नोंदी करत बसणं हे काम कंटाळवाणंच असतं. काळाच्या ओघात रोजनिश्याही गहाळ होतात. मात्र १९८३ सालची एक रोजनिशी मला सापडली. ती वाचता वाचता ते दूरचे पॉप्युलरचे दिवस जवळ आले...

दिवस धावपळीचे होते; पण उमेदीचे होते. आनंदाचे होते. 'ग्रंथव्यवहार' नामक उद्योगाचा मी एक घटक बनले होते. कोणत्या पुस्तकासाठी छापखान्याला कागद पुरवायचा, प्रदर्शनं कुठे भरवायची, पत्रव्यवहार तर मागे पडला नाही ना, हे आणि असेच विचार घरी आल्यावरही डोक्यामध्ये चालू असत. १९८३ सालच्या माझ्या रोजनिशीमधलं हे एक वाचनीय पान –

''६ फेब्रुवारी १९८३,
रविवार

सकाळी सव्वासहाच्या सुमारास मी आणि सुमन हट्टंगडी पुण्याला जायला निघालो. दादर, टी.टी.ला टॅक्सी पकडली. साडेदहाला पोहोचलो. सासरी सामान टाकून 'साप्ताहिक मुद्रण' येथे गेलो. 'हे ईश्वरराव... हे पुरुषोत्तमराव' या पुस्तकाचं मुखपृष्ठ तयार नव्हतं. फाटकांना बजावून बजावून ते लौकर करायला सांगितलं. मग 'यशवंत मुद्रणालय' गाठलं. तेथे *प्रवासी* (कुरियर) कुंजुरला बोलावलं होतं. त्याची व मामा दाते यांची गाठ घालून दिली. (प्रुफं मुंबईला पोहोचविण्यासाठी) तेथून साधना मुद्रणालयात गेलो. तिथले मॅनेजर नाना डेंगळे यांना 'नरसू माळी' या कादंबरीचं हस्तलिखित दिलं. डेंगळे अतिशय सुसंस्कृत आहेत. फार छान बोलतात. तेथून कर्वे रोडवरील 'सागर'मध्ये जाऊन आम्ही दोघी जेवलो. मग पॉप्युलरच्या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी आचार्य अत्रे सभागृहात गेलो. दुपार असल्यानं माणसं नव्हती. सुळे म्हणाले, 'अजूनपर्यंत कोणत्याही वृत्तपत्रात प्रदर्शनाची बातमी आली नाही.' मी त्यांना पाच-सहा नावं दिली व त्या मंडळींना आमंत्रण द्यायला सांगितलं.''

पॉप्युलरमधील सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर निर्णयस्वातंत्र्य! वादविवाद स्वातंत्र्य! रामदासांनी कधी बॉसिंग केलं नाही. माझ्या निर्णयक्षमतेवर त्यांचा विश्वास होता. ते एकदा मला म्हणाले, ''तू तुला योग्य वाटतील ती पुस्तकं जरूर निवड. फक्त निवडीमागे एक विचार असू दे – तो लेखक वा ते पुस्तक पुढील अनेक वर्षं टिकेल असा असावा.'' त्यांचा शब्द त्यांनी पाळला. एखादं पुस्तक वाचल्यावर त्यात मला जे बदल वा सुधारणा हव्या असतील त्या मी परस्पर लेखकांना सांगत असे. या चर्चा मला फार आवडत. इतरांच्या पुस्तकांचा चिकित्सकपणे विचार करत असतानाच माझ्यातील लेखिका घडत होती.

१९८३च्या प्रारंभी रामदासांनी मला मराठी विभागाची मॅनेजर केलं. त्यावेळी मी या विभागात एकटीच होते. सुमन हट्टंगडीला तयार करावं अशा विचारात होते. याच हेतूनं तिला मी पुण्याला नेलं होतं. त्यानंतर एक दिवस गोकर्णांनी मला व सुमनला केबिनमध्ये बोलावलं. त्यांनी संशयानं विचारलं, ''तुम्ही कोणाला विचारून पुण्याला गेलात? सुमनला न्यायची काय गरज होती? टॅक्सी का केलीत?'' मी आश्चर्यचकित झाले. आजवर माझ्याशी असं कोणी बोललं नव्हतं. वरिष्ठ, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून गोकर्णांचं त्यांच्या परीनं बरोबर असेल; पण त्यांच्या शब्दांतला संशय व अविश्वास मला झोंबला. रागावर काबू ठेवत मी शांतपणे म्हटलं, ''मी जे केलं, ते सर्व रामदासांना विचारूनच केलं.'' तो विषय तेवढ्यावरच थांबला. मात्र हे सारं प्रकरण रामदासांना सांगितल्याशिवाय मला राहवेना. त्याचीही नोंद माझ्या रोजनिशीत आहे.

''११ फेब्रुवारी १९८३

आज लौकर ऑफिसात आले. रामदासांना म्हटलं, ''तुम्हांला थोडा वेळ आहे का? मला काही बोलायचंय.'' रामदास म्हणाले, ''मला स्नेहप्रभा प्रधानांच्या ऑपरेशनसाठी जायचं आहे. पण मी ते १५ मिनिटं पुढे ढकलू शकतो.'' मी घडलेलं सर्व सांगितलं. ते म्हणाले, "You are absolutely right! मीच तुला सांगितलं होतं, की तुझे निर्णय तू घे. तुझ्या अधिकारांचा वापर तू करायलाच हवास. मी याबाबत बोलीन गोकर्णांशी. तू मनाला लावून घेऊ नकोस.''

गोकर्णांवरचा माझा राग मावळला. असे वादविवाद कामावर परिणाम करायचे नाहीत. कायम कोणी एकमेकांशी फटकून वागत आहे, अबोला आहे, असं होत नसे. कलह प्रत्येकाचा हक्क होता. त्यामागे हेवेदावे नसत; विचारभिन्नता असे. पॉप्युलरच्या वातावरणातील ही वैचारिक आरोग्यसंपन्नता मला प्रिय होती. दिवसेंदिवस मी या कामात खूप गुंतून गेले. पाच वर्षांत अनेक पुस्तकांवर काम केलं. पैकी एक पुस्तक त्याच्या अनोख्या पार्श्वभूमीमुळे आजही लक्षात आहे.

एका सकाळी बाहेरगावाहून ग. कृ. कुलकर्णी नावाचे एक मध्यमवयीन गृहस्थ आले. त्यांच्याबरोबर धोतर-सदरा, गांधीटोपी घातलेले, धिप्पाड पण अतिशय सात्त्विक चेहऱ्याचे आणखी एक गृहस्थ होते. कुलकर्णींनी मला 'नरसू माळी' नावाच्या कादंबरीचं हस्तलिखित दिलं. ही कादंबरी म्हणजे एक सत्यकथा होती. गुंडगिरीकडे व गुन्हेगारीकडे वळलेल्या, तरीही मूलत: सरळमार्गी असलेल्या एका माणसाची ही थरारक जीवनकहाणी होती. भुकेची आग, गरिबी यामुळे नरसू अनिष्ट मार्गाला लागतो; पण त्याच्यातला 'माणूस' नष्ट होऊ शकत

नाही. कुलकर्णींपेक्षा बरोबर आलेले गृहस्थच अधिक माहिती देत होते. माझ्या चेहऱ्यावरचं आश्चर्य वाचून कुलकर्णी म्हणाले. 'हेच नरसू माळी.' मी उडालेच! ''तुम्ही नरसू माळी? तुम्ही गुंडगिरी केली असेल, हे खरंच वाटत नाही!'' मी कादंबरी वाचली. लेखकाच्या मर्यादा स्पष्ट होत्या. तरीही त्या कादंबरीतील नाट्यपूर्ण, रोमांचकारी अनुभवांसाठी मला ती कादंबरी छापावीशी वाटली. रामदासांनी तत्काळ होकार दिला. मी या पुस्तकात जीव ओतला. पुस्तकाच्या प्रकाशनासाठी कुलकर्णी व नरसू माळी यांनी मला भूमला आग्रहानं बोलावलं; पण मला जमलं नाही. नरसू माळींची पुन्हा कधी भेट झाली नाही याची चुटपुट मागे राहिली.

पॉप्युलर मित्रमंडळाची योजना कार्यान्वित करतानाही असाच नवीन काही घडविण्याचा आनंद मला मिळाला. तो 'बुक-क्लब'चा जमाना होता. पुस्तकं वाचकांना थेट पोहोचविण्यासाठी प्रकाशन संस्थेतर्फे सभासद करून घेण्याची ती योजना होती. माझा नवरा सतीश मार्केटिंगमधला; त्यामुळे विक्रीसंबंधी घरी खूप चर्चा होत. रामदास म्हणाले, ''ही योजना संपूर्णपणे तू घडव.'' पॉप्युलरचे लेखक व अन्य लेखक यांना पाठविण्यासाठी प्रथम मी एक माहितीपत्रक तयार केलं. एक ठरावीक रक्कम भरून वाचकांनी पॉप्युलर मित्रमंडळाचं सभासद व्हायचं. त्यांना सभासद क्रमांक व कार्ड द्यायचं. आमच्या लेखकांना आम्ही विनामूल्य सभासद बनवलं. दरमहा एक नवीन सवलत-योजना जाहीर करायची. ताज्या पुस्तकांची माहिती कळवायची; असं या योजनेचं स्वरूप होतं. त्यासाठी चष्मा घालून पुस्तक वाचणाऱ्या छोट्या हत्तीचं बोधचिन्ह रघुवीर कुलकर्णींकडून करून घेतलं. मी व माझी साहाय्यक शुभांगी कांबळे यांनी या योजनेच्या प्रसारासाठी मुंबई, पुणे, ठाणे, डोंबिवली इथे धडाक्यात प्रदर्शनं भरवली. वाचकांनी उदंड प्रतिसाद दिला. ग्रंथप्रसारक शरद जोशी, ठाण्याचे पद्माकर शिरवाडकर यांनीही यात बराच रस घेतला. ऑफिसमधले सुळे, चंदावरबाई, नाडकर्णी सगळ्यांच्यात उत्साह संचारला होता. ध्येय एकच, सभासद वाढविणं. ते एक उत्तम टीमवर्क बनलं. दादरच्या किंग जॉर्ज शाळेतील प्रदर्शनाचे दिवस असे होते....

''२० एप्रिल १९८३

आज संध्याकाळी बरीच माणसं पॉप्युलर मित्रमंडळाची सभासद झाली. ग्रंथालीचे दिनकर गांगल आले होते. मी त्यांना म्हटलं, ''तुम्ही काही सभासद होणार नाही; तरीपण ही योजना कशी वाटते बघा.'' त्यांनी योजना वाचली. त्यांना ती आवडली; आणि ते चक्क सभासदही झाले.''

''२१ एप्रिल १९८३

संध्याकाळी साडेसातपर्यंत प्रदर्शनात थांबले. पॉ. मि. मंडळाविषयी तेच तेच बोलून घसा दुखायला लागला; पण सभासद चिक्कार मिळाले. मॅजेस्टिक प्रकाशनात काम करणारे केशव साठे यांनी आज उत्तम सहकार्य केलं. दोन पुस्तकप्रेमींना माझ्याजवळ घेऊन आले. म्हणाले, ''यांना तुमचे सभासद करून घ्या. हे खूप पुस्तकं विकत घेतात.'' हा जिव्हाळा मनाला स्पर्शून गेला.''

आयडियलचे कांताशेठ नेरूरकर, बॉम्बे बुक डेपोचे पांडुरंग कुमठा व झांट्ये, एक्स्प्रेसोचे अविनाश पाटणकर, किशोर आरस यांसारखे ग्रंथव्यवहारात विविध भूमिका निभावणारे लोक परिचयाचे झाले. या उद्योगाचा सम्यक अनुभव मला मिळाला. याव्यतिरिक्त प्रत्यक्ष रामदास भटकळांमुळे तर माणसांचा ओघच पॉप्युलरकडे वळला होता. काहींच्या भेटी होत, तर काही मंडळी रामदासांच्या आठवणींतून मनात जागी होत. जी. ए. कुलकर्णी, कुसुमाग्रज यांसारख्या दूरस्थ व्यक्तींचा परिचय मला रामदासांच्या आठवणींतून आणि पत्रव्यवहारांतून झाला. जी.एंचं ते लहान मुलासारखं सुटंसुटं इंग्रजी अक्षर आणि कुसुमाग्रजांचं अतिसुंदर अक्षर मनावर कोरलं गेलं. 'छंदोमयी' या त्यांच्या कवितासंग्रहाच्या मागील पृष्ठावर मी ब्लर्बऐवजी त्यांच्या हस्ताक्षरातील 'चिंब चिंब भिजतो आहे, भिजता भिजता मातीमध्ये पुन:पुन्हा रुजतो आहे' या ओळी टाकल्या.

वसंत कानेटकर, ग्रेस, सदानंद रेगे, स्नेहप्रभा प्रधान, ज्योत्स्ना देवधर, तारा वनारसे अशा मित्रमैत्रिणींविषयी रामदास खूप काही सांगत. त्यांची बोलीभाषादेखील विश्लेषणात्मक होती. ते 'जिगसॉ'पूर्वीचे दिवस होते. स्नेहकथा लिहायला त्यांनी थोडी थोडी सुरुवात केली होती. सदानंद रेगे यांच्यावर लेख लिहिण्यापूर्वी ते माझ्याशी बरंच बोलले. दोन-तीन दिवस तो विषय माझ्याही मनात घोळत राहिला. लेखनाची ऊर्मी माझ्यातही होती. पॉप्युलरमध्ये रुजू होण्यापूर्वीच मी लेखनाच्या वाटेला लागले होते. मला या दोन मित्रांविषयी कविता सुचली. गंमत म्हणजे ज्या दिवशी त्यांनी मला त्यांचा लेख वाचायला दिला, त्याच दिवशी मी त्यांना दाखविण्यासाठी माझी कविता नेली. 'माणूस'च्या दिवाळी अंकासाठी रामदासांनी जेव्हा दिलीप माजगावकरांना रेग्यांवरचा लेख दिला, तेव्हा माझी कविताही दिली. माजगावकरांनी चौकटीत ती कविता छापली.

**नातं ...**

*मृत मित्राच्या पत्रातील*
*उन्हाळे, पावसाळे,*
*माझ्या मनात आता फक्त*
*कोरड्या नदीचे पात्रच उरलेले.*
*पत्रात होते राग-रुसवे, हट्ट-आग्रह,*
*हेवेदावे, आरोप-प्रत्यारोप*
*आणि ....*
*बहरून आलेल्या कवितांचं*
*गर्द हिरवं अरण्य...!*
*या हिरव्यागार अरण्यासाठीच*
*मित्राला सारं काही माफ होतं.*
*धुंदही झालो होतो कधीतरी,*
*माझ्यापाशीच चालणारे*
*त्याचे प्रतिभावंत रुसवे झेलून;*
*पण अचानक एका संध्याकाळी लक्षात आलं,*

*माझ्या मनातील वादळवाऱ्यांकडे पाठ फिरवून*
*तो निघून जाऊ शकतो...*
*अगदी सहजपणे तो उद्ध्वस्त करू शकतो*
*बहरणारी सुंदर स्नेह-बाग*
*त्याच्या सुजाण प्रतिमेच्या साक्षीनं!*
*मग मी जपू लागलो*
*फक्त त्याच्या कविता... त्याला विसरून!*
*पत्रं...?*
*ती तर येतच राहिली – वर्षानुवर्षं*
*रंगबदलत्या पावलांनी.*

*त्याच्या आठवणींवर साचलेली*
*कित्येक वर्षांची पानगळ दूर सारून*
*मी चाळतो आहे*
*अर्थ हरवलेले संदर्भ*
*त्याच्या मृत्यूनंतर...!*

कार्यालयीन कामकाजांबाबत अत्यंत व्यवहारी असलेल्या रामदासांच्या मनाचा एक कोपरा अगदी हळवा होता. एका प्रसंगी मला तो दिसला. मार्च १९८३मध्ये त्यांना ज्योत्स्ना देवधरांकडून एक पत्र आलं, ''तुम्ही 'घरगंगेच्या काठी' वेळेवर काढलं नाहीत. त्यामुळे युनिव्हर्सिटीनं ते अभ्यासक्रमातून वगळलं. तुम्ही माझं फार आर्थिक नुकसान केलंत. 'घरगंगेच्या काठी', 'उत्तरयोगी' मी इतरत्र देत आहे.'' रामदासांचा चेहरा अतिशय ताणलेला होता. ते मला म्हणाले, ''तुझी प्रतिक्रिया काय आहे?'' मी म्हटलं, ''सध्या आपल्या डोक्यावर इतक्या पुस्तकांचं ओझं आहे, की एखादं पुनर्मुद्रण जात असेल तर जाऊ दे.'' नेहमीप्रमाणे रामदासांनी त्या घटनेचं अनेक बाजूंनी विश्लेषण केलं. ''पुस्तक छापून तयार आहे, असं कळवूया का? घरगंगेच्या काठी हे पॉप्युलरचं पुस्तक म्हणून ओळखलं जातं. मग ते अन्यत्र का जावं? ज्योत्स्नाबाईंचं हेच पुस्तक सर्वांत चांगलं आहे. तेच जाणार असेल तर 'उत्तरयोगी', 'कल्याणी', 'पडझड' ही सगळीच पुस्तकं मुक्त करून, 'तुमची माझी मैत्री संपली, असं मी कळवू का?' कारण त्या माझ्याशी आर्थिक नुकसानाविषयी बोलताहेत! त्या जेव्हा 'ज्योत्स्ना देवधर' नव्हत्या, तेव्हाही मी त्यांची पुस्तकं काढली...'' रामदास दुखावले गेले होते. कमालीचे अस्वस्थ झाले होते.

हे सर्व मनोनाट्य मी दूरस्थ म्हणून न्याहाळत होते. साहजिकच माझी प्रतिक्रिया रोखठोक होती. मी विचारलं, ''पुस्तक छापून तयार आहे, असं कळवून काय होणार? आपल्या हातून हे काम लगेच होईल का? ज्योत्स्नाबाई खऱ्या अर्थाने पॉप्युलरच्या लेखिका आहेत का? आपली बरीच शक्ती पुनर्मुद्रणात खर्च होते. तेव्हा गेलं तर जाऊ दे!'' रामदास गप्प! मग जडपणे म्हणाले, ''आजचा दिवस मला विचार करू दे. उद्या गोकर्णांनाही बोलावू. Then we will take Popular's decision. आजचा Personal होता.'' दुसऱ्या दिवशी दुसरा अंक सुरू झाला. कालचे हळवे रामदास आज गायब! बोलण्यात भावनांची उलघाल नव्हती. कणखरपणे त्यांनी कालची घटना गोकर्णांना सांगितली. ते थंडपणे म्हणाले, ''ज्योत्स्नाबाईंना कायदेशीर हक्क नाही; मला आहे! मग मी पुस्तक का सोडावं? तशीच वेळ आली तर मी कोर्टात जाईन. मी त्यांना सांगतो, की पुस्तक तयार आहे!'' मी थक्क – थक्क! रामदासांच्या भावनांनी आता वेश बदलला होता. मला मात्र ठामपणे वाटत होतं, रामदास भावना आणि व्यवहाराची गल्लत करत आहेत. दुसऱ्या दिवशीची माझी रोजनिशी सांगते –

''१७ मार्च १९८३

मी रामदासांच्या केबिनमध्ये गेले. ते ज्योत्स्नाबाईंना पत्र लिहीत होते. पत्र बाजूला ठेवून त्यांनी मला सांगितलं, ''ती कादंबरी छापायची! नातं तोडणं सोपं असतं; जोडणं अवघड. शिवाय ज्योत्स्नाबाईंना माझी गरज आहे. मी जर सर्व पुस्तकं रिलीज केली तर मैत्री तुटेल.'' मी गप्प! तेच पुढे म्हणाले, "You may call it my weakness." मी म्हटलं, ''ते माझ्या कालच लक्षात आलं होतं.''

रामदासांच्या स्वभावाचा एक पैलू आत्तापर्यंत माझ्या चांगलाच परिचयाचा झाला होता. त्यांच्या वर्तनात सौम्यपणा होता, ते कधीही आवाज चढवायचे नाहीत, निर्णयापूर्वी सर्वांशी ते विचारविनिमय करत; पण तरीही अनेकदा अंतर्यामी ते त्यांच्या निर्णयावर ठाम असत. पॉप्युलरमध्ये काम करत असताना, माझ्या सवयीनुसार गोकर्ण, शिराली, रामदास या त्रिमूर्तींच्या लकबी, सवयी, बोलण्याची पद्धत या सर्वांचा मी सूक्ष्म अभ्यास करत असे. रामदासांचा एखादा 'खास निर्णय' सर्वानुमते ठरला, की ते समाधानी दिसत. उजवा हात पेन्सिलसकट ते अर्धवर्तुळाकार हलवत आणि आम्हांला विचारत, "So, .... this is pakka (पक्का), हो ना?'' या समेवर 'चर्चा-राग' संपे. मला हसू यायचं. हा निर्णय त्यांच्या मनात केव्हाच पक्का झालेला होता! अर्थात हा त्यांचा धोरणीपणा होता. ते मला नेहमी सांगत, ''वेगवेगळ्या वृत्तीच्या माणसांना सांभाळण्याचं कौशल्य उपजत तरी असावं लागतं किंवा शिकून तरी घ्यावं लागतं.''

त्यांचं आयुष्य माणसांनी भरगच्च होतं. आपल्या मित्रांसाठी काय वाट्टेल ते करायला रामदास तयार असत. कोणाला विमानतळावरून आणायला जा; कोणाच्या ऑपरेशनच्या वेळी हजर राहा; कोणाची थंड हवेच्या ठिकाणी जायची व्यवस्था कर, अशी नाना 'मित्रकर्तव्यं' ते करत. मला प्रश्न पडे, इंग्रजी-मराठी ग्रंथांचा अफाट व्याप सांभाळून हा माणूस इतक्या उनाडक्या कशा करू शकतो? आमच्या ऑफिसची 'स्थानिक भाषा' कोकणी होती. ती माझ्या व शुभांगीच्या कानावर पडे. त्यातले काही शब्द उचलून आम्ही दोघींनी आमची स्वतंत्र भाषा घडवली. कोकणीत 'थांब' या अर्थी 'राब' हा शब्द वापरतात. रामदास दुपारी कोठे गायब झाले, की आम्ही म्हणायचो, 'हांव राबता; तू बागडता.' कोकणी 'राब'ला आम्ही 'राबणे' हा मराठी अर्थ बहाल केला होता.

रामदासांच्या मित्रांपैकी वसंत कानेटकरांचं आगमन फार लक्षणीय असे. दुपारी चारच्या सुमारास प्रथम युडी कोलनचा घमघमाट यायचा. मग स्थूल पण रुबाबदार कानेटकर,

हातातील चामड्याची बॅग हलवत धीरोदात्तपणे प्रवेश करायचे. तत्पूर्वी त्यांचं पत्र येऊन थडकलेलं असे. 'चंदा-दर्शनची फी भरायची आहे. पैसे पाठवा. घर बांधायचं आहे. पैसे पाठवा.' मला वाटे. यांना रॉयल्टी तरी किती मिळते? मी शुभांगीला म्हटलं, ''माझं एक स्वप्न आहे. कधीतरी यांच्यासारखं बॅग हलवत रॉयल्टी घ्यायला मला पॉप्युलरमध्ये यायचंय!'' गंमत म्हणजे ते स्वप्न पूर्ण झालं. श्रेयस मालिकेतील डॉ. आनंदीबाई जोशींचं काशीबाई कानिटकरलिखित पुस्तक संपादनासाठी माझ्याकडे आलं. तोवर हर्ष भटकळनं सूत्रं हाती घेतली होती. ज्या दालनात बसून मी ते स्वप्न पाहिलं, तिथेच आता हर्षची केबिन होती. तिथेच मला रॉयल्टीचा चेक मिळाला.

क्वचित स्नेहप्रभा प्रधान येत. लख्ख गोरा रंग, नाजूक चण, पिंगट केस आणि नीटस पोशाख केलेल्या स्नेहप्रभाबाई एखाद्या बाहुलीसारख्या दिसत. त्यांचं घर जवळच पेडर रोडवर होतं. कोणत्यातरी पार्टीच्या निमित्तानं मी व रामदास त्यांच्या घरी गेलो होतो; तिथेच माझी आणि माझे भावी प्रकाशक श्रीविद्याचे मधुकाका कुलकर्णी यांची ओळख झाली. स्नेहप्रभाबाई प्रेमळ होत्या. गप्पा मारायला घरी बोलवत. एकदा तर त्यांनी माझे केस त्यांच्या स्टाईलमध्ये कापून दिले. त्या घरी एकट्याच असत. सोबतीला एक तपकिरी कुत्रं आणि मांजर! मी मुलखाची भित्री! रामदास गमतीनं म्हणत, ''लेखकांशी रॅपो साधण्याच्या अंजलीच्या मार्गातला पहिला अडथळा म्हणजे लेखकाचे पाळीव प्राणी!'' निर्मला देशपांडे, शिरीष पै या माझ्या आईच्या मैत्रिणी. आता त्यांचं माझं स्वतंत्र नातं निर्माण झालं. विंदा करंदीकर माझे इंग्रजीचे प्राध्यापक; तेही कधीतरी येत. निर्मलाबाईंचं आणि माझं नातं 'बन्सी काहे को बजायी' या त्यांच्या कादंबरीमुळे जुळलं. पहिल्याच भेटीत मी त्यांना सांगितलं, ''कादंबरीत खूप त्रुटी आहेत. त्या सुधारण्याची तयारी आहे का?'' त्यांना हे अनपेक्षित होतं. काहीशा नाराजीनंच त्या म्हणाल्या, ''सांग काय सांगतेस ते.''

एकेका मुद्द्यावर तपशीलवार चर्चा सुरू झाली. दोघीही त्या कादंबरीतील पात्रांना घडविण्यात रंगून गेलो. निवेदनात्मक मजकूर अधिक नाट्यात्मक बनू लागला. एकेका प्रकरणाचं लेखन पूर्ण करून त्या मला फोन करत. सकाळी ११च्या सुमारास मी त्यांच्या शिवाजी पार्कच्या घरी जात असे. छानसं खायला करून, त्या माझी वाट बघत असत. कादंबरीचा त्यांनी केलेला शेवट मला फसवा वाटत होता. आता त्यांचा माझ्यावर इतका विश्वास बसला होता, की त्या मला म्हणाल्या, ''तू तुला हवा तसा शेवट कर. मग मी बघते.'' एकदा त्या ऑफिसमध्ये माझ्यासाठी चिक्कूच्या रंगांची चंदेरी साडी घेऊन आल्या. मला कोणाकडून भेटी घेणं आवडत नसे. मी म्हटलं, ''मला नको साडी. आहेत त्याच नेसणं होत नाही.'' त्या रागावल्या. ''नकोय काय? माझ्या येशूला नसती का मी दिली!'' त्यांनी खरंच माझ्यावर मुलीसारखं प्रेम केलं. एक दिवस त्या शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर माझी वाट पाहत बसल्या होत्या. त्या दिवशी बरोबर माझी आईदेखील होती. आईला त्या म्हणाल्या, ''पद्मिनी, तुझ्या मुलीच्या रूपानं माझी मुलगी मला परत मिळाली.'' त्यांचं माझं नातं तात्पुरतं, कामापुरतं नव्हतं; ते गाढ बनलं होतं.

पॉप्युलरमध्ये मला भेटलेली अविस्मरणीय व्यक्ती म्हणजे विश्राम बेडेकर. 'एक झाड दोन पक्षी' हे त्यांचं आत्मचरित्र प्रकाशनार्थ आमच्याकडे आलं. पिवळ्या, बिनरेघांच्या कागदांवर बारीक, नागमोडी अक्षरात लिहिलेलं! पॉप्युलरमधील ते सर्वांत सुंदर दिवस होते. विस्मृत घटना आता ताज्या कळ्यांसारख्या मनात उमलू लागल्या आहेत. शाळेत असताना बेडेकरांची 'रणांगण' कादंबरी वाचून मी अंतर्बाह्य थरारून गेले होते. माझ्या छोट्याशा लेखनवहीत नवख्या हातांनी बाळबोध परीक्षणही केलं होतं. तेव्हा आवडली होती नायिका हॅर्टा! चक्रधरचा राग आला होता. वाटत होतं, चक्रधर म्हणजे बेडेकरच! मोठेपणी लेखकाला भेटून जाब विचारायचं मी ठरवलं होतं, ''हॅर्टाशी तुम्ही इतक्या कठोरपणी का वागलात?''

... आणि आता त्याच बेडेकरांचं आत्मचरित्र माझ्या हातात आलं होतं. बाकी सारी कामं लांब सारून मी ते वाचायला घेतलं. मनाचं एक रूप दुसऱ्याशी बोलतं आहे, अशी कल्पना करून ते लिहिलं होतं. बेडेकरांनी स्वत:चा उल्लेख 'तो' असा केला होता. प्रांजळपणे स्वत:च्या पराभवाची कहाणी सांगितली होती. स्वत:ची भ्रामक प्रतिमा चितारण्याचा त्यात प्रयत्न नव्हता. आत्मचरित्राचा पहिला भाग रोचक आणि विश्लेषणात्मक होता. दुसऱ्या भागात त्यांनी आपल्या कारकिर्दीची रूपरेखा मांडली होती. मात्र इथे मानसिक द्वंद्वांचं चित्रण टाळलं होतं. चरित्र वाचताना मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. चित्रपटसृष्टीमुळे घरापासून मनानं दुरावल्यामुळे घरात संघर्ष उद्भवले असतीलच. मग त्याचं चित्रण का नाही? हरिभाऊ मोटेंशी असलेली घनिष्ट मैत्री का तुटली? आपलं हरिभाऊंशी लग्न ठरल्याची बातमी कृष्णाबाईंनी सांगताच बेडेकर एवढे का चिडले? मी हे प्रश्न रामदासांना विचारले. ते म्हणाले, ''तुझ्या प्रतिक्रिया तू मोकळेपणी बेडेकरांना सांग. त्या लिहून काढ. आपण त्यांना भेटू.'' अन्य माणसांच्या जीवनातील खासगी संदर्भ आणि मधूनच अकारण उमटणारा उपहासाचा सूरही मला खुपत होता.

१६ मे १९८३! साडेचारच्या सुमारास आम्ही वरळीच्या बेडेकरांच्या घरी गेलो. बंद दाराआड पावलं वाजली. 'रणांगण'चा नायक बघायला मी अधीर झाले होते. दार बेडेकरांनीच उघडलं. ''या!'' आवाज भरदार आणि राकट. पोशाख अस्सल मराठी. धोतर-सदरा. शरीर वृद्ध तरीही दणकट. माथ्यावर रूपेरी केसांचा मंदिल; पण चेहरा तोच! ताठा तोच! चक्रधरचा! त्या संध्याकाळी व्हायचं तेच झालं. येऊ घातलेल्या संघर्षाच्या कल्पनेनं मला गुदगुल्या होत होत्या. अंगठ्याएवढ्या माणसानं महाकाय गलिव्हरला आव्हान द्यायचाच तो प्रकार होता. प्रारंभिक गप्पा, चहापान यानंतर मी माझ्या प्रतिक्रियांचा कागद त्यांच्या हातात दिला. माझ्यासारख्या शेंदाड शिपायाकडून त्यांच्या लेखनावर टीका होईल अशी त्यांची अपेक्षा नव्हती. बेडेकरांचा चेहरा झरझर पालटू लागला. दबलेला संताप डोळ्यांत उतरला. एकेका मुद्द्याचा ते बेडेकरी शैलीत समाचार घेऊ लागले. मीही माझी बाजू मांडत होते,

पण बावरले होते. असं द्वंद्व यापूर्वी कधी खेळले नव्हते. एका क्षणी दोघंही थांबलो. ताणलेली शांतता दोघांच्यात थरथरत होती. घरी जाताना मी गप्प गप्प! रामदास म्हणाले, ''काळजी करू नकोस. ते तुझ्या सूचनांचा नक्की विचार करतील.''

झालंही तसंच. सुधारित हस्तलिखित वाचताना त्यांनी बदल केले आहेत, ही गोष्ट माझ्या लक्षात आली. इतकंच नव्हे तर, पुस्तक पूर्ण झाल्यावर मला पत्र पाठवून त्यांनी कळवलं, ''तुमच्या लक्षात आलं असेलच, की तुमच्या सूचनांनुसार मी बदल केले आहेत.'' असं आवर्जून कळवणं हा त्यांचा दिलदारपणा होता. पहिल्या वादळी भेटीनंतर बेडेकरांच्या व बाळूताईंच्या अनेक भेटी झाल्या. दोघांच्याही वागण्यातील साधेपणा, घरगुतीपणा आणि आतिथ्यशीलता यांमुळे परकेपणा लौकरच लोप पावला. संध्याकाळी फिरत फिरत, नवरा व मुलगा यांच्यासकट सहजपणे त्यांच्या घरी डोकवावं, इतका अनौपचारिकपणा निर्माण झाला. कामानिमित्त बेडेकरांच्यात आणि माझ्यात पत्रव्यवहार होत असे. पत्रं लहानशीच असत; पण छोट्या छोट्या पत्रांतून गच्च भरलेले त्यांचे शब्द डाळिंबाच्या दाण्यांसारखे रसाळ असत. ते वेचताना मन रंगीत होई. बेडेकर बरेच वृद्ध असूनही बोलताना मला अहो-जाहो करत. मला ते विचित्र वाटे. मी तसं त्यांना कोणत्यातरी एका पत्रात म्हटलंदेखील. त्यावर त्यांचं उत्तर आलं, ''तरुण स्त्रियांच्या बाबतीत आदरार्थी बहुवचन मी वापरतो. याचे एक कारण मी मूळचा अर्धवट हिंदी मुलखातला आणि दुसरे, जडजवाहीर सांभाळतात ते मखमली डबीतून किंवा पेटीतून, हे मी पाहत आलो आहे.''

'एक झाड...'च्या निर्मितीचं पर्व हे मंत्रमुग्ध करणारं पर्व होतं. बडा ख्याल संथपणे रंगत जावा, तशी त्या ग्रंथांची निर्मिती झाली. बैठका बेडेकरांच्या घरातच होत. पोचखानवाला रस्त्यावरचं दिनात कोर्ट हे त्यांचं घर त्यांच्यासारखंच थोराड अंगापिंडाचं, प्रशस्त आणि उंच. मोठ्या खिडक्यांचा ऐसपैस दिवाणखाना. त्यात गुबगुबीत कोच, भारतीय बैठक, डायनिंग टेबल आणि लेखनाचं मेज. दुपारी साडेतीननंतर मी आणि रामदास त्यांच्या घरी जायचो. चित्रकार द. ग. गोडसे मुखपृष्ठ आणि पुस्तकाची मांडणी करत होते. ते बहुधा आमच्या आधीच येऊन बसलेले असत. घरात शिरताना हास्याच्या लकेरी कानावर पडत. गालिच्यावर आरामात मांडा ठोकून बैठक जमे. गोडसे बेडेकरांचे जुने मित्र. त्या दोघांची 'सस्नेह जुगलबंदी' चाले. एकमेकांना कोपरखळ्या मारत, रेशमी चिमटे घेत गप्पा रंगत. त्या वेळच्या साऱ्याच आठवणींना एक खळाळता, मुक्त, आनंददायी नाद आहे. तो आजही मला ऐकू येतो.

सारांश, पॉप्युलरमधील वातावरण माझ्या चित्तवृत्तींना पोषक होतं. ते ऑफिस नसून कॉलेज वाटे. सुमन, मंगल, विशाखा, शुभांगी, नीलिमा या बरोबरीच्या मैत्रिणी होत्या. आम्ही सकाळी साडेनऊपर्यंत यायचो. रामदास, शिराली, गोकर्ण हे 'बिग बॉस' दहापर्यंत येत. त्यामुळे सुरुवातीचा अर्धा तास हा आमचा हक्काचा, टिवल्याबावल्या करायचा वेळ असे. माझं कॉलेजजीवन नुकतंच संपलं होतं. त्यामुळे माझ्यात अजूनही एक नटखट कॉलेजकन्या जिवंत होती. मला नकला करायची सवय होती. मृदुला जोशी, गोकर्ण, रामदास, इतकंच नव्हे तर, रामदासांच्या पत्नी लैलाबाई यांचीही नक्कल मी करत असे. लैलाबाईंना पाहण्याआधी मी फोनवरून त्यांचा लाडिक आवाज ऐकला होता. माझी लैलाबाईंची नक्कल लोकप्रिय होती. एकदा गंमत झाली. ''हॅलो, रामदास आहेत का? मी लैला बोलतेय,'' हे वाक्य मी उच्चारायला आणि रामदास दारातून आत यायला एकच गाठ पडली. माझ्याभोवती जमलेल्यांची पळापळ झाली. मला कळेना तोंड कुठे लपवावं. रामदास मात्र आमच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून निघून गेले. तेवढा खिलाडूपणा त्यांच्यात होता. माझं नुकतंच लग्न झालं होतं. एकत्र कुटुंब, लहान मूल, स्वयंपाकपाणी यांमुळे धावपळ व्हायची. मग दुपारी डबा खाल्ल्यावर डोळ्यांवर झापड येई. अशा वेळी रामदास तिथे आले व मला पेंगताना त्यांनी पाहिलं तर ते सुमनला सांगत. ''अंजली उठली, की तिला आत बोलावलंय म्हणून सांग.'' त्यांनी मला याचा कधी जाब विचारला नाही. मलाच चोरट्यासारखं होई.

पॉप्युलरमधील पाच वर्षं म्हणजे खरोखरच मला मिळालेला कॉलेजजीवनाचा बोनस होता. आम्ही मुली एकमेकींचे वाढदिवस साजरे करायचो. जवळच्या रोझ कॉर्नरमध्ये खादाडी करायचो. वरळी सीफेसवर भटकायचो. ऑफिसात भेळ करायचो. विशाखा कीर्तिकर ऋषिपंचमीला सर्वांसाठी मोठा स्टीलचा डबा भरून ऋषीची भाजी करून आणायची. चार ऑगस्टला भटकळ बुक्स इंटरनॅशनलचा वाढदिवस केक कापून साजरा व्हायचा. त्यादिवशी बॉम्बे बुक डेपोचे पांडुरंग कुमठा, मीराताई कुमठा, रामदासांचे मोठे बंधू सदानंद व त्यांच्या पत्नी निर्मलाताई आणि एकंदर तमाम भटकळ मंडळी येत. हर्ष आणि सत्यजित ही तेव्हा हाफ पँटीतील शाळकरी मुलं होती. ती मेणबत्त्या फुंकून केक कापत. दर गुडफ्रायडेला आर्टिस्ट डीकुन्हा सर्वांना खमंग मावा केक वाटत. सदानंद भटकळ दर शनिवारी येत. सर्वांना ते फार आवडत. त्यांच्या वृत्तीत वात्सल्य होतं. आले की आम्हांला चॉकलेट्स देत. त्यांच्या मनात एखादी जंगी योजना घोळत असे. हा स्वप्न पाहणारा माणूस होता. अगदी शेवटपर्यंत त्यांची ही वृत्ती कायम होती. त्यांची एकसष्टी आम्ही पॉप्युलरच्या गच्चीवर साजरी केली. त्यावेळी प्रभुराम जोशींनी आपल्या भावपूर्ण आवाजात पंकज मलिकचं 'आयी बहार आज आयी बहार' हे गाणं म्हटलं. ते आम्हांला इतकं आवडलं, की पुढे अनेकदा आम्ही त्यांच्याकडून पंकज मलिकची गाणी म्हणून घेतली. त्यांचं नावच आम्ही पंकज मलिक ठेवलं होतं. पॉप्युलर सोडल्यानंतरही माझं व सदानंदचं नातं टिकून होतं. डॉ. आनंदीबाई जोशींचं मी लिहिलेलं चरित्र वाचून त्यांनी मला फोन केला. ते समाधानानं म्हणाले, ''अंजली, पुस्तक उत्तम झालंय. मला तुझा अभिमान वाटतो. खूप लिही. माझा तुला आशीर्वाद आहे.'' पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेनं या चरित्राला शं. ना. जोशी पुरस्कार दिला. सदानंद तेव्हा पुण्यात होते. प्रकृती ठीक नसतानाही ते कौतुकानं समारंभाला हजर राहिले. प्रेक्षकांत त्यांना पाहून माझ्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

हे सारं इतकं 'आहे मनोहर' असताना मी जेमतेम पाच वर्षांत पॉप्युलर का सोडलं? राजीनामा देण्याचा निर्णय का घेतला?

एक सूक्ष्म असमाधान व अस्वस्थता माझ्या मनात हळूहळू वाढत होती. रामदासांना माझं काम आवडलेलं होतं. बाहेरच्या लोकांजवळही ते तोंडभरून कौतुक करत. मात्र या कौतुकाला व्यावहारिक दाद वा उत्तेजन मिळत नव्हतं. मी रुजू झाले तेव्हा माझा पूर्ण वेळचा पगार रु. ७५० होता. मी प्रथम अर्धवेळ येत असे. त्यामुळे पगार अर्धा मिळणं योग्यच होतं. दोन वर्षांत मला एक इन्क्रिमेंट मिळालं. मात्र मी जेव्हा पूर्ण वेळ येऊ लागले, तेव्हा मॅनेजरची पोस्ट देऊनही पगार फक्त सातशे पन्नासच! मग आधीच्या इन्क्रिमेंटचं काय झालं? आता तर कामाची जबाबदारी कितीतरी वाढली होती. पण पगार मात्र कारकुनाचा! मॅनेजर हे पद आनंददायक असलं, तरी आर्थिक लाभ काही नाही. नाव सोनुबाई आणि हाती कथलाचा वाळा! हा सरळ सरळ अन्याय होता. राबवून घेणं होतं. मी याबाबत रामदासांशी स्पष्टपणे बोलले. नोकरी सांभाळून मी पीएच.डी.चा अभ्यासही पूर्ण केला होता. माधव मनोहरांसारख्या अत्यंत परखड समीक्षकाला माझ्या थीसीसची परीक्षा करायला मुंबई विद्यापीठात नेमलं होतं. वा. ल. कुलकर्णी माझे गाईड होते. त्यांच्यापाशी माधव मनोहरांनी मुक्त कंठानं माझ्या थीसीसची वाखाणणी केली होती. इथे ऑफिसात मात्र माझी मेहनत, अभ्यास, पदवी, सर्जनशीलता यांची काहीच किंमत नाही, हे मला जाणवू लागलं होतं. रामदासांशी मी बोलल्यानंतर थोडीशी वाढ झाली. मात्र शेवटपर्यंत माझा पगार तीन आकडीच राहिला. माझ्यानंतर एक साहित्यप्रेमी मुलगी पॉप्युलरमध्ये रूजू होण्याचा विचार करत होती. ती मला घरी भेटायला आली. पॉप्युलरमधलं वातावरण कसं आहे, माणसं कशी आहेत हे तिला जाणून घ्यायचं होतं. बोलता बोलता तिनं मला माझा पगार विचारला. मी संकोचत सांगितला. तिला आश्चर्याचा धक्काच बसला. ती म्हणाली, ''इतका कमी? मी नाही इतक्या कमी पगारात काम करणार! किमान दोन हजार तरी पगार हवाच!'' ती मुलगी पॉप्युलरमध्ये गेली नाही.

✦

आपल्या आनंदात श्री.पुं.सारख्या ज्येष्ठ प्रकाशकानं सामील होऊ नये, याचं रामदासांना वाईट वाटलं. मात्र खुद्द रामदास माझ्या आनंदाच्या क्षणी श्री.पुं.सारखंच वागले होते. हे साम्य मला जाणवलं. रामदासांकडून माझी ही अपेक्षा नव्हती.

✦

ज्या दिवशी एका कारकुनाचा पगारही माझ्यापेक्षा जास्त झाला आणि माझा आहे तेवढाच राहिला, त्या दिवशी मी ठरवलं, आता पुरे झालं! बोलण्यासारखं काही उरलेलं नाही. मला आता स्वत:ला सिद्ध करण्याची इच्छा उरली नव्हती. तसं करणं अपमानास्पद वाटत होतं. मनात खळबळ माजली होती. माझा नवरा सतीश म्हणाला, ''हवं तर तू परत रामदासांशी बोलून बघ.'' मी दोन्ही बाजूंवर खूप विचार केला. एकदा मध्यरात्री मला जाग आली. वातावरण शांत होतं. मनदेखील शांत होतं. मनानं निर्णय घेतला होता. मार्ग सापडला होता. मी सतीशला जागं केलं. ''सतीश, मी निर्णय घेतलाय. मी पॉप्युलर सोडणार, केवळ पगारवाढीसाठी नाही. मी रामदासांशी बोलले, तर ते माझा पगार वाढवतीलही; पण माझ्यापुढे आता वेगळाच प्रश्न आहे. मी जन्मभर पॉप्युलर प्रकाशनाची संपादिका या भूमिकेत वावरू शकेन का? मला स्वत:ला लेखिका व्हायचंय. वाल-धोंडांच्या पावलावर पाऊल टाकून संशोधन करायचंय. हे माझे बहराचे दिवस आहेत. ते निघून गेले तर परत येणार नाहीत. मी इथे सतत दुसऱ्यांच्या पुस्तकांचा विचार करते. पण माझ्या स्वप्नांचं काय? इथंच राहिले, तर ती विरून जातील. पॉप्युलर या संस्थेवाचून मला स्वतंत्र अस्तित्व आहे. मला माझी वाट बदलायलाच हवी. तसं जर मी केलं नाही, तर रामदासांनी माझ्यावर जो अन्याय केला, त्यापेक्षा मोठा अन्याय मी माझ्यावर करीन. माझा आतला आवाज मला हे सांगतोय.''


मी पॉप्युलर सोडलं. रामदास म्हणत होते, ''मी तुला तीन महिने रजा देतो. तू शांतपणे विचार कर.'' माझं मन आता शांतच होतं. मी विश्राम बेडेकरांना पत्र लिहून माझा निर्णय कळवला. त्यांचं सुंदर उत्तर आलं. ''तुम्हांला स्थित्यंतराचा जबर मोह पडतो आहे, असे दिसते. स्वातंत्र्याच्या या ओढीबद्दल तुमचे अभिनंदन! स्वातंत्र्याची किंमत Eternal Vigilance! ते तुम्हांला साधो अशी शुभेच्छा! एक उर्दू शेर आठवतो. समुद्राकाठच्या एका घराच्या सज्जात शहाणपण आणि (तरुणपणचे) वेडेपण समोरची शोभा बघत बसले होते. पाहता पाहता तुफान आले. लाटा उसळल्या. घराला भिडल्या. काही विचार करण्यापूर्वीच तरुणपण त्यात उडी घेऊन निघून गेले. शहाणपण, अंगावर पाणी येऊ नये म्हणून ओव्हरकोट पांघरून काकडत बसले. निरर्थक जीवनाला जपणे हा वेडेपणा, हे ज्या शहाणपणाला कळत नाही, त्याने उसळत्या जीवनाला काय उपदेश करावा?'' बेडेकरांच्या पत्रानं मला नोबेल पुरस्कार मिळाल्याचा आनंद झाला. मी हे सारं बेडेकरांना सांगितलं, याला कारण बेडेकरांबद्दल आणि बाळूताईंबद्दल मला वाटणारा आदर आणि जिव्हाळा. त्यांच्या माझ्यात निर्माण झालेलं नातं!

मी पॉप्युलरमध्ये असतानाच 'पॅशनफ्लॉवर' हे माझं पहिलं पुस्तक (कथासंग्रह) प्रसिद्ध झालं होतं. त्याची प्रत मी बेडेकर दंपतीला भेट दिली होती. बेडेकरांसारख्या दिग्गज लेखकाचं मत मला मार्गदर्शक ठरलं असतं. त्या दोघांनीही आस्थेनं ते पुस्तक वाचलं. एकदा संध्याकाळी काही कामानिमित्त मी त्यांच्या घरी गेले असता त्यांनी त्यांचा मनमोकळा अभिप्राय दिला. या पुस्तकातील कोणत्या कथा आवडल्या, त्या का आवडल्या; त्रुटी काय वाटल्या, यांचं त्यांनी सविस्तर विश्लेषण केलं आणि शेवटी ते म्हणाले, ''Your stories are wet with emotions! आम्हा दोघांना तुमच्याविषयी खूप hopes आहेत.'' बक्षीस म्हणून त्यांनी मला गी द मोंपासाचा एक कथासंग्रह दिला. कोणत्याही क्षेत्रात नव्यानं पावलं टाकत असताना परखड अभिप्राय आणि मन:पूर्वक जिव्हाळा या दोन्हीची नितांत गरज असते.

*(उर्वरित मजकूर पान ३१० वर)*

दरमहा शेकडो पुस्तके प्रकाशित होत असतात. काहींचे विस्तृत परीक्षण अंतर्नादमध्ये येतच असे; पण काही महत्त्वाच्या नव्या पुस्तकांचा थोडातरी परिचय वाचकांना होणे त्यांच्या पुस्तकनिवडीसाठी खूप उपयुक्त असते. या भूमिकेतून दरमहा तीन-चार पुस्तकांचा नेमक्या शब्दांत परिचय करून देणारे स्वागत हे सदर प्रसिद्ध होत असे. त्याची ही एक झलक.

# *आर्त* : अपेक्षा वाढवणाऱ्या सकस कथा




*आर्त* या नव्या कथासंग्रहातल्या 'श्रद्धा' आणि 'जन्म' या आदिअंताच्या कथा मोनिका गजेंद्रगडकरच्या 'आर्त' कथासंग्रहात नव्हे तर एकूणच तिच्या आजवरच्या कथालेखनात उत्कर्षबिंदू ठराव्या अशा आहेत. सुरुवातीला 'साप्ताहिक सकाळ'च्या कथास्पर्धांच्या निमित्ताने सुरू झालेला मोनिकाचा कथाप्रवास आज महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहल्याचे या दोन कथा निदर्शक आहेत. गंमत म्हणजे अगदी सुरुवातीची, म्हणजे १९९६ सालची, साप्ताहिक सकाळमधली 'नातं' ही कथासुद्धा याच संग्रहात आहे, त्यामुळे मोनिकाचा एकंदर लेखनप्रवास इथे ठळकपणे समोर येतो. स्त्री लेखकांतल्या आधीच्या पिढीतल्या 'आयकॉन्स' म्हणाव्या अशा गौरी, सानिया, कमल देसाई वगैरे लेखिकांच्या आणि मेघना, कविता वगैरे समकालीनांच्या वाटेहून निराळी आणि आपली स्वत:ची अशी वाट चोखाळणाऱ्या मोनिकाच्या कथाप्रवासाने इतर लेखिकांप्रमाणेच आपल्या पित्याच्याही (कै. विद्याधर पुंडलिक) कथालेखनाचा ठसा नाकारलेला दिसतो. माणसामाणसांतली नाती आणि त्यांतला संवाद, असंवाद आणि विसंवाद हा मोनिकाच्या कथांचा शोधविषय आहे. त्यात तर्ककर्कश वाद मात्र नाही आणि नात्यातले सुसंवादही क्वचितच आहेत. आहे तो अभिनिवेशनहीन कुतूहलाने घेतलेला असंवादाचा अन् विसंवादाचा शोध. तिच्या कथा रीतसर तिहाई वगैरे घेऊन सीमेवरच संपतात, तरी त्यात ढोबळ निर्णायकता नाही.

मला तिच्या कथालेखनात खालील वैशिष्ट्ये आढळली आहेत :

१. बऱ्याचदा मोनिकाची कथा लेखिकेच्या दोन पावले पुढे जाते आणि कदाचित लेखिकेला अभिप्रेत नसलेला एखादा मौलिक पेच वाचकाच्या ओंजळीत टाकते, वाचकाला स्तिमित करते.

२. मोनिकाची कथा बऱ्याचदा शेवटी 'अति-अभिव्यक्ती' करते.

३. मोनिकाची कथा स्त्रीवादी अभिनिवेश आणि पुरुषद्वेष्टा पूर्वग्रह टाळते.

४. अनिर्णायक अभिव्यक्तीमुळे मोनिकाची कथा वाचकाला सर्जनात सामील करून घेते व त्यामुळे श्रेष्ठतेच्या शक्यता बाळगते. मुख्य म्हणजे वाचकाला सहभागाचा आनंद देते.

५. मोनिकाची कथा बहुतेक वेळा कादंबरीच्या शक्यता बाळगते.

'भूप' संग्रहातली 'नाळ' ही कथा वाचताना मला पहिल्यांदा मोनिकाचे कथालेखन लक्षवेधक वाटले. कथेने लेखिकेच्या दोन पावले पुढे जाण्याचा सुखद अनुभव तिथेच पहिल्यांदा आला. 'आर्त' मधल्या 'जन्म' कथेत हा अनुभव ठळकपणे येतो. 'जन्म' कथेची पार्श्वभूमी मोनिकाचे 'होम पीच' म्हणावे असे संगीताचे क्षेत्र आहे. त्यामुळे संगीतातल्या शैलीच्या रूपकाद्वारे ती मानवी स्वभावाच्या दोन परस्परविरुद्ध प्रकारांमधले द्वंद्व परिणामकारकरीत्या मांडते. कथेच्या पार्श्वभूमीवर असलेल्या संगीतक्षेत्राचे मोनिकाचे ज्ञान अस्सल आणि सखोल असल्याने हे रूपक विलक्षण ताकदीने समोर येते. सत्यजित या नायकाच्या आई अन् वडिलांच्या संगीतविषयक परस्परविरुद्ध भूमिकांद्वारा मुळात मोनिका 'श्रेय आणि प्रेय' या सनातन द्वंद्वावरच भाष्य करते आणि तिच्या पद्धतीने सुरेख तिहाई घेऊन कथा संपवते. सत्यजितचे दादा आणि अम्मा. दोघेही सरोदवादनात आपले स्वत्व शोधताहेत. पण अम्मा त्यातून आत्मशोध घेत श्रेयाच्या दिशेने आत शिरते तर वडील त्याद्वारे आत्यंतिक प्रेय अशा प्रसिद्धीच्या मागे लागतात. पण हे मांडता मांडता मोनिका मधेच सत्यजितच्या मनात वडिलांच्या मैत्रिणीबद्दल, मालविकाबद्दल, कोवळे प्रेम जागृत झाल्याचे सूचित करते. तिच्या अर्धवस्त्र दर्शनाने त्याच्या मनात निराळेच वादळ जागे झाल्याचे दाखवते. आणि मग एकदम आपल्या मूळ आशयाकडे येऊन कथा संपवते. कथेच्या मूळ आशयाच्या दृष्टीने सुसंगत असा हा समाधानकारक शेवट. पण नायकाच्या मनात मालविकेबद्दल जे आकर्षण निर्माण झाले त्याचे काय? एखाद्या स्त्रीचे प्रेम सर्जनाला जन्म देऊ शकते या विचाराचे काय? मोनिका त्यावर भाष्य करत नाही. कारण मोनिकाच्या कथेच्या अवकाशात त्याला स्थान नाही. वाचक मात्र त्यावर विचार करतच राहातो.

याच 'जन्म' कथेत दुसरे एक वैशिष्ट्य दिसते ते म्हणजे कथान्ताची मोनिकाची काहीशी 'अतिअभिव्यक्ती'. कथेच्या आशयातून, घटनाक्रमातून कथेचा अन्वयार्थ लावायला वाचक समर्थ आहे यावर विश्वास नसल्यामुळे की काय, पण शेवटी मोनिका बाळबोध भाषेत तो सांगू पाहते. 'जन्म' कथेत शेवटी मोनिका शेवटच्या पानावरच किमान आठ वेळा कथेचे शीर्षक

असलेला 'जन्म' हा शब्द वापरून जणू काही ते शीर्षक दिल्याचे समर्थन देत राहते. 'रूट्स' कथेतही शेवटून दुसऱ्या परिच्छेदात शीर्षक असलेला 'रूट्स' शब्द अनेकवेळा येऊन जणू समर्थन देतो. सांगायचे ते कथेत समर्थपणे सांगितल्यावर पुन्हा शेवटी केलेला हा उपचार टाळला, तर मोनिकाची कथा अधिक प्रगल्भ आणि संपन्न होईल असे वाटते. वाचक हा आपल्या दोन इयत्ता वरचा आहे असे समजून केलेले लेखनच नेहमी श्रेष्ठतेची वाट चालू शकते असे मला वाटते.

'आर्त' संग्रहातली 'श्रद्धा' ही मोनिकाची कथा हा तिच्या कथालेखनातला एक उत्कर्षबिंदू आहे. अनिर्णायकता आणि नाजूक विषयाची प्रगल्भ हाताळणी यांमुळे ही कथा विलक्षण प्रभावी ठरते. अत्यंत आक्रमक आणि हिंस्र शैलीतला शेवट असूनही कथेचा परिणाम नकारात्मक नाही हे विशेष. एका धाडसी विषयाला धाडसाने पण सनसनाटी अभिनिवेश न आणता मोनिका या कथेत भिडल्याचे जाणवते. मुस्लीम धर्माची पार्श्वभूमी असली तरी ही काही त्याच धर्माची कथा नव्हे. माणसाच्या मूलभूत प्रेरणा शोधणारी ही कथा आहे. जगण्यातले वैफल्य आणि अपयश याला चुकीच्या मार्गदर्शनाची जोड मिळाली, की मनातला अतिरेकी कसा तयार होतो, याचे हे प्रत्ययकारी चित्रण आहे. त्यात कथेचा शेवट हिंस्र असला तरी विलक्षण कारुण्याने भरलेला आहे. अर्शद या अँटीहीरोचे मोडून पडणे अंगावर येते. असहाय वनितेवर बलात्कार करणारा अर्शद स्वतःलाही पट्ट्याने फोडून काढतो, हे आत्मक्लेशाचे सर्ग वाचकाला अंतर्मुख करतात. त्यामुळे ही कथा वाचूनही संपत नाही. मनात चालूच राहते.

यातली यशोदा, असलम, अर्शद, वनिता वगैरे पात्रे केवळ घटनाचक्राचे घटक न उरता समाजातल्या निरनिराळ्या प्रवृत्तींची प्रातिनिधिक चित्रे होत जातात, हे मोनिकाचे लेखिका म्हणून यश. शिवाय घटना आणि पात्रांचे कृष्णधवल चित्रण टाळून तटस्थता राखण्यात मोनिकाला बऱ्याच अंशी यश आल्याचे जाणवते. श्रद्धा, अंधश्रद्धा आणि कट्टर दुराभिमान यांवरचे मोनिकाचे भाष्य सखोल चिंतनातून आल्याचे जाणवत राहते. कथेतली प्रमुख सुष्ट पात्रे दुर्दैवाने पलायनवादी मार्ग स्वीकारतात आणि 'दुष्ट' पात्र मार्गदर्शनाच्या अभावी वेगाने दयनीय होत जाते आणि दुष्कृत्यांच्या गर्तेत कोसळत जाते अशी मोनिकाची या कथेच्या घटनाक्रमाची योजना आहे. अर्थात सुष्ट आणि दुष्ट असे शिक्के मोनिका मारत नाही. ती फक्त त्या पात्रांना समजून घ्यायचा प्रयत्न करते. अनिर्णायक शेवटामुळे वाचक या कथेतून बराच काळ बाहेर न येता आपल्या सर्जक प्रतिभेनुसार आपले अन्वयार्थ आणि रंग भरत ही कथा मनात चालूच ठेवतो.

'आर्त'मधल्या इतर कथा कमीअधिक प्रमाणात यशस्वी असल्या तरी 'श्रद्धा' किंवा 'जन्म'च्या तोडीच्या मात्र वाटत नाहीत. 'नातं' ही अगदी सुरुवातीच्या काळात लिहिलेली कथा तर उमेदवारीच्या खुणाच दाखवते, तर 'बाबाची आई' ही यशस्वी वाटणारी कथा यशस्वी वळणाकडे जाण्याची काहीशी रचीव, स्मार्ट आणि 'दिलों को जीतनेवाली' व्यावहारिक वाट चोखाळल्याचे जाणवून देते. मतिमंद वडिलांची स्वतःच जणू आई होणारी मनस्वी मुलगी रंगवताना या कथेचा तोल मात्र ढळल्याचे जाणवते. वाचकांना खूप आवडेल अशी ही कथा कथांतर्गत सुसंगतीशी तडजोड करत असल्याचे भास होत राहतात. आयुष्यभर मतिमंद नवऱ्याशी जुळवून घेण्याचे प्रयत्न करणाऱ्या आईचे सारे कष्ट मुलीच्या स्वप्नवत आणि रोमँटिक वागण्याने मळकट वाटू लागतात हे दुर्दैवी आहे. भलत्याच भाबड्या तिहाईने संपणारी ही कथा बऱ्याच वाचकांना मात्र लोभस वाटेल. भावुक आणि गोड शेवटामुळे या कथेतली दाहक समस्या पुसट आणि रचीव होत जाते. शिवाय एकांगी त्यागाने कोणतेही नाते हळूहळू करपत जाते याचे सूचन कथान्ताला असायला हवे होते असे वाटते. लग्नाने निर्माण होणारे वीर्याचे नाते आणि जन्माने येणारे रक्ताचे नाते यांतला अर्थपूर्ण छेद हा खरे तर या कथेचा गाभा, पण तो ठळक होत नाही. पुरुषातले मतिमंदत्व स्त्रीबरोबरची सारी नाती मातृत्वात विलीन करते, असे काहीसे आदर्श तात्पर्य मोनिकाला अभिप्रेत असावे या कथेत.

सततच्या कथालेखनाने मोनिकाच्या कथालेखनात येणारे कसदारपणा आणि चिंतनशीलता यांतले लक्षणीय चढउतार मात्र मला चिंताजनक वाटतात. विशेषतः 'आर्त' संग्रहानंतरच्या यंदाच्या दिवाळी अंकांतल्या काही कथा तर मौलिकपण गमावलेले प्रयोग वाटतात. अर्थात प्रत्येक कथाकाराच्या प्रवासात असे टप्पे येतातच. 'भूप' या यशस्वी कथासंग्रहानंतर मोनिकाने 'आर्त'च्या निमित्ताने श्रेष्ठ कथेच्या दिशेने दोन पावले प्रवास केल्याचे मात्र नक्कीच जाणवते. ते स्वागतार्ह तर आहेच, पण मुख्य म्हणजे आशादायक आहे.


प्रयोगशीलता, चिंतनशीलता, अनिर्णायकता अशा अनेक गुणांनी मोनिकाची कथा समृद्ध आहे. तिने आजवर प्रामुख्याने दीर्घकथेचीच वाट पकडली आहे. पण केवळ वैविध्य म्हणून नव्हे तर अधिक मोठ्या अवकाशात (काळ आणि पट या दोन्ही अर्थाने), अधिक मुक्त आणि खोलवरचे स्तर तपासणारे आणि मुख्य म्हणजे यशापयशाची पर्वा न करणारे मनस्वी दीर्घ लेखन केल्यास मोनिकाची कथा श्रेष्ठतेच्या अधिकाधिक जवळ जाईल असे वाटते. त्याची सारी लक्षणे बाळगणाऱ्या *जन्म* आणि *श्रद्धा* यांसारख्या कथा तिच्या सहप्रवाशांना तिचा हेवा वाटेल इतक्या समृद्ध आहेत. 'भूप'मध्येही तिच्या *नाळ, आधार* यांसारख्या कथा अशाच जमून आलेल्या होत्या. स्त्रीत्वाचे सौंदर्य असूनही स्त्रीवादाचे बंधन अन् बेड्या नसणारे अभिनिवेशहीन लेखन करणाऱ्या मोजक्या लेखिकांत मोनिकाचा समावेश करता येईल. त्यात कांगावाही नाही आणि अरण्यरुदनाचे वैफल्यही नाही. जगण्याचे अंतःस्तर तपासण्याचे धाडस आहे. जगण्याच्या कुतूहलाची बोअरवेल अजून खोल नेल्यास श्रेष्ठतेचे पाणी या कथेला नक्कीच सापडेल. यशानुगामी कथेच्या रचीवतेचे आणि सततच्या लेखनाने येणारे वरवरच्या प्रयोगशीलतेच्या दडपणाचे धोके मात्र या कथेने टाळायला हवे. 'आर्त' संग्रहामुळे मोनिकाबद्दलच्या आशा आणि अपेक्षा (काकणभर) अधिकच वाढल्या आहेत असे मात्र आवर्जून म्हणायला हवे.

(***आर्त, मोनिका गजेंद्रगडकर***
मौज प्रकाशन, किंमत रुपये १६०, पृष्ठे १६९)
*(फेब्रुवारी २००९)*

■

***परीक्षण : संजय भास्कर जोशी***

# एक शोधयात्रा...




कवी, कथाकार, कथालेखक, नाटककार, कादंबरीकार, चित्रपट-लेखक अशा विविध रूपांतून रॉय किणीकर अनेक प्रतिभावंतांना आणि रसिकांना भेटले. काहींना ते अवलिया वाटले. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे 'माणूस आणि साहित्यिक' अशा दोन्ही अंगांनी दर्शन घडविणारे पुस्तक म्हणून 'रॉय किणीकर – माणूस आणि साहित्य' या पुस्तकाकडे पाहावे लागेल. हा महत्त्वपूर्ण ग्रंथ वाचकांच्या हाती देण्यासाठी रवींद्र घवी आणि किणीकरांचे सुपुत्र अनिल किणीकर यांनी संपादक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, अरविंद गोखले, विजया राजाध्यक्ष, स. ह. देशपांडे, मनमोहन, माधव मनोहर, मोहन नगरकर, सुभाष अवचट, सदानंद रेगे, माधवी देसाई, म. द. हातकणंगलेकर, रा. बा. कुलकर्णी, रावसाहेब जगताप, रा. भि. जोशी, बा. द. सातोस्कर, प्रभाकर पाध्ये, अ. सी. केळूसकर, हरिभाऊ विठ्ठल देसाई, मधुकर रामचंद्र नाडगौडा, बाबा पाटील, सविता पारिजात, वासुदेव कुलकर्णी, शरद कारखानीस, प्रकाश देवकुळे, राम देशपांडे, रणजित देसाई, शरद देशपांडे, विश्राम गुप्ते या मान्यवरांनी रॉय किणीकरांच्या उलगडलेल्या आणि न उलगडलेल्या व्यक्तिमत्त्वाविषयी लिहिले आहे.

''उत्तररात्र वाचताना वाटलं, ह्या अवलियाकडे आपण अधिक आस्थेने आणि आदराने पाहायला हवं होतं. त्यांनी स्वत: आदराची अथवा मानसन्मानाची चुकूनही अपेक्षा ठेवली नव्हती. म्हणून काय आपण त्यांना ओळखायला नको होतं? आपण ओळखीच्या माणसांच्या बाबतीत किती अनोळखी राहतो पहा, पण किणीकरांनी तरी स्वत:मधला चिंतनशील कलावंत असा दडवून का ठेवावा?... ते दृष्टीआड राहू इच्छित असले तरी त्यांना असं राहू द्यायला नको होतं. किणीकर काही अलौकिक ऋणं फेडायचीही इच्छा बाळगून होते.

'ऋण फेडायाचे राहून माझे गेले

ऋण फेडायाला पुन्हा पाहिजे मेले' म्हणणाऱ्या किणीकरांचे आपणही देणे लागत होतो, हे फार उशिरा कळले.'' अशा शब्दांत पुलंनी व्यक्त केलेली खंत किणीकरांवर आणि त्यांच्या प्रतिभेवर मनापासून प्रेम करणाऱ्या सर्वांच्या लेखांतून उमटली आहे.

युगायुगांचा सहप्रवासी – अद्‌भुत कलंदर; दैनिक, साप्ताहिक, मासिक किंवा वार्षिक काढणे – एक कला; बुडविणे एक धंदा; मंतरलेले व तंतरलेले दिवस, मी एक कलंदर माणूस हे रॉय किणीकरांचे स्वत:विषयीचे लेख एका अवलियाचे त्याच्याच शब्दांत दर्शन घडविणारे आहेत. रॉय किणीकरांच्या या लेखांमुळे हे पुस्तक परिपूर्ण वाटते. *संपली रात्र, वेदना संपली नाही...* हा अनिल किणीकरांचा लेख अप्रतिम आहे. आपल्या वडिलांचे एक प्रतिभावंत म्हणून घडलेले दर्शन, त्यांचे संघर्षमय जीवन, त्यांची अव्यभिचारी वाङ्मयनिष्ठा, या साऱ्यांचे दर्शन त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रात दिसते. जवळच्या माणसांवर अंतरावर राहून लिहिणे अवघड असते. हे अवघड काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडले आहे.

डॉ. अरुणा ढेरे, डॉ. स्वाती कर्वे, आसावरी काकडे, सतीश कामत, रमेश वैद्य यांनी किणीकरांच्या साहित्याविषयीचे जे लेख लिहिले आहेत, त्यांतून उलगडणारे वेगळे रॉय किणीकर वाचकांना भेटतात. *ग्रीक ट्रॅजेडीमधील नेमेसिस : ये ग ये ग विठाबाई, अनोखे न-नाट्य खजिन्याची विहीर, आधी केले; मग सांगितले* या अनुक्रमे रामूभैय्या दाते, कमलाकर नाडकर्णी आणि दीनानाथ दलाल यांच्या लेखांमुळे रॉय किणीकरांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वातले अनेक अपरिचित पैलू उलगडत जातात.

*अचपळ पारा...* या सविस्तर लेखात रवीन्द्र घवी यांनी रॉय किणीकरांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आणि त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाविषयी जे अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे, ते महत्त्वाचे आहे. ''पूर्वकालीन, समकालीन आणि उत्तरकालीन सगळेच रॉय किणीकरांच्या लेखनाने प्रभावित झाले आहेत. त्यांच्या विक्षिप्तपणाचा अनुभव घेतलेले प्रभावित झालेले आहेत. पाया पडण्यासाठी येणाऱ्यांना झटकून टाकणाऱ्या संत गाडगेबाबांच्या अफाट गणगोताप्रमाणे हुलकावण्या देत गेलेल्या रॉय किणीकरांचं गणगोत आहे, असं म्हटल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं अवलियासारखं एक अंग उजळून येतं.'' असे रवीन्द्र घवी त्यांच्या लेखात म्हणतात. हे पुस्तक वाचल्यानंतर वाचक त्यांच्या मताशी सहमत होतात. जीवनाचा शोध घेणाऱ्या प्रतिभावंताच्या जीवनाचा शोध हे एक कठीण काम असते. ज्यांना रॉय किणीकर समजून घ्यायचे आहेत अशा सर्वांना आवडेल, भावेल असे हे पुस्तक आहे.


(***रॉय किणीकर – माणूस आणि साहित्य,***
*डायमंड पब्लिकेशन्स,*
संपादन : रवीन्द्र घवी, अनिल किणीकर,
किंमत रुपये ३००, पृष्ठे ३४६)

*(दिवाळी २००९)*

■

***परीक्षण : मिलिंद जोशी***

# *मार्ग* : चांगले पण साचेबद्ध होण्याची शक्यता असणारे कादंबरीलेखन




मिलिंद बोकील हे मराठीतील आजचे आघाडीचे कथा-कादंबरीकार आहेत. 'झेन गार्डन', 'शाळा', 'रण', 'दुर्ग', 'समुद्र' या त्यांच्या कथात्म लेखनामुळे मराठी साहित्यात त्यांना निश्चित असे स्थान प्राप्त झाले आहे. 'मार्ग' ही त्यांची नवी कादंबरी हे स्थान अधोरेखित करणारी असली तरी, तिच्याद्वारे कादंबरीलेखनात त्यांचा असा एक साचा तर निर्माण होत नाही ना, असा प्रश्न उपस्थित करणारीही झाली आहे.

एन.जी.ओ.च्या माध्यमातून समाजकार्यासाठी जाणारे पति-पत्नी, त्यांना होणारे अनोखे व सूक्ष्म असे समाजदर्शन, निसर्गचित्रण, त्या पार्श्वभूमीत रंगणारा रोमान्स आणि आता सारे काही ठीक होणार असे वाटत असतानाच, नायक किंवा नायिकेच्या निग्रही निर्णयामुळे त्यांचे (त्यांना आणि वाचकांनाही) अस्वस्थ करणारे, एकमेकांपासून दूर जाणे हे साधारणपणे या साच्याचे स्वरूप. 'रण'च्या पाठोपाठ 'मार्ग' वाचली की हा साचा स्पष्ट होतो. हे सारे चित्रण बोकील अत्यंत बारकाईने आणि हृदयंगमपणे करतात, 'त्या दोघांच्या' मनोवस्थांचे त्यांनी केलेले चित्रणही बोकीलांची मानवी मनोव्यापारांची जाण किती सूक्ष्म आणि किती मनोवेधक आहे, हेही जाणवल्याशिवाय राहत नाही. पण त्याचवेळी याचा एक साचा तर होत नाही ना, अशी शंका वाचकांच्या मनाला कुरतडत राहते.

अतुल आणि विशाखा हे या कादंबरीतील नायक-नायिका (नात्याने पतिपत्नी) मुंबईजवळच्या माडभावन या आदिवासींच्या वस्तीवर मुंबईहून येऊन-जाऊन कार्य करतात. पण काही दिवसांनी सेवाकार्य अधिक चांगल्या रीतीने करण्यासाठी वस्तीवरच्या झोपडीतच जाऊन राहतात आणि भोवतालच्या वस्त्यांवरही फिरून कार्य करत राहतात. विशाखा डॉक्टर आहे तर अतुलने एम.एस.डब्ल्यू. केलेले आहे. दोघेही प्रामाणिकपणे आपापली कामे करतात. भोवताली दाट जंगल, भूल घालणारे डोंगर, सोबतीला आदिवासी. त्या आदिवासींशी पूर्णपणे मिसळलेल्या या दोघांना आदिवासींनीही आपले मानून स्वत:त सामावून घेतलेले आहे.

विशाखा भोवतालच्या निसर्गात व लोकांत मनाने पूर्णपणे इतकी गुंतत जाते, की तिच्या मनाने कायमचेच इथे राहावे असे घेतलेले आहे. अतुलला मात्र सेवाकार्यातच करियर करावयाचे आहे. त्यासाठीचा अनुभव म्हणून तो माडभावनच्या वस्तीवर राहतो आहे. दोघांमधील या वृत्तिभेदाचे चित्रण बोकीलांनी सुरुवातीपासूनच सूचित केलेले आहे.

त्या डोंगरी परिसरातील निसर्गाची, जंगलाची, आदिवासींच्या जगण्याची रम्य चित्रे कादंबरीत जागोजाग आलेली आहेत. त्यांच्या वागण्यातला निरोगी मोकळेपणा आणि या दोघांबद्दलची निरपेक्ष आत्मीयता विशाखाच्या मनाला फार भावते. आदिवासींची लग्न ठरवण्याची पद्धत, सुपारी फोडण्याचा कार्यक्रम, त्यांच्यात होणारे मृत्यू आणि अन्त्यक्रिया, वस्तीवरच करण्यात येणारे स्त्रियांचे बाळंतपण, जंगली झाडपाल्यांची आणि त्यांच्या औषधी उपयोगांची माहिती, त्यांचा उद्योगीपणा, त्यांचे नातेसंबंध या साऱ्यांची माहिती कथानकाच्या ओघात बोकील वाचकांना देतात आणि त्यातून वाचकांना या आदिवासींच्या जगण्याचा परिचय होतो.

एकीकडून या आकर्षक समाजजीवनाचे चित्रण, दुसरीकडून रमणीय निसर्गाचे आकर्षक वर्णन आणि तिसरीकडून नुकताच विवाह झालेल्या या समाजसेवी पतिपत्नींचे परस्परांविषयीचे शारीर पातळीवरून सतत व्यक्त होणारे प्रेम हे तीन पदर या कथानकात आलेले दिसतात.

प्रश्न निर्माण होतो हा, की या तीन पदरांचा एकजीव होणारा गोफ गुंफण्यात बोकीलांना यश लाभले आहे का? आणि त्याचे ठामपणे 'होय' असे उत्तर देता येत नाही. काही वेळा तर हे तीन घटक एकमेकांना रंजक करण्यासाठी तर येत नाहीत ना, अशी शंकाही येते. एकमेकांना मिठीत घेणे, चुंबनांचा वर्षाव करणे, आणि एकमेकांच्या छातीवर किंवा पोटात डोके घुसळणे या विशाखा-अतुल यांच्या कृतींचा तर अतिरेक होतो. दु:ख होवो, आनंद होवो, आदिवासींच्या संदर्भातले एखादे काम होवो, प्रत्येक वेळी यांपैकी एखादी कृती होतेच. आदिवासी स्त्रीच्या बाळंतपणाचे चित्रण तर विशाखाची मातृत्वाची इच्छा अधिक तीव्र करण्यासाठीच आलेले आहे असे वाटल्याशिवाय राहत नाही.

आणि शेवट होतो तो माडभावनातल्या प्रत्येक बाबीत जीव गुंतलेल्या विशाखाने त्या जीवनाचा भाग होऊन राहण्याचा निर्णय घेणे आणि अतुलने इथला अनुभव पुरेसा झाला मानून, आता अधिक व्यापक कार्य करण्याचे ठरवून त्यासाठी दिल्लीला जाण्याचा निर्णय घेणे आणि त्याप्रमाणे आपापल्या मार्गांनी पुढे जाण्याच्या कृतीतून. हे सारे वरवर पाहता स्वाभाविक आणि आपापल्या आंतरिक प्रेरणांप्रमाणेच होते आहे असा समज सहजपणे होतो. पण थोड्याशा बारकाईने पाहिल्यास कादंबरीच्या सुरुवातीपासूनच अगदी गणिती पद्धतीने त्याची मांडणी करण्यात आलेली आहे. (पृ. क्र. ३वरील विशाखाला जाणवलेले निसर्गचित्र

पाहावे.) हे ध्यानात येते आणि मग या साऱ्यातील नैसर्गिक सहजपणा संशयास्पद वाटू लागतो. वाचकांना तसे वाटणे हे काही लेखकाचे यश म्हणता येणार नाही.

आणि शेवटी ही कादंबरी साचेबंद झाल्यासारखी वाटते त्यासंबंधी. बोकीलांची या अगोदरची 'रण' ही कादंबरी वाचली, की तिचेही स्वरूप असेच असल्याचे जाणवते. गुजराथच्या भूकंपाच्यावेळी कच्छच्या रणात एन.जी.ओ.च्या माध्यमातून सेवाकार्यात सहभागी होण्यासाठी आलेले विस्फोटित पतिपत्नी. त्यांची अकल्पित भेट, मुलाच्या निमित्ताने त्यांचे जवळ येणे, रात्रभर एकांतातल्या अतिथिगृहात त्यांचा झालेला मुक्काम, असोशीने झालेले त्यांचे मिलन आणि पुन: एकदा सहजीवन जगण्याचा पतीने ठेवलेला प्रस्ताव आणि पत्नीने 'तू माझ्याकडे येऊ शकतोस, आपल्या मुलाचा बाप म्हणून, अगदी माझा माजी नवरा म्हणूनही. पण मला आता पत्नीपणात (बायको म्हणून) अडकणे शक्य नाही.' या शब्दांत त्याला नकार देणे आणि दोघांनी आपापल्या वेगळ्या मार्गांनी जाणे. हे सारे अत्यंत रमणीय स्वरूपात चित्रित होणे. या सर्वांचे स्वरूप 'मार्ग'शी मिळतेजुळते असेच नाही का?

हे जर बरोबर असेल (आणि माझ्या मते ते तसे आहेच) तर बोकीलांनी पुढील कादंबरी लिहिताना अधिक गंभीरपणे विचार करणेच इष्ट ठरेल.

(***मार्ग***, **मिलिंद बोकील**,
*मौज प्रकाशनगृह*, पृष्ठे ११९, मूल्य रुपये १२०)


*(फेब्रुवारी २०१६)*

■

***परीक्षण : बाळकृष्ण कवठेकर***

---

## *एक धारवाडी कहाणी* : जीए समजून घेताना




जी. ए. कुलकर्णी हे एक विलक्षण लेखक होते. त्यांच्या लेखणीनं मराठी रसिकाला अनेक अर्थांनी समृद्ध केलं. त्यांचं एकंदरच लेखन चिरेबंद होतं. सशक्त कथासृष्टी उभी करणाऱ्या जीएंनी अनेक अनुवाद केले. मात्र या साऱ्या लेखनातून जीए, एक व्यक्ती म्हणून, कधीच दिसत नाहीत. ते दिसतात, ते त्यांनी केलेल्या पत्रलेखनातून! त्यांना प्रदीर्घ पत्रं लिहिण्याची सवय होती. या पत्रांचीही पुस्तकं निघाली. या पत्रांतून मात्र जीए कसे असावेत, त्याचा अंदाज करता येतो. प्रस्तुतचं पुस्तक हे जीएंनी अनंत अंतरकर आणि आनंद अंतरकर यांना लिहिलेल्या पत्रांचं आहे. मात्र त्यामध्ये जीएंची पत्रच नाहीत तर त्या पत्रांवर आनंद अंतरकर यांचं भाष्य आहे. ते भाष्य म्हणजे जीएंच्या पत्रातून त्यांच्या, एरवी अबोध राहिलेल्या, व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध आहे. जीए आणि हंस मासिक यांचं फार जवळचं नातं होतं आणि ते अनंत अंतरकर यांच्या काळापासूनच निर्माण झालेलं होतं. इतके प्रदीर्घ काळचे संबंध असूनसुद्धा जीए ना कधी थोरल्या अंतरकरांना भेटले, ना धाकट्या! आनंद अंतरकरांशी निदान त्यांचं फोनवरून तरी बोलणं झालं. पण तेही हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्यावेळाच.

अशा लेखकाची पत्रं हा अंतरकरांकडचा मोठा ठेवा आहे. त्याचा विशेष असा की एरवी कुलुपबंद असणारं जीएंचं व्यक्तिमत्त्व त्यातून डोकावत राहतं. काही आटोपशीर तर काही सविस्तर असणाऱ्या या पत्रांवरचं आनंद अंतरकर यांचं भाष्य जीएंच्या गूढरम्य व्यक्तिमत्त्वावरचा पडदा अलगद हातानं दूर करणारं आहे. त्यांचं भाष्य वाचताना जाणवतं की जीएंप्रमाणेच आनंद अंतरकरांचं पाश्चात्त्य वाङ्मयाचं वाचन अफाट आहेच, पण पाश्चात्त्य समीक्षाग्रंथही त्यांनी वाचून पचवले आहेत आणि मराठी साहित्याचा तर त्यांचा व्यासंग चकित व्हावं असाच आहे. या साऱ्या साहित्याभ्यासातूनच असावी, पण कायम दृष्टीआड असणाऱ्या साहित्यिकाच्या अंतरंगाचा वेध घेण्याची हातोटी त्यांनी कमावली आहे. त्याचंच प्रत्यंतर आपल्याला प्रस्तुतच्या पुस्तकाच्या वाचनातून येतं. नवख्या लेखकातीलही ठिणगी अचूकपणे हेरणारे अनंत अंतरकर हे रोखठोक वृत्तीचे होते. त्यांच्याबद्दल आनंद अंतरकर लिहितात, 'त्यांची संपादकीय भूमी ही नुसतीच कोरडवाहू नव्हती. तिच्या गर्भात लेखकाविषयीचा नि लेखनाविषयीचा ओलावा असायचा. आस्था असायची.'

आपल्या कर्तृत्ववान पित्याकडूनच संपादनाचे धडे गिरविणाऱ्या आनंद अंतरकर यांनी आपल्या वडिलांचा वारसा अधिक समृद्ध केला. अनिल रघुनाथ कुलकर्णी, प्र. ल. मयेकर यांच्यासारखे अनेक नवीन लेखक हुडकले. या साऱ्याची जाणीव जीएंना होती, असं त्यांच्या पत्रांवरून दिसतं. अंतरकर कुटुंबीयांशीच त्यांचं गहिरं नातं जडलं होतं. मात्र पुण्यात येऊनही जीए अंतरकरांना कधीच भेटले नाहीत. त्यांनी स्वत:भोवती एक वारूळ तयार केलं होतं आणि ते अधिकाधिक पक्कं होईल असं वर्तन सामान्यत: ठेवलं होतं.

मात्र हेमलता अंतरकर त्यांची भेट घेण्यात यशस्वी झाल्या होत्या. नंतरच्या काळात त्यांच्याशी जीएंची स्नेहमय जवळीकही निर्माण झाली होती. अशा जीएंच्या व्यक्तिमत्त्वावरचे पापुद्रे अलवारपणे दूर सारणारी पत्रं आणि त्या पत्रांवरचं अंतरकर यांचं अंतर्वेधी भाष्य हे या पुस्तकाचं वैशिष्ट्य आहे. पुस्तकाच्या आशयाला साजेल असं मुखपृष्ठ अभिराम अंतरकर यांनी तयार केलं आहे. जीएंच्या चिरेबंदी व्यक्तिमत्त्वाला साजेशा दगडी वाड्याच्या एका खिडकीत जीए बसलेले दिसताहेत. मात्र तेसुद्धा समीप नाही, तर दूरदर्शनच आहे. शिवाय जीएंनी इथंही, म्हणजे घरातही, काळ्या काचांचा गॉगल लावलेलाच आहे. त्यामुळे त्यांच्या गूढरम्य व्यक्तिमत्त्वाचा आपल्याला अंदाजच करावा लागतो.

पुस्तकातली जीएंची पत्रं आणि त्यावरचं आनंद अंतरकरांचं भाष्य वाचल्यानंतरही आपल्या मनातलं जीए नावाचं कोडं सुटत नाही. मात्र त्याची उकल करण्याचा एक मार्ग या पुस्तकामुळं आपल्या हाती येतो! पुस्तकातली आनंद अंतरकरांच्या सखोल लेखणीतून उतरलेली काही वाक्यं मनाचा ठाव घेणारी आहेत. उदाहरणार्थ, जीएंबद्दल ते लिहितात, '...अशा माणसाच्या अभियुक्त स्वभावधर्माची कल्पना करता येते. मनाची अव्यक्तता हेच त्यांचं निजरूप असतं.' आणखी एके ठिकाणी जीएंच्या गाठीच्या म्हणजे एक आकड्यासारखी मात्रा काढण्याच्या सवयीचा उल्लेख करून अंतरकर म्हणतात, 'गाठीची मात्रा लिहिणारी माणसं आतल्या गाठीची असतात का? पण असा प्रश्न त्यांना विचारण्याचं धाडस मला कधीच झालं नाही. तो प्रश्न आतल्या आत नुसता कुढत राहिला. आतली गाठ आतल्या आत नुसती घट्ट होत राहिली.' अशी आशयगर्भ वाक्यं वारंवार आपल्याला भेटतात आणि अतीव आनंद देतात.

जीएंच्या लेखणीचा आदर करणाऱ्या आनंदरावांनी त्यांची 'रत्न' नावाची कथा परत पाठवली होती, कारण त्यांना ती कथा 'का कुणास ठाऊक, उगीचच लांबण आणि पिंजण लावल्यासारखी वाटली. कुठेकुठे तिची काही टोकं भरकटत गेल्यासारखी झाली होती. ती थोडी आटोपशीर असती आणि फोकस्ड असती तर बरं झालं असतं,' असं आनंदराव म्हणतात. मात्र त्यामुळे जीए आणि हंस मासिक यांच्या नात्यात उणेपणा आला नाही. त्या नात्याचे अनेक गहिरे रंग या पुस्तकात आपल्याला ठायीठायी दिसत राहतात.

(***एक धारवाडी कहाणी*, आनंद अंतरकर**, *मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस*, पृष्ठे : १७५, किंमत २०० रुपये)

*(मार्च २०१६)*

■

***परीक्षण : श्रीराम शिधये***

---

*(पान ३०४ वरून)*

रामदासांनी याबाबतही अत्यंत थंड प्रतिसाद दिला. या पुस्तकाला नवलेखक योजनेअंतर्गत अनुदान मिळाल्याचं आणि हे पुस्तक श्रीविद्या प्रकाशनाला दिलं असल्याचं पत्र मला जेव्हा आलं, त्यादिवशी मी मोठ्या आनंदानं ते रामदासांना दाखवलं. ते म्हणाले, ''प्रकाशक आधीच नेमतात वाटतं?'' मी सांगितलं, ''असं दिसतंय खरं! मलाही हे ठाऊक नव्हतं.'' रामदास पुढे म्हणाले, ''निदान प्रकाशक तरी चांगला दिला.'' बस! त्यानंतर चकार शब्द नाही. तरीही मी त्यांना माझ्या कथा वाचायला दिल्या. मी वा. ल., धोंड यांच्या तालमीत वाढलेली! त्यामुळे आपले दोष दाखविणारी, वेळप्रसंगी प्रखर टीका करणारी व्यक्ती ही आपली खरी हितचिंतक असते, हे मी अनुभवातून जाणत होते. मला रामदासांचं स्पष्ट मत हवं होतं. मी स्पष्टतेचा आदर करते, हे त्यांना ठाऊक होतं. तरीही त्यांनी एकेक कथा वाचून, न बोलता परत केली. भलाबुरा शब्द नाही! मला नवल वाटलं. खरं तर असा एक प्रसंग खुद्द रामदासांच्या बाबतीतच घडला होता. तो त्यांनीच मला सांगितला होता. विश्राम बेडेकरांचं आत्मचरित्र पॉप्युलरकडे आलं. त्यानंतर कधीतरी रामदासांची आणि मौज प्रकाशनाच्या श्री. पु. भागवतांची भेट झाली. रामदासांनी त्यांना उत्साहानं ही बातमी सांगितली. श्री.पुं.नी फक्त एक वाक्य उच्चारलं, ''हो, आलंय माझ्या कानावर!'' आपल्या आनंदात श्री.पुं.सारख्या ज्येष्ठ प्रकाशकानं सामील होऊ नये, याचं रामदासांना वाईट वाटलं. मात्र खुद्द रामदास माझ्या आनंदाच्या क्षणी श्री.पुं.सारखंच वागले होते. हे साम्य मला जाणवलं. रामदासांकडून माझी ही अपेक्षा नव्हती.

असमाधानाचे असे थरावर थर जमा झाले. काम करण्यातला आनंद विझला. पॉप्युलरचा निरोप घ्यायची वेळ येऊन ठेपली आहे, हे मी ओळखलं. आज मागे वळून पाहताना वाटतं, की पाच वर्षं पॉप्युलरमध्ये काम करणं आणि नंतर नोकरी सोडणं हे दोन्ही निर्णय एकमेकांना पूरक होते. पाच वर्षांत मला ग्रंथव्यवहाराचा जवळून परिचय झाला. पुस्तकांचं नवं भान आलं. माझ्यावर अन्याय झाला, तेही एका अर्थी बरंच झालं. त्यामुळेच तर मी आत्मशोधाला प्रवृत्त झाले. मला माझी स्वप्नं पूर्ण करण्याची वाट दिसली. माझा लेखनमार्ग मला सापडला. पुढे त्यातून लघुपट निर्मितीची दिशाही गवसली. त्यामुळेच असेल कदाचित; पण रामदासांबद्दल मनात कटुता राहिली नाही. कालौघात मोठी दु:खंही छोटी बनून गेली. कधीतरी मीही पॉप्युलर प्रकाशनाचा एक घटक होते, याचं समाधान मनाच्या तळाशी शिल्लक राहिलं.

*(दिवाळी २०१४)*

# पाडगावकरांची शहाणपणाची कविता

**सुधीर रसाळ**

१० मार्च १९२९ हा ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांचा जन्मदिन. पाडगावकरांना लोकप्रियता भरपूर मिळाली असली तरी त्यांच्या कवितेची गंभीर व दीर्घ अशी समीक्षा फारशी झालेली नाही. ही उणीव भरून काढण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न. निमित्त आहे *बोलगाणी* हा १९९० साली 'मौज'कडून प्रकाशित झालेला व त्यानंतर तब्बल बावीस आवृत्त्या निघालेला पाडगावकरांचा कवितासंग्रह.

प्रस्तुत लेखात मंगेश पाडगावकरांच्या *बोलगाणी* या संग्रहातील कवितेचा विचार करायचा आहे. मंगेश पाडगावकरांनी आपल्या काव्यलेखनात अनेक प्रयोग केले. मुळात रोमँटिक प्रवृत्तीची आणि वैणिक जातीची काव्यप्रतिभा असणाऱ्या या कवीने आपल्या काव्यलेखनप्रयोगात आपल्या कवितेची ही अंगभूत वैशिष्ट्ये मोडून टाकणारी कविताही लिहिली. परंतु असे प्रयोग करतानाही त्यांना आपल्या प्रतिभेचे रोमँटिकत्व आणि वैणिकत्व पूर्णपणे नष्ट करून टाकता आले नाही. त्यांच्या 'वात्रटिका', 'सलाम', 'विदूषक', 'मोरू', 'बोलगाणी' इत्यादी अनेक संग्रहातल्या कवितांतही त्यांच्या प्रतिभेचे हे दोन्ही अंगभूत गुणधर्म अधूनमधून डोकावतातच. किंबहुना त्यांची या प्रकारची कविता ही रोमँटिक प्रवृत्ती आणि 'वैणिकत्व' या धर्मांचा व्यत्यास आहे असे म्हणता येईल. कारण त्यांच्या जाणिवांच्या तळाशी असलेले हे दोन्ही गुणधर्म गृहीत धरल्याशिवाय त्यांच्या या प्रकारच्या कवितांची अर्थपूर्णता प्रत्ययाला येत नाही.


अलीकडे 'रोमँटिक' कविता लिहिणे हा जणू गुन्हा झाला आहे. म्हणूनच या प्रकारची कविता लिहिणे हे कमी दर्जाचे मानणारे समीक्षक पाडगावकरांच्या कवितेची दखल घेताना दिसत नाहीत. वस्तुत: मराठी कवितेची मुख्य प्रवृत्ती रोमँटिकच आहे. वारकरी संप्रदायाची मध्ययुगीन कविता ही प्रवृत्तीने रोमँटिक आहे. म्हणूनच, रोमँटिक प्रवृत्तीच्या वारकरी संतांनी विठ्ठलाला आपला 'स्वामी' आणि स्वत:ला त्याचा 'दास' असे न मानता ते विठ्ठलाला 'सखा' मानत आले. त्यामुळेच ते त्याला आपल्या कवितेतून वेळप्रसंगी 'शिव्या'ही घालू शकले. अद्वैतवादी दार्शनिक भूमिका ही मुळात रोमँटिक प्रवृत्तीची आहे. स्वत:च्या आत्म्यात परमात्मा पाहणे आणि मोक्षप्राप्तीनंतर आपला आत्मा परमात्मरूप होणार असल्याचे मानणे, या श्रद्धेत मानव हा परमेश्वराइतकाच श्रेष्ठ मानला गेला आहे. आधुनिक मराठी कवितेचा प्रारंभच मुळी पाश्चात्त्य रोमँटिसिझमच्या स्वीकारातून झाला आहे. मर्ढेकर, पु. शि. रेगे, दिलीप चित्रे, अरुण कोलटकर असे थोडे कवी सोडल्यास, एकूण मराठी कवी प्रवृत्तीने रोमँटिकच आहेत. असे असले तरी मंगेश पाडगावकरांच्या कवितेला काही समीक्षक मान्यता देत नाहीत. कारण त्यांची कविता ही 'व्याज रोमँटिक' असल्याचे मानण्याचा प्रघात आहे. परंतु असे म्हणत असताना 'व्याज रोमँटिक' कवितेची लक्षणे सांगून पाडगावकरांच्या कवितेचे व्याज रोमँटिक स्वरूप स्पष्ट केले जात नाही. रोमँटिसिझमची मूलभूत वैशिष्ट्ये सांभाळणारी पाडगावकरांची कविता अस्सल रोमँटिक कविता आहे.

पाडगावकरांनी *बोलगाणी* या संग्रहात समाविष्ट केलेल्या कवितेला 'बोलगाणी' म्हटलेले आहे. 'बोलगाणी' या शब्दात एक अंतर्विरोध आहे. 'बोल' हे भाषारूप गद्यप्रकाराचे असते आणि 'गाणी' ही काव्यरूप – किमान पद्यरूप असतात. तरीही हा अंतर्विरोधात्मक सामासिक शब्द पाडगावकरांनी अर्थपूर्ण बनवला आहे. या सामासिक शब्दातील 'बोल' हा शब्द दोन अर्थ सुचवतो. एक म्हणजे हे श्रोत्याला उद्देशून 'बोलणे' आहे. येथे आविष्काराऐवजी संवादाला, संप्रेषणाला महत्त्व आहे. दुसरा अर्थ : हे जरी गाणे असले तरी ते गायले जाणारे गाणे नसून ते बोलले जाणारे गाणे आहे. गाण्यातली शब्दरचना छंदोबद्ध असते. काटेकोरपणे सांभाळलेली पक्की लय गाण्यामध्ये असते. गाण्यातल्या शब्दांत स्वराकृती सामावून घेण्याचा अंगभूत गुणधर्म असतो. परंतु पाडगावकरांच्या बोलगाण्यात यांपैकी काहीही नाही. गाणे हे श्रोत्यासमोर *गायले* जात असते. गाण्यात ऐकणारा – श्रोता – गृहीत धरलेला असतो. अनेकदा स्वत: गाणाराच गाण्याचा श्रोता असू शकतो. म्हणून गाणे हे मनातल्या मनात गायले जाऊ शकत नाही. कविता मात्र मनातल्या मनात म्हटली, वाचली जाऊ शकते. 'बोलगाणी' या संग्रहातली कविता एका कवीने वक्त्याच्या भूमिकेतून श्रोत्यांना उद्देशून केलेले संभाषण आहे. ही ऐकायची कविता आहे. म्हणून ते 'गाणे' आहे.

या संग्रहातील कविता हे बोललेले गाणे आहे. त्याला जरी स्वरसाज प्राप्त होऊ शकत नसला तरी गाण्यातला पायाभूत घटक – लयबद्धता येथेही सांभाळली गेली आहे. एखाद-दुसऱ्या मात्रेचा फरक असलेल्या आणि सामान्यपणे विशिष्ट अक्षरसंख्या कायम ठेवलेल्या ओळी एकामागोमाग आणणे, मग अचानक वेगळी अक्षरसंख्या असलेली ओळ टाकून आधी प्रस्थापित झालेली लय

मोडणे आणि पुन्हा आधीच्या अक्षरसंख्येची ओळ टाकून मोडलेली लय पुन्हा प्रस्थापित करणे, भिन्न अक्षरसंख्येच्या ओळींनंतर विशिष्ट अक्षरसंख्येची ओळ पुनरुक्त करीत राहून त्यातून एक लय प्रस्थापित करणे, अशा आणि अशा प्रकारच्या विविध चरणरचना करून एक लवचीक लय प्रस्थापित करीत जाणे, या पद्धतीने ही गाणी लिहिली गेली आहेत. उच्चारणातील विशिष्ट काळाच्या अंतराने पुनरावृत्त होणारी यमके, विशिष्ट कालिक अंतराने ध्रुवपदासारख्या पुनरुक्त होणाऱ्या ओळी अशा प्रकारांतूनही एक सैल लय प्रस्थापित केली जाते. ही लय लवचीक, सैल ठेवून या गाण्यात गद्याचे सामर्थ्यही टिकवले गेले आहे. येथे 'गद्य' ही संज्ञा 'काव्यविहीन' या अर्थाने योजिलेली नसून ती विशिष्ट प्रकारचे अभिव्यक्तिसामर्थ्य असणारा भाषाप्रकार, या अर्थाने योजली आहे. 'गाणी' हे नामाभिधान प्राप्त झालेल्या या कवितेत पद्य आणि गद्य या भाषारूपांचे अभिव्यक्तिसामर्थ्य एकवटलेले आहे. या बोलगाण्यातल्या लयीमध्ये श्रोत्यांना वक्त्याच्या बोलण्यात सहभागी करून घेण्याचे सामर्थ्य आहे. वक्ता ही गाणी सादर करताना श्रोते केवळ तटस्थ राहून ती ऐकत नाहीत तर तेही या गाण्यात सहभागी होऊ लागतात. त्यांच्या या सहभागामुळे ही गाणी श्रोत्यांवर जो परिणाम करू पाहतात तो विनासायास होत जातो. ही गाणी ज्या उद्देशातून लिहिली गेली आहेत तो सफल करणारी लय या गाण्यांना प्राप्त झाली आहे. त्यामुळे मराठी भाषकांत ही गाणी अतिशय लोकप्रिय झाली असून गेल्या दोन तपांपासून ही लोकप्रियता तशीच कायम राहिली आहे. वाचक जेव्हा ही गाणी वाचतो तेव्हाही ती ऐकत असताना श्रोत्यांना येणाऱ्या अनुभवासारखाच अनुभव त्यालाही येतो. या गाण्याची लय अशी आहे की ती वाचत असताना आपण ती जणू ऐकत आहोत, असा अनुभव वाचकाला येतो. त्यामुळे ही बोलगाणी श्रोत्यांप्रमाणेच वाचकांनाही प्रिय झाली आहेत. त्यामुळेच 'बोलगाणी' या संग्रहाने पुस्तकविक्रीची सर्व प्रमाणके तोडली आहेत. ११९० पासून ते २०१२ पर्यंत, म्हणजे बावीस वर्षांत या संग्रहाच्या वीस आवृत्त्या निघाल्या आहेत. काव्यसंग्रहाच्या विक्रीचा हा नवा मानदंड आहे.

बोलण्याच्या क्रियेत बोलणारा आणि ऐकणारा असे दोन घटक असल्याचा निर्देश या पूर्वीच केला गेला आहे. बोलण्याच्या क्रियेला हे दोन्ही घटक अर्थपूर्णता देत असतात. बोलण्याच्या क्रियेत बोलणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व प्रत्यक्षपणे प्रकट होत असते आणि बोलणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वामुळे त्याच्या बोलण्याला विशिष्ट भावनिक अर्थ प्राप्त होत असतो. श्रोत्याने हे बोलणे कसे स्वीकारायचे हे बोलणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वामुळे त्याच्या बोलण्याला प्राप्त होणारा भावनिक अर्थ निश्चित करत असतो. बोलण्याच्या क्रियेत ऐकणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व मात्र अप्रत्यक्षपणे सूचित होत असते. बोलगाण्यात कथनकर्ता आणि ते ऐकणारा श्रोता असे दोन घटक असतात. या बोलगाण्यात बोलणाऱ्याला – कथनकर्त्याला – लोभस, आकर्षक व्यक्तिमत्त्व लाभले आहे. ऐकणाऱ्यांपेक्षा तो वयाने ज्येष्ठ असून अनुभवांनी समृद्ध आहे. या उलट या गाण्यात गृहीत धरण्यात आलेला त्याचा श्रोता त्याच्यापेक्षा वयाने लहान, तरुण आहे. अशा श्रोत्यांशी तो वडीलधाऱ्याच्या पातळीवरून, उपदेशकाच्या भूमिकेतून बोलत नाही. तर तो ज्येष्ठ, अनुभवी मित्राच्या भूमिकेतून, श्रोत्याला विश्वासात घेत, त्याची समजूत घालत बोलतो. तो मिस्किल आहे, अधूनमधून श्रोत्याला गुदगुल्या होतील असे नर्म विनोद करतो. आपले म्हणणे मांडताना तो श्रोत्याला सहज पटतील असे युक्तिवाद करतो. ही कविता ऐकताना किंवा वाचताना आपण सतत एका प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात असतो. ही 'बोलगाणी' ही जशी विशिष्ट आशयाची अभिव्यक्ती आहे तशीच ती एका वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय घडवणारा आविष्कारही आहेत.




'बोलगाण्या'त श्रोत्याचे व्यक्तिमत्त्व हे वक्त्याच्या बोलण्यातूनच सूचित होते. येथे ऐकणारा हा केवळ श्रोता आहे; तो वक्त्याच्या भूमिकेत जात नाही. त्यामुळे या गाण्यांना एकव्यक्तीय संभाषणाचे रूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे या गाण्यांत श्रोत्याचे व्यक्तिमत्त्व प्रत्यक्षपणे व्यक्त होत नाही. श्रोत्याभोवतीचे सामाजिक वास्तव, जगत असताना श्रोत्यापुढे उभ्या राहणाऱ्या समस्या, जगताना जागृत होणाऱ्या त्याच्या प्रेरणा, या प्रेरणांच्या तृप्तीत येणारे अडथळे या सर्वांमुळे अस्तित्वात आलेली त्याची मानसिक-भावनिक अवस्था हे सर्व लक्षात घेऊन बोलणाऱ्याने त्याला सुचविलेले मार्ग या सर्वांतून ऐकणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व सूचित होत असते. या कवितेत ऐकणारी विशिष्ट अशी एखादी व्यक्ती नाही; ती तारुण्यात पदार्पण केलेली नवी मध्यमवर्गीय पिढी आहे. या कवितेत ऐकणाऱ्याचे प्रकट होणारे व्यक्तिमत्त्व हे विशिष्ट व्यक्तीचे नसून एका पिढीचे ते सामूहिक व्यक्तिमत्त्व आहे. आधीच्या पिढीतीलच एक समजदार, अनुभवी आणि या तरुण पिढीला ओळखणारा – समजून घेणारा असा वक्ता आणि आधीच्या पिढीपेक्षा वेगळ्या सामाजिक प्रश्नांना सामोरा जात आपल्या वेगळ्या प्रकारच्या गरजा भागवू पाहणारा, आपल्या तारुण्यसुलभ प्रेरणांची तृप्ती साधू इच्छिणारा तरुण, यांच्यातले बोलणे या कवितेत साकार केले गेले आहे.

आता आपण या संग्रहातील कवितेमागील जाणीवव्यूहाचे स्वरूप जाणून घेऊ. पाडगावकरांच्या या कवितेतील जाणीवव्यूहाला दोन केंद्रे आहेत. त्यांपैकी एक केंद्र आजच्या प्रस्थापित वास्तवाचे आहे. आजच्या प्रस्थापित राजकीय-आर्थिक अवस्था, प्रस्थापित सामाजिक समजुती, श्रद्धा, आग्रह आणि मूल्यव्यवस्था हे आजच्या वास्तवाचे घटक पाडगावकरांच्या या कवितेचे लक्ष्यविषय आहेत. व्यक्तीचे केवळ व्यक्ती म्हणून असलेले अस्तित्व हे या जाणीवव्यूहाचे दुसरे केंद्र आहे. व्यक्तीचे व्यक्ती म्हणून असलेले अस्तित्व, त्याचे जगणे पाडगावकरांना

मूल्यवान वाटते. पाडगावकर जगण्यावर प्रेम करणारे कवी आहेत. जीवनातील सर्वच सामाजिक व्यवस्था या अस्तित्वाला, त्याच्या जगण्याला पूरक असल्या पाहिजेत, परंतु प्रत्यक्षात त्या या अस्तित्वाला आणि जगण्याला विरोधी – किंबहुना मारक आहेत; याची जाणीव त्यांची ही कविता व्यक्त करते. अशा या जगण्याला विरोधी सामाजिक वास्तवाबद्दल तीव्र प्रतिकूलतेची भावना ही या जाणीवव्यूहाचा भाग आहे. व्यक्तीच्या कृतिस्वातंत्र्याला केंद्रस्थानी असणारी जीवनपद्धती अस्तित्वात असली पाहिजे; व्यक्तीच्या पायाभूत, नैसर्गिक प्रेरणांमधून जन्मणाऱ्या कृती करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असणे, हा जगण्याला आवश्यक असणारा पाया आहे; त्यावरच मानवी जीवन उभे केले गेले पाहिजे असे त्यांना वाटते. निसर्गाची तद्रूप होणे, स्त्रीपुरुषांनी परस्परांवर आणि व्यक्तींनी एकमेकांवर प्रेम करणे, ही मानवाची नैसर्गिक – स्वाभाविक प्रेरणा आहे. मानव हा निसर्गाचा एक सेंद्रिय घटक आहे; निसर्गाशी तो जिवंतपणे जोडलेला असल्यामुळे त्याला स्वाभाविकपणे निसर्गाची ओढ वाटते; परंतु तो या जीवनपद्धतीत निसर्गापासून तोडला गेला आहे. व्यक्तीच्या नैसर्गिक प्रेरणांच्या तृप्तीतून मिळणाऱ्या आनंदासह व्यक्तीला जगायला मिळणे हा त्याचा जन्मजात अधिकार आहे, परंतु त्याचा हा स्वाभाविक अधिकार हिरावून घेणारी परिस्थिती त्याच्या सभोवताली निर्माण केली गेली आहे. पाडगावकरांच्या या कवितेच्या निर्मितीमागे असलेल्या जाणीवव्यूहाचे स्वरूप थोडक्यात याप्रकारे सांगता येईल. व्यक्तिकेंद्रित जीवनपद्धतिप्रस्थापनेचा आग्रह, मानव आणि निसर्ग यांच्यातील सेंद्रिय नात्याच्या आणि मानवामानवामधील प्रेमपूर्ण नात्याच्या अस्तित्वाचे भान, मानवी जीवनात स्त्रीपुरुषांतील प्रेमसंबंधांना पायाभूत आणि प्राथमिक स्थान असण्यावरचा विश्वास; हे सर्व रोमँटिक जाणीवव्यूहाचे मूलभूत घटक आहेत. केवळ बोलगाण्यांमधूनच नव्हे तर पाडगावकरांच्या सर्वच कवितांमधून हे घटक व्यक्त होत आले आहेत. म्हणून पाडगावकरांच्या कवितेमागील जाणीवव्यूह अस्सल रोमँटिक स्वरूपाचा आहे, असे म्हटले पाहिजे. पाडगावकरांचा रोमँटिक जाणीवव्यूह हा अस्सल असला तरी त्याच्या कक्षा त्यांच्या प्रारंभीच्या कवितांतच निश्चित झाल्या. नंतर त्या फारशा विस्तारल्या नाहीत आणि त्यांच्या जाणीवव्यूहाचा वेगवेगळ्या अंगांनी विकासही झाला नाही.

१९५२ साली लिहिलेली त्यांची 'जिप्सी' ही कविता या दृष्टीने पाहता येईल. 'जिप्सी' ही रूढ जीवनपद्धतीत राहणे नाकारण्याच्या आणि कुठलेही बाह्य बंधन न स्वीकारता आपल्या प्रेरणांप्रमाणे जगण्याच्या वृत्तीची प्रतिमा आहे. कुठलीही जीवनपद्धती प्रस्थापित झाली आणि तिचे व्यक्तीच्या प्रेरणांशी असलेले नाते संपुष्टात आले की ती उधळून देण्याची या कवितेच्या नायकाची प्रवृत्ती आहे. तो बालपणापासून आपल्या नैसर्गिक प्रेरणांना प्रतिसाद देत जगू पाहतो. म्हणूनच, झावळ्याच्या भिंती आणि पानांची कौले या निसर्गातील सामग्रीतून 'घर' बांधण्याचा प्रयत्न तो बालपणी करतो आणि हे घर बांधून होताच तो ते मोडून टाकतो. लहानपणी शाळेत भेटलेले 'जाड काचेची चाळिशी' लावलेले आणि बालक-विद्यार्थ्याकडे 'उग्र नजर' रोखणारे पंतोजी हे व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्याला विरोधी असणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेचे प्रतीक आहेत. त्यांच्या सहवासात या 'जिप्सी'चे मन रमत नाही. 'पानांच्या हातांनी झाडे' आणि 'शेपटीच्या झुबक्याने खार' हे निसर्गघटक त्याला बोलावीत राहतात. सारी लौकिक सुखे असूनही 'खोल खोल मनी' हा जिप्सी दुःखी असतो.

पाडगावकरांचा 'जिप्सी' ही रोमँटिक वृत्तीची प्रतिमा आहे. आणि ती त्यांच्या कवितेत प्रारंभापासून स्थिरावली आहे. त्यांच्या प्रारंभीच्या काळातल्या 'छोरी' (१९५३) या कवितेतली 'चौकोनी खोकेंच चार खिडक्यांचे' अशी असलेली शाळा आणि 'काढा पाट्या। कुठे उजळणी। चला दाखवा।' असा 'कर्कश आवाजाने हुकूम' देणारे मास्तर, हे प्रस्थापित, रूढावलेल्या आणि व्यक्तिविरोधी जीवनाची प्रतीके आहेत. येथे 'उजळणी' ही व्यक्तीच्या प्रेरणेपासून तुटलेली आणि यांत्रिकपणे करावयाची गोष्ट, याची प्रतिमा म्हणून आली आहे. अशी 'उजळणी' लिहून आणण्याचे नाकारणारा बाल-विद्यार्थी रोमँटिक हिरोची प्रतिमा आहे. चष्म्याची भिंगे रोखून मास्तरांनी या नायकाच्या हातावर छड्या मारणे, हा या प्रस्थापित, रूढ व्यवस्थेने केलेला 'न्याय' आहे. 'नजर खोडकर' असलेली 'छोरी' ही रोमँटिक नायिका आहे. तिने नायकाच्या दुखऱ्या हातावर ठेवलेली कैरीची फोड, ही व्यक्ती-व्यक्तींमधील प्रेमाच्या नात्याचे प्रतीक आहे. या कविता विशिष्ट घटनांची अभिव्यक्ती आहे, हे जरी खरे असले तरी या कवितांतील घटनांची उभारणी आणि घडण जाणिवांच्या ज्या विशिष्ट चौकटीवर झाली आहे ती रोमँटिक आहे. थोडक्यात, पाडगावकरांच्या प्रारंभापासूनच्या कविता या अस्सल रोमँटिक जाणिवांची अभिव्यक्ती आहेत असे म्हणावे लागते. याच रोमँटिक वृत्तीतून पाडगावकरांनी 'बोलगाणी' लिहिली आहेत.

पाडगावकरांच्या बोलगाणीमध्ये त्याच्या जाणीवव्यूहातील दोन्ही केंद्रे एकमेकांच्या विरोधात उभी ठाकली आहेत. आपल्या नैसर्गिक प्रेरणांप्रमाणे जगू पाहणाऱ्या, आपल्या सुखी जीवनाची स्वप्ने पाहणाऱ्या तरुणांचे जग हे या कवितेचे केंद्र आहे. हे तरुण आपल्या प्रेरणांना अनुकूल कृती करू पाहतात. अशा कृती करण्याचे स्वातंत्र्य त्यांना हवे आहे. पारंपरिक जीवन श्रद्धेने जगणारे आणि नव्या जीवनाला, तरुणांच्या इच्छा-आकांक्षा आणि प्रेरणाजन्य कृतींना विरोध करणारे, म्हणजेच वृत्तीने 'म्हातारे' झालेले जग हे या कवितेचे दुसरे केंद्र आहे. या दोन जगांतील संघर्ष ही या नाट्यकवितेची सामग्री आहे. या नाट्यकवितेची सामग्री असलेल्या दोन जगांचे अस्तित्व हे आपल्या आजच्या समाजाचे प्रत्यक्ष वास्तव आहे. आज आपल्या समाजात ही दोन्ही जगे अस्तित्वात आहेत. पारंपरिक, प्रस्थापित जीवनपद्धतीकडून एका नव्या जीवनपद्धतीकडे होणाऱ्या परिवर्तनाच्या गतिमान प्रक्रियेतून आजचा समाज जात आहे. जीवनाची पारंपरिक, प्रस्थापित मूल्ये आणि प्रमाणके, परंपरेने निश्चित केलेली जगण्यामागील उद्दिष्टे, विधिनिषेधांची प्रस्थापित चौकट, या सर्वांत वेगाने बदल होत आहेत. अशा सामाजिक परिवर्तनकाळावर ही कविता लिहिली गेली आहे. आजच्या प्रत्यक्षातल्या रोखठोक वास्तवावर ही कविता उभी केली गेली आहे. त्यामुळे ती ऐकताना

श्रोत्याला तिच्या बुडाशी असलेल्या वास्तवाच्या खरेपणाचा प्रत्यय येत जातो. त्यामुळे या कवितेचा कथनकर्ता आपल्या संभाषणातून या जीवनावर जे भाष्य करतो, या जीवनावर तो जे उपाय सुचवतो त्याचा श्रोत्यांकडून सहजपणे स्वीकार होऊ लागतो.

'बोलगाण्या'तील 'म्हाताऱ्या' जगाची जागा काही कवितांत माणसाच्या वाट्याला येणाऱ्या नियतीने घेतलेली असते. ज्यावर माणसाचे नियंत्रण नाही, अशा अनेक गोष्टी त्याच्या इच्छेप्रमाणे जगण्यात अडथळा आणत असतात. कधी ते स्वीकारून तर कधी त्यांवर मात करून माणसाला जगावे लागत असते. माणसाच्या जगण्याच्या मार्गात अडथळे आणणारी नियती ही माणसाला दुःखदायक वाटत असते. मग माणूस हताश होतो, अनेकदा तो जगणेच नाकारतो. या कवितेत तरुणांचे नवे जग हा एक घटक आणि त्याच्या विरोधी असलेले एक तर 'म्हातारे' जग किंवा त्याची जागा घेणारे मानवाच्या नियतीने घडवलेले वास्तव हा दुसरा घटक आणि त्यातून नाट्यपूर्ण तणाव, या सर्वांचेच दर्शन या बोलगाण्यांतून घडवले गेले आहे.

तरुण पिढीने जगावे कसे, जगताना कशाला महत्त्व द्यावे, जगताना विरोधी परिस्थितीला कसे सामोरे जावे, जगण्यातील मूल्यवान गोष्टी कोणत्या आणि त्यांची राखण कशी करावी, या संबंधीचे मार्गदर्शन ही कविता करत असल्यामुळे ती जगण्याला आवश्यक असणारे शहाणपण शिकवणारी कविता आहे. व्यक्तीच्या जीवनात अनेक समस्या सातत्याने उभ्या राहत असतात. जीवनपोषक मूल्ये धूसर होत असतात. अशावेळी त्याला मार्गदर्शनपर विचारांची गरज असते. तसेच व्यक्तिजीवनात जेव्हा अनेक दुःखाचे प्रसंग येतात तेव्हा त्याला सांत्वन करणाऱ्या विचारांची गरज असते. अशा परिस्थितीत त्याच्या भाषिक संस्कृतीतील शहाणपणाचा वाङ्मयीन ठेवा त्याच्या मदतीला येत असतो. जगण्याच्या प्रक्रियेत साह्यभूत ठरू शकतील अशी सुभाषिते, म्हणी, वाक्प्रयोग, कथा आणि काव्य, असे वाङ्मय भाषेत निर्माण झालेले असते. हे वाङ्मय व्यक्तीला शहाणपण शिकवत असते. यातले शहाणपण त्याला जगण्याच्या प्रक्रियेत आधारभूत होत असते. जात्यावरच्या ओव्यांमध्ये शहाणपण शिकवणाऱ्या कितीतरी ओव्या पाहावयास मिळतात. तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात असे शहाणपणाचे वाङ्मय विपुल प्रमाणात निर्माण केले आहे. म्हणून माणसावर जेव्हा काही विशिष्ट प्रकारच्या दुःखाचे, सुखाचे प्रसंग येतात तेव्हा तुकाराम महाराजांच्या अभंगातील अनेक चरण म्हणींसारखे वापरून अशा अनुभवांना अर्थ दिला जात असतो. रामदासांच्या दासबोधातील अनेक ओव्या असे शहाणपण शिकवणाऱ्या आहेत. अनंतफंदींचा 'बिकट वाट वहिवाट नसावी, धोपटमार्गा सोडू नको' हा शहाणपण शिकवणारा फटका प्रसिद्ध आहे. आधुनिक काळात काव्यनिर्मिती करणाऱ्या बहिणाबाई चौधरींच्या अनेक ओव्यांना शहाणपणाच्या वाङ्मयाचे रूप प्राप्त झाले आहे.

जेव्हा जेव्हा जीवनात मूलभूत परिवर्तन होत असते तेव्हा तेव्हा मानवी जीवनात अनेक पेचप्रसंग निर्माण होत असतात. कारण जीवनाचे उद्दिष्ट, व्यक्तीच्या गरजा, त्यांच्या प्रेरणांचे अग्रक्रम या सर्वांत बदल झालेला असतो. अशावेळी जीवनाचे नियंत्रण करणारी प्रस्थापित मूल्यव्यवस्था निकामी ठरू लागते आणि आवश्यक असणाऱ्या नव्या मूल्यव्यवस्थेची प्रस्थापनप्रक्रिया पूर्णत्वाला गेलेली नसते. अशा परिवर्तनकाळात शहाणपणाच्या नव्या वाङ्मयाची आवश्यकता असते. ते जर निर्माण झाले तर त्याच्या मार्गदर्शनाखाली नवे जीवन जगणाऱ्याला आत्मविश्वासपूर्वक जगता येऊ शकते. आजच्या काळात असेच जीवनपरिवर्तन सुरू आहे. आज सुरू असणाऱ्या जीवनपरिवर्तनाबद्दल पु.ल. देशपांड्यांच्या भाषेत बोलायचे तर हे जीवनपरिवर्तन 'रुद्राक्ष'संस्कृतीकडून 'द्राक्ष'संस्कृतीकडे होत आहे. पारलौकिक जीवनाच्या – म्हणजेच 'रुद्राक्ष' संस्कृतीच्या जागी लौकिक जीवन – म्हणजेच द्राक्षसंस्कृती केंद्रस्थानी आलेली आहे. आता लौकिक जीवन सुखाने जगण्याला प्राधान्य मिळू लागले आहे. या सुखासाठी अधिकाधिक उपभोग घेण्याची प्रवृत्ती वाढीला लागली आहे. उपभोगाची नवी नवी साधने उपलब्ध होऊ लागली आहेत. उपभोगसुलभतेसाठी अधिकाधिक अर्थार्जन करण्याची धडपड केली जाऊ लागली आहे. लैंगिक भुकेबद्दलचा दृष्टिकोन बदलू लागला आहे. लैंगिक भूक ही अन्नाच्या भुकेइतकीच नैसर्गिक असून तिची वांच्छा करण्यात आणि ती भागवण्यात अनैतिक असे काहीच नाही; हा दृष्टिकोन मूळ धरू लागला आहे. त्यामुळे ती भागविण्यात अडथळा ठरणारी पारंपरिक सामाजिक निषिद्धे अमान्य केली जाऊ लागली आहेत. काय खावे, काय प्यावे हा वैयक्तिक प्रश्न मानला जाऊ लागला असून त्यासंबंधीची पारंपरिक निषिद्धे गळून पडू लागली आहेत. मद्यपानाला अद्याप सामाजिक प्रतिष्ठा जरी प्राप्त झाली नसली तरी त्याकडे उदारपणे पाहिले जाऊ लागले आहे. जागतिकीकरण सुरू झाल्यापासून या परिवर्तनप्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. या परिवर्तनातून एक नवा वर्ग जरी अस्तित्वात आला असला तरी पारंपरिक जीवनव्यवस्था, मूल्ये आणि विधिनिषिद्धे टिकवून ठेवू पाहणारा वर्गही आज अस्तित्वात असून तो नव्या जीवनपद्धतीचा स्वीकार करू पाहणाऱ्या तरुण पिढीला उग्रपणे विरोध करतो आहे. अशा प्रकारचे दोन वर्ग असणारा आणि त्यांच्यातील संघर्षामुळे निर्माण होणाऱ्या ताणतणावाखाली जगणारा आजचा समाज पाडगावकरांच्या 'बोलगाण्यां'ची निर्मितिसामग्री आहे.

या दोन वर्गांखेरीज माणसाच्या जीवनात अडथळा ठरणारी नियती हा आणखी एक घटक 'बोलगाण्यां'च्या निर्मितिसामग्रीचा भाग आहे. माणसाच्या जगण्यात अडथळे उत्पन्न करणाऱ्या नियतीवर त्यांचे नियंत्रण नसते. जीवनातील तिचे अस्तित्व स्वीकारूनच माणसाला जगावे लागते. तरुण माणसाच्या विरोधात उभे राहणारे म्हातारे जग आणि माणसाच्या जगण्याला अडथळे आणणारी त्याच्या वाट्याला येणारी त्याची नियती अशा दोन्ही विरोधी घटकांना तोंड देत देत माणसाने कसे जगायचे हे पाडगावकरांची कविता सांगते. पाडगावकरांची ही शहाणपणाची कविता जीवनाकडे पाहण्याच्या त्यांच्या रोमँटिक भूमिकेतून जन्माला आली आहे.

जगण्यावर अढळ श्रद्धा बाळगणे हे या शहाणपणाच्या कवितेचे केंद्रीय सूत्र आहे. पारंपरिक जीवननिष्ठा बाळगणाऱ्या

वर्गाकडून होणारा विरोध आणि नियतीकडून जीवन कुंठित करून टाकणारे अडथळे वाट्याला येत गेल्यास माणसाचा जगण्यावरचा विश्वास उडतो. त्याची जिजीविषा क्षीण होते. अशा विरोधी परिस्थितीत जिद्दीने जगण्याची प्रेरणा जागृत ठेवण्याला शिकवणाऱ्या शहाणपणाची गरज असते. कुठलीही परिस्थिती असो माणसाने आपल्या जगण्यावर प्रेम केले पाहिजे, आपले जगणे नाकारण्याचा त्याला अधिकार नाही, हे जगण्याला आवश्यक असणारे पहिले सूत्र पाडगावकर आपल्या कवितेतून देतात. त्यांनी दिलेले हे सूत्र 'श्रेय' या त्यांच्या छोट्याश्या कवितेत व्यक्त झाले आहे. ते म्हणतात : 'कधी कधी। सगळंच कसं चुकत जातं!। नको ते हातात येतं,। हवं ते हुकत जातं!। अशा वेळी काय करावं?। सुकलेल्या झाडाला। न बोलता पाणी द्यावं!।' काहीही दोष नसतानाही जेव्हा माणसाच्या वाट्याला नको असलेल्या गोष्टी येतात तेव्हा तो वैतागतो, मनाला त्रास करून घेतो, आपल्या जीवनातील सुखशांती गमावतो आणि परिस्थितीला बोल लावत बसतो. परंतु त्याने असे काहीही न करता आणि बोलता ज्यामुळे 'जगणे' वाढेल, फुलेल-फळेल असे काही तरी केले पाहिजे! हे सांगण्यासाठी त्यांनी 'सुकलेल्या' झाडाला पाणी देऊन ते जगवण्याचा, वाढवण्याचा मार्ग अवलंबिला पाहिजे, हे व्यंजित करणारी 'सुकलेल्या झाडाला। न बोलता पाणी द्यावं!' ही अर्थपूर्ण प्रतिमा योजिली आहे.

बोलगाण्यात वारंवार 'गाणे' ही सूत्रप्रतिमा येते. सुंदर असलेले माणसाचे जीवन आनंदमय करून जगण्यासाठी योजलेली ही सूत्रप्रतिमा आहे. माणसाला ज्या ज्या गोष्टी करण्यात आनंद वाटतो, त्या त्या त्याने करत राहून आपले जगणे आनंदमय केले पाहिजे. म्हणजेच आपले जगण्याचे त्याने 'गाणे' बनवले पाहिजे. ज्यात माणसाला आनंद मिळतो ते करणे पाप आहे हे मानणारे एक 'म्हातारे' जग आपल्या भोवती आहे. ते जरी काहीही म्हणत असले तरी ज्यात आपल्याला आनंद मिळतो, ते ते करत राहून आपले जगणे आनंदमय बनवा, हे सांगताना – सिगारेट ओढणे, आमटीचा भुरका मारणे अशा दैनंदिन जीवनातील सामान्य गोष्टींचा उल्लेख 'यात काही पाप नाही' या कवितेत केला जातो. अशा गोष्टी करण्यात जर आनंद मिळत असेल तर या कवितेचा कथनकर्ता म्हणतो – 'विश्वास ठेवा, यात काही पाप नाही!। आनंदाने जगायचं नाकारणं। याचा सारखा आणि दुसरा शाप नाही!!' या कवितेतून हे सांगताना पाडगावकर माणसाच्या मूलभूत, नैसर्गिक प्रेरणांच्या तृप्तीला महत्त्व देतात. ज्या गोष्टी नैसर्गिक-स्वाभाविक आहेत त्या जरी रूढ नैतिकव्यवस्थेत 'पाप' मानल्या जात असल्या तरी त्या नैसर्गिक असल्यामुळे 'पाप' नाहीत; हे पाडगावकर सांगू पाहतात. म्हणूनच या कवितेचा कथनकर्ता एका 'अनैतिक' मानल्या जाणाऱ्या गोष्टीचा उल्लेख करतो. तो म्हणतो – 'नखऱ्याचं चालणं बघून। तुमचं काळीज धडधडतं। आणि एक उनाड पाखरू। तुमच्या मनात फडफडतं!। विश्वास ठेवा, यात काही पाप नाही!। आनंदाने जगायचं नाकारणं। याच्यासारखा आणि दुसरा शाप नाही!!' येथे आकर्षक स्त्रीला बघून मनात 'उनाड पाखराचे' फडफडणे कदाचित पारंपरिक दृष्टिकोनातून अनैतिक मानले जात असेल, तरीही ते पुरुषाच्या नैसर्गिक प्रेरणेतून घडलेले असल्यामुळे त्यात 'काही पाप नाही'. परंतु अशा स्त्रीच्या सुरक्षित अस्तित्वाला जर या प्रेरणेने धोका निर्माण केला तर ते मात्र 'पाप' ठरेल.

येथे थोडे विषयांतर करुन नैतिक बोध देणारे वाङ्मय आणि शहाणपणाचे वाङ्मय यांतला फरक स्पष्ट केला पाहिजे. नैतिक बोधपर वाङ्मयात व्यक्तिपरिस्थितिनिरपेक्ष परंतु सामाजिक स्वास्थ्याला पूरक-पोषक असलेली नैतिकता पुरस्कारिली जाते. 'सदा सत्य बोला', 'परस्त्री मातेसमान माना', अशा स्वरूपाची नैतिक विधाने बोधपर वाङ्मयात मांडली जातात. शहाणपण देणाऱ्या वाङ्मयात व्यक्तीच्या अस्तित्वाला, सुरक्षिततेला आणि सुखाला पूरक-पोषक असणारे वर्तन पुरस्कारिले जाते. प्रत्येक व्यक्ती, तिला येणाऱ्या अनुभवांतून स्वत:चे अस्तित्व, सुरक्षितता आणि सुख या गोष्टी लक्षात घेऊन वर्तनाच्या पद्धती निश्चित करीत असते. उदाहरणार्थ, रस्त्यावर जर कोणी जखमी अवस्थेत पडलेला असेल तर त्याच्या साह्याला कुठलाही पादचारी सरसावत नाही. हे अयोग्य असले तरी, अशा प्रसंगात आपण पोलिसाच्या कचाट्यात अडकू शकतो आणि त्याचा आपल्याला दीर्घकाळ त्रास होऊ शकतो, हे शहाणपण तो अनुभवातून शिकलेला असतो. त्याचे जखमीच्या मदतीला न जाणे हे नैतिकदृष्ट्या गैर आहे; पण आपल्या पोलिसांच्या तपासणीपद्धतीच्या संदर्भात ते शहाणपणाचे ठरणारे आहे. घरात जर सशस्त्र दरोडेखोर शिरले तर मुकाट्याने किल्ल्या त्यांच्या हवाली करणे शहाणपणाचे ठरते! नैतिकदृष्ट्या, कदाचित हे भ्याडपणाचे ठरेल. म्हणून शहाणपण हे व्यक्तीच्या प्रत्यक्ष जगण्याच्या संदर्भात ठरत असते आणि नैतिकता ही व्यक्तिपरिस्थितिनिरपेक्ष असते. शहाणपणाच्या वाङ्मयात व्यक्तीभोवतीची परिस्थिती आणि व्यक्तीच्या प्रेरणांची चौकट विचारात घेतली जाते. व्यक्तीभोवती निर्माण होणारी परिस्थिती दोन प्रकारची असते. एक विशिष्ट कालसंबद्ध परिस्थिती आणि दुसरी सार्वकालिक परिस्थिती. उदाहरणार्थ दंगल घडणे, ही विशिष्ट काळात घडणारी घटना आहे. जर दंगल सुरू झाली असेल तर जीव वाचवण्यासाठी पळणे, सुरक्षित जागी जाणे, शहाणपणाचे ठरेल. माणसांवर एकसारखी संकटे येत असतात. काही संकटांवर व्यक्ती सहजपणे मात करू शकते आणि काही संकटे अशी असतात की ती निश्चितपणे व्यक्तीच्या अस्तित्वाला धोकादायक ठरू शकतात. अशावेळी धोका घडवू शकणाऱ्या संकटाशी मुकाबला करण्याऐवजी माघार घेणे शहाणपणाचे ठरते. युद्धात पराभव दिसत असताना मराठे चटकन माघार घेत; तह घडवून आणीत. उलट राजपूत केशरियाचा आणि जोहाराचा मार्ग अवलंबीत, असे इतिहास सांगतो. मराठ्यांची अशी माघार घेणे हे शहाणपणाचे मानावे लागेल आणि युद्धात जिवंत राहून पराभव स्वीकारणे योद्ध्याच्या आत्मप्रतिष्ठेला, स्त्रियांच्या शीलाला बाधक ठरू शकणार असल्यामुळे पराभव होत असताना शत्रूंवर तुटून पडून वीरमरण स्वीकारणे आणि स्त्रियांनी आत्मबलिदान करणे नैतिक ठरू शकेल. म्हणून शहाणपणाच्या मार्गात व्यक्तीच्या हितसंबंधांचा विचार असतो तर नीतीत समाजव्यवहार सुरळीत चालावेत, त्यात सर्वच व्यक्तींना सुरक्षितता लाभावी यासाठी आवश्यक असणाऱ्या स्थलकालपरिस्थितिनिरपेक्ष जीवनमूल्यांचा

विचार असतो. शहाणपणाचे वर्तन व्यक्तीच्या नैसर्गिक प्रेरणासाफल्याच्या संदर्भात ठरत असते. नैतिक वर्तनात व्यक्तीच्या प्रेरणांचे नियंत्रण करणारी मूल्ये वर्तनप्रेरक असतात. म्हणून प्रत्येक शहाणपणाचे वर्तन नैतिक असेलच असे मानता येत नाही.

या संदर्भात पाडगावकरांची 'शहाणपणाचं गाणं' ही मिस्किल कविता विचारात घेता येईल. येथे व्यावहारिक शहाणपणा मिस्किलपणे सांगितला आहे. या कवितेत दोन प्रसंग आहेत. एक व्हिस्की पिऊन घरी जाताना आता घरी तोंड कसे देणार, असा प्रश्न पडणाऱ्या तरुणाचा आहे. त्यावर कथनकर्ता शहाणपणाचा सल्ला देतो की घरी जाताना गजरा घेऊन जावे, तिने दार उघडले की न बोलता तिच्याकडे 'भारावून बघत' राहावे आणि याप्रकारे येणारे संकट टाळावे! हा शहाणपणाचा सल्ला देताना नैतिकदृष्ट्या आक्षेपार्ह मानल्या जाणाऱ्या मद्यपानाला अप्रत्यक्षपणे मान्यता दिली गेली आहे. दुसरा प्रसंग, रस्त्याने चालत असताना अचानक एक स्त्री मोटारीतून उतरते आणि आपल्याकडे भारावून पाहत राहते. ती एकेकाळी आपल्या वर्गातली सुंदर मुलगी असते. कथनकर्ता म्हणतो की – 'ती खाली उतरणार!। आपण कसे (अंतर्बाह्य) फुलून येणार!!'... अशावेळी मुळीच नाही दाखवायचं। आपण आहोत आतून पेटलो!!।' मग तिला महागड्या हॉटेलात चहाला घेऊन जायचे, शामी कबाब मागवायचा, चहा प्यायचा. बाहेर पडताना ती म्हणणार 'बिल मी देणार'. अशावेळी जगावे की मरावे असे वाटत असणार. या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे; बिल तिला भरू द्यावे! या कवितेच्या शेवटी कथनकर्ता म्हणतो की – 'माणसानं शहाण्यासारखं वागावं। आणि मग या जगात आनंदानं जगावं।' या मिस्किलपणे सांगितलेल्या घटनांत मध्यमवर्गाचा व्यावहारिक शहाणपणा प्रकट झाला आहे. नैतिकदृष्ट्या असे वागणे स्वार्थीपणाचे म्हणून अयोग्य ठरू शकेल. थोडक्यात, नैतिकता आणि शहाणपणा या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. असे असले तरी अनेकदा नैतिकतेने वागणे शहाणपणाचे ठरू शकत असते.

आता आपण आनंदमय जगण्यासाठी योजलेल्या 'गाणे' या सूत्रप्रतिमेचा विचार करू. जगणे आनंदमय बनवण्यासाठी जगण्याला आवश्यक शहाणपणा प्राप्त झाला पाहिजे. जीवन सुरक्षित आणि आनंददायक करून जगण्याचा मंत्र देणारे शहाणपण हेच मुळात 'गाणे' आहे. हे शहाणपण दुसऱ्याने सांगणे आणि केवळ ऐकणे पुरेसे नसते. ते आपण स्वत: आत्मसात करायचे असते. हे सांगताना 'कोऱ्या कोऱ्या कागदावर। असलं जरी छापलं,। ओठांवर आल्याखेरीज। गाणं नसतं आपलं॥' असे 'गाणं कागदावरचं आणि आपलं' या कवितेचा कथनकर्ता म्हणतो. येथे *कागदावरचं गाणं* म्हणजे वाचले जाणारे किंवा इतरांनी सांगितलेले शहाणपण. म्हणून शहाणपण स्वत: आत्मसात केले आणि आचरणात आणले की त्यातून घडणारे जीवन 'गाणे' बनून जाते. 'हे गाणं मी तुझ्याकडून शिकलो' ही कविता या संदर्भात पाहता येईल. या कवितेत 'गाणे' ही प्रतिमा शहाणपणासाठी आणि शहाणपणामुळे घडणाऱ्या जीवनासाठी योजिली गेली आहे. यातला कथनकर्ता आपल्या प्रेयसीला उद्देशून बोलत आहे. विरोधी परिस्थितीत सुखाने जगायचे कसे, याचे शहाणपण या प्रेयसीला प्राप्त झालेले आहे. जगत असताना ती या शहाणपणाचा अवलंब करते आणि तिच्या जगण्याच्या पद्धतीतून यातला नायक जगण्याचे 'गाणे' शिकतो. 'जे आपलं असतं। ते आपलं असतं। जे आपलं नसतं। ते आपलं नसतं।' हे तिच्या जगण्याचे एक सूत्र आहे. त्यामुळे जे आपले नाही ते प्रयत्नपूर्वक आपले करण्याचा प्रयत्नच ती करत नाही आणि जे आपले आहे ते ती दूरही लोटत नाही. त्यामुळे तिचा कधी अपेक्षाभंग होत नाही आणि आपल्यांचा तिला सतत आधार मिळत राहतो. त्यामुळे जगण्यातले सुख आपोआप तिच्या पदरात पडते. हे सर्व या कवितेत अध्याहृत ठेवून ते सूचित केले गेले आहे. या संदर्भात 'हसत डोळे पुसून। आतून फळासारखा पिकलो।' एवढेच कथनकर्ता स्वत:बद्दल म्हणतो. जे आपले नाहीत त्यांना कथनकर्त्याने आपले मानले आणि आपला दु:खदायक अपेक्षाभंग करून घेतला, हे डोळे पुसण्याच्या उल्लेखातून सुचवले गेले आहे. अशा प्रसंगी तिच्याकडून 'जे आपलं नसतं। ते आपलं नसतं।' हे शहाणपण प्राप्त होते आणि तो 'हसत डोळे पुसून आतून फळासारखा पिकतो.' 'फळासारखा पिकणे' ही शहाणपण स्वीकारून सुखी, आनंददायक जगण्याची प्रतिमा आहे.

या जगात असह्य 'गोंगाट' आहे; बाळांना चिरडून टाकणारे पुस्तकांचे ओझे त्यांच्या पाठीवर आहे; कटुतेचा पाऊस आहे; अनेक घरे पेटवणाऱ्या दंगली आहेत आणि गावे बेचिराख करणारे द्वेषांचे बॉंब आहेत. तरीही माणसे 'गाण्याला ताल अजून देऊ शकतात'. अजून मुले 'फुगे घेऊन बागेत अजून धावू शकतात!' तसेच '... माणसं मायेने। बाळाचा पापा अजून घेऊ शकतात।' आणि 'कुंडीमधे फुलं अजून लावू शकतात!' माणसाने आपल्याभोवती जरी जीवनविरोधी वातावरण निर्माण केलेले असले तरी त्याच्या ठिकाणी असणाऱ्या जीवनानुकूल, जीवनपोषक नैसर्गिक प्रवृत्ती त्याला मारून टाकता आल्या नाहीत. शेवटी 'माणसं अजून गाऊ शकतात' या कवितेचा कथनकर्ता, 'गाणे' बनलेल्या जीवनाबद्दल आणि असे जीवन ज्यामुळे मिळते त्या स्त्रीपुरुषांच्या प्रेमाबद्दल म्हणतो : 'शीळ घालीत माणसं अजून गाऊ शकतात। हातात हात गुंफून अजून जाऊ शकतात।'

माणसाचे जीवन, त्याचे जगणे 'गाणे' बनवणारा निसर्ग हाही एक घटक आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातील संवादी असणाऱ्या रक्ताच्या नात्याची जाणीव हा रोमँटिक जाणीवव्यूहाचा एक घटक आहे. रोमँटिक प्रवृत्तीच्या पाडगावकरांच्या या कवितेतही हा घटक व्यक्त झाला आहे. एकीकडे मानवाला त्याच्या सहोदर असलेल्या निसर्गापासून तोडणारे आणि मानवी जीवनात दु:ख निर्माण करणारे मानवनिर्मित जग आहे आणि दुसरीकडे मानवाशी संवाद साधून त्याचे जीवन अर्थपूर्ण बनवणारा निसर्ग आहे. हा निसर्ग मानवी जीवनाचे 'गाणे' बनवून टाकतो ही जाणीव पाडगावकरांनी 'अजून एक सूर आहे' या कवितेत व्यक्त केली आहे. कारखान्यांचा 'कुंद काळा धूर' पिऊन पावसासाठी तरसणारी घरे जेव्हा पावसाच्या सरी कोसळू लागतात तेव्हा या कवितेच्या कथनकर्त्याची 'तडकलेली कौले' सांधली जातात. येथे 'घरे' ही माणसांची आणि 'कौले' ही घराला संरक्षण देणाऱ्या मनाची प्रतिमा आहे. 'तडकलेली कौले' सांधली गेली की मग

घराबाहेरचे हिरवे झाड गोड हसत असल्याचे जाणवते. चोचीत एक कोवळा किरण घेऊन येणारे पाखरू या कथनकर्त्याला एक 'गाणे' देऊन जाते. मग कथनकर्त्याला 'मला कळतं। माणसाचं। मरण अजून दूर आहे। प्रेम करीत। जगायला। या जगात अजून एक सूर आहे।' याची जाणीव होऊ लागते.

मानवाभोवती त्याला नको असलेले वास्तव असते. ते बदलण्याची ताकद मानवामध्ये नसते. अशावेळी एक चमत्कार घडू शकतो. जे घडावे असे आपण अपेक्षित असतो, जे अतिशय सुखद, मन प्रसन्न करून टाकणारे असते तेच घडत असल्याचे आपल्याला जाणवते. 'चमत्कार' या कवितेचा कथनकर्ता म्हणतो – आपण आपले डोळे हलकेच मिटतो आणि पुन्हा हलकेच उघडतो; आणि चमत्कार घडतो. हे जग बदलून जाते. कावळ्याच्या कर्कश ओरडण्यातून एक अनवट बंदीश उमलू लागते. 'पलिकडच्या आगगाडीची खडखडसुद्धा। अनोख्या आनंदाने भरू लागते!' 'प्रथमच जसं काही जाणवतं :। आपल्या आतून वहात असतो एक झरा। अगदी खरा... अगदी खरा!' जगातील नको वाटणाऱ्या घटनांना आपणच हव्या असणाऱ्या घटनांचे रूप देऊन त्यांचा उपभोग घ्यायचा असतो. आपला आनंद हा महत्त्वाचा. तो आपणच मिळवायचा असतो. तो मिळावा असे या जगात घडत राहावे, आणि ते घडत नाही म्हणून आपण खंतावत राहावे, हा मार्ग चुकीचा असल्याचे शहाणपण ही कविता देते. 'मनमोकळं गाणं' यातला कथनकर्ता म्हणतो : 'आपण असतो आपली धून। गात रहा। आपण असतो आपला पाऊस। न्हात रहा!'

जिवंत असेपर्यंत जगणे अपरिहार्य असल्यामुळे हे जगणे अर्थपूर्ण आणि आनंददायक करून जगले पाहिजे आणि आपल्या जगण्याला असे रूप देणे म्हणजे आपल्या जगण्याचे 'गाणे' बनवणे; ही 'बोलगाण्यां'तील केंद्रीय जाणीव असल्याचे आपण पाहिले. स्त्रीपुरुषांतील प्रेम आणि त्यांच्यातील प्रेमपूर्ण सहजीवन माणसाच्या जगण्याला 'सुंदर गाणे' बनवत असते; हा पाडगावकरांच्या जाणिवांचा दुसरा प्रमुख घटक आहे. प्रेम हे व्यक्तिविरोधी असलेल्या कष्टप्रद, दुःखदायक, असुरक्षित, निरस आणि 'गद्यप्राय' अशा जीवनाचे सुंदर गाणे कसे बनवते, याचे दर्शन पाडगावकरांनी प्रेमविषयक बोलगाण्यातून सांगितले आहे. म्हणून पाडगावकरांनी 'बोलगाण्या'त प्रेमावर आणि प्रेम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शहाणपणावर प्रामुख्याने 'बोलगाणी' लिहिली आहेत. प्रेमाचा अनुभव नसलेला परंतु प्रेमात पडण्यासाठी इच्छुक असणारा तरुण हा या 'बोलगाण्या'चा श्रोता आहे. प्रेमाबद्दल या तरुणांशी संवाद साधताना या कवितांच्या कथनकर्त्याने स्वीकारलेली आपुलकीची, श्रोत्याला विश्वासात घेण्याची आणि कधी नर्मविनोद करीत मिस्किलपणे तर कधी गंभीरपणे बोलण्याची पद्धती या कवितांना अर्थपूर्ण भावनिक स्वर मिळवून देतो. कथनकर्त्याच्या भावनिक पातळीवरील अशा भूमिकांमुळे या कवितांतील सर्वपरिचित असलेला प्रेमविषयक तपशील जसा नव्याने अर्थपूर्ण बनून जातो तसाच तो श्रोत्यांना या 'बोलगाण्या'त गुंतवूनही ठेवतो. या बोलगाण्यांना मिळालेल्या लोकप्रियतेचे रहस्य श्रोत्यांना खिळवून ठेवण्याच्या त्यांच्या क्षमतेतही आहे. परंतु याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, रोमँटिक पातळीवरच्या पण खास पाडगावकरांच्या म्हणाव्या लागतील अशा प्रेमाबद्दलच्या जाणिवांची अभिव्यक्ती या कवितांतून झालेली आहे. त्यामुळे त्यांची ही कविता जशी शहाणपणाची बनते तशीच ती पाडगावकरी प्रेमकविताही बनते. श्रोत्यांना संबोधित करणारी आणि कथनकर्त्याच्या आत्मकथनाचे रूप घेणारी, अशा दोन प्रकारांत पाडगावकरांनी ही कविता लिहिलेली आहे. प्रियकराने प्रेयसीला उद्देशून केलेली आणि प्रेमासंबंधीच्या स्वतःच्या अनुभवाचे कथन करणारी अशा दोन रूपांत यातली आत्मकथने व्यक्त झालेली आहेत. यातली आत्मकथनरूप कविता पाडगावकरांच्या प्रेमासंबंधीच्या रोमँटिक जाणिवा अभिव्यक्त करणारी कविता आहे.

'प्रेम म्हणजे प्रेम असतं', ह्या प्रेम म्हणजे काय, हे श्रोत्यांना सांगणाऱ्या आणि अतिशय लोकप्रिय झालेल्या कवितेचा येथे फक्त निर्देश करणे पुरेसे आहे. प्रेमात पडल्यावर कोणकोणते अनुभव प्रियकराला येतात, आणि हे अनुभव सर्व प्रेमिकांसाठी सारखेच कसे असतात, हे श्रोत्यांना मिस्किलपणे सांगणाऱ्या 'प्रेमात पडलं की' या कवितेचाही येथे उल्लेख पुरेसा आहे.

प्रेमाच्या साफल्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतले जीवनही कसे गाणे बनते, याचे दर्शन 'तिनं लाजून होय म्हटलं' या श्रोतासंबोधित आत्मकथनरूपातील कवितेत पाडगावकरांनी घडवले आहे. या कवितेतला नायक दरिद्री, निम्न मध्यमवर्गातला आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही तो जिच्यावर प्रेम करतो तिला लग्नासाठी मागणी घालतो. आणि 'मी तिला विचारलं, तिनं लाजून होय म्हटलं। सोनेरी गिरक्या घेत मनात गाणं नाचत सुटलं!।' असा अनुभव त्याला येतो. त्याचे कष्टसाध्य, असुखी जीवन प्रेमसाफल्याच्या क्षणीच 'गाणे' बनून जाते. त्या धुंदीत तो तिला इराण्याच्या हॉटेलात घेऊन जातो आणि चहासोबत मस्कापाव मागवतो. तो म्हणतो : 'तीसुद्धा ऐपत नव्हती। असली चैन झेपत नव्हती। देवच तेव्हा वाली। खिशातलं पाकीट खाली!' म्हणजे हॉटेलचे बिलही त्याला नव्हे तर त्याच्या प्रेयसीलाच चुकवावे लागते. हा नायक निम्न मध्यमवर्गीय असल्यामुळे तो जगात वावरताना भिऊन, गरिबीने वागत असला तरी प्रेमाच्या साक्षात्कारामुळे 'त्या दिवशी रस्त्याने। सिंहासारखा होतो हिंडत। पोलीससुद्धा माझ्याकडे। आदरपूर्वक होते बघत !' असा आत्मविश्वास त्याच्यात आला आहे. आपला प्रेमानुभव दुर्मिळ, अलौकिक आणि व्यवहारापलीकडचा कसा हे सुचवण्यासाठी हे आत्मकथन ऐकणाऱ्या श्रोत्यांना तो विचारतो : 'तुमचं लग्न ठरवून झालं?। कोवळपण हरवून झालं?।' प्रेमाच्या साक्षात्कारामुळे जीवनाला कोवळेपणा प्राप्त होतो, प्रेम न करता ठरवून लग्न केल्यामुळे तुम्ही हा कोवळेपणा गमावला असल्याचे हा कथनकर्ता सुचवत आहे. प्रेमाचा संबंध नसलेले लग्न हा केवळ रोखठोक व्यवहार बनतो, हे सांगण्यासाठी तो विचारतो – हुंडाबिंडा, मानपान हे सर्व घेऊन ते झालं? नंतर तो म्हणतो : 'तुम्हांला हे सांगून तरी कळणार कसं?। असलं गाणं तुमच्याकडे वळणार कसं?। पण ते जाऊ द्या,। माझं गाणं गाऊ द्या :।' पुढे नोकरी, मुले-बाळे, त्यांचे संगोपन आणि शिक्षण हे सर्व इतरांप्रमाणेच आणि रीतीप्रमाणेच

झाले असले तरी इतरांत आणि आपल्यात असलेला एक फरक आहे, तो म्हणजे – 'मी तिला विचारलं, तिनं लाजून होय म्हटलं :। सोनेरी गिरक्या घेत मनात गाणं नाचत सुटलं।' इतरांच्या जीवनात न आलेला 'जीवनाचे गाणे' बनण्याचा क्षण आपल्या जीवनात प्रेमसाफल्यामुळे आला, याची कृतार्थता प्रकट करून हे आत्मकथन संपवले जाते.

मानवी जीवनात प्रेमभावनेला लाभलेले असे असाधारण स्वरूप सांगितल्याशिवाय प्रेमासंबंधीच्या शहाणपणाचे मूल्य तरुणांना कळणार नाही म्हणून प्रेमाचे शहाणपण देणाऱ्या कवितांबरोबरच प्रेमाची महती सांगणाऱ्या कविता 'बोलगाणी' म्हणून पाडगावकरांनी लिहिल्या असाव्यात. प्रेम 'असे असे' असते एवढे कळणे पुरेसे नसते. तर त्याचा प्रत्यक्षात अनुभव घेणे गरजेचे असते. 'गाणं कागदावरचं आणि आपलं' या बोलगाण्यातून हा संदेश पाडगावकर तरुणांना देतात. या कवितेत 'मुक्कामाला जाणे' ही प्रतिमा प्रेमपूर्तीसाठी योजिली गेली आहे. ते विचारतात 'मला सांगा व्हायचं कसं?। मुक्कामाला जायचं कसं?। घट्ट जवळ घेतल्याखेरीज। माणूस नसतं आपलं!। कोऱ्या कोऱ्या कागदावर। असलं जरी छापलं। ओठांवर आल्याखेरीज। गाणं नसतं आपलं!' मग 'आपण ओठ लावल्याखेरीज पाणी नसतं आपलं' आणि 'फुलपाखरू झाल्याखेरीज फूल नसतं आपलं' अशा प्रतिमांमधून प्रेमपूर्ती कशी केली पाहिजे याचे शहाणपण शिकवले जाते.

प्रेम करत असताना प्रियकराला प्रेयसीच्या प्रेम करण्याच्या आणि प्रेम करवून घेण्याच्या पद्धतीचा अनुभव नसतो. त्यासाठी यासंबंधीचे तिचे मानसशास्त्र तरुणांना समजावून सांगण्याची गरज असते. 'खाली डोकं वर पाय' या कवितेत हे शहाणपण मिस्किलपणे दिले गेले आहे. प्रेयसीच्या प्रकट बोलण्यातल्या अर्थापलीकडे आणि सूचित होणाऱ्या अपेक्षांच्यापलीकडे बरेच काही महत्त्वाचे असते आणि ते प्रियकराने समजून घेऊन प्रेमाची कृती करायची असते. पण हे अनेक प्रियकरांना लक्षात येत नाही. त्यासाठी 'खाली डोकं वर पाय'चा कथनकर्ता अशा प्रियकरांच्या मदतीसाठी त्यांना सल्ला देऊ लागतो. तो म्हणतो : 'तिला जेव्हा वाटत असतं। तुम्ही जवळ यावं। जवळ यावं याचा अर्थ। तुम्ही जवळ घ्यावं!' पण हे न ओळखता – 'अशा क्षणी। चष्मा पुसत। तुम्ही जर शुद्ध काव्य बोलत बसला। व्यामिश्र अनुभूती। शब्दांनी तोलत बसला,। तर काय,। तर काय? खाली डोकं वर पाय!!' ती जेव्हा पावसात भिजायचं म्हणते तेव्हा तुम्ही चिंब भिजून तिला घट्ट जवळ घ्यावं असा त्याचा अर्थ असतो. अशा वेळी जर तुम्ही खोकल्याचं औषध बाहेर काढलं तर काय? 'खाली डोकं वर पाय!' या कवितेत वारंवार येणाऱ्या 'खाली डोकं वर पाय!' या उक्तीतून प्रियकराचा भाबडेपणा आणि प्रेमासंबंधीचा अजाणपणा कथनकर्त्याने मिस्किलपणे प्रकट केला आहे.

जीवनाला अर्थपूर्णता मिळवून देणाऱ्या आणि त्याचे गाणे बनवणाऱ्या प्रेमावर पारंपरिक समाजजीवनामध्ये अनेक बंधने घातली गेली आहेत. प्रेमासंबंधी अनेक निषिद्धे लागू केली गेली आहेत. त्यामुळे तरुणांना प्रेमाचा मुक्तपणे अनुभवच घेता येत नाही. तरुणांनी प्रेमासंबंधीची ही प्रस्थापित निषिद्धे नाकारली पाहिजेत आणि प्रेमावर लादलेली ही बंधने तोडली पाहिजेत. पाडगावकरांची ही 'बोलगाणी' हे करू पाहणाऱ्या तरुणांच्या मदतीला येतात. या बोलगाण्यात प्रेम करणाऱ्या तरुणांची बाजू घेऊन त्यांचे समर्थन केले जाते. त्यासाठी 'म्हाताऱ्या' पिढीच्या या वृत्तीला दूषण देणारे चार शब्द ऐकवले जातात. 'म्हाताऱ्या'च्या या वृत्तीचा उपहास केला जातो. यासाठी प्रथम 'म्हातारपणावरचं तरुण गाणं' या बोलगाण्यातून म्हाताऱ्यांनाच प्रेमाचे शहाणपण शिकवले गेले आहे. या गाण्यातला कथनकर्ता म्हाताऱ्यांना विचारतो : 'आयुष्य हे रंगून जगणं खरं नव्हे?' आणि त्यांना सल्ला देतो की, '... आधी एवढंच तुमच्या कानात सांगतो :। वय तुमचं साठ असो सत्तर असो। तिच्यासाठी फुलांची आणा वेणी;। मोरासारखा अंधार फुलून आल्यावर। मझा आणते थोडीशी काजूफेणी!' म्हाताऱ्यांना असा सल्ला देण्याबरोबरच पाडगावकरांनी जीवन समरसून जगलेल्या आणि म्हातारपणीही तसेच जगणाऱ्या आजोबांचे व्यक्तिचित्र 'नसलेल्या आजोबांचं असलेलं गाणं' या बोलगाण्यात रेखाटले आहे. आजोबांचा नातू या गाण्याचा कथनकर्ता आहे. आजोबा नुकतेच देवाघरी गेले आहेत. परंतु त्यांच्या नातवाला त्यांची आठवण येते. याचे कारण माणसाने जसे जगायला हवे तसेच आजोबा जगत आले आणि जगण्याच्या प्रारंभावस्थेत असलेल्या या नातवाला त्यांचे हे जगणे भावले आहे. ते नातवाशी मित्रासारखे वागतात. त्यामुळे नातूही त्यांना 'आजोबा, तुम्हांला मैत्रिणी होत्या का हो?' असा प्रश्न विचारू शकतो आणि आजोबाही त्याला त्या खूप असल्याचे सांगतात आणि त्याचवेळी आजी तेथे आल्याबरोबर आपली जीभ चावतात. असे आजोबा सतत आपल्याशीच गाणे गुणगुणणारे, ढेकर दिल्यावर 'आय ॲम जस्ट ढेकेरिंग' असा पोरकट विनोद करणारे आणि नातवाला 'बेटा, एक लक्षात ठेव। एकटं एकटं जाता आलं पाहिजे। स्वत:ला स्वत:शीच गाता आलं पाहिजे!'। असा उपदेश करणारे. म्हातारपणातही आपले मानसिक तारुण्य टिकवणारे.

परंतु अजून 'म्हातारी' न झालेली पिढीही जेव्हा म्हाताऱ्यांसारखे बोलू वागू लागते तेव्हा पाडगावकरांच्या बोलगाण्यांत त्यांचा उपहास केला जातो. 'प्रेम म्हणजे प्रेम असतं' या कवितेचा कथनकर्ता म्हणतो : 'प्रेमबीम झूठ असतं। म्हणणारी माणसं भेटतात। आम्ही कधी बायकोला फिरायला नेलं नाही। पाच मुलं झाली तरी प्रेमबीम कधीसुद्धा केलं नाही। ... त्याला वाटलं मला पटलं!।' परंतु ते जरी असे वागत नसले तरी त्यांच्या मनात मात्र प्रेमाबद्दल, शृंगाराबद्दल दाबले-दडपले गेलेले सुप्त आकर्षण असते. अशीच एक व्यक्ती यासंबंधीचा कबुलीजबाब 'खरं काय वाटतं त्याचं गाणं' या बोलगाण्यात देत आहे. हा कबुलीजबाब उपहासाच्या स्वरात व्यक्त केला गेला आहे. ती म्हणते : 'बाई आणि बुवा यांचं। कुठेही जर लफडं दिसलं। ... मग मी तुमच्यासारखा कडक चिडतो,। उच्च नैतिक मूल्यांना तडक भिडतो!!' पण आपल्यालाही 'वाटत असतं, धडक देऊन। तडक त्याला हाकलून द्यावा;। आणि मग तिच्याकडून हळूच तिचा पत्ता घ्यावा!!' प्रेम करत आपले 'गाणं' मुक्तपणे गाणाऱ्या तरुणांना विरोध करणाऱ्या 'म्हाताऱ्या' जगाला ताडन करणारा उपहास पाडगावकरांच्या 'तुमचं काय गेलं?' या आणि यासारख्या अनेक कवितांत केला गेला आहे आणि अशांकडे लक्ष न देता मुक्तपणे

पाडगावकरांची ही बोलगाणी रंजनाच्या गरजा भागवतात म्हणून लोकप्रिय नाहीत. आजचा तरुण ज्या प्रकारचे जीवन जगू पाहतो आहे, ते जगण्यासाठीचा शहाणपणा त्याला देऊन ते जगण्यातील त्याचा आत्मविश्वास जागृत करतात म्हणून ती लोकप्रिय झाली आहेत.

प्रेम करण्याचा सल्ला 'आपलं गाणं आपणच गावं' या आणि यांसारख्या कवितांतून दिला गेला आहे.

माणसाच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर बंधने घालणाऱ्या मानवनिर्मित संस्थांना आणि व्यवस्थांना विरोध हा रोमँटिसिझमचा महत्त्वाचा भाग आहे. पाडगावकरांच्या कवितेतून तो प्रारंभापासून व्यक्त झाला आहे. 'बोलगाणी' या संग्रहातही तो अपरिहार्यपणे प्रकट झाला आहे. याचे कारण नैसर्गिक प्रेरणांच्या तृप्तीला महत्त्व असलेल्या व्यक्तिकेंद्रित जीवनपद्धतीचा पुरस्कार करून अशा जीवनाचे शहाणपण देणारी ही कविता आहे. अशी कविता पूर्वप्रस्थापित असलेल्या आणि मानवावर लादल्या गेलेल्या जीवनपद्धतीला, जीवनव्यवस्थांना नकार देणारीच असणार. 'बोलगाणी'मधल्या 'अगदी नक्की डोकं फिरलं' आणि 'होय्योचं गाणं' यांत हा विरोध स्पष्टपणे व्यक्त केला गेला आहे.

कविता, किंबहुना एकूण वाङ्मय हे अनेक हेतूंच्या सिद्धीसाठी लिहिले जाते. ते केवळ कलाप्रत्यय देण्यासाठीच लिहिले जावे आणि त्यामागे कलाप्रत्ययाशिवाय अन्य हेतू नसावा, असा आग्रह धरता येत नाही. पाडगावकरांनी आपली काव्यनिर्मिती विविध हेतूंसाठी केली. कला कोणत्याही उद्दिष्टासाठी लिहिलेली असो, तिची कलात्मकता ही कलामूल्यांच्या साह्याने ठरत असते. हे त्यांच्या 'बोलगाण्यां'नाही लागू आहे. त्यांची सर्वच 'बोलगाणी' ही कलाकृती ठरणार नाही, असे जरी असले तरी या संग्रहातील 'इतक्या दुरून आलात तर' यासारखी बोलगाणी, त्यांच्या छोट्या स्वरूपाच्या कविता आणि प्रेमानुभव साकार करणाऱ्या कविता एकाच वेळी शहाणपणाही शिकवतात आणि त्या चांगल्या कलाकृतीही असतात.

पाडगावकरांच्या कवितेचे खरे सामर्थ्य त्यांच्या वैणिक जातीच्या कवितेत आहे. बोलगाण्यांपैकी अनेक कविता वैणिकतेची अनुभूती देणाऱ्या कविता आहेत. 'मन कसं धुंद आहे', 'एकटं असावसं वाटतं', अशा काही कवितांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. वैणिक जातीची त्यांची खास प्रतिमासृष्टी अनेक बोलगाण्यांत भेटते आणि पाडगावकरी प्रतिभेचा प्रत्यय देते. वैणिक स्वरूपाची प्रतिमा वाचकमनात केवळ एक अनामिक, शब्दातीत भावाचे संक्रमण करून त्याचा प्रत्यय घडवते. अशा प्रतिमांना संकल्पनांचा आधार नसतो. त्यामुळे या प्रतिमांचा अर्थ सांगताच येत नाही; त्यांचे स्पष्टीकरण देता येत नाही. ती केवळ अनुभवता येते. चांगली संकल्पनाधिष्ठित प्रतिमा अर्थांचे अनेक पदर प्रसवीत असते. परंतु वैणिक जातीची प्रतिमा मात्र सरळपणे एक मनोवस्था वाचकाच्या मनात संक्रात करते. 'नसलेल्या आजोबाचं असलेलं गाणं' यातला नातू जगात नसलेल्या आजोबांबद्दल जेव्हा 'आजोबांच्या खोलीत आता। धुकं... धुकं... धुकं...' असे म्हणतो तेव्हा त्याची मनोवस्था आपल्याला अनुभवायला येते. परंतु या प्रतिमेच्या अर्थाचे स्पष्टीकरण देता येत नाही. 'मन कसं धुंद आहे' या कवितेतल्या 'तुझं माझं असणं हीच भाषा आहे!' ही आणि 'मी आज। तुझ्यावरचा कवितेचा हळुवार छंद आहे।' ही प्रतिमाही या संदर्भात उल्लेखता येईल. पाडगावकरांच्या गीतांनाही या प्रकारच्या प्रतिमासृष्टीने एक वेगळाच काव्यात्म दर्जा मिळवून दिला आहे.

पाडगावकरांची ही बोलगाणी रंजनाच्या गरजा भागवतात म्हणून लोकप्रिय नाहीत. आजचा तरुण ज्या प्रकारचे जीवन जगू पाहतो आहे, ते जगण्यासाठीचा शहाणपणा त्याला देऊन ते जगण्यातील त्याचा आत्मविश्वास जागृत करतात म्हणून ती लोकप्रिय झाली आहेत. ही गाणी वाचण्यापेक्षा ती ऐकणे अधिक अर्थपूर्ण असल्यामुळे ती पाडगावकरांच्या तोंडून ऐकण्यासाठी तरुण गर्दी करतात. या 'बोलगाण्यां'मुळे आधुनिक मराठी संस्कृतीची गरज जशी भागवली गेली आहे तसेच मराठी कविताही संपन्न झाली आहे.

*(मूळच्या अधिक विस्तृत हस्तलिखिताचा संक्षेपित भाग)*

*(मार्च २०१५)*

- प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक आहे.
- थोड्यात गोडी आणि फारात लबाडी.
- लाड करणारी आई असते म्हणून मुलाचे बोबडे बोलणे शोभते. क्षमाशील परमेश्वर आहे म्हणून मनुष्याचे अज्ञान शोभते.
- उत्तम कल्पनांचे विपर्यास हीन असतात. ताज्या फळासारखे आरोग्यकारक अन्न नाही, तर कुजलेल्या फळासारखे आरोग्यनाशकही नाही.
- स्वधर्म सहजप्राप्त असतो. मुलाला दूध पाजण्याचा धर्म आई मनुस्मृतीतून शिकत नाही.
- गाढ झोपेत विचारांचा विकास झाल्याचा मला पुष्कळ वेळा अनुभव येतो. पेरलेले बी मातीत झाकले म्हणजे लोपलेसे भासते, पण आतल्या आत विकसत राहते. तसेच हे दिसते.
- बुडत्याशी सहानुभूती म्हणजे त्याच्याबरोबर बुडणे नव्हे, तर स्वतः तरून त्याला वाचविण्याचा प्रयत्न करणे.

**– विनोबा**

# जादू जयपूरच्या लिटफेस्टची

**मृण्मयी रानडे**

जेएलएफचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे हा फेस्ट पूर्णपणे मोफत आहे. झी, गूगल, ब्रिटिश एअरवेज, ॲमॅझॉन.इन, यूएन विमेन, डीएनए, दैनिक भास्कर, रेडिओ मिर्ची, पत्रिका ग्रूप, कोकाकोला, पर्यटन विभाग वगैरेंसारख्या तगड्या प्रायोजकांमुळेच हे साध्य होतं. परंतु म्हणून एकही पैसा न देता पाच दिवसांत खूप महत्त्वाचा, असामान्य अनुभव एक सामान्य माणूस घेऊ शकतो, तेही सुस्थितीत, हे मान्य करावंच लागतं.

साधारण सप्टेंबरमध्ये पुढच्या वर्षीच्या जयपूर लिटरेचर फेस्टिवलच्या (जेएलएफ) तारखा येतात. त्या आल्या, की जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पाच दिवस होणाऱ्या या फेस्टिवलला जाण्याची तयारी सुरू करायची, हे गेल्या तीन-चार वर्षांपासून ठरून गेलेलं. विमान परवडणार असेल तर तिकीट लगेच काढायचं, ट्रेनने जायचं असेल तर नोव्हेंबरपर्यंत थांबायचं. हॉटेलही लगोलग बुक करायचं. मुख्य म्हणजे जेएलएफच्या वेबसाइटवर जाऊन प्रतिनिधी म्हणून नोंदणी करायची. पुढचे दिवस वेळापत्रक कधी येणार, कोण लेखक/कलाकार असणार आहेत, याची माहिती मिळण्याची वाट पाहायची. वेळापत्रक डिसेंबरमध्ये येतं. ते पाहून काय काय चुकवून चालणारच नाही, याचा विचार करायचा. आपण जाणार आहोत, या विचारानेच येणारा थरार अनुभवायचा. (मी जातेय बरं का, असं इतरांना सांगून जळवलं तर हा थरार अधिक जाणवतो, हा तीन वर्षांचा स्वानुभव!) एकीकडे थंडी कितपत आहे याचा अंदाज घेऊन ऊबदार कपड्यांची जमवाजमव करायची. (हो, मुंबईकरांना जमवाजमव करावीच लागते. आमच्याकडे वुलन्स वा थर्मल नसतात – नेहमी लागत नसल्याने.) आणि अखेर जेएलएफच्या पहिल्या दिवशी जयपूरला पोचायचं.

डिग्गी पॅलेस या राजवाड्याच्या परिसरात गेली काही वर्षं हा फेस्टिवल भरवला जातो. जयपूरमधल्या रिक्षावाल्यांना तो अनेकदा माहीतही नसतो, कारण तो मुख्य रस्त्याच्या आत आहे. मग 'एसएमएस हॉस्पिटल के सामने' असं सांगून चालतं. एसएमएस म्हणजे सवाई मानसिंग; जयपूरमध्ये या एसएमएसच्या नावाने अनेक संस्था आहेत. डिग्गी पॅलेसला पोचलं, की हातातलं आपलं ओळखपत्र दाखवून आपल्या नोंदणीनुसार जेएलएफचं ओळखपत्र घ्यायचं नि गळ्यात अडकवायचं. पुढचे पाच दिवस हे ओळखपत्रच आपल्यासमोर असीम आनंदाचा, माहितीचा खजिना उघडणार असतं.

ओळखपत्रासोबत मिळतं वेळापत्रक. पाच दिवस, सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत सहा ठिकाणी प्रत्येकी तासभराची दीडशे ते दोनशे सत्रं होणार असतात. आपण एका वेळी एकाच ठिकाणी असू शकतो, हे आपलं सगळ्यात मोठं दुर्भाग्य असं वाटायला लावणाऱ्या व्यक्ती या सत्रांमध्ये बोलणार असतात. अशा वेळी हॅरी पॉटरची मैत्रीण हर्मायनी ग्रेंजर टाइमट्रॅव्हल करून अनेक विषय अभ्यासते, तशी सोय हवी होती, असं प्रकर्षाने वाटतं. उदाहरणार्थ, यंदा पहिल्या दिवशी जावेद अख्तर, होमी के. भाभा, जीत थयिल, देवदत्त पटनाईक, गिरीश कर्नाड अशी मंडळी वेगवेगळ्या सत्रांमध्ये होती, सकाळी सव्वा अकरा ते दीड या वेळेतल्या दोन सत्रांमध्ये. मग कुठलं तरी येडंबागडं लॉजिक लावून गिरीश कर्नाड चालेल हुकला तरी, पटनाईकांना ऐकू असं ठरवायचं नि त्या मांडवात जायचं. डिग्गी पॅलेसच्या अतिभव्य परिसरात *बैठक* आणि *दरबार हॉल* अशी दोन बंदिस्त सभागृहं आहेत. बऱ्यापैकी मोठी, दोनशेहून अधिक व्यक्ती एका वेळी मावतील अशी. *चार बाग, फ्रंट लॉन, मुगल टेंट* व *संवाद* असे चार प्रचंड मांडव या पॅलेसच्या हिरवळींवर घातलेले असतात. त्यातला फ्रंट लॉन सर्वांत मोठा, हजारेक माणसं बसू शकतील व त्याहून थोडी कमी आजूबाजूला उभं राहू शकतील एवढा. चार बाग व मुगल टेंट त्याहून थोड्या कमी आकाराचे. संवाद खूपच छोटा.

एकटेच असलो तर ठरवणं सोपं असतं. आपल्या आवडीनुसार त्या मांडवात जायचं, जागा पटकवायची आणि फोन बंद करून फक्त कान/डोळे उघडे ठेवायचे. सोबत कोणी असेल तर आपापल्या आवडीनुसारही सत्रांना हजेरी लावू शकतोच की आपण. किंवा तू 'तिथे', मी 'इथे' असं करायचं, 'तिथे' जास्त चांगलं वाटलं तर 'इथू'न जायचं, किंवा 'तिथ'ल्याला 'इथे' बोलवायचं. जेएलएफच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे कार्यक्रम पत्रिकेवर दिलेल्या वेळेलाच सुरू होतो व संपतो. प्रत्येक मांडव पाचही दिवस साधारणपणे एकाच कार्यकर्त्याच्या ताब्यात असतो. सत्र वेळेवर सुरू होणं व संपवणं ही त्याची/तिची जबाबदारी असते. आतापर्यंत मी उपस्थित राहिलेल्या तीन वर्षांत एखादंच सत्र उशिरा सुरू झालं असावं. दोन सत्रांच्या मध्ये १५ मिनिटं असतात. ती लोकांना एका मांडवातून दुसरीकडे जाता यावं यासाठी. जेवणाची वेळ असते पाऊण तास, पण त्याही वेळात प्रत्येक मांडवात एखाद्या पुस्तकाचं प्रकाशन, गाणं, काहीतरी सुरू

असतं. म्हणजे एकदा 'रवींद्रनाथ अँड द फेमिनीन' या पुस्तकाचं प्रकाशन झालं, त्यासोबत अर्पिता या गायिकेने रवींद्रनाथांची दोन अवीट गाणी गायली – 'ॲकला चालो रे' आणि 'चारुलता'मुळे आपल्याला ठाऊक झालेलं 'आमी चीनी गो चीनी तोमारो ओगो बिदेशिनी'. (दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध सरोदवादक अमजद अली खान यांच्या आत्मचरित्राचं प्रकाशन झालं या लंचटाइममध्ये. आयान व अमान या त्यांच्या सुपुत्रांचं सरोदवादनही झालं त्यानंतर.) फेस्टिवलच्या एक संचालक नमिता गोखले यांनी या वेळी लेखिका मालाश्री लाल यांच्याशी गप्पा मारल्या. नमिता गोखले मूळच्या उत्तराखंडमधल्या, विवाहानंतर गोखले झालेल्या. त्या लेखिका आहेतच, खेरीज जेएलएफ सुरू करण्यात त्यांचा मोठा हात आहे. २००६मध्ये जेएलएफ सुरू झाल्यापासून दरवर्षी नमिता आयोजनात बुडालेल्या असतात. प्रत्येक वर्षी काही सत्रांतून त्या मुलाखतीही घेतात. यंदा जेएलएफ संपल्यानंतर त्या एका पत्रकाराला म्हणाल्याचं वाचलं होतं, की 'पुढच्या वर्षी काय काय करायचं याच्या कल्पना डोक्यात उड्या मारू लागल्या आहेत आत्तापासूनच.' विल्यम डॅलरिम्पल हा ब्रिटिश इतिहासकार जेएलएफचा दुसरा संचालक. अत्यंत उत्साही, सतत इकडेतिकडे दिसत राहणारा. मागच्या वेळी एका भरगच्च कार्यक्रमाला तो चक्क मंचाच्या समोरच्या भागात जमिनीवर मांडी घालून बसून ऐकत होता. (मराठी साहित्य संमेलनात आयोजक किंवा स्वागताध्यक्ष असे जमिनीवर बसलेत, असं चित्र डोळ्यांसमोर येतंय का?)

फ्रंट लॉन प्रशस्त असल्याने अत्यंत लोकप्रिय लेखक वा कलाकारांचे कार्यक्रम बहुतकरून तिथेच होतात. यंदा व्ही. एस. नायपॉल, शशी थरूर, राजदीप सरदेसाई, रवीश कुमार, वहिदा रहमान, जावेद अख्तर आणि अर्थातच माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या सत्रांना सर्वाधिक गर्दी होती. राजदीप व रवीश दोघे टिव्हीवरील सेलेब्रिटी. राजदीप इंग्रजी बोलणाऱ्या उच्च मध्यमवर्गीयांमध्ये लोकप्रिय तर रवीश हा हिंदीभाषकांमध्ये स्टार आहे. अनेक पत्रकार त्याला आदर्श मानतात, त्यामुळे NDTV इंडियावरील त्याचा शो जसा लोकप्रिय आहे, तशीच त्याची इथली उपस्थितीही खूप ऊर्जादायी असते. यंदा मला त्याचं सत्र नाही पाहता आलं, पण मागच्या वेळी दोन सत्रं ऐकली होती. त्याचं किंचित बिहारी लहेजा असलेलं हिंदी, काहीसा टीपेचा आवाज आणि मार्मिक बोलणं यांमुळे तो ऐकत राहावासा वाटतो. विषयांतर होईल थोडं, पण मागच्या लोकसभा निवडणुकांच्या वेळी त्याने उत्तर प्रदेशात महिनाभर राहून केलेलं वार्तांकन व त्यावर आधारित लिहिलेला ब्लॉग आवर्जून पाहावं/वाचावं असं नक्की आहे. तो राजकारण्यांविषयी बोलत नाही, तर राजकारणाविषयी, मतदारांविषयी, माणसांविषयी बोलतो हा त्याचा मोठेपणा.

जेएलएफचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे हा फेस्ट पूर्णपणे मोफत आहे. झी, गूगल, ब्रिटिश एअरवेज, ॲमेझॉन.इन, यूएन विमेन, डीएनए, दैनिक भास्कर, रेडिओ मिर्ची, पत्रिका ग्रूप, कोकाकोला, पर्यटन विभाग वगैरेंसारख्या तगड्या प्रायोजकांमुळेच हे साध्य होतं. परंतु म्हणून एकही पैसा न देता पाच दिवसांत खूप महत्त्वाचा, असामान्य अनुभव एक सामान्य माणूस घेऊ शकतो, तेही सुस्थितीत, हे मान्य करावंच लागतं. सुस्थितीत म्हणजे काय, तर छान थंडी, बसायला चांगल्या खुर्च्या, डोक्यावर मांडव, रंगबिरंगी नेत्रसुखद सजावट, आणि अतिशय स्वच्छ व पाण्याचा भरपूर पुरवठा असलेली स्वच्छतागृहं! प्यायचं पाणी फुकट मिळतं. जागोजागी कचरा टाकायची सोय असते, आणि तो उचलूनही लगेच नेला जातो. (आपण जमलोय ते कुणाचं तरी घर आहे, आणि त्यामुळे ते नीट ठेवून जसंच्या तसं त्या मालकाला परत करायचं आहे, याची आठवण प्रत्येक मांडवातला कार्यकर्ता करून देत असतो. डिग्गी पॅलेस हे एक निवासस्थान आहे. खेरीज तिथे हॉटेलही आहे.) आणखी काय हवं एका रसिकाला! तिथे लावलेल्या स्टॉल्सवरचं खाणंपिणं महाग असतं, पण आपण आपला डबा नेऊ शकतोच की सोबत. तिथे जाण्याचा मुख्य उद्देश असतो, आवडत्या लेखक/कवीला ऐकायचं. तो अत्यंत सहज सिद्ध होतो. आणि बाकीच्या गोष्टीही सुखावणाऱ्याच असतात, पुन्हापुन्हा तिथे जावंसं वाटायला लावणाऱ्या असतात.

आपल्याकडच्या साहित्य संमेलनाची यांपैकी कुठल्याच बाबतीत तुलना होऊ शकत नाही, हे मोठंच दुर्दैव आपलं. खोड काढायचीच झाली तर ती पुस्तक प्रदर्शनाबाबत काढता येईल. जेएलएफमधलं पुस्तक प्रदर्शन यदा ॲमेझॉन.इन या वेबसाइटने प्रायोजित केलेलं होतं. यापूर्वी दिल्लीतील एका प्रतिष्ठित पुस्तकांच्या दुकानानेच ते आयोजित केलेलं होतं.

जेएलएफमध्ये जे लेखक/कवी सहभागी असतात, त्यांचीच पुस्तकं या प्रदर्शनात उपलब्ध असतात. त्यांची संख्या साहजिकच मर्यादित असते. 'पेंग्विन'चा एक स्टॉल होता, परंतु त्यातही फार पुस्तकं नव्हती. 'प्रथम'चा स्टॉल नेहमी असतो. खेरीज या पुस्तकांवर सूटही नसते, असलीच तर अगदी क्षुल्लक. त्यामुळे मराठी साहित्य संमेलनात पुस्तक विक्री हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असतो, तसा तो जेएलएफमध्ये नसतो. परंतु, असं असूनही प्रदर्शनात गर्दी होते, बरीच पुस्तकं विकली जातात. इथे ते पुस्तक लिहिणारा लेखक/कवी उपस्थित असतो, त्यामुळे त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी प्रचंड झुंबड असते. यंदा तर ही गर्दी लक्षात घेऊन एक वेगळी जागा स्वाक्षरी सोहळ्यासाठी ठेवण्यात आली होती.

आता थोडं यंदा मी जे ऐकलं त्याविषयी. यंदा दुसऱ्या दिवशी पाऊस पडल्याने बरीच गैरसोय झाली. आम्हीदेखील छत्री नेली नव्हती सोबत, त्यामुळे हॉटेलवरून डिग्गी पॅलेसला पोचणंही मुश्कील होतं. त्यात दुसरा दिवस बराचसा वाया गेला. आयोजकांचीही प्रचंड गडबड उडाली. परंतु तरीही एकही सत्र रद्द केलं गेलं नाही, हे विशेष. दोनच बंदिस्त जागा असल्याने सर्व सत्रं तिथेच, परंतु अर्ध्या तासाची झाली. यंदा एकमेव मराठी सत्र होतं, 'आयदान' या उर्मिला पवारलिखित आत्मचरित्रावर आधारित सुषमा देशपांडे यांनी बसवलेल्या नाटकाच्या निमित्ताने. या दोघी उपस्थित होत्या. हिंदी वृत्तपत्रांनी या कार्यक्रमाची चांगली दखल दुसऱ्या दिवशी घेतली. दोन वर्षांपूर्वी भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला'च्या इंग्रजी अनुवादातील काही भाग वाचून दाखवला होता. जीत थयिल यांनी त्यांना बोलतं केलं होतं. पहिलं सत्र ऐकलं ते प्रवासलेखकांचं – travel writers. प्रवासलेखन हा प्रकार मराठीत हल्ली फारसा दिसत नाही. गोडसेभटजींचं *माझा प्रवास* याच जातकुळीतलं खरं तर. अनिल अवचटांनी या प्रकारचं लिखाण केलं बरंच. पण नवीन

लेखक असं लिहू पाहात नाहीत. इंग्रजीत मात्र गेल्या २५ ते ३० वर्षांत अशी बरीच पुस्तकं आलीत, त्यातील अनेक पत्रकारांनी लिहिलेली आहेत. प्रवासलेखनात प्रामुख्याने प्रवासात भेटलेल्या माणसांचं, परिस्थितीचं वर्णन असतं. या सत्रात सहभागी झाले होते पॉल थेरॉ (Theroux), चार्ल्स ग्लास, सामंत सुब्रमण्यन, सॅम मिलर, ब्रिजिद कीनन व आकाश कपूर. जेएलएफचे संचालक व इतिहासविषयक लेखन करणारे विल्यम डॅलरिम्पल यांनी या सत्राचं सूत्रसंचालन केलं. या सर्व लेखकांनी आपापल्या पुस्तकांमधनं काही भाग वाचून दाखवला. ब्रिजिद यांच्या वाचनानं धमाल आणली. भारतात जन्मलेल्या व डिप्लोमॅट पती असल्याने ३७ देशांमध्ये वास्तव्य केलेल्या ब्रिजिद यांचे अनुभव मजेशीर व वैविध्यपूर्ण आहेतच, पण तीच मजा लिखाणातही जाणवली. सामंतने श्रीलंकेतल्या एलटीटीईच्या परिसरात वावरतानाचा एक उतारा वाचला. सॅम मिलर हा बीबीसीचा दिल्लीतील प्रतिनिधी; त्यांचं दिल्लीवरील पुस्तक प्रसिद्ध आहे. प्रवास आणि पर्यटन – travel and tourism – यांत फरक आहे. त्यामुळेच त्याविषयीच्या लिखाणातही, हे या सत्रात स्पष्ट झालं. लेखक त्याच्या पुस्तकातून उतारा वाचत असताना, आपण जणू त्याच्या सोबत फिरतोय, इतकं जिवंत वातावरण तिथे होतं. शंभर वर्षांपूर्वी प्रवासावर पुस्तक लिहिणं आणि आजच्या इंटरनेट/गूगलच्या काळात लिहिणं यांत फार फरक आहे. आता एखाद्या शहरातल्या प्रमुख वास्तूच कशाला छोट्या छोट्या इमारती/दुकानंसुद्धा गूगलमॅपवर आपण घरबसल्या पाहू शकतो. मग लिहायचं काय, तर तिथे पाहिलेल्या/भेटलेल्या माणसांबद्दल. तिथे आलेल्या अनुभवांबद्दल.

या सत्रानंतर याच जागी होती शशी थरूर व पत्रकार मिहीर शर्मा यांची मुलाखत, त्यामुळे कोणीच आपल्या जागेवरून उठलं नाही. नव्याने आलेल्या कोणालाही बसायलाच मिळालं नाही. 'इंडिया शास्त्र' हे थरूर यांचं पुस्तक नुकतंच बाजारात आलं आहे. त्यावर आधारित हे सत्र होतं. फ्रंट लॉनमध्ये हे सत्र होतं तरी ते पूर्ण ओसंडून वाहत होतं. पत्नीच्या संशयास्पद मृत्यूच्या संदर्भात थरूर यांची चौकशी होणार, अशा बातम्या या काळात जोरात होत्या. तरीही उपस्थितांमध्ये याविषयीची अस्वस्थता जाणवत नव्हती. थरूर देखणे आहेत, त्यांचं बोलणं अत्यंत आकर्षक, भाषा प्रभावी आणि शरीरभाषा आत्मविश्वासपूर्ण, किंचित बेदरकार म्हणावी अशी. पुस्तक मोदी सरकारचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर लिहिलेलं आहे. या संदर्भात उपस्थितांचे अनेक प्रश्न होते. एका तरुण मुलीने त्यांना विचारलं, ''मला व माझ्यासारख्या अनेकांना राजकारणात यायचं असतं. परंतु लोकसभा टीव्हीवर सभागृहात जो गोंधळ, घोषणाबाजी सुरू असलेली आम्ही पाहतो, त्याने आमच्या विचारांवर विरजण पडतं. याबाबत तुम्ही काय सांगाल?'' शशी थरूर एवढंच म्हणाले, "I am in politics! मी आहे, तुम्हाला यायला काय हरकत आहे.'' याला माज म्हणायचं, की जबरदस्त आत्मविश्वास ते आपण ठरवायचं. या संमेलनात राजकीय नेत्यांचा वावर अगदी मर्यादित असतो हेही इथलं एक वेगळेपण. मी तेथे असताना राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे यांनी एका कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन केले, पण एरव्ही सगळा वेळ त्या श्रोत्यांमध्येच बसल्या होत्या.

पॉल थेरॉ यांच्या गप्पा ऐकणं हा मस्त अनुभव होता. त्यांनी लेखकांसाठी दिलेला सल्ला फारच पटण्याजोगा वाटला – ''पुस्तक लिहायचं असेल, तर आधी घराबाहेर पडा'', ''प्रवास करताना कुणाच्या नजरेत न भरता निरीक्षण करत राहा. लिहिणं ही अत्यंत खाजगी गोष्ट आहे, ते स्वतःजवळच ठेवा. वाट पाहायला शिका'', ''प्रवास करणारा घाईत नसतो''. त्यांनी सांगितलेला एक किस्सा द्यायचा मोह आवरत नाही. पॉल आयर्लंडमध्ये फिरत होते. एक दिवस एका छोट्या इनमध्ये उतरले. वहीत व्यवसायाच्या समोर त्यांनी 'लेखक' लिहिलं. तर, त्या इनच्या मालकिणीने त्यांना विचारलं, "What books do you write, Mr. Thorax?" भारतात नावांचे/उच्चारांचे/शब्दांचे होणारे खून पाहून अस्वस्थ वाटणाऱ्या जीवांना हे वाचून शांत वाटावं!

जेएलएफच्या तिसऱ्या दिवशीची दोन सत्रं वेगळ्याच काळात घेऊन जाणारी होती. इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांचा मुलगा रोहन याने गेल्या वर्षी 'मूर्ती क्लासिकल लायब्ररी ऑफ इंडिया' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. प्राचीन लिप्या व भाषांमध्ये असलेल्या ग्रंथांचं नव्याने प्रकाशन असं या प्रकल्पाचं थोडक्यात स्वरूप सांगता येईल. या सत्रात पंजाबी (बुल्लेशा), फारसी (अबुल फजल), तेलुगु (मृणालिनी), पाली/सिंहला (खेमा) व ब्रज (सूरदास) या प्राचीन भाषांच्या अभ्यासकांनी त्या त्या भाषेतील (कंसात असलेल्या लेखकांचा) काही उतारा व त्यापाठोपाठ त्याचं इंग्रजी भाषांतर ऐकवलं, तेव्हा अंगावर आलेला काटा निव्वळ थंडीचा नक्की नव्हता. हजारो वर्षांपूर्वी बोलल्या/वाचल्या जाणाऱ्या या भाषा ऐकणं हा माझ्यासाठी यंदाच्या फेस्टिवलमधला अत्युच्च आनंदाचा क्षण होता. या पाच जणांपाठोपाठ शेल्डन पोलॉक या ब्रिटिश भाषातज्ज्ञाने ''किं वा काव्यरसः स्वादुः? किं वा स्वादीयसी सुधा?'' या संस्कृत वचनाने बोलायला सुरुवात केली. पोलॉक संस्कृतचे तज्ज्ञ आहेत, ते कोलंबिया विद्यापीठामध्ये शिकवतात व या मूर्ती प्रकल्पाचे प्रमुख संपादक आहेत. त्यांना भारत सरकारकडून पद्मश्रीने गौरवण्यात आले आहे. त्यांनी काशी व चेन्नईत शास्त्र्यांच्या घरी राहून संस्कृत शिकली आहे. पांढरीशुभ्र दाढी, गोरा वर्ण नि निळे डोळे असा हा माणूस बोलताना मधूनच संस्कृत शब्द असे पेरत होता, जसे आपण मराठी बोलताना इंग्रजी पेरतो. संस्कृत भाषेवरून सुरू असलेल्या वादाविषयी त्यांना प्रश्न केल्यावर ते म्हणाले, ''संस्कृत ही जोडणारी भाषा होती, तो एक पूल होता.'' येत्या काही वर्षांत १४ भाषा व १० लिप्यांमधील ४० पुस्तकं प्रकाशित करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. पोलॉक व गिरीश कर्नाड यांच्या मुलाखतीचे एक सत्र झाले. त्यातून कर्नाडांच्या व्यापक वाचनाची नव्याने ओळख झाली. या गप्पांनंतर रोहन मूर्तींचं प्रचंड कौतुक वाटतं. नारायण मूर्तींसारखा अब्जाधीश पिता, हार्वर्डमध्ये संगणकविषयक शिक्षण अशी पार्श्वभूमी असलेल्या रोहनने इतक्या लहान वयात, तिशीदेखील गाठलेली नसावी त्याने, भारतातील लुप्त होऊ घातलेल्या साहित्याचं जतन करण्याचा मोठा प्रकल्प हाती घेतला आहे. अत्यंत समरसून तो त्यात गुंतला आहे, त्याने त्यात काही कोटी रुपये गुंतवले आहेत. परंतु, ही काही दुपटीवर पैसे परत मिळवून

देणारी गुंतवणूक नव्हे. हरवत चाललेल्या भाषा व लिप्या जिवंत राहणं, हाच या गुंतवणुकीचा परतावा आहे. मराठीत आहे का असा कोणी? का नाही?

फेस्टिवलमध्ये नॉन-फिक्शन लिहिणाऱ्यांनाही मोठं महत्त्व असतं. व्यवसाय, अर्थशास्त्र, राजकारण, समाजकारण, चरित्र असे प्रकार हाताळणाऱ्यांना ऐकण्यासाठीही इथे खूप रसिक येत असतात. त्यांच्यात तरुणवर्ग मोठ्या प्रमाणावर असतो. या तरुणांना खूप प्रश्न विचारायचे असतात. त्यांचं वाचनही खूप असतं. याचा प्रत्यय देणारं एक सत्र होतं तरुण खन्ना या प्रिन्सटन विद्यापीठातील प्राध्यापकांच्या मुलाखतीचं! *Billions of Entrepreneurs: How China and India are reshaping their future* हे खन्ना यांचं पुस्तक प्रसिद्ध आहे. त्या संदर्भातच या गप्पा होत्या. चीन आणि भारतातील उद्योजकांना कोणत्या परिस्थितीत राहावं लागतं, काय सोपं आहे, काय कठीण आहे, याचा ऊहापोह या वेळी झाला. भारतात चीनच्या संदर्भात लिहिलेली अनेक पुस्तकं आहेत, पण चीनमध्ये भारताविषयी काही नाही, कारण आपण त्यांच्या दृष्टीने नगण्य आहोत. चीनमधल्या लोकांसाठी भारत म्हणजे बॉलिवूड नाच, बुद्ध आणि सॉफ्टवेअर. उद्योजकांसाठी मुख्य फरक जाणवतो तो सरकार चालवण्याच्या पद्धतीमुळे. भारतातल्या लोकशाहीचे परिणाम आणि चीनमधल्या कम्युनिस्ट सरकारचे परिणाम दोघांनाही भोगावे लागतात, तसेच फायदेही घेता येतात. खन्ना यांच्या या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर कम्युनिस्ट पक्षाकडून त्यांना त्यांच्या बीजिंग पार्टी स्कूलमध्ये भाषणाचं आमंत्रण आलं, तसंच पुस्तकाचा अनुवाद करण्याची परवानगीही मागण्यात आली. परंतु अनुवाद करताना कम्युनिस्ट पक्षाला नकारात्मक रंगवणारा भाग वगळायच्या अटीवर. खन्ना अर्थातच नाही म्हणाले (या आधीच तो भाग वगळून अनुवाद तयार होता, ही गोष्ट अलाहिदा.) पण हे लक्षात घ्यायला हवं, की या पुस्तकाची दखल पक्षाने घेतली. त्याचा आपल्या उद्योजकांना फायदा कसा करून घेता येईल याचा विचार पक्षाने केला. भारतात अशा प्रकारचं proactive पाऊल कोणत्याच पक्षाने/सरकारने उचलल्याचं फारसं ऐकवात नाही माझ्यातरी. तसंच, तिकडे एखाद्या लहान उद्योजकाचा एखादा प्रयोग यशस्वी झाला तर तो मोठ्या प्रमाणावर कसा प्रत्यक्षात येईल, इतर उद्योजक त्याचा कसा फायदा घेऊ शकतील, यासाठी पक्ष/सरकारी पातळीवर प्रयत्न होतात. आपल्याकडे काय होतं, ते सांगण्याची आवश्यकता नाही. खन्ना यांना उपस्थितांनी प्रश्न विचारून भंडावून सोडलं. अनेक उद्योजकांना या गप्पांमधून चांगलीच स्फूर्ती मिळाली होती.

भारतातल्या आजच्या घडीला लोकप्रिय असणाऱ्या व अनेक भाषांमधून मोठा खप असलेल्या एक लेखिका म्हणजे सुधा मूर्ती. त्यांच्याशी गप्पा मारल्या नमिता गोखले यांनी. बंदिस्त बैठक सभागृहात झालेल्या या सत्राला बच्चेकंपनीची मोठी गर्दी होती, तशीच मोठ्यांचीही. त्या आल्या तेव्हा एखाद्या स्टारला मिळाव्यात तशा टाळ्या पडल्या. त्यांच्या लहानपणाबद्दल, आजी-आजोबांसोबत घालवलेल्या मूल्यवान सुट्यांबाबत त्यांनी लिहिले आहेच; परंतु, इकडच्या मुलांना प्रश्न होता, की त्यांच्या आजीच्या गोष्टींचा पुढचा भाग कधी येणार आहे. एका तरुण आईने त्यांना विचारलं, ''नोकरी करणाऱ्या आईला मूल वाढवताना तुम्ही काय सांगाल?'' आयुष्य कसं जगावं, याचे मंत्र त्यांनी सांगितले, ते आपण अनेकांच्या तोंडून ऐकलेले असतात. परंतु, प्रचंड ऐश्वर्य असूनही सामाजिक भान ठेवून साधं बिनभपक्याचं आयुष्य जगणाऱ्या सुधाआजींकडून ते ऐकलं, की ते मंत्र महत्त्वाचे वाटायला लागतात. ''पैसा आवश्यक आहे, परंतु प्रमाणातच. आपण स्वतःपुरती एक रेष आखून घेतली, की त्याच्या पलीकडचा पैसा हा गरजू लोकांना द्यावा. दान श्रद्धापूर्वक करावं. नात्यातल्याच माणसांना देणं म्हणजे दान नव्हे. तू माझी पाठ खाजव, मी तुझी खाजवतो, असं झालं तर शेवटी पाठीवर जखम होते,'' असं त्या म्हणाल्या तेव्हा अशा कितीतरी घटना डोळ्यांसमोरून तरळल्या. त्यांनी त्यांच्या पहिल्या पुस्तकाचा उल्लेख केला, ज्याच्याबद्दल मला माहिती नव्हती, ते म्हणजे *Beyond the Atlantic.* अमेरिकेत असताना १९७८-७९मध्ये एकटीने केलेल्या प्रवासाबद्दल ते आहे. तुटपुंजी रक्कम हातात असताना अमेरिकेतल्या बहुतेक राज्यांमध्ये त्यांनी बॅकपॅकिंग केलं, त्या अनुभवांवरचं मूळ कानडी पुस्तक त्यांचं पहिलं. तो काळ लक्षात घेता, निदान आता तो वाचून असाच काही भटकंतीचा उद्योग करायला हवा, असं मला तीव्रतेने वाटलं.

✦

टीमवर्कतर्फे जयपूरमधल्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांचीही निवड करून त्यांना प्रशिक्षण दिलं जातं. ही कंपनीच प्रसिद्धीचंदेखील काम पाहाते. सलग काही वर्षं एकच कार्यक्रम आयोजित केल्याने मिळणारा अनुभव फार मोठा असतो, आणि अनुभवाने माणूस शहाणा होतो, हे जेएलएफमध्ये दिसून येतं. मराठी साहित्य संमेलन दरवर्षी वेगळ्या ठिकाणची स्वागत समिती आयोजित करते, त्यामुळे मागच्या चुकांवरून शिकण्याची संधीच त्यांना मिळत नाही. त्यामुळेच दरवर्षी चुकांची/गोंधळाची पुनरावृत्ती होतेच.

✦

फेस्टिवलमध्ये अनेक कलाकारांना/चित्रकारांना त्यांची शिल्पं, चित्रं, installations मांडण्याची संधी मिळते. ती पाहायला फार मजा येते. डिग्गी पॅलेसमधल्या तरणतलावात, तो रिकामा करून अर्थात, ही शिल्पं उभारलेली असतात. किंवा एखाद्या मांडवात बाजूला असतात. सोबत त्या कलाकाराची पूर्ण माहिती असते, हे विशेष.

यंदा प्रथमच मला मराठी ऐकायला मिळाली फेस्टिवलमध्ये. स्वच्छतागृहात जाण्यासाठी रांगेत उभं असताना मागे उभ्या असलेल्या दोघी मराठी बोलताना ऐकलं. त्या दोघी मुंबई/ठाण्यातल्या विद्यार्थिनी होत्या, इंग्रजी व मराठी शिकणाऱ्या. १८ जणांचा गट करून ही मंडळी आली होती. पाच दिवस आमच्यासाठी मेजवानी आहे, असं त्या उत्फुल्ल चेहऱ्याने सांगत होत्या. मला हे खूप सकारात्मक वाटलं. जयपूर मुंबईपासून काही फार लांब नाही,

तीन ट्रेन जातात तिकडे. म्हटलं तर फेस्टिवलसोबत पर्यटनही करता यावं, असा रंगबिरंगी, ऐतिहासिक वास्तूंनी सजलेला प्रदेश. एक आठवडा सुट्टी काढून जेएलएफला जाणं तसं कठीण नव्हे. विद्यार्थ्यांनी तर इथे यावंच, पण आपण मोठ्यांनीही यावं. समोर चाललेलं सगळं कळलं नाही, अगदी १० टक्के डोक्यात गेलं तरी खूप आहे. अनेक विषय कळतात, पुस्तकांची/लेखकांची नावं कळतात. त्यावरून काय वाचायला हवं, ते समजतं. *आपुल्याच जातीचे इतुके जन* भेटतात एकाच वेळी.

हेच सगळं खरंतर मराठी साहित्य संमेलनाच्या बाबतीतही म्हणता आलं असतं तर? आयोजनापासून सुरुवात करू. जेएलएफ सुरू झाल्यापासून नमिता गोखले व विल्यम डॅलरिम्पल त्याचे संचालक आहेत आणि संजय रॉय निर्माते. यंदा डेव्हिड गॉडविन, उर्वशी बुटालिया वगैरे सात-आठ जण सल्लागार होते तर शेवली सेठी कार्यकारी निर्माती होती. टीमवर्क या इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीकडे संपूर्ण आयोजनाची व्यवस्था होती. म्हणजे आयोजन व्यावसायिक पातळीवर होते. टीमवर्कतर्फे जयपूरमधल्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांचीही निवड करून त्यांना प्रशिक्षण दिलं जातं. ही कंपनीच प्रसिद्धीचंदेखील काम पाहाते. सलग काही वर्षं एकच कार्यक्रम आयोजित केल्याने मिळणारा अनुभव फार मोठा असतो, आणि अनुभवाने माणूस शहाणा होतो, हे जेएलएफमध्ये दिसून येतं. मराठी साहित्य संमेलन दरवर्षी वेगळ्या ठिकाणची स्वागत समिती आयोजित करते, त्यामुळे मागच्या चुकांवरून शिकण्याची संधीच त्यांना मिळत नाही. त्यामुळेच दरवर्षी चुकांची/गोंधळाची पुनरावृत्ती होतेच. वर नवनवीन ढिसाळपणाही करायला वाव मिळतो! मराठी साहित्य संमेलन तसं पाहिलं तर दीड ते दोन दिवसच होतं. ग्रंथदिंडी वगळता त्यात सगळी मिळून वीसएक सत्रं होत असतील. कविसंमेलन वगळून. किती कार्यक्रम, अगदी उद्घाटनासह, वेळेवर सुरू होतात आणि किती नियोजित वेळेच्या नंतरही सुरूच राहतात?

आपल्या संमेलनात सर्वांत जास्त गर्दी होते कविसंमेलन आणि पुस्तकप्रदर्शनाला. पुस्तकांवर किती टक्के सूट आहे, हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. यंदा घुमानला तर प्रकाशक जाणार की नाही पुस्तकं घेऊन, हेदेखील ठरायचंय. सासवडच्या २०१४च्या संमेलनात पुस्तक प्रदर्शनात गर्दी होती, पण ती त्रासदायक होती कारण जागा अपुरी होती, स्टॉल्सचं नियोजन योग्य नव्हतं. सुरक्षा हा विषय तर विचारात घेतलाच नसावा, असं वाटत होतं. मी रविवारी सकाळी प्रदर्शनात गेले, तेव्हा संपूर्ण न पाहताच बाहेर पडल्याचं आठवतंय. कारण भीती. काही झालं, तर आपल्याला इकडून बाहेर पडताच येणार नाही, याची खात्री वाटल्यानेच मी तिथे फार काळ भटकले नाही. धूळ तर इतकी होती, की काही फुटांवरचं दिसत नव्हतं. लहान गावांमध्ये पुस्तकं मिळत नाहीत त्यामुळे संमेलन ही पुस्तकखरेदीची मोठी संधी असते, पुस्तकांसाठी वाचक संमेलनाला येतात, हे ठाऊक आहे; तर तो अनुभव सुखकर का नाही होत? प्रकाशकांनाही या सगळ्या गैरसौयीचा त्रासच होतो, पण थोडाफार तरी धंदा होतो, म्हणून स्टॉल लावतात बिचारे.

सत्रांची मांडणी करताना जेएलएफमध्ये बाजारात नवीन आलेलं पुस्तक ही मध्यवर्ती कल्पना असते. वर उल्लेखलेल्या राजदीप सरदेसाई, शशी थरूर, तरुण खन्ना, सुधा मूर्ती आदींच्या सत्रांवरून हे लक्षात येईल. यात सुधा मूर्ती वगळल्या तर इतर पुस्तकं नॉन-फिक्शन प्रकारातली आहेत. अशी पुस्तकं मराठीत येत नाहीत का? कमी प्रमाणात असतील, पण येतात नक्की. पण आपल्याकडे नॉन-फिक्शनला साहित्यच समजलं जात नाही! खेरीज, असाही विचार तर होत नसावा, 'याच्या पुस्तकावर सत्र करायचं म्हणजे त्याची जाहिरात होणार. आपण का करावी त्याची जाहिरात?' जेएलएफमध्ये जयपूरमधल्या मोठ्या हिंदी व इंग्रजी वृत्तपत्रांनी प्रायोजित केलेली अनेक सत्रं असतात, मराठी वृत्तपत्रं असं करू शकणार नाहीत का? प्रत्येक सत्राच्या प्रारंभी व शेवटी प्रायोजकाचा उल्लेख होतो. बस्स. त्यात काय वाईट आहे?

आता बाब भाषेच्या विद्यार्थ्यांनी संमेलनाला भेट देण्याची. सासवडच्या संमेलनात शेकडो महाविद्यालयीन तरुणतरुणी होते. पुणे ते सासवड वा जवळच्या निमशहरी भागातले. पुण्यातून आलेले फारच कमी विद्यार्थी तिथे दिसले असतील. असं का? जयपूरला जाणं परवडत नाही, वेळ नाही, हे मान्य. महाराष्ट्रातल्या महाराष्ट्रात तरी विद्यार्थ्यांनी जावं ना. राज्यात सगळीकडे एसटी जाते. अनेक ठिकाणी ट्रेन जाते. दोन दिवस राहायची सोय कमी पैशात होऊ शकते. आपले नातलग, मित्रमंडळी अशा वेळी नाही उपयोगात येणार तर कधी, त्यांच्या घरी एक वस्ती करायला काय हरकत आहे? मराठीचे विद्यार्थी असणाऱ्यांनी जावं असं म्हणताना, त्यांच्या शिक्षकांची आठवण झाल्याशिवाय कशी राहील? पण साहित्य संमेलनातून आपल्याला काही मिळू शकतं, भले परीक्षेत त्याविषयी प्रश्न नसेल, पण मला काही तरी शिकायला मिळेल. मी श्रीमंत होऊन परत येईन, हा विश्वास त्यांना द्यायला आपलं संमेलन कमी पडतं हे निर्विवाद.

यंदा जेएलएफला दोन लाख पंचेचाळीस हजार लोकांनी भेट दिली. ही संख्या दर वर्षी वाढतेच आहे. आता असेच फेस्टिवल चेन्नई, बंगळुरू, कोलकाता, दिल्ली, पुणे, मुंबईतही होतात, परंतु जयपूरची रंगत त्यात नाही. कारण, तो जयपूरचा माहोलच असा असतो, की तो एकदा पाहिलाय, आता पुढच्या वर्षी नाही आलं तरी चालेल, असं अजिबात वाटत नाही. उलट, यंदा काय राहिलं ऐकायचं, पुढच्या वर्षी कोण असेल, काय पाहायला मिळेल, याची उत्सुकता खूप असते. पुन्हा पुन्हा जात राहावं, असं वाटायला लावणारं, श्रीमंत करून टाकणारं वातावरण असतं ते. म्हणूनच वाट पाहातेय सप्टेंबरची, तारखा जाहीर होण्याची.

(जयपूर फेस्टिवलची सर्व माहिती http://jaipurliteraturefestival.org/या वेबसाइटर उपलब्ध असते. तिथे माध्यम प्रतिनिधी वा सर्वसामान्य प्रतिनिधी म्हणून नोंदणी करता येते. माध्यम प्रतिनिधींना आपापल्या संस्थेचं प्रमाणपत्र सादर करावं लागतं. कारण, मागे लिहिल्याप्रमाणे इथले साहित्यिक कार्यक्रम सर्वांनाच नि:शुल्क उपलब्ध असले तरी पत्रकारांना तिथे भोजन व संगीताचे कार्यक्रम हेदेखील मोफत उपलब्ध असतात.)

*(जुलै २०१५)*

# निद्रिस्त परी

**सरोजा भाटे**

२४ जून हा या वर्षातील आषाढचा पहिला दिवस. म्हणजेच महाकवी कालिदास दिन. त्यानिमित्त संस्कृत भाषेची महती आणि भविष्यासाठी तिची उपयुक्तता सांगणारा हा विशेष लेख.

भारताचे सर्वात मोठे वैभव आणि श्रेष्ठ सांस्कृतिक वारसा कोणता असे जर मला कुणी विचारले तर मी तत्काळ सांगेन – संस्कृत भाषा, संस्कृत साहित्य आणि त्यात सामावलेले सर्व काही.''

**– पं. जवाहरलाल नेहरू**

''संस्कृत भाषा कितीही प्राचीन असली तरी तिची रचना अद्‌भुत आहे. ती ग्रीक भाषेहून परिपूर्ण आहे आणि लॅटिन भाषेपेक्षा विस्तृत आहे. आणि या दोन्ही भाषांपेक्षा तिचे सौष्ठव अधिक दिमाखदार आहे. तरीही या दोघींशी तिचे विलक्षण साम्य आहे.''

**– सर विल्यम जोन्स**

वरील दोन वचने 'सुसंस्कृत' वाचकाला संस्कृतच्या गौरवशाली संपन्नतेची आठवण करून देण्यासाठी, प्रारंभीच उद्‌धृत केली. पहिले वचन संस्कृतचे भारतातील असाधारण स्थान अधोरेखित करते, तर दुसऱ्यात तिचे जागतिक पातळीवरचे अनन्यत्व नमूद केले आहे. जगभरातल्या अनेक विख्यात विद्वानांनी संस्कृतच्या अनेक आगळ्या वेगळ्या वैशिष्ट्यांची नोंद वेळोवेळी घेतली आहे. मात्र सामान्य माणसाला त्यांची फारशी माहिती नसते. त्याला संस्कृत एक भाषा म्हणून माहीत असते. ती कुठल्याही समाजघटकाची बोली नसली, तरीही चलनी नोटांवर छापलेल्या पंधरा भाषांमध्ये ती दिसते. काही जणांना ती शाळेतच भेटलेली असते. सगळेच्या सगळे गुण देणारी म्हणून शालेय शिक्षण संपेपर्यंत तिची कास धरणारे काही जण असतात. हिंदूंच्या विवाह वगैरे मंगलकार्यात, तसेच पूजेअर्चेच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांमधून, प्रार्थनांमधून ती ऐकू येते तेव्हा तिचे धार्मिक पावित्र्याचे वलय लक्षात येते. कालिदास, भवभूति यांसारख्या महाकवींच्या काव्यनाटकांतून तसेच रामायण-महाभारतासारख्या आर्षकाव्यातून ती रसिक वाचकांपर्यंत, ललित लेखकांपर्यंत आणि वाङ्‌मयाच्या अभ्यासकांपर्यंत पोचलेली असते. संस्कृत यापलीकडे खूप काही आहे.

भाषा, वाङ्‌मय आणि संस्कृती या तीन घटकांना मिळून संस्कृत हे नाव आहे हे आधी लक्षात घ्यायला हवे. संस्कृतचे आगळेपण या तिन्ही रूपांत आहे. भाषा म्हणून तिला अधिक जवळून जाणून घ्यायला लागले की ठळकपणे नजरेत भरते ते तिचे खानदान. जगातल्या यच्चयावत भाषांची वर्गवारी भाषाशास्त्रज्ञांनी बारा कुळांत केली आहे. युरोभारतीय (Indo-European) हे कुळ सर्वात मोठे – संस्कृतचे खानदान. याच खानदानातल्या ग्रीक, लॅटिन, प्राचीन जर्मन, इटालियन इत्यादी युरोपियन भाषा संस्कृतच्या बहिणी. इकडे भारतातल्या बहुसंख्य भाषांमधली सरासरी चाळीस टक्के शब्दसंपत्ती संस्कृतमधून उचलल्यामुळे आणि हिंदी, मराठी, गुजराती, पंजाबी यांसारख्या अनेक भाषांची जडणघडणसुद्धा तिच्यासारखी असल्यामुळे भारतीय भाषांचे आजोळ संस्कृतच्या घरात. दक्षिण आशियाई राष्ट्रांमधल्या थाई, खोतानीज, जावानीज इ. भाषांमधल्या शब्दसंपत्तीवरून एक दृष्टिक्षेप टाकला तरी त्यांचे माहेर संस्कृतच्या घरात असल्याचे प्रत्यंतर येते. एकंदरीत जगातल्या निम्म्याहून अधिक लोकसंख्येच्या भाषांशी संस्कृतची नाळ जुळली आहे. बारा भाषाकुळांची वर्गवारी मांडणाऱ्या भाषाशास्त्रज्ञांच्या मते युरोभारतीय भाषांची गंगोत्री युरोपात किंवा मध्य आशियात कुठे तरी असली पाहिजे. हे मत स्वीकारले तर संस्कृतचे जन्मस्थान भारताबाहेर होते असे मान्य करावे लागते. हे मत बहुमान्य असले तरी अलीकडे काही विद्वानांनी संस्कृतचा मुळारंभ भारतातच होता असा अभ्युपगम (गृहीतक) मांडला आहे.

ध्वनिमाधुर्य हे वैशिष्ट्य मिरवणाऱ्या जगातल्या मोजक्या भाषांमध्ये संस्कृतचा समावेश होतो. स्वराघात (accent) हा

विशेष असणाऱ्या प्राचीन भाषा दोन, ग्रीक आणि संस्कृत. कालांतराने अभिजात संस्कृतात स्वराघात लोप पावला; तो फक्त वैदिक संस्कृतमध्ये शिल्लक राहिला. मात्र या दोन विशेषांमुळे संस्कृतच्या प्रथमश्रवणी भाषारसिक तिच्या प्रेमात पडतो, मग ते श्रवण वेदमंत्रांचे असो, किंवा जयदेवाच्या गीतगोविंदाचे. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी संस्कृत बोलण्याच्या वेडाने झपाटलेल्या स्पेनमधल्या काही विद्यार्थ्यांनी माझ्याकडून बोली संस्कृतचे धडे घेतले. गेल्या वर्षी याच कामगिरीवर माझी मैत्रीण डॉ. आशा गुर्जर नॉर्वेमध्ये गेली होती.

फिल्योझा या फ्रेंच विद्वानाने आपल्या संस्कृतविषयक पुस्तकात म्हटले आहे की जगात दीर्घायुषी भाषा दोन, संस्कृत आणि चिनी. चिनी भाषा काळाच्या ओघात बदलत गेली. संस्कृत मात्र चिरतरुण राहिली आहे. इ. पूर्व ५व्या शतकाच्या आसपास पाणिनी या वैयाकरणाने तिला सर्वांगी कोरून, तासून तिला शिल्पाचे चिरंतन रूप दिले. तेव्हापासून ती 'संस्कृत' – घडवलेली, अधिक सुंदर बनवलेली झाली. तिच्या अभिव्यक्तीत नेमकेपणा आला. तिच्या पदन्यासात लयबद्धता आली. मात्र बोलीचा सळसळता उत्स्फूर्तपणा जराही कमी झाला नाही. बोलीची सहजता आणि कृत्रिम भाषेचा नेटकेपणा एकाच ठायी असणारी संस्कृत ही एकमेव भाषा आहे, असे भाषाशास्त्रज्ञ म्हणतात.

वाङ्मय या संस्कृतच्या दुसऱ्या अंगाची प्रमुख तीन वैशिष्ट्ये; वैपुल्य, वैविध्य आणि वैलक्षण्य. या तिन्ही विशेषांच्या बाबतीत संस्कृत वाङ्मय जगातल्या कोणत्याही भाषेतल्या समृद्ध वाङ्मयाच्या तोडीचे आहे. आजवर प्रकाशित झालेल्या संस्कृत ग्रंथांची संख्या काही लाखांवर असेल. राष्ट्रीय पांडुलिपी मिशन (National Mission for Manuscripts) या केंद्रशासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत केलेल्या सर्वेक्षणानुसार जगातील सर्व संग्रहालयांत आणि अन्य ठिकाणी संग्रहित असलेल्या हस्तलिखितांची संख्या कच्च्या गणनेनुसार सुमारे पन्नास लाखांच्या आसपास आहे. एकट्या पुणे शहरातील विविध संस्थांमधील उपलब्ध हस्तलिखितांची संख्या एक लाखाच्या आसपास आहे. संस्कृत वाङ्मयाच्या या अफाट विस्ताराबद्दल एक पाश्चात्त्य अभ्यासक आपल्या लेखात म्हणतो की, 'प्रकाशित संस्कृत वाङ्मय म्हणजे हिमनगाचा समुद्राच्या पृष्ठभागावर दिसणारा भाग!'

या वाङ्मयाचे विषयही वैविध्यपूर्ण आहेत. सर्वसामान्यांना धार्मिक आणि ललित संस्कृत वाङ्मय थोडेफार माहीत असते. याखेरीज संस्कृतने तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, गणित, खगोलविज्ञान, तर्कशास्त्र, कृषिविज्ञान, वैद्यकशास्त्र, राज्यशास्त्र, नाट्यशास्त्र, संगीत, वास्तुविद्या, रसायनशास्त्र, इतकेच नव्हे तर धनुर्विद्या आणि पाकशास्त्र यांसारख्या अनेक विद्याशाखांची दालने समृद्ध केली आहेत. संस्कृत हस्तलिखितांच्या प्रकाशित झालेल्या सूचींवरून एक नजर टाकली तरी या वैविध्याची व्याप्ती केवढी आहे याची कल्पना येते. डेव्हिड पिंगरी या अमेरिकन विद्वानाने *Sensus of Exact Sciences in India* या शीर्षकाच्या पाच खंडांच्या ग्रंथात भारतीय खगोलविज्ञान आणि गणित या विषयांवरच्या सुमारे पाच हजार हस्तलिखितांची सूची प्रकाशित केली आहे. यांपैकी मोजकीच हस्तलिखिते आजवर प्रकाशित झाली आहेत (पुण्याच्या आनंदाश्रम संस्थेने पुण्यात उपलब्ध असलेल्या सुमारे ऐंशी हस्तलिखित सूचींमधून आयुर्वेद, वास्तुविद्या, संगीत, धर्मशास्त्र, कामशास्त्र इ. विषयांवरील हस्तलिखितांची विषयवार सूची तयार केली आहे; आर्थिक साहाय्याअभावी तिचे प्रकाशन रखडले आहे).

संस्कृत वाङ्मयातील विषयांची वर दिलेली यादी स्थूल आहे. काही विषयांची तपशीलवार विभागणी केली तर यादी खूप मोठी होईल. उदा. वैद्यकशास्त्र या विषयात मानव, घोडा, हत्ती, वृक्ष, पशुपक्षी यांच्या वैद्यकांवर वेगवेगळ्या ग्रंथांचा समावेश होतो. त्या त्या विषयांतले तज्ज्ञ आणि संस्कृतज्ञ यांनी एकत्र येऊन या प्राचीन विज्ञानाच्या महासागरात अवगाहन केले नाही तर काळाच्या ओघात हा महासागर जागच्या जागीच आटून जाईल की काय अशी भीती निर्माण झाली आहे.

विषयवैविध्याने नटलेल्या या वाङ्मयसागरातून अभ्यासकांनी आजवर जी रत्ने वेचली त्यावरून हा सागर किती विलक्षण आहे याची कल्पना येते. जगातले सर्वात प्राचीन, तरीही परिपूर्ण असे पाणिनीचे संस्कृत व्याकरण हा मानवी बुद्धिमत्तेचा सर्वश्रेष्ठ आविष्कार ('the greatest monument of human intelligence') आहे हा ब्लूमफील्ड या भाषाशास्त्रज्ञाचा उद्गार. या व्याकरणाची सांकेतिक परिभाषा, सूत्रांची बीजगणिती संरचना आणि संगणकीय आज्ञावली(computer programme)शी नाते सांगणारी विश्लेषण पद्धती पाहून थक्क झालेले काही पाश्चात्त्य वैज्ञानिक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (artificial intelligence) क्षेत्रात व्याकरणाचे उपयोजन करण्याच्या प्रयत्नात आहेत. आणि या व्याकरणाचा तोंडावळा पाहूनच त्याचा धसका घेतलेले आमचे विद्यार्थी त्यापासून दूर पळू पाहताहेत.

संस्कृत भाषेच्या कुशीत जन्मलेले आणखी एक विलक्षण अपत्य म्हणजे महाभारत, जगातले सर्वात मोठे आर्षकाव्य, होमरच्या इलियडच्या आठपट मोठे. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरात त्याच्या चिकित्सित संपादनाचा प्रकल्प सुमारे पन्नास वर्षे चालला होता. १९६६ साली १९ खंडांत प्रकाशित झाल्यानंतर या चिकित्सित आवृत्तीचा समग्र अनुवाद फारच थोड्या भाषांमध्ये झाला आहे. मराठीमधे अजूनही नाही. भारताबाहेर समग्र अनुवाद प्रकाशित करण्याचा मान केवळ चीनने पटकावला आहे. या काव्याची कथा, उपाख्याने, व्यक्तिचित्रे, ज्ञानविज्ञान आणि जीवनदर्शन आजही जगभरातल्या अभ्यासकांना, कलावंतांना आणि तत्त्वज्ञांना खुणावत आहेत. रामायण आणि महाभारत या आर्षकाव्यांनी अनेक रामायणमहाभारतांना जन्म दिला आहे. इतकेच नव्हे, तर भारतीय भाषांमधल्या वाङ्मयाच्या वैभवातही भर घातली आहे.

असाच एक विलक्षण ग्रंथ म्हणजे भरतमुनींचे नाट्यशास्त्र. नाट्याबरोबर संगीत, नृत्य, वाद्य, कलास्वाद इ. अनेक विषयांची सविस्तर मांडणी करणारा हा या विषयावरचा प्राचीनतम उपलब्ध ग्रंथराज. त्याचे नीट आकलन होण्यासाठी आवश्यक असणारी बुद्धिमत्ता आणि सखोल विचिकित्सा घेऊन त्याला भेटू इच्छिणाऱ्या प्रखर जिज्ञासूंच्या प्रतीक्षेत तो आजही आहे. आधुनिक

काळालाही उपयुक्त ठरतील असे व्यवस्थापनाचे, अनुशासनाचे धडे देऊ शकतील अशा अनेक विषयांना सामावून घेणारा, कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ हे संस्कृत वाङ्मयसागरातले आणखी एक देदीप्यमान रत्न. त्याला पारखलेले विद्वानही मोजकेच आहेत. प्राचीन भारतीय इतिहासाचा महत्त्वाचा दस्तैवज असणाऱ्या या ग्रंथात कितीतरी ज्ञानविज्ञान दडलेले आहे. मात्र संस्कृतच्या उत्तम ज्ञानाची किल्ली हस्तगत केल्याशिवाय हा खजिना उघडू शकत नसल्यामुळे आजची 'असंस्कृत' पिढी या ज्ञानापासून वंचित राहिली आहे. अजून कितीतरी मोती या महासागराच्या तळाशी पडून आहेत.

मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अंगांवर प्रकाश टाकीत, जगण्याची परिभाषा नेमक्या शब्दांत मांडणारी, जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर दीपस्तंभासारखी मार्गदर्शन करणारी असंख्य संस्कृत सुभाषिते संस्कृत वाङ्मयाच्या वैलक्षण्याला उठाव आणतात. आज मात्र त्यांची अवस्था एका सुभाषितात म्हटल्याप्रमाणे, 'जीर्णमङ्गे सुभाषितम्' – सुभाषित जागच्या जागीच जिरून गेले – अशी झाली आहे. प्राचीन संस्कृत कवींनी आपल्या सर्वंकष प्रज्ञेचा आणि प्रतिभेचा चमत्कार दाखवण्याच्या उद्देशाने रचलेली चित्रकाव्ये, काव्यात्म कोडी यांसारख्या अनवट वाङ्मयप्रकारांच्या वाटेला जाणारे संस्कृत अभ्यासक हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेच.

जानेट अम् ही बर्कले विद्यापीठात संस्कृतमध्ये पीएच.डी. करणारी विद्यार्थिनी काही दिवसांपूर्वी माझ्याकडे आली. तिला चित्रकाव्यांचे शास्त्र समजून घ्यायचे होते. तिला विचारले, ''या नसत्या खटाटोपात का पडलीस?'' ती म्हणाली, ''ही चित्रकाव्ये समजू लागली की जगातल्या एका श्रीमंत, देखण्या, प्रमाणबद्ध भाषेची नजाकत आपल्याला कळली याचा विलक्षण आनंद होतो आणि याची बरोबरी करणारा कुठलाच आनंद नसतो.'' जो आनंद एक कोरियन विद्यार्थिनी लुटू शकणार आहे त्याला आम्ही 'सुसंस्कृत रसिकते'अभावी मुकणार आहोत.

संस्कृत हे जसे भाषेचे, वाङ्मयाचे नाव, तसेच ते एका संस्कृतीचे, जीवनदृष्टीचे नाव आहे. एखादी भाषा आणि तिने जोपासलेले वाङ्मय जिथे जिथे रुजते तिथे तिथे त्या वाङ्मयाशी नाते सांगणारी संस्कृती उपजते, स्थिरावते. युरोभारतीय भाषेच्या अभ्युपगमानुसार संस्कृतचे खानदान भारताबाहेर युरोप, मध्य आशिया या भूप्रदेशावर पसरले आहे; तिचे मूलस्थानही भारताबाहेर आहे. तथापि वाङ्मयाच्या रूपात ती भारतात स्थिरावली आणि त्यामुळे भारतीय भाषा म्हणून गणली गेली. संस्कृत वाङ्मयातून भारतीय संस्कृती अंकुरली, विस्तारली. वैदिक किंवा हिंदू संस्कृती असे तिला संबोधले जाते. वास्तविक जैन आणि बौद्ध संस्कृतीसुद्धा या संस्कृतीचीच अंगे आहेत. या दोन्ही संस्कृतींच्या आविष्काराच्या प्रारंभीच्या भाषा जरी वेगळ्या होत्या तरी वैदिक संस्कृतीच्या पर्यावरणात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी आणि त्या संस्कृतीशी संवाद साधण्यासाठी त्यांना संस्कृत भाषेचा अवलंब करावा लागला.

इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकात बौद्ध धर्मप्रसारक श्रीलंका, जावा, सुमात्रा, थायलंड, चीन इत्यादी राष्ट्रांत पोचले होते. एका ऐतिहासिक वृत्तांतानुसार चौथ्या शतकात कुमारजीव ह्या पंडिताला चिनी अधिकारी लक्वांग चीनमध्ये संस्कृत ग्रंथांच्या चिनी अनुवादासाठी घेऊन गेला. ह्यूएनत्संग ६७१ साली भारतात यायला निघाला तेव्हा प्रथम वाटेत सुमात्रा बेटावरील श्रीवर्धन याठिकाणी थांबून संस्कृत संभाषण शिकला. चिनी यात्रेकरूंनी भारतातून संस्कृत हस्तलिखिते भरभरून चीनमध्ये नेली.

बौद्ध धर्माचे बोट धरून भारतीय वैद्यकशास्त्र चीनमध्ये पोचल्याचे काही पुरावे प्राचीन चिनी दस्तैवजात आढळतात. डॉ. विजया देशपांडे या विदुषींनी अशा काही दस्तैवजांचा अभ्यास करून आपल्या पुस्तकात असे म्हटले आहे, की प्राचीन चिनी नेत्रचिकित्साशास्त्रावर भारतीय नेत्रचिकित्साशास्त्राचा खूप प्रभाव होता. संस्कृत वाङ्मय चीनप्रमाणेच तिबेट, म्यानमार, थायलंड इ. ठिकाणी पोचले. चिनी भाषेत भाषांतरित झालेल्या संस्कृत ग्रंथांची संख्या ४४४६ असून तिबेटन भाषेत १४६७ संस्कृत ग्रंथांचा अनुवाद झाला आहे असे एका लेखात नमूद केले आहे. यांपैकी बहुसंख्य ग्रंथांची मूळ संस्कृत हस्तलिखिते नामशेष झाली असून सारनाथमधील तिबेटी विश्वविद्यालयासारख्या काही संस्थांमध्ये अनुवादावरून मूळ संस्कृत ग्रंथांच्या पुनर्रचनेचे काम चालू आहे.

बौद्ध धर्मप्रसारक जसे आशियाखंडाच्या काही भूप्रदेशावर गेले तसेच हिंदू पुरोहित, व्यापारी आणि राजघराण्यातले काही लोक स्थलांतर करीत जावा, सुमात्रा, बाली, कंपूचिया, व्हिएटनाम इ. प्रदेशांत जाऊन पोचले. त्यांनी बरोबर नेलेल्या सांस्कृतिक संचितात संस्कृत वाङ्मयाबरोबर कलावंत, कारागीर यांचाही समावेश होता. वैदिक धर्माच्या पालखीत बसून या भूप्रदेशावर अवतरलेल्या भारतीय संस्कृतीचे आविष्कार वाङ्मयाबरोबरच शिलालेख, मंदिरे, वास्तुशिल्पे, कला इ. अनेक माध्यमांतून उमटले. महाभारताचा अनुवाद जावानीज भाषेत झाला. कंपूचियामधील ६ व्या शतकात खोदलेल्या एका शिलालेखात सोमशर्मा नावाच्या पुरोहिताने त्रिभुवनेश्वराला महाभारताची पोथी अर्पण केली आणि त्या मंदिरात तिच्या दैनंदिन पारायणाची सोय केली असा उल्लेख आहे.

शेल्डन पोलक या अमेरिकन प्राच्यविद्या पंडिताने एका लेखात म्हटले आहे, की इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकात आशिया खंडात पश्चिमेला पुरुषपुर(पेशावर)पासून पूर्वेला व्हिएटनामधील पांडुरंग आणि मध्य जावामधील प्रंबननपर्यंतच्या भूप्रदेशावर ठिकठिकाणी त्या त्या काळातल्या सत्ताधीशांचा दानशूरपणा व त्यांच्या अन्य गुणांची कीर्ती गाणारे शिलालेख हजारोंच्या संख्येत कोरले गेले. एकट्या कंपूचियामध्ये दीड हजाराहून अधिक संस्कृत शिलालेख असून फ्रेंच अभ्यासकांची एक तुकडी त्या शिलालेखांचा अभ्यास करण्यासाठी काही वर्षांपूर्वी तिथे तळ ठोकून होती. सम्राट अशोकाचे शिलालेख हे प्राचीनतम उपलब्ध शिलालेख असून ते प्राकृत भाषांमध्ये आहेत. यानंतरचे शिलालेख मात्र वर निर्देशिल्याप्रमाणे संस्कृतात आहेत. याची कारणमीमांसा करताना पोलक, फिल्योझा इ. विद्वान म्हणतात, की वैदिक संस्कृती जेव्हा दक्षिणपूर्व आशियामध्ये विस्तारली तेव्हा तिच्या आकर्षक आणि प्रगत स्वरूपामुळे प्रभावित झालेल्या तिथल्या सत्ताधीशांनी तिचे स्वागत केले. संस्कृत भाषेचे माधुर्य, नेमकेपणा आणि, पोलक म्हणतो त्याप्रमाणे, अन्य कोणत्याही

भाषेत नसलेले, कोणताही आशय व्यक्त करण्याचे तिचे सामर्थ्य जाणवल्यामुळे सत्ताधीशांनी आपली कीर्ती चिरंतन करण्यासाठी या सुंदर भाषेची निवड केली.

इथे एक आनुषंगिक मुद्दा नोंदवावासा वाटतो; तो म्हणजे भारतातही अनेक प्राकृत भाषांचा समांतर विकास होत असताना काव्य, शास्त्र, तसेच शिष्टाचाराच्या अभिव्यक्तीसाठी संस्कृतची निवड केली गेली, याचे कारण ती उच्चवर्णीयांची शिष्ट व्यवहारांची भाषा म्हणून आधीच प्रतिष्ठित झाली होती हे नसून तिची आंतरिक गुणवत्ता हे आहे. इसवी सनाच्या आरंभीच्या काही शतकांत नव्यन्याय या शास्त्राने शास्त्रीय लेखनाची एक परिष्कृत परिभाषा तयार केली तिचा सर्व संस्कृत शास्त्रलेखकांनी स्वीकार केला. या परिभाषेमुळे वैचारिक अभिव्यक्तीमध्ये आकारिकता (formalism) आली. पाणिनीय व्याकरणाच्या जोडीला नव्यन्यायशास्त्राने संस्कृत भाषेला आशयाच्या अभिव्यक्तीच्या बाबतीत अधिक प्रमाणबद्ध, सौष्ठवपूर्ण आणि बांधेसूद रूप दिले.

डॉ. कपिला वात्स्यायन या विदुषींनी संस्कृत भाषेच्या ठायी असलेल्या उपजत विलक्षण प्रतिभेचा (genius) उल्लेख करून शास्त्रकर्त्यांनी तिचा स्वीकार करण्यामागे या विलक्षण प्रतिभेबरोबरच एकाच शब्दातून अनेक अर्थ व्यक्त करण्याचे तिचे असाधारण सामर्थ्य, लवचिकता आणि शास्त्रीय लेखनासाठी आवश्यक असलेला काटेकोर नेमकेपणा, शिस्त हे गुणविशेष कारणीभूत आहेत असे म्हटले आहे.

याखेरीज बहुभाषिक भारतातील वेगवेगळ्या समाजघटकांना, संपर्कभाषेचे (lingua franka) काम करीत एका सूत्रात बांधण्याचे कामही संस्कृतने केले.

शिलालेखांप्रमाणेच वास्तुशिल्पे आणि कला यांच्या माध्यमांतूनही ही संस्कृती प्रकटली. कंपूचियामधले अंगकोरवट हे जगातले सर्वात मोठे हिंदू मंदिर मानले जाते. महाभारतकथा सांगणारी शिल्पे कोरलेला जगातला सर्वांत मोठा शिलापट्टही याच मंदिराच्या प्रांगणात आहे. थायलंडमधल्या एका भव्य बौद्ध विहाराच्या आतल्या भिंतींवर रामायणातल्या प्रसंगांची चित्रे रंगवलेली पाहून बौद्ध आणि हिंदू संस्कृतींच्या समन्वयाचा प्रत्यय येतो. इंडोनेशिया, जपान इत्यादी राष्ट्रांमधल्या काही नृत्यनाट्यप्रकारांत रामायण-महाभारतातील पात्रे व प्रसंग आजही रंगवले जातात.

संस्कृतने घडवलेल्या संस्कृतीचा आणखी एक महत्त्वाचा आविष्कार म्हणजे जीवनदर्शन. आशियाखंडातल्या ज्या भूप्रदेशावर भारतीय संस्कृती विस्तारली त्या भूप्रदेशातील समाजजीवनातही ती पाझरली. जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक, निकोप दृष्टिकोन, शांततामय सहजीवनाला अनुकूल असे आचरण, विविधतेत एकता, सत्य, अहिंसा यांसारख्या मूल्यांचे महत्त्व हे या संस्कृतीचे काही झिरपे. या भूप्रदेशातील लोकांचे आचारविचार, शिष्टाचार यांत जी समानता आढळते तिच्या मुळाशी ही संस्कृती आहे.

संस्कृतच्या तिन्ही अंगांची काही वैशिष्ट्ये संस्कृतचे यथार्थ रूप काही प्रमाणात स्पष्ट करावे या हेतूने सांगितली. ते सांगताना संस्कृतने आशियाखंडावर कसे अधिराज्य केले हे स्पष्ट केले. नंतरच्या काळात संस्कृतने पश्चिम गोलार्धही पादाक्रांत केला. संस्कृतचे वैश्विक स्वरूप कळण्यासाठी तिच्या पाश्चात्त्य जगाशी आलेल्या संपर्काबद्दलही थोडक्यात समजून घेणे उचित ठरेल.

हाल्बफाससारखे काही विद्वान प्राचीन काळी पायथॉगोरससारख्या ग्रीक तत्त्वज्ञांवर प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला होता असे मानतात. सिकंदरच्या स्वारीनंतर काही भारतीय तत्त्वज्ञ ग्रीसमध्ये गेले होते असेही मानले जाते. तथापि, त्यासंबंधी भरीव माहिती हाती लागत नाही.

पाश्चात्त्य जगाचा संस्कृतशी खऱ्या अर्थाने संबंध आला तो १६व्या शतकापासून. ख्रिस्ती धर्मोपदेशक आणि नंतर भारतावर राज्य करण्यासाठी आलेले इंग्रज आपापले हेतू सफल करण्याच्या उद्देशाने संस्कृतकडे वळले. संस्कृत वाङ्मयाचा खजिना अवचित हाती लागल्यामुळे ते प्रभावित झाले. धर्मप्रसार किंवा शासन या हेतूंना जिज्ञासेची जोड मिळाल्यामुळे त्यांची संस्कृतीची ओढ अधिक तीव्र झाली. रॉबर्टो डी नोबिलीसारखे धर्मोपदेशक संस्कृत संभाषणकला आत्मसात करून संस्कृत पंडितांशी संवाद साधू लागले. काही धर्मोपदेशक मिळतील तेवढी हस्तलिखिते घेऊन स्वदेशी परतले. त्यात संस्कृत व्याकरणापासून महाभारतापर्यंत वेगवेगळ्या विषयांवरचे ग्रंथ होते. या हस्तलिखितांच्या पावली संस्कृत युरोपातील जिज्ञासू अभ्यासकांपर्यंत पोचली. पूर्वेकडून आलेल्या या अद्भुत भाषेने आणि वाङ्मयाने त्यांचे डोळे दिपले. त्यांच्या कुतूहलाचे रूपांतर भारतवेडात (Indomania) झाले. भारतवेडाची जर्मनीत आलेली लाट हा हा म्हणता युरोपभर पसरली. दरम्यान सर विल्यम जोन्सने युरोभारतीय गृहीतकाचा पाया ठरलेले, संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधल्या विलक्षण साम्यासंबंधी, या लेखाच्या प्रारंभी उद्धृत केलेले विधान केले.

या सर्वाचा परिपाक होऊन युरोपात भाषाशास्त्र आणि प्राच्यविद्या या दोन नव्या ज्ञानशाखा उदयाला आल्या. या दोन्ही ज्ञानशाखांचा विस्तार आज अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. अन्य खंडांतही झाला असून तौलनिक तसेच ऐतिहासिक भाषाशास्त्र, दैवतशास्त्र, मानववंशशास्त्र, सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र आणि अलीकडेच, पाणिनीय व्याकरणाच्या अभ्यासातून जन्मलेले संगणकीय भाषाशास्त्र (computational linguistics) इ. अनेक ज्ञानशाखांच्या अभ्यासक्रमात संस्कृतला स्थान मिळाले आहे.

काही प्रमाणात याचे श्रेय इंग्रज राज्यकर्त्यांनाही आहे. त्यांनी भगवद्गीता, शाकुंतल यांसारख्या ग्रंथांचे इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध केल्यामुळे संस्कृत वाङ्मयाचा दरवळ सर्वदूर पसरला. त्याने मोहित झालेला श्लेगेल हा जर्मन अभ्यासक एके ठिकाणी लिहितो, ''इंग्रजांना भारतीय वाङ्मयाची मक्तेदारी हवी आहे काय? फार उशीर झाला आहे. त्यांना फार तर भारतातील दालचिनीची मक्तेदारी मिळेल. भारताचा बौद्धिक खजिना मात्र सर्वांच्या मालकीचा आहे.''

संस्कृतच्या वेडाने झपाटलेल्या युरोपियन उच्चभ्रू समाजाविषयी लिहिताना मॅक्सम्युलर या जर्मन विद्वानाने पुढील किस्सा सांगितला आहे : एका राज्याची डचेस आपल्या नियोजित

वराला संस्कृतमधून पत्रे पाठवीत असे. त्यालाही थोडेफार संस्कृत येत होते. ती पत्रे घेऊन जाणाऱ्या सेवकांना मात्र संस्कृत येत नसल्यामुळे मधल्यामधे ती पत्रे उघडून वाचण्याचा त्यांचा खटाटोप वाया जात असे!

सोळासतराव्या शतकापासून आजवर झालेले संस्कृतचे अध्ययन आणि संशोधन यांचा इतिहास मनोरंजक आहे. थोडक्यात एवढेच म्हणता येईल, की संस्कृतच्या आंतरिक आणि संपादित गुणसंपदेमुळेच संस्कृतला आज जगात प्रतिष्ठा आहे. व्हिएन्नामध्ये चरकसंहितेच्या आणि न्यायसूत्रांच्या चिकित्सित संपादनाचा प्रकल्प, हाले विद्यापीठात मोक्षोपाय शास्त्र या ग्रंथाच्या चिकित्सित संपादनाचा दीर्घकाळ चाललेला प्रकल्प, बर्कले विद्यापीठात रामायणाच्या सर्वांगीण अभ्यासाचा प्रकल्प, जपान आणि फ्रान्स या देशांत प्राचीन भारतीय गणित आणि खगोलविज्ञान या शास्त्रांवर चाललेले संशोधन आणि कितीतरी अभ्यासकांचे वेगवेगळ्या संस्कृत ग्रंथांच्या सखोल अध्ययनाचे वैयक्तिक प्रकल्प ही काही मोजकी उदाहरणे संस्कृतला मिळणाऱ्या प्रतिष्ठेची निदर्शने आहेत.

पाकिस्तानातील लाहोर विद्यापीठात असलेल्या सुमारे सहा हजार संस्कृत हस्तलिखितांची सूची करून ती अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यासाठी व्हिएन्ना आणि द. कोरियामधील विद्यापीठांनी संयुक्त निधी उभारला आणि हे काम पुरे झाले.

भारतात संस्कृतच्या अभ्यासाची स्थिती शालेय पातळीवर केविलवाणी आहे. त्रिभाषासूत्राने शाळांमधून संस्कृत जवळजवळ हद्दपार केल्यामुळे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही संस्कृतची पीछेहाट झाली आहे. एकीकडे संस्कृतला अभिजात भाषेचा दर्जा देऊन आणि राष्ट्रीय संस्कृत संस्थान यासारख्या, संस्कृतच्या अध्ययनाची आणि संशोधनाची सोय असणाऱ्या, दहा परिसर असलेल्या, विद्यापीठाची, तसेच दिल्ली, तिरुपती इ. ठिकाणी राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठांची स्थापना करून शासनकर्ते संस्कृतच्या विकासावर भरपूर निधी खर्च करीत आहेत; तर दुसरीकडे अभ्यासातील गुणवत्तेचा दर्जा घसरत आहे असे चित्र दिसत आहे.

भारतासारख्या राष्ट्रात, शिक्षणाचा अर्थार्जनाशी थेट संबंध जोडल्यामुळे 'सुजाण' पालक आपल्या पाल्याला संस्कृतच्या वाटेला जाऊ देत नाहीत. प्रतिक्षणी ज्ञानाची नवनवीन क्षितिजे विस्तारत असताना वर्तमानातील व्यवहाराशी सांगड घालता न आल्यामुळे व्यावहारिक मूल्य शून्य असणाऱ्या संस्कृतसारख्या विषयाचा ध्यास कुणी घेत नसेल तर त्यात गैर काहीच नाही असे आपातत: वाटणे स्वाभाविक आहे. त्यात भरीला संस्कृत ही विशिष्ट धर्माची, वर्णाची, मनुस्मृतीसारख्या ग्रंथांची भाषा तर आहेच, शिवाय ती अतिशय अवघड आहे, संस्कृत म्हणजे घोकंपट्टी, यांसारखे कितीतर अपसमज – काही कळतनकळत तर काही जाणूनबुजून – समाजात बिंबवले जात आहेत. वर वर्णन केलेले संस्कृतचे सर्वसामान्य जाणिवेपलीकडचे स्वरूप कळल्यानंतर हे अपसमज दूर व्हायला मदत होईल असा विश्वास वाटतो.

आता शेवटचा मुद्दा. आज संस्कृत कुठल्याही समाजघटकाची बोली नसताना, तिला व्यावहारिक मूल्य नसताना, बरेचसे संस्कृत वाङ्मय कालबाह्य झालेले असताना ती का शिकायची?

या प्रश्नाची काही उत्तरे खरे तर तिच्या स्वरूपाच्या, वर केलेल्या वर्णनात दडलेली आहेत. केवळ युरोभारतीय कुळातील नव्हे, तर कोणतीही भाषा शिकून प्रावीण्य मिळवण्याचे संस्कृत भाषा हे उपयुक्त साधन आहे. आचार्य विनोबा भावे कुराणातली आयते उच्चारातल्या बारकाव्यांसकट अस्खलित म्हणत. 'कुराणपठण कुणाकडे शिकलात?' असे विचारल्यावर ते म्हणाले, 'ही सर्व पाणिनीच्या संस्कृत व्याकरणाची किमया आहे.' संस्कृत शिक्षाग्रंथांनी वर्णांच्या उच्चारणाच्या प्रक्रियेचे केलेले सूक्ष्म वर्णन वाचून पाश्चात्त्य अभ्यासक थक्क झाले. आजचे आघाडीचे गायक संगीतकार अजय-अतुल यांनी एका मुलाखतीत सांगितले, की शाळेत शंभर गुणांचे संस्कृत घेतल्यामुळे त्यांचे उच्चार चांगले झाले. जगातले पहिले आणि प्रगत ध्वनिशास्त्र संस्कृतात आहे. ध्वनिशास्त्रावर अनेक संस्कृत ग्रंथ असून त्यांचा काळजीपूर्वक अभ्यास झाला तर ध्वनिशास्त्रातली नवी रहस्ये हाती लागणे अशक्य नाही.

संस्कृतच्या ध्वनिमाधुर्याच्या ओढीने अनेक भाषारसिक संस्कृतकडे आकृष्ट झाले आहेत. विख्यात उर्दू कवी महंमद इक्बाल आपल्या *जावेदनामा* या ग्रंथात म्हणतो, ''संस्कृतचा गोडवा उर्दूस कोठून येणार?'' ज्या विदेशी अभ्यासकांनी हा गोडवा अनुभवला, ते तो मनात साठवून परत गेले. आमचे पालक विदेशी भाषांमधल्या गोडव्याने मोहित होऊन तो आपल्या पाल्यांना चाखवू पाहत आहेत. यामुळे काय होईल? संस्कृतचा गोडवा अनुभवण्यासाठी त्यांना विदेशी पाठवण्याची वेळ येईल!

गेल्या शतकातले विख्यात प्राच्यविद्या विशारद डॉ. रा. ना. दांडेकर यांनी एकदा आपली कटू आठवण विद्यार्थ्यांना सांगितली ती अशी :

दुसऱ्या महायुद्धाच्या सुमाराला ते जर्मनीत संस्कृतमध्ये पीएच.डी. करण्यासाठी गेले असताना त्यांना बऱ्याच खटापटीनंतर हिटलरची मुलाखत घेण्याची संधी मिळाली. दीडच मिनिटाच्या त्या मुलाखतीत हिटलर त्यांना म्हणाला, ''आपली विद्या शिकण्यासाठी आपला देश सोडून तुम्ही इकडे येता! मला तिरस्कार वाटतो तुमचा!''

या बोलण्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. वास्तविक ते संस्कृत विद्या शिकण्यासाठी नव्हे, तर नवनवीन संशोधनपद्धती शिकण्यासाठी आणि तिथल्या सुसज्ज ग्रंथालयांचा उपयोग करून घेण्यासाठी गेले होते. संस्कृतचे अभ्यासक सर्वसाधारणपणे याच हेतूने परदेशी जातात, परंतु या पुढच्या पिढ्यांचे काय? त्यांना भविष्यात संस्कृत शिकण्याची संधी या देशात मिळाली नाही तर ते शिकण्यासाठी परदेशी जावे लागेल!

संस्कृत वाङ्मयाचा मूल्यवान नजराणा सर्वच भारतीयांसमोर खुला आहे. ललित साहित्यच नव्हे तर गणित, खगोलविज्ञान, वास्तुविद्या यांसारख्या वेगवेगळ्या विषयांवरचे अनेक ग्रंथ प्रकाशात येण्याची वाट पाहत आहेत. भारतीय गणितावर फ्रान्स आणि जपानसारख्या राष्ट्रांमध्ये चाललेल्या संशोधनानंतरच

भारतीय त्याकडे वळणार आहेत का? आमच्या प्राचीन परंपरेचे श्रेष्ठत्व आणि महत्त्व विदेशी अभ्यासकांच्या नजरेने पाहण्याची आणि त्यांच्या तोंडून ऐकण्याची आमची बुरसटलेली सवय घालवायची असेल तर आमच्या येणाऱ्या पिढ्यांमध्ये जाग निर्माण करायला नको का? उत्तम वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, अभियंता किंवा कलावंत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पुढ्यात संस्कृत सरस्वतीने आपला खजिना रिता केला आहे. त्याकडे लक्ष जायला हवे आणि तो हस्तगत करण्याची इच्छाशक्ती हवी.

हिरोशिमा विद्यापीठातल्या डॉ. ओगावा या संस्कृत अभ्यासकाने सांगितलेला हा किस्सा :

दूरदर्शनवरील अमेरिकन वाहिनीवर अमेरिकेत स्थायिक झालेल्या एका भारतीय संगणक तंत्रज्ञाची मुलाखत तो पाहात होता. त्या तंत्रज्ञाला त्याच्या यशाचे रहस्य विचारले, तेव्हा तो म्हणाला, ''लहानपणी केलेल्या संस्कृत पाठांतराने माझ्या स्मरणशक्तीला धार आली आणि संस्कृतच्या अभ्यासाने माझ्या विचारांना शिस्त आणि प्रगल्भता आली.''

हा किस्सा सांगून ओगावा म्हणाले, ''मी संस्कृत विषय निवडला याचा मला हे ऐकून आणखीच अभिमान वाटतोय.''

हा अभिमान भारतीयांमध्ये उपजत असायला हवा. प्राचीन भारतीय ज्ञानविज्ञानाची श्रेष्ठता पश्चिमेकडून येणाऱ्या नवविचारांच्या वाऱ्यावर स्वार होऊन आमच्यापर्यंत पोचल्यावर आम्ही खडबडून जागे व्हावे का? क्वांटम फिजिक्सचा जनक, नोबेलपुरस्कार विजेता श्रोडिंजर जेव्हा उपनिषदांचा गौरव करीत म्हणतो, ''जगाच्या उत्पत्तीच्या कोड्याचे उत्तर या वाङ्मयात आढळेल'', तेव्हाच आम्ही उपनिषदांच्या अभ्यासाकडे वळायचे का? साहित्यातले नोबेल पारितोषिक मिळवणारा अमेरिकन कवी टी. एस. इलियट जेव्हा म्हणतो, ''प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान वाचल्यावर अमेरिकन तत्त्वज्ञ मला शाळकरी वाटले'', तेव्हा 'तुझं आहे तुजपाशी' असा साक्षात्कार होत आम्ही आमच्याकडे दृष्टी वळवायची का?

केंद्रशासनाचा 'राष्ट्रीय पांडुलिपी मिशन' हा, हस्तलिखितांच्या संरक्षण-जतनाचा प्रकल्प गेल्या काही वर्षांपासून सक्षम नेतृत्वाअभावी रखडला आहे पुण्यातल्या डेक्कन कॉलेजमध्ये अर्धशतकाहून अधिक काळ चालू असलेला संस्कृत कोशाचा (Dictionary of Sanskrit on historical principles) प्रकल्प असाच पुरेशा आर्थिक पाठबळाविना मालवण्याच्या स्थितीत आहे. असे कितीतरी संस्कृतच्या विकासासाठी उपयुक्त ठरणारे प्रकल्प बंद होण्याच्या वाटेवर आहेत. त्यांना आर्थिक पाठबळ पुरवणाऱ्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव जितका या दुर्दशेला जबाबदार आहे, तितकाच सामाजिक इच्छाशक्तीचा अभावही जबाबदार आहे. इटलीमधल्या सार्डीनिया बेटावर जर संस्कृतसमासरचनेवरच्या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन होऊ शकते तर आयआयटीमध्ये प्राचीन भारतीय तंत्रविज्ञानावर कार्यशाळेचे आयोजन का होऊ शकत नाही? काही वेळा असे प्रयत्न झालेले दिसतात, पण त्यांचा पाठपुरावा होताना दिसत नाही. आणि काही वेळा पाठपुरावा करणारे अतिराष्ट्रवादाच्या आहारी जाऊन प्राचीन भारतात नसलेले तंत्रज्ञान आणि विज्ञान शोधून काढू लागले आहेत! तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी एक किस्सा सांगितला तो असा :

एकदा घरासमोरच्या बागेत पहाटे फेऱ्या मारत असताना त्यांचे शेजारी पलीकडच्या कुंपणातून म्हणाले, ''अहो, मी काल बागेत दहा फूट खणल्यावर ही तार सापडली. प्राचीन काळी तारायंत्र असलं पाहिजे.'' दुसऱ्या दिवशी पहाटे फिरताना ते भेटल्यावर तर्कतीर्थ त्यांना म्हणाले, ''अहो, काल मीही माझ्या बागेत वीसफूट खोलपर्यंत खणल्यावर मला काहीच सापडले नाही. प्राचीन काळी बिनतारी तारायंत्र असले पाहिजे.''

अतिराष्ट्रवादाच्या आहारी जाऊन प्राचीन भारतात संगणकासारखे अत्याधुनिक तंत्रज्ञान शोधणारे यातून योग्य तो बोध घेतील असे वाटते.

शेवटी, संस्कृत ही भारताची ओळख आहे. विशेषत: जागतिकीकरणानंतर, अवघ्या जगाचे सपाटीकरण झाल्यानंतर, जगाच्या नकाशावर ठळकपणे उठून दिसण्यासाठी अशी ओळख आवश्यक असते. भारताबाहेर भारताला सन्मान आणि प्रतिष्ठा मिळवून देणारा हा समृद्ध वारसा आहे. काळाच्याही पुढे जाणारे विचार जिच्या कुशीत अजूनही दडले आहेत अशा संस्कृत भाषेचे, विद्येचे, संस्कृतीचे जतन लोकशक्ती एकवटून होणे गरजेचे आहे. केवळ शालेय पातळीवर संस्कृत शिकवून ही गरज भागणारी नाही. संस्कृतच्या विकासाच्या सर्वच प्रयत्नांत गुणवत्ता आणणे तितकेच गरजेचे आहे. यासाठी प्रज्ञावान, कार्यक्षम आणि चारित्र्यसंपन्न नेतृत्व निर्माण करणे गरजेचे आहे. संभूय समुत्थान झाले तरच हे होऊ शकते. संस्कृतकडे पाहण्याचा दृष्टिकोन जसा रुक्ष व्यावहारिक नको, तसाच तो अतिराष्ट्रवादी श्रद्धेने भारलेलाही नको; तो यथार्थ हवा.

तरीही संस्कृतप्रेमींनी निराश व्हायचे कारण नाही. जोवर माणसाला ज्ञानाची आस आहे, नवनवीन क्षितिजे पादाक्रांत करण्याचा ध्यास आहे, परंपरेची कास आहे, जे जे भव्य उदात्त, सुंदर त्याविषयी ओढ आहे, नादमाधुर्याचे वेड आहे, चिरंतन गाठण्याची धडपड आहे, सुसंस्कृत होण्याची तळमळ आहे, तोवर संस्कृत टिकणारच आहे. माणसाला जगण्यासाठी भाकरीइतकीच फुलाची गरज असते. संस्कृत हे एक फूल आहे, आजही टवटवीत, अनाघ्रात, सुगंधाने भरलेले, वैश्विक आशयाचा मकरंद निथळणारे.

टीपा : १) हा लेख लिहीत असताना माझे संगणक अभियंता आणि संस्कृतप्रेमी असलेले स्नेही श्री. सलील कुलकर्णी यांचे मला पुष्कळ साहाय्य झाले.

२) डॅनियल एच इंगाल्स ह्या गेल्या शतकातील हार्वर्ड विद्यापीठातील संस्कृतच्या प्राध्यापकांनी संस्कृत भाषेचे वर्णन 'परीकथेतील निद्रिस्त सुंदरी' असे केले आहे. या वर्णनावरून मला लेखाचे शीर्षक सुचले.

*(डॉ. भाटे पुणे विद्यापीठात संस्कृत विभागाच्या प्रमुख होत्या आणि लेखात उल्लेख केलेल्या बहुतेक आंतरराष्ट्रीय परिषदांमधे व प्रकल्पांमधे त्यांचा सहभाग होता आणि असतो.)*

*(जून २०१७)*

# मिळून केलेला लेखनप्रवास

**माधुरी तळवलकर**

मासिक प्रकाशनाच्या जोडीने कथाशिबिरासारखे इतरही काही साहित्यिक उपक्रम अंतर्नादने वेळोवेळी राबवले. त्यात सहभागी असणाऱ्यांनी आपापले छोटे छोटे गट तयार गेले, गावोगावी त्यांच्या गाठीभेटी सुरू झाल्या. त्यांतूनही काही जणांना वेगळ्या वाटा सापडत गेल्या.

काही वर्षांपूर्वी अंतर्नाद मासिकातर्फे एक कथाशिबिर आयोजित केले होते. तिथे आमच्यासारख्या लेखकांनी अशी अडचण बोलून दाखवली की, 'आपली कथा सकस व्हावी असे आम्हाला वाटतेच. आम्ही आपल्या परीने आमच्या मनात जे असते, ते कथारूपात उतरवतोही. पण शेवटी ते दुसरी व्यक्ती जेव्हा वाचते, तेव्हा ते तिला कसे वाटते? असे विचार आमच्या मनात येत राहतात.'

बहुतेक सहभागी लेखकलेखिका वरील विचाराशी सहमत झाले. पण यावर उपाय काय काढावा ते लक्षात येईना. मग अचानक मनात विचार आला – आपण आपल्याच कथेवर चर्चा केली तर?

आम्ही सातआठ लेखकलेखिकांनी मिळून त्या कथाशिबिरात असे ठरवले, की आता आपण आठपंधरा दिवसांतून एकदा भेटत जाऊ. येताना कुणीतरी एकाने नुकतीच लिहिलेली स्वतःची एक कथा आणायची. ती वाचून दाखवायची. ठरल्याप्रमाणे आम्ही एका बागेत अशा प्रकारे जमू लागलो. लक्षात आले, की अशा चर्चेचा लेखकाला पुष्कळच उपयोग होतोय. कथेचा रोख काय आहे, कथा कनव्हिन्सिंग वाटतेय का, तपशिलात काही चूक आहे का... अशा अनेक मुद्द्यांबाबत प्रत्येक जण आपापले मत या बैठकीत सांगत असे. कोणी काही बदल सुचवत असे. माझ्या असे लक्षात आले, की अगदी कोणतीही सूचना आपण स्वीकारली नाही तरी, ह्या निमित्ताने कथेविषयीच्या आपल्याच संकल्पना स्पष्ट व्हायला मदत होते आहे. मग हा प्रकार सगळ्यांनाच आवडू लागला.

मात्र हा ग्रुप नंतर हळूहळू आकसू लागला. कुणाला ती वेळ जमायची नाही, कुणाचे दुसरे काही कारण असायचे. कुणी आपल्या कथेवर चर्चा झाल्यावर येईनासे झाले. पण आम्ही चौघीजणींनी मात्र एकमेकींना घट्ट धरून ठेवले. अनघा केसकर, ज्योती कानेटकर, योगिनी वेंगुर्लेकर आणि मी; अशा आम्ही चौघी नियमितपणे भेटत असू.

आमच्यापैकी कुणाला काही पुरस्कार मिळाला, पुस्तक प्रकाशित झाले, तर तिचे कौतुक करण्याच्या निमित्तानेही आम्ही भेटण्याची ही संधी घ्यायचो आणि मग घरी आरामात तीनचार तास उलटसुलट चर्चा व्हायची. कधी ज्या कथेवर चर्चा झाली असेल ती सुधारून, पुन्हा बाकीच्यांना पाठवून, आता कशी वाटतेय ते विचारले जायचे. कधी त्या चर्चा झालेल्या कथेचे संबंधित लेखिकेने पुढे काय केले, हे कळायचेही नाही. पण आम्हांला त्या कथेचे पुढे काय झाले यापेक्षा समोर आलेल्या कथेवर वेगवेगळ्या अंगाने विचार करण्यातच जास्त रस असायचा.

अंतर्नादच्या या कथाशिबिराआधी आमचे एखाददुसरे पुस्तक प्रसिद्ध झालेले होते. आता आपल्या कथा प्रकाशनासाठी कुणाकडे पाठवाव्यात, यावरही आम्ही एकमेकींशी चर्चा करू लागलो. एकीला एक प्रकाशक चांगला वाटला की लगेच तिकडे बाकीच्यांनाही आपापले लेखन घेऊन पाठवणे चालू झाले. कधी कुणी गावाला गेलेली असताना तिच्या पुस्तकाची प्रुफे तयार झाली, तर तेवढ्यासाठी तिच्या पुस्तकाचे काम अडू नये म्हणून आमच्यापैकी दुसरी कुणीतरी ते तपासून देऊ लागली. कुणी जास्त काळासाठी परदेशी वगैरे जाणार असेल तर प्रकाशकाला सांगून, करारपत्रात तशी दुसऱ्या मैत्रिणीला ॲथॉरिटी देऊन, तिची करारपत्रावर सहीसुद्धा घेतली जायची. पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रकाशकाने आमच्याकडे पाठवले की, आम्ही ते एकमेकींना कॉम्प्युटरवर पाठवून कसे वाटते ते विचारू लागलो. थोडक्यात, एकीचे पुस्तक तयार होतानासुद्धा त्यात बाकीच्या तिघी सामील असायच्या. एक प्रकारे आम्ही एकमेकींच्या सहवासात लेखक म्हणून समृद्ध होत होतो. आणि आम्हा सर्वांनाच ते आवडत होते.

अशातच अनघा केसकर या माझ्या मैत्रिणीला विश्वकर्मा प्रकाशनचा शोध लागला. विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजी या संस्थेने अलीकडेच प्रकाशन व्यवसाय मोठ्या धडाक्याने सुरू केल्याचे कळले. तिने त्यांच्याकडे तिचे दोन कथासंग्रह होतील इतक्या कथा दिल्या. मग आम्ही तिघीही पाठोपाठ आपापल्या कथा घेऊन विश्वकर्मा प्रकाशनच्या विशाल सोनी यांच्याकडे हजर झालो.

त्यांची लेखकांशी वागण्याची पद्धत अपवादात्मक म्हणावी इतकी अदबशीर आणि चोख होती. सुदैवाने आम्हां सर्वांच्या

कथा त्यांना प्रकाशित करण्यायोग्य वाटल्या. मग एक कल्पना सुचली. आपण चौघी मिळून आपली पुस्तके एकाच वेळी प्रकाशित करू या. विशाल सोनींना आम्ही ही कल्पना सांगताच त्यांनी हे काम आव्हान म्हणून स्वीकारले. सर्वांच्या अनुमतीने एक तारीख निश्चित केली व त्या वेळी पाचही पुस्तके प्रकाशित व्हावीत असे ठरले.

मग हे प्रकाशन कोणाच्या हस्ते करावे असा विचार आला. अंतर्नाद मासिकातून आम्हां चौघींचेही लेखन मधूनमधून प्रकाशित होत असते. तेव्हा या मासिकाचे संपादक भानू काळे यांच्या हस्ते आपल्या पुस्तकांचे प्रकाशन झाले तर फारच चांगले, असे आम्हांला वाटले. त्यांना तसे विचारताच त्यांनी येण्याचे आनंदाने मान्य केले. मग सभागृह, मेनू, निमंत्रित... अशा एकेक गोष्टी ठरत गेल्या. (या निमित्ताने आम्हा चर्चाप्रिय मैत्रिणींना भेटण्यासाठी आणखी एक निमित्त मिळाले!)

सगळ्यांच्या सहकार्याने १४ मार्च २०१७ या दिवशी संध्याकाळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या सुमंत मुळगावकर सभागृहात आमच्या पाच पुस्तकांचा प्रकाशन सोहळा पार पडला. 'दान' आणि 'गुंता' ही दोन पुस्तके अनघा केसकर हिची होती. 'स्वान्त सुखाय' हा कथासंग्रह ज्योती कानेटकरचा होता. योगिनी वेंगुर्लेकर हिचा 'जाणता अजाणता' आणि 'तनहाई' हा माझा कथासंग्रह... अशी पाच पुस्तके त्या समारंभात प्रकाशित झाली. भानू काळे यांनी प्रसंगास अनुरूप असे मराठी वाङ्मयाबद्दल आणि एकूण साहित्यजगताबद्दल काही महत्त्वाचे मुद्दे मांडणारे भाषण केले. कथासंग्रहाचा फॉर्म घेऊन येणारे लेखन आक्रसत चालले आहे असे ते म्हणाले. पुस्तकांच्या दुकानात इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कथासंग्रहाची जागा कमीकमी होत चालली आहे आणि आपले स्थान निर्माण करण्यासाठी बदलत्या परिस्थितीनुसार आपले लेखन अधिक सकस व्हावे आणि ते अधिकाधिक वाचकांपर्यंत पोचावे म्हणून काय करता येईल यावर कथालेखकांनी नव्याने विचार करायला हवा असेही ते म्हणाले.

कथासंग्रह मोठ्या प्रमाणात वाचले जातात, लोकांना ते हवे असतात, त्याविषयी आम्ही सर्व्हे केला आहे असे विशाल सोनींनी त्यांच्या भाषणात सांगितले. ते सातच मिनिटे बोलले पण अगदी खेळीमेळीत आणि तरीही माहितीपूर्ण, आशादायक असे त्यांचे बोलणे होते.

लेखिका म्हणून आपण काय बोलायचे यावर आम्ही पुष्कळ ऊहापोह केला होता. त्यानुसार मुख्य गोष्ट अशी ठरली की, प्रत्येकीने फक्त पाच मिनिटे बोलायचे. म्हणजे लेखिकांचे एकूण मनोगत वीस मिनिटांचे होईल. मग विषय असा ठरला, की प्रत्येकीने स्वतःची एखादी कथा निवडून त्याचे कथाबीज मनात कसे रुजले आणि मग त्याने कथारूप कसे धारण केले... हा प्रवास उलगडून सांगायचा. मात्र पाचच मिनिटात! आम्ही खरोखरच त्याप्रमाणे वीस मिनिटांत चारजणी बोललो. (मला वाटते, श्रोत्यांना प्रकाशन समारंभातील हा भाग सगळ्यात दिलासादायक वाटला असला पाहिजे!)

प्रकाशनसमारंभातल्या सर्वच वेळा अगदी काटेकोर सांभाळल्या होत्या. समारंभ सुरू झाला तेव्हा सभागृह गच्च भरलेले होते. त्यानंतर दहापंधरा मिनिटांनी आलेल्यांना उभे राहून कार्यक्रम ऐकावा लागला. 'मिळून साऱ्याजणी'च्या विद्याताई बाळ आणि 'कथाश्री'चे प्रकाश पानसे हे संपादक या वेळी उपस्थित होते. वंदना बोकील, भारती पांडे, अर्चना अकलूजकर, मृणालिनी चितळे अशा लेखिका; दीपक पारखी, श्रीकांत जोशी हे लेखक; साहित्यप्रेमी भगिनी मंडळातील ज्योत्स्ना आफळे, मीरा शिंदे, शलाका माटे... अशा अनेक जाणकार व्यक्ती कार्यक्रमास आल्याने समाधान वाटले. सूत्रसंचालन संगीता पुराणिक आणि आभारप्रदर्शन प्रमोदिनी वडके-कवळे या आमच्या लेखिका असलेल्याच मैत्रिणींनी केले.

एक मात्र आवर्जून सांगावेसे वाटते की, विश्वकर्मा प्रकाशनच्या विशाल सोनी यांनी जर आमच्या कल्पनेला पाठिंबा देऊन पाच पुस्तके एकाच वेळी प्रकाशित करण्याची जबाबदारी घेतली नसती तर आमच्या ह्या कल्पनेच्या भराऱ्या हवेतच राहिल्या असत्या.

भानू काळेंनी आपल्या भाषणात आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला होता. आम्ही चारजणींनी एकत्र येऊन हा समारंभ केला हे त्यांना अगदी वेगळे, उल्लेखनीय असे वाटले. मराठी साहित्यक्षेत्रात असे सहसा घडत नाही; ज्याचे पुस्तक प्रकाशित होते, तो एकटा त्या त्या वेळी त्याचे प्रकाशन करतो; आम्ही चौघी लेखिकांनी मिळून एकाच वेळी प्रकाशन समारंभ आयोजित केला हे त्यांना अगदी वेगळे वाटले. पण मग हळूहळू काहीजणांकडून याचा आवर्जून उल्लेख केला गेला. भानू काळेंनी आम्हाला सांगितले की, 'हा प्रकाशनसमारंभ तुम्ही चौघींनी मिळून एकत्रितपणे करेपर्यंतचा तुमचा प्रवास कसा झाला, हे तुम्ही लिहून द्या. इतर लेखकलेखिकांच्या दृष्टीने हा प्रवास अनुकरणीय आहे.'

मग आम्हीही विचार करू लागलो. लेखन ही एकट्याने करायची गोष्ट आहे असे आपल्याला वाटते आणि त्यामुळे बहुतेक वेळा लेखक किंवा लेखिका आपणच उभ्या केलेल्या कल्पनाविश्वात रममाण होतात. लेखन करताना ही तन्मयता आवश्यकच असते. चिंतन, मनन यासाठी एकांत हवाच असतो. पण कधीकधी यातून लेखकाला एकटेपणा येतो. एक प्रकारे आपल्या लेखनासाठी लेखकाने चुकवलेली ही किंमत असते. त्यातून त्याचे इतरही काही तोटे होतात. ते टाळता येतील का? जर असेच एकेकटे लेखक एकत्र येऊन एकमेकांशी विचारांची, कल्पनांची देवाणघेवाण करू लागले तर? आम्हांला समृद्ध करून गेलेला अनुभव इतरांनाही आनंद देऊ शकेल असे वाटले.

आमची एकमेकींशी ओळख झाल्याच्या पहिल्या भेटीपासून आम्ही आज ज्या मुक्कामावर पोचलो आहोत, तिथपर्यंतचा हा प्रवास खरोखरच फार समाधान देणारा आहे.

*(दिवाळी २०१७)*



# समाजवेध

# हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरा आणि मी

**गंगाधर गाडगीळ**

मराठी साहित्यातील नवतेच्या पर्वाचे एक प्रवर्तक आणि श्रेष्ठ विचारवंत गंगाधर गाडगीळ आपले परंपरेशी असलेले नाते या खास अंतर्नादसाठी लिहिलेल्या लेखात उलगडून दाखवत आहेत. या परंपरेतील आजच्या काळाशी सुसंगत नसलेल्या गोष्टींचा त्याग करायला हवा पण अनेक गोष्टी जतन करणेही का आवश्यक आहे हे सांगणारा लेख.

परवाच एका चर्चासत्रात मला एक सिंधी प्राध्यापक भेटले. तेथल्या चर्चेत सिंधी भाषेची भारतात कशी दुर्दशा झाली आहे, ते त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडलं.

ते म्हणाले, ''ह्या भारतात आम्हाला स्वत:चा असा प्रदेश नाही. त्यामुळे सिंधीला नित्याच्या व्यवहारात कुठेच स्थान नाही. साहजिकच महाराष्ट्रातले सिंधी मराठी भाषिक होत आहेत. गुजराथेतले गुजराथी भाषिक होत आहेत. आता सिंधी भाषा फक्त सिंधीचे शिक्षक आणि प्राध्यापक बोलतात आणि सिंधी साहित्य तेच फक्त एकमेकांसाठी लिहितात आणि वाचतात. उलट पाकिस्तानात सिंधमधले मुसलमान सिंधी भाषा बोलतात आणि लिहितात. तिथलं सिंधी साहित्य तिथल्या भूमीत रुजलेलं आहे आणि म्हणूनच सकस आहे.''

चर्चासत्राच्या मध्यंतरात मी त्यांना भेटलो आणि सिंधी भाषेच्या दुरावस्थेविषयी सहानुभूती व्यक्त केली. मग मी त्यांना म्हटलं, ''तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे. तुम्हाला अवमानित करण्यासाठी अगर हिणविण्यासाठी मी तो विचारीत नाही, तर खऱ्याखुऱ्या बौद्धिक कुतूहलातून तो माझ्या मनात उभा राहिला आहे. तो असा की, फाळणीच्या वेळी तुम्ही मुसलमान धर्म स्वीकारला असता तर तुम्हाला सिंधमध्ये रहाता आलं असतं आणि मग सिंधी भाषा नित्याच्या जीवनात बोलण्याची आणि त्या जीवनातून निर्माण होणारं सिंधी साहित्य वाचण्याची आणि लिहिण्याची संधी तुम्हाला मिळाली असती. पण तुम्ही तिथे राहिला नाहीत, ते का?''

ते प्राध्यापक आश्चर्याने माझ्याकडे पाहात म्हणाले, ''असं काही करावं हा विचार माझ्या मनातही आला नाही.''

मी पुढे म्हटलं, ''तेव्हाची गोष्ट सोडून द्या. समजा आता तुम्हाला कोणी सांगितलं की मुसलमान हो आणि सिंधमध्ये येऊन रहा. तर तुम्ही तसं कराल का?''

यावर ते काहीच बोलले नाहीत. नुसते माझ्याकडे बघत राहिले. मग बऱ्याच वेळानं ते म्हणाले, ''नाही! आजही मी जाणार नाही.''

मी म्हटलं, ''का?''

ते म्हणाले, ''या प्रश्नाचं उत्तर असं चटकन मला देता येणार नाही.''

हे प्राध्यापक काही कडवे हिंदुत्वनिष्ठ नव्हते. महाराष्ट्रातली पुरोगामी मंडळी जशी चवताळून हिंदू धर्मावर आग पाखडतात तशीच टीका कदाचित त्यांनीही केली असती. पण आपला धर्म सोडून मुसलमान व्हावं, हे त्यांना पटत नव्हतं.

त्यांची गोष्ट मी बाजूला ठेवली आणि स्वत:ला असा प्रश्न केला की, 'समजा, तुझ्यावर असा प्रसंग आला असता आणि मुसलमान होण्याऐवजी निधर्मी होण्याचा पर्याय तुझ्यापुढे ठेवला तर तो तू स्वीकारशील का?'

या प्रश्नाचं उत्तर देताना माझ्या मनाचा गोंधळ उडाला. कारण आजही मी एकप्रकारे निधर्मीच आहे.

एक तर मी नास्तिक आहे. मी पूजा-अर्चा करीत नाही. गोव्यात जाऊन मंगेशाच्या पाया पडायचं आणि मुंबईत येऊन हिंदू धर्मावर टीका करून पुरोगामी म्हणून मिरवायचं असा प्रकार मी करीत नाही. मी खरोखरच नास्तिक आहे. मी जसे धार्मिक विधी करत नाही, तशीच जातपातही मानत नाही. मी आणि माझ्या मुलांनी आंतरजातीय आणि आंतरधर्मीयदेखील विवाह केले आहेत. ब्राह्मण असूनही मी मासे-मटण खातो.

हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरेत अनेक दोष आहेत, ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. अस्पृश्यता ही फारच भयंकर गोष्ट आहे, हे काही कोणी सांगायला नको. समाजाची अनेक जातींत झालेली विभागणी, त्यात उच्च-नीच असा केलेला भेदभाव ह्या गोष्टीदेखील तितक्याच भयंकर. स्त्रियांना आणि त्यातल्या त्यात विधवांना या समाजात मिळणारी वागणूक आणि इतर अनेक चालीरिती व रुढी शरम वाटावी अशाच आहेत, हेदेखील उघडच आहे.

अशा परिस्थितीत मी माझं हिंदुत्व नाकारावं हे तर्कसंगत वाटतं. पुन्हा आज अशी परिस्थिती आहे की माझं हिंदुत्व नाकारलं तर त्यापासून मला काहीही तोशीस पडणार नाही. मला कोणी

वाळीत टाकणार नाही, नोकरीवरून काढणार नाही, अगर मला मानसन्मान मिळणार नाहीत असंही होणार नाही. उलट मी हिंदू धर्मावर जर पुन्हा पुन्हा तुटून पडलो, तर पुरोगामी म्हणून मला मान्यता मिळेल आणि कोणी सांगावं, मी थोर विचारवंतदेखील ठरेन! असं असूनही माझं हिंदुत्व मी नाकारावं असं मला वाटत नाही. उलट या हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरेवर जेव्हा लोक तुटून पडतात, तिला अक्षरशः पायाखाली तुडवतात, तेव्हा तिची कड घ्यावी, तिच्यातही बरंच काही चांगलं आहे असं म्हणावं असं मला वाटतं.

सुदैवानं या बाबतीत मी एकाकी नाही. कारण महाराष्ट्रातल्या व भारतातल्या अनेक समाजसुधारकांनादेखील असंच वाटत आलेलं आहे. जगन्नाथ शंकरशेट, बाळशास्त्री जांभेकर इत्यादी समाजाच्या नेत्यांनी हिंदू परंपरेतले दोष दूर करावे, असा प्रयत्न केला; पण त्यांनाही हिंदू परंपरेविषयी आत्मीयता व अभिमानही वाटत होता. हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरेतली मूलतत्त्वं अत्यंत उदात्त आहेत, तिच्यातले दोष हे नंतर शिरलेले आहेत, अशी भूमिका त्यांनी घेतली. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग केला; पण त्यांनी धर्म स्वीकारला तो बुद्धाचा आणि त्याचा आध्यात्मिक विचार आपल्या परंपरेत सामावून घ्यावा, असा प्रयत्न शंकराचार्यांसारख्या हिंदू विचारवंतांनी फार पूर्वीच केला होता.

ह्या सगळ्यांना ही परंपरा पूर्णपणे अगर मूलत:देखील नाकारू नये, असं का वाटलं? या प्रश्नाची उत्तरं या सगळ्यांनी आपापल्या लेखांत अगर ग्रंथांत देऊन ठेवलेली आहेत. त्याची उजळणी न करताही परंपरा नाकारू नये असं मला का वाटतं तेवढं मी सांगतो.

ख्रिस्ती, मुसलमान वगैरे अन्य धर्म सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान, न्यायी व दयाळू अशा परमेश्वराच्या अस्तित्वावर आधारलेले आहेत. हे अस्तित्व हा त्या धर्माचा पाया आहे. निदान माझ्या अल्पस्वल्प वाचनातून माझा तसा समज झालेला आहे. हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरेतदेखील अशा परमेश्वराचं अस्तित्व अनुस्यूत आहे. पण त्याबरोबरच निर्गुण, निराकार ब्रह्माची संकल्पना अशा परमेश्वराचं अस्तित्व नाकारणारी आहे. निदान ती संकल्पना स्वीकारून परमेश्वराचं अस्तित्व नाकारणं माझ्यासारख्या नास्तिकाला शक्य आहे.

पण मला हिंदू आध्यात्मिक परंपरेचं आकर्षण वाटतं ते आणखी दोन कारणांसाठी. त्या परंपरेत परमेश्वराचं अस्तित्व नाकारूनही माणसाच्या मनाची एक आध्यात्मिक ओढ असते, त्याला आध्यात्मिक म्हणता येतील असे अनुभव येऊ शकतात हे मान्य करता येतं. प्रत्येक माणसाला आध्यात्मिक अनुभव येऊ शकतो, हे मान्य केल्यावर प्रत्येक माणसाच्या बाबतीत तो वेगवेगळा असू शकतो, सगळ्यांना एकच प्रकारचा आध्यात्मिक अनुभव येण्याची गरज नाही, हे मान्य करण्यात मला तरी कोणतीही अडचण दिसत नाही. म्हणून एकाच वेळी भक्तीसंप्रदाय व अद्वैत संप्रदाय असू शकतात हे हिंदू आध्यात्मिक परंपरा मान्य करू शकते. आध्यात्मिक अनुभवाची बहुविधता मान्य करणं हा एक क्रांतिकारक विचार आहे, असं मला वाटतं. हिंदू आध्यात्मिक परंपरा तो मान्य करते, म्हणून मी नास्तिक असूनही मला तिचं आकर्षण वाटतं. बहुविधतेला मान्यता देण्याची ही हिंदू परंपरेची प्रवृत्ती सर्वच क्षेत्रांत दिसून येते.

एखाद्या सांस्कृतिक परंपरेत ज्ञानाची निरनिराळी क्षेत्रं, विविध कला इत्यादींचा विकास किती व कसा झाला, त्या परंपरेनं या विकासाला काही अडथळे निर्माण केले का हा माझ्या दृष्टीनं महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि कोपर्निकस, गॅलिलिओ, डार्विन इत्यादींच्या शास्त्रीय सिद्धान्तांच्या स्वीकाराला जसा ख्रिस्ती परंपरेनं विरोध केला तसा या हिंदू परंपरेनं केलेला दिसत नाही. आर्यभटाला त्याचं संशोधन करायला व सिद्धान्त मांडायला विरोध झाल्याची मला माहिती नाही. पाणिनी, आयुर्वेदाचे आचार्य, योगाचे प्रवर्तक इत्यादींना आपापल्या क्षेत्रातलं संशोधन करण्यास या परंपरेनं मोकळीक दिली. आणि कौटिल्याचं अर्थशास्त्र वा रतिशास्त्र यांच्याही मांडणीला कुठे अडथळा आलेला दिसत नाही. ज्याला आपण व्यसनीपणा म्हणू, त्याचाही प्रचार तांत्रिकांनी या परंपरेत केला. यापैकी अनेक बाबतीत अन्य काही परंपरांनी किती संकुचित भूमिका घेतली आणि किती अंधश्रद्धा दाखविली ते मी सांगितलं पाहिजे असं नाही. अशा प्रकारे ज्ञानाच्या क्षेत्रात स्वातंत्र्य व बहुविधता यांचा स्वीकार या परंपरेनं केलेला दिसतो.

शास्त्रज्ञ बाजूला ठेवले तर सर्वसामान्य माणसाला जीवनाचं व नैतिक प्रश्नांचं आकलन करायला या हिंदू परंपरेत रामायण आणि महाभारत हे ग्रंथ शिकवतात आणि महाभारतात जे मानवी जीवनाचं बहुविध आणि विराट दर्शन घडतं, त्याची व्यामिश्रता आणि गुंतागुंत यांचा जो प्रत्यय येतो, त्यात निर्माण होणाऱ्या व्यावहारिक व नैतिक प्रश्नांची जी उकल होते, मानवी जीवनातल्या उत्तरं नसलेल्या प्रश्नांचं जे दर्शन घडतं, मानवी मनाचा जो सखोल वेध घेतला जातो, तो केवळ अपूर्व आहे. जगातल्या इतर कोणत्याही सांस्कृतिक परंपरेत जीवनाचं इतकं सर्वांगीण आकलन घडविणारा ग्रंथ असेल असं मला वाटत नाही.

महाभारत ही जगाच्या साहित्यातील सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे, असं मला वाटतं. त्याबरोबरच जगाच्या साहित्यात ज्यांना मानाचं स्थान मिळेल अशा इतरही अनेक साहित्यकृती या परंपरेनं निर्माण केल्या आहेत. त्यामुळे ही परंपरा नाकारणं मला केवळ अशक्य वाटतं.

ही परंपरा संपन्न करणारी आणि साहित्यिकाच्या दृष्टीनं बहुमोल असलेली आणखी एक गोष्ट म्हणजे या परंपरेतील पुराणकथांची व मिथकांची संपत्ती. या तोडीच्या पुराणकथा ग्रीक-रोमन परंपरेतदेखील इतक्या वैपुल्यानं नाहीत.

या परंपरेतील देवळातील शिल्पकृती कलात्मक दृष्टीनं अपूर्व आहेत. त्यातल्या अनेक आधुनिक कलेतल्या अनेक प्रवृत्तींची आणि शैलींची पूर्वसूचना देणाऱ्या आहेत. तसंच त्यांचे विषय व विविधता पाहिली म्हणजे ही परंपरा किती खुली आणि किती स्वीकारशील व समावेशक आहे, त्याचा प्रत्यय येतो. हे अपूर्व कलावैभव ज्या परंपरेनं निर्माण केलं ती नाकारावी असं मला कसं वाटेल!

यावर या परंपरेचे टीकाकार असं म्हणतील की, 'या सर्व गोष्टी आम्हालाही पुष्कळशा मान्य आहेत. पण या पूर्वीच्या गोष्टी झाल्या. आज या परंपरेतून काय निर्माण झालं आहे ते पाहा. जातीपातींत विभागलेला, अस्पृश्यता मानणारा, विषमता पोसणारा, माणसांची मनं संकुचित करणारा आजचा भारतीय समाज या परंपरेचाच वारसा सांगतो. अशा परिस्थितीत ती नाकारणंच योग्य नाही का?'

यावर माझं उत्तर असं, की या परंपरेतल्या चांगल्या गोष्टींवर जरी बुरशी धरलेली असली तरी तिच्यातली मूळ गुण पूर्णपणे नष्ट झालेले नाहीत. याचं सर्वांत मोठं गमक हे की तिचं भीडभाड न ठेवता, सडेतोडपणे दोष-दिग्दर्शन करणारे टीकाकार स्वत:ला हिंदू मानणारेच होते आणि आहेत. काही संत व विचारवंत टीका करीत नाहीत; पण त्या परंपरेतील काही गोष्टींच्या आधारेच समाजात मोठं परिवर्तन घडवून आणत आहेत. आणि त्यासाठी ते जी तंत्रं वापरत आहेत, ती याच परंपरेतील आहेत.

इंग्रजांचं राज्य या देशात स्थिर होतं ना होतं तोच कलकत्ता आणि मुंबई या केंद्रांतले हिंदू विचारवंत त्यांच्या यशाला व भारतीयांच्या अपयशाला कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या, याचा विचार करू लागले. त्यांनी इंग्रजी भाषा आत्मसात केली होती आणि आधुनिक पाश्चात्त्य विचारांशी व शास्त्रांशी त्यांचा परिचय झाला होता. त्याच्या आधारे आपल्या समाजातील दोषांचं त्यांनी अचूक निदान केलं आणि या समाजानं काय केलं पाहिजे तेदेखील लोकांच्या निदर्शनास आणलं. इतक्या सहजगत्या हे कसं झालं? अन्य परंपरा मानणाऱ्या लोकांनी असं का नाही केलं? मला वाटतं की स्वतंत्रपणे विचार करण्याची परंपरा या लोकांच्या रक्तात होती, बहुविधता मानण्याची त्यांना सवय होती, अनेक शतकं या प्रवृत्ती झाकोळल्या गेल्या असल्या तरी त्यांत धुगधुगी होती, म्हणून हे शक्य झालं.

पुन्हा हे विचार व्यक्त केल्यावर लोकांनी त्यांना विरोध अवश्य केला पण दंगेधोपे करून त्यांनी ते मांडणाऱ्या लोकांना नष्ट अगर नेस्तनाबूत केलं नाही. सनातनी व सुधारक असा झगडा या समाजात अवश्य झाला. त्यानं अनेकदा तीव्र स्वरूप धारण केलं. पण एका मर्यादेपलीकडे तो गेला नाही. याचं श्रेय हिंदू परंपरेच्या सहिष्णुतेला दिलं पाहिजे असं मला वाटतं. केवळ इंग्रजांचं इथे राज्य होतं, सनातन्यांच्या हाती सत्ता नव्हती म्हणून असं झालं हे पटत नाही. कारण पूर्वी इंग्रजांचं राज्य नसताना वैष्णव संतांनी असंच एक परिवर्तन समाजात घडवून आणलं होतं.

मी जेव्हा वाचन आणि विचार करू लागलो, तेव्हा सावरकर 'गाय हा केवळ एक उपयुक्त पशु आहे', 'अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे' असे विचार उघडपणे मांडत होते. ते झुणका-भाकर सहभोजन घडवून आणत होते. अस्पृश्यांना मंदिरप्रवेश मिळावा म्हणून चळवळ करीत होते. गांधी तर सतत रामाचं नाव जपत असत. आणि तरी अस्पृश्यतानिवारण हे धर्मविरोधी आहे, असं त्यांना वाटत नव्हतं. कर्व्यांच्या आश्रमात व शाळांत शिकलेल्या स्त्रिया धिटाईनं बायकांवर होणाऱ्या अन्यायांना वाचा फोडत होत्या. गांधीजींमुळे समाजसुधारणेचे विचार हळूहळू ग्रामीण भागातदेखील पोहोचत होते. आमचे बहुतेक मोठे साहित्यिक या आधुनिक विचारांनाच पाठिंबा देत होते. त्यातले कोणीच धर्मांतर करावं असं म्हणत नव्हते. अगर त्यांना धर्मांतर करायला कोणी भागही पाडत नव्हतं. उलट सर्व समाज हळूहळू त्यांचे विचार स्वीकारत होता. त्यामुळे मी सुधारकी विचारांचा असलो तरी त्यासाठी हिंदू परंपरा संपूर्णपणे नाकारावी असं मला कधीच वाटत नव्हतं.

तरीपण सुधारकी विचारांचा जेव्हा मी प्रथम स्वीकार केला तेव्हा काही काळ या हिंदू परंपरेशी माझं काहीच नातं नाही, तसं नातं ठेवण्याची मला इच्छा नाही, अशीच माझी भूमिका होती. कोणतीच धार्मिक परंपरा मी मानत नाही, असं मी तेव्हा म्हणत असे आणि आजही देवळात जाणं, धार्मिक विधी करणं वगैरे संदर्भात मी निधर्मीच आहे.

पण मी कोण आहे, माणूस म्हणून आणि लेखक म्हणून मी कसा घडलो याचा मी जेव्हा विचार करतो, तेव्हा माझी इच्छा असो नसो, पण हिंदुत्व मला कसं चिकटलेलं आहे, त्यानं मला कसं घडवलं आहे, इतकंच नव्हे तर ते किती मोलाचं आहे, याची मला पुन:पुन्हा जाणीव होते. माझं चालणं, बोलणं, उठणं, बसणं, मला रुचणारं अन्न, माझ्या मानसिक प्रतिक्रिया, एखाद्या प्रश्नाला सामोरं जायची अगर त्याचा विचार करायची माझी पद्धत, माझी भाषा, माझी दिनचर्या या सगळ्या गोष्टी ज्या हिंदू ब्राह्मणी वातावरणात मी वाढलो त्यानं निश्चित केलेल्या आहेत. पुढे त्यात अनेक बदल झाले, अनेक नवे संस्कार माझ्यावर झाले हे खरं. पण तरी हे मूळचे संस्कार माझ्या व्यक्तिमत्त्वात किती खोलवर रुजलेले आहेत, ते मला पुन:पुन्हा जाणवतं.

एक लेखक म्हणून मी कसा घडलो याचा मी विचार करतो तेव्हा हे हिंदुत्वाचे संस्कार मला अधिकच जाणवतात आणि मोलाचे वाटतात. मी ज्या भाषेत लिहितो ती बऱ्याच अंशी हिंदुत्वानं घडवलेली आहे. रामायण, महाभारत, पुराणं, लोककथा, भक्तिपरंपरा, शाहिरी साहित्य, पंडिती साहित्य इत्यादींनी तिची जडणघडण केलेली आहे. मी नास्तिक असलो तरी तुकाराम, नामदेव वगैरे संत जेव्हा विठूच्या नावाचा गजर करतात, तेव्हा माझं मन कसं भरून येतं. तो हिमालय, ती गंगा, ती यमुना, तो सह्याद्री, ती कृष्णा ही केवळ भौगोलिक अस्तित्वं आहेत, असं मला कधीच वाटू शकत नाही. त्यांना अनेक भावनिक व वैचारिक संदर्भ आहेत. भगवा रंग, भगवी वस्त्रं यांना माझ्या मनोविश्वात विशिष्ट भावनिक अर्थ आहे. 'समर्थचिया सेवका वक्र पाहे' असं कोणी खणखणीत आवाजात म्हटलं की माझं मन थरारतं. संस्कृतमधलं पठण माझ्या कानावर पडलं की, मी माझ्या प्राचीन परंपरेशी जोडला जातो आहे, असं मला जाणवतं.

हे जसे संस्कार माझ्या मनावर आहेत, तसेच शेक्सपिअरचे, डिकन्सचे, टॉलस्टॉयचे असे अनेक संस्कार माझ्यावर झाले आहेत. पण हे सर्व संस्कार माझ्यापर्यंत जेव्हा पोहोचतात, तेव्हा त्यांना संदर्भ असतो माझ्या इथल्या मूळ संस्कारांचा आणि हे दोन्ही प्रकारचे संस्कार जेव्हा एकत्र येतात तेव्हाच सकस, माझं, वेगळं असं साहित्य निर्माण होऊ शकतं. मर्ढेकरांच्या बाबतीत असंच झालं आणि खाडिलकरांपर्यंत शेक्सपिअर पोहोचला तो याच मार्गानं. माझ्या *कडू आणि गोड*, *बिनचेहेऱ्याची संध्याकाळ*,

*तलावातलं चांदणं* या कथा अशाच या दुहेरी संस्कारांतून निर्माण झाल्या. रामायण, महाभारत, पुराणं इत्यादींचे संपन्न संस्कार जर माझ्या मनातून पुसले गेले तर मी लेखक म्हणून आणि माणूस म्हणून दरिद्री होईन.

समाजजीवनातील आणि वैचारिक क्षेत्रातील बहुविधता स्वीकारायची या हिंदू समाजाला सवय असल्यामुळे अनेक विविध विचारधारा व वैचारिक पंथ या समाजात एकाच वेळी सहजगत्या अस्तित्वात असू शकतात. याच देशातल्या मुसलमानांना सलमान रश्दीचं पुस्तक स्वीकारणं, किंवा त्याच्या अस्तित्वाला व वाचनाला मान्यता देणं मंजूर नाही. त्यामुळे त्या पुस्तकावर आपल्या निधर्मी देशातही बंदी घातली जाते. पण रामावर वाटेल तशी टीका केली तरी ते इथे खपून जातं. हा बहुविधतेचा स्वीकार मुक्तपणे साहित्यनिर्मिती करण्यास अत्यंत उपकारक असतो. आणि या देशात बहुसंख्य हिंदू असल्यामुळेच असं वातावरण इथे नांदू शकतं. साहजिकच एक लेखक म्हणून हिंदुत्व नाकारणं मला उचित वाटत नाही.

बहुविधतेचा स्वीकार करायची या देशात परंपरा असल्यामुळे आणि समाजरचनेत व समाजजीवनात बहुविधता असल्यामुळेच या देशात लोकशाही अजून टिकाव धरू शकली आहे. आणि ही लोकशाही आहे म्हणूनच मी या देशात मोकळेपणानं जगू आणि लिहू शकतो.

अन्यायाची अस्पृश्यता हा ज्या समाजाचा अंगभूत भाग होता, स्त्रियांना ज्यात अत्यंत वाईट वागणूक मिळत असे तो समाज लोकशाही प्रकृतीचा आहे असं तुम्ही म्हणता तरी कसं? असा अगदी रास्त प्रश्न हे सगळं विवेचन वाचून कोणाला विचारावासा वाटेल आणि ते रास्तही होईल.

या प्रश्नाचं उत्तर दोन पातळ्यांवर देता येईल. जगातल्या इतर आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरा पाहिल्या तर त्यातही स्त्रीला दुय्यम स्थान होतं असं आढळतं. आणि समाजातल्या खालच्या वर्गांना गुलामासारखं वागवायचं ही प्रथा सर्व मध्ययुगीन जीवनात आढळते. तेव्हा केवळ हिंदू परंपराच या बाबतीत दोषी आहे, असं म्हणता येणार नाही. पण ह्या युक्तिवादाला मी फारसं महत्त्व देत नाही. आपल्या देशाच्या घटनेत आणि नंतर केलेल्या कायद्यांत हे दोष दूर करण्यात आले आहेत. आणि त्यावेळी आपल्या पार्लमेंटमधले बहुसंख्य सदस्य सवर्ण होते आणि पुरुषही होते. गुलामगिरी नष्ट करायला अमेरिकेत एक यादवी युद्ध व्हावं लागलं हे ध्यानात घेतलं की, या गोष्टीचं यथार्थ महत्त्व ध्यानात येईल असं मला वाटतं.

अस्पृश्यतेविषयी अशी उदार भूमिका हिंदूंनी स्वीकारली असूनही आंबेडकरांना ती परंपरा नाकारावी आणि बौद्ध धर्म स्वीकारावा असं वाटलं हे अगदी खरं आहे. आणि त्याबद्दल त्यांना दोष द्यावा असं मला मुळीच वाटत नाही. उलट तसं करून त्यांनी या देशातल्या हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरेवर फार उपकार केले असंच माझं मत आहे. बुद्धांची आध्यात्मिक भूमिका शंकराचार्यांनी बहुतांशी स्वीकारली होती. हिंदू परंपरेत समाविष्ट केली होती. पण सामाजिक पातळीवर त्याची शिकवण स्वीकारली गेली नव्हती. ती आता हिंदू परंपरेनं बऱ्याच अंशी प्रत्यक्ष व्यवहारातदेखील स्वीकारली आहे. ती या परंपरेनं आता पूर्णांशाने स्वीकारावी आणि अधिक व्यापक समावेशक स्वरूप धारण करावं असं मला वाटतं. कारण बहुविधता, समावेशकता, आणि परिवर्तनशीलता हे या परंपरेचे एकेकाळी विशेष होते असं मला वाटतं. आणि त्यामुळेच माझ्यातल्या निर्मितीक्षम कलावंताला ती आपलीशी वाटते.

✦
आपल्या देशाच्या घटनेत आणि नंतर केलेल्या कायद्यांत हे दोष दूर करण्यात आले आहेत. आणि त्यावेळी आपल्या पार्लमेंटमधले बहुसंख्य सदस्य सवर्ण होते आणि पुरुषही होते.
✦

असो. मी काही हिंदू आध्यात्मिक-सांस्कृतिक परंपरेचा सखोल शिस्तबद्ध अभ्यास केलेला नाही. तेव्हा या लेखातले विचार म्हणजे काही अभ्यासपूर्वक काढलेले निष्कर्ष नाहीत. पण मी या हिंदू परंपरेत जन्माला आलो, वाढलो. अनेक प्रकारे तिनं माझ्यावर संस्कार केले. पुढे तिच्यातील दोषांमुळे मी संतापलो. मी ती नाकारली. तरी मी ती झटकून टाकू शकलो नाही. महाभारत हा ज्या परंपरेचा भाग आहे ती मी कशी नाकारणार, झटकून टाकणार? माझ्या जीवनात पुनःपुन्हा तिच्या दीर्घ इतिहासाचं मला दर्शन घडत राहिलं. त्यातून व्यक्त होणाऱ्या तिच्या संपन्नतेनं, बहुविधतेनं आणि समावेशकतेनं मी भारावलो, स्तिमित झालो. विराट जीवनाचं विश्वरूपदर्शन तिनं मला घडवलं. मानवी जीवनातल्या अर्थपूर्णतेचा आणि अर्थशून्यतेचा प्रत्यय तिनं मला दिला. नैतिक समस्यांच्या चक्रव्यूहातून तिनं मला फिरवलं आणि त्यातून बाहेर पडायला अनेकदा मार्गच नसतो, असं दाखवून दिलं. मानवी जीवनाविषयीचे अनुत्तरित प्रश्नं तिनं माझ्यासमोर उभे केले. कलावंत म्हणून माझी रसिकता तिनं संपन्न केली. निर्मितीची बीजं माझ्या मनात पेरली. आयुष्याच्या दीर्घ प्रवासात निरनिराळ्या रूपांनी आपलं दर्शन तिनं मला घडवलं आहे. या सगळ्या अनुभवांतून हा लेख निर्माण झाला.

या परंपरेचं अगदी वेगळं, ती किती वाईट आहे हे दर्शविणारं चित्रही अनेकांनी काढलं आहे. त्यांच्याशी माझं भांडण नाही. एकाच परंपरेची अशी अगदी वेगवेगळी चित्रं मनात उमटणं शक्य असतं याची मला कल्पना आहे. कारण प्रत्येक परंपरेत बऱ्या आणि वाईट गोष्टी असतात. त्यातल्या चांगल्यांवर भर दिला तर ती चांगली ठरते आणि वाईटांवर दिला तर ती वाईट ठरते. हिंदू परंपरेच्या बहुविधतेमुळे असं करणं अधिक शक्य होतं.

मला इतकंच वाटतं की अशा परिस्थितीत कोणत्याही परंपरेला केवळ चांगली अगर त्याज्य ठरवणं हेच मुळात चूक आहे.

उलट व्यवहारात तरी या परंपरेचा चांगला भाग अधोरेखित करून तिला अधिक व्यापक व विकसनशील स्वरूप देणं आपल्या हिताचं आहे आणि ते सहजतः शक्यही आहे.

(जून १९९७)

# राष्ट्रीय गाणं

**स. ह. देशपांडे**

पण एकही गाणं असं नव्हतं की जे अखिल भारतातल्या लोकांच्या तोंडी बसलेलं होतं.

इंडोनेशियात जकार्ता इथं शेती-अर्थशास्त्रज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद होती. जगातल्या विकसित आणि विकासमान अशा देशांतील सुमारे सहाशे प्रतिनिधी परिषदेला उपस्थित होते. पाच दिवस परिषद चालली होती.

परिषदेच्या कामकाजाव्यतिरिक्तच्या वेळात सहली, जेवणं इत्यादी कार्यक्रम असत. एका संध्याकाळी इंडोनेशियाच्या कृषिमंत्र्यांनी एका हॉटेलच्या भव्य भोजनगृहात सर्व प्रतिनिधींना शाही खाना दिला.

विविध प्रकारच्या स्वादिष्ट अन्नांचे आणि काही परिचित आणि काही अपरिचित अशा फळांचे डोंगरच रचल्यासारखे होते.

प्रत्येक देशातले प्रतिनिधी निरनिराळ्या टेबलांभोवती आपापले गट करून बसले होते. आम्ही भारतीय एकूण पंचवीस-तीसजण होतो. त्यात बहुतेक सर्व राज्यांमधून आलेली मंडळी होती.

जेवण सुरू करण्यापूर्वी करमणुकीचा कार्यक्रम होता. एका विस्तीर्ण मंचावर एक हुशार सूत्रसंचालक (मास्टर ऑफ सेरेमनीज) सूत्रसंचालन करीत होता. त्याचं बोलणं मोठं खुसखुशीत होतं आणि त्याच्या निवेदनावरच टाळ्या पडत होत्या. नेहमीचे बाली-नृत्य, इंडोनेशियन वाद्यवृंद, इंडोनेशियन संगीत इत्यादी कार्यक्रम झाले आणि एकाएकी सूत्रसंचालकानं एका कोपऱ्यात बसलेल्या गटाकडं बोट दाखवून जाहीर केलं, ''आता फ्रेंच गट एक गाणं म्हणेल.''

फ्रेंच गटात जरासा गोंधळ उडालेला दिसला कारण त्यांना ही घोषणा अनपेक्षित होती. पण काही क्षणांतच त्यांची आपापसात मसलत झाली आणि पंचवीस-तीस फ्रेंच स्त्री-पुरुष मंचाच्या रोखानं सरसावले. तिथं येऊन त्यांनी नीटसपणानं एक फ्रेंच गाणं सादर केलं.

हे संपेपर्यंत कल्पना अशी होती की यानंतर दुसरे कार्यक्रम सुरू होतील. पण फ्रेंच गट सोडून गेल्यावर संचालकानं दुसऱ्या दिशेला बोट केलं आणि म्हणाला, ''जपान!'' जपानी आले आणि त्यांनी गाणं सादर केलं.

इकडं आम्हा भारतीयांच्या पोटात भीतीचा गोळा उठला. हे चक्र असंच चालू राहिलं आणि आपल्यावर पाळी आली तर काय करायचं? सगळ्या देशाला येणारं गाणं कुठाय? राष्ट्रगीत म्हणायची ही जागा नव्हे – आणि ते तरी सर्व भारतीयांना नीट म्हणता येतं असं थोडंच आहे? आमची शोधाशोध सुरू झाली.

एकही गाणं डोळ्यापुढं येत नव्हतं. सिनेमातलंही चाललं असतं; पण एकही गाणं असं नव्हतं की जे अखिल भारतातल्या लोकांच्या तोंडी बसलेलं होतं. ''इस मिट्टी को तिलक करेंगे धरती है बलिदान की'' ह्या गाण्याच्याही सगळ्या ओळी, निदान चार-पाच, येणारा एकही नव्हता. शिवाय हिंदी न येणारे आमच्या गटात अनेक होते.

आम्ही अगदी केविलवाणे झालो. संचालकाचं बोट आपणाकडे वळू नये अशी मनोमन प्रार्थना करू लागलो.

भारताला जगात फार मोठा मान आहे अशातली गोष्ट नाही. पण भारत कुठंही दुर्लक्षिला जात नाही. एका बाजूला एक मोठं वैभव आहे. जगातला सर्वांत मोठा आणि (त्या वेळी) पंचवीस वर्षं लोकशाही जपून ठेवलेला देश. त्याची पुरातन संस्कृती विशेषतः या इंडोनेशियाला जवळची. दुसऱ्या बाजूला, जगावर कुठल्याच बाबतीत छान न टाकलेला, एवढ्या मोठ्या लोकसंख्येचा पण दुबळा आणि खिळखिळा झालेला आपला देश. पण या विरोधांमुळंच की काय भारताबद्दल जगात अमाप कुतूहल असतं. त्याची कुठल्याही समूहात दखल घेतली जाते. आताही तसंच झालं. मंचावरून घोषणा झाली, ''इंडिया!''

शेवटी झालं काय तर आम्ही 'जनगणमन'च म्हणालो. त्यातल्या त्यात सगळ्यांना येणारं एवढंच गाणं. ते आमचं राष्ट्रगीत आहे हे फारसं कुणाला माहीत नसणार ही त्यातल्या त्यात सांभाळून घेणारी गोष्ट. गाणं म्हणताना एका आवाजात म्हटलं जात नव्हतं. शब्दोच्चार सर्वांचे सारखे नव्हते आणि अशुद्धही होते. कुणीकुणी उगाचाच मधेमधे मुठी आवळून हात हवेत फेकीत होते. एकूण, एका जागतिक रंगभूमीवर आम्ही आमच्या हाडीमाशी खिळलेल्या विस्कळितपणाचं ओंगळवाणं प्रदर्शन केलं. औपचारिक टाळ्या झडल्या त्यांवर आम्ही समाधान मानून घेतलं.

*(उर्वरित मजकूर पान ३४४ वर)*

# आज २००१ साली जयप्रकाश नारायण

**निळू दामले**

संपूर्ण क्रांती हे एक भव्य स्वप्न जेपींनी तरुणांना दिले. पण जुने आदर्श कायम उपयोगी ठरत नाहीत; प्रत्येक पिढीला स्वतःसाठी वेगवेगळे जेपी शोधावे लागतात.

माझा मोठा मुलगा १९७७ साली जन्मला. आज तो २३ वर्षांचा आहे. चित्रकार आहे. समाजातली विविध प्रकारची माणसं चित्राकडे कशी पाहतात याचा अभ्यास तो करतो. त्यामध्ये त्यानं गुन्हेगार, लहान मुलं, दहशतवादी, रा. स्व. संघ, कम्युनिस्ट अशा वर्गातली माणसंही धरली आहेत. सांगण्याचा मतलब असा की तो आजच्या जगाकडे काळजीपूर्वक, गंभीरपणानं बघणारा, विचार करणारा आहे. सध्या तो परदेशात शिकतो आहे.

त्याला जेपी, जयप्रकाश नारायण माहीत नाहीत.

माझा धाकटा मुलगा १९८५ साली जन्मला. आज तो शालांत परीक्षा पास झाला आहे. त्याला जेपी माहीत नाहीत. गांधी, नेहरू वगैरे माणसं त्यानं त्याच्या इतिहासाच्या पुस्तकात वाचली आहत. मार्क मिळवण्यासाठी. त्यापलीकडे त्याला त्या माणसांबद्दल जाणून घ्यायची इच्छा नाही.

✦

छान माणूस होता. आठवण झाली की बरं वाटतं. पण आजचा काळ, आजचे प्रश्न, भविष्य यांचा विचार करायला बसलं की त्यांची आठवण होत नाही.

✦

मी व्यक्तिशः राजकारणात गुरफटलेला होतो, असतो, आहे. माझं कल्पनाविश्व राजकारणाभोवतीच गुंफलेलं आहे. माझी इडियम राजकारणाची आहे. माझ्या उपमा राजकारणातल्या असतात. मोठा मुलगा परदेशात गेल्यावर तिकडल्या जीवघेण्या थंडीनं, बर्फानं आणि अमेरिकन वातावरणानं गांजला होता. निराश झाल्यावर तो पत्र लिही. माझ्या पत्रांमध्ये चांगलं जगणं म्हणजे काय हे सांगताना मी गांधी, पटेल आणि आंबेडकरांची उदाहरणं दिली. साधनांची टंचाई असताना, वाईट अनुभव येत असताना, प्रतिकूल परिस्थितीतही निराश न होता या माणसांनी कसा नेटानं अभ्यास केला, व्यासंग केला, ज्ञान मिळवलं याच्या गोष्टी ती त्याला लिहिल्या. सांगण्याचा मतलब असा की माझ्यावर कोणते प्रभाव आहेत ते लक्षात यावं.

तर मी माझ्या मोठ्या मुलाला आणि धाकट्या मुलाला जेव्हा गांधी, जेपी वगैरेंबद्दल आग्रहानं सांगतो तेव्हा त्यात त्यांना फारसा रस वाटत नाही. म्हणजे ते विरोधी असतात असं नाही. पण त्यात त्यांना आपलेपणा, जवळीक वाटत नाही. ती माणसं त्यांना दूरची वाटतात. माझ्या मोठ्या मुलाला मी राजकीय घालमेल कशी असते ते दाखवण्यासाठी सत्ताबदलाच्या काळात सत्तेच्या अंत:पुरात हिंडवलं. विलासराव देशमुख, छगन भुजबळ, रामदास आठवले इत्यादी माणसं जवळून दाखवली. माझ्या मुलाला त्यांच्यात काही विशेष आहे असं वाटलं नाही. त्याला ती माणसं जराशी बेकार आणि डब्बू वाटली. तो मला म्हणाला, ''तुम्ही लोक कशाला यांच्या नादी लागता? – ही अगदीच सामान्य माणसं आहेत.''

मोठा निदान माझ्याबरोबर राजकारणाच्या अड्ड्यावर फिरला तरी. धाकटा मुलगा तिकडे वळायलाही तयार नाही. त्याच्यावर जास्तीत जास्त प्रभाव आहे तो हृतिक रोशनचा.

अनेक निमित्तानं मी तरुण मुलांना जवळून पाहत असतो. माझ्या मोठ्या व धाकट्या मुलांसारख्या मुलांचीच बहुसंख्या दिसते.

अपवाद जरूर आहेत. माझा भाचा माझ्या मुलाच्याच वयाचा. कायद्याची पदवी घेऊन तो वकिली करतो. त्याला राजकारणात जबरदस्त रस. तो गांधी वाचतो, जगभरच्या राजकीय विषयांवर गंभीरपणे चर्चा करतो.

माझी दोन्ही मुलं सिनेमे पाहतात. मराठी, हिंदी, इंग्रजी, देशी, परदेशी, टीव्हीवर, थेटरात. चिक्कार. एक दृश्य दिसलं की त्यावरून लगेच तो कुठला सिनेमा आहे ते सांगतात. अगदी ताजे सिनेमे, नटनट्या त्यांना माहीत आहेत. पण जुने नटही त्यांना माहीत आहेत. त्यांच्या आठवणीत आहेत. देवानंद त्यांची चांगलीच करमणूक करतो, शम्मी कपूर त्यांना आवडतो. जुनी हिंदी गाणी त्यांना आवडतात, पाठ आहेत. त्यांना गझलाही आवडतात.

जेपी आणि गांधी त्यांच्या कपाटात नाहीत, पण जेपी-गांधींचे समकालीन गायक, गाणी, नट, सिनेमे त्यांच्या साठवणीत आहेत.

मी विचार करतो असं का व्हावं?

जेपी स्वातंत्र्यचळवळीत होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी राजकारणाचा संन्यास घेतला आणि ते विधायक कार्यात गेले. समाजवादी चळवळीची आपली परंपरा सोडून त्यांनी सर्वोदयाची वाट धरली. १९५३-५४ पासून ते थेट १९७३ पर्यंत जेपी राजकारणात नव्हते, लोकांच्या आठवणीत शिल्लक नव्हते. त्यांच्यासोबत काम करणारी माणसं, जुने समाजवादी वगैरेंनाच त्यांचं असणं माहीत होतं.

१९७२ नंतर देशात एक विचित्र परिस्थिती निर्माण झाली. काँग्रेसची राजवट 'फेल' गेली होती आणि विरोधक पर्याय देऊ शकले नव्हते. १९६७ साली देशभर काँग्रेस-विरोधाची लाट उसळली आणि अनेक राज्यांत गैरकाँग्रेसी सरकारं आली. त्या काळातले समाजवादी व जनसंघी त्या सरकारात होते. त्यांना वेळ फार मिळाला नसला तरी त्यांना काम जमत नाही, देशाचे प्रश्न सोडवणं त्यांना जमत नाही असं लोकांना वाटलं. काँग्रेस आणि विरोधक दोघंही सारखेच 'बेकार' आहेत अशी भावना लोकांमध्ये पसरली.

देशात बेकारी वाढत होती. विषमता वाढत होती. खेड्यांची दैना होत होती. अडाणीपण वाढत होतं. आरोग्याची हेळसांड झाली होती. भ्रष्टाचारानं कळस गाठला होता. थोडक्यात असं की देश हलाखीत होता. परिस्थिती वाईट आहे आणि राजकीय पक्ष त्यातून वाट काढू शकत नाहीत ही भावना देशात, विशेषत: तरुणांत, बळावली. राजकारण, राजकीय पक्ष, पुढारी यांना लोक विटले होते. संतापलेली मुलं रस्त्यावर उतरली आणि गुजरातेत नवनिर्माण आंदोलन सुरू झालं. आंदोलनाचा राग सर्वच राजकीय पक्षांवर होता.

अचानक जेपी या आंदोलनाच्या नेतृत्वपदी पोचले. तरुणांनी त्यांना ओढून नेतृत्वपदी बसवलं. जेपी तयार नव्हते. परंतु तरुणांची, देशाची दैना पाहवत नसल्यानं ते आंदोलनात पडले. देशातली परिस्थिती आमूलाग्र बदलली पाहिजे, संपूर्ण व्यवस्थाच बदलली पाहिजे, किरकोळ बदलानं भागणार नाही, केवळ एका राजकीय पक्षाची किंवा व्यक्तीची सत्ता घालवून उपयोगाची नाही, मुळातून समाजात बदल केला पाहिजे असं ते म्हणाले. नवनिर्माण आंदोलनाचं रूपांतर त्यांनी संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनात केलं. चिमणभाई पटेल आणि इंदिरा गांधींच्या सरकारविरोधातलं आंदोलन त्यांनी पक्षीय परिघाबाहेर नेऊन सर्वसमावशेक केलं.

हलके हलके आंदोलन युवकापुरतंच मर्यादित न राहता त्यात राजकीय पक्षही उतरले. ते आंदोलन प्रत्यक्षात काँग्रेसविरोधाचं आंदोलन झालं. जेपींना जे नको होतं तेच झालं. यथावकाश जनता पार्टी झाली. सगळे बेकार पक्ष आणि त्यांचे निरुपयोगी बेकार व भंपक पुढारी जनता पार्टीत सामील झाले. जेपींना हे कळत नव्हतं काय?

जरूर कळत होतं. त्याचं त्यांना दु:खही होत होतं. जेपींचा स्वभाव राजकारणी, सत्तेचं राजकारण खेळणारा नव्हता. सत्तेचा मोह त्यांना नव्हता. तरीही सत्तापिपासू लोकांना जवळ करून त्यांनी जनता पार्टी नावाची एक बंडल पार्टी स्थापन करायला परवानगी दिली. का? – त्यांचं म्हणणं होतं की त्यांचा इलाज नव्हता. जनता पार्टीत सामील झालेल्या लोकांचा इंदिरा गांधींवर राग होता कारण त्यांना स्वत: इंदिरा गांधी होणं जमलं नव्हतं. त्यांच्याइतका भ्रष्टाचार करण्याची संधी त्यांना मिळाली नव्हती. त्यांचा फॅसिझम व हुकूमशाहीला विरोध होता कारण त्यांना स्वत:ला फॅसिस्ट होणं, हुकूमशहा होणं जमलं नव्हतं. आज अडवाणी व फर्नांडिसांची भाषा पाहा. थेट इंदिरा गांधीच बोलत आहेत, असा भास होतो. वृत्तपत्रांनी त्यांच्या विरोधात कट केला आहे, विरोधी पक्षांनी (काँग्रेसनं) कट केला आहे, आंतरराष्ट्रीय शक्ती त्यांना अपदस्थ करण्याचा खटाटोप करत आहेत, पाच वर्षांसाठी जनतेनं निवडून दिलं असतानाही असंतुष्ट राजकीय आत्मे त्यांना सत्तेतून हुसकून लावत आहेत असं हे लोक म्हणत आहेत, आणि याच लोकांना जेपींनी जवळ करून जनता पार्टी स्थापन करायला परवानगी दिली होती.

त्या काळातल्या राजकीय पक्षांनी, त्यातल्या पुढाऱ्यांनी जेपींचा वापर करून घेतला. स्वतंत्रपणे सत्ता हस्तगत करणं त्यांना शक्य नव्हतं. त्यांच्यावर लोकांचा राग होता, अविश्वास होता. जेपींची ढाल वापरून लोकांच्या रागापासून त्यांनी स्वत:चा बचाव करून घेतला, सत्ता मिळवली. जेपींनी हे सारं होऊ दिलं. नाइलाजानं का होईना, वाईट वाटत असताना का होईना, पण जेपींनी स्वत:चा वापर होऊ दिला.

हा उद्योग करण्यात जेपींचा स्वार्थ नव्हता. त्यांच्यात एक भाबडा, आंधळा ध्येयवाद होता. प्रयत्न तर करायला काय हरकत आहे, असा कळकळीचा विचार त्यांनी केला असेल. पण नवनिर्माण आंदोलन सुरू झाल्यापासून तीनेक वर्षांत आणीबाणी, निवडणुका व जनता पार्टीचं सरकार अशी स्थित्यंतरं येऊन गेली.

जेपी संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनाचे नेते झाले. कशाच्या जोरावर? विचारांच्या जोरावर? – संपूर्ण क्रांतीचा जो काही विचार होता तो नवा नव्हता. अनेक अर्धवट विचारांचं ते एक भाबडं मिश्रण होतं. त्यात गांधी होते, समाजवाद होता, मिश्र अर्थव्यवस्था होती, आंबेडकर होते, फुले होते, उदारमतवादही होता. अकबरानं दिने इलाही काढला. जगभरची सर्व चांगली तत्त्वं गोळा करून दिने इलाही नावाचा धर्म त्यानं सांगितला. काय झालं त्या धर्माचं? – जेपींची संपूर्ण क्रांतीही एक राजकीय दिने इलाही होती. एका सज्जन माणसाची एक कळकळीची भाबडी इच्छा यापलीकडे त्या कार्यक्रमात काय होतं? त्यांनी सांगितलेले कार्यक्रम इतर अनेक पुढाऱ्यांनी मांडलेले होते. ते विचार अमलात आणणं कोणालाही जमलेलं नव्हतं.

काँग्रेसचे कार्यक्रम, संपूर्ण क्रांती, जनता पार्टीचे कार्यक्रम यांत काय फरक होता? – समाजवाद, गरिबांचं कल्याण, विषमता दूर करणं, दलित-आदिवासी-मुसलमानांचं कल्याण, अंत्योदय, विकेंद्रित अर्थव्यवस्था, तटस्थतेचं परदेश धोरण या सगळ्या गोष्टी सगळेच राजकीय पक्ष मांडतात. वांधा होता ते

या गोष्टी अमलात आणण्याचा. काँग्रेसचं धोरण चूक नव्हतं. (फक्त मार्क्सवाद्यांचे मात्र काँग्रेसच्या धोरणाबाबत अगदी मुळातून मतभेद होते.) त्यांचा अंमल चुकीचा होता. प्रश्न तत्त्वाचा कमी होता, व्यवहाराचा जास्त होता.

जेपींना आंदोलनाच्या नेतृत्वपदी का बसवण्यात आलं?

भारतीय मानस विचारांचे प्रभाव कमी स्वीकारतं, त्याला व्यक्तीची ओढ, आकर्षण फार असतं. गांधींचे विचार काय होते व ते योग्य होते की नाही याचा विचार करणारे गांधीवादी कमीच. गांधींच्या प्रभावाखाली बरीच माणसं गांधींच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यांमुळेच गोळा झालेली. माणूस संत आहे, माणूस चांगला आहे, माणूस स्वभावानं गरीब आहे, माणूस साधा राहतो, माणूस पैसे खात नाही, माणूस वनौषधी घेतो, माणूस कमी अन्न व कपड्यांवर राहतो वगैरेबद्दलचं फार आकर्षण. त्यांच्या विचारांची तपासणी करण्याच्या भानगडीत माणसं पडली नाहीत. तेच नेहरूंचं. त्यांचं राजबिंडं रूप, त्यांची श्रीमती, त्यांची भाषा इत्यादींचं आकर्षण जास्त. अनेकांच्या बाबतीत तेच. जेपींच्या बाबतीतही तेच. त्यांची ऋजुता, त्यांचा हळुवारपणा, त्यांचं लोभस व शांत दिसणं, मृदुता, अनाग्रहीपणा इत्यादी गोष्टी अनेकांना आकर्षून घेत.

काही होत नसलं, परिस्थिती निराशाजनक असली की भारतीय समाजाला आदर्श पुरुषाची भूक लागते. एखादा अवतार निर्माण होईल आणि सारं काही ठीक होईल असं त्याला वाटतं. थेट चाणक्य वगैरे कोणीतरी येईल, निदान शिवाजीचा नवा अवतार तरी होईल असं त्याला वाटतं. त्यातलं काहीच झालं नाही की हाताशी असलेल्या माणसांमध्ये कोण बरा माणूस आहे याचा शोध भारतीय माणूस व्याकूळ होऊन घेऊ लागतो. परिस्थितीची मूळ कारणं शोधणं, त्यावर काही मूलगामी उपाय शोधणं, मुख्य म्हणजे आपल्याआपण काही गोष्टी करणं याकडे समाज वळत नाही. १९७३-७४ सालातही तसंच झालं.

स्वातंत्र्यचळवळही बरीचशी भावनात्मकच होती. सुखानं जगणं ही गोष्ट जगण्याच्या केंद्रस्थानी मानली गेली नाही. पुढारी व माणसं भावनेच्या आहारी जाऊनच विचार करत होती. संस्कृती, भाषा, धर्म, स्नानसंध्येची सोय, भारतीयत्व, हिंदुत्व, आर्यत्व यांची चिंता जास्त होती. जगाच्या बाजारात उतरून आपलं भलं करण्यासाठी काय करावं लागेल याचा विचार फारसा नव्हता. एखादा टाटा तेवढा अपवाद. विज्ञान-तंत्रज्ञानातल्या संशोधनाकडे लक्ष नव्हतं. ज्ञानाचा उपयोग दररोजचं जगणं समृद्ध व सुखी करण्यासाठी असतो असं माणसं मानत नव्हती. गांधीजीसुद्धा. याचा परिणाम म्हणून ऐहिक सुखाला वंचित झालेल्यांची बहुसंख्या असलेला समाज, असं आपलं रूप झालं होतं. यातून वाट कशी काढणार? लोकांना स्वत: विचार करायची सवय नाही, सवड नाही.

थोर माणसाचा शोध सुरू झाला. त्यांना जेपी सापडले. सज्जन माणूस, भानगडी नाहीत, पैसे खाल्लेले नाहीत, बायांच्या भानगडी नाहीत, दारू नाही, जावई-नातेवाइकांच्या भानगडी नाहीत. बस, आणखी काय पाहिजे!

✦
थोर माणसाचा शोध सुरू झाला. त्यांना जेपी सापडले. सज्जन माणूस, भानगडी नाहीत, पैसे खाल्लेले नाहीत, बायांच्या भानगडी नाहीत, दारू नाही, जावई-नातेवाइकांच्या भानगडी नाहीत. बस, आणखी काय पाहिजे!
✦

मी पत्रकार म्हणून संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनात खूप हिंडलो. गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल इत्यादी सर्व ठिकाणी. जेपींच्या सभांना गेलो. एक मास हिस्टेरिया होता.

भारलेल्या वातावरणाचा प्रभाव माझ्यावरही होता. गंमत असते. एखाद्या अनोळखी माणसाच्या अंत्ययात्रेला गेलो की काय होतं? तिथं जमा झालेले लोक दु:खानं व्याकूळ असतात. रडत असतात. आपल्याला तर मेलेला माणूस जेमतेम माहीत असतो. तरीही अंत्ययात्रेत व शेवटची विधी चालतात तेव्हा वातावरण असं असतं की आपल्यालाही रडू येतं, गळा दाटून येतो. तसंच चळवळींमध्ये बहुतेक वेळा होतं. संपूर्ण क्रांतीच्या आंदोलनाचा प्रभाव, जेपींचा प्रभावही, काहीसा तसाच.

संपूर्ण क्रांतीच्या चळवळीवर लिहिण्यासाठी मी देशभर हिंडलो. महाराष्ट्रातल्या अनेक दैनिक-साप्ताहिकांत वार्तापत्रं लिहिली. अहमदाबादच्या गल्लीबोळातल्या घटना मी पाहत होतो, दुमका जिल्ह्यातल्या खेड्यात काय घडत होतं ते मी पाहात होतो. आणि मध्ये मध्ये पाटण्यात जाऊन जेपींच्या पातळीवर घडणाऱ्या घटनाही तपासत होतो. बंगाल, महाराष्ट्र, दिल्ली इत्यादी ठिकाणी काय चाललं आहे ते अभ्यासत होतो. तळातले लोक, जेपींच्या आसपास वावरणारे कार्यकर्ते, खेड्यातली तसेच शहरातली सामान्य माणसं, सरकारी माणसं, पुढारी, पत्रकार, अशा नाना प्रकारच्या माणसांशी माझा संपर्क होता. चळवळ संपून जनता सरकार स्थापन झालं. त्यानंतरही महाराष्ट्र आणि बिहारमधल्या खेड्यांतून मी हिंडलो आणि नव्या सरकारच्या हातून काय घडतंय त्याची चाचपणी केली.

चळवळीत सक्रिय भाग घेणाऱ्या आणि चळवळीला बाहेरून पाठिंबा-सहानुभूती असणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या लोकांना मी भेटत असे, त्यांच्याशी घनघोर चर्चा करत असे. ही सगळी माणसं कानावर पडतं त्यावर आणि रस्त्यावर जे काही दिसतं त्यावर विसंबून राहणारी. बस्स. यापलीकडे फार विचार करण्याची सवय व सवड त्यांना नाही. वर्तमानपत्रातून जे समोर येतं, आसपासच्या लोकांच्याकडून जे कानावर पडतं त्यावरून माणसं आपापली मतं बनवतात. खोलात जाणं, अभ्यास करणं हे त्यांचं काम नाही, तेवढा वेळही त्यांच्याजवळ नसतो. ही सारी माणसं भारावलेली असतात. गांधी, टिळक, जेपी, नेहरू, आंबेडकर अशांना देशानं मोठं मानलं ते वरील पद्धतीनं.

मी लोकांना भेटत असे, तेव्हा माझ्या लक्षात येई की संपूर्ण

क्रांतीचा विचार या लोकांना माहीत नाही. ढोबळमानानं, जेपी नावाचा एक भला माणूस देशाचं सगळ्या अंगांनी भलं करायला निघाला आहे, असं ही माणसं एकतर्फीपणानं मानत असत. जेपींच्या विचारांचे धागे गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद, मिश्र अर्थव्यवस्था, ग्रामप्रधान व्यवस्था, विकेंद्रीकरण इत्यादी अनेक विचारांमध्ये गुंतलेले होते. मी असे विषय काढले की लोक त्यावर प्रतिक्रिया द्यायला टाळत. कारण त्या गोष्टी त्यांच्या परिचयाच्या नसत, त्यांना त्या किचाट वाटत. कित्येक वेळा चर्चा निघाली की लोक म्हणत, असले वाद वगैरे आम्हांला सांगू नका, चांगला माणूस पाहिजे, चांगला नेता पाहिजे, बस झालं. कलकत्त्यातली माणसं म्हणत की नेताजी हवे होते, महाराष्ट्रातली माणसं म्हणत की टिळक, शिवाजी वगैरेंसारखा एक माणूस असला तरी पुरे. म्हणजे एखादा अवतारपुरुष झाला की भानगड संपली. मग आम्हांला काही करायला नको. सारं तो पाहून घेईल. आम्ही घोरत पडावं. मी म्हणे, अहो, असं एका माणसानं होत नाही, संपूर्ण समाजाची तयारी लागते. आपण काही केलं तरच अशा एखाद्या माणसाचा उपयोग होतो. जेपींच्या सोबत काम करणाऱ्यांमध्ये बरीच माणसं सर्वोदयी-गांधीवादी होती. त्यांना काही प्रमाणावर खादीग्रामोद्योगाच्या संस्था चालवण्याचा अनुभव होता. पण सभोवतालचं जग व बदललेलं वातावरण या संदर्भात हा अनुभव उपयोगी नव्हता. ही सर्वोदयी मंडळी वगळली तर बाकीच्या बहुतेकांना संस्था चालवणं, काम करणं याचा अनुभव नव्हता किंवा कमीच होता. त्यामुळं त्यांचं जेपींवरचं प्रेम किंवा चळवळीतला सहभाग हा वैचारिक पातळीवरचा (इंटलेक्च्युअल पातळीवरचा) असे. कार्यक्रम अमलात आणणं, संस्था चालवणं, व्यवहार करणं याचा त्यांचा अनुभव मर्यादित होता.

जेपी या माणसामध्ये स्वतंत्रपणे काही गमती होत्या, काही वैशिष्ट्ये होती. छान, सावकाश, संथ माणूस होता. एक माणूस म्हणून तो पटकन आवडणारा, मोहक होता. त्यांचा सहवास लाभल्यावर प्रभावित झाला नाही असा माणूस सापडणं कठीण. आंदोलनाच्या काळात त्यांच्यावर कडक टीका करणारे समाजवादी पुढारी मला भेटले. परंतु हे पुढारी जेव्हा काही कारणानं जेपींच्या सोबत असत, तेव्हा विरघळून गेलेले असत.

जेपींच्या कदमकुआँमधल्या घरात मी तीन-चार वेळा तरी त्यांना भेटलो. भेटलो म्हणजे काय की ते काहीबाही करत होते आणि मी अवतीभोवती वावरत होतो. बैठका असत. माणसांशी ते बोलत असत. एखाद-दोन प्रसंगी मीही एखाद-दुसरं वाक्य त्यांच्याशी बोललो असेन. सभोवतालचं वातावरण शांत व गंभीर असे. कोणी हसतबिसत नसे. जेपी बहुतेक वेळा ऐकत असत आणि अगदीच नाइलाज झाल्यावर बोलावं, तसं संथपणे थोडंसं बोलत. अगदी हलक्या आवाजात. हजर असणाऱ्या प्रत्येक माणसाला माहीत असे, की जेपी या भारतातल्या सध्याच्या नंबर एकच्या माणसाच्या सहवासात आपण आहोत. सध्या भारत देशातल्या घडामोडी या एकाच माणसाच्या हालचालींवर अवलंबून आहेत. जेपी शांत असत. कधीही त्यांचा आवाज चढत नसे. अगदी क्वचित प्रसंगी ते रागावत पण तो रागही चेहरा त्रासिक होऊन व्यक्त होत नसे. चढा शब्द नसे. एखादं छोटंसं मूल मध्येच येई. त्याच्याशी जेपी आजोबांच्या प्रेमानं खेळत. बिहारमधला कोणी कार्यकर्ता आला, तर जेपी त्याच्या गावाची चौकशी करत, त्याच्या आई-वडलांची चौकशी करत. वातावरण चळवळीचं असलं तरी त्याला एक व्यक्तिगत डूब, स्पर्श असे. याचाही परिणाम होत असे. एकदा अशी भेट झाली की तो माणूस कायमचा भारलेला राहात असणार व आसपासच्या शेकडो माणसांना आपला अनुभव सांगून भारून टाकत असणार.

कचेरीत त्यांचे चिटणीस, सल्लागार यांच्याशी त्यांची चर्चा होत असे. त्यांचे एक मदतनीस व सल्लागार माझे मित्र होते. त्यांच्याबरोबर मी चर्चा न्याहाळत असे. अटीतटीचे प्रसंग असत. पुढारी आणि पक्षांनी निर्माण केलेले पेच असत. इंदिरा गांधी व सरकार यांनी केलेले मोठ्ठे आरोप असत. जेपी शांतपणे ऐकत, वृत्तपत्रांना देण्यासाठी केल्या जाणाऱ्या निवेदनात सुधारणा सुचवत. देशात गोंधळ चालला होता यचा मागमूसही जेपींच्या या बैठकीत लागत नसे, इतके ते थंड असत. पण थंड म्हणजे सिनिक नव्हे. त्यांना चिंता असे. चिंताही ते संयमानं व्यक्त करत.

मी एकदा अनंतराव भालेराव व सदाशिवराव बागाइतकर यांच्याबरोबर जेपींकडे गेलो होतो. दोन-तीन तास मुलाखत व गप्पा चालल्या होत्या. आपण सत्तेच्या केंद्रस्थानी आहोत याची जाणीवही त्यांना नाही, असं त्यांच्या वागण्याबोलण्यात जाणवत असे. आपल्या गावाच्या गोष्टी त्यांनी सांगितल्या, आपल्या जुन्या सहकाऱ्यांच्या गोष्टी सांगितल्या. गप्पा मारल्यागत वातावरण. तिथून उठून आम्ही एका सभेला गेलो. पाटण्यात. तिथंही जेपी दीडेक तास संथपणे बोलले. तिथंही गावातल्या आठवणी, स्वातंत्र्यचळवळीतल्या आठवणी.

मी आणि विजय तेंडुलकर त्यांच्या मुलाखतीसाठी गेलो होतो. त्यांच्या घरी. चळवळीच्या नेपथ्यावरच साऱ्या गोष्टी चालल्या होत्या. तरीही मध्ये मध्ये ते त्यांनी चालवलेल्या एका शाळेबद्दल बोलत होते. त्या शाळेतली गरीब मुलं, साधनांची कमतरता, मुलं शिकतील खरी, पण पुढं काय करतील, बिहारमधल्या गावांचं दैन्य कसं घालवायचं असे प्रश्न ते विचारीत. आम्हांलाच. आम्ही कसलं बोडक्याचं दैन्य घालवणार होतो! ते प्रश्न त्यांनी स्वत:लाच विचारलेले असत.

मी जेपींच्याबरोबर काही प्रवास केला. मुंबईत, बिहारमध्ये. त्यांच्या कारमधून. त्यांच्या बाजूला बसून. त्यावेळी मी स्वस्थ बसत नसे. सतत प्रश्न विचारत असे. चळवळीबाबत. बहुतेक वेळ माझ्या बोलण्यात व त्यांच्या ऐकण्यात जाई. फार लांबलचक उत्तरं ते देत नसत. एकदा आमच्यापुढे सेक्युरिटीवाल्यांची गाडी फार धूळ उडवत चालली होती. जेपी वैतागले. त्यांना मुळात रागही येत नसावा किंवा आल्यास कमी तीव्रतेचा येत असावा. जो काही राग येईल तोही आणखी 'टोन डाऊन' करून व्यक्त करण्याची सवय. जेपींचा चेहरा थोडासा त्रासिक झाला. समोरच्या सीटवर बसलेल्या सुरक्षा रक्षकाला त्यांनी गाडी थांबवायला सांगितलं. तशी पुढली गाडीही धूळ उडवत, वेग कमी करत थांबली. पुढल्या गाडीतली माणसं विचारणा करायला आली. जेपींनी दोन गाड्यांत अंतर ठेवा, धुळीचा त्रास होतो असं सांगितलं. पुढच्या गाडीतले रक्षक जेपींच्या भक्तीतले. अजीजीच्या शब्दांत म्हणाले, 'तुमच्या गाडीवर लक्ष

राहील एवढं अंतर ठेवण्याचा नियमच आहे. इलाज नाही.' जेपींचा चेहरा पुन्हा त्रासिक झाला. 'ठीक आहे' असं म्हणाले आणि हात हलवून त्या लोकांना त्यांनी 'निघा' असं सांगितलं.

धुळीचे फवारे येतच होते. वेग कमी करून ते चुकवण्याचा प्रयत्न आमचा ड्रायव्हर करत होता. जेपी मध्येच खोकत. पण आपल्याला त्रास होतोय हे ते विसरूनच गेले.

काळाच्या ओघात माणसं येतात. काही टिकतात, काही टिकत नाहीत. काही माणसं त्यांच्या जाण्यानंतर थोडा काळ लोकांच्या लक्षात राहतात. काही माणसं बराच काळ, तर काही माणसं जवळपास कायम आठवणीत राहतात. शेक्सपीअर भारतात जन्मला नव्हता, त्यानं भारतासाठी वगैरे काहीही केलेलं नाही. त्याचा आपला काहीच संबंध नाही. तरीही त्याची आठवण आपल्याला येत राहते. मार्क्स नावाचा माणूसही भारतातला नाही, भारताचा त्याच्याशी संबंध नाही. पण त्या माणसानं जो काही उद्योग केला त्याचा साऱ्या जगावर परिणाम झाला. त्याची आठवण आपल्याला राहते. ज्ञानेश्वर, शिवाजी, फुले ही माणसं जाऊन बरेच दिवस झाले, तरी त्यांची आठवण आपल्याला येते. आंबेडकरही आपल्या स्मरणात फार दिवस राहतील असं दिसतंय. म्हणजे माणसांचं असं काहीतरी असतं जे आपल्याला उपयोगी पडतं, त्यासाठी आपण माणसांची आठवण काढतो. कोणाचे विचार, कोणाचे शब्द, कोणाचे सिद्धान्त, कोणाचं जोरदार जगणं यांतून इतर माणसं प्रेरणा घेतात. जेपींना जे कोणी व्यक्तिशः भेटले त्यांना जेपींच्या आठवण आजही येत राहील. कारण त्यांचं व्यक्तिमत्त्व हीच गोष्ट सर्वांत जास्त प्रभावी होती, विचार वगैरे गोष्टी त्यांच्यात विशेष नव्हत्या.

जेपींच्या सहवासात येणारी माणसं झपाटून जात नसत, पण प्रभावित जरूर होत असत.

जेपींसारखाच एक माणूस त्या काळात होता. एसेम जोशी असं त्याचं नाव. तोही मोठा मजेशीर व छान माणूस होता. त्याच्याही सहवासात आलेली माणसं प्रभावित होत असत. जेपी आणि एसेम यांचे संबंध जवळचे आणि जिव्हाळ्याचे होते.

जेपी, एसेम यांच्याबद्दल जे काही होतं ते खरंखरं, जसंच्या तसं, मीठ-मसाला न लावता, त्यांचे महात्मे करण्याच्या खटपटीत न पडता लिहिलं, तर आजही ती माणसं लोकांच्या आठवणीत राहू शकतील. त्यांचा सहवास मिळालेली माणसं आता नाहीशी होत चालली आहेत.

अनेकांनी जेपींना जवळून पाहिलं आहे. अनेकांनी कमी-अधिक प्रमाणात, कमी-अधिक दिवस जेपींच्या सहवासात काढले आहेत. त्यांच्या आठवणीत जेपी राहतील. मी काही तासच त्यांना जवळून पाहिलं आहे. त्यांच्या सहकाऱ्यांना मी जमेल तेवढं खरवडलं आहे. पत्रकारितेच्या नादात खूप माणसं पाहिली, त्यात जेपी हे एक होते. छान माणूस होता. आठवण झाली की बरं वाटतं. पण आजचा काळ, आजचे प्रश्न, भविष्य यांचा विचार करायला बसलं की त्यांची आठवण होत नाही.

जेपी आज असते तर बरं झालं असतं, ते आज असायला हवे होते, त्यांची देशाला गरज आहे असं माझ्या मनात येत नाही. त्यांच्या काळात त्यांनी कामगिरी केली. त्यांचा काळ ते उत्तम जगले. त्यांच्याबद्दल वाचायला आवडतं. गदगदून येत नाही, त्यांच्यावाचून अडतंय असं वाटत नाही. परिस्थिती खूप बदलली आहे. खूप वेगळी व गुंतागुंतीची झाली आहे. तिच्यातून वाट काढावी लागेल. एखाद-दुसऱ्या माणसाच्या चरित्रामधून वाट निघेल असं वाटत नाही. जेपीच काय, त्या त्या काळात झालेली इतरही बहुतेक मोठी माणसं या काळात उपयोगी पडण्यासारखी नाहीत.

प्रत्येक काळाला स्वतःची माणसं जन्माला घालावी लागतात, मागली माणसं उसनी आणून उपयोग होत नाही.

*(ऑगस्ट २००१, जयप्रकाश नारायण विशेषांक)*

---

*(पान ३३९ वरून)*

या सगळ्या कार्यक्रमात बाजी मारली ती इंग्लंडनं. 'इंग्लंड' ही घोषणा झाली आणि क्षणार्धाचाही विलंब न करात इंग्लंडचे कन्यापुत्र लष्करी शिस्तीत मंचावर दाखल झाले. आपापसात मसलत करून सामूहिक गाणं ठरवताना त्यांची अजिबात पंचाईत झाली नसावी. एक इंग्लिशमन आपल्या गटासमोर उभा राहून कंडक्टरचे शिस्तबद्ध इशारे देत होता आणि सगळे जण एका आवाजात, एका लयीत, कसलीही चूक होऊ न देता आपलं गीत सादर करून मंचावरून खाली उतरले. टाळ्यांच्या गगनभेदी कडकडाट झाला. जणू काही जाकार्ताला येण्यापूर्वी शेती-अर्थशास्त्रज्ञांचा हा संघ महिनोन् महिने या गीताचा रिवाज करीत असावा असा निर्दोष आणि रेखीव कार्यक्रम इंग्लंडनं रुजू केला.

हा फार अंतर्मुख करणारा अनुभव होता. आपल्या देशाला बांधणारी सूत्रंच नाहीत अशी विदारक जाणीव झाली आणि ही सूत्रं शोधण्याचा आपण नीट प्रयत्नही केला नाही हेही लक्षात आलं.

परिषद संपल्यावर दोन दिवस मी जकार्तामध्ये राहिलो होतो. त्या अवधीत एका भव्य राष्ट्रीय स्मारकगृहाला भेट दिली. पुरातन काळापासून अगदी सुकार्णो, सुहार्तो इत्यादींपर्यंतचा इतिहास तिथं चित्रांतून कोरलेला होता. त्या स्मारकगृहाला भेट देणारा इंडोनेशियन नागरिक फुगलेल्या छातीनंच बाहेर पडेल अशी सगळी व्यवस्था होती.

इंडोनेशिया हा भौगोलिक दृष्ट्याही एक नसलेला, हजारो बेटांत विभागलेला देश; पण त्यानं राष्ट्रीय अभिमानाची काळजीपूर्वक जपणूक केलेली आहे. सूत्रं शोधलेली आहेत आणि त्यातली बरीचशी सूत्रं त्या मुस्लिम देशाला रामायण-महाभारतात सापडलेली आहेत हे आणखी एक आश्चर्य.

गेली कित्येक वर्षं इंडोनेशियाचा आर्थिक विकासही आपल्या देशाच्या तुलनेत अधिक वेगानं होत आहे.

हीही काही योगायोगाची गोष्ट नाही.

*(सप्टेंबर १९९८)*

# शेख आडनाव आणि मी

**यास्मिन शेख**

गप्पा चालू असताना एकदम तिनं विचारलं, 'तुमचं आडनाव काय?' मी आडनाव सांगितलं आणि काय आश्चर्य! एकदम चित्र पालटलं! बाईनं झटकन तोंड फिरवलं. इतका वेळ ती मला चिकटून बसली होती, ती थोडं अंतर ठेवून बसली.

सात-आठ वर्षांपूर्वीचा प्रसंग. डेक्कन क्वीननं आम्ही दोघं पुण्याला येत होतो. आम्हाला दोघांनाही खिडकी जवळच्या समोरासमोरच्या जागा मिळाल्या होत्या.

बाहेरची दृश्यं पाहण्यात माझं मन गुंतलं होतं. रेल्वे लाइनच्या बाजूनं वाढलेली झोपडपट्टी, सांडपाणी वाहून नेणारी तिथली उघडी गटारं, वाऱ्यानं सर्वभर उडणाऱ्या प्लास्टिक पिशव्या, उकिरड्यावरचा ओंगळ, शिसारी आणणारा कचरा... मनात अनेक प्रश्न गर्दी करत होते. माणसाची अगतिकता! गलिच्छ वस्तीत नाइलाजानं राहणारी, जगणारी माणसं, हेच वास्तव स्वीकारून त्यातच समाधान मानत असतील? त्याच घाणीत खेळणारी, बागडणारी त्यांची उघडीनागडी मुलं – सारंच दृश्य मन उदास करणारं होतं, उद्विग्नता आणणारं होतं. बाहेर पाहण्यापेक्षा रेल्वेच्या डब्यात आपल्या अवतीभोवतीची माणसं पाहणं, जमल्यास एखाद्याशी संवाद साधणं बरं, असं वाटून मी माझी नजर आत वळवली.

इतक्यात माझ्या कानावर एका छोट्या मुलाचा आवाज आला – 'मला खिडकीजवळ बसायचंय...' माझ्या शेजारी बसलेल्या एका तरुण जोडप्याचा तीन-चार वर्षांचा मुलगा हट्ट करत होता. आई त्याला दटावत होती. माझ्या यजमानांचंही त्या मुलाकडे लक्ष गेलं. त्यांच्या लक्षात आलं की, त्या मुलाला आम्ही अडवलेल्या एका खिडकीपाशी बसायचं आहे. त्यांनी आपुलकीनं म्हटलं, ''बेटा, इकडे ये. इथं बस.'' त्यांनी थोडं सरकून त्याला खिडकीपाशी बसायला जागा दिली. हळूहळू त्या दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. तो मुलगाही त्यांना 'आजोबा' म्हणू लागला. त्यांच्या प्रश्नाला तत्परतेनं उत्तरं देऊ लागला. मी पाहिलं तर तो मधेच त्यांच्या मांडीवर बसे, मधेच खिडकीतून बाहेर गंमत बघे. दोघांची छान गट्टी जमली.

माझ्याजवळ त्या मुलाची आई बसली होती. कुठल्यातरी वर्तमानपत्रातलं शब्दकोडं ती सोडवत होती. माझं लक्ष साहजिकच त्या शब्दकोड्याकडे गेलं. तिला एखाद्या शब्द अडला की ती थांबायची, विचार करायची. कोड्यातली तेवढी जागा रिकामी ठेवायची. दुसऱ्या शब्दाचा विचार करायची. ती एखाद्या शब्दावर अडली आहे हे ध्यानात आलं, की मी तिला शब्द सुचवायची. असे चार-पाच शब्द मी तिला सांगितले. ती अगदी खूष झाली. तिला माझ्याविषयी आपुलकी वाटू लागली हे तिच्या माझ्याशी चाललेल्या गप्पांवरून माझ्या ध्यानात आलं. आपण कोण, कुठले, आपण पुण्याला का जात आहोत, आपला मुलगा किती हुशार आहे, तो कसे कसे प्रश्न विचारतो, असं बरंच काही ती मला मोकळेपणाने सांगत होती. मी सारं काही कौतुकानं ऐकत होते. माझीही छान करमणूक होत होती. आमच्या दोघींच्या गप्पाही चांगल्या रंगल्या. तास-दीड तास कसा गेला हे कळलंसुद्धा नाही.

गप्पा चालू असताना एकदम तिनं विचारलं, 'तुमचं आडनाव काय?' मी आडनाव सांगितलं आणि काय आश्चर्य! एकदम चित्र पालटलं – नाटकात Transfer Scene व्हावा तसं! बाईनं झटकन तोंड फिरवलं. इतका वेळ ती मला चिकटून बसली होती, ती थोडं अंतर ठेवून बसली. पलीकडच्या खिडकीतून ती बाहेर पाहू लागली. बोलणं एकदम थांबलं. इतका वेळ माझ्याशी मनमोकळ्या गप्पा मारणारी ती बाई! माझा व तिचा काहीच संबंध नसल्यासारखं तिच्या वागण्यातून मला जाणवलं. खिडकीपाशी बसलेल्या मुलाला ती आपल्याकडे येण्यासाठी सांगू लागली. ''पुरे झालं तुझं खिडकीजवळ बसणं. इकडे ये.'' असं थोडं रागावल्यासारखं करून त्याला आपल्याजवळ बसण्याची तिनं खूण केली. तो ऐकेना तशी झटकन उठून तिनं त्याला अक्षरशः ओरबाडल्यासारखं उचललं आणि आपल्या मांडीवर बसवून ''तुला किनई एक गंमत सांगते...'' असं म्हणून त्याचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न केला.

'शेख' या आडनावाची ही किमया!

मघाशी रेल्वेलाइनच्या कडेनं पाहिलेलं मन उद्विग्न करणारं बाहेरचं जग आणि आता गाडीच्या डब्यात अनुभवलेली, मन विषण्ण करणारी, पूर्वग्रहदूषित मानसिकता! या दोहोंत अधिक दुःखदायक काय होतं?

अशा प्रकारचे बरेच अनुभव मला आले. मलाच नव्हे, अनेकांना आले. माझ्या परिचयातील एका प्राध्यापकानं सांगितलेला किस्सा ऐकल्यावर काय प्रतिक्रिया व्यक्त करावी हेच

मला कळेना. त्यांच्या ओळखीच्या एका सद्गृहस्थानं त्यांची एका अपरिचित व्यक्तीशी ओळख करून देताना म्हटलं, ''हे अमुक अमुक प्रोफेसर. मुस्लीम असले तरी सभ्य आहेत बरं का!'' आणि असं म्हणताना आपण त्या प्राध्यापकाचा किती अपमान करत आहोत याची जाणीवही त्या सद्गृहस्थाला झाली नाही!

मला आलेले काही मजेदार अनुभव इथं सांगावेसे वाटतात. एखाद्या अपरिचित व्यक्तीशी बोलत असताना माझं आडनाव कळल्यावर अनेकांनी कौतुकाने उद्‌गार काढले आहेत, ''अरे वा! तुम्ही मुसलमान असून किती सुंदर मराठी बोलता हो!''

'मुसलमानांनी चांगलं मराठी बोलू नये की काय!' माझ्या मनात येई. खरं म्हणजे, सुंदर वगैरे काही नाही. महाराष्ट्रीय (पुणेरी) मनुष्य जसं बोलतो, तसं मराठी मी बोलते. त्यात कौतुक कसलं? मी उत्तर देई, ''त्यात एवढं आश्चर्य काय आहे! मी महाराष्ट्रीय आहे.'' त्यावर कित्येक जणांच्या भाबड्या प्रतिक्रिया अशा – ''तुम्ही मुस्लीम आहात ना? मग महाराष्ट्रीय कशा?''

माझं उत्तर असं – ''अहो, मी महाराष्ट्रात जन्मले, वाढले. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकले. मराठी घेऊन बी.ए., एम.ए. केलं. माझी मातृभाषा मराठी आहे.'' माझं हे उत्तर ऐकल्यावर काहींच्या चेहऱ्यावर कौतुकमिश्रित आश्चर्य दिसायचं, काहींना माझं म्हणणं थोडंफार पटल्यासारखं वाटायचं, पण बहुतेक जणांच्या मुद्रेवर मी सांगतेय यांच्यातील खरेपणाबद्दल साशंकता उमटलेली स्पष्ट दिसायची.

कॉलेजमध्ये शिकवत असताना काही गमतीदार अनुभव मला आले. त्या वेळेला एफ.वाय.ची मुलं शाळेतून कॉलेजात आलेली असत. पहिल्या दिवशी एफ.वाय.च्या वर्गात मी प्रवेश करणार इतक्यात वर्गापाशी प्राध्यापकांची वाट पाहत उभे असलेले एक-दोन विद्यार्थी यायचे. इंग्लिशमध्ये म्हणायचे, "Miss, this is not a French Class." किंवा "This is not an English class." त्यांना वाटायचं, ह्या बाई चुकून मराठीच्या वर्गाकडे आल्या आहेत. कदाचित त्यांना माझं आडनाव कळल्यामुळे ह्या बाई मराठी विषयाच्या असणं शक्य नाही असं त्यांना मनापासून वाटत असावं किंवा कदाचित मराठी शिकवणाऱ्या बाईंबद्दल त्यांच्या मनात जी प्रतिमा असेल, त्याहून मी वेगळी दिसत असली पाहिजे! मी हसून म्हणायची, ''मला माहीत आहे. हा मराठीचा वर्ग आहे ना?'' मात्र व्याख्यानाला सुरुवात झाली की हळूहळू त्यांचे साशंक चेहरे बदलत जायचे. मला जाणवायचं त्यांच्या प्रतिक्रियांवरून – 'ह्या आपल्यातल्याच.' विद्यार्थी अगदी सहजपणे माझा स्वीकार करायचे. माझ्या आडनावामुळे माझ्याविषयी काही प्रतिकूल प्रतिक्रिया माझ्या विद्यार्थ्यांनी (एक-दोन अपवाद वगळता) व्यक्त केली असं माझ्या वाट्याला आलं नाही.

ते अपवादात्मक अनुभवही सांगितल्याशिवाय राहवत नाही.

१९६५चं युद्ध सुरू झालं त्यावेळची ही हकीकत. स्टाफरूममधून मी तळमजल्यावरच्या माझ्या वर्गावर जात होते. वाटेत कॉरिडॉरमध्ये विद्यार्थ्यांचा घोळका मला दिसला. माझ्या मराठीच्या वर्गात नसलेले ते विद्यार्थी होते. मला पाहताच त्यातील दोन-तीन विद्यार्थी मला ऐकू येईल इतक्या मोठ्यानं कुजबुजले, ''पाकिस्तानी! पाकिस्तानी!'' मी चमकले. थबकले. त्यांच्याजवळ जाऊन मी विचारलं, ''तुम्ही कोणाला पाकिस्तानी म्हणताहात?'' सगळे गप्प. ते एकमेकांकडे पाहू लागले. जी मुलं 'पाकिस्तानी' म्हणून कुजबुजली होती, तीही बोलेनात. मी थोडा वेळ थांबले. तरीही मुलं काही बोलेनात! मी त्यांना म्हटलं, ''हे बघा, मी पाकिस्तानी नाही. तुम्ही जितके भारतीय आहात, तितकीच मी भारतीय आहे, समजलं?''

'शेख' आडनावाचा असाही एक प्रताप!

दुसरा एक अनुभव – माझी कन्या रुकसाना हिनं अकरावी नंतर माझ्याच कॉलेजात आर्ट्‌सला प्रवेश घेतला होता. त्या वर्गावरचा माझा पहिलाच तास होता. 'शेख मॅडम' आपल्याला मराठी शिकवायला येणार हे विद्यार्थ्यांना कळलं होतं. माझी मुलगी ज्या बाकावर बसली होती, त्याच बाकावर एक मुलगी बसली होती. दोघींची ओळख नव्हती. ती माझ्या मुलीला म्हणाली, ''बाप रे! ही कोण मुसलमान बाई आपल्याला मराठी शिकवणार आहे! वैताग!!'' यावर रुकसाना काहीच बोलली नाही. मात्र तिला वाईट वाटलं. तिचा चेहरा पडला पण ते त्या मुलीच्या लक्षातही आलं नाही. 'ती मुसलमान बाई माझी आई आहे' असं जर माझ्या मुलीनं तिला सांगितलं असतं तर काय झालं असतं, कुणास ठाऊक! (हे सारं माझ्या मुलीनं मला घरी आल्यावर सांगितलं.) माझं व्याख्यान त्या मुलीला आवडलं असावं. तसं तिनं रुकसानाजवळ बोलूनही दाखवलं. तरीही माझ्या मुलीनं, 'त्या बाई माझ्या आई आहेत' असं तिला सांगितलं नाही, तसं तिला सांगावसं तिला वाटलं नाही, हेच खरं. मीही माझ्या वर्तनातून, बोलण्यातून मला तिचं मत कळलं आहे असं सूचितही केलं नाही. तिला केव्हातरी आमचं नातं कळलं असणार. पण तिनं कधी बोलून दाखवलं नाही.

त्या वर्षाच्या शेवटी एक दिवस ती स्टाफरूममध्ये माझ्याकडे आली. पुढच्या वर्षाला ती दुसऱ्या गावाला जाणार होती आणि तिथल्या कॉलेजात ती नाव नोंदवणार होती. माझ्याकडे पाहून ती गोड हसली, म्हणाली, ''बाई, मला तुमचा autograph हवाय. मला आवडणाऱ्या सर्व प्रोफसरांचे मी autograph घेणार आहे.'' मी नुसतीच सही करणार होते, हे तिच्या लक्षात आलं. ती झटकन म्हणाली, ''बाई नुसती सही करू नका, संदेश द्या.'' माझ्या कन्येनं मला तिचे पहिल्या दिवशी काढलेले माझ्याविषयीचे उद्‌गार सांगितले होते, त्याची मला आठवण झाली. मला हसू आलं. तिच्या वहीत मी लिहिलं – ''कुणाविषयीही मत बनवताना मन पूर्वग्रहदूषित ठेवू नका. आपल्याला आलेल्या अनुभवावरून आपलं मत निश्चित करा.'' खाली सही केली. मी तिच्याकडे पाहिलं. ती किंचित लाजली. पण मी हसत होते. हस्तांदोलनासाठी मी हात पुढे केला. प्रेमानं तिनं माझा हात हातात घेतला. ती प्रसन्न हसली.

माझ्यावर खूप लोभ असलेली, बी.ए.ला मराठी स्पेशल

घेतलेली एक विद्यार्थिनी. खूप वर्षांनी मला भेटली. ती सांगत होती तिच्या घराबद्दल. खूप मोठी जमीन होती तिच्या नवऱ्याची. त्यातला बराचसा भाग त्यांनी विकला, वगैरे. मी ऐकत होते. तेवढ्यात ती म्हणाली, ''आम्ही खरं म्हणजे हिंदू माणसालाच आमची जमीन विकली होती. पण त्यानं एका मुसलमानाला ती विकली यात आमचा काय दोष? लोक म्हणतात, 'अशी कशी तुम्ही मुसलमानाला जमीन विकलीत?' आम्ही नाही हो बाई विकली. खरं सांगा, आम्ही कधीतरी मुसलमानाला जमीन विकू का?'' हे सारं सांगत असताना तिला मुळीच जाणवलं नाही की आपण असं बोलायला नको, निदान या बाईंजवळ तरी. मला राग नाही आला तिचा. पण जातिद्वेष किती रोमारोमांत भिनलाय हे जाणवून दुःख मात्र झालं.

निवृत्त झाल्यावर पुण्याला स्थायिक व्हायचं आम्ही ठरवलं. पुण्यात घर शोधण्याची मोहीम हाती घेतली. पुण्यातील काही प्रतिष्ठित बिल्डर्सना आम्ही भेटलो. आपण बांधत असलेल्या सदनिकांची तत्परतेनं माहिती देणाऱ्या बिल्डर्सनी 'शेख' हे आडनाव ऐकताच, 'आमच्याकडे सध्या एकही फ्लॅट शिल्लक नाही. सॉरी.' असं म्हणून आमची बोळवण केली. तुमच्या अधर्मामुळे आम्ही तुम्हाला फ्लॅट देऊ शकत नाही असं उघडपणे त्यांनी सांगितलं नाही, हा त्यांचा सभ्यपणा! अर्थात आम्हाला पुण्यात फ्लॅट मिळाला तो आमच्या बिल्डरच्या उदारमतवादामुळे, हेही इथं सांगायला हवं.

पुण्यात जनगणनेच्या वेळी आलेल्या अनुभवाचं तर हसूच येतं.

जनगणना करायला आलेल्या गृहस्थाला आम्ही घरात बसायला सांगितलं. चहा देऊन त्याचं स्वागत केलं. तो म्हणालाही, ''अहो, पुष्कळसे लोक घरातही घेत नाहीत. दारातच उभं करतात. उभ्याउभ्याच आम्हाला फॉर्म भरायला लागतो. चहा-पाणी तर सोडाच!''

माहिती सांगत असताना 'शेख' हे आडनाव सांगितल्यावर 'धर्म, मुस्लीम' असं म्हणून तो त्याच्याजवळच्या फॉर्मवर नोंदणी करू लागला. मी म्हटलं, ''थांबा. मी ज्यू आहे. माझी नोंद करताना 'ज्यू' हा धर्म लिहा.'' त्यानं चमत्कारिक दृष्टीनं माझ्याकडे पाहिलं. ''असं कसं? तुम्ही नवराबायको आहात ना?'' मी त्याला समजावून सांगितलं, ''शेख मुस्लीम आहेत, पण मी ज्यू आहे.'' मी धर्मांतर केलं नसल्याचं सांगितल्यावर तो म्हणाला, ''या फॉर्ममध्ये 'ज्यू' किंवा 'इस्राएल' धर्माचा उल्लेखच नाही. त्यामुळे त्यासाठी कोड नंबर नाही.'' त्यानं असं म्हटल्यावर मी तो फॉर्म पाहिला. त्यात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन इत्यादी धर्मांच्या नोंदीपुढे कोड नंबर होते. पण त्यात पारशी, ज्यू (इस्राएल) या धर्मांचा अंतर्भावच केलेला नव्हता! (भारतात कमी संख्येनं का असेनात, पण ज्यू व पारशी असूनही!)

पुढे तो फॉर्म भरू लागला – मातृभाषा, ''उर्दू''. त्याला पुन्हा आम्ही दोघांनी अडवलं. ''आमची मातृभाषा मराठी आहे,'' असं आम्ही दोघांनी त्याला निक्षून सांगितलं. त्याच्या नजरेत अविश्वास ओतप्रोत भरला होता. तो उत्तरला, ''असं कसं? तुम्ही मुस्लीम आहात ना? तुमची मातृभाषा उर्दूच आहे.'' आम्ही दोघांनी पुन्हा एकदा त्याला समजावण्याचा प्रयत्न केला की, ''आम्ही महाराष्ट्रीय आहोत. आमची मातृभाषा 'मराठी' आहे.'' यावर त्याने काय उत्तर द्यावं? ''मी जर मातृभाषा मराठी असं लिहिलं तर आमचे साहेब माझ्यावर रागावतील.'' मी त्याला ठामपणे सांगितलं, ''तुमचे साहेब रागावण्याचा इथं प्रश्नच नाही. आणि ते रागावले तर रागावले. आम्ही जी माहिती सांगतो आहोत, ती खरी आहे, आणि तुम्हाला या फॉर्मवर आमची मातृभाषा 'मराठी'च नोंदवायला हवी.''

आमच्या घराबाहेर पडल्यावर त्या गृहस्थानं 'साहेबा'च्या भीतीने काही बदल केला किंवा काय हे कळलं नाही. उर्दू भाषा आपल्याला काही प्रमाणात समजते. उर्दू भाषकांशी आपण संवाद साधू शकतो तो हिंदीच्या द्वारा, पण महाराष्ट्रात जन्मलेल्या, तेथेच सगळी हयात काढलेल्या, मराठीतच व्यवहार करणाऱ्या आम्हा दोघांची मातृभाषा उर्दू कशी? महाराष्ट्रातल्या मुस्लिमानं 'मी महाराष्ट्रीय आहे, मराठी माझी मातृभाषा आहे' असं मानलं तर त्याला विरोध का व्हावा?

आम्ही लग्न केलं नोंदणी पद्धतीनं. धर्मान्तर करण्याचा प्रश्नच नव्हता. माझ्या सासरच्या लोकांनीही आग्रह धरला नाही. लग्नापूर्वी आम्ही नाशिकला होतो. लग्नानंतरही आम्ही नाशिकला होतो. तिथे कधीही धर्मभेदामुळे आमच्या वाट्याला उद्वेगजनक अनुभव आले नाहीत. त्या काळी सामान्य समाजाच्या मनात जातीय तेढ आजच्या इतकी तीव्र नव्हती. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन इत्यादी एकमेकांच्या धर्मभावना जपण्याचे प्रयत्न करत. 'परधर्मसहिष्णुता' हा शब्द लोकांना त्या काळी माहीतही नव्हता, पण त्यांच्या कृतीतून परधर्मसहिष्णुता व्यक्त होत असे. आजच्याप्रमाणे जातीयवादाला राजकीय गोटातून खतपाणी घातलं जात नव्हतं. मला आठवतं, नाशिकच्या माझ्या एका हिंदू मैत्रिणीची आजी सांगायची, ''मोहरमच्या दिवशी आमच्या मुसलमान शेजाऱ्यांप्रमाणे आम्ही 'खिचडा' करायचो. फरक एवढाच की आमचा खिचडा बिनमटणाचा असायचा.'' या तिच्या उद्गारातून त्या काळात समाजात धार्मिक सलोखा कितीतरी अधिक प्रमाणात होता हे लक्षात येतं.

आजही कित्येक जण आमच्याशी वागताना कोणताही दुजाभाव दाखवत नाहीत हे मला सांगायलाच हवं. आमच्या दोन्ही कन्यांचे विवाह हिंदू तरुणांशी झाले आणि पराकोटीचं सामंजस्य त्यांच्या आणि आमच्याही अनुभवाला आलं. मी कॉलेजात शिकवत असताना माझ्या सहकाऱ्यांकडूनही मोलाचा स्नेह मला लाभला. आज जेव्हा मी माझ्या मित्रपरिवाराचा विचार करते, तेव्हा माझ्या असं लक्षात येतं की त्यात हिंदू स्नेहीच अधिक आहेत. आणि माझ्या स्नेह्यांनी, परिचितांनी जातिद्वेषानं मला नाकारलं, डावललं असं कधीच घडलं नाही. व्यक्तिगत पातळीवर अनुभवायला येणारं सौहार्द सार्वजनिक पातळीवरही जाणवायला हवं असं मला मनापासून वाटतं.

*(ऑगस्ट २००२)*

# साहब मिले सबूरी में....

**विनय सहस्रबुद्धे**

सभोवती सिनिसिझमचा अंधार काठोकाठ भरू पाहत असताना आणि मूल्ये, निष्ठा, व्रत वगैरे शब्दावली बाद होत असताना, ''मीच का म्हणून चांगलं वागायचं?'' या प्रश्नाचा नाग कार्यकर्त्यांच्या मनात घर करून बसला नसेल, तरच नवल. कार्यकर्त्याला या प्रश्नाचे प्रामाणिक, पटणारे आणि पेलता येणारे उत्तर हवे आहे.

ब्रिटनमधील प्रमुख राजकीय पक्षांना कार्यकर्ते मिळत नसल्याबद्दलची एक बातमी मध्यंतरी वाचनात आली. अर्थात, कार्यकर्त्यांची ही टंचाई केवळ ब्रिटनपुरती मर्यादित नाही. जगभरातल्या सर्वच लोकशाही देशांमधील राजकीय पक्षांपुढे स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या निष्ठावान आणि निरपेक्ष वृत्तीच्या कार्यकर्त्यांचा अभाव हे अलीकडच्या काळातले एक मोठे संकट आहे. भारतातले राजकीय पक्ष हेही याला अपवाद नाहीत.

निवडणुका जिंकून येनकेनप्रकारेण सत्तेवर येणे, एवढा एकच कार्यक्रम झाल्यापासून 'राजकीय कार्यकर्ता' नावाच्या संस्थेला कसर लागणे सुरू झाले. राजकारणात अगदी ठरवून, टप्प्या-टप्प्याने 'करियर'च्या पायऱ्या चढण्याच्या इराद्याने येणारी मंडळी वगळता, निखळपणे विचारांशी बांधिलकी मानून काम करणारा समूह गेल्या काही वर्षांत आक्रसत गेला आहे. सांप्रतच्या पक्षीय राजकारणात आजमितीस 'परिवर्तन' वगैरेची भाषा फारशा गांभीर्याने कोणी वापरतानाही दिसत नाही.

भारतातल्या आणि जगातील अन्य देशांमधल्याही राजकीय पक्षांच्या बाबतीत विचारसरणीचा लोप हे स्वयंस्फूर्त आणि कार्यकर्ताधिष्ठित सक्रियता कमी होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणता येईल. पूर्वी सरधोपटपणे 'डावे' आणि 'उजवे' अशी राजकीय विचारधारांची व पक्षांचीही विभागणी होई. त्यामुळे पक्षांना आपली अशी ओळखही असे. 'पोलिटिकली करेक्ट' राहण्याच्या दडपणाखाली गेल्या वीस-पंचवीस वर्षांत जगभरातली राजकीय मंडळी सुरुवातीला आपणही प्रस्थापित-विरोधी म्हणजेच डावे असल्याचा आणि आता जागतिकीकरणाच्या रेट्यानंतर डावे वगैरे नसून मध्यममार्गी असल्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दावा करू लागली आहेत. या सगळ्या परिस्थितीत वैचारिक गोंधळाची एवढी बजबजपुरी माजली आहे, की वैचारिक प्रेरणा नावाचा विषयच लोप पावावा!

अर्थात, हा गोंधळ केवळ राजकारणापुरता मर्यादित नसून समाजकारण, सांस्कृतिक जीवन, संस्था-जीवन इ. सर्वांनाच या गोंधळाने पुरते ग्रासले आहे. ग्रंथालये, सहकारी पतपेढ्या, शिक्षण संस्था इ. चालविणारी कार्यकर्ती अथवा पदाधिकारी मंडळी या संस्था वा संघटना नेमक्या कशासाठी चालवतात? संस्थांचे औपचारिक उद्देश स्पष्टच असतात, पण त्यांच्या 'चालवण्यासाठी' धडपडणारी माणसे नेमक्या कोणत्या प्रेरणेने काम करतात? त्यांच्यासमोर काही ठोस उद्दिष्टे आहेत का? संस्थाजीवनाबद्दल व त्या त्या संस्था ज्या क्षेत्रात काम करताहेत त्या क्षेत्रांबद्दल त्यांच्या काही निश्चित कल्पना आहेत का? की इथेही फक्त सत्तेचेच आकर्षण आहे? व्हिजिटिंग कार्डावरच्या मजकुरात भर पाडण्यापलीकडे त्या कार्यकर्त्याला खरेच आणि नेहमीच काही मिळवायचे असते?

संस्था आणि संघटनांमधील कार्यकर्ते आणि त्यांच्या प्रेरणा यांच्या संदर्भात साहित्य आणि नाट्य संमेलनांच्या वेळी बरीच चर्चा घडून येते. असे उत्सवी कार्यक्रम ज्यांच्या भरवशावरच यशस्वी होऊ शकतात अशा शिस्तीच्या, पडद्याआड राहण्यात कमीपणा न मानणाऱ्या, खऱ्या निरपेक्षवृत्तीच्या कार्यकर्त्यांची संख्या तिथेही दिवसेंदिवस कमीच होतेय. आज ज्याला 'चमकेश वृत्ती' म्हणतात ती 'तेवढेच ज्ञानप्रकाशात' ही प्रेरणा आजच्या जमान्यात ठळकपणे पुढे येते, हा सार्वत्रिक अनुभव आहे.

राजकीय व सामाजिक संस्था-संघटनांपेक्षा स्वयंसेवी संस्थांची स्थिती खूप काही वेगळी नाही. या क्षेत्रात व्यवसायनिष्ठेचा किंवा प्रोफेशनॅलिझमचा खूप बोलबाला आहे व त्यात तसे गैर काही नाही. पण हीच व्यवसायनिष्ठा कधीकधी विशुद्ध व्यापारी दृष्टिकोनात रूपांतरित होते, तेव्हा स्वयंसेवी कार्यकर्त्यांच्या प्रेरणांचा विषय चर्चेत येणे क्रमप्राप्तच होते. राजकीय पक्षांच्या बाबतीत निवडणुका जिंकण्याचे तंत्र आत्मसात करणे जसे महत्त्वाचे ठरते, तसेच स्वयंसेवी कामाच्या क्षेत्रात सरकारी वा देशी-परदेशी धनदात्यांकडून निधी मिळविण्याचे तंत्र महत्त्वाचे ठरते. तंत्राची मातब्बरी वाढली, की नि:स्वार्थभावनेतून स्वयंस्फूर्ततेने करावयाच्या सेवेचा मंत्र क्षीण होणे हे ओघाने आलेच.

थोडक्यात काय, तर राजकीय पक्ष, सामाजिक संस्था-संघटना

## टर्निंग द सर्च लाईट इनवर्ड!

एका महत्त्वाच्या निवडणुकीत पराभूत झालेला एक नेता नंतर म्हणाला, ''माझे मतदार माझ्यावर एवढे नाराज आहेत हे मला कोणी सांगितलंच नाही.''

कोण आणि कसं सांगणार? राजकारणात 'चमचा संस्कृती'चा दबदबा वाटू लागल्यापासून स्तुतिपाठकांचीच सद्दी सुरू झाली आहे. जिथे संस्था-संघटनांचे 'मठ' झाले, तिथेही थोड्याफार फरकाने हाच प्रकार आहे. निदान राजकारणातल्यांना निवडणुकींच्या माध्यमातून तरी वास्तवाचे भान करून देता येते. पण निवडणुका न लढवताच सत्तापदांवर गेलेल्यांचे काय? शिवाय, अनेक संस्था-संघटनांमध्ये ज्यांच्याकडे औपचारिक पद आणि अधिकार आहेत, त्यांनी अनेकदा नैतिक अधिकार गमावले आहेत. उलट, ज्यांच्याकडे नैतिक अधिकार आहे, त्यांनी काल्पनिक वा वास्तविक असुरक्षिततेपोटी खरे बोलण्याचे धाडस दाखविणे नाकारले आहे.

अशा स्थितीत, उच्चपदस्थांनी ठरविले तरच 'टर्निंग द सर्च लाईट इनवर्ड' घडण्याची शक्यता. अनेकदा हे इतक्या उशिरा घडते, की तोपर्यंत दृष्टी अधू झाल्याने सर्च लाईटही अपुरा पडतो.

आणि स्वयंसेवी संस्था या सर्वच ठिकाणी घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याची मानसिकता बाळगणारी कार्यकर्ते मंडळी पूर्वीपेक्षा खूपच दुर्मिळ झाली आहेत.

आपल्या सार्वजनिक जीवनातल्या कार्यकर्तेपणाला अशी कसर लागण्यामागे बदलत्या आणि विलक्षण गतिमान जीवनशैलीशी संबंधित असेही काही मुद्दे आहेत. रा. स्व. संघाचे प्रचारक पूर्वी शाळकरी किंवा तरुण मुलांना ''संध्याकाळी काय करतोयस?'' असा प्रश्न विचारत आणि बहुतेक वेळा त्याचे उत्तर ''खास असं काही नाही...'' असेच येई. आज कदाचित प्रश्न तोच असला तरी उत्तर तेच राहिलेले नाही. ट्यूशन क्लासेस, टीव्हीवरचे कार्यक्रम, मित्रांबरोबर फिरायला जाणे असे अनेक कार्यक्रम आज मुलांच्या अजेंड्यावर अगदी स्वाभाविकपणे असतात. जे पाल्यांचे, त्याहीपेक्षा कठीण पालकांचे. शहरात, व निमशहरात राहणाऱ्यांनाही, आता 'फावला वेळ' असा फारसा राहिलेलाच नाही. साहजिकच, रिकाम्या वा फावल्या वेळेत समाजासाठी काही काम, ही संकल्पनाच आता नाहीशी होत चालली आहे. विशेषतः तरुणांच्या बाबतीत, आज आजूबाजूला स्पर्धेचे वातावरण इतके विलक्षण गडद होत असताना, समाजासाठी नियमितपणे आणि आवर्जून वेळ देण्याची मानसिकता, आणि व्यावहारिक शक्यताही, कमी होत चालली आहे.

अर्थात, विचारसरणी कोणतीही असो, कामाचे क्षेत्र कोणतेही असो, सार्वजनिक जीवनातले 'कार्यकर्ता-जीवन' असे कोमेजण्यामागे असणारी कारणे केवळ व्यावहारिक नाहीत. समाजाच्या विचार करण्याच्या पद्धतीतले बदलही खूप परिणाम करणारे आहेत. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे आदर्शवाद कमी होत चालला आहे आणि आदर्शवादी जीवन जगल्याची उदाहरणेही आसमंतातून नाहीशी होत चालली आहेत. ''आम्ही नेमकं कोणाकडे बघून जीवन जगायचं?'' असा अंतरीच्या कळवळ्याचा प्रश्न एखाद्या संस्था-संघटनेतला कार्यकर्ता करतो, तेव्हा नेहमीच तो बेगडी आणि आव आणणारा नसतो. चहूबाजूचे वातावरण, नेत्यांच्या आणि संस्थाधुरीणांच्या विचार-वर्तनातील अंतर, त्यांच्यातला खोटेपणा, त्यांची स्वतःची अकर्मण्यता, त्यांचा निरुत्साह, त्यांचा अहंकार, त्यांचे 'मूडस्' या सर्वांना साक्षी असणारा कार्यकर्ता अशा वातावरणात अंगीकृत कामाची उमेदच हरवून बसतो. अशी उदाहरणे जेव्हा एखाददुसरीच असतात, तेव्हा कार्यकर्ते स्वतःच स्वतःच्या मनाची समजूत घालतात आणि स्वतःपुरती ऊर्जा मिळवून पुन्हा कामाला लागतात. पण आपण ज्यांना नेता मानले त्यांचेही पाय मातीचेच आहेत, तेही समर्थ आणि विवेकशील नेतृत्व करण्यास अपात्रच आहेत असे जेव्हा त्याला वारंवार दिसू लागते, तेव्हा तो मूळचा संवेदनशील, ऊर्जावान कार्यकर्ता सिनिक किंवा अश्रद्ध बनतो. अशा कार्यकर्त्यांचे प्रवाह-पतित बनणे ही मग या प्रवासाची फक्त तार्किक परिणतीच उरते. सामाजिक, राजकीय आणि खरे म्हणजे एकूणच सार्वजनिक जीवनात नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारणारे आपल्या दांभिक वर्तनातून सर्वसामान्यांच्या विश्वासाशी वा श्रद्धेशी खेळ खेळतातच, पण त्याहीपेक्षा गंभीर म्हणजे नेता आणि पर्यायाने कार्यकर्ता नावाच्या संस्थेचीही ते विलक्षण हानी घडवून आणतात!

महाराष्ट्राच्या एका महानेत्याने अलीकडेच दोन वेगवेगळ्या भाषणांमधून कार्यकर्ते आणि चळवळी याविषयी मतप्रदर्शन केले आहे. शिवसेनेचे थेट नाव न घेता हा नेता म्हणाला, ''लोकांमध्ये जाऊन राजकीय काम करायचं तर लवकर उठून कामाला लागावं लागतं; आणि संध्याकाळी सातनंतरही लोकांशी भेटण्या-बोलण्याच्या स्थितीत असावं लागतं.'' या प्रतिपादनाशी कोणीच असहमत होणार नाही. पण खुद्द या नेत्याने आपल्या आजच्या व पूर्वीच्या पक्षांची बांधणी करताना कार्यकर्त्यांसाठी अशी काही वर्तनसूत्रे घालून दिल्याचे ऐकिवात नाही.

आजही, खुद्द या महानेत्याच्या पक्षातही विचारांची पक्की बैठक असलेले, सद्वर्तनी, आणि 'संघटने'शी निष्ठावान असलेले कार्यकर्ते, एखादे 'केडर' बांधण्याच्या पद्धतीने; जोपासले जात आहेत, असे म्हणण्यासारखी स्थिती नाही. शिवाय, राजकीय कार्यकर्त्यांच्या वागणुकीतले हे अपेक्षित बदल जाहीर आवाहनातून वा अन्य पक्षांची उणीदुणी काढून साधत नाहीत. त्यासाठी तळातल्या कार्यकर्त्यांशी व्यक्तिगत संवाद असावा लागतो. असा संवाद आणि त्यातून जोपासले जाणारे 'नाते'च नसल्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही आज कोणी कोणाला सुधारायला धजत नाही. एखादा गुणी, सद्वर्तनी आणि परिश्रमी कार्यकर्ता पाय घसरून पडू लागला तर त्याबद्दलची 'कुजबुज' वाढते आणि अखेर झालीच तर त्यावर 'कारवाई' होते. पण चुकांचा असा कडेलोट होण्यापूर्वीच त्या संबंधिताला समजुतीच्या चार गोष्टी सांगायचे फारसे कोणी मनावर घेत नाहीत. बरेचदा तर असेही मनात येऊन

जाते, की उच्चपदस्थांचे नैतिक पोखरलेपण आता इतके खोलवर जात चाललेय, की कार्यकर्त्यांनी संघटनेतल्या नेत्यांना म्हणजेच संघटनेला उत्तरदायी असले पाहिजे, हे ठामपणे सांगण्याची हिंमतही उरू नये. अनेक संस्था-संघटनांमध्ये तर आज हेही दिसते, की ''तुम्ही मला प्रश्न विचारू नका, मी तुम्हांला विचारणार नाही'' अशा काहीशा परस्परसामंजस्यातून व्यवहार चालतात. अशा सगळ्या वातावरणात कार्यकर्ते, त्यांच्या प्रेरणा, त्यांच्या मन-बुद्धीची मशागत, त्यांच्या क्षेमकुशलाची चिंता हे विषय कितीतरी संघटनांच्या अजेंड्यावरून अदृश्यच झाले आहेत.

महाराष्ट्रातल्या त्याच महानेत्याने ''फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात धर्मदंडाच्या प्रश्नावरून लोक रस्त्यावर येतात हे दुर्दैवी आहे'' असेही विधान केलेय. खुद्द त्या नेत्यासह सर्वचजण हे जाणतात, की विचारांचा वारसा महापुरुषांचा नुसता उदोउदो करून रुजत नाही. त्यासाठी दीर्घ पल्ल्याचा विचार करून आणि मूल्यांशी तडजोड न करता धीरोदात्तपणे काम करणारे कार्यकर्ते जपावे लागतात, फुलवावे लागतात!

स्वयंसेवी सामाजिक कार्यात या पद्धतीने काम करणारे काही एकांडे शिलेदार आजही आहेत. आजूबाजूच्या विलक्षण असुरक्षित, गुंतागुंतीच्या, आणि गोंधळात टाकणाऱ्या वातावरणात त्यांनी शोधलाय तो पावलांपुरता प्रकाश आणि कमालीच्या चिकाटीने त्यांचा सुरू आहे तो एक प्रकारचा 'कदमताल'! स्वत:ची स्वायत्तता, स्वातंत्र्य, स्वयंपूर्णता यांच्या बळावर मोठ्या हिमतीने ही मंडळी उभी आहेत. पण त्यातून अवघ्या समाजाला सामावून घेणारी चळवळ वगैरे उभी राहण्याची शक्यता तशी धूसरच.

आपली स्वयंपूर्णता जपत, एक प्रकारच्या निमव्यावसायिकनिष्ठ पद्धतीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये मुख्यत्वे एन.जी.ओ. क्षेत्रातील मंडळींचा समावेश आहे. या क्षेत्रात इतके विविध प्रकार आहेत, की कोणतेही सामान्यीकरण करणे कठीणच. काहींनी खरोखरच आदर्श कामे उभी करून स्वयंसेवी क्षेत्राच्या विश्वासार्हतेत भर घातली आहे. याउलट, अनेकांनी या क्षेत्राला जन्मत:च लाभलेल्या आणि अजूनही न लोप पावलेल्या 'सेवाभावी' वलयाशी कोणतेही इमान न राखता चक्क दुकानदारी चालविली आहे. समाजकार्य महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेल्या आणि उराशी, निदान सुरुवातीला तरी निखळ सेवाकार्याच्या समाधानाचे स्वप्न बाळगणाऱ्या अनेक तरुणांना एन.जी.ओ. क्षेत्राचा भूलभुल्लैय्या असा खिळवून ठेवतो, की अवघ्या काही वर्षांतच 'कार्यकर्त्या'चा 'कर्मचारी' होतो. राजकारणाप्रमाणेच या क्षेत्रालाही एक प्रकारच्या बुद्धिमांद्यासारख्याच भावमांद्याने ग्रासले आहे. विलक्षण मनापासून ध्येयधुंद होऊन काम करावे, आनंदाने परिश्रम झेलावेत, स्वत:चे, सहकाऱ्यांचे मनस्तापही सांभाळावेत, कटकटींचा सामना करावा आणि परिवर्तन घडविण्याची जिद्द हरपू न देता दिवसअखेर विलक्षण समाधानाने, नव्या दिवसाची नवी स्वप्ने पाहत झोपी जावे, ही खरे म्हणजे हाडाच्या कार्यकर्त्याची भावनिक गरज. पण या भावनेची, बावनकशी समाधानाची भूकच लागत नसेल तर कुठले परिश्रम, कुठली जिद्द आणि कसले समाधान? राजकारणात आणि स्वयंसेवी क्षेत्रातही परिवर्तनाची तहान असलेला आणि समाधानाच्या भावनेने भूक हरपून काम करणारा वर्ग घटतो आहे. सार्वजनिक जीवनातल्या कार्यकर्तावृत्तीला कसर लागण्याचे हे एक महत्त्वाचे कारण म्हणता येईल.

राजकारण असो वा सामाजिक कार्य, आजच्या कार्यकर्त्यांना वा आज नेतेपदी पोचलेल्या कालच्या कार्यकर्त्यांनासुद्धा मुदलातच परिवर्तनाची अशी भूक लागतच नसेल, हे संभवत नाही. काळाच्या ओघात वरती खूपशा जाड थराच्या स्वरूपात राख साचलेली असली, तरी ध्येयवादाचा, सच्च्या प्रेरणेचा निखारा सर्वदूर ठार विझलेलाच असेल असे मानण्याचे कारण नाही. पण बदलत्या काळात निखाऱ्यात नुसती धुगधुगी असणे पुरत नाही, तसे ते पूर्वीही कधी पुरे पडत नव्हतेच! पण अस्तित्वाच्या लढाईत दुविधांच्या दगडांना ठेचकाळत मार्गक्रमणा करणारा कार्यकर्ता आपल्याच मनाची समजूत घालत एका मागोमाग एक तडजोडी करत जातो, तेव्हा मनाच्या गाभाऱ्यात उठणारी नैतिक पोखरलेपणाची समांतर रेषा निखाऱ्याची धग आणखीनच सौम्य करते. सुरुवातीचा तत्त्वांचा आग्रह, आपली तत्त्वे आपल्या व्यवहारातून दिसावीत यासाठी धडपड, आणि ही धडपड फारशी जमत नाही या जाणिवेतून होणारी मनाची तडफड हे सारे त्याच्याच आतल्या आवाजाच्या साक्षीने मंदावत जाते.

अशा अवघड वाटेवरच मग प्रारंभकाळातले तरुण, संवेदनशील मन कदाचित त्याच्याही नकळत 'अश्रद्ध' बनू लागते. स्वत: स्वीकारलेल्या तडजोडवादाच्या समर्थनासाठी हे मन चळवळीतल्याच इतरांच्या वर्तनाचा आधार शोधू लागते. नेमक्या याच अवस्थेत त्याला गरज असते ती सावरणाऱ्या हातांची, विवेकाच्या मार्गावरून ढळू न देणाऱ्या एक मित्राची आणि मार्गदर्शकाची. बहुसंख्य चळवळींमधल्या नेत्यांच्या वा कार्यकर्त्यांच्याही परस्परसंबंधांची आजची स्थिती पाहता अशा मित्र-मार्गदर्शकाची उणीव ही आज आपल्या संस्था-संघटनांची आणि पर्यायाने एकूणच सार्वजनिक जीवनाची मोठीच उणीव झाली आहे. एकेकाळी उमेदीने, निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते आज अनेकदा ढेपाळलेले तरी दिसतात किंवा परिस्थितीपुढे शरण जाऊन तडजोड हाच धर्म मानत, वारा वाहील तशी पाठ फिरवून बदलांना सामोरे गेलेले दिसतात. जे थकतात, गोंधळून जाऊन थबकतात, निराश होतात, त्यांना पाठीवर हात फिरवून दिलासा देणारे आणि 'चकमक हरला असलास तरी लढाई अजूनही जिंकता येईल' असे मन:पूर्वकतेने, तळमळीने आणि 'कन्व्हिन्सिंगली' सांगणारे आज दुर्मिळ आहेत. सुट्यासुट्या, एकेकट्या माणसांच्या संस्था-संघटनांमध्ये समोर दिसत असूनही, घसरणाऱ्या वा घरंगळणाऱ्यांना सावरणारी माणसेच नसणे ही खरी समस्या आहे. कर्ता नसलेली कुटुंबे, ती हीच!

सामाजिक आणि खरे म्हणजे राजकीय कामासंदर्भातसुद्धा आज एका चाकोरीबाह्य आणि व्यावसायनिष्ठ दृष्टिकोनाची गरज आहे. एकेकाळी गरिबीचे उदात्तीकरण करण्याची लाट होती आणि बहुधा त्याचीच प्रतिक्रिया म्हणून की काय आज साधी राहणी, साधेपणा हे मूल्य म्हणून सहजासहजी लोकांच्या गळी उतरत नाही. या मूल्याबद्दलची सखोल आणि समग्र जाणच संपत चालल्यामुळे

### *नेत्यांचा अहंकार!*

*मीपण ज्यांचे पक्व फळापरी, सहजपणाने गळले हो, जीवन त्यांना कळले हो...*

ज्यांचा 'मी'पणा गळतो त्यांनाच 'जीवन कळतं' असे म्हणतात. पण सार्वजनिक जीवनातल्या नेत्यांच्या बाबतीत असे 'जीवन कळलेल्या' व्यक्तींची संख्या दुर्मिळच म्हणायला हवी. व्यासपीठावर कोण, कसा आणि कुठे बसणार इथपासून ते संस्था-संघटनांच्या अहवालात आपले नाव कोणत्या क्रमांकावर आहे, इथपर्यंत वरवर अगदी किरकोळ वाटणाऱ्या गोष्टी वरिष्ठांचे अहंकार दुखावून जातात नि त्याची किंमत मोजावी लागते ती कार्यकर्त्याला. अध्यात्माच्या क्षेत्रातील बाबांना आणि महाराजांनाही नसेल एवढी, 'चरणस्पर्श' करून कार्यकर्ते आपल्याला सन्मान देतात या गोष्टीची कित्येक राजकीय नेत्यांना एक प्रकारची नशाच चढते.

''*असू आम्ही सुखाने, पत्थर पायातील, मंदिर उभविणे, हेच आमुचे शील* हे गीत कळसावर बसलेल्यांना इतरांकडून ऐकायला खूपच आवडते!'' ही एका कार्यकर्त्याची प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे.

साध्या राहणीचा संदर्भ कुठेतरी गरिबीशी, दारिद्र्याशी जोडला जाऊ लागला आहे. फिल्डमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यालाही हे जाणवते. साहजिकच साधेपणातून आपल्या गरिबीबद्दलचे गैरसमज पसरणे व त्याची परिणती आपण कुणाच्या तरी व्यक्त-अव्यक्त अनुंकपेचा विषय बनणे, हे त्याला अस्वस्थ करते. त्यातच आजूबाजूच्या वातावरणाच्या चंगळवादी कोलाहलात प्रसंगी 'साधेपणा' या मूल्याबद्दलची त्याची निष्ठाही मग पातळ होते, प्रसंगी उरतच नाही. ''मीच काय पाप केलंय?'' ही मानसिकता मग उसळी मारून वर येते.

वैचारिक कोलाहलामुळे ठिसूळ झालेल्या सैद्धान्तिक बैठका, स्पर्धात्मकता आणि व्यावसायिकता यांमुळे सामाजिक कार्यातल्या 'मिशन' भावनेला लागलेली आहोटी आणि व्यक्तिगत जीवनातही वेळेच्या, व्यवधानाच्या संदर्भात 'डिमांडिंग' झालेले घर-संसार यात बावचळून गेलेला कार्यकर्ता सतत 'मार्गदर्शक मित्रा'च्या शोधात असतो, हे सनातन सत्य आहे.

ज्ञानाच्या क्षेत्रात जसा गुरू लागतो तसाच सार्वजनिक जीवनात प्रत्येकालाच एक 'मेंटर' लागतो. कुणीतरी आपला हात धरून स्वीकृत क्षेत्रातल्या अवघड वाटा दाखवाव्यात, कुणीतरी पाठीवरून हात फिरवावा, कुणीतरी चुका समजावून सांगाव्यात, कुणीतरी आपले पालकत्व स्वीकारावे, काही यश मिळाले तर डोळ्यांच्या भाषेनीच का होईना पण कुणीतरी शाबासकी द्यावी असे प्रत्येक कार्यकर्त्यालाच वाटत असते. स्त्री असो की पुरूष, उजवा असो की डावा, ग्रामीण असो की शहरी, 'मेंटर'ची गरज कोणाला चुकलेली नाही. राजकारण, समाजकारण, संस्थाकारण, स्वयंसेवी कार्य; सर्वदूर काम करणाऱ्या तळातल्या कार्यकर्त्याची ही 'किमान समान' गरज आहे.

सभोवती सिनिसिझमचा अंधार काठोकाठ भरू पाहत असताना आणि मूल्ये, निष्ठा, व्रत वगैरे शब्दावली बाद होत असताना, ''मीच का म्हणून चांगलं वागायचं?'' या प्रश्नाचा फणा काढलेला नाग कार्यकर्त्याच्या मनात घर करून बसला नसेल, तरच नवल. सापडलेल्या वा न सापडलेल्या 'मेंटर'कडून कार्यकर्त्याला या प्रश्नाचे प्रामाणिक, पटणारे आणि पेलता येणारे उत्तर हवे आहे. त्याला नुसता उपदेशाचे डोस पाजणारा 'मार्गदर्शक' नकोय. दुविधांमधून चतुराईने पण तरीही प्रामाणिकपणे मार्ग काढायला शिकविणारा मेंटरवजा मित्र त्याला हवाय. त्याग, परिश्रम, सेवाभाव, प्रामाणिकता, निष्ठा या पारंपरिक आणि पराकोटीचे महत्त्व असलेल्या मूल्यव्यवस्थेला नव्या म्हणजेच कार्यक्षमता, उत्पादकता, कुशलता, व्यवस्थापनदृष्टी, इ. आधुनिक मूल्यांची जोड का आणि कशी द्यायला हवी हे सांगणारा 'मेंटर' त्याला हवाय. सेवाभाव आणि कार्यनिष्ठा असेल तर कार्यक्षमता उत्पन्न होतेच हे खरे नाही आणि कौशल्य असणाऱ्यांकडे निष्ठा आणि प्रामाणिकता असणारच हेही खरे नाही, हे नीट समजावून सांगणारा 'सखा आणि सहकारी' हा कार्यकर्ता शोधतोय!

जागोजागच्या आणि विविध क्षेत्रांमधल्या 'मावळत्या' पिढीने ही 'मेंटरशीप' केली नाही ही आजच्या कार्यकर्त्यांची सार्वत्रिक तक्रार असेल असे मानण्यास बरीच जागा आहे.

कबिराने लिहिलेल्या आणि आबिदा परवीनने गायलेल्या एका भजनात आबिदा विलक्षण आर्ततेने सांगते,

*कहत कबीर*
*सुनो भई साधो*
*साहब मिले सबूरी में,*
*मन लागो आज फकीरी में...*

ध्येयाच्या आणि आदर्शवादाच्या मागे लागून 'फकीर' व्हायला तयार असलेला तरुण कार्यकर्तावर्ग आजही जागोजाग आहेच. प्रश्न आहे, त्याची उमेद वाढविणाऱ्या 'साहबा'चा. सबुरीत, शांततेत, सहजपणे, अनौपचारिकपणे, हा 'साहब' त्याला 'भेटणं' अंमळ अवघडच. तो निदान 'सापडला' तरी खूप!

(ऑगस्ट २००६)

# समाजसेवेची दुकानदारी नको!

**शरद जोशी**

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचा हा महत्त्वाचा लेख 'बस करा हे समाजसेवेचे ढोंग!' या शीर्षकासह अंतर्नादच्या १९९९च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला होता. तो खूपच वादग्रस्त ठरला. त्यानंतर लेखकाने त्यात थोडेफार बदल केले. नंतरचा तो सुधारित लेख इथे थोडा संक्षिप्त करून प्रसिद्ध करत आहोत. लेखकाची मते सर्वांना पटतील असे नाही, पण लेखकाने उपस्थित केलेले अनेक मुद्दे एका वेगळ्या दिशेने विचार करायला आपल्याला प्रवृत्त करतात. लेखकाची एकूण जीवनविषयक दृष्टीही प्रस्तुत लेखात, बहुधा प्रथमच, प्रकट झाली आहे आणि तीही वाचकाला अंतर्मुख करणारी आहे.

अंतर्नादच्या १९९९च्या दिवाळी अंकासाठी 'स्वयंस्फूर्त कार्याचे समाजजीवनातील स्थान' या विषयावर मी लिहावे, अशी विनंती भानू काळे यांनी मला त्याआधी तीन-एक महिन्यांपूर्वी केली होती. माझी प्रकृती, निवडणुकीची धामधूम, वेगवेगळे दौरे यांमुळे हे लेखन मागे पडत गेले. पण नंतर अंक छपाईला द्यायची वेळ आली असल्याकारणाने हे काम मला हाती घ्यावेच लागले.

खरे सांगायचे तर, हे काम मागे पडायचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे या विषयावरील माझी मते इतकी धक्कादायक आहेत, की अंतर्नादच्या संपादकांना, तसेच ह्या अंकाच्या वाचकांनाही ती कितपत मानवतील याविषयी मी साशंक होतो. असो.

''स्वयंस्फूर्त कार्य याचा अर्थ या अंकापुरता सामाजिक कार्य किंवा सेवाकार्य असा घ्यावा, इंग्रजीतील voluntary work या अर्थाने येथे स्वयंस्फूर्त कार्य हा शब्दप्रयोग योजलेला आहे.'' – असा खुलासा संपादकांनी केलेला आहे. अशा अर्थाने केल्या जाणाऱ्या स्वयंस्फूर्त कार्याची समाजाला काहीही आवश्यकता नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

अशा प्रकारच्या सर्व स्वयंस्फूर्त कार्यामागील दृष्टिकोन महाभारतातील पुढील श्लोकात व्यक्त केला गेला आहे.

न त्वहं कामये राज्यम्
न स्वर्गम् नापुनर्भवम्
कामये दुःखतप्तानां
प्राणिनाम् आर्तिनाशनम् ॥

(मला राज्य, स्वर्ग, मोक्ष हे काही नको. दुःखाने तप्त अशा प्राणिमात्रांचे आर्त म्हणजे संकट वा दुःख दूर करणे एवढीच माझी कामना आहे.)

या दृष्टिकोनातून काही कार्य करणे हे मला अजिबात न पटणारे आहे. त्यामुळे या सर्व स्वयंस्फूर्त कार्याला माझा तत्त्वतःच विरोध आहे. परंतु त्यापूर्वी समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये चालू असलेल्या स्वयंस्फूर्त कार्याचा आपण जरा थोडक्यात आढावा घेऊ.

बरेच स्वयंस्फूर्त कार्य आज पर्यावरणाच्या क्षेत्रात चालू आहे. सामान्यतः या मंडळींचा मोठी धरणे बांधायला विरोध असतो. अनेक बडी बडी मंडळी या प्रश्नावर आपला आवाज उठवताना दिसतात. त्यांची मूळ भूमिकाच मला चुकीची वाटते. या देशातील शेतीचे प्रश्न मिटायचे असतील, अगदी प्यायच्या पाण्याचा प्रश्नही मिटायचा असेल, तर त्यासाठी अशी मोठी धरणे बांधणे अपरिहार्य आहे. असे असतानासुद्धा दोन-चार व्यक्ती केवळ आपले नाव दुमदुमत राहावे, आपला लौकिक वाढावा या एकमेव भूमिकेतून या आंदोलनामध्ये अग्रभागी असलेल्या दिसतात. सर्व प्रसारमाध्यमांमधून या मंडळींना, त्यांच्यामागे फारसा जनाधार नसतानासुद्धा, अवास्तव प्रसिद्धी दिली जाते. १९९९ सालच्या सुरुवातीला मी नुकताच तीन आठवडे गुजरातेत राहून आलो होतो. तिथल्या, विशेषतः सौराष्ट्रातील, जनतेचे पाण्याविना चाललेले हाल मी स्वतः पाहिले होते. पण राज्यातल्या तमाम जनतेकडे दुर्लक्ष करून काही संधिसाधू समाजकार्यकर्ते धरणविरोधी भूमिका घेत होते. मूठभर माणसांनी सगळ्या समाजाला वेठीस धरण्यातला हा प्रकार होता. या मंडळींच्या हुशारीचे तसे कौतुक करावेसे वाटते! स्वतःला महत्त्वाचे स्थान मिळावे म्हणून आंदोलन छेडताना, आपल्याला केवळ देशातच नव्हे तर देशाबाहेरही भरपूर प्रसिद्धी मिळेल, असेच क्षेत्र त्यांनी आंदोलनासाठी निवडले. धरणांना विरोध करणारी एक मोठी लॉबी आज जगभर कार्यरत आहे. या आंदोलकांना या लॉबीचा पुरेपूर फायदा मिळालेला आहे.

स्वयंस्फूर्त कार्याचे दुसरे क्षेत्र म्हणजे अंधश्रद्धानिर्मूलन. अंधश्रद्धा ही नेहमीच भोवतालच्या वास्तवाशी निगडित असते. अनिश्चितता आणि अज्ञान यांतून ती जन्माला येते. हे वास्तव बदलल्याशिवाय, केवळ आंदोलन करून ती दूर होईल असे समजणे, हीच मोठी अंधश्रद्धा आहे. नुसत्या शिक्षणाचा प्रसारही यासाठी पुरेसा नाही. तसे असते तर देशातील असंख्य बाबा-महाराजांसमोर आज जी उद्योजकांची, शास्त्रज्ञांची, पदवीधरांची गर्दी दिसते ती दिसली नसती.

देशातील बहुसंख्य समाज हा शेतकरी आहे आणि त्या शेतकऱ्याच्या सर्व श्रद्धा शेतीच्या परिस्थितीवर अवलंबून आहेत.

पावसाच्या अनिश्चिततेमुळे विज्ञाननिष्ठा शेतकऱ्याच्या अंगी बाणूच शकत नाही. शेतातले पीक आणि परिणामत: कच्च्याबच्च्यांचे जीवनच पावसाच्या पडण्यावर वा न पडण्यावर अवलंबून आहे. या जाणिवेमुळे विज्ञाननिष्ठा त्याच्या बुद्धीला पटली तरी मनाला पटू शकणार नाही. आधुनिक औषधोपचार जवळपास उपलब्ध नाहीत, असले तरी परवडत नाहीत, म्हणून तर त्याला जवळ असेल त्या वैदू-भोंदूचे औषधपाणी करावे लागते. आपल्या प्रियजनांना उत्तमातले उत्तम औषधपाणी करणे आपल्याला जमले नाही, ही मनाला घरे पाडणारी जाणीव विसरण्यासाठी वैदूभोंदूंच्या प्रभावाच्या कथा रचाव्या लागतात, आणि स्वत:लाही त्यावर विश्वास ठेवावा लागतो. निसर्गाच्या लहरीपणामुळे होणाऱ्या पीकबुडीपासून शेतकऱ्याला संरक्षण मिळेल, म्हणजे वास्तविक उत्पादनखर्च भरून निघण्याची शाश्वती मिळेल, त्या दिवशी या शेतकऱ्याला विज्ञाननिष्ठा शिकवण्याची गरजच राहणार नाही.

बरेच स्वयंस्फूर्त कार्यकर्ते हिंदुत्ववादी वा राष्ट्रवादी चळवळीत काम करताना दिसतात. आपला देश हे एक राष्ट्र आहे ही भावना जोपासण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. तरीही अनेक विघटनवादी शक्ती देशात आढळतात.

देशात अशी फुटाफूट का झाली? ज्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रत्येक जातीजमातीतल्या भर उमेदीतल्या तरुणांनी हसत हसत मरणालादेखील कवटाळले त्या देशातल्या तरुणांच्या मनातील देशभक्ती एकदम आटून कशी गेली? पाकिस्तानबरोबरच्या लढ्यांत चारचार वेळा इतर जवानांच्या बरोबरीने लढणारा शीख तरुण सगळ्या 'हिंदुस्थान'बद्दल एकदम एवढ्या चिडीने का बोलू लागला? भारतीय लष्करात परम शौर्य गाजवणारे गुरखे एकदम एवढे नाराज का झाले? मुस्लिम जमातीचा प्रश्न आणि दलितांचा प्रश्न पेटतच का राहिले?

✦

अंधश्रद्धा ही नेहमीच भोवतालच्या वास्तवाशी निगडित असते. अनिश्चितता आणि अज्ञान यांतून ती जन्माला येते. हे वास्तव बदलल्याशिवाय, केवळ आंदोलन करून ती दूर होईल असे समजणे, हीच मोठी अंधश्रद्धा आहे.

✦

हिंदू आणि मुसलमान यांच्यातील प्रश्न सोडवणे खरोखरच बिकट आहे. मुसलमान जमातीचे काही मूठभर नेते शहरात राहतात, व्यापार-धंदा करतात आणि त्यांतील काही चांगले धनाढ्यही आहेत. पण सर्वसाधारण मुसलमान दलितांपेक्षाही दलित आहेत. खरे सांगायचे तर त्यांच्यातील अनेकांचे पूर्वज भणंग दारिद्र्यामुळेच धर्मांतराकडे वळले. धर्म बदलल्याने आर्थिक हलाखी संपली नाही, पण इस्लामने थोड्या फार प्रमाणात 'माणूस' म्हणून आत्मसन्मान आणि अभिमान दिला. गावातला मुलाणी, छोटा शेतकरी, कारागीर, विणकर, रिक्षावाले आणि छोट्यामोठ्या कारखान्यांत काम करणारा असंघटित मजूर हे भारतातल्या मुसलमानांचे प्रातिनिधिक चित्र आहे. दलितांना मिळणाऱ्या सोयीसवलतीही त्यांना नाहीत. बहुसंख्याक समाज त्यांच्याकडे संशयाने पाहतो. संशयातून दुरावा तयार होतो आणि त्यातून पुन्हा संशय – अशा दुष्टचक्रामुळे दोन समाजांत एक अक्राळविक्राळ दरी सतत रुंदावते आहे.

भूमिहीन शेतकऱ्यांचे आणि छोट्या कारागिरांचे प्रश्न सुटल्याखेरीज सर्वसामान्य मुसलमानाच्या मनातील असुरक्षिततेची आणि कोंडले गेल्याची भावना दूर होणे कठीण आहे. मग तो सहजपणे आर्थिक विकासापेक्षा 'आखिरात' जास्त महत्त्वाची आहे असे निकराने सांगू लागतो. या वातावरणाचा फायदा त्यांचे शहरी पुढारी घेतात. परिणामत:, स्वातंत्र्याच्या एखाद्यातरी प्रकाशकिरणाकरिता मनात आक्रंदणाऱ्या मुसलमान मायबहिणीसुद्धा 'शरियत'चे समर्थन करू लागतात. मुस्लिम समाजाचे अर्थकारण करणारा नेता जन्मलाच नाही, हे मोठे दुर्दैव आहे.

दलितांची परिस्थितीही काही फार वेगळी नाही. हिंदू समाजापासूनची त्यांची फारकत काही बाबतीत थोडी कमी, तर काही बाबतीत पुष्कळ जास्त. गावच्या वतनदार महाराला चावडीसमोर कमरेत वाकून जावे लागे; पण तोच मुसलमान बनला तर जोडे घालून थेट चावडीपर्यंत जाऊ शके. मीनाक्षीपुरमचा हाच धडा आहे. इस्लामने त्याच्या आश्रयाला आलेल्यांना काही प्रमाणात सन्मान दिला. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाप्रमाणे बुद्धाला शरण गेलेल्यांना तशा सन्मानाचे भाग्यही मिळाले नाही. दलितांत फारसे कुणी मोठे व्यापारी, कारखानदारही नाहीत. समाजाचे नेतृत्व राजकीय सत्तेच्या काही दलालांकडे आणि राखीव जागेच्या धोरणाचा फायदा मिळालेल्या काही भाग्यवान नोकरदारांकडे. मुस्लिम नेतृत्वाप्रमाणेच दलित नेतृत्वालासुद्धा चिंता आहे ती दलितत्व संपवण्याची नाही, तर आपले नेतृत्व टिकवण्याची.

आजपर्यंत शेतकरी संघटनेमध्ये मला जो अनुभव आला त्यावरून मी स्पष्टपणे सांगू इच्छितो, की या देशातील सामान्य माणसाच्या मनामध्ये कुठेही जातीयवाद नाही, भाषावाद नाही, धर्मवाद नाही. हे सर्व क्षुद्रवाद केवळ स्वार्थी राजकारण्यांनी जोपासून ठेवले आहेत. सर्वसामान्य माणसे अर्थवादाच्या पायावर आवाज उठवू लागली, की ही मंडळी क्षुद्रवादाची भुतावळ उठवून त्यांना अर्थवादापासून दूर नेतात.

देशातली गरिबी हटली, देशातील सर्व घटकांचा विकास होत राहिला तर यांपैकी एकही भांडण होणार नाही. आपल्या देशातले एखादे राज्य म्हणते, की आम्हांला फुटून जायचे आहे. अमेरिकेतले एखादे संस्थान असे म्हणते का? मुळीच नाही. तिथेसुद्धा अनेक धर्मांची, पंथांची माणसे आहेत; अनेक राज्यांची आहेत, पण तिथे असे कुणी म्हणत नाही. उलट, अमेरिकेतील संस्थान असणे ही प्रतिष्ठेची, सन्मानाची गोष्ट समजली जाते. अशी भावना आपल्याकडे निर्माणच होऊ शकली नाही, कारण आम्ही गरिबी हटवू शकलो नाही.

मी हिंदू घरात जन्मलो, ब्राह्मण घरात जन्मलो. आयुष्यातील पहिली अठरा-वीस वर्षे सगळे धर्माचार केले, स्नानसंध्यादी विधी केले, पाठांतरही केले. आज मी यांतले काहीही करत नाही.



विश्वाच्या उत्पत्तीसाठी, जीवमात्राच्या उत्क्रांतीसाठी आणि मनुष्यसमाजाच्या विकासासाठी कोणी परमेश्वरी शक्ती असण्याची मला शक्यताही दिसत नाही आणि आवश्यकताही वाटत नाही. माझ्यासारखा माणूस कोणत्याही धर्मात चालण्यासारखा नाही. प्रत्येक धर्माची एक पोथी असते, एक प्रेषित असतो आणि त्याने मांडलेली आचारविचारांची एक नैतिकता असते. ज्या काळात पोथी लिहिली गेली तो काळ सगळा बदलला तरी प्रेषितांचे उत्तराधिकारी त्याच आचरणनियमांचा आग्रह धरतात. यहुदी, ख्रिस्ती, मुसलमान, गांधीवादी, मार्क्सवादी हे असे बांधीव धर्म आहेत. त्यांच्यात माझ्यासारख्या यात्रिकाला जागा नाही.

पण, माझ्यासारखा यात्रिक हिंदू राहू शकतो. नरबळींनी चामुंडा मातेला प्रसन्न करू पाहणाऱ्या अघोर भक्तांपासून, श्वासोच्छ्वासात जंतू तर मरत नाहीत ना अशी चिंता बाळगणाऱ्या साधूंपर्यंत कोणीही हिंदू असू शकतो. कारण, हजारो वर्षे हिंदू हा शब्द एका खुल्या प्रयोगशाळेचे नाव आहे. हिंदू हा बंधने घालणारा बांधीव धर्म नाही. हिंदू ही एक संस्कृती आहे.

✦

कार्यकर्त्यांचा छुपा पण प्रखर अहंकार, त्यांची ढोंगबाजी, त्यांची नाटके, सेवेच्या बुरख्याखाली स्वत:ची सोय पाहत राहणे, त्यांच्यातले हेवेदावे, त्यांच्यातील व्यासंगाचा अभाव, मूळ प्रश्न टाळून उगाचच काहीतरी छोटेसे पॅचवर्क स्वरूपाचे काम करीत राहण्याची त्यांची आत्ममग्न प्रवृत्ती हे सगळे विचारात घेता, अशा स्वरूपाच्या कामाची समाजाला काहीही आवश्यकता नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

✦

हिंदुबहुसंख्य देशात मुसलमान राष्ट्राध्यक्ष, शीख पंतप्रधान आणि रोमन कॅथॉलिक महिला राज्यकर्त्या पक्षाची अध्यक्षा हे फक्त हिंदू बहुसंख्य देशातच संभवते. असे उदाहरण जगात इतरत्र कोठेही दिसणार नाही.

आज हिंदुत्वाचा झेंडा घेऊन नाचणारे खरे म्हटले तर हिंदुत्वाला छोटे करू पाहत आहेत, निव्वळ बंदिस्त धर्माचे स्वरूप देऊ पाहत आहेत.

बरेच हिंदुत्ववादी स्वदेशीच्या प्रचारासाठी काम करीत असतात. वस्तुस्थिती अशी आहे, की आपण जर परदेशी मालावर बंदी घातली तर जगातील इतर देश हिंदुस्थानाशी एकतर्फी व्यापार थोडाच चालू देणार आहेत? आपण बंधने लादली तर तेही लादतील आणि थोड्याच काळात हिंदुस्थानचा आंतरराष्ट्रीय व्यापार संपुष्टात येईल. मग प्रश्न असा उभा राहतो, की जगाला आपली गरज जास्त, की आपल्याला जगाची गरज जास्त? हिंदुस्थानकडून एक पैशाचाही माल न घेतल्याने जगाचे काहीही बिघडणार नाही. पण, परदेशांशी संबंध तोडल्यास तीन महिनेदेखील रेटणे हिंदुस्थानी उद्योगधंद्यांना अशक्य होईल.

कोणी म्हणते, पूर्वी ईस्ट इंडिया कंपनी आली आणि देशावर अंमल बसवून गेली; नव्या बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच करतील. डॉन क्विक्झोटप्रमाणे मनाने मध्यम युगात वावरणारी ही माणसे. आपले स्वातंत्र्य नकली आहे, तकलादू आहे. विलायती सत्तांचे सामर्थ्य इतके मोठे आहे, की लष्करी सत्ता मिळवण्याचे त्यांनी मनात आणले, तर २४ तासांत लाल किल्ल्यावर त्यांचा झेंडा फडकू शकतो. 'पाश्चिमात्यांना वसाहती नकोशा झाल्या म्हणून केवळ आपण स्वतंत्र आहोत' ही दु:खद जाणीव स्वदेशीवाल्यांना नाही. ते आपले त्यांच्याच गुर्मीत राहतात. आजच्या अवस्थेतील हिंदुस्थान चालवण्यासाठी टेंडर काढले तरी ते भरण्यासाठी साऱ्या जगात कोणीही पुढे येणार नाही; पैसा आणि रक्त खर्चून हिंदुस्थानवर सत्ता गाजवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

मी स्वत:ला महात्मा फुल्यांचा पाईक समजतो. इतिहासाचा अर्थ सलगपणे, सुसूत्रपणे लावण्याचे पहिले काम महात्मा फुल्यांनी केले. अगदी विष्णूच्या मत्स्यावतारापासून ते वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडापर्यंत, 'शूद्रांची गुलामगिरी' ह्या एकसूत्रात त्यांनी सर्व घटना गुंफून दाखवल्या. राष्ट्रवादी आघाडीची पर्वा न करता त्यांनी मोगलांना शूद्रांच्या मुक्तीचे श्रेय दिले आणि राष्ट्रवाद्यांच्या महापुरुषांवर कडाकड आसूड ओढले.

महात्मा जोतिबा फुल्यांच्या इतिहासमांडणीला संशोधनाचा वा कागदोपत्री साधनांचा आधार नव्हता. अशा तऱ्हेचा पुरावा पाच हजार वर्षांचा इतिहास लिहिणाऱ्याला मिळवणे शक्यही नव्हते.

शूद्रांच्या गुलामगिरीच्या सूत्रावर प्रचंड प्रतिभेने इतिहासाचा एक प्रपंच त्यांनी उभा केला. पण विद्वन्मान्य इतिहासकारांत आज जोतिबांना काहीच मान्यता नाही.

स्वयंस्फूर्त कार्यातील बरीच मंडळी महिला आंदोलनात सहभागी आहेत. त्या महिला आंदोलनाची परिस्थिती काय आहे?

जागोजागी भगिनीमंडळे, स्त्री-संघर्ष समित्या उगवतात आणि स्त्री-साहाय्याची काही जुजबी कामे करीत राहतात. आपल्या कर्तबगारीला व्यापक समाजात पुरेसा वाव नाही अशी जाणीव झाली, की त्या स्त्रिया महिला-चळवळीकडे वळतात; भगिनीमंडळ किंवा समिती स्थापतात.

मोठमोठ्या मान्यवर महिला संघटनांत लब्धप्रतिष्ठित स्त्रियांनी महत्त्वाची सारी पदे अडवलेली असतात. कोणत्याही कार्यक्रमात मिरवायला त्यांनाच मिळते. नाव त्यांचेच होते. त्यामुळे अशा संस्थांत नव्या उमेदीच्या कार्यकर्त्यांना आत शिरायला फारसा वाव नसतो. अनेकदा होते असे, की महिला संघटनांतील स्त्रीचे स्थान तिच्या नवऱ्याच्या समाजातील प्रतिष्ठेवर आणि आर्थिक संपन्नतेवर अवलंबून असते. म्हणजे तर, कर्तृत्वाने नाव मिळविण्याचा, काही करून दाखविण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तेव्हा, जी ती स्त्री एक नवी पाटी लावून आपली एक संस्था उभी करू पाहते.

अनेक घरांत नवराबायकोचे, सासूसुनेचे, नणंदाभावजयांचे पटत नाही; काही ठिकाणी त्या वितुष्टांना मोठे विक्राळ स्वरूप येते. अशी अनेक प्रकरणे प्रत्येक समाजात, हर वस्तीत, दररोज घडतच असतात. असे काही घडले, की जवळपासच्या महिला संघटनांतील काही बाया असल्या ठिकाणी जमा होतात, नवविवाहित सुनेची बाजू न्याय्य आहे असे गृहीत धरून कामाला लागतात. पोलिसांत तक्रार नोंदवतात, मोर्चे काढतात, निदर्शने करतात. काही वेळा थोडेफार यश मिळते, बहुधा हाती फारसे काही लागतच नाही. अशा प्रकरणांचा पाठपुरावा करायचा म्हणजे मोठी ताकद, साधने, संयम आणि धैर्य लागते. एक प्रकरण निकालात निघण्याआधी दहा नवीन प्रकरणे उभी राहतात. अगदी उत्साही, तळमळीच्या कार्यकर्त्यांचीही दमछाक होऊन जाते.

कौटुंबिक वितुष्टांची ही प्रकरणे स्त्रीचळवळीच्या विषयपत्रिकेवर असणे कितपत योग्य आहे? आत्महत्या असो, खून असो, शारीरिक छळाचा प्रश्न असो; ही सारी कृत्ये गुन्हेगारीची आहेत. दंडविधानात त्यासंबंधी यथायोग्य तरतुदी आहेत. असल्या प्रकरणांत जाणकार तज्ज्ञांनी बारकाईने तपास करणे महत्त्वाचे असते. असले तपास हे काही हौशागवशा कार्यकर्त्यांचे काम नव्हे.

खरे म्हणजे, असल्या प्रकरणांत महिला आंदोलनांचा काही संबंध नाही. स्त्रीवर जुलूम, अन्याय करणारे केवळ पुरुषच असतात असे नाही; बहुसंख्य प्रकरणी एका बाजूस सून तर दुसऱ्या बाजूस सासू आणि नणंद इत्यादी उभे ठाकलेले असतात. सून ही स्त्री खरी, पण सासू आणि नणंद याही स्त्रियाच.

याखेरीज स्त्रियांची वेगळी महिला बँक, स्त्रियांची वेगळी पतपेढी, स्त्रियांचा वेगळा साखरकारखाना असे अनेक क्षेत्रांत 'जनाना डब्बे' करण्यात अनेक संस्था गुंतल्या आहेत.

नवऱ्याने टाकून दिलेल्या, विधवा, कुमारी माता, अपंग स्त्रिया यांच्याकरिता शिक्षणाची सोय करणे, त्यांना काही आरोग्यासेवा देणे, त्यांच्या चरितार्थासाठी काही उद्योगधंद्यांची सोय करणे, त्यांना स्वावलंबी बनविणे अशा तऱ्हेची कामे करता येतात. पण, गुजराथेतील इला भट यांच्या सेवा या संस्थेसारखे काही अपवाद सोडले तर इतरांना त्यांत फारसे यश मिळत नाही. अशा कामांना प्रचंड मेहनत, चिकाटी, व्यवस्थापन-कौशल्य आणि व्यवसायबुद्धी यांची गरज असते.

स्त्रियांचा प्रश्न हा अनेक संस्थांत, विश्वविद्यालयांत अभ्यासाचा स्वतंत्र विषय म्हणून मान्यताप्राप्त झाला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या परिषदा भरवणे, परिसंवाद घडवून आणणे हे काम गल्लीपासून दिल्लीपर्यंतच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रचंड जोमाने चालू आहे. महिला कार्यकर्त्या राज्यपातळीवरील परिसंवादांत आधी मान्यता पावतात, मग हळूहळू राष्ट्रीय पातळीवर त्या परिसंवाद करू लागतात आणि शेवटची पायरी म्हणजे, वर्षातून दोन-चार वेळा वेगवेगळ्या देशांत घडणाऱ्या परिसंवादांतील जागाही भूषवू लागतात. महिला-चळवळीतील कार्यकर्त्यांचे या दृष्टीने तीन संच बनतात : आगगाडीसंच, विमानसंच आणि जेटसंच!

या सगळ्यातून स्त्रीप्रश्नाविषयीची खरी कळकळ ओसरू लागली, ती एक 'करीअर' बनली.

वेगवेगळ्या क्षेत्रांत आपापली कर्तबगारी दाखविणाऱ्या स्त्रिया होत्या. कोणी वकील होत्या, कोणी डॉक्टर; कोणी लष्करात जात होत्या तर कोणी वैमानिक बनत होत्या; कोणी साहसाची कामे करीत होत्या तर कोणी कलाक्षेत्रात चमकत होत्या. अनेक उद्योजक महिलांनी कारखानदारी, व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतही, आपल्या स्त्रीपणाचा कोणताही आधार न घेता, मोठी कामगिरी करून दाखवली. साऱ्या स्त्रीजातीस ललामभूत असलेल्या या दुर्गा स्त्री-चळवळीपासून दूर राहिल्या आणि स्त्री-चळवळ वावदूक मुखंडींच्या हाती गेली.

खरे बघायला गेले तर स्त्रियांचे अनेक महत्त्वाचे प्रश्न स्त्री-मुक्तीच्या चळवळीमुळे नव्हे तर इतर अनेक कारणांमुळे सुटलेले आहेत. उदाहरणार्थ, स्त्री-शिक्षणाला सावित्रीबाई फुले आणि महर्षी कर्वे यांच्या कार्यामुळे जेवढी प्रेरणा मिळाली, त्याहून जास्त प्रेरणा दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी आलेल्या रेशनिंगमुळे मिळाली. रेशनिंग खात्यात शिकलेल्या बायकांना नोकऱ्या मिळू लागल्या, या नोकऱ्यांमुळे आर्थिक उत्पन्नाचे साधन बायकांना प्रथमच उपलब्ध झाले आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बायकांना शिकू द्यायला सुरुवात झाली.

स्त्रियांचे जीवन सुखकर करण्यामध्ये सगळ्या चळवळींपेक्षा कितीतरी जास्त वाटा हा आधुनिक तंत्रज्ञानाने उचलला आहे. शिवणयंत्र, पिठाची गिरणी, मिक्सर, वॉशिंग मशीन यांमुळे सर्वसामान्य स्त्रीचे जीवन जितके सुखकर झाले, तितके कुठल्याही चळवळीमुळे कधीच झाले नसते.

तंत्रज्ञानाने एकूणच कुठल्याही चळवळीपेक्षा मानवी जीवनावर जास्त प्रभाव टाकलेला आहे, जास्त आनंद निर्माण केलेला आहे. आज महाराष्ट्रातील द्राक्षे लंडन-पॅरीसमधील डायनिंग टेबलवर पोचली आहेत व त्यामुळे काही शेतकऱ्यांच्या घराततरी समृद्धी यायची शक्यता निर्माण झाली आहे, याचे एक कारण मालाची वाहतूक विमानाने करण्याची तंत्रज्ञानाने केलेली सोय. आणि याचे दुसरे कारण म्हणजे ही द्राक्षे खरेदी करणारी 'मार्क्स ॲण्ड स्पेन्सर' यांसारखी सुपर मार्केट्स. ''गरिबांसाठी मार्क्स आणि एंगल्स यांच्यापेक्षा कितीतरी जास्त कामगिरी मार्क्स ॲण्ड स्पेन्सर या सुपर मार्केटने केली'' अशी टिप्पणी प्रख्यात व्यंगकार जॉर्ज मिकेश यांनी केली आहे.

साहित्यक्षेत्रातही थोडेफार स्वयंस्फूर्त कार्य सुरू असते. या क्षेत्राकडे बघितले तरी एकूण परिस्थिती केविलवाणीच असल्याचे दिसते. मी आत्तापर्यंत अठरा-वीस पुस्तके लिहिली आहेत. मराठीबरोबर इंग्रजीतही लिहिली आहेत. माझ्या काही पुस्तकांची इतर भाषांतही भाषांतरे झाली आहेत. आमच्या शेतकरी संघटनेच्या कामामध्ये अक्षरशः लाखो शेतकरी रस्त्यावर उतरतात. शेतकरी आंदोलनात जितकी माणसे तुरुंगात गेली तितकी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य-आंदोलनातही गेली नव्हती. असे असूनही मराठी साहित्यामध्ये शेतकरी आंदोलनाला काहीही स्थान मिळालेले नाही.

✦

स्त्रियांचे जीवन सुखकर करण्यामध्ये सगळ्या चळवळींपेक्षा कितीतरी जास्त वाटा हा आधुनिक तंत्रज्ञानाने उचलला आहे. शिवणयंत्र, पिठाची गिरणी, मिक्सर, वॉशिंग मशीन यांमुळे सर्वसामान्य स्त्रीचे जीवन जितके सुखकर झाले, तितके कुठल्याही चळवळीमुळे कधीच झाले नसते.

✦

डाव्यांच्या चळवळीमध्ये, त्यांच्यामागे शेपाचशे माणसेसुद्धा नसली तरी, त्यांची कवने गाणाऱ्यांचा सुंदर ताफा त्यांच्यापुढे असतो. ज्यांच्या आंदोलनात आंदोलकांची संख्या कमी, पोलिसांची जास्त त्या आंदोलनात प्रतिभेचा हा झरा खळाळून वाहताना दिसतो आणि प्रचंड आंदोलने करणाऱ्या शेतकरी संघटनेत, काही अपवाद वगळल्यास, साहित्य, कला, संगीत, शाहिरी, पोवाडे अशी मार्गांनी प्रतिभा दाखविणारे निपजले नाहीत. असे का झाले? एकदा एका कार्यकर्त्याने नानासाहेब गोऱ्यांना प्रश्न विचारला, ''शेतकरी संघटना ही अशी रुक्ष, काव्य नसलेली का झाली?'' ते म्हणाले, ''शरद जोशी हा माणूसच गद्य आहे. त्यांनी जो अर्थशास्त्रीय विषय मांडला, तोच रुक्ष आणि गद्य आहे. आंदोलनाचे साहित्य हे कधी अशा गद्य भाषेत तयार होत नाही. आंदोलनात काहीतरी डोक्यात मस्ती चढवणारी, झिंग आणणारी गोष्ट असावी लागते. रामाच्या देवळाचे नाव घ्यावे लागते, नसलेल्या गोष्टी तयार कराव्या लागतात, सामान्य माणसांचेसुद्धा पुतळे जागोजागी उभे करून त्यांना देवता बनवावे लागते. समाजाच्या हितसंबंधांबरोबरच काही एक पागलपणा केल्याखेरीज आजकाल खरे आंदोलन बनतच नाही. आणि शरद जोशींना पागलपणा दाखवता येत नाही.''

एकेक दिवस, बी पेरल्यानंतर हाती पीक येईपर्यंत, किंवा न येईपर्यंत, सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतकऱ्याच्या मनाला ज्या सहस्र इंगळ्या डसतात त्याचे चित्र साहित्यात मला कुठेही दिसत नाही. साहित्यात आणि सिनेमातही नाही. सिनेमात तर काय, शेतकरी दाखवायचा म्हणजे एकदाच नांगर घालताना दाखवायचा. आणि लगेच सगळी पिके लहलहरती. मग पुढे, दहा मुली इकडे नाचत जाणार अन् दहा मुली तिकडे नाचत जाणार! शेतकऱ्याच्या आयुष्याचे चित्रण हे असे होऊन गेलेय. तुम्ही शेतकऱ्याच्या आयुष्यामध्ये बारकाईने का पाहत नाही?

साहित्यिक क्षेत्रातील चळवळी मंडळी वेगवेगळी संमेलने भरवतील, आपापले मंच उभे करतील, निधी जमवतील. पण जर त्यांना असे वाटत असेल, की त्यांतून मराठी भाषा जगणार आहे, तर तो त्यांचा भ्रम आहे. अशा प्रयत्नांतून मराठी भाषा जगणार नाही. वस्तुस्थिती अशी आहे, की लहान माणसांची भाषा ही मोठी असूच शकत नाही. मराठी भाषा मोठी व समृद्ध करायची असेल तर त्यासाठी आधी मराठी माणसाने सर्वार्थाने समृद्ध व्हावे लागेल.

या संदर्भात फ्रान्समधला माझा अनुभव बोलका आहे. मी जेव्हा फ्रान्सला प्रथम गेलो, त्यावेळी फ्रेंच माणसे इंग्रजीत बोलत नसत. आपल्या मातृभाषेचाच त्यांना अभिमान होता. परंतु त्यानंतर काही वर्षांनी मी जेव्हा फ्रान्समध्ये गेलो त्यावेळी फ्रेंच माणसे सर्रास इंग्रजी बोलताना मला आढळली.

काहीशा आश्चर्याने त्यांना मी विचारले, ''तुम्ही तुमच्या भाषेचे इतके अभिमानी होता, मग आता इंग्रजी कसे काय बोलायला लागलात?'' तेव्हा ते म्हणाले, ''आम्ही जी बोलतो ती इंग्लिश भाषा नाही, ती अमेरिकी भाषा आहे! आम्ही ही परकी भाषा शिकलो याचे कारण काय? अमेरिकेत आर्थिक वैभव आहे, सुखसंपन्नता आहे, साधनांची विपुलता आहे. त्यामुळे अमेरिकी भाषा खऱ्या अर्थाने संपन्न झाली आहे. आणि ज्याला जगाच्या सरहद्दीवर, इतिहासाच्या सरहद्दीवर, संशोधनाच्या सरहद्दीवर जायचे आहे त्यांना अमेरिकी भाषा शिकण्याखेरीज गत्यंतर नाही.''

तात्पर्य म्हणजे मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध व्हायला हवे असेल, तर त्यासाठी चळवळी करून काही होईल असे मला वाटत नाही, त्यासाठी मराठी माणूस समृद्ध व्हावा लागेल. आणि मग त्याच्या भाषेला आपोआपच महत्ता प्राप्त होईल.

थोडेसे विषयांतर होते आहे, पण एका नामवंत समाजसेवकाचा एक अनुभव या ठिकाणी मला सांगावासा वाटतो. यांच्या 'आदर्श गावाला' मी गेलो. ''गावात कोणीही चित्रहार बघत नाही.'' गावकरी मला सांगू लागले. ''का बरं?'' मी विचारले. ''नटनट्यांचे ते घाणेरडे चाळे काय बघायचे!'' ''पण एखाद्याला चित्रहार बघायची इच्छा असेल तर?'' ''तसा काही प्रश्नच उद्भवत नाही. चित्रहार पाहायचा नाही असा आदेशच आहे आम्हांला.'' हे

सांगताना त्या गावकऱ्यांना मोठा अभिमान वाटत होता. हा आदेश कोणाचा? तर त्या तथाकथित समाजसेवकाचा. असली ही त्यांची हुकूमशाही! आणि हे 'आदर्श गावे' तयार करण्याचे कॉन्ट्रॅक्ट घेणार!

'आदर्श गाव' ही कल्पनाच बाष्फळ आहे. असा कधी कुठे समाज बदलतो का? आज एक गाव आदर्श बनले, उद्या दहा गावे आदर्श बनतील, परवा १०० गावे आदर्श बनतील, असा गुणाकार या लोकांनी गृहीतच धरलेला असतो. प्रत्यक्षात असले गुणाकार कधीच होत नाहीत. पण अशी खोटी स्वप्ने विकण्यात आमचे महापुरुष वस्ताद असतात!

काही स्वयंस्फूर्त चळवळी समाजामध्ये नैतिकता वाढावी म्हणून काम करीत असतात. यात अनेक गांधीवादी संस्था आहेत. त्यांच्या मते आपल्या समस्यांचे कारण नैतिक मूल्यांचा ऱ्हास किंवा भ्रष्टाचार हे आहे.

या नैतिक प्रश्नाचा जरा खोलात जाऊन विचार करायला हवा, कारण आपल्या मुख्य विषयाशी हा थेट निगडित आहे. नीतिमत्तेच्या कल्पना वेगवेगळ्या काळांत, वेगवेगळ्या समाजांत बदलताना दिसतात.

स्त्रीसत्तेपासून स्त्रीदास्यापर्यंत, ब्रह्मचर्यापासून ते प्रौढसंमतीच्या स्वैराचारापर्यंत सर्व प्रकारचे नीतिनियम इतिहासात सापडतात. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबर नीतिव्यवस्थाही बदलताना दिसते. शेतीप्रधान समाजाची धारणा औद्योगिक समाजासारखी नसते. खासगी मालमत्तेवर आधारलेले समाज आपली वेगळी नैतिकता तयार करतात. स्थिर समाजाचे नियम लढाया, उत्पात इत्यादींनी वारंवार हादरे खाणाऱ्या समाजापेक्षा साहजिकच निराळे असतात. अर्थव्यवस्था बदलली, की नीतिमत्ताही बदलते.

तरीही, बहुतांश समाजांनी मानलेल्या नियमांत एक सूत्र सापडते. स्वार्थाचा त्याग करून दुसऱ्याचे भले करण्यात काही एक मोठेपण आहे असे बहुतेक काळांत मानले गेले आहे. दुसऱ्यासाठी जगलास तर अमर झालास, स्वतःकरता जगलास तर मेलास, अशा अर्थाची बोधवचने सतत वापरली जात असतात.

'संसार करावा नेटका' किंवा 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' यांसारखी अपवादात्मक वचने सोडल्यास संतवाणी ही वैराग्याचे, निःसंगत्वाचे आणि गरिबीचे गुणगान करण्याकरताच राबली आहे.

जे दुर्मिळ त्याची किंमत जास्त, या मागणीपुरवठ्याच्या अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार परहितरत वर्तणुकीला अलोट महत्त्व मिळाले असावे. दुसऱ्याचे भले केले, कोणाला संतुष्ट केले म्हणजे तो आपला शत्रू बनणार नाही, निदान तेवढ्यापुरते तरी आपले जीवन निष्कंटक झाले असा पृथ्वीराज चव्हाणी विचारही या निःस्वार्थतेच्या तत्त्वज्ञानामागे असावा. एखादा महमद घोरी उपटला तरीही औदार्याची मानसिकता परंपरेने चालूच राहते. परार्थाच्या महत्त्वाचे दुसरेही एक कारण असू शकेल. व्यावहारिक जगातील प्रत्यक्ष जगणे आणि व्यक्तीची जाहीर केली गेलेली तथाकथित तत्त्वे यांमध्ये प्रचंड दरी असते. व्यवहारात स्वार्थाने वागल्यानंतर शब्दांततरी परार्थाचे गुणगान गायले तर मनःशांती सुलभ होते; म्हणूनही परार्थाचे हे कौतुक असावे.

एकेकाळी मुंबईतील माणसे बसच्या रांगेची शिस्त कटाक्षाने पाळत. एका बसमध्ये जागा मिळाली नाही, तर शांतपणे दुसरी येण्याची वाट पाहात थांबत. त्या काळी दिल्लीकर बस पकडताना पराकोटीची बेशिस्त आणि हुल्लड दाखवत असत. याचा अर्थ दिल्लीवाले कमी नीतिमान आहेत असा नाही. मुंबईच्या व्यवस्थेत एक बस गेली तरी दुसरी; ती नाही तरी त्यापुढची मिळण्याची जवळ जवळ खात्री वाटत असे. दिल्लीत तर तशी आशाही नसे. यामुळे दोघांच्या वर्तणुकीत फरक पडत असे.

भविष्यात जितके दूर पाहण्याची शक्यता जास्त, तितका मनुष्य नागड्या स्वार्थापासून दूर जातो. डोंगराच्या शिखरावरून पाहिले, विश्वाच्या व्यापकतेच्या तुलनेने स्वतःची, स्वतःच्या इच्छा-आकांक्षांची क्षुद्रता जाणवली, की काही काळ विचार बदलतात, तसाच हा प्रकार आहे.

✦

शेतकरी आंदोलनात जितकी माणसे तुरुंगात गेली तितकी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य-आंदोलनातही गेली नव्हती. असे असूनही मराठी साहित्यामध्ये शेतकरी आंदोलनाला काहीही स्थान मिळालेले नाही.

✦

आजची भ्रांत आहे, उद्याची आशा नाही, कोण काय म्हणेल यांची चिंता करण्याचे कारण नाही अशा अवस्थेत नागड्या तात्कालिक स्वार्थाची उपज सहज होते. आजचा प्रश्न सुटला आहे, उद्याचा विचार करण्याची फुरसद आहे तेव्हा मनुष्य थोडा दूरचा विचार करून, दूरच्या फायद्यासाठी आजच्या स्वार्थाला मुरड घालू शकतो. परार्थ हा व्यापक स्वार्थच असतो.

परार्थाचा हा अर्थ समजून घेऊन अवघ्या मानवजातीला एका मानसिक गुलामगिरीतून सोडवणे आवश्यक आहे. खावे, प्यावे, उपभोगावे या नैसर्गिक प्राथमिक प्रेरणा. त्यांचे यथायोग्य पोषण झाले, तर सहभोगाचीही गोडी वाटू लागते. गावाबरोबर जगण्यात आनंद वाटू शकतो. राष्ट्राकरता प्राण देण्याची ऊर्मीही तयार होऊ शकते. त्यातही एका अलोट आनंदाचा अनुभव घेता येऊ शकतो.

प्रचंड दुःख आणि यातना सोसून केवळ दुसऱ्याच्या भल्याकरता मी हे दिव्य करीत आहे असे कोणी म्हटले, की माझ्या मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात. असे म्हणणारा निरोगी मनाचा नाही, याने काही लपवलेले आहे, या बोकेसंन्याशाच्या मनात काही क्षुद्र स्वार्थ आहे, असे मला वाटू लागते. मी हे माझ्या आनंदाकरिता करतो आहे, स्वार्थाकरिता करतो आहे, हे सांगण्यात कोणालाही शरम का वाटावी? परार्थाची साखर पेरणारा क्षुद्र स्वार्थ साधतो. त्यापेक्षा स्वार्थी बना, जितक्या व्यापक अर्थांनी, जितक्या मार्गांनी आयुष्य परिपूर्ण करता येईल तितके करा. दुसऱ्याचे हक्क लाथाडू नका — परार्थ म्हणून नव्हे, निव्वळ स्वतःच्या आयुष्याची

परिपूर्णता कमी होऊ नये म्हणून – अशी शिकवण ठीक. हीच खरीखुरी नैतिकता होईल.

मी भविष्यातील आदर्श समाजाचे काहीच स्वप्न देत नाही; स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणे हा मार्ग सांगतो, पण या कक्षा रुंदावत पोचायचे कोठे हे मात्र सांगत नाही. नैतिकता ही कोणत्याही एका विवक्षित व्यवस्थेत नाही, ती मार्गक्रमणात आहे, असे मानल्यानंतर आदर्शभूत समाज ही कल्पनाच अर्थहीन होते. आदर्शाची चित्रणे करणाऱ्या विचारपद्धतींपैकी मार्क्स व गांधी यांच्या स्वप्नसृष्टीचे काय झाले हे पाहण्यासारखे आहे.

मार्क्सवादाच्या समग्र विचारपद्धतीवर विसाव्या शतकातील कामगारचळवळ उभी राहिलेली आहे. जडवाद, विरोधविकासवाद, विपरीत उत्पादनसंबंध, खाजगी मालमत्ता, अतिरिक्त मूल्य, मजुरांचे शोषण, वर्गसंघर्ष यांतून भांडवलशाहीचा अटळ विनाश, यांतून वर्गरहित, शोषणरहित, समाजवादी समाजाची निर्मिती व त्यांतून मानवी मनाची मुक्ती एवढ्या सगळ्या, सर्व विश्वाला व्यापून दशांगुळे उरणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या पायावर मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाची उभारणी झाली. जगातील सर्व कामगारांना एक करण्याचे स्वप्न पाहत कामगारचळवळ जगभर उभी राहिली. आपल्या देशात अनेकांनी या चळवळीत स्वतःला झोकून दिले, बलिदान केले. मजुरीच्या रूपात, बोनसच्या रूपात, नोकरीच्या अटी, शर्तीबाबत सुधारणा असे अनेक फायदे मजुरांनी पदरात पाडूनही घेतले. पण मार्क्सवादी दर्शनाची बांधिलकी काही तयार झाली नाही.

> ✦
> प्रचंड दुःख आणि यातना सोसून केवळ दुसऱ्याच्या भल्याकरता मी हे दिव्य करीत आहे असे कोणी म्हटले, की माझ्या मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात.
> ✦

कामगारनेतेपण हा व्यवसाय होऊ लागला. जो पाच-दहा रुपये जास्त मिळवून देईल, त्याच्यामागे कामगार जाऊ लागले; कामगारक्रांतीच्या मार्गाने मानवजातीच्या मुक्तीचे स्वप्न पाहणाऱ्या कार्यकर्त्यांना कामगारांनी सोडून दिले, ही हकीकत आहे. ज्या देशात तथाकथित मार्क्सवादी राजवट आली तेथे घडून आलेले बदलही किरकोळ, भांडवलशाही व्यवस्थेचा हा एक अवतार असे वाटावे अशा धर्तीचे. अर्थव्यवस्थेच्या बदलांतून अपेक्षित परिवर्तन घडून आले नाही. हे असे का झाले?

नैतिकतेवर अर्थव्यवस्था आधारू पाहणाऱ्या महात्मा गांधींची शोकांतिका मार्क्सहूनही भयानक आहे. जगाच्या इतिहासात म. गांधींइतका कोणत्याही युगपुरुषाशी त्याच्याच शिष्यांनी द्रोह केला नसेल. गांधीवादाला अपेक्षित आर्थिक व्यवस्थेच्या नेमकी उलटी व्यवस्था त्यांच्या परमशिष्यांनी उभारू घातली. गांधीवादी नैतिकता त्यांच्या शिष्योत्तमांनीच उलथवली. महात्मा गांधींनी त्यांच्या विचारात नैतिक बाजू कोठेही लंगडी ठेवली नव्हती, पण प्रत्यक्षात तिचा समाजजीवनावर काहीच परिणाम झाला नव्हता.

मार्क्सवाद्यांच्या क्रांतितत्त्वज्ञानात एक मोठी चूक वारंवार आढळते. शोषित हे शोषकांविरुद्ध लढा उभारतात, कमालीचे शोषण झाले, की शोषित उफाळून क्रांती करतात, प्रस्थापित व्यवस्था उधळून देण्यास कंबर बांधतात असा काहीतरी विचार त्यांच्या मनात खोलवर रुजलेला असतो.

अगदी शरीरशास्त्राच्या दृष्टीनेसुद्धा ही कल्पना अवास्तव आहे. अतिशोषितांमध्ये उठण्याची ताकदच नसते. शोषणाच्या अगदी सुरुवातीच्या पायरीत त्यांची प्रतिकारक्षमता खलास होते. प्रत्यक्षात 'शोषक क्रमांक एक' विरुद्ध 'शोषक क्रमांक दोन' आघाडी उघडतात असे दिसते. शोषितांचे नाव घेऊन ते ही आघाडी उघडतात. उदाहरणार्थ, परदेशी भांडवलदाराविरुद्ध आघाडी स्थानिक भांडवलदार उघडतात – वरकरणी नाव मात्र गांधींच्या तत्त्वज्ञानाचे किंवा स्वदेशीचे किंवा शिवशाहीचे असते.

जगन्मान्य थोर विचारवंत लोकधुरीणांच्या दर्शनांची ही शोकांतिका विचार करावयास लावणारी आहे.

पहिला प्रश्न निर्माण होतो तो हा, की या प्रेषितांनी आदर्श समाजाची पाहिलेली स्वप्ने योग्य होती का? तत्कालीन समाजातील समस्यांचे अचूक विश्लेषण त्यांनी केले. ते दोष दूर केल्यानंतर ज्या आदर्श समाजाची निर्मिती होईल त्याचे मोठे मनोहारी चित्रण हर 'पैगंबरा'ने उभे केले. ॲरिस्टॉटल, प्लेटोपासून मार्क्स-गांधींपर्यंत प्रत्येकाने एक आदर्श समाजाचे लोभस चित्र लोकांसमोर ठेवले.

अतिरिक्त मूल्याचे विश्लेषण मार्क्सने केले. तेवढ्या आधारावर कामगारक्रांतीची आणि वर्गहीन समाजाची स्वप्ने रंगवणे हे मार्क्ससारख्या प्रकांड बुद्धिवाद्याला कसे काय योग्य वाटले? अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या आदर्शांवर समग्र समाज उभा राहिल्याची कल्पना गांधींनी करणे कितपत वास्तववादी होते?

प्रत्येक छायाचित्राचा एक केंद्रबिंदू असतो. त्या बिंदूत प्रतिमा स्वच्छ आणि स्पष्ट दिसते. त्या बिंदूपासून जितके दूर जावे, तितकी प्रतिमेची गुणवत्ता कमी होत जाते. प्रत्येक छोट्या-मोठ्या विचारवंताच्या विचारपद्धतीचेही असेच असते. काही केंद्रबिंदूंत त्यांना त्यांच्या काळाला व परिस्थितीला अनुरूप असा साक्षात्कार झालेला दिसतो. बुद्धिनिष्ठ सचोटी राखून आपला विचार तेवढ्यापुरताच मर्यादित ठेवावा, हे मात्र आजपर्यंत थोराथोरांना जमलेले नाही. आपल्याला गवसलेल्या सत्यकणांच्या आधारे विश्वव्यापी पसाऱ्याला गवसणी घालण्याच्या मोहाला मोठमोठे बळी पडले आहेत. विश्वाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात त्यांनी स्वतःच्या पराभवाचा पाया घातला.

आपल्या विचाराचा भविष्यावर परिणाम काय होईल, याचे चित्रण करताना बुद्धिनिष्ठ कठोर तर्कशास्त्राला सोडून देण्याचा मोह त्यांना का पडला? अनुयायांना एक विशाल दर्शन देऊन सर्वसंगपरित्यागाला तयार करण्यासाठी? स्वप्ने विकण्याच्या धंद्यात ते का पडले हे सांगणे कठीण आहे.

मुळात आदर्श, सुखी, शांतिपूर्ण समाज ही कल्पनाच हास्यास्पद आहे. मनुष्यप्राणी संपूर्ण सुखी होऊच शकत नाही. कधी काळी तो असा सुखी झाला, तर त्या कारणानेच तो दुःखी होईल. विरोधविकासवादाच्या जनकालासुद्धा परिपूर्ण समाजाचे स्वप्न रंगावावेसे वाटले, याचे आश्चर्य वाटते. समाज एका दोषास्पद अवस्थेतून दुसऱ्या दोषास्पद अवस्थेकडे जातो. जुने दोष समाजविकासाच्या आड येतात, तेव्हा त्यांना दूर केले जाते. या प्रयत्नांना वाचा हवी असते, ती वाचा पुरवण्याचे काम तत्कालीन पैगंबराकडे जाते.

मग प्रश्न निर्माण होतो तो हा, की परिवर्तनात थोर व्यक्तींनी नेमकी काय भूमिका बजावली? 'पैगंबरा'च्या विचारांच्या आधारे समाजपरिवर्तन घडून येते, ही कल्पना पूर्णपणे भ्रामक आहे. रूसो, वॉल्टेअर यांच्या विचारांनी फ्रेंच राज्यक्रांती घडली नाही, मार्क्समुळे रशियन क्रांती घडली नाही, गांधीवादामुळे भारतातील स्वातंत्र्यचळवळ उभी राहिली नाही. समाज स्वतःच परिवर्तनाची दिशा ठरवत असतो, मार्गक्रमण करीत असतो. मार्गक्रमांचे समर्थन करणारा सोयीस्कर विचार आसपासच्या विचार-मंडीत शोधला जातो, आवश्यक तर उत्खनन करून काढला जातो. वाळवंटातील भटक्या टोळ्यांना इस्लामप्रसाराचे तत्त्वज्ञान सोयीस्कर होते. सर्व युरोपखंडात एकेकाळी प्रभुत्व असलेल्या, पण औद्योगिक विकासात मागे पडलेल्या रशियाला समाजवादी औद्योगिकीकरणाचा विचार रुचणारा होता. इंग्रजांना हटवून त्यांची जागा पटकावू पाहणाऱ्या हिंदुस्थानातील नव्या व्यापारी, पांढरपेशा, कारखानदार वर्गाला गांधीतत्त्वज्ञान सोयीस्कर होते. त्या त्या वेळच्या आर्थिक गरजांनी स्वतःसाठी तत्त्वज्ञान निवडले, तत्त्वज्ञान्यांनी आर्थिक व्यवस्थेला गती दिली नाही.

✦

अगदी शरीरशास्त्राच्या दृष्टीनेसुद्धा ही कल्पना अवास्तव आहे. अतिशोषितांमध्ये उठण्याची ताकदच नसते. शोषणाच्या अगदी सुरुवातीच्या पायरीत त्यांची प्रतिकारक्षमता खलास होते. प्रत्यक्षात 'शोषक क्रमांक एक' विरुद्ध 'शोषक क्रमांक दोन' आघाडी उघडतात असे दिसते. शोषितांचे नाव घेऊन ते ही आघाडी उघडतात.

✦

रशियात मार्क्सवादाचा पराभव झाला, हे म्हणणे चूक आहे. गांधीवादही भारतात हरला नाही. मुळात या विचारांचा प्रयोग रशियात, भारतात झाला हे म्हणणे चूक आहे. या देशांत जे घडले त्याला मार्क्सवाद वा गांधीवाद अशी एक सोयीस्कर पाटी लावण्यात आली आहे. 'सुभाष केशकर्तनालय'चा सुभाषचंद्र बोसांशी जितका संबंध तितकाच या देशांतील घटनांचा मार्क्सशी वा गांधींशी संबंध.

मार्क्सला सापडलेले सत्यकण हे स्थलकालसापेक्ष होते. अतिरिक्त मूल्याचा प्रमुख स्रोत कामगारांच्या शोषणात नाही, तिसऱ्या जगाच्या शोषणात आहे, हे मार्क्सला समजले नव्हते असे नाही. साम्राज्यवादाच्या आर्थिक परिणामांचे तपशीलवार वर्णन त्याने दिले आहे. रोझा लुक्झेंबुर्गला तिसऱ्या जगातील लुटीचे भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेतील महत्त्व उमगले होते. मार्क्सला ते स्वच्छ दिसत असले पाहिजे. पण १८४८च्या अयशस्वी उठावाच्या अनुभवाने केवळ कामगारच क्रांती करू शकेल, ही कल्पना मनात दृढ झालेली. त्या कामगारवर्गाला क्रांतीसाठी उद्युक्त करावयाचे तर त्यांच्याच शोषणाच्या पायावर अर्थशास्त्र उभारावयास पाहिजे. त्याला वर्गजाणिवेसारखी (Class consciousness), तादात्म्यासारखी (non-alienation) मार्क्सच्या जडवादात अजिबात न सामावणारी कल्पनाही तयार करावी लागली. कोणत्याही व्यवस्थेच्या उत्पत्ती-स्थिती-लयाची मीमांसा करणाऱ्या मार्क्सलाच वर्गविहीन परिपूर्ण समाजाच्या स्वप्नांची भाकडकथा तयार करावी लागली. ती प्रत्यक्षात येण्याचा काहीच संभव नव्हता. इतिहासाला मार्क्सवर इतकी मेहेरनजर करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे महात्माजी सरसेनापती होते. आर्थिकदृष्ट्या दुबळ्या, निःशस्त्र, असंघटित जनांना बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध उभे करण्याचे प्रचंड काम त्यांनी घेतले. चंपारण्याच्या, बारडोलीच्या अनुभवांनंतर अस्पृश्य शेतमजुरांना, खेडुतांना चळवळीत गोवून घेतले पाहिजे हे ओळखणारा, चौरीचुरापासून 'करेंगे' या मरेंगे'पर्यंत झेप घेणारा हा रणधुरंधर आंदोलनासाठी नवनव्या आघाड्या व फौजा तयार करण्याकरिता पारंपरिक नीतिकल्पना वापरत होता. त्यांतून पारंपरिक नैतिकतेवर आधारित असा समाज निर्माण होईल अशी स्वतः महात्माजींची अपेक्षा असती, तर शासनाचे नेतृत्व त्यांनी आधुनिकीकरणवादी पंडितजींकडे उघडउघड सोपविले असते किंवा नाही, याबद्दल जबरदस्त शंका घेण्यास जागा आहे.

विचारवंतांनी केलेल्या स्वप्नरंजनाची परिपूर्ती न झाल्यामुळे आरामखुर्चीत बसलेल्या विद्वानांना कितीही वेदना झाल्या, तरीही काळपुरुषाला त्याची काही पर्वा वाटताना दिसत नाही.

'आपला तो बबड्या आणि लोकाचं ते कारटं' या वृत्तीने महाराष्ट्राच्या इतिहासात काही आत्मकौतुकाचा भाग यावा हे समजण्यासारखे आहे. पुण्यातील पेशव्यांचा विश्रामबागवाडा पाहिला आणि त्याच्या दीडदोनशे वर्षे आधी दिल्लीश्वरांनी केलेली बांधकामे पाहिली, म्हणजे सर्व देशाच्या इतिहासात पेशव्यांचे स्थान काय होते याबद्दलची वर्णने अवास्तव असावीत हे स्पष्टच होते. छत्रसाल, सुरजमल, हैदर, टिपू यांसारख्या इतर प्रदेशांतील पुरुषांच्या कार्याच्या संदर्भात मराठ्यांचा इतिहास लिहिला पाहिजे याची जाणीव होते. महाराष्ट्राचा इतिहास आत्मकौतुकाने भरलेला आहे आणि अवाजवीपणे आत्मकेंद्रीही आहे.

पण याहीपेक्षा एक फार मोठे कोडे इतिहास वाचताना मला पडते. देवगिरीचे एवढे बलाढ्य राज्य, पण मुसलमानी फौजा अगदी बिनधास्त गडाच्या पायथ्यापर्यंत येऊन पोचल्या कशा?

महाराष्ट्राच्या मध्यकेंद्रापर्यंत पोचण्याच्या आधी या परकी सैन्याला वाटेवरच्या शेतकऱ्यांनी, जनसामान्यांनी काहीच विरोध केला नाही? त्यांना नेतृत्व नसले मिळाले तरी काय झाले? राजारामाच्या वेळी कोठे होते नेतृत्व? तरी उभा महाराष्ट्र जागोजाग लढला. मग रामदेवरायाच्या वेळी का नाही तो उभा राहिला? बरे, शत्रूच्या फौजा किल्ल्यापाशी येऊन पोहोचल्यानंतरतरी वेढ्याच्या बाहेरच्या लोकांनी वेढ्याची कुतरओढ का नाही केली?

इतिहासात जागोजागी वाचावे लागते, की रजपूत/मराठा सैन्य शिकस्तीने लढले, पण अखेरीस शत्रूच्या प्रचंड संख्याबळापुढे त्यांचे काही चालले नाही. मोगल हजारो मैलांवरून येथे आलेले. त्यांची संख्येची ताकद स्थानिक राजांच्या त्यांच्या स्वतःच्या प्रदेशातील ताकदीपेक्षा जास्त कशी राहिली?

हे कोडे अनेकांनी मांडले आहे, अगदी १८५३ साली मार्क्सने एंगल्सला लिहिलेल्या पत्रातही ते मांडले आहे. भारतातील गावगाड्याबद्दल मार्क्स लिहितो,

''खेड्यात राहणाऱ्यांना राज्ये फुटली, मोडली याचे काहीच सुखदुःख नाही. खेड्याला धक्का लागला नाही तर ते कोणत्या राजाकडे जाते, कोणत्या सुलतानाची त्यावर अधिसत्ता चालते याची त्यांना काहीच चिंता नसते, गावगाडा अबाधित चालत राहतो.''

'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेत हे कोडे वेगळ्या पद्धतीने राजवाड्यांनी मांडले आहे. हिंदू राजवटीतील महाराष्ट्राच्या संस्कृतीची व्याप्ती अत्यल्प ब्राह्मणांपुरती व उत्तरेकडील क्षत्रियांपुरती होती. बहुसंख्य नागवंशी मराठे अत्यंत मागासलेले असून त्यांच्यात राष्ट्रभावनेचा उदय झालेला नसल्यामुळे ते अभिमानाने लढण्यास पुढे येऊ शकले नाहीत. आणि त्यामुळे अल्पसंख्य आर्यक्षत्रियांचा पराभव होताच महाराष्ट्रात मुसलमानी राजवट आली. सेनापती पडताच सैरावैरा पळत सुटण्याच्या प्रवृत्तीची पानिपतच्या तिसऱ्या लढाईच्या संदर्भात राजवाड्यांनी मीमांसा केली आहे. त्यात 'अधम', 'पशुतुल्य', 'द्विपाद' इत्यादी विशेषणे वापरून राजवाडे म्हणतात, एक अन्नदाता गेला म्हणजे दुसऱ्याच्या शोधात हे पोटभरू ताबडतोब सुटत. 'महिकावतीची बखर' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत हा विचार त्यांनी अधिक स्पष्ट केला आहे.

''गेल्या तीन हजार वर्षांत हिंदुस्थानात जी देशी व परदेशी सरकारे होऊन गेली ती सर्व एक प्रकारच्या पोटभरू चोरांची झाली व सरकार म्हणजे एक उपटसुंभ चोरांची टोळी आहे अशी हिंदू गावकऱ्यांची अंतस्थ प्रामाणिक समजूत आहे.''

राष्ट्रवादी इतिहासकारांनी 'उदे उदे' केलेल्या १८५७च्या स्वातंत्र्यसमरातील बंडखोरांची सर्वसामान्य जनतेला किती धास्ती वाटत होती, याचे वर्णन इतिहासकाराचा अभिनिवेश नसलेल्या गोडसे भटजींनी आपल्या प्रवासवर्णनात आणि उमराव जानने आत्मचरित्रात सविस्तर केले आहे.

शूद्रातिशूद्रांचा राणा जोतिबा फुले यांनी मुसलमानी आक्रमणाला सरळ 'विमोचन' असा शब्द वापरून गावातील सर्वसामान्यांची भावना व्यक्त केली आहे. इंग्रजांची राजवट आल्यानंतरही, ''सामाजिक प्रगतीला नि क्रांतीला प्रतिकूल ठरलेल्या ब्राह्मणी राज्यापेक्षा इंग्रज राज्य परवडले. नानासाहेब पेशवे यशस्वी झाले असते तर ब्राह्मणांचे जातिश्रेष्ठत्व मानणारे, अन्यायी नि प्रतिगामी ब्राह्मणी राज्य पुन्हा महाराष्ट्रात आले असते,'' अशी त्यांना भीती वाटत होती.

जोतिबांची भावना हीच देवगिरीच्या आसपासच्या कुणब्या-शूद्रांची भावना असली पाहिजे. हीच भावना सर्वसाधारण प्रजेची त्यांच्या जवळच्या गढीत किंवा किल्ल्यावर राहणाऱ्या तथाकथित देशबांधव स्वधर्मीय सरदार-राजांबद्दल असली पाहिजे. रामदेवराय आणि अलाउद्दीन यांत फरक एवढाच, की पहिला दरवर्षी उभी पिके हक्काने काढून नेई, तर दुसरा कधी तरी एकदा येणार. रामदेवरायाच्या पराभवात प्रजेला थोडे तरी सुडाचे समाधान मिळत असले पाहिजे. रामदेवरायाकडून लुटले जायचे का अल्लाउद्दिनाकडून, असा एवढाच विकल्प रयतेपुढे असेल तर परकीय लुटारूच्या रूपाने मोचकच आला, अशी प्रजेची भावना का होऊ नये? शिवाय, दोन लुटारूंच्या लढाईत स्वतः मरण्यात त्याला का स्वारस्य वाटावे? बंदा बहादुराच्या व त्यानंतरच्या पंजाबमधील लढायासंबंधी खुशवंतसिंग म्हणतात, की शिखांकडून किंवा मराठ्यांकडून लुटून घ्यायचे का अब्दालीकडून, एवढाच पर्याय पंजाबी शेतकऱ्यांसमोर असे आणि त्यांना त्यातल्या त्यात मुसलमानांकडून लुटले जाणे हा सौम्य पर्याय वाटे.

राष्ट्रवादी इतिहासकारांनी मध्ययुगातही राष्ट्र ही संकल्पना अस्तित्वात होती असे गृहीत धरले आहे. पण असे राष्ट्र त्यावेळी अस्तित्वात नव्हते. जोतिबांच्या वेळीही नव्हते. ''अठरा धान्यांची एकी होऊन त्याचे चरचरीत कोडबुळे म्हणजे एकमय लोक (Nation) कसे होऊ शकेल?'' असा प्रश्न त्यांनी विचारला. *(सार्वजनिक सत्यधर्म* – 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय', संपादक धनंजय कीर व स. गं. मालशे, सुधारित तृतीयावृत्ती १९८८, पृ. ४२३)

आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये दरवर्षी एका दाण्याचे हजार दाणे होण्याचा जो गुणाकार होतो तो लुटण्याची आहे. लुटण्याची वेगवेगळी साधने वापरली गेली. दरोडेखोरी, सैन्याची लूट, राजांचा महसूल, गुलामगिरी, वेठबिगारी, सावकारी, जमीनदारी वगैरे. सर्व समाजाचा इतिहास हा शेतीला लुटण्याच्या साधनांच्या विकासाचा इतिहास असतो.

अशा प्रकारे आपण भिन्न क्षेत्रांतील स्वयंस्फूर्त कार्याचा एकूण आढावा घेतला, तर त्या सर्वच क्षेत्रांमध्ये स्वयंस्फूर्त कार्याचा प्रयोग फसलेला आहे, हे आपल्या लक्षात येईल. असे असूनसुद्धा या क्षेत्रामध्ये अनेक लोक का शिरत असावेत? खूपदा ज्या स्वरूपाचे काम तथाकथित लाभार्थीनाही नकोच असते, ज्या प्रकारच्या कार्यामध्ये स्वतःचेच व्यक्तिमत्त्व खुरटले जाते, त्या प्रकारच्या कार्यात ही मंडळी स्वतः का सामील होतात? अनेकदा स्वयंस्फूर्त कार्य हा एक कधीही न संपणारा बोगदा असतो. अशा बोगद्यात ही मंडळी का उतरतात? आपण हे सगळे करतो आहोत हे कशासाठी, यातून काय निष्पन्न होणार आहे, हा विचारसुद्धा

त्यांच्या डोक्यात का येत नाही? मुळात समाजसेवेचा हा विंचू त्यांना डसतोच का?

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत मी शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने सतत प्रवास करीत आहे. ठिकठिकाणी लोकांना भेटत आहे, चर्चा करत आहे. या सर्व प्रवासात स्वयंस्फूर्त क्षेत्रांतील असंख्य लहान-थोर नेत्यांना मी खूप जवळून पाहिले आहे. एखाद-दुसरा अपवाद वगळता, त्यांतल्या बहुतेकांविषयी माझ्या मनात कौतुकाची भावना उरलेली नाही.

यांतली बहुतेक मंडळी ही आपल्या शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक जीवनात फारशी यशस्वी ठरलेली नाहीत. तरीही त्यांना असे वाटत असते, की आपण कोणीतरी खूप ग्रेट आहोत, आपली लायकी समाजाला पुरती कळलेली नाही. कसेही करून त्यांना प्रकाशात यायचे असते. (अशा प्रकारच्या सर्व विधानांना अपवाद निःसंशय असतात व या संदर्भातही असे अपवाद निश्चितच आहेत. परंतु असे अपवाद वगळता, सर्वसाधारणतः माझी निरीक्षणे बरोबर आहेत, असे मला वाटते.) अशा प्रकारचे स्वयंस्फूर्त कार्य करीत राहणे ही अशा मुळात सर्वसामान्य (Mediocre) असलेल्या काही मंडळींची गरजच असते. यामागे काही जैविक कारणेही आहेत. अशा कार्याद्वारे इतरांचे लक्ष स्वतःकडे वेधून घ्यायचा त्यांचा प्रयत्न असतो. दुबळे मूल किरकिर करून इतरांचे लक्ष स्वतःकडे वेधून घेत असते, तर गुटगुटीत मूल स्वभावतःच शांत, आत्ममग्न असते, ते स्वतःशीच खेळत असते, इतरांचे लक्ष वेधून घ्यायची त्याची फारशी धडपड नसते.

दुसऱ्याचा उद्धार करण्यातली झिंग ही काही और असते. बऱ्याच स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांमध्ये मला एक आत्मकौतुकी (Narcissist) भावना आढळते. स्वतःवरच ते कमालीचे खूष असतात. वरवर जरी त्यांनी आपण हे सर्व इतरांसाठी करतो असा आव आणला, तरी प्रत्यक्षात मात्र आपल्या तेजोवलयात इतरांना सामील करून घ्यायची त्यांची अजिबात तयारी नसते.

अशा स्वयंसेवी कार्यकर्त्यांची नम्रता ही वरकरणी असते. आतून ही मंडळी अतिशय अहंकारी व महत्त्वाकांक्षी असतात. आपले कार्यक्षेत्र निवडतानासुद्धा स्वतःला जास्तीत जास्त प्रसिद्धी व लोकमान्यता मिळेल असेच क्षेत्र ते निवडतात. आपल्या लौकिक जीवनात ही मंडळी फारशी यशस्वी नसतात. नोकरीधंद्यात अयशस्वी ठरलेली असतात. खूपदा आपल्या कौटुंबिक जीवनातही ती दुःखी असतात. नियतीची यांना कुठे ना कुठे जोरदार ठोकर बसलेली असते. आणि सामान्यतः अशीच मंडळी आपल्याला समाजकार्याकडे वळताना आढळतील. एके काळी कविता करणे वा कथा लिहिणे हे लोकमान्यता मिळवण्याचे सोपे माध्यम होते. आजकाल स्वयंस्फूर्त क्षेत्र हे असे माध्यम बनले आहे.

परोपकार ही एक चटकन चढणारी दारू आहे. सॉमरसेट मॉम हा माझा एक अतिशय आवडता लेखक. त्याने लिहिलेली एक छोटीशी कथा गंमतीदार आहे. एकदा येशू ख्रिस्ताला सैतान भेटतो. ख्रिस्ताने मोहाला बळी पडावे यासाठी तो अनेक लोभ दाखवतो. सोने-नाणे, पैसा-अडका, जमीन-जुमला इत्यादी. पण येशू ख्रिस्त कशालाच बळी पडत नाही. शेवटी सैतान त्याला म्हणतो, की पृथ्वीवर जाऊन सर्व मानवजातीच्या उद्धारासाठी बलिदान करण्याची संधी मी तुला देतो. हे प्रलोभन काही ख्रिस्ताला टाळता येत नाही!

दुसऱ्याचा उद्धार करण्यातली झिंग ही काही और असते. बऱ्याच स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांमध्ये मला एक आत्मकौतुकी (Narcissist) भावना आढळते. स्वतःवरच ते कमालीचे खूष असतात. वरवर जरी त्यांनी आपण हे सर्व इतरांसाठी करतो असा आव आणला, तरी प्रत्यक्षात मात्र आपल्या तेजोवलयात इतरांना सामील करून घ्यायची त्यांची अजिबात तयारी नसते. समाजहितापेक्षा आपल्या संस्थेची महती, प्रॉपर्टी व एकूण स्थान कसे उंचावेल याच्यावरतीच त्यांचे जास्त लक्ष असते. तुम्ही यांच्या विविध संस्थांची ट्रस्ट डीड्स एकवार चाळून बघा. यातल्या बहुतेक जणांनी ट्रस्टी म्हणून आपणच तहहयात राहू याची तजवीज करून ठेवलेली असते. बाहेर यांनी लोकशाही मूल्यांचा कितीही गवगवा केला, तरी स्वतःच्या संस्था मात्र ते 'हम करे सो कायदा' याच भूमिकेतून चालवीत असतात.

या मंडळींमध्ये एक गुण मात्र असतो. ही मंडळी बोलण्यात मोठी चतुर असतात. इकडली तिकडली वाचलेली दोनचार अवतरणे (quotations) फेकून विद्वत्तेचा आभास निर्माण करण्याची कला त्यांना चांगली अवगत झालेली असते. यांच्या संस्था म्हणजे यांचे व्यक्तिगत साम्राज्यच असते. यांच्या वागण्यातल्या विसंगतीला तर काही सीमाच नसते. वरवर गरिबांचा कळवळा दाखवणारी ही मंडळी स्वतः मात्र चैनीत जगत असतात. अन्य जीवनक्षेत्रांत त्यांना मिळू शकले असते, त्यापेक्षा जास्त उत्पन्न ही मंडळी या तथाकथित स्वयंस्फूर्त क्षेत्रातून स्वतःसाठी काढीत असतात. चर्चेत परकीयांना, विशेषतः अमेरिकेला, सतत दोष देणारी ही मंडळी आपल्या संस्थेला मदत मिळावी म्हणून मात्र सतत अमेरिकेपुढे झोळी पसरत असतात. वरकरणी ज्या उच्चभ्रूंना ते नावे ठेवतात, त्यांच्यासारखेच जगायचा आतून ते प्रयत्न करत असतात. ही कार्यकर्ती मंडळी कमालीची मत्सरग्रस्त असतात. सर्व यशस्वी माणसांना 'लब्धप्रतिष्ठित' म्हणून हिणवायला त्यांना आवडते. आपण तेवढे तत्त्वनिष्ठ आणि बाकीचे सारे भ्रष्ट अशी त्यांची ठाम धारणा असते. दुर्दैवाने समाजही अशा लोकांना त्यांचे वाजवीपेक्षा जास्त कौतुक करून डोक्यावर नाचवतो.

अशा या कार्यकर्त्यांचा व्यासंग अजिबात नसतो. त्यांचे सगळे ज्ञान हे एक प्रकारचे पॅचवर्क असते – थोडे इकडून घेतलेले, थोडे तिकडून घेतलेले. मला आश्चर्य वाटते, की समाजातील जे प्रश्न सोडवण्यासाठी ते झटत असतात, निदान त्यांचा वरकरणी तसा दावा तरी असतो, ते प्रश्न मुळात कसे

निर्माण होतात याचा पुरेसा अभ्यास ते का करीत नाहीत? तसे पाहायला गेले, तर या बहुतेक सर्व समस्यांचे मूळ गरिबीत आहे व गरिबीचे मूळ, हिंदुस्थानातील सद्य:स्थितीत तरी, शेतीच्या दुर्दशेत आहे.

जगातील पहिला व्यवसाय शेती हा आहे. प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर तो निर्माण झाला. उपभोग्य वस्तूंचा गुणाकार करणारा, एका दाण्याचे हजार दाणे करणारा, हा एकमेव व्यवसाय. व्यापार, वाहतूक, कारखानदारी यांसारख्या अन्य कुठल्याही व्यवसायात हे घडत नाही. तिथे फक्त वस्तूंची देवाणघेवाण होते, देवघेवीच्या मूल्याची (Exchange Value) वृद्धी होते. समाजाचा इतिहास हा या शेतीतील गुणाकाराच्या वाटपाचा – बहुतेकदा लुटीचाच – इतिहास आहे. शेतीमालाला जोपर्यंत योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत आपल्यापुढचे कुठलेही प्रश्न सुटणे शक्य नाही अशी माझी धारणा आहे.

उदाहरणार्थ, आपल्या शहरांतील भीषण बकालपणा, झोपडपट्टी, प्रदूषण, गलिच्छपणा हे प्रश्न घ्या. शहरांची इतकी अफाट वाढ का होते? फुटपाथवरसुद्धा पथारी पसरायला जागा नाही, अपुरा वीजपुरवठा, पाण्याचे हाल, सगळीकडे पसरलेली घाण असे सगळे वास्तव असूनसुद्धा लाखो माणसे शहरांमध्ये एक-एक दिवस रेटत राहतात; एवढेच नव्हे तर दररोज त्यांत हजारोंची भर पडत असते. असे का? याचे एकमेव कारण म्हणजे शहरांतले हे गलिच्छ जीवन कितीही हालांचे असले, तरी शेतीवरच्या उपासमारीपेक्षा ते परवडले, असा शास्त्रशुद्ध विचार करूनच रोज नवे लोक ते शहरी जिणे पत्करतात. शेतीतील उत्पन्न वाढवल्याशिवाय शहरांकडे येणारा त्यांचा लोंढा थांबवताच येणार नाही. शेतीमालाला योग्य भाव मिळाल्याशिवाय नागरी जीवनाचे कुठलेच प्रश्न सुटणे शक्य नाही.

स्वयंस्फूर्त कार्य करणाऱ्यांमध्ये ही व्यापक जाणीव मला कधीच आढळलेली नाही. प्रत्येकजण आपापल्या वीतभर क्षितिजात बुडलेला.

बरेचसे स्वयंस्फूर्त कार्य हे राष्ट्रावर कारगिलसारखी एखादी आपत्ती ओढवली की सुरू होते. परंतु, अशा कार्यातला उत्साह व त्यातील पावित्र्य हे अल्पजीवी असते हे इतिहासाची पाने चाळली की लक्षात येते.

किल्लारी भूकंप झाला. मृत्यूच्या तांडवाने थैमान घातले. साऱ्या देशातून आणि जगभरातून मदतीचे पूर लोटले. साऱ्या लोकांनी ज्या तत्परतेने मदतीसाठी धाव घेतली आणि जिवाची बाजी लावली त्याचे सर्वत्र मोठे कौतुक होऊ लागले. पण, कौतुकाच्या शब्दांचे ध्वनिप्रतिध्वनी विरतात न विरतात, तोच दगडामातीच्या ढिगाऱ्यात पडलेल्या प्रेतांच्या अंगावरचे दागिने काढून नेण्यासाठी भुरटे चोरटे हल्ले करू लागल्याच्या आणि त्यांत पोलीसही सामील झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या. परदेशांतून मदतीच्या रूपाने आलेले कपडे, अन्नधान्याचे डबे मान्यवर पुढाऱ्यांच्या कुटुंबीयांची आणि दोस्त मंडळींची शरीरे आणि घरे सजवू लागले. नेते मंडळींनी कोट्यवधींची माया जमा केल्याची खुलेआम चर्चा होऊ लागली.

अलीकडे येऊन गेलेल्या सुनामीच्या लाटेने सर्वदूर विध्वंस झाला. स्वयंसेवी संघटनांचे आयतेच फावले. मुंबईत आलेल्या अलीकडच्या पुरातही हाच अनुभव. प्रत्येक मृतामागे काही ठोक रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळते म्हटल्यावर, आपत्तीच्या आधी मृत झालेल्यांचीही नावे नुकसानभरपाईच्या यादीत घातली गेली.

सुनामीच्या बाबतीत तर एक प्रकरण सांगण्यासारखे आहे. सुनामीची लाट आली त्याआधी तमीळनाडूच्या समुद्रकिनाऱ्यावरील मच्छीमारांची हालत मोठी दयनीय झाली होती. मच्छीमारीच्या यांत्रिक बोटींशी स्पर्धा करता येत नसल्याने छोट्या होड्यांचे कोळी मच्छीमारीच्या धंद्यातून दूर कसे होता येईल याची चिंता करीत होते. त्यांना सुनामी ही इष्टापत्तीच वाटली. आता नवीन व्यवसाय करता येईल, नुकसानभरपाईदाखल काही रक्कम मिळाली तर त्याचा नवीन व्यवसायात प्राथमिक भांडवल म्हणून उपयोग होईल, असा विचार ते करीत होते. पण, सुनामीनंतर प्रेतांची वासलात लावल्यावर, हवा श्वसनीय झाल्यावर स्वयंसेवी संघटनांची लाट येऊन आदळली. जी ती संघटना कोळ्यांना मच्छीमारीच्या नव्या बोटी देण्याच्या धांदलीत. परदेशातील नावा बांधणाऱ्यांचा धंदा बुडीत आला होता, त्यांचा जुना साठा साफ झाला आणि तामीळनाडू व केरळ येथील मच्छीमार पुन्हा एकदा बोटी आहेत पण पकडायला मासे नाहीत, म्हणून समुद्रात खोलवर जाऊन शेजारी राष्ट्रांचे कैदी बनू लागले. स्वयंसेवी संस्थांचे सुनामी-पूर्व आणि सुनामी-उत्तर ताळेबंद पाहिले तर स्वयंसेवी संघटनांच्या उदात्त आणि नि:स्वार्थ कार्याचा बुरखा टरटरा फाटून जातो.

मी काही केवळ शेतकरी नेता नाही. किंबहुना, मी खरा शेतकरी नाहीच. मी नेहमीच सांगत असतो, की मी जोशी आडनावाचा म्हणजे माझा जन्म ब्राह्मणघरचा आहे. पण शेतकरी भावांनी आणि शेतकरी मायबहिणींनी आतापर्यंत मला जितके प्रेम दिले, तितके ते कुणालाही दिलेले नसेल. मी जरी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतीचा प्रश्न मांडत आलो असलो, तरी शेतीचा प्रश्न मी एका दरवाज्याची किल्ली म्हणून वापरला आहे; शेतीमालाच्या भावाचे तत्त्वज्ञान हे प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र करण्याची गुरुकिल्ली म्हणून मी वापरले आहे. मी मुळात स्वातंत्र्याचा भोक्ता आहे. गरिबीचे नाव घ्यायचे, गरिबी हटवायची म्हणायचे आणि गरिबी-निर्मूलनाचे वेगवेगळे कार्यक्रम काढून आपलेच खिसे भरून घ्यायचे, हे मी केले नाही.

मी माझा विचार मांडत असताना माझी निळी जीन सोडायला तयार नाही. सुरुवातीच्या काळात शेतकरी संघटनेच्या सभेत प्रास्ताविक करणारे सांगत, ''शरद जोशी परदेशात होते. इतका इतका पगार मिळत होता. ते सगळं सोडून शेतकऱ्यांची कीव आली म्हणून ते हिंदुस्थानात परत आले.'' पहिल्या सभेपासून मी भाषणाच्या आरंभीच सांगत होतो की, ''मी करुणेच्या पोटी आलेलो नाही. मी सत्यशोधनाकरिता आलेलो आहे आणि या

कामात आनंद मिळतो, म्हणून काम करतो आहे. हा आनंद जोपर्यंत वाटणार आहे, तोपर्यंत मी काम करणार आहे.''

एखाद्या माणसाने दुसऱ्याकरिता करुणेपोटी काम करावे हे दोघांनाही घातक आहे, असे मी मानतो. मी जर का सुरुवातीलाच डोळ्यांतून अश्रुंचे चार थेंब गाळीत मांडणी केली असती, तर माझी खात्री आहे, मी आत्तापर्यंत 'महात्मा' पदवीला पोहोचलो असतो! पण हे मी जाणीवपूर्वक टाळत आलो.

मी शेतकरीजीवनाचे उदात्तीकरण करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. काय ते खेड्यातले जीवन, काय ती हिरवी हिरवी झाडे, काय ती स्वच्छ हवा, कसे ते झुळझुळ झुळझुळ वाहणारे पाणी, शेतावर असणे म्हणजेच परमेश्वराच्या सन्निध असणे वगैरे सांगण्याचा वाह्यातपणा मी काही केला नाही.

शेतकरी असणे ही एक जीवनपद्धती आहे. इतिहासाच्या एका ठरावीक काळामध्ये तिचे महत्त्व होते. पण पुढे, जितकी माणसे शेतीतून निघून बिगरशेती व्यवसायाकडे वळतील, तितका त्या समाजाचा विकास आहे. शेतकऱ्यांनी उत्पन्न केलेले वरकड मूल्य लुटून नेणारे, शेतकऱ्यांची संपदा लुटून नेतात आणि शेतकऱ्याला मागे ठेवतात. स्वातंत्र्याच्या साठएक वर्षांतील महत्त्वाची आकडेवारी कोणती? शेतीवरील लोकसंख्या जवळजवळ कायम – ७४ ऐवजी ६६ टक्के – आहे; आणि शेतीचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा मात्र ६४ टक्क्यांवरून आज २३ टक्क्यांवर आला आहे. शेतीतील मालमत्ता बाहेर घेऊन जायची आणि माणसे तिथेच ठेवायची, हे होऊ नये; हे इतिहासाच्याविरुद्ध आहे, हे निसर्गाच्या विकासाच्या सिद्धांताच्याही विरुद्ध आहे अशी मांडणी आम्ही करत आलो.

सर्व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये एक डॉन क्विझोटे* लपलेला असतो, एक स्वप्नरंजन असते, प्रत्यक्षात न जमलेले भव्य दिव्य असे काहीतरी आपण करत असतो, अशी छुपी आत्मवंचना असते. वेळोवेळी असे अनेक डॉन क्विझोटे माझ्या स्वतःच्या मनामध्येही निर्माण झालेले आहेत. कधीकधी मी स्वतःला सॉमरसेट मॉमच्या The Moon and Six Pence या कादंबरीतील स्टॉकब्रोकर नायकाच्या जागी कल्पिलेले आहे. तर कधीकधी मी शरदबाबूंच्या 'सव्यसाची'मधील डॉक्टर बनलो आहे. कधीकधी मी स्वतःला एखाद्या आध्यात्मिक प्रेषिताच्या जागी कल्पिलेले आहे. या सगळ्या अनुभवांतून मी स्वतः गेलेलो असल्याकारणाने स्वयंस्फूर्त क्षेत्रातील कार्यकर्त्यांमधला डॉन क्विझोटे मला लगेच ओळखू येतो.

मला वाटते, समाजाची खरी प्रगती अगदी वेगवेगळ्या कारणांतून होत असते. इतिहास भिंती पाडत पाडत पुढे जातो. परंतु समाज मान्यता देतो ती मात्र भिंती उभारणाऱ्यांना – मग ती भिंत राष्ट्राची असो, धर्माची असो, जातीची असो की भाषेची. तैमूरलंग, चेंगीझखान, औरंगजेब, नादीर शाह यांना आपण क्रूरकर्मी ठरवले आहे. पण त्यांनी जगभर केलेल्या स्वाऱ्यांमुळे भिंती पाडण्याच्या या ऐतिहासिक विकासप्रक्रियेला फार मोठी चालना मिळाली. कोलंबसने अमेरिका शोधली तीदेखील तिथल्या लोकांचा उद्धार करण्यासाठी नव्हे, तर व्यापारातून होणारा फायदा वाढावा म्हणून. Cupidity often brings greater benefits than greatness. (महानतेपेक्षा खूपदा स्वार्थातून माणसाचा जास्त फायदा होतो.)

आपण सर्व 'युद्ध नको, युद्ध नको' असे म्हणत असतो, पण या युद्धामुळेच विकासाला सर्वांत जास्त चालना मिळाली आहे, असे इतिहास सांगतो. सगळे जग जवळ आणणारे आजचे कम्प्यूटर, इंटरनेट किंवा अन्य सेटेलाइट कम्युनिकेशन, किंवा अगदी विमाने हीसुद्धा युद्धासाठी केलेल्या प्रयत्नांतूनच झालेली निर्मिती आहे. तुमच्यातील जे सर्वोत्कृष्ट असते ते युद्धप्रसंगी नेहमी उफाळून येते. War brings out the best in men.

खूपदा माझ्याकडे अनेक तरुण मंडळी, ''आम्हांला शेतकऱ्यांची सेवा करायची आहे,'' असे म्हणत येतात. शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे वगैरे उद्योगधंदे त्यांना सुरू करायचे असतात. ''आम्हांला स्वतःला याच्यातून काही नकोय'', असा त्यांचा दावा असतो. पुन्हा एकदा तीच 'आर्तिनाशनम्'ची भाषा!

मला अशा लोकांची खूप भीती वाटते. मी त्यांना म्हणतो, ''तुम्ही शेतकऱ्यांच्या भल्यासाठी म्हणून काही करू नका. तुम्हांला जे काही करायचे असेल, ते स्वतःच्या भल्यासाठी करा.'' दुसऱ्याचे भले करायला निघालेली मंडळी जवळ आली, की माझी आवडती लेखिका आयन रॅन्ड हिच्या शब्दांत सांगायचे तर, "Leper's bells start ringing" असे वाटते.

या देशातील जे स्वयंस्फूर्त कार्य गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मी बघितले, त्यावरून माझे अशा कार्याविषयीचे मत प्रतिकूल बनले आहे. कार्यकर्त्यांचा छुपा पण प्रखर अहंकार, त्यांची ढोंगबाजी, त्यांची नाटके, सेवेच्या बुरख्याखाली स्वतःची सोय पाहत राहणे, त्यांच्यातले हेवेदावे, त्यांच्यातील व्यासंगाचा अभाव, मूळ प्रश्न टाळून उगाचच काहीतरी छोटेसे पॅचवर्क स्वरूपाचे काम करीत राहण्याची आत्ममग्न प्रवृत्ती, हे सगळे विचारात घेता अशा स्वरूपाच्या कामाची समाजाला काहीही आवश्यकता नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

*(दिवाळी १९९९ आणि फेब्रुवारी २००७)*

---

* सर्वांटिस (Cervantes) या स्पॅनिश लेखकाने १६०५ साली लिहिलेल्या कादंबरीचे व तिच्या नायकाचे Don Quixote हे नाव. ही जगातील पहिली आधुनिक कादंबरी मानली जाते व सर्वश्रेष्ठ जागतिक कादंबऱ्याच्या यादीत तिचा बहुतेकदा समावेश केला जातो. प्रत्यक्षात अगदी सर्वसामान्य असलेला हा नायक कायम काल्पनिक जगात रमलेला असतो आणि आपल्या असामान्य शौर्याची स्वप्ने रंगवत असतो.

**– संपादक**

# हे लढे कशासाठी?

## सर्वोत्तम (मोहन) ठाकूर

त्यावेळी भारतीय आयुर्विमा महामंडळाने त्यांच्या स्वत:च्या कामाकरिता संगणक आणला व तो त्यांच्या कामगारसंघटनेशी विचारविनिमय न करता. जगात सुरू झालेली संगणक क्रांती भारतात येण्यापासून रोखून धरायला हा मानाचा प्रश्न कारणीभूत झाला. भारताची इभ्रत नेत्यांच्या वैयक्तिक इभ्रतीपेक्षा कमी मानली गेली.

तसं पाहिलं तर आजकाल लढे सुरू करायला काहीही कारण चालतं. कोणीही उठावं आणि एखादा छोटा मोठा मुद्दा घेऊन लढा पुकारावा, असे हे दिवस आलेत. आणि त्या लढ्यासाठी खराखुरा महत्त्वाचा मुद्दा पाहिजेच असंही नाही. आपलं स्वत:चं महत्त्व कमी होतंय म्हणून, स्वत:चं पुनर्वसन करून पुढारीपण टिकवण्याच्या सुप्त उद्देशानेसुद्धा लढे पुकारले जातात. मोर्च्यात अनुयायी काय, कशालाही मिळतात.

आमच्या जमिनी घेतल्या म्हणून सेझ (SEZ) कल्पनेच्या विरोधात लढा देतानासुद्धा ''जमिनीची किंमत सतत वाढतच जाणार आहे, त्यामुळे आज जमीन न विकून काहीच बिघडत नाही, याची शेतकऱ्यांना जाण आहे'' ही भाषा बोलली जाते. हे शेतकऱ्यांना पटवलं जातं. आज ना उद्या जमिनी विकायची तयारी असली, तर मग लढा कशाच्या विरुद्ध? लढ्यात भाग घेणाऱ्यांना, मिरवणुकीत सामील होणाऱ्यांना, लढ्याचे पुढारी खऱ्या उद्दिष्टांची कल्पना तरी देतात काय? त्यांना स्वत:ला तरी त्याची कल्पना असते काय? हे प्रश्न अनुत्तरित राहतात.

रोज रोज नवीन नवीन लढे उभे राहत आहेत. जनघडी वारंवार विस्कळीत होत आहे आणि जनता अधिकाधिक आक्रमक बनून प्रचंड प्रमाणात मोडतोड, जाळपोळ, मारामाऱ्या करताना स्वत:ला विजयी मानत आहे. या गोष्टी दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत. आपल्या या असल्या 'लढ्याच्या' कृतीने आपलं उद्दिष्ट खरोखरच प्राप्त होणार आहे, या सर्वदूर पसरलेल्या अंधश्रद्धेचं निर्मूलन होणं जरुरीचं नाही काय?

अगतिक होऊन ही विध्वंसक लाट प्रेक्षक म्हणून नुसती पाहत बसायच्याऐवजी, या गोष्टी कशा कमी करता येतील याचा विचार करून, तशी कृती करायला आतातरी पावलं उचलली पाहिजेत.

या साऱ्याचा विचार करण्यापूर्वी माझ्या माहितीची दोन-तीन प्रत्यक्ष उदाहरणे पाहायला हरकत नाही. आमच्या रत्नागिरीत तीस-पस्तीस वर्षांपूर्वी गोव्याच्या चौगुल्यांनी 'नर्मदा सिमेंट' हा कारखाना सुरू केला. हा कारखाना सुरू होणार हे समजल्याबरोबर त्यावेळी कोकणच्या उदरनिर्वाहाचं एकमेव साधन असलेल्या आंबा, काजू वगैरेंचे छोटे मोठे, अशिक्षित आणि सुशिक्षित बागाईतदार आंदोलन करायला उठले. सिमेंट कारखान्याच्या धुरांड्यातून येणारी गरम वाफ व राख यांमुळे सर्व बागाईतींचंच नुकसान होईल आणि आमचं एकमेव उत्पन्नाचं साधन (मनी ऑर्डरी सोडून) कायमचं नष्ट होईल, ही त्यांची वरवर अगदी रास्त वाटणारी भीती होती. रत्नागिरीची जनता ही रस्त्यावर येऊन आपले प्रश्न सोडवून घेण्याचा प्रयत्न करणारी म्हणून कधीच ओळखली जात नव्हती. आणि त्यावेळी एकूण वातावरणसुद्धा तेवढं तापत नव्हतं. अशा परिस्थितीत हा नर्मदा सिमेंट कारखाना त्यावेळी उभा राहिला. नंतर काही वर्षांनी तो लार्सन अँड टूब्रोने विकत घेतला आणि त्याचा विस्तार केला. आता हा कारखाना बिर्लाच्या अल्ट्रा-टेक सिमेंटचा एक भाग आहे. पण या पस्तीस वर्षांत आंबा, काजू व इतर कलमांचं उत्पन्न कमी झालेलं नाही. कारखाना आणि बागायती या दोन्ही गोष्टी गुण्यागोविंदाने आणि उत्पन्नात वाढ होऊन चालू आहेत. काही थोड्या कलमांचं नुकसान झालं असेल, पण ते नर्मदा सिमेंटच्या कारखान्याने नाही, कारण बाकी कलमं जोमाने वाढत आहेत.

वास्तविक पाहता, नर्मदा सिमेंटचा गुजरातेत जाफराबाद येथे सिमेंट उत्पादनाचा मोठा प्रकल्प आहे. त्या कारखान्यात जे 'क्लिंकर' तयार करत, ते या रत्नागिरीच्या नर्मदा सिमेंट कारखान्यात येणार होतं – या कारखान्यात संपूर्ण बंदिस्त यंत्रसामग्रीत दळून त्याचं सिमेंटमध्ये रूपांतर करण्याकरता. या प्रक्रियेत जी थोडीफार राख उडे ती कारखान्याच्या आवारातच पडे. पण मुळात गरम वाफ व प्रचंड प्रमाणात बाहेर फेकली जाणारी राख या दोन्ही गोष्टी अतिशयोक्तिपूर्ण अथवा काल्पनिक होत्या. पण या काल्पनिक भीतीत वावरणाऱ्या स्थानिक निदर्शकांना तोंड देण्याचा मन:स्ताप मात्र नर्मदाच्या चौगुल्यांना विनाकारण सहन करावा लागला.

नर्मदा सिमेंटच्या उभारणीला विरोध करण्याकरता केलेल्या या निदर्शनांचा त्यांच्या पुढाऱ्यांना वैयक्तिक असा काहीच उपयोग झाला नाही. पण 'येणार येणार' म्हणून त्यावेळी खूप चर्चा होत असलेले किर्लोस्कर व बायर यांचे प्रकल्प मात्र या दोन्ही उद्योग समुदायांनी रत्नागिरीऐवजी अन्यत्र सुरू करण्याचे ठरवले. हे

प्रकल्प सुरू झाले असते तर त्यातून कोकणात जे रोजगार निर्माण झाले असते, ते मात्र कायमचे गेले. ठाण्याच्या रेमंड कंपनीचा जे. के. फाईल्स प्रकल्प सोडल्यास रत्नागिरीकडे इतर उद्योगगृहांनी पाठ फिरवली. आधीच दुर्गम भाग, अख्ख्या जिल्ह्यात एक मीटरही रेल्वे नाही (कोकण रेल्वे तेव्हा कागदावरसुद्धा नव्हती), सागरी वाहतूक नाही, प्रत्येक पावसाळ्यात खड्डेच खड्डे होणारे रस्ते आणि वर स्थानिक जनतेचा असा विरोध – मग कारखानदारांनी तिथे न जाण्याचं ठरवलं तर त्यात आश्चर्य नाही.

नर्मदा सिमेंट आली, तेव्हा शांततामय निदर्शनांचा काहीच उपयोग (?) नाही, हा धडा मात्र लढ्याचे पुढारी लगेच शिकले, आणि त्यांनी आपली चाल बदलली. शिवाय, कोकणची जनता शांततापूर्वक मार्गाने जाते, याची या बाहेरच्या पुढाऱ्यांना खंत वाटली असणार. पुढच्या मोठ्या आंदोलनात, रत्नागिरीच्या स्टरलाईट प्रकल्पाचं बांधकाम सुरू झाल्याबरोबर, या बांधकामाकरिता आलेल्या कामगारांच्या झोपड्याच जाळून टाकण्यात आल्या आणि स्टरलाईट प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच रत्नागिरीतून नष्ट केला. हा प्रकल्प औद्योगिक वसाहतीत होणार होता. कोणाचीच कसलीच जमीन जाणार नव्हती. प्रकल्प आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नोकऱ्या व इतर उपजीविकेची संधी मात्र कायमची गेली. विरोध कशाला होता, कल्पना नाही; पण कुठल्यातरी वर्तमानपत्राचा आणि स्टरलाईटच्या अधिकाऱ्यांचा खटका उडाला आणि मिडियाच्या झालेल्या या घोर अपमानाचा वचपा जाळपोळीला प्रोत्साहन देऊन काढण्यात आला, अशी त्यावेळी दाट अफवा होती.

दुसरं, आणि मला वाटतं कितीतरी अधिक महत्त्वाचं, कारण म्हणजे कामगारांची पगारवाढ. भारतभर उद्योगीकरणाच्या विरोधात जे लढे होतात – मग ते महाराष्ट्रात असोत, ओरिसा-आसामात असोत की ममताबाईंच्या बंगालात असोत – जी हिंसक निदर्शने होतात, त्यांचं प्रमुख कारण या उद्योगांमुळे पगारवाढ होते हे आहे. पगारवाढ होत नाही म्हणून नव्हे, तर पगारवाढ होते म्हणून! या विषयाचा सर्वंकष विचार केल्यावर, बरीच उदाहरणं पाहिल्यावर, माझं हे मत झालं आहे. अजूनपर्यंत तरी हे मत चुकीचं आहे असं दाखवणारं एकही उदाहरण मला सापडलेलं नाही.

नर्मदा सिमेंटबरोबरच रत्नागिरीत त्यावेळी सुरू झालेल्या जे. के. फाईल्स कारखान्यामुळे आठशे कामगारांच्या कुटुंबांचं जीवनमान खूपच उंचावलं होतं. या आठशे कुटुंबांव्यतिरिक्त मदतनीस उद्योगांमुळे (सर्व्हिस व ऑक्झिलियरी इण्डस्ट्रीज) इतरही बऱ्याच कुटुंबांत सुबत्ता आली होती. यांना मासिक उत्पन्न नियमित व चांगलं मिळत असल्यामुळे, छोटे-मोठे बागाईतदार, व्यापारी, दुकानदार अडचणीत आले! त्यांच्याकडे काम करण्याकरता कमी पगारावर कामगार मिळणं दिवसेंदिवस त्यांना कठीण पडू लागलं. कारण नर्मदा सिमेंट व जे. के. फाईल्समधील कामगार आणि छोट्या व्यावसायिकांकडील कामगार यांच्या पगारांतील तफावत खूपच मोठी होती.

औद्योगिकीकरणाला विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांना पगारवाढ नको होती, ही नुसती कल्पना नाही. अर्थात ते स्वतः चुकूनही हा विषय काढत नसत व काढत नाहीत. मी त्यावेळी रत्नागिरीला जे. के. फाईल्स या कंपनीत महाव्यवस्थापक होतो. सुरुवातीला कंपनीला प्रचंड तोटा झाला होता. पण तीच यंत्रसामग्री, तोच कारखाना, त्याच गोष्टींचं उत्पादन, तेच कामगार असूनही कामगारांच्या सहकार्यामुळे पुढे कंपनीची आर्थिक परिस्थिती खूपच सुधारली. तोट्यात चालणारा कारखाना भरघोस फायदा मिळवू लागला. दोन-चार वर्षांतच जे.के.च्या कामगारांचे पगार पूर्वीच्या मानाने पाच-सहापट इतके वाढले. यावेळी कितीतरी छोटे-मोठे स्थानिक उद्योजक मला प्रत्यक्ष भेटून ''तुमच्या कामगारांचे पगार निदान आता तरी आणखी वाढवू नका,'' ही विनंती करत. ''आमचे कामगारही आता पगारवाढ मागायला लागलेत. नाही म्हटलं, तर तुमच्या कारखान्याचं उदाहरण सांगतात,'' असं ते उघड उघड सांगत. ती त्यांची खरी अडचण होती. मी त्यांना आमचं स्वतःचं उदाहरण दाखवून, ''तुम्ही तुमचा व्यवसाय अधिक शास्त्रोक्त पद्धतीने केलात, तर तुमचा नफा बराच वाढेल आणि तुम्ही तुमच्या कामगारांनासुद्धा थोडीतरी पगारवाढ देऊ शकाल,'' असं सांगून पाहिलं. पण याचा काहीच उपयोग झाला नाही. व्यवसाय करण्याची वर्षानुवर्षं चालत आलेली पद्धत बदलायला ते तयार नव्हते. त्यांचं दुःख होतं, की त्यांना कमी पगारात कामगार मिळत नव्हते. औद्योगिकीकरणविरोधी बऱ्याचशा लढ्यांमागे हेच मुख्य कारण असू शकेल काय?

✦
यावेळी कितीतरी छोटे-मोठे स्थानिक उद्योजक मला प्रत्यक्ष भेटून ''तुमच्या कामगारांचे पगार निदान आता तरी आणखी वाढवू नका,'' ही विनंती करत. ''आमचे कामगारही आता पगारवाढ मागायला लागलेत. नाही म्हटलं, तर तुमच्या कारखान्याचं उदाहरण सांगतात,'' असं ते उघड उघड सांगत. ती त्यांची खरी अडचण होती.
✦

वर उल्लेख केलेली जास्त पगाराबाबतची माझी ही समजूत दिवसेंदिवस अधिकाधिक दृढ होत चालली आहे. सर्वच उद्योजक आपल्याला मदत करायला नोकरवर्ग नेमतातच. नोकरी देणारे उद्योजक पाहिले, तर त्यांत मोठे उद्योजक आणि छोटे उद्योजक असे दोन मुख्य भाग पाडता येतील. या दोघांत विभाजक रेषा कुठे काढायची हे ठरवतापण येत नाही आणि ती तेवढी महत्त्वाचीपण नाही. ती कुठेही काढली तरी एक गोष्ट स्पष्ट दिसते, की मोठ्या उद्योगात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार, सवलती, सुखसोयी, छोटे उद्योजक आपल्या कर्मचाऱ्यांना देऊ शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मुंबईतील गिरणीकामगार ज्या पगारावर नोकरी सुरू करतो त्याच पगारावर निवृत्त होतो, ही एकेकाळची सत्यस्थिती जाऊन आता कितीतरी दशकं लोटली आहेत. पण लढा चालवणाऱ्यांच्या मनातील तो राग, ती वृत्ती

अजून गेलेली नाही किंवा स्वत:च्या सोयीकरता त्यांनी ती मनातून काढलेली नाही.

दत्ता सामंतांनी मुंबईतील जवळजवळ सर्व कापड कारखाने कायमचे बंद पाडले. पण त्यावेळीसुद्धा मुंबईत गल्लोगल्लीत चालणारी हजारो छोटी मोठी वर्कशॉप्स होती. खोली-खोलीतून छोटे-छोटे उद्योजक, बालमजूर किंवा गरजू कामगारांकडून काम करून घेऊन आपला व्यवसाय चालवत होते. दत्ता सामंतांनी बंद पाडलेल्या गिरण्यांतील कोणाही कामगारांपेक्षा खूप कमी पगारावर आणि कोंदट, काळोख्या, अस्वच्छ परिसरात हे कामगार काम करत होते. या छोट्या व्यवसायांना ज्यांनी कोणी कोणत्याही कारणाकरता भेट दिली असेल, त्यांना तिथल्या कोंदट, काळोख्या वातावरणाची माहिती आहे. अत्यंत खराब परिस्थितीत चाललेल्या/चालवलेल्या मोठ्या व्यवसायातील वातावरणाशी तुलना केली, तरीही त्यांच्यापेक्षा हे बहुतांश छोटे उद्योग कितीतरी निकृष्ट दर्जाचे होते, आजही आहेत.

आणि असं असूनही, बहुतेक सर्वच्या सर्व 'विरोधी लढे' हे मोठ्या व्यवसायांच्या विरुद्धच असतात. या लढ्याच्या पुढाऱ्यांचे प्रत्यक्ष स्वत:चे छोटे उद्योग नसतील, पण त्यांना पाठिंबा मात्र या छोट्या उद्योगातील कार्यपद्धतीला विरोध नसणाऱ्यांचा, त्यांच्या आप्त-स्वकीयांचा आणि मोठे उद्योग आपली पिळवणूक करण्याकरताच आहेत, असं मानणाऱ्यांचा असतो. आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. व्यवसाय तोट्यात चालत असला तरीही कामगारांना वार्षिक बोनस मिळालाच पाहिजे या जमान्यात आहोत. पण मोर्चे-निदर्शकांचे पुढारी मात्र, मोठे व्यवसाय हे फक्त कामगारांची पिळवणूक करण्याकरताच आहेत, असं अनुयायांच्या मनात सतत बिंबवीत आहेत; ते सुरू करत असलेल्या नव्या प्रकल्पांना, औद्योगिकीकरणाच्या पुढच्या पायरीला कडाडून विरोध करत आहेत. या चळवळी एकूणच कशा चालतात, हा एक स्वतंत्र प्रबंधाचाच विषय आहे. इथे अंबानी येतील, इथे टाटा येतील, इथे बिर्ला येतील ही भीती 'इथे आतंकवादी येतील' अशासारखी घातली जाते.

✦

आनंद दिघे या पुढाऱ्याचा मृत्यू झाला, तर ठाण्याचं सिंघानिया हॉस्पिटल जाळून टाकलं. हॉस्पिटलच्या चारशे कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्याच; पण अधिक वाईट म्हणजे ठाणे शहर एका उपयुक्त सुविधेला कायमचं मुकलं.

✦

अत्यंत तुटपुंज्या पगारावर, रोज बारा बारा, चौदा चौदा तास काळोख्या, कोंदट जागेत काम करणाऱ्या, प्रॉव्हिडंट फंड वगैरे सोयी नसलेल्या कामगारांकरता एखाद्या पुढाऱ्याने मोर्चा काढल्याचं तुम्ही कधी पाहिलंय?

अर्थात या विरोधी लढ्यांच्या मोर्च्यांत सामील करून घेतलेल्या बहुसंख्य मोर्चेवाल्यांना कशाचंच काहीच माहीत नसतं आणि ते जाणून घेण्यात त्यांना स्वारस्यपण नसतं, हे आज सर्वांनाच ठाऊक आहे. ते भाडोत्री निदर्शक काँग्रेस, राष्ट्रवादी, बसपा, शिवसेना, समाजवादी पार्टी, सेझ विरोध, सेझ समर्थन अशा कोणत्याही मोर्च्यात जायला तयार असतात, उत्सुक असतात. मोर्चे आणि निदर्शनांना कारण लागत नाही आणि शुभ मुहूर्तपण लागत नाही. सगळं अगदी उत्स्फूर्त. आनंद दिघे या पुढाऱ्याचा मृत्यू झाला, तर ठाण्याचं सिंघानिया हॉस्पिटल जाळून टाकलं. हॉस्पिटलच्या चारशे कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्याच; पण अधिक वाईट म्हणजे ठाणे शहर एका उपयुक्त सुविधेला कायमचं मुकलं. पण कोणाचाच फायदा झाला नाही असं म्हणता येणार नाही. हॉस्पिटल जळत असताना आतल्या दिसतील त्या वस्तू पळवणारे होतेच की!

कमी जास्त पगाराच्या मुद्द्यांचा विषय सोडला तर आणखी एक माझ्या वैयक्तिक माहितीचं, केवळ विरोधाकरता विरोधाचं उदाहरण म्हणजे संगणकविरोधाचं – देशाची फार मोठी हानी करणारं. अमेरिकेतील नोकरी सोडून मी भारतात परतल्यावर संगणकक्षेत्रात नोकरी धरली. आजच्या पिढीला माहीत नसेल आणि कदाचित आश्चर्यही वाटेल, पण तेव्हा (चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी) संगणक या कल्पनेलाच सर्व पातळ्यांवर कडाडून विरोध होता. अर्थात विरोधाला कारण लागत नाही. हा विरोध राजीव गांधी पंतप्रधान होईपर्यंत टिकला. या विरोधात सर्वांत पुढे होत्या कामगार संघटना. यांत नंतर उपरती होऊन मध्यवर्ती सरकारात एक जबाबदार मंत्री झालेले, वाल्याचे वाल्मीकी बनलेले, श्री. जॉर्ज फर्नांडिस हे प्रमुख विरोधक होते. ''आम्ही संगणक घेतल्यामुळे एकाही कर्मचाऱ्याची नोकरी जाणार नाही'' इतकी स्पष्ट खात्री दिल्यावरसुद्धा, ''आजच्या नोकऱ्या टिकवायची तुम्ही हमी द्याल, पण पुढच्या पिढीचं काय?'' हा अनाकलनीय प्रश्न त्यांना त्रास देत होता. कामगार-संघटनांच्या विरोधातून सुटका झालीच, तर पुढच्या पायरीवर महाराष्ट्र राज्य सरकारचा – आणि इतरही प्रांतीय राज्य सरकारांचा – संगणकाला विरोध होता. या दोन अडचणी पार करणाऱ्यांना नंतर मध्यवर्ती सरकारच्या निरनिराळ्या खात्यांचा विरोध होता. कदाचित कागदोपत्री अजूनही हा विरोध चालूच असेल, पण प्रत्यक्षात मात्र १९८०च्या दशकाच्या मध्यानंतर सरकारनेच या विरोधाकडे दुर्लक्ष केले आणि भारतात संगणकयुगाच्या सुरुवातीला प्रारंभ झाला. १९८४च्या दरम्यान संपूर्ण भारतात चारशेहून कमी संगणक होते आणि गंमत म्हणजे यांतील निम्म्याहून अधिक संगणक आम्हांला प्रखर विरोध करणाऱ्या सरकारच्याच निरनिराळ्या खात्यांत होते. आमच्या संगणकाच्या मागणीला विरोध, पण स्वत:च्या उपयोगाकरता मात्र ते वापरायचे! कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेचा मी एक संस्थापक होतो, आणि नंतर या संस्थेचा मानद सचिव होतो. म्हणून मला या सर्व प्रकारांना आणि विरोधाला तोंड द्यावं लागे.

संगणकाला कामगारसंघटनांकडून मोठ्या प्रमाणावर विरोधाला सुरुवात व्हायला पुढे करण्यात आलेलं एक मुख्य कारण तसं अगदीच क्षुल्लक होतं. त्यावेळी भारतीय आयुर्विमा महामंडळाने त्यांच्या स्वत:च्या कामाकरिता संगणक आणला व तो त्यांच्या कामगारसंघटनेशी विचारविनिमय न करता. जगात सुरू

झालेली संगणक क्रांती भारतात येण्यापासून रोखून धरायला हा मानाचा प्रश्न कारणीभूत झाला. ''या पुढील संगणक कामगार संघटनांशी विचारविनिमय करून घेऊ'' या साध्या आश्वासनावर हा प्रश्न तिथेच सुटला असता. पण हा प्रश्न जॉर्ज फर्नांडिस (मला वाटतं त्यावेळी ते या कामगार संघटनेत नव्हते, पण या संघटनेवर त्यांचं खूपच वजन होतं) व त्यांचे इतर सहकारी यांनी इभ्रतीचा प्रश्न केला आणि भारताची इभ्रत ही त्यांच्या वैयक्तिक इभ्रतीपेक्षा कमी ठरली.

आज संगणकक्षेत्रामुळे भारताचं जगातील स्थान किती वर गेलं आहे, हे तर जगन्मान्य आहे. पण तेव्हा विरोध नसता, तर हे सर्व दहा-पंधरा वर्षं आधीच झालं असतं. पुढच्या पिढीच्या (म्हणजे आजच्या तरुण पिढीच्या) नोकऱ्या जातील ही जॉर्ज फर्नांडिसना काळजी होती, पण निरनिराळ्या नव्या नव्या प्रांतांत नव्या नोकऱ्या संगणकामुळे आल्या, की या उलट झालं, आणि एकूणच नोकऱ्या व व्यवसाय संगणकामुळे वाढले की कमी झाले, हे सर्वांनाच ठाऊक आहे. मग संगणकाला विरोध म्हणजे नेमका कशाला विरोध होता? तो का होता?

इथे त्यावेळची एक सत्यस्थिती सांगायला हरकत नाही. संगणकाचं युग सुरू होण्याच्या सुरुवातीच्या काळात, भारत या क्षेत्रात मागे नव्हता. संगणकविरोध सुरू होण्याच्या दरम्यान मुंबईच्या 'टाटा मूलभूत संशोधन केंद्रा'त (टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च) आणलेला सीडीसी कंपनीचा संगणक हा त्यावेळी जगातील सर्वांत शक्तिमान संगणक मानला जाई. कलकत्ता परिसरातील जादवपूर विश्वविद्यालयात अधिकाधिक कार्यक्षम असे भारतीय बनावटीचे संगणक तयार करण्याचे प्रयत्न सुरू होत होते. म्हणजेच जगातील संगणकक्षेत्रात आपण तेव्हा मागासलेले नव्हतो. संगणकविरोधाने ही सुरुवातच मुळात खुडून टाकली आणि जागतिक शर्यतीत पुढे राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या आपल्या देशाला पंधरा वर्षं मागे ढकललं.

माझा प्रत्यक्ष संबंध नसला, तरी आपल्या सर्वांनाच भेडसावणारा आणखी एक प्रश्न म्हणजे वीजटंचाईचा. दाभोळ वीज निर्मिती केंद्र उभारून एन्रॉनने वीजपुरवठा वाढवला आणि दोन वर्षांत तो चौपटीने वाढवण्याची तयारी सुरू केली. पण आपले त्यावेळचे मंत्री गोपीनाथ मुंडे यांनी दाभोळ प्रकल्प अरबी समुद्रात बुडवण्याची घोषणा केली आणि महाराष्ट्राला काळोखात बुडवलं. दाभोळ प्रकल्पातून येणारी वीज थांबली, त्यांचे वाढीव वीजनिर्मितीचे पुढचे टप्पे थांबले आणि सर्वांत अपरिमित नुकसान झालं ते कितीतरी छोट्या छोट्या व्यवसायांचं. मोठ्या व्यवसायांना अशा वीजटंचाईचा सहसा कधी फारसा त्रास होत नाही, त्यामुळे ते यातून सुटले. त्रास होतो छोट्या व्यवसायांना. नुकसान त्यांचं. आता दाभोळ प्रकल्प पुन्हा सुरू झाला आहे, पण गेल्या दहा वर्षांत झालेलं छोट्या उद्योगांचं नुकसान कधीच भरून येणार नाही. वर्षानुवर्षं न वापरल्यामुळे कोणत्याही यंत्रसामग्रीचं जे नुकसान होतं, तेच दाभोळच्या जनित्रांचं झालं. ती पुन्हा एकदा कार्यान्वित करायला शेकडो कोटी रुपयांचा नाहक खर्च. गोपीनाथ मुंड्यांनी त्यांच्या राजकीय जीवनात खूप वचनं दिली असतील, दाभोळ प्रकल्प बुडवण्याचं वचन मात्र त्यांनी प्रत्यक्षात खरं करून दाखवलं. माझा प्रश्न आहे, दाभोळ प्रकल्पविरोधी लढा नेमक्या कोणत्या कारणाकरिता होता? तेव्हा तर मुंड्यांचंच राज्य होतं.

दाभोळच्या, म्हणजे गुहागरच्या परिसरात, या प्रकल्पात काम करणाऱ्या स्थानिक कर्मचाऱ्यांना दरमहा, एकदाही न चुकता, तीन-साडेतीन हजार रुपये मिळत. त्यावेळी, म्हणजे बऱ्याच वर्षांपूर्वी, हा आकडा अभिमानाने सांगण्याएवढा मोठा मानला जाई. त्यामुळे, ''आमची आर्थिक घडी या प्रकल्पाने बिघडवली'' अशी त्यावेळी त्या परिसरात बरीच ओरड होती. दाभोळ प्रकल्पाच्या विरोधाला हे तर छुपं कारण नव्हतं ना?

अधिक वीजनिर्मितीला सध्या चालू असलेल्या विरोधाचं आणखी एक ताजं उदाहरण म्हणजे रत्नागिरीच्या फिनोलेक्स कंपनीने सुरू केलेला वीजविस्तार प्रकल्प. भारनियमनामुळे, वीजटंचाईमुळे, खुद्द रत्नागिरीत आणि जवळपासच्या सर्व गावांत रोज बराच वेळ वीज गायब होते. मुंबई शहर सोडून महाराष्ट्रात सर्वत्र होते. पण वीजनिर्मितीत वाढ करण्याच्या फिनोलेक्सच्या प्रकल्पाला काम बंद करायला लावण्याची निदर्शनं आहेतच. जनतेच्या ज्या काय अडचणी असतील त्या अडचणी, प्रकल्पाला विरोध न करता, सोडवण्याचा प्रयत्न करणे अशक्य आहे काय? विरोध कशाला? नियमित आणि पुरेशी वीज मिळेल याला?

या सर्व लढ्यांच्या मागे, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, कुठले ना कुठले राजकीय पक्ष उभे असतात, आणि या लढ्यांतून त्यांना राजकीय फायदा उठवायचा असतो. हेच महत्त्वाचं कारण आहे.

मला वाटतं, आज आपल्याकडे चालत असलेली, 'सरकार पक्ष' व 'विरोधी पक्ष' ही नावंच बदलली पाहिजेत. 'विरोधी पक्ष' म्हटल्यावर 'सरकार'च्या सर्व गोष्टींना विरोध करायचा, हे आपोआप आलंच. सरकारी पक्षात आल्यावरसुद्धा, आपण पूर्वी विरोधी पक्षात होतो हे मुंडेसाहेब विसरले नव्हते, असं वाटतं. किंवा पूर्वीच्या सरकार पक्षाने दाभोळ प्रकल्प सुरू केला व म्हणून मुंड्यांना तो नको झाला, असं वाटतं. मुंबई-दिल्ली-कोलकाता-चेन्नई-मुंबई जोडणाऱ्या सुवर्ण महामार्गाचं काम वाजपेयी सरकार पडल्यावर काही महिने एकदम थंडावलेलं होतं – कारण ते काम भाजपने म्हणजे विरोधी पक्षाने सुरू केलं होतं!

विरोधी पक्ष या संकल्पनेचा किती दुरुपयोग केला जातो, हे केंद्रीय मंत्री बॅरिस्टर अब्दुल रेहमान अंतुले यांनी नुकतंच दाखवून दिलं आहे. आपण धार्मिक वास येईल असं कोणतंही विधान केलं तर त्याला विरोधी पक्ष आक्षेप घेईल, आणि मग विरोधी पक्षाचा आक्षेप म्हटल्यावर, आपला स्वत:चा पक्ष (काँग्रेस) आपल्या विरुद्ध जाणार नाही, आणि आपल्याला ताबडतोब तरी पक्षशिस्तीची भीती बाळगायचं कारण नाही, हे बॅरिस्टर अंतुलेनी हेरलं आणि ते निर्धास्तपणे आपल्या बेजबाबदार विधानाला चिकटून बसले.

'विरोधी पक्ष' या ऐवजी 'दुसरा/दुसरे पक्ष' किंवा 'इतर पक्ष' हे नाव अधिक योग्य व बरं वाटतं. अर्थात, नुसती नावं बदलून फारसं काहीच साध्य होणार नाही, हे सत्य आहे. पण सरकार पक्षाच्या (किंवा सरकारतर्फे विरोधी पक्षाच्या) प्रत्येक प्रस्तावाला आपण विरोध केलाच पाहिजे ही सुप्त मानसिकता बदलण्याची



श्री. सर्वोत्तम ठाकूर हे मूळचे गणिताचे प्राध्यापक. भारतात व नंतर अमेरिकेत पंधरा वर्षे प्राध्यापकी केल्यानंतर त्यांनी कॉर्पोरेट जगात प्रवेश केला. IBM कंपनीत ते दक्षिण आशियासाठी प्रशिक्षण विभागाचे प्रमुख होते. एक दिवस ते सारे सोडून भारतात परत. कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाचे एक संस्थापक.

सामाजिक कार्याची आवड. लहानपणीच अप्पासाहेब पटवर्धन (कोकणगांधी) यांच्या संपर्कात. विनोबा भावेंचे व्यक्तिगत सचिव म्हणूनही त्यांनी दीड महिना काम केले. संगमेश्वर-देवरूख परिसरातील गरजू विद्यार्थ्यांसाठी १९८० साली 'सांदिपनी गुरुकुल' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना. त्याच वेळी रत्नागिरी येथील जेके उद्योगसमूहाच्या प्रकल्पात जनरल मॅनेजर म्हणूनही काम. सुनीताबाई देशपांडे यांचे हे धाकटे बंधू. ते रूढार्थाने लेखक नाहीत, पण अनेक विषयांवर त्यांनी मूलभूत विचार केला आहे – इतरांना सांगण्यासारखे बरेच काही त्यांच्यापाशी आहे. भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात त्यांनी लिहिलेला आणखी एक लेख लवकरच अंतर्नादमध्ये प्रकाशित होईल.

थोडी सुरुवात इथे होऊ शकते. आपण विरोधी पक्षात आहोत, उद्या 'आमचं सरकार' येऊ शकेल, तेव्हा आम्हांला विसरू नका, हे लोकांच्या मनावर बिंबवण्याकरता काढायचे मोर्चे आणि त्यांपासून होणारे सर्वंकष नुकसानतरी थोडंफार कमी होऊ शकतं.

या 'विरोधी पक्षा'बद्दल माझा एक वैयक्तिक अनुभव आहे. आज इतकी वर्षं झाली, पण अजूनही मला त्याचं आश्चर्य वाटतं. त्यावेळी संगणकाच्या संदर्भात माझ्या मुंबई-दिल्ली अशा खूप वाऱ्या होत. अशाच एका प्रवासात, आमच्या विमानात एक तरुण माजी मंत्री होते. ते आता खूप मोठे व आदरणीय नेते झाले आहेत. मी लिहीत असलेल्या त्या वेळच्या वृत्तीपासून ते निश्चितच बदलले आहेत. या प्रवासाच्या आधी एकच आठवडा महाराष्ट्र सरकार पडलं होतं, आणि आधीच्या त्या सरकारातील हे तरुण मंत्री त्यावेळी नुकतेच 'माजी मंत्री' झाले होते. मंत्री असताना, बहुसंख्य जनतेचा बराच फायदा होईल असं एक विधेयक त्यांनी विधानसभेत मांडलं होतं, आणि त्यावर एक खूप चांगलं भाषण केलं होतं. तेवढ्यांत सरकार पडलं आणि हे मंत्री आपोआपच विरोधी पक्षात गेले. तरीही त्यांनी मांडलेलं विधेयक नव्या सरकारने आपलं म्हणून उचलून धरलं. खरं म्हणजे कोणालाही ही अभिमानाची गोष्ट वाटली पाहिजे. पण यावेळी नव्या सरकारला विरोध करण्याकरता मुंबईत एक मोर्चा निघाला, आणि त्यात, गेल्या आठवड्यापर्यंत मंत्री असलेले हे तरुण गृहस्थ पुढाकार घेऊन सामील झाले. सरकारला विरोध करताना, आपणच दहा-पंधरा दिवसांपूर्वी मांडलेल्या विधेयकाच्या विरोधात ते घोषणा देत चालले होते!

विमानात, माझ्या शेजारच्या आसनावर, त्यावेळच्या सिनेदुनियेतील एक खूप प्रसिद्ध असामी श्री. शाम बेनेगल बसले होते. विमान सुरू झाल्यावर श्री. बेनेगलना भेटायला हे माजी मंत्री माझ्या आसनाजवळ आले, आणि गप्पा सुरू झाल्या. मंत्र्यांशी माझी अजिबात ओळख नव्हती. पण नेहमीच्या सवयीने, आगाऊपणा करीत, मी त्यांना या स्वतःच्याच विधेयकाला स्वतःच विरोध करण्याच्या प्रकाराबद्दल विचारलं. ''अहो हे चालायचंच. आम्ही आता विरोधी पक्षात आहोत. चालू सरकारच्या कृतीला आम्ही विरोध करणारच,'' हे माझ्या विचारशक्तीला आणि बुद्धीलाही धक्का देणारं त्याचं उत्तर मला आजही शब्दन्‌शब्द आठवतंय. हा प्रकार सर्व पक्षांत अजूनही चालू आहे. नुकतीच दूरचित्रवाणीवर आमदार श्री. नितीन गडकरी यांची कुठल्यातरी वाहिनीने घेतलेली मुलाखत ऐकली. ताज-ओबेरॉयवरील आतंकवादी हल्ल्यानंतर विधानसभेचं जे अधिवेशन झालं, त्यात पहिल्या दिवशी सर्व आमदार (आपण आमदार आहोत हे विसरून) काहीही गडबड न करता वागले. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा सभात्याग, हौदात उतरणं, घोषणाबाजी करणं वगैरे अंगवळणी पडलेले नित्याचे प्रकार सुरू झाले. याबद्दल मुलाखतकर्त्यांनी श्री. नितीन गडकरींना छेडलं. त्यांना प्रतिक्रिया देताना गडकरी म्हणाले, ''अहो, आम्ही विरोधी पक्षाचे. सरकारचे वाभाडे काढणारच.'' वाचकांपैकी बऱ्याच जणांनी ही मुलाखत ऐकली/पाहिली असेल.

'विरोधी पक्ष' ही संकल्पनाच बदलली पाहिजे, या माझ्या मताला पुन्हा पुन्हा दुजोरा मिळतोय.

दुसरं, आणि अधिक महत्त्वाचं म्हणजे, आपलं आजचं जे सरकार आहे, ते काँग्रेस-राष्ट्रवादी यांच्या युतीचं आहे, किंवा पूर्वीचं सरकार शिवसेना-भाजप युतीचं होतं, असं मानणं हे संपूर्णपणे चूक आहे. विलासराव मुख्यमंत्री होते आणि आता अशोक चव्हाण मुख्यमंत्री आहेत, ते केवळ सध्याचं सरकार हे काँग्रेस-राष्ट्रवादीचे नेते असलेल्या विलासरावांना, किंवा अशोकरावांना किंवा अशाच कोणा इतर रावांना सध्या चालवायला देण्याचा प्रयोग चालू आहे म्हणून. मात्र ते सरकार त्यांच्या पक्षाचं/पक्षांचं नसून, महाराष्ट्राच्या सर्व जनतेचं आहे, ही कल्पना रुजली पाहिजे. उद्या, आजचे मुख्यमंत्री गेले अथवा राहिले तरी सरकारात बदल होणार नाही – सरकार पूर्वीसारखंच, मराठी जनतेचंच राहणार आहे. सरकार चालवणारा मुख्यमंत्री त्या वेळेपुरता त्याचा मुख्य कार्यकारी संचालक असेल. अगदी एखाद्या मोठ्या व्यवसायात असतो तसा. कार्यकारी संचालक बदलेल, पण व्यवसाय तोच चालू राहील. नवा कार्यकारी संचालक आपल्याला कोणी नेमलं याच्यापेक्षा व्यवसायाच्या भरभराटीला अधिक महत्त्वाचं काय, इकडे लक्ष देईल.

*(उर्वरित मजकूर पान ३७६ वर)*

# मराठीपणाचे वैश्विक आयाम

ज्ञानेश्वर मुळे

आपले मराठीपण जपताना सगळे जग आपल्याविरुद्ध कट करते आहे, अशी भावना पराकोटीची धोकादायक आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, एकच व्यक्ती अनेक अस्मिता घेऊन जगत असते. आपण सगळे मराठी बाण्याचा अभिमान बाळगतो, तरी आपले नागरिकत्व व म्हणून पासपोर्ट भारतीय आहे हे विसरून कसे चालेल? शिवाय, जगाच्या कोणत्याही देशातील प्रवेशद्वारावर आपले स्वागत भारतीय म्हणूनच होईल. मराठी म्हणून नव्हे.

मालदीवमध्ये उच्चायुक्त म्हणून रुजू होताच, काही महिन्यांत अनपेक्षित अशा एका विषयावर निर्णय घेण्याची पाळी आली. दक्षिण भारताच्या एका विशिष्ट राज्याच्या/भाषेच्या जनतेच्या संघटनेने मालदीवमध्ये सामाजिक/सांस्कृतिक संस्था म्हणून नोंदवण्यासाठी परवानगी मागितली. एरवी अशी परवानगी देण्यासाठी उच्चायुक्त कार्यालयाकडे येण्याची गरज नसते, कारण नोंदणीसाठी स्थानिक प्रशासनाकडे अर्ज करायचा असतो. आमच्याकडे परवानगी मागण्याचे एक विशिष्ट कारण होते. मालदीवमध्ये संपूर्ण भारतीयांसाठी आम्ही 'इंडिया क्लब' नावाची सांस्कृतिक संस्था चालवतो. मालदीवमध्ये भारतीयांची संख्या साधारण तीस हजार असावी. यात प्रामुख्याने केरळ, तामिळनाडू या राज्यांचे लोक असले, तरी इतर अनेक राज्यांतील लोकांची, तुरळक का असेना, संख्या आहे. मालदीव या छोट्या देशात भारतीयांच्या अनेक संस्था होऊन त्यांच्यात फूट पडू नये, या उद्देशाने मी प्रादेशिक किंवा भाषिक तत्त्वावर चालवण्यात येणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन द्यायचे नाही, असे ठरवले होते. एक दोन संस्था (मंडळे) अस्तित्वात होत्या. त्यांना मी नम्रपणे पण स्पष्ट सांगितले होते, ''तुमच्या संस्था अनौपचारिक पद्धतीने चालू राहिल्या, तर आमची ना नाही; पण संस्थेच्या कार्यक्रमात उच्चायुक्त कार्यालयाचा सहभाग किंवा पाठिंबा हवा असेल, तर कार्यक्रम 'इंडिया क्लब'च्या छत्राखाली व्हायला हवेत. शिवाय, 'इंडिया क्लब' या नावाखाली कार्यक्रम नसेल, तर मालदीवमधल्या महत्त्वाच्या व्यक्तींना बोलावण्यासाठी उच्चायुक्त किंवा त्यांचे कार्यालय मदत करणार नाही. आपण सगळे भारतीय आहोत. स्थानिक लोकांना आपला परिचय 'भारतीय' म्हणून व्हायला हवा; एक मराठी, तमीळ, बंगाली किंवा मल्याळी म्हणून नव्हे.''

हे औषध कडू होते. शिवाय जगभर पसरलेले भारतीयही आपापल्या प्रांतीय किंवा भाषिक गटातच जगतात. पण सुदैवाने माझ्या प्रस्तावात चुकीचे काहीच नव्हते. शिवाय, काही महिन्यांतच 'इंडिया क्लब'तर्फे आम्ही घेतलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमाने संपूर्ण मालदीवचे लक्ष वेधून घेतले. आमच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावणे राष्ट्राध्यक्षांपासून मंत्र्यांपर्यंत प्रत्येकालाच प्रतिष्ठेचे वाटू लागले. माझ्या विचारांना सुरुवातीला असणारा विरोध ठिसूळ झाला, कार्यक्रमात सर्वांचाच सहभाग वाढला. शिवाय, आम्ही पोंगल, ओनम यांसारखे प्रादेशिक उत्सव बंद केले नाहीत, तर ते देशाचे उत्सव म्हणून साजरे केले. प्रादेशिकतेला राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्याचा आणि राष्ट्रीयतेला प्रादेशिक पातळीपर्यंत पोहोचवण्याचा तो प्रयत्न यशस्वी झाला होता.

या पार्श्वभूमीवर संस्था-नोंदणीच्या नव्या प्रकरणाने एक छोटेसे वादळच निर्माण केले. गंमत म्हणजे, त्या संस्थेचे मुख्यालय भारतात नसून अमेरिकेत आहे आणि तिच्या शाखा जगभर पसरलेल्या आहेत. आपली एक अधिकृत शाखा मालदीवमध्ये असावी, असा त्यांचा रास्त आग्रह होता. त्यांच्या दुर्दैवाने मी उच्चायुक्त होतो. मी स्थानिक सरकारला आधीच सांगून ठेवले होते, की आमचा हा छोटा भारतीय समुदाय आहे, त्याची प्रातिनिधिक संस्था एकच असेल. दुसऱ्या कोणत्याही संस्थेला परवानगी देण्यापूर्वी आम्हांला जरूर विश्वासात घ्या; कारण त्यांच्या उपक्रमाची जबाबदारी उच्चायुक्त कार्यालय घेणार नाही. पूर्ण विचारान्ती आणि माझ्या विचारांना (कदाचित) शह देण्यासाठीही या नव्या संस्थेच्या नोंदणीचा प्रस्ताव काही भारतीय बांधवांनी केला असावा. स्थानिक प्रशासनाने त्यांना उच्चायुक्तांचे 'ना हरकत' पत्र आणायला सांगितले आणि तो अर्ज माझ्या टेबलावर आला.

माझे मत मी स्पष्ट नोंदवले, ''सर्व भारतीयांसाठी कार्य करणारी संस्था व्यवस्थित चालली असताना, शिवाय, या संस्थेत प्रादेशिक व भाषिक अस्मितांना पूर्ण न्याय देण्याची क्षमता असताना पूर्णपणे प्रादेशिक स्वरूपाची एक नवीन संस्था सुरू करणे भारतीय समाजाच्या एकोप्याच्या दृष्टीने चांगली गोष्ट नाही. सबब, या संस्था-नोंदणीला आमची मान्यता नाही.'' माझ्या या निर्णयानंतर वेगवेगळ्या पद्धतीने माझ्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला, पण मी त्याला दाद दिली नाही. काही महिन्यांनंतर दबाव आणू पाहणाऱ्यांची सहनशीलता संपली व दबाव थांबला.

या संपूर्ण प्रकरणात मला काही मूलभूत गोष्टी सर्वांना पटवून द्यायच्या होत्या. आपली प्रादेशिक किंवा भाषिक अस्मिता जागी ठेवणे गरजेचे आहे; पण त्याचबरोबर राष्ट्रीय अस्मिता अधिकाधिक सुदृढ करणे आवश्यक आहे. आपल्या राज्याबाहेर किंवा देशाबाहेर तर हे तत्त्व अधिकाधिक चांगल्या पद्धतीने जपायला हवे.

पण अस्मितेचा प्रश्न फक्त राष्ट्रीय अस्मिता सुदृढ केल्याने संपत नाही. राष्ट्राच्या पुढे अनेक दुवे पसरलेले आहेत. आसपासची राष्ट्रे आणि त्यांना जोडून असणारी राष्ट्रे यांचा खंड बनलेला आहे. अशा पाच खंडांचा आणि त्यांना चहूबाजूंनी जोडणाऱ्या महासागरांचा मिळून जो भू-जल प्रदेश आहे, ते आपले जग आहे. शिवाय, वैयक्तिक जीवनात ज्याचा आपला संबंध येण्याची शक्यता नाही, पण पंचमहाभूतांद्वारे ज्यांच्याशी आपण जोडले गेलो आहोत, ते अवकाश आणि ब्रह्मांड यांचे व आपलेही खूप खोल असे नाते आहे. ज्ञान, विज्ञान, पर्यटन, शिक्षण, तंत्रज्ञान व संपर्क-माध्यमे यांच्यामुळे झपाट्याने ज्या जगाबरोबर आपण जोडले जात आहोत आणि परस्परावलंबन हे जिथे एकमेव सूत्र आहे, तिथे स्थानिक व राष्ट्रीय अस्मिता कितपत टिकाऊ आहेत? थोडक्यात, स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व वैश्विक हे सर्वच आयाम अधिकाधिक दृश्य स्वरूपात जीवनाला प्रभावित करत असताना, फक्त प्रादेशिक-भाषिक (किंवा राष्ट्रीय) अशा अस्मितांना नेमके कसे तोलायचे, मापायचे?

माझ्या परीने माझे मराठीपण टिकवत मी कशा पद्धतीने अनुभवातून शिकत गेलो, हे मागे वळून बघणे गमतीचे ठरेल. एका पातळीवर मी अस्सल मराठी आहे आणि एका पातळीवर मी अस्सल वैश्विकही झालो आहे. विदेश सेवेत रुजू झालो, तेव्हा माझे प्रत्येक वाक्य 'आमच्या कोल्हापुरात.. किंवा आमच्या महाराष्ट्रात...' असेच सुरू व्हायचे. आज त्यातला कडवा प्रादेशिक डंख जाऊन तिथे मराठीपणाचा मोगरी सुगंध आहे; पण त्याचबरोबर हे सगळे जगच आपल्याला आंदण मिळालेले आहे, अशी संपूर्ण जगाबद्दलची आपुलकी व आस्थेची भावनाही रुजली आहे.

मी पंचविसाव्या वर्षी महाराष्ट्राबाहेर आणि लगेचच देशाबाहेर पाऊल टाकले. जपान माझ्या मुक्कामातला पहिला देश. तिथे माझी तीन रूपे मी पाहिली. दूतावासात भारताच्या विविध राज्यांचे लोक होते, बोली भाषा हिंदी व कार्यालयीन भाषा इंग्रजी. तिथे एक भारतीय हीच माझी ओळख होती. मला जपानी भाषा शिकण्याचे कामही होते. माझ्या जपानी शाळेत शिक्षक जपानी, तर विद्यार्थी जगातल्या वेगवेगळ्या देशांचे होते. तिथे माझी मूलभूत ओळख भारतीय होती, मराठीपण केव्हाच सूक्ष्म झाले होते. हळूहळू या पलीकडच्या जगाशीही आपले नाते आहे, याचा मधुर प्रत्यय आला. तिथे माझ्या मराठी आणि भारतीय या दोन्ही ओळखींना संदर्भ होता; पण मर्यादित महत्त्व व अर्थ होता. याशिवाय, सुट्टीच्या वेळी मी आमच्या मराठी मित्रमंडळींना भेटत असे. मंत्री, बापट, देवरे, अरोंदेकर, कुलकर्णी अशा आपल्याच देशी बांधवांना भेटताना काही काळ महाराष्ट्रात गेल्यासारखे वाटे; पण कुणाच्याही घराच्या खिडकीतून बाहेर डोकावले, की तोक्योच्या त्या इमारतींच्या जंगलात आमच्या मराठीपणाच्या मर्यादा लक्षात यायच्या. पण खिडकी बंद करताच आमच्या गप्पांत आचार्य अत्रे, व. पु. काळे, पु. ल. देशपांडे, कुमारगंधर्व, तुकाराम, शिवाजीमहाराज अवतीर्ण व्हायचे. 'ब्रह्मविद्येचा सुकाळु' व्हायचा आणि 'मी मराठी'ची खुमखुमी स्पष्ट दिसायची. पण आपापल्या घरी जाताना भुयारी रेल्वेत किंवा चारचाकीत बसले, की कळायचे, 'अहा! ते सुंदर दिन हरपले.' स्वत:च्या अस्तित्वाच्या गुंतागुंतीचे स्वरूप लक्षात यायचे. काही काळाने आम्ही अलगद तोक्योकर होऊन जायचो. माझ्या हेही लक्षात आले, की आमची सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी आम्ही सप्ताहान्तात एकत्र येत होतो; पण आमच्या मराठीपणाच्या सीमा स्पष्ट होत्या. दरम्यान आमच्या नकळत भोवतालच्या जपानी संस्कृतीतील घटक – भाषा, चालीरीती, शिस्त, इकेबाना, बोन्साइ, सगळेच – आमच्या मराठी बालेकिल्ल्यातून आत झिरपत होते. आम्ही थोडे मराठी होतो, थोडे जपानीसुद्धा!

आमचा परीघ असा विस्तारत होता. मॉस्कोच्या वास्तव्यात रशियन संस्कृतीही आमच्या मनाचे कवच तोडून आत घुसली. ताजमहालची आठवण जशी भारावून टाकते, तशीच मला क्रेमलिनची आठवण येते. तिथे मी असताना घडत असलेल्या पेरेस्त्रोइका आणि ग्लासनोस्तचा क्रांतिकारी काळ होता. ते बघताना जाणवलेले थ्रिल आपल्या बांधवांना सांगणे ही मनाची गरज होती. मी दैनिक सकाळला 'रशियाचे अंतरंग' ही मालिका सुरू केली. मराठीत विचार करण्यात, लिहिण्यात एक नैसर्गिक आनंद होता. याच दरम्यान मॉस्कोत आम्ही आंतरराष्ट्रीय मराठी परिषद भरवली. या परिषदेत मराठी संस्कृती, इतिहास, समाजजीवन वगैरेंचा अभ्यास करणारे जगभरचे वीसेक अभ्यासक आले. त्या अभ्यासकांत जितके मराठी-मराठी होते, तितकेच विदेशी मराठी होते. हे विदेशी मराठी भारतीय नव्हते; पण मराठी संस्कृती हा त्यांच्या प्रेमाचा, अभ्यासाचा विषय होता. मराठीपणाचा कट्टर पुरस्कार करणाऱ्यांनी आपल्या प्रेमाचा एक हिस्सा या अभ्यासकांना देणे आवश्यक आहे, तरच 'मराठीपण' काय आहे, हे जगाला कळू शकेल.

त्यानंतर मी मॉरिशसला होतो. तिथे १९ व २०व्या शतकात गेलेल्या मराठी माणसांच्या वंशजांची संख्या लाखभर आहे. आपण या मराठी लोकांना विसरलो असलो व या जनतेनेही चरितार्थासाठी फ्रेंच, क्रिओल व इंग्रजी भाषा शिकल्या असल्या, तरी 'मराठीपण' जपण्यासाठी ते देत असलेली झुंज युद्धावर लढणाऱ्या जवानांसारखी आहे. त्यांची भजने, शाहिरी, लावण्या, शिवजयंती, एवढेच काय, १९व्या शतकातल्या महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या विवाहप्रथेनुसार होणारी लग्ने – प्रत्येक गोष्टीत मराठी अस्मिता जपण्यासाठी त्यांची चाललेली लढाई वाखाणण्यासारखी होती. माझ्यावर या लोकांचे खूप प्रेम; पण ते मला 'मराठी' उपउच्चायुक्त असे म्हणायचे, ते मला रुचायचे नाही, कारण एक भारतीय उपउच्चायुक्त या नात्याने मला तिथल्या समस्त मॉरिशन जनतेशी संपर्क ठेवणे आवश्यक होते. त्यात तमिळ, भोजपुरी,

तेलुगू, गुजराती सर्वांचाच समावेश होता. एवढेच काय, फ्रेंच आणि क्रिओल लोकही तिथले नागरिक आहेत. मला फक्त 'मराठी' लेबल चिकटणे माझ्या कामाच्या दृष्टीने अयोग्य ठरले असते. त्या मराठी लोकांना मी ते सांगितले आणि त्यांना ते पटले. त्यानंतर सार्वजनिक कार्यक्रमात मला 'मराठी उपउच्चायुक्त' असे संबोधणे ते टाळू लागले. महाराष्ट्र फक्त मराठी माणसांचा, असा आग्रह धरणाऱ्या प्रत्येकाने मॉरिशसमधल्या मराठी माणसांची शिस्त, एकजूट, मराठी प्रेम आणि अभिमान पाहावा. हे सर्व सांभाळत असताना इतर देशवासीयांकडून त्यांनी मिळवलेली प्रशंसा अभ्यासण्यासारखी आहे.

काळाच्या तडाख्यात सापडलेला मराठी माणूस आता थोड्याफार प्रमाणात जगभर भेटतो. त्याने आपली मराठी, भारतीय, आणि जागतिक अस्मिता यांचा कधी खुशीने, तर कधी पर्याय नाही म्हणून, स्वीकार केला आहे. स्वत:चा असा शोध घेणाऱ्या या नव्या मराठी माणसांच्या मानसिक, शारीरिक, मानसशास्त्रीय व सांस्कृतिक संघर्षाचे फार मनोज्ञ दर्शन अपर्णा वेलणकरांच्या व नीलिमा बोरवणकरांच्या पुस्तकांत घडते. माणसाचे मूळ आणि आकाशाकडे होणारा त्याचा विस्तार या दोन्ही गोष्टींत परस्परविरोधी काही नाही; पण झाडालासुद्धा स्वत:चे स्थान बनवताना हवा, पाणी, प्रकाश यांचा शोध घ्यावा लागतो आणि वादळ, महापूर, यांसारख्या नैसर्गिक घटकांशी संघर्ष करत उभे राहावे लागते. मानवी अस्मितेचे थोडेफार असेच आहे.

मराठी अस्मितेचे किंवा मराठीपणाचे मूळ व अवकाश कुठे आहे? महाराष्ट्राची भूमी – जिचे ऐसपैस स्वरूप जाऊन, ती भाषावार प्रांतरचनेनंतर 'महाराष्ट्र' राज्य या नावाने ओळखली जाऊ लागली. संतपरंपरा – जिने भाषा व विचार समृद्ध केले. तुकाराम, रामदास हे आध्यात्मिक नेतृत्व, तर शिवाजी ही राजकीय प्रेरणा. संस्कृती, देश आणि धर्म यांच्या रक्षणासाठी शिवाजीमहाराजांनी रणशिंग फुंकले. 'महा राष्ट्र' या दोन शब्दांमागे अधिक विशाल, पुरोगामी आणि चांगल्या प्रदेशाची संकल्पना आहे. विजापूरची आदिलशाही आणि उत्तरेच्या मुगलांपासून 'मराठी' मुलूख स्वतंत्र करण्याची जिद्द महाराजांकडे होती.

स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारतातील एक राज्य म्हणून मराठी संस्कृती, भाषा आणि मराठी माणूस यांच्या प्रगतीची इच्छा हेच 'मराठीपण' म्हणता येईल. १७व्या शतकातील मराठी 'राष्ट्रवाद' आणि २१व्या शतकातील 'मराठीपण' यांच्यातील कालसापेक्ष फरक जाणीवपूर्वक समजून घेतला नाही आणि काळाप्रमाणे योग्य पाऊल उचलले नाही, तर संकुचित प्रादेशिक व भाषिक अट्टहासापायी स्वत:च्याच पायांवर कुऱ्हाड मारून महाराष्ट्राचे नुकसान केल्याचा दोष महाराष्ट्राच्या आजच्या नेतृत्वावर आल्याशिवाय राहणार नाही.

टिळकांनी काळाची पावले ओळखून मराठी अभिमानाला राष्ट्रप्रेमात आणि राष्ट्रीय चळवळीत बदलवून टाकले. शिवाजींच्या काळात 'आपण विरुद्ध ते' अशी फारकत शक्य होती. आता 'मराठी विरुद्ध बिहारी' किंवा 'मराठी विरुद्ध दाक्षिणात्य' अशा घोषणा आकर्षक व काही जणांचे रक्त पेटवणाऱ्या असल्या, तरी त्यांचा प्राण मर्यादित आहे. शिवाय, मराठी अस्मिता टिकवण्याच्या इतर हजार संवैधानिक वाटा असताना, प्रागतिक महाराष्ट्राविषयी संपूर्ण भारतात नकारात्मक प्रतिमा पैदा करणाऱ्या जातीय, प्रांतीय आणि धार्मिक संघटना या महाराष्ट्राच्या दृष्टीने धोक्याच्या आहेत, हे जाणणे आवश्यक आहे. शिवाय, अशा संकुचित नेतृत्वाचे फक्त मनसुबेच बदलत नाहीत, तर राजकीय सोयीप्रमाणे ते कधी 'मराठी' कधी हिंदू, तर कधी कधी भारतीयही असतात. अशा सगळ्या नेत्यांची मुले इंग्रजी माध्यमात तर शिकतातच, पण त्यांतल्या अनेकांची कायमची पाश्चात्त्य देशांत जाऊन राहण्याची इच्छा असते.

पण हे समजण्यासाठी अस्मितेची संकल्पना समजावून घेतली पाहिजे. कारण मराठी अस्मिता ही मराठीची सक्ती, बिहारी लोकांना विरोध, शिवाजी महाराजांच्या नावाच्या घोषणा यांच्या पलीकडे जाणारी आहे. पहिली गोष्ट, 'मराठीपण' राखण्यासाठी सतत 'आम्ही विरुद्ध ते' या न्यायाने सतत कोणीतरी शत्रू असण्याची आवश्यकता नाही. सतत संघर्ष हाही काही अस्मितेचा स्थायिभाव नव्हे. शिवाय, सामूहिक अस्मिता असते, पण त्याहून महत्त्वाची असते वैयक्तिक अस्मिता; त्यात स्त्री किंवा पुरुष, हिंदू किंवा मुस्लिम, कौटुंबिक वारसा, वैचारिक वारसा (गांधीवादी की मार्क्सवादी?) वगैरे गोष्टी येतातच. मराठीपणाची एक थेट सरळसोट शिवाजी किंवा संभाजी, ज्ञानेश्वर किंवा रामदास अशी संकल्पना आजच्या काळात संभवत नाही. महाविद्यालय असो वा क्रीडामंडळे, सामाजिक संस्थासुद्धा अस्मितेत फार मोठी भूमिका बजावतात. पुस्तके, प्राध्यापक आणि फुल्यांसारखे समाजसुधारक अस्मिता घडवतात. शेक्सपिअरवर प्रेम करणाऱ्या आणि मिल्टनवर जीव ओवाळून टाकणाऱ्या प्राध्यापकांना पाहून आपण त्यांच्या मराठीपणाच्या सच्चेपणाविषयी शंका घेत नाही. विवाहसंस्था, मैत्री, एवढेच काय, एखाद्याशी व्यावसायिक किंवा वैचारिक शत्रुत्व ही माणसाची ओळख बदलून टाकते.

आजच्या काळात मराठी माणसाच्या नावावर संघर्ष करणाऱ्या अ, ब, क नेत्यांपेक्षा मराठी तरुण पिढीला बिल गेट्स, बराक ओबामा किंवा कॅटरिना कैफ आवडण्याची शक्यता जास्त आहे. याचे कारण, माणसाला त्याच्या संकुचित ओळखीपेक्षा काही विशाल, मनोवेधक, दूरस्थ अशा गोष्टींविषयी खोल आकर्षण असते. आज अण्णा हजारे मराठी माणसाला आवडतात ही गोष्ट खरी आहे, पण ते संपूर्ण देशाला एक परिवर्तनवादी नेतृत्वाची खूण वाटतात, याचे श्रेय त्यांच्या मराठीपणाइतकेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि चारित्र्याला जाते, कारण अस्मितेपेक्षा मूल्ये व चारित्र्य महत्त्वाचे आहे. शिवाय, मराठीपण सांभाळत माणसाला नोकरी, देशान्तर, शिक्षण, विवाह यांच्याबाबतीत तडजोड शक्य आहे, पण शिवाजी, संभाजी किंवा अन्य मराठी श्रद्धास्थानांबाबत तडजोड शक्य नाही, अशी समावेशकता व असमावेशकता एकाच वेळी

दिसते. हा विरोधाभास आहे, कारण अस्मितेची कुठलीही साचेबंद कसोटी नाही. थोडक्यात, आपले मराठीपण जपताना सगळे जग आपल्याविरुद्ध कट करते आहे, अशी भावना सर्वस्वी त्याज्य आहे. एवढेच नव्हे तर, ती मराठीपणाच्या संवर्धनाच्या दृष्टीने पराकोटीची धोकादायक आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, एकच व्यक्ती अनेक अस्मिता घेऊन जगत असते. आपण सगळे मराठी बाण्याचा अभिमान बाळगतो, तरी आपले नागरिकत्व व म्हणून पासपोर्ट भारतीय आहे हे विसरून कसे चालेल? शिवाय, जगाच्या कोणत्याही देशातील प्रवेशद्वारावर, म्हणजे विमानतळ असो वा बंदर, तिथे आपले स्वागत भारतीय म्हणूनच होईल. मराठी म्हणून नव्हे.

हा सर्व विचार गोंधळात टाकणारा आहे. यातून सर्वसाधारण माणसाने मार्ग कसा काढायचा? मार्ग सोपा आहे. शिवाजीमहाराज मराठ्यांची फौज घेऊन लढले, पण त्यांना मराठी राज्य नको होते, 'हिंदवी स्वराज्य' हवे होते. (हिंदवीचा अर्थ हिंदूंचे किंवा हिंदुस्तानचे.) शिवाय, त्यांच्या या राज्याची अस्मिता 'महाराष्ट्र मराठ्यांचा' अशी नव्हती, तर 'वर्धिष्णु विश्ववंदिता' अशी होती. 'वर्धिष्णु विश्ववंदिता' या शब्दांत राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षेइतकीच जगाच्या आदरास प्राप्त होण्याची इच्छा आहे.

ज्या क्षणी आपण 'महाराष्ट्र मराठी माणसाचा' म्हणतो, त्या क्षणी आपण दोन प्रमाद करतो. एक, मराठी माणसाची अस्मिता महाराष्ट्रात कैद करतो आणि दोन, आपल्या अस्मितेचे परराज्यातील किंवा परदेशातील स्थान ठिसूळ करतो. त्यामुळे आपल्या राज्याइतकाच हक्क आपण संपूर्ण देशावर सांगितला पाहिजे. शिवाय, तो आता कायद्यानेही आपला हक्क आहे. पण संपूर्ण देशावरच कशाला, संपूर्ण जगावर आम्हांला हक्क दाखवता आला पाहिजे.

कारण जात, धर्म, राज्य, देश ही सगळी परिमाणे मानवनिर्मित आहेत. आपल्या सर्वांच्या अस्मितेला शतदा छेदणाऱ्या या आयामांपलीकडचे हे जग हा आपला सर्वांचा एकमेव नैसर्गिक आयाम आहे. या जगाशी जोडणारे हजारो धागे आहेत आणि मानवता हा त्यांतील सर्वांत महत्त्वाचा धागा आहे. केवळ हवा, पाणी, डोंगर, जमीन, सागर व आकाश यांच्यामुळेच नव्हे, तर खाद्यसुरक्षा, जलसुरक्षा आण्विक व इतर संहारक शस्त्रे, विषमता व गरिबी या समस्यांद्वारेही आपण संपूर्ण जगाला जोडले गेले आहोत. तापमान बदल, आतंकवाद, धार्मिक कट्टरतावाद यांच्या प्रभावानेही संपूर्ण मानवतेला एकमेकांशी असलेल्या अद्वैताचा अधिकाधिक प्रत्यय येऊ लागला आहे. त्यामुळेच एकदा संपूर्ण मानवता किंवा संपूर्ण जगच आपले असे मानले, की त्यात भारतीयत्व, मराठीपण या सर्वांचे एक स्थान आपोआप आहे. आपली भाषा, संस्कृती, विचार यांना जगभर पोहोचवण्यासाठी आता फेसबुकपासून ट्विटरपर्यंत कित्येक अमराठी आणि अभारतीय साधने उपलब्ध आहेत. नाहीतरी फोन, संगणक, घड्याळ, आगगाडी, विमान – सगळ्यांना आपण आपलेसे केलेलेच आहे ना! यांतली एकही गोष्ट मराठी नाही. पण म्हणून काय झाले? 'अहं ब्रह्मास्मि' या भारतीय विचारात सगळे आपले आहे, असा गूढ संदेश आहे. ज्ञानेश्वरांनी त्याला 'विश्वचि माझें घर' असा समजणारा पर्याय दिला आणि विनोबांनी 'जय-जगत्' असे सर्वांसाठी सुलभ रूपांतर केले. एकदा फक्त मानवतेलाच नव्हे, तर चराचराला जोडणारी एकात्मता समजली आणि ती 'एकता' किंवा तो 'योग' मनातून अनुभवला, तर मराठीपणाची विविधता किंवा वेगळेपणा कसा जपायचा, याचे धडे राजकारण्यांपासून घेण्याची गरज कुठे आहे?

*(दिवाळी २०११)*

National character is the keystone on which rests the future of our public affairs, not on this or that 'ism'. This national character, again, depends on the individual rectitude. If the parched field of Indian administration has to get fresh green life, we need the monsoon of purity in national character. And the monsoon consists of little drops falling and uniting to make the rain. Individual purity of character alone can revive the parched field. Politics, economics, administration, education, health and a score of other things, all call for good character in the individual. Individuals make or mar the nation.

(आपल्या सार्वजनिक जीवनाचे भवितव्य या किंवा त्या 'इझम'वर नव्हे, तर राष्ट्रीय चारित्र्याच्या पायावर अवलंबून आहे. हे राष्ट्रीय चारित्र्य पुन्हा व्यक्तिगत चारित्र्यावर अवलंबून आहे. भारतीय प्रशासनाच्या वैराण भूमीत जर ताजे हिरवे अंकुर फुटायला हवे असतील, तर त्यासाठी आपल्याला शुद्ध राष्ट्रीय चारित्र्याच्या पावसाची गरज आहे. आणि छोटे-छोटे थेंब एकत्र येऊन कोसळतात, तेव्हाच पावसाच्या धारा बनतात. शुद्ध व्यक्तिगत चारित्र्यच केवळ या वैराण भूमीचे पुनरुज्जीवन करू शकेल. राजकारण, अर्थकारण, प्रशासन, शिक्षण, आरोग्य व अशा इतरही अनेक बाबींसाठी व्यक्तीतील चारित्र्यसंपन्नता हवी आहे. राष्ट्राच्या उभारणीसाठी किंवा ऱ्हासासाठी शेवटी व्यक्तीच कारणीभूत असतात.)

**चक्रवर्ती राजगोपालाचारी**

(*How to save Indian democracy from Money Power* या पुस्तकातून)

*(सप्टेंबर २०१३)*

■

# विकाससन्मुख धोरणांची आवश्यकता

**सुरेश द्वादशीवार**

विकासाच्या वाटचालीत एकच एक विचारधारा कायम उपयुक्त ठरत नाही; ती कितीही चांगली असली तरी. बदलत्या परिस्थितीत वेगवेगळ्या विचारांची कास धरावी लागते.

## १. समाजवादी मनोधारणेचे कैदी

जी गोष्ट फार पूर्वी करायची आणि जी करताना जनतेला विश्वासात घ्यायचे, ती उशिरा केल्याने व तिची उघड चर्चा टाळत राहिल्याने पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारला आताचा राजकीय क्षोभ ओढवून घ्यावा लागला आहे.

समाजवादी अर्थकारण देशाला समृद्धीच्या वाटेवर नेणार नाही, याची कल्पना १९६७ मध्येच साऱ्यांना आली. त्या वर्षी प्रकाशित झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अर्थविषयक समितीने तयार केलेल्या दक्षिण-पूर्वेविषयीच्या अहवालात आलेली आकडेवारी याविषयी साऱ्यांचे डोळे उघडणारी होती. भारताचे सारे राष्ट्रीय उत्पन्न त्याच्या विकासकामात प्रामाणिकपणे गुंतविले, तरी १९६७ सालची जपानची पातळी गाठायला त्याला १२७ वर्षे लागतील, असे त्या अहवालात म्हटले होते. स्कॅन्डिनेव्हिअन देशांच्या पातळीवर जायला त्याला १६७ वर्षे लागतील, असेही त्यात नोंदविले होते. अहवाल समोर होता, तो नाकारणे अवघड होते; पण त्याचा स्वीकार त्याहून कठीण होता. तो स्वीकारल्याने अगोदरची ३७ वर्षे आपण ज्या समाजवादाचा मंत्र आळवला आणि लोकांसकट स्वत:ला त्यात गुंगविले, तो फोल होता हे सांगणे राजकारणाला भाग होते. ते सांगण्याची सर्वात मोठी जबाबदारी काँग्रेसवर असली, तरी इतर पक्षही त्यातून मुक्त नव्हते. 'आम्ही तुमच्याहून जास्तीचे समाजवादी आहोत', असे काँग्रेसला बजावण्याची स्पर्धा करणारे अनेक पक्ष त्या काळात देशात होते. 'स्वतंत्र' या नावाने ५०च्या दशकाच्या अखेरीस उगवलेला आणि ७०च्या अखेरीस अंतर्धान पावलेला चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचा एकच पक्ष काय तो समाजवादाचे वैयर्थ्य तेव्हा देशाला सांगत होता. मात्र त्या पक्षात राजे-रजवाडे आणि उद्योगपती यांचा भरणा मोठा असल्याने तो देशाला फार काळ आपला वाटला नाही आणि राजकारणाच्या तेव्हाच्या समाजवादी मनोधारणेने त्याला यशस्वीही होऊ दिले नाही.

सगळे उद्योगपती आणि भांडवलदार 'चोर' आहेत, ही डावी मानसिकता राजकारणाला अर्थकारणाचा शहाणा सल्ला ऐकू देत नव्हती. 'उद्योग करणे हा सरकारचा उद्योग नव्हे', ही गोष्ट जे.आर.डी. टाटा तेव्हाही देशाला सांगत होते. बजाज आणि बिर्ला या औद्योगिक घराण्यांचे नेतेही तसे बजावत होते. मात्र समाजवादी व साम्यवादी मनोधारणेच्या त्या काळात त्यांच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. उलट, त्यात त्या माणसांचा स्वार्थच अधिक असल्याची जाहिरात तेव्हा केली गेली. परवा मनमोहन सिंगांनी केलेल्या नव्या सुधारणांच्या घोषणेचे रतन टाटांनी स्वागत केले. टाटांचे आताचे वक्तव्य देशाने जेवढ्या गंभीरपणे घेतले, तेवढे त्या अगोदरच्या टाटांचे घेतले गेले नाही, ही बाबही यासंदर्भात समाजाच्या बदलत्या आर्थिक मनोधारणेची साक्ष देणारी ठरावी. डोळ्यांना स्पष्ट दिसणाऱ्या व अनुभवांनी अधोरेखित केलेल्या खऱ्या गोष्टी आपल्या जुन्या धारणांना धक्के देणाऱ्या असतील, तर त्या स्वीकारणे व्यक्तींएवढेच समाजांना व देशांनाही कठीण होते.

साम्यवादाने आपला देश अर्धपोटी व अर्धनग्न ठेवला, हे दिसत असतानाही माओ-त्से-तुंगाने खुल्या मनाने ते कधी मान्य केले नाही. उलट भांडवली श्रीमंतीपेक्षा समाजवादी दारिद्र्य चांगले असे एक निरर्थक वाक्य तो देशाला व जगाला ऐकवीत राहिला. चीनची ती मानसिकता माओ-त्से-तुंगच्या अखेरपर्यंत तशीच टिकली. नावडते सत्य नाकारणे व आवडते ढोंग गोंजारणे या दुटप्पीपणाचा तो परिणाम होता. भांडवली व्यवस्था व समाजवादी कविता एकाच वेळी स्वीकारणे व आळवणे हा आपल्याही अशाच दुटप्पीपणाचा पुरावा आहे.

देशाने समाजवादाची कास सोडायला सुरुवात केली, त्यालाही आता बरीच वर्षे झाली. राजीव गांधींनी ती प्रक्रिया सुरू केली, नरसिंहरावांनी पुढे नेली, वाजपेयींनी दृढ केली आणि तिला परिणामकारक वळण देण्याचे १९९१ मध्ये अर्थमंत्री म्हणून हाती घेतलेले काम २००४ ते २००९ या काळात मनमोहन सिंगांनी पूर्ण करीत आणले. या वाटचालीचा परिणाम अर्थव्यवस्थेवर आणि समाजव्यवस्थेवर झालेला पाहताही आला. समाजवादी पर्वातील

आपण आजवर मिरविलेला शाहिरी समाजवाद टाकून दिल्याचे सांगणे वा जाहीर करणे हे त्यांना पराभव पत्करण्याहून मोठे अपयश वाटते.

देशाचा वार्षिक साडेतीन टक्क्यांचा विकासदर या काळात ६,७,८ व ९ टक्क्यांपर्यंत वर गेला. मध्यमवर्गाची संख्या ६ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर गेली. पायी चालणारा देश सायकलवर, सायकलीवरून जाणारा देश मोटारसायकलीवर आणि मोटारसायकलीवरचा देश चार चाकी गाड्यांवर आला. ही वाट खुल्या अर्थकारणाची, स्पर्धेच्या अर्थव्यवहाराची, विदेशी गुंतवणुकीची आणि स्पष्ट शब्दांत सांगायचे तर, भांडवलशाहीच्या दिशेने जाणारी होती. या वाटेवर एकदा पाऊल टाकले, की मग ते मागे घेता येत नाही आणि त्या वाटचालीची गती कमीही करता येत नाही. २००९ नंतर सरकारने ही वाट सोडली नसली, तरी तिच्यावरची त्याची गती मात्र मंदावली. जगाच्या अर्थकारणाला देशाची दारे मोकळी करून देणे, विदेशी उद्योगांचे स्वागत करणे आणि तोट्यात चालणारे सरकारी उद्योग खासगी क्षेत्राच्या ताब्यात देण्याचे १९९१ ते २००४ पर्यंतचे धोरण या काळात रखडत व प्रसंगी थांबत असल्याचे देशाला दिसले.

त्याचे कारण आर्थिक नव्हते. १९३० ते १९८४ या काळात डोक्यावर वाहिलेल्या समाजवादी समाजरचनेच्या राजकीय व सामाजिक मनोधारणेचे ते फळ होते. एवढी वर्षे खांद्यावर घेतलेली विचारांची ही चौकट उतरून ठेवणे आपल्या राजकीय मानसिकतेला न जमणे हे त्याचे मुख्य कारण होते. ज्या काँग्रेस पक्षाने ही मानसिकता टाकायची, त्याच्या नेतृत्वावर त्या जुन्याच विचारांचे जोखड खांद्यावर असणाऱ्या पक्षांसोबत राहण्याची व त्यांच्याबरोबर केलेल्या आघाडीचा धर्म पुढे नेण्याची जास्तीची जोखीमही होती. मनमोहन सिंग यांच्या सत्तारूढ आघाडीतील तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी व त्यांचे १९ खासदार यांना बदलात 'भांडवली' आक्रमण दिसत होते. त्या सरकारला बाहेरून पाठिंबा देणाऱ्या आणि स्वत:ला अजून समाजवादी समजणाऱ्या मुलायम, लालू आणि पासवान यांनाही त्यांची जुनी वस्त्रे एकाएकी बदलणे अवघड होते. डावे पक्ष तर या बदलावर अमेरिकेचा ग्रांथिक शिक्का उमटवायला तयार होते. विनोद हा, की याच वाटेवरून चालत आलेला व ती वाट आवडत असलेला भारतीय जनता पक्षही केवळ राजकीय लाभावर नजर ठेवून या बदलाला विरोध करीत होता. कारण कोणतेही असो, मनमोहन सिंग सरकार अल्पमतात येत असेल तर त्यासाठी वाटेल ते करण्याची, डाव्यांपासून बहुजन समाज पार्टीवाल्यांपर्यंत कोणाही बरोबर जाण्याची त्याची तयारी होती. ती त्याने १९६७ पासून देशाला दाखविलीही होती.

कोणत्याही सरकारची, मग ते मनमोहन सिंगांचे असो वा वाजपेयींचे, पहिली जबाबदारी देशात राजकीय स्थैर्य राखण्यासाठी सरकार टिकविणे ही आहे. ज्या वाटेवरून सरकार घसरणार असेल तिच्यावरून चालत जाण्यापेक्षा थांबणे व ती प्रशस्त होण्याची वाट पाहणे एवढाच पर्याय मग त्याच्याजवळ शिल्लक राहतो. 'सत्ता गेली तरी चालेल..', हे वीरश्रीपूर्ण विधान सत्तेत नसलेली माणसे करतात. सत्तेतली माणसे ते उच्चारत वा मनात आणत नाहीत. सत्तेला चिकटून राहण्याचा मोहच तसे करायला त्याला कारणीभूत असतो असे नाही, सत्ता सोडल्याने निर्माण होणारी अस्थिर पोकळी भरून काढणारे दुसरे कोणी दिसत नसणे हेही त्याचे कारण असते. भाजपा पर्याय होत नाही, तिसरी आघाडी अस्तित्वात नाही आणि प्रादेशिक पक्ष केंद्राच्या रिंगणाजवळ अजून पोहचायचे आहेत हे वास्तवही अशा वेळी महत्त्वाचे ठरते. हे सारे जाणकारांना आणि राजकारणी माणसांना कळत नाही काय? कळते. पण बदलत्या राजकारणाचे वास्तव लक्षात आल्यानंतरही ते स्वीकारण्यातली अपरिहार्यता मान्य करणे यात त्या साऱ्यांना त्यांचे दुबळेपण दिसते. आपण आजवर मिरविलेला शाहिरी समाजवाद टाकून दिल्याचे सांगणे वा जाहीर करणे हे त्यांना पराभव पत्करण्याहून मोठे अपयश वाटते.

आपण समाजवादाचा मार्ग सोडला आहे, हे काँग्रेसला व त्या पक्षाच्या नेत्यांना ठाऊक नाही असे नाही. पण तसे सांगून जनतेला विश्वासात घेण्याचे धाडस त्या पक्षातल्या कोणालाही अजून जमले नाही. भाजपला व त्याच्या पूर्वीच्या जनसंघावताराला समाजवादाशी अगोदरही फारसे घेणे-देणे नव्हते व आताही ते नाही. पण आपण खुल्या म्हणजे भांडवली अर्थव्यवस्थेचे तरफदार आहोत, असे जनतेला सांगणे त्यांच्याही कोणा पुढाऱ्याला जमले नाही. समाजवाद आणि गांधीप्रणीत समाजवाद ही नावे त्यांचे नेमके स्वरूप स्पष्ट न करता घेत राहायची आणि मनात भांडवली व्यवस्था आळवायची, हे ढोंग टाकणे त्यांच्याही मनोधारणेला जमणारे नाही. मुलायमसिंगांच्या पक्षाचे नावच तेवढे समाजवादी आहे. प्रत्यक्षात त्यांचा व त्यांच्या पक्षाचा कार्यक्रम समाजवादापासून दूर जाऊन अनेक दशके लोटली आहेत. लालूप्रसाद व पासवान यांचे पक्ष, दक्षिणेतले द्रमुक व अण्णा द्रमुक, महाराष्ट्रातला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, टीडीपी, जेडियू, जेडीएस यांच्यातल्या कोणालाही समाजवादाशी देणेघेणे राहिले नाही. शिवसेना किंवा मनसेसारखे स्थानिक भावनांवर उभे असणारे पक्ष तो शब्दही उच्चारताना कधी दिसत नाहीत. मात्र गेली साठ वर्षे समाजाला समाजवाद ऐकविल्याने घडलेली या साऱ्यांची मानसिकता यांच्यातल्या कुणाला टाकवत नाही आणि त्या प्रचाराने घडविलेली समाजाची मनोधारणा त्याला टाकायला सांगणे यांना भयावहही वाटते. मन भांडवलशाही आणि मनोधारणा समाजवादी असा हा विसंवाद आहे. तो आहे तोवर आपले राजकीय ढोंगही शाबूत राहणार आहे.

समाजवाद हा अनेकांच्या भजनाचा पण जगाने टाकलेला विचार आहे. त्यातल्या वाटपाच्या प्रक्रियेविषयी अनेकांना आस्था असली तरी त्याच्या उत्पादकतेचे अपयश साऱ्यांच्या कधीचेच ध्यानात आले आहे. ज्या देशांनी त्या विचारासाठी आपली माणसे मारली व जगावर युद्धे लादली त्यांनीही आता तो सोडला आहे.

रशियाने ते ओझे खांद्यावरून उतरविले, तर चीनने त्याचे लेबलच केवळ शिल्लक ठेवले. मुक्त अर्थव्यवस्था (भांडवलशाही हे तिचे जुने व बदनाम नाव) या साऱ्यांनी स्वीकारली. अमेरिकेचा म्हणून हिणविला गेलेला हा विचार त्या देशाशी वैर कायम ठेवूनही त्यांनी घेतला. या वैरालाही आता स्पर्धेचे व प्रसंगी सहकार्याचे वळण मिळत असल्याचे जगाला दिसले आहे.

❑

## २. मध्यमवर्गाचा उदय

मध्यमवर्गाचा उदय ही गेल्या २५ वर्षांत झालेली देशातील सर्वांत मोठी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्रांती आहे. १९९१नंतर बदललेले देशाचे अर्थकारण व त्याने समाजात आणलेली वार्षिक ५ ते ९ टक्क्यांची सुबत्ता, यामुळे सारा देश दारिद्र्याच्या सीमारेषेच्या वर उठण्याची शक्यता प्रथमच निर्माण झाली आहे. ही वाढ अशीच सुरू राहिली, तर २०२१पर्यंत भारत हा जगातली महासत्ताच नव्हे तर साऱ्यांना गंभीरपणे दखल घ्यावी लागेल अशी अर्थसत्ताही होणार आहे. एका जागतिक पाहणीनुसार (गोल्डन सॅक्स – ब्रिक) २०३२पर्यंत भारत जपानहून मोठी अर्थसत्ता बनला असेल. दुसऱ्या पाहणीनुसार २०२१पर्यंत ३.५ लाखांपासून १७ लाखांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या देशातील मध्यमवर्गीय कुटुंबांची संख्या दीड लाखांचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांहून अधिक झाली असेल. २०२५पर्यंत कमी उत्पन्न (दीड ते अडीच लाख) असणाऱ्या कुटुंबांची संख्या देशाच्या एकूण कुटुंबसंख्येच्या १५ टक्क्यांहून कमी होईल. त्याच वेळी वरिष्ठ मध्यमवर्गातील कुटुंबांची संख्या ४० टक्क्यांवर गेली असेल.

याच वेळी घडून येणारी आणखी महत्त्वाची बाब ही की आज ३५ टक्क्यांएवढ्या राष्ट्रीय मिळकतीचा स्वामी असलेला मध्यमवर्ग २०२५ पर्यंत ४७ टक्के मिळकतीचा मालक बनला असेल व त्याची संयुक्त मिळकत देशाच्या धनिक वर्गाच्या एकूण उत्पन्नाहून मोठी असेल. ३७ टक्क्यांहून मोठा झालेला मध्यमवर्ग आणि १५ टक्क्यांएवढा उरलेला कनिष्ठ वर्ग यातूनच उद्याच्या राज्यकर्त्यांना त्यांचा मतदारसंघ निश्चित करावा लागेल. येत्या २० वर्षांत घडणारी एक आणखी महत्त्वाची बाब ही, की ग्रामीण भागातील २६ ते २८ कोटी लोक तोवर शहरात येतील. गेल्या ६० वर्षांत झालेल्या शहरीकरणाहून हे शहरीकरण मोठे असेल. (गेल्या दहा वर्षांत शहरी नागरिकांची संख्या २८.६० कोटींवरून ३७.७ कोटींवर गेली, हा हीच वस्तुस्थिती सांगणारा प्रकार आहे.) आर्थिकदृष्ट्या मध्यम असलेला कोणताही वर्ग स्थितिवाद्यांचा असणार नाही, तो क्रांतिकारकांचीही पैदास करणारा नसेल. ॲरिस्टॉटल म्हणाला तसे, तो 'सर्वोत्कृष्ट राजकारण' करणारा व एकाच वेळी प्रगतिशील व स्थितिशील असेल. ॲरिस्टॉटलच्या मते खरी लोकशाही हे त्याचेच राज्य आहे.

१९९१पर्यंत टेलिफोनधारकांची देशातील संख्या १ कोटीहून कमी होती. आजच्या मोबाइलधारकांची संख्या ८० कोटींहून अधिक आहे व तीत दरमहा १० ते १५ लाखांची भर पडत आहे. आजच्या मोबाइलधारकांपैकी सुमारे एक कोटी लोक वर्षाकाठी मोबाइल बदलतात. एका मोबाइलची किंमत १ हजार रुपये धरली तर हा बाजार १ हजार कोटींचा होतो. अडीच लक्ष रुपयांच्या लहान मोटारींच्या संदर्भात ही किंमत थेट ४ लक्ष मोटारींच्या किमतीएवढी होते. तेवढ्या रकमेत मोटारींचा कारखानाही उभारता येतो. प्रत्येक मोबाइलधारक दरमहा १०० रुपयांचे बिल भरणारा असेल, तर ती रक्कमही ८ हजार कोटींएवढी भरते. भारताची पहिली पंचवार्षिक योजना फक्त २ हजार कोटींची आणि दुसरी २.५ हजार कोटींची होती हे लक्षात घेतले, की मोबाइलधारकांच्या एका महिन्याच्या खर्चात तशा चार योजना बसू शकतात, हेही ध्यानात येते. अर्थव्यवस्थेची ही वाढ व तीत येणाऱ्या समाजाच्या एका मोठ्या वर्गाची भागीदारी यातून ठळकपणे जाणवणारी आहे. या धारणेबाहेर असणाऱ्यांचा वर्ग अर्थातच आहे आणि तो या धारणेचा भाग बनवणे हे देशासमोरचे आताचे आव्हान आहे. अडचण एवढीच, की या व्यवस्थेचा भाग बनलेली लाभधारक माणसे तिच्या अपुरेपणाविषयी जेवढी संघटितपणे बोलतात, तेवढी या व्यवस्थेबाहेरची माणसे बोलत नाहीत. त्यांच्या असंघटित असण्याचा जसा तो परिणाम आहे, तसा त्यांच्या आवाजाहून संघटितांचा स्वर उंचीचा असण्याचाही तो भाग आहे.

✦

> या स्थितीत आपला सामाजिक वाद-विचार जातीपातीचा न राहता समाजाच्या नव्या संरचनेचा, रस्ते, पाणी, वाहतूक, मेट्रो व निवासव्यवस्था इत्यादीसंबंधीचा असेल व तो सध्याच्या विचारांच्या क्षेत्राहून वेगळा असेल. वाढलेला मध्यमवर्ग, लोकसंख्येचे होणारे शहरीकरण, कृषिप्रधान देशाचे होत असलेले औद्योगिकीकरण या बाबी समाजाचे पूर्वीचे व आताचेही अनेक प्रश्न निकालात काढणाऱ्या वा विस्मृतीत टाकणाऱ्या आहेत.

✦

लोकसंख्येचे स्थलांतर, राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ आणि आर्थिकदृष्ट्या कनिष्ठ वर्गातील लोकांचा मध्यमवर्गात झपाट्याने होत असलेला प्रवेश या बाबी प्रस्थापित विचारांच्या कक्षांनाही धक्का देणाऱ्या आहेत. राजकीय पक्ष, विचारवंतांचे वर्ग, माध्यमांवरील चर्चक या साऱ्यांच्या विचारातून गरिबी, बेकारी, दारिद्र्यरेषेखालची माणसे इत्यादींची चर्चा कमी होताना दिसते. निवडणुकीतील प्रचाराचा भर त्या वर्गाला भेडसावणाऱ्या

प्रश्नांकडून ज्यांचे ते प्रश्न सुटले आहेत, त्यांच्या भावनात्मक वा अस्मितेच्या प्रश्नांकडे वळणे याही गोष्टी या नव्या वास्तवाचे परिणाम सांगणाऱ्या आहेत. विकासाच्या योजनांचे क्षेत्रीय (वर्गीय वा जातीय स्वरूपाहून वेगळे) स्वरूप या संदर्भात विचारात घेतले, की त्यांचा लोकसंख्येच्या बदलत्या स्थिती व स्वरूपावरील परिणामही वेगळा दिसू लागतो. लोकशाही ही जात, धर्म, पंथ, क्षेत्र व वृत्ती यांच्या कडा बोथट करणारी व्यवस्था आहे, असे म्हटले जाते. ती फक्त माणसांचा विचार करते. त्यांच्या जन्मदत्त विशेषांचा विचार करीत नाही. लोकसंख्येचे आताचे स्थित्यंतर व स्वरूपांतर हे या विषयाच्या अभ्यासकांना व विशेषतः त्यातील प्रचारकी भूमिका घेणाऱ्यांना बरेच काही शिकवू शकणारे आहे.

भारत हा मोटारींची निर्यात करणारा जगातला चौथ्या क्रमांकाचा (त्या बाबतीत चीनला मागे टाकलेला) देश आहे. 'सर्वाधिक वेगाने स्वत:चा आर्थिक विकास करणारा लोकशाही देश' म्हणूनही त्याला जगात मान्यता मिळाली आहे. या स्थितीत आपला सामाजिक वाद-विचार जातीपातीचा न राहता समाजाच्या नव्या संरचनेचा, रस्ते, पाणी, वाहतूक, मेट्रो व निवासव्यवस्था इत्यादीसंबंधीचा असेल व तो सध्याच्या विचारांच्या क्षेत्राहून वेगळा असेल. वाढलेला मध्यमवर्ग, लोकसंख्येचे होणारे शहरीकरण, कृषिप्रधान देशाचे होत असलेले औद्योगिकीकरण या बाबी समाजाचे पूर्वीचे व आताचेही अनेक प्रश्न निकालात काढणाऱ्या वा विस्मृतीत टाकणाऱ्या आहेत. दलित-सवर्ण संघर्ष, गरीब-श्रीमंत यांच्यातील तणाव किंवा माओला घातक वाटणारी शहर व खेडी यांच्यातील शोषणप्रधान व्यवस्था यांतल्याही अनेक गोष्टी यामुळे इतिहासजमा होतील. तशाही आताशा त्या धूसर झाल्या आहेत आणि त्या टिकवून ठेवायला अनेकांना जोरात बोलावे व टोकाचे लिहावे लागत आहे.

वाढणारा व सुखवस्तूपण जपणारा नवा मध्यमवर्ग आजही एकजातीय नाही. पुढेही तो सर्ववर्गीयच असणार आहे. त्याचे शौक आणि राहणीमान सारखेच राहणार आहेत. ही प्रक्रिया आणखी गतिमान करायची, तर औद्योगिकीकरणाचा वेग, अर्थकारणाचे खुलेपण आणि गुंतवणुकीच्या अधिकाधिक शक्यता कायम राहतील, याची काळजी नेतृत्वाला घ्यावी लागेल व त्याला विरोध करणारे गतिरोधाचे राजकारणही थांबवावे लागेल. त्याच वेळी समाजातील विसंगती घालविणे आणि त्यातल्या सुसंगतींवर अधिक भर देणे हे समाजधुरीणांचेही कर्तव्य ठरणार आहे.

*(जानेवारी २०१३)*

---

*(पान ३६८ वरून)*

मोठ्या व्यवसायालासुद्धा तो चालवायला एक मार्गदर्शक मंडळ (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स) असतं. तेसुद्धा इतर तज्ज्ञांचा सल्ला घेऊन मार्गदर्शन करतात. म्हणूनच टाटांच्या मार्गदर्शक मंडळावर असलेल्या सभासदांत वाडिया, बिर्ला, महिंद्र अशी नावं दिसतात. हे मार्गदर्शक मंडळ व्यवस्थापकीय अधिकारी नेमून त्यांच्यामार्फत दैनंदिन कारभार चालवतात. पण मार्गदर्शक मंडळालासुद्धा अनिर्बंध अधिकार नसतात. मंडळाचे सभासद कितीही प्रसिद्ध, वजनदार आणि आदरणीय व्यक्ती असल्या तरीही अतिमहत्त्वाच्या मुद्द्यावर त्यांना भागधारकांची संमती घेणं आवश्यक असतं. महाराष्ट्रातील जनतेचं सरकार चालवताना त्यावर अंकुश ठेवायला भागधारक म्हणजे मराठी मतदार. दुर्दैवाने भागधारक म्हणजे मतदार नव्हे, तर आम्हीच आमदार-खासदार असं मानलं जातं. आणि म्हणूनच स्वत:चे पगार, भत्ते वगैरे वाढवून घेणं, शहाबानूसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर जनतेला विश्वासात न घेता स्वत:च निर्णय घेणं, असे प्रकार होतात. अतिमहत्त्वाच्या प्रश्नावर लोकमत अजमावणं ही वाटते तेवढी कठीण गोष्ट नाही. आपली निवडणूक यंत्रणा ते सहज करू शकेल इतकी सक्षम आहे.

आज क्रिकेट, फुटबॉल, हॉकी आणि इतर खेळांतही 'कोच' असतात. विद्यापीठात व्हिजिटिंग लेक्चरर्स बोलावतात. मोठमोठे प्रकल्प उभारणं, असलेल्या प्रकल्पांचा विस्तार करणं, मोठे पूल बांधणं यांसारख्या कामालासुद्धा 'ग्लोबल टेंडर' मागवतात. सर्वच क्षेत्रांत हे चालू आहे. मग राजकारणात – आपल्या पक्षाला सार्वत्रिक निवडणुकीत निर्णायक बहुमत मिळालं, तरीही इतर पक्षांची मदत घ्यायला नकार का?

या संदर्भात माजी पंतप्रधान कै. विश्वनाथ प्रताप सिंग यांची एक आठवण सांगण्यासारखी आहे. निवडणुकीत निर्णायक बहुमत न मिळाल्याने, एक राष्ट्रीय सरकार स्थापन करावं अशी त्यांनी सूचना केली. या संकल्पनेला सर्वच पक्षांनी विरोध केला. त्यांचं सर्वांचं म्हणणं पडलं, की असं सरकार चालणार नाही, कारण निरनिराळ्या मुद्द्यांवर सर्व पक्षांचं एकमत होणं शक्य दिसत नाही. विश्वनाथ प्रताप सिंग यांनी या आक्षेपाला दिलेलं उत्तर खूपच मार्मिक होतं. ते म्हणाले, ''खेडीपाडी, शहरं, लहान-मोठी गावं, सर्व चांगल्या रस्त्यांनी जोडली गेली पाहिजेत, याला कोणत्या पक्षाचा विरोध आहे? सर्व जनतेला नळाचं पाणी मिळालं पाहिजे, याला कोणत्या पक्षाचा विरोध आहे? गरिबांना मोफत आरोग्यसेवा खेडोपाडी पोहोचली पाहिजे, याला कोणत्या पक्षाचा विरोध आहे? शंभर टक्के जनता साक्षर झाली पाहिजे आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सर्वांना विनामूल्य मिळालं पाहिजे, याला कोणत्या पक्षाचा विरोध आहे? विजेची टंचाई गेली पाहिजे व ती मुबलक प्रमाणात उपलब्ध झाली पाहिजे, याला कोणत्या पक्षाचा विरोध आहे? धान्योत्पादनात देश स्वावलंबी झाला पाहिजे, याला कोणाचा विरोध आहे? अशा कितीतरी अतिमहत्त्वाच्या गोष्टी आहेत, त्यावर आपण आधी लक्ष देऊ या, इतर बाबी नंतर बघता येतील.''

कदाचित या संकल्पनेतून 'दुसऱ्या पक्षाच्या' सरकारने केलेल्या कृतीच्या विरोधात लढे उभारण्याचे प्रसंग थोडे तरी कमी होतील, हे लढे कोणत्या उद्दिष्टांकरता आहेत, हे स्पष्ट होईल आणि ते साध्य करण्याकरता कधी ना कधी इतर व्यक्ती व संघटनांची मदतही मिळू शकेल.

*(मार्च २००९)*

*आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात*

# मराठी भाषेपेक्षा मराठी मानसिकता कालानुरूप व्हायला हवी

**विवेक सावंत**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञान (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी) कसे आणि किती उपयुक्त ठरू शकते याची ही एक आगळी आणि अनुभवसिद्ध, सम्यक आणि संदर्भबहुल मांडणी

मला असं वाटतं, की 'अमृताशी पैजा जिंकणारी' जी आपली मराठी भाषा आहे, त्या भाषेला आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात कालानुरूप करण्यापेक्षा, खरी गरज माहिती तंत्रज्ञानाने मराठी भाषेशी अनुरूप होत राहण्याची आहे. परंतु त्याचबरोबर आधुनिक ज्ञानयुगाच्या संदर्भात, आणि ते ज्ञानयुग माहिती तंत्रज्ञानाने सक्षम केलं आहे म्हणून त्या तंत्रज्ञानाच्या संदर्भात, मराठी मानसिकता कशी कालानुरूप व्हावी, याचं मात्र आपण चिंतन करणं आवश्यक आहे. हा आपल्या मराठी समाजाच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

कविवर्य कुसुमाग्रजांनी म्हटलं आहे : ''मातृभाषेचा दुरभिमान माझ्या ठिकाणी नाही, पण अभिमान मात्र अवश्य आहे. इंग्रजांची सत्ता गेली, पण इंग्रजीची सत्ता वाढत्या प्रमाणात येथे फैलावत आहे. भारतातील कोणाही नागरिकाला आपल्याला इंग्रजी येत नाही याचा संकोच वाटावा, किंवा इंग्रजी येत नाही म्हणून प्रगतीचे अनेक दरवाजे त्याला बंद असावेत, ही परिस्थिती खरोखर लज्जास्पद आहे. बहुसंख्य लोकांना न कळणाऱ्या भाषेत आपले सर्व वरच्या पातळीवरील आर्थिक, राजकीय व्यवहार होत असल्यामुळे लोकांना न कळणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही ही सुसंस्कृत जगात कोठेही नसलेली अद्भुत घटना आपण सिद्ध करत आहोत. देशातील बहुसंख्यांना न समजणाऱ्या परस्थ भाषेचा पांगुळगाडा घेऊन सामाजिक परिवर्तनाचा पर्वत आपण चढू पाहतो आहोत. भाषाविषयक समस्या सोडवणे सोपे नाही हे तर खरेच, पण अवघड प्रश्न कपाटात कोंडल्यामुळे अधिक अवघड होत जातात आणि शेवटी सर्व संभाव्य उत्तरे गमावून बसतात. हा केवळ भाषेचा प्रश्न नसून समाजाच्या अस्मितेचा आणि म्हणून अस्तित्वाचा प्रश्न आहे. समाजाच्या परिवर्तनाची वा क्रांतीची पेरणी ही स्वभाषेच्या किनाऱ्यावरच होऊ शकते.''

✦
मार्क डेव्हिस यांनी ॲपल कंपनीचा राजीनामा देऊन युनिकोड फाउंडेशन तयार केलं. या माणसाने भाषांची आणि लिप्यांची अव्याहत सेवा करण्यासाठी आपलं सबंध जीवन समर्पित केलं आहे.
✦

आता आपण या प्रश्नाचा माहिती तंत्रज्ञानाच्या बाजूने विचार करू या. भाषा आणि तंत्रज्ञान यांच्यामधला संबंध हा आशय आणि त्याच्या अभिव्यक्तीच्या साधनांमधल्या संबंधासारखा आहे. आशय हा श्रेष्ठ आहे, अभिव्यक्तीची साधनं ही त्याला सहायभूत आहेत. तंत्रज्ञानाच्या इंग्रजी भाषेतील व्यापक प्रमाणातील वापरातून महाराष्ट्रातही इंग्रजीचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे मराठी भाषा नामशेष होईल, अशी भीती अनेकांना वाटत आहे. या भीतीतून एका बाजूने समाजात तंत्रज्ञानाविषयी गैरसमजूत पसरतेय व दुसऱ्या बाजूने मराठीच्या अस्तित्वाला असलेल्या आव्हानाचं सम्यक आकलन होण्यात अडथळे निर्माण होत आहेत. मला असं वाटतं, की आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात आज जो मराठीच्या अस्तित्वाबद्दलचा प्रश्न आहे, तो खरा मराठीतील आशयाचा प्रश्न आहे; त्याच्या अभिव्यक्तीसाठी अनुरूप असं तंत्रज्ञान इंग्रजीप्रमाणेच मराठीलाही सहज उपलब्ध होत आहे.

जगामध्ये हजारो भाषा बोलल्या जातात व हजारो लिप्यांमधून त्या लिहिल्या जातात. युनिकोडचं तंत्रज्ञान जगापुढे आलं त्यावेळेला आपल्या हे लक्षात आलं, की या सर्व लिप्यांचं सहअस्तित्व जर संगणकावर निर्माण करायचं असेल, तर त्या सर्व लिप्यांचं कोडिफिकेशन हे एका कळपटामध्ये (कीबोर्डमध्ये) करायला पाहिजे. युनिकोड प्रकल्प ज्यावेळेला सुरू झाला, त्यावेळेला मार्क डेव्हिस यांनी ॲपल कंपनीचा राजीनामा देऊन युनिकोड फाउंडेशन तयार केलं. या माणसाने भाषांची आणि लिप्यांची अव्याहत सेवा करण्यासाठी आपलं सबंध जीवन समर्पित केलं आहे. त्यांनी जो प्रचंड प्रकल्प राबवला त्यातून असं स्पष्ट झालं, की केवळ इंग्रजीच नव्हे तर जगातल्या हजारो लिप्या आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या भाषा आता संगणकांवर एकत्र नांदू शकतील व परस्परांमध्ये सहज व्यवहार करू शकतील.

यासंदर्भात आपली जमेची बाजू काय आहे हे आपण थोडंसं

लक्षात घेऊ या. महाराष्ट्र हा आता जवळ जवळ बारा कोटी मराठी लोकांचा प्रचंड असा एक भाषक गट आहे. त्यामुळे जगात मराठी भाषक गटाचा संख्यानिहाय क्रमांक पंधरावा आहे. ही जेवढी आपल्या संख्येच्या दृष्टीने जमेची बाजू आहे, तेवढीच ही आपल्या अस्मितेच्या व आपल्या अस्तित्वाच्या दृष्टीनेही जमेची बाजू आहे.

तंत्रज्ञानाला स्थानिक व जागतिक बाजारपेठेची भाषा कळते. म्हणजे आपण जसं आपल्याकडे 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणतो, तसं तंत्रज्ञान क्षेत्रातले लोक जगाकडे 'वसुधैव मार्केटम्' या दृष्टीने पाहतात. त्यामुळे जर मराठी भाषकांचा एवढा मोठा समूह मराठीची कास धरणार असेल व संगणक, मोबाइल फोन, टॅब्लेट व तत्सम तंत्रज्ञानांचा वापर करून मराठीतून दैनंदिन व इतर व्यवहार करण्यासाठी आग्रही असेल, व त्यामुळे तशा तंत्रज्ञानासाठी एक मोठी बाजारपेठ निर्माण होत असेल, तर तंत्रज्ञान देणाऱ्या कंपन्या मराठी भाषेचा वापर तंत्रज्ञानातून सुलभ करण्यासाठी वाट्टेल ते करायला तयार होतील, हे प्रथम लक्षात घेतलं पाहिजे.

आम्ही सौदी अरेबियामध्ये 'एमकेसीएल'चे अनेक प्रकल्प राबवतो. सौदी अरेबियाची लोकसंख्या ही अडीच कोटींपेक्षा कमी आहे. पण सौदी अरेबियाच्या कुठल्याही मॉलमध्ये तुम्ही गेलात तर प्रथमदर्शनी इंग्रजीत चालणारा कम्प्यूटर सहसा दृष्टीस पडत नाही. कारण त्याला मागणीच नाही. कारण कुठल्याही अरब ग्राहकाला उजवीकडून डावीकडे जाणाऱ्या अरेबिक लिपीमधलाच संगणक हवा असतो. म्हणजे मायक्रोसॉफ्टलासुद्धा जर सौदी अरेबियामध्ये सॉफ्टवेअर विकायचं असेल, तर सगळंच्या सगळं अरेबिक भाषेमध्ये करावं लागतं. त्यांच्या चौपटीपेक्षा जास्त लोकसंख्या असून आपल्याला मात्र हे भाग्य लाभलेलं नाही! याचं कारण आम्ही असा दृढनिश्चय केलेला नाही, की आम्ही जे काही संगणकावर करू, मोबाइल फोनवर करू ते मराठी भाषेमध्येच करू. जर आम्ही तसा दृढ निर्धार केला, तर मात्र जगातल्या कुठल्याही मोठ्या कॉर्पोरेट हाउसला आमच्यासमोर हात जोडून त्यांचं तंत्रज्ञान मराठी भाषेमध्ये देणं भाग पडेल; आणि एवढंच नाही तर ते त्यासाठी उत्सुक असतील. तंत्रज्ञानाला बाजारपेठेची भाषा बरोबर कळते हे महत्त्वाचं तत्त्व लक्षात घ्यायला हवं.

✦

आज जो मराठीच्या अस्तित्वाबद्दलचा प्रश्न आहे, तो खरा मराठीतील आशयाचा प्रश्न आहे; त्याच्या अभिव्यक्तीसाठी अनुरूप असं तंत्रज्ञान इंग्रजीप्रमाणेच मराठीलाही सहज उपलब्ध होत आहे.

✦

तुम्ही गुगल ॲडव्हान्स सर्चमध्ये गेलात आणि 'भाषा मराठी'वर क्लिक केलं, की मराठीतले सगळे सर्च रिझल्ट्स तुमच्यापुढे हात जोडून उभे राहतात. ज्यावेळेला हजारो मराठी लोकांनी मराठीमधून ब्लॉग्ज वापरायला मोठ्या प्रमाणात सुरुवात केली, आपली पोर्टल्स मराठीतून तयार करायला सुरुवात केली, आपल्या वेबसाइट्स मराठीतून तयार करायला सुरुवात केली, त्यावेळेला हे परिवर्तन घडलं. कारण आमचं पोर्टल मराठीत आहे आणि गुगलमधून ते सर्च होत नसेल तर तो गुगलला कमीपणा आहे; आमच्या पोर्टलला नाही. त्याच्यामुळे गुगलसारखी महाकाय कंपनीही तत्काळ मराठीच्या सेवेला उपस्थित झाली. आज ज्या प्रमाणात आपण हे करायला पाहिजे त्या प्रमाणात मात्र आपण ते करत नाहीये, ही गोष्ट जरी खरी असली, तरीसुद्धा आज निरनिराळ्या ब्लॉग्जच्या माध्यमातून विविध देशांतली हजारो मराठी माणसं एकमेकांना भेटत आहेत. म्हणजे मराठीच्या अस्तित्वाचा प्रश्न तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेपेक्षा जास्त आपल्या मानसिकतेचा आहे.

मराठीच्या अस्तित्वाला असलेल्या इंग्रजीच्या आव्हानाचा विचार करताना म्हणूनच तंत्रज्ञानाच्या प्रभावाला दोष देत बसणं योग्य होणार नाही. याचा तंत्रज्ञानाच्यापलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. 'आम्ही इंग्रजीचं मांडलिकत्व का स्वीकारलं आहे?' या प्रश्नाचं मूलभूत स्वरूप फारसं तंत्रवैज्ञानिक नसून सामाजिक आहे.

मराठीची आजची चिंतनीय स्थिती का निर्माण झाली ते बघू या. आम्ही ज्यावेळेला 'मराठी' ही प्रमाणभाषा, शासकीय भाषा, इत्यादी करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळेला आम्ही सर्वसामान्य लोक दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या (लोकप्रयुक्त) साध्या सोप्या मराठी भाषेतील शब्दांपेक्षा संस्कृतप्रचुर किंवा संस्कृतोद्भव अशा अपरिचित, दुर्बोध व उच्चारायला अवघड शब्दांना प्राधान्य द्यायला सुरुवात केली. हा एक दुर्दैवी पायंडा आमच्या समाजात पडला. महाराष्ट्राच्या एका माजी मुख्यमंत्र्यांनी विधानसभेपुढे ठेवण्यात आलेल्या (शासकीय) 'मराठी' भाषेतील प्रस्तावाचं 'मराठीत भाषांतर' करून सदस्यांना द्यावं, असं आपल्या मिश्किल शैलीत अधिकाऱ्यांना सुचवलं होतं!

ह्या नव्या शासकीय मराठी भाषेची निर्मिती करत असताना आव असा आणला गेला, की आम्ही बहुजनांपर्यंत त्यांच्या भाषेत शासन नेत आहोत. प्रत्यक्ष झालं असं, की त्या बुरख्याखाली आम्ही आमची प्रमाणभाषा व तिच्यातून चालणारं शासन लोकांपासून अधिक दूर नेलं. काही वेळेला तर लोकांना इंग्रजी बरी, पण ही मराठी नको, असं वाटावं अशी परिस्थिती आम्ही निर्माण केली.

हे करत असताना त्याच्यामागे काही छुपी प्रेरणा होती का? आम्हांला आमच्या सर्वसामान्य जनतेला मुख्य प्रवाहामध्ये खरोखर आणायचं होतं का? भारताचा इतिहास जर तुम्ही बघितलात तर त्यात एकात्मतेसबंधी, समतेसंबंधी जिवापाड अशी कन्सर्न (आच) ही फार क्वचित आपल्याला बघायला मिळते. काही थोड्या अभिजनांनी प्रचंड मोठ्या संख्येच्या बहुजनांवर सतत सत्ता गाजवणं याच वास्तवाने आमचा पूर्ण इतिहास बरबटलेला आहे. त्यामुळे बहुजनांना समजणाऱ्या भाषेत जर आम्ही आर्थिक, राजकीय, सामाजिक व्यवहार केले, तर ते लोक ही शिडी चढून लवकर वर येतील, याची आमच्या मनात असलेली भीती हे त्यामागचे मुख्य कारण आहे. असं मी म्हणण्याचं कारण असं, की जर तुम्ही जपानचा इतिहास बघितला, चीनचा, रशियाचा, कोरियाचा,

इराणचा किंवा तुर्कस्तानचा इतिहास बघितला, तर तुमच्या असं लक्षात येईल, की सर्वसामान्य लोकांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी स्वभाषेमधून केवळ शिक्षण देणं एवढंच नव्हे, तर विज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक व्यवहार, राजकीय व्यवहार, प्रशासन ह्या सगळ्या गोष्टी एका स्वकीय अशा सोप्या, लोकप्रयुक्त पण प्रमाणित केलेल्या भाषेमधून देण्याचा-करण्याचा मोठा खटाटोप या देशांनी जिद्दीने दीर्घकाळ चालवला. सर्वसामान्यांच्या विकासासाठी स्वभाषेचा चहूबाजूंनी विकास करण्याची ही विलक्षण रणनीती पाहून आपण थक्क होतो.

मी एकदा कोरियातल्या विद्यार्थ्यांना भारतामध्ये आयटीतल्या प्रगत शिक्षणासाठी आणण्याचा एक प्रकल्प तयार केला आणि त्यासाठी सन २००० मध्ये मी कोरियामध्ये गेलो. मला तर काही कोरियन भाषा येत नव्हती. कोरियामध्ये गेल्यानंतर एक साधी युक्ती तिथल्या यजमानांनी केली. ती अशी, की त्यांनी मला एका खोलीमध्ये नेलं आणि तिथे खाद्यपदार्थांसबंधी कोरियन शब्द मला अवगत होतील अशी पूर्ण व्यवस्था केली. मी म्हटलं, की ''मला तर भूक लागली आहे आणि मी वेळेत जर जेवलो नाही तर माझं डोकं दुखतं,'' तर ते लोक म्हणाले, ''काहीच हरकत नाही, पण तुमचा जेवणाचा मार्ग याच खोलीतून जातो. तुम्ही प्रथम हे शब्द अवगत करा.'' त्याच्यानंतर त्यांनी मला एका कॅन्टीनमध्ये नेलं. तिथे मॅक्डोनल्डच्या दुकानात दिसतात तशी पदार्थांची रंगीत छायाचित्रं नव्हती, की ज्यांच्याकडे बोट दाखवून मी ऑर्डर देऊ शकेन. तिथल्या कुठल्याही वेटरला कोरियन भाषेशिवाय दुसरी कुठलीही भाषा येत नव्हती आणि कुठलेही पदार्थ बुफेसारखे समोर मांडलेले नव्हते. त्या टेबलावर बसल्यानंतर माझे जे कोरियन यजमान होते, ते निघून गेले. मी एकटा उरलो! आणि 'आता तुम्हांला जर जिवंत राहायचं असेल तर कोरियन भाषेमध्येच ऑर्डर प्लेस केली पाहिजे', अशी परिस्थिती त्यांनी सहजगत्या निर्माण केली! माझी जी काही आकलनाची मर्यादा होती आणि भुकेल्या पोटाने जेवढी काही शब्दसंपदा मी आत्मसात केलेली होती, तिचा पुरेपूर उपयोग करून मी माझी जेवणाची ऑर्डर दिली आणि कोरियन भाषेतले काही पोटापुरते महत्त्वाचे शब्द आपण शिकलो आहोत या जाणिवेने सुखावलो. मग मी त्या यजमानांना असं विचारलं, (ते चांगले निष्णात प्रोफेसर होते) ''काय हो तुमचा हा प्रकार?'' तर ते म्हणाले, ''सर, तुम्हांला सांगतो की परकी भाषा डोक्याने शिकता येत नाही, ती पोटातून शिकावी लागते.'' परकीय लोकांमध्ये आपली भाषा रुजवण्याची त्यांची जी पद्धत आहे, त्यामागचा मनोवैज्ञानिक अभ्यास बघून मी चकित झालो. मग मला उमजलं, की या देशातल्या अगदी सर्वसामान्य लोकांनी ज्ञानाच्या क्षेत्रात एवढी मोठी मजल कशी मारली ते. साठसत्तर वर्षांपूर्वी अप्रगत असलेले हे देश आज तंत्रज्ञानाच्या बाबतीमध्ये स्वभाषेतून कार्यरत होणाऱ्या 'स्मार्ट सिटीज' उभारतात आणि आम्हांला त्यांच्या जवळपास पासंगाला पुरता येत नाही. आम्ही सुपरकॉम्प्युटिंगमध्ये खूप मोठं काम केलेलं असल्यामुळे अर्थातच मी एका आत्मविश्वासाने गेलो होतो, की या प्रगत देशामधील मुलांना मी भारतामध्ये प्रगत तंत्रज्ञान शिकवणार आहे. त्याप्रमाणे त्या मुलांना भारतात आणलंही. परंतु त्यांना आणण्यातला प्रवास मला त्या देशाने त्यांच्या भाषेतून करायला भाग पाडलं. आपल्या भाषेवर किती अविचल निष्ठा असावी, किती प्रेम असावं व तिच्या अपरिहार्यतेचा किती ध्यास घ्यावा याचं ते उत्कृष्ट उदाहरण आहे. सौदी अरेबियामध्येही आमचा अनुभव असाच आहे.

सौदी अरेबियामध्ये ज्यावेळी मी गेलो, त्यावेळी अर्थातच त्यांनी मला सांगितलं, ''हे सगळे तुमचे तंत्रज्ञान शिक्षणाचे उपक्रम अरेबिकमध्येच व्हायला पाहिजेत.'' मला असं वाटलं होतं, की आमचं सर्व शैक्षणिक इ-साहित्य अरेबिकमध्ये भाषांतरित करायचं म्हणजे आपल्याला फार मोठा त्रास आहे. पण अरेबिक स्कॉलर्सनी काही दिवसांच्या आत आमचा सबंध इलर्निंग कन्टेन्ट त्यांच्या प्रमाणभाषेत भाषांतरित करून माझ्यासमोर हजर केला. ते म्हणाले, ''आमची मुलं शिकतील तर अरेबिकमधूनच शिकतील.'' डावीकडून उजवीकडे वाचणाऱ्या-लिहिणाऱ्या आम्हांला उजवीकडून डावीकडे जाण्याची पाळी आली! वेबडिझाइन करतानासुद्धा सगळ्या लिंक्स आम्हांला उजवीकडून डावीकडे जाणाऱ्या कराव्या लागल्या. ते त्यावेळी फारसं सहजसाध्य नव्हतं. म्हणजे आपल्या लक्षात येईल, की सर्वसामान्य लोकांना नव्या ज्ञानाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी सुबोध व सुलभ अशा स्वभाषेच्या वापराची एक प्रकारची सर्वंकष रणनीती त्या देशांनी स्वीकारली, हे त्यांचं फार मोठं अनुकरणीय वैशिष्ट्य आहे.

MKCLच्या MS-CIT या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील जवळ जवळ ८५ लक्ष जिज्ञासूंना आम्ही संगणक साक्षर करण्याचा प्रयत्न केला. गावोगावी शिकवलं. गडचिरोलीच्या दुर्गम भागातही आमची केंद्रं आहेत. आपल्याला आश्चर्य वाटेल, की या सगळ्या सुमारे ४५०० केंद्रांमध्ये ८५ लाख विद्यार्थ्यांपैकी ५० लाखांहून अधिक विद्यार्थी मराठी भाषेमधून संगणक वापरायला शिकले. त्यांना आधुनिक तंत्रज्ञान मराठी भाषेमधून शिकवलं गेलं. आमच्या अभ्यासक्रमाचा सबंध आशय जर जवळून बघितला, तर एक अतिशय सुबोध अशी मराठी भाषा आधुनिक माहिती तंत्रज्ञान शिकवण्यासाठी अत्यंत आकर्षक अशा पद्धतीने आपल्यासमोर येते आणि आपल्याला आपल्या भाषेचा अभिमान वाटतो.

इतकंच नव्हे तर MKCLच्या सर्व ४५०० केंद्रांमध्ये ज्यांना संगणक वापरता येतो, अशा सर्व व्यक्तींसाठी आयटीत मराठी हा दोन तासांचा उपयुक्त अभ्यासक्रम केवळ १०० रुपये शुल्कात उपलब्ध करण्यात आला आहे. सर्व आयटी टूल्समध्ये मराठी भाषा कशी वापरायची ते शिकण्याचा हा सुलभ अभ्यासक्रम आहे.

पण बहुजनांना सुलभ अशा प्रमाण स्वभाषेतून आधुनिक ज्ञानाच्या उपासनेत रममाण करण्यासाठी जे मनापासून प्रयत्न व्हायला पाहिजेत, तसे MKCLसारखे सातत्यपूर्ण व व्यापक प्रयत्न कमी आणि क्षीण आहेत.

दुसरा तितकाच महत्त्वाचा भाग असा, की कुठल्याही भाषेला जर आज पुढे जायचं असेल तर ती केवळ साहित्याची आणि काव्याची भाषा असणं पुरेसं नाही, तसंच ती केवळ बोलीभाषा असणं पुरेसं नाही, तर ती ज्ञानभाषा असायला पाहिजे. स्वभाषेतून नवीन ज्ञानाची निर्मिती, जुन्या ज्ञानाशी तिची जोड, नव्या आणि जुन्या ज्ञानाचा मेळ घालत वाढत जाणारा जो स्वभाषेतला ज्ञानसाठा आहे त्याचं समाजाच्या सर्व स्तरांमध्ये तत्काळ मुक्त वितरण, तसंच आर्थिक व सामाजिक विकासासाठी या ज्ञानाचं सर्वसामान्यांनी सातत्यानं केलेलं उपयोजन या बाबी महत्त्वाच्या आहेत. कारण आर्थिक-सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी स्वभाषेतल्या ज्ञानाचा वापर करता येण्याच्या संधी सर्वसामान्य समाजाला कितपत आहेत, यावरून त्या भाषेचं भवितव्य स्पष्ट होतं. केवळ साहित्य, कला आणि संस्कृती यांची किंवा करमणुकीची भाषा राहून तिचं भविष्य उज्ज्वल राहतंच असं नाही. विज्ञान तंत्रज्ञान अरेबिकमध्ये शिकवायचं असेल किंवा चायनीजमध्ये शिकवायचं असेल, तर त्यांच्याकडे सर्व शब्दसंपदा उपलब्ध आहे. तंत्रज्ञानातला अगदी प्राथमिक भाग जरी शिकवत असलात, तरी त्याला प्रतिशब्द आमच्याकडे नाहीत म्हणून अनाकलनीय अशा प्रमाणभाषेतील शब्दांनंतर कंसात आम्ही इंग्रजी शब्द छापू, अशी वेळ त्या समाजांवर येत नाही. प्रगत ज्ञानक्षेत्रातलीसुद्धा सुलभ शब्दसंपदा त्या भाषांकडे आहे. पण आमच्याकडे ठायी ठायी इंग्रजी शब्द वापरावे लागतात. आम्हांला त्याचं तत्त्वज्ञान करावं लागतं. मग आम्ही असं म्हणतो, की ग्रामीण मराठी जनतेसाठी संगणक हा इंग्रजी शब्द आहे आणि कंम्प्यूटर हा मराठी शब्द आहे! हे आम्हांला सांगावं लागतं याचं कारण आम्ही आमच्या भाषेला सुलभ अशी ज्ञानभाषा बनवण्यात कमी पडत आहोत.

✦

समाजातल्या सर्वांत तळातल्या स्तरामधला हा मुलगा, भाषेचं कुठलंही बंधन नसल्यामुळेच एका श्रेष्ठ शास्त्रज्ञाची भाषणं लिहू शकतो; शोध लावू शकतो; ते जाहीररीत्या मांडू शकतो; नुसतंच बुक-बाइंडिंग करत बसत नाही. आमच्या समाजात जर असा एखादा मायकेल फॅरेडे जन्माला आला असता, तर तो सुरुवातीला बुकबाइंडर असता आणि शेवटी बुकबाइंडर म्हणूनच रिटायर झाला असता! याचं कारण त्या शास्त्रज्ञाची भाषा आणि या बाइंडरची भाषा यांचा काही मेळच नाही, संबंधच नाही. त्यामुळे वैज्ञानिक व्यवहारात ज्ञानाच्या पातळीवर बहुजनांनी सहभागी होण्याचा प्रश्नच नाही. भारतातील वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये आजही हेच चित्र कायम आहे.

✦

इतिहास बघितला तर एकेकाळी मोठ्या प्रमाणात धातूंमध्ये काम करणारे आमचे कारागीर होते, आमच्याकडे नवीन वास्तुरचना करणारे कितीतरी असे उत्तम कारागीर होते, की ज्यांनी ताजमहालसारख्या आश्चर्यजनक वास्तू बांधल्या, कैलाससारखी जगाला आकर्षित करणारी अद्वितीय लेणी कित्येक पिढ्यांनी पुढच्या पिढीकडे ज्ञान संक्रमित करत करत बांधली. पण अशा लोकांना आम्ही समाजाच्या मुख्य ज्ञानप्रवाहामध्ये वैज्ञानिक किंवा तंत्रज्ञ म्हणून प्रतिष्ठा दिली नाही. त्यांची, तसेच कोट्यवधी शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची, बलुतेदारांची जी कामाची, व्यवहाराची ज्ञानभाषा होती, तिला आम्ही अभिजनांच्या भाषेमध्ये प्रवेशच दिला नाही, मानाचं स्थान दिलं नाही. श्रमाधिष्ठित अशा त्या सर्व व्यवहारांसंबंधी व त्यातील जिवंत अशा ज्ञानभाषेसंबंधी अभिजनवर्गानं उदासीनता किंवा तिरस्कार दर्शवला. परा विद्यांची भाषा अभिजनांची व अपरा विद्यांची भाषा बहुजनांची, अशी दरी निर्माण झाली. जगात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अपरा विद्यांचा उदय ज्या १९व्या व २०व्या शतकात झाला व त्या विकासाच्या स्रोत बनल्या, त्या काळात आमच्या अभिजनवर्गाच्या भाषा त्या विद्यांच्या व्यवहाराला अपरिचित असल्यामुळे कालबाह्य ठरल्या व इंग्रजीची अपरिहार्यता अधोरेखित झाली. अभिजन व बहुजनांच्या अनुक्रमे डोक्याच्या व हाताच्या व्यवहारांमधली दरी अखेरीस आमच्या प्रमाणभाषेला अगदी नैसर्गिकपणे आणि दैनंदिन लोकव्यवहारातून विज्ञान-तंत्रज्ञानाची परिभाषा निर्माण करण्यासाठी सक्षम ठेवू शकली नाही. प्रमाणभाषा बनवण्याची मक्तेदारी अभिजनांकडे एकवटल्यावर दुसरे काय होणार? इतर अनेक देशांनी नेमकी ही चूक करण्याचं टाळलं. प्रत्यक्ष वैज्ञानिक आणि तंत्रवैज्ञानिक व्यवहार जे करत होते व त्या लोकांची जी रोजची व्यवहाराची भाषा होती, तीच थोडेफार उचित संस्करण करून प्रमाणभाषेच्या रूपात त्यांच्या आजच्या वैज्ञानिक शब्दकोशांमध्ये आहे. हा केवढा मोठा फरक आहे!

चौथी नापास झालेला, एक गरीब तरुण हा विख्यात शास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही ('डेव्हीचा रक्षकदीप'वाले) यांचा बुक बाइंडर होता. एक दिवस सर हंफ्रे त्याला म्हणाले, ''तू माझ्या व्याख्यानांचं बुकबाइंडिंग करतोस, अलीकडे माझी व्याख्यानंसुद्धा ऐकून स्वतः लिहितोस, तर तू आता माझ्या प्रयोगशाळेमध्ये प्रयोगपण कर.'' आाणि मग दुपारच्या जेवणाची भ्रांत होती अशा घरातला हा मुलगा, त्या प्रयोगशाळेत प्रयोग करू लागला आणि कालांतराने त्याने एक विलक्षण शोध लावला. त्या वेळेला हंफ्रे डेव्ही त्याला म्हणाले, ''तू रॉयल सोसायटीपुढे भाषण कर. तुझा हा शोध सर्व शास्त्रज्ञांपुढे मांड.'' मग त्याने आपला इलेक्ट्रोमॅग्नेटिक इन्डक्शनचा शोध मांडला, की ज्याच्यामुळे पृथ्वीवर आज रात्रीसुद्धा दिवस करता येतो. हे दिवे ज्याच्या संशोधनामुळे लागतात, तो मुलगा इंग्लंडच्या रॉयल सोसायटीमध्ये सर्वांच्या समोर येतो, आणि आपला संपूर्ण शोध हा प्रयोगाच्या साहाय्याने मांडून दाखवतो! त्यावेळेला समोर कोण बसलेले असतात? तर ब्रिटनचे अर्थमंत्री, चॅन्सलर ऑफ एक्सचेकर! ते त्याला विचारतात, ''याचा काय उपयोग आहे? लोहचुंबक तारेच्या वेटोळ्यातून पुढे मागे हलवलं

की करंट निर्माण होतो व मीटरमधला काटा हलतो. पुढे काय?'' त्यावेळेला हा मुलगा आत्मविश्वासाने सांगू शकतो, ''सर, एका नवजात अर्भकाचा असा काय उपयोग असतो?'' आणि मग थांबून तो अर्थमंत्र्यांना एकदम म्हणतो, ''काय सांगावं सर, उद्या कदाचित ह्या शोधामुळे तुम्हांला निरनिराळ्या प्रकारचे कर गोळा करता येतील!'' आणि पुढे तसंच झालं. आजदेखील तुम्ही तुमच्या घरी येणारं MSEBचं बिल उघडून बघा, त्याच्यात कितीतरी अधिभार आणि कितीतरी कर आकारलेले तुम्हांला दिसतील!

सांगायची गोष्ट अशी, की समाजातल्या सर्वांत तळातल्या स्तरामधला हा मुलगा, भाषेचं कुठलंही बंधन नसल्यामुळेच एका श्रेष्ठ शास्त्रज्ञाची भाषणं लिहू शकतो; शोध लावू शकतो; ते जाहीररीत्या मांडू शकतो; नुसतंच बुक-बाइंडिंग करत बसत नाही. आमच्या समाजात जर असा एखादा मायकेल फॅरेडे जन्माला आला असता, तर तो सुरुवातीला बुकबाइंडर असता आणि शेवटी बुकबाइंडर म्हणूनच रिटायर झाला असता! याचं कारण त्या शास्त्रज्ञाची भाषा आणि या बाइंडरची भाषा यांचा काही मेळच नाही, संबंधच नाही. त्यामुळे वैज्ञानिक व्यवहारात ज्ञानाच्या पातळीवर बहुजनांनी सहभागी होण्याचा प्रश्नच नाही. भारतातील वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये आजही हेच चित्र कायम आहे.

हे असं होण्याची कारणं जर आपण भारताच्या इतिहासामध्ये बघितली, तर आपल्या असं लक्षात येतं, की आमची राजभाषा ही नेहमी लोकभाषेपेक्षा वेगळी राहिलेली आहे. आमची राजभाषा एकेकाळी संस्कृत होती, त्याच्यानंतर ती पर्शियन झाली आणि त्याच्यानंतर ती इंग्लिश झाली. मग इंग्रज गेले तरी आमची राजभाषा मात्र इंग्लिशच राहिली! राजभाषा एक आणि लोकभाषा वेगळी हा प्रकार भारतात घडला. त्यामुळे भारतामध्ये तुम्ही अभिजन आहात ही तुमची ओळख, ही तुम्हांला किती ज्ञान आहे, तुम्ही किती सुसंस्कृत आहात, यावरून ठरत नाही, तर तुम्ही अभिजन आहात याची ओळख, ही तुम्ही सफाईदार इंग्रजीत बोलता की नाही यावर ठरते. आम्ही बहुजनांच्या मनांमध्ये एक प्रकारची अशी भावना आणि रुखरुख निर्माण केली की, 'तुम्ही नॉन एलिट आहात, कारण तुम्ही स्वभाषेमध्ये व्यवहार करता. तुम्हांला इंग्रजीमध्ये व्यवहार करता येत नाहीत. आणि जर तुम्हांला अभिजन व्हायचं असेल, तर इंग्रजीच्या राजमार्गावरूनच तुम्हांला ते होता येईल.' हा लेख जरी तंत्रज्ञानाच्या संदर्भात असला, तरी त्यातील प्रश्न खरं म्हणजे आपल्या समाजाच्या अभिजनांच्या व्याख्येमध्ये दडलेला आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. त्यामुळे मला जर आता अपवर्ड मोबिलिटी हवी असेल (वरच्या सामाजिक स्तरात संक्रमण करायचं असेल), तर मी एखाद्या विषयामध्ये, एखाद्या व्यवहारामध्ये, एखाद्या तंत्रामध्ये किंवा एखाद्या कौशल्यामध्ये पारंगत व्हायला पाहिजे असं नाही, तर मला सफाईदार इंग्रजी यायला पाहिजे, असा दृढ समज आम्ही निर्माण केला. ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील प्रवेशांचं सातत्यानं वाढणारं प्रमाण आमच्या अभिजनांच्या उफराट्या व्याख्येची परिणती आहे. म्हणून हा झगडा हा इंग्रजी विरुद्ध मराठीचा नाही. हा झगडा बहुजनांना मुख्य प्रवाहात आणायचं की नाही, असा आहे. चुकून त्याला भाषिक स्वरूप दिलं जातं, ते त्याचं अतिशय मिथ्या असं स्वरूप आहे. जर आमचे वैज्ञानिक, तंत्रवैज्ञानिक, राजकीय, आर्थिक, प्रशासकीय व्यवहार लोकभाषेतून झाले, तर समाजातल्या सर्वांत तळातल्या माणसालासुद्धा ही शिडी फार चटकन चढता येईल. पण हे आम्हांला करायचंय का, हा खरा कळीचा प्रश्न आहे!

आता आपण तंत्रज्ञानाकडे येऊ या. माहिती तंत्रज्ञानाची दिशा काय आहे? त्याची दिशा अशी आहे, की एकाच वेळी ती कोट्यवधींना स्पर्श करू शकते. म्हणूनच मोबाइल फोन सगळ्यांच्या खिशात आला – त्यांना इंग्रजी येवो वा न येवो. भारतामध्ये ८० कोटी लोकांच्या खिशामध्ये मोबाइल फोन आला. त्यांना समजेल अशा स्वभाषेत त्यांना तो बोलण्याऐकण्यासाठी वापरता येतो. तसेच, मराठी भाषा आणि देवनागरी लिपी आता संगणकावर सहज वापरण्यासाठी उपलब्ध आहे.

माहिती तंत्रज्ञान उद्योगानं असाच विचार केला, की जगातल्या पंधराव्या नंबरचे हे लोक आहेत; त्यांना कम्प्यूटरवर मराठीचा वापर करता आला नाही तर आमचं तंत्रज्ञान त्या बाजारपेठेत खपणारच नाही. म्हणून युनिकोडवर मराठी आणली गेली. मग त्याप्रमाणे सर्व संगणक-उत्पादकांनी ते प्रमाण म्हणून स्वीकारलं. त्याच्यामुळेच जागतिक बाजारातला कुठलाही संगणक हा आज मराठी भाषेत सहज वापरण्यासाठी सिद्ध आहे. म्हणजे तंत्रज्ञान हे तुम्हांला एक प्रकारचं व्यासपीठ देतं आहे, प्रश्न आमच्या मानसिकतेचा आहे. तंत्रज्ञानाचं मराठीवर आक्रमण होतंय इत्यादी गळेकाढू वल्गना दिशाभूल करणाऱ्या आहेत.

दुसरी गोष्ट – तंत्रज्ञान स्वस्त झालेलं आहे. सर्वदूर त्याची उपलब्धता वाढते आहे. त्याला लागणारी विद्युतऊर्जा कमी कमी होत चाललेली आहे. पण ते देत असलेली कंप्यूटिंग पॉवर मात्र वाढत चाललीय. त्याच्यामुळे तुमच्याकडे लोडशेडिंग असलं, तरी तुम्हांला ते दीर्घकाळ बॅटरीवर वापरता येईल अशी सुविधा आज आहे. त्याचबरोबर ते तुमच्या भाषेमधून तुम्हांला वापरता येतंय. त्यामुळे भावनिकदृष्ट्या खोलवरचा असा एक व्यक्तिगत अनुभव तुम्हांला त्याच्यामध्ये घेता येऊ शकतो, तुम्ही त्याच्यातून तुमचे ब्लॉग्ज लिहू शकता, इ-बुक्स प्रकाशित करू शकता, तुमच्या भावनांचं, विचारांचं अभिसरण करू शकता. सर्वसामान्य गरीब मराठी लोकांच्या दृष्टीने तंत्रज्ञानाने दिलेली ही फार मोठी गोष्ट आहे. ज्ञानाचे स्रोत जर मराठीत असतील तर तंत्रज्ञान ते बहुजनांपर्यंत पोहोचवायला सज्ज आहे.

इजिप्तमधल्या स्त्रिया ज्यावेळी घरोघरी अरेबिकमध्ये कम्प्यूटर वापरू लागल्या आणि फेसबुकवर एकमेकीला भेटू लागल्या, त्यावेळेला त्या बायकांनी आपल्या नवऱ्यांना रस्त्यावर ढकललं. त्यांच्या मागोमाग त्याही आल्या आणि इजिप्तमध्ये सत्तांतर होणं अपरिहार्य झालं. म्हणजे एक तंत्रज्ञान किती वेगळी परिमाणं हुकूमशाहीनं दडपलेल्या समाजाला देऊ शकतं, हे इजिप्तने आम्हाला दाखवलं. 'संघटनेशिवाय संघटन' (Organizing without organization) हा एक नवा चमत्कार तिथे तंत्रज्ञानामुळे घडला. जे सर्वसामान्य लोक कैरोच्या तेहरीर चौकामध्ये आले होते, त्यांची २१व्या शतकातली एक अतिशय अभिनव फॉर्म असलेली अदृश्य संघटना त्यापूर्वीच फेसबुकवर

तयार झाली होती. तिच्यामुळे ते तिथे आले. नाहीतर त्यांना माहितीसाठी फक्त सरकारी मालकीची एकांगी प्रसारमाध्यमंच उपलब्ध होती. ते एका हुकूमशाहीतले नागरिक होते. म्हणजे तंत्रज्ञान आज किती इक्वलायझिंग (समानता आणणारं) होऊ शकतं याचा एक पुरावा आम्हांला अलीकडेच मिळाला.

आमच्याकडे स्वभाषेतून असं परिवर्तन वगैरे सोडाच, प्राथमिक शिक्षणसुद्धा मिळेनासं होतंय. इंग्रजीचा प्रभाव आमच्या शालेय शिक्षणावर वाढत असला तरी त्यातील इंग्रजी अध्यापनामध्ये एक मूलभूत चूक झालीय. ज्या पद्धतीने आमच्या शाळांमध्ये इंग्रजी शिकवलं जातं, ती भाषा शिकवण्यासाठी अत्यंत अशास्त्रीय अशी पद्धत आहे. आमच्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी हा विषय संभाषणकेंद्री नसून व्याकरणकेंद्री बनवण्यात आला आहे आणि शिक्षक सामान्यतः इंग्रजीतून बोलून तो कधीच शिकवत नाहीत. ते मुलांशी मराठीत बोलतात, म्हणून मुलंही इंग्रजी बोलू शकत नाहीत. याउलट इंग्रजी माध्यमांच्या कॉन्व्हेंट व तत्सम शाळेतले शिक्षक इंग्रजीत बोलतात, म्हणून ती मुलंही इंग्रजी बोलायला शिकतात. नव्यानं पेव फुटलेल्या तथाकथित इंग्रजी माध्यमाच्या तसंच सेमीइंग्लिश शाळांतील बहुसंख्य शिक्षकांना सफाईदार इंग्रजी बोलता येत नाही, त्यामुळे ते मराठीचा वापर करतात व शाळेतील एकूण पर्यावरण अर्धवट मराठी व अर्धवट इंग्रजी राहिल्याने तेथील मुले धड इंग्रजी बोलू शकत नाहीत व धड मराठीही बोलू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास खच्ची होतो आणि त्यांची भाषिक बुद्धिमत्ता या भाषिक गोंधळाच्या संभ्रमात निकृष्ट ठेवण्याचा गुन्हा आम्ही करत राहतो. ज्ञानयुगाकडे झेप घेऊ पाहणाऱ्या भारताला सुमार भाषिक बुद्धिमत्तेच्या प्रचंड संख्येच्या पिढीमुळे मोठी किमत मोजावीच लागेल.

ही मुलं केवळ काही इंग्रजी शब्द आत्मसात करतात, पण मग त्यांच्या वाक्यरचना ह्या मराठी वळणाच्या असतात किंवा मराठी असतात आणि त्याच्यात काही शब्द तेवढे इंग्रजी असतात. सर्वसामान्य मराठी घरांमधली मुलं 'ब्लू जीन वर रेड टीशर्ट मॅच होतो' अशा प्रकारची वाक्यं मराठी भाषेमध्ये बोलतात! म्हणजे मोठ्या प्रमाणात इंग्रजी शब्दांचा वापर हा आम्ही मराठी भाषेचा बाज कायम राखून आता करतो. आता तर ती फॅशन झाली आहे. त्याचं सर्वात उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आमचे एफएम रेडिओ चॅनेलवरचे रेडिओ जॉकी. ते एकाच वेळी मराठी, हिंदी, इंग्रजीची इतकी बेमालूम सरमिसळ करतात, की मी स्वतःमध्ये न्यून समजतो, की मला तशी भाषा बोलता येत नाही! इंग्रजीपासून पिढ्यानुपिढ्या वंचित राहिलेल्या व इंग्रजीच्या बेसुमार प्रभावामुळे गोंधळून गेलेल्या लोकांचा अभिजनवर्गाकडे सरकण्याचा प्रवासही अशाच मिश्र भाषेच्या वाटेने जातो आहे हे आपण लक्षात घ्यायला हवं.

आज कितीही ग्रामीण भागातला मुलगा असला तरी त्याला अनेक इंग्रजी शब्द आत्मसात करणं भाग पडतं, कारण त्याच्यापाशी समानार्थी असे, बोलायला-लिहायला सोपे, साधे, छोटे, चपखल, अर्थवाही असे मराठी शब्दच अस्तित्वात नाहीत. दैनंदिन व्यवहारासाठीच्या संवादाची सोय ही तर कुठल्याही भाषेकडून प्राथमिक अपेक्षा असते. प्रमाण मराठी आज ही प्राथमिक अपेक्षाही पूर्ण करत नाही. कारण प्रमाणभाषेची निर्मिती करण्याचा हक्क राखणारा अभिजनवर्ग आपले व्यवहार इंग्रजीत करण्यात तरबेज आणि मशगुल आहे. खेड्यातला मुलगासुद्धा 'मोबाइलवर टॉप-अप' घेताना म्हणतो की, ''अनलिमिटेड टॉक टाइम फ्री असायला हवा.'' कारण ह्याचे समानार्थी सोपे शब्दच आमच्याकडे नाहीत. त्यामुळे हा वर्ग आपल्या दैनंदिन गरजेपोटी एका मिश्र भाषेची निर्मिती करतो आहे. ही एक चिंतेची बाब आहे. कारण या प्रकारामुळे ही पिढी एकीकडे स्थानिक व जागतिक पातळीवर निखळ इंग्रजीत व्यवहार करू शकत नाही आणि दुसरीकडे मराठी ही लोकाभिमुख अशी ज्ञानभाषा म्हणून विकसितही होत नाही.

अशा परिस्थितीत अभिजानांकडून लोकाभिमुख अशा प्रमाणभाषेची निर्मिती होईल अशी भाबडी आशा बाळगण्यात अर्थ नाही. आता सर्वसामान्य लोकांनीच लोकांसाठी लोकांची प्रमाणभाषा बनवण्याची गरज आहे. विकिपीडियाप्रमाणे सर्वसामान्य मराठमोळ्या लोकांना, माहिती तंत्रज्ञानाचा सामूहिक सहभागी वापर करून, आपली लोकाभिमुख अशी (समांतर) प्रमाणभाषा व ज्ञानभाषा बनवणे व रूढ करून दाखवणे शक्य आहे.

माहिती तंत्रज्ञानामध्ये भाषेविषयी आता एक नवीनच गोष्ट घडते आहे आणि ती आपण नीट समजून घेतली पाहिजे. मज्जाशास्त्राचा अभ्यास जसा पुढे गेला तसं आपल्या लक्षात आलं, की माणसाच्या मेंदूमध्ये भाषेसंदर्भात दोन केंद्रं असतात – एक भाषा आकलनाचं केंद्र आणि दुसरं भाषा व्यक्त करण्याचं केंद्र. सर्व मानवांच्या मेंदूमध्ये भाषिक बुद्धिमत्तेची हीच दोन केंद्रं असतात. म्हणजे ज्या भाषा मनुष्य निर्माण करतो त्यांच्या उगमाच्या व विकासाच्यामागे हीच दोन केंद्रं आहेत हे लक्षात येईल. ह्या दोन केंद्रांचा अभ्यास हा आता खूप वेगळ्या दिशेने चालू आहे. आणि तो असा आहे, की सर्व भाषाभगिनींमध्ये व्याकरणदृष्ट्या साम्यस्थळं काय आहेत? ह्याच दोन केंद्रांनी आकलन होण्याचं व व्यक्त करण्याचं सर्व काम होत असेल, तर मग त्यांच्या मदतीने तयार झालेल्या भाषांमध्ये बरंचसं मूलभूत साम्य असायला पाहिजे. ते शोधणं आणि त्याचा भाषांतराचं तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी उपयोग करणं ही आता संशोधनाची दिशा आहे.

मग त्याचा उपयोग करून आम्ही काय करणार आहोत? तर टेलीफोन कंपन्या अजून दहा-वीस वर्षांच्या आत अशी एक तांत्रिक व स्वयंचलित सेवा देतील, की वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक त्या सेवेच्या माध्यमातून आपापल्या भाषांमध्ये बोलू शकतील व ते इतरांनाही त्यांच्या-त्यांच्या भाषांमध्ये त्याच वेळी आपोआप भाषांतरित होऊन ऐकू येऊ शकेल. ह्याला 'रिअल टाइम व्हॉइस/लँग्वेज ट्रान्सलेशन टेक्नॉलॉजी' असं संबोधलं जातं. माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं आपोआप आणि प्रचंड वेगानं सध्या होत असलेल्या संगणक किंवा मोबाइल फोनवरील लिखित मजकुराच्या लिप्यंतराच्या (transliteration) आणि भाषांतराच्या (translation) फार

फार पुढची ही झेप आहे. ज्या संशोधनासाठी आत्ता मोठ्या प्रमाणात रिसर्च फंडिंग होतं, त्या गोष्टींचे दहा-वीस वर्षांत तंत्रज्ञानात मेगाट्रेंड (महाप्रवाह) होतात. तुमच्या खिशात आज जो मोबाइल फोन आहे, त्याच्या तंत्रज्ञान विकासासाठी १९८०च्या दशकामध्ये फार मोठ्या प्रमाणात रिसर्च फंडिंग दिलं गेलं होतं. म्हणून तुमच्या खिशात आज प्रगत तंत्रज्ञानावर चालणारे मोबाइल फोन आहेत. मग आज कशाला रिसर्च फंडिंग दिलं जातंय? तर या ऑनलाइन भाषांतर तंत्रज्ञानाच्या संशोधनाला. कारण आम्हांला आमच्या टेलीकॉम कंपनीतर्फे आमच्या ग्राहकांना ही एक अभिनव सेवा द्यायची आहे, कारण आमचं मार्केट ग्लोबल करायचं आहे. आणि आम्हांला तर हे माहिती आहे, की आमचे जे मराठी बांधव आहेत, किंवा अनेक देशांतले अनेक स्थानिक भाषा बोलणारे जे बांधव आहेत, त्यांतले १०%पेक्षा अधिक लोक इंग्लिश शिकू शकणार नाहीत. तंत्रज्ञानातल्या लोकांना याची पूर्ण खात्री आहे. मराठी भाषेचं काय होणार, ती जगणार की नाही, कुठेतरी अस्तंगत होईल की काय, सगळेच इंग्रजीत बोलू लागतील की काय अशी काल्पनिक भीती निष्क्रिय विद्वान व्यक्त करत असतात. तंत्रज्ञानातल्या लोकांचे मार्केट सर्व्हे मात्र खूप स्ट्राँग असतात. त्यांना माहितीये, की ही मराठी भाषा कदाचित थोडीशी मिश्र होईल, पण ती अस्तित्वात राहणार आहे आणि कोट्यवधी मराठी माणसं तिचा वापर दैनंदिन जीवनात करणार आहेत. आणि तसं सगळ्याच भाषांचं होणार आहे.

तर मग तंत्रज्ञान कुठली दिशा घेतंय? फारच इन्टरेस्टिंग दिशा आहे. समजा, एक मराठी माणूस आहे, एक जॅपनीज माणूस आहे, एक रशियन आहे, एक कोरियन आहे, एक चायनीज आहे, एक इंग्लिश आहे, एक स्पॅनिश आहे – असे लोक, ज्यांना एकमेकांची भाषा येत नाही. पण आता एका कुठल्यातरी ग्लोबल अशा व्यवहारामध्ये ते परस्परांशी मोबाइल फोनवर कॉन्फरन्सद्वारे संभाषण करत आहेत. अशा वेळेला आमची टेलीकॉम कंपनी त्यांना असं म्हणणार आहे, की ''तुम्ही सर्व जण ही कॉन्फरन्स तुमच्या मोबाइलवरून करा. तुम्ही सर्व जण तुमच्या-तुमच्या मातृभाषांमधूनच बोलत राहा. तुम्ही ज्यांच्याशी कॉन्फरन्स करता आहात त्यांना त्यांच्या त्यांच्या मातृभाषांमध्ये रन-टाइम ट्रान्सलेशन, म्हणजेच तत्क्षणी भाषांतर, उपलब्ध होत राहील! काही सेकंदांची कदाचित गॅप असेलही, पण ती तुम्हांला कळणार नाही.'' सुरुवातीला ती भाषांतरं अगदी अचूक व परिपूर्ण नसतील, पण हळूहळू होत जातील आणि त्यामुळेच तर परस्परांच्या भाषा अवगत नसूनही हे लोक जागतिक व्यवहारात सहजतेनं पुढे जातील. कारण त्यासाठी तयार होत असलेलं सॉफ्टवेअर सेल्फ-इम्प्रूव्हिंग व सेल्फ-करेक्टिंग (स्वतःच स्वतःमध्ये आपोआप सुधारणा करणारं व चुकांची दुरुस्ती करणारं) असणार आहे, नॅनो टेक्नॉलॉजीमुळे ते अतिशय वेगवान अशा संगणकांवर व मोबाइल फोन्सवर चालेल व रिअल टाइम इफेक्ट आपल्याला बोली भाषांतराच्या स्वरूपात मिळेल.

सेल्फ-इम्प्रूव्हिंग आणि सेल्फ-करेक्टिंग सॉफ्टवेअरच्या निर्मितीची पहाट झालेली आहे. आता त्याच्या छोट्या छोट्या पाऊलखुणा आपल्याला दिसताहेत. डोकोमो कंपनीने आपल्या जपानी ग्राहकांना मोबाइलवरील संभाषणात जपानीतून इंग्रजीत व इंग्रजीतून जपानीत तत्काळ बोली भाषांतर सेवेची प्रायोगिक पातळीवर सुरुवात केली आहे व त्याचे निष्कर्ष उत्साहवर्धक आहेत.

त्यामुळे आपली भाषा जपण्याची, ती वाढवण्याची एक खूप मोठी संधी निर्माण होणार आहे. इंग्रजी भाषेतील वाङ्मयाचा जरूर अभ्यास करावा. चार्ल्स डिकन्स वाचू नका असं कोण म्हणेल? पण आमच्या प्रगतीच्या मार्गातला इंग्रजी भाषा हा अडसर ठरता कामा नये. तंत्रज्ञान तशा दिशेने प्रगत होतंय. मग या तंत्रज्ञानाच्या संदर्भात आमची मराठी मानसिकता कशी बदलली पाहिजे? ती कशी कालानुरूप होऊ शकेल? त्यासाठी प्रथम आपण बाजारात किंवा उपाहारगृहामध्ये गेल्यानंतर मराठीत बोलणं, शाळेत, महाविद्यालयात, कार्यालयात, कारखान्यात, न्यायालयात, सरकारी कार्यालयात, दवाखान्यात, इस्पितळात, रिक्षा-टॅक्सीमध्ये, बसमध्ये, आगगाडीमध्ये सर्वत्र मराठीत बोलणं, टेलिफोनवर, मोबाइल फोनवर मराठीत बोलणं, मराठीत चॅट करणं, एसेमेस, इमेल, ब्लॉग, ट्विटरवर, whatsapp वर मराठीत व्यवहार करणं, आपलं ज्ञान सोप्या मराठीत व्यक्त करण्याचा प्रयत्न सातत्यानं करणं, आणि आपल्या मुलांशी घरात मराठीत बोलणं, मराठीत जे जे काही श्रेयस्कर आहे त्याचा मनापासून अभिमानाने अंगीकार करणं, आस्वाद घेणं आणि मराठीमध्ये स्वतःला व्यक्त करणं हे महत्त्वाचं आहे असा संदेश आपल्या प्रत्यक्ष कृतीतून इतरांना देणं; इतर भाषकांना प्रेमाने मराठी शिकवणं; मराठी शिकण्यासाठी ई-लर्निंग सुविधा तयार करणं; मराठीसाठी ऑटोमॅटिक रिअल टाइम भाषांतराचं तंत्रज्ञान उपलब्ध होण्यासाठी आग्रह धरणं आणि हाती आल्यावर ते सतत वापरणं, स्वतःहून शिकणाऱ्या, स्वतःच्या चुका दुरुस्त करणाऱ्या व सुधारणा करत राहणाऱ्या अभिनव सॉफ्टवेअर प्रणालींवर ते अवलंबून आहे, हे लक्षात घेऊन आपण इतर भाषकांशी या तांत्रिक भाषांतर सेवेचा अधिकाधिक वापर करून, मराठीत जितकं जास्त बोलता येईल तितकं बोलून, आपल्या सामूहिक कृतीतून हे भाषांतर तंत्रज्ञान अधिकाधिक विश्वासार्ह बनवणं. त्यामुळे आपल्या मराठीचं भवितव्य आपण ती इतर मराठी भाषकांबरोबरील व्यवहारात किती वापरतो यावर जितकं अवलंबून आहे, तितकंच जगातल्या इतर भाषकांबरोबर तांत्रिक भाषांतर सेवेतून किती वापरतो यावरही अवलंबून असणार आहे.

आमचे ग्रामीण मराठी युवक व युवती नजिकच्या भविष्यकाळात त्यांच्या आयुष्याची १५ वर्षं इंग्रजी शिकण्यात वाया घालवूनही न्यूनगंडात राहण्यापेक्षा या तंत्रज्ञानामुळे स्वतःच्या मराठी भाषेत जागतिक बाजारपेठेत आत्मविश्वासाने व्यवहार करू शकतील. आजचं इंग्रजीचं जगाची संपर्क भाषा म्हणून असलेले स्थान आणि इंग्रजी माध्यमकेंद्री शिक्षण या दोन्ही गोष्टी कालबाह्य होण्याची घटिका समीप येत आहे!

जितक्या आत्मविश्वासाने आपल्या खेड्याच्या सीमांचं बंधन तोडून मोबाइल फोनवरून हे युवा आज आपल्या स्वभाषक गटात व्यवहार करतात, तितक्याच आत्मविश्वासानं ते स्वभाषेतूनच जगातल्या इतर भाषक गटांशीही त्यांच्या विकासासाठी जोडले

जातील. अशा पद्धतीची आपली एक रणनीती यापुढे सर्व मराठी भाषकांनी एकत्र येऊन कृतीत आणली पाहिजे. तरच तंत्रज्ञान आपल्या मराठी बाजारपेठेला अनुकूल होईल. त्यासाठी खास 'मराठी' असा ग्राहकवर्ग असलेली बाजारपेठ निर्माण करायला हवी व वाढवायला हवी.

परंतु सर्वसामान्य लोक वरती आले तर, आपल्यावर आपत्ती येईल, असं काही अभिजन समजतात. त्यांच्यामुळे आमची 'स्पेस' कमी होईल असं त्या अभिजनांना वाटतं. हा विचार खरं तर ज्यावेळेला समाज हा शेतीप्रधान व्यवस्थेमध्ये होता, तेव्हा ठीक होता. याचं कारण, शेती करण्यासाठी असलेली पृथ्वीवरची जमीन ही मर्यादित आहे. तिची वाटणी जर जास्त लोकांमध्ये झाली, तर माझ्या वाट्याला येणारी जमीन कमी होणार आहे. पण हा विचार ज्ञानयुगामध्ये सयुक्तिक ठरत नाही. याचं कारण, प्रत्येक जण नवीन ज्ञाननिर्मिती व त्यातून संपत्तिनिर्मिती व मूल्यनिर्मिती करू शकला, आणि तशा कर्मशील ज्ञानाचं आदानप्रदान जर आम्ही सहजासहजी करू शकलो, तर ज्ञानाचा व त्यातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा विस्तार पृथ्वीच्या क्षेत्रफळाशी सबंधित नाही हे लक्षात येईल. त्यामुळे आता सगळ्याच समाजाला वर येण्यासाठी फार मोठा अवसर आहे, अवकाश आहे आणि सगळ्यांच्या उन्नतीसाठी संधी आहे. एकाची उन्नती झाली असता दुसऱ्याची अवनती होते अशी जी स्थिती शेतीप्रधान व्यवस्थेमध्ये होती, ती आता बदलते आहे. ज्ञानप्रधान व्यवस्थेमध्ये 'विन-विन' अशी परिस्थिती सहज शक्य आहे आणि त्याच्यामुळे एक नवा जोडलेला समाज निर्माण करून ज्ञानयुगामध्ये आम्ही सगळेच पुढे जाऊ शकतो. कोणालातरी खाली दाबूनच, त्याचं शोषण करूनच, मला माझा विकास करता येतो, ही मानसिकतासुद्धा आम्हांला बदलायला पाहिजे. मग आम्हांला अभिजन आणि बहुजन असा वाद निर्माण करण्याची गरज पडणार नाही. खरं म्हणजे, सगळ्यांनाच आम्ही जर बरोबर घेऊन जाऊ शकलो तर एका विषमताविरहित समाजाची आणि राष्ट्राची निर्मिती आम्ही करू शकू. आज आमच्याकडे लांच्छनास्पद परिस्थिती अशी आहे, की भारतात कितीही तथाकथित आर्थिक विकास झाला – आर्थिक विकासाचा दर वाढला, तरी ८० कोटी लोक हे प्रचंड दारिद्र्याच्या विळख्यात राहतात, शोषित अवस्थेत राहतात. इतक्या भीषण अशा प्रकारचं जीवन ८० कोटी लोक जगताहेत याचं मूळ आमच्या त्या 'विन-लूज' मानसिकतेमध्ये आहे. नव्या ज्ञानयुगामध्ये आम्ही सगळ्यांना समृद्धीकडे घेऊन जाऊ शकतो. आम्ही जर ज्ञानाधिष्ठित अशी शेती करू लागलो, आम्ही जर ज्ञानाधिष्ठित असे उद्योगधंदे करू लागलो तर त्यांच्यातून निर्माण होणारी संपत्ती सर्वांना पुरेशी असू शकेल. त्यामुळे आमचा सर्वसामान्य विद्यार्थी, सर्वसामान्य कुटुंबातला मुलगा किंवा मुलगीही ह्या ज्ञानप्रधान संस्कृतीमध्ये किती लवकर सहभागी होईल हे आम्हांला बघावं लागेल. त्यामुळे ती व्यक्ती स्वतःही एका नवीन ज्ञानाच्या निर्मितीमध्ये रत होईल आणि एका नवीन दारिद्र्यमुक्त व विषमतामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी ती खूप महत्त्वाचं योगदान द्यायला तयार होईल आणि तेही तिच्या स्वभाषेतून.

✦

अभिजनांची मानसिकता जी बदलायची आहे ती समतेच्या दिशेने आपल्याला बदलायची आहे. ही आत्ता आपल्या पुढची फार महत्त्वाची प्राथमिकता आहे. भाषेचं त्याला फक्त आवरण आहे, हे आपण कृपा करून नीट लक्षात घ्या. नाहीतर खूप चुकीची रणनीती निर्माण होते. आम्ही 'मराठी पाट्या लावा' असं म्हणायला लागतो, कुणी बेरोजगार अमराठी युवक नोकरीसाठी उमेदवार म्हणून आला, तर त्याच्यावर जाऊन आम्ही हल्ले करतो. मला असं वाटतं, की खरा प्रश्न अगदीच वेगळा आहे आणि आपण जी रणनीती अवलंबतो ती कालबाह्य आहे किंवा एक प्रकारे गैरसमजूत करून देणारी आणि लोकांमध्ये विशिष्ट पद्धतीने फूट पाडणारी आहे.

✦

अभिजनांची मानसिकता जी बदलायची आहे ती समतेच्या दिशेने आपल्याला बदलायची आहे. ही आत्ता आपल्या पुढची फार महत्त्वाची प्राथमिकता आहे. भाषेचं त्याला फक्त आवरण आहे, हे आपण कृपा करून नीट लक्षात घ्या. नाहीतर खूप चुकीची रणनीती निर्माण होते. आम्ही 'मराठी पाट्या लावा' असं म्हणायला लागतो, कुणी बेरोजगार अमराठी युवक नोकरीसाठी उमेदवार म्हणून आला, तर त्याच्यावर जाऊन आम्ही हल्ले करतो. मला असं वाटतं, की खरा प्रश्न अगदीच वेगळा आहे आणि आपण जी रणनीती अवलंबतो ती कालबाह्य आहे किंवा एक प्रकारे गैरसमजूत करून देणारी आणि लोकांमध्ये विशिष्ट पद्धतीने फूट पाडणारी आहे. त्याच्यापासून आपण सावध राहायला पाहिजे. खरं तर आम्हांला मराठी पाटी लावण्याशिवाय गत्यंतरच राहिलं नाही पाहिजे; कारण सौदी अरेबियात जशी सर्वसामान्यपणे लोकांना अरेबिक भाषेशिवाय दुसरी भाषाच कळत नाही तसंच आपल्याकडेही मराठीचं होऊ शकेल. याचं कारण एकदा याची खात्री पटली, की ती ज्ञानभाषा आहे, ती विज्ञान तंत्रज्ञानाची भाषा आहे, तिच्यातून मला इतर सगळ्या जगातल्या लोकांशी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बोलता येतंय, व्यवहार करता येतायत, मग ते चिनी असोत, नाहीतर जॅपनीज असोत, मग मला इंग्रजीच्या पांगुळगाड्याची गरजच राहणार नाही. ह्या नव्या परिस्थितीकडे आपलं तंत्रज्ञान आपल्याला घेऊन जातंय. ही त्याच्यातली सर्वात आनंदाची बातमी आहे. म्हणजे सहिष्णुतेवर व प्रेमावर आधारलेल्या, भाषेच्या दऱ्या बुजवणाऱ्या आणि जगभर शांततामय सहजीवनाची निर्मिती करणाऱ्या दिशेला

तंत्रज्ञानाचा विकास चालू आहे.

शेवटी या सगळ्या विषयाविषयी ज्यांनी खूप पूर्वी दिग्दर्शन करून ठेवलं, अशा आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण यांच्या कोपरगावला केलेल्या भाषणातला एक उतारा उद्धृत करतो. ७ सप्टेंबर १९६७ला ते असं म्हणतात :

''मी इंग्रजी हटाववाला नसून, 'हिंदी पाहिजे' म्हणणारा आहे. पण त्याचबरोबर मी हेही सांगू इच्छितो, की आमच्या देशातले उच्च शिक्षण हे मातृभाषेतूनच झाले पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. आम्हांला समाजाच्या खालच्या थरापर्यंत शिक्षण पोचवायचे असेल, तर ते परक्या भाषेतून तेथपर्यंत जाणार कसे? आज किती लोकांना इंग्रजी येते? म्हणजे वर्तमानपत्रातील मथळे वाचण्यापुरते नव्हे, नव्या विषयाचा अभ्यास करून त्या ज्ञानाचा वापर करण्याइतके इंग्रजी किती लोकांना येते? चार टक्के लोकांनाही नाही. म्हणजे देशातले ९६ टक्के लोक ज्ञानाला पारखे राहिले आहेत असा याचा अर्थ होतो. हे काय शास्त्र आहे? आम्ही म्हणतो, की देशामध्ये आम्हांला लोकशाहीची वाढ करायची आहे. आम्हांला सामान्य माणसाला मोठे करायचे आहे. पण अशाने सामान्य माणूस मोठा होणार कसा? त्याची सुरुवातीची सगळी शक्ती जर परकीय भाषा शिकण्यात निघून गेली तर तो पुढे काय करणार? उच्च शिक्षण मातृभाषेतून दिले पाहिजे याला एक दुसरेही कारण आहे. क्रांती होऊन, सामाजिक उलथापालथ होऊन, एक नवीन तऱ्हेचे जीवन बनले असे हिंदुस्थानात फारसे कधी घडलेले नाही. याचे खरे कारण असे आहे, की सामान्य माणसापर्यंत महत्त्वाचा विचार किंवा ज्ञान आम्ही कधी जाऊच दिले नाही. ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षित राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा आम्हांला जनजीवन विकसित करायचे आहे असे आम्ही म्हणतो, तेव्हाही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल, तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल. ते होऊ देता कामा नये असे माझे स्वत:चे खंबीर मत आहे.''

मा. यशवंतरावांचे हे विचार आमच्या नाकर्तेपणामुळे आज तब्बल ४५ वर्षांनंतरही किती समर्पक, प्रासंगिक आणि मार्गदर्शक आहेत हे वेगळे सांगण्याची काय गरज आहे?

जाताजाता एक सांगेन, की आमचे जे भाषा विषयातले तज्ज्ञ आहेत किंवा साहित्यातले काही तज्ज्ञ आहेत, ते तंत्रज्ञानाचा भारी तिरस्कार करतात. पण आजच्या डिजिटल युगातले युवा आता डिजिटल तंत्रज्ञान वापरूनच त्यांचे बहुतेक सर्व दैनंदिन व्यवहार करणार आहेत. भाषा कुठलीही असो, भाषिक व्यवहारांसाठी तंत्रज्ञानाची अपरिहार्यता त्यामुळे नाकारून कशी चालेल? अशा परिस्थितीत आमच्या भाषेला खरं वैभव हे तिला तंत्रज्ञानाची भक्कम जोड दिल्यामुळेच प्राप्त होणार आहे.

यासंदर्भात एक मार्मिक आख्यायिका सांगून हा लेख तूर्तास संपवतो.

पॅरिस शहरामध्ये भरणाऱ्या एका जागतिक ट्रेड फेअरच्या निमित्ताने आर्किटेक्ट गुस्ताव आयफेलने 'आयफेल टॉवर' बांधायचं ठरवलं. त्यामुळे पॅरिस शहरातले सुमारे ३०० अभिजन त्याच्यावर भारी नाराज झाले. पॅरिस या आमच्या रम्य सांस्कृतिक नगरीत मध्येच कुठे हा असा लोखंडी राक्षसी सांगाडा बांधताय तुम्ही, अशी टीका ते आयफेलवर करायचे. त्याच्या बांधकामाला विरोध करायचे. ट्रेड फेअर जवळ जवळ येऊ लागली. आता काहीही करून हा मनोरा पूर्ण बांधून होणं आवश्यक होतं. कारण तो मनोरा हे ट्रेड फेअरचं प्रतीक होतं. पॅरिस जसं सांस्कृतिक क्षेत्रात संपन्न शहर आहे तसंच ते अभियांत्रिकीतही अग्रेसर आहे हे आयफेल जगाला दाखवू इच्छित होता.

गाय दि मोपासा (Guy de Maupassant) नावाचा प्रसिद्ध फ्रेंच लघुकथाकार गुस्ताव आयफेलच्या मनोऱ्याचा कट्टर विरोधक होता. तो आयफेल टॉवर या कल्पनेच्या इतकं विरोधी लेखन प्रसिद्ध करीत असे की आयफेल कधी त्याला उत्तर देण्याचं धाडस करत नसे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आयफेलच्या प्रयत्नाअंती आयफेल टॉवर वेळेत उभा राहिला. आयफेल टॉवरच्या सर्वांत वरच्या मजल्यावर एक कॉफी बारही बांधण्यात आला.

ट्रेड फेअर आटोपल्यावर मात्र गाय दि मोपासा रोज आयफेल टॉवर चढून जायचा असं म्हणतात. आजच्यासारखी लिफ्टची सुविधा त्यावेळी नव्हती. तरीही तो चढून जायचा म्हणे. तिथं बारमध्ये कॉफी पीत बसायचा आणि तिथे बसून आयफेल टॉवरच्या विरोधी लेखन करायचा आणि ते 'आयफेल टॉवरवरून' अशा मथळ्याखाली वृत्तपत्रात प्रकाशित व्हायचं. पॅरिसमधले लोक ते मोठ्या चवीने वाचायचे. शेवटी लोकांनी एकदा मोपासाला विचारलं, ''तू रोज आयफेल टॉवर चढून जातोस खरा, पण तिथे जाऊन त्याच्यावरच टीकास्त्र सोडणारं लेखन करतोस, हे विसंगत नाही का?'' त्यावर मोपासा उत्तरला, ''काय करणार? आता अख्ख्या पॅरीस नगरीत आयफेल टॉवरचं शिखर ही एकमेव अशी जागा शिल्लक राहिली आहे की जिथून मला न आवडणारा आयफेल टॉवर अजिबात दिसत नाही आणि माझी रम्य पॅरिस नगरीच फक्त दिसते!''

तंत्रज्ञानाचा तिरस्कार करणाऱ्या मराठीप्रेमींना एवढंच सांगायचंय की यापुढे मराठीच्या रम्य नगरीचं सम्यक दर्शनही तुम्हाला प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या उंचच उंच आयफेल टॉवरवरूनच दिसणार आहे!

(दिवाळी २०१३)

# लॉग-इन आयडी आणि पासवर्ड विसरलेली सुवर्णभूमी

**दत्तप्रसाद दाभोळकर**

ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि विचारवंत दत्तप्रसाद दाभोळकर यांनी विपुल लेखन अंतर्नादसाठी केले. पाण्याचे योग्य नियोजन हा आपल्या विकासाचा लॉग-इन आयडी आहे व ऊर्जा हा समृद्धीचा पासवर्ड आहे आणि या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आज आपला देश गरीब, विकसनशील देश राहिला आहे असे मांडणारा त्यांचा लेख.

अनेक शतके आपला देश जगभर 'सुवर्णभूमी' म्हणून ओळखला जायचा. आज जसे जगभरचे कर्तृत्ववान साहसी तरुण अमेरिकेत जाऊन स्थायिक व्हायची स्वप्ने पाहतात आणि त्यासाठी अथक परिश्रम करतात त्याप्रमाणे अनेक शतके जगातील कर्तृत्ववान, साहसी माणसांचे थवे या देशात येत राहिले. आज अमेरिकेची समृद्धी जशी भारतातील व जगभरचे तरुण वाढवतात, त्याप्रमाणे या देशात येणाऱ्या माणसांनी याच देशातील बनून येथील समृद्धीत अधिकाधिक भर घातली. ते आश्रित म्हणून आले, पोटार्थी म्हणून आले, की जेते म्हणून, यामुळे काही फरक पडला नाही. पण ते येथेच राहिले. आज काही वेगळेच होतेय. या देशातील आपण सारेच जण आज एक तसा गरीब, विकसनशील देश म्हणूनच धडपडतोय.

हे असे का झाले? खरेतर सुरुवात आपण 'सुवर्णभूमी' म्हणून का ओळखले गेलो येथपासून करावयास हवी. खरे तर या देशात सोन्याची एकही खाण नाही. नाही म्हणायला अपवाद म्हणून, म्हणजे नियम अपवादाने सिद्ध व्हावा म्हणून, आपल्याकडे कोलारची खाण आहे. पण 'नाव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा' ही म्हण या खाणीवरून आली असे वाटावे, एवढे नगण्य सोने तिथे मिळायचे. मात्र आपण सुवर्णभूमी बनलो त्याचे कारण जगभराचे सोने या देशात येत होते. हे सोने सर्व जगातून इकडे ओढले जात होते, कारण समृद्धी कशातून निर्माण होते हे या आपल्या हुरहुन्नरी कल्पक पूर्वजांनी ओळखले होते. उत्पादन, प्रक्रिया, व्यवस्थापन आणि वितरण या क्षेत्रांत आपण आज विसरूनही गेलोय असे कल्पक मानदंड या देशाने निर्माण केले होते. फक्त दोन गोष्टी लक्षात घेऊ. चीनचे रेशीम जगभर जायचे. तो रेशीम मार्ग म्हणजे 'सिल्क रूट' भारतातून जातो. कौसानीच्या जवळ आल्यावर वाटेत एक अतिशय अवघड, उंच, तिरका निसरडा असा हिमालयाचा एक भाग येतो. या कड्याच्या दोन्ही बाजूला विस्तीर्ण अशी मैदाने आहेत. म्हणजे आलेला माल एका बाजूला उतरायचा हा कडा पार करून दुसऱ्या बाजूला जायचा. माणसे सामान न घेतासुद्धा हा कडा पार करू शकणार नाहीत – घोडे, खेचरे, गाढव सारे या कड्यापुढे हतबल. आपण हे सामान या बाजूने त्या बाजूला कसे न्यायचे? त्या मैदानातील मातीचे पृथक्करण केले त्यावेळी लक्षात आले; त्यात मेंढ्या-बकऱ्यांच्या लेंड्यांचे अवशेष आहेत. मग लक्षात आले, आपले कल्पक पूर्वज दोन्ही बाजूंना मेंढ्या-बकऱ्यांचे कळप ठेवायचे. त्यांच्या पोटाला खाली पिशव्या लावून त्यात सामान भरलेले. उपाशी शेळ्यांना आपण तिकडे गेलो, की छान खायला मिळते हे माहीत. झपाट्याने दोन्ही बाजूंनी माल सहजपणे इकडून तिकडे जात होता.

दुसरी गोष्ट घेऊ. व्यवस्थापन हे या देशात खेड्यापाड्यांत रुजलेले असणार. गवयाचे पोर जसे तालात रडते तसे ते आपल्या रक्तात आले असणार किंवा प्रत्येक पिढीतून बोलण्या-चालण्यातून कमी कमी होत का होईना ते संस्काराच्या रूपात पुढे आले असणार. नाहीतर एका अनाम खेड्यातून जपानमधील व्यवस्थापन गुरुजींनी अवाक होऊन पाहावी आणि तिचा अभ्यास करावा अशी, एका महानगरात कुठल्याही कोपऱ्यातून ठरलेल्या वेळी डबा उचलून, अनेक मार्ग बदलून, महानगरात दुसऱ्या टोकाला, नेमक्या ठिकाणी डबा पोचविण्याची यंत्रणा खेड्यात राहणाऱ्या अर्धशिक्षित लोकांनी कशी काय तयार केली असती?

पण व्यवस्थापन आणि वितरण यांच्याआधी निर्मिती आणि प्रक्रिया या गोष्टी येतात. माणसाला समजलेली निर्मितीची पहिली गोष्ट म्हणजे निसर्ग एका दाण्याचे शंभर दाण्यांत रूपांतर करतो. दुसरे म्हणजे या उत्पन्नावर किंवा इतरही कशावर काही उद्योग करावयाचे असतील तर ऊर्जा लागते. ती ऊर्जा वापरूनच तर लोहार, सोनार, पाथरवट यांची अवजारे बनतात. अग्नी हे ऊर्जेचे अनेक शतके एकमेव साधन होते आणि अग्नीची निर्मिती, संवर्धन, रक्षण, उपयोग यांबाबतची एक अभ्यासपूर्ण रचना या देशाने केली होती.

मात्र ऊर्जा, व्यवस्थापन, वितरण या सर्व पुढच्या पायऱ्या आहेत. सुरुवात निर्मितीपासून होते. एका दाण्यापासून शंभर दाणे चांगले आणि हमखास कसे बनवायचे हे समजावे लागते. ते

समजले, की अतिरिक्त धान्य निर्माण करता येते. मग खूप लोक शेती न करता, कलाकुसर, हुन्नर, व्यवस्थापन, वितरण या गोष्टींचा अभ्यास करून नव्या कल्पक रचना निर्माण करतात. या देशातील तयार वस्तू जगभर जातात. जगभराची संपत्ती म्हणजे सोने इकडे येते.

अतिरिक्त अन्नधान्य निर्माण करावयाचे असेल, तर लहरी पावसावर आणि बेभरवशाच्या नद्यांवर अवलंबून राहून चालणार नाही, हे त्यांच्या लक्षात आले. पाण्याचे विलक्षण नियोजन या देशाने अनेक शतके केले. जलवास्तू निर्माण करण्याची आणि त्या वास्तूच्या व्यवस्थापनाची एक सजग परंपरा या देशात आहे. दोन हजार वर्षांपूर्वी समुद्राशी झुंजत, दोन लाख एकर जमिनीला पाणी देणारा कावेरीपक्कम (ग्रँड एनीकेट) या देशात निर्माण झाला. दहाव्या शतकात आंध्रप्रदेशात अनंतराज सागराची निर्मिती झाली. फिरोजशहा तुघलकने १३५०मध्ये पश्चिम यमुना कालव्याची निर्मिती केली. त्यानंतर सुमारे दोनशे वर्षांनी म्हणजे १५७०मध्ये शहेनशाह अकबरनी त्याला एक उपकालवा खणून सबंध हिसार जिल्हा बागायती बनविला. शालीमार बागेत पाणी खेळविण्यासाठी शहाजहानने रावी नदीला १८० किलोमीटर लांबीचा कालवा बनवला. अजंठा व वेरूळ निर्माण करणाऱ्या राष्ट्रकूटांनी नांदेडजवळ विलक्षण बळकट असा कंधारचा भूईकोट किल्ला बनविला. महत्त्वाचे म्हणजे पाणलोट क्षेत्राचा विकास करून या किल्ल्याच्या आत व बाहेर बारा महिने मुबलक पाणी देणारे तलाव निर्माण केले. आंबेजोगाईजवळच्या धारूरच्या किल्ल्यात व किल्ल्याबाहेर असेच तलाव त्यांनी निर्माण केलेत. पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी केवळ मंदिरे आणि घाट बनविले नाहीत तर धुळ्याजवळच्या साक्री येथे, भारतात फार पूर्वी अस्तित्वात असलेल्या पण विस्मृतीत गेलेल्या फड पद्धतीचे पुनरुज्जीवन केले. फड पद्धती हा पाण्याच्या व्यवस्थापनातील मैलाचा दगड आहे. जलवास्तू राजा निर्माण करतो. मात्र त्याचे व्यवस्थापन व वितरण गावकरी ठरवतात. कोणत्या गावाने कोणती पिके या वर्षी घ्यावीत, आवर्ती पद्धतीने म्हणजे 'रोटेशनल सिस्टिम'प्रमाणे कोणती शेते यावर्षी उत्पादन न घेता मोकळी ठेवायची हे सर्व गावकऱ्यांनी ठरवायचे. आजही साक्री येथे फड पद्धत अस्तित्वात आहे. आपल्या देशातील जलवास्तूंचा आणि व्यवस्थापन पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकन सरकारने १८७० साली एस. विल्यम हा त्यांचा इंजिनिअर भारतात पाठविला होता आणि त्याच्या अहवालाच्या प्रती अमेरिकेत रहस्यकथेसारख्या खपल्या होत्या.

पण ही समृद्ध परंपरा बरोबर असलेला आपला देश विसाव्या शतकाच्या मध्यावर अर्धपोटी देश म्हणून प्रसिद्ध झाला. अमेरिकेचे क्षेत्रफळ आहे आपल्या तिप्पट. पण निसर्गाने अमेरिकेला आणि आपल्याला सारखीच जलसंपदा दिली आहे. मात्र अमेरिकेत त्यांच्या ८५ टक्के जलसंपदेचा उपयोग केलाय. आपण फक्त १५ टक्के केलाय. अमेरिकेतील ८७ टक्के शेती सिंचनाखाली आहे. आपणाकडे फक्त १७ टक्के! पाणी हा आपल्या प्रगतीचा पासवर्ड होता. तो आपण विसरलोय हे आपल्या लक्षात यायला लागले होते. १९८५ साली आणखी एक गोष्ट घडली. पाणी ही आजच्या जगातील सर्वात ज्वालाग्रही गोष्ट आहे, हे जगातील विचारवंतांनी मान्य केले. दुसरे आणि पहिले महायुद्ध प्रामुख्याने तेलासाठी झाले, तिसरे महायुद्ध पाण्यासाठी होईल हा विचार पुढे आला. इस्राएल-पॅलेस्टाइन युद्धाचे खरे कारण गाझापट्टीतील पाणी आहे, असे सांगणारे पुढे आले. या लांबच्या गोष्टी राहू द्या, एकाच देशातील, एकाच सांस्कृतिक बंधनात असलेले भाषक विभाग असे पाण्यासाठी युद्धपातळीवर येतील किंवा एकभाषक विभागातील खेडी पाण्यासाठी युद्धे खेळतील हे विचारवंतांच्या लक्षात आले. त्यावेळी आणखी एक गोष्ट लक्षात आली. याचा व्यत्यासही खरा आहे. ज्या देशांकडे विपुल प्रमाणात पाणी आहे आणि त्याचे ज्यांनी कल्पकतेने नियोजन केलेय, ते देश नकळत या जगात एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात समृद्ध, संपन्न, समर्थ देश म्हणून प्रस्थापित होतील.

म्हणजे आपल्या देशाने पाण्याचे नीट नियोजन केले नाही, तर हा आपला देश यादवी युद्धात सापडेल आणि पाण्याचे योग्य नियोजन केले, तर आपण महासत्ता बनू हे आपल्या लक्षात आले आणि नेमका त्याचवेळी, म्हणजे १९८८ साली नर्मदा प्रकल्प ऐरणीवर आला. नर्मदेच्या खोऱ्यात दोन समृद्ध पंजाब निर्माण करू अशी प्रतिज्ञा करून तो उभा होता.

पण पुढे जाण्यापूर्वी या देशात आपण पाणीप्रश्न किती बेफिकीर वृत्तीने हाताळत होतो हे लक्षात घ्यावयास हवे. १९४७ ते १९८८ या ४१ वर्षांत ज्या गतीने नर्मदा प्रकल्पाने प्रवास केला ती गती, तो वेग जर आपण पाहिला तर त्यामानाने 'ससा आणि कासव' या गोष्टीतील कासवालाही स्वत:च्या गतीचा गर्व वाटेल! देश स्वतंत्र झाला, त्यावेळी सरदार पटेलांनी सांगितले, 'नर्मदा प्रकल्प लगेच पुरा व्हावयास हवा. तो पुरा झाल्यावर हा देश अन्नधान्य आयात करणार नाही, तर निर्यात करेल.' मात्र पटेलांचे मोठेपण हे की केंद्रीय मंत्रिमंडळापुढे हा प्रश्न आला, त्यावेळी पटेलांनी आग्रहाने भाकरा नानगलचा आग्रह धरला. ते म्हणाले, 'हा आपला सीमावर्ती भाग आहे. हा समृद्ध झाला, तर सीमेपलीकडे कळेल, सर्वधर्मसमभाव मानणारी लोकशाही कोणता चमत्कार करते ते.' आपला आज विश्वासही बसत नाही, की या देशात एकवेळ असे नेते होते, जे अमेठी आणि बारामती सोडून साऱ्या देशाचा विचार करायचे आणि या देशाचा जलद विकास ही त्यांची बांधिलकी होती. भाकरा नानगल मार्गी लागले. थकलेभागले पटेल काळाच्या पडद्याआड गेले. ४७ ते ६१ अशी १४ वर्षे उलटली आणि ५ एप्रिल १९६१ रोजी पंडीतजींनी सरदार सरोवराची कोनशिला बसविली. ६४ साली थकलेभागले पंडीतजी काळाच्या पडद्याआड गेले. त्यानंतर ६१ ते ६९ अशी आठ वर्षे गेली आणि १९६९ मध्ये आपण नर्मदा आयोगाची स्थापना केली. रामस्वामी, अन्सारी आणि सिन्हा ही फार ताकदीची तीन माणसे या आयोगाची सदस्य होती. आयोगाने चक्क दहा वर्षे घेतली आणि १९७९ मध्ये आयोगाचा अहवाल बाहेर आला. आयोगाने दहा वर्षे घ्यावयास नको होती. मात्र दहा वर्षांत त्यांनी केलेले काम विलक्षण आहे. आजही जगभर कोणताही प्रकल्प बनविताना

‘प्रथम या आयोगाचा अहवाल वाचा’ असे सांगितले जाते. महत्त्वाचे म्हणजे विस्थापितांसाठी इतकी चांगली योजना यापूर्वी कोणीच मांडलेली नाही. आपण ती पुढे पाहणार आहोत.

मात्र १९७९ साली बाहेर आलेल्या या अहवालावर आठ वर्षे चर्चा करून १९८७ साली केंद्रीय मंत्रिमंडळाने याला मान्यता दिली. त्यानंतर योजना आयोगाने एक वर्ष घेतले आणि १९८८ साली हा प्रकल्प ऐरणीवर आला. १९४७ ते १९८८ या ४१ वर्षांत प्रकल्पाचा खर्च पाच हजार कोटींवरून ७० हजार कोटींपर्यंत वाढला आणि ४१ वर्षे या देशातील माणसे, जनावरे आणि जमीन सहजपणे उपलब्ध होऊ शकणाऱ्या पाण्यापासून वंचित राहिली.

नर्मदेच्या खोऱ्यात दोन समृद्ध पंजाब निर्माण करणारा हा प्रकल्प नीट समजावून घ्यावयास हवा. नर्मदाप्रकल्प मोठा आहे. पण तो मोठा आहे, हे त्याचे मोठेपण नाही. त्याच्याहूनही मोठे प्रकल्प भारतात आहेत. या प्रकल्पाचे मोठेपण हे, की आपण नदीच्या खोऱ्याचा एकत्रित विकास करतोय. नर्मदेमुळे जे भाषक विभाग सांस्कृतिक दृष्टीने एकमेकांत गुंतले होते, त्या विभागांना आर्थिक समृद्धीत एकमेकांशी जोडून हा देश अधिक एकसंध बनवील, ही त्याची आणखी एक प्रतिज्ञा आहे. नर्मदा ही भारतातील पाचवी मोठी नदी आहे. नर्मदा आणि तापी या दोनच नद्या गुजराथ, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या तीन वेगवेगळ्या भाषक विभागांतून वाहतात. नर्मदेची एकूण लांबी १३१२ किलोमीटर आहे. त्यातील ११०० किलोमीटरचा प्रवास ती गुजराथ राज्यातून करते. जवळजवळ चाळीस उपनद्या या प्रवासात तिला मिळतात. त्यात लुनासारखी मोठी नदीपण आहे. म्हणजे वेगाने पाण्याचे लोंढे नर्मदेतून वाहत असतात. आपण पाण्यात तीन हजार छोटे बंधारे, १३० मध्यम आकाराची धरणे आणि ३५ मोठी धरणे बांधणार आहोत. पण खरी महत्त्वाची आहेत, ती चार महाकाय धरणे – सरदार सरोवर, इंदिरा सागर, ओंकारेश्वर आणि महेश्वर. या प्रकल्पामुळे आपणाला विपुल प्रमाणात सिंचनासाठी पाणी आणि वीज मिळेल. या पाण्यामुळे मध्यप्रदेशात १८२ लाख एकर फूट, गुजराथेत ९० लाख एकर फूट व महाराष्ट्रात अडीच लाख एकर फूट पाणी मिळेल. राजस्थानचा नर्मदेशी संबंध नाही, पण राजस्थान भारताचा भाग आहे. राजस्थानातील दुष्काळी भागालापण नर्मदा-प्रकल्प पन्नास हजार एकर फूट पाणी देतो. म्हणजे सर्वाधिक पाणी मध्यप्रदेशला व त्याच्या निम्मे गुजराथला मिळते. विजेचे वाटप पण असेच आहे. मध्यप्रदेशला ५७ टक्के, २७ टक्के गुजराथला व १६ टक्के महाराष्ट्राला. आपण विजेचे वाटप असे का केले आहे, तेपण लक्षात घ्यावयास हवे. मध्यप्रदेशाला आपण पाणी खूप दिले, पण त्याचा शेतीसाठी उपयोग नाही. ते डोंगराळ विभागात आहे. म्हणून आपण त्यांना वीज जास्त दिलीय. म्हणजे ज्या अवजड उद्योगांसाठी विपुल पाणी व वीज लागते, त्यांची एक मालिका आपण संरक्षणाच्या दृष्टीने सुरक्षित असलेल्या मध्यप्रदेशात उभारू शकतो.

◆

१९६९ मध्ये आपण नर्मदा आयोगाची स्थापना केली. रामस्वामी, अन्सारी आणि सिन्हा ही फार ताकदीची तीन माणसे या आयोगाची सदस्य होती. आयोगाने चक्क दहा वर्षे घेतली आणि १९७९ मध्ये आयोगाचा अहवाल बाहेर आला. आयोगाने दहा वर्षे घ्यावयास नको होती. मात्र दहा वर्षांत त्यांनी केलेले काम विलक्षण आहे. आजही जगभर कोणताही प्रकल्प बनविताना ‘प्रथम या आयोगाचा अहवाल वाचा’ असे सांगितले जाते. महत्त्वाचे म्हणजे विस्थापितांसाठी इतकी चांगली योजना यापूर्वी कोणीच मांडलेली नाही.

◆

१९८८ साली नर्मदाप्रकल्प सुरू होणार होता. फार धिम्या गतीने प्रवास करणारे आपले कासव जिंकले होते. पण त्याचवेळी जगभरचे झोपलेले ससे जागे झाले. नर्मदाप्रकल्पाला विरोध करण्यासाठी १३ विकसित देशांत ५३ ‘गैर सरकारी संस्था’ कामाला लागल्या. यांपैकी अनेक संस्था नेमक्या त्याचवेळी आणि तेवढ्याच उद्देशाने जन्माला आल्या होत्या. त्यामुळे या ‘गैर सरकारी संस्था’ त्या त्या देशातील सरकारला वा बहुराष्ट्रीय कंपन्यांना दुसऱ्या देशावर गैरमार्गांनी दडपण आणण्यास मदत करतात, असेही म्हटले जाते. या संस्थांनी नर्मदाप्रकल्पाच्या विरोधातील मोहीम फार कल्पकतेने चालविली. हा प्रकल्प झाला तर भारत कसा गाळात जाईल, यावर ध्वनिचित्रफीत काढून जगभर दाखवली. हे धरण होऊ नये, म्हणून जगभर धरणे धरली. ऑस्ट्रेलियातील ‘रेन फॉरेस्ट इन्फॉर्मेशन’ सोसायटीचे लोक जागतिक वित्त बँकेचे प्रमुख एन. कॉनब्ले यांना भेटले आणि ‘नर्मदा प्रकल्पाला कर्ज दिलेत तर भारत कायमचा कर्जाच्या गळ्यात बुडेल’ म्हणून सांगितले. हॉलंडमधील ‘सरव्हायवल इंटरनॅशनल’ या संस्थेचे लोक जागतिक श्रमसंस्थेच्या प्रमुखांना भेटले. ‘ही योजना झाली, तर आज अतिशय सुखात आणि आनंदात राहणारे भारतातील आदिवासी विस्थापित करून संपवले जातील,’ म्हणून त्यांनी सांगितले.

या परदेशांतील संस्थांनी नर्मदाप्रकल्पाला विरोध केला याला काही कारणे संभवतात. भारत अन्नधान्य आयात करीत होता. ही योजना पुरी झाली, तर भारत अन्नधान्य निर्यात करणार होता. आपल्याकडील अतिरिक्त अन्नधान्य भारताला विकून पैसे मिळवून पुन्हा भारताला अपमानित आणि मिंधे करण्याची या देशांची खेळी संपणार होती. नर्मदाप्रकल्प हा जलविद्युत्प्रकल्प होता. जलविद्युत्प्रकल्प संपूर्णपणे भारतीय बनावटीचा असतो. लागणारा कच्चा माल व तंत्रज्ञान सर्व भारतात होते. हा जलविद्युत्प्रकल्प झाला नाही, तर विजेसाठी आपणासमोर त्यावेळी ‘औष्णिक वीज’ एवढाच पर्याय होता. त्यासाठी लागणारा कोळसा, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान परदेशातून आणावे लागले असते. परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांना हे हवे होते. आणखी एक महत्त्वाचे कारण होते. १९८५ मध्ये जागतिक शेतीसंघटनेने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. २०५०पर्यंत फार

मोठ्या प्रमाणात, मोठ्या धरणांची निर्मिती करून, फार मोठी जमीन सिंचनाखाली आणली नाही, तर २०५० पर्यंत जगात फार मोठे दुष्काळ पडून खूप माणसे भुकेने मरण पावतील असे त्यात सांगितले होते. जागतिक वित्तसंस्थेने हा अहवाल स्वीकारला होता व १९८८पासून शेतीविषयक एकूण रक्कमेपैकी ३८ टक्के रक्कम मोठ्या जलसिंचन प्रकल्पांसाठी कर्ज वा अनुदान म्हणून दिले जाईल, असे जाहीर केले होते. हे कर्ज वा अनुदान घेणाऱ्यांच्या रांगेत आपण खूप पुढे उभे होतो. आपल्याला या रांगेतून बाहेर फेकले, तर पाठीमागे उभे असलेल्या देशांना ते हवे होते.

पण या परकीय संस्था हे कसे वा का करत होत्या याची खरे तर आपण चर्चापण करावयाची गरज नाही. आपल्या घरात आपण कोणते अन्न शिजवायचे ते आपण ठरवितो, शेजारी नव्हे. मात्र खरी अडचण ही होती, की या देशातील फार आदरणीय, प्रामाणिक, पारदर्शक, तळागाळात जाऊन काम करणारी माणसे त्यांच्याबरोबर उभी होती. त्यात रजनी कोठारी होते, सुंदरलाल बहुगुणा होते, मेधा पाटकर होती, बाबा आमटे होते. ही माणसे सांगत होती, 'या धरणामुळे लाख दीड लाख, तळागाळातील माणसे बेघर होऊन विस्थापित म्हणून बाहेर फेकली जातील वा कायमची नाहीशी होतील. त्याच्यापलीकडे तांत्रिकदृष्ट्या हा प्रकल्प चुकीचा आहे. धरणामुळे फार मोठ्या प्रमाणात फार मोठे भूकंप या विभागात होतील. फार थोडी जमीन सिंचनाखाली येईल. धरणाची उंची तांत्रिकदृष्ट्या चुकीची आहे. फार मोठ्या प्रमाणात जमीन पाणथळ बनेल आणि फार थोड्या काळात ही धरणे गाळानी भरून निरुपयोगी होतील.' अनेक संदर्भ हातात घेऊन हे ताळागाळातील कार्यकर्ते आपले मत फार प्रभावीपणे मांडत होते.

या कार्यकर्त्यांचे सर्व सांगणे पूर्णपणे चुकीचे आणि हट्टाग्रही आहे, असे सरकारी यंत्रणा व या देशातील जागतिक कीर्तीचे अभियंते सांगत होते. 'दोन ध्रुवावर दोघे आपण' म्हणून या दोन बाजू उभ्या होत्या. लोक भांबावलेले होते. दोन्ही बाजू समजावून घ्याव्यात, समन्वयाचा मार्ग दिसला तर तो शोधावा, म्हणून मी नर्मदा प्रकल्पाची शोधयात्रा केली. बिनपगारी रजा घेऊन, स्वतःच्या खर्चाने सर्वत्र भटकलो. सुंदरलाल बहुगुणांपासून, केंद्रीय मंत्री, केंद्रीय जलसचिव, गुजराथचे मुख्यमंत्री, नर्मदा प्राधिकरणाचे प्रमुख, विस्थापित अशा सर्वांना भेटलो. या शोधयात्रेवर आधारित माझे पुस्तक 'माते नर्मदे' राजहंस प्रकाशनने प्रसिद्ध केले. समन्वय शक्य आहे, पण कार्यकर्ते तो टाळताहेत हे जाणवत होते.

प्रथम समन्वय शक्य कसा होता, ते पाहू. विस्थापितांचा प्रश्न हा या प्रकल्पातील सर्वांत महत्त्वाचा कळीचा प्रश्न आहे. विस्थापित होणारे आदिवासी, गरीब शेतकरी हे विकासाच्या सर्वांत शेवटच्या थरावर असलेले आपले अभागी भाऊ आहेत. त्यांना अधिक यातना देणारा कोणताही विकास आम्हांला नको, हे अगदी बरोबर आहे. मात्र सारे समजावून घेतल्यावर लक्षात आले, खरे तर या अभागी लोकांना विकासाच्या धारेत आणण्याची ही फार मोठी संधी आहे. नर्मदाआयोगाने विस्थापितांसाठी केलेल्या प्रमुख तरतुदी अशा होत्या : ''प्रत्येक विस्थापिताला, त्याची जमीन कितीही कमी वा कोरडवाहू असली, तरी नव्या ठिकाणी पाच एकर बागायती जमीन द्यावी लागेल. विस्थापितांच्या घरातील १७ वर्षे वयाच्या पुढील मुलाला आणि मुलीलाही नवे कुटुंब मानून प्रत्येकी पाच एकर बागायती जमीन द्यावी लागेल. तो जरी बेघर असला, तरी त्याला नव्या ठिकाणी ९० बाय ६० एवढ्या जमिनीच्या तुकड्यावर घर बांधून द्यावे लागले. खेड्यातील माणसे एकमेकांत गुंतलेली असतात. त्यामुळे माणसे विखुरता येणार नाहीत. एका खेड्याचे दुसऱ्या खेड्यात रूपांतर होईल. नव्या खेड्याला वीज व नळ देणे अपरिहार्य आहे. पुन्हा विहिरीपण ठेवाव्या लागतील. त्या खेड्यात प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक शाळा असेल. नव्या ठिकाणी रुळण्यापूर्वी वर्षभर प्रत्येकाला भत्ता किंवा वेतन मिळेल.''

ही सारी कागदावरील आश्वासने वाचताना मनात एक प्रश्न येत होता. हे सारे कागदी घोडे असतील किंवा हवेत उडवलेले पतंग. माझी ही शंका बरोबर घेऊन, मी नर्मदा प्राधिकरणाचे प्रमुख केंद्रीय जलसचिव व त्या खात्याचे केंद्रीय मंत्री यांना भेटलो. ते सारे जण म्हणाले, ''धरणाच्या एकूण खर्चात विस्थापितांचा खर्च फक्त चार टक्के आहे. हवा असेल, तर तो आणखी वाढवायला, विस्थापितांना आणखी काही द्यावयासपण आमची तयारी आहे. कार्यकर्त्यांना मान्य असेल, तर आम्ही लोकायुक्त नेमायला तयार आहोत. त्या लोकायुक्ताने पाहिजे तर विस्थापितांना आणखी काही द्यावयास हवे आहे का, हेपण ठरवावे आणि जे कागदावर ठरले आहे ते प्रत्यक्षात दिले आहे, हे सांगावे. म्हणजे धरणाचे काम सुरू राहील. हा तिढा सुटेल.'' कार्यकर्त्यांचे नेते म्हणाले, ''आम्हांला लोकआयुक्त मान्य नाही.'' मला आश्चर्य वाटले आणि खेदही.

ही आडमुठी भूमिका कार्यकर्त्यांनी सर्व तांत्रिक मुद्द्यांबाबत घेतली. आता भूकंप होणार की होणार नाही, याबाबत कार्यकर्ते व सरकारी यंत्रणा एकदम विरोधी भूमिका घेणार. यावर उपाय एकच. या देशात भूकंपाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या शास्त्रज्ञांची एक संस्था असते. त्या संस्थेचे फक्त याच विषयावर चर्चा करायला एक अधिवेशन बोलवावे. सरकारी यंत्रणा व कार्यकर्ते यांनी आपले म्हणणे संदर्भ देऊन मांडावे. त्यावर त्या संस्थेच्या सभासदांनी आपली मते सांगावीत. त्या चर्चेचा संपूर्ण अहवाल प्रसिद्ध करावा. आमच्यासारख्या सर्वसामान्य माणसांना आपले मत ठरवायला हा अहवाल मार्गदर्शन करील. धरणाची उंची, धरणावर होणारा खर्च व मिळणारा परतावा यावर चर्चा करण्यासाठी अशीच 'इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्स' व खर्च आणि परतावा यांसाठी 'भारतीय अर्थशास्त्र परिषद' यांची खास अधिवेशने बोलवावीत. प्रत्येक प्रश्नावर अशी नेमकी शास्त्रीय चर्चा व्हावी. सरकारी यंत्रणा प्रत्येक तांत्रिक विभागातील 'मान्यताप्राप्त व्यावसायिक संघाची (Recognised Professional Bodies) खास अधिवेशन भरवण्याच्या या कल्पनेचे स्वागत करीत होती. या अधिवेशनांचा पूर्ण खर्च करावयाची व त्या चर्चेचा विस्तृत अहवाल प्रसिद्ध करण्यासाठी लागणारा खर्च करावयास आनंदाने तयार होती. कार्यकर्त्यांनी मात्र याला विरोध केला. त्यांनी सांगितले, ''आम्हांला अशी अधिवेशने व त्यातील खुली चर्चा मान्य नाही. या देशातील 'मान्यताप्राप्त व्यावसायिक संघ' सरकारी दबावाखाली आहेत असे आम्ही मानतो.'' मला आश्चर्य वाटले.

कार्यकर्ते व नर्मदा बचाव आंदोलन अशी आडमुठी भूमिका का घेत होती हे फार नंतर लक्षात आले. ते लक्षात आले सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निवाड्यामधून. आंदोलनाने धरणाचे काम थांबवावे, म्हणून १९९४ मध्ये सर्वोच्च न्यायालयात जनहितयाचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाने आपली अमूल्य अशी सहा वर्षे खर्च केली. १८ ऑक्टोबर २०००मध्ये आपला ऐतिहासिक निवाडा दिला. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले, या कार्यकर्त्यांना 'पर्यायी विकास नीती' हवी आहे. सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात पुढे सांगितले,

''या देशात कोणती विकास नीती हवी, कोणता प्रकल्प हवा, हे लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेल्या राज्यकर्त्यांनी ठरवायचे असते. गावातील चार कार्यकर्त्यांनी व त्यांच्याबरोबरच्या विचारवंतांनी नव्हे. पण असे असले, तरीही या वेळी आम्ही या प्रकल्पाचा अभ्यास केला. शासनाने सर्व पर्यायांचा अभ्यास करून सर्वात योग्य असा पर्याय निवडलाय. भूकंपाचा बागुलबुवा उभा करून कार्यकर्त्यांनी धरणाचे कामकाज खूप पुढे ढकलले, हे गुजराथचे मुख्यमंत्री वाघेला यांचे म्हणणे महत्त्वाचे आहे. हा देश स्वतंत्र झाला, त्यावेळी अर्धपोटी होता. त्यानंतर अभियंत्यांनी निर्माण केलेल्या मोठ्या प्रकल्पांनी आपण आता अन्नधान्याबाबत स्वावलंबी आहोत. आपण अभियंत्यांचे हे ऋण मान्य केले पाहिजे. या देशाच्या विकासाचा इतिहास सांगतो, की जेथे जेथे मोठे प्रकल्प झाले, तेथील पर्यावरण सुधारले आहे. पेरियारच्या धरणामुळे अनेक शतके दुष्काळी असलेला मदुराई जिल्हा हिरवागार झाला आहे आणि पेरियारच्या जंगलात हत्तींचे एक अभयारण्य आपण निर्माण केलेय. नागार्जुनसागर डॅममुळे मंडी विभाग हिरवागार बनलाय. इंदिरानगर परियोजनेसाठी आपण कालवा खणून भाक्रानानगलमधून पाणी आणलेय. त्यामुळे पश्चिम राजस्थान हिरवागार झालाय. याउलट एकाही मोठ्या परियोजनेमुळे पर्यावरणाचा नाश झाल्याचे एकही उदाहरण नर्मदा बचाव आंदोलनाने आमच्यासमोर आणले नाही. या योजनेमुळे होणारे विस्थापित हे विकासापासून वंचित राहिलेले आपले अभागी भाऊ आहेत. त्यांना विकासाच्या धारेत आणण्याची फार चांगली संधी या प्रकल्पामुळे पुढे आली आहे.'' त्यानंतर सर्वोच्च न्यायालय दोन फार महत्त्वाच्या गोष्टी सांगते. सर्वोच्च न्यायालय म्हणते, ''या देशात कार्यकर्त्यांनी एक नवी टूम, नवी फॅशन सुरू केली आहे. आपण वीज वापरायची, सरकारने आणखी वीज निर्माण करावी, असा आग्रह धरावयाचा. मात्र आम्हांला 'औष्णिक वीज' नको, त्यामुळे वातावरणात दूषित वायू पसरतात; आम्हांला 'किरणोत्सर्गी वीज' नको, त्यामुळे किरणोत्सर्गाचा धोका आहे; आम्हांला 'जलविद्युत' नको, त्यामुळे जंगले पाण्यात जातात, असे म्हणायचे. वीज बनविण्याचे हे तीनच व्यावहारिक पर्याय जगासमोर आहेत. म्हणजे या कार्यकर्त्यांना नक्की काय हवेय?'' आणि या याचिकाकर्त्यांना नक्की काय हवे आहे, हे ओळखून फार कठोर शब्दांत सुप्रिम कोर्ट त्यांना सुनावते, ''ही जनहितयाचिका नाही. ही स्वहितयाचिका आहे. स्वत:ला प्रसिद्धी मिळविण्यासाठी केलेली याचिका. It is not public interest litigation, it is publicity interest litigation आणि या देशात कार्यकर्ते जर असेच वागणार असतील, तर सर्वोच्च न्यायालयाचा वेळ बरबाद करणाऱ्या या जनहितयाचिकांचे माध्यम आता बंद करा, असे आम्हांला सरकारला सांगावे लागेल?''

मात्र या जनहितयाचिकेमुळे सहा वर्षे प्रकल्पाचे काम बंद होते. नेमलेले तंत्रज्ञ, आणलेली यंत्रसामग्री अशा अनेक गोष्टींमुळे काम न होता आपल्या गरीब देशाचे सहा वर्षे दररोज चार कोटी रुपये खर्च होत होते आणि त्याच्याही पलीकडची गोष्ट म्हणजे या देशातील जमीन आणि माणसे सहा वर्षे या समृद्ध जलसाठ्यापासून वंचित राहिली. नर्मदाप्रकल्प आता मार्गी लागलाय. नर्मदा प्रकल्पामुळे आता आपणाला विपुल नियोजनबद्ध पाणी मिळेल. विपुल नियोजनबद्ध पाणी हा विकासाचा 'लॉग इन आयडी' आहे. निसर्गाची क्षमता एका दाण्याची शंभर दाण्यांत रूपांतर करण्याची आहे. विपुल नियोजनबद्ध पाणी निसर्गाच्या या क्षमतेला मदत करत नैसर्गिक वस्तूंची विपुलता वाढवते. मात्र संपत्ती, समृद्धी हवी असेल, तर या नैसर्गिक वस्तूंचे, अनेक जीवनोपयोगी वस्तूंत रूपांतर करावयास हवे. त्यासाठी ऊर्जा हवी. ऊर्जा हा समृद्धीचा 'पासवर्ड' आहे. ही ऊर्जा वापरूनच तर लोहार, सोनार, पाथरवट यांची अवजारे बनतात. अग्नी हे ऊर्जेचे अनेक शतके एकमेव साधन होते. आणि अग्नीची निर्मिती, संवर्धन, रक्षण, उपयोग यांबाबतची एक अभ्यासपूर्ण सुनियोजित रचना या देशाने तयार केली होती. फक्त एक साधी गोष्ट लक्षात घेऊ – दोनशे, अडीचशे वर्षांपूर्वीपर्यंत काड्यापेट्या नव्हत्या. रात्री झोपताना निखारा झाकून ठेवायला लागायचा. पावसाळ्यात अनेक गळक्या किंवा चांगल्या घरातसुद्धा निखारा विझणार! मग गारगोट्या एकमेकांवर घासून पहिली ठिणगी पाडावी लागणार. पुन्हा ती कोळशावर वा कडब्यावर टाकली, तर पावसाळ्यातील दमट हवेत ती विझण्याची शक्यता अधिक. या समाजव्यवस्थेने जागोजागी अग्निहोत्री ब्राह्मण तयार केले. त्या अग्नीचे अखंड रक्षण हे त्यांच्यासाठी धर्मकृत्य बनले. कोणत्याही गरजू माणसाला, केव्हाही हमखास निखारा देणारी व्यवस्था केली. ऊर्जा, सर्वत्र सर्वांना सर्वकाळ उपलब्ध व्हावी, हा विकासाचा आणि समृद्धीचा पासवर्ड आपण विसरलोय. झालेय असे – नर्मदाप्रकल्प मार्गी लागला. आपला जैतापूरप्रकल्प पुढे आला. 'किरणोत्सर्ग', 'फुकुशिमा' हे शब्द जगातील आणि भारतातील पर्यावरणप्रेमी मंडळी उठता-बसता आपल्या कानात ओतायला लागली. त्या शब्दांचे अर्थ आपण समजावून घेऊ या; पण त्यापूर्वी वीज या क्षेत्रात आपली काय महाभयंकर स्थिती आहे, हे समजावून घेऊ.

पुण्या-मुंबईत राहून भरपूर वीज वापरणारी मंडळी जैतापूर हा शब्द ऐकला, की पश्चिम घाट आणि किरणोत्सर्ग या शब्दांनी आपल्याला गोंधळून टाकतात. त्याच्यापुढे जाऊन सांगतात, वीज उत्पादनात भारत पाचव्या क्रमांकावर आहे. ही आकडेवारी खरी, पण फसवी आहे. वीज उत्पादन **दरडोई** किती वीज निर्माण होते यावर ठरवतात. या यादीत आपला क्रमांक आहे १५०वा! आणि आपण महासत्ता आहोत किंवा होणार आहोत, असे आपण मानतो. भारतात आपण आज १८९ हजार मेगावॅट वीज उत्पन्न करतो, त्यापैकी नगण्य अशी ४१२० मेगावॅट म्हणजे अडीच ते तीन टक्के वीज किरणोत्सर्गी मार्गातून मिळवतो. जगभर आज ४३० अणुभट्ट्या कार्यरत आहेत. भारतात फक्त २० अणुभट्ट्या

आहेत. त्यांची वीज निर्माण करण्याची क्षमता खूप कमी आहे, पण या अणुभट्ट्यांमधून आपण अणुभट्ट्या कशा उभारायच्या आणि कशा वापरायच्या हे शिकलोय. आणखी एक आहे, थोरियमचे फार समृद्ध साठे भारतात आहेत. आपल्या कल्पक्कम येथील प्रायोगिक अणुभट्टीत आपण यशस्वीपणे थोरियम वापरलेय. त्यामुळे जैतापूरला आपण फ्रान्समधून ज्या अणुभट्ट्या आणणार आहोत, त्या तिसऱ्या टप्प्यात आपण भारतातील थोरियम वापरू शकू. आपले थोरियम आपल्याला महासत्ता बनवू शकेल.

तंत्रविज्ञानातील प्रत्येक प्रगतीत माणूस धडपडतो, पडतो; पण त्यातून काही नवे शिकून पुढे जातो. अमेरिकेत थ्री मायलर आयलंड झाले. रशियात चेर्नोबिल. पण त्या देशांनी अणुऊर्जेचा त्याग केला नाही. ते त्या अपघातातून शिकले आणि पुढे गेले. आज भारतात आपण एकत्रितपणे जेवढी वीज बनवतो, त्याहून अधिक हे दोन देश अणुऊर्जेतून बनवतात. फ्रान्समध्ये ८७ टक्के वीज अणुऊर्जेतून मिळते किंवा फ्रान्स ६३ हजार मेगावॅट वीज अणुभट्ट्यांतून मिळवतो. अणुभट्टीभोवतालचा जो फार मर्यादित विभाग प्रतिबंधित क्षेत्र व संरक्षित क्षेत्र म्हणून सोडलेला असतो किंवा सोडावा लागतो, त्यापलीकडील क्षेत्रातील किरणोत्सर्ग अजिबात वाढत नाही किंवा या विभागातील किरणोत्सर्ग अणुभट्टी कार्यान्वित होण्यापूर्वी सहा वर्षे आधीपासून दररोज मोजला जातो. दगड, वनस्पती, पक्षी, प्राणी, माणूस या सर्वांवर तो मापला जातो आणि अणुभट्टी कार्यान्वित झाल्यावर तो कायम दररोज असाच मोजावा लागतो. जगातील ४३० आणि भारतातील सर्व २० अणुभट्ट्यांमध्ये हे अनिवार्य असते. महत्त्वाचे म्हणजे अगदी माहितीचा अधिकार न वापरतासुद्धा ही नोंदवलेली माहिती त्या अणुभट्टीवर कोणासाठीही पाहण्यासाठी उपलब्ध असते. जगातील ४३० आणि भारतातील २० अणुभट्ट्या स्थापनेपासून आजपर्यंत भोवतालच्या वातावरणातील किरणोत्सर्ग अजिबात न वाढवता कार्यरत आहेत.

अणुभट्ट्या सुरक्षित आहेत आणि अणुभट्ट्या ही भारताची निकडीची गरज आहे. आपण अगदी महासत्ता वगैरे बनण्याची स्वप्ने न बघता किमान गरजेचा विचार केला तरी इसवी सन २०५०पर्यंत आपणाला ४०० हजार मेगावॅट वीज लागेल. आपण भारतात जलविद्युत बनवू शकतो, तेवढी आपण बनवली आहे. अर्थात, या विधानातही ग्यानबाची मेख आहे. कारण आपण भारतात आणखी ६७ हजार मेगावॅट जलविद्युत बनवू शकू. पण आज प्रगत देशांनी पर्यावरणाचे जे जागतिक मानदंड तयार केले आहेत, त्यामुळे आपण हे प्रकल्प हातात घेऊ शकत नाही. हे असे पर्यावरणीय मानदंड बनवण्यापूर्वीच अमेरिकेने त्यांचे जलविद्युत प्रकल्प पुरे केलेत आणि हे पर्यावरणीय मानदंड अजिबात मनावर न घेता चीन त्यांचे जलविद्युत प्रकल्प पुरे करतोय.

आपण असे करावे, की नाही हा वादाचा मुद्दा आहे. समजा हे आपण असे पुरे केले, तरी ३३० हजार मेगावॅट वीज आपणाला बनवावी लागेल. त्यासाठी कोळसा आणि अणुऊर्जा एवढेच दोन मार्ग आपल्यासमोर आहेत. आपण जर एक हजार मेगावॅट वीज कोळशापासून बनवणार असू, तर आपल्याला ७० हेक्टर जागा लागेल आणि दरवर्षी आठ हजार रेल्वे वाघिणी लागतील. म्हणजे दररोज २०० ते ३०० कोळशाच्या वाघिणी लागतील. त्यातून हा कोळसा परदेशातून आणावा लागेल. त्यासाठी बंदराची सोय लागेल. मात्र एक हजार मेगावॅट वीज अणुभट्टीतून बनवायची असेल, तर फक्त २० हेक्टर जागा लागेल. एका वर्षात २७ टन इंधन लागेल. त्यातून काही काळाने आपण सध्याचेच इंधन पुन्हा वापरू शकतो किंवा भारतातील थोरियम त्याच अणुभट्टीत वापरू शकतो.

> ✦
> ''या देशात कार्यकर्त्यांनी एक नवी टूम, नवी फॅशन सुरू केली आहे. आपण वीज वापरायची, सरकारने आणखी वीज निर्माण करावी, असा आग्रह धरावयाचा. मात्र आम्हांला 'औष्णिक वीज' नको, त्यामुळे वातावरणात दूषित वायू पसरतात; आम्हांला 'किरणोत्सर्गी वीज' नको, त्यामुळे किरणोत्सर्गाचा धोका आहे; आम्हांला 'जलविद्युत' नको, त्यामुळे जंगले पाण्यात जातात, असे म्हणायचे. वीज बनविण्याचे हे तीनच व्यावहारिक पर्याय जगासमोर आहेत. म्हणजे या कार्यकर्त्यांना नक्की काय हवेय?''
> ✦

आणखी एक गोष्ट आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल सांगतो, की दरवर्षी औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातून बाहेर पडणाऱ्या वायुमुळे ३० लाख माणसे मृत्युमुखी पडतात. आज आपल्याकडे चंद्रपूर, परळी, पारस येथे जी औष्णिक वीजकेंद्रे आहेत, तेथील परिस्थिती काय आहे, हे आपणाला माहिती आहे. त्यातून त्यांच्यासाठी वर्षाला दोन कोटी टन कोळसा लागतो. आपण जर ४०० हजार मेगावॅट वीज कोळशापासून बनवायची ठरवले, तर आपल्याला दरवर्षी परदेशातून १६० कोटी टन कोळसा आयात करावा लागेल आणि आपण आपले अणुऊर्जा प्रकल्प 'किरणोत्सर्गाचे काय' या शब्दांच्या भूलभुलैय्यात अडकवून ठेवलेत! आपण विसरलोय जगातील सारे देश फार मोठ्या प्रमाणात अणुऊर्जा बनवताहेत. खरेतर आपण अमेरिका, फ्रान्स यांच्यापेक्षा खूप अधिक भाग्यवान आहोत. अणुभट्ट्यांचे, काही प्रमाणात आजचे, आणि पुढेतर जवळजवळ संपूर्ण इंधन थोरियम आहे. थोरियमचे सर्वात समृद्ध साठे भारतात आहेत. जैतापूरलापण तिसऱ्या टप्प्यात आपण भारतातील थोरियम इंधन म्हणून वापरणार आहोत. नीट आखणी केली तर यापुढे भारतातील प्रत्येक अणुभट्टीत आपण भारतातील थोरियम इंधन म्हणून वापरू शकू – झाले ते एवढेच. नर्मदा प्रकल्पाप्रमाणे जैतापूरलापण विरोध करीत आपण उभे आहोत. आपण आपल्या समृद्धीचा 'लॉग इन आयडी' आणि 'पासवर्ड' विसरलोय आणि आपली प्रगती रोखणाऱ्या परकीय शक्तींना ते नेमके माहीत आहेत.

*(मार्च २०१५)*

# माया... माझ्या पराभवाचे नाव

**हेरंब कुलकर्णी**

---

मी स्वत: हा एक माझ्या धडपडीचा आठ वर्षे लढून झालेला पराभव मानत होतो. माझ्या पराभवातून एक विषण्णता मनात दाटली होती. स्त्री-शिक्षणाची आकडेवारी सतत सांगताना, सावित्रीबाईंचा वारसा सांगताना एका वंचित मुलीला शाळेपर्यंत आणणे... तिला अत्याचारापासून वाचविणे किती कठीण आहे, हे मी गेली सात वर्षे अनुभवत होतो.

---

मला गेली सात वर्षे छळणारे हे नाव. मला लागलेली साडेसाती असे कुणी म्हटले तरीही मला चालेल. मायाला शाळेत टिकवण्याचा प्रयत्न सतत गेली सात वर्षे करतो आहे; पण माया मला काही भीक घालत नाही. मी पुन्हा पुन्हा तिच्यापुढे हरतो आहे... शिक्षणाचा सक्तीचा कायदा तर तिच्या खिजगणतीतही नाही... मायाचा आणि तिच्या नातेवाइकांचा मला संताप संताप येतो... पुन्हा या कार्टीचे नाव घ्यायचे नाही म्हणून मी निर्धार करतो आणि पुन्हा एकदा ती मला कुठेतरी दिसतेच... पुन्हा मी उसने अवसान आणून तिला कुठल्या तरी शाळेत नेतो. पुन्हा ती बाहेर...सात शाळा आजपर्यंत झाल्या, तरीसुद्धा अजूनही ती शाळेबाहेरच आहे... मी ८०० मुले शाळेत बसविल्याचे श्रेय घेतो, पण एका पारड्यात ८०० मुले दाखल केल्याचा माझा शैक्षणिक सामाजिक अहंकार आणि दुसऱ्या पारड्यात मायाला शाळेत बसविण्याचे माझे अपयश. पण तरीही हे मायाचे पारडेच खाली जाते... मला विलक्षण शरमल्यासारखे वाटते.

कुठे भेटली मला ही माया... भेटलीच नसती तर किती बरे झाले असते... 'सर्व शिक्षा अभियाना'त काम करायला लागल्यावर वीटभट्ट्यांवर मी फिरायचो. आमच्या गावच्या नदीकाठच्या वीटभट्टीवर माया मला भेटली.

या भट्टीवर काम करणाऱ्या माणसांची मुले शाळेत अपवादानेच जातात. मी तरीही गेलो. विचारले. भट्टीवर चार-पाच मुले खेळत होती.

मे महिना. रणरणते ऊन. समोर नदीचे वाहणारे पाणी. तितक्यात माया नदीतून पोहून तशीच ओल्या कपड्याने माझ्यासमोर आली. वय वर्षे सात. काळ्या कुळकुळीत रंगाची चिमुरडी माया. चेहऱ्यावरून पाणी निथळतानाही डोळ्यांतील चमक आणि चेहऱ्यावरचा आनंदी भाव काही लपत नव्हत... ती परका माणूस बघत झोपडीत कपडे बदलायला पळाली. तिच्यासोबत होता सुरेश. तिच्याच वयाचा सुरेश. तोही ओलाचिंब भिजलेला. नदी घरासमोर वाहत असणे एवढी एकच गोष्ट त्यांना श्रीमंती वाटत होती. सारी गरिबी, दैन्य विसरायला लावायला पुरेशी होती... अतिशय आनंदाने ते पाण्यात खेळत होते.

थोड्या वेळाने सगळी लहान मुले एकत्र केली. शाळेत कुणीच जात नव्हते. भट्टीमालकाला बोललो. तोही जून महिन्यात शाळेत घालायला तयार झाला. पालकही तयार झाले...

मे महिन्यात आमच्या ऑफिसातही फारसे काम नव्हते. तेव्हा मी व माझ्या बायकोने ठरविले, की आपण रोज यांना शिकवायचे. तेवढीच शाळेची तयारी होईल. आम्ही जाऊ लागलो. आमचा मुलगा बरोबर मायाच्याच वयाचा. त्यामुळे तोही येऊ लागला. त्यालाही हे मित्र मिळाले.

पहिला काही वेळ या सर्वांना गोळा करण्यात जायचा. माया आणि सुरेश हमखास पाण्यात पोहत असायचे. पाण्यात अंघोळ करणाऱ्या या गर्दीतून त्यांना शोधून काढणे जिकीरीचे असायचे. आम्हांला बघितले, की दोघेही पाण्यात सूर मारायचे आणि पाण्याखालून पोहत लांब निघून जायचे आणि लांब जाऊन हसायचे... आमची गंमत करायचे... ओरडून कसेतरी त्यांना कडेला आणायचे. कडेला येताना ते आमच्या पाण्याला घाबरणाऱ्या मुलाची गंमत करायचे. त्यांच्या अंगावर पाणी उडवायचे. त्याला कधीकधी पाण्यात ओढायचे. तो घाबरून ओरडला की मोठ्याने हसायचे... त्याला सूर मारून दाखवायचे आणि पाण्याखाली बराच वेळ राहून वर येताना मासा घेऊन यायचे... मासा शोधून आणून दाखविणे हा रोजचाच खेळ होता.

मला त्यांचे कौशल्य बघितले की आपण आपली मुले सुरक्षिततेच्या नावाखाली किती बनचुकी करतो आहोत असेच वाटायचे. आपला मुलगा पोहू शकत नाही आणि ही मुले कुणीच न शिकवता पलीकडच्या तीरावर जातात... माया, सुरेश काठावर आले, की नंतर वीटभट्टीवर आमची शाळा सुरू होणार. सर्वांना पाट्यांवर गिरवायला शिकवायचो. मला खूप प्रयोगशील शाळा बघितल्यावर आता प्रत्यक्ष कार्यवाही करून बघायला मिळत होती. तेव्हा वाचन, लेखन शिकविण्याच्या नव्या नव्या पद्धती मी वापरून बघायचो आणि चक्क ही मुले वाचनाच्या दिशेने प्रगती करायला लागली.

मायाचे कुटुंब म्हणजे एक प्रश्नचिन्हच होते. मायाच्या जन्मानंतर मायाच्या वडिलांनी तिच्या आईला सोडले. आईचे आता हे दुसरे लग्न. मुलाच्या आशेने या नवऱ्याकडून तिला पाच मुली रांगेने झाल्या. मायासह एकूण सहा बहिणी. मायाच्या आईचे

वडील याच भट्टीवर कामाला होते. तेव्हा मोठे कुटुंबच तयार झाले होते. हळूहळू मायाचे आजी, आजोबा, आई, वडील यांच्या कुटुंबाचे प्रश्न लक्षात आले. त्यांना रेशन कार्ड, जातीचे दाखले मिळवून देणे गरजेचे आहे हे लक्षात आले... त्यादृष्टीने काम सुरू केले. कागदपत्रे जमवली. तहसिलदारकचेरीत जमा केली. खूप पाठपुरावा केला आणि एक दिवस तहसिल कार्यालयात कळले, की ती सगळी कागदपत्रे हरवली होती.

माझे तर अवसानच गळाले. तहसिलदारांशी खूप भांडलो. पेपरला बातम्या दिल्या. तक्रार केली. दोन दिवसांत तलाठ्याने सर्व कागदपत्रे गोळा करून रेशनकार्ड व जातीचे दाखले भट्टीवर आणून पोहोचते केले होते. मला आश्चर्यही वाटले आणि विषादही. पेपरला बातम्या आणि तक्रारी केल्यावर इतक्या वेगाने पळणारी ही यंत्रणा या माणसांना एकटे गेल्यावर दारात तरी उभी करील का?

कसेतरी दाखले मिळाले. रेशन मिळायला लागले. मुलांना जून महिन्यात शाळेत दाखल केले. माया शाळेत जाऊ लागली. मला वाटले, चला प्रश्न मार्गी लागला.

पुढे काही दिवसांनी एकदा भट्टीवर गेलो तर भट्टीवर शांतता. मालकाला विचारले, मंडळी कुठे गेली? मालक म्हणाला, 'त्यांना कोण मालक? तेच त्यांच्या मनाचे राजे! गेले असतील कुणीकडे.' अनेक महिन्यांनी शोध लागला की ते जवळच्या भट्टीवर आहेत.

तिथे गेलो. खूप बोललो. मायाची शाळा सुटलेली. पुन्हा जवळच्या शाळेत दाखल. असे शाळा बदलणे, भट्टी बदलणे काही थांबेना.

एकावर्षी जून महिन्यातच घरी गेलो. भट्टीवर मायाची आई, बाप, आजी बसलेले. काय करायचे? सरळ मायासह चार मुलींना घेतले आणि आश्रमशाळेत नेले. मायाच्या आईला एकदम चार पोरींची शिक्षणाची सोय झाल्यापेक्षासुद्धा चार पोरींच्या जेवणाची सोय झाल्याचा जास्त आनंद झाला...भार कमी झाल्याचा आनंद चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.

माया आश्रमशाळेत बंद केल्यावर आता चिंता मिटली असे वाटले... पण तिच्या आजीला भलतेच सुचले. तिने सुट्टी काढून मायाला नवस फेडायला आणले. नवस होता खंडोबाशी लग्न लावायचा. माया लहानपणी आजारी होती. खंडोबाला नवस केला, तेव्हा पोरगी वाचली. तुझ्याशी लग्न लावेन असा नवस आजी बोलली होती. झाले! लग्न ठरले. भट्टीवर लग्नाचा कार्यक्रम. मला निमंत्रण आले. गेलो.

सीन असा. सगळीकडे भंडारा उधळून पिवळेधम्मक झालेले. लहानशी माया नटलेली. तिला साडी नेसवलेली. मायाला काहीच समजत नव्हते. खंडोबा नवरा म्हणजे काय हे काहीच कळेना. बिचारी खाली मान घालून बसलेली. मला बघितल्यावर तर अधिकच लाजली. लग्न लागले. वऱ्हाड जेवून पांगापांग झाली. आजीला बाजूला घेतले. म्हटले, 'हा काय वेडेपणा आहे...' आजी माझ्यावरच उचकली. म्हणाली, 'सर, तुमचा नसंल भरवसा. पण आमचं लेकरू खंडोबानं वाचवलंय. त्यानं वाचवलंय. त्याच्याच स्वाधीन तिचं जगणं.'

मला एकदम यल्लमादेवी आणि तिथल्या बायकांची परवड आठवली... सर्रकन काटा आला... म्हटले,... 'म्हणजे तिला आता जेजुरीला पाठवणार?'... हसल्या, म्हणाल्या, 'सर नाही हो... लेकरू इथंच तर राहणार. बघू पुढचं पुढं...'

न जेवताच मागे फिरलो. अस्वस्थ झालो. लहानपणची पाण्यातून सूर मारून मासा काढून देणारी माया डोळ्यांपुढं आली... आज तीच मासा होऊन भलत्याच जाळ्यात सापडली होती.

माया पुन्हा आश्रमशाळेत. पण हळूहळू रविवारी घरी यायची. कुठे जागरण-गोंधळाच्या कार्यक्रमाला जायला लागली. आश्रमशाळेत गैरहजेरीच्या तक्रारी वाढल्या. कार्यक्रमात ती हळूहळू नाचूही लागली. लहान मुरळी म्हणून कौतुक व्हायचे. पैसे मिळायचे आणि आजीला आनंद खंडोबाची सेवा करते म्हणून.

मायाच्या हातात पैसा यायला लागला. आश्रमशाळेतून तक्रारी यायला लागल्या. ती जवळच्या दुकानातून गुटक्याच्या पुड्या खाते. इतर मुलींशी अचकट विचकट बोलते. फारच बिनधास्त वागते. सतत मेकअप करते. इतर मुली तिच्यासारख्या नटतात. असल्या अगम्य तक्रारी येऊ लागल्या. मायाही फारशी हजर राहत नव्हतीच. तिच्या इतर तीन बहिणी शिकवा, या तडजोडीवर माया पुन्हा घरी आणली. तिच्या वडिलांशी बोलायला जावे तर ते म्हणायचे, 'पाच पोरी माझ्या आहेत. त्यांचं काहीभीबी सांगा. पण माया माझी नाहीच. ती पहिल्या बापाची. मी काय करू? तिचं मला काहीबी नका सांगू.'

मी गप्प. पुन्हा काही दिवस कुटुंब तालुक्याबाहेर पळाले. सिन्नर तालुक्यात गेल्याचे कळले. अशीच दोन वर्षे गेली आणि एक दिवस मोठी झालेली माया मला दिसली. सगळ्यांचेच अवतार दोन वर्षात बदललेले. मला कुणी ओळख दाखवेना. गोडीत घेतल्यावर कळले, की माया तिकडे शाळेत गेलेली नव्हती. निरागसताच लोपून ती आता थोराड दिसू लागली होती. माझ्यासमोर मुद्दाम गळ्यातले मंगळसूत्र नाचवत बसली होती.

मी परत फिरलो. आठ दिवसांनी मायाची आई आजी मला शोधत आल्या. घाबरलेल्या. रात्रीची वेळ. मीही घाबरलो. मायाच्या बापाकडे एक सीमकार्ड सापडल्याने मोबाइल चोरीच्या गुन्ह्याखाली त्याला अटक झालेली. पोलिसांअगोदर गावातील माणसांनी बेदम मारलेले. तो बेकसूर असल्याचे त्या सांगत होत्या. त्याचा एक लांबचा नातेवाईक मुक्कामाला आला. त्याच्याकडेच ते सीमकार्ड होते वगैरे. पोलिसांनाही खरा आरोपी सापडला होता. एका पत्रकारमित्राच्या मदतीने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी दंडाधिकाऱ्याची समज देऊन सोडविले. भट्टीमालकाने वर त्याच्या डोक्यावर हात ठेवला. म्हणाला, 'बाबा तुला सोडवायला लई खर्च झालाय. आता कामातून फेड.'...मालकाने पुन्हा उपकाराच्या ओझ्याखाली त्याला दाबला.

आता कुटुंब पुन्हा माझ्याकडे भक्तिभावाने पाहू लागले आणि उपकाराची फेड म्हणून माया पुन्हा शाळेत जायला लागली...पण काही दिवसच.

जंगलात एके ठिकाणी त्यांची शेतजमीन होती. तिथे दूर

डोंगराच्या पायथ्याशी जाऊन ते राहायला लागले. एक दिवस बघायला गेलो, तर थक्कच झालो. दूर डोंगराच्या पोटाला झोपडी. एकटीच झोपडी. नजरेच्या टप्प्यात काहीसुद्धा दिसेना. दाट झाडी. शेती कसायला ना बैल ना नांगर. केवळ हातची जमीन अतिक्रमणात जाऊ नये म्हणून राहिलेले. तिथे लाइट नाही की पाणी नाही. जवळच्या एका खेड्यात शाळा होती. मायाला तिथे तरी पाठवा म्हणत राहिलो. पण एकटी कशी जाणार, म्हणत टाळत राहिले... पुन्हा माझी गरज लागलीच.

एक दिवस सकाळीच फोन कुठूनतरी दुकानातून लावलेला. रडक्या आवाजात सांगत होते... 'सर, आपली शेळी वाघाने खाल्ली हो...' मी माझा फोटोग्राफर मित्र गोरख घोडकेला घेऊन गेलो. त्या वातावरणात भीतीच वाटत होती. झाडांच्या मधोमध शेळी पडलेली. घरातला माणूस गेल्यावर बसावे तसे रडवेले चेहेरे करून सारे बसलेले...आम्ही फोटो काढला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतले. वनअधिकाऱ्यांची माणसे पाठवली आणि ३००० रुपये मिळतील असे प्रकरण केले... या भांडवलावर मी पुन्हा दडपण आणले आणि त्याला मायाला शाळेत पाठवायला तयार केले.

माया पुन्हा त्या जवळच्या खेड्यात जायला लागली. त्या कौतुकाने तिच्या स्वागताचा कार्यक्रम केला. ती शाळेत जायला लागली. मी पुन्हा निर्धास्त झालो.

अनेक दिवस पुन्हा भेट नाही. एकदा खूप दिवसांनी मायाचे वडील रस्त्यात भेटले. मी विचारले, 'शेळीचा चेक मिळाला का...'

तो म्हणाला, 'चेक मिळाला पण पैसे मिळाले नाहीत...'

मला कळेनाच. म्हटले, 'म्हणजे?'

तो म्हणाला, 'वनखात्यात चेक आला, पण ते म्हणाले पैसे जमा करायला बँकेत खातं उघडा. बँकेत गेलो तर ते म्हणाले, रेशनकार्ड पुरावा म्हणून आणा किंवा रहिवासी दाखला... आता जवळ काहीच नाही. तुम्ही दिलेलं कार्ड तेव्हाच हरवलं. तलाठी रहिवासी दाखला देत नाही. त्यामुळे बँकेचं खातं उघडता आलं नाही. यात सहा महिने संपले आणि चेक आता बाद झाला...'

मला काही सुचेनाच. शेळी मारल्यावर फोटोग्राफर नेऊन, वनखात्याची माणसे पाठवून, कसेतरी प्रकरण केले आणि त्याचा शेवट हा असा झाला... पुन्हा चेक मिळायला पुन्हा अर्ज करा असे उत्तर आले. पुन्हा पाठपुरावा सुरू...

दरम्यान माया पुन्हा शाळेबाहेर. शेवटी मीच आता शिक्षक म्हणून शाळेबाहेर आलो. म्हटले, चला आता, मीच बघतो कशी शाळेत बसत नाही ते. त्या शाळेकडून दाखला मागवला. तिच्या आईबापाला आता मीच शिक्षक आहे हे पटवले. प्रत्यक्ष शिक्षक म्हणून तिला आता सातव्यांदा शाळेत दाखल केले आणि आता माझ्याकडून जातेय कुठे या गुर्मीत राहिलो.

वर्गात माया यायला लागली. वयाने कमी पण अनुभवाने मोठी. जागरण गोंधळाची कामे करून नजर उघडी झालेली माया त्या लहान पोरींमध्ये रमेना... एक दिवस काही पोरींना तिला त्रास दिला तेव्हा तिने जिवंत उंदराची पिल्ले शाळेत आणली आणि त्या पोरींच्या दप्तरात टाकली. सगळ्या वर्गात हलकल्लोळ. वर्ग सोडून मुली रडत बाहेर आणि जिवंत उंदराची पिल्ले बघायला उरलेली शाळा थेट वर्गात...त्या मुलींचे पालक भांडायला शाळेत... आणि सगळ्यांच्या दृष्टीने माया खलनायिका झाली. पुन्हा काही दिवस शाळेबाहेर.

तिला मात्र जिवंत उंदराची पिल्ले वर्गात आणण्यात काहीच गैर वाटले नव्हते... जिवंत माशांशी लहानपणी खेळणारी ती... पण मध्यमवर्गीय पालकांनी खूप कांगावा केला. कशीतरी तिला पुन्हा बसवली... पुन्हा तेच. तिची आजी आता वेगळी राहत होती. ती तिला घेऊन गेली... पुन्हा आजीकडे मनधरणी सुरू केली. आजी तिला कधी कामाला पाठवायची, तर कधी नाचायला. ती मुरळी म्हणून वाघे आता त्यांच्या घरी येत. तिचे भावविश्वच बदलले. आजीचे दारू प्यायचे प्रमाण वाढले. आजी, मामा दारू प्यायचे आणि माया रस्त्यावर त्यांच्यासोबत बसलेली दिसायची. कुणाशी बोलायचे? कुणाला समजावून सांगायचे? आता माया जीन-पँट, टी शर्टमध्ये दिसू लागली. तिच्याबाबत काही वाईटसाईटही लोक बोलायला लागले. तिचा गैरवापरही होतोय असे कुणी बोलले की कसेनुसे व्हायचे. माझ्या मुलाबरोबर लहानपणी खेळायला येणारी माया समोर दिसायची.

एकदा पुलावर भेटली. सगळे नाते विसरून मला फाडफाड बोलली. म्हणाली, 'मला नाही शिकायचं. माझा खंडोबा माझं बघून घेईल, तुम्ही मला पुन्हा शाळेचं बोलायचं नाही,' असं म्हणून गेली...

शेवटचा पर्याय कायद्याचा होता. पोलीस स्टेशनला अर्ज दिला. लहान मुलीचा मुरळी म्हणून गैरवापर होतो आहे. ते म्हणाले, प्रत्यक्ष जागरण गोंधळ सुरू असताना आम्हांला सांगा, आम्ही तिथं येऊन तिला ताब्यात घेऊ. मी गप्पच झालो. आता घरात शुभकार्य असताना कोण आम्हांला कळवणार आणि म्हणणार, की या पोलीस घेऊन आणि बंद पाडा आमचा कार्यक्रम...

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यकर्त्यांनी सापळा लावायचे ठरविले.

एक मधला मार्ग निघाला. मित्र वसंत मनकर व गजेसर वकील. ते म्हणाले तिच्या आईने अर्ज दिला, तर तिची मालकी आईकडे येऊ शकते. कायद्याने हे घडेल. तिचा गैरवापर तर टळेल. रात्रीच्या वेळी वीटभट्टीवर गेलो. आई मासे विकत होती. समोर गिऱ्हाइके. तिला कायदा समजावून सांगितला. म्हणालो, फक्त सही करा. मुलगी घरात... तिचे उत्तर ऐकून पायच गळाले... ती म्हणाली, 'कशाला तिला इथं आणता माझ्या बाकीच्या पोरी बिघडवायला... ती अचकट विचकट बोलते. शिव्या देते. राहू द्या तिला तिकडेच,'

खूप संतापलो. गर्दी जमा झाली. म्हटले, दारूसाठी तिची आजी तिला विकून टाकील. तिला काहीच फिकीर नव्हती... एक आई अशी बोलू शकते हेच मला पटत नव्हते. तिच्या काकाशी बोललो, तर तो दारूच्या नशेत. त्याची पहिली बायको त्याला

सोडून गेलेली. दुसरी केलेली. माझ्या सोबत वकील आहे म्हटल्यावर तो त्याचेच दुःख सांगत बसला... आता काय करावे? अर्ज द्यायला बापही तयार नाही. तो म्हणाला, 'ती आहे पहिल्या नवऱ्याची, मी कसा अर्ज देऊ?'

शेवटी तिचा एक मामा औरंगाबादला असतो, त्याच्याशी बापाने संपर्क केला व कायदेशीर प्रकरणातून सुटका केली. मामा आला व मायाला घेऊन गेला. त्याला फोन केला, तर शाळेत घालतो म्हणाला... मला सुटल्यासारखे झाले. किमान माझ्या डोळ्यासमोरून प्रश्न गायब झाला होता. हे फसवे समाधान तरी आहे.

मी गावात रोज दबकत फिरतो...पुन्हा माया दिसू नये म्हणून ... आज माया दिसली नाही या समाधानात घरी येतो. पण ती पुन्हा कधीतरी दिसणारच आहे... हे माहीतच होते.

आम्ही गाफिल राहिलो पण तिथून काही महिन्यांतच गुपचुप तिला इथे आणले आणि पुन्हा जागरण-गोंधळ, रात्रीचे लोक येणे सुरू झाले... तिच्या आजीला, मामाला पैशांची चटक लागली होती. ती इथे आल्याची माहिती चार महिन्यांनी मिळाली, हे पुन्हा लक्षात आले, तेव्हा खूप उशीर झाला होता...१३ वर्षांची ती आता पाच महिन्यांची गरोदर होती....ॲबॉर्शन करण्याचा घाबरून प्रयत्न करतील आणि मग आरोपी सापडणार नाही तेव्हा तिला नैसर्गिक रीतीने बाळंत होऊ द्यावे, असे ठरवले. तेव्हा बाळंत होताच पोलिसांना कल्पना दिली. पोलीस सतत बंदोबस्त आणि इतर कामे सांगत राहिले. पण पाठपुरावा व ती तिथे आहे याची खात्री करत राहिलो. बाळंत झाल्यावर तिला खूपच रक्तस्राव झाला, त्यांची झोपडी रस्त्याच्या खूपच आत होती. तिचे नातेवाईक तिला पाठकुळी घेऊन येत होते.

शेवटी एक दिवस सतत पाठपुरावा करून पोलिसांच्यामार्फत तिला ताब्यात घेतले... आम्ही सगळे तिच्या खोपटावर गेलो, तेव्हा ती झोपडीत आत बसली होती. तिच्या आजीने नेहमीप्रमाणे आरडाओरडा केला. तिला वाटले, की आपली नात शाळेत जात नाही म्हणूनच पोलीस आले आहेत. सर्वांना पोलीस स्टेशनला आणले. पोलिसांनी कोणतेच पुरावे नाहीत, म्हणून टाळाटाळ केली, पण आम्ही पत्रकारांची मदत घेतली आणि सर्व चॅनलवर बातम्या लागल्या. दिवसभर ठळक बातमी झाली आणि लगेच गुन्हा दाखल झाला... माजी आमदार विवेक पंडित येऊन गेले. तेव्हा खूप मोठा सामाजिक प्रश्न यात गुंतलेला असल्याचे लक्षात आले.

मुरळी आता महाराष्ट्रात शिल्लक नाहीत असा शासनाचा दावा आहे. तो दावा खोटा असल्याचे आमच्या या प्रकरणाने उघड झाले. पण प्रकरण इतके गाजूनही शेवटपर्यंत मुख्य आरोपींना अटक झाली नाही. फक्त तिची आजी व जे गोंधळाच्या कार्यक्रमांना न्यायचे ते वाघ्या-मुरळी यांनाच पकडले गेले.

पुढे तिला व तिच्या मुलीला जवळच्या महिला-आश्रमात ठेवले. तिथे सतत भेटायला जावे लागायचे, कारण ती खूप त्रास द्यायची. एकदा तिथून पळून जायचा तिने प्रयत्न केला. सर्वोदय नावाच्या एका जुन्या गांधीवादी संस्थेतल्या त्या महिला कर्मचाऱ्यांचे विलक्षण कौतुक वाटते. इतक्या अल्प मानधनात त्या बिचाऱ्या प्रत्येक मुलीची काळजी घेतात. हिने इतका त्रास दिला, पण त्या सारे सहन करायच्या. एकदा मायाने तिच्याच लहान मुलीचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. पण त्या संस्थेने तिला जीव लावला. पुण्याच्या एका देशपांडे नावाच्या गृहस्थांनी तिच्यासाठी ५००० रुपये पाठविले.

हळूहळू केस उभी राहिली. माया आजीला भेटायला व्याकूळ झाली होती. आपली आजी आपल्यामुळे तुरुंगात आहे याचे तिला खूप दुःख व्हायचे. याचा फायदा तिच्या वकिलाने उचलला. त्याने तिला आजीला सोडविण्यासाठी कशी साक्ष द्यायची हे पढविले आणि ती तसेच बोलली. 'माझ्यावर अज्ञात व्यक्तीने अत्याचार केला, आजीचा काही दोष नाही,' असे म्हणाली.

ती असे बोलल्यावर केसच संपली आणि सर्व आरोपी निर्दोष सुटले. मुख्य आरोपी तर फरार होता. आमचा पराभव झाला... आणि तो जिच्यासाठी इतके केले तिनेच आजीच्या प्रेमापायी केला.

मी स्वतः हा एक माझ्या धडपडीचा आठ वर्षे लढून झालेला पराभव मानत होतो. माझ्या पराभवातून एक विषण्णता मनात दाटली होती. स्त्री-शिक्षणाची आकडेवारी सतत सांगताना, सावित्रीबाईंचा वारसा सांगताना एका वंचित मुलीला शाळेपर्यंत आणणे... तिला अत्याचारापासून वाचविणे किती कठीण आहे, हे मी गेली सात वर्षे अनुभवत होतो.

एक हताशा आणि निराशा नक्कीच मनात आहे...की आपण पाच वेगवेगळ्या शाळांमध्ये दाखल करूनसुद्धा तिला शिकवू शकलो नाही... पाठपुरावा करूनसुद्धा तिला या अत्याचारातून वाचवू शकलो नाही.

आकडेवारीत साक्षरता शिक्षण मोजताना जेव्हा असे एक एक उदाहरण आपण तपासतो, तेव्हा लक्षात येते की हे आव्हान किती थकविणारे आहे.

शिक्षणावर लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष एका एका समस्येला भिडणे किती कठीण आहे ही जाणीव या प्रकरणाने करून दिली.

*(पुढे लेखकाने पाठवलेला वाढीव मजकूर)*

कोर्टाच्या केसचा निकाल लागला. आजी सुटली. त्यामुळे माया खूष होती. पण ती काही केल्या शिकायला तयार झाली नाही. आम्ही निराश झालो. या सगळ्या धडपडीतून शेवटी तिने शिकावे हाच प्रयत्न होता पण तोही फसला. ती मुरळी झाली नाही एवढेच फक्त समाधान.

पण हेही समाधान टिकले नाही. माया १८ वर्षांची झाली. अठरा वय झाले की अशा संस्थेत राहणाऱ्या मुलामुलींना त्यांची इच्छा विचारली जाते व त्यानुसार कार्यवाही केली जाते. ज्या संस्थेत ती होती त्यांनी आम्हाला बोलावून घेतले. मी व एक मित्र तिथे गेलो. ती समोर बसली. ते १८ वयानंतरही तिला सांभाळायला तयार होते. मी तिला सुचवले की नगरला स्नेहालय ही प्रसिद्ध संस्था आहे. या संस्थेत जर ती गेली, तर मुलीचे चांगले शिक्षण होईल. संस्था तिचे लग्न करून देईल. मी हे बोललो आणि नंतर तिचे जे बोलणे ऐकले तो क्षण मी

कधीच विसरणार नाही. जणू तुमचा आणि माझा काहीच संबंध नाही अशी भूमिका तिने घेतली. ''मी कुठेच जाणार नाही. मी माझ्या आजीकडे जाणार आणि मला कायदा माहीत आहे. तेव्हा माझ्यावर कोणीच सक्ती करायची नाही.'' आम्ही तिला खूप समजावून सांगितले, पण ती अधिकच अपमानकारक बोलू लागली. आमचा नाईलाज होता. उठून आलो. लवकरच संस्थेने तिला आजीकडे पोहचवले. एका सुंदर इमारतीतून ती पुन्हा आजीच्या झोपडीत गेली. त्या झोपडीत सगळीच दैना होती. तिच्या त्या लहान मुलीचे खूप हाल होत होते, पण तिला त्यातच समाधान वाटत होते.

अगदी दोन महिन्यापूर्वी मी वीटभट्टीजवळून जात होतो. तिच्या आजीने हाक मारली. कागदपत्रे हवी होती. बघितले तर मायाची लहान मुलगी मातीत खेळत होती. तिथे काम करून माया काळी पडली होती. अशक्त झाली होती. मी पुन्हा एकदा शेवटचे तिला ''स्नेहालयला जा'' असे म्हणालो. ती ठामपणे ''नाही'' म्हणाली. आजी म्हणाली, ''आता स्थळ शोधतोय. लग्न करू.'' या निरक्षर आणि कुमारी माता असलेल्या मायाला असाच एखादा वीटभट्टीवरचा नवरा मिळणारा आणि ही पुन्हा आजी आणि आईबापासारखे तेच अमानुष कष्टाचे जीवन जगणार!

तिचा आर्थिक, सामाजिक स्तर बदलण्याचा माझा प्रयत्न बारा वर्षांच्या धडपडीनंतर असा निष्फळ ठरला. क्षणभर 'हे लोक असेच असतात. उपकाराची जाणीव नसते' वगैरे सगळे मनात येऊन गेले. पुन्हा असे काहीच करायचे नाही असेही ठरवले. पण त्यात फार अर्थ नसतो. पुन्हा असे काही घडले की मी सगळे विसरून त्या नव्या विषयात पुन्हा ताकदीने उतरेन आणि नव्या एखाद्या मायाच्या आयुष्याला न्याय देण्यासाठी धडपडेन. हे विसंगत असले तरी हीच माझ्या संवेदनशीलतेची सुसंगती आहे आणि तीच अधिक सुंदर आहे.

(नावे काल्पनिक)

*(दिवाळी २०१६)*

## निळ्या पहाटेचे आवाहन

दलित साहित्याची खरीखुरी गरज स्वच्छ व दार्शनिक अधिष्ठानाची आहे. दलित समाजाला साहित्यिकापेक्षा निष्ठावंत विचारवंतांची अधिक आवश्यकता आहे. विचारदरिद्री समाजात कोणतीच कला निर्माण होऊ शकत नाही. बौद्धांचे तत्वज्ञान दलित समाजाचे मूल्यवान धन आहे. केवळ काही नित्य-नैमित्तिक संस्कारांपुरते हे धन बाहेर काढून पुन्हा लगेच ते पुरून ठेवले, तर अशी कृपणता त्या धनाचा क्षय करील.

मुख्य म्हणजे, बौद्ध जीवनमूल्यांची कास धरल्यास दलित समाजाचे केवळ नकारात्मक विचारसरणीपासून संरक्षण होईल. कदाचित वर्गकलहाच्या प्रलोभनीय विचारसरणीलाही तो चार हात दूर ठेवू शकेल. त्यामुळे बौद्ध विचारप्रणाली मनोमन रुजविण्याचे व दलित मने दृढ करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य दलित सामाजिक विचारवंतांनी केले पाहिजे.

पण समाज वाढतो व विकासतो तो विद्रोहाने नव्हे व निषेधानेही नव्हे; तो विधायक विचारप्रणालीच्या खांद्यावर विश्रब्धपणे विसावलेला नसेल, तर प्रगतीची वाटचाल करण्यास त्यास बळ लाभणार नाही. डॉ. आंबेडकरांना खरा वैचारिक शिष्य लाभला नाही, तर दलितसमाज महान स्वप्ने पाहू शकत नाही, असाच त्याचा अर्थ होईल.

दलित साहित्याची दुसरी गरज नव्या मराठी धर्मग्रंथांची व पुराणांची आहे. बौद्धदर्शनाच्या आधारे नवीन रामायण-महाभारतासारखे ग्रंथ निर्माण करणे आवश्यक आहे. नव्या मिथ्स निर्माण होणे आवश्यक आहे. नवबौद्ध दलित समाज रामायण, महाभारत मानीत नाही. दलितांच्या बालकांना एखादी आजीबाई कोणत्या गोष्टी सांगणार? दलितांतून एखादा शिवाजी निर्माण करण्यास कोणते संस्कारी साहित्य वापरणार? आरत्या, स्तोत्रे, पदे यांबरोबरच आख्याने, कथाकाव्ये, भाष्ये, पोथ्या वगैरेंचीही निर्मिती करणे भाग आहे. प्राचीन बौद्ध साहित्याची या दृष्टीने पाहणी करण्याचे काम दलित साहित्यिकांचे आहे. 'फोडिले भांडार' अशी आरोळी देणारे कविलेखक पुढे आले, तरच हे शक्य आहे. सगळ्याच दलित साहित्यिकांनी सूडाच्या कथा लिहिल्या, तर संस्कृतिसंभवाचे हे पूरक कार्य कोण करणार?... ''हे विसावे शतक आहे. वैज्ञानिक युग आहे. त्यामुळे पुराणसाहित्यनिर्मिती कालविसंगत व म्हणून अशक्य आहे,'' असे काहींचे म्हणणे असेलही; परंतु आधुनिकतेचा हा हवाला देऊन दलित समाजाचे वाङ्मयीन प्रश्न कधीच सुटणार नाहीत.

वैज्ञानिकता सांस्कृतिकतेला काटछेद देऊ शकत नाही. अचल नि दृढतम दार्शनिक आत्मप्रत्ययातूनच कलासाहित्यासारखी अभिव्यक्ती समाज संसिद्ध करू शकतो आणि तसा अचल व दृढतम दार्शनिक आत्मप्रत्यय केवळ धर्मश्रद्धाच किंवा तत्सदृश श्रद्धाच निर्माण करू शकते. ही महत्त्वाची वस्तुस्थिती दलित समाजीयांनी लक्षात घेतली नाही, तर वर्गविग्रहाच्या, विद्रोहाच्या व निषेधाच्या कांचनमृगाचा मोह पडून, तो एका घातक भूलभुलय्यात अडकून पडल्याशिवाय राहणार नाही. यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका अनिष्ट सांस्कृतिक पोकळीत तो स्वत:स टांगून घेईल आणि या देशात पुन्हा बौद्धदर्शनाचा पूर्ण पराभव होईल.

**– प्रा. रा. ग. जाधव**

***(माझे चिंतन)***

# दिल्ली विद्यापीठाची दुनिया

**निशिकांत मिरजकर**

डॉ. निशिकांत मिरजकर दिल्ली विद्यापीठातील कला शाखेचे अधिष्ठाता (डीन) व व्यवस्थापन परिषदेचे (एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे) सदस्य होते. त्यांच्या पत्नी डॉ. ललिता यांनीही तिथे प्राध्यापक म्हणून काम केले. देशातील बहुतेक प्रमुख भाषांचे तिथे शिक्षण घेता येते. तीस वर्षे त्यांनी तिथे व्यतीत केली. त्यांचे तेथील काही अनुभव.

सांगलीच्या श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून चार वर्षे काम केल्यानंतर जुलै १९७८ मध्ये मी दिल्ली विद्यापीठात रुजू झालो. एक वर्षानंतर आम्ही आमचा कुटुंबकबिला दिल्लीला हलवला. आणखी एका वर्षानंतर डॉ. ललिता मिरजकर यांचीही नियुक्ती दिल्ली विद्यापीठात झाली. अधिव्याख्याता, प्रपाठक, प्राध्यापक अशा पदोन्नती होत आम्ही दोघांनी दिल्ली विद्यापीठात अध्यापन केले. कालांतराने मी 'आधुनिक भारतीय भाषा व साहित्याभ्यास' या आमच्या विभागाचा प्रमुख झालो, कलाशाखेचा अधिष्ठाता (आर्ट्स फॅकल्टीचा डीन) बनलो, विद्यपीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा (एक्झिक्युटिव्ह कौन्सिल) सदस्य बनलो. तीस वर्षांचा प्रदीर्घ काळ मी दिल्ली विद्यापीठात व्यतीत केला. या प्रदीर्घ काळातील अनुभवांविषयी परिचितांना आणि जिज्ञासूंना कुतूहल असणे हे स्वाभाविक आहे. दिल्ली सोडून आता पुरेसा काळ लोटल्यामुळे मलाही त्या अनुभवांचा पोत काहीशा तटस्थपणे न्याहाळणे आणि त्यातले ताणेबाणे नीट समजून घेणे शक्य होईलसे वाटते. म्हणून 'अंतर्नाद'च्या वाचकांसाठी तसा प्रयत्न करण्याचे योजले आहे.

सुरुवात दिल्ली विद्यापीठातील मराठीच्या अध्यापनापासून करू या कारण भारताच्या राजधानीतील विद्यापीठात मराठीचे अध्यापन कसे चालते, याविषयी बऱ्याच लोकांना कुतूहल असते. कित्येकांना तर दिल्लीत विद्यापीठीय पातळीवर मराठीचे अध्यापन ही गोष्टच असंभाव्य आणि अविश्वसनीय वाटते.

दिल्ली विद्यापीठात मराठीचे अध्यापन अठ्ठावन्न वर्षांपूर्वी म्हणजे १९६०मध्ये सुरू झाले. तेही हिंदी विभागाच्या अंतर्गत. हिंदी विभागाने तेव्हा एम.ए.च्या अभ्यासक्रमात 'कॉंपोझिट कोर्स' या वैकल्पिक अभ्यासक्रमाचा समावेश केला. त्यानुसार मराठी, बांग्ला, तमिळ आणि मल्याळम यांपैकी कोणत्याही एका भाषेतील साहित्याविषयीच्या दोन प्रश्नपत्रिका एम.ए.(हिंदी)च्या विद्यार्थ्यांना घेता येण्याची सोय निर्माण झाली. अर्थातच या चारही विषयांच्या अध्यापनाची व्यवस्था केली गेली. मराठीकरिता डॉ. म. अ. करंदीकर यांना हिंदी विभागामध्ये मराठीचे प्रपाठक म्हणून नेमण्यात आले.

लगोलग 'आधुनिक भारतीय भाषा' या स्वतंत्र विभागाची स्थापना झाली. दिल्ली विद्यापीठात मी या विभागात मराठीचा अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो, तेव्हा या विभागात असमीया, बांग्ला, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, मणिपुरी, ओडिया, पंजाबी, सिंधी, तमिळ आणि तेलुगू अशा बारा भाषांचा समावेश होता.

या सर्वच भाषांमध्ये प्रमाणपत्र आणि पदविका असे भाषेचे अभ्यासक्रम होते. हे अभ्यासक्रम केवळ भाषाशिक्षणाचे होते. हे अर्धवेळ अभ्यासक्रम होते. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याकरिता विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी असे. अक्षरश: हजारो विद्यार्थी प्रवेशासाठी अर्ज करीत. या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक पात्रता 'बारावी उत्तीर्ण' एवढीच होती, तरी पदवीधर विद्यार्थीही प्रवेशासाठी अर्ज करीत. या गर्दीमागे नवीन भाषा शिकण्याची विद्यार्थ्यांची तळमळ हे कारण नव्हते. खरे कारण वेगळेच होते. त्या काळी विद्यार्थ्यांना दिल्लीच्या स्थानिक बससेवेचा 'ऑल रूट पास' केवळ बारा रुपयांत मिळायचा. म्हणजे महिन्याला फक्त बारा रुपये भरून कोणत्याही रूटच्या बसने कितीही वेळा प्रवास करता यायचा. प्रवेश मिळवण्याची विद्यार्थ्यांची धडपड या पासकरिता असायची! एकदा पास पदरात पडला, की मग ते वर्गाकडे ढुंकूनही पाहायचे नाहीत. पन्नास विद्यार्थांना प्रवेश दिला, तर परीक्षेपर्यंत सहासातच विद्यार्थी उरलेले असायचे. हे खरे विद्यार्थी असायचे. श्रीकांत नरुला नावाचा एक विद्यार्थी होता. तो महानुभाव होता आणि धर्मभाषा म्हणून मराठी शिकत होता. निष्ठेने मराठी शिकून त्याने महानुभावांचे साहित्य वाचून काढले आणि श्रीचक्रधरांच्या जीवनावर एक आणि महदाईसेच्या जीवनावर एक अशा दोन उत्कृष्ट चरित्रात्मक कादंबऱ्या हिंदीमध्ये लिहिल्या. अंशुल नावाची एक बिहारी मुलगी होती. तिला एका मराठी मित्राशी लग्न करायचे होते, म्हणून ती मराठी शिकली. त्याच्याशी लग्न करून ती मुंबईला गेली आणि आता उत्कृष्ट मराठी बोलते. केंद्रीय हिंदी निदेशालयातील एक अधिकारी आणि संसदेमध्ये अनुवादक म्हणून काम करणारे एक अधिकारी मराठी शिकले आणि आपापल्या कार्यालयात त्यांना त्याचा उपयोग करता आला.

या अध्यापनासाठी आम्ही प्रारंभी डॉ. ग. न. साठे यांचे 'मराठी स्वयंशिक्षक' हे पुस्तक वापरत असू. नंतर कल्याण काळे आणि अंजली सोमण यांचे 'लर्निंग मराठी' हे पुस्तक निघाल्यावर ते वापरू लागलो. मी विभागप्रमुख झाल्यावर सगळ्या भाषांमध्ये प्रमाणपत्र, पदविका यांच्यानंतरचा 'उच्च पदविका अभ्यासक्रम' सुरू केला. यासाठी मराठीकरिता एक लघुनिबंधांचे पुस्तक लावले होते.

या वर्गांतील अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकवणे हा मला अगदी सर्वस्वी नवीन अनुभव होता. मराठीतील लिंगव्यवस्था ही इतकी विचित्र व अनियमित आहे, की त्यामुळे नवीन भाषा म्हणून शिकण्यासाठी मराठी ही सर्वात अवघड भाषा होऊन बसली आहे. 'ळ' हे अक्षर आणि च-छ-ज-झ यांचे दंततालव्य उच्चार उत्तरेकडच्या विद्यार्थ्यांना खूप प्रयत्न करूनही नीट जमत नाहीत. हे सगळे त्या अमराठी विद्यार्थ्यांना इंग्लिश व हिंदी माध्यमांतून शिकवताना भाषेविषयी, भाषेच्या मोडणीविषयी, तिच्या क्षमतांविषयी मीही काही नवीन-नवीन शिकत होतो.

दिल्ली विद्यापीठात मराठी विषयात पीएच.डी. करण्याचीही सोय होती. पण एम.ए. मराठीची सोय नसल्यामुळे (एम.ए.ची सोय फक्त बांग्ला आणि तमिळ या दोन भाषांमध्ये होती. अजूनही आहे.) बाहेरून कुठून एम.ए. मराठी करून दिल्लीत स्थायिक झालेले विद्यार्थीच मराठीमध्ये पीएच.डी. करू शकत होते. असा योग कपिलाषष्ठीचा योग होता. माझ्या इतक्या वर्षांच्या अध्यापनाच्या कारकिर्दीत फक्त दोन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अशा तऱ्हेने मराठीमध्ये पीएच.डी. केले.

✦

या गर्दीमागे नवीन भाषा शिकण्याची विद्यार्थ्यांची तळमळ हे कारण नव्हते. खरे कारण वेगळेच होते. त्या काळी विद्यार्थ्यांना दिल्लीच्या स्थानिक बससेवेचा 'ऑल रूट पास' केवळ बारा रुपयांत मिळायचा. म्हणजे महिन्याला फक्त बारा रुपये भरून कोणत्याही रूटच्या बसने कितीही वेळा प्रवास करता यायचा. प्रवेश मिळवण्याची विद्यार्थ्यांची धडपड या पासकरिता असायची!

✦

पण विभागातील आम्ही सगळे अध्यापक मिळून एक महत्त्वाचा अभ्यासक्रम राबवत होतो, तो म्हणजे 'तौलनिक भारतीय साहित्या'चा. हा अतिशय प्रतिष्ठित अभ्यासक्रम आहे आणि संपूर्ण भारतात तो फक्त दिल्ली विद्यापीठातच शिकवला जातो. मी रुजू झालो, तेव्हा 'तौलनिक भारतीय साहित्या'चे अध्यापन एम.फिल. आणि पीएच.डी. या पातळीवर केले जात असे. मी नंतर विभागप्रमुख आणि कलाशाखेचा अधिष्ठाता झालो, तेव्हा हा अभ्यासक्रम एम.ए.च्या पातळीवर सुरू केला. या अध्यापनाचे माध्यम इंग्लिश हेच असते.

या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मराठीचे अध्यापनही होत असे. एम.फिल.च्या विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त एक भारतीय भाषा शिकावी लागे. यामध्ये मराठी भाषा निवडणारे काही विद्यार्थी असत. त्यांचा अभ्यासक्रम मराठीच्या प्रमाणपत्र वर्गाप्रमाणेच असे. पुढे या प्रश्नपत्रिकेऐवजी 'एका भारतीय भाषेतील अनुवादित साहित्य' अशी प्रश्नपत्रिका लावण्यात आली. त्यामध्ये 'मराठीतील अनुवादित साहित्य' निवडणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता 'पोएम्स ऑफ विंदा' हा विंदा करंदीकरांनी इंग्लिशमध्ये स्वतःच अनुवादित केलेल्या आपल्या कवितांचा संग्रह आणि साहित्य अकादमीचे 'समकालीन भारतीय साहित्य' हे द्वैमासिक निघते, त्यातल्या काही हिंदीमध्ये अनुवादित कथा-कविता लावल्या होत्या. 'भारतीय कादंबरी' या प्रश्नपत्रिकेसाठी लावलेल्या कादंबऱ्यांमधे भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' होती, तर 'भारतीय नाटक' या प्रश्नपत्रिकेसाठी लावलेल्या नाटकांमध्ये विजय तेंडुलकरांचे 'घाशीराम कोतवाल' होते. 'भारतीय साहित्यातील आशयसूत्रे' या प्रश्नपत्रिकेसाठी 'व्यवस्थेला विरोध करणाऱ्या स्त्रिया' हे आशयसूत्र होते, तेव्हा हरी नारायण आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो?' ही कादंबरी लावलेली होती, तर पुढे 'शहर व खेडे' हे आशयसूत्र लावले गेले तेव्हा जयवंत दळवी यांची 'चक्र' कादंबरी लावली गेली. 'भारतीय साहित्यशास्त्र' या प्रश्नपत्रिकेत 'आधुनिक भारतीय साहित्यसिद्धान्त या विषयात अरविंद, रवींद्रनाथ, बा. सी. मर्ढेकर आणि रामचंद्र शुक्ल यांच्या साहित्यसिद्धान्तांचा समावेश होता. अर्थात हे सारे अध्यापन इंग्लिश माध्यमातून करावे लागे; पण प्रमाणपत्र पदविकेच्या वर्गांना भाषेचे अध्यापन करण्यापेक्षा या साहित्यविषयक अध्यापनामध्ये आम्हांला जास्त रस वाटे. शिवाय, हिंदी विभागामध्ये कॉंपोझिट कोर्सचे तासही आम्ही घेत असू. तिथे वसंत कानेटकरांचे 'अश्रूंची झाली फुले' हे नाटक, 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' (सं. राम कोलारकर) या संकलनाच्या एका खंडातील काही कथा आणि रा. भि. जोशी यांचा एक लघुनिबंधसंग्रह अशी पुस्तके लावलेली होती. हेही साहित्याचे अध्यापन असल्याने त्यात आम्हांला रस वाटायचा.

हे झाले विद्यापीठातील मराठीच्या अध्यापनाचे स्वरूप. महाविद्यालयीन स्तरावरही बी.ए.साठी मराठी हा एक गौण (subsidiary) विषय म्हणून ठेवलेला होता. त्याचा व्यवस्थित अभ्यासक्रम तयार केलेला होता. त्या विषयासाठी पु. शि. रेगे यांची 'सावित्री' ही कादंबरी आणि वि. द. घाटे यांचा 'मनोगते' हा ललितलेखांचा संग्रह अशी दोन पुस्तके लावलेली होती. परंतु कुठल्याही महाविद्यालयात मराठी हा विषय बी.ए.ला गौण म्हणून घेणारा कुणीही विद्यार्थी नसल्याकारणाने हा अभ्यासक्रम केवळ सिलॅबसमध्ये छापलेल्या अवस्थेत पडून होता. सबंध दिल्ली विद्यापीठाच्या इतिहासात मराठी हा बी.ए.ला गौण विषय म्हणून फक्त एका विद्यार्थ्याने (माझा मुलगा नीलेश याने) घेतला होता.

दिल्ली विद्यापीठातील अध्यापनाचा दुसरा महत्त्वाचा अनुभव म्हणजे आमच्या विभागातील साप्ताहिक चर्चासत्रे. ही प्रथा मी तेथे

रुजू होण्याच्या आधीपासून विभागात चालू होती. दरवर्षी या चर्चासत्रासाठी प्रारंभी एक विषय निश्चित केला जायचा आणि प्रत्येकाने त्या विषयांतर्गत आपल्या भाषेच्या संदर्भात एक निबंध सादर करायचा व त्या निबंधावर सर्वांनी चर्चा करायची अशी प्रथा होती. दर गुरुवारी हे चर्चासत्र व्हायचे. प्रत्येक आठवड्यास एक निबंध असा वर्षभर हा कार्यक्रम चालायचा. विभागातील सर्व प्राध्यापकांना आणि विभागात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना या चर्चासत्रात सहभाग घेणे अनिवार्य असायचे. हा असा उपक्रम दिल्ली विद्यापीठात फक्त आमच्या विभागात वर्षानुवर्षे चालत आलेला होता आणि अन्य विभागांतील प्राध्यापकांना त्याचे साश्चर्य कौतुक वाटे.

मी विभागप्रमुख झाल्यावर गुरुवारप्रमाणे मंगळवारीही चर्चासत्र सुरू केले आणि वर्षभरासाठी गुरुवारच्या चर्चासत्राचा एक व मंगळवारच्या चर्चासत्राचा एक असे दोन विषय ठरवून प्रत्येकाने दोन्ही चर्चासत्रांसाठी एकेक निबंध लिहावा, अशी प्रथा पाडली. या विभागीय चर्चासत्रांसाठी तीस वर्षांमधे आम्ही दोघांनी (मी व माझी पत्नी डॉ. ललिता यांनी) प्रत्येकी पंचेचाळीस निबंध लिहिले. हे सगळे मराठी साहित्याशी संबंधित होते. या निबंधांच्या द्वारे आणि तदनुषंगिक चर्चेच्या माध्यमातून मराठी साहित्याची पृथगात्म वैशिष्ट्ये सर्वांना परिचित होत गेली.

मी जेव्हा विभागप्रमुख झालो, तेव्हा विभागामध्ये वर्षातून एकदा राष्ट्रीय चर्चासत्र घेण्याची नवीन प्रथा सुरू केली. विद्यापीठाकडून याकरिता काहीही आर्थिक साहाय्य उपलब्ध होत नसे. (आता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून राष्ट्रीय चर्चासत्रासाठी अनुदान मिळते, पण त्या काळी ती सोय नव्हती.) तथापि विशिष्ट विषयाशी भावनिक जवळीक असणाऱ्या संस्थांकडून आणि व्यक्तींकडून चर्चासत्रासाठी प्रायोजक म्हणून आर्थिक साहाय्य मिळविणे कठीण नाही, असे माझ्या लक्षात आले. त्याप्रमाणे 'सावरकर प्रतिष्ठान' आणि 'विश्व हिंदू परिषद' यांच्याकडून आर्थिक साहाय्य मिळवून 'सावरकरांच्या विशेष संदर्भात भारतीय साहित्यातील देशभक्तीची मूल्ये' ('Patriotic elements in Indian Literature with special reference to Savarkar') या विषयावर मी विभागातर्फे पहिले राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. उद्घाटनाच्या सत्राचे अध्यक्ष म्हणून देवदत्त दाभोलकर, उद्घाटक म्हणून के. ज. पुरोहित यांना बोलावले. स्वागताध्यक्ष म्हणून वसंत साठे स्वेच्छेने सहभागी झाले. एक उद्घाटन सत्र, एक सत्र खास सावरकरांच्या साहित्यावर आणि एक सत्र अन्य भारतीय भाषांमधील साहित्यातील देशभक्तीच्या मूल्यांविषयी असा तीन सत्रांचा भव्य कार्यक्रम झाला. के. ज. पुरोहितांचे उद्घाटनाचे भाषण अप्रतिम झाले. सावरकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे त्यांनी सुरेख विश्लेषण केले. दीडशे श्रोते उपस्थित होते. तमिळनाडू, ओडिशा, पश्चिम बंगाल असे लांबून लांबून निबंधवाचक आले होते. शिवाय आपापल्या भाषांच्या संदर्भात विभागातील पाच प्राध्यापकांनी निबंध वाचले. सावरकरांच्या कवितेवर डॉ. ललिता मिरजकरांनी निबंध वाचला. चर्चा रंगल्या. दोन दिवस दणदणीत कार्यक्रम झाला. वृत्तपत्रांमध्ये सचित्र वार्ता आल्या. दिल्ली विद्यापीठामध्ये आमचा विभाग कोणाच्या खिजगणतीत नव्हता, तो एकदम प्रकाशझोतात आला. यानंतर असेच प्रायोजकत्व मिळवून 'कन्नड संत कवयित्रींच्या विशेष संदर्भात भारतीय भक्तिकाव्यातील कवयित्रींचे योगदान', 'असमीया भाषावैज्ञानिक काकती यांच्या विशेष संदर्भात भारतीय कोशवाङ्मय आणि भाषाविज्ञान' वगैरे राष्ट्रीय चर्चासत्रे मी घेतली. ही प्रथा पुढे चालूच राहिली. प्रायोजकांना ज्यामध्ये विशेष रुची असेल, त्यावर एक संपूर्ण सत्र ठेवायचे, अन्य भारतीय भाषांतील तत्सदृश कार्यावर एक सत्र ठेवायचे आणि संपूर्ण चर्चासत्राचा विषय त्या विशिष्ट संदर्भात भारतीय साहित्याचा वेध असा ठेवायचा, असे तंत्र मी अवलंबिले आणि रूढ केले. त्याचा प्रारंभ मराठीतील सावरकरांच्या साहित्यापासून झाला हे विशेष!

✦

आमची मराठी मित्रमंडळी आमच्या घरी आल्यावर आमची मुले सहजशुद्ध मराठीत वार्तालाप करताना पाहून त्यांना साश्चर्य कौतुक वाटायचे व ते ती बोलून दाखवायची; पण हा प्रयोग आपल्या मुलांच्या बाबतीत करावा असे त्यांना कधी वाटले नाही!

✦

माझ्या मार्गदर्शनाखाली दिल्ली विद्यापीठात एकूण दहा पीएच.डी.चे प्रबंध आणि पाच एम.फिल.च्या प्रबंधिका झाल्या. पीएच.डी.च्या दहा प्रबंधांपैकी मराठीचे दोन आणि बाकीचे तौलनिक भारतीय साहित्याचे होते. एक पंजाबीमधील होता. तौलनिक भारतीय साहित्याच्या प्रबंधासाठी विषय देताना त्याचा मराठी साहित्याशी काहीतरी संबंध असावा असा माझा कटाक्ष असायचा. एम.फिल.साठी एका विद्यार्थिनीने ''रत्नाकर मतकरींचे 'आरण्यक' आणि धर्मवीर भारतींचे 'अंधायुग' या नाटकांचा तुलनात्मक अभ्यास'' असा विषय प्रबंधिकेकरिता घेतला होता. तिला मार्गदर्शन करताना रत्नाकर मतकरींच्या 'आरण्यक'चे मी हिंदीमध्ये भाषांतरच करून टाकले. बरेच दिवस ते माझ्या संग्रही होते. ते प्रसिद्ध करण्याचा मानस होता, पण सवड होत नव्हती. मग 'आरण्यक'चे हिंदी भाषांतर प्रसिद्ध झाल्याचे मला समजले आणि माझे हस्तलिखित कुठेतरी हरवून गेले.

वर जी मराठी विषयाची दुर्दशा वर्णन केलेली आहे, त्याचे मूळ शालेय जीवनातच आहे. दिल्लीमध्ये चार-पाच लाख मराठीभाषक राहात असतील पण या तिथे राहणाऱ्या मराठी लोकांच्या मुलांचा मराठीशी संबंध तुटत चालला आहे. त्यांचे आईवडीलच त्यांच्याशी कौतुकाने इंग्लिश किंवा हिंदीमधून बोलतात, मग त्यांचा मराठीशी संबंध राहणार कसा? आपले मूल सफाईदार इंग्लिशमध्ये वा हिंदीमध्ये बोलते, त्याला मराठी नीट येत नाही, ही बाब आईवडिलांना चिंतेची न वाटता उलट कौतुकाचीच वाटत असेल, तर त्याला कोण काय करणार? आमची मराठी

मित्रमंडळी आमच्या घरी आल्यावर आमची मुले सहजशुद्ध मराठीत वार्तालाप करताना पाहून त्यांना साश्चर्य कौतुक वाटायचे व ते ती बोलून दाखवायची; पण हा प्रयोग आपल्या मुलांच्या बाबतीत करावा असे त्यांना कधी वाटले नाही!

महाविद्यालयात मराठी हा गौण विषय निवडणारे विद्यार्थी न मिळण्याचे मुख्य कारण पालकांच्या या अनास्थेमुळे शालेय जीवनात मुले मराठीपासून दूर राहणे हेच आहे, याच शंका नाही. दिल्लीमध्ये मराठी मंडळींनी काढलेल्या एका शाळेशी मुलांचा पालक म्हणून आणि नंतर संचालक मंडळाचा सदस्य म्हणून बरीच वर्षे माझा संबंध आला. तिथे आठवीपर्यंत मराठी हा विषय अनिवार्य म्हणून ठेवलेला आहे, पण त्यात उत्तीर्ण होणे अनिवार्य नाही. नववी ते बारावी या वर्गांत मराठी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या मुष्किलीने तीन ते पाच या दरम्यान असायची. पालक आपल्या मुलांना मराठी विषय घ्यायला मनाई करायचे! दुसऱ्या एका शाळेच्या नावातच 'मराठी' हा शब्द आहे; पण तेथेही मराठी या विषयाचे अध्यापन (कोणी तो विषय घेईना म्हणून) बंद करावे लागले. बारावीलाच मराठी हा विषय घेतला नाही, तर बी.ए.ला (गौण झाला तरी) तो कोण घेणार?

डॉ. ललिता मिरजकर दिल्ली विद्यापीठातून २००५मध्ये निवृत्त झाल्या. मला विद्यापीठाने तीन वर्षांची मुदतवाढ दिल्यामुळे मी २००७मध्ये निवृत्त झालो. तथापि एम.फिल. आणि उच्च पदविका या वर्गांना शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत अध्यापन करीत राहण्याची विनंती मला विद्यापीठाने केल्यामुळे एप्रिल २००८ पर्यंत मी दिल्ली विद्यापीठाच्या सेवेत होतो. मला निवृत्त होऊन आता दहा वर्षे झाली, तरी अजूनही दिल्ली विद्यापीठाने मराठीच्या प्राध्यापकाची नेमणूक केलेली नाही. आमची दोघांचीही पदे रिक्त पडलेली आहेत. दोन्ही पदांसाठी वृत्तपत्रांत व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पुन:पुन्हा तीन वेळा जाहिरात आली होती. मी एकदा विद्यापीठात चौकशी केली तेव्हा ''पुरेसे अर्ज आले नाहीत म्हणून आम्ही मुलाखती घेऊ शकलो नाही'', असे कारण सांगितले गेले. ते खरे असेल असे वाटत नाही. फक्त मराठीचीच पदे रिक्त पडलेली आहेत, असे नाही. मल्याळम्‌ची दोन पदे, गुजरातीचे एक पद, मणिपुरीचे एक पद, बांग्लाची दोन पदे, तमिळची दोन पदे एवढी पदे गेल्या अनेक वर्षांपासून रिकामी पडलेली आहेत. व्यवहाराच्या भाषेत बोलायचे, तर दिल्ली विद्यापीठातील आमचा 'आधुनिक भारतीय भाषा व साहित्याभ्यास विभाग' हे काही 'क्रॅश क्रॉप' नाही. तेव्हा तुटपुंजी विद्यार्थिसंख्या आणि प्राध्यापकांचे वाढलेले गलेलठ्ठ पगार यांचे आतबट्ट्याचे त्रैराशिक जमवण्यापेक्षा विभागातील प्राध्यापक जसजसे निवृत्त होतील, तसतशी ती रिक्तपदे भरूच नयेत, म्हणजे आपोआपच काही वर्षात हा विभागच बंद करता येईल, अशी कुटिल नीती या परिस्थितीच्या मागे आहे की काय, अशी दुष्ट शंका भेडसावू लागते.

या कुटिल नीतीमागील तर्कशास्त्र बरोबर नाही. दिल्ली ही भारताची राजधानी आहे. विविध भाषिक संस्कृतींनी समृद्ध असलेल्या या देशातील सर्व भाषा व त्यांतील साहित्य शिकण्याची सोय राजधानीच्या या शहरात करणे हे तेथील विद्यापीठाचे व पर्यायाने शासनाचे कर्तव्य आहे. विद्यार्थिसंख्या आणि आर्थिक ताळेबंद हे प्रश्न तेथे विचारात घेता कामा नयेत.

सध्या दिल्ली विद्यापीठात मराठीचे अध्यापन पूर्णतया बंद आहे – भाषेचेही आणि साहित्याचेही. मध्यंतरी वृत्तपत्रांत बातमी वाचली, की महाविद्यालयांमध्ये बी.ए.साठी मराठी, मल्याळम्‌ आणि ओडिया हे विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेतून ५८ गुण कमी करावेत, असा फतवा शासनाने काढला आहे. हे जर खरे असेल तर ती फारच चिंताजनक बाब आहे, असे म्हणावे लागले. 'मराठी साहित्य महामंडळ' आणि 'महाराष्ट्र सहित्य परिषद' यांनी याच्या विरोधात पत्रे लिहिली आहेत. पण त्यासंबंधात पुढे काय झाले, हे माहीत नाही.

मी निवृत्त झाल्यानंतर जे प्राध्यापक विभागप्रमुख झाले, त्यांना 'तौलनिक भारतीय साहित्या'पेक्षा 'लोकसाहित्य' या विषयात रुची असल्यामुळे त्यांनी त्या दृष्टीने विभागाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. गेली जवळजवळ चाळीसेक वर्षे चाललेली साप्ताहिक चर्चासत्रे बंद केली. बांग्लाचे एक प्राध्यापक आणि माझे विद्यार्थी राहिलेले व सध्या एका महाविद्यालयात इंग्लिशचे प्राध्यापक असलेल्या एका मणिपुरी प्राध्यपकांनी विभागामध्ये 'तौलनिक भारतीय साहित्या'ची मदार समाहित प्राध्यापक म्हणून कशीबशी सांभाळली आहे.

दिल्ली विद्यापीठामध्ये मला परदेशी विद्यार्थ्यांना शिकवण्याचा जो अनुभव मिळाला, तो इतरत्र कोठेही मिळाला नसता. इरीना लेबेदेवा ही रशियन विद्यार्थिनी पहिल्यांदा मराठी शिकण्यासाठी आली. ती येणार असल्याचे विभागप्रमुखांनी मला आधीच सांगून ठेवले होते आणि माझ्या खोलीत मी तिची वाट पाहत बसलो होतो. बरोबर ठरलेल्या वेळी ती आली आणि तिला समोर बसवून मी इंग्लिशमध्ये तिची प्राथमिक चौकशी करू लागलो. तेव्हा ती माझ्याकडे पाहून छान हसली आणि चक्क मराठीत म्हणाली, ''आपण मराठीत बोलू या. मला मराठी येतं.'' मी चाटच पडलो. ती यापूर्वी एकदा पुण्यात विजया चिटणीस यांच्या घरी राहून मराठी शिकून गेलेली होती. मॉस्को आकाशवाणीवर मराठी बातमीपत्रात ती वृत्तनिवेदिका म्हणून काम करत होती. वृत्तनिवेदनाच्या दृष्टीने मराठीचा वापर अधिक चांगल्या प्रकारे कसा करावा, याचे शिक्षण तिला हवे होते. दहा महिन्यांकरिता मॉस्को आकाशवाणीने तिला यासाठी दिल्ली विद्यापीठात पाठवले होते. मग तिच्याकरिता त्या प्रकारचा एक खास अभ्यासक्रम आम्ही तयार केला. त्या अभ्यासक्रमात रोजच्या मराठी वृत्तपत्रांचे वाचन, त्यातील बातम्यांच्या सादरीकरणावर चर्चा वगैरे अभिप्रेत होते. मराठी वृत्तपत्रांमध्ये सरकारी ध्येयधोरणांवर आणि प्रशासनावर येणारी टीका पाहून इरीनाला प्रचंड आश्चर्य वाटायचे. ''हे असं लिहिलं तर चालतं? परवानगी असते?'' ती अगदी निरागसपणे विचारायची. तिचा अभ्यासक्रम संपल्यावर ती मुद्दाम पुण्या-मुंबईस जाऊन विजय तेंडुलकर, सतीश आळेकर वगैरेंना भेटली होती.

दुसऱ्याच वर्षी म्युजेल स्त्रेलकोवा नावाची दुसरी एक रशियन विद्यार्थिनी दहा महिन्यांसाठी मराठी शिकायला आली.

हिलाही मराठी येत होते, पण इरीनाइतके येत नव्हते. हिंदी उत्तम येत होते. किंबहुना ती मॉस्को विद्यापीठात हिंदीचे अध्यापन करत होती. नामदेवांच्या हिंदी काव्यरचनेवर तिने रशियनमध्ये प्रबंध लिहिला होता. आता तिला नामदेवांच्या मराठी अभंगांचे वाचन करायचे होते आणि त्यासाठी मराठी शिकायचे होते. तिच्या गरजेप्रमाणे आम्हांला तिच्यासाठी अभ्यासक्रम बनवावा लागला.

एक वर्षी चार अमेरिकन विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीत तीन महिने संस्कृत शिकवण्याचे काम माझ्याकडे आले. संस्कृत विभागातील कोणीही प्राध्यापक त्यावेळेस उपलब्ध नसल्यामुळे मला विचारणा करण्यात आली व मी तत्परतेने होकार दिला. तीन विद्यार्थिनी आणि एक विद्यार्थी. चौघेही कॅलिफोर्नियातून आलेले होते. चौघांपैकी कुणीही एक दिवसही एक मिनिटभरदेखील उशिरा आले नाही. शिकण्याकडे सगळ्यांचे पूर्ण लक्ष असायचे. मधून-मधून अगदी मार्मिक शंका विचारायचे. पूर्ण समाधान करून घेतल्याशिवाय पुढे जाऊ द्यायचे नाहीत. तीन महिन्यांच्या अभ्यासक्रमाच्या शेवटी, अकरावीला नेमलेले संस्कृतचे क्रमिक पुस्तक वाचून त्यातील उताऱ्यांचा अर्थ त्यांना सांगता येऊ लागला होता. रशियन विद्यार्थिनींपेक्षा या अमेरिकन विद्यार्थ्यांना शिकवण्याचा अनुभव फार वेगळा होता. शिकण्याची खरी उत्कट इच्छा, त्यासाठी कष्ट करण्याची तयारी आणि पराकाष्ठेचा वक्तशीरपणा हे त्यांचे गुण आपल्या विद्यार्थ्यांनी घेण्यासारखे होते.

अशाच दोन जपानी विद्यार्थ्यांना (एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी) आम्ही दोघांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत तीन महिने हिंदी शिकवले. त्यांना महाराष्ट्रात आणि उत्तर भारतात हिंडायचे होते; आणि त्यासाठी हिंदीतून संभाषण करता येणे आवश्यक वाटत होते. आम्ही शिकवलेली वाक्ये ते दोघे रिक्षावाल्याशी बोलताना आणि दुकानात खरेदी करताना वापरून बघायचे आणि त्या संभाषणात त्यांना उद्भवणाऱ्या शंका आणि येणाऱ्या अडचणी लिहून ठेवून दुसऱ्या दिवशी आम्हांला विचारायचे. जपानमध्ये चेरीच्या झाडांना बहर येतो, त्याला 'साकुरा' म्हणतात आणि जपानी लोक अगदी आत्मीयतेने या बहराचा उत्सव साजरा करतात, एवढी ऐकीव माहिती आम्हांला होती. त्या विद्यार्थ्यांशी बोलताना सहज 'साकुरा'चा विषय काढला, तर त्या विद्यार्थिनीने आपल्या मोबाइलमधले 'साकुरा'चे असंख्य फोटो अगदी कौतुकाने दाखवले. अमेरिकन विद्यार्थ्यांपेक्षा हे जपानी विद्यार्थी भावुक होते. अभ्यासक्रम संपल्यावर शेवटी 'सायोनारा' म्हणताना दोघांचेही डोळे पाणावले होते.

या परदेशी विद्यार्थ्यांच्या तुलनेसाठी म्हणून नव्हे, पण एकंदर दिल्ली विद्यापीठात विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचे संबंध कसे असतात आणि विद्यार्थिवर्गात कोणत्या शक्ती कार्यरत असतात हे पाहणे इथे मनोरंजक ठरेल. दिल्ली, विद्यापीठात विद्यार्थिसंघाच्या (DUSU – Delhi University Students' Union) निवडणुकांना फार महत्त्व असते. सगळ्या राजकीय पक्षांच्या विद्यार्थीसंघटना आपापल्या पक्षाच्या बॅनरखाली त्यामध्ये हिरीरीने भाग घेतात. किंबहुना ते भावी राजकारणप्रवेशाचे महाद्वार मानले जाते. केंद्रीय क्रीडामंत्री श्री. विजय गोयल हे त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात DUSUचे अध्यक्ष होते. विद्यार्थिसंघटनांची आंदोलने फार शक्तिशाली असतात. प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रमाकरिता येणाऱ्या हजारो अर्जांना पायबंद घालण्याच्या हेतूने आणि बोगस विद्यार्थ्यांचे तण काढून टाकण्याच्या हेतूने, मी विभागप्रमुख आणि कलाशाखेचा अधिष्ठाता झाल्यावर, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरिता असलेली 'बारावी उत्तीर्ण' ही पायाभूत पात्रता वाढवून ती 'पदवीपरीक्षा उत्तीर्ण' अशी करून घेतली, तेव्हा चिडलेल्या विद्यार्थ्यांनी माझ्या कार्यालयावर हल्ला करून कपाटाच्या काचा फोडल्या होत्या आणि फायली फाडल्या होत्या.

तिकडे 'तौलनिक भारतीय साहित्या'च्या एम.फिल.च्या वर्गात मात्र वेगळी परिस्थिती होती. तिथे प्रवेश घेणारे बहुतेक विद्यार्थी हे इंग्लिशचे प्राध्यापक म्हणून कुठल्या ना कुठल्या महाविद्यालयात अध्यापन करत असायचे. त्यामुळे एकीकडून ते आमचे विद्यार्थी असले, तरी एकीकडून आमचे सहकारी असायचे. त्यामुळे ते वर्गात आमच्यासमोर विद्यार्थी म्हणून बसले, तरी एरवी बरोबरीच्या नात्याने वागायचे.

आणखी एक चांगली पद्धत मी दिल्ली विद्यापीठात अनुभवली. आपल्याला ज्यांच्याकडून काही शिकण्यासारखे वाटेल, त्या प्राध्यापकांच्या वर्गात आम्ही विद्यार्थ्यांच्याबरोबर बसत असू. उदाहरणार्थ, तौलनिक साहित्य या नव्याने समोर आलेल्या अभ्यासशाखेचा सैद्धांतिक पाया मजबूत होण्यासाठी आम्ही दोघेही, आमचे सहकारी, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तौलनिक साहित्याचे विद्वान डॉ. शिशिरकुमार दास यांच्या 'तौलनिक साहित्य : सिद्धांत व इतिहास' या विषयाच्या तासांना एम.फिल.च्या विद्यार्थ्यांबरोबर बसत असू. मी निवृत्त होण्याच्या आदल्या वर्षी, माझ्यानंतर 'भारतीय साहित्यसिद्धांत आणि पाश्चात्त्य काव्यशास्त्र यांचा तौलनिक अभ्यास' हा विषय शिकवण्याची जबाबदारी घेणारे डॉ. अमिताव चक्रवर्ती हे वर्षभर एम.फिल.च्या विद्यार्थ्यांबरोबर माझ्या तासांना बसत असत. सिंधीचे प्राध्यापक डॉ. रवी टेकचंदानी यांना मराठी शिकायचे होते, तर ते माझ्या प्रमाणपत्र वर्गात विद्यार्थ्यांच्याबरोबर बसत. इतके खुले ज्ञानग्रहण महाराष्ट्रात कुठेच आढळत नाही.

दिल्ली विद्यापीठात अनुभवलेली आणि महाराष्ट्रात अत्यंत दुर्मिळ असलेली प्राध्यापकांच्या आंतरिक परस्परसंबंधांतली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तिथे प्राध्यापकांमधील आंतरिक मतभेद कितीही तीव्र असले, तरी ते वादाच्या टेबलापुरतेच सीमित असायचे. परस्परांच्या मैत्रीवर आणि विभागातील सहकार्यावर त्या मतभेदांचा परिणाम व्हायचा नाही. मी विभागप्रमुख झाल्यावर तौलनिक भारतीय साहित्याचा अभ्यासक्रम एम.ए.च्या पातळीवर सुरू करण्याचे ठरवले. (तोवर तो फक्त एम.फिल. आणि पीएच.डी.साठी होता.)

माझ्याआधी डॉ. शिशिरकुमार दास विभागप्रमुख असताना त्यांच्या डोक्यात ती कल्पना आली होती आणि त्या दृष्टीने माझ्या मदतीने त्यांनी हा अभ्यासक्रमाची आखणी करायला प्रारंभही केला होता. पण त्यांचा पवित्रा अत्यंत सावधगिरीचा आणि केवळ वैचारिक पातळीवर थबकणारा होता. मी धडाक्याने ही कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा निर्धार केला. रीतसर एक अभ्यासक्रम-समिती स्थापन करून त्यावर विषयतज्ज्ञ म्हणून कोलकात्याचे डॉ. अमिय देव आणि मुंबईचे डॉ. भालचंद्र नेमाडे यांना निमंत्रित केले. समितीच्या दोन सभांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण निश्चित करून टाकला. या वेळेपर्यंत मी कलाशाखेचा अधिष्ठाता झालेलो असल्यामुळे कलाशाखेच्या नियामक समितीमध्ये तो अभ्यासक्रम मंजूर करून घ्यायला काहीच अडचण आली नाही. त्यानंतर विद्वत्सभा आणि त्यानंतर विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद यांची मंजुरी मी मिळवली. मी या दोन्ही ठिकाणी सदस्य होतोच. त्यामुळे तेथे भाषणे करून मला अभ्यासक्रमाचे स्वरूप आणि महत्त्व इतर सदस्यांना नीट समजावून सांगता आले आणि त्यांच्या शंकांचे निराकरण करता आले. एका वर्षात हे सर्व करून पुढल्या वर्षी मी एम.ए. (तौलनिक भारतीय साहित्य)चे वर्ग सुरू केले!

तरीही, पहिल्या वर्षी अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी घेतलेल्या विभागातील प्राध्यापकांच्या बैठकीत डॉ. दास यांनी सबुरीचा राग आळवला. ‘‘अजून आपल्या विभागातले अध्यापक तौलानिक साहित्याच्या अभ्यासात पुरेसे प्रशिक्षित झालेले नाहीत, तेव्हा प्रत्यक्ष अध्यापन आपण इतक्यात नको सुरू करायला’ असा विचार त्यांनी मांडला. यावर मी एक दीर्घ भाषण करून प्राध्यापकांना भावनिक स्तरावर आवाहन केले. हा अभ्यासक्रम लौकरात लौकर सुरू करणे हे कसे विभागाच्या हिताचे आहे ते सांगून मी म्हटले, ‘पोहायचे असेल, तर आधी मला पोहायला चांगले येऊ दे; मगच मी पाण्यात उडी टाकेन, असे म्हणून कसे चालेल? पाण्यात उडी टाकल्यावरच पोहायला येईल. आधी डुबक्या खाव्या लागतील, नाकातोंडात पाणी जाईल, पण त्यातूनच पट्टीचे पोहणारे तयार होतील.’’ माझ्या भाषणानंतर सगळ्या प्राध्यापकांनी अभ्यासक्रम सुरू करायला पाठिंबा दिला. दास यांनीही आपला विरोध मागे घेतला. एकदा अभ्यासक्रम सुरू झाल्यावर तो चालवताना त्यांनी पूर्ण सहकार्य दिले. ‘तौलनिक साहित्य : सिद्धांत व इतिहास’ हा विषय त्यांनी निवृत्त होईतो शिकवला.

दिल्ली विद्यापीठाची प्राध्यापक संघटना (DUTA – Delhi University Teachers' Association) फारच शक्तिशाली आहे. DUTAने काही कारणाने संप पुकारला, तर विद्यापीठाचे सर्वच व्यवहार बंद पडतात, हे मी एकदा प्रत्यक्ष अनुभवले आहे. DUTAच्या या ताकदीमुळे अगदी कुलगुरूंपासूनच्या सर्व अधिकारयंत्रणा कायमच DUTAला न दुखवता चुचकारूनच आपला कार्यभाग साधत असतात. DUTA च्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका दर दोन वर्षांनी मोठ्या जोरदारपणे होतात. त्यामध्ये सगळे राजकीय पक्ष सहभागी असतात.

एकूणच दिल्ली विद्यापीठातील प्राध्यापकवर्गात राजकीय मतप्रणालीच्या वर्चस्वाचा प्रभाव मला जास्त जाणवला. महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या नियुक्ती करताना जे मुलाखती घेणारे पॅनेल असते, त्यामध्ये संबंधित विभागाचा विद्यापीठातील विभागप्रमुख हा एक पदसिद्ध सदस्य असतो. माझ्या विभागप्रमुखपदाच्या कालावधीत दिल्लीमधील महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या भारतीय भाषांच्या अध्यापकांच्या नियुक्तींसाठी मुलाखती घेणाऱ्या पॅनेलचा सदस्य म्हणून जाण्याचा अनुभव मला अगणित वेळा आला. महाविद्यालयांतील नियुक्तींची प्रक्रिया मी जवळून पाहिली. त्यामध्ये कुठे पैशाची देवाणघेवाण होत असल्याचा संशय मला कधी आला नाही. परंतु एखाद्या उमेदवाराच्या नियुक्तीविषयी निर्णय घेताना त्याच्या राजकीय विचारधारेची चर्चा मात्र अगदी उघडपणाने होत असे. महाविद्यालयाची व्यवस्थापन समिती ज्या राजकीय विचारप्रणालीची असेल, त्याच विचारधारेचे प्राध्यापक नेमण्याकडे सार्वत्रिक कल असे.

दिल्ली विद्यापीठातील काही प्राध्यापकांशी माझे छान सूर जुळले. डॉ. शिशिरकुमार दास हे त्यांपैकी प्रमुख. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तौलनिक साहित्याचे अभ्यासक होते. आमच्या विभागात ते ‘गुरुदेव टागोर अध्यासना’चे बांग्लाचे प्राध्यापक होते. बांग्लामधील विख्यात नाटककार आणि कवी होते. त्यांच्याबरोबर मी साहित्य अकादमीच्या एका बृहत्-प्रकल्पामध्येही सहभागी झालो. ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या असमीया कादंबरीकार इंदिरा गोस्वामी यांच्याशी माझी निकटची मैत्री झाली. त्यांच्याबरोबर मी दोन वेळा आसामचा दौरा केला. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणारे तमिळ कादंबरीकार ‘इंदिरा’ पार्थसारथी हेदेखील माझे असेच मित्र बनले. विभागातील तरुण प्राध्यापकांपैकी कन्नडचे टी.एस. सत्यनाथ आणि सिंधीचे रवी टेकचंदानी या दोघांनी माझ्या मार्गदर्शनाखाली आमच्याच विभागात ‘तौलनिक साहित्य’ विषयामध्ये पीएच.डी केले. मल्याळममधील कवी डॉ. अनुजन हेही विभागातले एक जवळचे सहकारी. याखेरीज हिंदी विभागातले प्राध्यापक ओमप्रकाश, संस्कृत विभागाचे प्राध्यापक रमेश भारद्वाज, इंग्लिश विभागाचे प्राध्यापक हरीश त्रिवेदी, भाषाशास्त्राचे प्राध्यापक अंजनीकुमार सिन्हा या सगळ्या प्राध्यापकमित्रांची आठवण आज तीव्रतेने येते आहे. दिल्ली विद्यापीठामध्ये मी छान रमलो होतो. कर्तृत्त्वाची नवीनवी क्षितिजे मला दिल्ली विद्यापीठाने उपलब्ध करून दिली. आता मागे वळून सिंहावलोकन करताना स्थळकाळाची अंतरे विरघळून जातात. दिल्ली विद्यापीठातील तीस वर्षे मनात पुन्हा जागी होतात.

दिल्ली विद्यापीठातून निवृत्त होऊन दहा वर्षे झाली, तरी तिथले सारे अनुभव अगदी ताजे आहेत. एका वेगळ्या दुनियेत आयुष्याची तीस वर्षे अगदी वेगळ्याच कैफात व्यतीत झाली होती!

*(दिवाळी २०१८)*

# आक्रोशांचे अवकाश

**प्रतिभा रानडे**

सत्ताधीश कोणीही असोत – भांडवलशाहीचे, साम्यवादी, कट्टर धर्मवादी असोत – सगळेच आपापल्या राजकीय, आर्थिक सत्तेसाठी बळी देतात तो सर्वसामान्यांनाच. मग ते सैनिक असोत वा नागरिक असोत. सध्या चर्चेत असलेल्या अफगाणिस्तानच्या काही आठवणी. त्या देशात काही वर्षे वास्तव्य केलेल्या लेखिकेने जागवलेल्या.

अफगाणिस्तान सोडून अडतीस वर्षे होऊन गेलीत. पण त्या देशाशी जुळलेले नाते अजूनही मला तोडता आलेले नाही. कारण जीव गुंतला होता तो त्या अत्यंत अस्वस्थ काळात होरपळून निघणाऱ्या अफगाणांच्या सुखदु:खांमध्ये. अजूनही त्यांच्या सुखदु:खांच्या बातम्याच मला ते नाते तोडू देत नाहीत. काही अफगाणांनादेखील माझ्याशी नाते तोडवत नाही. काही महिन्यांपूर्वीच शाह मोहम्मद रईस यांचा फोन आला होता. त्यांना मला भेटण्यासाठी माझ्या घरी यायचेय. १९७६ ते १९८० या चार वर्षांच्या वास्तव्यातील माझ्या आठवणी ऐकायच्यात. आमच्या बंगल्याच्या छपरावर पडलेल्या शेल्स, आम्ही काढलेले फोटो त्यांना पाहायचेत. त्यांनी माझ्याशी फोनवर बोलण्याचे कारण माझा धाकटा मुलगा सौमित्र. तेव्हा तो १२ वर्षांचाच होता.

अफगाणिस्तानबद्दल लिहिताना एक जुनी आठवण सांगायला हवी. माझे पती फिरोझ (ऊर्फ मुकुंदा) यांच्या नोकरीमुळे आम्ही इथे आलो असतानाची.

इथे यायचे ठरले तेव्हाच मनाने ठरवून टाकले होते, की संधी मिळाली की बादशहाखान यांना भेटायचे. हातात बंदुका घेऊनच जन्माला येणाऱ्या पठाणांना त्यांनी अहिंसेची दीक्षा दिली होती. मुस्लिम लीगच्या राजकारणाला स्वत:पासून चार हात दूर ठेवणाऱ्या याच गफारखानांच्या 'लाल शर्टवाल्यां'च्या जीवावरच काँग्रेस स्वत:चे निधर्मी राजकारण करत होती. 'माझ्या देहाचे तुकडे होतील, मगच देशाची फाळणी होईल' असे म्हणणाऱ्या महात्मा गांधींसकट सगळेजण वेळ आली तेव्हा बादशहाखान यांना विसरून गेले. परस्परच ब्रिटिशांशी समझोता करून मोकळे झाले. या आणि अशा कित्येक गोष्टींमुळे बादशहाखान यांच्या नावाभोवती अद्‌भुततेचे वलय आलेले आहे. म्हणूनच त्यांना पाहण्याची विलक्षण उत्सुकता होती. पण इथे आल्यावर लक्षात आले, की त्यांना भेटणे फारच कठीण आहे.

पाकिस्तानी नागरिक असूनही पाकिस्तानशी शत्रुत्व असल्यामुळे बादशहाखान अफगाणिस्तानातच राहत. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाबद्दल फारच गुप्तता पाळली जाई. ते कधी काबूलला असत तर कधी जलालाबादला असत. इथे यांना खूपच मान असे. साधारणपणे त्यांना इथे 'बाबा'च म्हटले जाई.

शिवाय मुकुंदा केंद्रसरकारचा अधिकारी. आम्ही त्यांना भेटायला गेलो तर त्याचा काय अर्थ लावला जाईल कुणास ठाऊक? 'बादशहाखान यांना भेटण्याचा तुमचा एवढा आग्रह कशाला?' अधिकारावर असलेल्या एकाची ही वृत्ती आणि सल्लादेखील. त्यामुळे बादशहाखान यांना भेटणे होतच नव्हते.

पुण्याचे श्री. हरिभाऊ जोशी आणि 'मुंबई सकाळ'चे श्री. माधव गडकरी बादशहाखान यांना भेटायला काबूलला आले. जोशींचे वय ऐंशी, पूर्णपणे शाकाहारी, पथ्याचे खाणारे. ते इथल्या हॉटेलमध्ये कसे राहतील? ओळख नसली तरी आपली मराठी माणसेच आहेत, हॉटेलमध्ये कुठे राहतील, असा विचार करून, एअरपोर्टवरून त्यांचा फोन आला तेव्हा मुकुंदाला सांगून त्यांना आमच्या घरीच राहायला बोलावले. ते आले त्याच्या दुसऱ्याच दिवशी इथे 'पश्तूनिस्तान डे' साजरा झाला. पश्तुनिस्तान चौकामध्ये आम्हीही सगळे गेलो. तिथे भाषणे वगैरे झाली. त्या दिवशी शंभर-दीडशे पठाण मुद्दामहून दूरवरून आले होते. 'पश्तुनिस्तान झालेच पाहिजे', 'पठाणांना न्याय मिळालाच पाहिजे' म्हणून जोरजोरात भाषणे झाली. भुट्टो फाशी गेले त्याअगोदर ते इथे आले होते, तेव्हा विमानतळावरून अर्ग पॅलेसवर जाताना, त्यांनी या मुख्य राजमार्गाने जाण्याचे नाकारले होते. त्यांची गाडी वळसे घेऊन दुसऱ्याच रस्त्याने गेली होती. त्याचे कारण, या चौकाला पश्तुनिस्तानचे नाव आहे हे होते आणि दरवर्षी 'पश्तुनिस्तान डे' साजरा करणाऱ्या अफगाण सरकारने त्या वेळी भुट्टोंच्या म्हणण्याला मान तुकवली होती! जाहीरशहा काय, दाऊदखान काय किंवा तराकीचे नवीन क्रांतिकारी सरकार काय, पश्तुनिस्तानच्या बाबतीत सगळ्यांचे धोरण एकच होते.

बरीच खटपट केल्यानंतर बादशहाखान यांचा ठावठिकाणा मिळाला. जोशी आणि गडकरी यांचे जलालाबादला जाण्याचे ठरले. त्यांच्याबरोबर जाण्याची माझी फार इच्छा होती. कारण अशी संधी पुन्हा मिळणार नाही याची खात्रीच होती मला. पण आपल्या अँबॅसडरसाहेबांची तशी इच्छा नव्हती. जोशी यांचीही इच्छा नव्हती. त्यांचे म्हणणे होते की, ते स्वत: बऱ्याच वर्षांनी

गफारखान यांना भेटत होते, ती भेट कशी काय होते कुणास ठाऊक? शिवाय इथली नवीन राजवट. आपल्या सरकारचे गफारखान यांच्याबद्दलचे धोरण अनिश्चित. त्या वेळी गफारखान यांनी औषधोपचारासाठी दिल्लीला जावे, की मॉस्कोला जावे याची चर्चा सरकारी पातळीवर होत होती. सरकारी नोकराच्या पत्नीने अशा वेळी गफारखान यांना भेटणे याचा अर्थ कोण कसा लावील... अशीच बरीच चर्चा झाली. शेवटी जोशी आणि गडकरी दोघेच गेले जलालाबादला. पाठोपाठ ॲम्बॅसॅडर एस. के. सिंग यांचा फोन आलाच, 'कैसी है आप भाभीजी?' म्हणून उगाचच इकडचे तिकडचे बोलले. खरे म्हणजे त्यांना खात्री करून घ्यायची होती की मी गेले नाही ना याची!

जोशी, गडकरी जाऊन दोन दिवस झाले, त्या दिवशी सकाळी मी घरातला केर काढीत होते. सकाळचे दहा-साडेदहा वाजले होते. आणि अचानक गडकरी धावतच घराच्या फाटकातून आत शिरले. जोशी, गडकरींच्या बरोबरच गफारखान काबूलला आले होते. त्या दोघांना आमच्या घरी सोडून मग गफारखान स्वत:च्या निवासस्थानी परत जाणार होते. म्हणजे त्या वेळी बादशहाखान माझ्या घरासमोरच गाडीमध्ये होते. तेच सांगायला गडकरी घाईघाईने घरात आले होते. मीही मग हातातला झाडू कपाटाखाली ढकलला आणि धावतच बाहेर गेले. बादशहाखान यांना नमस्कार केला. त्यांना उर्दू-हिंदी चांगलेच यायचे. त्यांना म्हटले, ''आपण तीन-साडेतीन तासांच्या प्रवासाने दमला असाल. पण पाच मिनिटं माझ्या घरी आलात तर मला फारच बरं वाटेल, येणार का?' हे विचारतानाच मनात आले होते, एवढ्या मोठ्या माणसाला मी इतक्या सहजासहजी माझ्या घरी या, असे आमंत्रण देऊ शकते का? बरे दिसेल का ते? आगाऊपणाच नव्हे का हा?

पण तेवढ्यात हरिभाऊ जोशी गफारखानांना म्हणाले, ''या मुलीने माझ्या स्वत:च्या मुलीसारखी माझी काळजी घेतली आहे. तिला तुम्हाला पाहायची अतिशय तळमळ होती. जलालाबादलाच येणार होती ती. पण तुम्हाला न विचारता येणं बरं दिसलं नसतं म्हणून ती आली नाही. पण आता तुम्ही सहजच तिच्या घरासमोर आला आहात. पाच मिनिटं घरी आलात तर तिला फार बरं वाटेल.'' आणि हरिभाऊंच्या म्हणण्याला मान देऊन बादशहाखान माझ्या घरी आले! एवढा मोठा माणूस सहजपणाने माझ्या घरी आला.

खादीचा पांढराशुभ्र, धुवट कुडता पायजमा, गोल उंच टोपी. सव्वासहा फूट उंची. गोरापान रंग, एखाद्या अतिशय देखण्या माणसाचे कुणा सिद्धहस्त कार्टुनिस्टने चित्र काढावे तसा चेहरा. म्हणजे भले मोठे नाक, जाडजाड विस्कटलेल्या भुवयांखालचे मायाळू डोळे. ब्रिटिशांच्या डोक्याला तापदायक झालेले, बॅ. जिनांनी ज्यांना शत्रू मानले होते ते, एकेकाळचे हिंदुस्थानचे राजकारण गाजवलेले असे हे ९० वर्षांचे बादशहाखान माझ्या घरी आल्यावर मला म्हणाले, ''घर छान आहे हं तुमचं!'' जगातल्या कुठल्याही गृहिणीला जिंकून घेणारे वाक्य!

मी त्यांना म्हटले, ''आपल्यासारखा एवढा मोठा माणूस माझ्या घरी आला, केवढं भाग्य माझं! जन्मभर आठवणीत राहील ही आपली भेट.''

''मी कुणी मोठा माणूस नाही. मी खुदाई खिदमतगार (परमेश्वराचा सेवक) आहे. आम्हांला पश्तुनिस्तान स्वतंत्र हवं आहे. ते परमेश्वराचं काम आहे असं समजून मी ते करतो आहे. तुमच्यासारख्या लोकांनी मदत केली तर हे काम होईल, नाही तर होणार नाही. (मी लेखिका आहे, अफगाणिस्तानवर लिहीत असते, असे जोशींनी त्यांना सांगितले होते, म्हणून ते तसे म्हणाले.) राजकारण करणारे सगळेजण आता आपापल्यातच एवढे गुंतून पडले आहेत की पश्तुनिस्तानसारख्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला कुणालाही वेळ नाही, इच्छाही नाही. पण हे काम झालंच पाहिजे एवढीच माझी इच्छा आहे. माझ्या आयुष्याचं ध्येय तेच आहे.''

थोडेसे थांबून मग ते म्हणाले, ''खरं म्हणजे आम्हांला हिंदुस्थानातच राहायचं होतं. गांधींनी तसं वचन मला दिलं होतं, पण नंतर त्यांनी आमचा विश्वासघात केला. गांधी-नेहरूंनी स्वत:चं स्वातंत्र्य तर मिळवलं, पण आम्हांला मात्र या कुत्र्यांसमोर (पाकिस्तान) टाकलं त्यांनी, हे दु:ख मी कधीही विसरणार नाही. गांधी-नेहरूने हमे धोखा दिया.'' बादशहाखान विषण्णपणाने म्हणाले.

बादशहाखानांचा एक मुद्दा मात्र मला राहून राहून आठवतो. ते म्हणाले होते, ''तुम्ही तर अफगाणिस्तानचा सगळा इतिहास वाचला आहे. तुम्हांला माहीतच आहे, पूर्वी इथे हिंदू राजांचं राज्य होतं. मग कनिष्क राजाचं केवढं तरी बलाढ्य साम्राज्य होतं. तेव्हा आम्ही सगळेच बुद्धधर्मीय होतो. मग नंतर मुस्लिम इथं आले आणि आम्ही मुसलमान झालो. इस्लाममुळे जगातल्या इतर ज्ञानाचे सगळे दरवाजे आम्हांला बंद झाले. म्हणून आम्ही असे मागासलेले राहिलो आहोत... आता हे डाव्या विचारांचे लोक सत्तेवर आलेत. बघूया त्यांच्या हातून तरी आमची सुटका होते का ते.''

त्यांचे उद्‌गार ऐकून मी थक्क झाले होते. एका मुस्लिम माणसाकडून अशा तऱ्हेची कबुली येणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे आणि तेवढीच विरळा, पण अलीकडे जगातल्या सर्वच मुसलमानांना, विशेषत: जिथे इस्लामपूर्व प्रगत संस्कृती नांदत होती अशा देशांतील मुसलमानांना 'आम्ही खरे कोण?' हा प्रश्न सतावतो आहे.

इराणमधील इस्लामपूर्व आर्य संस्कृती, सायरस राजाचे साम्राज्य, ससानिअन संस्कृती यांबद्दल इराणी लोकांना केवढा अभिमान! इंडोनेशिया, थायलंड इथेही इस्लामपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या रामायण-महाभारताबद्दल त्यांना केवढे कौतुक! तेवढे कौतुक तर भारतामध्येही नाही. अफगाणिस्तानातही बौद्धधर्मीय राजांचे केवढे तरी बलिष्ठ आणि प्रगत साम्राज्य होते. त्या संस्कृतीबद्दल अभिमान वाटावा असे अवशेष आजही अफगाणिस्तानामधील बामीयान, हड्डा (जलालाबाद), फंदुकिस्तान, सुर्खकोटल वगैरे ठिकाणी विखुरलेले आहेत. कुणालाही आपल्या राष्ट्रीय अस्मितेची पाळेमुळे खोलवर रुजलेली हवी असतात. पण मग इस्लामपूर्व संस्कृतीच्या वारशाबद्दल अभिमान बाळगला तर इस्लामशी प्रतारणा केल्यासारखी होते आणि मग 'हे की ते' अशी द्विधा अवस्था होते.

अलीकडे जगभरच इस्लामचे पुनरुत्थान चालले आहे. त्यामागच्या प्रेरणांचा विचार करताना या मुद्द्याचाही विचार व्हायला हवा.

त्यांची निघण्याची वेळ झाली. त्यांनी चहा, फळे, मेवा काहीही खाल्ले नाही. त्यांच्याबरोबर आलेल्यांनी सांगितले, 'बाबा दुसरीकडे कधीच काही खात नाही. स्वतःचा स्वयंपाक, कपडे, भांडी सगळी कामे ते स्वतःच करतात.' निघताना अफगाण पद्धतीप्रमाणे मी त्यांच्याशी हस्तांदोलन केले. मी वाघाशी काही कधी हस्तांदोलन केलेले नाही तरी, बादशहाखान यांच्याशी हस्तांदोलन करताना वाटले, वाघाचा हात असाच असावा. वाघासारखे रुंद, मजबूत हात असूनही तळवे अतिशय मऊशार, गुलाबी. आणि हे तर धुण्याभांड्यासह सगळी कामे स्वतः करतात!

त्याला २६ वर्षे उलटून गेल्यानंतरची ही एक घटना.

त्यावेळी तालीबानींची राजवट संपून लोकशाही सुरू झाली होती. सौमित्रला वाटले, परत एकदा अफगाणिस्तानात जाऊन एक शॉर्ट डॉक्युमेंटरी बनवावी. त्याआधी त्याने दोन-तीन हिंदी चित्रपट बनवलेही होते. मला म्हणाला, 'तू चल माझ्याबरोबर. म्हणजे तिथल्या बायकांच्या मुलाखती घेता येतील.' त्यासाठीचा खर्च आम्हीच करायचा ठरवले. पैशांची जुळवाजुळव, व्हिसा यामध्ये दोन-तीन महिने गेले. थंडी सुरू झाली. युद्धाची दहा वर्षे आणि नंतर तालीबानींची सत्ता यांमुळे चांगली हॉटेल्स उद्ध्वस्त झाली होती. जी होती त्यांमध्ये खोली गरम करण्याच्या सोयी नव्हत्या. वयाच्या सत्तरीत मी. तिथली थंडी मला सहन होणे शक्य नव्हते. मी नाही जाऊ शकले. सौमित्र एकटाच गेला.

काबूलच्या वृत्तवाहिनीवरच्या एका माणसाशी त्याने संपर्क साधला. त्यामुळे भाषेचा प्रश्न सुटला. काबूलमध्ये १०-१५ दिवस राहून त्याने 'खूब अस्ती अफगाणिस्तान' – 'ठीक चाललंय ना अफगाणिस्तान?' हा तासाभराचा चित्रपट बनवला. लॉस एंजेलिसमधल्या फिल्म फेस्टिव्हलमध्ये त्या चित्रपटाची सर्वोकृष्ट चित्रपट म्हणून निवड होणारच होती. परंतु झाली नाही निवड. कारण चित्रपट उत्तम, पण काही अफगाणांनी त्या चित्रपटात आम्हाला अमेरिका नकोय, असे म्हटले होते. काही रशियाच्या विरोधातही बोलले होतेच. अफगाणांना रशिया, अमेरिका दोघेही नकोसे झालेत.

मुलाचा हा चित्रपट अनेक ठिकाणी दाखवला मात्र गेला. शाह मोहम्मद रईस आणि कित्येक अफगाणांनी तो पाहिला. रईस यांनी सौमित्रला फोन केला. सौमित्राने त्यांना सांगितले, की 'त्या काळात तो शाळकरी मुलगा होता. आईनं पुस्तक लिहिलंय, 'अफगाण डायरी'. त्याचं इंग्रजी भाषांतर झालंय, 'माय अफगाण डायरी', ते तुम्ही वाचा.'

त्यांनी ते पुस्तक वाचले. मला फोन केला. बोलणी झाली. त्यांनी 'माय अफगाण डायरी'च्या शंभर प्रती विकत घेतल्या, कुणाकुणाला देण्यासाठी. मी त्यांना सांगितले, 'तुम्हाला हवं तर त्याचं फारसी भाषेत भाषांतर प्रसिद्ध करा. मला त्याचा एक पैसाही रॉयल्टी नको. इंग्रजी वाचता न येणाऱ्यापर्यंत माझे अनुभव पोचतील.' 'तहशक्कूर' ('धन्यवाद') – ते म्हणाले.

रईस यांनी नंतर सांगितले की, एक अमेरिकन, हेन्री ब्रॅन्डन यांनाही माझ्याशी बोलायचे आहे. तालीबानी सरकारने अफगाणिस्तानात चालवलेला विध्वंस लोकांचा छळ थांबवण्यासाठी अमेरिकेने २००१ साली अफगाणिस्तानमध्ये सैन्य पाठवले होते. त्यामध्ये त्यावेळेचे अगदीच तरुण ब्रॅन्डन तिथे गेले होते. म्हणून त्यांनी रईस यांच्याशी बोलणे केले. माझ्या पुस्तकाबद्दल कळल्यावर त्यांना माझे पुस्तक हवे होते, माझ्याशी बोलायचे होतेच. मी अर्थातच होकार दिला.

रईस यांच्याशी बोलणे झाले आणि माझ्या अफगाणिस्तानमधल्या आठवणी उफाळून आल्या. त्या आठवणींनी अस्वस्थ केले. सौर (जेव्हा मार्क्सवादी दाऊद सत्तेवर आला) राज्यक्रांती, त्या पाठोपाठची रशियन सैन्याची घुसखोरी यांचे अनुभव आठवू लागले. काबूल दूरचित्रवाणी इमारतीवर टाकलेल्या बॉम्बमुळे आभाळाला भिडणाऱ्या धुराचे लोट, रात्रभर चाललेला फायरिंगचा दणदणाट, विमानांचा घरघराट. जे काय घडलेय ते बघायला म्हणून दुसऱ्या दिवशी शहरात पायीपायी हिंडत राहिलो. एका चौकातल्या एका रशियन सैनिकाचा फोटो काढावसा वाटला. जेमतेम मिसरूड फुटलेला तो सैनिक तर माझ्या मोठ्या मुलाच्या वयाचाच दिसत होता. इतिहासाचा साक्षीदार म्हणून फोटो काढावासा वाटला तेव्हा एक अफगाण आमच्यावर संतापला होता. ओरडलाच 'फूटू? ची फुटू? इमरोज अफगाणी मुर्दा शुद!' – फोटो? फोटो कसला? आज अफगाणिस्तान मेलंय! – त्याचे हे वाक्य कसे विसरेन मी?

रशियाच्या घुसखोरीनंतरचा सहा महिन्यांचा अनुभव, कितीतरी अफगाणांशी झालेल्या चर्चा आठवीत बसले. मनात आले, आपण तर फक्त सहाच महिन्यांचा अनुभव घेतलाय. रशियन सैन्य तर तिथे तब्बल फक्त दहा वर्षे होते. काय काय घडले होते त्या दहा वर्षांत?

मी विचार करीत बसले, तेवढ्यात सौमित्रचा फोन आला, त्याने मला सांगितले ते अतिशयच महत्त्वाचे. 'एका रशियन लेखिकेचं त्याबद्दल पुस्तक आहे, ते वाच!' स्वेटलाना अलेक्झांड्रीया यांच्या त्या पुस्तकाचे नावच आहे, 'झिंकी बॉईज' – म्हणजे शवपेट्यातील मुलं! स्वेटलाना यांचे हे पुस्तक वाचत गेले आणि युद्ध म्हणजे काय, 'डावे-उजवे' म्हणजे काय, यांचे विश्वदर्शन झाले आणि त्याच वेळी मानवतावादी, लोकशाहीवादी यांचे केविलवाणेपणदेखील दिसले.

रशियन सैन्याच्या घुसखोरीनंतर सहा-साडेसहा वर्षांनंतर, १९८६ साली स्वेटलाना काबूलला भेट द्यायला गेल्या होत्या. त्या आधी त्यांनी दुसऱ्या महायुद्धातील रशियन स्त्रियांच्या सहभागाबद्दल पुस्तक लिहिले होते. त्या वस्तुस्थितीमुळे त्यांना अतिशय मनस्ताप झाला. तेव्हाच त्यांनी ठरवले, की यापुढे युद्धाबद्दल कधीच लिहायचे नाही. त्यानंतर एकदा त्यांना अफगाणिस्तानातील युद्धातून परत आलेले दोन सैनिक भेटले. बोलणी झाली. त्यांच्याकडून त्यांचे एक एक अनुभव ऐकून त्या काबूलला गेल्या. त्यावेळी काबूल शहरात जागोजागी मोठमोठे फलक झळकत होते – 'कम्युनिझमच आपले उज्ज्वल भविष्य!'

'शांततेचं शहर काबूल!' अनेक फलकांवर हात उंचावलेल्या लेनिनचे फोटो झळकत होते!

त्याच वेळी कॅसेट्सवरची अफगाणांची गाणी ऐकता आली. अफगाण सैनिकांचीच गाणी होती ती. लपवून ऐकता आली.

*'सूर्य मावळतोय, बॉम्बसारखा दिसतो, क्षितिजावरचा सूर्य'*

*'कुणाला हवंय ते वैभव, मला फक्त जिवंत राहायचंय.'*

*'मारतो आम्ही माणसांना का? माणसं मारतात आम्हाला, का?'*

एक गाणे तर असे होते,

*'माझ्या प्रिय रशिया, का केलास विश्वासघात माझा?'*

ही गाणी ऐकून स्वेटलाना चक्रावून गेल्या. अफगाणांची मन:स्थिती त्यांना कळली. ती त्यांना सांगितले गेले होते त्यापेक्षा वेगळीच होती.

डिसेंबर १९७९ ते फेब्रुवारी १९८९ या दहा वर्षांत रशियाने अफगाणिस्तानात एकूण दहा लाखांचे सैन्य पाठवले होते. त्यापैकी रशियन सरकारच्या आकडेवारीनुसार पन्नास हजार मृत्यू पावले होते. त्यापेक्षा कितीतरी अधिक नाहीसेच झाले होते. कारण त्यांच्या शवपेट्या परत आल्याच नव्हत्या किंवा ते स्वत:ही परत आले नव्हते. अफगाणिस्तानातील आभाळाला भिडणाऱ्या पर्वतांवर आणि त्यांच्यामधल्या खोलखोल दऱ्यांमधे कुठे कुठे मरून पडले असतील. नाहीतर उत्तर अफगाणिस्तानामधल्या वाळवंटात वाट चुकून गेले असतील आणि आपल्या जीप्स, रणगाड्यांसह जिवंत गाडले गेले असतील. ती वाळवंटे तशीच आहेत. ज्यांचे हात-पाय तुटलेत, दृष्टी गेली, बहिरेपणा आलाय, आवाज बंद पडलेत, मानसिक आजार झालेत अशांची संख्या तर मोजलीच गेली नाही. पायदळ, वैमानिकांबरोबर डॉक्टर्स, नर्सेस, स्वयंपाकिणी, मोलकरणी पाठवल्या होत्या. काही वेश्यांनादेखील पाठवले होते. सैनिकांची 'ती' गरज भागवण्यासाठी! जे सैनिक पाठवले गेले होते, ते बहुतेक सगळेच अगदी सर्वसामान्यांमधलेच होते. जेमतेम शिक्षण झालेले, तर पुष्कळसे विद्यार्थीच होते. ज्यांचे वडील, काका, मामा सैन्यातील होते त्यांच्यापैकी मोजकेच कोणी होते. श्रीमंत, उच्चभ्रू सरकारी नोकरदार, विचारवंत, लेखक, कलावंत, वकील, कम्युनिस्ट पक्षाचे लहानमोठे नेते, अशा सारख्यांच्या मुलांना मात्र पाठवले नव्हतेच. त्यांच्यापैकी बहुतेकांना अफगाणिस्तान हा देश कसा आहे, कुठे आहे हेदेखील माहीत नव्हते.

अफगाणिस्तानात पाठवताना त्यांना सांगितलं गेले होते की तुम्हाला तिकडे पाठवीत आहोत ते 'आपल्या मातृभूमीची प्रतिष्ठा जपण्यासाठी.' आपल्यावर आंतरराष्ट्रीय जबाबदारी आहे ती निभावण्यासाठी तुम्हाला तिकडे जायचं आहे. अशा सांगण्यामुळे त्या तरुणांच्या मनात स्फुरण आले होते. त्याचबरोबर असेही सांगितले गेले होते की अफगाणिस्तान हा देश अत्यंत गरीब आहे, मागासलेला आहे. तिथे जाऊन आपल्याला हॉस्पिटल्स बांधायची आहेत, शाळा, कॉलेजेस सुरू करायची आहेत, आधुनिक शिक्षण द्यायचे आहे, नवे उद्योग सुरू करायचेत. तिथल्या श्रीमंतांनी, राजकर्त्यांनी, जमीनदारांनी गरिबांवर केलेले अत्याचार दूर करायचेत. त्यांना सुस्थितीत आणायचे आहे. अमेरिकेसारख्या भांडवलशाहीच्या विळख्यातून त्यांना सोडवायचे आहे. तुम्ही तिकडे गेल्यावर तुमच्या सुरक्षिततेची, खाण्यापिण्याची, औषधोपचारांची पूर्ण जबाबदारी आपलेच सरकार घेणार आहे. जी मुले विद्यार्थी होती त्यांना पगार सुरू केला जाईल, जे नोकरी करणारे होते त्यांना पगार दीडपट करणार, अशी सगळी आश्वासने त्यांना दिली गेली.

ज्यांना त्यांचा पूर्ण पगार मिळू लागला होता त्यांनी आपल्या पैशाने काबूलमधल्या दुकानातून स्वस्तात मिळणाऱ्या जपानी, अमेरिकी वस्तू, कपडे विकत घेतले आणि रशियाला आपल्या गावी परत गेल्यावर त्याच वस्तू दुप्पट तिप्पट पैशांना विकून पैसा कमावला. तर अनेकांनी दुकानातील वस्तू 'उचलल्या', त्यांच्याकडे पैसे मागण्याची हिंमतच अफगाण दुकानदारांकडे नव्हती. तर काही सैनिकांनी अफगाणांच्या घरात शिरून घरात सापडतील त्या वस्तू पळवल्या होत्या. काही सैनिकांनी तर अफगाणांना मारल्यानंतर त्यांच्या हातातल्या वजनाने हलक्या, उत्तम प्रतीच्या मशिनगन्स, त्यांचे बूट, त्यांची गरम जाकिटे, त्यांच्या जवळचे पैसेदेखील काढून घेतले होते.

ही त्यांची एक काळी बाजू झाली. दुसरी बाजू तर त्यांच्याबद्दल दया वाटणारी आहे. ज्यांनी आधी थोडेफार सैनिकी शिक्षण घेतले होते त्यांची गोष्ट वेगळी होती. पण ज्या तरुणांनी त्यांच्या आयुष्यात प्रथमच कमरेभोवती मशीगन्सच्या गोळ्यांचे वजनदार पट्टे बांधले आणि हातामध्ये जडशील कॅलिनाश्कॉव्ह मशीनगन धरली होती, त्यांची गोष्ट वेगळीच ठरली. त्यांना जेव्हा हुकूम झाले, 'शूट'... तेव्हा क्षणभरासाठी त्यांचे मन सुन्न झाले. 'शूट' म्हणजे काय? 'मशीनगनचं बटण दाबून धरा!' हे सांगितले गेले, पण समोरच्यांवर बंदूक चालवण्याची हिंमतच होत नव्हती. या अनोळखी, काहीही संबंध नसलेल्यांना ठार मारायचे? पण त्यांना मी नाही मारले तर समोरचे लोक मला मारतील! क्षणभरासाठी मस्तकात वादळ उठले आणि दुसऱ्याच क्षणाला मशीनगन्समधून गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. एका सैनिकाने स्वेटलानाला सांगितले, 'तुमच्या भोवती बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज घुमत असताना, मरण म्हणजे काय हे तुम्हाला कधी कळणारच नाही. तुमच्या शेजारीच असलेला सैनिक मरून पडलेला असतो. तो मेलाय हे माहीत असलं तरी तुम्ही त्याला हाका मारत सुटता! हे का, कसं होतं हे कसं कळणार तुम्हाला? हा अनुभव तुम्ही घेतलेलाच नाही.'

दुसऱ्या एका सैनिकाने स्वेटलानाला सांगितले, 'आम्ही एका गावाला पूर्णपणानं उद्ध्वस्त केले. बायका, पुरुष, मुलांची प्रेतं सगळीकडे पडलेली दिसत होती. एका म्हातारी मात्र कशीबशी वाचली होती. तिला पकडून आमच्यासमोर आणलं तेव्हा आम्हाला बघून तिरस्कारानं ती थुंकली होती. आम्ही ते गावच उद्ध्वस्त केलं होतं. कारण त्या गावच्या कितीतरी लोकांनी त्या गावावरून उडत जाणाऱ्या आमच्या हेलिकॉप्टर्सवर तोफांचा मारा केला होता. कितीतरी हेलिकॉप्टर्स जाळूनच टाकली होती. त्यातल्या आमच्या माणसांच्या चिंधड्या उडाल्या होत्या. म्हणून आम्ही त्या गावाला उद्ध्वस्त करून टाकलं. आता या सगळ्याची

सुरुवात कोणी केली, का केली, केव्हा केली? त्याबद्दल आम्ही विचारच करत नाही. आमची माणसं मारली गेली याचंच दुःख होतं आम्हाला.'

लहान मुलांनादेखील मारल्याचे काही सैनिकांनी सांगितले, एकाने म्हटलेय, 'धडकी भरणं, भीतिग्रस्त होणंच माणसाचा पशू बनवतो. आम्हाला सांगितलं होतं, अफगाणिस्तान आपल्या सगळ्यांना बंधुभाव शिकवतो! ते सांगणं म्हणजे खोटेपणाची कमाल होती. अफगाणांनी हजारो रशियनांना मारलं होतं, मेलेल्यांच्या अंगावरचे पैसे, शस्त्रंच काय कपडे, बूटदेखील काढून घ्यायचे. आमचे लष्करी टँक्स, रणगाडे, जीप्स, हेलीकॉप्टर्स उद्ध्वस्त करायचे. एवढेच नाही तर एकटा-दुकटा रशियन त्यांच्या ताब्यात सापडला की त्याच्या संपूर्ण शरीराची कातडी सोलून त्याला झाडाला टांगून ठेवायचे!'

त्या सैनिकाचे हे सांगणे खरेच होते. एकदा ही घटना माझे पती फिरोझ रानडे यांच्या ऑफिसातील गुहा या इंजिनिअरने पाहिली होती. गुहा काबूलहून गझनीला जात होते. तेव्हा एका लहानशा गावातून जाताना एका गोऱ्या माणसाला सोलून काढून झाडाला टांगून ठेवलेले त्यांनी पाहिले होते. गुहा तिथूनच काबूलला परतले आणि त्यांनी आपल्या राजदूताकडे मागणी केली की मला भारतात परत पाठवा.

अफगाणांच्या क्रौर्याला तर सीमाच नाहीत. एका रशियन सैनिकाने स्वेटलानाला सांगितले, 'एखादा रशियन सैनिक हाती लागला तर त्याला त्याच्या गळ्यापर्यंत जमिनीत पुरून, जमिनीवरच्या त्याच्या मस्तकाभोवती जागा मोकळी करायचे आणि मग त्याच्या मस्तकावर गावातले पुरुष, मुलगे लघवी करीत राहायचे. एखादे वेळेस तो रशियन सैनिक मरून जायचा. तो मेला नाही, तर त्याला खड्ड्यातून बाहेर काढून त्याला पिस्तुलाने मारून टाकायचे.'

अशाच एका घटनेबद्दल ब्रिटनचे एकेकाळचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनीदेखील त्यांच्या आत्मचरित्रात लिहून ठेवलेय. त्यांच्या अगदी तरुण वयात १८९७ साली ते वायव्य प्रांतातील पश्तून लोकांच्या एका गावात राहात होते. तेव्हा ते ब्रिटिश सैन्यात रुजू झाले होते. त्याचवेळी ते वार्ताहर म्हणूनही बातम्या पाठवायचे. 'माय अर्ली लाइफ' या पुस्तकात त्यांनी अशाच एका घटनेचा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्याशिवाय असेही नोंदवले आहे की एकदा ब्रिटिश सैन्यातील ३६ हिंदुस्थानी आणि ब्रिटिशांना अफगाणांनी मारल्यानंतर, ब्रिटिशांनी त्यांचे त्याच भागात दफन केले आणि ते माघारी निघून गेले. त्यानंतर ती जागा अफगाण्यांना सापडली. त्यांनी त्यांना जमिनीतून बाहेर काढले आणि त्यांच्या प्रेतांना गोळ्या घातल्या!

अफगाणिस्तातून परत आलेल्या एका सैनिकाच्या आईने म्हटलेय, 'आमच्या मुलांना सरकारने तिकडे पाठवले. तिथूनच मग त्या सैनिकांच्याच कितीतरी शवपेट्या येऊ लागल्या. कधी शवपेट्या मुलांच्या आईवडिलांच्या घरी पोचवल्या जायच्या. तर मॉस्कोपासून दूरवरच्या गावातल्या मुलांच्या आईवडिलांना कळवले जायचे की मॉस्कोला येऊन तुमच्या मुलांची शवपेटी घेऊन जा. त्यावेळी त्या आईवडिलांच्या जिवाची जी काय घालमेल व्हायची, ती शवपेटी आपल्या गावी घेऊन जाताना त्यांची जी काय परवड व्हायची त्याची आपण कल्पनादेखील करू शकणार नाही,' अशी वर्णने आहेत स्वेटलानाच्या पुस्तकात.

कोणी सैनिक धडधाकट, तर पुष्कळसे अपंग होऊनच परत आले की ती मुले आपल्या घरच्यांना, नातेवाइकांना अफगाणिस्तानात चाललेल्या मरणातांडवाबद्दल सांगायची. पण त्यांच्या सांगण्यावर लोकांचा विश्वासच बसायचा नाही. कारण दूरचित्रवाणीवरून त्यांना सतत वेगळेच काही दाखवले जायचे. ते म्हणजे अफगाण माणसे रशियन सैनिकांचे मनापासून स्वागत करताहेत, त्यांना गळामिठ्या मारताहेत, त्यांच्या रणगाड्यांवर फुले उधळत आहेत. श्रीमंत जमीनदारांकडून त्यांची शेती सरकार काढून घ्यायचे, ती शेती गरीब शेतकऱ्यांना, शेतमजुरांना देताना दाखवायचे. मग ते शेतकरी, मजूर, शेतजमिनीची माती कपाळाला लावताना दाखवले जायचे. पण प्रत्यक्षात अफगाण आणि आमची माणसं एकमेकांना मारतच सुटली होती.'

एका सैनिकाचा मात्र एक अगदी वेगळाच असा हा अनुभव. त्याला अफगाणांची भाषा येत होती. एका खेडेगावात तो पोचला, तो आपली मशिनगन घेऊनच. तिथे पोचताच तो तिथल्या गरीब लोकांशी फारसी भाषेतच बोलू लागला. त्यांना आश्चर्यच वाटले. त्यांनी विचारले, 'तू मुसलमान आहेस का?' त्याने खोटेच सांगितले, 'हो, मी मुसलमानच.'

'तुला कलमा पढायला येतो का?' असे त्यांनी विचारल्यावर त्या सैनिकाने लगेचच, 'ला इलाही इल्लला...' हा मंत्र म्हणून दाखवला. तेव्हा मग त्या लोकांनी 'दोस्त...दोस्त...' म्हणून त्याला मिठ्याच मारल्या.

'मग आमच्यातली मैत्री वाढत गेली. दूरचित्रवाणीवरून मुल्लामौलवी यांचा कलमा पढून झाला की मग आमचे लोक त्यांना आमची बाजू समजावून सांगू लागायचे. आमचं सैन्य तिथे पोचण्याआधी तिथे झालेली सौरराज्य क्रांती याबद्दल सांगायचे. त्या राज्यक्रांतीमुळे तुमचा कसा फायदा झाला ते सांगायचे. आम्हीदेखील तुमच्या फायद्यासाठीच आलो आहोत असे सांगितले जायचे. ते सगळे फारसी भाषेतच. हे सगळं कधी संपणार, चित्रपट कधी सुरू होणार याचीच वाट पहात राहायचे लोक. बहुतेक वेळा त्यांना भारतीय चित्रपटच आम्ही दाखवीत होतो. कारण तेच त्यांना सर्वाधिक आवडतात.'

त्या सैनिकाने चित्रपटाबद्दलची हकिगत सांगितली ती खरीच. आमचा अनुभवदेखील तसाच होता. कुठेकुठे बंदुकीच्या फैरी झडू लागल्या, लष्करी विमानांच्या घिरट्या सुरू झाल्या, घातपाताची शक्यता अमुकतमुक वेळेला आहे, अशा बातम्या पसरल्या की त्या त्या वेळी राजकपूर, देवआनंद, धर्मेंद्र, हेमा मालिनी यांचे चित्रपट दाखवले जायचे. धर्मेंद्र-हेमा मालिनी त्यांचे अत्यंत लाडके. दूरचित्रवाणीवर चित्रपट सुरू असला की त्यावेळी लोक घराबाहेर पडणार नाहीत व त्यामुळे त्यांचे बळी जाणे थांबेल, ही त्यामागची भावना होती.

दूरवरच्या खेडेगावातून, शहरातून काबूलला परत

आल्यावर रशियनांना दुकानांबाहेरच्या जाहिराती बघून आनंदच व्हायचा. त्या जाहिराती रशियन भाषेतच असायच्या, 'व्होडका घ्या, स्वस्तात उपलब्ध'! अमेरिकन, चिनी बनावटीचे कपडे, डबाबंद भाज्या, दूध, चीज, लोणी, यांच्याबरोबर इलेक्ट्रिकच्या शेगड्या, इस्त्र्या, मिक्सर्स अशा वस्तूही तिथे खूप स्वस्तात उपलब्ध केल्या गेल्या होत्या.

खलैविना नावाच्या नर्स बाईने स्वेटलानाला लिहिलेल्या पत्रात म्हटलेय, 'माझ्यासारख्या हजारो बायका होत्या तिथे. आम्ही सैनिक नव्हतोच. तिथल्या लालक्रांतीबद्दल सांगून सरकारने आम्हाला तिकडे पाठवलं होते. तिथल्या गरीबांसाठीच तिकडे जायचं होतं. त्यांच्या मदतीसाठी. त्यावर आमचा विश्वास बसला. पण तिथं गेल्यावर लक्षात आलं की तिथं सगळं काही विकायलाच काढलं होतं. स्वयंपाकिणी, नर्सेस, मदतनीस, मोलकरणी म्हणून आम्ही गेलो होते. आमची कामं तर आम्ही मनापासून करीत होतोच, पण आमच्या कामाची दखलच न घेता, आम्हालाही 'विकायलाच' काढलं होतं. तेही आमच्याच लोकांनी. आमचा गैरवापर केला त्यांनी. आमचं स्वत:चं असं काही शिल्लकच राहिलं नाही आमच्याजवळ. आम्हाला जणू नाहीसच केलं त्यांनी.'

आपल्या पुस्तकाच्या सुरुवातीला स्वेटलाना म्हणतात, ''एक दिवस एका रशियन माणसाचा फोन आला. तो म्हणाला, 'तुम्ही आमच्यावर, आमच्याबद्दल पुस्तक लिहिणार आहात. पण शांततावादी, मानवतावादाची भाषा बोलणाऱ्यांचा मी किती तिरस्कार करतो हे तुम्हाला कधी कळणारच नाही. तुम्ही कधी जाडेभरडे, संपूर्ण शरीर झाकणारे लष्करी कपडे घातलेत? त्यावर कायमच अंगावर असणारी वजनदार शस्त्रं सांभाळत टळटळीत उन्हात, वाळवंटातून जीप चालवलीत? उंचच उंच पर्वत चढलात? उत्तम व्हायोलीन वाजवणारा माझा एक मित्र होता. त्या मित्राचं मस्तक उडवून, हात-पाय कापून टाकलेलं धड एका पेटीतून परत आणलं होतं! त्याचं दफन झालं आणि त्याच्या आईला वेड लागलंय. सैनिक आम्ही आहोत, आम्ही लढलोय आणि तुम्हाला दहा वर्षांनंतर जाग आलीय! हुशारच आहात तुम्ही! बंदुकीतून उडणारी गोळी म्हणजे काय ते तुम्हाला कधी कळणारच नाही. तुमच्या त्या बायबलमधील सत्याला मी कवडीची किंमत देत नाही. माझी सत्यं आहेत ती म्हणजे प्लॅस्टिकच्या मोठ्या पिशवीतून आणलेली माणसांची मस्तकं, त्यांचे हात-पाय. तेच माझं सत्य आहे. नाहीच कळणार ते तुम्हाला.''

सैनिक तशा अवस्थेत परत येत होते, त्याचे दु:ख तर अपरंपार होते. पण त्याचबरोबर आपल्या देशासाठी, अफगाणिस्तानातल्या गरिबांसाठी त्यांचा बळी गेलाय त्याचा अभिमानदेखील वाटला होता. त्यांना कौतुकाने 'अफगाणीसा' म्हटले जाऊ लागले होते. पण नंतर जसजसे एकूणच भयानक वास्तव समजायला लागले तसतसा लोकांचा संताप वाढतच गेला. आपल्या सरकारचा आलेला संताप दाखवणे अशक्य होते, कारण सरकारची भीतीच होती. म्हणून मग परत आलेल्या सैनिकांचा, मग ते अपंग होऊन आले असले तरीही, त्यांचा संताप येऊ लागला. 'तुम्ही खुनी आहात, काय काय आणलंत लुटून त्या गरिबांकडून?' असे प्रश्न विचारून त्यांचा अपमान होऊ लागला. परत आलेल्यांपैकी अनेकांची मानसिक अवस्था तर पराकोटीची बिघडली होती. अनेक मनोरुग्ण झाले, त्यांना औषधोपचार घ्यावे लागत होते, काही जण तर वेडेच झाले. पुष्कळ सैनिक स्वत:ला खुनी समजू लागले होते. हे सगळे जगभर पसरायला वेळ लागला नाही. आपण हे युद्ध फार काळ चालवू शकणार नाही याची जाणीव लवकरच रशियाला झाली.

दहा वर्षांनंतर जिनिव्हा करार झाला आणि रशियाने आपले सैन्य काढून घेतले. त्यामागे अमेरिकेचाही हात होताच. कम्युनिस्टांचा द्वेष करणाऱ्या इस्लामवाद्यांना अमेरिकेने हाताशी धरले होते. अफगाणिस्तानच्या सीमेला चिकटून असलेल्या पाकिस्तानमध्ये राष्ट्राध्यक्ष होता जनरल झिया उल हक. हा तर कट्टर इस्लामवादीच. त्यालाही रशियाची भीती वाटायला लागली होतीच. त्याच्याही मनात रशियाबद्दलचा द्वेष होताच. अमेरिकेने झियाशी संधान बांधले. अब्जावधी डॉलर्स आणि अपरंपार शस्त्रास्त्रांचा साठा पाकिस्तानकडे पोचवला आणि पाकिस्तानमध्येच कट्टर इस्लामवादी तयार करण्याचे, कम्युनिस्टांना विरोध करण्यासाठीचे क्लासेसच सुरू केले. त्या सगळ्याला जनरल झियाने खुल्या मनाने स्वीकारले. ओमर अब्दुल रहमान, अल जवाहिरी, मुल्ला ओमर अशा अनेकांना 'तयार' केले. मुल्ला ओमर हा एका डोळ्याने आंधळा, म्हणून 'आंधळा शेख' म्हणूनच ओळखला जात होता. त्यानेच बामियानच्या बुद्धांना सुरुंग लावून उद्ध्वस्त केले होते. या विशाल ऐतिहासिक मूर्तींचा उपयोग जाणारे-येणारे अफगाण टोळीवाले नेमबाजीचा सराव करण्यासाठी वापरत. पुढे त्यांनी त्या जमीनदोस्तच केल्या. त्यांवरचा सोन्याचा वर्ख व मौल्यवान अलंकार लुटले गेले. त्या सगळ्यांच्या पाठीशी होता मुल्ला म्हणजे धनाढ्य अरब – ओसामा बिन लादेन.

अमेरिकेच्या मदतीने निर्माण केलेली ही शक्ती एवढी वाढत गेली की अफगाणिस्तानातील सुरुवातीचे मुजाहिदीन नंतर तालीबानी झाले, 'अल कायदा' झाले. त्याची शक्ती एवढी वाढत गेली की त्याची किंमत अमेरिकेलाच चुकवावी लागली. रशियन सैन्य परत गेले असले तरी रशियाच्या आशीर्वाद आणि आधारानेच चालणारे अफगाण सरकार सत्तेवर होते. अमेरिकेची लुडबूड वाढत गेली आणि १९९२ साली कम्युनिस्ट राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नजिबुलाचा अपरंपार छळ करून याच अतिरेक्यांनी त्याला काबूलमधल्या झाडाला टांगून ठेवले. मुजाहिदी, तालीबानी असा प्रवास करीत अल कायदाने अफगाणिस्तान ताब्यात घेतले. मूलभूत इस्लामवादी सरकार सत्तेवर आले. अफगाणिस्तानचे पूर्णपणे इस्लामीकरण झाले. कित्येक अफगाणांना हे इस्लामीकरण असह्य होते. त्यांचे आणि अमेरिकेचे संबंध वाढू लागले. इस्लामवाद जगभर पसरू लागला होता. २००१साली न्यूयॉर्कच्या ट्वीन टॉवर्सवर हल्ला झाला. या जुळ्या इमारती म्हणजे अमेरिकेचा मानबिंदू

समजल्या जायच्या. वॉशिंग्टन राजधानीमधील लष्करी कचेरीवरदेखील हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. न्यूयॉर्कमधील जुळ्या इमारती जमीनदोस्त झाल्या होत्या; पण वॉशिंग्टनमधील इमारतीवर झालेल्या हल्ल्याचा नेम चुकला होता. शेकडो लोक मरण पावले होते. हा हल्ला म्हणजे मानबिंदूवरचा हल्ला होता असे अमेरिकेला वाटले. या हल्ल्याचा सूत्रधर ओसामा बिन लादेन असणार याची त्यांना खात्रीच होती, म्हणून पाकिस्तान-अफगाणिस्तानात येरझरा घालणाऱ्या ओसामाला ताब्यात द्या अशी मागणी केली अमेरिकेने. ती मागणी पूर्ण झाली नाहीच. त्याचा परिणाम म्हणजे अमेरिकेने अफगाणिस्तानात सैन्य घुसवले. त्यासाठी ब्रिटन, कॅनडा यांचाही प्रत्यक्षात पाठिंबा होताच.

रशियन सैन्य घुसले होते तेव्हा काही अफगाणांनी त्यांचे स्वागत केले होते, त्याच पद्धतीने या वेळीदेखील दुसऱ्या बाजूच्या अफगाणांनी अमेरिकन सैन्याचे स्वागत केले. या वेळी स्वागत करणाऱ्यांची संख्या खूप अधिक होती. कारण तालीबानी, अलकायदा यांच्या अमलाखाली असलेल्यांचे जगणे त्यांना असह्य झाले होते. इस्लामी कायद्याशिवायचे इतर सगळे संदर्भ त्यांच्या जीवनापासून तोडले गेले होते. म्हणूनच त्यांनी अमेरिकन सैन्याचे स्वागत केले होते ते मनापासूनच. अमेरिकेने तालीबानी, अल कायदाला दूर करून टाकले. आणि 'लोया जिरगा' या सगळ्या टोळीवाल्यांच्या नेत्यांच्या सभेमध्ये मतदान झाले. हमीद करझाई राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले.

हळूहळू स्थैर्य आले. सर्वसामान्यांना आता रोजच्या जगण्यासाठी कितीतरी स्वातंत्र्य मिळू लागले. दूरचित्रवाणीवरची मुल्लामौलवींची सततची भाषणे बंद झाली, गाणी, चित्रपट, नाटके सुरू झाल्या. मुलांसाठीच नाही तर मुलींसाठीदेखील शाळा सुरू झाल्या. काबूल विद्यापीठ चालू झाले. काबूलमध्ये तरी काही स्त्रियांनी संपूर्ण बुरखे न घालता हिंडा-फिरायला सुरुवात केली. दुकाने जगभरच्या वस्तूंनी, पुस्तकांनी भरली. तालीबानींच्या धास्तीमुळेच अफगाणिस्तानाचा अडीच-तीन हजार वर्षांपूर्वीचा सांस्कृतिक खजिना जमिनीखाली पुरून ठेवला होता, तो बाहेर काढला. हिंदू-बौद्ध देवदेवतांच्या सुंदर मूर्ती, दागदागिने, भांडी-कुंडी, चित्रे, हस्तलिखिते, वस्तुसंग्रहालय पुन्हा सुरू करून मांडून ठेवले. संगीताच्या टेप्स बाहेर आल्या. संगीताची वाद्ये पुन्हा वाजू लागली. अमेरिकेने हळूहळू सैन्य माघारी घ्यायला सुरुवात केली. आजच्या घटकेला त्यांचे दहा-बारा हजार सैन्यच आहे, तेदेखील काबूल शहरात. भोवतीने तालीबानींचा जोर मात्र वाढतच आहे. मधल्या काळात अमेरिकेने ओसामा बिन लादेनला मारून टाकले होते तरी तालीबान, अलकायदाने आपले हातपाय पसरलेच आहेत. आजही अफगाणिस्तानामध्ये दररोज कुठे ना कुठे हल्ले होत आहेत. परधर्मी, परकीयच नाहीत तर स्वकीयांनादेखील कट्टरवादी मारत सुटले आहेत.

अफगाणिस्तानचे पाकिस्तान, रशिया, अमेरिकेशी असलेले संबंध उघड झाले. भारताशी कसे होते संबंध? कसे आहेत? आमचाच अनुभव सांगते. ही घटना आहे सौरक्रांती होण्याआधीची. आपला काका जाहीरशहाला हटवून दाऊदखान सत्ताधारी झाला. दाऊदखानला अफगाणिस्तानातील वर्षोनुवर्षे चालत आलेल्या परंपराग्रस्त कारभाराला नवे, शिस्तबद्ध, आधुनिक, लोकहितवादी वळण द्यायचे होते. म्हणून दाऊदखानने भारताकडे एक गुप्त प्रस्ताव मांडला. साधारण १९८०च्या सुमारास. त्यावेळी इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. आपल्या नव्या लोकसत्ताकाची संपूर्ण आखणी, बांधणी, यांसाठी भारताने योजना आखून द्याव्यात, सरकारचा कारभार, व्यवस्थापनाची मांडणी करून द्यावी, प्रत्येक खात्याची आधुनिक नीटनेटकी पुनर्रचना करून द्यावी असा प्रस्ताव होता. इंदिरा गांधींनी संमती दिली. वेगवेगळ्या क्षेत्रांतील १२-१५ अधिकाऱ्यांना काबूलमध्ये पाठवले. त्यांनी अभ्यास सुरू केला. योजना आकार घेऊ लागली. ही बातमी रशियाला कळलीच! ब्रेझनेव्ह यांनी इंदिरा गांधींना संदेश पाठवला, 'अशी कोणतीही मदत भारताने अफगाणिस्तानला देऊ नये! ती जबाबदारी आमची आहे!' इंदिरा गांधी या संदेशाविरोधात जाऊ शकत नव्हत्या. दोन-चार दिवसातच सगळ्या अधिकाऱ्यांना भारतात परत जावे लागले. श्रीनिवासन हे त्यांच्यापैकीच एक अधिकारी. त्यांनी स्वतःच ही हकीगत सांगितली होती आम्हाला.

दुसरी हकीगत आहे १९७८ सालची. सौर राज्यक्रांतीनंतर कम्युनिस्टांची सत्ता आली. नूर मोहम्मद तराकी हे राष्ट्राध्यक्ष होते. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी आपल्या नावातून 'मोहम्मदाला' काढूनच टाकले होते. परराष्ट्रमंत्री होते हफिजुल्ला अमीन. त्यावेळी भारताचे परराष्ट्रमंत्री होते अटलबिहारी वाजपेयी. ते काबूलला आले होते. सरकारशी बोलणी करायला. तेव्हा अमीनने त्यांच्यासमोर म्हणे एका गुप्त कराराचा प्रस्ताव मांडला होता. अमीननी वाजपेयींना सांगितले की 'तुम्ही तुमच्या बाजूचा अर्धा पाकिस्तान ताब्यात घ्या, आणि आम्ही आमच्या सरहद्दीला लागून असलेला अर्धा भाग काबीज करतो! पाकिस्तान तुमचा शत्रू आहे व आमचाही शत्रूच आहे.' वाजपेयींनी या कराराला अर्थातच मान्यता दिली नाही. ही कल्पना त्यांना हास्यास्पदच वाटली असावी. ही घटना आपल्या दूतावासातीलच एका अधिकाऱ्याने आम्हांला सांगितली होती. 'माझं नाव कुणाला सांगू नका' ही त्यांची अट होती, ते साहजिकच होते. अशा अनेक गोष्टी त्यांनी सांगितल्या होत्या.

अफगाणिस्तानच्या या सगळ्या इतिहासाचे, वास्तवाचे विचार मनात कल्लोळ माजवतात. विचार, भावनाचे भिरभिरणे सुरूच. तेव्हा मनात आलेच की अमेरिकादेखील रशियाचे प्रतिबिंबच जणू. रशियाने अफगाणिस्तानला आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी आजच्या काळातच नाही, तर अठराव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच प्रयत्न सुरू केले होते. पण त्याचा जबरदस्त अनुभव आला तो डिसेंबर १९७९साली, रशियाने अफगाणिस्तानात लष्करी घुसखोरी केली तेव्हाच.

जगभरातल्या लहान, कमकुवत देशांवर ताबा मिळवण्यासाठीची ईर्ष्या जगभरच्याच महासत्तांच्या मनात

असते. तोच जगाचा इतिहास आहे. मग त्या महासत्ता 'उजव्या' विचारसरणीची भांडवलशाही असो, कम्युनिस्ट असोत की कट्टर धर्मवादी असोत. त्यांच्या मूळच्या विचारांचा अतिरेक झाला की मग त्यांचे 'वाद' होतात आणि मग जगाला आपल्या वादात गुंडाळून घ्यायच्या मोहिमेवर ते निघतात. जे रशियाने अफगाणिस्तानच्या बाबतीत केले, तेच अमेरिकेने व्हिएटनामच्या बाबतीत केले होते.

दुसरे महायुद्ध संपले आणि एकापाठोपाठ एक वसाहतवाद्यांच्या गुलामीतून एक एक देश स्वतंत्र होऊ लागला. हिंदुस्थानची फाळणी झाली तरी इंग्रजांचे राज्य संपले, भारत स्वतंत्र झाला. व्हिएटनामवरची फ्रेंचांची सत्ता घसरणीला लागली. १९४६ सालापासून व्हिएटनाममधील कम्युनिस्टांनी – व्हिएटकाँगनी आघाडी उघडली. घातपाताचे प्रकार सुरू झाले. व्हिएटकाँगला चीनची मदत अर्थात होतीच. उत्तर व्हिएटनाममधले वातावरण बिघडतच चालले. दक्षिण व्हिएटनाममधल्या लोकांना वाटले, हे युद्धच सुरू झालेय की काय? व्हिएटकॉन्ग आमच्या जिवावरच उठलेत. आपली कुटुंबे, घरे, शेती, नोकऱ्या यांच्याबद्दलच्या काळज्या वाढतच गेल्या. दक्षिणेकडून आरंभापासूनच कम्युनिस्टांना – व्हिएटकॉन्गना विरोधच होता, कारण त्यांच्यामुळे आपल्या जगण्यावर कित्येक बंधने येतील, आपले हक्क गमावून बसावे लागेल यांची त्यांना खात्री वाटत होती. त्यामुळे त्यांचे बळ वाढू नये म्हणून अमेरिका त्यांना मदत करण्यास उत्सुक होतीच. अमेरिकेने १९५० सालापासूनच फ्रेंचांना आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली, म्हणजे त्यांना व्हिएटनामची 'काळजी' घेण्यास मदत होईल.

१९५४मध्ये जिनिव्हामध्ये शांती परिषद भरली. उत्तर व्हिएटनाम आणि दक्षिण व्हिएटनाम हे दोन वेगवेगळे घटक आहेत, त्यांच्यामध्ये मूलभूत मतभेद आहेत ही गोष्ट त्या परिषदेमध्ये अधोरेखित झाली. या परिषदेपाठोपाठच उत्तर व्हिएटनामचे नेते, व्हिएटकॉन्गचे नेते हो चि मिन्ह यांना दक्षिण व्हिएटनामवर हल्ला करून आपले वर्चस्व स्थापन करायचे होते. पण चीनने त्यांना आवर घातला. युद्धामुळे परिस्थिती चिघळत जाईल, त्यापेक्षा सार्वत्रिक निवडणुका घ्याव्यात. निवडणूक घेण्याचा निर्णय जाहीर झाला, पण हो चि मिन्हच्या मनातील इच्छा लोकांना समजलीच होती. फ्रेंच तर निघून गेलेच होते. या निवडणुकीनंतर सत्ता व्हिएटकॉन्ग काबीज करणार, मग ते आमच्या जिवावरच उठतील ही भीती उत्तरेतील लोकांना भेडसावत होती. म्हणून दहा लाख लोक दक्षिणेकडे स्थलांतरित झाले. त्यामध्ये अनेक ख्रिस्ती होतेच. इतर बौद्धधर्मीय होते. त्यांना सुखरूपपणाने जमिनीवरून येणे धोक्याचे होते. त्यांना समुद्रमार्गाने हलविण्यासाठी अमेरिकेने आपला जहाजांचा ताफाच पाठवला. एकदा पोचल्यावर स्थायिक होता यावे म्हणून नऊ कोटी डॉलर्स पाठवले. तेव्हापासूनच म्हणजे १९५५ पासून अमेरिका व्हिएटनाममध्ये गुंततच गेली. त्यांच्या सुरक्षिततेसाठी अमेरिकेने दक्षिणेकडे सोळा हजार सैनिक पाठवले. तेव्हापासून उत्तरेकडून होणारे हल्ले वाढत गेले. अमेरिकेकडून येणाऱ्या सैनिकांची संख्या वाढत गेली. काही काळानंतर सैनिकांना परत जावे लागायचे, त्यांची जागा घ्यायला नवे सैनिक पाठवले जायचे. एकूण संख्या दहा लाखापर्यंत पोचली.

रशियन सैनिकांप्रमाणेच अमेरिकेच्या सैनिकांत सर्वाधिक होती ती अगदी सर्वसामान्यांची मुले. शिक्षणात कमी असलेली. सैनिकी शिक्षण घेतलेलेदेखील कमीच. श्रीमंत, उच्चभ्रू, सरकारात उच्च पदावरचे, विचारवंत, कलावंत वर्गातील मुले अगदीच कमी. कृष्णवर्णीयांची संख्या तर अधिकच होती. त्यापैकी बहुतेकांची वये होती ती विशीच्या आतबाहेरचीच. त्यांना सांगितले होते, आपल्याला व्हिएटनामी लोकांना कम्युनिस्टांच्यापासून वाचवायचे आहे. हे कारण बहुतेकांना पटले होते, तरीदेखील अनेकांना वाटले होतेच की आपण त्यांच्या भानगडीत पडूच नये. तरी अमेरिकेने आपल्या सैन्याला पाठवणे सुरूच ठेवले.

दक्षिण व्हिएटनाममधील कडोविकडीच्या युद्धाचे स्वरूप होते ते गनिमी काव्याचेच. तेथील घनदाट जंगलामुळेच. नंतर अमेरिकेने हवाई हल्ले करायला सुरुवात केली. मृत्यूचे तांडव सुरू झाले. दूरचित्रवाणीवरून तिथल्या युद्धाची दृश्ये दाखवली जात होती. ती वस्तुस्थिती पाहून अमेरिकेचे लोक हादरून गेले. आमची मुले अपंग होताहेत, मरताहेत या दुःखाने लोकांचा या युद्धाला विरोध वाढत चालला. सरकारवर त्यांची दडपणे वाढत चालली. एक तर युद्धात कामाला येणाऱ्यांची संख्या वाढत चालली. आर्थिक बोजा वाढत होता. जे सैनिक परत यायचे त्यांची अवस्था केविलवाणी झाली. लष्करी विमानाचे पायलट जॉन चेशियार यांनी म्हटले होते, 'आम्हाला सांगितलं होतं, तुम्ही युद्धावरून परत याल तेव्हा तुमचे स्वागतच होईल, पण परत आल्यावर आम्हाला धिक्कारच सहन करावा लागला होता. आम्हाला पाहून लोक तिरस्कारानं थुंकायचे, काहींच्या अंगावर तर कचरा फेकला होता. अमेरिकेने रासायनिक शस्त्रे वापरायला सुरुवात केली. त्यामुळे एका लहान मुलीच्या अंगावरचे कपडे जळून गेले. ती मुलगी आक्रोश करीत पळत होती. हे दृश्य वृत्तपत्रांमधून, दूरचित्रवाणीवरून जगभर पोचले आणि युद्धाचं चित्रच बदलायला सुरुवात झाली.'

१९७५च्या मे महिन्यापासून अमेरिकेने आपल्या सैन्याला माघारी आणण्याची सुरुवात केली. ज्या दक्षिण व्हिएटनाममधील लोकांना, अमेरिकेचे सैन्य परत गेल्यानंतर आपले राहणे सुरक्षित नसणारच असे वाटले होते, त्या लोकांना अमेरिकेत जायचे होते. त्या हजारो लोकांना त्यांच्या कुटुंबीयांसह अमेरिकेने आपल्याबरोबर घेऊन जायला सुरुवात केली. अनेक विमानाने गेले, परंतु बहुतेक लोक जहाजातून निघाले होते. त्यांच्यापैकी कितीतरी जहाजांवर व्हिएटकॉन्गने हवाई हल्ले करून त्या जहाजांना, त्यातील माणसांसह जलसमाधी दिली होती.

व्हिएटनाममधील युद्धात मानवी नुकसान किती झालेय त्याची मोजदाद अमेरिकेने केली. ती प्रसिद्ध केली. अमेरिकेने

एकूणात दहा लाखांचे सैन्य पाठवले होते. त्यापैकी ५८ हजारांवर सैनिक मारले गेले होते. ७५ हजार अपंग झाले, त्यापैकी २३ हजारांवर पूर्णपणे अपंग झाले होते. पाच हजारांवरच्या काहीनी हात, नाहीतर पाय गमावला होता. जे सैनिक मारले गेले होते त्यांची वये बव्हंशी २० वर्षांखालचीच होती. दीड हजारांचा पत्ताच लागला नव्हता, ते हरवलेच होते जणू. जे मारले गेले होते त्यांच्यापैकी अधिक संख्या होती ती कृष्णवर्णीयांचीच. त्या दहा लाख लोकांपैकी काही स्वयंपाकी, कामगार अशी माणसेही होतीच. त्यांच्यामधले काही लोकदेखील बॉम्ब वर्षावाखाली मृत्यू पावले होते, अपंग झाले होते.

दक्षिण व्हिएटनाममधील दोन ते अडीच लाख लोक व्हिएटकाँगने केलेल्या बॉम्ब वर्षावात, गनिमी युद्धात मारले गेले होते. तर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यामुळे नऊ लाखांच्यावर व्हिएटकाँगच्या सैनिकांना मारले होते. त्यांच्यापैकी काही सामान्य नागरिकदेखील होते. व्हिएटनाममधून परत आल्यानंतर सगळ्यांनी आपले पूर्वीसारखे आयुष्य जगायचा प्रयत्न केला, तशीच त्यांची इच्छा होती. पण अनेकांचे घटस्फोट झाले, बरेच ड्रग ॲडिक्ट झाले, मनोरुग्ण झाले. कुटुंबापासून दुरावलेपण आले, आजारपणे सोसावी लागली. अमेरिकन सरकारने ज्यांना ज्यांना वैद्यकीय मदतीची गरज असेल त्यांना सर्वप्रकारे मदत दिली. तरीदेखील त्यांना सर्वतऱ्हेची दुःखे, अपमान सहन करावे लागत होते. त्यांची संख्या मोठीच होती. हे सगळे टाळण्यासाठी अनेकांनी सांगायला सुरुवात केली की आम्ही व्हिएटनामला गेलोच नव्हतो, आम्ही फक्त तिकडे जाणाऱ्या सैनिकांच्या सामानाची ने आण केली. तिकडे जावे लागले तरी आम्ही लढायला गेलो नाही, तळावरची कामे करीत होतो.

अमेरिकन सैन्य परत गेले. ज्यांना शक्य झाले ते व्हिएटनामी लोकही गेले अमेरिकेला. पण ज्यांना मागे राहावेच लागले, त्यांना व्हिएटकाँगकडून अतोनात छळ सोसावा लागला. तिथेही आत्महत्या करणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. दक्षिणेतील राजधानीचे शहर 'सायगाव' हे नाव बदलून त्याचे नाव 'हो ची मिन्ह' ठेवण्यात आले. आजही संपूर्ण व्हिएटनामवर कम्युनिस्टांचेच राज्य आहे. पण काय काळाचा विचित्र महिमा, की आजच्या व्हिएटनामला आपल्या एकमेकांच्या कट्टर शत्रू असलेल्या अमेरिकेशीच व्यापारी, आर्थिक संबंध जोडायचे आहेत; ते वाढवीत न्यायचे आहेत; त्याबद्दलची बोलणी सुरू झालीच आहेत.

व्हिएटनाममधील युद्ध संपल्यानंतर २५-३०वर्षांनंतर अनेक अमेरिकन सैनिक, आपल्या वृद्धावस्थेत पुन्हा दक्षिण व्हिएटनाममध्ये गेले आहेत. काहींना त्या वेळच्या युद्धकाळातील आपल्या व्हिएटनामी सहकाऱ्यांचा शोध घेऊन भेटायचे आहे. काहींना तर तिथेच स्थायिक व्हायचे आहे. युद्धकाळात ज्यांचे स्थानिक स्त्रियांशी नाते जुळले होते, मुले झाली होती, त्यांना भेटायचे आहे. पुन्हा संसार सुरू करायचा आहे. त्यासाठी जमेल त्या नोकऱ्या करायच्या आहेत. एक वयस्क सैनिक तर एका हॉटेलमध्ये वेटरचे काम करू लागले आहेत. 'त्या काळात आम्ही किती वाईट वागलो! मूर्खपणाच होता तो! त्याची भरपाई करावीशी वाटते म्हणून परत आलोय' असे सांगणारे आहेत. तसेच, 'अमेरिकेत राहाताना मनाला सतत टोचणी लागली होती. आता इथं या लोकांमध्ये राहून मनाला शांत वाटतंय.' तर कोणी म्हणाले, 'मला ईश्वरानेच सांगितलं, जा तिकडे, म्हणून मी आलोय परत. इथं आम्ही लढलो. कितीतरी लोकांना मारलं. मग परत गेलो. आता वाटतंय आपले अखेरचे दिवस इथेच काढावेत, मरण यावं ते इथेच. म्हणून आलो इथे.'

जी गोष्ट अमेरिकन सैनिकांची तीच गोष्ट रशियन सैनिकांची. फरक असा की कोणीही रशियन सैनिक आपणहून अपराधीपणाच्या भावनेची भरपाई म्हणून अफगाणिस्तानात आले नाहीत. तर काही रशियन सैनिक शहरांपासून दूरवरच्या डोंगरदऱ्यांमध्ये, तर कधी खेडेगावांत जखमी होऊन, बेशुद्ध होऊन पडले होते. क्रौर्याची परिसीमा गाठणाऱ्या अफगाणांची दुसरी बाजू अशा परिस्थितीत बघायला मिळते. जखमी, बेशुद्ध होऊन पडलेल्या माणसांची दया येऊन काही अफगाणांनी त्यांना आपल्या घरी नेले, दवापाणी दिले, खाणेपिणे सांभाळले. त्यांची प्रकृती सुधारली, पण त्या सैनिकाना परत आपल्या सैनिकी ठाण्याकडे जायची इच्छाच झाली नाही. रशियाला जाणे तर दूरच. ते तिथेच राहू लागले. काहींच्या मनात कुठेतरी अपराधाची भावना होतीच. या निरपराध अफगाणांना आपण काय म्हणून मारतच निघालो होतो, त्याबद्दलची.

युद्धानंतर २५-३० वर्षानंतर अशा अनेक रशियन सैनिकांचा ठावठिकाणा उजेडात आला. बचेरत्झिन चकीमॉव्ह, खाकीमॉव्ह अशा काहींच्या मुलाखती घेतल्या गेल्या. जखमी झाले होते तेव्हा अफगाणांनी त्यांना संभाळले होते. प्रकृती सुधारल्यानंतर ते त्याच ठिकाणी राहू लागले. अफगाण मुलींशी विवाह केले दोघांनी, त्यांना आपल्या घरी जायची इच्छा आहेच, नातेवाइकांना मित्र-मंडळींना भेटायची इच्छा आहे, पण त्यांची इच्छा असेल तरच. आपण अफगाणिस्तानात जी काय कामगिरी केली त्याबद्दल आपल्याच लोकांच्या मनात नाराजी, संताप आहे हे त्यांना कळले होते. म्हणूनही त्यांना घरी परतायचा धीर झाला नव्हता. शिवाय अफगाणांनी त्यांना नीटपणाने सांभाळलेच होते.

जेनेडी निखम्मन हा युक्रेनचा. वीस-बावीस वर्षांचा पायलट. त्याच्या तळावर मुजाहिदींनी हल्ला केला, तोडफोड केली आणि जेनेडीला घेऊनच ते पळून गेले. त्याला आपल्या ताब्यातच ठेवून घेतले. रशियाला वाटले जेनेडी मुजाहिदींना सामील झाला आहे. हे कळल्यावर परत जायची त्याची हिंमतच नाही झाली. तो तिथेच राहू लागला. त्याने मुजाहिदींना मदत नाही केली, पण तिथेच राहावे लागणार म्हणून इस्लामचा स्वीकार केला. अफगाणांचे कपडे घालू लागला, फारसी उत्तम बोलू लागला. अफगाण मुलीशी लग्न केले. दोन मुलगे, दोन मुली झाल्या. काठी घेऊनच चालू लागला. आपल्या कुटुंबाला सांभाळायचे म्हणून मिळेल ती कष्टाची कामे करू लागला.

२९ वर्षांनंतर त्याच्या अफगाण मुलानेच त्याच्यावर डॉक्युमेंटरी फिल्म केली, तासाभराची. आपली ही सगळी हकिकत तो सांगतो. आपल्या बायकोला कोणी कोणी चिडवतात, 'तुझा नवरा रशियन!' मोठी मुलगी १७ वर्षांची झाली, तिच्या लग्नाची काळजी, तयारी सुरू आहेच. धाकटी मुलगी 'मोठी' झाली, आता तिच्यासाठी बुरखा घेण्यासाठी तो बाजारात जातो. त्याला बुरखा घालणे आवडत नाही पण इलाज नाही. इस्लामचे कायदे पाळणे भाग आहे. त्याच्या मुलांचे रंगरूप इतर अफगाण मुलांपेक्षा वेगळे याची त्याला जाणीव आहे. त्याबद्दल त्याला खुशी वाटते. अफगाणिस्तानातले २९ वर्षांचे आयुष्य कसे गेले हे त्याला नेमकेपणाने सांगता येत नाही.

त्याचा अफगाण मुलगा त्याला त्याच्या मूळच्या गावी घेऊन जातो. घरी जातो तेव्हा त्याची भाऊ, बहिणीशी गळाभेट होते. शेजारी, नातेवाइकांशी भेटीगाठी होतात. त्यांच्याशी तो रशियन भाषेतच बोलतो, तेव्हाचा त्याचा चेहरा प्रफुल्लित दिसतो. आई-वडिलांचा मृत्यू झाला होता, त्यांच्या कबरीचं दर्शन घेतो. फुले वाहतो त्यावर. पण तो परत आलाय म्हणून काही लोकांना आवडत नाहीच. त्याला ते टाळतातच. काही सैनिक त्याला म्हणतात, 'आम्ही आलो परत. तू राहिलास तिथेच. मुजाहिदींना खरंच सामील झाला होतास ना?' त्याला आपल्या घरी राहायचीच इच्छा आहे पण अफगाणिस्तानला परत जाणे भाग आहे, कारण आपल्या सगळ्या कुटुंबाची जबाबदारी आहे. या फिल्मचे नाव आहे 'दि लोन सर्व्हाव्हर'. ही फिल्म बरेच काही सांगून जाते.

या फिल्मशिवाय इतरही चित्रपट निघालेत युद्धावरचे. काही चित्रपट रशियननी बनवलेत, तर काही अमेरिकनांनी बनवले आहेत. 'हेल ॲण्ड कमबॅक', 'लिव्हिंग अफगाणिस्तान', रेट्रोस्पेक्ट, दि बीस्ट ऑफ वॉर', 'काईटरनर' 'अफगाणस्ती', 'ओसामा' हे चित्रपट तर गाजलेले. जसे अफगाण युद्धावरचे चित्रपट निघालेत, तसेच व्हिएटनाम युद्धावरचेही चित्रपट बनलेच आहेत. 'वुई आर सोल्जर्स', 'प्लॅटून', 'गुड मॉर्निंग व्हिएटनाम', 'बॉर्न ऑन दि फोर्थ जुलै', 'अपोकोलिप्स नाऊ', हे चित्रपट तर खूपच गाजलेले.

या सगळ्या विचारांचा गुंता सोडवता सोडवता काही धागे हाती आलेत असे वाटू लागले. या दोन्ही देशांमधील युद्धांचा काळ होता तो अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांचाच. या दोन्ही बड्या देशांनी त्या दोन्ही छोट्या देशांना कठपुतळीसारखे नाचवले.

त्या देशांवर त्यांना राजकीय सत्ता गाजवायची होती. त्याला छेद देणारी होती आणि आजही आहे ती धर्मसत्ता. अफगाणिस्तानातच मुजाहिदीन – धर्मयोद्धा – या शक्तीचा उदय झाला.

पुस्तकातील मार्क्सवादाने प्रवास करीत करीत, वास्तवाला जरब बसवणाऱ्या, दरारा, भीती निर्माण करणाऱ्या साम्यवादाचे रूप घेतले. मार्क्सने म्हटले होते, 'धर्म ही अफूची गोळी आहे.' याचा अर्थ धर्माच्या धाग्यांमध्ये गुंतत गेले की अफूची गोळी घेणारा धुंदीत सापडतो, त्याला वास्तवाचे, भान राहात नाही. तो तारतम्य गमावून बसतो. मार्क्सवादाचा प्रवास पाहिला की वाटते की मार्क्सवादाचा साम्यवाद झाला म्हणजे धर्मवादच झाला. मुजाहिदींचा – धर्मयोद्ध्यांचा प्रवास होत होत आज संपूर्ण जगाला भयग्रस्त करणाऱ्या तालीबानी, आय.सी.एस.एस. (इस्लामिक स्टेट ऑफ इराक सिरिया), बोको हराम, लष्करे तोयबा, जैशए मोहम्मद, जमात उद दावा यांसारख्या कितीतरी शाखा निर्माण झाल्या आहेत. त्या मुस्लीम समाजातील शिया, अहमदी, कुर्दी, सुफी यांच्या जिवावरदेखील उठल्या आहेत. वहाबी सुन्नी आतंक माजवीत आहेत. शाळकरी मुलांना मारून टाकत आहेत. अगदी कोवळ्या वयाच्या मुलामुलींना पळवून नेऊन त्यांचा बाजार मांडला गेला. मुलींचा तर लिलाव सुरू केला, त्यांना वेश्या व्यवसायाला लावले. इस्लामवाद्यांच्या सेवेसाठी. ती मुले-मुली इस्लामी पंथातीलच असतात. इस्लामी देशातदेखील.

साम्यवादी देशातदेखील हेच दिसते. स्टॅलीन, माओ त्से तुंग सारख्यांनी आपल्याच विचारांची सत्ता कायम राहावी म्हणून स्वकीयांवरच शस्त्र उगारून, लाखो लोकांना मारून धर्मवाद्यांसारखीच दहशत बसवली होती. हीच गोष्ट भांडवलशाही देशातदेखील दिसतेच. स्वतःचाच खजिना भरला जावा म्हणून स्वकीयांचीच पिळवणूक करायला त्यांनीही कमी केले नाही, मारून टाकायलाही कमी केले नाही.

सत्ताधीश कोणीही असोत – भांडवलशाहीचे, साम्यवादी, कट्टर धर्मवादी असोत – सगळेच आपापल्या राजकीय, आर्थिक सत्तेसाठी बळी देतात तो सर्वसामान्यांनाच. मग ते सैनिक असोत वा नागरिक असोत. ही गोष्ट अफगाणिस्तान, व्हिएटनाममध्येच दिसली नाही तर जगभरच दिसते आहे. ही शिक्षा त्यांना कायमचीच भोगावी लागते. राजकीय, धार्मिक, आर्थिक सत्तेच्या चक्रव्यूहात अडकून पडण्यापेक्षा, मानवी जीवनाला या चक्रव्यूहातून बाहेर काढणे हेच सर्वाधिक महत्त्वाचे असते. तेच सत्य असते. हे सत्य खरे करून दाखविण्याचा दावा करणारे स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारे हा एक समाजातील घटक, पण त्यांच्याही लक्षातच येणार नाही किंवा ते लक्षात घेणे त्यांना जमतच नाही, परवडत नाही; ते म्हणजे सत्तेच्या मागे धावणारे सगळे 'वादी' लोक त्यांचाही वापर करून घेत असतात, तो त्यांच्या त्यांच्या स्वार्थासाठीच.

असफल क्रांत्या, वाऱ्याच्या वेगाने धावणारे तंत्रज्ञान, देवधर्म संकल्पनांचा अतिरेक, थकले भागलेले आदर्शवाद या सगळ्यांची सरमिसळ झालेले, एकमेकांमध्ये अडकून पडलेले भ्रष्ट इतिहास हा आपला भूतकाळ. या इतिहासांची वारसदार असलेली आजची आणि उद्याची पिढी यांचे भविष्य काय असेल या विचाराने अस्वस्थपणा येतोच. यातून सुटका नाही हे माहीत असूनही. याचीही जाणीव आहेच की जगाच्या आरंभापासून सुरू असेलेले, जगाच्या अंतापर्यंत असेच सुरू राहणार आहे.

*(दिवाळी २०१८)*



# संकीर्ण

# बेगम अख्तर

## अरविंद गजेंद्रगडकर

पं. अरविंद गजेंद्रगडकर बनारस हिंदू विश्वविद्यालयात संगीताचे प्राध्यापक होते. त्यानंतर आकाशवाणीमध्ये संगीतसंयोजक. भारतातल्या जवळजवळ सर्व प्रमुख संगीत मैफलींत त्याचप्रमाणे परदेशातही त्यांचे बासरीवादनाचे कार्यक्रम झाले आहेत. संगीतक्षेत्रातील अनेक दिग्गजांच्या आठवणी सध्या ते खास अंतर्नादसाठी लिहित आहेत. कुमारगंधर्व आणि ओंकारनाथ ठाकूर यांच्यानंतर या अंकात बेगम अख्तर.

नियतीची खरोखरच मेहेरबानी! नाहीतर जगद्‌विख्यात गजल आणि ठुमरी गायिका बेगम अख्तर यांचा इतका निकट सहवास मला कसा लाभला असता?

गजलची सम्राज्ञी म्हणून विख्यात असलेल्या बेगम अख्तर यांना प्रथम मी रूपेरी पडद्यावर पाहिलं. फार वर्षांपूर्वीची गोष्ट. प्रख्यात दिग्दर्शक मेहबूब यांचा 'रोटी' नावाचा सिनेमा लागला होता. त्यावेळचे प्रख्यात अभिनेते चंद्रमोहन यांच्यासाठी मी तो सिनेमा पाहिला. त्याच सिनेमात अख्तरी फैजाबादी या गायिकेनं नायिकेचंपण काम केलं होतं. अनिल विश्वास यांनी संगीत दिलं होतं. प्रभावी कथा आणि कौशल्यपूर्ण दिग्दर्शन यामुळे तो चित्रपट प्रभावी वाटलाच पण मनात खोल रूतून बसले ते अख्तरींचे स्वर! त्या वयात उर्दू विशेष कळत नव्हतं. पण अख्तरींच्या विलक्षण आर्जवी आणि व्याकूळ स्वरातील भाव मात्र मनात कुठेतरी खोल खोल रुतून बसले. 'रहने लगा है दिलमे अंधेरा तेरे बगैर' अशी त्या गाण्याची पहिली ओळ अजून आठवते.

पुढे वय वाढत गेलं, गाण्याची थोडी समजही वाढत गेली, तशी अख्तरीबाई (ज्या आता बेगम अख्तर झाल्या होत्या) आणि त्यांच्या ठुमरी, दादरा, गजल यांच्या ध्वनिमुद्रिकांचा परिचय होत गेला आणि पुढे पुढे तर त्यांच्या गाण्याची अनिवार ओढच लागली. रेडिओवर त्यांचा कार्यक्रम असला की न चुकता ऐकणे आणि नंतर त्या धुंद स्वरांचं चिंतन करीत मस्त राहणे हा छंदच लागला.

ठुमरी, दादरा, गजल या गीतप्रकारांना त्याकाळी तुच्छ समजलं जायचं. कधी मैफलीत ठुमरीची फर्माईश झाली तर ''आम्ही असले क्षुद्र प्रकार गात नाही'' असं गायक-गायिका आढ्यतेनं सांगायच्या. पण ठुमरी, दादरा आणि गजल हे गीतप्रकार झपाट्यानं लोकप्रिय होत चालले होते आणि या गीतप्रकारात एकच नाव सर्वत्र दुमदुमत होतं – मलका-ए-तरन्नुम, मलका-ए-गजल बेगम अख्तर!

या श्रेष्ठ गायिकेचा प्रत्यक्ष सहवास व्हायचा पहिला योग आला तो धारवाडला. मी नुकताच आकाशवाणी केंद्रावर संगीतसंयोजक म्हणून रुजू झालो होतो. त्या काळी चेन बुकिंग म्हणजे साखळी कार्यक्रमाची प्रथा होती. निरनिराळ्या केंद्रांवर ओळीने कार्यक्रम करीत कलाकार मंडळी हिंडत असत. या साखळी कार्यक्रमांमुळे अनेक दिग्गज अशा कलावंतांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग आला. हे माझं भाग्यच! अशाच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने बेगम अख्तर यांचा प्रत्यक्ष सहवास घडला.

त्यांना डाकबंगल्यात उतरविण्याचं आणि त्यांची सर्व व्यवस्था बघण्याचं काम माझ्याकडे होतं आणि ते मी मोठ्या उत्साहाने स्वीकारलं होतं.

''गजल हा जगण्याचा पंथ आहे. जीवनाकडे पाहण्याची ती एक विशिष्ट दृष्टी आहे. ती ज्याला समजली तोच गजलचा असली 'मझा' घेऊ शकतो. त्याचा 'लुत्फ' लूटू शकतो. बेबंद, बेहिशेबी, धुंद जीवन जगण्याची ज्याची तयारी आहे त्यानंच गजलशी सलगी करावी. आपलं सर्वस्व लुटू देण्याची हिंमत असणाराच गजलचा आत्मा जाणू शकतो. जळत्या 'शमा'वर बेदरकारपणानं झेप घेऊन स्वत:चे पंख जाळून घेणाऱ्या परवान्याची तडप जाणून घेणाराच गजलची 'धडकन' अनुभवू शकतो. जीवन हे केवळ जगायचं नसतं, ते सर्वांगानं भोगायचं असतं हे जो जाणतो त्यालाच गजल खऱ्या अर्थाने अनुभवता येते,'' बेगम अख्तर शांतपणाने सांगत होत्या. गेल्या अर्ध्या तासात त्यांनी तिसरी सिगरेट पेटवली होती आणि फ्रिजमधल्या थंडगार पाण्याची अर्धी बाटली संपवली होती.

पानाचा विडा खाणं तर अविरत सुरू होतं. चांदीच्या नक्षीदार डब्यात व्यवस्थित रचून ठेवलेले मघई पानाचे विडे होते. दर पाच मिनिटांनी त्या विडा तोंडात ठेवत होत्या. आणखीन एक विडा तोंडात ठेवून नवी सिगरेट पेटवीत त्या म्हणाल्या, ''जीवनाला इष्काची आच लावून काढलेला अर्क म्हणजे गजल. ही आच, हा दर्द ज्याला समजला त्याला गजल समजली.'' असं म्हणून त्यांनी समोरच्या पेटीवर हळूच बोटं फिरवली आणि त्या गाऊ लागल्या.

'ऐ मुहब्बत तेरे अंजाम से रोना आया,
जाने क्यूं आज तेरे नाम पे रोना आया.'

''वाहव्वा! बहोत अच्छे!'' मी नकळत दाद दिली.

त्या हसल्या. मग सिगरेटचा एक झुरका घेत त्या म्हणाल्या, ''तुम्हाला थोडं तरी उर्दू समजतं. पण ज्याला उर्दू अजिबात समजत

नाही त्याच्यापर्यंतसुद्धा मी गाते. त्या काव्याचा अर्थ पोहोचावा असा माझा प्रयत्न असतो. इथं माझे स्वर माझ्या मदतीला येतात. लहानपणापासून मी बुजुर्ग आणि गुणी अशा गुरुजनांकडे रागाची तालीम घेतली. स्वरातून भाव कसा व्यक्त करायचा याची फार चांगली तालीम मला माझ्या उस्तादांनी दिली,'' असं म्हणून त्या आपल्या गुरुजनांविषयी आत्मीयतेने बोलू लागल्या. पतियाला घराण्याचे अताम महंमदखां आणि किराणा घराण्याचे अब्दुल वहीदखां या आपल्या उस्तादांविषयी बोलत असताना अनेक वेळा त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या.

''सुरांचा असर! गाणाऱ्याच्या सुरांचा ऐकणाऱ्यावर काय परिणाम होतो त्याला महत्त्व आहे. तुमची विद्वत्ता, पांडित्य हे सारं झूट आहे. तुमचे गाण्याचे भाव तुम्ही कसे पोहोचवता हेच महत्त्वाचं'' असं म्हणून त्यांनी एक पान तोंडात ठेवलं आणि पेटी वाजवत त्या गाऊ लागल्या.

'कोयलिया मत कर पुकार, कलेजवा लागे कटार...'

त्या क्षणी माझ्या डोळ्यासमोरून तो डाकबंगला, गाणाऱ्या अख्तरी बाई हे सारं विरून गेलं आणि डोळ्यासमोर आली गर्द आमराई आणि त्या आमराईत विरहवेदनेनं व्याकूळ झालेली विरहिणी! कोकिळेची विनवणी करणारी, कोकिळांच्या गंधित स्वरांनी विद्ध झालेली विरहिणी! अगं कोकिळे! नको घालूस अशी जीवघेणी साद! तुझे हे कोमल स्वर कट्यारीसारखे माझ्या काळजात घुसतात आणि माझ्या साजणाच्या विरहाची वेदना वाढवतात. कोकिळे! अग वैरिणी! नको करूस ही 'पुकार'!

'कोयलिया मत कर पुकार...'

मी भानावर आलो तेव्हा बेगम हसत हसत सिगरेट पेटवीत होत्या. ''क्या जनाब! हाल कैसे है आपके?'' त्या हसत विचारत होत्या.

मी मान हलवीत त्यांना मला आलेला अनुभव सांगितला.

''यही असली बात है । असर! सूरोंका असर! सूर लावताना सगळा प्राण गोळा करून लावायला पाहिजे. किती सूर लावता, काय चमत्कार करता, तुम्हाला किती राग येतात आणि कोणत्या तालात गाता याला काहीही महत्त्व नाही. महत्त्व आहे ते सूर कसा लावता याला. एकच सूर लावा पण असा लावा की ऐकणाऱ्याच्या थेट काळजाचा वेध घ्यावा. शिकाऱ्याच्या बाणासारखा! उस्तादोंकी इनायत, गुरुची कृपा, म्हणूनच थोडं थोडं जमतं मला,'' त्या थंड पाण्याचा घोट घेत म्हणाल्या.

''थोडं का म्हणता? पूर्णपणे जमलंय,'' मी म्हणालो.

त्या हसल्या. मान हलवीत म्हणाल्या,

''तुम अभी बच्चे हो! तुला अजून खूप ऐकायचं आहे. हे जग फार मोठं आहे. खूप गुणी लोकांनी भरलेलं आहे. कुणी प्रकाशात येतं, कोणी येत नाही. फार वर्षांपूर्वीची गोष्ट सांगते. ऐन जवानीत होते तेव्हाची गोष्ट. कलकत्त्याला फिल्म कंपनीत काम करत होते. त्या वेळी मौजुद्दीनखां म्हणून एक गायक होते. जन्मभर ते फक्त भैरवीच गायले.''

''काय! फक्त एकच राग?'' मी आश्चर्याने विचारलं. त्याचवेळी दरमहा पाच राग शिकून झटपट संगीतअलंकार होणाऱ्या अनेक तथाकथित कलाकारांची नावं डोळ्यासमोरून तरळून गेली.

''हो. फक्त भैरवी! म्हणून ते मैफलीत असले की कोणी भैरवी गायचे नाही. मैफलीच्या शेवटी तेच गायचे. अशाच एका मैफलीत आम्ही जमलो होतो. सगळे गाणारे, वाजवणारेच होते. सगळेजण कसून गायले. सगळेच गुणी लोक. सर्वांनीच आपापलं गाणं रंगवलं. इतक्या प्रकारच्या गाण्यानंतर आता मौजुद्दीनखां कसं काय गाणं जमवणार असं मला वाटत होतं. शेवटी ते बसले. तंबोरा वाजत होता. मी त्यांना प्रथमच पाहात होते. अगदी बेढब आणि जवळजवळ कुरूपच होते ते. क्षणभर डोळे मिटून त्यांनी तंबोरा ऐकला आणि स्वर लावला. अहाहा! काय तो स्वर! जणू तेजाची शलाकाच! नुसता सा लावला आणि सारी मैफल प्रकाशमय झाली. त्यांचा चेहरा पण उजळून निघाला. इतका वेळ कुरूप वाटणारा माणूस एकदम देखणा वाटायला लागला. सगळी मैफल त्या पहिल्याच स्वरानं स्तब्ध झाली, भारून गेली आणि मग त्यांनी फक्त तीनच स्वर लावले. सारे गरे सारेसा. बेटा, तुला खरं सांगते. प्रत्येकाच्या डोळ्यांत खळकन् पाणी आलं.

''मैफल संपल्यानंतर मी त्यांचे पाय धरून म्हणाले, 'तुम्ही तर तीनच स्वरात आम्हाला रडवलं.' तेव्हा ते हसून म्हणाले, 'जन्मभर मैफलीचा ध्यास घेतलाय. तेव्हा कुठे थोडसं जमतंय. अजून खूप करायचं आहे. तानसेन, बैजू बावरा यांनी गाण्यानं पाषाणाला पाझर फोडला. दिवे लावले. पाऊस पाडला. तिथं जायचं आहे मला. बघू या परवरदिगार काय करतो.' असे लोक होते ते. सूरों के दीवाने!'' अख्तरी बाई अंतर्मुख होत म्हणाल्या.

त्या हकीकतीने मी भारावून गेलो होतो.

''एक विचारू का?'' मी भीत भीत म्हणालो.

''हां हां पूछो. क्या बात है बोलो.'' त्या सिगरेट पेटवत म्हणाल्या.

''हे थंड पाणी, सिगरेट यांचा गळ्यावर परिणाम होत नाही?''

त्या हसल्या. आपण शरीराला जशी सवय लावू तसं ते वागतं. लहानपणापासूनच मी माझ्या गळ्याला थंड पाण्याची सवय लावली आहे. त्यामुळे काही त्रास होत नाही. फक्त एकाच गोष्टीचा त्रास होतो मला.''

''ती कोणती?''

''गायले नाही की त्रास होतो मला. सुरांशिवाय जगूच शकत नाही मी. माझं पहिलं लग्न झालं तेव्हा आमच्या नवरोजीनं सांगितलं की गायचं नाही. घरी नाही. कुठंच गायचं नाही.''

''बापरे! मग?''

''मग काय? आठ-पंधरा दिवस कसेबसे काढले. गाण्याशिवाय वेड लागण्याची पाळी आली. माझं वजन तीस पौंडांनी उतरलं. मग मी निर्णय घेतला.''

''कोणता? नवऱ्याचं मन वळवायचा?''

''छे: छे: नवऱ्याला सोडण्याचा.''

''बापरे!'' मी दचकून म्हणालो. माझी मध्यमवर्गीय नीतिकल्पना हादरून गेली.

''हा: हा: हा:'' अख्तरीबाई हसत म्हणाल्या. ''दचकलास ना! पण माझा दुसरा नवरा चांगला आहे. बॅरिस्टर तर आहेच पण गाण्याचा, उर्दू शेरोशायरीचा शौकीन आहे.''

बेदरकारपणानं सिगरेटचा झुरका घेत आणि ऐटीत मान झुकवीत त्या म्हणाल्या, ''माझी निष्ठा फक्त सुरांशी आहे. सूर माझा परमेश्वर आहे. मी जर बेसूर गायले तर आणि तरच तो व्यभिचार होईल. बाकी सगळं झूट आहे. फक्त सूर हेच सत्य आहे.'' किंचित थांबून त्या थोड्या आत्ममग्न झाल्या आणि मग जराश्या गंभीरपणानं म्हणाल्या, ''हे बघ बेटा, या विश्वाचा मालिक, आपल्या सर्वांचा जन्मदाता, आपल्याला जन्म देताना प्रत्येकाच्या कानात पुटपुटतो आणि त्याचं जन्माचं प्रयोजन त्याला सांगतो. क्रांतिकारकाला तो सांगतो, तू देशासाठी हसत हसत फाशी जा. शास्त्रज्ञाला सांगतो, तू तहान-भूक विसरून प्रयोग करीत राहा. बाकी सगळं मी बघतो. बस्स! मी त्याची आज्ञा पाळते आहे. त्याचा हुकूम पाळते आहे. त्यात कसलाही कसूर करत नाही. म्हणून मला वाटतं बाकी सगळं मला माफ आहे. आपण आपल्या सुरात गात राहावं. जीवन कसं सुरेल होऊन जातं.''

घरी परतलो तेव्हा त्यांचे हेच शब्द मनात घुमत होते. 'आपण आपल्या सुरात गावं. जीवन कसं सुरेल होऊन जातं.'

संध्याकाळी निमंत्रितांसमोर मैफल होती. मी त्यांना नेण्यासाठी गाडी घेऊन गेलो तेव्हा त्या नमाज पढत होत्या. नमाज संपवून त्या गाडीत बसल्या तेव्हा म्हणाल्या, ''इतकी वर्षं गाते आहे. हजारो मैफली केल्या. पण खरं सांगते, अजूनही प्रत्येक मैफलीच्या आधी मी मनापासून त्याची प्रार्थना करते. विनवणी करते. ऐ खुदा, रहम कर. माझा प्रत्येक सूर सच्चा लागू दे. तू जे काम मला नेमून दिलं आहेस ते सचोटीने पार पाडण्याचं सामर्थ्य मला दे.''

संध्याकाळची ती मैफल विलक्षण रंगली. धारवाड आणि हुबळी इथले निवडक रसिक हजर होते. या कानडी मुलुखातल्या, उर्दू विशेष न जाणणाऱ्या लोकांसमोर अख्तरीबाईंचं गाणं रंगणार का, अशी मला बारीकशी शंका होती. पण अख्तरीबाईंचा स्वर असा तेजाळ होता की त्या स्वरांनीच सर्वांना दिपवून टाकलं. त्या मैफलीत अख्तरीबाईंनी ठुमरी, दादरा, होरी लोकगीत हेच प्रकार जास्ती गायले आणि नंतर दोन गजल पेश केल्या. त्यामुळे मंडळी खूष होती. स्वरांचा 'मझा' मनमुराद लुटत होती.

दुसऱ्या दिवशी त्यांना 'अलविदा' करताना त्या म्हणाल्या, ''बेटा, लक्षात ठेव. सुरांचं सतत स्मरण हे महत्त्वाचं आहे. हाच खरा रियाज. मग प्रत्यक्ष ते स्वर गळ्यातून काढायला जो रियाज हवा, तो थोडा वेळ केला तरी तेवढा पुरेसा होतो. महत्त्व आहे ते चिंतनाला. अध्यात्मामधले लोक जसं सतत ईश्वराचं नामस्मरण करतात तसं संगीतातल्या माणसानं सतत सुरांचं स्मरण करायला हवं. कारण तोच त्याचा ईश्वर आहे. तोच त्याचा मोक्षपण आहे. अच्छा, खुदा हाफीज. उपरवालोने चाहा तो फिर मिलेंगे.'' त्या हात हलवीत म्हणाल्या. त्यांच्या मंदस्मिताबरोबरच त्यांच्या नाकावरची चमकीपण मंदपणे हसली.

उपरवाला खरोखरच मेहेरबान होता. कारण केवळ आठच वर्षांनी त्यांचा माझा पुन्हा एकदा निकट सहवास झाला. धारवाडहून पाटणा आणि पाटण्याहून पुणे अशी माझी बदली झाली. पुण्यात अनेक गुणी कलावंतांशी जवळीक झाली.

वसंतराव देशपांडे यांच्याबद्दल मला अतीव आदर होता. त्यांची विद्वत्ता, त्यांचा हजरजबाबीपणा, त्यांचा चौफेर जाणारा गळा, त्यांची चिकित्सक दृष्टी हे सारं सारं चकित करणारं होतं. थक्क करून टाकणारं होतं. त्यांचे आणि माझे सूर कसे काय जुळले कुणास ठाऊक. माझ्या कुंडलीतला तो शुभयोगच म्हणायचा. पण जुळले खरे. एरवी लोकांना चटकन तोडून टाकणारे वसंतराव माझ्या सुदैवाने माझ्याशी अत्यंत आपलेपणाने बोलायचे.

एवढा मोठा कलाकार पण आकाशवाणीने त्यांना सामान्य कलाकाराचा दर्जा दिला होता. त्यामुळे ते आकाशवाणीवर गातच नव्हते. त्यांचा आकाशवाणीवरचा दर्जा वाढावा म्हणून अनेक अधिकाऱ्यांनी खटपटी केल्या. पण दिल्लीवाल्यांनी दाद दिली नाही आणि म्हणून वसंतरावही आकाशवाणीवर गायला आले नाहीत. आकाशवाणीचा सर्वोच्च वर्ग मिळाल्याशिवाय मी गाणार नाही या त्यांच्या प्रतिज्ञेला त्यांनी केवळ एकच अपवाद केला.

पुणे आकाशवाणीवर 'गीतारती' नावाचा रागदारीवर आधारित 'सुगम संगीताचा' कार्यक्रम मी दरमहा सादर करीत असे. या कार्यक्रमाच्या एका गाण्यासाठी ते केवळ माझ्या विनंतीवरून आले. माझ्या स्नेहासाठी त्यांनी आपल्या प्रतिज्ञेला जी मुरड घातली, मनाचा जो मोठेपणा दाखवला, त्या आठवणींनं आजही गहिवरून येतं. अशा या दिलदार आणि प्रतिभावान कलाकाराच्या जीवनात वादळवारं शिरलं. सरकारी नोकरीत असलेल्या वसंतरावांची दूरच्या प्रांतात बदली झाली. कलेसाठी अत्यंत पोषक असलेलं पुण्यामुंबईचं क्षेत्र सोडून दूरप्रांती केवळ नोकरीसाठी जाणं त्यांना मानवेना. त्यांनी निर्णय घेतला; स्वेच्छानिवृत्ती घेतली.

''या ग्रेट बाईमुळे मी हा निर्णय घेतला,'' वसंतराव समोरच्या अख्तरीबाईंच्या तसबीरीकडे बोट दाखवीत म्हणायचे. त्यावेळी त्यांच्या लहानशा घरात भिंतीवर फक्त अख्तरीबाईंची तसबीर होती.

''या बाईनं मला सांगितले, 'अरे तू सिंह आहेस. असा कोकरासारखा काय वागतोस. तुझ्यासारखा चौफेर गायक कोण आहे? सोड नोकरी. सुरुवातीला होईल थोडा त्रास. पण एकदा मैफली व्हायला लागल्या की फुरसत नाही मिळणार तुला.' आणि अगदी तसंच झालंय. या बाईमुळे मी या क्षेत्रात झोकून दिलं स्वत:ला. नाहीतर कुठल्यातरी खेड्यात आकडेमोड करीत बसलो असतो,'' वसंतराव कृतज्ञतेने म्हणायचे.

त्याच सुमारास पु. ल. देशपांडे यांनी रामूभैय्या दाते यांच्यावर लिहिलेला लेख खूपच गाजला होता. रामूभैय्या दाते यांचं अख्तरी प्रेम, त्यांचं गजल प्रेम सगळ्या महाराष्ट्रात गाजत होतं. रामूभैय्यांचा मुलगा अरुण दाते पण भावगीतगायक म्हणून चमकू लागला होता.

पुण्याच्या प्रसिद्ध कलावती आणि धनवती वसुंधरा पंडित या आपल्या बंगल्यावर मोठमोठ्या कलावंतांच्या खासगी मैफली करायच्या आणि काही निवडक लोकांना निमंत्रित करायच्या. त्यांनी अख्तरीबाईंचा गंडा बांधला होता आणि त्या वसंतराव देशपांड्यांच्याकडेपण गाणं शिकायच्या.

वसुंधराबाईंकडे आम्ही अनेक नामवंतांची गाणी अगदी खासगीत ऐकली. पं. जसराज जेव्हा उगवते कलाकार होते तेव्हा त्यांचा अप्रतिम यमन इथेच ऐकला. आज उस्ताद असलेल्या जाकीर हुसेनचा तबला त्यांच्या पोरवयात इथेच ऐकला. ''आमच्याबद्दल पेपरमध्ये काहीतरी लिहाना'' अशी त्यांनी त्यावेळी केलेली विनंती अजूनही आठवते. पं. शिवकुमार यांनी संतूरवर रंगवलेला अप्रतिम पहाडी आणि पं. गोपीकृष्ण यांचे नेत्रसुखद भावनृत्य इथेच मनमुराद अनुभवले. अशा या मैफलीत बेगम अख्तर गाणार, एवढंच नव्हे तर त्या आठ दिवस इथे मुक्काम करणार, अशी बातमी वसुंधराबाईंनी फोनवरून दिली आणि मैफलीचं आग्रहाचं निमंत्रणपण दिलं.

मैफलीसाठी बंगल्यावर गेलो तेव्हा नुकतीच पावसाची सर येऊन गेली होती. हवेत सुखद गारवाही होता. मोगऱ्याचा गजरा देऊन सगळ्यांचं स्वागत करण्यात आलं होतं. त्याचा सुगंध घेत गुलाबाच्या फुलांनी सजवलेल्या दिवाणखान्यात पाऊल टाकलं तेव्हा संगीत आणि साहित्य या क्षेत्रांतील नामवंत मंडळी दिसली. पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, संगीत समीक्षक वामनराव देशपांडे, माणिक वर्मा अशी दिग्गज मंडळी हजर होती.

इतक्यात बेगम अख्तर सुहास्य मुद्रेनं रंगमंचावर आल्या. चेहऱ्यावर प्रचंड आत्मविश्वास, नाकात चमकणारी चमकी आणि तोंडात पान! सर्वांना नमस्कार करून त्यांनी पेटीवर लडिवाळपणाने बोटं फिरवली आणि सूर लावला. दोन पेट्या, दोन तंबोरे या सर्वांच्या सुरांवरून तरंगत त्यांचा मधाळ स्वर कानातून थेट हृदयात उतरला. अंगावर रोमांच उभे राहिले. मला त्यांचे धारवाडचे शब्द आठवले. सुरांचा असर! परिणामकारक सूर!

माझ्या शेजारीच वसंतराव देशपांडे बसले होते. ते म्हणाले, ''प्रत्येक स्वर म्हणजे चोख सोनं आहे. अहाहा! याला म्हणतात गाणं.'' मी माणिकबाईंकडे पाहिलं. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू चमकत होते. हिराबाईसारखी ज्येष्ठ गायिका मूकपणे बसून होती. ''मुश्किल है भैय्या! मुश्किल है!'' पु.ल. शहारून म्हणत होते.

त्या रात्री अख्तरीबाईंनी अनेक गजल, दादरे, ठुमऱ्या पेश केल्या. त्या मैफल संपवणारच होत्या इतक्यात भीमसेनजींनी नम्रपणे फर्माइश केली. ''कोयलिया मत कर पुकार –''

भीमसेनजींनी आमच्या सर्वांच्याच मनातली फमाईश केली होती. या दादऱ्याशिवाय त्यांची मैफल पूर्ण होणंच शक्य नव्हतं. त्या हसल्या आणि त्यांनी सुरुवात केली.

'कोयलिया मत कर पुकार, कलेजवा लागे कटार'

अहाहा! पुन्हा तो आमराईतला आम्रगंध आणि ती विरहिणी आमच्यासमोर साकार झाली. स्वरांचा सामर्थ्यशाली आविष्कार आम्ही पुन्हा अनुभवू लागलो.

''आता बरीच रात्र झाली. भैरवी घेते,'' अख्तरीबाई म्हणाल्या.

''गुस्ताखी मुआफ! पण भैरवीच घ्यायची असेल तर मग 'रतियां किधर गवाई रे बलम हरजाई' हीच घ्या.'' वसंतराव अदबीने म्हणाले. ''हां हां! क्यूं नही'' असं म्हणून अख्तरीबाईंनी भैरवी सुरू केली. ''रतियां किधर गवाई रे ऽऽ...''

शेवटचे सूर वातावरणात विरले! शांत शांत! कोणीही त्या श्रवणसमाधीचा भंग करायला तयार नव्हतं. सन्नाटा! मैफलीच्या यशाची पावती! ज्या शांततेमुळे कलावंताची तपश्चर्या धन्य होते तो शांततेचा क्षण! श्रोत्यांना मूक करणारा! अंतर्मुख करणारा!

मैफलीनंतर आम्ही काही निवडक लोक थांबलो होतो. अख्तरीबाईंबरोबर खाणेपिणे, गप्पा-टप्पा झाल्या. वसंतराव जायला निघाले. अख्तरीबाई त्यांना सोडायला तयार नव्हत्या. गाणं ऐकवा म्हणाल्या.

''क्या गला और कैसा दिमाग दिया है परवरदिगारने'' अख्तरीबाई कौतुकाने म्हणाल्या.

वसंतराव मग पेटी घेऊन पहाटेपर्यंत गात होते. पु.ल. आणि अख्तरीबाई भरभरून दाद देत होत्या.

''जीओ! जुग जुग जीओ!'' मैफल संपली तेव्हा अख्तरीबाई म्हणाल्या.

पहाटेची चाहूल लागली होती. अख्तरीबाईंचा निरोप घेऊन बाहेर पडलो तेव्हा रामूभैय्यांचे उद्‌गार आठवले. त्यांनी म्हटलेला शेर मनात घोळू लागला.

*''अब तो ये तमन्ना है के, किसको भी न देखूं*
*सूरत जो दिखादी है, ले जाओ नजर भी!''*

दिवस जातच होते. अधूनमधून भेटी होत होत्या आणि १९७४च्या ३० ऑक्टोबरला त्यांच्या अचानक निधनाची बातमी आली. अहमदाबादच्या एका मैफलीत गातानाच हृदय बंद पडून त्यांचं निधन झालं.

ती बातमी ऐकून सुन्नपणानं मी बसून होतो. त्यांचा हसरा चेहरा डोळ्यांसमोर तरळत होता. नाकातली चमकी चमकत होती. आणि त्याचे ते उद्‌गार आठवत होते – ''बस्स! एकच इच्छा आहे. मरण येणारच आहे, गाता गाता ते यावं हीच इच्छा.''

परवरदिगारनं त्यांची ती 'मुराद' पूर्ण केली. पुण्यवान आत्मा! त्यांच्या निधनानं शोकाकूल झालेलं माझं मन म्हणत होतं,

'बडे शोक से सुन रहा था जमाना,
तुम ही सो गये दास्तां कहते कहते.'

*(एप्रिल १९९८)*

# गांधी

**यशवंत रांजणकर**

---

यशवंत रांजणकर यांची 'अ-पूर्व चित्रगाथा' ही अंतर्नादमधील लेखमाला (मे १९९६ ते जुलै १९९७) खूप गाजली होती. *गॉन विथ द विंड, द गॉडफादर, सायको, वदरिंग हाइट्स, कॅसाब्लांका, २००१ : अ स्पेस ओडेसी, लॉरेन्स ऑफ अरेबिया* आणि *सिटिझन केन* या आठ श्रेष्ठ चित्रपटांच्या निर्मितीची ती कहाणी. त्यानंतर *स्नो व्हाईट अँड द सेव्हन ड्वार्फ्स* (ऑगस्ट २००४) व *शिंडलर्स लिस्ट* (दिवाळी २००५) या चित्रपटांविषयी त्यांनी लिहिले. त्याच मालिकेतील हा *गांधी* चित्रपटाच्या निर्मितीविषयीचा लेख.

---

१९६२मधला एक दिवस.

रात्री झोपायला बराच उशीर झाल्यामुळे रिचर्ड ॲटनबरो दिवस बराच वर आला तरी गाढ झोपेत होते. त्यांना जाग आली, ती फोनच्या अविरत खणखणण्यानं. त्यांनी रिसीव्हर उचलला.

कुणा अपरिचित अशा भारतीय गृहस्थांनी तो फोन केला होता. मोतीलाल कोठारी, असं त्यांनी आपलं नाव सांगितलं. त्यांना अगदी तातडीनं ॲटनबरोंची भेट हवी हाती. काम फारच महत्त्वाचं होतं. मात्र फोनवर त्यांना त्याची वाच्यता करता येत नव्हती. कामाचं स्वरूप अत्यंत गोपनीय होतं.

गृहस्थाच्या स्वरातली कळकळ आणि गांभीर्य ॲटनबरोंना जाणवलं. आणखी दोन दिवसांनी आपण सवड काढू शकू, असं त्यांनी सांगितल्यावर कोठारींनी भेटीची वेळ नि स्थळ त्यांना कळवलं.

त्याच दिवशी दुपारी ॲटनबरोंचा एक मित्र आणि चित्रपट व्यवसायातला सहकारी डेनिस ओ'डेल याचा त्यांना फोन आला. त्याला त्या गूढ कोठारींविषयीच त्यांच्याशी बोलायचं होतं.

कोठारी यांचं लंडन इथं वास्तव्य असून ते इंडियन हाय कमिशनच्या सेवेत होते. ते कट्टर गांधीभक्त होते. गांधीजींचं कार्य आणि तत्त्वज्ञान यांचा जगाला परिणामकारक परिचय करून देण्यासाठी त्यांच्या जीवनावर एक चित्रपट निघावा, याकरिता त्यांची केव्हापासून धडपड चालली होती. याच संदर्भात ओ'डेलशी त्यांचा कुणीतरी परिचय करून दिला होता.

ब्रिटिश चित्रपटसृष्टीतील दोघा-तिघा मान्यवर दिग्दर्शकांपुढे 'गांधी' चित्रपटाचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतु त्यांनी त्यात स्वारस्य दाखवलं नाही. अखेर ॲटनबरोंशी या बाबतीत सूर जुळू शकतील, असं डेनिस आणि कोठारी यांना वाटलं.

ॲटनबरो तेव्हा ३९ वर्षांचे होते. ब्रिटिश सिनेमाच्या नव्या प्रवाहातील ते एक अग्रणी होते. एक चतुरस्त्र नट आणि स्वतंत्र निर्माता म्हणून त्यांची कारकीर्द बहरात होती. ब्रिटिश रंगभूमीवरील आघाडीचे नट म्हणूनही ते ख्यातनाम होते. जागतिक विक्रम नोंदवणाऱ्या 'माउसट्रॅप' या नाटकातील त्यांची डिटेक्टिव्ह सार्जंट ट्रॉटर ही महत्त्वपूर्ण भूमिका चांगलीच गाजली होती. कामांची त्यांना मुळीच ददात नव्हती. अनेक चांगले चांगले प्रस्ताव प्रत्यही त्यांच्याकडे येत होते. अशा एकूण परिस्थितीत आपण एका अनोळखी गृहस्थाशी, आपल्याला विशेष काहीच माहिती नसलेल्या विषयाच्या संदर्भात भेट घेण्यास का तयार झालो, हे मात्र ॲटनबरोंना कोडंच वाटत होतं.

### ही तो कोठारींची इच्छा!

ठरल्या दिवशी, ठरल्या वेळी ॲटनबरो नि कोठारी यांची ठरलेल्या रेस्टॉरंटमध्ये भेट झाली.

'गांधी' प्रस्तावावर बोलणं सुरू करण्यापूर्वी कोठारींनी थोडा वेळ घेतला. ते सारखे संशयी नजरेनं आजूबाजूला पाहत होते. बोलतानाही तोच प्रकार. एकूण हा विषय त्यांना अत्यंत गोपनीय वाटत होता. आपलं बोलणं ॲटनबरो यांच्याखेरीज अन्य कुणाच्याही कानी जाऊ नये, याची ते आटोकाट खबरदारी घेत होते. रेस्टॉरंटमध्ये बसलेल्यांपैकी कुणी सहज जरी त्यांच्याकडे पाहिलं तरी ते एकदम गप्प होत. त्यांचं बोलणं त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच सौम्य होतं. परंतु, 'गांधी' चित्रपट करण्यापासून आपल्याला कोणीही रोखू शकणार नाही, हे मात्र त्यांनी अगदी निर्धारपूर्वक सांगितलं.

हे सारं खरं! पण या गृहस्थाला सिनेमातलं फारच थोडं कळत होतं. शिवाय मुळात त्याच्याकडे स्क्रिप्टही नव्हतं. आणि भांडवल तर त्याहूनही नव्हतं. व्यवसायात ओळखी थोड्याफार होत्या, इतकंच. मग कोठारींपाशी होतं तरी काय? तर गांधीजींच्या चरित्राचं एक पुस्तक आणि चित्रपटाच्या माध्यमातून गांधीजींचा साऱ्या जगाला परिचय करून देईल, असा एक मुरब्बी व्यावसायिक शोधून काढण्याचा निर्धार!

मुळात ॲटनबरोंना भारताबद्दल फारशी माहिती नव्हती; होती, तीही शाळकरी पोराच्या भूगोलाच्या ज्ञानाइतपतच. आणि गांधीजींविषयी तर त्याहूनही कमी. गांधी-हत्येच्या वार्तेनं ब्रिटिश



जनमानसावर जो आघात झाला होता, तो त्यांना आठवत होता. (त्यावेळी ते चोवीस वर्षांचे होते.)

ॲटनबरोंनी हे सारं स्पष्टपणे सांगून टाकलं. त्यावर कोठारींनी त्यांना थोडक्यात गांधीजी, त्यांचं कार्य आणि तत्त्वज्ञान याविषयी माहिती दिली. अशा ह्या प्रकल्पाची जबाबदारी ॲटनबरोंनीच स्वीकारायला हवी, ते पालुपद ते बोलताना मधूनच घोळवत होते.

ॲटनबरोंना एका गोष्टीचा उलगडा होत नव्हता. या प्रकल्पामध्ये कोठारी आपल्यालाच का गुंतवू पाहताहेत? आपण तर एकाही चित्रपटाचं आजवर दिग्दर्शन केलेलं नाही. पास्कल, प्रेमिंजर, मायकेल पॉवेल आणि त्याहूनही विशेष म्हणजे साक्षात डेव्हिड लीन यांच्यासारख्या दिग्गजांनी याआधी 'गांधी' या विषयावरील चित्रपटाला हात घालण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांच्यापैकी कुणालाच पुढे जाता आलं नव्हतं.

भोजनोत्तर कॉफी घेताना कोठारींनी विचारलं, ''लुई फिशरनं लिहिलेलं गांधीजींचं चरित्र तुम्ही वाचून पाहाल का?''

ॲटनबरो त्याच सुमारास सपत्नीक स्वित्झर्लंडमध्ये सुट्टी घालवण्यासाठी प्रवासास निघण्याच्या गडबडीत होते. तरीही त्यांनी प्रवासात चरित्र वाचण्यासाठी वेळ काढण्याचा अवश्य प्रयत्न करू, असं कोठारींना आश्वासन दिलं. चरित्र वाचल्याशिवाय तो चित्रपट करण्याची आपल्यात क्षमता आहे की नाही, ते ठरवता येणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

गांधी-चरित्र वाचून ॲटनबरोंनी अस्ति-नास्ति जी काही प्रतिक्रिया असेल, ती कोठारींना दोन आठवड्यात कळवायची, असं ठरवून दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला.

घराकडे परतताना ॲटनबरोंच्या मनात संमिश्र विचारांची एकच गर्दी उसळली होती.

आजवर आपल्या कलाजीवनात जे काही येत गेलं, त्याहून हे काहीतरी वेगळं आहे, खास! हा काही सर्वसामान्य चित्रपट-विषय नाही. मघाशी कोठारींनी जी काही माहिती दिली, त्यावरून गांधीजी हे एक महाप्रचंड व्यक्तिमत्त्व असलं पाहिजे.

लुई फिशरचं गांधी-चरित्र वाचल्यावर आपली प्रतिक्रिया काय होईल? आपल्याला ठाऊक असलेली जुजबी माहिती आणि कोठारींकडून ऐकलेल्या काही गोष्टी यापलीकडे सध्या तरी या विषयातली आपली पाटी तशी कोरीच आहे.

मात्र चित्रपटाचा विषय महाप्रचंड असल्यानं चित्रपटाची निर्मितीही अर्थातच त्याच महाप्रचंड प्रमाणावर होणं आवश्यकच नव्हे तर अटळही आहे. त्यासाठी उभारायला लागणारं भांडवलही तसंच छाती दडपून टाकणारं असेल. गांधीजींचा जीवनपट फार मोठ्या कालावधीचा आहे. चित्रपटाच्या वाजवी लांबीत तो सामावला जाईल, असं स्क्रिप्ट तयार करणं शक्य होईल का? गांधीजींच्या आयुष्यात आलेल्या अनेकानेक व्यक्तींपैकी वेचकच जरी घ्यायच्या म्हटलं, तरी त्यांचीही संख्या मोठीच असणार. म्हणजे चित्रपटाचं कास्टिंग (पात्रयोजना) ही एक मोठीच डोकेदुखी ठरणार!



**स्केच आर्टिस्ट चॉकी व्हाइटनं बेन किंग्जलेच्या मूळ छायाचित्रावरून पारदर्शक कागदाच्या साह्यानं, ब्रशची करामत करत, तो अखेर 'गांधी' म्हणून कसा दिसेल याची केलेली प्राथमिक स्केचेस**

विचार करता करता ॲटनबरोंना अचानक जाणवलं, की पुस्तक वाचण्यापूर्वीच आपण नकळतच 'गांधी' या विषयाकडे आकर्षिले गेलो आहोत!

### 'ते' एकच वाक्य निर्णायक!

स्वित्झर्लंडमधील मुक्कामाच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवशी ॲटनबरोंनी पलंगावर पडल्या पडल्या लुई फिशरचं गांधी-चरित्र वाचायला घेतलं. पुस्तकाची सुरुवात गांधीजींच्या अंत्ययात्रेनं केली होती. मग त्यांचं बालपण, पौगंडावस्था, शिक्षणासाठी इंग्लंडला जाणं, बॅरिस्टर होऊन भारतात परतणं वगैरे चरित्रातले टप्पे झाल्यावर आलं, त्यांचं दक्षिण आफ्रिकेतलं आगमन. येथपर्यंतचा भाग वाचण्यात तासाहून अधिक वेळ कसा निघून गेला ते ॲटनबरोंना कळलंच नाही. त्यानंतर पुढे जे काही लिहिलं होतं ते वाचून मात्र ते एकदम ताडकन उठून बसले.

''१८९०च्या दशकारंभीची घटना. दक्षिण आफ्रिकेत गांधीजी आपल्या एका भारतीय सोबत्याबरोबर फुटपाथवरून चालले असता समोरून दोन गोरे त्यांच्या दिशेनं येऊ लागले. तिथल्या अलिखित नियमानुसार (काळ्यांनी गोऱ्यांना आपला वारासुद्धा लागू देता कामा नये) हे दोघे काळे घाईघाईनं फुटपाथलगतच्या गटारात उतरून गोरे जाईपर्यंत थांबून राहिले. गांधीजी मग आपल्या सोबत्याकडे वळून म्हणाले, ''दुसऱ्या माणसाची मानखंडना केल्यानं आपली प्रतिष्ठा वाढते, असं काही माणसांना कसं वाटतं, याचं मला नेहमीच कोडं पडतं.''

("It has always been a mystery to me how men can feel themselves honoured by the humiliation of their fellow beings.")

हे बोलताना गांधीजींच्या स्वरात राग नव्हता. होतं ते केवळ आश्चर्यच...

वयाच्या अवघ्या बावीस-तेविसाच्या वर्षी मोहनदास करमचंद गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेत उच्चारलेलं ते वाक्य वाचताच ॲटनबरो एकदम थरारून उठले. एकाच वेळी ते उत्तेजित आणि बधिरही होऊन गेले. मूळ ५०५ पानी पुस्तकाचं ते केवळ ४८वं पान होतं. आणि तेच... किंवा खरं तर त्यावरचं ते वाक्यच ॲटनबरोंच्या दृष्टीनं निर्णायक ठरलं; त्यांच्या तोवरच्या कारकिर्दीला आणि एकूणच जीवनालाही कलाटणी देणारं ठरलं!

गांधी-चरित्रानं ॲटनबरोंना झपाटूनच टाकलं. त्या बैठकीत डोळे अगदी थकून जाऊन मिटेपर्यंत ते वाचतच राहिले.

दुसऱ्या दिवशी, पुस्तक वाचून पूर्ण होण्याचीही वाट न पाहताच त्यांनी स्वित्झर्लंडहून थेट लंडनला कोठारींना फोन लावला आणि एखाद्या अधीर पोराच्या उत्साहानं आपली प्रतिक्रिया कळवली. कोठारींना अर्थातच आनंद वाटला. पण आश्चर्य मात्र मुळीच वाटलं नाही. त्यांनी विचारलं –

''बरं पण चित्रपटाचं काय?''

ॲटनबरोंनी सांगितलं, ''हा 'एपिक' स्वरूपाचा म्हणजेच महाचित्रपट होणार. माझ्या दृष्टीनं तर ही फारच मोठी उडी आहे. बजेट प्रचंड, जबाबदारीही प्रचंड! हे काम काही सहजसोपं नाही.''

कोठारींनाही त्याची पूर्ण कल्पना होतीच.

आपल्या सुट्टीच्या उरलेल्या दिवसांत ॲटनबरोंनी लुई फिशरचं ते पाचशे पानी गांधी-चरित्र आणखी एकवार वाचून काढलं. आयुष्यात त्यांना प्रथमच चित्रपट दिग्दर्शित करावा असं तीव्रतेनं वाटू लागलं. आणि तोही असा तसा चित्रपट नव्हे, तर मोहनदास करमचंद गांधी या महामानवावरचा!

### 'वेड्या साहसा'त उडी

लंडनला परतल्यावर लागलीच कोठारींची भेट न घेता ॲटनबरोंनी या विषयावर आपले काही सहकारी, स्नेही आणि हितचिंतक यांच्याशी सल्लामसलत केली. कुणाकडूनही फारसा उत्साहाचा प्रतिसाद मिळाला नाही. उलट काहींनी तर 'वेडं साहसं'



**दिल्ली. सप्टेंबर १९६४. श्रीमती इंदिरा गांधी यांना जेराल्ड हॅन्लीचं स्क्रिप्ट दाखवताना रिचर्ड ॲटनबरो आणि मोतीलाल कोठारी (इंदिराजींची तीन महिन्यांपूर्वी माहिती आणि प्रसारण खात्याच्या मंत्री म्हणून नियुक्ती झाली होती)**

अशी त्याची संभावना केली. ॲटनबरोंचा एजंट जॉन रेडवे यानंही चित्रपट-दिग्दर्शनाच्या पहिल्याच प्रयत्नात असा अवघड, प्रचंड विषय घेऊ नये, असा व्यावहारिक सल्ला दिला. शिवाय अशा प्रकल्पास लागणाऱ्या प्रचंड भांडवलाच्या उभारणीसाठी कोणतीही वितरणसंस्था वा वित्तसंस्था पुढे येण्याची शक्यता जवळजवळ नाहीच, असंही बजावलं. उमेद वाढावी, असं काहीही न बोलता प्रत्येक जण अनेक समस्यांचाच बागुलबुवा उभे करत होता.

ॲटनबरो आणि कोठारी यांच्या भेटीत या साऱ्याचा ऊहापोह झाला. कार्यारंभ करण्यापूर्वी एक गोष्ट मात्र निश्चितच आवश्यक होती. भारत सरकारची मान्यता, पसंती. ती मिळाल्याशिवाय या प्रकल्पाला हात घालता येणं शक्य नव्हतं.

या बाबतीत लॉर्ड लुई माउंटबॅटन यांची मदत घ्यायचं ॲटनबरोंनी ठरवलं. लॉर्डसाहेबांच्या युद्धकालीन नौदल कारकिर्दीवर आधारलेल्या 'इन विच वुई सर्व्ह' या चित्रपटात ॲटनबरोंनी भूमिका करून आपल्या रुपेरी कारकिर्दीचा प्रारंभ केला होता. त्या निमित्तानं दोघांची ओळख झाली होती.

माउंटबॅटन हे स्वातंत्र्यपूर्व भारताचे शेवटचे व्हाइसरॉय आणि स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे ते निकटवर्ती स्नेही. ॲटनबरो १९६३मध्ये त्यांना भेटायला गेले असता त्यांनी त्यांची विनंती तात्काळ मान्य केली.

कर्मधर्मसंयोगानं अगदी लवकरच ते भारतात जाऊन पंडित नेहरूंची भेट घेणार होते. त्या वेळी ॲटनबरोंच्या गांधी प्रकल्पात मध्यस्थ होण्याचं त्यांनी आश्वासन दिलं. आणि नंतर त्यांनी ते यशस्वीपणे पारही पाडलं. परिणामी, एकूण प्रकल्पाविषयी माहिती देण्यासाठी, चर्चा करण्यासाठी भारतात येऊन आपल्याला प्रत्यक्षच भेटावं, असं पंडितजींचं ॲटनबरोंना आमंत्रण आलं.

गेल्या कित्येक वर्षांपासून हृदयविकारग्रस्त असलेले मोतीलाल कोठारी दुर्दैवानं त्याच सुमारास आजारी पडल्यानं ॲटनबरो एकटेच भारतात दिल्लीस गेले.


पंडितजींनी माउंटबॅटन यांच्या शब्दाखातर जरी आपल्याला भेटीचं आमंत्रण दिलं असलं तरी प्रत्यक्ष भेटीत ते आपल्यासारख्या अनोळखी व्यक्तीशी कसे काय वागतील; त्यांच्या कामांच्या प्रचंड व्यापातून आपल्या या प्रकल्पात कितपत स्वारस्य दाखवतील, वगैरे शंकांचं एकच काहूर ॲटनबरोंच्या मनात त्यांच्या भेटीस जाताना माजलं होतं.

साउथ ब्लॉक येथील पंतप्रधानांच्या कार्यालयात ॲटनबरो मे महिन्यातल्या एका सकाळी ठरलेल्या वेळेच्या पंधरा मिनिटं आधीच जाऊन पोहोचले. पंडितजींचे खाजगी सचिव एस. पी. खन्ना यांनी त्यांचं स्वागत केलं आणि थांबायला सांगितलं. मग ते त्यांना हलकेच म्हणाले, ''पंतप्रधानांचा आजचा दिवस भेटी आणि कार्यक्रम यांनी भरगच्च भरलेला आहे. तरीही तुम्हांला भेटीसाठी तीस मिनिटं इतका अवधी दिलेला आहे. तेव्हा कृपया तुम्ही तेवढ्या मुदतीतच भेट आवरण्याची खबरदारी घ्यावी, अशी विनंती आहे.''

ॲटनबरोंनी लागलीच मान डोलावून त्यांना निश्चिंत राहण्याचं आश्वासन दिलं आणि भेटीची वेळ होताच... ठीक साडेआठ वाजता पंतप्रधानांच्या दालनात प्रवेश केला.

### अगा जे नवल वर्तले...

नेहरूंनी त्यांचं मन:पूर्वक स्वागत केलं. लॉर्ड माउंटबॅटन यांचं आणि आपलं प्रकल्पाबाबत बोलणं झालं असल्याचं सांगून त्यांनी गांधीजींच्या जीवनावर चित्रपट होण्याच्या



**दांडीयात्रा... मिठाचा सत्याग्रह. गांधीजी (बेन किंग्जले) झपझप चालले असताना त्यांना आदरपूर्वक प्रणाम कसा करावा, याचं गावकऱ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवताना दिग्दर्शक ॲटनबरो**

शक्यतेबद्दल आनंद व्यक्त केला. ॲटनबरोंना गांधीजींविषयी कितपत माहिती आहे, असं त्यांनी विचारलं. त्यावर आपण गांधीजींची 'माय एक्स्पेरिमेंट्स विथ टूथ' आणि 'सत्याग्रह इन साउथ आफ्रिका' ही दोन पुस्तकं, डी. जी. तेंडुलकरांच्या 'महात्मा'चे सर्व खंड, तसंच लुई फिशर यांचं पुस्तक वाचल्याचं ॲटनबरोंनी सांगितलं.

नेहरूंनी अगदी अल्पावकाशातच साऱ्या औपचारिकतेला फाटा देऊन, ॲटनबरोंवरचं दडपण काढून टाकून, त्यांना त्यांच्या प्रकल्पाविषयी मोकळेपणानं बोलण्यास उत्तेजन दिलं. बोलता बोलता त्यांनी 'नाइन अवर्स टु राम' या सत्यापलाप करणाऱ्या चित्रपटाचा विषय काढून त्याविषयी आपली तीव्र नापसंती व्यक्त केली. ॲटनबरोंनीही तो पाहिलेला असल्यानं तेही पंडितजींशी सहमत झाले.

तारखांची अचूकता आणि घटनाक्रम यांना पंडितजी विशेष महत्त्व देत नव्हते. गांधीजींच्या जीवनाचं वस्तुनिष्ठ, सत्याधिष्ठित चित्रण त्यांना महत्त्वाचं वाटत होतं; चित्रपटात गांधी-चरित्राचा आत्मा मुळीच हरवता कामा नये, यावर त्यांचा कटाक्ष होता.

संकल्पित चित्रपटाची प्रमुख वैशिष्ट्यं काय असतील, असं त्यांनी विचारलं. ॲटनबरोंनी मग गांधी-चरित्रातील कोणकोणत्या ठळक आणि नाट्यपूर्ण घटना आपण घेणार, ते उत्साहानं, रंगवून सांगण्यास सुरुवात केली, तसे पंडितजी आणखीनच खुलत गेले; नकळतच त्या घटनांतले आपलेही स्वानुभवाचे तपशील उत्साहानं सांगू लागले.

ॲटनबरोंचं मध्येच घड्याळाकडे लक्ष गेलं आणि त्यांना चांगलाच धक्का बसला. कारण आता नऊ वाजले होते. भेटीची तीस मिनिटांची वेळ संपली होती. ते निघण्यासाठी चुळबुळ करू लागले. नेहरूंच्या ते लक्षात येताच कपाळाला आठ्या घालत त्यांनी विचारलं –

''काय झालं? कुठं जायची घाई झालीए तुम्हांला?''

''नाही सर,'' कसनुसा चेहरा करत ॲटनबरो म्हणाले. ''पण नऊ वाजले आहेत.''

''हो हो,'' नेहरू म्हणाले. ''पण आपलं काम अजून कुठं आटोपलंय? बसा, खाली बसा!''

ते मग खुर्चीतून उठून कपाटाकडे गेले; त्यातून त्यांनी एक लठ्ठ अल्बम बाहेर काढला; तो त्यांनी उघडून खाली कार्पेटवर ठेवला. मग हातागुडघ्यांवर रांगत्या अवस्थेत विसावत त्याची पानं उलटत, एक एक फोटो ॲटनबरोंना दाखवत, ते स्मरणरंजनात जात त्या त्या संदर्भातील आठवणींना उजाळा देऊ लागले. ॲटनबरोही रांगत्या अवस्थेत विसावत आतुरतेनं त्यांचं भाष्य ऐकत फोटो पाहू लागले. (नेहरूंचं त्या वेळचं ते स्मृतिकोशात जपलेलं भाष्य पुढे 'गांधी'ची पटकथा बांधताना त्यांच्या फारच उपयोगास आलं.)

तेवढ्यात दारावर टकटक झाली आणि सचिव खन्ना आत आले. पंतप्रधान त्यांच्या खुर्चीत नसल्याचं पाहून त्यांना धक्का बसला. पण त्याहूनही मोठा धक्का त्यांना बसला, तो कार्पेटवरील



**रोहिणी हट्टंगडी (कस्तुरबा) आणि बेन किंग्जले (गांधी) यांच्यासह एका तळ्याकाठी ॲटनबरो**

रांगत्या अवस्थेतल्या पंतप्रधानांना पाहून! स्वत:च अकारण ओशाळत, अवघडत त्यांनी साहेबांना एक चिठ्ठी दिली. साहेबांनी न उठताच तिच्यावर नजर टाकली आणि 'ठीक आहे, ठीक आहे' असं पुटपुटल्यागत म्हणून हातातल्या 'अधिक महत्त्वाच्या' कामाकडे परत लक्ष केंद्रित केलं.

अशा प्रकारे किती वेळ गेला, याचं दोघांनाही भान नव्हतं. अल्बमचं शेवटचं पान उलटल्यावर उठून उभे राहत ते ॲटनबरोंना म्हणाले, ''तुम्हांला इथल्या आणखीही काही लोकांना भेटायला हवं; काही अधिकारी, माहितगार अशा खास व्यक्तींची भेट घेतली पाहिजे. आणि अर्थातच माझ्या मुलीचीही तुम्ही भेट घ्यायला हवी.''

एवढं बोलूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या निवासस्थानी फोन करून, ब्रिटिश नट आणि निर्माते रिचर्ड ॲटनबरो हे भेटीस येत असल्याचं नि ते बापूंवर फिल्म करत असल्याचं, आपली कन्या इंदिरा गांधी यांना कळवलं.

नेहरूंनी दार उघडलं. बाहेर अनेक लोक ताटकळत उभे होते. त्यातच नाराज खन्नाही होते. त्यांच्या नजरेस नजर न देता तोंडातल्या तोंडात आभाराचे शब्द पुटपुटून ॲटनबरो तेथून सटकले.

पंतप्रधान-कार्यालयातून निघाल्यावर ॲटनबरो इंदिरा गांधींच्या भेटीस गेले. वडलांप्रमाणेच त्यांनीही त्यांचं चांगलं स्वागत केलं. त्या स्वत: चित्रपट-रसिक होत्या; चित्रपटसृष्टीविषयी त्यांना आपुलकी होती. त्या वेळी त्यांच्याकडे कोणतंही सरकारी पद नव्हतं. किंबहुना दिल्लीबाहेर त्यांची फारशी कुणाला माहितीही नव्हती.

इंदिराजींनी ॲटनबरोंकडून 'गांधी' चित्रपटाविषयीच्या त्यांच्या योजनांची माहिती लक्षपूर्वक, आस्थेवाईकपणे ऐकून घेतली; काही प्रश्न विचारले; बापूंच्या सहवासात आलेल्या काही महत्त्वाच्या व्यक्तींची भेट घेऊन अधिक माहिती घेण्याचं त्यांना सुचवलं.

अर्ध्या तासानं इंदिराजींचा निरोप घेताना ॲटनबरोंनी त्यांना सांगितलं, की या वर्षअखेर चित्रपटाची पटकथा तयार होईल, तेव्हा ती घेऊन आपण परत भारतात येऊन त्यांची भेट घेऊ.

## दिग्दर्शनाची कोरी पाटी जेव्हा नडते...

भारतातून ॲटनबरो लंडनला परतल्यावर ते आणि कोठारी यांनी थोड्याफार भांडवलाची उभारणी केली. भारतभेट आशादायक झाल्यामुळे दोघांचीही उमेद वाढली होती. त्यातच नेहरूंनी चित्रपट-प्रकल्पाला तत्त्वत: मान्यता दिल्याची आनंदवार्ता सांगणारं लॉर्ड माउंटबॅटन यांचं ॲटनबरोंना पत्र आलं. त्यामुळे आता नि:शंकपणे कामास सुरुवात करण्यास प्रत्यवाय नव्हता. आणि ही सुरुवात म्हणजे अर्थातच पटकथा. कारण पटकथा तयार नसेल तर पुढच्या गोष्टी पुढे सरकणारच नव्हत्या. ॲटनबरो आणि कोठारी यांनी एकमतानं ती जबाबदारी जेराल्ड हॅन्ली या लेखकावर सोपवली. पुढे 'गांधी' पटकथेचे जे अनेक लेखक झाले त्यांतला हॅन्ली हा पहिला.

त्यानंतर चित्रपटाच्या कामानिमित्त ॲटनबरोंच्या भारत-वाऱ्या सुरू झाल्या. मंत्र्यासंत्र्यांचे अहंकार, लहानसहान बाबतीतही नोकरशहांच्या लाल फितीचा अडेलतट्टूपणा यांमुळे वेळोवेळी कामांत निर्माण होणाऱ्या अडचणींचं निवारण करण्यासाठी दर वेळी पंतप्रधानांकडे धाव घेणं उचित नव्हतं. म्हणून माउंटबॅटन यांनी सुचवल्याप्रमाणे नेहरूंनी इंदिराजींना या चित्रपटाच्या कामात लक्ष घालण्यास सांगितलं. इंदिराजींनी आस्थेवाईकपणे आपली जबाबदारी पेलत चित्रपटकार आणि दिल्लीतील विविध केंद्रीय मंत्रालयं यांच्यात वेळोवेळी सुसंवाद घडवून आणला.

पुढे एका भेटीत नेहरूंनी ॲटनबरो यांच्याकडून चित्रपटाचं स्क्रिप्ट, पात्रयोजना, कामाची एकूण रूपरेषा यांविषयी माहिती घेतली; चर्चा केली. त्यानंतर त्यांनी लोकसभेत सांगितलं, की रिचर्ड ॲटनबरो नामक एक नामवंत ब्रिटिश नट, निर्माता गांधीजींवर एक चित्रपट करत असून या कामासाठी तो अत्यंत योग्य आहे.

## सर ॲलेक गिनेस 'गांधी'?

आरंभापासूनच गांधीजींच्या भूमिकेसाठी सर ॲलेक गिनेस यांचंच नाव ॲटनबरो आणि कोठारी यांच्यापुढे होतं. मात्र सर गिनेस यांची कलावंत म्हणून असामान्य प्रतिभा, गुणवत्ता आणि लोकप्रियता एवढीच केवळ यामागची कारणं नव्हती. तर त्या वेळच्या अभिनेत्यांत गांधीजींशी अधिकाधिक शारीरिक साधर्म्य असणारे केवळ तेच एकमेव होते. नेहरूंचीही तीच पसंती होती.

याबाबत चर्चा करण्यासाठी ॲटनबरो यांनी लागलीच गिनेस यांची भेट घेतली. परंतु सुरुवातीसच सर ॲलेक यांनी आपल्या मनातली शंका बोलून दाखवली. एका महान भारतीयाच्या भूमिकेत आपण लोकांच्या (विशेषत: भारतीय) पसंतीस कितपत उतरू, याविषयी ते कमालीचे साशंक होते. त्याखेरीज आणखीही एक मोठीच व्यावहारिक अडचण होती. ही अत्यंत महत्त्वपूर्ण ऐतिहासिक भूमिका ताकदीनं पेलण्याच्या दृष्टीनं पूर्वतयारी करण्यास आवश्यक ती सवड त्यांच्यापाशी नव्हती. कारण आधीच करार

झालेल्या अनेक कामांत ते व्यग्र होते.

परंतु ॲटनबरोंनी त्यातूनही एक तोडगा काढला – 'गांधी' चित्रपटाच्या पटकथेचा पहिला खर्डा तयार होईपर्यंत सर ॲलेक यांनी दम धरावा आणि तो वाचल्यावरच त्यांनी काय तो अंतिम निर्णय घ्यावा. यास मात्र त्यांनी संमती दिली. यापूर्वी दिग्दर्शक डेव्हिड लीन यानं याच विषयावर चित्रपट करण्याचा विचार चालवला होता, तेव्हा गांधीजींची भूमिका वठवण्याबद्दल तो आणि सर ॲलेक गिनेस यांच्यात चर्चा झाल्याचं ॲटनबरोंना ठाऊक होतं. त्यामुळे ते आशावादी होते.

परंतु चित्रपटाच्या सुधारित पटकथेचा पहिला भाग पाठवल्यानंतर सर गिनेस यांच्याकडून आलेल्या पत्रानं ॲटनबरो यांची पार निराशाच झाली. पटकथा अत्यंत काळजीपूर्वक वाचल्यानंतर तर आपली पुरतीच खात्री पटली, की ही भूमिका करण्याची आपली मुळीच पात्रता नाही, असं सांगणाऱ्या त्या पत्रात गिनेस यांनी जे लिहिलं होतं त्याचा भावार्थ असा –


''पटकथा अत्यंत तरल आणि वेधक झाली आहे. सत्याचं अधिष्ठान असल्यानं तिला अधिकृतता प्राप्त झाली आहे. त्याबद्दल तू आणि पटकथाकार दोघेही अभिनंदनास पात्र आहात. पण मत्प्रिय डिकी (रिचर्ड), मला अत्यंत प्रामाणिकपणे वाटतं, की माझ्याशिवायच तू अधिक काहीतरी चांगलं करू शकशील. मला अजूनही वाटतं, की गांधीजींच्या भूमिकेसाठी एखाद्या भारतीयाचीच गरज आहे. माझ्या या पत्रानं तुझी किती निराशा होणार आहे, याची मला पूर्ण कल्पना आहे. माझ्याबद्दलचा तुझा नितांत सुहृदभाव, तसंच ही भूमिका मलाच देण्याविषयी तुझा उत्साह आणि माझ्या पात्रतेबद्दल तुला वाटणारी खात्री मी जाणतो. परंतु ही भूमिका मी करणं, हे मला स्वत:लाच अप्रामाणिकपणाचं वाटतं. कारण मी खूपच वयस्कर, खूपच करड्या डोळ्यांचा नि खूपच धट्टाकट्टा आहे. असो.''

पत्राच्या वाक्यावाक्यातून प्रांजलपणा व्यक्त होत होता. तरीही सर ॲलेक यांचा हा नकार पचवणं ॲटनबरोंना जडच गेलं. त्याहूनही अवघड प्रश्न म्हणजे, पंडित नेहरूंना हे कसं सांगायचं? कारण गांधीजींच्या भूमिकेत सर ॲलेक गिनेस, या कल्पनेनंच ते किती उत्साहित, प्रभावित झाले होते!

आणि त्यानंतरच्या प्रत्यक्ष भेटीत नेहरूंनी तो विषय काढलाच. ॲटनबरोंनी एकूण हकिगत सांगितल्यावर नेहरूंनीही निराशा, खंत व्यक्त केली. कारण बापूंच्या भूमिकेसाठी सर ॲलेक यांचंच व्यक्तिमत्त्व अत्यंत सुयोग्य आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

या विषयाच्या ओघात ॲटनबरो यांनी त्यांना विचारलं, ''पंडितजी, मला अगदी खरंखरं सांगा. एका इंग्लिशमननं आपल्या महान नेत्याची भूमिका वठवणं, हे तत्त्वत: तुम्हांला स्वत:ला आणि एकूणच अखिल भारताला कितपत स्वीकारार्ह वाटतं?''

पंडितजी क्षणभर घुटमळले आणि मग एक खट्याळ हास्य करीत म्हणाले, ''तसं जर खरोखरच घडलं... एक इंग्लिशमन आपली भूमिका साकारतोय, हे गांधीजींना स्वर्गात कळलं, तर ते पोट धरधरून हसतील.''




बेन किंग्जले (गांधी) आणि ॲटनबरो

नेहरूंच्या मनाचा एकूण कल पाहून ॲटनबरोंनी पुन्हा एकवार सर ॲलेक गिनेस यांच्याकडे विचारणा केली. पण त्यांचा नकार कायमच होता.

१९६४मध्ये नेहरू यांचं निधन झालं आणि सरकारी स्तरावरील चित्रपटविषयक संपर्कच काही काळ खंडित झाला. नंतर लालबहादूर शास्त्री मंत्रिमंडळात इंदिराजी माहिती आणि प्रसारण खात्याच्या मंत्री झाल्या. त्यांच्या अखत्यारीत चित्रपट माध्यमही येत होतं. तेव्हा, आणि त्यानंतरही त्या देशाच्या पंतप्रधान असताना, त्यांनी 'गांधी' प्रकल्पासंदर्भात ॲटनबरोंची सतत पाठराखण करत त्यांना मोलाची मदत केली.

साठच्या पूर्वार्धात ॲटनबरो आणि कोठारी यांनी आपल्या चित्रपट-निर्मिती-संस्थेचं नाव 'इण्डो-ब्रिटिश फिल्म्स' असं ठेवलं. चित्रपटाचं तात्पुरतं नाव 'द नेकेड फकीर' असं ठेवण्यात आलं.

अजूनही आवश्यक ते भांडवल उभारण्यासाठी ते दोघे आटोकाट प्रयत्न करत होते. परंतु त्यांना त्यात म्हणण्यासारखं यश येत नव्हतं. लवकरच ॲटनबरोंच्या लक्षात आलं, की या मार्गात



**इंग्लंडहून परतल्यावर गांधीजी (बेन किंग्जले) भारतीय नेत्यांशी आश्रमात चर्चा करताना. त्यांच्यासोबत प्यारेलाल नायर (पंकज मोहन), महंमद अली जिना (अलेक पदमसी), पटेल (सईद जाफ्री), आझाद (वीरेंद्र राझदान), कृपलानी (अनंग देसाई), नेहरू (रोशन सेठ)**

सारखी आडवी येणारी गोष्ट एकच. आणि ती म्हणजे चित्रपट-दिग्दर्शनाची आपली कोरी पाटी. त्यामुळे प्रकल्पात पैसे गुंतवण्यास फारसे कुणी उत्सुक नव्हते. आता, बॉक्स ऑफिसवर नाव असलेले नट या चित्रपटात असते तर गोष्ट वेगळी होऊ शकली असती. पण तिथंही पुन्हा तीच कोऱ्या पाटीचीच मेख! एका अननुभवी दिग्दर्शकाबरोबर एक अत्यंत गुंतागुंतीची आणि परिश्रम घ्यावयास लावणारी प्रमुख भूमिका करण्याचं नामवंत नट टाळत होते.

### पटकथा : जमेचि ना, घडेचि ना!

१९६५मध्ये 'गांधी' प्रकल्पाकरिता पात्रयोजना ही तशी दुय्यमच गोष्ट होती. आद्य महत्त्वाचं होतं ते, पटकथालेखनासाठी पुरेसे पैसे उभे करणं. कारण ती तयार झाल्याशिवाय काहीच करता येणं शक्य नव्हतं. आणि या पटकथेसाठी परिश्रमांना पार नव्हता. नायक महान होता. कालपट फारच व्यापक होता. पात्रांची संख्या मोठी होती. काय घ्यायचं, काय टाळायचं, याचा निर्णय घेणं कसोटी पाहणारं होतं. एका ऐतिहासिक महामानवाच्या जीवनातील घटनाप्रधान अशी ७९ वर्षं पडद्यावरील तीनच काय पण चार तासांच्या अवधीत सामावणं हे शिवधनुष्य पेलण्याहूनही खडतर होतं.

एव्हाना ॲटनबरोंनी आपलं घरदार गहाण टाकून कर्ज काढलं होतं. ते पैसे, तसंच तोवर गोळा केलेलं भांडवल, या प्रकल्पात गुंतलं होतं. मोतीलाल कोठारी यांनी भारतीय उच्चायुक्तालयातील आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि प्रकल्पासाठी स्वत:ला पूर्णवेळ वाहून घेतलं. हाती घेतलेलं काम चालू ठेवण्यासाठी तसंच आपल्या कुटुंबाच्या चरितार्थासाठी ॲटनबरोंना पैसे मिळवण्याची निकड होती. त्याकरिता त्यांनी १९६५-६६च्या दरम्यान तीन अमेरिकन चित्रपटांत भूमिका केल्या.

पटकथेचं काम ज्याच्यावर सोपवलं होतं, तो जेराल्ड हॅन्ली यानं काही पटकथा लिहिल्या होत्या. महत्त्वाचं म्हणजे भारताविषयीचं त्याचं ज्ञान उत्तम होतं. तो अभ्यासू आणि कष्टाळू होता. ॲटनबरोंशी त्याच्या वारंवार चर्चा होत होत्या. गांधीजींविषयीच्या मिळतील त्या संदर्भग्रंथांची त्यानं पारायणं केली होती; परिश्रमपूर्वक टिपणं काढली होती. अखेर त्याची पटकथा तयार झाली. पण तिच्यावर चित्रपट काढायचा तर तो तब्बल पाच तासांचा झाला असता. पाच तासांचा ऐवज तीन तासांत कसा काय बसवायचा? कापून कापून ती कितीशी आटोपशीर करता येणार होती?

हॅन्लीनं पटकथेचा दुसरा खर्डा लिहिण्याचं मान्य केलं पण त्यासाठी चार महिन्यांची मुदत मागितली. पुन्हा त्यासाठी आणखी पैशांची तरतूद करणं भाग पडलं. तेवढ्यात ॲटनबरोंकडे एक चित्रपट चालून आला, म्हणून बरं.



**'गांधी'च्या सेटवर रोहिणी हट्टंगडी (कस्तुरबा) यांना साहाय्य करताना दिग्दर्शक ॲटनबरो**

पटकथा दिल्लीला पाठवण्यात आली. यथावकाश माहिती आणि प्रसारण मंत्रालयातून पत्र आलं. सोबत गांधी-चरित्रकार तेंडुलकर यांची पटकथेवरील अभिप्रायाची सविस्तर टिपणंही होती. त्यांनी वस्तुस्थितीच्या संदर्भातल्या बऱ्याच चुका निदर्शनास आणल्या होत्या. त्या अर्थातच सुधारता येण्यासारख्याच होत्या.

१९६४च्या एप्रिल अखेरीस हॅन्लीचं दुसरं स्क्रिप्ट तयार झालं. पण तेसुद्धा बरंच मोठं झालं होतं. हॅन्लीनं खूप अभ्यास केला होता; खूप परिश्रम घेतले होते, हे कितीही खरं असलं तरी त्याचं दुसरंही स्क्रिप्ट जमलं नव्हतं, ही वस्तुस्थिती होती.

त्यानंतर हॅन्लीच्या मदतीला दुसरा एखादा अधिक अनुभवी पटकथाकार देण्याचे प्रयत्न झाले. पण ते काही जमले नाहीत. स्वतंत्रपणे पटकथा लिहिण्याचे काहींकडून प्रयत्न झाले. तेही फसले.

### हेचि फल काय...

अखेर, चित्रेतिहासातील एक मानदंड ठरलेल्या 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' या चित्रपटाचा पटकथाकार, ख्यातनाम नाटककार रॉबर्ट बोल्ट हा 'गांधी' चित्रपटाची नवी पटकथा लिहिण्यास तयार झाला. (अगदी सुरुवातीलाच त्याला विचारलं असता मात्र त्यानं नकार दिला होता.) पण त्याची एक अट होती. 'लॉरेन्स'साठी ज्याच्याबरोबर त्यानं काम केलं होतं ते ख्यातकीर्त दिग्दर्शक डेव्हिड लीन हाच त्याला 'गांधी' याही चित्रपटासाठी दिग्दर्शक म्हणून हवा होता.

मोतीलाल कोठारींचा हृदयविकार त्यांना अधिकाधिक त्रासदायक होत चालला होता. 'गांधी' चित्रपट पाहायला आपण जिवंत तरी राहू काय, अशी शंका त्यांना अलीकडे सारखी भेडसावू लागली होती. बोल्ट आणि लीन ही ख्यातनाम युती 'गांधी' चित्रपटासाठी प्रसिद्धी आणि बॉक्स ऑफिस या दृष्टीनं चांगलीच लाभदायक ठरेल; आपल्या सर्वच समस्या सुटतील, असं अगदी निकराला आलेल्या कोठारींना तीव्रतेनं वाटू लागलं. त्यांनी ॲटनबरोंना पत्र लिहिलं. त्यात त्यांनी सर्व हकिगत कळवून आपला मनोदय व्यक्त केला आणि 'गांधी' चित्रपटाच्या दिग्दर्शनाचा जो काही हक्क असेल तो सोडून देण्याची ॲटनबरोंना विनंती केली. इतकंच नव्हे तर त्या बदल्यात जणू सांत्वनार्थ त्यांना गांधीजींची भूमिका देण्याचीही तयारी दर्शविली.

पत्र वाचून ॲटनबरो एकदम सुन्न होऊन गेले. कोठारींची दुसरी सूचना शारीरिक स्वरूपाचा विचार करता त्यांनी लागलीच निकालात काढली, पण मुख्य विनंतीला मात्र त्यांनी काळजावर दगड ठेवून मान दिला. इतकी वर्षं जो प्रकल्प साकारण्यासाठी तहानभूक हरपून आपण तनमनधनानिशी झटत होतो, तो सोडून देताना त्यांच्या जिवाला काय यातना झाल्या असतील, याची कल्पनाच केलेली बरी! पण बोल्ट हा ख्यातकीर्त यशस्वी नाटककार, पटकथाकार होता. आणि 'गांधी'करिता डेव्हिड लीनसारखा दुसरा दिग्दर्शकच असू शकत नाही, हे ॲटनबरोंनाही मनोमन पटत होतं.

प्रकल्पात भावनात्मक दृष्ट्या ते कितीही गुंतलेले असले, तरी या नव्या पुनर्रचनेत त्यांना आपोआपच गौणत्व आलं. परंतु इथं दिग्दर्शकाच्या खुर्चीतून उठून बाजूस होणं भाग पडलं असलं, तरी अनपेक्षितपणे दिग्दर्शनाची दुसरी एक संधी त्यांच्याकडे स्वतःहून चालत आली. 'ओह्! वॉट अ लव्हली वॉर' हा तो चित्रपट! दिग्दर्शनाच्या पदार्पणातच प्रेक्षक आणि समीक्षकांनी त्यांच्यावर प्रशंसेची उधळण केली. प्रतिष्ठेच्या 'गोल्डन ग्लोब'सह एकूण १६ ॲवॉर्ड्स या चित्रपटानं पटकावली. दोनच वर्षांत त्यांना आणखी एक चित्रपट दिग्दर्शनासाठी मिळाला. या चित्रपटाचं नाव 'यंग विन्स्टन'. माजी ब्रिटिश पंतप्रधान, गांधीजींचे कट्टर विरोधक चर्चिल यांच्या संस्कारक्षम वयातील जीवनावर तो आधारित होता. या चित्रपटानंही ॲटनबरोंना 'गोल्डन ग्लोब' मिळवून दिलं.

इकडे 'गांधी'च्या कामास आरंभ करण्यापूर्वी आपण एक 'लहानशी' फिल्म झटकन उरकून घेतो, असं बोल्ट आणि लीन यांनी कोठारींना सांगितलं. त्या फिल्मचं नाव 'रायन्स डॉटर'. ती पुरी होईपर्यंत वाट पाहण्याखेरीज कोठारींच्या हातात दुसरं काहीच नव्हतं. फिल्म पूर्ण होण्यास तीन वर्षं लागली. आणि रॉबर्ट बोल्टनं स्क्रिप्टची पहिली ओळ लिहिण्याच्या आतच, १७ जानेवारी १९७१ रोजी मोतीलाल कोठारी यांनी या जगाचा कायमचा निरोप घेतला.



**सेटवर जनरल डायरच्या भूमिकेतील एडवर्ड फॉक्स याला चित्रीकरणापूर्वी काही महत्त्वाच्या सूचना देताना दिग्दर्शक रिचर्ड ॲटनबरो**

### पुनश्च 'गांधी' ओम!

ॲटनबरो 'गांधी' प्रकल्पातून जरी बाजूस झाले असले आणि त्यांच्यामागे इतर व्याप असले तरी त्यांच्या मनातून मात्र 'गांधी' हा विषय जात नव्हता. कोठारींच्या निधनानंतर आणि 'यंग विन्स्टन' प्रदर्शित झाल्यावर ते आणि रॉबर्ट बोल्ट यांची एक भेट झाली. त्या वेळच्या बोलण्यातून असं समजलं, की इत:पर लीन याला 'गांधी' चित्रपटाच्या दिग्दर्शनात काहीच स्वारस्य उरलं नव्हतं. पण बोल्ट मात्र हा चित्रपट होण्याची शक्यता असेल तर अजूनही पटकथा लिहिण्यास तयार होता. मग त्याचं दिग्दर्शन ॲटनबरो यांनी केलं तरी आता त्याची हरकत नव्हती.

ॲटनबरोंच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या. बोल्टबरोबर त्यांच्या भेटी, चर्चा सुरू झाल्या. आत्तापर्यंत त्यांच्यापाशी २००हून अधिक संदर्भग्रंथ जमा झाले होते. ते त्यांनी बोल्टला दिले.

### 'गांधी'ला आठ ऑस्कर्स (१९८२)

| | |
|---|---|
| **१. सर्वोत्कृष्ट चित्रपट** | : 'गांधी' (इण्डो-ब्रिटिश फिल्म्स, कोलंबिया, निर्माता : रिचर्ड ॲटनबरो). |
| **२. सर्वोत्कृष्ट अभिनेता** | : बेन किंग्जले (भूमिका : गांधी). |
| **३. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक** | : रिचर्ड ॲटनबरो. |
| **४. सर्वोत्कृष्ट स्वतंत्र पटकथा** | : जॉन ब्रायली. |
| **५. सर्वोत्कृष्ट छायांकन** | : बिली विल्यम्स आणि रॉनी टेलर. |
| **६. सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शन – सजावट** | : स्टुअर्ट क्रेग आणि बॉब लेंग; मायकेल सीर्टन. |
| **७. सर्वोत्कृष्ट संकलन** | : जॉन ब्लूम. |
| **८. सर्वोत्कृष्ट वेशभूषा** | : जॉन मोलो आणि भानू अथय्या. |

त्यांनी आता नव्या हुरुपानं कंबर कसली; महत्त्वाच्या संबंधित व्यक्तींच्या भेटीगाठी ते घेऊ लागले; भांडवलाच्या उभारणीसाठी चित्रपटसृष्टीतले दिग्गज निर्माते, प्रमुख चित्रपट वितरक, भारतीय संस्थानिक इत्यादींचे उंबरठे झिजवू लागले. कधी त्यांची उमेद वाढत होती, तर कधी ते निराशेच्या खोल गर्तेत कोसळत होते. पण हार मानायला मात्र ते मुळीच तयार नव्हते. त्यातच ते अनेक प्रतिष्ठित भारतीयांच्या विरोधालाही तोंड देत होते. एक इंग्रज रुपेरी पडद्यावर राष्ट्रपित्याच्या जीवनचरित्राला कसा काय न्याय देऊ शकेल, असा या विरोधकांचा सवाल होता.

अशा एकूण आशानिराशेच्या खेळात वर्षं उलटत असतानाच आणखी एक वाईट बातमी येऊन थडकली. रॉबर्ट बोल्ट भयंकर आजारी पडला आणि आणखी काही काळ तरी आपण स्क्रिप्ट लिहिण्यास असमर्थ असल्याचं त्यानं कळवलं. या समस्येवर आता काय तोडगा काढावा, अशा विचारात ॲटनबरो पडले असताना अचानक त्यांना बऱ्याच वर्षांपूर्वीच्या एका गोष्टीची आठवण झाली. त्या वेळी त्यांना एक चित्रपट दिग्दर्शित करण्याची अनावर इच्छा झाली होती. आणि याचं कारण, त्यांनी वाचलेलं त्या चित्रपटाचं अत्युत्कृष्ट स्क्रिप्ट! अर्थात त्या वेळी तो योग हुकला. ते स्क्रिप्ट लिहिलं होतं, जॉन ब्रायली नामक एका अमेरिकन लेखकानं.

ॲटनबरोंनी ब्रायलीशी संपर्क साधला. निर्णय घेण्यापूर्वी या विराट कामाविषयी साधकबाधक विचार करण्यासाठी त्यानं पंधरवड्याच्या अवधी घेतला. मग इतक्या वर्षांत अनेकांचे हात लागून बदलत बदलत गेलेल्या स्क्रिप्टच्या ढाच्याच्या मूळ चौकटीत राहून नवीन स्वतंत्र स्क्रिप्ट लिहायचं त्यानं मान्य केलं. एका गोष्टीबाबत मात्र तो आणि ॲटनबरो या दोघांचंही एकमत झालं. एक म्हणजे, भारताला स्वातंत्र्य कसं मिळालं हे काही आपल्याला दाखवायचं नाही, तसंच चित्रपटाला कोणत्याही प्रकारे एखाद्या रुक्ष राजकीय प्रबंधाचं स्वरूपही येऊ द्यायचं नाही; आपल्याला सांगायची आहे, ती खरोखरच असाधारण, अलौकिक अशा माणसाची कहाणी... त्याचे दोष, त्याच्या उणिवा, त्याचा विकास आणि त्याची महानता... सारं सारं! चित्रपटाचं नावसुद्धा कोणत्याही विशेषण-उपपदाशिवाय नुसतं 'गांधी' एवढंच ठेवायचं.

### अखेर काम मार्गी लागलं

दरम्यान भारतात इंदिरा गांधी पराभूत होऊन मोरारजी देसाई पंतप्रधानपदी आले होते. त्यामुळे आधीच्या सरकारनं 'गांधी' प्रकल्पाबाबत जी आश्वासनं दिली होती, ती नव्या सरकारलाही मान्य आहेत का, याची एकवार खातरजमा करून घ्यायचं ठरलं. ॲटनबरो राणी दुबे यांच्यासह ऑगस्ट १९७८मध्ये भारतात आले. दुबे या इंग्लंडस्थित भारतीय होत्या. त्या सुरुवातीपासूनच या प्रकल्पाबाबत ॲटनबरोंच्या संपर्कात होत्या; त्यांना जमेल तितकी मदत करत होत्या. पुढे त्या 'गांधी' चित्रपटाच्या सहनिर्मात्या झाल्या. नवी दिल्लीत बऱ्याच वजनदार लोकांशी त्यांच्या ओळखी होत्या.

नव्या पंतप्रधानांनीही आधीच्या आश्वासनांवर शिक्कामोर्तब केलं.

तेवढ्यात साऱ्या जगाला हादरवून टाकणारी एक बातमी



**राजस्थानमधून धावत जाणाऱ्या आगगाडीच्या टपावरून केलेलं 'ॲक्शन' चित्रण**

आली. आयर्लंडमध्ये सहकुटुंब सुट्टी घालविण्यासाठी निघालेल्या लॉर्ड लुई माउंटबॅटन यांच्या नौकेवर घातपात्यांनी बॉम्ब टाकून तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवल्या. त्यात इतर तिघांसह लॉर्डसाहेब ठार झाले होते.

आधी पंडितजी गेले; नंतर मोतीलाल कोठारी; आणि आता माउंटबॅटन. (पुढे ॲटनबरोंनी 'गांधी' चित्रपट या तिघांच्या स्मृतीस अर्पण केला.)

१९८०मध्ये इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान झाल्या. ब्रायलीचं स्क्रिप्टही पूर्ण झालं होतं. ॲटनबरो राणी दुबे यांच्यासह भारतात आले. इंदिराजींनी त्यांना आपल्या घरी स्नेहभोजनासाठी आमंत्रित केलं. त्यावेळी त्यांनी चित्रपटाच्या संदर्भात ॲटनबरोंना विचारलं असता त्यांनी तोवरचा वृत्तांत कथन केला. एक प्रकारे इंदिराजीही जवळजवळ आरंभापासूनच या प्रकल्पात भावनात्मकरीत्या गुंतलेल्या होत्याच. त्यांनी ॲटनबरोंच्या साऱ्या आर्थिक समस्या आस्थेनं ऐकून घेतल्या. इंदिराजींनी त्यांना 'गांधी'ची पटकथा माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडे सादर करायला सांगितलं. त्या स्वत: संबंधित मंत्री वसंत साठे यांच्याशी बोलणार होत्या.

परिणामी, साऱ्या सरकारी सोपस्कारातून नि आशानिराशेच्या लपंडावातून गेल्यावर 'नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'नं चित्रपटाच्या एकूण बजेटचा काही अर्थभार उचलण्याचं मान्य केलं. ही सरकारी मदत बरीच वादग्रस्त ठरली. विरोधकांनी टीकेचा एकच गदारोळ उठवला. त्याचेच पडसाद मग चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत सतत उमटत राहिले.

त्यानंतर मात्र हळूहळू आर्थिक समस्या निवळू लागल्या आणि चित्रपटाच्या कामाला गती येऊ लागली. मुळात स्क्रिप्ट चांगलंच बंदिस्त, उत्तम झाल्यानं पायाच भक्कम होता. ॲटनबरोंनी आपला संघ बांधायला करारमदार करायला सुरुवात केली.

### अखेर 'गांधी' सापडले!

कोणत्याही परिस्थितीत गांधीजींच्या भूमिकेसाठी नामवंतच अभिनेता हवा, असा चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेतील बहुतेक खाशांचा आग्रह होता. कुणाही अभारतीय अभिनेत्याला ह्या भूमिकेत घेण्यास नाखूष असलेल्या ॲटनबरोंनी आपली मतं तात्पुरती बाजूस ठेवून डर्क बोगार्ड, पीटर फिंच, अल्बर्ट फिनी आणि टॉम कर्टनी यांना वेगवेगळ्या वेळी 'गांधी'चं स्क्रिप्ट पाठवलं. परंतु त्या सर्वांकडून नकारच मिळाले.

एकीकडे चित्रपटाची पूर्वतयारी चालू असतानाच गांधीजींच्या भूमिकेसाठी ॲटनबरोंच्या डोक्यात एक नाव सारखं घोळू लागलं – बेन किंग्जले. 'रॉयल शेक्सपिअर कंपनी'चा तो एक प्रमुख नट होता. त्याचे वडील भारतीय डॉक्टर होते आणि मँचेस्टरमध्ये

त्यांची प्रॅक्टिस होती. बेनचं मूळ नाव कृष्ण भानजी. पुढे ब्रिटिश रंगभूमीवर काम करू लागताच त्यानं ते बदललं होतं.

ॲटनबरोंनी रंगभूमीवरील त्याच्या काही भूमिका पाहिल्या होत्या. परंतु त्याची जोरदार शिफारस केली होती, ती त्यांचा मुलगा मायकेल यानं. इंग्लंडमध्ये तेव्हा रंगभूमीवर कार्यरत असलेल्या नटांमध्ये तो त्याला अग्रगण्य वाटत होता.

परंतु बेनच्या गुणवत्तेखेरीज आणखीही एक गोष्ट ॲटनबरोंना उपकारक वाटली. बेनचे वडील भारतीय असल्यानं गांधीजी म्हणून पडद्यावर तो अधिक स्वीकारार्ह वाटू शकत होता. त्यामुळे त्याची स्क्रीनटेस्ट घेण्याचं त्यांनी मनाशी पक्कं केलं.

आणि ती टेस्ट पाहून सारेच आश्चर्यानं (तसेच आनंदानं) अवाक होऊन गेले. पडद्यावर आपल्याला एखाद्या अनुबोधपटातील खऱ्याखुऱ्या गांधीजींचंच दर्शन घडतंय असाच साऱ्यांना भास झाला. कल्पनेपलीकडे विश्वासार्ह. गांधीजींच्याप्रमाणेच बेनच्याही डोळ्यांत तेच दुसऱ्याला खिळवून टाकणारे संमोहक भाव होते. तो धोतरही असं नेसला होता, की तो त्याचा जणू रोजचाच पेहराव असावा, असं वाटत होतं. गांधीजींची भूमिका प्रत्ययकारी वठविण्यास या पृथ्वीतलावर केवळ बेन हाच एकमात्र कलावंत, यावर साऱ्यांचंच एकमत झालं आणि एक मोठाच यक्षप्रश्न सुटला.

### ... आणि कस्तुरबाही!

गांधीजींप्रमाणेच त्यांच्या पत्नी कस्तुरबा हीही चित्रपटातली महत्त्वपूर्ण भूमिका. पात्रयोजनाकार डॉली ठाकोर हिनं ॲटनबरोंना अनेक हिंदी चित्रपट दाखवले; हिंदी, मराठी, गुजराती नाटकं दाखवली; त्यांतल्या अनेक नट्यांशी प्रत्यक्षात भेटीही घडवून आणल्या. त्यांतल्या स्मिता पाटीलनं ते चांगलेच प्रभावित झाले. तिच्या ठायी उत्तम बुद्धिमत्ता आणि प्रतिभा असल्याचं त्यांना प्रथमदर्शनीच जाणवलं. परंतु त्यांना ती सुंदर म्हणजे फारच सुंदर वाटली. त्यांनी भक्ती बर्वेचं एक नाटक पाहिलं आणि स्क्रीन-टेस्टसाठी लंडनला येण्याची तिची तयारी आहे काय, असं तिला विचारलं. परंतु तरीही अजून आपल्याला यथायोग्य 'कस्तुरबा' सापडली आहे, असं काही त्यांच्या मनाला आतून वाटत नव्हतं.

पुढच्या तयारीसाठी लंडनला परतण्याच्या बेतात ते असताना एका दुपारी डॉलीचा त्यांना फोन आला. आपलं लंडन-प्रयाण एकदोन दिवसांनी पुढं ढकलता येणं त्यांना शक्य आहे काय, असं ती विचारत होती. कारण कस्तुरबांच्या भूमिकेसाठी तिला आणखी काही कलावती गवसल्या होत्या.

ॲटनबरो या संदर्भातल्या आपल्या आठवणीला उजाळा देताना आत्मवृत्तात लिहितात –

''त्यांतल्या पाचजणींना ती (डॉली) मुंबई विमानतळाजवळील हॉटेलमधल्या माझ्या खोलीत घेऊन आली, तो प्रसंग मला आठवतो. त्यांतल्या एका मुलीचं नाव होतं, रोहिणी हट्टंगडी. ती दारातून आत आली, तत्क्षणी आपल्या काळजाचा एक ठोका चुकल्यासारखं मला वाटलं. कस्तुरबांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीसाठी माझ्या दृष्टीनं अत्यावश्यक, पायाभूत असलेले गुणधर्म तिच्या ठायी असल्याचं मला लागलीच जाणवून गेलं.''

त्याच रात्री त्यांनी तिचं एक नाटक ('रथचक्र') पाहिलं. त्यातला तिचा परस्परविरोधी व्यक्तिमत्त्वांचा डबल रोल पाहून ते थक्कच झाले. एकीकडे, पुरुषाला मोहवश करणारी एक नखरेल तरुणी तर दुसरीकडे, पार दुसऱ्या टोकाची ऐंशी वर्षांची वडीलधारी वृद्धा. ॲटनबरो कमालीचे प्रभावित होऊन गेले. रोहिणीविषयी त्यांच्या मनात फक्त दोनच शंका होत्या. ती कितपत सफाईदार इंग्रजी बोलू शकेल? आणि दुसरं म्हणजे ती रंगमंचावर वाटली तशीच पडद्यावरही प्रभावी वाटेल काय?

भक्ती, स्मिता आणि रोहिणी यांच्यासह ॲटनबरो लंडनला परतले. तिघींनीही आपल्या संवादांवर कसून मेहनत घेतली. तीन दिवस खर्चून जॉन हर्ट आणि बेन किंग्जले यांच्याबरोबर त्यांच्या स्क्रीन-टेस्ट्स झाल्या. त्यांतून खरी निवड स्मिता आणि रोहिणी यांच्यातूनच होणार, हे स्पष्ट झालं.

ॲटनबरोंच्या मते स्मिताची टेस्ट अव्वल व्यावसायिक दर्जाची होती; अभिनय हेलावून टाकणारा होता. रोहिणीची टेस्टही तितक्याच तोडीची होती. पण तिची खासियत म्हणजे, कस्तुरबा या व्यक्तिरेखेशी ती एक प्रकारे आंतरिक जिव्हाळ्यानं समरस झाली होती. शिवाय कुशल रंगभूषेनं ती विशीपासून सत्तरीपर्यंतच्या वयोमानात सहज स्वाभाविकपणे वावरू शकेल, असाही ॲटनबरोंना विश्वास वाटला. त्यामुळे अखेर तिचीच निवड करण्यात आली.

पूर्वतयारीदरम्यान रोहिणी आणि बेन यांच्या रंगभूषा, केशभूषा या संदर्भात कसून चाचण्या घेऊन अगदी बारीकसारीक तपशील निश्चित करण्यात आले.

### ॲटनबरोंचे 'सिक्स्थ सेन्स'

'गांधी'मध्ये बॅ. महंमद अली जिना झाले होते, ॲलेक पदमसी. मुंबईच्या इंग्रजी रंगभूमीवरील पन्नासहून अधिक नाटकांचे निर्माते आणि दिग्दर्शक, उत्तम जाहिरातपटू तसेच 'लिंटास' या भारतातील बड्या जाहिरात कंपनीचे एकेकाळचे सर्वेसर्वा. आपल्या 'अ डबल लाइफ' या आत्मचरित्रात एक संपूर्ण प्रकरण त्यांनी हा चित्रपट आणि आपले अनुभव यांवर लिहिलं आहे.

ॲटनबरो यांच्या सन्मानार्थ मुंबईत आयोजिलेल्या एका पार्टीत ते आणि पदमसी यांची पहिली भेट झाली. पदमसी त्यांना आधीपासूनच ओळखत होते. ॲटनबरोंविषयी त्यांना आदरही होता. ॲटनबरोही मूळचे नाटकवालेच. त्यामुळे साहजिकच त्या भेटीत दोघांच्याही त्याच विषयावर थोड्याफार गप्पा झाल्या.

दुसऱ्याच दिवशी सकाळी ॲटनबरोंनी पदमसींना फोन करून त्यांना आपल्या 'गांधी' चित्रपटात 'जिनांची भूमिका कराल काय,' असं विचारलं. या निवडीसाठी त्यांना पदमसींच्या स्क्रीन टेस्टचीही आवश्यकता वाटत नव्हती. त्यांच्या चित्रपटविषयक अननुभवाचीही ॲटबरोंना अडचण वाटत नव्हती. उलट रंगभूमीचा अनुभवच त्यांना अधिक मोलाचा वाटे. 'गांधी' चित्रपटासाठी त्यांनी महत्त्वाच्या भूमिकांसाठी निवडलेले बेन किंग्जले (गांधी),

रोहिणी हट्टंगडी (कस्तुरबा), रोशन सेठ (नेहरू), सईद जाफ्री (सरदार पटेल), आयन चार्लसन (चार्ली अॅण्ड्र्यूज), डॉ. श्रीराम लागू (गोपाळ कृष्ण गोखले) वगैरे बरेच कलावंत मूळचे रंगभूमीवरचेच. आपला नाट्य-कलावंतांवरच अधिक विश्वास असल्याचंही अॅटनबरोंनी सांगितलं.

आधीचा काहीच परिचय नसताना, केवळ पार्टीतल्या एकाच भेटीवर आपण जिनांसारख्या महत्त्वाच्या भूमिकेसाठी योग्य आहोत, हे त्यांना कसं काय कळलं, याचं पदमसींना नेहमीच नवल वाटे. अखेर एकदा त्यांनी अॅटनबरोंनाच त्याविषयी विचारलं. त्यावर ते म्हणाले, की आपल्याकडे एक 'सिक्स्थ सेन्स' ('सहावी जाण') आहे. हवा तसा माणूस दिसला, की ती टक्कन जागी होते!

त्यांच्या म्हणण्यात चांगलंच तथ्य होतं. रोहिणी हट्टंगडी आणि जेराल्डिन जेम्स (मीराबेन) यांच्या बाबतीतही तसंच झालं होतं. त्यांना पाहताच अॅटनबरोंच्या या सहाव्या जाणेनंच कौल देऊन त्यांच्या निवडीवर तात्काळ शिक्कामोर्तब करून टाकलं होतं.

## बेन किंग्जलेची पूर्वतयारी

'गांधी' या भूमिकेच्या पूर्वतयारीसाठी बेन किंग्जलेला देण्यात आलेली गांधीजींविषयीची सर्व पुस्तकं त्यानी अगदी बारकाईनं पुनःपुन्हा वाचून त्यांचा नीट अभ्यास केला होता. गांधीजींचं ज्या ज्या स्थळी महत्त्वपूर्ण वास्तव्य होतं, त्यांना त्यानं आवर्जून भेट दिली होती.

बेनची उंची साधारणतः गांधीजींशी मिळतीजुळती असली तरी त्याची देहयष्टी मात्र किरकोळ नव्हती, हे मान्यच करायला हवं. परंतु आहारतज्ज्ञांनी सुचवलेल्या मर्यादित आणि शाकाहारी अन्नावरच राहून त्यानं चित्रीकरणास आरंभ होईपर्यंत निर्धारपूर्वक आपलं वजन सुमारे सतरा पौंडांनी घटवलं. गांधीजींच्या सहज शारीरिक हालचाली तंतोतंत साध्य व्हाव्यात म्हणून बेन नित्यनेमानं रोज सायंकाळी नव्वद मिनिटं योगसाधना करी.

एका खास शिक्षकाच्या मदतीनं तो दोन तऱ्हांच्या चरख्यांवर सूत कातायला शिकला. अल्पावधीतच त्यानं त्यात प्रावीण्यही मिळवलं.

हॉटेलमधील त्याची खोली म्हणजे जणू एक पवित्र स्मृतिस्थळच होऊन गेलं होतं. एका संपूर्ण भिंतीवर हालचालींतल्या (इन अॅक्शन) गांधीजींची मोठमोठाली छायाचित्रं (ब्लो अप्स) लावलेली होती. दुसऱ्या भिंतीवर त्यांच्या विविध भावमुद्रांचं दर्शन घडवणारी तशीच मोठाली छायाचित्रं होती.

खोलीतल्या खुर्च्या काढून टाकण्यात आल्या होत्या. त्यांच्याऐवजी जमिनीवर पेंढा भरलेल्या गाद्या आणि लोड-तक्के ठेवण्यात आले होते. बेन एका खाटेवर झोपत असे.

## चित्रीकरणपूर्व तयारीची लगीनघाई

चित्रपटात एकूण १८९ दृश्यं होती. त्यासाठी ८७ दृश्यांसाठी सेट्सची आवश्यकता होती. त्यातले १९ मोठ्या प्रमाणात उभारावे लागणारे होते. आणि सर्वांत मोठा होता तो आश्रमाचा.

### 'गांधी' चित्रपटातील भारतीय कलाकार

**मराठी :**

रोहिणी हट्टंगडी (कस्तुरबा), श्रीराम लागू (प्रो. गोखले), प्रभाकर पाटणकर (प्रकाश), मोहन आगाशे (तय्यब महम्मदांचा मित्र), सुनीला प्रधान (मोतीलाल नेहरूंची पत्नी), मनोहर पितळे (शुक्ल), नाना पळशीकर (खेडूत), सुधीर दळवी (पोलीस कमिशनर), विनय आपटे आणि सुहास पळशीकर (कलकत्ता स्ट्रीटवरील तरुण).

**महत्त्वाच्या भूमिकांतले अन्य :**

सईद जाफ्री (सरदार पटेल), अॅलेक पदमसी (महम्मद अली जिना), अमरीश पुरी (खान), रोशन सेठ (पं. नेहरू), ओम पुरी (नरहरी), वीरेंद्र रझदान (मौलाना आझाद), हर्ष नायर (नथूराम गोडसे), विजय कश्यप (आपटे), निगम प्रकाश (करकरे), सुप्रिया पाठक (मनू), नीना गुप्ता (आभा), अनंग देसाई (कृपलानी), आलोकनाथ (तय्यब महम्मद), जलाल आगा आणि मोती मलकान (ट्रेनच्या छपरावरील प्रवासी), हबीब तन्वीर (भारतीय बॅरिस्टर), पंकज मोहन (महादेवभाई देसाई), पंकज कपूर (प्यारेलाल), सरोजिनी नायडू (तरला मेहता), दिलीप ताहील (झिया), दिलशेर सिंग (अब्दुल गफार खान), इर्पिंदर पुरी (सुशीला नायर), सुदर्शन सेठी (मोतीलाल नेहरू), राज चतुर्वेदी (हरीलाल गांधी), अवपार झिटा (मणिलाल गांधी).

**'गांधी'चे भारतीय तंत्रज्ञ :**

रवि शंकर (संगीत); राणी दुबे (सह-निर्माती); गोविंद निहलानी (सेकंड युनिट डायरेक्टर/कॅमेरामन); सुरेश जिंदाल (असोशिएट प्रोड्युसर); कमल स्वरूप (साहाय्यक दिग्दर्शक); भानू अथय्या (वेशभूषाकार); सिना कौल (भारतीय कपडेपट सल्लागार); राम येडेकर (कला दिग्दर्शक); निस्सार अल्लाना, अमल अल्लाना आणि अरुणा हरप्रसाद (सेट ड्रेसर्स); ए. के. बीर (सेकंड कॅमेरा ऑपरेटर); शमा हबिबुल्ला (प्रॉडक्शन मॅनेजर); देवी दत्त (युनिट मॅनेजर); डॉली ठाकोर (प्रसिद्धी/भारतीय पात्रयोजना).

भारतात उभारण्यात आलेला सर्वांत महत्त्वाचा सेट म्हणजे हा साबरमती आश्रम. 'अशोक' हॉटेलपासून साधारणतः चाळीस मिनिटांच्या वाहन-अंतरावर असलेल्या यमुना नदीच्या तीरावर अनेक एकर जागेवर तो होता. गांधीजींनी करून ठेवलेल्या वर्णनानुसार तो हुबेहूब दिसावा, यासाठी प्रॉडक्शन डिझायनर स्टुअर्ट क्रेग यानं परिश्रमांची पराकाष्ठा केली. सुमारे सहा महिने आधीच तो उभारण्यात आल्यामुळे प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वेळेपर्यंत ऊनपाऊस झेलल्यानं नवटपणाच्या उरल्यासुरल्या खुणा पुसल्या जाऊन तो बऱ्यापैकी जुना आणि वापरात असल्यासारखा दिसू लागला होता. याच ऊनपावसामुळे

आजूबाजूच्या शेतांत लावलेली झाडं, पिकंही आता चांगली तरारली होती.

दिल्ली आणि तिच्या आसपासच्या चित्रीकरणाच्या एकूण दहा आठवड्यांपैकी जास्तीत जास्त वेळ या आश्रमाच्या सेटवरच खर्ची पडला. तिथल्या एकूण वातावरणाचा माहोलच मुळी शांत, गंभीर, प्रसन्न असा होता. साऱ्या गांधी युनिटवर त्याचा लक्षणीय प्रभाव पडला होता. यामुळे आपोआपच परस्परांतील सौहार्दाची, सामंजस्याची आणि सहकार्याची भावना वाढीस लागून स्नेहबंध अधिक दृढावत गेले, असं आपलं निरीक्षण ॲटनबरो यांनी आवर्जून नोंदवून ठेवलं आहे.

पुराभिलेख खात्याच्या दफ्तरखान्याचा धांडोळा घेऊन जुनी छायाचित्रं मिळवून, त्यांचा अभ्यास करून, मग १९१७ मधलं 'गाव' उभारलं गेलं. ऐतिहासिक दृष्ट्या सारं काही कालानुरूप यथातथ्य असलं पाहिजे, यावर विशेष कटाक्ष होता. त्या काळातील छपरांवरची हाती बनावटीची कौलं, मुलांची लाकडी घसरगुंडी, ओटीवरचा गुजराती झोपाळा, स्वयंपाकघरातील भांडीकुंडी, गोठ्यातील गुरंढोरं, पिंजऱ्यातले पोपट... अगदी त्या काळातल्या खास घाटाच्या पिकदाण्यादेखील.

दरम्यान सुमारे ४५,००० पौंड वजनाची तांत्रिक आणि कार्यालयीन साधनसामग्री इंग्लंडहून भारतात वाहून नेण्यासाठी एक 'बोइंग ७०७' चार्टर करण्यात आलं. चार मोठाली वाहनं (त्यात एक जनरेटर), दोन फिरती (मोबाईल) स्वयंपाकघरं आणि एक फूड रेफ्रिजरेशन ट्रक एवढ्या गोष्टी सागरी मार्गानं पाठवण्यात आल्या. सर्व तंत्रज्ञ आणि संवाद बोलणारे १५० कलावंत, तसंच गर्दीसाठी येणारे काही रोजगारी तर काही हौशी स्वयंसेवी, अशा सहस्रावधी लोकांच्या पोटापाण्याच्या तरतुदीचा हा सरंजाम होता.

भारतातील चित्रीकरणाची लोकेशन्स (चित्रणस्थळं) दिल्ली, मुंबई, पाटणा, अमृतसर, पुणे, उदयपूर, पोरबंदर आणि अलाहाबाद अशा निरनिराळ्या ठिकाणी पसरली होती. ती सर्व अस्सल होती. त्यांत झोपडपट्टीपासून शाही प्रासादांपर्यंत आणि माळरानांपासून नदीकिनाऱ्यांपर्यंत विविधता होती. निष्णात अशा वेचक १०२ ब्रिटिश आणि १२३ भारतीय तंत्रज्ञांचा संघ चित्रपटासाठी राबत होता. दृश्यांच्या मागणीनुसार त्यांची संख्या कमीअधिक होई. प्रवासासाठी गरजेनुसार बसेस, कार्स, ट्रेन्स, विमानं या वाहनांचा वापर होई. तंत्रज्ञ आणि कलावंतांना चित्रीकरणादरम्यान सर्व प्रकारच्या हवामानाला तोंड द्यावं लागलं. हाडं गोठवून टाकणारी दिल्लीची हिवाळ्यातली थंडी आणि भाजून काढणारा राजस्थानातला एप्रिलमधला उष्मा! चित्रीकरण एकूण २६ आठवडे (२४ भारतात; २ लंडन नि आसपास) झालं.

### चित्रीकरणास आरंभ

दि. २६ नोव्हेंबर १९८०.

दिल्लीच्या पश्चिमेस पंचवीस मैलांवर असलेल्या सिकंदरापुरा घासी नामक एका खेड्यात आज 'गांधी' चित्रपटाच्या चित्रीकरणास आरंभ होणार होता.

भल्या सकाळी सर्व कलाकार आणि तंत्रज्ञ कार्यस्थळी उपस्थित होते. दिल्लीचा कडाक्याचा गारठा असूनही प्रत्येकाच्या गात्रांतून उत्साहाची, उत्सुकतेची ऊब सळसळत होती.

चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक रिचर्ड ॲटनबरो यांचं गेल्या सुमारे दीड तपाचं स्वप्न आता थोड्याच वेळात आकार घेऊ लागणार होतं. त्यांच्यावर जबाबदारीचं ओझं अर्थातच सर्वाधिक होतं. मात्र ते अविचल होते. ब्रिटिश शिस्तीतल्या ॲटनबरोंनी चित्रीकरणाची संपूर्ण योजना बारीकसारीक तपशिलांनिशी अगदी काटेकोर आखली होती.

चित्रीकरणाचा मुहूर्त पारंपरिक हिंदू पद्धतीनं झाला. हिंदू उपाध्यायांनी यथासांग कॅमेऱ्याची पूजा केली; नारळ वाढवण्यात आला; प्रसाद वाटण्यात आला. आणि मग लागलीच कामाला सुरुवात झाली.

लोकेशनवरील जी बत्रा खाण वापरण्यात येत होती, ती चित्रपटात दक्षिण आफ्रिकेतील एक खाण म्हणून दाखवण्यात येणार होती. तरुण गांधी आपल्या राजकीय कारकिर्दीच्या प्रारंभकाळातील ब्रिटिश सरकारविरोधी आंदोलन तिथं छेडतात, असं दृश्य होतं. हे सारंच दृश्य मोठं गुंतागुंतीचं होतं. या चित्रीकरणासाठी प्रथमतःच लूमा क्रेन वापरण्यात येणार होती. ती पूर्ण ३६० अंशात फिरवता येत असल्यानं एका टेकमध्ये फार मोठा परिसर टिपून दृश्याची भव्यता साधता येत होती. नेहमीच्या यंत्रेणनं हे साधता येणं अशक्य होतं. या दृश्यात अश्वारूढ पोलिसदलासह सुमारे तीनशेजणांचा जमाव होता.

गांधीजींच्या भूमिकेतील बेन किंग्जले अगदी आरंभापासूनच पूर्णतया आत्मविश्वासपूर्वक वावरत होता. भूमिकेच्या पूर्वतयारीसाठी त्यानं कसून मेहनत घेतली होती. आपल्याला कोणतं शिवधनुष्य पेलायचं आहे, याची त्याला पुरेपूर कल्पना होती. या भूमिकेत आपण जरा जरी कमी पडलो तर सारा चित्रपटच भयंकर टीकेला पात्र होऊन कोसळेल, हे तो मनोमन ओळखून होता. मात्र या संभाव्य धोक्याच्या कल्पनेनं भयग्रस्त होण्याऐवजी त्याची जिद्दच उफाळून आली होती.

बेननं महात्मा आपल्या अंगी किती भिनवला आहे, याची प्रचिती पहिल्या दिवशीच्याच चित्रीकरणापासून येऊ लागली.

दुसरं दृश्यही महत्त्वाचं होतं. १९१५ साली गांधीजी भारतात परतल्यानंतरचं. एका भल्या मोठ्या मंडपात ते चित्रित करण्यात आलं. मंडपात तेराशेहून अधिकच माणसांचा जमाव होता. गांधीजींच्या भूमिकेतील बेनला भाषणासाठी व्यासपीठावर आमंत्रित करण्यात येतं. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कोणता मार्ग अनुसरायला हवा, याविषयीचं ते भाषण होतं. कळकळीनं ओथंबलेलं बेनचं ते भाषण इतकं हृदयस्पर्शी आणि मंत्रमुग्ध करणारं झालं, की ते संपल्यावर कितीतरी वेळ टाळ्यांचा कडकडाट होत राहिला... मंडपातल्या जमावाकडून आणि चित्रपटाच्या तंत्रज्ञांकडूनही!

चित्रीकरणाच्या तिसऱ्या आठवड्यात रोहिणी प्रथम सेटवर अवतीर्ण झाली. तिचं पहिलंच दृश्य होतं, ते दोन हजारांहून अधिक लोकसमुदायापुढे भाषण देण्याचं. ती आणि स्वतः

ॲटनबरोही मनातून काहीसे धास्तावलेले होते. पण आपलं हे पहिलंच दृश्य तिनं अत्यंत उत्कृष्ट दिलं. तिचं इंग्रजी निर्दोष, सफाईदार होतं.

बेनप्रमाणेच तिनंही आपल्या भूमिकेवर अगदी शिस्तबद्ध परिश्रम घेतले. तिनंही सूतकताईत प्रावीण्य मिळवलं. कस्तुरबांविषयी जे जे हाती लागेल ते ते ती वाचून काढत होती; त्यावर मनन करत होती. आपल्या इंग्रजी संवादांचा ती अगदी तपशिलात जाऊन अभ्यास करी.

इंग्रजीबाबतच्या तिच्या या परिश्रमांना दाद देत ॲटनबरो आपल्या पुस्तकात म्हणतात, ''(मुळात) एक मराठी नाट्यकलाकार असल्यानं ती मोजकंच इंग्रजी बोले. परंतु चित्रपटाचं काम संपेपर्यंत ती आम्हां सर्वांशी अगदी सफाईदार बोलू लागली होती.''

### गांधीहत्येचं दृश्य : बेन आणि हर्ष

चित्रपटाच्या आरंभी येतो, तो गांधीहत्येचा सीक्वेन्स. जिथं प्रत्यक्षात ती महाभयंकर घटना घडली त्या बिर्ला हाऊसच्या गार्डनमध्येच केलेलं चित्रण. पुरा आठवडाभर युनिट तिथं काम करीत होतं. चित्रीकरणास काही अटींवरच परवानगी मिळाली होती. युनिटमधला तसंच जमावामधला (मॉब) प्रत्येकजण त्या अटींचं काटेकोरपणे पालन करत होता. हिरवळीवर जिथं गांधीजींनी अखेरचा श्वास घेतला, ती जागा श्रद्धेय असल्यानं तिच्या पावित्र्यास जराही धक्का लागू नये, यावर विश्वस्तांचा कटाक्ष होता. सर्व जण केवळ नियम म्हणूनच नव्हे, तर आंतरिक श्रद्धेनं ती काळजी घेत. त्यामुळे तिथं वावरताना कुणीही पादत्राणांचा वापर करत नव्हतं. सारेच अनवाणी वावरत.

प्रत्यक्ष गांधीहत्येचं दृश्य चित्रित करायचं होतं, त्या दिवशी अख्खं युनिटच एक प्रकारच्या तणावाखाली होतं. वस्तुत: ॲटनबरोंच्या काटेकोर शिस्तीमुळे पूर्वतयारी पक्की होती. सारं काही जिथल्या तिथं होतं. आयत्या वेळी कशासाठीही धावपळ करावी लागणार नव्हती. पण तरीही...

जो तो कामापुरतंच एकमेकांशी बोलत होता. एक विरोधाभासाची गोष्ट म्हणजे, गांधीजींचा मारेकरी नथूराम गोडसे ही भूमिका करणारा हर्ष नायर हा गांधीचरित्रकार प्यारेलाल नायर यांचा पुतण्या होता. तसा तो शारीरिकदृष्ट्या फारसा नथूरामसारखा दिसत नव्हता. तरीही ॲटनबरोंनी त्याची त्या भूमिकेसाठी निवड केली, ती त्याच्या डोळ्यांमुळे. ते भेदक होते; नजर एकटक होती; पापण्या क्वचितच लवत. तो चित्रीकरणाच्या आधीपासूनच खूप अस्वस्थ होता. तो बेनशी बोलत नव्हता, की त्याच्या आसपासही जात नव्हता. चित्रीकरणापर्यंत तो जणू त्याला टाळतच होता.

गांधीजींच्या मृत्यूचा प्रसंग जेव्हा चित्रित झाला, तेव्हा उपस्थित कलावंत, तंत्रज्ञ आणि जमाव या साऱ्यांवरच एक विलक्षण परिणाम झाला. सारेच सुन्न होऊन गेले. बेन तर नखशिखान्त नुसता थरथरत होता. त्या दृश्याचं चित्रण आटोपून ॲटनबरो त्याच्यासह छोट्या विश्रामासाठी व्हॅनकडे जात असता तो त्यांना म्हणाला, की आजवरच्या अभिनय कारकिर्दीत आपण आजच्यासारखी विलक्षण मन:स्थिती पूर्वी कधीच अनुभवली नव्हती.

गांधीहत्येच्या दृश्याचा अपवाद वगळता भावनांवर जबरदस्त आघात करणारं, चित्रपटातील अत्यंत भव्य (आणि अवघडही) दृश्य म्हणजे भारतीय इतिहासातलं अत्यंत निर्घृण असं 'जालियनवाला बाग हत्याकांड'. त्या चित्रणाच्या वेळीही अशाच काहीशा अनुभवातून जावं लागलं.

### अंत्ययात्रेच्या भव्य दृश्याचं चित्रीकरण

३१ जानेवारी १९८१ (प्रत्यक्ष घटना घडल्यानंतर बरोबर ३३ वर्षांनी) रोजी तंत्रज्ञांनी 'गांधी' चित्रपटातील सर्वाधिक अवघड आणि भव्य दृश्याचं चित्रीकरण केलं. प्रात:काळापासून तिन्हीसांजा होईपर्यंत, मैलभर लांब असलेल्या राजपथावरून राजघाटाकडे चाललेल्या गांधीजींच्या अंत्ययात्रेचं. शोकाकुल असा प्रचंड जनसमुदाय महात्म्याच्या पुष्पावृत अचेतन देहाला अखेरची सोबत करत होता.

प्रचंड जनसमुदाय असलेलं, चित्रेतिहासात संस्मरणीय ठरलेलं हे एक विराट दृश्य. त्यात महत्त्वाच्या प्रमुख भूमिका साकारणाऱ्या १४ कलाकारांखेरीज पोलीस नि लष्कर यांच्या सहा विविध शाखांची एकूण १०६० गणवेशधारी माणसं; शववाहक गाड्याच्या आसपास सबंध दिवसभर वावरणारे १००० शोकग्रस्त (३३ वर्षांपूर्वीच्या मूळ व्यक्तींसारखीच त्यांची वेशभूषा ठेवण्यात आली होती); गर्दीचा बंदोबस्त राखणारे ३००० होम गार्ड आणि ८९,५०० लोकांचा शिस्तबद्ध जमाव भाग घेत होता. या दृश्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी ११ कॅमेरे नेमस्त केले होते. त्यांनी निश्चित केलेल्या चित्रण-क्षेत्रांनुसार गर्दीतल्या लोकांना रस्त्यावरील वेगवेगळे विभाग वाटून दिले होते. कॅमेऱ्यांची हाताळणी भारतीय, सध्या भारतातच असलेले ब्रिटिश आणि खास या दृश्यासाठी इंग्लंडहून मागवलेले आणखी ब्रिटिश तंत्रज्ञ यांचा ताफा करत होता.

या अंत्ययात्रेच्या दृश्यासाठी प्रचंड प्रमाणावर जनसमुदायाची आवश्यकता होती. एवढे लोक जमवणं, त्यांना त्यांचा मेहनताना देणं, ही गोष्ट ॲटनबरोंच्या हाताबाहेरची होती. त्यांनी गांधीजींच्या पुण्यतिथीच्या दुसऱ्या दिवशीच चित्रीकरण निश्चित केलं. कारण दर वर्षीप्रमाणेच बाहेरचेही खूप लोक श्रद्धांजली वाहण्यासाठी दिल्लीत येणार होते. त्यांनी, तसंच स्थानिकही लोकांनी दृश्यात भाग घेण्यासाठी एक आवाहनात्मक जाहिरात चित्रीकरणाच्या आदल्या दिवशी ३० जानेवारीला 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये झळकली –

'उद्या ३१ जानेवारीस इतिहासाची पुनर्निर्मिती होणार आहे. आपण तेव्हा तिथं असाल?'

अवघ्या दोन वाक्यांची पण अत्यंत कल्पक अशी ही जाहिरात कमालीची परिणामकारक ठरली आणि चित्रीकरणाच्या दिवशी हा हा म्हणता राजपथ गर्दीनं ओसंडून गेला.

नेहमी भरपूर वर्दळ असलेला राजपथ या दृश्यासाठी एका सकाळपुरता बंद राखण्याचा परवाना मिळवण्यात आला होता.

दिल्लीकरांनी जमावामध्ये सामील व्हावं म्हणून आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून आवाहनं करण्यात आली होती. या सर्वांना पैसे नाही, तरी लंच पॅक्स देण्यात आले.

आणखी एक महत्त्वाचं दृश्य चित्रित झालं, ते मुंबईच्या गोद्यांत, दक्षिण आफ्रिकेतील नागरी हक्कांसाठीच्या मोहिमेवरून वीस वर्षांनी गांधीजी मायभूमीस १९१५मध्ये परततात, ते दृश्य. त्याकरिता त्या जमान्यातली एक आगबोट आणि भारतीय तसेच ब्रिटिश यांचा फार मोठा जनसमुदाय यांची गरज होती. जमावासाठी मुंबईत पुरेसे इंग्लिश वा अमेरिकन्स मिळू शकत नसल्यानं गोव्यात वास्तव्य करून असलेल्या हिप्पींना मुद्दाम आमंत्रून आणवण्यात आलं; त्यांचे लांब केस पुरेसे छाटून त्यांच्या अंगावर खाकी वर्द्या चढवण्यात आल्या. त्या काळातील लोकांचे पेहराव नि लष्करी गणवेश यांचा संशोधनात्मक अभ्यास करून वेशभूषाकार जॉन मोलो नि भानू अथय्या यांनी या दृश्याचा खास कपडेपट तयार केला होता.

हे दृश्य कॅमेराबद्ध झालं आणि दिल्ली परिसरातील चित्रीकरण आटोपलं.

ॲटनबरो नेहमी कार्यव्याप्त असले तरी विशेषतः 'गांधी' चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या काळातील त्यांचा दिनक्रम पाहण्यासारखा आहे. सकाळी पाच ते सायंकाळी सात वा आठ वाजेपर्यंत त्यांचं दिग्दर्शनकार्य चाले. त्यानंतर हॉटेलवर परतल्यावर प्रॉडक्शन टीमबरोबर दोनदोन चारचार तास बैठका चालत. आठवड्यात अनेकदा लंडनहून टेक्निकल लॅबमधून येणारे रशेस पाहण्यास त्यांचा जागेपणाचा अवधी आणखी वाढे.

चित्रीकरणादरम्यान ॲटनबरो अगदी मिनिटामिनिटाला महत्त्व देत. प्रत्येक कलावंताला रात्री दुसऱ्या दिवशीचं त्याचं वेळापत्रक (कॉल शीट) दिलं जाई. त्यावर काटेकोर नोंदी असत. उदा. –

सकाळी ५-३० वा. उठवलं जाईल; ६-०० वा. खोलीत नाश्ता दिला जाईल; ६-३० वा. हॉटेलमधील ठरलेल्या ठिकाणी मेकअप केला जाईल; ७-०० वा. चित्रीकरण स्थळी नेण्यासाठी गाडी येईल...

पदमसींना त्यांच्यावरील चित्रीकरणाच्या पहिल्याच दिवशी गाडीसाठी लॉबीत येण्यास फक्त दोनच मिनिटं उशीर झाला. गाडी त्यांच्यासाठी न थांबता निघून गेली होती. त्यांना धडा मिळाला. त्यांचा हा पहिलाच दिवस असल्यानं ॲटनबरोंनी त्यांची गय केली, पण सुनावलंही, "आम्हांला या चित्रपटाचा खर्च मिनिटाला एक हजार पौंड इतका येतो. दोन मिनिटं म्हणजे दोन हजार पौंड नाहक वाया गेले."

### भरतवाक्य

'गांधी'चं भारतातलं सर्व चित्रीकरण आटोपलं. पूर्वनियोजित कालावधीहून तीनच दिवस ते ओव्हर शेड्यूल झालं. सर्व ब्रिटिश मंडळी आपल्या भारतीय सहकाऱ्यांचा निरोप घेऊन मायदेशी परतली आणि लागलीच तिथल्या कामाला लागली. तिथं आता फक्त दोनच आठवड्यांचं चित्रीकरण बाकी उरलं होतं. त्यात पाहुणे कलाकार सर जॉन गिलगुड आणि ट्रेव्होर हॉवर्ड यांनी भाग घेतला.

रविवार दि. १० मे १९८१. 'गांधी' चित्रपटाच्या एकूण चित्रीकरणाचा १२६वा दिवस.

लंडनच्या शेड्यूलमधल्या शेवटच्या दृश्याचं चित्रीकरण. नं. १० डाउनिंग स्ट्रीटच्या बाह्यभागात योजिलेलं. गांधीजी पंतप्रधान रॅमसे मॅक्डॉनल्ड यांचा निरोप घेतात, असं.

साधारणतः दिवसाला किमान १ मिनिट २९ सेकंद स्क्रीन टाइम अशा गतीनं चित्रीकरण होत गेलं. संकल्पित साध्य गाठण्यासाठी युनिटला एकूण ५,२५,१५० फूट इतकी फिल्म (रॉ स्टॉक) एक्स्पोज करावी लागली. (प्राथमिक संकलनात चित्रपट सव्वा तीन तासांचा झाला. पुढे कुशल संकलक जॉन ब्लूमनं तो तीन तास सात मिनिटांवर आणला.)

चित्रीकरण हे जरी मुख्य काम आटोपलं असलं तरी बाकी लहानमोठी नि वेळखाऊ बरीच कामं शिल्लक होतीच. त्यातलं महत्त्वाचं म्हणजे संगीत. त्यासाठी ॲटनबरोंनी जागतिक कीर्तीचे कलावंत रवी शंकर यांचं नाव मनाशी केव्हाच निश्चित करून ठेवलं होतं आणि त्याबद्दल खूप आधीच बोलणं केलं होतं. रवीजींनीही या प्रकल्पात कमालीचं स्वारस्य दाखवलं.

ऑक्टोबरमध्ये ॲटनबरो मुंबईस आले. तिथं त्यांनी रवी शंकर यांना एका मिनी थिएटरात प्राथमिक संकलन झालेला संपूर्ण चित्रपट दाखवला. तो पाहून ते इतके प्रभावित झाले, की अशा प्रकल्पात सहभागी होणं, ही आपल्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट असल्याचं ते अगदी उत्स्फूर्तपणे म्हणाले. त्याच मुक्कामात 'गांधी'च्या संगीताच्या बाबतीत दोघांनी आपापल्या विचाराचं आदानप्रदान केलं. ॲटनबरो यांनी आपलं वेळापत्रक सांगितलं नि रवी शंकर आपल्या कामाला लागले.

जानेवारी १९८२च्या दुसऱ्या आठवड्यात रवी शंकर आणि त्यांचे गायक-वादक यांचं इंग्लंडमध्ये आगमन झालं, तेव्हा तिथं हिमवर्षा अगदी भरात होती. त्यामुळे पुढील समस्या लगेच लक्षात आली. भारतीय वादकांकरिता त्यांना सोयीचं असं तापमान रेकॉर्डिंग स्टुडिओत उपलब्ध करून देणं आवश्यक होतं. एक तर ते त्यांच्या हस्तकौशल्याकरिता उपकारक होतं आणि दुसरं म्हणजे त्यांच्या वाद्यांच्या नैसर्गिक ध्वनीवर होऊ शकणाऱ्या विकृत परिणामास प्रतिबंधक ठरणारं होतं.

रवी शंकरांचा संगीतवृंद चांगलाच कसलेला, वेचक आणि नामवंत होता. सतारीवर स्वतः रवी शंकरच होते. त्याखेरीज विजय राघव राव (बासरी), सुलतान खान (सारंगी), शरद कुमार (शहनाई), टी. के. रामकृष्णन (मृदंगम) ही मंडळी होती. स्वर लक्ष्मी शंकर यांचे होते. काही भारतीय वाद्यांचे स्वर त्या पाश्चिमात्य ध्वनिमुद्रणालयात प्रथमच घुमले होते. रेकॉडिग पुरं होण्यास सात दिवस लागले. परंतु ज्यांनी ज्यांनी ते संगीत ऐकण्यासाठी स्टुडिओला भेट दिली, त्या सर्वांनी त्याची मुक्त कंठानं प्रशंसा केली. कोणत्याही बाबतीत तडजोड न करता केलेल्या त्या भारतीय कलावंतांच्या श्रमांचं सार्थक झालं.

संकलन, डबिंग, ध्वनिमिश्रण, स्पेशल इफेक्ट्स वगैरे उरलेले

सारे सोपस्कार पूर्ण होऊन जून १९८२मध्ये 'गांधी' चित्रपट लोकांसमोर येण्यास सज्ज झाला. वीस वर्षांपूर्वी पाहिलेलं एक स्वप्न साकार करण्यासाठी रिचर्ड ॲटनबरो नामक एका जिद्दी ब्रिटिश नटानं आरंभिलेल्या अथक श्रमयज्ञाची कुणाही चित्रपट-व्यावसायिकाला हेवा वाटावा अशीच सांगता झाली.

## माणसांसाठी माणसाची गोष्ट

'गांधी' चित्रपटास आरंभ होतो.

गांधीहत्या आणि गांधीजींची विराट अंत्ययात्रा हे महत्त्वाचे सीक्वेन्स झाल्यानंतर फ्लॅशबॅक सुरू होतो.

रात्रीच्या अंधारातून शिट्टी फुंकत, धडाडत जात असलेल्या ट्रेनचं दृश्य येतं. त्या पार्श्वभूमीवर अक्षरं येतात, 'दक्षिण आफ्रिका : १८९३'

ट्रेनमधला पहिल्या वर्गाच्या कंपार्टमेंटमध्ये खिडकीजवळच्या सीटवर बसून तरुण गांधी पुस्तक वाचण्यात दंग. मस्तकावर काळेभोर दाट केस. चेहरा देखणा. याआधी बिर्ला हाउसमधील सिक्वेन्समध्ये पाहिलेल्या त्यांच्या डोळ्यांमुळे आपल्याला इथं त्यांची ओळख पटते. कंपार्टमेंटमध्ये ते आणि एक कृष्णवर्णीय पोर्टर यांच्याखेरीज तिसरं कुणीही नाही.

कंपार्टमेंटवरून जाणारा एक युरोपियन दारात थबकतो. पहिल्या वर्गाच्या डब्यात एक काळा आदमी पाहून तो थक्क होतो. पोर्टर त्याच्याकडे अस्वस्थपणे पाहतो; हलक्या, पडेल आवाजात गांधींना विचारतो, ''माफ करा साहेब, पण दक्षिण आफ्रिकेत तुम्ही किती काळ आहात?''

गांधी गोंधळून म्हणतात, ''का बरं? एक आठवडा.''

''मला कळत नाही, की तुम्हांला पहिल्या वर्गाचं तिकीट कसं काय...''

अचानक तो घाबरून त्यांच्याकडे पाठ करतो नि आपल्या कामाकडे वळतो. तो कशासाठी एवढा घाबरला ते पाहण्यासाठी गांधी दाराकडे नजर वळवतात. मघाच्या त्या युरोपिअनासह गाडीचा कंडक्टर काचेचं दार उघडून आत येतो. उर्मटपणे गांधींकडे पाहत तो दरडावून विचारतो, ''ए कूली, तू इथं या कंपार्टमेंटमध्ये काय करतो आहेस?''

आपल्याशी कुणी अशा रीतीनं बोलेल, यावर गांधींचा विश्वासच बसत नाही. खिशातून तिकीट काढत ते म्हणतात, ''का बरं? माझ्यापाशी तिकीट आहे. फर्स्ट क्लासचं तिकीट.''

''कसं काय मिळालं तुला हे?'' कंडक्टरचा उद्धट प्रश्न.

''मी पोस्टानं मागवलं. मी ॲटर्नी आहे. आणि मला वेळ नसतो.''

''दक्षिण आफ्रिकेत कुणीही काळे ॲटर्नीज नाहीत,'' लागलीच तो युरोपियन बरळतो, ''जा, पुढच्या स्टेशनावर उतर आणि जिथं तुझी खरी जागा आहे तिथं जाऊन बैस.''

तो जोरजारानं ट्रेनच्या पाठीमागच्या दिशेस हस्तनिर्देश करतो. गांधी संभ्रमित होतात. पुढचा संभाव्य अप्रिय प्रसंग टाळण्यासाठी पोर्टर रॅकवरील त्यांच्या सामानास हात घालत म्हणतो, ''तुमचं सामान मी पाठीमागे नेऊन ठेवतो, साहेब.''

गांधी त्याला थांबवतात आणि कोटाच्या खिशातून एक कार्ड काढून कंडक्टरला देतात.

''पाहा, पाहा,'' ते सांगतात, ''मोहनदास के. गांधी, ॲटर्नी ॲट लॉ. एका भारतीय व्यापारी फर्मसाठी केस चालवण्यासाठी मी प्रिटोरियाला चाललो आहे.''

''मी काय म्हणालो ते ऐकलं नाहीस का तू?'' युरोपियन कडाडला. ''दक्षिण आफ्रिकेत कुणीही काळे ॲटर्नीज नाहीत.''

''तर मग सर, माझ्या रूपानं एक तरी काळा ॲटर्नी दक्षिण आफ्रिकेत आहे.''

पोर्टर थक्क होऊन गांधींकडे पाहातच राहतो. युरोपिअनाचा क्रोध उत्कलन बिंदूकडे झेपावतो आणि हातवारे करत तो किंचाळतो, ''स्मार्ट ब्लडी काफिर! थ्रो हिम आउट!''

इतक्यात गाडी स्टेशनात येऊन थांबते. त्यासरशी जणू वाटच बघत असलेला कंडक्टर गांधींना गाडीतून बाहेर फलाटावर ढकलून देतो आणि पाठोपाठ त्यांचं सामानही.

आपण मनोमनी संतप्त होतो. हे पडद्यावरचं दृश्य आहे, याचा क्षणमात्र विसर पडतो.

गाडीची एक कर्णपटू शिट्टी रात्रीच्या नीरव वातावरणाला छेद देते. इंजिनातून निघालेल्या वाफेचा ढग अंधाराच्या तोंडाला पांढरं फासतो. धापा टाकत गाडी तिथून पळ काढते.

ती दिसेनाशी होईपर्यंत तिच्याकडे आंधळ्या नजरेनं पाहत गांधी सुन्नबधिरपणे उभे आहेत.

स्टेशनातल्या मळकट खाकी प्रकाशात फलाट झाकोळून निघाला आहे.

एकाकी फलाट. एकाकी गांधी. अवमानित, संतप्त आणि हतबल. कुणातरी तान्ह्या बाळाचं कोवळं आक्रंदन कानांवर येतं. बाजूलाच कुठंतरी अंधारात उभ्या असलेल्या कुणा मातेच्या धूसर आकृतीकडे कॅमेरा हलकेच वळतो. ती आपल्या रडणाऱ्या लेकराची समजूत काढत असते.

कॅमेरा झपकन टॉप ॲंगलला जातो. वरून सारा फलाट नजरेच्या टप्प्यात येतो. सुना सुना. त्यावर उभे असलेले गांधी अधिकच एकाकी, असहाय आणि हरवलेले वाटू लागतात.

पुन्हा काळजात कळ उठते. वाटतं, की ते गांधी आहेत, की आपण स्वत:च? त्या वेळची त्यांची मन:स्थिती केव्हाच आपल्यात भिनू लागलेली असते. आपण आणि गांधी यांच्यातलं द्वैत विरून जातं. इथून पुढे गांधी आपल्यासाठी एक नेता, राजकारणी म्हणून न राहता निखळ माणूसच उरतात. त्याच दृष्टीतून आपण पुढचा सारा चित्रपट पाहत राहतो.

अखेर माणसांना माणसांच्याच गोष्टी अधिक भावतात. आणि मनाला भिडतातही!

*(दिवाळी २००७)*

# आपली क्रीडासंस्कृती

**भीष्मराज बाम**

कणखर शरीर आणि कणखर मन खेळाच्या मैदानावरच घडते, हे ठाऊक असलेल्या ग्रीकांनी ऑलिंपिक स्पर्धा सुरू केल्या. सतत साडेअकराशे वर्षे भरत आलेल्या या स्पर्धांत राजे, सेनापती, योद्धे तर भाग घेतच असत; पण तत्त्वज्ञ म्हणून इतिहासात प्रसिद्ध असलेल्या सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, प्लेटो आणि पायथॅगोरसचाही ऑलिंपिकच्या यशस्वी स्पर्धकांत आणि प्रशिक्षकांत समावेश होता.

महेन्द्रसिंह धोनीच्या संघाने जागतिक चषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला, तेथपासून तो ११ एप्रिल २०११ रोजी अंतिम फेरी जिंकेपर्यंत सर्व भारतवासीयांना दुसरे काही सुचतच नव्हते. जागतिक चषक पटकावल्यावर जो जल्लोष झाला त्याला तोड नव्हती. असाच जल्लोष २० षटकांच्या स्पर्धांत भारताने जागतिक चषक जिंकला तेव्हाही झाला आणि १९८३मध्ये कपिलच्या संघाने एक दिवसीय सामन्यांचा चषक जिंकला तेव्हाही झाला होता.

भारतीयांच्या या क्रिकेटप्रेमाबद्दल सर्वांना नवल वाटते. पण त्यांना सर्वसामान्य जनतेची मानसिकता समजत नाही. युरोपचे वा दक्षिण अमेरिकेचे फुटबॉलचे वेड आणि आपले क्रिकेटचे वेड यांत फार मोठा फरक आहे. आपण विजयासाठी आसुसलेले आहोत. जागतिक चषक स्पर्धेत भारतीय संघ लवकर बाद झाला असता, तर एकूण स्पर्धेला प्रेक्षकांचा प्रतिसाद कितपत मिळाला असता त्याची शंकाच आहे. रणजी ट्रॉफी स्पर्धा ही आपली क्रिकेटची राष्ट्रीय स्पर्धा आहे. त्यात मुंबई विरुद्ध कर्नाटक असा उपांत्य फेरीचा सामना चालू असताना व दोन्ही संघांत उत्तम खेळाडू असतानाही प्रेक्षकांची संख्या खेळाडूंपेक्षा कमी होती!

राष्ट्रीय भावना जागी करायला क्रीडाक्षेत्रात अजिंक्य संघ निर्माण करणे किती महत्त्वाचे आहे, ते आमच्या समाजधुरीणांना अजून समजलेले दिसत नाही. नाहीतर भारतात क्रीडाक्षेत्र इतके उपेक्षित राहिले नसते. क्रिकेट तसा प्रेक्षकांना आकर्षित करू शकणारा खेळ आहे. ब्रिटिशांनी जिथे राज्य केले, त्या बहुतेक सर्व ठिकाणी तो लोकप्रिय आहे. पण स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या राज्यकर्त्यांनी, नोकरशहांनी आणि क्रीडासंघटकांनी एकूण क्रीडा विकासाकडे अक्षम्य असे दुर्लक्ष केले आहे. आज आपल्या क्रीडाक्षेत्रावर प्रचंड प्रमाणात आणि पुष्कळसा अनाठायी खर्च होत आहे, पण खेळाडूंच्या विकासाकडे फारसे कोणाचे लक्षच नाही.

कणखर शरीर आणि कणखर मन खेळाच्या मैदानावरच घडते, हे ठाऊक असलेल्या ग्रीकांनी ऑलिंपिक स्पर्धा सुरू केल्या. सतत साडेअकराशे वर्षे भरत आलेल्या या स्पर्धांत राजे, सेनापती, योद्धे तर भाग घेतच असत; पण तत्त्वज्ञ म्हणून इतिहासात प्रसिद्ध असलेल्या सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, प्लेटो आणि पायथॅगोरसचाही ऑलिंपिकच्या यशस्वी स्पर्धकांत आणि प्रशिक्षकांत समावेश होता. ऑलिंपिक विजेत्याला बक्षीस म्हणून ऑलिव्हच्या पानांचा मुकुट तेवढा मिळे. पण त्याच्या राज्यातले लोक त्याच्यावर देणग्यांचा वर्षाव करून त्याला मालामाल करून टाकत असत. एखाद्या विजेत्या योद्ध्यासारखा ऑलिंपिक जिंकणाऱ्याला मान दिला जाई. त्याच्या मिरवणुकीला अडथळा नको, म्हणून तटबंदीच्या भिंतीसुद्धा पाडून टाकल्या जात असत. रोमनांचे राज्य आल्यावर त्यांनीही या स्पर्धा चालू ठेवल्या. या सर्व काळात ऑलिंपिकच्या स्पर्धांत इतर विघ्ने येऊ नयेत, यासाठी शांततेचा तह केला जाई आणि तो कसोशीने पाळलाही जाई. पण इ.स. ३९३मध्ये ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या रोमन सम्राट थिओडोससने ग्रीकझियस या देवतेच्या उत्सवाप्रीत्यर्थ चालणारे हे ऑलिंपिकचे 'पाखंड' बंद करून टाकले.

नेपोलियनच्या युद्धांत आणि नंतर झालेल्या फ्रॅन्को-प्रशियन युद्धांत युरोपीय शासकांना आणि विचारवंतांना युवा पिढी कणखर व्हावी, यासाठी स्पर्धात्मक खेळ आवश्यक आहेत, असे वाटले. वॉटर्लूची लढाई हॅरो आणि ईटनच्या क्रीडांगणावर जिंकली गेली, हे ती लढाई नेपोलियनविरुद्ध जिंकणाऱ्या ड्यूक ऑफ वेलिंग्टनचे उद्गार प्रसिद्धच आहेत. १८९६पासून दर चार वर्षांनी या ऑलिंपिक स्पर्धा भरायला लागल्या. पण १९३२पर्यंत या स्पर्धांना म्हणावा तसा प्रतिसाद नव्हता.

जर्मन हुकूमशहा हिटलर याने या स्पर्धांचे राजकीय महत्त्व ओळखले आणि १९३६मध्ये बर्लिन येथे या स्पर्धा भरवल्या. जर्मन खेळाडूंनीही सर्वाधिक पदके पटकावून हिटलरला आनंदित केले. त्यानेही आपल्या वंशश्रेष्ठत्वाच्या मुद्द्यावर प्रचार करण्यासाठी या स्पर्धांचा भरपूर उपयोग करून घेतला. आफ्रिकन खेळाडू हे हलक्या वंशातले असल्याने ते जर्मन खेळाडूंना हरवूच शकणार नाहीत, हा हिटलरचा प्रचार मात्र जेसी ओवेन्स या अमेरिकन कृष्णवर्णीय खेळाडूने खोटा ठरवला. कारण १०० व २०० मीटर्सच्या शर्यती जिंकून तो जगातला सर्वात वेगवान

खेळाडू ठरला आणि लांब उडी व ४ x १०० मीटर स्पर्धांतही सुवर्णपदके पटकावून तो सर्वश्रेष्ठ खेळाडू असल्याचे सिद्ध झाले. त्याच्याशी हस्तांदोलन करायला लागू नये म्हणून हिटलरने बक्षीस समारंभांना यायचेच टाळले.

दुसऱ्या जागतिक महायुद्धामुळे १९४० व १९४४ साली ऑलिंपिक स्पर्धा झाल्याच नाहीत. सर्वच युरोपियन राष्ट्रांना महायुद्धाच्या धक्क्यातून सावरायला बराच काळ जावा लागला. त्यामुळे १९४८च्या लंडन ऑलिंपिक्स व १९५२च्या हेलसिंकी ऑलिंपिक्समध्ये अमेरिकेला आपले वर्चस्व राखता आले. पण १९५६च्या मेलबर्न ऑलिंपिक्समध्ये रशिया पूर्ण तयारीनिशी उतरला आणि त्याच्या संघांनी अमेरिकेला मागे टाकले. याचीच पुनरावृत्ती १९६०च्या रोम ऑलिंपिक्समध्ये झाली. १९६४चे ऑलिंपिक्स पहिल्यांदाच आशियात जपानची राजधानी टोकियो येथे भरले. तोपर्यंत ऑलिंपिक स्पर्धा सुप्रतिष्ठित झाल्या होत्या. त्या स्पर्धांत मिळालेली पदके म्हणजे त्या राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख समजला जाऊ लागला होता. दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेला जपान जोमाने परत उभा राहिला. ऑलिंपिकचे आयोजन तर उत्तम करून दाखवलेच; पण १६ सुवर्णपदके, ५ रौप्य आणि ८ कांस्यपदके मिळवून त्याने आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखवली. यावेळी अमेरिकेने पदकतालिकेत पहिला क्रमांक मिळवताना रशियाला मागे टाकले. मग १९६८च्या मेक्सिको ऑलिंपिकमध्ये हीच क्रमवारी राहिली.

आता बलाढ्य राष्ट्रांमध्ये क्रीडाविषयक शास्त्रांमध्ये प्रगती करून खेळाडूंचा विकास साधण्याची चढाओढ सुरू झाली. क्रीडावैद्यकशास्त्र, आहारशास्त्र आणि क्रीडामानसशास्त्र यांत मोठ्या प्रमाणावर संशोधन करून १९७२च्या म्युनिक ऑलिंपिकमध्ये आणि १९७६च्या मॉन्ट्रिअल ऑलिंपिकमध्ये सोव्हिएट रशियाने अमेरिकेला कोठल्या कोठे मागे टाकले. जर्मनीचे पूर्व आणि पश्चिम असे दोन स्वतंत्र संघ उतरलेले असतानाही मॉन्ट्रिअलमध्ये पूर्व जर्मनीनेही अमेरिकेला मागे टाकले. हंगेरी, रोमानिया, पोलंड हे रशियन वर्चस्वाखालचे युरोपीय देशही आपली चमक दाखवू लागले. १९८०मध्ये मॉस्को येथे भरलेल्या ऑलिंपिकमध्ये बहुतेक पाश्चात्त्य राष्ट्रांनी बहिष्कार टाकलेला असल्याने स्पर्धा एकतर्फी होऊन रशिया आणि पूर्व जर्मनीने बहुसंख्य पदके जिंकली. अमेरिकेत भरलेल्या १९८४च्या लॉस एंजेलिस ऑलिंपिकवर रशियन वर्चस्वाखालील बहुतेक राष्ट्रांनी बहिष्कार टाकल्यामुळे स्पर्धा एकतर्फीच झाल्या.

मग सर्वांनीच या स्पर्धांत भाग घ्यायला हवा, असे प्रयत्न सुरू झाले. १९८८च्या स्पर्धा दक्षिण कोरिया या झपाट्याने आर्थिक प्रगती करीत असलेल्या देशाची राजधानी सेऊल येथे झाल्या. उत्तम आयोजन करून पदकतालिकेत पश्चिम जर्मनी, जपान यांच्याहीवर क्रमांक मिळवून कोरियाने आपल्या शक्तीची चुणूक दाखविली. परत सोव्हिएट रशियाने अमेरिकेपेक्षा १९ सुवर्णपदके जास्त पटकावून आपले वर्चस्व निर्विवाद प्रस्थापित केले. पूर्व जर्मनीनेही पुन्हा एकदा अमेरिकेला मागे टाकले. आशियातली आणखी एक महासत्ता चीनपण या स्पर्धांत उतरला आणि पदकतालिकेत सहावा क्रमांक पटकावून त्याने आपल्या तयारीची चुणूक दाखवून दिली. पुढल्या १९९२च्या बार्सिलोना ऑलिंपिकपर्यंत सोव्हिएट युनियनचे विघटन झाले होते. तरी त्या साऱ्या देशांचे संघ एकत्र उतरले आणि त्यांनी अमेरिकेच्या संघाचा धुव्वा उडवला. चीनने चौथ्या स्थानावर येऊन आपले सामर्थ्य वाढले असल्याची सर्वांना कल्पना दिली. १९९६ सालच्या अटलांटा येथील ऑलिंपिकमध्ये अमेरिकेने ४४, रशियाने २६, जर्मनीने २० व चीनने १६ सुवर्णपदके मिळवली.

तीच परिस्थिती २०००च्या सिडनी ऑलिंपिकमध्येही होती. पण यावेळेला तिसऱ्या क्रमांकावर येऊन चीनने अमेरिकेला धोक्याचा इशारा देऊन ठेवला. २००४चे ऑलिंपिक ग्रीसची राजधानी अथेन्स येथे झाले. अमेरिकेने आपले वर्चस्व कसेबसे राखले; तर चीनने त्यांच्यापेक्षा फक्त ४ सुवर्णपदके मागे राहून पदकतालिकेत दुसरा क्रमांक पटकावला. ग्रीकांनी स्पर्धांचे सुंदर आयोजन तर केलेच; पण ६ सुवर्ण, ६ रौप्य आणि ४ कांस्यपदके जिंकून पदकतालिकेत बराच वरचा क्रमांक मिळवला.

२००८चे ऑलिंपिक चीनमध्ये भरले. उत्कृष्ट आयोजनाचा एक नमुना पेश करत चीनने ५१ सुवर्णपदके जिंकली; तर श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या अमेरिकेच्या वाट्याला फक्त ३६ सुवर्णपदके आली. २०१२च्या ऑलिंपिकच्या यजमानपदाचा मान मिळालेल्या ब्रिटनने १९ सुवर्ण, १३ रौप्य व ८८ कांस्य पदके जिंकून पदकतालिकेत रशियाच्या मागे चौथा क्रमांक पटकावला. आशियामधील कोरिया व जपान या सत्तासुद्धा चांगल्या क्रमांकावर आल्या; तर स्वातंत्र्याला ६० वर्षे पूर्ण केलेल्या भारताचा क्रमांक पदकतालिकेत ५०वा आला. ही आपली ऑलिंपिकमध्ये आजवरची सर्वोत्तम कामगिरी आहे. आशियामधलेही मंगोलिया, मलेशिया, कझाकस्तान वगैरे १०/११ देश पदकतालिकेत आपल्या पुढे आहेत आणि आपण ऑलिंपिक स्पर्धा भरवण्याच्या गप्पा करीत आहोत! आपली पुढे आलेली पोटे घेऊन समारंभात मिरवण्याचा प्रयत्न तेवढा करणाऱ्या आपल्या संघटक, राजकारणी आणि नोकरशहांमुळे आपण भारतीय जागतिक क्रीडाक्षेत्रातले विदूषक समजले जातो. आपले सगळीकडे हसे होत आहे, हेसुद्धा या महाभागांना समजत नाही. त्यांना फक्त उद्घाटन आणि समारोपाच्या कार्यक्रमात रस असतो. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत पदकप्रदान समारंभ अगदी साधेपणाने साजरा केला जातो. सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक मिळवणारे खेळाडू विजयमंचावर उभे असतात. त्यांच्या देशांचे ध्वज फडकवले जातात. त्यात सुवर्णपदक जिंकणाऱ्या खेळाडूच्या देशाचा ध्वज सर्वात उंचावर असतो आणि त्याच्या देशाच्या राष्ट्रगीताची धून त्यावेळी वाजवली जाते. आपला झेंडा सर्वात वर फडकवणे आणि आपले राष्ट्रगीत सर्वांना ऐकवणे हे साऱ्या खेळाडूंचेच नव्हे; तर साऱ्या देशांतील क्रीडाप्रेमींचे स्वप्न असायला हवे.

क्रीडाक्षेत्रात खेळाडूच्या वर कोणी नाही, तोच मुख्य घटक आहे आणि बाकीचे सारे फॅसिलिटेटर्स म्हणजे मदत करायच्या भूमिकेत आहेत, हेच मुळी विसरायला होते. मग आपल्या वाट्याला विदूषकाची भूमिका येणार, याचेही आपल्याला काही वाटत नाही. कारण 'चक दे इंडिया'सारखा एखादा सिनेमा पाहिला, तरी आपल्याला ते पुरेसे असते.

दिल्लीत जिम्नॅस्टिक्सच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा झाल्या, तेव्हा त्या पाहायला चिटपाखरूसुद्धा आले नाही. अर्थात आपले राष्ट्रगीत एकदाही वाजले नाही, हे सांगायला नकोच. समारोपाच्या कार्यक्रमाला मात्र अमिताभ बच्चन आल्यामुळे तुफान गर्दी झाली. अजिंक्यपद जिंकणाऱ्या जपानच्या संघाच्या प्रशिक्षकाला अमिताभ बच्चन हे सिनेनट आहेत असे कळल्यावर धक्काच बसला. पण त्याने यावर व्यक्त केलेली प्रतिक्रिया पुरेशी बोलकी होती. तो म्हणाला, ''तुम्हां भारतीयांना पदकं का मिळत नाहीत, हे आता ध्यानात आलं! तुम्हांला जिंकण्याचा अभिनय पुरतो. आमच्याकडेसुद्धा सिनेनटनट्या लोकप्रिय आहेत. पण खेळाच्या कार्यक्रमाला गर्दी जमवण्यासाठी सिनेनटनट्या बोलवायची गरज कधीच भासत नाही.''

विकासाच्या आणि महासत्ता बनण्याच्या गप्पा मारणाऱ्या भारताचे क्रीडाक्षेत्राकडे अक्षम्य असे दुर्लक्ष झालेले आहे. कोणत्यातरी राजकीय नेत्याच्या मनात आले, की प्रचंड पैसा खर्च करून क्रीडासंकुले उभारली जातात. त्यांचा वापर कोण, केव्हा, कसा करणार याचे नियोजन नसते आणि देखभाल-दुरुस्तीसाठीही काहीच व्यवस्था नसल्याने त्यांचे भग्नावशेष बनायला वेळ लागत नाही. मोठमोठ्या व्यक्तींची नावे दिलेली स्टेडियम्स प्रत्येक शहराच्या चेहऱ्यावर कोडाचे डाग पडल्यासारखी जागोजागी दिसतात.

दिल्लीला राष्ट्रकुल स्पर्धा घेण्याचे ठरल्यावर आधी असलेली क्रीडासंकुले पाडून टाकण्यात आली. ती पाडण्याच्या आधी खेळाडू कोठे सराव करणार, याचा विचारही झाला नाही. ट्रॅप नेमबाजीच्या खेळाडूंचे तर फारच हाल झाले. आधीच आपल्याकडे ट्रॅप अँड स्कीटच्या रेंजेस फार थोड्या. दिल्लीची रेंज पाडून टाकलेली. पुण्याला शिवछत्रपती क्रीडासंकुलात रेंज बांधताना सुरक्षेचा विचारच केला गेला नाही. सराव सुरू झाल्याबरोबर आसपास राहणाऱ्या लोकांच्या घरांमधे छऱ्यांचा वर्षाव व्हायला लागला व मग त्यांनी खटले भरण्याची धमकी दिली, तेव्हा तेथली रेंज बंद करून टाकण्यात आली. सैन्यदलाकडे महूला रेंज होती; पण त्यांनी इतर खेळाडूंना सराव करू देण्याचे नाकारले. जसे काही ते पाकिस्तानातून आलेले खेळाडू होते! ऑलिंपिकमध्ये सहा सुवर्णपदके असलेल्या या क्रीडाप्रकारातल्या खेळाडूंची फारच परवड झाली. काही निवडक खेळाडूंना परदेशात पाठवण्यात आले. जे धनिक घरातले होते ते स्वतःच्या खर्चाने परदेशी जाऊन आले. पण इतरांचे काय? ऑलिंपिकमध्ये रौप्यपदक, जागतिक अजिंक्यपद मिरवणाऱ्या भारताच्या वाट्याला योग्य नियोजनाच्या अभावी फक्त दोन रौप्य आणि एक कांस्यपदक येऊ शकले. कमीत कमी चार सुवर्णपदके जिंकण्याची क्षमता असलेल्या आपल्या संघाला या प्रकारात एकदाही आपले राष्ट्रगीत वाजवता आले नाही.

राष्ट्रकुल स्पर्धा भारतात घेण्याचे ठरल्यावर भरमसाट खर्च करणे सुरू झाले. पुण्याला बालेवाडीत युवा राष्ट्रकुल स्पर्धा घेण्यात आल्या. सराव स्पर्धा यापलीकडे या स्पर्धांना महत्त्व नसल्याने इतर देशांच्या खेळाडूंचा सहभाग अत्यंत नगण्य होता. अशा स्पर्धांसाठी ऑलिंपिक दर्जाचे स्टेडियम बांधण्याची काय गरज होती? स्पर्धांचे निमित्त करून बांधायचेच होते तर ते नंतर कसे वापरात येऊ शकेल, आपल्या खेळाडूंचा दर्जा वाढवण्यासाठी त्याचा कसा उपयोग होईल, या सर्व बाबींचा विचार न करता शेकडो कोटी रुपये काय म्हणून उधळले? ८० खेळाडू एका वेळी स्पर्धा करू शकतील अशी १० मीटरची रेंज, तेवढीच क्षमता असलेली ५० मीटरची रेंज, ५० खेळाडू एका वेळी भाग घेऊ शकतील अशी २५ मीटरची रेंज, मुळीच वापरात न आलेली ट्रॅप अँड स्कीट रेंज या सर्व रेंजेस या स्पर्धेसाठी बांधण्यात आल्या. ऑलिंपिक दर्जाची अंतिम फेरीची रेंज बांधण्यात आली. पण ती रेंज तांत्रिकदृष्ट्या सदोष असल्याने एक दिवसही वापरली गेली नाही. युवा राष्ट्रकुल स्पर्धांत नेमबाजीमध्ये कोणत्याच प्रकारात ८ ते १०च्या वर स्पर्धकांनी भाग घेतला नाही. अत्यंत महागडी संगणक-यंत्रणा बसवण्यात आली. आव असा आणला गेला, की आपण जणू ऑलिंपिक स्पर्धाच पुण्यात भरवत आहोत!

अशा स्पर्धा आपल्या संयोजकांना, त्यांच्या स्वयंसेवकांना, पंचमंडळींना मोठ्या स्पर्धांचा सराव व्हावा, म्हणून घ्यायच्या असतात. पण या युवा राष्ट्रकुल स्पर्धांचे संयोजन इतके भिकार होते, की भारताची सर्व राष्ट्रकुल देशांत बदनामी मात्र झाली. आपल्या नेहमीच्या पद्धतीने स्पर्धा सुरू होईपर्यंत बांधकाम चालूच होते. सफाई व्यवस्थित नव्हती. परदेशांतून आलेल्या पंचांना, प्रशिक्षकांना आणि स्वयंसेवकांना चारपाच दिवस जेवायचीही धड सोय नव्हती. राष्ट्राध्यक्ष येणार असल्याने सुरक्षा व्यवस्था कडक असल्याचे निमित्त सांगण्यात आले.

राष्ट्रकुल स्पर्धांसाठी आपल्याकडे पुरेसे आणि चांगले प्रशिक्षक नसल्याने परदेशांतून अनेक खेळांसाठी प्रशिक्षक आणावे लागले. स्टॅनिस्लाव लॅपिड्स हा रायफल-जगात सर्वोत्तम प्रशिक्षकांत गणला जाणारा रशियन प्रशिक्षक आपल्याला मिळाला. ट्रॅप अँड स्कीट नेमबाजीत मार्सेल्लो हा इटालियन प्रशिक्षक आला. या दोन्ही प्रकारांत राष्ट्रकुल स्पर्धेत प्रत्येकी १२ सुवर्णपदके असतात. पण पिस्तुल नेमबाजीत एकूण २० सुवर्णपदके असतात. त्यासाठी प्रशिक्षकच नेमला नाही. बराच आरडाओरडा झाल्यावर लॅपिड्सलाच एखादा चांगला प्रशिक्षक पाहाण्यास सांगण्यात आले. त्यानेही दिमेन्तिएव या जगप्रसिद्ध पिस्तुल नेमबाजीच्या प्रशिक्षकाचे मन वळवले. पण त्याने होकार कळवल्यानंतरही चार महिने त्याच्याशी कोणी संपर्कसुद्धा साधला नाही. शेवटी तो कंटाळून अमेरिकेला निघून गेला. त्यामुळे पिस्तुल नेमबाजीला प्रशिक्षकच शेवटपर्यंत नेमला नाही आणि ट्रॅप अँड स्कीटच्या सरावाला रेंजच मिळाली नाही. या साऱ्या गलथानपणामुळे आपली ६ ते ८ सुवर्णपदके हुकली.

या काळात माझी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या संचालकांशी गाठ पडली. पिस्तुल नेमबाजी प्रशिक्षक नसल्याबद्दल मी तक्रार केली, तेव्हा त्यांनी मला सांगितले, की लॅपिड्सने सुचवलेला रशियन पिस्तुल प्रशिक्षक नेमला असून तो पुण्यात हजरसुद्धा झाला आहे. पुण्याच्या पुढल्या भेटीत मी उत्सुकतेने नव्या प्रशिक्षकाला भेटायला गेलो, तेव्हा मला समजले, की हजर झालेला रशियन हा संगणकतज्ज्ञ आहे आणि त्याचा पिस्तुल नेमबाजीशी काहीही

संबंध नाही! असला गलथानपणा क्रीडाक्षेत्रात जागोजाग आढळतो. अगदी संघटनेचे पदाधिकारीसुद्धा साऱ्या गोष्टींत अनभिज्ञ असतात.

अंजली भागवतने जागतिक चषक स्पर्धांत सुवर्णपदक जिंकले. जगातल्या साऱ्या पुरुष आणि स्त्री स्पर्धकांना हरवून तिने जर्मनीत चँपियन्स ऑफ चँपियन हा विश्वातला सर्वोच्च किताब पटकावला. ऑलिंपिकच्या सरावासाठी तिला रायफलच्या गोळ्या हव्या होत्या. त्यासाठी ती दिल्लीला संबंधित अधिकाऱ्यांना जाऊन भेटली, तेव्हा त्यांना ती कोण आहे, हे माहीत नव्हते. ती शूटिंगबद्दल बोलायला लागली तेव्हा त्यांना ती व्हिडिओ शूटिंगबद्दल बोलते आहे असे वाटले! सर्वात कडी म्हणजे ऑलिंपिक स्पर्धांत भाग घ्यायला जाताना राष्ट्रीय रायफल संघटनेच्या अध्यक्षांना ती भेटायला गेली. तेव्हा त्यांनी तिला विचारले, ''तू पिस्तोल नेमबाजी करतेस का रायफल?'' हाच प्रश्न अभिनव बिंद्रालाही विचारला! त्यावेळी अभिनवने रायफल शूटिंगचे जागतिक अजिंक्यपद जिंकलेले होते!

आपल्या सर्वोत्तम खेळाडूंबद्दल ही अनास्था आहे, तर सर्वसामान्य खेळाडूंना कोण विचारणार? आणि नेमबाजीच्या खेळावर तर आयातीच्या नियमांचा फास गच्च आवळलेला आहे. एकदा मी केंद्रीय क्रीडामंत्र्यांना सांगितले होते, ''आम्ही आंतरराष्ट्रीय अजिंक्यवीर घडवण्याच्या प्रयत्नात आहोत. आमचे पैसे खर्चून तांत्रिकदृष्ट्या उत्तम साधनं मिळवायला आम्हांला चार चार वर्षं खेटे घालावे लागतात. मी जर आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांना किंवा गुन्हेगारी टोळ्यांना प्रशिक्षण देण्याच्या उद्योगात असतो, तर हवी असलेली शस्त्रं आणि दारुगोळा मला एका आठवड्यात घरपोच मिळाला असता! असली कसली यंत्रणा आहे आपली?''

ते हसले. माझ्याकडून साऱ्या गोष्टी नीट समजावून घेऊन मगच दिल्लीला परतले. १५ दिवसांनी आम्ही दिल्लीत भेटायचे ठरले. पण त्या पंधरवड्यात दिल्लीचे सरकारच कोसळले! असा अनुभव मला अनेकदा आलेला आहे. राजकारणी आणि नोकरशहांना साऱ्या गोष्टी समजावून सांगितल्या की त्यांची खातीच बदलतात. नव्या आलेल्यांना हे काही करण्यात रसच नसतो.

पण केंद्र शासनाने, भारतीय क्रीडा प्राधिकरणाने आणि राष्ट्रीय रायफल संघटनेने गेल्या राष्ट्रकुल स्पर्धांच्या वेळी मला एक मोठा आश्चर्याचा धक्काच दिला. चक्क दिल्लीहून क्रीडाखात्याच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने माझ्याशी फोनवरून संपर्क साधला आणि भारताच्या नेमबाजीच्या संघाच्या मानसिक सरावाची जबाबदारी मी घेऊ शकेन का असे विचारले. ज्या मंडळींना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे असे वाटतच नाही, त्यांनी मानसिक सरावाचा विचार करावा हे नवलच! पण नेमबाजी आणि मानसिक सराव हे दोन्ही माझ्यासाठी भयंकर आकर्षणाचे मुद्दे. तेव्हा मी नाही म्हणणे शक्यच नव्हते. पण मी साधारणपणे एका सत्रासाठी घेतो तेवढे मानधन महिन्याभरासाठी देऊ, असे मला सांगण्यात आले. माझी इतर कामे पुष्कळ होती. तेव्हा मला संपूर्ण वेळेसाठी न नेमता मी जेवढी सत्रे घेऊ शकेन, तेवढ्याचेच मानधन मला द्यावे म्हणजे शासनाचे आणखी पैसे वाचतील, असे मी सुचवले. (अर्थात हे कमी पैसे आणि माझे खर्च झालेले पैसे अजूनही मला दिले गेलेले नाहीत, हा मुद्दा वेगळा!)

शिबिर पुण्याला चालू झालेले होते. नेमबाजांना मी येणार हे कळल्याने त्यातल्या काही जणांचे मला फोन यायला लागले. नेमणुकीचे पत्र राष्ट्रीय रायफल संघटनेकडून यायचे होते. म्हणून मी दिल्लीला त्यांच्याकडे चौकशी केली. तेव्हा मला सांगण्यात आले, की मी पुण्याला जाऊन काम सुरू करावे, पत्र नंतर पाठवण्यात येईल. तेव्हा मी डिसेंबर २००९ मध्ये पुण्याच्या शिबिराला गेलो. त्यात मी इतका गुंतत गेलो, की बाकीची जवळजवळ सर्व कामे बंद करून मी जास्तीत जास्त वेळ नेमबाजांना दिला. त्यात मला भरपूर ताण पडला, पण अतिशय आनंद मिळाला. शिबिरे चार वेगवेगळ्या रेंजेसवर होत. त्यातून पुण्याला ट्रॅप अँड स्कीटची रेंज बंद असल्यामुळे त्यांची शिबिरे त्याच कालावधीत कधी दिल्लीला तर कधी पतियाळाला होत. त्यामुळे मी काही दिवस पुण्याला तर काही दिवस दिल्ली किंवा पतियाळाला जाई.

सुरुवातीला जवळजवळ शंभर नेमबाज शिबिरांना येत. चाचणी स्पर्धा असतील तेव्हा त्यात ५०/६० जणांची भर पडे. त्यातल्या बहुसंख्यांना मानसिक सराव ही काय भानगड आहे, हेही ठाऊक नव्हते. बहुतेक सारा वेळ नेमबाजीच्या सरावालाच दिला जाई. संध्याकाळी दीड एक तास इतर व्यायामासाठी दिला जाई. त्यानंतर अर्धा तास जेमतेम मला मिळे. तोपर्यंत सारे जण इतके दमलेले असत, की अनेक जण गाढ झोपी जात. मानसिक सरावाचे महत्त्व पटवून देण्यासाठी पुष्कळ वेळा मी एकत्र सत्रे घेत असे. ती सकाळी अर्धा तास होत. मग दिवसभर मी या ना त्या रेंजवर असे. नेमबाजांना जशी सवड होई, तसे ते मला वैयक्तिक सत्रांसाठी भेटत. कधीकधी तर रात्री दीड वाजेपर्यंत या चर्चा चालू राहत.

हॉकी, टेनिस, बॅडमिंटन, टेबल टेनिस, जिम्नॅस्टिक्स, जलतरण या खेळांची शिबिरेही बालेवाडीत झाली. त्यांतले बरेच खेळाडू माझ्याकडे प्रशिक्षण घेतलेले होते. त्यांच्या प्रशिक्षकांशीही परिचय झाला. त्यांनी आग्रह केल्यावरून मी त्यांचीही सत्रे घेतली.

माझी पुस्तके वाचून त्यांतल्या तंत्रांवरही चर्चा करून मला आपापल्या देशात येऊन व्याख्याने देण्यासाठी निमंत्रणे दिली. यात पाकिस्तानचाही समावेश होता. ते १५ दिवस फार आनंदात गेले.

पण या आनंदाला विषादाची झालर होती. झालेला आणि होत असलेला अनाठायी खर्च सारखा बोचत होता. संयोजकांवर रोज नवे आरोप वृत्तपत्रांतून होत होते. संयोजन अगदीच टुकार होते. पदके जिंकणाऱ्या खेळाडूंना कित्येक तास समारंभासाठी खोळंबून राहावे लागे. त्यांचे सामने नंतर असले, तर त्यांना फारच त्रास होई. स्वयंसेवकांचे प्रशिक्षण नीट झालेले नव्हते. कोणीच काही माहिती देऊ शकत नसे. उद्घाटन आणि समारोपाचे सोहळे भपकेबाज करून आम्ही किती सुधारलेले आहोत, त्याचे प्रत्यंतर देण्याचा केविलवाणा

प्रयत्न झाला. खेळाडूंनी या राष्ट्रकूल स्पर्धांत ३८ वेळा आपले राष्ट्रगीत वाजवायला लावून आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आणून दिला खरा, पण स्पर्धा संपल्याबरोबर त्यांचे हाल सुरू झाले. खेलग्राममध्ये पाश्चात्त्य खेळाडूंसाठी उत्तम भोजन असे, पण भारतीय भोजन अत्यंत भिकार होते.

एक दिवस रात्री १० वाजता आमच्या खोलीवर निरोप आला. सर्व भारतीय खेळाडूंचा आणि प्रशिक्षकांचा एकत्रित फोटो घ्यायचा आहे; सकाळी ६॥ वाजता करमणूक केंद्रावर सर्वांनी एकत्र जमावे. मी आणि माझे एक सहकारी वेळेवर तेथे गेलो. पण इतर कोणीच आलेले नव्हते. नंतर भारतीय पथकाचे प्रमुख तेथे आले आणि खेळाडू का आलेले नाहीत, याबद्दल आम्हांलाच जाब विचारायला लागले. शेवटी फोटो वगैरे बाजूलाच राहिले आणि आम्हांला नाश्ता न घेताच रेंजची बस गाठावी लागली. अशी अव्यवस्था सगळीकडेच होती. उत्तम स्पर्धा चाललेल्या असताना त्या पाहण्याची संधी खेळाडूंनाच मिळाली नाही. सुरक्षेच्या नावाखाली जवळजवळ सारी प्रेक्षागृहे रिकामीच असत. मग ती इतका प्रचंड खर्च करून बांधली कशाकरता?

जवळजवळ साऱ्याच स्टेडियम्सचे बांधकाम स्पर्धा सुरू होईपर्यंत पूर्ण झालेले नव्हते. वास्तविक ते दोन वर्षे आधीच पूर्ण करून एकदा तरी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तेथे व्हायला हव्या होत्या. नोव्हेंबर २०१० मध्ये चीनने वॉन्गझौ येथे आशियाड भरवले. तेव्हा ऑगस्ट २०१० मध्ये सारी स्टेडियम्स पूर्ण करून संयोजन समितीच्या हवाली करण्यात आलेली होती. चिनी खेळाडूंना घरच्या साऱ्या मैदानांवर सराव करता आला आणि त्यांनी आशियाडमध्ये २०० सुवर्णपदके जिंकली! आपल्या वाट्याला फक्त १४ आली! कारण राष्ट्रकुल स्पर्धांनंतर खेळाडूंवरचे लक्षच काढून घेतले गेले. नेमबाजीचा संघ पुण्याच्या शिबिराकरिता गौरव समारंभामुळे वेळेवर पोहोचू शकला नाही. मला माझी नेमणूक फक्त राष्ट्रकुल स्पर्धा होईपर्यंतच आहे, असे सांगण्यात आले. सारे खेळाडू गोळा होईपर्यंत नोव्हेंबरची एक तारीख उजाडली. त्यांच्या सरावासाठी गोळ्याच नव्हत्या. दिल्लीहून घाईगडबडीत पाठवलेल्या गोळ्या इतक्या निकृष्ट दर्जाच्या होत्या, की त्या नवोदितांनाही वापरायला द्याव्यात की नाही असा प्रश्न पडावा. मग चारपाच दिवसांतच शिबिर आटोपते घेऊन नेमबाजांना दिल्लीला नेण्यात आले आणि तेथे दोन-तीन दिवस नुसतेच घालवल्यावर चीनला नेले. बलाढ्य चीन, कोरिया आणि जपानच्या संघांशी टक्कर देण्याची तयारी इतक्या हलगर्जीपणाने केल्यावर व्हायचे तेच झाले. नेमबाजीच्या संघाची पार वाट लागली.

अडीचशे कोटी रुपये खर्चून बांधलेल्या आणि अद्ययावत संगणकीय सामग्री बसवलेल्या कर्णीसिंह रेंजेस राष्ट्रकुल स्पर्धा संपल्याच्या दुसऱ्या दिवसापासून बंद झाल्या. फेब्रुवारीमध्ये राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या स्पर्धा तेथे घेण्यात आल्या, त्या दिवसापर्यंत तिथली साधी सफाईसुद्धा कोणी केलेली नव्हती, अगदी संडास-मुताऱ्यांचीसुद्धा. निम्म्याच्यावर संगणकीय यंत्रणा नादुरुस्त झालेली होती. ती वापरायची नव्हती, तर विकत घेतली कशाला?

खेळांकडे अक्षम्य दुर्लक्ष करून आपण आपल्या पुढल्या पिढ्यांचा घात करीत आहोत. स्पर्धा म्हणजे काय, याचे नीट आकलन न झाल्याने अनेक हुशार माणसे पूर्णपणे वाया गेलेली मी पाहिली आहेत. स्पर्धा ही शत्रूशी कधीच नसते, ती नेहमी भावंडांशी आणि आपल्या सहकाऱ्यांशी, नातेवाइकांशीच असते. उत्तम आणि श्रेष्ठ काय ते निवडायला दुसरा मार्गच नाही. पण चुरशीची स्पर्धा असतानाच मैत्र आणि नाती ही प्रेमाने, संघभावनेने मजबूत करायची असतात. द्वेष, मत्सर, शत्रुत्व या उपटसुंभ भावनांना मूठमाती द्यायची असते. म्हणजे मग आयुष्य खऱ्या अर्थाने संपन्न होत असते. हे सारेच स्पर्धात्मक खेळांतून शिकता येते.

शालेय शिक्षणात खेळ आणि कला यांची आवड असणाऱ्यांना त्यातच करिअर करता यावी. खेळ हा विषयच १० वी, १२ वी पर्यंत परीक्षेसाठी ऐच्छिक असावा. राज्य अजिंक्यपद, राष्ट्रीय अजिंक्यपद किंवा आंतरराष्ट्रीय पदक मिळाल्यास त्याला पदवी देण्याची व्यवस्था व्हावी. खेळ या विषयातही पदवी घेता यावी आणि पुढे त्यात संशोधनही करता यावे.

योगशास्त्र ही भारतीयांची जगाला मोठीच देणगी आहे. योगासने, प्राणायाम, सूर्यनमस्कार हे व्यायामप्रकार शाळा-कॉलेजातून शिकणे आवश्यक करायला हवे. योगशास्त्र हे आपले मानसशास्त्र आहे. त्याचा वापर गेली कित्येक वर्षे खेळाडूंच्या मानसिक तयारीसाठी मी करीत आहे आणि त्याचा त्यांना अतिशय उत्तम उपयोग होत आहे. इतरही सर्व क्षेत्रांत हे प्रयोग यशस्वी झाले आहेत. याचा पाया शालेय जीवनातच घातला गेला, तर स्पर्धात्मक खेळात येणारे दडपण हाताळणे सोपे जाऊन त्यांना उत्कृष्ट कामगिरी तर करता येईलच, पण जीवनातल्या इतर धकाधकीच्या प्रसंगांनाही उत्तम तोंड देता येईल.

फुटबॉल, ॲथलेटिक्स, भारतीय खेळ यांचा सर्वाधिक प्रचार व्हायला हवा. हे सर्व अतिशय कमी खर्चाचे खेळ आहेत. विनाकारण स्टेडियम आणि हॉल बांधत न बसता क्रीडांगणे तयार करण्यावर शासनाने भर द्यावा. आतापर्यंत जेवढी बांधकामे सुरू झाली असतील, तेवढीच पूर्ण करून ती जास्तीत जास्त वापरली जातील असे पाहावे. खासगी संस्थांकडेही जी क्रीडांगणे आणि सोयीसुविधा असतील, त्याही सर्वाधिक वापरल्या जातील असे पाहावे आणि शाळांना या सोयी उपलब्ध करून द्याव्या. पुण्याला बालेवाडीमध्ये बांधलेले क्रीडासंकुल हे फक्त राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठीच वापरले जावे. तेथे क्रीडा विद्यापीठ, प्रशिक्षकांचे खास वर्ग चालवले जावेत. देखभाल- दुरुस्तीचा खर्च शासनाने संपूर्णतः करावा. व्यापारी तत्त्वावर क्रीडासंकुल भाड्याने देण्याचे ताबडतोब बंद करायला हवे.

जनतेनेही संघटित होऊन, माहिती अधिकाराचा वापर करून शासनावर दडपण आणावे आणि क्रीडाक्षेत्राचा योग्य विकास करायला शासनाला आणि क्रीडा संघटनांना भाग पाडावे. तुमच्या मुला-नातवंडांचे आयुष्य जास्त चांगले जावे असे वाटत असेल, तर हे करायलाच हवे.

*(ऑगस्ट २०११)*

# खाद्यसंस्कृतीतले मराठीपण

**वर्षा काळे**

इतिहास, भूगोल, राजकारण, समाजकारण, साहित्य, कला इत्यादीप्रमाणे खाद्यपदार्थांतही मराठीपण बऱ्याच प्रमाणात सामावलेले असते. आपण जे नेहमी खातो त्यातूनच आपण घडत जातो. 'अन्नाद्भवती भूतानि' असे म्हटलेच आहे. मराठी खाद्ययात्रेची ही एक झलक.

'मराठीपण जपणे म्हणजे नेमके काय' या विषयावर अंतर्नादच्या या अंकात अनेक मान्यवरांचे मौलिक विचार आपण वाचालच. पण साहित्य, भाषा, वैचारिकता, वागणं यांमधून आपला मराठीपणा जसा दिसतो, तसाच आपल्या खाद्यसंस्कृतीमधूनही तो ठळकपणे डोकावतो, याची जाणीव असल्यामुळे मी हा लेख लिहायला प्रवृत्त झाले.

मुंबईतील विलेपार्ले येथील माझ्या शाळेत अठरापगड जातींच्या मैत्रिणींच्या घोळक्यात बसून डबा खाताना प्रत्येकीच्या डब्यातले वेगवेगळे पदार्थ त्या त्या जातींच्या खाद्यसंस्कृतीचे द्योतक होते, हे कळायला वेळ लागला, पण मैत्रिणींच्या डब्यात आपल्यापेक्षा काहीतरी वेगळं असतं, हे मात्र लगेचच कळत होतं. त्यामुळे माझी एक सीकेपी मैत्रीण जेव्हा मला ''तुझ्याकडलं कोकणस्थी गोडं वरण, भात व अळूची भाजी खायची आहे,'' असं म्हणायची, तेव्हा त्यातलं इंगित मला कळायचं. कारण ब्राह्मणी गोड्या वरणात हळद-हिंगाबरोबर थोडा गूळही घालायची पद्धत आहे. तसंच अळूभाजीतही. त्यामुळे किंचित गोडसर असणारं आमचं वरण व अळूभाजी तिला खूप वेगळी वाटायची व आवडायची.

चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीचं मराठी स्वयंपाकघर व आजचं मराठी स्वयंपाकघर यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. विज्ञानाने पुरवलेल्या आधुनिक उपकरणांमुळे स्वयंपाक करणं फारच सुखावह झालं. जागतिकीकरणानंतर कॉंटिनेन्टल, मेक्सिकन, थायी, चायनीज पदार्थांचाही स्वयंपाकात शिरकाव झाला. जगभरातल्या वेगवेगळ्या 'क्विझिन्स'ची ओळख होऊ लागली. याअगोदर हिंदी चित्रपटसृष्टीवरील पंजाबी प्रभावामुळे पंजाबी खाद्यसंस्कृती महाराष्ट्राच्या पचनी पडलीच होती. 'माँ, तेरे हाथ का....' असा हिरोने डायलॉग मारायचा अवकाश, की तो 'गाजर का हलवा, मक्कई की रोटी व सरसों का साग' हेच पदार्थ मागणार याची आम्हांला खात्री होती! पार्ल्यात गुजराती वस्तीही बरीच असल्याने उंधियू-ढोकळा-फरसाण अधूनमधून व्हायचं. जागोजागी पसरलेल्या उडिपी हॉटेल्समुळे इडली-डोशाचीही ओळख आम्हांला शाळेत असतानाच झाली होती. वयाच्या चौदाव्या वर्षी उडिपी हॉटेलात पहिल्यांदा मसाला डोसा खायचा योग आला असताना तो काट्या-चमच्याने खायच्या काल्पनिक संकटाने मला किती घाम फुटला होता, हे माझं मलाच माहिती.

गेल्या चाळीस वर्षांत अनेक देशी-विदेशी पदार्थ खायचा व करायचा योग आला, तरी माझ्या कुटुंबाची वरण-भात-तुपाची गोडी यत्किंचितही कमी झालेली नाही, याची मला गंमत वाटते व अभिमानही वाटतो. एक महिन्याच्या युरोपातल्या प्रवासानंतर परतताना माझ्या बारा वर्षांच्या मुलीने विमानातच, ''आई, घरी गेल्यावर लगेच वरण-भात व बटाट्याच्या काचऱ्या कर,'' या बेताची केलेली फर्माईश आठवली, की मला आजही हसू येतं.

'प्रतिनायक' हे बॅरिस्टर महंमदअली जिना यांच्यावरचं पुस्तक वाचताना त्यांच्या मृत्यूसमयीचं वर्णन वाचलं. मरणासन्न स्थितीतल्या जिनांनी दोन-तीन दिवस अन्नाचा कणसुद्धा खाल्ला नव्हता. त्यामुळे त्यांची बहीण फातिमा त्यांना काहीतरी खाण्याचा आग्रह करत होती. त्यावेळी पाकिस्तानच्या त्या सर्वेसर्वांनी तिला ''आपली आई जशी भरपूर तूप घालून व वर पिठीसाखर पेरून गव्हाची लापशी करायची ना, तशी करून मला दे'' असं सांगितलं. (जिनांचे पूर्वज गुजराती वैष्णव होते. त्यामुळे त्यांच्या घरातल्या खाण्यापिण्यावर गुजराती खाद्यसंस्कृतीचा प्रभाव असावा.) खरं तर जिनांनी आयुष्यभर विदेशी राहणीचा अंगीकार केला होता. त्यांच्या बहिणीलाही आश्चर्य वाटलं. पण तिने लगेच त्यांना तशी लापशी करून भरवली. ती समाधानाने खाल्ल्यावर जिना जे कोमात गेले, ते वारलेच. तेच त्यांचं Last Supper होतं! आपल्या खाण्याच्या आवडीसुद्धा बहुधा आपल्या जीन्समधूनच येत असाव्यात.

एक जुनी आठवण. सुमारे तीन आठवड्यांच्या कर्नाटक व तामिळनाडूमधील वास्तव्यानंतर मुंबईला परतताना गाडी सोलापूर स्टेशनवर थांबली. खिडकीतून खमंग कांदाभज्यांचा वास आला आणि जीभ खवळून उठली! खरं तर, आम्हा दोघांना दाक्षिणात्य पदार्थ आवडतात. पण तीन आठवड्यानंतर मात्र भज्यांची आठवण

यायला लागली होती. दोनतीन प्लेट भजी तिखट लालभडक लसणीच्या चटणीबरोबर खाल्ली मात्र; तृप्त वाटलं!

'आपले' असे काही पदार्थ असतातच. सरोज माथूर या माझ्या मुंबईतील एका मैत्रिणीने लिहिलेलं 'माथूर घरानों के रीतिरिवाज' नावाचं पुस्तक जगभर विखुरलेल्या माथूर समाजात लोकप्रिय आहे. त्यात कोणत्या सणांना काय पदार्थ करायचे याचंही विस्तृत वर्णन आहे. शेवटी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही राहिला तरी आपली पालमुळं घट्ट रोवून राहायचा प्रयत्न करतो आणि खाद्यपदार्थ हा त्या मुळांचा एक महत्त्वाचा भाग असतो.

शाळेत असल्यापासूनच मला स्वयंपाक करायची व नवे नवे पदार्थ शिकायची फार हौस. सुदैवाने मला माझ्या मातुल व पितुल घराण्यातल्या आज्यांचा सहवास भरपूर लाभला व त्यामुळे अनेक अस्सल मराठी पदार्थांची माहिती मिळाली, पाककृती मिळाल्या, ते पदार्थ शिकायलाही मिळाले. तसेच, लग्नानंतर भरपूर भारतभ्रमण व विदेशसंचार झाला आणि त्यामुळेही माझ्या पाककृतींत भर पडत गेली. परंतु आज आपण महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचाच विचार करत आहोत.

चांद्यापासून बांद्यापर्यंत पसरलेल्या विशाल महाराष्ट्रात अनेक वेगवेगळ्या चवींच्या सामिष (व निरामिषही) पदार्थांची रेलचेल आहे. कमलाबाई ओगले यांच्या 'रुचिरा' या पुस्तकानं, तर मंगलाताई बर्वे यांच्या 'अन्नपूर्णा' या पुस्तकानं अनेक पदार्थ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचवले. सध्याच्या काळात तर वृत्तपत्रं व टीव्हीवरील विविध कार्यक्रमांतून सर्वच खाद्यसंस्कृतींचा जोरदार प्रसार होत आहे. वेगवेगळ्या ज्ञातींच्या वैशिष्ट्यपूर्ण पाककृती स्वतंत्र पुस्तकांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचत आहेत. घरगुती स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या सीकेपी, सारस्वत, मालवणी, वैदर्भीय, आगरी पाककृती, विविध खाद्यजत्रा व हॉटेलांच्या माध्यमांतून लोकांच्या रसना तृप्त करत आहेत.

हे सगळं असूनदेखील, अस्तंगत होणाऱ्या प्राण्यांच्या जातींप्रमाणे, आज अनेक मराठी खाद्यपदार्थ मराठी घरांतून अस्तंगत होताना दिसत आहेत. एकदा आमच्याकडे आलेल्या पाहुण्या बाईंना मी भाजणीचं थालिपीठ, घरचं लोणी व फोडणीची मिरची असं खायला दिल्यावर त्यांनी अनेक वर्षांनी इतकं चवदार थालिपीठ खाल्ल्याचं व त्यामुळे त्यांना त्यांच्या आईची आठवण आल्याचं आवर्जून सांगितलं. या पाहुण्याबाईंचं वास्तव्य अनेक वर्षं महाराष्ट्राबाहेर होतं. माझी एक मैत्रीण नुकतीच ऑस्ट्रेलियात मुलाकडे राहून परत आली. तिथे तिने एक दिवस पुरणपोळ्या केल्या होत्या. त्यावेळी त्यांच्याकडे तिथे गेली चाळीस वर्षं स्थायिक असलेले एक मराठी डॉक्टर जेवायला आले होते. ''अशा सुंदर गरमागरम पुरणपोळ्या माझी आई वारल्यानंतर अनेक वर्षांत मी खाल्ल्या नव्हत्या'' असं त्यांनी गहिवरून सांगितलं. जगाच्या पाठीवर कुठेही राहिलं आणि कितीही वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेतला, तरी आपल्या लहानपणच्या खाद्यसंस्कृतीशी आपली नाळ कुठेतरी कायम जोडलेलीच राहते.

सव्वा हात लांबीच्या हिरव्यागार केळीच्या पानावर वाढलेल्या, अनेक पदार्थांनी ते पान सजलेल्या, भोवती रांगोळी घातलेल्या पेशवाई पंगतींची वर्णनं आपण अनेक ऐतिहासिक पुस्तकं व मालिका यांतून वाचली व बघितली आहेत. फक्त मराठी खाद्यसंस्कृतीतच भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, भात, गोड पदार्थ वगैरे वाढण्याच्या ठरावीक जागा व ठरावीक क्रमही आहेत. घरातल्या तरुण लग्नाळू मुलींना जेवणाऱ्याचं पान कसं वाढावं, याचं शिक्षण घरातल्या पोक्त स्त्रिया देत असत. पानाच्या डाव्या बाजूला चटण्या-कोशिंबिरी, उजवीकडे भाज्या व उजवीकडच्याच बाजूला ठेवलेल्या वाट्यांत पातळ भाजी व आमटी. ताटाच्या मध्यभागी भाताचे प्रकार. सर्व जागा ठरलेल्या. माझे सासरे आयुष्याची शेवटची काही वर्षं आंधळे झाले होते. परंतु अशा वाढण्याच्या नेमक्या पद्धतीमुळे ते कोणाच्याही मदतीशिवाय व्यवस्थित जेवू शकत असत.

मराठी संस्कृतीत पानाची डावी बाजू ही उजव्याइतकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे शेंगदाणा, जवस, तीळ, कारळे, खोबरं, लसूण आदींच्या चटण्या संपूर्ण महाराष्ट्रभर बनवल्या जातात. मिरचीचा खर्डा ऊर्फ ठेचाही प्रचंड लोकप्रिय. लोणच्यांमध्ये मात्र राजस्थानी किंवा गुजराती लोणच्यांएवढं वैविध्य नाही. कांदा-बटाट्याच्या भज्यांबरोबर दुधीभोपळा, लालभोपळा, केळी, फ्लॉवर, कोबी, वांगी यांचीही भजी केली जातात. पालकाच्या पानांची भजी सर्रास सगळीकडे मिळतात. पण मायाळूच्या पानांची व ओव्याच्या पानांची भजी फक्त महाराष्ट्रातच होतात. पोह्याचे पापड, मिरगुंड, कुर्डया, पापड्या, फेण्या हीही खास आपलीच खासियत. हायवेवरच्या धाब्यांमुळे मटण-भाकरी, चिकन-भाकरी, पिठलं-भाकरी-ठेचा वगैरे पदार्थ अमराठी लोकांच्या ओळखीचे झाले आहेत. ''तुम्हारा पिठलं-भाकरी-ठेचा हमको बहुत अच्छा लगता है'' असं आमचे अमराठी मित्र आम्हांला आवर्जून सांगतात व कधी जेवायला येणार असले, तर तेच करा असा आग्रहही धरतात.

ज्वारी, बाजरी, तांदूळ, नाचणी वगैरेंच्या भाकऱ्या ही महाराष्ट्राचीच खासियत. पिठल्यातसुद्धा किती प्रकार! झुणका, रावण पिठलं, कुळथाचं पिठलं वगैरे. शिवाय कांदा, लसूण, शेवग्याच्या शेंगा, टोमॅटो आदींचा वापर केला, की प्रत्येक पिठल्याची कृती एकच, पण चव मात्र वेगळी. ब्राह्मणी घरात वाटली डाळ या नावाने होणारा पदार्थ थोड्या फार फरकाने कृषक संस्कृतीत 'मोकळं बेसन' या नावाने ओळखला जातो, हे आमच्या घरी कामाला असलेल्या सुलोचनाबाईंकडून मला कळलं. त्याशिवाय, उन्हाळ्यातली आंब्याची डाळ वेगळीच. साधं भरलं वांगंसुद्धा कांदा, लसूण, ओलं खोबरं, सुकं खोबरं, शेंगदाणे, तीळ, चिंच, गूळ आदी घटकांच्या फेरफाराने किती वैविध्यपूर्ण बनू शकतं, हे महाराष्ट्रातच बघता येतं. 'बैंगनका भर्ता' नामक पदार्थ दक्षिणेपासून उत्तरेकडे एकाच युनिव्हर्सल चवीचा मिळेल. पण महाराष्ट्रातलं वांग्याचं भरीत हे चिंच-गुळाच्या कोळाचं, नारळाच्या रसातलं, दह्यातलं, कच्च्या कांद्याचं, हातफोडणीचं, कसंही असू शकेल. दाक्षिणात्य संस्कृतीत भाताचे अनेक प्रकार आहेत, तसेच महाराष्ट्रातसुद्धा आहेत. साधा मसालेभात घ्या. प्रत्येक जिल्ह्यात फोडणीच्या पद्धती वेगळ्या. भातात घालण्यात येणारे घटकपदार्थ वेगळे. त्यामुळे चवीत खूप फरक. उदाहरणार्थ, बेसनभात,

तोंडलीभात, नागपुरी वडाभात, साखरभात, वांगीभात, नारळीभात, मटारभात वगैरे. वेगळी भाजी, भाताला वेगळी चव!

महाराष्ट्राला मोठा समुद्रकिनारा लाभल्याने बहुतांश जिल्ह्यांत भात व भाकरी हेच मुख्य अन्न. चपात्या (पोळ्या म्हटलं की त्या पुरणाच्याच असं काही जण म्हणतात) व पुऱ्या एवढेच गव्हाचे वारंवार केले जाणारे पदार्थ. पराठे, खाकरे, थेपले हा फ्यूजनचा परिणाम. महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या भाज्या पिकतात व त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीने ओल्या वा कोरड्या मसाल्यांचा वापर करून अनेक भाज्या बनवल्या जातात. ब्राह्मणी डाळिंबी उसळ ही सीकेपी मैत्रिणींकडे 'वालाचं बिरडं' म्हणून ओळखली जाते. मटकी, मूग, मसुराच्या उसळीच्या जोडीला उडदाचं घुटं हा प्रकार मी एका शेतकरी कुटुंबात खाल्ल्याचं मला आठवतं. महाराष्ट्रात पालेभाज्या भरपूर, त्यामुळे अनेक पालेभाज्या भाकरीबरोबर खायची पद्धत. इतर कुठल्याच प्रांतात इतका पालेभाज्यांचा (पालकाव्यतिरिक्त) वापर नाही. त्यामुळे 'पालेभाज्या म्हणजे घासफूस', असं तिथे समजलं जातं. महाराष्ट्रात मुळा, चाकवत, मेथी, शेपू, लाल-पांढरा माठ, राजगिरा, अळू, पालक, पातीचा कांदा यांसारख्या अनेक पालेभाज्या बारा महिने मिळतात; तर भारंगी, फोडशी, टाकळा या पावसाळी पालेभाज्या. ताक घालून, डाळीचं पाठ लावून, मूगडाळ-तूरडाळ-हरभराडाळ यांचं व्यंजन वापरून, कांदालसूण घालून या पालेभाज्या महाराष्ट्रभर बनवल्या जातात.

न्याहारीच्या पदार्थांतसुद्धा महाराष्ट्राइतके वैविध्य इतर प्रांतात नाही. साधे पोहे घ्या. सबंध महाराष्ट्रभर पोह्याचे विविध प्रकार केले जातात. दडपे पोहे, फोडणीचे पोहे, बटाटे पोहे, कोळाचे पोहे, दही पोहे, दूध पोहे, तळलेले पोहे, साखर पेरलेले पोहे. आठवडाभर न्याहारीला पोहे करा; तरी रोज व्हरायटी मिळेल! साबुदाण्याची खिचडी हा तर मराठी स्वयंपाकघराचा मानबिंदू. माझ्या अनेक अमराठी मैत्रिणींना साबुदाणा भिजवण्यापासूनची कृती मी लिहून दिली आहे. वड्यांचे प्रकार तरी किती! साबुदाणा वडे, भाजणीचे वडे, बटाटेवडे, तांदळाचे वडे, कोथिंबीर वडी इत्यादी. भाजणीचे थालिपीठ, तसे ज्वारीच्या पिठाचे धपाटे. आमच्या धिरड्यांची सर अमेरिकेतल्या कुठल्याही पॅनकेकला कधीच येणार नाही. काही ठिकाणी तांदळाच्या पिठाची ताक, लसूण, ओली मिरची घालून केलेली उकड, तर काही ठिकाणी ज्वारीच्या पिठाची उकडपेंडी. उपमा अलीकडचा. पूर्वीचा तिखटमिठाचा वा गोडाचा शिरा किंवा सांजा. हे सगळं फक्त न्याहारीबद्दल!

मराठी संस्कृतीत वर्षभर येणारे सणवार आणि खाद्यपदार्थ यांचं एक अतूट नातं आहे. आपल्या कृषकसंस्कृतीशी व ऋतुबदलांशी ते निगडित आहे. शरीरातील कफ, वात व पित्त यांच्यातील संतुलन आणि त्यावेळी उपलब्ध असणारे पदार्थ यांची सांगडही या परंपरांत घातलेली दिसते.

चैत्रात गुढीपाडव्याला श्रीखंड किंवा बासुंदी हमखास. चैत्री नवरात्र तेव्हाच सुरू व्हायची. सगळीकडे चैत्रगौरीच्या हळदीकुंकवांची धामधूम. गार पन्हं. आंब्याची डाळ. भिजवलेल्या हरभऱ्यांनी भरलेली ओटी. आम्हा पोराटोरांची चंगळ. रामनवमीला व हनुमानजयंतीला सुंठवडा. अक्षयतृतीयेला सुंठ घातलेला केशरी आमरस नैवेद्याला हवाच. ज्येष्ठातील वटपौर्णिमेला गावठी छोट्या आंब्यांचा नैवेद्य. आषाढ व श्रावणात उपासतापास भरपूर. एकादशी दुप्पट खाशी! साबूदाण्याची खिचडी, वरीचा भात, दाण्याची आमटी, बटाट्याची भाजी, दाण्याचे लाडू, राजगिरा वडी. श्रावणातल्या चारही मंगळवारी कुठे ना कुठे मंगळागौरीचं आमंत्रण असायचंच. मटकीची उसळ, मसालेभात, पुरणपोळी, कटाची आमटी, खमंग काकडी असा ठरलेला मेनू. रात्री मंगळागौरीच्या खेळांचा दंगा. श्रावणातल्या शुक्रवारी हळदीकुंकवांना मसाला दूध व चणे हवेतच. नागपंचमीला पुरणाची दिंड आणि वर साजूक तूप. गोपाळकाल्याच्या दिवशी सायीच्या दह्यादुधात बनवलेले मस्त दहीपोहे. भाद्रपदात गणेशचतुर्थीला गूळ-नारळाच्या पुरणाने भरलेले उकडीचे मोदक ठरलेले. आश्विनातल्या दसऱ्याला श्रीखंडपुरीचा बेत. कोजागरीच्या रात्री मसाला दूध हवेच. आटीव दूध, केशराच्या काड्या, वेलची, जायफळ, चारोळ्या. घरोघरीच काय, सार्वजनिक बागांतसुद्धा हाच कार्यक्रम. मग लगेच कार्तिकात येणाऱ्या दिवाळीचा थाट तर विचारू नका. खुसखुशीत अनरसे, चिरोटे, पाकातले चिरोटे, कडबोळी, चकल्या, रव्याखोबऱ्याचे लाडू, बेसनाचे लाडू, कडाकण्या, चकल्या, चिवडा, ओल्या नारळाच्या करंज्या, खाजाचे कानवले... नुसत्या नावांनी दिवाळीची चाहूल लागते. आजदेखील आमच्याकडे दिवाळीच्या पहिल्या दिवसाचा फराळ हाच असतो. त्याचप्रमाणे पौषातील संक्रांतीला गूळपोळ्या व तिळगुळाचे लाडू किंवा फाल्गुनातल्या होळीला पुरणपोळी हा बेत ठरलेला. सण आणि पक्वान्न यांचं हे नातं किती छान आहे नाही!

माझ्या लहानपणी माझ्या आज्या करत असलेल्या खाद्यपदार्थांपैकी अनेक पदार्थ मला आजही आठवतात व आजही मी ते अधूनमधून करते. हळदीच्या पानातले पातोळे, काकडीचे घावन, भोपळ्याचे घारगे, कणकीचे शंकरपाळे इत्यादी. माझ्या बाबांची आई 'गाकर' म्हणून एक अफलातून प्रकार करायची. गुळाचं पाणी, मीठ व तेल घालून कणीक भिजवायची व थालीपिठासारखी तव्यावर लावायची. ते असे खरपूस व्हायचे, की आजच्या कुठच्याही बिस्किटाला ती चव येणार नाही. केळीच्या पानातली तांदळाच्या पिठाची पानगी घरच्या लोणी-तुपाबरोबर व फोडणीच्या मिरचीबरोबर अफलातून लागायची. भरपूर गूळखोबऱ्याचं सारण घातलेल्या मोदकाबरोबर निवगरी नावाचा एक अफलातून प्रकार आजी करायची. तांदळाच्या पिठाची मुलायम उकड काढायची व ती मळताना तिच्यात जिरं, कोथिंबीर, वाटलेली ओली मिरची असं घालायचं व त्याच्या छोट्या चकत्या हातावर थापून इडलीसारख्या उकडून काढायच्या. कच्च्या तेलाबरोबर वा सायीच्या दह्याबरोबर कितीही खा, जीभ खवळणारच. लेकाला, म्हणजे माझ्या बाबांना, आवडतात म्हणून पहाटे उठून स्टोव्हवर तांदळाच्या पिठाच्या ओल्या फेण्या करणारी स्वयंपाकघरातली पाठमोरी आजी मला अजून आठवते. आईच्या हातची फणसाची-आंब्याची सांदणं, फणसाची ठेचकुयरी, फणसाच्या आठळ्यांची भाजी, काय काय आठवतं! आज माझी कन्यादेखील फणसाची भाजी आवडीनं खाते.

सामिष पदार्थांबद्दल अधिकारवाणीने मला काही लिहिता येणार नाही. कारण शाकाहाराचा आमच्यावरील प्रभाव! तरीदेखील अनेक जातींच्या मित्रमंडळींत वावरणं, वाचणं व टीव्हीवरील अनेक कार्यक्रमांमुळे नागपूरकडचं सावजी मटण, कोल्हापूरचा तांबडा-पांढरा रस्सा, मालवणी वडे-सागुती, नाशिकचं काळं मटण हे बनवण्याच्या पद्धतीतले फरक व वेगवेगळे मसाले यांचं ज्ञान मात्र झालं. पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, रवींद्र पिंगे प्रभृतींनी मत्स्याहाराबद्दल भरपूर लिहिलं आहेच. त्यात मी बापडी काय भर घालणार?

गोडाचं म्हणाल तर मात्र श्रीखंड, बासुंदी, पुरणपोळ्या, गूळपोळ्या, सुधारस, पाकपुऱ्या, घावन-गुळवणी, पुरणाची दिंड यापलीकडे आपली गाडी जात नाही. कारण जेवणानंतर खायचे पुडींग, कस्टर्ड, पाय, टार्ट आदी पाश्चात्त्य पदार्थ आपल्या खाद्यसंस्कृतीत कधी आलेच नाहीत. दीडशे वर्षांची इंग्रजांची राजवट आमच्या खाद्यसंस्कृतीवर टोमॅटो केचप, केक आणि ब्रेडपलीकडे फारसा काहीच प्रभाव टाकू शकली नाही, याचं मला आश्चर्य वाटतं. उत्तर भारतातल्या मिठायांवर व इतर गोड पदार्थांवर मुसलमान संस्कृतीचा मोठा प्रभाव पडला. त्यामुळे त्यात भरपूर दूध व सुक्यामेव्याचा, केवडा-गुलाब आदी सुगंधांचा वापर झाला व बहुधा त्यामुळेच हे पदार्थ बऱ्यापैकी लोकप्रिय झाले. यामध्ये फिरनी, शाही टुकडा, कुल्फी, मालपोवा, शीरकुर्मा, खुबानीका मीठा आदी पदार्थांचा समावेश होतो. रसगुल्ला, संदेशसारख्या बंगाली मिठाया तर हल्दीराम व के. दासने पार जगभर पोचवल्या.

समृद्ध अशा या मराठी खाद्यसंस्कृतीची आज आपल्याला दुर्दैवाने पीछेहाट होताना दिसत आहे. मराठी लग्नात वा पार्ट्यांतही मराठी खाद्यपदार्थ फारसे कधी खायला मिळत नाहीत. पाहुणे येणार असतील, तर मराठी घरातही हटकून पंजाबी किंवा दाक्षिणात्य पदार्थ बनतात, नाहीतर अलीकडचे पनीर आणि मशरुम घातलेले प्रकार. मराठी खाद्यपदार्थ देणारी मुंबईतली हॉटेलंही नामशेष होत चालली आहेत. लग्नात मराठी खाद्यपदार्थ ठेवले, तर ''काय ते अळूचं फदफदं आणि बटाट्याची भाजी! हे काय लग्नी जेवण आहे का?'' असं आपलेच मराठी लोक बोलू लागले आहेत.


मग हा प्रश्न उभा राहतो, की मराठी खाद्यसंस्कृतीचं आज भारतात काय स्थान आहे? मिसळ, बटाटेवडे, साबुदाणा खिचडी, कोंबडी-वडे, भाकरी-पिठलं-ठेचा, कोथिंबीरवडी हे मराठमोळे पदार्थ अमराठी लोकांपर्यंत हळूहळू पोचत आहेत, विविध खाद्यजत्रांतून या पदार्थांना चांगला प्रतिसादही मिळत आहे, पण ज्या प्रमाणात पंजाबी, दाक्षिणात्य वा गुजराती पदार्थ देशभरच नव्हे, तर जगभर लोकप्रिय झाले, त्या प्रमाणात मराठी पदार्थ लोकप्रिय झाले नाहीत हे मात्र खेदाने नमूद करावंसं वाटतं.

'चख ले इंडिया', 'विकी गोज व्हेज', 'हाय वे ऑन माय प्लेट' यासारख्या टीव्हीवरच्या अनेक कुकरी शोजमध्ये आजपर्यंत मी तरी (मिसळीव्यतिरिक्त) मराठी पदार्थ दाखवलेला कधी पाहिलेला नाही. मराठी पदार्थ इंग्रजी-हिंदी भाषांच्या माध्यमांतूनच जास्तीत जास्त अमराठी लोकांपर्यंत पोचतील, असं वाटतं.

मराठी खाद्यपदार्थांची विक्री अजून आक्रमकपणे व्हायला हवी. आपण प्रत्येकाने आवर्जून आपले मराठी पदार्थ आपल्या अमराठी मित्रमंडळींना खायला घालायला हवेत. आपल्याकडच्या लग्नांत, पार्ट्यांत दोन-चार तरी मराठी पदार्थ आवर्जून ठेवावेत. कोक व ज्यूस अशी पेयं पाहुण्यांना देण्याऐवजी कोकम सरबत, कैरीचं पन्हं द्यावं. आपल्या तरुण पिढीला हे पदार्थ करायला व खायला प्रोत्साहन द्यावं. तरच आपल्या मराठी खाद्यसंस्कृतीची त्यांना ओळख होईल. माथेरान-महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणी हजारो पर्यटक देशभरातून येत असतात. उत्तम मराठी पदार्थ विकायची तिथे व्यवस्था करायला हवी. मराठीपण जपण्याचा हाही एक महत्त्वाचा मार्ग आहे. पिझ्झाला *पिझ्झा हट* आणि बर्गरला *मॅक्डोनल्ड* यांनी जगभर पोहोचवलं. चितळेंची बाकरवडी हा आपल्याकडचा एक यशस्वी ब्रँड म्हणता येईल. साबुदाण्याच्या खिचडीला व कैरीच्या पन्ह्याला ब्रँडचं स्वरूप देणारी तशीच एखादी चेन भेटली असती किंवा एखाद्या मराठी उद्योजकाने छोट्या प्रमाणात का होईना, पण तशी एखादी स्वत:ची चेन सुरू केली असती, तर किती छान झालं असतं!

एकंदरच आपल्या मराठीपणाचा साकल्याने विचार करताना आपल्या खाद्यसंस्कृतीला त्यातून वगळता येणार नाही असं मला वाटलं, म्हणून हा लेखप्रपंच. असं म्हणतात, की माणसाच्या हृदयात शिरायचा मार्ग त्याच्या पोटातून जातो. मराठी संस्कृती इतर बहुरंगी, बहुढंगी समाजाच्या हृदयात स्थानापन्न करण्यासाठीसुद्धा खाद्यसंस्कृतीचंच साहाय्य घ्यावं लागेल.

*(दिवाळी २०११)*




*जुलै २०१५*
*शनिवारवाडा (चित्रकार एडवर्ड लिअर)*

# यात्रा रेल्वेची!

## गणेश मनोहर कुलकर्णी

आपण सगळेच काही ना काही कारणांनी रेल्वेने प्रवास करतच असतो. ती ट्रेन चालवणाऱ्या इंजिन ड्रायव्हरचा आणि साहित्याचा काही संबंध असावा असे सहजतः वाचकांना वाटत नाही. पण रसिक आणि संवेदनक्षम मन त्या नोकरीतही अनेक वेधक अनुभव टिपत असते.

कॉलेज संपता संपता मी रेल्वेची कुठलीतरी परीक्षा दिली होती. त्यात पास होऊन रतलामला प्रशिक्षणासाठी जायचं होतं. दोन वेळचा जगण्याचा झगडा इतका मोठा होता, की कसली नोकरी आहे याचा काहीही विचार न करता ट्रेनिंगसाठी रतलामला पोचलो. तिथे कळलं की, आपण इंजिन ड्रायव्हर बनणार आहोत. सुरुवातीला सहायक, मग चालक, त्यातही पहिल्यांदा छोट्या शंटिंग गाड्या, मग मालगाडी, मग पॅसेंजर आणि सरतेशेवटी मेल-एक्सप्रेस चालक.

मेल गाड्यांचा चालक हा सर्वांत सीनिअर असतो. इथपर्यंत येण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर कठोर प्रशिक्षण / वैद्यकीय परीक्षा / सायको टेस्ट अशा विविध गोष्टींना सामोरं जावं लागतं. हा सारा प्रवास, वाचताना वाटतो तितका, सोपा असतच नाही. निसर्गाच्या विरुद्ध वेळात, लांब घरापासून दूर जात, सातत्याने एक तणावाचं आयुष्य जगत स्वत:ला सिद्ध करत राहणं सोपं नाही. त्यात माझी पदवी वनस्पतिशास्त्रातली. त्यामुळे नट आणि बोल्ट कशाशी खातात हेच माहीत नाही. मग नोकरीला गेल्यावर चार वर्षांचा पार्ट टाइम यांत्रिक शाखेचा सोमय्यात डिप्लोमा केला. नोकरीत काही कुणी पायघड्या घातलेल्या नव्हत्याच. त्या सगळ्या अडचणींवर मात करत खूप कष्टाने शिक्षण घेतलं. मी थोडासा कवी वगैरे – जे वयाप्रमाणे सारेच असतात – तसाही होतो. आमच्या कॉलेजातदेखील सर्वांना शंका होती, की मी हे सारं कसं निभावेन. आमच्या दूरच्या एका काकांनी तर बाबांना घाबरवून टाकलं होतं, की हा मुलगा पाच वर्षांत नोकरी सोडून देईल. टिपिकल मध्यमवर्गीय बापाने त्यावेळी तर अगदी हाय खाल्ली होती. पण आज २२ वर्षं मी सगळे टक्केटोणपे खात माझ्या नोकरीत ताठ मानेने उभा आहे. मी आज मेल ड्रायव्हर आहे. बांद्रा ते अहमदाबादपर्यंत रोज ये-जा करतो. 'गरीबरथ'सारखी मानाची गाडी नित्य नवी आव्हाने पेलत चालवतो.

*सोसण्याने घडत जाते जिंदगी पण.... सोसण्यासाठीच कुणी जगत नाही....* हेसुद्धा तितकंच खरं असतं. तर ड्रायव्हरच्या आयुष्यावर मी काहीतरी लिहावं हा संपादकांचा तगादा. हा विषय 'पुलं'नी थोडासा मांडला होता. तोही मिश्किलपणे. म्हणजे कुलकर्णी / बापट कोळशाची इंजिनं चालवू शकलोच नसते! आज अतिशय प्रगत अशी इंजिनं आल्यामुळे तसे शारीरिक कष्ट कमी असतात. याचप्रमाणे, अनिल अवचटांनी स्टेशनवर लिहिताना ड्रायव्हरसारखा अस्पर्शित विषयाला ओझरता स्पर्श केला आहे, त्यांच्या नव्या पुस्तकात *(पुण्याची अपूर्वाई)*. खरं तर अवचटांचा लेख वाचताना मनातून थोडा खट्टूही झालो होतो. कारण त्यांनी या विषयाला हात घातला, तर आपला हुकमी विषय आपल्या हातून निसटेल ही भीती आणि त्यांच्यासारखं लिहिणं आपल्याला बापजन्मात जमणार नाही हा विश्वास. पण स्टेशनवर लिहिताना अचानक तो विषय त्यांनी अर्धवटच ठेवला. कदाचित माझ्यासाठी!

ड्रायव्हर हा कुठल्याही संस्थेत महत्त्वाचा भाग असतो. साधं आपण कुठे फिरायला गेलो तरी आपल्या गाडीच्या ड्रायव्हरला आपण अपार प्रेमानं सांभाळतो. इथे तर रेल्वेच्या इतक्या मोठ्या अजस्र पसाऱ्यात ड्रायव्हरचं महत्त्व आजही अबाधित आहे. पूर्वी अँग्लो-इंडियन लोक ड्रायव्हर असायचे. त्यावेळी कोळशाची इंजिनं असायची. तसली वाफेवर चालणारी इंजिनं आज कालबाह्य झाली, तरीही काही ठिकाणी रेल्वेची हौस म्हणून ती चालवली जातात. मी ज्या ठिकाणी काम करतो, तो भारतीय रेल्वेचा मानाचा मार्ग आहे. ज्याला इंग्रजीत ट्रंकरूट म्हणतात अशा मार्गावर माझी नोकरी असते. आज डिझेल / इलेक्ट्रिक यांवर चालणारी नवीनवी इंजिनं आलेली आहेत. भारतीय रेल्वेचा प्रवास थक्क करणारा आहे. पृथ्वीच्या चोवीस प्रदक्षिणांइतके किलोमीटर आपली रेल्वे रोजच्या एका दिवसात धावत असते.

ठाणे येथला पारसिकचा बोगदा १९१६ साली बांधला. त्यावेळी नुकतीच रेल्वे रांगत होती. पण आत त्याच बोगद्यातून रोज असंख्य गाड्या ये-जा करतात. इंग्रजांनी बांधलेल्या अनेक स्टेशनांपैकी व्हीटी स्टेशन हे एकमेव स्टेशन होतं ज्यावर पादचारी पूल नव्हता. किंबहुना, त्याची गरज वाटू नये अशीच त्याची रचना होती. जाता जाता इथे नमूद करतो, की व्हीटी स्टेशनचं जुनं नाव ज्या राणीच्या नावावर होतं, तिच्या घराण्यातून काही रक्कम दरसाल या स्टेशनच्या देखभालीसाठी यायची, पण ज्या दिवशी नवे नाव छत्रपती शिवाजी टर्मिनस ठेवलं, त्या दिवसापासून हा

तनखा बंद झाला आहे असं ऐकिवात आहे. आज राज्य आणि केंद्र एकमेकांवर हा खर्च ढकलत आहेत, त्यामुळे येणाऱ्या दिवसांत त्याची देखभाल कुणी करायची, हा मोठाच वादाचा विषय ठरणार हे नक्की!

ड्रायव्हर हा पदोन्नती घेत घेत ड्रायव्हर बनतो. सहायक लोको पायलट अशी रेल्वेत सुरुवातीची भरती होते. मग परीक्षा / अनुभव / निरंतर प्रशिक्षण आणि शारीरिक प्रशिक्षण अंमळ कठीणच असतं. दर चार वर्षांनी आमची मेडिकल होते. यात थुंकीपासून लघवीपर्यंत सारंच तपासलं जातं. सुरुवातीची दोन मेडिकल, म्हणजे जवळ जवळ आठ वर्षं, चष्मा चालत नाही. रंगांधळेपणा तर कुठल्याही वयात खपवून घेतला जात नाही. सायको टेस्ट सुरुवातीला घेतली जातेच, पण जेव्हा आम्ही १०० कि.मी.पेक्षा जास्त वेगाने गाडी चालविण्यासाठी निवडलो जातो, त्याच्या अगोदर परत एकदा सायको टेस्ट घेतली जाते – ज्याला हाय-स्पीड सायको टेस्ट म्हणतात. ती पास झालो, तरच १२० कि.मी. वेगाची गाडी चालवायला दिली जाते. भारतीय रेल्वेचा अधिकतम वेग १२० कि.मी. आहे.

गाडीचा वेग हा सर्वस्वी इंजिनाच्या मागे लावलेल्या डब्यांवर अवलंबून असतो. इंजिन स्वतः अधिकतम १६० कि.मी.पर्यंत चालू शकतं. आता भारतात सगळीकडे या वेगाने गाड्या चालतात असं नाही. मुंबई-दिल्ली वेस्टर्न रेल्वेवर १२० कि.मी.ने गाडी चालते, पण मध्य रेल्वेत घाट असल्यामुळे ते शक्य नाही. म्हणजे वेगासाठी डब्यांबरोबर भौगोलिक परिस्थितीदेखील महत्त्वाची असते. भारतात तीन गेजवर गाड्या चालतात – नॅरो गेज, मीटर गेज आणि ब्रॉड गेज. नॅरो गेज म्हणजे माथेरानची गाडी. मीटर गेज म्हणजे अहमदाबाद-उदयपूर एक गाडी चालते. नॅरो आणि मीटर गेजमध्ये इलेक्ट्रिफिकेशन शक्य नाही. त्या गाड्यांसाठी वेगळी, छोटी, फक्त डिझेलवर चालणारी इंजिनं असतात. याच मार्गाचं नंतर नूतनीकरण होऊन त्याचं रूपांतर ब्रॉड गेजमधे करतात. हे रूपांतर तिथल्या विकासावर सर्वस्वी अवलंबून असतं. मग सिंगल लाइन / डबल लाइन / फोर लाइन अशा चढत्या भाजणीने रेल्वे धावते. तुमचा पुणे-सोलापूर आता आतापर्यंत सिंगल लाइन होता. आमच्याकडे उधना-नंदुरबार असा एक मार्ग मध्य रेल्वेशी हितगुज करायला जातो. तो अजूनही सिंगल लाइन आहे. मुंबई ते पुणे डबल लाइन आहे. वाचकांच्या पटकन लक्षात यावं म्हणून मी अशी उदाहरणं देत आहे. पश्चिम रेल्वेत आमच्याकडे चर्चगेट-मुंबई सेंट्रल चार लाइन. मुंबई सेंट्रल अंधेरी, बांद्रा पाच लाइन. बांद्रा बोरीवली सात लाइन. नंतर परत बोरिवली विरार चौपदरी अशा वाढत्या नेटवर्कमध्ये काम करणं सोपं नाही. एका प्रख्यात सर्जनचं असं म्हणणं होतं, की जेव्हा एखादा सर्जन ऑपरेशन करत असतो, तेव्हा मेंदूपासून पायातल्या बोटापर्यंत त्याचा प्रत्येक अवयव कामात असतो. त्याचप्रमाणे आम्हां ड्रायव्हर लोकांचंदेखील असतं. गाडी चालवताना मेंदूपासून पायाच्या बोटापर्यंत आमचे सगळेच अवयव कामात असतात. इतका तणाव झेलण्यासाठी कणखरपणा खूपच आवश्यक असतो. तो कैक वर्षांच्या सरावाने अंगात मुरत जातो. एकाच जागेवर सात-आठ तास बसून गाडी चालवणं खरंच खूप आव्हानात्मक असतं.

काही गाड्या सतत धावत असतात. एका निर्धारित गतीने धावताना समोर येणाऱ्या प्रत्येक घटनेला प्रतिसाद देत पुढे सरकावं लागतं. हाय स्पीड सायको घेण्याचा उद्देशदेखील हाच असतो, की तुम्ही चटकन निर्णय घेता की नाही हे तपासणं. चटकन निर्णय घेण्याची सवय इतकी अंगात मुरत जाते, की घरातल्यांनाही त्याचा त्रास होतो. खूपदा एखाद्या विषयावर घरातले सगळे मिळून चर्चा करत असतात, पण कुठल्याही ठाम निर्णयाअगोदर त्या सर्वांना माझ्याशी बोलायचं असतं. मग मी ज्यावेळी उपलब्ध असतो, त्यावेळी अशा एखाद्या समस्येची चर्चा सुरू होते. मी त्यावर चटकन निर्णय देऊन मोकळाही होतो. घरच्यांना मात्र मला त्या समस्येचं गांभीर्यच नाही असं वाटतं. पण प्रत्यक्षात इतका वेळ दवडणं मला पटतच नाही. मग उगाच घरच्यांचे गैरसमज वाढत राहतात.

भोवताली रेल्वेचे रूळ आणि दगड असल्यामुळे ड्रायव्हर रुक्षच असतात असाच साधारण समज आहे. यात एकटेपणा हा त्यांच्या नशिबाने त्याला बहाल केलेला एक दुखरा सल आहे. निसर्गाच्या विरुद्ध वेळेत सतत घरापासून दूर राहणारा ड्रायव्हर माणसांत फार कमी रमतो, कारण भोवतालच्या लोकांच्या वेळेत तो घरात असतच नाही. दिवाळी, दसरा, कुठला सण, काळ, वेळ या कुठल्याच गणितात नसणारी अशी त्याची कामाची वेळ असते. पुलंचा पोस्टमन आग विझवायला आलेल्या गाडीच्या शिडीवरून वरच्या मजल्यावर पत्र टाकून स्वतःचा निष्कामपणा सिद्ध करत असतो, त्याचप्रमाणे आम्ही निष्कामपणे भोवतालच्या कुठल्याही मोहात गुंतून न पडता सतत धावत असतो. मेल गाड्या साधारणपणे रात्रीच चालतात. त्यामुळे जेव्हा हा घरी असतो, तेव्हा सारं जग वेगळ्या दुनियेत असतं आणि हा मात्र मोठ्या कष्टाने स्वतःची झोप पूर्ण करत असतो. परत संसारातल्या मूलभूत जबाबदाऱ्या पार पाडताना थोडासा अवघडलेपणा नकळत याच्या वागण्यात येत जातो. हा ज्या लोकांमध्ये असतो, त्यांची दुनियाच वेगळी असते. खूपदा एकाकीपणा घेरून येतो, आपल्याला इतरांनी वाळीत टाकल्यासारखंदेखील वाटतं. अस्तु!

भारतात रेल्वेचं जितकं लोकांना आकर्षण आहे तितकं जगात कुणालाच नसेल. माझी नोकरी भारताच्या पश्चिम किनाऱ्याच्या काठाने वाढली. म्हणजे मुंबई-गुजरात हा पट्टा तसा समुद्राच्या जवळचा. समुद्राला मिळणाऱ्या अनेक नद्या मी रोजच्या रोज पार करतो. त्यांच्या दर्शनाने धन्य होतो. यांतल्या काही नद्या बारमाही असल्यामुळे मुबलक पाणी पार उन्हाळ्यातही यांतून वाहत असते. त्यामुळे नकळत भोवतालचा हिरवेपणा ऋतुमानानुसार कमी जास्त होतो इतकंच, पण अगदी रखरखीतपणा मात्र नसतो. रेल्वेचा ट्रॅक हा भर वस्तीतून कधीच जात नाही, पण ट्रॅक आल्यावर मात्र त्याच्या भोवताली वस्ती इतकी गच्च होते, की ट्रॅक अगोदर की वस्ती यांच्या झगड्याला उगाचच सुरुवात होते. सतत काहीतरी घडणारी नोकरी मी करतोय. प्रत्येक क्षण महत्त्वाचा / मोलाचा. सतत सतर्क / सावध. कारण येणाऱ्या प्रत्येक क्षणाचं आव्हान निराळं, त्याला सामोरी जाणारी आपली वृत्ती, नजर रोज निराळी. कालचे फंडे आज नाहीत, आजचे उद्या नाही. सतत नवे पवित्रे, रोज काहीतरी वेगळे.

वपुंनी एके ठिकाणी म्हटलं होतं, की जो सातत्याने फिरतो, तो सर्वांत शहाणा असतो. या विभागात त्यांनी टीसीचा एक वेगळाच अनुभव सांगितला होता. एकदा पुण्याच्या गाडीत कल्याणहून काही मुलांचा ग्रुप चढला. सुट्टीचा मूड, धमाल चाललेली. एकमेकांची फिरकी घेणं / चिडवणं असं सर्व चाललं होतं. तब्बल २० ते २५ जणांचा ग्रुप होता. पण या सगळ्या गदारोळातदेखील एक मुलगा मात्र खिडकीत बसून हातातल्या पुस्तकात गढून गेला होता. त्याला या सगळ्या भोवताली घडणाऱ्या घटनांशी जसं काहीच देणं-घेणं नव्हतं. इतक्यात लोणावळ्याला एक मुलींचा ग्रुप चढला. सुंदर तरुणींना बघून या सर्वांना जरा अधिकच चेव आला. मग त्यांची मस्ती / आवाज जरा अधिकच वाढले. पण खिडकीतल्या मुलाने मात्र एकदा त्यांच्याकडे बघितलं व तो परत पुस्तकात गढून गेला. इतक्यात गाडीतला टीसी, जो दुरून हे सारं बघत होता तो, तिकीट तपासत या ग्रुपजवळ पोचला. सर्वांनी रिझर्व्हेशन दाखवलं. इंजिनिअरिंग कॉलेजचा ग्रुप पावसाळ्याच्या धमाल पिकनिकला निघालेला होता. टीसी, त्यातला जो कोणी एक लिडर होता त्याला म्हणाला, की 'तुमच्यात एकच मुलगा मात्र वेगळा आहे. जो या रिझर्व्हेशनच्या यादीत नाही. म्हणजे ऐनवेळी जो मुलगा येणार होता त्याच्याऐवजी दुसराच कोणीतरी तुम्ही आणला आहे.' सर्वांनी टाळाटाळ करायला सुरुवात केली. टीसी म्हणाला, 'बघा! मी तुम्हाला चार्ज नाही करत, फक्त मी तुमचा खोटेपणा ओळखला, याचा मला आनंद मिळू द्या.' शेवटी तो तथाकथित लीडर शरण आला, म्हणाला, 'आम्ही सारे इंजिनिअरिंगचे विद्यार्थी आहोत. पण खिडकीतला मुलगा आमच्याबरोबरचा नाही.' टीसी म्हणाला, 'थांबा, मी सांगतो की तो नक्की मेडिकलचा विद्यार्थी असणार.' आता माझ्यापासून सारेच चकित. याने कसं बरं ओळखलं? मलाच राहवलं नाही. मी म्हणालो, 'तुम्ही कसं ओळखलंत?' तो म्हणाला, 'हा वर्षानुवर्षाचा आमचा अनुभव आहे. एकतर त्या मुलाचे हात स्वच्छ आहेत. डॉक्टर लोकांना सतत हात धुवायची सवय असते. दुसरं, लोणावळ्याला मुली गाडीत चढल्यावर तुम्ही सारे चेकाळलात, पण तो मात्र शांत होता; कारण मेडिकलच्या विद्यार्थ्यांना मुलींचं एवढं आकर्षण असत नाही, त्यांच्या बरोबरीने भरपूर मुली शिकत असतात. पण इंजिनिअरिंगवाल्यांना मात्र मुलींचं जरासं स्टार्व्हेशनच असतं.' तर 'घुमता साधू आणि बहता पानी कधीही धीरगंभीर आणि अनुभवांनी समृद्ध असतात.' यात आम्हां इंजिन ड्रायव्हरचादेखील समावेश करायला हरकत नाही.

तर आमच्या ड्रायव्हर लोकांचेदेखील वेगवेगळे समज / गैरसमज असतात. फार पूर्वी आमच्या विभागात खूप कष्टाचे काम असल्यामुळे निरक्षरता होती. कारण कोळशाचं इंजिन चालवणं खरंच कष्टाचं काम होतं. सतत गरम धगीजवळ राहून लघवीदेखील बंद व्हायची. सतत कोळशाचा काळेपणा, धूर, एकटेपणा आणि भरपूर निरक्षरता यामुळे सहजच ड्रायव्हर व्यसनांच्या अधीन व्हायचे. स्वत:ला रमवण्यासाठी जिथे जातील तेथे घरोबा करणं, दारू, सिगरेट, भांग आणि बऱ्याच गोष्टींचं व्यसन आपसूकच लागायचं. त्या काळात खेड्यांमधून काही बायका अशा निरक्षरांना अक्षरशः पिळून घ्यायच्या. त्यांचा पगार घरी कमी आणि या बायकांच्या पदरात जास्त जायचा. घरचे उपाशी, त्याच वेळी बाहेरचे मात्र तुपाशी, असा साधारण एक काळ होता. पण हळूहळू काळ बदलला. रेल्वेने कात टाकायला सुरुवात केली. तिचा पसारा वाढत असतानाच कमी श्रमाची डिझेल / इलेक्ट्रिक इंजिनं आली. त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक होतं. साधारण १९८० नंतर प्रशिक्षितांची पलटण रेल्वेत यायला सुरुवात झाली. तोपर्यंत कुणीही ड्रायव्हर बनू शकायचा. ज्याला कुठेच नोकरी नसायची, त्याला रेल्वेत ड्रायव्हरची नोकरी चटकन मिळायची. त्याचमुळे सुरुवातीला यात मुस्लिम खूप होते. मग कष्टकरी यूपी / बिहारी आले. अजूनही मराठी माणसं तशी कमीच आहेत. त्यातही आमच्यासारखे ब्राह्मण तर अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच!

अनेक जाती, प्रजाती / धर्मांचे लोक आम्ही एकमेकांच्या सतत संपर्कात येत असतो. एखादा ड्रायव्हर इंजिनमध्ये आपल्या श्रद्धेचे फोटो लावतो / उदबत्ती पेटवतो, मग रस्त्यात दिसणाऱ्या देवीला, दर्ग्याला, मंदिराला रात्रीच्या अंधारात दोन फुटाच्या ट्रॅकवर समोर दिसणाऱ्या सिग्नलना प्रतिसाद देत भरधाव वेगाने गाडी धावत असते. आमच्या पाठीमागच्या २१-२४ डब्यांमध्ये प्रवासी आमच्यावर निर्धास्तपणे विसावून झोपलेले असतात. एका रिदमवर छानपैकी झोपेत मग्न झालेले असतात. (गाडीच्या रिदमने अनेक गीतांना / तालांना जन्म दिलेला आहे.) त्यामुळे आम्ही जरासे अधिकच सावध असतो. ट्रेनिंगच्या काळात आम्हांला हे सतत शिकवलेलं असतं, की मागच्या डब्यांमध्ये तुमचे आई-वडील बसलेले आहेत असं समजा. जर काही चूक केली, तर जे काही वाईट व्हायचं आहे, ते सर्वप्रथम त्यांच्या बाबतीत होईल. तेव्हा या ठिकाणी कुठल्याही चुकीला काही वावच नाही. सतत सावध, सतर्क हा इथला मंत्र आहे. तो वर्षानुवर्षाच्या सवयीने अंगात मुरलेला असतो. आता झोप येत नाही, असं नाही, कारण आपण सारीच माणसं आहोत. मग अशा वेळी उठून उभे राहतो. थोडेसे काहीतरी बिस्किट वगैरे तोंडात टाकतो. थर्मास असतोच, त्यातला थोडा चहा घेतो. खिडकीतून बाहेर डोकावतो. जंगलातला मस्त वास खोलवर भरून घेतो. वर आभाळावर उमटलेली चांदण्यांची नक्षी न्याहाळतो. उगाच एखादा तारा ओळखण्याचा प्रयत्न करतो. खरं तर गाडी खूप वेगात धावत असते व सप्तर्षींची दिशाही त्याच वेगाने बदलत असते.

गाडी सिग्नलप्रमाणे धावत असते. जवळ आलेला सिग्नल आमच्यासाठी महत्त्वाचा असतोच पण पुढचा येणारा, त्याच्या पुढेही येणारा सिग्नल अधिक महत्त्वाचा असतो. गेला तो क्षण गेला, येणाऱ्या क्षणाच्या पोटात काय दडलंय ते महत्त्वाचं. त्याच्यावर गाडीचा वेग अवलंबून असतो. इंजिनमध्ये स्टिअरिंग असत नाही. पण वेग वाढवणं आणि कमी करणं इतकंच काम आमच्या हातात नसतं; तर संपूर्ण इंजिनाची जबाबदारी आमच्यावर असते. जोडीला अनेक कामं आम्ही करत असतो. समोरचा ट्रॅक बघणं / स्टेशन पास होताना ऑलराइट देणं. 'ऑलराइट देणं' ही इंग्रजांनी सुरू केलेली पद्धत आजही उपयोगी पडत असल्यामुळे आजतागायत सुरू आहे. म्हणजे मी स्टेशनवरून पास होताना माझ्याकडचा हिरवा झेंडा (किंवा बॅटरी) मास्टरला दाखवतो. तोही

त्याच्याकडून मला प्रतिसाद देतो. या सगळ्या सांकेतिक भाषेतल्या खुणा आहेत. म्हणजे मी जेथून आलो तो भाग (सेक्शन) निर्धोक आहे, त्यात काही अडचण नाही, हे मी स्टेशन मास्टरला सुचवतो. त्याचवेळी तोदेखील मला पुढे जायला काहीच अडचण नाही, मार्ग निर्धोक आहे याची सूचना त्याच्या प्रतिसादातून देत असतो. याचप्रमाणे गाडीच्या शेवटी असणारा गार्डदेखील आपली गाडी बरोबर आणि संपूर्णपणे स्टेशनमधून जात आहे याची सूचना देत असतो. हे प्रत्येक स्टेशनवर एका रिदममध्ये घडत असतं. इंजिनवर माझ्याबरोबर सहायकदेखील असतो. मास्टर गाडी समोरून जाताना तिचं निरीक्षणही करत असतो. जेणेकरून काही तुटलं / सुटलेलं लटकत असेल किंवा चाकांमधून आग / ठिणगी उडत असेल तर ताबडतोब लाल झेंडा किंवा बॅटरी दाखवून तो गाडी थांबवतो. त्यामुळे स्टेशनमधून जाताना शेवटपर्यंत आमचं मास्टरकडे लक्ष असतं, त्याच्या अशा काही संकेतांना प्रतिसाद देणं हे आमचं कामच आहे.

परत प्रत्येक गेटवर शिटी वाजवावी लागते. आपल्याकडे रेल्वेचे रूळ ओलांडणं ही एक फॅशन आहे. अशा 'फॅशनेबल' माणसांनी आमच्या गाडीखाली मरू नये, यासाठी आम्ही सतत शिटी वाजवत स्टेशन / गेट पास करत असतो. याचा लोकांना त्रास होतो. मग ते रागावून शिव्या देतात / दगड फेकतात. पण आम्हांला यावर काहीच प्रतिक्रिया देता येत नाही. कारण आम्ही सरकारी नोकर! समोरचा दोन रुपयांचं तिकिट घेऊन वाटेल ते करू शकतो. कारण तो जनताजनार्दन! खरंतर गाडीखाली माणसं मरणं हा एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे! तो पुन्हा केव्हातरी. गाडी धावताना भोवताली अनेक खुणांचे बोर्ड लटकत असतात. त्यांचं अचूक पालन करत धावायचं असतं. कधी कधी रेल्वेची माणसं काम करत असतात. रूळ / दगड सातत्याने तपासावे लागतात. वेगाच्या प्रचंड हादऱ्यानं त्यात आलेली कमतरता वेळीच दुरुस्त नाही केली तर एखादा अपघात होण्याची शक्यता असते. अशा वेळी त्या-त्या ठिकाणी वेग कमी करण्याचे बोर्ड लागतात. त्याप्रमाणे निर्धारित गतीने आम्ही गाडी चालवतो. आम्ही म्हणजे आम्ही अनेक जण मिळून गाडी चालवतो.

एक गाडी ट्रॅकवर चालते तेव्हा वेगवेगळ्या विभागांतले अनेक लोक पडद्यामागे काम करत असतात. प्रत्यक्ष फिल्डवर आम्ही असलो, तरी सिग्नल यंत्रणेचे नियंत्रण कंट्रोल ऑफिसमधून होत असते. कंट्रोल ऑफिस हे एक वेगळंच प्रकरण आहे. इथे रात्रंदिवस काम चालू असतं. रेल्वेच्या मुख्यालयात हे असतं. सगळ्या ऑफिसेसना कुलपं लागतात, वेळ संपल्यावर किंवा सुटीच्या दिवशी, पण कंट्रोल ऑफिस मात्र तिन्ही त्रिकाळ, बाराही महिने सुरू असतं. याच्या अखत्यारीत वेगवेगळे विभाग असतात. एक मेन कंट्रोलर असतो. त्याला दिवसभराचं नियोजन करायचं असतं. इतरांच्या मदतीने तो त्या त्या दिवसाचं नियोजन यशस्वीपणे पार पाडायचा प्रयत्न करतो. रेल्वे अनेक विभागांमध्ये वाटली गेलेली आहे. प्रत्येक विभागाचं स्वतंत्र कंट्रोल ऑफिस असतं. ट्रॅकवर घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे पडसाद कंट्रोल ऑफिसमध्ये लगेच उमटतात. 'तुझ्या अंतरी कोणती वादळे, मला हेलकावे बसू लागले', असंच काहीसं कंट्रोल ऑफिसचं स्वरूप असतं. या सर्वांचा मुख्य डिविजनल मॅनेजर असतो. एक मॅनेजरने टीव्हीच्या मुलाखतीत असं सांगितलं होतं, ''मी ऑर्केस्ट्रॉचा कंडक्टर आहे. माझ्या अखत्यारीतील सर्व वाद्यं व्यवस्थित वाजली, तरच त्यातून आनंद देणारं संगीत मी निर्माण करू शकेन.''

आमच्या वेस्टर्न रेल्वे मुंबई डिविजनचं कंट्रोल ऑफिस पूर्ण जगात नावाजलं गेलं आहे. नॅशनल जिऑग्राफीवर वेस्टर्न रेल्वेच्या कंट्रोल ऑफिसवर एक डॉक्युमेंटरीदेखील दाखवली जाते. 'ट्रेन मॅनेजमेंट सिस्टिम' (TMS) ही प्रणाली आपल्याकडे वापरली जाते. डच टेक्नॉलॉजीवर आधारित संपूर्ण संगणकाने वापरलं जाणारं अद्ययावत तंत्रज्ञान इथे वापरलं आहे. नासाच्या ऑफिससारखं प्रचंड मोठं ऑफिस मुंबई सेंट्रलला आहे. याचा रस्तादेखील इतरांपेक्षा वेगळा असतो. इतर ऑफिसमधील लोकांचा उपसर्ग / संपर्क होऊ नये अशा तऱ्हेने या ऑफिसची रचना केलेली असते. नको ती माणसं इथे येऊच शकत नाही. रेल्वेत काम करणाऱ्या इतर विभागांतील लोकांनादेखील या यंत्रणेचं महत्त्व आणि कार्य माहीत असेलच असं नाही. कंट्रोल ऑफिस हे रेल्वेचं धडकतं हृदय आहे. मी स्वत: काही वर्षं कंट्रोल ऑफिसमध्ये काम केलेलं आहे. प्रचंड मोठ्या पडद्यावर विरार ते चर्चगेटमध्ये धावणाऱ्या प्रत्येक गाडीचं रेखाचित्र समोर उमटतं. प्रत्येक गाडीला एक नंबर असतो. वेस्टर्न रेल्वेवर रोजच्यारोज जवळजवळ १,३०० लोकल धावतात. बाहेरगावच्या तब्बल ५० ते ६० गाड्या रोज ये-जा करत असतात. हे सगळं विस्ताराने कंट्रोल ऑफिसमधून नियोजित केलं जातं. आम्ही कसला अहं ठेवत नाही, की मी गाडी चालवतो, कारण गाडी कंट्रोल ऑफिस चालवतं. योग्य वेळी, योग्य ठिकाणी, योग्य गाडी पोचवणं हे कंट्रोलचं कर्मकठीण काम तिथली माणसं रोजच करत असतात. आम्ही ड्रायव्हर लोक समोर येणाऱ्या वेगवेगळ्या समस्यांना रोज प्रत्यक्षपणे भिडत असतो. पण आम्हाला कंट्रोलचा पूर्ण सपोर्ट असतो. प्रत्यक्षात गाडी चालवताना रोज निरनिराळी आव्हानं समोर असतात. वेळ, ऋतू, वातावरण, तापमान सारंच निराळं असतं. इंजिन डबे ठरावीक दिवसांनी रिपीट झाले, तरी त्यात बसणारी माणसं मात्र रोजच नवी असतात.

आम्हाला जिथे जातो, तेथे राहण्याची सोय म्हणून 'रनिंग रूम' ही एक मोठी व्यवस्था रेल्वेने केलेली असते. मोठ्या मोठ्या स्टेशनवर रेल्वेने ड्रायव्हर, गार्ड, टीसी यांच्यासाठी राहण्याची सोय केलेली आहे. या ठिकाणी राहून आपली रेस्ट पूर्ण करणे म्हणजे एक वेगळाच संघर्ष असतो. अक्षरश: धर्मशाळा! विविध जाती-धर्मांचे, राज्यांतले / वेगवेगळ्या परंपरांतले लोक एकत्र येतात. त्यांच्या प्रत्येकाच्या झोपण्याच्या, खाण्याच्या सवयी अगदी निराळ्या असतात. आपण स्वत:देखील एक वेगळ्या परंपरेचे, संस्कृतीचे पाईक असतो. आपली मते आपण इतरांवर लादू शकत नाही. अशा ठिकाणी बेअरर, कुक रेल्वेनं नियोजित केलेले असतात. आपण गेल्यावर असेल त्या बेडवर बेअरर आपल्यासाठी एक बेडशीट अंथरतो. एका रूममध्ये साधारण ४ ते ५ बेड असतात. प्रत्येक बेडवर वेगवेगळ्या वेळी झोपणारा आणि उठणारा असतो. प्रत्येकाच्या गाड्या निराळ्या असतात.

त्यामुळे भोवताल झोपलाय आणि तुम्हीही झोपलाय, असं क्वचितच होतं.

रनिंग रूममध्ये म्हणजे बऱ्याचदा कोंडवाड्यात झोपल्यासारखं असतं. इथे आम्हाला २४ तास जेवण बनवणारा उपलब्ध असतो, पण कोरडा शिधा मात्र प्रत्येक वेळी द्यावा लागतो. जे द्याल ते बनवतात, पण त्यांच्या पद्धतीने. माझ्या आईची चिंच गुळाची आमटी गेल्या कैक वर्षांत मला बाहेर खायलाच मिळत नाही. कारण इथे सगळी कांदा, लसूण, मिरची खाणाऱ्यांची चलती. हे सारं रोजच्या जेवणात नसेल, तर लोकांना जेवल्यासारखं वाटतच नाही. माझ्यासारखा बराच सौम्य खाणारा त्यांना त्रासदायक असतो. बनवणारे मुस्लिम, भैये असे कुणीही असतात. त्यांच्याकडे अठरापगड लोकांची रोजच वर्दळ असते. तेव्हा तुम्ही कितीही सांगितलं तरी कमी तिखट जेवण त्यांना बनवता येत नाही. कारण त्यांच्या हाताला तशी सवयच नसते. मी कवी मनाचा वगैरे. त्यात कुलकर्णी. घरात कधी अंडे या विषयावर चर्चादेखील न करणारा. अशा गोतावळ्यात मी स्वत:ला खूपच आकसून घेतो. एका बाजूला मटण, अंडे खाणारा असतो, त्याच्याच बाजूला मी माझी पोळी, भाजी खात असतो. खरंतर शाकाहारी, मांसाहारी अशी नावं लिहिलेली दोन वेगळी स्वयंपाकघरं उपलब्ध असतात. पण कोणतं घर कोणात मिसळून गेलं आहे, हे न कळण्याइतपत तिथे सारी लगबग चाललेली असते. प्रत्येकाला घाई असते. दोन घास पोटात टाकून मिळेल तेवढी विश्रांती घेणं महत्त्वाचं.

पण कधी कधी इथेही खूप चांगले अनुभव येतात. उत्तम जेवण पदरात पडतं. ती चव मग घरी कधीतरी ट्राय केली, तर घरच्यांनादेखील आवडतं. बऱ्याचदा घरातदेखील सखी फर्माईश करते रनिंग रूमच्या दाल फ्राय, पुलावची. मग मीही वेळ असेल तेव्हा लसूण, आलं, कांदे, मिरची, टोमॅटो यांचा सढळ वापर करत प्रेमानं हे सारं करतो. सखी-चिरंजीव खूष होतात. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मलाही सुखावून जातो. अशा तऱ्हेने जेवण मिळणं हा एक भाग झाला. त्यांच्या नंतरचा भाग झोपणं. तो खूपच अवघड असतो. घरात आपण आपली चादर, उशी बदलली तरी तक्रार करतो. इथे मात्र रोज नवं अंथरूण, नवी उशी, नवा बेड. एकाच बेडवर दरवेळी झोपायला मिळेल याची खात्री नाही. परत कधी बरोडा, कधी सुरत, कधी अहमदाबाद अशा वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या वेळी झोपण्याची कसरत करायची. रात्रभर गाडी चालवून अंग अगदी आंबून गेलेलं असतं. डोळे थकलेले असतात. रनिंग रूममध्ये जाऊन लगेच झोपावं तर खूपदा झोपच लागत नाही. घरापासून दूर ४०० ते ५०० कि.मी. प्रवास केल्यावर त्याच्या व्हायब्रेशनचा शरीरावर परिणाम होणारच. ती शरीरातील वादळं शांत व्हायला काही वेळ जावा लागतो. त्यानंतर थोडीशी झोप येते. परत वातावरणातले बदलही शरीराला मारक असतात. मुंबईत आपण ३३°C मध्ये वावरत असतो. इथे रनिंग रूममध्ये आणि बाहेर बराच फरक असतो. बाहेर अहमदाबाद, सुरत, बरोडा उन्हाळ्यात धगधगत असतात. (४०°C ते ४२°C) संपूर्ण इंजिन, आम्ही, आमचं खाणं, पाणी सर्व काही तापलेलं असतं. (रात्रीच्या वेळी या दिवसांत जरा बरं वाटतं!) आणि रनिंग रूममध्ये जावं तर ए.सी. १६° वर सेट केलेला. म्हणजे बाहेर घामाच्या धारा आणि आत ब्लँकेट घेऊन झोपावं लागतं. या साऱ्याचा शरीरावर परिणाम होत असेलच. भले तो दृश्य नसेल.

रनिंग रूममध्ये स्वतंत्र झोपण्याची व्यवस्था असते. प्रत्येक बेडवर आपण वेगळे असतो. घरी पोचतो तेव्हा सर्वांबरोबर झोपताना बऱ्याचदा खूप वेगळा अनुभव येत राहतो. मुलगा अंगाला चिकटून झोपल्याशिवाय पूर्वी झोपायचा नाही. त्याला कुशीत घेऊन झोपणं एक आनंदाचं निधान असायचं. या साऱ्या आनंदाला मी सध्या मुकतोय. मला आता अंगावर हात पडलेलाही सहन होत नाही. त्यामुळे नकळत दुरावा आल्यासारखा वाटतो. मुलाच्या स्पर्शाला जसा मुकलो, तसाच सखीचा स्पर्शदेखील खूपदा नकोसा, अनोळखी वाटतो. आपण गाढ झोपेत असतो, सखी अलगद जवळ येते, आपल्याला मिठीत घेण्याचा प्रयत्न करते आणि तेव्हा आपली पहिली प्रतिक्रिया करवादण्याची असली, तर काय होईल? समोरच्याचा रोमँटिक मूड कसा बरं टिकेल? सखी काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत असते, आपण एका वेगळ्याच धुंदीत असतो. 'या जगाच्या वेदनेचे दाखले देते कशाला, दु:ख माझे एवढेसे मी तुला सांगू कशाला?' हा झगडा मनातल्या मनात सुरू असतो. एवढ्यानेही आपली पटकन झोपमोड होते, गांगरून आपण बाजूला बघतो. सखी म्हणते, ''अरे मीच आहे. एवढं घाबरायला काय झालं?'' या प्रश्नाला उत्तर नाही. आपण या नोकरीच्या नादात 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात' या अनुभवाला मुकतो आहोत याचा प्रचंड त्रास होतो. हा माझ्या नोकरीचा माझ्यावर झालेला एक जबरदस्त परिणाम आहे. पटकन झोप लागत नाहीच. मग खूपदा चेहऱ्यावर पुरळ येणं, डोळ्यात पुळी येणं अशा तऱ्हेने हीट बाहेर पडत राहते. मग त्यासाठी सतत औषधं घेत राहणं हेच आपल्या हातात उरतं!

ज्या प्रवासासाठी लोक तीन तीन महिने अगोदर नियोजन करतात तो आम्ही रोजच करत असतो. यासाठी आमची बॅग सतत सज्ज असते. यात आणीबाणीच्या प्रसंगात लागणारी प्रत्येक गोष्ट मौजूद असते. परत या जोडीला एखादं नवं पुस्तक, नवा दिवाळी अंक, माझा शास्त्रीय संगीताने समृद्ध असा मोबाइल अशा अनेक गोष्टी यात सामील असतात. खूप थकतो, तेव्हा कानावर किशोरीताईंचा यमन / भीमसेनजींचा पुरिया / राशिदखानाचा नटभैरव, गोरख कल्याण कानाला लावतो. शरीर झोपेची मागणी करत असतं. प्रचंड थकवाही अंगभर पसरलेला असतो. मग हे जादुई स्वर प्रत्येक अवयव शांत करत जातात. हळूहळू शांत शांत वाटायला लागतं. मग मधेच एखादी डुलकी येते. पुन्हा नव्या आव्हानाला सामोरं जायला नवं बळ मलातरी यातून मिळतं. कदाचित हे सारं मानसिक असेल, पण मला स्वत:ला यातून निर्मळ आनंद मिळतो. काम संपल्यावर कानावर मोबाइलमधून या स्वरांची झिंग अनुभवणं माझ्यासाठी आल्हाददायक असतं. खरं तर कधीतरी वाटतं, एखाद्या मानसोपचारतज्ज्ञाकडे जावं, त्याचा सल्ला घ्यावा. पण पुन्हा नकोसं वाटतं. आहे त्या परिस्थितीत आनंद शोधणं हेच मी खूप मोठं समजतो!

*(जून २०१३)*

# देवदासचे गारूड

**प्रकाश भूपाल मगदूम**

विसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला ज्यावेळी ही कादंबरी प्रसिद्ध झाली त्यावेळी या कथानकाने एकाच वेळी खळबळ उडवून दिली आणि प्रसिद्धीही अनुभवली. आत्मघाताचे तीव्र आकर्षण असणारा नायक, त्याचप्रमाणे प्रस्थापित विवाहसंस्थेविषयीची भूमिका आणि नायकाचे दारूच्या आहारी जाणे; भरीस भर म्हणून नायकाचे गणिकेबरोबर असलेले संबंध या भारतीय समाजातील निषिद्ध गोष्टी! या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे या कादंबरीची सिनेमामध्ये रूपांतरण करण्याविषयीची उपयुक्तता अनेकांच्या लक्षात आली, नव्हे तिने अनेकांना भुरळच घातली.

काही कलाकृती रसिकांच्या मनावर वर्षानुवर्षे अधिराज्य करत राहतात आणि त्यांची गोडी कमी न होता ती उलट वाढतच जाते. अर्थात फार कमी कलाकृतींना हे भाग्य लाभते. *देवदास* ही त्यांपैकीच एक. शरच्चन्द्र चटर्जी यांची बंगाली भाषेतील *देवदास* (१९०१) ही कादंबरी या भाग्याची धनी ठरली आहे. केवळ बंगाली साहित्यरसिकांच्या हृदयात स्थान मिळवून न थांबता देशातील आणि विदेशातील अनेक भाषांमध्ये या कादंबरीचे अनुवाद झाले आणि सर्वत्र ही कलाकृती लोकप्रिय ठरली.

अशा या लोकप्रिय कादंबरीकडे भारतीय चित्रपटसृष्टीचे लक्ष न वळले तर नवलच! शोकात्म कथानक असलेल्या या कादंबरीमध्ये चित्रपट बनवण्यासाठीची बीजे होती हे अनेक दिग्दर्शकांनी लगेच ओळखले. त्यामुळेच भारतामध्ये बोलपटांना सुरुवात होण्याअगोदरच या कादंबरीचे रूपांतर पडद्यावर केले गेले. देवदासवरील पहिलावहिला मूकपट नरेशचंद्र मित्रा यांनी १९२८ साली बनवला. दुर्दैवाने भारतातील बहुतांश मूकपटांप्रमाणे हाही चित्रपट आपल्या देशातील चित्रपटजतनाबद्दल असलेल्या अनास्थेमुळे काळाच्या पडद्याआड गेला आहे. लक्षात घेण्याजोगी विशेष बाब म्हणजे भारतामध्ये राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाची (National Film Archives of India) १९६४ साली स्थापना होऊन रीतसर चित्रपटांचे जतन सुरू होण्याअगोदरच जवळपास ९०% मूक चित्रपट नष्ट झाले होते.

प्रथमेश बारूआ या आसामी राजघराण्यातील युवकाचे लक्ष या कादंबरीने वेधून घेतले आणि १९३५ साली त्यांनी प्रथम बंगाली आणि त्याच वर्षी लगेचच हिंदी भाषेमध्ये देवदास पडद्यावर आणला. बी. एन. सरकार यांच्या कलकत्ता येथील प्रसिद्ध न्यू थिएटर्सच्या बॅनरखाली ह्या बोलपटाची निर्मिती झाली. हा चित्रपट चालला खरा, मात्र काही वर्षांनंतर या चित्रपटाच्या सर्व प्रती नष्ट झाल्या. न्यू थिएटर्सच्या स्टुडियोला लागलेल्या आगीमध्ये बाकी काही चित्रपटांबरोबर हा चित्रपट जळून खाक झाला. त्यामुळे सर्व देशभरात हा चित्रपट अस्तित्वात नाही असे समजले जात होते. नंतर कळले, की बांगलादेशातील फिल्म अर्काइव्हमध्ये या चित्रपटाची एक प्रत उपलब्ध आहे. NFAIच्या पी के नायर यांच्यापासून अनेक संचालकांनी हा चित्रपट भारतामध्ये परत आणण्यासाठी बरेच प्रयत्न केले परंतु ते अयशस्वी ठरले. फक्त एकदाच २००२मध्ये आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने दिल्लीमध्ये अतिशय कडेकोट बंदोबस्तामध्ये या चित्रपटाची प्रत बांगलादेशातून आणली गेली व विशेष प्रदर्शन झाल्यानंतर पुन्हा परत नेली गेली. कोणत्याही देशाच्या सांस्कृतिक अवकाशात चित्रपटांचे महत्त्व हे अनन्यसाधारण असते आणि त्यामुळे अशा चित्रपटांबद्दल आस्था ठेवून त्यांचे पालन करणे किती महत्त्वाचे असते हे या घटनेवरून दिसते.

NFAIचा संचालक म्हणून मी कार्यभार स्वीकारल्यानंतर एकदा चित्रपट अभ्यासक अमृत गंगर यांच्याशी झालेल्या चर्चेमध्ये या चित्रपटाचा विषय निघाला. लगेचच मी एक इ-मेल बांगलादेशाच्या फिल्म अर्काइव्हच्या संचालकांना पाठवली. दोन अर्काइव्हच्यामध्ये चित्रपटांच्या आदानप्रदानांविषयी FIAF (International Federation of Film Archives) या आंतरराष्ट्रीय संघटनेने काही मार्गदर्शक तत्त्वे आखली आहेत. त्यानुसार दोन्ही संस्थांमध्ये एकमेकांना हव्या असलेल्या चित्रपटांविषयी सहमत व्हावे लागते. ही प्रक्रिया वेळखाऊ असते. इथे तर देवदाससारखा बंगाली भाषेतील क्लासिक चित्रपट बांगलादेशाकडून मिळवायचा होता! काही दिवसानंतर त्यांचे प्रत्युत्तर आले. लगेचच भरलेल्या FIAFच्या सिडनी आणि कॅनबेरा येथील वार्षिक परिषदेमध्ये बांगलादेशाच्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष गाठभेट झाली. मी पुन्हा हा विषय छेडल्यावर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. परत आल्यावर पुन्हा पत्रव्यवहार सुरू झाला. आणखी एका योगायोगाद्वारे बांगलादेशाचे हे अधिकारी भारतभेटीवर पुण्यास आले आणि त्यांनी देवदासची डिव्हिडी प्रत आमच्याकडे सुपूर्द केली. त्या बदल्यात आम्ही त्यांना *राजा हरिश्चंद्र* या भारतात निर्माण झालेल्या पहिल्या चित्रपटाची डिव्हिडी भेट म्हणून दिली. अशा प्रकारे NFAIच्या संग्रहामधील आणि भारतीय चित्रपट इतिहासातील एक महत्त्वाची उणीव भरून निघाली.

विसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला ज्यावेळी ही कादंबरी प्रसिद्ध झाली त्यावेळी या कथानकाने एकाच वेळी खळबळ उडवून दिली आणि प्रसिद्धीही अनुभवली. आत्मघाताचे तीव्र आकर्षण असणारा नायक, त्याचप्रमाणे प्रस्थापित विवाहसंस्थेविषयीची भूमिका आणि नायकाचे दारूच्या आहारी जाणे; भरीस भर म्हणून नायकाचे गणिकेबरोबर असलेले संबंध या भारतीय समाजातील निषिद्ध गोष्टी! या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे या कादंबरीची सिनेमामध्ये रूपांतरण करण्याविषयीची उपयुक्तता अनेकांच्या लक्षात आली, नव्हे तिने अनेकांना भुरळच घातली. याच्या जोडीला शरच्चंद्र चटर्जी यांच्या कादंबरीतील सहजता आणि नाट्यात्मकता यांचे सुरेख मिश्रण, प्रभावशाली संवाद आणि या सर्वांचा होणारा एकत्रित परिणाम या कारणांमुळे केवळ देवदासच नव्हे तर त्यांच्या *परिणिता, बिराज बहू* इत्यादी कृतींचे यशस्वी रूपांतर पडद्यावर केले गेले.

१९३५मधील बंगाली देवदास चित्रपटामध्ये नायकाची भूमिका स्वतः प्रथमेश बारूआ यांनीच केली. पारोची भूमिका जमुना व चंद्रमुखीची भूमिका चंद्रावतीदेवी यांनी निभावली होती. या चित्रपटाने व्यावसायिक सफलता तर मिळवलीच पण समीक्षकांसकट सर्वांनीच हा बोलपट वाखाणला. खुद्द शरच्चंद्र चटर्जी यांनीही चित्रपटाचे कौतुक केले. चांगल्या कथानकाबरोबरच प्रथमेश बारूआ यांनी अतिशय परिणामकारक वठवलेली देवदासची व्यक्तिरेखा आणि तितकेच कुशल दिग्दर्शन यामुळे या चित्रपटाने चांगलेच यश मिळवले.


त्यानंतर १९३५ मध्येच लगेच आला तो हिंदी भाषेमधील देवदास ज्यामध्ये प्रसिद्ध पार्श्वगायक कुंदनलाल सैगल यांनी देवदासाची भूमिका केली. पुन्हा एकदा पारोच्या भूमिकेमध्ये जमुना होत्या, तर राजकुमारी यांनी चंद्रमुखीची भूमिका साकारली. सैगल यांच्या अभिनयापेक्षा त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांना वेड लावले. त्यामुळे या चित्रपटाने तुफान यश मिळवले. अजूनही सैगल यांची गाणी रसिकांच्या ओठावर आहेत! बिमल रॉय या चित्रपटाचे छायालेखक होते. पुढच्या वर्षी म्हणजे १९३६ साली तमिळ भाषेमध्ये पी. व्ही. राव यांनी देवदास बनवला. यामध्ये कुंदनलाल सैगल यांनी दोन गाणी गायली. मग १९५३ मध्ये राघवैय्या यांनी तेलुगूमध्ये देवदास पडद्यावर आणला. प्रसिद्ध अभिनेते अक्किण्णेणी नागेश्वरराव (सध्याचा तेलुगूमधील प्रसिद्ध अभिनेता नागार्जुन याचे वडील) यांनी देवदासची भूमिका केली.

१९५५ मध्ये बिमल रॉय यांनी हिंदीमध्ये देवदास बनवताना दिलीपकुमारची निवड देवदास साकारण्यासाठी केली. त्याने अतिशय समर्थपणे ही भूमिका पडद्यावर वठवून देवदास म्हणजे दिलीपकुमार हे समीकरण रसिकांच्या मनामध्ये पक्के केले. जिवंत आणि वास्तववादी अभिनय यामुळे अजूनही दिलीपकुमार यांचा देवदास लोकांना आठवतो. देवदासच्या मित्राची, चुन्नीलालची भूमिका मोतीलाल यांनी जिवंत केली होती तर सुचित्रा सेन आणि वैजयंतीमाला यांनी अनुक्रमे पारो आणि चंद्रमुखी म्हणून समर्थ साथ दिली. हा चित्रपट खूप गाजला आणि त्याचबरोबर एक 'क्लासिक' चित्रपट म्हणून त्याची नोंद भारतीय सिनेमाच्या इतिहासामध्ये केली जाते.

प्रसिद्ध दिग्दर्शक गुलजार यांनाही देवदासने मोहिनी घातली होती. धर्मेन्द्र आणि हेमामालिनी यांना घेऊन त्यांनी सुरुवातही केली, पण फक्त दोन रिळांचे शूटिंग झाल्यानंतर काही कारणास्तव हा चित्रपट डब्यात गेला. अशाच प्रकारे तमिळ, मल्याळम इत्यादी आणखी काही भाषांमध्ये देवदास बनवला गेला. शक्ती सामंत यांनी बंगालीमध्ये तर संजय लीला भन्साळी यांनी शाहरूख खानला घेऊन खर्चिक देवदास बनवला. नव्या पिढीतल्या अनुराग कश्यप यांनी देवदासपासून प्रेरणा घेऊन 'देव डी' या Black Comedyची निर्मिती केली. नामांकित दिग्दर्शक सुधीर मिश्रा यांनीही 'और देवदास' नावाच्या चित्रपटाची घोषणा केली आहे. या कथेची मोहिनी अशी जबरदस्त आहे, की काही ठरावीक कालावधीनंतर एक नवीन दिग्दर्शक येतो आणि त्याला भावलेले देवदासचे एक नवीन रूपांतरण सादर करण्याचा प्रयत्न करतो!

✦
आत्तापर्यंत जवळजवळ तेरा वेळा वेगवेगळ्या देवदासची निर्मिती झाली आहे पण मराठी भाषेमध्ये देवदास पडद्यावर आला नाही. असे का झाले असावे याचा विचार करताना आपल्याला देवदासच्या पात्राकडे बारकाईने पाहावे लागेल.
✦

इतर अनेक भाषांमध्ये देवदास बनवला गेला, परंतु भारतीय चित्रपट उद्योगाचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या मराठी चित्रपटसृष्टीने मात्र आश्चर्यकारकरीत्या देवदासकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. आत्तापर्यंत जवळजवळ तेरा वेळा वेगवेगळ्या देवदासची निर्मिती झाली आहे पण मराठी भाषेमध्ये देवदास पडद्यावर आला नाही. असे का झाले असावे याचा विचार करताना आपल्याला देवदासच्या पात्राकडे बारकाईने



**हिंदी देवदास, १९३५. प्रमुख भूमिकेत कुंदनलाल सैगल. सोबत पारोच्या भूमिकेत पुन्हा एकदा जमुना.**



**हिंदीतील सर्वांत गाजलेला देवदास, १९५५. बिमल रॉय यांनी बनविलेला. भारतीय सिनेमाच्या इतिहासातील एक 'क्लासिक' चित्रपट. देवदासच्या अजरामर भूमिकेत दिलीपकुमार. त्याच्यासोबत डावीकडे चंद्रमुखीच्या भूमिकेत वैजयंतीमाला व उजवीकडे पारोच्या भूमिकेत सुचित्रा सेन.**

पाहावे लागेल. स्वत:ची ठाम मनोभूमिका नसलेला, दुबळा, स्वकेंद्रित, बेजबाबदार वागणे असलेला हा नायक आहे. त्याची आत्मघाताची प्रवृत्ती, चंचल मन, विवाहसंस्थेबद्दलची धरसोड भूमिका बंगाली तरुण वर्गाला आकर्षित करू शकली, पण मराठी मानसिकतेवर त्याचा विशेष प्रभाव पडला नाही असेच म्हणावे लागेल. नाहीतर इतकी मजबूत निर्मिती मूल्ये असलेल्या या कादंबरीचे रूपांतरण एकाही मराठी निर्माता-दिग्दर्शकाला आव्हानात्मक वाटू नये? नायकाचे दारू पिणे, प्रेमभंग आणि दुसऱ्या बाईच्या नादी लागणे हा विषय तर मराठीमध्ये तमाशापटांनी चावून चावून चोथा केला आहे. परंतु मदिरेमध्ये स्वत:ला बुडवून घेणे, गणिकेशी असलेले अनैतिक संबंध या नायकाच्या अध:पतनाच्या आणि विनाशाच्या दिशेची वाटचाल अजूनपर्यंत एकदाही मराठी भाषेमध्ये चित्रित होऊ शकली नाही!

> ✦
> मदिरेमध्ये स्वत:ला बुडवून घेणे, गणिकेशी असलेले अनैतिक संबंध या नायकाच्या अध:पतनाच्या आणि विनाशाच्या दिशेची वाटचाल अजूनपर्यंत एकदाही मराठी भाषेमध्ये चित्रित होऊ शकली नाही!
> ✦

यासाठी आपल्याला ज्या काळामध्ये बंगाली आणि हिंदी भाषांमध्ये देवदास बनवला गेला त्या वेळच्या परिस्थितीकडे पाहावे लागेल. त्या कालखंडामध्ये, म्हणजे १९३०च्या दशकामध्ये मराठीत प्रभातयुग बहरात होते. व्ही. शांताराम यांच्या नेतृत्वाखाली प्रभातचे सर्व शिलेदार एका दुर्दम्य आशावादी ध्येयाने चित्रपटनिर्मिती करत होते. म्हणूनच ज्यावेळी बंगाली आणि हिंदीमध्ये देवदास चालला आणि गाजला त्याच वेळेस व्ही. शांतारामांचा 'माणूस/आदमी' हा मराठी आणि हिंदी भाषेमधील आशावादाने प्रेरित चित्रपटही भरपूर चालला.

देवदास या पात्राच्या पूर्णपणे विरुद्ध किंवा त्याच्या निराशावादी मानसिकतेला छेद देऊन शांताराम यांचा 'आदमी' आशावादाची वाट स्वीकारतो. (शांताराम यांनी या चित्रपटाचे इंग्रजीमध्ये *Life is for Living* असे शीर्षक दिले होते!) हे जीवन चांगले असून पूर्ण अर्थाने जगण्यासाठी आहे, कर्तव्ये पार पाडण्यासाठी आहे, नवीन काही घडवण्यासाठी आहे असा मार्ग हा चित्रपट दाखवतो. एक पोलीस शिपाई वेश्येचे जीवन सुधारण्यासाठी तिच्याशी लग्न करतो आणि मग होणाऱ्या परिणामांना ते दोघे कसे सामोरे जातात याचे प्रभावी चित्रीकरण शांताराम यांनी केले. या चित्रपटाच्या अगोदर आलेल्या 'कुंकू' या मराठीतील आणि 'दुनिया ना माने' या हिंदीतील रुपांतरणामध्ये एक विधवा तरुण स्त्री तिच्यापेक्षा वयाने मोठ्या विधुर माणसाशी विवाह झाल्यानंतर बंड करून उठते. अशा प्रकारे निराशावादी व दैववादी विचारधारणेला तिलांजली देऊन मानवी जीवनाच्या आशवादी आणि कर्मवादी जगण्यावर भर देणारे सिनेमे त्यावेळी मराठीमध्ये प्रामुख्याने निर्माण झाले.

कदाचित याच विचारसरणीचा पगडा पुढील काळातील मराठी चित्रपटनिर्मितीवर झाला असे म्हणण्यास वाव आहे. त्यामुळेच इतक्या वेळेस अन्य भाषांमध्ये निर्मिती होऊनही मराठीमध्ये मात्र देवदास अजूनपर्यंत पडद्यावर येऊ शकला नाही. कोणी नवीन प्रतिभावान दिग्दर्शक हे धाडस पुढील काळात दाखवू शकेल का?

(लेखक राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे [NFAI] संचालक आहेत.)

*(छायाचित्र सौजन्य : राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय)*

*(मे २०१६)*

# कॅमेरा आणि सतार

**विजय पाडळकर**

२०२० हे वर्ष पंडित रविशंकर यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष. त्यानिमित्ताने हा एक विशेष लेख. सत्यजित राय त्यांच्यापेक्षा जेमतेम एका वर्षानी लहान. दोन्ही आपापल्या क्षेत्रांतील उत्तुंग व्यक्तिमत्त्वे. रविशंकर आणि सत्यजित राय या दोन भारतरत्नांची ही एक आगळी जुगलबंदी.



**सत्यजित राय आणि रविशंकर : एका गाण्याच्या रेकॉर्डिंगदरम्यान चहा पिताना**

महान संगीतकार रविशंकर हे जसे त्यांच्या सतारवादनाबद्दल प्रसिद्ध आहेत, तसेच ते अल्ला रख्खा, यहुदी मेनुहिन, हरिप्रसाद चौरासिया अशा कलावंतांसोबत त्यांनी केलेल्या जुगलबंदीच्या कार्यक्रमांबद्दलही प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांनी आणखी एका महान भारतीय कलावंतासोबत केलेली जुगलबंदी मात्र काहीशी अलक्षित राहिली आहे. ते कलावंत म्हणजे जगातील सर्वोत्तम चित्रपट दिग्दर्शकांपैकी एक, सत्यजित राय.

सत्यजित यांचा कॅमेरा आणि पंडितजींची सतार यांची ही जुगलबंदी 'पाथेर पांचाली' या चित्रपटापासून सुरू झाली. 'पाथेर पांचाली' हा जागतिक चित्रपटसृष्टीतील एक चमत्कार आहे. चित्रपटनिर्मितीचा कसलाही अनुभव नसणाऱ्या तीन तरुणांनी एकत्र येऊन हा चित्रपट निर्माण केला. आज हा चित्रपट भारतीय सिनेजगतात मन्वंतर घडवून आणणारा मानला जातो. *In the beginning there was Pather Panchali* असे श्रेष्ठ सिनेदिग्दर्शक अदूर गोपाल कृष्णन यांनी त्याबद्दल म्हटले आहे. या चित्रपटाने भारतीय चित्रपटाच्या इतिहासाचे सरळसरळ दोन भाग केले – एक : 'पाथेर पांचाली'पूर्वीचा सिनेमा व दुसरा : 'पाथेर पांचाली'नंतरचा सिनेमा. या चित्रपटाला वीसपेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली व आजही तो भारतीय सिनेमाची ओळख म्हणून नावाजला जातो.

या चित्रपटाच्या निर्मितीत सत्यजित राय, त्यांचे छायाचित्रकार सुब्रतो मित्रा, कला निर्देशक बन्सी चंद्रगुप्त यांचा जेवढा वाटा आहे, तेवढाच त्याचा प्रभाव आणि सौंदर्य वाढविण्यात त्याचे संगीत

देणाऱ्या रविशंकर यांचाही वाटा आहे. योगायोगाची गोष्ट म्हणजे पुढे सत्यजित राय आणि रविशंकर या दोघांनाही 'भारतरत्न' ही पदवी मिळाली. या दोन महान कलावंतांच्या एकमेकांसोबत केलेल्या वाटचालीची कहाणी मोठी चित्तवेधक आहे.

सत्यजित राय आणि रविशंकर हे तसे समवयस्कच. २ मे १९२१ रोजी कलकत्ता येथे जन्मलेले सत्यजित राय हे प्रख्यात बंगाली लेखक सुकुमार राय यांचे पुत्र. संगीत ऐकणे आणि चित्रपट पाहणे या दोन गोष्टींचे सत्यजितना लहानपणापासून वेड होते. मात्र त्यांचा अधिक कल पाश्चिमात्य संगीताकडे होता. बीथोवन, बाख, मोझार्ट यांच्या संगीताच्या अनेक रेकॉर्ड्स त्यांनी जमवल्या होत्या व त्या संगीतावरील पुस्तकेही वाचली होती. त्यांनी शांतिनिकेतनमध्ये चित्रकलेचे शिक्षण घेतले होते व ते एका जाहिरातसंस्थेत चित्रकार म्हणून काम करीत होते. १९४८ साली सत्यजित राय यांनी आपल्या काही मित्रांच्या सोबतीने कलकत्ता फिल्म सोसायटीची स्थापना केली. जगभरचे उत्तमोत्तम चित्रपट पाहणे, त्यावर चर्चा करणे, त्यासंबंधी वाचन करणे व श्रेष्ठ चित्रपटाविषयी सर्वसाधारण प्रेक्षकाची रुची वाढवणे ही या सोसायटीची प्रमुख उद्दिष्टे होती. या सोसायटीतर्फे राय यांनी एकदा चेतन आनंद यांचा 'नीचा नगर' हा चित्रपट पाहिला. हा लोकप्रिय हिंदी चित्रपटांपेक्षा वेगळा असा प्रयोग होता व त्याला १९४६ साली कान येथील चित्रपट महोत्सवात पहिले पारितोषिक मिळाले होते. या चित्रपटाचे संगीत रविशंकर यांनी दिले होते.

रविशंकर यांचा जन्म ७ एप्रिल १९२० रोजी बनारस येथे एका सुखवस्तू आणि सुशिक्षित बंगाली कुटुंबात झाला. त्यांचे वडील श्याम शंकर चौधरी हे प्रख्यात वकील होते आणि काही काळ त्यांनी राजस्थानातील एका संस्थानात दिवाण म्हणून काम पाहिले होते. प्रख्यात नर्तक उदयशंकर हे रविशंकर यांचे वडील बंधू. रविशंकर कला आणि संगीत यांच्या सान्निध्यात मोठे झाले. लहान असतानाच ते वडील बंधूच्या नृत्यनाटिकांत भाग घेत, नृत्य करत व वाद्ये वाजवत. तेरा वर्षांचे होईपर्यंत ते अनेक वाद्ये वाजवण्यात प्रवीण झाले होते, मात्र त्यांचे विशेष प्रेम हे सतार या वाद्यावर होते. भावाच्या ग्रुपसोबत त्यांना अनेकदा परदेशांत जावे लागे. या संधीचा फायदा घेऊन त्यांनी फ्रेंच शिकून घेतले, तसेच पाश्चात्त्य शास्त्रीय संगीताचाही अभ्यास केला. १९३८ साली रविशंकर यांनी नृत्य करणे बंद केले व प्रख्यात वादक अल्लाउद्दिन खां यांचे शिष्यत्व पत्करून ते त्यांच्याकडे भारतीय शास्त्रीय संगीत शिकू लागले. सहा वर्षांनी त्यांनी स्वत:चे सतारवादनाचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. त्या सुमारासच त्यांनी 'धरती के लाल' व 'नीचा नगर' या हिंदी चित्रपटांना संगीतही दिले.

विभूतिभूषण बंदोपाध्याय यांच्या 'पाथेर पांचाली' या कादंबरीवर चित्रपट निर्माण करण्याचे जेव्हा राय यांनी ठरवले, तेव्हा काही गोष्टी त्यांच्या मनात पक्क्या होत्या. एक म्हणजे या चित्रपटासाठी त्यांना शक्यतो नवे चेहरे घ्यायचे होते. दुसरे म्हणजे चित्रपटाचे चित्रण बव्हंशी बाह्य लोकेशन्सवर करावयाचे होते व लोकप्रिय चित्रपटांचा कसलाही मालमसाला त्यांना चित्रपटात वापरायचा नव्हता. चित्रपटासाठी संगीत आवश्यक आहे असे त्यांचे मत होते; पण हे संगीत लोकप्रिय बंगाली किंवा हिंदी चित्रपटासारखे गाण्यांना महत्त्व देणारे नको होते. (खरे तर त्यांची चित्रपटातील संगीताबद्दलची मूळ कल्पना काही निराळीच होती. त्यांनी लिहिले आहे, 'माझ्या चित्रपटाचा मी जर एकटाच प्रेक्षक असतो तर मी चित्रपटात संगीत वापरलेच नसते. संगीत हा एक बाह्य घटक आहे व त्याच्याशिवाय चित्रपट करता आला पाहिजे.' परंतु इतके 'बंडखोर' होणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. चित्रपट ही कला असली तरी तो व्यवसायही आहे, व त्यात पैसे गुंतवणाऱ्यांचा विचार करणे आवश्यक असते अशीही त्यांची धारणा होती.) चित्रपटातील प्रसंगांच्या मूडला मिळतेजुळते आणि प्रसंगांचा प्रभाव वाढवणारे संगीत त्यांना हवे होते व त्यासाठी त्यांच्या डोळ्यांसमोर प्रथम रविशंकर हेच नाव आले.

'My years with Apu' या आठवणींच्या पुस्तकात सत्यजित राय यांनी या संदर्भात लिहिले आहे,

''पाथेर पांचालीचे चित्रण जवळजवळ पूर्ण झाले होते व आता पार्श्वसंगीताचा विचार करणे आवश्यक होते. मी रविशंकर यांची निवड केली, कारण एक तर मी व्यक्तिश: त्यांना ओळखत होतो व दुसरे म्हणजे त्यांची सतार मला आवडत होती. या सतारीचा चित्रपटात चांगला उपयोग करून घेता येईल, असे मला वाटले. रविशंकर त्यावेळी दिल्लीला राहत होते. मी त्यांना पत्र लिहून त्याबद्दल विचारले. त्यांनी आनंदाने संगीत देण्यास संमती दिली. मला त्यांची गरज अंदाजे केव्हा लागेल हे मी त्यांना कळवले व त्यावेळी ते उपलब्ध आहेत असा त्यांचा निरोप आला.''

रविशंकर यांनी 'स्मृती' नावाचे (बंगाली) आत्मचरित्र लिहिले आहे. त्यांत सत्यजित रायबद्दल ते लिहितात,

''जगातील अनेक चित्रपटदिग्दर्शकांचा मी उल्लेख केला आहे पण त्यात आपल्या सत्यजित राय यांचे स्थान वेगळे आहे. त्यांच्या पहिल्या चार चित्रपटांना मी संगीत दिले आहे. एका अर्थाने आम्ही दोघेही बरोबर वाढलो. त्यामुळे त्यांच्याविषयी विचार करताना मी भावुक होतो. माझ्या मनात त्यांच्याविषयी जिव्हाळ्याच्या भावना आहेत व एक हळवा कोपराही आहे. त्यामुळे मी त्यांच्याबद्दल व्यक्तिनिरपेक्ष मत देऊ शकत नाही. त्यांच्या 'पाथेर पांचाली'ने माझ्यावर उमटवलेला ठसा मी विसरू शकत नाही.

''१९५१ किंवा १९५२ सालची गोष्ट आहे. मी कलकत्त्याच्या ज्ञानप्रकाश घोष यांच्या घरी उतरलेलो असताना सत्यजित बाबू मला भेटायला आले. आम्ही दोघे एकमेकांना पूर्वीपासून ओळखत होतो. मला त्यावेळी हेही माहीत होते की सत्यजित 'पाथेर पांचाली' या कादंबरीवर एक चित्रपट निर्माण करत आहेत. जवळजवळ दोन वर्षांपासून ते या कामात गुंतले आहेत व या चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान त्यांना असंख्य अडचणी आलेल्या आहेत. त्यांची जिद्द मला जाणवली. एकानंतर एक चमत्कारिक अडथळ्यातून मार्ग काढण्याचा ते प्रयत्न करत होते. काही गोष्टींची मला माहिती दिल्यानंतर ते म्हणाले, 'या चित्रपटाला तुम्ही पार्श्वसंगीत द्यावे अशी माझी इच्छा आहे. त्यामुळे त्याची प्रतिष्ठा नक्की वाढेल.' ''

या काळात रविशंकर यांचे संगीताच्या क्षेत्रात बरेच नाव झाले होते. त्यामुळे सत्यजित यांना असे वाटणे स्वाभाविक आहे. सत्यजित राय यांनी रविशंकर यांना थोडक्यात चित्रपटाची कथा सांगितली व ती आपण कशा प्रकारे चित्रित करत आहोत हेही सांगितले. ही कादंबरी ज्यावेळी 'भारतवर्ष'मधून क्रमश: प्रकाशित होत होती त्यावेळीच रविशंकर यांनी ती वाचलेली होती. ती त्यांना अतिशय आवडलेलीदेखील होती. त्यांनी सत्यजित राय यांना सांगितले, की ते 'पाथेर पांचाली' चित्रपटाचा जेवढा भाग पूर्ण झाला आहे तेवढा पाहू इच्छितात. त्यानुसार 'भवानी' टॉकीजमध्ये एका 'शो'चे आयोजन करण्यात आले.

(एखाद्या घटनेसंबंधी त्यात गुंतलेल्या व्यक्ती जेव्हा स्वतंत्रपणे काही सांगू लागतात तेव्हा त्यांच्या तपशिलात काही फरक आपोआपच पडतात. हे फरक का पडतात हा मानसशास्त्रीय अभ्यासाचा विषय आहे. बरे, दोघांपैकी कुणालाही 'खोटे' सांगावयाचे असते असे नव्हे. सत्यजित राय यांनी या संदर्भात लिहिले आहे, 'रविशंकर यांनी मूळ पुस्तक वाचलेले नव्हते, पण त्यांना त्याची महती माहीत होती व सर्वसाधारण कथानक ठाऊक होते.')

रविशंकर यांनी कादंबरी पूर्वी वाचली होती आणि ती त्यांच्या पक्की स्मृतीत होती याचा एक परिणाम असा झाला, की राय यांनी संगीताचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवल्यानंतर त्यांचे मन अभावितपणे त्याच कथानकाचा विचार करू लागले आणि अचानक कादंबरीच्या आशयाशी मिळत्याजुळत्या अशा एका संगीतरचनेने त्यांच्या मनात आकार घेतला. सत्यजित यांनी या संदर्भात लिहिले आहे, ''पाथेर पांचालीची मुख्य थीम म्हणून आज जी प्रसिद्ध झाली आहे, ती बासरीवर वाजवलेली संगीतरचना चित्रपट पाहण्यापूर्वीच रविशंकर यांच्या मनात तयार होती. It was certainly a stroke of inspiration.''

ही अप्रतिम रचना ऐकून सत्यजित अतिशय प्रभावित झाले. रविशंकर आपल्या चित्रपटाला न्याय देऊ शकतील याची खात्री त्यांना वाटू लागली. रविशंकर त्यावेळी फक्त दोन दिवसांसाठी कलकत्त्याला आलेले होते. दुसरे म्हणजे 'पाथेर पांचाली'च्या अमेरिकेतील प्रदर्शनाची तारीखदेखील निश्चित झालेली होती व त्यासाठी आता वेळ फार कमी उरला होता. त्यामुळे लगेच दुसऱ्या दिवशी त्यांना या चित्रपटातील काही महत्त्वाच्या प्रसंगांच्या रशेस दाखवण्यात आल्या. त्याच दिवशी संध्याकाळी चित्रपटाचे संगीत रेकॉर्ड करण्याचे ठरले. रविशंकर यांनी संगीतासाठी भारतीय वाद्येच उपयोगात आणण्याचे ठरवले होते. त्यानुसार सत्यजित राय यांचे सहकारी अलोक डे हे सतार, बासरी, तर शहनाई व काही वाद्ये आणि वादक घेऊन आले. अलोक डे हे स्वत: अतिशय उत्तम बासरीवादक होते.

सत्यजित राय यांना संगीताची उत्तम जाण असल्यामुळे एक गोष्ट अशी घडली होती, की काही ठळक प्रसंगांना पार्श्वसंगीत कसे असावे याच्या काही कल्पना त्यांच्या मनात तयार होत्या. त्या त्यांनी रविशंकर यांना सांगितल्या. सुमारे सहा प्रसंग असे होते, की जेथे योजनापूर्वक संगीताचा उपयोग करावयाचा होता. हरिहरची मुलगी दुर्गा हिच्या मृत्यूनंतरचा प्रसंग हे त्यांपैकी एक महत्त्वाचे उदाहरण. दुर्गा मरण पावते त्यावेळी हरिहर गावाला गेलेला असतो. परत आल्यावर पत्नीच्या रडण्यातून त्याला समजते, की आपली मुलगी आपल्याला कायमची सोडून गेली आहे. या प्रसंगात आईने केलेला विलाप का कुणास ठाऊक सत्यजितना खटकत होता. तिच्या रडण्याऐवजी तिला मूक ठेवावे व पार्श्वभूमीला तार शहनाईचा उपयोग करावा अशी कल्पना त्यांच्या मनात आली. रविशंकर यांनी या प्रसंगासाठी अतिशय प्रभावी असा संगीताचा तुकडा तयार केला. चित्रपट पाहताना सर्वाजयाचे दु:ख आपल्या काळजात घुसते ते या संगीताला सोबत घेऊनच आणि मन शतश: विदीर्ण होते.

रविशंकर एकेका प्रसंगासाठी संगीत तयार करावयाचे. आलोक डे त्याचे नोटेशन उतरून घ्यायचे, आपल्या वादकांना समजावून सांगायचे आणि तो तुकडा रेकॉर्ड व्हायचा. असा हा विलक्षण खेळ संध्याकाळी सहा वाजता सुरू झाला तो सलग अकरा तास चालू होता. चित्रपटाच्या इतिहासात क्वचितच दुसऱ्या एखाद्या सिनेमाचे संगीत अशा प्रकारे तयार केले गेले असेल! झपाटल्यासारखे सारे जण काम करत होते.

जुलै १९६६ मध्ये 'Montage' या पत्रिकेला मुलाखत देताना रविशंकर यांनी याबाबतीत सविस्तर चर्चा केली आहे. ते म्हणतात, ''विभूतिभूषण यांनी शब्दांतून जी धून निर्माण केली होती ती मी संगीतातून पुनरावृत्त करण्याचा प्रयत्न केला. थिएटरच्या अंधारात मी ज्यावेळी हा मूक चित्रपट पाहत होतो त्यावेळी माझ्या मनात त्याला अनुरूप असे संगीत तयार होत होते.''

संवादांना अतिशय कमी महत्त्व देऊन प्रसंगांच्या दृष्यात्मकतेवर भर द्यायचा हा विचार राय यांच्या मनात सतत होता. संवाद नसलेले प्रसंग 'रिकामे' वाटू नयेत आणि त्यांचे सौंदर्य अधिक खुलावे यासाठी त्यांना पार्श्वसंगीत वापरायचे होते. रविशंकर यांनी ही संकल्पना अचूक ओळखली. 'पाथेर पांचाली'मध्ये अनेक जागा संगीताने अविस्मरणीय बनवल्या आहेत.

हरिहर हा कामाच्या शोधात गावोगाव फिरत असताना घरी त्याची पत्नी व मुले अर्धपोटी असतात. अशावेळी अचानक त्याचे पत्र येते. आपल्याला काही पैसे मिळाले आहेत व आपण लवकरच घरी परतणार आहोत असे त्याने पत्रात लिहिलेले असते. त्याची पत्नी सर्वाजया ते पत्र वाचते आणि जगण्याची एक नवी उमेद तिच्या मनात जन्म घेते. तिला झालेला आनंद तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होतो. अशावेळी रविशंकर पार्श्वभूमीला सतारीची एक हळुवार धून सुरू करतात. मनातला आनंद हळूहळू विस्तारत जातो. सर्वाजयाच्या चेहऱ्यावर जलाशयाच्या लाटा सत्यजित सुपर इम्पोज करतात. पावसाचे थेंब येण्यास सुरुवात झालेली असते. आकाशात ढग दाटून आलेले असतात. जलाशयात पडणाऱ्या थेंबांसोबत लहान लहान कीटकांचे नर्तन सुरू झालेले असते. उडता उडता कीटक पाण्याला स्पर्श करतात आणि पाण्यावर नाजूक तरंग उठतात. आता सतारीची लय वाढते. निसर्गातही नव्या मोसमाची सुरुवात झालेली असते. माणसाच्या मनात निर्माण झालेल्या आनंदाला निसर्ग साथ देत असतो आणि आपण

अनुभवत असतो एका मनस्वी कलावंताच्या कॅमेऱ्याला तितक्याच मनस्वीपणे दुसऱ्याने केलेली संगीत-साथ.

दुर्गा आणि तिचा धाकटा भाऊ अपू हे दोघे प्रथमच रेल्वे पाहतात हा प्रसंगही असाच अविस्मरणीय आहे. कोठे वाद्यांचा उपयोग करावयाचा आणि कोठे नाही याचीही स्पष्ट कल्पना सत्यजित यांच्या मनात होती. रविशंकर यांच्याशी चर्चा करताना या प्रसंगात कोणतेही पारंपरिक वाद्य वाजवायचे नाही असे त्यांनी ठरवले. मुलांनी रेल्वेचा फक्त आवाज ऐकलेला आहे, ती कधी पाहिलेली नाही. एके दिवशी दोघे जण शेतात हुंदडत असताना दुर्गाला दूरवरून घुमल्यासारखा एक आवाज ऐकू येतो. तोंडातील ऊस चघळताना ती कान टवकारते. हलक्या पावलांनी विजेच्या खांबाजवळ येऊन त्याला कान लावते. तिच्यामागून अपूही धावत येतो आणि खांबाला कान लावतो. आता दुर्गाला या आवाजाचा उगम ओळखू येतो. ती धावत त्या दिशेला जाते. शेतातून मुले धावत जात असताना भोवती 'काश'चे शुभ्र तुरे डोलत असतात. दोघांच्या मनातील उत्सुकता खूप वाढली आहे. त्यामुळे काही काळ मागे कोणतेच संगीत वाजत नाही. केवळ शांतता. मग वाऱ्याची सळसळ ऐकू येते. आता आवाजाचे स्वरूप दुर्गाला स्पष्ट होते. अपू काही बोलू पाहतो, पण ती त्याला गप्प बसवते व आवाजाच्या दिशेने धावू लागते. आता रेल्वेचा आवाज स्पष्ट ऐकू येतो. थोडे अंतर पळत गेल्यावर त्यांना आकाशात धुराच्या रेषा दिसतात. दुरून येणारी रेल्वेही दिसते. मागचा आवाजाचा कल्लोळ वाढतो व मुले रुळांजवळ पोहोचता त्यांच्या समोरून रेल्वेचे अजस्र धूड धडधडत जाते...

कुठल्याही पारंपरिक वाद्याचा उपयोग न करता हे दृश्य सत्यजित व रविशंकर अविस्मरणीय बनवतात.

दुःख आणि आनंद यांना सामावून घेऊन जीवनाचा प्रवाह सतत पुढे जात असतो हे 'पाथेर पांचाली'चे एक मध्यवर्ती आशयसूत्र आहे. त्याला अनुसरून रविशंकर यांनी श्रेयनामावलीच्या वेळी आणि चित्रपटाच्या शेवटी वापरलेली संगीतरचना आता 'Pather Panchali signature tune' म्हणून जगप्रसिद्ध झाली आहे.

संध्याकाळी सहा वाजता सुरू झालेले रेकॉर्डिंग सकाळी पाच वाजता संपले तेव्हा सारे जण थकून गेले होते. मात्र संगीत अगदी रायच्या मनासारखे तयार झाले होते आणि आपण केलेल्या कामाबद्दल रविशंकरही समाधानी होते. दुसऱ्या दिवशी रविशंकरना परत जायचे होते. त्यांना वेळ नसल्यामुळे काही प्रसंग तसेच पार्श्वसंगीताविना राहिले. मग असे ठरले की तीन-चार मिनिटांचे सतारीचे वेगवेगळ्या रागांतील तुकडे रेकॉर्ड करून ठेवायचे व ते जसे योग्य वाटतील तसे सत्यजित यांनी नंतर एडिटिंगच्या वेळी वापरायचे. चित्रपटाच्या रशेस पाहताना सत्यजितना जाणवले की एका ठिकाणी पार्श्वसंगीताची फार गरज आहे. गावात एक मिठाईवाला आलेला असतो. तो मिठाईची मडकी खांद्यावर काठीला बांधून घेऊन चालतो तेव्हा त्याच्या चालण्याला आपोआप एक लय येते. ह्या लयीला साजेसे संगीत पार्श्वभूमीला असेल तर प्रसंग अधिकच खुलेल असे रायना वाटले. पण रविशंकर तर निघून गेले होते. अशावेळी सुब्रतो मित्र यांच्या मनात एक कल्पना आली.

('The Pather Panchali Sketchbook' या पुस्तकात लिहिलेल्या लेखात सुब्रतो मित्र यांनी या कल्पनेचे श्रेय राय यांना दिले आहे.) मित्र उत्तम सतारवादक होते. त्यांनी या प्रसंगासाठी साजेसा असा सतारीचा एक पीस तयार केला व तो वापरला. या संगीताच्या तुकड्यामुळे पुढे एक फार मजेदार प्रसंग घडला. रविशंकर परदेशात कार्यक्रम करत असताना एका स्त्रीने त्यांना त्यांनी 'मिठाईवाल्याच्या' प्रसंगात वापरलेला पीस वाजवण्याची फर्माईश केली. हा पीस तर त्यांनी तयार केलाच नव्हता, त्यामुळे त्यांना तो आठवणे शक्य नव्हते. रविशंकर यांनी, 'आता बरेच दिवस झाले आहेत, तो नेमका कोणता पीस होता हे मी विसरलो आहे' असे सांगून वेळ मारून नेली.

'पाथेर पांचाली' या चित्रपटाची जगभर प्रशंसा झाली आणि या चित्रपटाच्या वेगळेपणात व श्रेष्ठत्वात संगीताचाही फार मोठा वाटा आहे हे मान्य केले गेले. चित्रपटावरील अनेक परीक्षणांत संगीताचा खास गौरवपर उल्लेख केला गेला. पंकज दत्त या समीक्षकाने लिहिले, 'Ravi Shankar's music in the film reaches unsurpassable heights. There is great novelty in the way he has used a variety of instruments to produce a harmonious whole.'

०००

'पाथेर पांचाली'नंतर जेव्हा सत्यजित यांनी या कादंबरीतील पुढल्या कथानकावर 'अपराजितो' हा सिनेमा काढण्याचा विचार केला तेव्हा त्यांनी संगीतासाठी रविशंकर यांचेच साहाय्य घेण्याचे ठरवले. मात्र यावेळीदेखील मागच्याच घटनांची पुनरावृत्ती झाली. आतापावेतो रविशंकर यांची लोकप्रियता खूपच वाढली होती. त्यामुळे 'अपराजितो'साठी सत्यजितना अपेक्षित होता तेवढा वेळ ते देऊ शकले नाहीत. 'My years with Apu' मध्ये सत्यजितनी लिहिले आहे, ''अपराजितोमध्ये काही उणिवा राहून गेल्या व त्यापैकी एकीचे कारण रविशंकर हे होते. त्यांनी यावेळीदेखील सारे काम अतिशय घाईगडबडीत केले व त्यामुळे काही जागा – जेथे संगीत आवश्यक होते – तशाच रिकाम्या राहून गेल्या.''

'अपराजितो' बंगाली प्रेक्षकांना फारसा रुचला नाही. सत्यजित राय यांनी यानंतर ताराशंकर बंदोपाध्याय यांच्या 'जलसाघर' या कथेवर चित्रपट निर्माण करण्याची तयारी सुरू केली. या चित्रपटातील प्रमुख भूमिकेसाठी त्यांनी छबी विश्वास या बंगालमधील श्रेष्ठ अभिनेत्यास करारबद्ध केले. मात्र चित्रपटाचे चित्रीकरण अर्ध्यातच असताना एक अनपेक्षित अडचण उभी राहिली. छबी विश्वास यांची भूमिका असलेला 'काबुलीवाला' या बंगाली चित्रपटाला बर्लिन येथील महोत्सवात रौप्यपदक मिळाले. त्यासाठी छबी विश्वास यांना बर्लिनला जायचे होते. परत येताना त्यांनी युरोप पाहून येण्याचे ठरवले. त्यामुळे 'जलसाघर'चे काम तीन महिने रेंगाळले. एवढा वेळ

आपले युनिट बसवून ठेवणे राय यांना परवडण्यासारखे नव्हते. त्यांनी या वेळात 'परास पत्थर' या नावाचा एक चित्रपट तयार केला. यासाठी पुन्हा त्यांनी रविशंकर यांचेच संगीत घेतले.

मात्र 'अपराजितो'प्रमाणे हा चित्रपटदेखील चालला नाही. त्यामुळे जेव्हा 'जलसाघर'ला संगीत देण्याची वेळ आली, तेव्हा संगीत देण्यासाठी त्यांनी रविशंकर यांना न बोलावता उस्ताद विलायत खां यांना पाचारण केले. राय यांनी या बदलामागची कारणे स्पष्टपणे सांगितलेली नाहीत, पण 'अपराजितो'च्या अपयशामुळे राय व रविशंकर यांच्यात थोडासा दुरावा, किमान मतभेद, निर्माण झाला असावा असे वाटते. रविशंकरही याबाबतीत कधी स्पष्टपणे बोललेले नाहीत. 'जलसाघर' हा संगीतमय चित्रपट असल्यामुळे त्याच्या संगीतासाठी बराच वेळ द्यावा लागणार होता व तो रविशंकर देणे शक्य दिसत नव्हते. त्यांच्या देश-परदेश दौऱ्यांतून त्यांना या गोष्टीसाठी वेळ मिळेल की नाही याची राय यांना शंका होती. एका संगीतप्रेमी व्यक्तीच्या आयुष्याभोवती फिरणाऱ्या या कथेत संगीताला फार मोठा वाव होता, चित्रपटात तीन मोठ्या संगीत मैफिलींचे चित्रण करावयाचे होते व ते कसेबसे 'उरकून' घेणे सत्यजितना मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी संगीतासाठी रविशंकर यांच्या तोडीचेच दुसरे कलाकार, उस्ताद विलायत खां यांना पाचारण केले.

मात्र 'जलसाघर' या चित्रपटाची समीक्षकांनी स्तुती केली तरी तो चित्रपटदेखील फारसा लोकप्रिय झाला नाही. लागोपाठ तीन चित्रपटांना प्रेक्षकांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही हे पाहून राय चिंतित झाले. यावेळी त्यांना पुन्हा विभूतीभूषण बंदोपाध्याय यांची आठवण झाली. त्यांनी अपूच्या कथानकावर 'अपूर संसार' या नावाचा तिसरा चित्रपट तयार करण्यास प्रारंभ केला. चित्रपटाचे शूटिंग संपत आल्यावर जेव्हा त्याच्या पार्श्वसंगीताचा विचार करण्याची वेळ आली तेव्हा राय यांच्या मनात प्रथम रविशंकर यांचेच नाव आले. याचे प्रमुख कारण म्हणजे आत्तापर्यंत आपण अपूच्या जीवनावर एक 'चित्रपट-त्रिवेणी' तयार करतो आहोत हे त्यांच्या ध्यानात आले होते. (पहिला चित्रपट काढताना असा विचार त्यांच्या मनात नव्हता.) 'अपूर संसार' हा जरी स्वतंत्र चित्रपट म्हणून पाहता येतो, तरी पाहणाऱ्यांच्या मनात पहिल्या दोन चित्रपटांची पार्श्वभूमी तयार असेल तर तो मनावर अधिक परिणाम करतो. सुख आणि दुःख, मिलन आणि वियोग यांचे जीवनात चालू असलेले अविरत चक्र, आशा व निराशेच्या आवर्तनातून पुढे प्रवास करणारे मानवी जीवन अशी या तिन्ही चित्रपटांत अनेक महत्त्वाची व समान आशयसूत्रे आहेत, हे ध्यानात घेता त्यांचे संगीतही एका धाग्याने गुंफलेले असावे असा विचार राय यांनी केला. त्यांनी पुन्हा एकदा रविशंकर यांना संगीत देण्यासाठी बोलावून घेतले. मात्र यावेळी पूर्वीच्या दोन चित्रपटांसारखी घाई मुळीच करायची नाही हे दोघांनीही ठरवले. दोघांनी निवांतपणे सिनेमातील महत्त्वाच्या प्रसंगांवर चर्चा केली. संगीताचा कसा, कुठे आणि किती वापर करता येईल हे ठरवले आणि त्याप्रमाणे तीन पूर्ण शिफ्टमध्ये रेकॉर्डिंगचे काम करण्यात आले.

आज 'अपु त्रिवेणी' [Apu Trilogy] ही जगातील सर्वोत्तम चित्रपट त्रिवेणी मानली जाते. या त्रिवेणीच्या यशात रविशंकर यांच्या संगीताचा फार मोठा वाटा आहे. 'अपूर संसार'च्या संगीताबद्दल रायदेखील खूप समाधानी होते. त्याचे मनापासून कौतुक करताना त्यांनी लिहिले आहे, ''संगीताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा 'अपूर संसार'मधील एक प्रसंग मला आठवतो. अपर्णाच्या मृत्यूनंतर अपू जंगलात निरुद्देश भटकत असतो. एके दिवशी तो आपण लिहीत असलेल्या कादंबरीची पाने टेकडीवरून खाली सोडून देतो. या प्रसंगासाठी रविशंकर यांनी तयार केलेले संगीत ऐकताना वेदांतील ऋचांची आठवण होते.''

१९५९ साली राय यांनी प्रभात मुखर्जी यांच्या कथेवर आधारित 'देवी' या चित्रपटाच्या पटकथेवर काम करण्यास प्रारंभ केला. मात्र या चित्रपटाला संगीत देण्यासाठी त्यांनी अली अकबर खां यांची निवड केली. त्यानंतरचा त्यांचा चित्रपट 'तीन कन्या' हा १९६१ साली प्रदर्शित झाला. या चित्रपटासाठी राय यांनी स्वतःच संगीत तयार केले. येथून पुढे त्यांच्या शेवटच्या चित्रपटापर्यंत आपल्या सिनेमातील संगीताची धुरा त्यांनीच वाहिली. यामुळे 'अपूर संसार'नंतर हे दोन महान कलावंत पुन्हा कोणत्याही चित्रपटात एकत्र आले नाहीत. राय यांनी स्वतःच संगीत देण्यास सुरुवात केली याबद्दल अनेकांनी त्यांच्यावर टीकाही केली. सुप्रसिद्ध संगीतकार वनराज भाटीया यांनी या निर्णयाला 'An expression of ego' असे नाव दिले. राय हे 'one man show' करत आहेत अशीही टीका त्यांनी केली. परंतु याच भाटीयांनी जेव्हा राय यांनी दिलेले 'चारुलता'चे संगीत ऐकले तेव्हा मात्र आपले मत त्यांनी बदलले. ''राय यांच्या 'चारुलता'चे संगीत चित्रपटाच्या सौंदर्यात लक्षणीय भर घालणारे आहे. जसे संगीत त्यांनी तयार केले तसे क्वचितच कुणा संगीतकाराने तयार केले असते.'' असे मत त्यांनी मांडले.

या संदर्भात राय यांची भूमिका स्पष्ट होती. 'Some aspects of my craft' या लेखात त्यांनी लिहिले आहे. '' 'तीन कन्या'पासून मी स्वतःच्या चित्रपटांना स्वतःच संगीत देऊ लागलो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे माझ्या मनात संगीताच्या संदर्भात असंख्य कल्पना येत आणि इतर संगीतकारांना 'खूप काही सूचना दिलेल्या' आवडत नाहीत. [They resent being guided too much.]''

सत्यजित यांनी १९६० नंतर त्यांच्या चित्रपटाला संगीत देण्यासाठी आपल्याला बोलावले नाही याबद्दल कोणतीही प्रतिक्रिया देण्याचे रविशंकर यांनी सतत टाळले आहे. एका मुलाखतीत या संदर्भात बोलताना ते फक्त म्हणाले, '' 'पाथेर पांचाली'ला खूप पारितोषिके मिळाली. यानंतर सत्यजित यांनी माझ्या संगीतात सुधारणा करण्यास सुरुवात केली.'' [He started adjusting my scores.] राय यांनी वापरलेला 'resent' आणि रवी बाबूंचा 'adjust' हे दोन्ही शब्द वेगवेगळे असले तरी ते एकाच अर्थाकडे बोट दाखवतात.

आणखी एकदा रविशंकर यांना आडवळणाने विचारले गेले

की संगीतकार सत्यजित यांच्याबद्दल तुमचे काय मत आहे? त्यावर ते म्हणाले, ''सत्यजित हे सक्षम संगीतकार आहेत. त्यांना काय हवे ते ते चांगल्या प्रकारे जाणतात. शिवाय त्यांचा पाश्चात्त्य संगीताचा अनुभवही मोठा आहे.''

चित्रपटाचे प्रत्येक अंग कसे असावे याबद्दल दिग्दर्शकाचे मत अंतिम असते हे पंडितजींनी मान्य केले होते. 'सत्यजित यांनी स्वतःच संगीत देण्यास का सुरुवात केली असे विचारल्यावर रविशंकर म्हणाले, ''चित्रपट दिग्दर्शकाचे मन हे आईच्या मनासारखे असते. दुसऱ्या कुणीतरी तिच्या मुलीची काळजी घेण्याचा प्रयत्न केलेले तिला आवडत नाही. जर आईजवळ वेळ असेल व करण्याची क्षमता असेल तर आपल्या मुलाचे संगोपन तीच करील.''

सत्यजित आणि रविशंकर यांचा एकमेकांशी परिचय वाढल्यानंतरच्या दिवसांतच कधीतरी सत्यजित यांच्या मनात रविशंकर यांच्यावर एक डॉक्युमेंटरी तयार करण्याचा विचार आला. राय यांची चरित्रकार मेरी सेटन हिच्या मते ही डॉक्युमेंटरी काढण्याची कल्पना राय यांच्या मनात १९५१-५२ साली आली. पण 'पाथेर पांचाली'चे संगीत देण्याचा विचार सुरू झाल्यावरच, म्हणजे १९५४ साली राय व पंडितजींचे संबंध घनिष्ठ बनले. त्यामुळे ही कल्पना तितकी जुनी असणे शक्य नाही. रविशंकर यांच्याशी चर्चा करत असताना, त्यांचे सतार वाजवणे लक्षपूर्वक निरखीत असताना राय यांच्या मनात जी चित्रे उमटली ती त्यांनी कागदावर रेखाटून ठेवली. संगीताचे एक जाणकार, शंकरलाल भट्टाचार्य यांनी १९७७ साली रविशंकर यांची एक मुलाखत घेतली होती. त्या मुलाखतीत या संदर्भात रविशंकर म्हणतात,

''होय. त्यांच्या मनात तसा विचार होता हे खरे आहे. ही गोष्ट त्यांनी त्यांचा दुसरा चित्रपट 'अपराजितो'चे चित्रण सुरू केले त्यापूर्वीची आहे. त्यांनी या डॉक्युमेंटरीसाठी एक संपूर्ण अल्बम भरेल एवढी रेखाचित्रे चितारली होती. तो अल्बम मी पाहिलेला आहे. त्यात त्यांनी माझ्या एका काल्पनिक मैफिलीची रेखाटणे केली होती. मी सतार वाजवतो आहे... मी वेगवेगळे राग वाजवतो, असे दाखवताना माझ्या भावमुद्रांना वादळ, वारा, पाऊस, ढग यांच्या प्रतिमांची त्यांनी जोड दिली होती. हा एक वेगळाच प्रयोग होता. त्यानंतर काय झाले कुणास ठाऊक, तो प्रोजेक्ट बाजूलाच पडला. त्या विषयावर आम्ही त्यानंतर बोललोही नाही.''

खूप वर्षांपर्यंत या प्रकल्पाविषयी फारशी काही माहिती कुणालाच उपलब्ध नव्हती. २०१४ साली सत्यजित यांनी काढलेल्या मूळ रेखाटनांच्या वहीचा शोध लागला व ती 'Society for the preservation of Satyajit Ray Archives' या संस्थेने एका देखण्या पुस्तकाच्या रूपात प्रकाशित केली.

या रेखाटनाची सुरुवात राय यांनी रविशंकर यांच्या एका क्लोजअपने केली आहे. रविशंकर तन्मय होऊन राग तोडी वाजवत आहेत. यानंतर जवळून आणि दूरवरून, वेगवेगळ्या कोनांतून काढलेली अनेक लहान लहान रेखाचित्रे आपल्याला दिसतात. एका चित्रात तबला वाजवणारे हात दिसतात. यानंतर रायनी या रागाशी संबंधित निसर्गातील काही दृश्यांची रेखाचित्रे काढलेली आहेत. आकाशात विहरणारे ढग, गळून पडलेली पाने, पाण्याच्या लाटांवर तरंगणारी कमळे, वादळात थरथरणारी झाडे... संगीत ऐकताना रसिकाच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रतिमा...

पण या साऱ्यांतून राय यांना कोणत्या दिशेने पुढे जायचे होते ते समजत नाही. या चित्रांसोबत त्यांनी काही नोंदी लिहून ठेवलेल्या नाहीत. चित्रे, किंवा कॅमेऱ्यातून निर्माण होणाऱ्या प्रतिमा आणि संगीत यांची जुगलबंदी त्यांना दाखवायची असावी. मात्र हा अनोखा प्रकल्प कधीच पूर्णत्वाला गेला नाही. याचे महत्त्वाचे कारण या दोघांत निर्माण झालेला दुरावा हेच होते. रविशंकर एकदा या संदर्भात म्हणाले,

''सत्यजित राय यांनी एका ठिकाणी असे मत व्यक्त केले की मी बॅलेचे संगीत उत्तम देऊ शकतो, पण चित्रपटसंगीत हा माझा प्रांत नाही. या व्यक्तव्यामुळे मी काहीसा दुखावलो गेलो.''

असे असले तरी व्यक्तिगत जीवनात हे दोघे कलावंत एकमेकांचे मित्रच राहिले. दोघेही आपल्या कामात अतिशय व्यग्र असल्यामुळे दुर्दैवाने रविशंकर यांना १९७४ साली व सत्यजित यांना १९८३ साली हृदयविकाराचे झटके आले व त्यांची प्रकृती अधू बनली. यानंतर त्यांच्या भेटीही कमी झाल्या. तरीही कलकत्त्याला आले म्हणजे पंडितजी वेळात वेळ काढून सत्यजित यांना भेटून जात. रायबाबूंना फोन करून ते म्हणत, 'चला, आपण भेटू आणि गप्पा मारू.' अनेक विषयांवर दोघांच्या छान गप्पा चालत.

सत्यजित राय यांचे १९९२ साली निधन झाल्यानंतर रविशंकर यांनी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'Farewell My Friend' या नावाच्या एका रेकॉर्डची निर्मिती केली. या रेकॉर्डमध्ये त्यांनी 'अपु त्रिवेणी'मधील संगीताचा वेगळ्या पद्धतीने वापर केला होता. आपल्या मित्राची आठवण काढताना त्यांच्या मनात तेच संगीत झंकारणे अपरिहार्य होते.

*(दिवाळी २०१९)*

# वा. वि. मांजरेकर : एक आत्ममग्न, संयत शिल्पकार

साधना बहुळकर

उत्तम चित्रकृती वाचकांसमोर आणणारी मुखपृष्ठे हे अंतर्नादचे एक मोठे वैशिष्ट्य होते. या प्रयत्नांत ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे आणि साधना बहुळकर यांनी मोलाची साथ दिली. चित्रसंवाद ह्या साधना बहुळकर यांच्या अंतर्नादमधील सदराला चांगला वाचकप्रतिसाद मिळाला. चित्रसाक्षरतेप्रमाणे शिल्पसाक्षरताही हवी या भूमिकेतून पुढील लेख प्रसिद्ध करत आहोत. शिल्प चिरंतन टिकते; शिल्पकार मात्र विस्मृतीत जातो. वासुदेव विष्णू मांजरेकर (जन्म : १८ जानेवारी १९१८, निधन : १ मार्च १९९७) यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने हे एक संस्मरण.

क्वचितच मिळणाऱ्या निवांतवेळी मला आठवते आमचे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, ड्रॉइंग अँड पेंटिंग विभाग! चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वीचा तेथील पहिल्या मजल्यावरचा एल शेप असणारा स्टुडीओ म्हणजेच वर्ग! त्याच्या भिंती केवढ्यातरी उंच. त्या भिंतींलगत ओळीने मांडलेले धवलरंगी ग्रीक-रोमन अँटिक्स! वेगवेगळ्या पोझमधील! मानवी शरीराची ती प्रमाणबद्ध, पिळदार, सुडौल अभिव्यक्ती निश्चल राहूनही विद्यार्थ्यांना खूप काही शिकवीत असते. त्या उंच भिंतींना आणि स्टुडीओला साजेसे आगळेच गवाक्ष. त्या गवाक्षातून प्रवेशणाऱ्या प्रकाशात तो आसमंत अद्‌भुतरम्य वाटायचा. याच प्रकाशात चित्रकलेच्या व्यापक क्षेत्राची ओळख करून देणारे शिक्षण आम्हाला मिळाले.

या स्टुडीओप्रमाणे असाच आठवतो तो स्कल्पचर-मॉडेलिंग विभागाचा स्टुडीओ. त्या स्टुडीओचे दर्शनही अजबच वाटले होते. अनेक पुतळ्यांची, अर्धपुतळ्यांची, कोरीव कामांची तेथे रेलचेल. विद्यार्थ्यांनी केलेली काही आधुनिक शिल्पेही लक्ष वेधून घ्यायची. खजुराहो मंदिरशिल्पातील 'कामिनी'पासून, शिल्पकार बाळाजी तालीमांच्या 'दरिद्री नारायणा'पर्यंत आणि 'सिंहासनाधिष्ठित राजा'पासून ते शिल्पकार बी. के. गोरेगावकरांच्या 'पेपर विक्या'पोऱ्यापर्यंत! हे सर्व तेथे असण्याचा निकष म्हणजे त्यातील कलात्मकता, कलाकाराचा अभ्यास व माध्यमावरील प्रभुत्व! विद्यार्थ्यांना ते जाणवावे, त्यांची नजर व हात तयार व्हावेत म्हणून. तेथील सर्वच कलाकृती वैशिष्ट्यपूर्ण, उत्तम, तरीही प्रवेशद्वाराजवळची ती वनवासी राम-सीतेची डौलदार, सुबक शिल्पकृती आपोआप डोळ्यांत साठविली जायची. अंतरंगात झिरपायची. अंतर्मनात जपली जायची. ती अप्रतिम निर्मिती शिल्पकार, प्रा व्ही. व्ही. मांजरेकर यांची. ते जे.जे. स्कूलचे विद्यार्थी. त्यांनी तेथे १९४७ ते १९७६पर्यंत अध्यापक, विभागप्रमुख व अधिष्ठाता म्हणूनही कार्य केले.

गेल्या वर्षी म्हणजे २०१८ मध्ये मी एका कार्यक्रमासाठी जे. जे स्कूलला गेले होते. वेळ होता म्हणून स्कल्पचर-मॉडेलिंग विभागात सहज डोकावले. प्रवेशद्वारालगत असणाऱ्या रुंद पॅसेजच्या दोन्ही भिंतीलगत, तात्पुरत्या स्वरूपाचे डिस्प्लेबोर्ड उभे केले होते. त्यावर माजी विभागप्रमुख कै. मांजरेकर सरांच्या जन्मशताब्दीप्रीत्यर्थ त्यांच्या सुमारे ४५ शिल्पाकृतींची छायाचित्रे प्रदर्शित केली होती. तसेच त्यांचा संक्षिप्त परिचय लावला होता. त्यांची काही सर्टिफिकेट्स, पत्रव्यवहारदेखील होता. आत्ताच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या, प्रा. मांजरेकरांच्या दोन्ही उत्थित व्यक्तिशिल्पांना पिवळ्या-केशरी झेंडूच्या माळा घातल्या होत्या. त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षाची दखल निदान, जे.जे. स्कूलमधील त्यांच्या विभागानेतरी घेतली हे बघून फार बरे वाटले. ते सर्व पाहताना माझ्या मनात वसलेले त्यांचे 'वनवासी राम-सीता' डोळ्यांसमोर तरळले. आता त्याचे प्रत्यक्ष दर्शनही घ्यायचेच, म्हणून मी उत्सुकतेने आतील स्टुडीओ गाठला.

तेथे विद्यार्थ्यांचा संगीत-नृत्य असा कार्यक्रम नुकताच संपला होता. त्यासाठी वर्गातच एका बाजूला लहान रंगमंच थोडक्यात पण कल्पकतेने साकार केला होता. सरांच्या जन्मशताब्दीला पोषक अशी त्या मंचाची पार्श्वभूमी होती. मुद्दाम चुरगळवलेल्या मोठाल्या काळ्या कागदांतून दहा-बारा फूट उंचीचा, पाषाणाचा पोत निर्माण केला होता. त्यावर त्यांचे राम-सीता, नटराज व अन्य मूर्तींचे कटआउट होते. एका निष्णात पाषाणशिल्पीला वाहिलेली ही कल्पक व औचित्यपूर्ण आदरांजली होती. सहज विचारले, 'हे दोन-तीन दिवस तरी इथे ठेवणार आहात ना?' पण पुढील दिवसाचा वर्ग तेथेच भरणार असल्याने ते शक्यच नव्हते. सर्व त्याच संध्याकाळी काढून टाकावे लागणार होते. ऐकून विरस झाला. पण त्यांची अडचण रास्त होती. वाटले, पॅसेजमधील डिस्प्लेबोर्ड तेवढा वर्षभर ठेवणार असतील. पण तोही महिनाभरदेखील ठेवणे शक्य नव्हते. मांजरेकरांनी आपल्या हयातीतील तीस वर्षांचा प्राईम टाइम तेथे व्यतीत केला. तेथील फौंड्री त्यांनी सुरू केली. तळमळीने नव्या पिढीला माध्यमातील तांत्रिकतेचे धडे दिले. त्या थोर शिल्पकार-प्राध्यापकाच्या जन्मशताब्दीनिमित्त केवळ एक दिवसीय उपक्रम संस्थेकडून व एकूणच महाराष्ट्रात झाला. तीव्र खंत वाटली. पण समाधानही वाटले, की त्यांची विद्यार्थ्यांप्रती असणारी तळमळ, या संस्थेप्रती व आपल्या


कामाप्रती असणारी सचोटी, निष्ठा या पिढीपर्यंत पोचली आणि त्याबद्दलची त्यांची कृतज्ञताच त्या उपलब्ध वेळातून व्यक्त झाली.

या सर्वांमुळे ते वनवासी राम-सीता बघण्याची अधिकच ओढ मला वाटली. त्या शिल्पाकृतीला 'मास्टर पीस'चा मान असल्याने, या विभागाच्या एका स्टुडीओत त्यासाठी एक जागा निश्चित केली आहे, हे विशेष. गेले तिथपर्यंत मी. आवडती शिल्पाकृती बघितली आणि निघाले. अनेक वर्षांनी बघितल्यामुळे आणखी काही वैशिष्ट्ये जाणवली. योग्यता असूनही विशेष नावलौकिक न झालेल्या त्या तत्त्वनिष्ठ मांजरेकरसरांचे योगदान योग्य प्रकारे अधोरेखित न झाल्याचे मनात ठसठसत होते. म्हणूनच अंतर्नादच्या दिवाळी अंकासाठी जेंव्हा संपादकांनी विचारले तेव्हा जन्मशताब्दीनिमित्त शिल्पकार व्ही. व्ही. मांजरेकरांचा परिचय, हाच विषय मी नक्की केला.

रामायणातील कांचनमृग कथेची खालील चित्र (वनवासी राम-सीता) म्हणजे नितांतसुंदर अभिजात अभिव्यक्ती! प्रभू श्रीरामचंद्रांची ही वनवासातील प्रतिमा तरुण, सुकुमार पण क्षात्रतेजही झळकत असणारी आहे. असे क्षात्रतेज शिल्पित करणे सोपे नाही. या प्रतिमेच्या अणुरेणूत ओतप्रोत आत्मविश्वास आहे. तो छातीच्या ठेवणीतून, उभे राहण्यातील सशक्त डौलातून आणि धनुष्य-बाण धरलेल्या हातातून प्रतीत झाला आहे. लक्षात आले असेल की यात धनुष्याची प्रत्यंचा, बाण प्रत्यक्षात तेथे नाहीत. पण त्या सबंधीत सर्व घटकांचे, हाताचे, बोटाचे बारकावे असे काही आहेत की तो आभास निर्माण होऊ शकतो. रामाजवळ थोडी रेलून उभी राहिलेली सीतेची प्रतिमा, चेहऱ्यावरील भाव निभ्रांत, प्रसन्न. काहीतरी विशेष दिसत असणारी मुद्रा. वर गळ्याजवळ नेलेल्या हातामुळे, ती स्वतःच्या कंचुकीसाठी कांचनमृगाच्या कातडीची मागणी करत आहे, अशी कल्पना बघणाऱ्यांच्या मनात नकळत निर्माण होते. म्हणजे ज्यांना ही कथा माहीत आहे त्यांच्या मनात. आत्ताच्या तिशी-पस्तिशीपर्यंतच्या पिढीला, हे कथानक माहीत नसण्याची शक्यता आहे. तथापि हे कथानक माहीत नसले तरी कलाकृतीचे सौंदर्य उणे होणारे नाही. पार्श्वभूमीची झाडेझुडपे थोडीफार निगा असलेली आहेत. यातूनही वनातील निवासाची कुटी जवळपास असल्याचे सुचित होते. संपूर्ण शिल्पाकृतीला लयबद्धता आहे. माफक वस्त्रे, आभूषणे, यांचे कोरीव काम लाजबाब आहे.



**वनवासी राम-सीता. पहिल्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनातील सुवर्णपदकविजेती शिल्पकृती - १९५६ (माध्यम-प्लास्टर)**



**अंगी उत्तम गुणवत्ता असूनही फारसे नाव न झालेले व्ही. व्ही. मांजरेकर**

हे यातील कलात्मक सौंदर्य. यामागे अर्थातच शिल्पकाराचा अभ्यास आहे. पाश्चात्त्य व भारतीय शिल्पकलाशैलींच्या त्यांच्यात झिरपलेल्या सखोल संस्कारांचा संयोग आहे.

### कलाशिक्षण व कलासंस्कार


व्ही. व्ही. मांजरेकरांचे जे.जे.स्कूलमधे झालेले स्कल्पचर-मॉडेलिंगचे औपचारिक कलाशिक्षण पाश्चात्त्य धाटणीचे आहे, तसेच त्यांच्यावर परंपरागत भारतीय कला-कारागिरीचाही सखोल संस्कार तेथे झाला.

त्यांचा स्टोन कार्व्हिंगचा 'आर्ट अँड क्राफ्ट' विभागातील तीन वर्षांचा कालावधी असणारा शिक्षणक्रम, दोन वर्षातच म्हणजे १९४४ मधे पूर्ण झाला. ते प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. तेथे खिमजी मास्तरांच्या हाताखाली शिक्षण घेण्याची मोठीच संधी त्यांना मिळाली. खिमजी हे काठेवाडमधील परंपरागत कारागीर. दगडातील खोदकामात ते अत्यंत निष्णात होते. वास्तववादी पद्धतीपासून ते अगदी परंपरागत आलंकारिक पद्धतीपर्यंतच्या सर्वच कामांवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. मांजरेकर यांचा पुढील कलाप्रवास पाहता लक्षात येते, की खिमजी यांच्याकडून कळत नकळत, परंपरागत कलेचा अमीट छाप त्यांच्यावर उमटला.

ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या या कलाशाळेत, त्यांच्या अॅकेडमिक म्हटल्या जाणाऱ्या पद्धतीचे शिक्षण दिले जायचे. त्यासाठी त्यांनी इंग्लंडहून काही शिक्षकांना येथे मुद्दाम पाचारण केले. मांजरेकरांच्या एकंदरीत शिल्पनिर्मितीचा मागोवा घ्यायचा, तर ती परंपरा या शिक्षकांपैकी जॉन लॉकवुड किपलिंग (१८३७-१९११) यांच्यापर्यंत पोचते. हे किपलिंग म्हणजे 'जंगल बुक' लिहिणारे सुप्रसिद्ध इंग्लिश लेखक रुडयार्ड किपलिंग यांचे वडील होय. ते जमशेटजी जीजीभॉय यांचे चिरंजीव रुस्तुमजी जीजीभॉय यांच्यामुळे येथे आले व जे.जे स्कूलमधे शिक्षण देऊ लागले. त्या दरम्यान मुंबईत क्रॉफर्ड मार्केट, व्ही.टी स्टेशन, बॉम्बे हायकोर्ट, अशा बऱ्याच इमारतींची बांधकामे सुरू होती. या वास्तूंच्या दर्शनी भागावरच्या अलंकरणाचे व अंतर्भागातील अलंकरणाचे काम करण्यात जॉन किपलिंग यांच्याबरोबर अन्य सहकाऱ्यांचा व जे.जे.स्कूलच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. किपलिंग यांच्या दर्जेदार कौशल्याची साक्ष देणारी दोन दर्जेदार उत्थित शिल्पे, क्रॉफर्ड मार्केटच्या प्रवेशद्वारावर आजही विराजमान आहेत. १८७५ मधे किपलिंग लाहोरच्या मेयो कॉलेज ऑफ आर्टचे प्रिन्सिपॉल झाले व मुंबई सोडून तिकडे गेले. परंतु त्यांच्यामुळे स्टोन कार्व्हिंग व शिल्पकला या विषयांचा प्रभावी प्रारंभ मुंबईत झाला. जे.जे.स्कूलमधे शिकणाऱ्या पुढील परंपरेत रावबहादूर गणपतराव म्हात्रे, बी. के. गोरेगावकर आणि प्रस्तुत शिल्पकार व्ही. व्ही. मांजरेकर ही नावे प्रामुख्याने आहेत. मांजरेकरांनी ही परंपरा सुरू ठेवत प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार, सदाशिव साठे व नारायण सोनावडेकर यांसारख्यांना विद्यार्थिदशेत त्यात पारंगत केले.

व्ही. व्ही. मांजरेकर यांचे पाषाण माध्यमावरील प्रभुत्व पाहता, त्यांची नियुक्ती १९४७ मधे स्कल्पचर-मॉडेलिंग विभागात नव्याने निर्माण केलेल्या स्टोन कार्व्हरपदी झाली. ही नियुक्ती जे.जे. स्कूलचे पहिले भारतीय संचालक श्री. अडूरकर यांनी केली. (या आधीचे संचालक ब्रिटिश होते.) या दरम्यान त्यांनी प्रायव्हेट विद्यार्थी म्हणून स्कल्पचर-मॉडेलिंगच्या परीक्षाही दिल्या. त्यात पहिला वर्ग मिळून १९५१ मधे ही पदविका प्राप्त झाली. वेळ काढून ते वेगवेगळ्या ओतकामांच्या भट्ट्यांवर, त्या कामांचा अनुभव घ्यायला जात. अधिक सराव, अनुभव यासाठी त्यांनी विनायक वाघ या शिल्पकाराकडे चार वर्षे काम केले.

पाश्चात्त्यांच्या वास्तववादी कलाशैलीच्या शिक्षणाबरोबर, १९२०च्या दरम्यान जे.जे. स्कूलमधे कॅ. सॉलोमन यांच्या प्रेरणेने भारतीय कला तत्त्वांना उजाळा देणारा उपक्रम 'इंडियन क्लास' म्हणून सुरू झाला होता. त्यातून 'बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट स्कूल' ही शैली निर्माण झाली. भारतीय कलातत्त्वांचा अंगीकारलेल्या त्या शैलीतही मांजरेकर उत्कृष्ट काम करीत. राम-सीतामधे वास्तववादी पाश्चात्त्यशैली व भारतीय कलेतील लयदारता, अलंकृतता, आत्मिक सामर्थ्य यांचा संयोग आहे. या पद्धतीच्या आणखीही काही कलाकृती त्यांनी, पौराणिक व्यक्तिरेखा व पौराणिक कथांवर आधारित केल्या. उदाहरणार्थ, विविध मुद्रांतील (पोझेस) भगवान शिवशंकर, नृत्यमग्न शिव-पार्वती, वनवासी राम-लक्ष्मण इत्यादी. इतकेच काय, शिवलिंग हलवू पाहणाऱ्या दहातोंडी रावणाची



**ताजमहाल हॉटेलसाठी केलेला जमशेटजी टाटा यांचा संगमरवरी पुतळा**

शक्तिमान अशी प्रतिमा त्यांनी समर्थपणे साकार केली आहे. ही प्रतिमा लहान आकाराची स्केच स्वरूपाची आहे. पण त्यातूनही त्यांच्या गुणवत्तेची झलक प्रत्ययाला येते. अशी बरीच त्रिमित स्केचेस त्यांनी, 'स्वान्तसुखाय' म्हणून केली. परंतु या ऊर्मींना पूर्णत्वाचे लेणे क्वचितच लाभले. त्यामागे व्यावहारिक कारणे असणार. कामासाठी पुरेशी मोठी जागा नसणे, त्या शिल्पांना मागणी असणे इत्यादी. त्यासाठी मागणी यायला त्या शिल्पाकृती रसिकांसमोर यायला पाहिजेत. परंतु भिडस्त स्वभावामुळे त्यांना ते अवघड वाटायचे. काही तत्त्वे निकराने जपण्यामुळे, नुकसान थोडेफार झालेच. त्यांचा नावलौकिक मर्यादित राहिला ही त्यांच्या निकटवर्तीयांची भावना आहे व ती योग्यही आहे.

**सार्वजनिक ठिकाणच्या काही खास शिल्पाकृती**

शिल्पकार मांजरेकरांचे नाव व्हिक्टोरिया टर्मिनस (छत्रपती शिवाजी टर्मिनस) या महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूच्या घुमटावर डौलदारपणे उभ्या असलेल्या 'प्रगती देवतेच्या' चेहऱ्याशी जोडलेले आहे, हे कलाक्षेत्राखेरीज अन्य कोणाला फारसे माहीत नाही. ब्रिटिशांची राजवट असताना हे टर्मिनस अस्तित्वात आले. गॉथिक शैलीतील या देखण्या वास्तूचे बांधकाम दहा वर्षे सुरू होते. १८८७ मधे ते पूर्ण झाले. प्रगतीचे प्रतीक असणाऱ्या तेथील देवतेच्या उजव्या उंचावलेल्या हातात मशाल आहे तर डाव्या हातात परिभ्रमण करणारे चाक आहे. हे शिल्प ग्रीक अँटिकच्या धाटणीचे आहे. १९६९च्या जूनमधे झालेल्या तुफानी पावसात त्यावर वीज कोसळली आणि ती पाषाणमूर्ती भंगली. दुसऱ्या दिवशी ती तुकडा पडलेली मूर्ती लक्षात येताच एकच खळबळ उडाली. तर्कवितर्कांना उधाण आले. मध्य रेल्वेने ती मूर्ती पूर्ववत करण्याचा निर्णय घेतला. पण उंचावरील घुमटाच्या टोकाला असणारी मूर्ती दुरुस्त करणे, हे मोठे आव्हान होते. तिचे शिर ते छातीपर्यंतचा भाग धडावेगळा झाला होता. ते अवघड, गुंतागुंतीचे काम करण्यास देशभरातून कोणी शिल्पकार धजावले नाही. जे एक दोन जण पुढे आले, त्यानी दोन लाखांपर्यंतचे बजेट दिले. मांजरेकरांच्यातील पाषाणशिल्पीला राहवले नाही. सोळा फूट उंचीच्या मूर्तीचे शिर पूर्ववत करण्याची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे शिवधनुष्य पेलणेच होते. ते त्यांनी लीलया पार पाडले. हे काम ते नोकरी करत असणाऱ्या जे. जे. स्कूलमधे झाले. विद्यार्थ्यांनाही त्यात सहभागी केले. आधीच्या मूर्तीसारखे, त्याच शैलीतील पण नवा चेहरा, हात असणारे अर्धेमुर्धेच पाषाणशिल्प करणे आणि जोडल्यावर तेथे त्या सांध्यावर असणारे तपशील एकमेकांशी जुळून ते एकसंध दिसणे, यासाठीचे पराकोटीचे कौशल्य, कल्पकता, अचूक मोजमापे व माध्यमावरील प्रभुत्व त्यांच्याकडे होते. ही घटना त्याचे द्योतक आहे. काम पूर्ण झाले. त्यानंतर रेल्वेचे इंजिनिअर्स, स्वतः शिल्पकार, विद्यार्थी यांनी महत्प्रयासाने ते तेथे चढविले. या कामाचे केवळ साडेचारहजार रुपये त्यांनी घेतले.

मनात येते, हे काम मांजरेकर यांनी स्वीकारल्यावर, त्या शिल्पाकृतीच्या तपशिलांचे रेकॉर्ड, ब्रिटिशकालीन असल्याने त्यांना उपलब्ध झाले असणार. पण स्वातंत्र्योत्तर काळात, व्ही. व्ही. मांजरेकरांच्या या मोलाच्या कार्याचे तपशील सरकारी खाक्यानुसार उपलब्ध असण्याची शक्यता अगदीच कमी. हा अर्धामुर्धा पुतळा साकारणे व तो त्या अवघड जागी चढविणे यात पेच, थरार असतील. पण त्याची वर्णने लेखांतून, मुलाखतीतून शब्दबद्ध झाल्याचे, ऐकिवात नाही. त्यावेळी आजच्यासारखी प्रसारमाध्यमे नव्हती. टी.व्ही. अस्तित्वात नव्हते. तेव्हाच्या वर्तमानपत्रात पुतळा मोडल्याची व नंतर तो पुन्हा उभा केल्याची वृत्ते होती, असे ऐकले. पण आपल्या खाक्यानुसार त्यात शिल्पकाराचे नाव आले असेल, असे वाटत नाही.

सर्वसाधारणपणे शिल्पकारांकडे पौराणिक व ऐतिहासिक व्यक्तिरेखा, राष्ट्रपुरुष, संत-महंत, आध्यात्मिक गुरू, पुढारी, उद्योजक अशांचे पुतळे करण्याची कामे असतात. त्याप्रमाणे मांजरेकर यांनीही बरेच पुतळे प्लास्टर, ब्राँन्झ, पाषाण इत्यादी माध्यमांत केले. उदाः जिजाबाई-शिवबा, पुण्यातील वाडिया कॉलेजचे संस्थापक सर कुस्रो वाडिया यांचा संगमरवरी अर्धपुतळा, मुंबईतील ताजमहाल हॉटेलसाठी केलेला जमशेटजी टाटा यांचा संगमरवरी पुतळा, बजाज हाउससाठी साकार केलेला जमनालाल बजाज पुतळा इत्यादी. हे पुतळे काहींनी बघितलेही असतील. गोव्याचे माजी मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांचा कास्य धातूतील नऊ फूट उंचीचा पुतळा तेथील कलंगुटच्या किनारी स्थापन झाला. या पुतळ्याचे काम





**मांजरेकर यांच्या शिल्पकृतींचे जे.जे. स्कूलमधील प्रदर्शन**

बांद्र्याच्या कलानगरमधील त्यांचे स्नेही प्रल्हाद धोंड यांच्या स्टुडिओत केले. ते बघण्यास मा. बाळासाहेब ठाकरे वरचेवर तेथे जात असत.

स्वामी नित्यानंद हे गणेशपुरी आश्रमाचे संस्थापक. तेथे १९७२ मधे स्थापन झालेले त्यांचे शिल्प हे व्यक्तिशिल्पकलेचा उत्तम नमुना मानला जातो. नित्यानंदांचा चेहरा, शरीरयष्टी हुबेहूब आहेतच, शिवाय चेहरा बोलका आहे. तसेच त्वचेचा पातळ तरीही सुरकुतलेला पोत, छातीवरचे केस यांत विशेषत्वाने प्रत्ययाला येतात. चेहऱ्याची त्वचा, केशविरहित माथ्याची त्वचा, उघड्या अंगाची त्वचा यांत असणारा पोताचा (टेक्सचर) फरक लक्षणीय आहे. हा पुतळा त्यांनी हाजीअली येथील आपल्या राहत्या गव्हर्मेंट क्वार्टर्समधे केला. जे.जे. स्कूलमधे नोकरीसाठी जाण्यास त्यांना सकाळी साडेसातला घराबाहेर पडावे लागे. त्यामुळे गणेशपुरी आश्रमातील सबंधित व्यक्तींना त्यांची अट होती, की काम बघायचे असल्यास सकाळी सातपर्यंत इथे पोचावे लागेल. ती मंडळीही त्यांची वेळ पाळत. हा पुतळा झाल्यावर तेथून तो वाजतगाजत मिरवणुकीने गणेशपुरीपर्यंत नेला गेला. त्यात सुमारे एक हजार स्वामिभक्त सामील होते. याशिवाय अमेरिका, हवाई, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, जपान व इंग्लंड येथील प्रमुख शहरांतील मठांमधे महाराज / स्वामी यांचे मांजरेकर यांनी केलेले पुतळे आहेत. अशा 'कमिशन्ड वर्क'बरोबर त्यांनी 'स्वान्तसुखाय' केलेली व्यक्तिशिल्पे म्हणजे यशवंतराव चव्हाण, राजीव गांधी, गानतपस्वी मोगुबाई कुर्डीकर इत्यादी.

व्ही. व्ही. मांजरेकर व्यक्तिशिल्पांसाठी सुरुवातीचे जे आर्मेचर (माती थापण्यापूर्वीचा सांगाडा) करीत, तो अचूक असे. त्या प्राथमिक टप्प्यातील बांधणीतूनच व्यक्तीच्या शरीराच्या ठेवणीचा अंदाज यायचा. शिल्पकामाची आपली काही हत्यारे ते स्वतःच तयार करीत. मातीकामात अंगठ्याचा वापर बराच केला जातो. त्यासाठीचे हत्यार त्यांनी केले होते. मातीकामाच्या टप्प्यानंतरच्या धातूकामातही ते जातीने लक्ष घालत. संगमरवर माध्यमासाठी त्याकाळात, आज उपलब्ध असणारे ग्राइंडर अस्तित्वातच नव्हते. ते छिन्नी-हातोडीने लहान मोठे आकार स्वतः करीत. छिन्नी-हातोडी वापरण्याची काही तंत्रे, खुब्या त्यांनी स्वानुभवातून प्राप्त केल्या. बारीक कलाकुसरीच्या कामात ते माहीर होते. कारागिरांची मदत कधीही घेत नसत. पुढ्यातील संगमरवर शिल्पकामाला योग्य आहे का, त्याला कुठे आतमधे चीर नाही ना, हे त्यावर हातोडीचा हलका आघात करून, त्या केवळ आवाजावरून ते ओळखायचे. त्या टीप्स त्यांनी उत्सुक विद्यार्थ्यांना शिकवल्याही.



**स्वामी नित्यानंद - गणेशपुरी आश्रमाचे संस्थापक**

आपल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिशिल्प शिकवताना आवश्यक त्या प्राथमिक व सूक्ष्मही बाबतीतले मार्गदर्शन, ते त्या त्या विद्यार्थ्यांच्या पातळीवर जाऊन करीत. माती एकदम चिकट, बरीच कडक अथवा हाताला चिकटणारी उपयोगी नसते. त्यासाठी ती योग्य प्रकारे मळून विशिष्ट दर्जाची म्हणजे कशी असावी हे ते सांगायचे, दाखवायचे. प्लास्टरसाठी पाणी किती घालायचे, त्यात हात कधी घालून चालेल, मोल्ड्च्या वेळी प्लास्टर वाया जाऊ नये म्हणून कशी काळजी घ्यायची इत्यादी अनेक तांत्रिक बाबींचे ते मार्गदर्शन करीत. व्यक्तीची बाह्यरेषा महत्त्वाची असते व म्हणून ती जाणून आपल्या कामात आणली पाहिजे, शरीराकृती घडत असताना त्यात सतत तोल राखला गेला पाहिजे, असे ते विद्यार्थ्यांना सांगत. उत्तम शिक्षक म्हणून त्यांचे नाव होते. त्यांच्या तांत्रिक प्रभुत्वामुळे विनायक करमरकरांसारखा मातब्बर शिल्पकार आपले काम पाहण्यास मांजरेकरांना बोलावून नेत असे व त्यांचे मत विचारात घेत असे.

अंगी गुणवत्ता असून त्यांचे नाव फारसे न होण्याचे कारण त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यात आहे; तसेच ते सभोवतालच्या कलाक्षेत्रातील बदलांशी निगडित आहे. ते जे.जे. स्कूलच्या म्हणजे सरकारी नोकरीत असल्याने त्या नियमांचे काटेकोर पालन झालेच पाहिजे, ही त्यांची स्वयंशिस्त. नोकरी सुरू असताना शासनाची अन्य कलात्मक कामे दिली गेल्यास नियमाप्रमाणे त्याचा मोबदला नसतो. नोकरीच्या वेळेव्यतिरिक्तच्या वैयक्तिक कामांसंदर्भातही काही अडनिडे नियम असतात. ते कलावंतांच्या उन्नतीला बाधक ठरू शकतात. शासनातर्फे विविध ठिकाणी पुतळे उभारले जातात. त्यासाठी टेंडर मागविली जातात. ही पद्धती त्यांना अमान्य होती. त्यांनी कधीही ते केले नाही. शिवाय काम मिळण्यासाठी सरकारदरबारी शिफारस करणारे फोन वा अन्यही वहिवाटा असणाऱ्या आडवाटेने जाणाऱ्यांपैकी ते नव्हते. त्यांच्याकडे कामे आली नाहीत म्हणून किंवा केलेल्या कामाचे पैसे वेळेवर न येणे किंवा मिळालेही नाहीत, काम दुसऱ्या साध्या शिल्पकाराकडे गेले, तरी या कशानेही ते कधीही विचलित झाले नाही. त्याबद्दलची खंतच नव्हती. त्यांना करावीशी वाटणारी कलानिर्मिती ते मन:पूर्वक करीत राहिले. मांजरेकरांच्या कारकीर्दीच्या सुरवातीच्या काळात पाश्चात्त्य वास्तववादी कलाशैली येथे स्थिरावून बहरली होती. त्यात उत्तम काम करणाऱ्यांची परंपरा निर्माण झाली. ती बॉम्बे स्कूल परंपरा म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र्यचळवळीच्या परिणामी येथे भारतीय कलामुल्यांची जोपासना करणाऱ्या भारतीय पुनरुज्जीवनवादी कलाचळवळींनी जोर धरला होता. या कलाचळवळींचे फलित म्हणजे, त्या प्रकारच्या चित्रांनी अखिल भारतीय पातळीवरच्या प्रदर्शनातून यश, लोकप्रियता संपादन केली. त्यांच्यात काही प्रमाणात प्रयोगशीलता होती. मात्र पाश्चिमात्य कलाशैलीने भारावलेल्या अनेक चित्रकार-शिल्पकारांचा या प्रकारच्या आविष्काराला विरोध होता. इतकेच नाही तर त्याचा उपहास, टिंगल होत असे. एक प्रकारे ही दुफळी निर्माण झाली होती. १९३६ नंतर या दोन्ही गटांपेक्षा आधुनिक पद्धतीच्या प्रयोगशील व जोमदार कलाविष्काराने तरुण पिढीला आकर्षित केले व कलेचा प्रवाह वेगाने, तिकडे वाहत गेला. या घुसळणीत मांजरेकरांसारखे काही कलाकार मागे पडले.

त्यांचा जन्म रत्नागिरीतील आकरे या गावी झाला. आईचे नाव चंद्रभागा. शालेय शिक्षण वेंगुर्ले येथे झाले. शालेय शिक्षणानंतर त्यांनी कलाशिक्षणासाठी मुंबई गाठली ती स्वतःच्या हिमतीवर. मुंबईत आले त्यावेळी ते कुठेतरी राहायचे, खायचे. कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना टक्केटोणपे सोसत पुढे गेले. आवडीच्या क्षेत्रात उत्तम शिकले. परिश्रम केले. कलाक्षेत्रात स्वतःला प्रस्थापित केले. विवाह १९५७मधे सुशीला खोत यांच्याबरोबर झाला. २ फेब्रुवारी २०२० साली वयाच्या ८७व्या वर्षी सुशीलाताईंचे दीर्घ आजाराने निधन झाले. मात्र तोवर त्यांनी कौटुंबिक संसाराची आणि कलेच्या संसाराचीही भरपूर उस्तवार केली. उत्तम स्वयंपाक करणाऱ्या या गृहिणीने आपल्या शिल्पकार नवऱ्याला, अनेकदा माती मळून देण्याचे काम केले. मांजरेकर पूर्वीपासून वयाच्या पंचाहत्तरीपर्यंत घरातही शिल्पकामात मग्न असत. 'जेवायला या' सांगताना त्यांना शब्दशः हलवावे लागे. घरी सतत असणारी पाहुण्यांची वर्दळ, वाढत्या वयाची दोन अपत्ये, या धामधुमीतही ते कामात एकाग्र असत. स्वतः शिस्तीचे, टापटीपीचे असल्याने कामाची माती, प्लास्टर यामुळे घर कधी माखलेले, अस्ताव्यस्त नसे. त्यांचा पुत्र विभव प्रिंटिंग-ग्राफिक डिझाइन क्षेत्रात आहे. कन्या भारती नृत्यकलेचे वर्ग घेते. सून, जावई, नातवंडे या प्रत्येकाचे कार्यक्षेत्र वेगळे आहे. कन्या भारतीमुळे ते गानसम्राज्ञी किशोरीताई आमोणकर यांचे व्याही आहेत. किशोरीताईंनाही त्यांच्या कलेबद्दल आदर होता. ते मूर्तिकार होते. आध्यात्मिक मार्गातील गुरूंची व्यक्तिशिल्पे केली, ती कलेच्या ओढीने. व्यक्तिगत, कौटुंबिक जीवनात कर्मकांडे पाळणारे, अंधश्रद्ध अजिबात नव्हते. राहणी, जीवनमान साधे, सचोटीचे होते. कलाक्षेत्रातील वावरही मर्यादित. ये-जा मोजक्या मित्रमंडळींकडे असे. ते स्वभावाने तापट पण मदतीसाठी तत्पर होते.

वयाच्या पंचाहत्तरीच्या सुमारास प्रकृत्ती अधूनमधून बिघडू लागली. दृष्टी क्षीण झाली. ती सुधारण्यासाठी बरेच उपचार केले. तथापि वाचणे, काम करणे बंद पडले, प्रकृतीचीही गुंतागुंत वाढत गेली. अखेरीस १ मार्च १९९७ रोजी त्यांचे निधन झाले.

त्यांच्यामागे एका काळाचे प्रतिनिधित्व करणारी त्यांची दर्जेदार शिल्पसंपदा आहे. काही सार्वजनिकरित्या स्थापित, तर काही घरगुती चार भिंतींत सीमित असणारी. ती अमूल्य आहेत. त्या शिल्पाकृती कायम स्वरूपात एखाद्या योग्य दालनात प्रदर्शित झाल्या पाहिजेत.

*(आभार : विभव मांजरेकर, भारती आमोणकर, विक्रांत मांजरेकर, दत्तात्रेय पाडेकर, श्रीकांत देवधर, प्रशांत इंझे)*

*(दिवाळी २०१९)*

# *अंतर्नाद* कशासाठी...

आजकाल कुठेही नजर फिरवा, आर्थिक समृद्धीबरोबरच सांस्कृतिक कंगालपणाच्या खुणाही पटकन नजरेत भरतात.

सातासमुद्रापार कुठेही क्षणार्धात संपर्क साधायची सोय असलेला हातातला अत्याधुनिक मोबाइल आणि फ्लॅटच्या बंद दाराआड एकेकट्याने वाढणारी आपली संवादविन्मुख पुढची पिढी. 'ग्लोबल व्हिलेज'ची अविरत चर्चा आणि एकमेकांच्या बिऱ्हाडात चुकूनही कधी पाय न ठेवणाऱ्यांच्या 'कोऑपरेटिव्ह' सोसायट्या. नवनव्या उत्पादनांनी ओसंडणारी बाजारपेठ व टीव्हीवरचा रंगीबेरंगी जल्लोष आणि भावनांचे बधिरीकरण व जीवनाचे थिल्लरीकरण.

आर्थिक समृद्धीइतकीच सांस्कृतिक समृद्धीचीही समाजाला गरज असते. ही सांस्कृतिक समृद्धी साहित्याच्या माध्यमातून वाढवण्याचा अंतर्नाद हा एक छोटा प्रयत्न आहे.

दलाल स्ट्रीटवरचे चढउतार आणि शॉपिंग मॉलवरची दिलखेचक प्रलोभने ह्यांच्यापलीकडच्या एका आगळ्या, अधिक शाश्वत विश्वात श्रेष्ठ साहित्य आपल्याला घेऊन जाऊ शकते. टीव्हीवर काल काय बघितले, ते कदाचित आज आठवणार नाही, पण वीस-तीस वर्षांपूर्वी वाचलेले मात्र आजही आठवते. मनावर कोरले जाण्याची, संस्कार करण्याची लिखित शब्दांची क्षमता अजूनही उल्लेखनीय आहे.

आज जीवनाचा विविधांगांनी अफाट विस्तार होत आहे आणि साहजिकच साहित्याला समाजव्यवहारात पूर्वीइतके सर्वव्यापी महत्त्वाचे स्थान राहिलेले नाही, हे उघड आहे. परंतु चांगल्या साहित्याची अनेक सामर्थ्यस्थळे आजही लक्षणीय आहेत.

चांगले साहित्य वाचकाला अंतर्मुख करते, त्याचबरोबर त्याची जिज्ञासा व संवादाची भूकही जागवते. जीवनाचे अल्पपरिचित पैलू नजरेसमोर आणून जाणिवेच्या कक्षा रुंदावते, त्याचप्रमाणे त्या सखोल करते; त्याला अस्वस्थ करते, उल्हसितही करते. अशा परस्परविरोधी परिणामांतून ते वाचकाच्या भावविश्वाला व्यामिश्रता आणि अनुभवविश्वाला अर्थपूर्णता देत असते. साहित्य कदाचित स्वत:च्या बळावर समाजात परिवर्तन घडवू शकणार नाही, पण ते तशा परिवर्तनाच्या अपेक्षा नक्की निर्माण करू शकते; विकाससन्मुखता जोपासू शकते; एका अधिक चांगल्या समाजाचे स्वप्नतरी जिवंत ठेवू शकते. आपापल्या जगण्यातून प्रत्येक जण शिकतच असतो; साहित्य इतरही अनेकांच्या जगण्याचे सार आपल्यापर्यंत पोहोचवते. मनावर व समाजावर या सगळ्यातून कळत-नकळत संस्कार होत असतात, त्यातूनच सांस्कृतिक समृद्धीही साधली जात असते.

ही सांस्कृतिक समृद्धी वाढवणे हे अंतर्नादचे ध्येय आहे. या मूलभूत व्यापक ध्येयाप्रत वाटचाल करण्याच्या दृष्टीने तीन सुस्पष्ट उद्देश 'अंतर्नाद'ने पहिल्या अंकापासूनच समोर ठेवले आहेत :

१. मराठी भाषेच्या व साहित्याच्या संवर्धनाला हातभार लावणे.
२. सकस साहित्याच्या वाचनाची आवड जोपासणे.
३. अन्य माध्यमांतून आज सहसा स्थान न मिळणाऱ्या पण मौलिक अशा वैचारिक व ललित दीर्घ लेखनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

हे तिन्ही उद्देश साधतील अशा प्रकारच्या साहित्यासाठी मासिक हे माध्यम आजही खूप सोयीचे आहे. मासिकातील साहित्य बातम्यांच्या आणि जाहिरातींच्या भाऊगर्दीत हरवून जात नाही. दैनिक वा साप्ताहिकाप्रमाणे घडलेल्या सर्वच घटनांवर घाईघाईने भाष्य करायची मासिकाला गरज नसते. मासिकातील लेखन तात्कालिक महत्त्वापेक्षा, बातमीमूल्यापेक्षा अधिक व्यापक संदर्भांवर बेतलेले, चटपटीत शैलीपेक्षा अनुभवाच्या खोलीवर व व्यासंगावर भर देणारे असू शकते. ह्या लेखनासाठी, त्यावर संस्कार करून आवश्यक अशा पुनर्लेखनासाठी पुरेसा वेळ देता येतो. कल्पनेच्या वा विचाराच्या समग्र अभिव्यक्तीसाठी आवश्यक एवढी जागाही मासिकाला देता येते. लेखनादरम्यान चर्चा-चिंतनाला वाव असतो. या सगळ्यामुळे ते साहित्य जास्त परिपक्व बनू शकते. वाचकाच्या वेळेवरही मासिक आक्रमण करत नाही. लेखनाचा योग्य तो आस्वाद घ्यायला, त्यावर विचार करायला आवश्यक तो निवांतपणा मासिकच वाचकाला देऊ शकते.

इंग्रजीचा वा हिंदीचा दुस्वास न करताही मराठी भाषा व साहित्य समृद्ध करता येते, अशी अंतर्नादची धारणा आहे. कुठल्याही प्रकारची सामाजिक, राजकीय, वैचारिक वा साहित्यिक अस्पृश्यता अंतर्नाद पाळत नाही. अन्य कुठल्या नव्या-जुन्या मासिकाशी अंतर्नाद स्वत:ची बरोबरी करू इच्छित नाही, स्वत:विषयी अवास्तव दावेही करू इच्छित नाही.

अंतर्नादमध्ये सुधारणांना भरपूर वाव आहे, याची आम्हांला जाणीव आहे. प्रत्येक मासिक हे शेवटी आपापल्या काळानुसार, परिस्थितीच्या मर्यादांनुसार, वाचकवर्गानुसार, स्वतः संपादकाच्या विशिष्ट अशा पिंडानुसार आणि सर्वांत निर्णायक म्हणजे मासिकात लिहिणारे लेखक शेवटी किती कसदार लिहितात त्यानुसार आकार घेत असते. मराठी साहित्यविश्वापुढच्या आजच्या अनेक गंभीर अडचणी तशा बहुपरिचित आहेत. पण त्या अडचणींवर यथाशक्ति मात करत इतकी वर्षे न चुकता दर महिन्याच्या पहिल्या तारखेला अंतर्नादचा अंक प्रकाशित होत आहे.

आपल्याला हा अंक आवडला, तर आपणही अवश्य वर्गणीदार व्हावे; शक्य असेल तर जाहिरातींच्या मार्फतही सहकार्य करावे. अंतर्नादची आजवरची वाटचाल ही साहित्यप्रेमींच्या अशाच सहकार्यामुळे शक्य झाली आहे.

***(अंकात वेळोवेळी छापलेले निवेदन)***

■

संपादकीय

# अंतर्नादची दशकपूर्ती : थोडे प्रकट चिंतन

अंतर्नादची संपादकीये म्हणजे वाचकांशी साधलेला संवादच असायचा. नमुना म्हणून चार संपादकीये या संकलनात समाविष्ट करत आहोत. सर्वप्रथम ऑगस्ट २००५ मध्ये अंतर्नादच्या वाटचालीला दहा वर्षे पूर्ण झाली त्या वेळी घेतलेला हा एक आढावा. त्या वेळच्या अनेक अडचणी काळाच्या ओघात दुर्दैवाने अधिकच बिकट होत गेल्या आणि दु:खद शेवट अपरिहार्य ठरला.

---

अंतर्नादचा हा दशकपूर्ती विशेषांक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. अडखळत पडणारी पावले आता थोडीफार स्थिरावत आहेत, पण वाटेत खाच-खळगे आहेतच. ''दहा वर्षं कशी गेली, कळलंच नाही'' असे म्हणण्याइतकी काही ही वर्षे सुरळीत पार पडली नाहीत, पण हस्तलिखित ते छापील हा प्रवास मूलत: आवडीचा असल्याने अडचणींचा फारसा वैतागही कधी आला नाही; आज तरी या उपक्रमात अडचणींपेक्षा आनंदाचा भाग अधिक आहे.

एखाद्या मासिकाने अकराव्या वर्षात पदार्पण करणे यात उपक्रमाशी थेट संबंध नसलेल्यांनी दखल घ्यावी, असे फारसे काही नाही. पण आपण कुठे चाललो होतो आणि आता कुठे आहोत, याचा आढावा घ्यायची संबंधित व्यक्तींना ही एक संधी असते. असे सिंहावलोकन करताना आज दहा वर्षांनंतर काय वाटते?

सर्वप्रथम मनात दाटते ती अनेकांविषयीची कृतज्ञतेची भावना.

मागचा साधारण शंभर वर्षांचा कालखंड विचारात घेतला तर मनोरंजन-करमणूक-विविधज्ञानविस्तार-चित्रमयजगत-ज्योत्स्नापासून किर्लोस्कर-स्त्री-अभिरुची-सत्यकथा-हंसपर्यंत अनेक मराठी मासिकांनी अंतर्नादच्या पूर्वीच मराठी नियतकालिकांच्या वाटचालीत अनेक मैलाचे दगड निर्माण करून ठेवले आहेत. एकूण साहित्यसृष्टीला त्यांनी दिलेले योगदान वादातीत आहे. पण त्याचबरोबर हेही खरे, की नियतकालिकांना व एकूणच साहित्यनिर्मितीला एकेकाळी बऱ्यापैकी पूरक असलेले वातावरण साधारण १९८०नंतरच्या कालखंडात झपाट्याने बदलत गेले. लेखकाचे – व साहित्याचे – समाजातील अग्रस्थान नाहीसे झाले. दृक्‌श्राव्य माध्यमाचा विकास, वृत्तपत्रांच्या घरपोच येणाऱ्या भरगच्च पुरवण्या, इंग्रजीचे प्राबल्य, नागरी जनजीवनातील वाढती स्पर्धा व त्यातून हरपलेले मानसिक स्वास्थ्य या व अशा इतरही अनेक कारणांनी मासिकांची पडझड होत गेली. सामाजिक परिस्थितीचा लाभ मिळणे तर सोडाच, एकूणच मासिक चालवणे म्हणजे उघडउघड प्रवाहाविरुद्ध पोहणे बनले. त्यात दमछाक होऊन अनेक मासिकांनी मान टाकली – बहुतेकांचे अस्तित्व केवळ दिवाळी अंकापुरतेच उरले.

मराठी मासिकांच्या – व एकूणच वाचनसंस्कृतीच्या – दृष्टीने अतिशय प्रतिकूल अशा या परिस्थितीत अंतर्नादने जन्म घेतला. वाट बिकट आहे याची कल्पना होती, पण अनेकांनी दिलेल्या निरलस सहकार्यामुळेच ती थोडीफार सुकर झाली. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी.

सुरुवात लेखकांपासून करायला हवी. ''लेखक एवढ्या-तेवढ्याने दुखावले जातात, कारण ते खूप संवेदनाक्षम असतात. लेखकाची अस्मिता सांभाळून त्याच्याकडून हवं तसं लेखन करून घेणं हे संपादकापुढचं सर्वांत कठीण काम आहे,'' असे अंतर्नादच्या प्रथम अंक प्रकाशन समारंभात ज्येष्ठ संपादक मुकुंदराव किर्लोस्कर म्हणाले होते. याचीही सत्यता यथावकाश पटली. दोन-तीन लेखक, व इतरही काही परिचित, दुरावले. का, ते कधीच स्पष्ट झाले नाही, पण अंतर पडले हे खरे. नंतर प्रयत्न करूनही ते साधता आले नाही, याचे आता मागे वळून पाहताना खूप वाईट वाटते.

पण असे अनुभव अपवादस्वरूप आहेत. सामान्यत: लेखक व इतरही व्यावसायिक सहकाऱ्यांचे अंतर्नादला चांगले सहकार्य मिळाले. नावानिशी उल्लेख करत नसलो तरी त्यांच्याशी असलेले नाते हे नेहमीच आपलेपणाचे राहिलेले आहे.

श्रेयनामावलीत 'व्याकरण-सल्लागार' हे बिरुद असणारे दुसरे मराठी मासिक बहुधा नसावे. अंतर्नादमध्ये व्याकरणाच्या चुका फारशा आढळत नाहीत, याचे मोठे श्रेय यास्मिन शेख यांना द्यावे लागेल. निरंजन घाटे, मानसी मागीकर, मयूर जोगळेकर, प्रसाद मणेरीकर, सुशील धसकटे, स्नेहा अवसरीकर हे अंतर्नादचे वेळोवेळीचे कार्यालयीन सहकारी. त्यांचे सहकार्यही खूप मोलाचे होते, आहे. ज्यांनी अंतर्नादला वेळोवेळी जाहिराती दिल्या त्यांचाही उल्लेख इथे कृतज्ञतापूर्वक करायला हवा. स्वत:चा कुठलाही व्यावसायिक फायदा नसतानाही त्यांनी हे सहकार्य दिले.

पत्नी वर्षाचा उल्लेख तर कुठल्या शब्दांत करायचा? तिच्या पूर्ण सहभागाशिवाय हा उपक्रम इतकी वर्षे चाललाच नसता; किंबहुना सुरूच झाला नसता.

## अंतर्नादची कमाई

चांगले साहित्य चांगल्या वाचकांपर्यंत पोचवणे हे कुठल्याही मासिकाचे जीवितकार्य. डावे-उजवे, दलित-सवर्ण, ग्रामीण-शहरी, मित्र-परका, मदतशील-खडूस, स्वतःला व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त वा अनुपयुक्त, प्रस्थापित-नवोदित वगैरे कुठचेही साहित्यबाह्य निकष लेखकांना न लावता, शक्य तितक्या वस्तुनिष्ठपणे, प्रत्यक्ष साहित्य वाचून वाचकांना चांगले साहित्य द्यायचा, एक किमान दर्जा राखायचा, अंतर्नादने सातत्याने प्रयत्न केला आहे.

शेक्सपीअर विशेषांक, कालिदास विशेषांक, रवीन्द्रनाथ विशेषांक, धार्मिक सलोखा विशेषांक असे अनेक विशेषांक अंतर्नादने काढले. कथालेखनाला उत्तेजन द्यावे म्हणून कथास्पर्धा घेतल्या. पुणे विद्यापीठ, राज्य मराठी विकास संस्था वगैरे अनेक संस्थांच्या सहकार्याने कवितावाचन, मुलाखती, कथालेखकांसाठी निवासी शिबिरे इत्यादी उपक्रम राबवले. अनेक सांस्कृतिक कार्यक्रम केले. वेगवेगळ्या गावी केले.

अंतर्नादमधल्या बऱ्याच लेखनाची इतर प्रसारमाध्यमांनीही वेळोवेळी बऱ्यापैकी दखल घेतली. उदाहरणार्थ, 'एक करपलेला झंझावात' हा राम शेवाळकर यांचा सुरेश भटांवरील लेख. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये या लेखाचा विस्तृत आढावा घेताना 'कलंदर'नी लिहिले होते, ''शेवाळकरांनी भटांची कविता व त्यांचे व्यक्तिमत्त्व याबद्दल इतका मार्मिक आणि अभूतपूर्व लेख लिहिला आहे, की तो लेख म्हणजे जणू एक अपूर्व गद्य गझलच झाला आहे.'' कलाकृती आणि कलावंताचे व्यक्तिगत जीवन यांचे नेमके काय नाते असते हा एक महत्त्वाचा प्रश्न या संदर्भात चर्चेत आला.

अंतर्नादमधल्या इतरही अनेक लेखांच्या बाबतीत हे म्हणता येईल. अंतर्नादमधल्या अनेक सदरांची पुढे वेगवेगळ्या प्रकाशकांनी पुस्तके काढली. यशवंत रांजणकर यांचे 'अ-पूर्व चित्रगाथा', लक्ष्मण लोंढे यांचे 'लक्ष्मणझुला', अरविंद गजेंद्रगडकर यांचे 'स्वरांची स्मरणयात्रा', शान्ता शेळके यांचे 'कविता स्मरणातल्या' इत्यादी. नवोदितांनाही अंतर्नादने जवळजवळ प्रत्येक अंकात आवर्जून स्थान दिले. मुखपृष्ठाबाबत वेगवेगळे प्रयोग केले. अनेक उत्तम चित्रे वाचकांपुढे आणली. अनुवादित साहित्यही भरपूर छापले. कविता व कविताविषयक गंभीर लेखनही छापले. वृत्तपत्रांत विस्तृत पुस्तकपरीक्षणांना पुरेशी जागा मिळत नाही, म्हणून ती अंतर्नादमध्ये जाणीवपूर्वक दिली; चार-चार, सहा-सहा पानी पुस्तक परीक्षणेही छापली.

वाचकांनाही अंतर्नादने नेहमीच मानाचे स्थान दिले. वाचकपत्रांना इतकी जागा देणारे दुसरे मासिक बहुधा पटकन सांगता येणार नाही. खरे तर अशा प्रकारे व्यक्त होण्याची मराठी वाचकांना फारशी सवयही नाही. अंतर्नादने हा एक नवा पायंडा पाडला, असे विनयाने सांगावेसे वाटते. 'प्रतिसाद' हे सदर आता अंतर्नादचा एक अविभाज्य भाग बनले आहे.

लेखनाशेवटी लेखकाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक आम्ही छापत असतो. आपले लेखक इतर नियतकालिकांनी हिरावून नेण्याची शक्यता असूनही! वाचकांना लेखकांशी त्यामुळे थेट संवाद साधता येतो व असा परस्परसंपर्कही वाङ्मयीन संस्कृती जोपासण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

आमच्या सर्व लेखकांचे, व पत्रलेखकांचेही, आम्ही मनापासून आभारी आहोत.

मागे वळून पाहताना जाणवणारी आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अंतर्नादला लाभलेला वर्गणीदारांचा विश्वास. वाचकांशी बांधिलकी, संपादकीय जबाबदारीचे भान, दर्जेदार निर्मिती आणि व्यवहारातील चोखपणा ही चार मूल्ये पाळायचे पहिल्याच अंकात दिलेले आश्वासन पाळायचा अंतर्नादने जास्तीत जास्त प्रयत्न केला आहे. दर महिन्याच्या एक तारखेला अंक हाती पडेल याची या वर्गणीदारांना खात्री वाटते. ही नियमितता कायमच पाळली गेली आहे. एकदा अंक पोस्टात दिल्यावर मात्र पुढच्या वितरणावर आमचे काहीच नियंत्रण नसते व त्यामुळे 'अंक मिळाला नाही' अशा साधारण वीस-पंचवीस तक्रारी दरमहा येतात; पण त्या प्रत्येकाला दुसरा अंक आम्ही निश्चित पाठवतो, खूपदा कुरीअरचा खर्च करावा लागला तरी पाठवतो.

बहुधा अशाच काही कारणांमुळे अनेक वर्गणीदारांना अंतर्नाद 'आपला' वाटतो. ''प्रत्येक वर्गणीदाराने एक अधिक वर्गणीदार मिळवून दिला, तरी वर्गणीदारांची संख्या दुप्पट होईल,'' अशी केवळ सूचना करून स्वतः वर्गणीदार असलेले एक ज्येष्ठ शास्त्रज्ञ व विद्यापीठाचे उपकुलगुरू थांबत नाहीत; आपल्या वीस मित्रांचे पत्ते वर्गणीच्या एकत्रित चेकसह दुसऱ्याच दिवशी पाठवून देतात.

''अहमदाबादच्या चारुल-विनयवरचा लेख आवडला. दरमहा तुम्ही एखादा छोटा कार्यक्रम करता; एखाद वेळी त्यांनाही बोलवा. चांगला हॉल घेऊन तो कार्यक्रम करा,'' अशी केवळ सूचना करून एक ज्येष्ठ वकील वर्गणीदार थांबत नाहीत. कार्यक्रमाच्या सर्व खर्चाची रक्कमही आगाऊ व घरपोच देतात. हे सगळे पुन्हा स्वतःचे नाव जाहीर न करण्याच्या अटीवर.

अंतर्नादविषयीच्या ममत्वातूनच हे घडू शकते. 'अंक पसंत नसेल तर वर्गणीचा उर्वरित हिस्सा परत केला जाईल', असे अंकातून जाहीर केले असतानाही जवळपास कोणीच कधी वर्गणी परत घेतलेली नाही, वर्गणी नूतनीकरणाचे प्रमाणही साधारण ७५ टक्के राहिले आहे, ही वर्गणीदारांनी दिलेली एक पसंतीची पावतीच आहे.

मराठी साहित्य लिहूनच मोठ्या झालेल्या आणि तरीही वाचकांपासून फटकून राहणाऱ्या काही साहित्यिकांपेक्षा अशा सर्वसामान्य वर्गणीदारांचे साहित्यप्रेम अधिक सच्चे असते. असो.

वर्गणीदारांचा विश्वास ही अंतर्नादची मोठी कमाई आहे. हा विश्वास अंतर्नादमधून प्रतीत होणाऱ्या एका विशिष्ट जीवनदृष्टीवरचा विश्वास आहे, याचीही जाणीव आम्हांला अर्थातच आहे.

## अंतर्नादच्या मर्यादा

पण हे सगळे खरे असले, तरीही आज अंतर्नादच्या वर्गणीदारांची एकूण संख्या फक्त १५६० एवढीच आहे, हे कटू सत्य नजरेआड करता येत नाही. विक्रेत्यांमार्फत सरासरी ३५० प्रती दरमहा विकल्या जातात. म्हणजे एकूण खप १९१० झाला. (या व्यतिरिक्त दरमहा ८० प्रती 'सप्रेम भेट' म्हणून पाठवल्या

जातात. यात पोस्ट मास्टर, सेंट्रल लायब्ररी, कलेक्टर वगैरेंना कायद्यानुसार पाठवाव्या लागणाऱ्या प्रती, अंतर्नादकडे जे आपली नियतकालिके पाठवतात त्यांना 'प्रतिभेट' म्हणून पाठवायच्या प्रती, आणि व्यक्तिगत मित्र-जाहिरातदार-काही लेखक यांना पाठवल्या जाणाऱ्या प्रतींचा समावेश आहे.)

यातही पुन्हा सुमारे ७५ टक्के खप हा मुंबई, पुणे, ठाणे व नाशिक या चारच जिल्ह्यांमध्ये (त्याच अनुक्रमाने) एकवटलेला आहे.

दहा वर्षे जवळ जवळ पूर्णवेळ हे एकच काम करूनसुद्धा, नऊ कोटी मराठी भाषकांत, खपाची एवढीच पातळी गाठता यावी, ही एकच गोष्ट अंतर्नादच्या मर्यादा स्पष्ट करायला खरेतर पुरेशी आहे.

वर्गणीदार वाढवायचे प्रयत्न केले गेले नाहीत, असे अर्थातच नाही. 'प्रकाशन-डायरी'तून लेखक-प्रकाशक-ग्रंथालये यांचे, तसेच देशभरातील महाराष्ट्र मंडळांचे, पत्ते घेऊन त्यांना तीन-तीन अंक व सहपत्र पाठवणे, परदेशस्थ मराठी माणसांचे पत्ते मिळवून त्यांना पत्र व एखादा नमुना अंक पाठवणे, वेगवेगळ्या वर्गणीदारांनी सुचवलेल्या व्यक्तींना पत्र व नमुना अंक पाठवणे, ज्यांचे दर परवडतील अशा मासिकांमधून जाहिरात देणे, स्थानिक पातळीवर वर्गणी भरणे सोपे जावे म्हणून पंधरा-वीस मित्रांचे पत्ते 'येथे वर्गणी स्वीकारली जाईल' म्हणून छापणे, विद्यार्थ्यांसाठी वर्गणी निम्मी करणे, वाढदिवस-दिवाळी अशा प्रसंगी भेटवर्गणी द्यायची सोय करणे वगैरे विविध योजना वेळोवेळी राबवून झाल्या. पण त्यांना फारसे यश लाभले नाही.

उत्पन्नाचे दुसरे साधन म्हणजे जाहिराती. त्याही आघाडीवर परिस्थिती बिकटच आहे. मराठी मासिकांसाठी जाहिराती मिळवणे हा एक खूपच कठीण प्रकार आहे. खप अगदीच कमी असल्याने त्या हक्काने कधीच मागता येत नाहीत. अर्थात याचा अर्थ जाहिराती मिळवणे अशक्य आहे असा नाही. पण त्या मिळवायचेही एक विशेष तंत्र बनले आहे व त्यासाठी वेगळीच यंत्रणा लागते; अंतर्नादकडे तशी यंत्रणा नाही. पंधरा-वीस टक्के कमिशन घेऊन जाहिराती गोळा करणारा एखादा चांगला एजंट बरेच प्रयत्न करूनही अंतर्नादला मिळवता आलेला नाही.

सध्या अंतर्नादला फ्लीटगार्ड फिल्टर्स, फिल्ट्रम पॉलिमर्स, होडेक व्हायब्रेशन, पी.सी.आर.ए. (पेट्रोलियम कॉन्झर्वेशन रिसर्च असोसिएशन) व केप्र मसाले यांच्या जाहिराती नियमित मिळतात. पण त्याही केवळ अंतर्नादला मदत करायच्या भावनेतून दिल्या जातात.

यातल्या मुखपृष्ठाच्या तीन बाजूंवर छापल्या जाणाऱ्या उपरोक्त पहिल्या तीन जाहिराती या अरुण किर्लोस्कर यांच्या औदार्याने व सौजन्याने मिळतात. अंतर्नादचा तो मोठा आधार आहे. या जाहिरातींचाच एक भाग म्हणजे अंतर्नादच्या मलपृष्ठावर दरमहा छापली जाणारी 'नव्या जगाची सुरुवात स्वत:पासून होते' ही जाहिरातमालिका. अगदी कमी आणि सोप्या शब्दांत मांडलेले, मनाला भिडणारे एक जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यातून सांगितले जाते. खरेतर तीच अंतर्नादची स्वत:ची जीवनदृष्टीही आहे. अंतर्नादमधील इतर कुठल्याही लेखनापेक्षा अधिक वाचक-प्रतिसाद या जाहिरात-मालिकेला मिळाला आहे. या संदर्भात लोकसत्तेच्या 'चतुरंग' पुरवणीत (शनिवार, ४ जून) सुधीर जोगळेकर यांनी एक सुंदर लेखही लिहिला आहे.(त्यामुळेच खरेतर श्री. किर्लोस्कर यांचे नाव जाहीर झाले; अन्यथा निनावी राहायच्या अटीवरच त्यांनी त्या दिल्या होत्या. मजकुरात शेवटी त्यांचा लोगो छापायचा आग्रहही आमचाच; त्यांचा त्याला विरोधच होता.)

अशा जाहिराती निश्चितच खूप हातभार लावतात, त्याबद्दल मनोमन कृतज्ञताही वाटते, पण त्या कायम मिळत राहणे अशक्य आहे.

आर्थिक बाजू बळकट करायचा आणखी एक मार्ग म्हणजे साहित्य संस्कृती मंडळातर्फे नियतकालिकांना मिळू शकणारे अनुदान. पण ते अगदीच कमी असते. सध्या वार्षिक रु. १५०००. तेही व्यक्तिगत मालकीच्या नियतकालिकांना दिले जात नाही.

अंतर्नादची आजीव सदस्य योजना म्हणजे ही कोंडी फोडण्याचा एक चांगला प्रयत्न होता. प्रत्येकी २००० रुपये देणारे १००० आजीव सदस्य नोंदवायचे व त्यातून उभ्या राहणाऱ्या वीस लाख रुपयांच्या व्याजातून मासिकाचा खर्च भागवायचा, अशी ही योजना. तिला प्रतिसादही चांगला मिळाला. ८३५ आजीव सदस्य बनले होते; ती संख्या लौकरच वाढूही शकली असती. दुर्दैवाने त्यानंतर एकतर व्याजदर झपाट्याने घटत गेले व दुसरे म्हणजे तशातच एक-दोन सहकारी बँकांची स्थिती नाजूक बनली आहे, अशा बातम्या ऐकू येऊ लागल्या. या बँकांमध्ये आपण ठेव म्हणून ठेवलेले हे वर्गणीचे पैसे बुडले तर, ही भीती वाटायला लागली. या दोन्ही कारणांचा एकत्रित परिणाम म्हणून ही योजना बंद करावी लागली. सर्वांचे पैसे अंतर्नादने परत करून टाकले. धनादेशासोबतच्या पत्रात केलेल्या विनंतीनुसार वर्गणीदार राहणे मात्र यांतल्या बहुतेक सर्वांनी चालू ठेवले. आता इतक्या वर्षांनी मासिकाचा खर्च दुप्पट झाला आहे, तर व्याजदर निम्म्याहून खाली आले आहेत! काही अर्थतज्ज्ञांच्या मते ते आणखीन खाली जाणार आहेत व स्थावर निधीच्या व्याजावर एखादा उपक्रम चालवणे भविष्यात अव्यवहार्य ठरणार आहे. त्यामुळे ही योजना बंद केली ते बरेच केले, असे आता वाटते.

अंतर्नादपुढच्या अडचणी या तशा एकूणच मराठी साहित्यविश्वापुढच्या अडचणी आहेत. या लेखात त्यातील काहींचा उल्लेख केलेलाच आहे. त्याशिवाय अगणित टीव्ही चॅनेल्सचे आक्रमण, इंग्रजी माध्यमातील शिक्षणामुळे मराठीपासून दुरावलेली तरुण पिढी, विकत घेऊन वाचायच्या सवयीचा पारंपरिक अभाव, लेखकांमधील ढासळती लेखननिष्ठा, नव्या सकस साहित्यनिर्मितीचा आक्रसणारा स्रोत, तुटपुंजी वितरणयंत्रणा, जाहिरातींचे दुर्भिक्ष, कमी खप-कमी उत्पन्न-कमी दर्जा-आणखी कमी खप हे दुष्टचक्र, मराठी मानसिकतेतील एकारलेपणा आणि इतरांविषयींची तीव्र अनास्था... अडचणींचा पाढा कधीच न संपणारा आहे.

## मासिकांची आवश्यकता

या सगळ्या अडचणींवर मात करत अंतर्नादसारखी मासिके चालू ठेवायचा खटाटोप करायचा का?

माझ्या मते याचे उत्तर होकारार्थी आहे. तीन कारणांसाठी.

पहिले कारण म्हणजे साहित्याचे महत्त्व आणि अशा सकस साहित्यनिर्मितीसाठी असलेली मासिकांची आवश्यकता. (ललित व वैचारिक हे साहित्याचे सोयीसाठी केलेले तथाकथित वर्गीकरण या संदर्भात महत्त्वाचे नाही. वैचारिक साहित्यातही लालित्य असते आणि ललित साहित्यातही विचार असतोच. कुठल्याही अंगाने घेतला – ललित वा वैचारिक – तरी तो एक प्रकारे सत्याचाच शोध असतो आणि दोन्हींच्या अभिव्यक्तीत शब्दलाघव, वाचनीयता, कल्पकता आणि रचना-सौंदर्य सारखेच असू शकते. असो.)

साहित्य नसेल तर मानवी जीवन अपरंपार समृद्ध करणारा आणि त्याच वेळी एक अनिर्वचनीय आनंद देणारा महान ठेवा आपण हरवून बसू. अंतर्नादच्या पहिल्याच (ऑगस्ट १९९५ अंकातल्या) संपादकीयाची सुरुवात होती : ''शब्दब्रह्माचा महिमा काही और आहे. लोकलमधून लोंबकळताना हातातलं मासिक कसंबसं वाचणाऱ्याच्या गालावर, एखादा चुटका वाचून उमटणारं मंद हसू आणि रूसो-व्हॉल्टेअरच्या साहित्यातून प्रेरणा घेऊन, बॅस्टिलचा तुरुंग फोडायला निघालेल्या फ्रेंच क्रांतिकारकाच्या डोळ्यांतील उन्माद, हे शब्दब्रह्माच्या प्रभावाचेच दोन टोकाचे आविष्कार. दलाल स्ट्रीटवरचा जल्लोष आणि टीव्हीवरचा रंगीबेरंगी चंगळवाद ह्यांच्या पलीकडच्या एका आगळ्या विश्वात साहित्य तुम्हांला घेऊन जातं...''

आज दहा वर्षांनंतरही हे साहित्यमाहात्म्य मनाला पटते.

'रोमिओ अँड ज्युलिएट'मधली प्रेमभावनेची उत्कटता आणि 'दी ओल्ड मॅन अँड दी सी'मधला माणूस आणि नियती यांच्यातला संघर्ष यांचे आविष्कार मानवी अनुभवविश्वाला एका वेगळ्याच पातळीवर घेऊन जातात. उन्नत मनोवस्थेचा तो परीसस्पर्श सर्वसामान्य अस्तित्वाचेही काही क्षण सुवर्णमय करून टाकतो.

अगदी जवळचे एक उदाहरण. अलीकडेच लिहायला लागलेल्या अभिजित कदम या एका खेड्यातल्या कवीची 'बिचारी' ही अवघ्या बारा शब्दांची कविता.

*हेडमास्तरांनी*
*काल दहावीतली मुलगी*
*स्वयंपाकासाठी घरी नेली...*
*बिचारीची पहिलीच भाकरी जळून गेली!*

पुरुषोत्तम पाटील लिहितात (अंतर्नाद, ऑक्टोबर २००३, पृष्ठ ३७) : ''असली कविता आरडीएक्सच्या चिमूटभर भुकटीसारखी असते. समाजाच्या बधिरतेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवणारी.''

अशा श्रेष्ठ साहित्यनिर्मितीसाठी लेखकांना लिहायला आणि वाचकांना वाचायला भरपूर सवड देणारे मासिकासारखे माध्यम वृत्तपत्रांपेक्षा अधिक पोषक आहे. सावरकरांचे घणाघाती निबंध असोत वा फडक्यांच्या रसिल्या कादंबऱ्या, ताम्हनकरांचा 'गोट्या' असो वा दळवींचा 'ठणठणपाळ', मिलिंद बोकीलांच्या कथा असोत वा दासू वैद्यांच्या कविता; रसिकांच्या मनात घर करून राहणारे असले साहित्य मासिकांतूनच प्रकाशनात आलेले आहे, वृत्तपत्रांतून नव्हे. म्हणून मासिके टिकायला हवीत.

दुसरे कारण आपल्या मातृभाषेच्या संदर्भातले आहे. जी मराठी भाषा टिकवण्याची आपण धडपड करत आहोत, त्या भाषेलाही तिची महत्ता प्राप्त होते ती मुख्यत: तिच्यातील साहित्यामुळे. चांगले साहित्य नसेल तर भाषा कंगाल, उजाड बनेल. मग मराठी केवळ एखाद्या बोलीभाषेप्रमाणे उरेल. यू. आर. अनंतमूर्ती म्हणतात त्याप्रमाणे, ''आई, भूक लागली, जेवायला दे'' असे स्वयंपाकघरात मुलाने म्हणण्यापुरती. म्हणूनच भाषासंवर्धनासाठीही मासिके टिकायला हवीत.

मासिकांची तिसरी आवश्यकता आहे नव्या, वेगळ्या विचारांना व्यासपीठ म्हणून. आर्थिक बाबींना सर्वत्र प्राथमिकता देणाऱ्या आजच्या समाजातले वैचारिक दारिद्र्य व्यथित करणारे आहे. लोकसभेतील चर्चा असो, की कट्ट्यावरच्या गप्पा – बहुतेकदा खटकतो तो व्यासंगाचा अभाव आणि उथळ मतप्रदर्शन. वैचारिक प्रबोधनाची आज खूपच गरज आहे आणि त्या बाबतीत छोट्या मासिकांचे योगदान विशेष लक्षणीय असते. सात-आठशे शब्दांच्या जाचक वृत्तपत्रीय मर्यादेत मांडता न येणारे, किंवा इतरही काही कारणांसाठी प्रस्थापित व्यवस्थेला गैरसोयीचे वाटणारे अनेक विचार छोट्या मासिकांतून मांडता येतात. अभिव्यक्तिस्वातंत्र्य टिकून राहण्यासाठी अशी छोटी-छोटी व्यासपीठे आवश्यक आहेत. सॅम्युअल हंटिंग्टन यांचे 'The Clash of Civilizations' हे आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणावर खूप प्रभाव टाकणारे पुस्तक म्हणजे मुळात 'Foreign Affairs' या त्रैमासिकातीलच एक लेख आहे. म्हणून अशी छोटी-छोटी मासिके टिकायला हवीत; समाजातला तो एक महत्त्वाचा असा मोकळा अवकाश असतो.

## अंतर्नादचे भवितव्य

असे असूनही गंभीरपणे वाचन करणारे कुठल्याही समाजात दोन-तीन टक्क्यांहून अधिक नसतात. 'आमच्या वेळी...' हे स्मरणरंजन नेहमीच सुखद असते, पण प्रत्यक्षात पूर्वीही वाचकसंख्या फार नसावी. अर्थात आज ती अधिकच रोडावली आहे. कारण वाचनाशिवायही माणूस आरामात जगू शकतो.

पण तसा तो गायन, वादन, चित्रकला, नृत्य यांच्याशिवायही जगू शकतो. प्रश्न फक्त खाणे, पिणे आणि विणे या प्राथमिक पातळीवर जगण्याचा नाही; प्रश्न आहे, ते जीवन अधिक अर्थपूर्ण करण्याचा. खूप कमी लोकाश्रय असलेली, पण तरीही उपयुक्त अशी मासिके कशी जगतील – चांगल्या प्रकारे कशी जगतील – याचा. समाजाला आवश्यक वाटते ते आपोआप चालते व जे कालबाह्य असते ते आपोआपच बंद पडते, हा बाजारी अर्थव्यवस्थेचा (मार्केट

इकॉनॉमीचा) नियम, सांस्कृतिक-वैचारिक क्षेत्राला सरसकट लागू पडत नाही. सामाजिक उपयुक्ततेच्या अनेक गोष्टी शेवटी प्रयत्नपूर्वकच टिकवाव्या लागतात.

या सर्व पार्श्वभूमीवर अंतर्नादच्या भावी वाटचालीचा विचार करताना एक गरज प्रकर्षाने जाणवते.

ती म्हणजे अंतर्नादची संस्थात्मक पातळीवर व्यावसायिक (प्रोफेशनल ऑर्गनायझेशन म्हणून) उभारणी करणे – जे मला स्वत:ला दुर्दैवाने कधीच जमू शकले नाही आणि भविष्यातही कधी ते जमणे आज तरी कठीण दिसते.

एके काळी तर या प्रकारच्या उभारणीला माझा विरोधच होता. मासिकनिर्मितीला प्राणभूत असलेली व्यक्तिगत प्रतिभा आणि ऊर्जा अशा उभारणीत मंदावू शकते, आटूही शकते; या भीतीपोटी. आजही ती भीती आहेच; पण आजच्या काळात अशी मासिके टिकवायची असतील तर अशा उभारणीला पर्याय नाही, असे आता वाटते.

दरमहा काहीतरी दर्जेदार वाचायला मिळेल, समाधानकारक व्यावहारिक सेवा मिळेल या अपेक्षेने अनेक चोखंदळ वाचक आज अंतर्नादकडे पाहतात. ही जाणीव म्हटले तर सुखद आहे; आणि म्हटले तर अस्वस्थ करणारीही आहे. या अपेक्षांना एखादा एकखांबी तंबू कितपत पुरा पडणार? शिवाय या व्यक्तीचे स्वत:च्या जीवनातील प्राधान्यक्रमही काही वर्षांनी बदलू शकतात.

आर्थिकदृष्ट्या अंतर्नादची उलाढाल (टर्न-ओव्हर) खूपच कमी असली, तरी मासिकाचे संपादकीय आणि व्यावहारिक काम (नीट काळजीपूर्वक करायचे असेल तर) खूप किचकट, वेळखाऊ व मुख्य म्हणजे मानसिक शीण देणारे असते. हे सगळे दीर्घकाळ करायचे असेल तर उत्तम व्यावसायिक यंत्रणा उभारायलाच हवी. घरातच कार्यालय ठेवणे, सजावट-रंगीत छपाई टाळणे, जास्तीत जास्त काम स्वबळावरच रेटायचा प्रयत्न करणे हे सगळे सध्याचे अंतर्नादचे उपाय फार काळ चालू शकत नाहीत. शिवाय 'कसे तरी' मासिक चालू ठेवायचे, यात काय स्वारस्य?

सुसज्ज कार्यालय, संपादकीय व व्यावहारिक कामासाठी बऱ्यापैकी पगार असणारी तीन-चार कुशल माणसे ही अशा मासिकाच्या दृष्टीने चैन नसून आवश्यकता आहे. व्यावसायिकदृष्ट्या केवळ एका मासिकाच्या प्रकाशनासाठी ही यंत्रणा पोसणे अव्यवहार्य आहे व म्हणून अशी यंत्रणा त्याच आस्थापना-खर्चात (ओव्हरहेड्समध्ये) इतरही काही पूरक गोष्टी कदाचित करू शकेल – उदाहरणार्थ, सांस्कृतिक कार्यक्रम-व्याख्याने-साहित्यचर्चा यांचे आयोजन – पण त्या यंत्रणेचा 'फोकस' मासिक हाच असायला हवा.

पण हे सगळे करायला मोठ्या प्रमाणावर आर्थिक पाठबळ लागेल. तेही फायद्याची अपेक्षा न ठेवता दिले गेलेले. आणि असे मासिक चालवणे हा मूलत: श्रेयविहीन (थँकलेस) प्रयत्न आहे, याचीही स्वत:पुरती पूर्ण जाणीव ठेवूनच हे काम करावे लागेल.

एव्हरेस्ट मोहिमेसाठी आज लाखो रुपये उभारता येतात; पांढऱ्या वाघांच्या रक्षणासाठी काही कोटीही उभारता येतात. मराठीच्या संदर्भात बोलायचे तर साहित्यसंमेलनासाठी दरसाल पंचवीस लाख शासनातर्फे अनुदान मिळते; याहून कितीतरी अधिक रक्कम दरसाल इतरही प्रायोजकांकडून उभारली जाते. अगदी मराठी चित्रपटासाठीही शासनातर्फे प्रत्येकी पंधरा ते वीस लाख रुपये अनुदान मिळते. पण एखाद्या चांगल्या मराठी मासिकासाठी मात्र असे पाठबळ मिळणे कठीण आहे.

पण असे मासिक पुन्हा उभे करणेही सोपे नाही.

या बाबतीत अन्य जगातला अनुभव काय आहे?

अमेरिकेत आज जवळपास शंभर छोटी-छोटी नियतकालिके प्रसिद्ध होतात. त्यांना 'The Little Magazines' असेच म्हणतात. त्यांचा सरासरी खपही हजाराच्या आसपासच असतो. पण त्यांचे महत्त्व विचारात घेऊन वेगवेगळी विद्यापीठे-प्रतिष्ठाने यांतली बहुतेक नियतकालिके चालवतात. ही नियतकालिके टिकवणे ही एक सामाजिक जबाबदारी मानली जाते आणि 'आगाखान फाउंडेशन'पासून 'रॉकफेलर फाउंडेशन'पर्यंत अनेक प्रतिष्ठाने (खूपदा विविध व्यक्तीसुद्धा) त्याबाबतीत पुढाकार घेतात. केवळ व्यक्तिगत मालकीची असली, तर असली छोटी नियतकालिके फार टिकत नाहीत; ज्यांना संस्थात्मक पाठबळ मिळते तीच दीर्घकाळ टिकतात.

आधी उल्लेख केलेले 'Foreign Affairs' हे असेच एका प्रतिष्ठानाने पुरस्कृत केलेले त्रैमासिक. 'Paris Review' हे दुसरे एक उदाहरण. 'Writers At Work' सारखी जगप्रसिद्ध लेखमाला (जिचे नंतर कैक खंड प्रकाशित झाले) देणारे नियतकालिक हेच. जॉर्ज प्लिम्प्टन (Plimpton) यांनी १९३५ साली पॅरिस येथे सुरू केलेले हे त्रैमासिक १९७२पासून न्यूयॉर्कहून प्रकाशित होऊ लागले. पुन्हा, एका प्रतिष्ठानाच्या साह्याने.

संस्थात्मक पातळीवर अशी व्यावसायिक उभारणी अंतर्नाद कशी करू शकेल? व्यक्तिगत मालकी सोडून दिली तर ते अधिक सुलभ होईल का? अंतर्नाद दीर्घकाळ चालू राहावे या दृष्टीने वाचकांना काही सांगावेसे वाटते का? – असे काही प्रश्न आज समोर आहेत.

आमच्या एका लेखक-स्नेह्यांना असे प्रश्न अंतर्नादने वाचकांपुढे मांडणे अनावश्यक व गैरही वाटते. त्यांच्या मते, "गिऱ्हाईकाला दुकानदाराच्या चोपड्या पाहण्यात रुची नसते, त्याला फक्त चांगला माल मिळण्याशी मतलब असतो."

त्यांची ही भूमिका तशी 'प्रॅक्टिकल' वाटते, तरीपण अंतर्नादचे (बऱ्याचशा) वर्गणीदारांशी असलेले नाते दुकानदार-ग्राहक या नात्यापेक्षा खूपच वेगळे आहे. म्हणूनच हे प्रकट चिंतन. बघू या यातून काय निघते ते.

(ऑगस्ट २००५)

संपादकीय

# श्रेष्ठ पुस्तके विशेषांक : थोडी पार्श्वभूमी

पंचवीस वर्षांत अंतर्नादने अनेक साहित्यिक उपक्रम राबवले. त्यांची एक झलक म्हणून त्यांपैकी 'वीस श्रेष्ठ पुस्तकांची निवड' या एका उपक्रमाविषयी माहिती देणारे हे संपादकीय.

*"Some books are to be tasted, others to be swallowed, and some few to be chewed and digested."*

*(''काही पुस्तके चव घेण्यासाठी असतात, बाकीची गिळून टाकण्यासाठी, आणि काही थोडी चावून चावून खाण्यासाठी व पचवण्यासाठी.'')*

— फ्रान्सिस बेकन (१५६१-१६२६)

दिवाळी अंकाची परंपरा पुढे नेणारा, पण त्याचबरोबर एक आगळा प्रयोग करणारा, हा दिवाळी अंक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

जगभरच्या सर्व क्रिकेटपटूंमधून आपल्या आवडीचा एक 'आदर्श संघ' निवडणे, आजवरच्या सर्व चित्रपटांमधून 'सर्वोत्कृष्ट दहा' ठरवणे किंवा आपल्याला सर्वश्रेष्ठ वाटणाऱ्या गाण्यांची एखादी यादी बनवणे हा प्रकार आपल्यापैकी सगळ्यांनीच केव्हा ना केव्हा केला असणार! अशा याद्या तयार करण्यात नियतकालिकेही मागे नसतात. वीस श्रेष्ठ मराठी पुस्तकांची यादी करण्याचा असाच एक उपक्रम अंतर्नादनेही गेल्या वर्षभरात केला.

अर्थात हा प्रयत्न म्हणजे केवळ एक छंद वा गमतीचा चाळा नव्हता; त्याला एक व्यापक औचित्य होते, त्यामागे एक विशिष्ट भूमिका होती. २००५ साल हे मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मराठीतले पहिले पुस्तक प्रकाशित झाले त्याला २००५मध्ये २०० वर्षे पूर्ण झाली. १८०५ साली बंगालमधल्या श्रीरामपूर (सेरामपूर) गावी असलेल्या ख्रिस्ती मिशनच्या छापखान्यात देवनागरी टाईप वापरून दोन मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली होती. एक होते, 'अ ग्रामर ऑफ द महरट्ट लँग्वेज' व दुसरे होते, 'मॅथ्यूचे शुभवर्तमान' — म्हणजेच बायबल. यांतले पहिले कुठचे व दुसरे कुठचे, याविषयी तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत; पण कलकत्त्याच्या फोर्ट विल्यम कॉलेजात शिकवणारा भाषातज्ज्ञ ख्रिस्ती मिशनरी विल्यम कॅरी हाच या दोन्ही पुस्तकांचा कर्ता होता, यावर एकमत आहे.

पुढल्या २०० वर्षांत मराठी प्रकाशनविश्वाचा बराच विस्तार झाला. एका अंदाजानुसार गेल्या एका वर्षातच मराठीत ३००० पुस्तके प्रकाशित झाली. या प्रचंड ग्रंथसंपदेतून काही थोडी पुस्तके निवडणे किती कठीण असेल याची यावरून कल्पना येईल.

पण अशा काही निवडक पुस्तकांची यादी बनवणे हे आपल्या ग्रंथवैभवाची, समृद्ध साहित्यपरंपरेची नीटशी कल्पना यावी यासाठी खूप उपयुक्तही असते. आजच्या परिभाषेत सांगायचे तर तो मराठी साहित्याचा 'रोड शो' म्हणता येईल!

मराठीतील दीडशे निवडक पुस्तकांची अशी एक यादी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या संपादकांनी स्वत:च २८ जून १९८६च्या रविवार आवृत्तीत प्रकाशित केली होती. नंतर त्यात वाचकांचा प्रतिसाद विचारात घेऊन सत्तावीस पुस्तकांची भरही घातली गेली. या पुस्तकांचा थोडा अधिक तपशील देणारी दीपक घारे यांची 'मराठीतील साहित्यलेणी' ही पुस्तिका 'ग्रंथाली'ने २५ ऑक्टोबर १९८६ रोजी प्रकाशित केली होती. 'आकाशवाणी'नेही अशीच एक १९४७ ते १९९७ या पन्नास वर्षांतील अठरा उत्तम पुस्तकांची काही निवडक श्रोत्यांच्या शिफारशीनुसार केलेली यादी स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने प्रसिद्ध केली होती. (या दोन्ही याद्या याच अंकात इतरत्र संदर्भासाठी छापल्या आहेत.) इतरही काहींनी अशा याद्या पूर्वी प्रकाशित केल्या असतील.

या सर्वांचा संदर्भासाठी उपयोग करून घेत अंतर्नादनेही असा एक प्रयत्न यथामति यथाशक्ति केला. त्यातून तयार झालेली मराठीतल्या १०० निवडक पुस्तकांची एक प्राथमिक यादी, वाचकांना त्यांची निवड करणे सोयीचे जावे म्हणून, मागच्या दिवाळी अंकात छापली होती. ती करत असताना अनिल बळेल, यास्मिन शेख, सु. रा. चुनेकर व अवधूत परळकर यांनी मोलाचे सहकार्य दिले होते. यादीतील त्रुटी ही अर्थातच फक्त अंतर्नादची जबाबदारी.

## 'अंतर्नाद'च्या २००५च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली १०० पुस्तकांची ही प्राथमिक यादी

### कादंबरी

१) *वज्राघात* / हरी नारायण आपटे
२) *दौलत* / ना. सी. फडके
३) *रणांगण* / विश्राम बेडेकर
४) *श्यामची आई* / साने गुरुजी
५) *बनगरवाडी* / व्यंकटेश माडगूळकर
६) *रथचक्र* / श्री. ना. पेंडसे
७) *सावित्री* / पु. शि. रेगे
८) *ययाति* / वि. स. खांडेकर
९) *कोसला* / भालचंद्र नेमाडे
१०) *माहीमची खाडी* / मधु मंगेश कर्णिक
११) *स्वामी* / रणजित देसाई
१२) *घरगंगेच्या काठी* / ज्योत्स्ना देवधर
१३) *रघुनाथाची बखर* / श्री. ज. जोशी
१४) *पार्टनर* / व. पु. काळे
१५) *मृत्युंजय* / शिवाजी सावंत
१६) *मुंबई, दिनांक...* / अरुण साधू
१७) *झाडाझडती* / विश्वास पाटील
१८) *एमटी आयवा मारू* / अनंत सामंत
१९) *ताम्रपट* / रंगनाथ पठारे
२०) *बारोमास* / सदानंद देशमुख

### कथा

१) *कळ्यांचे निःश्वास* / विभावरी शिरूरकर
२) *चिमणरावाचे चऱ्हाट* / चिं. वि. जोशी
३) *तलावातले चांदणे* / गंगाधर गाडगीळ
४) *मंजुळा* / अरविंद गोखले
५) *सतरावे वर्ष* / पु. भा. भावे
६) *काजळमाया* / जी. ए. कुलकर्णी
७) *देवचाफा* / विद्याधर पुंडलीक
८) *तेरुओ आणि काही दूरपर्यंत* / गौरी देशपांडे
९) *यक्षांची देणगी* / जयंत नारळीकर
१०) *वनवास* / प्रकाश नारायण संत
११) *राहीच्या स्वप्नांचा उलगडा* / भारत सासणे
१२) *जन्मजंजाळ* / राजन खान
१३) *डायरी* / पंकज कुरुलकर
१४) *हंस अकेला* / मेघना पेठे
१५) *झेन गार्डन* / मिलिंद बोकील

### नाटक

१) *संगीत शारदा* / गोविंद बल्लाळ देवल
२) *एकच प्याला* / राम गणेश गडकरी
३) *साष्टांग नमस्कार* / आचार्य अत्रे
४) *कुलवधू* / मो. ग. रांगणेकर
५) *एक शून्य बाजीराव* / चिं. त्र्यं. खानोलकर
६) *सखाराम बाईंडर* / विजय तेंडुलकर
७) *संध्याछाया* / जयवंत दळवी
८) *लोककथा ७८* / रत्नाकर मतकरी
९) *वाडा चिरेबंदी* / महेश एलकुंचवार
१०) *फायनल ड्राफ्ट* / गिरीश जोशी

### कविता

१) *संपूर्ण केशवसुत* / केशवसुत
२) *बालकवींची कविता* / बालकवी
३) *बहिणाबाईची गाणी* / बहिणाबाई चौधरी
४) *विशाखा* / कुसुमाग्रज
५) *मर्ढेकरांची कविता* / बा. सी. मर्ढेकर
६) *मृद्गंध* / विंदा करंदीकर
७) *जिप्सी* / मंगेश पाडगावकर
८) *बिजली* / वसंत बापट
९) *गीतरामायण* / ग. दि. माडगूळकर
१०) *गभरीशीम* / इंदिरा संत
११) *एल्गार* / सुरेश भट
१२) *माझे विद्यापीठ* / नारायण सुर्वे
१३) *गोलपीठा* / नामदेव ढसाळ
१४) *तूर्तास...* / दासू वैद्य
१५) *पीकपाणी* / इंद्रजित भालेराव

### समीक्षा

१) *सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य* / शरच्चंद्र मुक्तिबोध
२) *सौंदर्यानुभव* / प्रभाकर पाध्ये
३) *युगान्त* / इरावती कर्वे
४) *धार आणि काठ* / नरहर कुरुंदकर
५) *कविता स्मरणातल्या* / शान्ता ज. शेळके
६) *देशी वाण* / चंद्रकांत बांदिवडेकर

### चरित्र / आत्मचरित्र

१) *स्मृति-चित्रें* / लक्ष्मीबाइ टिळक
२) *माझी जन्मठेप* / वि. दा. सावरकर
३) *जेव्हा माणूस जागा होतो* / गोदावरी परुळेकर
४) *डॉ. केतकर* / द. ना. गोखले
५) *स्मरणगाथा* / गो. नी. दांडेकर
६) *हरवलेले दिवस* / प्रभाकर उर्ध्वरेषे
७) *बलुतं* / दया पवार
८) *उपरा* / लक्ष्मण माने
९) *झोंबी* / आनंद यादव
१०) *आहे मनोहर तरी...* / सुनीता देशपांडे
११) *आमचा बाप आन् आम्ही* / नरेंद्र जाधव
१२) *माती, पंख आणि आकाश* / ज्ञानेश्वर मुळे
१३) *वादळवाटा* / विलास पाटील
१४) *माझी वाटचाल* / ग. प्र. प्रधान
१५) *चकवाचांदण* / मारुती चितमपल्ली

### संकीर्ण

१) *लोकहितवादींची शतपत्रे* / गोपाळ हरी देशमुख
२) *उपेक्षितांचे अंतरंग* / श्री. म. माटे
३) *आधुनिक भारत* / आचार्य जावडेकर
४) *महाराष्ट्र-संस्कृती* / पु. ग. सहस्रबुद्धे
५) *धुक्यातून लाल ताऱ्याकडे* / अनंत काणेकर
६) *व्यक्ती आणि वल्ली* / पु. ल. देशपांडे
७) *पैस* / दुर्गा भागवत
८) *शतपावली* / रवींद्र पिंगे
९) *माणसं!* / अनिल अवचट
१०) *माझे लंडन* / मीना प्रभु
११) *संवाद* / विजया राजाध्यक्ष
१२) *काही आर्थिक, काही सामाजिक* / स. ह. देशपांडे
१३) *समग्र माते नर्मदे* / दत्तप्रसाद दाभोळकर
१४) *स्वरांची स्मरणयात्रा* / अरविंद गजेंद्रगडकर
१५) *अ-पूर्व चित्रगाथा* / यशवंत रांजणकर
१६) *शिखरे रंग-रेषांची* /रवी परांजपे
१७) *लक्ष्मणझुला* / लक्ष्मण लोंढे
१८) *स्थल-काल* / अरुण टिकेकर
१९) *विठोबाची आंगी* / विनय हर्डीकर

१०० पुस्तकांची अशी निवड करताना अंतर्नादने लावलेले पाच निकष असे होते :

१) दोन साहित्यकृती साधारण एकाच पातळीवरच्या असतील तर अलीकडच्या साहित्यकृतीला झुकते माप द्यावे. म्हणून 'पाणकळा' किंवा 'सराई'पेक्षा 'बारोमास' या यादीत घेतली होती.

२) साहित्यकृतीबरोबरच त्या साहित्यकृतीचे एकूण साहित्यविश्वावरील परिणाम व तिचे आगळेपणही विचारात घ्यावे. म्हणून काही समीक्षकांचे मूल्यमापन वेगळे असले तरी 'श्यामची आई' हे पुस्तक या यादीत घेतले होते.

३) यादीत जास्तीत जास्त लेखकांचा समावेश करता यावा म्हणून एका लेखकाचे एकच पुस्तक घेतले होते. उदाहरणार्थ, 'विशाखा' घ्यायचे म्हटल्यावर 'नटसम्राट' घेतले नव्हते. किंवा 'व्यक्ती आणि वल्ली' घेतल्यावर 'बटाट्याची चाळ' वगळले होते.

४) धार्मिक स्वरूपाची पुस्तके महत्त्वाची व लोकप्रिय असली तरी विचारात घेतलेली नव्हती. उदाहरणार्थ, विनोबांचे 'गीताप्रवचने' हे पुस्तक.

५) रहस्यकथा, पोलीसतपासकथा, बालसाहित्य व अनुवाद यांचा वाचनसंस्कृती रुजवण्यामध्ये असलेला महत्त्वाचा वाटा मान्य करूनही त्यांचा या यादीत विचार केलेला नव्हता. म्हणून बाबूराव अर्नाळकर, बाबा कदम, सुहास शिरवळकर किंवा भा. रा. भागवत किंवा श्रीपाद जोशी यांच्यासारखी नावे यादीत समाविष्ट केलेली नव्हती.

वाचकांनी स्वत:ला आवडलेली/वा महत्त्वाची वाटलेली या यादीतील वीस पुस्तकांची नावे आम्हांला ५ डिसेंबर २००५पर्यंत कळवावी अशी विनंतीही वाचकांना केली होती व त्यानुसार एकूण १२० वाचकांनी आपली निवड कळवली. एकूण उपक्रम जास्तीत जास्त निर्दोष, विश्वासार्ह व उपयुक्त ठरावा यादृष्टीने अंतिम निवड दोन टप्प्यांत करावी असे ठरले.

पहिला टप्पा म्हणून वाचकांच्या सर्वाधिक पसंतीच्या ठरलेल्या ५० पुस्तकांची दुसरी यादी जानेवारी २००६च्या अंकात छापली होती व त्यांपैकी वीस पुस्तकांची अंतिम निवड वाचकांनी करावी असे आवाहनही केले होते. काही वाचकांना न रुचलेली पहिल्या यादीतील काही नावे यावेळी अनायासे गळून गेली होती – त्या पुस्तकांना पुरेशा वाचकांची पसंती न लाभल्यामुळे.

## अंतिम निवडीसाठी राहिलेली ५० पुस्तके (जानेवारी २००६ अंकात प्रसिद्ध झालेली यादी)

### *कादंबरी*

१) *वज्राघात* / हरी नारायण आपटे
२) *दौलत* / ना. सी. फडके
३) *रणांगण* / विश्राम बेडेकर
४) *श्यामची आई* / साने गुरुजी
५) *बनगरवाडी* / व्यंकटेश माडगूळकर
६) *रथचक्र* / श्री. ना. पेंडसे
७) *सावित्री* / पु. शि. रेगे
८) *ययाति* / वि. स. खांडेकर
९) *कोसला* / भालचंद्र नेमाडे
१०) *स्वामी* / रणजित देसाई
११) *मृत्युंजय* / शिवाजी सावंत
१२) *मुंबई, दिनांक...* / अरुण साधू
१३) *झाडाझडती* / विश्वास पाटील
१४) *बारोमास* / सदानंद देशमुख

### *कथा*

१) *कळ्यांचे नि:श्वास* / विभावरी शिरूरकर
२) *चिमणरावाचे चऱ्हाट* / चिं. वि. जोशी
३) *तलावातले चांदणे* / गंगाधर गाडगीळ
४) *सतरावे वर्ष* / पु. भा. भावे
५) *काजळमाया* / जी. ए. कुलकर्णी
६) *यक्षांची देणगी* / जयंत नारळीकर
७) *वनवास* / प्रकाश नारायण संत
८) *हंस अकेला* / मेघना पेठे
९) *झेन गार्डन* / मिलिंद बोकील

### *नाटक*

१) *एकच प्याला* / राम गणेश गडकरी
२) *सखाराम बाईंडर* / विजय तेंडुलकर
३) *संध्याछाया* / जयवंत दळवी
४) *वाडा चिरेबंदी* ('*युगान्त*'मधील नाट्य-त्रिधारा) / महेश एलकुंचवार

### *कविता*

१) *संपूर्ण केशवसुत* / केशवसुत
२) *बालकवींची कविता* / बालकवी
३) *बहिणाबाईची गाणी* / बहिणाबाई चौधरी
४) *विशाखा* / कुसुमाग्रज
५) *मर्ढेकरांची कविता* / बा. सी. मर्ढेकर
६) *मृद्‌गंध* / विंदा करंदीकर
७) *गीतरामायण* / ग. दि. माडगूळकर
८) *एल्गार* / सुरेश भट
९) *माझे विद्यापीठ* / नारायण सुर्वे
१०) *तूर्तास...* / दासू वैद्य

### *समीक्षा*

१) *युगान्त* / इरावती कर्वे

### *चरित्र / आत्मचरित्र*

१) *स्मृति-चित्रें* / लक्ष्मीबाई टिळक
२) *माझी जन्मठेप* / वि. दा. सावरकर
३) *जेव्हा माणूस जागा होतो* / गोदावरी परुळेकर
४) *स्मरणगाथा* / गो. नी. दांडेकर
५) *बलुतं* / दया पवार
६) *उपरा* / लक्ष्मण माने
७) *आहे मनोहर तरी...* / सुनीता देशपांडे
८) *आमचा बाप आन् आम्ही* / नरेंद्र जाधव

### *संकीर्ण*

१) *उपेक्षितांचे अंतरंग* / श्री. म. माटे
२) *व्यक्ती आणि वल्ली* / पु. ल. देशपांडे
३) *पैस* / दुर्गा भागवत
४) *माणसं!* / अनिल अवचट

या दुसऱ्या फेरीला वाचकांचे अधिक व्यापक सहकार्य लाभले. या फेरीत एकूण १८२ वाचकांनी आपली निवड कळवली. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर परप्रांतांतून व परदेशांतूनही पत्रे आली. अशा प्रकारच्या उपक्रमांना आजकाल लाभणाऱ्या वाचकसहभागाच्या पार्श्वभूमीवर वाचकांचा हा प्रतिसाद उत्तम म्हणावा लागेल.

वीस पुस्तकांची अंतिम यादी पुढीलप्रमाणे : (त्या-त्या पुस्तकाच्या अंकातील परीक्षणकर्त्याचे नाव कंसात दिले आहे.)

### *कादंबरी (५)*

१. *श्यामची आई* / साने गुरुजी (विलास खोले)
२. *रणांगण* / विश्राम बेडेकर (चंद्रकांत बांदिवडेकर)
३. *बनगरवाडी* / व्यंकटेश माडगूळकर (विजय पाडळकर)
४. *ययाति* / वि. स. खांडेकर (सु. रा. चुनेकर)
५. *कोसला* / भालचंद्र नेमाडे (संजय भास्कर जोशी)

### *कथा (४)*

६. *चिमणरावाचे चऱ्हाट* / चिं. वि. जोशी (गो. मा. पवार)
७. *कळ्यांचे निःश्वास* / विभावरी शिरूरकर (यास्मिन शेख)
८. *तलावातले चांदणे* / गंगाधर गाडगीळ (सुधा जोशी)
९. *काजळमाया* / जी. ए. कुलकर्णी (द. भि. कुलकर्णी)

### *नाटक (१)*

१०. *सखाराम बाईंडर* / विजय तेंडुलकर (रमेश धोंगडे)

### *कविता (४)*

११. *संपूर्ण केशवसुत* / केशवसुत (कल्याण काळे)
१२. *विशाखा* / कुसुमाग्रज (लीला दीक्षित)
१३. *मर्ढेकरांची कविता* / बा. सी. मर्ढेकर (वसंत पाटणकर)
१४. *मृद्गंध* / विंदा करंदीकर (नीलिमा गुंडी)

### *समीक्षा (१)*

१५. *युगान्त* / इरावती कर्वे (राम शेवाळकर)

### *चरित्र/आत्मचरित्र (३)*

१६. *स्मृति-चित्रें* / लक्ष्मीबाई टिळक (पुष्पा भावे)
१७. *बलुतं* / दया पवार (रावसाहेब कसबे)
१८. *आहे मनोहर तरी...* / सुनीता देशपांडे (मिलिंद जोशी)

### *संकीर्ण (२)*

१९. *व्यक्ती आणि वल्ली* / पु. ल. देशपांडे (मंगला गोडबोले)
२०. *माणसं!* / अनिल अवचट (वि. शं. चौघुले)

## निवडीबाबतची काही निरीक्षणे

- सर्वप्रथम जाणवते ती निवडल्या गेलेल्या पुस्तकांमधली प्रचंड विविधता. प्रत्येक पुस्तकाचा घाट वेगळा, आशय वेगळा, सौंदर्य वेगळे. *श्यामची आई* ते *सखाराम बाईंडर* आणि *युगान्त* ते *बलुतं* हा विशाल कॅनव्हास कुठल्याही भाषेला अभिमानास्पद वाटावा असाच आहे. साहित्यसृष्टीतील विविध स्तरांचे, अभिरुचीच्या विविध पैलूंचे प्रतिबिंब या निवडीत पडलेले दिसते.
- ही निवड म्हणजे या पुस्तकांना मिळालेला रसिकांचा पुरस्कारच आहे. इतर पुरस्कारांपेक्षा हा रसिक-पुरस्कार अधिक उचित वाटतो. उदाहरणार्थ, साहित्य अकादमी पुरस्कार भालचंद्र नेमाडेंना 'टीकास्वयंवर'साठी वा गंगाधर गाडगीळांना 'एका मुंगीचे महाभारत'साठी मिळाला असला तरी रसिकांच्या मनामध्ये ते लेखक 'कोसला' वा 'तलावातले चांदणे' यांच्याशीच अधिक जोडलेले आहेत.
- वीस लेखकांपैकी चार स्त्रिया आहेत : विभावरी शिरूरकर (मालती बेडेकर), इरावती कर्वे, लक्ष्मीबाई टिळक व सुनीता देशपांडे.
- यादीत दोन जोडप्यांचा समावेश आहे : विश्राम बेडेकर व मालती बेडेकर, पु. ल. देशपांडे व सुनीता देशपांडे.
- वीसापैकी सहा लेखक आज हयात आहेत – सर्व साठीपुढचे: भालचंद्र नेमाडे, गंगाधर गाडगीळ, विजय तेंडुलकर, विंदा करंदीकर, सुनीता देशपांडे व अनिल अवचट.
- सर्व पुस्तके १९१७ ते १९९० या कालखंडातली आहेत. ('केशवसुतांची कविता' १८८५ ते १९०५च्या दरम्यान लिहिली गेली असली तरी पुस्तकरूपाने ती प्रकाशित झाली तेव्हा १९१७ साल उजाडले होते. 'आहे मनोहर तरी...'ची प्रथमावृत्ती १२ जून १९९०ची आहे.) पुस्तकाचे यथार्थ मूल्यमापन होण्यासाठी किमान काही वर्षे उलटावी लागतात याचे भान निवडकर्त्यांनी राखलेले दिसते.
- ह. ना. आपटे यांचे 'वज्राघात' व ना. सी. फडके यांचे 'दौलत' ही दुसऱ्या यादीतील दोन्ही पुस्तके तशी खूप गाजलेली व दीर्घकाळ टिकलेली. पण अंतिम निवडीत त्यांना सर्वांत कमी वाचकांची पसंती मिळाली.
- दुसऱ्या यादीतील ५० पुस्तकांमध्ये सर्वांत अलीकडची पुस्तके होती सदानंद देशमुख यांचे 'बारोमास' (२००२) व दासू वैद्य यांचे 'तूर्तास...' (२००३). परंतु अंतिम फेरीत ती मागे पडली. वाचकांना सगळे नवे-नवेच हवे असते, असे दिसत नाही.
- या यादीतील पुस्तकांची वाचकपसंतीनुसार पुन्हा क्रमवारी लावायची आवश्यकता भासत नाही. सर्वच वीस पुस्तके श्रेष्ठ म्हणता येतील अशी आहेत एवढेच.

## वाचकांच्या प्रतिसादाबाबत थोडे

मूळ १०० पुस्तकांच्या निवडीबाबत बहुतेक वाचक समाधानी होते, परंतु काहींनी असमाधान व्यक्त केले होते हे नमूद करायला हवे. उदाहरणार्थ, नांदेडहून विजय पाडळकर यांनी लिहिले होते, ''मराठीतील निवडक १०० पुस्तकांचा शोध घेण्याची कल्पना आवडली. अर्थात अशा यादीतील पुस्तकांबद्दल मतभेद नेहमीच असतात. उदाहरणार्थ, त्र्यं. वि. सरदेशमुखांची 'डांगोरा – एका नगरीचा' ही असामान्य कादंबरी या यादीत असायला हवी होती. 'संध्याकाळच्या कविता' हे असेच एक 'अ'टळ नाव. कथेत पानवलकरांना वगळून चालणार नाही...''

इतरही अनेक लेखकांचा / पुस्तकांचा उल्लेख वाचकांकडून झालेला आहे. त्यांच्या मतांविषयी पूर्ण आदर आहे; पण ही मतभिन्नता अपरिहार्यच आहे. ''पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना, कुण्डे कुण्डे नवं पयः। जातौ जातौ नवाचारा, नवा वाणी मुखे मुखे॥'' यातली विविधता हे सामर्थ्य आहे, तशीच मर्यादाही! क्रिकेट संघात समावेश व्हावा असे अनेक असतात, पण शेवटी अकराच खेळाडू निवडायचे असतात – तसेच काहीसे हे आहे.

काही जणांना वीसपेक्षा अधिक पुस्तके निवडणे अपरिहार्य वाटले. उदाहरणार्थ, नाशिकच्या डॉ. चंद्रकांत वर्तकांनी २६ पुस्तके निवडली होती.

उपक्रम अधिक चांगला व्हावा म्हणून काही काही वाचकांनी स्वतः पुढाकार घेऊन वेगवेगळे मार्ग चोखाळले. उदाहरणार्थ, बुलडाण्याचे एक ग्रंथपाल नरेंद्र लांजेवार यांनी स्वतःची निवड कळवण्याबरोबरच वाचनालयाचे इतरही चांगले वाचक हेरून त्यांच्यापैकी बारा जणांची निवडपत्रे पाठवली.

पुण्यातले एक आर्थिक सल्लागार सु. रा. थिगळे यांची प्रतिक्रिया एक प्रातिनिधिक वाचक म्हणून बोलकी आहे. आपली निवड कळवताना हे लिहितात : ''प्रथम मनमोकळेपणे, मनावर कोणतेही दडपण अथवा बंधन न ठेवता, मला आवडलेल्या पुस्तकांवर खुणा केल्या. ती एकूण ३७ पुस्तके झाली. त्यातून शेवटी वीस पुस्तके निवडताना – व इतर पुस्तके गाळताना – मनाची खूपच घालमेल झाली. गाळलेल्या पुस्तकांच्या लेखकांवर आपण अन्याय करत आहोत, ही अपराधीपणाची भावना मनाला सतत बोचत होती. 'तुमच्या एकूण अपत्यांपैकी तुमची आवडती अपत्ये सांगा,' असे एखाद्या मातेला विचारल्यावर तिच्या मनाची जी स्थिती होईल, तशीच स्थिती माझ्या मनाची झाली. पण यानिमित्ताने गेले पंधरा-वीस दिवस वाचलेल्या पुस्तकांची कथानके, त्यांच्या वाचनाने त्या त्या वेळी मिळालेला आनंद, पुस्तक वाचतानाचा काळ, या सगळ्याची परत उजळणी झाली व त्यामुळे एक निराळाच आनंद उपभोगता आला.''

वाचकांनी या उपक्रमाकडे किती गांभीर्याने पाहिले, याचे हे एक द्योतक म्हणता येईल. या सर्व वाचकांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

वीस पुस्तकांची निवड केल्यानंतर या उपक्रमाचा पुढचा टप्पा होता वाचकांपुढे ही पुस्तके आणण्याचा.

त्यासाठी एकाच जाणकार लेखकाने सर्व लेख लिहिणे हा एक पर्याय होता. व्यवहार्यतः तो अधिक भावणारा होता. (गंगाधर गाडगीळ यांचे 'साहित्याचे मानदंड' हा अशा लेखनाचा एक आदर्श मानता येईल.) पण त्या पर्यायात सर्व पुस्तकांचे मूल्यमापन एकाच नजरेतून, एकाच विशिष्ट अभिरुचीतून झाले असते. पुस्तकांची विविधता पाहता, त्यांच्यावर लिहिण्याची जबाबदारी वीस वेगवेगळ्या लेखकांवर सोपवणे अधिक श्रेयस्कर वाटले.

या परिचयपर लेखांपासून पुढील अपेक्षा होत्या :

१. पुस्तकाचा साधारण आशय-गोषवारा या लेखांतून वाचकांना कळावा. 'मला हे पुस्तक का आवडले' हे परिचयकर्त्याने ३५०० ते ४००० शब्दांत (अंतर्नादची सुमारे सहा पाने) सर्वसामान्य वाचक डोळ्यांपुढे ठेवून मांडावे.

२. पुस्तकाचे साहित्यगुण, विषयाचे नावीन्य, आशय आणि अभिव्यक्तीतील वेगळेपण लेखात मांडले जावे.

३. पुस्तकाचे एकूण मराठी साहित्यातील स्थान व त्या लेखकाच्या एकूण लेखनातील या पुस्तकाचे स्थान यांचा ऊहापोह व्हावा. लेखकाविषयीही नव्याने काही सांगता आले तर ते सांगितले जावे.

४. या पुस्तकांविषयी पूर्वीही बरेच लिहिले गेले असणार. त्याच्यापेक्षा वेगळे काही सांगण्याचा प्रयत्न असावा.

५. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर श्रेष्ठ कलाकृतीचे सौंदर्य रसिकाला वेगवेगळ्या अंगांनी प्रतीत होते. किंबहुना रसिकाला अशी वेगवेगळ्या अनुभूतींची प्रचिती द्यायचे सामर्थ्य हे कलाकृतीच्या श्रेष्ठत्वाचेच एक लक्षण आहे. आज काही वर्षांनंतर पुन्हा एकदा हे पुस्तक वाचताना नव्याने असे काय गवसते, पुस्तकाचे स्वतःच्याच मनाशी कळत-नकळत पुनर्मूल्यमापन होते का याचाही वेध घ्यावा.

पुस्तकपरिचय करून देण्यासाठी किमान सहा महिने वेळ मिळावा म्हणून मार्च महिन्यातच त्या त्या विशिष्ट पुस्तकासाठी सर्व दृष्ट्या योग्य असे वीस नामवंत लेखक / समीक्षक निश्चित केले गेले, त्यांच्याशी चर्चा झाली व आमच्या स्वतःच्या उपरोक्त अपेक्षा व्यक्त करणारे पत्रही त्यांना पाठवले गेले. काही अपरिहार्य व्यक्तिगत कारणांमुळे त्यांतल्या तिघांना हे काम जमू शकले नाही व त्यांच्याऐवजी अन्य लेखकांवर ही जबाबदारी सोपवावी लागली.

प्रत्येक समीक्षकाची जाण-भूमिका-लेखनशैली ही अपरिहार्यपणे वेगळी होती व त्यामुळे प्रत्येक लेखाला येणारे वेगळेपण आम्हांलाही जाणवत होते. प्रासादिकता, सोपेपणा हा काहींच्या लेखनाचा एक उपजत गुण होता; काहींच्या लेखनाची सामर्थ्यस्थळे वेगळी होती. हे अभिव्यक्तीचे वेगळेपण एकूण पुस्तकांमधील वैविध्याचाही एक सहजाविष्कार आहे; ते वेगळेपण अशा लेखमालिकेचे एक वैशिष्ट्यही मानता येईल.

ही सर्व परीक्षणे या दिवाळी अंकातून वाचकांपुढे ठेवत आहोत. गेले वर्षभर चालू असलेल्या अंतर्नादच्या एका उपक्रमाची ही तशी स्वाभाविक सांगता आहे.

## हे सारे कशासाठी?

जागतिकीकरणाच्या रेट्यात आपली अस्मिता, आपले 'स्व'त्व सांभाळण्यासाठी आपापल्या मातृभाषेचे संवर्धन करणे अधिकच निकडीचे बनले आहे.

आपला मराठीचा अभिमान गैर किंवा अवाजवी मुळीच नाही. एखादी भाषा बोलणाऱ्यांच्या संख्येनुसार भाषांचा अनुक्रम लावायचे ठरवले, तर मराठी भाषेचा क्रमांक जगात बारावा लागेल व म्हणूनच, केवळ संख्याबळ विचारात घेतले तरीही, मराठी भाषेला जागतिक पातळीवरही महत्त्व आहे.

पण त्याचबरोबर केवळ संख्याबळापेक्षा भाषेच्या समृद्ध साहित्यिक वारशाची जाणीव ही आपला भाषाभिमान अधिक सार्थ ठरवणारी आहे आणि 'श्रेष्ठ पुस्तके' हा या साहित्यिक वारशाचा एक मोठा हिस्सा आहे. तेजस्वी पूर्वजांचे स्मरण व 'त्यांची तेजोमय परंपरा म्हणजे मी' ही जाणीव समाजाच्या सामूहिक अस्मितेचा एक मोठा आधार असतो. 'श्रेष्ठ पुस्तके' हा त्या तेजोमय परंपरेचाच एक भाग आहे. 'अरे वा, मराठीतही एवढी चांगली पुस्तके आहेत तर,' असे प्रत्येक मराठी वाचकाला वाटायला हवे. आपल्या भाषाप्रेमाला समृद्ध साहित्यिक वारशाच्या जाणिवेचा आधार पुरवणे हा या उपक्रमाचा एक उद्देश म्हणता येईल.

या उपक्रमाचा दुसरा उद्देश आहे, अशा श्रेष्ठ पुस्तकांच्या वाचनातून आपली अभिरुची अधिक संपन्न करण्याचा. 'श्रेष्ठ पुस्तके' ('क्लासिक्स') कळत-नकळत आपल्या मनावर खोलवर रुजणारे संस्कार करत असतात, त्यांच्या वाचनाने-पुनर्वाचनाने आपली अभिरुची अधिकाधिक संपन्न होत जाते यात शंकाच नाही. आपल्या सर्वांच्याच अभिरुचीवर असे श्रेष्ठ साहित्याचे संस्कार होत राहणे व त्यातून आपल्या सांस्कृतिक जाणिवांचे उन्नयन होत राहणे हे आजच्या बकाल, उथळ जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर अधिकच अगत्याचे वाटते. वृत्तपत्रांच्या पुरवण्या आणि साप्ताहिकांचे 'स्पेशल रिपोर्ट' यांच्या पलीकडच्या जगात आपण जायला हवे, आपले मन रमायला हवे.

"Classics are the books that everyone wants to have read but no one actually reads!" असे मार्क ट्वेन याने म्हटले आहे. ("श्रेष्ठ पुस्तके ती, जी वाचलेली असावीत असे प्रत्येकाला वाटते, पण जी प्रत्यक्षात कोणीच वाचत नाही!") यातला चेष्टेचा भाग सोडून द्या; पण हे मात्र खरे, की खूपदा अनेक उत्तम पुस्तके वाचायची राहून जातात. कधी आपल्याला सवड होत नाही, कधी पुस्तक वेळच्या वेळी उपलब्ध होत नाही. कधी अशी उत्तम पुस्तके एकेकाळी वाचलेली-चाळलेली असतातही, पण नंतर ती विस्मरणात गेलेली असतात.

पुस्तकपरिचय हा प्रत्यक्ष पुस्तकवाचनाला पर्याय नाही, याची आम्हांला जाणीव आहे; पण या उपक्रमाद्वारे वाचकांचे लक्ष या पुस्तकांकडे निदान वेधले गेले, यांतली काही जरी त्याला (प्रथमच वा पुन्हा एकदा) वाचावीशी वाटली, तरी या उपक्रमाचे सार्थक झाले असे आम्ही मानू.

ज्यांचा प्रभाव दीर्घकाळ रसिकांच्या मनावर टिकून राहतो अशी पुस्तके फारच थोडी असतात. इंग्रजी वाचनाचा पर्याय ज्यांना उपलब्ध आहे अशांच्या दृष्टीनेतर श्रेष्ठ मराठी पुस्तकांचा हा परीघ अधिकच आक्रसलेला असतो. त्यादृष्टीने एक सांगावेसे वाटते. निदान ही वीस पुस्तके तरी वाचकांनी पुन्हा एकदा अवश्य वाचावीत, शक्य असेल तर विकत घ्यावीत, संग्रही ठेवावीत. या वीसांतील प्रत्येक पुस्तक हे त्या-त्या साहित्यिकाचा 'मास्टर पीस' म्हणता येईल असे आहे; त्याचा 'अंतर्नाद' त्या पुस्तकात प्रकर्षाने जाणवेल.

श्यामची आई आजही आपले डोळे पाणावेल, चिमणराव आजही हसवेल, दगडू मारुती पवारची वेदना अजून तीच आहे, आणि पांडुरंग सांगवीकरचे तुटलेपणही. आजही अनेक कळ्या निःश्वास सोडताना दिसतील आणि आपल्या प्रत्येकातच उपभोगांमागे धावणारा एक अतृप्त ययाति दडलेला आजही जाणवेल. श्रेष्ठ कलाकृती कधीच कालबाह्य होत नाही; ती अजर असते. शाश्वत सत्याच्या वाटेवर ती आपल्याला कायम साथ देते. "Art is a lie that enables us to realize the truth" ("कला म्हणजे आपल्याला सत्याप्रत नेणारे एक असत्य") हे 'मॉडर्न आर्ट'चा प्रणेता पाब्लो पिकासो याचे उद्गार या वीसांपैकी प्रत्येक पुस्तकाला लागू पडावे.

कुठल्याही मराठी माणसाच्या घराचे भूषण ठरतील अशीच ही पुस्तके आहेत आणि म्हणून ती वाचकांपुढे आणावीत, याच सुस्पष्ट भूमिकेतून अंतर्नाद हा उपक्रम राबवत आहे.

मराठीत साधारण चारशेच्या आसपास दिवाळी अंक प्रसिद्ध होतात व तसे ते या वर्षीही प्रसिद्ध होतीलच. या सर्वच दिवाळी अंकांची रचना चार-पाच कथा, दोन-तीन लेख, एखाद-दुसरा परिसंवाद, एखादी कादंबरी, एखादे आत्मकथन, काही कविता, अशा काहीशा ठरून गेलेल्या साच्यानुसार होत असते. श्रेष्ठ पुस्तके विशेषांकाच्या निमित्ताने या पारंपरिक साच्यापेक्षा काहीतरी वेगळे व बऱ्यापैकी संग्राह्य असे वाचकांना द्यायचा आमचा प्रयत्न आहे.

ज्येष्ठ चित्रकार बाळ ठाकूर यांचा मराठी वाचकांना वेगळा परिचय करून द्यायची गरज नाही. त्यांची रेखाटने हे या अंकाचे एक वैशिष्ट्य ठरावे. रेखाटनांखालील जन्म-मृत्यूच्या तारखा 'संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश' या जी. आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथातून घेतल्या आहेत. गेल्या काही वर्षांप्रमाणे या दिवाळी अंकाचेही मुखपृष्ठ आहे श्याम देशपांडे यांचे – भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेल्या कमळांचे. संस्कृत वचने लीला अर्जुनवाडकर यांनी तपासून दिली. या सर्वांचा अंतर्नाद आभारी आहे.

या वीस श्रेष्ठ पुस्तकांचा इतक्या सुजाण रसिकतेने परिचय करून देणाऱ्या सर्व वीस लेखकांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. त्यांच्या – तसेच आमचे जाहिरातदार व व्यावसायिक संबंधित यांच्या – मन:पूर्वक दिलेल्या सहकार्याशिवाय हा अंक साकार झालाच नसता. या सर्वांना, तसेच आमच्या सर्व वाचकांना, ही दिवाळी सुखसमृद्धीची जावो आणि प्रत्येकाला आपापल्या अंतर्नादाप्रमाणे जगण्याचे-फुलण्याचे स्वातंत्र्य व सामर्थ्य लाभो ही सदिच्छा!

*(दिवाळी २००६)*

संपादकीय

# प्रत्यक्षाहुनि प्रतिमा अद्भुत

**भानू काळे**

आपल्या अनेक धारणा वास्तवापेक्षा माध्यमांमार्फत मनावर उमटणाऱ्या प्रतिमांवरच अधिक बेतलेल्या असतात.

सोमवार, ४ फेब्रुवारी २००८. सहज टीव्ही लावला आणि उत्तर भारतीयांविरुद्ध मुंबईत जोरदार आंदोलन सुरू असल्याची बातमी समोर आली. वेगवेगळ्या माणसांच्या प्रतिक्रिया दाखवल्या जात होत्या. 'आमचा गुन्हा तरी काय?' – भयभीत झालेले उत्तर भारतीय विचारत होते. मुंबई फक्त मराठी माणसांचीच आहे का, परप्रांतातल्या दोन कोटी मराठी माणसांवर असे हल्ले झाले तर, यांसारखे प्रश्न उपस्थित केले जात होते. निवेदकाचा स्वर गंभीर होता. याच वेळी पडद्याच्या अर्ध्या भागात प्रत्यक्ष दंगलीची दृश्ये दाखवली जात होती. काचा फुटलेल्या टॅक्स्या, फेरीवाल्यांना लाथाबुक्क्यांनी तुडवत असलेले दंगेखोर, काठ्या परजत धावणारे हेल्मेटधारी पोलीस, सायरनचे आवाज, दगडफेक...

त्यावेळी मी नुकताच मुंबईहून परतलो होतो. वा. रा. ढवळे जन्मशताब्दीनिमित्त मुंबई मराठी साहित्य संघात 'संपादन : दृष्टी आणि कौशल्य' या विषयावरील एका परिसंवादात भाग घ्यायचे आमंत्रण होते. त्या निमित्ताने इतरही काही कामे करावीत म्हणून तीन दिवस मुंबईतच मुक्काम होता. तेव्हा तर सगळीकडे शांतता होती. राहायलाही एका उत्तर भारतीय मित्राच्याच घरी होतो. तिथेही कुठला तणाव आढळला नव्हता. आदल्या दिवशी, म्हणजे रविवारी, तर योगायोगाने शिवाजी पार्कलाच होतो – म्हणजे मुख्यत: ज्या परिसरात ही दंगल चालली होती असे चित्र निर्माण केले गेले होते, तिथेच. तेव्हाही एकूण वातावरण नेहमीसारखेच दिसले होते. ज्यांच्या घरी गेलो होतो तिथे व्यवस्थित गप्पागोष्टी रंगल्या होत्या. रस्त्यावर वाहनांची नेहेमीचीच वर्दळ, बाजारहाट करणारे लोक; आमची पुण्याची बसही अगदी वेळच्या वेळी दादर बसस्टँडवरून सुटली होती. त्यामुळे सोमवारी पुण्यात टीव्ही बघताना 'आपल्याला कसं नाही यातलं काही दादरमध्ये दिसलं', याचे साहजिकच कुतूहल वाटून त्या बातम्या उत्सुकतेने बघू लागलो.

आणि काही मिनिटांतच लक्षात आले, की हे सगळे मिडियानाट्य दिसते आहे; म्हणजे प्रत्यक्ष घटना खऱ्या असतीलही, पण ज्या नाट्यपूर्ण पद्धतीने त्या पडद्यावर साकार केल्या जात होत्या, ते केवळ मिडियाचे कसब होते. पुढची काच फुटलेली एकच टॅक्सी पुन:पुन्हा दाखवली जात होती, मारझोड केला जाणारा एकच बापडा फेरीवाला पुन:पुन्हा दाखवला जात होता. असल्या दोन-चार दृश्यांचेच फूटेज एकसारखे दाखवून, वेगवेगळ्या लोकांचे बाइट्स मधून मधून पेरून, जणू एक चित्तथरारक चित्रपटच प्रेक्षकांपुढे सादर केला जात होता.

बातम्या देणाऱ्याच्या आवाजातला कमावलेला चढउतार, स्वरातली उत्कंठा, पार्श्वसंगीताची जोड, क्लोजअप्सचा कुशल वापर, पार उत्तर प्रदेश-बिहारमधल्या हिंदी नेत्यांच्या घाईघाईने घेतलेल्या व 'संतप्त' वाटाव्या अशा प्रकारे संपादित केलेल्या प्रतिक्रिया आणि या सगळ्यांची परिणामकारकता वाढवणारा, जनतेला आपणच 'सत्य' परिस्थिती सांगत असल्याचा आविर्भाव, या सगळ्यांतून त्या बातमीपत्राचे 'टीआरपी' चांगलेच वाढले असणार.

आणि आजच्या धंदेवाईक माध्यमांच्या दृष्टीने तीच खरी महत्त्वाची बाब असते. कारण मुळात, शिवाजी पार्कवरच्या ज्या सभेच्या निमित्ताने हा सगळा प्रकार घडला, ज्या सभेला भरपूर गर्दी होती, ज्या सभेत अनेक मोठे हिंदीभाषक राष्ट्रीय नेते बोलले, त्या प्रत्यक्ष सभेची बातमी मात्र अगदी जेमतेमच दिली गेली होती – सगळा भर होता तो भडकपणे दाखवल्या गेलेल्या मूठभरांच्या दंगेखोरीवर.

या सगळ्या आंदोलनामागची सामाजिक-राजकीय कारणे काय असतील, त्यातून कोणाच्या करिअरला किती 'पुश' मिळेल, कोण किती 'मायलेज' काढेल हा सगळा स्वतंत्र चर्चेचाच विषय आहे; पण एखादी बारीकसारीक घटनाही प्रसारमाध्यमांतून अतिशय भडकपणे कशी सादर केली जाऊ शकते, सुतावरून स्वर्ग गाठावा तसे तिच्यावरून व्यापक निष्कर्ष कसे काढले जातात, आणि अशा नाट्यपूर्ण सादरीकरणातून लोकांच्या मनावर ठसल्या जाणाऱ्या प्रतिमा प्रत्यक्षापेक्षा कितीतरी जास्त 'अद्भुत' कशा असतात, याचे हे एक ताजे उदाहरण आहे.

या बातम्या चार-पाच वेळा सलग पाहिल्या, की बघणाऱ्याच्या मनावर अशीच प्रतिमा ठसणार होती, की जणू अख्खी मुंबई उत्तर भारतीयांविरुद्ध पेटून उठली आहे. त्यामुळे भडकून काही उत्तर भारतीय तरुणांनी अन्य प्रांतांतल्या दोन कोटी मराठी माणसांविरुद्ध आंदोलन

छेडले असते तर किती भयानक परिस्थिती उद्‌भवली असती – मध्य प्रदेशात, उत्तर प्रदेशात, दिल्लीत?

पडद्यावरच्या प्रतिमा मोठ्या अद्‌भुत असतात. बघता बघता आपल्याला कुठून कुठे घेऊन जातात.

एकूणच, आपल्या मनात ठसलेल्या अनेक प्रतिमा या वास्तवापेक्षा खूपच वेगळ्या असतात.

उदाहरणार्थ, 'बॉम्बस्फोट' हा अतिरेक्यांच्या संदर्भात सर्रास वापरात येणारा शब्द घ्या. आता बॉम्बस्फोट म्हटला, की माझ्या डोळ्यांपुढेतरी पटकन उभी राहणारी प्रतिमा म्हणजे आगीचा अन् धुराचा मशरूमच्या आकाराचा एक प्रचंड लोट, हिरोशिमा-नागासाकीसारखी बेचिराख झालेली शहरे, हजारो प्रेतांचा खच; क्वचित केव्हातरी एखाद्या युद्धात घडणारा उत्पात. पण अलीकडे 'दोन ठार, तीन जखमी' झाले तरी टीव्हीवरच्या 'ब्रेकिंग न्यूज'च्या दृष्टीने तो 'प्रचंड बॉम्बस्फोट'च असतो, आणि त्याने सगळे शहर 'हादरलेले' असते!

'युद्ध' हा प्रकार घ्या. अगदी लहानपणापासून माझ्या मनातली युद्धाची प्रतिमा मोठी रोमँटिक होती. त्या वेळच्या प्रभावी माध्यमातून – म्हणजे पुस्तकांतून – तयार झालेली. उभ्या-आडव्या फिरणाऱ्या तलवारी, उडणारी मुंडकी, रक्ताच्या चिळकांड्या, किंकाळ्या, वळलेल्या मुठी, डोळ्यांत फुललेला विस्तव, 'तोफेआधी मरे न बाजी सांगा मृत्यूला' म्हणणारा आवेश. पुढे पुढे ती प्रतिमा आधुनिक पण आणखीनच भडक बनली. तोफांचा धडधडाट, सुरुंगाचे स्फोट, आगीचे लोळ. मग नंतर केव्हातरी एका निवृत्त लष्करी अधिकाऱ्याशी परिचय झाला. त्यांच्याशी आधुनिक युद्धाबद्दल गप्पा झाल्या. आपण आणि शत्रू प्रत्यक्षात कधीच असे आमनेसामने नसतो, तोफगोळे तर चांगले पंधरा-वीस मैलांच्या अंतरावरून फेकले जातात, त्यांचाही धडाडधूम असा अविरत वर्षाव ('बरसता अंगार') नसतो, दोन फायरिंग्ज्‌मध्ये खूपदा काही तासांचाही अवधी असतो, जवळजवळ सगळेच कॉम्प्युटर आणि लेझरवर ठरते, 'वर भिवई चढली दात दाबती ओठ, छातीवर तुटली पटबंदाची गाठ' असला काहीच प्रकार नसतो, वगैरे गोष्टी कळल्या; प्रतिमेपेक्षा वास्तव किती मवाळ-मचूळ असते हे लक्षात आले, आणि 'युद्ध' या प्रकारातले सगळे 'ग्लॅमर'च जणू नाहीसे झाले!

पण चित्रपटात व टीव्हीवर दिसणारी युद्धाची प्रतिमा आजही पूर्वीइतकीच रोमँटिक आहे आणि लोकमानसात सामान्यत: तीच प्रतिमा ठसलेली असते.

युद्धच कशाला, अगदी साधी मारामारीही घ्या. रायफलींमधला गोळ्यांचा वर्षाव, रक्तपात, स्फोट, आग हे सगळे त्यात असतेच, पण त्यानंतर प्रत्यक्ष हाणामारीही असतेच असते. खूपदा तर खलनायकाला गोळी घालून झटक्यासरशी सगळे संपवण्यापेक्षा बलदंड नायक स्वत:च्या हातातले पिस्तुल उगाचच फेकून देतो व प्रत्यक्ष हाणामारी सुरू करतो. लाथाबुक्के, पिळवटलेले चेहरे, रक्ताचे ओघळ हे सगळे खूप वेळ दाखवल्याशिवाय मारामारीला जणू पूर्णत्व येतच नाही. या सगळ्या क्रौर्याला क्लोजअप्समुळे आणि जोरदार म्युझिकमुळे अधिकच उठाव दिला जातो.

पडद्यावरचा गरबा आणि आजूबाजूच्या सोसायट्यांमधला आपण प्रत्यक्ष बघितलेला गरबा, पडद्यावरची पार्टी आणि प्रत्यक्षातली, पडद्यावरची नातीगोती-सणवार आणि प्रत्यक्षातले यांत जमीनअस्मानाची तफावत असते. स्टम्प्समध्ये छोटे मायक्रोफोन ठेवून आणि तोकड्या कपड्यातल्या मुली कॅमेऱ्याच्या कक्षेत पेरून केरी पॅकरने क्रिकेट कोट्यवधी दर्शकांसाठी 'आकर्षक' केले. तीच गोष्ट 'कॅन्ड ह्यूमर'ची. प्री-रेकॉर्डेड हंशा-टाळ्यांशिवाय टीव्हीवरचा विनोद आज रंगूच शकत नाही. संगीताच्या कार्यक्रमात डुलणारे, हातवारे करणारे, टाळ्या वाजवणारे श्रोते लागतातच; डोळे मिटून संगीताचा आस्वाद घेणारा रसिक आज टीव्हीवर कधी दिसणार नाही. सूक्ष्मता, सूचकता ही श्रेष्ठ कलाकृतीची वैशिष्ट्ये आजच्या प्रसारमाध्यमांनी केव्हाच हद्दपार केली आहेत.

प्रत्येक गोष्ट भडक, बटबटीत करण्याच्या प्रयत्नात माध्यमे सर्रास अतिशयोक्ती करत असतात. संगीतस्पर्धांमधल्या वेगवेगळ्या स्पर्धकांना मिळणाऱ्या मतांचे आकडे हास्यास्पद वाटावेत इतके फुगवलेले असतात. आणि पुढच्या फेरीत सरकलेला प्रत्येक उमेदवार 'देशभर के करोड़ो दर्शकों को उनके ढेर सारे प्यार के लिए धन्यवाद' देतो तेव्हा वाटते त्याला कोणीतरी सांगावे, की 'करोड़ो देशवासीयांना' हा कार्यक्रम बघणे एवढाच एक धंदा नाही आहे!

एखाद्या पादचाऱ्याला अगदी त्याच्याच चुकीने अपघात झाला असला तरी बातमीत मात्र 'भरघाव' जाणाऱ्या गाडीने त्याला 'उडवले' असते, आणि गाडीचालक एखादा बँकेतला क्लार्क असला तरी बातमीत मात्र तो 'धनदांडगा' असतो!

अशा बेफाट अतिशयोक्तीचे उत्तम उदाहरण म्हणजे मागे गाजलेले भ्रष्टाचाराचे एक प्रकरण. हा घोटाळा ३३,००० कोटी रुपयांचा आहे असे एकूणएक वृत्तपत्रांमधून व वाहिन्यांवरून सतत सांगण्यात येत होते. पुढे एकदा एका पोलीस अधिकाऱ्यांशी भेट झाली असता ते सांगत होते, "हा ३३,००० कोटीचा आकडा पत्रकारांनी कुठून व कसा पैदा केला तेच आम्हांला एक कोडं वाटतं. महाराष्ट्र सरकारचं स्टॅम्पपेपरविक्रीचं एकूण वार्षिक उत्पन्नच जेमतेम हजार कोटी आहे आणि बनावट स्टॅम्पपेपर छापायचा उद्योग फारतर वर्षभर चालला असेल. राज्यात विकला गेलेला अगदी प्रत्येक स्टॅम्पपेपर बनावट होता असं गृहीत धरलं – आणि ते अर्थात अशक्यच आहे – तरीही घोटाळ्याचा संभाव्य आकडा कितीतरी कमी येतो. मग हा इतका भरमसाट आकडा – आणि तोही अगदी प्रत्येक बातमीमध्ये – आला कुठून?" (या बातमीशी निगडित असो वा नसो, ३३ कोटी देव हाही असाच एक आकडा!)

या प्रश्नाचे उत्तर 'दिला कोणीतरी दडपून' एवढेच असू शकते. अर्थात बातमी देण्यापूर्वी शहानिशा न करण्याची बेपवाई हाही त्या उत्तराचा एक भाग आहेच.

मागे एकदा पोपनी अमेरिकेला भेट दिली तेव्हाचा एक ऐकीव किस्सा. 'न्यूयॉर्क विमानतळावर पोप उतरले' या घटनेत सनसनाटी

असे काय असणार? पण एका खवचट पत्रकाराने त्याची 'बातमी' कशी केली पाहा. त्याने पोपना आल्या आल्या प्रश्न विचारला,

''न्यूयॉर्कमधल्या वेश्यावस्तीला आपण भेट देणार का?'' ("Do you plan to visit New York's red light area?")

पोपनी निरागसपणे विचारले, ''न्यूयॉर्कमध्ये वेश्यावस्ती आहे?'' ("Is there red light area in New York?")

झाले, दुसऱ्या दिवशी या पत्रकाराने दिलेल्या बातमीचा मथळा होता : ''न्यूयॉर्कमधल्या वेश्यावस्तीची पोपकडून चौकशी'' ("Pope enquires about New York's red light area")

– तांत्रिकदृष्ट्या सत्य, पण प्रत्यक्षात पूर्ण विपर्यस्त!

'खास बातमी' ('स्कूप') मिळवण्यासाठी वृत्तपत्रे काय काय उपद्व्याप करतात यावर *मीट जॉन डो* (*Meet John Doe*) हा गॅरी कूपर व बार्बरा स्टॅनवाइक यांच्या भूमिका असलेला एक सुरेख चित्रपट फ्रँक काप्राने बऱ्याच वर्षांपूर्वी बनवला होता. (अमिताभ बच्चन आणि शबाना आझमी यांच्या भूमिका असलेले या चित्रपटाचे 'मै आझाद हूं' हे हिंदी रूपांतरही नंतर आले होते.) एका पत्रकार तरुणीची नोकरी तिने एखादा 'स्कूप' मिळवण्यावर अवलंबून असते. पण खूप प्रयत्न करूनही तिला खास काही सापडत नाही. मग ती एक काल्पनिक बातमी तयार करते. दुःखाला आणि अन्यायाला कंटाळलेला 'जॉन डो' नावाचा एक तरुण अमुक अमुक तारखेला जाहीर आत्महत्या करणार आहे, अशी. वाचकांमध्ये प्रचंड खळबळ माजते. वातावरण तापत जाते. त्याच्याविषयी रोज काही ना काही सनसनाटी (अर्थात काल्पनिक) छापले जात असल्याने त्या बातमीचा 'टेंपो' वाढत जातो, वृत्तपत्राचा खपही गगनाला भिडतो. राजकारणासाठीही या बातमीचा उपयोग केला जातो. संपादक पत्रकारावर खूश होतात. पण जसजसा प्रत्यक्ष आत्महत्येचा दिवस जवळ येऊ लागतो, तसतशी तिची अवघडल्यासारखी परिस्थिती होत जाते – ही काल्पनिक व्यक्ती आता आत्महत्येसाठी प्रत्यक्षात कुठून आणायची? मग पैशाचे आमिष दाखवून ती एका गावठी बेकार तरुणाला तयार करते – 'जॉन डो' म्हणून पुढे येण्यासाठी. आपल्या पश्चात आपल्या कुटुंबाचे तरी भले होईल या आशेने तो तयार होतो. पण पुढे 'जॉन डो' विषयीच्या सहानुभूतीची एवढी मोठी लाट उसळते, देशभर इतके 'जॉन डो फॅन क्लब्ज्' तयार होतात की ते लोकप्रेम बघून या नकली 'जॉन डो'चे 'हृदयपरिवर्तन' होते; म्हणजे, केले जाते.

'खास बातमी'चा मोह माध्यमांना कुठल्या कुठे घेऊन जातो!

असे 'स्टंट्स' जेव्हा क्वचित कधी केले जातात तेव्हा जगण्याच्या एकूण व्यामिश्र पसाऱ्यात ते खपून जाते. पण जर ते सतत व्हायला लागले तर एक मोठा धोका संभवतो – 'लांडगा आला रे आला' अशी गत होऊन त्यातून माध्यमाची एकूण विश्वासार्हताच नाहीशी व्हायची. तसे झाले तर मग एक दिवस कुठल्यातरी कारणाने खराखुरा लोकक्षोभ होईल, लोक कधी काळी उत्स्फूर्तपणे रस्त्यावर उतरतील, तेव्हा त्या खऱ्या आंदोलनाचे चित्रणही व्यापक समाजाला पेटवून उठणार नाही; त्या चित्रणालाही स्टंट समजून लोक आपापल्या घरी स्वस्थच बसून राहतील.

भावनांच्या या निबरीकरणाचे कलात्मक चित्रण आपल्याला सुप्रसिद्ध हिंदी कथालेखिका सूर्यबाला यांच्या एका कथेत आढळते. (मराठी अनुवाद : 'जीजी आणि रिमोट', अंतर्नाद, जुलै २००६) आपल्या घाईगर्दीच्या दैनंदिन प्रपंचात म्हाताऱ्या आईने एकसारखी लुडबुड करू नये म्हणून मुलगा तिच्या खोलीतच एक स्वतंत्र टीव्ही घेऊन देतो. तिथे सतत टीव्ही बघत ती आपला वेळ काढू लागते आणि मग हळूहळू केवळ घरच्यांपासूनच नव्हे, तर एकूण जगण्यापासूनच तुटते. टीव्हीवरचे जग हेच जणू तिचे वास्तव जग बनते. जेव्हा शहरात खराखुरा दंगा सुरू झाल्याची बातमी तिला तिचा नातू धावत धावत जाऊन कळवतो, तेव्हा तिला त्या घटनेचे गांभीर्य जाणवतच नाही; जणू टीव्हीवरचाच तो एक कार्यक्रम होता, आणि पुढे काय घडते ते तिला आधीच ठाऊक होते, अशी तिची यांत्रिक प्रतिक्रिया होते.

दृक्श्राव्य माध्यमाचे सामर्थ्य एवढे असते, की कळत-नकळत आपल्या दैनंदिन जगण्यावर त्याचा प्रभाव पडतच असतो. मोठमोठे नट आपल्या पडद्यावरच्या प्रतिमेचे कैदी बनतातच, पण आपल्या सगळ्यांचेच वागणे वेगवेगळ्या प्रतिमांवर बेतले जाऊ लागते – मयताला पांढरे कपडे, मैफलीला सुरवार-कुर्ता आणि वीकएंडला जीन्स-टीशर्ट हे प्रतिमांनुरूपच ठरले असते. देव गोरेगोमटे आणि राक्षस काळे-केसाळ हेही माध्यमप्रतिमांनीच निश्चित झाले आहे. कार्यकर्त्याची शबनम आणि उद्योगपतीचा चिरूट, 'गांव की गोरी' आणि 'बल्ले बल्ले' याही माध्यमप्रतिमाच.

समाजात प्रत्यक्ष वावरतानाही आपल्या वेगवेगळ्या लोकांविषयी वेगवेगळ्या प्रतिमा बनलेल्या असतात व त्यानुसारच आपण एकमेकांशी वागत असतो; त्यालाच तर पूर्वग्रह म्हणतात. ते दूर सारून एकमेकांना भेटतो, प्रतिमा बाजूला सारून प्रत्यक्षाला भेटतो, तेव्हाच एकमेकांची खरी भेट होते.

'अद्भुत' प्रतिमा केवळ भडक चित्रणातूनच निर्माण होतात असे नाही, तर घाईघाईने व्यापक निष्कर्ष काढण्याच्या माध्यमांच्या प्रवृत्तीतूनही त्या निर्माण होतात. उदाहरणार्थ, माध्यमांनी केलेल्या वेगवेगळ्या लोकमतचाचण्या. 'तरुणांमधील सर्वांत लोकप्रिय राजकारणी कोण' इथपासून ते 'विवाहबाह्यसंबंधांचे प्रमाण कुठल्या शहरात सर्वाधिक आहे' इथपर्यंत कुठल्याही विषयावरची ही सर्वेक्षणे असतात. अत्यंत अपुऱ्या पाहणीवर ती आधारित असल्याने त्यांचे निष्कर्षही फसवेच असतात; पण वाचकांना मात्र काहीतरी 'महत्त्वाची' माहिती मिळाल्यासारखे उगाचच वाटते.

एखादी निवडणूक भा.ज.प.ने जिंकली की लगेच 'हिंदुत्वाची नवी लाट' ही मुखपृष्ठकथा बनते आणि एखाद्या दुय्यम गुंडाच्या कथित वक्तव्यावरून 'सिनेसृष्टीवर माफियाचा कबजा' हा निष्कर्ष निघतो! सरधोपट मतांना (जनरलायझेशनला) काही सीमाच नसते.

कुणीतरी म्हटले आहे : ''आजचे पत्रकार दोन सायकलस्वारांच्या टक्करीवरून थेट संस्कृतीच्या विनाशावर येतात!'' ("Modern journalists often confuse the collision of two cyclists with the collapse of civilization!")

माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे तुम्ही प्रत्यक्षात *कसे आहात* यापेक्षा, तुम्ही पडद्यावर *कसे दिसता,* हेच आज अधिक महत्त्वाचे मानले जाऊ लागले आहे. पडद्यावर अधिक प्रभावी कसे दिसायचे याचे खास प्रशिक्षण आज पाश्चात्त्य राजकारणी घेतात. राजकारण्यांप्रमाणेच उद्योगपती, खेळाडू, कलावंत, लेखक, पत्रकार, व्यावसायिक अशा अनेकांना हे प्रशिक्षण घेणे उपयुक्त वाटते. आपल्याकडेही आता हा प्रकार रूढ होत आहे. कारण तुमची तुम्हांला हवी तशी प्रतिमा तयार करण्याचे, तुमची 'हवा' तयार करण्याचे माध्यमांचे सामर्थ्य प्रचंड आहे. अगदी शोकसभेला जातानाही पत्रकारांनी 'बाइट्स' घेतले तर, याचे भान ठेवूनच कपडे करणारे महाभाग आहेत.

पुस्तकप्रकाशन असो की वर्धापनदिन, खूप परिश्रमपूर्वक एखादा मोठा कार्यक्रम आयोजित करण्यापेक्षा प्रसारमाध्यमांचा योग्य वापर केला, तर आज कितीतरी अधिक प्रसिद्धी मिळू शकते. हॉलमध्ये जेवढे पंखे तेवढेच श्रोते असले तरी चालते, व्यासपीठाचा फोटो तरीही पहिल्या पानावर झळकू शकतो. योग्य त्या व्यक्तींना पटवता आले पाहिजे. व्याप कमी, खर्च कमी, प्रसिद्धी मात्र भरपूर.

माध्यमांना 'मॅनेज' करता येणे, मिडिया-सॅव्ही असणे, हे आज एक मोठेच कौशल्य मानले जाते. मध्यंतरी एका विख्यात पण विक्षिप्त चित्रकाराला मुंबईच्या एका प्रतिष्ठित क्लबने, तो अनवाणी आला आहे म्हणून, प्रवेश नाकारल्याची खळबळजनक बातमी पेपरात वाचली होती. त्यावर नंतर बरेच दिवस गरमागरम चर्चाही रंगली होती. पण मुळात, त्या क्लबचे नियम ठाऊक असूनही, त्या चित्रकाराने तिथे अनवाणी का जावे, हा प्रश्न त्याला कोणीच विचारला नाही. शिवाय त्या प्रसंगाची 'बातमी' करायला नेमक्या त्या क्षणी तो पत्रकार तिथे कॅमेऱ्यासह हजर होता, हा निव्वळ 'योगायोग' म्हणायचा का?

बरेचसे माध्यम व्यावसायिक या सगळ्याचे समर्थनच करतात. त्यांच्या मते, बातमी जर सनसनाटी नसेल, तर तिच्यात कोणालाच काही रुची असणार नाही – एखाद्याने दगड मारून खिडकीची काच फोडली, तरच ती बातमी होते, तुम्ही ती काच पुन्हा नव्याने बसवता, तेव्हा ती मात्र बातमी नसते. किंवा कुत्रा माणसाला चावला, तर ती काही बातमी होत नाही, पण एखादवेळी माणूस कुत्र्याला चावला, तर ती मात्र लगेच मोठी बातमी होईल. थोडक्यात, जे नेहमीचेच आहे ती बातमी नव्हे, तर जे चाकोरीबाहेरचे (ॲबनॉर्मल) आहे, तीच बातमी होते. म्हणूनच, त्यांच्या व्यावसायिक विचारसरणीनुसार, भडक वा सनसनाटी असे काहीतरी बातमीत असणे हे लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आवश्यक आहे.

मला वाटते, 'बातमी' शब्दाविषयीची आपली ही मूलभूत धारणाच बदलायला हवी. तिचा संबंध करमणुकीशी जोडू नये. समाजात महत्त्वाचे बदल घडवणाऱ्या घटना टिपणे हे जर बातम्यांचे, व म्हणून माध्यमांचे, मुख्य काम असेल, तर तशा घटना बहुतेकदा भडक वा सनसनाटी नसतात याची जाणीव ठेवायला हवी. किंबहुना त्या घटना म्हणजे चाकोरीतच दीर्घकाळ होत राहणाऱ्या असंख्य छोट्या-छोट्या प्रक्रियांचा एकत्रित परिपाक असतो.

उदाहरणार्थ, लोकशाही मार्गाने सातत्याने होत राहिलेले देशातले सत्तांतर. रेल्वे तिकीट आरक्षण यंत्रणेचे संगणकीकरण. दिल्ली मेट्रोचे बांधकाम. भारताने आयएमएफचे कर्ज मुदतपूर्व फेडणे. माहितीहक्काचा कायदा. ग्रामपंचायतीत महिलांना एक तृतीयांश राखीव जागा. निवडणूक आयोगाने किंवा दक्षता आयोगाने केलेली कायद्यातील उपलब्ध तरतुदींची प्रत्यक्षातली अंमलबजावणी. आयटी क्षेत्रातली प्रगती. सर्व शिक्षा अभियान. कन्याकुमारीला टाकलेले पोस्टकार्ड पन्नास पैशांत कोहिमाला पोचणे.

उत्तम पीक काढून एखाद्या शेतकऱ्याने कर्जमुक्त होणे किंवा बांधकाम-मजूराच्या मुलानी आयआयटीला प्रवेश मिळवणे यादेखील तशा महत्त्वाच्या घटना म्हणता येतील.

अशा घटना, व त्यांमागची प्रक्रियास्वरूप कारणे, यांचा सातत्याने पाठपुरावा करत राहावा लागतो, तरच त्यांचे नेमके महत्त्व स्पष्ट होते – जे माध्यमांचे मोठे योगदान असू शकते.

मात्र त्यासाठी हे लक्षात घेतले पाहिजे, की अशा समाजात मूलगामी बदल घडवणाऱ्या घटनांचे नाते क्रांतीपेक्षा उत्क्रांतीशी अधिक असते. आणि त्यामुळे होणारा बदल हा बहुधा मांजरीच्या पावलांनीच येतो.

बीजाचे रोपटे अन् कळीचे फूल कधीच दवंडी पिटवून होत नाही.

सोमवारी, चार फेब्रुवारीला, मुंबईतील दंगलीच्या बातम्या टीव्हीवर बघताना मला अचानक दिल्लीतला एक जुना प्रसंग आठवला.

मागे एकदा दिल्लीत कॅनॉट प्लेसजवळ भाड्याने आणलेले 'निदर्शक' एका ट्रकमधून उतरताना बघितले होते. अधिक चौकशी केली असता कळले होते, की असे 'निदर्शक' पुरवणे हा एक धंदाच आहे.

आणि मग मनात आले, 'दंगेखोर'ही असेच पैसे देऊन मिळवता येत असतील का? मुंबईतील एका बड्या कामगारनेत्याचा मागे खून झाला होता, तेव्हा चौकशीत बाहेर आले होते, की ज्याने प्रत्यक्ष चाकू खुपसला त्याला त्या कामाचे फक्त पाच हजार रुपयेच मिळाले होते. जिथे खुनाचीही सुपारी इतक्या स्वस्तात देता येते, तिथे पैसे देऊन 'दंगेखोर' का नाही मिळू शकणार? आणि चॅनेल्सचे फोटोग्राफर्स? काही पूर्वसूचनेशिवाय का ते चॅनेलवाले अगदी मोक्याच्या क्षणी, आणि तेही कॅमेऱ्याला योग्य 'ॲंगल' मिळेल अशा जागी हजर असतात? अगदी थोडी मूठभर मंडळी तावातावाने घोषणा देतात, एखाद-दुसरा टायर किंवा मोडकेतोडके वाहन जाळले जाते, त्या सगळ्याचा व्हिडिओ शूट केला जातो. दहा-पंधरा मिनिटांतच सगळा खेळ आटोपतो; मंडळी विखुरतात. पण तो व्हिडिओ नंतर चॅनेलवर पुन:पुन्हा झळकत राहतो. चित्र असे

निर्माण होते की जणू सारे रान पेटून उठले आहे. म्हणजे मग पडद्यावरची बरीचशी निदर्शने, बरेचसे 'हल्लाबोल' स्टंटबाजीचाच एक प्रकार म्हणायचा? काही 'मिडिया-सॅव्ही' मंडळींनी व्यक्तिगत अजेंड्यानुसार घडवून आणलेला? इव्हेंट मॅनेजमेंट?

हा विचार मनात आला आणि मग त्या पाठोपाठ आणखीन एका शंकेचा किडा मनात घुसला. असे वाटले, की महत्त्वाचे मानले गेलेले आणि अगदी इतिहासातही नोंद होणारे अनेक व्यापक लढेही वास्तवापेक्षा असल्या प्रतिमांवरच आधारित असतात का?

उदाहरणार्थ, आणीबाणीविरुद्धचे देशातील आंदोलन?


त्या आंदोलनात आमच्यासारखे जे कमी-अधिक प्रमाणात सहभागी झाले होते त्यांच्या दृष्टीने तो अगदी रोमांचकारक, मंतरलेला काळ होता. हे आंदोलन म्हणजे जणू दुसरे स्वातंत्र्ययुद्धच आहे, अशीच आमची प्रामाणिक भावना होती. पण पुढे एक काळ असाही आला, की हे सगळे आंदोलन चुकीच्या समजुतींवर आधारलेले होते की काय, अशी आमच्यापैकी काहींना शंका येऊ लागली. आणीबाणीतील अत्याचारांची चौकशी करण्यासाठी नंतर नेमलेल्या शहा कमिशनलाही अत्याचारांचे विशेष कुठचे आरोप सिद्ध करता आले नव्हते, बरेचसे आरोप म्हणजे केवळ अफवाच निघाल्या होत्या. आणीबाणीविरोधी आंदोलकांचे जे 'हिरो' होते, तेही स्वत: नंतर पोकळ आणि भ्रष्टच निघाले. विरोधी पक्षांचे सरकार पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळले. आणि पुढे यथावकाश जनतेनेही पुन्हा काँग्रेसलाच प्रचंड बहुमताने निवडून देऊन इंदिराजींच्या निरपराधित्वावरच जणू शिक्कामोर्तब केले होते.

मग त्या सगळ्या अत्याचाराच्या घटनांचे काय – ज्या आम्ही गुप्त पत्रकांत छापून मोठ्या धाडसाने एकमेकांकडे पोचवत होतो? ते सगळे अत्याचार-आरोप केवळ अतिरंजित होते? त्या केवळ अफवा – म्हणजे एक प्रकारच्या प्रतिमाच – होत्या? त्यांच्यावरच विश्वास ठेवून आम्ही त्या आंदोलनात उतरलो होतो? लोकशाहीसाठी लढतो आहोत असे म्हणताना नकळत कुणाच्या तरी हातची बाहुली बनून गेलो होतो? मुळात परिस्थिती तेवढी वाईट नव्हतीच? बहुसंख्य लोकांचा आणीबाणीला फारसा विरोध कधी नव्हताच?


टीव्ही बघता बघता हे सगळे प्रश्न मनात आले आणि मग अस्वस्थ वाटू लागले.

पडद्यावरच्या प्रतिमा मोठ्या अद्‌भुत असतात. बघता बघता आपल्याला कुठून कुठे घेऊन जातात.

*(मार्च २००८)*




*मार्च २०११*
*(चित्रकार जयप्रकाश जगताप)*




*दिवाळी २०१८*
*(चित्रकार सुभाष कुलकर्णी)*

# दूधवाला, कचरेवाला, पेपरवाला

आपले ठरलेले काम जास्तीत जास्त निष्ठापूर्वक व उत्तम करणे हेच समाजसेवेचे सर्वोत्तम रूप आहे. कारण शेवटी तुमचे सर्वांत महत्त्वाचे सामाजिक योगदान बहुतेकदा तुमच्या नियत कार्यक्षेत्रातच दिले जाते.

उर्वरित दिवसभरात कितीही कटकटींना सामोरे जावे लागले, तरी माझ्या दिवसाची सुरुवात मात्र तशी प्रसन्न असते.

ही सुरुवात होते तीन 'वालां'पासून – दूधवाला, कचरेवाला आणि पेपरवाला. प्रातर्विधी जेमतेम उरकत असतात, तेवढ्यातच हे तिघे दाराशी हजर होतात – साधारण पावणेसात-सातच्या दरम्यान. तसे ते खूपदा दृष्टीसही पडत नाहीत; आपले काम उरकून बाहेरच्या बाहेरच गुपचूप निघून जातात. पण ते यायची मी आतुरतेने वाट बघत असतो. कारण ते येऊन गेल्यानंतरच माझा पहिला चहा होतो आणि उठल्याउठल्या पेपर वाचण्याचे आता जणू व्यसनच जडून गेले आहे.

इतकी वर्षे मी बघतो आहे; हे 'वाले' कधीही खाडा करत नाहीत. इतर सर्वांप्रमाणे त्यांना हक्काची साप्ताहिक सुट्टीही नसते. परीक्षेचे दिवस असोत की मतदानाचे, आजारपण असो की घरगुती अडचणी, थंडी असो की पाऊस, दिवाळी असो की दसरा – हे येतातच. अर्थात एखाददुसरा अपवाद सोडून द्या. उदाहरणार्थ, प्रजासत्ताकदिन, स्वातंत्र्यदिन वा अनंतचतुर्दशीनंतरच्या दिवशी पेपरवाला येत नाही; कारण आदल्या दिवशी वृत्तपत्रांना सुट्टी असल्याने नंतरच्या दिवशी पेपर नसतोच. पण यांतल्या एखाद्याचे असे न येणे हे अगदी अपवादस्वरूपच. त्यांच्याशी असलेल्या माझ्या जुजबी तोंडओळखीनुसार हे 'वाले' फारसे शिकलेले नसावेत; आवर्जून दखल घ्यावी असे फारसे काही कर्तृत्व त्यांच्यापाशी बहुधा नसावे; आपल्या कामाचा आर्थिक मोबदलाही त्यांना विशेष काही मिळत नसावा. पण तरीही वर्षानुवर्षे, अत्यंत नियमितपणे, कसलीही तक्रार-कुरकुर न करता ते आपले काम अगदी चोख करत आले आहेत. त्यांच्या या कार्यनिष्ठेचे मला नेहमीच खूप कौतुक वाटते.

मध्यंतरी एकदा सहज त्यांच्याबद्दल विचार करत होतो आणि तेव्हा जाणवले, की आपल्या नकळत समाजात सुरळीतपणे चालत असलेल्या तीन प्रचंड यंत्रणांचे (सिस्टिम्सचे) हे तिघे अगदी छोटे असे हिस्से आहेत; त्या यंत्रणांची ही तीन जणू प्रतीके आहेत.

तो दूधवाला घ्या. कुठल्यातरी खेड्यातला कोणीतरी शेतकरी रोज सकाळी आपल्या गोठ्यातल्या गाईचे दूध काढतो. सहकारी दूध सोसायटीतर्फे गोळा केले जाऊन ते दूध संकलन-केंद्रावर येते. मग त्या दुधावरची प्रक्रिया, पाश्चरायझेशन, दुधातील स्निग्धांश मोजणे, त्यानुसार त्याचे वर्गीकरण. तिथून पुढे अमूल, गोकुळ, वारणा, चितळे, कात्रज अशा एखाद्या डेअरीत. या डेअरींचे स्वत:चेही मोठे गोठे असू शकतात. आणि त्या दुधापासून पुढे दही, लोणी, चीज, आईस्क्रीम, श्रीखंड वगैरे अनेक पदार्थही तिथे बनतात. नंतर ते दूध छोट्या प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधे भरणे. वातानुकूलित टँकरमधून ते वेगवेगळ्या शहरांमधे व पुढे त्या शहराच्या उपविभागांमधे पोचवणे. आणि शेवटी वितरकांमार्फत ते घरोघर पोचणे. वर्षाचे बाराही महिने आणि अगदी रोजच्या रोज ही प्रचंड यंत्रणा कार्यरत असते. आमच्या घरी येणारा दूधवाला म्हणजे तिचे एक छोटेसे प्रतीक. आमच्या लहानपणचा मुंबईतला दुधाचा तीव्र तुटवडा, ती दुधाची कार्डे, ते बूथ, होल मिल्क-टोन्ड मिल्कच्या त्या बाटल्या, तिथल्या अस्ताव्यस्त रांगा, धक्काबुक्की, दूध आणायला कोणी जायचे यावर घरोघरी भावाभावांमधे होणारी भांडणे वगैरे सगळे आठवले, की आजच्या या मुबलक दूधपुरवठ्याचे व दुग्ध-शृंखलेचे अधिकच कौतुक वाटते.

हाच प्रकार कचरेवाल्याच्या बाबतीत. प्रत्येक सदनिकेच्या दाराबाहेर ठेवलेल्या त्या कचऱ्याच्या बादल्या वा पिशव्या. ओला कचरा-सुका कचरा असे त्याचे विभाजन. तो सगळा कचरा प्लॅस्टिकच्या मोठ्या ड्रम्समधे भरणे. मग महानगरपालिकेची घंटागाडी. पुढे कचरा डेपो. मोठ्या ट्रक्समधून तो आणखी लांब कुठेतरी नेणे. त्याचे पुन्हा वर्गीकरण. री-सायकलिंगसाठी त्यातील काच, प्लॅस्टिक, लाकूड, पत्रे वगैरे घटक वेगळे करणे. वीजनिर्मिती, खतनिर्मिती वगैरे वेगवेगळे प्रायोगिक प्रकार. त्या कचऱ्याची विल्हेवाट लावणारी, तो जाळणारी अवाढव्य यंत्रे. आत्यंतिक दुर्गंधीमुळे या सगळ्याला होणारा स्थानिक रहिवाशांचा विरोध. त्यातून कसाबसा काहीतरी मार्ग काढणे. कचरेवाल्याच्या मागे असते ती ही एक अविरत चालणारी, अगडबंब यंत्रणा.

पेपरवाल्याच्या मागे असते तीही अशीच एक यंत्रणा. काळाच्या ओघात थोडीफार अधिक परिचित झालेली. वेगवेगळ्या वृत्तपत्रांची कार्यालये. तिथले बातमीदार. लिहिला जाणारा मजकूर.

त्यावरचे संस्कार. अक्षरजुळणी. मुद्रितशोधन. मथळे. छायाचित्रांची जोड. पृष्ठनियोजन. स्कॅनिंग. सगळ्याची छापखान्यात रवानगी. तिथली प्रचंड अशी अमेरिकन-जर्मन यंत्रे. कागदाची रिळे. जी कॅनडा-फिनलंड-इंडोनेशिया वा अशीच लांबून कुठूनतरी आलेली. मग रातोरात होणारी छपाई. रंगीबेरंगी पुरवण्यांची जोड. भल्या पहाटे टेम्पोंमधून होणारे वृत्तपत्रांचे विभागश: वितरण. तिथे खूपदा स्थानिक पातळीवर होणारे हँडबिले भरण्याचे काम. गिऱ्हाइकाच्या मागणीनुसार वेगवेगळ्या मराठी-इंग्रजी वृत्तपत्रांचे एकत्रीकरण. गठ्ठे बांधणी. आणि मग शेवटी केव्हातरी आपल्या दारात येऊन पडणारा तो पेपर्सचा गठ्ठा.

हे तीन 'वाले' म्हणजे केवढ्या महाकाय शृंखलांची आपल्याला दिसणारी टोके आहेत! या सगळ्यामागे काय-काय असते! प्रचंड अशी यंत्रसामग्री असते, रस्ते असतात, वाहने असतात. वीज-भांडवल-मनुष्यबळ असते. आणि हे सगळे खूप मोठ्या प्रमाणावर असते. वेगवेगळ्या यंत्रणांची ही एक शृंखलाच असते (चेन ऑफ सिस्टिम्स) आणि यातला कुठलाही दुवा खूप कच्चा असून चालत नाही. यातही काही कामचुकार मंडळी नक्कीच असतात, पण आपल्या कामाविषयी आवश्यक ती कार्यनिष्ठा असणारे अनाम वीरही बरेच असतात व अशा अनेक अनाम वीरांमुळेच या सर्व यंत्रणा बऱ्यापैकी सुरळीत अखंड चालू असतात. आपल्या दैनंदिन व्यवहारांमागेही केवढी गुंतागुंत असते! 'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे' हे फक्त साहित्यापुरतेच खरे नसते!


✦

हे तीन 'वाले' म्हणजे केवढ्या महाकाय शृंखलांची आपल्याला दिसणारी टोके आहेत! या सगळ्यामागे काय-काय असते! प्रचंड अशी यंत्रसामग्री असते, रस्ते असतात, वाहने असतात. वीज-भांडवल-मनुष्यबळ असते. आणि हे सगळे खूप मोठ्या प्रमाणावर असते. वेगवेगळ्या यंत्रणांची ही एक शृंखलाच असते.

✦


या तीन 'वाल्यां'पुढे असंख्य अनपेक्षित अडचणीही असू शकतात. उदाहरणार्थ, भटके कुत्रे मागे लागले, तर सायकलस्वाराला किती भीती वाटू शकते याची कल्पना, ज्यांना स्वत:ला कधी तसा अनुभव आला आहे त्यांनाच येऊ शकेल. पण अशा अनेक अडचणींवर मार्ग काढत, कंटाळा न करता हे 'वाले' त्यांचे काम रोज पार पाडत असतात. एकीकडे त्यांच्यापैकी खूप जणांचे शिक्षणही चालू असते, इतरही काही कामधंदा चालू असतो. पण त्यापायी आपल्या रोज सकाळच्या कामाकडे हे 'वाले' दुर्लक्ष करत नाहीत. घरात लग्न वा मयत वा अन्य असला काही प्रकार घडला, तर आपल्या वाटच्या कामासाठी ते एखादा बदली मुलगा देतात, पण आपल्या कामात सहसा कधी खंड पडू देत नाहीत. हे 'वाले' काही कोणावर मेहेरबानी करत नसतात, पैशासाठीच काम करतात हे खरे आहे; पण तसे करता करता त्यांच्या कार्यनिष्ठेमुळे ते काही महत्त्वाच्या सामाजिक गरजाही उत्तम प्रकारे भागवत असतात, आणि आपले ठरलेले काम जास्तीत जास्त निष्ठापूर्वक व उत्तम प्रकारे करणे हेच समाजसेवेचे सर्वोत्तम रूप आहे. कारण शेवटी तुमचे सर्वांत महत्त्वाचे सामाजिक योगदान बहुतेकदा तुमच्या नियत कार्यक्षेत्रातच दिले जाते. विख्यात अमेरिकन प्रशिक्षक आणि 'सेव्हन हॅबिट्स ऑफ हायली इफेक्टिव्ह पीपल'चे लेखक स्टीफन कोवी म्हणतात त्याप्रमाणे, तुमचे 'सर्कल ऑफ कन्सर्न' (आस्थावर्तुळ) खूप विशाल असू शकते, पण तुमचे 'सर्कल ऑफ इन्फ्लुअन्स' (प्रभाववर्तुळ) हे मुख्यत: तुमचे कार्यक्षेत्र हेच असते.

कुठलाही झेंडा खांद्यावर न घेता, कुठलाही गाजावाजा न करता, आपल्या दैनंदिन कार्यक्षेत्रातच एखादा कार्यनिष्ठ व कर्तव्यतत्पर माणूस किती चांगल्या प्रकारे काम करू शकतो व ते काम किती समाजोपयोगी ठरू शकते याची भारतीय विदेश सेवेतील ज्ञानेश्वर मुळे, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील प्रभाकर देवधर आणि संगणक क्षेत्रातील विवेक सावंत ही तीन उत्तम उदाहरणे या दिवाळी अंकातही सापडतात.

साहित्यक्षेत्राचा विचार करतानाही याच कार्यनिष्ठेची गरज खूप जाणवते. बाकी कामे आपापल्या आवडीनुसार करायला काहीच हरकत नाही, पण आपले नियत काम जास्तीत जास्त चांगले पार पाडणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. लेखकाने, अनुवादकाने, संपादकाने, मुद्रितशोधकाने, समीक्षकाने, पुरस्कारविजेती पुस्तके ठरवणाऱ्या परीक्षकाने, विक्रेत्याने, पुस्तकप्रदर्शन भरवणाऱ्याने ग्रंथपालाने वा साहित्यसंस्थेच्या पदाधिकाऱ्याने आपले स्वत:चेच काम जर पूर्ण निष्ठेने, कौशल्याने व पुरेसा वेळ देऊन केले तर कुठल्याही लाख-लाख रुपयांच्या पारितोषिकांशिवाय, कोटी-कोटीच्या सरकारी अनुदानाशिवाय वा अन्य कुठल्याही बाह्य हस्तक्षेपाशिवाय मराठी साहित्य नक्कीच खूप अधिक समृद्ध होईल.

माझे काही मित्र अलीकडच्या काळात पुष्कळसे निराशावादी बनले आहेत. सध्या सगळीकडे सुमारांची सद्दी सुरू आहे, सगळा समाज आळशी, कामचुकार आणि भ्रष्ट झाला आहे, देशातील सर्व यंत्रणा (सिस्टिम्स) सडलेल्या-किडलेल्या आहेत आणि त्या कुठल्याही क्षणी कोसळून पडण्याच्या मार्गावर आहेत, आणि एकूणच आता ऱ्हासपर्व सुरू झाले आहे, असे त्यांचे ठाम मत आहे.

आपल्या देशात अनेक गोष्टी आज बदलायला हव्या आहेत यात काही शंकाच नाही, आपण जगाच्या खूप मागे पडलो आहोत यातही काही शंका नाही; पण रोज सकाळी न चुकता, एका अघोषित व मूक कार्यनिष्ठेने माझ्या दारात येणारा दूधवाला, कचरेवाला आणि पेपरवाला – आणि त्यांच्यामागे कार्यरत असलेल्या महाकाय यंत्रणा – याची ग्वाही देत असतात, की अजूनतरी त्यांना वाटते तसले ऱ्हासपर्व काही सुरू झालेले नाही!

ही ग्वाही हेदेखील माझ्या सकाळच्या प्रसन्नतेचे एक कारण असू शकेल.

*(दिवाळी २०१३)*

# प्रतिसाद या सदराविषयी अंकात वारंवार छापलेले निवेदन

*"We write to be read, we write to have responses."*
*("वाचलं जावं म्हणून आम्ही लिहितो. प्रतिसाद मिळावा म्हणून आम्ही लिहितो.")*

**- जाँ ल क्लेझिओ (Jean Le Clezio)**
२००८ सालचे नोबेल पुरस्कार विजेते फ्रेंच लेखक

*प्रतिसाद* हे प्रथमपासूनच 'अंतर्नाद'चे एक आगळेवेगळे व वैशिष्ट्यपूर्ण सदर आहे. अशा पत्रांतून साधला जाणारा संवाद व सहभाग वाङ्मयीन संस्कृती जोपासण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. दूरचित्रवाणीवरच्या रंगीबेरंगी भूलभुलैयात हरवून गेलेल्या आणि *जादा-सोच-मत* ही भूमिका स्वीकारणाऱ्या आपल्या आजच्या समाजात तर हे विचारमंथन अत्यावश्यक आहे.

नवा-जुना कुठलाही लेखक असला आणि केवळ 'स्वान्तसुखाय' लेखनाचा कोणी कितीही दावा केला, तरी प्रत्येक लेखकाच्या मनाचा एक कोपरातरी वाचकांच्या प्रतिक्रियांचा निश्चितपणे कानोसा घेत असतो. हे अगदी स्वाभाविकही असते. रसिकाची दाद मिळाल्याशिवाय निर्मितीला पूर्णत्व लाभत नाही, असे म्हणतात.

तेव्हा प्रतिक्रिया कळवण्याबाबत वाचकांमध्ये अनास्था नसावी. वाचकांनी थेट लेखकाकडेही आपली प्रतिक्रिया नोंदवायला हरकत नाही. किंबहुना त्यासाठीच लेखकपत्ते अंतर्नादमधे छापले जातात; लेखकाचा विरोध असेल, तर मात्र त्याचा फोन-पत्ता छापला जात नाही.

प्रतिक्रिया कळवणे हा वेळेचा अपव्यय नसून, वाङ्मयीन संस्कृती जोपासण्यासाठी एक सहजशक्य, पण महत्त्वाचे असे योगदान आहे. आपली ही भूमिका प्रथमपासून अंतर्नादने मांडलेली आहे आणि म्हणूनच अंतर्नादच्या प्रत्येक अंकात वाचकांच्या पत्रांना इतकी जागा दिली जाते.

---

## *दिलासा देणारी घटना*

*नवीन मासिक काढता आहात, तेही संपूर्ण विचार करून, ही मोठीच दिलासा देणारी घटना आहे. प्रायोगिक लघुलेखन (कविता नव्हेत) करणाऱ्या, नवी क्षितिजे शोधू पाहणाऱ्या संवेदनाक्षम नवलेखकांना अशा एका माध्यमाची नितांत आवश्यकता आहे. (विशेषतः कथा हा फॉर्म हाताळणाऱ्या लेखकांना.) हा प्रयत्न दीर्घकाल सुरू ठेवण्यासाठी काही 'जादूची कांडी' तुमच्याकडे असेलच. तुमच्या संपादनकौशल्याची कसोटीही लागेल आणि यश मिळाल्यास एक भरघोस माप तुमच्या पदरात पडेल असा हा प्रकल्प आहे. मला सहभागी व्हायला आवडेलच. शुभेच्छा!*

**प्रकाश नारायण सन्त,** कऱ्हाड
(ऑगस्ट १९९५)

## *पण अजून विचार करा*

*तुमचा अंतर्नाद मासिकाचा विचार कदाचित नव्हे, नक्कीच धाडसी आहे. मन:पूर्वकता आणि कष्ट घेण्याची तयारी एवढ्यानी आता धंदा उभा राहू शकत नाही आणि मासिक ही हौस म्हटल्यास ती फार महाग हौस ठरण्याची शक्यता आहे. तुम्ही मनाशी घेतले आहे त्या प्रकारच्या मासिकाची गरज लेखकांना वाटते; पण ती गरज वाटणारे वाचक किती आहेत ते तपासून पहा.*

*तुम्ही लेखक आहात म्हणून काळजी वाटते. संपादनापायी तुमचे लेखन मागे पडू नये. माझ्याकडे तुम्ही लेखनसहाय्य मागत आहात. पण मी ओसरणारा लेखक आहे. नवे उत्साही लेखक शोधून घडवा. तेच तुमच्या मासिकाला दर्जा आणतील. स्फूर्ती आली तर अधूनमधून मीही लिहीन, पण मासिक चालवण्याला नियमितपणे लिहिणारे नवे लेखक हाताशी लागतात. शुभेच्छा आहेत. पण अजून विचार करा अशी प्रेमाची सूचना.*

**विजय तेंडुलकर,** विलेपार्ले, मुंबई
(ऑगस्ट १९९५)

## *तारेवरची कसरत*

*मराठी मासिकांची सध्या काय दयनीय अवस्था आहे हे मी तुम्हाला मुद्दाम सांगायची गरज नाही. या दिवसात नवं मराठी मासिक सुरू करण्याचं धाडस करत आहात. अशा परिस्थितीत नवं मासिक काढताना दीड-दोन वर्षं तोटा सहन करावा लागेल याची जाणीव ठेवा. तेवढी तयारी असेल तरच हे पाऊल उचला. प्रारंभी अपेक्षित प्रतिसाद*

*मिळाला नाही तरी नाउमेद होऊ नका. मासिकाला स्वत:चं व्यक्तिमत्त्व प्राप्त होईपर्यंत काही काळ जावा लागेल. दर्जा सांभाळतानाच वाचकांच्या आवडीनिवडीही लक्षात ठेवणं ही तारेवरची कसरत करावी लागेल. पैशाची बाजू भरभक्कम असेल तर ही कसरत परवडेल. अंतर्नादसाठी मी जरूर लेखन साहाय्य करीन.*

**सुभाष भेण्डे,** वांद्रे, मुंबई
(ऑगस्ट १९९५)

*अंतर्नादचा पहिला अंक मिळाला. हल्ली कोणतंही मासिक वाचावसं तर सोडाच पण हातात धरवत नाही. पण अंतर्नादने अपेक्षा वाढवल्या. 'यशवंत जयवंत' (डॉ. राम बिवलकर) हा लेख आणि 'महात्मादेखील माणूस असतो' हा तुम्ही लिहिलेला पुस्तकपरीक्षणाचा लेख खूप आवडला. हरिलाल मोसंब घेऊन बांना भेटतो त्या प्रसंगाने तर डोळ्यात पाणी आले. हल्ली असा अनुभव विरळाच झाला आहे. बरेच दिवस माझी लेखणी अबोल होती. अंतर्नाद वाचून पुन्हा लेखनाची उर्मी आली आहे.*

**पं. अरविंद गजेंद्रगडकर,** पर्वती, पुणे
*(सप्टेंबर १९९५)*

*मराठीत आज एक-एक मासिक बंद पडत असताना आपण 'अंतर्नाद' सुरू केलंय, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. आज आठ कोटीपेक्षा जास्त मराठी बोलणाऱ्यांची संख्या असतानाही महाराष्ट्रात एकही मासिक धड चालू नये ही परिस्थिती फारशी उत्साहवर्धक नाही. मुलांचं मासिक सुरू करून, दोन वर्षांनंतर ते, वाढत जाणारा तोटा सहन करून नाईलाजाने बंद करावं लागलं, हा माझा अनुभव आहे. 'अंतर्नाद' या सगळ्या गोष्टींवर मात करून एक उत्तम मासिक म्हणून चालू शकेल याची खात्री दुसरा अंक बघून येते. अंक वाचनीय झाला आहे. काफ्काची कथा, जे.आर.डी.च्या सहवासात, एक लेखक कुत्रा होतो त्याची गोष्ट; हे आवडले. नवीन महत्त्वाच्या पुस्तकांचा परिचय यात यावा.*

**बाबा भांड,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद
*(दिवाळी १९९५)*

*आजच्या भल्या भल्या मासिकांच्या बंद पडण्याच्या काळातही आपण मनस्वी चैतन्याने हे मासिक सुरू केले हे पाहून फार समाधान झाले. त्यामुळे मी ताबडतोब वर्गणी भरायचे ठरवले. अंकातील सर्व साहित्य चांगले वाटले. विशेषत: जेआरडी टाटा यांच्यावरील 'भव्यतेचा यात्रिक' हा आपला लेख मला फार आवडला.*

**डॉ. ललिता व डॉ. निशिकांत मिरजकर**, दिल्ली
*(डिसेंबर १९९५)*

*अंतर्नादचे ऑगस्ट व सप्टेंबरचे दोन्ही अंक नावीन्यपूर्ण असून मजकुरात विविधता आहे. या दोन्ही अंकांत आपण विविध सदरे घेतलेली आहेत. यातील काही सदरे सर्वसामान्य वाचकाला रुचतील काय हा एक प्रश्न आहे. सर्वसामान्य वाचक नजरेसमोर ठेवून मासिकाचे संपादन केले तरच मासिक टिकू शकेल.*

*मी जेव्हा नव्याने कथालेखनाला सुरूवात केली तेव्हा मराठीत बरीच मासिके नियमितपणे निघत होती. नियमित निघणाऱ्या या मासिकांनी मला आणि माझ्यासारख्या इतरही कथालेखकांना घडवलेले आहे. परंतु अलीकडच्या काही वर्षांपासून ही मासिके बंद पडलेली आहेत. या मासिकांचे केवळ दिवाळी अंक निघत आहेत. या दिवाळी अंकांत नवोदित लेखकांना स्थान प्राप्त होत नाही. त्यामुळे या लेखकांची सध्या फार मोठी कोंडी होत आहे. ही कोंडी फोडण्याचे महत्त्वाचे कार्य अंतर्नादला करावयाचे आहे.*

**प्राचार्य रा. रं. बोराडे,** औरंगाबाद
*(डिसेंबर १९९५)*

## *जाणकार वाचकांचा जिव्हाळा*

*अंतर्नाद या आगळ्यावेगळ्या मासिकाच्या अंतरंग दर्शनाने बरे वाटले. अभिनिवेश, अगणित अव्यावहारिक संकल्प आणि सगळ्या अंगभर पसरलेला कृतकतेचा तवंग हेच आजच्या मराठी मासिकांचे भागधेय असते.*

*प्रचार आणि प्रसार या अंगीकृत कार्याच्या वाढीसाठी वेठीला धरल्या जाणाऱ्या मराठी मासिकांच्या प्रभावळीत अंतर्नाद हे मासिक पृथक् कसे आहे हे आजपर्यंत अनेकांनी सांगितले आहे. अंतर्नादने जी जवळीक आणि जो जिव्हाळा जाणकार वाचकांच्या मनात निर्माण केलेला आहे त्याला तोड नाही. हा खरे तर हृदयसंवादच आहे. जवळीकीचा खरा अर्थ अंतर्नादमध्येच उमटला आणि उमगलादेखील!*

**प्रा. डॉ. शशिकांत शां. देशपांडे,** फर्ग्युसन कॉलेज, पुणे
(एप्रिल १९९६)

*अंतर्नादचा पहिला अंक वाचल्यावर लगेच पत्र पाठवावे असे मनात आले. पण भाकरी थोडी निवण्याची वाट पहावी असे मुलांना सांगण्याची सवय आड आली.*

*आत्तापर्यंत बहुतेक सर्व अंक वाचले. वाट पहावी अशा मासिकाचा आनंद त्यातल्या खस्तांच्या अनुभवाने विशेषच झाला. तेव्हा प्रथम मन:पूर्वक अभिनंदन! सोबत माझी व माझ्या मुलीची वर्गणी पाठवत आहे. आगीनझाड (वैशाली पंडित) व बागी (राजन खान) या दोन्ही कथा आवडल्या. तसलिमाच्या लेखनाचा अनुवाद मिळवल्याबद्दल खूब खुषी.*

**शांता किर्लोस्कर,** संपादन, एरंडवणे, पुणे
(मे १९९६)

*आत्ताच सकाळी सकाळी आपला अंक आणि पत्र मिळाले. अंतर्नादबद्दल ऐकले होते. अनिल किणीकर, ह.मो. मराठे, राजन खान यांनी माझे लेखन तुमच्याकडे पाठविण्याचा सल्ला दिला होता. पण मीच चालढकल करत होतो.*

*अंतर्नाद जगले पाहिजे आणि साहित्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने ते जगवले पाहिजे. वाचकांच्या दृष्टीने बुडत चाललेल्या विसाव्या शतकातील हे एकमेव तारू ठरावे. ह्यापेक्षा स्वच्छ काय लिहू? मी कार्यकारी संपादक, संपादक, एका मासिकाचा मालक, मुक्त पत्रकार, लेखक आणि सरतेशेवटी भाजीवाला अशा वेटोळ्यांतून फरफटलो आहे. सध्या भाजीचे दुकानही बंद करून*

*बसलो आहे. आपली वर्गणी भरू शकेन एवढी धनसंपदाही तूर्तास तरी माझ्याजवळ नाही. ज्या दिवशी तेवढी रक्कम हाती येईल, त्याच दिवशी अंतर्नादचा वर्गणीदार होईन. खात्री बाळगा.*

*काही दैनिकांनी अग्रलेखातही आपल्या प्रयत्नांची दखल घेतली आहे. पहिल्याच वर्षी एवढे यश कुठल्याच वाङ्‌मयीन नियतकालिकाला मिळाले नव्हते. पण ते यश नसून जबाबदारीच आहे, असे वाटते. वाचक चळवळीला आलेले शैथिल्य अंतर्नाद धुवून टाको. तुमच्या प्रयत्नांना वाचकांनी, लेखकांनी आणि जाहिरातदारांनी चांगले साह्य करावे.*

**गणेश दिघे,** प्रेरणा प्रतिष्ठान, चिंचवड, पुणे
(जून १९९६)

*अंक खूप वेधक आहे. वाचकांच्या पत्रांना तुम्ही देत असलेली जागा तसेच कोणत्याही मतप्रवाहावर बंदी किंवा बहिष्कार न घालण्याचं (गंगाधर गाडगीळांनाही पुरस्कारलेलं) तुमचं धोरण या गोष्टी मला विशेष लक्षणीय व स्वागतार्ह वाटतात.*

**राम पटवर्धन**, मौज प्रकाशनगृह, गिरगाव, मुंबई
*(दिवाळी १९९६)*

*वर्षभर तुमचा अंक फुकटात वाचला. आवर्जून तुम्हाला पत्र लिहून काही कळवावे असे वाटले नाही. मराठी भाषा आणि मराठी साहित्यसंस्कृती यांच्या नावाने दुकाने घातलेल्यांकडून वाईट अनुभव आले असल्याने आपल्या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा असे वाटत नव्हते. काही गोष्टी तर कशासाठी असाही प्रश्न पडत होता. रतीब घालणारे स्तंभगवळी आपल्यात आहेत. त्यांचे नको नको वाटणारे 'खुसखुशीत' लिखाण आवडते अशी शिफारसपत्रे देणारेही आहेत. 'अंतर्नाद'ही याला अपवाद नव्हता.*

*मला आपली एक चांगले मासिक चालवण्याची धडपड सगळ्यात अधिक भावली. तुम्ही मासिक चालवताय म्हटल्यावर 'वा वा वा! किती किती छान!' म्हणणाऱ्यांचे लोंढे तुमच्यावर कोसळणार होतेच. संपादकाभोवती पिंगा घालणाऱ्यांची मराठीत वानवा नाही. आपल्या प्रामाणिक प्रयत्नाला दाद द्यावी, नव्हे त्याला आपल्यापरीने मदत करावी, असे वर्षभर विचार करून मी ठरवलेय. सोबत २,००० रुपये माझे + २,००० रुपये माझ्या मुलीच्या नावाचे असे ४,००० रुपये + गेल्या वर्षी आपण सप्रेम भेट म्हणून पाठवलेल्या अंकांचे १६० असे एकूण रुपये ४,१६०/- चेकने पाठवले आहेत.* *

*पांडुरंगशास्त्रींचे विचार आपण छापत असता. मला वाटते, त्यांचे विचार छापण्यापेक्षा त्यांच्या भक्तीतून शक्ती निर्माण करणाऱ्या कार्याची ओळख (रिपोर्ट नव्हे) करून देणारे, त्यांच्या स्वाध्यायात गुंतलेल्या सामान्य माणसाला त्यांच्यापासून प्रेरणा कशी मिळते याबद्दलचे अनुभव छापा. पांडुरंगशास्त्रींचे शब्द प्रभावी नाहीत; पण त्यांचे कार्य प्रभावी आहे.*

*शक्य असेल तर डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे लेख आपण पुन्हा छापण्याचा विचार करा. पांडुरंगशास्त्रींचा विचार (त्यातला, कर्मठपणा म्हणू का सनातनीपणा म्हणू, वगळून) पांडुरंगशास्त्रींच्या आधी डॉ. पु. ग. सहस्रबुद्ध्यांनी सांगितलाय. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सामाजिक विचार शक्य असतील तर छापा. लोकहितवादींची काही पत्रे, आगरकरांचे काही लेख पुन्हा छापण्याची नितांत आवश्यकता आहे.*

**खास. नारायण आठवले,** नवी दिल्ली
*(दिवाळी १९९६)*

*'अंतर्नाद'चे दोन अंक प्राप्त झाले. खरे तर दोन्ही अंक पाहिल्यावर आणि वाचल्यावर त्वरीत पत्र लिहिणार होतो. परंतु याच दरम्यान नेताजींवरील नव्या कादंबरीसाठीच्या अभ्यासासाठी जपानला जावे लागले. त्यामुळे वेळेत उत्तर लिहिता आले नाही. क्षमस्व. आपले सर्व अंक एवढे चांगले आहेत की, त्याला दृष्ट लागू नये ही सदिच्छा. विशेषत: यशवंत राजंणकर यांचे हॉलिवूड चित्रपटांवरचे लेख मला खूप आवडले.*

**विश्वास पाटील**, उपजिल्हाधिकारी, ठाणे
*(डिसेंबर १९९६)*

*हृदयविकारामुळे मी हॉस्पिटलमध्ये असताना माझ्या बायकोने मला अंतर्नादचा अंक वाचायला आणून दिला. तो अंक वाचल्यावर माझ्या निराश मनात चैतन्य जागृत झाले. जगून जगासाठी भरीव काहीतरी करायची इच्छा प्रबळ झाली. त्यातील 'इथे व तेथे' ही चैताली विजय मोंडकर, वय वर्षे १५, हिची कविता वाचून मी भारावलो व तिच्याशी पत्रव्यवहार व दूरध्वनीवर संभाषण करून गेल्या आठवड्यात तिची व तिच्या सर्व कुटुंबियांची तिच्या घरी जाऊन भेट घेतली. एका अत्यंत सुसंस्कृत कुटुंबाशी माझे कायमचे संबंध जोडले गेले.*

*जीवन आनंदाने जगण्याचा अंतर्नाद तुमच्या प्रयत्नांमुळे मिळाला याची पावती देण्यास माझे शब्द तोकडे पडतात.*

**चैतन्य कोप्पीकर**, लॉ कॉलेज रोड, पुणे
*(एप्रिल, १९९७)*

*अंतर्नादमधील 'लॉरेन्स ऑफ अरेबिया'वरचे यशवंत रांजणकर यांचे दोन लेख (मार्च व एप्रिल १९९७) वाचले. ते आवडले हे कळविण्यासाठी हे पत्र लिहित आहे.*

*पुन्हा एकदा 'लॉरेन्स' डोळ्यांपुढे उभा राहिला. या लेखात पटकथालेखक म्हणून डेव्हिड गार्नर याचा उल्लेख आहे. मला अंधुक*

---

* *याचा संदर्भ आजीव सदस्य योजनेशी आहे. अनेक कारणांमुळे ती योजना पुढे अंतर्नादने बंद केली व सर्व ८३५ आजीव वर्गणीदारांना त्यांचे दोन-दोन हजार रुपये परत केले. पण त्यांनी वर्गणीदार म्हणून कायम राहावे व शक्य झाल्यास त्यांच्यासारखाच अजून एक उत्तम वाचक वर्गणीदार म्हणून मिळवून द्यावा असे आवाहनही केले. सुदैवाने बहुतेक वर्गणीदारांनी हार्दिक प्रतिसाद दिला व त्यामुळे वर्गणीदारांची संख्या दुप्पट झाली. दुर्दैवाने त्यात पुढे फारशी भर पडू शकली नाही; पण तो सगळा एक वेगळाच विषय आहे.*

– ***संपादक***

*आठवतं की, त्याने आपल्या आत्मचरित्रात सावरकरांचा उल्लेख केला आहे. 'मी ऐकलेले सर्वांत प्रभावी वक्ते' असे सावरकरांचे वर्णन त्याने केले आहे.*

**बॅ. विठ्ठलराव न. गाडगीळ**, शहाजहान रोड, नवी दिल्ली
*(ऑगस्ट १९९७)*

## अकस्मात मिळालेलं समाधान

*आज अकस्मात समाधानाची चार फुलं वेचली.*

*सकाळी अकरा वाजता ज्ञानमाता दुर्गा भागवतांचा फोन आला. म्हणाल्या, ''अंतर्नादमधील तुमची कथा 'जमुना' वाचली. मला आवडली. तुमच्या इतर लेखनासारखी ती नाही. वेगळी आहे.''*

*मी आभार मानले. दुर्गाबाईंनी चांगलं म्हणणं आणि मुद्दाम टेलिफोन करून वळवणं, हे सुख अनुपमेय आहे. यापुढे जुळवून आणलेले पुरस्कार वगैरे फिके आणि फोल वाटतात.*

*त्यांचं 'गोधडी' हे ताजं पुस्तक नि विशेषत: त्यातला ज्ञानकोशकार केतकरांवरचा जेमतेम वीतभर लांबीचा आखूड पण आशयगर्भ लेख, मला फार हृद्य वाटल्याचं मी बाईंना सांगितलं. त्यांना ज्ञानकोशकार हा आवडीचा विषय मिळाला. मग त्यांनी मला त्यांच्या अनेक गोष्टी ऐकवल्या. ज्ञानकोशकार केतकर, म. गांधी, आचार्य अत्रे, असे अनेक विषय त्यांनी त्यांच्या पद्धतीने अक्षरश: घुसळून काढले. नंतर आचार्य अत्रेंविषयी एक आठवण सांगून त्यांनी फोन ठेवला. नंतर पुन्हा फोन करून त्या जे म्हणाल्या ते पुढे शब्दश: देत आहे :*

*''मला 'अंतर्नाद' मासिक आवडलं. मला त्यांची वर्गणीदार होण्याची इच्छा आहे. पण सध्या माझा हात अवघडला आहे, त्यामुळे मी अर्ज वगैरे लिहू शकत नाही. तुमची 'अंतर्नाद'शी ओळख आहे काय? मग माझं एक काम करा. त्यांना म्हणावं, मला अंक व्ही.पी.ने पाठवा, म्हणजे मी तो इकडे सोडवून घेऊ शकेन. माझ्याकडे कॅश आहे. तुम्ही एवढं त्यांना कळवाच. ती माणसं एका जागी बसून चांगलं काम करीत आहेत. त्यांचा अंक वाचून आपल्याला आनंद होतो. आणखी काय हवं?''*

*तेव्हा तुमच्या धोरणात बसेल तसं करा.*

*बाई ८७ वर्षांच्या आहेत. तब्बेत बरी नाही. कायम घरी असतात. केव्हातरी फोनवरून संपर्क साधा. किंवा पत्र लिहा. मात्र कदाचित त्या पत्रोत्तर लिहू शकणार नाहीत.*

*केवळ 'अंतर्नाद'मुळे मला दुर्गाबाईंची शाबासकी मिळाली!*

*बाकी श्रीरामकृपा!*

**रवींद्र पिंगे,** हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई
*(ऑगस्ट १९९७)*

## विद्याधर पुंडलिक : एक आठवण

*अंतर्नादचे अंक उत्सुकतेने वाचतो. वाचकांना काही नवं द्यावं या ईर्ष्येतून तुम्ही अंक संपादित करता हे लक्षात येतं. वाचकांचा प्रतिसादही वाचनीय असतो.*

*मार्च १९९८च्या अंकात डॉ. प्रल्हाद वडेर यांचं चंद्रकांत वर्तकांनी राम पटवर्धनांवर लिहिलेल्या लेखाच्या संदर्भातलं पत्र प्रसिद्ध झालं आहे. 'सत्यकथा'च्या लेखकांना पटवर्धन अनेक वेळा पुनर्लेखन करायला लावीत, आपल्या चौकटीत लेखकाला ठोकून ठोकून बसवीत, असं वडेरांनी लिहिलं आहे. स्वत:च्या चौकटीत जे बसेल तेच सत्यकथेनं छापलं. 'जो जे वांछिल तो ते लिहो' यावर पटवर्धन व अन्य यांचा विश्वास नव्हता. संपादकीय संस्करणाविषयी विचित्र कल्पना या मंडळींनी उरी बाळगलेल्या होत्या. स्वत: वडेर 'सत्यकथा' परिवारातले; त्यामुळे त्यांचं हे निरीक्षण लक्षणीय वाटलं.*

*कै. विद्याधर पुंडलिकसारखा चांगला लेखक त्या चौकटीतच समाधान मानून राहिला व परिणामी तो खुरटला, या वडेरांच्या विधानाच्या संदर्भात माझी आठवण सांगतो.*

*पुण्याहून मुंबईला आले की पुंडलिक अनेकदा माझ्याकडे उतरत असत. दिवाळी अंक जवळ आले की पुंडलिक सत्यकथेची कथा घेऊन मुंबईला येत. 'सत्यकथा' कचेरीत जाऊन संध्याकाळी हस्तलिखित घरी आणत. ''पटवर्धनांनी थोडे बदल सुचविले आहेत,'' असे सांगत. रात्री जेवण झाल्यावर गप्पाटप्पा टाळून टेबलापाशी बसत. कथेशी झटापट सुरू होई.*

*एकदा दोन वाजता मला जाग आली तर पुंडलिक लिहिण्यात मग्न. वर पंखा फिरत असून घामाघूम झालेले!*

*''काय पुंडलिक, चाकू-ब्लेड काही देऊ का?'' मी विचारी.*

*''कशासाठी?''*

*''कथेला टोक वगैरे काढण्यासाठी!'' मी म्हणे.*

*ते हसून लेखन सुरू ठेवीत. कधी झोपेत कोण जाणे!*

*हे पाठोपाठ दोनतीन दिवस चालत असे. दुपारी खटाववाडी, रात्री जागरणं. मला त्यांची दया येई. सकाळी चहा पिताना कथा-दुरुस्तीच्या मॅरेथॉन प्रकल्पावर आमची चर्चाही होत असे. पुंडलिक दुरुस्तीचे तावातावानं समर्थन करीत. त्यांचं म्हणणं पटत नसे, पण त्यांच्या सत्यकथा-निष्ठेचं मनोमन कौतुक करत त्यांचं बोलणं मी मुकाट्याने ऐकून घेई. असं तीन वर्ष घडलं. सत्यकथा बंद पडल्यावर पुंडलिक येईनासे झाले.*

*'सत्यकथा का बंद पडली?' यावर लवकरच मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात चर्चा झाली. राम पटवर्धन यांनी चर्चेला उत्तर देताना विधान केलं, ''विद्याधर पुंडलिकांसारखे दुय्यम दर्जाचे कथालेखक सत्यकथेला सांभाळावे लागले.''*

*'माणूस'मध्ये हा वृत्तांत सविस्तर प्रसिद्ध झाला. पुंडलिकांच्या तो वाचनात आला. मी पुण्याला गेलो की त्यांना न चुकता भेटत असे. एकदा पर्वतीकडे फिरायला जाताना, गप्पा मारताना, ते मध्येच थांबले. मला विचारू लागले,*

*''तू पटवर्धनांचं भाषण ऐकलंस?''*

*मी होकारार्थी मान हलवली.*

*''त्यांनी माझ्याबद्दल तसं विधान खरंच केलं?''*

*मी ''हूं'' केलं. आणखी काही बोललो नाही.*

*त्यांचा विवर्ण चेहरा आजही डोळ्यांपुढं येतो...*

**डॉ. सुभाष भेण्डे,** साहित्य सहवास, बांद्रे (पू.), मुंबई.
*(मे १९९८)*

## 'हंस'च्या कामगिरीची दखल

*'अंतर्नाद' दिवाळी अंक वाचला. माझे वडील, अनंत अंतरकर, ह्यांच्यावर प्रा. बाळ गाडगीळ यांनी लेख लिहिला याचं अप्रूप वाटलं, कारण अंतरकरांच्या 'हंस'ची दखल सहसा घेतली जात नाही. त्यांच्या संपादकीय कार्याची व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळखही करून दिली जात नाही. यामुळे प्रा. गाडगीळ यांनी लिहिलेला लेख आणि त्याला आपण दिलेली सुरेख फोटोसह प्रसिद्धी याचं कौतुक वाटलं.*

*अनंत अंतरकरांवर मी प्रबंध लिहिला आहे. त्यावर मला पीएच.डी. मिळाली आहे. माझे मार्गदर्शक डॉ. हे. वि. इनामदार यांनी माझ्या प्रयत्नांना सतत प्रोत्साहन दिल्यामुळे हे घडून आलं. हे सांगायचं कारण असं की, प्रा. गाडगीळ यांनी अंतरकरांच्या 'सत्यकथे'च्या कामगिरीबद्दल उल्लेख नसल्याची एक खंत, एक पोकळी म्हणा, व्यक्त केली आहे.*

*मला जे सांगायचं आहे ते प्रा. गाडगीळ ह्यांना दिलासा देणारं आहे. प्रा. श्री. पु. भागवत ह्यांचं आमच्याकडे एक पत्र आहे, त्यात त्यांनी म्हटलं आहे, ''सुजाण साहित्याचा स्पर्श 'सत्यकथे'ला अनंत अंतरकर यांनी दिला.'' हा श्री.पु.नी अंतरकरांचा केलेला गौरवच नाही का?*

*'हंस'च्या कामगिरीची दखल घेणारा एक लेखकवर्ग आहेच. तो 'सत्यकथे'च्या लेखकवर्गातलाही आहे. कारण 'सत्यकथे'तले जी. ए. कुलकर्णी, दि. बा. मोकाशी, अरविंद गोखले हे लेखक अंतरकरांनी त्यांच्या काळात प्रकाशात आणलेले आहेत. 'सत्यकथे'च्या मुखपृष्ठावर विनोदी चित्र अंतरकरांनी त्या काळात प्रसिद्ध केलेलं होतं. 'हंस'च्या चाहत्या लेखकवर्गाला, रसिक वाचकांना 'हंस'चं एवढं कौतुक होत नाही आणि 'सत्यकथे'चं होतं याची एक हळहळ वाटते, हे प्रबंधलेखनाच्या वेळी माझ्या हाती आलेलं एक सत्य आहे. याचंही कारण मी माझ्यापुरतं मान्य केलेलं आहे, ते उघड करून सांगणं म्हणजे पुन्हा 'सत्यकथे'च्या प्रेमींना, 'सत्यकथा'वादी लेखकांना दुखावणं आहे. कदाचित त्यांच्या 'इगो'ला धक्का लावणारं आहे; पण 'सत्यकथे'बद्दल बोलताना, माझ्या वडिलांचा संबंध आल्यामुळे, माझ्यापुरतं जाणवलेलं 'सत्य' मी सांगायलाच हवं.*

*'सत्यकथे'एवढा 'हंस' गाजला नाही. कारण त्याकाळी अंतरकरांची 'मौज'सारखी प्रकाशनसंस्था नव्हती. आपलं पुस्तक निघणं हा लेखकांना सन्मान वाटत असतो. हा सन्मान 'सत्यकथे'च्या लेखकांना 'मौज प्रकाशन' मिळवून देत होतं. 'सत्यकथे'विषयी ममत्व वाटायला हेही एक महत्त्वाचं कारण आहे.*

***अनुराधा औरंगाबादकर**, पारिजात नगर, नाशिक*
*(जानेवारी १९९९)*

## हेवा वाटावा असे यश

*कालचा कालिदास विशेषांकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम फार उत्तम प्रकारे पार पडला.*

*कालिदास विशेषांकाची मूळ कल्पनाच अभिनव होती आणि त्याला साजेशीच कार्यक्रमाची आखणी होती. मी संगीतप्रिय असल्याने श्री. गजेंद्रगडकरांच्या बासरीवादनाची योजना मला विशेष भावली. तुम्ही केलेली वक्त्यांची निवड 'अंतर्नाद'च्या चोखंदळ वाचकांच्या १००% पसंतीस उतरेल अशीच होती.*

*श्रोत्यांच्या पसंतीस ही निवड पूर्णतः उतरली होती याची उत्तम साक्ष म्हणजे प्रचंड संख्येने त्यांनी केलेली उपस्थिती. फुले सभागृहातील अनेक साहित्यविषयक कार्यक्रमांना मी हजर राहिलेलो आहे, पण कालच्या वाचकांची जातकुळीच काही वेगळी होती. मला वाटते, 'अंतर्नाद'ने चार वर्षांतच मिळवलेली वाचकमान्यता व मराठी साहित्यक्षेत्रात मिळवलेले स्थान, यांसाठी वेगळ्या पुराव्याची आता आवश्यकता उरलेली नाही. अत्यंत अपुरी साधने व पुरेसा संपादकीय अनुभव हाताशी नसतानाही तुम्ही केवळ साहित्यप्रेमापोटी 'अंतर्नाद' सुरू केलेत. पण अल्पावधीत 'अंतर्नाद'ने मिळवलेले यश कोणाही संपादकाला हेवा वाटावा असे आहे.*

*कालिदास प्रत्यक्ष उपस्थित असता तर १९९१ सालातही आपल्या निर्मितीवर प्रेम करणारा एवढा मोठा वर्ग आहे हे पाहून त्याला आनंदाश्चर्याचा धक्का बसला असता. कार्यक्रमाच्या दरम्यान दिवे गेले असताना व मायक्रोफोन चालू नसताना शेकडो श्रोते पिनड्रॉप सायलेन्समध्ये दाद देत होते, हीदेखील तेवढीच आनंदाश्चर्याची गोष्ट होती.*

**मुकुंदराव किर्लोस्कर**, संपादन, एरंडवन, पुणे
*(सप्टेंबर १९९१)*

## शरद जोशींचे शेरे कंबरडे मोडणारे

*मी एक सामाजिक कार्यकर्ता आहे व मालेगावसारख्या 'विसंगत' वातावरणात गेली ४१ वर्षं निरनिराळ्या संस्थांत काम करीत आहे. समाजकार्याची आवश्यकता, त्याची लोकांकडून होणारी उपेक्षा हा माझ्या सततच्या चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे अंतर्नाद दिवाळी अंकातील 'स्वयंस्फूर्त कार्याचे समाजजीवनातील स्थान' या विशेष विभागाचं वाचन सहजतेनं झालं.*

*सर्वांत धक्कादायक विचार वाटले ते शरद जोशी ह्यांचे. शरद जोशी हे शेतकरी संघटनेचे नेते व शेतकऱ्यांचं दारिद्र्य हा त्यांचा सतत चिंतनाचा विषय. त्यामुळे प्रत्येक गोष्टीकडे त्याच दृष्टिकोनातून पाहण्याची त्यांनी वृत्ती. त्याचा सामाजिक परिणाम त्यांच्या प्रदीर्घ लेखातून दिसतो. लेखाचं शीर्षकच पहा, 'बस करा हे समाजसेवेचे ढोंग!' कुणालाही न पटणारं असं आणखी एक विधान ते करतात : ''शेतकरी आंदोलनात जितकी माणसं तुरुंगात गेली, तितकी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य-आंदोलनातही गेली नव्हती.''*

*''अशा स्वरूपाच्या कामाची समाजाला काहीही आवश्यकता नाही असे माझे स्पष्ट मत आहे'' हा शरद जोशींचा समाजकार्याबद्दलचा शेरा समाजकार्यकर्त्यांच्या आशेचं कंबरडं मोडणाराच ठरावा.*

*समाजकार्य हे माणसाला झिंग आणणारं असतं, हे खरं आहे. सुरुवातीला ते काम केवळ 'हॉबी' म्हणून, आवड म्हणून तो करतो व नंतर त्या कामाचं जबरदस्त व्यसन लागतं हे खरं आहे. त्यातील काही कार्यकर्ते भ्रष्टाचारी, स्वार्थी वृत्तीचे निघतात, हेही खरं आहे. पण हे काही सर्रास नियम म्हणून सांगता येणार नाही. कोपऱ्या कोपऱ्यावर स्थापन होणाऱ्या गणपती मंडळांच्या काम करण्याच्या पद्धतीवरून सर्रास सर्व सामाजिक संस्थांचं मूल्यमापन करणं योग्य होणार नाही. ते पॅच वर्कही असेल कदाचित, पण त्यात निदान समाजाच्या एखाद्या भागाला दिलासा निश्चित मिळतो व काम करणाऱ्याला समाधान*

*मिळतं. ह्या सामाजिक संस्थांचे आणखी एक महत्त्व म्हणजे जनतेच्या सेवेबरोबरच नवीन कार्यकर्त्यांना समाजसेवेचे प्रशिक्षण देणाऱ्याही त्या संस्था असतात. समाज कार्यकर्त्यांची एक परंपरा निर्माण करतात. नवीन तरुणांना व्यक्तिविकासाची संधीही त्या संस्थांद्वारा मिळू शकते, हेही नसे थोडके. सारांश, शरद जोशी ह्यांचा 'अशा संस्था म्हणजे निव्वळ भंपकबाजी' हा शेरा अस्थानी आहे. सच्च्या कार्यकर्त्याचा अपमान करणारा आहे. आपण करतो तेच खरं समाजकार्य, इतरांचं कार्य म्हणजे ढोंगबाजी अशा उथळ नजरेने सामाजिक संस्थांकडे पाहणे चूक आहे. तो अहंभाव आहे.*

**ॲड. दत्तात्रय कुलकर्णी,** मालेगाव, जि. नाशिक
*(जानेवारी २०००)*

## स्तिमित करणारी उपस्थितांची संख्या

*कालचा 'अंतर्नाद'च्या रवीन्द्रनाथ टागोर विशेषांकाचा नॅशनल फिल्म्स अर्काइव्हजमधील प्रकाशन समारंभ उत्तम प्रकारे पार पडला. 'अक्षर' माध्यमाला तुम्ही इतर माध्यमांची फार कौशल्याने जोड दिली होती. कार्यक्रमाचा प्रारंभच अमित मित्रा आणि त्यांच्या बंगाली सहकाऱ्यांच्या रवींद्रसंगीताने करून तुम्ही रवींद्रनाथांच्या कलाप्रेमाची ओळख करून दिली. प्रा. व. दि. कुलकर्णी यांच्या भाषणाने रवींद्रांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान श्रोत्यांना समजले तर, सत्यजित रे यांच्या डॉक्युमेंटरीतून रवींद्रांच्या जीवनाचे व प्रत्यक्ष कार्याचे दर्शन घडले. बहुतेक मराठी वाचकांना रवींद्रांच्या 'गीतांजली'ची व नोबेल पारितोषिकाची तेवढी ऐकून ओळख असते. पण २-२॥ तासांच्या अवधीत तुम्ही शांतिनिकेतनात नेऊन जणू श्रोत्यांची प्रत्यक्ष रवींद्रांशीच भेट घडवून दिलीत. या तुमच्या कामगिरीबद्दल 'अंतर्नाद'च्या विशेषांकाच्या वाचकांबरोबर कालच्या कार्यक्रमाचे श्रोतेही तुमचे ऋणी आहेत.*

*मी तुम्हांला शाबासकी देऊ इच्छितो ती दुसऱ्या एका कामगिरीबद्दल. कालची उपस्थितांची संख्या पाहून मी खरोखर स्तिमित झालो. एखाद्या लोकप्रिय चित्रपटास गर्दी व्हावी, तशी गर्दी काल होती. 'अंतर्नाद' आता सुसंस्कृत पुणेकरांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे याचीच ती निशाणी होती. 'अंतर्नाद'चे सामर्थ्य केवळ वर्गणीदार संख्येवरून मापणे अविचाराचे होईल. 'अंतर्नाद' आपल्या वाचकांच्या मनावर किती परिणाम करतो ही खरोखर त्याच्या सामर्थ्याची कसोटी मानली पाहिजे. त्या अर्थाने 'अंतर्नाद' पहिल्या वर्गात डिस्टिंक्शन मिळवून पास झाला आहे असे म्हटले पाहिजे.*

**मुकुंदराव किर्लोस्कर,** संपादन, एरंडवन, पुणे
(जुलै २०००)

## डावीकडेही नाही, उजवीकडेही नाही, केवळ सरळ : योग्य भूमिका

*गेल्या महिन्यात 'अंतर्नाद'चा पाचवा वर्धापनदिन साजरा झाला. त्या कार्यक्रमाला मी फक्त अनिल अवचट यांना ऐकण्यासाठी आलो होतो. कार्यक्रम आटोपशीर झाला. मासिकाचा संपादक शांतपणे व्यासपीठावर बसून राहतो आणि अवचटांची मुलाखत सुरू झाल्यावर प्रेक्षकांत जाऊन बसतो, याचं जरा आश्चर्य वाटलं. आपली भूमिका संपादकीयात मांडल्यानं आपल्याला भाषणाची गरज वाटली नसावी. पण असा प्रकार मी प्रथमच पाहत होतो.*

*अवचटांची मुलाखत नेहमीप्रमाणेच छान झाली. पण तरीही त्यासाठी तीन मुलाखतकारांची गरज नव्हती. काही प्रश्न इतके मोठे होते की त्या प्रश्नांनी श्रोतेही अस्वस्थ झाले होते. हे ओळखूनच की काय, अवचटांनी तसल्या मोठ्या प्रश्नांना छोटी उत्तरं दिली. हे टाळता येणं अशक्य नव्हतं. असो.*

*गेली चार वर्षं पुस्तकं-मासिकं यांच्या साम्राज्यात भटकंती करत असूनही 'अंतर्नाद' माझ्यापर्यंत आलं नाही याची खंत वाटली. प्रत्येक अंक वाचलाच पाहिजे असं एक मासिक मला या कार्यक्रमाच्या निमित्तानं मिळालं याचा आनंद आहे.*

*त्यानंतर काही जुने अंक मिळवून वाचले. कालिदास, रवींद्रनाथ व शेक्सपियर यांच्यावरील विशेषांक तर माझ्या संग्रहातील 'दुर्मिळ' विभागात जाऊन बसले.*

*राम शेवाळकरांनी सुरेश भट यांच्यावर लिहिलेला, 'एक करपलेला झंझावात' हा लेख अप्रतिम होता. तोंडात नेहमीच गोडवा असलेले, रसाळ बोलणारे राम शेवाळकर इतका सडेतोड लेख लिहू शकतात याची प्रथमच जाणीव झाली. त्या लेखातील प्रत्येक शब्द विचारपूर्वक मोजून-मापून लिहिल्याप्रमाणं वाटला.*

*सी.पं. खेर यांनी लिहिलेले 'बदलते भांडवलशाही' आणि 'बदलता समाजवाद' हे दोनही लेख माहितीपूर्ण होते. 'साम्यवाद' व 'समाजवाद' यांतील मूलभूत फरक मला, दुसरा लेख वाचून समजला. 'भांडवलशाही' व 'समाजवाद' यांच्या फक्त मर्यादा सांगून खेर थांबले नाहीत तर, भारतासाठी 'संमिश्र अर्थव्यवस्था' हाच खरा पर्याय आहे, हे त्यांनी निःसंदिग्धपणे सांगितलं.*

*सप्टेंबरच्या अंकातील 'कृष्णमूर्तींच्या सावलीत' हे संपादकीय वाचले. त्यातील शेवटचे तीन परिच्छेद संपादकांचे अंतरंग दाखवतात. त्या ओॲसिसमध्ये संपादकांनी पाहिलेले निवडुंग अस्वस्थ करून जातात. 'आपल्या मुलानं याच शाळेत शिकावं असं त्याला कधी वाटत असेल का? वाटत असेल तर ते कधी शक्य होईल का?' ह्या प्रश्नानं हृदयात कालवाकालव होते. 'विचारांच्या अभावाप्रमाणेच विचारांची अतिव्याप्ती हाही दोष!' हे वाक्य तर 'कोटेबल कोट' ठरावं. 'अंतर्नादपुढील आव्हानं' हे संपादकीय प्रांजळ मनोगत वाटलं. 'डावीकडेही नाही आणि उजवीकडेही नाही, केवळ सरळ जायचं' ही अंतर्नादची भूमिका अभिनंदनीय आहे; नव्हे ती काळाची गरज आहे.*

**विनोद शिरसाठ**, सदाशिव पेठ, पुणे
*(दिवाळी २०००)*

## मर्यादित यशही कौतुकास्पद

*तुम्ही आजीव वर्गणीदारांसंबंधीचा केलेला संकल्प अजून पुरा करू शकला नाही असे दिसते. तुम्ही वाढवून दिलेल्या मुदतीत म्हणण्यापेक्षा केलेल्या नव्या आवाहनाला पुरेसा प्रतिसाद मिळेल, अशी आशा वाटते. पण संकल्प समजा पुरा झाला नाही तरी खंतावू नये. आजवर नोंदल्या गेलेल्या आजीव वर्गणीदारांची संख्या नवल करावी अशी आहे.*

*माझ्या तरी माहितीत मराठी नियतकालिकांत एवढे यश मिळवलेले दुसरे उदाहरण नाही. तुमच्याइतक्या कल्पकतेने, योजनापूर्वक, एक प्रकारच्या व्यावसायिक कार्यक्षमतेने व सातत्याने या बाबतीत प्रयत्न करणाऱ्या दुसऱ्या संपादक-प्रकाशकाचेही नाही. खरे तर इंग्रजी साहित्याविश्वातही गंभीर साहित्यिक नियतकालिक केवळ वर्गणीदारांच्या आधारावर फार काळ तरी चालत नाही असे दिसते. जाहिरातींची वा विश्वस्तनिधींच्या, प्रतिष्ठानांच्या अनुदानांची मदत घ्यावी लागते.*

*हा सारा विचार करता तुमचे मर्यादित यशही कौतुकास्पद आहे. तुम्हांला व तुमच्या सहकाऱ्यांना उत्साहवर्धक वाटावे असेच ते आहे. त्याचबरोबर संपादकीय जबाबदारीचे भान वाढवणारे आहे. अर्थात तुम्हांला ते प्रथमपासून आहे. अधूनमधून एखाददुसऱ्या अंकातील साहित्याचा कस उतरल्याची शंका आली तरी ते भान उणावल्याची नाही. ते वाढते राहो व तुम्हांला त्यात अधिकाधिक यश मिळो.*

**श्री. पु. भागवत**, सायन (पूर्व), मुंबई
*(मार्च २००१)*

## श्रवणबेळगोळ : जैन संस्कृतीचे योगदान

*अंतर्नाद दिवसेंदिवस अधिक चोखंदळ अभिरुचीचे नि अर्थघन शैलीचे होत चालले आहे. अभिनंदन! या वर्षीच्या पहिल्या तीनही अंकांच्या मुखपृष्ठाची 'म' ही थीम खूपच आवडली. संपादकीयामध्ये आपण मराठी भाषेच्या आजवरच्या वाटचालीत अमराठी घटकांकडून झालेल्या योगदानाचा उल्लेख केला आहे नि कृतज्ञताही व्यक्त केली आहे. मूळ गुजराती असलेल्या चक्रधर स्वामींनी लिहिलेले 'लीळाचरित्र'. पहिले मुद्रण तंजावर व नंतर प. बंगालमध्ये. छापखाना केरळमधून आलेला. तोही पोर्तुगीजांनी आणलेला. पहिला मराठी शब्दकोश मोल्सवर्थ या इंग्रज गृहस्थाचा नि पहिली मराठी शाळा काढली ती इंग्रज सरकारच्या विलायती गव्हर्नरने! हा सारा महाराष्ट्राबाहेरच्या प्रदेशाकडून नि अमराठी घटकांकडून घडलेला इतिहास माझ्यासारख्या आजच्या मराठी वाचकाला अचंबित करतो.*

*माय-मराठीचे आणखी एक तीर्थस्थान म्हणजे कर्नाटकातले 'श्रवणबेळगोळ' हे ठिकाण! आजच्या मराठीच्या मुख्य म्हणवून घेणाऱ्या प्रवाहाला या जन्मस्थानाचा विसर पडलेला असला, तरी श्रवणबेळगोळच्या ५७ फूट उंचीच्या ग्रॅनाईटच्या अखंड कातळातल्या गोमटेश्वराच्या भव्य मूर्तीच्या पायाशी मराठी भाषेतला पहिला शिलालेख खोदलेला आहे, हे कसे विसरता येईल? त्याला एक हजाराहून जास्त वर्षे होऊन गेली. या मूर्तीच्या पायाशी दोन मराठी वाक्ये आहेत. पहिले 'श्री चावुण्डराजें करवियलें' व दुसरे 'श्री गंगराजे सुत्ताले करवियले' असे आहे. श्री चावुण्डराजें करवियलें' हे मराठीतले पहिलेच लिखित वाक्य आहे. मायमराठीच्या आजवरच्या वाटचालीतली, जैन संस्कृतीने प्रदान केलेली ही अजोड आद्यनिर्मिती मराठी लिहायला, बोलायला व वाचायलाही प्रवृत्त करते, यात शंका नाही.*

**डॉ. महावीर अक्कोळे,** जयसिंगपूर, कोल्हापूर
*(मे २००३)*

## वास्को द गामा आणि आपण भारतीय

*'अंतर्नाद'च्या जुलैच्या अंकातील 'वास्को द गामा आणि गॉड्स ओन कंट्री' हा आपला लेख वाचनीय व माहितीपूर्ण झाला आहे. त्या लेखात केरळमधील देवळे व इतर नेहमीची प्रेक्षणीय स्थळे यांचा उल्लेख आपण कटाक्षाने टाळला, हे उत्तम. कारण ही माहिती प्रवासवर्णनात्मक पुस्तकांतून मिळू शकते.*

*भारतीयांचा पिंड परदेशीयांच्याकडून काही शिकावे, असा नव्हता (अजूनही नाही). तुम्ही म्हणता त्याप्रमाणे वास्को द गामाप्रमाणे धाडस करून, गलबताचे तंत्रज्ञान हस्तगत करून युरोपात जावे असे त्यांच्या मनात येणे शक्य नव्हते. यामागे आपला जात्याच अल्पसंतुष्टपणा व त्यावेळचा चौकसपणाचा व उत्सुकतेचा अभाव ही कारणे असावीत. देशाटन करणे हे धार्मिकदृष्ट्या निषिद्धच नव्हे, तर पापही मानले जात होते. वास्को द गामाबद्दल आश्चर्य होते, पण कुतूहल वा जिज्ञासा नव्हती.*

*औद्योगिक क्रांती युरोपात घडण्याअगोदर त्या खंडाला अनेक सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अडथळ्यांतून व स्थित्यंतरांना तोंड देत पुढे जावे लागले. ही जडणघडण दोन शतके चालू होती. याउलट भारतात 'ठेविले अनंते तैसेची राहावे' अशी अल्पसंतुष्ट वृत्ती होती. देव व दैव यांचा पगडा होता. अजूनही हा स्थायिभाव बदललेला नाही. यातून कुठली औद्योगिक क्रांती या देशात होणार? व कशी? तशी औद्योगिक क्रांती घडण्यास ज्या वैचारिक बैठकीची व परिस्थितीची पार्श्वभूमी हवी असते, त्या वैचारिक बैठकीचा व परिस्थितीचा पूर्ण अभाव या देशात होता.*

*एकदा माझा एक ऑस्ट्रियन मित्र मला म्हणाला होता, ''आमच्याकडे खार, मारमोट यांच्यासारखे प्राणी जंगलात असतात, उन्हाळ्यात हे प्राणी आपल्याला हिवाळ्यात लागणाऱ्या फळांची बेगमी करून ठेवतात. हिवाळ्यात एकदा बर्फ पडू लागल्यावर काहीही हाती लागणार नाही, याची त्यांना कल्पना असते. याउलट तुमच्या उष्णकटिबंधातील ती स्वच्छंद संचार करणारी माकडे, वानरे पाहा. त्यांना भविष्यासाठी काही तरतूद करावी, असे वाटत नाही. जसा या प्राण्यांचा स्वभावगुण, तसाच तुमच्या-आमच्या माणसांतही तो मला दिसतो!'' मला त्याचे विचार हसण्यावारी नेता आले नाहीत. सांगण्याचे तात्पर्य, भवितव्याचा विचार न करता बेपर्वाईने वागणाऱ्या देशात कुठली आली औद्योगिक क्रांती?*

*'आपल्या भारतात असे व्हावयास हवे होते,' या आपल्या हुरहुरीमागे एक प्रकारचे सुप्त देशप्रेम असावे. पण असे वाटणे व प्रत्यक्ष घडणे, यांतील जमीन-आसमानाची तफावत भारतात औद्योगिक क्रांती घडवून आणत नाही.*

*प्रगत, साक्षर व सर्वधर्मसमानता मानणाऱ्या व भारतीय मूल्यांची जपणूक करणाऱ्या, सर्व भारताला ललामभूत ठरलेल्या अशा केरळाची आपण ओळख करून दिली, याबद्दल आभार.*

**डॉ. अविनाश बा. जगताप**, बिनिंगेन, स्वित्झर्लंड
*(सप्टेंबर २००४)*

## *'दीप-शिखा मॅनेजर्स'*

*श्री. शरू रांगणेकर यांच्या 'दीप-शिखा मॅनेजर्स' या मूळ इंग्रजी लेखाचा श्री. अ. पां. देशपांडे यांनी केलेला अनुवाद आवडला. लेखातील रांगणेकर यांचा माझ्याविषयीचा गौरवपर उल्लेख अंगावर मूठभर मांस चढवून गेला! (आणि ते शरीरावर नको त्या ठिकाणी चढत असतं, हे मी सोयीस्करपणे विसरलो!)*

*रांगणेकर यांचं व्यवस्थापन क्षेत्रातील योगदान मोठं आहे. त्यांना मी मानतो. पण एक प्रश्न पडला — त्यांच्या लेखाचं शीर्षक अंतरंगाला विसंगत तर नाही?*

*रांगणेकर यांनी 'विक्रम साराभाई स्पेस सेंटर'ला १९८१च्या सुमारास भेट दिली. माणूसकेंद्रित व्यवस्थापन संस्कृती मागे ठेवून साराभाई गेल्याला तेव्हा दहा वर्षं झाली होती. मी एका कामगाराबाबत जे केलं असं रांगणेकर म्हणतात, तो खास साराभाईंच्याच कार्यसंस्कृतीचा आविष्कार होता.*

*आमच्यासारखी हजारो माणसं साराभाईंच्या व्यवस्थापन पद्धतीत आनंदाने डुंबत होती. जेव्हा शरू रांगणेकर यांनी आम्हाला पाहिलं, त्याच्या आधी दहा वर्षं (म्हणजे साराभाई असताना) त्यांनी आम्हाला पाहिलं असतं तर, कदाचित तेही आमच्याबरोबर नाचले असते!*

*'विक्रम साराभाई अंतरिक्ष केंद्रा'चा संचालक म्हणून बरीच वर्षं काम केल्यावर मी दिल्लीला बढतीवर गेलो. साराभाईंना जाऊन तेव्हा जवळजवळ १५ वर्षं झाली होती. आज ३३ वर्षं झाली आहेत. साराभाई संस्कृतीची मूळ झळाळी आज थोडी ओसरलीय; पण तरीही, भारत सरकारच्या अगडबंब नोकरशाहीत 'अंतरिक्ष विभाग' आजही सर्वांत कार्यक्षम व देशाची शान सतत उंचावत ठेवणारा आहे असं एकमुखानं म्हटलं जातं.*

*ज्यांनी या कार्यसंस्कृतीची मुहूर्तमेढ रोवली आणि ती माणूसकेंद्रित असतानाही वस्तुनिष्ठ राहावी यासाठी अनेक निकोप रीतिरिवाज रुजवले, ते विक्रम साराभाई आदर्श मॅनेजर होते, पण 'दीप-शिखा' नव्हते. त्यांच्यासारखा मॅनेजर, रांगणेकर म्हणतात त्याप्रमाणे ध्येयनिष्ठा, कृतिशीलता व स्वामिनिष्ठा अशा तिन्ही गुणांनी संपन्न हवाच; कालिदासाच्या उपमेतील इंदुमतीसारखा तो देखणा व 'आधुनिक राजेरजवाड्यां'च्यावर छाप टाकणारा असेल तर फारच उत्तम. पण तो इंदुमतीसारखा, जिथे जाईल तिथलाच भाग तेवढा उजळवून टाकणारा व पुढे गेल्यावर मागचा भाग काळोखात लोटणारा असा नको. कारण तसा तो असेल तर विधायक, पद्धतशीर कार्यप्रणालीची परंपरा तो निर्माण करू शकणार नाही. अराजकता माजलेल्या देशात एखाद्या लष्करी हुकूमशहाने काही काळ शिस्त आणावी आणि तो काळाच्या पडद्याआड गेल्यावर 'येरे माझ्या मागल्या' व्हावं, अशा पद्धतीचा 'दीप-शिखा' मॅनेजर शरूजींना नक्कीच अभिप्रेत नसावा. फक्त, इंदुमतीच्या काव्यमय उपमेमुळे 'आदर्श मॅनेजर'चा अपभ्रंश 'दीप-शिखा मॅनेजर' असा कदाचित झाला असावा.*

*थोडक्यात, माणसाला उच्च-नीचतेच्या चष्म्यातून न बघणारी, माणसाला माणूस असं मानणाऱ्या व्यवस्थापन संस्कृतीची पेटती पणती आमच्यासारख्यांच्यासाठी मागे ठेवणारी विक्रम साराभाई, सतीश धवन यांच्यासारखी माणसं मला खरी आदर्श मॅनेजर्स वाटतात. शरू रांगणेकर यांच्यातील व्यवस्थापन तज्ज्ञाला त्रिवेंद्रमच्या भेटीत ती संस्कृती जाणवली आणि म्हणून वीस वर्षांच्या प्रदीर्घ कालानंतरही त्यांना विक्रम साराभाई अंतरिक्ष केंद्रांतली माणसं आठवली, असं मी मानतो.*

**डॉ. वसंत गोवारीकर,** मॉडेल कॉलनी, पुणे
(एप्रिल २००५)

## *दुर्बोध कविता*

*जानेवारी २००५ अंकातील प्रा. विलास पाटील यांचे आधुनिक कवितेतील दुर्बोधतेबद्दलचे पत्र वाचल्यानंतर मराठी कवितेवर प्रेम करणाऱ्या अनेक रसिकांना आपल्याच भावनांना या पत्राने तोंड फोडले आहे असे वाटेल. पत्र फारच अर्थपूर्ण आणि कविप्रेमींच्या दुखण्यावर नेमके बोट ठेवणारे आहे.*

*मी यंदाचे निवडक आणि दर्जेदार असे दहा-बारा दिवाळी अंक वाचले. अंक उघडल्यावर प्रथम मी सर्व कविताच वाचते. अंकातील निदान तीन-चार कविता माझ्या डोक्यावरून, एकही केस बाका न करता, भराभर पार झाल्या. नेहमी जुन्या-नव्या कविता वाचणाऱ्या (क्वचित स्वत:ही बरे-वाईट, पांढऱ्यावर काळे करणाऱ्या) माझ्यासारख्या काव्यरसिकाला अलीकडच्या कवींच्या कविता अजिबात कळू नयेत, ही व्यथा मला फार त्रास देते. आपण स्वत:च या कवितांबाबत कमी पडतो, असे समजून मी हा विचार बाजूस सारते. माझेच दुर्दैव!! असो.*

**पद्मा लोकूर,** प्रभादेवी, मुंबई
(एप्रिल २००५)

## *नियतकालिके बुडण्याचे एक कारण*

*जानेवारी महिन्यात 'साधना मीडिया सेंटर'मध्ये मी अंतर्नादबरोबरच इतर सात मराठी नियतकालिकांची वर्गणी भरली. बरेच दिवस अंकांची वाट पाहून संबंधितांना 'साधना' व मी (अशा दोघांनीही) पत्रे लिहिली; आठवण केली. पण मंडळी काही आजपर्यंत हललेली नाहीत. वर्गणी गिळून, सुस्तावून पडून आहेत. पत्राचे साधे उत्तर देण्याचेही सौजन्य नाही.*

*यातली काही नियतकालिके खास आणि खास करून पुरोगामी चळवळीतली आहेत, असे त्यांचे सगेसोयरे सांगत असतात. मराठी नियतकालिके बुडतात, चालत नाहीत, त्यामागचे एक कारण हे सामाजिक नीतिमत्तेचा अभाव. आणि जाणत्या, रसिक वाचकांसंबंधीची बेमुर्वतखोर वृत्ती! पुढे-मागे यावर एक लेखच लिहावा असा विचार आहे.*

*'अंतर्नाद'बद्दल आनंद प्रकट करतो तो अशासाठी की असा ताप त्यांच्याकडून झाला नाही. अंक नियमितपणे येत आहेत. व्यावसायिक निष्ठा हे व्यवसायवृद्धीचे मायपोट असते. या निमित्ताने अभिनंदनाची संधी साधून घेतो.*

**प्रा. डॉ. एस. एस. भोसले,** सिडको, औरंगाबाद
(सप्टेंबर २००५)

## ‘अंतर्नाद’सारखी मासिके चालावीत

*नुकतेच तुमचे संपादकीय प्रकट चिंतन वाचले आणि ऊर भरून आला. काय, योगायोग, की मागच्याच आठवड्यात श्री. आनंद अंतरकर यांचे ‘रत्नकीळ’ पुस्तक वाचले आणि असेच बधिर व्हायला झाले. ‘हंस’, ‘मोहिनी’, ‘नवल’ यांसारखी तुफान लोकप्रिय आणि दर्जेदार मासिके चालवणारे आनंद अंतरकर एका खिन्न क्षणी मासिके बंद करून बसले. त्यांनी म्हटलेय पुस्तकात एके ठिकाणी, ‘‘मराठी भाषेचे नि साहित्याचे एकंदर व्यवहार, त्यांची रीत, इथले कंपू, अनैतिकता या साऱ्यानं मन विटून गेलं होतं. फुटाफुटावर बोकाळलेल्या भ्रष्टाचाराला, निलाजरेपणाला, उद्दामपणाला तोंड देताना वेड लागायची पाळी येते. असह्य मनस्ताप होतो. तीन मासिकं, प्रेस, ‘विश्वमोहिनी’ची पुस्तकं, यांचा कारभार पेलताना मन आणि शरीर मोडकळीला येतं. कधी कधी वाटतं, एका फुंकरीसरशी या साऱ्यापासून सुटका करून घ्यावी. जळो हे भयंकर उपेक्षित जिणं!’’*

*मला या क्षणी माझ्या वडिलांची, कै. अनंत भालेराव यांची आठवण प्रकर्षाने होते. सुरुवातीला ‘हैद्राबादी मराठवाडा’ हे साप्ताहिक होते. नंतर ‘औरंगाबादी’, प्रथम द्विसाप्ताहिक नि नंतर दैनिक केले. त्या दैनिकाचा खप कमी असूनही त्याचा जनमानसात, सरकारदरबारी आणि राजकारणात खूपच दबदबा होता. ज्या काळात ‘सत्यकथा’ लोप पावत होती, त्या काळात त्यांच्या दिवाळी अंकाचे व ‘प्रतिष्ठान’चे भरघोस स्वागत होत असे. दर्जाही अप्रतिम असे. त्यांना नंतर ‘मायेस्थेनिया ग्रॅव्हीस’ (अमिताभचा आजार) झाला आणि त्यांनी खूप प्रयत्न करूनही नंतर ‘मराठवाडा’ बंदच झाला. बाबा दळवी, पन्नालाल सुराणा, निळू दामले इत्यादी व्यावसायिक दृष्टीचे संपादक नेमूनही. ज्या ज्या वेळी त्यांना पैशांची अडचण येई (म्हणजे बऱ्याच वेळा!) तेव्हा ते चक्क चार-पाच जणांना घेऊन देणग्या गोळा करायला निघत. जनाधारावरच असली दैनिके चालतात, असा त्यांचा ठाम समज होता. असल्या जनाधारावरच त्यांनी औरंगाबादी पहिले रोटरी मशिन आणले होते.*

*लॉजिकने हे खरेच पटते, की माणसासारखी माणसे जातात, पण कोणाचे काही अडत नाही. लहानपणी क्षणभरही आई नजरेआड झाली, तर जे मूल आकांत करते, तेच मोठे झाल्यावर, अमेरिकाला वसून झाल्यावर आईची खुशालीही विचारू धजत नाही. ‘सत्यकथा’ बंद पडली तर काही अडले का? हे तर खरेच पण गेल्या दहा वर्षांत अंतर्नादने ज्या साहित्यराशी रचल्यात त्या अनमोलच नाहीत का?*

*त्रुटींचा शोध घेऊ या. काय काय करता येईल, त्याची यादी करू या. ‘प्रतिसाद’मध्ये ज्या तळमळीने वाचक तुम्हांला पावती देतात, त्यावरून पैशाचे आवाहन केलेत, तर ते नक्कीच मदत करतील. तुम्ही ज्या ८३५ जणांना आजीव सभासदत्वाचे दोन-दोन हजार रुपये परत केलेत, त्यांनाच तुम्ही मदतीचे साकडे घातलेत तर? शेवटी ‘अंतर्नाद’सारखी मासिकं चालावीत, ही मराठी सारस्वताची नितांत गरज आहेच. आणि ह्या कामी तुमच्या प्रसिद्ध जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे, ‘नव्या जगाची स्वतःपासून सुरुवात’ करण्याकरिता सोबत पाच जणांच्या वर्गणीचा चेक व त्यांचे पत्ते पाठवीत आहे. स्वीकार असावा.*

**अरुण अनंत भालेराव**, मुंबई ४००००७

*(दिवाळी २००५)*

## ज्ञानप्रबोधिनी आणि सिंबायॉसिस

*मी हाडाचा (किंवा चरबीचा म्हणा) शिक्षक आहे. १९४८ साली बी.ए.ला पहिला वर्ग मुंबई विद्यापीठात मिळविल्यानंतर दोन वर्षे मी कॉलेजचा फेलो होतो. माझे कॉलेज म्हणजे तीर्थरूप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुप्रसिद्ध सिद्धार्थ कॉलेज – मुंबईचे. नंतर एम.ए. झाल्यावर मला लेक्चरर नेमण्यात आले. नंतर I.A.S., तिथून I.R.S. १९५७ साली ही नोकरी सोडून फर्ग्युसन कॉलेजात असिस्टंट प्रोफेसर. मग १९७५ साली मला नको असताना तेथील प्राचार्यपद गळ्यात पडले. पाच वर्षे. त्यानंतर आणखी दोनदा – प्रत्येकी तीन तीन वर्षे. म्हणून प्राचार्यपदाचा अनुभव अकरा वर्षे. पुढे विद्यापीठात प्रकुलगुरू. नंतर सिंबायॉसिस. इथे मी १९९४पासून आहे. उपाध्यक्षपदावर. व्यवस्थापन-समितीचा सभासद आहेच. तुम्ही मला ‘आत्मचरित्र’ लिहायला सांगितले नाहीत हे मी विसरलेलो नाही. पण माझ्या दीर्घ अनुभवानंतर मी शिक्षण या विषयावर थोड्याअधिक अधिकाराने बोलण्याचा प्रयत्न करू शकतो हे स्पष्ट व्हावे.*

*श्री. राजीव रानडे यांनी आपल्या दीर्घ लेखात ‘ज्ञानप्रबोधिनी’ला ‘विलक्षण स्वप्न’ वगैरे म्हटले आहे. पस्तीस वर्षे या ना त्या प्रकारे ज्ञानप्रबोधिनीशी संबंध ठेवून नंतर ही संस्था त्यांनी सोडली असेही ते सांगतात. ज्याचा आपण जवळजवळ तीन तपे पाठलाग केला, ते केवळ एक स्वप्न होते असे उमजण्यास इतक्या कुशाग्र बुद्धीच्या रानडेसाहेबांना पस्तीस वर्षे लागली याचे खूप नवल वाटते. माझेच उदाहरण घ्यायचे तर माझे मोठे बंधू श्री. अमरेंद्र गाडगीळ यांच्या प्रेरणेने मी संघात (R.S.S.) जायला लागलो, तेव्हा मी सातआठ वर्षांचा असेन. शिवाजी मंदिरात भरणाऱ्या बालशाखेत मी जायचो. तिथला कार्यक्रम म्हणजे खेळ, कवायत, कधीकधी परेड, बौद्धिक वर्ग, ध्वजप्रणाम, प्रार्थना आणि अखेर ‘वीकिर’ (समाप्त). ध्येय कोणते? हिंदुसंघटन. म्हणजे काय? कशासाठी? कोणीही, कधीही आम्हा ‘बालांना’ (बाल-शाखेतल्या स्वयंसेवकांना) समजेल अशा शब्दांत ते सांगितले नाही. या तोच-तोपणाला कंटाळून मी स्वतः होऊन संघ सोडला. तेव्हा मी फारतर इंग्लिश दुसरीत असेन, किंवा तिसरीत. मी हे लिहिताना खूप शेखी मिरवतो आहे असे विशेषतः रानडेसाहेबांना वाटणे शक्य आहे. पण तसे त्यांना वाटले तरी मी समजू शकतो. कारण त्यावेळी आमच्या पिढीला संघाने किती मोहिनी घातली होती, याची कल्पना त्यांना असणार नाही. त्यामुळे मी स्वेच्छेने, काही वर्षांतच संघ सोडला याचे त्यांना महत्त्व वाटणार नाही.*

*श्री. अप्पा(साहेब) पेंडसे यांना मी ओळखत असे. तेव्हा ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात होते. अमरेंद्र गाडगीळ हे माझे मोठे भाऊ संघातील अधिकारी वर्गात होते. अप्पा पेंडसे किंवा ज्ञानप्रबोधिनी यांनी काही मोलाचे, महत्त्वाचे काम केले हे खरे, पण ते टिकाऊ स्वरूपाचे ठरले नाही. ध्येय पाहिजे हे खरे, पण त्याच्या पूर्तीसाठी प्रेरित असे कार्यकर्तेही पाहिजेत. दुसरे म्हणजे ध्येय हे रेखीव (well-defined) पाहिजे. कार्यकर्त्यांच्या निर्वाहासाठी पैसा हवा. सातत्य आवश्यक*

आहेच. अप्पा हे सज्जन होते, विद्वान होते, त्यांचे हेतू उत्तम होते; पण प्रत्यक्षात ते काही मोठे, टिकाऊ कार्य निर्माण करू शकले नाहीत. पुण्यातही ज्ञानप्रबोधिनी म्हणजे काय याची सदाशिव पेठेच्या पलीकडे फारशा मंडळींना कल्पनाही नसावी.

श्री. अशोक निरफराके एस.एस.सी. बोर्डात पहिले आले होते हे मी पेपरात वाचले होते. पण तेव्हापासून पुढे त्यांची काहीच माहिती मला नव्हती. अर्थात माझ्या त्यांच्याबद्दलच्या अज्ञानाला मीच जबाबदार आहे हे निःसंशय. त्यांनी 'ज्ञानप्रबोधिनी' आणि ती. अप्पांसंबंधी श्री. रानडे यांच्या लेखाची दुसरी बाजू मांडणारे बरेच काही अंतर्नादमध्ये लिहिले आहे. त्यांनी ज्ञानप्रबोधिनीबाबत जी काही भूमिका अखेरीस घेतली, ती मला समाधानकारक वाटत नाही. अर्थात ते असे म्हणू शकतात, की 'Who is this Bal Gadgil? What does he know about अप्पा आणि ज्ञानप्रबोधिनी?' तर त्यांच्याइतकी मला 'ज्ञानप्रबोधिनी' परिचित नाही हे मान्य केलेच पाहिजे.

आता थोडे डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या सिंबायॉसिस या शिक्षणसंस्थेविषयी. समयसूचकता आणि दूरदृष्टी हे गुण डॉ. मुजुमदारांच्यामध्ये असल्यामुळेच त्यांनी दृष्ट लागेल असे कार्य केले. सुरुवात तशी साधी. परदेशी विद्यार्थ्यांसाठी आईच्या घरापासून दूर असे 'माहेर' निर्माण करायचे. पुढे ते इतके वाढले.

आता पहा, की डॉ. मुजुमदार हेही सुरुवातीला आर्थिकदृष्टीने कफल्लकच होते. बोलूनचालून आमच्या फर्ग्युसन कॉलेजातील असिस्टंट प्रोफेसर. शून्य भांडवलातून त्यांनी कोट्यवधीची निर्मिती केली. सगळी पुन्हा संस्थेसाठी वापरली.

विद्यार्थ्यांची आणि पालकांची गरज, शिवाय व्यवसाय-उद्योगांची गरज यांतून मग एकापाठोपाठ एक अशा अनेक शिक्षणसंस्था मुजुमदारांनी स्थापन केल्या. संगणक, इंटरनॅशनल बिझिनेस, ह्यूमन रिसोर्सेस डेव्हलपमेंट (H.R.D.), इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (I.T.), टेलेकम्युनिकेशन, जिओइन्फर्मेटिक्स, इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन, फॅशन – तुम्ही म्हणाल ते ते सर्व विषय. सिंबायॉसिसमधल्या या सर्वच प्रकारच्या शिक्षितांना इतकी मागणी आहे, की तेथील असंख्य विद्यार्थ्यांना Hundred percent placement मिळेल याची शाश्वती वाटते. विद्यार्थी आणि पालक यांना दुसरे काय हवे असते? शिवाय सरासरी वार्षिक वेतन तीन ते पाच लक्ष रुपये.

गुणवत्ता व उत्कृष्टता (quality and excellence) हे दोन शब्द म्हणजे डॉ. मुजुमदारांचे watch-words. सांगायला आनंद वाटतो, की SIBM (Symbiosis Institute of Business Management) या संस्थेला हिंदुस्थानातील उत्तम व्यवस्थापन शिक्षण संस्थांत नुकताच चौथा क्रमांक मिळाला. गुणवत्तेकरिता मशहूर असलेल्या दोनतीन I.I.M.s देखील S.I.B.M.च्या खाली आहेत.

अर्थात तसे पाहिले तर ज्ञानप्रबोधिनीदेखील आता काही बंद पडलेली नाही, तिचे कार्य चालूच आहे. कदाचित असे असेल, की त्या संस्थेचा जीवच लहान. म्हणून तिची मोठ्या प्रमाणात वाढ झाली नाही. शेवटी असे म्हणावेसे वाटते, की जो तो आपल्या शक्तीप्रमाणे आपले काम करीत राहतो. असे विधायक कार्य करणारे अनेक असतील तर समाजाचे भलेच होईल. डॉ. मुजुमदार, डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. पतंगराव कदम या सर्वच मंडळींनी केलेले कार्य महत्त्वाचे व मोलाचे आहे. उगाच 'तथाकथित शिक्षणमहर्षी' असे म्हणून त्यांची हेटाळणी करण्यात मतलब नाही.

**प्रा. बाळ गाडगीळ,** एरंडवन, पुणे ४११००४.
(दिवाळी २००६)

## आत्मीयतेपोटी देणगी

माझ्या 'जाय काय जूय?' ह्या कोंकणी पुस्तकाला २००६ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. या पुरस्काराबरोबर मला रु. ५०,००० चा धनादेश मिळाला. हल्लीच गोवा शासनाने सगळ्या साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या गोमंतकीय लेखकांचा सन्मान केला. त्यावेळी गोवा शासनातर्फेही मला रु. ५०,००० मिळाले.

या दोन्ही रकमांत माझी स्वतःची थोडी रक्कम घालून मी मला आदरणीय असलेल्या तीन प्रकाशनसंस्थांना प्रत्येकी रु. १,००,००० ची देणगी देण्याचे ठरवले आहे. ज्येष्ठ कोंकणी लेखक व गांधीवादी विचारवंत रवींद्र केळेकर 'जाग' ह्या मासिकाचे संपादन करतात व 'जाग' नावाची त्यांची प्रकाशनसंस्था आहे. त्या 'जाग' प्रकाशनाला, तसेच पुण्याच्या 'साधना प्रकाशन'ला व 'अंतर्नाद'ला ही देणगी द्यावी असे मला वाटले. मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या वृद्धीसाठी अंतर्नादच्या माध्यमातून आपण करत असलेल्या अथक प्रयत्नांबद्दल माझ्या मनात अतीव आदराची भावना आहे. या भावनेपोटी आणि अंतर्नादविषयी वाटत असलेल्या आत्मीयतेच्या नात्यापोटी ही छोटीशी देणगी पाठवतो. तिचा स्वीकार करावा.

**दत्ता दामोदर नायक,** मडगाव, गोवा
(दिवाळी २००७)

## एक बाब खटकली

'अंतर्नाद'चा जुलैचा अंक परवा मिळाला, सहज चाळतानाच पूर्ण वाचल्याशिवाय राहवले नाही.

श्रीमती माणिक खेर यांचे अभिनंदन करावयास हवे. आपला उद्देश साध्य करताना आलेल्या अडचणींतून त्यांनी कल्पकतेने मार्ग काढल्याचे त्यांच्या जुलै अंकातील लिखाणातून लक्षात आले. श्रीमती कविता महाजन यांची त्या अंकातील स्नेहा अवसरीकर यांनी घेतलेली मुलाखत उद्बोधक आहे. त्यांचा आत्मविश्वास त्यांच्या शब्दांतून व्यक्त होतो. कृष्णात खोत यांचा 'गोंडोलीकर' चटका लावतो, तर रामदास भटकळांचे आजारपणातील अनुभव ('ते नऊ दिवस') आशेची उभारी देतात.

'अंतर्नाद'च्या विद्यमाने पुण्यात पार पडलेल्या 'कथामंथन' या कथालेखन शिबिराच्या वृत्तांताने ऑगस्ट अंकाची बरीच पाने व्यापली आहेत. ते योग्यच आहे. एक गोष्ट मात्र ती पाने चाळताना खटकली. हे 'कथामंथन' फक्त पुणे-मुंबई शहरातील कथालेखक व समीक्षकांना संधी देणारे होते, असे जाणवले. ग्रामीण महाराष्ट्रातील काही अप्रसिद्ध लेखकांना प्रसिद्धीच्या झोतात

*आणण्याचा शिरस्ता अंतर्नादने यापूर्वी जपला आहे. त्या धोरणाला अनुसरून पुण्याबाहेर राहूनही साहित्यसेवा करणाऱ्यांना 'कथामंथन'सारख्या जाणिवा विस्तारणाऱ्या उपक्रमात सहभागी करून घेणे योग्य झाले असते. खटकलेली बाब निदर्शनास आणून दिल्याशिवाय राहवेना, म्हणून हे पत्र.*

**देवकिसन सारडा,** नाशिक
(दिवाळी २००७)

## *एकेरी उल्लेख आणि पारंपरिकता*

*यास्मिन शेख यांनी श्री. म. माटे यांच्यावर लिहिलेला हृदयंगम लेख वाचला. माटे यांचे सुस्पष्ट व्यक्तिचित्रण आणि लेखिकेचे उत्कट भावदर्शन या दोन्ही दृष्टींनी लेख प्रशंसनीय आहे. मात्र, उत्कट गुरुभक्ती अनाठायी समर्थन करण्यास कशी प्रवृत्त करते, याचे एक मजेदार उदाहरणही या लेखात आहे.*

*यास्मिन शेख लिहितात, ''आम्ही महाविद्यालयात असताना ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, शिवाजी इ. थोर पुरुषांचा एकेरी उल्लेख करण्याची पद्धत होती. या एकेरी उल्लेखाने त्या थोरांचा उपमर्द करावा असा त्याचा अर्थ नव्हता. ऐतिहासिक काळात जमा झालेल्या व्यक्तींचा असा एकेरी उल्लेख त्या काळात होत असे... हे आजच्या पिढीला आक्षेपार्ह वाटू नये म्हणून हे स्पष्टीकरण देते.''*

*तथापि त्यांनी माटे यांच्या व्याख्यानातील त्यांचे उद्गार जे उद्धृत केले आहेत, ते पुढीलप्रमाणे आहेत : ''**तुकारामाला** (एकेरी उल्लेख) प्रपंचाबद्दल प्रश्न पडला. प्रपंच मिथ्या असून परमार्थ श्रेष्ठ होय असा उंच घोष **करणारा** (एकेरी उल्लेख) प्रपंचविन्मुख तुकाराम हे महाराष्ट्राचे एक स्वतंत्र स्फुरण आहे. तर संपूर्ण महाराष्ट्रावर राज्य **करणारा** (एकेरी उल्लेख) शिवाजी हा (एकेरी उल्लेख) प्रपंचशूर...*

*''समकालीन रामदासांनी (एकेरी उल्लेख नाही) जगाचे मिथ्यत्व स्वत:पुरते खरे मानले; ...स्वत: **ते** (एकेरी उल्लेख नाही) विरागी **होते** (एकेरी उल्लेख नाही); पण **त्यांनी** (एकेरी उल्लेख नाही) अखख्या महाराष्ट्राचा संसार केला... 'तर्क तो अर्क जाणावा' असा संदेश **देणारे** (एकेरी उल्लेख नाही) रामदास म्हणजे प्रपंचविन्मुखता आणि प्रपंचशूरता यांचा अत्यंत मनोज्ञ मिलाफ.''*

*एकेरी उल्लेख केला जाणाऱ्यांच्या यादीत यास्मिन शेख रामदास, तुकाराम, शिवाजी यांचा एकत्र उल्लेख करतात आणि 'ऐतिहासिक काळात जमा झालेल्या व्यक्ती' असा त्यांचा सामाईक गट करतात. प्रत्यक्ष उद्धरणात मात्र या 'ऐतिहासिक काळात जमा झालेल्या व्यक्ती'पैकी तुकाराम आणि शिवाजी यांचा एकेरी उल्लेख येतो, पण रामदासांचा मात्र एकदाही एकेरी उल्लेख येत नाही.*

*तुकाराम आणि शिवाजी यांचा उपमर्द करण्याचा माटे यांचा हेतू होता, असे कोणीही म्हणणार नाही. उलट या दोन्ही महान व्यक्तींचा यथोचित गौरवच त्यांनी केलेला आहे. तथापि माटे यांच्यासारखा विचक्षक, उदारमतवादी व प्रगतिशील लेखकाच्या मानसिकतेचे एक अंग कसे (त्यांच्याही नकळत) पारंपरिक धारणेने घडविलेले असते, हे मात्र यातून उघडकीस येते आणि उत्कट गुरुभक्तीच्या प्रभावाने काही गोष्टी यास्मिन शेख यांनी विनाकारण सोप्या करून स्वीकारलेल्या आहेत आणि समर्थनाचा व्यर्थ खटाटोप केला आहे याची गंमत वाटते.**

**प्रा. डॉ. निशिकांत मिरजकर,** दिल्ली विद्यापीठ
(जुलै २००८)

## *'सागरास'ची जन्मकथा*

*स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या १२५व्या जयंतीचे औचित्य साधून सावरकर-साहित्याचा वेध घेणारा डॉ. अरविंद गोडबोले यांचा लेख आपण मेच्या अंकात प्रसिद्ध केलात त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन!*

*सावरकरांच्या जवळजवळ प्रत्येक साहित्यकृतीला आगळा इतिहास आहे. प्रसिद्ध गांधीवादी साहित्यिक आचार्य काका कालेलकर यांनी 'ही कविता मराठी भाषेचे लेणे म्हणून मराठीत कायमचे स्थान मिळवून बसली आहे', असा अभिप्राय (प्रतिभा, १५ जाने. १९३६) सावरकरांच्या ज्या कवितेसंबंधी दिला, ती 'सागरास' ही कविता याचे उत्तम उदाहरण आहे. अक्रूर वृत्तातील ही कविता रचतानाच्या सावरकरांच्या करुणाजनक मन:स्थितीचे वर्णन 'अंतर्नाद'च्या वाचकांसमोर ठेवण्याचा मोह आवरत नाही.*

*दि. १ जुलै १९०९ ला सावरकरांचे सहकारी मदनलाल धिंग्रा यांनी इंग्रज अधिकारी कर्झन वायलीचा लंडन येथे वध केला. या सर्व प्रकरणाचा सावरकरांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला. दि. २८ जुलैला वायुपालट म्हणून लंडनच्या दक्षिणेस ५० मैलांवरील ब्रायटनला समुद्रकिनारी असलेल्या विश्रामालयात ते राहावयास गेले. क्रांतिकार्यातील त्यांचे सहकारी निरंजन पाल (लाल-बाल-पाल या त्रिकुटातील बिपिनचंद्र पाल यांचा मुलगा) त्यांना आस्थेने तेथे भेटावयास जात. एके दिवशी ते दोघे समुद्रकिनारी फिरावयास गेले*

---

* प्रा. श्री. म. माटे यांच्यावरील अंतर्नाद मार्च २००८ मधल्या माझ्या 'एका विद्यार्थिनीच्या दृष्टिकोनातून...' या लेखात रामदासांचा जो आदरार्थी **अनेकवचनी** उल्लेख आहे, त्याला मी (लेखिका) सर्वस्वी जबाबदार आहे. प्रा. माटे यांची विधाने उद्धृत करताना अनवधानाने माझ्याकडून झालेली ती चूक आहे. त्या चुकीबद्दल मी दिलगीर आहे.

प्रा. माटे यांनी ऐतिहासिक काळातील त्या सर्वच संतांचा, राज्यकर्त्यांचा उल्लेख **एकेरीच** केला होता. या संदर्भात प्रा. श्री. म. माटे यांच्या 'साहित्यधारा' (प्रकाशनवर्ष १९४३) या पुस्तकातील 'पारमार्थिकांनी केलेला **रामदासाचा** पराभव (एकेरी उल्लेख)' हा लेख अवश्य वाचावा. प्रा. माटे यांच्याबद्दल मला वाटणारी 'उत्कट गुरुभक्ती' त्यांच्या 'समर्थनाचा व्यर्थ खटाटोप' करण्यास प्रवृत्त झाली, हा पत्रलेखकाचा निष्कर्ष सर्वस्वी अयोग्य आहे. प्रा. माटे यांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा भेद कधीच मानला नाही. त्यामुळे पत्रलेखकाचा आरोप त्यांच्यावर अन्याय करणारा आहे व माझ्यावरही.

**– यास्मिन शेख**
(जुलै २००८)

असता, सभोवार इंग्रज स्त्री-पुरुष आनंदात हसत-खेळत वावरत होते. ते दोघे समुद्रकिनाऱ्यावर बसले. आपल्या उदासीन अवस्थेत सावरकरांना मातृभूमीची तीव्र आठवण झाली आणि तिची अनावर ओढ लागली. त्यांची तंद्री लागली आणि त्या नादात ते समोरच्या सागराशी बोलू लागले. निरंजन पाल यांना हा सगळा अनुभव अपूर्व होता. आपल्या विख्यात कविमित्राला ही कविता कशी स्फुरली हे त्यांनी पुढे २९ वर्षांनी (द मराठा, पुणे दि. २७ मे १९३८) लिहून ठेवले :

''इतक्यात सावरकरांनी एक गाणे गुणगुणण्यास सुरुवात केली. एकीकडे ते गाणे रचीत असताना ते गातही होते. हिंदुस्थानच्या दीनवाण्या परदास्याचे वर्णन करणारे ते एक मराठी गाणे होते. आजूबाजूच्या सर्व जगाचा विसर पडून सावरकर आपले गाणे गातच राहिले. इतक्यात त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले नि ते त्यांच्या गालांवर ओघळू लागले. त्यांचा कंठ रुद्ध झाला. त्यांचे गाणेही अपूर्णच राहिले आणि सावरकर एखाद्या बालकाप्रमाणे मुक्तपणे रडू लागले!''

सावरकरांची ही अजरामर कविता त्यांच्या वादळी आयुष्यातील नंतरच्या घडामोडींत जिवंत राहिली हे आश्चर्यच.

**डॉ. श्रीरंग गोडबोले,** औंध, पुणे
(सप्टेंबर २००८)

## मुस्लीम समाजाचे योगदान प्रश्नातीत

अंतर्नादच्या एप्रिल २००८मधील अंकात पारशी समाजावर किशोर आरस यांचा अप्रतिम लेख आला आहे. या छोट्या जमातीने एकूण भारतीय समाजात मिसळून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे, हे निर्विवाद.

यावर प्रतिक्रिया देताना श्री. महेश काळे यांनी त्या लेखाची स्तुती करून समारोपात मुस्लीम समाजाचे तुलनेने योगदान किती, असा अप्रस्तुत प्रश्न उपस्थित केला आहे. (अंतर्नाद, सप्टेंबर अंक, पृष्ठ १०) यामागे त्यांची पूर्वग्रहदूषित दृष्टी किती आणि अज्ञान किती हा चर्चेचा विषय होऊ शकतो.

आम्ही अंतर्नादचे सामान्य वाचक. महेश काळे यांच्या प्रश्नामुळे काही थोर मुस्लिमांची नावे व त्यांचे योगदान सहजपणे आमच्या नजरेसमोर आले आणि ते ऋण आपण स्वीकारावे, या भावनेने केलेला हा पत्रप्रपंच!

मुख्यत: मुघल कालखंडात मुघल व इराणी स्थापत्यशास्त्राचा मनोहारी संगम त्या काळच्या इमारती, किल्ले, मशिदी, राजवाडे इत्यादींमध्ये दिसून येतो. जगप्रसिद्ध कुतुबमिनार, लाल किल्ला, गोल घुमट आणि नितांतसुंदर ताजमहाल हे त्याचे नमुने.

शेती हा भारताचा अनादी काळापासून उत्पन्नाचा कणा आहे. उत्तर भारतात मुसलमान सल्तनीच्या कारकिर्दीत धरणे बांधली गेली, आणि कालवेही खोदले गेले. फिरोझशहा तुघलकने यमुनेतून थेट हिस्सारपर्यंत कालवा खणला. दारा शुकोहने बागायती शेतीवर ग्रंथरचना केली. मोठ्या सैन्याच्या हालचालीसाठी उपयोगी पडावे म्हणून रुंद, सरळ रस्ते मुघलांनी बांधले, रस्त्यावर पाणपोया, सराया आणि अंतर दाखविणारे कोस मिनार बांधले. दरबारातल्या रोजच्या व्यवहाराच्या नोंदी लिखित स्वरूपात करायची पद्धत त्यांचीच. अजूनही वापरात असलेला, शेरशहा सुरीने बांधलेला ग्रँड ट्रंक रोड हे मुघल दूरदृष्टीचेच उदाहरण आहे.

भारताच्या सशस्त्र सेनेत एअर मार्शल लतीफ, ले. जनरल सुलतान मेहमूद, जनरल सामी खान, जनरल अफसर करीम, जनरल फारूख भट्टी, जनरल हबीबुल्ला यांनी आयुष्य खर्ची घातले. आपल्या २१ 'परमवीर चक्र' विजेत्यांपैकी एक अब्दुल हमीद या तरुणाने देशासाठी बलिदान केले. 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा' लिहिणारे इक्बालदेखील याच समाजातले.

अध्यात्मात वैचारिक फरक असला तरी सूफी संतांनी या दोन विचारसरणी जवळ आणण्यात मोलाची भर घातली. हिंदू भक्तिपंथ आणि सूफी तत्त्वज्ञान यांत बरेच साम्य असल्याने, त्यांचा एकमेकांवर चांगला परिणाम झाल्याचे दिसून येते. सलीम चिस्ती, निजामुद्दिन अवलिया, कबीर यांचे कार्य अलौकिक आहे. मराठी संतांमध्ये मुंतोजी, शेख मोहंमद, हुसेन अंबरखान, लतीफ शहा इत्यादी मुस्लीम संतांनी भक्तीपर काव्यरचना केल्या आहेत. त्यात विठ्ठलभक्ती आणि गीतेचे निरूपण दिसून येते.

इस्लामने काही खास चिजा भारतास दिल्या. त्यांपैकी एक म्हणजे संगीत. त्याने भारतीय संगीताला एक इराणी साज चढविला. सारंगी ही त्यांचीच खासियत. काव्य-संगीताला उत्तरेत राजाश्रय मिळाल्याने या कलांचा झपाट्याने विस्तार व प्रगती झाली. लखनौचे नबाव वाजिद अलि शाह स्वत: संगीतज्ञ, ज्ञानी होते. ठुमरीचा उदय ही त्यांची देणगी. अल्लाउद्दिनाचे दरबारी अमीर खुस्रो यांनी खयाल गायकी रुजविली. यांच्याच दरबारी ध्रुपद गायकी बहरली, जी आजपर्यंत डागर बंधूंनी टिकविली आहे. मुघल दरबारात असलेल्या तानसेनचे योगदान अनन्यसाधारण आहे. आजही संगीत, काव्यक्षेत्रातील मिर्झा गालिबांपासून, कैफी आझमी, मजरुह सुलतानपुरी, नौशाद, खय्याम, जावेद अखतरपर्यंत अनेक दिग्गजांची नावे सांगता येतील.

समाजकारणात व राजकारणात मौलाना अब्दुल कलाम आझाद, न्यायमूर्ती छागला, न्यायमूर्ती हिदायतुल्ला, न्यायमूर्ती फातिमा बीबी, माजी राष्ट्रपती झाकिर हुसेन, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अशी गुणी व्यक्तिमत्त्वे याच समाजाने दिली.

क्रीडाक्षेत्रात टेनिसपटू घोस महंमद, सानिया मिर्झा दिले. पतौडीचे नबाब, मुश्ताक अली, अझरुद्दिन, इरफान पठान, झाहिर खान यांसारखे जागतिक कीर्तीचे क्रिकेटपटू दिले. बॉलिवूडचेतर पानही 'खानां'वाचून हलत नाही. डॉ. सलीम अली यांच्यासारखा ख्यातनाम पक्षितज्ज्ञ दिला. एम. एफ. हुसेन, रझा यांच्यासारखे जगप्रसिद्ध चित्रकार दिले. भारतीय सांस्कृतिक व कलाक्षेत्रातील या समाजाचे योगदान प्रश्नातीत आहे.

शेवटी या समाजाचे योगदान किती, व दुसऱ्या समाजाचे किती, अशी तुलना करू नये. गुणी माणसे सर्व समाजांत असतात व लहान-मोठ्या समाजांचे आपापल्या परीने राष्ट्राच्या घडणीत योगदान होतच असते.

**सुमन किर्लोस्कर,** लकाकि, मॉडेल कॉलनी, पुणे
**सुरेश पिंगळे,** पिंगळे फार्म्स, कोरेगाव पार्क, पुणे
(दिवाळी २००८)

## भरीव उत्तरे आहेत का?

विनय हर्डीकर यांचा प्रदीर्घ लेख (ज्ञानप्रबोधिनीचे अप्पा पेंडसे यांच्यावरील) वाचला. तो 'प्रसवत' असताना ते दिल्लीत मुक्कामास होते व त्यामुळे लेखात का मांडणी असणार याचा काहीसा अंदाज मला होता. लेखाबद्दल बरेच काही लिहिता येईल. ते टाळतो. पण त्यानिमित्ताने अनेक जुन्या आठवणींना उजाळा मिळाला व नंतर शोध घेताना काही जुने कागदही सापडले. १९९२मध्ये ज्ञानप्रबोधिनीशी संबंधित आम्ही २५-३० मित्रमंडळी/कार्यकर्ते एक दिवसभर ज्ञानप्रबोधिनीशी संबंधित आमचे अनुभव, विचार व भावी संकल्प यांच्यासंबंधी काही पूर्वसूचित प्रश्नांच्या अनुषंगाने गप्पा मारण्यासाठी जमलो होतो. माझे स्मरण ठीक असेल तर त्या दिवशी हर्डीकरही बहुधा होते. त्या गप्पांचे एक टिपण लेखात उल्लेख झालेल्या श्री. राम डिंबळे यांनी तयार केले होते. ते मला सापडले. श्री. डिंबळे यांच्याच सुंदर हस्ताक्षरातील हे टिपण सोबत पाठवत आहे.

आज सोळा वर्षांनी त्यांतले आम्ही सर्वजण कोठे आहोत; या प्रश्नाचे उत्तर फार अवघड आहे. बहुधा १९९२ ही तारीख बदलून २००८ ही तारीख टाकणे एवढाच बदल त्यात हाईल. पण त्यावेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने काही भरीव उत्तरे आमच्या गटाकडे आज आहेत का? ज्ञानप्रबोधिनीसारख्या अन्य ध्येयवादी संस्थांकडे ती आहेत का? नसल्यास का नाहीत?

**डॉ. अजित कानिटकर,** नवी दिल्ली
(जानेवारी २००९)

## ह्या वर्षी वाचलेल्या दिवाळी अंकांत सर्वोत्कृष्ट

मी 'अंतर्नाद'चा अनियमित वाचक होतो. मला वाटते, की एकदोन वर्षे वर्गणीदारही होतो (पुण्याला Posting निमित्ताने असताना). पुढे, मुंबईला आल्यावर गेली दोन वर्षे, 'नित्य' वाचकाचा 'नैमित्तिक' वाचक झालो. असो.

अंतर्नादचा दिवाळी २००८ अंक लायब्ररीत वाचनात आला. ह्या वर्षी वाचलेल्या दिवाळी अंकांपैकी हा सर्वोत्कृष्ट अंक वाटला. कुटुंबातल्या प्रत्येक घटकाच्या 'आवडी-निवडी'चे 'काहीना काही' अंकात असलेच पाहिजे, ह्या अट्टाहासापायी, 'ऊंधियू'छाप दिवाळी अंक काढण्याची प्रथा रूढ झाली आहे. त्या भाऊगर्दीत 'अंतर्नाद' आपल्या अंगभूत 'मेरिट'वर उठून दिसला, वाचनीय (आणि संग्राह्य) झालाय; पण बाजारात विकत मिळाला नाही.

सुरुवातच मुखपृष्ठाने झाली. रवी परांजपे हे ख्यातकीर्त ज्येष्ठ चित्रकार आहेत, ह्यांच्या नेहमीच्या शैलीपेक्षा वेगळ्या शैलीतले हे अतिशय सुरेख चित्र. त्याचबरोबर, चित्रकाराच्या परिचयाचा लेख आवर्जून दिलेला. दाद देनी होगी!

प्राथमिक शिक्षण विषयावरचा विभाग हे या अंकाचे विशेष बल-स्थळ आणि गौरव-स्थळही! विषय जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा, पण कित्येकांच्या मते 'चावून चोथा' झालेला. अशा विषयावर इतके अभ्यासपूर्ण लेख आणि समतोल दृष्टिकोन यांमुळे ह्या चोथ्याचेही मिष्टान्न झाले! कविता दर्जेदार (बहुतांशी). प्रभू राजगडकरांची 'गोंगलू', डॉ. तांबोळींची 'आवाहन' आणि डॉ. केळुसकरांची 'कविता' या मला विशेष आवडल्या. 'साहित्यातले दोन शिवाजी' (मिलिंद जोशी) आणि 'पत्रातले तेंडुलकर' (दत्तप्रसाद दाभोळकर) हे दोन लेखही खासच!

**प्रभाकर करंदीकर,** भा.प्र.से., मुंबई
(एप्रिल २००९)

## 'उंची' कवितेचा असाही उपयोग

अंतर्नादचा जानेवारी २००९चा अंक हातात पडला. मासिकाच्या पृष्ठ चारवरील श्री. दत्ता हलसगीकर यांची 'उंची' कविता वाचली. छान वाटली व पुढे अंक वाचत गेलो. सर्वांत शेवटी 'भाग्यवती कविता' हा श्री. दत्ता हलसगीकरांचा त्यांच्या 'उंची' कवितेवरील लेख वाचल्यावर मग ती कविता एक/दोन नाही तर दहा वेळा वाचली.

पन्नास वर्षे सर्जरी केल्यानंतर कॅन्सरच्या अखेरच्या अवस्थेत असणाऱ्या रुग्णांची वेदनारहित सेवा करण्यासाठी मी जबलपूर येथे कॅमरेक (कॅन्सर) ट्रस्ट स्थापन केला. या रुग्णांची निःशुल्क सेवा करण्याची ही योजना आहे. आमच्या ट्रस्टच्या बैठकीत यावेळी मी 'उंची' कविता वाचल्यावर व त्यातील गर्भितार्थ सांगितल्यावर दहा मिनिटांत पस्तीस हजार रुपये जमा झाले. खरे म्हणजे या प्रकल्पाची माहिती महाराष्ट्रात व्हावी म्हणून माझ्या भावास मी कळवले; त्यावेळी त्याने माध्यमे अशा गोष्टी प्रकाशित करण्यासाठी पैसे मागतात म्हणून कळवले. मी अशा गोष्टींच्या विरुद्ध आहे. यासाठी थांबणे हाच एक मार्ग आहे. वेळ येईल तेव्हा अंतर्नादच्या संपादकांना यासाठी आंतरिक प्रेरणा होईल व मग अनेकांना ही माहिती देता येईल. तोपर्यंत 'उंची' या कवितेचा उपयोग करून घेणार आहे. पुन्हा एकदा उत्तम अंक काढल्याबद्दल धन्यवाद.

**डॉ. म. द. वैद्य,** अधारताल, जबलपूर
(मे २००९)

## समाधानकारक म्हातारपण

फेब्रुवारी २००९ अंतर्नादच्या अंकातला श्री. किशोर आरस ह्यांचा 'हे म्हातारपण!' हा लेख फार वाचनीय वाटला. ह्या लेखात माझ्या 'प्लॅनिंग फॉर रिटायरमेंट' ह्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उल्लेख केला आहे. ह्या कार्यक्रमात मी शेवटी म्हणतो, की जर माणसाचे म्हातारपण समाधानकारक व्हायचे असेल तर त्याला तीन गोष्टींची आवश्यकता आहे.

१) अजेंडा फॉर दि डे (दिवसाचा कार्यक्रम) : सकाळी ६ वाजता उठल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत आपण काय करणार ह्याचा आराखडा मनात सकाळी उठल्याबरोबर आला पाहिजे.

२) माइलस्टोन्स टु बी अचीव्हड : भविष्यात ज्या गोष्टी साध्य व्हायला हव्यात त्याचासुद्धा आराखडा मनात हवा.

३) व्हॅल्यू : आपल्या बाकी जीवनामध्ये काही ना काही मूल्यउत्पादन होत आहे असा विश्वास.

जोपर्यंत माणूस नोकरीवर किंवा व्यवसायात असतो, तोवर पहिल्या दोन गोष्टी आपोआप होतात. तिसरी गोष्ट, मूल्य, ही माणसाच्या मिळकतीवर अवलंबून असते. म्हातारपणामुळे हे

*पैशाचे मूल्य राहणार नाही, पण त्याऐवजी काही दुसरी मूल्ये माणसांना समाधान देऊ शकतात.*

*माझी आई नेहमी स्वतः कुटुंबासाठी स्वयंपाक करायची. जेव्हा तिने पंचाहत्तरी ओलांडली तेव्हा आम्ही मुलांनी सांगितले, की एक स्वयंपाकी ठेव. आम्ही स्वयंपाकी पाठवूनही दिला. पण तिने दुसऱ्या दिवशी त्याला हाकलला (फार तेल वापरतो, फार डालडा वापरतो वगैरे, वगैरे). ती आमचं ऐकणार नाही, म्हणून आम्ही आमच्या फॅमिली डॉक्टरना सांगितले. डॉक्टर म्हणाले,*

*''हा तुमचा बेत अगदी मूर्खपणाचा आहे. ती स्वयंपाक करते, त्यामुळे सकाळी उठल्याबरोबर तिचा दिनक्रम तिच्या डोक्यामध्ये असतो. न्याहारी, दुपारचे व रात्रीचे जेवण ह्याचा मेनू तिला ठरवायचा असतो. दिवाळी आली, की ती फराळाची तयारी करते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिच्या कामाचे मूल्य हे अर्थात पैशामध्ये व्यक्त होत नाही.''*

*पण ज्या दिवशी तिने शिजवलेला कुठचाही पदार्थ अगदी संपून जातो आणि तिला स्वतःसाठी तो जरासुद्धा उरत नाही, त्यावेळी तिला सर्वांत जास्त मूल्य मिळते. डॉक्टर म्हणाले, की ह्या तीन गोष्टी तिच्याकडून काढून घेतल्यात, की ती जी बिछान्याला खिळेल ती पुन्हा उठणार नाही.*

**शरू रांगणेकर,** पेडर रोड, मुंबई
*(मे २००९)*

## पुरुषसत्ताक व्यवस्थेचा प्रभाव

*महाराष्ट्राच्या ५०व्या वाढदिवसाचं औचित्य साधून प्रसिद्ध झालेला, अंतर्नादचा मे महिन्याचा अंक मला खूप आवडला. त्यातले श्री. मधु मंगेश कर्णिक, डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, डॉ. रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ इत्यादींचे लेख अभ्यास आणि माहिती यांचा चांगला आलेख पुढे ठेवतात.*

*श्री. कर्णिकांचा लेख मला आवडला. त्यांच्याबरोबर साहित्यसंस्कृती मंडळाचं काम करताना, त्यांचा माझा व्यक्तिगत परिचयही झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखाबाबत काही त्रुटी दाखवून लिहिताना मला हे मान्यच आहे, की ते वृत्तीने स्त्रीविरोधी नाहीत. मात्र या पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या प्रभावामध्ये पुरुष आणि स्त्रिया दोघेही काही गोष्टी गृहीत धरून चालतात किंवा सवयीने विसरतात!*

*उदाहरणार्थ, श्री. कर्णिकांच्या लेखात १८ क्रमांकाच्या पानावर भाषेच्या दृष्टीने महत्त्वाच्या, मोजक्या उपक्रमांचा उल्लेख आहे. त्यात म.सा.प.च्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा उल्लेख आहे. मात्र पुण्याच्या साहित्यप्रेमी भगिनी मंडळाने डिसेंबर, २००७ मध्ये प्रसिद्ध केलेल्या, 'भारतातील स्त्रीसाहित्याचा मागोवा' – खंड १ आणि २ आणि त्याही पूर्वी, 'स्त्रीसाहित्याचा मागोवा' – खंड १, २, ३ या खंडांचं प्रकाशन केलं आहे. हे काम खूप मेहनतीचं आणि महत्त्वाचं आहे. पण त्याची नोंद घ्यायला श्री. कर्णिक विसरले.*

*याच अंकात माझाही 'स्त्रीसाहित्याभोवतीचं वास्तव' हा लेख आहे. त्यात स्त्रियांची आणि त्यांच्या लेखनाची कशी नोंद घेतली जात नाही किंवा घ्यायची राहून जाते, यासंबंधी मी लिहिलं आहे. म्हणून श्री. कर्णिकांचा लेख परखड म्हणून आवडला, तरी ही त्रुटी नम्रपणे निर्देशनास आणून द्यावीशी वाटली.*

**विद्या बाळ,** भोंडे कॉलनी, एरंडवन, पुणे
(जुलै २००९)

## राग व निराशा यांचा अनुभव

*फेब्रुवारीच्या अंकातले औरंगाबाद येथील डॉ. सुधाकर भोसले यांचे पत्र जरा लांबले असले, तरी खूप आवडले. त्यातले बहुतेक मुद्दे पटले. खास करून (''आपल्याला 'आवडणे', 'न आवडणे' हा मुद्दा नाही. मुद्दा आहे 'भले' आणि 'बुरे' यांचा. जर एखादी गोष्ट 'बुरी' असेल, तर ती भारताचे वास्तवरूप म्हणून स्वीकारायची का? का ती बदलण्यासाठी प्रयत्न करायचा? सतीची चाल, बालविवाह, केशवपन, अस्पृश्यता इत्यादीदेखील एके काळी भारताचे वास्तव होते आणि ते वास्तव महात्मा फुले प्रभृतींनी बदलले. 'आपले' म्हणून स्वीकारले नाही!'') हा मजकूर फारच आवडला, अगदी नेटकेपणाने मांडला आहे. याच पत्रात प्रा. व. कृ. नूलकर यांच्या मुलाखतीतील बोटचेप्या व तर्कविसंगत विधानांची दखल घेतली आहे. भले भले विचारवंत, मंत्रिपदावर बसणारे बडे लोक, अगदी तर्कविसंगत व असंबद्ध विधाने करताना दिसतात, त्या वेळी राग व निराशा यांचा अनुभव येतो.*

**मंगला नारळीकर,** पंचवटी, पाषाण, पुणे.
(जुलै २००९)

## फारसी/उर्दूचे ऋण मान्य करावे

*आपले सर्व अंक उत्कृष्ट, उद्बोधक व विचारोत्तेजक आहेत. म्हणूनच हे पत्र लिहीत आहे. श्रीमती यास्मिन शेख यांचा मराठी लेखनासंबंधित लेख, त्यावर आलेली पत्रे व श्रीमती शेख यांचे उत्तर वाचले. एक गोष्ट मला नेहमीच जाणवते – मराठीतील शब्दांचा उगम सांगताना शिक्षक संस्कृतमधून आलेले तत्सम, तद्भव शब्द याबद्दल माहिती देतात. परंतु फारसी/उर्दूमधून आलेल्या शब्दांचा उल्लेखही होत नाही. प्रत्यक्षात आज हे शब्द सर्रास वापरले जातात. जसे, बेलाशक (बिला शक), फाजील (फ़ज़ूल), जरुर (ज़रूर), गरज (ग़र्ज़) इत्यादी. काही शब्दांचे अर्थ इतके बदलले गेले आहेत, की कधी कधी उलट्या अर्थाने शब्द वापरला जातो. जसा, राजीनामा हा शब्द. त्याचा अर्थ आहे करार (agreement). पण मराठीत तो अगदी उलटा झाला आहे. 'मंत्री राजीनामा देतात' तेव्हा काम करणे सोडून देतात. अशा अपभ्रंशित शब्दांची गिनती अनगिनत होऊ शकते.*

*माझे मत असे आहे मराठी व्याकरणकारांनी राजकारणात न पडता मराठीची ही फारसी/उर्दू ठेव लोकांपुढे मांडावी. शिवाजीराजांवरचे अत्यधिक प्रेम इथे आडवे येऊ नये. महाराजांच्या दरबारातही फारसीमिश्रित मराठीच बोलली जात होती.*

**डॉ. अंजला महर्षी,** नवी दिल्ली
*(जानेवारी २०१०)*

## अखेरच्या श्वासाचा एकमेव साक्षीदार

सांस्कृतिक समृद्धीसाठी आपण खूप दक्ष आहात याची साक्षच 'वेलु तयाचा गेला गगनावरी' हा आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील यांच्यावरील फेब्रुवारी अंकातील लेख पटवतो. त्यातील विविधता व आधुनिक दृष्टिकोन आपल्या प्रज्ञेची झळाळी सिद्ध करणारा आहे. 'साधना'शी जवळीक असल्यामुळे मी सा. रे. पाटील यांच्याकडे आदरभावनेनेच पाहत होतो, पण त्यांच्या कामाचा इतका सखोल आवाका मला पूर्वी आला नव्हता. त्यामुळेच मी तुमचा आभारी आहे.

साधनेचा दिवाळी अंक व त्यातील आर्टपेपरवरील बहुरंगी विविध जाहिरातींची पाने पाहता, आप्पासाहेब हे साधनेचे वटवृक्षासारखे आधार आहेत व या सामाजिक योगदानात आपल्या सहकाऱ्यांनाही ते प्रवृत्त करीत आहेत, हे जाणवते व त्यामुळे त्यांच्याबद्दलची आदराची भावना दृढ होते.

संपूर्ण महाराष्ट्रातील सहकारी व्यवहाराला बदलत्या काळात भ्रष्टाचाराच्या कर्करोगाने ग्रासलेले आढळते. त्याच्या प्रतिबंधाकडे राजसत्तेने डोळेझाक करून तो रोग वाढू दिलेला दिसतो. हे बदलत्या काळातील भान ठेवूनच कदाचित 'श्रीवर्धन बायोटेक' हा संपूर्ण आधुनिक शास्त्रीय हरितगृहातील शेतीचा एक खूप मोठा टप्पा गाठताना त्याची रचना आप्पासाहेबांनी भागीदारी तत्त्वावर ठेवलेली असावी. श्रीवर्धन बायोटेकचे वैश्विक दर्जाचे उत्पादन व निर्यातीतील घवघवीत यश पाहून डोळस, प्रगतिशील व कष्टाळू शेतकऱ्यांचे ते एक तीर्थक्षेत्र झालेले दिसते.

आप्पासाहेब व मी समवयस्क तर आहोतच, पण तसेच समधर्मीही आहोत. श्री. एस. एम. जोशी व अच्युतराव पटवर्धन हे त्यांचे राजकीय गुरू व साने गुरुजी हे प्रेरणास्थान. अच्युतराव यांचा मी सर्वांत धाकटा भाऊ ही माझी ओळख पुरेशी व्हावी. साने गुरुजींच्या बरोबर मुंबईतील पार्शी कॉलनीमधल्या 'मेघाभुवन' येथे मी एकत्र राहिलेलो आहे. नैराश्य व निद्रानाश यांनी गुरुजींना पूर्णपणे घेरलेले असताना आई मुलाला जशी कुशीत घेते तसे गुरुजींना कुशीत घेऊन बगाराम तुळपुळे झोपत असत. एक अत्यंत लबाड मुलगा गुरुजी एकटे असताना त्यांना भेटून, खोटेनाटे रडून, गयावया करून त्यांच्याकडचे पैसे उकळीत असे. गुरुजींच्या खिशात पुरेसे पैसे असावेत ही जबाबदारी बगाराम सांभाळत होता. एकदा तसे पैसे ठेवलेले असताना काही तासांतच त्यात पन्नास रुपयाची घट बगारामच्या लक्षात आली. बगारामने ओळखले, की तो भामटा गुरुजींना भेटायला आला असावा. म्हणून बगाराम थोडेसे रागावून गुरुजींना म्हणाला, "तो मुलगा भामटा आहे, ते तुमच्या कसे लक्षात येत नाही?" गुरुजी शांतपणे म्हणाले, "अरे, ते न समजण्याइतका का मी मूर्ख आहे? मला स्पष्ट दिसते आहे, की त्याचे पुढचे पाऊल तुरुंगातच पडणार आहे. तुरुंग म्हणजे गुन्हेगारीची पाठशाळा. तो जर तुरुंगात गेला तर, त्यातच त्याचा अंत होईल. तो होऊ नये, त्याचे प्राण वाचावेत इतकाच माझा हेतू."

ओघाने आले म्हणूनच सांगतो, के. ई. एम. हॉस्पिटल, परळ, येथे गुरुजींच्या अखेरच्या श्वासाचा मी एकमेव साक्षीदार आहे. माझे स्नेही श्री. हरिभाऊ लिमये (कॅपिटल बॉम्ब केस) यांनी 'आम्ही जातो आमच्या गावा' असे छोटे पुस्तक संपादित केलेले आहे. त्यात गुरुजींनी मृत्यूबद्दल जे जे लिहिले आहे ते नोंदवून, त्याचा मागोवा घेत, 'प्रचलित कायद्याच्या जंजाळात न अडकता गुरूजींनी निद्रासमाधी घेतली' असे प्रांजळ मत नमूद केले आहे. कोणत्याही दृष्टीने ती आत्महत्या नव्हती.

**मधू पटवर्धन,** पुणे
(मे २०१०)

## आरोग्य आणि समाज' – संग्राह्य अंक

'अंतर्नाद'चे अंक मी नियमित वाचतो. म्हणूनच 'आरोग्य आणि समाज' विशेषांकाची आवर्जून वाट पाहत होतो. अंक मिळाल्याबरोबर जवळ जवळ एकहाती वाचून काढला. नंतर काही लेख पुन्हा वाचले. एकूण अंक केवळ वाचनीय नव्हे, संग्राह्य, आवर्जून प्रसार करण्यायोग्य आहे. सर्वांचे अभिनंदन.

मी गेली ४०-५० वर्षे रुग्णालयकामात गुंतलेला असल्याने त्यासंबंधी सर्व व्यवहारांचा साक्षी, नव्हे प्रत्यक्ष अनुभवी आहे. अंकातील सर्व विषयांना लेखकांनी योग्य तो न्याय दिला आहे. परखडपणे व कळकळीने सत्याची मांडणी केल्याचे जाणवते. शब्दरचना, प्रस्तुती विधायक भावनेने केलेली आहे. खिल्ली उडवणे, सनसनाटी लिहिणे किंवा अतिरंजित लिखाण अनुभवास आले नाही. काही विषयांत लेखकांचे दृष्टिकोन टोकाचे आहेत, त्यामुळे बाह्यतः विरोधाभासही जाणवतो. परंतु विषयच तसा असल्याने अशा भूमिकाही सयुक्तिक असू शकतात.

संबंधित अनेक प्रश्नांवर व्यक्तिगत, संस्थात्मक पातळीवर उपायाचे प्रयत्न होताहेत. त्याचीही प्रसिद्धी व्हावी. काही विश्वस्त रुग्णालये, सरकारी रुग्णालये उत्तम काम करीत आहेत. उदा. शुश्रूषा – दादर, डॉ. हेडगेवार रुग्णालय – औरंगाबाद. त्या त्या ठिकाणी सेवाभावी (ध्येयवादी म्हणावे का?) डॉक्टरांचा गट कार्यरत आहे. सर्व व्यवहार खुले, पारदर्शी असणे हे पहिले महत्त्वाचे लक्षण आहे. प्रशिक्षित, तज्ज्ञ डॉक्टर्स असूनही व्यक्तिगत उत्पन्नावर तिथे घातलेल्या स्वेच्छाबंधनामुळे वेगळी विश्वसनीयता अनुभवाला येते. अशा रुग्णालयांनी आपापल्या क्षेत्रात 'रोल मॉडेल' संस्था उभ्या केल्या आहेत. महाराष्ट्रात अशा २०-२५ संस्था तरी निश्चित असतील.

अर्थात त्याने सर्व प्रश्न सुटणार नाहीत. कारण अर्थकारण हा खरेच अवघड विषय आहे. विवेकानंद रुग्णालयात आम्ही 'वैद्यकीय व्यवस्थापन' या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी एक Dissertation 'ICU अर्थकारण' या विषयावर केले. डॉक्टरांचे शुल्क व औषधांचा खर्च हे मुख्य खर्चाचे विषय आहेत आणि त्यांत २० ते २५% घट करणे शक्य आहे, असा निष्कर्ष काढता आला. तरीही अनेक आजार असे असू शकतात, की ज्यांच्या उपचाराचा खर्च, उच्च मध्यमवर्गीयांनाही झेपणारा नाही. यासाठी वेगळे संचित किंवा विमा योजना हाच मार्ग असू शकतो.

वैद्यकीय व्यवसायातील अपप्रवृत्तीबद्दल बोलले-लिहिले जात आहे, ते योग्यच आहे. पण वाढत्या सामाजिक अपप्रवृत्तीबद्दलही मांडले गेले पाहिजे. ती प्रवृत्ती अधिक धोक्याची आहे. अगदी आताच घडलेले याविषयीचे एक उदाहरण लिहून थांबतो.

जवळच्या एक मोठ्या गावातून अडलेली बाळंतीण म्हणून एक तरुण महिला (प्रथम प्रसूती) आणली गेली. बाळाच्या हृदयाचे ठोके

*अनियमित झाले होते, म्हणून लगेच सिझेरिअन ऑपरेशन केले. गावातील ज्या डॉक्टरांनी प्रसूतीचा आधी प्रयत्न केला होता, ते स्वत: सोबत आले होते. बाळाची अवस्था गंभीरच होती. चार दिवसांनी ते दगावले. नंतर लगेच माहिती मिळाली, की नातेवाइकांनी गावाच्या त्या डॉक्टरांवर पोलीस केस केली, की त्यांनी मोठ्या हॉस्पिटलमध्ये पाठविण्यास उशीर केला, म्हणून बाळ दगावले. आम्ही तपशीलवार चौकशी केली, तेव्हा पूर्ण सत्य समजले.*

१. *सदर महिलेस सासरी आठ महिने होईपर्यंत कोठेही प्रसूतिपूर्व दाखवले नव्हते.*

२. *सरकारी व्यवस्थेतून फक्त दोन T.T. Inj. दिली होती.*

३. *संबंधित गावाच्या डॉक्टरांकडे कळा सुरू झाल्यावर आणले – ऐनवेळी.*

४. *बाळंतपणाला वेळ लागू लागला, तेव्हा संबंधित डॉक्टरांनी मोठ्या रुग्णालयात घेऊन जाण्यास सांगितले तर नातेवाइकांनी : 'होती हो – इथेच बघा, भारी इंजेक्शन द्या', हा आग्रह धरून भरपूर कालापव्यय केला. शेवटी रुग्णाला हलवले.*

५. *अर्भकाचा मृत्यू झाल्यावर संबंधित गावातील डॉक्टरांवर केस करण्याची धमकी देऊन एक लाख रुपये मागितले. डॉक्टर सहजी दाद देईनात, म्हणून पोलीस केस केली.*

*वरील सर्व गोष्टींची आम्ही शहानिशा केली. आता बोला! असो. तरीही जसे असावे असे वाटते, तसे वागण्याचा-करण्याचा प्रयत्न कोणीतरी केला पाहिजे. ते आम्ही असावे. Charity begins at (my) home!*

*सदर अंक आमच्या रुग्णालयातील सर्वांना वाचण्यास आम्ही उद्युक्त केले आहे.*

**डॉ. अशोक ल. कुकडे,** विवेकानंद रुग्णालय, लातूर
(दिवाळी २०१०)

## *हळुवार विश्लेषण*

*आपला बंग दांपत्यावरचा लेख वाचला (ऑक्टोबर २०१०). आपण फार हळुवारपणे त्यांच्या कार्याचे विश्लेषण केले आहे. त्यांचा योग्य तिथे गौरव केलेला आहे, त्याचप्रमाणे काही अवघड मुद्द्यांनाही हात घातला आहे. अर्थात टोकाची विधाने किंवा अलंकारिक भाषा न वापरण्याचा संयम तुम्ही पाळता – मला हा तुमच्या लेखनाचा सर्वांत महत्त्वाचा पैलू वाटतो. स्टॅम्प-पेपर घोटाळा व 'महात्मा' लोकांचे संदर्भ फार आवडले. त्याचप्रमाणे 'बंग यांच्यानंतर कोण' (त्यांच्या संस्थेत आणि इतरत्रही!) या अवघड प्रश्नाला तुम्ही स्पर्श केला आहे, हे महत्त्वाचे वाटते.*

*हल्ली, जोरजोराने बोलले किंवा समर्थकांची गर्दी उभी केली, की आपला मुद्दा बरोबर, हा न्याय आहे! त्या कोलाहलात निदान आपले वाचकतरी आपली ही सूक्ष्म निरीक्षणे लक्षपूर्वक वाचतील अशी आशा आहे.*

**रवी गोडबोले,** अटलांटा, युएसए
*(जानेवारी २०११)*

## *भारावून टाकणारा वाचक प्रतिसाद*

*अंतर्नादमध्ये प्रकाशित झालेल्या माझ्या लेखास वाचकांकडून फोन आणि एसएमएसने सतत मिळत असलेल्या प्रतिक्रिया खूप सुखावून जात आहेत. बेळगावपासून नागपूरपर्यंतचा अंतर्नादचा वाचक अत्यंत प्रेमाने व आपुलकीने फोन करतो, लेख आवडल्याची मनापासून पावती देतो, याचे कौतुक वाटते.*

*गेल्या वीस वर्षांपासून लेखन करतोय मी, पण असा आणि इतका प्रतिसाद मला पूर्वी कधीच मिळाला नव्हता. प्रतिसाद संख्येने तर प्रचंड होताच, पण त्या मागच्या भावनाही अत्यंत उत्कट असल्याचे सातत्याने जाणवत होते.*

*माझ्यासारख्या अतिसामान्य लेखकास मात्र या प्रतिसादामुळे भारावल्यागत झाले आहे. मुख्य म्हणजे पुण्याच्या वाचकांबद्दल जो गैरसमज आतापर्यंत होता, तो या प्रतिक्रियांनंतर पार पुसून निघाला. पन्नासवर फोन पुण्याहूनच आले. बहुतेकांनी सुरुवात ''मी पुणेकर असलो/असले तरी...'' अशी केली. एक वयस्कर आवाजाच्या बाई तर ''माझं माहेर ग्वाल्हेरचं व तुमचा लेख वाचून माहेरची खूप आठवण येते आहे'', असे म्हणत फोनवर रडायला लागल्या. काय बोलणार? 'पुण्याला/मुंबईला/अमरावतीला/बेळगावला आलात की घरी अवश्य या', असा प्रेमळ आग्रहही बऱ्याच जणांनी केलेला आहे.*

*वाचकांकडून होणारे हे कौतुक लेखकाच्या भविष्यासाठी फार मोठा साठा असतो, हे मी काय सांगावे? अंतर्नादच्या सर्व खाद्यप्रेमी वाचकांस मी इंदौरला माझ्याकडे येण्याचे आग्रहपूर्वक निमंत्रण या पत्राद्वारे देत आहे.*

**श्रीकांत तारे,** इंदोर
*(एप्रिल २०११)*

## *अंतर्नादकडून अपेक्षाभंग*

*'म.टा.चे दिवस' म्हणता मोठ्या अपेक्षेने वाचायला घेतलेल्या मृण्मयी रानडे यांच्या लेखाने अपेक्षाभंग केला. फुटकळ आठवणी विस्कळीतपणे लिहिल्यासारख्या वाटल्या. यांतील तळवलकर, केतकर इत्यादी काही नावे वगळल्यास हा कोणत्याही चाकरमान्याच्या आठवणींचा लेख होऊ शकेल.*

*दत्तप्रसाद दाभोळकरांचा ४२च्या चळवळीवरचा लेख (फेब्रुवारी अंक) खरे तर एका पुस्तकाचा ऐवज आहे. त्यांनी ते मनावर घ्यावे. आहे त्या स्वरूपात हा लेख मुख्य प्रवाहातील एखाद्या दैनिकात येणेही जरूर आहे.*

*हेमंत गोविंद जोगळेकर 'पुन्हा कविता' घेऊन आले, म्हणजे आमच्या दृष्टीने अंतर्नादची चार पाने बाद झाली. अवधूत परळकरांच्या 'अनवधाना'ने आधीच चार पाने बाद झाली होती. असो, हे चालायचेच.*

**राजेंद्र करंबेळकर**, पुणे
*(एप्रिल २०११)*

## *भेण्डे यांचे आणखी एक आगळेपण*

*आपण 'अंतर्नाद'च्या फेब्रुवारीच्या अंकात कै. सुभाष भेण्डे यांना उचित श्रद्धांजली वाहिली आहे. ते अतिशय उमदे व*

मनमिळाऊ होते, यात शंकाच नाही. पण त्यांच्या एका गोष्टीचा उल्लेख कोणीच केला नाही. तो येथे नमूद करतो. भेण्डे यांनी निवृत्त झाल्यावर एक लाख रुपयांची देणगी 'द गोवा हिंदू असोसिएशन'ला दिली. त्या रकमेच्या व्याजातून एक वर्षाआड उत्कृष्ट अनुवादासाठी व उत्कृष्ट नाट्यसंहितेसाठी पारितोषिक देण्यात यावे, असे त्यांनी सांगितले होते. विशेष म्हणजे त्यांनी पारितोषिकाला स्वत:चे किंवा आपल्या कोणा पूर्वजाचे नाव दिले नाही. श्रेष्ठ कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या नावाने हा पुरस्कार देण्यात यावा, अशी त्यांची अट होती. साधी फोटोफ्रेम जरी दिली तरी त्यात देणगीदार म्हणून स्वत:चे नाव ठळकपणे लिहिणारे लोक असतात. या पार्श्वभूमीवर भेण्ड्यांसारखी व्यक्ती दुर्मिळच!

'हिंदी वाक्यम् प्रमाणम्' हा सलील कुलकर्णी यांचा लेख अत्यंत भावला. कोणीतरी 'इंडस्ट्रियल प्लांट'चे भाषांतर 'औद्योगिक झाड' असे केल्याचा उल्लेख त्यांच्या पत्रात आहे. या निमित्ताने भाषांतराच्या काही मोठ्या चुका आठवल्या. 'नेचर ऑफ धिस प्रॉब्लेम'चे भाषांतर 'या प्रश्नाचा निसर्ग' असे केले होते! दिब्रुगढ येथे पावसामुळे व पुरामुळे रेल्वेचे शेकडो 'स्लीपर्स' वाहून गेले याचे भाषांतर 'रेल्वे रुळावर झोपलेले शेकडो लोक वाहून गेले' असे एका महाभागाने केले होते!

**अशोक जैन,** अंधेरी, मुंबई
(मे २०११)

## अराजकीय कार्याच्या मर्यादा

डॉ. बंग दांपत्य, डॉ. आरोळे दांपत्य, आमटे कुटुंब यांनी वैयक्तिक कर्तबगारी, समाजातील तळागाळातील माणसांबद्दल वाटणारे प्रेम व आपल्या कार्यात इतर तरुणांना सहभागी करण्यातील यश यांच्या जोरावर हजारो आदिवासी, खेडूत आणि कुष्ठपीडित लोकांना मदत केली, जीव वाचवले, त्यांची आरोग्यवृद्धी केली व त्यांना स्वावलंबी आणि शिक्षितही बनवले. पण त्यांचे काम ठरावीक लहान परिसरात मर्यादित राहिले व सर्व आयुष्यभर काम करून, काही हजार व्यक्तींच्या जीवनातच त्यांना बदल घडवून आणता आला. या सर्वांचे काम इतके व्यक्तिवैशिष्ट्यांवर आधारित होते, की जागोजागी अशा कार्याची पुनरावृत्ती होऊ शकली नाही. आपल्या खंडप्राय, विस्तीर्ण देशामध्ये व त्यात राहणाऱ्या १२० कोटी लोकांच्या जीवनामध्ये, या सर्वांच्या कार्याने, जवळपास काहीच फरक पडला नाही, हे सत्य अप्रिय असले तरी मान्य केले पाहिजे.

याउलट, श्रीमती मेधा पाटकर यांनी धरणग्रस्तांसाठी केलेल्या राजकीय चळवळीमुळे देशभरातल्या प्रकल्पग्रस्तांच्या आत्मविश्वासात भर पडली. राज्यकर्त्यांना पुनर्वसनासाठी नवीन कायदेकानू करावे लागले. एकूण, देशाच्या कानाकोपऱ्यांत पोचणारा व दीर्घकाळ टिकणारा फायदा मेधा पाटकर यांच्या राजकीय चळवळीमुळे झाला. एक प्रकारचा व्यवस्था-बदल झाला, ज्याचा परिणाम दिसण्यासाठी प्रत्येक जागी मेधा पाटकर यांनी व्यक्तिश: हजर असणे आवश्यक नाही. श्री. शरद जोशी यांच्या शेतीमालाच्या किमतीबद्दलच्या राजकीय चळवळीमुळेदेखील असा विस्तृत प्रदेशात व दीर्घकाळ टिकणारा बदल झाला व त्याचा फायदा मोठ्या लोकसंख्येला मिळाला, मिळणार आहे.

अशाच प्रकारचे चांगले व्यवस्थात्मक बदल टी. एन. शेषन (निवडणूक आयोग), श्री. श्रीधरन (कोकण रेल्वे कॉर्पोरेशन), श्री. चंद्रशेखर भावे (सेबी) यांनी घडवून आणले, कारण त्यांनी उपलब्ध व्यवस्थांचा वापर करून निवडून आलेल्या राजकारण्यांच्या प्रभावापासून मुक्तता-स्वायत्तता मिळवली. श्री. अण्णा हजारे यांच्या प्रयत्नाने झालेल्या माहितीचा हक्क कायद्यामुळे एक प्रकारचे मन्वंतरच झाले आहे.

यापेक्षाही अनेक पटींनी चांगले बदल, चांगले राजकीय नेते जर प्रधानमंत्री / मुख्यमंत्री बनले तर घडवून आणू शकतात. सहज डोळ्यांसमोर येणारी नावे म्हणजे प्रधानमंत्री नरसिंह राव, अटलबिहारी वाजपेयी, मुख्यमंत्री नरेंद्र मोदी, वाय. एस. रेड्डी. हे राजकीय नेते कोट्यवधी जनतेच्या जीवनात खूप मोठा बदल घडवून आणू शकतात. अर्थात वाईट नेता मुख्यपदी आल्यास प्रचंड नुकसानदेखील घडवून आणू शकतो. सातत्याने चांगले, निदान बरे नेते सत्तेवर आणणे ही चांगल्या लोकशाहीची कसोटी आहे.

राजकीय नेत्यांच्या खालोखाल परिणामकारकता टाटा, किर्लोस्कर, अंबानी, नारायणमूर्ती, डॉ. रेड्डी या उद्योग-स्थापकांची दिसते. या लोकांनी लाखोंना रोजगार दिला. जनतेची कार्यसंस्कृती, अर्थसंस्कृती यांत बदल केला व देशाच्या केवळ अर्थव्यवस्थेलाच नाही, तर सर्वांगीण बदलाला चालना दिली.

डॉ. बंग, डॉ. आमटे, डॉ. आरोळे यांची कामे उत्तम व प्रशंसनीय आहेतच; पण ज्यांना देशातील एकूण जनतेच्या जीवनात लक्षणीय बदल घडवायचा असेल, त्यांना राजकीय किंवा औद्योगिक वाटांनीच जावे लागेल.

**डॉ. सुभाष आठले,** नागाळा पार्क, कोल्हापूर
(जुलै २०११)

## यामुळे मराठी भाषेचेच नुकसान!

'शहीद नव्हे, हुतात्मा' या शीर्षकाखालील अंतर्नादच्या एप्रिल अंकातील पत्र वाचले. समाजातील कट्टरपंथीय हिंदूंमधील इस्लाम धर्मीयांबद्दलच्या खोलवर रुजलेल्या विद्वेषाचे अस्तित्व त्यातून निदर्शनास आले. 'हुतात्मा' शब्दाऐवजी 'शहीद' शब्द वापरल्यामुळे इस्लामी संकल्पना व्यक्त होते असा अर्थ काढणे व शहीद म्हणजे 'जिहादमध्ये मेलेला मुस्लिम' असा मुख्य अर्थ काढणे, हे सरळसरळ कट्टर धार्मिक द्वेषाचे लक्षण आहे. अशा संकुचित मनोवृत्तीमुळेच वेळोवेळी स्वतंत्र भारताची जगभर बदनामी होत आहे. एवढेच नाही, तर सावरकरांचे नाव घेऊन अशा भाषाशुद्धीच्या अतिरेकी आग्रहामुळे मराठी भाषेचेही आत्तापर्यंत प्रचंड नुकसान झाले आहे. आज पुण्यातील 'म्युनिसिपालिटी'च्या मराठी शाळांची संख्याही घटू लागली आहे. इंग्रजी भाषेच्या 'ऑक्सफर्ड' शब्दकोशात मराठीसह अनेक भारतीय भाषांमधले शेकडो शब्द आदरपूर्वक समाविष्ट झाले आहेत. म्हणूनच 'शहीद भगतसिंग' या शब्दांनी देशभर नि:संकोचपणे व्यक्त होणारा देशभक्तीचा आदर, तसेच लता मंगेशकर यांच्या 'ए मेरे वतन के लोगो' या गीताने जागवलेली

*'शहीदां'च्या 'कुरबानी'ची कृतज्ञतापूर्वक जाणीव ही आत्तापर्यंत फारशा कोणालाही न खटकलेली अभिव्यक्ती आहे.*

**एकनाथ बागूल,** पत्रकार नगर, पुणे
*(दिवाळी २०११)*

## *'इसराएल' असा उच्चार आहे*

*अंतर्नाद मासिक वाचणे ही आमच्यासारख्या परदेशी राहणाऱ्या वाचकांसाठी मोठी आनंदाची बाब असते. २०११चा दिवाळी अंक मिळाला. परदेशात दीर्घकाळ वास्तव्य करणाऱ्यांसाठी, आपण भरकटले जाऊ नये म्हणून, मातृभाषेत संवाद करणे हा एक आधार असतो. अमेरिकेतल्या डॉ. भाग्यश्री बारलिंगे यांच्या लेखात हाच अनुभव व्यक्त झाला आहे. त्याची तीव्रता परदेशात दीर्घकाळ वास्तव्य करणाऱ्यांनाच जाणवेल.*

*बऱ्याचदा अंतर्नादच्या अंकात (आणि इतरही नियतकालिकांमधून) इसराएल देशाचा उल्लेख असतो. बरेच लेखक तो 'इसराईल', 'इस्रायल', 'इज्रेल', 'इस्राईल' असा वेगवेगळ्या प्रकारे लिहितात. असे लिहिणे चुकीचे असून हा शब्द 'इसराएल' असाच लिहिणे हिब्रू भाषेतील उच्चारानुसार योग्य आहे. जाता जाता – 'इसराएल' या शब्दाचा हिब्रू भाषेतला अर्थ 'ज्याने ईश्वरासह झुंजून यश मिळविले आहे तो इसराएल' असा आहे.*

**मोझेस जोसेफ**, अश्दोद, इसराएल
(फेब्रुवारी २०१२)

## *सहृदय वाचनप्रेमींसाठी*

*वाचनसंस्कृती रुजवणे, वाढवणे ही एकट्या संपादकाची किंवा लेखकाची जबाबदारी आहे असे मला वाटत नाही. ही सामुदायिक प्रक्रिया आहे. किंबहुना वाचनसंस्कृती वाढवणे ही एक सातत्याने चालणारी चळवळ व्हायला पाहिजे असे मला वाटते.*

*अंतर्नादमधील विविध लेख, कविता, पुस्तक परीक्षणे इ. तर आवडतेच पण विशेष आवडते ते म्हणजे वाचकांच्या पत्रव्यवहाराला दिलेले महत्त्वपूर्ण स्थान. अंतर्नादमधील लेखांवर वाचकांच्या अनेक महिने चर्चा चालू असतात. मला अंतर्नाद आवडल्यामुळे माझ्या कार्यालयातील सहकारी, मित्रमंडळी, नातेवाईक यांना सांगून वर्गणीदार वाढविण्यास सुरुवात केली. विवाह, सेवानिवृत्ती, प्रमोशन्स, परीक्षेतील यश इ. प्रसंगी कौतुक करण्यासाठी अंतर्नादची एक वर्षाची वर्गणी भरून अंक सप्रेम भेट देण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर हेही सांगितले की अंक आवडल्यास एक वर्षानंतर आपल्या खर्चाने अंक चालू ठेवा.*

*यावर्षी (२०१३) मी 'अंतर्नाद' आणि 'साधना'चे प्रत्येकी चाळीसहून अधिक वर्गणीदार केलेले आहेत. मला असे वाटते की अंतर्नादच्या किमान एक हजार वर्गणीदारांनी कमीत कमी दोन नवीन वर्गणीदार करायचे मनावर घेतले तर अंतर्नादला सहज दोन हजार नवे वर्गणीदार मिळू शकतील. अंतर्नादच्या नूतनीकरणाची टक्केवारी ८०% हून अधिक आहे. एकदा अंतर्नादचा वर्गणीदार झालेला अंक सहसा बंद करत नाही असा माझा अनुभव आहे.*

*कुठलेही मासिक हे वर्गणीदारांच्या बरोबरच जाहिरातदारांच्या पाठिंब्यावर चांगली वाटचाल करू शकते. व्यापार-उद्योगाच्या सर्वच थरांत संपादकांच्या ओळखी असतीलच असे नाही. तसेच संपादकांनी दारोदार जाहिरातींसाठी हिंडावे हेही उचित वाटत नाही. मात्र वाचकांपैकी अनेकजण व्यापारी आस्थापने, उद्योगक्षेत्र, बँका इत्यादी ठिकाणी चांगल्या हुद्द्यावर असतात अशा 'सहृदय' वाचकांनी मनावर घेतले तर ते जाहिरातीसाठी शब्द टाकू शकतात.*

*अंतर्नाद अनेक वर्षे नियमितपणे प्रसिद्ध होत आहे व त्याचबरोबर आपला दर्जाही टिकवून आहे.*

**प्रमोद बेंद्रे**, आनंदनगर, पुणे
*(जून २०१३)*

## *बंगाल आणि मराठे*

*दिवाळी अंकातील रवीन्द्रनाथ टागोर यांच्यावरील लेख खूपच आवडला. मी चौदा वर्षे कोलकत्यात राहिलो आहे आणि माझ्या मते सर्वसामान्य बंगाली माणसाचे वाचन सर्वसामान्य मराठी माणसापेक्षा खूपच जास्त आहे. कोलकत्यातील वार्षिक ग्रंथयात्रेला बंगाली जनतेकडून मिळणारा प्रतिसाद हे याचेच द्योतक आहे. संगीत आणि नृत्य यांचीही आवड मला महाराष्ट्रापेक्षा बंगालमधे अधिक आढळली.*

*बंगालमधील महाराष्ट्रीयांविषयीच्या भावना या संमिश्र आहेत. बंगालमधील मराठ्यांच्या स्वाऱ्या व त्यांतून निर्माण झालेली बंगाली समाजातील दहशत यांचे हे पर्यवसान असावे. मराठ्यांचा उल्लेख इथे 'बोरगीस' (बारगीर शब्दावरून) म्हणून केला जायचा. 'बोरगीस येतील हं, झोप पटकन' अशी लहान मुलांना भीती घालणारे एक अंगाईगीतही इथे प्रसिद्ध होते. मी जेव्हा तेथील आय.आय.एम.मधे प्रवेश घेतला तेव्हा जाणवले, की मराठ्यांच्या इतिहासाबद्दलच्या माझ्या धारणा आणि अन्य भारतात प्रचलित असणाऱ्या धारणा यांत खूप फरक आहे. आमच्या मॅनेजमेंट अभ्यासक्रमात इतिहास हाही एक विषय होता. मराठ्यांची बंगालमधील प्रतिमा 'लुटारू' अशी होती व त्यांच्यापासून जेव्हा ब्रिटिशांनी बंगाल्यांना संरक्षण पुरवले तेव्हा बंगाली जनतेला खूप आनंद वाटला, असे माझ्या प्रा. नबेन्दू सेन या प्राध्यापकांकडून मी ऐकले तेव्हा मला धक्काच बसला. मला तोवर ठाऊक नसलेल्या अनेक गोष्टी प्रा. सेन यांनी मला शांतपणे समजावून सांगितल्या. कोलकत्यात लोअर सर्क्युलर रोड नावाचा एक रस्ता आहे. तो रस्ता म्हणजे मूळचा मराठ्यांना दूर ठेवण्यासाठी, ब्रिटिशांनी खणलेला एक खंदक होता व त्याला 'मराठा डिच' असे नाव होते!*

**गिरीश वैद्य,** बंगलोर.
*(जुलै २०१३)*

## *अंतरीच्या जिव्हाळ्याने लिहिलेला लेख*

*'अंतर्नाद'चा मेचा अंक कालच हाती आला. अंक उघडताच कै. प्रिय मुकुंदावर लिहिलेला आपला विस्तृत, सर्वस्पर्शी व यथोथित दर्शन घडविणारा, भावपूर्ण व अंतरीच्या जिव्हाळ्याने लिहिलेला लेख पाहावयास मिळाला. तो लेख वाचताना माझे डोळे कितीदा भरून आले ते आपल्याला कसे सांगू? लेख ती. कै. शंकरभाऊ, मुकुंदा, शांताबाई या सर्वांच्या कार्याचे उत्तम मूल्यमापन करणारा, त्या सर्वांबद्दल आपल्या मनात असलेला*

*जिव्हाळा व आपुलकी यांची खात्री पटविणारा, माहितीपूर्ण आणि पुनःपुन्हा वाचावा असे वाटणारा आहे. शं.वा.किं.ची कन्या व मुकुंदाची बहीण म्हणून आपल्या लेखाने मला वाटणारी कृतज्ञता आपल्यापर्यंत पोहोचवावी म्हणून हे पत्र. मुकुंदावर अनेक लेख, अग्रलेख वाचले. आपला, दशरथ पारेकरांचा, गाडगीळांचा, नरेंद्र चपळगावकरांचा असे काही लेख मी फोटोकॉपी करून ठेवले आहेत. 'अंतर्नाद'चे मराठी साहित्यजगात एक वैशिष्ट्यपूर्ण, मोलाचे, मानाचे स्थान आहे. त्यामुळे त्यात आलेल्या या भावोत्कट लेखाचे महत्त्वही आगळेच आहे. पुन्हा एकवार अंतःकरणापासून आपल्या लेखाबद्दल मी ऋणी आहे असे म्हणते. आपण माझी भावना समजून घ्याल असा विश्वास आहे.*

**मालती शं. किर्लोस्कर,** सांगली
*(ऑगस्ट २०१३)*

## आनंदवनातले मुकुंदराव आठवले

*आत्ताच मे २०१३चा अंतर्नाद हाती आला. आपण लिहिलेले कै. श्री. मुकुंदराव किर्लोस्करांवरील संपादकीय अतिशय आवडले. आनंदवनातही ते वारंवार येत. त्यामुळे त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा परिचय वाचनात येताच त्या आठवणी जाग्या झाल्या. एक विशेष आठवण म्हणजे आमच्या लग्नात, माझे वडील कै. ती. भाऊसाहेब वैशंपायन व कै. पू. बाबा या व्याह्यांचा त्यांनी काढलेला फोटो. त्यांनी तो कधी काढला कुणास ठाऊक, पण लग्नानंतर आठवड्याच्या आतच तो माझ्या पत्त्यावर आला व माझी दुर्मिळ ठेव बनला. इतका आनंद त्यामुळे मिळाला. माझ्या वडिलांवर स. भु. शिक्षण संस्थेने आता जो विशेषांक काढला आहे त्यात हा अनमोल फोटो देता आला. जर आज कै. मुकुंदराव असते तर हा आनंद त्यांच्याबरोबर वाटून घेता आला असता.*

*उत्तम कविता व तिचे रसग्रहण हे सदर पुन्हा सुरू केले आहे. तेही आवडते. नित्यनूतन आनंदवन व हेमलकसा तिसरी पिढी कशी चालवीत आहे हे बघण्यास पुन्हा एकदा यावे.*

**डॉ. भारती विकास आमटे,** वरोरा, जि. चंद्रपूर ४४२९१४
*(ऑगस्ट २०१३)*

## पारशांची खासियत आणि इतरांचेही दातृत्व

*मार्च अंतर्नादमधील तीन पारशी व्यक्तींच्या चरित्रकथा अप्रतिम आहेत. ती नुसती चरित्रे नाहीत, किंबहुना, ती पारंपरिक पद्धतीची चरित्रे नाहीतच. त्यांना पारशांच्या आठवणींच्या किंवा आठवणीतल्या पारशांच्या स्मरणकथाही म्हणता येईल. कारण त्या व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्वांविषयी लिहिताना लेखकाने तो काळ, त्यांनी उभ्या केलेल्या संस्था, त्यांची जडणघडण कथाकथनाच्या अंगाने लिहिली आहे. एवढे करूनही मला आवडलेली गोष्ट म्हणजे ते कथन एकांगी वाटत नाही. पारशांचे गुणधर्म जसे असतात, स्पष्ट दिसतात, तसेच त्यांनी त्यांचा विक्षिप्त स्वभावही दाखवला आहे.*

*सामान्यपणे पारशी सरळ, सखोल आणि न्यायी. त्याचप्रमाणे उथळपणा आणि अन्यायाच्या विरोधात. पूर्वी पुणे-मुंबई जलदगती मार्ग झाला नव्हता तेव्हा तळेगावचे पोलीस विनाकारण वाहतूक कोंडी, खोळंबा करीत. तेव्हा एका संध्याकाळी सर्व मोटारी रांगेने पहिल्या-दुसऱ्या गीअरमध्ये चालल्या होत्या. एका महागड्या गाडीचा बेशिस्त चालक रांगेत घुसण्याचा प्रयत्न करीत होता. माझ्या पुढचा वयस्क पारशी गाडीवाला त्याला घुसू देत नव्हता; त्याने शेवटी खुशाल त्या चकचकीत गाडीला चेपले. त्यात पारशाच्या फियाटलापण लागले. पारशाच्या बाजूने भांडायला मी उभा राहिलो, पण चुकीच्या मार्गाने पुढे रेटणारी गाडी चेपण्याएवढी हिंमत माझ्यात नव्हती आणि ती पारशाची खासियत होती.*

*लेखात शेवटी कै. भालचंद्र – BG – देशमुखांच्या दानशूरपणाचा उल्लेख आहे. माझाही अनुभव असाच आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देणाऱ्या एका संस्थेचा मी अध्यक्ष होतो. आमच्या संस्थेतर्फे डॉ. सी. डी. देशमुखांचे टपाल तिकीट निघावे म्हणून आम्ही प्रयत्न करीत होतो. खूप खटाटोप केल्यावर श्री. मनोहर जोशी व श्री. अरुण शौरी यांच्या मदतीने ते तिकीट प्रसृत झाले. बी. जी. देशमुख तेव्हा उपस्थित होते. काही दिवसांनी आमच्या संस्थेच्या व्यवस्थापकाचा उन्मादित झाल्यासारखा फोन आला, की साध्या टपालाने रु. १५ लाखाचा एक चेक संस्थेकडे आला आहे. मी त्याला म्हटले, "अहो १५ हजाराचा असेल, पुढची पैशाची शून्ये तुम्ही मोजता आहात!" पण तो खरोखर १५ लाख रुपयांचाच चेक होता. भालचंद्र देशमुखांचा. त्या रकमेची पावती, 80Gचे सर्टिफिकेट व पुष्पगुच्छ व्यक्तिशः पुण्यात त्यांच्या घरी नेऊन देण्यासाठी मी त्यांची भेट फोनवर मागितली तर "उगीच खर्च करू नका. पावती-सर्टिफिकेट पोस्टाने पाठवा," असे सांगून त्यांनी संवाद संपवला.*

**सुहास मोकाशी,** दादर (पश्चिम), मुंबई
*(सप्टेंबर २०१३)*

## किर्लोस्कर मासिकाचे योगदान

*अंतर्नाद मे २०१३ मधला संपादकीय लेख आनंद देणारा होता. सुरुवातीपासूनच आमचे वडील किर्लोस्करचे वर्गणीदार होते. वयाच्या आठ-नऊ वर्षांपासून प्रत्येक महिन्याला १ तारखेनंतर मी किर्लोस्करची उत्कंठतेने वाट पाहायचो. मराठी अभिजन, सुसंस्कृत घरांमधील, का. रा. मित्रांच्या 'मनोरंजन'च्या अस्तानंतर निर्माण झालेली दरी किर्लोस्करने भरून काढली होती.*

*मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत जाहिरातीसकट (आणि त्या पुष्कळच असायच्या) सर्व मजकूर वाचून काढणे हा बहुतेकांचा छंद असायचा. 'दरमहा एका महापुरुषाला हुडकून काढणारे मासिक' अशी हेटाळणी काही टीकाकार करत असले, तरी शेवटपर्यंत सुरुवातीचा लेख म्हणजे मोठ्यामोठ्यांची व्यक्तिचित्रे असायची आणि तो आवडीने वाचल्याशिवाय आम्ही कधीही पुढे गेलेलो नाही. नंतर ख्यातकीर्त झालेल्या अनेक व्यक्तींचा शोध किर्लोस्करने अगोदरच घेतलेला असायचा.*

*याखेरीज बाकीचाही मजकूर चित्तवेधक असायचा. वि. सी. गुर्जर, ग. ल. ठोकळ, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांच्या चटकदार लघुकथा. माझी आठवण बरोबर असेल तर खांडेकर आणि फडके यांच्या कादंबऱ्यांची क्रमशः प्रसिद्ध होणारी प्रकरणे पुढे काय होते याची उत्सुकता जागवत ठेवायची. ना. धों. ताम्हनकरांची 'दाजी' ही हास्यमाला अप्रतिम होती. लेखांसोबत*

*चित्रकार माळी, जाधव यांचे समर्पक रेखाटन. शं.वा.किं.ची हास्यचित्रे आनंदात भर टाकायची. मुखपृष्ठावरील सुंदर बाया जीव कासावीस करत. दिवाळी अंकही जाडजूड आणि सुरेख असायचा.*

*पण सगळ्यात गाजली ती महादेवशास्त्री दिवेकरांची 'बुवाबाजी व स्त्री' ही धक्कादायक लेखमाला. उपासनी महाराज तर होतेच पण आणखीही ढोंगी संत आणि बुवा यांची वस्त्रे किर्लोस्करने टराटरा फाडली होती. बुवाबाजीला आळा घालण्यात अक्षरे किती प्रभावी ठरतात याचे हे ज्वलंत उदाहरण. पुरोगामी महाराष्ट्र उभारण्यात किर्लोस्करचा मोलाचा वाटा होता.*

*आणखी एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे. कॉलेजात असताना १९५०मध्ये 'मनोहर'ने माझा एक लेख छापला होता. त्या अंकाबरोबर लेखाची दोन कात्रणे व रु. १५ची मनिऑर्डरही आली होती. म्हणजे कमालच! कारण माझा मासिक पॉकेटमनी रु. २० होता. किर्लोस्कर मासिक चोख आणि ताबडतोब मोबदला पाठवायचे. (अंतर्नादने तो कित्ता गिरवला आहे, ही सुखदायक गोष्ट.)*

*मागे वळून बघताना वाटते, माझ्यात सुसंस्कृतपणाचा काही अंश असेल, तर तो रुजवण्यात किर्लोस्करच कारणीभूत होता. अशी मासिके आता का बरे निर्माण होत नाहीत?*

**किशोर आरस,** ताडदेव, मुंबई
*(दिवाळी २०१३)*

## शेवटी नुकसान होते ते देशाचेच

*मार्च अंकातील डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांचा लेख (लॉग-इन आयडी आणि पासवर्ड विसरलेली सुवर्णभूमी) आवडला. माझ्या भारतभेटीमध्ये डॉ. विजय केळकर, प्रभाकर देवधर यांसारख्या मित्रांबरोबर मी या विषयावर चर्चाही केली. दाभोळकर यांच्या प्रतिपादनाशी मी पूर्णतः सहमत आहे. नर्मदाप्रकल्पाच्या वेळी मी जागतिक बँकेशी संलग्न असलेल्या एका संस्थेबरोबर काम करत होतो. बँकेच्या अध्यक्षांनी एका प्रख्यात कॅनेडियन संस्थेची प्रकल्पाचे फायदे व प्रकल्पावरील आरोप यांचा अभ्यास करण्यासाठी नेमणूक केली. त्या कॅनेडियन संस्थेचा उत्कृष्ट अहवाल पुस्तकरूपाने प्रकाशितही झाला. प्रकल्पग्रस्तांचे योग्य तसे पुनर्वसन न केल्याबद्दल अहवालात भारत सरकारवर ठपका ठेवला होता. पण त्याचबरोबर प्रकल्पाचे फायदेदेखील अहवालात अधोरेखित केले होते. बँकेने घालून दिलेल्या निकषांची शासनाने पूर्तता केली नाही म्हणून बँकेने आपले कर्ज रद्द केले.*

*नर्मदाप्रकल्प पार पडल्यावरही गेल्या काही वर्षांमध्ये मी अनेकदा गुजरातला गेलो आहे. कधीकधी तर वर्षातून तीनदा माझे जाणे होत असते. माझ्या कामाचे मुख्य क्षेत्र खते व कृषिरसायने हे असल्याने पार कच्छपर्यंतच्या ग्रामीण भागातही माझे जाणे होते. या सर्व परिसरातील शेती व पाणीप्रश्न यांत प्रचंड सुधारणा झाल्याचे मी पाहिले आहे. उत्तम काम करणाऱ्या काही अपवादस्वरूप संस्था वगळता, बहुसंख्य एनजीओंचा कार्यक्रम (अजेंडा) मात्र मला संशयास्पद वाटत आला आहे. त्यांच्या कारवायांमुळे व त्यातून झालेल्या विलंबामुळे दोन उत्कृष्ट प्रकल्प तीन-चार वर्षांच्या मेहनतीनंतर कसे रद्द करावे लागले याचा मी स्वतः एक साक्षीदार आहे. त्यातला एक भारतात तामिळनाडूमध्ये होता व दुसरा थायलंडमध्ये होता. माझ्या व्यावसायिक कारकिर्दीतलाच हा प्रत्यक्ष अनुभव होता. दोन्ही प्रकल्पांमधील एकत्रित गुंतवणूक (त्यावेळचे) ९० कोटी डॉलर्स होती.*

*अणुऊर्जा प्रकल्पाबाबतही माझ्या भावना अशाच आहेत. महाराष्ट्रात होऊ घातलेल्या जैतापूर प्रकल्पाचे सुरक्षानिकष हे निश्चितच पूर्वीपेक्षा खूप अधिक काटेकोर आहेत. तंत्रज्ञानही आता पूर्वीपेक्षा खूप जास्त पुढारलेले आहे. अणुऊर्जावापराचे फ्रान्स हे उत्तम उदाहरण आहे. ते वापरत असलेल्या एकूण ऊर्जेपैकी ८५ टक्के ही अणुऊर्जा आहे. अणुऊर्जाक्षेत्रात चाळीस-चाळीस वर्षे काम केलेल्या माझ्या तीन मित्रांकडून मी या विषयाची शहानिशा करून घेतली आहे. दुर्दैवाने काही राजकारणी नेते अशिक्षित जनतेचा फायदा उकळतात आणि काही उच्चशिक्षित लोकही या प्रश्नाबाबत लोकांच्या भावना भडकवत ठेवतात. शिवाय, तसे करताना ते कुठलाही उचित पर्याय मात्र लोकांपुढे ठेवत नाहीत. शेवटी नुकसान होते ते देशाचेच!*

**डॉ. आनंद बर्वे,** वॉशिंग्टन डिसी., युएसए,
*(दिवाळी २०१५)*

## नैराश्य दूर करणारे लेख

*'नव्वदीतली नवलाई' हा प्रा. यास्मिन शेख यांच्यावरील आपला संपादकीय लेख सुरेख. नव्वदीतही स्वतःच्या दैनंदिन व्यवहारात स्वतःला गुंतून ठेवून दिवसभर कुठल्या ना कुठल्या कामात गर्क असणे व क्षणाचीही विश्रांती वा वामकुक्षी न घेता हसतमुखाने वावरणे, या त्यांच्या जीवनशैलीला मनापासून दाद द्यावीशी वाटते. मराठी भाषेवर त्यांनी असामान्य प्रभुत्व मिळवले व आज 'अंतर्नाद'सारख्या मासिकाच्या त्या व्याकरण-सल्लागार म्हणून काम करत आहेत ही कौतुकाची गोष्ट आहे.*

*त्यांची कन्या डॉ. शमा भागवत (एक ॲनेस्थेटिस्ट) व मी (एक कार्डिओव्हस्क्युलर सर्जन) आमच्या वैद्यक व्यवसायाच्या निमित्ताने एकमेकांना ओळखतो. पण त्या यास्मिन शेख यांच्या सुकन्या आहेत याचा शोध हा लेख वाचल्यानंतरच झाला. त्यांच्या हुरहुन्नरी व प्रेमळ स्वभावाचे प्रतिबिंब डॉ. शमा भागवत यांच्यामध्ये पुरेपूर उतरले आहे.*

*'किमया करांची – प्रतिभेच्या विध्वंसाची' हा साधना बहुळकर यांचा मासिकाच्या मुखपृष्ठावरील चित्रासंबंधीचा रसग्रहणात्मक लेख अप्रतिम आहे. चित्राचे अवलोकन कसे करावे याचे उत्तम मार्गदर्शन त्यांनी या लेखातून सहजेतेने केलेय व त्यामुळे चित्र बघण्याचा व समजून घेण्याचा एक नवा दृष्टिकोन समजला.*

*समाजाची एकूणच खालावलेली सांस्कृतिक मूल्ये व नैतिक पातळी व त्यामुळे येणारे नैराश्य, काही क्षणतरी दूर होण्यास अंतर्नादमधील लेखांची मोलाची मदत होते. असेच उत्तमोत्तम व विविध विषयांवरील लेख 'अंतर्नाद'मधे येत राहोत ही इच्छा.*

**डॉ. सुधीर भाटे**, डेक्कन, पुणे
*(दिवाळी २०१५)*

## बिघडणारी मराठी भाषा

मे २०१५ अंकात मराठी भाषेच्या संबंधातील विचार व्यक्त करणारे तीन वाचनीय लेख प्रसिद्ध केले आहेत. मराठी भाषेत अनेक अनावश्यक शब्दांचा शिरकाव, सुळसुळाट, धुमाकूळ सध्या चालू आहे आणि त्यातच आपण मोठेपणा मिरवत आहोत. असे मानले जाते की एखाद्या भाषेत परभाषेतील शब्द आले, की ती भाषा वाढते, अधिक समृद्ध होण्यास मदत होते. आपल्या मराठीचे पाहता, अगोदर मुस्लिम व नंतर इंग्रजांच्या राजवटीमुळे अनेक उर्दू, हिंदी व इंग्रजी शब्दांची भर पडली. काही हिंदी-इंग्रजी शब्द तर आपण रोजच्या जीवनात सरसकट मूळ मराठी शब्दांऐवजी वापरत आहोत. ते आपल्या अंगवळणी पडले आहे. तथापि अलीकडील स्वातंत्र्योत्तर काळात उत्तरेकडून सतत होत राहणाऱ्या हिंदी भाषेच्या वर्चस्वामुळे मराठी भाषा आणखीच बिघडून मूळ अर्थ न पाहता चुकीचे शब्द वापरले जात आहेत. असे काही शब्द आणि त्यांचे केले जाणारे दैनंदिन जीवनातले उपयोग खाली देत आहे.

१) संपन्न : आज कोणताही समारंभ, सोहळा झाला, असे न म्हणता तो समारंभ संपन्न झाला असे म्हणतात. नुसता 'झाला' असे म्हणण्याने कोणता गैर अर्थ व्यक्त होतो?

२) षड्यंत्र : कट, कारस्थान या शब्दांऐवजी हा शब्द!

३) निर्धारित : ठरलेली वेळ. ठरलेली रेल्वे/बस गाडीची वेळ असे न म्हणता, निर्धारित गाडी आज उशिरा येत आहे, अशा रेल्वे स्थानकावरील घोषणा आपण रोज ऐकतो.

४) बोजा : एखादी सवलत दिली, पगारवाढ मान्य करण्यात आली, तर त्याचा भार पडला असे म्हणायचे नाही. बोजा पडला, असे म्हटले तर कोणता विशेष असा भार पडतो?

आणखी कितीतरी अनावश्यक शब्द देता येतील. येथे थांबतो.

**मंगेश नाबर,** परळ, मुंबई
(दिवाळी २०१५)

## आठवणी डॉ. वसंतराव गोवारीकरांच्या

अंतर्नादच्या जानेवारी अंकातील अजित कानिटकरांचा डॉ. वसंत गोवारीकर यांच्यावरील लेख वाचला. त्यांच्या संबंधातील दोन आठवणी येथे नोंदू इच्छितो.

गोवारीकर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते त्या काळात मी संख्याशास्त्र विभागाचा प्रमुख होतो. हवामान अंदाज या विषयात माझी थोडी लुडबुड होती. 'गोवारीकर मॉन्सून मॉडेल' या नावाने ओळखली जाणारी पद्धत ही संख्याशास्त्रीय होती. तिचे काही तांत्रिक पैलू मला पटत नसत. म्हणून मी आणि सहकाऱ्यांनी एक अन्य मॉडेल विकसित करून प्रसिद्ध केले.

या काळात एके दिवशी मी माझ्या कार्यालयात काम करीत असताना माझा शिपाई धावत आत आला. संध्याकाळचे पाच वाजले होते. तो म्हणाला, की कुलगुरुमहोदय चालत आपल्या विभागाकडे येत आहेत. मी उत्तर दिले, की ते खरेच आले तर चहापानाची व्यवस्था करा. एवढ्यात ते पोचलेदेखील. त्यांना माझ्या वैज्ञानिक संशोधनाबद्दल आणि हवामानअंदाज या विषयातील कामाबद्दल उत्सुकता होती. मी माझा दृष्टिकोन समजावून सांगितला. गोवारीकरांनी काही उपयुक्त सूचना केल्या व मदतीचा हात पुढे केला. त्यांच्यामुळे आम्हाला हवामानखात्यातून आकडेवारी व अन्य माहिती मिळणे सुकर झाले.

दुसरी आठवणसुद्धा गोवारीकरांनी विद्यापीठातील उपयोजित संशोधनाला केलेल्या भरघोस मदतीची आहे. खरे तर, मी व माझे सहकारी सातत्याने वीस-पंचवीस वर्षे औद्योगिक कंपन्यांसाठी विविध प्रकारचे काम करीत होतो. त्यातून मिळणाऱ्या रकमांचे धनादेश रीतसर विद्यापीठाच्या 'सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क' या खात्याकडे सुपूर्द करीत होतो. गोवारीकरांचा अपवाद वगळता अन्य कोणी कुलगुरूंनी (मदत देणे फार दूर) उत्तेजनाचा एक शब्दसुद्धा कधी उच्चारला नाही. म्हणून गोवारीकरांचे वेगळेपण आम्हाला फार भावले.

माझी एक आठवण संकरित गोपैदास संशोधनाच्या संदर्भात आहे. विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागातील प्राध्यापक सीतारामम यांना बैलांच्या शुक्रजंतूंच्या अभ्यासात एक शोध लागला. सीतारामम यांच्या अभ्यासाला संख्याशास्त्रीय पाठबळ देणे हे माझे आवडीचे काम होते. म्हणून माझी त्या विभागात सतत ऊठबस होती. संकर करण्यासाठी देशी गाईच्या शरीरात विलायती बैलाचे वीर्य कृत्रिम रेतन पद्धतीने घालतात. हा खटाटोप ६०-७० टक्के वेळा फसतो व गाय गाभण राहात नाही. यामुळे खर्च वाढतो व अमूल्य वेळ वाया जातो.

सीतारामम यांचा शोध असा, की वीर्यावर काही विशिष्ट प्रक्रिया केली तर कृत्रिम रेतन यशस्वी होण्याचे प्रमाण खूपच वाढते. हे संशोधन व्यवहारात आणले तर शेतकऱ्यांच्या पदरात भरघोस फायदा पडेल असे डेअरी तज्ज्ञांचे मत होते. अर्थात असे संशोधन वापरात आणण्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर चाचण्या घेणे (फील्ड टेस्टिंग) गरजेचे असते. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च येतो. शिवाय सरकारच्या पशुधन विभागाचे पाठबळ जरुरीचे असते. हा सगळा घाट कसा जुळून येणार?

ही आमची चिंता गोवारीकरांच्या कानावर गेली. त्यांनी प्रथम तो विषय नीट समजावून घेतला. नंतर सांगून टाकले, की हा प्रस्ताव सरळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्यासमोर मांडला पाहिजे. ती जबाबदारी गोवारीकरांनी स्वतःवर घेतली. थोड्याच दिवसांत त्यांनी निरोप पाठवला की आपण आपली योजना सगळ्या मंत्रिमंडळासमोर विस्ताराने सांगायची आहे, त्या तयारीला लागू या. कुलगुरूंच्या दालनात बसून सर्वांनी या निवेदनाची आखणी केली. निवेदन प्रभावी होण्यासाठी कोणती काळजी घ्यावी हे आम्ही गोवारीकरांकडून शिकलो.

ठरल्या दिवशी मंत्रालयात राजमुद्रा नावाच्या दालनात बैठक झाली. मनोहर जोशी, गोपीनाथ मुंडे व सर्व मंत्रिगण हे श्रोते. गोवारीकर हे वक्ते. सीतारामम व अन्य शास्त्रज्ञ त्यांच्या पाठीशी. व्याख्यान उत्तम झाले. काही चर्चेनंतर मंत्रिमंडळाने आमच्या योजनेस तोंडी संमती दिली.

यथावकाश गोवारीकर निवृत्त झाले. प्रत्यक्षात सरकारकडून एक दिडकीसुद्धा पुणे विद्यापीठापर्यंत आली नाही. पशुधन

*विकास खात्याने या कार्यक्रमात काहीच रस दाखवला नाही. पण यात गोवारीकरांचा काहीच दोष नव्हता.*

*माझ्या पुणे विद्यापीठातील ३०-३५ वर्षांत कुलगुरूंनी संशोधनात रस घेण्याचा व हातभार लावण्याचा हा अनुभव अद्वितीय होता.*

**प्रा. अनिल गोरे**, सोपानबाग, पुणे
*(मार्च २०१६)*

## *कर्मवीर भाऊराव आणि ग. दि. माडगूळकर*

*ही साधारण १९४८ सालची घटना. कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांचे शिक्षक व विद्यार्थी सातारा येथील गांधी टेकडी फोडून संस्थेच्या शैक्षणिक संकुलासाठी जागा सपाट करत होते. त्याचवेळी शेजारूनच चाललेल्या एसटी बसमधील ग. दि. माडगूळकर यांनी ते दृश्य बघितले. गदिमा इतके भारावून गेले, की लगेच मोती चौकात ते एसटीतून उतरले व टांगा पकडून माघारी आले. एका बाभळीच्या झाडाखाली त्यावेळी कर्मवीरांशेजारी बसून गदिमांनी थोडी चर्चा केली. भर उन्हात घाम गाळत शिक्षक व विद्यार्थी आणि स्वत: कर्मवीरही करत असलेले ते काम विलक्षण स्फूर्तिदायक होते. रयतेला, कष्टकऱ्याला, बहुजनसमाजाला, श्रमिकाला प्रतिष्ठा मिळवून देणारे 'कमवा व शिका' पद्धतीचे, श्रमाची प्रतिष्ठा जागवणारे ते काम पाहून शीघ्रकवी ग.दि.मां.ना कर्मवीर अण्णांसोबत गांधी टेकडी, सातारा येथे झाडाखाली बसून स्फुरलेले काव्य :*

***श्रमाची प्रतिष्ठा***

*नसे राऊळी वा नसे मंदिरी*
*जिथे राबती हात तेथे हरी ॥ध्रु.॥*

*जिथे भूमीचा पुत्र गाळील घाम*
*तिथे अन्न होऊन ठाकेल श्याम*
*दिसे सावळे रूप त्याचे शिवारी*
*जिथे राबती हात तेथे हरी ॥१॥*

*नको मंत्र त्याला मुनी ब्राह्मणांचे*
*तया आवडे गीत श्वासा-घणांचे*
*वसे तो सदा स्वेदगंगे किनारी*
*जिथे राबती हात तेथे हरी ॥२॥*

*शिळा फोडती संघ पाथरवटांचे*
*कुणी कापसा रूप देती पटांचे*
*तयांच्या घरी नांदतो तो मुरारी*
*जिथे राबती हात तेथे हरी ॥३॥*

*जिथे काम तेथे उभा श्याम आहे*
*नव्हे घर्म रे धर्म ते रूप पाहे*
*असे विश्वकर्मा श्रमाचा पुजारी*
*जिथे राबती हात तेथे हरी ॥४॥*

**सुभाष पाटील,** विश्रामबाग, सांगली
(मार्च २०१६)

## *लेखकांना दिलासा देणारा प्रतिसाद*

*गतवर्षी आपण आयोजित केलेल्या दि. बा. मोकाशी कथास्पर्धेसाठी पाठविलेल्या माझ्या 'टँकर' या कथेला आपण प्रथम पुरस्कार जाहीर केलात. त्याचा निश्चित आनंद आहे. पण या कथापुरस्काराने माझ्या आयुष्याला एक आनंदमय वळण मिळाले.*

*या कथेसाठी गेल्या चार-पाच महिन्यांत मला महाराष्ट्रातून अभिनंदनाचे जवळपास शंभरएक फोन आले. त्यामुळे मी बऱ्यापैकी कथा लिहू शकते, हा नवा शोध मला लागला. अन्यथा आजवर ४० वर्षे मी कवितेत रमले होते. माझी थोडीफार ओळख असली तर ती एक कवयित्री म्हणूनच आहे. परंतु या पुरस्काराने मला अभिव्यक्तीची एक नवी वाट सापडली. याचे सर्व श्रेय आपण देऊ केलेल्या पुरस्काराला आहे.*

*खरे तर या पुरस्कारापूर्वी आपली कोणती ओळख नव्हती, साहित्यक्षेत्रातही माझी ओळख नव्हती, परंतु आपण व कथास्पर्धेच्या निवड समितीने अतिशय नि:स्पृहपणे या पुरस्कार व्यवहाराकडे पाहिले आणि साहित्य प्रांतातही भ्रष्टाचार माजला असताना या क्षेत्रात आजही अभिरुचिसंपन्न आणि न्याय्यवृत्तीने साहित्याचे मूल्यमापन करणारी माणसे अस्तित्वात आहेत याचा विश्वास दिलात. हा विश्वास आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तळमळीने साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकांना दिलासा देईल अशी मला खात्री वाटते.*

*विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे ही कथा वाचल्यानंतर एका चित्र-निर्मात्याने माझ्याशी संपर्क करून या कथेवर लघुपट काढण्याची इच्छा व्यक्त केली आणि सध्या त्या कथेच्या लघुपटाचे काम सुरू आहे. बी सुपीक जमिनीत पडले की किती जोमाने झाड वाढते याचे हे उत्तम उदाहरण आहे. तेव्हा मनापासून आभार. अंतर्नादच्या परिवाराशी जोडून घेणे ही माझ्या आनंदाची गोष्ट आहे.*

**छाया कोरेगांवकर**, बदलापूर (पूर्व)
*(जून २०१६)*

## *अच्युतराव आणि इंदिरा गांधी*

*न्या. नरेन्द्र चपळगावकर यांचा अच्युतराव पटवर्धन यांच्यावरील लेख वाचून पूर्वी न लिहिलेले असे काहीतरी लिहावेसे वाटले व म्हणून हे पत्र. राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर सगळे सार्वजनिक समारंभ आणि प्रसिद्धी यांपासून ते कटाक्षाने दूर राहिले होते व फक्त आध्यात्मिक साधनाच करण्यात आयुष्य व्यतीत करत होते. त्यावेळी मिरज येथे त्यांच्या निकटवर्तीयांनी त्यांच्याशी गप्पा मारायचा एक दुर्मिळ योग तेथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात घडवून आणला होता. त्याचा वृत्तान्त एक पत्रकार या नात्याने मी त्यावेळी लिहिला होता, पण त्यातून काही भाग वगळला होता. आता तो लिहायला हरकत नसावी.*

*अच्युतरावांशी झालेल्या या संवादाच्या शेवटी औत्सुक्य म्हणून आणि त्यांच्या परवानगीने मी त्यांना एक व्यक्तिगत स्वरूपाचा प्रश्न विचारला होता. नेहरू कुटुंबीयांशी रावसाहेब व अच्युतराव यांचे अतिशय घनिष्ठ संबंध होते, हे सर्वश्रुत होते. या पार्श्वभूमीवर अच्युतजी व इंदिराजी यांचे लग्न व्हावे असे*

जवाहरलालजींना वाटत होते व तसा प्रस्ताव त्यांनी रावसाहेबांकडे दिला होता असे ऐकले होते. 'ही गोष्ट खरी का?' असे मी शेवटी अच्युतजीना विचारले.

त्यांच्या प्रतिक्रियेचा अंदाज नव्हता. पण या प्रश्नावर ते मनमोकळे हसले आणि म्हणाले, 'होय, ते खरं आहे.'

'मग तुम्ही नकार का दिलात?'

अच्युतजी म्हणाले, 'इंदिराजी फार महत्त्वाकांक्षी आहेत, हे तेव्हाही दिसत होतं. त्यांच्याशी माझं जमेल, असं मला त्या क्षणी वाटलं नाही, म्हणून मी नकार दिला.'

औचित्याचा भाग म्हणून मी त्यावेळी ह्या प्रश्नाचा वृत्तान्तात समावेश केला नव्हता, पण आज हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

**दशरथ पारेकर,** कोल्हापूर
(फेब्रुवारी २०१७)

## एका सांस्कृतिक चळवळीचा शेवट

'सांस्कृतिक समृद्धीसाठी' असे समर्पक, अर्थपूर्ण बोधवाक्य असलेले, गेली तेवीस वर्षे वाचकांना खऱ्या अर्थाने श्रीमंत करणारे 'अंतर्नाद' मासिक स्वरूपात बंद होण्याच्या मार्गावर आहे हे ऐकून धक्का बसला. वाईट वाटले. एका वर्षापूर्वीच्या पुण्यातील भेटीत भानू काळे ह्यांनी ह्या बातमीचे सूतोवाच केले होते, पण काहीतरी मार्ग निघेल ह्या आशेपोटी मी ते गांभीर्याने घेतले नव्हते. परंतु काही दिवसांपूर्वी फोनवर झालेल्या चर्चेत संपादकांनी जेव्हा ह्या शक्यतेचा पुनरुच्चार केला, तेव्हा मात्र मन खंतावले.

अंतर्नादने आपले आगळे-वेगळे वैशिष्ट्य पूर्वीपासून सातत्याने जपले. बाजारू पद्धत न अवलंबता, गुणवत्तेशी तडजोड न करता सकस, वैचारिक, लालित्यपूर्ण साहित्याचा निर्भेळ आनंद वाचकांना दिला. एकेकाळी सत्यकथा वाचणाऱ्यांचा जसा 'वेगळा' वर्ग होता तसाच 'अंतर्नाद' वाचणाऱ्यांचादेखील एक खास वर्ग निर्माण झाला. हे वाचक संख्येने मोजके असले (कारण भरपूर संख्या असती तर अंतर्नाद बंदच पडले नसते!) तरी दिल्ली, बंगलोर, मध्यप्रदेश, कोकण, अमेरिका, ब्रिटन अशा विविध भागांत ते जगभर पसरलेले होते.

मासिकाची समृद्धी अन् श्रीमंती ही बहुतांशी संपादकाच्या वैचारिक श्रीमंतीवर अवलंबून असते. त्या दृष्टीने काळे पती-पत्नींचे कौतुक करावे तेवढे थोडेच. अंतर्नादच्या जडणघडणीत अन् संवर्धनात भानू काळे ह्यांच्याइतकाच वर्षा काळे ह्यांचाही हातभार आहे ह्याची अंतर्नादचा लेखक/वाचक ह्या नात्याने मला पुरेपूर जाणीव आहे. अंतर्नादच्या साहित्याची चोखंदळ निवड हे ह्या मासिकाच्या सांस्कृतिक समृद्धीचे खरे रहस्य आहे. कोणे एके काळी सत्यकथेत आपले साहित्य प्रसिद्ध व्हावे असे ज्याप्रमाणे काही लेखकांना वाटत असे, तोच मान अंतर्नादलादेखील गेल्या दोन दशकांत मिळाला हे निश्चित. एवढेच काय, आपले साहित्य स्वीकारले गेले नाही, तरी त्याचे वाईट न वाटता, तो संपादकांचा ग्राह्य अधिकार मानून ही अस्वीकृतीसुद्धा खेळकरपणे, चोखंदळपणे स्वीकारण्याची सवय एव्हाना अंतर्नादच्या लेखकांच्या पचनी पडली आहे!

या मासिकाच्या मुख्यपृष्ठाची निवड चोखंदळपणे तज्ज्ञांकडून केली जाते, एवढेच नव्हे, तर ते मुखपृष्ठ आस्वादक पद्धतीने समजावून दिले जाते, हेसुद्धा अंतर्नादचे खास आगळेवेगळे वैशिष्ट्य. एरवी सामान्य रसिकांना रंगरेषांतून साकारलेले कलाकौशल्य सहजपणे समजायला जडच जाते.

मुखपृष्ठच नव्हे तर 'प्रतिसाद' ह्या सदरातील वाचकांचा पत्रव्यवहार हाही केवळ औपचारिक रिस्पॉन्स न राहता त्याला वैचारिक चर्चेचे व्यासपीठ देण्यात संपादकांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. त्यामुळे संपादकांवरसुद्धा मोकळी, स्पष्ट टीका (जशीच्या तशी – काटछाट न करता) ह्या 'प्रतिसाद'मध्ये प्रसिद्ध झाली आहे. टीकेबरोबरच मूळ लेखकाचे उत्तरदेखील प्रसिद्ध करून इथे दोन्ही पक्षी न्याय दिला गेलाय. त्यामुळे ह्या वादविवादाला गेल्या दोन दशकांत अविचारी भांडणाचे स्वरूप कधीच आले नाही. उलट प्रतिसादमधील पत्रे वाचणे हीदेखील बौद्धिक मेजवानी ठरली.

भानू काळे ह्यांच्या संपादक-लेखक ह्या नात्याच्या जपणुकीविषयी खास उल्लेख करणे गरजेचे आहे. पाठवलेल्या साहित्याची पोच न देणे, महिनोन्‌महिने निर्णय न कळवणे, अंक, मानधन न पाठवणे असे प्रकार लेखकाच्या अनुभवाला येतात. या संदर्भात 'झाकली मूठ सव्वा लाखाची' म्हणतात. पण भानू काळे ह्यांच्या संपादकीय कारकीर्दीला एक प्रोफेशनल टच आहे.

अंतर्नादमध्ये कवितेलासुद्धा तीन अंकी मानधन दिले जाते, हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. प्रश्न पैशाचा नसला तरी लेखकाच्या बौद्धिक संपदेचा सन्मान करण्याचा आहे. तो ह्या संपादकांनी निश्चितच केला आहे. अंतर्नादची छपाई, मासिकाचे वितरण कधीही दिरंगाईने झाले नाही. दरमहा एक तारखेच्या आतच हा अंक वाचकाच्या हाती पडतो. लेखकाची प्रत, मानधन हेदेखील तत्परतेने पाठवले जाते. हे सारे आजकाल दुर्मिळ झाले आहे, म्हणून मुद्दाम नमूद करावेसे वाटले.

यास्मिन शेख या वयोवृद्ध तज्ज्ञ अंतर्नादच्या व्याकरण सल्लागार या नात्याने प्रत्येक लेखनाचे व्याकरण तपासतात. लेखकाला फोन करून शंकानिरसन करतात. एवढा काटेकोरपणा, परफेक्शनविषयी तळमळ आजकाल क्वचितच अनुभवास येते. त्यामुळे अंतर्नादचे अन् संपादकांचे वेगळेपण उठून दिसते.

अंतर्नाद बंद होऊ नये म्हणून कुणाला नेमके काय करता येईल हा वेगळा चर्चेचा विषय. खरे तर, मराठी वाचणारे काही काळाने किती उरतील हासुद्धा चिंतेचाच विषय आहे. कारण नव्या पिढीचे सगळेच काही बदलले आहे. भाषादेखील! तरीपण अंतर्नाद बंद होण्याचे दुःख आमच्यासारख्यांना होणारच. ह्या दुःखाला सांत्वन नाही हे माहिती असूनसुद्धा.

(अंतर्नादच्या संदर्भात गेल्या काही दिवसांत अनेक जणांनी पत्रे पाठविली. त्यातील हे एक पत्र प्रातिनिधिक म्हणून प्रकाशित करत आहोत.)

**डॉ. विजय पांढरीपांडे**, हैद्राबाद
(दिवाळी २०१७)

# भानू काळे यांची काही रसिकमान्य पुस्तके

- **तिसरी चांदणी :** आणीबाणीपूर्व बिहार-ओरिसाच्या राजकीय पार्श्वभूमीवरील, मॅजेस्टिक प्रकाशनाच्या कादंबरीस्पर्धेतील पुरस्कारप्राप्त कादंबरी. पहिली आवृत्ती : १९७९, मॅजेस्टिक प्रकाशन. दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन, पृष्ठे २२९, रुपये २२५

- **कॉम्रेड :** साठ वर्षे पूर्ण वेळ कामगारचळवळीत काम केलेल्या एका मुंबईस्थित कामगारनेत्याच्या जीवनावरील कादंबरी. पहिली आवृत्ती : १९८९, ग्रंथाली प्रकाशन. दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन, पृष्ठे २०५, रुपये २२५

- **बदलता भारत :** देशभर प्रत्यक्ष भ्रमंती करून टिपलेली, जागतिकीकरणात होणाऱ्या बदलांची निरीक्षणे. केशवराव कोठावळे परितोषिकप्राप्त ग्रंथ. सहावी आवृत्ती, मौज प्रकाशन, पृष्ठे २६०, रुपये २६०

- **अंतरीचे धावे... :** रोचक प्रासादिक शैलीतील आणि विषयांचे वैविध्य असलेला ललितलेखसंग्रह. पुणे नगर वाचन मंदिराचा श्री. ज. जोशी पुरस्कारप्राप्त ग्रंथ. तिसरी आवृत्ती, पृष्ठे २३३, रुपये २००

- **वेगळ्या वाटा शोधताना :** संगणकतज्ज्ञ विवेक सावंत, सहकारमहर्षी आप्पासाहेब सा. रे. पाटील, 'सर्च'चे प्रमुख अभय बंग, ज्येष्ठ शास्त्रज्ञ दत्तप्रसाद दाभोळकर, रत्नागिरीचे उद्योजक दीपक गद्रे, टाटांचे चरित्रकार रुसी लाला, केमोल्ड आर्ट गॅलरीचे केकू गांधी आणि कारागिरांच्या अम्मा रोशन कालापेसी यांची व्यक्तिचित्रे. पहिली आवृत्ती, मौज प्रकाशन, पृष्ठे २२४, रुपये ३३०

- **अजुनी चालतोची वाट... रावसाहेब शिंदे जीवन आणि कार्य :** स्वातंत्र्यसैनिक, निष्णात वकील, रयत शिक्षण संस्थेचे व इंडियन लॉ सोसायटीचे अध्यक्ष आणि समाजातील नैतिक शक्तीचे प्रतिनिधित्व करणारे रावसाहेब शिंदे यांचे चरित्र, पाचवी आवृत्ती, ऊर्मी प्रकाशन, पृष्ठे ४४८, रुपये ४५०

- **रंग याचा वेगळा...दत्तप्रसाद दाभोळकर लेखन आणि जीवन :** संशोधनक्षेत्रात आणि शोधपत्रकारितेत आपला अमीट ठसा उमटवणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तित्वाचा वेध. लेखसंकलन, संपादन आणि विस्तृत प्रस्तावना. दुसरी आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृष्ठे ४४०, रुपये ४००

- **अंगारवाटा... शोध शरद जोशींचा :** शेतीमालाला रास्त भाव दिल्याशिवाय शेतकऱ्यांचे व एकूणच देशाचे दारिद्र्य कधीही दूर होणार नाही हे प्रथमतः मांडणाऱ्या आणि 'इंडिया' विरुद्ध 'भारत' हे भारताचे मूलभूत दुभंगलेपण अधोरेखित करणाऱ्या लढवय्या शेतकरीनेत्याचे सर्वसमावेशक चरित्र, दुसरी आवृत्ती, ऊर्मी प्रकाशन, पृष्ठे ५१२, रुपये ६००

- **समतानंद अनंत हरी गद्रे, समतेच्या लढ्यातील अनाम शिलेदार :** पत्रकार, मौज व निर्भीड या साप्ताहिकांचे संस्थापक, नाटककार, जाहिराततज्ज्ञ आणि झुणकाभाकर सत्यनारायण या अस्पृश्यतानिवारणाच्या आगळ्या चळवळीतून महाराष्ट्र ढवळून काढणाऱ्या व्यक्तीचे चरित्र, दुसरी आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पृष्ठे १७५, रुपये २२५

- **पोर्टफोलिओ :** पंचवीस वर्षांच्या वाटचालीत भेटलेल्या आणि लेखकाचे आयुष्य समृद्ध करून गेलेल्या सव्वीस सुहृदांची व्यक्तिचित्रे, पहिली आवृत्ती, उन्मेष प्रकाशन, पृष्ठे २०९, रुपये २५०

- **गंध अंतरीचा :** समाजवेध, वृत्तान्त, साहित्यविचार, व्यक्तिचित्रण, आठवणी, मूल्यचिंतन अशा विविध प्रकारच्या विचारप्रवर्तक आणि तरीही रसाळ लेखांचे संकलन, पहिली आवृत्ती, उन्मेष प्रकाशन, पृष्ठे २०९, रुपये २५०

- **कामगार संघटना – काही निरीक्षणे :** गेली शे-दीडशे वर्षे अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आणि कामगारक्रांतीची मशाल उचलून धरणाऱ्या पण आज दिशाहीन झालेल्या चळवळीचा आढावा. पहिली आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पृष्ठे ६४, रुपये ९९

- **कर्मवीर भाऊराव पाटील – एक आधुनिक भगीरथ :** जगातील सर्वांत मोठ्या शिक्षण संस्थांमध्ये गणना होणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या संस्थापकांची प्रेरणादायी जीवनगाथा, पहिली आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पृष्ठे १६०, रुपये १९९

***(सर्व पुस्तके प्रमुख ग्रंथविक्रेत्यांकडे उपलब्ध)***

# शेवटचा अंक प्रकाशित झाल्यानंतर...

## १. अंतर्नादपर्व

### स्नेहा अवसरीकर

पुणे विद्यापीठाकडून औंधकडे जायला निघालं की पहिल्यांदा ब्रेमेन चौक लागतो आणि तिथून डावीकडे वळलं की लगेचच बँक ऑफ महाराष्ट्रची निळ्या रंगातली पाटी दिसते आणि त्याच्या अगदी समोर पाहिलं की उर्मी वाचनालय अशी पाटी दिसायची. इथूनच अंतर्नाद मासिक ऑगस्ट १९९५ महिन्यापासून सुरू झालं आणि तेव्हापासून २३ वर्षं दरमहा एक तारखेला प्रकाशित होत गेलं. ह्या तारखेत कुठल्याही कारणांनी कधीही खंड पडला नाही ही फार विशेष गोष्ट आहे. त्यानंतरची तीन वर्षं केवळ दिवाळी अंक निघाला. यंदाच्या म्हणजे २०२० सालच्या दिवाळी अंकानंतर अंतर्नाद पूर्णविराम घेत आहे.

भानू काळे यांनी हे मासिक सुरू केलं तो काळही मासिकांना अनुकूल नव्हताच. दर्जेदार समजली जाणारी मासिकं बंद पडली होती. मराठी भाषा आणि तिचं अस्तित्व याविषयी चर्चा सुरू होती. पण तरीही काळे यांनी हे मासिक सुरू केलं आणि पहिल्या अंकापासून त्याची संपादकीय आणि व्यवस्थापकीय घडी फार कौशल्याने आणि मेहनतीने बसवली. यामध्ये कुठल्याही नियोजित तारखेत कधीही बदल झाला नाही. लेखकांचं मानधन आणि इतर तत्सम गोष्टींची पुर्तताही न चुकता एक तारखेला होत गेली.

सुरुवातीपासूनच अंतर्नादचे अंक फार बहारदार असायचे. राजकारण हा विषय सोडला तर जवळपास सगळ्या विषयांना मासिकात जागा होती. शान्ताबाई शेळके यांचं कविता स्मरणातल्या हे अप्रतिम सदर सुरुवातीपासून होतं. जुन्या सुंदर कवितांचं विस्तृत रसग्रहण शान्ताबाई करत असत. लक्ष्मणझुला हे एक विशेष सदर लक्ष्मण लोंढे लिहीत असत. हेही तीन वर्षं सुरू होतं. अवधूत परळकर, मधुकर धर्मापुरीकर, विजय पाडळकर, सुबोध जावडेकर, पंकज कुरुलकर, आनंद अंतरकर अशा अनेक लिहित्या लेखकांनी बरीच वर्षं आपलं अप्रतिम लेखन अंतर्नादकडे आवर्जून पाठवलं, याचं मुख्य कारण म्हणजे संपादकांनी थोडक्या काळात कमावलेला विश्वास. मराठी मासिकांसाठीचा सर्वोत्कृष्ट असा वाढता वाचकवर्ग हेही एक मोठं कारण असावं. आपलं लेखन ज्यांच्यापर्यंत पोचायला हवं असं लेखकाला वाटतं तो वाचकवर्ग अंतर्नादला लाभला होता.

अंतर्नादमध्ये पहिल्यापासून जसं या मान्यवरांचं लेखन प्रकाशित होत होतं, तसंच नव्या उमेदीने लिहू पाहणाऱ्या लेखकांनाही आवर्जून स्थान मिळत असे. वैशाली पंडित, प्रमोदिनी वडके कवळे, सतीश वसंत कुलकर्णी, परशुराम देशपांडे अशी कितीतरी त्याकाळी नवोदित असलेली मंडळी या मासिकातून लिहिती झाली. फिल्म्स डिव्हिजनचे प्रेम वैद्य, आकाशवाणीचे पंडित अरविंद गजेंद्रगडकर अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील व्यक्तींना संपादकांनी लिहीतं केलं.

साहित्यप्रांतात कुठेही फारसा सार्वजनिक वावर न ठेवता, पुण्यातल्या औंधसारख्या एका कोपऱ्यात सातत्याने, ध्यासाने काम करत साहित्यक्षेत्रात एक दर्जेदार ठसा संपादकांनी उमटवला. हा काळही अनेक सामाजिक, जागतिक बदलांचा काळ होता. वृत्तपत्रं, पुस्तकं आणि मासिकं वाचून आपली वाचनाची भूक भागवणारी या काळातली पिढी म्हणजे तसं करणारी शेवटची पिढी. मराठी माध्यमाकडे पाठ फिरवून घरोघरी इंग्रजी माध्यमाची शाळा निवडणारे पालक याच काळात तयार झाले. वाचनापेक्षाही अधिक आकर्षक, अधिक रंगीत, अधिक सहज होणारी करमणूक या काळात सर्वदूर पसरली. या सगळ्या अतिशय गुंतागुंतीच्या, मोहमयी समाजात नेटाने एक मराठी मासिक वाचकांच्या हाती दरमहा सोपवत राहणं हे काळे यांनी केलेलं सगळ्यात कठीण आणि महत्त्वाचं काम आहे. कारण या पुढच्या काळात छापील स्वरूपात सलग पंचवीस वर्षं असं एखादं मासिक प्रकाशित होत राहणं, तेही एकहाती, हे कितपत शक्य होईल याविषयी शंकाच आहे.

अंतर्नादच्या वाटचालीत सुरुवातीला अगदी वर्गणीदार नोंदण्यापासून व पुढे संपादकीय कामातही मी सहभागी होते. संपादक काळे, लेखक काळे, आपल्या अंतर्नादाशी प्रामाणिक राहात चोख काम करणारे काळे आणि यासह माणूस म्हणून असणारे काळे मला जवळून अनुभवता आले. एक अनोखी उर्मी बाळगत त्यांनी हे काम सुरू केलं आणि आपल्या आयुष्याचा उमेदीचा काळ यात घातला. त्यातून त्यांना काय मिळालं असेल? ह्याविषयी त्यांच्याशी कधीतरी बोलायला हवं आहे.

काळे रोज सकाळी बारा ते संध्याकाळी पाच कार्यालयात असत. मासिक चालवणं हे पूर्णवेळ काम आहे हे त्यांनी मला वारंवार सांगितलं आहे. मासिकाकडे येणारं प्रत्येक लेखन, अनाहूत असो की मुद्दाम लिहून घेतलेलं असो; ते स्वतः वाचत. त्याच्या पहिल्या वाचनासाठी काही लेखन माझ्याकडे आणि वर्षा काळे यांच्याकडे देत असत, मात्र अंतिम निवड ते स्वतः वाचल्याशिवाय कधीही करत नसत. ह्या लेखनासंदर्भात सगळा पत्रव्यवहार ते स्वतः हाताळत. प्रत्येक कृतीत काटेकोर शिस्त त्यांच्याकडे असल्यामुळं अगदी वर्गणीदार नोंदणीसाठीच्या रजिस्टरपासून ते अंकावर वर्गणीदारांचा पत्ता कसा लिहावा

ह्याविषयी ते सतर्क असत. म्हटलं तर ही फार किरकोळ, बिनमहत्वाची, क्षुल्लक बाब आहे; म्हटलं तर ही अंतर्नादला अपेक्षित कार्यसंस्कृती आहे.

अंतर्नाद कशासाठी, याबाबत त्यांची भूमिका अगदी चोख होती. त्यांनी ती वारंवार जाहीरही केली होती व त्या भूमिकेशी त्यांनी कायम बांधिलकी ठेवली. कुठल्याही साहित्यिक वादात न पडता, डावे-उजवे अशा विचारसरणीत न पडता या मासिकाने प्रदीर्घ वैचारिक लेख प्राधान्यपूर्वक प्रकाशित केले. दत्तप्रसाद दाभोळकर, नरेंद्र चपळगावकर, राम शेवाळकर, सुरेश द्वादशीवार, ज्ञानेश्वर मुळे, यास्मिन शेख, मधु मंगेश कर्णिक, द. भि. कुलकर्णी, अरुण गद्रे ही अगदी सहज आठवणारी नावं. काळे यांना मुळातच सामाजिक कामाविषयी विशेष आस्था असल्याने तसले विषय मासिकात वारंवार येत होते. 'स्वयंस्फूर्त कार्याचे समाजजीवनातील स्थान' यावर १९९९ साली दिवाळी अंकही प्रकाशित केला. कलाक्षेत्रही वाचकांसमोर येत राहावं यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अंतर्नादची मुखपृष्ठं अनेक प्रयोग करून पाहणारी असत. मुखपृष्ठावर कविता, प्रथितयश तसंच नवोदित चित्रकारांची चित्रं असत. या सगळ्यात दर्जा राखताना कुठेही तडजोड नव्हती, पण अनाठायी चकाचकही नव्हती. अतिशय साधं, तरीही प्रसन्न, देखणं मुखपृष्ठ ही एक खासीयत या मासिकाने नेटाने जपली. अंतर्नादची खासियत असणारं आणखी एक सदर म्हणजे प्रतिसाद. कुठल्याही लेखकाला आपल्या लेखनाविषयी वाचकांची मतं ऐकण्याची स्वाभाविक उत्सुकता असते. या सदरातून वाचकांच्या सविस्तर प्रतिक्रिया छापून येत असत, विषयाच्या अनुषंगाने चर्चा चालत व यामध्ये वाचकाबरोबर बऱ्याचदा लेखकही उतरत. एक निखळ मनमोकळा संवाद घडत असे. प्रत्येक वाचकाचा त्याच्या हस्ताक्षरात लिहिलेला प्रतिसाद वाचणं, हा आमच्यासाठी फार आनंदाचा भाग असायचा. आता अशी वाचकांची प्रतिक्रिया दुर्मीळच असणार आहे.

अंतर्नादला दहा वर्षं पूर्ण झाल्यावर काळे पुन्हा एकदा आपल्या लेखनाकडे वळले. पूर्वीही त्यांचं बरंच लेखन प्रकाशित झालंच होतं. तिसरी चांदणी, कॉम्रेड यांसारख्या राजकीय व सामाजिक विषय अत्यंत प्रगल्भतेने मांडणाऱ्या दोन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या होत्या. आता ते जागतिकीकरणात 'बदलता भारत' पाहात होते. त्यासाठी प्रवास करत होते. माहिती घेणं, संदर्भ शोधणं, विषयाच्या आसपासच्या गोष्टींचं वाचन, चिंतन आणि त्यातून निकर्षापर्यंत येत, लेखन-पुनर्लेखन करत त्यांनी 'बदलता भारत'मधले लालित्यपूर्ण भाषेतले लेख पूर्णत्वास नेले आहेत. वेळोवेळी संपादकीयातून केलेल्या लेखनाचं 'अंतरीचे धावे' हे पुस्तकही पाठोपाठ मौजतर्फेच प्रकाशित झालं.

अंतर्नाद बंद करण्याची चर्चा या पुढच्या टप्प्यावर लोकांसमोर आली. २०१७ साली अंकातल्या संपादकीयात त्यांनी ह्याविषयी ठळक उल्लेख केला. त्यावर वृत्तपत्र, फेसबुक, व्हॉट्सअप यांसारख्या माध्यमातून बरीच उलटसुलट चर्चा सुरू झाली. ''अंतर्नादने नव्या लेखकांचा शोध घेतला नाही, ते 'मनोरा संपादक' आहेत वगैरे.'' या काळात मी अंतर्नादच्या कामात सहभागी नव्हते व त्यामुळे चर्चेत पडून काही बोलणं मला उचित वाटत नव्हतं; पण वेळोवेळी अनेक लेखकांचं पहिलं लेखन अंतर्नादमध्ये छापून आलेलं माझ्या स्मरणात होतंच. अनेक वर्षं अंतर्नादमध्ये मी पूर्णवेळ काम केलं होतं. या काळात नव्या लेखकांसाठी वेळोवेळी राबवले गेलेले उपक्रम, त्यातला माझा उत्साही सहभाग आणि काळे यांनी सगळ्या उपक्रमात, कुठेच समोर न येता, दिलेला संपूर्ण पाठिंबा मला स्पष्ट आठवत होताच, आजही आठवतो. नव्या लेखकांसाठी अंतर्नादने दोन वेळा कार्यशाळा घेतली होती. अनेक नवेजुने लेखक त्यात सहभागी होते. ते केवळ मुंबई-पुण्यातले नव्हते, तर इतरही अनेक गावांतून आलेले होते. अगदी सुरुवातीच्या काळातही एका नैसर्गिक आपत्तीचा आढावा घेणारा लेख लिहिण्यासाठी त्यांनी एका तरुण होतकरू लेखिकेला बऱ्याच लांब पाठवलं होतं. छोटे-छोटे वाचकगट करून त्यांच्यासाठी काही कार्यक्रम आयोजित केले जात असत. मनकविता हे कवितेविषयक खास सदर दोन वर्षं मासिकात सुरू होतं. महाराष्ट्रातल्या अनेक नामवंत कवींनी या सदरात लिहिलं होतं. या सदराच्या समारोपाच्या मुंबईतील कार्यक्रमात अनेक कवी उपस्थित होते. अतिशय हृद्य, देखणा आणि कसदार कार्यक्रम या निमित्ताने पार पडला होता. अंतर्नादच्या कितीतरी लेखकांनी आज मोठा नावलौकिक मिळवला आहे. अंतर्नादमध्ये प्रकाशित झालेल्या कितीतरी सदरांची पुस्तकं झाली आहेत. कितीतरी लेखकांना अंतर्नादच्या निमित्ताने उत्तम मैत्र लाभलं आहे. पंचवीस वर्षं हा तसा मोठा प्रवास आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे भवताल त्याच्या वेगानं पुढे सरकत आहेच, पण या काळातही एका कोपऱ्यात राहून अंतर्नादने जे काम केलं त्याची ठळक नोंद घ्यायलाच हवी.

प्रत्येक अंक हाती आल्याबरोबर काळेंना मनःपूर्वक आनंद वाटायचा, बारीकशी चूक नजरेस पडली तरी बेचैन होतानाही त्यांना पाहिलं आहे. नव्या, आणखी दमदार मजकुराचा पाठलाग व त्यासाठी होणारी त्यांची तगमग ह्या सगळ्याची मी साक्षीदार आहे. त्यांना त्यांच्या मनासारखा अंतर्नाद प्रकाशित करता आला का? याचं उत्तर बहुधा 'नाही' हेच असावं. एकदा माझ्याशी बोलताना ते म्हणाले होते, ''अंतर्नादमध्ये मी पूर्ण यशस्वी झालो असं मला वाटत नाही. मुळात मासिक कितीही निष्ठापूर्वक चालवलं तरी त्याच्या काही मर्यादा आहेत; अनेकांना बरोबर घेऊन जावं लागतं.''

आज अक्षरधाराच्या अंकाचं संपादन करत असताना, किंवा इतरही प्रकाशकांच्या पुस्तकांचं संपादन करताना वेळोवेळी अंतर्नादच्या कामातला अनुभव हाताशी येतो. विषयाकडे व्यापकतेने पाहणं, अभ्यासू वृत्ती, नव्या साहित्याकडे बघण्याची असोशी, माणसं वाचत राहण्याची सवय ह्या सगळ्यांचे मूलभूत धडे नकळत गिरवले गेले. आणि या सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे आपल्या कामातून तयार होणारी आपली जीवनवृत्ती, सकस, सहज, आणि संवेदनशील माणूस बनण्याची आच या काळात अंगी नकळत बाणवली गेली. आणखी किती अपेक्षा असते एका कामाकडून?

*(ललित दिवाळी अंक २०२० मधील लेखाचा संक्षेपित भाग)*

*स्नेहा अवसरीकर (९९२३४ १७०६६)*

# २. अंतर्नादचा पूर्णविराम

## रवी गोडबोले

'कोरोना'च्या प्रादुर्भावामुळे २०२० मध्ये वर्षानुवर्षे सहजगत्या घडणाऱ्या गोष्टी होऊ शकल्या नाहीत. आपल्याकडची पंढरीची वारी असो किंवा जपानमधे होऊ घातलेले ऑलिम्पिक; मग सांस्कृतिक उपक्रम होणे तर दूरच राहिले. पण या सगळ्यात एक गोष्ट सुदैवानं चांगली झाली. ती म्हणजे ज्याला आधुनिक महाराष्ट्राची समृद्ध परंपरा म्हणता येईल असे दिवाळी अंक बहुतांशी प्रकाशित झाले आणि ते डिसेंबरच्या सुरुवातीला मला अमेरिकेतल्या ॲटलांटा इथे घरपोच मिळालेदेखील! त्यामुळे घरकैदेने पुरत्या त्रासलेल्या या वाचकाला भरपूर नवीन सामग्री मिळाली. मोठ्या उत्साहानं 'अंतर्नाद'चा अंक वाचायला घेतला खरा, पण संपादकीय वाचतानाच हा शेवटचा अंक याची जाणीव प्रकर्षानं झाली. अर्थात हे माहीत होतंच, परंतु शेवटी ते घडलं आणि खूप खिन्न झालो. अंतर्नादनं ऐन रौप्यमहोत्सवी वर्षात अशी ग्रेसफुल एक्झिट घ्यावी ही चोखंदळ मराठी वाचकांच्या दृष्टीनं एक लक्षवेधी व दुर्दैवी घटना आहे. आणि तिची योग्य दखल घेतली जावी याच एका भावनेनं हे मनोगत लिहीत आहे.

माणूस खिन्न झाला की जुन्या चांगल्या आठवणींत रमतो हे खरं, त्यामुळे माझं मन अंतर्नादच्या आठवणी काढत बरीच वर्षं मागे गेलं. तसं पहिलं तर वृत्तपत्रं आणि मासिकं यातलं बरंचसं चांगलं वाचन हे योगायोगानं होत असतं. मी पंधरा वर्षांपूर्वी मद्रासला राहात असताना मुंबईला भेटायला आलो की वडील रविवार पुरवण्यांची जपून ठेवलेली कात्रणं मला देत असत. (त्यांना वाटे, मला तिथे मराठी वाचायला कसं मिळणार?) एका पुरवणीत संपादकांनी 'बदलता भारत' या पुस्तकातील भानू काळेंचं मनोगतच छापलं होतं. ते मला खूप आवडलंच, पण त्याचबरोबर 'अंतर्नाद' नावाचं मराठी भाषा आणि संस्कृती याला वाहिलेलं एक छोटेखानी मासिक गेली कित्येक वर्षं काळे पती-पत्नी चालवितात हे प्रथमच कळलं. मग तत्परतेने अंतर्नादचा वर्गणीदार होणं आणि त्यातून छापून येणाऱ्या लेखांचा आनंद लुटणं या गोष्टी ओघाने आल्याच!

आता यंदाच्या दिवाळी अंकाबद्दल. २०२०च्या दिवाळी अंकात गेल्या २५ वर्षांतील काही निवडक लेखन आहे. त्यावर एक नजर फिरवली तरी कितीतरी नावाजलेल्या आणि त्याचबरोबर काहीश्या अपरिचित व्यक्तींना अंतर्नादने कसं बांधून ठेवलं, प्रोत्साहित केलं याचा अंदाज येतो. ही पुनर्भेट संग्राह्य झाली आहेच, आणि त्यामुळेच की काय मीदेखील जपून ठेवलेले जुने अंक परवा चाळत बसलो होतो. आणि जाणवलं की जे लेखन, मोठ्या वृत्तपत्रांत किंवा मासिकांत जागेच्या मर्यादेमुळे वा अन्य कारणांमुळे छापलं जाणं शक्य नव्हतं, ते 'अंतर्नाद'च्या संपादकांनी आवर्जून छापलं. उदा. पं. भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ पुत्र राघवेंद्र जोशी यांच्या 'गाणाऱ्याचे पोर' या पुस्तकातील एक प्रकरण, किंवा ना. सी. फडके यांच्या कन्येने लिहिलेल्या वडिलांच्या आठवणी. या दोन्ही लेखकांनी मनात साचलेल्या भावनांना मोकळेपणाने वाट करून दिलेली आहे. आणखी एक साठवण म्हणजे डॉ. सरोजा भाटे यांचा संस्कृत भाषेतली सौंदर्यस्थळं उलगडून दाखवणारा 'निद्रिस्त परी' हा सुंदर लेख. 'तेलगू मराठी घरोबा' हा विजय पांढरीपांडे यांचा लेख. हेरंब कुलकर्णी लिखित 'ग्रामीण दारिद्र्याची शोधयात्रा' किंवा 'मालदीव सोडताना' हे ज्ञानेश्वर मुळे यांचं कथन.

कवितेवर संपादकांचं खास प्रेम असावं; इतकी जागा अंतर्नाद कवितेसाठी देत असे. कोणताही अंक चाळलात तर त्यांत जागोजागी कविता दिसतात – अगदी जाहिरातीतही! कवितांवर आधारित 'सदरे' वेळोवेळी चालवलेली आढळतात. कविवर्य पाडगावकर कुठलंही मासिक उघडताच त्यातल्या कविता सगळ्यात आधी वाचायचे असं म्हणतात; मला खात्री आहे की त्यांनी 'अंतर्नाद'ला उत्तम गुण दिले असणार! मुखपृष्ठावरील चित्रं आणि चित्रकलेवरची सदरं हे इथलं आणखी एक दालन. ती लिहिण्यासाठी त्यांनी नामवंत चित्रकारांना लिहितं केलं. मला स्वतःला आवडणारा एक भाग म्हणजे वाचकांचा प्रतिसाद. यातली काही पत्रं जरूरीपेक्षा अधिकच 'दीर्घ' असली तरी बहुतांशी वाचनीय आणि पोटतिडिकीने लिहिलेली असत.

मला वाटतं की अंतर्नाद हा अडीच खांबी तंबू; पहिला खांब म्हणजे हे मासिक निष्ठेने चालवणारे काळे पती-पत्नी, दुसरा वर्गणीदार-आश्रयदाते यांचा, आणि डगमगणारा अर्धा खांब जाहिरातदारांचा! तरीदेखील मासिक २५ वर्षं नेटाने टिकून राहिलं, हे कसं? माझ्या मते वर उल्लेखलेल्या वैविध्यपूर्ण गोष्टींबरोबरच संपादकांच्या स्वतःच्या लेखनशैलीचाही त्यात सिंहाचा वाटा आहे. यात वेळोवेळी खाद्य आणि भ्रमंती यावर खुसखुशीत लिहिणाऱ्या वर्षा काळेदेखील आल्या.

भानू काळे यांचं संपादकीय म्हणजे वाचकांशी हळुवारपणे केलेलं हितगुज जणू. याची इतकी सवय होऊन गेली होती, की गेल्या तीन वर्षांपासून मासिक स्वरूपातील प्रकाशन बंद झाल्यानं मला चुकल्यासारखं वाटे, काहीतरी गमावल्यासारखं वाटे! गेली काही वर्षं चरित्रलेखनातून ते शरद जोशी यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची व सुचवलेल्या मूलभूत उपायांची ओळख करून देताना, किंवा विस्मृतीत गेलेल्या समतानंद अनंत हरी गद्रे यांचं सामाजिक क्षेत्रातलं काम लोकांपर्यंत पोहोचवताना दिसले. ॲडव्होकेट रावसाहेब शिंदे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केलेल्या बहुमोल शैक्षणिक कार्याचा त्यांनी फार सुंदर आढावाही घेतल्याचं स्मरतं. हे लेखन संशोधनात्मक असल्याने काहीसं भरीव व माहितीपूर्ण आहे. त्यामानाने त्यांचं आधीचं लेखन जास्त सुटसुटीत आणि जास्त आकर्षक झालं आहे. त्यातले विषय

काहीसे नैमित्तिक असतीलही, पण लेखन विचार करायला लावणारं. अंतर्नादच्या सुरुवातीपासून २००७पर्यंत वेळोवेळी त्यांनी अंकात लिहिलेल्या काही लेखांचं संकलन 'अंतरीचे धावे' (मौज प्रकाशन गृह) या संग्रहात झालं आहे, त्यातील मला भावलेल्या दोन-तीन लेखांविषयी थोडक्यात!

यात जे.आर.डी.टाटा यांच्यावरील एका पुस्तकावरचा एक सुंदर लेख येतो. त्यात जेआरडींनी रुजवलेली व्यवस्थापन शैली, एअर इंडियाबद्दलचं त्यांचं प्रेम आणि पुढे त्यातूनच त्यांच्या वाट्याला आलेली कटुता यावर भानू काळे छान टिप्पणी करताना दिसतात. (आता २०२१ मध्ये आर्थिक डबघाईला आलेली 'एअर इंडिया' टाटा समूहाने जर पुन्हा विकत घेतली तर that will be a sweet justice!) एखादी कंपनी निव्वळ नफ्याइतकंच महत्त्व सामाजिक बांधिलकी आणि Human Resources या गोष्टींनाही देऊ शकते याचा इथे प्रत्यय येतो. हे मी स्वतः जमशेदपूर व कुर्ग येथे अनुभवलं आहे.

काळे स्वतः एके काळी मुद्रण-व्यवसायात होते आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांनी मुशाफिरी केली आहे. साहजिकच त्यांनी 'इंडिया टुडे'चे सर्वेसर्वा अरुण पुरी यांची वाटचाल फार आत्मीयतेने आणि त्या क्षेत्रातल्या बारकाव्यांसह मांडली आहे. चांगल्या समाजाभिमुख (त्याचप्रमाणे चटकदार) विषयांवर अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून एक पाक्षिक निघतं आणि निव्वळ अभ्यासपूर्ण लेख व आकर्षकता यामुळे ते दिवसेंदिवस लोकप्रिय होत जातं ही कल्पनाच ८०च्या दशकात करवत नसे! माझं इंग्रजी नियतकालिकं वाचायचं वेडही 'इंडिया टुडे'पासूनचं. पत्रकारांना पुरी यांनी त्यावेळी दिलेल्या सोयी आणि स्वातंत्र्य हे आजही बऱ्याच ठिकाणी मिळत नसेल.

शान्ता शेळकेंना त्यांनी वाहिलेली आदरांजली म्हणजे एका अतिशय गुणी व्यक्तीचं मूल्यमापन आहे. शान्ताबाई किती व्यासंगी आणि तितक्याच साध्या आणि भावूक होत्या याची प्रचीती हा लेख वाचताना येते. त्यांचं इंग्रजी वाचन किती चौफेर होतं याची कल्पना त्यांच्या मराठमोळ्या अवताराकडे बघून पटकन येत नसे अशा अर्थाचं काळेंचं प्रांजळ आणि अचूक निरीक्षण मला खूप भावलं! त्याचबरोबर शान्ताबाईंचे जाणवलेले स्वभावविशेष, हरहुन्नरी वृत्तीमुळे त्यांच्या legacyला आलेल्या मर्यादा यावरही काळे स्पष्टपणे लिहितात, अर्थात तेही शान्ताबाईंवरच्या जिव्हाळ्यापोटीच!

हे लेख वाचले की काळे हे काय ताकदीचे लेखक, संपादक आहेत याची कल्पना येते आणि लगेच जाणवते की ते हस्तिदंती मनोऱ्यात बसून लेख लिहिणारे संपादक नाहीत. अर्थकारण, राजकारण, जागतिकीकरण आणि त्याचे मराठी समाजावर व भाषेवर होणारे बरेवाईट परिणाम हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे व त्यात ते खरे रमतात. आणि ते करताना उसनं ढोंग आणण्यापेक्षा सुसंस्कृत, शहरी व मध्यमवर्गीय या आपल्या कक्षा ते सोडत नाहीत. बहुतांशी स्वतः प्रवास किंवा शोधयात्रा करून अनुभवलेल्या गोष्टींवरच ते मोकळेपणे लिहितात. त्यात राणा भीमदेवी थाटाचं लेखन नसतं किंवा 'मी सांगत नव्हतो का?' ही आत्मप्रौढीही नसते. आपला मुद्दा माहितीच्या आधारावर ते सभ्यपणे पण नेटाने मांडत राहतात.

आज 'अंतर्नाद'चा प्रवास थांबल्यावर काळे यांनी २००५ मध्ये लिहिलेल्या 'अंतर्नादची दशकपूर्ती : थोडे प्रकट चिंतन' या लेखाचा उल्लेख करणं उचित ठरेल. हा लेख म्हणजे एक छोटे मासिक चालवताना, संपादन करताना येणाऱ्या अडचणी, परंतु त्याचबरोबर मिळणारं आंतरिक समाधान यावर मोकळेपणे केलेलं भाष्यच. मी वाचलेल्या चिंतनपर लेखांपैकी तो एक सर्वोत्तम लेख आहे, आणि मुख्य म्हणजे त्यात कुठेही त्यागाचा, अन्याय झाल्याचा सूर नाही! आपण जाणीवपूर्वक एक कार्ययज्ञ करतो आहोत आणि ते यज्ञकुंड यथाशक्ति पेटतं कसं ठेवता येईल हीच भावना आहे. त्यांना चिंता असलीच तर मासिक स्वबळावर दीर्घकाळ कसं तगेल, कालानुरूप त्यात काय बदल केले पाहिजेत, आणि ते करताना मूळ उद्देश व निष्ठावंत वर्गणीदार यांच्यावर अन्याय होणार नाही ना, याची आहे! 'सत्यकथा' बंद करण्यामागची आपली भूमिका श्री. पु. भागवतांनी अंकातील शेवटच्या लेखात मांडली होती, आणि पुढे 'सत्यकथा' बंद करावं लागलं. तो लेख आणि भानू काळेंचा हा लेख यांत मनाला चटका लागणारं साधर्म्य आहे. ते कटू वास्तव आपण वाचक किंवा आश्रयदाते बदलू शकलो नाही हे आज खेदाने मान्य करावं लागतं.

खरं तर आज उडप्याच्या हॉटेलात जेवायला गेलं तर जितकं बिल होतं त्याहून खूप कमी अंतर्नादची वार्षिक वर्गणी होती! मग दहा कोटींच्या महाराष्ट्रात अडीच-तीन हजारांपेक्षा जास्त वर्गणीदार त्याला का मिळाले नसावेत? शेकडो कोटींचे व्यापार करणारी आणि समाजात 'मराठी उद्योजक' म्हणून टेंभा मिरवणारी मंडळी अंतर्नादसारख्या उपक्रमांना सढळ हस्ते जाहिराती का देत नसावीत? हे प्रश्न मलाही पडतात. अर्थात आता हे प्रश्न विचारायला किंवा त्यांची उत्तरं शोधायला बराच उशीर झाला आहे!

'अंतर्नाद' हे कसलेल्या तसेच होतकरू लेखकांचं हक्काचं आणि घरगुती व्यासपीठ होतं, ते आज नाहीसं झालं. पण एक विचार मनात आला की 'अंतर्नादने मला काय दिलं?' उत्तर शोधू लागलो तेव्हा जाणवलं की सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे वाचनाचा आनंद मुबलक प्रमाणात दिला. चांगलं आणि वेगवेगळ्या प्रकारचं वैचारिक खाद्य दिलं. वरवर अनाग्रही वाटणारं लेखन डोळसपणे वाचायची नवी दृष्टी दिली. फुरसतीने वाचायला आणि लिहायला सुचवलं. वाचताना अंतर्मुख व्हायला शिकवलं व चांगल्या लेखनासाठी आवश्यक अशी स्वानुभव, सभ्यपणा व उदारता ही त्रिसूत्री दिली. हे संचित आपल्यापासून कोणीच हिरावू शकणार नाही. हे काय कमी आहे?

एक वाचक म्हणून 'अंतर्नाद'बद्दल कृतज्ञता व्यक्त करणं हे मी माझं कर्तव्य समजतो. अंतर्नादचे संपादक आणि त्यांचे सहकारी यांनी दीर्घकाळ केलेल्या या अजोड कार्याबद्दल त्यांना मनःपूर्वक सलाम. आणि पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा!

*(साधना साप्ताहिकाच्या २० मार्च २०२१ अंकातील लेखाचा संक्षेपित भाग)*

**रवी गोडबोले,** युएसए / ravigod08@rediffmail.com

## ‘अंतर्नाद’ म्हणजे...

*... समृद्ध साहित्यसृष्टी*
*... वाचकांना सुसंस्कृत करू पाहणारी सकारात्मक जीवनदृष्टी*
*... सर्वस्पर्शी रसिकतेचा अनाहत नाद*
*... आधुनिक, सर्जनशील आणि सौंदर्योपासक समाजनिर्मितीचा निरंतर ध्यास*
*... सकस मराठी साहित्याचा दुर्मिळ खजिना. जणू सूपभर लाह्यात दडलेला एकच बत्तासा...*

## आणि ‘निवडक अंतर्नाद’ म्हणजे...

*... प्रेयसीच्या आर्ततेनं प्रत्येक नव्या अंकाची वाट पाहणाऱ्या वाचकांचं कायमच्या वियोगाचं दु:ख थोडं हलकं करणारी मर्मबंधातली ठेव...*

– **विवेक सावंत,** चीफ मेंटॉर, एमकेसीएल (महाराष्ट्र ज्ञान महामंडळ)

गेली सव्वीस वर्षे अंतर्नादने मराठी वाचकाच्या मनाची मशागत केली. त्याची संवेदनशीलता तरल केली. वाचकाला ३६० अंशांच्या कक्षेतून फिरवत त्याच्या साहित्यिक जाणिवेची क्षितिजे विस्तृत केली. अंतर्नादने कुठलाच विषय वर्ज्य मानला नाही. भाषेपेक्षा साहित्य आणि साहित्यापेक्षा जीवन श्रेष्ठ असते याचे भान अंतर्नादने ठेवले.

– **दत्ता दामोदर नायक,** साहित्यिक आणि उद्योजक

आमच्या जाणिवा समृद्ध करण्याचे काम अंतर्नादने सव्वीस वर्षे केले. यास्मिन शेख यांच्यासारखा व्याकरण-सल्लागार असणारे अंतर्नाद हे बहुधा एकमेव मराठी मासिक असावे. भानूदा व वर्षाताई यांची सांस्कृतिक समृद्धीची कल्पना नुसते वैभवशाली गतकाळाचे स्मरणरंजन करीत राहणारी नव्हती; तर ती वर्तमानातील चांगुलपणा टिपत आशादायी भविष्यकाळाचा वेध घेणारी होती. चंगळवाद व तुच्छतावाद यावर हा उतारा आहे. हे करण्याचे दोन मार्ग भानुदांसमोर होते. लेखन व संपादन. त्यांनी हे दोन्ही मार्ग चोखाळले. पण हे करताना त्यांच्यातील संपादकाने लेखकावर थोडीफार मात केली. बहुधा हा अन्याय दूर करण्यासाठी अंतर्नादने पूर्णविराम घेण्याचे ठरविले. अर्थात भानुदा आपल्याला त्यांच्या पुस्तकांमधून भेटत राहणारच आहेत.

– **अनिल जोशी,** पॅथोलॉजिस्ट

सांस्कृतिक अभिरुचीच्या विकासप्रक्रियेत नियतकालिकांचा मोठा वाटा असतो. या संदर्भातले अंतर्नादचे श्रेय नोंदवायला हवे. अंतर्नादचा कालखंड हा दोन शतकांचा संधिकाल होता. त्या कालखंडातील आव्हाने ओळखून संपादकांनी परंपरेतील सत्त्वांश वेचलेच, पण त्याचबरोबर बदलत्या भविष्याचा वेध घेणारे लेखनही सामावून घेतले. विविध सदरांची योजना, मुखपृष्ठ, मांडणी यांतून प्रगट झालेली संपादकीय दृष्टी कलात्मकतेची जपणूक करतानाच जीवनाभिमुखही राहिली. भाषा, साहित्य आणि इतर कला या घटकांच्या माध्यमातून सांस्कृतिक श्रीमंती कशी जपायची, याची जाणीव भानू काळे यांना होती. त्यामुळे अंतर्नादला स्वत:चा अमीट ठसा उमटवता आला.

– **नीलिमा गुंडी,** ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक

# स्मरणयात्रा



ऊर्मी वाचनालय, नियोशी पार्क, औंध, पुणे
इथूनच 'अंतर्नाद' मासिकाची सुरुवात झाली.
छायाचित्रात स्नेहा अवसरीकर व वर्षा काळे.



२९ जुलै १९९५. अंतर्नाद मासिकाचा पुण्यातील शुभारंभ. ऑगस्ट महिन्याच्या त्या प्रथमांकाचे प्रकाशन करताना डॉक्टर आनंद यादव. त्यांच्या एका बाजूला समारंभाध्यक्ष शान्ता शेळके व मुकुंदराव किर्लोस्कर आणि दुसऱ्या बाजूला संपादक-प्रकाशक भानू काळे. किर्लोस्कर, स्त्री व मनोहर यांचे चाळीस वर्षांहून अधिक काळ संपादन केलेल्या किर्लोस्कर यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे पुढे येऊन भाषण केले होते. उजवीकडे वर्षा काळे.







१ जुलै १९९९. महाकवी कालिदास विशेषांकाचे प्रकाशन शान्ता शेळके यांच्या हस्ते पुण्यातील महात्मा फुले सभागृहात झाले. आपले अध्यक्षीय भाषण करताना प्रा. वसंत बापट. (डावीकडून अनुक्रमे संपादक, बापट, शेळके, प्रा. लीला अर्जुनवाडकर आणि वर्षा काळे) अर्जुनवाडकर यांचे 'कालिदास : रसिकांच्या मर्मबंधातली ठेव' हे भाषण रसिकांना विशेष आवडले होते. वीज गेलेली असतानाही अतिशय शांत राहून श्रोत्यांनी ते एकाग्रतेने ऐकले. या कार्यक्रमाची सुरुवात झाली होती पंडित अरविंद गजेंद्रगडकर यांच्या सुरेल बासरीवादनाने.



२९ जुलै २०००. अंतर्नादचा पाचवा वर्धापनदिन. मुख्य वक्ते होते डॉ. स. ह. देशपांडे. त्या प्रसंगी डॉ. अनिल अवचट यांची विनया खडपेकर, मुग्धा यार्दी आणि अनिल शिदोरे यांनी प्रकट मुलाखत घेतली. मुलाखतीनंतर अवचट यांनी काष्ठशिल्प करण्याचे प्रात्यक्षिक व बासरीवादनही सादर केले. छायाचित्रात अवचट यांच्या डावीकडे अनिल शिदोरे.

३१ मे २००३. अंतर्नादने मुंबईत दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये 'जनी प्रकटते मनातली उर्वशी...' हा कार्यक्रम सादर केला. त्या प्रसंगी दासू वैद्य, नीरजा आणि कविता महाजन यांची मुलाखत घेताना डॉ. महेश केळुसकर.








नंतर झालेल्या कविसंमेलनात उपरोक्त चौघांशिवाय नलेश पाटील, संदेश ढगे, अशोक नायगावकर, माधव हुंडेकर, वर्जेश सोलंकी व इंद्रजित भालेराव यांनीही आपापल्या कविता सादर केल्या. अध्यक्षस्थानी होते त्या वर्षीच्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुभाष भेण्डे. रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमाला श्री. पु. भागवत, विश्वास पाटील, मेघना पेठे, अरुण म्हात्रे वगैरे अनेक साहित्यिक शेवटपर्यंत उपस्थित होते. (डावीकडे) कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी गप्पा मारताना वासंती व गंगाधर गाडगीळ आणि मंगेश पाडगावकर. (उजवीकडे) मध्यंतरात विश्वास पाटील, सुभाष भेण्डे आणि महेश केळुसकर.



५ ऑगस्ट २००५. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्सचे पुण्यातील सभागृह. अंतर्नादचा दशकपूर्ती समारंभ. अध्यक्षस्थानी होते डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर. त्याप्रसंगी बोलताना डॉ. सुभाष भेण्डे. त्यांच्या शेजारी कथाकार पंकज कुरूलकर. याच कार्यक्रमात 'बदलता भारत' या भानू काळे यांच्या अंतर्नादमध्ये क्रमशः प्रकाशित झालेल्या पुस्तकाचेही प्रकाशन डॉ. वसंतराव गोवारीकर यांच्या हस्ते झाले. मौज प्रकाशनाचे संजय भागवत व पंकज कुरूलकर यांचीदेखील भाषणे झाली.





९ व १० जून २००७. अंतर्नादतर्फे दोन दिवसांचे कथामंथन शिबीर आयोजित केले गेले. बीजभाषण मधु मंगेश कर्णिक यांनी केले (उजवीकडचे छायाचित्र), तर समारोप केला डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी. सूत्रसंचालक होते संजय भास्कर जोशी. शिबिरात सुबोध जावडेकर आणि मोनिका गजेंद्रगडकर यांच्या त्यांच्या कथाप्रवासाविषयी मुलाखती झाल्या. दीपप्रज्ज्वलन करताना (डावीकडून) कर्णिक, कुलकर्णी आणि आनंद अंतरकर.







२५ सप्टेंबर २००९. शरद जोशी विशेषांकाचे पुण्याच्या एसेम जोशी सभागृहातील प्रकाशन. त्यावेळी जोशी यांची मुलाखत घेताना साप्ताहिक सकाळचे संपादक सदा डुम्बरे (उजवीकडे). याच कार्यक्रमात भानू काळे यांच्या 'अंतरीचे धावे...' या अंतर्नादमध्ये प्रकाशित लेखांच्या संकलनाचेही प्रकाशन झाले. अध्यक्षस्थानी होते रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲडव्होकेट रावसाहेब शिंदे. या प्रसंगी पुस्तकाविषयी भाषण करताना एम.के.सी.एल. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत (डावीकडे). मौज प्रकाशनचे संजय भागवत यांचेही यावेळी भाषण झाले. तरुण कवी व संगीतकार आशुतोष जावडेकर यांनी सूत्रसंचालन केले.






दि. बा. मोकाशी जन्मशताब्दीनिमित्ताने अंतर्नादने मोकाशी कुटुंबियांच्या पुढाकारातून कथास्पर्धा आयोजित केली होती. देश-विदेशातून तब्बल ३१६ कथा स्पर्धेसाठी आल्या होत्या. स्पर्धेतील विजेत्यांना २७ नोव्हेंबर २०१५ रोजी ज्येष्ठ संपादक विजय कुवळेकर यांच्या हस्ते पुरस्कार दिले गेले. प्रथम पुरस्कार स्वीकारताना छाया कोरेगांवकर (डावीकडे). दिबांच्या कन्या ज्योती कानिटकर यांनी वडिलांच्या आठवणी सांगितल्या तर जावई डॉ. अजित कानिटकर यांनी सूत्रसंचालन केले. आपली काही निरीक्षणे मांडताना मुख्य परीक्षक मोनिका गजेंद्रगडकर (उजवीकडे).



रविवार, २० ऑक्टोबर २०१९. अंतर्नादच्या रौप्यमहोत्सवी दिवाळी अंकाचे पुणे विद्यापीठाच्या महात्मा फुले अध्यासनाचे प्रमुख डॉ. हरी नरके यांच्या हस्ते प्रकाशन. मुसळधार पाऊस असतानाही एसेम जोशी सभागृह पूर्ण भरले होते.


(डावीकडून) स्नेहा अवसरीकर, वर्षा काळे, सुबोध जावडेकर, डॉ. हरी नरके, डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, भानू काळे आणि प्रा. यास्मिन शेख.

अंतर्नादसाठी ज्यांनी सातत्याने लेखन केले त्यांचे एक प्रतिनिधी म्हणून अंतर्नादच्या पहिल्या अंकात आणि पंचविसाव्या दिवाळी अंकातदेखील लेखन करणाऱ्या सुबोध जावडेकर यांचा अंतर्नादच्या वतीने सत्कार करताना डॉ. दाभोळकर.






अंतर्नादच्या व्याकरण-सल्लागार यास्मिन शेख यांचाही सत्कार यावेळी अंतर्नादतर्फे केला गेला. त्यांना वाकून नमस्कार करताना डॉ. दाभोळकर.




पहिला अंक, ऑगस्ट १९९५ (चित्रकार दीपक संकपाळ)




शेवटचा अंक, दिवाळी २०१९ (चित्रकार मिलिंद मुळीक)

निवडक

# अंतर्नाद

सांस्कृतिक समृद्धीसाठी

मराठी माणसाचे काही खरे नाही. मानदंड ठरावीत अशी ज्योत्स्ना, अभिरुची, छंद, सत्यकथा, किर्लोस्कर, सोबत, माणूस अशी नियतकालिके तो उभी करतो, आणि मग बंदही करतो! महाराष्ट्रात मासिक चालवणे म्हणजे लाखाचे बारा हजार करणे. हे असे का होते? रसिकता कमी पडते की व्यवहार जमत नाही? पण मराठी माणसाचे खरेच काही खरे नाही. कारण हे असे होत असतानाही, एक मराठी माणूस मुंबईमधील आपला सुस्थितीतला व्यवसाय बंद करतो, पुण्याला येतो, 'प्रकाशाचे गाणे अवसेच्या रात्री' म्हणत अंतर्नाद सुरू करतो. त्यानंतरच्या वाटचालीत अंतर्नादने इतिहास घडविला. साहित्यातील नवे-जुने हे वाद मानले नाहीत. पुरोगामी-प्रतिगामी असेही काही मानले नाही. वाचकांना बदलत्या भारताचे दर्शन घडविले आणि नव्या जगाची सुरुवात स्वत:पासून होते हे सहजपणे समजावून दिले. चटपटीत पण टाईमपास नव्हे, वैचारिक पण जांभई द्यावयास लावणारे नव्हे असे ललितचिंतनाचे एक प्रसन्न दालन साहित्यविश्वात अंतर्नादने प्रस्थापित केले. निवडक अंतर्नाद म्हणजे त्या वाटचालीतील दमदार, देखणी, अक्षय अक्षरे.

– **दत्तप्रसाद दाभोळकर,** शास्त्रज्ञ आणि शोधपत्रकार

महाराष्ट्राची वाचनसंस्कृती, अभिरुचीसंपन्नता आणि बौद्धिक मनोरंजन यांत भर घालणारे अंतर्नाद हे मासिक त्याच्या क्षेत्रातले सर्वाधिक लोकप्रिय व सर्वश्रेष्ठ म्हणावे असे होते. वाचकांनी वाट पाहावी, समाजाने मार्गदर्शन शोधावे आणि ज्ञानाने रंजकतेची कास धरावी असा अंतर्नादचा पेहराव आणि अंतर्भाव होता. मासिक म्हणून आज ते काळाच्या पडद्याआड गेले असले तरी अंतर्नाद आणि त्याचे संपादक भानू काळे यांनी मराठीच्या सांस्कृतिक क्षेत्राला दिलेले योगदान कोणाच्याही विस्मरणात जाणार नाही.

– **सुरेश द्वादशीवार,** भूतपूर्व संपादक लोकमत आणि अध्यक्ष, मराठी साहित्य महामंडळ

माझ्या साहित्यिक प्रवासात अंतर्नादचे स्थान अद्वितीय आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातही या मासिकाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. विदेशात असतानासुद्धा मला भारताच्या विविध आयामांचे दर्शन घडवण्याचे काम अंतर्नादने केले आहे. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे तीनही धागे जुळवून मराठी माणसाची अभिरुची संपन्न करत असतानाच साहित्यिक अभिरुचीचे लोकशाहीकरण करण्यातही अंतर्नाद आघाडीवर राहिले आहे. अंतर्नादच्या बंद होण्याने माझ्यासारख्या हजारोंची एक सांस्कृतिक खिडकी बंद झाली आहे.

– **ज्ञानेश्वर मुळे,** सदस्य, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग

सुसंस्कृत समाजासाठी निकोप अभिरुचीची गरज असते. तशी अभिरुची विकसित करण्यासाठी झोकून देऊन काम करावे लागते, त्याग करावा लागतो. असा त्याग भानू आणि वर्षा काळे यांनी केला. भानू काळे एक श्रेष्ठ प्रतीचे कादंबरीकार आहेत. परंतु त्यांनी स्वत:चे ललितलेखन बाजूला ठेवून मुक्त विचारांना वाहिलेले अंतर्नाद हे वाङ्मयीन नियतकालिक सव्वीस वर्षे चालवले आणि निकोप वाङ्मयीन संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. निवडक अंतर्नाद हा मराठीचा मौलिक ठेवा ठरावा.

– **नागनाथ कोत्तापल्ले,** लेखक आणि माजी कुलगुरू

मूल्य ₹ १००/-

निवडक अंतर्नाद

**संपादक, मुद्रक, प्रकाशक :**
भानू काळे, सी २, गार्डन इस्टेट, नागरस रस्ता, औंध, पुणे ४११००७.
संपर्क : ९८५०८ १००९१ / bhanukale@gmail.com

**प्रकाशन : १ नोव्हेंबर २०२१**